Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारतीय
संस्कृतिकोश

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Y73(P15):1k 8418
155M2J.7
Joshi, Mahadev Shastri,
...riti

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

8418

Y73 (P15) : 1k
155M2J·7

S.J.V.J. PRATISHTHAN
LIBRARY
Jangamawadimath, Varanasi
Acc. No. 7

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारतीय संस्कृतिकोश

सातवा खंड

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारतीय संस्कृतिकोश

– सातवा खंड –

मराठी भाषा व साहित्य ते राजस्थान

संपादक :

पं. महादेवशास्त्री जोशी

सहसंपादक

तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर, एम् ए.

भारतीय संस्कृतिकोश मंडळ,

४१०, शनिवार पेठ, पुणे : ४११०३०

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकाशक :

पं. महादेवशास्त्री जोशी
कार्यवाह, भारतीय सं. कोश मंडळ,
४१०, शनिवार,
पुणे : ४११०३०

□

प्रथमावृत्ती :
शके : १८९४
१५ ऑगस्ट १९७२
पुनर्मुद्रण :
शके १९१४
(इ. स. १९९३)

© पं. महादेवशास्त्री जोशी

Y73(P15):1k
155M2J.7

□

मुद्रक
श. हे. गुर्जर
आयुर्विद्या मुद्रणालय,
१९२ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

□

फोटोप्रोसेसिंग
ब. शं. दाते
कलाप्रतिमा, पुणे ३०.

□

वितरक
अनमोल प्रकाशन
६८३, बुधवार पेठ,
अप्पा बळवंत चौक,
पुणे २.

S.J.V.J. PRATISHTHAN
LIBRARY
Jangamawadimath, Varanasi
Acc. No. 7

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
Acc No. 8419

मूल्य : दोनशेपन्नास रुपये

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रस्तावना

भारतीय संस्कृति कोशाचा सातवा खंड गेले सहा महिने दुर्मिळ झाला होता, ती उणीव पुनर्मुद्रणाने आज भरून निघत आहे. कोशाचा संकल्प, योजना आणि व्याप्ती याविषयी प्रथम खंडाच्या प्रस्तावनेत सविस्तर लिहिलेच आहे. म्हणून त्याची पुनरुक्ति इथे टाळीत आहे. मात्र काही गोष्टींचा खुलासा दुसऱ्या, तिसऱ्या, पाचव्या व सहाव्या खंडांच्या प्रस्तावनेत केला आहे. तोच इथे पुन्हा उद्धृत करणे आवश्यक आहे.

शुद्धलेखन : कोशाच्या पहिल्या खंडात महाराष्ट्र साहित्य परिषदेने केलेले शुद्धलेखनाचे नियम आम्ही पाळले. त्यानंतर मराठी साहित्य महामंडळाने शुद्धलेखनाचे नवे नियम केले व ते महाराष्ट्र राज्य सरकारने मान्य केले. त्या नियमांना अनुसरून दुसऱ्या, तिसऱ्या, चवथ्या, पाचव्या व सहाव्या खंडाचे मुद्रण केले आहे. तेच नियम या सातव्या खंडाच्या मुद्रणात पाळले आहेत.

जाती-जमातींची माहिती : गेल्या शतकात व चालू शतकाच्या प्रारंभी अनेक पाश्चात्य व भारतीय संशोधकांनी भारतातील बहुसंख्य जाती जमातींचे संशोधन करून मोठमोठे ग्रंथ लिहून ठेवले आहेत. अशा अनेक ग्रंथांचा उपयोग करून आम्ही विविध जाती–जमातींची माहिति संकलित केली आहे व तिचा योग्य तो उपयोग केला आहे. पण त्यातील बरीच माहिती आता जुनी झाली आहे. कालमानाप्रमाणे बहुतेक जाती–जमातींच्या व्यवसायात, राहणीत व चालीरितीत पुष्कळ फरक पडले असणे शक्य आहे, पण त्याची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांच्याविषयी अद्यावत माहिती मिळणे आम्हाला शक्य झाले नाही. अर्थात प्रत्येक गोष्टीची समक्ष पाहणी करून एखादा ज्ञानकोश निर्माण करणे शक्यच नसते. संपादकाला उपलब्ध ग्रंथांच्या आधारेच आपला कार्यभाग साधावा लागतो. आम्हीहि तेच आणि तसेच केले. मात्र अलिकडे शास्त्रीय व पाश्चिमात्य संशोधकांनी काही जातीजमातींचे प्रत्यक्ष संशोधन करून नवे ग्रंथ लिहिलेले आहेत. त्यांचा आम्ही शक्य तेवढा उपयोग करून घेतला आहे.

इ. स. १९६१ च्या जनगणनेचे अहवाल व भारतातील अनेक जिल्ह्यांचे जिल्हानामे (गॅझेटिअर्स) यांचाहीं शक्य तेवढा उपयोग केलेला आहे.

गेली काही वर्षे भारतीय सं. कोशाचा तिसरा, चवथा, पाचवा, सहावा व सातवा हे खंड दुर्मिळ झाले होते. ग्राहकांना पुरा संच मिळत नव्हता. हे दुर्मिळ खंड पुनर्मुद्रित करावयाचे तर त्यासाठी लागणारी मदत मिळवण्यासाठी मला अनेक उदार दात्यांकडे याचना करण्यासाठी भ्रमन्ति करावी लागली असती. पण माझ्या उतारवयामुळे व शारिरीक दुर्बलतेमुळे मला हे काम सर्वथैव अशक्य होते. माझी ही परिस्थिति लक्षात घेऊन 'अनमोल प्रकाशन'चे श्री. पद्माकर नांदूरकर व कलाभुवन पुणे, या संस्थेचे श्री. ब. शं. दाते हे माझे मित्र कोशाचे हे खंडित झालेले काम पुढे चालविण्यासाठी माझ्या मदतीला आले आणि त्यांनी सर्व आर्थिक जबाबदारी उचलण्याचे ठरवून खंड तिसरा, चवथा, पाचवा, सहावा व सातवा पुनर्मुद्रित करण्याचे काम तडीला नेले. याच क्रमाने उर्वरित सर्व खंड संपतील तस तसे पुनर्मुद्रित करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला आहे.

तसेच आयुर्विद्या मुद्रणालय या संस्थेचे मालक व सहकारी यांनी छपाईची जबाबदारी घेतली. त्यांच्या या उदार सहाय्याबद्दल मी कोश मंडळातर्फे त्यांचे हार्दिक आभार मानतो. वरील सद्गृहस्थांच्या या सहकार्यामुळे आता ग्राहकांना कोशाचा समग्र संच उपलब्ध होऊ शकेल.

पुणे,

सर्वांचा नम्र

कार्तिक, शके : १९१४

ऑक्टोबर, १९९२

पं. महादेवशास्त्री जोशी

संपादक व कार्यवाह.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रास्ताविक

भारतीय संस्कृतिकोशाच्या सातव्या खंडाच्या प्रकाशनाचा सुयोग आज येत आहे, त्याबद्दल आनंद वाटतो.

कोशाचा संकल्प, योजना आणि व्याप्ती यांविषयी प्रथम खंडाच्या प्रस्तावनेत सविस्तर लिहिलेच आहे. म्हणून या ठिकाणी त्याची पुनरुक्ती करीत नाही. मात्र काही गोष्टींचा खुलासा आधीच्या खंडांच्या प्रस्तावनेत केला आहे, तोच पुन्हा इथेही करणे आवश्यक वाटते.

शुद्धलेखन -- कोशाच्या पहिल्या खंडात महाराष्ट्र साहित्य परिषदेने केलेले शुद्धलेखनाचे नियम पाळले. त्यानंतर मराठी साहित्य महामंडळाने शुद्धलेखनाचे नवे नियम केले आणि ते महाराष्ट्र राज्य सरकारने मान्य केले. त्या नियमांना अनुसरून दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या व सहाव्या खंडांचे मुद्रण केले आहे. तेच नियम या सातव्या खंडाच्या मुद्रणातही पाळले आहेत.

जाती-जमातींची माहिती — गेल्या शतकात व चालू शतकाच्या प्रारंभी अनेक पाश्चात्य संशोधकांनी भारतातील बहुसंख्य जाती – जमातींचे संशोधन करून मोठमोठे ग्रंथ लिहून ठेवले आहेत. जाती–जमातींची माहिती देताना आम्ही त्या ग्रंथांचा उपयोग केला आहे. कालमानाप्रमाणे बहुतेक जाती–जमातींच्या व्यवसायांत, राहणीत व चालीरीतींत पुष्कळ प्रमाणात बदल झालेला असणे शक्य आहे. पण त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांच्याविषयी अद्ययावत माहिती मिळविणे ही गोष्ट आम्हांला शक्य झालेली नाही. पण अलिकडे भारतीय वा पाश्चिमात्य संशोधकांनी काही जाती – जमातींचे प्रत्यक्ष संशोधन करून नवे ग्रंथ लिहिलेले आहेत, त्यांचा मात्र आम्ही उपयोग करून घेतला आहे. जनगणनेचे आणि भारतातील अनेक जिल्ह्यांचे जिल्हानामे (गॅझेटिअर्स) यांचाही आवश्यक तेवढा उपयोग आम्ही केला आहे.

प्रस्तुत कोशातील व्रते, सण व उत्सव यांतील तिथी अमान्त मास धरून लिहिलेल्या आहेत. पूर्णिमान्त मास मानणाऱ्या प्रदेशात त्यांच्या मासनामांत फरक पडेल, हे ध्यानात घ्यावे. उदा. धूलिवंदनाच्या तिथीला अमान्त मासपद्धतीने फाल्गुन वद्य प्रतिपदा असे म्हटले जाते. पण पूर्णिमान्त मासात तीच तिथी चैत्र वद्य प्रतिपदा ठरेल. कारण पूर्णिमान्त मासाचा प्रारंभ कृष्ण प्रतिपदेपासून होत असतो.

माननीयांचे साहाय्य व सहकार्य — सर्वश्री तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, म. म. पोतदार, डॉ. रा. ग. दांडेकर, वि. पु. भागवत, न. र. फाटक, सेतुमाधवराव पगडी, अ. ह. लिमये, चॅरिटी कमिशनर गोडसे, रूपटलाल शहा, सौ. सुधाबाई जोशी, रामदास भटकळ, सदानंद भटकळ, पी. एन्. कुमठा, जयंतराव टिळक, ईश्वरसिंघ ठाकूर, जी. डी. आपटे आणि कंपनी, ऑडिटर्स; सरदार आबासाहेब मुजुमदार, पद्मश्री काकासाहेब कारखानीस, श्री. र. भिडे, बोकील, ढमढेरे, गोंधळेकर, वा. रा. पाटणकर, शं. मं. होडारकर, ग. ह. खरे,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे; डॉ. विठ्ठलराव घाटे, श्री. बाळ सामंत, मुंबई; श्री. ग. वा. नेवाळकर, मुंबई; श्री. श्री. गो. सोहनी, सौ. कमला भागवत, कलकत्ता; प्रा. वसंत नूलकर, भाऊसाहेब नातू, सौ. जयश्री फाटक, सुब्राय कांशिनाथ नायक, माधव रामकृष्ण बर्वे, म्हापसे; मधुकर द. वैद्य, पणजी; आत्माराम द. फडके, म्हापसे; विष्णू निंबकर, दि. प. दांडेकर, बा. द. सातोस्कर, पी. डी. कुंटे, गोवा हिंदू असोसिएशन, कला विभाग, मुंबई; ग्रंथपाल, केसरी – मराठा संस्था, पुणे; ग्रंथपाल, भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर, पुणे; ग्रंथपाल, हिंद सेवक संघ ग्रंथालय; ग्रंथपाल, जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ; इ. मंडळींनी कोशाला हस्ते परहस्ते अनेक प्रकारे मदत केली आहे. आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो व प्रस्तुत कार्याला त्यांचे सहकार्य अखंडपणे मिळत राहो, असे प्रार्थितो.

अनुदाने — कोशाच्या सहाव्या खंडाप्रमाणेच या सातव्या खंडासाठीही महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतिमंडळाकडून आरंभी पाच हजार रुपये अनुदान मिळाले असून, प्रकाशनानंतर दहा हजार रुपये मिळायचे आहेत. या अनुदानाबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतिमंडळाचे आम्ही अत्यंत ऋणी आहो.

कोशाच्या चौथ्या खंडापासून दहाव्या खंडापर्यंत सात खंडांसाठी केंद्रीय शिक्षणमंत्रालयाने चाळीस हजार रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. त्यातील तीस हजार रुपये मंडळाला मिळाले आहेत. त्याबद्दल भारतीय संस्कृतिकोशमंडळ केंद्र सरकारचे ऋणी आहे.

देणग्या — भारतीय संस्कृतिकोशमंडळाला काही मान्यवर दात्यांकडून देणग्या मिळाल्या आहेत, त्यांतील काही देणग्या पुढीलप्रमाणे —

श्रीमान शेठ अरविंद नवीनचंद्र मफतलाल, मुंबई (आजपर्यंत एकूण)	रु. ६५,०००
श्री. दयानंद बांदोडकर, पणजी (आजपर्यंत एकूण)	रु. १३,०००
सर दोराबजी टाटा ट्रस्ट, मुंबई	रु. १०,०००
श्री. डॉ. ना. भि. परुळेकर, पुणे	रु. २,००१
गोवा हिंदू असोसिएशन, मुंबई	रु. १,५८६
श्री. ठक्कर जादवजी कारा चॅरिटी ट्रस्ट, मुंबई	रु. १,५००
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे	रु. १,०००
श्री. दे. कृ. जाधव, ग्वाल्हेर	रु. १,०००
श्री. मेघजी तुलसीदास भाटिया धर्मशाळा ट्रस्ट, मुंबई	रु. १,०००
श्री. विश्वासराव चौगुले, वास्को (संभाजीनगर)	रु. १,०००
आंतर भारती, पुणे	रु. १,०००
हिंदुस्थान मटीरियल्स प्रा. लि., मुंबई	रु. १,०००
अखिल भारतीय आर्य (हिंदू) धर्म सेवा संघ, दिल्ली	रु. १,०००
संचालक, नाट्यमंदिर, कोल्हापूर – मुंबई	रु. १,०००
श्री. जगन्नाथ वामन खलप व डॉ. ना. वा. खलप, म्हापसे	रु. १,००१
श्रीमान धेंपे बंधू, पणजी	रु. १,००१
महाराज फत्तेसिंह चॅरिटीज, बडोदे	रु. १,००१
श्री. प्रभाकर पणशीकर, नाट्यसंपदा, मुंबई	रु. १,०००
	रु. ७५१

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुणे महानगरपालिकेकडून मंडळाला दर वर्षी ५०० रुपयांची देणगी मिळते. या सर्व दात्यांनी केलेल्या साहाय्याबद्दल मी अत्यंत कृतज्ञ आहे.

आजपर्यंत कोशाचे आगाऊ मूल्य देऊन ज्यांनी आमचे कार्य पुढे जाण्यास मदत केली, त्या सर्व सज्ज-नांना हार्दिक धन्यवाद.

प्रस्तुत कोशाच्या मुद्रणाची जबाबदारी संचालक, संगम प्रेस, पुणे २९ यांनी स्वीकारली आहे. कोशाचे मुद्रण निर्दोष, स्वच्छ व सुंदर व्हावे, यासाठी ते संपादकांशी आत्मीयतेने सहकार्य करीत आहेत. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन, त्यांचे सहकार्य आम्हांला असेच अविच्छिन्न मिळत राहो, अशी आकांक्षा धरतो.

कलाभुवन, पुणे या संस्थेचे चालक श्री. ब. शं. दाते यांनी कोशातले सर्व ठसे सुबक करून दिल्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार !

प्रस्तुत खंडातली रेखाचित्रे श्री. सुधाकर खाजगीवाले, श्री. दत्ता महाबळेश्वरकर, श्री. विजय पटवर्धन व श्री. म. दि. पारखी यांनी काढलेली आहेत. त्याबद्दल त्यांचेही आभार मानले पाहिजेत.

कोशाच्या आठव्या खंडाच्या मुद्रणाला आम्ही लवकरच प्रारंभ करू, असे आमच्या ग्राहकांना, वाचकांना व चाहत्यांना आश्वासन देऊन हे प्रास्ताविक पुरे करतो.

सर्वांचा नम्र,
महादेवशास्त्री जोशी
संपादक व कार्यवाह

संपादकीय विभागात काम करणारी मंडळी

श्री. व. ग. सहस्रबुद्धे, बी. एस्सी.	उपसंपादक
सौ. सुलोचना लिमये, एम्. ए.	उपसंपादक
श्री. रा. शं. नगरकर, बी. ए.	उपसंपादक
श्री. सु. ह. जोशी, एम्. ए.	उपसंपादक
श्री. विद्याधरशास्त्री भिडे, एम्. ए., पीएच्. डी.	समीक्षक
श्री. मोरेश्वर माधव वाळिंबे	उपसंपादक
श्री. ना. स. करंदीकर, बी. ए.	साहाय्यक
श्री. किशोर हरी जोशी	लेखनिक
श्री. विजय रामचंद्र पटवर्धन	लेखनिक
श्री. मा. य. मिराशी	लेखनिक
श्री. मनोहर केशव रानडे	लेखनिक
श्री. सुरेंद्र यशवंत देवळे	लेखनिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संदर्भ ग्रंथ संक्षेप

अं. यु. भा. — अंधकारयुगीन भारत, काशीप्रसाद जायस्वाल, १९५७.

अ. का. — अशोक ते कालिदास, अ. ज. करंदीकर, १९६२.

अ. च. को. — अर्वाचीन चरित्रकोश, सि. वि. चित्राव, १९४६.

अ. द. हिं. क. — अकबरी दरबारके हिंदी कवि, सरयूप्रसाद अग्रवाल, १९५१.

अ. दे. अ. सा. — असा देश असे साधुसंत, वासंती शहा, १९६७.

अॅ. फ्रॉ. फ्रे. व. — Aspirations from a Fresh World, Shakuntala Rao Shastri, 1954.

अ. बृ. ज्यो. — अभिनव बृहज्ज्योतिषसार, श्रीवासुदेवगुप्त, १९६०.

अ. सा. — अपभ्रंश साहित्य, हरिवंश कोछड, १९५६.

अ. सु. अ. — अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद, श्री. दा. सातवळेकर.

अ. हि. इं. — The Early History of India, Vincent A. Smith, 1957.

अ. हि. डे. — Early History of The Deccan, R. G. Bhandarkar, 1957.

अ. हि. नॉ. इं. — Early History of Northern India, Sudhakar Chattopadhyaya, 1958.

आ. अ. आ. लि. — Aspects of Early Assamese Literature, Editor – B. Kakti, 1953.

आ. दे. आ. दै. — आपला देश आपली दैवते, शं. रा. देवळे, १९६४.

आ. भा. — आदिवासी भारत, योगेश अटल, १९६५.

आ. म. वा. इ. — आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, अ. ना. देशपांडे, १९५४.

ऑ. मु. इं. — Observation on the Mussulmauns of India, Mrs. Meer Hassan Ali, 1917.

आ. सं. उ. — आर्य संस्कृतीचा उत्कर्षापकर्ष, महादेवशास्त्री दिवेकर, १९३९.

आ. सं. मू. — आर्य संस्कृति के मूलाधार, बलदेव उपाध्याय.

आ. स. प्रा. अ. इ. — आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास, ऋग्वेदी, १९१६.

इं. फो. लो. — Indian Folk-Lore.

इं. बु. इ. — The Indian Buddhist Iconography, Benoytosh Bhattacharya, 1958.

इं. मि. ली. — Indian Myth and Legend, Makenzi.

इं. वे. क. सू. — India of Vedic Kalpasutras, Ram Gopal, 1959.

इं. स्ट. पा. प्रे. — Indian Studies, Past and Present, Calcutta.

इ. ब्रॉं — Icons in Bronze, D. R. Thapar, 1961.

उ. अ. — उपनिषदांचा अभ्यास, के. वि. बेलसरे, १९६५.

उ. क. तों. — उर्दू कवितेची तोंडओळख, श्रीपाद जोशी, १९५४.

उ. का. प. — उर्दू काव्याचा परिचय, सेतुमाधवराव पगडी, १९६१.

उ. प्र. बौ. वि. — उत्तर प्रदेश में बौद्ध धर्म का विकास, नलिनाक्ष दत्त, कृष्णदत्त वाजपेयी, १९५६.

उ. भा. सं. प. — उत्तरी भारत की संत परंपरा, परशुराम चतुर्वेदी, १९५२.

उं. यो. द. — उमेश योगदर्शन, उमेशचंद्रजी, अनु. – प्रभाकर रानडे, १९५९.

उ. र. — उपनिषद्रहस्य, रा. द. रानडे, अनु. — कृ. वें. गर्जेंद्रगडकर, १९३८.

उ. सा. इ. — उत्कल साहित्य का इतिहास, अनुसूया प्रसाद पाठक.

ऋ. द. — ऋग्वेददर्शन, रा. गो. कोलंगडे, १९५४.

ऋ. ब्र. स. — ऋग्वेदीय ब्रह्मकर्मसमुच्चय.

ऋ. म. भा. — ऋग्वेदाचे मराठी भाषांतर, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, १९६९.

ऋ. सं. — ऋग्वेदसंहिता.

ऋ. सां. इ. — ऋग्वेदकालीन सांस्कृतिक इतिहास, चिं. ग. काशीकर, १९३५.

ए. इं. मजु. — Ancient India, R. C. Majumdar, 1960.

एन्सा. मुंडा. — Encyclopaedia Mundarica, Haufman, 1950.

एन्सा. रि. ए. — Encyclopaedia of Religion and Ethics, James Hastings, 1955.

एन्सा. हिं. आ. — Encyclopaedia of Hindu Architecture, Prasannakumar Acharya, 1946.

ए. हि. सौ. — Ancient History of Saurashtra, K. J. Virjee, 1952.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ए. हो. रा. — एक होता राजा, सरोजिनी बाबर, १९६४.

ओ. ऑ. स्टो. — The Ocean of Story, Tawney's translation of Somadeva's Katha Sarit-Sagar, 1924.

क. कौ. — कविता कौमुदी, रामनरेश त्रिपाठी, १९४६.

क. द. — Karnatak Darshan, R. S. Hukkerikar, 1955.

क. नृ. का. — कलचुरी नृपति आणि त्यांचा काळ, वा. वि. मिराशी, १९५६.

क. सं. — कल्पना संगीत, गो. स. टेंबे.

क. हि. वा. पु. — Cultural History from the Vayu Puran, D. K. Patil, 1946.

क. हे. इं. — Cultural Heritage of India, S. K. Chatterji, 1958.

का. ए. सां. अ. — कादंबरीः एक सांस्कृतिक अध्ययन, वासुदेवशरण अग्रवाल, १९५८.

का. ट्रा. नि. डो. — The Castes and Tribes of H. E. H. The Nizam's Dominions, S. S. Hassan, 1920.

का. ट्रा. स. इं. — Castes and Tribes of Southern India, Thurston.

का. भा. — कालिदास का भारत, भगवतशरण उपाध्याय.

का. सा. सा. — काशी की सारस्वत साधना, म. म. गोपीनाथ कविराज, १९६५.

की. पॉ. — The Keys of Power, J. Abbot, 1932.

कु. लो. सा. — कुमाऊं का लोकसाहित्य, त्रिलोचन पाण्डेय, १९६२.

कृ. क. त. — कृत्यकल्पतरु.

कृ. जी. ब्र. श. — कृषक जीवनसंबंधी ब्रजभाषा शब्दावली, अम्बाप्रसाद 'सुमन,' १९६०.

कै. सा. द. — कैरली साहित्य दर्शन, रत्नमयीदेवी दीक्षित, १९५६.

को. क. वे. बें. — The Koras and Some Little known Communities of West Bengal, Amalkumar Das, 1964.

क्रि. स्ट. का. शु. प्रा. — Critical Studies on Katyayana's Shukla Yajurveda Pratishakhya, V. V. Sharma, 1935.

क्रि. स्ट. ले. उ. — A Critical Study of the Later Upanishadas, S. G. Desai.

खो. प. — खोज की पगडंडियाँ, मुनि कांतिसागर, १९५३

गां. गा. — गांवगाडा, त्रि. ना. आत्रे, १९५९.

गा. दें. — गाजती दैवते, पं. महादेवशास्त्री जोशी, १९५९.

गॉ. नॉ. बु. — The Gods of Northern Budhism.

गी. र. — गीतारहस्य, बा. गं. टिळक, १९५६.

गुज. सा. इ. — गुजराती साहित्य का इतिहास, जयंतकृष्ण हरिकृष्ण दवे, १९६३.

गु. जा. — गुन्हेगार जाती, त्रि. ना. आत्रे, १९११.

गु. सं. हिं. दे. — गुजरात के संतों की हिंदी साहित्य को देन, रामकुमार गुप्त, १९६७.

गु. सा. इ. — गुप्त साम्राज्य का इतिहास, वासुदेव उपाध्याय, १९३९.

गो. च. प. — श्रीगुरुगोरक्षनाथ चरित्र आणि परंपरा, रा. चिं. ढेरे, १९५९.

ग्रे. वी. इं. — Great Women of India, Swami Madhavanand, 1953.

ग्लो. ट्रा. पं. नॉ. प्रॉ. — A Glossary of the Tribes and Caste of Punjab and N. W. Frontier Province, H. A. Rose, 1914.

चं. मौ. उ. का. — चंद्रगुप्त मौर्य और उसका काल, राधाकुमुद मुकर्जी, १९६२.

च. ब्रा. इ. — वेदशाखा वाङ्मय आणि चरक ब्राह्मण यांचा इतिहास, य. खु. देशपांडे, १९६१.

च. भा. नि. — चतुर्दश भाषा निबंधावली, बिहार राष्ट्रभाषा परिषद, १९५७.

च. व. चिं. — चतुर्वर्ग चिंतामणि, हेमाद्रि, सदाशिवाचार्य दीक्षित, १९०२.

चै. म. ब्र. सा. — चैतन्यमत और ब्रज साहित्य, प्रभुदयाल मीतल, १९६२.

ज. अँ. सो. बॉं. — Journal of The Anthropological Society of Bombay.

ज. आं. हि. रि. सो. — Journal of The Andhra Historical Research Society.

ज. इ. — जगाचा इतिहास, द. श्री. मराठे, १९५६.

ज. द. — जयपूरदर्शन, द. वा. पोतदार, १९४८.

ज. वि. ध. — जगातील विद्यमान धर्म, रा. ब. आठवले, १९३५.

जॉं. ए. मे. इं. — Studies In The Geography of Anicent and Medieval India, D. C. Sircar, 1960.

जॉं. पु. — The Geography of The Puranas, S. Muzfer Ali, 1966.

जा. व्य. — जाति-व्यवस्था, नर्मदेश्वर प्रसाद, १९६५.

जै. इ. — The Jain Iconography, B. C. Bhattacharya.

जै. क. — Jain Community – A Social Survey, V. A. Sangve, 1959.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जै. ध. — जैनधर्म, कैलाशचंद्र शास्त्री, १९५५.

जै. बि. — Jainism In Bihar, P. C. Roy Choudhury, 1956.

जै. व्र. वि. सं. — जैन व्रत विधान संग्रह, बारेलाल जैन राजवैद्य, १९५२.

जै. सं. सं. – जैन संप्रदाय आणि संस्कृति, शां. भा. देव, १९६३.

जै. सा. इ. — जैन साहित्य और इतिहास, नाथूराम प्रेमी, १९५६.

टॅ. ली. आं. प्र. — Temples and Legends of Andhra Pradesh, N. Ramesan, 1962.

टॅ. ली. बि. — Temples and Legends of Bihar, P. C. Roy Choudhury, 1965.

टे. सें. इं. — Ten Saints of India, T. M. P. Mahadevan, 1961.

ट्रा. आ. — Tribes of Assam, S. Barkataki, 1969.

ट्रा. इं. — Tribes of India, Bharatiya Adimjati Sevak Sangha, New Delhi, 1950.

ट्रा. ए. इं — Tribes in Ancient India, Editor – Bimal Churn Law, 1943.

ट्रा. का. बाँ. — The Tribes and Castes of Bombay, R. E. Enthoven.

ट्रा. का. सें. प्राँ. इं. — Tribes and Castes of the Central Provinces of India, R. V. Russel, R. B. Hiralal.

ट्रा. के. — Tribes of Keral, A. A. De Luiz, 1962.

ट्रा. डे. इं. — Tribal Demography in India, C. B. Mamoria, 1957.

डि. इ. — Dictionary of Islam, T. P. Hughes, 1935.

डि. सा. इं. म्यु. म्यु. — A Dictionary of South Indian Music and Musicians, P. Sambamoorthy.

डे. रि. सा. इं. — Development of Religion in South India, K. A. N. Shastri. 1963.

डे. हिं. इ. — The Development of Hindu Iconography, Jitendranath Banarjee, 1959.

तं. स्ट. रि. लि. — The Tantras, Studies on their Religion and Literature, Chintaharan Chakravarti, 1963.

त. प्र. हिं. कृ. — आळवार भक्तों का तमिल प्रबन्धम् और हिन्दी कृष्णकाव्य, मलिक मोहंमद, १९६४.

त. सा. सं. — तमिळ साहित्य और संस्कृति, अवधनंदन, १९५८.

तां. बौ. सा. सा. — तांत्रिक बौद्ध साधना और साहित्य, नागेंद्रनाथ उपाध्याय, १९३९.

तु. म. गु. प. — तुकाराम महाराजांची गुरुपरंपरा, वा. सी. बेंद्रे, १९६०.

ते. उ. सा. — तेलुगु और उसका साहित्य, हनुमच्छास्त्री ‘ अयाचित ’.

ते. वा. — तेलगु वाङ्मय, परशा, १९३२.

ते. सा. इ. — तेलुगु साहित्य का इतिहास, बालशौरि रेड्डि, १९६४.

द. सं. इ. — दत्त संप्रदायाचा इतिहास, रा. चिं. ढेरे, १९६४.

दा. चं. — दानचंद्रिका.

दे. ऋ. ब्रा. प. — देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण परिचयग्रंथ, सि. वि. चित्राव, १९४४.

दे. को. — देवीकोश – आदिशक्तीचे विश्वस्वरूप, प्र. कृ. प्रभुदेसाई.

द्र. गॉ. मॉ. हिं. — Dravidian Gods in Modern Hinduism, W. T. Elmore.

ध. तं. शि. — धन्वन्तरितन्त्रशिक्षा, कन्हैयालाल मिश्र, १९५३.

ध. शा. वि. — धर्मशास्त्रविचार, पां. वा. काणे, १९३५.

ध. सि. — धर्मसिंधु.

न. आ. ध. — नवा आचारधर्म, पं. रघुनाथशास्त्री कोकजे, १९३६.

ना. प्र. प. — नागरी प्रचारिणी पत्रिका.

ना. सं. — नाथ संप्रदाय, हजारीप्रसाद द्विवेदी, १९५०.

नि. उ. सा. — निमाडी और उसका साहित्य, कृष्णलाल हंस, १९६०.

नि. म. भा. — निरुक्ताचे मराठी भाषांतर, वै. का. राजवाडे, १९३५.

नि. सि. — निर्णयसिंधु.

ने. क. — नेपाल की कहानी, काशीप्रसाद श्रीवास्तव, १९५५.

न्यू इं. अँ. — New Indian Antiquary.

पं. का. — Punjab Castes, Denzil Ibbetson.

पं. ज्यो. शा. — पंचांगातील ज्योतिषशास्त्र, त्र्यं. गो. ढवळे, १९५८.

पं. म. — पंढरीमाहात्म्य, विठ्ठल दाजी घारूरकर, १९०८.

पं. हिं. सा. इ. — पंजाबप्रान्तीय हिन्दी साहित्य का इतिहास, चंद्रकांत बाली, १९६२.

प. का. भा. — पतंजलिकालीन भारत, प्रभुदयाळ अग्निहोत्री, १९६२.

प. च. — परशुराम चरित्र, श्री. म. माटे, १९३८.

प. पु. सृ. खं. — पद्मपुराण, सृष्टिखंड.

प. भा. द. — पश्चिम भारताचे दर्शन, गो. प्र. सोहोनी, १९६९.

प. भा. व. — पवित्र भारत वर्णन, केशव बळवंत जोशी, १९५७.

पा. का. भा. — पाणिनिकालीन भारतवर्ष, वासुदेवशरण अग्रवाल, १९५५.

पा. यो. द. — भारतीय मानसशास्त्र अथवा सार्थ आणि सविवरण पातंजल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

योगदर्शन, कृ. के. कोल्हटकर, १९५९.

पॉ. रि. फो. नॉ. इं. — Popular Religion and Folklore of Northern India, Crooke, 1894.

पा. सा. इ. — पाली साहित्य का इतिहास, भरतसिंह उपाध्य, १९५१.

पु. इं. — Puran Index, V. R. Ramchandra Dikshitar, 1955.

पु. चिं. — पुरुषार्थ चिंतामणि.

पु. त. नि. — पुरातत्त्व निबंधावली, राहुल सांकृत्यायन, १९३७.

पु. नि. — पुराणनिरीक्षण, त्र्यंबक गुरुनाथ काळे.

पु. विं. — पुराणविमर्श, बलदेव उपाध्याय, १९६५.

पु. वि. अ. — पुराणविषयानुक्रमणी, राजबली पाण्डेय, ९९५७.

पु. वे. सा. स. अ. — पुराणगत वेदविषयक सामग्री का समीक्षात्मक अध्ययन, रामशंकर भट्टाचार्य, १९६५.

पू. मा. प्र. — पूजामार्ग प्रदीप, अनंत वासुदेव मराठे, १९६२.

पे. पु. — पेरिय पुराण.

प्रा. च. को. — प्राचीन चरित्रकोश, सि. वि. चित्राव, १९३२.

प्रा. भा. न. न. जी. — प्राचीन भारत में नगर तथा नगर-जीवन, उदय नारायणराव, १९६५.

प्रा. भा. प्र. — प्राचीन भारत के प्रसाधन, अत्रिदेव विद्यालंकार.

प्रा. भा. म. — प्राचीन भारतीय मनोरंजन, मन्मथराय, १९५७.

प्रा. भा. लो. ध. — प्राचीन भारतीय लोकधर्म, वासुदेवशरण अग्रवाल, १९६४.

प्रा. भा. वि. — प्राचीन भारतीय विद्यापीठे, ना. गो. तवकर, १९५०.

प्रा. भा. वि. वि. — प्राचीन भारतीय विचार और विभूतियाँ, राधाकुमुद मुकर्जी, १९५८.

प्रा. भा. व्या. — प्राकृत भाषाओं का व्याकरण, पिशेल, हेमचंद्र जोशी, १९५८.

प्रा. भा. सं. — प्राचीन भारतीय संस्कृती, स. का. दीक्षित, १९६०.

प्रा. भा. सां. — प्राचीन भारत की सांग्रामिकता, पं. रामदिन पांडेय, १९५७.

प्रा. भा. सा. सां. भू. — प्राचीन भारतीय साहित्य की सांस्कृतिक भूमिका, रामजी उपाध्याय, १९६६.

प्रा. भा. हिं. का. — प्राचीन भारत—हिंदुकाल, राजबली पांडे.

प्रा. म. — प्राचीन महाराष्ट्र, श्री. व्यं. केतकर, १९६३.

प्रा. म. क. पं. — प्राचीन मराठी कविपंचक, द. सि. पंगु, १९४४.

प्रा. म. जै. सा. — प्राचीन मराठी जैन साहित्य, सुभाषचंद्र अक्कोळे, १९६८.

प्रा. म. वा. इ. — प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, अ. ना. देशपांडे, १९६६.

प्रा. म. वा. स्व. — प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, ह. श्री. शेणोलीकर, १९६२.

प्रा. म. सं. क. — प्राचीन मराठी संतकवी, ज. र. आजगांवकर, १९५७.

प्रा. व्य. प्र. — प्रायश्चित्त व्यवहार प्रकाश अथवा हिंदुधर्मशास्त्रदर्पण, संपा. वि. दा. घारूरकर, १९०८.

प्रा. सा. इ. — प्राकृत साहित्य का इतिहास, जगदीशचंद्र जैन, १९६१.

फे. फे. म. — Fairs and Festivals of Maharashtra, Maharashtra Census office, Bombay, 1969.

फो. डा. म. — Folk Dance of Maharashtra, A.G. Agarkar, 1950.

फो. लो. — Folk–Lore.

फो. लो. नॉ. इं. — Folklore of Northern India.

बं. उ. सा. — बंगला और उसका साहित्य, हंसकुमार तिवारी.

बं. सा. क. — बंगला साहित्य की कथा, भोलानाथ शर्मा, १९५७.

बं. सा. सं. इ. — बंगला साहित्य का संक्षिप्त इतिहास, सत्येंद्र, १९६१.

बॉ. बे. का. — Bombay Beggars and Criers.

बि. ज. स्मा. ग्रं. — बिहार – जयंति – स्मारक ग्रंथ, शिवपूजन सहाय, १९४२.

बी. सी. लॉ. को. व्हॉ. — B. C. Law Commemoration Volume, Ed. D. R. Bhandarkar, 1946.

बु. भा. स. — बुद्धकालीन भारतीय समाज, ना. गो. कालेलकर, १९३६.

बे. फू. आ. रा. — बेला फूले आधी रात, देवेंद्र सत्यार्थी, १९४८.

बौ. का. भा. — बौद्धकालीन भारत, जनार्दन भट्ट, १९२६.

बौ. द. मी. — बौद्धदर्शन मीमांसा, पं. बलदेव उपाध्याय, १९५४.

बौ. ध. द. — बौद्धधर्मदर्शन, आचार्य नरेंद्र देव, १९५६.

बौ. ध. बि. — बौद्धधर्म और बिहार हवलदार त्रिपाठी, १९६०.

ब्र. कृ. मा. भ. — ब्रजभाषा के कृष्ण काव्य में माधुर्यभक्ति, रूपनारायण, १९६२.

ब्र. ख. तु. अ. — ब्रजभाषा और खडी बोली का तुलनात्मक अध्ययन, कैलासचंद्र भाटिया, १९६२.

ब्र. सां. इ. — ब्रज का सांस्कृतिक इतिहास, प्रभुदयाल मीतल, १९६०.

ब्र. सा. — ब्रजबुलि साहित्य, रामपूजन तिवारी, १९६०.

भ. बु. द. — धर्मचक्रवर्ती भगवान बुद्धदर्शन, रा. गो. कोलंगडे, १९५९.

भ. बौ. ध. — भक्तिमार्गी बौद्धधर्म, नर्मदेश्वर चतुर्वेदी, १९६१.

भ. वि. — भक्ति का विकास, मुंशीराम शर्मा, १९५८.

भा. आ. — भारत के आदिवासी, जनक अरविंद, १९५७.

भा. आ. अ. — भारत में आर्य और अनार्य, सुनीतिकुमार चाटुर्ज्या, १९५९.

भा. इ. रू. — भारतीय इतिहास की

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रूपरेखा, जयचंद्र विद्यालंकार, १९३३.
भा. क. प. — भारतीय कला के पदचिन्ह, जगदीश गुप्त, १९६१.
भा. कौ. — Bharat Kaumudi, Radhakumud Mukarjee, 1945.
भा. ज्यो. इ. — भारतीय ज्योतिष का इतिहास, गोरखप्रसाद, १९५६.
भा. ज्यो. शा. — भारतीय ज्योतिष – शास्त्र, शं. बा. दीक्षित, १९३१.
भा. त. रा. — भारतीय तत्त्वज्ञान अथवा राष्ट्रधर्म, पु. ग. सहस्रबुद्धे, १९६५.
भा. द. — भारतीय दर्शन, (१) बलदेव उपाध्याय, १९५७, (२) उमेश मिश्र, १९५७.
भा. द. रू. — भारतीय दर्शन की रूपरेखा, एम्. हिरियण्णा, १९६५.
भा. द. सं. — भारतीय दर्शनसंग्रह, पं. द. वा. जोग, १९५८.
भा. न. क. — भारतीय नदियों की कहानी, भगवतशरण उपाध्याय, १९५५.
भा. ना. सा. — भारतीय नाट्य साहित्य, संपा. नगेन्द्र.
भा. प्र. वि. — भारतीय प्रतीक विद्या, जनार्दन मिश्र, १९५९.
भा. प्रा. जै. ती. — भारत के प्राचीन जैन तीर्थ, जगदीशचंद्र जैन, १९५२.
भा. प्रा. रा. — भारत के प्राचीन राजवंश, विश्वेवरनाथ रेऊ, १९२१.
भा. प्रा. सं. — भारत की प्राचीन संस्कृति, रामजी उपाध्याय, १९४८.
भा. बृ. इ. — भारतवर्ष का बृहद् इतिहास, पं. भगवद्दत्त, १९६०.
भा. ब्रा. जा. प्र. — भारतीय ब्राह्मण जाति-प्रदीपिका, इंद्रदेव नारायणसिंह, १९५८.
भा. भ. स्तो. — भारत भक्तिस्तोत्र, वि. गो. आपटे, १९६१.
भा. मा. शा. — भारतीय मानसशास्त्र अथवा सार्थ आणि सविवरण पातंजल योगदर्शन, कृ. के. कोल्हटकर, १९५९.
भा. मू. क. — भारतीय मूर्तिकला, कृष्णदास राय, १९५२.
भा. मू. क. क. — भारतीय मूर्तिकला की कहानी, भगवतशरण उपाध्याय, १९५५.
भा. यु. उ. — भारतातील युद्धशास्त्राची उपेक्षा, ज. द. जोगळेकर, १९७०.
भा. रा. प्र. — भारतीय राज्यशास्त्र प्रणेता, श्यामलाल पांडेय, १९६४.
भा. लो. नृ. — भारत के लोकनृत्य, लक्ष्मीनारायण गर्ग, १९६१.
भा. लो. सा. — भारतीय लोकसाहित्य, श्याम परमार, १९५४.
भा. वा. प्र. वि. — भारतीय वास्तुशास्त्र–प्रतिमाविज्ञान, द्विजेंद्रनाथ शुक्ल, १९५६.
भा. व्र. — भारतीय व्रतोत्सव, पुरुषोत्तमशर्मा चतुर्वेदी, १९५७.
भा. शि. सं. इ. — भारतीय शिक्षा का संक्षिप्त इतिहास, वंशीधरसिंह, भूदेवशास्त्री, १९५७.
भा. सं. — भागवत संप्रदाय, बलदेव उपाध्याय, १९५४.
भा. सं. क. — भारत की संस्कृति और कला, राधाकमल मुकर्जी, १९५९.
भा. सं. जै. यो. — भारतीय संस्कृति में जैन धर्म का योगदान, हिरालाल जैन, १९६२.
भा. सं. प. — भारत की संग्राम पद्धति, वीरेंद्रसिंह रघुवंशी, १९६५.
भा. सं. म. — भारत के संत महात्मा, रामलाल, १९५७.
भा. सं. स. — भारतीय संरक्षणाच्या समस्या, के. एम्. पणिक्कर, १९६३.
भा. सं. सा. — भारतीय संस्कृति और साधना, गोपीनाथ कविराज.
भा. सां. इ. — भारताचा सांस्कृतिक इतिहास, रा. वि. ओतुरकर, १९५२.
भा. सा. — भारत सावित्री, वासुदेवशरण अग्रवाल, १९५७.
भा. सा. इ. — भारतवर्षका सामाजिक इतिहास, विमलचंद्र पाण्डेय, १९६०.
भा. सा. पु. ७ — भारतीय साम्राज्य, पुस्तक ७ वे, ना. भ. पावगी, १८९६.
मं. म. — मंत्रमहोदधि.
मं. मू. मो. — मंगलमूर्ती मोरया, रा. चिं. ढेरे, १९५८.
म. क. — मनोरम कश्मीर, मनोहरकृष्ण दर, १९५८.
म. क. च. — महाराष्ट्रीय कविचरित्र, ज. र. आजगांवकर.
म. क. शि. — महाभारत कथाभाग आणि शिकवण, ज. स. करंदीकर, १९५८.
म. का. स. — मराठेकालीन समाजदर्शन, शं. ना. जोशी, १९६०.
म. ग्रा. स. — महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना, दांडेकर, जगताप, १९५७.
म. च. को. — मध्ययुगीन चरित्रकोश, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, १९३७.
म. जि. — महाराष्ट्राचे जिल्हे, महाराष्ट्र सरकार.
म. जी. — महाराष्ट्र जीवन, संपादक – गंगाधर बाळकृष्ण सरदार, १९६०.
म. झो. त्या. शि. — महर्षि झोरोष्टर आणि त्याची शिकवण, रा. गो. कोलंगडे, १९६३.
म. नि. इ. — मराठी नियतकालिकांचा इतिहास, रा. गो. कानड, १९३८.
म. नि. वा. — मराठी निबंधाची वाटचाल, शं. गो. तुळपुळे, १९६८.
म. प. — महाराष्ट्र परिचय, संपा. – कर्वे, जोगळेकर, जोशी, १९५४.
म. प्रा. इ. सं. — महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास व संस्कृती, द. वा. डिसकळकर, १९६४.
म. भा. इ. — मध्य भारत का इतिहास, द्विवेदी, १९५६.
म. भा. उ. — महाभारताचा उपसंहार, चिं. वि. वैद्य, १९२१.
म. भा. – उ. वि. — मराठी भाषा –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उद्गम व विकास, कृ. पां. कुलकर्णी, १९५७.

म. भा. ना. — महाभारत में नारी, वनमाला भवाळकर, १९६४.

म. भा. व्या. — महाभारतावरील व्याख्याने, वाळशास्त्री हरदास, १९६१.

म. भा. स. — महाभारतकालीन समाज, सुखमय भट्टाचार्य, १९६५.

म. म. वा. — महानुभावीय मराठी वाङ्मय, य. खु. देशपांडे, १९६०.

म. यु. भा. — मध्ययुगीन भारत, चिं. वि. वैद्य, १९२३.

म. र. स्व. वि. — मधुर रस स्वरूप और विकास, भाग १, रामस्वार्थ चौधरी, १९६८.

म. लो. उ. — मराठी लोकसंस्कृतीचे उपासक, रा. चिं. ढेरे, १९६४.

म. लो. क. — मराठवाड्यातील लोककथा, यू. म. पठाण, १९६२.

म. लो. मा. — महाराष्ट्र लोकसाहित्य-माला, महाराष्ट्र लोकसाहित्य समिती.

म. लो. सं. — मराठी लोकांची संस्कृती, इरावती कर्वे, १९५१.

म. वा. इ. — मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल. रा. पांगारकर, १९३९.

म. शा. मा. — महाराष्ट्र शारदेचे मानकरी, ह. भा. वाघोलीकर, १९५०.

म. सं. क. — महाराष्ट्र संत-कवयित्री, ज. र. आजगावकर, १९३९.

म. सा. — महाराष्ट्र सारस्वत, वि. ल. भावे, १९५१.

म. सा. अ. — मध्यकालीन साहित्य में अवतारवाद, कपिलदेव पाण्डेय, १९६३.

म. सा. इ. — मलयालम साहित्य का इतिहास, के. भास्करन नायर, १९६०.

म. सा. प. — महाराष्ट्र साहित्य पत्रिका.

म. सा. रू. — मराठी साहित्याची रूपरेखा, वि. पां. दांडेकर, १९६१.

म. सा. सिं. — मराठी साहित्याचे सिंहावलोकन, द. के. केळकर, १९६३.

म. स्मृ. ग्रं. — श्रीमहावीर स्मृतिग्रंथ, कामताप्रसाद जैन, १९४९.

म. ज्ञा. को. — महाराष्ट्रीय ज्ञानकोश, श्रीधर व्यंकटेश केतकर.

मा. उ. सा. — मालवी और उसका साहित्य, श्याम परमार.

मा. – ए. सां. अ. — मानसोल्लास : एक सांस्कृतिक अध्ययन, शिवशेखर मिश्र, १९६६.

मा. गु. लि. — Milestones in Gujarati Literature, K. M. Jhaveri, 1934.

मा. गों. ब. — The Maria Gonds of Bastar, W. V. Grigson, 1949.

मा. दे. मा. लो. — माझा देश माझे लोक, श्रीपाद जोशी, १९५७.

मा. पु. सां. अ. — मार्कंडेय पुराण : एक सांस्कृतिक अध्ययन, वासुदेवशरण अग्रवाल, १९६१.

मा. प्रा. रा. — माळव्यातील प्राचीन राजधान्या, कृ. गं. कवचाळे, सह्विचार मासिक, १९२८–२९.

मा. म. सु. — Maria Murder and Suicide, Verrier Elwin, 1950.

मा. लो. वि. अ. — मालवी लोकगीत – एक विवेचनात्मक अध्ययन, चिंतामणी उपाध्याय, १९६४.

मि. सि. ए. इं. — The Military System in Ancient India, B. K. Majumdar, 1955.

मी. द. — मीमांसादर्शन, मंडनमिश्र शास्त्री, १९५५.

मुं. इ. जा. — मुंबई इलाख्यातील जाती, गो. म. कालेलकर, १९२८.

मु. अं. को. — मुकुंदराजांची अंबानगरी कोणती ? वि. अं. कानोले, १९६१.

मु. का. भा. — मुगलकालीन भारत, आशीर्वादीलाल श्रीवास्तव, १९५९.

मु. चिं. — मुहूर्तचिंतामणि.

मु. पू. म. — मुसलमानपूर्व महाराष्ट्र, वा. कृ. भावे, १९४६.

मु. म. सं. — मुसलमान मराठी संतकवी, रा. चिं. ढेरे, १९६७.

मु. स. सं. — मुस्लिम सण आणि संस्कार, श्रीपाद जोशी.

मू. वि. — मूर्तिविज्ञान, ग. ह. खरे.

मैं ध. पं. — मैं धरती पंजाबकी, नरेंद्र धीर, १९५८.

मै. गु. अ. ग्रं. — मैथिलीशरण गुप्त अभिनंदन ग्रंथ, संपा. – वासुदेवशरण अग्रवाल, १९५६.

मै. ट्रा. का. — Mysore Tribes and Castes, Nanjundayya and Iyer, Mysore University.

मै. लो. अ. — मैथिली लोकगीतों का अध्ययन, तेजनारायण लाल, १९६२.

मो. का. भा. इ. – मोगलकालीन भारताचा इतिहास, मा. म. देशमुख, १९६९.

मो. सिं. स. — मोहेंजो–दडो तथा सिंधुसभ्यता, सतीशचंद्र काला, १९५१.

म्यु. इं. — Music of India, Herbert A. Popley, 1921.

यं. चिं. — यंत्रचिंतामणि.

यं. मे. कं. ए. इं. — Yantras Or Mechanical Contrivances In Ancient India, V. Raghavan, 1952.

या. का. म. — यादवकालीन महाराष्ट्र, मु. ग. पानसे, १९६३.

यु. यं. तं. — युद्धशास्त्र– यंत्र व तंत्र, अ. वि. बेंद्रे, १९६६.

यो. उ. सि. — योगवासिष्ठ और उसके सिद्धान्त, भीखनलाल आत्रेय, १९५७.

यो. मा. — योगेश्वरीचे माहेर, आनंदयात्री, १९६०.

यो. सं. वा. — योगवासिष्ठ आणि संतवाङ्मय, य. वि. परांजपे, १९५४.

यो. सो. पू. — योगसोपान पूर्वचतुष्क, ह. ता. घमंडे, १९५१.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यो. हृ. — योगवासिष्ठाचे हृद्गत, पांडुरंगशास्त्री गोस्वामी, १९५६.
रा. का. सं. — रामायणकालीन संस्कृती शां. ना. व्यास, १९५८.
रा. का. स. — रामायणकालीन समाज, शां. ना. व्यास, १९५८.
रा. जा. — राजस्थान की जातियाँ, बजरंगलाल लोहिया, १९५४.
रा. पिं. सा. — राजस्थान का पिंगल साहित्य, मोतीलाल मेनारिया, १९५८.
रा. भ. शा. — रामभक्तिशाखा, रामनिरंजन पांडेय, १९६०.
रा. भा. सा. — राजस्थानी भाषा और साहित्य, मोतीलाल मेनारिया, १९५२.
रा. र. सं. — रामभक्ति में रसिक संप्रदाय, भगवतीप्रसाद सिंह, १९५७.
रा. रा. उ. ऱ्हा. — राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास, ह. वा. देशपांडे, १९३८.
रा. रा. का. — रास और रासान्वयी काव्य, दशरथ ओझा, दशरथ शर्मा, १९५९.
रा. ले. सं. — राजवाडे लेखसंग्रह, संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी, १९५८.
रा. लो. ना. — राजस्थानी लोकनाटच, देवीलाल सामर, १९५७.
रा. लो. सं. — राजस्थान का लोकसंगीत, देवीलाल सामर, १९५७.
रा. सा. म. उ. — रामभक्ति साहित्य में मधुर उपासना, श्रीभुवनेश्वरनाथ मिश्र, १९५७.
रि. इं. — The Religions of India, A. P. Karmarkar, 1950.
रे. हि. इं. — Racial History of India, Chandra Chakraberty.
ल. र. प. — लघुरत्नपरीक्षा, म. ल. खांबेटे, १९४१.
ल. वि. सो. — लग्नविधि आणि सोहळे, ना. के. आलोनी, १९०४.
लो. ध. ना. प. — लोकधर्मी नाटच-परंपरा, श्याम परमार, १९५९.
लो. सं. क्षि. — लोकसंस्कृतीची क्षितिजे, रा. चिं. ढेरे, १९७१.
लो. सा. रू. — लोकसाहित्याची रूपरेखा, दुर्गा भागवत, १९५६.
लो. सा. सा. — लोकसाहित्य साजशिणगार, सरोजिनी बाबर, १९६५.
लौ. दं. — लौकिक दंतकथा, गो. मं. कालेलकर, १९३४.
लौ. नी. — लौहित्य और नीलाचल, हेम बारुआ, १९६१.
व. का. रा. — वरंगळचे काकतीय राजे, कृष्णाकुमार, १९४६.
व. व जा. — वर्ण व जाती, मो. वि. पटवर्धन, १९६६.
वा. रा. को. — वाल्मीकिरामायणकोश, रामकुमार राय, १९६५.
वि. मुं. रा. प. — विशाल मुंबईराज्य परिचय, प्रसाद प्रकाशन, १९६०.
वि. सं. मं. — विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर.
वि. सा. इ. — विजयनगर साम्राज्य का इतिहास, वासुदेव उपाध्याय, १९४५.
वि. स्मृ. ग्रं. — विक्रम स्मृतिग्रंथ, १९४५.
वृ. प. इ. — वृत्तपत्रांचा इतिहास, वि. कृ. जोशी, रा. के. लेले, १९५१.
वे. इं. — Vedic Index of Names and Subjects, Macdonell and Keith, 1954.
वे. का. य. — वेदकालीन कालगणना व यज्ञसंस्था, र. वि. वैद्य, १९६४.
वे. रा. द. — वेदातील राष्ट्रदर्शन, बाळशास्त्री हरदास, १९५५.
वै. दे. अ. द. — वैदिक देवतांचे अभिनव दर्शन, रा. ना. दांडेकर, १९५१.
वै. मा. — वैदिक माइथोलोजी, ए. ए. मैकडौनेल, १९६१.
वै. वा. इ. — वैदिक वाङमय का इतिहास, भगवद्दत्त, १९५६.
वै. वि. भा. प. — वैज्ञानिक विकास की भारतीय परंपरा, सत्यप्रकाश, १९५४.
वै. शै. म. व. — The Vaishnava Sects, the Shaiva sects, Mother Worship, Swami Tattvananda.
वै. सं. वि. — वैदिक संस्कृतीचा विकास, लक्ष्मणशास्त्री जोशी, १९५१.
वै. सा. — वैदिक साहित्य, पं. रामगोविंद त्रिवेदी, १९६०.
वै. सा. सं. — वैदिक साहित्य और संस्कृति, बलदेव उपाध्याय, १९५८.
व्या. ज्ञा. को. — व्यायाम ज्ञानकोश, सरदार मुजुमदार, बडोदे.
व्र. चं. — व्रतचंद्रिका, गौरीशंकर उपाध्याय, १९५२.
व्र. ति. नि. — व्रततिथिनिर्णय, नेमिचन्द शास्त्री, १९५६.
व्र. प. — व्रतपरिचय, हनुमान शर्मा, १९५७.
शं. आ. द. — श्रीशंकराचार्य का आचार-दर्शन, रामानंद तिवारी, १९४९.
शं. हि. टा. — Shankardeo and His Times, Maheswar Neog, 1965.
श. क. — शब्दकल्पद्रुमः, राजा राधाकान्त देव.
शां. क. — शांतिकमलाकर.
शि. इ. — शिखांचा इतिहास, न. वि. गाडगीळ, १९६३.
शृं. हा. — शृंगार-हाट, संपा. – मोतीचंद्र, अग्रवाल, १९५९.
ष. द. भे. — षट्चक्र दर्शन व भेदन, श्री. म. वैद्य, १९६७.
सं. अ. ग्रं. — श्रीसंपूर्णानंद अभिनंदन ग्रंथ, आचार्य नरेंद्रदेव, १९५०.
सं. क. द. — संस्कृत–कवि–दर्शन, भोलाशंकर व्यास, १९५५.
सं. का. पं. — संस्कृत काव्याचे पंचप्राण, के. ना. वाटवे, १९४७.
सं. कौ. — संस्कार कौस्तुभ, वेंकटाचार्य गजेन्द्रगडकर, १९१४.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सं. चा. अ. — संस्कृति के चार अध्याय, रामधारीसिंह दिनकर, १९५६.

सं. मि. — संशोधकाचा मित्र, ग. ह. खरे, १९३१.

सं. मु. — संशोधन - मुक्तावली, वा. वि. मिराशी.

सं. र. — संगीत रत्नाकर, संपा. एस्. सुब्रह्मण्यशास्त्री.

सं. शा. – संगीत शास्त्र, के. वासुदेव शास्त्री, १९५८.

सं. शा. क. इ. — संगीत शास्त्रकार व कलावंत यांचा इतिहास, लक्ष्मण दत्तात्रेय जोशी, १९३५.

सं. सं. — संस्कृति संगम, द. के. केळकर, १९५६.

सं. स. सं. — संतमत का सरभंग संप्रदाय, धर्मेंद्र ब्रह्मचारीशास्त्री, १९५९.

सं. सा. इ. — संस्कृत साहित्य का इतिहास, (१) बलदेव उपाध्याय, १९५६ (२) ए. बी. कीथ, अनु. मंगलदेव शास्त्री, १९६०.

सं. सा. शा. इ. — संस्कृत साहित्यशास्त्राचा इतिहास, पां. वा. काणे, १९३१.

सं. सा. सा. — संत साहित्य और साधना, भुवनेश्वरनाथ मिश्र, 'माधव', १९६९.

सं. सा. सो. इ. — संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास, वि. वा. करंबेळकर, १९५४.

स. द. सं. — सर्वदर्शनसंग्रह, म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर, १९२४.

स. पॉ. — The Serpent Power, Arthur Avalon, 1958.

स. पे., ऑ. इं. ओ. कॉं. — Summaries of Papers submitted to the 20th Session of the All India Oriental Conference.

स. भा. प्र. व. — सचित्र भारत प्रवासवर्णन, बाळासाहेब घोरपडे, १९१२.

स. म. खे. पु. — सचित्र मराठी खेळांचे पुस्तक, अ. बा. देवधर, १९०५.

स. सं. — समाज और संस्कृति, राजाराम शास्त्री, आकाशवाणी द्वारा प्रसारित तेरह वार्ताएं, १९५६.

स. सं. गा. — सकल संतगाथा.

स. सा. वा. — समग्र सावरकर वाङ्मय.

स. सो. पा. — सहा सोनेरी पाने, वि. दा. सावरकर.

सा. इं. ए. — The Cyclopaedia of India and Eastern and Southern Asia, Edward Balfore, 1885.

सा. इं. गॉं. — South Indian Gods, Bartholomaeus Ziegeuvalg.

सा. इं. फे. — South Indian Festivities, P. V. Jagadisa Ayyar, 1921.

सा. भा. वि. — सामान्य भाषा विज्ञान, बाबूराम सक्सेना, १९४३.

सा. र. — सारस्वत रत्नमाला, ग. वा. शर्मा, १९१०.

सिं. भा. सं. प. — सिंधी भाषा का संक्षिप्त परिचय, कृष्णचंद्र जेतली, १९५७.

सि. इ. — सिख इतिहास, ठाकूर देशराज, १९५४.

सि. सा. — सिद्ध साहित्य, धर्मवीर भारती, १९५५.

सी. ऋ. — The Seers of The Rigved, V. G. Rahurkar, 1964.

सु. वि. को. — सुलभ विश्वकोश, य. रा. दाते, चिं. ग. कर्वे.

सु. स्तो. सं. — सुबोध स्तोत्र संग्रह, म. म. पां. ग. गोस्वामी.

सू. सं. — सूफी संप्रदाय, तत्त्वज्ञान आणि कार्य, सेतुमाधवराव पगडी, १९५३.

सू. सा. श. — सूरसागर शब्दावली, निर्मला सक्सेना, १९६२.

से. इं. — Census of India.

से. इं. १९५१, वे. बें. — Census of India, 1951, West Bengal.

सो. ला. रा. — Social Life in Rajasthan, T. S. Katiyar, 1957.

सो. हि. का. — The Social History of Kamrup, Nagendranath Basu, 1926.

स्ट. इं. क. हि. — Studies In Indian Cultural History, P. K. Gode.

स्ट. ओ. फो. — A Study of Orissan Folk-Lore, Kunjabihari Das, 1953.

हॅं. सा. इं. इ. — A Handbook of South Indian Images, T. N. Shrinivasan, 1954.

ह. च. सां. अ. — हर्षचरित – एक सांस्कृतिक अध्ययन, वासुदेवशरण अग्रवाल, १९५३.

हा. ट्रा. ई. इं. — The Halfclad Tribes of Eastern India, N. A. Watts.

हिं. अ. — हिंदी अनुशीलन – धीरेंद्रवर्मा विशेषांक, संपा. – रघुवंश.

हिं. क. भ. तु. अ. — हिंदी और कन्नड में भक्तिआंदोलन का तुलनात्मक अध्ययन, हिरण्मय, १९५९.

हिं. कृ. पु. प्र. — हिंदी कृष्णभक्ति काव्य पर पुराणों का प्रभाव, शशि अग्रवाल, १९६०.

हिं. कृ. मा. — हिंदी कृष्णकाव्य में माधुर्योपासना, श्याम नारायण पाण्डेय १९६३.

हिं. जै. भ. क. — हिंदी जैन भक्तिकाव्य और कवी, प्रेमसागर जैन, १९६४.

हिं. ते. म. रा. तु. अ. – हिंदी और तेलुगु के मध्यकालीन रामसाहित्यों का तुलनात्मक अध्ययन, चावलि सूर्यनारायण मूर्ति, १९६६.

हिं. दे. का. व. — हिंदुस्थान देशातील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कारागिरीचे वर्णन, बाळकृष्ण आत्माराम गुप्ते, १८८९.

हिं. ध. त. — हिंदु धर्माची तत्त्वे, चिं. वि. वैद्य, १९३१.

हिं. ध. स. — हिंदुधर्माची समीक्षा लक्ष्मणशास्त्री जोशी, १९४२.

हिं. ना. उ. वि. — हिंदी नाटक – उद्गम और विकास, दशरथ ओझा, १९५४.

हिं. नी. वि. — हिंदी में नीतिकाव्य का विकास, रामसरूप, १९६२.

हिं. प. मी. — हिन्दु परिवार मीमांसा, हरिदत्त वेदालंकार, १९५५.

हिं. बं. वै. क. — १६ वी शतीके हिंदी और बंगाली वैष्णव कवि, रत्नकुमारी, १९५६.

हिं. म. — हिंदी महाकाव्ये, शि. शं. आपटे, १९६३.

हिं. मा. रि. — A Classical Dictionary of Hidu Mythology and Religion etc., John Dowson, 1957.

हिं. मु. सां. मि. — हिंदुमुस्लिमांचा सांस्कृतिक मिलाफ, सय्यद अमीन, १९६५.

हिं. रा. तं. — हिंदु राज्यतंत्र, काशीप्रसाद जायस्वाल, १९५२.

हिं. रि. इ. — The Hindu Religious Year, M. M. Underhill 1921.

हिं. वि. को. —हिन्दी विश्वकोश, संपा. – फूलदेवसहाय वर्मा.

हिं. वै. सा. र. — हिन्दी वैष्णव साहित्य में रसपरिकल्पना, प्रेमस्वरूप, १९६९.

हिं. व्र. प. त्यो. — हिंदुओंके व्रत, पर्व और त्योहार, रामप्रताप त्रिपाठी, १९५७.

हिं. शि. शा. — हिंदी शिल्पशास्त्र, कृष्णाजी विनायक वझे, १९२८.

हिं. स. व्र. — हिंदू सण व व्रते, बाळकृष्ण तनय, १९२५.

हिं. स. सं. वि. — हिंदुसमाज – संघटना आणि विघटना, पु. ग. सहस्रबुद्धे, १९६७.

हिं. सा. — हिंदी साहित्य, धीरेंद्र और व्रजेश्वर वर्मा, १९५९.

हिं. सा. इ — हिंदी साहित्य का इतिहास, रामचंद्र शुक्ल, १९६२.

हिं. सा. को. — हिंदी साहित्यकोश, संपा. धीरेंद्र वर्मा, १९५९.

हिं. सा. बि. — हिन्दी साहित्य और बिहार, संपा. – शिवपूजन सहाय, १९६०.

हिं. सा. बृ. इ. — हिंदी साहित्य का बृहत् इतिहास, संपा. – राजबली पांडेय.

हिं. हॉ. से. — Hindu Holidays and Cerimonials, B. A. Gupte, 1916.

हि. इं. ज. — History of Indian Journalism.

हि. इं. फि. ५ — A History of Indian Philosophy, Vol. V. Surendranath Dasgupta, 1955.

हि. ओ. लि. — History of Oriya Literature, Mayadhar Mansinha, 1962.

हि. क. इं. पी. — History and Culture of the Indian People, Bharatiya Vidya Bhavan.

हि. कै. मा. — History of Kailas – Mansarover, Pranavanand, 1949.

हि. जॉ. ए. इं. — Historical Geography of Ancient India, Bimla Churn Law, 1954.

हि. जै. मो. — History of Jain Monachism, S. B. Deo, 1956.

हि. ध. — History of Dharma Shastra, P. V. Kane.

हि. बें. लॅं. लि. — History of Bengali Language and Literature, D. C. Sen, 1954.

व्हॉ. इं. इ. स्ट. — A Volume of Indian and Iranian Studies, Katre – Gode, 1939.

व्हि. गॉ. सा. इं. — The Village Gods of South India, Henry Whitehead, 1921.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारतीय संस्कृतिकोश

खंड सातवा

मराठी भाषा व साहित्य (सहाव्या खंडातील अपूर्ण विषय पुढे चालू) कथा–गोष्टी सांगणे आणि गोष्टी ऐकणे ही माणसाची आवड प्राचीन काळापासूनची आहे. मराठी भाषा जन्मताच जरी तत्त्वज्ञानाचे बोल बोलू लागली असली, तरी तिला कथेचे वावडे नव्हते. भास्करभट्ट बोरीकर आणि एकनाथ यांनी तत्त्वविवेचनाच्या अनुषंगाने काही कथाही सांगितल्या आहेत. इ. स. च्या तेराव्या किंवा चौदाव्या शतकात पंचतंत्राचे मराठी भाषांतर झाले. चक्रधराने तत्त्वोपदेश करताना अनेक कथारूप दृष्टान्त सांगितले आहेत. तंजाऊरच्या सरफोजी राजाने इसापनीतीचे मराठी भाषांतर करविले. वैजनाथ पंडित यांनी हितोपदेश व सिंहासन बत्तीशी हे कथाग्रंथ मराठीत आणले. स. का. छत्रे यांनी बाळमित्र पुस्तकमालेत अनेक बोधकथा व नीतिकथा प्रकाशित केल्या. त्यापुढच्या काळात बकासुराची बखर, चंद्रहास्यबखर, नलराजाची बखर, इ. पौराणिक बखरी म्हणजे गोष्टी प्रकाशित झाल्या. पुढे कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी प्रसिद्ध केल्या. याच पद्धतीवर मराठी भाषेतील सुरस गोष्टी दामले व सिनकर यांनीही लिहिल्या.

पण जिला आपण सांप्रत लघुकथा म्हणतो, ती मात्र इ. स. १८९० सालापासून सुरू झाली, असे मानतात. त्या वर्षी हरिभाऊ आपटे यांनी करमणूक नावाचे नियतकालिक काढले आणि त्यातून कथा लिहायला सुरुवात केली. करमणुकीतून लिहिलेल्या कथा स्फुट गोष्टी या नावाने प्रसिद्ध आहेत. मध्यमवर्गीय जीवनातील साधेच पण भावनात्मक प्रसंग घेऊन हरिभाऊंनी ते कलात्मकतेने कथेत गोवले. त्यांतील पात्रे आणि प्रसंग भोवतालच्या समाजात नित्य आढळणारे असल्यामुळे हरिभाऊंच्या कथांनी वाचकांच्या मनाची पकड घेतली. समाजाला नीतिबोध करणे हा हेतू त्यांच्या कथेत सुस्पष्ट दिसतो.

हरिभाऊंच्या काळातलेच, लोकजागृतीसाठी गोष्टी लिहिणारे दुसरे लेखक सहकारी कृष्ण हे होत. कुटुंबमालेतून त्यांनी आपल्या कथा लिहिल्या. त्यांच्या सर्व कथा उपदेशपर व साध्या असून मध्यमवर्गियांच्या जीवनावर आधारलेल्या आहेत.

करमणुकीच्या काळात लघुकथेचे बीज पडले आणि तिचे रोप वाढविण्याचे कार्य इ. स. १९१० नंतर मनोरंजन मासिकाने स्वीकारले. १९१० ते १९२६ हा मनोरंजनाचा काळ होय. या काळात लेखकांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण व्यापक आणि उदार होऊ लागला होता. तत्कालीन कथांतून ही गोष्ट दिसून येते. याच काळात महाराष्ट्रियांचे लक्ष बंगाली व इंग्रजी कथावाङ्मयाकडे वळले. मग अशा अन्य भाषांतील कथा रूपांतरित होऊन मराठीत येऊ लागल्या. कथा म्हणजे छोटी कादंबरी ही पूर्वीची दृष्टी बदलली. नीतिबोधाचे प्राबल्य कमी झाले. लघुकथा खऱ्या अर्थाने लघुकथा होऊ लागली. मनोरंजनाने आणि त्या काळातील इतर मासिकांनीही लघुकथा प्रसिद्ध करून तिच्याविषयी वाचकवर्गात आवड निर्माण केली.

या कालखंडात लघुकथा लोकप्रिय करण्याचे सर्वांत अधिक श्रेय विठ्ठल सीताराम गुर्जर यांना आहे. स्वतंत्र, तशाच अनुवादित अशा शेकडो लघुकथा त्यांनी लिहिल्या. त्यांच्या कथा प्रामुख्याने घटनाप्रधान आहेत. कोणते तरी रहस्य निर्माण करायचे व त्याला अचानक कलाटणी देऊन शेवट गोड करायचा, हे त्यांच्या कथांचे स्वरूप आहे.

वि. सी. गुर्जर

घात-पात, जगदंबा, दिपोटी, पुरुषांची जात, बायकांची जात, घरपद-धमार, लाजाळूचे झाड, शेवटचे हास्य, योगदर्शन या त्यांच्या कथा अनेक दृष्टींनी उल्लेखनीय ठरल्या आहेत.

कृ. के. गोखले हेही याच काळातले. केवळ मनोरंजन हा त्यांच्या लघुकथांचा उद्देश होता. ते आपल्या कथानकात बरीच गुंतागुंत आणीत. अद्‌भुतता आणि कल्पकता हे त्यांचे मोठेच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भांडवल होते. बालक, दो-दिवसांची बायको, मंतरलेले पाणी थोडासा मेंदूचा विकार, अशा काही कथांतून त्यांचे कौशल्य विशेषत्वाने प्रकट झाले आहे.

त्या काळच्या कथालेखकांत नारायण हरी आपटे यांचे स्थान फार मोठे आहे. मध्यमवर्गीय कुटुंबांचे आदर्श त्यांनी वाचकांपुढे ठेवले. नाव नसलेली गोष्ट, ताऱ्हेला कैदी, सुमती, कल्पनेची भरारी यांसारख्या त्यांच्या कथा आकर्षक शैलीचे नमुने आहेत.

सरस्वतीकुमार यांनी सिंहस्थ, प्रेमवंचना, रक्तरात्री खून, अशांसारख्या गुंतागुंतीच्या पण प्रभावी चित्रणाच्या कथा लिहिल्या. वाग्भट नारायण देशपांडे हेही याच काळातील कथालेखक. त्यांच्या कथांतून अतिरंजकता व अस्वाभाविकता यांचे प्रमाण अधिक आहे.

तत्कालीन स्त्री-लेखिकांपैकी काशीबाई कानिटकर, गिरिजाबाई केळकर व आनंदीबाई शिर्के या स्त्रिया प्रसिद्ध होत. काशीबाईंच्या कथा मुख्यत्वे बोधप्रधान आहेत. गिरिजाबाईंनी आपल्या कथांतून सामाजिक गोष्टींचा ऊहापोह केला आहे. आनंदीबाईंचा दृष्टिकोणही नीतिबोध करण्याचा असला, तरी त्यांनी कलेची हानी होऊ दिली नाही. घटनाप्रधान व मनोरंजक अशा कथा लिहून त्यांनी बरीच लोकप्रियता मिळविली.

इ. स. १९१० ते १९२६ या कालात लघुकथेने प्रगतिपथावर पुष्कळच वाटचाल केली असली, तरी आधुनिक वळणाची लघुकथा १९२६नंतरच निर्माण झाली. १९२६ ते १९४५ हा काळ लघुकथेच्या आत्यंतिक उत्कर्षाचा काळ ठरला आहे. या काळात रत्नाकर, यशवंत, ज्योत्स्ना, किर्लोस्कर, समीक्षक, संजीवनी, ध्रुव, प्रतिमा, इ. नियतकालिकांनी लघुकथेचे दालन चांगलेच समृद्ध केले.

ना. सी. फडके व वि. स. खांडेकर हे या काळातले अग्रगण्य कथालेखक होत; पण त्यांच्याही आधी दिवाकर कृष्णांचा उल्लेख करायला हवा. नव्या आणि जुन्या काळामधील सांधा जुळविण्याचे कार्य प्रामुख्याने दिवाकर कृष्णांनी केले. घटनाप्रधान कथेकडून स्वभावप्रधान कथेकडे झालेली वाटचाल दिवाकर कृष्णांच्या कथेत स्पष्ट दिसते. अंगणातील पोपट, मृणालिनीचे लावण्य, संकष्टचतुर्थी व समाधी या त्यांच्या कथा नाजूक, कोमल व मनोज्ञ आहेत. काव्यात्मकता व वातावरणनिर्मिती हे त्यांच्या कथेचे विशेष गुण होते.

ना. सी. फडके यांनी १९२६ पासून आजतागायत शेकडो कथा लिहिल्या आहेत. तंत्रशुद्धता, रेखीवपणा व भाषेचा डौल या गुणांनी त्यांच्या कथा विशेष उल्लेखनीय ठरल्या आहेत. आकर्षक सुरुवात, मध्ये गुंतागुंत आणि शेवटी तिचा उकल करून घडवलेला शेवट हे त्यांच्या कथेचे ठरीव तंत्र आहे. दुहेरी गुण, उलटे शाकुंतल आणि शोभेसाठी, या त्यांच्या प्रारंभीच्या कथा व मीरा, काळ चुकला, वेळही चुकली आणि ऊन आणि सावल्या या त्यांच्या अलिकडच्या कथा होत. या सर्वच कथा फडकेप्रणीत तंत्राला धरून आहेत.

वि. स. खांडेकर यांचेही कथालेखन १९२३ सालापासून आजतागायत चालू आहे. त्यांच्या कथेत अनुभवांची विविधता, समृद्धता आणि जिव्हाळा या गोष्टी पुरेपूर आढळतात. सामाजिकता हा त्यांच्या कथेचा आत्मा आहे. आंधळयाची भाऊबीज, भावाचा भाव, जांभळीची शाळातपासणी, शिष्याची शिकवण, हिरा तो भंगला, या त्यांच्या प्रारंभीच्या कथा; तर आरसेमहाल, तीन कलावंत, पृथ्वी, घरटे, धरणीकंप, इ. त्यांच्या अलिकडील रूपककथा. फडके हे कलावादी म्हणजे कलेसाठी कला अशा मताचे असून, खांडेकर हे जीवनासाठी कला या मताचे आहेत. प्रा. म. ना. अदवंत लिहितात -- खांडेकरांच्या कथा विशेष लोकप्रिय झाल्या, त्या त्यांतील तंत्रकौशल्यामुळे नव्हेत किंवा रचना-चातुर्यामुळे नव्हेत; तर त्यांमध्ये आढळणाऱ्या सामाजिक जाणिवेने आणि त्यांतील जीवनदर्शनाने.

य. गो. जोशी हे या लोकांहून अगदी वेगळे ठरले. तंत्र बिंत्र सब झूट असे मानीत ते कथाक्षेत्रात उतरले. मध्यमवर्गियांचे कौटुंबिक जीवन हे मर्यादित क्षेत्र त्यांनी आपल्या लघुकथांसाठी निवडले आणि त्या वर्गाच्या भावना अत्यंत जिव्हाळ्याने रंगविल्या. शेवग्याच्या शेंगा, कोथिंबिरीच्या काड्या, सुपारी, वहिनींच्या बांगड्या, आला का रे बाळकृष्ण, अन्न आणि अन्न, कर्ज फिटले पण सावकार गमावला, इ. त्यांच्या कथांतून जीवनाचे माणुसकीने भारलेले आणि सोज्वळ दर्शन घडते. धर्म ही अफू आहे, प्रवासी, अखेरचे तत्त्वज्ञान या त्यांच्या चिंतनशील वृत्तीतून स्फुरलेल्या कथा होत. ते जुन्याचे अभिमानी आणि नव्याचे टीकाकार होते.

य. गो. जोशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जुन्या निवेदनपद्धतीचा व जुन्या वळणाचा आश्रय करूनही आपलें कथाविश्व फुलविणारे व त्यायोगे रसिकांना मुग्ध करणारे जे काही थोडे कथालेखक आजच्या काळात आहेत, त्यांत पं. महादेवशास्त्री जोशी यांचा प्रामुख्याने उल्लेख करावयास पाहिजे, असे प्रा. म. ना. अदवंत लिहितात. गोमंतकातील सर्व थरांचे जीवन त्यांनी आपल्या कथांतून रंगविले आहे. धन आणि मन, भावबळ, मानिनी, घररिघी, जगावेगळे सासर, आज मी असेच बोलणार, इ. त्यांच्या कथा प्रसिद्ध आहेत.

श्री. म. माटे यांच्या कथांमध्ये व्यक्तिगत अनुभूतीचा जिवंतपणा, भावनेचा उमाळा आणि निरीक्षणाची सूक्ष्मता यांचा प्रत्यय येतो. उपेक्षितांविषयी माटयांच्या मनात असीम सहानुभूती आहे. त्यांच्या विवाहित कुमारी, एकांगी घटस्फोट, इ. गोष्टी वाचनीय आहेत.

प्रभाकर पाध्ये यांनी थोडयाच कथा लिहिल्या; पण त्या कलापूर्ण व हृदयस्पर्शी आहेत. कोकणातला निसर्ग व तियल्याच व्यक्ती यांच्याभोवती त्यांच्या कथा केंद्रित झाल्या आहेत. ना. ग. गोरे यांनीही दाजीवाने सांगितलेली गोष्ट, कृष्णेचा डोह, निर्वंश, पासीघाट, इ. कथांच्या द्वारे कोकणातील विविध समजुतींचे, प्रसंगांचे व व्यक्तींचे चित्रण परिणामकारकपणे केले आहे. रा. भि. जोशी यांच्या कथांतून भावतरल वृत्ती आणि गाढ अनुभूती यांचा प्रयत्न येतो.

वि. वि. बोकील हे विनोदी आणि उपरोधप्रधान कथालेख-

र. वा. दिघे

अ. वा. वर्टी

सौ. मालतीबाई बेडेकर

शंभू शिखरीचा राजा, माणुसकीचा गहिवर, रामभरोशी पुनः घऱ्याच्या दारात, तिच्या सौभाग्याचा बावटा, शेवंतीचा खराटा, इ. कथा वाचकांच्या अंतःकरणाला पाझर फोडतात आणि त्याला विचार करायलाही लावतात.

श्री. म. माटे यांच्याच प्रवृत्तीचे आणखी एक कथालेखक म्हणजे डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे. त्यांनी ज्या कथा लिहिल्या आहेत, त्या सहेतुक आहेत. सामाजिक जीवनात काय असावे व काय नसावे यांविषयी त्यांची मते पक्की आहेत. लपलेले खडक हे त्यांच्या एका कथासंग्रहाचे नाव आहे. ते समाजातल्या अन्यायांना आणि घातुक रूढींना लपलेले खडक मानतात व ते कसे चुकवावे यासंबंधी काही मार्गही दाखवतात. या दृष्टीने नात पटाईत आहेत. चतुर व मार्मिक संवाद हे त्यांचे वैशिष्टय. जमीन आणि अस्मान, हक्कांची जाणीव, धंदेवाईक मंडळी, व्यवहार आहे हा, इ. कथा त्या दृष्टीने उल्लेखनीय ठरतील.

द. र. कवठेकर हे य. गो. जोशी यांच्या वृत्तीचे कथालेखक होत. मध्यमवर्गीय जीवनातील अतिशय करुण असे प्रसंग निवडून त्यांचे अतिशय भावव्याकुळ चित्रण करताना कवठेकर विशेष रंगून जातात. अंध अंधारी बैसले, तिळाच्या वडया, कुंकवाचा करंडा, मी लावते हं निरांजन, इ. कथांतून त्यांनी करुणरम्य व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत.

प्रा. अनंत काणेकर यांनी रक्ताची खूण, काळेकुट्ट ढग, काश्मिरी गुलाब, कालप्रवाहाशी झुंज, खरे झालेले स्वप्न, इ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रभावशाली कथा लिहिल्या आहेत. त्यांनी कित्येक विनोदी कथाही लिहिल्या असून, बहुतेक कथांतून जगाची उफराटी तऱ्हा दाखविली आहे.

गनीम, साधना, केळीचे पान, सस्यशामला, ताजमहाल, लकाकणारे पाणी, इ. कथा लिहून र. वा. दिघे कथाक्षेत्रात पुढे आले. कल्पनारम्य वातावरण व अद्‌भुतपूर्ण घटना ही त्यांच्या कथांची प्रमुख वैशिष्ट्ये होत.

ग. ल. ठोकळ हेही दिघ्यांच्या प्रवृत्तीचे होत. त्यांनाही अद्‌भुताची आवड आहे. ते बहुतांशी ग्रामीण जीवन आणि त्यातील दैन्य, दारिद्र्य आणि अज्ञान यांवरच कथा लिहितात. कडू साखर, दौलतजादा, गोफणगुंडा, इ. त्यांच्या कथा उल्लेखनीय वाटतात.

डॉ. अ. वा. वर्टी हे कथानक व घटना यांच्या उभारणीवर भर देऊन कथा लिहितात. त्यांच्या पुष्कळ कथांना विनोदाचा रंग असतो. मुमताज, टॉमी, सहा मास्तर व एक मास्तरीण, यांसारख्या अत्यंत भावनाप्रधान कथा त्यांनी लिहिल्या आहेत.

या काळात प्रादेशिक कथांनाही भर आला. गोमंतकाच्या निसर्गाच्या पार्श्वभूमीवर कित्येक कथा वि. स. सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, जयवंतराव देसाई, सां. घ. कंटक, व्यंकटेश पै रायकर इ. लेखकांनी लिहिल्या. गोमंतकीय जीवनातील दैन्य, देवदासीसारख्या अनिष्ट प्रथा, अज्ञान, हिंदू-ख्रिस्ती यांचे सांस्कृतिक संबंध, मोकळे ख्रिस्ती जीवन, इ. विषयांवर या लेखकांनी कथांच्या द्वारे प्रकाश टाकला. वि. ल. बर्वे यांनीही याच कालात उत्तर कोकणाच्या पार्श्वभूमीवर बऱ्याच कथा लिहिल्या.

प्रस्तुत काळात स्त्री-जीवनातील समस्या व स्त्री-मनाचे विश्लेषण यांच्या आधारे कथा लिहिणाऱ्या ज्या काही स्त्री लेखिका पुढे आल्या, त्यांत विभावरी शिरूरकर (मालतीबाई बेडेकर) या अग्रगण्य होत. परिस्थितीने, अवहेलनेने, उपेक्षेने आणि लोकनिंदेने कोळपून गेलेल्या अनेक स्त्रियांना लेखिकेने आपल्या कथांतून बोलके केले. प्रेम हे विष की अमृत, प्रेम की पशुवृत्ती, प्रेमाची पारख, रिकाम्या भांड्यांचे निनाद व बाबांचा संसार माझा कसा होईल, या त्यांच्या कथा विशेष उल्लेखनीय आहेत. कृष्णाबाई या नावाने लिहिणाऱ्या सौ. मुक्ताबाई दीक्षित यांचाही या बाबतीत आवर्जून उल्लेख करायला हवा. स्त्रियांची सुख-दुःखे त्यांनी आत्मीयतेने आणि हळुवार हाताने रंगविली आहेत. कमलाबाई टिळक यांनीही स्त्रीजीवनातल्या नव्या नव्या समस्यांचे सूक्ष्म दर्शन घडवले. आशाभंग, पूर्वस्मृती, पतिव्रता, इ. त्यांच्या कथा उठावदार आणि परिणामकारक झाल्या आहेत.

शांताबाई नाशिककर, कुमुदिनी रांगणेकर, आनंदीबाई किर्लोस्कर, पिरोज आनंदकर, कमलाबाई बंबेवाले, क्षमाबाई राव, मालतीबाई दांडेकर, इ. अनेक कथालेखिकांनी या कालात नाव मिळविले. मालतीबाई दांडेकर यांनी मध्यमवर्गीय जीवनावर बऱ्याच कथा लिहिल्या. त्यांच्या कथांत बोधप्रधानता विशेषत्वाने दिसून येते. सुशीलाबाई चिकटे व स्नेहलता दसनूरकर यांनीही कथांच्या द्वारे समाजातली सुखदुःखे वेशीवर टांगली आहेत.

कुसुमावती देशपांडे

इ. स. १९४३च्या सुमारास नवे नवे लघुकथालेखक क्षितिजावर चमकू लागले. त्यांच्या कथांनीही जुनी चाकोरी सोडून नवीन वाट मिळविली. ते आपल्या कथांतून जीवनाचे अधिक वास्तव, सूक्ष्म व विविध पातळ्यांवरून दर्शन घडवू लागले. त्यांच्या लघुकथा अधिक स्वैर व अधिक लवचीक बनल्या. मानवी मनाचे सूक्ष्म पदर उलगडण्याच्या प्रयत्नात व्यक्तिदर्शनाचे नवे तंत्र त्यांनी आत्मसात केले. अशा या नव्या कथांचा साक्षेपी पुरस्कार अभिरुची व सत्यकथा या मासिकांनी केला. प्रा. म. ना. अदवंत लिहितात–

" या नव्या लघुकथांची पूर्वचिन्हे ज्या दोन लघुकथाकारांच्या लघुकथांतून १९३५ पासून दिसू लागली, त्या व्यक्ती म्हणजे वामनराव चोरघडे व कुसुमावती देशपांडे या होत. चिंतनशील मनोवृत्ती व काव्यात्म आविष्कार यामुळे या दोघांच्याही कथांतून एक निराळाच आगळेपणा प्रतीत होऊ लागला. समुद्राचे पाणी, भाकरी, गोरी बायको, नव्या रूढी, अमरवेल, माणूस का रडतो, गंगादेखील आटली, इ. चोरघड्यांच्या कथा जिव्हाळ्याने भरलेल्या असून, त्या वाचकांना अंतर्मुख करतात. कुसुमावतींच्या नदीकिनारी, दमडी, समांतर रेषा, गवताचे पाते, इ. कथांतून जीवनाचे विशाल दर्शन घडते. "

इ. स. १९४५ च्या आसपास लघुकथेचे नवे युग सुरू झाले. त्या कालात लघुकथेची मूल्ये बदलू लागली. अभिव्यक्तीतही फरक पडला. लघुकथा कथानकाच्या ठराविक चाकोरीतून मुक्त होण्याच्या मार्गाला लागली. या नव्या कथेची गंगोत्री सुरू झाली, ती अरविंद गोखले यांच्या कोकराची कथा या कथेपासून.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आशय व अभिव्यक्ती या दोनही बावतींत या काळापासून मराठी लघुकथेत बदल दिसून येऊ लागला. ती अधिक सूक्ष्म व अंतर्मुख झाली. दुसऱ्या महायुद्धाने समाजावर जी विफलतेची छाया पडली व मानवी जीवनातील चिरंतन मूल्ये घडाघड कोसळून पडलेली दिसल्यामुळे जी अश्रद्ध वृत्ती समाजाच्या ठिकाणी निर्माण झाली. तिचे अतिवास्तव आणि अतिकटू चित्रण ती करू लागली. दुसऱ्या महायुद्धाने उद्ध्वस्त झालेल्या विश्वाचे व मानवतेच्या विटंबनेचे दर्शन ती घडवू लागली. त्यासाठी मनोविश्लेषणाच्या तंत्राचा आश्रय करून माणसाच्या अंतर्मनात खोलवर दडून बसलेल्या सुप्त-अर्धसुप्त आशा-आकांक्षांची, दवलेल्या विचारांची व विकृत भावनांची चित्रे ती रंगवू प्रत्ययाला येते आणि स्त्रीजीवनाचे मनोज्ञ दर्शनही घडते.

प्रयोगशीलता, स्तिमित करणारी अंतर्विरोधाची मांडणी, निरनिराळ्या पातळ्यांवरून अनुभव घेण्याची पद्धती व मनोविश्लेषणाची हातोटी ही गंगाधर गाडगिळांच्या कथेची वैशिष्ट्ये होत. त्यांनी मध्यमवर्गीय समाजावरच बहुतांशी कथा लिहिल्या आहेत. परिस्थिती, रूढ समजुती, उराशी कवटाळलेल्या नीतिकल्पना, दारिद्र्य, जीवनाला आलेली यांत्रिक चाकोरी, इत्यादींच्यामुळे ज्यांच्या भावना दडपल्या आहेत, मने मुर्दाड झाली आहेत आणि अंतःकरणाला अनेक व्यथा जडल्या आहेत, अशा दुबळ्या आणि व्यथित मनांचे चित्रणच त्यांच्या कथांतून अधिक झाले आहे. किडलेली माणसे, सुखी माणसे, दुबळा, वारा

वामनराव चोरघडे

अरविंद गोखले

वसुंधरा पटवर्धन

लागली. त्यासाठी तिने आपले वाह्य स्वरूप व आकारही वदलला. १९४५ च्या नंतरच्या काळातील कथेत अंतर्बाह्य होत असलेला हा बदल प्रामुख्याने अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे व व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांतून स्पष्टपणे जाणवू लागला.

अरविंद गोखले यांचे कथाविश्व व्यापक आहे. त्यात विविध जातींची व थरांची माणसे आहेत. महायुद्ध, बेकारी, १९४२ चे आंदोलन, जातीय दंगे, फाळणी, महागाई, इ. अनेक घटनांची पार्श्वभूमी त्यांच्या कथांना लाभली आहे. एरुशा, विदाय बोंघू, नकार, रिक्ता, मीलन, दिव्य, मंजुळा, डाग, अधर्म, इ. कथांतून गोखले यांच्या कथांचे आगळे सौंदर्य व त्यांतील मनोविश्लेषण भरलेले शीड, इ. त्यांच्या कथा त्या दृष्टीने वाचनीय आहेत. कबुतरे, घरातला चोर, शामचे गुपित, नाविन्य, इ. कथांतून त्यांनी लहान मुलांच्या अंतर्मनाचाही कानोसा घेतला आहे.

उद्दाम भावना आणि कणखर व प्रभावी भाषा ही पु. भा. भावे यांच्या कथांची वैशिष्ट्ये होत. प्रणयभावनेच्या अनेकविध छटा ते प्रभावीपणे रेखाटतात. सतरावे वर्ष, पहिले पाप, संस्कार, सुगंध, प्रतारणा, मोह, फुलवा, इ. त्यांच्या कथा वरील विधानाची साक्ष देतील. प्रा. अदवंत लिहितात—

"भाव्यांच्या सामाजिक मनाचा आविष्कार त्यांच्या बऱ्याच कथांतून झाला आहे. ज्या ज्या ठिकाणी पाश्चात्यांचे अंधानुकरण आहे, अनैसर्गिक मनोवृत्तीचे निदर्शक असे वर्तन आहे, दंभ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे, ढोंग आहे, खोटेपणा आहे, त्या त्या ठिकाणी व्यक्तिचित्रण किंवा प्रसंगचित्रण करताना भाव्यांची लेखणी अतिशय तिखट झाली आहे."

व्यंकटेश माडगूळकर यांनी माणदेशी माणसांची निराळीच सृष्टी उभी केली आहे. त्यांची कथा माणदेशाच्या मातीत खोलवर रुजली आहे. माणगंगेच्या परिसरातील व्यक्तींचे दारिद्र्य, भोळेपणा, अडाणीपणा, कधी विकारवश, तर कधी कणखर वृत्ती या सर्वांचे दर्शन त्यांनी परिणामकारक रीतीने घडविले आहे त्यांची भाषा खेडवळ लोकांच्या भावना व कल्पना चांगल्या प्रकारे पेलू शकते. त्या दृष्टीने न्याय, ऑडिट, विलायती कोंबडी, झोंबी, करणी, भुताचा पदर, इ.कथा उल्लेखनीय ठरतील.



व्यंकटेश माडगूळकर

दि. बा. मोकाशी यांच्या कथांचे क्षेत्र बरेच विस्तृत आहे. विविध क्षेत्रांतली, विविध व्यवसायांतली आणि विविध थरांतली पात्रे त्यांच्या कथांत येतात आणि त्यांच्याविषयी बरेच काही कळून जाते. काय रानटी लोक आहेत, आमोद सुनासी आले, रोमच्या सुताराची गोष्ट, इ. त्यांच्या गाजलेल्या कथा होत. सदानंद रेगे यांच्या कथांतून कोकणातले जीवन आणि मुंबईतल्या कारकुनाचे जीवन याचे कुशल चित्रण आढळते. त्यांना अद्भुततेचे बरेच आकर्षण आहे. अं. शं. अग्निहोत्री यांनी सुमारे ५००कथा लिहिल्या आहेत. मध्यम वर्गाच्या सामाजिक जीवनाचे चित्रण त्यांच्या कथांतून विशेषत्वाने आढळते. त्यांच्या कथांतली पात्रे व प्रसंग यांची विविधता आश्चर्यजनक आहे.

पु. भा. भावे

शशिकांत पुनर्वसू (मो. शं. भडभडे) हे थोड्याच कथा लिहून वाचकांना चटका लावून गेले. मानवी मनातील व्यथा त्यांनी कुशलतेने चितारल्या. वसुंधरा पटवर्धन यांच्या कथा व्यक्तिचित्रण व भावजीवन या दोन्ही दृष्टींनी विशेष उल्लेखनीय झाल्या आहेत. त्यांच्या कथांतून एक वेगळ्याच प्रकारची आर्तता जाणवते. कमला फडके यांनी विनोदी आणि खेळकर अशा बऱ्याच कथा लिहिल्या आहेत. शांता शेळके यांच्या कथा हळुवार व भावनाप्रधान अशा उतरल्या आहेत. ग. दि. माडगूळकर यांनीही अस्सल ग्रामीण कथा लिहिल्या आहेत.

ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या कथांचे वळण जुन्या धर्तीचे असले तरी, त्यामधला आशय नवा असतो. कथेतल्या पात्रांची सुखदु:खे ते अलिप्तपणे सांगतात. कौलारू घरांची शाळा व मोडून पडलेली मोटार या त्यांच्या गाजलेल्या गोष्टी.

द. मा. मिरासदार यांनी ग्रामीण कथेला विनोदाची झालर लावली. आपल्या कथेतला विनोद विसंगतीच्या आविष्काराने प्रभावशाली होण्यासाठी त्यांनी इरसाल, कावेबाज, बढाईखोर, विक्षिप्त अशांसारखी माणसे निवडली. व्यंकूची शिकवणी, दळण, चोरी एक प्रकार, इ. त्यांच्या कथा मिस्किल विनोदाचे नमुने म्हणून सांगता येतील.

द. मा. मिरासदार

शंकर पाटील यांनी मुख्यत्वे ग्रामीण भागावरच कथा लिहिल्या. ग्रामीण माणसे विचार कसा करतात किंवा कशी वागतात एवढेच सांगून न थांबता ते त्यांच्या मनांत शिरले आणि त्यांतल्या गुंतागुंती त्यांनी उकलून दाखवण्याचा प्रयत्न प्रयत्न केला. आभाळ, वेणा, पात, सारवण, धार, इ. त्यांच्या कथा त्या दृष्टीने वाचनीय ठरतील.

मंगेश व सरिता पदकी या दांपत्यानेही पुष्कळशा गोष्टी लिहिल्या आहेत. यक्षगान, खारीची पिले या मंगेशरावांच्या व घटस्फोटाची गोष्ट आणि दंश या सरिताबाईंच्या गाजलेल्या गोष्टी होत. शिरीष पै यांनी बऱ्याच कथा लिहिल्या असून, त्यांचे कथा-लेखन काव्याला जवळचे आणि मुलायम असते. त्यांच्या शून्य, सिकल या कथा वाचनीय आहेत. कमल देसाई या अलिकडे बऱ्याच प्रसिद्धीस आल्या आहेत. त्यांच्या कथेतील विषयांची विविधता व कथेची उंची या दोन्ही गोष्टी प्रशंसनीय आहेत. रंग, भेट, इ. त्यांच्या कथा सुरेख आहेत.

शं. ना. नवरे यांच्या कथांतून प्राधान्याने शृंगार डोकावतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांच्या पुष्कळशा गोष्टी मुंबईच्या विविध कचेऱ्यांतून काम करणाऱ्या स्त्री–पुरुषांच्या असतात. तिळा उघड ही त्यांची गोष्ट प्रसिद्ध आहे. व. पु. काळे यांच्या कथेत एखादी सर्वांगपूर्ण गोष्ट असते. त्यांना उदात्ततेचे आकर्षण असून, ते कथेची बांधणी चांगल्या प्रकारे करतात. मध्यमवर्गीय माणसांच्या जीवनातले हृद्य व प्रातिनिधिक असे प्रसंग निवडून कथेची उभारणी करणे हे श्री. ज. जोशी यांचे वैशिष्ट्य आहे. राक्षस, मामाचा वाडा, वृंदावनच्या मामी, इ. त्यांच्या कथा वाचनीय आहेत.

जयवंत दळवी म्हटले, की त्यांची रुक्मिणी ही गोष्ट वाचकांच्या चटकन स्मरणात येते. त्यांच्या पुष्कळशा गोष्टीत कामप्रवृत्तींचे चित्रण येत असले, तरी त्यातला शृंगाररस आस्वाद्य वाटतो. त्यातले बारकावे ते पुष्कळ दाखवतात.

शंकरराव खरात यांनी कित्येक कथा लिहून महार समाजाचे अंतर्बाह्य जीवन परिणामकारकपणे चित्रित केले आहे. इतर उपेक्षित जातीजमातींविषयीही त्यांनी बरेच लिहिले आहे. प्रा. आनंद यादव म्हणतात, की खरातांच्या कथांतली पात्रे जे जे भोगा आले ते निमूटपणे सोसतात; तर अण्णाभाऊ साठे यांची तशाच जातीजमातींतली पात्रे अन्यायाविरुद्ध चिडून उठतात, खून करतात, दरोडे घालतात आणि कौटुंबिक पातळीवर स्वत:ची कुचंबणा करून घेतात.

डॉ. सरोजिनी बावर यांचे कथाविश्वही ग्रामीणच आहे. ग्रामीण जीवनातल्या परंपरा आणि तिथली खानदानी या गोष्टींचा त्यांना अभिमान आहे. त्या आपले अनुभव प्रसन्न शैलीने व्यक्त करतात. जीवनातल्या शाश्वत मूल्यांवर त्यांचा

जयवंत दळवी

वि. शं. पारगावकर

श्री. ज. जोशी

अढळ विश्वास आहे.

विद्याधर पुंडलिक यांच्या कथा मनोविश्लेषणात्मक असल्या तरी, त्यांतल्या व्यक्ती पुष्कळदा खूप उंची गाठतात. आजी शरण येते, विपरीत काही झालं नाही व वाटा या त्यांच्या गाजलेल्या कथा होत.

जी. ए. कुलकर्णी यांनी बऱ्याच कथा लिहिल्या आहेत. ते आपल्या कथांतून मानवी जीवनातल्या दु:खांचे अनेक पैलू दाखवतात. चंद्रावर, दु:ख नावाचे जहाज, तुती, पारध, इ. त्यांच्या गोष्टी वाचनीय आहेत.

हळुवार भावनांना फुलवीत फुलवीत त्या कलात्मक पातळीवर नेणे हे वि. शं. पारगावकर यांचे वैशिष्ट्य आहे. संसा, मोर, स्वाती, पितर जेवायला येतात, या कथा सुंदर आहेत.

आनंद यादव हे पाटील-मिरासदार यांच्या नंतरचे ग्रामीण कथालेखक होत. आपले अनुभव ते सखोलपणे आणि उत्कटतेने मांडण्याचा प्रयत्न करतात. आवश्यक वाटेल तिथे भाषाही ग्रामीणच वापरतात. त्यांच्या मोट, धुणं, गाळ, इ. कथा परिणामकारक उतरल्या आहेत.

हमीद दलवाई हे कोकणातले, त्यामुळे त्यांच्या कथांनाही तिथलीच पार्श्वभूमी मिळाली आहे. त्यांच्या संबंधी प्रा. आनंद यादव म्हणतात– हिंदू-मुस्लीम संबंधांवर दलवाई यांनी अत्यंत मन:पूर्वक थोडे, पण बहुगुणी लेखन केले आहे. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांतील मुस्लीम समाजाच्या भावभावना ते अत्यंत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तटस्थतेने आणि कलात्मकतेने रेखाटतात.

मधु मंगेश कर्णिक यांचे कथाक्षेत्र मुख्यत्वे रत्नागिरी जिल्ह्याचा दक्षिण भाग हे आहे. मुंबईतले चाकरमानी, त्यांच्यावर अवलंबून असलेलो कोकणांतली कुटुंबे, तिथली देवदेवस्की आणि गांवकी आणि या पार्श्वभूमीवर वावरणारा तिथला समाज यांचे प्रत्ययकारी चित्रण त्यांच्या कथेत आढळते. संवाद रंगवताना ते मालवणी भाषेचा सर्रास उपयोग करतात.

नारायण धारप यांच्या कथांतून अतींद्रिय शक्तींच्या बऱ्यावाईट आणि जीवघेण्या अशा सामर्थ्याचे चित्रण असते. आपल्या कथेतील सामान्य माणसांना ते सहजतेने अद्भुताच्या जगात घेऊन जातात. त्यांच्या प्रत्येक कथेत काहीतरी रहस्य असते आणि त्या रहस्याला विज्ञान आणि मानसशास्त्र यांचा काही

शंकर पाटील

डॉ. सरोजिनी बाबर

मधु मंगेश कर्णिक

ना काही आधार असतो. अशा शक्तींवर विजय मिळविणारे समर्थ नावाचे एक पात्र त्यांनी कल्पिले आहे. पारंब्याचे जग, पेशंट नं. ३०२, इ. त्यांच्या कथा मनावर दडपण यावे इतक्या जबरदस्त आहेत.

याव्यतिरिक्त पूर्वीच्या आणि चालू काळातल्या काही कथालेखकांची नांवे अशी– दिलीप चित्रे, श्री. दा. पानवलकर, चिं. त्र्यं. खानोलकर, अच्युत तारी, प्रभाकर अत्रे, चंद्रकांत वर्तक, पद्माकर गोवईकर, विजया राजाध्यक्ष, शरच्चंद्र चिरमुले, रा. रं. बोराडे, चारुता सागर, तारा वनारसे, इंद्रायणी सावकार, शंकर वैद्य, आनंद विनायक जातेगावकर, म. वि. कोल्हटकर, सुभाष भेंडे, प्रल्हाद वडेर, क. दि. सोनटक्के, ए. वि. जोशी, विजय तेंडुलकर, अच्युत वर्वे, वावा पाटील, द. का. हसमनीस, वा. भ. पाटील, नामदेव व्हटकर, उद्धव शेळके, सदानंद रेगे, शांताराम, मुक्ता केणेकर, निर्मला कुलकर्णी, र. गं. विद्वांस, म. ना. अदवंत, दि. वा. फडणवीस, चिं. य. मराठे, उमाकांत भेंडे, वि. वा. शिरवाडकर, गो. के. भट, सदाशिव आठवले, अनंत गुप्ते, प. स. देसाई, वसंत माने, वि. गं. देशपांडे, श्रीपाद जोशी, राम डोके, म. त्रि. देव, रा. के. रानडे, श्रीकांत राय, भालचंद्र लाड, वा. वा. भोळे, वाय. बी., कृ. के. रहाळकर, पां. अ. वेलणकर, द. पां. खांबेटे, वसंत पाटोळे, भा. अ. पटवर्धन, व. अ. कुंभोजकर, द. के. बर्वे, वसंत पटवर्धन, श्रीराम कामत, अच्युत पारसनीस, पद्माकर निमदेव, श्री. के. बोवडे, ल. ग. जोग, शैला पाठक, इंदुमती शेवडे, राधाबाई शेवडे, लता सप्रे, आनंदीबाई जयवंत, रा. द. ब्रह्मे, भा. द. खेर, भा. श्री परांजपे, ब्रह्मानंद नाडकर्णी, वा. ग. तळवलकर, केशव नाडकर्णी, वि. द. चिंदरकर, श्री. रा. देवभानकर, वि. कृ. नेरुरकर, ल. रा. पटवर्धन, वि. ग. भिडे, मा. कृ. शिंदे, ह. रा. महाजनी, र. गो. सरदेसाई, ग. रा. बाळ, ग. खं. पवार, दा. न. शिखरे, व्यं. शं. वकील, पां. गो. लोहोकरे, रा. पां. शिर्के, पद्माकर डावरे, सुधाकर प्रभू, योगिनी जोगळेकर, बाळ गाडगीळ, कविता नरवणे, भानू शिरधनकर, वि. वि. फडणीस, माधव कानिटकर, भा. वि. नाडकर्णी, चंद्रकांत बावडेकर, दिनकर पाटील, प्रफुल्ल दत्त, यदुनाथ थत्ते, के. रा. पुरोहित, प्रभाकर ताम्हणे, ना. ल. वैद्य, व्यं. न. कुलकर्णी, वि. बा. मराठे, उषा आपटे, स. आ. आपटे, तु. शं. कुलकर्णी, म. गो. पाठक, ग. वा. बेहेरे, न. शे. पोहनेरकर, इरावती कर्वे, जोत्स्ना देवधर, वसुधा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाटील, शैलजा राजे, हिरा कर्नाड, व. मो. पुरंदरे, श्रीपाद काळे इत्यादी.

कादंबरी – मराठीतील पहिली कादंबरी बाबा पदमनजी या ख्रिस्ती गृहस्थाने लिहिली (इ. स. १८५७), तिचे नाव यमुना-पर्यटन. या कादंबरीत त्यांनी विधवा स्त्रियांची दुरवस्था वर्णिली असून, वैधव्यातील निरनिराळ्या अवस्थांचे दर्शनही घडवले आहे. हळबे यांची मुक्तामाला ही कादंबरी १८६१ मध्ये अवतरली. यातही वैधव्याचे दुःख व स्त्रीजीवनाविषयी अनुकंपा व्यक्त झालेली आहे. याच पद्धतीवर पुढे रिसबूड यांनी मंजुघोषा, विश्वासराव व वसंतकोकिला या कादंबऱ्या लिहिल्या; जोरवेकर यांनी विचित्रपुरी व पारखी यांनी मित्रचंद्र ही कादंबरी लिहिली. असल्या सुधारणाविषयक व अद्‌भुतप्रधान कादंबऱ्यांची निर्मिती १८८५ सालापर्यंत चालत राहिली. चंद्रप्रभा विरहवर्णन ही या कालात एका स्त्रीने लिहिलेली प्रमुख कादंबरी होय. इ. स. १८७१ साली गुंजीकरांची मोचनगड नावाची ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध झाली. ऐतिहासिक कादंबरीचा प्रारंभ म्हणून मोचनगडचे महत्त्व आहे.

इ. स. १८८५ ते १९२० या ३५ वर्षांच्या कालखंडावर हरिभाऊ आपटे यांनी आपल्या कलेचा आणि कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. आईच्या मायेने समाजाला आंजारून गोंजारून शिकवावे अशी हरिभाऊंची दृष्टी होती. त्यांची कलात्मक सौंदर्य-दृष्टी चोखंदळ होती. हळूहळू त्यांच्या कादंबऱ्यांतील आशयातही व्यापकता येत गेली. हरिभाऊंनी समाजाला सर्वांगसुंदर बनविण्याचा निदिध्यास बाळगला होता. आपल्या काळातील सामाजिक मनाच्या घडामोडी त्यांनी जाणल्या आणि आपल्या कादंबरीतून रेखाटल्या.

हरिभाऊंनी एकंदर दहा सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. गणपतराव, मधली स्थिती, पण लक्षात कोण घेतो, यशवंतराव खरे, मी, जग हे असे आहे, भयंकर दिव्य, मायेचा बाजार, कर्मयोग व आजच ही त्यांची नावे होत. या कादंबऱ्यांतून त्यांनी समाजसुधारणेच्या विविध अंगांचे समर्थन केले.

इ. स. १८९५ सालापासून हरिभाऊंनी ऐतिहासिक कादंबऱ्या लिहायला प्रारंभ केला. शिवकालावर पाच, पेशवेकालावर एक, राजपुतांच्या इतिहासावर एक, चंद्रगुप्तकालीन एक व विजयनगरच्या साम्राज्यनाशावरील एक अशा नऊ ऐतिहासिक कादंबऱ्या हरिभाऊंनी लिहिल्या. इतिहासाच्या द्वारे त्यांनी समाजाला स्वाभिमान आणि देशप्रेम या गोष्टी शिकविल्या. हरिभाऊंची अनेक वैशिष्ट्ये पुढल्या सर्व कादंबरीकारांना यशस्वी होण्यासाठी दक्षतेने पाळावी लागली आहेत.

नारायण हरी आपटे यांनी अजिंक्यतारा, आनंदमंदिर, कपटजाल, कर्मगती, भुरळ, पहाटेपूर्वीचा काळोख, न पटणारी गोष्ट, सुखाचा मूलमंत्र, इ. कादंबऱ्या लिहिल्या. हरिभाऊंप्रमाणेच लोकशिक्षणाची दृष्टी ठेऊन ना. ह. आपटे यांनी ध्येयवादी आदर्श व्यक्ती निर्माण केल्या आहेत. त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांतून नैतिक दृष्टीला प्राधान्य मिळाले आहे.

हरि नारायण आपटे

नाथ माधव अर्थात द्वारकानाथ माधव पितळे यांनीही सामाजिक व ऐतिहासिक अशा उभयविध कादंबऱ्या लिहिल्या. ग्रहदशेचा फेरा, डॉक्टर कादंबरी, देशमुखवाडी, रायक्लब, सावळ्या तांडेल, स्वराज्याचा श्रीगणेशा, इ. त्यांची नावे आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांत कोणते-तरी रहस्य असते व कथानक खूप गुंतागुंतीचे असते. ऐतिहासिक कादंबऱ्यांत त्यांनी स्वराज्याची विविध स्थित्यंतरे मनोवेधक शैलीने रेखाटली आहेत.

नाथ माधव

धनुर्धारीकृत वाईकर भटजी, सी. के. दामले यांची जग हे त्रिविध आहे, काशीबाई कानिटकरांच्या रंगराव व पालखीचा गोंडा, श्री. कृ. कोल्हटकर यांची श्यामसुंदर, इ. कादंबऱ्या १९२० पूर्वी बऱ्याच गाजल्या. तुळजापूरकर यांनी माझे रामायण नावाची भली मोठी आत्मवृत्त–शैलीची कादंबरी लिहून तत्कालीन राजकीय व सामाजिक विषय, एकत्र आणण्याचा प्रयोग केला. तरी तिचे कथानक अत्यंत चित्तवेधक झाले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वामन मल्हार जोशी यांनी रागिणी, आश्रमहरिणी, नलिनी, सुशीलेचा देव, इंदू काळे व सरला भोळे अशा तत्त्वप्रधान कादंबऱ्या लिहिल्या. तात्त्विक कादंबरीचे जनक म्हणून ते ओळखले जातात. वामन मल्हारांनी आपल्या कादंबऱ्यांतून उच्च शिक्षित स्त्रीच्या जीवनाचा विचार केला व वाचकांचे स्त्रीविषयक विचार उदार बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कादंबऱ्यांतून अनेक ठिकाणी तात्त्विक चर्चा आणि वादविवाद आढळतात. मराठी कादंबरीचे कलावैभव जरी ते फारसे वाढवू शकले नाहीत, तरी मराठी कादंबरीचे तत्त्ववैभव वाढविण्यात ते यशस्वी ठरले आहेत, असे डॉ. अ. ना. देशपांडे लिहितात.

याच काळात इंग्रजी, बंगाली व गुजराती या भाषांतील शेकडो कादंबऱ्या अनुवादित होऊन मराठीत आल्या. वि. सी. गुर्जर, ग. वि. कुलकर्णी, कृ. के. गोखले, शं. बा. मुजुमदार, वरेरकर, धनुर्धारी, नाडकर्णी, के. रा. पुरोहित, इ. लेखकांची नावे त्या बाबतीत उल्लेखनीय ठरतील.

डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी विचारप्रधान व समस्यापूर्ण अशा काही कादंबऱ्या लिहून मराठी कादंबरीसृष्टीत स्वतंत्र दालनच उघडले. गोंडवनातील प्रियंवदा, परागंदा, आशावादी, गावसासू, ब्राह्मणकन्या, विचक्षणा व भटक्या (अपूर्ण) अशा कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांचे विचार रूढ समजुतींना धक्के देणारे असले, तरी ते प्रामाणिक व प्रगतिपोषक असत. केतकरांनी सुशिक्षित समाजाला आपल्या नीति-अनीतिविषयक कल्पनांचा आणि भावनांचा फेरविचार करायला लावले, ही त्यांची एक मोठीच कामगिरी आहे, असे श्री. वा. म. जोशी म्हणतात. 'वेश्यांचा म्हणजे कलावंत स्त्रियांचा वर्ग समाजाला आवश्यक आहे, जाती मोडण्यापेक्षा टिकणेच श्रेयस्कर आहे, वर्णविहीन समाजव्यवस्थेपेक्षा वर्णभेदयुक्त समाजरचनेतच माणसाचा निकोप रीतीने विकास होईल, इ. कल्पना त्यांनी मांडल्या. त्या जितक्या वैचित्र्यपूर्ण आहेत, तितक्याच केतकरांची स्वतंत्र बुद्धी व्यक्त करणाऱ्याही आहेत.

विठ्ठल वामन हडप यांनी सामाजिक, ऐतिहासिक आणि लघुकादंबऱ्या मिळून शंभराच्या आसपास कादंबऱ्या लिहिल्या. बहकलेली तरुणी ही त्यांची कादंबरी एका काळी फारच गाजली होती. त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांत समाजातल्या सर्व थरांतल्या व्यक्ती आढळतात.

भा. वि. वरेरकर यांची विधवाकुमारी हीदेखील एक अशीच गाजलेली कादंबरी आहे. कौमार्यात वैधव्य प्राप्त झालेल्या विधवेने पुनर्विवाहाचा विचार सोडून देऊन शिक्षण व देशकार्य या गोष्टींकडे आपले मन कसे वळवले, हे विधवाकुमारीत सांगितले आहे. परतभेट, सात लाखातील एक, कुलदैवत, इ. त्यांच्या आणखी काही कादंबऱ्या होत. याशिवाय त्यांनी कित्येक बंगाली कादंबऱ्यांचे अनुवादही केले आहेत. वरेरकरांचे सर्वच लिहिणे सहेतुक व लोकशिक्षणात्मक असे.

पु. य. देशपांडे यांनी बंधनाच्या पलीकडे, सुकलेले फूल, सदाफुली, काळी राणी, इ. कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्याविषयी श्री. वि. बा. आंबेकर म्हणतात – शरीरात कार्यप्रीतीचा न मावणारा आवेश, मनात न मावणारा महत्त्वाकांक्षेचा आवेग, डोक्यात न मावणारा विचारांचा अनावर भर आणि हृदयात न मावणारा मानवतायुक्त भावनांचा कोलाहल, हे नवे विश्व पु. य. देशपांडे यांनी कादंबरी-वाङ्मयाला दिले.

प्रा. ना. सी. फडके हे मराठी कादंबरीला तंत्रशुद्धता, रचनाशैली, भाषासौष्ठव, प्रसंगनिर्मिती, इ. अनेक कलागुणांनी वेगळे वळण लावणारे यशस्वी कादंबरीकार होत. त्यांनी अल्ला हो अकबर, कुलाब्याची दांडी, जादूगार, दौलत, अटकेपार, कलंकशोभा, इ. सुमारे पंचाहत्तर कादंबऱ्या लिहिल्या. चतुर व चित्तवेधक निवेदन, रेखीव व आकर्षक व्यक्तिदर्शन, स्वभावानुरूप संवादलेखन, भाषेचा विलास आणि प्रणयप्रवण रसिकता याच गोष्टीपुरते फडक्यांचे कर्तृत्व मर्यादित आहे. 'त्यापुढे जाऊन, व्यापक जीवननिष्ठेच्या व ध्येयदर्शित्वाच्या निकषावर त्यांच्या कादंबरीलेखनाचे मूल्यमापन करू पाहणे हे, सुंदर रंगीबेरंगी फुगा हा वजनदार का नाही याबद्दल व्यर्थ पृच्छा करण्यासारखे आहे,' असे प्रा. अ. ना. देशपांडे म्हणतात.

ग. त्र्यं. माडखोलकर

इ. सं. १९३० साली वि. स. खांडेकर यांनी आपली हृदयाची हाक ही पहिली कादंबरी लिहिली. त्यानंतर कांचनमृग, दोन ध्रुव, उल्का, हिरवा चांफा, दोन मने, पांढरे ढग, रिकामा देव्हारा, सुखाचा शोध, पहिले प्रेम, क्रौंचवध, ययाति, इ. कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. दीनदलितांच्या उद्धाराबद्दल त्यांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाटणारा जिव्हाळा आणि स्वार्थत्यागी व ध्येयवादी व्यक्तींबद्दल त्यांना असलेली आत्यंतिक तळमळ त्यांच्या सर्व कादंबऱ्यांतून व्यक्त झालेली आहे. किंबहुना या तळमळीतच त्यांच्या कादंबऱ्यांचे सारे बळ साठवलेले आहे. ते जीवनवादी कलाकार आहेत. उन्नत विचार हा त्यांच्या साहित्याचा प्राण आहे. रम्य कल्पनाविलास आणि लालित्यपूर्ण भाषा यांचे देणे लाभल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या वाचकांची मने आकर्षून घेतात.

वरील दोघांच्या बरोबर ज्यांचे नाव घेतले जाते, ते म्हणजे ग. त्र्यं. माडखोलकर हे होत. मुक्तात्मा, भंगलेले देऊळ, शाप, कांता, दुहेरी जीवन, मुखवटे, नवे संसार, नागकन्या, इ. बहीण, झंझावात, ठिगळ, इ. कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांची वृत्ती प्राधान्यपणे खेळकर आहे. सात्त्विक शृंगार, वात्सल्य आणि विनोद या रसांचा त्यांनी चांगला परिपोष केला आहे. प्रेमविवाह, प्रेमोत्तर विवाह, विवाहोत्तर प्रेम, विवाहबाह्य प्रेम, विवाह आणि स्वतंत्र व्यक्तिविकास असे स्त्री–पुरुष संबंधात गुंतलेले सामाजिक विषय ते आपल्या लेखनातून हाताळतात.

साने गुरुजी यांनी श्यामची आई, कठिण कसोटी, श्याम, जन्माचा बंदिवास, पराधीन, ओघळलेले मोती, धडपडणारी मुले, इ. अनेक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांचे कादंबरीलेखन सद्भावना व सद्विचार यांचा परिपोष करण्यासाठीच झाले

ना. ह. आपटे

ना. सी. फडके

वि. स. खांडेकर

कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. मराठीतले हे पहिले आणि प्रमुख राजकीय कादंबरीकार म्हणून समजले जातात. त्यांच्या राजकारणाचे सहज लक्षात येणारे दोन ठळक पैलू म्हणजे क्रांतिकारकांबद्दलचे आकर्षण आणि गांधींचा व गांधीवादाचा अधिक्षेप. मानवी स्वभावातील विकृतींचे चित्रण करण्यात माडखोलकरांच्या लेखणीने उल्हास दाखविलेला आहे. विवाहित स्त्रीच्या जीवनात पतीच्या पत्नीद्रोहामुळे उत्पन्न होणारा एकच एक प्रश्न त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून चित्रिलेला आहे, असे अ. ना. देशपांडे म्हणतात.

वि. वि. बोकील यांनी फोल आशा, चल पुढे, वेबी, बेबीची आहे. स्वातंत्र्यचळवळीत त्यांना अनेकदा कारावास भोगावा लागला. त्या काळातच त्यांचे बरेचसे लेखन झाल्यामुळे ते देशप्रेमाने ओतप्रोत भरलेले आहे. श्यामची आई या कादंबरीत सुसंस्कृत बालबोध घराण्यातल्या साध्या, सरळ व उदात्त अशा संस्कृतीचे रम्य चित्र त्यांनी रेखाटले आहे. श्याम ही त्रिखंडात्मक कादंबरी आत्मचरित्रपर असून, तिच्यात श्यामचा शारीरिक व मानसिक विकास कसकसा व कोणाकोणाकडून झाला ते दाखविले आहे. साने गुरुजींची भाषा भावनोत्कट असल्यामुळे ती सहृदय माणसाच्या अंतःकरणात जाऊन भिडते.

गीता साने यांनी आपल्या कादंबऱ्यांच्या माध्यमाने स्त्री-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जीवनातील समस्या चांगल्या रीतीने हाताळल्या आहेत. त्यांच्या लिखाणात जोम आहे, तसाच आग्रहही आहे. निखळलेली हिरकणी, वठलेला वृक्ष, हिरवळीखाली, लतिका, माळरानात, घुके आणि दहिवर, इ. त्यांच्या कादंबऱ्या होत. प्रखर वस्तुनिष्ठा हा गीता साने यांच्या कादंबरीलेखनाचा एक विशेष होय. डॉ. सुमती क्षेत्रमाडे यांच्या आधार, मैथिली, इ. कादंबऱ्याही याच जातीच्या आहेत.

विभावरी शिरूरकर (सौ. मालतीबाई बेडेकर) यांच्या हिंदोळ्यावर व विरलेले स्वप्न या कादंबऱ्या जेव्हा प्रसिद्ध झाल्या, तेव्हा आधुनिक स्त्रियांचे प्रश्न सहृदयतेने, मर्मज्ञतेने व वास्तवपूर्ण रीतीने मांडणारी एक नवीन लेखिका उदयास आली, असे लोकांना वाटले. त्यांच्या कादंबऱ्यांत बाह्य घटनांपेक्षा आंतरघटनांना व मानसिक खळवळींना विशेष प्राधान्य आहे.

सौ. मालतीबाई दांडेकर यांचे कादंबरीलेखन प्राधान्याने मध्यमवर्गीय स्त्रियांच्या कौटुंबिक समस्यांचे चित्रण करण्याच्या हेतूने झालेले आहे. मातृमंदिर, तेजस्विनी, वज्रलेख, कृष्णरजनी, काटेरी मार्ग, इ. त्यांच्या कादंबऱ्यांतून स्त्रीजीवनविषयक प्रश्नांचा ऊहापोह अत्यंत जिव्हाळ्याने केलेला आहे. त्यांचे नायक उदात्ततेची पूजा करणारे आहेत.

सौ. मालतीबाई दांडेकर

शांताबाई नाशिककर यांनी लग्नाचा बाजार, हाच का धर्म?, इ. कादंबऱ्या लिहिल्या. महाराष्ट्रीय मध्यम वर्ग हाच त्यांनी आपल्या डोळ्यांपुढे ठेवला आहे. कुमुदिनी शंकर प्रभावळकर यांनी कर्तव्याची जाणीव, एकेरी गाठ, निर्माल्यातली कळी या कादंबऱ्यांतून मिश्रविवाह, घटस्फोट, वेश्याव्यवसायबंदी, इ. विषयांची तरफदारी केली आहे. लीला देशमुख यांनी पूर्वेचा वारा, दोन घडीचा डाव, दूर कुठेतरी, इ. कादंबऱ्या लिहिल्या असून, त्यांत हिंदी राजकीय चळवळीचे पडसाद उमटले आहेत. शांता शेळके यांनी विझती ज्योत, कोजागिरी, पुतळा, स्वप्नतरंग, इ. कादंबऱ्या लिहून आपली कथानिवेदनाची रसाळ शैली प्रकट केली आहे. शृंगारानुकूल प्रसंगांचे आणि वृत्तींचे चित्रण त्या उमेदीने करतात. सूक्ष्म पद्धतीचे स्वभावलेखन चांगले जमते.

दत्त रघुनाथ कवठेकर यांनी अपुरा डाव, उमाडलेल्या भावना रेशमाच्या गाठी, इ. कादंबऱ्या लिहिल्या. साध्या कौटुंबिक गोष्टी सहृदयतेने सांगितल्या असता त्या किती परिणामकारक होऊ शकतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे कवठेकरांच्या कादंबऱ्या होत, असे वि. पां. दांडेकर म्हणतात.

द. र. कवठेकर

शितू, पडघवली, कुणा एकाची भ्रमणगाथा, पूर्णामायची लेकरे, पवनाकाठचा धोंडी, आम्ही भगीरथाचे पुत्र, इ. अनेक कादंबऱ्या गो. नी. दांडेकर यांनी लिहिल्या. शितू ही त्यांची अमर प्रेमकथा आहे. कोकण, विदर्भ, नौखाली, भाकडा नांगल, नर्मदेचा परिसर अशी विस्तृत पार्श्वभूमी त्यांनी आपल्या कादंबऱ्यांसाठी वापरली आहे. भारताचा एवढा मोठा भाग घेऊन त्या त्या ठिकाणच्या प्रादेशिक गोष्टींचा आणि संस्कृतीचा सूक्ष्म परिचय करून देणारे दांडेकर हे मराठीतले एकमेव कादंबरीकार म्हटले पाहिजेत. प्रसादपूर्ण भाषा आणि रेखीव स्वभावचित्रे ही दांडेकरांची वैशिष्ट्ये होत.

श्री. ना. पेंडसे हे प्रादेशिक कादंबऱ्यांचे निर्माते म्हणून प्रसिद्ध आहेत. एल्गार, हद्दपार, गारंबीचा बापू, हत्या, रथचक्र, इ. त्यांच्या कादंबऱ्या वास्तवतापूर्ण स्वभावरेखन, नाट्यमय प्रसंग, सूचक संवाद व प्रत्ययकारी निसर्गचित्रण, इ. गुणांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरल्या आहेत.

विश्राम बेडेकरांनी रणांगण ही एकच कादंबरी लिहून आपल्या नवनिर्माणशक्तीचे सामर्थ्य दाखविले. पु. शि. रेगे यांनी सावित्री ही लघुकादंबरी लिहून वाचकांना एका वेगळ्या वातावरणात हिंडवून आणले. बा. सी. मर्ढेकर यांनी संज्ञाप्रवाह पद्धतीचा उपयोग करून रात्रीचा दिवस, तांबडी माती, व पाणी या कादंबऱ्या लिहिल्या.

इ. स. १९२० नंतरच्या काळात अनेक वाङ्मयमाला निर्माण होऊन त्यांच्या द्वारे कित्येक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. सरस

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाङ्मयरत्नमाला, सुरस ग्रंथमाला, समाजगौरव ग्रंथमाला, भारतगौरव ग्रंथमाला, इ. त्यांची नावे आहेत. प. स. देसाई, ता. ने. पांगळ, भि. गो. भिडे, वि. ग. जोशी, ह. रा. मराठे, मो. गु. व्होरा, रा. ह. दातार, ग. कृ. पाठक, प्र. श्री. भिसे, भा. श्री. कुलकर्णी, इ. कादंबरीकार या मालांतून प्रसिद्धीस आले.

श्री. ना. पेंडसे

गोपीनाथ तळवलकर यांनी आकाश मंदिर, छायाप्रकाश, अनुराधा व मालकंस या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांतून स्वप्नाळू सौंदर्यवाद दिसतो, असे डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात. अंधारातील दिवे, सौ. मालती, भूकंप, इ. कादंबऱ्या लिहून गं. भा. निरंतर यांनी वैवाहिक जीवनात उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांचा परामर्श घेतला. श्री. रा. बिवलकर यांनी सुनीता व शुभा या कादंबऱ्या लिहिल्या. त्यांतील शुभा कादंबरीची नायिका महारोगाने पीडित आहे.

चंद्रकांत काकोडकर यांनी निसर्गाकडे, कुंणाच्या स्वातंत्र्यासाठी, गोमंतका जागा हो, इ. बऱ्याच कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या काही कादंबऱ्या शरच्चंद्रांच्या धर्तीवर असून, काहींमध्ये शृंगाराचे व कामवासनेचे अतिरिक्त चित्रण झालेले आहे. माधव कानिटकर यांनीही बऱ्याच कादंबऱ्या लिहिल्या आहेत. अनुरागाची वेल, झोका, मयूरपंख, चंदनगौर, पाळणा, तुळशीचा मळा, दीपकळी, अंतरंग, चक्रवाक. इ. त्यांची नावे आहेत. यांची कथानके ना. सी. फडके यांच्या वळणाची असून, काम आणि शृंगार हा त्यांच्या बऱ्याच कादंबऱ्यांचा स्थायीभाव आहे.

श्रीधर देशपांडे यांनी सहारा, सायंतारा, ठेंगणे अस्मान, इ. कादंबऱ्या लिहिल्या असून, त्यांतले वातावरण अद्भुतरम्य आहे. मनमोहन नातू यांनी कड्यावरून कोमळलेली कामिनी, टिपरी पडघमवर पडली व लुटुजी-खुटूजी या कादंबऱ्या लिहून एका वेगळ्या जगाचे दर्शन घडवले आहे.

अण्णाभाऊ साठे यांची चित्रा ही कादंबरी वस्तुनिष्ठ प्रतिभा आणि पीडित खेडुतांबद्दल त्यांना वाटणारी जिवंत सहानुभूती यांची निदर्शक आहे. घर आणि पंख या वसंत कानेटकरांच्या दोन कादंबऱ्या. त्यांत त्यांनी संस्कारवादी आणि प्रतीकवादी निवेदनपद्धतीचा अवलंब केला आहे.

वैष्णव आणि जान्हवी या वि. वा. शिरवाडकरांच्या दोन कादंबऱ्या. पहिलीत एका मराठी शाळेतील शिक्षकाचे जीवन व त्याचे परिवर्तन चित्रित आहे व दुसरीत उच्च, उदात्त आणि काव्यमय असे वातावरण आहे.

रघुवीर सामंत यांच्या उपकारी माणसे या कादंबरीचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. एक प्रदीर्घ कुटुंबकथा लिहिण्याचा त्यांचा हा प्रयत्न गौरवास्पद ठरला आहे.

ना. वि. कुलकर्णी यांनी महाराष्ट्र कुटुंबमाला सुरू करून एक नवीन व आवश्यक असे दालन मराठी कादंबरीक्षेत्रात निर्माण केले. मजूर या त्यांच्या कादंबरीने एक नवीनच दिशा लेखकांना व वाचकांना दाखवून दिली. मजुरांची दुःस्थिती, कामगारांचे संप, खेड्यातील इनामदारांची केविलवाणी परिस्थिती, इ. विषय त्यांनी रंगविले आहेत. रामतनय (ग. रा. वाळिंबे) या लेखकाने भल्याबुऱ्या ग्रामीण जीवनाकडे लोकांचे लक्ष मोठ्या प्रमाणावर वेधले. मोहित्यांची मंजुळा ही त्यांची कादंबरी फार गाजली. खरा उद्धार, साखरगोटी, प्रमिलाबेन, तिघीजणी, इ. त्यांच्या अन्य कादंबऱ्या होत. वि. ल. बर्वे यांनी मुचकुंददरी ही कादंबरी लिहून खेड्यातील शेतकरी व सावकार यांच्या संबंधांचे चित्रण केले. ना. धों. ताम्हनकर यांनी गोटचा ही कादंबरी तीन भागांत लिहून बालस्वभावाचे मनोज्ञ दर्शन घडवले. त्यांचा गोटचा हा विलक्षण कल्पक व भाग्यवान ठरल्यामुळे वाचकांत खूप लोकप्रिय झाला. ग. ल. ठोकळ यांनी गावगुंड नावाची कादंबरी लिहून दहशतवादी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण जीवनाचे चित्र रेखाटले. न. चिं. केळकर यांनी कोकणचा पोर ही कादंबरी लिहून नाविकांच्या जीवनाचा परिचय घडविला. शं. रा. भिसे यांनी जंगलातील छाया ही कादंबरी लिहून वारली, कातकरी, कोळी यांचे जंगलाच्या व्यापाऱ्यांकडून कसे निर्दय शोषण होत असते, त्याची माहिती दिली. अगदी अलिकडच्या काळांत जयवंत दळवी यांनी चक्र व मधु मंगेश कर्णिक यांनी माहिमची खाडी या कादंबऱ्या लिहून मुंबईतल्या झोपडपट्टीतल्या मानवी जीवनाचा वास्तवपूर्ण परिचय करून दिला. सामान्य लोकांना अज्ञात असलेले झोपडपट्टीचे जीवन त्यांनी वास्तवाला धरून चित्रित केले. भाऊ पाध्ये यांनी वासूनाका ही कादंबरी लिहून मदभिरुचीच्या वाचकांना चांगलाच धक्का दिला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बा. द. सातोस्कर यांनी जाई व आज मुक्त चांदणे या स्वतंत्र कादंबऱ्या लिहून गोमंतकातील वेश्याजीवन व राजकीय जीवन यांचा परिचय करून दिला. बा. भ. बोरकर यांची भावीण ही कादंबरीही गोव्यातील देवदासींचे जीवन चित्रित करणारी आहे. वरील दोघांनीही देवदासी समाजातील स्त्रियांचे उदात्तीकरण केले आहे. ' मांडवी, तू आटलीस ' ही लक्ष्मणराव सरदेसायांची कादंबरी राजकीय विषयावर असली, तरी तिच्यात गोमंतकाच्या पार्श्वभूमीवरचा उत्तान शृंगार वर्णित आहे.

अलिकडे काही वर्षांत मराठी वाङ्मयात चरित्रात्मक कादंबऱ्यांचे एक नवे पर्व सुरू झाले आहे. या नव्या पर्वातले श्रेष्ठ मानकरी श्री. रणजित देसाई हे होत. त्यांनी स्वामी व श्रीमान योगी या दोन कादंबऱ्या लिहिल्या. पहिलीत थोरल्या माधवराव पेशव्यांचे व दुसरीत छत्रपती शिवाजी महाराजांचे समग्र जीवन चित्रित केलेले आहे. स्वामीला खूपच लोकप्रियता मिळाली. स्वामीच्या अनुषंगाने त्यांनी पेशवाईच्या काळातील सामाजिक व राजकीय जीवनही दिग्दर्शित केले आहे. श्रीमान योगी हे तर एक भव्योत्तुंग शिल्पच होय. वेरूळच्या कैलासलेण्याशी त्याची तुलना केल्यास ती अतिशयोक्ती ठरू नये. शिवाजीमहाराजांचे द्रष्टेपण, त्यांच्या विचारांची आध्यात्मिक बैठक, त्यांचे साक्षेपी प्रयत्न आणि त्यांची अमोघ मुत्सद्दे गिरी यांचे प्रभावी दर्शन या कादंबरीत घडते. तिच्यात रामदास-शिवाजी यांच्या गुरुशिष्य-संबंधावर एक रम्योदात्त प्रकरण असून ते, मराठी वाङ्मयाला भूषणभूत ठरेल, एवढ्या योग्यतेचे आहे.

रणजित देसाई

चरित्रात्मक कादंबरी लिहून महाराष्ट्रात गाजलेले दुसरे कादंबरीकार श्री. ज. जोशी हे होत. त्यांच्या आनंदी गोपाळ या कादंबरीत आनंदीबाई जोशी या महत्त्वाकांक्षी, पतिपरायण परंतु दुर्दैवी अशा स्त्रीचे चित्र हळुवारपणे रेखाटले आहे. तत्कालीन समाजजीवनाचा परिचयही या कादंबरीच्या द्वारे घडतो.

गंगाधर गाडगीळ

याच काळात ना. सं. इनामदार यांनी झेप, झुंज आणि मंत्रावेगळा या तीन चरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या. चरित्रनायक व्यक्तींचे त्यांनी बऱ्याच प्रमाणात उदात्तीकरण केले आहे. श्री. स. शं देसाई यांनी चंबळेच्या पलिकडे ही कादंबरी लिहून महादजी शिंदे यांचे जीवन वर्णिले आहे. मृत्युंजय कादंबरी लिहून श्री. शिवाजी सावंत यांनी कर्णाच्या अनुषंगाने संपूर्ण महाभारत ढवळून काढले आहे. यज्ञ ही स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावरची कादंबरी श्री. भा. द. खेर व सौ. शैलजा राजे या उभयतांनी मिळून लिहिली आहे. खेरांची दुसरी चरित्रात्मक कादंबरी अमृतपुत्र. ती स्व. लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर आहे. सावरकर व शास्त्री यांची त्यागमय, धुरंधर व निःस्वार्थ अशी जीवने फुलवून खुलवून श्री. खेर यांनी कादंबरीच्या मखरात बसवली आहेत. कॅ. बेलवलकर यांच्या घटकेत रोविले झेंडे, शर्थीनं राज्य राखिलं या दोन कादंबऱ्या व भीमराव कुलकर्णी यांची ओंकार ही कादंबरी याही चरित्रप्रधानच आहेत. मृणासिनी देसाई यांची पुत्र मानवाचा, ही कादंबरीही चरित्रप्रधान असून, ती म. गांधींच्या जीवनावर लिहिलेली आहे.

दुर्दम्य नावाची कादंबरी लिहून श्री. गंगाधर गाडगीळ यांनी एक असेच महान धाडस आरंभले आहे. तिचा पहिला खंड प्रसिद्ध झाला आहे. एका परीक्षणात या कादंबरीविषयी म्हटले आहे, ते असे — ' टिळकांचे जीवन तर अफाट, त्यांचे व्यक्तिमत्त्व तर विभूतिमत्त्वाच्या सदरात मोडणारे, त्यांच्या हयातीतच त्यांच्याबद्दल दंतकथा निर्माण झालेल्या; अशा वेळी टिळ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कामघला 'माणूस' शोधून तो अत्यंत संयमान आणि सरळपणाने साकार करण्याचा प्रयत्न श्री. गाडगीळ यांनी केला आहे. तसे करताना त्यांनी टिळकांबद्दलच्या आदरातिशयाला कुठेही धक्का लागू दिला नाही.'

पद्माकर गोवईकर यांनी ज्ञानेश्वरमहाराजांच्या जीवन-चरित्रावर लिहिलेली मुंगी उडाली आकाशी ही कादंबरीही अलिकडे लोकप्रिय ठरली आहे. श्री. गोवईकरांची भाषा लालित्यपूर्ण आणि वर्णने प्रत्ययकारी आहेत.

याशिवाय, वि. शं. पारगावकर, राजा राजवाडे, लीला देशपांडे, पु. भा. भावे, चिं. त्र्यं. खानोलकर, अनिरुद्ध पूनर्वसू, लक्ष्मीकांत तांबोळी, बाबूराव बागूल, प्रभाकर अत्रे, सुभाष भेंडे, रवींद्र पिंगे, चंद्रकांत खोत, बाळ सामंत, य. बा. मोकाशी, शं. ना. नवरे, पु. वि. बेहेरे, वसंत देशमुख, उद्धव शेळके, शशी पटवर्धन, श्रीकांत रानडे, चंद्रप्रभा जोगळेकर, शकुंतला गोगटे, ज्योत्स्ना देवधर, लीला श्रीवास्तव, कमला फडके, इ. लेखकांनीही कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

नाट्य – प्रारंभीच्या काळात महाराष्ट्राच्या नाट्यकलेला लिखित वाङ्मयाचे स्वरूप म्हणण्यासारखे नव्हते. इ. स. १८४३ साली विष्णुदास भावे यांनी पहिले मराठी नाटक करून दाखविले. पुढे १७-१८ वर्षे त्यांनी नाटकाचा व्यवसाय केला. या अवधीत त्यांनी सुमारे ५० पौराणिक नाट्याख्याने रचिली व नाट्य-कवितासंग्रह या नावाने ती छापून प्रकाशित केली. इ. स. १८६०च्या सुमारास पौराणिक आख्यानांच्या जोडीला गद्यात्मक फार्स करून दाखविण्याची प्रथा सुरू झाली. हे फार्स काही ऐतिहासिक व काही अद्भुतरसात्मक असत. याच परंपरेतून पुढे बुकिश नाटकांचा जन्म झाला. बुकांच्या स्वरूपात प्रथम प्रसिद्ध होणारी सामान्यत्वे इंग्रजीतली अनुवादित नाटके ही बुकिश या नावाने ओळखली जात. ही बुकिश नाटके म्हणजे मराठी वाङ्मयाची खरी सुरवात म्हणावी लागते.

इंग्रजी नाटकांबरोबरच संस्कृत नाटकांची भाषांतरेही सुरू झाली. परशुरामतात्या गोडबोले यांनी वेणीसंहार, उत्तररामचरित, शाकुंतल व मृच्छकटिक ही संस्कृत नाटके मराठीत अनुवादली; पण या नाटकांना प्रयोगक्षमता बेताचीच होती. त्यामुळे जेव्हा त्यांचे प्रयोग करायचे ठरले, तेव्हा त्यांच्या रचनेत पुष्कळ बदल करावे लागले.

अशा स्थितीत नाट्याचा अभिनव आदर्श निर्माण करणारे मराठीचे पहिले खरेखुरे नाटककार म्हणजे विनायक जनार्दन कीर्तने हे होत. त्यांच्या थोरले माधवराव पेशवे या नाटकापासून मराठी नाट्यवाङ्मयाचा आरंभ मानला जातो. श्री. बनहट्टी म्हणतात– थोरले माधवराव पेशवे (१८६१) या नाटकापासून मराठी वाङ्मयाचा आरंभ गणण्याचा प्रघात आहे. थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीतल्या बहुतेक महत्त्वाच्या व हृद्य प्रसंगांचा चित्रपट या नाटकाच्या द्वारा नाटककाराने दाखविला असून, त्या धीरोदात्त वीर पुरुषाविषयी नितांत आदरभाव प्रकट केला आहे. नाट्यवाङ्मयाच्या ऐतिहासिक शाखेचा पाया या नाटकाने उत्तम रीतीने घातला. शृंगार, करुण, इ. रसांचा आविर्भाव, रेखीव व चटकदार संवाद आणि चढत्या रसोत्कर्षाची प्रवेशरचना हे कीर्तन्यांचे गुण होत.

कीर्तन्यांचे दुसरे नाटक जयपाळ (१८६५) ही एक कल्पनारम्य नाट्यकृती आहे. कीर्तन्यांची प्रौढ व मधुर भाषाशैली या नाटकात विशेषत्वाने दिसते. सामाजिक नाटकात अग्रपूजेचा मान महादेव बाळकृष्ण चितळे भाजेकर यांच्या मनोरमा (१८७१) या नाटकाकडे जातो. इंग्रजी नाटकांच्या रूपांतरात शेक्सपीअरच्या हॅम्लेटचे विकारविलसित हे आगरकरकृत रूपांतर, बजाबा रामचंद्र प्रधान यांचे कॉमेडी ऑफ् एरर्सचे भ्रांतिकृत चमत्कार हे रूपांतर, विष्णू मोरेश्वर महाजनी यांचे सिंबेलाइन नाटकाचे तारा हे रूपांतर, ही तीन्ही रूपांतरे रंगभूमीवर यशस्वी ठरली. पूर्वीच्या धांगडधिंग्याच्या अवस्थेतून पौराणिक नाटकेही हळूहळू उत्क्रांत होत गेली. पुढच्या काळात विनायकशास्त्री नातू व रावजी बाळकृष्ण लेले यांनी बरीच पौराणिक नाटके लिहिली. पौराणिक नाटकांच्या रचनेला शंभर वर्षांनंतर आजही खंड पडलेला नाही.

अण्णासाहेब किर्लोस्कर

इ. स. १८८० साली अण्णासाहेब किर्लोस्करांनी संगीत शाकुंतल लिहून त्याचा पहिला प्रयोग केला. त्यांनी शाकुंतला-शिवाय सौभद्र आणि रामराज्य-वियोग अशी आणखी दोन संगीत नाटके लिहिली. संगीत नाटकांचा त्यांनी एक नवा मनूच सुरू केला. त्यांची नाटकातली पदे प्रसादपूर्ण व नादमधुर असल्यामुळे लोकांच्या ती सहज स्मरणात राहिली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याचबरोबर कथानकाची रचना, स्वभावपरिपोष व संवाद या बाबतीत त्यांनी सफाई आणल्यामुळे त्यांची नाटके लोकादरास पात्र झाली. त्यांच्या पश्चात संगीत नाटकांची परंपरा पुष्कळ वर्षे टिकली. शामराव नारायणराव भेंडे, गोपाळ लक्ष्मण केळकर, माधवराव पाटणकर, धुंडिराज शेंबेकर, भा. वि. घामणसकर, सि. ना. परुळेकर, वासुदेव नारायण डोंगरे, म. वि. केळकर, द. वा. जोगळेकर आणि वि. गो. श्रीखंडे यांनी संगीतप्रधान नाटके लिहून किर्लोस्करांची परंपरा जितीजागती ठेवायचे कार्य केले.

या परंपरेत मुकुटमणी शोभतील असे जे महान नाटककार पुढे जन्माला आले, ते म्हणजे गोविंद बल्लाळ देवल, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर व श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे होत.

देवलांनी (इ. स. १८५५ ते १९१६) विक्रमोर्वशीय, दुर्गा (इसाबेला), झुंझारराव (ऑथेल्लो), फाल्गुनराव, मृच्छकटिक, शारदा, संशयकल्लोळ व शापसंभ्रम ही नाटके लिहिली. त्यांतली शारदा व संशयकल्लोळ ही रंगभूमीवर आजही टिकून आहेत. देवलांनी नाटकातले संगीत अर्थपूर्ण व भावपूर्ण बनविले, रसोत्कट व जिव्हाळ्याचे प्रसंग निर्माण केले आणि संवादांची भाषा लयबद्ध केली. खाडिलकर हे त्यांच्या नंतरचे श्रेष्ठ नाटककार होत. कांचनगडची मोहना, सवाई माधवरावांचा मृत्यू, भाऊबंदकी, प्रेमध्वज, कीचकवध, विद्याहरण, मानापमान, स्वयंवर, बायकांचे बंड, मेनका, द्रौपदी, सत्त्वपरीक्षा, सवतीमत्सर, सावित्री, त्रिदंडी संन्यास या नावांची ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक नाटके लिहून त्यांनी रसिकांकडून नाट्याचार्य ही पदवी मिळवली. खाडिलकरांची नाटके सहेतुक म्हणजे एखादे तत्त्व सांगण्यासाठी लिहिलेली आहेत. प्रभावशाली स्वभावरेखन, रचनाचातुर्य आणि प्रौढ भाषाशैली ही खाडिलकरांची

गोविंद बल्लाळ देवल

वैशिष्ट्ये होत. त्यांच्याविषयी प्रा. वि. पां. दांडेकर लिहितात– सभोवतालच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीत प्रमुखत्वाने आणि प्रक्षोभाने जे विचारप्रवाह वाहत असतील त्यांना अनुकूल असा पौराणिक किंवा ऐतिहासिक कथाभाग निवडून त्यावर नाट्यरचना करण्याची कला त्यांच्या इतकी कुणालाच साधलेली नाही.

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

देशात स्वातंत्र्याची व स्वदेशाभिमानाची लाट उसळली असताना तिच्या आड आपापसातील भांडणे येत आहेत असे पाहताच त्यांनी सवाई माधवरावांचा मृत्यू व भाऊबंदकी ही ऐतिहासिक नाटके लिहिली. इ. स. १९०५-१९०६ सालच्या सुमारास हिंदुस्थानातील त्या काळच्या नोकरशाहीचा उन्मत्तपणा पराकोटीला जात असलेला पाहताच त्यांनी कीचकवध या नाटकाची निर्मिती केली.

खाडिलकरांसारखा ध्येयवादी नाटककार मराठीत दुसरा झाला नाही. राजकीय, सामाजिक व वैयक्तिक ध्येयांची उदात्त चित्रे रंगवून नाट्यकला ही केवळ मनोरंजनाचे साधन नाही; तर उदात्त मनोवृत्तींचे व भव्य ध्येयांचे पोषण करण्याचा तो राजमार्ग आहे, हे त्यांनीच प्रथम दाखवून दिले.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष, मतिविकार, प्रेमशोधन, वधूपरीक्षा, जन्मरहस्य, सहचारिणी, परिवर्तन, इ. बारा नाटके लिहिली. त्यांच्या बहुतेक नाटकांतून काही ना काही रहस्य असते आणि ते उलगडण्यासाठी निरनिराळ्या प्रसंगांची योजना असते. अद्भुतरम्यता, चटकदार संवाद, विनोदी उपकथानके व गुंतागुंतीची चमत्कृतिपूर्ण गुंफण ही कोल्हटकरांच्या नाटकांची वैशिष्ट्ये होत. त्यांची नाटकेही काहीतरी उद्दिष्ट साधण्यासाठी व कोणत्यातरी दुष्ट रूढींचे खंडन करण्यासाठी असतात. मूकनायकात ते मद्यपानाचे दुष्परिणाम सांगतात, गुप्तमंजूषात स्त्रीशिक्षणाची थोरवी गातात, मतिविकारात पुनर्विवाहाची तरफदारी करतात, तर प्रेमशोधनात विषम विवाहाची निंदा करतात.

या पुढच्या नाटककारांबद्दल वि. पां. दांडेकर लिहितात–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

किर्लोस्कर, देवल, खाडिलकर व कोल्हटकर यांची नाटके एकीकडे होत असताना दुसरीकडे ज्यांची नाटके बहुजनसमाजाचे मनोरंजन करण्याचे कार्य करीत होती, अशा नाटककारांत माधवराव पाटणकर, पु. भा. डोंगरे, अनंत वामन बर्वे, कृष्णाजी हरी दीक्षित, य. ना. टिपणीस, वासुदेवशास्त्री खरे, वासुदेव रंगनाथ शिरवळकर, दा. वि. नेवाळकर, बाबाजी दौलतराव राणे यांची गणना प्रामुख्याने करावी लागेल. माधवराव पाटणकरांची युवतिविजय, सत्यविजय, विक्रमशशिकला, ही नाटके कलादृष्ट्या प्रथम श्रेणीची नसूनही अत्यंत लोकप्रिय झाली. या नाटकांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. त्यावरूनही त्यांची लोकप्रियताच सिद्ध होते. पुरुषोत्तम भास्कर डोंगरे यांची चंद्रहास व चंद्रसेन ही नाटके अनुक्रमे स्वदेशहितचिंतक व किर्लोस्कर संगीत मंडळींच्या रंगभूमीवर खूपच गाजली. य. ना. टिपणीस हे स्वतः उत्तम नट व नाटककार असल्याने त्यांची मत्स्यगंधा, जरासंध, राधामाधव ही पौराणिक नाटके; चंद्रग्रहण, शहाशिवाजी, शिक्काकट्यार इत्यादी ऐतिहासिक नाटके; तसेच आशानिराशा, कमला, राजरंजनादी सामाजिक नाटके चांगलीच यशस्वी झाली. टिपणिसांची भाषा व पद्यरचना ही सरस असल्याने काव्यदृष्ट्याही त्यांची नाटके सरस आहेत. कृष्णाजी हरी दीक्षित यांनी खाडिलकरांच्या तोडीस तोड अशी विद्यासाधन, रुक्मिणीहरण, राजा सत्त्वधीर अशी नाटके लिहिली. औदार्याचा डंका या नाटकाने त्यांची विशेष ख्याती झाली. पौराणिक नाटकांतून प्रचलित राजकारणाचे प्रतिबिंब उमटविण्याची कला त्यांना चांगली साधली होती. वासुदेवशास्त्री खरे यांची गुणोत्कर्ष, तारामंडळ, शिवसंभव, ही नाटके कलादृष्ट्या उत्तम असून, रंगभूमीवरही यशस्वी झाली आहेत. ऐतिहासिक नाटकांचा उत्तम नमुना म्हणून या नाटकांकडे बोट दाखविता येईल. शिरवळकरांच्या संत तुकाराम, संत एकनाथ व संत नामदेव याही नाटकांनी एके काळी



श्री. कृ. कोल्हटकर

लोकमनाची जबरदस्त पकड घेतली होती. नेवाळकरांच्या संगीत दंडधारी व संगीत कर्मयोगी नाटकांनी लोकमान्य टिळकांचे राजकारण घरोघरी प्रसृत केले. त्यांचे मनोविजय हेही नाटक चांगलेच प्रसिद्ध होते. बाबाजी दौलत राणे यांची संत तुकाराम, संगीत कुसुमचंपा, इ. नाटके सामान्य लोकांची चांगली करमणूक करीत असत.

राम गणेश गडकरी (इ. स. १८८५ ते १९१९) यांनी एकच प्याला, पुण्यप्रभाव, प्रेमसंन्यास, वेड्यांचा बाजार, भावबंधन, राजसंन्यास, इ. नाटके लिहिली. गडकरी कोल्हटकरांना आपले गुरू मानीत. आपल्या गुरूच्या अनेक गुणांचे गडकऱ्यांनी अनुकरण केलेच; शिवाय कितीतरी अभिनव गोष्टी योजून आपली नाट्यसृष्टी त्यांनी नव्यानवलाईची बनवली. कथानकाच्या प्रमाणबद्धतेपेक्षा त्याच्या भव्यतेकडे त्यांनी अधिक लक्ष दिले. त्यांची मुख्य पात्रे ध्येयवादी, त्यागशील व उदात्त आचरणाची असतात. त्यांच्यामुळेही त्यांच्या कथानकाला भव्यता येते.

मराठी नाट्यसृष्टीत शोकान्त नाटके व त्यांतील दुष्ट वृत्तीचे खलनायक गडकऱ्यांनीच प्रथम मोठ्या प्रमाणावर निर्माण केले. त्याचबरोबर गंभीर कथेचा ताण कमी व्हावा म्हणून नाटकात विनोदी उपकथानकेही त्यांनी मोठ्या कौशल्याने निर्माण केली. गडकऱ्यांची भाषा हेही एक त्यांच्या नाटकांचे वैशिष्ट्य आहे. त्यांचे एकेक वाक्य म्हणजे नभांगणात चमकणाऱ्या नक्षत्रपुंजासारखे वाटते. इतकी संपन्न, कल्पनायुक्त, अनुप्रासयुक्त, लवचीक, सुंदर आणि हृदयस्पर्शी भाषा अद्यापपर्यंत दुसऱ्या कोणत्याही नाटककाराला साधली नाही. त्यामुळेच गडकऱ्यांची नाटके जशी प्रेक्षणीय तशीच वाचनीयही ठरली आहेत. त्यांत गद्यकाव्याचे उत्तम नमुने आहेत.

राम गणेश गडकरी

भावनात्मकता हा गडकऱ्यांचा सर्वांत मोठा विशेष होय.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्री. वि. पां. दांडेकर लिहितात —ही भावनात्मकता गडकऱ्यांच्या सर्व नाटकांत आहे. प्रेमसंन्यास नाटकातील जयंत-लीला, सुशीला-विद्याधर यांच्या प्रवेशांत; पुण्यप्रभाव नाटकातील वसुंधरा-ईश्वर, वसुंधरा-वृंदावन, कालिंदी-वृंदावन यांच्या प्रवेशांत; आणि भावबंधन नाटकातील मालती-धुंडिराज, मालती-मनोहर, लतिका-घनश्याम, मालती-कुमुद यांच्या प्रवेशांत भावनात्मकता ओतप्रोत भरलेली आहे. गडकऱ्यांच्याच नव्हे, तर अखिल मराठी नाट्यसृष्टीत हे सर्व प्रवेश अव्वल दर्जाचे ठरतील. वाङ्मयात रसाला प्राणस्वरूप मानण्यात येते. वर उल्लेखिलेल्या सर्व प्रवेशांत मुख्यतः करुण, शृंगार व वीर रसांचा आविर्भाव मोठ्या बहारीचा झाला आहे. हे प्रवेश पाहत किंवा वाचीत असताना प्रेक्षकांच्या किंवा वाचकांच्या मनोवृत्ती अगदी उचंबळून आल्याखेरीज राहत नाहीत.

भार्गवराम विठ्ठल उर्फ मामा वरेरकर यांनी कुंजविहारी या नाटकापासून आपल्या नाट्यलेखनाला प्रारंभ केला. त्यांनी पौराणिक, ऐतिहासिक आणि सामाजिक अशी तीन्ही प्रकारची सुमारे ५० नाटके लिहिली. नाट्य आणि तंत्र या दोन्ही दृष्टींनी प्रारंभापासून शेवटपर्यंत कोणी कालानुरूपता व अद्यतनता दाखविली असेल, तर ती मामांनीच. हुंड्याचा प्रश्न तीव्र बनून त्या पायी स्नेहलता नावाच्या एका बंगाली तरुणीला इ. स. १९१४ साली आत्महत्या करावी लागली. ते वृत्त एकून मामांचे मन कळवळले आणि त्यांनी हाच मुलाचा बाप हे नाटक लिहून महाराष्ट्रीय समाजाचे लक्ष या दुर्दैवी प्रकाराकडे वेधले. स्वामी विवेकानंद व स्वामी रामतीर्थ यांनी संन्यास स्वीकारून देशाची व धर्माची सेवा सुरू केली या गोष्टीकडे लक्ष गेल्यावर त्यांनी, संन्याशाचा संसार हे नाटक लिहिले. सत्तेचे गुलाम हे नाटक लिहून त्यांनी कोर्टात भांडणे गेल्याने पैशाचा कसा चुराडा होतो हे दाखविले. म. गांधींच्या अस्पृश्यता निवारण चळवळीची हाक ऐकू येताच तिला उद्देशून तुरुंगाच्या दारात हे नाटक त्यांनी लिहिले. पापी पुण्य, जागती ज्योत,

भा. वि. वरेरकर

सदा बंदिवान, समोरासमोर, कोरडी करामत, इ. नाटके लिहून समाजातल्या दुष्ट रूढींवर त्यांनी प्रहार केला. भूमिपुत्रांचा प्रश्न निर्माण होताच त्यांनी भूमिकन्या सीता हे नाटक लिहिले. प्रतिपाद्य विषयांच्या विविधतेच्या जोडीला स्त्रीवर होणाऱ्या अन्यायांना वाचा फोडणे, हे त्यांचे मुख्य लक्ष्य होते. स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीने नानाविध क्षेत्रांत आपले कर्तृत्व प्रकट करू शकते आणि शकेल हे त्यांनी प्रचारकी अभिनिवेशाने दाखविले आहे. त्यांच्या बहुतेक नायिका स्वतंत्र विचाराच्या, तेजस्वी आणि तडफदार आहेत.

माधव नारायण जोशी यांनीही आपल्या नाटकांतून समाजजीवन चित्रित केले आहे; पण ते बरीच प्रतिगामी भूमिका स्वीकारून आणि खालच्या दर्जाच्या विनोदाच्या माध्यमातून. कृष्णविजय, विनोद, करमणूक, स्थानिक स्वराज्य, वऱ्हाडचा पाटील, पैसाच पैसा, इ. चोवीस नाटके त्यांनी लिहिली. त्यांत स्थानिक स्वराज्य, वऱ्हाडचा पाटील व पैसाच पैसा ही त्यांची नाटके रंगभूमीवर विशेष गाजली. संन्यस्त खड्ग, उत्तरक्रिया व उःशाप ही तीन नाटके लिहून स्वा. वि. दा. सावरकरही नाटककार झाले; तथापि या क्षेत्रात ते फारसे यशस्वी झाले नाहीत.

माधवराव जोशी

माधवरावांच्या मानाने शं. ए. जोशी यांची अभिरुची अधिक स्वच्छ आणि नाट्य-रचना अधिक निर्दोष आहे. विचित्र लीला, मायेचा पूत, खडाष्टक, तो आणि ती, ही त्यांची चार नाटके होत. या सर्वांत खडाष्टक हे रंगभूमीवर विशेष यशस्वी ठरले.

वीर वामनराव जोशी यांनी राक्षसी महत्त्वाकांक्षा, रणदुंदुभी आणि धर्मसिंहासन अशी तीन नाटके लिहिली. वीररस हा या नाटकांतला प्रमुख रस होय. आपल्या प्रत्येक नाटकात लेखकाने कसलेतरी उदात्त तत्त्वज्ञान सांगितले आहे.

नरसिंह चिंतामण केळकर यांनी तोतयाचे बंड, चंद्रगुप्त, कृष्णार्जुनयुद्ध, अमात्यमाधव, वीर विडंबन व संत भानुदास अशी सहा नाटके लिहिली. कथेची रचना, स्वभावपरिपोष,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भाषा व विनोद या सर्व दृष्टींनी त्यांची नाटके निर्दोष असूनही सगळीच रंगभूमीवर गाजली नाहीत. तोतयाचे बंड व कृष्णार्जुन-युद्ध यांनाच फक्त लोकप्रियता लाभली.

अरुणोदय व सरलादेवी ही दोनच नाटके वासुदेव वामन भोळे यांनी लिहिली आणि वरच्या दर्जाचे सामाजिक नाटककार म्हणून कीर्ती मिळविली. श्री, सज्जन व स्त्री-पुरुष ही तीन नाटके न. ग. कमतनूरकरांनी लिहिली. ते गडकऱ्यांचे वळण गिरवणारे आहेत. गणेशशास्त्री फाटक यांनी क्रांतिकौशल्य, पंतांची सून, माळी जमीन, घरजावई, सासुरवास, स्वराज्य, श्रीकृष्णदान, इ. सामाजिक व पौराणिक नाटके लिहिली. सामान्य अभिरुचीच्या प्रेक्षकांची मने त्यांनी बराच काल रिझविली.

स. अ. शुक्ल

स्वर्गावर स्वारी, साध्वी मीराबाई, साक्षात्कार, सिंहाचा छावा, सत्याग्रह, सौभाग्यलक्ष्मी व लोकसिंहासन ही स. अ. शुक्ल यांची नाटके होत. शुक्लांनी आपल्या नाटकांतून खाडिलकरांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. पटवर्धन, तुलसीदास व वत्सलाहरण ही गो. स. टेंबे यांची तीन पौराणिक नाटके. यांतून त्यांनीही खाडिलकरांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्या दृष्टीने वि. चिं. बेडेकरांचे ब्रह्मकुमारी नाटक यशस्वी म्हणायला हवे. त्यात अज्ञानाने व अन्यायाने पतित झालेल्या स्त्रियांचा उद्धार व विषम-विवाह या सामाजिक गोष्टींची चर्चा केलेली आहे. पौराणिक नाटकांतून सामाजिक समस्या मांडण्याचा आणखी एक प्रयत्न वि. ह. औंधकर यांनी आपल्या महारथी कर्ण या नाटकात केला आहे. बेबंदशाही व आग्र्याहून सुटका ही दोन औंधकरांची ऐतिहासिक नाटके होत. रचनेच्या बाबतीत खाडिलकरांचे आणि भाषेच्या बाबतीत गडकऱ्यांचे संस्कार त्यांच्यावर झालेले आहेत. मत्स्यगंधा, राधा-माधव, जरासंघ व नारद ही. य. ना. टिपणीस यांची पौराणिक व चंद्रग्रहण, शहाशिवाजी, शिक्काकटयार, शिवाजीला शह व दख्खनचा दिवा ही ऐतिहासिक नाटके आणि कमला, राजरंजन, आशा-निराशा व स्वस्तिक बँक ही सामाजिक नाटके होत. अतिरंजितपणा हा या नाटकांचा मुख्य दोष आहे. त्यांतल्या त्यांत त्यांची ऐतिहासिक नाटके रंगभूमीवर बरेच दिवस टिकली. याच कालात म्हणजे २० व्या शतकाच्या दुसऱ्या चरणात द. ग. सारोळकर, कृ. ना. अस्नोडकर, शिरगोपीकर, शं. गो. गुप्ते, लक्ष्मणशास्त्री लेले, शं. गो. घैसास, गो. वि. पटवर्धन, मो. वा. दोंदे, वि. सी. गुर्जर, वि. वा. हडप, व. शां. देसाई, श्री. कृ. ओक, किरात, ना. वि. कुलकर्णी, वि. गो. शेटये, इ. अनेक नाटककार आपापल्या नाटकांनी काही काल रंगभूमीवर वावरले.

वि. स. खांडेकर व ना. सी. फडके या कादंबरीकारांनाही नाटयलेखनाचे आकर्षण वाटल्यावाचून राहिले नाही. रमणीय रत्न, रंकाचे राज्य, इ. सात नाटके खांडेकरांनी लिहिली; तर युगांतर, संजीवन, इ. पाच नाटके फडके यांनी लिहिली. ब्रह्मर्षी, विद्यार्जन, गुरुदक्षिणा, मृत्युंजय, इ. बरीच बोधप्रवान नाटके, तशीच काही प्रहसनेही ना. धों. ताम्हनकर यांनी लिहिली आहेत. ताम्हनकरांच्या नाटकांतील समाजदृष्टीसंबंधी असे म्हणता येते, की ते नव्याचे चाहते आहेत; पण त्या चाहण्यात नव्या–जुन्याचा समन्वय साधण्याकडे प्रवृत्ती अधिक आहे, असे डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात.

इ. स. १९२० ते १९३५ या कालखंडात जी नाटके निर्माण झाली, ती बहुसंख्य सामाजिक होती; तरी पण त्याच काळात कल्पनारम्य अशा नाटकांची निर्मितीही अजिबात खंडित झाली नव्हती. अन्य भाषेतील नाटकांनाही मराठी पेहराव चढविण्याचे काही प्रयत्न याच कालात झालेले दिसतात.

श्रीधर विनायक वर्तक हे १९३३ साली नाटककार म्हणून पुढे आले. नाटयमन्वंतर या नव्या संस्थेसाठी त्यांनी आंधळ्याची शाळा, लपंडाव व तक्षशिला अशी तीन नाटके लिहिली. त्यांनी आपल्या नाटकात इब्सेनप्रणीत तंत्राचा अवलंब केलेला आहे. समाजाच्या जिव्हाळ्याचे विषय व आधुनिक नाटयतंत्र यामुळे काही काळ ही नाटके लोकप्रिय ठरली.

प्रल्हाद केशव अत्रे यांचे साष्टांग नमस्कार हे नाटक १९३३ साली रंगभूमीवर अवतरले. अत्र्यांच्या नाटकांचे तीन गट सहजपणे पडतात. पहिल्या गटात साष्टांग नमस्कार, भ्रमाचा भोपळा, लग्नाची बेडी, पराचा कावळा, पाणिग्रहण व कवडीचुंबक ही प्रहसनात्मक नाटके येतात; दुसऱ्या गटात घराबाहेर, उद्याचा संसार व जग काय म्हणेल ही भावपूर्ण, गंभीर व अभिजात स्वरूपाची नाटके येतात आणि तिसऱ्या गटात वंदे-भारतम् व मी उभा आहे यांसारखी प्रमेयात्मक नाटके येतात. मराठी रंगभूमीकडे पूर्णपणे पाठ फिरवून बोलपटाच्या नादी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लागलेल्या प्रेक्षकांचे चित्त पुन्हा रंगभूमीकडे थोड्याफार अंशांनी वळविण्यात अत्र्यांच्या लेखणीने स्पृहणीय यश संपादन केलेले

आचार्य प्र. के. अत्रे

आहे. उच्छृंखल विनोद हे अत्र्यांनी आपल्या नाट्यलेखनासाठी वापरलेले अमोघ शस्त्र असले, तरी त्यांची भाषाशैली सहज आणि आकर्षक आहे. इब्सेनचे तंत्र मराठी रंगभूमीवर यशस्वी करण्याचे श्रेय मुख्यतः अत्रे यांनाच आहे.

फुलपाखरे, देवमाणूस, मैलाचा दगड व विजय या नाटकांच्या रूपाने नागेश जोशी हे १९३५ सालानंतर चमकले. यांचे नाट्यलेखन एकंदरीने चटकदार व रंजनचतुर आहे. ह. वि. देसाई यांनी याच काळात अर्ध्या वाटेवर, जीवनासाठी व संसारसुख ही नाटके लिहिली. ग. कृ. बोडस यांनी सामाजिक तशीच ऐतिहासिक अशी बरीच नाटके लिहिली आहेत. त्यांची काही नाटके रंगभूमीवर गाजली. प्रतिज्ञा-कंकण, तोफेच्या तोंडी, बंडाचे निशाण, इ. नाटके मा. आ. कामत यांनी लिहिली. महाराष्ट्राचा शिलेदार, कल्याणखजिना अशी कित्येक नाटके ग. के. दातार यांनी लिहिली. ला. कृ. आयरे हे मायेचा संसार, फिर्याद, जुलूम, बुद्धिभेद, लाख माणूस, इ. नाटकांचे कर्ते होत. मुंबईच्या गिरणीकामगारांत यांची नाटके आवडती ठरली आहेत. आबासाहेब आचरेकर यांनी मी राजा आहे, तो फाशी गेला, रणकंकण अशी बरीच नाटके लिहिली आहेत. एखादे समाजोपयोगी तत्त्व सांगण्यासाठी ते नाट्यकृतीचा अवलंब करतात. कॅ. मा. कृ. शिंदे यांनी बंडखोर कुमारी, गृहलक्ष्मी, इ. बरीच नाटके लिहिली असून, ती प्रयोगदृष्ट्या यशस्वी ठरली आहेत. वसंत दुदवडकर यांनी सोन्याचा संसार, माझं लग्न, सरसंग्राम, इ. नाटके लिहिली असून, ती मध्यम व गरीब स्थितीतील लोकांच्या जीवनावर आधारलेली आहेत.

अनंत काणेकर यांनी घरकुल, फास, झुंज, पतंगाची दोरी, इ. रूपांतरित नाटके व कित्येक स्वतंत्र व अनुवादित एकांकिका लिहिल्या आहेत. काणेकरांच्या एकूण रूपांतरित नाटकांत झुंज हे सर्वश्रेष्ठ नाटक आहे. उत्कट मनोवृत्तींचे प्रभावी चित्रण करण्यापेक्षा मानवी जीवनातील विसंवादाचे मर्मग्राही आणि सूचक दिग्दर्शन करण्यात काणेकरांच्या लेखणीने विशेष कौशल्य प्रकट केले आहे.

आशीर्वाद, कुलवधू, नंदनवन, कन्यादान, अलंकार, माझे घर, वहिनी, इ. नाटके व काही एकांकिका ही मो. ग. रांगणेकर यांची निर्मिती होय. त्यांच्याविषयी डॉ. देशपांडे लिहितात – कोणतीही समस्या पूर्ण गंभीर स्वरूपात प्रकट होण्याच्या आधीच हा नाटककार तिला कृत्रिम सुखात्मिकतेच्या मात्रेचे वळसे देऊन गारद करून टाकतो आणि समस्येच्या भीषण पर्यवसनाचे चित्रण करण्याच्या जबाबदारीतून स्वतःला मुक्त करून घेतो. विकट, भीषण, प्रश्नांच्या वाऱ्यालासुद्धा रांगणेकरांची प्रतिभा राहू इच्छीत नाही, असे यावरून दिसून येते.

अनंत काणेकर

चित्रशाळा, सोन्याचे देव व भारती ही तीनच खऱ्याखुऱ्या अर्थाने सामाजिक, परिणामकारक व साहित्यगुणांनी युक्त अशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाटके लिहून मराठी नाट्यसृष्टीत नाना जोग यांनी मानाचे स्थान मिळविले आहे. त्यांनी केलेले हॅम्लेटचे रूपांतरही सरस उतरले आहे. बाबूराव गोखले हे माधवराव जोशी यांच्या प्रवृत्तीचे नाटककार होत. पेल्यातील वादळ, करायला गेलो एक व संसार पाहावा मोडून ही त्यांची रंजनप्रधान नाटके होत.

मो. ग. रांगणेकर

मुक्ताबाई दीक्षित यांची जुगार, अवलिया व अंधारातून ही तीन सामाजिक नाटके नीटस रचना, सोज्वळ वातावरण व विलोभनीय व्यक्तिरेखन या गुणांनी वाचनीय व प्रेक्षणीय ठरली आहेत.

वि. वा. शिरवाडकर हे जितके कवी (कुसुमाग्रज) म्हणून प्रसिद्ध आहेत, तितकेच नाटककार म्हणूनही गाजले आहेत. त्यांनी दूरचे दिवे, दुसरा पेशवा, वजयंती, कौंतेय, राजमुकुट, वीज म्हणाली धरतीला, नटसम्राट, इ. नाटके लिहिली आहेत. त्यांची नाटके रंगभूमीवर यशस्वी झाली आहेत, तशीच भाषाविलासाच्या दृष्टीने वाचनीय व आस्वादनीयही ठरली आहेत. त्यांच्या नटसम्राट नाटकाला घडलेला माणुसकीचा स्पर्श इतउत्तर असाच निरंतर जाणवत राहिला तर एक अलौकिक नाट्यकर्तृत्व मराठी रंगभूमीवर आकारास येईल, असे माधव मनोहर म्हणतात.

पु. ल. देशपांडे हे विनोदी लेखक म्हणून प्रसिद्ध असले तरी, तुझे आहे तुजपाशी हे त्यांचे नाटक दिसायला विनोदी पण आशयाने गंभीर आहे. एका गांधीवादी आचार्याची शोकांतिका त्यांनी त्यात समर्थपणे उभी केली आहे. या त्यांच्या नाटकाला कमालीची लोकप्रियता लाभली अंमलदार, भाग्यवान, सुंदर मी होणार तुका म्हणे आता, ही त्यांची अन्य नाटके होत. ही नाटके जितकी प्रेक्षणीय, तितकीच वाचनीयही आहेत.

पु. भा. भावे यांनी विषकन्या, स्वामिनी, पडछाया, इ. काही सामाजिक नाटके लिहिली आहेत. ओजस्वी काव्यमय भाषा, चटकदार संवाद, रेखीव पात्रे व अंतर्बाह्य संघर्ष या गुणांनी त्यांच्या नाटकांना भरीवपणा व प्रभावीपणा प्राप्त झाला आहे.

प्रा. वसंत कानेटकर यांनी देवांचे मनोराज्य, प्रेमा तुझा रंग कसा, वेड्याचे घर उन्हात, रायगडाला जेव्हा जाग येते, तुझा तू वाढवी राजा, इथे ओशाळला मृत्यू, मत्स्यगंधा, अश्रूंची झाली फुले, घरात फुलला पारिजात, मला काही सांगायचंय, लेकुरे उदंड जाली, इ. बरीच ऐतिहासिक व सामाजिक नाटके लिहिली आहेत. आपल्या नाटकांतून कोणतेतरी एखादे प्रमेय ते मांडतात व अनेक घटना व पात्रे यांच्या आधारे ते उभे करतात. कानेटकरांची नाट्यरचना बांधेसूद असते आणि ती प्रेक्षकांना पकडून ठेवण्यात यशस्वी होते. काकासाहेब खाडिलकर यांच्या नंतर खुमासदार संवाद लिहिणारे नाटककार म्हणजे कानेटकर हेच होत. खाडिलकरांप्रमाणेच त्यांचेही नाटकांतील प्रणयप्रसंग खुमासदार आणि हृदयंगम असतात. रंगभूमीवर तर त्यांनी अमाप यश मिळविलेच आहे, पण त्यांची नाटके नुसती वाचली तरी त्यांतली रसवत्ता वाचकांना मंत्रमुग्ध करते.

कानेटकरांच्या मागून यशस्वी नाटककार म्हणून उल्लेख करावा लागतो, तो बाळ कोल्हटकर यांचा. त्यांनी मुंबईची माणसं, एखाद्याचे नशीब, आकाशगंगा, दुरितांचे तिमिर जावो, वाहतो ही दुर्वांची जुडी, वेगळं व्हायचंय मला, लहानपण देगा देवा, देव दीनाघरी धावला, ही नाटके लिहिली असून, त्यांतील बरीच प्रयोगदृष्ट्याही यशस्वी ठरली आहेत. प्रसंगामागून प्रसंग चढत्या श्रेणीने निर्माण करण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. त्यांची भाषा अनुप्रासयुक्त असून, ती बऱ्याच अंशी गडकऱ्यांच्या थाटाची आहे. त्यांच्या प्रत्येक नाटककृतीत एखादे तत्त्व मध्यवर्ती असते. त्यांचे कोणतेही हलकेफुलके नाटकसुद्धा शेवटी उदात्ततेच्या पातळीवर येते.

श्री. ना. पेंडसे यांनी आपल्या काही कादंबऱ्यांचीच नाटके बनविली असून, काही स्वतंत्रही लिहिलेली आहेत. राजेमास्तर, गारंबीचा बापू, असं झालं आणि उजाडलं, संभूसाच्या चाळीत, चक्रव्यूह, इ. त्यांच्या नाटकांची नावे आहेत. रंगभूमीवर प्रभावी ठरतील असे संवाद ते सहजपणे लिहितात. त्यांची नाटके समस्याप्रधान असून, ती वाचकांना आणि प्रेक्षकांना विचार करायला लावतात. एखाद्या समस्येच्या तळाशी खोल खोल जाणे हा त्यांच्या प्रतिभेचा विशेष होय.

शं. ना. नवरे यांनी देवदास, मन पाखरू पाखरू, घुम्मस, इ. काही नाटके लिहिली असून, त्यांपैकी काही रंगभूमीवर गाजलीही आहेत. त्यांचा दिनूच्या सासूबाई राधाबाई हा फार्सही लोकप्रिय ठरला आहे. यशस्वी फार्स लिहिणाऱ्यांत शाम फडके व बबन प्रभू यांचीही नावे उल्लेखनीय आहेत. पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी वऱ्हाडी मानसं, चंद्र नभीचा ढळला व कट्यार काळजात घुसली ही नाटके लिहिली असून, रंगभूमीवर त्यांचे प्रयोग गाजत आहेत. गो. गं. पारखी यांनी काही रहस्यात्मक नाटके लिहिली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेत. एखादी सामाजिक समस्या घेऊन नाट्यलेखन करणाऱ्यांत विजय तेंडुलकर, मधुकर तोरडमल आणि सुरेश खरे यांची नावे प्रामुख्याने दिसतात. विजय तेंडुलकर हे नवनाट्याचे पुरस्कर्ते आहेत. त्यांनी काही आधारित व काही स्वतंत्र अशी नाटके लिहिली आहेत. ते आपल्या प्रत्येक नाटकात काहीतरी नवा प्रयोग, नवी घाटणी आणायचा प्रयत्न करतात. श्रीमंत, माणूस नावाचे बेट, मधल्या भिंती, मी जिंकलो मी हरलो, गिधाडे, शांतता ! कोर्ट चालू आहे, इ. नाटके त्यांनी लिहिली आहेत. रत्नाकर मतकरी हेही समस्याप्रधान व गंभीर अशी नाटके लिहिण्यात सिद्धहस्त आहेत. मधुसूदन कालेलकर, हिरा-कांत कलगुटकर, दत्ता केशव, हे कौटुंबिक जिव्हाळ्याची हृदयस्पर्शी नाटके लिहिण्यात यशस्वी ठरले आहेत.

लीळाचरित्र होय. याची रचना म्हाइंभट्टाने इ. स. १२७६ मध्ये केली. पुढील काळात लिहिले गेलेले गुरुचरित्र, भक्त-लीलामृत, संतलीलामृत, इ. पद्यग्रंथ हीही चरित्रेच होत. रामदास स्वामींची एकाहून अधिक चरित्रे त्यांच्या शिष्य – प्रशिष्यांनी लिहिली. सभासदकृत शिवाजीमहाराजांची बखर हेही चरित्रच आहे. वरील चरित्रांतून चरित्रविषयक व्यक्तीला मानवकोटीतून देवकोटीत नेऊन बसवण्याची प्रवृत्ती आढळते. त्यामुळे ती विश्वसनीयतेच्या कसोटीस उतरत नाहीत.

इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर महाराष्ट्रीय लोकांना पाश्चात्य विद्या-कलांचा परिचय झाला आणि त्यातून चरित्र-लेखनाचा नवा आदर्श त्यांच्यापुढे आला. इथल्या विद्वानांनी पाश्चात्य पुरुषश्रेष्ठांची जी चरित्रे वाचली आणि जी त्यांना

वसंत कानेटकर



पुरुषोत्तम दारव्हेकर

विजय तेंडुलकर

विद्याधर गोखले यांनी पंडितराज जगन्नाथ (ऐतिहासिक), सुवर्णतुला (पौराणिक), मंदारमाला, मेघमल्हार, मदनाची मंजिरी, साक्षीदार, इ. काव्यमय व संगीत नाटके लिहून रंगभूमीच्या उत्कर्षाला हातभार लावला आहे.

नाटकाबरोबरच अलिकडे वग या लोकनाट्यप्रकारालाही उधाण आले आहे. असे अनेक वग आले आणि गेले. या सर्वांत यशस्वी आणि बहुत काल टिकलेले वगलेखक म्हणजे वसंत सबनीस, शंकर पाटील, शाहीर साबळे व दादु इंदूरीकर हे होत.

चरित्र – आत्मचरित्र – एखाद्या प्रिय व आदरणीय व्यक्तीच्या स्मृती भविष्यकालात चिरंतन राहाव्या व त्यांतून पुढील पिढीच्या लोकांना काही आदर्शभूत गोष्टींची प्रेरणा मिळावी, या सामान्य प्रवृत्तीतून चरित्रलेखनाच्या प्रथेचा जन्म झाला आहे. मराठीतील सर्वांत प्राचीन चरित्र म्हणजे चक्रवराचे

आवडली, त्यांची भाषांतरे करण्याचा उपक्रम त्यांनी केला. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे सॉक्रेटिसाचे चरित्र, महादेवशास्त्री कोल्हटकरांचे कोलंबसाचा वृत्तांत, वि. म. भिडे यांचा खुसरू राजाचा इतिहास, रा. गो. करंदीकरांचे बेंजामिन फ्रँकलीनचे चरित्र, वि. प. रानडे यांचे जॉर्ज वॉशिंग्टनचे चरित्र, इ. चरित्रे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झाली. इ. स. १८८१ साली वि. कों. ओक यांनी बालबोध नावाचे मासिक सुरू केले व त्यातील प्रत्येक अंकात एकेक अशी अनेक पाश्चात्य व एतद्देशीय लोकांची छोटी छोटी चरित्रे त्यांनी प्रसिद्ध केली.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी डॉ. जॉन्सन यांचे चरित्र लिहून भावी लेखकांसमोर चरित्रलेखनाचा आदर्श निर्माण करून ठेवला. तत्पूर्वी प्रसिद्ध झालेली इतर बहुतेक चरित्रे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भाषांतरित होती; पण चिपळूणकरांनी चरित्रकाराची माहिती अनेक ठिकाणांहून गोळा करून स्वतंत्रपणे चरित्ररचना केली. विष्णुशास्त्र्यांचे बंधू लक्ष्मणराव यांनी विष्णुशास्त्र्यांचे चरित्र लिहिले आणि ते लिहिताना विष्णुशास्त्रीरचित डॉ. जॉन्सनच्या चरित्राचाच आदर्श पुढे ठेवला.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीची काही वर्षे हा राजकीय व सामाजिक जागृतीचा उदयकाळ होता. या नव्या युगाचे प्रवर्तक न्या. रानडे, चिपळूणकर, टिळक, आगरकर, इ. थोर नेते होते. यांपैकी टिळक व रानडे यांची काही चरित्रे त्यांच्या हयातीतच निर्माण झाली. या राष्ट्रीय जागृतीचा परिणाम म्हणून काही पाश्चात्य देशभक्तांची चरित्रेही देशसेवेचा आदर्श लोकांपुढे ठेवण्याच्या उद्देशाने लिहिली गेली.

विष्णुशास्त्र्यांचा आदर्श व साक्षेप घेऊन काशीबाई कानिटकर यांनी डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र लिहिले. या ग्रंथात चरित्रनायिकेचे अंतरंगदर्शन घडविण्यासाठी काशीबाईंनी तिच्या खाजगी पत्रव्यवहाराचा उपयोग करून घेतला आहे.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या लेखांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेबद्दल अभिमान निर्माण होऊन काही लेखकांना प्राचीन कवींची चरित्रे लिहिण्याची प्रेरणा मिळाली. अशा लेखकांत ल. रा. पांगारकर यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागते. त्यांनी मोरोपंत, एकनाथ, ज्ञानेश्वर, तुकाराम व मुक्तेश्वर यांची चरित्रे लिहिली. असेच दुसरे एक संतचरित्रकार म्हणजे ज. र. आजगांवकर होत. त्यांनीही आपल्या कविचरित्रमालेतून अनेक संतचरित्रे लिहिली. त्यानंतरचा या बाबतीतला व्यासंगपूर्ण प्रयत्न प्रा. न. र. फाटक यांचा होय. त्यांनीही एकनाथ, ज्ञानेश्वर व रामदास यांची विवेचक चरित्रे लिहिली. लो. टिळकांच्या मृत्यूनंतर न. चिं. केळकर यांनी तीन भागांत टिळकचरित्र लिहिले. त्यापुढच्या काळात न. र. फाटकांनी लिहिलेले न्या. रानडे चरित्र, ग. र. हवलदार यांनी लिहिलेले वि. ना. मंडलिक यांचे चरित्र, दा. ना. आपटे यांनी लिहिलेले सयाजी महाराजांचे चरित्र, ग. गं. जांभेकर यांनी लिहिलेले बाळशास्त्र्यांचे चरित्र, इ. चरित्रग्रंथ निर्माण झाले. वरील सर्व ग्रंथ अतिव्याप्त स्वरूपाचे, पसरट व विस्कळित असल्याचे अ. न. जोशी यांनी म्हटले आहे. शि. ल. करंदीकरांचे सावरकरचरित्र मात्र पद्धतशीर मांडणीचे आहे, असे जोशी म्हणतात.

इ. स. १९२० सालानंतर देशात म. गांधींच्या राजकारणाचे युग सुरू झाले. या काळात गांधींची व गांधीयुगातील राजकीय पुढारी नेहरू, मालवीय, सुभाषचंद्र, इ. राष्ट्रसेवकांची लहान-मोठी बरीच चरित्रे निर्माण झाली. या सर्वांत दा. न. शिखरे यांनी लिहिलेले म. गांधींचे चरित्र निःपक्षपाती व तटस्थ वृत्तीने लिहिलेले आहे. इतर चरित्रांत ही वृत्ती दिसत नाही.

प्राचीन संतकवींच्याप्रमाणे अर्वाचीन प्रसिद्ध ग्रंथकार गडकरी, फडके, खांडेकर, अत्रे, हरिभाऊ आपटे, यांच्या चरित्राचा व वाङ्मयाचा आढावा घेणारी कित्येक पुस्तके निर्माण झाली आहेत. चरित्रात्मक व वाङ्मयात्मक असे त्यांचे दुहेरी स्वरूप असल्यामुळे त्यांचा निखळ चरित्रात अंतर्भाव होण्यासारखा नाही. गं. दे. खानोलकर व शं. के. कानेटकर या दोघांनी माधव ज्यूलियन यांची वेगवेगळी चरित्रे लिहिली. इ. स. १९५९ साली द. न. गोखले यांनी डॉ. केतकरांचे चरित्र लिहिले. हे चरित्र म्हणजे एका थोर व काहीशा जगावेगळ्या साहित्यसेवकाचे अंतरंगदर्शन घडवणारे व त्यांच्या कार्याचे महत्त्वमापन यशस्वी रीत्या करणारे ठरले आहे. इ. स. १९६१ साली कविवर्य रवींद्रनाथ ठाकूर यांची जन्मशताब्दी भारतभर साजरी झाली. त्या निमित्ताने वि. स. सुखटणकर, गोपीनाथ तळवलकर, गं. दे. खानोलकर व बा. भ. बोरकर यांनी त्यांची चरित्रे लिहिली. काळकर्ते परांजपे यांचे चरित्र त्यांच्या नातवाने लिहिले व लक्ष्मणराव किर्लोस्करांचे चरित्र शं. वा. किर्लोस्कर यांनी लिहिले. अ. म. जोशी यांनी वडिलांचे सेवेसी या नावाने आपले वडील व चुलते यांची चरित्रे लिहिली. ही सर्व नातेवाइकांनी लिहिलेली चरित्रे होत. वा. ग. भावे यांचे विष्णुदास भावे, का. ह. खाडिलकरांचे नाट्याचार्य खाडिलकर, दुर्गा भागवतांचे राजारामशास्त्री भागवत, गार्गी भाटवडेकरांचे सर भालचंद्र भाटवडेकर ही चरित्रेही नातेवाइकांच्याच हातून लिहिली गेली आहेत. नातेवाइकांनी लिहिलेल्या चरित्रांपैकी आणखी एक चरित्र म्हणजे पुरुषोत्तमराव गोडसे यांचे. ते त्यांची नात कु. विद्या गोडसे यांनी लिहिले आहे. त्याचे नाव आहे लक्ष्मीनारायणाच्या छायेत पुरुषोत्तम. या चरित्राविषयी म. म. पोतदार लिहितात बाबासाहेबांच्या (गोडसे) भव्य कर्तृत्वाच्या सर्व रेषा या चरित्रचित्रात ठळकपणे उमटल्या आहेत.

विविध प्रकारची साधनसामुग्री गोळा करून चरित्र शक्य तितके साधार व प्रमाणभूत करण्याच्या प्रवृत्तीतून अलिकडे काही चरित्रे निर्माण झाली आहेत. त्यांत ब. मो. पुरंदरे व दि. वि. काळे यांनी लिहिलेली शिवाजीमहाराजांची चरित्रे आणि पु. बा. कुलकर्णी यांची नाना शंकरशेट व मामा परमानंद ही चरित्रे उल्लेखनीय आहेत. याच व्यासंगी वृत्तीने म. श्री. दीक्षित यांनीही काही ऐतिहासिक व्यक्तींची चरित्रे लिहिली आहेत.

थोर पुरुषांची चरित्रे हा मानवजातीचा एक अमोल ठेवा आहे. महान तत्त्वज्ञ, मुत्सद्दी, ग्रंथकार, समरधुरंधर आणि कलावंत यांची चरित्रे भावी पिढ्यांना दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या पावलांचा मागोवा घेत, त्यांच्या जीवन-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कार्यापासून स्फूर्ती घेत, मानवजात आपल्या विकासाची वाटचाल करीत असते. त्यामुळे चरित्रलेखनाचा हेतू उघड आणि स्पष्ट आहे; पण आत्मचरित्राचे तसे नाही. आत्मचरित्र कोणी लिहावे, याविषयी नियम कोण घालून देणार? आत्मचरित्र लिहिणारी व्यक्ती कोणी असामान्य असते, असेही सर्व ठिकाणी आढळत नाही; आणि असामान्य विभूती आत्मचरित्र लिहितीलच याचीही शाश्वती नाही. एखादा सामान्य माणूसही आपले जीवनवृत्त रंजकपणे सांगू शकेल. त्यामुळे आत्मवृत्ताचे प्रयोजन काय? हा प्रश्न विचार करण्यासारखा ठरतो. गतगोष्टीच्या प्रस्तावनेत न. चिं. केळकर आत्मवृत्तलेखनाचे एक कारण देतात, ते असे —'कोणतेही काम करून आलेल्या माणसाला त्या कामाचा वृत्तांत साद्यंत संकलित असा कोणाला तरी सादर करावयाचा असतोच. काही काही यात्रेकरू आपल्या यात्रेची वर्णने लिहितात. त्याचप्रमाणे आत्मचरित्रे लिहिणारे आपल्या जीवनप्रवाहाचा किंवा यात्रेचा वृत्तान्त लिहितात, असे म्हणण्याला काय हरकत आहे?'

बाबा पदमनजी

पण ही यात्रेकरूची भूमिका फारच थोडया आत्मचरित्रकारांनी स्वीकारली आहे. बऱ्याचशा आत्मचरित्रकारांनी आपल्या आत्मवृत्तांतून एका उभ्या पिढीच्या जीवनाचा इतिहास सांगण्याचा इरादा व्यक्त केला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे आत्मवृत्त, श्री. म. माटे यांचे आत्मवृत्त व कऱ्हेचे पाणी हे आचार्य अत्रे यांचे आत्मवृत्त ही याची उदाहरणे होत. आत्मचरित्राची सुरुवात कुठून करावी, याबाबतही आत्मचरित्रलेखकांनी वेगवेगळी धोरणे अंगिकारली आहेत. आपल्या जीवनातील कोणत्या घटनांना किती महत्त्व द्यायचे आणि कोणत्या घटनांचा किती तपशील द्यायचा, याचे अवधानही सर्वांनाच राखता आलेले नाही.

आत्मचरित्रात चरित्रकाराने आपले जीवन यथातथ्य पुढे मांडावे अशी अपेक्षा असते; पण सर्वच चरित्रकारांना स्वतःविषयीचे निर्भेळ सत्य सांगणे शक्य होत नाही. एक तर, त्यांच्या स्मरणशक्तीला मर्यादा असतात. आणि दुसरे म्हणजे, आयुष्यात जे आणि जसे घडले ते आणि तसे सांगणे सर्वच लेखकांना इष्ट वाटत नाही. शिवाय, सत्य मोकळेपणाने कथन करण्याचे धैर्यही बहुतेकांच्या ठिकाणी नसते. याविषयी श्री. बाळ सामंत लिहितात, ते असे —

आत्मचरित्र लिहिणे ही एक प्रकारे तारेवरची कसरत असते, असे मानावे लागेल. कारण आपले आत्मचरित्र लिहिताना हयात व्यक्ती अथवा त्यांचे नातलग किंवा पक्षपाती हे निर्भीड सत्यकथनामुळे दुखावतील अशी भीती वाटत असते. राजकीय क्षेत्रात वावरणाऱ्या व्यक्तींना या बाबतीत विशेष काळजी घ्यावीशी वाटते. या काळजीपायी एखाद्या विशिष्ट घटनेच्या संदर्भात आपले व्यक्तिमत्त्व कसे प्रखर आणि निष्कलंक राहिले होते, हे सांगण्याचा मोह न आवरून स्वतःभोवती एक वलय निर्माण करण्याच्या भरात सत्याचा महाविपर्यास घडण्याची शक्यता फार असते. देशाच्या राजकीय जीवनात आघाडीवर असणाऱ्या व्यक्तीला तर एखाद्या विशिष्ट देशहितकारक निर्णयाच्या प्रसंगी आपण त्या घटनेला अथवा निर्णयाला कसे प्रेरक होतो हे खुलवून सांगण्याचा मोह न आवरणे फार कठीण आहे. त्यामुळे अशा आत्मवृत्तांत सत्याचा संपूर्ण आविष्कार झाला आहे, असे खात्रीलायक म्हणता येणार नाही.

मराठी संतकवींनी प्रसंगोपात्त आपल्या अभंगांतून अथवा अन्य काव्यांतून स्वतःविषयी तुरळक असे आत्मपर उल्लेख केले असले, तरी मराठी गद्य वाङ्मयात पेशवेपूर्वकालात कोणी आत्मचरित्र लिहिल्याचा पुरावा सापडत नाही. मराठीतले पहिले आणि अत्यंत महत्त्वाचे आत्मवृत्त म्हणजे नाना फडणिसांचे. आपल्या जन्मापासून स्वतःला फडणिशी मिळेपर्यंतचा आत्मवृत्तांत नानांनी यात सांगितला आहे. त्यानंतरचे दुसरे आत्मवृत्त गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचे. गोडसे भटजींनी जरी उत्तर भारताचे प्रवासवर्णन लिहिले असले, तरी त्यातही आत्मवृत्तपर मजकूर बराच आहे. जुन्यापैकी आणखी एक महत्त्वाचे आत्मचरित्र म्हणजे वासुदेव बळवंत फडके यांचे. याची माहिती श्री. अ. का. प्रियोळकर यांनी दिली आहे. दादोबा पांडुरंग यांनी लिहिलेल्या आत्मचरित्राविषयी श्री. अ. का. प्रियोळकर लिहितात— 'दादोबांचे हे आत्मचरित्र त्यांच्या वैयक्तिक माहितीपेक्षाही त्यांच्या काळाच्या माहितीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.' दामोदरपंत चाफेकर यांनीही आत्मचरित्र लिहिले आहे.

महाराष्ट्रातील ख्रिस्ती धर्मप्रचारक श्री. बाबा पदमनजी यांचे आत्मवृत्त अरुणोदय या नावाने १८८४ साली प्रसिद्ध झाले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वरील दोघांच्या नंतर महर्षी कर्वे यांचे आत्मवृत्त, धर्मानंद कोसंबी यांचे निवेदन, सी. ग. देवधरांचा जीवनवृत्तान्त, माधवराव बागल यांचे बंधनात आणि कर्मवीर शिंदे यांचे माझ्या आठवणी आणि अनुभव ही आत्मचरित्रे प्रसिद्ध झाली. ही सगळी समाजसुधारकांची आत्मचरित्रे होत. मराठीतील ही समाजसुधारकांची चरित्रे वाचताना एक गोष्ट ध्यानी येते, की उत्तम, बांधेसूद, ललितरम्य असे आत्मवृत्त एकानेही लिहिलेले नाही, असे श्री. बाळ सामंत म्हणतात.

विठ्ठल रामजी शिंदे

महाराष्ट्रात राजकारणी पुरुषांची आत्मचरित्रे हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच सापडतील. जी आहेत त्यांमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांची माझी जन्मठेप व आत्मवृत्त ही दोन पुस्तके महत्त्वाची ठरतात. अंदमानमधील कारावासातल्या अद्भुतरम्य आणि रोमहर्षक अनुभवांचे चित्तथरारक चित्रण जन्मठेपमध्ये केलेले आहे. वीर, रौद्र आणि भयानक रसांचा आविष्कार असणारी अशा तऱ्हेची आत्मचरित्रे फारच थोडी सापडतील. सावरकरांची भाषाशैली ओजस्वी आणि धारदार आहे. त्यांची प्रसंगवर्णने तर जिवाचा ठावच घेतात. या आत्मचरित्रात सावरकरांचे तेजःपुंज व्यक्तिमत्त्व सर्वार्थाने प्रकट झाले आहे.

न. चिं. केळकर यांनी गतगोष्टी या नावाने मोठे आत्मचरित्र लिहिले आहे. 'केळकरांच्या लेखनाचा झपाटा मोठा व त्याचा कंटाळा नाही; पण एक सलग, शिस्तबद्ध, बांधेसूद आत्मवृत्त लिहिण्यात केळकर फारसे यशस्वी झाले नाहीत, असे श्री. बाळ सामंत म्हणतात. केळकरांच्या नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात अग्रभागी असणाऱ्या न. वि. गाडगिळांचे आत्मविषयक लेखन मात्र फारच सरस आहे. पथिक या नावाने त्यांनी आत्मवृत्त लिहिले आहे. त्याचप्रमाणे इतरही अनेक निबंधांतून आत्मचरित्रविषयक अनेक प्रसंग व अनुभव त्यांनी काव्यात्म वृत्तीने, विनोदी पद्धतीने आणि खेळकरपणाने ग्रथित केले आहेत.

विदर्भातील प्रख्यात पुढारी डॉ. ना. भा. खरे यांचे आत्मवृत्त त्यांच्या आग्रही मनोवृत्तीवर पूर्ण प्रकाश टाकणारे आहे. श्री. ना. ग. गोरे यांची कारागृहाच्या भिंती व शंख आणि शिंपले ही आत्मवृत्तपर पुस्तके होत. ललितरम्य लेखनाचा तो एक उत्तम नमुना आहे. संवेदनाक्षम आणि काव्यात्म अशा वृत्तीने या पुस्तकांत जी चित्रे रेखाटली आहेत, ती वाचकांना वेगळयाच वातावरणात नेतात आणि अंतर्मुख होऊन विचार करायला लावतात. श्री. एस्. एम्. जोशी यांनी लिहिलेल्या बालपणच्या आठवणी साध्या, सरळ आणि अकृत्रिम वाटतात. गंगाधरराव देशपांडे यांनी माझी जीवनकथा या नावाने आपले चरित्र लिहिले आहे. गंगाधररावांची भाषा जितकी प्रांजळ तितकीच कणखर आहे. चांगल्या आत्मचरित्रांत या जीवनकथेचा समावेश अवश्य करता येईल. यांच्याच प्रभावळीतले श्री. पुंडलिकजी कातगडे यांनीही आपले विस्तृत आत्मवृत्त नुकतेच प्रसिद्ध केले आहे.

मराठीतील पहिले वहिले ठळक असे साहित्यकाराचे आत्मवृत्त म्हणजे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे; दुसरे चरित्रचंद्र हे ल. रा. पांगारकर यांचे. पांगारकरांच्या अघळपघळ व्यक्तिमत्त्वाची साक्ष या ग्रंथात पानोपानी दिसते. त्याची भाषा प्रसादपूर्ण असल्यामुळे ते चटकदार झाले आहे.

आधुनिक साहित्यिकांपैकी ना. सी. फडके यांची माझ्या साहित्यसेवेतील स्मृती व माझे जीवन–एक कादंबरी, तसेच ग. त्र्यं. माडखोलकर यांची दोन तपे व एका निर्वासिताची कहाणी या आत्मपर पुस्तकांचा उल्लेख अवश्य केला पाहिजे. या दोन साहित्यिकांच्या तुलनेने जुन्या पिढीतील ना. गो. चापेकर यांची जीवनकथा व काका कालेलकर यांची स्मरणयात्रा ही आत्मचरित्रे प्रामाणिक आणि मनमोकळी वाटतात. श्री. म. माटे यांचे आत्मचरित्र चित्रपट या नावाने प्रसिद्ध झाले आहे. त्यात तत्कालीन पुणे, पुण्याचे विद्यार्थिजीवन, त्या वेळचे विद्वान प्राध्यापक इत्यादींच्या चित्रणाबरोबरच त्यांनी केलेले अस्पृष्टांच्या वसतीतील समाजकार्य याचाही इतिहास आलेला आहे.

एक अष्टपैलू लेखक आचार्य अत्रे यांचे मी कसा झालो हे वाङ्‌मयीन आत्मवृत्त सरस उतरले आहे. कवी, विडंबनकार, विनोदी लेखक, शिक्षक, पत्रकार, नाटककार, पटकथाकार, वक्ता, राजकारणी, इ. एकाच व्यक्तीची भिन्न भिन्न रूपे चित्रित करणारा हा इतिहास अत्र्यांनी आपल्या प्रासादिक भाषेने आणि वेधक शैलीने कमालीचा रंजक केला आहे. मी कसा झालो या ग्रंथाचे विस्तृत आणि व्यापक रूप म्हणजे त्यांचे खंडशः प्रसिद्ध झालेले कऱ्हेचे पाणी हे आत्मवृत्त होय.

के. ना. वाटवे, कृ. पां. कुळकर्णी, कृ. भा. बाबर, वि. द.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घाटे या साहित्यिक, तशाच शिक्षणक्षेत्रातल्या नामवंत व्यक्ती होत. या सर्वांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत. त्यांत दिवस असे होते हे वि. द. घाटे यांचे आत्मचरित्र अत्यंत आगळे आणि सरस ठरते. त्यांच्या प्रस्तावनेत घाटे लिहितात– ही माझी जीवनकहाणी. बाहेरच्या आणि आतल्या जीवनाची कहाणी. बाहेरचे जीवन त्यात येईलच. सारे नाही पण बेताचेच. पण त्याबरोबर बरेचसे आंतरजीवन तिच्यामधून प्रगट व्हावे अशी माझी इच्छा आहे.' घाटयांच्या या आत्मकथेला बंदिस्तपणा नाही; पण काव्यात्मवृत्ती आणि घोटीव भाषाशैली या गुणामुळे या आत्मवृत्ताला अवीट गोडी आली आहे. त्यातही बाह्य जीवनापेक्षा त्यांचे आंतरजीवनाचे चित्रण अधिक सरस उतरले आहे.

महाराष्ट्रातील अनेक थोर कलावंतांनी आपली आत्मवृत्ते लिहून नाट्य, संगीत, चित्रपट, इ. कलांचा इतिहास बोलका केला आहे. श्री गोविंदराव टेंबे यांची माझा संगीतव्यासंग व माझा जीवनविहार ही दोन आत्मचरित्रे त्यांचा स्वतःचा जीवनपट तर उलगडून दाखवतातच, शिवाय संगीतक्षेत्रातल्या अनेक बुजुर्गांचाही परिचय करून देतात.

गणपतराव बोडस यांचे माझी भूमिका हे आत्मवृत्त होय. त्यात मराठी रंगभूमीचा एक कालखंड चित्रित झाला आहे. वसंत शांताराम देसाई यांचे मखमलीचा पडदा हे पुस्तक आत्मपरच आहे. बालगंधर्वांसह अनेक कलावंतांच्या गमतीदार आठवणी व चटकदार आख्यायिका आत्मवृत्ताच्या बरोबरीने यात आल्या आहेत. त्यामुळे या ग्रंथाला एक विलक्षण मोहकता आली आहे.

काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेले बहुरूपी हे चिंतामणराव कोल्हटकर यांचे आत्मचरित्र होय. मराठी भाषेतील एक श्रेष्ठ आत्मवृत्त म्हणून बहुरूपीची योग्यता वादातीत आहे. या आत्मवृत्तात अनेक नाटककारांच्या आणि नटांच्या व्यक्तिरेखाही आल्या आहेत. चित्रपटक्षेत्रात वावरणाऱ्या व्यक्तींत केशवराव भोळे, शांताराम आठवले, ग. दि. माडगूळकर, सी. रामचंद्र, यांनी आपापली त्रोटक व विस्तृत अशी आत्मवृत्ते लिहिली आहेत. या सर्वांत बाबुराव पेंढारकर यांचे चित्र आणि चरित्र अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण ठरेल. त्यांची भाषा प्रसन्न आणि ओघवती आहे. चित्रपटनिर्मितीच्या क्षेत्रात केलेले नवे नवे प्रयोग, रंगभूमीवर पदार्पण, त्यातल्या भूमिका वठवण्यासाठी केलेले परिश्रम यांचे साद्यंत वर्णन बाबुरावांनी आपल्या आत्मचरित्रात कथन केले आहे.

अगदी अलिकडे प्रकाशित झालेली दोन आत्मचरित्रे म्हणजे आनंद सांघले यांचे मातीची चूल आणि सेतुमाधवराव पगडी यांचे जीवनसेतू ही होत. सांघले यांच्या आत्मचरित्रात प्रामाणिक सत्यकथन असले, तरी त्यांनी जे स्वच्छंद विलासविहार केले, त्यांचा वाचकांच्या दृष्टीने काय उपयोग? किंबहुना असले आत्मचरित्र लिहायला हवे होतेच का? असा प्रश्न उत्पन्न होतो. प्रा. फडके यांच्या आत्मचरित्राविषयीही असेच म्हणता येईल. सेतुमाधवराव पगडी यांचा जीवनसेतू मात्र अगदी वेगळ्या आणि अपरिचित वातावरणात घेऊन जातो. त्यांच्या जीवनात काही तरी सांगण्यासारखे आहे, हे नक्की. प्रस्तुत ग्रंथाविषयी त्यांनी एका भाषणात म्हटले आहे, ते असे–'ज्याची सदसद्विवेकबुद्धी स्वच्छ नाही तो आत्मचरित्र लिहू शकणार नाही. माझ्या आत्मचरित्रातील प्रांजळपणा कितपत यशस्वी झाला, हे वाचकांनीच ठरवावे. यातून माझे व्यक्तिमत्त्व व त्या वेळच्या समाजाची पार्श्वभूमी रंगविण्याचा मी प्रयत्न केला आहे. माझ्या आत्मचरित्रात हैद्राबादमध्ये मराठी भाषेवर जे गंडांतर आले होते, त्याचा उल्लेख मी मुद्दाम केला आहे. त्या काळात 'मराठी वाचवा' अशी परिस्थिती मराठवाड्यात होती. माझ्या आत्मचरित्रात या युगाची व्यथा मी सांगितली आहे.'

थोर पुरुषांच्या पत्नींनी लिहिलेली आत्मवृत्ते हा मराठी वाङ्मयाचा अमोल ठेवा आहे. न्या. रानडे यांच्या पत्नी रमाबाई रानडे यांनी लिहिलेले आमच्या आयुष्यातील काही आठवणी हे पुस्तक म्हणजे केवळ रमाबाईंची आत्मकथा नसून, त्यात न्या. रानडे यांचे हृदयंगम स्वभावचित्र रेखाटलेले आहे. त्यांच्या नंतर लक्ष्मीबाई टिळक यांची स्मृतिचित्रे येतात.

लक्ष्मीबाई टिळक

आपल्या स्मृतिचित्रात लक्ष्मीबाईंनी एका मुलखा–वेगळ्या, तऱ्हेवाईक पण प्रेमळ अशा पतीचे जे स्वभावचित्र रेखाटले आहे, ते अत्यंत मनोज्ञ आहे. जीवनात जे जे भोगावे लागले त्याला धीराने, पण हसत खेळत तोंड देऊन परिस्थितीशी समरस होणाऱ्या एका वत्सल स्त्रीचे दर्शन या स्मृतिचित्रांतून घडते. भाषा आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रतिपादन या दृष्टीने तर ही स्मृतिचित्रे अजोडच ठरतील.

पार्वतीबाई आठवले यांच्या माझी कहाणी या आत्मवृत्तात एका अशिक्षित स्त्रीने कर्तबगारीच्या बळावर केवढी वरची पायरी गाठली, त्याचे उद्बोधक चित्रण आढळते. आनंदीबाई कर्वे यांचे माझे पुराण अतिप्रांजळ आणि मनमोकळे आहे. महर्षि कर्वे हे त्यांचे पती. त्यांच्या कार्यात सहभागी होऊन त्यांनी ज्या ज्या धडपडी केल्या, त्यांची कथा या पुराणात निस्संकोचपणे सांगितली आहे. कमलाबाई देशपांडे यांनी स्मरण-साखळी या नावाने आत्मचरित्र लिहिले आहे. लीलाबाई पटवर्धन यांचे आमची अकरा वर्षे हे आत्मवृत्त सरस उतरले आहे. माधवराव पटवर्धनांच्या सहवासात घालवलेली संसाराची अकरा वर्षे त्यांनी आपल्या पुस्तकात रेखाटली आहेत. माधव ज्यूलियन यांच्या स्वभावावरही या पुस्तकाने खूपच प्रकाश टाकला आहे.

. अन्नपूर्णाबाई रानडे, इंदिराबाई भागवत, गिरिजाबाई केळकर, राधाबाई आपटे, सत्यभामाबाई सुखात्मे, यशोदाबाई जोशी आणि चित्रपटव्यवसायातील सुप्रसिद्ध अभिनेत्री हंसा वाडकर यांनीही आत्मचरित्रे लिहिली आहेत.

निबंध – आधुनिक मराठी वाङ्मयाचे ऐतिहासिक दृष्ट्या मूल्यमापन करताना त्याचे तीन कालविभाग पडतात, ते असे –

इ. स. १८१८ ते १८७४ हा पहिला कालखंड, इ. स. १८७४ ते १९२० हा दुसरा कालखंड आणि इ. स. १९२० ते आजतागायत हा तिसरा कालखंड.

इंग्रजांच्या राज्यामुळे व इंग्रजीच्या प्रसारामुळे महाराष्ट्राच्या विचारात आणि जीवनात जी स्थित्यंतरे वेगाने होऊ लागली होती, त्याचे अस्पष्ट प्रतिबिंब दर्शविणारे निबंधवाङ्मय या पहिल्या कालखंडात निर्माण झाले.

बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, म. ज्योतिबा फुले, लोकहितवादी, बाबा पद्मनजी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, रा. भि. गुंजीकर, इ. अनेक निबंधकार या काळात झाले. त्यांपैकी साहित्यक्षेत्रात लोकहितवादी व सामाजिक क्षेत्रात फुले यांची नावे अद्यापिही घेतली जातात. आगरकर व हरिभाऊ आपटे यांच्या आधी किती तरी वर्षे लोकहितवादींनी विधवांच्या दुःस्थितीने दुःखी होऊन त्यांच्या पुनर्विवाहाचा पुरस्कार केला होता. त्याविषयी त्यांचा एक उतारा असा–

मला तर असे वाटते की, स्त्रियांचे दुःख इतके भारी आहे, की त्यांची स्मृती झाली तर रोमांच उभे राहतात आणि आईबापांस दुःखाचे पर्वत पडतात, आणि दुष्काळात पाऊस पडत असता राहतात. अरेरे ! हा अनुभव घरोघर आहे, इतके असून जुन्या काळचीही समजूत दृढ बसली आहे की, आपली पोरे आपण मारतात. हे ब्राह्मण लोक आपल्या मुली मारल्यापेक्षा अधिक दुःखात ठेवतात. त्या दुःखास पारावर नाही. अद्यापि या सुधारणेविषयी उलटे बोलणारे आहेत; परंतु जसा व्याध रानात माजला तर सर्वजण जाऊन मारतात, तसे या उलट बोलणारांचा लोक धिःकार का करीत नाहीत ? व याविषयी एकमत का होत नाही ? बारा, पंधरा वीस, तीस वर्षांच्या पोरींचे गळे कापतात हे पाहून अंतःकरण खवळून न जावे काय ? ही मूर्ख समजूत पडून गेली आहे. स्त्रियांनी पुनर्विवाह केला म्हणून त्यात काय तुमचा नामोश झाला ? तुमच्या पोरी, बहिणी सुखेकरून नांदतील, हल्ली जो कल्होळ दृष्टीस पडतो तो पडणार नाही. पोरे आणि बाळे घेऊन पतीशिवाय काय काय उपास तापास, दुःखे या विधवा भोगतात ? परंतु भले हिंदू हो, धन्य तुमची ! तुम्हीच आपल्या मुलींचे खाटीक स्वस्थपणाने होता. तुमच्या सारिखे राष्ट्र आणि तुमच्यातील विद्वानांसारखे विद्वान यांस तुलना पृथ्वीवर कोठेही मिळणार नाही हेच खरे.

लोकहितवादी देशमुख

म. ज्योतिबा फुले यांची प्रकृती समाजसुधारकाची होती. त्यांच्या निबंधांत तीव्र तळमळ दिसते; पण प्रतिभा किंवा साहित्य यांचा फारसा आढळ होत नाही. फुल्यांची अशी धारणा होती, की शूद्रातिशूद्रांच्या ज्ञानाच्या व उत्कर्षाच्या आड ब्राह्मण समाज येत असून, देशातून त्यांचे वर्चस्व कमी होईल, त्या वेळी शूद्रातिशूद्रांना ज्ञानाचा व उत्कर्षाचा मार्ग मोकळा होईल. त्या अनुरोधाने त्यांनी आपले सडेतोड लेखन केले आहे. त्यांच्या इशारा या निबंधातला एक उतारा असा –

शेकडो वर्षे भट राजांनी प्रजेवर वाकेतोपर्यंत कराचे ओझे लादून कोटयवधि रुपये घरांत टाकिले; परंतु त्याचा एक छदाम तरी ईश्वराला स्मरून तिच्या कल्याणाकडे लावावयाचा होता ! हरहर ! प्रजेपासून वसूल केलेल्या पैशांचा ज्या रीतीने त्यांनी व्यय केला ती सांगण्यास आम्हांस लज्जा वाटते. त्यांनी आपले जातीच्या भट लोकांकरितां जागोजागीं देवाची संस्थानें स्थापन करून तेथें त्यांजकरितां अन्नछत्रें घातली. प्रजेकडून पैसा वसूल झाला की लागलीच ब्राह्मणभोजनप्रीत्यर्थ अमुक संस्थानाकडे दोन लक्ष रुपये, अमुक संस्थानाकडे पन्नास हजार, येणे प्रमाणे ठराव

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करून पैसा वाटून घ्यावा आणि दररोज पर्वतीसारख्या संस्थानावर आज काय, फक्त ब्राह्मणांस तूप-पोळीचें जेवण व वर दहा दहा रुपये दक्षणा, आज काय ब्राह्मणांस लाडूचे जेवण व वर वीस रुपये दक्षणा, आज ब्राह्मणांस केशरी भाताचे जेवण व वर ओगराळे भरून रुपये प्रत्येकास दक्षणा. याशिवाय कित्येक ब्राह्मणांस शालजोडया, कित्येकांस पागोटी, कित्येकांस धोतरजोडे, कित्येकांस वर्षासन देण्याच्या नेमणुका, अशा रीतीने दररोज ब्राह्मणांस यथेच्छ भोजन, वर रगड दक्षणा. घालून देण्यात व बक्षिसे देण्यात प्रजेस अति दुःख होऊन वसूल केलेल्या सर्व पैशांची नासाडी करून टाकली होती.

या काळातल्या निबंधवाङ्मयाविषयी श्री. वि. स. खांडेकर लिहितात, ते असे-- इ. स. १८७४ पूर्वीच्या बहुतेक निबंधकारांच्या दृष्टीने लेखन हे ज्ञानप्रसाराचे व समाजसुधारणेचे एक साधन होते. या एकाच दृष्टीने हे लेखक लिहीत गेले. तरवारीला साधी मूठ असली काय किंवा रत्नजडित मूठ असली काय, शत्रूशी लढताना महत्त्व असते ते तिच्या धारेचे, अशीच जणू काही त्यांची कल्पना होती. त्यामुळे आपला विचार नटवून, सजवून, फुलवून किंवा साहित्यगुणांत घोळवून सांगण्याचा प्रयत्न करणारा निबंधकार त्या काळात जवळजवळ झालाच नाही, असे म्हटले तरी चालेल.

दुसऱ्या कालखंडाचा प्रारंभ विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्यापासून होतो. या काली त्यांनी आपली निबंधमाला सुरू केली आणि निबंधलेखनात एक क्रांतीच घडवून आणली. अव्वल दर्जाच्या इंग्रजी निबंधात आढळणारा विचारगुण व वाङ्मयगुण यांचा संगम त्यांच्या लेखनात उत्कृष्ट रीतीने प्रथमच व्यक्त झाला. त्यांचे निबंध तत्कालीन वाचकांना जितके प्रेरक तितकेच मोहकही वाटले. विस्तार, विकास व विलास या तीन्ही दृष्टींनी त्यांनी मराठी निबंधाचे स्वरूप इतके पालटून टाकले, की या लढाईवर जाण्याकरिता फुरफुरणाऱ्या अरबी घोडयापुढे पूर्वीचा निबंध हरदासी तट्टासारखा वाटू लागला, असे श्री. वि. स. खांडेकर म्हणतात. संस्कृतविद्येची उपयुक्तता या विष्णुशास्त्र्यांच्या निबंधातील एक परिच्छेद असा –

इतिहासाच्या योगाने आपणांविषयी व इतर राष्ट्रांविषयी यथार्थ ज्ञान वाचकांस होते. आपली मोठी मानवजाति जी साऱ्या भूमंडळावर पसरली आहे, व एकेक राष्ट्र केवढेंहि ज्ञानसंपन्न किंवा थोर असलें तरी तें जिचा केवळ एक कोपरा असतें, तिचे सर्वांशीं जेव्हां पर्यालोचन करावे तेव्हांच तिचें एकंदर खरें स्वरूप लक्षांत येतें. मनुष्यस्वभावाच्या नित्य व शाश्वत स्वरूपापासून त्याचें आगंतुक म्हणजे देशकालविशेषजन्य स्वरूप निवडता येण्यास अर्थात् असेंच एकंदर सर्व राष्ट्रांचें मनानें आकलन झालें पाहिजे. असो, तेव्हां मनाचा दृक्प्रदेश वाढवून कोणत्या समजुतींपासून व भ्रमांपासून इतिहास त्यांस मुक्त करितो, व

विष्णुशास्त्री चिपळूणकर

आपणांविषयीं व इतरांविषयीं यथार्थबुद्धि मनांत आणून देऊन इतरांशी सलोख्यानें वागण्यास तो आपणांस शिकवितो हाहि त्याच्या अध्ययनानें होणारा एक मोठा लाभ आहे.

लोकमान्य टिळक हे जसे लोकाग्रणी, थोर देशभक्त, वैदिक वाङ्मयाचे संशोधक व गीतेचे श्रेष्ठ रहस्यकार म्हणून ओळखले जातात, तसेच ते मराठी भाषेचे अव्वल दर्जाचे निबंधकार म्हणूनही ओळखले जातात. टिळकांनी मुख्यत्वे केसरीतून निबंधलेखन केले. त्यांचे केसरीतले निबंध शेकडयांनी मोजावे लागतील. राजकारण, अर्थकारण, धर्मकारण, समाजकारण, तत्त्वज्ञान, चरित्र, काव्य, भाषा, शिक्षण, संशोधन अशा अनेक विषयांवर त्यांनी निबंधलेखन केले आहे, त्याच्याविषयी श्री. वि. पां. दांडेकर लिहितात –

मनोरंजनाच्या किंवा कलाविलासाच्या दृष्टीने आपले लेख टिळकांनी न लिहिता मतप्रचारार्थ व लोकशिक्षणार्थ लिहिले असले, तरी त्यांची तळमळ व त्यांचा जिव्हाळा ही इतकी पराकोटीची होती, की त्यांच्या साध्या बोलांना साहित्याचे स्वरूप येई. अग्रलेखांना त्यांनी जे मथळे दिले आहेत, त्यांवरून ही गोष्ट प्रत्ययास येईल. ‘ प्रिन्सिपॉल, पशुपाल कीं शिशुपाल ?,’ ‘ नवी विटी नवे राज्य,’ ’ हे आमचे गुरुच नव्हेत,’ ‘ सरकारचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डांके ठिकाणावर आहे काय ?' इत्यादी मथळे व्यंगार्थाने ओतप्रोत भरलेले आहेत. टिळकांच्या भाषाशैलीत निश्चयी वाक्ये, जोरदार विशेषणांच्या मालिका, सुबोध विवेचन, माफक उपमारूपकादी अलंकार, बेताचा विनोद, मार्मिक संस्कृत सुभाषितेही असत.

लो. टिळकांच्या शिवजयंतीचा राष्ट्रीय उत्सव या निबंधातील एक परिच्छेद असा –

शिवजयंतीच्या उत्सवाच्या स्वरूपाबद्दल हा प्रकार झाला. आता सदर उत्सव आम्ही कशाकरिता करावा याबद्दल थोडासा खुलासा करणे जरूर आहे. ज्या शूर पुरुषांनी आपल्या देशाचें नांव इतिहासांत अजरामर केलें, किंवा ज्यांनीं आपल्या कर्तबगारीनें आमच्यांत अद्याप कांहीं पाणी आहे असें जगास दाखविलें त्यांच्या कृत्यांचे कितीहि अभिनंदन केले तरी त्यांच्या ऋणांतून सर्वस्वीं मुक्त होणें कठीण आहे. श्री शिवछत्रपतींचा उत्सव करण्यांत त्यांजबद्दलची वर सांगितलेल्या प्रकारची आपल्या अंगीं वसत असलेली कृतज्ञताबुद्धि हेंच मुख्य कारण होय. ज्याप्रमाणें आम्ही आपल्या वाडवडिलांचे स्मरण कायम ठेवून त्याच्या योगें आपल्या घराण्याचा पूर्वापार चालत आलेला लौकिक राखण्याचें एक साधन करून ठेवितो, तद्वतच राष्ट्रांतील महापुरुषांचे स्मरण हे राष्ट्रीयत्व कायम राहण्यास एक चांगले साधन आहे. एकराष्ट्रीयत्व म्हणजे कांहीं दृश्य पदार्थ नव्हे हो एक प्रकारची कल्पना असून, ती सतत जागृत ठेविली तरच ती टिकण्यासारखी आहे; व ज्या ज्या राष्ट्रांनी ती कायम राखिली आहे त्यांनी आपल्या ऐतिहासिक थोर पुरुषांच्या इतिहासाची या कामी योग्य मदत घेतली, असें थोड्या विचारांती कोणाच्याही लक्षांत येईल. सर्व लोकांस आदरास पात्र झालेल्या जितक्या अधिकाधिक वस्तु असतात त्या मानानें एकराष्ट्रीयत्वाची कल्पना अधिकाधिक दृढ होत जाते हे तत्त्व निर्विवाद आहे; व राष्ट्राचे जे खरे हितकर्ते आहेत ते अशीच कांहीं रचना करितात कीं, त्यामुळें सर्वांचीं अंतःकरणें एका गोष्टीकडे लागून लोकांस आपण एका राष्ट्रांतील व्यक्ति आहों असें वाटूं लागावें. श्रीरामदासस्वामींनीं 'मराठा तेवढा मिळवावा' असा जो उपदेश केला आहे त्यांतील बीज हेंच होय. कोणत्याहि लोकांचे राष्ट्र बनण्यास त्या सर्व लोकांस पूज्य अशा कांहीं वस्तु असाव्या लागतात; व देशकालानुसारें अशा कांहीं गोष्टी लोकांपुढे मांडणें हेंच प्रत्येक देशाभिमान्यांचें कर्तव्य आहे.

लो. टिळकांच्या बरोबरीने ज्यांचे नांव निबंधकार म्हणून घेतले जाते, ते म्हणजे गोपाळ गणेश आगरकर हे होत. आगरकर हे समाजसुधारणेला राजकीय सुधारणेच्या आधी स्थान देत. त्यांनी सुधारक नावाचे एक साप्ताहिकच चालवले होते. आपल्या समाजातील दुष्ट आणि कालबाह्य चालीरीतींचे ते सात्त्विक संतापाने वर्णन करू लागले, की त्यांच्या त्या भावनोत्कटतेला एकदम वाङ्मयस्वरूप प्राप्त होई. श्री. वि. ह. कुलकर्णी म्हणतात – प्रचंड श्रोतृसमाजापुढे आणीबाणीच्या प्रसंगी, प्रक्षुब्ध वातावरणात एखाद्या श्रोत्याच्या चित्तवृत्ती तल्लीन करून सोडण्याकरिता एखादा धुरीण वक्ता ज्या थाटात भाषण करतो त्या थाटात आगरकर लिहिण्यास जेव्हा प्रवृत्त होतात, तेव्हा त्यांच्या लिखाणात उत्कृष्ट वक्तृत्वातील सर्व गुण एकत्रित झालेले आढळून येतात.

गोपाळ गणेश आगरकर

'वाचालमंद मुघारकांनो,' 'विषयलंपट निःशक्त वाचाल बाबूंनो,' 'हे भीषण, बीभत्स, अमंगळ हिंदुधर्मा,' 'निर्दय वंचका' इ. संबोधनसमूहाने युक्त अशा वाक्यपंक्ती आगरकरांच्या निबंधातून सर्वत्र विखुरलेल्या आढळतात. त्यांच्या निबंधातील एक परिच्छेद असा –

जगातील प्रत्येक गोष्ट ईश्वरकृत असा ठाम व स्थूल सिद्धांत ठोकून दिला म्हणजे जगांतील प्रत्येक अन्याय न्यायस्वरूप आहे असे म्हणावे लागते. "हे असे का ?" हा प्रश्न विचारला की "देवाची इच्छा" असे उत्तर मिळते; व अशा प्रकारे बेधडक नास्तिक्याने जशी अनवस्था प्राप्त होण्याचा संभव असतो तसेच बेधडक आस्तिक्यानेही तोच प्रसंग ओढवतो व मनुष्य हे केवळ नशीबाच्या हातातील बाहुले आहे असे मानावे लागते. सत्ताधारी लोकांना सर्व माणसांची अशी स्थिति असावी असे वाटते. आणि म्हणूनच जगाच्या इतिहासात सर्वत्र धर्म हा सत्तेचा गुलाम होऊन राहिलेला आहे, असे आढळून येते. तेव्हा प्रपंचाची उभारणी करावयाची ती अशा अज्ञात आणि कदाचित् अज्ञेय अशा तत्त्वावर करून मनुष्यकर्तव्य हे अगदी शून्यत्वावर आणून सोडणे हा मार्ग प्रगतीचा नव्हे. प्रगतीच्या मार्गाला प्रपंचाची गाडी लावावयाची असेल तर त्याची उभारणी आशा आणि प्रयत्न या तत्त्वावर झाली पाहिजे व मनुष्याने आपले आचरणाचे ध्येय जगात सुख अधिक करणे, आपली, आपल्या शेजाऱ्याची, आपल्या देशाची, किंबहुना सर्व जगताची स्थिती सर्वतोपरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुधारणे, असे ठेवले पाहिजे. या ध्येयाची परिपूर्ती करण्यात त्याचे एक आयुष्य खरोखर अपुरे पडणार आहे. अर्थात अज्ञात गोष्टीवर ज्ञानाच्या साहाय्याने प्रकाश पाडून त्या ज्ञात करण्याचा उद्योग त्याने नेहमी चालू ठेवला पाहिजे.

पांडित्य व लालित्य यांचा सुरेख संगम साधून मराठी निबंधाला विदग्ध वळण लावण्याचे श्रेय चिपळूणकरांच्या खालोखाल आगरकरांनाच दिले पाहिजे.

काशिनाथ नारायण साने यांना विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या सहवासामुळे इतिहास या विषयाची गोडी लागली. त्यांनी काव्येतिहाससंग्रह नामक मासिक सुरू करून त्यात अनेक ऐतिहासिक कागदपत्रांचे संपादन केले व छोटे मोठे तेवीस ग्रंथ लिहिले. महाराष्ट्रात इतिहासाविषयीची जिज्ञासा त्यांनीच वाढवली.

प्रस्तुत कालखंडात निबंधाचा अनेक मुखांनी विस्तार झाला. निबंधाच्या अनेक शाखाही विकसित झाल्या. महादेव शिवराम गोळे यांनी हिंदुधर्म व सुधारणा हा प्रबंध लिहून समाजशास्त्राचे निर्भय व स्वतंत्र असे प्रकट चिंतन केले. तो ग्रंथ अभ्यसनीय तर आहेच, शिवाय आकर्षक भाषाशैलीने नटलेलाही आहे.

वासुदेवशास्त्री खरे हे हाडाचे इतिहाससंशोधक; पण त्यांच्या ठिकाणी निबंधकाराचीही प्रज्ञा होती. मराठे व इंग्रज या न. चिं. केळकर यांच्या ग्रंथाला त्यांनी जी प्रस्तावना लिहिली आहे, तो एक उत्कृष्ट निबंधच आहे. त्यातला एक परिच्छेद असा–

आमचा पुणे-सातारा इंग्रजांनी का घेतला आणि त्यांचा मद्रास-कलकत्ता आम्ही का घेऊ शकलो नाही, याचा संक्षेपाने विचार केला. देशाभिमानशून्यता, समूहरूपाने कार्य करण्याची नालायकी, स्वार्थसाधनाची बेसुमार हाव, आळस, हेळसांड इत्यादी दुर्गुण आमच्या अंगी जे खिळले आहेत तेच आमच्या राज्यनाशाला कारण झाले आहेत. असल्या दुर्गुणांनी खिळखिळे झालेले कोणतेही पौरस्त्य राष्ट्र सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांशी विरोध प्राप्त झाला असता टिकाव धरू शकत नाही. हिंदुस्थान जर इंग्रजांनी घेतले नसते तर फ्रेंचांनी घेतलेच असते. प्रवाहात पडलेली भांडी एकमेकांवर आदळली असता त्यांतले कोणते फुटावयाचे, मातीचे की लोखंडाचे हे ठरलेलेच आहे. हल्लीचा काळ असा आहे की, आम्ही पाश्चात्त्यांची बरोबरी तरी करावी, नाही तर त्यांचे मजूर तरी होऊन राहावे. राजकारण, उद्योगधंदे, कलाकौशल्य, भौतिकशास्त्रांचा उपयोग, प्रत्येक गोष्टीत हीच स्थिती आहे. जर आम्हांस पाश्चात्यांची बरोबरी करण्याची हिंमत असेल तर या लेखात वर्णिलेले आमचे दुर्गुण आम्ही टाकले पाहिजेत. पूर्वी स्वराज्य होते ते या दुर्गुणांमुळे गेले, हे समजून जर आम्ही सावध झालो नाही तर, नवीन स्वराज्य मिळूनसुद्धा व्यर्थच आहे. हाच इतिहासडिंडिमाचा घोष प्रत्येकाच्या कानी घुमत राहिला पाहिजे.

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे हेही महान इतिहाससंशोधक होत. त्यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने या नावाचे बावीस खंड प्रसिद्ध केले आहेत. या खंडांना राजवाड्यांनी ज्या प्रस्तावना जोडल्या आहेत, त्यांची गणना उत्कृष्ट निबंधांतच करावी लागेल. ते अभिजात साहित्य ठरते. त्यातले विवेचन मुद्देसूद, तर्काधिष्ठित व नवविचारपरिप्लुत आहे. त्यांची भाषा तेजस्वी, प्रौढ व शुद्ध आहे. मराठ्यांचा इतिहास हा त्यांच्या अंतरात नुसता इतिहास न राहता तो ऊर्जस्वल तत्त्वज्ञान बनतो. पुढील उताऱ्यावरून या गोष्टीचा प्रत्यय येईल–

वासुदेवशास्त्री खरे

वि. का. राजवाडे

शिवाजीच्या कारकीर्दीत रामदासस्वामींनी नीतिमत्तेचा, देशाभिमानाचा, परस्पर विश्वासाचा व राजनिष्ठेचा धडा घालून दिला, तो इ. स. १६४६ ते १६८० पर्यंत शिवाजीने, शिवाजीच्या मुत्सद्यांनी व शिवाजीच्या सरदारांनी मनोभावाने गिरविला. पुढे संभाजी गादीवर येऊन त्याने करू नयेत अशी अनन्वित कृत्ये केली. त्याची फळेही तो लौकरच पावला. परंतु त्याच्या गैदी व तामसी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्तनाने वडिलोपार्जित स्वराज्य औरंगजेबाच्या हातात बहुतेक गेल्यासारखेच झाले. शिवाजीने, रामदासाने व तत्समकालीन मुत्सद्यांनी व सरदारांनी घालून दिलेला नीतिमत्तेचा, देशाभिमानाचा, परस्पर विश्वासाचा व राजनिष्ठेचा धडा पुढील पिढी कितपत गिरविते ह्याची परीक्षा या वेळी झाली. राजारामाने देशत्याग केला. शाहू शत्रूच्या हातात सापडला, सर्व स्वराज्य मोंगलांनी पादाक्रांत केले व औरंगजेबाने नाना प्रकारची आमिषे दाखविली; परंतु या संकटपरंपरेतील एकाचीही पर्वा न करता ह्या पुढील पिढीतील मुत्सद्यांनी व सरदारांनी स्वातंत्र्यार्थ लढण्याची पराकाष्ठा केली व स्वातंत्र्य मिळविण्याचा पण शेवटास नेऊन आपले पुढारपण व श्रेष्ठत्व सार्थ करून दाखविले. ह्यावरून लक्षात एवढेच घ्यायचे, की जाज्वल्य नीतिमत्ता आपला गुण सहसा विसरत नाही. आता ह्या नीतिमत्तेच्या धड्याच्या जोडीला दुसऱ्या बाजीरावाच्या वेळची नीतिमत्ता अथवा अनीतिमत्ता घ्या. औरंगजेबाच्या वेळी ज्या राष्ट्रातील पुढाऱ्यांनी स्वातंत्र्यार्थ जीवापाड मेहनत घेतली, त्याच राष्ट्रातील मंडळी बाजीरावाच्या वेळी केवळ स्तब्ध व उदासीन राहिली. रामदासी व भार्गवरामी धड्याचे हे असे वेगवेगळे परिणाम झाले.

मात्र वरील सर्व वाङ्मयसेवकांचे ऋण मान्य करूनही या कालखंडातला निबंध चिपळूणकर–आगरकरांनंतर परांजपे-केळकरांनी घडविला असे, वि. स. खांडेकर म्हणतात.

शि. म. परांजपे यांची देशभक्ती जितकी प्रखर तितकीच कल्पनाशक्ती पल्लेदार. त्यांनी मुख्यत्वे तत्कालीन राजकीय परिस्थितीवर आपल्या काळ पत्रातून लेखन केले. तथापि त्यातील वाङ्मयगुणांच्या विपुलतेमुळे त्यांच्या कित्येक निबंधांना चिरंतनत्व लाभले आहे. श्री. वि. स. खांडेकर म्हणतात– ' परांजपे जसे पंडित तसे रसिकही होते. पारतंत्र्यावर प्रहार करणाऱ्या तलवारीची मूठसुद्धा रत्नजडित असली पाहिजे, असे मानण्याइतके रसिक होते. '

दिल्लीचे तख्त आणि भाऊसाहेबांचा घण, एका खडी फोडणाऱ्याची गोष्ट, अर्जुनाचा वेडेपणा, ध्रुवाची गोष्ट खोटी असली पाहिजे, रायगडावरील संपत्ती, शिवाजीचे पुण्याहवाचन, भासाची भवितव्यता, इ. त्यांचे राजकीय व वाङ्मयीन निबंध आजही पूर्वीइतकेच ताजे आणि टवटवीत वाटतात. त्यांच्या ' शिवाजीची एक रात्र ' या निबंधातील एक परिच्छेद असा–

हे ताऱ्यांनो, तुम्हांला गुप्त रीतीने एकत्र जमा होण्याची ही हातोटी किती तरी छान साधली आहे ! तुम्ही इतके जण येथे जमला, पण कोठे एक पाऊल तरी वाजले आहे का ? किंवा कोठे थोडासा तरी गलबला झाला आहे का ? किती गुपचुप पद्धत. इतक्या गुप्त रीतीने तुम्ही वावरता यावरून तुमच्यावर फारच कडक जुलूम चाललेला असला पाहिजे ! रात्रीच्या अंधारात तुम्ही लपून छपून येथे येता यावरून दिवसास तुम्हांला एकमेकांपाशी, आपली अंतःकरणे मोकळी करून आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी सांगण्याची सक्त मनाई असली पाहिजे ! अरेरे! इतक्या जाचात तुम्हांला ठेवणारा असा कोणता तरी राजा तुमच्यावर जुलूम करीत आहे ? आमची, या पृथ्वीतलावरील लोकांची, पुराणादिकांतील गोष्टीवरून साधारणपणे अशी समजूत झालेली आहे, की नरकलोक खाली आहे आणि स्वर्गलोक वर आहे. पण छे, छे ! वरदेखील गुलामगिरीचा नरकलोक आहेच असे दिसते. तुमच्यावर कोणता जुलमी राजा जुलूम करीत आहे ?–सांगा, सांगा, मला तुम्ही त्याचे नाव निर्भयपणाने सांगा. माझ्याबद्दल तुम्हांला यत्किंचितही शंका नको. मी काही कोणी जुलमी राजांच्या जुलमाला मदत करणारा गुप्त हेर नव्हे. उलट मी तुमच्यासारखाच दुसऱ्या एका जुलमी राजाच्या जुलमाने गांजलेला प्राणी आहे. तुम्ही ज्या स्वतंत्रतेच्या प्राप्तीसाठी गुप्त बेत करण्याकरिता या ठिकाणी एकत्र जमले आहा, त्याच स्वतंत्रता देवीचा मीही एक उपासक आहे.

शिवराम महादेव परांजपे

अच्युत बळवंत कोल्हटकर हे शिवरामपंतांच्याच परंपरेतले व्यासंगी पत्रकार व निबंधकार होते. राजकारण हा काही केवळ गंभीर चर्चेचाच विषय नाही, तर त्याला विनोदाचीही एक बाजू असते, हे प्रथम अच्युतरावांच्या संदेश या वृत्तपत्राने लोकांना जाणवून दिले. त्यांची कल्पकता अपूर्व होती. त्यामुळे त्यांच्या निबंधांत जितके वैचित्र्य आढळते, तितके इतर कोणाच्याही निबंधांत आढळणार नाही. जिजा, तू का रडतेस, नाटक झाले जन्माचे, हे तात्या आणि हे तात्या, द्रौपदीवस्त्रहरण, पुणेरी जोडे, कुडबुड्या जोशी, बंगालचा गुलाब, बायकोचे दागिने, शेम शेम पुराण, प्राणनाथ, काय आज्ञा आहे, माधवाश्रमात शिवाजी, इ. लेख अच्युतरावांच्या कल्पकतेचे कागदी पुरावेच होत. चटकदारपणा हा त्यांचा मुख्य गुण.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांच्या माधवाश्रमात शिवाजी यानिबंधातील परिच्छेद असा–

एकदा माधवाश्रमात शिवाजी अचानक रीतीने प्रकट झाला. त्यामुळे प्रथमतः घाटी लोक फार घाबरले. कुणाला वाटले, की हा आता पुन्हा आपल्याला लढाईवर घेऊन जाणार! आपण कसे सुखाने भांडी घाशीत व गिरण्या फिरवीत बसलो आहो! आता ह्या भांडी घासण्याच्या सुखाला व गिरण्यातल्या सुखकर काबाडकष्टांना आम्ही मुकणार! आता आमच्या बायकांच्या मजुऱ्या व खानावळी बंद होणार! काही मराठे म्हणाले, की आम्ही नुकतेच शिवस्मारकाची लढाई खेळत आलेले आहोत. पण हा शिवाजी म्हणणार, की ही लढाई हवी कशाला? आता हा शिवाजी आमच्यातली सगळी भांडणे बंद करणार व आम्हांला आपल्या पाठीमागे ओढणार! आता आम्ही भांडावे कशासाठी? शिवाजी आल्यामुळे इतिहासकारांची तोंडे गोरी-मोरी झाली. त्यांना भय वाटले, की आता हा मारवाडी विश्वविद्यालयात लेक्चर देणार व घडलेले सर्व सांगत सुटणार! ह्या इतिहासकारांना खरा इतिहास नको होता. त्यांना स्वतःचे सिद्धान्त जगापुढे आणावयाचे होते. शिवाजी माधवाश्रमात आला हे समजल्या बरोबर बँकांवर रश झाला. वॉर लोनचे भाव एकदम उतरले. त्यांतही काही लोकांनी अशी बातमी उठविली, की सरकारचे कर्ज नाकबूल करण्याचा ठराव शिवाजी प्रथम हातात घेणार आहे. ह्यामुळे तर जो तो येईल त्या भावाने वॉर बांड विकीत सुटला. माधवाश्रमात शिवाजी उतरला, त्याच सुमारास इकडे जमनादास मेहता यांच्या पोटात कळ उठली. त्यांच्या मुद्रेवरून हे स्पष्ट दिसत होते, की आपल्याला कौन्सिलात कोण जाऊ देणार, ह्याची त्यांना चिंता पडलेली होती. 'तुरुंगाचे दारात' हे नाटक पाहत असता मला जी डुलकी आली त्या अवधीत हे सगळे स्वप्न मला पडले होते. मी जागा होऊन पाहातो तो पडदा पडला व जाग्रण न होता मी घरी निजायला गेलो.

चिंतामणराव विनायक वैद्य हे महाभारताचे व्यासंगी अभ्यासक म्हणून ओळखले जातात. महाभारताचा उपसंहार हा त्यांचा ग्रंथ प्रदीर्घ अभ्यासातूनच निर्माण झाला आहे. इतरही अनेक विषयांवर त्यांनी निबंधलेखन केले आहे. त्यांचे बहुतेक निबंध संशोधनात्मकच आहेत. प्राचीन मराठी वाङमयाचा व ते लिहिणाऱ्या ज्ञानेश्वरादी संतकवींचा मोठेपणा आणि वेगळेपणा सांगताना त्यांनी बारा ते पंधरा या शतकांत निर्माण झालेल्या संस्कृत वाङमयाशी त्याची तुलना केली आहे. या काळातले संस्कृत वाङमय म्हणजे विकृत आणि केवळ कारागिरीने युक्त असे होते. त्या दृष्टीने तत्कालीन मराठी संतवाङमय हे नीती व अध्यात्म यांना पोषक असल्यामुळे तत्कालीन संस्कृत वाङमयापेक्षा ते श्रेष्ठ दर्जाचे आहे, असे वैद्यांनी विवेचन केले आहे.

चिं. वि. वैद्य

डॉ. अ. ना. देशपांडे यांच्या मते मराठी वाङमयाच्या विकासाच्या दृष्टीने जिला खरोखर असामान्य म्हणता येईल अशी एक महत्वाची कामगिरी डॉ. केतकरांच्या हातून पार पडलेली आहे. महाराष्ट्राला दिलेली समाजशास्त्रीय दृष्टीची दीक्षा ही ती कामगिरी होय. भारतीय समाजशास्त्र या ग्रंथात त्यांच्या समाजशास्त्रीय विचारांचे परिणत आणि संकलित प्रतिपादन आलेले आहे. महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचा प्रस्तावनाखंड हा केतकरांचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा आहे. या प्रस्तावना खंडावरून त्यांच्या सूक्ष्म आणि मर्मग्राही पांडित्याची प्रतीती येते. प्राचीन महाराष्ट्र हा त्यांचा ग्रंथ त्यांच्या समाजशास्त्रीय दृष्टीन केलेल्या व्यासंगाचा आणि प्रतिभाशालित्वाचा साक्षात्कार घडविणारा आहे. महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण या त्यांच्या लहानशा ग्रंथातही त्यांच्या स्वतंत्र विवेचनशक्तीची साक्ष पटते.

श्री. व्यं. केतकर

राजारामशास्त्री भागवत यांचाही लौकिक सुधारक म्हणूनच होता. त्यांनी अनेक नियतकालिकांतून आपले निबंधलेखन प्रसिद्ध केले. राजवाडे आणि डॉ. केतकर यांच्याप्रमाणेच त्यांचेही व्यक्तिमत्त्व बंडखोर व काही अंशी विक्षिप्त होते. ते कोणत्याही प्रश्नाचा सांप्रदायिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पद्धतीने विचार न करता तो स्वतंत्रपणे करीत. त्यांच्या निबंधलेखनात मार्मिकपणा, युक्तिवाद व चिकित्सक वृत्ती हे गुण आढळतात.

प्रस्तुत कालखंडातले मूर्धाभिषिक्त निबंधकार म्हणजे न. चिं. केळकर हे होत. ते जितके विचारप्रिय तितकेच कल्पकही होते. त्यांच्याविषयी श्री. वि. स. खांडेकर लिहितात— त्यांची कल्पकता विजेसारखी नसून, चांदणीसारखी आहे. जीवनाशी संबद्ध असलेल्या सर्व लहानमोठ्या विषयांविषयी रुची असणे, त्यांचे शक्य तेवढे अधिक ज्ञान मिळविण्यात आनंद वाटणे, ते ज्ञान आपल्या वाचकांपर्यंत सुंदर रीतीने पोचविण्यात रस घेणे आणि वाचकाला उद्दीपित अथवा प्रभावित करण्याऐवजी विचारप्रवृत्त करणे हे केळकरांच्या निबंधलेखनाचे विशेष होत.

साहित्यसम्राट न. चिं. केळकर

या विशिष्ट गुणांमुळेच सर्वसामान्य वाचकाची ज्ञानसंपत्ती व विचारशक्ती त्यांनी वृद्धिगत केली. केळकरांइतके विपुल निबंधलेखन दुसऱ्या कोणी केले नाही, तसेच त्यांच्याइतक्या विविध विषयांवरही अन्य कोणी लिहिले नाही. केळकरांनी पांडित्याला प्रसन्नतेची जोड दिली आणि लालित्याने निबंधाला मोहक रूप देता देता त्या प्रसाधनात त्याचा मूळ हेतू लोपवून टाकू नये अशी दक्षता घेतली. चिपळूणकरांनी प्रवर्तित केलेल्या निबंधाला नव्या कालाला अनुरूप असे स्वरूप देण्यात केळकरांचे चातुर्य दिसून येते. साहित्यसम्राट म्हणून त्यांचा जो गौरव झाला त्याला मुख्यतः त्यांचे निबंधलेखनच कारणीभूत आहे. वाङ्मय म्हणजे काय या केळकरांच्या निबंधातला एक परिच्छेद असा —

वाङ्मयाला नैतिक प्रबंध म्हणणे म्हणजे साखरभाताला नुसत्या साखरेचा भात आहे, असे म्हणण्यासारखे आहे. देवळाचे उंच शिखरच सुंदर का, तर ते आकाशात ईश्वर आहे असे उंच बोट करून दाखवते म्हणून, असे म्हणणे बरोबर होईल काय ? ताजमहालाच्या पांढऱ्या शुभ्र दगडात जी रंगीबेरंगी कुसर बसविलेली आहे, तिचा नैतिक हेतु काय असणार? पोहायला उतरलेला माणूस जलक्रीडा करतो, ती स्नानाच्या हेतूने नव्हे. शिकारी क्षत्रिय अरण्यात मृगयाविलास करतो, तो काही एक दिवस चांगले मांस खावयास मिळावे म्हणून नव्हे. गवई दीपक राग आळवितो तो काही आर्थिक दृष्ट्या मशालजीचा खर्च वाचावा म्हणून नव्हे. कलेच्या दृष्टीने वाङ्मय सुंदर असून त्यातूनच नीतिबोध निघेल तर दुधात साखर पडेल; पण ज्याचा मूळ हेतू नीतिबोध नाही ते वाङ्मयच नव्हे असे म्हणणे बरोबर नाही. अशी काही स्थळें असतात, की ज्यांच्या पलीकडे जाऊन हेतूची पृच्छाच करता येत नाही. हा रस्ता कोठे जातो तर अमुक गावाला असे सांगता येते, पण थेट गावाशी गेल्यावर हा गाव कोठे जातो, असे विचारणाऱ्याला काय सांगावे ? ईश्वरभजन हे मोक्षासाठी असते असे म्हणता येईल; पण मोक्षाचा हेतू काय याचे उत्तर कसे देता येईल ? वाङ्मयकला ही तशीच आहे. तिचा हेतू व तिचे फल ही एकच असतात, दोन नसतात.

पां. स. साने ऊर्फ साने गुरुजी हे म. गांधींच्या प्रभावळीतले एक सत्पुरुष होत. भावनाप्रधानता हा त्यांचा स्वभावधर्म होता. ज्ञानाच्या खाणीतले सुवर्णकण वेचावे आणि सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोचवावे, ही त्यांची तळमळ अत्यंत तीव्र होती. ज्ञानपिपासू विद्यार्थी, समाजाचे अज्ञान पाहून विव्हल होणारा सुधारक आणि उच्च जीवनमूल्ये ही केवळ विचाराकरिता नसून आचाराकरिता असतात अशी श्रद्धा बाळगणारा संत यांचे विलक्षण मिश्रण साने गुरुजींच्या व्यक्तित्वात झाले होते, असे श्री. वि. स. खांडेकर म्हणतात. या मिश्रणाचे प्रतिबिंब त्यांच्या इतर वाङ्मयाप्रमाणेच निबंधांतही पडले आहे. भारतीय संस्कृती हा त्यांचा निबंधसंग्रह सुप्रसिद्ध आहे. रसाळ शैली, उच्च विचारसरणी व उत्कट जिव्हाळा हे तीन्ही गुण त्या निबंधांत प्रकर्षाने प्रकट झाले आहेत. त्यांच्या निबंधातला एक परिच्छेद असा —

संपत्ती मिळवावयाची आहे, मिळव. परंतु उत्तम व्यवहाराने. कोणाला फसवू नकोस. लुबाडू नकोस. चोरीमारी करू नकोस.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गरिबाला पिळू नकोस. फार फायदा घेऊ नकोस. फार व्याज घेऊ नकोस. दुसऱ्या देशातील लोकांना दारू पाजून पैसे नको मिळवू: दुसऱ्या देशातील लोकांना तरवारीच्या धारेखाली अफू खायला देऊन पैसे मिळवू नकोस. दुसऱ्या देशातील लोकांना बेकार करून त्यांचे उद्योग-धंदे मारून त्यांना गुलाम करून पैसे मिळवू नको. दुसऱ्याला नाडून स्वतः नको नटू. दुसऱ्याची घरे पाडून स्वतःच्या माड्या नको बांधू. दुसऱ्याला रडवून स्वतः नको हसू.

साने गुरुजी

असे धर्म सांगतो. हळूहळू तुम्हांला प्रगतीकडे धर्मस्थापनेचे नर घेऊन जात असतात. धर्म, अर्थ, काम, मोक्ष. अर्थ आणि काम यांच्या आरंभी धर्म आहे व अंती मोक्ष आहे. मनुष्याचा प्रयत्न मोक्षासाठी आहे. मोक्ष म्हणजे मोकळेपणा, आनंद. मोक्ष म्हणजे दुःखापासून सुटका. मोक्ष म्हणजे परम सुख, केवळ शांती. हा मोक्ष मिळवण्यासाठी मानवाची धडपड आहे. हा मोक्ष कसा मिळेल ? वासना–विकारांचा गोळा असा जो हा दुबळा मानव, त्याला ही परम शांती कशाने मिळेल ?

अर्थ आणि काम ह्यांच्या पाठीशी धर्म हवा. आधी धर्माचे अधिष्ठान. धर्माच्या पायावर अर्थ–कामाची मंदिरे बांधा. अर्थ आणि काम यांच्या सांगाती जर धर्म असेल, तर तेच अर्थ – काम सुखकर होतील; बद्ध करणारे न होता मुक्त करणारे होतील. अर्थ आणि काम यांच्यातही अर्थाला प्राधान्य. कारण अर्थ नसेल तर कोठला काम ? खायला, प्यायला नाही तर मी मरेन. मग कामोपभोग कोठला ? अर्थ म्हणजे कामाची साधने. अर्थाशिवाय काम–वासना, निरनिराळ्या विषय–भोगेच्छा कशा तृप्त होणार ? द्रव्याशिवाय सर्व फुकट. धनधान्याशिवाय काम तडफडून मरेल.

पं. श्री. दा. सातवळेकर हे विशेषेकरून वैदिक निबंधकार आहेत. आर्य संस्कृतीला आधारभूत अशा जीवनमूल्यांवर त्यांनी साधार प्रकाश टाकलेला आहे. त्यांचे अत्रिऋषींचा कारागृहवास, लक्ष्मीचा एकच प्रश्न व वामनावताराचा संदेश हे निबंध उल्लेखनीय आहेत.

ज. स. करंदीकर यांनी केसरी पत्रामधून बहुमोल व विपुल निबंधलेखन केलेले आहे. राष्ट्रीय जीवनाशी तादात्म्य, सडेतोडपणा, संस्कृत वचनांचा समर्पक उपयोग, विषय समजावून सांगण्याचे कौशल्य, इ. त्यांचे गुण उल्लेखनीय आहेत. त्यांच्या लेखनपद्धतीवर लो. टिळकांच्या लेखनशैलीची छाप स्पष्टपणे दिसते.

मर्मभेद हा ग. वि. केतकर यांचा राजकीय निबंधसंग्रह आहे. पाकिस्ताननिर्मिती आणि रा. स्व. संघावरील बंदी हे दोन मुख्य विषय त्यात चर्चिलेले आहेत. तर्कशुद्ध विवेचन हे त्यांचे वैशिष्ट्य होय. त्यांच्या लेखणीची मर्मभेदकता पाहायची असेल तर, आधी फाशी मग चौकशी हे त्यांचे तीन लेखांक अवश्य वाचावे. श्री. म. (एस. एम.) जोशी यांनी राजकीय कार्यकर्त्याच्या भूमिकेवरून जे निबंधलेखन केले ते ऊर्मी या संग्रहात प्रसिद्ध झालेले आहे. या निबंधांतून त्यांची ध्येयवादी आणि चिंतनशील मनोवृत्ती प्रकट झालेली आहे. दादा धर्माधिकारी यांचे निबंधलेखन मराठी निबंधाची वैचारिक बाजू



श्री. दा. सातवळेकर

समृद्ध करणारे आणि एका नव्या सामर्थ्य लेखनशैलीची ओळख करून देणारे आहे. क्रांतिनिष्ठा या त्यांच्या निबंधसंग्रहात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांनी सर्वत्र आपली विधायक विचारशीलता व्यक्त केली आहे.

न. वि. गाडगीळ हे चुरचुरीत लेखन करण्यात फार पटाइत होते. सालगुदस्त, अनगड मोती, माझा येळकोट, इ. त्यांच्या निबंधसंग्रहांत नाना प्रकारच्या चटकदार चिजा आहेत. कथा, शब्दचित्र, निबंध इत्यादींचे मिश्रण त्यांच्या लेखनात आढळते. मात्र ते मूलतः निबंधकारच आहेत. त्यांची वृत्ती काहीशी मिस्किल व कोपरखळ्या देणारी आहे. शैली खुसखुशीत व खुमासदार आहे. त्यांचा संस्कृत भाषेचा व्यासंग त्यांच्या निबंधलेखनात अनेक ठिकाणी दिसतो. कुठल्याही विषयावर ते लिहीत असले तरी त्यात लालित्य सहजपणे येऊन जाते. त्याचा येळकोट राहीना या त्यांच्या निबंधातला एक परिच्छेद असा –

काही माणसे जन्मतःच मोठी असतात, काही माणसे पराक्रम व परिस्थिती यांमुळे मोठी होत जातात, काहींच्या वर वज्राघात व्हावा तसा मोठेपणा येऊन कोसळतो आणि काही बेभानपणे पतंगदीपकन्यायाने प्रक्षोभित होऊन मोठेपणावर झडप घालतात. जे जन्मतःच मोठे त्यांच्या षष्ठीपूजनाच्या वेळी त्यांचे भविष्य विधात्याने निश्चित केलेले असते. त्यांचे तसे होणे अपरिहार्य असते आणि प्रसंगी स्वपराक्रमाने जरी गाढवपणा केला तरी दैव त्याला गोपाळदासाची प्रतिष्ठा देते. त्यांनी केलेला अल्प पराक्रम श्रेष्ठ ठरतो व केलेल्या चुका सामान्य जनांच्या दृष्टीने त्या तशा असल्या तरी त्यांच्या दैवाचे भालदार त्यांच्या प्रज्ञेची व दीर्घ दृष्टीची चमक दाखविणारे प्रसंग म्हणून ललकार करतात व या रीतीने मर्कटलीला महामहीमपणाचे लक्षण ठरते. रेल्वेच्या वेळापत्रकाप्रमाणे सर्व काही होते असे नाही आणि वेळापत्रकाप्रमाणे गाड्या निघाल्या अगर पोहोचल्या तर जसे आश्चर्यच, तसेच काहीसे अशा व्यक्तीच्या जीवनात होते. पोहोचण्याची वेळ जरी निश्चित नसली तरी पोहोचण्याचा मुक्काम निश्चित असतो. कार्य होईल ही आशा असते; विलंब होत आहे हा अनुभव असतो; पण गोरखनाथी भविष्य कार्य होईल पण विलंब लागेल, हे अटळ असते. ज्याच्यावर मोठेपणा कोसळतो त्याची अवस्था मोठी कठीण असते. झालेले सर्व अकल्पित व त्यामुळे त्याचे चित्त भांबावलेले आणि मोठ्या पंक्तीत छोट्या चमच्याने श्रीखंड असे थोडेसे होते. ते स्वतः असे असतात, की मोठेपणावर ते कोसळतात. इतर काही म्हणोत, ते मोठेपणा आपणांवर सारखा ओढून आणण्याचा प्रयत्न करीत असतात, मग उसनी भाषा घेतात. उधारीनं गांभीर्य पण घेतात. इकडून तिकडून आणलेली बुद्धी चक्रपाणीची प्रार्थना करून शक्य तेवढी राबवतात व जगाने काही मानले तरी स्वतःला ते धन्य समजतात. इतर चरित्रे लिहोत अगर न लिहोत, स्वतःची चरित्रे लिहीत असतात. निदान कुणी तरी, केव्हा तरी समानधर्मा निपजेल म्हणून स्मरण, टिपणे ठेवीत असतात. यात अस्वाभाविक काही नाही आणि लोकशाहीच्या युगात असे जो न वागेल त्याचा गुरू लटका!

न. वि. गाडगीळ

स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे बहुतेक निबंध सावरकर साहित्याच्या पाच भागांत समाविष्ट आहेत. आगरकरांच्याप्रमाणेच सावरकरांचेही बहुतेक निबंध सामाजिक विषयांवरच आहेत. इतिहासाचे सूक्ष्म परिशीलन करून व अंतर्मुख होऊन त्यांनी हिंदू समाजाची समीक्षा केलेली आहे. आगरकरांचा आवेश सावरकरांच्या ठिकाणी पराकोटीला गेलेला दिसतो. त्यांच्या निबंधात तडफ आणि धडाडी कमालीची आहे. प्रतिपक्षावर तर ते नुसते तुटून पडतात. हिंदू राष्ट्राच्या उत्थानाची, वैभवाची आणि सामर्थ्याची तळमळ त्यांच्या सर्व लेखनात प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. शब्दप्रामाण्य, पोथीनिष्ठा व श्रुतिस्मृतिपुराणोक्त अपरिवर्तनता यांनी आपला हिंदू समाज जखडून गेलेला आहे आणि या बेड्या तोडायच्या तर रूढींचा प्रथम उच्छेद केला पाहिजे, असे सावरकर म्हणत. आपल्याला जखडून टाकणाऱ्या या शृंखला मानसिक असल्यामुळे बुद्धिप्रामाण्य, प्रत्यक्षनिष्ठा आणि विज्ञानोन्मुखता या शस्त्रांनीच त्या तोडता येतील, असे सावरकरांचे ठाम मत होते. त्यांच्या दोन शब्दांत दोन संस्कृती या निबंधातील एक परिच्छेद असा –

प्रथम ही आपली यज्ञसंस्था पाहा. अत्यंत थंड प्रदेशात अग्नीचे सतत साहचर्य सुखावह असते. अशा कोणत्या तरी शीत प्रदेशात नि हिमसंकुल काळी ही संस्था जन्मास आली असावी. त्या वेळी प्रत्येक घरी अखंड अग्निहोत्र आणि वेळोवेळी मोठमोठे प्रज्वलित होणारे यज्ञ आरोग्यप्रद आणि सुखमय होत असतील; पण आजकालच्या हिंदुस्थानच्या असह्य उष्णतेत ह्या अग्निपूजेने कोणतेही भौतिक हित साधत नाही. हे वणवे घरोघर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि गावोगाव भडकवन ठेवणे असुखदच होते. पूर्वी अग्नी पेटविण्याचे साधनही सुलभ नसे. रानावनातून झाडांवर झाडे घासून अग्नी सहज पेटताना पाहून प्राचीन मनुष्याला कृत्रिम अग्नी उत्पन्न करण्याची विद्या त्या विशिष्ट लाकडावर लाकूड घासून सुचली नि साधली असावी. ती यज्ञसंस्थेत त्या काळी उपयोजिली गेली तेही साहजिकच होते. पण त्यावर धार्मिक छाप पडल्यामुळे आता अग्नी आगपेटीतील काडीच्या गुलातही अगदी माणसाळवून ठेवता येऊ लागला असताही, यज्ञातील पवित्र अग्नी म्हटला म्हणजे तो त्या अत्यंत प्राचीन आणि म्हणूनच आज अत्यंत अडाणी ठरलेल्या पद्धतीनेच मंत्रपूर्वक लाकडावर लाकूड घासून 'अग्ने, प्रदीप्त हो' अशा हृदयद्रावक प्रार्थनांनी पेटवावा लागतो! लाकूड आणि गारगोटी या अडाणी साधनांपलिकडे अग्नी पेटविण्याचे साधन गल्या पाच हज़ार वर्षांत आम्हांस शोधता आले नाही! युरोपने आगपेट्या काढल्या, वीज काढली. 'दीपोज्योति नमोऽस्तुते' इत्यादी करुणा न आळविता

वि. दा. सावरकर

बुटाने जरी बटन-दाबले तरी पटकन लखलखाट पाडण्यास विजेस दासीसारखे भाग पडू लागले; पण अजूनही श्रुतिस्मृतिपुराणोक्त पवित्र अग्नी म्हटला की तो लाकडांवर लाकडे घासूनच पेटविलेला असला पाहिजे! मागासलेल्या ग्रंथांस त्रिकालाबाधित मानल्यामुळे त्यांच्याइतकेच सदोदित मागासलेले राहणे असे भाग पडते! अग्नी ही देवता आहे. 'यज्ञाद् भवति पर्जन्यो' अशी प्राचीनांची प्रामाणिक भावना होती आणि म्हणूनच ते त्यास मणोगणती तूप ओतीत ते का, हे समजते. तरी पण आता हजारो वर्षांच्या अनुभवाने हे निश्चित झाले आहे, की अग्नीचे नैसर्गिक गुणधर्म त्यास रागावले तर जास्त होत नाहीत, प्रसादिले तरी सौम्य होत नाहीत; घृताची सतत धार धरून 'अग्ने नय सुपथा राये अस्मान् देव वयुनानि विद्वान्' अशी प्रार्थना करीत राहणाऱ्या यजमानाच्या घरात तोच यज्ञीय अग्नी संधी साधली की जाळून भस्म करण्यास सोडीत नाही! आणि यज्ञाचे वणवे सारखे पेटलेल्या भारतवर्षामध्ये दहा वर्षांत जितके दुष्काळ पडतात तितके दमडीच्या आगपेटीत त्या अग्नीला कोंडून टाकणाऱ्या युरोपमध्ये शंभर वर्षांत पडत नाहीत. यज्ञमंत्र आणि पर्जन्यसूक्ते म्हणून भारतवर्षाचा कंठ कोरडा झाला तरी त्या धार्मिक मतांस पर्जन्य भीक घालीत नाही. पण तिकडे रशियात पाहा; पर्जन्याचे वैज्ञानिक सूक्त काढले जाताच आता कुणीही आणि पावसाळा नसला तरी केव्हाही 'पर्जन्या पड! म्हटले, की पर्जन्य झकत पाया पडतो! विमान दूरच्या नदीवरून फिरवून आणले की जाताना ते त्या नदीचे पाणी शोषून घेते आणि मग वाटेल त्या शेतावर एखाद्या भरून आणलेल्या ढगासारखे ते त्या पाण्याचा पाऊस पाडते! अशा अनुभवानंतरही आता त्या यज्ञसंस्थेचे आम्ही विसर्जन करावयास नको काय? जर थोडे दूध उतास गेले किंवा तुपाची बाटली लवंडली तर सुनांस सासवा तिकडे बोलत असताच, इकडे मणोगणती तूप समारंभपूर्वक आम्ही आगीत तासन्‌तास ओतीत बसलेले असतो! कारण? एवढेच, की तसे करणे श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे! त्या यज्ञसंस्थेचे राष्ट्रीय केंद्र म्हणून या आर्यावर्तावर जे प्राचीन काळी अनंत उपकार झाले त्यांविषयी कृतज्ञता व्यक्तवूनही आता यापुढे मात्र त्या आगीत तुपाचा एक थेंबही न ओतता बुद्धाप्रमाणे ती सारी यज्ञसामग्री नि ते यज्ञकुंड गंगेत विसर्जिणेच युक्त आहे. 'यज्ञाद् भवति पर्जन्यः' हे सूत्र खोडून 'विज्ञानादेव पर्जन्यः' हे सूत्र आता नव्या स्मृतीत घातले पाहिजे.

म. म. पांडुरंग वामन काणे यांचा हिंदुधर्मशास्त्राविषयीचा व्यासंग दांडगा आहे. त्यांनी 'हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र' नावाचा एक सप्तखंडात्मक प्रचंड ग्रंथ इंग्रजी भाषेत लिहिला आहे. मराठीतला त्यांचा एद्‌विषयक प्रबंध म्हणजे धर्मशास्त्रविचार हा होय. या ग्रंथात त्यांनी धर्माचे सामान्य स्वरूप, धर्मशास्त्रीय वाङ्मय, वर्णाश्रमव्यवस्था, जातिभेद, संस्कार, इ. विषयांचा साधार व सोपपत्तिक असा परामर्श घेतला आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या प्रास्ताविकात सर्व भारतीय समाजाला एकत्र गोवणाऱ्या काही गोष्टींचा उल्लेख ते पुढील परिच्छेदात करतात –

हिंदुस्थान देशात भिन्न पंथाचे लोक आहेत ते खरे, पण त्या सर्वांना एकत्र गोवणाऱ्या तीन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. पहिली गोष्ट अशी, की त्या सर्व पंथांची संस्कृत म्हणजे दैवी वाक् ही धर्मभाषा आहे. वैदिकांचा तर प्रश्नच नाही; पण बौद्ध व जैन यांचेही धर्मग्रंथ संस्कृत भाषेत आहेत व सर्व पंथ संस्कृत भाषेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विद्वानांची भाषा समजतात. दुसरी गोष्ट म्हणजे सर्वसाधारण संस्कृती. पंथ भिन्न असले तरी त्यांच्या सामान्य चालीरीती व समजुती एकाच साच्याच्या आहेत. तिसरी गोष्ट ग्रंथप्रामाण्याची. वैदिक धर्मातील वैष्णव, शैव, अद्वैती, द्वैती असे भिन्न भिन्न पंथ आपापल्या मतानुसार ग्रंथ लावीत असले, तरी सर्वजण वेद, उपनिषदे यांचीच कास धरतात. 'तत्त्वमसि' म्हणजे 'ते ब्रह्मच तू आहेस' असा अर्थ करून कोणी अद्वैत प्रतिपादो किंवा 'तस्य त्वमसि' म्हणजे 'त्या परमेश्वराचा तू आहेस' असा करून कोणी द्वैत स्थापो, दोघेही एकाच उपनिषदाला प्रामाण्य देतात. हा सर्व प्रकार वृक्ष व रान यांतील संबंधासारखा असून, तो आज अडीच हजार, तीन हजार वर्षांपूर्वीपासून तरी चालत आलेला आहे; पण रानाकडे पाहताना आम्हाला वृक्षाचा विसर पडतो व वृक्षाचा विचार करताना एकेक वृक्ष डोळ्यापुढे ठेवून सर्वांमिळून होणाऱ्या रानाला आम्ही विसरतो, अशी स्थिती मात्र आमची झाली आहे.

डॉ. केशव लक्ष्मण दप्तरी हे आधुनिक युगातील प्रखर बुद्धिवादी विद्वान व संशोधक होत. त्यांनी औपनिषदिक जीवनसौख्य, उपनिषदर्थव्याख्या, धर्मरहस्य, इ. अनेक प्रबंध संशोधनपूर्वक लिहिले आहेत. त्यांच्याविषयी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी पुढीलप्रमाणे गौरवपर लिहिले आहे –

मानवी जीवनाचे अत्यंत नवे तत्त्वज्ञान सांगणारे व आधुनिक, ऐहिकवादी दृष्टिकोणांवर आधारलेले असे डॉ. दप्तरींचे बुद्धिवादी उपनिषद्भाष्य आहे. डॉ. दप्तरींची प्रज्ञा परंपरेच्या बंधनांना झुगारून नवे नवे अर्थ पाहण्यास कशी विलक्षणपणे समर्थ झालेली होती, याचे हे एक प्रत्यंतर आहे. भारतीय मनुष्यास आधुनिक जीवनसंग्रामात आवश्यक असलेली मौलिक दृष्टी वेदांच्या आधारे देणारा यासारखा दुसरा प्रबंध नाही. हा प्रबंध भारतीय विचारेतिहासात अनन्यसाधारण महत्त्वाचा आहे.

डॉ. दप्तरी नवीन पिढीच्या संशोधकांना पुढील संदेश देतात–

अनुभव व स्वतंत्र विचार हेंच ज्ञानाचें खरें साधन होय. ग्रंथ केवळ मार्गदर्शक आहेत व कित्येक वेळीं तर ते भ्रामकहि होतात. म्हणून कोणत्याहि संशोधकाने स्वतःच्या अनुभवावरून स्वतंत्रपणे विचार केला पाहिजे. इतिहासात मात्र घडलेल्या गोष्टी ज्यांनी स्वतः पाहिल्या त्यांची वचने मुख्यप्रमाण मानली पाहिजेत. संशोधन करण्यात कितीही श्रम पडले तरी ते टाळू नका. असे कराल तरच तुम्हांला सिद्धी मिळेल. विचार करताना कोणताही अभिनिवेश मनात धरू नका आणि तुम्हांस जे ज्ञान होईल ते कोणासही न भिता बोलून दाखवा. तुमची चूक झाली आहे असे दिसून आले तर तीही बोलून दाखवण्यास कचरू नका.

आचार्य शं. द. जावडेकर यांनी आधुनिक भारत, राजनीतिशास्त्रपरिचय आणि राज्यशास्त्रमीमांसा असे तीन प्रबंध लिहिले आहेत. आधुनिक भारताची त्यांनी केलेली मीमांसा शास्त्रीय इतिहासाचे नमुनेदार उदाहरण होय. या विषयावर इतका सुंदर ग्रंथ दुसरा कोणताही नाही. ऐतिहासिक कार्यकारणभाव, वर्गसंबंध, वैचारिक प्रवाह, थोर व्यक्तींचे इतिहासातील स्थान, इ. गोष्टींचे उत्कृष्ट विवेचन या ग्रंथात मिळते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे महाराष्ट्रातील एक प्रकांड पंडित आणि श्रेष्ठ विचारवंत आहेत. त्यांची प्रज्ञा सर्वतोमुखी आहे. ती अनेक शास्त्रांत आणि दर्शनांत लीलया अवगाहन करू शकते. संस्कृत भाषा व दर्शने यांचे पारंपरिक पद्धतीने केलेले अध्ययन आणि त्याला आधुनिक शास्त्रांची इंग्रजी भाषेच्या द्वारे मिळालेली जोड यांमुळे त्यांच्या ज्ञानाची कक्षा खूप वाढली आहे. हिंदुधर्माची समीक्षा व वैदिक संस्कृतीचा विकास हे त्यांचे दोन प्रबंधग्रंथ होत. पहिल्या ग्रंथात त्यांनी केलेल्या धर्मसमीक्षेवर मार्क्सवादी दृष्टिकोणाचा विशेष प्रभाव होता. वैदिक संस्कृतीच्या विकासात त्यांची पूर्वीची दृष्टी बदलली आहे. या निबंधात त्यांनी आध्यात्मिक किंवा वैचारिक स्थिरमूल्यांची शक्ती समाजातील भौतिक प्रवृत्तींवरही आधिपत्य गाजवू शकते, या इतिहाससिद्ध गोष्टीला महत्त्व दिलेले आहे. प्रस्तुत निबंधाच्या प्रस्तावनेत त्यांनी या संबंधात जे लिहिले आहे, त्यातील एक परिच्छेद असा –

पाश्चात्य संस्कृती जगातील सर्व राष्ट्रांच्या व समाजांच्या एकत्र संनिपातास कारण झाली. या संस्कृतीने आपल्या वाहतुकीच्या साधनांनी व व्यापारी तंत्राने सर्व जग एकत्र आणले गेली तीनशे वर्षे यांत्रिक संस्कृतीने मानवी जीवनांत क्रांति घडवून आणली. सतराव्या, अठराव्या व एकोणिसाव्या शतकांनी पाश्चात्य संस्कृतीचा उत्कर्ष पदोपदी पाहिला. आता त्या संस्कृतीने सर्व सुसंस्कृत राष्ट्रांच्या अंतरंगात प्रवेश केला आहे. प्रत्येक संस्कृतीच्या गर्भागारात आत्मदेवतेच्या शेजारी पाश्चात्य संस्कृतीच्या संस्था व यांत्रिक संस्कृतीची उपकरणे विराजमान आहेत. विद्या व कला हा संस्कृतीचा गाभा होय. संस्कृतीच्या चैतन्यशक्तीचा साठा या गाभ्यात असतो. पौर्वात्य देशांतील विद्यापीठे व शिक्षणसंस्था यांचा मुख्य शिक्षणक्रम म्हणजे पाश्चात्य विद्या व कला यांचा शिक्षणक्रम होय. गणित व तर्कशास्त्र हा विज्ञानाचा पाया आहे. त्यात पाश्चात्यांनी भारतीय किंवा पौर्वात्य गणितापेक्षा व तर्कशास्त्रापेक्षा फार मोठी प्रगती केली आहे. विज्ञानाच्या व विज्ञाननिष्ठ तंत्राच्या शेकडो शाखा अगदी नूतन आहेत. त्या बाबतीत पौर्वात्यांना पाश्चात्य गुरूंच्याच मार्गाने काही कालपर्यंत जावे लागेल. सामाजिक शास्त्रेसुद्धा अगदी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नवीन पाश्चात्यप्रणीतच आहेत. राजकीय संघटनेची तत्त्वे पाश्चात्यांचीच घ्यावी लागत आहेत. वाङ्मय आणि ललित कला यांच्यांतील भावनांची स्पंदने व तंत्र पाश्चात्यांच्या संसर्गाने बदलून गेले आहे. पाश्चात्य संस्कृतीने सर्व जुन्या विद्यमान संस्कृतींना वेढून टाकले आहे. ती त्या संस्कृतींना एका विश्वव्यापी संस्कृतीच्या रसात आटवून टाकण्यास बद्धपरिकर झाली आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या शक्ती विशाल, प्रभावी, दिग्विजयी व देदीप्यमान आहेत. त्यांनी या जुन्या संस्कृतींना निष्प्रभ करून सोडले आहे. गेल्या तीनशे वर्षांत तिची अव्याहत प्रगती झाल्यामुळे तिच्या तत्त्ववेत्त्यांनी प्रगती हाच मानवी संस्कृतीचा व इतिहासाचा स्वभावधर्म ठरविला. इतिहासाच्या शक्ती वळणे घेऊन प्रगतीचा मार्ग अनिवार्यपणे आक्रमीत असतात, त्यांना कोणी अडवू शकत नाही, अशा सिद्धांताला ते येऊन पोचले. परंतु विसाव्या शतकाच्या मध्यभागात त्या संस्कृतीच्या अवनतीची व विनाशाची अवलक्षणे प्रकट होऊ लागली आहेत. प्रगतिवादाच्या निश्चयाला विपरीत अनुभवाचे व भावी सर्वविनाशक संग्रामाच्या भयाचे हादरे बसून तो ढासळून चालला आहे. मानवसंस्कृतीच्या भवितव्याची काळजी करणारे तत्त्वचिंतक विनाशाची अवलक्षणे पाहून विनाशाच्या व अवनतीच्या कार्यकारणभावाची चिंताजनक मीमांसा मांडू लागले आहेत. अशा गंभीर मीमांसेचे मोठेमोठे प्रबंध, निबंध व ग्रंथ गेल्या ३० वर्षांत शेकडो बाहेर पडले आहेत.

द. के. केळकर हे संस्कृतिसंगम, काव्यालोचन, उद्याची संस्कृती या विद्वन्मान्य ग्रंथांमुळे प्रसिद्धीस आले. वादळी वारे आणि विचारतरंग हे त्यांचे निबंधसंग्रह होत. भौतिक शास्त्रांवरील जाणत्या श्रद्धेतून त्यांचे निबंधलेखन विस्तारले आहे. उद्याचा भारत वैभवशाली व्हायचा असेल तर, त्याने भौतिक प्रगतीची दखल घेऊन विज्ञानाची कास धरली पाहिजे, हे केळकरांच्या विचारांचे मूलसूत्र होय.

वामन मल्हार जोशी यांच्या निबंधाचा विचारशीलता हा स्थायीभाव असून, सत्यसंशोधन ही त्यामागची प्रमुख प्रेरणा आहे. ते समतोल, बुद्धिनिष्ठ, सहृदय आणि प्रांजळ आहेत. कोणत्याही प्रश्नासंबंधी मूलगामी विचार करायला लावण्याचे सामर्थ्य त्यांच्या निबंधलेखनात आहे. त्यांच्या निबंधांनी मराठीतल्या विचारप्रधान वाङ्मयात मोलाची भर टाकली आहे. माझ्या अनुभवाचे सार या त्यांच्या निबंधातला एक उतारा असा –

मिस् मेयोसारख्या स्त्रियांना हिंदू समाजात अनीतीचा आणि खुळचटपणाचा बाजार भरलेला दिसतो, आणि काही हिंदू लोकांना अमेरिकेत घटस्फोटादी प्रकार सर्रास चालून तेथील स्त्री-पुरुष पशुतुल्य स्वैर आचार करीत असतात असे वाटते, हा मोठा दोष तर खराच; पण यापेक्षा अधिक मोठा दोष असा, की परकी समाजात खरोखरीच अनीतिमत्ता आहे, हे पाहून पुष्कळांना आनंद होतो ! वास्तविक हिंदू समाजात जर खरोखरच मिस् मेयोने सांगितल्याप्रमाणे अनीतिमत्ता असेल, तर त्याबद्दल सर्व विचारी ख्रिश्चन लोकांना हळहळ वाटली पाहिजे. पण तसे न होता मिस् मियोचे पुस्तक काही ख्रिश्चन लोक मिटक्या मारीत वाचतात ! आमचेही असेच. Uncle Sham हे अमेरिकेतील सामाजिक गटारे उपसणारे पुस्तक आपणही मोठ्या हौसेने वाचतो व त्यातील गोष्टी इतरांना तिखटमीठ लावून सांगतो ! खरे म्हटले म्हणजे कोठेही वाईट प्रकार असेल, तर त्याबद्दल नीतिप्रिय मनुष्याला खेद व्हावा; पण स्वेतर समाजाविषयी व धर्माविषयी मनुष्याचे मन इतके पूर्वग्रहदूषित असते आणि सापेक्षत: आपला समाज व धर्म हे श्रेष्ठ आहेत, असे सांगण्यात व ऐकण्यात असा काही आनंद असतो, की परधर्मीयांची निंदा ही मेवामिठाईप्रमाणे आपणांस वाटते आणि ती ऐकण्यास किंवा वाचण्यास मिळाली असता त्यातील अंश आपण इतरांना प्रसाद म्हणून वाटतो ! ब्राह्मण-ब्राह्मणेतरांतील भांडणे व हिंदु-मुसलमानांतल्या मारामाऱ्या अशाच प्रकारच्या दुरभिमानामुळे व दुष्प्रवृत्तीमुळे उत्पन्न होतात. समाजकारणात व राजकारणात जातिभेदांमुळे व धर्मभेदामुळे जे विकट प्रश्न उत्पन्न झालेले आहेत, त्यांच्या बुडाशी असलाच दुरभिमान व असलीच दुष्प्रवृत्ती बव्हंशी आहे व हे प्रश्न कधी सुटायचे असतील, तर धर्मभेदांना व सामाजिक भेदांना जे फाजील महत्त्व आले आहे, ते नाहीसे होईल तेव्हाच ते सुटतील. खरा सदाचार व खरे सौजन्य हे विशिष्ट जातीत जन्म घेतल्याने प्राप्त होत नाहीत किंवा विशिष्ट धर्माचे आपण आहोत, असे म्हणून घेतल्यानेही अंगी येत नाहीत. सामाजिक जाती व लौकिकधर्म इत्यादिकांतील भेद खरोखर वेष-भाषादिकांप्रमाणे बाह्य आहेत. अंतरात्म्यातील चांगुलपणा त्यांवर विशेष अवलंबून नाही. त्यांना

वा. म. जोशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आजकाल जे भलते महत्त्व प्राप्त झालेले आहे, ते नाहीसे होईल तो सुदिन !

लोकनायक माधव श्रीहरी अणे यांचा एक निबंधसंग्रह अक्षर-माधव या नावाने प्रकाशित झाला आहे. त्यात लोकोत्तर व्यक्ती, धर्म, संस्कृती, इ. अनेक विषयांवर त्यांनी लिहिलेले निबंध संकलित केलेले आहेत. त्या ग्रंथाच्या संपादकीय निवेदनात त्यांच्याविषयी लिहिले आहे, त्याचा सारांश असा–

लो. बापूजी अणे यांनी आयुष्यभर राजकारण लढवले असले, तरी त्यांची प्रकृती एखाद्या ज्ञानोपासक ऋषीची होती. त्यांचा महाभारताचा व्यासंग प्रदीर्घ आणि प्रगाढ होता. त्यावर एखादा संशोधनपर ग्रंथ लिहिण्याचाही त्यांचा मानस होता; पण ती गोष्ट त्यांच्या हातून घडू शकली नाही. तथापि त्यांनी निबंधरूपाने जे लिहिले आहे, ते मात्र अक्षय्य व अक्षर वाङ्मयात समाविष्ट होण्यासारखे आहे. त्यांच्या हिंदूधर्माची मीमांसा या निबंधातील एक परिच्छेद असा–

संवेदनाशक्तीमुळे मनुष्याला सुखदुःखाची जाणीव उत्पन्न होते. जगात जे प्रेम व जो आनंद भरलेला आहे, त्या प्रेमाचा किंवा आनंदाचा सर्वांत मोठा वाटा मला मिळावा, म्हणून यच्चयावत् मनुष्यजातीची सारखी धडपड सुरू आहे. प्रत्येक इंद्रिय अनुकूल संवेदना होणाऱ्या वस्तूला अगदी लालचावलेले असते; परंतु बारकाईने विचार करणारास असा अनुभव येतो, की बहुतेक आनंदाच्या वस्तूंमधील आनंद थोडक्याच काळात नाहीसा होतो. एकाच गोष्टीपासून नेहमी टिकणारा आनंद त्यास मिळत नाही. खरोखर पाहता आनंदानुभवाचा कंटाळा उत्पन्न न होता आनंदाच्या प्रकाराचा कंटाळा उत्पन्न होतो. गुलाबाच्या फुलाच्या सुवासापासून उत्पन्न होणारा आनंद जर एक तासभर टिकणारा असला, तर मार्मिक ग्रंथवाचनाने झालेला आनंद निदान एक दिवसभर तरी टिकतो. तेव्हा हळूहळू मनुष्य जर अधिकाधिक उंच प्रतीच्या आनंदाच्या शोधार्थ निघाला, तर कल्पनेने तरी त्याला असे वाटेल, की असे एक तत्त्व आहे, की ज्याचा प्रत्यय आला असता आनंदास खंड नाही. संवेदनामार्गाने परमेश्वरी तत्त्व आनंदमय आहे, असे तेव्हा त्यास कळून येईल. पृथ्वीतलावर दृष्टीस पडणाऱ्या कृमिकीटकादिकांपासून तो मनुष्यापर्यंतच्या सर्व योनींतील प्राण्यांची अहोरात्र चाललेली हालचाल, प्रत्यक्ष पृथ्वी व इतर सूर्यचंद्रादिकांचे परिभ्रमण, समाजात होणाऱ्या क्रांती आणि विश्वातील घडामोडी यांच्याकडे अवलोकन केले असता जिज्ञासू मनास त्या चेतनेच्या संतत प्रवाहाचे उगमस्थान कोठे असेल, असा विचार सहज उत्पन्न होतो व अखिल ब्रह्मांडाला अव्याहत परिभ्रमणात ठेवणारी ही मूळ शक्ती अत्यंत चैतन्ययुक्त असली पाहिजे, ही कल्पना त्याला सहज येते. म्हणूनच तो जगद्बीज-शक्ती ही चिन्मय आहे, असे समजतो.

म. म. दत्तो वामन पोतदार हे एक इतिहाससंशोधक, बहुभाषाकोविद, खंदे वक्ते आणि शिक्षणशास्त्रज्ञ म्हणून भारतातील पंडित मंडळींना परिचित आहेत. वि. का. राजवाडे यांच्या तालमीत ते तयार झाले. त्यांचा बाणा अस्सल मऱ्हाठी, पेहराव पेशवाई थाटाचा; पण विचार आधुनिक. 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' हा स्वतंत्र ग्रंथ सोडल्यास त्यांचे बहु-

म. म. द. वा. पोतदार

तेक निबंध नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. स्वतंत्र विचार, ठाकठीक रचना, आटोपशीर वाक्ये, ठाशीव पण चटकदार शब्द, भाषा साधीसुधी पण लवचिक हे त्यांच्या निबंधांचे विशेष होत. प्रांतिक भाषांचे भवितव्य या त्यांच्या निबंधातील एक उतारा असा–

मातृभाषेच्या साहाय्याने ज्ञानाची चढण जेथवर चढता येईल तेथवर चढणे आणि तदनंतर पुढे जाणाऱ्या दुसऱ्या परक्या भाषेची सोबत पाहून वाट चालणे हा खऱ्या जिज्ञासूचा दुहेरी धर्म होय. ज्ञानाच्या वाटेने ज्या भाषा जितक्या उंच गेल्या असतील त्या सर्व भाषा, परकीय असल्या तरी, खऱ्या जिज्ञा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सूस नित्य वंद्यच असल्या पाहिजेत. अर्थात जेथे मातृभाषा थबकल्या तेथून पुढे दुसऱ्या भाषांचा आश्रय घेणे यात पाप नाही. परंतु मातृभाषांची गती व सामर्थ्य वाढविण्यासाठी झटणे हेही पुण्यकर्मच आहे.

आपणांस जगाची प्रगती झपाट्याने कशी होईल हे पाहावयाचे आहे. जग त्वरेने अधिकात अधिक ज्ञानसंपन्न ज्या उपायांनी होईल ते उपाय आपणांस ठरवायचे आहेत. ज्ञानग्रहणाचे साधन भाषा आणि ही भाषा, आपण प्रथमच पाहिले, की जगाची तर एक होऊ शकत नाही. अर्थात मातृभाषांचाच आश्रय करणे आपणांस एतदभावी भाग झाले. यात प्रौढ व पोक्त्या तेवढ्या मातृभाषा ठेवाव्या असेही आपण ठरविले. आणि त्यांच्या आश्रयाने गेले तरच अल्प श्रमाने परंतु बहुसंख्य लोकांना ज्ञानसंपन्न होता येईल. बहुश्रमाने अल्पसंख्य लोकांनी पूर्ण ज्ञानी बनणे हेच जगाच्या फायद्याचे आहे आणि असे व्हायचा एकच सरळ व सोपा मार्ग म्हणजे पोक्त अशा मातृभाषांची उपासना. पुष्कळ श्रम करूनही परकी भाषा घड येत नाही. आली तरी तिचा गुप्तभाव बहुधा हाती येत नाही. एखाद्या भाग्यवंतालाच त्याचे दर्शन घडते. भाषेच्या द्वारा साध्य होणारा सरस्वतीचा साक्षात्कार परकीय भाषेच्या द्वारे अनुभवास येणे परम दुर्घट असते. ज्याप्रमाणे भगवंतांनी भगवद्गीतेत ‘ मनुष्याणां सहस्रेपु कश्चिद्यतति सिद्धये । यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥ ’ असे स्वरूपाकार होणाऱ्या ज्ञान्यांसंबंधाने उद्‌गार काढले आहेत, नेमकी तशीच स्थिती परकीय भाषेच्या द्वारा विद्येचा साक्षात्कार मिळवू पाहणारांची होते. मातृभाषेतून भाव सहज व्यक्त होतात, परंतु परकीय भाषेच्या साहाय्याने किती खटपट केली तरी परम सूक्ष्म भाव ‘ अव्यक्त ’च राहतात आणि अशा अव्यक्तासक्तचेतसांना अधिकतर कष्ट मात्र व्यर्थ पडतात.

इतिहासविषयक निबंधलेखनात रियासतकार सरदेसाई यांची कामगिरी मोलाची म्हणावी लागेल. त्यांनी नवी-जुनी सर्व उपलब्ध इतिहाससाधने अभ्यासून व तपासून मुगलकालापासून ब्रिटिश कालापर्यंतचा एक साधार, समग्र व सुसंगत इतिहास आपल्या रियासतींच्या द्वारे मराठी वाचकांपुढे सादर केला. याशिवाय, इतिहासविषयक फुटकळ साहित्याची १५-२० पुस्तके त्यांनी लिहिली, ती वेगळीच.

ग. त्र्यं. माडखोलकर हेही अग्रेसर निबंधकार आहेत. चिपळूणकरांच्या निबंधमालेचा परिणाम त्यांच्यावर विशेष आहे. कोल्हटकर व केळकर या दोघांकडूनही निबंधलेखनाची अनेक रहस्ये त्यांनी हस्तगत केली आहेत. सूक्ष्म चिकित्सा, चमकदार उपमा, चोखंदळ सौंदर्यदृष्टी आणि आकर्षक भाषाशैली हे त्यांच्या आकर्षक निबंधांचे विशेष होत. त्यांच्या स्वैरविचार या निबंधसंग्रहातील उर्वशी, नयनचुंबन, अंगराग आणि अनुराग, इ. निबंधांचे तेज सदैव तळपत राहील असे आहे.

र. धों. कर्वे यांनी समाजस्वास्थ्य व प्रगती या दोन नियतकालिकांतून संततिनियमनविषयक आणि तदनुषंगाने अन्यही अनेक सामाजिक विषयांवर निबंध लिहून महाराष्ट्रात बौद्धिक जागृतीचे प्रयत्न केले.

त्र्यं. शं. शेजवलकर यांचे लेख शेजवलकरांचे लेख या नावाच्या अनेक भागांत प्रसिद्ध आहेत. त्यांची शैली साधी पण खोचक आहे. श्री. के. क्षीरसागर यांच्या निबंधांत विविधता आहे. त्यांना वाङ्मयीन प्रश्नांप्रमाणे सामाजिक प्रश्नाबद्दलही जिव्हाळा वाटतो. त्यांचा सुवर्णतुला हा निबंधसंग्रह वाचनीय आहे.

श्री. द. बा. ऊर्फ काका कालेलकर यांच्या निबंधवाङ्मयात चिंतनशीलतेचा पानोपानी प्रत्यय येतो. या चिंतनशीलतेला काव्यात्मकता व अभिजात सौंदर्यदृष्टी यांचे कोंदण आहे. त्यांनी मुख्यत्वे प्रवासपर निबंध लिहिले; पण त्यांची ही प्रवासवर्णने केवळ त्या त्या स्थळांची माहिती देण्यासाठी लिहिलेली नाहीत. ते त्या त्या स्थळांच्या अस्मितेत, तिथल्या सौंदर्यात आणि वैचित्र्यात रंगून जातात आणि त्यांच्या दर्शनाने स्वतःला झालेला सात्त्विक आनंद मुक्तहस्ताने उधळून देतात. ब्रह्मदेशातील ऐरावती नदीच्या वर्णनातला एकच परिच्छेद वरील विधानाची साक्ष देईल—

काकासाहेब कालेलकर

प्रवाहाबरोबर जणू काय ताल धरीत असल्याप्रमाणे स्तूप व देवळे मधून मधून येऊन जात. उंच टेकड्या व शिखरे मनुष्याला सदैव प्रिय असतातच. त्यात पुन्हा नाईल नदीसारखी ऐरावती जेव्हा चारी दिशांना आपली कृपा पसरून देते, तेव्हा तर उंच उंच जागाच मनुष्याचे आश्रयस्थान होऊन बसतात. त्या जागांसंबंधी वाटणारी कृतज्ञता मनुष्याने त्यांच्यावर देवळे बांधून व्यक्त करायची नाही तर दुसऱ्या कोणत्या रीतीने प्रकट करायची ? निसर्गाने आपणांस शिकवले आहे, की हिरव्या पानात पिवळे पिकलेले फळ आपली सगळी खुमारी दाखवू शकते. या शिकवणीचा लाभ घेऊन येथील लोकांनी झाडांमध्ये

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवळे बांधून त्यांच्या शिखरावर 'ते पाहा' म्हणून आकाशाचे आनंत्य दाखवणारी सोन्याची पिवळी बोटे ठेवली आहेत. निसर्गाच्या शोभेला मानवाच्या हातून अलंकार चढविता यावयाचा नाही, असे समजणाऱ्या लोकांनी ही शिखरे अवश्य पाहावीत.

आचार्य विनोबा भावे हे अध्यात्मप्रवण निबंधलेखनाच्या क्षेत्रात अग्रपूजेचे अधिकारी आहेत. विनोबांचे सारे निबंधलेखन हे उदात्त जीवनमूल्यांवरील श्रद्धेतून उगम पावले आहे. त्यांच्याविषयी श्री. वि. स. खांडेकर म्हणतात —

विनोबांचे निबंध हे जणू काही विसाव्या शतकातल्या एखाद्या संताचे गद्य अभंगच आहेत. त्यांच्यापुढचे प्रश्न विशाल व त्यांचे तत्त्वज्ञान व्यापक आहे. त्यांची वाणी उपनिषदे व ज्ञानदेवी यांच्या संस्कारांनी प्रभावित झालेली आहे. प्रज्ञा व प्रतिभा यांचा संगम विनोबांच्या निबंधांत अनेक ठिकाणी आढळतो. कृष्णभक्तीचा रोग नावाचा त्यांचा एक निबंध आहे, त्यातील एक परिच्छेद असा—


आचार्य विनोबा भावे

चंद्राप्रमाणे हरएक वस्तूला शुक्लपक्ष आणि कृष्णपक्ष आहेत. त्यामुळे टीकाखोर मनाला स्वैर संचार करण्यास हरकत येण्यासारखी नाही. सूर्य दिवसा दिवाळी करीत असला, तरी 'रात्री अंधारच देतो' एवढ्या वाक्याने त्या सर्व दिवाळीची होळी होऊ शकेल. त्यातून अवगुणच घ्यायचा नियम ठरला म्हणजे दोन दिवसांमध्ये एक रात्र न दिसता एका दिवसाभोवती दोन रात्री दिसायच्या. मग अग्नीच्या ज्योतीकडे लक्ष न जाता धुरावरून अग्नीचे अनुमान करणारे न्यायशास्त्र निर्माण व्हायचे. भगवंतांनी या सर्व मौजा गीतेत सांगितल्या आहेत. अग्नीचा धूर, सूर्याची रात्र किंवा चंद्राचा कृष्णपक्ष पाहणाऱ्या 'कृष्णभक्तां'चा त्यांनी एक स्वतंत्र वर्ग केला आहे. दिवसा डोळे मिटले म्हणून अंधार आणि रात्री डोळे उघडले म्हणून अंधार, असा स्थितप्रज्ञाच्या कार्यक्रमाबरहुकूम या लोकांचाही कार्यक्रम आहे; पण भगवंतांनी स्थितप्रज्ञाला मोक्ष दाखविला आहे, तर यांची रवानगी कपाळमोक्षाकडे केली आहे; पण इतके झाले तरी हा संप्रदाय एखाद्या साथीच्या रोगाप्रमाणे वाढतच चालला आहे. बुबुळे काळी असल्यामुळे म्हणा किंवा काळ्या रंगात आकर्षण अधिक असल्यामुळे म्हणा, काळी बाजू जशी आमच्या डोळ्यांत भरते, तशी उजळ बाजू भरत नाही. अशा स्थितीत हा सांप्रदायिक रोग कोणत्या औषधाने बरा होईल, हे पाहून ठेवणे जरूर आहे.

श्रीपाद महादेव माटे यांची गणनाही श्रेष्ठ निबंधकारांत होते. माटयांच्या मनाची बैठक विचारवंताची असली तरी, सर्वस्पर्शी रसिकतेचा, सूक्ष्म निरीक्षणाचा, सामाजिक जिव्हाळ्याचा, विविध विषयांत रमणाऱ्या वृत्तींचा आणि अस्सल मराठी व भरघोस अशा भाषाशैलीचा ती आधार आहे, असे श्री. वि. स. खांडेकर म्हणतात. ही भगवद्गीता अपुरी आहे, शृंगाररसांचा राजा, लहान लहान वशीकरणे, राम गणेशाला माझा मुजरा आणि माझे मनोराज्य हे माटयांचे पाच निबंध वाचले तरी निबंधकार माटयांचे लेखनक्षेत्र किती मोठे आहे, ते कळून येईल. परांजपे आणि केळकर यांच्या वाङ्मयाचे काही संस्कार त्यांच्यावर झाले असले, तरी चिंतनशीलता, समतोलपणा, सत्य शोधण्याची इच्छा आणि डौलदार शैली हे गुण त्यांचे स्वतःचे आहेत. केळकरांनंतरचे अव्वल निबंधकार म्हणून माटयांचाच उल्लेख केला जातो. प्रयोगशाळेला शरण जा या त्यांच्या निबंधातला उतारा पुढीलप्रमाणे —

एकदा वीज लकलकली तर, भुईच्या पोटात सुपीकतेची मर्मे भराभर उत्पन्न होतात असे शास्त्रज्ञ सांगतात. ही मर्मे कृत्रिमाने सहज उत्पन्न करता येतील. आणि तीसुद्धा विजेचे कृत्रिम केवळ क्षणभर केल्यानेच होतील. नाश जसा क्षणार्धात होतो तसा पोषही निदान त्वरेने झाला पाहिजे. फक्त आपण शास्त्राच्या रस्त्यावर कोणत्या बाजूने शिरतो, नळी उरफाटी लावतो की सुरफाटी लावतो, यावर सारे अवलंबून आहे. पृथ्वीवरील सर्व शास्त्रज्ञांनी जर आपली बुद्धी समृद्धिसंपादनामागे लाविली, तर आपला अडचणींचा प्रश्न हां हां म्हणता सुटेल. दारूगोळ्याला हवी असलेली द्रव्ये पहिल्या महायुद्धात जर्मन शास्त्रज्ञांनी हवेतून काढली, तर माणसाच्या जीवनाला अवश्य असलेली द्रव्ये त्याच हवेतून काढता येणार नाहीत, असे आपण का समजावे ? मला वाटते, की सर्व समाज सुखी होण्याला सध्या सुरू असलेली मारामारी करावी लागते, एकमेकांचे दाईज बनावे लागते, समाजच्या समाज उलथेपालथे करावे लागतात किंवा असूयेने सर्व जगत संत्रस्त करावे लागते, असे मुळीच नाही. समाजाला सुखी करण्याची सध्याची ही एक ओबडधोबड आणि रानटी पद्धती आहे. माणसाला ज्या वेळी आत्मसामर्थ्याचा हुंकार आलेलाच नव्हता, तेव्हाचे शिल्लक राहिलेले अज्ञान-असूयेचे हे चमत्कारिक विकार आहे. जर आपण भौतिक शास्त्रांच्या मार्गाने गेलो आणि त्यांची योग्य ती आवाहने केली, तर 'देता किती घेशिल दो कराने' अशी आपली अवस्था ही शास्त्रे करून टाकतील आणि असे झाले म्हणजे मालकी हक्काची वासना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि संग्रहाची सावधगिरी यांचा मागमूसही शिल्लक राहणार नाही. परंतु दुर्दैव हे, की या कामधेनूचे सत्त्व किती अगाध आहे आणि ती शरणागतीस कशी पात्र आहे, याचे मर्मच आम्ही माणसांनी अजून पुरते ओळखले नाही.

वा. वि. मिराशी हे विदर्भातील एक नामवंत संशोधक आहेत. त्यांनी सनपूर्व दुसऱ्या शतकापासून इ. स. च्या तेराव्या शतकापर्यंत सुमारे दीड हजार वर्षांच्या कालातील सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, परमार, यादव, इ. राजवंशांविषयी नवीन संशोधन करून अनेक लेख प्रकाशित केले आहेत. राजवंशांप्रमाणेच कालिदास, भवभूती, शूद्रक, प्रवरसेन, इ. कवींच्या कालाविषयीच्या आणि ग्रंथांविषयीच्या समस्या सोडविण्याचाही प्रयत्न त्यांनी केला आहे. संशोधन मुक्तावली या ग्रंथमालेत त्यांचे हे निबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांच्याविषयी लोकनायक मा. श्री. अणे लिहितात –

म. म. मिराशींनी केलेल्या संशोधनाचा विचार केल्याशिवाय मध्ययुगीन भारताचा सुसंगत इतिहास इतउत्तर कोणासही लिहिता येणे शक्य नाही, एवढे त्यांच्या लेखांचे महत्त्व आहे.

पु. ग. सहस्रबुद्धे हे विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी प्रवर्तित केलेल्या निबंधयुगाचे सांप्रतचे श्रेष्ठ मानकरी होत. वाङ्मय, इतिहास, राजकारण, समाजकारण, इ. विषयांचा त्यांचा गाढ' व्यासंग आहे. जगातील सर्व लोकसत्तांचा इतिहास त्यांनी अभ्यासिला आहे. भारताची लोकसत्ता आदर्श स्वरूपाची व्हावी अशी त्यांना तळमळ आहे. इहलोकावर निष्ठा, बुद्धिवाद, प्रयत्नवाद आणि विज्ञानसन्मुखता हे त्यांच्या विचारसरणीतील प्रमुख घटक होत. त्यांची विषयाची मांडणी तर्कशुद्ध, साधार आणि इतिहासाला धरून असते. त्यांचे विचार ठाम असतात. त्यांत डळमळीतपणा कुठेही आढळत नाही. हिंदुसमाज संघटना आणि विघटना या ग्रंथात धर्मशास्त्रकारांच्या कोत्या बुद्धीचे मार्मिक विच्छेदन त्यांनी केले आहे, ते असे –

शूद्रांच्या वेदाधिकाराप्रमाणेच पूर्वी होत असलेल्या अनुलोम-प्रतिलोम विवाहांविषयीही प्रश्न उद्भवतो. हे विवाह चालू ठेवले असते, तर हिंदू समाजावर कोणते संकट कोसळले असते? अलीकडे असा एक युक्तिवाद करण्यात येतो, की पूर्वी असे विवाह चालू होते; पण त्यांचे वाईट परिणाम पाहून पुढील शास्त्रकारांनी ते निषिद्ध मानले. पण प्रश्न असा येतो, की असे कोणते वाईट परिणाम या शास्त्रकारांना दिसून आले? त्यांच्या या शास्त्रनियमाचे समर्थन करणाऱ्या अर्वाचीन विद्वानांनी तरी, त्या मिश्रविवाहांमुळे कोणते वाईट परिणाम झाले, ते सांगितले आहे काय? मुळीच नाही. हे अर्वाचीन पंडित तरी इतिहास पाहू शकत होते ना? मग त्यांनी कोणत्या इतिहासाच्या आधारे या बेटीबंदीचे समर्थन केले? इतिहासकाळातला अखिल

पु. ग. सहस्रबुद्धे

भारताचा पहिला सम्राट चंद्रगुप्त मौर्य हा शूद्र होता. सम्राट अशोक हा त्याचा नातू अर्थातच शूद्र होता. दक्षिणेत प्रथमच साम्राज्य स्थापन करणारे सातवाहन घराणे शूद्र होते. ही मते पुराणांनीच मांडली आहेत. इतिहासपूर्वकाळातील आविक्षित मरुत्त हा शंभर अश्वमेध करणारा महाराजा शूद्र होता. पुराणे ज्या काळात लिहिली जात होती, त्या काळात गुप्तसाम्राज्य विस्तारत होते; गुप्त हे वैश्य होते; पण त्यांचा पहिला सम्राट चंद्रगुप्त याने लिच्छवी या क्षत्रिय घराण्यातील राजकन्येशी लग्न केले होते. म्हणजे हा प्रतिलोम विवाह होय. भारताचा नेपोलियन म्हणून ज्याची ख्याती आहे, तो सम्राट समुद्रगुप्त हा प्रतिलोम विवाहातूनच जन्मला होता. या घराण्यात कदंब या ब्राह्मण राजघराण्यातील कन्याही दिल्या होत्या. म्हणजे आणखी प्रतिलोम. शास्त्रकारांच्या मते सर्व प्रतिलोमसंतती ही शूद्र होय. अर्वाचीन पंडित म्हणतात त्याप्रमाणे, चांगले-वाईट परिणाम पाहून, शास्त्रकारांनी आपले शास्त्र लिहिले असते, तर असल्या विवाहाचा त्यांनी पुरस्कारच केला असता; पण देशकाल बघून, परिस्थिती अभ्यासून, प्रत्यक्ष अवलोकन करून बुद्धीच्या,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तर्काच्या आश्रयाने निर्णय करण्याची ऐपतच या शास्त्रकारांच्या ठायी नव्हती. त्यांच्या कोणत्याही ग्रंथात तर्कनिष्ठ कारणे कोणत्याही प्रसंगी दिलेली नाहीत. असे केल्याने सर्व कुळ नरकात जाईल, पुढील जन्मी ते कृमिकीटक होतील, अनंत जन्म या पापाचे प्रायश्चित्त भोगावे लागेल, अशीच कारणे ते देतात. पूर्वकाळी विदूर व धर्मव्याध हे दोघे शूद्र असून मोठे धर्मवेत्ते होते, म्हणून शूद्रांना धर्माधिकारही आहे, असे कोणी म्हणेल. त्यावर या शास्त्रकारांचे उत्तर असे आहे, की पूर्वजन्मीच्या पुण्याईमुळे त्यांना हे सामर्थ्य प्राप्त झाले होते, म्हणून सर्व शूद्रांना तसे होणार नाही. पण पुढील काळातील शूद्रांना पूर्वजन्मीची पुण्याई नव्हती, हे या शास्त्रकारांनी कसे ठरविले ? पण असा प्रश्न विचारणे हेच चूक आहे. कोणत्याही सुसंगत युक्तिवादावर त्यांचे शास्त्र उभारलेलेच नाही. त्यांना तसे उभारण्याचे सामर्थ्यच नव्हते. ज्यांना तशी ऐपत होती त्यांनी अगदी रोख व्यवहार पाहून, प्रत्यक्ष अवलोकन करून, आपले धर्मशास्त्र रचले होते. त्यामुळे शूद्र राजा होण्यास हरकत नाही, शूद्राला मंत्रिपद देण्यास हरकत नाही, चारित्र्यावरून वर्ण ठरवावा, अशा तऱ्हेचे निर्णय त्यांनी दिले होते.

डॉ. रा. ना. दांडेकर हे वैदिक वाङमयाचे संशोधक म्हणून जगप्रसिद्ध आहेत. स्वतंत्र प्रज्ञेने त्यांनी वेदांचे संशोधन केले आहे. त्यांनी १९५१ साली कौशिक व्याख्यानमालेत जी व्याख्याने दिली ती निबंधरूपाने प्रकाशित झाली आहेत. या ग्रंथात त्यांनी 'असुर' वरुण 'वृत्रहा' इंद्र व 'शिपिविष्ट' विष्णू या तीन देवतांचे संशोधनपूर्वक विवेचन केले आहे. या तीन देवतांना त्यांनी अवतरणात जी विशेषणे दिली आहेत त्यांना अनुलक्षून त्यांचे हे विवेचन आहे. वैदिक दैवतशास्त्र हे विकसनशील असे दैवतशास्त्र आहे, असे त्यांचे मत असून, त्यांनी ते पुढील परिच्छेदात संक्षेपाने मांडले आहे – वैदिक दैवतशास्त्राचा ठोकळेबाज पद्धतीने विचार करणे योग्य होणार नाही. वैदिक दैवतशास्त्र हे विकसनशील आहे, जिवंत आहे, गतिमान आहे – केवळ स्थितिमान नाही. वेदकालीन सांस्कृतिक इतिहासातील स्थित्यंतरांबरोबर वैदिक दैवतशास्त्रांतही अपरिहार्यपणे स्थित्यंतरे घडून आली असली पाहिजेत अणि या स्थित्यंतरांचा परिणाम म्हणजेच एखाद्या देवतेच्या व्यक्तिमत्त्वांत दिसून येणारे परस्परासंबद्ध किंवा परस्परविरोधी अंश ! त्या अंशांचे पौर्वापर्य सयुक्तिक रीतीने निश्चित करणे आणि त्यायोगे त्या देवतेच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा घडून आला असावा व का घडून आला असावा, याचे शक्य तितक्या वस्तुनिष्ठ पद्धतीने विवेचन करणे हे अत्यंत अवश्य आहे. या दृष्टीने वैदिक देवतांचा अभ्यास केला, त्यांच्या व्यक्तिमत्वात दिसून येणाऱ्या विसंगती आणि विरोध यांचे सयुक्तिक स्पष्टीकरण केले, म्हणजे त्या देवतांचे आचरणांस एक अभिनव दर्शन घडते, असे मला वाटते.

इरावती कर्वे हे नाव अलिकडच्या काळात सर्वतोमुखी झाले आहे. त्यांचे निबंध हे केवळ ललित निबंध नाहीत. सूक्ष्म जीवनदर्शन आणि समाजशास्त्राचा सुगंध घेऊन ते अवतरले आहेत. त्यामुळेच त्यांच्या निबंधांना एक गंभीर माधुर्य प्राप्त झाले आहे. परिपूर्ती हा त्यांचा निबंधसंग्रह या दृष्टीने वाचनीय आहे.

अलिकडे त्यांनी युगान्त या नावाने महाभारतावर जे निबंध लिहिले, ते बरेच गाजले. त्या संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कारही लाभला. त्यातील एक परिच्छेद असा–

महाभारतात जे काही अर्धवट उल्लेखिलेले व अतिशय कुतूहल जागृत करणारे विषय आहेत, त्यांमध्ये 'वासुदेव' हा एक आहे. त्या काळात तीन लोक वासुदेव होण्याची मनीषा बाळगून होते, असे दिसते. एक वसुदेवाचा मुलगा वासुदेव कृष्ण; दुसरा शिशुपाल. ह्याला जन्मतःच चार हात होते. त्यांतील दोन कृष्णाच्या दृष्टिपातानेच गळून पडले व त्यानंतर त्याने वासुदेव होण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. पण त्याचे कृष्णाशी भयंकर वैर होते, असे दिसते. पूर्वेकडे (?) पौंड्र देशाचा राजा स्वतःला 'वासुदेव' म्हणवून घेई. कृष्ण स्वतः सांगतो की, 'हा पौंड्र माझी चिन्हे धारण करतो.' पौंड्रावर चाल करून कृष्णाने त्याला युद्धात मारले, त्याचे कारण तो स्वतःला 'वासुदेव' म्हणवून घेई हें होय. 'वासुदेव' हे नाव प्राप्त करून घेणे म्हणजे काय होते हे स्पष्ट कोठेही सांगितलेले नाही. पण वासुदेव म्हणवून घेण्याची कृष्णाची धडपड पाहिली, म्हणजे त्यात काहीतरी विशेष होते, ह्याबद्दल शंका राहत नाही. कोठच्याही राज्याचा राजा नाही; सम्राट तर नाहीच नाही; पण वासुदेव असलेला असा कृष्ण होता. भगवद्गीतेत कृष्ण स्वतः म्हणतो, 'वृष्णीनां वासुदेवोऽहम्.' वसुदेवाला पुष्कळ बायका होत्या व त्यांना बलराम, सारण वगैरे मुलगेही होते. पण फक्त कृष्णच आपल्याला वासुदेव म्हणवून घेई, हे कसे ? प्रत्येक मुलाला आपल्या आईवरून नाव पडे. जसे रौहिणेय, कौंतेय, माद्रेय वगैरे. पण जरी निरनिराळ्या आयांचे मुलगे असले, तरी एका बापाचे असले, म्हणजे सर्वांचे पैतृक नाव सारखे असावयाचे. उदाहरणार्थ धर्म, भीम, अर्जुन हे कौंतेय होते व नकुल, सहदेव हे माद्रेय होते व पाचही जण पांडूचे म्हणून पांडव होते. त्याप्रमाणे खरे पाहिले तर वसुदेवाच्या सर्वच मुलांना वासुदेव ही संज्ञा असावयास पाहिजे होती. पण ती फक्त कृष्णालाच तेवढी दिसते. म्हणजे वासुदेव हे पैतृक नाव नसून काही विशेष अधिकार प्राप्त झालेल्या व्यक्तीनेच फक्त

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

द्यावयाचे ते पद होते. ज्याप्रमाणे राजसूय यज्ञ केलेल्या माणसाला सम्राट-पदही प्राप्त होई व एकाच वेळी राजसूय यज्ञ केलेले दोन राजे असू शकत नव्हते, तसेच काहीतरी वासुदेव ह्या पदवीत असावे. वासुदेव म्हणवून घेण्याची धडपड काही राजे करीत. पण खरोखर ती पदवी एकच मनुष्य धारण करू शकत असे.

दुर्गा भागवत याही व्यासंगी निबंधलेखिका आहेत. त्यांचा समाजशास्त्राचा व लोकसाहित्याचा विशेष अभ्यास आहे. त्यांच्या भाषेला लालित्याचा मनोहर स्पर्श आहे. ऋतुचक्र या नावाने त्यांनी जे निबंध लिहिले आहेत, ते उत्कृष्ट ललित निबंध ठरावे, अशा योग्यतेचे आहेत. व्यासपर्व हा त्यांचा महाभारतावरील निबंधसंग्रह होय. त्यातील एक परिच्छेद असा –

परीकथेतल्या राजपुत्राचा खरा प्राण इथेच कायमचा गेलेला आहे. नेहमीच्या परीकथेत गौरवाच्या शिखरावर नायक असताना कथेचा शेवट होतो आणि नायकाला चिरजीवन लाभते. या अभिनव व्यासकथेत मात्र अर्जुन लहानसहान मरणे मरत अखेर अशा तऱ्हेने जिवंतपणींच्या मोठ्या मरणात कायमचा गाडला जातो. स्वर्गारोहण करते ती त्याची केवळ छाया, युधिष्ठिराच्या भावाची छाया, द्रौपदीच्या पतीची छाया. त्याची स्वतःची छाया युद्धात हळूहळू झरू लागली आणि कृष्णमरणात कायमची विरली. अर्जुनाच्या वीरत्वाच्या स्फूर्तीचा झरा जसा कृष्ण, तसा अर्जुनाच्या दोषांचाही अक्षरशः वाटेकरी कृष्ण होतो. " मला मुलेबाळे, बायका, राज्य यांच्याहूनही, इतकेच काय पण प्राणांहूनही अर्जुन प्रिय आहे. " या कृष्णाच्या उद्गारांचा व्यासाने अतिसूचकतेने उपयोग करून घेतला आहे. " कृष्णाचा प्राण अर्जुन आणि अर्जुनाचा प्राण कृष्ण " या वचनाला धरून दोघांनाही एकाच विदारक नियतीला जखडून ठेवून व्यासाने मानवतेची मूल्ये कलेच्या परमोच्च पातळीवर कायमची नेऊन ठेवली आहेत. दुःखांतिका, नीती, बोध, कला, नाट्य, इतिहास, निरूपण – सारे मृत्यूच्या विराट पार्श्वभूमीवर केवळ मानवी आविष्कारात एकजीव करून त्याने ओतले आहे. हरघडीला जीवन व मृत्यू यांत असलेला ताणतणावा त्याने एकाच गतीत कायम राखला आहे. गर्भातल्या जीवापासून तो भीष्मासारख्या जराजीर्णापर्यंत सर्वांना एकाच आवरणात त्याने लपेटले आहे. दुष्टमुष्ट, लहानथोर – सारे विविध भावनांच्या भोवऱ्यात सापडून एकाच अंतमय अज्ञात सृष्टीत प्रवेश करून पाहता पाहता नाहीसे होताहेत. आणि उरते काय ? तर त्यांच्या कृत्यांच्या दीर्घकाळ मागे राहतील अशा जोवट, चिवट मातीवर चित्रविचित्र आकृती आणि त्या आकृती चक्रव्यूहासारख्या मेलेल्यांच्या नियतीतून उत्पन्न झालेल्या. जे जिवंत राहिले ते घुटमळत अखेरपर्यंत त्या आकृतीतच अडकून राहिले; केवळ मेल्यावरच मुक्त झाले. पण त्यांच्या त्या बद्धतेचे कायमचे प्रतीक म्हणजे अश्वत्थामा. त्याच्या मृत्यूहीनतेला तोडच नाही.

बाळशास्त्री हरदास यांनी रामायण, महाभारत, भागवत, इ. ग्रंथांचा सखोल अभ्यास केला असून, व्याख्यानरूपाने त्यांनी तो श्रोत्यांना परिचित करून दिला आहे. त्यांची व्याख्याने ग्रंथरूपाने प्रसिद्धही झाली आहेत. भारताचा इतिहास, यातून घ्यायचा बोध आणि भविष्यकालातील भारताची समर्थ वैभवशाली आणि नैतिक मूल्यांची कदर करणारी प्रतिभा त्यांनी वाचकांपुढे उभी केली आहे. महाभारताविषयी ते लिहितात –

बाळशास्त्री हरदास

'यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत् क्वचित्' जे येथे प्रतिपादन केले आहे तेच सर्व विश्वात आहे व जे येथे नाही असे कोठेही काही अपूर्व आढळावयाचे नाही. याचा अर्थ असा आहे की, विश्वाच्या सर्व व्यापारांचे व त्याच्या पाठीमागच्या शाश्वत आणि अशाश्वत अशा सर्व प्रकारच्या प्रेरणांचे महाभारतात संपूर्ण दिग्दर्शन झालेले आहे. नामे व रूपे कितीही बदलली व साधनांच्या बाह्य स्वरूपात केवढाही थारेपालट घडून आला तरी मानसशास्त्रज्ञांचे असे मत आहे की, सामाजिक व वैयक्तिक मनोवृत्ती व तिचे नैसर्गिक व्यापार अनादिकालापासून एकरूपच असतात व त्यांच्याच वेगवेगळ्या प्रकारच्या विहरणाचा व्यापार म्हणजेच मानवी इतिहासाचा ओघ होय. जो काय बदल किंवा जी काय भिन्नता असेल ती त्या विहरणाच्या बाह्य कवचापुरतीच असते. अंतःप्रेरणा व त्यांचे संघर्ष तेच चालू असतात. महर्षी व्यासांनी ही गोष्ट ओळखून या विहरणाचे व त्याच्या तरल अशा गतीचे आणि त्यामुळे घडून येणाऱ्या परिणामांचे जे भव्य चित्र महाभारतात चित्रित केले आहे, ते इतके सर्वंकष स्वरूपाचे आहे, की इतिहासाच्या ओघात व्यक्ती व समाजाच्या अवस्थेतील नावे, रूपे व साधनांचे दृश्य स्वरूप कितीही बदलले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तरी प्रत्येक संघर्षाच्या व साम्याच्या मुळाशी त्याच त्या अंतः-प्रेरणा व त्यांचेच विहार आढळल्यावाचून राहणार नाहीत. म्हणूनच जे महाभारती नाही 'ते नाहीच लोकत्रयी' ही ज्ञानदेवांची उक्ती अगदी सार्थ ठरते.

नरहर कुरुंदकर हे गेल्या दहा वर्षांत निबंधकार म्हणून पुढे आले आहेत. निबंधलेखकाला नुसते चिंतनच पुरत नाही, तर त्याला प्रतिभाही असावी लागते, हे वास्तव सत्य कुरुंदकरांच्या निबंधसंग्रहाकडे पाहिल्याने मनावर ठसते. विद्वानाला कोणताही विषय हा अविषय नसतोच, हे कुरुंदकरांच्या बाबतीत निःशंक म्हणता येते. मागोवा, रूपवेध, जागर, शिवरात्र हे कुरुंदकरांचे निबंधसंग्रह प्रकाशित आहेत. वाङ्मय, राजकारण, समाजकारण, ललितकला, इतिहास, भाषा, इ. सर्व विषयांत त्यांचे ज्ञान खोल आहे. त्यांची विद्या पल्लवग्राही नसून मूलग्राही आहे. वरवर दिसणाऱ्या एखाद्या साध्या घटनेतलाही एक वेगळाच आशय ते उलगडून दाखवतात. शकुंतलेने दुष्यंताशी गांधर्व विवाह केला आणि कण्वाने त्या संबंधाला बाहे उभारून मान्यता दिली ही आजवर कवींच्या रसिकवृत्तीचे पोषण करणारी घटना होती. पण या घटनेच्या मागे कुरुंदकरांना एक खोलवर दडलेले राजकारण दिसले व ते त्यांनी पुढीलप्रमाणे उकलून दाखवले –


प्रा. नरहर कुरुंदकर

इक्ष्वाकुवंशाचा राजा सगर याच्या पराक्रमामुळे पौरवांच्या सत्तेची धूळधाण उडाली. पौरवांचा राजा इलीन राज्यत्याग करून आपला मुलगा दुष्यंत यासह भटकत फिरत होता. असे भटकताना तो तुर्वसूंच्या राज्यात आला. तुर्वसू कुलातील एक राजा करंधमपुत्र मरुत्त याला मूलबाळ काहीच नव्हते. या राजाने दुष्यंताला आपला पुत्र म्हणून स्वीकारले. मरुत्ताच्या मृत्यूनंतर आपोआपच दुष्यंत तुर्वसूंचा राजा झाला. दुष्यंत ज्या वेळी राजा झाला, त्या वेळी इक्ष्वाकूंच्या सत्तेला उतार पडलेला होता. दुष्यंताने आपले पैतृक राज्य या घटनेची संधी घेऊन परत जिंकून घेतले. अशा रीतीने तो पौरवांच्या व तुर्वसूंच्या एकत्रित राज्याचा धनी झाला. पण यानंतर दुष्यंताची बुद्धी पालटली. त्याने आपली राजधानी परत यमुनेच्या काठी प्रतिष्ठान केली. तो स्वतःला पौरव म्हणवून घेऊ लागला. मरुत्ताने दुष्यंताला तुर्वसू केले व तुर्वसूंचा राजा केले. तुर्वसू कुलाच्या या उपकाराचे स्मरण दुष्यंताने ठेवायला हवें होते, ते त्याने ठेवले नाही. तुर्वसूंच्या दयेवर तो राजा झाला. तुर्वसूंच्या सेनेच्या शौर्यावर त्याने पैतृक राज्य पुन्हा हस्तगत केले व तो स्वतःला पौरव म्हणू लागला. त्यामुळे विनाकारण तुर्वसू मांडलिक झाले. पौरव घराण्यातील दुष्यंत, तुर्वसूंचा सम्राट झाला. पुराणात जरी उल्लेख नसला, तरी दुष्यंताच्या या कृत्यामुळे तुर्वसू असंतुष्ट झाले असतील, हे आपण समजू शकतो. या तुर्वसूंचे राजपुरोहित कण्व होते. ऋग्वेदापासून व प्रसिद्ध दाशराज्ञ युद्धापासून तुर्वसूंचे पुरोहित कण्व होते. दुष्यंताने स्वतःला पौरव म्हणवून घेतले याचा अर्थ काण्वांचे राजपुरोहितपद संपुष्टात आले हा होतो. या घटनेच्या संदर्भात भरताने पुन्हा काण्वांना राजपुरोहित केले, या ओळीचा अर्थ आपण समजून घेतला पाहिजे. तुर्वसू सरदारांच्या बरोबरच काण्वकुळही दुष्यंताच्या विरोधी असणारे पुरोहितांचे अत्यंत प्रभावशाली कुळ होते. भरताच्या नंतर मामतेय भारद्वाज काण्व हा पौरव–तुर्वसूंच्या संयुक्त राज्याचा राजा झाला. ही पुराणग्रंथांनी पुरविलेली माहिती हीं घटना समजून घेण्याच्या दृष्टीने बरीच महत्त्वाची आहे. ऐतिहासिक घटना म्हणून ज्या वेळी शकुंतलेच्या आख्यानाकडे आपण पाहू लागतो, त्या वेळी काण्व पुरोहितांनी व तुर्वसूंनी शकुंतलेच्या साहाय्याने दुष्यंताच्या गादीवर काण्व तुर्वसूंच्या कह्यातला असणारा भरत आणून बसवला व पौरव–तुर्वसू राज्य पुन्हा तुर्वसूंच्या नेतृत्वाखाली आणले, हा इतिहास उघड होतो.

रामचंद्र चिंतामण ढेरे हे नव्या पिढीतले एक विख्यात संशोधक आहेत. त्यांनी आजवर केलेले संशोधन विद्वानांनाही विचार करायला लावणारे ठरले आहे. महाराष्ट्रातले आणि तदनुषंगाने भारतातले सर्व धार्मिक संप्रदाय हे त्यांच्या संशोधनाचे क्षेत्र आहे. जुन्या धूळ खात पडलेल्या हस्तलिखित पोथ्या व इतरही काही साधने विचारात घेऊन त्यांनी संशोधनाचा व्याप मांडला असून, काही सांप्रदायिक कूटप्रश्न उलगडून दाखवण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. या कामी त्यांची तर्कशक्ती प्रभावी ठरली आहे. त्यांचा प्रत्येक तर्क हा साधार असतो आणि त्यांच्या विवेचनात सूत्रबद्धता असते. विविधा या पुस्तकात त्यांचे निबंध संग्रहित असून, त्यांतले विषय–वैचित्र्य सहजपणे लक्षात येते. इतिहाससाधन म्हणून वाङ्मयाचे मूल्य ठरवताना ते पुढील विचार व्यक्त करतात –

वाङ्मयाचा आणि लोकमानसाचा असा जिव्हाळ्याचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संबंध असल्यामुळे इतिहासातील वाङ्मयीन साधनांचे महत्त्व निश्चित होते. परंतु इतिहाससाधन म्हणून वाङ्मयाच्या महत्त्वाला काही मर्यादाही आहेत, याची मला जाणीव आहे. वाङ्मय हे लोकमानसाचे सार्वकालीन आणि सर्वांगीण प्रतिनिधित्व करते, असे नाही. शिवाय वाङ्मयात सहेतुकपणे व अहेतुकपणाने ऐतिहासिक सत्याचा अपलाप वा विपर्यासही केला जातो. अर्थातच सहेतुकपणाने केलेला ऐतिहासिक सत्याचा अपलाप वा विपर्यास काही विशिष्ट वृत्तींतून घडत असतो. सत्यापलापाला कारणीभूत ठरणारे हे हेतूही इतिहासाचा विषय ठरतातच! अन्य निश्चित स्वरूपाच्या इतिहास – साधनांच्या प्रकाशात या सत्यापलापाचा वा सत्यविपर्यासाचा आपण शोध घेऊ लागलो, तर इतिहासाच्या एका सूक्ष्मतम अंगाचे दर्शन आपणांस घडू लागते. यावरून आपणांस असे म्हणता येते, की इतिहास – साधन म्हणून वाङ्मयाच्या काही मर्यादा असल्या, तरी इतिहासाच्या व्यापक अध्ययनात वाङ्मयीन साधने डावलून चालणार नाहीत.

रा. चिं. ढेरे

विद्वत्त्व आणि रसिकत्व यांचा ढेरे यांच्या ठिकाणी सुरेख संगम झाला आहे, हे विशेष होय. अमृतकन्या आणि इंद्रायणी या पुस्तकांतले त्यांचे ललित निबंध वाचताना त्यांच्या विदग्ध रसवृत्तीचा पदोपदी प्रत्यय येतो.

गेल्या पन्नास वर्षांच्या कालखंडात मराठी भाषेला असे अनेक मातबर निबंधकार लाभले आहेत. भास्करराव जाधव, श्री. दा. सातवळेकर, न. र. फाटक, कुसुमावती देशपांडे, प्रभाकर पाध्ये, अरविंद मंगरूळकर, ह. रा. महाजनी, शं. दा. पेंडसे, प्र. रा. देशमुख, पां. वा. गाडगीळ, केशवराव भोळे, कृ. द. दीक्षित, ना. गो. नांदापूरकर, रा. भि. जोशी, वि. भि. कोलते, वा. ना. देशपांडे, पु. मं. लाड, आचार्य भागवत, शंकरराव देव, गं. भा. निरंतर, ना. मा. संत, आनंद साधले, मधुकर केचे, वा. ल. कुलकर्णी, वि. ल. बर्वे, वि. पां. दांडेकर, शशांक (वा. मा. दाभाडे) म. ना. अदवंत, अ. का. प्रियोळकर, का. दा. नायक, माधव आचवल, दादा धर्माधिकारी, महादेवशास्त्री दिवेकर, शं. ल. गोखले, रघुनाथशास्त्री कोकजे, ज. स. करंदीकर, श्री. ना. बनहट्टी, गं. बा. सरदार, इत्यादी.

प्रस्तुत कालखंडात निबंध हा लोकमान्य असा वाङ्मयप्रकार होता. लोकजागृती हा या युगाचा संदेश होता. हा संदेश आपापल्यापरी देऊन निबंधप्रकाराला भरघोसपणा आणून देणारे अनेक श्रेष्ठ निबंधकार या कालखंडात झाले. ल. रा. पांगारकर, ना. गो. चापेकर, इ. अनेक नावे या संदर्भात सांगता येतील. पांगारकरांनी भाविकपणे संतवाङ्मयाचा अभ्यास केला व तो अभ्यास रसाळ शैलीने वाचकांपर्यंत पोचविला. चापेकरांनी विविध सामाजिक विषयांचे चिंतन केले. त्यांची शैली सुबोध पण खोचक आहे. गच्चीवरील गप्पा हे त्यांचे छोटे पुस्तक वाचले तरी त्यांच्या वैशिष्ट्याची कल्पना येते. चिपळूणकर, आगरकर, परांजपे व केळकर ही या कालखंडातल्या निबंधराजीची शिखरे होत. त्यांचे वैचित्र्यपूर्ण सौंदर्य आजही डोळ्यात भरते.

इ. स. १९२० नंतरच्या काळात निबंधलेखनाला ओहोटी लागली असे वरवर पाहता दिसत असले, तरी या काळात मराठी निबंधाचा कायापालट होत होता, असे दिसून येईल. शैली, विषय, प्रतिपादनपद्धती, इं. सर्व दृष्टींनी हा पालट झाला. श्री. वि. स. खांडेकर म्हणतात – या काळातील माटे, कालेलकर, माडखोलकर, र. धों. कर्वे, शेजवळकर, साने गुरुजी, द. के. केळकर, विनोबा श्री. के. क्षीरसागर, वा. ल. कुलकर्णी, न. वि. गाडगीळ, इरावती कर्वे, प्रा. भगवंत देशमुख, पु. ग. सहस्रबुद्धे, पं. महादेशास्त्री जोशी, एवढीच नावे उच्चारली, तरी निबंधाला प्राप्त झालेली विविधता व संपन्नता लक्षात येईल.



ल. रा. पांगारकर

समीक्षात्मक निबंध – मराठी काव्यकथावाङ्मयाबरोबरच मराठी साहित्यविचार जन्मास आला. रूढ साहित्यापेक्षा वेगळे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असे साहित्य जेव्हा जेव्हा नव्या जाणिवा, नव्या रीती आणि नवे हेतू घेऊन जन्मास आले, तेव्हा तेव्हा त्या त्या साहित्यिकांनी आपापली वाङ्मयीन भूमिका विशद केल्याचे दिसून येते. केवळ टीकाकारांचा व साहित्यविमर्शकांचा असा एक स्वतंत्र वर्गही महाराष्ट्रात निर्माण झाला आहे. या समीक्षक साहित्यशास्त्रज्ञांपैकी काही धुरंधर समीक्षकांचा परिचय असा–

रा. श्री. जोग हे महाराष्ट्रातल्या प्रमुख साहित्यशास्त्रज्ञांपैकी एक होत. त्यांनी सौंदर्यशोध आणि आनंदबोध या ग्रंथांची रचना केली आणि सौंदर्याचा रसिक मनावरील परिणाम जो आनंद त्याच्या स्वरूपाची मीमांसा केली. जोगांना कलेचे स्वातंत्र्य मान्य आहे. ते खऱ्या काव्यानंदाला निस्वार्थी, उदात्त आणि अपार्थिव मानतात.

जोगांच्या सौंदर्यशोध आणि आनंदबोधानंतर द. के. केळकर यांचा काव्यालोचन व य. र. आगाशे यांचा सारस्वतसमीक्षा हे ग्रंथ प्रसिद्ध झाले. रसव्यवस्था आणि करुणरसानंदमीमांसा हे या काळातले वाङ्मयीन चर्चेचे विषय होते. त्याबरोबरच वाङ्मय हे 'सत्यं शिवं सुंदरम्' असावे हाही एक चर्चेचा विषय बनला होता. सत्य हे वाङ्मयाचे समवायी कारण असावे, शिवं चा संबंध परिणामरूपाने आणि सुंदरंचा मूर्तिरूपाने असावा, असे श्री. म. माटे यांनी प्रतिपादिलेले आहे.

श्री. के. क्षीरसागर हेही सत्य-शिव-सुंदराचाच पुरस्कार करणारे आहेत. त्यांच्या मते कला हा एक स्वतंत्र अध्यात्ममार्गच आहे. ते स्वतःला सौंदर्यवादी आणि अध्यात्मवादी मानतात. रिॲलिझम, रोमँटिसिझम आणि मिस्टिसिझम हे आधुनिक साहित्याचे त्रिनेत्र आहेत, असे त्यांचे मत आहे. सौंदर्यासंबंधीचे अनावर आकर्षण आणि त्याबरोबर ते सौंदर्य खरेखुरे प्राप्त होत नाही, हाती येत नाही याबद्दल चुटपुट, हुरहुर, हे सौंदर्यवादी कवींच्या काव्याचे रहस्य असते, असे ते म्हणतात. या सौंदर्यालिंगनातून – सान्निध्यातही अनुभवाला येणाऱ्या सौंदर्याच्या या हुलकावणीतून – सौंदर्यवादी कवीच्या अध्यात्मदर्शनाची वाट फुटत असते.

कलानिर्मितीच्या प्रक्रियेचे सूक्ष्म विश्लेषण करणारे वामन मल्हार जोशी आणि कलाकृतीच्या सौंदर्याचा शोध घेणारे रा. श्री. जोग या दोघांनी मराठी साहित्यकलाविमर्शाला एक नवीन दिशा दाखवली आणि एक वस्तुनिष्ठता मिळवून देण्याचा प्रयत्न केला. वा. म. जोशी यांच्या साहित्यसमीक्षेतून पुढच्या पिढीतल्या कित्येक साहित्यविमर्शकांना प्रेरणा मिळाली. काहींनी मार्क्सवादी दृष्टिकोन स्वीकारून वाङ्मयसमीक्षा आरंभिली. अशा लेखकांमध्ये लालजी पेंडसे हे प्रमुख आहेत. कवीची प्रतिभा 'नियतिकृतनियमरहित' असते हे त्यांना मान्य नाही. विशिष्ट भौतिक परिस्थितीत विशिष्ट प्रकारच्याच विचारसरणी व कलाकृती निर्माण होत असतात व प्रत्येक फरकाला अनुकूल असेच कलेचे स्वरूप व तंत्र बनत असते, असे लालजी पेंडसे यांच्या विचारांचे सूत्र आहे. कलेपेक्षा जीवन महत्तर आहे. कला ही आर्थिकतेच्या मांडीवर बागडणारी असल्याने भौतिक समृद्धीची बाळवाटी तिला मिळत राहील, तरच ती गोंडस व बाळसेदार बनेल, असे लालजी पेंडसे वारंवार पटविण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या मते वस्तुगत उत्क्रांतीच्या अनुरोधाने जीवनाचे चित्रण करणे हा खरा वास्तववाद होय.

पण पु. य. देशपांडे यांना असे मार्क्सवादी ठोकळेबाज पद्धतीने कलाकृतीचे मूल्यमापन करणे चुकीचे वाटते. त्यांच्या प्रतिपादनाचे सूत्र असे, की कालिदासाच्या शाकुंतलातील अथवा मेघदूतातील सौंदर्य केवळ 'वर्गीय लक्षणेने' स्पष्ट करता येणे अशक्य आहे. कलेची प्रेरणा 'व्यक्तिनिष्ठ' मानसिक कल्लोळात आहे. यामुळे वर्ग-कला आणि मानवी-कला असे कलेचे वर्गीकरण करणे मूलतः चुकीचे आहे. कला – अस्सल कला – सदैव मानवीच असते. कोणत्याही वर्गाचे हितसाधन हा अस्सल कलेचा हेतू नसतो, व्यक्तिजीवनाचे मानवताप्रधान स्वातंत्र्य हाच एकमेव 'ध्वनी' कलेतून सूचित झालेला असतो.

इ. स. १९४५ नंतरचे विख्यात साहित्यविमर्शक म्हणजे बा. सी. मर्ढेकर हे होत. त्यांचे वाङ्मयीन सौंदर्यशास्त्र जे मराठीत आले, ते परंपरेचे धागे तोडूनच आले. मर्ढेकरांनी कला – साहित्यविचार अकलात्म संदर्भातून सोडवून शुद्ध कलेच्या क्षेत्रात आणून ठेवला. साहित्यविषयक मूलभूत तत्त्वांचा विमर्श त्यांनी अगदी नव्याने सुरू केला. त्यांच्या विचारांची काही सूत्रे अशी–

(१) सौंदर्य हे एक स्वतंत्र, स्वायत्त आणि अंतिम मूल्य आहे. कलाव्यवहाराचे उद्देश सुंदर वस्तूची निर्मिती करणे आणि सौंदर्यानुभव घेणे, हे असतात.

(२) अस्तित्वाचे अंतिम घटक म्हणजे संवेदनांचे आशय आणि अर्थ होत.

(३) संवेदनांच्या आशयांची तर्कशास्त्राच्या नियमांना अनुसरून रचना केली असता वास्तव विश्व सिद्ध होते. या विश्वातील वस्तूविषयी जी विधाने आपण करतो, त्यांचे सत्य तर्कशास्त्राच्या नियमांच्या कसोटीवरून पडताळून पाहायचे असते.

(४) अस्तित्वाच्या अंतिम घटकांची संवाद, विरोध आणि समतोलपणा या लयतत्त्वानुसार रचना केली असता सुंदर वस्तू निर्माण होते. ज्या वस्तूच्या घटकांचे संबंध या लयतत्त्वानुरूप असतात ती वस्तू सुंदर असते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(५) ललितसाहित्य हा एक कलाप्रकार आहे. साहित्य-प्रकृतीचे अंतिम घटक म्हणजे शब्दांनी निर्दिष्ट झालेले भावनारंजित अर्थ. साहित्यप्रकृतीमध्ये या घटकांची रचना लयतत्त्वानुसार व्हावी लागते; एखाद्या संभवनीयता किंवा आवश्यकता यांसारख्या मार्मिक तत्त्वानुसार नव्हे.

मर्ढेकरांची प्रारंभी उपेक्षा झाली; पण पुढे त्यांचे विचार सोप्या भाषेत स्पष्ट करणारे लेख लिहिले जाऊ लागले. मात्र त्यांचे कला-विचार जसेच्या तसे स्वीकारले गेले, असे नव्हे. त्यांनी पुरस्कारिलेल्या लयतत्त्वाला अतेकांनी अनेक अर्थांनी विरोध केला आहे. मर्ढेकरांच्या लयतत्त्वाचा विचार त्यांच्या वाङ्मयीन महात्मतेच्या विचारांच्या संदर्भात करू लागल्यास त्या दोहोंचा आंतरिक संबंधच जाणवत नाही, ही मर्ढेकरांच्या विचारांतली एक फार मोठी अडचण सर्वांनाच कळून चुकली आहे; पण त्यांच्या सौंदर्यशास्त्राची तत्त्वज्ञानाच्या पातळीवरून मूलगामी परीक्षा करण्याची प्रवृत्ती अलिकडे खूपच बळावली आहे. मागे सुरेंद्र बार्लिंगे आणि मे. पुं. रेगे यांनी मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रीय अभ्यासातील शिस्तीचा अभाव चिकित्सकपणे दाखवून दिला होता. आता नरहर कुरुंदकर, भा. ज. कविमंडन व प्रभाकर पाध्ये यांनी मर्ढेकरांच्या विचारांची चिकित्सा करून कलेच्या स्वरूपाविषयी स्वतःचे काही वेगळे विचार मांडले आहेत. मर्ढेकरांच्या कलास्वरूपावर रसेल, कोहलर, जेम्स, वॅटसन यांच्या तत्त्वज्ञानाचा आणि क्लाइव्ह बेल व रोजर फ्राय यांच्या कलामीमांसांचा जो परिणाम झाला आहे, तो एकजिनसीपणाने झाला नाही. किंबहुना तसा तो होणे वस्तुतः शक्य नाही, असे कुरुंदकरांचे मत आहे.

वाङ्मयीन टीका किंवा कलाक्षेत्रावरील टीका ही सौंदर्यशास्त्रीय अधिष्ठानापासून बाजूला काढली जाऊ शकत नाही. स्वानुभूतीची पाऊलवाट व सौंदर्यशास्त्रीय अवघड चढण हे दोन्ही भिन्न मार्ग नाहीत. हे मार्ग योग्य पातळीवर योग्य प्रमाणात जर सहकृत झाले तरच सौंदर्यशास्त्र व कलेचे तत्त्वज्ञान यांचे भले होण्याचा संभव आहे, अशी भा. ज. कविमंडन यांची भूमिका आहे.

प्रभाकर पाध्ये यांनी मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राचा व कलामीमांसेचा सूक्ष्म व तात्त्विक अभ्यास करून, स्वतः मर्ढेकरांना न उमजलेली काही स्थळे उलगडून दाखविली आहेत आणि मर्ढेकरांच्या तत्त्वप्रणालीवर घेतल्या गेलेल्या काही आक्षेपांचे निरसनही केले आहे; शिवाय आपण स्वतः आणखी नवे काही आक्षेप घेऊन त्यांचे स्पष्टीकरण दिले आहे. आजच्या मानसंशास्त्राच्या आणि ज्ञानतंतुशास्त्राच्या आधारे त्यांनी हे सारे विवेचन आणि पुनर्मूल्यमापन केले आहे. 'मानसशास्त्र, सौंदर्यशास्त्र आणि मर्ढेकर' असेच त्यांच्या लेखमालेचे नाव आहे.

वा. ल. कुलकर्णी यांनी अर्थपूर्ण भावानुभव हा ललितकृतीचा अंतिम घटक मानला आहे. एखाद्या ललितकृतीची श्रेष्ठता साहित्यमूल्यांच्याच आधारे ठरविता येणे हे कसे शक्य आहे, ते त्यांनी दाखविले आहे. हा भावानुभव जितक्या नानाविध अर्थांचे संदर्भ सुचवीत असेल, त्याला जितकी अनेकविध परिमाणे असतील, त्याच्या कक्षा अनेक अनुभवांच्या कक्षांमध्ये जितक्या एकसारख्या मिसळल्या असतील आणि या साऱ्या घटकांची संघटना अनेक पदरी व गुंतागुंतीची असूनही अनन्यसाधारण घाट घेऊन अभिव्यक्त होत असेल, तितकी ती ललितकृती श्रेष्ठ ठरते, असे वा. ल. कुलकर्णी यांचे मत आहे.

प्रभाकर पाध्ये

साहित्य ही एक स्वतंत्र वस्तू आहे, असे पु. शि. रेगे मानतात आणि जीवन जगले तर साहित्य जगणार नसून साहित्य जगले तर जीवनात जगण्यासारखे काहीतरी उरणार आहे, असा साहित्याच्या सामर्थ्याचा गौरव करतात. कलेच्या स्वयंभू आणि स्वतंत्र अस्तित्वावर त्यांची पूर्ण निष्ठा आहे.

गंगाधर गाडगीळ यांनी कलाविचारातील अनेक रूढ प्रश्नांचे अप्रस्तुतत्व आणि वैयर्थ्य स्पष्ट केले आहे. साहित्य म्हणजे अनुभवाची अभिव्यक्ती, असे ते मानतात आणि मग साहित्यातून प्रगटणाऱ्या अनुभवाची रूपचिकित्सा करतात. साहित्यात जो अनुभव व्यक्त होतो, ती एक निर्मिती असते. साहित्यिक जो अनुभव, जी प्रतिमा, जी संगती पूर्वी अस्तित्वात नव्हती ती निर्माण करतो. म्हणून त्याच्या व्यक्तिमत्त्वाला महत्त्व असते. त्याच्या निर्मितीवरून त्याच्या प्रतिभेची उंची ठरविता येते.

कलावंताची दृष्टी उदंड मानवतेची असली पाहिजे. विशाल मानवतेच्या भूमिकेवरून तटस्थपणे संपूर्ण सत्य पाहून जो तिच्याशी तादात्म्य पावेल आणि मनाच्या सर्व वृत्तींना साकल्याने आवाहन करणारी कला निर्मू शकेल तोच शाश्वत कलाकार ठरेल, असे कुसुमावती देशपांडे म्हणतात.

कलावंतांनी आणि टीकाकारांनी, तसेच रसिकांनी आणि वाचकांनी कलास्वातंत्र्याला जपले पाहिजे आणि एकांतिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यक्तिवादी (मर्ढेकर) आणि बोधवादी (य. द. भावे) यांच्या गैरसमजापासून सावध राहिले पाहिजे, असे दि. के. बेडेकर सांगतात. कलेचे मोजमाप कलेनेच केले पाहिजे असाही त्यांचा दावा आहे. त्यांच्या साहित्यविचारात सौंदर्यवाद,जीवनवाद आणि मार्क्सवाद या तीन्ही वादांचे विलक्षण रसायन बनले आहे. सौंदर्यावर त्यांची निष्ठा आहे म्हणून ते सौंदर्यवादी, सौंदर्य-प्रत्यय मानवी जीवनाच्या संदर्भात घडतो म्हणून ते जीवनवादी आणि जीवनसापेक्ष समस्या ही सामाजिक. आर्थिक, राजकीय, इ. व्यवहारांशी संदर्भ ठेवते म्हणून ते मार्क्सवादी होत.

शरच्चंद्र मुक्तिबोधांची कलामीमांसा प्राधान्याने परिस्थिति-निष्ठ आहे. कलावंताचे निर्भेळ स्वातंत्र्य त्यांना मान्य नाही. अभिव्यक्तिगुणापेक्षा आशयनिष्ठ महात्मतेवरच कलाकृतीचे मूल्य अवलंबून असते, असे ते प्रतिपादितात. मर्ढेकरांच्या विचारसरणीचा हा प्रतिवाद आहे.

कलेची ही परिस्थितिनिष्ठमीमांसा द. ग. गोडसे यांनी आपल्या 'पोत' या ग्रंथात शास्त्रीय पद्धतीने पण स्वतंत्रपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या साऱ्या प्रबंधाचे मुख्य सूत्र असे, की प्रत्येक आविष्काराच्या निर्मितीची प्रेरणा कलावंताला त्या त्या कालखंडातील जीवनविषयक निष्ठांतूनच मिळते.

कलेच्या क्षेत्रात आदर्श जीवनवादाचा पुरस्कार पु. ग. सहस्रबुद्धे यांनी केला आहे. त्यांच्या विचारांचे सार असे — वास्तववाद हा जीवन–विषयक तत्त्वज्ञानातून निर्माण होतो; मानवी जीवनाचे सम्यक आकलन झालेले असेल तरच या तत्त्वज्ञानाची अभिरुची माणसाच्या ठायी निर्माण होते. टिळक, वॉशिंग्टन, चर्चिल, या नेत्यांना मानवसमाजाचे जितके ज्ञान आवश्यक आहे, तितकेच वास्तववादी महाकाव्य निर्माण करणाऱ्या कवीलाही ते आवश्यक आहे. थोर ललितवाङ्मय म्हणजे 'जीवनमहाभाष्य' होय.

प्रचाराची पातळी वजा करून व्यापक दृष्टीने जीवनवादाचा जोरदार पुरस्कार करणाऱ्यांमध्ये वि. स. खांडेकर हे अग्रस्थानी आहेत. ते कलाविरोधी नाहीत; पण कलेहून जीवनाला मोठे मानणारे आहेत. जीवन हे केवळ कलामय नाही. जीवनात ज्या अत्यंत रम्य आणि वंद्य गोष्टी आहेत, त्यांत कलेबरोबर नीतीचा आणि सत्याचाही समावेश होतो. नीतीच्या नरड्याला नख लावून किंवा सत्य पायदळी तुडवून कला नाच करू लागली, तर ती सात्त्विक आनंद देऊ शकणार नाही, असे त्यांचे मत आहे.

आधुनिक काळात संस्कृत साहित्यशास्त्राच्या अभ्यासालाही एक वेगळी दिशा लागली आहे. संकलन, संपादन, संस्करण आणि समन्वय या अवस्थांतून संस्कृत साहित्यशास्त्र आता बाहेर पडले आहे. या बाबतीत ग. त्र्यं. देशपांडे यांचा भारतीय साहित्यशास्त्र हा ग्रंथ महत्त्वपूर्ण ठरला आहे. भरताचे नाट्यशास्त्र आणि संस्कृत काव्यशास्त्र यांच्या जोड अभ्यासातून संस्कृत साहित्यविचाराचे मूळ शुद्ध रूप आणि त्याच्या विकासावस्था यांचा शोध घेण्याचा प्रयत्न देशपांडे यांनी केला आहे.

विनोदी निबंधलेखन– जुन्या मराठी साहित्यात विनोद फारसा आढळत नाही. अध्यात्मविद्या व हरिभक्ती या दोन विषयांचा जुन्या वाङ्मयावर प्रभाव असल्यामुळे विनोदाकडे कुणाचे लक्ष गेले नाही. संतवाङ्मयात तुरळक विनोदस्थाने आढळतात. एकनाथांची काही भारुडे, तुकोबांचे काही अभंग, श्रीधराचा हरिविजय यांत काही ठिकाणी विनोद डोकावतो. पण अशी स्थळे थोडीच. रामदासांनी तर 'टवाळां आवडे विनोद' म्हणून विनोदाची टवाळीच केली आहे.

अव्वल इंग्रजीच्या काळात विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या निबंधमालेत 'विनोद व मह्दाख्यायिका' हे सदर सुरू केले होते. हरिभाऊ आपटयांच्या करमणूक पत्रातही विनोदाचे एक सदर असे. ज्ञानमित्र व लोकमित्र या पत्रांनीही विनोदाला थोडी जागा दिली होती. इ. स. १८९३ साली डॉन क्विक्झोट या पुस्तकाचे शामभट आणि त्याचा शिष्य बटो नावाचे रूपांतर प्रसिद्ध झाले व ते काही काळ लोकप्रिय ठरले. हिंदुपंच या पत्राने तासमर मौज या नावाचे पुस्तक १८८५ साली प्रसिद्ध केले आणि ते लोकांना आवडले.

पण मराठी साहित्यात अस्सल विनोदाची गंगोत्री निर्माण झाली ती श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्यापासून. विनोदाला प्रतिष्ठाही त्यांनीच मिळवून दिली. कोल्हटकरांनी आपले सुदाम्याचे पोहे या नावाचे विनोदी लेख विविधज्ञानविस्तारातून प्रसिद्ध करण्यास सुरवात केली. त्यांनी जो कित्ता घालून दिला तोच थोडयाफार फरकाने त्यांच्या शिष्य–प्रशिष्यांनी गेली ५०–६० वर्षे गिरविला आहे. कोल्हटकरांचा विनोद हा विनोदासाठी विनोद नव्हता. समाजाची सामाजिक व धार्मिक सुधारणा हे त्याचे उद्दिष्ट होते. विनोदाच्या द्वारे अनिष्ट रूढींचे विध्वंसन, लोकभ्रमांचा निरास व धर्मभोळेपणाचे उच्चाटण हे त्रिविध ध्येय त्यांनी अंगिकारले होते. विनोदासाठी त्यांनी मी (सुदामा), बंडूनाना व पांडूतात्या असे तीन मानसपुत्र निर्माण केले होते. या तिघांच्या हस्ते त्यांनी समाजातल्या अनेक व्यंगांवर प्रहार केले. शिमगा, गणेशचतुर्थी, श्रावणी, भविष्य-कथनाची साधने, साधुसंत, पांडुतात्यांची निर्जळी एकादशी, अशासारखे विनोदी लेख लिहून सामाजिक व धार्मिक बाबतीत कुठे-कुठे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुधारणा आवश्यक आहे ते त्यांनी दाखवले. त्यांनी जसे वाचकांना खदखदून हसायला शिकविले तसेच विचार करायलाही शिकविले.

राम गणेश गडकरी ऊर्फ बाळकराम हे कोल्हटकरांचे शिष्य होत. त्यांच्या विनोदात कोल्हटकरांच्या विनोदाचे बरेच विशेष उतरले आहेत. ठकीच्या लग्नासंबंधीच्या लेखात त्यांनी लग्न जमविण्याच्या पद्धतीची रेवडी उडविली आहे; तर कवींचा कारखाना या लेखात मारून मुटकून कवी बनलेल्या 'कवड्यांना' उद्देशून खरमरीत उपहास आहे. कल्पकता, कोटिबाजपणा आणि अतिशयोक्ती या बाबतींत गडकरी कोणालाही हार जाणारे नाहीत. तिंबूनानांनी बाळकरामाला ठकी पत्करण्याचे सुचविताच त्याचे हृदय बंद होण्याची पाळी आली. तेव्हा नानांनी चार साधे डॉक्टर, तीन देशी वैद्य, एक गुरांचा डॉक्टर, दोन वैदू, एक खाटिक व एक चांभार एवढ्यांची एक कमिटी बसविली, इत्यादी वर्णनात अतिशयोक्तीचा कडेलोट आहे. कोल्हटकरांच्या बंडूनाना–पांडूतात्यांप्रमाणेच बाळकरामांनी तिंबूनाना, बाळक्या, ठकी अशी काल्पनिक पात्रे तयार करून त्यांच्याकरवी बहारीचा विनोद साधला आहे.

काशिनाथ नारायण पटवर्धन ऊर्फ नाटकी यांनी 'नाटक्याचे तारे' नावाचे लेख लिहून रंगभूमीविषयी काही पडद्यामागच्या व काही पडद्यापुढच्या अशा काही गोष्टींवर विनोदी टीका लिहिली आहे.

कै. गो. गं. लिमये यांनी विनोदाला एक नवे, मोहक व अनुकरणीय असे रूप दिले. दैनंदिन जीवनातल्या साध्या व प्रासंगिक विषयांवर त्यांनी आपल्या विनोदाची उभारणी केली. कोटिबाजपणाला त्यांनी फारसा थारा दिला नाही व कल्पकतेला स्वैर सोडले नाही. त्यामुळे त्यांचा विनोद स्वाभाविक वाटतो.

चिं. वि. जोशी

चिं. वि. जोशी यांनी जेव्हा रत्नाकर मासिकात चिमणराव व गुंड्याभाऊ या मानसपुत्रांना जन्म दिला, तेव्हा लोकांना कोल्हटकर व गडकरी यांचे नव्याने स्मरण झाले. पण असे असले, तरी जोश्यांच्या विनोदाचे स्वरूप कोल्हटकर–गडकऱ्यांहून बरेच भिन्न आहे. वास्तवता हा जोश्यांच्या विनोदाचा प्राण ठरला आहे. डॉक्टर, वकील, शिक्षक, संशोधक, विमा–एजंट, लग्नजुळव्या, घरगुती नोकर, इ. समाजातल्या सर्व थरांतील व्यक्तींची विनोदी चित्रे त्यांनी रेखाटली असून, अनेक सदोष घटनांचे विडंबन केले आहे. शुद्ध व सात्त्विक, तसाच प्रसंगनिष्ठ व स्वभावनिष्ठ विनोद कसा करावा, याचा जणू आदर्शच त्यांनी निर्माण करून ठेवला आहे. स्टेटगेस्ट, स्टेशनस्टाफची मेजवानी, लग्नसराई, वरसंशोधन, गुंड्याभाऊचे दुखणे, घरगुती नोकरांचा प्रश्न, स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग, इ. त्यांचे लेख वरील विधानाची साक्ष देतील.

ना. घों. ताम्हनकर यांनी दाजी नावाचा एक मानसपुत्र निर्माण केला. तो प्रामाणिक, सत्यप्रिय, लोकसेवक व रूढिविध्वंसक असा होता. त्याचे चालणे, बोलणे, वागणे, सारे काही चाकोरीबाहेरचे असल्याने स्वभावनिष्ठ व प्रसंगनिष्ठ अशा उभयविध विनोदाला जागोजाग वाव मिळाला आहे. ताम्हनकरांच्या दाजीने मराठीच्या विनोदी साहित्यात चांगली भर टाकली, असे म्हटले पाहिजे.

शा. नी. ओक

वि. मा. दी. पटवर्धन यांना विनोदी लेखक या नात्याने 'जीते रहो जीवा' या विनोदी लेखसंग्रहाने बराच नावलौकिक मिळवून दिला. पटवर्धनांचे विनोद वाचकांचे सात्त्विक मनोरंजन करतात.

बाळकृष्ण वामन पाठक यांनी आपल्या विनोदी लेखनासाठी मुंबई आणि त्यांतल्या त्यात मुंबईतल्या काही चाळी हे स्थळ पसंत केले आहे. शामराव ओक यांच्या विनोदी लेखांतून कधी प्रसंगावर, तर कधी व्यक्तीवर भर असतो. त्यांनी समाजातले अनेक दोष विनोदी पद्धतीने उकलून दाखविले आहेत. डॉ. अ. वा. वर्टी यांच्या प्रतिभेचा विनोद हा अंगभूत गुण असून त्यांचे अवलोकनही सूक्ष्म आहे. भा. रा. भागवत यांनी मुंबईत वास्तव्य करणाऱ्या माणसाला ज्या ज्या गोष्टी अनुभवाव्या लागतात, त्यांचे गमतीदार वर्णन केले आहे. व्याजोक्ती, अत्युक्ती व उपरोध यांच्या साहाय्याने ते हास्यरस निर्माण करतात. मो. ग. सोमण यांनी विश्वविद्यालयीन वातावरणावर व ग्रामीण जीवनावरही विनोदी लेखन केले आहे. गो. ल. आपटे यांनी कोर्टकचेऱ्या करणाऱ्या इरसाल व्यक्तींचे विनोदी चित्रण केले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

LIBRARY Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
Jangamwadi M Varanasi
ACC No. 8418

आहे. वा. वि. जोशी यांचा विनोद सहेतुक असला तरी काहीसा बोचरा वाटतो. मो. वा. जोशी यांनीही बगूनानांचे आत्मचरित्र लिहून हास्यरस निर्माण केला आहे. ह. वि. वाडेकर यांचा विनोद खोडकर व बहारींचा आहे. द. वि. गुप्ते यांनी पौराणिक व्यक्ती व विभूती पुनश्च भूतलावर आणून त्यांच्या अडीअडचणींचे विनोदी चित्रण केले आहे.

वृत्तपत्रीय विनोदाच्या क्षेत्रात दत्तू बांदेकर यांचे नाव प्रामुख्याने झळकते. त्यांचा विनोद बहुजनसमाजाला कळतो, वळतो, पटतो. बांदेकरांच्या विनोदी सृष्टीत कारकून, शिक्षक, अधिकारी, बुद्धिजीवी, वेश्या, भिकारी, गल्लीतला दादा, टॅक्सी-ड्रायव्हर, मजूर असे सर्व पेशांचे लोक वावरतात. त्यांनी आपल्या विनोदासाठी सख्याहरी हे एक काल्पनिक पात्र निर्माण केले आहे व विनोदाच्या धारदार शस्त्राने राजकीय, धार्मिक व सामाजिक दंभांवर तीव्र प्रहार केले आहेत. सभोवतालच्या परिस्थितीवर ते मर्मभेदक टीका करतात, तरीही सहानुभूती हा गुण सोडत नाहीत. त्यांची कित्येक वाक्ये वेधक व उद्‌बोधक असतात आणि त्यामुळेच ती वाचकांच्या मनाचा ठाव घेतात. उदा० 'वैद्याजवळ कधी खोटे बोलू नये; बायकोजवळ कधी खरे बोलू नये,' 'हसणारा पुरुष व रडणारी स्त्री दोन्ही लबाड असतात.' 'चारित्र्यवान पुरुष मान ताठ करून फिरतो; पण चारित्र्यवान स्त्री मान खाली घालून फिरते.'

खुमासदार, मार्मिक व उपरोधपूर्ण असा वृत्तपत्रीय विनोद निर्माण करणारे लेखक म्हणजे प्र. श्री. कोल्हटकर हे होत.

आचार्य अत्रे यांनी आपल्या नवयुग या साप्ताहिकात व मराठा या दैनिकात उपहास-उपरोधाने रसरसलेले अनेक लेख लिहून प्रतिपक्षी व्यक्तींना, मतांना व कृतींना हास्यास्पद बनवले आहे. प्रत्येक व्यक्तीतील विसंगती दाखवून अत्रे हसतात व वाचकांना हसवतात. नाटके, कथा, वृत्तपत्रीय लेख, इ. अनेक क्षेत्रांतून अत्र्यांचा विनोद खळाळतो. त्यांचा विनोद कधी कल्पनानिष्ठ तर कधी शब्दनिष्ठ असतो. हास्यकथा या भावकथाही कशा होऊ शकतात, याची उदाहरणे म्हणून अत्र्यांच्या काही कथांकडे निःसंशय बोट दाखविता येईल, असे वि. पां. दांडेकर म्हणतात.

गेल्या महायुद्धानंतर मराठी वाङ्मयात एक नवे युग निर्माण झाले. त्या पूर्वीच्या काळात विनोदी निबंध थोडासा मागासला होता. तो या काळात जोरात फोफावला. १९४५ नंतरच्या सर्व विनोदी लेखकांत पु. ल. देशपांडे यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. देशपांडे यांनी आपल्या आयुष्यात मानवी स्वभावाचे जे विविध नमुने पाहिले व जे विविध अनुभव घेतले, त्याचा त्यांना कधीही विसर पडला नाही. ते कोल्हटकर व गडकरी यांचा वारसा चालवीत असले, तरी त्यांच्या स्वतःजवळ कल्पनाचमत्कृतीचे भांडवल भरपूर आहे. कोल्हटकर–गडकरी यांच्याप्रमाणे त्यांनीही समाजातल्या मूर्खपणा, शिष्टपणा, भंपकपणा, छांदिष्टपणा, इ. गोष्टींचा आपल्या लेखणीच्या द्वारे भरपूर उपहास केला आहे. साहित्यात प्रतिष्ठा पावलेल्या भंपक प्रकारांचाही त्यांनी दंभस्फोट केला आहे. त्यांच्या स्वभावनिष्ठ व प्रसंगनिष्ठ विनोदाची भरपूर उदाहरणे बटाट्याची चाळ या संग्रहात पाहायला मिळतील. विनोद हा त्यांच्या प्रकृतीत मुरला असला, तरी ते कुठेही सहानुभूतीला पारखे होत नाहीत. संगीत चिवडामणी ही त्यांची विनोदी कथा हास्याने फुलली आहे; त्याबरोबरच कारुण्याने आर्द्रही झाली आहे. शाब्दिक कोट्या, विक्षिप्त कल्पना, विरोधाभासाने व अतिशयोक्तीने बहरलेली वर्णने पु. ल. देशपांडे यांना छान साधतात. त्यांनी काहीही लिहिले तरी त्यात सहजसौंदर्य असते.

पु. ल. देशपांडे

पु. ल. देशपांडे यांच्या नंतर विनोदी साहित्यातले दुसरे सुप्रसिद्ध नाव म्हणजे वि. आ. बुवा हे होय. विविधता, विपुलता व अतीव उत्साह या तीन गुणांचाच विचार केला, तर वि. आ. बुवा यांच्या विनोदी वाङ्मयाला तोड नाही, असे डॉ. म. मा. अळतेकर म्हणतात. बुवा म्हणजे कल्पनाशक्तीचा खजिनाच होय. त्यांना एखादी कल्पना सुचली म्हणजे तदनुषंगिक अनेक कल्पना भराभर सुचू लागतात आणि त्यांतून त्यांचा विनोदी लेख तयार होतो. ते व्युत्पन्न आहेत, बहुश्रुत आहेत आणि चतुरस्त्रही आहेत. पु. ल. देशपांडे यांच्यापेक्षाही बुवांच्या विनोदाचे क्षेत्र व्यापक आहे बुवांनी आजवर विपुल लिहिले आहे. त्यामुळे त्यात अस्सल विनोदाबरोबर काही गबाळही निर्माण झाले आहे.

पु. भा. भावे हे कथा-कादंबरीलेखक म्हणून वाचकांच्या डोळ्यांसमोर असले, तरी त्यांनी काही वैशिष्ट्यपूर्ण विनोदी निबंध लिहिले आहेत. वाकुल्या या नावाने त्यांच्या विनोदी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लेखांचा संग्रह प्रसिद्ध आहे. भावे यांची कल्पनाशक्ती समाजात प्रतिष्ठित पावलेल्या अनेक प्रश्नांची दुसरी बाजू बरोबर हेरते व त्याला अवलोकनाची जोड देऊन आपल्या प्रभावी भाषाशैलीने वाचकांपुढे मांडते, असे म. मा. अळतेकर यांनी म्हटले आहे.

रमेश मंत्री अलिकडे विनोदाचा अमरकोश लिहीत आहेत. जयवंत दळवी हे ठणठणपाळ या नावाने एक नवीन विनोदी रंजक, मिस्किल, चुरचुरी व आस्वाद्य अशी विनोदी लेखनाची घाटणी दाखवीत आहेत. बाळ सामंत हे संसारातल्या लहान महान गोष्टींवर आधारलेला विनोद वाचकांपर्यंत पोचवीत आहेत. वसंत सबनीस, द. मा. मिरासदार, बाळ गाडगीळ, शं. ना. नवरे, ही आणखी काही अलिकडच्या विनोदी लेखकांची नावे होत.

लघुनिबंध – इ. स. १९२५ नंतर, ज्याला आपण लघुनिबंध म्हणतो, तो प्रकार मराठीत जन्माला आला. पांडित्य हा जसा गंभीर निबंधाचा आत्मा; तसा लालित्य हा लघुनिबंधाचा आत्मा होय. वि. स. खांडेकर व ना. सी. फडके यांनी पहिल्याप्रथम लघुनिबंधलेखनाला सुरुवात केली आणि कित्येक वर्षे लघुनिबंध लिहून तो प्रकार मराठी वाङ्मयात प्रतिष्ठित केला. तिसरे लघुनिबंधकार अनंत काणेकर हे होत.

त्यांच्या लघुनिबंधांत विस्तार व विषयांतरे अपवाद म्हणूनही नसतात. काही सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक समस्या यांमधून काणेकरांच्या लघुनिबंधाचा जन्म होतो. त्यांच्या लघुनिबंधाची जात विचारात्मक आहे. विचाराची दुसरी बाजू मांडण्यासाठी काणेकरांनी गणूकाका हे पात्र निर्माण केले आहे. लेखक आणि गणूकाका यांच्या मतभेदामधून आणि वादविवादांमधून काणेकरांच्या लघुनिबंधाला एक विलोभनीय रूप प्राप्त होते. या तीन ललितकारांच्या पावलावर पाऊल टाकून वि. पां. दांडेकर, ना. मा. संत, गो. रा. दोडके, कुसुमावती देशपांडे, वि. ल. बरवे, र. गो. सरदेसाई, वि. द. साळगावकर, म. ना. अदवंत, यशवंत, कुसुमाग्रज, शांताराम, इ. लेखकांनी बरेच लघुनिबंध लिहिले आहेत. इ. स, १९४५ सालानंतर दुर्गा भागवत, न. वि. गाडगीळ, गो. वि. करंदीकर, कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर यांनी लघुनिबंधाच्या सौंदर्यात खूप भर घातली, त्यामुळे हा ललितनिबंध केवळ विचारप्रकटीकरणाचे मनोरंजक साधन न राहता काव्यात्मक व सौंदर्यपूर्ण बनला. कारागिरीच्या कृत्रिम पाशातून तो बंधमुक्त झाला व खऱ्या अर्थाने कल्पनेच्या अंतराळात भराऱ्या मारू लागला, असे म. मा. अळतेकर लिहितात.

लोकसाहित्य – महाराष्ट्रात विविध प्रकारचे लोकसाहित्य विपुल आहे. कृषिगीते, संस्कारगीते, उत्सवगीते, देवाधर्मांची गीते, आख्याने, विनोदगीते, लोककथा, कहाण्या असे त्याचे स्वरूप आहे. महाराष्ट्र म्हटला तरी त्यातही प्रादेशिक भिन्नता आहे. त्या त्या प्रदेशाची भौगोलिक परिस्थिती, तिथला इतिहास, तिथली पिके, तिथली ग्रामदैवते, तिथले वेगवेगळे सण आणि उत्सव त्या त्या प्रदेशाच्या लोकसाहित्यात उमटलेले दिसतात. प्रदेशपरत्वे भाषेच्या लकबीही वेगवेगळ्या आढळतात. सीमेवरच्या प्रदेशातील भिन्न भाषेतले काही शब्द आणि तिच्या लकबीही त्यातून आविष्कृत होतात. त्या त्या प्रदेशाच्या सांस्कृतिक गरजा पुऱ्या करण्यासाठी आणि मनोविनोदासाठी हे साहित्य निर्माण झाले असून, ते एका पिढीतून दुसऱ्या पिढीत मुखपरंपरेने चालत आलेले आहे.

लोकगीते – मराठी लोकगीते ही ओवी, पदे, आख्याने, गद्यसदृश तोकडी रचना, अशा स्वरूपात आढळतात. अगदी पहिल्याप्रथम लक्षात येणारा लोकगीतांचा गुणविशेष म्हणजे सहजता हा होय. सहजतेमुळेच त्यांना रम्यता प्राप्त होते. मानवी मनाच्या सहज प्रेरणा व भावना खळाळत्या झऱ्याप्रमाणे त्यांतून प्रकट होताना दिसतात.

लोकगीते उगीच निर्माण होत नाहीत, त्यांच्या मागे काही प्रेरणा असतात. त्यांपैकी अद्भुततेचे आकर्षण ही एक प्रेरणा होय. अशिक्षित व रांगड्या अशा समाजात ज्ञानविज्ञानाचा प्रवेश झालेला नसतो. त्यामुळे त्या समाजाला तर्क आणि बुद्धी यांच्या आधारे विचार करण्याची सवयच निर्माण झालेली नसते. अशा वेळी तो समाज मनाने अद्भुताच्या जगात वावरत असतो. देव दैत्य, यक्ष, गंधर्व, अप्सरा, पऱ्या, नाग, इ. अतिमानवी योनी हे त्याचे मनाने संचार करण्याचे विश्व असते. त्यातून मग कित्येक लोकगीतांचा जन्म होतो. कित्येक पौराणिक कथाही अशा अद्भुततेच्या रंगात बुडून लोकगीतांच्या रूपाने पुढे आलेल्या दिसून येतात

देव आणि धर्म ही लोकगीतांची दुसरी प्रेरणा होय. सकाम आणि निष्काम अशी ही उभयविध प्रेरणा आहे. काहीतरी इच्छा धरून केलेली देवाची प्रार्थना अनेक लोकगीतांतून आढळते. नमन आणि स्मरण या नावाने निर्माण झालेली कित्येक लोकगीतेही याच प्रकारात येतील. कोणत्याही शुभ कार्याला आरंभ करताना देवाचे नाव घेऊन त्याला नमन करायचे आणि मग पुढे पाऊल टाकायचे, ही रूढी सुशिक्षित-अशिक्षित अशा सर्व समाजाच्या हाडीमासी खिळलेली आहे. स्त्रियांनी निर्मिलेल्या अशा प्रकारच्या शेकडो ओव्या ऐकायला मिळतील. एक उदाहरण असे–

पहिली माझी ओवी । तेत्तीस कोटी देवा ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सावळया बाळराजा । विटेवरल्या सखाजीवा ।।

लग्नकार्याच्या प्रसंगी त्या त्या प्रदेशातल्या बहुतेक देवतांना 'मूळ' धाडलेले असते. उदाहरणार्थ--

आधी मूळ धाडा । घुंगुराची गाडी
झालजोडीचे बऱ्हाडी । गणराज ।।
माझ्या कार्याला । गणराज तुम्ही यावं
धाग्याचे घोळ । संग सारजाला घ्यावं ।।
आधी मूळ धाडा । तुरिचिये तुरी
देवी जोगेश्वरी । फुलीचिये ।।

गोंधळी लोकही आपला गोंधळ सुरू करताना 'मोरगावच्या मोरेसरा गोंधळा ये, कोल्हापुरच्या अंबाबाई गोंधळा ये,' अशा प्रकारे सर्व प्रादेशिक देवतांना गोंधळाचे निमंत्रण देतात.

मंगल कार्याच्या निमित्ताने देवाला नमन करण्याच्या चालीतून हळूहळू निरपेक्ष नामस्मरणाची वृत्ती उगम पावली आहे. राम, कृष्ण, शिव आणि विठ्ठल यांच्या निरपेक्ष नामस्मरणाच्या ओव्या कितीतरी सापडतील.

स्मरण आणि नामसंकीर्तन याच्या पुढची पायरी म्हणजे देवाच्या लीलाकथांचे गायन ही होय. यात राम आणि कृष्ण यांच्या लीलाकथांचे गायन प्रामुख्याने आढळते. या राम-कृष्ण-कथा ओव्यांतून तशाच पद्यात्मक आख्यानांतूनही गायल्या गेल्या आहेत. सीता-स्वयंवर, रामाचा वनवास, लक्ष्मणाचे बंधुप्रेम, मारुतीची दास्यभक्ती, कृष्णजन्म, कृष्णाच्या बाललीला, रुक्मिणीस्वयंवर, इ. गीते या प्रकारात येतात.

लोकगीतांची तिसरी प्रेरणा म्हणजे प्रापंचिक किंवा कौटुंबिक प्रेरणा ही होय. ही सर्वांत प्रमुख प्रेरणा आहे. या प्रेरणेतून निर्माण झालेल्या लोकगीतांमध्ये अनेक प्रकार आहेत. जात्यावरच्या ओव्या, झोपाळ्यावरच्या ओव्या आणि लग्न, डोहाळे, बारसे, इ. कौटुंबिक प्रसंगांची गीते, या प्रकारात येतात. आई-बाप, बहिण-भाऊ, पति-पुत्र, इ. कुटुंबातील निकटच्या नातेवाइकांसंबंधीच्या भावना ज्यात व्यक्त झालेल्या असतील, त्या सर्व गाण्यांमागची प्रेरणा कौटुंबिकच आहे. मराठी लोकगीतांत ओव्यांचा भरणा विपुल आहे. या बहुतेक सर्व ओव्या स्त्रियांनीच रचल्या आहेत. स्त्रीजीवनाचे अनेक पदर त्यांतून व्यक्त होतात. सासुरवास, नणंदेची चुगलखोरी, सासऱ्याचा धाक, पतीबद्दल आदरयुक्त प्रेम, बाळाची कौतुके, प्रापंचिक सुखदुःखे, नीती आणि शालीनता, तुळशीविषयी भक्ती, गाई, बैल, वासरे यांनी समृद्ध असलेल्या व माणसांनी गजबजलेल्या कुटुंबाविषयी आपुलकी, इ. गोष्टींविषयी स्त्रियांनी या ओव्यांतून आपल्या हळुवार भावना व्यक्त केल्या आहेत. ग्रामीण भागातही सास्वासुना आणि नणंदा-भावजया ही द्वंद्वे आहेतच. सर्व कुटुंबाला मध्यवर्ती धरून स्त्रियांनी निर्माण केलेले हे ओवी-वाङ्मय अत्यंत हळुवार आणि हृदयंगम आहे. त्यात प्रतिभेची चमक आहे आणि सहजपणे येऊन जाणाऱ्या मनोज्ञ उपमा-उत्प्रेक्षाही आहेत.

नागरी असो वा ग्रामीण असो; स्त्रियांनी ज्या आकांक्षा व्यक्त केल्या आहेत, त्यांत धनदौलतीच्या आकांक्षेला प्राधान्य नाही, हे लक्षात घेण्याजोगे आहे. आपली कूस उजवावी, पुत्रप्राप्ती व्हावी, पतीला दीर्घायुष्य लाभावे आणि आपल्याला अहेव मरण यावे ही भावनाच स्त्रियांमध्ये सर्वांत प्रबल आहे. या स्त्रीचे जीवन जणू पती आणि पुत्र यांनाच वेष्टून राहिले आहे. उदाहरणार्थ काही ओव्या अशा--

चार माझी बाळं पाचवा भरतार, कृस्नदेवाचा अवतार ।।
सांबाच्या पिंडीवर बेल वाहते तिकटीचं,
चुडीया राजसाला औक्ष मागते वुपटीचं ।।
देरे देवा मला पाच पुत्रांची पंगत,
जल्माची धरधनियांची संगत ।।
देरे देवा मला जुनं जुंधळं ठेवणीला
घरधनियांना बारा बैल दावणीला ।।

स्त्रियांच्या मानाने लोकगीतांच्या निर्मितीत पुरुषवर्गाचा वाटा कमी आहे. याविषयी श्री. न. शे. पोहनेरकर म्हणतात --

पुरुषवर्गात जुन्या काळापासूनच तीन प्रवृत्तींचा पसारा आपणांस दिसतो. धार्मिकता अर्थात भक्तिभाव, पुरुषाचे वैशिष्टय म्हणून वीरवृत्ती आणि सर्वसामान्यतः आढळणारी शृंगारभावना. पुरुषांचे क्षेत्र घराबाहेर आणि म्हणूनच अमर्याद. स्त्रियांची रचना किंवा लोकसाहित्य हे त्यांच्या परसापासून अंगणापर्यंतच्या परिसरातच उगम पावत असल्याने, कौटुंबिक जीवनाचे सर्व पैलू त्यात आपणांस आढळून येतात. पुरुषवर्गाच्या साहित्याचा आधार ह्या बाहेरचे सामाजिक जीवन असल्याने त्याचे अनेक पैलू आपणांपुढे दिसतात. आणि त्यात प्रामुख्याने वरील तीन वैशिष्टयांचा आढळ होतो. मात्र यातही जी लोकसाहित्याची रचना आपणांस आढळते, ती शाहिरी साहित्य या नावाने आज आपणापुढे आहे. यात कलगीतुऱ्यांच्या सवालजबाबात धार्मिक व सांस्कृतिक भावना, लावणी वाङ्मयातून शृंगाराची लयलूट आणि पोवाडयातून वीररसाची हजार कारंजी उडत असताना आपणांस दिसतात. मराठी मनावर या साहित्याची आजही किती पकड आहे हे सांगण्याची काही आवश्यकता नाही. शाहिरी साहित्याला पुरुषवर्गाच्या लोकसाहित्यात स्थान दिले तर मात्र आताचे 'अपौरुषेय' लोकसाहित्य या पुरुषसाहित्याच्या तुलनेला घेता येईल. शाहिरी साहित्याची सरस्वती तुणतुण्याच्या टणत्कारांनी आणि डफाच्या थापांनी रसिकाच्या भावसमुद्राला सहस्र मुखांनी व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धारांनी आकर्षित करते, आलिंगन देते. याच्या उलट ही अपौरुषेय आकाशगंगा आपल्या तेजस्वी बिंदुधारांनी अष्टसात्त्विक भावांना आवाहन करते.

सण व उत्सव यांची गीते – कोकणभागात शिमगा गाऊन साजरा केला जातो. त्यात राधा-कृष्णांची सोंगे आणून त्यांच्या प्रणयाची गीते गातात. देशावर नागपंचमीचा सण मोठा असतो. त्या दिवशी बायका वारुळाची पूजा करायला जाताना गीते म्हणतात. विदर्भात दिवाळीच्या प्रसंगी गवळी लोकांमध्ये गीते गाण्याची रूढी आहे. त्यांचा एक नमुना असा–

धन धन दिवाळी, गाईम्हशी ओवाळी,
गाईम्हशी कोणाच्या ? रामलक्ष्मणाच्या ।
गाईम्हशींनी भरला वाडा
शेळ्या-मेंढ्यांनी भरला वाडा ।।

विदर्भात काही गीते महादेवाची गाणी म्हणून प्रसिद्ध असून, ती अत्यंत लोकप्रिय आहेत. त्यांतला एक नमुना असा–

महादेवाच्या पिंडीवर बेल कोण्या डोंगराचा
राजा कोण्या नगराचा पूजा करितो ।।
शेंदराच्या पुड्या धाडू कोण्या हाती
तुझ्या भेटीसाठी येणे केले रातोराती ।।

समाजाच्या सर्व थरांतला महत्त्वाचा संस्कार म्हणजे विवाह हा होय. सर्व जाती–जमातींत विवाहगीते प्रचलित आहेत. विवाहमंगलातल्या सर्व उपचारांचे आणि सोहळ्यांचे वर्णन त्यांत असते. त्या त्या प्रदेशातल्या विवाहविषयक भिन्न भिन्न चालीरीतींचेही त्यांतून निदर्शन होते. या गीतांतून वराच्या जागी राम किंवा कृष्ण आणि वधूच्या ठिकाणी सीता किंवा रुक्मिणी यांची योजना केलेली असते. वधू-वरांना त्या देवतांच्या स्वरूपातच पाहिले जाते.

महाराष्ट्रात लोकसंस्कृतीचे उपासक असे काही वर्ग आहेत. वासुदेव, गोंधळी, भुत्या, वाघ्यामुरळी, भराडी, पोतराज, जोगती, इ. त्यांची नावे आहेत. यांच्या जवळ लोकसाहित्याचे धन विपुल प्रमाणात आहे. श्री. रा. चिं. ढेरे म्हणतात– वासुदेवाच्या मुखी रंगणारी गाणी विविध प्रकारची आहेत. त्या गाण्यांत काही बालकृष्णाचे चरित्र रंगविणारी आहेत; काही भक्तीचा महिमा आळवणारी आहेत; काही प्रपंचाचे स्वरूप रेखाटून तो नेटका करण्याची नीती सांगणारी आहेत; काही कौटुंबिक भावबंध उलगडणारी आहेत आणि काही सरळ–सुबोध भाषेत वेदान्त स्पष्ट करणारी आहेत. एक उदाहरण असे–

बांधा उखळाला, याला बांधा उखळाला,
नंदाचा पोर, याला बांधा उखळाला ।।
न कळत हरि हा घरांत शिरतो,
दहि–दुध–लोणी चोरुनि खातो,
सोडु नका याला आता बांधा उखळाला,
नंदाचा पोर याला बांधा उखळाला ।।

गोंधळी लोक गोंधळात जे वाङ्मय उपयोजितात, ते लोकसाहित्याच्या श्रेणीतलेच आहे. आबालवृद्ध श्रोत्यांना रात्रभर गोंधळात गुंगवून टाकण्यासाठी गोंधळी अनेक कथात्मक गीते आकर्षक पद्धतीने गात असतो. गोंधळाच्या गीतसंभारात देवीची स्तुती, कृष्णलीला, गौळणी, पोवाड, उपहासात्मक गीते, अशी विविध प्रकारची गीते असतात. नागपंचमीच्या दिवशी वारुळाला जाण्यासाठी लगबगीने निघालेल्या बायकांचे वर्णन गोंधळ्यांच्या विनोदगीतांत आढळते. त्याचे एक उदाहरण असे–

आली चांभारीण इठी तिच्या बोलण्याची धाटी
सदा रुसे पेल्यासाठी, सखा समजावी तिला बाजूला ।।
आली सुतारीण बबी तिच्या बोलण्याची खुबी
हाती तपकिरीची डबी हाक मारी खेळगड्याला ।।
आली घिसाडीण हिरी न्हाई पदर डोईवरी
तिची तारांबळ सारी न्हाई कुंकू तिच्या कपाळाला ।।

भुत्या कुठेही हिंडत असला, तरी तो गाणं गाऊ लागला की त्याच्या दृष्टीसमोर तुळजापूरच्या आई भवानीचा दरबार खुला होतो आणि मग तो तन्मयतेने गात राहतो. देवीच्या किती तरी आरत्या त्याच्या मुखी घोळत असतात. त्या आईचा उदोकार करताना भुत्याचे भान हरते आणि तो मुक्त कंठाने गाऊ लागतो.

त्याच्या या उदोकाराचा एक नमुना असा –

उदो रे बोला वाचे – मुखि नाम जगदंबेचे ।
हे नाम रेणुकेचे ।।
उदो वेगळा देव नाही – उदो कवणे ठायी ।
देवी अंतर्बाह्य पाही ।।
गगनी सूर्य उदो उदो रे – भजन करीत आली ।
अंबा भजन करीत आली ।।
छत्तिस कवडी गळां जोडुनी माळ अंबा ल्याली ।
दया अराधीण झाली ।।
माया परडी घेऊनी – जोगवा मागाया आली ।
अंबा जोगवा मागाया आली ।।

वाघ्या – मुरळ्यांच्या मुखी असणारी गीते ही शाहिरी ढंगाची आहेत. खंडोबा हे त्यांचे उपास्य दैवत होय. या गीतकारांनी खंडोबाकडे एखाद्या मराठी शिलेदाराची किंवा सरदाराची भूमिका देऊन त्याच्या प्रणयाचे रंग-ढंग लावणीच्या सुरात चितारले आहेत. खंडोबाची एक बायको बाणाई. त्या दोघांच्या स्वप्न-मीलनाचा प्रसंग वर्णिताना वाघ्या म्हणतो –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकदा मध्यान्हीच्या अमलात देव मल्हारी निद्रागत
बानू नार आली शयनागारात
हिनं उशाला मांडी ग दिली ।
स्वारी देवाची ग वेडी झाली ।।
ह्या ग बानू नारीचं अंग जसं चमके ऐनाचं भिंग
देव मल्हारी झाले दंग
गोष्ट देवाच्या मनी ग ठसली
स्वारी देवाची ग वेडी झाली ।।

भराडी भिक्षा मागताना नाना प्रकारची गीते म्हणतो, तशीच भराड्याच्या कार्यक्रमातही ती म्हणतो. त्यात अनेक पुराणकथा व लोककथा तो गीतबद्ध करून सांगतो.

पोतराजाच्या मुखी असणारी मराठी गीते मरीआई किंवा महालक्ष्मी हिच्या विषयीची असतात. याशिवाय त्याच्या पाठात काही कथात्मक गीतेही असतात. त्यांतल्या पार्वती भिल्लीण झाली, या कथेच्या काही पंक्ती अशा –

सोंगठ्यांचा डाव गिरजा म्हणती 'आठ-नऊ'
संबूदेव बोले, 'गिरजा, लबाडी नकं घेऊ !'
सोंगठ्यांचा डाव आला एकमेकीं
गिरजानार पक्की संबूदेवाचं डोळं झाकी !
भोळवा शंकराचा त्येच्या खेळाच्या छंदामंदी
गिरजानारीनं त्येचा जिंकून नेला नंदी
रुसला संबूदेव जाऊन डोंगरी घाली धूप,
पिर्तीची गिरजानार घेती भिल्लिणीचं रूप !

जोगती आणि जोगतिणी ही मंडळी यल्लम्माची उपासक आहेत. यल्लम्माचें माहात्म्य सांगणारी कितीतरी गीते त्यांच्या पाठात असतात. त्याशिवाय काही गीतकथाही असतात. महारोगाने पछाडलेला एक मनुष्य आप्तेष्टांनी दूर केल्यावर एका मित्राकडे जातो आणि त्याच्या सल्ल्यावरून यल्लम्माची उपासना करून रोगमुक्त होतो, अशी एक कथा ते सांगतात. त्या कथागीतातल्या काही पंक्ती अशा –

कांटा मोडला, नायटा झाला । गर्व मनुष्याला आला ।
अंगावरनं सर्व नायटं । आगीन घेईला ।
नाकातोंडाच्या भिंती बसल्या । मनुष्यांतून गेला ।
घरच्या बायकोनं वढून टाकलं । बाहेर रस्त्याला ।।
डोंगराचा रस्ता धरला । पू बंद झाला ।
त्यानं जाऊन आंघोळ केली । खलूतीर्थाला ।
सव्वा रुपयाची भोगि वाहिली । यल्लूबाईला ।
माळ परडी घेऊन बसला । उजव्या बाजूला ।।

लोककथा – लोकगीतांप्रमाणेच मराठी लोककथांचा संभारही मोठा आहे. प्राणिकथा, नीतिकथा, नक्षत्रकथा, बालकथा, अद्‌भुतकथा, परीकथा, दैवतकथा असे त्यांचे प्रकार आहेत. या लोककथांतून राजा, त्याच्या आवडत्या-नावडत्या राण्या, प्रधान, राजपुत्र, प्रधानपुत्र, देव, राक्षस, जादूगार, भूत, पिशाच्च, चेटकीण म्हातारी, साधू, बैरागी, महंत, जलचर-स्थलचर प्राणी, इ. व्यक्ती आढळतात. सुष्ट व दुष्ट अशा उभयविध प्रवृत्तींचा संघर्ष त्यांच्यामध्ये दिसून येतो. बऱ्याचशा लोककथा या नीतिकथा असतात. सज्जनांचा जय व दुर्जनांचा पराजय हा त्यांचा बाणा असतो.

बालकथांमध्ये काही कथा क्रमसंवृद्ध असतात. एकेका दुव्याने त्या वाढत जातात आणि विशिष्ट बिंदूवर ती साखळी थांबून ती कथा परत मूळ पदावर येते. एक उदाहरण असे –

एका चिमणीचे मोती एक कावळा पळवतो व एका झाडावर जाऊन बसतो. चिमणी 'कावळ्याला पाड' असे झाडाला सांगते. झाड 'मी नाही पाडीत' म्हणते. मग ती झाड तोडायला सांगण्यासाठी सुताराकडे जाते. सुतारही नकार देतो. मग ती तिथून राजाकडे, तिथून राणीकडे, तिथून उंदराकडे, तिथून मांजराकडे, तिथून कुत्र्याकडे, तिथून पुढे सोटा, अग्नी, समुद्र, हत्ती असे करीत शेवटी मुंगीकडे जाते. मुंगीला ती हत्तीच्या कानात शिरायला सांगते. मुंगी 'हो' म्हणते. त्याबरोबर हत्ती घाबरतो. तो म्हणतो, 'मी समुद्र ढवळतो'. समुद्र म्हणतो, 'मी अग्नी विझवतो.' अग्नी म्हणतो, 'मी सोटयाला जाळतो.' सोटा म्हणतो, 'मी कुत्र्याला मारतो.' कुत्रा म्हणतो, 'मी मांजराला चावतो.' मांजर म्हणते, 'मी उंदराला खाते.' उंदीर म्हणतो, 'मी राणीचे लुगडे फाडतो.' राणी म्हणते, 'मी राजावर रुसते.' राजा म्हणतो, 'मी सुताराला दंड करतो.' सुतार म्हणतो, 'मी झाड तोडतो.' झाड म्हणते, 'मी कावळ्याला पाडते.' कावळा म्हणतो, 'नको, नको, मी चिमणीचे मोती परत देतो.'

अद्‌भुत गोष्टींपैकी एक लोककथा अशी –

फार प्राचीन काळची गोष्ट. एके दिवशी एक बाई मुसळ घेऊन कांडीत होती. पण त्या वेळी आकाश अगदी सखल होते. तेव्हा कांडता कांडता तिचे मुसळ आकाशाला लागले. तेव्हा ती म्हणाली, 'किती बाई सखल तरी हे । कांडतासुद्धा घड येत नाही.' ते ऐकून आकाशाला क्रोध आला व ते जे वर गेले, ते अगदी पार उंच गेले.

कोकणात काही लोककथा गीतात्मक असतात. अशी एक लोककथा शं. ग. दाते यांनी दिली आहे, ती अशी –

आंबा जो कोवळा त्याचा मोहोर पीकला
त्या मोहोराचें मी लोणचें घातलें
तें मी लोणचें दिराला वाढलें दिरानें मला चुडे ते दिले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ते मी चुडे खेळतां वाढवले सासूनें मला धपाटे दिले
त्यामुळें माझी आसुवें गळालीं तीं मीं आसुवें तांब्यांत भरीलीं
तो मी तांब्या गंगेंत सोडीला गंगेनं मला उदक तें दिलें
तें मी उदक कुडाला पाजीले कुडान् मला काठी ती दिली
ती मी काठी बुरडाला दिली बुरडान् मला परडी ती दिली
ती मी परडी माळ्याला दिली माळ्यान् मला फुलें तीं दिलीं
तीं मीं फुले ईश्वरा पार्वतीच्या चरणीं अर्पण केलीं
इटुकली मिटुकली गोष्ट सरो तुमचे आमचे पोट भरो.

सोन्याचे वाडे, कल्पवृक्षांच्या बागा, पोपटाने अमृतफळाचे झाड आणणे, नागाने एखाद्या स्त्रीचा भाऊ होणे, अन्न देणारी थाळी, कथानायकाला अर्धे राज्य व राजकन्या प्राप्त होणे, राक्षसान अपरंपार संपत्ती साठवणे, इ. कल्पनाबंध लोककथांतून आढळतात.

कोकण, देश, मराठवाडा, खानदेश आणि विदर्भ यांमध्ये वेगवेगळ्या लोककथा प्रचलित आहेत. या कथा आपले मराठमोळे वळण कायम राखून आपापले विभागीय वैशिष्ट्य प्रगट करतात. श्री. यू. म. पठाण यांनी 'मराठवाड्यातील लोककथा' या नावाचा एक कथासंग्रह प्रकाशित केला आहे. त्याच्या प्रस्तावनेत ते म्हणतात–

लोकसाहित्यातून, विशेषत: लोककथांतून त्या त्या प्रदेशाची किंवा विभागाची म्हणून गणली जाणारी संस्कृतिमूल्ये प्रकट होणे अपरिहार्य असते. कारण त्या लोककथेचा त्या प्रदेशातील लोकजीवनाशी घनिष्ठ संबंध असतो. त्या प्रदेशातील समाजमनाचे कंगोरे, तेथील लोकांच्या स्वभावातील गुणदोष, चालीरीती, प्रचलित समजुती, ऐतिहासिक घटना, भौगोलिक परिसर, इ. गोष्टींचा या व्यवच्छेदक मूल्यांमध्ये समावेश करावयास हवा.

महाराष्ट्रात सर्व प्रकारच्या लोकसाहित्याचे बरेचसे संकलन झालेले आहे. ते करणाऱ्या काही व्यक्तींची नावे अशी– सर्वश्री श. ग. दाते, जॅक्सन, एन्थोवेन, साने गुरुजी, पां. श्री. गोरे, अनंत काणेकर, ना. गो. हूड, महादेवशास्त्री जोशी, डॉ. नांदापूरकर, वामन चोरघडे, डॉ. नरेश कवडी, भानू शिरधनकर, सदाशिव माळी, दा. गो. बोरसे, ना. गो. चापेकर, अं. रा. गाडेकर, वि. स. सुखटणकर, वा. दा. मुंडले, म. वि. डोंगरे, वि. स. सोहोनी, वि. वा. जोशी, कृ. गो. साठे, ग. त्र्यं. देसाई, वि. म. घुले, श्री. म. वर्दे, श. ना. केळकर, मेरी फ्रिअर, दुर्गा भागवत, डॉ. सरोजिनी बाबर, कमलाबाई देशपांडे, सौ. मालतीबाई दांडेकर, अनसूया लिमये, शरदिनी पवार, कुमुदिनी रांगणेकर, लीला दुर्वे, इत्यादी.

महाराष्ट्रराज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र शासनाचेही लोकसाहित्याकडे लक्ष वेधले आहे. महाराष्ट्राच्या लोकसाहि[त्याच्या] संग्रहासाठी, प्रसिद्धीसाठी आणि अभ्यासासाठी सर[कारने] 'महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती' नावाची एक संस्था स्थापन केली आहे. तिच्या द्वारा आजवर भरघोस अशी सहा पुस्तके वेगवेगळ्या नावांनी प्रकाशित झाली आहेत.

वरील संस्थेचे 'साज शिणगार' हे पुस्तक प्रकाशित होताना श्री. यशवंतराव चव्हाण यांचा आशीर्वाद घेण्यात आला आहे. त्या आशीर्वादात श्री. चव्हाण यांनी जे विचार व्यक्त केले आहेत, ते लोकसाहित्याच्या अभ्यासकांना चिंतनीय ठरण्याजोगे आहेत. ते म्हणतात–

लोकसाहित्य या शब्दामध्ये किती किती गोष्टींचा अंतर्भाव होऊ शकेल याची चर्चा आजवर अनेकदा झालेली आहे. परंतु म्हणी, गाणी, ओव्या म्हणजेच केवळ लोकसाहित्य नव्हे. लोकसाहित्याचा संगीताशी संबंध आहे, नृत्याशी संबंध आहे, गीताशी संबंध आहे, कथांशीही संबंध आहे; किंबहुना लोकजीवनाची जी विविध तऱ्हेची स्वरूपे आहेत व ज्यांचे वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये स्वरूप व्यक्त होत असेल, ती सगळी लोकजीवनाची व्यक्त दर्शने म्हणजे लोकसाहित्य असे आपणाला मानावे लागेल आणि या दृष्टीने मला वाटते, आम्हांला अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे. निव्वळ आमच्यांतले[च] शोधून काढावयाचे असे नव्हे; हिंदुस्थानातील वेगवेगळ्या क्षेत्रांतील लोकगीतांशी त्यांचा काही संबंध आहे किंवा [नाही] याचा विचार करण्याची गरज आहे. बाहेरच्या देशांतील त्या त्या काळातील लोकसाहित्याचा आमच्या लोकसाहित्याशी काही संबंध जुळतो का हेही पाहण्याची गरज आहे.

वृत्तपत्रे व नियतकालिके – बाळशास्त्री जांभेकर यांनी इ. स. १८३२ साली सुरू केलेले दर्पण हे मराठीतले पहिले वृत्तपत्र होय अशी कल्पना होती; पण इ. स. १८१३ साली एक मराठी वृत्तपत्र अमेरिकन मिशन प्रेसमधून निघाले होते, असे म्हणतात. मात्र त्याचे नाव व त्यासंबंधी अधिक माहिती मिळत नाही. इ. स. १८२८ मध्ये मुंबापूर वर्तमान या नावाचे मराठी वृत्तपत्रही निघाले होते. त्याचे काही अंक निघाल्यावर ते बंद पडले असावे. त्याच्यासंबंधीही अधिक माहिती उपलब्ध नाही. दर्पण हे पाक्षिक मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांत छापले जात होते. देशाची परिस्थिती, पाश्चात्य विद्या, स्थानिक वार्ता यांव्यतिरिक्त जातिभेद, धर्मांतर, इ. विषयांची चर्चा त्यात केली जाई. त्याच्या संपादकांनी आपल्या पत्राचा उच्च दर्जा राखण्याचा कसोशीने प्रयत्न केला. इ. स. १८३२ च्या ... महिन्यातच त्याचे साप्ताहिकात रूपांतर करण्यात आले; पु[ढे] ते इ. स. १८४० मध्ये बंद पडले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इ. स. १८३७ साली दिग्दर्शन हे नियतकालिक जांभेकरांनीच सुरू केले. त्यानंतर १८४० च्या जुलै महिन्यात मुंबई अखबार हे संपूर्ण मराठी वृत्तपत्र सुरू झाले, पण ते फार दिवस चालले नाही. इ. स. १८४१ मध्ये भाऊ महाजन (गोविंद विठ्ठल कुंटे) यांनी प्रभाकर नावाचे पत्र सुरू केले. ते सुमारे वीस वर्षे चालले. बाळशास्त्री जांभेकरांचेही साहाय्य त्यांना मिळत होते. प्रभाकरात विविध वार्तांप्रमाणेच माहितीपूर्ण लेखही छापले जात. लोकहितवादींची शतपत्रे प्रथम प्रभाकरातच प्रसिद्ध झाली. इंग्रजी राज्यपद्धतीवर टीका प्रथम त्याच पत्रात सुरू झाली. भाऊ महाजनांनी पाश्चात्य ज्ञानाचा प्रसार केला, त्याचप्रमाणे आपल्या संस्कृतीविषयी व भाषेविषयी अभिमानही प्रगट केला. पाश्चात्यांचे अंधानुकरण नाही व स्वसंस्कृतीचा दुरभिमानही नाही, अशा समतोल वृत्तीने त्यांनी आपली लेखणी चालवली.

इ. स. १८४२ च्या जून महिन्यात अमेरिकन मिशनऱ्यांनी अहमदनगर येथे धर्मप्रसारासाठी ज्ञानोदय हे पत्र सुरू केले. प्रथम ते मासिक होते, पण १८४५ पासून पाक्षिक झाले. पहिले सहा अंक केवळ मराठीत निघाले. पुढे १८६६ पर्यंत त्यात इंग्रजी व मराठी लेख येत असत. इ. स. १८७६–८२ या काळात ज्ञानोदय केवळ मराठीत निघाले. मग ते पुन्हा इंग्रजी-मराठी झाले. ज्ञानोदयात हिंदू धर्मावर बरीच टीका केली जात होती. तथापि या वृत्तपत्राने केलेले शिक्षणप्रसाराचे व ज्ञानप्रसाराचे कार्य उल्लेखनीय आहे. त्याने हिंदू धर्मातील अनिष्ट गोष्टींवर प्रहार केल्यामुळे समाजसुधारणेला निश्चित मदत झाली. मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांचा व वाङ्मयाचा परामर्श ज्ञानोदयात प्रथमपासून घेतला जात असे. त्यामुळे आज नामशेष झालेल्या अनेक वृत्तपत्रांची माहिती ज्ञानोदयावरून कळते.

प्रभाकराचे समकालीन ज्ञानसिंधु हे पत्र इ. स. १८४२ मध्ये मुंबई येथे सुरू झाले. वीरेश्वर सदाशिव छत्रे हे त्याचे संपादक होते. ज्ञानसिंधू व प्रभाकर यांची स्पर्धा असून, त्यांत परस्परांविषयी उपहासात्मक लिहिलेले आढळते. त्या वेळी चंद्रोदय नावाचे एक पत्र चालविले जात होते. त्या पत्रात मिशनऱ्यांप्रमाणेच प्रभाकरावरही टीका येई.

पुण्यातील पहिले मराठी वृत्तपत्र म्हणजे मित्रोदय हे होय. ते इ. स. १८४४ साली निघाले; पण फार काळ चालले नाही. त्यानंतर इ. स. १८४९ मध्ये पुणे येथे ज्ञानप्रकाश हे पत्र निघाले. ते इ. स. १८६२ पर्यंत शिळेवर छापले जाई. प्रथम ते फक्त सोमवारी निघत होते, पण पुढे सोमवारी व गुरुवारी निघू लागले. कृष्णाजी त्रिंबक रानडे यांनी हे पत्र सुरू केले. तेच त्याचे पहिले संपादक होते. कृष्णशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, छत्रे, न्या. रानडे, विष्णुशास्त्री, गो. कृ. गोखले, लिमये, भानू, इ. नामवंत लेखकांचे साहाय्य ज्ञानप्रकाशाला लाभले. इ. स. १९०४ मध्ये ते पत्र दैनिक स्वरूपात निघू लागले. पहिल्याच अंकावर ह. ना. आपटे आणि वा. गो. आपटे यांची नावे संपादक म्हणून आढळतात. देशातील व परदेशातील वर्तमान सर्वांना कळावे, हा तर ज्ञानप्रकाशाचा उद्देश होताच, शिवाय महाराष्ट्रातील विविध संस्था, स्त्रीशिक्षण, देशी उद्योगधंदे, व्यापार, कर, इ. विषयांची चर्चाही त्यात होत असे. त्या काळात जे विविध सामाजिक प्रश्न उपस्थित झाले, त्यांत ज्ञानप्रकाशाने सुधारणांचा पाठपुरावा केलेला दिसतो. अभ्यासपूर्ण विवेचन व समतोलपणा हे त्यांतील संपादकीय लेखांचे वैशिष्ट्य होते. मराठी ज्ञानप्रसारक हे मासिक मुंबईला इ. स. १८५० मध्ये सुरू झाले. ते सुमारे १५ वर्षे चालले.

खिस्ती धर्मोपदेशकांच्या वाढत्या प्रचाराला आळा घालण्यासाठी कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी विचारलहरी नावाचे साप्ताहिक इ. स. १८५२ मध्ये सुरू केले. उपदेशचंद्रिका व सद्धर्मदीपिका ही पत्रेही त्याच उद्देशाने निघाली. याशिवाय ज्ञानसागर, हिंदुहितेच्छू, इ. पत्रे मुंबईत चालू होती. इ. स. १८५३ मध्ये भाऊ महाजन यांनी धूमकेतू नावाचे साप्ताहिक सुरू केले. त्यांनीच १८५४ मध्ये ज्ञानदर्शन हे त्रैमासिक सुरू केले. इ. स. १८६१ साली शालापत्रक हे मासिक सुरू झाले. इ. स. १८६२ साली नारायण मोरेश्वर केळकर यांनी ज्ञानप्रकाशाला प्रतिस्पर्धी असे वृत्तप्रकाश नामक पत्र पुण्यात काढले. पण ते जेमतेम एक वर्ष चालू राहिले असावे.

इ. स. १८५३ च्या सुमारास कोल्हापूर येथे ज्ञानप्रसारक व वर्तमानसंग्रह ही पत्रे सुरू झाली. इ. स. १८५४ मध्ये रत्नागिरी येथे जगन्मित्र हे पत्र व १८५८ मध्ये सातारा येथे शुभसूचक नावाचे साप्ताहिक सुरू झाले. त्यापूर्वी साताऱ्यात बोधामृत व शुभचिंतक ही पत्रे चालू असल्याचा उल्लेख आढळतो.

ज्ञानप्रकाशाप्रमाणेच महाराष्ट्रात गेल्या शतकात प्रसिद्धी पावलेले महत्त्वाचे वृत्तपत्र म्हणजे इंदुप्रकाश हे होय. ते मुंबईत इ. स. १८६२ च्या जानेवारीत सुरू झाले. लोकहितवादी व न्या. रानडे यांच्या प्रेरणेमुळे विष्णुशास्त्री पंडित यांनी ते चालू केले. जनार्दन सखाराम गाडगीळ हे त्याचे पहिले संपादक होते. इंग्रजी विभागाचे संपादन पहिले चार महिने न्या. रानडे यांनी केले. विष्णुशास्त्री पंडित यांनी इंदुप्रकाशात विधवाविवाह, बालविवाह, केशवपन, स्त्रीशिक्षण, इ. विषयांवर अभ्यासपूर्ण व आवेशयुक्त लेखन केले. त्यामुळे हे पत्र महाराष्ट्रात फार गाजले. सामाजिक सुधारणेच्या बाबतीत इंदुप्रकाशची कामगिरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

फार मोलाची आहे. इ. स. १९०२ पासून हे पत्र दैनिक स्वरूपात निघू लागले. इ. स. १९२० नंतर ते त्या वेळच्या लोकमान्यात सामील करण्यात आले. शेवटी लोकमान्य १९२५मध्ये बंद झाले.

इ. स. १८६३ साली वि. ना. मंडलिक यांनी नेटिव्ह ओपिनियन नावाचे इंग्रजी-मराठी साप्ताहिक सुरू केले. त्यातील लेखन भारदस्त व अभ्यासपूर्ण असल्यामुळे, त्याचा बोलबाला परदेशांतही झाला होता. त्यात समाजसुधारणेचा पुरस्कार केलेला आढळत नाही. इतिहासाचा अभिमान जागृत करण्यावर मंडलिकांचा जास्त भर होता. मामा परमानंद हे त्या पत्राचे प्रथमपासून संपादक होते. त्यांची लेखनशैली सुबोध, चटकदार व मार्मिक होती. कोणत्याही विषयावर ते समतोल बुद्धीने व निश्चयपूर्वक लिहीत. त्यांच्या लेखनामुळे पत्राला भारदस्त स्वरूप प्राप्त झाले. ते पत्र इ. स. १९०६मध्ये बंद पडले.

इ. स. १८६७ मध्ये विविधज्ञानविस्तार या मासिकाचा जन्म झाला. रा. भि. गुंजीकर हे त्याचे पहिले संपादक होते. त्या मासिकात निबंध, प्रवासवर्णने व विविध विषयांवरील लेख प्रसिद्ध केले जात. आपल्या दीर्घ आयुष्यात त्याने भरीव वाङ्मयसेवा केली.

त्या काळात मुंबई-पुण्याबाहेरही काही उल्लेखनीय पत्रे होती. इ. स. १८६६ मध्ये ठाणे येथे अरुणोदय नावाचे पत्र काशिनाथ धोंडो फडके यांनी सुरू केले. ते सुमारे ४५ वर्षे चालू होते. त्यातील लेखांत विद्वत्ता किंवा सखोल विवेचन नसे; पण जहाल राजकीय विचार असत. अरुणोदयाच्या चालकांनी हिंदुपंच नावाचे एक विनोदी पत्रही चालू केले होते. त्यात प्रचलित राजकीय घडामोडींचे चित्रमय दर्शन घडत असे. ही दोन्ही पत्रे त्यांतील जहाल विचारांमुळे सरकारी रोषाला बळी पडली.

इ. स. १८७३ मध्ये प्रार्थनासमाजाचे मुखपत्र म्हणून सुबोधपत्रिका सुरू झाली. समाजकारण व धर्मकारण हेच पत्रिकेचे क्षेत्र होते. न्या. रानडे, रा. गो. भांडारकर, मामा परमानंद, चंदावरकर, इ. विद्वानांचे लेख पत्रिकेत येत.

इ. स. १८७७ मध्ये श्री. म. व. नामजोशी यांनी पुणे येथे किरण नावाचे पत्र सुरू केले. ते दोन वर्षांतच बंद झाले. त्यात कित्येक बातम्या निर्भयपणे व सविस्तर छापलेल्या असत.

त्यानंतर १८७४ मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमाला सुरू केली. सात वर्षांत मालेचे ८४ अंक निघाले. आपल्या आवेशयुक्त, चटकदार व अलंकारिक भाषेच्या साहाय्याने मालाकारांनी महाराष्ट्रात विचारक्रांती घडवून आणली.

इ. स. १८७७ मध्ये दीनबंधू नामक साप्ताहिक भालेकर यांनी सुरू केले. म. फुले यांच्यापासून त्यांना प्रेरणा मिळाली होती. सत्यशोधक समाजाचा प्रचार करण्यासाठी हे साप्ताहिक निघाले होते. मागसलेल्या बहुजन समाजाविषयीचे लेख त्यात छापले जात.

इ. स. १८७८ साली केवळ ऐतिहासिक साधने प्रसिद्ध करण्यासाठी काव्येतिहाससंग्रह हे पत्र सुरू झाले.

याव्यतिरिक्त अनेक पत्रे त्या काळात जन्मास आली. इ. स. १८६३ मध्ये नासिक येथे नासिकवृत्त, इ. स. १८६४ साली बेळगाव समाचार, १८६७ साली ठाणे येथे सूर्योदय व धुळे येथे खानदेशवैभव, १८६९ साली कोल्हापूरला ज्ञानसागर, १८७१ साली पुणे येथे लोककल्याणेच्छू व रत्नागिरीला सत्यशोधक, १८७५ मध्ये वेंगुर्लेवृत्त, १८७६ मध्ये धुळ्याला आर्यावर्त, इ. पत्रे निघाली. हिंदू रिफॉर्मर, ज्ञानचक्षू, शिवाजी, विनोद प्रतोद, कष्टविलासिनी, पुणेवैभव, वृत्तप्रकाश ही पत्रेही चालू होती. गोव्यात देशसुधारणेच्छू, सोलापूरला कल्पतरू, पंढरपूरला पंढरीवैभव, साताऱ्याला बोधसुधाकर, अलिबागला सत्यसदन, इंदूरला पूर्णचंद्रोदय, देवासला वृत्तलहरी, धारला वृत्तधारा, अशी बरीच वृत्तपत्रे त्या काळी सुरू झाली. बेने इसरायल समाजाने इ. स. १८७७ मध्ये सत्यप्रकाश नावाचे मराठी पत्र सुरू केले, ते १८८४ च्या जूनपर्यंत चालू होते.

प्रस्तुत कालखंडातील वृत्तपत्रांत बातम्यांचा भरणा थोडाच असे. बहुतेक बातम्या इंग्रजी वृत्तपत्रांवरून घेतलेल्या असत. स्वतंत्र बातमीदारांकडून आलेली बातमीपत्रे अगदी थोडी असत. धार्मिक व सामाजिक प्रश्नांची चर्चा बरीच चाले. पुणे व मुंबई येथील पत्रे सोडल्यास, इतर पत्रांत राजकारणाला फारसे स्थान नसे. वाचकांचा पत्रव्यवहार मात्र भरपूर आढळतो. वृत्तपत्रांतील एकंदर धोरण सरकारला अनुकूल असे. त्यात ब्रिटिश राज्यापासून झालेल्या फायद्याचे गोडवे गायले जात.

इ. स. १८८१ च्या सरकारी अहवालात देशी वृत्तपत्रांची संख्या ७६ व त्यांत मराठी पत्रांची संख्या ४१ दिलेली आहे. १८८० पर्यंत मराठी भाषेत सुमारे ७० मासिके सुरू झाली होती. त्यांतील विद्याकल्पतरू (बडोदे), मनोविहार (ठाणे), जगद्धितेच्छू (पुणे), ज्ञानसागर (पुणे), काव्येतिहाससंग्रह (पुणे), विद्योदयमाला (रत्नागिरी) व व्यवहारदर्पण (मुंबई) ही विशेष उल्लेखनीय आहेत.

त्यानंतरचा कालखंड केसरीच्या आरंभापासून सुरू होतो. केसरीचा पहिला अंक इ. स. १८८१ साली जानेवारीच्या पहिल्या मंगळवारी निघाला. त्यात वाङ्मयविषयक लेख चिपळूणकर लिहीत; इतिहास, अर्थशास्त्र व समाजकारण यांवरचे लेख आगरकरांचे असत आणि धर्मशास्त्र व कायदा या विषयांवर लो. टिळक लिहीत. प्रथम आगरकर हे संपादक व प्रकाशक होते. पण आधी सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा यासंबंधी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मतभेद झाल्यामुळे त्यांनी इ. स. १८८७ मध्ये केसरीचा संबंध सोडला आणि पुढील वर्षी सुधारक हे साप्ताहिक काढले.

त्यानंतर लो. टिळक हे केसरीचे संपादक झाले. मध्यंतरी त्यांना तीनदा कारावास भोगावा लागला, तो काळ सोडला तर तेच शेवटपर्यंत केसरीचे संपादक होते. निधनापर्यंत त्यांनी केसरीमधून लोकजागृतीचे कार्य केले आणि देशाभिमान व

ज. स. करंदीकर

धर्माभिमान वाढीस लावला. आपल्या जहाल विचारांचे लोण त्यांनी मोठ्या धडाडीने लोकांपर्यंत पोचवले. तात्यासाहेब केळकर, ज. स. करंदीकर व काकासाहेब खाडिलकर यांनीही त्यांना चांगली साथ दिली.

प्रथम केसरी केवळ मंगळवारी निघत असे. त्यात बातम्यांपेक्षा विचारप्रवर्तक लेखांनाच अधिक वाव दिला जात असे. पुढे त्याचे रूपांतर अर्धसाप्ताहिकात आणि मग दैनिकात झाले.

केसरी सुरू झाला त्याच वर्षी अरण्यपंडित, बकुल, जगदादर्श, छावा व दैवज्ञदीपिका ही वर्तमानपत्रे निघाली. अरण्यपंडित हे साप्ताहिक त्या काळात बरेच गाजले. त्यात लौकिक व धार्मिक विषयांवर निर्भिडपणे उपरोधिक भाषेत लेख लिहिले जात. इ. स. १८८५ साली सोलापूरसमाचार हे वृत्तपत्र निघाले. त्यानंतर इ. स. १८८८ च्या ऑक्टोबरमध्ये आगरकरांनी आपले सुधारक पत्र सुरू केले. त्यांतील तेजस्वी लेखांमुळे महाराष्ट्रात हे पत्र खूपच गाजले. पण इ. स. १८९५ साली आगरकरांचे निधन झाल्यामुळे सुधारकाचे तेज मावळले. त्यानंतर ते पत्र काही वर्षे चालून बंद पडले.

इ. स. १८८९ साली मुंबईत वार्ताहर हे पत्र निघाले. त्यातील निवडक वार्ता, चटकदार निबंध व इतर माहिती यांमुळे ते बरेच लोकप्रिय झाले होते.

इ. स. १८९० च्या ऑक्टोबरमध्ये हरिभाऊ आपटे यांनी करमणूक हे साप्ताहिक सुरू केले. त्यांच्या कादंबऱ्या प्रथम पुणेवैभव या पत्रात प्रसिद्ध झाल्या. पुढे १८९६ च्या जुलै महिन्यात त्यांनी मनोरंजन नावाचे मासिक सुरू केले. त्याच्या पहिल्याच अंकात काशीताई कानिटकरांची 'रंगराव' व हरिभाऊंची 'गणपतराव' या कादंबऱ्या सुरू झाल्या. १८८३ मध्ये सुरू झालेले निबंधचंद्रिका हे मासिक इ. स. १८८७ साली मनोरंजनात समाविष्ट झाले. हे जोड मासिक १८९२ पर्यंत चालले. करमणूक हे साप्ताहिक अत्यंत उच्च दर्जाचे होते. हरिभाऊंच्या कादंबऱ्या, उद्‌बोधक चरित्रे, उपयुक्त माहिती, चटकदार वर्तमानसार, मगुणाबाईंची मुलींना पत्रे, स्फुट गोष्टी व टीकालेख अशा विविध प्रकारच्या वाङ्मयामुळे ते खूप लोकप्रिय झाले. १९१७ साली ते बंद पडले.

इ. स. १८९८ साली शिवरामपंत परांजपे यांनी काळ हे पत्र सुरू केले. प्लेगाची साथ, त्या साथीत सोजिरांनी केलेली दांडगाई, रँडचा वध, सरकारची दडपशाही व लो. टिळकांना झालेली शिक्षा, या सर्व प्रकरणांमुळे त्या वेळी महाराष्ट्रातील वातावरण प्रक्षुब्ध झालेले होते. त्यातच परांजपे यांनी व्याजोक्तिपूर्ण व उपरोधिक असे जहाल वृत्तीचे लेख लिहून त्या वातावरणातला क्षोभ वाढवला. त्यांच्या लेखांमुळे सरकारी अधिकाऱ्यांत बरीच खळबळ झाली आणि शेवटी इ. स. १९०८ मध्ये काळ पत्रावर खटला होऊन ते बंद पडले. त्यांचे काळातले उत्कृष्ट लेख मराठी वाङ्मयाला भूषणभूत ठरले आहेत.

या कालखंडातली संस्थानांतील वृत्तपत्रांची कामगिरीही उल्लेखनीय आहे. ज्ञानसागर, विद्याविकास, समर्थ, बडोदावत्सल, सयाजीविजय अशी त्यांची नावे होती.

इ. स. १८८१ ते १९०० या कालखंडात ऐतिहासिक साधने, धार्मिक विचार, संस्कृत ग्रंथांची भाषांतरे, फलज्योतिष, आयुर्वेद, इ. विषयांसंबंधी पुष्कळ मासिके निघाली. त्यांतील बरीच अल्पावधीतच बंद पडली. दंभहारक, सत्यबोधिनी, तत्त्वविवेचक, ज्ञानसागर, ज्ञानदीप, हिंदुधर्म-विवेचक, सद्धर्मदीप या मासिकांनी बरीच धर्मजागृती केली. ज्ञानसंग्रह, विद्याविलास, कुमुदिनी, वाग्विलास, महाराष्ट्र कोकिळ, इ. मासिकांची साहित्यसेवा डोळ्यात भरण्यासारखी झाली. याव्यतिरिक्त दीनमित्र, गृहिणी, भारतविजय, मराठी शालापत्रक (नवे, चित्रशाळेचे)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही मासिके उल्लेखनीय आहेत. कोल्हापूर येथे विजापूरकर यांनी सुरू केलेले ग्रंथमाला हे मासिक बारा वर्षे चालले. त्यात अनेक प्रथितयश व होतकरू लेखकांचे लेख व ग्रंथ प्रसिद्ध झाले.

इ. स. १८९४ च्या सुमारास प्रभाकर नावाचे दैनिक मुंबईला सुरू झाल्याचा उल्लेख सापडतो. गुराखी हे दैनिकही त्या वेळी चालू होते. हीच मराठीतली पहिली दैनिके होत.

इ. स. १९००–१९१० हा कालखंड वृत्तपत्रांच्या इतिहासात महत्त्वाचा मानला जातो. गेल्या शतकाच्या अखेरीस जी राष्ट्रीय जागृती झाली, तिचे पडसाद या कालखंडातील वृत्तपत्रांत उमटू लागले. महाराष्ट्राच्या इतर भागांत आणि त्या वेळी मागास राहिलेल्या वऱ्हाड–मध्य प्रांतातही वर्तमानपत्रे सुरू झाली. इ. स. १९०२ मध्ये वऱ्हाडसमाचार, देशसेवक, वैदर्भ ही पत्रे निघाली. मुंबईत निघालेल्या मुंबईवैभव या दैनिकाचा उल्लेख अवश्य करायला पाहिजे. इ.स. १९०४ मध्ये ज्ञानप्रकाश या अर्धसाप्ताहिकाचे रूपांतर दैनिकात झाले. त्याची साप्ताहिक आवृत्ती रविवारी निघू लागली.

इ. स. १९०५ मध्ये भोपटकर बंधूंनी भाला हे पत्र सुरू केले. ते दहा दिवसांनी प्रसिद्ध केले जाई. ते खरेखुरे मतपत्र असून, त्यातले लेख खूप गाजले. त्यानंतरच्या पाच वर्षांत सरदेसाई – विजय (सावंतवाडी १९०६), मुमुक्षु (धुळे व पुणे १९०७), देशसेवक (नागपूर), हितवाद (नागपूर १९०७), विजयी मराठा (कोल्हापूर १९०७), प्रगति (कोल्हापूर १९०८), खानदेशसमाचार (धुळे १९०८), कुलाबा (वैजनाथ १९०८), हिंदूपंच (साप्ताहिक, ठाणे १९०९) अशी अनेक पत्रे निघाली. त्या काळात राष्ट्रीय चळवळीचा जोर वाढल्यामुळे वर्तमानपत्रांचीही प्रगती झाली. पण १९०५ पासून सरकारने राष्ट्रीय वर्तमानपत्रांवर करडी नजर ठेवली आणि भाला, हरिकिशोर (यवतमाळ), विहारी, अरुणोदय (ठाणे), प्रनोद (इस्लामपूर), स्वराज्य (सोलापूर), विश्ववृत्त वगैरे नियतकालिकांवर खटले भरले. इ. स. १९०८ च्या सुमारास राष्ट्रमत नावाचे दैनिक सुरू करण्यात आले. पण त्यातील राष्ट्रीय वृत्तीच्या लेखनामुळे सरकारने त्याच्यावर खटला भरला आणि मग ते लौकर बंद पडले. राष्ट्रोदय मासिक, काळ, देशसेवक ही वृत्तपत्रेही अशीच सरकारी रोषामुळे बंद पडली. इ. स. १९०८ साली लो. टिळकांना राजद्रोहाबद्दल सहा वर्षे कारावासाची शिक्षा झाली. पण केसरी पत्र मात्र चालू राहिले. इ. स. १९१० साली वृत्तपत्रांवर नियंत्रण घालण्यासाठी सरकारने प्रेस ॲक्ट संमत करून घेतला. त्यालाही अनेक पत्रे बळी पडली.

या कालखंडात ३०–४० मासिके निघाली. त्यांतली कादंबरी–कल्पद्रुम, आनंद, विद्यार्थी, राष्ट्रोदय, चित्रमयजगत ही विशेष उल्लेखनीय होत. आपटे, करंदीकर, देवगिरीकर यांच्या सहकार्यामुळे आणि भारदस्त लेख, भरपूर चित्रे व नियमितपणा या गुणांमुळे चित्रमयजगत खूप लोकप्रिय झाले. खाडिलकरांचे महायुद्धाविषयीचे, चटकदार भाषेत लिहिलेले लेख हे त्याचे मोठेच आकर्षण होते. मासिक समालोचन व शास्त्रीय माहिती सचित्र देण्याचा उपक्रम या मासिकानेच प्रथम केला.

इ. स. १९१० ते १९२० हा कालखंड पहिल्या महायुद्धामुळे विशेष गाजला. त्या कालखंडात अनेक महत्त्वाची पत्रे उदयास आली. १९१४ साली वऱ्हाडात महाराष्ट्र नामक साप्ताहिक सुरू झाले. त्याचा इतका बोलबाला झाला, की ते वऱ्हाडचा केसरी समजले गेले. मुंबईतील लोकसेवक, वाईचे धर्ममार्तंड लेलेशास्त्री यांचे ज्ञानसाधन व पुण्याचे बापटशास्त्री यांचे पाक्षिक आचार्य ही नावे घेण्याजोगी वृत्तपत्रे त्याच वर्षी निघाली. पुढच्या वर्षी अच्युतराव कोल्हटकर यांनी संदेश हे पत्र सुरू केले. त्यापूर्वी आपल्या तेजस्वी लेखनामुळे कोल्हटकर प्रसिद्धी पावले होते. त्यामुळे संदेशचा बोलबाला झाला. महायुद्धाच्या ताज्या व चटकदार बातम्या आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे सुबोध विवेचन यांमुळे त्याचा खप खूप वाढला. पण पुढे अच्युतरावांनी राष्ट्रीय नेत्यांवर निरर्गल टीका सुरू केल्यामुळे त्यांच्या पत्राची लोकप्रियता कमी झाली. तथापि त्यांनी दोन तपांच्या काळात जे विपुल लेखन केले, त्याला मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळाले आहे. चिपळूणकर, टिळक, आगरकर, परांजपे, खाडिलकर, केळकर व कोल्हटकर या सप्तर्षींच्या लेखनाचे आणि विचारांचे अनंत संस्कार मराठी भाषेवर व जीवनावर झालेले आहेत. गोमंतकात याच कालखंडात पं. करंडेशास्त्री यांनी सत्संग, ब्र. दादा वैद्य यांनी प्राचीप्रभा व हळदकुंकू (स्त्रियांसाठी) व विद्याप्रसार ही नियतकालिके सुरू केली. भारत नावाचे साप्ताहिक हेगडे देसाई यांनी बरीच वर्षे चालवले. त्यानंतर हिंदू हे साप्ताहिक द. व्यं. पै यांनी काही काल चालवले. श्री. सां. घ. कंटक यांनी सुबोध या नावाचे

अ. ब. कोल्हटकर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एक मासिक कित्येक वर्षे चालवले.

इ. स. १९१९ मध्ये पुण्यातील राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांनी लोकसंग्रह नावाचे दैनिक सुरू केले. त्यात संदेशमधील टीकेला प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पण १९२३ मध्ये ते बंद पडले. या कालखंडात वृत्तपत्रांप्रमाणे मनोरंजन करणारी नियतकालिकेही पुष्कळ निघाली.

इ. स. १९२० नंतर भारतात म. गांधींच्या नेतृत्वाखाली निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ सुरू झाली आणि ती देशाच्या सर्व भागांत पसरली. त्या चळवळीच्या अनुषंगाने वृत्तपत्रांनीही मोठी कामगिरी बजावली. इ. स. १९२१ मध्ये महाराष्ट्रातील पुढाऱ्यांनी सामायिक भांडवलाच्या साहाय्याने एक मंडळी स्थापन केली व लोकमान्य हे दैनिक सुरू केले. कृ. प्र. खाडिलकर हे खंदे संपादक त्याला लाभले होते, त्यामुळे प्रथम त्याचा खूप प्रसार झाला. पण १९२३ मध्ये खाडिलकरांनी लोकमान्याशी असलेला संबंध सोडून नवा काळ हे पत्र सुरू केले. लोकमान्य दैनिक १९२५ पर्यंत कसेबसे चालू होते. त्या वर्षी ते बंद पडले.

नवा काळ हे पत्र राष्ट्रीय सभेच्या प्रचारासाठी निघाले. खाडिलकर हे म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळीचा पुरस्कार करणाऱ्या महाराष्ट्रीय वर्गाचे अध्वर्यू होते. त्यांनी आपले नवीन दैनिक समर्थपणे चालवले.

मुंबईत राष्ट्रीय पक्षाच्या मतांचा पुरस्कार करणारे स्वस्त दैनिक म्हणजे प्रभात हे होय. मौज प्रि. ब्युरोचे मालक पां. म. भागवत हे त्याचे चालक होते. अच्युतराव कोल्हटकरांच्या लेखांमुळे प्रभात खूप लोकप्रिय झाले.

इ. स. १९१० साली बंद झालेल्या भाला पत्राचे पुनरुज्जीवन १९२१ मध्ये भोपटकरांनी केले. ते सुमारे १६ वर्षे चालले. सनातनी पक्षाची बाजू त्या पत्राने सावरून धरली होती. त्याच सुमारास काळकर्ते परांजपे यांनी स्वराज्य साप्ताहिक सुरू केले. त्यातले त्यांचे लेखही खूप गाजले. पण ते लवकरच बंद पडले.

इ. स. १९२४ च्या प्रारंभी नागपूर येथे डॉ. हेडगेवारांच्या प्रेरणेने स्वातंत्र्य या नावाचे दैनिक सुरू करण्यात आले. पण ते वर्षभरच चालले.

इ. स. १९२५ मध्ये ज्ञानकोशकार केतकरांनी पुणेसमाचार हे दैनिक सुरू केले होते; पण तेही अल्पायुषी ठरले.

इ. स. १९२९ मध्ये ज्ञानप्रकाशची मुंबई आवृत्ती रोज निघू लागली. त्यानंतर सुरू झालेल्या असहकार चळवळीच्या साद्यंत हकीकतीमुळे ती यशस्वी ठरली.

इ. स. १९२५ मध्ये मुंबईत वैद्य बंधू यांनी ताजी बातमी नावाचे पावआणा दैनिक सुरू केले होते. गिरणी-कामगारांच्या चळवळींची ताजी बातमी त्यात चटकदार स्वरूपात असल्यामुळे ते यशस्वी ठरले. त्यात संपादकीय लेख किंवा स्फुटे यांना मुळी जागाच नसे. अशाच प्रकारची धूमधडाका, भगवा झेंडा वगैरे अनेक पावआणा दैनिके मुंबईत १९३१ च्या सुमारास चालू होती. पुण्यात १९३० साली शांतिदूत नावाचे एक पावआणा दैनिक श्री. करमाळेकर यांनी सुरू केले. ते सुमारे चार वर्षे चालू होते.

आचार्य जावडेकरांनी लोकशक्ती नावाचे अर्धसाप्ताहिक केवळ काँग्रेसच्या प्रचारासाठी तीन वर्षे चालवले. नंतर ते दैनिक झाले. इ. स. १९४२ च्या धामधुमीत ते बंद पडले होते. पण श्री. लिमये यांनी ते पुन्हा सुरू केले. १ जानेवारी १९३१ रोजी डॉ. ना. भि. परुळेकर यांनी पुण्यात सकाळ हे दैनिक सुरू केले. त्यांनी अमेरिकेत वृत्तपत्रशास्त्राचा अभ्यास केला होता. पूर्वी उपेक्षित असलेल्या अनेक नवीन क्षेत्रात सकाळने पहिल्याने पाऊल टाकून बहुजन समाजाला आकर्षित केले. तसेच विविध प्रकारची माहिती त्यात प्रसिद्ध होत असल्यामुळे त्या पत्राला सांप्रत मोठे स्थान प्राप्त झाले आहे. सकाळमध्ये काम करणारे शि. ल. करंदीकर यांनी ३–४ वर्षांनी त्रिकाळ हे स्वतंत्र पावआणा दैनिक सुरू केले.

इ. स. १९२० ते १९३५ या कालखंडात महाराष्ट्राच्या निरनिराळ्या जिल्ह्यांतही बरीच वृत्तपत्रे निघाली. त्यांतली रत्नागिरी येथील बलवंत व सत्यशोधक, सातारा येथील ऐक्य व समर्थ, अमरावतीचे उदय, सावंतवाडीचे वैनतेय, कुलाबा जिल्ह्यातील कुलाबा समाचार, कोल्हापूरचे सत्यवादी आणि सोलापूरचे कर्मयोगी साप्ताहिक, सोलापूरसमाचार व विजय ही दैनिके विशेष उल्लेखनीय होत. नागपूरचे महाराष्ट्र व अमरावतीचे उदय ही साप्ताहिके नंतर अर्धसाप्ताहिक स्वरूपात निघू लागली. अमरावती येथे विदर्भ-संचार हे वृत्तपत्र सुरू झाले.

इ. स. १९१० चा प्रेस अॅक्ट १९२१ साली रद्द करण्यात आला होता. पण १९३० साली जो एक नवा वटहुकूम निघाला, त्यामुळे हिंदुस्थानातील सुमारे २०० वृत्तपत्रे बंद झाली.

इ. स. १९३४ साली मुंबईत श्री. सदानंद यांनी नवशक्ती हे दैनिक सुरू केले. शं. द. जावडेकर हे त्याचे संपादक होते. नंतर द. ग. सावरकर हे संपादक झाले.

इ. स. १९३५ मध्ये भागवतांनी पुण्याला दैनिक प्रभात सुरू केले. ते लोकशाही पक्षाचे मुखपत्र होते. इ. स. १९३७ साली पुण्यात लोकहित व नवभारत ही दैनिके सुरू झाली. त्याच सुमारास कोल्हापूरला दैनिक पुढारी सुरू झाले. लोकशाही स्वराज्य पक्षाचे राष्ट्रमत हे दैनिक १९३७ च्या निवडणुकीच्या काळापुरते चालू होते. इ. स. १९३८ साली नासिकचे गावकरी हे पत्र सुरू

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाले. इ. स. १९४० मध्ये श्री. शंकरराव दाते यांनी हिंदु-महासभेचे मुखपत्र म्हणून काळ हे पत्र सुरू केले.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात नवीन वृत्तपत्रे फारशी निघाली नाहीत. इ. स. १९४४ साली नरकेसरी स्मारक मंडळाने तरुण भारत हे पत्र नागपूरला सुरू केले. ग. त्र्यं. माडखोलकर गेली कित्येक वर्षे ते पत्र जोमाने चालवीत आहेत. ओगले यांनी १९१४ साली सुरू केलेले महाराष्ट्र हे साप्ताहिक १९२९ साली अर्धसाप्ताहिक व १९४५ साली दैनिक झाले. पुढे ते वऱ्हाडचे मुखपत्रच ठरले.

अकोल्याचे मातृभूमी हे साप्ताहिक श्री. पु. ब. गोळे यांनी १९३८ मध्ये सुरू केले. ते पुढे दैनिक म्हणून निघू लागले. नागपूरच्या महाराष्ट्र या साप्ताहिकाप्रमाणेच केसरी, अकोल्याचे उदय व रत्नागिरीचे सत्यशोधक ही साप्ताहिके अर्धसाप्ताहिके झाली.

वर उल्लेख केलेल्या साप्ताहिकांव्यतिरिक्त दुसऱ्या महा-युद्धापूर्वी सुरू झालेली चित्रा, मौज, निर्भीड, धनुर्धारी, कोल्हा-पूरचे विद्याविलास या साप्ताहिकांची कामगिरीही उल्लेखनीय आहे. महायुद्धापूर्वीच्या २५–३० वर्षांत पाच-सहाशे नवी नियत-कालिके सुरू झाली. त्यांतील काहींची नावे अशी– ब्रह्मकर्म-प्रदीप, आरोग्य, केरळ–कोकिळ, उपनिषत्प्रकाश, सारस्वत, लोकशिक्षण, मराठा–वैभव, उषा, महाराष्ट्र साहित्यपत्रिका, नवयुग, नवे मन्वंतर, आयुर्वेद, मराठा, नवनीत, हास्यविनोद, बालबोध, व्यायाम, भारतसेवक, महाराष्ट्र सारस्वत, रत्नमाला, बालोद्यान, उद्यम (१९१९), तरुण भारत (१९१९), कीर्तन, उद्योगी भारत, भा. इ. सं. मंडळ–त्रैमासिक, कर्मयोगी, किर्लो-स्कर खबर (१९२०), समाजसेवक, स्वाध्याय, मराठा–मंडळ, क्रीडांगण, राष्ट्रधर्म, मुमुक्षू (१९२१), विद्याप्रसार, प्रमोद, विवेक, लोकमान्य, सहविचार, महाराष्ट्रधर्म, शारदा, करमणूक, पुरुषार्थ, मातृभूमी, वारकरी, रत्नाकर, स्वधर्म, ज्ञानसंग्रह, दास-बोध, समाजस्वास्थ्य, इंद्रधनुष्य, रंजनमाला, उषःकाल, सृष्टिज्ञान, विद्यार्थी, यशवंत, राष्ट्रोदय, मनोरमा, नवा मनु, राजहंस, स्त्री, प्रगति, प्रभात, नवजीवन, हंस, महाराष्ट्र, गोमंतक, सत्यकथा, पारिजात, मनोहर, गावकरी, वसंत, युगां-तर, सह्याद्रि, विजय, ध्रुव, वाग्विलास, कुमार, संदेश, संजी-वनी, वीणा, मुद्रण–प्रकाश, समर्थ, आरोग्यमंदिर, वाङ्मय-शोभा, निशा, नयन, ज्योति, संगीतसुधा, समाजजीवन, संध्या, धनुर्धारी, ग्रामोद्धार, स्वराज्य, राष्ट्रतेज, संदेश, सत्य-प्रकाश, पुढारी, नवयुग, इत्यादी.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात कागदाच्या टंचाईमुळे व सरकारी निर्बंधांमुळे वृत्तपत्रांचा फारच कोंडमारा झाला. पूर्वीची वृत्तपत्रे कशीबशी टिकून राहिली. नवी काढणे अशक्यच होते. महायुद्धानंतर भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले आणि वृत्तपत्र-व्यवसायाच्या विकासाला फार मोठे क्षेत्र उपलब्ध झाले. त्या व्यवसायातील लोक संघटित होऊन आपल्या हितसंबंधाचे रक्षण करू लागले. आता त्या व्यवसायाला विराट स्वरूप प्राप्त झालेले आहे. असंख्य नवी वृत्तपत्रे व नियतकालिके निघाली असून, ती सुशिक्षित नागरिकांच्या जीवनाचा एक आवश्यक असा घटक बनली आहेत. ग्रामीण जीवनातही वर्तमानपत्रांचा थोडासा शिरकाव झालेला दिसतो. सर्व जिल्ह्यांच्याच नव्हे, तर तालुक्यांच्या ठिकाणीही लहान लहान वृत्तपत्रे चालू झाली आहेत. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत निघालेल्या नियतकालिकां-पैकी काहींची नावे खाली दिली आहेत.

दैनिके– हिंदुस्थान (अमरावती), सोलापूर समाचार, भारत (पुणे), काळ (पुणे), लोकसत्ता (मुंबई), मराठवाडा (औरंगा-बाद), सुदर्शन (नागपूर), संध्या (पुणे), तरुण भारत (नागपूर व पुणे), विशाल सह्याद्रि (पुणे), मराठा (मुंबई), अजिंठा (औरंगाबाद), शिवशक्ति (अकोला), महाराष्ट्र टाइम्स (मुंबई), उदय (अमरावती), इंद्रधनुष्य, गोमंतक (पणजी). राष्ट्रमत (मडगाव), नवसंदेश (पणजी) इ.

साप्ताहिके – स्वतंत्र भारत (धुळे), चवाठा (नागपूर) बांधव (सोलापूर), जनसत्ता (नगर), हिंदू (मुंबई) जागृती (नासिक), अग्रणी (पुणे), जनशक्ती (जळगाव), नवविदर्भ (अमरावती), प्रबुद्ध भारत (मुंबई), स्वदेश (यवतमाळ), विवेक (मुंबई), आलमगीर (मुंबई), आपला महाराष्ट्र (धुळे), आमचा महाराष्ट्र (परभणी), आदेश (नासिक), ध्रुव (सातारा), गोफण (सोलापूर), लोकराज्य (मुंबई), सोबत (पुणे), माणूस (पुणे), साधना (पुणे), मार्मिक (मुंबई), दूधसागर (मुंबई), अग्रदूत (सांगली), नवयुग (मुंबई), प्रगती (मुंबई), युगांतर (मुंबई), तलवार (धुळे), सन्मित्र (ठाणे), लोकवाणी (भंडारा), गर्जना (कोल्हापूर), राष्ट्रमत, नवप्रभा.

मासिके – अनुराधा (पुणे), अनुप्रीता (मुंबई), अप्सरा, (मुंबई), अभिरुची (मुंबई), उत्तमकथा (पुणे), एकता (पुणे) ऊसमळा (पुणे), कथालक्ष्मी (पुणे), गोकुळ (पुणे), जत्रा (पुणे), नवभारत (वाई), नवल (पुणे), पैंजण (पुणे), प्रपंच (पुणे), प्रसाद (पुणे), महात्मा (पुणे), माहेर (पुणे), मानिनी (पुणे), मेनका (पुणे), हंस, मोहिनी (पुणे), रसरंग (नासिक), रोहिणी (पुणे), ललित (मुंबई), वीणा (मुंबई), दीपलक्ष्मी (मुंबई), दीपावली (मुंबई), संपदा (पुणे), सुदर्शन (पुणे), सह्याद्रि (पुणे), चांदोबा, धनुर्धारी,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नवनीत (मुंबई), वसुधा (मुंबई), साहित्य सहकार (मुंबई), कुमार (पुणे), श्री (नासिक), अमृत (नासिक), वहिनी (पुणे), रंभा (पुणे), गृहलक्ष्मी (पुणे), नाट्यभूमी (मुंबई).

वार्षिके – अंजली, दीपमाला, पॅरामाउंट उद्योग व्यापार, बागेश्री, रत्नप्रभा, आवाज, मौज, सुगंध, केदार, ज्ञानदूत, उत्तम, धरती, साहित्यलक्ष्मी.

अशा प्रकारे सांप्रत मराठी नियतकालिकांचा संसार खूपचमोठा झाला आहे मासिकांचे व साप्ताहिकांचेच नव्हे, तर दैनिकांचे देखील दिवाळी अंक निघू लागले आहेत. दिवाळी अंकांत कथा, कादंबऱ्या, नाटके, निबंध, प्रवासवर्णने, टीकात्मक लेख, इ. सर्व प्रकारचे विपुल साहित्य वाचायला मिळते. सांप्रत बरेच वाङ्मय प्रथम नियतकालिकांतून प्रसिद्ध होते आणि मग त्यांतले काही पुस्तकरूपाने प्रकाशित केले जाते. नियतकालिकांच्या माध्यमातून मराठी वाङ्मय-वृक्षाचा विस्तार खूपच झाला आहे.

इ. स. १९५० साली बेळगाव येथे मराठी पत्रकार परिषदेचे दहावे अधिवेशन झाले. त्या प्रसंगी आचार्य अत्रे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी वृत्तपत्रांच्या व नियतकालिकांच्या एकशेअठरा वर्षांच्या इतिहासाचे विहंगमावलोकन करून, मराठी पत्रव्यवसायाच्या तत्कालीन परिस्थितीसंबंधी विचार केला, त्याचा आशय असा –

ध्येयवादी महापुरुषांच्या जीवितकार्यातला एक भाग म्हणूनच मराठी वृत्तपत्रे उदयाला आली आणि त्या त्या पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाच्या व कार्यांच्या विकासाबरोबरच त्यांची वाढ होत गेली. लोकजागृतीचे व समाजक्रांतीचे एक प्रभावी शस्त्र या एकाच दृष्टीने वृत्तपत्रांची निर्मिती व जोपासना महाराष्ट्रात झाली. भारतात स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य स्थापन झाल्यापासून वृत्तपत्रांच्या कार्यक्षेत्राला विराट वर्तुळाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. कोट्यवधी मतदारांना जागृत व सुशिक्षित करण्याचे कार्य त्यांना करावयाचे आहे. विविध बुद्धीच्या, प्रतिभेच्या व शक्तीच्या अनेक थोर विभूती आणि प्रभावी व्यक्ती आज महाराष्ट्राच्या पत्रव्यवसायात वावरत आहेत आणि ह्या व्यवसायाचे सामर्थ्य व शोभा वाढवीत आहेत. आचार्य जावडेकर, न. र. फाटक व श्री. ग. वझे ह्यांच्यासारखे अधिकारी पुरुष नवीन तत्त्वज्ञान व नवीन दृष्टी देऊन पत्रकारांचे बौद्धिक मार्गदर्शन करीत आहेत. साने गुरुजींच्या साधनेने तरुणांना मोहिनी घालणारी एक नवीन सोज्वळ शक्ती पत्रकारांना उपलब्ध करून दिलेली आहे. श्री. म. माटे आणि देवगिरीकर ह्या विद्वानांनी आपल्या व्यासंगाची कोठारे वाचकांना सदैव खुली करून ठेवलेली आहेत. अप्पा खाडिलकर, शंकरराव दाते, श्रीपादराव नवरे व शंकरराव ओगले ह्यांच्यासारख्यां अभिजात व निष्णात संपादकांनी मराठी पत्रव्यवसायाची इभ्रत सांभाळून धरलेली आहे. रामभाऊ तटणीस व शंकरराव मोरे ह्यांच्यासारखे लढाऊ संपादक हातात लेखण्यांच्या तरवारी घेऊन लोकहिताभोवती जागता पहारा करीत आहेत. जुन्या पत्रकारांची प्रखर ध्येयनिष्ठा व आधुनिक राजकीय तत्त्वज्ञानाची अखंड तपश्चर्या यांचा सात्विक समन्वय पां. वा. गाडगीळ ह्यांच्यामध्ये झालेला आढळतो. आजच्या जीवनातील विषमतेचे आणि विसंगतीचे मर्मभेदक विडंबन करणारा दत्तु बांदेकरांसारखा अमोघ विनोदी लेखक महाराष्ट्रात दुसरा आढळणार नाही. माडखोलकर, ना. ग. गोरे व प्रभाकर पाध्ये ह्यांच्यासारखे राजकारणात व साहित्यात सारखीच गती असलेले प्रतिभाशाली, वादकुशल व शैलीदार, लेखक-संपादक मराठी वृत्तसृष्टीची भूषणे होत. अनंत काणेकर व द्वारकानाथ कर्णिक यांच्यासारखे मार्मिक स्तंभलेखक, ग. बा. नेवाळकर व ह. रा. महाजनी यांच्यासारखे तल्लख आणि अभ्यासू राजकीय समीक्षक, चं. वि. बावडेकर व वि. ग. देशपांडे ह्यांच्यासारखे चतुरस्र बुद्धीचे स्फुटलेखक हे मराठी पत्रव्यवसायाची मोठीच आकर्षणे आहेत.

पां. वा. गाडगीळ

ह. रा. महाजनी

वरील भाषणात आचार्य अत्रे यांनी ज्यांचा गौरव केला आहे, त्यांच्या व्यतिरिक्त डॉ. ना. भि. परुळेकर, ग. वि. केतकर, श्रीकांत पालेकर, पु. रा. बेहरे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गोविंद तळवलकर, र. ना. लाटे, विद्याधर गोखले, जयंतराव टिळक, बा. द. सातोस्कर, चंद्रकांत केणी, अनंत पाटील, माधव गडकरी, कोठारी, त्र्यं. वि पर्वते, अ. द. पोतनीस, बाळासाहेब पाटील, गणपतराव जाधव, भालेराव, ह. मो. जोशी, रॉय किणीकर, इ. अनेक पत्रकारांनी गेल्या वीस वर्षांत मराठीची पुष्कळ सेवा केली आहे.

पण गेल्या २०–२५ वर्षांत वृत्तपत्रांचे स्वरूप खूप बदलले आहे. यांत्रिक सुधारणा, विमाने, तारायंत्रे, बिनतारी संदेश यामुळे व्याप व गती यांत फार वाढ झाली आहे. लोकांना विविध, त्रोटक व ताजे वृत्त हवे असते. ते ज्यात सापडते तेच पत्र त्यांना आवडते. मात्र वृत्तपत्रांच्या मालकांच्या राजकीय व आर्थिक हितसंबंधांमुळे संपादकांचे स्वातंत्र्य आता मर्यादित झालेले आहे. पूर्वी पत्रकार हा कर्तव्य, ध्येयनिष्ठा, तत्त्वाचरण अशा गुणांनी प्रेरित असे. आता त्या व्यवसायात धंदेवाईक दृष्टी आली आहे आणि तत्त्वनिष्ठा फारशी उरलेली नाही. भविष्य, शब्दकोडी यांना नियतकालिकांत मानाचे स्थान लाभले आहे. गेल्या ५–१० वर्षांत वृत्तपत्रांचे स्वरूप पुन्हा थोडे बदललेले दिसते. शीघ्र-साहित्य निर्माण करणारे बरेच पत्रपंडित आता तयार झाले आहेत. सिनेमा, नभोवाणी, क्रीडाविश्व, रंगभूमी, संगीत, चित्रकला, यांसंबंधी वाचकांची जिज्ञासा तृप्त करण्याचा प्रयत्न आता पत्रकार करू लागले आहेत. त्याचप्रमाणे पूर्वीसारखे धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय विषयांवर विवेचनात्मक विस्तृत लेखही अलिकडे वृत्तपत्रांत वाचायला मिळू लागले आहेत. शास्त्र आणि तंत्र या दोन्ही दृष्टींनी सांप्रत पत्रव्यवसाय जटिल झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात काही विद्यापीठांनी वृत्तपत्रविषयाचा पदवी आणि पदविका अशा धर्तीवर अभ्यासक्रम सुरू केला आहे. कित्येक विद्यार्थी हल्ली त्या अभ्यासक्रमाकडे वळत आहेत. [प्रदक्षिणा – संपा. रा. श्री. जोग, १९६८; म. सा. रू.; म. सा.; म. सा. सि.; प्रा. म. वा. इ.; आ. म. वा. इ.; प्रा. म. जै. सा.; म. भा.–उ. वि.; मातीतलं मोती, कुळकर्णी, यादव, १९७०; म. नि. वा; मराठी निबंध – म. मा. अळतेकर; लो. सा. रू.; म. लो. क.; हितगुज– श्री. बाळ सामंत; लो. सा. मा.; म. लो. उ.; प्रा. म. वा. स्व.; म. जी. २; द. सं. इ.; मु. म. सं.; सप्तसरिता – संपा. मालती किर्लोस्कर; म. नि. इ.; वृ. प. इ.; हि. इं. ज.]

मराठी रंगभूमी व चित्रपट

नाटक हे मनोरंजनाचे एक सर्वोत्कृष्ट साधन म्हणून परिचयाचे असताना आणि संस्कृत नाटकांची संपन्न परंपरा पाठीशी असतानाही मराठी रंगभूमीचा उद्भव होण्यास मात्र १९ वे शतक उजाडावे लागले. भरतमुनी आणि इतरांचे नाट्यशास्त्रविषयक लेखन आणि कालिदास-भवभूतिप्रभृतींच्या नाट्यकृती यांचा समृद्ध वारसा मध्ययुगातील मराठी कवींनी पूर्णपणे उपेक्षिला होता. गीता-टीका, वेदान्तपर स्वतंत्र रचना आणि पौराणिक आख्याने यांची शतकानुशतके उजळणी करणाऱ्या प्राचीन कवींनी संस्कृत भाषेतील नाट्यप्रकार मात्र स्वीकारला नाही; त्यामुळे प्राचीन संस्कृत नाट्यसृष्टी आणि अर्वाचीन मराठी नाट्यकला यांमध्ये अनेक शतकांचा खंड पडलेला दिसतो.

मनोरंजन ही मानवी मनाची मूलभूत गरज आहे. नाट्याने ती भागवली नाही, तरी प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात इतर अनेक करमणुकीचे प्रकार उपलब्ध असल्याचे प्राचीन वाङ्मयातील निर्देशांवरून आढळून येते. कळसूत्री बाहुल्यांचे खेळ, गोंधळी, भांड, वासुदेव, ललित, बहुरूपी, दशावतारी खेळ अशा कितीतरी रंजनप्रकारांचे उल्लेख आणि थोडाफार तपशील वाचायला सापडतो. गायन, अभिनय आणि नृत्य या तीनही अंगांचा त्यांत कमीअधिक प्रमाणात समावेश झालेला होता. मात्र या सर्व कला-प्रकारांची सांगड कोणत्या ना कोणत्या तरी धार्मिक चालीरीतींशी व कुळधर्म-कुळाचाराशी घातलेली होती. विशेषतः कोकण आणि गोमंतक या भागांत दशावतारी खेळांची परंपरा फार प्राचीन आणि समृद्ध असल्याचे दिसते. उत्तर पेशवाईत तमाशा हा करमणुकीचा प्रकार उदयाला आला आणि अल्पावधीतच त्याची भरभराटही झाली. तमाशात पौराणिक आख्याने आणि देव-देवतांची स्तोत्रे यांचा अंतर्भाव असला, तरी त्यातील मुख्य भाग हा शृंगार-प्रचुर लावणीगायनाचा होता. त्यामुळे तमाशाला लोकप्रियता भरपूर लाभली, तरी प्रतिष्ठा मात्र केव्हाच प्राप्त झाली नाही. आजमितीस मात्र लोकनाट्य या नावाखाली तमाशा प्रतिष्ठित होऊ लागला आहे. कीर्तन हा एकपात्री कार्यक्रम एका विशिष्ट सामाजिक थरात मोठ्या आदराने ऐकला जात असे. पण त्याचे मुख्य उद्दिष्ट पारमार्थिक स्वरूपाचे असल्यामुळे मनोरंजनाचे एक साधन या दृष्टीने त्याचा विचार करणे योग्य नव्हे.

केवळ नाटकाचेच रूप घेतलेला वाङ्मयप्रकार १७ व्या शतकातील तंजाऊरच्या राजपुरुषांनी हाताळलेला दिसतो. वाङ्मयीन गुणांनी युक्त, वाचनीय आणि नृत्यप्रधान अशी सुमारे ३५ नाटके आज तंजाऊरच्या सरस्वती-महाल या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. परंतु महाराष्ट्रापासून दूरवर निर्माण झालेले हे नाट्यवाङ्मयाचे रोपटे प्राचीन मराठीच्या वाङ्मयीन प्रवाहापासून अगदी अलग पडल्यामुळे त्याचा महाराष्ट्राच्या कला-जीवनाशी संबंध आला नाही आणि मराठी वाङ्मयातील नाटकाची उणीव

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तशीच कायम राहिली. ती भरून काढण्याचे श्रेय कर्नाटकी रंगभूमीला आहे. कानडी भाषेत यक्षगान-भागवत असे संबोधिले जाणारे नाटयदर्शन सांगलीचे अधिपती चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांच्या पाहण्यात आले आणि त्या दाक्षिणात्य नाटकापेक्षा अधिक कलापूर्ण असे नाटय मराठीत तयार करण्याची सूचना त्यांनी आपल्या दरबारातील एक हरहुन्नरी सेवक विष्णू अमृत भावे यांना केली. विष्णुदासांनी तशा प्रकारच्या कानडी नाटयात स्वतःच्या कल्पनेने काही फेरबदल करून सीतास्वयंवर नावाचे मराठी नाटक सिद्ध केले. या नाटकाचा पहिला प्रयोग सांगली येथे इ. स. १८४३ मध्ये झाला आणि त्याच दिवशी मराठी रंगभूमीची प्राणप्रतिष्ठा झाली.

या नाटकाच्या जन्माबरोबर 'एका राष्ट्रीय करमणुकीचे' उद्घाटन झाल्याचा प्रत्यय तत्कालीन रसिकांना आला. कारण

विष्णुदास भावे

पेशवाईचा अस्त आणि इंग्रजी राजवटीची सुरुवात या संक्रमणकाळात वावरणाऱ्या त्या रसिकांना साखसुरतपणे आस्वाद घेता येईल, अशा कला-प्रकाराची नितांत आवश्यकता होती आणि ती विष्णुदासांच्या नाटकाने योग्य वेळी पूर्ण केली.

विष्णुदासांचे नाटक लिखित स्वरूपाचे नव्हते. फक्त त्यातील पदे विष्णुदासांनी लिहिलेली होती. सीतास्वयंवरानंतर त्यांनी अनेक पौराणिक आख्यानांवर पदे तयार केली. त्यांच्या नाटकांचे अवतरण हे अगदी प्राथमिक अवस्थेतील असल्यामुळे अद्भुत वातावरण, स्थूल भावनादर्शन आणि रंगसज्जेचा अभाव असे त्याचे स्वरूप होते. प्रथम सूत्रधारकृत ईशस्तवन झाल्यावर सूत्रधार व विदूषक यांच्या विनोदी संवादातून पुढील नाटकाची सूचना होई. नाटक यशस्वी होण्यासाठी प्रथम श्रीगणेशाचे व नंतर सरस्वतीचे आगमन होऊन त्या दोघांचे वरप्रदान झाल्यावर मुख्य आख्यानाला प्रारंभ होई. देवांची कचेरी, राक्षसांची कचेरी, दोघांतील संघर्ष आणि अखेरीस देवपक्षाचा विजय अशा पद्धतीने बहुतेक आख्याने सादर होत. निरनिराळया भूमिकांच्यासाठी पदे लिहिलेली असली, तरी त्यांचे गायन मात्र एकटा सूत्रधारच करीत असे. कथेतील प्रसंगांच्या अनुरोधाने गद्य संवाद उत्स्फूर्तपणे बोलले जात. एका रात्री अशी तीनचार आख्याने रंगभूमीवर सादर होत. अखेरीस कीर्तनसंप्रदायाप्रमाणे आरती होऊन 'खेळ' खलास होई. नाटकांतील एकंदर रांगडेपणा आणि विशेषतः युद्धप्रसंगी होणारा आरडाओरडा यांमुळे या विष्णुदासी पद्धतीच्या नाटकांना अलल डुर्र किंवा तागडथोम नाटके असे नाव मिळाले होते.

विष्णुदासांनी केलेल्या नवीन उपक्रमाबद्दल सांगलीच्या अधिपतींनी त्यांना व त्यांच्या नटसंचाला भविष्यकालीन योगक्षेम चालविण्याचे आश्वासन दिले होते, पण इ. स. १८५१ मध्ये चिंतामणराव आकस्मिकपणे दिवंगत झाल्याने विष्णुदासांनाच सर्वांच्या चरितार्थाचा विचार करावा लागला. त्या चिंतेत असताना गावोगाव दौरे काढून त्यांनी आपली नाटके करून दाखवायचा संकल्प केला. अशा प्रकारे विष्णुदासांची नाटयसंस्था सांगलीबाहेर पडली. किंबहुना राजाश्रयाच्या मर्यादित व निर्बंधित परिघाचा त्याग करून मराठी नाटयकलाच लोकाश्रयाच्या विशाल व अनिबंध प्रांगणात येऊन उभी राहिली. विष्णुदासांनी इ. स. १८५१ पासून १८६२ पर्यंत सर्व महाराष्ट्रभर वारंवार दौरे केले, ठिकठिकाणच्या जाणत्या रसिकांची वाहवा मिळवली, विपुल द्रव्यार्जन केले आणि त्याचबरोबर नाटयकलेसंबंधीची आवड सगळीकडे निर्माण केली. त्यांच्या अनुकरणाने भिन्न भिन्न गावच्या उत्साही तरुणांनी आपआपल्या नाटयसंस्थांची उभारणी केली आणि 'सर्वत्र नाटकेच नाटके होऊन गेली.' इ. स. १८६० पर्यंत ज्या ज्या नाटयसंस्था उदयाला आल्या, त्या सर्वांनी विष्णुदासांच्या पद्धतीचीच नाटके करून दाखवली. इचलकरंजीकर, कोल्हापूरकर, पुणेकर, सांगलीकर, अळतेकर अशा विविध नाटयसंस्था या काळात रसिकांचे मनरंजन करीत होत्या. विशेषतः

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इचलकरंजीकर नाटकमंडळीतील बाबाजीशास्त्री दातार या व्युत्पन्न व रसिक पंडितांनी रचलेली शेकडो पदे काव्यगुणांच्या आणि नाटचगुणांच्या दृष्टीने विष्णुदासलिखित कवितेपेक्षा सरस असल्याचे दिसून आले.

पौराणिक आख्यानांचा हा अतिमानवी, भडक आणि अवास्तव असा जमाना सगळीकडे प्रसृत झालेला असतानाच 'फार्स' या नवीन नाटचप्रकाराची त्यात भर पडली. इ. स. १८५६ साली अमरचंद वाडीकर या नाटकमंडळीने प्रथमतःच एक सामाजिक कथा फार्साच्या रूपाने सादर केली आणि तेव्हापासूनच फार्स हा प्रकार रूढ झाला. त्या वेळी मुंबईमध्ये हास्यरसप्रधान अशी जी इंग्लिश नाटके होत असत त्यांच्या अनुकरणाने या विनोदी फार्साची निर्मिती झाली होती. सामाजिक जीवनातली एखादी गमतीदार विसंगती अवास्तव प्रसंगांच्या आणि खालच्या पातळीवरील विनोदाच्या साहाय्याने थोडक्यात दाखवणे, असे फार्साचे स्वरूप होते. मुख्य पौराणिक नाटक झाल्यावर पुरवणी म्हणून अर्धा तास चालणारा विनोदी फार्स होई. कालांतराने खून किंवा मृत्यू अशा गंभीर घटना असलेले फार्सही रंगभूमीवर होऊ लागले. नारायणरावाच्या वधाचा फार्स त्या काळात बराच नावाजला गेला आणि त्यात सुमेरसिंगाची भूमिका करणाऱ्या गोपाळराव दाते या नटाची तर विशेषच प्रसिद्धी झाली.

इ. स. १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना होऊन इंग्रजी वाङमयाचा अभ्यास करणारे पदवीधर बाहेर पडू लागले. विष्णुदासी परंपरेतील अद्‌भुतरम्य नाटक त्यांच्या सुजाण रसिकतेला पसंत न पडणे स्वाभाविकच होते. या असंतोषातून इंग्रजी नाटचवाङमयाचा नमुना समोर ठेवून लिखित स्वरूपात स्वतंत्र किंवा अनुवादित स्वरूपाचे नाटचलेखन करण्याची कल्पना निर्माण झाली. तत्पूर्वी काही नाटकांतून गद्य संवादही लिहून ठेवण्याची व 'नाटक-पुस्तके' तयार करण्याची प्रथा क्वचित सुरू झाली होती; तिला या इंग्रजी शिक्षित मंडळींनी स्वतंत्र व वेगळे वळण लावले. वि. ज. कीर्तने यांनी लिहिलेले 'थोरले माधवराव पेशवे' हे या नवीन परंपरेतील पहिले नाटक इ. स. १८६१ मध्ये प्रकाशित होऊन १८६२ मध्ये इचलकरंजीकर नाटक मंडळीने रंगभूमीवर आणले. लिखित स्वरूपातील या नाटचपरंपरेला 'बुकिश नाटके' असे नाव मिळाले. कीर्तन्यांच्या नाटकानंतर अनेक स्वतंत्र व अनुवादित नाटके हळूहळू रंगभूमीवर सादर होऊ लागली. त्या वेळच्या शास्त्रीमंडळींनी याच काळात शाकुंतल, मृच्छकटिक, वेणीसंहार अशी काही उत्कृष्ट संस्कृत नाटके मराठीत अनुवादित केली आणि तीही प्रयोगरूपाने रंगभूमीवर येऊ लागली. इ. स. १८६२ मध्ये महादेवशास्त्री कोल्हटकरांनी शेक्सपिअरच्या ऑथेल्लो नाटकाला मराठी पेहराव चढविला आणि तेव्हांपासून शेक्सपिअरच्या नाटकांचे अनेक मराठी अनुवाद क्रमशः तयार होण्यास प्रारंभ झाला.

तत्कालीन सुशिक्षित मंडळींनी केवळ नाटचलेखनालाच चालना दिली असे नसून, संस्कृत व इंग्रजी नाटकांचे त्याच भाषांतून प्रयोगही करून दाखविले. साहजिकच त्या प्रयोगाविष्काराचा परिणाम त्या काळच्या पौराणिक प्रयोगपद्धतीवरही झाला. प्रयोगातील व्यक्तिरेखांचे प्रकटन हे पूर्वीपेक्षा अधिक वास्तव व यथार्थदर्शी होण्यास सामाजिक नाटकांनीही मदत केली. इंग्रजी संस्कृतीच्या परिचयाने आपल्या सामाजिक आचारातही जरूर ते बदल करण्याचे विचार प्रकट होऊ लागले आणि त्यांचे समर्थन करणारी, तसेच त्यांना विरोध करणारीही सामाजिक नाटके तयार होऊ लागली. चितळेकृत मनोरमा (१८७१) आणि अभ्यंकरशास्त्रीकृत स्वैरसकेशा (१८७१) ही नाटके त्यांतील भडक समाजचित्रणामुळे त्या काळात विशेष गाजली होती.

सुविद्य हौशी मंडळींनी जे नाटचप्रयोग करून दाखविले त्यामुळे व्यावसायिक नटमंडळींच्या अभिनयपद्धतीत सुधारणा घडून येऊ लागली. तोपर्यंत अभिनयाची जी एक ढोबळ व अतिरेकी पद्धत होती, ती हळूहळू लुप्त होत जाऊन यथार्थ व परिणामकारक भावदर्शन होऊ लागले. थोरले माधवराव पेशवे या नाटकात रमाबाईची भूमिका करणाऱ्या श्री. विष्णू वाटवे या नटाने करुणरसाच्या प्रभावी आविष्काराने मोठा लौकिक मिळवला होता. अन्य दृष्टींनेही रंगभूमीचे पाऊल पुढे पडण्यास प्रारंभ झाला. त्यापूर्वीचे नाटचप्रयोग हे बहुधा मोठाले वाडे, मंदिरे किंवा मंडपवजा कच्ची नाटचगृहे यांत होत असत. बुकिश नाटकांचे युग सुरू झाल्यानंतर पुणे व मुंबई येथे पक्की व बंदिस्त नाटचगृहे बांधली गेली. प्रयोगदर्शनाच्या बाबतीत पूर्वी अतिमानुष असे काही देखावे प्रदर्शित होत असत; परंतु इ. स. १८७३ पासून विविध देखावे रंगवलेले पडदे वापरण्यास प्रारंभ झाला.

नाटकातील सर्व भूमिकांची पदे एकटचा सूत्रधारानेच म्हणायची या संकेताचाही रसिकांना कंटाळा आला होता. त्यातून प्रत्येक नटाने आपापली पदे स्वतः म्हणावी, अशी खरीखुरी कलात्मक वृत्ती निर्माण होऊ लागली. या कल्पनेने प्रेरित झालेले श्री. सोकर बापूजी त्रिलोकेकर यांनी नलदमयंती हे नाटक लिहिले. इ. स. १८७९ मध्ये त्याचा पहिला प्रयोग झाला. त्या अपूर्व प्रयोगामुळे संगीत नाटक निश्चितपणे प्रगतिपथावर गेले.

बेळगाव येथे शिक्षकाचा व्यवसाय करीत असलेले श्री. बळवंत पांडुरंग ऊर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर हे नाटचक्षेत्रातील या विविध घटना पहात होते आणि धार्मिक उत्सवासाठी पदे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लिहून देण्यापासून नटवर्ग जमा करून प्रत्यक्ष नाटके करून दाखविण्यापर्यंत अनेक प्रकारचे उद्योग करीत होते. त्यांच्या तत्पूर्वीच्या सर्व नाट्यविषयक कार्याची परिणती म्हणजे पारशी नाटक मंडळीच्या इंद्रसभा या संगीतमय नाटकाच्या अनुकरणाने त्यांनी पुणे येथे दि. ३१ ऑक्टो. १८८० या दिवशी केलेला संगीत शाकुंतल नाटकाच्या चार अंकांचा प्रयोग ही होय. त्या नाट्यदर्शनाने मराठी रंगभूमीवर एका नवीन युगाचा प्रारंभ झाला; इतकेच नव्हे, तर रंगभूमीच्या पुढील वाटचालीची दिशाही निश्चित झाली.

इ. स. १८८० पर्यंत रंगभूमीवर जी वैशिष्ट्ये प्रकट झालेली होती; त्या सर्वांचे अत्यंत आल्हादक असे एकत्रीकरण 'शाकुंतला'च्या प्रयोगात बघायला सापडल्यामुळे किर्लोस्करांची नाट्यसंस्था अल्प काळात रसिकांच्या कौतुकाला पात्र ठरली. त्यानंतरचे सौभद्र नाटक तर रंगभूमीवरील अमर नाट्यकृती म्हणून रसिकमान्य झाले. कीर्तनपरंपरेतील लोकप्रिय चाली, लावणी–ढंगाच्या चाली आणि कर्नाटकी व हिंदुस्थानी रागदारी यांच्या मिलाफामुळे किर्लोस्करांचे संगीत नाटक हा सर्व थरांतील रसिकांचा विरंगुळाच ठरला. भाऊराव कोल्हटकर, मोरोबा वाघुलीकर, नाटेकर यांच्यासारखे सुरेल गायक, देवलांच्यासारखा नामांकित तालीममास्तर आणि वाङ्मयगुणांनी संपन्न असलेली नाटके यांमुळे किर्लोस्कर मंडळीला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात एक प्रतिष्ठित स्थान प्राप्त झाले. त्याबरोबरच समाजातल्या मान्यवर मंडळींच्या साहाय्यामुळे व लोभामुळे नटवर्गाविषयीची पूर्वीची तिरस्काराची भावनाही कमी झाली.

किर्लोस्कर मंडळीच्या या लोकोत्तर यशामुळे त्या थाटाची नाटके करणाऱ्या संगीत नाटकमंडळ्या सर्व महाराष्ट्रात निर्माण झाल्या. किर्लोस्कर इ. स. १८८५ मध्ये दिवंगत झाले, तरी त्यांचे तुल्यगुणी पट्टशिष्य गोविंद बल्लाळ देवल यांची मृच्छकटिक, शापसंभ्रम ही रंगतदार नाटके मिळाल्यामुळे आणि नटवर्गाच्या एकोप्यामुळे किर्लोस्कर मंडळीची लोकप्रियता वाढतच

भाऊराव कोल्हटकर

गेली. विशेषतः भाऊराव कोल्हटकरांच्या अलौकिक नाट्यगुणांमुळे किर्लोस्कर मंडळीवरील रसिकांची आपुलकी केव्हाही कमी झाली नाही. तेजःपुंज सौंदर्य आणि सुरेल व तेजस्वी आवाजातील कर्णमधुर गायन हे भाऊरावांचे विशेष होते. देवलांच्या मार्गदर्शनामुळे त्यांनी सुभद्रा, शकुंतला, मंथरा या स्त्रीभूमिकांप्रमाणेच पुंडरीक, चारुदत्त, कोदंड या पुरुषभूमिकाही तितक्याच यशस्वीपणे करून दाखविल्या. यवतेश्वरकर मंडळी किंवा डोंगरे मंडळी या नाट्यसंस्थांनी तर शास्त्रशुद्ध संगीतही रंगभूमीवर यशस्वी करून दाखविले. त्या कालापर्यंत समाजाच्या वरच्या थरात वावरणारी ही नाट्यगंगा बहुजनसमाजापर्यंत नेऊन पोचविण्याचे कार्य दत्तोपंत हल्याळकर व माधवराव पाटणकर या कर्तबगार पुरुषांनी केले. मात्र पाटणकरांच्या नाटकांना किर्लोस्कर मंडळीच्या नाटकांची गुणवत्ता नसल्याने तशी प्रतिष्ठा मात्र मिळाली नाही.

संगीत रंगभूमीचा पसारा वाढत असताना गद्य रंगभूमीनेही चांगले बस्तान बसविले होते. इ. स. १८८० सालीच शंकरराव पाटकर व देवल यांनी आर्योद्धारक ही ध्येयवादी नाट्यप्रेमी मंडळींची एक संस्था स्थापन केली व रंगभूमीला इष्ट ते वळण देण्याचा संकल्प केला. ती संस्था अल्प काळातच विराम पावली, तरी तिने ऑथेल्लो आणि वेणीसंहार या नाटकांचे केलेले प्रयोग गद्य रंगभूमीच्या प्रगतीला फार उपकारक ठरले. त्याच परंपरेतून शाहूनगरवासी या गद्य नाटक मंडळीची सुरवात झाली. अभिनयाची नैसर्गिक व प्रत्ययकारी पद्धत हे या संस्थेचे वैशिष्ट्य होते. हॅम्लेट, मानाजीराव, झुंजारराव, त्राटिका ही शेक्सपिअरची अनुवादित नाटके; तुकाराम, नामदेव ही संतचरित्रपर नाटके आणि राणा भीमदेव हे कल्पनारम्य व वीररसप्रचुर नाटक अशा कलाकृती या संस्थेने रंगभूमीवर गाजवल्या. श्री. गणपतराव जोशी आणि श्री. बाळाभाऊ जोग ही या संस्थेतील नटरत्नांची जोडी आपल्या अभिनयगुणांनी अमर झालेली आहे. गणपतराव जोशी यांना बांधेसूद शरीरयष्टी, गगनभेदी सुरेल आवाज आणि सूक्ष्म अभिनयछटा व्यक्त करणारा हलता चेहरा या नाट्यगुणांची निसर्गदत्त देणगी मिळाली होती. तिला प्रा. वा. ब. केळकर यांचे व्यासंगी मार्गदर्शन मिळाल्यामुळे महाराष्ट्रात गणपतराव जोशी आणि हॅम्लेट ही नावे एकरूप झाली. बाळाभाऊ जोग यांना निसर्गाने रूपसंपदा दिलेली नसली, तरी आपल्या अभिनयगुणांच्या जोरावर त्यांनी नायिकांच्या भूमिकांतून गणपतरावांच्या बरोबरीने यश संपादन केले. सतत ३० वर्षे या जोडीने गद्य रंगभूमीवर अद्वितीय असे कर्तृत्व करून दाखविले.

इ. स. १८९९ मध्ये देवलांचे शारदा हे जरठ–कुमारी विवा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ह्याच्या प्रश्नावर आधारलेले प्रभावी सामाजिक नाटक किर्लोस्कर मंडळीने रंगभूमीवर आणले. यापूर्वी तरुणी शिक्षण नाटिका, संमतिवयाचे नाटक अशी काही सामाजिक नाटके रंगभूमीवर आलेली होती; पण त्यांतील अतिशयोक्त प्रसंगचित्रण, ठोकळेबाज स्वभावचित्रण आणि हीन अभिरुची यांमुळे ती नाटके रसिकांना आपलीशी वाटली नाहीत. शारदा नाटकाने मात्र सामाजिक समस्याही किती कलापूर्ण रीतीने मांडता येते, याचा नवा आदर्शच निर्माण केला. इ. स. १८९६ साली रंगभूमीवर आलेल्या श्री. कृ. कोल्हटकरांच्या वीरतनय, गुप्तमंजूष, मतिविकार, मूकनायक, इ. नाटकांतून काही सामाजिक प्रश्न हाताळले गेले; पण उत्कटतेच्या अभावी ती नाटके फार काळ टिकू शकली नाहीत. तरीसुद्धा स्वतंत्र कथानके, बुद्धिप्रधान विनोदाची भरपूर योजना आणि पारशी व गुजराती संगीताच्या चालीवरील चमकदार व खटकेबाज पदे यामुळे मराठी रंगभूमीच्या परंपराप्रिय नाटकापेक्षा नाविन्यपूर्ण अशा वैशिष्ट्यांचे मराठी रसिकांना दर्शन घडले, हे नमूद करणे अवश्य आहे.

गणपतराव जोशी

इ. स. १९०० ते १९३० हा कालखंड गायनाभिनयकुशल नट, दर्जेदार नाटके, प्रतिभाशाली नाटककार आणि प्रयोगशील नेपथ्यकार यांनी सजलेला असल्यामुळे, या काळाला मराठी रंगभूमीचे सुवर्णयुग म्हणायला हरकत नाही. या काळातल्या नटांनी व नाटककारांनी मराठी मनाच्या सर्व क्षेत्रांतील आशाआकांक्षांचे, हर्षामर्षांचे आणि सुखदु:खांचे मराठी रंगभूमीवर इतके कलापूर्ण आणि समर्थ दर्शन घडविले, की मराठी नाटक हे मराठी जीवनाचे एक अविभाज्य अंगच होऊन बसले.

इ. स. १९०४ च्या सुमारास महाराष्ट्र नाटक मंडळी ही सुशिक्षित तरुणांनी स्थापिलेली संस्था खाडिलकरांच्या गद्य नाटकांनी विशेष नावारूपाला आली. कारखानीस, टिपणीसबंधू, त्र्यंबकराव प्रधान आणि गणपतराव भागवत हे या संस्थेच्या यशाचे प्रमुख मानकरी होते. त्या मंडळीची लो. टिळकांच्या जहाल राजकारणाचे पडसाद उमटविणारी आणि भारतीय संस्कृतीतील आदर्श मूल्यांचा पुरस्कार करणारी कीचकवध, कांचनगडची मोहना, भाऊबंदकी, प्रेमध्वज, इ. नाटके रसिकांना विशेष पसंत पडली. कीचकवध या नाटकातील भागवतांची कीचकाची भूमिका ही सारा महाराष्ट्र दणाणून टाकणारी व अविस्मरणीय अशी भूमिका होती. कोणतीही नैसर्गिक अनुकूलता नसताना केवळ अपरिमित कष्टांच्या जोरावर एखादा नट नाट्यक्षेत्रात केवढी उंची गाठू शकतो, याचे प्रात्यक्षिकच भागवतांनी दाखवून दिले. बाह्यत: कृत्रिम वाटणारी परंतु नाट्यपूर्ण आरोहावरोहांनी प्रेक्षकांना थरारून टाकणारी विशिष्ट उच्चारपद्धती या संस्थेतील नटांनी स्वीकारलेली होती.

किर्लोस्कर मंडळीचा १९०० नंतरचा कालखंड जोगळेकर, कृष्णराव गोरे, चिंतुबुवा गुरव, गणपतराव बोडस यांच्या कलागुणांनी सजलेला आहे. इ. स. १९१० पर्यंतच्या काळात या नटसंचाने रंगभूमीवर आणलेली कोल्हटकरांची नाटके अल्प काळातच मागे पडल्यामुळे किर्लोस्कर मंडळीला नव्या प्रभावी नाटककाराची गरज होती. नायिकेच्या भूमिकेसाठी नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व या नावाचा एक नवा तारा १९०५ मध्येच उदयाला आलेला होता. अशा स्थितीत या कलावंताचे नाट्यगुण ओळखून त्यांना अनुरूप असे यशस्वी संगीत नाटक लिहिण्याचे श्रेय खाडिलकरांनी मिळवले. इ. स. १९११ मध्ये रंगभूमीवर आलेल्या त्यांच्या मानापमान नाटकाने केवळ एक लोकप्रिय संगीत नाटकच रंगभूमीवर आले असे नव्हे; तर त्यामुळे संगीत नाटकांच्या परंपरेत एका नव्या युगाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

गणपतराव भागवत

किर्लोस्कर-देवलांच्या संगीत नाटकांत रागदारीची पदे असली, तरी त्यांचा मुख्य भर साकी व दिंडी यांसारखी साधी व नाट्योत्कर्ष साधणारी जातिवृत्ते, लावणी थाट आणि प्रचलित पदांच्या चाली यांवरच होता. नाट्य-संविधानकाचा एक अंगभूत भाग अशी पदांची रचना होती आणि त्यांचे गायनही नाट्यपोषक व बेतशीर असे. मानापमान नाटकासाठी खाडिलकरांनी गोविंदराव टेंबे यांच्याकडून प्रसंगानुकूल अशा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हिंदुस्तानी संगीतातील चाली घेतल्या व त्यावर पदरचना केली. त्यामुळे नाटच–संगीताला प्रौढ व भारदस्त स्वरूप प्राप्त झाले. परंतु गद्यातील भावनांना किंवा विचारांना अधिक रमणीय व उत्कट करण्याच्या उद्देशाने पदांची योजना होऊ लागल्यामुळे यापुढील काळात नाटचसंगीत हे नाटकाचा अपरिहार्य भाग म्हणून न येता नाटचाला शृंगारणारा अलंकार या स्वरूपात योजिले जाऊ लागले.

पुढील काळात गंधर्व, ललितकला, बलवंत, शिवराज, यशवंत, इ. नाटचसंस्थांनी जी नाटके रंगभूमीवर आणली, त्यांसाठी त्यांनी भास्करबुवा बखले, वझेबुवा, मा. कृष्णराव, इ. संगीतज्ञांचे साहाय्य घेतले. यामुळे संगीत नाटके विलक्षण लोकप्रिय झाली. संत तुकाराम, दामाजी, पुंडलीक या भक्तिरसप्रधान नाटचप्रयोगांत प्रकट केली आणि त्यात भरघोस यशही मिळवले. श्री. शुक्ल यांची तुकारामाची भक्तिरसाने ओथंबलेली भूमिका ही जाणत्या–नेणत्या सर्वांनाच अतिशय आवडली.

परंतु ही दृष्टी विरळाच होती. बहुसंख्य संगीत नाटके मानापमानप्रणीत संगीताचेच अनुसरण करीत होती. मात्र संगीत हे प्रमुख आकर्षण असणाऱ्या त्या नाटकांतून अभिनयश्रेष्ठ नटांचा कलाविलासही प्रभावी राहिला होता. किंबहुना ज्या संगीत नाटकांना समर्थ नाटचाची जोड मिळाली नाही, ती नाटके केवळ संगीताच्या जोरावर यशस्वी ठरू शकली नाहीत. मराठी रंगभूमीचा हा विशेष आवर्जून सांगितला पाहिजे. या

मास्टर दीनानाथ

नानासाहेब फाटक

चिंतामणराव कोल्हटकर

बालगंधर्वांच्या आगेमागे सवाई गंधर्व, केशवराव भोसले, मा. कृष्णराव, सरनाईक, मा. दीनानाथ, इ. ढंगदार गायक रंगभूमीवर आले आणि त्यांच्या गाननैपुण्यामुळे खानदानी संगीताचे लोण महाराष्ट्रात घरोघरी जाऊन पोचले. विद्याहरण, स्वयंवर, द्रौपदी, राक्षसी महत्त्वाकांक्षा, संन्याशाचा संसार, शहा – शिवाजी, सत्तेचे गुलाम, चित्रवंचना, उग्रमंगल, रणदुंदुभी, एकच प्याला, भावबंधन, इ. संगीत नाटके याच काळात रंगभूमीवर आली आणि यशस्वीही झाली. परंतु या यशाबरोबरच स्वरविलासाच्या नादामुळे काही संगीत नट अभिनयाकडे दुर्लक्ष करू लागले, या दोषाचाही निर्देश केला पाहिजे.

नाटचाला उठाव आणील एवढे आटोपशीर, पण साथेसुधे संगीत योजण्याची दृष्टी राजापूरकर नाटक मंडळीने आपल्या नाटचाच्या आकर्षणामुळेच गणपतराव बोडस, नानासाहेब फाटक, चिंतामणराव कोल्हटकर, दिनकर कामण्णा, भांडारकर, इ. श्रेष्ठ गद्य नटांनी त्या काळात अलोट लोकप्रियता मिळवली. संगीत रंगभूमीचे सम्राट बालगंधर्व हे तर त्यांच्या स्वर्गीय गायनाइतकेच हृदयस्पर्शी अभिनयाबद्दलही प्रसिद्ध होते. त्यांच्या स्वरूपात मराठी रसिकांनी एका दिव्य स्वप्नसृष्टीचाच आस्वाद वर्षानुवर्षे घेतला. खानदानी घराण्यातील कुलवधूला शोभेल असा सात्त्विक व मोहक चेहरा आणि गंधर्वतुल्य कंठमाधुर्य हे त्यांचे जन्मजात गुणविशेष होते. त्यातून देवल–खाडिलकरांच्यासारखे नाटचशिक्षक आणि बखलेबुवांच्यासारखे संगीतमार्गदर्शक त्यांना लाभल्यामुळे त्यांच्या उपजत गुणांचे रसरंग वैभव नाटचसृष्टीत बहरून आले. रंगभूमीला परोपरीने नटविण्याचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हव्यास आणि गुणी कलावंतांचा संग्रह करण्याची दिलदार वृत्ती यामुळे तर गंधर्व मंडळीचे नाटक म्हणजे मराठी रसिकांना अभूतपूर्व नाट्यानंद देणारी गंधर्वनगरीच ठरली. पटवर्धनबुवा, मा. कृष्णराव, पंढरपूरकरबुवा हे गायक आणि भांडारकर, रानडे हे अभिनेते बालगंधर्वांचे प्रमुख सहकारी होते.

केशवराव भोसल्यांच्या नेतृत्वाखालील ललितकला ही संगीत संस्था रसिकांच्या कौतुकाला पात्र ठरली. विशेषतः आनंदराव मिस्त्री आणि पु. श्री. काळे या अभिजात चित्रकारांचे साहाय्य मिळवून ललितकलेने नेपथ्यरचनेत विविध कलात्मक प्रयोग केले व त्या बाबतीत अद्वितीय स्थान मिळवले. य. ना. टिपणीस यांच्या शहा–शिवाजी नाटकाच्या वेळी, त्यांच्याच मार्गदर्शनाने ऐतिहासिक काळाला अनुरूप अशी वेषभूषा प्रथम तयार झाली. गंधर्व मंडळीनेही द्रौपदी नाटक रंगभूमीवर आणताना पौराणिक काळाची कल्पना देणारी वेगळ्या प्रकारची वेषभूषा तयार केली होती. हे दोन्ही उपक्रम भावी काळात इतरांना अनुकरणीय ठरले. नेपथ्यरचनेच्या बाबतीत आणखी एक नावीन्य म्हणजे शहा–शिवाजी नाटकातील काही देखावे तयार करताना गुंडाळत वर जाणाऱ्या पडद्याऐवजी सरळ उभ्या चित्रफलकांची योजना करण्यात आली होती. वाद्यवृंदाच्या बाबतीत बालगंधर्वांनी हार्मोनियमचे उच्चाटण करून इ. स. १९१९ मध्ये आपल्या संगीताला ऑर्गन व सारंगी यांची श्रुतिमधुर जोड दिली आणि साथ उत्कृष्ट होण्यासाठी तिरखवा, कादरबक्ष, कांबळे यांच्यासारखे निष्णात वादकही पदरी ठेवले.

गंधर्व व ललितकला या दोन्ही अग्रगण्य नाट्यसंस्थांनी टिळक स्वराज्य फंडाच्या मदतीसाठी एकत्र येऊन दि. ८ जुलै १९२१ रोजी केलेला मानापमान या नाटकाचा प्रयोग हा रंगभूमीच्या सुवर्णयुगाचा कलशाध्याय समजला पाहिजे. मराठी रंगभूमीचे सारे वैभव त्या नाटकात प्रकट झाले होते.

गद्य रंगभूमीवरील काही नाटकेही या काळात विशेष लोकप्रिय झाली. बेबंदशाही, शिवसंभव, कृष्णार्जुनयुद्ध, विचित्र लीला, चंद्रग्रहण, हाच मुलाचा बाप ही नाट्यगुणांनी संपन्न असलेली नाटके केशवराव दाते, पोतनीस, नानबा गोखले, टिपणीसबंधू या गुणी कलाकारांनी उत्कृष्ट रीतीने रसिकांच्या समोर सादर केली. विशेषतः विविध स्वभावधर्माच्या भूमिका सारख्याच यशस्वीपणे करून केशवराव दात्यांनी प्रेक्षकांना आपल्या लोकोत्तर अभिनयगुणांची सातत्याने प्रतीती आणून दिली.

संगीताचा प्रमाणाबाहेर होणारा आणि नाट्याला बाधक ठरणारा विस्तार लक्षात घेऊन नवीन तंत्राने लिहिलेली, अडीच ते तीन तासांत संपणारी नाटके रंगभूमीवर आणण्याची कल्पना इ. स. १९२३ मध्ये मूर्त स्वरूपात आली. श्री. मामा वरेरकर यांनी लिहिलेले तुरुंगाच्या दारात हे नाटक ललितकलादर्श या संस्थेने रंगभूमीवर आणून मोठ्या धाडसाने या नाविन्याचा शुभारंभ केला. परंतु नाटकाचे कलाशून्य स्वरूप त्याला यश मिळवून देण्यास असमर्थ ठरल्याने श्री. बापूराव पेंढारकरांनी केलेला त्यावरील अफाट खर्च मातीमोल झाला आणि रंगभूमीच्या प्रगतीलाही पायबंद बसला.

व्यावसायिक दृष्टीने १९३० पर्यंत नाट्यकलेची सर्वत्र व सर्वांगीण भरभराट होत होती; परंतु त्यांचमुळे नाट्यसंस्थांचे चालक आणि प्रमुख यांच्यामध्ये सुखासीनतेची आणि भविष्याविषयीच्या बेफिकिरीची वृत्ती निर्माण होऊ लागली होती.

गणपतराव बोडस

नारायणराव राजहंस

केशवराव भोसले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संगीत नाटकांच्या हुकमी यशामुळे संगीत-संस्थांमधील, नेकीने नाट्यकलेची उपासना करण्याची प्रवृत्ती कमी कमी होऊ लागली. गद्य नाटकांना मिळणारा लोकाश्रय, संगीत नाटकांच्या तुलनेने, अत्यंत बेताचा असल्याने गद्य नाट्यसंस्थाही मोठ्या कष्टाने जेमतेम आपला प्रपंच सांभाळीत राहिल्या. बदलत्या काळानुसार नाट्यकला आणि नाट्यव्यवसाय यांत कोणत्या सुधारणा करणे आवश्यक आहे, याची जाण कोणाच्याच ठायी नव्हती. तशाही स्थितीत, दुसरी चांगली करमणूक उपलब्ध नसल्याने नाटकवाल्यांना पैसे मिळत होते. सतत फाटाफुटी चालू असूनही नाट्यसंस्था तग धरून होत्या.

परंतु १९३१ मध्ये बोलपटांची नाविन्यपूर्ण व स्वस्त करमणूक निर्माण झाल्याबरोबर तीन चार वर्षांच्या अल्पावधीत हा लेले सहकार्य आणि कलापूर्ण प्रयोगनिर्मिती यामुळे या संस्थेविषयी रसिकांच्या मनात पुष्कळ अपेक्षा निर्माण झाल्या. या संस्थेचे आंधळ्यांची शाळा हे नाटक चांगले लोकप्रियही झाले. परंतु चालकांमधील तात्त्विक मतभेद, निकृष्ट नाटकांची निवड आणि व्यावसायिक दृष्टीचा अभाव यांमुळे एक दोन वर्षांतच नाट्यमन्वंतर ही संस्था विराम पावली. जुन्या पिढीतील श्रेष्ठ नटांप्रमाणेच नवीन पिढीतील हौशी मंडळीही अपयशी ठरल्यामुळे रंगभूमीला पुढे भवितव्य नाही, अशी दारुण निराशेची परिस्थिती निर्माण झाली.

पण या अंधकारमय दशेतूनही नाट्यकलेचे जमीनदोस्त होऊ पाहणारे निशाण पुन्हा वर फडकवणारा ताज्या दमाचा नाटककार आचार्य अत्र्यांच्या रूपाने रंगभूमीला मिळाल्याने, तिला

पु. श्री. काळे

य. ना. टिपणीस

केशवराव दाते

मराठी नाट्यसृष्टीचा डोलारा एकदम कोसळून पडला. वर्षानुवर्षे लोकरंजनाचे आणि लोकशिक्षणाचे कार्य कलात्मक रीतीने आणि आत्मविश्वासाने करणारी मराठी रंगभूमी मरणोन्मुख झाली. बोलपटांनी सगळी नाट्यगृहे काबीज केल्यामुळे नाट्यव्यवसाय चालविणे अशक्यप्राय होऊन, अग्रेसर नाट्यसंस्थाही एकामागून एक बंद पडल्या. सतत पाऊणशे वर्षे आपल्या रसिकवृत्ती तृप्त करून घेणारा रसिकांचा वर्गही रंगभूमीकडे पाठ फिरवून बोलपटाकडे वळला. रंगभूमी गाजविणारे संगीतसम्राट आणि अभिनयसम्राटही अगतिक होऊन रुपेरी पडद्याकडे वळले. अशा प्रतिकूल अवस्थेतही सुजाणपणे विचार करून रंगभूमीला नवीन इष्ट ते वळण लावण्याचा उल्लेखनीय प्रयत्न नाट्यमन्वंतर या संस्थेने १९३३ मध्ये करून पाहिला. सुशिक्षित मंडळींचे नेतृत्व, स्त्रीभूमिकांसाठी कुलीन स्त्रियांचे मिळा-

काही काळ जीवदान मिळाले. इ. स. १९३३ मध्ये रंगभूमीवर आलेल्या साष्टांग नमस्कार या नाटकापासून १९४० पर्यंत अत्र्यांची नाटके बालमोहन नाटक मंडळीने एका पाठोपाठ एक सादर केली. त्यांपैकी घराबाहेर, लग्नाची बेडी, उद्याचा संसार ही नाटके वाङ्मयगुण आणि प्रायोगिक यश या दोन्ही दृष्टींनी अत्यंत यशस्वी ठरली. त्या यशात अत्र्यांच्या लेखणीतील रसरशीत नाट्यगुणांबरोबरच दामुअण्णा जोशी, बापुराव माने, छोटा गंधर्व, धुमाळ, नागेश जोशी, इ. नामवंत कलाकारांचाही महत्त्वाचा वाटा होता. बालमोहनच्या कामगिरीमुळे १९४० पर्यंत रंगभूमीवर नवे चैतन्य निर्माण झाले. परंतु त्यानंतर अत्र्यांनी बोलपटसृष्टीत प्रवेश केल्यामुळे रंगभूमीला पुन्हा पूर्वीचेच दुर्दिन प्राप्त होण्याची भीती निर्माण झाली. पण त्याही अवस्थेत नाट्यकलेच्या काही निष्ठावंत उपासकांनी तिचे पुन्हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुनरुज्जीवन करण्याचा विडा उचलला. त्यांचे प्रयत्न सफळ झाले.

त्या काळातही गंधर्व मंडळीची संगीतप्रधान नाटके अधून मधून रसिकांना पहायला मिळत. परंतु तीच तीच नाटके आणि बालगंधर्वांच्या कलाविलासावर पसरलेल्या वार्धक्याच्या छाया यामुळे त्या चिरंजीव नाटकांत पूर्वीचा जोम उरला नव्हता. अशा वेळी गंधर्व मंडळीतच प्रथितयश झालेल्या गंगाधरपंत लोंढे यांनी आपल्या राजाराम संगीत मंडळीची उभारणी केली. जुनी लोकप्रिय नाटके सादर करण्याच्या उद्देशाने त्यांनी भार्गवराम, मा. नरेश, जोगळेकर, दिनकर कामण्णा, इ. गुणी कलावंतांचे सहकार्य मिळवले; तसेच काही काळ गणपतराव बोडस आणि सरनाईक यांचेही सहकार्य मिळवून संशयकल्लोळ आणि सौभद्र या नाटकांचे प्रयोग सादर केले.

रंगभूमीच्या पुनरुज्जीवनाचा दुसरा प्रयत्न मो. ग. रांगणेकर यांनी आपल्या नाट्यनिकेतन संस्थेमार्फत केला. बोलपटांच्या स्पर्धेत नाट्यकला टिकून ठेवायची असेल, तर नव्या पद्धतीने नाट्यव्यवसायाची आखणी करणे आवश्यक आहे हे त्यांनी ओळखले. त्यांनी तीन तासांची, माफक संगीत योजलेली आणि चटकदार संवाद असलेली नाटके लिहिली आणि त्यांचे परिश्रमपूर्वक प्रयोग बसवून रसिकांना वेगळ्या, आटोपशीर व थोडक्यात मनोरंजन करणाऱ्या नाटकांचा लाभ करून दिला. त्यांच्या कुलवधू नाटकाने तर अफाट लोकप्रियता मिळविली. त्यातली सौ. ज्योत्स्ना भोळे यांची भूमिका नव्या पिढीच्या प्रेक्षकांना मनापासून आवडली आणि त्यांनी गायिलेली पदे तर घरोघरी जाऊन पोचली. त्यानंतरच्या नाटकांपैकी माझे घर, वहिनी, एक होता म्हातारा, रंभा, इ. नाटकेही चांगली चालली. राणीचा बाग हे डॉ. वर्टीचे नाटक स्नेहप्रभा प्रधानांच्या भूमिकेमुळे विलक्षण लोकप्रिय झाले. इ. स. १९५० पर्यंत नाट्यनिकेतनचा बराच बोलबाला झाला.

या वैयक्तिक प्रयत्नांना सार्वत्रिक व सामूहिक उठाव देण्याचे कार्य १९४३ मध्ये अखिल महाराष्ट्रात मोठ्या धूमधडाक्याने व उत्साहाने साजरा झालेल्या रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवाने केले. बृहन्महाराष्ट्रात ७५ ठिकाणी हा उत्सव कमी-अधिक थाटाने झाला. या उत्सवाच्या निमित्ताने सादर झालेल्या जुन्या चिरस्मरणीय नाट्यप्रयोगांतून मागील पिढीतील अनेक नटरत्नांच्या गायनाभिनयाचे नव्या पिढीला दर्शन घडले. तसेच त्यानंतर संगीत नाटकांचे प्रयोग वारंवार होऊ लागल्यामुळे नव्या दमाचे गायकही गाजलेल्या भूमिका करण्यास अहमहमिकेने पुढे येऊ लागले. त्यातूनच संयुक्त प्रयोगाची कल्पना निघाली आणि ठेकेदारांच्या मार्फत 'नाईट' पद्धतीने चालणारा नाट्यव्यवसाय बराच भरभराटीला आला. त्या प्रयोगांनी रंगभूमीविषयी रसिकमनात पुन्हा जागृती घडविली असली, तरी कलात्मक दृष्टीने या प्रयोगांचे आविष्करण अत्यंत निकृष्ट दर्जाचे होते. शतसांवत्सरिक उत्सवापासून काही ठिकाणी वार्षिक नाट्योत्सवांचे जे सहेतुक नियोजन करण्यात आले, त्यातून मात्र अनेक जुन्या-नव्या नाटकांचे देखणे प्रयोग रसिकांना पाहायला मिळाले. त्या प्रसंगाने नवीन नाटककार व नट यांना प्रोत्साहन मिळाल्यामुळे रंगभूमीच्या उत्कर्षासाठी जाणीवपूर्वक धडपडणाऱ्या नवीन कलाकारांची एक पिढीच उदयाला आली. पु. ल. देशपांडे यांच्यासारखे नाटककार आणि राम मराठे, मा. दत्ताराम, दाजी भाटवडेकर, काशिनाथ घाणेकर, इ. नट यांना नाट्योत्सवानेच आघाडीवर आणले.

दाजी भाटवडेकर

इ. स. १९५० पूर्वीच हौशी नाट्य संघांच्या कार्याचा प्रारंभ झाला होता. पण हे संघ मुख्यतः मुंबई-पुण्यालाच होते आणि त्यांचे नाट्यप्रयोगही स्थानिक स्वरूपाचे होत. इ. स. १९५ पासून शासकीय पातळीवरून राज्य नाट्य-स्पर्धा सुरू झाल्या. या स्पर्धांमुळे ठिकठिकाणी हौशी नाट्य संघ तयार झाले. स्पर्धेतील यशस्वी नाट्यप्रयोगांच्या प्रभावामुळे अन्य ठिकाणचे प्रयोगही दिवसेंदिवस अधिक कलापूर्ण होऊ लागले. त्यामुळे हौशी रंगभूमीचा व्याप व दर्जा या दोहोंचीही वाढ झाली. कानेटकर, दारव्हेकर, तेंडूलकर, शं. गो. साठे हे नाटककार; डॉ. ... बिजया मेहता, गणेश सोळंकी, प्रा. तोरडमल हे कला...

आत्माराम भेंडे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि आत्माराम भेंडे, भालबा केळकर हे दिग्दर्शक या हौशी चळवळीतूनच पुढे आले. पाश्चात्य नाट्यवाङ्मय आणि प्रयोग यांच्या परिचयामुळे या हौशी नाट्यसंस्थांनी अनेक धाडसी प्रयोग केले आणि नाट्यलेखन व नाट्यप्रयोग यांत क्रांतिकारक फेरबदल घडवून आणले. नेपथ्यरचना व प्रकाशयोजना या बाबतींत तर त्यांनी आमूलाग्र पालट घडवून आणला.

या सर्वंकष सुधारणांचा परिणाम नाट्यव्यवसाय करणाऱ्या नटसंचावरही झाल्याशिवाय राहिला नाही. नाट्यगृहांच्या अभावामुळे कायम स्वरूपाच्या नाटक मंडळ्या टिकणे अशक्यप्राय असल्याने ठराविक नाटकापुरते एकत्र येऊन गावोगाव प्रयोग करणारे अनेक नटसंच तयार होऊ लागले. त्यातच १९५८ मध्ये नाटकावरील करमणुकीचा कर रद्द झाल्याने हौशी आणि व्यावसायिकांच्या नाट्यप्रयोगांना विलक्षण तेजी चढली. आणि आज तर या दोन्ही वर्गांचे स्वरूप पूर्वीसारखे एकमेकापासून संपूर्णपणे अलिप्त असे न राहता दोन्ही वर्गांतील नट एकमेकांच्या नाट्यप्रयोगांतून भूमिका करू लागले आहेत. या नवीन लाटेमुळे गेल्या काही वर्षांत मुंबई मराठी साहित्य संघाची नाट्यशाखा, पेंढारकरांची ललितकलादर्श, सावकार-बंधूंचे कलामंदिर, रांगणेकरांचे नाट्यनिकेतन, अत्रे थिएटर्स, गोवा हिंदु असोसिएशन, इ. नाट्यसंस्थांनी नाट्यगुणसंपन्न अशी कितीतरी नाटके रसिकांपुढे सादर केली. त्यांतल्या तो मी नव्हेच, तुझे आहे तुजपाशी, रायगडाला जेव्हा जाग येते, अश्रूंची झाली फुले, डॉ. लागू, गारंबीचा बापू अशा काहींचा सहज निर्देश करता येईल. पी. डी. ए., कलोपासक, रंगायन यांची, नवीन तंत्र व मंत्र यांनी भारलेली नाटकेही रंगभूमीच्या कक्षा विस्तृत करू लागली आहेत.

नेपथ्याच्या बाबतीत आडारकर, तळाशीलकर यांच्यासारखे कल्पक चित्रकार जुन्या-नव्या नाटकांना शृंगारीत आहेत. नेपथ्याबरोबरच फिरता व सरकता रंगमंच बराच रूढ झाल्याने प्रयोगदर्शनात विविध उपक्रम करणे सहज शक्य झाले आहे.

संगीतप्रधान नाटकांचे पुनरुज्जीवन हा गेल्या काही वर्षांतील मराठी नाट्यकलेचा महत्वपूर्ण असा विशेष आहे. तसे पाहिले, तर किर्लोस्करांच्या शाकुंतल नाटकांपासून मराठी रसिकांना संगीत नाटकांचे जे वेड लागले ते खरोखर केव्हाच नाहीसे झाले नाही. मध्यंतरीच्या रंगभूमीच्या वनवासकाळात ते जरा मागे पडले होते एवढेच. इ. स. १९४३ नंतर जुन्या संगीत नाटकांना लोटणारी रसिकांची गर्दी पाहून नवीन संगीत नाटके लिहवून घेणारे निर्माते पुढे सरसावले. त्यातूनच होनाजी बाळा, पंडितराज जगन्नाथ, मंदारमाला, कट्यार काळजात घुसली, मत्स्यगंधा अशी संगीतमय नाटके पुन्हा रसिकांसमोर आली. जुन्या नाटकांचे प्रयोग अधूनमधून का होईना, परंतु सातत्याने होत होतेच. त्यांना या नवीन नाटकांची साथ मिळाल्याने संगीतलुब्ध रसिकांना ती पर्वणीच वाटली तर त्यात नवल नाही. या संगीत नाटकांतून छोटा गंधर्व, नेवरेकर, भार्गवराम हे जुन्या पिढीतले आणि राम मराठे, प्रसाद सावकार, रामदास कामत, जयमाला शिलेदार हे नव्या पिढीचे कलावंत आपल्या स्वर-नैपुण्याने रसिकांना तल्लीन करीत आहेत.

प्रौढ रसिकांच्या रंगभूमीवर असे नवयुग अवतरले असताना बाल-रंगभूमी ही नव्याने अवतरली आहे. विशेषतः पुणे व मुंबई येथे केवळ बालांसाठी लिहिलेली नाटके सादर करणारे अनेक नाट्यसंघ निर्माण झाले आहेत. सुधा करमरकर, रत्नाकर मतकरी, सई जोगळेकर इत्यादींनी या क्षेत्रात केलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे.

पु. ल. देशपांडे यांनी नाट्यगुणांच्या आणि वाङ्मयीन प्रतिभेच्या बळावर आपल्या एकपात्री प्रयोगांना अफाट लोकप्रियता मिळवली. तिच्या प्रभावामुळे एकपात्री प्रयोगांचेही विविध नमुने सातत्याने रसिकांसमोर येत आहेत आणि त्यांना चांगला लोकाश्रयही मिळत आहे.

याचा अर्थ रंगभूमीची प्रगती निर्वेधपणे चालू आहे असा नाही. व्यावसायिक नाट्यसंस्थांना निश्चित उत्पन्नाची खात्री नसल्याने व गावोगाव नाट्यगृहे नसल्याने त्यांना बांधीव नटसंच बाळगता येत नाही. त्यामुळे नाट्यव्यवसायाची बाह्यात्कारी खूप जाहिरात होत असली, तरी त्याला स्थैर्य लाभलेले नाही. याउलट मराठी मनाचे खरे-खुरे प्रश्न समजून न घेता एका बाजूला पाश्चात्य नाट्यवाङ्मयातील विकृत जीवनदर्शन घडविणारे प्रयोग, तर दुसऱ्या बाजूला सवंग लोकप्रियतेसाठी हीन अभिरुचीचे उथळ प्रदर्शन चालू झाले आहे, तेही रंगभूमीला घातक ठरण्याचा संभव आहे. सदभिरुचिसंपन्न आणि समर्थ अशा नाट्यकृतींची दुर्मिळता तर फार तीव्रतेने जाणवू लागली आहे. केवळ जुन्या कसदार नाटकांवर रंगभूमीचा

बाळ कोल्हटकर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संसार फार दिवस चालेल, असे कोणालाच वाटत नाही.

तथापि रंगभूमीच्या पाठीशी इ. स. १८८० ते १९३५ या काळातल्या उज्ज्वल इतिहासाची पूर्वपुण्याई उभी आहे. तिचा मागोवा घेत नेटाने व जबाबदारीने पुढे जाणारे निष्ठावंत पाईकही तिला लाभले आहेत. या निष्ठावंत कलाकारांच्या सुजाण कर्तृत्वावर विसंबून राहून मराठी रंगभूमीच्या उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने पाहणे अवास्तव किंवा व्यर्थ ठरणार नाही. [डॉ. मु. श्री. कानडे, पुणे]

सांप्रत मराठी रंगभूमीवर विशेष गाजत असलेल्या नट–नटींची काही नावे अशी–

सर्वश्री पु. ल. देशपांडे, चित्तरंजन कोल्हटकर, डॉ. काशिनाथ घाणेकर, शंकर घाणेकर, दामू केंकरे, प्रभाकर पणशीकर, दाजी भाटवडेकर, रामदास कामत, आत्माराम भेंडे, मा. दत्ताराम, बाबूराव गोखले, गणेश सोळंकी, बाळ कोल्हटकर, बबन प्रभू, श्रीकांत मोघे, भिकू पै आंगले, विनायक पै, अरविंद देशपांडे, अनंत वर्तक, भालचंद्र पेंढारकर, छोटा गंधर्व, श्री. जोगळेकर, मामा पेंडसे, जब्बार पटेल, दादा कोंडके, निळू फुले, राम नगरकर, शाहीर साबळे, राजा मयेकर, घुमाळ, शरद तळवलकर, वसंतराव देशपांडे, दत्ता भट, मधुकर तोरडमल, श्रीराम लागू, प्रसाद सावकार, राम मराठे, चंद्रकांत गोखले, राजा नेने, नानासाहेब शिरगोपीकर, रमेश देव, भार्गवराम, उदयराज गोडबोले, सतीश दुभाषी, दामूअण्णा मालवणकर, गणपत पाटील, स्वरूपकुमार, अरुण सरनाईक, वसंत शिंदे, विश्वनाथ बागूल, आशालता वाबगावकर, विजया मेहता, जयमाला शिलेदार, ललिता केंकरे, सुधा करमरकर, फैयाज, नलिनी चोणकर, भक्ती बर्वे, पुष्पा भोसले, रसना, पद्मा चव्हाण, रेखा कामत, नीलम प्रभू, रजनी मुथा, निर्मला गोगटे, कुसुम शेंडे, सुनीता देशपांडे, सुहासिनी मुळगावकर, आशा काळे, कान्होपात्रा, मंगला संझगिरी, रेखा, कीर्ती शिलेदार, मीनाक्षी, ललिता जोगळेकर, माई भिडे, सीमा, लता काळे, वर्षा, इंदुमती पैंगणकर, सुमन जगताप, ज्योत्स्ना मोहिले, इत्यादी.

चित्रपट – मराठी चित्रपटसृष्टीचा प्रारंभ इ. स. १९१३ साली झाला. त्या वर्षी भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक श्री. दादासाहेब फाळके यांनी तयार केलेला ‘ राजा हरिश्चंद्र ’ हा पहिला संपूर्ण मराठी चित्रपट मुंबई येथे प्रकाशित झाला. दादासाहेब फाळके यांच्या अगोदर इ. स. १९११ साली सर्वश्री पाटणकर, दिवेकर व करंदीकर या उत्साही तरुणांनी चित्रपटनिर्मितीचे काही प्रयत्न केले होते; तथापि त्यांचे ते प्रयत्न या ना त्या कारणांनी फलद्रूप होऊ शकले नाहीत.

त्याच वर्षी, म्हणजे इ. स. १९११ साली श्री. दादासाहेब फाळके यांनी मुंबईच्या मुक्कामात ‘ दी लाइफ ऑफ ख्राइस्ट ’ हा मूकपट पाहिला व त्यामुळे भारावून जाऊन त्यांनी चित्रपटनिर्मितीचे प्रयत्न सुरू केले. चित्रपटनिर्मिती करण्यापूर्वी त्यांनी जे नानाविध उद्योग व व्यवसाय केले होते, त्या सर्वांत ते यशस्वी झाले होते. तीच जिद्द घेऊन ते आता चित्रपटनिर्मितीच्या मागे लागले. परंतु चित्रपट निर्माण करण्यासाठी केवळ चिकाटी आणि परिश्रम याच गोष्टी पुरेशा नव्हत्या. त्यांच्या बरोबरीने विपुल पैशाचीही गरज होती. दादासाहेब तर निष्कांचन होते. पण त्यांच्या हुशारीवर व कर्तबगारीवर विश्वास असणाऱ्या यशवंत घनश्याम नाडकर्णी या सद्गृहस्थांनी दादासाहेबांच्या या नव्या उद्योगाला १०,००० रुपयांचे साहाय्य केले. त्यामुळे दादासाहेब मोठ्या हुरूपाने कामाला लागले. इ. स. १९१२ च्या फेब्रुआरी महिन्यात चित्रपटनिर्मितीसाठी लागणाऱ्या साधनांच्या खरेदीसाठी ते इंग्लंडला गेले.

तिकडून परत आल्यावर, एकदम मोठ्या चित्रपटाच्या निर्मितीला हात घालण्यापूर्वी एक छोटासा चित्रपट तयार करावा, या हेतूने त्यांनी ‘ एका रोपट्याची वाढ ’ हा अवघ्या ५० फूट लांबीचा चित्रपट तयार केला. या चित्रपटात दादासाहेबांनी वाटाण्याचे बी जमिनीत रुजल्यापासून त्याच्या वेलाला शेंगा येईपर्यंतचा त्याचा क्रमबद्ध विकास चित्रित केला होता. दादासाहेबांचा हा छोटा चित्रपट ज्यांनी ज्यांनी पाहिला, त्यांनी त्यांनी त्यांच्या लोकविलक्षण धडाडीचे व कर्तृत्वाचे अमाप कौतुक केले. अशा प्रकारे पहिल्याच प्रयत्नास मिळालेले अपूर्व यश पाहून दादासाहेबांचा उत्साह दुणावला व ते मोठ्या, संपूर्ण लांबीच्या चित्रपटाच्या निर्मितीकडे वळले.

दादासाहेब फाळके

आपल्या पहिल्या चित्रपटासाठी त्यांनी भारतातील आबालवृद्धांना पूर्ण परिचित असणारी अशी राजा हरिश्चंद्राची कथा निवडली. या चित्रपटाचे ते केवळ निर्मातेच नव्हते, तर रंगभूषाकार, छायाचित्रकार, नेपथ्यकार आणि तंत्रज्ञही होते. या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. राजा हरि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्चंद्र हा पहिला मराठी चित्रपट मुंबईत प्रकाशित झाल्यावर तो पाहण्यासाठी प्रतिदिवशी प्रेक्षकांची गर्दी होऊ लागली. अनेक देशीविदेशी पत्रांनी दादासाहेबांच्या या चित्रपटाचा भरघोस गौरव करणारी स्फुटे लिहिली. समाजातील अनेक मान्यवर व्यक्तींनी त्यांचे तोंड भरून कौतुक केले. राजा हरिश्चंद्राने त्यांना अमाप कीर्ती मिळवून दिली असली, तरी पुढच्या चित्रपटांना लागणारा पैसा मात्र या चित्रपटाने त्यांना उभा करता आला नव्हता. सर्वत्र त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक होत असले, तरी त्यांना भांडवलादाखल रक्कम मात्र कोणीही देत नव्हते. दादासाहेबांनी अशा कठिण काळात स्वतःच्या पत्नीचे दागिने विकून पैसा जमवला व आपला उद्योग पुढे चालू ठेवला.

यानंतर दादासाहेबांनी भस्मासुरमोहिनी व सावित्री हे दोन चित्रपट बनवले व पुढील चित्रपट अधिकाधिक निर्दोष व्हावे, यासाठी लागणारी अद्ययावत यंत्रसामग्री आणण्यासाठी ते पुनश्च इंग्लंडला गेले. तिकडे जाताना त्यांनी आपले भस्मासुरमोहिनी व सावित्री हे दोन्ही चित्रपट बरोबर नेले व तिथे त्यांचे प्रदर्शन घडवून तिथल्या लोकांकडूनही वाहवा मिळवली. बायोस्कोप, किनोमाटोग्राफ, इ. चित्रपटनियतकालिकांनी तिथे फाळक्यांच्या चित्रपटांची खूप वाहवा केली.

अशा प्रकारे चित्रपटसृष्टीच्या माहेरघरीही दादासाहेबांच्या पराक्रमाचे चौघडे झडले. इतकेच नव्हे, तर तिथल्या एका प्रसिद्ध चित्रपटनिर्मितिसंस्थेने दादासाहेबांच्या सहकार्याने नवीन चित्रपट निर्मिती करण्याची योजना आखली. परंतु तिला मूर्त स्वरूप प्राप्त होण्यापूर्वीच युरोपात पहिल्या महायुद्धाला प्रारंभ झाला व त्यामुळे दादासाहेबांना भारतात परतावे लागले.

इ. स. १९१८ साली हे महायुद्ध संपले. तथापि मधल्या काळात जगातल्या सर्वच उद्योगधंद्यांत मोठी उलथापालथ झाली होती. अनेक उद्योग तर जवळजवळ थांबलेच होते. चित्रपटनिर्मितीसारखा महागडा धंदाही साहजिकच मंदगतीने चालू होता. तरीही या कठिण काळात दादासाहेबांनी एकूण १७ चित्रपट तयार केले. मग भांडवलाची अडचण कायमची दूर करण्यासाठी त्यांनी सर्वश्री वामन श्रीधर आपटे, मायाशंकर भट्ट, गोकुळदास दामोदर, ल. ब. फाटक, इ. आपल्या काही सहकाऱ्यांसह 'हिंदुस्थान फिल्म कंपनी' नावाच्या संस्थेची स्थापना केली; परंतु अवघ्या एकाच चित्रपटाच्या निर्मितीनंतर तिच्या भागिदारांत मतभेद होऊन ती बंद पडली.

यानंतर दादासाहेब कधी एकाकीपणे, तर कधी अन्य कोणाच्या सहकार्याने चित्रपटनिर्मिती करीत राहिले. तथापि १९१८ च्या शेवटी त्यांच्या चित्रपटांचा सुवर्णकाळ जो संपला तो संपलाच. नंतरच्या काळात त्यांनी काढलेले चित्रपट इतरांच्या स्पर्धेत टिकू शकले नाहीत.

दादासाहेबांचे हे सर्व चित्रपट मूक होते. त्यांतील संभाषणे व पात्रांच्या हालचाली या 'टायटल्स'च्या द्वारे सूचित करण्यात येत. टायटल्स उर्दू, इंग्रजी, हिंदी व अन्य प्रांतिक भाषांतून असत. दादासाहेबांच्या चित्रपटांचे वैशिष्टच म्हणजे त्यांत दिसून येणारी सर्वगामी मराठी परंपरा हे होय.

दादासाहेब फाळक्यांची चित्रपटनिर्मिती ज्या सुमाराला मंदावली, त्याच सुमारास म्हणजे इ. स. १९१९ साली कोल्हापूर येथे श्री. बाबुराव पेंटर यांनीही चित्रपटनिर्मितीस प्रारंभ केला. श्री. पेंटर हे चित्रकार होते. त्यामुळे त्यांनी निर्मिलेले सर्वच चित्रपट कलात्मक दृष्टचा उच्च दर्जाचे निघाले.

दि. १ डिसेंबर १९१९ या दिवशी श्री. बाबुराव पेंटर यांनी कोल्हापूर मुक्कामी महाराष्ट्र फिल्म कंपनीची स्थापना केली. त्यांनाही प्रारंभीच्या काळात भांडवलाची अडचण होतीच; तथापि कोल्हापूरच्या तत्कालीन श्रेष्ठ गायिका तानीबाई कागलकर, विनायकराव घोरपडे, रामचंद्र पाटील, इ. मंडळींनी बाबुरावांना पुरेसे आर्थिक साहाय्य दिले व महाराष्ट्र फिल्म कंपनीने पांडवांच्या अज्ञातवासातील जीवनावर सैरंध्री नावाचा पहिला चित्रपट काढला. सैरंध्री चित्रपट प्रथम लो. टिळक यांना दाखविण्यात आला. हा चित्रपट ज्या कॅमेऱ्यावर चित्रित केला होता, तो कॅमेरा बाबुराव पेंटरांनी स्वतःच तयार केला होता. त्यामुळे लोकमान्य टिळकांना बाबुराव पेंटरांच्या सर्वच उद्योगाविषयी एक प्रकारचे आदरमिश्रित कौतुक वाटले. सैरंध्री चित्रपटाचे दिग्दर्शन, नेपथ्य, छायालेखन, इ. अनेक बाबी बाबुरावांनीच सांभाळल्या होत्या. हा चित्रपट पाहिल्यावर लोकमान्य इतके प्रसन्न झाले, की त्यांनी बाबुरावांना सिनेमाकेसरी अशा पदवीने गौरविले.

अशा प्रकारे लोकमान्यांचा आशीर्वाद मिळवून बाबुरावांनी आपल्या चित्रपटनिर्मितीच्या कारकिर्दीला आरंभ केला. फाळक्यांच्या चित्रपटांप्रमाणेच त्यांच्याही चित्रपटांना लोकांनी उचलून धरले. तथापि फाळक्यांच्या चित्रपटांपेक्षा बाबुरावांचे चित्रपट अनेक दृष्टींनी वेगळे व वैशिष्टचपूर्ण होते. त्यांनी केवळ चमत्कृतीपेक्षा अभिनय, कथानकाची कलात्मक मांडणी व त्या कथानकाच्या द्वारे लोकांना एखादा संदेश देणे या गोष्टींकडे अधिक लक्ष दिले. ध्येयवादी व कलात्मक चित्रपटांची परंपरा बाबुराव पेंटरांच्या सैरंध्रीपासूनच सुरू झाली.

सैरंध्रीनंतर त्यांनी सुरेखा-अभिमन्यू व वत्सलाहरण हे दोन चित्रपट काढले. हेही चित्रपट सैरंध्रीप्रमाणेच लोकप्रिय ठरले; परंतु त्यानंतर मात्र स्वभावातील लहरीपणामुळे ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust Funding by MoE-IKS

चित्रपटनिर्मितीचे काम सोडून दुसऱ्याच उद्योगाला लागले. त्यामुळे स्वाभाविकच त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या तंत्रज्ञ,

व्ही. शांताराम

कलाकार व कामगार मंडळींची मोठी कुचंबणा होऊ लागली. सैरंध्री, सुरेखा-अभिमन्यू व वत्सलाहरण या तीन चित्रपटांच्या निर्मितिकालात दामले, फत्तेलाल, धायबर, शांतारामबापू, इ. तंत्रज्ञ-कलावंत आपापल्या विभागात प्रवीण झाले होते. तथापि या ना त्या कारणामुळे त्यांना अजून स्वतंत्रपणे चित्रपट निर्माण करणे शक्य झाले नव्हते. महाराष्ट्र फिल्म कंपनीचा कारभार असा मंदावला असतानाच दि. ६ नोव्हेंबर १९२२ या दिवशी कंपनीत एकाएकी आग लागली व त्यामुळे कपडेलत्ते, सीनसीनरीचे साहित्य व फिल्मची भेंडोळी जळून खाक झाली. नव्यानेच यशस्वी होऊ पाहणाऱ्या महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या तंत्रज्ञ-कलावंतांवर या घटनेमुळे मोठाच आघात झाला. त्यामुळे नवा चित्रपट काढायचा, तर भांडवलापासून तयारी करणे आले. मग बाबुराव पेंढारकर, बापूसाहेब इंगळे, इ. मान्यवर मंडळींच्या प्रयत्नांनी श्रीमंत शंकरराव नेसरीकर यांच्याकडून भांडवलाची व्यवस्था झाली व महाराष्ट्र फिल्म कंपनी पुनश्च नव्या चित्रपटाच्या निर्मितीला लागली.

कंपनीचे यापूर्वीचे सर्व चित्रपट महाभारतीय कथानकांवर आधारलेले होते. आता देशातील स्वातंत्र्यलढ्याला उपकारक असे स्फूर्तिशाली वातावरण निर्माण करण्यासाठी ऐतिहासिक कथानके निवडावी, असे ठरले व त्यानुसार कंपनीचा नवा चित्रपट नरवीर तान्हाजीच्या हौतात्म्यप्रसंगावर घेण्यात आला. 'सिंहगड' हा चित्रपट अनेक अर्थांनी त्या काळी युगप्रवर्तक ठरला. या चित्रपटाच्या निमित्ताने बाबुरावांची प्रतिभा नव्याने पल्लवित झाली. या चित्रपटाचे कथानक 'गड आला पण सिंह गेला' या हरिभाऊ आपटे यांच्या कादंबरीवरून घेतले गेले होते. बाबुराव पेंटरांचे भव्य ऐतिहासिक देखावे, पडद्यावर प्रथमच अवतरलेली रोमांचकारी दृश्ये, उत्कट देशप्रेमाने ओथंबलेले एकापेक्षा एक बहारदार प्रसंग, इ. वैशिष्ट्यांमुळे सिंहगड हा चित्रपट अतिशय लोकप्रिय ठरला.

सिंहगडनंतर महाराष्ट्र फिल्म कंपनीने पौराणिक व ऐतिहासिक विषयांवरचे आणखी २–४ चित्रपट काढले. त्यानंतर १९२५ साली बाबुरावांनी 'सावकारी पाश' हा पहिला सामाजिक चित्रपट निर्माण केला. त्यातील पात्रांचा जिवंत अभिनय व अंतःकरणाला भिडणारे ज्वलंत प्रसंग यांमुळे हा चित्रपट विलक्षण यशस्वी ठरला. यानंतर आणखीही काही चित्रपट बाबुरावांनी काढले; तथापि दिवसेंदिवस त्यांचा लहरीपणा व चित्रपटनिर्मितीतला मंदपणाही वाढत चालला. त्यामुळे त्यांच्या

एस्. फत्तेलाल

हाताखाली काम करणाऱ्या तंत्रज्ञ-कलावंतांत असंतुष्ट वातावरण पसरले व शेवटी व्ही. शांताराम, केशवराव धायबर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एस्. फत्तेलाल व विष्णुपंत दामले हे बाबुरावांचे प्रमुख सहकारी महाराष्ट्र फिल्म कंपनीतून बाहेर पडले.

दि. १ जून १९२९ या दिवशी या मंडळींनी कोल्हापूर येथे प्रभात फिल्म कंपनी या नव्या चित्रपट संस्थेची स्थापना केली.

विष्णुपंत दामले

कंपनीच्या उभारणीसाठी व नव्या चित्रपटाच्या निर्मितीसाठी लागणारे भांडवल कोल्हापूरचे सराफी दुकानदार सीतारामपंत कुलकर्णी यांनी दिले व थोड्याच काळात ' प्रभात 'चा पहिला चित्रपट गोपाळकृष्ण हा पडद्यावर आला. शांतारामबापूंचे प्रतिभाशाली दिग्दर्शन, फत्तेलालांची कलापूर्ण सजावट व मांडणी, दामले-धायबरांच्या संकलन–छायालेखनातील करामती आणि आबालवृद्धांना मोहविणाऱ्या गोपालकृष्णाच्या गोकुळातील लीला या विविध गुणवैशिष्ट्यांनी नटलेला हा चित्रपट प्रेक्षकांना फार आवडला. गोपालकृष्णानंतर खुनी खंजीर, उदयकाल, राणीसाहेब व चंद्रसेना हे चार वेगवेगळ्या विषयांवरील चित्रपट प्रभातने निर्माण केले व तेही लोकप्रिय ठरले

प्रभातची तुतारी अशा प्रकारे सर्वत्र निनादत असतानाच भारतात बोलपटांचे आगमन झाले. आंतापर्यंत पडद्यावर हलणारी चित्रे आता बोलूही लागली. भारतात पहिला बोलपट सर आर्देशीर इराणी यांनी निर्माण केला. या बोलपटाचे नाव आलमआरा असे होते. सदैव नाविन्याच्या शोधात असणारे प्रभातचे कलाकारही बोलपटाच्या या नव्या क्षेत्रात पदार्पण करण्यास उत्सुक होतेच.

प्रभातचा पुढचा चित्रपट हा ' बोलपट ' म्हणूनच काढायचा या जिद्दीने व्ही. शांताराम आणि त्यांचे अन्य सहकारी कामाला लागले. त्यासाठी विष्णुपंत दामले यांनी ध्वनिमुद्रण–विभागाची सांगोपांग माहिती अभ्यासली. नव्या बोलपटाच्या कथालेखनाची जबाबदारी तत्कालीन सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. ना. वि. कुलकर्णी यांच्यावर सोपविण्यात आली. हा नवा बोलपट राजा हरिश्चंद्राच्या जीवनावरच आधारला असून, त्याचे नामकरण ' अयोध्येचा राजा ' असे करण्यात आले.

मराठीतला पहिला मूकपट दादासाहेब फाळके यांनी काढला तोही राजा हरिश्चंद्राच्याच जीवनावर आणि आता मराठीतला हा पहिला बोलपट निघत होता, तोही हरिश्चंद्राच्याच जीवनावर. तथापि एवढे हे साम्य सोडले, तर प्रभातच्या चालकांनी घेतलेल्या मेहेनतीमुळे हा बोलपट अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण व युगप्रवर्तक ठरला.

संगीतासाठी व हरिश्चंद्राच्या प्रमुख भूमिकेसाठी मराठी रंगभूमीवरील एक श्रेष्ठ गायक नट गोविंदराव टेंबे यांना पाचारण करण्यात आले, तर तारामतीच्या भूमिकेसाठी दुर्गा खोटे या तत्कालीन प्रतिष्ठित व सुविद्य बाईंना बोलावण्यात आले. याशिवाय, शांतारामबापूंचे दिग्दर्शन, एस्. फत्तेलाल यांचे कलादिग्दर्शन आणि केशवराव धायबर यांचे छायालेखन या प्रभातच्या नित्याच्या यशस्वी बाजू होत्याच. या बोलपटाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे बाबुराव पेंढारकर यांनी उभा केलेला खलनायक गंगानाथ महाजन हे होय. बाबुरावांची ही भूमिका त्या काळी एवढी गाजली, की पडद्यावर त्यांचे दर्शन घडताच पुरुष प्रेक्षक संतापाने दात ओठ खात आणि स्त्रीवर्ग कडाकडा बोटे मोडून त्या पात्राला शिव्याशाप देत.

गोविंदराव टेंबे

अशा प्रकारे आपल्या पहिल्याच बोलपटाने प्रभातने सर्वत्र उत्कृष्ट चित्रनिर्मितीचा एक आदर्श उभा केला. प्रभातच्या अयोध्येचा राजा या बोलपटापाठोपाठ मुंबईत शामसुंदर हा बोलपट प्रदर्शित झाला. त्याची निर्मिती पुण्याच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सरस्वती सिनेटोनने दादासाहेब तोरणे यांच्या नेतृत्वाखाली केली. शामसुंदरची कथा व दिग्दर्शन भालजी पेंढारकर यांचे होते, तर त्यातल्या राधाकृष्णांच्या भूमिका अनुक्रमे शांता आपटे व शाहू मोडक यांनी केल्या होत्या. या बोलपटाचे वैशिष्टय म्हणजे तो सतत २५ आठवडे एकाच चित्रमंदिरात चालला व त्याने एक अभूतपूर्व असा लोकप्रियतेचा विक्रम प्रस्थापित केला.

वरील दोन दिग्विजयी बोलपटांनंतर प्रभातने मायामच्छिंद्र व सरस्वती सिनेटोनने भक्त प्रल्हाद हे आणखी दोन सुरेख बोलपट सादर केले व तेही प्रेक्षकांना अतिशय पसंत पडले. या चार चित्रपटांच्या अमाप यशामुळे आणि त्यांत आढळणाऱ्या संगीताच्या मेजवानीमुळे मराठी रंगभूमीची पीछेहाट होऊ लागली. यानंतरच्या प्रदीर्घ काळात बोलपट हेच सर्व समाजाचे प्रमुख करमणुकीचे साधन होऊन राहिले. या काळात रंगभूमी-वरचे लहानथोर अनेक कलावंत बोलपटात आले. तथापि त्यांच्यांतील काही सन्माननीय अपवाद वगळता अन्य अनेकांना हे नवे माध्यम पेलले नाही.

इ. स. १९३३ साली प्रभात कंपनीने कोल्हापुराहून पुण्याला स्थलांतर केले. त्यामुळे पुण्याला जाऊ न शकलेल्या कोल्हा-पूरच्या अनेक कलावंत–तंत्रज्ञांवर उपासमारीचा प्रसंग ओढ-वला. ही आपत्ती टाळण्यासाठी व चित्रपटकलेचे माहेरघर हा कोल्हापूरचा लौकिक टिकवण्यासाठी कोल्हापूरच्या महाराजांनी कोल्हापूर सिनेटोन नामक एक चित्रनिर्मितिसंस्था उभारली व तिची व्यवस्था मेजर दादासाहेब निंबाळकर, भालजी पेंढारकर, बाबुराव पेंढाकर, मास्टर विनायक, इ. जाणत्या मंडळींकडे सोप-वली. या नव्या संस्थेने अल्पावधीतच आकाशवाणी नावाचा श्रीकृष्णचरित्रावरील बोलपट काढला व तो प्रकाशित होताच लोकप्रियही झाला. यानंतर कोल्हापूर सिनेटोनने विलासी ईश्वर हा नाटककार वरेरकर यांच्या कथानकावरील सामाजिक चित्रपट काढला. याच वेळी बाबुराव पेंटर यांचा सावकारी पाश हा सामाजिक बोलपट रुपेरी पडद्यावर आला व त्याने विलक्षण लोकप्रियता मिळवली. त्यातल्या चंद्रकांत व विष्णुपंत औंधकर यांच्या अनुक्रमे शेतकरी व सावकार या भूमिका प्रेक्ष-कांवर विशेष प्रभाव पाडून गेल्या. उन्मत्त सावकाराकडून अज्ञ आणि निरक्षर कुळाची होणारी पिळवणूक ही या चित्रपटाची मध्यवर्ती कल्पना अत्यंत प्रक्षोभक असल्यामुळे व बाबुराव पेंटर यांच्यासारख्या कसबी कलावंताने तिची अत्यंत कौश-ल्याने मांडणी केल्यामुळे हा चित्रपट आजही लोकांच्या कौतु-काचा विषय होऊन राहिला आहे.

आकाशवाणी व विलासी ईश्वर या अवघ्या दोनच चित्र-पटांच्या निर्मितीनंतर कोल्हापूर सिनेटोनमधील कलावंत आणि चालक यांच्यांत मतभेद सुरू झाले व त्यामुळे अल्पावधीत भालजी पेंढारकर, बाबुराव पेंढारकर व विनायक यांनी कोल्हा-पूर सिनेटोनचा निरोप घेतला.

भालजी पेंढारकर

प्रभात कंपनी पुण्यास गेल्यावर तिने श्री. ना. ह. आपटे यांच्या भाग्यश्री नामक कादंबरीवर आधारलेला अमृत-मंथन नावाचा एक कलात्मक चित्रपट काढला. या चित्र-पटाच्या निमित्ताने संगीतासाठी केशव-राव भोळे व गीत-लेखनासाठी शांता-राम आठवले या दोन गुणी कलावंतांचा प्रभातमध्ये प्रवेश झाला व तो कंपनीला लाभदायी ठरला. अमृतमंथनमधील केशवराव दाते यांची राजगुरूची भूमिका विशेष गाजली. याशिवाय शांतारामबापूंचे कलात्मक व प्रतिभाशाली दिग्दर्शन हीही या चित्रपटाच्या यशाची एक मोठी बाजू होती. याच वेळी प्रभातने आपले चित्रपट हिंदीमध्येही काढायचे धोरण अवलंबिल्याने सबंध भारतात त्यांच्या यशाची तुतारी निनादत राहिली.

प्रभातची अशा प्रकारे आगेकूच चालू असतानाच तिकडे कोल्हापूर सिनेटोनमधून बाहेर पडलेल्या बाबुराव पेंढारकर, मा. विनायक, इ. कलावंतांनी छायालेखक पांडुरंगराव नाईक यांच्या सहकार्याने हंसचित्र नामक एक नवी चित्रसंस्था उभा-रली व तिच्या द्वारा वि. स. खांडेकर यांच्या कथेवरील छाया नावाचा एक चित्रपट काढला. या चित्रपटाची कथा एवढी प्रभावी होती, की केवळ त्याच्या कथेलाच कलकत्ता प्रेस असो-सिएशनने पदक देऊन गौरविले. याशिवाय या चित्रपटाचे मा. विनायकांनी केलेले दिग्दर्शन व लीला चिटणीस, बाबुराव पेंढार-कर, विनायक, इत्यादिकांच्या भूमिका ही या चित्रपटाची विशेष आकर्षणे होती.

छायानंतर हंसने धर्मवीर हा विनोदी चित्रपट काढला. धर्म-वीरच्या निमित्ताने आचार्य अत्रे या सव्यसाची साहित्यिकाचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चित्रपटसृष्टीत प्रवेश झाला. अत्र्यांची ही चित्रकथा एवढी गाजली, की पुढेपुढे तर अत्र्यांची कथा हा चित्रपटाच्या यशस्वितेचा एक महत्त्वाचा भाग समजला जाऊ लागला. बाह्यतः धर्मवीर व सज्जन म्हणून मिरवणाऱ्या, परंतु व्यक्तिगत जीवनात अत्यंत ढोंगी व नीच कर्मे करण्यात गुंतलेल्या एका पुढाऱ्याची स्फोटक कथा अत्र्यांनी या चित्रपटात सादर केली होती व तिला मा. विनायकांच्या विनोदी अभिनयाची आणि प्रतिभाशाली दिग्दर्शनाची जोड मिळाली होती. बाबुराव पेंढारकरांनी उभा केलेला धर्मवीर तर केवळ अविस्मरणीय होता.

बाबूराव पेंढारकर

यानंतर मराठी चित्रपटसृष्टीत संतांच्या जीवनपटांचे युग सुरू झाले. प्रभातने संत एकनाथांच्या जीवनावर काढलेला धर्मात्मा हा चित्रपट त्याला दिलेल्या समाजसुधारक वळणामुळे वेगळा वाटला. या चित्रपटात मराठी रंगभूमीचे नटसम्राट बालगंधर्व एकनाथांच्या भूमिकेत चमकले; तथापि इथल्या यंत्र-तंत्राची धकाधकी त्यांना मानवली नाही व त्यामुळे तो चित्रपटच प्रभावी ठरू शकला नाही. शिवाय, या चित्रपटात अस्पृश्योद्धाराचा विचार प्रकर्षाने मांडायचे धोरण स्वीकारल्याने व चित्रपटाला प्रथम दिलेले महात्मा हे नाव सरकारला

दुर्गाबाई खोटे

म. गांधींशी जवळीक करणारे वाटल्याने त्याच्या प्रसिद्धीला सरकारनेही आक्षेप घेतले. हा चित्रपट अनेक अर्थांनी क्रांतिकारक असूनही यशस्वी ठरला नाही. त्याच्या पाठोपाठ आलेला रजपुतरमणी हा चित्रपट प्रभावी वाटला नाही. अशा अवस्थेतच शांतारामबापूंनी अमरज्योती हा दर्यावर्दी पार्श्वभूमी असलेला चित्रपट तयार केला. सागरी प्रदेशातील साहसपूर्ण प्रणयरम्य कथानक; शांतारामबापूंचे अप्रतिम दिग्दर्शन; चंद्रमोहन, बी. नांद्रेकर, दुर्गा खोटे, शांता आपटे, इ. नामवंत कलावंतांच्या अविस्मरणीय भूमिका; पाश्चात्य चित्रपटांच्या तोडीस तोड अशी समुद्राच्या पार्श्वभूमीवर उभारलेली एस्. फत्तेलाल यांची दृश्ये आणि मा. कृष्णराव यांचे गोड, ढंगदार संगीत, इ. अनेक गुणवैशिष्ट्यांमुळे हा चित्रपट अतिशय गाजला.

अमरज्योतीच्या तुफानी यशानंतर शांतारामबापूंनी स्वतः बाजूला राहून प्रभातमधील आपल्या इतर सहकाऱ्यांना संधी देण्याचे ठरविले व त्यानुसार तुकाराम या संतपटाची सिद्धता झाली. त्यात दिग्दर्शन दामले व फत्तेलाल या जोडीचे, संगीतनियोजन केशवराव भोळयांचे, एकूण मार्गदर्शन शांतारामबापूंचे, सहदिग्दर्शन राजा नेने यांचे, कथा-संवाद शिवराम वाशीकरांचे आणि गीतलेखन शांताराम आठवले यांचे होते. या सर्वच मंडळींनी एवढ्या उत्साहाने आणि दक्षतेने आपल्या जबाबदाऱ्या संभाळल्या, की तुकाराम चित्रपट अत्यंत लोकप्रिय ठरला. या चित्रपटातील विष्णुपंत पागनीस यांनी केलेली तुकारामाची भूमिका तर एवढी गाजली, की तुकारामाचे नाव काढले, की आजही पागनीसच डोळ्यांसमोर उभे राहतात. त्यांच्या जोडीला जिजाऊच्या भूमिकेत गौरीबाई आणि सालोमालोच्या भूमिकेत काका भागवत यांनीही आपापली कामे गाजवली. तुकारामचे संगीत हेही या काळात अतिशय श्रवणीय व म्हणूनच अविस्मरणीय ठरले. या चित्रपटातील 'आधी बीज एकले' हा शांताराम आठवले यांचा अभंग तर साक्षात संत तुकारामाच्या कवित्वाशी स्पर्धा करणारा होता.

इ. स. १९३७ ते १९४० हा काल मराठी चित्रपटांना सर्वस्वी अनुकूल व यशदायी असा होता. या काळात प्रभातच्या तुकारामने, भालजींच्या नेताजी पालकरने व हंसच्या ब्रह्मचारीने लोकप्रियतेचा कळस गाठला. या चित्रपटांच्या बरोबरीनेच प्रभातने निर्मिलेल्या शांतारामदिग्दर्शित कुंकू या चित्रपटानेही अमाप यश संपादन केले.

कुंकू हा चित्रपट अनेक अर्थांनी युगप्रवर्तक चित्रपट म्हणता येईल. किंबहुना कुंकू, माणूस व शेजारी हे एकापाठोपाठ आलेले तीन सामाजिक चित्रपट म्हणजे प्रभातच्या सांघिक कलाकीर्तीचे दीपस्तंभ होत. या तीनही चित्रपटांचे दिग्दर्शन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शांतारामबापूंचे होते. 'शांताराम टच्' हा शब्दप्रयोग मराठी बोलपटसृष्टीत रूढ झाला तो याच सुमारास. अनेकविध प्रतीकांचा वापर करून प्रसंगाचे परिणामकारक चित्रण करण्याची कल्पना शांतारामबापूंनी प्रत्यक्षात आणली, ती याच चित्रपटांपासून. कुंकूची कथा ना. ह. आपटे यांची, माणूसची कथा अनंत काणेकरांची आणि शेजारीची कथा विश्राम बेडेकरांची होती. या तीन कथांतून प्रभातने तीन ज्वलंत सामाजिक समस्यांचे चित्रण केले. कुंकूमध्ये बाला-जरठविवाहाच्या निमित्ताने अन्यायाचा प्रतिकार जास्तीत जास्त सभ्यतेने पण परिणामकारकपणे कसा करता येतो, हे दाखविले होते; तर माणूसमधे प्रेमापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ असल्याचा संदेश देण्यात आला होता. शेजारी या चित्रपटात हिंदु-मुसलमान संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दोन जिवलग मित्रांच्या गाढ प्रेमाची कथा चित्रित करण्यात आली होती. कथा-दिग्दर्शनाप्रमाणेच या तीन्ही चित्रपटांचे संगीत या काळात अतिशय गाजले. कुंकूचे संगीत केशवराव भोळे यांनी व माणूस आणि शेजारी यांचे संगीत मा. कृष्णराव यांनी दिले होते. कुंकूमधील केशवराव दाते व शांता आपटे यांच्या अभिनयाची जुगलबंदी अविस्मरणीय होती. माणूसमधील शाहू मोडक यांचा गणपत शिपाई व शांता हुबळीकर यांची मैना नायकीण अशीच न विसरता येण्याजोगी

केशवराव भोळे

होती. शेजारीत तर केशवराव दाते आणि गजानन जागीरदार या दोन श्रेष्ठ आणि समर्थ नटांनी अभिनयगणांत एकमेकांवर मात करण्याचा प्रयत्न केला आहे. सारांश कथा, संगीत, अभिनय, दिग्दर्शन, छायालेखन, इ. अनेक विभागांतील व्यक्तींनी

मास्टर विनायक

आपापले सर्वस्व पणाला लावून हे चित्रपट उभे केले व ते आजतागायत लोकप्रिय व अजोड ठरले.

ब्रह्मचारीचे प्रधान यश आचार्य अत्र्यांच्या कथासंवादांत व मा. विनायकांच्या प्रमुख भूमिकेत होते. या चित्रपटातील विनायकांचे दिग्दर्शन जितके कलापूर्ण, तितकाच त्यांचा अभिनय जिवंत व खेळकर होता. याशिवाय, मीनाक्षीची मोकळी व प्रणयरम्य भूमिका आणि दामूअण्णा मालवणकरांनी उभा केलेला गांधीवादी आचार्य चंडीराम याही या चित्रपटाच्या आकर्पणात भर टाकणाऱ्या बाजू होत्या. पुण्यात हा चित्रपट ५० आठवडे चालला व आजही केव्हाही लागला तरी गर्दी खेचतो, हे या चित्रपटाच्या चिरकालीन यशाचे गमक म्हणायला हवे. या चित्रपटातील 'यमुनाजळी' या गीताने तर अक्षरशः लोकप्रियतेचा उच्चांक गाठला.

भालजी पेंढारकरांचा नेताजी पालकर व त्यांनी निर्मिलेले अनेक ऐतिहासिक चित्रपट तांत्रिक अंगात विशेष प्रभावी नसले, तरी कथासंवादाच्या द्वारे ते लोकांची मने काबीज करीत. विशेषतः स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात भालजींचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चित्रपटांनी लोकजागृतीच्या कार्यातील मोठा वाटा उचलला.

पार्श्वनाथ अळतेकर व दुर्गा खोटे यांनी सौंगडी हा चित्रपट निर्माण केला तोही उल्लेखनीय आहे.

मराठी चित्रपटनिर्मात्यांबरोबरच महाराष्ट्रीयेतर निर्मातेही मराठी चित्रपट काढीत होते. इंपीरिअल फिल्म कंपनीने नानासाहेब सरपोतदार यांच्या दिग्दर्शनाखाली काढलेले देवकी, व रुक्मिणीहरण हे चित्रपट कमीअधिक प्रमाणात यशस्वी झाले. नागेंद्र मुजुमदार यांचा तुकाराम प्रभातच्या तुकारामपुढे प्रभावी ठरला नाही. नानुभाई वकील यांनी राधामोहन, मिनर्व्हा मुव्हिटोनने नामाचा महिमा व अकरावा अवतार, जनरल फिल्म्संने चंद्रराव मोरे, रणजितने तुळसीदास, सिर्कोने गीता, आपले घर व विदुर, नॅशनल स्टुडिओने निर्दोष, इ. अनेक चित्रपट निर्माण केले.

कुंकू, माणूस व शेजारी या चित्रपटांप्रमाणेच प्रभातने काढलेले गोपाळकृष्ण, माझा मुलगा, ज्ञानेश्वर, इ. चित्रपटही अमाप लोकप्रिय झाले. यांपैकी गोपाळकृष्ण हा चित्रपट कृष्णाच्या गोकुळातील बालक्रीडांवर आधारित असल्यामुळे व प्रभातच्या सर्व कलावंतांनी सांघिक रीत्या आपापली कामे कसून केल्यामुळे लोकांना आवडला. माझा मुलगा हा चित्रपट सामाजिक विषयावरचा होता. ध्येयवादी पुत्राचा त्याच्या व्यवहारवादी बापाशी उभा राहिलेला संघर्ष हा त्या चित्रकथेचा गाभा होता. या सर्वांत संत ज्ञानेश्वर हा चित्रपट आबालवृद्ध प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारा होता. ज्ञानेश्वरांचे लोकोत्तर आणि तरीही करुणरम्य जीवनचरित्र हा विषयच या चित्रपटाचे मोठे आकर्षण होता. यातली शाहू मोडक यांची ज्ञानेश्वराची भूमिका लोकांना फार आवडली.

अशा प्रकारे एकापेक्षा एक वेगवेगळे विषय समर्थपणे निवडून व त्यांची कलात्मक आणि परिणामकारक हाताळणी करून दिग्विजयाकडे वाटचाल करीत असतानाच प्रभातच्या चालकांत मतभेद उद्भवले आणि शेवटी त्याचा परिणाम शांताराम-बापूंनी प्रभातचा त्याग करण्यात झाला. पुढे त्यांनी स्वतःची राजकमल ही नवी चित्रसंस्था सुरू केली.

प्रभातप्रमाणेच हंस ही कंपनीही त्या काळी उत्कृष्ट चित्रनिर्मितीच्या बाबतीत अग्रेसर समजली जाई. तिने छाया, ब्रह्मचारी, ब्रँडीची बाटली, देवता, सुखाचा शोध, अर्धांगी यांसारखे एकाहून एक नावीन्यपूर्ण चित्रपट काढले. प्राधान्याने या चित्रपटांचे स्वरूप विनोदी किंवा करुणरसप्रधान आहे. या चित्रपटांच्या कथा सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर व आचार्य अत्रे यांच्या आहेत. या चित्रपटांतून कामे करणारे मा. विनायक, मीनाक्षी, बाबुराव पेंढारकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर, इ. नट हे अव्वल दर्जाचे अभिनेते असल्यामुळे प्रेक्षकांचे अत्यंत आवडते होते. अर्धांगीनंतर हंस कंपनीचे 'नवयुग चित्रपट लिमिटेड' या नव्या कंपनीत रूपांतर झाले व नवयुगने लपंडाव हा सामाजिक चित्रपट सादर केला. त्याची कथा आचार्य अत्र्यांची व दिग्दर्शन के. नारायण काळे यांचे होते. वनमाला ही नवी सुविद्य नटी लपंडावमुळे मराठी चित्रपटसृष्टीत आली व तिने पुढे अनेक चित्रपटांत लहान-मोठ्या भूमिका अप्रतिमपणे वठवल्या.

अशा प्रकारे छायापासून लपंडावपर्यंत अनेक सुरेख चित्रपट सादर करून हंस कंपनी कीर्तिवंत झाली असतानाच, प्रभातप्रमाणे तिच्याही चालकांत भांडणे उद्भवली व त्यामुळे हंसमधून निर्माण झालेली नवयुग कंपनी मोडण्याचा प्रसंग आला. या कंपनीतून प्रथम अत्रे बाहेर पडले व मग बाबुराव पेंढारकर व पांडुरंगराव नाईक हेही वेगळे झाले. यानंतर सर्व मराठी चित्रसृष्टीत एकांड्या शिलेदारांची सद्दी सुरू झाली. आतापर्यंत आपापल्या कलाकर्तृत्वावर नाव मिळविलेला कोणीही कलावंत चार अन्य कलावंतांच्या साहाय्याने नवी कंपनी उभारू लागला व एकदोन चित्रांच्या निर्मितीनंतर या कंपन्या बंद पडू लागल्या. मराठी चित्रपटसृष्टीत सुरू झालेला हा दुर्दैवी प्रकार आजतागायत तसाच चालू आहे.

हंसमधून बाहेर पडल्यावर आचार्य अत्रे यांनी स्वतःची अत्रे पिक्चर्स ही संस्था काढली व तिच्या द्वारा त्यांनी पायाची दासी हा उत्तम चित्रपट सादर केला. भालजी पेंढारकरांनीही पुणे येथे अरुण स्टुडिओ स्थापन करून त्याच्या द्वारा गोरखनाथ, सूनबाई, थोरातांची कमळा ही वैविध्यपूर्ण चित्रे सादर केली. हंस-चित्र या संस्थेद्वारा मा. विनायकांनी लग्न पहावं करून व बाबुराव पेंढारकर यांनी आपल्या नव्या संस्थेच्या द्वारा पहिला पाळणा हे विनोदी चित्रपट सादर केले. पहिला पाळणा या चित्रपटामुळे ग. दि. माडगूळकर या गुणी कलावंताचा लाभ मराठी चित्रसृष्टीला झाला.

मराठी चित्रपटांची आणि चित्रसंस्थांची अशी सर्वत्र वेगाने वाताहात होत असतानाच दुसरे महायुद्ध भडकले. त्याचा परिणाम अर्थातच चित्रपटसृष्टीवर अत्यंत विपरीत झाला. चित्रपटासाठी लागणारी फिल्म या काळात फार महागली व त्यामुळे या व्यवसायाबर अवलंबून असणारे अनेक कलावंत बेकार होण्याचा प्रसंग आला. तथापि ऐन युद्धकाळातही प्रभातने रामशास्त्रीसारखा एक उत्तम चित्रपट सादर करून आपला लौकिक टिकवला. त्यात रामशास्त्री यांची मध्यवर्ती भूमिका गजानन जागीरदार या समर्थ नटाने अत्यंत दमदारपणाने उभी केली व त्यामुळे आजही प्रेक्षकांना प्रभातचा रामशास्त्री एक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आकर्षक चित्रपट वाटतो. महायुद्ध सरले त्या वर्षी म्हणजे १९४६ च्या सुमारास तर अवघे दोन मराठी चित्रपट निर्माण झाले व तेही विजय भट्ट या गुजराती निर्मात्याने केले. राम-

ग. दि. माडगूळकर

राज्य व भरतभेट ही त्यांची नावे. हे दोन चित्रपट मात्र विलक्षण यशस्वी झाले. त्यांतील संगीत, अभिनय, निर्मितिमूल्ये, दिग्दर्शन या सर्वच बाजू अतिशय श्रेष्ठ दर्जाच्या होत्या.

इ. स. १९४७ साल उजाडले ते भारतीय स्वातंत्र्याचा प्रकाश घेऊन; परंतु त्याचबरोबर या वर्षाने अनेक समस्याही समोर उभ्या केल्या. देशाचे विभाजन झाल्यामुळे अनेक गुणी मुस्लिम कलावंत पाकिस्तानात गेले. उर्वरित भारतातही निर्वासितांचा प्रश्न व जीवनावश्यक वस्तूंची टंचाई अशा अडचणींनी रौद्र स्वरूप धारण केले. मराठी चित्रपटसृष्टीच्या दृष्टीने मा. विनायकांचे निधन ही एक मोठी आपत्ती या काळात आली. तथापि याही परिस्थितीत अनेक गुणवान कलावंतांनी नवे नवे चित्रपट काढून मराठी चित्रसृष्टीचा झेंडा फडकत ठेवण्याचा प्रयत्न केला.

या काळातील पहिला यशस्वी प्रयत्न म्हणून मंगल चित्र या संस्थेच्या जयमल्हार या चित्राचा उल्लेख करता येईल. या संस्थेचे सूत्रधार बाबुराव पेंढारकर होते. हा पहिला ग्रामीण आ लावणीप्रधान चित्रपट होता व तो प्रसिद्धीस येताच लोकां अतोनात कौतुकाने उचलून धरला. पुढील प्रदीर्घ काळा गाजतगर्जत राहिलेल्या मराठी चित्रपटांतील लावणीसंगीता प्रारंभ याच चित्रपटापासून झाला. रामजोशी, होनाजी बा यांच्या तोडीच्या लावण्या लिहिणारे प्रासादिक शाहीर क म्हणून ग. दि. माडगूळकरांचा लौकिक झाला, तोही याच चित्र पटापासून. जयमल्हारपाठोपाठ ग. दि. माडगूळकरांच्या कथा संवादपद्यांनी व शांतारामबापूंच्या निर्मिति-दिग्दर्शनाने गाजले लोकशाहीर रामजोशी हे संपूर्ण तमाशाप्रधान चित्र पडद्या वर आले व प्रदीर्घ काळपर्यंत गाजले.

यानंतरच्या काळात मंगल चित्रने जिवाचा सखा हे ग्रामी चित्र सादर केले व त्या चित्राच्या निमित्ताने राजा परांज सुधीर फडके व सुलोचना हे नवे कलावंत पुढे आले. रा परांजपे यांच्या प्रतिभाशाली दिग्दर्शनाची चमक याच चित्र पटात प्रथम दिसून आली. पुढील काळात मंगल चित्रच्या बरोबरीने दत्ता धर्माधिकारी यांची आल्हाद चित्र व बाळ साहेब पाठकांची माणिक चित्र या दोन चित्रसंस्थाही उत्तमो त्तम चित्रांची निर्मिती करण्यात अग्रेसर होत्या. बाळा जो जो रे स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी, चिमणी पाखरं, अबोली, महात्मा ह आल्हाद चित्रे दत्ता धर्माधिकारी यांच्या कुशल व भावनापू दिग्दर्शनाने; ग. दि. माडगुळकरांच्या कथा-गीतांनी; व पवार यांच्या सुगम संगीताने व सूर्यकांत, उषाकिरण, सुलोच राजा परांजपे, बेबी शकुंतला, इंदिरा चिटणीस, गजानन जागी दार इ. गुणवान नटांच्या अभिनयाने अतोनात लोकप्रिय झाले आल्हादचे बहुतेक चित्रपट हे मध्यमवर्गीय कुटुंबातील भाव प्रधान व करुणरम्य कथाप्रसंगावर आधारित होते. त्यामु त्यांची लोकप्रियताही निश्चित होती.

माणिक चित्र या संस्थेने आपला पहिला चित्रपट मायाबाजा या नावाने महाभारतातील एका रंजक कथाप्रसंगावर उभार त्याचे संगीत सुधीर फडके यांनी दिले होते. हे संगीत आ आबालवृद्ध प्रेक्षकांना एकदम आकर्षित करणारा पौराणि रंजक कथाविषय ही दोन या चित्रपटाची प्रधान आकर्ष होती. माणिकचे दुसरे चित्र पुढचं पाऊल हेही एक वैशिष्ट्यपू चित्र होते. माडगूळकरांची कथा-गीते, राजा परांजपे यांचे अ शय सुरेख व मनोज्ञ दिग्दर्शन, सुधीर फडके यांचे मनमोह लावणीसंगीत आणि जोडीला राजा परांजपे, पु. ल. देशपां ग. दि. माडगूळकर, इ. प्रथम श्रेणीच्या कलावंतांचा स अभिनय या गुणवैशिष्ट्यांमुळे हा चित्रपट विलक्षण लोकप्रि झाला. कोणाही व्यक्तीने आपल्या अंगच्या कलागुणांच्या ब

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर वाटेल त्या क्षेत्रात पुढे यावे, हा या चित्रपटाचा मध्यवर्ती संदेश होता.

यानंतरच्या काळात म्हणजे १९५० पासून १९७० पर्यंतच्या वीस वर्षांत अनेक छोटयामोठ्या कलावंत – तंत्रज्ञांनी काही चांगली व अविस्मरणीय चित्रे सादर केली; परंतु एकूण पाहता या काळात मराठी चित्रसृष्टी अधिकाधिक निष्प्रभ होत गेली. या काळात निर्माण झालेली श्रेष्ठ चित्रे म्हणून राजा परांजपे यांच्या पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, ऊनपाऊस, जगाच्या पाठीवर, हा मार्ग एकला, इ. चित्रपटांची नावे घेता येतील. य. गो. जोशी यांच्या वहिनींच्या बांगड्या या कथेवर आधारित वहिनींच्या बांगड्या याच नावाचा चित्रपट त्यातील कौटुंबिक वातावरणामुळे आणि शांताराम आठवले यांच्या कलात्मक व काव्यात्मक हाताळणीमुळे यशस्वी ठरला. त्यातील वहिनींची भूमिका सुलोचना या अभिनेत्रीने अतिशय हळुवारपणाने पण समर्थपणे उभी केली. मराठी चित्रसृष्टीत ही व्यक्तिरेखा चिरंजीव होऊन राहील. या चित्रपटाचे संगीत सुधीर फडके यांचे होते. वहिनींच्या बांगड्याप्रमाणेच य. गो. जोशी यांच्या

सुलोचना

कथेवर आधारित असा दुसरा चित्रपट शेवग्याच्या शेंगा हाही त्यातल्या कौटुंबिक जिव्हाळ्यामुळे प्रेक्षकांना आवडला. भालजी पेंढारकर यांचा छत्रपती शिवाजी, विश्राम बेडेकर यांचा वासुदेव बळवंत आणि आचार्य अत्रे यांचा महात्मा फुले हे या काळातील तीन उत्कृष्ट चित्रपट होते व ते त्यांत चित्रित केलेल्या व्यक्तींविषयीच्या आदराइतकेच त्यांतील प्रमुख अभिनेत्यांच्या भूमिकांमुळे गाजले होते. छत्रपती शिवाजीच्या भूमिकेत चंद्रकांत या जुन्या व जाणत्या नटाने,वासुदेव बळवंतांच्या भूमिकेत विश्वास कुंटे या नव्या, उत्तम शरीरसौष्ठव लाभलेल्या देखण्या नटाने आणि महात्मा फुले यांच्या भूमिकेत नटश्रेष्ठ बाबुराव पेंढारकरांनी आपले अभिनयकौशल्य प्रकट केले. अमर भूपाळी ही एकच मनोरम व काव्यात्मक पातळीवरील चित्रकथा सादर करून शांतारामबापूंनी आपल्या महान कलाकर्तृत्वाची जाण प्रेक्षकांना या काळात दिली. त्याचे संगीत वसंत देसाई यांनी दिले व ते विशेष लोकप्रिय झाले. शांतारामबापूंच्या दिग्दर्शनातही त्यांचा नेटकेपणा दिसून आला. याशिवाय आचार्य अत्रे यांनी निर्मिलेला श्यामची आई हा चित्रपट या काळातील एक विशेष महत्त्वाचा व राष्ट्रपतींचे प्रथम सुवर्णपदक लाभलेला म्हणून उल्लेखनीय होता. साने गुरुजींच्या मूळ कथेवर चित्रकथेचा साज चढवताना आचार्य अत्रे यांनी आपले सारे कौशल्य पणाला लावले होते.

राजा परांजपे

इ. स. १९५० ते १९७० या वीस वर्षांच्या काळात चित्रसृष्टीला अनेक उत्तमोत्तम कलावंत-तंत्रज्ञांचा लाभ झाला. त्यांत राजा परांजपे, राम गबाले, अनंत माने, राजा ठाकूर, शांताराम आठवले, माधव शिंदे, दिनकर पाटील राजदत्त यांसारखे प्रतिभाशाली व सव्यसाची दिग्दर्शक; ग. दि. माडगूळकर,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यंकटेश माडगूळकर, ग. रा. कामत, मधुसूदन कालेलकर, मधुकर पाठक, पु. ल. देशपांडे यांसारखे उत्कृष्ट पटकथालेखक; पं. महादेवशास्त्री जोशी, पु. भा. भावे, अरविंद गोखले, द. र.

सुधीर फडके

कवठेकर, य. गो. जोशी, इ. समर्थ कथालेखक; सुधीर फडके, वसंत पवार, पु. ल. देशपांडे, वसंत प्रभू, राम कदम, दत्ता डावजेकर यांसारखे संगीतदिग्दर्शक; ग. दि. माडगूळकर, जगदीश खेबुडकर, संजीव, इ. गीतलेखक; ई. महंमद, दत्ता गोर्ले, बाळ बापट, अरविंद लाड, इ. छायालेखक अग्रगण्य होत. या काळात मराठी चित्र-निर्मात्यांनी निरनिराळे कथाविषय हाताळून त्यांत आपले सव्यसाचित्व सिद्ध केले. राजा परांजपे यांचा पाठलाग हा पहिला यशस्वी रहस्यपट होता. अनंत माने यांचा सांगत्ये ऐका हा एकाच थिएटरात एकशे एकतीस आठवडे चालणारा व कथा, संगीत, अभिनय, दिग्दर्शन, इ. गुणवैशिष्ट्यांनी अपूर्व गाजलेला म्हणून उल्लेखनीय होता. प्रपंच हा संपूर्ण उघड्यावर दृश्यीकरण असलेला व समर्थ कथाबांधणीवर आधारलेला चित्रपट याच काळात निर्माण झाला. तथापि दिवसेंदिवस लोकांच्या बदलत्या अभिरुचीमुळे, हिंदी चित्रपटांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे, मर्यादित बाजारपेठेमुळे व पुनरुज्जीवित मराठी रंगभूमीच्या दिग्विजयी घोडदौडीमुळे अत्यंत उज्ज्वल परंपरा असलेली मराठी चित्रसृष्टी निष्प्रभ झाली आहे. [श्री. बाळ चितळे; दादासाहेब फाळके – इसाक मुजावर, १९७०; प्रभात काल – शांताराम आठवले; चित्र आणि चरित्र–बाबुराव पेंढारकर १९६१]

मराठेशाही इ. स. च्या १७ व्या शतकात महाराष्ट्रात छत्रपती शिवाजीमहाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. पुढे पेशवाईत त्या स्वराज्याचे साम्राज्य झाले. इ. स. १८१८ मध्ये पेशवाई बुडाली आणि मराठ्यांच्या साम्राज्याचा अंत झाला. मराठ्यांच्या या सुमारे दीडशे वर्षांच्या राजवटीला मराठेशाही असे म्हणतात. इ. स. १२९६ साली अलाउद्दीन खिलजीने रामदेवराय यादवाचा पराभव केला, तेव्हापासून सुमारे साडेतीनशे वर्षे महाराष्ट्रात मुसलमानांची सत्ता होती. यादवांची सत्ता असतानाच मुसलमानांनी हिंदू मंदिरे पाडून तिथे मशिदी बांधण्याचे आणि हिंदूंना इस्लामची दीक्षा देण्याचे सत्र सुरू केले होते. पण कोणीही या आक्रमणाचा बंदोबस्त करायला पुढे आला नाही. कारण त्याची कोणाला चीड आली नाही. सर्वजण त्याविषयी उदासीनच राहिले. पुढे तीनशे वर्षांनंतर शिवाजीमहाराज जन्माला आले आणि हा दुर्दैवी मनू पालटला. ते स्वराज्यस्थापनेसाठी कटिबद्ध झाले. त्यांनी ते धर्मकार्यच मानले. समर्थ रामदासस्वामींनीही त्याच काळात महाराष्ट्राला स्वधर्माची जाग आणली. अनेक संकटांना तोंड देऊन, अनेक शाहयांशी झुंजून आणि त्या कार्यात विजय मिळवून शिवाजीमहाराज स्वराज्याची स्थापना करण्यात यशस्वी ठरले. स्वराज्य व स्वधर्म यांचा त्यांनी संयोग घडवला. समाजसंघटनेचे तत्त्व म्हणून त्यांनी धर्माची प्रेरणा दिली. त्यांचा हा विचार त्या काळी क्रांतिकारक होता. त्यासाठी त्यांना रूढ धर्मकल्पनांचा उच्छेद करावा लागला. तसे करीत करीत तच मार्ग आक्रमावा लागला. त्यांनी समुद्रगमनबंदीचा निषेध मोडून काढला व सागरतीरावर जागोजाग जलदुर्ग बांधून स्वतःचे आरमार निर्माण केले. पतितांची शुद्धी रूढ धर्मशास्त्राला मान्य नव्हती, ती त्यांनी केली आणि नेताजी पालकर व बजाजी निंबाळकर यांना इस्लाम धर्मातून स्वधर्मात परत घेतले. स्वतःला क्षत्रियकुलावतंस असे म्हणवून घेऊन त्यांनी विधियुक्त उपनयन व राज्याभिषेकही करवून घेतला. नवं साधावे हेच त्यांचे ब्रीद होते. त्यामुळे त्यांना नवे राष्ट्र निर्माण करता आले. सुर्वे, मोरे, सावंत, जेधे, इ. मराठा देशमुख व सरदार विजापूरच्या दरबारचे ताबेदार बनून आपापल्या मुलखातला वसूल पातशाहाकडे भरीत होते. आपल्या वतनापलीकडे त्यांना कसलीच दृष्टी नव्हती. त्यांच्या आपसांत कायमच्या लढायाही चालू होत्या. अशा त्या मराठ्यांना शिवाजीमहाराजांनी नवी दृष्टी दिली, आपण सर्व मराठे एक आहो

CC0. In.Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही भावना त्यांच्या मनात उत्पन्न केली आणि त्यांना संघटित करून स्वातंत्र्याची घोषणा दिली. त्या कार्यात महाराजांना समर्थ रामदासस्वामींचे अत्यंत मोठे साहाय्य झाले. 'शक्तीने मिळती राज्ये,' 'यत्न तो देव जाणावा,' 'मराठा तितुका मेळवावा,' असा प्रवृत्तिधर्माचा उपदेश समर्थांनी महाराष्ट्राला केला आणि तो समाजात प्रसृत करण्यासाठी अनेक मठांची स्थापना केली. संघटनेच्या या नव्या तत्त्वांतूनच महाराष्ट्रात एक महान शक्ती निर्माण झाली. त्या शक्तीचे प्रत्यंतर औरंगजेबाशी झालेल्या स्वातंत्र्ययुद्धात दिसून आले. प्रचंड सेनेसह महाराष्ट्रावर धाड घालणारा तो बलाढ्य बादशहा शेवटी हतबल झाला. तो मराठ्यांना जिंकू शकला नाही.

मराठा सरदारांनी ते स्वातंत्र्ययुद्ध जिंकले खरे; पण त्यानंतर पुन्हा अंतःस्थ यादवी सुरू झाली. ताराबाई व शाहू यांचे दोन पक्ष आपसांत लढू लागले. बरेच सरदार तर मोगलांनाच जाऊन मिळाले. त्यांना स्वराज्य, स्वधर्म, किंवा स्वामी यांपैकी कशाचीही निष्ठा नव्हती. सुदैवाने लवकरच बाळाजी विश्वनाथासारखा कर्ता पुरुष शाहूमहाराजांना मिळाला आणि त्याने त्या विघटित मराठा समाजातून एक संघटित शक्ती निर्माण केली. ती शक्ती इतकी प्रभावी ठरली, की पुढे पेशव्यांना मराठ्यांचे साम्राज्य सर्व हिंदुस्थानात प्रस्थापित करता आले. पहिला बाजीराव, नानासाहेब, थोरला माधवराव हे पेशवे आणि त्यांच्या प्रेरणेमुळे उदय पावलेले असंख्य मराठे सरदार यांनी शिवाजीमहाराजांचे हिंदुपदपातशाहीचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवले. इ. स. १७७० नंतर भारतात मुसलमानांची सत्ता निष्प्रभच नव्हे, तर नामशेष झाली.

पण त्याच काळात भारतात इंग्रजांच्या रूपाने दुसरी एक शक्ती मूळ धरू लागली होती. हळूहळू इंग्रजांनी या भूमीत आपले पाय पक्के रोवले. खर्ड्याच्या लढाईत मराठ्यांनी निजामावर प्रचंड विजय मिळवून साम्राज्यावर कळस चढवला होता. पण लवकरच महादजी, हरिपंत फडके, नाना फडणीस, हे कर्ते पुरुष मरण पावले आणि मराठामंडळ पुन्हा फुटले. त्यामुळे इंग्रजांना डोके वर काढायला उत्तम संधी मिळाली. त्यांच्या सामर्थ्यापुढे फुटीर मराठी सत्ता टिकली नाही आणि मराठेशाही लवकरच नष्ट झाली.

मराठ्यांनी तंजाऊर, कर्नाटकाचा काही भाग, माळवा, गुजरात, ग्वाल्हेर, नागपूर या प्रदेशांत राज्य स्थापले होते. संरक्षण, न्यायदान, करवसुली, बंदोबस्त ही शासनाची कर्तव्ये ते त्या प्रदेशांतच पाहत असत. इतर प्रांतांत ते फक्त चौथाई वसूल करण्यासाठी जात. त्या वेळी लढाई व लूटमार होत असे. त्याचा परिणाम असा झाला, की मराठे केवळ लुटारू आहेत, असा त्या त्या भागातील लोकांचा समज झाला. त्या लोकांनी मराठ्यांना कधीही मनापासून मदत केली नाही, उलट विरुद्ध बाजूलाच ती केली. दुसरे असे की प्रथम दक्षिणेत सर्वत्र दृढ अशी राज्यस्थापना न करता त्यांनी उत्तरेकडे स्वाऱ्या केल्या. त्यामुळे त्यांची शक्ती विभागली गेली.

मराठी साम्राज्य नष्ट होण्याची अनेक कारणे इतिहासपंडितांनी सांगितली आहेत. सवता सुभा करण्याची आकांक्षा, राष्ट्राभिमानाचा अभाव, आपसांतली फूट, मध्यवर्ती सत्तेचा कमकुवतपणा आणि कवाइती लष्कर व सुधारलेली शस्त्रसामग्री यांचा अभाव ही न. चिं. केळकरांच्या मते मराठेशाही बुडण्याची खरी कारणे होत. मराठ्यांच्या साम्राज्यात घटनात्मक राज्यव्यवस्था नव्हती, लष्करात व्यवस्था व शिस्त नव्हती, भौतिक ज्ञानाची आस्था नव्हती, जगप्रवास करण्याची वृत्ती नव्हती, ही कारणे सरदेसाई देतात. खरेशास्त्री यांच्या मते देशाभिमानशून्यता, समूहरूपाने कार्य करण्याची नालायकी, स्वार्थ साधण्याची बेसुमार हाव आणि आळस, हेळसांड, हे दुर्गुण या गोष्टी मराठ्यांच्या राज्यनाशाला कारण झाल्या. कडवा धर्माभिमान, करडी राजनीती, करारीपणा, चिकाटी, निश्चय या गुणांचा अभाव हे कारण शेजवलकरांनी दिले आहे. वतनदारी, सरंजामदारी, उच्च ध्येयनिष्ठेचा व मुत्सद्देगिरीचा अभाव ही कारणे सनगर यांनी दिली आहेत. नित्याची दुही, अव्यवस्थितपणा आणि जुटीने काम करण्याच्या वृत्तीचा अभाव, इ. कारणे मराठ्यांच्या अपकर्षाला कारणीभूत झाली, असे न्या. रानडे यांनी सांगितले आहे. हे सर्व दुर्गुण मराठ्यांच्या ठायी का उद्‌भवले आणि इंग्रजांचे सद्‌गुण का निर्माण झाले नाहीत याचा विचार करून डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे लिहितात—

माझ्या मते अकराव्या बाराव्या शतकापासून त्या वेळच्या धर्मशास्त्रकारांनी जे हिंदुधर्मशास्त्र — खरे म्हणजे अधर्मशास्त्र — समाजात रूढ केले, ते या सर्व अनर्थांच्या बुडाशी आहे. निरनिराळ्या आचार्यांनी उपदेशिलेली ती निवृत्ती, तो पुराणप्रणीत (गीताप्रणीत नव्हे) निष्क्रिय भागवत धर्म, चातुर्वर्ण्य, जातिभेद, अस्पृश्यता ही सनातन विघटक तत्त्वे, ते शब्दप्रामाण्य, तो कर्मवाद, ती शुद्धिबंदी, तो समुद्रगमननिषेध, ती कलियुगकल्पना, ते कर्मकांड, ती व्रतवैकल्ये, ती संसारनिंदा हे ते अधर्मशास्त्र होय. शिवछत्रपती व समर्थ रामदासस्वामी यांनी रूढ धर्मातले हे दोष जाणून त्यांतील बरेच नष्ट करण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे या भूमीत एक अद्‌भुत शक्ती निर्माण झाली; पण त्या दोन महापुरुषांनी घडविलेल्या क्रांतीची तत्त्वे समाजात दृढमूल करून टाकण्याचे कार्य कोणीच न केल्यामुळे त्यांचा प्रभाव उत्तरोत्तर कमी होत गेला. खुद्द शिवछत्रपतींच्या वार-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यंकटेश माडगूळकर, ग. रा. कामत, मधुसूदन कालेलकर, मधुकर पाठक, पु. ल. देशपांडे यांसारखे उत्कृष्ट पटकथालेखक; पं. महादेवशास्त्री जोशी, पु. भा. भावे, अरविंद गोखले, द. र.

सुधीर फडके

कवठेकर, य. गो. जोशी, इ. समर्थ कथालेखक; सुधीर फडके, वसंत पवार, पु. ल. देशपांडे, वसंत प्रभू, राम कदम, दत्ता डावजेकर यांसारखे संगीतदिग्दर्शक; ग. दि. माडगूळकर, जगदीश खेबुडकर, संजीव, इ. गीतलेखक; ई. महंमद, दत्ता गोर्ले, बाळ बापट, अरविंद लाड, इ. छायालेखक अग्रगण्य होत. या काळात मराठी चित्र-निर्मात्यांनी निरनिराळे कथाविषय हाताळून त्यांत आपले सव्यसाचित्व सिद्ध केले. राजा परांजपे यांचा पाठलाग हा पहिला यशस्वी रहस्यपट होता. अनंत माने यांचा सांगत्ये ऐका हा एकाच थिएटरात एकशे एकतीस आठवडे चालणारा व कथा, संगीत, अभिनय, दिग्दर्शन, इ. गुणवैशिष्ट्यांनी अपूर्व गाजलेला म्हणून उल्लेखनीय होता. प्रपंच हा संपूर्ण उघड्यावर दृश्यीकरण असलेला व समर्थ कथाबांधणीवर आधारलेला चित्रपट याच काळात निर्माण झाला. तथापि दिवसेंदिवस लोकांच्या बदलत्या अभिरुचीमुळे, हिंदी चित्रपटांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे, मर्यादित बाजारपेठे-मुळे व पुनरुज्जीवित मराठी रंगभूमीच्या दिग्विजयी घोडदौडी-मुळे अत्यंत उज्ज्वल परंपरा असलेली मराठी चित्रसृष्टी निष्प्रभ झाली आहे. [श्री. बाळ चितळे; दादासाहेब फाळके – इसाक मुजावर, १९७०; प्रभात काल – शांताराम आठवले; चित्र आणि चरित्र–बाबुराव पेंढारकर १९६१]

मराठेशाही इ. स. च्या १७ व्या शतकात महाराष्ट्रात छत्र-पती शिवाजीमहाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. पुढे पेशवाईत त्या स्वराज्याचे साम्राज्य झाले. इ. स. १८१८ मध्ये पेशवाई बुडाली आणि मराठ्यांच्या साम्राज्याचा अंत झाला. मराठ्यांच्या या सुमारे दीडशे वर्षांच्या राजवटीला मराठेशाही असे म्हणतात. इ. स. १२९६ साली अलाउद्दीन खिलजीने रामदेवराय यादवाचा पराभव केला, तेव्हापासून सुमारे साडेतीनशे वर्षे महाराष्ट्रात मुसलमानांची सत्ता होती. यादवांची सत्ता असतानाच मुसलमानांनी हिंदू मंदिरे पाडून तिथे मशिदी बांधण्याचे आणि हिंदूंना इस्लामची दीक्षा देण्याचे सत्र सुरू केले होते. पण कोणीही या आक्रमणाचा बंदोबस्त करायला पुढे आला नाही. कारण त्याची कोणाला चीडच आली नाही. सर्वजण त्याविषयी उदासीनच राहिले. पुढे तीनशे वर्षांनंतर शिवाजीमहाराज जन्माला आले आणि हा दुर्दैवी मनू पालटला. ते स्वराज्यस्थापनेसाठी कटिबद्ध झाले. त्यांनी ते धर्मकार्यच मानले. समर्थ रामदासस्वामींनीही त्याच काळात महाराष्ट्राला स्वधर्माची जाग आणली. अनेक संकटांना तोंड देऊन, अनेक शाहांशी झुंजून आणि त्या कार्यात विजय मिळवून शिवाजीमहाराज स्वराज्याची स्थापना करण्यात यशस्वी ठरले. स्वराज्य व स्वधर्म यांचा त्यांनी संयोग घडवला. समाजसंघटनेचे तत्त्व म्हणून त्यांनी धर्माची प्रेरणा दिली. त्यांचा हा विचार त्या काळी क्रांतिकारक होता. त्यासाठी त्यांना रूढ धर्मकल्पनांचा उच्छेद करावा लागला. तसे करीत करी-तच मार्ग आक्रमावा लागला. त्यांनी समुद्रगमनबंदीचा निषेध मोडून काढला व सागरतीरावर जागोजाग जलदुर्ग बांधून स्वतःचे आरमार निर्माण केले. पतितांची शुद्धी रूढ धर्मशास्त्राला मान्य नव्हती, ती त्यांनी केली आणि नेताजी पालकर व बजाजी निंबाळकर यांना इस्लाम धर्मातून स्वधर्मात परत घेतले. स्वतःला क्षत्रियकुलावतंस असे म्हणवून घेऊन त्यांनी विधियुक्त उपनयन व राज्याभिषेकही करवून घेतला. नवे साधावे हेच त्यांचे ब्रीद होते. त्यामुळे त्यांना नवे राष्ट्र निर्माण करता आले. सुर्वे, मोरे, सावंत, जेधे, इ. मराठा देशमुख व सरदार विजापूरच्या दरबारचे ताबेदार बनून आपापल्या मुलु-खातला वसूल पातशाहाकडे भरीत होते. आपल्या वतनापलि-कडे त्यांना कसलीच दृष्टी नव्हती. त्यांच्या आपसांत का-मच्या लढायाही चालू होत्या. अशा त्या मराठ्यांना शिवाजी-महाराजांनी नवी दृष्टी दिली, आपण सर्व मराठे एक आहो

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही भावना त्यांच्या मनात उत्पन्न केली आणि त्यांना संघटित करून स्वातंत्र्याची घोषणा दिली. त्या कार्यात महाराजांना समर्थ रामदासस्वामींचे अत्यंत मोठे साहाय्य झाले. 'शक्तीने मिळती राज्ये,' 'यत्न तो देव जाणावा,' 'मराठा तितुका मेळवावा,' असा प्रवृत्तिधर्माचा उपदेश समर्थांनी महाराष्ट्राला केला आणि तो समाजात प्रसृत करण्यासाठी अनेक मठांची स्थापना केली. संघटनेच्या या नव्या तत्त्वांतूनच महाराष्ट्रात एक महान शक्ती निर्माण झाली. त्या शक्तीचे प्रत्यंतर औरंगजेबाशी झालेल्या स्वातंत्र्ययुद्धात दिसून आले. प्रचंड सेनेसह महाराष्ट्रावर धाड घालणारा तो बलाढ्य बादशहा शेवटी हतवल झाला. तो मराठ्यांना जिंकू शकला नाही.

मराठा सरदारांनी ते स्वातंत्र्ययुद्ध जिंकले खरे; पण त्यानंतर पुन्हा अंतःस्थ यादवी सुरू झाली. ताराबाई व शाहू यांचे दोन पक्ष आपसांत लढू लागले. बरेच सरदार तर मोगलांनाच जाऊन मिळाले. त्यांना स्वराज्य, स्वधर्म, किंवा स्वामी यांपैकी कशाचीही निष्ठा नव्हती. सुदैवाने लवकरच बाळाजी विश्वनाथासारखा कर्ता पुरुष शाहूमहाराजांना मिळाला आणि त्याने त्या विघटित मराठा समाजातून एक संघटित शक्ती निर्माण केली. ती शक्ती इतकी प्रभावी ठरली, की पुढे पेशव्यांना मराठ्यांचे साम्राज्य सर्व हिंदुस्थानात प्रस्थापित करता आले. पहिला बाजीराव, नानासाहेब, थोरला माधवराव हे पेशवे आणि त्यांच्या प्रेरणेमुळे उदय पावलेले असंख्य मराठे सरदार यांनी शिवाजीमहाराजांचे हिंदुपदपातशाहीचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवले. इ. स. १७७० नंतर भारतात मुसलमानांची सत्ता निष्प्रभच नव्हे, तर नामशेष झाली.

पण त्याच काळात भारतात इंग्रजांच्या रूपाने दुसरी एक शक्ती मूळ धरू लागली होती. हळूहळू इंग्रजांनी या भूमीत आपले पाय पक्के रोवले. खर्ड्याच्या लढाईत मराठ्यांनी निजामावर प्रचंड विजय मिळवून साम्राज्यावर कळस चढवला होता. पण लवकरच महादजी, हरिपंत फडके, नाना फडणीस, हे कर्ते पुरुष मरण पावले आणि मराठामंडळ पुन्हा फुटले. त्यामुळे इंग्रजांना डोके वर काढायला उत्तम संधी मिळाली. त्यांच्या सामर्थ्यापुढे फुटीर मराठी सत्ता टिकली नाही आणि मराठेशाही लवकरच नष्ट झाली.

मराठ्यांनी तंजाऊर, कर्नाटकाचा काही भाग, माळवा, गुजरात, ग्वाल्हेर, नागपूर या प्रदेशांत राज्य स्थापले होते. संरक्षण, न्यायदान, करवसुली, बंदोबस्त ही शासनाची कर्तव्ये ते त्या प्रदेशांतच पाहत असत. इतर प्रांतांत ते फक्त चौथाई वसूल करण्यासाठी जात. त्या वेळी लढाई व लूटमार होत असे. त्याचा परिणाम असा झाला, की मराठे केवळ लुटारू आहेत, असा त्या भागातील लोकांचा समज झाला. त्या लोकांनी मराठ्यांना कधीही मनापासून मदत केली नाही, उलट विरुद्ध बाजूलाच ती केली. दुसरे असे की प्रथम दक्षिणेत सर्वत्र दृढ अशी राज्यस्थापना न करता त्यांनी उत्तरेकडे स्वाऱ्या केल्या. त्यामुळे त्यांची शक्ती विभागली गेली.

मराठी साम्राज्य नष्ट होण्याची अनेक कारणे इतिहासपंडितांनी सांगितली आहेत. सवता सुभा करण्याची आकांक्षा, राष्ट्राभिमानाचा अभाव, आपसांतली फूट, मध्यवर्ती सत्तेचा कमकुवतपणा आणि कवाइती लष्कर व सुधारलेली शस्त्रसामग्री यांचा अभाव ही न. चिं. केळकरांच्या मते मराठेशाही बुडण्याची खरी कारणे होत. मराठ्यांच्या साम्राज्यात घटनात्मक राज्यव्यवस्था नव्हती, लष्करात व्यवस्था व शिस्त नव्हती, भौतिक ज्ञानाची आस्था नव्हती, जगप्रवास करण्याची वृत्ती नव्हती, ही कारणे सरदेसाई देतात. खरेशास्त्री यांच्या मते देशाभिमानशून्यता, समूहरूपाने कार्य करण्याची नालायकी, स्वार्थ साधण्याची बेसुमार हाव आणि आळस, हेळसांड, हे दुर्गुण या गोष्टी मराठ्यांच्या राज्यनाशाला कारण झाल्या. कडवा धर्माभिमान, करडी राजनीती, करारीपणा, चिकाटी, निश्चय या गुणांचा अभाव हे कारण शेजवलकरांनी दिले आहे. वतनदारी, सरंजामदारी, उच्च ध्येयनिष्ठेचा व मुत्सद्देगिरीचा अभाव ही कारणे सनगर यांनी दिली आहेत. नित्याची दुही, अव्यवस्थितपणा आणि जुटीने काम करण्याच्या वृत्तीचा अभाव, इ. कारणे मराठ्यांच्या अपकर्षाला कारणीभूत झाली, असे न्या. रानडे यांनी सांगितले आहे. हे सर्व दुर्गुण मराठ्यांच्या ठायी का उद्भवले आणि इंग्रजांचे सद्गुण का निर्माण झाले नाहीत याचा विचार करून डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे लिहितात–

माझ्या मते अकराव्या बाराव्या शतकापासून त्या वेळच्या धर्मशास्त्रकारांनी जे हिंदुधर्मशास्त्र – खरे म्हणजे अधर्मशास्त्र – समाजात रूढ केले, ते या सर्व अनर्थाच्या बुडाशी आहे. निरनिराळ्या आचार्यांनी उपदेशिलेली ती निवृत्ती, तो पुराणप्रणीत (गीताप्रणीत नव्हे) निष्क्रिय भागवत धर्म, चातुर्वर्ण्य, जातिभेद, अस्पृश्यता ही सनातन विघटक तत्त्वे, ते शब्दप्रामाण्य, तो कर्मवाद, ती शुद्धिबंदी, तो समुद्रगमननिषेध, ती कलियुगकल्पना, ते कर्मकांड, ती व्रतवैकल्ये, ती संसारनिंदा हे ते अधर्मशास्त्र होय. शिवछत्रपती व समर्थ रामदासस्वामी यांनी रूढ धर्मातले हे दोष जाणून त्यांतील बरेच नष्ट करण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे या भूमीत एक अद्भुत शक्ती निर्माण झाली; पण त्या दोन महापुरुषांनी घडविलेल्या क्रांतीची तत्त्वे समाजात दृढमूल करून टाकण्याचे कार्य कोणीच न केल्यामुळे त्यांचा प्रभाव उत्तरोत्तर कमी होत गेला. खुद्द शिवछत्रपतींच्या वार-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सांनाच त्या महाराष्ट्रधर्माची कल्पना आली नाही आणि समर्थांच्या एकाही शिष्याला त्यांच्या प्रवृत्तिधर्माचे आकलन झाले नाही, यापरते दुर्दैव ते काय !

पाहा – भोसले राजवंश, पेशवाई. [हिं. स. सं. वि.]

मरीआई एक क्षुद्र देवता. ही स्वभावाने क्रूर व उग्र आहे. या देवतेच्या निर्मितीसंबंधी अनेक कथा प्रचलित आहेत. त्यांतील काही अशा–

(१) पिरुह नामक ऋषीची नागावली नामक पत्नी होती. ती अत्यंत सुंदर असून पतिव्रता म्हणून प्रसिद्ध होती. तिची ही कीर्ती ऐकून ब्रह्मा-विष्णु-महेशांनी तिची सत्त्वपरीक्षा घ्यायचे ठरविले. देव तिच्याकडे आले असताना त्यांची ओळख न पटल्याने नागावलीने आपल्या पातिव्रत्याच्या सामर्थ्याने तीन्ही देवांचे बालकांत रूपांतर केले. यामुळे देवांना राग आला आणि त्यांनी तिला शाप दिला, की 'तुझे रूप नष्ट होऊन तू कुरूप बनशील.' शापाच्या प्रभावाने नागावलीचे सौंदर्य नष्ट झाले आणि तिच्या मुखावर देवीच्या वणांसारखे वण उमटले. पिरुह ऋषी घरी येऊन पाहातात, तो त्यांना आपली पत्नी कुरूप झालेली दिसली. त्यांनी रागाने तिला बाहेर काढले आणि पुन्हा शाप दिला, की 'तू राक्षसी म्हणून जन्माला येशील आणि लोकांना रोगाने पछाडून आपल्याप्रमाणेच कुरूप बनवीत राहशील.' या शापाचा परिणाम म्हणून नागावली मरिअम्म (किंवा मरीआई)च्या स्वरूपात जन्माला आली. तिच्या अवकृपेला लोक बळी पडू लागले.

(२) एक सुंदर ब्राह्मणकन्या होती. तिच्यावर एका चांडालाची नजर गेली. तो काशीला जाऊन वेद व ब्राह्मणी आचार शिकला. परत येऊन त्याने ब्राह्मणाकडे मुलीला मागणी घातली. ब्राह्मणाला त्याचे कपट कळले नाही व त्याने त्याला मुलगी दिली. पुढे त्यांना मुलेही झाली. काही काळ गेल्यावर त्या मुलीला त्याचे कपट उमगले. तिने ही घटना आईवापांना सांगितली. मुलीला फार राग आला होता. तिने आपल्या नवऱ्याला व स्वतःलाही शाप दिला. त्या शापाने ती झाली मरी व तिचा नवरा झाला रेडा. तिची मुले कोंबडी व बकरी बनली.

(३) मरिअम्म ही जमदग्नी ऋषीची बायको. परशुराम नावाचा तिला एक मुलगा होता. मरिअम्माचे पातिव्रत्य इतके कडक होते, की ती त्या जोरावर घड्याविना पाणी वाहून नेत असे. तिने धुतलेले कपडे वाळेपर्यंत आकाशात अधांतरी राहात असत. एके दिवशी ती स्नान करून घरी चालली असता आकाशातून जाणाऱ्या एका गंधर्वाचे प्रतिबिंब तिने पाहिले. गंधर्वाच्या सौंदर्यावर ती क्षणभर भाळली. क्षणभराच्या या पतनामुळे तिच्या सामर्थ्याला ढळ पोचली. तिने घड्याविना वाहून आणलेले पाणी वाहून गेले. आकाशातील वस्त्रेही खाली पडली. आश्रमात आल्यावर जमदग्नीने तिची ही अवस्था जाणली. त्याने संतापून तिला ठार करण्यासाठी परशुरामाला आज्ञा दिली. आज्ञेप्रमाणे परशुराम तिला घेऊन दूर अरण्यात गेला. तिथे तो आपल्या मातेचा शिरच्छेद करायला निघाला असता मरिअम्मेने टाहो फोडला. तो करुण आक्रोश ऐकून एक परिया (मांग) जातीची स्त्री तिथे आली आणि तिने मरिअम्माला पाठीशी घातले. परंतु परशुरामाने त्या दोघींचीही शिरे उडविली. नंतर तो आश्रमात आला. त्याच्या आज्ञाधारक वृत्तीमुळे जमदग्नी प्रसन्न होऊन त्याला म्हणाला, 'तू हवा तो वर माग.' या संधीचा फायदा घेऊन परशुरामाने आपल्या मातेला पुन्हा जिवंत करण्याचा वर मागितला. जमदग्नीने त्याचे म्हणणे मान्य केले. त्याने थोडे पाणी मंत्रून त्याला दिले. शिवाय एक छडीही दिली. नंतर त्याला सांगितले, की 'तुझ्या आईचे धड व शिर जुळवून त्यावर हे पाणी टाक आणि या छडीने त्याला स्पर्श कर. म्हणजे तुझी आई पुन्हा जिवंत होईल.' परशुराम अरण्यात गेला. आनंदातिरेकाने गोंधळून जाऊन त्याने आपल्या आईच्या धडाला त्या मांग स्त्रीचे शिर जोडले आणि मांग स्त्रीच्या धडाला आपल्या आईचे शिर जोडले व त्यांवर मंत्रजल टाकून, त्यांना छडीने स्पर्श केला. असे करताच त्या शिराधडांची अदलाबदल झालेल्या त्या दोघीही जिवंत झाल्या. ब्राह्मण स्त्रीचे शिर आणि परिया स्त्रीचे धड यांच्या मिळणीतून जिवंत झालेली स्त्री मरिअम्म म्हणून मान्यता पावली. दुसरी स्त्री यल्लम्म झाली.

मरीआईचे देऊळ सामान्यपणे गावाच्या कडेला असते. तिच्या पूजे-अर्चेची व्यवस्था महारमांग यांच्याकडे असते. हिच्या कोपाने पटकी, देवी, कांजिण्या, इ. सांथीचे रोग उद्भवतात, अशी लोकांची समजूत आहे. हिच्या उपासनेत कडुनिंबाच्या पाल्याला फार महत्त्व असते. हा पाला हिच्या उपासनेत का आला यासंबंधीचे स्पष्टीकरण देणारी लोककथा दक्षिणेत प्रचलित आहे. त्या कथेचा गाभा असा–

मरिअम्म ही प्रसिद्ध तमिळ कवी तिरुवल्लुवर याची पत्नी. हा कवी परिया जातीचा होता. मरिअम्माला देवीच्या रोगाने पछाडले होते. ती गावात भिक्षा मागताना हातात लिंबाचे टाळे घेऊन अंगावरील माश्या मारीत असे. पुढे लोक तिलाच देवीच्या रोगाची देवता समजून भजू लागले आणि तिच्या कृत्यात लिंबाचा पाला वापरू लागले.

पोतराज हा मरीआईचा उपासक होय. याच्या मध्यस्थीने देवीला प्रसन्न करून घेतात. गावात जेव्हा पटकीची साथ सुरू होते, तेव्हा मरीआईचा गाडा गावाबाहेर घालविण्यासाठी पोत-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजाला निमंत्रण देतात. गाडा आंब्याच्या लाकडांचा बनवितात. तिच्या मूर्तीही याच लाकडाच्या करतात. एखाद्या मंगळवारी

पोतराज

किंवा शुक्रवारी तो गाडा सीमेपार करण्याचा विधी होतो. गाडा ग्रामसीमेपाशी आला, की सर्व बाजूंनी गाव बांधण्याचा कार्यक्रम होतो. गाव बांधणे म्हणजे गावात शिरणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर नारळ व अंडी पुरून त्याजागी एक लाकडी खुंटी ठोकणे होय. अशा तऱ्हेने हा कार्यक्रम झाला, की आईचा गाडा डोक्यावर घेतात. या वेळी पोतराज व इतर महार मंडळी 'मरीआईचा चांग भले' असा घोष करतात. हा घोष करीत असताना पोतराज काही गाणीही म्हणत असतात. त्यांतील एक गाणे असे–

> आलीया मरीबाई निचळ सोनियाची
> गावाला ताकीद इच्छा आंबील बोणियाची
> खंडीची आंबील मरिआईला झाली थोडी
> भोळा हा भगत परभार हात जोडी
> निघाली मरीबाई संग पोतराज नटल्यात
> शिंग-वाक्या हलग्यांत दारी गज्जर उठतात

अशा तऱ्हेचा कार्यक्रम चालू झाला, की शेजारच्या गावची मंडळी आईचा गाडा आला असे समजतात. नंतर ते तो गाडा पुढच्या गावी पोचता करण्याच्या तयारीला लागतात. हा कार्यक्रम म्हणजे जरी-मरीची जत्रा असे काहींचे मत आहे.

मरीआईच्या उपासनेत रेडा बळी देण्याचा एक उग्र विधी असतो. हा विधी रेडेजत्रा या नावाने ओळखला जातो. प्रथम काही दिवस देवीच्या नावाने एक रेडा सोडण्यात येतो. थोड्या दिवसांत तो गावभर मोकाटपणे खाऊन खाऊन माजतो व मग गावाला उपद्रव देऊ लागतो. असे झाले, की मग त्याला बळी देण्याचा कार्यक्रम होतो. त्याचे शिर देवीपुढे पुरतात आणि धडाचे मांस महार मंडळी शिजवून खातात. हा विधी बऱ्याच काळापासून होत असावा, असे वाटते. या देवीचे जत्रा-उत्सव सामान्यतः आषाढ मासातच होतात.

ही देवता कडक असून, तिचे उपासनाविधीही उग्र आहेत. म्हणून हिला कडकलक्ष्मी असेही म्हणतात. काही लोक हिला केवळ लक्ष्मीआई, तर काहीजण कृष्णाची बहीण म्हणूनही ओळखतात. पाहा – कडकलक्ष्मी, पोतराज. [म. लो. उ.; गा. दै.; म. ग्रा. स.; गां. गा.; ए. हो. रा.; म. का. स.].

मरीचसप्तमी एक काम्य व्रत. चैत्र शुद्ध सप्तमीला या व्रताचा प्रारंभ करतात. सूर्यपूजा हा या व्रतातला प्रमुख विधी होय. उद्यापनाच्या वेळी ब्राह्मणभोजन घालतात. या वेळी त्यांना शंभर मरीचे (मिरी) 'ॐ खखोल्काय स्वाहा' असा मंत्र म्हणून खायला सांगतात. राम-सीता, नलदमयंती यांनी हे व्रत केले होते, अशी कथा आहे. फल–प्रियजनांचा विरह टळणे. [हि. ध.]

मरीची (१) एक प्रजापती. हा स्वायंभुव मन्वंतरात ब्रह्मदेवाच्या डोळ्यापासून उत्पन्न झाला. हा दक्षाचा जावई आणि शिवाचा साडू होय. दक्षकन्या संभूती ही याची पत्नी असून, संभूतीपासून याला पूर्णमास नावाचा मुलगा आणि कृष्टी, वृष्टी, त्विषा व उपचिती अशा चार मुली झाल्या. स्वायंभुव मन्वंतरातील सप्तर्षींमध्ये याची गणना करतात. ब्रह्मदेवाने याला अठरा पुराणे सांगितली. इंद्राच्या अश्वमेधाचे पौरोहित्य यानेच केले. भगवंताचा त्रिविक्रम अवतार पाहायला हा आला होता. हा वेन राजाच्या कारकिर्दीत प्रमुख ऋषी होता. वेनाला ठार मारण्यात हाच प्रमुख होता. दक्षयज्ञात हा उपस्थित होता. दक्षाने शिवाचा अपमान केल्यामुळे शिवाने याला जाळून टाकले.

भागवतमते याला दोन बायका होत्या. एक कर्दम-कन्या कला व दुसरी ऊर्णा. कलेपासून याला कश्यप व पूर्णिमा नावाची दोन मुले झाली आणि ऊर्णेपासून स्मर, उद्गीथ, परिष्वंग, क्षुद्रभृत व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घृणी. अग्निष्वात्त नामक पितर हेही याचेच पुत्र होत.[प्रा.च.को.]

(२) वैवस्वत मन्वंतरात याला ब्रह्मदेवाने अग्नीपासून उत्पन्न केले. याला कश्यप हा मुलगा व सुरूपा ही कन्या अशी दोन मुले झाली. इंद्रप्रस्थातील सात तीर्थांत स्नान केल्यामुळे याला सात मुले झाली, असेही म्हटले आहे. प्रातःस्मरणात याचे नाव येते. [प्रा. च. को.]

(३) एक धर्मशास्त्रकार. विज्ञानेश्वर, अपरार्क व देवण्णभट्ट यांनी आह्निक, आशौच, श्राद्ध, प्रायश्चित आणि व्यवहार या विषयांसंबंधी मरीचीला प्रमाण मानले आहे. अपरार्काने तर्पणासंबंधी याचे बरेच श्लोक दिले आहेत.

स्थावर मिळकतीचे खरेदीखत, गहाणखत, वाटणीपत्र वा बक्षीसपत्र यांचे व्यवहार दस्तऐवज झाल्याखेरीज पूर्ण होत नाहीत, असे याचे मत आहे. जर एखाद्याने व्यापाऱ्यासमक्ष, सरकारी अधिकाऱ्याच्या संमतीने, दिवसा एखादी मालमत्ता खरेदी केली आणि नंतर, खरेदी केलेली मालमत्ता दुसऱ्याची आहे, असे कळून आले, तर खरेदी करणारा दोषी ठरत नाही. त्याला त्याचे पैसे परत मिळतात. हे पैसे वसूल न होतील तर ते मूळ मालक व खरेदीदार यांत विभागावे, असे याचे प्रतिपादन आहे. अपरार्काने याचा आशौचावरील एक गद्य उताराही दिला आहे. श्रावण व भाद्रपद महिन्यांत नदीत स्नान करू नये असे मरीचीने सांगितले आहे. [प्रा. च. को.; हि. ध.]

मरीयू गुजरात प्रदेशातील एक लौकिक विधी. याला अडघो बडघो असेही दुसरे नाव आहे. धान्याला कीड लागू नये म्हणून हा विधी आश्विन अमावास्येला करतात. या दिवशी एक माणूस चूड पेटवून हातात घेतो आणि दुसरा हातात मडके घेऊन ते एका काठीने वाजवतो. हे दोघे घराच्या प्रत्येक भागात व गुरांच्या गोठ्यात फिरतात, त्या वेळी 'अडघो जाऊ दे, बडघो जाऊ दे' असा मंत्र म्हणतात. अखेरीस गावाच्या शिवेवर जाऊन ती चूड, मडके व काठी तिथे टाकतात. हा विधी म्हणजे घरातल्या अलक्ष्मीचे निस्सारण होय. [लौ. दं.]

मरुद्गण वेदांतील एक देवतागण. ऋग्वेदात मरुतांचे स्थान बरेच महत्त्वाचे आहे. ऋग्वेदातील तेहतीस सूक्ते यांना उद्देशून आहेत. मरुत हे नेहमी गण करून राहतात. त्यांची संख्या एकशे ऐंशी किंवा एकवीस आहे. त्यामुळे त्यांचा उल्लेख नेहमी बहुवचनातच होतो. सर्व मरुत हे दिसायला सारखे आहेत. त्यांचे वर्णन करताना म्हटले आहे, ते असे–

ते अज्येष्ठा अकनिष्ठास उद्भिदो अमध्यमासो महसा विवावृधुः ।
(ऋ. ५.५९.६)

अर्थ – ते मरुत मोठे नाहीत, लहान नाहीत किंवा मध्यम नाहीत. ते आपल्या महान शक्तीने वाढले आहेत.

सर्व मरुतांचा वेष सारखाच असतो. त्यांच्या छातीवर पदके व गळ्यांत माळा चमकत असतात. त्यांच्या पायांत अलंकार असतात. सर्वांची शस्त्रास्त्रेही सारखी असतात. त्यांच्या हातांत कुऱ्हाड व धनुष्य आणि खांद्यावर भाले असतात. त्यांच्या मस्तकांवर सोनेरी शिरस्त्राणे असतात.

मरुतांचे रथ चार प्रकारचे आहेत. त्यांच्या काही रथांना घोडे जोडलेले असतात, तर काहींना हरिणी जोडलेल्या असतात. त्यांचे काही रथ घोडे न जोडताच वेगाने दौडतात; तर काही आकाशात उडतात.

मरुत हे देवांचे सैनिक आहेत. ते देवशत्रूंचा पुरा बीमोड करतात. ते ज्ञानी, दूरदर्शी व कवी आहेत. वृत्रवधाच्या वेळी त्यांनी इंद्राला साहाय्य केले होते.

ते रुद्राचे पुत्र असून, पृश्नी ही त्यांची माता आहे. रोदसी ही त्यांची भार्या होय. मरुतांचे एक मुख्य कार्य म्हणजे पर्जन्यवृष्टी करणे हे आहे. सागरातून वर जाऊन ते पाऊस पाडतात. मेघ, विद्युत व सोसाट्याचा वारा यांच्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे.

वैदिकोत्तर काळात मरुत हे दिती व कश्यप यांचे पुत्र मानले गेले आहेत. त्यांची संख्या एकुणपन्नास आहे. श्वसन, स्पर्शन वायू, मातरिश्वा, सदागती, महाबल, बलवर्धन, पृषदश्वक, गंधवह, गंधवाहक, आशुग, सुमुख, कर्कर, समीरण, इ. त्यांची नावे आहेत. दितीचे पुत्र विष्णूने मारले; म्हणून दितीने कश्यपाजवळ वर मागितला, की मला इंद्राला मारणारा व अमर असा पुत्र होऊ दे. त्याप्रमाणे कश्यपाने तिला वर दिला; पण त्याचबरोबर तिची बुद्धी पालटावी, म्हणून तिला एक व्रतही करायला सांगितले. त्याप्रमाणे ती व्रत आचरू लागली. त्या वेळी तिला जो गर्भ राहिला, तो आपल्याला मारील या भीतीने इंद्र तिच्या जवळ साधुवेषाने राहिला आणि तिच्या व्रतात न्यून शोधू लागला. त्याप्रमाणे एक दिवस त्याला न्यून सापडले आणि योगबलाने तो तिच्या पोटात शिरला. त्याने तिच्या गर्भाचे सात तुकडे केले. पण ते सात तुकडेही जिवंत राहिलेले पाहून इंद्राने पुन्हा प्रत्येकाचे सात तुकडे केले. त्यामुळे ते एकूणपन्नास तुकडे स्वतंत्र जीव होऊन रडू लागले. तेव्हा इंद्र त्यांना 'मा रोदीः' = रडू नका, असे म्हणाला. त्यावरून त्यांना 'मरुत' असे नाव पडले. मारण्याचा प्रयत्न करूनही हे मरत नाहीत, तेव्हा हे देवाचे अंश असले पाहिजेत, असे म्हणून त्यांना इंद्राने आपले भाऊ मानले आणि ते जन्मल्यावर त्यांना तो स्वर्गात घेऊन गेला. मी एकाच पुत्रासाठी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्रत केले असता, मला एकुणपन्नास मुले कशी झाली, असे दितीने साधुवेषधारी इंद्राला विचारले. तेव्हा इंद्राने झाला प्रकार तिला सांगितला व तुझ्या तपःप्रभावाने ते वाचले, असे सांगून त्याने तिची क्षमा मागितली.

रामायणात यापेक्षा थोडी निराळी कथा आहे – इंद्राच्या सेवेने दिती संतुष्ट झाली आणि त्याला म्हणाली, की तुला मारणारा पुत्र व्हावा, अशी मी इच्छा केली होती हे खरे; पण तोच पुत्र तुला मदत करील, असे आता मी पाहीन. तरीही इंद्र तिच्या गर्भाचे तुकडे करू लागला. तेव्हा तिने त्याला तसे न करण्याची विनंती केली. पण इंद्राने गर्भाचे सात तुकडे केले व मग तिची क्षमा मागितली. तिने इंद्राला क्षमा केली व आपल्या पुत्रांनी वायूच्या सात प्रवाहांत संचार करावा, अशी इच्छा व्यक्त केली. ती तिची इच्छा पूर्ण झाली.

मरुतांचे सात गण असून, पृथ्वी, सूर्य, सोम, ज्योतिर्गण, ग्रह, सप्तर्षिमंडळ व ध्रुव अशी त्यांची संचारस्थाने आहेत.

यांच्या मूर्ती करण्याविषयी हेमाद्रीने सांगितले आहे, ते असे – ते चतुर्भुज असावे व त्यांच्या चारही हातांत आयुधे असावी. त्यांचे डोळे लाल व भुवया कुटिल असाव्या. ते तरुण व हरिणारूढ असावे. त्यांच्या अंगावर अलंकार असावे. त्यांचा वर्ण धूसर व वस्त्र शवल असावे. [प्रा. च. को.; च. व. चिं.; ऋ. द.; वै. सा. सं.; हि. वि. को.; म. ज्ञा. को.–वेदविद्या]

मरुद्व्रत एक काम्य व्रत. चैत्र शुद्ध सप्तमीला या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. व्रतविधी असा – षष्ठीला उपवास आणि सप्तमीला ऋतूंची पूजा. व्रतधारी व्यक्तीने प्रथम सात ओळी तयार कराव्या. प्रत्येक ओळीत चंदनाच्या गंधाने सात मंडले काढावी. पहिल्या ओळीमध्ये एकज्योतीपासून सप्तज्योतीपर्यंत सात नावे घालावी. प्रत्येक ओळीत निरनिराळी नावे असावी. एकुणपन्नास दिवे लावावे. कारण मरुत हे सात किंवा एकुणपन्नास मानलेले आहेत. नंतर होम करून ब्राह्मणभोजन घालावे. उद्यापनाच्या वेळी नवीन वस्त्रे व एक गाय दान द्यावी. फल – संतती, संपत्ती, आरोग्य, विद्या व स्वर्ग यांचा लाभ. [हि. ध.]

मरुमक्कतायम केरळ प्रदेशातील नायर जातीची वारसापद्धती. या पद्धतीत वारसाहक्क मुलाकडे न जाता मुलीकडे जातो. या पद्धतीत तरवाड म्हणजे संयुक्त कुटुंब असते. या कुटुंबाची सर्व मालमत्ता सर्वांच्या मालकीची असते. कुटुंबातील प्रत्येक घटकाला या संपत्तीमधून निर्वाहापुरते मिळते; पण वाटणी मिळत नाही. तरवाडमधील सर्व व्यक्तींची संमती असेल तरच संपत्तीची वाटणी करता येते.

तरवाडमधील सर्वांत ज्येष्ठ पुरुषाला कारणवान असे म्हणतात. तरवाडच्या संपत्तीवर देखरेख ठेवण्याचा अधिकार त्याला असतो. मात्र संपत्तीची विल्हेवाट करताना त्याला सर्वांची संमती घ्यावी लागते. कारणवानाच्या पत्नीला अम्माई म्हणतात. हिचा कुटुंबव्यवस्थेवर खूप प्रभाव असतो; पण तिला किंवा तिच्या मुलांना मालमत्तेवर हक्क नसतो.

नायर कुटुंबाची मालमत्ता विभागली न जाता पिढ्यान् पिढ्या एकत्रित राहावी, या हेतूने ही वारसापद्धती निर्माण झाली, असे म्हणतात. ही पद्धती फार प्राचीन आहे, असा अनेकांचा दावा आहे. पण श्री. पी. टी. श्रीनिवास अय्यंगार यांच्या मते ही पद्धत इ. स. च्या दहाव्या शतकापूर्वी केरळमध्ये ज्ञात नव्हती; तर श्री. के. पी. पद्मनाभ मेनन यांच्या मते ती तेराव्या शतकापूर्वी नव्हती. चवदाव्या शतकापूर्वीच्या एकाही प्रवाशाने या पद्धतीचा उल्लेख केलेला नाही. चवदाव्या शतकाच्या प्रारंभीच इथे आलेल्या जोर्दनुस या परकीय प्रवाशाने प्रथमच या पद्धतीचा उल्लेख केला आहे. म्हणजे तेराव्या शतकात केरळमध्ये मक्कतायम ही पद्धती होती, असे बहुतेकांचे अनुमान आहे. पित्याच्या संपत्तीचा वारसा पुत्राला मिळणे या पद्धतीला मक्कतायम म्हणतात. ही पद्धती इतरत्र प्रचलित आहे. श्री. ए. कुंजन पिल्लै म्हणतात, की इ. स. च्या अकराव्या शतकात केरळात नंपूतिरींचे धार्मिक व राजकीय वर्चस्व निर्माण झाल्यामुळे ही पद्धती अस्तित्वात आली. पाहा – नायर. [त्रिवेंद्रम गॅझे.]

मरोरी एक जमात. या लोकांची वस्ती भंडारा व छिंदवाडा जिल्ह्यांत, तसेच वऱ्हाडातील काही भागांत आढळते. मरोरी हा शब्द मारवाडी या शब्दाचा अपभ्रंश असावा. छिंदवाडा जिल्ह्यात यांना छत्री म्हणून आणि तरोरा तालुक्यात अलकरी म्हणून ओळखतात. मरोरी लोक आपल्याला राजपूत मानतात, पण राजपुतांच्या बहुतेक चालीरीती यांनी सोडल्या आहेत. अजून यांचा पोशाख मात्र काही अंशी राजपुतांसारखा असतो. परिहार, राठोड, सिसोदिया अशी यांची आडनावे आहेत.

यांच्यांत सगोत्र विवाह होत नाहीत. जातीत मुलींची संख्या कमी असल्याने यांना वधूसाठी बरीच किंमत द्यावी लागते. मात्र असा पैसा घेणे हे प्रतिष्ठितपणाचे समजले जात नाही. यांना विधवाविवाह मान्य आहे; पण घटस्फोट मान्य नाही.

यांच्यांत कोणी गाय किंवा मांजर चुकून मारले, तर त्याला त्या प्राण्याची सोन्याची मूर्ती करून ब्राह्मणाला दान द्यावी लागते. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मर्कुला एक देवी. हिमालयाच्या चंबा प्रदेशात ब्रह्मौर गावाच्या जवळ असलेल्या उदेपूर गावी हिचे स्थान आहे. ही बर्मन घराण्यातील लोकांची देवी असावी. कारण मेरुवर्मा नामक राजाने या देवीचे लाकडी मंदिर बांधले, असे कळते. या मंदिराचे छप्पर त्रिकोणी असून, त्यात गुप्तशैलीचे दर्शन घडते, असे शिल्पशास्त्रज्ञांचे मत आहे. मंदिराचा दर्शनी भाग मात्र काश्मीरी शैलीचा आहे. मंदिरात शिव–पार्वती, विष्णू व लोकपाल यांच्या मूर्ती असून, रामायण व महाभारत यांतील काही प्रसंगांची चित्रेही कोरलेली आहेत. [देवीकोश ३]

मर्दनशास्त्र आरोग्यरक्षणासाठी उपयुक्त असे एक शास्त्र. शरीराच्या निरनिराळ्या भागांना तेल किंवा दुसरे एखादे स्निग्ध द्रव्य लावून चोळणे, असे त्याचे स्वरूप आहे. मानवी शरीराला अंतर्बाह्य स्नेहनाची म्हणजे तेलातुपाची अत्यंत आवश्यकता असते. कारण हा देह स्नेहसार आहे, असे आयुर्वेदात सांगितले आहे–

स्नेहश्च धातून् संशुष्कान् पुष्णात्याशु प्रयोजितः ।
बलमग्निबलं पुष्टिं प्राणांश्चास्याभिवर्धयेत् ।।

अर्थ – शुष्क धातूही त्यांना तेल दिल्याने पुष्ट होतात. तसेच त्यामुळे अग्निबल वाढते व प्राणही बलवान होतात.

शरीराची झीज भरून काढून, एकंदरीत सर्व शरीरव्यापार सुधारण्यासाठी दुसऱ्याकडून करून घेतलेल्या मर्दनाला संवाहन असे नाव आहे. त्यामुळे शरीरातील स्थूल व सूक्ष्म स्रोतसे मोकळी होतात व त्यांतील वहनकार्य चांगल्या रीतीने चालू होते. त्याचा परिणाम म्हणून शरीराची व मनाची कार्यक्षमता व रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि निरामय दीर्घायुष्य प्राप्त होते.

संवाहनाचे विविध प्रकार आहेत. देहदृष्ट्या त्याचे सार्वदेहिक, पृष्ठवंशरज्जूचे व स्थानिक असे तीन भेद होतात–

सार्वदेहिक – सार्वदेहिक म्हणजे सर्व देहाचे संवाहन. हे स्वास्थ्यरक्षणासाठी बहुमोल आहे. नित्य नियमाने अंगाला तेल चोळल्यास तारुण्य व ताकद दीर्घ काळ टिकते. मस्तक व तळपाय यांना तेल चोळल्याने दृष्टी चांगली राहते, केस काळेभोर राहतात, झोप चांगली येते व डोकेदुखी उद्भवत नाही. कानांतही मधून मधून तेल घातल्याने कर्णरोग होत नाहीत व म्हातारपणीही नीट ऐकू येते. अशक्त मुले, बाळबाळंतीण व वृद्ध यांना संवाहन उपयुक्त आहे. आजारानंतर येणाऱ्या अशक्तपणात, पित्तामुळे हातापायांची आग होत असता किंवा अतिश्रम, स्त्रीसंगजन्य दौर्बल्य, निद्रानाश, लठ्ठपणा, किरकोळ अंगकाठी, वातप्रकृतिजन्य सर्वांगरुक्षता, इत्यादींत सार्वदेहिक संवाहन अत्यंत उपयुक्त आहे.

पृष्ठवंशरज्जू – शरीरशास्त्रदृष्ट्या हा पृष्ठवंशरज्जू किंवा मेरुदंडच आपल्या अस्थिमय सांगाड्याचा मुख्य आधार असतो. या बत्तीस मणक्यांच्या साखळीतून निघणाऱ्या एकतीस नसनाड्यांच्या जोड्यांचे जाळे सर्व शरीरभर पसरलेले असते. योगशास्त्रदृष्ट्या सुषुम्ना, इडा, पिंगला व षट्चक्रे यांचा मुख्य आधारही हाच आहे. तसेच नाभिकमलातून चौवीस धमन्या प्रसृत होतात, असे आयुर्वेद सांगतो. अशा महत्त्वाच्या भागाला केलेले मर्दन हे सर्व अंगोपांगांना पुष्ट करते. ज्यांना सार्वदेहिक संवाहन सहन होत नाही, अशा अशक्त व्यक्तींना व आजारानंतर येणाऱ्या अशक्तपणात बोटांनी मेरुदंडाला केलेले संवाहन उपयुक्त ठरते. मेरुदंडाचे मान, पाठ, कंबर, त्रिकास्थी व शेपूट असे पाच भाग आहेत. पुढच्या बाजूने याच भागात गळा, छाती, पोट, ओटीपोट हे अवयव आहेत. पंचप्राणांपैकी उदान, समान व अपान ही वातत्रयी गळा, छाती, पोट व ओटीपोट या विभागात आहे. तेव्हा त्यांच्या विकृतीवर मेरुदंडाचे संवाहन हे फार उपयुक्त आहे. बद्धकोष्ठ, मूत्रकृच्छ्र, स्वप्नावस्था, स्त्रियांच्या मासिक पाळीच्या तक्रारी, अग्निमांद्य, अन्नद्वेष, दमा, इ. विकारांवर मेरुदंडसंवाहनाचा चांगला उपयोग होतो.

स्थानिक – कंबर लचकणे, मान अवघडणे, उसण भरणे, हातपाय मुरगळणे, हातापायांना मुंग्या येणे, मुका मार बसणे, इ. विकृतींत स्थानिक संवाहन लाभदायक ठरते. त्यामुळे रसरक्तादींचे अभिसरण सुधारते व लाभ होतो.

स्थानिक संवाहनाचे शिरःपूरण, नासापूरण, कर्णतर्पण, अक्षिपीडन व प्रतिसारण असे भेद आहेत.

शिरःपूरण – लहान मुलांची टाळू भरण्याची प्रथा आपल्याकडे आहे. मोठेपणी कवटीची हाडे पूर्णपणे कल्कमय झाल्यावरही डोक्याला तेल चोळणे इष्ट आहे. मनःक्षोभ, निद्रानाश, रक्तदाबवृद्धी, इ. विकारांवर शिरःपूरण उपयुक्त आहे.

नासापूरण – नाक हे मस्तकाचे द्वार आहे. त्याचे इतके महत्त्व असल्यामुळे त्यात वेळोवेळी तेल सोडणे हितावह आहे. जुनाट पडसे, दमा, अर्धशिशी, डोकेदुखी, इ. विकारांवर नासापूरण व नस्य उपयुक्त आहे.

कर्णतर्पण – कानात आवाज येणे, वारंवार मळाचे खडे होणे, बहिरेपणा, कान दुखणे, इ. तक्रारींवर कानात तेल अवश्य घालावे.

दंतमांससंवाहन – हिरड्या सुजणे, त्यांतून रक्त किंवा पू येणे, त्या शिवशिवणे, इ. विकारांवर स्थानिक संवाहन अत्यंत उपयुक्त आहे.

संवाहनाचे द्रव्यगुणदृष्ट्या बृंहणात्मक, कर्षणात्मक, सदाह व रुक्ष असे चार भेद आहेत. अशक्तांना शक्ती यावी, यासाठी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बदामाच्या तेलासारखी तुष्टिपुष्टिदायक तेले संवाहनासाठी वापरतात. शीत, स्निग्ध व मधुररसात्मक द्रव्येच या कामी वापरण्याची पद्धत आहे. हे बृंहणात्मक संवाहन होय. मेद कमी करण्यासाठी जे मर्दन करतात, ते कर्षणात्मक होय. त्यासाठी मोहरी, वेखंड यांसारखी उष्णवीर्य, तीक्ष्ण व कटुरसात्मक द्रव्ये वापरतात. तीव्र वेदना असल्यास बिब्व्यासारख्या दाहक द्रव्याचा उपयोग करतात. त्यामुळे वेदना कमी होते. पित्तप्रकृती असलेल्या व्यक्तीने मात्र बिब्याचा उपयोग अजिबात करू नये, असे आयुर्वेदात सांगितले आहे. फार घाम येणे, स्थूलपणा असणे, अशा विकारांत ओवा, तुळस, कडुनिंब, इ. द्रव्यांचे चूर्ण वा कल्क लावून रुक्ष संवाहन करतात.

मर्दन करण्याचे काही नियम आहेत, ते असे –(१) हातपाय किंवा मेरुदंड यांचे मर्दन करताना खालून वर म्हणजे हृदयाकडे मर्दनाची दिशा व गती ठेवतात. (२) मोठे सांधे, पोट किंवा कटिविभाग यांचे मर्दन करताना बोटांची गती चक्राकार असते व दिशा घड्याळाच्या काट्याप्रमाणे डावीकडून उजवीकडे असते. (३) तळहात, तळपाय किंवा बोटे यांचे मर्दन करताना तर्जनी खाली व अंगठा वर अशी फक्त दोन बोटे वापरतात. (४) पृष्ठवंशरज्जूचे मर्दन करताना, संबंधित व्यक्तीला पालथे निजवून त्रिकास्थीच्या कोणात चमचाभर कोमट तेल सोडतात व ते हातांच्या तळव्यांनी खालून वर मानेपर्यंत सावकाश लावतात. मग मेरुदंडाच्या बाजूचा भाग तळव्यानेच खालून वर चोळतात. (५) मर्दन हे नेहमी सुखावह झाले पाहिजे. त्यासाठी मर्दनातील दाब, भार व ताण या क्रिया तारतम्याने वापराव्या लागतात.

कोणताही ताप, खोकला, न्युमोनिया, संधिवाताची तीव्र किंवा मध्यम अवस्था, क्षय, आमवात, त्वचारोग, आनुवंशिक रोग, स्त्रियांची मासिक पाळी, गळवे, व्रण किंवा सूज असताना संवाहन करू नये.

'मर्दनं गुणवर्धनम्' – मर्दन हे आरोग्यवर्धक आहे, असे म्हटलेले आहे. त्यामुळे शरीरातील रक्तादी प्रवाहांचे अभिसरण सुधारते, चेतनसंस्था जास्त कार्यक्षम होते, पचनक्रिया सुधारून खाल्लेले अंगी लागते व उत्सर्जनही सुधारते आणि मुख्य म्हणजे त्वचेचे कार्य सुधारून प्रतिकारशक्ती वाढते.

भारतात प्राचीन काळापासून मर्दनाची क्रिया लोकांना माहीत आहे. शतपथ ब्राह्मणात (१२-८-३-१६) सौत्रामणी यागाच्या वेळी यजमानाला अभिषेक करण्यापूर्वी सुगंधी द्रव्याने त्याच्या अंगाला मर्दन करीत, असा उल्लेख आहे. शतपथ ब्राह्मणाचा काळ सनपूर्व सुमारे १००० वर्षे एवढा मानलेला आहे.

त्यानंतर मानवगृह्यसूत्र (९-२६), शांखायनगृह्यसूत्र (४-७) कौषीतकी गृह्यसूत्र (३-९), कौटिलीय अर्थशास्त्र (१-२१), विष्णुस्मृती (३२-६), मनुस्मृती (२-२०९,२११), इ. धर्मग्रंथांत उत्सादन म्हणजे मर्दन याचे उल्लेख आलेले आहेत.

जैनांच्या आचारांगसूत्रात, जैन श्रमण किंवा भिक्षुणी यांनी, ज्या घरात गृहस्थ व त्याची पत्नी एकमेकांच्या अंगाला तेल, तूप किंवा लोणी लावून मर्दन करीत असतील, त्या घरात राहू नये, असे सांगितले आहे (२-२-३). आचारांगसूत्रातील आणखी एका उल्लेखावरून (२-२-१) असे कळते, की त्या काळात (सनपूर्व ३ रे शतक) आरोग्यासाठी व गुडघेदुखी, अतिसार, इ. विकारांसाठीही मर्दनाचा उपयोग करीत.

बौद्धांच्या चुल्लवग्ग या ग्रंथात बौद्ध भिक्षूंना अंगमर्दनाची मनाई केलेली आढळते.

चरकसंहितेत (१-१५) दवाखान्यासाठी चांगल्या संवाहकाची जरूरी असते, असे सांगितले आहे. सुश्रुतसंहितेतील चिकित्सास्थानात औषधिद्रव्य म्हणून तिळाचे तेल व गाईचे तूप यांचा संवाहनासाठी उपयोग करावा, असे सांगितले आहे.

यानंतरही अनेक ग्रंथांतून संवाहनाचे उल्लेख आलेले आहेत. चौसष्ट कलांमध्ये संवाहनकलेचा समावेश केलेला आहे. वात्स्यायनाच्या कामसूत्रांवरील टीकाकार यशोधर याने पायांनी करायचे मर्दन व हातांनी करायचे मर्दन, असे मर्दनाचे दोन प्रकार सांगितले आहेत. पायांनी करायच्या मर्दनाला उत्सादन असे नाव आहे आणि केशमर्दन सोडून इतर अंगाला केलेल्या मर्दनाला संवाहन म्हटलेले आहे.

वाग्भटाने आपल्या अष्टांगहृदयात व्यायामानंतर सर्व देहाचे मर्दन करावे, असे सांगितले आहे. याविषयी सुश्रुत म्हणतो–

> व्यायामस्विन्नगात्रस्य पद्भ्यामुद्वर्तितस्य च ।
> व्याधयो नोपसर्पन्ति सिंहं क्षुद्रमृगा इव ।।
>
> (चिकित्सास्थान २४·४३)

अर्थ – व्यायामामुळे ज्याच्या अंगाला घाम आला आहे आणि ज्याने आपल्या अंगाचे पायांनी मर्दन करून घेतले आहे, त्याच्या जवळ, सिंहाकडे ज्याप्रमाणे क्षुद्र पशू, त्याप्रमाणे व्याधी फिरकत नाहीत.

मल्लपुराण नामक एका हस्तलिखित ग्रंथात उद्वर्तन म्हणजे मर्दन हे बारा प्रकारे शरीराला उपयुक्त आहे, असे म्हटले आहे. ते वात, कफ, मेद, तंद्रा, कंडू, मल, मरोचक व स्वेद नष्ट करणारे आहे. तसेच ते स्थैर्यकर गंधकर, घर्णकर व गौरकर आहे, असे सांगितलेले आहे.

यावरून मर्दनशास्त्र हे ३००० वर्षांपूर्वीपासून भारतात प्रचलित आहे, हे कळून येईल. भारतीय मल्ल तर कितीतरी प्राचीन काळापासून शरीर मर्दन करून घेत आले आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

[पौर्वात्य व पाश्चिमात्य मर्दनशास्त्र – वैद्य श्री. म. पु. नानल डॉ. र. कृ. गर्दे, १९५१; हिस्ट्री ऑफ दि प्रॅक्टिस ऑफ, मसाज इन एन्शंट ॲण्ड मेडिईव्हल इंडिया – प. कृ. गोडे, स्ट. इं. क. हि. ३]

मर्यादागिरी प्रदेशाची मर्यादा सांगणाऱ्या पर्वतांना मर्यादागिरीं असे म्हणतात. मर्यादागिरी आठ आहेत. त्यांची नावे अशी – इलावृत्तखंडाच्या उत्तरेकडे नील, श्वेत आणि शृंगवान असे तीन पर्वत असून, ते अनुक्रमे रम्यक, हिरण्मय आणि कुरू या खंडांच्या मर्यादा दर्शविणारे आहेत. हे पर्वत पूर्व-पश्चिम लांब असून, दोहो बाजूंनी खाऱ्या पाण्याच्या समुद्राला मिळालेले आहेत. त्यांची रुंदी दोन दोन हजार योजने असून, उत्तरेकडील प्रत्येक पर्वत पूर्वींच्यापेक्षा दशांशाहून थोडा अधिक, इतका लांबीने कमी आहे. उंची व रुंदी सर्वांची सारखीच आहे.

दक्षिणेकडे निषध, हेमकूट आणि हिमालय असे तीन पर्वत आहेत. ते दहा दहा हजार योजने उंचीचे असून, दोन हजार योजने रुंद आहेत. पूर्व व पश्चिम समुद्रापर्यंत त्यांची लांबी आहे. ते हरिवर्ष, किंपुरुष आणि भारत या वर्षांच्या मर्यादा दर्शवितात.

इलावृत्ताच्या पश्चिमेकडे व पूर्वेकडे माल्यवान आणि गंधमादन असे दोन पर्वत आहेत. उत्तरेकडे नील पर्वतापर्यंत व दक्षिणेकडे निषध पर्वतापर्यंत लांबीचे, दोन हजार योजने रुंदीचे व दहा हजार योजने उंचीचे हे पर्वत असून, ते क्रमाने केतुमाल आणि भद्राश्व या खंडांच्या सीमा दाखवितात (भाग. पु. ५.१६.८–१०).

या मर्यादागिरींचे अतिक्रमण केल्यास शिक्षा होते, असे मत्स्य पुराणात म्हटले आहे (२२७.१८४).

भागवतकार म्हणतात – हे सर्व पर्वत म्हणजे भगवंताचे सगुण असे विराट स्वरूप आहे. या ठिकाणी मन स्थिर केले असता निर्गुण, अतिसूक्ष्म, स्वप्रकाश व परब्रह्मरूप अशा भगवान वासुदेवाच्या ठिकाणीसुद्धा ते स्थिर होण्याला मदत होते (भाग. पु. ५.१६. ३). [श. क.]

मलअरयन द. भारतातील एक वन्य जात. या लोकांची वस्ती केरळात आढळते. मलअरयन म्हणजे पर्वताचे राजे. उल्लादन लोक यांना वाल्याणमार म्हणजे राज्यकर्ते असे म्हणत. यावरून हे लोक कधी काळी पराक्रमी राज्यकर्ते असावे, असे दिसते. इतर सर्व जातींपेक्षा आपण श्रेष्ठ आहो, असे हे मानतात. गौतम आणि अहल्या यांची आपण संतती असल्याचे हे सांगतात. हे लोक मलयाळम भाषा बोलतात.

मुलीला प्रथम ऋतुप्राप्ती झाली, की हे तिला सात दिवस वेगळ्या खोलीत ठेवतात. सातव्या दिवशी स्नान घालून तिला घरात घेतात. नंतर आठव्या दिवशी ती ओढ्यावर स्नानाला जाते. तिथे तीन वेळा बुड्या मारून ती स्नान करते. तिसरी बुडी मारल्यावर मुलगी ताळी बांधणाऱ्याकडे बघते. मग मुलीला व ताळी बांधणाऱ्याला समारंभपूर्वक घरी आणतात. घरी आल्यावर एका चटईवर बसून ती दोघे भोजन करतात. ताळी-बंधनाचा मूळ समारंभ मुलीला ऋतुप्राप्ती होण्यापूर्वीच झालेला असतो.

विवाहप्रथा – मुलीचे लग्न ती वयात आल्यानंतर करतात. लग्न सायंकाळी किंवा रात्रीच्या वेळी लागते. एकाच पानात वधू-वरांची जेवणे व काही घास थुंकून टाकणे हा लग्नातील आवश्यक विधी असतो. मुलाचा बाप वधू-वरांना आहेर करतो. नंतर त्या दोघांना पूर्वेकडे तोंड करून एका चटईवर बसवितात. तिथे बसल्यावर मुलीचा भाऊ मुलीला एक विडा देतो. नवरी मुलगी या विड्याचे आपल्या दाताने दोन भाग करते. त्यांपैकी एक भाग ती स्वतः खाते आणि दुसरा भाग नवऱ्या मुलाला देते. ती दोघे एकाच भांड्यात विड्याची पीक टाकतात. नंतर सर्वांना विडे देतात. एवढे झाल्यावर विवाहसमारंभ संपतो.

या लोकांत क्वचित अनेक भावांत एक बायको असते. बायकोला मूल होत नसेल, तर पुरुष दुसरे लग्न करतात. यांच्यांत पुनर्विवाहाची पद्धत आहे.

बापाची संपत्ती मुलांकडे जाते. मुलगा नसल्यास मुली वारस ठरतात. परंतु मनुष्य निपुत्रिक मेला, तर त्याची संपत्ती भावाकडे जाते. भाऊ नसल्यास बहीण वारसदार होते.

हे लोक पितरांची पूजा करतात. दुर्गा, भगवती, शास्ता इ. देवांनाही हे भजतात. त्याचप्रमाणे हे पाच टेकड्यांची पूजा करतात. या टेकड्यांमध्ये दिव्य शक्ती असते, असे हे समजतात. हे लोक प्रेते पुरतात. [रजःकण; ट्रा. के.]

मलकापुरम दक्षिणेतील एक प्राचीन विद्यापीठ. हे विद्यापीठ आंध्र प्रदेशातील गुंतुर परगण्यात मलकापुरम येथील एका मंदिरात थाटलेले होते. इथे विद्यार्थ्यांच्या राहण्या–जेवणाची व औषधपाण्याची व्यवस्था केलेली होती. याशिवाय कपडालत्ता, अंथरूण–पांघरूण व शिक्षणाची सर्व साधने विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत पुरवली जात. इथे एकूण आठ शिक्षक असून, ते वेद, व्याकरण, न्याय, आगम, इ. विषय शिकवीत. प्रत्येक शिक्षकाकडे सामान्यतः वीस विद्यार्थी शिकत. शिक्षकांना विद्यापीठ भरपूर वेतन देत असे. मुख्याध्यापकाचे वेतन १०० निष्क असे. त्यांच्यावरच विद्यापीठाची सर्व जबाबदारी असे. [प्रा. भा. वि.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मलकुरवन एक जमात. या लोकांची वस्ती मुख्यत: केरळ प्रदेशातील त्रिवेंद्रम, क्विलॉन व कोट्टायम या जिल्ह्यांत आहे. चित्तर, कट्टाचिरा आणि राजंपारा भागातील काही ठिकाणीही यांची थोडीफार वस्ती आढळते. भारतीय युद्धात पांडवांनी पराभव केलेल्या कुरू लोकांचे आम्ही वंशज आहो, असे हे म्हणतात. पांडवांनी आम्हांला हस्तिनापुरातून हुसकून लावल्यानंतर आम्ही वस्तीसाठी इकडे आलो, असेही हे सांगतात. केरळात यांचे कुनकुरवन, पुमकुरवन, कक्काकुरवन व पांडीकुरवन असे चार पोटभेद आहेत.

मलकुरवन पुरुष

मलकुरवन लोक वर्णाने काळे असतात. त्यांचे हात लांबसडक, डोळे काळे व केस कुरळे असतात. यांच्यापैकी स्त्री वा पुरुष कोणीही कमरेच्या वर कपडे वापरीत नव्हते. यांना गोमांस व मद्य चालते.

शेती, शिकार व डोंगराळ भागातील कच्चा माल गोळा करणे हे यांचे प्रमुख व्यवसाय होत. यांच्या स्त्रिया लाकुडफाटा विकण्याचा उद्योग करतात. शिकारीसाठी हे धनुष्यबाण, पिंजरे, इ. साधनांचा उपयोग करतात. कधी कधी रान उठवूनही शिकार करतात. कधी कोणाचे भविष्यही सांगतात.

यांची घरे वांबू आणि झाडाच्या फांद्या यांपासून बनवलेली असतात. एक स्वयंपाकघर आणि दुसरी बसण्या-उठण्याची खोली, एवढेच घर असते.

यांच्यांत प्राणिपूजा व पितृपूजा रूढ आहे. अप्पुवन या देवालाच ते पूर्वजांचा लोकप्रिय देव म्हणून पूजतात. कल्लादी हा यांचा प्रमुख सण होय. हा सण ते रात्री साजरा करतात. जादुटोणा, शकुन यांवरही यांचा विश्वास आहे.

विवाहप्रथा – हे लोक मुलीचे लग्न ती वयात आल्यावर करतात. मामेबहिणीबरोबर लग्न होते; पण आतेबहिणीबरोबर मात्र होत नाही. विवाहसमारंभ मुलीच्या घरी आणि तोही एका दिवसात होतो. यांच्यांत देज घेण्याची पद्धत आहे. देज घेतल्याशिवाय मुलीला मुलाच्या घरी पाठवीत नाहीत. देजाची रक्कम सामान्यपणे अडीच रुपयापर्यंत असते. मुलीला दोन साड्या देणे, हाच प्रमुख लग्नविधी होय. पूर्वी मुलीच्या गळ्यात ताळी बांधण्याचा कार्यक्रम होत असे; पण अलिकडे ही चाल बंद पडली आहे. हे लोक अनेक बायका करू शकतात. अनेक

मलकुरवन स्त्री

बायका करणे याला ते श्रीमंतीचे लक्षण समजतात.

प्रसूतिप्रथा – मुलगी गरोदर राहिल्यावर सातव्या महिन्यात हे पुल्लीकुर्डी नावाचा समारंभ करतात. या वेळी तिला चिंचेचा रस आणि एक आंगठी देतात. प्रसूतीनंतर सोळा दिवस सुवेर पाळतात. मुलाचा नामकरण समारंभ विसाव्या दिवसापासून तिसाव्या दिवसापर्यंत केव्हातरी करतात. यांच्यांत दत्तकाची प्रथा आहे.

यांची जातपंचायत असते. तिच्या प्रमुखाला उरळी किंवा कणी असे म्हणतात. याची नेमणूक वंशपरंपरेने करतात. पंचायतीचे सर्व निर्णय हे बंधनकारक मानतात. पंचायतप्रमुखाला शिकारीतील काही वाटा दिला जातो.

मृतकप्रथा – मृताला वस्तीपासून दूर पुरतात. त्याच्यावर थडगे बांधतात आणि सोळा दिवस सुतक पाळतात. शेवटच्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. [ट्रा. के.; रजःकण]

मलक्करण एक जमात. या लोकांची वस्ती केरळ प्रदेशातील कालिकत भागात आढळते. हे पर्वताच्या पायथ्याशी राहत असून, शरीराने धिप्पाड आहेत. तमिळ व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मलयाळम यांच्या मिश्रणातून तयार झालेली एक भाषा हे बोलतात. यांच्यांत मातृसत्ताक वारसापद्धत आहे.

शेती व शिकार हे यांचे प्रमुख व्यवसाय होत. यांच्यांतील काही लोक वकऱ्या पाळतात. काही नगरसंरक्षणाचेही काम करतात.

विवाहप्रथा – पूर्वी भावी जावयाकडून काही काळ सेवा करून घेतल्यावर त्याला मुलगी देण्याची पद्धत यांच्यांत होती. अलिकडे देज घेऊन मुलगी देतात. यांच्यांत विधवांना पुर्नविवाहाची परवानगी नसते. ती दिराबरोबर मात्र लग्न करू शकते. पुरुष मृत पत्नीच्या बहिणीशी लग्न करू शकतात.

विविध प्राणी, वृक्ष आणि शिव यांची हे पूजा करतात.

यांच्यांत जातपंचायत आहे. पंचायतप्रमुखाला मुप्पन म्हणतात. त्याचा सर्वत्र मान राखला जातो. आपल्या उपजीविकेपुरता पैसा त्याला जमातीकडून मिळतो. प्रसंगविशेषी हा पुजाऱ्याचेही काम करतो.

मतिकप्रथा – मलक्करण लोक मृतांना पुरतात. परंतु खून किंवा रोगराई यांनी मृत्यू आलेल्यास जाळतात. मृताचे थडगे बांधण्याची पद्धत आहे. [ट्रा. के.; का. ट्रा. स. इं.]

मलंग

मुसलमान फकिरांची एक जात. झिंदूशाह मदार नावाचा एक फकीर होऊन गेला. जमन जुती नावाचा त्याचा एक शिष्य होता. त्याच्या अनुयायांना व वंशजांना मलंग म्हणतात. यांची वस्ती विशेषकरून पंजाबात असली तरी सर्व भारतभर हे लोक विखुरलेले आहेत. हे लोक केसाच्या लांब जटा करून त्या पाठीमागे बांधतात. [डि. इ.]

मलंगगड

एक पवित्र स्थान. महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात कल्याण स्टेशनापासून सुमारे दहा मैलांवर हा किल्ला आहे. हा फार अवघड असून, त्याच्या पहिल्या टप्प्यावर, १८०० फूट उंचीवर बावा हाजी मलंग नामक एका मुसलमान साधूची कबर आहे. सांप्रत हा पहाड बाबा हाजी मलंग याचा पहाड म्हणूनच ओळखला जातो. पहाडाच्या पायथ्याशी ब्राह्मणवाडी नामक स्थान आहे, तिथपर्यंत एस्. टी. ची बस जाते.

सुमारे सातशे वर्षांपूर्वी नळ नावाच्या राजाने हा किल्ला बांधला व मक्केहून इथे आलेल्या हाजी अबदूल रहिमान या साधूला आपली मुलगी दिली, अशी आख्यायिका आहे. थोडा पहाड चढून गेल्यावर हाजी मलंगाचा एक साथी बख्तावरशाहा याचा व त्यापुढे थोड्या अंतरावर दुसरा साथी सुलतानशाहा याचा दरगा आहे. सर्व धर्मांचे लोक हाजी मलंगाचे भक्त असून, दरसाल माघ शु. द्वादशी ते वद्य द्वितीया इथे मो यात्रा भरते. हाजी मलंग नवसाला पावतो, असेही सांगता त्याच्या कबरीची सर्व व्यवस्था केतकर नावाच्या ब्राह्मण कु स्थांकडे आहे. हाजी मलंग मक्केहून या पहाडाच्या पायथ्या आला, तेव्हा त्याला खूप तहान लागली. त्या वेळी तिथे ब्राह्म णवाडीत वस्ती करून राहिलेल्या केतकरांनी त्याला दू प्यायला दिले. त्यामुळे हाजी मलंगाने संतुष्ट होऊन या घराण्या कडे कबरीची व्यवस्था पाहण्याचा अधिकार दिला, असे सां तात.

अलिकडे एक नवा शोध पुढे आला आहे, तो असा – हाजी मलंग याची कबर नसून, सिद्धनाथ नामक एका योग्याचे



हाजीमलंग दर्गा

समाधी आहे. इ. स. ९२६ ते ९७० या काळात नलदेव याद हा या भागावर राज्य करीत होता. हे यादव घराणे मूळ द्वारकेचे. यादवांचा संहार झाल्यावर हे यादव घराणे दक्षिणे आले. अलिबाग ते शहापूर हा मोठा विभाग नलदेव राजाच्या ताब्यात होता. सिद्धनाथ हे नलदेवाचे गुरू होते. त्यांच्या समाधीसाठी नलदेवाने या टेकडीवरील एकांताची जागा निवडली नलदेव व त्याची कन्या रुखमावती ही दोघेही, सिद्धनाथांनी समाधी घेतली, त्या वेळी तिथे उपस्थित होती, असा पुरावा उपलब्ध आहे. रुखमावती सिद्धनाथांची शिष्या होती. म्हणून तिच्या मृत्यूनंतर तिची समाधीही तिच्या इच्छेनुसार गुरूच्या समाधीजवळच बांधण्यात आली.

पुढे विजापूरच्या अली आदिलशाहाने हा भाग जिंकून घेतला आणि अनेक हिंदू देवस्थानांचे मुसलमानी देवस्थानां

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रूपांतर केले. याच काळात सिद्धनाथ महाराज हे हाजी मलंग झाले. या हाजी मलंगाच्या कल्पित कथेचा प्रसार करण्याच्या अटीवर तिथले पुजारी केतकर यांना जीवदान देण्यात आले. यासंबंधीचा पुरावा अद्यापही त्यांच्या वारसदारांकडे आहे, असे सांगतात. [म. प.; बाबा हाजी मलंग चरित्र, साहेबराव कोकाटे; फे. फे. म.; सोवत, २२ नोव्हेंबर १९७०]

मलद एक प्राचीन जनपद. हे जनपद बिहार प्रदेशातल्या शहाबाद जिल्ह्यात असावे, असे विद्वानांचे मत आहे. याला मलद हे नाव का प्राप्त झाले, यासंबंधी रामायणात एक कथा आहे, ती अशी —

इंद्र-वृत्रयुद्धात इंद्र रक्ताने माखला गेला आणि क्षुधेनेही व्याकुळ झाला. अशा प्रकारे तो मलिन झालेला पाहून ब्रह्महत्या त्याच्या मागे लागली. तेव्हा त्या मलिन इंद्राला देव आणि ऋषी यांनी गंगाजलाने स्नान घालून त्याचा मल काढून टाकला व क्षुधा शमवली. मल आणि बुभुक्षितपणा हे दोन्ही ज्या प्रदेशांत नष्ट झाले त्या प्रदेशांना इंद्राने प्रसन्न होऊन वर दिला, की 'माझ्या शरीराचा मल व क्षुधा धारण करणारे हे प्रदेश मलद व करुष या नावांनी प्रसिद्ध होतील आणि पृथ्वीवर या देशांची मोठी ख्याती होईल.'

हे जनपद दीर्घ कालपर्यंत समृद्ध होते. पुढे ताटका नावाच्या यक्षिणीने हे उद्ध्वस्त केले, असे रामायणात म्हटले आहे. पाहा— करुष. [वा. रा. को.; पु. वि.; पु. इं.; शृं. हा.]

मलधारीदेव (इ. स. चे १२ वे शतक) एक जैन आचार्य. हा तमिळनाडू प्रदेशातील पाटशिवपुरम या गावचा रहिवासी होता. वीरनंद सिद्धान्त चक्रवर्ती हे याच्या गुरूचे नाव असून, हा मूल संघाच्या देसीय गणातील पुस्तक गच्छाचा होता. याचे मूळ नाव पद्मप्रभ होते. पण पुढे याच्या शरीरावर मलाचे अनेक थर साचले, म्हणून याला मलधारी-देव ही उपाधी मिळाली. नंतर हा याच नावाने प्रसिद्धीला आला. याच्या अहिंसाव्रताचरणासंबंधी अनेक आख्यायिका सांगितल्या जातात.

मलधारीदेवाने कुंदकुंदाचार्यांच्या नियमसार ग्रंथावर तात्पर्य-वृत्ती नावाची टीका लिहिली आहे. [अ. दे. अ. सा.]

मल पंडारम केरळ प्रदेशातील एक भटकी जमात. या लोकांची वस्ती मुख्यत्वे क्विलॉन व कोट्टायम या जिल्ह्यांतील डोंगरांवरील जंगलात आहे. हे लोक काळ्या वर्णाचे, मध्यम उंचीचे आणि धष्टपुष्ट असतात. यांच्या स्त्रिया साडीसारखेच वस्त्र वापरतात. पुरुष कमरेभोवती लुंगी किंवा झाडांच्या साली गुंडाळतात. हे तमिळ व मलयाळम यांच्या मिश्रणातून बनलेली भाषा बोलतात. शिकार करणे हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. हे मांसाहारी असून दारूही पितात. यांच्यापैकी बरेचसे लोक गुहेत किंवा झाडांच्या ढोलीत राहतात.

विवाहप्रथा—यांच्यात मुली वयात आल्यावर किंवा वयात येण्यापूर्वीही त्यांची लग्ने करतात. आते किंवा मामे बहिणीशी लग्न करणे हा सर्वसाधारण नियम आहे. वधूपित्याने वधूचा हात वराच्या हातात देणे, हा लग्नातील आवश्यक विधी असतो. विवाह समारंभ वधूच्या घरी होतो. हे पहिली बायको जिवंत असता दुसरी करीत नाहीत.

या जमातीचा एक प्रमुख असतो. त्याला कानी किंवा अय्या म्हणतात. जमातीमधील सर्व लोक त्याला मान देतात. समाजामध्ये घडणाऱ्या भल्याबुऱ्या गोष्टींवर हा नियंत्रण ठेवतो. विविध उत्सवप्रसंगी पुजाऱ्याचे कामही हाच करतो.

हे वृक्ष व प्राणी यांची पूजा करतात. शास्ता व करुप्प-स्वामी हे यांचे देव होत.

मर्तिकप्रथा—पूर्वी हे लोक मृताला तिथेच सोडून दुसरीकडे निघून जात असत. अलिकडे हे प्रेताचे दफन करू लागले आहेत. यांच्यांत नऊ दिवस सुतक पाळतात. [ट्रा. के.]

मलपुलय द. भारतातील एक जात. या लोकांची वस्ती केरळ प्रदेशातील तिरुवितांकुर जिल्ह्यात आढळते. यांचे कुरुंब, करवशी व पांपू असे तीन पोटभेद आहेत.

मलपुलय स्त्री

या जातीतील मुलगी प्रथम ऋतुमती झाली म्हणजे तिला तीस दिवस वेगळ्या गृहात राहावे लागते. एकतिसाव्या दिवशी ती स्नान करून घरी येते. घरी आल्यावर जेवणावळीचा कार्य-क्रम होतो.

विवाहप्रथा—मुलगी वयात आल्यावर तिचे लग्न करतात. चुलत बहीण-भावांत लग्न-संबंध होतो. लग्न-समारंभ तीन दिवस चालतो. लग्न मुलीच्या घरी होते. कर-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वशी पुलय लोकांमध्ये देज द्यावे लागते. देजात चाळीस वहान (एक माप) भात आणि मुलीच्या आईला लुगडे यांचा समावेश असतो. यांचे लग्न रात्री लागते. लग्नाच्या वेळी नवरानवरी पूर्वेकडे तोंड करून एका चटई-वर बसतात. मुलगा मुलीच्या गळयात मण्याची माळ घालतो ती दोघे एकाच ताटात भोजन करतात. त्यांनी एकमेकांना घास दिल्यावर इतर वऱ्हाडी जेवायला बसतात.

मलपुलय पुरुष

कुरुंब जातीत देजाची पद्धत नाही. नवरीला एक साडी देतात आणि केशराच्या पाण्यात बुड-विलेली दोरी नवरीच्या गळयात बांधतात. नंतर सर्वजण जेवतात.

यांच्यांत धाकटया भावाच्या विधवेला मोठया दिराबरोबर लग्न करण्यास परवानगी असते. त्याचप्रमाणे हे अनेक बायका करू शकतात. बायकोलाही अनेक पती करण्यास मुभा असते. बहिणीबहिणी सवती होऊ शकतात. हे लोक नीतीची बंधने फारशी पाळीत नाहीत.

करवशी पुलय लोक बहुधा वेहराळ जातीच्या लोकांकडे नोकरीला असतात. त्यांच्याकडून पगार म्हणून यांना भात मिळते.

मलपुलय लोक काली, मरिअम्म, चपळम्म, कल्लपारम्म या देवतांना भजतात. कोणताही धार्मिक विधी करायचा असल्यास त्याच्यापूर्वी हे दहा दिवस स्त्रीशी संबंध ठेवीत नाहीत. [रा. कृ.]

मलप्रहारिणी एक नदी. हिला मलापहारिणी असेही म्हण-तात. सध्याची मलप्रभा नदी म्हणजे हीच होय. ही सह्य पर्वतात उगम पावते आणि बेळगावच्या नैर्ऋत्येस सुमारे बावीस मैलांवरून वाहत जाऊन विजापूर जिल्ह्यात कृष्णेला मिळते. सुप्रसिद्ध ऐहोळ हे कलाशिल्पाचे गाव याच नदीच्या काठी आहे. परशुरामाने आपला रक्तमय परशू या नदीत धुतला, असे म्हणतात. [हि. ध.]

मलयद्वीप प्राचीन भारतातील एक भूप्रदेश. वायू पुराणाच्या ४८ व्या सर्गात मलयद्वीपाचे वर्णन पुढीलप्रमाणे केलेले आहे– या प्रदेशात सोने आणि मौल्यवान रत्ने यांच्या खाणी आहेत. इथे चंदनवृक्षही विपुल आहेत. या प्रदेशात मल पर्वत असून, त्याच्यावर चांदीच्या खाणी आहेत. हा पर्व पवित्र मानलेला असून, तो सदैव फळाफुलांनी बहरलेला असतो याला महामलय असेही म्हणतात. या प्रदेशातून पुष्कळ नद्य वाहतात. हा जणू दुसरा स्वर्गच भासतो. याच पर्वतावर अगस्त्य ऋषीचा आश्रम आहे. याच प्रदेशात मंद नावाचा आणखी एक पर्वत आहे. त्याच्यावर देवांची व ऋषींची वसती आहे. त्रिकू नावाचा आणखीही एक पर्वत इथे आहे. तो अतिशय उंच असू त्याच्यावर मौल्यवान धातू सापडतात व राक्षस राहतात.

द. भारतातील तिरुनेलवेली जिल्ह्यात अगस्त्य कूट पर्वता वर अगस्त्याचा आश्रम होता, असे मानतात. मलयद्वीपाच्या वरील वर्णनावरून भारताच्या दक्षिणेकडील चिंचोळया भागा प्राचीन काळी मलयद्वीप असे म्हणत, असे दिसते. [जों. पु.]

मलयाडियर केरळ प्रदेशातील एक जात. या लोकांची वस्त प्राधान्याने कोट्टायम जिल्ह्यात, तसेच रा कोन्नी या संरक्षित जंगलात आणि आदिवरम भागात आढळ शेती आणि शेतमजुरी हे यांचे प्रमुख व्यवसाय आहेत.

विवाहप्रथा – यांच्यांत वधूपिता विवाह जमवितो. विवा समारंभ दोन दिवस चालतो. वराने वधूच्या गळयात ता बांधणे, हा यातील प्रमुख विधी होय. विवाहासाठी ज्योतिष कडून मुहूर्त पाहाण्याची यांच्यांत पद्धत आहे. बहुपत्नीप्रथा यांना मान्य आहे.

देवदेवता – हे प्राणी व वृक्ष यांची पूजा करतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना पुरतात आणि मृतांचे पु करून ते त्या जागी उभारतात. अशा प्रकारचे पुतळे उभारल्या मृत माणूस परत येत नाही, अशी यांची समजूत आहे. हे सो दिवस मृताशौच पाळतात. [ट्रा. के.]

मलयाळ द. भारतातील एक लोकदेवता. लंबाडी लोक हि उपासक आहेत. ही देवी अत्यंत क्रूर असल्या समजूत आहे. हिला नरबलीची अपेक्षा असते. पूर्वी लंबाडी लो हिला नरबली देत असत. या देवतेच्या मूर्ती नसतात आ मंदिरेही नसतात. कोणी मूर्ती करू गेल्यास त्याचा नाश हो अशी समजूत आहे. [द्र. गॉ. मॉ. हि.]

मलयालर केरळ प्रदेशातील एक जमात. हे लोक कण्णनू जिल्ह्यातील जंगलांमध्ये राहातात. पण पू अंबलट (पालाई) इथे राहात होते. हे मध्यम उंचीचे, काळ वर्णाचे असून मलयाळम भाषा बोलतात. कोट्टायम राजाच्या सैन्यात आमचे पूर्वज होते असे हे सांगतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय होय. शिकार करण्यातही ते पटाईत आहेत. मलयार लोक शिवपूजक आहेत. याशिवाय भगवती, अय्यप्पन, इ. देवतांनाही हे भजतात. यांना नृत्य-गीतांची खूप आवड आहे.

विवाहप्रथा—यांच्यांत मुली वयात आल्यावर त्यांची लग्ने करतात. विवाहप्रसंगी ताळी बांधत नाहीत. वधूला नवे वस्त्र देणे, एवढाच लग्नातील आवश्यक विधी असतो. बहुपत्नी-कत्वाची प्रथा यांच्यांत रूढ आहे.

या जातीचा एक प्रमुख असतो. त्याला उलरन म्हणतात. त्याच्या आज्ञा सर्वजण पाळतात. पूर्वी त्याच्या उपजीविकेसाठी आपल्या उत्पन्नातील काही भाग लोक याला देत असत.

मृतकप्रथा—श्रीमंत लोक मृतांचे दहन करतात. इतरांना पुरतात. हे मृताशौच आठ दिवस पाळतात. [ट्रा. कें.]

मलयाळम भाषा व साहित्य

मलयाळम् ही केरळ प्रदेशाची भाषा आहे. तिला केरळी असेही म्हणतात. दीड ते पावणेदोन कोटी लोक ही भाषा बोलतात. ही द्रविड कुळातील भाषा असून, तिचा विशेष संबंध तमिळ भाषेशी आहे. त्यामुळे विद्वान तिला तमिळची एक शाखाच समजतात. मात्र भाषाशास्त्रज्ञांच्या मते या दोन्ही भाषा वेगवेगळ्या आहेत. एक गोष्ट खरी, की तमिळभाषी व केरळी लोक एकमेकांच्या भाषा जाणतात व आपसांत विचारांची देवाण-घेवाणही करू शकतात.

मलयाळमला स्वतंत्र लिपी आहे. तिची विशेषता ही, की कोणताही ध्वनी या लिपीत स्पष्ट रूपाने लिहिणे शक्य होते.

प्राचीन मलयाळम साहित्यावर तमिळचा प्रभाव स्वच्छ दिसतो. कित्येक प्राचीन तमिळ लेखक केरळचेच रहिवासी होते. शिलप्पधिकारम या प्राचीन महाकाव्याचा लेखक केरळीच होता. पण उत्तरेहून आर्य लोक या प्रदेशात येऊन वसते झाल्यावर मलयाळमवरचा तमिळ-प्रभाव हळूहळू संपुष्टात आला आणि त्या जागी संस्कृतचा प्रभाव वाढू लागला. केवळ विषयाच्या बाबतीतच नव्हे, तर साहित्यिक संकेत, रूढी व शैली याही संस्कृत भाषेच्याच स्वीकारल्या गेल्या. संस्कृत भाषेचे अनेक आचार्य केरळात निर्माण झाले. पूज्यपाद शंकराचार्य हे अशा आचार्यांचे मुकुटमणी होत. या आचार्यमंडळीने केरळात संस्कृतचा बराच प्रसार केला व कित्येक केरळी लोकांनी गद्य, पद्य व चंपू या स्वरूपाचे ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिले. ही परंपरा इ. स. च्या तिसऱ्या-चौथ्या शतकापासून सुरू झाली, ती आजपावेतो चालू आहे.

मलयाळम भाषेच्या काही बोली प्रचारात आहेत; मात्र त्यांच्यामध्ये फारसा फरक नाही. जो फरक आहे, तो शाब्दिक असून, ध्वनी किंवा वाक्यरचना या बाबतीत तो अगदीच कमी आहे. या बोलींमुळे केरळी लोकांत परस्पर विचारविनिमयाला कधीही अडचण होत नाही. पश्चिम सागराच्या लक्ष द्वीपातली व्यावहारिक भाषा मलयाळमचीच एक बोली मानली जाते.

मलयाळम साहित्याचे पुढील तीन कालखंड पडतात –

(१) प्राचीन काल – इ. स. च्या १०व्या शतकापासून १५व्या शतकापर्यंत.

(२) नवीन काल – इ. स. च्या १५व्या शतकापासून १९व्या शतकापर्यंत.

(३) वर्तमान काल – इ. स. च्या १९व्या शतकाच्या अखेरीपासून आजतागायत.

इतर काही विद्वानांनी या कालाची विभागणी वेगळ्या प्रकारे केली आहे.

भाषेच्या स्वरूपाचा विचार करून प्राचीन मलयाळम साहित्याचे (१) पाट्टू (लोकगीत) व (२) मणिप्रवालम

मलयाळम्

അ	ആ	ഇ	ഈ	ഉ	ഊ	ഋ	എ	ഏ	ഐ	ഒ	ഓ	ഔ	ം	ഃ				
अ	आ	इ	ई	उ	ऊ	ऋ	ए	ए	ऐ	ओ	ओ	औ	अनुस्वार	विसर्ग				
ക	ഖ	ഗ	ഘ	ങ	ച	ഛ	ജ	ഝ	ഞ	ട	ഠ	ഡ	ഢ	ണ	ത	ഥ	ദ	ധ
क	ख	ग	घ	ङ	च	छ	ज	झ	ञ	ट	ठ	ड	ढ	ण	त	थ	द	ध
ന	പ	ഫ	ബ	ഭ	മ	യ	ര	റ	ല	വ	ശ	ഷ	സ	ഹ	ള	ഴ	ഺ	
न	प	फ	ब	भ	म	य	र	ऱ	ल	व	श	ष	स	ह	ळ	ऴ	ट (दन्तमूलीय)	

मलयाळम लिपी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असे दोन भाग सांगता येतात.

लीलातिलकम या ग्रंथात पाट्टू गीतांचे लक्षण दिले आहे, ते असे –

द्रमिडसंघाताक्षरनिबद्धमेंतुकामीन, वृत्तविशेषयुक्तं पाट्टु

भावार्थ – द्रविड अक्षरे व ध्वनी यांचा प्रयोग करून लिहिले जाणारे, कोणता तरी वृत्तविशेष सांगणारे, ऐंतुका (= चरणांचा दुसरा वर्ण समान असणे) युक्त आणि अनुप्रासात्मक असे जे गीत, त्याला पाट्टू म्हणावे.

अशी पाट्टु गीते अनेक आहेत. ती देवतांची पूजा, वीर पुरुषांची चरित्रे, विनोद, देशभक्ती, इ. विषयांवर लिहिलेली आढळतात. त्यांत संस्कृत शब्द कमी व तमिळ शब्द बरेच सरमिसळ आढळतात. या गीतांतून तत्कालीन ग्रामीण जीवनाचा आभास मिळतो. केरळाच्या कोनाकोपऱ्यांत या गीतांना लोकप्रियता आहे.

भद्रकालीप्पाट्टु, शास्ताम्पाट्टु, पूरक्कळ्ळिक पाट्टु, पाणरप्पाट्टु, कुरवप्पाट्टु, वेलरप्पाट्टु, मण्णारप्पाट्टु, इ. त्यांची नावे आहेत. याशिवाय कृषिप्पाट्टु (शेतीची गीते), वळ्ळप्पाट्टु (नाविक गीते) व कोलटिप्पाट्टु (खेळाची गीते) अशी अन्यही काही गीते प्रचारात आहेत.

लीलातिलकम या ग्रंथात मणिप्रवाल शैलीचे लक्षण दिले आहे, ते असे – 'भाषासंस्कृतयोगो मणिप्रवालम्' (=मलयाळम शब्दांच्या बरोबरीने विभक्तीसहित संस्कृत शब्द घालून केलेली काव्यरचना म्हणजे मणिप्रवाल होय). मणी म्हणजे माणिक व प्रवाळ म्हणजे पोवळे. ही दोन्ही एकत्र आणल्याने जी शोभा दिसते, तशी देशी व संस्कृतच्या साहचर्याने काव्याला प्राप्त होते, म्हणून तिला वरील नाव दिले गेले. प्रस्तुत शैलीचा एक श्लोक असा –

पूत्तूवि निन्न पुरुहूतपुराङ्गनानां
कोलत्तेनुटप्पिरवि कोलिन पाट्टु केट्टु ।
कालत्ताळरम्यरुचि कालियमूर्ध्निरङ्गो
कूत्ताटुमायर् कुलदैवतमाश्रयामः ॥

अर्थ – आम्ही गवळ्यांच्या त्या कुलदेवतारूप श्रीकृष्णाला शरण जात आहो. तो श्रीकृष्ण पुष्पवृष्टी करणाऱ्या अप्सरांचे मधुमधुर गायन ऐकत ऐकत आणि आपल्या पदतलांची रम्य शोभा प्रकट करीत करीत, कालिय नागाच्या फणांवर नाचत राहिला आहे.

रामचरित हा ग्रंथ मलयाळमचा प्राचीनतम ग्रंथ मानला जातो. याच्या कर्त्यासंबंधी मतभेद आहेत. काही समीक्षकांच्या मते वीररामवर्मा हा याचा कर्ता आहे. त्याचा काल इ. स. १२व्या शतकाच्या अखेरीचा असून, तो तिरुवितांकूर राजपरिवारातला एक होता. वाल्मीकिरामायणाचे युद्धकांड हा रामचरिताचा प्रधान विषय आहे. हा ग्रंथ पाट्टुशैलीत लिहिलेला असून, त्यावर तमिळचा खूप प्रभाव आहे.

उण्णुनीलीसंदेशम, कोकसंदेशम, उण्णियच्चिरुतेविचरितम, उण्णियाटिचरितम, अशी मणिप्रवालशैलीतली काही संदेशकाव्ये आणि चंपूकाव्ये मलयाळमच्या प्राचीन वाङ्मयात आढळतात.

तिरुवितांकूर राज्यात निरणम नावाचे पंपा नदीच्या तीरावर वसलेले एक गाव आहे. तिथे माधव पणिक्कर, राम पणिक्कर व शंकर पणिक्कर असे तीन कवी समकाली (इ. स.१४–१५ वे शतक) निर्माण झाले. तिसऱ्याला कण्णश (करुणेश) असेही म्हणतात. हा वरील दोघांचा भाचा होता. त्या तिघांनी पुराणे, उपनिषदे, इ. संस्कृत ग्रंथांचे अध्ययन करून त्यांचा आशय मलयाळममध्ये आणला. माधवाने गीता पद्यबद्ध केली. शंकरने भारतमाला या नावाने महाभारतकथा लिहिली. त्याने काही पुराणे साररूपात मलयाळममध्ये आणली. रामाने वाल्मीकिरामायणाला अनुसरून रामकथा व भारत-भागवतादी ग्रंथ मलयाळममध्ये अनुवादिले. मलयाळम साहित्याची अभिवृद्धी करणाऱ्या तत्कालीन कवींमध्ये निरणम येथील कवींचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले जावे अशा योग्यतेचे आहे.

इ. स. च्या १५व्या शतकाच्या अखेरीस कोलत्तिरी राजाच्या दरबारात चेरुश्शेरी नंपूतिरी नावाचा एक दरबारी कवी होता. राजाज्ञेला अनुसरून त्याने कृष्णगाथा नावाने कृष्णचरित्रावर पाट्टुशैलीत काव्य लिहिले. हे काव्य भागवताच्या दशम स्कंधावर आधारलेले आहे. केरळात आबालवृद्धांना आदरणीय ठरलेले हे काव्य आहे. आषाढ व श्रावण मासांत धार्मिक दृष्टीने या ग्रंथाची पारायणे केली जातात. या ग्रंथात कृष्णजन्मापासून त्याच्या स्वर्गारोहणापर्यंतच्या ४७ कथा संग्रहित आहेत. कालिदासाप्रमाणेच चेरुश्शेरीही उपमा-अलंकाराचा सम्राट आहे. मलयाळम साहित्यात त्याचे स्थान अमर आहे.

मलयाळम भाषेत चंपूसाहित्य विपुल आहे. या चंपूकवींत पूनम नंपूतिरीचे स्थान सर्वोच्च आहे. मलबारचा राजा भानुविक्रम याचा तो दरबारी कवी होता. त्याने रामायणचंपू, रावणविजयचंपू व कामदहनचंपू असे ग्रंथ लिहिले.

याशिवाय उमातपस्या, पारिजातहरणम, नैषधम, राजरत्नावलीयम, कोटियविरहम, इ. अनेक चंपूग्रंथ १५–१६ व्या शतकांत निर्माण झाले. चंद्रोत्सवम या चंपूग्रंथाला एक आगळे सौंदर्य आहे. ही चंपूकृती पाच खंडांत विभक्त आहे. तिच्यात विविध छंदांतले ५७० श्लोक आहेत. हे काव्य शृंगारप्रधान असून मलयाळम भाषेचा अमूल्य कंठहार ठरले आहे.

आधुनिक काल – या कालावर आपला लोकविलक्षण प्रभाव

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

टाकणाऱ्या कवींमध्ये पहिले स्थान तुंचत्तुरामानुजन एडुत्तच्छन याला आहे. अध्यात्मरामायणम आणि भारतम या त्याच्या दोन सर्वश्रेष्ठ कृती होत. भारतम हा महाभारताचा स्वतंत्र अनुवाद आहे. एडुत्तच्छन हा भक्तकवी होता. ज्या भक्तीचे बीज त्याच्या हृदयात पडले, त्या भक्तीचे सुगंधी फूल म्हणजे अध्यात्मरामायण व प्रसादफळ म्हणजे भारतम होय. केरळात अध्यात्मरामायण हा ग्रंथ केवळ वाचनीय राहिला नसून, तो घरोघरी नित्यपाठाचा विषय बनला आहे. त्याच्या हरिनामकीर्तनम या ग्रंथात समस्त उपनिषदांचे सार आहे. लाखो लोक तो ग्रंथ पाठ करून संध्याकाळी 'शुभं करोति' सारखा म्हणतात. चिंतारत्नम या ग्रंथात अद्वैतवेदान्ताची तत्त्वे त्याने सांगितली आहेत. त्याने आपले ग्रंथ शुकमुखातून वदविले असून, त्या शैलीला किळिप्पाट्टु अशी संज्ञा आहे. एडुत्तच्छनच्या कवित्व, विद्वत्त्व आणि भाषाप्रभुत्व या महनीय गुणांमुळे त्याला आधुनिक मलयाळम भाषेचा जनक समजतात.

एडुत्तच्छनच्या जोडीने दुसरे नाव उच्चारले जाते ते पूंतानम नंपूतिरीचे. हा केरळातला भक्तकवी होता. याचा काल १६ व्या शतकाचा उत्तरार्ध व १७व्या शतकाचा पूर्वार्ध एवढा मानतात. हा प्रथम गृहस्थ होता; पुढे तो विरक्त बनला. या विरक्तीतून त्याच्या हृदयात कृष्णभक्ती उपजली. तो नित्य भजन-कीर्तनात निमग्न राहत असे. त्याला सगुण भक्ती आवडे. त्याने विल्वमंगलाच्या श्रीकृष्णकर्णामृतम या संस्कृत काव्याचा भाषाकर्णामृतम या नावाने अनुवाद केला आहे. आपल्या ग्रंथात आपल्या मनाचे दोष दूर करण्याबद्दल तो पुढील श्लोकाने कृष्णाला आळवतो–

अंपाडिक्कॉरु भूषणं, रिपुसमूहत्तिन्नहो भीषणं,
पैंपाल्वॅण्णतयिक्कुं मोषण, मतिक्रूरात्मनां पेषणं ।
वनपापत्तिनु शोषणं, वनितमाक्कनिन्वसंपोषणं,
निन्पादं मतिदूषणं हरतु मे मंजीरसंघोषणम् ॥

अर्थ– हे श्रीकृष्णा, चाळ बांधलेले तुझे पाय व्रजभूमीचे भूषण आहेत. ते शत्रुसमूहाचे संहारक आहेत. दूध, दही, लोणी यांची चोरी करण्याच्या कामी ते चपल होऊन उठतात. क्रूरांना चिरडण्यात ते संकोचत नाहीत. तशा प्रसंगी ते द्रुत गतीचे होतात. गोपींचा आनंद ते आपल्या चपल नर्तनाने वाढवतात. हे प्रभो, तुझे हे चरण माझ्या मनाचे दोष दूर करोत.

सगळे जग कनक आणि कांता यांच्या पाठीमागे लागलेले दिसत असूनही कवी त्यांपासून दूर आहे. तो श्रीकृष्णाकडे याचना करतो, ती ही–

मन्नाशवालुं मदनाशयालुं पान्नाशयालुं मरुकुन्नु लोकम् ।
निन्नाशकंटीलारुयक्कुंमय्यो कण्णा, शमं नल्कुक मानसे मे ॥

अर्थ – भूमी, काम आणि सुवर्ण यांच्या हावेमध्ये सगळे जग बुडून गेले आहे. हे कृष्णा, तुझी आकांक्षा मात्र कुणालाच नाही. तू माझ्या मनाला शांती दे.

ज्ञानप्पाना, घनसंघ, पार्थसारथिस्तव, आनंदनृत्तम, कृष्णलीला, इ. पूंतानमचे ग्रंथ आहेत.

रामपुरत्तुवारियर हा १८ व्या शतकातला आणखी एक प्रसिद्ध कवी होय. याने कुचेलवृत्तम नावाचे सुदामचरित्रावर काव्य लिहिले आहे व ते नौकागीत म्हणून प्रसिद्ध आहे. केरळात नौकास्पर्धा होतात, त्या वेळी या गीताच्या लयीवरच वल्ही मारली जातात. याने गीतगोविंदाचाही अनुवाद केला आहे.

याच काळातला आणखी एक सुप्रसिद्ध कवी कुंचननंपियार हा होय. याने कथकळी नृत्याच्या तुळ्ळलशाखेला जन्म दिला. हा संस्कृत भाषेचाही पंडित होता. याने राघवीयम, विष्णुविलासम, उत्तररामचरितम ही महाकाव्ये, भागवतचंपू व सीताराघवम हे नाटक, अशी संस्कृत काव्यरचना केली. त्याचबरोबर शीलवतीचरित, नलचरित, शिवपुराण, पंचतंत्र, इ.काव्ये मलयाळम भाषेत लिहिली. तुळ्ळल नृत्यासाठी ४०–५० पौराणिक आख्यानेही त्याने रचली. कोट्टयत्तुतंपुरान (कोट्टयम देशाचा राजा) याने बकवधम, कल्याणसौगंधिकम, किर्मीरवधम व कालकेयवधम ही चार आख्याने लिहून कथकळी नृत्याच्या साहित्याला उन्नत केले. श्री. भास्करन नायर म्हणतात, की त्याचे हे ग्रंथ म्हणजे मलयाळम साहित्यातली उज्ज्वल रत्ने आहेत.

उण्णायिवारियर यानेही रामपंचशती, गिरिजाकल्याणम व नलचरितम नावाची कथकळी आख्याने लिहून कथकळी साहित्यात स्वतःला अमरपद मिळविले. त्याचे गिरिजाकल्याणम् हे एक उत्कृष्ट गीतकाव्य असून, ते मलयाळम भाषेचे साहित्यरत्न आहे. प्रतिभा, कल्पना, रसवत्ता, भाषाप्रभुत्व, अर्थघनत्व, इ. गुणांनी प्रस्तुत काव्य मंडित आहे. कथकळी नृत्याला त्याने नाटकाच्या उंचीला आणण्याचा प्रयत्न केला. पुढे इरयिम्मनतंपीने कीचकवधम, उत्तरास्वयंवरम व दक्षयागम अशी तीन आख्याने रचून केरळीय साहित्य परिपुष्ट केले. भावाभिव्यक्ती आणि शब्दकळा या दोन गुणांत तो उण्णायिवारियरच्याही पुढे गेला; मात्र उण्णायीची गंभीरता आणि आशयघनता त्याला साधली नाही. कोयित्तंपुरान याची रावणविजयम ही एक विशाल कृती आहे. तिच्यात कवीने रावणाला एक रसिक व माननीय व्यक्तीच्या रूपाने चित्रित केले आहे.

चेलप्परंपुनंपूतिरी हा १८व्या शतकातला एक मुक्तककवी आहे. याची मुक्तके श्रेष्ठ दर्जाची मानली जातात. याने संस्कृत वृत्तांची परंपरा सोडून मलयाळमच्या स्वतंत्र वृत्तांवर आपली पद्यरचना केली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रस्तुत आधुनिक कालात पद्यावरोबर गद्यही हळूहळू विकसित होत गेले. प्राचीन काळी राजाची आज्ञा, अधिकारपत्र, मंदिरव्यवस्था, इ. गोष्टी ताडपत्रांवर किंवा शिलांवर लिहिल्या जात आणि त्यांची भाषा गद्य असे. अशा लेखांना मलयाळममध्ये 'ग्रंथवरि' या नावाने ओळखले जाते. मलयाळमच्या प्राचीन स्वरूपाची कल्पना या लेखांवरून येऊ शकते. इ. स. च्या १०व्या शतकापासून गद्यात ग्रंथरचना होऊ लागली. यांपैकी पहिला ग्रंथ म्हणजे कौटिल्य हा होय. कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा सर्व भारतीय भाषांत मलयाळममध्ये प्रथम अनुवाद झाला, ही गोष्ट केरळीय साहित्यिकांना अभिमानास्पद वाटते. खेदाची गोष्ट ही, की या अनुवादकर्त्याचे नाव अजून अज्ञात राहिले आहे. त्यानंतर काही कालाने अन्य संस्कृत ग्रंथांचाही अनुवाद होऊ लागला. अशा रचनांमध्ये १४ व्या शतकातला दूतवाक्य हा अनुवाद श्रेष्ठ दर्जाचा समजला जातो. हा अनुवादकही अजून अज्ञात आहे.

या काळातले भागवतम, भागवतसंग्रहम, मुकुंदमालाव्याख्यानम, संगीतरत्नाकरम, इ. ग्रंथ आढळतात. इ. स. १४९८ साली पोर्तुगीज लोक व त्यांच्यामागून डच, इंग्रज व फ्रेंच हे परदेशी लोक व्यापारासाठी केरळात आले. त्यांपैकी पोर्तुगीज लोकांनी मलयाळम भाषेचा अभ्यास करून तिच्या द्वारे ख्रिस्ती धर्माचा प्रसार सुरू केला. त्यांनी ख्रिस्ती धर्माचे अनेक उपदेश मलयाळम भाषेमध्ये लिहिले. इ. स. १५९९ साली उदयम्पेरूर या ठिकाणी कित्येक लोक धर्मपरिवर्तनासाठी एकत्र जमले असता ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी त्यांच्या सुधारणेसाठी मलयाळम भाषेमध्ये कित्येक प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेविले. ते प्रस्ताव कानोन या नावाने प्रसिद्ध आहेत. आधुनिक मलयाळम गद्याचे ते पहिले नमुने होत. पोर्तुगीज धर्मप्रचारकांनी कोच्ची येथे एक छापखानाही सुरू केला. त्यांनी मलयाळमचा एक कोश व तिचे एक व्याकरणही छापखान्यात छापले. केरळी लेखकांमध्ये औसेप्पुमेत्रान व तोम्माकत्तनार या दोघांनी अनुक्रमे वेदतर्कम व वर्तमानपुस्तकम असे गद्य ग्रंथ लिहिले. दुसऱ्या ग्रंथात रोमच्या यात्रेचे वर्णन आहे. केरळपलमा हा केरळच्या इतिहासावरील ग्रंथही याच काळात निर्माण झाला. कोण्या ख्रिस्ती धर्मगुरूने तो लिहिला, असे म्हणतात.

दक्षिण भारतात टिपू सुलतानाचे राज्य आल्यावर जे एक दहशतीचे वातावरण निर्माण झाले, त्याचा परिणाम साहित्यावरही झाल्यावाचून राहिला नाही. पुढे इंग्रजांचे राज्य आल्यावर जमाना बदलला. केरळात अनेक विद्यालये उघडली गेली. इंग्रजी भाषा हे शिक्षणाचे माध्यम बनले. डॉ. गुंडर्ट या ख्रिस्ती धर्मगुरूने मलयाळमचे उत्कृष्ट अध्ययन करून शाळेतल्या मुलांसाठी पाठमाला आणि व्याकरण तयार केले.

इ. स. १८६० ते १९२४ या काळात तिरुवितांकुर गादीवर तीन प्रतिभाशाली राजे आरूढ झाले आणि त्यां मलयाळम भाषेच्या उन्नतीसाठी खूप प्रयत्न केले.

इंग्रजी साहित्याच्या अध्ययनातून केरळातल्या अनेक ले कांना स्फूर्ती मिळाली आणि त्यांनी कादंबरीलेखनास प्रा केला. 'कुंतलता' ही मलयाळममधली पहिली कादंबरी नेटुड-अटी या लेखकाने लिहिली. पूर्वीच्या काळात (१८ शतक) कुंचन नंपियार या ओट्टम तुळ्ळलआख्यानलेख समाजातल्या दुष्ट रूढींवर कोरडे ओढून तिथल्या विचारवंतां जागे केले होते. त्याच्या मृत्यूनंतर ते कार्य खंडित झाले हों पण १९व्या शतकाच्या उत्तरार्धात चंतुमेनोन या लेखकाने समा सुधारणेचे कंकण बांधून इंदुलेखा नावाची कादंबरी लिहि आणि तिच्या द्वारे नंपूतिरी समाजाच्या सामाजिक व नैति अध:पतनाचे चित्र रेखाटले. याच काळात तिरुअनंतपुरम येथे सी. बी. रामनपिळ्ळा याने मार्तंडवर्मा, धर्मराजा व रा राजबहुदूर या तीन ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून स्वत:चे न अजरामर केले. बंगालमध्ये बंकिमचंद्रांचे आणि महाराष्ट् हरिभाऊ आपटे यांचे कादंबरीक्षेत्रात जे स्थान, तेच केरळा रामन पिळ्ळा यांचे मानले जाते.

कोच्चिन राज्याच्या राजवंशात अप्पन तंपुरान नावाचा ए पुरुष निर्माण झाला. मलयाळम साहित्यात संपादक, संशोध गद्यकवी अशा अनेक रूपांनी तो वावरलेला आहे. भूतराय त्याची ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध आहे. के. रामकृष्ण पिळ्ळ यांनी उदयभानू व पारप्पुरम अशा दोन कादंबऱ्या लिहि अंबाटी नारायणप्पुतुवाल यांनी केरलपुत्रन नावाची कादंब लिहून पेरुमाल राजाशी संबंधित अशा घटनांचे चित्रण के के. एम्. पणिक्कर यांनी ऐतिहासिक घटनांवर आधारले पाच कादंबऱ्या लिहिल्या. केरलसिंह, कल्याणमल, परंकिप्प लाळि, दोरशणी व अफंटेमकळ अशी त्यांची नावे आहेत. तक शिवशंकर पिळ्ळा यांनी मोंपासाच्या प्रवृत्तीला अनुसरून दे कादंबऱ्या लिहिल्या, त्या प्रस्थापित नीती व सदाचरण यां विरुद्ध होत्या. त्यामुळे रूढीवादी लोकांनी त्यांच्यावर कठ टीका केली. त्यांनी गरीब, दलित व हीनवर्णीय लोकां दयनीय अवस्थेबद्दल आत्मीयतेने पुष्कळच लिहिले आहे. म मार कोळ्यांच्या जीवनावरची चेम्मीन ही त्यांची कादंब पुष्कळच गाजली. त्या कादंबरीबद्दल भारतसरकारकडून त्यां पुरस्कारही मिळाला. केशवदेव यांनी ओटयिल निन्न नावा कादंबरी लिहून एका रिक्षावाल्याचे जीवन चित्रित केले आ उलक्का, नटी, इ. त्यांच्या कादंबऱ्या सामाजिक प्रश्नांची च

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
RK
Y73(P15):1k
155M2J·7

करणाऱ्या आहेत. त्यांत धनिकांच्या दुष्कृत्यांचे चित्रण आहे.

वैकम येथील मुहम्मद बशीर यांनी बाल्यकालसखी व माझ्या वडिलांचा एक हत्ती होता या नावाच्या दोन कादंबऱ्या लिहिल्या असून, त्यांमध्ये तिकडील मुसलमानांचे आचार-विचार प्रदर्शित झाले आहेत. कुट्टिकृष्ण यांनीही मुस्लीम आचार-विचारांवर प्रकाश टाकणारी उमाच्चु नामक कादंबरी लिहिली आहे. यथार्थवाद व प्रेमानुभूती या दोन गोष्टींचा सुंदर समन्वय एस्. के. पोट्टकाट्ट यांच्या विषकन्यका, मूटुपटम नाटनप्रेम, इ. कादंबऱ्यांतून दिसून येते. जोसेफ मुंडश्शेरी, पद्मनाभ पिळ्ळा यांच्या कादंबऱ्यांतून ख्रिस्ती पाद्र्यांचे प्रभुत्व, वेळोवेळी त्यांचा राजनैतिक क्षेत्रात प्रवेश, नीतिविषयक शैथिल्य, ख्रिस्ताच्या उपदेशाचा स्वतःच्या स्वार्थासाठी उपयोग, इ. गोष्टींवर प्रकाश टाकलेला आहे.

आधुनिक कालातल्या कादंबरीकारांत विवेकानंद यांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. कल्लिचेल्लमा या कादंबरीत त्यांनी ग्रामीण मजुरांच्या कष्टमय जीवनाकडे वाचकांचे ध्यान आकर्षित केले आहे.

मलयाळम भाषेत हिंदी, बंगाली, मराठी, रशियन, इंग्रजी, इ. अन्य भाषांतल्या श्रेष्ठ कलाकृतींचे अनुवादही झाले आहेत.

आधुनिक काव्य – सांप्रतच्या कालात मलयाळम भाषेतल्या महाकाव्यांचा प्रवाह थांबल्यासारखा झाला आहे. त्यांच्या ऐवजी खंडकाव्ये, मुक्तके, भावगीते, इ. प्रकारच्या काव्यांना बहर आला आहे. सांप्रतचे कवी मानवतावाद, गांधीवाद, समाजवाद, साम्यवाद, इ. तत्त्वज्ञानांचा प्रचार करणाऱ्या कविता लिहीत आहेत. राष्ट्रीयत्वासाठीही कित्येक कवी आपली लेखणी झिजवीत आहेत. सांप्रत संस्कृतप्रचुर काव्यशैली अदृश्य झाली असून, शुद्ध मलयाळम शब्दांचा किंबहुना थेट जनतेच्या बोलीचा उपयोग केला जातो. जुने आणि नवे यांच्या सीमारेषेवर असणारे जे कवी केरळात निर्माण झाले, त्यांमध्ये वळ्ळतोळ नारायण मेनन व उळ्ळूर यांची नावे विख्यात आहेत.

वळ्ळत्तोळ हे परंपरागत पद्धतीने शिक्षण घेतलेले संस्कृत पंडित होते. त्यांनी संस्कृतात चित्रयोग नावाचे काव्य लिहिले असून, महत्त्वाची गोष्ट ही, की त्यांनी ऋग्वेदाचाही पद्यबद्ध अनुवाद केला आहे. त्यांनी बंधन स्थानाय अनिरुद्धन, मग्दलन मरीयम, अच्छ नुं मकळुम, इ. पौराण प्रसंगांवरही काव्यरचना केली आहे. साहित्यमंजरी नावाने आठ भागांत त्यांची स्फुट कविता छापलेली आहे. या संग्रहात वळ्ळत्तोळ यांच्या प्रतिभेचा प्रकर्ष दिसतो. जीवनाविषयी वळ्ळत्तोळ यांचा दृष्टिकोन निरंतर प्रसन्न आणि आशापूर्ण राहिलेला आहे. त्यांच्या कवितेत विषादाला स्थान नाही. त्यांना प्रेमाची गोडी आहे, तसेच निसर्गाचेही आकर्षण आहे. त्यांच्या विचारावर गांधीवादाचाही प्रभाव पडला होता. भारतदेश आणि त्याचे स्वातंत्र्य यांच्या

महाकवी वळ्ळतोळ

विषयी त्यांना अत्यंत आस्था होती. आपल्या एका कवितेत ते लिहितात –

चॉल्लक्कॉट रत्नङ्ङळेयुं कक्ककक्कूट्टत्तेयु मॉप्पम्
उत्कॉट गंभीराब्धि तन्नोमन मकळ्,
सीमारिक्कं च्चमतकळामखुवाल् ऑप्पं वॅट्टुम्
जामदग्न्य महर्षितन् दत्तपुत्रियाळ्,
परयन्टॅ कुटिलिलुं मरप्पॉरुळ् कॉळुत्तिय
परमयां मनस्विनी नम्मुटॅ अम्मा;
अद्वैतं तानल्लो नमुक्कमिञ्ञप्पाल् पिरवि तॉ –
दुद्वैषर नाम, अभेदर नाम, अनहंतर् नाम।
एकतयिलूंन्निनिन्नु कंकळॉन्नाय् चेर्त्तुपिटी –
च्चाकुलियिल् निन्नुयर्त्तु कस्मद् राज्यत्तं।

अर्थ – बहुमूल्य रत्ने आणि शिंपले यांना एकाच वेळी आपल्या पोटात धारण करणाऱ्या गंभीर समुद्राची प्रियपुत्री आहे आमची भारतभूमी. भयंकर शत्रूंच्या हातरूपी समिधा कुऱ्हाडीने तोडणाऱ्या परशुरामाची ती दत्तकपुत्री आहे. पाक्कनार नामक एका परया (अस्पृश्य) च्या झोपडीत जिने वेदांचे सिद्धान्त प्रज्वलित केले, अशी आहे महामनस्वी आमची भारतमाता.

अद्वैतसिद्धान्त हेच आमच्यासाठी भारतमातेचे दुग्ध आहे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जन्मापासूनच आम्ही द्वेष, भेदबुद्धी आणि अहंकार यांच्यापासून अलिप्त आहो. आम्ही भारतीय ऐक्याच्या ठिकाणी स्थिर राहावे आणि हातात हात मिळवून आपल्या देशाला दैन्य-दुःखातून वर काढावे.

उळ्ळूर परमेश्वर अय्यर यांनी चित्रशाला, अन्नुंइन्नुं, इ. कविता लिहून भारताच्या उज्ज्वल इतिहासाचे वर्णन केले आहे. पिंगला, कर्णभूषण, भक्तिदीपिका, इ. त्यांच्या पौराणिक काव्यरचना आहेत. अरुणोदय, तारहारम्, किरणावली, इ. त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध असून, त्यांत त्यांच्या अनेक विषयांवर कविता आहेत. उमाकेरळम हे त्यांचे ऐतिहासिक महाकाव्य होय. संस्कृत शैलीत लिहिलेले हे मलयाळमचे सर्वश्रेष्ठ महाकाव्य समजले जाते. माणसाने अंतर्बाह्य शुद्ध असावे आणि त्याचे जीवन भौतिक व आध्यात्मिक उन्नतीसाठी साधनरूप बनावे, असा त्यांचा जीवनविषयक सिद्धान्त आहे.

पळ्ळत्तुरामन, के. एम्. पणिक्कर, पी. कुंजिरामन नायर, के. के. राजा, व्ही. उण्णिकृष्णन नायर, व्ही. व्ही. नंपियार,

जी. शंकर कुरुप

एन् गोपाल पिळ्ळा, बोधेश्वरन, इ. सांप्रतच्या कवींतले वयस्कर पुरुष होत. नव्या पिढीतले कवी आणि हे वयस्क कवी यांच्यामध्ये जी. शंकर कुरुप हे कवी येतात. कुरुप यांनी प्रामुख्याने गीतिकाव्ये लिहिली. त्यांचे आतापर्यंत १५-१६ संग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या कवितांचे विषय विविध आहेत. जीवनातली घोर निराशा अणि त्यातील पराजय बरोबरच मानवाच्या आशा-आकांक्षा आणि पुरुषार्थ गीते त्यांनी मुक्तकंठाने गायिली आहेत. निसर्ग, अध्यात्म अशा परंपरेने त्यांच्या कवितेचा विकास झाला. त्यांची कालम ही कविता पुढे दिली आहे. तिच्यावरून त्यांच्या कवितेची उंची आणि खोली दोन्ही कळून येतील –

माळमॅङ्ङ-रिञ्ञोल, संचरिक्कुन्नू काल –
काळमंडलि जगन्मंडलङ्ङळॅच्चुट्टि ।
नेरिय नाना ‘ शुक्ल पटल ’ ङ्ङळ ल्लिति –
भूरियोरुरकळाण व्यक्त स्थलांतत्तिल् ।
‘ विरियुं विरियु’–मॅन्निङ्ङनॅ मोहिच्चुं कॉ –
ष्टरिकत्तिरिक्कुन्नू पावमे वियत्पक्षी ।
गोळमुट्टफळतिन् चिरकिन् कीषिल् क्काणाम्
नीळवे; कालं कॉत्तिप्फुटिच्च तॉण्टाणॅल्लाम् ॥ १ ॥
पकलुं रावुं नाविन् रण्टु तुम्पव नोट्टि –
प्पकयोटुग्रानंतद्विजिह्वं नक्कीटुम्पोळ्
उटलु तरिक्कुन्नू, पर्वतं स्तंभिक्कुन्नु,
कटलुं जाताकम्प संरंभं चुळु ङ्ङन्नु ।
ईविधम्निरिक्कवे तन् कळिक्कोप्पुं कॉण्टु
जीवितं कळिक्कयाणिन्नितिन् भोगत्तिन्मेल् ॥ २ ॥

अर्थ – कालरूपी कृष्णसर्प भूमंडलाच्या ठिकाणी खात खात चालला आहे. त्याचे बिळ कुठे आहे, ते नाही. त्या अव्यक्त स्थली अस्पष्टशा शुभ्र पटला (निहारिका) रूपात त्याची गळून पडलेली कातच दिसून राहिली आहे. आत्ताच ती भग्न होईल, आत्ताच अशी अभिलाषा करीत बिचारा आकाशपक्षी त्या कातीवर बसला आहे. त्याच्या पंखांखाली भूगोलांची अंडी आहेत. पण ती खरी अंडी नाहीत. ती सर्व कालाने फेकलेली अंडयांची कवचे मात्र आहेत.

या कालसर्पाच्या जिभेला दोन टोके आहेत. दिवस रात्र. जेव्हा तो उग्र व अनंत अशा त्या जिभेची दोन्ही लांब करतो, वैरभावनेने ती चाटतो, तेव्हा शरीर पहाड स्तंभित होतो. समुद्रही थरकाप दाखवून संकुचित अशा स्थितीतही जीवन मात्र आपली खेळणी घेऊन कालसर्पाच्या अंगावर खेळत राहिले आहे.

इटपिळ्ळी राघवन पिळ्ळा, चङ्ङम्पुषा, कृष्ण वैलोप्पिल्ली, श्रीधर मेनन, पी. भास्करन, एम्. पी. पाला नारायण नायर, इरश्शेरी गोविंदन नायर, वयलार वर्मा, ओ. एन्. व्ही. कुरुप, अक्कित्तत्तु, अच्युतन नंपूतिरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ऑल्प्पमण्ण नंपूतिरी सहोदर, कॅटामंगलम पप्पकुट्टी, सी. जी. मण्णुंम्मूट्ट, नालप्पाट्टू बालामणियम्मा, हे मलयाळमचे आधुनिक व सुप्रसिद्ध कवी होत.

मलयाळम नाटय – केरळात नाटयकलेचे जे स्थानिक प्रकार आहेत, त्यांत कथकळी हा लोकजीवनाचे प्रतिनिधित्व करणारा एकमेव नाटयप्रकार आहे. काव्यात्मक साहित्य, गीते, विविध वाद्ये, नृत्य, अभिनय आणि पोषाख या सर्व गोष्टींचा कथकळी-मध्ये अंतर्भाव होतो. हे एक परंपरागत नृत्य-नाटय असून, आजतागायत जिवंत असलेली ती एक श्रेष्ठ दर्जाची कला आहे.

कथकळीच्या जोडीचे कूटियाट्टम हे नृत्यनाटय होय. या दोन नृत्यनाटयांतून केरळात नवव्या शतकापासून नाटयरचना निर्माण होऊ लागली. पेरुमल राजाने शाकुंतल नाटकाचे वाङ्मयचौर्य केल्याबद्दल त्याची टिंगल करणारे सुभद्राधनंजय नावाचे नाटक तोलन या कवीने लिहिल्याचे सांगतात. गेल्या १०० वर्षांमागे कित्येक सुप्रसिद्ध संस्कृत नाटकांची भाषांतरे मलयाळममध्ये झाली आहेत. या संस्कृत नाटकांचे रंगभूमीवर प्रयोग करण्याचा प्रयत्न ए. आर. राजवर्मा याने केला. हे प्रयोग तिरुवितांकूर-मध्ये होणाऱ्या मावेल्लीकरा या वार्षिकोत्सवात त्याने केले.

मलयाळममधले पहिले स्वतंत्र नाटक कल्याणी हे होय. ते कोच्चुण्णि तंपुरान यांनी लिहिले. त्यानंतर चंद्रिका, लक्षणासंग, गंगावतरण, कविसभारंजनम, मनोरमाविजयम, लक्ष्मीलक्षणम, इ. नाटके स्वतंत्र रूपाने निर्माण झाली. या स्वतंत्र नाटककारांत के. वरुगोस माप्पिळा यांना प्रमुख स्थान आहे. त्यांनी इन्नायिक्कुट्टी नावाचे, बायबलातल्या एका कथेवर नाटक रचले. सी. व्ही. रामन पिळ्ळे यांनी काही प्रहसने लिहिली. त्यांच्या नंतर इ. व्ही. कृष्ण पिळ्ळे यांनी स्वतंत्र हास्यात्मक नाटके लिहून जुन्या संस्कृत व तमिळ परंपरेविरुद्ध बंड पुकारले. त्यांच्यामुळेच मलयाळम रंगभूमीला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले. के. पद्मनाभ पिळ्ळे यांनी कित्येक गंभीर नाटके लिहिली. त्यांतली दोन वेळुत्तम्पीदळवा आणि कल्परिले कल्पपादम या नावाची आहेत. दुसऱ्या नाटकात येशू ख्रिस्ताच्या जीवनचरित्राचे दर्शन घडविलेले आहे. त्यांचे बंधू कुमार पिळ्ळे हेही नाटककार म्हणून बरेच प्रसिद्धीस आले.

अशा प्रकारे मलयाळम रंगभूमी स्वतंत्र आकार धारण करीत असता शेक्सपिअर, इब्सेन, तुर्जेन्यू, सोफोक्लीस, इ. श्रेष्ठ अशा पाश्चात्य नाटककारांच्या कलाकृतींचीही मलयाळममध्ये रूपांतरे झाली. अशा नाटकांत सरदार के. एस्. पणिक्कर यांनी अनुवादिलेल्या सोफोक्लिसच्या ओडिपस या नाटकाचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे.

केरळी प्रेक्षकांना ऐतिहासिक नाटकांचे फार मोठे आकर्षण आहे. ती त्यांची भूक भागविण्यासाठी रामन पिळ्ळे यांच्या कित्येक ऐतिहासिक कादंबऱ्यांना नाटयरूप दिले गेले. के. पद्मनाभ पिळ्ळे यांनी तिरुवितांकुराचे भवितव्य घडवणाऱ्या वेलुत्तम्पी दळवा या राजाच्या हौतात्म्याचे दर्शन घडवणारे नाटक लिहिले व तेही रंगभूमीवर फार गाजले. त्यांचे बंधू के. कुमार पिळ्ळे यांनी माया आणि मुक्ती व हरिश्चंद्र ही दोन पौराणिक नाटके लिहिली. या पिळ्ळे बंधूंनी काही सामाजिक आणि कौटुंबिक नाटकेही लिहिली; पण ती विशेषशी यशस्वी झाली नाहीत.

आधुनिक नाटककारांत एन्. कृष्ण पिळ्ळे यांचा खास उल्लेख केला पाहिजे. भग्नभवनम, कन्यका आणि इतर काही कौटुंबिक नाटके लिहून त्यांनी सामाजिक प्रश्नांची चर्चा केली. ए. गोविंदन नायर आणि चेरुकाड यांनीही सामाजिक विषयांवर अनेक यशस्वी नाटके लिहिली.

जुन्या नाटककारांना जे साधले नाही ते आजचे नाटककार साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ते जुन्या नाटककारांहून अधिक वास्तववादी आणि क्रांतिकारक आहेत. ग्रामीण जीवनाकडे ते आस्थेवाईकपणे पाहतात. समाजातले दोषही ते निर्भीडपणे दाखवतात. के. टी. महम्मद आणि तोप्पिल भासी हे अलिकडचे दोन प्रथितयश नाटककार होत. मुहम्मद यांनी इतु भुमियाण (ही जमीन आहे) हे नाटक लिहिले व त्याच्या द्वारे मलबारमधील मुसलमानांना अंधश्रद्धा व दुष्ट रूढी टाकून देण्याचा संदेश दिला. भासी यांच्या ' निङ्ङल एन्ने कमूनिस्ट आक्कि ' (तुम्ही मला कम्युनिस्ट बनवले) या नाटकाने तर उभे केरळ या टोकापासून त्या टोकापर्यंत गाजविले.

नंपूतिरी समाज केरळातला एक वरिष्ठ समाज समजला जातो. या समाजाचे नैतिक अधःपतन पहिल्या प्रथम लोकांच्या टीकेचा विषय ठरले. त्याच्या सामाजिक रूढींवर टीकेचा प्रहार करणारी, पण त्या समाजाच्या सुधारणेची आकांक्षा बाळगणारी अशी कित्येक नाटके निर्माण झाली. टी. व्ही. रामन भट्टतिरी व एम्. पी. भट्टतिरी हे दोन नाटककार अशा प्रकारच्या नाटककारांमध्ये प्रमुख आहेत. अशाच प्रकारचे जमीनदारीवर टीका करणारे पाट्टनाक्की नावाचे नाटक के. दामोदरन यांनी व शेतकऱ्यांच्या कष्टप्रद जीवनावर प्रकाश टाकणारे एक नाटक इरश्शेरी गोविंदन नायर यांनी लिहिले. कृष्ण पिळ्ळा यांनी प्रतिभा नावाचे एक राजनैतिक नाटक लिहून नाटयसाहित्यात मोलाची भर टाकली. केशवदेव, तकशी शिवशंकर पिळ्ळा, पोनकुन्नमवर्की, इ. लेखकांनीही कित्येक नाटके लिहून केरळीय नाटयसाहित्याचा विकास केला. अनुवादित नाटकेही पुष्कळ निर्माण झाली. जी. शंकर कुरुप, के. सुरेन्द्र, जी. विवेकानंद,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

टी. एन्. गोपीनाथन नायर यांनी स्वप्नात्मक नाटके लिहून नाट्य-साहित्यात एक विशेष शैली प्रचलित केली. आधुनिक जीवनाच्या भिन्न भिन्न समस्यांवर के. टी. मोहमद, मोहमद युसुफ, सुरेंद्र, ओंचेरी नारायण पिळ्ळा, तिक्कोटियन, इ. लेखकांनी कित्येक नाटके लिहिली आहेत. सांप्रत एकांकिकांची निर्मितीही विपुल प्रमाणात होऊ लागली आहे.

वृत्तपत्रे व नियतकालिके– मलयाळममध्ये सर्वांत प्रथम जी नियतकालिके प्रकाशित होऊ लागली त्यांचा उद्देश ख्रिस्ती धर्माचा प्रचार हाच मुख्यत्वे होता. अशा प्रकारचे एक वृत्तपत्र म्हणजे विज्ञान निक्षेपम हे होय. इ. स. १८६४ साली पश्चिम तारका हे नियतकालिक सुरू झाले. त्यात व्यापार, व्यवसाय, ललित साहित्य आणि सांस्कृतिक गोष्टी यांचा अंतर्भाव असे. त्यानंतर सत्यनादकाहलम हे वृत्तपत्र एर्णाकुलम येथे सुरू झाले; त्यात प्रामुख्याने धार्मिक वृत्त प्रकाशित होत असे. देवजी भीमजी हे गुजराती गृहस्थ त्याचे निर्माते होते. त्यांनीच पुढे इ. स. १८८१ साली केरळमित्र सुरू केले. त्यानंतर कालिकत येथे केरळपत्रिका सुरू झाली. विशाखानक्षत्रज राजाच्या प्रोत्साहनाने विद्याविलासिनी नावाचे मासिक सुरू झाले. त्यात गंभीर विषयांवर निबंध प्रसिद्ध होत असत. इ. स. १८८६ साली सी. कृष्ण पिळ्ळा यांच्या संपादकत्वाखाली मलयाळी या नावाचे वृत्तपत्र निघाले. याच सुमारास मान्नानम गावच्या ख्रिस्ती पाद्र्यांनी नस्राणिदीपिका हे वृत्तपत्र सुरू केले. प्रथम ते धार्मिक कार्यांचा प्रसार करीत असे. पुढे जेव्हा रामकृष्ण पिळ्ळा हे त्याचे संपादक बनले, तेव्हा त्यात राजकारण व समाजकारण यांचाही पुरस्कार होऊ लागला. पाठीमागून 'नस्राणि' गेले आणि 'दीपिका' एवढेच नाव राहिले. सांप्रत दैनिक वृत्तपत्राच्या रूपाने केरळात त्याचा खूप प्रचार आहे. केरळमित्राचे संपादक वरुगीस माप्पिळा यांनीच इ. स. १८९० साली मलयाळमनोरमा नावाचे वृत्तपत्र सुरू केले. केशवनाशान यांच्या संपादकत्वाखाली सुजना नंदिनी हे साप्ताहिक वृत्तपत्र सुरू झाले.

वर उल्लेखिलेल्या विद्याविलासिनी मासिकावरोबर आणि त्यानंतर विद्याविनोदिनी, भाषापोषिणी, मनोरमा, कवनकौमुदी, केरळचिंतामणी, रसिकरंजिनी, आत्मपोषिणी, इ. मासिके प्रकाशित झाली आणि त्यांनी मलयाळम साहित्याच्या उन्नतीसाठी यशस्वी प्रयत्न केले.

सांप्रत पंचविसाहून अधिक दैनिक वृत्ते आणि तितकीच साप्ताहिके केरळमध्ये प्रकाशित होत आहेत.

अन्य विषय– पी. गोपाळ पिळ्ळा यांनी १८८१ साली मलयाळम साहित्याचा इतिहास लिहिला. दुसरा त्याच विषयावरचा ग्रंथ आर्. पणिक्कर यांचा. तो सात खंडांत प्रकाशित झाला आहे. रामराज वर्मा यांनी केरळातल्या संस्कृत साहित्यावर ऐतिहासिक ग्रंथ लिहिला आहे. डॉ. एस्. के. नायर हे अनेक संशोधनात्मक ग्रंथ लिहून प्रसिद्धीस आले आहेत. राजराज वर्मा यांनी भाषाशैलीप्रदीपम नावाचा कोश लिहिला असून, उत्तम कोशांत त्याची गणना होते. सरदार के. एम्. पणिक्कर यांनी केरळाच्या इतिहासावर अधिकृत असे ग्रंथ लिहिले आहेत. याशिवाय विज्ञान, अर्थशास्त्र विषयांवरही मलयाळम भाषेत बरीच ग्रंथरचना झाली आहे.

लोकसाहित्य– मलयाळम लोकसाहित्यात गीतांना प्राधान्य आहे. त्यांचे पुढील प्रकार आहेत – (१) मलायन गीते – ही गीते कौटुंबिक सुखदुःखाविषयींची व भक्तिरसात्मक असतात. (२) जिप्सी गीते – ही कुरथींची गीते म्हणून प्रसिद्ध आहेत. (३) नाखवा गीते – होड्या चालवणारे लोक ही गीते गातात.

केरळात पाण नावाची एक हिंदू जमात आहे. हे लोक कुलीन लोकांच्या घरोघर जाऊन गीते गातात व त्यांनी दिलेल्या देणग्यांवर आपला गुजारा करतात. कुलदेवता व बालकृष्ण यांच्या संबंधी ही गीते असतात. त्यांच्या सुरेल कंठातून ती ऐकताना आनंद वाटतो. त्यांतले एक गीत बालकृष्णाच्या माखनचोरीबद्दलचे आहे. यशोदा श्रीकृष्णाला 'तू लोणी चोरलेस' असे म्हणून तोंड उघडायला सांगते. श्रीकृष्ण तोंड उघडतो, त्यात तिला विश्वरूपदर्शन होते. ते पाहून यशोदा भयचकित होते व ती श्रीकृष्णाची प्रार्थना करते–

आनत्तलयोलम् वेण्ण तराम् उण्णी ।
अंपाटि श्रीकृष्णा वा मुरुक्क ।।
किंकिणि मोतिरम् तंकत्ताल चर्तिटाम् ।
पंकजलोचना ! वा मुरुक्क ।।
पैक्कले मेटक्कुवान पाटत्तयटक्काम् ञान् ।
सैक्कणा ! पोन्नुण्णी ! वा मुरुक्क ।।
अण्ड चराचरम् कण्टु मथङ्ङिन्नेन ।
कोण्डल नेखर्णा ! तीवा मुरुक्क ।।
आट्टि क्कुलियानाथ कोण्डुपोकाम पोन्नु ।
पोट्टि मुरान्तका ! वा मुरुक्क ।।
अच्छन्टेंतेवारक्कच्च तराम् कुञ्ञे ।
अच्युतषंतले ! वा मुरुक्क ।।

भावार्थ – हे वंदावनविहारी श्रीकृष्णा, मी तुला हत्ती एवढे लोणी देईन. तुला किंकिणी आणि अंगठी देईन. तुला गायी चारायला रानात पाठवीन. स्नानासाठी मी तुला नदीवर घेऊन जाईन. वडिलांचा अंगरखा तुला देईन. तू तुझे मुख बंद कर. तुझ्या मुखात सारे विश्व पाहून माझे डोळे फिरून जायची वेळ आली आहे. तू मुख बंद कर.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ऐंजा मन्तकळी नावाचा एक खेळ केरळात खेळला जातो. मध्ये दिवा पेटवून ठेवतात आणि त्याच्या भोवती खेळणारे आणि गाणारे लोक बसतात. प्रथम खेळ होतात आणि नंतर विशिष्ट लयीत हास्यरसप्रधान गीते गायिली जातात. त्यांतला एक खेळगडी दुसऱ्याला विचारतो –

ञान कुलिक्कुम् कुलंमल्लो । ऐट्टुमानूर तेवर कुलम् ।
नी कुलिक्कुम् कुलत्तिन्टे । पेर चोल मारा ! ।।'

अर्थ – ज्या तलावात मी स्नान करतो, त्याचे नाव आहे ऐट्टुमानूर. देवाचा तलाव. अरे मार, तलावाचे नाव काय ?

मग दुसऱ्या बाजूचा माणूस त्याला उत्तर देतो –

ञान कुलिक्कुम् कुलमल्लो । श्री वैक्कत्तु तेवर कुलम् ।
नी कुलिक्कुम् कुलात्तिन्टे । पेर चोल मारा ।।

अर्थ – माझ्या स्नानाच्या तलावाचे नाव आहे वैक्कम. देशात प्रतिष्ठित असलेला देवाचा तलाव. अरे मार, तू कुठे स्नान करतोस ? त्याचे नाव सांग.

अशा प्रश्नोत्तरांत कुणीतरी योग्य उत्तर देण्यास असमर्थ ठरतो. त्याची मग सर्व मिळून टर उडवितात.

केरळात पुलयन नावाची एक पूर्वास्पृश्य जमात आहे. हे लोक शेतमजूर असून, शेतात काम करताना अनेक प्रकारची गाणी म्हणतात. त्यांतले एक गीत वीररसप्रधान आहे. उण्णि यारच्चा नावाची एक वीर तरुणी आपल्या पतीसह बाजाराला गेली होती. तिथे पोचताच काही गुंडांनी तिला घेरले. तिचा पती थरथर कापायला लागला. त्याची ती भयकंपित अवस्था पाहून त्या तरुणीला राग आला. ती नवऱ्याला म्हणाली –

पेण्णाय ञान विरटक्कुन्निल्ला;
आणाय निङ्ङल विरटक्कुन्नेन्ते ?

अर्थ – मी स्त्री असून घाबरले नाही आणि तू मर्द असून असा कापतोस ?

असे म्हणून ती वीर तरुणी त्या गुंडांशी सामना द्यायला सिद्ध झाली. तिने प्रथम त्या गुंडांची निर्भर्त्सना केली. तिच्या अंगात जणू चंडीचा संचार झाला. तिने कमरेची कटधार हातात घेतली आणि ओढणीने लुगडयाचा कासोटा बांधला.

एन्नालो नोक्किक्कटुत्तु कोलक ;
पक्किरि तिरिञ्ञोन्नु निन्नु पेण्णुम्
कुतिरप्पाच्चिल ओन्नु परज्ज्वलुम्
ननमुण्डु वीशीहु निन्नु पेण्णुम्
अञ्जरम मुन्नुरुम् वीणु पेण्णुम्
रण्डामतोन्नुमरिञ्ञवलुम्
पतिनट्टाले करत्तिल वेटक्कुन्नुण्ड
तोटुवोर कलरये करम् वन्नु वल्लो ।

भावार्थ – पाहा आता माझा वार कोण अडवू शकेल ? असे म्हणून ती एका बाजूला उभी राहिली, घोडीसारखी इकडे तिकडे दौडली आणि उत्तरीय हवेत फैलावून थांबली. मग ती गुंडांशी लढली. गुंड लोक धडाधड पडू लागले. ती आवेशात येऊन म्हणाली. 'माझी अस्त्रशाला जितकी उंच आहे तितकी उंच रास तुम्हा गुंड लोकांच्या प्रेतांचा ढीग रचून मी उभारीन.

जिप्सी गीतांत कुरथी नावाची एक स्त्री आढळते. ती भविष्य सांगते, जादूटोणा करते आणि कारस्थानेही करते. या कुरथीने व्यभिचार केलेला असतो. कुरवन हा तिचा पती. त्याला तिच्याबद्दल संशय येतो. मग त्यांची पुढीलप्रमाणे प्रश्नोत्तरे होतात–

कुरवन – तुझ्या कपालावरचा सुंदर तिलक पुसला कसा ?
कुरथी – पायी प्रवासात घाम आल्यामुळे तो पुसला गेला.
कुरवन – तुझ्या नाकातील नथ बाहेर का येत आहे ?
कुरथी – पाणी पिताना मी आपले हात नाकावर धरले होते.
कुरवन – तुझे लाल ओठ फिकट का दिसतात ?
कुरथी – मी एक गोड आंबा चोखीत होते.
कुरवन – तुझा मोत्याचा कंठा तुटला का ?
कुरथी – तो एका झाडाच्या फांदीला अडकला.

अशी समयसूचक उत्तरे देऊन कुरथी आपल्या नवऱ्याला चकवते.

केरळात नावाड्यांची गाणी फार लोकप्रिय आहेत. ती विविध प्रकारची असून, वेगवेगळया तालांवर म्हटली जातात. त्यांत लोककथा, उपरोध, उपहास, स्थानिक लोकवार्ता, इ. विषय असतात. सर्व गाण्यांचे धृपद बहुधा एकच असते, ते असे – 'लाटा माझ्या डोक्याइतक्या उंच उसळताहेत व माझी नाव त्यावर नाचत बागडत जात आहे'.

याशिवाय इतर प्रदेशांप्रमाणे केरळात संस्कारगीते व कृपिगीतेही प्रचलित आहेत. पाहा – केरळ. [म. सा. इ.; कविश्रीमाला मलयाळम्; सी. नारायण मेनन–फोक लोअर, जून १९६२; के. भास्करन नायर–राष्ट्रभारती, जुलै १९५६]

मल वेत्तुवन

एक जात. यांची वस्ती मुख्यत्वे केरळ प्रदेशातील कन्ननोर जिल्ह्यात आहे. स्त्रिया व पुरुष दोघेही कानांत वलये व हातांत अंगठ्या घालतात. स्त्रिया नाकांत नथ, गळयांत रंगीत मण्यांच्या माळा व हातांत बांगडया घालतात. स्त्रिया कमरेभोवती एक कापड गुंडाळतात व त्याचे एक टोक उजव्या खांद्यावर घेतात. हे लोक तुळू व मलयाळम यांच्या मिश्रणातून बनलेली भाषा बोलतात. हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मागसलेले असून मांसाहारी आहेत. परंतु यांना गाय व रेडा यांचे मास चालत नाही. शिकार हा यांचा पिढिजात धंदा आहे. शिवाय ते शेती व टोपल्या विणण्याचे कामही करतात. भात व मिरी हे यांचे प्रमुख पीक होय. जंगलाच्या कडेला चार सहा झोपडयांची यांची वसाहत असते. यांच्या झोपडया कंबळाच्या असल्या तरी आकर्षक असतात. झोपडीचे दोन भाग केलेले असतात. एक स्वयंपाकघर व दुसरी निजायची खोली.

विवाहप्रथा--यांच्यांत मुली वयात आल्यावर विवाह करतात. पूर्वी राक्षस–विवाहाची पद्धत होती; पण आता देज देऊन मुलगी करण्याची पद्धत आहे. लग्न जमविण्यात वधूपिता पुढाकार घेतो. वधूला नवे वस्त्र देणे हा लग्नातील आवश्यक विधी असतो. यांच्यांत घटस्फोट रूढ आहे.

वेत्तुवन लोक पूर्वी निसर्गपूजक होते. आता ते मूर्तिपूजा करतात. यांच्या जातिप्रमुखाला किरन म्हणतात.

मर्तिक प्रथा--यांच्यांत मृतांना पुरतात. हे मृताशौच बारा दिवस पाळतात. [ट्रा. के.]

मलवेदन

दक्षिण भारतातील एक जात. यांना मलैवेदन. कानन‌वेदन, वेट्टुवन किंवा वेंदर असेही म्हणतात, या लोकांची वस्ती मुख्यत्वे केरळ प्रदेशातील कोट्टायम-क्विलॉन भागात आढळते. हे लोक मध्यम बांध्याचे, कुरळ्या केसांचे व काळ्या डोळ्यांचे असतात. यांच्यांतील स्त्री-पुरुष दोघेही हातांत बांगडया घालतात. तमिळ व मलयाळम यांच्या मिश्रणातून तयार झालेली भाषा हे बोलतात. हे वाल्मीकीला आपला पूर्वज मानतात. शिकार, शेतमजुरी आणि जंगलातील उपयुक्त वस्तू गोळा करून त्या विकणे, हा यांचा व्यवसाय होय.

इतरांपेक्षा आपण वेगळे आहो हे दाखविण्यासाठी मलवेदन लोक स्वतःचे दात तासून घेतात. मुलाचे दात अठराव्या वर्षी आणि मुलीचे दात दहाव्या वर्षी तासतात.

या जातीत वलियवेदन, चेरुवेदन, चिंगणीवेदन व एलिचठ्ठीवेदन अशा चार पोटजाती आहेत. चेरुवेदन व वलियवेदन यांच्यांत रोटी-बेटी व्यवहार होत नाही. चिंगणीवेदनांकडे मात्र तो होतो. चेरुवेदनांचा आणि एलिचठ्ठीवेदनांचा रोटी-बेटी व्यवहार होत नाही. चेरुवेदन लोक चिंगणीवेदनांना शिवतही नाहीत.

विवाहप्रथा – यांच्यांत चुलत-बहिणीशी व आते-मामेबहिणींशी लग्न-संबंध होतात. साटेलोटे पद्धतही रूढ आहे. मुलीच्या घरी भावी जामात नोकरी करतो व मुलगी मिळवतो. मुलीला पळवून नेऊनही लग्न करण्याची पद्धत आहे. कोणत्याही शुभ दिवशी सकाळी लग्न होते. लग्न मुलीच्या घरी होते आणि तेही एका दिवसात. नवऱ्या मुलाने नवरीला साडी देऊन तिच्या गळयात ताई बांधणे एवढाच लग्नाचा प्रमुख विधी असतो. नंतर वधूने स्वतः विणलेल्या चटईवर वधू-वर बसतात व भोजन करतात.

मलवेदन पुरुष

यांच्यांत अनेक बायका करण्याची चाल आहे. काही ठिकाणी प्रत्येक पत्नीला वेगळी झोपडी असते. विधवा भावजयीशी हे लग्न करीत नाहीत.

मुलगी प्रथम रजस्वला झाली असता तिला दूर झोपडीत नेऊन ठेवतात. रजोदोष नऊ दिवस पाळतात. दहाव्या दिवशी स्नान करून ती घरातील सर्वांच्या कपाळावर गाईच्या शेणाने उभी रेघ काढते आणि प्रत्येकाला पेज देते. एवढे झाल्यावर ती शुद्ध झाली, असे समजतात.

प्रसूतिप्रथा – पहिल्या गरोदरपणी सातव्या महिन्यात गर्भवतीला माहेरी पाठवितात. तिथे पुळिकुडी नावाचा समारंभ होतो. या वेळी तिला चिंचेचे पाणी प्यायला देतात. नंतर नारळ फोडतात. जननाशौच एक महिना पाळतात.

हे लोक ओणम, कर्कदक, इ. सण आषाढ-श्रावणांत साजरे करतात.

चिंगणीवेदन जातीत वडिलांच्या मिळकतीचे तीन भाग करतात. पैकी दोन हिस्से मुलांना देतात आणि तिसरा हिस्सा भाच्याला देतात. परंतु चेरुवेदन जातीत मुलगे व भाचे यांच्यात सर्व संपत्ती समप्रमाणात वाटली जाते.

मर्तिकप्रथा–हे लोक मृताला पुरतात किंवा जाळतात आणि मृताशौच सोळा दिवस पाळतात. त्या सोळा दिवसांत कोणी जंगलात जात नाही किंवा शिकार करीत नाही. शेवटच्या दिवशी ज्ञातिभोजन असते. [ट्रा.के.; का. ट्रा. स. इं.; रज.कर]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मलसर केरळ व तमिळनाडू प्रदेशांतील एक जमात. या लोकांची वस्ती प्राधान्याने कोइंबतूर व कोच्चिन जिल्ह्यांत आढळते. यांचा रंग काळा असून केस कुरळे असतात. हे तमिळ व मलयाळम भाषेचे मिश्रण असलेली भाषा बोलतात. जंगलातील लाकडे तोडणे, मध गोळा करणे, शेतमजुरी करणे, इ. व्यवसाय हे करतात. काही लोक शेती व पशुपालनही करतात.

विवाहप्रथा – सामान्यपणे मलसर प्रौढपणीच विवाह करीत असले, तरी बालविवाहाची पद्धतही यांच्यांत रूढ आहे. सोमवारी किंवा बुधवारी यांची लग्नें लागतात. यांच्यांत अनेक बायका करण्याची पद्धत आहे. घटस्फोटाचीही चाल आहे. हे रजोदोष सात दिवस पाळतात.

देवधर्म – मरिअम्म व मल्लुंग या देवतांना हे भजतात. या देवतांच्या मूर्ती व मंदिरे नसतात. मल्लुंग देवतेचा चैत्र मासात उत्सव करतात. त्या वेळी तिला बकऱ्याचा बळी देतात. टेकड्यांवर राहणारे लोक गणेश आणि काली यांना भजतात. यांचा भुताखेतांवर विश्वास असतो.

यांच्यांत जातपंचायत आहे. हे पंचायतप्रमुखाच्या आज्ञा मानतात.

मर्तिकप्रथा – मृताला उताण्या स्थितीत पुरतात. मृताशौच तीन दिवस पाळतात. [ट्रा. के.; का. ट्रा. स. इं.]

मलावह पापांचा एक प्रकार. मलावह पाप म्हणजे शरीर व मन अशुद्ध करणारे पाप होय. विष्णुधर्मसूत्रांत नऊ प्रकारची पापे दिली आहेत (३३·३–५), त्यांत मलावह पापांची नोंद आहे. मनुस्मृतीत या पापांचा उल्लेख आहे, तो असा – कीटक, पक्षी यांची हत्या; मद्याजवळ ठेवलेला पदार्थ खाणे; फळे, फुले, सरपण यांची चोरी करणे, मनाची चंचल वृत्ती, इ. गोष्टींची या पापांमध्ये गणना करतात (११·७०). या पापांच्या निवारणासाठी सातूची कढत कांजी पिणे हे प्रायश्चित्त मनूने सांगितले आहे (११·१२५). [हि. ध.]

मलूकदास (इ. स. १५७५ ते १६८३) एक संत व पंथसंस्थापक. याचा जन्म उत्तर प्रदेशातील कडा नामक गावी झाला. हा जातीने खत्री होता. याच्या पित्याचे नाव लाला सुंदरदास असे होते व त्याला कक्कड अशी उपाधी होती. त्याला तीन भाऊ होते. लहानपणापासून मलूकदासाचा ओढा साधुसंतांकडे होता. त्याबद्दल काही कथाही प्रचलित आहेत. एकदा त्याच्या घरी बरेच साधू आले आणि त्यांनी जेवण मागितले. पण घरातल्या लोकांनी त्यांच्याकडे लक्षच दिले नाही. मग मलूक पुढे सरसावला. त्याने घरात जे काही खाण्यासारखे होते ते सर्व त्या लोकांना देऊन टाकले.

एकदा त्याच्या वडिलांनी त्याला जवळच्या आठवड्याच्या बाजारात घोंगड्या विकायला पाठवले. पण त्याची एकही घोंगडी खपली नाही. तो गठ्ठा घेऊन घरी परत येत असता, तो दमला आणि एका झाडाखाली बसला. त्याच वेळी तिकडून एक मजूर चालला होता. त्याच्या डोक्यावर त्याने ते ओझे दिले. मजूर झपाझप पुढे गेला आणि मलूक मागून हळूहळू जाऊ लागला. मजूर एकटा पुढे आलेला पाहून, याने एखादी घोंगडी पळवली तर नाही, अशी त्याच्या आईला शंका आली आणि त्याला जेवायला घालायच्या मिषाने तिने त्याला एका खोलीत कोंडून ठेवले. मलूक घरी आल्यावर जेव्हा तिने खोली उघडली, तेव्हा आत मजूर नव्हता. त्याला वाढलेले ताट मात्र तिथे तसेच होते. तेव्हा त्याला कळले, की तो मजूर नसून साक्षात परमेश्वर त्याच्या मदतीला आला होता. मग त्या परमेश्वराचे आपणांस पुनः दर्शन व्हावे, म्हणून तो सतत तीन दिवस खोली बंद करून आत बसून राहिला. त्या अवधीत त्याला परमेश्वराचे दर्शन झाले, असे म्हणतात. त्यानंतर लोक त्याला मलूकदास असे म्हणू लागले. मग त्याने देशभ्रमणाला आरंभ केला आणि अनेक साधूंच्या भेटीगाठी घेतल्या. त्यांपैकी मुरारस्वामी नावाच्या एका साधूकडून त्याने गुरूपदेश घेतला. मग भ्रमंती संपवून तो परत आला व आपल्या कडा गावी राहिला.

त्याने लग्न केले होते; पण पहिल्याच मुलीच्या जन्माच्या वेळी त्याची पत्नी मरण पावली आणि लवकरच त्या कन्येलाही मृत्यू आला. मलूकदासाने १०८ वर्षांचे दीर्घायुष्य भोगून देह ठेवला.

दुष्काळात पाण्याचा वर्षाव करणे, बुडते जहाज वाचवणे, कुठेही गुप्त वा प्रकट होणे, इ. चमत्कार याने केले, असे सांगतात.

मलूकदासाने ज्ञानबोध, रतनखान, भक्तवच्छावली, भक्तबिरुदावली, पुरुषविलास, दस रत्नग्रंथ, गुरुप्रताप, अलखबानी व रामावतारलीला हे ग्रंथ लिहिले आहेत.

मलूकदासाच्या कवितेचे काही नमुने असे–

जहाँ जहाँ बच्छा फिरै, तहाँ तहाँ फिरै गाय ।
कहे मलूक जहाँ संतजन, तहाँ रमैया जाय ।।

अर्थ – ज्या ज्या ठिकाणी वासरू फिरते, त्या त्या ठिकाणी त्याच्या मागून गाय फिरते. मलूक म्हणतो जिथे जिथे संतजन असतील तिथे तिथे परमेश्वर जातो.

माला जपौं न कर जपौं, जिभ्या कहौं न राम ।
सुमिरन मेरा हरि करै, मैं पाया बिसराम ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – माळ ओढली नाही, जप केला नाही, किंवा जिभेने रामनाम घेतले नाही, तरी चालेल. परमेश्वर माझे स्मरण करतो आहे आणि मी विश्रांती घेत पडलो आहे.

सुमिरन ऐसा कीजिये, दूजा लखैं न कोय।
ओठ न फरकत देखिये, प्रेम राखिये गोय ॥

अर्थ – परमेश्वराचे स्मरण असे करावे, की ते दुसऱ्याच्या लक्षात येणार नाही. तसेच ओठ विलग झालेलेही दाखवू नयेत. आपले प्रेम गुप्त राखावे.

दया धर्म हिरदै बसै, बोलै अमृत बैन।
तेई ऊंचे जानिये, जिनके नीचे नैन ॥

अर्थ – ज्यांच्या अंतःकरणात दया व धर्म आहे, ज्यांची वाणी अमृतासारखी आहे आणि ज्यांचे डोळे खाली पाहत आहेत तेच खरे उच्च होत.

आत्मज्ञानाने मुक्ती मिळते, असेच मलूकदासाचेही मत होते. पण मलूकदासाने आपल्या मताचा प्रचार केला किंवा एखादा मठ स्थापला, असे उल्लेख मात्र कुठे आढळत नाहीत. त्याच्या अनुयायांची संख्या बरीच आहे. हे लोक रामोपासक असून, कपाळावर लाल तिलक लावतात. ते गृहस्थाला गुरू करून त्याकडून दीक्षा घेतात. प्रयाग, लखनौ, पुरी, मुलतान, सीता कोयल (दक्षिण भारत), जयपूर, वृंदावन, पटना, इ. ठिकाणी व नेपाळमध्येही या पंथाचे मठ आहेत.

संत मलूकदासाची कीर्ती त्याच्या काळातच पसरली होती. शिखांचा नववा गुरू तेगबहादूर त्याला भेटायला गेला होता. औरंगजेबानेही त्याला आपल्या भेटीला बोलावले होते आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन त्याच्या कडा गावावरील जिझिया कर माफ केला होता.

याच्या मृत्यूनंतर याचे शव कडा गावाहून प्रयागला, तिथून काशीला व तिथून जगन्नाथपुरीला वाहत गेले. तिथे जगन्नाथाने आपल्या पंड्यांना स्वप्नदृष्टांत देऊन त्याला आपल्याजवळ आणवले. मलूकदासाच्या इच्छेवरून त्याने त्याला आपल्याजवळ स्थान दिले, अशी आख्यायिका आहे. अजूनही ते स्थान तिथे दाखवतात आणि जगन्नाथांच्या प्रसादाबरोबर त्याच्या नावाचा रोटही भक्तांना वाटतात.

अजगर करे न चाकरी, पक्षी करे न काम
दास मलूक कहत हैं सबके दाता राम ॥

अर्थ – अजगर नोकरी करीत नाही, पक्षी काम करीत नाही. मलूकदास म्हणतो, की सर्वांचा दाता राम आहे.

या दोह्यावरून मलूकदासाला नियतिवादी मानण्यात येते; पण श्री. परशुराम चतुर्वेदी यांचे मत असे आहे, की मलूकदास नामक अनेक व्यक्ती होऊन गेल्या. त्यांतल्या एका मलूकदासाचे हे पद्य असेल; प्रस्तुत मलूकदासाचे नव्हे. [उ. भा. सं. प.; क. को. १; सं. सा. सा.]

मल्लखांब व्यायामांचा एक प्रकार. मल्लखांब याचा अर्थ मल्लाला उपयोगी पडणारा खांब असा आहे. कारण मल्लाला कुस्तीसाठी योग्य असे शरीर कमावण्यासाठी हा खांब बनवलेला असतो. कुस्ती खेळण्यासाठी शक्तीबरोबर चपळतेचीही गरज असते. शरीरात चपळपणा यावा व दम चांगला वाढावा, या हेतूने अनेक प्रकारच्या मेहनती जुन्या काळी केल्या जात होत्या. त्यांत मल्लखांबाच्या मेहनतीची भर घालण्याचे काम बाळंभटदादा देवधर यांनी केले.

श्री. बाळंभटदादा देवधर हे शेवटले बाजीराव पेशवे यांचे मल्लविद्येचे गुरू होते. शेवटले बाजीराव पेशवे यांच्या कारकिर्दीत, निजामाच्या आश्रयाला असलेले अल्ली व गुलाब या नावाचे दोन पहिलवान निरनिराळ्या ठिकाणची अजिंक्यपदे मिळवीत पुण्याला आले व आपल्याला जोड मिळावी, अशी त्यांनी पेशव्यांच्या दरबारात मागणी केली. हे दोन्ही पहिलवान उत्तम कुस्तिगीर व शरीरसामर्थ्याने फार दांडगे होते. त्यामुळे त्यांच्याशी कुस्ती खेळण्यास कोणीच सरकारी पहिलवान तयार होईना. दरबारची अब्रू जाऊ नये म्हणून पेशव्यांनी सहा महिन्यांची मुदत मागून घेतली. बाळंभटदादा देवधर यांनी त्या पहिलवानांशी लढत द्यायचे ठरवले. त्यासाठी शारीरिक तयारीबरोबर देवीची कृपाही आवश्यक आहे, असे त्यांना वाटले. म्हणून त्यांनी नाशिकजवळच्या सप्तशृंगी देवीच्या मंदिरात एकवीस दिवस सप्तशतीचा पाठ केला. एकविसाव्या दिवशी देवीने स्वप्नात येऊन, तुझी इच्छा पुरी होईल व मल्लविद्येची देवता हनुमान, वानररूपाने भेटून तुला हवी ती माहिती देईल, असा त्यांना वर दिला. त्याप्रमाणे, पुढे तीन दिवस मारुतिरायाने त्यांना कुस्तीचे अनेक डाव शिकवले. तसेच, जवळच उभा असलेल्या एका लाकडी स्तंभावर नाना प्रकारच्या उड्या मारून दाखविल्या व बाळंभटदादांना त्या शिकविल्या. हा लाकडी स्तंभ म्हणजे मल्लखांब परंपरेतील आद्य मल्लखांब होय. त्या स्तंभावर उड्या मारून दाखवणारा हनुमान हाच या विद्येचा आद्य गुरू होय. यानंतर बाळंभटदादांनी माणसाच्या कंबरेइतका जाड व माणसाच्या उंचीइतका उंच मल्लखांब करविला व त्यावर निरनिराळ्या उड्या करून मेहनत केली. मग त्यांनी अल्लीशी कुस्ती केली व तिच्यात जय मिळवला. गुलाबने न खेळताच आपली हार मान्य केली. अशा रीतीने, या कुस्तीमुळे पेशवे दरबारची अब्रू संभाळली गेली. त्यामुळे पेशव्यांची बाळंभटदादांवर फार भक्ती बसली. पुढे उत्तम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कुस्तिगीर म्हणून देशभर त्यांची ख्याती झाली.

पुढे बाळंभटदादांनी बराच प्रवास केला व पुष्कळ ठिकाणी आखाडे सुरू केले. काशी येथे त्यांनी कोंडभटनाना गोडबोले

बाळंभटदादा देवधर

यांना मल्लविद्या शिकवून उत्तम प्रकारे तयार केले व काशीच्या आखाड्याचे मुख्य चालक नेमले. बाळंभटदादांचे पुत्र नारायणगुरू हेही कुस्ती व मल्लखांब यांत प्रवीण झाले. कोंडभटनाना गोडबोले यांचे पट्टशिष्य दामोदरभट मोघे यांनी पुढे वेताचा मल्लखांब शोधून काढला, कोंडभटनानांचे पुत्र अनंतरामगुरू व नारायणगुरू हे साधा व वेताचा मल्लखांब फार उत्तम करीत. मल्लविद्येचाही त्यांचा दांडगा अभ्यास होता. याशिवाय, ग्वाल्हेर येथील अच्युतानंद व्यायामशाळेचे संचालक रामचंद्र हरनाथ पेंटर, बडोदे येथील हरी माधव ऊर्फ तात्यासाहेब सहस्रबुद्धे, गजाननपंत टिळक, गोविंदराव तातवडेकर, धोंडो नारायण विद्वांस, लक्ष्मण नारायण सप्रे, वसंत बळवंत कप्तान, रंगोपंत वाठोरे, सातारा येथील दामोदर बळवंत भिडे, पुणे येथील गणेश सखाराम वझे मास्तर, भाऊराव गाडगीळ, सरदार अनंत हरिहर खासगीवाले, ल. ब. भोपटकर, उज्जयिनी येथील विष्णू मार्तंड डिंगरे आणि बडोदे येथील सरदार द. चिं. ऊर्फ आबासाहेब मुजुमदार, या सर्वांनी मल्लविद्येच्या व मल्लखांबाच्या प्रसारासाठी खूपच परिश्रम घेतले.

कुस्तीचे डाव करताना ज्या प्रकारे शरीर वळवावे लागते, तशा प्रकारचे शरीर वळवण्याचा सराव मल्लखांबावर करता येतो. तसेच पायांची स्वारी, रगडा व पायाचा खोडा बांधण्याची सवयही याच्यावर करता येते. ज्याला मल्लखांब येत नाही, त्याला कुस्तीतील निरनिराळ्या प्रकारचे दसरंग नीट करता येत नाहीत. कारण, अशा माणसाचा तोल स्वाधीन न राहिल्यामुळे तो उताणा होण्याचा संभव असतो. मल्लखांबाची मेहनत केलेला मनुष्य आक्रमकपणे प्रतिस्पर्ध्यावर नाना प्रकारचे डाव करू शकतो.

नुसता व्यायामाचा प्रकार म्हणूनही मल्लखांबाचा व्यायाम फार वरच्या दर्जाचा आहे. यातील उड्या, शरीर निरनिराळ्या प्रकारे वाकवून करायच्या असल्यामुळे निरनिराळ्या इंद्रियांच्या क्रिया सुधारतात. शरीराच्या सर्व भागांतील स्नायूंना ताण पडून ते मजबूत होतात. तसेच त्यामुळे सर्व सांधे मजबूत होऊन वाटेल तसे लवू शकतात. सर्व शरीर त्यामुळे नरम राहते.

साध्या मल्लखांबाचे मुख्य दोन प्रकार आहेत — एक कुस्तीच्या उपयोगी अढ्या करण्याचा जाड मल्लखांब व दुसरा कौशल्याच्या दिखाऊ उड्या करण्याचा बारीक मल्लखांब. शिसवीच्या लाकडाचा मल्लखांब सर्वांत उत्तम समजतात. तो नसेल तर देशी किंवा मलबारी सागवानाचा मल्लखांब करावा, असे सांगितले आहे. शिसवी लाकडाचा मल्लखांब थंड समजतात. कारण त्याचे तंतू फार जवळ असल्याने तो जास्त गुळगुळीत होऊ शकतो आणि त्याच्यावरून शरीर घसरले, तरी कातडे घासत नाही. याउलट सागवानी मल्लखांबावरून शरीर घसरले तर कातडे सोलले जाण्याचा संभव असतो. मल्लखांब बंद जागेत पुरतात. पुरताना त्याच्या खळग्यात विटा, चुना, वाळू वगैरे पदार्थ टाकतात. त्याच्या खालच्या अंगाला डांबराचा जाड लेप देतात. त्यामुळे त्याला वाळवी लागत नाही.

मल्लखांबाजवळची जमीन मऊ करतात. त्यामुळे मल्लखांबावरून उडी टाकल्यावर पायांना झिणझिण्या येत नाहीत. मल्लखांबाच्या बोंडावरून मारलेल्या उड्या मल्लखांबापासून दूर व जोराने पडतात. म्हणून ती जागा उकरून नरम करतात किंवा त्या जागी काथ्याची गादी पसरतात.

प्रातःकाळी स्नानसंध्यादी आटपल्यावर थोडे सूर्यनमस्कार घालून किंवा दंडबैठकांची थोडी मेहनत करून मल्लखांब करावा. पावसाळ्यात व थंडीच्या दिवसांत संध्याकाळी पाच वाजल्यानंतर व उन्हाळ्यात साडेपाच वाजल्यानंतर थोडी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मेहनत करून मल्लखांब करावा. त्यापूर्वी केल्यास उष्णतेमुळे शरीराला घाम येऊन शरीर मल्लखांबावरून घसरते. थंडीच्या



आतल्या हाताची व बिनहाती अढी

दिवसांत शरीराला मुळीच घाम येत नसल्यामुळे ते मल्लखांबावरून घसरत नाही. म्हणून अंगाला एरंडेल लावून मल्लखांब करावा. जेवणानंतर पाच तासांनी मल्लखांब करावा. फार जेवण झाले असता अगर फार भूक लागली असता मल्लखांब करू नये.

मल्लखांब करताना फक्त काचा नेसून त्यावर कुस्तीची असते तशी, पण सैल चड्डी घालावी. काचा पातळ जीनचा किंवा मांजरपाटाचा असावा. तो सहा बोटे रुंद व अकरा हात लांब असावा. काही लोक लंगोट व त्यावर चड्डी घालून मल्लखांब करतात. पण लंगोटापेक्षा काचाने शरीराचा जास्त चांगला बचाव होतो.

मल्लखांबावरील कामाचे सोळा वर्ग केलेले आहेत, ते असे – (१) अढ्या, (२) उड्या, (३) सलाम्या, (४) तिढ्या, (५) वगल्या, (६) दसरंग, (७) फिरक्या, (८) उतरत्या, (९) वेल, (१०) सुईदोरे, (११) फरारे, (१२) आसने, (१३) झाडे, (१४) दिव्याचा मल्लखांब, (१५) हत्यारांचा मल्लखांब व (१६) चमत्कृतिजन्य कामे. या वर्गांची क्रमाने माहिती अशी –

अढ्या – मल्लखांबाला दोन्ही पायांनी विळखा घालून व खाली डोके आणि वर पाय करून मल्लखांबाकडे पोट येईल, अशा तऱ्हेने मल्लखांबावर राहतात, त्याला अढी म्हणतात.

मल्लखांबाला अढी बांधून राहण्याची क्रिया व्यायामाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे व शिकायला सोपी आहे. म्हणून ही क्रिया मल्लखांब नवीन शिकणाऱ्याला प्रथम शिकवतात. अढ्यांचे साधी, बगल, हातखोड्याची, गोफण, आदव, कातरपकडीची, इ. प्रकार आहेत.

उड्या – कोणत्याही प्रकारची कामे करण्यासाठी मल्लखांबावर गेल्यानंतर, ती कामे करून झाल्यावर किंवा कामे करणारा दमल्यावर जमिनीवर येण्यासाठी जी क्रिया करतात तिला उडी मारणे म्हणतात.

अढी बांधून साधी उडी मारण्याचा प्रकार सोपा व सोयीचा असल्यामुळे तोच प्रथम शिकवतात. उडी पायांच्या पंजावर मारायची असते. उडी मारल्यावर पायांचा आवाज होता कामा नये. बत्तासे किंवा पैसे जमिनीवर ठेवून त्यांवर उडी मारली असता बत्तासे फुटता कामा नयेत व पैसे सरकता कामा नयेत. साधी, जमिनीला नाक लावून, छाती लावून, दुहाती, एकहाती, इ. उड्यांचेही अनेक प्रकार आहेत.



जमिनीला छाती लावून उडी

सलाम्या – मल्लखांबाला हात लावून, काम करणाऱ्याने कोलांटी मारल्याप्रमाणे उडी मारून जागच्या जागी राहण्याच्या क्रियेला सलामी असे म्हणतात. या सलाम्या म्हणजे प्रेक्षकांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वंदन करण्याचा एक प्रकार होय. मल्लखांब धरण्याच्या निरनिराळ्या प्रकारामुळे सलाम्यांचे अनेक प्रकार होतात; पण प्रत्येक प्रकारात कोलांटी मारण्याची क्रिया सारखीच असते. साधी, दुहाती, एकहाती, घोड्याची, बगलीची, इ. सलामीचे प्रकार आहेत.

तिड्या – मल्लखांबाकडे पाठ करून व खाली डोके आणि वर पाय करून मल्लखांबाला पायांची अढी बांधून राहणे, याला तिडी असे नाव आहे. तिडी बांधताना शरीर कमरेतून मुरडून मल्लखांबाला प्रथम एक पाय लावल्यानंतर जास्त फिरून नंतर दुसरा पाय पहिल्या पायावर टाकून पायांची अढी बांधावी लागते. अढीपेक्षा तिडी करताना शरीर जास्त स्वाधीन ठेवावे लागते.

साधी, बगल अढीची, खांदा अढीची, कोकापकडीची, गोफण अढीची, आदब अढीची, मोकळ्या हाताची, बंदरपकडीची, शयनासन, कातरपकडीची, मानेची, शीर्षासनाची, तिरप्या वृक्षासनाची, थापेची, एकहाती, घोड्याची, नकीकसाची, इ. तिडीचे अनेक भेद आहेत.

बगल्या – मल्लखांबाजवळ ओणवे उभे राहून, मल्लखांब बगलेत धरून व मागून पाय वर उडवून, तिडीप्रमाणे मल्लखांबाकडे पाठ करून, मल्लखांबाला पायांची अढी बांधतात, त्याला बगली असे म्हणतात. बगलेत मल्लखांब धरून त्यावर सर्व शरीराचा तोल संभाळायचा असतो.

साधी, दुहाती, आदब अढीची, कानपकडीची, मोकळ्या हाताची, बगलीच्या पायाची, इ. बगलीचे प्रकार आहेत.

दसरंग (दस्तरंग) – जमिनीवर उभे राहून केलेली अढी, तिडी, बगली, सुईदोरे वगैरे कामे, पुन्हा जमिनीवर न येता वरच्या वर तीच ती कामे करीत राहणे, याला दसरंग असे नाव आहे. याप्रमाणे, पुन्हा पुन्हा वरच्या वर तेच काम दोन्ही अंगांनी करीत राहिल्याने मेहनत चांगली होऊन दम वाढतो व ते काम पक्के व सफाईदार करता येते.

साधा, साध्या बगल अढीचा, दुहाती बगल अढीचा, आदब अढीचा, मोकळ्या हाताचा, दुहाती, कानपकडीचा, साध्या घोडाअढीचा, बगलीचा, दुहाती नकीकसाच्या तिडीचा, एकहाती, एकहाती बगलीचा, आदब अढीच्या बगलीचा, इ. दसरंगाचे अनेक प्रकार आहेत.

फिरक्या – दसरंग करून मल्लखांबाच्या बोंडाजवळ गेल्यानंतर वरच्या वर शरीर फिरवून, दुसऱ्या बाजूला तोंड फिरविणे, या क्रियेला फिरकी असे नाव आहे. या क्रियेत शरीर कमानदार वळून ते आपल्या भोवती वर्तुळाकार किंवा पाऊण वर्तुळाकार फिरते. अशा फिरक्या करताना शरीर आकुंचित करून जलदीने फिरवावे लागते. फिरताना पायांची पकड मजबूत ठेवून हातावर सर्व शरीराचा तोल संभाळावा लागतो.

साधी, मधे पाय घालून, एकहाती साधी, गुरुपकडीची, बगलीची, मछलीपकड, बगलीची मछलीपकड, डंकीची, मानेची, बंदरउडीची, पद्मासनाची, सुदर्शन, इ. फिरकीचे अनेक प्रकार आहेत.

उतरत्या – दसरंग करून मल्लखांबाचे बोंडाजवळ गेल्यावर एकदम वरून खाली येण्याचे काही प्रकार आहेत, त्यांना उतरत्या असे म्हणतात. अशा वेळी शरीर ताब्यात ठेवून संकोचावे लागते. उतरत्या करून खाली आल्यानंतर जमिनीला पाय न लावताच पुन्हा वर उठून अढी बांधायची असते.

साधीची, बगलीच्या साधीची, बगलीची, दुहाती साधीची, एक हाती उतरती, डंकीची, असे उतरतीचे भेद आहेत.

वेल – झाडाच्या भोवती गोल गोल वेटाळीत ज्याप्रमाणे वेल वर जातो, त्याप्रमाणे वेलाची क्रिया करताना शरीर मल्लखांबाभोवती फिरते. म्हणून या क्रियेला वेल असे म्हणतात.

खालून वर वेल चढताना चार किंवा सहा बोटांच्या अंतराने हात वर वर चढवावे लागतात व फिरताना शरीर मुरडून ते थोडे थोडे वर उचलून अंग संकुचित करून हात मल्लखांबावर बांधावे लागतात.

तिडीचा, दुहाती तिडीचा, साधीचा, बगलीचा, अंगसफाच्या मच्छाचा, अंगसफाच्या पलंगाचा, उलट झाप, बगलीच्या पलंगाचा, इ. वेलाचे प्रकार आहेत.

सुईदोरा – सुईत दोरा ओवतात, त्याप्रमाणे हातांच्या गोफणीतून किंवा मल्लखांब व हात यांच्या मधून एक किंवा दोन्ही पाय घालून मल्लखांबावर जी निरनिराळी कामे करतात, त्यांना सुईदोरे असे नाव आहे.

साधा, एक पायाचा, दोन पायांचा, तबकफाडीचा, इ. सुईदोऱ्याचे प्रकार आहेत.

फरारे – मल्लखांब हातांनी धरून व पाय मल्लखांबापासून लांब ताठ ठेवून, तोल संभाळून मल्लखांबावर स्थिर राहण्याच्या प्रकाराला फरारा असे म्हणतात.

साधीचा, दुहाती, एकहाती, साधीचा आडवा, खांद्याचा, विळखा अढीचा, बगलीचा उभा, बगलीचा आडवा, मानेचा उभा, मानेचा आडवा, घोडाअढीचा उभा, घोडाअढीचा आडवा, बोंडावर हात टेकून उभा, बोंडावर खांदा टेकून, बोंडावर छाती टेकून, पताकेचा, बंदर उडीचा, ताजव्याचा, पलंगाचा, इ. फराऱ्याचे प्रकार आहेत.

आसने – मल्लखांबाच्या मेहनतीचा व आसनांचा खरोखर संबंध नाही. पण मल्लखांबावर निरनिराळ्या प्रकारची प्रेक्ष-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

णीय कामे करण्याचा प्रघात पडल्यापासून निरनिराळी आसने मल्लखांबावर करण्यात येऊ लागली. योगासनातील बहुतेक आसने मल्लखांबावर होऊ शकतात.



पलंगाचा फरारा

पश्चिमोत्तानासन, पद्मासनाचे अनेक प्रकार, गर्भासन, हंसासन, मयूरासन, बद्धपद्मासन, पर्वतासन, कोकिलासन, उत्कटासन, कुक्कुटासन, शीर्षासन, वृक्षासन, बगलीचे वृश्चिकासन, इ. आसने मल्लखांबावर करतात.

झाडे – एकापेक्षा अधिक मुलांनी मल्लखांबावर निरनिराळी कसरतीची कामे करून निरनिराळे आकृतिबंध तयार करणे, याला झाडे असे नाव आहे. मल्लखांबावर झाडे करण्याचा प्रकार नवीन असून, तो फार जोखमीचा आहे. झाडे पुष्कळ प्रकारची होतात. त्यांपैकी कित्येक फारच कठीण असतात. झाडे करताना एखादा मुलगा झोक जाऊन वरून खाली पडला, तर त्याच्या शरीराला इजा होण्याची भीती असते. म्हणून झाडे करताना फार सावधगिरी बाळगावी लागते. झाडे करताना मधला मुलगा सर्वात उंच व सशक्त असावा आणि झाडांना आधारभूत मुलगे सर्वात मोठे, सारख्या उंचीचे व सशक्त असावे.

दिव्याची कामे – एका तबकडीला मेणबत्तीचा तुकडा चिकटवून व मेणबत्ती पेटवून ती तबकडी कपाळावर ठेवतात व मल्लखांबावरील निरनिराळी कामे करून दाखवतात. ही कामे करताना कपाळावर ठेवलेली तबकडी पडू नये व मेणबत्ती विझू नये अशी काळजी घ्यावी लागते. हे काम साधले, की क्रमाने काचेचा किंवा पितळेचा एक मोठा पेला पाण्याने भरून तो कपाळावर ठेवून पडू न देता किंवा आतील पाणी सांडू न देता, दिवा किंवा पाण्याचा पेला कपाळावर ठेवून व हातांत आणि तोंडात तलवार धरून, मग शरीराला हत्यारे बांधून, हातात आणि तोंडात तलवार धरून, दोन्ही हातांत शमादाने घेऊन कामे करण्याची सवय करावी.

हत्यारांचा मल्लखांब – हातांत व तोंडात हत्यारे धरून व दंडाला, पाठीला आणि पायांना निरनिराळ्या ठिकाणी हत्या… बांधून मल्लखांबावरची कामे करून दाखवणे, याला हत्यारां… मल्लखांब असे म्हणतात. स्वतःच्या अंगाला किंवा मल्लखांबा… हत्यार लागू न देता मल्लखांबावर काम करणे फार कौशल्य… असते. तसेच, शरीरावर निरनिराळ्या योग्य ठिकाणी हत्… बांधणे हेही काम कौशल्याचेच आहे. हत्यारांच्या मल्लखांबा… अनेक प्रकार आहेत.

चमत्कृतिजन्य कामे – ही कामे दिसायला फार अव… दिसतात; पण तितकीशी कठीण नसतात. ही कामे करणार… शरीर मात्र फार स्वाधीन असावे लागते. मल्लखांबाला हात… लावता बंदूक, तीरकमठा, बालशिटे, तमंचा वगैरे साधने हात… धरून मल्लखांबावर बोंडापर्यंत जाण्याची उत्तम सवय कर… लागते. तसेच दोन हातांत दोन मुद्‌गर घेऊन बोंडावर… राहून ती फिरवण्याची सवय करावी लागते.

दोघांनी एकदम दसरंग करणे, दातांनी विद्यार्थ्याला उच… धरणे, विद्यार्थ्याला करेल्याप्रमाणे फिरविणे, पाण्याने भर… पेला हातात धरून बगली करणे, बोंडावर उभे राहून कढ… शरीर काढणे, बोंडावर बसून बनेटी, पट्टा, इ. फिरवणे, ति… तिरंदाजी करणे, बाटल्यांवरील मल्लखांब, नोंडात धरले… मल्लखांबावरील कामे, इ. कामांचा यांत अंतर्भाव होतो.

वरील सर्व प्रकार हे कुस्तीच्या उपयोगाच्या जाड म… खांबावर आधारलेले आहेत. याशिवाय मल्लखांबाचे गि… उंच व बारीक, जमिनीत बसवता व काढता येण्यासार… वाटोळ्या मेजावरील, गाडीवरील, चक्री, लांब अंतरपक… पायावरील जाड अंतरपकड, हत्यारे बांधलेला, गायदुमी अं… पकड, पलित्याचा, बाटल्यावरील, जोड, टांगता, अंतरपकड, … अंतरपकड, वेताचा, जोडवेताचा, दोरीचा, आतषबाजीचा, पा… वरील, आडवा असेही अनेक प्रकार आहेत. [व्या. ज्ञा. को.]

मल्लद्वादशी

एक तिथिव्रत. मार्गशीर्ष शुद्ध द्वादशीला कृष्ण… पूजा करणे, हा या व्रताचा विधी आहे. … अरण्यद्वादशी असेही म्हणतात. पाहा – अरण्यद्वादशी.

मल्लपुराण

मल्लविद्येवरील एक ग्रंथ. ग्रंथाच्या लेखक… किंवा ग्रंथनिर्मितीच्या काळाचा ग्रंथात कु… उल्लेख नाही. पण ग्रंथाची नक्कल पौष शु. ११ संवत १… (इ. स. १६७४) या दिवशी केली, असे मात्र नमूद के… आहे. या ग्रंथात नऊ प्रकरणे आणि सुमारे ४३७ श्लोक आ… पहिल्या प्रकरणाचे नाव कृष्णपुरप्रवेशोत्सव असे आहे. कृष्ण… मल्लविद्या सोमेश्वराला सांगितली, असे तिथे म्हटले …

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दुसऱ्या प्रकरणाचे नाव सोमेश्वरकृष्णप्रश्न असे असून, त्यात मल्लविद्येची प्रशस्ती गायिली आहे. मल्लविद्येच्या अभ्यासाने अंगशुद्धी, सत्त्वशुद्धी व बलवृद्धी प्राप्त होते, असे सांगितले आहे.

चतुःपात्रप्रकरण असे तिसरे प्रकरण असून, त्यात मल्लांचे पुढील प्रकार दिलेले आहेत. ज्येष्ठी हा सर्वश्रेष्ठ मल्ल असून, त्याच्या अंगी चौसष्ट गुण असतात. अंतरज्येष्ठी हा मध्यम मल्ल असून, त्याच्या अंगी तीस गुण असतात. गोपकुल आणि भविष्य हे त्याहून कमी प्रतीचे मल्ल होत.

चौथ्या पंचांगमल्ललक्षण प्रकरणात मल्लांच्या निरनिराळ्या अवयवांचा विचार केला असून, उत्तमांगाची वत्तीस व अधमांगांची सोळा लक्षणे सांगितली आहेत. याशिवाय मल्लांचे अस्थिसार, मांससार, मेदसार, अस्थिमेदसार आणि अस्थिमांससार असे पाच भेद वर्णिले आहेत.

पाचव्या गजसिंहमृगवृषभमल्लस्वरूप प्रकरणात मल्लाच्या शरीरांच्या बांध्यांवरून त्यांचे गजवर्गातील, सिंहवर्गातील, वृषभवर्गातील व मृगवर्गातील असे भेद कलिलेले आहेत.

सहाव्या कला प्रकरणात आखाड्याचे सविस्तर वर्णन आहे. आखाड्याचे देवमान, दैत्यमान व मर्त्यमान असे तीन प्रकार असून, देवमान आखाड्याची लांबीरुंदी प्रत्येकी २०१ हस्त, दैत्यमानाची ५० हस्त व मर्त्यमानाची २१ हस्त असावी, असे सांगितले आहे. पांढऱ्या मातीच्या आखाड्याला ब्राह्मणीभूमिका, पिवळ्या मातीच्या आखाड्याला क्षत्रियभूमिका आणि काळ्या मातीच्या आखाड्याला शूद्रीभूमिका अशी नावे दिलेली आहेत.

नंतर मल्लाचा दिनक्रम सांगितलेला आहे – सकाळी उठून स्नानसंध्या करून मल्लाने आखाड्यात जाऊन व्यायाम करावा, व्यायाम करण्यापूर्वी आखाड्याची अधिष्ठात्री देवता जी कृष्ण तिला नमस्कार करावा आणि मग वासुकीचे ध्यान करावे. पाखंडी, रोगी आणि स्त्रिया यांच्या देखत व्यायाम करू नये.

सातव्या अंगधाट प्रकरणात वेगवेगळ्या मल्लांचे अवयव कसे असावे, ते वर्णिले आहे. गजवर्गातील मल्ल उन्नतांग आणि समपाद, सिंहवर्गातील मल्ल लीनांग आणि उन्नतपाद, वृषभवर्गातील समांग आणि विषमपाद आणि मृगवर्गातील वलांग आणि चलत्पाद असावे, असे म्हटले आहे. नंतर कुस्तीतील निरनिराळे प्रहार उल्लेखिले आहेत.

आठव्या चतुर्मल्लश्रमलक्षण प्रकरणात चौदा प्रकारचे लाग, शरीरातील जयस्थाने व आम्रने वर्णिली आहेत. नंतर मल्लाचा आहारविहार कसा असावा, ते सांगितले आहे.

साधारणपणे हिवाळ्यात जास्त, उन्हाळ्यात बेताचा आणि पावसाळ्यात कमी व्यायाम करावा, असे नवव्या प्रकरणात सांगितले आहे. तसेच गार पाण्याने स्नान व अंगमर्दन हे मल्लासाठी प्रशस्त मानलेले आहे. मल्लाने पौष्टिक आहार घ्यावा आणि हरीतकी, पिंपळी, हिंग, सैंधव, खडीसाखर, मध इ. पाचक पदार्थ सेवन करावे; तसेच ऋतुमानाप्रमाणेही योग्य ते पदार्थ सेवन करावे, असे सांगितले आहे. [श्री. ई. डी. कुलकर्णी, प्रोसीडिंग्ज अँड ट्रँझॅक्शन्स ऑफ दि ऑल इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्स, ट्वेंटिएथ सेशन, भुवनेश्वर, ऑक्टो. १९५९]

मल्लव एक लिंगायत जात. या लोकांची वस्ती प्रामुख्याने बेळगाव, धारवाड आणि कानडा या जिल्ह्यांत आहे. मल्लव हे नाव मलनाड म्हणजे डोंगराळ मुलूख या शब्दावरून आले आहे. पूर्वी या लोकांचे वास्तव्य डोंगराळ प्रदेशात होते, असे म्हणतात. मल्लव लोक स्वतःला वीरशैव क्षत्रिय मानतात. कारण त्यांचे पूर्वज सोंदे, बिलगी आणि इक्केरी या गावांचे प्रमुख होते. मल्लव हे मुळात जैन होते आणि इ. स. च्या १४ व्या व १५ व्या शतकांत ते लिंगायत बनले, असे म्हणतात.

मल्लव लोकांचे मस्किन, नीर, बलसाड, कोडग किंवा कूर्ग आणि वंडी किंवा गौडी संतान असे पाच पोटभेद आहेत. मस्किन मल्लव स्त्रिया तोंडावर बुरखा घेतात. तसेच त्या पाण्याचे घडे डोक्यावरून न वाहता कमरेवरून वाहतात. घडा डोक्यावर घेतल्यास त्यांना जातिबहिष्कृत व्हावे लागते. नीर मल्लव लोक विहिरीवरून पाण्याचे घडे आणताना त्यांची तोंडे फडक्याने झाकतात. बलसाड आणि कोडक किंवा कूर्ग मल्लव हे त्या त्या प्रदेशात राहतात. वंडी किंवा गौडी संतान हे मल्लव विधवा व कुमारिका यांची संतती समजले जातात.

बहुतेक मल्लवांकडे शेतजमिनी असून, त्यांत ते भात, ऊस आणि सुपारी पिकवतात. काही लोक व्यापारही करतात.

त्यांच्यात नंदी, स्कंद, वीर, भृंगी आणि वृष अशी गोत्रे आहेत. हे लोक बसव, गुड्ड, गुट्टी, ईश्वर, इ. देवतांना भजतात. एकाच देवतेला भजणाऱ्या कुटुंबांत लग्नसंबंध होत नाही. मल्लवांना अष्टवर्ण विधीविहित आहेत. जंगम किंवा ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करतात.

भूतप, हुलिअप, बिरूप, इ. त्यांच्या क्षेत्रदेवता असून, त्यांची ते पाषाणांच्या स्वरूपात पूजा करतात आणि त्यांना दर वर्षी तांदूळ, केळी, भात, बकरा वगैरे अर्पण करतात. [ट्रा. का. वाँ.]

मल्लविद्या प्राचीन कालापासून प्रचलित असलेली एक विद्या. सांप्रत हिला कुस्ती असे म्हणतात. मानवाच्या प्रारंभिक अवस्थेत त्याला जगण्यासाठी शरीरबळाची आवश्यकता असे. स्वतःचे पोषण आणि संरक्षण तो आत्मबलाच्या जोरावरच करीत असे. पुढच्या काळात हे बळ पद्धत-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शीरपणे कसे मिळवावे आणि त्याचा विनियोग कसा करावा त्याचे शास्त्र निर्माण झाले.

रामायणकाळात बलोपासनेला विशेष महत्त्व आले. प्रतिस्पर्ध्याशी अंगाला अंग भिडवून युद्ध करणे, याला त्या काळी बाहुयुद्ध म्हणत. या बाहुयुद्धातले काही डावपेच –

देवमार्ग – वर ओढणे, अधोमार्ग – खाली दाबणे, मार्गगत – सरळ ओढणे, गजस्कंध – खांद्यावर चढणे, अपराङ्मुख – पालथे पाडणे, गमनाकुल – गरगर फिरवणे, यष्टिघात – काठीसारखे आपटणे, गात्रबंध – मिठी मारणे, बाहुमूल – खांदे धरणे, इत्यादी.

या काळात बाहुयुद्धाला लोकप्रियता मिळू लागली आणि पुढे महाभारतकाळी तर मल्लविद्येला राजाश्रयही मिळाला.

पुढे अनेक ठिकाणी मल्लयुद्धासाठी मल्ल तयार करण्याचे आखाडे निर्माण झाले. या आखाड्यांत निवडक मुलांना शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांना बळकटी आणण्यासाठी व्यायामाचे वेगवेगळे प्रकार आणि स्वसंरक्षण व आक्रमण यांना उपयोगी पडणारे डावपेच शिकवीत. शिकवणाऱ्याला मल्लाध्यक्ष म्हणत. मुलगा तेवीस वर्षांचा होईपर्यंत मल्लाध्यक्ष त्याला हे शिक्षण देई. शिक्षण चालू असताना त्याला ब्रह्मचर्य पाळावे लागे. शिक्षण पूर्ण झाल्यावर मल्लाध्यक्ष आपल्या मल्लांना घेऊन राजाकडे जाई व त्यांची विद्या पाहण्यासाठी राजाला समाज (फड) बोलावण्याची विनंती करी.

महाभारत, हरिवंश, विष्णु पुराण, मानसोल्लास. इ. ग्रंथांत मल्लयुद्धाची प्राथमिक योजना कशी करीत, त्याचे वर्णन आढळते. काटेकुटे व मोठे वृक्ष नसलेली एक विस्तृत जागा द्रोणाचार्यांनी निवडली आणि सुमुहूर्तावर नागरिकांच्या उपस्थितीत भूमिपूजन करून तिथे एक मोठे प्रेक्षागार बांधवून घेतले, असे वर्णन महाभारतात आहे.

कंसाला मल्लयुद्धाची फार आवड होती. तो स्वतः मल्लविद्येत पारंगत होता. त्याच्या पदरीही अनेक बलाढ्य मल्ल होते. तो वारंवार मल्लयुद्धे घडवून आणी. त्यासाठी त्याने एक भव्य मैदान बांधले होते. हे मैदान अष्टकोनी होते. त्याचे प्रवेशद्वार पूर्वेकडून होते व बाकीच्या सात बाजू बंद होत्या. प्रेक्षकांना बसण्यासाठी आत लाकडी सोपानाची रचना केलेली होती. पूर्वभागी उंचावर प्रशस्त आखाडा बांधलेला होता. त्यात एका वेळी अनेक मल्लयुद्धे होत. आखाड्याभोवती तीन लाकडी कोट असत. मल्ल घामाघूम झाल्यास घाम टिपण्यासाठी रानशेण्यांची वस्त्रगाळ राख भरलेले रांजण आणि तहान लागल्यास पिण्यासाठी पाणी भरलेले रांजण ठिकठिकाणी ठेवलेले असत. तसेच काही औषधेही ठेवलेली असत. आखाड्याजवळच कंस व इतर राजे, सरदार, मानकरी यांच्यासाठी सुंदर व प्रशस्त इमारत बांधलेली होती. तिच्या दुसऱ्या मजल्यावर राजघराण्यातील स्त्रियांसाठी खास व्यवस्था केली होती. कुलीन स्त्रियांसाठी पडदे लावून बसण्याची सोय केलेली असे. मैदानात उपाहारगृहांचीही सोय असे. मल्लयुद्धे सुरू होण्यापूर्वी रणवाद्ये वाजवीत.

महाभारतकाळी मल्लयुद्धाचे काही नियमही निश्चित झाले होते. त्यांपैकी काही असे–(१) लढणाऱ्या मल्लांपैकी कोणीही शस्त्राचा अवलंब करू नये. (२) वय, वजन व ताकद समान असलेल्या मल्लांचीच जोडी ठरवावी. (३) जोडी ठरवल्यापासून साधारण एक महिन्याने लढत व्हावी. त्या अवधीत मल्लांनी सराव करावा. (४) लढतीच्या वेळी एखाद्या मल्लास मूर्च्छा आल्यास लढत थांबवावी व त्याच्या डोक्यावर पाणी शिपडून त्याला सावध करावे. (५) घाम आला असता किंवा मूर्च्छा आली असता, लढत ज्या अवस्थेत थांबवली असेल त्याच अवस्थेत ती नंतर पुन्हा सुरू करावी. (६) मल्लयुद्धाचा निकाल लागल्यानंतर जित व जेता अशा दोन्ही मल्लांच्या संरक्षणाची व्यवस्था असावी. (७) हा नियम मोडणाऱ्या मल्लाला कडक शासन व्हावे. (८) लढत नियमाप्रमाणे चालली आहे की नाही, हे पाहण्याचे व तिचा निकाल देण्याचे काम पंचांनी करावे.

मल्लांना युद्धासाठी निमंत्रण मिळाले, की ते अंगाला चंदन चर्चून नवीन वस्त्र धारण करीत आणि दहीभातासारखा अल्पाहार घेत. नंतर हातांत दूर्वा व अक्षता घेऊन ते हत्तिणीवर आरूढ होऊन तूर्यभेरींच्या निनादात भगवान श्रीकृष्णाला पुष्पांजली अर्पण करीत आणि राजाला वंदन करून आपापल्या जागी जाऊन बसत.

प्रत्यक्ष लढतीच्या वेळी मल्ल लंगोट घालीत व एका लांब वस्त्राने कंबर कशीत. मग मल्ल हस्तस्पर्श करून एकमेकांच्या पाया पडत आणि लढतीला सुरुवात होई.

मल्लासाठी आचारसंहिता ठरवलेली होती. मल्लाने अंगमर्दन करून मग गार पाण्याने स्नान करावे, असे सांगितले आहे. मल्लाच्या जीवनात योग्य आहाराला महत्त्वाचे स्थान असे. भाजीपाला, फळे, मासे, मांस, दही, दूध, तूप, इ. शक्तिवर्धक पदार्थ त्याच्या आहारात असावे, तसेच ऋतुमानाप्रमाणे त्याने आहारात बदल करावे, असे सांगितलेले आहे.

पूर्वी युद्धमह नामक एक उत्सव दर वर्षी होत असे. त्या वेळी मल्ल आपले कौशल्य दाखवीत काही मल्ल तर देशाच्या निरनिराळ्या भागांत दौरे करून राजमल्लांशी युद्ध करीत, असे उल्लेख जैन साहित्यात आढळतात. पाहा – आखाडा, कुस्ती मल्लपुराण. [प्रा. भा. सा. सां. भू.; मानसोल्लास; भारतीय

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मल्लविद्या, उदय आणि विकास – श्री. कृ. गो. सूर्यवंशी, १९६५; एकता, पौष शके १८७९]

मल्लार एक जात. या लोकांची वस्ती मध्य प्रदेशात आढळते. नावाडी व मच्छिमार या लोकांची बनलेली ही जात आहे. हे लोक मूळचे केवट जातीतले होते असे म्हणतात; पण यांनी ताग पिकविण्याचा व्यवसाय सुरू केल्यामुळे यांची स्वतंत्र जात बनली. बलराम हा आपला पूर्वज असल्याचे हे सांगतात.

केवट लोकांशी यांचा लग्नसंबंध होत नाही. हे लोक मुलींची लग्ने बालपणीच करतात. यांच्यांत घटस्फोट व विधवाविवाह पूर्वीपासुन रूढ आहे. घटस्फोट जातीच्या पंचायतीसमोर घ्यावा लागतो. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

मल्लारिमहोत्सव एक पूजाप्रधान व्रत. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीला मल्लारी व त्याची पत्नी म्हाळसा यांची पूजा करतात. मल्लारीच्या पूजेत हळद ही मुख्य वस्तू असते, तिला भंडार असे म्हणतात. ही पूजा प्रत्येक रविवारी किंवा शनिवारी किंवा प्रत्येक षष्ठीलाही करतात. [हिं. ध.]

मल्लारी (इ. स. चे १७ वे शतक) महाराष्ट्रातील एक विख्यात ज्योतिषी. मराठवाड्यात गोदावरी नदीच्या काठी गोलग्राम (गोलटगाव) नामक एक गाव आहे. तिथे एक प्रसिद्ध विद्वत्कुल होऊन गेले. या कुळात विष्णू नावाचा एक मोठा ग्रंथकार होऊन गेला. हे घराणे पुढे काशीला जाऊन स्थायिक झाले. या विष्णूच्या कुळात मल्लारीचा जन्म झाला. मल्लारीने ग्रहलाघवावर एक टीका रचली आहे. गणेश दैवज्ञाच्या ग्रहलाघवाचे चौदा अधिकार उपलब्ध आहेत; पण मल्लारीच्या टीकेत पंचांगग्रहणाधिकार म्हणून पंधरा श्लोकांचा पंधरावा अधिकार मिळतो. याशिवाय याची ताजिकावरही टीका आहे. [भा. ज्यो. शा.; भा. ज्यो. इ.]

मल्लारी मार्तंड मल्ल दैत्याचा वध करणारा देव म्हणजेच खंडोबा. याची जेजुरी, पाली, इ. क्षेत्रे महाराष्ट्रात आहेत. पाहा – खंडोबा.

मल्लिकार्जुन बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक. याचे स्थान श्रीशैल पर्वतावर आहे. आंध्र प्रदेशातील कर्नूर जिल्ह्यात हे क्षेत्र असून, या देवस्थानाची सर्व व्यवस्था तिरुपती संस्थानाकडे आहे. पाहा – श्रीशैल.

मल्लिकार्जुन पंडिताराध्य (१११०–११७५ इ. स.) एक वीरशैव धर्माचार्य. याचा जन्म आंध्र प्रदेशातील गोदावरी जिल्ह्याच्या द्राक्षाराम या गावी झाला. याचे वडील भीमन पंडित हे गौतमगोत्री ऋग्वेदी ब्राह्मण असून, ते द्राक्षारामाच्या भीमेश्वरस्वामीमंदिरात पुजारी होते. मल्लिकार्जुनाच्या आईचे नाव गौरांबा. द्राक्षारामाजवळ कोटपल्ली नावाचे गाव आहे. तियले आराध्यदेव हे मल्लिकार्जुनाचे गुरू होत. मल्लिकार्जुनाने यांच्यापासून शैव दीक्षा घेतल्यावर आपले उर्वरित सारे आयुष्य शैवमताचा प्रसार करण्यात घालविले.

वेंगीच्या (पूर्व) चालुक्य राजवंशातील राजेंद्र दुसरा इ. स. १०७० मध्ये चोळांच्या सिंहासनावर बसला तो कुलोत्तुंग पहिला या नावाने ओळखला जातो. तेव्हापासून वेंगीचे राज्य चोळांच्या साम्राज्यात समाविष्ट झाले. चोळांचे राजप्रतिनिधी म्हणून जे घराणे वेंगीवर राज्य करू लागले, ते कुलोत्तुंगाच्या वंशातलेच होते. त्या घराण्याला वेळनाटी चोळ घराणे म्हणतात. त्या घराण्यातला राजा चोळराज दुसरा (इ. स. ११६३–११८०) याच्या दरबारात मल्लिकार्जुनाने प्रतिज्ञा केली ती अशी – शिव हा सर्वश्रेष्ठ देव आहे, हे सिद्ध करण्यासाठी जरूर पडली तर मी स्वतःचे मस्तकही अर्पण करीन आणि शिवाहून इतर देव श्रेष्ठ आहेत, असे प्रतिपादन करणाऱ्याच्या मस्तकावर मी लत्ताप्रहार करीन.

एकदा बौद्ध व जैन पंडितांबरोबर पंडिताराध्याचा वाद होऊन त्यात त्याचा विजय झाला. बौद्धांचा पराजय झाल्यावर, मल्लिकार्जुनाच्या पूजेत असलेल्या शिवलिंगावरील हार घेऊन ते पळून गेले. मल्लिकार्जुनाच्या शिष्यांनी त्यांना गाठून त्यांची हत्या केली. यामुळे वेळनाटी चोळ राजा (दुसरा) चिडला व त्याने पंडिताराध्याचे डोळे काढले. पंडिताराध्याने चिडून राजाला शाप दिला. त्यानंतर वेळनाटी चोळांचा नाश झाला. दुसऱ्या एका ग्रंथात वेळनाटी चोळाचा मेहुणा कोंडापटी बुद्धराज याने पंडिताराध्याचे डोळे काढले असे म्हटले आहे. वीरशैवांची समजूत अशी आहे, की शिवानुग्रहाने त्याला पुनश्च दृष्टिलाभ झाला.

चंदवोळ ही चोळांची राजधानी होती. ती सोडून मल्लिकार्जुन प्रथम अमरावतीला व नंतर श्रीशैलाला गेला. श्रीशैलाच्या खाली बेरुहूरी या गावी तो राहिला आणि अखेर तियेच त्याचा मृत्यू झाला.

मल्लिकार्जुनाने तत्कालीन प्रसिद्ध शैव तीर्थांच्या यात्रा केल्या. या यात्रांतच त्याने रुद्रमहिमा, लिंगोद्भवगद्य, अमरेश्वराष्टक, इ. ग्रंथ रचले. हे ग्रंथ तेलुगू भाषेत आहेत. याशिवाय गण-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सहस्रनाम, इष्टलिंगस्तोम व बसवगीत हे ग्रंथ त्याने कानडीत रचले आहेत. त्याची स्फुट रचनाही बरीच आहे.

या सर्व ग्रंथांमध्ये शिवतत्त्वसार हा त्याचा ग्रंथ प्रमुख होय. त्यात ४८९ पदे आहेत. हा ग्रंथ प्रौढ शैलीत रचला गेला आहे. वीरशैव साहित्यात त्याला मोठा मान आहे.

मल्लिकार्जुन पाशुपत शैव मताचा होता व तो बसवेश्वराचा समकालीन होता. बसवेश्वराने कल्याणीहून याच्याकडे विभूती पाठविली होती, असे सांगतात. ती विभूती लावल्याबरोबर याला कानडी भाषा येऊ लागली, अशी दंतकथा आहे. त्याचबरोबर बसवेश्वराने याला ब्राह्मण्याचा त्याग करण्यासही सांगितले होते; पण त्याने ते मानले नाही, असे म्हणतात. या दंतकथांच्या आधारावरून या दोन पंडितांमधील विचारांचा भेद स्पष्ट होतो. [व. का. रा.; ते. सा. इ.; जर्नल दि ऑफ आंध्र हिस्टॉरिकल रिसर्च सोसायटी, १९६०-६१]

मल्लिनाथ

(१) (इ. स. चे १४ वे किंवा १५ वे शतक) संस्कृत भाषेतील एक प्रसिद्ध टीकाकार. याचे संपूर्ण नाव कोलाचल मल्लिनाथ असे होते. याला पेड्डुभट्ट असेही म्हणत असत. हा आंध्र प्रदेशाचा रहिवासी असावा. काव्य, अलंकार, व्याकरण, ज्योतिष, स्मृती व षड्दर्शने यांमध्ये तो पारंगत होता. व्याकरण, व्युत्पत्ती आणि अर्थविवेचन या दृष्टीने त्याच्या टीका विशेष प्रशंसनीय आहेत. 'नामूलं लिख्यते किञ्चित नानपेक्षितमुच्यते' = निराधार किंवा अनावश्यक असे काही लिहिले जाणार नाही, अशी त्याची प्रतिज्ञा होती. त्याने रघुवंश, मेघदूत, कुमारसंभव, शिशुपालवध, किरातार्जुनीय, नैषधीयचरित, अमरकोश, इ. ग्रंथांवर टीका लिहिल्या आहेत.

त्याने रघुवंशावरील संजीवनी नामक आपल्या टीकेत शंभरापेक्षा जास्त ग्रंथांचा व ग्रंथकारांचा उल्लेख तरी केला आहे किंवा त्यांची अवतरणे तरी दिली आहेत. त्यांत अमर-वैजयंती यांसारखे कोश, अलंकारशास्त्र, दंडनीती, राजनीती, कायदा, ज्योतिष, संगीतशास्त्र, कामशास्त्र, गजशास्त्र, विविध पुराणे, स्मृती, धर्मशास्त्र, निरनिराळी दर्शने, इ. विविध विषयांवरील ग्रंथ उल्लेखित आहेत.

रघुवंशातील पुढील श्लोकावरील त्याची टीका अशी–

सेना परिच्छदस्तस्य द्वयमेवार्थसाधनम्।
शास्त्रेष्वकुण्ठिता बुद्धिर्मौर्वी धनुषि चातता ॥
(रघु. १.१९)

टीका – तस्य राज्ञः सेना चतुरङ्गबलम्। परिच्छाद्यतेऽनेनेति परिच्छदः उपकरणं बभूव। छत्रचामरादि तुल्यमभूदित्यर्थः। 'पुंसि संज्ञायां घः प्रायेण' इति घप्रत्ययः। 'छादेर्घेऽद्व्युपसर्गस्य' इत्युपधाह्रस्वः। अर्थस्य प्रयोजनस्य तु साधनं द्वयमे शास्त्रेष्वकुण्ठिता अव्याहता बुद्धिः। 'व्यापृता' इत्यपि पा धनुष्याततता आरोपिता मौर्वी ज्या च। 'मौर्वी ज्या शिञ्जि गुणः' इत्यमरः। नीतिपुरःसरमेव तस्य शौर्यमभूदित्यर्थः ॥

अर्थ – त्याचे (दिलीप राजाचे) सैन्य त्याला केवळ रा चिन्हाप्रमाणे असे. कारण कोणतेही कार्य साधण्याचे त्याचे मार्ग होते. एक शास्त्रांत सर्वगामी बुद्धी व दुसरा प्रत्यंचा वलेले धनुष्य.

मल्लिनाथाचा वैश्यवंशसुधाकर नामक तेलुगू भाषेतील ग्रंथ नुकताच उपलब्ध झाला आहे, असे श्री. राघवन लिहिले आहे.

मल्लिनाथ हा टीकाकार म्हणून इतका प्रसिद्ध होता, पुढे मल्लिनाथी हा शब्द टीका या अर्थी रूढ झाला. [हि को.; म. च. को.; व्हॉ. इं. इ. स्ट.; प. कृ. गोडे – प्रो. ट्रॅ कॉ. मद्रास, १९२४.]

(२) जैनांचा १९वा तीर्थंकर. हा गर्भात असताना या आईला मल्लिकापुष्पांचा वास घेण्याचे डोहाळे लागले म्हणून याचे नाव मल्लिनाथ असे ठेवले. श्वेतांबरमते मल्लि हा पुरुष नसून, ती स्त्री आहे. पण याच्या मूर्ती मात्र पुरुषा आढळतात. पाहा – तीर्थंकर. [जै. इ.]

मल्लिनाथपुराण

जैन तीर्थंकर मल्लिनाथ याच्यावि माहिती देणारा हा ग्रंथ सकलकीर्तीने र आहे. जिनस्तुती, विदेहातील कच्छकावती नामक नगरीचे व तिथल्या वैश्रवण राजाची कथा, धर्मोपदेश, रत्नत्रयवर्णन, वै णाच्या दीक्षेचे वर्णन, इंद्रभवनाचे वर्णन, मल्लिनाथाचा अ वतार व जन्माभिषेककल्याण यांचे वर्णन, त्याची वैराग्योत्प त्याचे निष्क्रमण व कैवल्योत्पत्ती, त्याचा धर्मोपदेश शेवटी त्याचे निर्वाण, एवढे विषय यात आले आहेत. [हिंदु

मल्लिषेण

(इ. स. चे ११ वे किंवा १२ वे शतक). श्रेष्ठ जैन कवी व मांत्रिक. याच्या चरित्राचे फारशी माहिती मिळत नाही. हा संस्कृत व प्राकृत भा चांगला जाणकार होता. हा लोककल्याणासाठी मंत्रतंत्रांचे गही करीत असे. याच्या उपलब्ध ग्रंथांची नावे अशी – पुराण, नागकुमारकाव्य, भैरवपद्मावतीकल्प, सरस्वतीमंत्र ज्वालिनीकल्प व कामचांडालीकल्प. या ग्रंथांपैकी भैरव वतीकल्प हा ग्रंथ मंत्रशास्त्रासाठी फार प्रसिद्ध आहे. महा या ग्रंथात अनेकांची चरित्रे आहेत. हा ग्रंथ दोन हजार श्लोकांचा आहे. [जै. सा. इ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मव्लूदी एक कालगणनापद्धती. टिपू सुलतानाने ही पद्धत सुरू केली. ही कालगणना म्हणजे हिंदू कालगणना व त्याची स्वतःची कल्पना यांचे संमिश्रण आहे. टिपू ४ मे १७८३ ला गादीवर बसला (हि. स. ११९७ जमादिलावर १), तेव्हापासून ही कालगणना सुरू झाली. हा गादीवर बसला तेव्हा संवत्सरचक्रापैकी सदतिसावे शोभन संवत्सर चालू होते. टिपूने हिंदू पद्धतीचे संवत्सरचक्र व महिने घेतले; पण त्यांची नावे बदलली. हि. स. ११९७, ११९८, ११९९ व १२०० या वर्षांबरोबर जुळणारे संवत्सरक्रमांक ३७, ३८, ३९ व ४० यांना याच संख्या ज्यांनी व्यक्त होतील असे अब्जद पद्धतीचे शब्द त्याने शोधून काढले; काही नवीन शब्द बनवून तेच त्या संवत्सरांची नावे म्हणून वापरात आणले. महिन्यांसाठी असे शब्द शोधून काढले, की त्यांच्या पहिल्या एक किंवा दोन अक्षरांची अब्जद पद्धतीने १ ते १२ किंमत होईल. पुढे ते शब्द हीच महिन्यांची नावे बनली.

दि. २३ ऑक्टोबर १७८६ ला हिजरी १२०० हे साल संपले. या सुमाराला टिपूला एक नवीन कल्पना सुचली. हिजरात या शब्दाचा मूलार्थ निष्क्रमण असा आहे. परंतु पुढे पलायन असा अर्थ या शब्दाला प्राप्त झाला. अर्थात हिजरी सन म्हणजे महंमदाने मदिनेला केलेल्या पलायनापासून सुरू झालेला काळ, असा अर्थ सामान्य जनांनी केला. टिपूला ही कल्पना आवडली नाही. त्याने महंमदाच्या जन्मापासून आरंभ झालेल्या कालाची कल्पना केली व त्याला मव्लूदी (जन्मासंबंधी) हे नाव दिले. महंमदाचा जन्म इ. स. ५७२ किंवा शके ४९४ धरला म्हणजे तेव्हापासून हिजरी १२०० किंवा इ. स. १७८६ पर्यंत चांद्रसौर मानाची १२१४ वर्षे गेली, असे होईल. १२१५ वे वर्ष किंवा ४१ वे संवत्सर २० मार्च १७८७ ला सुरू व्हावयाचे होते. दि. २४ ऑक्टोबर १७८६ ते १९ मार्च १७८७ हि. स. १२०१ किंवा ४० वे वर्ष चालू होते. हे टिपूने तसेच चालू ठेवले; पण दि. २० मार्च १७८७ पासून ४१ वे वर्ष चालू होत असल्याने त्या दिवसापासून मव्लूदी १२१५ साल सुरू केले. [सं. मि.]

मशीद मुसलमानांची सामुदायिक प्रार्थनेची जागा. ही बहुधा दगडांची किंवा विटांची चौकोनी इमारत असते. तिच्या समोर मोकळी जागा असते आणि भोवती ओवऱ्या बांधलेल्या असतात. इमारतीची जी भिंत मक्केच्या बाजूला असते, तिच्यात मध्यभागी एक कोनाडा असतो. त्यावरून मक्केतील काबाची दिशा समजते. कोनाड्याच्या उजव्या बाजूला एक ओटा असतो. त्याच्यावर उभे राहून खुत्बा पढतात. अंगणात एक हौद असतो. तिथे हातपाय धुण्याची सोय असते. तसेच तिथे एक स्नानगृहही बांधलेले असते. मशिदीच्या आवारात प्रवेश केल्यावर प्रत्येकजण पादत्राणे काढून डाव्या हातात नेतो, हौदावर जाऊन हातपाय धुतो आणि प्रार्थनेच्या जागी जातो. तिथे पादत्राणे स्वतःच्या समोर ठेवून तो प्रार्थनेला सुरुवात करतो.

मशिदीच्या मुख्य अधिकाऱ्याला इमाम म्हणतात. काही मशिदीत मौलवी नेमलेले असतात. ते विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम करतात. मशिदीची देखभाल करणाऱ्याला मुतावल्ली असे नाव आहे. या सर्वांची उपजीविका लोकाश्रयावर चालते.

ईदसारख्या मोठ्या सणाच्या दिवशी मशिदीत नमाज पढण्यासाठी खूप लोक जमतात. मशीद हे एक पवित्र स्थान असून, तिथे फालतू गप्पा मारणे किंवा इतर व्यवहार करणे हे निषिद्ध मानलेले आहे.

मदिनेजवळ कूबा येथे हजरत मुहंमदाने पहिली मशीद बांधली. तिला घुमट, कोनाडा, मनोरे, कमानी वगैरे काहीही नव्हते. त्यानंतर ऐंशी वर्षांनी ही अलंकरणे मशिदीच्या बांधकामात शिरली. नंतरच्या काळात तुर्कस्थान, सिरिया, इजिप्त, इ. देशांत चर्चच्या धर्तीवर मशिदी बांधण्यात आल्या. सांप्रत दिल्ली येथील मोती व जुम्मा मशीद, अजमेर येथील जामा मशीद व अढाई दिनका झोपडा ही मशीद, आग्र्याच्या लाल किल्यातील नगीना व मोती मशीद, इ. काही मशिदी भारतात प्रसिद्ध आहेत. [डि. इ.]

मसलर भिक्षेकऱ्यांची एक भटकी जात. महाराष्ट्रात यांची वस्ती आहे. भिक्षेसाठी हे जेव्हा एखाद्या गावी जातात, तेव्हा एखाद्या मांगाच्या घरी मुक्काम ठेवतात. मांग लोक आमचे आईबाप आहेत व त्यांनीच आम्हांला पोसले, असे हे सांगतात. म्हणून मांग जातीकडे भिक्षा मागणे हा ते आपला धर्म समजतात. कधीकधी हे दोरावरची शारीरिक कसरत करूनही पैसे मिळवितात. या कसरतीच्या वेळी एखादा सोनार, लोहार किंवा सुतार याची उपस्थिती आवश्यक असते. यांच्यापैकी कोणीच नसेल, तर हे कसरतीचे खेळ करीत नाहीत; याचे कारण काय ते मात्र सांगत नाहीत.

यांच्यामधील एखाद्या स्त्रीने व्यभिचार केल्यास तिचा नवरा जातपंचायतीची बैठक बोलावतो. त्या बैठकीच्या वेळी पंचायत तिची निर्भर्त्सना करते, तिच्या डोक्यावर दगड ठेवते आणि 'तुला हवे तिकडे जा' असे तिला सांगते. तिचा जार जर त्यांच्याच जातीचा असेल तर अशा स्त्रीला त्याच्याशी लग्न करण्यास परवानगी असते. [बां. बे. का.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मसूरकर, विनायकमहाराज (इ. स. १८८८–१९५५) एक अर्वाचीन धर्मप्रचारक. यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील मसूर या गावी झाला. समर्थ रामदासस्वामींप्रमाणे यांनी विवाहमंडपातून पलायन केले आणि अनेक वर्षे तपश्चर्या करून परमेश्वरी कृपा संपादली. त्या काळात त्यांनी संस्कृत ग्रंथांचा व धर्मशास्त्राचा खोल अभ्यासही केला. त्यानंतर बारा वर्षे त्यांनी रामेश्वरापासून कैलास–मानससरोवरापर्यंत व काबूलकंदाहारपर्यंत तीर्थाटन केले. त्या प्रवासात त्यांनी भारताच्या भिन्न भिन्न भागांत वसलेल्या जातीजमाती, नगरे, संस्था व एकंदर समाजस्थिती यांचे सूक्ष्म अवलोकन केले आणि हिंदू समाजाच्या उत्कर्षासाठी कोणते कार्य करणे आवश्यक आहे, ते निश्चित केले. त्यासाठी त्यांनी इ. स. १९२० साली मसुराश्रमाची स्थापना केली. त्या आश्रमात उपनयन झालेली मुले आणि आत्मोद्धार करून देव, धर्म, संस्कृती व राष्ट्र यांच्या सेवेसाठी आजन्म वाहून घेणारे तरुण यांना प्रवेश मिळत असे. त्यांना ध्यान, धारणा, प्राणायाम, योग; तसेच भाषा, गणित, इतिहास, भूगोल, इ. विषय शिकवले जात. संयमी, त्यागी, विद्वान व सेवाभावी असे साधक-प्रचारक निर्माण करणे हा या आश्रमाचा उद्देश होता. आश्रमातील अध्यापक व साधक मिळून कधीकधी देशयात्रा करीत. या भ्रमणकाळातही त्यांचा दैनंदिन कार्यक्रम नियमित चालू असे. त्याव्यतिरिक्त विनायकमहाराजांची गीतेवरील ओजस्वी प्रवचने हे त्या प्रचारयात्रांचे वैशिष्ट्य असे.

इ. स. १९२८–२९ साली महाराजांनी गोव्यातील सहस्रावधी ख्रिस्ती गावड्यांना सामुदायिकपणे हिंदू धर्मात घेतले. त्या कार्यात त्यांना व त्यांच्या शिष्यांना पोर्तुगीज सरकारकडून बराच त्रास सोसावा लागला. या घटनेमुळे मसुराश्रमाचे नाव सर्व जगात गाजू लागले आणि सर्व हिंदू समाजात एक प्रकारचे चैतन्य निर्माण झाले. त्यानंतर मसूरकरमहाराजांनी वसई, दमण, नगरहवेली, कर्नाटक, वऱ्हाड, सातपुडा, इ. प्रदेशांत शुद्धीकरणाचे कार्य जोमाने सुरू केले.

महाराजांनी जागोजागी व्यायामशाळा स्थापून नमस्कार, योगासने; तसेच लाठी-काठी, जंबिया, भाला, इ. आयुधांचा उपयोग यांचे तरुणांना विनामूल्य शिक्षण देण्याचाही उपक्रम सुरू केला. त्याचप्रमाणे हिंदू धर्मातील आदर्शभूत अशा राम, कृष्ण, हनुमान व समर्थ रामदास या पुरुषांची लक्षावधी सुंदर चित्रे लोकांना वाटली. धर्मशिक्षणासाठी त्यांनी दासबोध, मनाचे श्लोक, नित्योपासना, श्रीकृष्णाचा संदेश, श्रीशिवरायांचे जयसिंहास पत्र, इ. पुस्तकेही तशीच लाखांनी छापून वाटली. गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी भारतीयांना दासबोधाची शिकवण देणे आवश्यक आहे, असा निश्चय करून त्यांनी दे‍‍भर व्याख्याने दिली आणि श्रीदासबोध हे मासिक व विश्व‍ हे साप्ताहिक सुरू केले.

विनायकमहाराज मसूरकर

पूर्वास्पृश्य व गिरिजन यांची सेवा हे कार्यही मसुराश्र‍ केले व आजही काही आश्रमीय साधक ते कार्य करीत अस‍ हिंदू लोकांच्या अज्ञानाचा व दारिद्र्याचा फायदा घेऊन ख्रि‍ मिशनरी व मुल्ला–मौलवी त्यांना आपल्या धर्मात ओढ‍ प्रयत्न जिथे जिथे करीत असतात, अशा ठिकाणी आपले प्र‍ रक पाठवून, त्या गरीब लोकांच्या अडीअडचणी सोडव‍ मदत करून त्यांना स्वधर्माची महती पटवून देण्याचे ‍ मसुराश्रमाने केले. हिंदूंच्या संघटनेसाठी महाराजांनी ‍ ठिकाणी यज्ञसत्रे चालवून वैदिक परंपरेला उजळा दिला. क्ष‍ व वैश्य लोकांच्या सशास्त्र, समंत्रक, सामुदायिक उपनयनवि‍ उपक्रमही त्यांनी सुरू केला. तसेच परधर्मियांनी पळवून ‍ बाटवलेल्या कित्येक स्त्रियांना सोडवून आणून त्यांना शुद्ध ‍

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घेऊन स्वधर्मात त्यांच्या पुनर्वसनाचे कार्यही त्यांनी केले.

मसुराश्रमावर अनेक संकटे कोसळली होती; पण त्या सर्वांना खंबीरपणे तोंड देऊन महाराजांनी आपले कार्य शेवटपर्यंत मोठ्या जोमाने चालवले. इ. स. १९५५ साली त्यांचा मृत्यू झाल्यानंतर गोरेगाव (पूर्व) मुंबई ६२, येथे त्यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम प्रतिवर्षी रामनवमीपासून हनुमानजयंतीपर्यंत केला जातो. [श्री. ब्रह्मचारी विश्वनाथजी– दीपलक्ष्मी, मे १९६३]

मस्तक मानवी शरीराचा सर्वांत उच्च भाग. यात डोळे, नाक, कान व जीभ ही चार व कातडीमुळे स्पर्शेंद्रिय अशी पाचही ज्ञानेंद्रियें असतात. मेंदूचे स्थानही मस्तकात असल्यामुळे मस्तकाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. माणसाचा प्राण किंवा आत्मा मेंदूत असतो, अशी काही लोकांची समजूत आहे. तसेच मस्तकातील अनेक छिद्रांतून दैवी किंवा दानवी शक्तींना आत प्रवेश करता येतो, असेही समजतात.

ज्या सप्त पुरुषांपासून प्रजापतीची उत्पत्ती झाली, त्यांचे प्राणतत्त्व एकत्र होऊन प्रजापतीचे मस्तक बनले, असे शतपथ ब्राह्मणात सांगितले आहे. शरीराच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या देवतांचा वास असतो. त्यांपैकी सर्वश्रेष्ठ देवतेचे स्थान मस्तकात असते, असे हिंदू लोक मानतात. त्यामुळे धार्मिक, सामाजिक व वैद्यकीय विधींत मस्तकालाच अंगारेधुपारे, कुंकुमतिलक, अक्षता, रक्ताचा तिलक, विभूती वगैरे लावण्याची चाल पडली आहे.

शत्रूला जिंकल्यानंतर त्याचे शिर कापून ते विजयचिन्ह म्हणून मिरवण्याची प्रथा प्राचीन काळी सर्व जगात प्रचलित होती. ही मस्तके जतन करून ठेवण्याचीही पद्धत होती. यामागचे आणखी एक कारण असे, की त्या मारलेल्या व्यक्तीची शक्ती त्याच्या मस्तकातच केंद्रित असल्यामुळे, त्याचा आत्माही आपल्या ताब्यात राहील व आपल्याला मदत करील, अशी आदिम लोकांची धारणा होती. इतकेच नव्हे; तर धनधान्यसमृद्धी, प्रजोत्पादन, आरोग्य व एकंदरीत सर्व सुखोपभोग त्याच्यामुळे प्राप्त होतात, अशीही त्यांची श्रद्धा होती. मस्तकातील कवटीच्या आतील मेंदू भक्षण केल्याने किंवा कवटीतून पेय प्याल्याने त्या व्यक्तीची बुद्धी, धैर्य, इ. गुण प्राप्त होतात, असेही समजले जाई. कित्येक जातीजमातींत स्वतःच्या वंशातील थोर व्यक्तीचे किंवा जमातीच्या प्रमुखाचे मस्तक जपून ठेवण्याची प्रथा होती. त्यावरूनच पुढे मस्तकाची प्रतिमा करून ठेवण्याची पद्धत पडली.

मस्तक हा शरीराचा महत्त्वाचा अवयव असल्यामुळे देवापुढे भक्तीने व थोर व्यक्तींसमोर आदराने मस्तक नमविण्याची पद्धत पडली आहे. ही पद्धत जगात सर्वत्र प्रचलित आहे.

मानवाचे जे अनेक वंश पृथ्वीवर होऊन गेले व सध्या अस्तित्वात आहेत, त्यांच्या मस्तकातील कवटीची लांबी, रुंदी व आकार यांचा अभ्यास करून शास्त्रज्ञांनी त्याचे एक शास्त्रच बनविले आहे.

मस्तकाला महत्त्व असल्यामुळे अनेक देवतांच्या प्रतिमा केवळ त्यांचे मस्तक व त्याभोवती तेजोवलय अशा रूपांत केलेल्या आढळतात. काही मूर्तींना एकापेक्षा अधिक मस्तके असतात. जितकी मस्तके जास्त, तितकी त्यांची शक्ती जास्त अशी कल्पना त्याच्या मुळाशी असावी. [एन्सा. रि. ए.]

मस्नवी उर्दू शायरीचा एक प्रकार. एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीचे जीवनचरित्र अथवा वर्णनात्मक दीर्घ काव्य, किंवा कल्पित कथा पद्यात लिहिणे याला मस्नवी म्हणतात. मस्नवी शब्दाचा अर्थ दोन-दोन असा आहे. मस्नवीतील प्रत्येक शेराचे दोन्ही चरण यमकयुक्त असतात. परंतु एका शेराचे यमक दुसऱ्या शेराबरोबर साधलेले नसते. सात छंदांतही मस्नवी लिहिलेल्या आढळतात.

मस्नवींच्या निर्मितीची आवश्यकता का भासली याचे विवेचन करताना श्री. सेतुमाधवराव पगडी लिहितात – गज़ल हा पद्यप्रकार म्हणजे तुटक आणि लहान अशा कवितांचा. त्यामुळे एखादे महाकाव्य रचणे असल्यास गज़ल हा प्रकार वापरणे अशक्य होते. म्हणून फार्सी काव्यात मस्नवी हा प्रकार प्रचारात आला. सोपे व सुटसुटीत वृत्त, वर्णनाचे सातत्य, हे मस्नवीचे विशेष होत.

सामान्यतः इ. स. च्या पंधराव्या शतकात मस्नवी रचल्या जाऊ लागल्या, असे समजतात. प्रारंभीच्या मस्नवी लहान लहान आणि धार्मिक विषयांवर असत. गुजरातमधील सूफी संत मियां खूब महंमद चिश्ती याची खूब तरंग नावाची मस्नवी हे उर्दूतील पहिले मस्नवी काव्य मानतात. इ. स. १५७८ चा सुमार हा या काव्याचा काळ होय. या काव्यातील विषय नीतिपर असून, कथानकांच्या द्वारे नीतितत्त्वे बिंबविण्याचा प्रयत्न त्यात केलेला आहे.

विजापूरचा सुलतान इब्राहिम आदिलशहा (दुसरा) आणि गोवळकोंड्याचा महंमद कुली कुतुबशहा यांच्या काळात मस्नवींना बहर आला. या वेळी प्रेमी जनांच्या कथा मस्नवीतून गायल्या गेल्या. मुफीक हा या काळातला प्रसिद्ध कवी होय. चंद्रबदन माहयार आणि सोमहारकी कहानी या त्याच्या प्रसिद्ध मस्नवी होत. चंद्रबदन माहयार हे काव्य फार लोकप्रिय झाले. थोड्या-फार फरकाने या काव्याच्या आधारावर अनेक मस्नवी लिहिल्या गेल्या. या काव्यातल्या काही ओळी अशा–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यौ दुख आज मुझ जीव का साथी हुआ
यौ साती सो मुझ जिव का घाती हुवा ।।
अता जगमें रहना नहीं खूब काम
के इस बाज जीना अपस को हराम ।।
मेरा दुख कहुंगी तो सरते का नें
हिकायत मेरी बेग सरने की नें ।।
कहीं यौं दो नाजुक मिठे बोल सों
सो बेगी मिलूं जाके उस पीय सों ।।

अर्थ– एक वियोगिनी प्रेयसी म्हणते– हे दुःख आज माझ्या जीवनाचे साथीदार बनले आहे. आणि हा साथी माझ्या जीवनाचा नाश करणारा ठरला आहे. आता जगात जगण्यासारखे चांगले काही उरले नाही. याच्या शिवाय जगणे मला अशक्य आहे. मी माझे दुःख सांगू लागले, तर ते संपणारे नाही आणि माझ्या तक्रारीही लवकर मिटणाऱ्या नाहीत. आता दोन गोड शब्द जर मी बोलेन, तर मी माझ्या प्रियकराच्या पायांजवळ लवकर पोचेन.

यानंतर मस्नवींची रचना करणारे अनेक कवी होऊन गेले. त्यांत प्रामुख्याने पंडित दयाशंकर कौल नसीम आणि मीर हसन यांची गणना करावी लागते. मीर हसनची सहरुलबयान ही मस्नवी सर्वोत्कृष्ट आहे. [उ. क. तों.; उ. का. प.]

महंकाळेश्वर लिंगायतांचा देव. सोलापूर जिल्ह्यात वार्शीपासून सुमारे चौदा मैलांवर वैराग नावाचे एक गाव आहे. तिथून एक मैलावर असलेल्या सासुरे नामक गावात हे देवस्थान आहे. गावाजवळून नागघरी नावाची नदी वाहते. हे दैवत जागृत आहे, अशी इथल्या लोकांची समजूत आहे. सर्पदंश झालेल्या लोकांना इथे आणून त्यांना कडुनिंबाच्या पाल्याचा रस पाजतात आणि देवालयाला प्रदक्षिणा घालायला लावतात. या उपचारानंतर विष उतरते, असे म्हणतात. कार्तिक शुद्ध पौर्णिमेला महंकाळेश्वराची यात्रा भरते. [म. लो. मा. ३]

महढ अष्ट विनायकांपैकी वरदविनायकाचे स्थान. हे स्थान मुंबई-पुणे मार्गावर खोपोलीपासून ४ मैल अंतरावर आहे. इथले मंदिर लहानसेच असून, त्यातली गणेशमूर्ती दगडी सिंहासनावर विराजमान झालेली आहे. सिंहासनावर दोन गजराज कोरलेले असून, त्यांच्या मध्ये देवाची मूर्ती आहे. गाभाऱ्याच्या द्वारावर ऋद्धिसिद्धींच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. आतला सभामंडप ८ फूट चौरस असून, बाहेरचा ४० फूट चौरस आहे. देवळाच्या चारही बाजूंना हत्तीच्या दोन दोन आकृती कोरलेल्या आहेत. घुमटाची उंची २५ फूट आहे. इ. स. १८९२ पासून मंदिरात अखंड नंदादीप तेवत आहे.

देवळाच्या मागे एक तळे आहे. इ. स. १६९० साली पौडकर नावाच्या गणेशभक्ताला दैवी दृष्टान्तानुसार विनायकाची मूर्ती त्या तळ्यात सापडली. त्याने ती तळ्याजवळच एका अखंड दगडी कोनाड्यात स्थापली. पुढे इ. स. १७२५ साली पेशव्यांचे एक सरमुभे त्रिवलकर यांनी तिथे देऊळ बांधले. त्यांनीच इ. स. १७५७ मध्ये महढ हे गाव देवाच्या नावे करून दिले.

इथल्या वरदविनायकाच्या उद्भवाविषयी एक आख्यायिका प्रचलित आहे, ती अशी –

प्राचीन काळी विदर्भ देशातील भीमराजाचा पुत्र रुक्मांगद अरण्यात मृगयेला गेला. असता विश्रांतीसाठी वाचक्नवी मुनीच्या आश्रमात गेला. तेव्हा मुनीची पत्नी मुकुंदा त्याच्या असामान्य रूपावर भाळली. पण तो राजपुत्र तिला काही



वरदविनायक – महढ

केल्या वश होईना. म्हणून तिने त्याला 'तू कुष्ठी होशील' असा शाप दिला. तो तिथून निघून गेल्यानंतर इंद्राने रुक्मांगदाचे रूप घेऊन मुकुंदेची कामेच्छा तृप्त केली. पुढे तिला पुत्र झाला, त्याचे नाव गृत्समद असे ठेवले गेले. तो मोठा झाला व विद्यासंपन्नही झाला; पण तो जारज असल्यामुळे समाजात त्याचा पदोपदी उपहास होऊ लागला. स्वतःच्या जन्माची सत्यकथा त्याला कळल्यावर त्याने महढच्या वनात घोर तपश्चर्या केली व 'गणानां त्वा' या मंत्राच्या अनुष्ठानाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गजाननाला प्रसन्न करून घेतले. यानंतर गृत्समद मंत्रद्रष्टा ऋषी झाला. त्याने ज्या वनात तप केले, ते पुढे भद्रक या नावाने प्रसिद्ध झाले. त्या स्थळी स्नान व दान करणाऱ्या भक्तांच्या सर्व कामना पूर्ण होतील, असा आशीर्वाद गणपतीने दिला. पुढे गृत्समदाला वर देणाऱ्या गणपतीला वरदविनायक नाव मिळाले.

वरील कथेतले भद्रक म्हणजेच सध्याचे महड होय इथे भाद्रपद व माघ या दोन्ही मासांत शुक्ल प्रतिपदा ते पंचमी या दिवसांत गणेशोत्सव होतो. [अष्टविनायक]

महतम पंजाब प्रदेशातील एक जात. या लोकांना तिकडे बहुरूपी असे म्हणतात. गुजरात भागातील महतम लोकही स्वतःला बहुरूपीच म्हणवितात. जालंधर जिल्ह्यात हे महतो या नावाने ओळखले जातात. ते जम्मू ही आपली मूलभूमी असल्याचे सांगतात.

यांची वस्ती सतलज नदीच्या खोऱ्यात आणि टेकड्यांच्या पायथ्याशी असून, त्यांची पूर्वास्पृश्यांत गणना केली जाते. हे भटके शिकारी आहेत, पण सतलजच्या खोऱ्यातील बहुरूपी मात्र प्रामुख्याने शेतीचा व्यवसाय करतात.

बहुसंख्य महतम लोक हिंदू आणि फार थोडे मुसलमान आहेत. मुसलमान महतो डुकराचे मांस खातात आणि हिंदूंचे सण पाळतात. त्यामुळे खरे मुसलमान यांना हलके समजतात. हे गवताच्या झोपड्या बांधून राहतात. दोन झोपड्या झाल्या की त्यांची एक वसाहत तयार होते, अशी म्हणच आहे.

होशियारपूरमधील महतम लोक सामाजिक दृष्ट्या वरच्या दर्जाचे आहेत. त्यामुळे सतलजमधील महतम आणि हे लोक परस्परांहून भिन्न असावे, असे वाटते. [पं. का.]

महता अजीतसिंह (१८३३ – १८९४ इ. स.) राजस्थानातील जैसलमीर येथील एक कवी. याच्या पित्याचे नाव लक्ष्मणसिंह असे होते. अजीतसिंहाने जैसलमीरच्या महारावळाकडे अनेक उच्च पदांवर काम केले. महारावळ रणजितसिंह व वैरीसाल यांच्या कारकिर्दीत तो जैसलमीरचा दिवाण होता. त्याने लोकांसाठी रणजीतसागर व गडीसर असे दोन तलाव खोदले, दोन धर्मशाळा बांधल्या आणि अजितेश्वर महादेवाचे मंदिर बांधले.

अजीतसिंह हा प्रौढ विद्वान होता. त्याला संस्कृत, फारसी, अरबी व उर्दू या भाषांचे चांगले ज्ञान होते. त्याने सुमारे साठ ग्रंथ लिहिले आहेत. पण त्या सर्वांची नावेही मिळत नाहीत. तवारीख भाटीनामा, जुगराफीया, विद्याबत्तीसी, शिक्षाबत्तीसी गुणेशनाममाला, राजनीत, हनुमन्नाममाला, अर्कनाममाला, अजीतसागरवेदक, अजीतपिंगल, इ. काही त्याच्या ग्रंथांची नावे उपलब्ध आहेत. या नावांवरून त्याला वैद्यक, पिंगलशास्त्र, राजनीती, इ. विषयांचे ज्ञान होते हे कळते. तवारीख भाटीनामा हा त्याचा सर्वांत महत्वाचा ग्रंथ होय. त्यांत जैसलमीरच्या राजांची नावे, त्यांचा काळ आणि त्यांची महत्त्वाची कार्ये यांचे पद्यबद्ध वर्णन आहे. जुगराफीया या ग्रंथात जैसलमीरच्या भौगोलिक स्थितीचे वर्णन आहे. आपल्या शिक्षाबत्तीसी या ग्रंथाच्या प्रारंभी तो म्हणतो –

मंत्री सेवन कीजिये, नृप सेवन के काज ।
केवल नृप नहिं सेविये, सेव्या हुए अकाज ।।
पहलो भय गोपाल को, भय दूजो भुव पाल ।
तीजो भय लोकीक को, राख्या बिन मत चाल ।।

अर्थ – राजाची सेवा करायची असेल, तर आधी मंत्र्याची सेवा केली पाहिजे. केवळ राजाचीच सेवा करून चालणार नाही. तसे केल्यास कार्यभाग साधणार नाही. (तसेच) प्रथम गोपालकृष्णाचे, दुसरे राजाचे आणि तिसरे लोकांचे भय मनात बाळगल्याशिवाय आचरण करू नकोस.

या ग्रंथांशिवाय त्याने अनेक कवित्त, छप्पय, दोहे, सोरठे वगैरे रचले आहेत आणि ते आजही जैसलमीरमध्ये लोकांत प्रचलित आहेत.

अजीतसिंहाला आळसाचा तिटकारा व श्रमाबद्दल प्रेम होते. श्रमाचे महत्त्व सांगताना तो म्हणतो –

श्रमसे सिध कार्य हुवे, श्रमसे होय पुनीत ।
श्रमसे सुख सम्पत मिले, महता कहत अजीत ।।

अर्थ – श्रम केल्याने कार्य सिद्धीला जाते, श्रमाने माणूस पवित्र होतो आणि श्रम केल्याने सुख व संपत्ती प्राप्त होते, असे अजीत महता म्हणतो.

याशिवाय, त्याने अनेक संस्कृत श्लोकांचे व उर्दू आणि फारशी पद्यांचे हिंदी भाषेत अनुवाद केले आहेत. याची भाषा अत्यंत सरल व सुबोध आहे. कधीकधी तो आपल्या काव्यात राजस्थानी शब्दांचाही उपयोग करतो.

अजीतसिंह कट्टर वैष्णव होता. श्रीनाथजीचे दर्शन घेतल्याशिवाय तो अन्नोदक घेत नसे. या भक्तिबळाच्या प्रभावाने त्याला आपला मृत्युदिन आधीच समजला होता, असे म्हणतात. मृत्युसमयी त्याने तीनदा श्रीकृष्ण असे म्हटले व प्राण सोडला. [मरु-भारती, एप्रिल १९५८]

महतीसागर (१७७२–१८३२ इ. स.) एक जैन मराठी कवी. हा ब्रह्ममहतीसागर या नावानेही प्रसिद्ध आहे. कारंजा येथील भट्टारक पीठाच्या शिष्यवर्गातील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हा अखेरचा श्रेष्ठ कवी होय. याचा जन्म वऱ्हाडमधील अंबनेर (शिंदुरंजन) या गावी सैतवाळ जैन ज्ञातीत झाला. याचा गुरू देवेंद्रकीर्ती हा होता. अर्धमागधी, संस्कृत, हिंदी व मराठी या भाषा याला चांगल्या अवगत होत्या. धर्मप्रसाराच्या निमित्ताने महतीसागराने फलटण, दहिगाव, नातेपुते, मेडद, इ. ठिकाणी भ्रमण केले होते. अखेर दहिगाव येथे याचे देहावसान झाले.

महतीसागराचे बहुतेक सारे वाङ्मय महतीकाव्यकुंज या नावाने संग्रहीत झालेले आहे. या संग्रहात अभंग, पदे, आरत्या, अष्टके, व्रतकथा, इ. प्रकार आहेत. यातील अरहंताष्टक हे संस्कृत भाषेत असून, यात देवेंद्रकीर्तींच्या चरित्रासंबंधी एक लावणीही आहे.

महतीसागर केवळ कवीच नव्हता; तर तो समाजकार्य करणाराही होता. आपल्या सरळ स्वभावाने, कडक तपश्चर्येने आणि सुगम काव्यसंभाराने त्याने वऱ्हाडपासून सोलापूरपर्यंत आपला शिष्यवर्ग तयार केला व समाजावर छाप बसविली. [प्रा. म. जै. सा.]

महत्तमव्रत एक तिथिव्रत. भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला हे व्रत करतात. व्रतविधी असा – तीन नेत्र, पाच शिरे आणि जटा असलेली सोन्याची किंवा रुप्याची शिवमूर्ती करून ती एका पानावर ठेवावी. मूर्तीला पंचामृतस्नान घालून तिची पूजा करावी. पूजेनंतर सोळा फळे अर्पण करावी. मौन पाळावे. उद्यापनाच्या वेळी ब्राह्मणाला एक गाय दान द्यावी. फल – दीर्घायुष्य व राज्य यांची प्राप्ती. [हि. घ.]

महत्तरिका राजाच्या अंतःपुरातील स्त्रीप्रतिहारींच्या प्रमुख स्त्रीला महत्तरिका असे नाव असून, तिचे स्थान महत्त्वपूर्ण होते. अंतःपुरातील कोणीही तिच्या आज्ञेचे उल्लंघन करू शकत नसे. तिच्या हातात अधिकाराचे प्रतीक म्हणून वेत्राची छडी असे. वेत्र (वेत) राजदंडाचे अंतःपुरातील प्रतिनिधी मानले जात असे. अंतःपुराच्या रक्षणाची सर्व जबाबदारी तिच्यावर असे. ती राजकुमारीची धात्री, सखी आणि सहचरी असे. कालिदासाने महत्तरिकेला दौवारिकी, प्रतिहाररक्षी किंवा द्वारपालिका असे म्हटले आहे. [का. ए. मां. अ.]

महदाइसा मराठी भाषेतील आद्य कवयित्री. हिला महदंबा असेही म्हणतात. तिचे मूळचे नाव रूपाई असे होते. तिच्या पणजीचे नाव महदाइसा असे होते. ती बुद्धिमान होती. तिने वेदांचा अभ्यास केला होता. ती भविष्यही सांगत असे. तिने अनेक पंडितांना वादात जिंकले होते. रूपाईच्या ठिकाणची बुद्धिमत्ता व रसिकता पाहून चक्रधराने तिला ति[...] पणजीचे महदाइसा हे नाव दिले. पुढे केसोवासाने तिला [...] दंबा म्हटले.

महदाइसेच्या पित्याचे नाव वायेनायेक व मातेचे नाव का[...] इसा असे होते. वायेनायेक हा रावसगावी राहत होता. मह[...] इसा ही बालविधवा होती. महानुभाव पंथाचा आद्य आ[...] नागदेव हा तिचा चुलतभाऊ होता. महदाइसा व नागदेव [...] महानुभाव पंथाचा संस्थापक चक्रधर याचे प्रथम दर्शन [...] वध या गावी झाले व त्याच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित हो[...] दोघांनी महानुभाव पंथाचा स्वीकार केला. तिला चक्रधरा[...] सहवासही पुष्कळ मिळाला. ती चक्रधराला अनेक प्रश्न वि[...] रून आपले शंकासमाधान करून घेत असे. ब्रह्मानुभूती, बाल[...] ज्ञान, कुलधर्म, इ. अनेक विषयांवर चक्रधराने तिच्याशी च[...] केली होती. 'म्हातारी जीज्ञासक : म्हातारी चर्चक : म्हाता[...] एथ काही पूसतचि असे :' अशी चक्रधराने तिची प्रशंसा के[...] आहे. या तिच्या चौकसपणामुळेच लीळाचरित्र या चक्रधरा[...] आत्मचरित्रपर ग्रंथाचा बराचसा भाग चक्रधरांच्या तोंडून बा[...] पडला. चक्रधरांच्या निर्याणापर्यंत तिने त्यांची सेवा केली. चक्र[...] बद्रिकाश्रमाकडे निघून गेल्यावर महदाइसा ऋद्धिपूर येथे जा[...] चक्रधराचे गुरू गोविंदप्रभू यांच्या सांनिध्यात राहिली.

चक्रधराच्या वियोगाने नागदेव वेडापिसा होऊन इतस्त[...] भटकू लागला. शेवटी तर भानखेडा येथे राणेडोंगराज[...] तो निश्चेष्ट होऊनच पडला. त्या वेळी महदाइसा त्या[...] पाठुंगळी घेऊन गावात आली. त्याला बोळचाने दूध पा[...] तिने त्याला सावध केले. मग त्याला घेऊन ती गोविंदप्रभूं[...] आली. त्यामुळे नागदेवाच्या मनात तिच्याविषयी निरंतर कृ[...] ज्ञतेची भावना होती.

इ. स. १२८६ मध्ये गोविंदप्रभू समाधिस्थ झाले. तोपर्[...] महदाइसा त्यांच्या जवळ राहिली आणि त्यानंतर आपले उ[...] लेले आयुष्य तिने नागदेवाच्या सहवासात घालवले.

महदाइसेने धवळे, मातृकीरुक्मिणीस्वयंवर व गर्भकां[...] ओव्या अशी तीन प्रकरणे लिहिली आहेत. तिच्या धवळ्यां[...] पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. कोणत्या प्रसंगा[...] महदाइसेने हे धवळे रचले, त्याची माहिती ऋद्धिपुरचरि[...] नामक ग्रंथात दिली आहे, ती अशी –

एकदा गावात एका लग्नसमारंभाचा धूमधडाका चालल[...] असताना, गोविंदप्रभूंनाही आपण लग्न करावे, असे वाट[...] प्रभूंची ती इच्छा पाहून परमेश्वर नायकाने त्यांना आपल[...] मलगी दिली. त्या दोघांचे लग्न लागल्यावर गोविंदप्रभूंनी मह[...] दाइसेला गाणे म्हणण्याचा आग्रह केला. महदाइसेने आपल्या[...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गाणे येत नसल्याचे सांगितले. तेव्हा 'चक्रधराचे शिरीं धरूनियां चरण' या पंक्तीने गाणे सुरू कर' म्हणजे तुला काव्यस्फूर्ती होईल, असे गोविंदप्रभूंनी तिला सांगितले. मग तो चरण म्हणताच तिला काव्यस्फूर्ती झाली आणि रुक्मिणीस्वयंवरावर एक गीत रचून तिने तो प्रसंग साजरा केला. त्या काव्याचा नमुना असा —

भीमकाकुळी रुक्मिणी केला अवतारु।
रूपें लावण्यें तियां जिंतला संवसारु।
तव रावो चिंता करी कवणा। दयावी सलक्षणिक कुमरी।
या त्रिभुवनमाझारीं रूपें सुंदरु वाखाणे मुरारी।

पुढे रुक्मिणीने श्रीकृष्णाला लिहिलेली पत्रिका घेऊन सुदेव ब्राह्मण द्वारकेत गेला, त्या प्रसंगाचे वर्णन तिने पुढीलप्रमाणे केले आहे—

नग्री प्रवेसु जाला राउळाभीतरी :
ब्राह्मणां आडकाठी नाहीं तीय द्वारी :
सप्तही दारवठे वेखे तथा भीतरी कृष्णमंदिरें :
रत्नखचिते रम्यें सरि न पवती मेरुसीखरें :
विप्रें देखियला कृष्ण यादवांचा राणा :
योगिय-मुनिजन सन्नेधी-चरण :

धवळचांच्या पूर्वार्धाची ८३ कडवी आहेत. धवळचांचा उत्तरार्ध म्हाइंभट आणि लक्ष्मींद्रभट यांनी रचला असून, महदाइसेने तो फक्त गाऊन दाखवला आहे.

तिचे मातृकीरुक्मिणीस्वयंवर हे काव्य धवळचांपेक्षा अधिक सरस आहे. त्यातील आरंभीचे श्रीकृष्णवर्णन असे—

कासे पीतांबरु कंठीं कुंदमाळा :
कांतु शोभे सांवळा : रुक्मिणीचा :
खांदावरि कावडी पडिभरें चालतु :
तो खेळे वनांतु : दत्तु सए :
गावो द्वारावती गोमतीए प्रांतीं :
गोदरीयें क्रीडती : चक्रपाणी :
धावो देउनि अविद्ये घाली निजपदीं :
खेळें कृपानिधि : रिधपुरीं :

महदाइसेचे तिसरे प्रकरण गर्भकांड ओव्या हे अद्याप प्रसिद्ध झालेले नाही.

महदाइसा ही महानुभाव पंथाची मोठी अभिमानी होती. ही म्हातारी माझ्या धर्माची रक्षक आहे, असे नागदेवाने तिच्या विषयी गौरवोद्गार काढले आहेत.

एकदा महदाइसा नवगावी गेली असता, तिच्या पायाला व्रण झाला आणि त्या दुखण्यातच तिचा अंत झाला. शेवटच्या क्षणापर्यंत तिला चक्रधराचे स्मरण राहिले होते.

महदाइसेचा जन्म व मृत्यू केव्हा झाला, याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. पण स्थूल मानाने इ. स. १२४२ ते १३१२ हा तिचा काळ मानतात. [म. सं. क.; म. शा. मा.; महदंबा, आद्य मराठी कवयित्री–श्री. वा. ना. देशपांडे, १९५६; प्रा. वसंत स. जोशी, नवभारत, मार्च १९६६]

महंमद कासिम हिंदूशाह

(इ. स. चे १७ वे शतक) एक मुसलमान इतिहासकार. याचे उपनाम फरिश्ता असे होते. हा मूळचा इराणमधील असून, लहानपणी आपल्या बापाबरोबर भारतात आला. याचा बाप अहमदनगरचा पहिला मुर्तझा निजामशहा याच्या मुलाचा शिक्षक म्हणून राहिला. त्याच्या वशिल्याने महंमद हाही त्याच्या दरबारात मोठ्या मानाच्या जागी पोचला. मुर्तझाच्या मृत्यूनंतर तो विजापूरला गेला व इब्राहिम आदिलशहा (दुसरा) याच्या पदरी राहिला. विजापुरात राहून त्याने मुसलमानी इतिहासाचा खोल अभ्यास केला. आदिलशहाच्या आज्ञेवरून त्याने हिंदुस्थानातील मुसलमान बादशहांचा विशेषतः दक्षिणेतील राजांचा इतिहास लिहिला. निजामशाहीचा इतिहास त्याने इ. स. १६११ पर्यंतचा लिहिला आहे. तारिखे फरिश्ता हा त्याचा फारसी ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यात इ. स. १६१२ पर्यंतचा इतिहास वर्णिलेला आहे. [ब्र. सां. इ.; म. ज्ञा. को.]

महंमद तकी

(इ स. चे १८ वे शतक) एक फारसी कथाकार. याचे संपूर्ण नाव महंमद तकी खियाल असे होते. तो अहमदाबादचा रहिवासी होता. लहानपणापासून याला गोष्टी ऐकण्याचा व सांगण्याचा नाद होता. तरुणपणी आपल्या प्रेयसीची हौस पुरवण्यासाठी तो तिला रोज गोष्टी सांगे. त्यासाठी त्याने गोष्टींची शेकडो पुस्तके वाचली. इ. स. १७२६ च्या सुमारास तो दिल्लीला गेला. तिथे त्याने स्वतः गोष्टी लिहून सांगण्यास प्रारंभ केला. त्या त्याच्या कथा फार लोकप्रिय झाल्या. अनेक अमीर व नबाब त्याच्या कथा ऐकून त्याच्यावर खूप झाले. दिल्लीच्या बादशहालाही त्या गोष्टी आवडल्या आणि त्याने महंमद तकीला आणखी कथा लिहिण्यास प्रोत्साहन दिले व पुष्कळ साहाय्यही केले. पुढे तो बंगालचा नबाब सिराजुद्दौला याच्या आश्रयाला गेला. तिथे त्याने आपला ग्रंथ बूस्ताने खियाल (कल्पनांचे उपवन) हा पंधरा खंडांत प्रसिद्ध केला. त्यात राजपुत्र मोइजुद्दीन याची अद्भुत कथा त्याने विस्तारपूर्वक सांगितली आहे. या ग्रंथाचे स्वरूप प्रचंड (१४ हजार पाने) असून, तो पुरा करायला महंमद तकीला एकंदर पंचवीस वर्षे लागली. [मणिकांचन]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महंमद पैगंबर (५७०-६३२ इ. स.) इस्लाम धर्माचा संस्थापक. याचे मूळ नाव मुहंमद असे असून, त्याचा अर्थ प्रशंसित मनुष्य असा आहे. महंमद अरबस्तानातील मक्का या शहरात जन्मला. मक्केतील कुरैश म्हणजे पुजाऱ्यांचे घराणे त्या काळी अत्यंत प्रतिष्ठित समजले जाई. या घराण्याच्या पुढे दोन शाखा झाल्या. त्यांपैकी हाशिम शाखेच्या कुळात महंमदाचा जन्म झाला. महंमदाच्या वडिलांचे नाव अवदुल्लाह व आईचे अमिनावी असे होते.

महंमदाच्या जन्मापूर्वीच त्याचा बाप मरण पावला होता. जन्मानंतर थोड्याच दिवसांत त्याची आईही निवर्तली. त्यामुळे त्याचे पालनपोषण प्रारंभी हलीमा नावाच्या एका दाईने व नंतर आज्याने आणि चुलत्याने केले.

महंमदाच्या उदयकाली अरब लोक अत्यंत हीन दशेला पोचले होते. ठिकठिकाणी ते टोळ्या करून राहत व परस्परांवर हल्ले चढवून लूटमार करीत. दैन्य, दास्य आणि दारिद्र्य या त्रिविध तापांनी अरब समाज गांजून गेला होता. खून, मारामारी, जुगार, मद्यपान, वेश्यागमन, इ. गोष्टी करण्यात कुणाला काही विशेष वाटतच नसे. विधवा आणि अनाथ, अपंग व्यक्ती यांना तर कोणी वालीच उरला नव्हता. विवाहविषयक निर्बंध अस्तित्वातच नव्हते; त्यामुळे कोणीही कोणत्याही स्त्रीला बळजबरीने ओढून नेई, हवा तितका तिचा उपभोग घेई व एक दिवस तिला सोडून देई. धर्माच्या नावावर सर्वत्र अनाचार चालू होता. मक्केत जागोजाग लहान मोठ्या देवांच्या मूर्ती होत्या व त्यांचे पुजारी अज्ञानी व भोळ्या लोकांना नाना प्रकारांनी लुटीत होते. सारांश, सगळा अरबस्तान अंधश्रद्धा आणि दुराचार यांच्या पंकात रुतला होता. महंमदाने आपल्या अवघ्या बासष्ट वर्षांच्या आयुष्यात या समाजाचे स्वरूप आमूलाग्र पालटून टाकले.

महंमद बारा वर्षांचा असताना त्याला त्याच्या चुलत्याने (अबू तालीब) सिरियाला नेले. त्या वेळी त्याला तिथल्या ख्रिश्चन व ज्यू लोकांचे जीवन जवळून पाहायला मिळाले आणि त्यांच्या तुलनेने आपला अरबी समाज अतिशय मागसलेला व रानटी चालीरीतींनी बुजबुजलेला असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्या वेळेपासूनच तो अरबी समाजाच्या सुधारणेविषयी विचार करू लागला. बसरा येथील मुक्कामात एका ख्रिश्चन धर्मगुरूने महंमदाच्या चुलत्याला सांगितले, की भावी काळात महंमद एक थोर पुरुष होईल.

प्रवासाहून परत आल्यावर महंमदाने मक्का येथे दहा-बारा वर्षे मेंढपाळाचे काम केले. तथापि याही काळात त्याचे स्वसमाजाच्या उद्धाराविषयीचे चिंतन-मनन चालू होतेच. या काळातील त्याचे शुद्धाचरण, विनम्र स्वभाव, लोकहिततत्पर[ता] इ. गुण पाहून मक्केच्या नगरजनांनी अल-अमीन या बहुमान[ा]र्थक पदवीने त्याला गौरविले.

वयाच्या पंचविसाव्या वर्षी महंमदाने मक्का येथील ख[दी]जाबी नामक एका श्रीमंत विधवेकडे नोकरी पत्करली. [ति]तिच्या वतीने तो देशोदेशी व्यापारही करू लागला. थोड्या[च] दिवसांत महंमदाची व्यापार-व्यवहारातली सचोटी व त्या[चे] अनुपम रूपसौंदर्य यांवर खदीजावी मोहित झाली आ[णि] त्याची परिणती पुढे त्या दोघांच्या विवाहात झाली. खदीजाबी[चे] वय या वेळी चाळीस वर्षांचे होते; तथापि त्या दोघांनी [पु]ढे पंचवीस वर्षे सुखाने संसार केला. महंमदाचे खदीजाबी[वर] गाढ प्रेम होते. ती जिवंत असेपर्यंत त्याने दुसऱ्या कोणत्या[ही] स्त्रीशी लग्न केले नाही. महंमदाच्या नवयुगप्रवर्तक व समाज[-] सुधारक अशा विचारांना समाजातील लब्धप्रतिष्ठितांनी जे[व्हा] कडाक्याचा विरोध आरंभिला व त्याला भोंदू ठरविले, ते[व्हा] खदीजाबीनेच त्याचा पाठपुरावा करून त्याला देवदूत म्ह[णून] गौरविले.

महंमदाने समाजजागरणाच्या आपल्या कार्याला प्रारं[भ] केला तो मक्केमध्ये एका लहानशा मंडळामार्फत. पूर्वी हि[ल्फ-] फुल- फुजुल नामक एक गुंडविरोधी मंडळ मक्केमध्ये का[म] करीत असे. महंमदाने त्या मंडळात स्वतःचा शिरकाव क[रून] घेतला व लौकरच तो त्याचा प्रमुख बनला. हळूहळू [या] मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मक्केतल्या अनेक समाजविघात[क] रूढींना पायबंद घातला.

आरंभी मिळालेल्या या यशाने महंमदाची उमेद वाढ[ली.] मग त्याने वयाच्या पस्तिसाव्या वर्षापर्यंत मक्केतील भिन्न भि[न्न] जमातींतील संघर्ष मिटवून सर्व समाज एकसंध केला. [त्या] वेळी तिथल्या काबाच्या पुरातन देवालयाचा जीर्णोद्धार चा[लू] होता. देवालयाचे अर्धेअधिक बांधकाम पुरे झाल्यावर पवि[त्र] काळ्या पाषाणाची प्रतिष्ठापना करण्याचा प्रसंग आला[.] त्याचा मुख्य मान कोणत्या जमातीच्या पुरुषाला मिळावा[,] मुद्यावरून संघर्ष उभा राहिला. त्या वेळी महंमद पुढे आ[ला.] त्याने तो संघर्ष टाळण्यासाठी एक सोपी युक्ती सुचविली, [ती] अशी – एका वस्त्रावर तो पवित्र पाषाण ठेवावा आणि स[र्व] जमातींच्या प्रतिनिधींनी त्या वस्त्राला हात लावून तो उचलावा व नियोजित स्थळी स्थापावा. महंमदाची ही योजना सर्वां[ना] पसंत पडली व त्यामुळे संघर्ष टळला.

यानंतरची दहा-बारा वर्षे महंमदाने आत्मचिंतनात घा[ल]विली. या काळात तो एका गुहेत ध्यान लावून बसे. [त्या] ध्यानात त्याला दृष्टांत होत. आपण ईश्वराचे प्रेषित (पैगंबर)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहोत, अशी त्याला जाणीव झाली, ती याच काळात.

पुढे त्याने इस्लाम धर्माच्या प्रचाराला सुरुवात केली. त्याच्या या नव्या धर्माचे पहिले अनुयायित्व त्याच्या पत्नीने – खदीजेने स्वीकारले. यानंतर त्याचे दोन दत्तक पुत्र अली व झैद हेही इस्लामचे अनुयायी बनले. अबू बक्र व उस्मान यांनीही याच काळात इस्लामधर्म स्वीकारला. प्रारंभीच्या काळात मक्केच्या नागरिकांनी महंमदाच्या इस्लामविषयक प्रचाराकडे दुर्लक्ष केले; तथापि त्याच्या अनुयायांची संख्या वाढू लागली. पण पुढे त्याच्या या नव्या धर्मसंघटनेमुळे प्रस्थापित समाजरचना कोसळणार असे दिसू लागताच मक्केतल्या धर्मपंडितांनी महंमदाच्या या नव्या धर्मप्रचाराला पायबंद घालण्याचे ठरवले. ते महंमदाला सर्व प्रकारे विरोध करायला उभे राहिले. परिणामी उभय पक्षांत चकमकीही उडू लागल्या. त्यामुळे रक्तपातही होऊ लागला. महंमदाचा मूळ स्वभाव शांतताप्रिय असला, तरी विरोधकांनी सुरू केलेल्या या दंगलींना तोंड देण्यासाठी त्यालाही त्याच मार्गांचा अवलंब करणे भाग पडले. पुढे कुरेश घराण्यातील श्रेष्ठींच्या आज्ञेवरून समस्त मक्कानिवासियांनी महंमद व त्याचे अनुयायी यांच्या वर सार्वत्रिक बहिष्कार पुकारला. तथापि तो फारसा यशस्वी झाला नाही.

महंमदाच्या वयाच्या पन्नासाव्या वर्षी खदीजा मरण पावली. त्यानंतर महंमदाने वेगवेगळ्या काळी एकूण ७–८ स्त्रियांशी विवाह केले. मुस्लिम इतिहासकार सांगतात की, यांतील एक सोडून अन्य स्त्रिया विधवा होत्या व त्यांच्या उद्धारासाठीच महंमदाने त्यांच्याशी लग्ने केली. काहींच्या मते त्यामागे धर्म-प्रचाराचाही उद्देश होता.

महंमदाला मक्केत जसजसे अनुयायी मिळत गेले, तसतसे तिथल्या विरोधकांच्या विरोधाचे स्वरूपही उग्र बनू लागले. कित्येक वेळा त्याच्यावर प्राणघातक हल्लेही करण्यात आले. त्यामुळे महंमदाला अखेर आपल्या अनुयायांसह मदिनेला पळून जावे लागले. या पलायनाला इस्लाम धर्मात हिजरात असे म्हणतात. त्यावरूनच २० जून ६२२ इ. स. पासून हिजरी नावाची नवीन कालगणना मुसलमानांमध्ये सुरू झाली.

मदिनेला गेल्यावर महंमदाला असंख्य अनुयायी लाभले. तिथल्या लोकांनी त्याचे व त्याच्या अनुयायांचे मनःपूर्वक स्वागत केले. मक्केपेक्षा मदीना हीच आपल्या धर्मप्रचाराला अनुकूल भूमी आहे, असा प्रत्यय आल्यावर महंमदाने तिथेच स्थायिक होण्याचा निश्चय केला. लौकरच त्याने तिथे स्वतः-साठी घर व अनुयायांसाठी प्रार्थनामंदिर उभारले. कालांतराने महंमदाने तिथल्या राज्यव्यवस्थेतही शिरकाव करून घेतला व हळूहळू तो तिथला सर्वसत्ताधारी झाला. सत्ता प्राप्त करून घेत असताना महंमदाला छोट्या मोठ्या लढाया कराव्या लागल्या व त्यांत त्याला निर्णायक यश मिळाल्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढीला लागला. मग त्याने धर्मप्रचाराच्या बाबतीतही आक्रमक धोरण स्वीकारले. यानंतर अवघ्या ८–१० वर्षांत त्याने सबंध अरबस्तान आपल्या स्वामित्वाखाली आणला. इ. स. ६३० साली त्याने मक्केवर हल्ला चढवून तिथल्या असंख्य देवमूर्तींचा उच्छेद केला व सरसकट नाग-रिकांना सक्तीने इस्लामची दीक्षा दिली. ज्यांनी त्या पायी त्याला विरोध केला, त्यांना त्याने ठार मारले.

मक्का–विजयानंतर अवघ्या दोनच वर्षांनी महंमद मरण पावला. स्वतःला तो परमेश्वराचा प्रेषित म्हणवून घेई. व्यक्तिशः तो अत्यंत साधेपणाने वागत असे. त्याचे बोलणे स्पष्ट व साव-काश असे. त्याला असत्य, अन्याय व उद्दामपणा यांचा राग येत असे.

इस्लाम धर्माचा प्रधान धर्मग्रंथ म्हणजे पवित्र कुराण हा होय. महंमदाला परमेश्वरचिंतन करीत असता भावावस्थेत स्फुरलेल्या सुवचनांचा हा संग्रह आहे. त्याविषयी श्री. नरहर कुरुंदकर लिहितात, ते असे–

परमेश्वराकडून देवदूत महंमदाकडे येई. तो परमेश्वराचा संदेश आणी. हा ईश्वरीय संदेश म्हणजे पवित्र कुराण. इस्ला-मच्या सर्व धर्माला, तत्त्वज्ञानाला व वागणुकीला हा ग्रंथ आधार-भूत आहे, अशी मुसलमानांची श्रद्धा आहे. त्यांच्या मते हा परमेश्वराचा शेवटचा परिपूर्ण ग्रंथ असल्यामुळे, या ग्रंथाच्या शुद्धतेची जबाबदारी स्वतः परमेश्वरानेच घेतलेली आहे. म्हणून त्यात नवीन काही आलेले नाही, त्यातून जुने काही गळून पडलेले नाही. मुसलमानांच्या मते अरबी ही जगातली सर्वांत पवित्र भाषा आहे. कारण ती परमेश्वराने उपदेशासाठी निवड-लेली आहे. प्रत्यक्ष कुराणामध्ये मात्र असे म्हटले आहे की काफि-रांना उपदेशाची गरज असल्यामुळे ईश्वरी उपदेश काफिरांच्या भाषेत पाठविण्यात आलेला आहे. ही भूमिका अधिक समंजस-पणाची होती. जे जी भाषा बोलणारे त्यांना त्यांच्या भाषेत धर्माचा उपदेश, हा मुद्दा पुढे अमान्य करण्यात आला. महंमद हा शेवटचा प्रेषित म्हणून तो सर्वांत मोठा; कुराण हा शेवटचा ईश्वरी ग्रंथ, म्हणून तो सर्वांत प्रमाण आणि त्या ग्रंथाची भाषा अरबी, म्हणून अरबी सर्वश्रेष्ठ भाषा, अशी भूमिका नंतरच्या काळात घेण्यात आली.

'कुराण' याचा शब्दशः अर्थ 'संदेश' 'भाषण सांगणे' असा आहे. मक्केत असताना एकूण १४४ सुऱ्यांपैकी ९० सुरे परमेश्वराकडून पाठविले गेले. हा संदेश पाठविण्याचा जो साक्षात्कार किंवा ज्या साक्षात्काराने संदेश प्राप्त होतो, त्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वही असे म्हणतात. मक्केतील सुरे काही प्रमाणात उदार मतवाद सांगणारे आहेत. उदाहरणार्थ, सुरे काफरून जर घेतला तर त्यात असे म्हटले आहे की, "हे काफिरांनो, मी ज्या वस्तूची उपासना करतो, ती तुम्हांला उपास्य नाही; पण म्हणून काय झाले ? लकुम दिनुकुम वलीये दिन' तुमचा धर्म तुम्हांला असो, माझा धर्म मला असो." मक्केतील हा उदार मतवाद मदिनेत मावळलेला आहे. पाहा – इस्लाम, कुराण [डि. इ.; हजरत महंमद पैगंबर – सय्यद अहंमद अमीन, १९३५; जागर – श्री. नरहर कुरुंदकर, १९७०]

महमुदीया मुसलमान लोकांचा एक पंथ. मीर शरीफ हा या पंथाचा संस्थापक होय. तो अकबराचा एक सेनाधिकारी असून, बंगालमध्ये राहत होता. नुक्तवीया पंथाचा संस्थापक बुसरवूवानचा महमूद हा मीर शरीफचा गुरू होता. मीर शरीफने त्याच्याच नावाने हा पंथ सुरू केला. महमुदाने पुनर्जन्माच्या सिद्धांताचा पुरस्कार करून असे प्रतिपादिले, की पृथ्वी या अणूपासून सर्व विश्वाची उत्पत्ती झाली आहे. नुक्ता या शब्दाचा अर्थ अणू असाच आहे. यावरून त्या पंथाला नुक्तवीया असे नाव मिळाले. या पंथाच्या अनुयायांना महमुदीया व वहीदीया असेही म्हणतात. पर्शियाचा राजा अब्बास याने या लोकांना आपल्या राज्यातून घालविले होते; पण अकबराने त्यांना आश्रय दिला. [डि. इ.]

महमूद अलत्वी (इ. स. चे ११ वे शतक) एक मुसलमानी इतिहासकार. महंमद गझनीने भारतावर केलेल्या आक्रमणांचा इतिहास ज्या मुसलमान ग्रंथकारांनी लिहिला आहे, त्यांत याचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. हा गझनीच्या महंमुदाचा मंत्री होता; मात्र तो स्वारीच्या वेळी महंमुदाबरोबर हजर नव्हता. याने सुबुक्तगीन आणि महंमूद यांच्या शासनकालाचा इतिहास कितान-उल्-यमीनी या ग्रंथात लिहिला आहे. या ग्रंथाची भाषा अरबी असून, महंमुदाच्या आक्रमणापर्यंतचा विस्तृत इतिहास यात वाचायला मिळतो. इतिहासपंडितांच्या मते, हा इतिहास एकदेशीय आणि अतिशयोक्तींनी भरलेला असला, तरी इतिहासाचे एक साधन म्हणून त्याचे मूल्य अबाधित आहे. [ब्र. सां. इ.]

महर्लोक भूरादी सप्त लोकांपैकी चौथा लोक. ब्रह्मदेवाचा दिवस संपल्यावर सर्व चराचर त्रैलोक्य दग्ध होते, त्या वेळी त्रैलोक्यातले लोक महर्लोकाला जातात, असे अग्नी पुराणात सांगितले आहे. कल्पवासी लोकही या लोकात राहतात. निरनिराळे मनूही आपले कार्य संपल्यावर या लोका[त] जातात. हा लोक प्राप्त करून घेणे, हे योगी लोकांचे ध्ये[य] असते. ध्रुव आणि जन या दोन लोकांच्या मधे महर्लोक आ[हे.] इथल्या लोकांच्या अंगी एवढे मानसिक सामर्थ्य असते, की[ते] आपल्याला हवी ती वस्तू इच्छामात्रे निर्माण करू शकतात.

हा लोक व्याहृतीपासून निर्माण झाला आहे. कल्पांती हा निर्जन बनतो आणि प्रलयकाली दग्ध होतो. [श. क.; पु. इं.]

महली एक जात. यांची वस्ती छोटा नागपूर भागात आढळते. यांच्यांत पाच पोटजाती आहेत. पोटजातींचे विभाजन धंद्यावरून झाले असल्याचे सांगतात. यांचा मुं[डा] लोकांशी संबंध असावा, असे वंशशास्त्रज्ञांचे मत आहे.

विवाहप्रथा – लग्नाला निघण्यापूर्वी नवऱ्या मुलाचे आंब्याच्या झाडाबरोबर आणि नवरीचे मोहाच्या झाडाबरोबर लग्न लावतात. नंतर मुलगा डोक्यावर पाण्याचा घडा घेऊन कोणाच्या तरी खांद्यावर बसून नवरीच्या घरी जातो. तिथे तो वधूच्या कपाळी पाच वेळा शेंदूर लावतो आणि तिला लोखंडाची एक बांगडी देतो. एवढे झाले म्हणजे त्यांचा लग्नविधी संपतो.

महली लोकांत घटस्फोटाची चाल आहे. घटस्फोट घेताना नवरा त्या स्त्रीला एक रुपया देतो आणि लग्नाच्या वेळी दिलेली लोखंडाची बांगडी परत घेतो.

या जातीत प्रवेश करू इच्छिणाऱ्याला प्रथम जातिप्रमुखाला थोडे पैसे द्यावे लागतात आणि इतर महलींना भोजन घालावे लागते. भोजनाच्या वेळी पाहुण्यांनी पानात टाकलेले थोडे उष्टे ही त्याला खावे लागते. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

महसू जौनसार–बावरमधील लोकांची प्रमुख देवता. या देवतेची तिथे अनेक मंदिरे असून, सर्वांत मोठे मंदिर बावर परगण्यातील हिनोले या गावी आहे. विशू उत्सवाच्या वेळी हजारो स्त्रीपुरुष व मुले तिथे या देवाची पूजा करण्यासाठी जमतात. त्या वेळी देवाला बकरा बळी देतात.

महसू ही एक देवता नसून बसक, पिबसक, बैठ आणि चलडा या चार देवांचा तो समुदाय आहे. यांपैकी पहिले दोन देव टेहरी–गढवालमधे व बाकीचे जौनसार–बावरमधे निवास करतात. चलडा देव नेहमी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत असतो. पण लोकांनी निमंत्रण दिल्याशिवाय तो जात नाही आणि सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ एका जागी थांबत नाही. एखाद्या गावच्या लोकांनी त्याला निमंत्रण दिले, की या देवाची मूर्ती मोठ्या थाटामाटाने, वाजतगाजत मिरवणुकीने त्या गावी नेतात. देवाबरोबर त्याचे पुजारी आणि वाजंत्री

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वालेही असतात. देवाचा मुक्काम त्या गावात असेपर्यंत त्यांचा खर्च गावकरी करतात. देव आपल्याबरोबर सुखसमृद्धी आणतो, अशी समजूत आहे.

मुळात महसू देवतासमूह काश्मीरमध्ये होता आणि सुमारे पाचशे वर्षांपूर्वी उना नावाच्या एका भक्ताच्या साहाय्यासाठी तो जौनसार–बावर प्रदेशात आला, अशी आख्यायिका आहे. [वन्यजाती, जानेवारी १९६८]

महा एकादशी

आषाढ शुद्ध एकादशी व कार्तिक शुद्ध एकादशी, या दोन तिथींना महा एकादशी असे म्हणतात. आषाढी एकादशीला शयनी व कार्तिकी एकादशीला प्रबोधिनी अशी अन्य नावे आहेत. चातुर्मासाचा प्रारंभ शयनी एकादशीला होतो आणि तो प्रबोधिनी एकादशीला संपतो. या एकादशीच्या अनेक कथाही सांगितल्या आहेत. पाहा– एकादशी, प्रबोधिनी एकादशी, शयनी एकादशी.

महा एकाक्षरा

एक देवता. हिचे मूर्तिध्यान असे –त्रिनेत्र व दशभुज. चक्र, शंख, त्रिशूल, पाश, इक्षुचाप, तामरस, गदा, धान्य, महाळुंग व दंत या वस्तू धारण करणारी. हिला सोंड असते. सोंडेवर कलश असतो. [श्रीविद्यार्णवतंत्र]

महाकल्पलतादान

याचा विधी मत्स्य पुराणात दिला आहे, तो असा –सोन्याच्या दहा वेली करून त्यांच्या मुळाशी इंद्रादी देवतांच्या प्रतिमा ठेवाव्या आणि मग त्यांचे दान द्यावे. हे महादान आहे. फल – सत्यलोकप्राप्ती.

महाकाल

(१) शिवाचे एक भयानक रूप. हा चतुर्भुज असून, नागपाश धारण करतो आणि कालीला आलिंगन देऊन तिच्यासह सुरापान करतो, असे त्याचे वर्णन आहे. महानिर्वाणतंत्रात (४.३१) त्याच्या नावाची व्युत्पत्ती दिली आहे, ती अशी–

कलनात् सर्वभूतानां महाकालः प्रकीर्तितः ।

अर्थ – सर्व भूतांचा ग्रास करीत असल्यामुळे त्याला महाकाल म्हटले आहे.

(२) एक बौद्ध देव. महादेवाचे बौद्ध रूप. साधनमाला व निष्पन्नयोगावली या ग्रंथांत याचे अनेक प्रकार वर्णिलेले आहेत. कुठे त्याला एकमुख आणि दोन, चार किंवा सहा हात असल्याचे सांगितले आहे; तर कुठे आठ मुखे व सोळा हात असल्याचे लिहिले आहे. तीक्ष्ण, लांब सुळे, मोठे पोट, व्याघ्रचर्म, अंगावर सर्प; मस्तकावर व गळ्यात कपालमाला आणि विविध आयुध, यांमुळे हा देव भेसूर दिसतो. त्याचा वर्ण निळा व तोंड रक्ताने माखलेले असून, त्याला तीन नेत्र असतात. तो मनुष्याच्या प्रेतावर उभा आहे. याला दोनापेक्षा अधिक हात असतात, तेव्हा त्याच्या हातात खड्ग, खट्वांग, शूल, वज्र, त्रिशूळ, दंड ही आयुधे आणि डमरू, घंटा, पाश, माला, इ. वस्तू असतात. अष्टमुख व षोडशभुज मूर्तीला चार पाय असून, शक्ती त्याला आलिंगन देत असते. याच्या मस्तकी पाच ध्यानी बुद्धांच्या मूर्ती असतात. तांत्रिक मारणविधीत शत्रुविनाशासाठी या देवाची पूजा केली जाते. [इं. बु. इ.]

महाकाली

(१) आदिशक्ती महामायेचे एक रूप व परात्पर महाकालाची संहारक शक्ती. आदिशक्तीच्या तमःप्रधान रौद्र रूपाला महाकाली म्हणतात. ती दुष्टांचा संहार करण्यासाठी प्रकट होते. मधु-कैटभ या दैत्यांचा नाश करण्यासाठी ती अवतरली, असे देवी भागवतात सांगितले आहे.

शाक्त संप्रदायात महाकाली या नावाने देवीची उपासना केली जाते. तिचे रूप भयानक आहे. तिच्या मुखातून रक्त गळत



महाकाली– तांत्रिक देवता

असते व तिचे सुळे बाहेर आलेले असतात. तिचे केस ज्वालेसारखे दिसतात आणि तिच्या गळ्यात नररुंडमाला असते. तिला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चार हात असून, त्यांत संहारक शस्त्रे असतात. श्रीविद्यार्णव-तंत्रात तिचे रूपध्यान वर्णिले आहे, ते असे – कृष्णवर्ण, दशमुख, त्रिनेत्र, दशभुज, दशपाद आणि खड्ग, शर, त्रिशूळ, गदा, चक्र, पाश, इ. आयुधे धारण करणारी.

महाकालीचे रूप असे उग्र असले, तरी ती आपल्या भक्तांना वरदायिनी होते आणि त्यांचे संरक्षणही करते. [दे. को. ३; कल्याण-शक्तिअंक; इ. व्रॉं.]

(२) द. भारतातील एक ग्रामदेवता. ही कोपिष्ट असून, तिच्या कोपामुळे पटकी हा रोग उद्‌भवतो, अशी समजूत आहे. पौष मासात हिची जत्रा भरते व ती सोळा दिवस चालते. जत्रेच्या पहिल्या दिवशी देवीला एक सोन्याची बांगडी भरतात. नवव्या दिवशी ती उतरवून देवीच्या भांडारात ठेवतात. दहा दिवस तिला वेगवेगळ्या वाहनांवर बसवितात. अकराव्या दिवशी तिचा रथ निघतो. त्या वेळी तिला पशू बळी दिला जातो.

(३) जैन संप्रदायातील यक्षिणी. ही सुमतिनाथाची सेविका आहे. श्वेतांबरमते ती सुवर्णकांतीची, कमलासना व चतुर्भुज असून, वरदमुद्रा, मातुलिंग, पाश व अंकुश धारण करते. दिगंबर पंथाचे लोक तिला पुरुषदत्ता म्हणतात. ती चक्र, वज्र, फल व वरद मुद्रा धारण करणारी व गजवाहना आहे.

ही जैनांची विद्यादेवीही आहे. ती आपल्या उपासकांना समाधी प्राप्त करून देते, असे म्हटले आहे. [जै. इ.]

महाकाव्य सर्गादी विभागांनी युक्त असे मोठे काव्य. याचे आर्ष व विदग्ध असे दोन प्रकार आहेत.

आर्ष महाकाव्य हे ऋषिप्रणीत, द्रष्टेपणाने युक्त, प्राचीन, प्रथम निर्माण झालेले, स्वयंस्फूर्त व खरा इतिहास सांगणारे असते. रामायण व महाभारत या आर्ष महाकाव्यांत मानवी विकार व विचार यांचा भरघोस व त्रिकालाबाधित आविष्कार दिसून येतो. भारतीय आर्य वंशाच्या सर्व विशेषांचे एकत्रीकरण आणि त्यांच्या प्रभावाचा परमोच्च बिंदू त्यांत आलेला आहे. ही काव्ये म्हणजे त्या वेळच्या संस्कृतीचे भांडार व त्या वेळच्या ज्ञात जगताचे विश्वकोशच आहेत. वरील आर्ष महाकाव्यांचे विषय पुढीलप्रमाणे आहेत

(१) घनघोर रणसंग्राम, बाणांचा सणसणाट, रथांचा घडघडाट आणि मृत्यूचे तांडव.

(२) लांबचा व धाडसी प्रवास आणि त्या प्रवासात आढळणारी नद्या, पर्वत, सागर, अरण्ये, हिंस्र पशू, इ. दृश्ये.

काही साहसी व शूर जमातींनी एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशावर केलेली आक्रमक परिभ्रमणे हीही महाकाव्यरचनेला प्रेरक होतात, असा सिद्धान्त ए. जे. टॉयनबी याने मांडला आहे. पांडवांचा दिग्विजय, रामाचा लंकाविजय किंवा आर्… भारतातील वसाहत ही याची उदाहरणे होत.

(३) परस्त्रीचे धर्षण. उदा० सीता, द्रौपदी यांचे राव… दुःशासन यांनी केलेले धर्षण.

(४) द्यूत, शर्यती व खेळ.

(५) कडाक्याचे वादविवाद. उदा० भीम, द्रौपदी व … यांचा वाद.

(६) नियतीचे प्रभुत्व आणि अपरिहार्यत्व. रामायण-म… भारतातील स्त्री-पुरुषांच्या जीवनावर भवितव्यतेच्या संब… त्याची छाया पडलेली स्पष्ट दिसते.

(७) अतिमानुष शक्तींचा उपयोग. रामायणात व म… भारतात इंद्र, अग्नी, वरुण, ब्रह्मदेव, विष्णू, शंकर, इ. देव … यक्ष, राक्षस, इ. अतिमानवी संघ मानवी व्यवहारात प… दिसतात.

याशिवाय, अधोमानुष म्हणजे पशू व पक्षी यांचीही यो… सर्व आर्ष महाकाव्यांत दिसते. उदा० जटायू, जांबुवंत, ह… गरुड, इत्यादी.

आर्ष महाकाव्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील

(१) त्याचा नायक हा महान युगपुरुष असतो आणि त्या… जीवनात फार मोठ्या राष्ट्रव्यापक घडामोडींचा, विजय… किंवा उत्थानाचा समावेश असतो. त्याच्या अंगी शौर्य, … त्याग, औदार्य, इ. गुण प्रकर्षाने असतात.

(२) त्यात नायकाचे संपूर्ण जीवन चित्रित केलेले अस…

(३) त्यात देव, राक्षस, गंधर्व, इ. अतिमानुष व अमा… व्यक्ती असाव्या लागतात. त्याचबरोबर मानवी जीव… विशाल दर्शनही त्यात घडावे लागते आणि मानवी क… पार्श्वभूमी विश्वव्यापक ठेवावी लागते. म्हणजेच मा… जीवनातील घटनांचा संबंध विश्वाचे धारण, पोषण कि… संहार यांच्याशी जोडावा लागतो.

(४) मुख्य विषयाच्या अनुषंगाने अनेक उपकथा, आख्या… वर्णने, भाषणे आणि धर्म व तत्त्वज्ञान यांची चर्चा सामाव… इतका त्याचा विस्तार मोठा असावा लागतो.

(५) त्याची शैली सोपी पण आकर्षक, साधी पण जोरक… आणि गंभीर असावी लागते. त्यात पांडित्याच्या दिमाखाऐवजी… सहजस्फूर्तता व अनुभवप्राप्त ज्ञान असावे लागते.

आदिकवी वाल्मीकीचे रामायण हेच पहिले आर्ष महाका… होय. काव्य या नावाला साजेल अशी आकर्षक, सुसूत्र, … आणि भव्य अशी त्याची रचना आहे. यात रामचरित्राशिवाय… इतर गौण आख्यानोपाख्यानांची सुंदर गुंफण केलेली आहे.

व्यास महर्षींचे महाभारत हे दुसरे आर्ष महाकाव्य. मूळ…

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कुशाग्र बुद्धी आणि मानी स्वभाव यांचे दर्शन, ठसकेबाज व विचारप्रधान भाषा आणि प्रसंगसापेक्ष नैतिक गुणांचे तारतम्य-विवेचन ही महाभारताची वैशिष्ट्ये होत. पुढील काळातील बहुतेक महाकाव्ये या आर्ष महाकाव्यांवर आधारलेली आहेत.

विदग्ध महाकाव्याची लक्षणे, संस्कृत साहित्य-शास्त्रकारांनी अग्नी पुराण (३३७·२०–३२), काव्यालंकार (१·१९), काव्यादर्श (१·१४–२०), सरस्वतीकण्ठाभरण (५·१२८), साहित्यदर्पण (६·३२४), इ. ग्रंथांत दिलेली आहेत. ती बहुतेक सारखीच आहेत. विश्वनाथाने साहित्यदर्पणात दिलेली लक्षणे बहुतेक पूर्ण असून, ती पुढीलप्रमाणे आहेत –

(१) रामायण-महाभारतादी इतिहास किंवा साधुशील पुरुषांची चरित्रे यांतून महाकाव्याची कथा निवडावी. ती विस्तृत असावी.

(२) त्यातील नायक देव किंवा थोर क्षत्रिय कुळातील पुरुष किंवा धीरोदात्त गुणांनी युक्त असा चतुर महापुरुष असावा. नायक एक किंवा अनेक असले तरी चालतील. याशिवाय नायिका, मुनी, दूत, योद्धे, खलनायक, इ. पात्रे त्यात असावी.

(३) मुख्य कथानक उठावदार व्हावे, म्हणून त्यात प्रभात, मध्याह्न, सायंकाळ, रात्र, अंधकार, सहा ऋतू, पर्वत, सागर, नद्या, अरण्ये, चंद्र, सूर्य, उद्यानक्रीडा, जलविहार, मद्यपान, सुरतक्रीडा, नगरे, मुनी व त्यांचे आश्रम, स्वर्ग, यज्ञ, इत्यादींची वर्णने आणि विवाह, पुत्रजन्म, युद्धयात्रा, दूतप्रेषण, राजकारण, वियोग, समागम, मृगया, इ. प्रसंग असावे. शृंगार, वीर व शांत यांपैकी कोणतातरी एक रस मुख्य असून, इतर सर्व त्याला पोषक असावे. काव्य अलंकारयुक्त असावे.

(४) काव्याच्या आरंभी आशीर्वाद किंवा इष्ट देवतेला नमन असावे किंवा कथेला एकदम सुरवात केली, तरी चालेल. कथेचे सुटे पण सुसंबद्ध भाग पाडून त्यांना सर्ग म्हणावे. ते फार मोठे किंवा लहान नसावे. एका सर्गात एकच वृत्त असावे. क्वचित अनेक वृत्तेही चालतील. सर्गाच्या शेवटचा श्लोक निराळ्या वृत्तात असावा. सर्गाच्या शेवटी पुढील सर्गातील विषयाची सूचना असावी. सर्गसंख्या आठांपेक्षा कमी व तिसांपेक्षा जास्त नसावी. कवी, प्रतिपाद्य विषय, नायक किंवा इतर महत्त्वाचे पात्र यांवरून महाकाव्याला नाव द्यावे. प्रत्येक सर्गाला नाव द्यायचे असेल, तर त्यातील कथेवरून ते द्यावे.

(५) वैदर्भी, गौडी, पांचाली, लाटी वगैरे सर्व प्रमुख रीती यथाप्रसंग योजाव्या व माधुर्य, ओज, प्रसाद, इ. गुणांनी व शब्दार्थालंकारांनी शैली समृद्ध करावी. तिच्यात उपनागरिका, परुषा व कोमला या वृत्ती असाव्या.

(६) धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांचे साधन हा महाकाव्यरचनेचा हेतू असावा. महापुरुषांच्या थोर कीर्तीचे वर्णन, सज्जनांची स्तुती व दुर्जनांची निंदा त्यात असावी. काव्य लोकरंजक असावे.

(७) चार वेद; मन्वादी स्मृतिग्रंथ; रामायण-महाभारतादी इतिहास; पुराणे; मीमांसा, न्याय, वैशेषिक, इ. प्रमाणविद्या; शैव, वैष्णव, बौद्ध, इ. समयविद्या; अर्थशास्त्र, नाटचशास्त्र, कामशास्त्र, ही शास्त्रे; निरनिराळ्या देशांतील प्राकृत व विदग्ध लोक; व्यक्तींची किंवा स्थलांची खरी किंवा काल्पनिक वर्णने; हस्तिशिक्षा, रत्नपरीक्षा, धनुर्वेद, इत्यादींच्या साहाय्याने रामायण-महाभारतांतून निवडलेल्या कथांची भरघोस व डौलदार सजावट करावी.

संस्कृत साहित्यात अनेक महाकाव्ये आहेत. रघुवंश, कुमारसंभव, किरातार्जुनीय, शिशुपालवध व नैषधीयचरित ही पंच महाकाव्ये विशेष प्रसिद्ध आहेत. कालिदासाचे रघुवंश, कुमारदासाचे जानकीहरण, भट्टीचे रावणवध, ही काव्ये रामायणावर आधारलेली आहेत. पंच महाकाव्यांपैकी किरातार्जुनीय, शिशुपालवध व नैषधीयचरित ही तीन काव्ये महाभारतातील कथांवर आधारलेली आहेत. मंखाचे श्रीकंठचरित, विद्यामाधवाचे पार्वतीरुक्मिणीय, कविराजाचे पारिजातहरण, वेंकटाध्वरीचे यादवराघवीय व रत्नाकर आणि राजानकाचे हरविजय ही काव्ये पुराणांतील कथांवर आधारित आहेत; तर अश्वघोषाचे बुद्धचरित व सौंदरनंद; शिवस्वामीचे कप्फणाभ्युदय, भट्टार हरिचंद्राचे धर्मशर्माभ्युदय व हेमचंद्राचे त्रिषष्टिशलाकापुरुष या काव्यांना धार्मिक चरित्रकथांचा आधार आहे. पद्मगुप्ताचे नवसाहसांकचरित, बिल्हणाचे विक्रमांकदेवचरित, न्यायचंद्राचे हम्मीर महाकाव्य ही काव्ये अर्वाचीन इतिहासावर आधारित आहेत. याव्यतिरिक्त परमानंदाचे शिवभारत, जयरामाचे पर्णालपर्वतग्रहणाख्यान, केशवपंडिताचे राजारामचरित, भागवतशास्त्र्यांचे अहल्याचरितम् ही काव्ये ऐतिहासिक व्यक्तींच्या जीवनावर लिहिलेली आहेत.

विदग्ध महाकाव्याची वर जी लक्षणे सांगितली, ती प्रायः त्याच्या बाह्यांगासंबंधीच आहेत. त्यांवरून महाकाव्याचा साचा कसा असावा, याची कल्पना येते; पण त्यात व्यापून राहणाऱ्या चैतन्याची कल्पना येत नाही.

त्यामुळे रामायण-महाभारतातील कथेवर आधारलेले व बाह्यांगविषयक नियमांनी युक्त असे कोणतेही काव्य महाकाव्य ठरू शकते. व्याकरणशास्त्र व साहित्यशास्त्र यांच्या उदाहरणांसाठी रचलेले भट्टिकाव्य किंवा द्विसंधान, त्रिसंधान वगैरे शाब्दिक चमत्कार दाखवण्यासाठी लिहिलेले तंत्रबद्ध काव्य हेही महाकाव्य या संज्ञेला प्राप्त होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माघानंतरच्या महाकाव्यांत लालित्यापेक्षा पांडित्याचे प्रभुत्व अधिक आढळू लागले आणि ती काव्ये सर्वसामान्य वाचकाच्या आवाक्याबाहेर जाऊन केवळ पंडितगम्य झाली. काव्याचा आत्मा हरवला आणि बाह्य आडंबर मात्र शिल्लक राहिले. कालिदासाचे भावनोत्कटता व प्रसाद हे गुण लोप पावून भारवीची विचारप्रवणता, माघाचे पांडित्य व पुढील कवींचे शब्दचमत्कार अशा पायऱ्यांनी महाकाव्य घसरत चालले मध्यंतरी सुबंधू, दंडी, बाण वगैरे वक्रोक्तिनिपुण गद्यलेखकांची छाप पद्यलेखकांवर पडली व काव्यात कृत्रिमपणा येऊ लागला. द्विसंधान व त्रिसंधान म्हणजे एका श्लोकातून दोन-दोन किंवा तीन-तीन अर्थ काढणे होय. हा एक नवाच प्रकार काव्यात रूढ झाला. याचा आरंभ भारवी व माघ यांच्या अर्थत्रयी दाखवणाऱ्या श्लोकांमध्ये (किरात. १५.४५; शिशु. १९.११६) पूर्वी झालाच होता. श्रीहर्षाने तर एकेका श्लोकातून पाच-पाच अर्थ काढून दाखवले (नैषध. १३.३४). ही करामत अपूर्वच म्हटली पाहिजे. पण त्यामुळेच काव्ये कमालीची कृत्रिम झाली.

जैन कवी धनंजय याच्या राघव-पांडवीयात (रचनाकाल इ. स. ११३०) राम व पांडव यांची चरित्रे एकदम एका शब्दयोजनेने वर्णिली आहेत. हरदत्तसूरीचे राघवनैषधीय, विद्यामाधवाचे पार्वतीरुक्मिणीय, वेंकटाध्वरीचे यादवराघवीय व सोमेश्वराचे राघवयादवीय ही अशाच रचनेची काव्ये होत. चिदंबराच्या राघवपांडवयादवीय या काव्यात तर राम, पांडव व यादव यांची कथा एकदमच सांगितली आहे.

या कृत्रिम काव्यरचनेच्या काळात नैषधीयचरित हे एकच काव्य विशेष उल्लेखनीय असे झाले. यानंतर ऐतिहासिक, धर्मपर व विशिष्ट राजवर्णनपर अशी महाकाव्ये पुष्कळ रचली गेली. संस्कृत महाकाव्यांची संख्या तीनशे साडेतीनशे भरेल. पण त्यांपैकी पंच महाकाव्ये व इतर दहा-पंधरा महाकाव्येच तेवढी अधिक प्रसिद्ध आहेत. एका ठराविक चाकोरीतून गेल्यामुळे पुढील महाकाव्यांत तोचतोपणा आला. पुढे इस्लामी आक्रमणांमुळे संस्कृत भाषेची पीछेहाट झाली. तथापि संस्कृतात महाकाव्यांची निर्मिती मात्र आजतागायत चालू आहे. अलिकडेच श्री. भा. वर्णेकर यांनी शिवचरित्रम् व मा. श्री. अणे यांनी तिलकयशोऽर्णवः नामक महाकाव्ये लिहिली आहेत.

इ. स. च्या ११ व्या शतकापासून संमिश्र महाकाव्यांच्या रचनेला सुरवात झाली. या काव्यांत आर्ष महाकाव्ये, पुराणे व विदग्ध महाकाव्ये यांच्या रचनाविशेषांचे मिश्रण आढळते क्षेमेंद्राची नृपावली, नीलमुनीचे नीलमतपुराण, कल्हणाची राजतरंगिणी व मेरुतुंगाचा प्रबंधचिंतामणी ही त्याची उदाहरणे होत.

संस्कृत महाकाव्यरचनेबरोबरच प्राकृत भाषेतही महाकाव्ये रचली जात होती. कालिदासाच्या समकालीन सम[...] जाणाऱ्या प्रवरसेनाने सेतुबंध किंवा दसमुहवहो हे महा[...] प्राकृतात लिहिले. रामायणकथेच्या जैन संस्करणावर आधा[...] विमलसूरीचे पउमचरिय हे पुराणमहाकाव्य गाथा व [...] श्रुतिमनोहर वृत्तांत लिहिलेले आहे (इ. स. चे ४ थे शत[...] यशोवर्म्याचा राजकवी वाक्पतिराज याने गौड राजा[...] वधावर गउडवहो हे महाकाव्य लिहिले (इ. स. चे ८ वे शत[...] पहिला तीर्थंकर आदिनाथ याच्या चरित्रावर आदिनाथचरि[...] पुराणमहाकाव्य रचलेले आहे (इ. स. ११०३). पुष्पदं[...] महापुराण व जसहरचरिउ ही महाकाव्ये अपभ्रंश भाषेत [...] (इ. स. चे १० वे शतक).

प्राकृत काव्ये हा संस्कृत काव्ये व देशी काव्ये यांमधील [...] टप्पा असून, त्यांत पुढील देशी महाकाव्यरचनेची काही वैशि[...] आढळतात. देशी काव्यरचनेचा काळ साधारणपणे ११ वे [...] वे शतक हा आहे.

मराठीतील पहिली काव्यरचना महानुभाव कवींनी के[...] भास्करभट्ट बोरीकर (इ. स. चे १३ वे शतक) हा म[...] भाषेतील पहिला महाकवी होय. त्याने शिशुपालवध हे [...] काव्य रचले आहे. दुसरा महाकवी नरेंद्रपंडित याने रुक्मि[...] स्वयंवर हे काव्य लिहिले. एकनाथांचे रुक्मिणीस्वयंवर व [...] राजाचे रुक्मिणीहरण हीही महाकाव्येच होत. त्यानंतर कुंटे[...] राजा शिवाजी हे महाकाव्य प्रसिद्ध आहे (इ. स. १८[...] वा. वा. खरेशास्त्री यांनी यशवंतराव हे महाकाव्य लि[...] (इ. स. १८८८). ही काव्ये ऐतिहासिक व्यक्तींवर आ[...] लेली आहेत. यानंतरचे महाकवी म्हणजे स्वा. सावरक[...] होत. त्यांनी कमला व गोमांतक ही दोन महाकाव्यसदृश [...] लिहिली आहेत. त्यांपैकी कमला हे काव्य अपूर्ण आहे. [...] पतच्या रणसंग्रामावर आधारलेल्या एका महाकाव्याचा [...] हा पहिला सर्ग आहे. गोमांतक या काव्याचे पूर्व व उत्तर [...] दोन भाग आहेत. पूर्व भागात गोव्यात पोर्तुगिजांनी हि[...] कसा दुर्धर छळवाद मांडला ते सांगितले असून, उत्तर भा[...] मराठ्यांची सत्ता वाढल्यामुळे त्या छळाचे परिमार्जन कसे [...] त्याचा वृत्तान्त आहे. स्वतंत्र कथानक, भव्य प्रसंग, ओज[...] शैली, तडफदार व उत्कट भावना, पल्लेदार कल्पना व उदात्त [...] यांमुळे या काव्यांना मराठी महाकाव्यांत फार वरचे स्थान [...]

यानंतरच्या कालात सांगलीच्या साधुदास (गो. गो. मु[...] दार) यांनी विदग्ध महाकाव्यांच्या धर्तीवर व रामायण[...] आधारित अशी काव्ये रचली. त्यांच्या वनविहार (इ. [...] १९१२) या काव्यात सतरा सर्ग असून, त्यांत राम[...] वनवासापासून हनुमान लंकेत सीतेचा शोध लावतां, [...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पर्यंतचा कथाभाग आहे. रणविहार काव्यात (इ. स. १९१६) रामरावणयुद्ध आहे व गृहविहार या काव्यात (इ. स. १९२८) रामचंद्राच्या उत्तरचरित्राची कथा आहे. सांगलीच्याच वि. वा. भिडे यांनी रामकथेवर राघवीयपरीवाह नावाचे वीस सर्गांचे महाकाव्य लिहिले आहे. भाषेच्या दृष्टीने हे काव्य बरेच क्लिष्ट आहे. साधुदासांच्या गृहविहारात त्या मानाने सहजता, प्रसाद व रसपरिपोष अधिक आहे. अलिकडे श्री. यशवंत कवींनी छत्रपती शिवराय नामक एक महाकाव्य लिहिले आहे. तसेच श्री. ना. रा. मोरे यांनीही शिवचरित्रावरच गीतशिवायन हे अठरा हजार ओळींचे महाकाव्य लिहिले आहे.

गुजराती भाषेतही काही महाकाव्यसदृश रचना झाली आहे. श्रीधराने रणमल्लचंड हे वीररसप्रधान काव्य इ. स. १४०० मध्ये लिहिले. त्यात राठोड कुलातील रणमल्ल या पराक्रमी राजपुत्राने पाटण्याच्या झाफरखानाशी केलेल्या लढाईचे वर्णन आहे. या काव्याचे सत्तर श्लोक उपलब्ध असून, ते चौपाई व दोहा या छंदांत आहेत. पद्मनाभाच्या कान्हड दे प्रबंध या काव्यात (इ. स. १४५६) झालोरचा राजपुत्र कान्हड दे याने अलाउद्दीन खिलजीने घातलेल्या वेढ्याला मोठ्या शौर्याने बारा वर्षेपर्यंत कसे तोंड दिले, त्याचे वर्णन आहे. प्रेमानंदाच्या नलाख्यान व ओखाहरण या काव्यांत महाकाव्यरचनेचे काही विशेष आढळतात.

नव्या गुजरातीत नर्मदाशंकर (इ. स. १८३३ ते १८८६) यांची वीरसिंह, इंद्रजितकाव्य व पृथुराज रासा ही काव्ये महाकाव्यसदृश आहेत. प्रा. ठाकोर यांचे एक तोडेली डाळ (तोडलेली फांदी) हा महाकाव्यरचनेचा अपूर्ण प्रयत्न आहे. नागरदास पंड्या यांनी कालिदासाच्या रघुवंश व कुमारसंभव या काव्यांची गुजरातीत छंदोबद्ध भाषांतरे केली आहेत. न्हानालाल यांनी कुरुक्षेत्र नावाचे महाकाव्य लिहिले आहे. उमाशंकर जोशी यांचे विश्वशांती हे काव्य भव्य व व्यापक कल्पनेच्या दृष्टीने महाकाव्य या प्रकारात येऊ शकेल. अर्वाचीन गुजरातीत महाकाव्याची रचना झालेली नाही.

चंदबरदाईचे पृथ्वीराज-रासो हे हिंदी भाषेतील पहिले महाकाव्य आहे. मलिक मुहंमद जायसीचे पद्मावत हे दुसरे महाकाव्य होय. हिंदी भाषेतील तुलसीदासकृत रामचरितमानस (इ. स. चे १६ वे शतक) हे महाकाव्य अत्यंत लोकप्रिय ठरले आहे कवी भूषण याचे शिवराजभूषण हे ऐतिहासिक महाकाव्य प्रसिद्ध आहे (इ. स. चे १७ वे शतक). आधुनिक हिंदी काव्यांत अनूप शर्मा यांचे गौतम बुद्धाच्या जीवनावरील सिद्धार्थ (इ. स. १९३०–३५), द्वारकाप्रसाद मिश्र यांचे राजकारणध्वनियुक्त कृष्णायन (इ. स. १९४६), सोहनलाल द्विवेदींचे कुणाल, हरिऔध यांचे राधाकृष्णपर प्रिय प्रवास, जयशंकर प्रसादांचे आध्यात्मिक रूपकपर कामायनी, मैथिलीशरण गुप्तांचे बुद्धचरित्रावरील यशोधरा व रामायणकथेवरील साकेत, इ. महाकाव्ये प्रसिद्ध आहेत.

इ. स. च्या तेराव्या चौदाव्या शतकापासून बंगाली भाषेत प्रदीर्घ अशी आख्यानात्मक आणि रामायण, महाभारत व भागवत यांवर आधारित काव्ये लिहिली गेली. कृत्तिवास ओझा यांचे रामायण, मालाधर बसू व रघुनाथ भागवताचार्य यांचे भागवत, काशीरामदास यांचे भारत, इ. त्यांची नावे होत. इ. स. च्या १९ व्या शतकात रंगलाल बानर्जी यांनी पद्मिनी व कर्मदेवी ही वीररसपूर्ण अशी ऐतिहासिक काव्ये रचली. अर्वाचीन बंगालीतील मेघनादवध (इ. स. १८६१) हे मधुसूदन दत्तांचे महाकाव्य उल्लेखनीय आहे. या काव्याचे नऊ सर्ग असून, त्याची रचना निर्यमक आहे. या काव्यात कवीचा कल्पनाविलास, स्वभावरेखाचातुर्य व वृत्तीची स्वतंत्रता दिसून येते. त्यांचे तिलोत्तमासंभव हे पाश्चात्य महाकाव्याच्या धर्तीचे महाकाव्य आहे. याच काव्याच्या प्रेरणेने हेमचंद्र बंदोपाध्याय यांनी वृत्रसंहार नावाचे महाकाव्य रचले (इ. स. १९००). नवीनचंद्र सेन यांची रैवतक, कुरुक्षेत्र व प्रभास ही श्रीकृष्णाच्या बाल्य, तारुण्य व प्रौढ वयाचे चित्रण करणारी काव्ये मांडणीच्या दृष्टीने महाकाव्यसदृश आहेत. यानंतर नाव घेण्यासारखे महाकाव्य बंगालीत झाले नाही.

तमिळ भाषेत इ. स. च्या पहिल्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत बरीच महाकाव्ये रचली गेली. इळंगोअडिगळ याचे शिलप्पधिकारम, शीत्तनार याचे मणिमेखलै व तिरुतक्कदेवर याचे जीवकचिंतामणी, ही महाकाव्ये प्रसिद्ध आहेत. याच कालखंडात पेरुंकदै नामक आणखी एक महाकाव्य रचले गेले. त्यात उदयनाची कथा वर्णिलेली आहे. वलयापती व कुंडलकेशी ही या कालातील महाकाव्ये उपलब्ध नाहीत. इ. स. च्या नवव्या शतकात महाकवी कंबन याने वाल्मीकिरामायणाच्या आधारावर रामायणाची रचना केली. ते रामायण कंबरामायण या नावाने प्रसिद्ध आहे. यानंतरच्या काळात तमिळ भाषेत अनेक प्रबंधकाव्ये निर्माण झाली. पण महाकाव्ये मात्र निर्माण झाली नाहीत.

तेलुगू भाषेत अनेक महाकवी होऊन गेले. नन्नय्यभट्ट, तिक्कन्न सोमयाजी व यर्राप्रगड या तीन महाकवींनी महाभारताचा अनुवाद केला आहे. श्रीनाथ याने पल्नाटी वीरचरितम हे महाकाव्य रचले. आंध्र प्रदेशातील राजवंश या काव्यात वर्णिले असून, वीररसाचा उत्तम परिपोष केलेला आहे. कवीच्या उज्ज्वल प्रतिभेचे अनेक गुणविशेष या काव्यात आढळतात. बम्मेर पोतन्ना या महाकवीने भागवताचा तीस हजार पदांत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनुवाद केला आहे. मूळ भागवतातली अनेक स्थळे आणि आख्याने त्याने आपल्या मधुर काव्यशैलीने नटवली आहेत. त्याची प्रतिभा अलौकिक आहे. श्रीपाद कृष्णमूर्ती शास्त्री यांनी महाभारताचा तेलुगू अनुवाद केला. विश्वनाथ सत्यनारायण हेही तेलुगू भाषेचे एक महाकवी होत. आंध्रप्रशस्ती, शृंगारवीथी, शशीदूतम्, इ. काव्ये त्यांनी रचली. गाडियारम व्यंकट शेषशास्त्रींनी शिवाजीमहाराजांच्या जीवनावर शिवभारतम् नावाचे व राजशेखर शतावधानी यांनी राणा प्रतापच्या चरित्रावरचे महाकाव्य लिहिले आहे.

कन्नड साहित्यातला पंप हा पहिला महाकवी होय. त्याने महाभारतावर विक्रमार्जुनविजय हा ग्रंथ लिहिला. त्याला पंपभारत असेही म्हणतात. या काव्याचा नायक युधिष्ठिर नसून, अर्जुन आहे. अर्जुनाचे अनेक पराक्रम आणि विजय पंपाने ओजस्वी भाषेत वर्णिले आहेत. रन्नाचे साहसभीमविजय किंवा गदायुद्ध हे महाकाव्य वीररसपूर्ण आहे. नागवर्मा द्वितीय, याने पंपभारताच्या धर्तीवर रामायण लिहिले आहे. पण ते जैन कल्पनेप्रमाणे सुधारून लिहिले आहे. पुढच्या कालात कुमारव्यासाने महाभारताची पहिली दहा पर्वे कन्नड भाषेत रूपांतरित केली. तो परम भागवत असून, त्याच्या महाभारताचा नायक अर्जुन किंवा धर्म नसून योगेश्वर श्रीकृष्ण हा आहे. या ग्रंथात कवीचा कृष्णविषयक भक्तिभाव ओतप्रोत दिसून येतो. कुमारवाल्मीकी नामक कवीने भामिनीषट्पदी या छंदात कन्नड तोरवे रामायणाची रचना केली. लक्ष्मीशाने जैमिनिभारत रचले. कुमारव्यासाने न लिहिलेली पुढची आठ पर्वे तिम्मण्ण कवीने लिहिली व कन्नड महाभारत संपूर्ण केले. आधुनिक काळात पुट्टप्पांनी रामायणदर्शन हे महाकाव्य रचले आहे.

मलयाळम भाषेतही अनेक महाकवी होऊन गेले. इ. स.च्या १८व्या शतकात कुंचन नंपियारने भागवतावर आधारलेले भागवतम इरुपत्तिनालुवृत्तम हे चोवीस सर्गांचे एक महाकाव्य लिहिले. त्यात त्याने अनेक वृत्तांचा उपयोग केला आहे. त्यानंतरच्या काळात केशव पिळ्ळा याने केशवीय नामक एक महाकाव्य रचले. उल्लूर एस्. परमेश्वरय्यर याने उमाकेरलम नावाचे महाकाव्य लिहिले. कुमारनाशान हाही एक महाकवी होता. त्याने श्रीबुद्धचरितम, बालरामायणम, इ. काव्ये रचली. वळ्ळत्तोळ नारायण मेनोन यांनी चित्रयोगम हे महाकाव्य लिहिले. आधुनिक कालात पल्लत्तुरामन हे आणखी एक महाकवी होऊन गेले.

असमिया भाषेतील पहिला महाकवी माधव कंदली हा होय. याने रामायणाची रचना केली. त्याच्या रामायणाच्या सहा सर्गांपैकी फक्त पाचच उपलब्ध आहेत. पुढील काळात शंकरदेवाने भागवत पुराणाचा असमिया भाषेत अनुवाद के[ला] तर रामसरस्वतीने महाभारताचे भाषांतर केले. त्याची क[ल्पना]शक्ती प्रखर होती. मूळ महाभारतात नसलेली कित्येक आ[ख्याने] त्याने अनुवादात घातली आहेत.

ओडिया भाषेतील महाकवी सारलादास याचा महा[भारत] हा प्राचीन ओडिया साहित्यातील सर्वश्रेष्ठ ग्रंथ मानला [जातो.] एकोणिसाव्या शतकातील राधानाथ राय यांचे महायात्रा महाकाव्यही अद्वितीय गणले जाते.

अशा प्रकारे, निरनिराळ्या देशी भाषांत अनेक महा[काव्ये] असून, अद्यापही कुठे कुठे महाकाव्यांची रचना होत [आहे.] [सं. का. पं.; हिं. वि. को.; म. सा. इ.; हिं. म.; ते. उ. ...

महाकाश्यप बौद्ध संघातील एक महान आचार्य. [त्याचा] जन्म बिहार प्रदेशाच्या पटना जिल्ह्या[तील] महातीर्थ नामक गावी एका ब्राह्मण कुळात झाला. [त्याच्या] पित्याचे नाव कपिल आणि त्याचे पिप्पली माणवक असे [होते.] महाकाश्यप हे त्याला नंतर मिळालेले बौद्ध नाव आहे. [त्याने] ब्रह्मविद्येचे व अनेक शास्त्रांचे अध्ययन केले आणि तो [पंडित] झाला. हा मोठा जमीनदार असून अत्यंत धनाढ्य होता; [पण] एवढे अपार वैभव असूनही तो विरागी होता. मातापि[त्यांनी] वारंवार आग्रह केल्यामुळे तो लग्नाला तयार झाला. त्याच्या मातापित्यांनी सोन्याची एक अतिलावण्यवती [प्रतिमा] बनवून घेतली आणि तिच्यासारखी अप्रतिम रूपसुंदर [कन्या] शोधण्यासाठी ब्राह्मणांची देशोदेशी रवानगी केली. मद्रदे[शातील] साकल या राजधानीत त्यांना तशी कन्या आढळली. ती[ही] श्रीमंत ब्राह्मण कुळातील होती आणि तिचे नाव भद्रा का[पिला]यनी असे होते. ब्राह्मणांनी तिच्या पित्याकडे जाऊन ल[ग्नाची] मागणी घातली आणि तिला रुकार मिळून पिप्पली आणि [भद्रा] यांचा मोठ्या थाटाने विवाह झाला. वरातीच्या वेळी [तिच्या पित्याने] ५५ हजार बैलगाड्या भरून धन आपल्या कन्येला [आंदण] म्हणून दिले. पण दुर्दैवाची गोष्ट अशी, की एवढी सारी [अनु]कूलता असूनही त्या दोघांमध्ये पति-पत्नीसंबंध निर्माण [होऊ] शकला नाही.

पुढे पिप्पली प्रव्रज्या घेण्याच्या हेतूने घर सोडून बुद्ध[ाकडे] गेला. तेव्हा बुद्धाने त्याची स्वतंत्रपणे भेट घेतली, त्याला प्र[व्रज्या] देऊन भिक्षुसंघात दाखल करून घेतले आणि महाकश्यप [असे] त्याचे नाव ठेवले. मग त्याने महाकश्यपाला सम्यक प्र[धान] चतु:सूत्रीचा उपदेश केला, तो असा – (१) वर्तमान पा[पांचा] नाश करणे (२) भविष्य काळात त्यांची वाढ होऊ न देणे [(३)] वर्तमान पुण्याचे रक्षण करणे व (४) पुण्याची वाढ करणे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दीक्षा दिल्यानंतर बुद्धाने महाकाश्यपाच्या अंगावरची रेशमी चादर स्वतः घेतली आणि आपले पवित्र चीवर त्याच्या अंगावर घातले. एवढा मोठा सन्मान बुद्धाने कोणत्याही भिक्षूचा केला नाही. यामुळेच केवळ सात दिवसांच्या तपश्चर्येनंतर महाकाश्यपाला धूतवादी अर्हत असेही म्हणत असत. बौद्ध संघात त्याचा क्रमांक तिसरा होता.

बौद्ध संघात महाकाश्यपाला फार मोठा मान होता. आनंदासारख्या विद्वान बुद्धशिष्याला त्यानेच विनयांचा उपदेश केला होता. बुद्धाच्या निर्वाणानंतर सात दिवसांनी महाकाश्यप त्या ठिकाणी पोचला आणि त्याने त्याच्या शवाचे दर्शन घेतल्यावर मगच बुद्धाच्या देहावर अंत्यसंस्कार करण्यात आला.

बौद्ध संघातील नियमांचे हा अत्यंत काटेकोरपणे पालन करीत असे. बुद्धाच्या निर्वाणानंतर तीन महिन्यांच्या आत त्याने बौद्ध धर्म दृढ करण्यासाठी पाचशे भिक्षूंची एक सभा राजगृह येथे बोलावली. तिला प्रथम संगीती असे नाव आहे. तो स्वतः त्या सभेचा धर्माचार्य बनला. त्या सभेत त्याने बौद्ध धर्माला व्यवस्थित आणि चिरस्थायी स्वरूप देण्याची योजना आखली. त्यामुळेच बुद्धानंतर बौद्ध धर्म कित्येक शतके टिकून राहिला. त्याच्या या प्रचंड कर्तृत्वामुळेच त्याच्या मागून बौद्ध धर्मात महाकाश्यपीय संप्रदाय अस्तित्वात आला आणि तो आजतागायत टिकून राहिला.

महाकाश्यपाची पत्नी भद्रा कापिलायनी ही सुद्धा पतीवरोवरच घर सोडून बाहेर पडली; पण तिला स्त्री म्हणून बुद्धसंघात प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे प्रथम ती एका नास्तिक संप्रदायात दीक्षित झाली आणि काही कालानंतर महाप्रजापती गौतमीबरोबर तिने बौद्ध संघात प्रवेश मिळविला. [बौ. ध. वि.]

महागणपती गणपतीचे एक नाव. महाराष्ट्रातील रांजणगाव व टिटवाळा आणि म्हैसूर राज्यातील इडगुंजी, कुरूडमळे, शिर्शी व शिराळी या क्षेत्रांतील गणपतीला महागणपती म्हणतात. शिर्शी येथील मूर्ती पाच फूट उंच असून भव्य आहे, पण मंदिर मात्र लहान आहे. शिराळी येथील मंदिरातही महागणपतीची मूर्ती आहे.

महागणपतीची प्रतिमा कशी करावी, ते सारसंग्रहात पुढीलप्रमाणे सांगितले आहे. इक्षुरससागरातील रत्नद्वीपात पारिजात वृक्षाखाली सहा पाकळ्यांच्या कमळाचे रत्नजडित सिंहासन बनवावे व त्याच्यावर मध्यभागी त्रिकोण करून त्यावर मूर्ती स्थापन करावी. गणपतीला श्वेतवर्ण द्यावा. त्याला तीन नेत्र व दहा भुजा असाव्या. त्याच्या डाव्या हातांत चक्र, त्रिशिखा, इक्षुचाप, गदा व बीजपूर आणि उजव्या हातांत शंख, दोरी, लाल कमळ, साळीच्या लोंब्या आणि दंत या वस्तू असाव्या. रत्नखचित कलशातून तो शुंडाग्राने रत्ने, मोती वगैरे उपशीत असावा आणि शक्तीने त्याला आलिंगन दिलेले असावे.

राघवचैतन्याने एक महागणपतिस्तोत्र रचले आहे. तसेच महागणपतीचा एक मंत्रही आहे. [श्रीगणेशकोश]

महाचतुर्थी एक तिथिव्रत. भाद्रपद शुद्ध चतुर्थी रविवारी किंवा मंगळवारी आल्यास तिला महाचतुर्थी असे म्हणतात. या दिवशी गणेशपूजा करतात. फल—इच्छापूर्ती.

महाचीन तारा एक बौद्ध देवता. महाचीन देशातील तारा म्हणून हिला हे नाव प्राप्त झाले, असे म्हणतात. ही अक्षोभ्यापासून उत्पन्न झाली. हिचे मूर्तिध्यान असे – एकमुख, त्रिनेत्र व चतुर्भुज. जीभ बाहेर आलेली. गळयात मुंडमाला आणि सर्पाचे अलंकार. पोट सुटलेले आणि गि सुळे लांब व भयानक. हातांमध्ये खड्ग, कात्री, कमल आणि कपाल या वस्तू. ती प्रत्यालीढ अवस्थेत प्रेतावर उभी आहे. तिच्या कमरेला व्याघ्रचर्म असून, जटामुकुटावर अक्षोभ्याची प्रतिमा आहे.

महाचीन तारा (नेपाळी चित्रावरून)

बौद्धांच्या तंत्रसाहित्यात हिला उग्रतारा असे नाव आहे. तारा या नावाने ही देवी हिंदूंच्या दैवतपरिवारात प्रविष्ट झाली आहे. तिच्या मस्तकी अक्षोभ्य असून, पायाखाली महादेवाचा निश्चेष्ट देह आहे. नेपाळातील शांकू गावी वज्रयोगिनीच्या मंदिरात या देवतेची मूर्ती आहे. [इं. बु. इ.; दे. को. खं. ३]

महाचैत्री चैत्र पौर्णिमेला गुरू व चंद्र यांची युती चित्रा नक्षत्रात झाली, तर तिला महाचैत्री असे म्हणतात. ही दानादी कृत्यांना विशेष पुण्यप्रद असते. [हि. ध.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाजनपदे सनपूर्व आठव्या शतकात भारतात अनेक जनपदे नांदत होती. कालांतराने त्यांतील काही जनपदे मिळून महाजनपदे निर्माण झाली. सनपूर्व सातव्या शतकात अशी सोळा महाजनपदे होती. त्यांची माहिती बौद्ध व जैन ग्रंथांतून मिळते. त्यांच्या नावांच्या आठ जोडया प्रसिद्ध आहेत, त्या अशा--(१) अंग–मगध, (२) काशी–कोसल, (३) वृज्जी–मल्ल, (४) चेदी–वत्स, (५) कुरु–पांचाल, (६) मत्स्य–शूरसेन, (७) अश्मक–अवंती व (८) गंधार–कंबोज.

अंग हे पूर्व भारतात असून, त्याची राजधानी सांप्रतच्या भागलपूरच्या जागी होती. अंगाच्या पश्चिमेला शोण नदापर्यंत मगध असून, राजगृह ही त्याची राजधानी होती. काशी या राज्याची राजधानी काशी हो त्या काळी भारतवर्षात अत्यंत प्रसिद्ध होती. श्रावस्ती ही कोसलाची राजधानी. तो प्रदेश काशीच्या वायव्येला होता. मल्ल व वृज्जी हे प्रदेश काशीच्या ईशान्येला व कोसलाच्या पूर्वेला होते. वत्स देश काशीच्या पश्चिमेला व त्याच्या पश्चिमेला चेदी म्हणजे बुंदेलखंड होते व त्याची राजधानी कौशांबी होती. कुरु-पांचाल ही प्राचीन जनपदे होती. त्यांना त्या युगात विशेष राजकीय महत्त्व नव्हते. मत्स्य व शूरसेन यांचीही तशीच स्थिती होती. अवंती हे राज्य बरेच मोठे होते. त्याची राजधानी उज्जयिनी हे अत्यंत मोठे सांस्कृतिक व व्यापारी केंद्र होते. अश्मक हे जनपद गोदावरीच्या काठी होते. गंधार देशाची राजधानी तक्षशिला ही त्या काळी विद्याकेंद्र म्हणून प्रख्यात होती. गंधारच्या उत्तरेस असलेल्या पामीर व बदख्शा या प्रदेशाला त्या काळी कंबोज असे नाव असून, तो भारताचा एक भाग होता.

या सोळा महाजनपदांपैकी काही गणराज्ये होती, तर काही राजशासित होती. मगधातील हर्यंक, कोसलातील ऐक्ष्वाकू, वत्समधील पौरव आणि अवंतीमधील प्रद्योत हे राजवंश त्या काळी विशेष प्रबळ होते. कुरु-पांचाल, काशी व मत्स्य ही राज्ये महाभारतकाळी बरीच गाजली; पण पुढच्या काळात ती तितकीशी प्रबळ राहिली नाहीत. मिथिलेचे वृज्जी, कपिलवस्तूचे शाक्य, पावा–कुशीनगर येथील मल्ल ही गणराज्ये त्या काळी बरीच प्रसिद्ध होती. वरील भिन्न भिन्न राज्यांचे वैवाहिक संबंध होत असले, तरी त्यांच्यांत परस्पर-शत्रुत्वही होते. सनपूर्व सहाव्या शतकात अवंतीचा राजा प्रद्योत, कौशांबीचा उदयन, कोसलचा प्रसेनजित व मगधाचा बिंबिसार यांच्यांत सत्तासंघर्ष चालू होता. शेवटी सनपूर्व पाचव्या शतकात मगधाचा राजा सर्वांत बलिष्ठ ठरला आणि त्याने आपल्या जनपदाचे एका साम्राज्यात रूपांतर केले. [म. ज्ञा. को.–बुद्धोत्तर जग; इतिहासप्रवेश; ए. इं.–मजु.]

महाजया सप्तमी एखाद्या महिन्याच्या शुद्ध सप्त॰ सूर्याने कोणत्याही राशीत प्रवेश॰ तर त्या तिथीला महाजया सप्तमी असे म्हणतात. या दि॰ स्नान, जप, होम आणि देवांची व पितरांची पूजा केली॰ त्याचे एक कोटी फल मिळते. या दिवशी जी व्यक्ती॰ मूर्तीला दुधाने किंवा तुपाने स्नान घालील, तिला सू॰ मिळतो. तसेच, या दिवशी उपवास करणारी व्यक्ती॰ लोकाला जाते. [हि. ध.]

महाज्यैष्ठी एक तिथिव्रत. ज्येष्ठ पौर्णिमेला ज्येष्ठा॰ असेल, चंद्र व गुरू यांची युती असेल॰ सूर्य रोहिणी नक्षत्रात असेल, तर तिला महाज्यैष्ठी असे॰ तात. या दिवशी जप, दान, इ. केल्याने महाफल प्राप्त॰ असे सांगितले आहे. [हि. ध.]

महाज्वाला (१) एक नरक. जे लोक आपली कन्या॰ सून यांच्याशी व्यभिचार करतात, जे वेद॰ किंवा वेदनिंदा करतात किंवा जे आचार्यांचा अपमान कर॰ त्यांना नरक भोगावा लागतो, असे ब्रह्म पुराण, वायू पुराण॰ विष्णू पुराण यांत म्हटले आहे. [पु. इं.]

(२) जैनांची एक विद्यादेवी. हिला ज्वालामालिनी॰ म्हणतात. ही मांजरावर किंवा डुकरावर बसते आणि॰ शस्त्रे धारण करते. [जै. इ.]

महातप्तकृच्छ्र एक व्रत. हे व्रत चार दिवसांचे आहे.॰ एक दिवस पाणी, एक दिवस दूध,॰ दिवस तूप खाऊन राहायचे व अखेरच्या दिवशी उप॰ करायचा असतो. पहिल्या तीन्ही दिवसांतले पदार्थ॰ घ्यावे लागतात. पाहा – तप्तकृच्छ्र.

महातिलपात्रदान एक दान. सोळा पले तांबे (सुमारे॰ तोळे) घेऊन त्याचे एक पात्र कर॰ ते तिळाने भरून यथाशक्ति सुवर्णदक्षिणेसह ब्राह्मणाला॰ देतात. फल – पापनाश. [दा. चं.]

महातृतीया एक तिथिव्रत. माघ किंवा चैत्र महिन्या॰ शुद्ध तृतीयेला हे नाव आहे. गौरी ही॰ व्रताची देवता होय. या दिवशी गुळाची गाय दान द्यावी आ॰ स्वत: गूळ खाऊ नये, असे सांगितले आहे. फल – गौरीलो॰ सुख यांची प्राप्ती. [हि. ध.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महातोबा शिवपरिवारातील एक भैरव देवता. या देवतेचे मूळ नाव महातुंड असावे. महाराष्ट्रात कुठे कुठे याची देवळे आहेत.

महात्यमराम (१८२५–१८८८ इ. स.) एक गुजराती संत. हा खेडा जिल्ह्यातील सीमरडा गावचा रहिवासी होता. याला तिथल्या ब्रह्मचारी आश्रमाचा संस्थापक मानतात. देवराम म्हणून याचा कोणी गुरू होता, असे सांगतात. महात्यमरामाने छोटी चिंतामणी, वडी चिंतामणी, शब्दवाण सुधा-सिंवू, भक्तमहिमावली, इ. ग्रंथांची रचना केली आहे. कक्का, मास, तिथी या याच्या स्फुटरचना होत. भक्तमहिमावली या ग्रंथात अनेक संतांचा गौरव केलेला आहे. [गु. सं. हिं. सा दे.]

महादाने सोने, दासी, रथ, भूमी, घर, वधू व कपिला गाय यांच्या दानाला अग्नी पुराणात महादान म्हटले आहे. परंतु सामान्यपणे पुराणांनी सोळा महादाने सांगितली आहेत, ती पुढीलप्रमाणे आहेत – तुलापुरुष, हिरण्यगर्भ, हिरण्याश्वरथ, हेमहस्तिरथ, पंचलांगल, धरा, विश्वचक्र, कल्पलता, सप्तसागर, रत्नधेनू, महाभूतघट, ब्रह्मांड, कल्पवृक्ष, गोसहस्र, कामधेनू व हिरण्याश्व.

या महादानप्रसंगी सोळा अरत्नी लांबीचा मांडव घालावा, त्याला चार दारे असावी आणि आत विटांची कुंडे करावी असे सांगितले आहे. [हि. ध.; पु. चिं.]

महादेव (१) (इ. स. चे १३ वे शतक) एक ज्योतिषग्रंथकार. याच्या जीवनवृत्तांतासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. रत्नमालेवरील टीकेच्या वारप्रकरणात याने आनंदपूर नामक गावाचा उल्लेख केला आहे. त्यावरून हा आनंदपुरचा रहिवासी असावा, असे श्री. शं. बा. दीक्षित यांचे मत आहे. श्रीपतीच्या रत्नमाला व जातकपद्धती या दोन ग्रंथांवर याची महादेवी नावाची टीका आहे. रत्नमालेवरील टीकेच्या प्रारंभीच याने श्रीपतीचे वंशवृत्त दिले आहे. त्यावरूनच श्रीपतीची माहिती कळते. याशिवाय ही टीका रचताना महादेवाने अनेक अप्रसिद्ध ग्रंथकार व ग्रंथनामे दिली आहेत. काही ग्रंथकारांची वाक्येही याने उदधृत केली आहेत. त्याने उल्लेखिलेले सर्वच ग्रंथकार आणि ग्रंथनामे विषयाशी संबंधित आहेत, असे नाही. परंतु त्यामुळे ज्योतिषशास्त्राच्या इतिहासात याला एक महनीय स्थान प्राप्त झाले आहे. याच्या रत्नमाला टीकेत वृद्धजानक म्हणून एक ग्रंथ आला आहे; त्याचप्रमाणे याने लल्लोक्त नक्षत्रसंख्याही दिल्या आहेत. श्री. शं. वा. दीक्षित यांनी ज्या नक्षत्रसंख्या दिल्या आहेत, त्या याच होत. महादेवाने भास्कराचार्यांचा भास्करव्यवहार म्हणून एक ग्रंथ सांगितला आहे. पंडितांच्या मते, सिद्धान्तशिरोमणिकार भास्कराचार्यांचाच हा ग्रंथ असावा [भा. ज्यो. इ.]

(२) (इ. स. चे १४ वे शतक) एक ज्योतिषग्रंथकार. हा पंडित वोपदेव याचा मुलगा होय. हा कौंडिन्यगोत्री होता. याने ब्रह्मपक्ष आणि आर्यपक्ष यांना अनुसरून कामधेनुकरण नावाचा एक ग्रंथ रचला. या ग्रंथात सारण्या, वर्षगती व क्षेपक दिले आहेत. बाव्वीस कोष्टकांच्या पटात तिथिसिद्धी होते, असे याचे मत आहे. याच्या ग्रंथावर अनंत नामक एका ज्योतिष्याची टीका आहे. [भा. ज्यो. इ.]

(३) (इ. स. चे १४ वे शतक) एक ज्योतिषग्रंथकार. हा गौतमगोत्री ब्राह्मण असून, परशुराम हे याच्या पित्याचे नाव होते. हा मूळचा गुजरातचा पण नंतर महाराष्ट्रात आला. ग्रहसिद्धी नावाचा एक करणग्रंथ आहे. त्याला महादेवी सारणी असेही म्हणतात. कोण्या चक्रेश्वर नामक ज्योतिष्याने या ग्रंथाच्या रचनेला प्रारंभ केला; पण तो अपुरा राहिला. हा अपुरा ग्रंथ महादेवाने पूर्ण केला, असे दिसते. गुजरात प्रदेशात हा ग्रंथ बराच काल प्रचारात असावा. कारण गुजरातमधील टीकाकारांनी याचा उपयोग केला आहे.

महादेवी सारणीमध्ये मध्यम ग्रह आणि स्पष्ट ग्रह यांचे साधन आहे आणि वर्षगणावरून मध्यमग्रहसाधन करण्यास सारण्या दिल्या आहेत. यामुळे ग्रहगणित फार सोपे होते, असे म्हणतात. "यात ग्रहगतिस्थिती दिल्या आहेत. त्या राजमृगांकोक्त बीजसंस्कृत ब्रह्मसिद्धांततुल्य आहेत." असे श्री. शं. बा. दीक्षित यांचे मत आहे.

याच्या ग्रंथावर धनराजाची महादेवीदीपिका नावाची एक टीका आहे. धनराज महादेवाला आपला गुरू मानतो. हा टीकाकारही गुजरात प्रदेशातलाच आहे. [भा. ज्यो. इ.]

(४) शिवाचे एक नाव. पाहा – शिव

महादेव कोळी कोळी लोकांचा एक पोटभेद. महाराष्ट्रातील पुणे, नगर आणि नासिक या जिल्ह्यांत प्रामुख्याने यांची वस्ती आहे. मुळात हे महादेव डोंगरात राहत होते आणि तिथून इकडे आले, असे कॅप्टन मॅकिन्टॉश याने म्हटले आहे. पण आपण मुळात पुणे जिल्ह्यातील जुन्नरचे असल्याचे यांच्यापैकी काही लोक सांगतात.

शेती करणे, गुरे पाळणे व मजुरी करणे, हे महादेव कोळ्यांचे प्रमुख व्यवसाय आहेत. यांची घरे ठेंगणी, चौपाखी व बिनखिडक्यांची असतात. घरांच्या भिंती भाजलेल्या विटांच्या व छप्पर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कौलारू किंवा झापांचे असते. घराचे दोन तरी भाग असतातच. आतल्या भिंतींवर वाघ, नाग, गौळणी, इ. चित्रे काढलेली असतात. घरातली जमीन नीट तयार केलेली असते. प्रत्येक घराच्या पुढे सिमेंट लावलेला मोठा रांजण असतो आणि त्यात प्यायचे पाणी ठेवलेले असते.

या लोकांचा वर्ण काळा असतो. यांच्या स्त्रिया नऊवारी लुगडे नेसतात व अंगात चोळी घालतात. पुरुष ऐपतीप्रमाणे लंगोटी किंवा धोतर नेसतात. स्त्रिया गळ्यांत मंगळसूत्र, गाठले, सरी, इ. दागिने घालतात. त्यांच्या हातांत काचेच्या बांगड्या, चांदीचे किंवा कथलाचे गोठ आणि बोटांत चांदीच्या अंगठ्या व पायांत जोडवी असतात.

हे लोक भात, नागली, वरी, गहू, कडधान्ये, इ. पिके काढतात.

देवधर्म – हे लोक शिव, कमळजा, मारुती, राम, कृष्ण, वीर, चेडा, भैरोबा, मरीआई, इ. अनेक देवदेवतांना भजतात. भीमाशंकर, कळसूबाई आणि त्र्यंबक या ठिकाणी दर वर्षी ते यात्रेला जातात. त्र्यंबक येथे जातीतील प्रश्न सोडविण्यासाठी ते अनेकदा एकत्र जमतात. निमगिरी येथील कमळजा देवीला ते नवस करतात व ती नवसाला पावल्यास चैत्र महिन्यात तिला कोंबडे व बकरे बळी देऊन नवस फेडतात. बहुतेक प्रत्येक गावात मारुतीचे मंदिर असते. त्याचा उपयोग शाळा भरण्यासाठी, चावडी व धर्मशाळा म्हणून आणि झोपण्यासाठीही होतो. याशिवाय ते ग्रामदेव, हिरवा व वाघदेव यांनाही भजतात. हिरवा हा मोरपिसांच्या गुच्छात एक टाक खोवून बनवतात. दर दहा किंवा पंधरा वर्षांनी नवा गुच्छ घेतात. त्यावेळी गोंधळ घालण्याची पद्धत आहे. भुताखेतांवर यांचा विश्वास आहे. त्यांची पीडा दूर करण्यासाठी त्यांना भगताची आवश्यकता असते.

भात, एखाद्या कडधान्याचे कालवण आणि नागली-वरीची भाकरी हे त्यांचे रोजचे जेवण असते. कधीमधी ज्वारी-बाजरीची भाकरी आणि सणासुदीला गव्हाची पुरणपोळी ते करतात. मटण, मासे व अंडी हंगामानुसार ते खातात. पावसाळ्यात तोंडीलावणे म्हणून ते सांडगे व पापड वापरतात.

सण, उत्सव, खेळ – महाराष्ट्रातील बहुतेक सर्व सण व उत्सव महादेव कोळी लोक साजरे करतात. पण त्यांचे असे खास दोन सण आहेत. एक वाघबारस व दुसरा बकरेसठ. कार्तिक महिन्यातील दोन्ही द्वादशींना वाघबारस हा सण साजरा करतात. आदल्या दिवशी गावाचे गुराखी गावात हिंडून तांदूळ, गहू, गूळ वगैरे पदार्थ गोळा करतात. दुसऱ्या दिवशी सकाळी गावाबाहेर जाऊन ते तांदूळ किंवा गहू यांची खीर बनवतात. एकजण एका दगडावर शेंदराने वाघाची आकृती रेखाटतो. मग काहीजण वाघ बनतात व काही खिरीचे रक्षक बनतात. वाघ खीर पळवायचा प्रयत्न करतात आणि दुसरी मुले ती राखायचा प्र[यत्न] करतात. या गडबडीत रक्षक थोडी खीर वाघांच्या पा[ठीवर] टाकतात व त्यामुळे त्यांची पाठ भाजते. मग सर्वजण [खीर] खातात. दुसऱ्या द्वादशीला खिरीऐवजी सुकवलेले मासे [शि]जवतात आणि असाच खेळ खेळतात. माणिक ओझर भागात अशी [पद्धत] आहे. पण देवरगाव भागात यापेक्षा निराळ्या पद्धतीने हा [सण] साजरा करतात. तिथे गहू, तांदूळ यांच्या बरोबर डा[ळ,] भोपळा गोळा करतात. कुमारिका गावाबाहेर स्वयंपाक कर[तात.] गावातले व आसपासचे लोकही तिथे जमतात. एका [ओ]ट्याच्या झाडाखाली थोडी जागा स्वच्छ करतात. एक मु[लगा] शिजवलेले अन्न डोक्यावर ठेवून तिथे आणतो, आपट्या[च्या] झाडाला पाच प्रदक्षिणा घालतो, अन्न खाली ठेवतो आणि [जव]ळच्या झऱ्याकडे पळत जातो. जमलेले लोक त्याला भोपळ्या[च्या] सालीच्या तुकड्यांनी मारतात. तो झऱ्यावर पोचला, की [सर्व]जण भोजन करतात.

पौष शु. षष्ठीला बकरेसठ साजरी करतात. ज्या लोकां[च्या] घरी देव असतात, ते लोक आपल्या नातेवाइकांना बोल[वतात,] त्यांच्याकडून थोडे तांदूळ व पैसे जमा करतात. त्या दि[वशी] संध्याकाळी ते बकरा कापतात आणि त्याच्या मस्तकाचा [व] पायांचा देवाला नैवद्य दाखवतात. मग सर्व बकऱ्याचे [मांस] शिजवतात आणि इतरही स्वयंपाक करून निमंत्रि[तांसह] भोजन करतात.

अक्षय्यतृतीया हा त्यांचा पितरांचा दिवस. फाल्गुन [वद्य] प्रतिपदेला पितर स्वर्गातून घरी येतात व अक्षय्यतृतीयेला [परत] जातात, अशी त्यांची समजूत आहे. त्यांना परत जाणे सो[पे] व्हावे, म्हणून त्या दिवशी घराच्या दोन्ही बाजूंना शेणाची ए[क] लहानशी शिडी बनवून भिंतीला टेकून ठेवतात. किंवा शि[डीचे] प्रतीक म्हणून भिंतीवर हळदीचे किंवा चंदनाचे पाच टिळे ए[का]वर एक काढतात. आईबाप हयात नसतील, तर काही ठि[काणी] दोन कोरी मडकी आणून त्यांत पाणी व थोडे तांदूळ घ[ालून] पुरुष त्यांची पूजा करतात.

या लोकांची दिवाळी आश्विन वद्य द्वादशीला सुरू हो[ते.] त्या दिवशी गावातले गुराखी एकत्र जमून मोळाचा नाग [बन]वतात आणि त्याच्या शेपटीच्या वेटोळ्यात पणती पेटवून [ठेव]तात. या प्रतिमेला दिवाळी असे म्हणतात. ही दिवाळी [घेऊन] ते घरोघर गाणी गात हिंडतात आणि तिथल्या गुरांना ओ[वा]ळतात. मग घरची स्त्री त्यांना पणतीसाठी तेल देते. सरतेशे[वटी] ते गावातील देवळात पणती नेऊन ठेवतात आणि नाग [देव]ळाच्या छपरावर टाकतात. बलिप्रतिपदेपर्यंत रोज नवीन [नाग] बनवून हा कार्यक्रम चालतो. रोज नागाची एक फडा वाढव[तात.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संक्रांत केव्हा आहे, ते ब्राह्मण पुरोहित घरोघरी जाऊन सांगतो. त्या वेळी प्रत्येक घरी त्याला पसाभर धान्य मिळते. संक्रांतीच्या दिवशी सकाळी सर्व पुरुष तिळगूळ, उसाचे करवे, हरभऱ्याचे घाटे व गाजराचे तुकडे यांचे मिश्रण घेऊन गावातील मंदिरात जातात, देवाला त्याचा नैवेद्य दाखवतात आणि जमलेल्यांना तिळगूळ वाटतात. गावातल्या गृहिणींना त्या दिवशी कुंभार तीन तीन सुगडे देतो. त्याबद्दल त्याला एक सुगडभर धान्य मिळते.

होळीच्या दिवसांत स्त्रिया व पुरुष टिपऱ्या व इतर मैदानी खेळ खेळतात. गावात एका मैदानात गावचा पाटील होळी पेटवतो. त्या वेळी तो, गावातील सर्व कोळी कुटुंबांतील लोक होळीचा नैवेद्य घेऊन आले आहेत का नाही, याची चौकशी करतो. पूर्वी वाजतगाजत मिरवणुकीने लोक हा नैवेद्य होळीच्या जागी आणीत असत.

तमाशा हा महादेव कोळ्यांचा अत्यंत आवडता खेळ आहे. अनेक गावांचे स्वतःचे असे स्वतंत्र तमाशाचे फड असतात. त्यात पाच ते सात माणसे असतात. लग्नसमारंभ, इतर सार्वजनिक समारंभ व जत्रा अशा प्रसंगी तमाशाच्या फडाला बोलावण्याची पद्धत आहे.

लेझिम हा त्यांचा आणखी एक आवडता खेळ आहे. अनेक सणासमारंभांत लोक लेझिम खेळतात. या लोकांना कुस्ती खेळण्याचीही फार आवड आहे. प्रत्येक गावात एक भजनीमंडळ असते आणि रात्री ते गावातील देवळात जाऊन भजन करतात.

विवाहप्रथा – महादेव कोळी लोक लग्न ही एक अत्यावश्यक बाब मानतात. बारा कुटुंबांचा एक गट असे अनेक गट त्यांच्यांत आहेत. या गटाला गोत्रीभाऊ असे नाव असून, एका गोत्रीभाऊतील लोकांत परस्पर लग्नसंबंध होत नाही. तसेच मावसबहिणीशी लग्न करता येत नाही; मामेबहिणीशी करता येते.

वरपिता वधूला मागणी घालतो. मुलगी पंचक्रोशीतली म्हणजे साधारणपणे माहितीतील निवडतात. मुलाची व मुलीची पत्रिका जुळली, की मग पुढच्या गोष्टी ठरवितात. देजाची पद्धत आहे. इ. स. १९५२ मध्ये या लोकांनी देजाची रक्कम एकशे एक रुपये एवढी ठरवली होती. त्याशिवाय कपडे व धान्यही द्यावे लागते. लग्न ठरले, की साखरपुडा करतात. त्या वेळी वरपक्षाकडून वधूला नवी साडी-चोळी व ऐपत असल्यास एखादा दागिना मिळतो. नंतर सर्वांसमक्ष वधूपक्षाच्या मंडळीला मानपान व करणी म्हणून काय द्यायचे ते ठरवतात. नंतर वरपिता गावजेवणासाठी म्हणून काही रक्कम वधूपित्याकडे देतो. त्यात थोडी भर घालून वधूपिता पाहुण्यांना व गावातल्या काही लोकांना त्या दिवशी जेवण देतो. अशा प्रकारे लग्न निश्चित होते.

लग्नाचा मुहूर्त ज्योतिषी काढून देतो. लग्नविधी पाच दिवस चालतो. प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी वधूच्या व वराच्या घरातील लोक गावकऱ्यांना बोलावून त्यांच्याशी सल्लामसलत करतात आणि त्या बदल्यात गावकरी त्यांना कामात मदत करतात. पहिल्या दोन दिवशी मांडव घालणे, हळद लावणे, देवदेवक बसवणे, तिसऱ्या दिवशी मुख्य लग्नविधी, चौथ्या दिवशी वरात आणि पाचव्या दिवशी कंकण सोडणे, असा कार्यक्रम असतो.

लग्नाच्या मांडवाला, जे खांब लागतात, त्यांतला एक आंब्याचा व एक उंबराचा अवश्य असावा लागतो. लग्नाच्या आदल्या दिवशी सकाळी किंवा संध्याकाळी वधूवरांना आपापल्या घरी हळद लावण्याचा समारंभ होतो. त्यानंतर एका खंजिराच्या टोकाला लिंबू किंवा पोफळ टोचतात व तो कपड्यात गुंडाळून वराजवळ देतात. लग्नसमारंभ पुरा होईपर्यंत तो त्याने जवळ बाळगायचा असतो. नंतर वधू-वरांना आपापल्या घरी फुलांच्या मुंडावळ्या बांधतात. त्यांपैकी एक रुईच्या फुलांची व दुसरी बहुधा पांढऱ्या चाफ्याच्या फुलांची असते. हळदीसमारंभ झाल्यावर वरमायेला आपल्या भावांकडून नवी साडीचोळी मिळते.

मांडव उभारून झाल्यावर संध्याकाळी घाणा भरणे, तेलवण आणि देवदेवक म्हणजे घरातल्या देवांची पूजा करणे, हे विधी होतात.

देवदेवक बसवताना भगताची आवश्यकता असते. त्या वेळी त्याच्या अंगात येते आणि वधूगृही जाताना वाटेत कोणती भुतेखेते त्रास देतील आणि त्यांना शांत कसे करायचे, ते तो वरपक्षाच्या लोकांना सांगतो.

लग्नाच्या दिवशी वरपक्षाकडील मंडळी वधूगृही जायला निघतात. त्यांच्याबरोबर एक मूळपाटी असते. तिच्यात एका मडक्यात तांदूळ, दुसऱ्या मडक्यात गहू, पाच भाकऱ्या, गोडे तेल भरलेली बाटली, हळदकुंकू आणि इतर पूजासाहित्य असते. हे सर्व मग मुलीच्या घरी देतात. मिरवणूक वधूच्या गावाच्या सीमेवर थांबते. तिथे वधूपक्षाकडील लोक वरपक्षाकडील लोकांचे स्वागत करतात. तिथे सीमेची आणि लेझिम खेळणाऱ्यांच्या लेझमींची पूजा होते. मग वधूपक्षातील एखादा तरुण वराला खांद्यावर घेतो आणि लेझमीचा ताफा व वाजंत्री यांच्या गजरात मिरवणूक गावात एखाद्या देवळात किंवा घरी येऊन थांबते. नंतर वधूचे आईबाप, नातेवाईक व गावकरी मंडळी वाजंत्र्यांसह मिरवणुकीने तिथे येतात. एक मुलगा काठीला खण बांधून तो ध्वजासारखा धरतो. त्याला शेवंती असे म्हणतात. इष्ट त्या स्थळी पोचल्यावर वधूपिता व वरपिता कलशाची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूजा करतात. ब्राह्मण पुरोहित पूजा सांगतो. मग वधूपिता वराला नवे कपडे देतो आणि सर्वजण मिरवत वधूगृही येतात. तिथे वर तोरणाखाली पत्रावळीवर उभा राहतो. वधूही त्याच्या समोर पत्रावळीवर उभी राहते. त्या दोघांच्या मध्ये पुरोहित आणि गावचा पाटील मग अंतरपाट धरतात. मंगलाष्टके संपल्यावर अंतरपाट दूर करतात आणि वधू-वर एकमेकांच्या गळ्यात माळ घालतात. मग जमलेल्या लोकांना गूळ व पानसुपारी वाटतात. त्यानंतर सूत्रबंधन, कन्यादान, नवग्रहपूजा व सप्तपदी हे विधी होतात. मग वधूची ओटी भरतात. वरात वरगृही येते. तिथे जेवणावळ होते. वधू लहान असली तर परत माहेरी जाते आणि वयात आल्यावर मग सासरी राहायला येते.

प्रसूतिप्रथा – गरोदर स्त्रीला काही नियम पाळावे लागतात, ते असे– तिने उथळ पाण्यातून चालत गेले तर चालते, पण होडीत बसून नदी ओलांडता कामा नये. तिने करवली होता कामा नये किंवा कोणी तिची ओटी भरता कामा नये. स्त्रीची प्रथम प्रसूती बहुधा सासरीच होते. त्या वेळी सुईण तिला मदत करते. नाळ कोयतीने कापतात. प्रसूती अवघड वाटली, तर भगताला बोलावतात. मंत्रतंत्राबरोबरच तो झाडपाल्याच्या मुळांचे तोडगेही करतो. मूल जन्माला आल्याबरोबर त्याला जागे करण्यासाठी त्याच्या अंगावर गार पाणी शिंपडतात. स्त्रीला मुलगी झाली, की तिची नणंद घराचा उंबरा शेणाने सारवते. याचा अर्थ आपल्या मुलासाठी वधू म्हणून ही मुलगी तिने निश्चित केली, असा होतो. पाचव्या दिवशी ती उंबऱ्यावर राखेने एक रेघ ओढते. त्यामुळे भुतेखेते घरात शिरून नवजात मुलीला त्रास देत नाहीत, अशी समजूत आहे.

चौथ्या दिवशी आई मुलाला अंगावर पाजते. तोपर्यंत बहुधा मुलाला काही देत नाहीत. पण जर ते भुकेने रडते असे वाटले, तर त्याला गूळपाणी पाजतात. बाळंतिणीच्या खोलीत जाताना पायावर गोमूत्र शिंपडतात आणि मग आत जातात. त्यामुळे भुतेखेते माणसाबरोबर आत शिरत नाहीत, अशी समजूत आहे. पाचव्या दिवशी सटीपूजा करतात. आंबेगाव, जुन्नर वगैरे ठिकाणी त्या दिवशी वरवंट्याची पूजा करतात. साधारणपणे बाराव्या दिवशी बाळंतीण स्त्री प्रथमच पाणी आणण्यासाठी विहिरीवर जाते. त्या वेळी ती प्रथम विहिरीची पूजा करते व मग तिचे पाणी काढते.

बाराव्या दिवशी किंवा मूल सहा महिन्यांचे व्हायच्या आत कुलदेवतेला बकरा बळी देतात व गावजेवण देतात. तसे न केल्यास मुलाचे काहीतरी वाईट होईल, असे मानतात. तसेच मूल रांगायला लागण्यापूर्वी त्याला कुलदेवतेच्या पाया पडण्यासाठी तिच्या मंदिरात घेऊन जातात. ते जर शक्य नसेल, तर गावाबाहेर जाऊन मंदिराच्या दिशेने पाच पावले जातात व तिथे पाच दगड मांडून कुलदेव म्हणून त्यांची पूजा करतात.

पूर्वी यांच्यांत समारंभपूर्वक नाव ठेवण्याची पद्धत नव्हती. पण इतर शेजारी लोकांचे पाहून त्यांच्यांतही आता मुलाची पत्रिका पाहून नाव ठेवण्याची पद्धत रूढ झाली आहे. मुलाला दुसरे वर्ष लागल्यावर गावाबाहेर जाऊन मुलाचे जावळ करतात. त्या वेळी पाच दगड मांडून त्यांची पूजा करतात व त्यांना कोंबडे किंवा बकरे बळी देतात आणि गावकऱ्यांना जेवण देतात.

मर्तिकप्रथा – एखादा पुरुष माणूस अगदी आसन्नमरण झाला की त्याचे डोके आई, पत्नी किंवा बहीण हिच्या मांडीवर ठेवतात. त्याची घटका भरत आली, की त्याच्या मुखात दूध किंवा पाणी घालतात. माणसाच्या मृत्यूची बातमी एका गुराख्याकडून दुसऱ्या गुराख्याकडे अशी जवळपासच्या गावच्या नातेवाइकांकडे पोचवतात. नंतर काही लोक खड्डा खणण्यासाठी जातात. दोघेजण बाजाराच्या गावी जाऊन शिंप्याकडून त्या माणसाच्या इतमामाला शोभेल असे कापड आणतात. पुरोहित आणि न्हावी यांना अंत्यक्रियेत बरेच काम असते. शिंपी, पुरोहित आणि न्हावी या प्रत्येकाला नंतर एक गाय किंवा बैल मिळतो. मृताचा उत्तराधिकारी मृतासाठी शिदोरी म्हणून अंगणात गोवऱ्यांच्या जाळावर थोडा भात शिजवतो. प्रेत कपड्याने झाकून तिरडीवर घालून स्मशानात नेताना वाटेत दोन ठिकाणी तिरडी थोडा वेळ खाली ठेवतात; त्या स्थानांना विसावा असे म्हणतात. त्या ठिकाणी तीन दगड त्रिकोण करून मांडून ठेवतात. मृताचा आत्मा विसावा स्थानापर्यंतच येऊ शकतो. त्यापुढे घरापर्यंत जाऊ शकत नाही, अशी या लोकांची समजूत आहे. पुरायच्या खड्ड्याला घर असे म्हणतात. काही लोक प्रेत बसल्या स्थितीत, तर काही निजलेल्या स्थितीत, डोके दक्षिणेकडे करून पुरतात. खड्ड्याच्या खाली आणि मृताच्या अंगावर आंब्याच्या डहाळ्या घालतात. मग मृताचा उत्तराधिकारी डोक्यावर पाण्याचे मडके घेऊन त्या खड्ड्याभोवती साडेतीन प्रदक्षिणा घालतो आणि मृताच्या पायांच्या बाजूला उभे राहून पाण्याचे मडके मागे फेकतो आणि मागे वळून न बघता घरी जातो.

कोकणभागात हे लोक प्रेते जाळतात. माणूस शनिवारी मेला, तर घरात दुसरा मृत्यू ओढवतो, अशी या भागातील लोकांची समजूत आहे. अशा वेळी त्या मृताबरोबर कोंबडीचे एक पिल्लू त्यांच्या काखेत बांधून जाळतात. म्हणजे दुसरा मृत्यू टळतो, अशी त्यांची समजूत आहे. प्रेत स्मशानात नेल्यावर मृताचा उत्तराधिकारी त्याच्या तोंडावर आणि दोन्ही डोळ्यांवर खोबऱ्याच्या वाट्या ठेवतो आणि मृताला अग्नी देतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रेत पुरले असेल, तर संध्याकाळी गावातले काही लोक स्मशानात जाऊन थडग्याभोवती गोवऱ्या रचतात आणि त्यांतील एक पेटवतात. याला धुनी लावणे असे म्हणतात. रानटी जनावरांनी थडगे उकरू नये, म्हणून ही काळजी घेतात. दुसऱ्या दिवशी सकाळी लोक स्मशानात जातात आणि गोलाकार बमून थडग्यावर हातांनी माती लोटतात. याला सावडणे असे म्हणतात. प्रेत जाळले असले, तर रक्षा व अस्थी गोळा करून जवळच्या नदीत टाकून देतात.

दहाव्या दिवशी नदीकिनारी दर्सपिंडी विधी करतात. तेरावा दिवस हा अंत्यक्रियेचा मुख्य दिवस असतो. त्या दिवशी घरातील स्त्रिया मृतात्म्यासाठी पुऱ्या, पुरणपोळ्या, घावन, चपात्या, नागलीच्या भाकऱ्या आणि भात एवढे पदार्थ करतात. मग स्मशानात जाऊन थडग्याच्या तोंडाशी अश्मा ठेवून त्याची पूजा करतात व त्याला हे पदार्थ अर्पण करतात. नंतर मृताचा उत्तराधिकारी संध्याकाळच्या गावजेवणासाठी प्रमुख गावकऱ्यांना धान्य व इतर साहित्य देतो. कारण हे जेवण गावकऱ्यांनी तयार करायचे, अशी पद्धत आहे. आसपासचे सर्व कोळी पुरुष या जेवणाला आणि त्यानंतर होणाऱ्या दुखवटा नामक विधीला आमंत्रणाशिवाय उपस्थित राहतात. दुखवट्याचा मुख्य कार्यक्रम म्हणजे मृताच्या उत्तराधिकाऱ्याला आणि त्याच्या गोत्रीभावांना पांढरे पागोटे देणे, हा असतो. अगदी जवळचे नातेवाईक अशी पागोटी देतात. ही पागोटी डोक्याला बांधली, की त्यांचे आशौच संपले, असे समजतात.

महादेव कोळी लोकांचा समावेश अनुसूचित जातींत केलेला आहे. सरकारकडून त्यांना शिक्षणाच्या व इतर बाबतींतही सवलती मिळत आहेत. सांप्रत त्यांच्यापैकी बरीच मुले व मुली शिक्षणाचा लाभ घेत आहेत. बरेच लोक चांगले शेतकरीही बनले आहेत. [दि महादेव कोळीज् – जी. एस. घुर्ये, १९५७]

महादेवचंडी मुंडा लोकांचा एक देव. आपल्यावर येणारी संकटे महादेवचंडीमुळे येतात, अशी यांची कल्पना आहे. जादूटोणा करणारे लोक याला प्रसन्न करून घेऊन आपले कार्य साधतात. त्याला बळीही देतात. बळी देताना एक पांढरा ध्वज उभारतात. [एन्सा. मुंडा.]

महादेवदास (इ. स. चे १७ वे शतक) एक ओडिया कवी. पौराणिक वाङ्मय ओडिया भाषेमध्ये रचणाऱ्या प्रमुख कवींमध्ये याची गणना केली जाते. याने मार्कंडेय पुराण, विष्णुकेशरी पुराण, पद्म पुराण, वैशाख पुराण, कार्तिक पुराण, आषाढ पुराण, द्वादशीमाहात्म्य, नीलाद्रिमहोदय, इ. ग्रंथ रचले. याने वरील पुराणांचा जसाच्या तसा अनुवाद न करता अनेक ठिकाणी स्वातंत्र्य घेतलेले आहे. महादेवदासाच्या या ग्रंथांमुळे ओडिसात पौराणिक वाङ्मय सामान्य जनांपर्यंत पोचले. [उ. सा. इ.; हि. ओ. लि.]

महादेवपंत (इ. स. चे १७ वे शतक) वाराणशीतील एक संस्कृत पंडित व ग्रंथकार. हा नैयायिक म्हणून प्रसिद्ध होता. तत्त्वचिंतामणिदीधिति नामक ग्रंथावर भवानंदाची भवानंदी टीका नावाची एक टीका आहे. महादेवाने या भवानंदी टीकेवर भवानंदीप्रकाश या नावाची एक विशाल टीका रचली. ही टीका फार विस्तृत झाली म्हणून, महादेवानेच त्याचे सर्वोपकारिणी नावाचे एक लघू संस्करण बनविले. याशिवाय याचे अन्य ग्रंथ असे – न्यायकौस्तुभ, गदाधरकृत शक्तिवादावरील टीका, ईश्वरवाद, सादृश्यवाद व अनुमिती.

याचे मूळ घराणे गोदावरीकाठी पुण्य स्तंभ या गावी वसलेले पुणतांबेकर हे होय. नंतर इ. स. च्या १६ व्या शतकात ते काशीमध्ये वास्तव्याला गेले. [का. सा. सा.]

महाद्वादशी एक तिथिव्रत. भाद्रपद शुद्ध द्वादशीला श्रवण नक्षत्र असेल, तर तिला महाद्वादशी असे म्हणतात. या दिवशी उपवास आणि विष्णूची पूजा या गोष्टी करायच्या असतात. याच तिथीला बुधवार व श्रवण नक्षत्र असेल तर तिचे माहात्म्य अधिक आहे, असे म्हटले आहे. हे व्रत केल्याने महाफल मिळते. [हि. ध.]

महानंदानवमीव्रत एक तिथिव्रत. माघ शुद्ध नवमीला महानंदा असे म्हणतात. व्रतावधी एक वर्ष. दुर्गा ही या व्रताची देवता होय. या व्रतात वर्षाचे चार-चार महिन्यांचे तीन भाग करून प्रत्येक भागात देवीची पूजा, देवीच्या निरनिराळ्या नावांनी, निरनिराळ्या फुलांनी आणि निरनिराळ्या नैवेद्यांनी करतात. फल – इच्छापूर्ती व ब्रह्मलोकप्राप्ती. [हि. ध.]

महानंदी एक शिवस्थान. हे शिवमंदिर आंध्र प्रदेशातील कर्नूल जिल्ह्यात नल्लमलई नामक डोंगराच्या पायथ्याशी आहे. नंद्याळ नावाच्या रेल्वेस्टेशनपासून हे ठिकाण दहा मैलांवर आहे. नंद नावाच्या राजाने हिमालय रससिद्धाच्या मार्गदर्शनाखाली हे मंदिर बांधले, अशी आख्यायिका आहे. या देवालयाला कृष्णदेवरायाचा बंधू नरसिंहराय याने पुष्कळ देणग्या दिल्या होत्या. विजयनगरच्या साम्राज्यातील कृष्ण-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवरायाच्या ताम्रपटात महानंदीतीर्थ म्हणून या स्थानाचा उल्लेख आहे. हंपीच्या लेखातही याचा निर्देश आहे. एक भव्य नंदी या देवालयात आहे, म्हणून याला महानंदी मंदिर असे म्हणतात. या लिंगासमोर श्रीचक्र आहे, ते आद्य शंकराचार्यांनी स्थापिलें, असे सांगतात. लिंगाजवळ शाळिग्राम असल्यामुळे वैष्णवांनाही हे क्षेत्र आपले वाटते. इथले शिवलिंग स्वयंभू असून, त्यावर दोन छिद्रे आहेत. अशा प्रकारची लिंगरचना भारतात अन्यत्र आढळत नाही. या छिद्रांसंबंधी एक आख्यायिका सांगतात, ती अशी–

नंद नावाचा राजा नवनंदी प्रदेशात राज्य करीत होता. एकदा त्याला शिवावर दुधाचा अभिषेक करण्याची इच्छा झाली. म्हणून त्याने खूप गाई जमा केल्या. त्यात एक कपिला गाय होती. राजाला तिचे भरपूर दूध मिळत असे. पुढे कपिला अरण्यात चरायला जाऊ लागली. काही दिवसांनी असे आढळून आले, की तिचे दूध कमी कमी होत आहे. असे का होते याचा तपास करण्यासाठी गुराखी गाईच्या मागे गेला असता त्याला दिसले, की कपिला एका वारुळाजवळ चरत असून, तिच्या स्तनातून दूध स्रवत आहे. हळूहळू तिथून एक बाळसेदार कृष्णमूर्ती वर आली. कृष्णदर्शन होताच गाय नित्याप्रमाणे कळपात परतली.

गुराख्याने ही घटना राजाच्या कानांवर घातली. दुसऱ्या दिवशी राजाच गायीच्या मागून गेला आणि त्यालाही तेच दृश्य दिसले. तो आश्चर्यचकित झाला. मग तो गाईजवळ गेला. राजाला पाहून गाय घाबरली. ती कृष्णमूर्ती अदृश्य झाली. वारुळाचे रूपांतर एका मातीच्या ढिगात झाले. आसल्यामुळे हे परिवर्तन घडले, असे वाटून राजा दुःखी झाला. त्याने देवाजवळ क्षमायाचना केली. देवाने प्रसन्न होऊन राजाला वर दिला, की या वारुळाचे स्वयंभू लिंग होईल आणि या प्रसंगाची खूण म्हणून लिंगावर दोन छिद्रे असतील.

या शिवमंदिराचे शिल्पसौंदर्यही वाखाणण्यासारखे आहे. मंदिराचे विमान हे नागरी शैलीचा खास नमुना आहे. हे मंदिर एका डोंगराच्या पायथ्याजवळ आहे. या डोंगरात उगम पावलेले पाच झरे लिंगाच्या खालून तलावात आणून सोडले आहेत. त्यातले पाणी उष्ण व आरोग्यदायक आहे.

महानंदीमंदिराच्या भोवतालच्या दहा मैलांच्या परिसरात नऊ नंदीमंदिरे आहेत. म्हणून त्या भागाला नंद्याल म्हणतात. इथे शिवरात्रीला मोठी यात्रा भरते. [टॅं. ली. आं. प्र.]

महानदी मध्य प्रदेश व ओडिसा या राज्यांतून वाहणारी एक मोठी नदी. रायपूर जिल्ह्यातील सिहाव नामक गावाजवळच्या एका लहानशा कुंडात हिचा उगम झाला आहे. हिचे चित्रोत्पला असेही एक नाव असून, तिला विन्ध्य – पादविनिर्गता असे म्हटले आहे. तो सर्वपापहरा व शुभा आहे. प्रथम ती उत्तरवाहिनी असून, बिलासपूरच्या दक्षिणेला तिला शिवनाथ ही नदी मिळाल्यानंतर ती पूर्ववाहिनी बनून ओडिसा प्रदेशात प्रवेश करते. संबळपुराजवळ पोचल्यानंतर ती दक्षिणेकडे वळते. तिथे तिचे पात्र दोन मैल रुंद होते. पुढे तिचे पात्र अरुंद होत गेलेले असून, वेग वाढला आहे. सोनपूरजवळ ती पुन्हा पूर्वेकडे वळून एका ४० मल लांब खिंडीतून वाहते. कटक जिल्ह्यातून जाताना तिला अनेक फाटे फुटतात आणि ते शेवटी बंगालच्या उपसागराला मिळतात.

महानदीची लांबी ५५० मैल असून, तिचा बराच भाग जलमार्ग म्हणून उपयुक्त आहे. पण काही भागात पावसाळ्यात तिला प्रचंड महापूर येतो. संबळपूरपासून ९ मैलांवर या नदीवर हिराकुड हे प्रचंड धरण बांधण्यात आले आहे. हिला पाच उपनद्या मिळतात. या नदीच्या काठावर असंख्य देवालये बांधलेली आहेत. [हि. जॉ. ए. इं.; मार्च ऑफ इंडिया, मे १९५५; श. क.]

महानवमी एक तिथिव्रत. आश्विन शुद्ध नवमीला दुर्गानवमी किंवा महानवमी म्हणतात. हे व्रत आश्विन, कार्तिक किंवा मार्गशीर्ष शुद्ध नवमीला सुरू करतात. दुर्गा ही या व्रताची देवता आहे. व्रतावधी एक वर्ष. प्रत्येक मासात भिन्न उपचारांनी देवीची पूजा करणे व उद्यापनाचे वेळी कुमारिकांना भोजन घालणे, हा या व्रताचा विधी आहे. फळ - देवीलोक प्राप्ती. पाहा– दुर्गानवमी, दुर्गापूजा. [हि. ध.; व्र. प.]

महानाम्नी एक ब्रह्मचारिव्रत. हे जन्मापासून १३ व्या वर्षी करायचे असते. ऐतरेय आरण्यकात महानाम्नी नावाने प्रसिद्ध असलेल्या मंत्रांच्या अध्ययनास प्रारंभ करण्यापूर्वी हे व्रत करायचे असते. याचा विधी असा – आचार्याने ब्रह्मचाऱ्यासह स्नान करून होमाचा संकल्प करावा. गणपतिपूजनापासून नांदीश्राद्धापर्यंत कृत्ये करावी. दुसऱ्या दिवशी ब्रह्मचाऱ्याचे वपन करवावे. आचार्याने त्याला उजव्या बाजूस बसवून अग्निप्रतिष्ठा करावी. आज्यहोम करावा. बटूला प्रजापतीला अर्पण करून उपनयनोक्त विधीने मेखला व दंड द्यावा. जुने यज्ञोपवीत जलात टाकायला लावावे. मगहो मशेष समाप्त करून ब्रह्मचाऱ्याला म्हणावे, 'महानाम्नीव्रतं संवत्सरं चर' (= तू एक वर्षपर्यंत माहानाम्नी व्रताचे आचरण कर.) त्यावर 'चरिष्यामि' (मी आचरीन), असे ब्रह्मचाऱ्याने उत्तर द्यावे. मग एक वर्षपर्यंत केस वाढवून भिक्षाचरण करावे.

वर्ष संपल्यावर उत्तरायणात व शुक्ल पक्षात आचार्याने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मचाऱ्याला बरोबर घेऊन निर्जन स्थळी जावे आणि तिथे व्रतपूर्तीचा होम करावा. त्यात अग्नी अग्नी, असूयंती, अनुमती, प्रदाता अग्नी, वायू आणि सूर्य या देवतांना कृसरान्नाच्या (तिळासहित भात) आहुती द्याव्या. होम आणि ब्रह्मचाऱ्याचे भोजन यांना पुरेसे होतील इतके भिक्षेत मिळालेले तांदूळ स्थालीपाकविधीने शिजवावे. मग आचार्याने वटूला त्याच्याकडून व्रतलोप झाला आहे किंवा काय ते विचारावे. झाला असल्यास त्याबद्दल प्रायश्चित्त करवावे. मग प्रधान देवतांना शिजविलेल्या भाताच्या आहुती द्याव्या. उरलेला भात ब्रह्मचाऱ्याने भक्षण करावा. मग उपस्थान करावे. एक रात्र डोळे मिटून व मौन पाळून राहावे. दुसऱ्या दिवशी आचार्याने ब्रह्मचाऱ्याच्या मस्तकाला तोंडावरून कोऱ्या वस्त्राचे तीन फेरे द्यावे. एक रात्र त्याला त्या स्थितीत ठेवावे. दुसऱ्या दिवशी आचार्याने ब्रह्मचाऱ्याला घेऊन गावाबाहेर ईशान्य दिशेस जावे. तिथे अग्निप्रतिष्ठापना करावी. अग्नीच्या उत्तरेस तलवार, उदककमंडलू आणि एक दगड या वस्तू ठेवाव्या. जवळच एक कालवड बांधावी. मग ब्रह्मचाऱ्याच्या मुखावरचे वस्त्र दूर करावे. त्याला मुखप्रक्षालन व कंठस्नान करायला सांगावे. मग ब्रह्मचाऱ्याच्या पाठीला पाठ लावावी. ब्रह्मचाऱ्याने मनानेच आचार्याला म्हणावे 'ॐ महानाम्नीर्भो अनुब्रूहि' (अहो मला महानाम्नी सांगा.) मग गुरूने 'विदामघवन्विदा' इ. मंत्रांचा उपदेश करावा. शिष्याने ते मंत्र तीन वेळा म्हणावे. आचार्याने ब्रह्मचाऱ्याचे शिरोवेष्टन सोडून त्याला सूर्यदर्शन करायला सांगावे. मग ब्रह्मचाऱ्याने भूमिस्पर्श करावा. बांधलेली कालवड गुरूला अर्पण करावी. भिक्षा मागून आणलेल्या तांदळाचा भात शिजवून सूर्यास्तापूर्वी ब्रह्मौदन होम करावा. मग महानाम्नीच्या अंगभूत असलेला अनुप्रवचनीय होम करावा. चरुशेषाने ब्राह्मणभोजन घालावे. ब्राह्मणांनी 'तुझी वेदसमाप्ती होवो,' असा आशीर्वाद दिल्यावर ब्रह्मचाऱ्याने कर्म ईश्वरार्पण करून भोजन करावे. [ऋ. ब्र. स.]

महानारायणोपनिषद एक नव्य उपनिषद. हे आथर्वण उपनिषद असून, महत्त्वाचे व प्रदीर्घ आहे. त्याचे पंचवीस भाग असून, प्रत्येक भागाला खंड असे नाव आहे.

पहिल्या खंडात नारायणाची स्तुती आहे. जलातून हिरण्यगर्भ निर्माण झाला, असे पुढे सांगितले आहे. दुसऱ्या खंडात त्या हिरण्यगर्भाचे वर्णन असून, तो सर्वव्यापी असल्याचे सांगितले आहे. खंडाच्या शेवटी अग्नीची स्तुती आहे. तिसऱ्या खंडात एकूण अठरा गायत्री मंत्र दिलेले आहेत. ते रुद्र, वृषभ, दन्ती, षष्ठ, वैश्वानर, अग्नी, सूर्य, दुर्गा, भगवती, गौरी, गरुड, विष्णू, ब्रह्मदेव, इ. देवतांसंबंधी आहेत.

चौथ्या खंडात दूर्वामाहात्म्य वर्णिले आहे. दूर्वा या अमृतसंभूत, शतमूल व शतांकुर असून, त्या शंभर पापे नष्ट करतात आणि माणसाला शतायुषी बनवतात, असे सांगितले आहे. तसेच यात भूमिस्तुती असून, मृत्तिकामंत्रही दिलेला आहे.

पाचव्या खंडात विविध देवतांना वंदन केले असून, नंतर अनेक नद्यांचे माहात्म्य आणि अघमर्षणाचे मंत्र सांगितले आहेत. सहाव्या खंडात अग्नी व दुर्गा यांची स्तुती व संध्यावंदनातील काही मंत्र आहेत. सातव्या खंडात अग्नी, पृथ्वी, वायू, अंतरिक्ष, आदित्य, चंद्र, देव आणि पितर यांना वंदन व त्यांना अन्नादी अर्पण करण्याचे मंत्र दिलेले आहेत.

आठव्या खंडात ऋत, सत्य, श्रुत, शान्त, दान्त आणि यज्ञ ही सर्व ब्रह्माचीच रूपे आहेत, असे वर्णन केलेले आहे. पुण्यकर्माचा सुगंध आपोआप दूरवर पसरतो, हे सांगताना उपनिषद्‌कार म्हणतो–

यथा वृक्षस्य सम्पुष्पितस्य दूराद् गन्धो वाति,
एवं पुण्यस्य कर्मणो दूराद् गन्धो वाति ।

अर्थ – ज्याप्रमाणे फुललेल्या वृक्षाचा सुवास दूरवर पसरतो, त्याप्रमाणे पुण्यकर्माचा सुगंधही दूरवर फैलावतो.

नवव्या खंडात ईश्वराचे स्वरूप प्रत्येक जातीत कोणत्या विशिष्ट व्यक्तीत विशेष रूपाने प्रादुर्भूत झाले आहे त्याचे वर्णन आहे. दहाव्या खंडात, चार शिंगे, तीन पाय, दोन डोकी आणि सात हात असलेल्या वृषभाचे वर्णन आहे. शेवटी, रुद्र आणि ओंकार यांचे महत्त्व सांगितले आहे. अकराव्या खंडात नारायण हा सहस्रशीर्ष पुरुष आहे, असे वर्णन आहे. नारायण म्हणजेच ब्रह्म असे म्हटले आहे.

बाराव्या खंडात हिरण्मय पुरुषाचे वर्णन आणि तेराव्यात सूर्यमंत्र व रुद्रवर्णन आलेले आहे. चौदाव्या खंडात जलाची प्रार्थना असून, प्रथम या पृथ्वीवर जलच होते, असे सांगितले आहे. संध्यादी कर्मात जे जल आचमनरूपाने घेतले जाते, त्याने पापविमोचन होते असा उल्लेख आहे. पंधराव्या खंडात गायत्री मंत्र, सोळाव्यात मेधा प्राप्त होण्यासाठी म्हणायचा मंत्र, सतराव्यात रुद्राच्या विविध रूपांचे वर्णन व रुद्रगायत्री, आणि अठराव्यात पापविमोचक मंत्र असे विषय आलेले आहेत.

एकोणिसाव्या खंडात काळ्या व पांढऱ्या तिळांचे महत्त्व विशद केले आहे. विसाव्या खंडात विष्णूच्या तीन पावलांचा उल्लेख आहे. एकविसाव्यात सत्य, तप, दान, धर्म वगैरे उपायांनी देवता प्रसन्न होतात, असे सांगितले आहे. बाविसाव्या खंडात, प्रजापतीच्या ठिकाणी सत्य आणि यज्ञ यांचा समन्वय असल्यामुळे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवरायाच्या ताम्रपटात महानंदीतीर्थ म्हणून या स्थानाचा उल्लेख आहे. हंपीच्या लेखातही याचा निर्देश आहे. एक भव्य नंदी या देवालयात आहे, म्हणून याला महानंदी मंदिर असे म्हणतात. या लिंगासमोर श्रीचक्र आहे, ते आद्य शंकराचार्यांनी स्थापिले, असे सांगतात. लिंगाजवळ शाळिग्राम असल्यामुळे वैष्णवांनाही हे क्षेत्र आपले वाटते. इथले शिवलिंग स्वयंभू असून, त्यावर दोन छिद्रे आहेत. अशा प्रकारची लिंगरचना भारतात अन्यत्र आढळत नाही. या छिद्रांसंबंधी एक आख्यायिका सांगतात, ती अशी–

नंद नावाचा राजा नवनंदी प्रदेशात राज्य करीत होता. एकदा त्याला शिवावर दुधाचा अभिषेक करण्याची इच्छा झाली. म्हणून त्याने खूप गाई जमा केल्या. त्यात एक कपिला गाय होती. राजाला तिचे भरपूर दूध मिळत असे. पुढे कपिला अरण्यात चरायला जाऊ लागली. काही दिवसांनी असे आढळून आले, की तिचे दूध कमी कमी होत आहे. असे का होते याचा तपास करण्यासाठी गुराखी गाईच्या मागे गेला असता त्याला दिसले, की कपिला एका वारुळाजवळ चरत असून, तिच्या स्तनातून दूध स्रवत आहे. हळूहळू तिथून एक बाळसेदार कृष्णमूर्ती वर आली. कृष्णदर्शन होताच गाय नित्याप्रमाणे कळपात परतली.

गुराख्याने ही घटना राजाच्या कानांवर घातली. दुसऱ्या दिवशी राजाच गायीच्या मागून गेला आणि त्यालाही तेच दृश्य दिसले. तो आश्चर्यचकित झाला. मग तो गाईजवळ गेला. राजाला पाहून गाय घाबरली. ती कृष्णमूर्ती अदृश्य झाली. वारुळाचे रूपांतर एका मातीच्या ढिगात झाले. आसल्यामुळे हे परिवर्तन घडले, असे वाटून राजा दुःखी झाला. त्याने देवाजवळ क्षमायाचना केली. देवाने प्रसन्न होऊन राजाला वर दिला, की या वारुळाचे स्वयंभू लिंग होईल आणि या प्रसंगाची खूण म्हणून लिंगावर दोन छिद्रे असतील.

या शिवमंदिराचे शिल्पसौंदर्यही वाखाणण्यासारखे आहे. मंदिराचे विमान हे नागरी शैलीचा खास नमुना आहे. हे मंदिर एका डोंगराच्या पायथ्याजवळ आहे. या डोंगरात उगम पावलेले पाच झरे लिंगाच्या खालून तलावात आणून सोडले आहेत. त्यातले पाणी उष्ण व आरोग्यदायक आहे.

महानंदीमंदिराच्या भोवतालच्या दहा मैलांच्या परिसरात नऊ नंदीमंदिरे आहेत. म्हणून त्या भागाला नंद्याल म्हणतात. इथे शिवरात्रीला मोठी यात्रा भरते. [टें. ली. आं. प्र.]

महानदी मध्य प्रदेश व ओडिसा या राज्यांतून वाहणारी एक मोठी नदी. रायपूर जिल्ह्यातील सिहाव नामक गावाजवळच्या एका लहानशा कुंडात हिचा उगम झाला आहे. हिचे चित्रोत्पला असेही एक नाव असून, तिला विन्ध्य – पादविनिर्गता असे म्हटले आहे. तो सर्वपापहरा व शुभा आहे. प्रथम ती उत्तरवाहिनी असून, विलासपूरच्या दक्षिणेला तिला शिवनाथ ही नदी मिळाल्यानंतर ती पूर्ववाहिनी बनून ओडिशा प्रदेशात प्रवेश करते. संबळपुराजवळ पोचल्यानंतर ती दक्षिणे-कडे वळते. तिथे तिचे पात्र दोन मैल रुंद होते. पुढे तिचे पात्र अरुंद होत गेलेले असून, वेग वाढला आहे. सोनपूरजवळ ती पुन्हा पूर्वेकडे वळून एका ४० मल लांब खिंडीतून वाहते. कटक जिल्ह्यातून जाताना तिला अनेक फाटे फुटतात आणि ते शेवटी बंगालच्या उपसागराला मिळतात.

महानदीची लांबी ५५० मैल असून, तिचा बराच भाग जलमार्ग म्हणून उपयुक्त आहे. पण काही भागात पावसाळ्यात तिला प्रचंड महापूर येतो. संबळपूरपासून ९ मैलांवर या नदीवर हिराकुड हे प्रचंड धरण बांधण्यात आले आहे. हिला पाच उपनद्या मिळतात. या नदीच्या काठावर असंख्य देवाले बांधलेली आहेत. [हि. जॉ. ए. इं.; मार्च ऑफ इंडिया, मे १९५५; श. क.]

महानवमी एक तिथिव्रत. आश्विन शुद्ध नवमीला दुर्गानवमी किंवा महानवमी म्हणतात. हे व्रत आश्विन, कार्तिक किंवा मार्गशीर्ष शुद्ध नवमीला सुरू करतात. दुर्गा ही या व्रताची देवता आहे. व्रतावधी एक वर्ष. प्रत्येक मासात भिन्न उपचारांनी देवीची पूजा करणे व उद्यापनाचे वेळी कुमारिकांना भोजन घालणे, हा या व्रताचा विधी आहे. फळ - देवीलोक प्राप्ती. पाहा– दुर्गानवमी, दुर्गापूजा. [हि. ध.; व्र. प.]

महानाम्नी एक ब्रह्मचारिव्रत. हे जन्मापासून १३ व्या वर्षी करायचे असते. ऐतरेय आरण्यकात महानाम्नी नावाने प्रसिद्ध असलेल्या मंत्रांच्या अध्ययनास प्रारंभ करण्यापूर्वी हे व्रत करायचे असते. याचा विधी असा – आचार्याने ब्रह्मचाऱ्यासह स्नान करून होमाचा संकल्प करावा. गणपतिपूजनापासून नांदीश्राद्धापर्यंत कृत्ये करावी. दुसऱ्या दिवशी ब्रह्मचाऱ्याचे वपन करवावे. आचार्याने त्याला उजव्या बाजूस बसवून अग्निप्रतिष्ठा करावी. आज्यहोम करावा. बटूला प्रजापतीला अर्पण करून उपनयनोक्त विधीने मेखला व दंड द्यावा. जुने यज्ञोपवीत जलात टाकायला लावावे. मग होम शेष समाप्त करून ब्रह्मचाऱ्याला म्हणावे, 'महानाम्नीव्रतं संवत्सरं चर' (= तू एक वर्षपर्यंत माहानाम्नी व्रताचे आचरण कर.) त्यावर 'चरिष्यामि' (मी आचरीन), असे ब्रह्मचाऱ्याने उत्तर द्यावे. मग एक वर्षपर्यंत केस वाढवून भिक्षाचरण करावे.

वर्ष संपल्यावर उत्तरायणात व शुक्ल पक्षात आचार्याने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मचाऱ्याला बरोबर घेऊन निर्जन स्थळी जावे आणि तिथे व्रतपूर्तीचा होम करावा. त्यात अग्नी अग्नी, असूयंती, अनुमती, प्रदाता अग्नी, वायू आणि सूर्य या देवतांना कृसरान्नाच्या (तिळासहित भात) आहुती द्याव्या. होम आणि ब्रह्मचाऱ्याचे भोजन यांना पुरेसे होतील इतके भिक्षेत मिळालेले तांदूळ स्थालीपाकविधीने शिजवावे. मग आचार्याने बटूला त्याच्याकडून व्रतलोप झाला आहे किंवा काय ते विचारावे. झाला असल्यास त्याबद्दल प्रायश्चित्त करवावे. मग प्रधान देवतांना शिजविलेल्या भाताच्या आहुती द्याव्या. उरलेला भात ब्रह्मचाऱ्याने भक्षण करावा. मग उपस्थान करावे. एक रात्र डोळे मिटून व मौन पाळून राहावे. दुसऱ्या दिवशी आचार्याने ब्रह्मचाऱ्याच्या मस्तकाला तोंडावरून कोऱ्या वस्त्राचे तीन फेरे द्यावे. एक रात्र त्याला त्या स्थितीत ठेवावे. दुसऱ्या दिवशी आचार्याने ब्रह्मचाऱ्याला घेऊन गावाबाहेर ईशान्य दिशेस जावे. तिथे अग्निप्रतिष्ठापना करावी. अग्नीच्या उत्तरेस तलवार, उदककमंडलू आणि एक दगड या वस्तू ठेवाव्या. जवळच एक कालवड बांधावी. मग ब्रह्मचाऱ्याच्या मुखावरचे वस्त्र दूर करावे. त्याला मुखप्रक्षालन व कंठस्नान करायला सांगावे. मग ब्रह्मचाऱ्याच्या पाठीला पाठ लावावी. ब्रह्मचाऱ्याने मनानेच आचार्याला म्हणावे 'ॐ महानाम्नीर्भो अनुब्रूहि' (अहो मला महानाम्नी सांगा.) मग गुरूने 'विदामघवन्विदा' इ. मंत्रांचा उपदेश करावा. शिष्याने ते मंत्र तीन वेळा म्हणावे. आचार्याने ब्रह्मचाऱ्याचे शिरोवेष्टन सोडून त्याला सूर्यदर्शन करायला सांगावे. मग ब्रह्मचाऱ्याने भूमिस्पर्श करावा. बांधलेली कालवड गुरूला अर्पण करावी. भिक्षा मागून आणलेल्या तांदळाचा भात शिजवून सूर्यास्तापूर्वी ब्रह्मौदन होम करावा. मग महानाम्नीच्या अंगभूत असलेला अनुप्रवचनीय होम करावा. चरुशेषाने ब्राह्मणभोजन घालावे. ब्राह्मणांनी 'तुझी वेदसमाप्ती होवो,' असा आशीर्वाद दिल्यावर ब्रह्मचाऱ्याने कर्म ईश्वरार्पण करून भोजन करावे. [ऋ. ब्र. स.]

महानारायणोपनिषद एक नव्य उपनिषद. हे आथर्वण उपनिषद असून, महत्त्वाचे व प्रदीर्घ आहे. त्याचे पंचवीस भाग असून, प्रत्येक भागाला खंड असे नाव आहे.

पहिल्या खंडात नारायणाची स्तुती आहे. जलातून हिरण्यगर्भ निर्माण झाला, असे पुढे सांगितले आहे. दुसऱ्या खंडात त्या हिरण्यगर्भाचे वर्णन असून, तो सर्वव्यापी असल्याचे सांगितले आहे. खंडाच्या शेवटी अग्नीची स्तुती आहे. तिसऱ्या खंडात एकूण अठरा गायत्री मंत्र दिलेले आहेत. ते रुद्र, वृषभ, दन्ती, षष्ठ, वैश्वानर, अग्नी, सूर्य, दुर्गा, भगवती, गौरी, गरुड, विष्णू, ब्रह्मदेव, इ. देवतांसंबंधी आहेत.

चौथ्या खंडात दूर्वामाहात्म्य वर्णिले आहे. दूर्वा या अमृतसंभूत, शतमूल व शतांकुर असून, त्या शंभर पापे नष्ट करतात आणि माणसाला शतायुषी बनवतात, असे सांगितले आहे. तसेच यात भूमिस्तुती असून, मृत्तिकामंत्रही दिलेला आहे.

पाचव्या खंडात विविध देवतांना वंदन केले असून, नंतर अनेक नद्यांचे माहात्म्य आणि अघमर्षणाचे मंत्र सांगितले आहेत. सहाव्या खंडात अग्नी व दुर्गा यांची स्तुती व संध्यावंदनातील काही मंत्र आहेत. सातव्या खंडात अग्नी, पृथ्वी, वायू, अंतरिक्ष, आदित्य, चंद्र, देव आणि पितर यांना वंदन व त्यांना अन्नादी अर्पण करण्याचे मंत्र दिलेले आहेत.

आठव्या खंडात ऋत, सत्य, श्रुत, शान्त, दान्त आणि यज्ञ ही सर्व ब्रह्माचीच रूपे आहेत, असे वर्णन केलेले आहे. पुण्यकर्माचा सुगंध आपोआप दूरवर पसरतो, हे सांगताना उपनिषद्कार म्हणतो—

> **यथा वृक्षस्य सम्पुष्पितस्य दूराद् गन्धो वाति,**
> **एवं पुण्यस्य कर्मणो दूराद् गन्धो वाति ।**

अर्थ – ज्याप्रमाणे फुललेल्या वृक्षाचा सुवास दूरवर पसरतो, त्याप्रमाणे पुण्यकर्माचा सुगंधही दूरवर फैलावतो.

नवव्या खंडात ईश्वराचे स्वरूप प्रत्येक जातीत कोणत्या विशिष्ट व्यक्तीत विशेष रूपाने प्रादुर्भूत झाले आहे त्याचे वर्णन आहे. दहाव्या खंडात, चार शिंगे, तीन पाय, दोन डोकी आणि सात हात असलेल्या वृषभाचे वर्णन आहे. शेवटी, रुद्र आणि ओंकार यांचे महत्त्व सांगितले आहे. अकराव्या खंडात नारायण हा सहस्रशीर्ष पुरुष आहे, असे वर्णन आहे. नारायण म्हणजेच ब्रह्म असे म्हटले आहे.

बाराव्या खंडात हिरण्मय पुरुषाचे वर्णन आणि तेराव्यात सूर्यमंत्र व रुद्रवर्णन आलेले आहे. चौदाव्या खंडात जलाची प्रार्थना असून, प्रथम या पृथ्वीवर जलच होते, असे सांगितले आहे. संध्यादी कर्मात जे जल आचमनरूपाने घेतले जाते, त्याने पापविमोचन होते असा उल्लेख आहे. पंधराव्या खंडात गायत्री मंत्र, सोळाव्यात मेधा प्राप्त होण्यासाठी म्हणायचा मंत्र, सतराव्यात रुद्राच्या विविध रूपांचे वर्णन व रुद्रगायत्री, आणि अठराव्यात पापविमोचक मंत्र असे विषय आलेले आहेत.

एकोणिसाव्या खंडात काळ्या व पांढऱ्या तिळांचे महत्त्व विशद केले आहे. विसाव्या खंडात विष्णूच्या तीन पावलांचा उल्लेख आहे. एकविसाव्यात सत्य, तप, दान, धर्म वगैरे उपायांनी देवता प्रसन्न होतात, असे सांगितले आहे. बाविसाव्या खंडात, प्रजापतीच्या ठिकाणी सत्य आणि यज्ञ यांचा समन्वय असल्यामुळे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याला श्रेष्ठ मानतात, असे सांगितले आहे. तेविसाव्यात, जगताची प्रतिष्ठा म्हणून यज्ञाचा गौरव केलेला आहे. चौविसाव्यात, प्रत्येकाने ओंकाराशी एकरूप होऊन यज्ञ करावा, असे सांगितले आहे.

पंचविसाव्या खंडात, आत्मा हा यजमान, श्रद्धा ही पत्नी, शरीर हे इध्म, उर हे वेदी, अशा प्रकारे यज्ञाचे आध्यात्मिक रूपक दिले आहे. शेवटी, ब्रह्माचे सत्य स्वरूप जाणणाऱ्या ब्राह्मणाला महिमा प्राप्त होतो, असे सांगून हे उपनिषद संपविले आहे. [डॉ. सी. ग. देसाई]

महानिशा

बंगाल प्रदेशातील लोक आश्विन महिन्याच्या अमावास्येला महानिशा असे म्हणतात. या लोकांची अशी श्रद्धा आहे, की या दिवशी दीपमाला लावून रात्रभर लक्ष्मीच्या आगमनाची वाट पाहत जागरण केल्यास, घरातली लक्ष्मी घरातच राहते.

याच दिवशी कालीमाता चौसष्ट हजार योगिनींसह प्रकट झाली, म्हणून या दिवशी कालीची पूजा केल्यास मोक्षप्राप्ती होते, अशी त्यांची समजूत आहे. [संजय, नोव्हेंबर १९६०]

महानुभाव संप्रदाय

हिंदू धर्माच्या अंतर्गत जे अनेक संप्रदाय भारतात प्रचलित आहेत, त्यांतच महानुभाव संप्रदायाचा अंतर्भाव होतो. सामान्य जनतेत मानभाव या नावाने तो ओळखला जातो. मानभाव हा शब्द महानुभाव याचा अपभ्रंश आहे. पण मानभाव या शब्दाला एक वेगळा कुत्सित अर्थ प्राप्त झाल्यामुळे अलिकडे जाणते लोक तो शब्द कटाक्षाने टाळतात व महानुभाव अशा मूळ नावाने त्याचा उल्लेख करतात. उगमस्थानीच समृद्ध असलेल्या काही संप्रदायांपैकी हा एक आहे. इ. स. च्या १३ व्या शतकात या पंथाचा उगम झाला व पुढे दोन-तीन शतके त्याचा खूप प्रचार झाला. महाराष्ट्र, मध्यभारत, पंजाब, सरहद्द प्रांत, काश्मीर एवढ्या भू भागात त्याचा विस्तार झालेला दिसतो. वारकरी संप्रदाय हा जसा वैष्णव संप्रदाय आहे, तसाच हाही आहे; मात्र या दोन्ही संप्रदायांचे तत्त्वज्ञान, उपास्य दैवत व उपासनामार्ग भिन्न भिन्न आहेत.

श्रीचक्रधर हा या पंथाचा संस्थापक होय. तो मूळचा गुजरातमधील भडोच या गावचा रहिवासी होता. गोविंदप्रभू यांच्याकडून त्याने शक्तिस्वीकार केला व त्यांचे शिष्यत्व पत्करले. तिथून पुढे बारा वर्षे तो सालबर्डीच्या डोंगरात राहिला. त्यानंतर त्याने भारतात बरेच परिभ्रमण केले. या संचारात त्याला अनेक शिष्य व शिष्यिणी मिळाल्या. या शिष्यांना त्याने स्वतःच्या चिंतनातून मिळालेले तत्त्वज्ञान उपदेशिले आणि विशिष्ट आचारधर्मही सांगितला. तिथून या पंथाचा प्रारंभ झाला. (चक्रधर पाहा)

ज्या काळात हा संप्रदाय निर्माण झाला, त्या काळात उत्तर भारतामध्ये मुसलमानी राजसत्तेची पकड पक्की बसली होती. त्या मानाने भारताचा दक्षिण भाग यवनी सत्तेपासून बऱ्याच प्रमाणात मुक्त होता. महाराष्ट्रात त्या वेळी यादवांचे राज्य होते. त्या काळी शंकराचार्यांचे अद्वैत तत्त्वज्ञान प्रतिष्ठित झाले होते. जैन धर्मही आपले बस्तान बसवून होता. महाराष्ट्राच्या दक्षिण सीमेपलिकडे लिंगायत पंथाचा उगम होऊन द. महाराष्ट्रात त्याचा हळूहळू प्रवेश होऊ लागला होता. वारकऱ्यांची विठ्ठलभक्ती गाजत होती. नाथयोगीही आपल्या मताचा प्रचार करीत होते. वर्णव्यवस्था क्वचित शिथिल झाल्यासारखी वाटत असली, तरी जनसमूहावर तिची पकड जबरदस्त होती. याशिवाय कितीतरी क्षुद्र दैवते समाजाच्या निरनिराळ्या थरांत पूजिली जात होती. हेमाद्री हा या काळातला मोठा धर्मशास्त्री होय. तो यादवांच्या राज्यात करणाधिप या महत्पदावर अधिष्ठित होता. त्याने चतुर्वर्ग चिंतामणी नावाचा ग्रंथ लिहिला होता आणि त्यात हजारो व्रते तपशीलांसह वर्णिली होती. समाजात प्रचलित असलेल्या अनेक देवतांच्या उपासनेला त्याने शास्त्रीय प्रतिष्ठा मिळवून दिली होती.

अशा या परिस्थितीत चक्रधराच्या तत्त्वज्ञानाचा महाराष्ट्रात उदय झाला. प्रा. कोलते म्हणतात – परमेश्वराच्या वास्तव स्वरूपाची ओळख करून देऊन जनतेला मुक्तीचा खरा मार्ग दाखविणे, हे चक्रधरांचे अवतारकार्य म्हणून थोडक्यात सांगता येईल. सर्वसामान्य लोक इतकेच नव्हे, तर मोठमोठे तत्त्वज्ञ पंडितसुद्धा परमेश्वराच्या वास्तव स्वरूपाची ओळख विसरले होते, असे वाटल्यावाचून चक्रधरांना आपले तत्त्वज्ञान सांगण्याची आवश्यकता वाटली असणे शक्य नाही.

शंकराचार्यांचे अद्वैत तत्त्वज्ञान विवर्तवादावर व रामानुजाचार्यांचे विशिष्टाद्वैत परिणामवादावर आधारलेले होते. विवर्तवादात जीव आणि जगत हे ब्रह्मस्वरूपावरचे विवर्त मानले गेल्यामुळे त्यात सर्व देवतांना परमेश्वरस्वरूप प्राप्त होते, म्हणजे कोणत्याही देवतेची केलेली उपासना अखेरीस परमेश्वराची उपासना होते. परिणामवादात जीव आणि जगत ह्या स्वतंत्र वस्तू मानलेल्या असल्या, तरी त्या ईश्वरस्वरूपातून परिणाम पावतात म्हणजे कार्यान्वित होतात. चक्रधराच्या तत्त्वज्ञानाची पायरी याच्या पुढची आहे. तो ईश्वराला पूर्णपणे स्वतंत्र मानतो आणि अद्वैत किंवा विशिष्टाद्वैत खोटे ठरवून द्वैताचा पूर्ण स्वीकार करतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पंथाचे मूळ नाव – महानुभाव पंथाची अनेक नावे आहेत, ती पुढीलप्रमाणे – (१) महानुभाव पंथ (२) महात्मा पंथ (३) अच्युत पंथ (४) जयकृष्णी पंथी (५) भटमार्ग व (६) परमार्ग. एकाच पंथाला ही वेगवेगळी नावे का पडली आणि त्याचे खरे मूळ नाव कोणते, या मुद्याची संशोधकांनी जी चर्चा केली आहे, तिचा सारांश पुढीलप्रमाणे –

(१) महानुभाव – याचा खरा अर्थ होतो, तो असा – 'महान् अनुभावः तेजः बलं वा यस्य स महानुभावा' (= मोठा अनुभाव म्हणजेच तेज किंवा बल ज्याचे, तो महानुभाव अर्थात् महान तेजस्वी व शक्तिशाली पुरुष होय.) अनेक संस्कृत व प्राकृत कवींनी याच अर्थाने हा शब्द वापरला आहे. चक्रधराचा पंथ स्थापन झाला त्या काळी त्याला महानुभाव हा शब्द लावला जात नव्हता. पण निरंजन माधवाने पंथांची गणना सांगताना महानुभाव असा पंथ या अर्थी तो शब्द वापरला आहे. त्यावरून निरंजन माधवाच्या काळात हा पंथ महानुभाव या संज्ञेने ओळखला जाऊ लागला, असे दिसते. अर्थात महानुभाव हे या पंथाचे मूळ नाव नव्हे.

(२) महात्मा – चक्रधराचे अनुयायी परस्परांना महानुभाव म्हणत; तसेच महात्मा या पदवीनेही संबोधीत. सिद्धांत सूत्रपाठात हा शब्द अनेक वेळा आलेला आहे. चक्रधराच्या अनुयायांना महात्मा हीच उपाधी लावली जात असल्यामुळे कोण्या एका काळी तो पंथ महात्मा पंथ या नावानेही ओळखला जात असावा; पण तेही त्याचे मूळ नाव नसावे. प्रा. कोलते म्हणतात, की सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात हे नाव प्रचलित झाले असावे आणि ते वामनपंडित व मध्वमुनीश्वर यांच्या काळापर्यंत रूढ असावे.

(३) अच्युत पंथ – चक्रधराने एकदा आपल्या अनुयायांना, 'तुम्ही अच्युत गोत्रीयं कीं गा : तुम्हां परस्परें परम प्रीती होआवी' (आचारस्थळ १३६), असे म्हटले होते. त्यावरून त्याच्या अनुयायांना अच्युतपंथी म्हणत असावे, असे दिसते.

(४) जयकृष्णी – पंजाब – पेशावरकडे प्रचलित असलेल्या या पंथाला श्रीकृष्ण देवतेचा उपासक या नात्याने हे नाव प्राप्त झाले. हे नाव इ. स. च्या १६ व्या शतकाच्या नंतरचे असल्यामुळे तेही पंथाचे मूळ नाव नव्हे.

(५) भटमार्ग – नागदेवाचार्य हा चक्रधराचा महान शिष्य होय. पंथात त्याचे स्थान फार मोठे आहे. पंथाचे अनुयायी याला प्रतिचक्रधर समजतात. त्याला भट अथवा भटोबास असे म्हणत. ज्या काळात नागदेवाचार्याचे व्यक्तिमाहात्म्य वाढले आणि त्याचा शब्द हा जणू चक्रधराचाच शब्द, असे समजले जाऊ लागले, तेव्हा पंथाला भटमार्ग असे म्हणू लागले. रामदेवाची राणी कामाइसा हिच्या तोंडी पुढील वाक्य आहे – 'मज भटमार्गीचा उपदेसु असे :' त्यावरून नागदेवाचार्याने वाढवलेल्या या पंथाला भटमार्ग असे नाव पडले असावे. तेही मूळ नाव नव्हे.

(६) परमार्ग – परमार्ग हेच पंथाचे मूळ नाव असले पाहिजे व इतर नावे त्याला देशकालपरत्वे प्राप्त झाली असली पाहिजेत. खुद्द चक्रधराच्या मुखातून स्वतःच्या संप्रदायाचा मार्ग म्हणूनच उल्लेख होत असे. 'या मार्गासि दत्तात्रेयं प्रभु आदिकारण :' असे तो म्हणतो. स्मृतिस्थळातही 'पंडितासि ये मार्गीचा उमटु जाला गा :' असे वचन आढळते. महानुभावीय महंत आपल्या धर्माला परधर्म व शास्त्राला परशास्त्र म्हणतात. खुद्द चक्रधरानेही 'परधर्म म्हणजे तुमचे जीवन कीं गा' असा उद्‌गार काढला आहे (सिद्धांतसूत्रपाठ, आचारमालिका ८६). इथे पर शब्द परमेश्वर या अर्थी आहे. पराचा अर्थात ईश्वराचा अर्थात त्याच्या प्राप्तीचा जो धर्म तो परधर्म किंवा परमार्ग होय. केसोबास, दामोदर पंडित, नारायणबास, इ. महानुभावीय ग्रंथकारांनी परमार्ग हा शब्द अनेक वेळा आपल्या संप्रदायाला उद्देशून वापरला आहे. यावरून प्रस्तुत पंथाचे मूळ नाव परमार्ग हेच असावे, असा निष्कर्ष निघतो.

प्रस्तुत पंथाची गुरुपरंपरा दत्तात्रेय– श्रीकृष्ण – द्वारावतीकर चांगदेव राऊळ – गुंडम राऊळ अर्थात गोविंद प्रभू – चक्रधर अशी आहे. सूत्रपाठांत या सर्वांचा उल्लेख आहे. या पाच पुरुषांना पंचकृष्ण या नावाने ओळखले जाते. हे परमेश्वराचे अवतार असून, पंथानुयायांचे तेच उपास्य होत.

प्रार्थना आणि प्रसादसेवा – महानुभावांच्या प्रार्थनेत पंचकृष्णांना स्थान असले, तरी चक्रधराची प्रार्थना ते पुढील वाक्यांनी करतात–

जए जए जी : इश्वरा श्रीचक्रधरा :
सच्चिदानंदस्वरूपा देवा : मी आनादीचा
अपवीयु गा : श्रीचक्रधरा : आज्ञानें :
अन्यथाज्ञानें अपवीयु : स्वोक्ति : शास्त्रोक्ति :
लोकोक्ति : अपवीयु : अभिलासें
अपवीयु : अहंता ममता अपवीयु :
कामक्रोधी अपवीयु : मदमच्छरीं अपवीयु :
रागद्वेषीं अपवीयु : आणि श्रुष्ठाश्रुष्ठीचा
प्रमादिया : गा श्रीचक्रधरा : आतां
ए सृष्टीमध्यें तु एक वांचौनि : आणिक
काइसेनही पवित्र नव्हे गा जी चक्रधरा :
आपुलेनि दर्शनें : स्पर्शनें : संभासणें :
अवलोकनें : अंतष्करणें माते अपवीत्रातें
पवित्र कीजो गा श्रीचक्रधरा :

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सगुण ईश्वरावताराच्या उपासनेला महानुभाव पंथात श्रेष्ठ स्थान आहे. त्या अवताराशी संबद्ध असलेल्या सर्व चराचर वस्तू पवित्र मानून त्यांचीही ते उपासना करतात. ज्या प्रापंचिक पदार्थांना ईश्वरावताराने संयोग – संबंध दिला, त्या पदार्थांना ते संबंध म्हणतात. त्यांना वंदन करणे म्हणजे त्या ठिकाणी निक्षेपिलेल्या कृपाशक्तीची प्रार्थना करणे होय. अशा संबंधी वस्तूंना स्थूल मानाने प्रसाद असे मानतात. चक्रधरांनी ज्या वस्तू वापरल्या त्या सर्व प्रसाद होत. त्यांचे नित्य स्मरण करणे हा महानुभावीयांच्या प्रार्थनेचा एक महत्त्वाचा भाग असतो. त्या वस्तू अशा– पांचवर्णि जाडि : सोरठी जाडी : चवरी : घोंगडे : सकलादेचें टोपरें: हें मुख्य करुनि जेतुलियासि रोमांसि संबंधु जाला : तेतुलेयांसि माझें दंडवत :

प्रसादसेवेप्रमाणेच अवताराच्या मूर्तीचे व त्याने केलेल्या नानाविध क्रीडांचे ध्यान करणे हाही एक भाग प्रार्थनेच्या पोटी असतो. नामस्मरणाला तर विशेषच महत्त्व असते. चक्रधर म्हणतो–

साकारापासौनि नामः मूर्ती :
नीराकारापासौनि लीळा : चेष्टा :
म्हणौनि साकारा नीराकारा नामचि कारण
नाम आठवीजे : स्मरीजे : ध्याइजे
तैंचि या सर्वसारापासौनि मूंचिजे :

परमेश्वराच्या आनंदमय स्वरूपाची प्राप्ती हे या पंथाचे ध्येय असून, ज्ञान आणि प्रेम ही त्याची मुख्य साधने होत. ही साधने आचरीत असता अंतर्बाह्य शुद्धी होते. पावित्र्याचा प्रसाद प्राप्त करून घेण्यासाठी नामस्मरण, मूर्तिध्यान व प्रसादसेवा यांच्या साहाय्याने प्रार्थना करणे त्यांना अगत्याचे वाटते.

वैदिक की अवैदिक – चक्रधराने आपले तत्त्वज्ञान व उपदेश सांगण्यासाठी आपल्या ग्रंथात श्रीकृष्ण, व्यास, शुक, वसिष्ठ, नारद, उद्धव, इ. विभूतींचा व वेद, उपनिषदे, पुराणे, गीता, भागवत, इ. ग्रंथांचा आधार घेतला आहे. भगवद्‌गीता ही तर चक्रधराने प्रमाणभूतच मानली आहे. गीतेतली वचने चक्रधराने 'श्रीमुखोक्त' ठरवली आहेत, त्यामुळे महानुभावांना ती चक्रधराच्या वचनाइतकीच पूज्य वाटतात. पण हा पंथ साक्षात वैदिक नसून परंपरेने तो वैदिक आहे, असे म्हणता येईल. प्रा. कोलते यासंबंधात लिहितात, ते असे–

ईश्वरप्राप्तीचे साधन म्हणून श्रीचक्रधरस्वामींना वेदानुयायित्व मान्य नाही आणि ईश्वरज्ञानाचे साधन म्हणून त्यांना वेद प्रमाण नाहीत, ही गोष्ट आता स्पष्ट झालेली आहे. अर्थात श्रीचक्रधरस्वामी आणि त्यांनी स्थापन केलेला महानुभाव पंथ अवैदिक आहेत यात शंका नाही. तथापि, श्रीचक्रधरस्वामी 'वैदिक' नसले तरी त्यांनी वेदांना वि[रोध] केलेला आहे, त्यांचा अनादर किंवा उपहास केलेला आ[हे] असे मात्र नाही. देवता या परमेश्वराहून भिन्न आहेत, परमेश्वर नाहीत आणि म्हणून आत्यंतिक मोक्षप्राप्तीक[रिता] त्यांची उपासना करण्यात अर्थ नाही, या दृष्टीने त्यांनी दे[व]तांची व्यावृत्ति केलेली असली तरी देवता या परमेश्वराच्या शक्ती असल्यामुळे त्यांचा यथायोग्य आदर त्यांनी स[दैव] ठेवला आणि आपल्या अनुयायांनाही तो ठेवण्यास सांगितले.

पंथाचे तत्त्वज्ञान – शंकराचार्यांनी ब्रह्म हा एकच पदा[र्थ] नित्य मानला असून, जीवजगतादी पदार्थांना अनित्य व मा[यिक] म्हटले आहे. चक्रधराने मात्र जीव, प्रपंच, देवता व परमेश्व[र] हे चार पदार्थ स्वतंत्र व अनादि-अनंत मानले आहेत. यां[पैकी] प्रत्येक पदार्थ इतरांपासून स्वतंत्र असून, त्या दोहोंचे ऐ[क्य] कधीच होत नाही, या चक्रधराच्या भूमिकेमुळे त्याला पूर्ण द्वै[ती] असे म्हणणे योग्य ठरेल. या चारांचे विवरण असे–

जीव – जीव हा सर्व दोषांचे माहेरघर असला, तरी त्या[ला] जशी संगती लागेल तसा तो होतो. जीव उपाधींमुळे दोष[युक्त] जीव हा बद्धमुक्त आहे. अविद्येच्या बंधांमुळे त्याला ब[द्धता] यते; पण त्यापासून मुक्त होऊन ईश्वरस्वरूपाचा आ[नंद] उपभोगण्याची पात्रता त्याच्या ठिकाणी असते. परमेश्वर त्या[ला] बद्धावस्थेतून मुक्त करतो. संहारकाली मायेच्या एका भा[गात] असणाऱ्या अंधकारात तो मग्न असतो. परमेश्वरप्रवृत्तीप्र[माणे] माया जीवाला 'चैतन्यमहम्' अशी प्रवृत्ती देऊन त्या तम[ातून] बाहेर काढते. जीव प्रपंचाशी समरस झाल्याने जीवाला अन्[य] ज्ञानादी मळ लागतात. मग तो स्वर्ग, नरक, कर्मभूमी, मो[क्ष] इ. फळे भोगतो.

प्रपंच – याचे कारणप्रपंच व कार्यप्रपंच असे दोन [भेद] मानले आहेत. पहिला अव्यक्त आणि नित्य व दुसरा [व्यक्त] आणि अनित्य असतो. अव्यक्त असणारी पंचमहाभूते व त्रिगु[णी] म्हणजेच कारणप्रपंच होय. व्यक्त पंचमहाभूते व त्रिगुणी म[हत्] कार्यप्रपंच होय. तो सृष्टिकाली गंधर्वनगरीच्या हत्ती[प्रमाणे] भासमान होतो आणि संहारकाली अदृश्य होतो; म्ह[णजे] कारणप्रपंचात विलीन होतो. कार्यप्रपंच हा जड व अ[नित्य] असून, तो जीवाशी कधी संलग्न तर कधी जीवापासून अ[लग] असतो. त्याची नाना रूपे असल्यामुळे तो अनंत[रूपी] आहे.

देवता – जीवाप्रमाणे देवताही जातिस्वरूपाने एक; [पण] वास्तवात अनेक आहेत. देवतांचे नऊ समूह किंवा थोवे अ[सून] त्यांची संख्या प्रत्येक ब्रह्मांडात ८१ कोटी ११ लक्ष १० ह[जार] आहे. त्यांची समूहातील संख्या व स्वरूपमर्यादा पुढीलप्र[माणे]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(१) कर्मभूमीच्या देवता – १३ कोटी. प्रत्येक देवतेची स्वरूपमर्यादा ५०० योजने.

(२) अष्टौ देवयोनी–१३कोटी. स्वरूपमर्यादा ५००० योजने.

(३) अंतराळ – १३ कोटी. स्वरूपमर्यादा ५०००योजने.

(४) स्वर्ग – ३३ कोटी. स्वरूपमर्यादा ५ लक्ष योजने.

(५) सत्य – कैलास – वैकुंठ – ९ कोटी. स्वरूपाची मर्यादा ५० लक्ष योजने.

(६) क्षीराब्धी – १. लक्ष. स्वरूपमर्यादा ५ कोटी योजने.

(७) अष्टभैरव – आठ. स्वरूपमर्यादा ५० कोटी योजने.

(८) विश्व – एक. स्वरूपमर्यादा ५०० कोटी योजने.

(९) माया – एक. स्वरूपमर्यादा अगणित.

वरील नऊ देवतासमूहांमध्ये उच्च-नीच क्रमही आहे. सर्वांत खालचा थर कर्मभूमीच्या देवतांचा असून, माया ही सर्वोच्च आहे. पाचव्यातले ब्रह्मा, विष्णू, महेश व सातव्यातले अष्टभैरव मात्र समान आहेत. या सर्व देवता नित्यबद्ध आहेत. त्यांना मुक्ती कधीच मिळत नाही. जीवांना त्यांच्या बऱ्यावाईट कर्मांची फळे देणे हे त्यांचे कार्य होय.

परमेश्वर – अद्वैत वेदान्तात ब्रह्म हे अंतिम सत्य असून, ईश्वर हे त्याचे सोपाधिक अर्थात गौण स्वरूप असते. महानुभावांचे याच्या उलट आहे. ते ईश्वर मुख्य व ब्रह्म गौण मानतात. त्यांच्या मते ब्रह्म ईश्वराच्या अंतर्गत असणारा एक भाग होय. ईश्वर हा अनादी, नित्य, अव्यक्त, स्वयंप्रकाश, सर्वव्यापक, ज्ञानमय, आनंदमय, सर्वसाक्षी व सर्वकर्ता आहे. त्याच्या ठिकाणी परस्परविरुद्ध धर्म राहतात. उदा० तो अविक्रिय असून सर्वकर्ता व निर्गुण असून सगुण आहे. जीवाच्या उद्धारासाठी तो अवतार घेतो.

हे अवतार तीन प्रकारचे असतात –(१) अवरदृश्यावतार (२) परदृश्यावतार व (३) उभयदृश्यावतार.

ज्याने फक्त अवरशक्ती स्वीकारली तो पहिला, परशक्ती स्वीकारली तो दुसरा व दोन्ही शक्ती स्वीकारल्या तो तिसरा. हाच मनुष्यदेह धारण करून जीवांचा उद्धार करू शकतो. दत्तात्रेय, श्रीकृष्ण व चक्रधर हे उभयदृश्यावतार आहेत.

अवतारांचे आणखी तीन प्रकार आहेत, ते असे–(१) गर्भावतार (२) दवडण्याचा अवतार व (३) पतितावतार. पहिल्याचा अर्थ मातेच्या उदरात जन्म घेणे. उदा० श्रीकृष्णावतार. दुसऱ्याचा अर्थ वाढत्या गर्भाला दवडून म्हणजे दूर करून त्या जागी अवतार स्वीकारणे. उदा० श्रीगोविंदप्रभूंचा अवतार. तिसऱ्याचा अर्थ एखाद्या मृत मनुष्याच्या शरीरात प्रवेश करून अवतार घेणे. चक्रधर हा तिसऱ्या प्रकारचा पतितावतार आहे. त्याने हरपाळदेवाच्या मृत शरीरात प्रवेश करून अवतार घेतला.

ईश्वर व त्याचे अवतारयांच्याविषयी चक्रधराची काही सूत्रे अशी–

जीव, प्रपंच व्यतिरिक्त सच्चिदानंद स्वरूप परमेश्वरु एक आतिः तो सर्वशक्तियुक्तः प्रतिसृष्टी परमेश्वरु अवतरेतिः अनंत अवतारः सकळहि अवतार देहधर्म स्वीकारीतिः गर्भ स्वीकारतिः कां पतितांतें उठवीतिः का जीवांतें ववडीतिः

अवताराचे कार्य म्हणजे जीवाला शाब्दिक ज्ञानाचा बोध करून जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर यांचे खरे स्वरूप सांगणे हे होय. जीवाने ईश्वरस्वरूप ज्ञानाने ओळखायचे आहे. ज्ञान हे शाब्द, अपरोक्ष, सामान्य व विशेष असे चार प्रकारचे आहे. ईश्वराने जरी शाब्द ज्ञान दिले तरी तेवढ्याने तो ज्ञानी मोक्षमार्ग आक्रमीत आहे, असे म्हणता येणार नाही. त्यासाठी ईश्वराचे अनुसरण पाहिजे. हे अनुसरण संपत्तीचा मोह, स्त्री-पुरुषांची ममता आणि सर्वसंगपरित्याग करून झाले पाहिजे. मोक्षाचा दुसरा मार्ग हा प्रेममार्ग आहे. प्रेम म्हणजे भक्ती. परमेश्वरच जीवनामध्ये प्रेमशक्तीचा संचार करतो. या संचारानंतर साधकाचे संकल्प-विकल्प नष्ट होऊन तो परमेश्वराला अनुसरतो. भक्ताला या अनुसरणाने जो आनंद होतो तो म्हणजे दुसरी स्वतंत्र वस्तू नसून स्वतः ईश्वर जो आनंद उपभोगीत असतो तोच तो आनंद होय. मुंगी जशी साखरेपासून वेगळी राहून साखरेची गोडी चाखते, त्याप्रमाणे भक्त परमेश्वरापासून वेगळा राहून त्याचा आनंद उपभोगतो. ज्ञान व प्रेम या दोहोंत प्रेम हे सुलभ आहे. ज्ञान हा ईश्वराचा बहिरंग आहे, तर प्रेम हा त्याचा अंतरंग आहे. प्रेमी जीवाला शारीरिक कष्टादिकांचा आचार सहन करावा लागत नाही. तो त्याच्या प्रेमानेच सहजपणे उद्धरून जातो. मात्र दोहोंच्या तुलनेने ज्ञानमार्ग अधिक कष्टाचा आहे. कारण ज्ञान झाल्यानंतर त्याला आपल्या मळकर्मांचा नाश करण्यासाठी ‘असती परीचा’ खडतर आचार पाळावा लागतो. ही असती परी म्हणजेच महानुभावांचा आचारधर्म होय.

असती परी – चक्रधरांनी आपल्या तत्त्वज्ञानाला अनुसरून विशिष्ट असा आचारधर्म शिष्यांना उपदेशिला आहे, त्याला असती परी असे नाव आहे. असती म्हणजे असण्याची अथवा वागण्याची, परी म्हणजे रीत होय. साधकाने कशा रीतीने वागावे अर्थात कोणते विधि-निषेध पाळावे यांविषयी सांगितलेला धर्म तो आचारधर्म होय. हा आचारधर्म केवळ ज्ञानमार्गियांसाठी आहे. जीवाला ईश्वराचे ज्ञान झाल्यानंतर तो किंवा सगळेच ज्ञानी, ज्ञान झाल्यानंतर परमेश्वराला अनुसरतातच असे नाही. अनुसरणारा हजारोंतून एखादाच. ‘जेतुकेया ज्ञान तेतुके अनुसरति ऐसे नाही : अनुसरति ते मनुष्याणां सहस्रेषु :’ (लक्षणस्थल उद्ध. २२).

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्ञान झाल्यानंतर सर्वसंगपरित्याग करून एखाद्या लहान लेकराप्रमाणे पूर्णपणे परमेश्वराधीन होणे आणि त्याने सांगितलेला आचार पाळणे याचे नाव अनुसरण. ' एथ अधिनु होइजेः एथौनि भणितलें कीं जें तें अनुसरण : '(आचार स्थळ २८३). हे अनुसरण करतांना पुढील द्वादश धर्मांचा त्याग करणे आवश्यक असते--(१) देशधर्म – देशातील विशिष्ट रीतिरिवाज (२) ग्रामधर्म (३) जातिधर्म (४) कुळधर्म (५) वर्णधर्म (६) आश्रमधर्म (७) पुराणधर्म – पुराणात सांगितलेले आचार, जयंत्या, संक्रांत, व्यतिपात वगैरे (८) आगमधर्म – हठयोग, शाक्तसंप्रदाय, नवचंडी, अघोरकर्म वगैरे (९) प्रवृत्तिधर्म (१०) निवृत्तिधर्म – अन्यमार्गी संन्यासी वगैरेंचे (११) युगधर्म आणि (१२) राज्यधर्म.

याशिवाय विधि – विषयांचा त्यागही आवश्यक आहे. विधी म्हणजे कर्मराहाटीतील विधी. उदा० यजनयाजन, अध्ययन-अध्यापन, दानप्रतिग्रह, स्नानसंध्या, अघमर्षण, श्राद्धपक्ष, पर्वणी वगैरे आणि विषय म्हणजे पंचेंद्रियांचे उपभोग्य पदार्थ. उदा० अष्टभोग, स्त्रीपुरुषसेवन, वगैरे. ' रागः द्वेषः कामः क्रोधः मदः मत्सरः यांचा त्यागु याचि नावे संन्यासुः ' (आचार १७७).

त्यागाचे चार प्रकार आहेत ते असे –

(१) मळत्याग – परमेश्वराचे ज्ञान होताच आपले सर्वस्व हा मळ समजून त्याचा तत्काळ त्याग करणे. असा ज्ञानी सात्त्विक असतो. उदा० महिंभट्ट.

(२) अनिष्टत्याग – अष्टभोगांचा त्याग करणारा हा राजस असतो. उदा० नागदेवाचार्य

(३) स्वतेवत्याग – ज्याला निमित्तापगमामुळे म्हणजे दैववशात संसारादी विषय व स्त्रीपुत्रधनादिक नष्ट झाल्यामुळे जो आपोआपच त्याग घडतो, तो स्वतेवत्याग होय. असा ज्ञानी तामस असतो. उदा० ब्राह्मण गावची राणाइसा नावाची चक्रधर-शिष्या.

(४) कुष्टिवासनात्याग – शरीर कुष्टादी रोगांनी जर्जर झाल्याने एखाद्याचे नातेवाईक त्याला हाकलून देतात आणि मग तो ईश्वराला अनुसरतो. उदा० कोड झालेला एक व्यापारी.

विधि-निषेधांचे पालन – परमेश्वराने जे करायला सांगितले, तो विधी आणि करू नये म्हणून सांगितले तो निषेध होय. नित्य विधी आणि निमित्त विधी असे विधींचे दोन प्रकार आहेत. अटन-विजन (संचार आणि एकांत) भिक्षा-भोजन, स्मरण-प्रसादसेवा आणि निद्रा या गोष्टी नित्य विधीत येतात. संग, सांघात, भेट व शुश्रूषा या गोष्टी निमित्तविधीत येतात. नित्यविधीपेक्षा निमित्तविधी श्रेष्ठ होय.

निषेधाचे चार प्रकार होतात, ते असे –– (१) अनिष्ट भोजनासाठी विहित असलेल्या पदार्थांव्यतिरिक्त पदार्थ. (उदा० मीठ, मिरची, इ.) (२) अविधी (ज्या क्रि... जीवाला दुःख होते व ईश्वराला खंती येते अशी क्रिया) (३) हिंसा (अन्न शिजविताना होणारी जंतूंची हिंसा व इतर) आणि (४) अन्यधर्म (देवतांचा धर्म आचरणे.)

विषयलोभ त्याज्य. सर्वांत मोठा विषय म्हणजे स्त्री. चक्रधर म्हणतो–'स्त्री भणिजे मत्त द्रव्याचा राओ गाः आणि द्रव्यें सेविलियां माजवीति : स्त्रीदर्शनमात्रेंचि माजवी :'

साधकाने कुठे वास्तव्य करावे यात्रिषयी चक्रधर म्हणतो– 'महाराष्ट्रीं असावें : मातापुरा कोल्हापुरा न वचावें :' (कारण तिथल्या देवता विघ्न निर्माण करतात.) भिक्षाटनास जाताना 'देशाच्या शेवटीं झाडातळीं जन्म क्षेपावें :' 'एका झाडाची ... न होआवि :' 'एका स्थानाची सवे न होआवि :' भोगस्थानीं न बैसावें : लेपाचां देऊळिं न बैसावें : वोळखतेया घरां न वचावें तोरणमंडळाचेया घरां न वचावें : ' मिळालेली भिक्षा केवळ प्राणधारणेपुरतीच खावी. ' प्राणांसि आहारु देआवाः इंद्रियांसि नेदावा : ' चांगल्या रुचकर अन्नाची चटक वाईट.

साधकाने पहाटे उठावे. कारण ' तो सारस्वत काळु : देवा हृदयासि ये :' साधकांनी परस्परांशी परम प्रीतीने वागावे. चक्रधराचा संबंध ज्या ज्या स्थानांशी आला ते ते स्थान पवित्र मानावे. प्रियभाषी, सत्यभाषी व ऋजुभाषी असावे. ' देवो मा... मी देवाचा ऐसें या परि असीजो कीं : ' याशिवाय चक्रधरांनी सांगितलेल्या आणखी काही विधि-निषेधात्मक गोष्टी अशा--

निरंतर परमेश्वराची आर्ति करावी : निरंतर परमेश्वराचा विरहो भावावा : किंचित दुःखे पाप नासे : आनंदे पुण्यराशि नासेति : परमेश्वरालागीं रंका होआवें : निर्धूम नगर जाले भिक्षे रिगीजे : भिक्षे पडिला हातीं घेईजे : आला विखो पां हानावा : भिक्षा मागोनि नदियां तीरीं भोजन कीजे : जेविता आवडी नावडी न होआवी–देहाची अनास्था होआवी... क्रोध... ज्ञानीं आचारें इंद्रियधर्म पातळ होति : पुजा पुरस्कारु न स्वीकारावें : स्तुतिपर वैराग्य न करावें : संपन्नांचा घरीं न बसावें विषयाचा संगु न करावा : जेतुला जेतुला प्रपंची जडे तेतुला तेतुला ईश्वरीं उजेडे : जेतुल जेतुल प्रपंची उजडे तेतुल तेतुल ईश्वरीं जडे :

कृष्णवस्त्रे – महानुभाव लोक कृष्ण वस्त्रे परिधान करतात. चक्रधराची तशी आज्ञा आढळत नाही; पण तशी रूढी मात्र पडली आहे. याविषयी महानुभाव संशोधक श्री. य. खु. देशपांडे माहिती देतात, ती अशी––

या पंथाने ऐन यवन बादशाहीत आपल्या धर्माचे मोठ्या कुशलतेने रक्षण केले. त्या काळी हिंदुधर्मियांवर मुसलमानांनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जेझिया (डोईपट्टी) या नावाचा कर बसविला होता. परंतु या महानुभाव मंडळींनी या यवन राजांकडून मोठ्या कुशलतेने डोईपट्टीमाफीच्या सनदा मिळविल्या. तवपर्यंत महानुभाव काषायवस्त्र परिधान करीत असत. तथापि जेझिया कर माफीसंबंधी व यवनांनी नागेगोसावी इ. हिंदू साधुलोकांवर जो गहजब उडविला त्यापासून अलिप्त राहता यावे म्हणून महानुभावांनी काषायवस्त्र टाकून देऊन काळी वस्त्रे धारण केली. एवढेच नव्हे तर जेझिया माफीच्या बादशाही सनदेत काळी वस्त्रे (शाहपाश) धारण करणारे हे शब्द लिहवून घेतले. या जेझिया कर माफीवरूनही इतर हिंदूंच्या मनात महानुभावीयांसंबंधाने किल्मिष उत्पन्न झाले. हल्ली जेझियासारख्या करांची भीति नसल्यामुळे महानुभावांनी पुन्हा पूर्वीची काषायवस्त्रे धारण करण्याचा उपक्रम केला आहे.

मान्य ग्रंथ – सिद्धान्तसूत्रपाठ, लीळाचरित्र, पूजावसर, मूर्तिप्रकाश, इ. ग्रंथ हे महानुभावांना पूज्य आहेत. सिद्धान्तसूत्रपाठात चक्रधराची सूत्रे गोवलेली आहेत. लीळाचरित्र हे चक्रधराचे चरित्र असून, ते माहिंभट्टाने लिहिले आहे. पूजावसर ग्रंथात चक्रधराची दिनचर्या वर्णिली आहे. भावे देवव्यास हा त्याचा कर्ता होय. मूर्तिप्रकाश हा ग्रंथ केशव व्यास याने लिहिला असून, त्यात चक्रधराचे वर्णन आहे.

याशिवाय या पंथात पुढील सात ग्रंथ सातीग्रंथ या नावाने प्रसिद्ध असून, तेही पवित्र मानले जातात. या ग्रंथांची नावे व त्यांचे कर्ते यांची तालिका अशी :–

(१) शिशुपालवध – कवीश्वर भास्करभट उर्फ भानुभट बोरीकर (शके ११९५)

(२) एकादशस्कंध – कवीश्वर भास्कर (शके ११९६)

(३) वस्त्रहरण – दामोदरपंडित (शके १२००)

(४) रुक्मिणीस्वयंवर – नरेंद्रकवी (शके १२१०)

(५) ज्ञानप्रबोध – विश्वनाथ बाळापूरकर (शके १२५३)

(६) सैह्याद्रि-वर्णन – रवळो व्यास (शके १२५४)

(७) ऋद्धिपूरवर्णन – नारो व्यास उर्फ नारायण पंडित बहाळे (शके १२८५)

आम्नायभेद – महानुभाव आचार्य आम्नाय शब्द शाखाभेद या अर्थाने वापरतात. चक्रधराचा शिष्य नागदेवाचार्य हा त्या पंथात एक मोठा कर्तबगार पुरुष होऊन गेला. त्याच्या हयातीत महानुभावांच्या गुरुकुलाची व्यवस्था पद्धतशीर व शिस्तीची होती व कोणालाही पंथात प्रवेश मिळवायचा झाल्यास त्याला नागदेवालाच शरण जावे लागे. तोच सर्वांना पंथाची दीक्षा देई. पण त्याच्या मृत्यूनंतर ही व्यवस्था विघडली आणि नागदेवाचे जे अनेक शिष्य होते, त्यांनीही स्वतःची शिष्यपरंपरा वाढविण्यास सुरुवात केली. यामुळे प्रत्येक महंताच्या अनुयायी वर्गात आपापल्या गुरूविषयी अहंकाराचे बीज पेरले गेले. त्यातून जे भेद उत्पन्न झाले, त्यांच्या तेरा शाखा बनल्या व तेरा आम्नाय या स्वरूपात त्या प्रचलित झाल्या. या आम्नायांची नावे अशी – (१) उपाध्ये (२) कवीश्वर (३) पारिमांडल्य (४) अमृते (५) मदालसा (६) कुमार (७) यक्षदेव (८) दामोदर (९) हरिदेव (१०) जयदेव (११) साळकर (१२) दिवाकर व (१३) महेश्वर.

या सर्व आम्नायांपैकी उपाध्ये व कवीश्वर हे दोनच आम्नाय सांप्रत विशेष प्रचलित आहेत. उपाध्ये आम्नाय जानोपाध्ये यांची पुतणी कमळाइसा हिने प्रवर्तित केला. तिचे सहा प्रमुख शिष्य होते. त्या सर्वांच्या परंपरा आजतागायत चालत आल्या आहेत. बीडकर, धाराशिवकर, सेवलेकर, पाचराऊत, पातुरकर व अकुलनेर या महंतांच्या गाद्या उपाध्ये आम्नायांच्या आहेत.

कवीश्वर बास याचा शिष्य परशराम बास याच्यापासून कवीश्वर आम्नाय सुरू झाला. आपल्या जवळ असलेल्या चक्रधराच्या दाढेच्या व नखांच्या अवशेषांची व प्रसादवस्त्रांची विभागणी या परशराम बासानेच केली. या आम्नायांची शाखा नंतर फार विस्तारली. कारंजेकर व दर्यापूरकर महंतांच्या गाद्या या आम्नायाच्या आहेत. वरील दोन्ही आम्नायांत तात्त्विक भेद तर आहेतच, शिवाय बाह्याचरणाचे भेदही आहेत. बाकीचे ११ आम्नाय आतापर्यंत केवळ नामशेष होते; पण अलिकडे महानुभावी महंतांनी त्यांचा जीर्णोद्धार केला आहे.

इतिहास – सुमारे सहाशे वर्षांपूर्वी हा संप्रदाय महाराष्ट्रात प्रवर्तित झाला. त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीत ज्या अनेक गोष्टी दुष्ट आणि कालबाह्य ठरल्या होत्या, त्यांवर प्रहार करून या पंथाने आचारधर्माचा एक नवा प्रवाह निर्माण केला. चक्रधराला नवा संप्रदाय सुरू करण्याचा अभिनिवेश नसावा असे दिसते. कारण त्याने गीता, उपनिषदे, इ. ग्रंथांतील द्वैतात्मक तत्त्वज्ञानाला अनुसरून एक मार्ग प्रवर्तित केला एवढेच. नागदेवाचार्यांच्या काळापासून त्या मार्गाला पंथाचे स्वरूप प्राप्त झाले. चक्रधराने आपल्या शिष्य–शिष्यिणींना कोणाला ज्ञानमार्ग तर कोणाला भक्तिमार्ग उपदेशिला. चक्रधराची काही वचने प्रवृत्तिपर असली तरी, महानुभावांचा मार्ग हा प्रवृत्तिपर नसून निवृत्तिपरच आहे. वैदिकधर्मियांत वेदाक्षरांना जे प्रामाण्य आहे, तेच या संप्रदायात चक्रधराच्या शब्दांना आहे. चक्रधराने वेदकालापासून उपास्य ठरलेल्या देवतांची उपासना त्याज्य ठरवून अनुयायांना निरुपाधिक ईश्वर आणि पंचकृष्ण हे त्याचे अवतार यांनाच उपास्य ठरविले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चक्रधराने आपल्या पंथात स्त्रीशूद्रादिकांना इतरांच्या बरोबरीने प्रवेश मिळवून दिला, त्याना मोक्षाचा अधिकार आहे असे त्याने घोषित केले; अच्युतपदप्राप्ती म्हणजे ईश्वराच्या आनंदाचे अधिकारी होणे हे मोक्षाचे स्वरूप ठरविले. चक्रधर हा द्वैती होता; त्यामुळे त्याचे शंकाराचार्यांपेक्षा मध्वाचार्यांच्या भूमिकेशी अधिक साम्य आहे.

चक्रधराने चातुर्वर्ण्याची कल्पना अमान्य केली; चातुर्वर्ण्यावर कठोर टीकाही केली. त्याने आपल्या शिष्यांना चारही वर्णांत भिक्षा मागायला परवानगी दिली. एका मातंगाने दिलेला लाडू त्याने स्वत: खाल्ला व शिष्यांनाही वाटला. एका प्रसंगी त्याने चांभाराच्या हातचाही विडा खाल्ला आणि एका प्रसंगी एका अस्पृश्याच्या घरी भोजनही केले. यावरून चक्रधराला अस्पृश्यता मान्य नव्हती हे कळून येते.

चक्रधराने स्त्रीपुरुषांना सर्रास संन्यास घेण्याची मोकळीक ठेवली. पण संन्यास ही सुळावरची पोळी असते. ती सर्वांनाच खाता येत नाही व पचविताही येत नाही. महानुभाव पंथातही तसेच झाले. संन्यास सगळ्यांनाच पेलला नाही. महानुभाव पंथ महाराष्ट्रात अप्रिय होण्यास जी कारणे घडली त्यांत हेही एक आहे.

शुचित्व अशुचित्व यांच्या परंपरागत कल्पनाही चक्रधराने टाकून दिल्या. विचारबंध या ग्रंथात म्हटले आहे, "उत्तम म्हणजे ब्राह्मण– आन आवम म्हणजे मातंग ऐसे म्हणे : परि तोहि मनुष्यदेही आत निष्पत्तिकारकचि असे : परि वृथा कल्पना करी."

स्त्रियांनी रजस्वला स्थितीत विटाळ पाळण्याची आवश्यकता नाही, असे त्याने महदाइसेला सांगितले. बाह्य शुचित्वापेक्षा अंतःशुचित्वाला चक्रधर विशेष महत्त्व देत असे. तो म्हणतो, 'मनिचे अभिलास निवर्तले तरि शुचि अशुचि ये दोन्ही नाहीं की ना एका :' (ली. च. उद्ध० ४३८).

चक्रधराने आणि त्याच्या अनुयायांनी मराठीला आपली धर्मभाषा मानले आणि तिचा अभिमान धरला; त्याचबरोबर महाराष्ट्राचाही अभिमान धरला. महानुभावांनी मराठीचे केवढ्या मोठ्या प्रमाणात संगोपन व संवर्धन केले ते त्यांच्या अफाट वाङ्मयविस्तारावरून सहज लक्षात येईल. महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे यांच्या अंदाजाप्रमाणे महानुभावांचा ग्रंथसमूह अंदाजे ६०० पर्यंत भरेल. या ग्रंथसमूहात गद्य, काव्य, कोश, व्याकरण, इ. अनेक विषयांवर ग्रंथ असल्यामुळे त्यांच्या वाङ्मयोपासनेचे वैविध्य कळून येते. नागदेवाचार्यांने चक्रधराचा उपदेश पंथातील पंडितांना संस्कृतबद्ध करू दिला नाही. कारण त्यामुळे पंथाचा अनुयायी स्त्रीवर्ग आणि साधी भोळी अशिक्षित माणसे ज्ञानाला वंचित होतील, असे त्याला वाटले. मराठी भाषेच्या प्रसारालाही महानुभाव पंथाची मदत झाली आहे. याविषयी प्रा. कोलते म्हणतात–

महानुभाव पंथ चिमुकल्या वऱ्हाडात स्थापन झाला असला तरी त्याचा प्रसार मात्र भरतखंडभर झाला आहे. प्रांतातील सारंगकोट शहरी राहणाऱ्या कृष्णराज नावाच्या क्षत्रिय गृहस्थाने पंधराव्या शतकात या पंथाची दीक्षा घेतली, त्यापासूनच हा पंथ हिंदुस्थानात फैलावला. सध्यातर काबूल कंदहार येथेही महानुभावांचे मठ आढळतात. पंथाच्या विस्ताराबरोबरच त्याची धर्मभाषा जी मराठी तिचाही अनायासे फैलाव झाला. पंथात प्रविष्ट झालेल्या अनुयायांना 'धर्म सूत्रपाठ' याचे अध्ययन अवश्य झाले. पूजाविधी देखील चक्रधराच्या मराठी भाषेतूनच होणे अधिक पुण्यकारक होते, कारणासाठी त्यांना मराठीचा अभ्यास करावा लागला. महानुभावांची धर्मभाषा असल्यामुळे मराठीचा फार फायदा झाला.

पण मोक्षमार्ग स्त्रीपुरुषांना खुला करणारा, शूद्र-चांडाळादिकांनाही आपल्या धर्ममार्गात प्रवेश देणारा आणि मराठी भाषेचा व महाराष्ट्राचा अभिमानी असणारा हा पंथ महाराष्ट्रात रुजला नाही आणि वाढला नाही, ही गोष्ट आश्चर्याची वाटते. महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे यांनी पंथाच्या अप्रियतेची काही ऐतिहासिक व काही सामाजिक कारणे सांगितली आहेत. मुसलमानी राज्यकर्त्यांकडून ... बळावर मिळविलेल्या काही खास सवलती, औरंगजेबासारख्या बादशहाने जेझिया कराची माफी देऊन हा पंथ अहिंदू असल्याचे केलेले शिक्कामोर्तब, इ. गोष्टी ही ती ऐतिहासिक कारणे होत. महानुभाव संन्याशांची भिन्न राहाणी, विटाळ-चांडाळ व शुचित्व–अशुचित्व यांबद्दलच्या कल्पना, त्यांची ... पद्धती व रूढ चाली-रीती पाळण्यातील शिथिलता, ही सामाजिक कारणे म्हणून श्री. भावे यांनी निर्देशिली आहेत.

डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी या पंथाच्या अप्रियतेचे ... चक्रधर व त्याचा गुरू गोविंदप्रभू यांच्या लोकविरुद्ध आचरणात असल्याचे सूचित केले आहे. सर्वांना न झेपणारा संन्यास ... विजनवासाचा उपदेश, अतिरेकी देहदंडन, कदन्न व ... यांवर निर्वाह, पंचकृष्णांव्यतिरिक्त इतर देवतांसंबंधी ... निषेध, इ. अन्य गोष्टीही संप्रदायाविषयी अप्रियता उत्पन्न होण्यास कारणीभूत ठरल्या. पंथाच्या आचार्यांनी वस्त्र, अन्न, ... भिक्षा, उपासना, इ. बाबतींतही बारिकसारिक तपशीलवार नियम घालून दिले. पंथातील पुढील आचार्यांना स्वत:चे ... चालविण्यास अवसरच उरला नाही. पंथाचार्यांनी जणू ... -धर्माचे नवीन कर्मकांडच अस्तित्वात आणले. ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भागवतधर्मीय संतांनी आपला भक्तिमार्ग सुलभ आणि सर्वसमावेशक केला, त्यामुळे महाराष्ट्रापुरती तरी या पंथाला उतरती कळा लागली. तत्त्वज्ञान आणि व्यवहार यांची त्यांना योग्य सांगड घालता आली नाही. त्यामुळे महानुभावांची ध्येये जरी उच्च होती तरी, त्यांचा पराभव झाला, असे प्रा. गं. बा. सरदार म्हणतात.

पुढे मुसलमान आणि नाथपंथी यांना भिऊन या पंथातील लोकांनी आपल्या पोथ्या सकळ नावाच्या गुप्त लिपीत लिहून बंदिस्त केल्या. त्यामुळे त्यांचे प्राचीन ग्रंथ अपपाठांपासून सुरक्षित राहिले हे खरे असले, तरी पंथानुयायी मात्र समाजापासून अलिप्त झाल्यासारखे झाले. एकनाथ आणि तुकाराम या संतांनीही या पंथावर कोरडे ओढले. त्यामुळे पंथाचे प्रसार–प्रचाराचे कार्य संपुष्टात आले.

पूजास्थाने – महानुभाव संप्रदायाची पूजास्थाने बीड, पैठण, आपेगाव, फलटण, त्र्यंबक, मढ, पिंपरी अरणगाव, भिंगार, रामदस, जोगेश्वरी, वेरूळ, इ. ठिकाणी आहेत. ती ओटे किंवा वोटे या स्वरूपात दिसतात. कित्येक ठिकाणी हे ओटे मंदिराच्या आवारातही आहेत. श्री. वि. ल. भावे म्हणतात, की मुसलमान राजवंशातील एका राजाकडून मुनिव्यास– पूर्वाश्रमीचे पंडित कमळाकर अयाचित कोठी– या उद्योगी व पाताळयंत्री पुरुषाने एका आज्ञापत्राचे फर्मान मिळविले आणि या आज्ञापत्राच्या जोरावर त्याने सर्व महाराष्ट्रभर महानुभाव पंथाचे ओटे उर्फ पूजास्थाने बांधिली.

पण भाव्यांचे हे मत डॉ. तुळपुळ्यांनी अमान्य केले आहे. ते म्हणतात, हे ओटे म्हणजे चक्रधरांची स्मृतिस्थळेच होत, अशी पंथियांची समजूत आहे. हे ओटे अनेक देवळांतून चक्रधरांच्या पूर्वीही होते. चक्रधरांचा त्यांच्याशी संबंध आल्याने पंथियांस ते पूज्य होऊन बसले इतकेच. पाहा – चक्रधर. [महानुभाव संशोधन १ – डॉ. वि. भि. कोलते, १९६२; म. सा.; महाराष्ट्रातील पाच संप्रदाय– श्री. पं. रा. मोकाशी; महानुभवीय मराठी वाङ्मय– श्री. य. खु. देशपांडे १९६०; प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (पूर्वार्ध)– डॉ. अ. ना. देशपांडे]

महान्यास

शरीराच्या बाह्य अवयवांवर मंत्रपूर्वक निरनिराळ्या देवतांचे आवाहन करणे, याला न्यास असे म्हणतात. रुद्र या देवतेसंबंधी जेव्हा एखादे अनुष्ठान करायचे असते, त्या वेळी महान्यास करण्याची पद्धत आहे. महान्यासात एकूण पाच वेळा मंत्र म्हणून डोक्यापासून पायांपर्यंत साधारणपणे तीस अवयवांना स्पर्श करतात. 'ॐ नमो भगवते रुद्राय' हा महान्यासातील प्रमुख मंत्र होय. रुद्राध्यायातील आणि इतर ठिकाणचे रुद्रासंबंधीचे काही मंत्र म्हणून प्रत्येक मंत्राने एकेका अवयवाला स्पर्श करीत डोक्यापासून पायांपर्यंतच्या अंगांना स्पर्श करतात. 'ॐ नमो भगवते रुद्राय' या मंत्रातील प्रत्येक अक्षर हे बीज समजून त्या बीजाने पुन्हा वरीलप्रमाणे न्यास करतात. नं, मों, भं, गं, वं, तें, रुं, द्रां आणि यं, ही ती बीजे होत. तिसरा न्यास हंसमंत्राने करतात. चौथा न्यास बीजपूर्वक एकेक मंत्र म्हणून करतात. नंतर 'विभूरसि ...' (तै. सं. १.३.३) इ. सोळा मंत्रांनी रौद्रीकरण करतात. पाचव्या वेळी पायाकडून डोक्याकडे स्पर्श करीत जावयाचे असते. यानंतर शिवसंकल्पसूक्त, पुरुषसूक्त, उत्तरनारायणसूक्त, अप्रतिरथसूक्त आणि शतरुद्रिय सूक्त या सूक्तांनी पंचांगन्यास करावयाचा असतो. शेवटी अष्टांग प्रणाम केल्यावर महान्यासाचा विधी पूर्ण होतो. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

महापराह्ण

एका विशिष्ट दिवसाचे नाव. महापराह्ण शब्दाचा अर्थ मोठी दुपार असा आहे. सूर्यप्रज्ञप्ती या ग्रंथात लिहिले आहे, की श्रावणातील सर्वांत मोठ्या दिवशी नवे वर्ष सुरू होत असे आणि हा दिवस खरोखरच महापराह्ण असे. कारण या दिवसाची रोजकीर्द त्या दिवशी बंद न करता पुढे अनेक दिवस चालू ठेवीत असत. सरकारी कार्यालयांतही त्या दिवशी उशिरापर्यंत हिशेब लिहिण्याचे काम चालत असे. महाभारतात (आदि. १८१.४०) महापराह्ण दिवसाचा उल्लेख केलेला आहे–

महत्यथापराह्णे तु घर्मे सूर्य इवावृतः ।

अर्थ – महापराह्णाच्या दिवशी (अर्जुन, कृष्णमृगचर्म पांघरलेल्या ब्राह्मणांच्या मधे) मेघांनी घेरलेल्या सूर्याप्रमाणे शोभला.

ही कल्पना वर्षा ऋतूतच ठीक बसते. त्यावरून, महापराह्ण दिवस श्रावणातच येतो, हे म्हणणे सुसंगत ठरते. श्रावण वद्य प्रतिपदा हा महापराह्ण दिन मानीत असत. [पा. का. भा.]

महापवित्रेष्टी

मृगारेष्टी पाहा.

महापातक

ब्रह्महत्या, गुरुपत्नीशी व्यभिचार, सुरापान व सुवर्णाची चोरी ही धर्मशास्त्रात महापातके मानलेली आहेत. या महापातकांसाठी बारा वर्षे वनवास व खडतर तप हे प्रायश्चित्त सांगितले आहे (शङ्खलिखित. १७. १–३). महापातक्याची त्या काळातील दिनचर्या पुढीलप्रमाणे असावी – तरटाचा लहान तुकडा नेसावा, मृत ब्राह्मणाच्या मस्तकाचे एक हाड हातात व एक हाड दंडाला बांधावे, दिवसा उभे राहावे, रात्री बसून राहावे, तीनदा स्नान करावे,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व भिक्षा मागून एकदाच भोजन करावे. (ब्रह्महत्या पाहा)

गुरुपत्नीशी व्यभिचार या महापातकासाठी मात्र मृत्युदंडच सांगितलेला आहे. पाप मान्य करून तप्त लोहाला कवटाळणे किंवा स्वतःचे लिंग कापून टाकणे, हे पर्याय गौतम धर्म सूत्र (२३. ८–११), आप. धर्म सूत्र (१·९·२५·१–२) आणि मनुस्मृती (११·१०३–१०४) यांत सांगितले आहेत. इतर पुरुषांच्या पत्नीशी व्यभिचार या पापाला किंचित सौम्य प्रायश्चित्त सांगितलेले आहे. वनात राहून १ ते ३ वर्षे प्राजापत्य कृच्छ्र व ३ महिने चांद्रायण असे त्याचे स्वरूप आहे. माता, कन्या किंवा भगिनी यांच्याशी व्यभिचार करणे या पापासाठी लिंग कापणे, तीन कृच्छ्रे किंवा तीन चांद्रायणे ही प्रायश्चित्ते पराशराने सांगितली आहेत (१०·१०–११).

जाणून बुजून अतिशय सुरापान करणे हे महापातक असून, त्यासाठी उकळते गोमूत्र किंवा दूध किंवा तूप पिणे हे प्रायश्चित्त सांगितले आहे. (गौतम. २३.१ व मनु. ११·९०–९१). मृत्युदंड असाच त्याचा अर्थ होतो. कधी कधी मद्यपान करणे, औषध म्हणून सुरा घेणे या पापासाठी पुनरुपनयन, तप्तकृच्छ, पराक, चांद्रायण अशी सोपी प्रायश्चित्ते प्रायश्चित्तसारात सांगितलेली आहेत.

ब्राह्मणाकडील सोने (८० रत्तिका किंवा अधिक) चोरणे या पापासाठी मृत्यूचीच शिक्षा सांगितली आहे, (मनु. ८·१३४ याज्ञ. १.३६३). अग्निप्रवेश किंवा आमरण उपवास असे त्या शिक्षेचे स्वरूप आहे. स्वतःच्या वजनाइतके सोने किंवा जन्मभर पुरेल एवढे द्रव्य ब्राह्मणाला द्यावे किंवा वर्षभर कृच्छव्रत करावे, असाही पर्याय आहे (याज्ञ. ३.२५८). [हि ध.]

महापुराण (१) पुष्पदंतविरचित एक जैन महाकाव्य. याला तिसट्ठि महापुरिसगुणालंकार असेही दुसरे नाव आहे. या ग्रंथाचे आदिपुराण, उत्तरपुराण प्रथमार्ध व उत्तरपुराण द्वितीयार्ध असे तीन खंड आहेत. तीन्ही खंडांत मिळून १०२ संधी आहेत. प्रथम खंडात पहिला तीर्थंकर ऋषभदेव आणि पहिला चक्रवर्ती भरत यांच्या जीवनाचे वर्णन केले आहे.

महापुराण याचा अर्थ प्राचीन कालातील एक मोठी कथा असा होतो. या महापुराणात चोवीस तीर्थंकर, बारा चक्रवर्ती, नऊ वासुदेव, नऊ प्रतिवासुदेव व नऊ बलदेव अशा त्रेसष्ट शलाकापुरुषांच्या चरित्रांचे वर्णन केले आहे. म्हणूनच या ग्रंथाला तिसट्ठि महापुरिसगुणालंकार असे नाव दिलेले आहे. मगधराज श्रेणिक याने विनंती केल्यावरून महावीराचा शिष्य गौतम महापुराणाची कथा सांगतो, ती संक्षेपात अशी–

अयोध्या नगरीत मरुदेवीच्या पोटी ऋषभाचा जन्म झाला. नाभी हे त्याच्या पित्याचे नाव. ऋषभ मोठा झाल्यावर त्या जसवई आणि सुनंदा या दोन राजकन्यांशी लग्न झाले. ज वईला त्याच्यापासून भरह, भरत, इ. शंभर पुत्र व ब्रा नावाची कन्या झाली. तसेच सुनंदाला बाहुबली नामक व सुंदरी नावाची कन्या झाली. राजपुत्र आणि राजकन्या योग्य असे शिक्षण देण्यात आले. कालांतराने ऋषभाला सं रापासून विरक्ती प्राप्त झाली. मग त्याचा पुत्र भरत राज्या आला. त्याने दिग्विजय केला. अनेक वर्षे राज्य करून त्याने निर्वाण प्राप्त करून घेतले.

आदिपुराणात ऋषभाने आपले मित्र व पुत्र यांच्या पू जन्मांच्या अनेक कथा सांगितल्या आहेत. या कथा अनेक अ किक घटनांनी आणि चमत्कारांनी भरलेल्या आहेत.

उत्तरपुराणाच्या प्रथमार्धात वीस तीर्थंकर, आठ बलदे आठ वासुदेव, आठ प्रतिवासुदेव व दहा चक्रवर्ती यांचे व आहे. याच भागात अजितादी तीर्थंकरांची व रामायण कथा आहे. या रामायणकथेलाच जैन लोक पउमचरिउ म्हणतात. यातील रामकथा ही वाल्मीकिरामायणापेक्षा ब वेगळी आहे. राम, लक्ष्मण आणि रावण जैन धर्मानुसार बलदेव, वासुदेव व प्रतिवासुदेव आहेत. यानंतर नमीची आलेली आहे.

उत्तर पुराणाच्या द्वितीयार्धात महाभारताची कथा आ महाभारतातील अनेक पात्रांच्या पूर्वजन्माच्या कथाही वर्णिल्या आहेत. शेवटी पार्श्वनाथ, महावीर, जंबूस्वामी प्रीतिकर यांच्या कथा आलेल्या आहेत. महावीराच्या निर्वा णाच्या वर्णनाने हे महापुराण समाप्त झाले आहे.

महापुराणाचे कथानक बरेच मोठे आहे. त्रेसष्ट महापुरु वर्णन, त्यांच्या अनेक पूर्वजन्मांच्या कथा आणि अवांतर क यामुळे कथानक इतके विस्तृत झाले आहे, की त्यातून कथा धरून ठेवणे कठिण जाते. कथानक सुसंबद्ध नसले, तरी अनेक ठिकाणी सरससुंदर वर्णने मात्र आढळतात. एका काच्या पत्नीचे वर्णन कवीने पुढीलप्रमाणे केले आहे–

बहु कासु वि देइ ण दहिय तिलउ अहिलसइ वइरिहिरेण तिलउ।
बहु कासु थिवइ ण अक्खयाउ खलबई करि मोत्तिय अक्खयाउ।

अर्थ – कोण्या युद्धोन्मुख वीराची पत्नी त्याला दह्या टिळा लावीत नाही; तर शत्रूच्या रक्ताने ती त्याला टि लावण्याची इच्छा करते. दुसऱ्या कोण्या योद्ध्याची प त्याला अक्षतांचा तिलक लावीत नाही; तर शत्रूच्या हत्ती गंडस्थळातील मोत्यांचा तिलक लावण्याची ती आकांक्षा ध

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संसार असार आहे, हे सांगताना कवी म्हणतो–

इह संसार दारुणे बहु सरीर संघारणे।

वसिऊणं दो वासरा के के ण गया णरवरा ।।

अर्थ – या दारुण संसारात दोन दिवस राहून कोणते राजे इथून गेल्याशिवाय राहिले आहेत ?

तणु लायण्णु वण्णु खणि खिज्जइ कालालि मयरंदु व पिज्जइ।

वियलइ जोव्वणु करयलजलु णिवडइ माणुसु णं पिक्कइ फलु ।।

अर्थ – शरीर, लावण्य व वर्ण क्षणात क्षीण होऊन जातात. कालभ्रमर मकरंदाप्रमाणे ते पिऊन टाकतो. हाताच्या तळव्यावरील पाण्याप्रमाणे यौवन गळून जाते. माणूस पिकलेल्या फळाप्रमाणे गळून पडतो.

पुष्पदंताने आपल्या महाकाव्यात काही सुंदर सुभाषितांचा उपयोग केला आहे. उदा०–

भुक्कउ छणयंदहु सारमेउ।

अर्थ – पौर्णिमेच्या चंद्रावर कुत्रा भुंकला, म्हणून चंद्राचे काय वाकडे होणार आहे !

माणभंगु वर मरणु ण जीविउ।

अर्थ – अपमान झाल्यावर जिवंत राहाण्यापेक्षा मृत्यू परवडला.

लूयासुत्ते वज्झइ मसउ ण हत्थि णिरुज्झइ।

अर्थ – कोळयाच्या जाळयाच्या धाग्याने डास बांधता येईल. हत्ती नाही.

पुष्पदंताने आपल्या काव्यात विविध छंदांचा प्रयोग केला आहे. पाहा – पुष्पदंत. [अ. सा.]

(२) जिनसेनानेही महापुराण नामक एक ग्रंथ लिहिला आहे हा ग्रंथ संस्कृत भाषेत आहे. याचे दोन खंड असून, पहिल्या खंडाला आदिपुराण किंवा पूर्वपुराण आणि दुसऱ्या खंडाला उत्तरपुराण असे नाव आहे. आदिपुराणाच्या ४७ पर्वांपैकी ४२ पर्वे आणि ४३ व्या पर्वातील तीन श्लोक जिनसेनाने रचले असून, बाकीचा ग्रंथ त्याचा शिष्य गुणभद्र याने रचला आहे. महापुराण हेही महाकाव्यच आहे. संस्कृत साहित्यातील हे एक अनुपम रत्न आहे. पुराण, धर्मकथा, धर्मशास्त्र, राजनीतिशास्त्र व आचारशास्त्र या सर्वांचे या ग्रंथात विवेचन आहे. त्रेसष्ट शलाकापुरुषांचे वर्णन यात केलेले आहे. पण ऋषभदेव व त्याचा ज्येष्ठ पुत्र चक्रवर्ती भरत हे या कथेचे प्रमुख नायक आहेत. संसारातून निवृत्त झाल्या वर ऋषभदेवाने एक हजार वर्षे तप केले व केवलज्ञान प्राप्त करून घेतले. मग त्याने दिव्य ध्वनीच्या द्वारे अनेक प्राण्यांना हितोपदेश केला. सर्व आर्यखंडात त्याने विहार केला. शेवटी तो कैलास पर्वतावर गेला आणि तिथे त्याला निर्वाण प्राप्त झाले त्याचा पुत्र भरत हा सम्राट होता. पण त्याला राज्याबद्दल आसक्ती नव्हती. त्यामुळे त्याने जेव्हा प्रव्रज्यादीक्षा घेतली, तेव्हा त्याला थोडयाच कालात केवलज्ञान झाले. मग त्यानेही पित्याप्रमाणे आर्य देशात संचार करून लोकांना उपदेश केला आणि अंती निर्वाण प्राप्त करून घेतले.

या ग्रंथातील वन, लता, नद्या, सरोवर, पर्वतशिखरे, झरे, पक्षी, सूर्योदय, चंद्रोदय इत्यादींची वर्णने मनोरम आहेत. [महापुराण – जिनसेनाचार्य, भारतीय ज्ञानपीठ, काशी]

महापुरुष एक देव. याचा नैवेद्य बाहेर ठेवण्याची प्रथा आहे. याची पूजा महार करतात. यावरून हा महारांचा मूळ पुरुष असावा, असे श्री. ना. गो. चापेकर यांचे मत आहे. एखाद्या वेदपारंगत ब्राह्मणाच्या पिशाचालाही महापुरुष असे नाव आहे. हे पिंपळावर किंवा उंबराच्या झाडावर राहते. महापुरुषाचे एक देऊळ रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागरगावी आहे. [चित्पावन]

महापुरुषविद्या देवपूजेमध्ये अभिषेकाच्या वेळी जी निरनिराळी सूक्ते म्हणतात, त्यांत महापुरुषविद्या या नावाचे पौराणिक १६ श्लोक म्हणायला सांगितले आहेत. यांत विष्णूची स्तुती आहे. ‘ जितं ते पुण्डरीकाक्ष ’ अशी त्या श्लोकांची सुरवात आहे. ऋग्वेदीय ब्रह्मकर्मसमुच्चयात हे सगळे श्लोक दिलेले आहेत.

महापुरुषिया संप्रदाय आसामातील एक भक्तिपंथ. या पंथाचे प्रवर्तन आसामी संत शंकरदेव याने केले. शंकरदेवाला आसामांत सर्वत्र महापुरुष या नावाने ओळखत असल्याने त्याने प्रवर्तिलेल्या या पंथालाही महापुरुष किंवा महापुरुषिया असे नाव मिळाले. या पंथाचे प्रारंभीचे नाव सनातन भागवतीधर्म असे होते. याशिवाय य पंथाला महाधर्म असेही आणखी एक नाव आहे.

महापुरुषिया पंथाची स्थापना शंकरदेवाने केलेली असली, तरी या पंथाचा उत्कर्ष आणि विस्तार मात्र शंकरदेवाच्या नंतरच झाला. या पंथाची दीक्षा घेणाऱ्याला शरणिया व दीक्षाविधीला शरणविधी असे म्हणतात. दीक्षा देताना दीक्षार्थीला ‘ शरणं मे जगन्नाथ श्रीकृष्ण पुरुषोत्तम ’ हा मंत्र उपदेशितात.

परमब्रह्माचे ज्ञान, त्याच्या ठायी अनन्यभक्ती, सत्संग आणि भगवत्सेवा या चार तत्त्वांचे काटेकोर पालन प्रत्येक पंथियाने केले पाहिजे, अशी पंथाची आज्ञा आहे. भगवान श्रीकृष्ण हा पूर्णब्रह्म असून, त्या ला निष्काम बुद्धीने भजावे, त्याच्या व्यतिरिक्त

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दुसऱ्या कोणाची पूजा करू नये, असा पंथाचा सिद्धान्त आहे.

भागवत पुराण हा महापुरुषिया पंथाचा अधिकृत ग्रंथ असून, शिखांच्या गुरुग्रंथासारखी त्याची सर्वत्र पूजा केली जाते. याव्यतिरिक्त भक्तरत्नावली, कीर्तन, दशम व नामघोष या चार ग्रंथांचे पठण व मनन हे सर्व पंथानुयायांना अगत्याचे मानलेले आहे.

या पंथात दास्यभक्तीला प्राधान्य आहे. सामाजिक सुधारणांवर भर हे या पंथाचे प्रमुख वैशिष्ट्य होय. त्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी पंथाने सत्र नावाचे मठ स्थापन केलेले असतात व तिथले अनुयायी भोवतालच्या समाजात लोकोपयोगी कामे करून पंथप्रसार करतात. [वैष्णवधर्म; मा. सं.; शं. हि. टा.]

महापौर्णमासीव्रत एक तिथिव्रत. ज्या नक्षत्रावरून महिन्याला नाव पडले आहे, त्या नक्षत्री पूर्णचंद्र जेव्हा गुरूने युक्त होतो, तेव्हा त्या तिथीला महापूर्णिमा असे म्हणतात. अशा प्रकारच्या सर्व पौर्णिमांना हे व्रत करतात. व्रतावधी एक वर्ष. श्रीविष्णूची पूजा हा या व्रताचा विधी आहे. या दिवशी दिलेले अल्पदानही महाफल मिळवून देते. [हि. ध.]

महाप्रतिसरा एक बौद्ध देवता. बौद्धांच्या पंचरक्षामंडलातील ही प्रमुख देवता होय. ही त्रिमुख, त्रिनेत्र, दशभुज व पीतवर्ण असते. क्वचित अष्टभुज व चतुर्भुजही असते. हिचे उजवे मुख नील वर्णाचे आणि डावे श्वेत वर्णाचे असते. ही हातांत वज्र, खड्ग, धनुष्यबाण, ध्वज, परशू, शंख व रत्न धारण करते. ही रत्नसंभव या ध्यानी बुद्धापासून उत्पन्न झाली असून, तो तिच्या मस्तकी असतो. बौद्ध तंत्रशास्त्रात या देवीला फार महत्त्व आहे.

महाप्रतिसरा

या देवतेच्या पूजनाने दुःख, खेद, इत्यादींचा नाश होतो. चित्त अस्वस्थ झाल्यास या देवतेचा शंभर वेळा जप करावा, असे सांगि[तले] आहे. जपमंत्र असा – " ॐ मणिधारी वज्रिली महाप्रतिसरे हुं फट् स्वाहा. "

या देवतेच्या काही मूर्ती सापडल्या आहेत. सांप्रत एक मू[र्ती] ढाका शहरातील एका उद्यानात असून, ती अडीच फूट [उंच] आहे. [इं. बु. इ.; देवीकोश ३]

महाप्रत्यंगिरा एक बौद्ध देवता. ही हुंकारातून उत्प[न्न] झाली असे मानतात. हिच्या मस्तकावर अक्षोभ्य या ध्यानीबुद्धाची प्रतिमा असते. ही एमुकख, षड्[भुज] व नील वर्णाची असते. हिच्या हातांत खड्ग, त्रिशूल, इ. आयु[धे] असतात. ही तरुण आणि सुंदर असल्याचे मानतात.

नेपाळमध्ये या देवीची मूर्ती उपलब्ध झाली आहे; पण ती बहुमुखी व अनेक हातांची आहे. [इं. बु. इ.; देवीकोश ३]

महाप्रस्थान वाटचालीत मरण यावे या उद्देशाने मोठ्या प्रवासाला निघणे, याला महाप्रस्थान असे म्हणतात. आहे. वानप्रस्थाश्रमी माणसाने महाप्रस्थानाला निघण्यास हरकत नाही, असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. जराजर्जर, रोगी व निरिच्छ माणसानेही महाप्रस्थानाला निघून देहत्याग केल्यास आत्महत्येचा दोष लागत नाही. कलियुगात मात्र महाप्रस्थान वर्ज्य मानलेले आहे. महाभारतामध्ये महाप्रस्थानिक नावाचे एक पर्वच आहे [हि. ध.; श. क.]

महाफलद्वादशी एक तिथिव्रत. पौष वद्य एकादशी विशाखा नक्षत्रयुक्त असेल त्या दिवशी हे व्रत सुरू करून द्वादशीस संपवतात. व्रतावधी एक वर्ष. विष्णू ही या व्रताची देवता असून, त्याची पूजा करणे हा या व्रताचा विधी आहे. फल– विष्णुलोकाची प्राप्ती. [हि. ध.]

महाफलव्रत एक काम्य व्रत. हे व्रत एक पंधरवडा, एक महिने किंवा एक वर्षभर करतात. व्रतविधी असा– प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत प्रत्येक दिवशी अनुक्रमे पुढे दिलेल्या वस्तूंवर निर्वाह करावा– दूध, फुले, मीठ न घातलेले खाद्य पदार्थ, तीळ, भाज्या, बेलफळ, कणीक, कच्चे अन्न, तूप व साखर घातलेली तांदुळाची खीर, यव, गोमूत्र, कुश बुडविलेले पाणी इत्यादी.

व्रताच्या पूर्व दिवशी तीन वेळा स्नान करून उपवास करतात. यात वेदातील काही ऋचांचा व गायत्री मंत्राचा जप विहित आहे. फल– सूर्यलोकप्राप्ती. [हि. ध.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाफलसप्तमी एक तिथि व्रत. रविवारी सप्तमी आणि रेवती नक्षत्र असेल तर तिला महाफल-सप्तमी असे म्हणतात. या दिवशी दुर्गेची पूजा अशोकाच्या कळ्यांनी करून नंतर त्या कळ्या भक्षण कराव्या असे, सांगितले आहे. फल – कामनापूर्ती. [हि. ध.]

महाबंध हठयोगातील एक प्रक्रिया. हिचे वर्णन असे –

पार्ष्णि वामस्य पादस्य योनिस्थाने नियोजयेत् ।
वामोरूपरि संस्थाप्य दक्षिणं चरणं तथा ।।
पूरयित्वा ततो वायुं हृदये चिबुकं दृढम् ।
निष्पीड्य वायुमाकुञ्च्य मनोमध्ये नियोजयेत् ।।
धारयित्वा यथाशक्ति रेचयेदनिलं शनैः ।
सव्याङ्गेषु समभ्यस्य दक्षाङ्गे पुनरभ्यसेत् ।।
अयं तु सर्वनाडीनामूर्ध्वगतिनिरोधकः ।
अयं खलु महाबन्धो महासिद्धिप्रदायकः ।।

अर्थ – डाव्या पायाची टाच शिवणीवर जोराने दाबून उजवा पाय मांडीवर ठेवावा. नंतर पूरक व जालंधरबंध करून कुंभक करावा. मन स्थिर करून मग हळूहळू रेचक करावा. याप्रमाणे उजव्या अंगानेही अभ्यास करावा. याला महाबंध असे म्हणतात. हा सर्व नाडींची उर्ध्व गती बंद करणारा आहे. [यो. सो पू.]

महाबलिपुरम द. भारतातील एक ऐतिहासिक स्थान व प्राचीन संस्कृतीचे केंद्र. हे गाव मद्रासपासून ३५ मैलांवर, समुद्रकिनारी वसलेले आहे. पुराणप्रसिद्ध बलिराजावरून या गावाला महाबलिपुरम हे नाव मिळाले, अशी लौकिक समजूत आहे. पण पल्लव वंशातील राजा पहिला नरसिंह वर्मा याला महामल्ल, मामल्ल किंवा महाबल अशी पदवी होती. त्याने या गावी अनेक शिल्पे निर्माण केली, त्यावरून या गावाला मामल्लपुरम किंवा महाबलिपुरम हे नाव मिळाले, असे इतिहासपंडितांचे मत आहे. हे ठिकाण पल्लवांच्या आधीपासून बंदर म्हणून प्रसिद्ध होते. इ. स. च्या पहिल्या व दुसऱ्या शतकांतील ग्रीक व रोमन ग्रंथांत याचा मलंगी म्हणून उल्लेख आढळतो. तमिळ काव्यातही या बंदराचा उल्लेख आहे. प्राचीन काळी त्याला मलंगे व कदलमल्लई ही नावे होती.

पल्लव वंशाच्या राजवटीत इथे अनेक शिल्पे निर्माण झाली. हॅवेलच्या मते हे शिल्पकाम इंडो-आर्यन संस्कृतीचे अपत्य आहे. इ. स. च्या ६ व्या शतकातली मंदिरे अगदी साधी असत. इथले दुर्गामंदिर (अर्जुनाचा रथ) हे त्याचे उत्तम उदाहरण होय. नालंदा येथील विहाराच्या धर्तीवर इथला धर्मराजरथ खोदलेला आहे, असेही त्याचे म्हणणे आहे. मात्र कुमारस्वामींच्या मते मामल्लपुरमचे शिल्प हे द्राविडी कलेच्या उत्कर्षाचे प्रतीक आहे. लाकूड आणि विटा यांच्या साहाय्याने जे आकार पूर्वी बनविले जात, त्यांची ही पाषाणातली प्रतिकृती आहे.

परदेशी प्रवाशांनी या ठिकाणाला सात पागोडा असे नाव दिलेले होते. कारण समुद्रकिनारी पूर्वी सात देवळे होती आणि त्यांची पितळी शिखरे दर्यावर्दी लोकांचे लक्ष वेधून घेत असत. सध्या मात्र त्या जागी एकच देऊळ आहे. हे किनाऱ्यावरील शिवमंदिर लहान असून, ते दगडांचे बांधलेले आहे. मुख्य गाभाऱ्यात ४–५ फूट उंच, सोळाकोनी, काळ्या संगमरवराचे शिवलिंग भग्न स्थितीत दिसते. समुद्राच्या खारट पाण्याचे तुषार सतत देवळावर उडत असल्यामुळे त्यावरील नक्षीकामही खराब झालेले आहे. मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याच्या मागील बाजूला एका ओवरीत शेषशायी विष्णूची मूर्ती आहे.

अखंड दगडात खोदलेली मंदिरे हे महाबलिपुरमचे वैशिष्ट्य आहे. इथेच कृष्णमंडप नावाची एक गुंफा पहाडात खोदलेली आहे. त्या गुंफेत गोवर्धनधारी श्रीकृष्ण व गोप-गोपी यांची चित्रे कोरलेली आहेत. हे कोरीव शिल्प साऱ्या भारतात अप्रतिम समजले जाते.



गोप-गोपी व गायी यांची कोरीव चित्रे – कृष्ण-मंडप, महाबलिपुरम

या गुंफेजवळच पंचपांडवरथ आहेत. या शिल्पाचे रथ हे नाव सार्थ वाटते. कारण पाहाणाऱ्याला त्यांची गतिमानता प्रत्ययाला येते. द्रौपदीचा रथ हे पूर्वी दुर्गेचे मंदिर असावे. तेच सर्वांत सुंदर असून, त्यात दुर्गेची मूर्ती आहे. धर्मराजाच्या रथात शंकर, विष्णू, कृष्ण यांच्या मूर्ती आहेत; तर अर्जुनाच्या रथात शिव, विष्णू व इंद्र यांच्या मूर्ती आहेत. फर्ग्यूसनच्या मते बौद्ध व द्राविड शिल्पशैलीचे सुंदर मिश्रण या रथशिल्पात झाले आहे.

तिथून काही अंतरावर १०० फूट लांब व ३० फूट उंच अशा एका प्रचंड खडकावर अनेक चित्रे कोरलेली आहेत. त्या खडकाचे दोन भाग असून, त्यांच्यामध्ये एक फट आहे. त्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

फटीतही नाग व नागिणी यांची चित्रे कोरलेली आहेत. एका बाजूला एक जटाधारी पुरुष उभा राहून तप करीत असलेला दिसतो. पाशुपतास्त्र मिळविण्यासाठी तप करणाऱ्या अर्जुनाची ती प्रतिमा आहे, असे काही लोक म्हणतात; तर गंगेला पृथ्वीवर आणण्यासाठी भगीरथाने तप केले त्याची ही मूर्ती आहे, असे इतरांचे म्हणणे आहे. त्या खडकावर हत्ती, वाघ, सिंह, यक्ष, गंधर्व, सूर्य, चंद्र, अप्सरा यांचीही चित्रे कोरलेली आहेत.

तिथून जवळच एका दगडात कोरलेले एक सुंदर तीन मजली मंदिर आहे. त्यात पूर्वी शिवलिंग असावे; पण सांप्रत त्यात गणपतीची स्थापना केलेली असून, त्या मंदिराला गणेश-रथ हे नाव मिळाले आहे. त्या मंदिरासमोरच वराहमंडप आहे. त्यात वराहरूपी विष्णू पृथ्वीला समुद्रातून वर काढीत असल्याचे सुंदर शिल्प कोरलेले आहे. त्याच मंडपात गजलक्ष्मीचे व वामनावताराचेही कोरीव चित्र आहे. महाबलिपुरम येथील सर्वच शिल्पांत स्त्रियांच्या मूर्ती नग्न आढळतात.

या गावात एका टेकडीवर एक शिवमंदिर आहे, त्याला ओलक्कनाथाचे मंदिर म्हणतात. ते दगडांचे बांधलेले असून इतके उंच आहे की, पूर्वी ते दीपगृहाचे काम करीत असावे. [मार्च ऑफ् इंडिया, फेब्रुवारी १९५८; मा. दे. मा. लो.]

महाबळेश्वर महाराष्ट्रातील एक पुण्यक्षेत्र. अर्वाचीन काळात सुमारे १४० वर्षांपूर्वी इथून जवळच स्थापन झालेल्या शीतल निवासस्थानाला महाबळेश्वर असे नाव दिलेले आहे. त्यामुळे क्षेत्रस्थानाला जुने महाबळेश्वर, क्षेत्र महाबळेश्वर किंवा धोम महाबळेश्वर असे म्हणतात. सातारा जिल्ह्यात वाई तालुक्याच्या पश्चिमेला महाबळेश्वर पेटा आहे. त्यात सह्याद्रीच्या रांगेतील चार-साडेचार हजार फूट उंचीच्या पठारावर महाबळेश्वर वसलेले आहे. पुण्यापासून महाबळेश्वर शहर ७५ मैल अंतरावर असून, ते समुद्रसपाटीपासून ४७१० फूट उंच आहे. जुने क्षेत्र महाबळेश्वर या शहराच्या उत्तरेला तीन मैलांवर असून, त्याची उंची ४३८५ फूट आहे. या क्षेत्राच्या उत्पत्तीची कथा स्कंद पुराणातील सह्याद्रिखंडात दिली आहे, ती अशी –

पद्मकल्पात महाबळ व अतिबळ हे दोन पराक्रमी दैत्य बंधू सर्व लोकांना उपद्रव करू लागले, म्हणून ब्रह्मा, विष्णू व महेश यांनी त्यांच्याशी युद्ध आरंभले. त्यात विष्णूने अतिबळाचा वध केला; पण महाबळाच्या पराक्रमापुढे तीन्ही देवांचे काही चालेना. तेव्हा देवांनी महामाया देवीचे स्तवन केले. तिने महाबळाला मोह घालून समरांगणातून परत बोलावले. नंतर महाबळाने संतुष्ट होऊन देवांना वर मागण्यास सांगितले. 'तुला आमच्या हातून मृत्यू यावा,' असा वर देवांनी मागितला. महाबळाने त्यांचे म्हणणे मान्य केले. मग देवांनी त्याला मुक्ति दिले आणि वर मागण्यास सांगितले. तेव्हा, शिवाने लिंग धारण करून महाबळेश्वर नावाने, विष्णूने माझ्या भा नाव धारण करून अतिबळेश्वर या नावाने आणि ब्रह्मदे माझ्या कोटी सैन्याचे नाव धारण करून 'कोटीश्वर' नावाने या ठिकाणी वास करावा, असा वर त्याने मागित या वराप्रमाणे देव सह्य पर्वतावर राहू लागल्यावर ब्र देवाने यज्ञ करण्याचे ठरविले. त्यासाठी त्याने सर्व तया केली. यज्ञाच्या मुहूर्ताची घटिका भरत आली. पण ब्र देवाची पत्नी सावित्री ही वेषभूषेत गढल्यामुळे वेळे मंडपात आली नाही. तेव्हा ब्रह्मदेवाने विष्णूच्या संमतीने आपली द्वितीय पत्नी गायत्री हिच्यासह यज्ञदीक्षा घेतली यज्ञकर्मास सुरवात केली. थोड्या वेळाने सावित्री यज्ञमंड आली. आपल्या जागी गायत्री बसलेली पाहून सावित्रीला रा राग आला आणि तिने ब्रह्मा, विष्णू, महेश व गायत्री सर्वांना नदीरूप होण्याचा शाप दिला. हे शापवचन ऐक विष्णूला फार राग आला आणि त्याने सावित्रीलाही तसाच शा दिला. या शापाप्रमाणे विष्णूने कृष्णा नदीचे, शिवाने वेण्णा नदी व ब्रह्मदेवाने कोयना नदीचे रूप घेतले. गायत्री व सावि याही नदीरूप झाल्या आणि त्याच नावाने प्रसिद्ध झाल्या.

महाबळाला दिलेल्या वरदानाप्रमाणे शिवाने महाबळाचे विष्णूने अतिबळाचे लिंगरूप धारण केले. त्याप्रमाणे प नद्या व दोन शिवलिंगे एकाच क्षेत्रात वास करू लाग आणि ते क्षेत्र महाबळेश्वर म्हणून प्रसिद्ध झाले.

दर बारा वर्षांनी गुरू कन्या राशीस आला, की गंगा व दर वर्षांनी सरस्वती नदी कृष्णा नदीला भेटायला येते, अशी जूत आहे. त्यामुळे काशीपेक्षाही या क्षेत्राचे महत्त्व जव अधिक आहे, असे मानतात.

इथले महाबळेश्वराचे मंदिर हेमाडपंती बांधणीचे आहे काळ्या पाषाणांचे आहे. गाभाऱ्यातील स्वयंभू शिवलिंग एखा रुद्राक्षाप्रमाणे खडबडीत असून विस्तीर्ण आहे त्याच्यावर खळगे असून, ते नेहमी जिवंत पाण्याने भरलेले असता कृष्णादी पंचगंगा आणि भागीरथी व सरस्वती यांची उत्प या खळग्यांतूनच होते, असे क्षेत्रमाहात्म्यात सांगितले आहे. लिंगावर चौदा हातांची गजाननाची ताम्रप्रतिमा आहे.

हे मंदिर इ. स. १२१५ मध्ये यादववंशी राजा सिंघणदे याने बांधले. नंतरच्या काळात शिवाजीमहाराज, चंद्रराव मो व शाहूमहाराज यांनी त्याची डागडुजी केली. इथे पाऊस फा पडत असल्यामुळे देवळांची फार हानी होते. शिवाजीमहाराजांनी इथल्या मंदिराला तीन सोनेरी कळस दिले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इथले दुसरे महत्त्वाचे मंदिर म्हणजे कृष्णाबाईचे. याला पंचगंगांचे मंदिर असेही म्हणतात. देवालयाची बांधणी काळ्या दगडांची व एखाद्या वाड्याच्या चौकाप्रमाणे असून, त्याच्या चारही बाजूंना चार सोपे आहेत. देवळाच्या गाभाऱ्यात कृष्णेची सुंदर प्रतिमा आहे. देवालयाच्या मागच्या पश्चिमेकडच्या भिंतीमागे डोंगर असून, भिंतीच्या पाच छिद्रांतून पाण्याचे प्रवाह वाहतात ते तिरप्या पाटांतून एका पाटात आणून एकत्र केले आहेत. तो पाट कृष्णाबाईच्या मंदिराखालून वाहत येऊन गायमुखातून पहिल्या कुंडात पडतो. त्याला ब्रह्मकुंड असे नाव आहे. तिथून ते पाणी दुसऱ्या कुंडात येते. कृष्णाबाईचा वार्षिकोत्सव फाल्गुन वद्य पक्षात पाच दिवस होतो.

याशिवाय, इथे रुद्र, चक्र, हंस, पितृमुक्ती, अरण्य, मलापकर्ष, इ. तीर्थे आहेत. कृष्णाबाईच्या मंदिराजवळ एक मोठी धर्मशाळा आहे.

अहल्याबाईने बांधलेले केदारेश्वराचे व रामदासांनी बांधलेले मारुतीचे अशी आणखी दोन मंदिरे इथे आहेत. [स. भा. प्र. व.; कल्याण– तीर्थांक; रविवार सकाळ, ७ डिसेंबर १९६९– श्री. डी. डी. रेगे; गोकर्ण-धोममहाबळेश्वर यात्रा – गो. चिं. भाटे १९४४; धोम- महाबळेश्वरवर्णन– य. आ. उदास, १८९१]

महाभद्राष्टमी एक तिथिव्रत. पौष शुद्ध अष्टमीला जर बुधवार असेल, तर त्या तिथीला महाभद्राष्टमी असे म्हणतात. शिव ही या व्रताची देवता होय. या दिवशी शिवपूजा करावी, असे सांगितले आहे. [हि. ध; व्र. प]

महाभरणी श्राद्ध भाद्रपद मासाच्या वद्य पक्षातील ज्या दिवशी चंद्र भरणी नक्षत्रात असतो, त्या तिथीला मृत व्यक्तीचे वर्षश्राद्धाच्या पूर्वीचे श्राद्ध करावे, असे सांगितले आहे. या श्राद्धाला वरील नाव आहे. हे श्राद्ध गयाक्षेत्रात केलेल्या श्राद्धाइतके पुण्यप्रद असते. [हि. ध.]

महाभारत एक महान राष्ट्रीय ग्रंथ. हा ग्रंथ केवळ संस्कृत भाषेतच नव्हे, तर जगातील सर्व भाषांतल्या ग्रंथांत अद्वितीय आहे. भाषेची रसवत्ता आणि वर्णनाची भव्यता या दोन महनीय गुणांमुळे महाभारत हे महाकाव्य बनले आहे. पण ती केवळ कल्पित कथा नसून, तो इतिहास आहे. म्हणून त्याला महाकाव्यरूप इतिहास असे म्हणणेच यथार्थ ठरेल. 'भारतं पञ्चमो वेदः' असा त्याचा गौरव केलेला आहे. याचा अर्थ वेदांच्या खालोखाल ऐतिहासिक दृष्ट्या महाभारताची थोरवी फार मोठी आहे. वेद हे प्राचीन आर्यभाषेत आहेत. त्यांतला बहुतेक भाग देवतांच्या स्तुतीने आणि यज्ञ-यागांच्या वर्णनांनी भरलेला आहे. त्यामुळे वैदिक वाङ्मयातून निघणारी ऐतिहासिक अनुमाने धूसर व अस्पष्ट असतात; पण महाभारत हा ग्रंथ लौकिक संस्कृतात असल्यामुळे तो बहुतेक सुगम आहे. त्यात प्राचीन काळच्या अनेक ऐतिहासिक गोष्टी एका ठिकाणी ग्रथित केल्या गेल्या आहेत.

प्राचीन काळी अश्वमेध वगैरे जे बरेच दिवस चालणारे यज्ञ होत असत, त्यांत फुरसतीच्या वेळी ऐतिहासिक गाथा आणि आख्याने गायिली जात. त्या सर्व गाथा आणि आख्याने महाभारतात एकत्र झालेली आहेत. महाभारतात ज्या राजांचा उल्लेख आला आहे, त्या त्या राजांच्या प्राचीन वंशावळी अनेक पुराणांतून वर्णिलेल्या असून, मध्ययुगीन व अर्वाचीन राजांच्या पदरी असलेल्या भाट-चारणांनी त्या वंशावळींचा धागा अखंड राखला आहे. याव्यतिरिक्त धर्म, तत्त्वज्ञान, व्यवहार, राजनीती, इ. गोष्टींसंबंधी महाभारतात जागजागी विस्तृत विवेचन आहे. त्यामुळे ग्रंथारंभी केलेली महाभारताची प्रशंसा त्याला यथार्थत्वाने लागू पडते –

धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च पुरुषर्षभ ।
यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ।

अर्थ – हे पुरुषश्रेष्ठा, धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांविषयी या ग्रंथात जे लिहिलेले आहे, तेच अन्य सर्व ठिकाणी आढळेल आणि जे या ग्रंथात नाही ते कुठेही दिसणार नाही.

महाभारतात वर्णिलेल्या परिस्थितीचा संबंध एका बाजूने वैदिक वाङ्मयाशी पोचतो, तर दुसऱ्या बाजूने बौद्ध, जैन व ग्रीक या लोकांच्या प्राचीन इतिहासग्रंथांशी पोचतो.

प्रचलित महाभारत सुमारे एक लक्ष श्लोकांचे आहे. हा ग्रंथ कृष्णद्वैपायन व्यासाने रचिला, अशी सार्वत्रिक समजूत आहे; पण एवढा प्रचंड ग्रंथ एका माणसाने लिहिला असावा, हे संभवनीय दिसत नाही. यावरून महाभारताचे कर्ते एकाहून अधिक असावे, असे अनुमान निघते. महाभारतानेच या अनुमानाला पुष्टी दिली आहे. व्यास, वैशंपायन आणि सौती अशा तिघांनी हा ग्रंथ निर्माण केला, असे आदिपर्वात म्हटले आहे (आदि. १.१७.२१).

भारतीय युद्ध संपून धर्मराजाला राज्याभिषेक झाल्यावर कौरव–पांडवांचा इतिहास ग्रंथनिविष्ट करावा, असे व्यासांनी ठरविले. ते त्यासाठी नर-नारायण पर्वतांच्या सन्निध असलेल्या बदरीक्षेत्रात गेले आणि तिथे सतत तीन वर्षे लेखनोद्योग करून त्यांनी जय नावाचा ग्रंथ लिहिला. त्याचा प्रारंभश्लोक असा–

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥

अर्थ – नारायण आणि नरश्रेष्ठ नर, तसेच देवी सरस्वती यांना नमस्कार करून जय नामक ग्रंथाचा पाठ करावा.

कौरव-पांडवांच्या उत्पत्तीपासून भारतीय युद्धाच्या समाप्ती-पर्यंतचा इतिहास या जय नामक ग्रंथात असून, त्याचे सुमारे आठ–दहा हजार श्लोक असावे, असे विद्वानांचे मत आहे.

पांडवांच्या चौथ्या पिढीत जनमेजय नावाचा राजा झाला. त्याला आपल्या पूर्वजांचा सविस्तर इतिहास ऐकण्याची इच्छा झाली. त्याने त्याविषयी वैशंपायन ऋषीला प्रश्न केला आणि त्याने पौरव वंशाच्या प्रारंभापासूनचा इतिहास त्याला सांगितला. जनमेजय राजाचा बाप परीक्षिती. तो सर्पदंशाने मेला. जनमेजयाने तोही प्रसंग ऐकण्याची उत्सुकता दाखविली. त्यावरून वैशंपायनाने तेही कथानक मूळ ग्रंथाला जोडले. अशा प्रकारे पांडवांच्या पूर्वजांचा वृत्तांत आणि पांडवांच्या वंशजांचा जनमेजय राजापर्यंतचा वृत्तांत अशी दुहेरी भर पडून जय ग्रंथाचा विस्तार तिपटीने वाढला आणि त्याबरोबरच मूळ ग्रंथाचे जय हे नाव बदलून त्याला भारत हे नाव प्राप्त झाले. वैशंपायनाने वाढविलेल्या या भारताचा विस्तार तीस हजार श्लोकांचा असावा.

भारताचे तिसरे संस्करण सौतीने केले. नैमिषारण्यात जम-लेल्या शौनकादी ऋषींनी एका प्रदीर्घ सत्रात सौतीला म्हणजेच लोमहर्षणी नामक सूतपुत्राला पाचारण केले व त्याला भारत-कथा सांगण्याची विनंती केली. त्याचबरोबर शौनकादी ऋषींनी अनेक प्रश्न व अनेक शंकाही त्याला विचारल्या. त्यांची उत्तरे देताना सौतीने अनेक आख्याने-उपाख्याने सांगितली. या सर्वांची भर पडून सौतीचा ग्रंथ भारतापेक्षा वराच मोठा झाला. त्याची श्लोकसंख्या तीस हजारांवरून एक लक्षापर्यंत गेली. मूळ ग्रंथात कुठेही विसंगती येणार नाही, अशा प्रकारे त्याने ग्रंथाचे हे प्रचंड संस्करण केले. हा त्याच्या बुद्धिमत्तेचा अभूतपूर्व विलास होय.

हा जो प्रचंड उद्योग सौतीने केला त्याची काही कारणे विद्वानांनी सांगितली आहेत, ती अशी–

जैन व बौद्ध धर्मांच्या प्रचारामुळे आर्यांची बुद्धी सनातन धर्मापासून विचलित होत असलेली पाहून सौतीला दुःख झाले व वैदिक धर्माचे श्रेष्ठत्व आर्यांच्या मनावर ठसविण्यासाठी त्याने भारताचे महाभारत बनवण्याचा हा अतिप्रचंड उद्योग केला. सौतीच्या काळी जैन व बौद्ध हे आपल्या ग्रंथांतून व बोलण्याचालण्यांतून वेदांविषयी अनादर दाखवीत होते, राम–कृष्णादी अवतारी पुरुषांची निंदा करीत होते, यज्ञ–यागादी कर्मांची हटाळणी करीत होते. त्यांनी सर्वांनाच संन्यासाची मुभा दिली होती. या गोष्टींमुळे सामान्य माणसाच्या बुद्धी भ्रम पडणे साहजिक होते. दुसरी गोष्ट म्हणजे जैन व बौ संघटित होते व संघटितपणे वैदिक धर्माविरुद्ध प्रचार करी होते, तर वैदिक लोकांत विविध पंथांची भर पडून त्यांच्या फुटीरपणा बळावला होता. त्यामुळे त्यांचा जनमानसावर प्रभावच लोपून गेला होता. अशा स्थितीत या सगळ्या वैदि पंथांना एका सूत्रात गोवणे, त्यांच्यांतले अंतर्गत विरोध करणे, शिव व विष्णू यांच्यांत श्रेष्ठ–कनिष्ठ भाव नाही, हे पटवून देणे आणि मतामतांचा गलबला शमवून सना धर्माचे उज्ज्वल स्वरूप जनतेच्या मनावर ठसविणे या गोष्टी अत्यंत आवश्यकता होती. सौतीने ते कार्य समर्थपणे केले.

श्री. ज. स. करंदीकर म्हणतात – गीतेने सांख्य व यो या दोहोंचा मेळ घातलाच होता. सौतीने अनुगीता जो बौद्धांच्या संन्यासमार्गाला तोडीस तोड उठवून दिली. पां रात्रपंथियांच्या समाधानासाठी त्याने नारायणीय उपाख्या शांतिपर्वात घातले आणि त्या योगाने भक्तिमार्गियां आपल्यांत सामावून घेतले. यज्ञांतील पशुहिंसेला जैनांचा बौद्धांचा विरोध होता आणि कित्येक सनातनीही हिंसे त्रासून वैदिक यज्ञयाग टाकून बौद्ध धर्माकडे वळत होते. त्यां समाधान करून त्यांना आवरण्यासाठी सौतीने हिंसेविना केले यज्ञांची प्रशंसा करून हिंसायुक्त यज्ञाहून अहिंसक यज्ञ श्रे असे दाखविण्यासाठी अश्वमेधपर्वाच्या शेवटी नकुलाख्या घातले. त्याशिवाय शांतिपर्वातही जागोजागी हिंसा व अहिं यांची भवति न भवति करून सनातन धर्मातही अहिंसा श्रे मानली जाते, असे त्याने पटवून दिले.

वैदिकधर्मियांची आपल्या व्रतादिकांवरील श्रद्धा दृढ करण्या साठी सौतीने तीर्थयात्रादिकांची रसभरित वर्णने करून तीर्थां माहात्म्य वाढविले. यात तीर्थमाहात्म्याबरोबरच देवतांचे माहात्म्य वाढले. तीर्थयात्रांच्या माहात्म्याचे वर्णन करून सौती दुसराही एक हेतू साधला, तो आंतरप्रांतीय संघटनेचा. प्रत्ये प्रांतात कोणते ना कोणते तरी तीर्थ असल्याने प्रत्येक प्रांति स्वाभिमान जागृत झाला आणि तीर्थयात्रा पूर्ण करण्याकरि आसेतुहिमाचल हिंडावे लागल्यामुळे, परस्परांशी संबंध वै वैदिकधर्मियांतील आपुलकीची भावना दृढ होत गेली.

महाभारतात अनेक प्राचीन आख्याने व उपाख्याने घा सौतीने पूर्वजांविषयींचा अभिमान जागृत केला. रामकथा, हरि श्चंद्राख्यान, सावित्री या सर्व कथा आपल्या धर्मा स्त्रीपुरुषांच्या धीरोदात्त स्वभावाचे चित्र आपल्या मना ठसवितात. विश्वामित्र ब्राह्मण कसा झाला, हे सांग आपल्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेतही जात्युत्कर्षाला संधी ठेवली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे पटवून दिले आहे. शांतिपर्वात भीष्माने सांगितलेला राजधर्म हा समाजधर्माचा अर्थातच प्रवृत्तिधर्माचा उत्तम नमुना असून, त्यात अप्रत्यक्षपणे बौद्धांच्या क्षणिकवादाचे व निवृत्तवादाचे खंडन आहे.

भारताचे महाभारत बनविण्यात सौतीचा दुसरा उद्देश कथा-संग्रह हा दिसतो. तत्कालीन व गतकालीन अनेक ब्रह्मर्षींच्या व राजर्षींच्या ज्या कथा तोंडोतोंडी किंवा लहान-लहान गाथांतून विस्कळितपणे प्रचलित होत्या, त्यांचा एका ठिकाणी संग्रह करणे आवश्यक होते. सनातन धर्माला त्या कथांपासून प्रोत्साहन मिळणार होते. याशिवाय अशा प्रकारची ऐतिहासिक माहिती एकत्र झाल्याने सनातनधर्मियांचा पूर्वजांविषयींचा अभिमान जागृत करणेही सुलभ होणार होते. म्हणून सौतीने महा-भारतात अशा सर्व सांगोवांगीच्या कथा, प्रसंग साधून गुंफून टाकल्या. बौद्ध व जैन लोक त्या काळी भारतातील प्राचीन प्रसिद्ध पुरुषांच्या कथांना आपापल्या संप्रदायाचे वळण लाव-ण्याचा प्रयत्न करीत होते. त्या सर्व कथांचा संग्रह करून सौतीने बौद्ध-जैनांच्या त्या प्रयत्नांना आळा घातला. अशा प्रकारची जी आख्याने व उपाख्याने सौतीने महाभारतात समा-विष्ट केली, ती सगळी वेगळी काढून दाखविणे शक्य नाही. ती त्याने अगदी नवीनच बनवली असेही नाही. किंबहुना ती जुनीच होती. जनमानसात ती गुंजत होती आणि राष्ट्रीय भाव-नेशी एकजीव झाली होती; आणि म्हणूनच या राष्ट्रीय ग्रंथात त्यांचा संग्रह करण्याची आवश्यकताही उत्पन्न झाली होती. सौतीने ते काम चोख बजावले. नमुन्यादाखल त्यांतली काही उदाहरणे सांगता येतील, ती अशी —

(१) षोडशराजीय उपाख्यान — हे द्रोणपर्वात आहे. हे जुने आख्यान शतपथ ब्राह्मणामध्ये मूळ स्वरूपात दिसते.

(२) रामोपाख्यान — हे वनपर्वात आहे. हे आख्यान निःसंशय सौतीने घातले आहे. कारण मूळ भारतात एवढे उपाख्यान असणे संभवनीय दिसत नाही.

(३) सरस्वती-आख्यान — हे शल्यपर्वात असून, एकोणिस अध्यायांत त्याचा विस्तार झाला आहे. यातच दोनतीन उपाख्याने आहेत. वास्तविक भीम व दुर्योधन यांच्या गदायुद्धाचा तो निर्णायक प्रसंग. तिथे विषयांतराला अवसरच नाही; पण तरीही सौतीने बलराम तीर्थयात्रा संपवून नेमका तिथे आला, हे सूत्र पकडले आणि वरील आख्यानाचा प्रपंच केला. श्री. चिं. वि. वैद्य लिहितात — हे सारस्वतोपाख्यान घालणे सौतीस जरूर वाटले असावे. कारण, प्राचीन काळापासून ज्या सर-स्वतीचे माहात्म्य हिंदुस्थानात मानले गेले आहे, तिचे वर्णन महाभारतात येणे जरूर होते.

(४) विश्वामित्र क्षत्रियाचा ब्राह्मण झाला, ते आख्यान.

(५) पौष्य व पौलोमी यांची उपाख्याने. या जुन्या दंतकथा होत्या.

याचप्रमाणे व्यासांच्या काळापासून स्वतःच्या काळा-पर्यंत कौरव-पांडवांच्या इतिहासावर ज्या अनेक दंतकथा शेवाळ्यासारख्या वाढल्या होत्या, त्यांचाही समावेश सौतीने महाभारतात केला आहे.

महाभारतात अध्यायामध्ये एखादा गूढार्थक श्लोक नकळत डोकावतो. त्यातील एखादा शब्द भलताच अर्थ मनात उत्पन्न करणारा असतो. त्याचा रूढ अर्थ घेतल्यास अर्थज्ञानाला प्रति-बंध होतो. अशा श्लोकांना कूट श्लोक असे म्हटलेले आहे. महाभारतातल्या कूटश्लोकांची संख्या कित्येक हजारांवर जाईल, असे चिं. वि. वैद्य म्हणतात. त्यांपैकी काही उदाहरणे अशी—

यत्र सा बदरी रम्या ह्रदो वैहायसस्तथा ।

(शांति. १२७.३)

बदरीवनात वैहायस ह्रद (=आकाशातला डोह) कसा काय असू शकेल ? पण इथे वैहायस शब्द मंदाकिनी या अर्थाने वापरला आहे.

न शङ्खलिखितां वृत्तिं शक्यमास्थाय जीवितुम् ।

(शांति. १३०.२९)

इथे शंखलिखितां या शब्दाने शंखलिखित या स्मृतिकारांचे स्मरण होते; पण त्यामुळे अर्थ मात्र लागत नाही. शंख=ललाटावरचे हाड, यावर लिहिलेले भविष्य, असा अर्थ जेव्हा कळावा, तेव्हा ते कूट उलगडते.

पारावतकुलिङ्गाक्षाः सर्वे शूराः प्रमाथिनः ।

(शांति. १०१.७)

इथे पारावत म्हणजे पारवा आणि त्याच्या डोळ्यांसारखे डोळे असलेले शूर हेही कळले. पण कुलिंग म्हणजे काय ? कुलिंग=कुत्सित लिंग किंवा पृथ्वीचे लिंग अर्थात चिन्ह, असे अर्थ सकृत् दर्शनी डोळ्यांपुढे येतात; पण अर्थबोध मात्र होत नाही. कुलिंग म्हणजे सर्प, हा अर्थ जेव्हा कळेल, तेव्हा कोडे उकलते.

पुढील दोन कूट श्लोकांचे स्पष्टीकरण डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांनी दिले आहे, ते असे—

काकुदीकं शुकं नाकमक्षिसन्तर्जनं तथा ।
सन्तानं नर्तनं घोरमास्यमोदकमष्टकम् ।।

अर्थ — काकुदीक=काम, शुक=क्रोध, नाक=लोभ, अक्षिसंतर्जन=मोह, संतान = मद, नर्तन = मान, घोर = मत्सर, आस्यमोदक (तोंडातला लाडू)= अहंकार. हे आठ शत्रू म्हणजे दैवी अस्त्रे आहेत. हे ज्याचे विधान करतात, तो मनुष्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मृत्यूच्या आधीच मरून जातो. अतएव या आठ घोर शत्रूंपासून मनुष्याने दूर असावे.

अत्र ध्वजवती नाम कुमारी हरिमेधसः ।
आकाशे तिष्ठ तिष्ठेति तस्थौ सूर्यस्य शासनात् ॥

अर्थ – इथे हरिमेघाची ध्वजवती नावाची कन्या 'थांब थांब' अशा सूर्याच्या आज्ञेने आकाशात राहिली.

हा श्लोक जितका गूढ आहे, तितकाच ऐतिहासिक दृष्टचा महत्त्वाचा आहे. हरिमेघा व ध्वजवती कोण, तसेच सूर्याच्या आदेशाने ती आकाशात का उभी राहिली, या प्रश्नांचे उत्तर भारतीय साहित्यात कुठेही नाही. ते आहे झरतुष्ट्री धर्मात. अहुरमज्द हा पारशांचा सर्वश्रेष्ठ देव आहे. त्याला पहलवी भाषेत हुरमुज म्हटले आहे. गुप्त युगातल्या संस्कृत भाषेत त्याचे हरिमेधस् झाले. हरिमेधाचा उल्लेख पश्चिम दिशेच्या संबंधात शांतिपर्वात अनेकदा आला आहे. अहुरमज्दाची शक्ती व्हेरेनो या नावाने प्रसिद्ध होती. अहुरमज्दाच्या प्रभामंडलाच्या आत तिचे चित्र काढले जात असे. तिच्या दोही अंगी फडफडणारा पट किंवा ध्वज दाखवला जात असे. म्हणून महाभारतात तिला ध्वजवती हे नाव दिले गेले. प्राचीन काळी इराणात या प्रभारूपी शक्तीला तरुणीच्या स्वरूपात आकाशामध्ये दाखवले जात असे व तिला सूर्याची प्रेयसी मानले जात असे. म्हणून त्याच्या आज्ञेने ती आकाशात राहिली आहे. इराण हा भारताच्या पश्चिमेला असल्यामुळे पश्चिम दिशेच्या वर्णनात हा श्लोक घातला गेला आहे.

काही काल भारत आणि महाभारत या दोहोंचे पृथक अस्तित्व कायम राहिले होते. पाणिनीच्या अष्टाध्यायीत दोहोंचे अलग अलग नामोल्लेख येतात (६.२.३८). त्याच्याही पूर्वी आश्वलायनगृह्यसूत्रातील ऋषितर्पणात वंदनीय आचार्यांचे परिगणन करताना वैदिक ऋषींव्यतिरिक्त चार व्यासशिष्य आणि भारताचार्य व महाभारताचार्य यांची वेगवेगळी नावे येतात (३.४). कालांतराने म्हणजे संभवतः शुंगकालात भारतग्रंथ महाभारतात म्हणजे आपल्याच बृहत्तररूपात विलीन झाला. यांविषयीचा महाभारतातला एक श्लोक असा–

इदं शतसहस्रं तु श्लोकानां पुण्यकर्मणाम् ।
उपाख्यानैः सह ज्ञेयमाद्यं भारतमुत्तमम् ॥
(आदि १.१०१–१०२)

अर्थ– हे शतसहस्र श्लोक पुण्यकर्मे करणाऱ्या मनुष्यांच्या उपाख्यानांसह (बनलेले) आद्य उत्तम भारतच जाणावे.

वैशंपायनाचे संस्करणही पर्वांतच विभागले होते; पण ही पर्वे लहान लहान होती. सौतीने अशी लहान पर्वे एकत्र करून आपला प्रचंड ग्रंथ १८ पर्वांत बांधला. सौतीने केलेल्या महाभारताच्या १८ पर्वांची नांवे पुढीलप्रमाणे आहेत –

(१) आदि (२) सभा (३) वन (४) विराट (५) उद्योग (६) भीष्म (७) द्रोण (८) कर्ण (९) शल्य (१०) सौप्तिक (११) स्त्री (१२) शांती (१३) अनुशासन (१४) आश्वमेधिक (१५) आश्रमवासिक (१६) मौसल (१७) महाप्रस्थानिक व (१८) स्वर्गारोहण.

हरिवंश हे पर्व खिल म्हणजे मागून जोडलेले १९ वे पर्व होय. हे सौतीने ग्रंथाच्या पूर्तीसाठी निर्माण केले.

प्रस्तुत महाभारतात भार्गवविषयक आख्यानांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. भृगूंच्या कितीतरी कथा महाभारतात आल्या आहेत. भृगूंचा जो गौरव वैदिक साहित्यातही आढळत नाही, तो पहिल्या प्रथम महाभारतात आढळतो. भार्गवकथांच्या समावेशनानेच मूळ भारत ग्रंथाला महाभारत हे स्वरूप प्राप्त झाले. हे कार्य व्यासांनी किंवा वैशंपायनाने केले असण्याची शक्यता नाही. सौतीने एकट्याने ही गोष्टी केली असेल, हेही संभवनीय वाटत नाही. यावरून असे अनुमान निघते, की महाभारताचे एक संस्करण भार्गवांच्या साक्षात प्रभावाखाली झाले असले पाहिजे. ज्या शौनकाने सौतीला भारतकथेविषयी प्रश्न केला तो शौनक स्वतः भृगुकुलोत्पन्न होता. त्याने भरतवंशाची कथा ऐकण्याआधी भार्गववंशाची कथा ऐकण्याची इच्छा प्रकट केली आहे (आदि. ५.३). आदिपर्वातले और्व उपाख्यान, वनपर्वातले कार्तवीर्य उपाख्यान, उद्योगपर्वातले अंबा उपाख्यान, शांतिपर्वातले विपुलोपाख्यान ही सर्व भार्गवांची उपाख्याने आहेत. आदिपर्वातल्या पौलोम व पौष्य या उपपर्वांचा अर्धांश भागही भार्गवकथांनीच भरलेला आहे. महाभारतात भृगुकुलाला जेवढे स्थान प्राप्त झाले आहे, तेवढे कोणत्याही ऋषिकुलाला नाही. या भृगुकुलातल्या महापराक्रमी पुरुषांचे भीष्म, कर्ण, कृष्ण, अर्जुन अशा अतिरथी–महारथींशी साम्य दिला आहे आणि कुठे कुठे ते या अतिरथी–महारथींपेक्षाही वरचढ ठरले आहेत.

महाभारतकथा – मनूपासून सूर्य आणि सोम हे वंश उत्पन्न झाले. मनूची इला नावाची मुलगी बुधाला दिली होती. तिच्या संततीला सोमवंश म्हणतात. या वंशात पुरू नावाचा पुत्र जन्मला. त्याच्यापासून पाचव्या पिढीत दुष्यंत झाला. दुष्यंताचा पुत्र भरत हा चक्रवर्ती झाला. त्याच्या पश्चात १०–१२ पिढ्यांत कुणी नावाजता राजा झाला नाही. १२ व्या पिढीत प्रतीप झाला. प्रतीपाचा पुत्र शांतनू. त्याला गंगेपासून देवव्रत नावाचा पुत्र झाला. एकट्या पुत्राने वंशवृद्धी मनाजोगती होणार नाही अशा सबबीवर शांतनू पुन्हा लग्नाला तयार झाला. दाशराजाची कन्या सत्यवती हिला त्याने वरण्याचे योजले; पण तिच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बापाने अट घातली, की 'हिच्यापासून झालेल्या मुलाला राज्य देणार असशील, तर मी माझी मुलगी देईन.' शांतनूला ते पटले नाही; मात्र तो सत्यवतीच्या प्राप्तीसाठी मनातल्या मनात झुरत राहिला. देवव्रताने बापाच्या या अस्वस्थ मनोवृत्तीचे कारण समजून घेतले. मग दाशार्हाकडे जाऊन तो त्याला म्हणाला. 'सत्यवतीचा मुलगा राजा होईल आणि मी आमरण ब्रह्मचर्य पाळीन. तू आपली मुलगी माझ्या वडिलांना दे.' त्यावर शांतनू आणि सत्यवती यांचे लग्न झाले. पित्याच्या सुखासाठी देवव्रताने घोर प्रतिज्ञा केली, हे पाहून देवांनी देवव्रताला भीष्म असे नाव दिले.

सत्यवतीला चित्रांगद व विचित्रवीर्य असे दोन मुलगे झाले. मग थोड्याच काळात शांतनू निवर्तला. दोन्ही मुलांचा भीष्मानेच प्रतिपाळ केला. चित्रांगद तारुण्याच्या उंबरठ्यावर असतानाच गंधर्वांच्याकडून मारला गेला. उरला विचित्रवीर्य. तो वयात येताच भीष्माने काशिराजाच्या अंबा, अंबिका व अंबालिका या तीन कन्या विचित्रवीर्यासाठी हरण करून आणल्या. त्यांपैकी अंबेने आधीच शाल्वाला मनाने वरले होते. भीष्माने तिला शाल्वाकडे जाण्याची अनुज्ञा दिली; पण शाल्वाने तिचा स्वीकार केला नाही. अशी परवड झाल्याने ती भीष्मावर रागावली आणि त्याचा सूड घेण्याच्या हेतूने तपस्येला निघून गेली.

अंबिका व अंबालिका यांच्याशी विचित्रवीर्याचे लग्न झाले; पण त्यांचे सौभाग्य अल्पकालीच ठरले. विचित्रवीर्य क्षयी होऊन मरून गेला. दोघींनाही पुत्र नसल्याने वंश खंडित होण्याची वेळ आली. मग सत्यवतीने व्यासांचे स्मरण केले. तो तिचा कौमार्यातला पुत्रच होता. नियोगपद्धतीने आपल्या सुनांच्या ठिकाणी पुत्रोत्पत्ती करण्याबद्दल तिने व्यासांना सांगितले. व्यासापासून अंबालिकेला पांडू व अंबिकेला धृतराष्ट्र असे दोन मुलगे झाले. एका दासीच्या पोटी विदुर झाला. तो महाज्ञानी निपजला. धृतराष्ट्र हा जन्मांध आणि पांडू हा जन्मजात पांडुरोगी निपजला. त्या दोघांत पांडू अधिक लायक असे मानून भीष्माने त्याला राज्याधिकारी ठरविले. तो पांडूच्या वतीने कारभार पाहू लागला. धृतराष्ट्र, पांडू व विदुर या तिघांनाही शिक्षण देऊन त्याने योग्य वेळी त्यांची लग्नेही केली. धृतराष्ट्राने गांधारीला वरले. आपला पती अंध आहे असे समजताच तिने आपल्याही डोळ्यांवर कायमची पट्टी बांधली. कुंती आणि माद्री यांना पांडूने वरले. त्याने दिग्विजय करून आपले राज्य वाढवले. बराच काळ त्याला संतानच झाले नाही. त्यामुळे तो उद्विग्न होऊन शिकारीच्या निमित्ताने अरण्यातच जाऊन राहिला. एकदा त्याच्या हातून एका कामोत्सुक मुनीचा वध झाला. त्याने मरताना पांडूला शाप दिला, की 'तूही स्त्रीसंग घडताच तत्काल मरशील.' त्यामुळे त्याची पुत्रप्राप्तीची इच्छा कायमचीच खुंटली. मग त्याने आपल्या बायकांना नियोगाची अनुज्ञा दिली. त्यावर कुंती म्हणाली. 'मला एका ऋषीने मंत्रविद्या शिकवली आहे. मंत्राने पाचारलेला देव मला पुत्र देईल.' पांडू म्हणाला. 'ठीक आहे.' मग यम, वायू आणि इंद्र या देवांपासून कुंतीला अनुक्रमे धर्म, भीम व अर्जुन हे तीन पुत्र झाले. नकुल सहदेव हे माद्रीच्या पोटी अश्विनीकुमारांपासून जन्मले.

याच वेळी गांधारीही गर्भवती होती. आपल्या आधी कुंती–माद्रीला पुत्र झाल्याचे ऐकून ती छाती पिटून रडू लागली. या आघाताने तिचा गर्भ पतन पावला. ती गर्भपेशी तुपाच्या कढईत सुरक्षित ठेवण्यात आली. योग्य वेळी त्या पेशीतून शंभर पुत्र व एक कन्या अशी मुले जन्म पावली. गांधारीचे हे दुर्योधन, दुःशासन, इत्यादी पुत्र कौरव म्हणून प्रसिद्ध पावले.

इकडे वनात एके दिवशी माद्रीचा अंगसंग करीत असता पांडू मरण पावला. माद्रीने त्याच्या बरोबर सहगमन केले. मग कुंती पाच पुत्रांसह हस्तिनापुराला आली. त्या पांडवांना पाहून भीष्माला संतोष झाला. कौरव–पांडव एकत्र वाढू लागले. त्या दोघांत भांडणे आणि मारामाऱ्याही होऊ लागल्या. कौरवांनी कुरापत काढली, की भीम त्यांचा यथेच्छ समाचार घेत असे. भीष्माने या सर्व मुलांना धनुर्विद्या शिकविण्यासाठी कृपाचार्यांची योजना केली. काही काळाने द्रोणाचार्यांनीही आपला मुलगा अश्वत्थामा याच्यासह हस्तिनापुरी आगमन केले. तो अस्त्रविद्येत पारंगत आहे, हे पाहून भीष्माने त्याला कौरव–पांडवांचा शिक्षक म्हणून नेमले. द्रोणाने कौरव–पांडवांचे शिक्षण परिपूर्ण केले. कुंतीचा कर्ण नावाचा कानीन पुत्र तिने टाकला होता. तो एका सूताने सांभाळला होता. तोही कौरव–पांडवांसह धनुर्विद्या शिकला व तिच्यात त्याने विशेष प्राविण्य मिळविले. मग या शिष्यांची जाहीरपणे परीक्षा घेण्यात आली. त्या परीक्षेच्या वेळी कर्ण अर्जुनाशी सामना द्यायला आला. पण 'तू क्षत्रिय नसून सूतपुत्र आहेस, तेव्हा तुझ्याशी मी सामना करणार नाही' असे म्हणून अर्जुनाने कर्णाचा हिरमोड केला. ती गोष्ट कर्णाला लागली. कर्ण आणि दुर्योधन यांचे सख्य होते. कर्णाचा पुनश्च असा तेजोभंग होऊ नये म्हणून दुर्योधनाने कर्णाला अंगदेशाचा राजा बनविले. मैत्रीतले हे औदार्य कर्ण जन्मभर विसरला नाही. त्याने यावज्जीव दुर्योधनाचा पाठपुरावा केला.

मग द्रोणाने शिष्यांकडे गुरुदक्षिणा मागितली. शिष्यांनी विचारले, की 'काय गुरुदक्षिणा हवी ?' द्रोण म्हणाला. 'द्रुपद राजाने माझा अपमान केला आहे; त्याला तुम्ही जिवंत पकडून माझ्यापुढे आणावे.' ते काम अर्जुनाने पार पाडले. द्रोणाने द्रुपदाचे अर्धे राज्य हिरावून घेतले व त्याला क्षमा केली. तो घोर अपमान द्रुपदाच्या मनात सलत राहिला. द्रोणाला ठार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करील असा पुत्र आपल्याला हवा म्हणून त्याने एक यज्ञ केला. त्या यज्ञाने अग्नी प्रसन्न होऊन त्याने द्रुपदाला धृष्टद्युम्न नावाचा पुत्र आणि द्रौपदी नावाची कन्या अशी दोन अपत्ये दिली. आणखी एक कन्या द्रुपदाला झाली होती; पण पुढे तिला पुरुषत्व प्राप्त झाले आणि तो पुरुष शिखंडी या नावाने आणखी एक द्रुपदपुत्र ठरला. एवंच, द्रुपदाच्या या यज्ञातून भावी अनर्थांची बीजे निर्माण झाली.

पुढे दुर्योधनाने बलरामाकडे गदायुद्धाचा व कर्णाने परशुरामाकडे अस्त्रविद्येचा विशेष अभ्यास केला. मग भीष्माने धर्मराजाला यौवराज्याचा अभिषेक केला. राज्य पांडुपुत्राकडे गेले. त्यामुळे धृतराष्ट्र व कौरव मत्सराने ग्रस्त झाले. हळूहळू त्यांच्यांतले वैमनस्य वाढीस लागले. भीष्माला ते कळून आल्यावर त्याने कौरव-पांडवांना वेगळे करायचे ठरविले. धृतराष्ट्राला ती गोष्ट आवडली. त्याने पांडवांना वारणावत नगरीत जाऊन वास्तव्य करण्याची आज्ञा दिली. पांडव तिकडे जात आहेत हे कळल्यावर कौरवांनी त्यांचा कायमचा काटा काढण्याचा गुप्त बेत केला. त्यांनी पुरोचनाला सांगून पांडवांसाठी ज्वालाग्राही पदार्थांचे लाक्षागृह बांधविले. या कटाचा सुगावा विदुराला लागला. त्याने त्या लाक्षागृहातून भुयार खोदण्यासाठी एक मनुष्य पाठविला. त्या माणसाने ते काम बेमालूम केले. पांडव लाक्षागृहात राहायला जाण्याआधी विदुराने सांकेतिक भाषेत पांडवांना तशी सूचनाही दिली. पांडव सावधपणे त्या घरात राहिले. एका रात्री पुरोचनाने लाक्षागृहाला आग लावून दिली. पांडव लगेच उठले आणि त्या भुयारातून कुंतीसह सुखरूपपणे बाहेर पडले. मग काही काळ त्यांनी गुप्त राहायचे ठरविले.

एका रात्री पांडव रानात झोपले असता हिडिंब नावाचा एक राक्षस आणि हिडिंबा नावाची त्याची बहीण यांना माणसाचा वास आला. हिडिंबाने आपल्या बहिणीला त्यांच्या मागावर पाठविले. तिला पांडव दिसले. त्यांतला भीम तिला फार आवडला. पांडवांना ठार करण्याचे सोडून ती भीमावर अनुरक्त झाली आणि तिथेच बसून राहिली. बराच वेळ हिडिंबा परत येत नाही असे पाहिल्यावर हिडिंब खवळून तिथे आला. भीमाचे आणि त्याचे युद्ध झाले. त्या युद्धात भीमाने त्याला ठार केले. मग हिडिंबेने भीमाशी लग्न करण्याची अनुज्ञा मागितली. ती म्हणाली. 'भीमापासून माझ्या पोटी गर्भ राहिला म्हणजे मी तुम्हाला सोडून जाईन.' कुंतीने तिचे म्हणणे मान्य केले. भीम व हिडिंबा यांचे लग्न झाले. काही दिवसांनी हिडिंबा गर्भवती झाली आणि तिला घटोत्कच नावाचा पुत्र झाला.

पुढे पांडव एकचक्रा नगरीला आले आणि ब्राह्मणवे[...] एका ब्राह्मणाच्या [...] राहिले. उपजीविकेसाठी त्यांनी [...] करी मागणे सुरू केले. या एकचक्रा नगरीला ब[...] नावाच्या राक्षसाची पीडा होती. नगरातल्या लोकांनी [...] संहार टळावा या हेतूने घरटी एक माणूस पाळीप[...] त्याच्याकडे खाण्यासाठी पाठवायचा असे ठरविले होते. [...] दिवशा ती पाळी ब्राह्मणाच्या घरावर आली आणि तिथे [...] रड सुरू झाली. त्या वेळी कुंतीने ब्राह्मणाची समजूत [...] भीमाला बकासुराकडे पाठविले. तो अंगावर चालून [...] भीमाने त्याला अधांतरी गरगर फिरवून भूमीवर [...] आणि त्याचा प्राण घेतला. भीमामुळे ब्राह्मणावरचेच नव्हे [...] सगळ्या नगरावरचेच संकट कायमचे नष्ट झाले.

थोड्या दिवसांनी पांडवांना एक ब्राह्मण भेटला. तो [...] दीच्या स्वयंवरात दक्षिणा मिळविण्यासाठी पांचाल न[...] चालला होता. पांडव म्हणाले. 'आम्हीही तुझ्याबरोबर [...] पाहायला येतो.' ते निघाले आणि योग्य वेळी स्वयंवरा[...] दाखल झाले. त्यांनी अजून ब्राह्मणवेष टाकला नसल्या[...] ब्राह्मणसमुदायातच बसले. क्षत्रियांच्या विभागात दुर्योधन, [...] शकुनीप्रभृती मंडळी त्यांना दिसली. श्रीकृष्ण आणि [...] हेही त्या स्वयंवराला आले होते; पण अजून कृष्णाची [...] वांची ओळख व्हायची होती. योग्य वेळी द्रुपदाने स्वयं[...] पण घोषित केला.

"मंडपात एक फिरते चक्र टांगलेले आहे. त्याव[...] मत्स्य आहे. खाली तेलाची कढई आहे. तेलात मत्स्याचे [...] बिंब पाहायचे आणि वर बाण सोडायचा. जो कोणी या [...] यंत्राचा भेद करील त्याला द्रौपदी माळ घालील."

अनेक राजपुत्रांनी तसा प्रयत्न केला; पण कोणा[...] जमले नाही. मग कर्ण उभा राहिला. त्याला पाहून [...] म्हणाली, 'हा सूतपुत्र आहे. याने मत्स्यवेध केला, [...] याला वरणार नाही.' त्यामुळे कर्णाचा तेजोभंग झाला. [...] द्रौपदीचा सूड उगविण्याची त्याच वेळी प्रतिज्ञा केली.

मग अर्जुन उठून उभा राहिला. त्याने मत्स्यभेद क[...] जिंकला. द्रौपदीने त्याच्या गळ्यात माळ घातली. एका [...] णाने द्रौपदीसारखे कन्यारत्न हस्तगत केल्याचे पाहून स[...] मंडळ खवळले. सर्व राजपुत्रांनी द्रौपदीला पळवून [...] ठरविले. त्या वेळी श्रीकृष्णाने मध्यस्थी करून युद्धाचा [...] टाळला. अर्जुन द्रौपदीला घेऊन कुंतीकडे आला. 'आ[...] अपूर्व भिक्षा आणली आहे.' असे तो कुंतीला [...] म्हणाला. त्यावर कुंती म्हणाली 'पाचहीजण वाटून घ्या[...]' द्रौपदीला पाहिले असते, तर ती असे बोलली नसती. [...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वचन सत्य करायचे म्हणून पाचही पांडवांनी द्रौपदीशी लग्न केले.

मग श्रीकृष्ण व बलराम कुंतीला येऊन भेटले. परस्परांचा परिचय झाला. ही वार्ता हस्तिनापुरात कळली. धृतराष्ट्राने पांडवांना हस्तिनापुरात आणण्यासाठी विदुराला पाठविले. पांडव पुनश्च हस्तिनापुरात आले. पुनश्च कौरव-पांडवांचे अंतर्वैर सुरू झाले. ते वाढीस लागायला नको म्हणून भीष्माने राज्याची वाटणी केली आणि पांडवांना इंद्रप्रस्थ ही राजधानी नेमून देऊन त्यांची तिकडे रवानगी केली.

इंद्रप्रस्थात स्थिरस्थावर झाल्यावर नारद पांडवांकडे आला. एका बायकोवरून पाचजणांत कलह माजू नये म्हणून त्याने वर्षातील दोन महिने व बारा रात्री एकेकाने आळीपाळीने द्रौपदीशी संसार करावा असा नेम घालून दिला. हा नेम मोडील त्याने एक वर्ष वनवास पत्करावा असेही ठरवून दिले.

पुढे एका रात्री एक ब्राह्मण 'चोरांनी आपल्या गायी पळविल्या' म्हणून आक्रोश करीत अर्जुनाकडे आला. अर्जुनाने त्याला धीर दिला आणि तो शस्त्रे आणण्यासाठी शस्त्रागारात गेला. तिथे धर्म व द्रौपदी एकांतात बसली होती. अर्जुनाच्या हातून नियमभंग झाला होता. त्याने प्रथम ब्राह्मणाच्या गायी सोडवून आणल्या आणि नंतर लगेच नियमभंगाचे प्रायश्चित्त म्हणून वनवास करण्यासाठी इंद्रप्रस्थ सोडले. या वनवासात तो अनेक देश हिंडला. या प्रवासात उलूपी नावाची नागकन्या व मणिपूरची राजकन्या चित्रांगदा, या दोघींचे त्याने पाणिग्रहण केले. पुढे द्वारकेला आल्यावर तो कृष्णभगिनी सुभद्रा हिच्या प्रेमात पडला. बलराम तिला दुर्योधनाला द्यावयाचे ठरवीत आहे, असे समजताच एके दिवशी सुभद्रेला त्याने पळवूनच नेले. या गोष्टीला कृष्णाची संमती होतीच. प्रथम बलराम खवळला; पण कृष्णाने त्याची युक्ति-प्रयुक्तीने समजूत काढली. मग त्या दोघांचा लग्नसमारंभ थाटात पार पडला. सुभद्रेला घेऊन अर्जुन इंद्रप्रस्थात आला.

इंद्रप्रस्थात द्रौपदीला पाच पांडवांपासून पाच पुत्र झाले. त्यांची नावे प्रतिविंध्य, सुतसोम, श्रुतकर्मा, शतानीक व श्रुतसेन अशी होती. सुभद्रेला अभिमन्यू नावाचा पुत्र झाला. पुढे एके दिवशी अर्जुन कृष्णासह वनविहाराला गेला असता त्याने खांडववन पाहिले. ते दग्ध करून आपल्या राज्याची सीमा वाढवावी असा विचार अर्जुनाच्या मनात आला. त्याने त्या वनाला आग लावली. त्या वणव्यात पशु-पक्षी, कृमि-कीटक सगळेच जळू लागले. मय नावाचा एक असुर त्या वनातच राहत होता. तो प्राणभयाने कृष्णार्जुनांना शरण गेला. अर्जुनाने त्याला जीवदान दिले. खांडववन भक्षून अग्नी तृप्त झाला. त्याच्याकडून अर्जुनाला दिव्य रथ, अभंग धनुष्य व अक्षय्य भाते या वस्तू प्राप्त झाल्या. त्याचबरोबर अग्नीने कृष्णालाही एक दिव्य चक्र दिले.

सभापर्व – खांडववनात जगलेल्या मयासुराने कृतज्ञता म्हणून पांडवांना एक लोकपालसभा निर्माण करून दिली. त्या सभेत अशा गमती होत्या, की भिंतीच्या ठिकाणी दार दिसावे व दाराच्या जागी भिंत दिसावी; पाण्याच्या जागी भूमी दिसावी आणि भूमीच्या जागी पाणी दिसावे. अशा त्या अद्भुत सभेत धर्मराज सिंहासनावर बसला असता नारद तिथे आला. काही गप्पागोष्टी झाल्यावर त्याने धर्मराजाला राजसूय यज्ञ करण्याची शिफारस केली. धर्मराजाने ती स्वीकारली व त्या बाबतीत श्रीकृष्णाचा सल्ला घेण्याचे ठरविले. श्रीकृष्णाला ती गोष्ट हवीच होती. कारण त्या प्रसंगाने जरासंध आणि शिशुपाल या दोन उन्मत्त राजांचा संहार घडवून आणता येणार होता. श्रीकृष्ण लगेच इंद्रप्रस्थाला आला आणि भीमार्जुनांना बरोबर घेऊन जरासंधावर स्वारी करण्याकरिता निघाला. सर्वांनी ब्राह्मणाचे वेष घेतले होते. कृष्णाने जरासंधाकडे युद्धभिक्षा मागितली. भीम व जरासंध यांचे युद्ध झाले. त्यात जरासंध मारला गेला. जरासंधाच्या वधाने देशातल्या अनेक दुष्ट राजांना दुष्कर्मात प्रवृत्त करणारी मूळ शक्तीच नष्ट झाली. मग कृष्णाने जरासंधाच्या कारागृहात खितपत पडलेल्या अनेक राजांची मुक्तता केली व जरासंधपुत्र सहदेव याला राज्यावर बसवले.

पुढे भीम, अर्जुन, नकुल व सहदेव यांनी अनुक्रमे पूर्व, उत्तर, दक्षिण व पश्चिम दिशा जिंकून दिग्विजय केला व अपार धनसंपत्ती इंद्रप्रस्थात आणली. मग सर्व कौरवांना आणि तत्संबंधियांना पाचारण करून धर्माने राजसूयाची दीक्षा घेतली व सर्वांना संतुष्ट करून राजसूय यज्ञ पार पाडला. या यज्ञात अग्रपूजा कोणाची करायची असा प्रश्न पडला. भीष्माने कृष्णाचे नाव सुचविले. शिशुपालाने त्याला हरकत घेतली. त्या संबंधात जी बोलाचाली झाली तिच्यात शिशुपालाने कृष्णाची खूप निन्दा केली. ते निमित्त साधून कृष्णाने त्या उन्मत्त शिशुपालाचे सुदर्शन चक्राच्या योगे मस्तक तोडले.

सर्व राजमंडळ परतले तरी कौरव मागे राहिले. दुर्योधनाला ती अपूर्व मयसभा पाहायची होती. पांडव ती त्याला दाखवायला निघाले. दुर्योधन एके ठिकाणी भूमी समजून पुढे जाऊ लागला आणि पाण्यात पडून भिजला. ते पाहून सर्व पांडवांनी त्याची चेष्टा केली. ती गोष्ट दुर्योधनाच्या जिव्हारी लागली व पांडवांवर जळफळतच तो हस्तिनापुरास गेला.

मग पांडवांचे ऐश्वर्य कसे हरण करता येईल, याविषयी कौरवांमध्ये खल सुरू झाला. शकुनीने द्यूताचा मार्ग सुचवला, तो कौरवांना पटला. धर्मराजाला बोलावणे गेले. युद्धासाठी व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

द्यूतासाठी कोणी आव्हान दिले, तर ते स्वीकारणे हा क्षत्रियाचा धर्म आहे, हे धर्मराजाला ठाऊक होते; म्हणून तो द्यूतासाठी हस्तिनापुरास गेला आणि त्या द्यूतात सर्वस्व हरला. मग कौरवांनी पांडवांची वस्त्रे उतरून घेण्याची आज्ञा केली. पांडवांनी ती स्वतःच उतरून ठेवली. मग राणीवशात असलेल्या द्रौपदीला सभेत आणण्यात आले. त्या वेळी ती रजस्वला होती. दुःशासनाने जेव्हा तिच्या निरीला हात घातला, तेव्हा त्या कुलस्त्रीवर आकांत गुदरला. या प्रसंगी आपले पती व भीष्म – द्रोणादी मंडळी कोणीच आपले लज्जारक्षण करू शकत नाही, असे दिसून आल्यावर तिने आपला धर्मबंधू श्रीकृष्ण याचा धावा केला. त्याने धावत येऊन तिला अदृश्य रूपाने वस्त्रे पुरवली. दुःशासनाने तिचे एक वस्त्र फेडले, तर दुसरे त्याच्या खाली तयार. ते फेडले तर त्याखाली तिसरे. दुःशासन वस्त्रे फेडून फेडून दमला. मग धृतराष्ट्राने तो प्रसंग आवरता घेण्याचे ठरविले. आपल्यावर भलताच प्रसंग गुदरेल अशी त्याला भीती वाटली. त्याने द्रौपदीला म्हटले. 'तू मागशील तो वर देईन.' तिने 'आपले पती दास्यमुक्त व्हावे आणि त्यांची शस्त्रे त्यांना परत मिळावी' असा वर मागितला. धृतराष्ट्राने तो वर तर दिलाच; शिवाय पांडवांचे राज्यही त्यांना परत दिले. सर्व पांडव द्रौपदीसह इंद्रप्रस्थाला जायला निघाले.

आपला बेत धृतराष्ट्राने अशा प्रकारे सर्वस्वी फसवला हे पाहून कौरव कासावीस झाले. पुनश्च एकवार पांडवांना द्यूतासाठी बोलवावे, अशी दुर्योधनाने धृतराष्ट्राला गळ घातली. धृतराष्ट्र मोहवश झाला आणि दुर्योधनाला त्याने तशी परवानगी दिली. धर्माने पुनश्च ते आव्हान स्वीकारले. एकच डाव खेळायचा आणि त्यात जो हरेल त्याने बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास पत्करायचा, अशा अटीवर तो डाव सुरू झाला. त्या डावातही धर्मराज हरला. पांडवांच्या कपाळी बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास आला. त्याप्रमाणे पांडव द्रौपदीसह वनवासाला निघाले.

· वनपर्व – पांडव वनवासाला निघाले, तो दिवस कार्तिक शुद्ध पंचमी हा होता. त्यांच्या बरोबर त्यांचा पुरोहित धौम्य ऋषीही होता. वनात एका रात्री त्यांच्यावर किर्मीर नावाचा राक्षस चालून आला. भीमाने त्याला ठार केले. पांडवांवर वनवासाची पाळी आली, हे वृत्त द्वारकेत कृष्णाला समजताच तो त्यांच्या भेटीस आला. तो म्हणाला. 'मी आत्ताच्या आत्ता दुर्योधनावर स्वारी करून त्याला जिंकतो आणि तुमचे राज्य तुम्हांला परत मिळवून देतो.' पण धर्मराजाने ती गोष्ट नाकारली. कृष्ण निघून गेल्यावर व्यास महर्षी पांडवांकडे आले. त्यांनी धर्मराजाला म्हटले, 'तेरा वर्षांनंतरही कौरवांना जिंकून तुला तुझे राज्य मिळविणे जड जाईल. त्यासाठी तुमची [आता]पासूनच तयारी हवी. म्हणून अर्जुनाने तपश्चर्या करून [अस्त्रे] मिळवावी.'

व्यासांचा तो उपदेश मान्य करून अर्जुन हिमालयात [गेला] आणि तप करू लागला. शिवाने त्याला पाशुपतास्त्र देण्या[पूर्वी] त्याची बलपरीक्षा घ्यायचे ठरविले. त्याने किरातवेषाने अर्जुना[शी] युद्ध आरंभिले. अर्जुनाला शंकराचा पराभव करता आला न[ाही]; पण त्या युद्धात शंकराला अर्जुनाच्या सामर्थ्याची मात्र पू[र्ण] खात्री पटली. मग शंकराने त्याला पाशुपतास्त्र दिले. [इतर] अष्ट लोकपालांनीही त्याला आपापल्या शक्ती दिल्या. अर्जुन इंद्रलोकी गेला. इंद्राने त्याचे स्वागत केले आणि [त्याला] आपल्याकडची सर्व अस्त्रविद्या शिकवली. इंद्राचे प्रिय कर[ावे] म्हणून अर्जुनाने इंद्राला त्रास देणाऱ्या निवातकवचादी दै[त्यांवर] स्वारी करून त्यांना ठार मारले. इंद्राने आपल्या [अर्ध्या] सिंहासनावर बसवून अर्जुनाचा विशेष गौरव केला. स्वर्गा[तील] या मुक्कामात उर्वशी ही अप्सरा अर्जुनावर भाळली; [पण] त्याने तिचा स्वीकार केला नाही. त्यामुळे चिडून तिने अर्जु[नाला] शाप दिला, की 'एक वर्ष तू षंढ होशील.'

अर्जुन तपश्चर्येला गेला, तेवढ्या काळात पांडवांनी [लोमश] ऋषीला बरोबर घेऊन तीर्थयात्रा केल्या. तीर्थयात्रा [करून] पांडव गंधमादन पर्वतावर वास्तव्याला गेले. स्वर्गातून [परत] आलेला अर्जुन इथेच त्यांना भेटला. मग ते सगळे द्वैत[वनात] राहायला आले.

ते द्वैतवनात आल्याचे समजताच कौरवांची दुष्ट [बुद्धी] पुनश्च जागृत झाली. गायींच्या खिल्लारांची पहाणी कर[ण्याचे] मिष करून ते पांडवांकडे आले. त्यांचा अंतःस्थ हेतू हा [होता] की पांडवांपुढे आपल्या वैभवाचे प्रदर्शन करून त्यांना खि[जवावे]; पण झाले ते उलटेच. चित्ररथ गंधर्वाला दुर्योधनाचा नीचपणा आवडला नाही. त्याने कौरवांवर हल्ला केला [आणि] सर्वांची पांगापांग करून दुर्योधनाला पकडले. मग त्याचा [अपमान] वान करून चित्ररथ गंधर्व आपल्या देशाला जायला नि[घाला]. ही वार्ता घेऊन दुर्योधनाचे अनुयायी धर्मराजाकडे आले. [धर्म]राजाने दुर्योधनाला सोडवून आणण्याबद्दल भीमार्जुनांना [आज्ञा] केली. भीम म्हणाला.' कशाला त्याला सोडवायचे ? परस्पर[च] निघाला ते बरे झाले.' त्यावर धर्म म्हणाला. 'तू बु[द्धी]... गंधर्वाने केवळ दुर्योधनाचा पराभव केला असे नव्हे; तर आपल्या कुरुकुलाचा अपमान केला आहे. जेव्हा आपण आ[पसात] भांडू, तेव्हा ते शंभर आणि आम्ही पाच. पण जेव्हा पर[की] चालून येईल आणि आपल्या कुरुकुलाचा उपमर्द करील, [तेव्हा] ते शंभर आणि आम्ही पाच मिळून एकशे पाच.'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यावर काही बोलता आले नाही. मग भीमार्जुनांनी चित्ररथावर चाल करून दुर्योधनाला सोडवून आणले. अशा प्रकारे त्या प्रसंगाची परिणती कौरवांच्या फजितीतच झाली.

पुढे काही काळाने दुर्योधनाचा मेहुणा जयद्रथ हा प्रवासाला जात असता त्याला पांडवांचा आश्रम दिसला. पांडव शिकारीला गेले आहेत आणि द्रौपदी एकटीच आश्रमात आहे, असे पाहिल्यावर त्याला द्रौपदीची अभिलाषा उत्पन्न झाली. बळे बळे तिला रथात बसवून तो मार्गस्थ झाला. द्रौपदी घाबरली. तिने पांडवांच्या नावाने टाहो फोडला. तिची ती अवस्था कोणीतरी पांडवांना कळवली. भीमार्जुन लगेच धावले. त्यांनी जयद्रथाला पकडून धर्मराजापुढे आणले. 'मी पांडवांचा दास आहे' हे शब्द उच्चारल्यानंतरच त्याची सुटका झाली.

एकदा एका हरणाने एका ऋषीची अरणी पळविली. पांडव त्या मृगाचा पाठलाग करण्यास निघाले. वाटेत ते तहानेने व्याकुळले. धर्मराजाने सहदेवाला पाण्याचा शोध घेण्यासाठी पाठविले. त्याला जवळच एक तलाव दिसला. तो पाणी प्यायला निघाला असता तिथल्या एका यक्षाने त्याला बजावले. 'माझ्या प्रश्नांची उत्तरे दिल्याशिवाय पाणी पिऊ नकोस.' ती आज्ञा न मानून सहदेव पाणी प्याला आणि तिथेच मरून पडला. मागाहून इतर तिघे आले व त्यांचीही दशा तीच झाली. शेवटी धर्मराज आला. त्यालाही यक्षाने तीच आज्ञा केली. धर्मराज म्हणाला. 'विचार तुझे प्रश्न.' यक्षाने त्याला अनेक समस्यात्मक प्रश्न विचारले. धर्मराजाने त्या सर्वांची समर्पक उत्तरे दिली. यक्ष प्रसन्न झाला; पण त्याने धर्माची आणखी एक परीक्षा घ्यायचे ठरविले. तो म्हणाला. 'तुझ्या चार भावांपैकी एकाला कोणाला तरी उठवीन. कोणाला उठवू ते सांग.' त्यावर धर्म म्हणाला. 'कुंतीचे तीन व माद्रीचे दोन असे आम्ही पाच. कुंतीचा मी जिवंत आहे. माद्रीचाही एक जिवंत असू दे. म्हणून नकुलाला तू उठव.' धर्मराजाची ही समबुद्धी पाहून यक्ष अधिकच संतुष्ट झाला आणि त्याने त्या चौघांही भावांना उठविले.

आता वनवासाची मुदत भरत आली होती. तेव्हा अज्ञातवास कुठे काढावा हा पांडवांच्या पुढे प्रश्न पडला. त्या वेळी यमधर्माने प्रत्यक्ष दर्शन देऊन पांडवांना विराटाच्या नगरीत अज्ञातवास करण्याचा आदेश दिला आणि 'त्या मुदतीत तुम्हांला कोणी ओळखणार नाही' असा आशीर्वादही दिला.

विराटपर्व – यमधर्माच्या आदेशाप्रमाणे पांडव विराटनगराला जाण्यासाठी मत्स्य देशाकडे निघाले. धर्माने कंक ब्राह्मण व्हायचे ठरविले. भीम म्हणाला. 'मी बल्लव होऊन विराटाच्या पाकशाळेत राहीन.' अर्जुनाला एक वर्ष षंढ होण्याचा शाप होताच; तेव्हा तो म्हणाला. 'मी बृहन्नडा होऊन नृत्यशाळेत राहीन व तिथल्या मुलींना नृत्य-गीत शिकवीन.' नकुल म्हणाला. 'मी घोड्याच्या पागेवर राहीन.' सहदेव म्हणाला. 'मी गोशाळेवर राहीन.' द्रौपदी म्हणाली. 'मी सैरंध्री बनून राणीवशात राहीन व अंतःपुरातल्या स्त्रियांची वेणीफणी करीन.' अशी सर्व योजना ठरली. नगराजवळ येताच पांडवांनी आपली शस्त्रे एकत्र करून ती एका शमीच्या झाडावर ठेवली. सर्वांनी विराटाच्या राजसभेत प्रवेश मिळवला. सगळे आपापल्या जागी रुजू झाले. कोणीही त्यांना ओळखले नाही. असे दहा महिने निर्वेध लोटले.

मग द्रौपदीवर अकस्मात एक संकट ओढवले. विराटाची राणी सुदेष्णा हिचा कीचक नावाचा भाऊ होता. तो बलाढ्य आणि मदोन्मत्त होता. एके दिवशी त्याची नजर सैरंध्रीवर पडली. त्यामुळे त्याची विषयवासना चाळवली. तो सुदेष्णेला म्हणाला. 'हिला माझ्या महालात पाठवून दे!' त्यावर सुदेष्णेने 'कीचकाकडून मद्य घेऊन ये' अशी तिला आज्ञा केली. निरुपाय होऊन सैरंध्रीला त्याच्याकडे जावे लागले. सैरंध्री तिथे जाताच कीचकाने तिचा हात धरला. कशीबशी तिने आपली सुटका करून घेतली आणि ती विराटाकडे दाद मागायला आली. पण कीचक राजाला डोईजड असल्यामुळे राजाकडून तिला न्याय मिळाला नाही. रात्री तिने बल्लवरूपी भीमाला गाठून आपले गाऱ्हाणे सांगितले. भीम म्हणाला. 'मी त्याची वासलात लावतो. तू त्याला रात्री नृत्यशाळेत भेटण्याचा संकेत कर.' द्रौपदीने त्याप्रमाणे केले; पण संकेतस्थळी कीचकाला सैरंध्री न भेटता भीम भेटला. भीमाने त्याला यथेच्छ बुकलले आणि ठार केले. कीचकाचे बंधू अनुकीचक यांना हे वृत्त कळले. सैरंध्रीच्या पायी आपला भाऊ मेला हे जाणून त्यांनी कीचकाच्या प्रेताबरोबर सैरंध्रीला जाळायचे ठरविले; पण भीम त्यांच्या आधीच स्मशानात जाऊन बसला होता. सैरंध्रीला ओढीत आणणाऱ्या अनुकीचकांना त्याने झोडपून ठार केले.

हा अनर्थ विराटाला समजताच तो घाबरून गेला. त्याने 'सैरंध्रीला वाड्यातून ताबडतोब हाकलून द्या' असा सुदेष्णेला निरोप पाठविला. सुदेष्णा तसे करायला निघालेली पाहून सैरंध्रीने तिची विनवणी केली. 'एक वर्ष पुरे व्हायला थोडाच अवधी आहे, तोवर मला इथे राहू द्या. त्या आधी जर तुम्ही मला घालविलेत, तर माझे पती गंधर्व खवळतील आणि तुमच्या राज्यावर भलतेच संकट आणतील.' ही मात्रा बरोबर लागू पडली व सुदेष्णेने तिला ठेवून घेतले.

इकडे पांडवांना मुदतीत हुडकून काढण्यासाठी कौरवांनी देशोदेशी हेर पाठविले होते, त्यांपैकी मत्स्य देशात गेलेल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हेरांनी, कीचकाला कोणी तरी ठार मारले, अशी बातमी आणली. त्यावर कौरवांना वाटले, की हे काम भीमावाचून दुसऱ्या कोणाला जमणे शक्य नाही. मग त्यांनी विराटनगरीवर चालून जायचे व विराटाच्या गायी पळवून आणायचे ठरविले. त्या प्रसंगात पांडव उघडकीला येतील, अशी त्यांची कल्पना होती. कौरवांचे आक्रमण होताच विराटनगरात एकच खळबळ माजली. खुद्द विराट राजा कौरवांना सामना देण्यासाठी रणभूमीवर गेला. त्याला शत्रुसैन्याने घेरले; पण भीमाने शर्थीचा पराक्रम करून त्याला सोडविले. तरीही कौरव आणि सुशर्मा यांचे सैन्य नगराकडे दौडत निघालेच. कौरवांनी गोळवाड्यात घुसून गायींचे तांडे पळविले. हे सर्व परचक्र परतून लावायचे, तर मोठ्या पराक्रमाची गरज होती. विराटपुत्र उत्तर म्हणाला. 'काय करू रे! मला कुणी सारथी नाही; नाही तर मी शत्रूला पळवून लावून गायी सोडवून आणल्या असत्या.' बृहन्नडेने त्याची ही बढाई ऐकली. ती म्हणाली. 'चल; मी तुझे सारथ्य करते.' उत्तर रथात बसून रणभूमीवर गेला; पण ते प्रचंड सैन्य पाहून त्याला वीरश्री येण्याऐवजी कापरेच भरले. तो रणातून पळायला निघालेला पाहून बृहन्नडेने त्याला म्हटले. 'तू लढणार नसलास तर मी लढेन. तू माझे सारथ्य कर.' त्या वेळी बृहन्नडेने आपला गौप्यस्फोट केला व बृहन्नडा हा अर्जुन आहे, असे समजताच उत्तराने कसाबसा धीर केला व तो सारथ्याच्या जागी बसला. अर्जुनाने शमी वृक्षावरची आपली शस्त्रास्त्रे उतरून घेतली आणि तो अपूर्व उत्साहाने कौरवांवर तुटून पडला. अर्जुनाला पाहून दुर्योधनाला हर्ष झाला. मुदतीपूर्वी आपण त्याला हुडकून काढले, असे त्याला वाटले. पण भीष्माने त्याचा भ्रम दूर करताना म्हटले, 'पांडवांचा अज्ञातवास आजच संपला आहे. त्यांनी करार पूर्ण केला आहे.'

भीष्माचार्यांच्या या ठाशीव शब्दांनी दुर्योधन खिन्न झाला. आता लढाई करण्याचे किंवा गायी पळविण्याचे प्रयोजनच उरले नव्हते. म्हणून तो आपले सैन्य घेऊन परत गेला. मग विराटाने विजयोत्सव केला. ज्येष्ठ कृष्ण दशमीच्या दिवशी पांडवांनी वेषांतर टाकले आणि ते पाचही जण खऱ्या स्वरूपात विराटाकडे आले. धर्मराजाने सर्व गोष्टींचा उलगडा करून विराटाची जिज्ञासा शमवली. विराटाने मग पांडवांचा सत्कार केला आणि धर्मराजाची क्षमा मागितली. नंतर त्याने आपली कन्या उत्तरा सुभद्रेचा पुत्र अभिमन्यू याला द्यायचे ठरविले. अभिमन्यू त्या वेळी द्वारकेत होता. श्रीकृष्ण त्याला घेऊन विराटाकडे आला. लगेच उत्तरा आणि अभिमन्यू यांचा थाटाने विवाह झाला.

उद्योगपर्व — अभिमन्यूचा विवाह होताच कृष्णाने तिथेच पांडवांच्या आप्तेष्टांची सभा भरवली आणि पांडवांचे रा[ज्य] परत मिळविण्यासाठी कोणते उपाय योजावे याबद्दल चर्चा के[ली]. कौरवांकडे दूत पाठवून राज्याची मागणी करावी आणि ति[थे] योग्य प्रतिसाद न मिळाल्यास पुढचे उपाय योजावे, असे ठर[ले]. त्याला अनुसरून द्रुपदाचा पुरोहित हस्तिनापुरास गेला. त्यां[ने] पांडवांचे म्हणणे कौरवांना ऐकवले. कौरव म्हणाले, की 'आम[चा] दूत पाठवून आम्ही तुम्हांला आमचा विचार कळवू.'

या दूतांच्या येरझारीच्या काळात पांडवांनी उपप्लव्य न[ग]रात आपला तळ ठेवला. कौरव देशोदेशीचे राजे आप[ल्या] पक्षाला मिळवून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे समजता[च] पांडवांनीही तोच मार्ग अनुसरला. त्या मोहिमेत अर्जुन व[ ] दुर्योधन दोघेही द्वारकेला गेले. दुर्योधनाने सगळे यादव[ ] मागून घेतले आणि अर्जुनाने 'न धरी शस्त्र करी मी' अ[ ] श्रीकृष्ण आपल्या पक्षाला मागून घेतला.

एवढ्या अवधीत धृतराष्ट्राकडून संजय नावाचा दूत ध[ ] राजाकडे आला. त्याने धर्मापुढे अहिंसेचे स्तुतिस्तोत्र गा[ ] आणि युद्धातला संहार टाळावा व ज्ञातिबांधवांच्या व[ ] पातक शिरावर घेऊ नये, असे धर्मराजाला सुचविले. त्[ ] धर्म म्हणाला. 'आम्ही आपत्काली भिक्षा मागितली. प[ ] ती गोष्ट करणार नाही. याउपर श्रीकृष्ण जे सांगेल ते अ[ ] उत्तर.' श्रीकृष्ण म्हणाला. 'आम्हांलाही शांतता हवी; [ ] ती सन्मानाने हवी आहे. त्यासाठी पांडवांना इंद्रप्रस्थाचे रा[ ] देऊन समेट घडवून आणावा, असे तू कौरवांना सांग. ह[ ] जे काय समजायचे ते समजला; पण जाताना त्याने [ ] एकदा धर्माचे उत्तर विचारले. धर्म म्हणाला, 'मागचे [ ] विसरून मी दुर्योधनाला क्षमा करायला तयार आहे. [ ] आमचा भाग आम्हांस देऊन समेट करावा. तेवढेही [ ] नसेल तर अविस्थल, वृकस्थल, वारणावत व माकंदी ही [ ] गावे आणि पाचवे दुर्योधनाला जे आवडेल ते कोणतेही [ ] अशी पाच गावे तरी त्याने आम्हाला द्यावी म्हणजे [ ] समेट करू. मी जसा समेटाला तयार आहे, तसाच युद्धा[ला] तयार आहे, हे ओळखून दुर्योधनाने जे रुचेल ते पत्करावे.'

हळूहळू उभयबाजूंकडे चतुरंग दळ जमा होऊ लागले. [ ] न्यत: कुलू-कांगडा धरून मध्य आशियापर्यंतच्या राजे लो[ ] मदत कौरवांना मिळाली होती. मध्यदेश, विंध्यपृष्ठ, प्राच्य[ ] अपरान्त व सौराष्ट्र येथील राजे पांडवांच्या पक्षाकडे [ ] होते. अर्थात यामध्ये काही अपवादही होते. पण स्थूल [ ] शक्तींचे विभाजन अशा प्रकारे झाले होते. सैनिकी श[ ] संतुलन कशा प्रकारे व्हावे, याचा विचार श्रीकृष्णाने आधी[ ] करून ठेवला होता. त्याने जाणले होते, की पश्चिमेच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सौवीर देशाचा अधिपती जयद्रथ, वायव्येच्या गांधार देशाचा शकुनी आणि मद्र किंवा मध्य पंजाब या देशाचा शल्य हे त्रिकूट जोरकस असून, ते कौरवांचे पक्षपाती आहे. त्यांच्या मागच्या अंगाला त्रिगर्तांच्या गणराज्यांचा संशप्तक नावाचा संघ होता, तोही कौरवांनाच अनुकूल झाला होता. या तीन-चार मोठ्या शक्तिशाली राज्यांच्या वेढ्यात असलेली छोटी छोटी राज्ये त्यांना विरोध करून पांडवांना मिळणेच शक्य नव्हते.

त्यामुळे कृष्णाची सगळी मदार मत्स्य देश धरून मध्यदेश, विंध्यपृष्ठ आणि पश्चिमी जनपदे यांच्यावरच होती. या विभागातले दोन बलाढ्य राजे जरासंध आणि शिशुपाल यांचा काटा त्याने आधीच काढून टाकला होता. त्यांचा पाठपुरावा करणाऱ्या करूष देशाच्या दंतवक्त्रालाही कृष्णाने ठार केले होते. त्यामुळे चेदी, करूष व मगध एवढा विस्तृत प्रदेश पांडवांना सर्वस्वी साहयकारी झाला होता. करूषाच्या पश्चिमेला दशार्ण व निषध या जनपदांमध्ये कृष्णाच्या नारायणी सेनेचा अड्डा होता. शूरसेन, पांचाल व विराट ही राज्ये स्पष्टपणे पांडवपक्षपाती होती. सौराष्ट्रात अंधक व वृष्णी यांची बरीचशी गणराज्ये कृष्णाच्या हुकमतीत होती. ती सर्व पांडवपक्षाकडे आपोआपच आली.

खरे तर धर्मराजाला आपसांतले हे युद्ध नको होते. त्यामुळे गोष्टी इतक्या थराला आल्यावरही त्याच्या मनाची चुळबूळ चालूच राहिली. तो कृष्णाला काकुळतीने म्हणाला. 'कसेही करून तू या युद्धाच्या खाईतून आम्हाला वाचव.' कृष्णाला ते आवडले नाही; पण तरीही त्याने शेवटचा उपाय म्हणून कौरवांकडे शिष्टाईला जायचे ठरवले. ते समजून द्रौपदी अस्वस्थ झाली. तिला असला थातुरमातुर समेट नको होता. तिला हवा होता कौरवांचा सूड. म्हणून ती कृष्णाला म्हणाली. 'शिष्टाई करताना दुःशासनाने ओढलेल्या या माझ्या केसांचे तुला स्मरण असू दे!'

श्रीकृष्ण सात्यकीला बरोबर घेऊन हस्तिनापुराला गेला. कौरवांच्या सभेत त्याने वक्तृत्वपूर्ण भावेत प्रतिपादिले, की 'तुम्ही अर्धे राज्य पांडवांना द्यावे व सर्वांनी प्रेमाने आणि सुखाने नांदावे.' त्यावर दुर्योधन रागाने खवळून म्हणाला. 'पाच गावे तर सोडाच; पण सुईच्या टोकावर राहील एवढी मातीही मी पांडवांना देणार नाही.' त्यावर श्रीकृष्णाने त्या भरलेल्या सभेला बजावले. 'यापुढे युद्ध सुरू झाल्यास त्याचा दोष पांडवांकडे नाही.'

एवढे बोलून कृष्ण सभेतून उठला आणि कुंतीला भेटायला गेला. मग त्याने कर्णाचीही भेट घेतली. कर्ण पांडवपक्षाकडे येईल, तर सगळाच रंग पालटेल, असे त्याला वाटत होते. तो कर्णाला रथात घेऊन हळूच म्हणाला. 'तू कुंतीचा कानीन पुत्र आहेस, म्हणून पांडवांचा जेष्ठ बंधू आहेस. हे नाते लक्षात घेऊन तू पांडवांकडे ये. धर्मराजा तुलाच राज्यावर बसवील.' पण कर्णाने ती गोष्ट मान्य केली नाही.

मग कृष्ण उपप्लव्य नगराला परत आला. शिष्टाई फसली हे ऐकून धर्माला दुःख झाले. अखेर धर्मराजाने आपल्या भावांना युद्धाची अनुमती दिली.

कुरुक्षेत्रावर उभय सेनादलांचे तळ पडले. पांडवांचे ७ अक्षौहिणी व कौरवांचे ११ अक्षौहिणी असे एकूण १८ अक्षौहिणी सैन्य युद्धासाठी खडे झाले. भारतातील सर्व देशांचे राजे आपापल्या दळभारांसह या ना त्या पक्षाला मिळून तिथे गोळा झाले. पांडवांनी धृष्टद्युम्नाला आपला सेनापती केले; तर कौरवांनी भीष्माला सेनापती नेमले. धृतराष्ट्र हा वृद्ध व अंध असल्याने युद्धाला जाऊ शकला नव्हता व ते पाहूही शकत नव्हता. तेव्हा व्यासांनी संजयाला दिव्य दृष्टी देऊन त्याच्यापाशी बसविले आणि बसल्याजागी युद्ध पाहून धृतराष्ट्राला सविस्तर वृत्त ऐकविण्याची व्यवस्था केली.

भीष्मपर्व — कुरुक्षेत्रावर रणतुरे वाजू लागली. आता लढाईला प्रारंभ होणार; एवढ्यात धर्मराज रथातून उतरला आणि सरळ कौरवसैन्याकडे चालू लागला. त्याचा सगळ्यांनाच अचंबा वाटला. त्याच्या मागोमाग त्याचे चारही भाऊ जाऊ लागले. धर्मराज सरळ भीष्माकडे गेला व भीष्माला वंदन करून त्याने युद्धाची अनुज्ञा मागितली आणि जयाचा आशीर्वादही मागितला. ते पाहून भीष्म सद्‌गदित झाला. तो म्हणाला. 'युधिष्ठिरा, तुझा पक्ष सत्याचा आहे आणि सत्याचाच विजय व्हावा अशीच मी अपेक्षा करीन.' याच वेळी आणखी एक अचंबा करण्याजोगी गोष्ट घडली. एवढा समरधुरंधर अर्जुन; पण त्यानेच ऐन वेळी हात-पाय गाळले. प्रथम तो मोठ्या उत्साहाने आपला सारथी श्रीकृष्ण याला म्हणाला. 'तू माझा रथ उभय सेनादळांच्या मध्यभागी नेऊन उभा कर.' श्रीकृष्णाने तसे केले. पण आपल्या समोर युद्धाला उभे ठाकलेले भीष्म-द्रोणादी पूज्य वृद्ध आणि अनेक आप्तस्वजन यांना पाहून अर्जुनाला व्यामोह उत्पन्न झाला. आपल्या हातून हे मरणार, या कल्पनेने तो भयभीत झाला. 'मी लढणार नाही' असे म्हणून तो रथाखाली उतरला. श्रीकृष्णापुढे हा एक नवाच पेचप्रसंग उभा राहिला. मग त्याने अर्जुनाला गीता सांगितली व त्याचा व्यामोह दूर केला. त्यानंतर अर्जुन आपल्या सर्व सामर्थ्यानिशी युद्धाला सज्ज झाला.

नंतर भारतीय युद्ध सुरू झाले. सात दिवस युद्ध चालले तरी रणांगण काही गाजले नाही. आठव्या दिवसापासून मात्र युद्धाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खरा रंग चढला. त्या दिवशी अनेक कौरव धारातीर्थी पडले. दुर्योधन भीष्माकडे जाऊन त्याला टाकून बोलला. नवव्या दिवशी भीष्माने फार मोठा पराक्रम करून पांडव सैन्याची दाणादाण उडविली. त्या धुमश्चक्रीत भीष्म आणि अर्जुन समोरासमोर आले; पण काही केल्या अर्जुनाला रणावेशच चढेना. भीष्मापुढे तो कच खातो असे दिसताच कृष्ण रथाखाली उतरला आणि 'या युद्धात मी शस्त्र धरणार नाही' ही स्वत:ची प्रतिज्ञा अवमानून भीष्मावर चालून गेला. तो जणू अर्जुनाच्या वर्मावर घावच होता. अर्जुनाने त्याला अडविले आणि 'यापुढे मी ईर्षेने लढेन' असे सांगितले.

आता युद्धाचा दहावा दिवस सुरू झाला. त्या दिवशी शिखंडी भीष्मापुढे उभा ठाकला. 'शिखंडीशी मी लढणार नाही' अशी भीष्माची प्रतिज्ञा होती. त्यामुळे तो स्तब्ध बसला. शिखंडीच्या मागे अर्जुन उभा होता. त्याने भीष्मावर बाणांचा वर्षाव सुरू केला. हे बाण शिखंडीचे नसून अर्जुनाचे आहेत, हे कळूनही भीष्माने त्याचा प्रतिकार केला नाही. अखेर अर्जुनाच्या बाणांनी सर्वांगांनी विद्ध होऊन तो रथातून खाली कोसळला. त्याच्या अंगात इतके बाण घुसले होते, की त्याचे शरीर जमिनीवर न टेकता बाणांवरच पडले. फक्त शीर तेवढे अधांतरी राहिले. अर्जुनाने तीन बाण जमिनीत रोवून त्याचा भीष्माच्या मस्तकाला आधार दिला. भीष्म पडला त्या वेळी दक्षिणायन होते. तेव्हा त्याने उत्तरायण लागेपर्यंत प्राण धारण करण्याचे ठरविले.

द्रोणपर्व – भीष्म पतन पावल्यावर कौरवांनी द्रोणाला सेनापती केले. 'तुझी इच्छा काय ते सांग' असे द्रोणाने दुर्योधनास विचारताच दुर्योधन म्हणाला. 'तुम्ही धर्मराजाचा वध न करता त्याला जिवंत धरून माझ्या स्वाधीन करा.' द्रोणाने त्याचा कपटी हेतू ओळखला; पण त्यावर तो काही न बोलता एवढेच म्हणाला. 'अर्जुन रणांगणावर नसेल, तर मी धर्मराजाला पकडीन.' ही गोष्ट पांडवांना कळली. त्यावर अर्जुन म्हणाला. 'मी धर्मराजाला केव्हाही पकडू देणार नाही.' नंतर उभय पक्षी तुंबळ युद्ध झाले. त्यात अभिमन्यूने मोठा पराक्रम करून शल्य आणि जयद्रथ यांना जेरीस आणले. हा अपमान जयद्रथाच्या जिव्हारी झोंबला. त्याने अभिमन्यूचा सूड उगविण्याचा निश्चय केला.

त्या रात्री कौरवशिबिरात त्रिगर्तांचा राजा सुशर्मा व त्याचे बंधू (संशप्तक) यांनी अर्जुनाला मुख्य रणभूमीवरून दूर नेण्याचे दुर्योधनाला वचन दिले. दुसऱ्या दिवशी त्यांनी ती गोष्ट घडवूनही आणली. अर्जुन त्यांचा काटा काढण्यासाठी दुसऱ्या युद्धभूमीवर गेला. द्रोणाने त्या दिवशी चक्रव्यूहाची उभारणी केली. तो व्यूह कोण भेदील याची धर्मराजाला चिंता पड[…] त्या कामी अभिमन्यू पुढे झाला. त्याने व्यूह भेदावा [...] पाठीमागून भीमादिकांनी आत घुसावे असे ठरले; पण [...] मन्यू व्यूहात शिरताच जयद्रथाने व्यूहाचे दार रोखून [...] दिकांना अडवले व पिटाळून लावले. अभिमन्यू एकटा [...] अडकला. त्याने थोर पराक्रम केला. शेवटी दु:शासनपुत्र[...] त्याची गाठ पडली. ते दोघे एकमेकांवर घाव घालून मू[...] पडले. पण दु:शासनपुत्र आधी सावध झाला व अभि[...] मूर्च्छित असताना त्याला त्याने गदाघाताने ठार केले.

त्यामुळे पांडवसैन्यावर दु:खाचा सागर लोटला. [...] संशप्तकांना मारून परत येतो तो शिबिरावर अवकळा [...] लेली त्याला दिसली. धर्माने अश्रू गाळीत घडलेला वृत्तान्त [...] सांगितला. अभिमन्यूच्या रक्षणासाठी व्यूहात शिरू पाह[...] भीमादी वीरांना जयद्रथाने द्वारावरून पळवून लावले [...] त्यामुळे अभिमन्यूला एकाकी लढून वीरगतीला जावे ल[...] ही गोष्ट अर्जुनाच्या मनाला तीव्रतेने बोचली. त्याच [...] त्याने प्रतिज्ञा केली, की 'उद्या सूर्यास्ताच्या आत जयद्र[थाला] मी ठार मारीन; अन्यथा अग्निकाष्ठ भक्षण करून स्व[...] हत्या करीन.' या वार्तेने कौरवसैन्यात एकच हलक[ल्लोळ] उडाला. जयद्रथ तर रणभूमी सोडून पळायलाच ला[...] पण कौरवांनी त्याच्या जीवरक्षणाची हमी घेतल्यामु[ळे] कसाबसा थांबला. मात्र तो आघाडीवर न येता पिछा[डीला] लपून राहिला. दिवसभर घनघोर युद्ध करूनही अर्जुनाचे [...] त्याच्यापर्यंत पोचले नाहीत. अशा स्थितीत सूर्य अ[स्ताला] जाण्याची वेळ आली. कृष्णाला चिंता पडली. त्याने 'अर्जु[...] मेघास्त्र सोड' असे सांगितले. अर्जुनाने तसे केले. त्यामु[ळे] [...] झाकला गेला. आपण सुटलो म्हणून जयद्रथ बाहेर पडला [...] बेसावधपणे वर मान करून सूर्याकडे पाहू लागला. त्याच [...] अर्जुनाने मेघास्त्र आवरले आणि सूर्य प्रगट झाला. श्री[कृष्णाने] 'हा सूर्य आणि हा जयद्रथ' असा इषारा देताच अ[र्जुनाने] एक अर्धचंद्र बाण सोडून जयद्रथाचे मस्तक उडवले.

त्या दिवशी नित्याचा शिरस्ता मोडून रात्री मशा[लींच्या] उजेडात युद्ध चालू राहिले. त्या युद्धात पांडवांच्या [...] घटोत्कचाने अपूर्व पराक्रम गाजवला. तो कुणालाच [...] नाही असे पाहून दुर्योधनाने कर्णाला म्हटले. 'तू तुझी [...] शक्ती घटोत्कचावर सोड.' कर्ण म्हणाला, 'मी ती अर्जु[नासाठी] राखून ठेवली आहे.' त्यावर दुर्योधन म्हणाला. 'आज [...] तर उद्या अर्जुनाशी गाठ. तेव्हा तू घटोत्कचाला ठार [...] कर्णाला निरुपाय होऊन तसे करावे लागले. घटोत्कच [...] पण कर्ण मात्र उदास झाला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

द्रोणाने आपल्या सेनापतित्वाच्या कालात अस्त्रप्रयोगही केले. त्या अस्त्रांनी झालेला सेनासंहार चिंता उत्पन्न करणारा होता. त्यामुळे द्रोणाला शस्त्रसंन्यास करायला लावणे अपरिहार्य ठरले. त्यासाठी कृष्णाने भीमाशी कानगोष्ट केली. भीमाने अश्वत्थामा नावाचा मालव राजाचा हत्ती गदेने ठार केला आणि 'अश्वत्थामा मेला' अशी आरोळी ठोकली. द्रोणाला वाटले, की आपला मुलगाच मेला. त्यामुळे द्रोणाचे धैर्य खचले; पण एकदा खात्री करून घेण्यासाठी तो सत्यवादी धर्मराजाकडे आला. कृष्णाने त्यालाही कानगोष्ट सांगितली होती. त्यामुळे धर्मराज म्हणाला. 'अश्वत्थामा मेला हे खरे; पण हत्ती की तुमचा मुलगा हे ठाऊक नाही.' द्रोणाने त्याचा अर्थ आपला मुलगा असाच घेतला. त्यामुळे त्याचे युद्धातले स्वारस्यच संपले. तो शस्त्र टाकून रथातच योगसाधन करू लागला. ही संधी धृष्टद्युम्नाने साधली. त्याने द्रोणावर चाल करून त्याचा तशा स्थितीतच शिरच्छेद केला.

कर्णपर्व – द्रोणाचार्यानंतर दुर्योधनाने कर्णाला सेनापती नेमले. युद्धाचा १७ वा दिवस उजाडला. अजून एकही पांडव मेला नाही, म्हणून दुर्योधन कर्णाला टाकून बोलला. दुर्योधन मुख्यत्वे अर्जुनाच्या मरणाची वाट पाहत होता. त्यावर कर्ण दुर्योधनाला म्हणाला. 'श्रीकृष्णासारखा सारथी अर्जुनाच्या रथावर आहे. त्या दर्जाचा सारथी आपल्याकडे राजा शल्य हा आहे. त्याने माझे सारथ्य केले तर मी माझा पराक्रम दाखवीन.' सारथ्य करणे हे शल्याचे काम नव्हते. पण 'मी बोलेन ते कर्णाने सहन केले पाहिजे' या अटीवर शल्य तयार झाला. ही वस्तुस्थिती पाहून अर्जुनाच्या मनातही आवेश चढला. रणांगणावर अर्जुनाचा रथ कुठे दिसेना, असे पाहून कर्ण शल्याला म्हणाला. 'माझ्या पराक्रमाचा धाक वाटून अर्जुन पुढे यायला घाबरतो आहे.' ती आत्मप्रौढी ऐकून शल्य कर्णाचा तेजोभंग करण्याच्या हेतूने त्याला म्हणाला. 'कुठे दिग्विजयी अर्जुन आणि कुठे घोषयात्रेच्या प्रसंगी दुर्योधनाला सोडून पळून जाणारा तू म्याड !' एवढे बोलूनच शल्य थांबला नाही, तर त्याने कर्णाच्या तोवरच्या पराभवांचा पाढाच वाचला. त्यामुळे कर्ण विमनस्क झाला. एवढयात अर्जुनाचा रथ कर्णाच्या रोखाने पुढे येऊ लागला.

इकडे भीम आणि दुःशासन यांची गाठ पडली. उभयतांची निकराची लढाई झाली. भीमाने एक तडाखा देऊन दुःशासनाला रथाखाली पाडले आणि खड्गाने दुःशासनाचा कंठ चिरून त्याचे रक्त प्राशन केले. याप्रमाणे आपली प्रतिज्ञा पुरी करून हर्षभराने तो श्रीकृष्णाकडे आला आणि त्याने श्रीकृष्णाला वंदन केले.

इकडे अर्जुनाने कर्णाच्या डोळ्यांदेखत त्याचा मुलगा वृषसेन यत्ला ठार केले. आधीचा तेजोभंग आणि नंतरचा पुत्रशोक या घटनांमुळे कर्ण गलितगात्र झाला. त्याला नीट शरसंधानही करता येईना. तेवढयात त्याचा रथही भूमीने गिळला. ते पाहून कृष्ण अर्जुनाला म्हणाला. 'कर्णाचा रथ भूमीतून वर निघाला नाही तोवरच त्याचा तू निकाल लावून टाक.' पण अर्जुन त्या गोष्टीला तयार होईना. कर्णानेही तिथून 'हे धर्मयुद्ध नव्हे,' असे कृष्णार्जुनांना बजावले. त्यावर कर्णाच्या आजवरच्या दुष्कृत्यांचा पाढा वाचून कृष्ण त्याला म्हणाला. 'तेव्हा कोठे गेला होता राधासुता तुझा धर्म ?' मग अर्जुनही त्या गोष्टीला तयार झाला. त्याने सर्व तपोबल पणाला लावून एक बाण सोडला आणि कर्णाचा शिरच्छेद केला.

शल्यपर्व व गदापर्व – कर्णाचा वध झाल्यावर दुर्योधनाने शल्याला सेनापती केले. हा युद्धाचा १८ वा दिवस होता. आता कौरवांकडे कोणीही प्रबळ योद्धा उरला नव्हता. त्या दिवशी भीमाची व शल्याची गाठ पडली. भीमाने प्रथम त्याला घायाळ केले आणि मग धर्मराजाने त्याचा वध केला. त्यानंतर शकुनी पुढे आला; पण थोडयाच वेळात सहदेवाने त्याला ठार केले. मग उरलेल्या कौरवसैन्याची पांगापांग झाली. हे सर्व पाहून दुर्योधन अत्यंत निराश झाला आणि कुरुक्षेत्रातल्या एका तळयात जाऊन बसला. कृष्णासह पांडव त्याचा शोध करीत तिथे पोचले. भीमाने दुर्योधनाला युद्धाचे आव्हान दिले. दुर्योधन पाण्यातून वर आला. मग त्यांचे गदायुद्ध जुंपले. भीमाने शेवटी दुर्योधनाच्या डाव्या मांडीवर निर्वाणीचा गदाप्रहार केला. त्या घावाने दुर्योधनाचे प्राण कंठाशी आले. आता हा जगत नाही असे पाहून भीमाने युद्ध थांबविले. मग सगळे पांडव शिबिराकडे परतले.

सौप्तिकपर्व व ऐषीकपर्व – त्यानंतर कृपाचार्य, कृतवर्मा व अश्वत्थामा हे दुर्योधनाकडे गेले. दुर्योधन अजूनही जिवंत होता. त्याने अश्वत्थाम्यास सेनापत्य दिले आणि 'उद्या उरले सुरले सैन्य घेऊन पांडवांवर चाल कर' अशी त्याला आज्ञा दिली. त्यावर अश्वत्थामा बोलला. 'उद्याचा वायदा कशाला? मी आज रात्रीच सर्वांचा संहार करतो.'

त्या रात्री अश्वत्थाम्याने तो भयानक संहार आरंभला. तो निद्रिस्त अशा पांडवशिबिरावर चालून गेला. प्रथम त्याने धृष्टद्युम्न व शिखंडी यांना ठार मारले. पाठोपाठ द्रौपदीच्या पाच पुत्रांचीही वाट लावली. त्याच्या जोडीला कृपाचार्य व व कृतवर्मा हेही दोघे होते. त्यांनी सामुदायिक संहार सुरू केला. मग अश्वत्थाम्याने सर्व छावणीलाच आग लावून दिली. खरे म्हणजे त्या आगीतच पांडवही होरपळून मरायचे. पण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीकृष्णाला दूरदृष्टी होती. तो त्या रात्रीच पांडव आणि सात्यकी यांना घेऊन दुसरीकडे झोपायला गेला होता. सगळे मेले व पांडव तेवढे जिवंत राहिले हे समजल्यावर दुर्योधनाचा विरस झाला. तेव्हा अंतकाळी त्याला सूडाचे समाधान मिळवून देण्यासाठी अश्वत्थामा म्हणाला. 'आता मी ब्रह्मास्त्राचा प्रयोग करून पांडवांचा संहार करतो.'

आपले पाचही पुत्र मारले गेले ही वार्ता द्रौपदीला समजताच ती विलाप करू लागली. तिने भीमाला म्हटले, 'तुम्ही त्या अश्वत्थाम्याला ठार मारा. निदान त्याच्या मस्तकावरचा मणी तरी काढून आणा. अन्यथा मी प्राणत्याग करीन.'

त्यावर भीम अश्वत्थाम्याच्या शोधासाठी निघाला. त्याच्या पाठोपाठ कृष्णार्जुनही गेले. एवढ्यात अश्वत्थाम्याचे ब्रह्मास्त्र सुटले. त्याचा प्रतिकार करण्यासाठी अर्जुनानेही ब्रह्मास्त्रच सोडले. त्या दोन्ही अस्त्रांच्या टकरीत सर्व जग भाजून निघण्याची अवस्था उत्पन्न झाली. मग नारदादी ऋषींनी त्या उभयतांना अस्त्रे आवरण्याची विनंती केली; पण अश्वत्थाम्याला अस्त्राचा प्रयोग तेवढा माहीत होता आणि उपसंहार माहीत नव्हता. मग अर्जुनाने त्याचे व आपले अशी दोन्ही अस्त्रे आवरून घेतली. लगेच भीमाने अश्वत्थाम्याला मस्तकातला मणी काढून देण्यास सांगितले व अश्वत्थाम्याने घाबरून ती गोष्ट केली. श्रीकृष्णाने दिलेल्या शापानुसार त्याचे सर्वांग दुर्गंधयुक्त झाले आणि तो भ्रमिष्टासारखा रानावनात भटकू लागला. भीमाने तो मणी आणून द्रौपदीला दिला. इकडे दुर्योधनही मरून गेला.

स्त्रीपर्व – अशा प्रकारे अठरा अक्षौहिणी सैन्याचा संहार होऊन युद्धसमाप्ती झाल्यावर धर्मराजाने कुरुक्षेत्रावरील प्रेतांना अग्निसंस्कार करून तिलांजली दिली. त्या वेळी गांधारी व कौरव स्त्रिया तिथे आल्या होत्या. त्या सर्वांनी आपल्या पति-पुत्रांसाठी जो विलाप केला, तो अत्यंत करुणाजनक होता. त्या वेळी श्रीकृष्ण गांधारीजवळ गेला असता तोच या संहाराचे मूळ आहे, असे समजून गांधारीने त्याला शाप दिला. "तुझ्या यादवकुळाचाही असाच संहार होईल आणि तुला तो सर्व आपल्या डोळ्यांनी पाहावा लागेल." त्यावर श्रीकृष्ण म्हणाला. "हा तुझा शाप नसून वरच आहे, असे मी समजतो. यादवसंहाराचे कार्य मला स्वतःलाच करायचे आहे."

नंतर मृतांचे श्राद्धादी विधी आटोपून सगळे आपल्या निवासस्थानी परतले. घडलेल्या संहाराचे प्रायश्चित्त म्हणून धर्मराज आपल्या बंधूंसह आशौच पाळून सर्व पौष महिना गंगातीरीच राहिला.

शांतिपर्व – माघ शुद्ध प्रतिपदेला धर्मराजाने हस्तिनापुरात प्रवेश केला. पण त्याला एवढ्या महान रक्तपातानंतर आणि सर्व लहान थोर नातलगांच्या संहारानंतर मिळालेल्या रा... राज्याची चवच राहिली नाही. तो वैराग्याची भाषा बो... लागला. कृष्ण आणि व्यास यांनी धर्मोपदेश करून सम... विल्यावर त्याने माघ शुद्ध पंचमीला राज्याभिषेक करून घेत... मग कृष्णासह पांडव शरपंजरी पडलेल्या भीष्माकडे गे... त्या वेळी कृष्णाने धर्मराजाला राजधर्म सांगण्याबद्दल भीष्मा... सुचविले. भीष्माने त्याला राजधर्म तर सांगितलाच; शिवा... आपद्धर्म आणि मोक्षधर्म यांचाही उपदेश केला.

अनुशासनपर्व – मग भीष्माने धर्मराजाला निरोप दि... आणि 'उत्तरायण लागताच परत ये,' असे सांगितले. यु... समाप्तीपासून ५० दिवस झाल्यानंतर पुनश्च कृष्ण व... पांडव तिथे आले. आता दक्षिणायन संपून उत्तरायण ला... होते. भीष्माच्या देहत्यागाचा समय आला होता; त्याने पुन... एकदा पांडवांना अखेरचा उपदेश केला आणि योगमार्गा... देहत्याग केला. मग भीष्माच्या देहाला अग्निसंस्कार क... सगळे परत आले.

आश्वमेधिकपर्व – त्यानंतर व्यासांच्या सांगण्यावरून ध... राजाने अश्वमेध यज्ञ केला. या प्रसंगी जेव्हा दक्षिणा देण्या... वेळ आली त्या वेळी धर्मराजाने व्यासांनाच आपले राज्य दा... करून टाकले. व्यासांनी त्याची समजूत घालून त्याचे रा... त्याला परत केले.

आश्रमवासिकपर्व – यज्ञसमाप्तीनंतर धर्मराजाने राज्या... सुव्यवस्था राहावी म्हणून आपल्या बंधूंना कामे वाटून दि... अशा स्थितीत १५ वर्षे गेली. या अवधीत गांधारी व धृतरा... पांडवांकडेच राहत होती. सर्व मंडळी धृतराष्ट्राचा मान ठे... वागत; पण भीम तेवढा त्याला वेळोवेळी टाकून बोले. ... धृतराष्ट्राने विचार केला, की आता इथे अधिक काळ मानहा... सोसून राहणे बरे नव्हे. म्हणून त्याने वानप्रस्थाश्रमास जाय... ठरविले. त्याच्या बरोबर गांधारी, विदुर व कुंतीही निघा... त्यांनी तपोवनात वास्तव्य करून तप करायचे ठरविले. ... कालाने प्रथम विदुराने देहत्याग केला आणि त्यानंतर थोड्या... दिवसांनी त्या तपोवनाला लागलेल्या वणव्यात धृतरा... गांधारी व कुंती तिघेही दग्ध झाली.

मौसलपर्व – धर्मराजाने ३६ वर्षे राज्य केल्या... श्रीकृष्णाने आपली अवतारसमाप्ती करायचे ठरवले; ... त्या आधी समग्र यादवांचा संहार व्हायला हवा होता. थोड्या... दिवसांत त्याला निमित्त घडले. एकदा काही ऋषी द्वार... आले असता काही यादवांनी त्यांच्या त्रिकालज्ञानाची परी... पाहायचे ठरविले. त्यांनी त्यासाठी एका यादव तरु... गर्भवतीचे सोंग देऊन ऋषींच्या पुढे आणले आणि विचा...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'हिला मुलगा होईल की मुलगी ?' ऋषींनी ते कपट ओळखले. त्यांना क्रोध आला. ते म्हणाले. "हिला मुसळ होईल आणि ते सर्व यादवांचा संहार करील." तो शाप ऐकून यादव घाबरले. गर्भवतीचे सोंग सोडताच त्यातून खरोखरच लोहाचे मुसळ निघाले. यादवांनी त्याचे पीठ करून ते समुद्रात फेकून दिले. पण त्या लोहाचे कण समुद्रकाठच्या लव्हाळ्यांना चिकटून बसले व ते लव्हाळे हीच शस्त्रे बनली. पुढे एके दिवशी एका पर्वणीच्या निमित्ताने यादव प्रभास क्षेत्री गेले आणि तिथे मद्य पिऊन धुंद झाले. त्यातून भांडणे निघाली. त्यांत प्रत्येकाने ते शस्त्ररूप लव्हाळे उपटले आणि एकमेकांवर वार करायला सुरवात केली. या अंतःकलहाने इतका पेट घेतला, की त्यात सर्व यादवांचा निःपात झाला.

त्यानंतर बलरामानेही आपला अवतार संपवला. कृष्णाने अर्जुनाला निरोप पाठविला, की 'तू द्वारकेला येऊन वसुदेवादी वृद्ध पुरुषांना आणि स्त्रियांना द्वारकेतून हस्तिनापुरात ने.' एवढे झाल्यावर कृष्ण एका वृक्षाला टेकून बसला असता एका व्याधाने त्याच्यावर बाण सोडला. त्या बाणाने कृष्णाचीही अवतारसमाप्ती झाली. पाठीमागून अर्जुन द्वारकेत गेला आणि श्रीकृष्ण व बलराम यांच्या देहांना त्याने अग्नी दिला. त्या वेळी रुक्मिणी, सत्यभामा, इ. कृष्णस्त्रियांनी अग्निप्रवेश केला. उरलेल्या स्त्रियांना घेऊन अर्जुन द्वारकेतून बाहेर पडला. पाठोपाठ समुद्राला उधाण येऊन त्यात द्वारका गडप झाली.

अर्जुन यादवस्त्रियांसह हस्तिनापुरास येत असता पंजाबातल्या रानटी टोळ्यांनी अर्जुनावर हल्ला केला आणि कित्येक यादवस्त्रियांना पळवून नेले. अर्जुनाचा पराक्रम त्या प्रसंगी कोता ठरला. वाटेत व्यासांच्या आश्रमात येऊन त्याने आपली दुरवस्था त्यांना सांगितली. त्यावर व्यास म्हणाले. 'तू नर आणि श्रीकृष्ण म्हणजे नारायण. तुम्हा दोघांचे अवतारकृत्य संपले. आता पांडवांनीही महाप्रस्थान ठेवावे.'

महाप्रस्थानिकपर्व – व्यासांचा तो निरोप अर्जुनाने धर्मराजाला सांगितला. त्यानंतर धर्मराजाने महाप्रस्थानाचा विचार ठरविला. परीक्षितीला हस्तिनापुरात राज्याभिषेक केला आणि वज्र नावाचा श्रीकृष्णाचा पणतू अर्जुनाने द्वारकेहून आणला होता, त्याला इंद्रप्रस्थाचे राज्य दिले. एके दिवशी धर्मराज चौघे बंधू व द्रौपदी यांच्यासह हस्तिनापुराहून बाहेर पडला. ही सर्व मंडळी उत्तरेच्या रोखाने निघून हिमालयात प्रविष्ट झाली. हिमालयाची बर्फाच्छादित शिखरे चढता चढता सर्वांची शक्ती क्षीण झाली होती. त्यात प्रथम द्रौपदी पडली. मग बाकीचे सगळे पडले. धर्म तेवढा तसाच पुढे मेरू पर्वतापर्यंत पोचला. तिथे स्वतः इंद्र रथात बसून धर्मराजाला सामोरा आला. मग इंद्र व धर्मराज हे दोघे इंद्राच्या रथातून स्वर्गाकडे निघाले.

स्वर्गारोहणपर्व – धर्मराज स्वर्गात पोचताच दुर्योधन आपल्या बांधवांसह प्रतिष्ठितपणे बसला आहे व स्वर्गातले देव त्याला मान देत आहेत, असे दृश्य त्याला दिसले. त्याचे बंधू मात्र तेथे कुठे दिसेनात. त्याने चौकशी केली तेव्हा कळले, की ते सगळे नरकात आहेत. धर्मराजाला त्या गोष्टीचे आश्चर्य वाटले. तो यमदूतांना म्हणाला, की 'मला नरकात घेऊन चला.' धर्मराजा नरकात गेला. मग यमदूत त्याला म्हणाले. 'इथे तुमचे बंधू आहेत; पण तुमची जागा स्वर्गात आहे. तेव्हा तुम्ही आमच्या बरोबर तिकडे चला.'

पण नरकातले जीव त्याला म्हणाले. 'धर्मराजा, तू इथे आल्याने आमच्या नरकयातना खूप सुसह्य झाल्या आहेत. तेव्हा तू इथून जाऊ नकोस.' धर्मराजाला त्या जीवांची दया आली. त्याने तिथेच राहायचे ठरवले.

पण ही वस्तुस्थिती नव्हती. इंद्राने मायाजाल रचून त्याची ही परीक्षा पाहिली होती. धर्मराजाची ही परोपकारबुद्धी पाहून इंद्र परम संतुष्ट झाला. त्याने मायापटल काढून घेताच धर्माला आपले स्वजन स्वर्गात सुख भोगीत असल्याचे दिसले.

सांस्कृतिक जीवन – महाभारतात तत्कालीन समाजाचे व संस्कृतीचे दर्शन घडते, ते असे –

मुळात चातुर्वर्ण्य गुणकर्माधिष्ठित असे उत्पन्न झाले असले तरी, महाभारतकालातली समाजरचना जन्मसिद्ध चातुर्वर्ण्यावरच आधारलेली होती. ब्राह्मण, क्षत्रिय, इ. वर्ग जन्मामुळे ठरतात आणि त्यांचे गुण अनुवंशावर अवलंबून असतात, हाच सिद्धान्त महाभारतात जागोजागी सांगितलेला आहे. प्रत्येक वर्णाला विहित व्यवसायही ठरलेले होते. भृगु व भारद्वाज यांच्या संवादात, भिन्न भिन्न वर्ण कर्मामुळे झाले, असे भृगूने सांगितले आहे. प्रथम सर्व ब्राह्मण होते; त्यांच्यापैकी जे रजोगुणी व साहसी होते ते क्षत्रिय झाले; ज्यांच्यांत रज व तम या गुणांचे मिश्रण होते आणि ज्यांनी कृषी व पशुपालन सुरू केले ते वैश्य झाले. जे तमोगुणी असून, हिंसा व असत्य यावर आसक्त झाले, हवी ती कर्मे करू लागले ते शूद्र झाले (शांति १८८.१४)

वर्णसंकराची भीती महाभारतकारांना फार वाटत होती असे दिसते. म्हणून त्यांनी प्रतिलोम वर्णसंकराचा निषेध केला आहे. पण युधिष्ठिराने एके ठिकाणी म्हटले आहे की 'सध्या सर्व वर्णांचा संकर चालू आहे. कोणताही पुरुष कोणत्याही स्त्रीशी विवाह करतो. त्यामुळे जाती निवडून सांगणे कठिण आहे. म्हणूनच हे भुजंगश्रेष्ठा, ज्याच्या ठायी संस्कारजन्य असे उच्च शील दिसून येईल त्याला ब्राह्मण म्हणावे. (वन १८०)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाभारतकालीन वर्णव्यवस्थेचे वर्णन चिं. वि. वैद्य यांनी केले आहे ते असे– पूर्वीच्या काळी क्षत्रियांचे ब्राह्मण झाल्याची उदाहरणे आहेत. पण तसे परिवर्तन पुढे बंद झाले. महाभारतकाली अन्य वर्णाचा मनुष्य ब्राह्मण होऊ शकत नव्हता. वैश्य हा क्षत्रिय किंवा शूद्र हा वैश्य होऊ शकत नव्हता. चारी वर्ण अभेद्य झाले होते. चारी वर्णांना आपसांत विवाह करण्यास बंदी होती. तथापि तीन वर्णांतील पुरुष आपल्याहून कनिष्ठ वर्णांतील स्त्रिया करीत होते. महाभारतकाली असे अनुलोम विवाह चालू होते.

वर्णसंकर पूर्वीपासून चालू होता. त्यामुळे उत्पन्न झालेल्या अधिरथ, अंबष्ठ, उग्र, वैदेह, श्वपाक, पुल्कस, स्तेन, निषाद, सूत, मागध, अयोगव, करण, व्रात्य, चांडाल वगैरे अनेक जाती महाभारतकाली अस्तित्वात होत्या. (शांति २४६) त्याच अध्यायात जातीचे हीनत्व हे कर्म व उत्पत्ती या दोन्हींवर अवलंबून असते, असे सांगितले आहे. मात्र हीन कर्माचा त्याग केला असता, हीन जातीत जन्मलेल्या मनुष्याची गणना उत्तम पुरुषांत करता येईल; उलट उच्च जाती असूनही हीन कर्म असेल तर ते मनुष्याला हीनत्व आणते, असेही म्हटले आहे. येथे कर्माची प्रशंसा केली असली, तरी जातींचे जन्मसिद्धत्व मान्य केले आहे.

महाभारतातील वर्ण-व्यवस्थेचा ऊहापोह करून डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी त्याचा निष्कर्ष सांगितला आहे, तो असा – भारतीय तत्त्ववेत्त्यांनी जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य जमेस धरून समाजव्यवस्था केली हे जरी खरे असले, तरी अशा व्यवस्थेमुळे उत्पन्न होणारे जे दोष ते समाजव्यवस्थेत शिरू न देण्याचे त्यांनी आटोकाट प्रयत्न केले होते; आणि यातच त्यांचे वैशिष्टय दिसून येते. त्यांनी वर्ण जन्मसिद्ध मानला तरी योग्यता मात्र जन्मावर कधीही अवलंबून ठेवली नाही. क्षत्रिय कुळात पुरुष जन्माला आला म्हणून तो क्षत्रिय असे धरून त्याने युद्ध, प्रजापालन, ही कार्ये करावी असे त्यांनी सांगितले आहे. पण ही कार्ये त्याने केली नाही, तर केवळ जन्मामुळे त्याला मान द्यावा, असे भारतीय तत्त्ववेत्त्यांनी कधीही सांगितले नाही. तेच ब्राह्मणांसंबंधी आहे. ब्राह्मण वर्ण हा जन्मावरून गृहीत धरून ब्राह्मणाने यजन-याजन इ. कार्ये करावी, असा दंडक घातलेला आहे. पण ब्राह्मणाने आपली कार्ये केली नाहीत, तरी केवळ जन्मामुळेच त्याला श्रेष्ठ मानावा ही मनुस्मृतीतली समाजहिताला अत्यंत घातक अशी कल्पना त्यांना स्वप्नातसुद्धा शिवलेली नाही.

आश्रमव्यवस्था – वर्णव्यवस्थेप्रमाणे आश्रमव्यवस्थाही भारतीय समाजाचे एक अंग आहे. वर्णव्यवस्थेचे बीज जसे प्रत्येक समाजात असते, तसेच ते आश्रमव्यवस्थेचेही असते. लहानप[णी] विद्याभ्यास करावा, तरुणपणी संसार करावा आणि म्हाता[र]पणी ईश्वरभजनात काळ घालवावा, अशी भावना प्रत्येक स[मा]जात असते. मात्र तिला भारताच्या बाहेर निबंधाचे स्वरूप [आले] नाही. भारतीय आर्यांनी याही समजुतीला शाश्वत रूप [दि]… व आश्रमव्यवस्था ही धर्माचीच एक बाब ठरवली. मात्र … व्यवस्था त्यांनी फक्त त्रैवर्णिकांसाठी लागू केली. महाभा[रत]… व त्याहीपूर्वी उपनिषद्कालात त्रैवर्णिक मुले गुरुगृही राहून वि[द्या] संपादीत असत, असे दिसते. मुख्यत: ही ब्राह्मण वर्णाची … असत. क्षत्रिय व वैश्य यांची मुले गुरुगृही जात असत कि[ंवा] नाही याचा स्पष्ट उल्लेख महाभारतात आढळत नाही. … काळी राजे लोक व धनिक लोक विद्या शिकविण्यासाठी चां[ग]ल्या शिक्षकांना आपल्या जवळ वाळगीत. भीष्माने कौरव-पांडवांना शिक्षण देण्यासाठी द्रोणाचार्याला आपल्या पदरी ठे[वले] होते, हे याचे प्रमुख उदाहरण होय. कौरव–पांडवांच्या का[ळा]पर्यंत क्षत्रिय व वैश्य मुलांचा गुरुगृहवास संपुष्टात आला हो[ता] व त्यामुळे ब्रह्मचर्याश्रमाचे महत्त्व व त्यातील कृत्ये यांचे मह[त्त्व] कमी होऊन नाममात्र उपनयन संस्कार तेवढा शिल्लक राहि[ला] होता, असे दिसते.

गृहस्थाश्रमातला संसार हा व्यवहारी भाग आणि अ[ग्नि] व अतिथी यांची सेवा हा दुसरा भाग होय. घरात गृह्या[ग्नि] वाळगून ब्राह्मण व क्षत्रिय त्या काळी अग्नीचे यजन कर[ीत] असे दिसते. श्रीकृष्णाने शिष्टाईला निघताना प्रथम स्नान … जपजाप्य करून अग्नीला आहुती दिली, असे वर्णन महाभार[तात] आहे (उद्योग.९४). पांडव वनवासात असताना ते नित्य गृह्या[ग्]नीची सेवा करीत होते. ते महाप्रस्थानाला गेले तेव्हा त्यां[नी] आपला गृह्याग्नी उदकात विसर्जन केला. ही परिस्थिती … भारताच्या काळातली आहे. सौतीच्या काळी काय व्यव[स्था] होती हे समजायला साधन नाही. तथापि त्या काळी यज्ञवि[धी] जटिल झाल्यामुळे अनेक क्षत्रिय व ब्राह्मणही अग्निवि[रहित] झाले असावे, असे वाटते. कारण अग्नी न वाळगणाऱ्या ब्रा[ह्म]णांना शूद्रवत मानावे असे महाभारतात म्हटले आहे.

वानप्रस्थाचा अधिकारही त्रैवर्णिकांना होता. तीन्ही व[र्णांचे] लोक उतारवयात वानप्रस्थ स्वीकारीत असत, असे दिसते. … राष्ट्र व विदुर यांचा वानप्रस्थ महाभारतात वर्णिला आहे.

संन्यासाचा अधिकार त्रैवर्णिकांनाच होता. प्राचीन का[ळी] शूद्रही वेदान्त – ज्ञानाचे व संन्यासाचे अधिकारी होते; प[ण] पुढे त्या आश्रमातले नेमधर्म पाळणे ब्राह्मणांशिवाय इत[रांना] अशक्य होऊ लागल्यामुळे इतर वर्णांना संन्यासाचा अधि[कार] आहे की नाही हा प्रश्न उपस्थित झाला असावा. मात्र …

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पर्वाच्या ६३ व्या अध्यायात स्वकर्म आचरून पुनीत झालेल्या शूद्रालाही सर्व आश्रम विहित असल्याचे सांगितले आहे.

या चारही आश्रमांत गृहस्थाश्रम सर्वश्रेष्ठ होय, असे विस्तारपूर्वक सांगितले आहे (२४३). गृहस्थाने चतुर्विध पुरुषार्थ साधावे आणि वार्धक्यात पुत्रावर सर्व भार टाकून वानप्रस्थ व संन्यास या मार्गांकडे वळावे, असे महाभारतकारांचे मत दिसते.

शिक्षणपद्धती – प्राचीन लोकांना शिक्षण देण्याची जबाबदारी ब्राह्मणांनी आपल्या शिरावर घेतली होती. अध्यापन हे त्यांचे आवश्यक कर्तव्य ठरले होते. केवळ वेद – शास्त्रेच नव्हेत; तर इतर कलाही ब्राह्मणांनी शिकवाव्या ही गोष्ट मान्य होती. तत्कालीन राजे लोक त्यांच्या चरितार्थाची सोय करीत व तसे त्यांनी करावे, असे महाभारतकारांनीही सांगितले आहे. त्यामुळे समाजात शिक्षकांचा एक स्वतंत्र वर्गच निर्माण झाला होता. चिं. वि. वैद्य म्हणतात – ब्राह्मणांनी लोकांस प्राचीन काळी अज्ञानात ठेवले ही गोष्ट चुकीची असून, उलट ब्राह्मणांनी सर्व लोकांचे शिक्षण आपल्या डोक्यावर घेतले होते असे त्यांच्या संबधाने आपल्यास आदराने म्हणावयास पाहिजे.

त्रैवर्णिकांच्या प्रत्येक मुलाने शिकलेच पाहिजे, असाही नियम वर्णव्यवस्थेत होता. त्यासाठीच त्रैवर्णिकांना उपनयन (विद्यार्थ्याला गुरूजवळ नेणे) हा संस्कार धर्मात समाविष्ट केला गेला होता. विद्यार्थ्यांच्या भोजनाची सोय बहुधा गुरुगृहीच होत असे. विद्यार्थ्याला विद्याशुल्क द्यावे लागत नसे; पण गुरूच्या घरचे कामधाम करावे लागत असे. धौम्य ऋषींच्या आश्रमात आरुणी, वेद व उपमन्यू हे शिष्य करीत असलेल्या कामांचे वर्णन आदिपर्वात आहे (३). गुरुगृही शिक्षण होत असता शिष्याला स्वगृही जाण्याची अनुज्ञा नसे, असे दिसते. विद्या संपूर्ण झाल्यानंतर गुरूला दक्षिणा देण्याचा प्रघात होता. अशा गुरुदक्षिणेच्या अनेक कथा महाभारतात आल्या आहेत.

गुरूवाचून विद्या शिकण्याचा प्रघात महाभारतकाळी नसावा. निदान वेदविद्या तरी गुरूवाचून शिकू नये असा समज होता. यवक्रीताने गुरूवाचून वेदांचे अध्ययन केले म्हणून त्याला अतिशय दुःख भोगावे लागले असे वर्णन आहे (वन. १३८). यावरून त्या काळी वेद लिपिबद्ध झाले असावे, असे अनुमान होते. कारण गुरूवाचून वेदाध्ययन करायचे ते पुस्तकावरूनच करणे शक्य आहे.

शूद्रांना वेदविद्येचा अधिकार नव्हता; पण इतर विद्या शिकण्यास हरकत नव्हती. जिथे कौरव-पांडवांसारखे विद्यार्थी एकाच ठिकाणी असत, तिथे त्यांना गुरुगृही न पाठवता त्यांच्यासाठी एखादा शिक्षक ठेवण्याचा संप्रदाय होता. अशा वेळी घरच्या मुलांच्या बरोबरच बाहेरच्या मुलांचेही शिक्षण होत असे. क्षत्रियांना मुख्यत्वे धनुर्विद्या व राजनीती शिकवीत. वैश्यांना वार्ता व शिल्प ही शास्त्रे शिकवीत. सामान्य लोकांना धंदेशिक्षण घरच्या घरीच पिता-पुत्रपरंपरेने मिळत असे. काही विद्या प्रौढ वयात जास्त व्यासंगाने प्राप्त होणाऱ्या असत. अशा विद्यावंतांचा राजाकडून गौरवही होत असे.

महाभारतकाळी मुलींनाही शिक्षण देण्याची रीत होती. त्यांच्यासाठी स्वतंत्र शाळा नसत; पण घरच्या घरीच पित्यापासून, थोरल्या भावापासून किंवा घरी येणाऱ्या विद्वान अतिथीपासून त्यांना शिक्षण मिळत असे. लिहिणे – वाचणे व काही धार्मिक गोष्टी त्यांना शिकविल्या जात. क्षत्रिय मुलींना नृत्यगीतादी ललितकलांचे शिक्षण देत असत. मुलींना नृत्य शिकविण्यासाठी विराटाच्या राजवाड्यात स्वतंत्र नृत्यशाळा बांधलेली होती. स्त्रियांना कुमारीदशेतच जे काय शिक्षण द्यायचे ते देण्याचा प्रघात होता. त्यांना ब्रह्मचर्याश्रम नव्हता व गुरुगृही वासही नव्हता. तसे असते तर त्यांना उपनयन संस्कारही लागू केला गेला असता. मात्र स्त्रियांना शिक्षणाची सक्ती नव्हती. त्यामुळे सामान्य स्थितीतल्या स्त्रिया एकंदरीत अशिक्षितच असाव्या, असे दिसते. ब्राह्मण–क्षत्रियांच्या मुली मात्र शिक्षणसंस्काराच्या सुलभतेमुळे अधिक सुशिक्षित असाव्या. द्रौपदीचे वर्णन 'पण्डिता च पतिव्रता' असे केले आहे (वन. २७).

विवाहसंस्था – फार प्राचीन काळी विवाहनिर्बंध कडक नव्हता. स्त्री स्वेच्छेने कोणत्याही पुरुषाकडे जाऊ शकत असे. स्त्रीने एकाच पुरुषाशी निष्ठावंतपणे पत्नीधर्माने राहावे हा नियम श्वेतकेतूने केला. पत्नीने व्यभिचार केल्यास तिला भ्रूणहत्येचे पातक लागेल असे त्याने ठरविले. पतीने व्यभिचार केल्यास त्यालाही तेच पातक त्याने सांगितले. त्या काळी निरनिराळ्या समाजांत आठ प्रकारचे विवाह प्रचलित होते. ब्राह्मणांत ब्राह्मविवाह रूढ होता. क्षत्रियांत गांधर्व व राक्षस विवाह बऱ्याच प्रमाणात होत असत. दुष्यंत– शकुंतला यांचा विवाह हे गांधर्व विवाहाचे उदाहरण होय. भीष्माने केलेले काशिराजाच्या कन्यांचे हरण, दुर्योधनकृत चित्रांगदकन्येचे हरण व अर्जुनकृत सुभद्राहरण ही राक्षस विवाहाची उदाहरणे होत. मामाच्या मुलीशी विवाह होत असे. थोरल्या भावाचे लग्न झाल्यावाचून धाकट्याचे करणे निषिद्ध मानले जाई. भ्रातृहीन कन्या सहसा कुणी पत्करीत नसत. गुरुकन्येशी विवाह निषिद्ध होता हे खरे; पण महाभारतात असे अनेक विवाह झालेले दिसतात. कहोड आणि उत्तंक यांनी गुरुकन्येशीच लग्न केले होते. अनुलोम विवाहाला संमती होती. पराशर-सत्यवती, च्यवन-सुकन्या, ऋचीक-गाधिकन्या, ऋष्यशृंग-शांता, अगस्त्य-लोपामुद्रा, जमदग्नी रेणुका यांचे विवाह ही अनुलोम विवाहाची उदाहरणे होत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्राह्मणाने शूद्र कन्या करू नये असा निषेध होता. समान वर्णातला विवाह प्रशस्त मानला जाई. वधूपिता लग्नाच्या वेळी आपल्या मुलीचे देज घेत असे. भीष्माने पांडूसाठी माद्री ही कन्या तिच्या बापाला देज देऊनच आणली होती. गालवाने काशिराजकन्या माधवी हिला देज देऊनच वरले होते. मात्र रूढी अशी असली, तरी महाभारतात या शुल्कग्रहणाची निंदाच केली आहे. तसेच कोणताही प्रतिलोम विवाहही निंद्यच मानला आहे. अपवाद काय तो एकच. ययाती या क्षत्रियाने देवयानी या ब्राह्मणकन्येला वरले आणि तो विवाह तेवढा समाजाने दूषणीय ठरविला नाही.

यक्ष, राक्षस, नाग, सुपर्ण या तत्कालीन आर्येतर जाती होत. भारतात त्यांची वस्ती होती व राज्येही होती. या आर्येतर जातींतल्या मुलींशीही आर्यांचे विवाह होत. जरत्कारू-वासुकी (नाग); भीम-हिडिंबा (राक्षस), अर्जुन-उलूपी (नाग), इ. यांची उदाहरणे होत. दीर्घतम्याने त्रैवर्णिक स्त्रियांना पुनर्विवाहाची बंदी प्राचीन काळीच केली होती. पातिव्रत्याच्या उच्च कल्पनांमुळे ही बंदी भारतीय आर्यांत रूढ झाली. महाभारत-काळी उच्च वर्णांच्या स्त्रिया पुनर्विवाह करीत नसत. कदाचित कोणी केल्यास ती स्त्री हीन व पतित समजली जाई. एका पुरुषाला अनेक पत्नी करण्याचा अधिकार प्राचीन काळापासून महाभारतकालापर्यंत व पुढेही चालू होता. जिच्याशी लग्न करायचे ती कन्या अनुपभुक्त असावी, असा प्राचीन कळापासून महाभारतकाळापर्यंत आग्रह होता. महाभारतकाळातल्या मुली लग्नाच्या वेळी प्रौढ असत असे सावित्री, कुंती, द्रौपदी, सुभद्रा, इ. स्त्रियांच्या उदाहरणांवरून कळते. यावरून महाभारतकाळापर्यंत बालविवाह मुळीच होत नव्हते, असे म्हटले पाहिजे. बहुधा पुरुषांचे विवाह वयाच्या २१ व्या वर्षापासून ३० व्या वर्षापर्यंत व मुलींचे विवाह वयाच्या १५ किंवा १६ व्या वर्षी होत असत.

नियोगाची चाल फार प्राचीन काळी अस्तित्वात होती. परशुरामाने क्षत्रियांचा संहार केल्यानंतर त्यांच्या निपुत्रिक विधवा स्त्रिया ब्राह्मणांना शरण गेल्या व ब्राह्मणांनी त्यांच्या ठिकाणी पुत्रोत्पत्ती करून क्षत्रिय वर्णाचा लोप होऊ दिला नाही, अशी कथा आहे. कौरव–पांडवांच्या कालातही तिचा आढळ होतो. पांडू व धृतराष्ट्र हे नियोगजन्यच होते. पण समाजात पातिव्रत्याच्या कल्पना जसजशा उंचावत गेल्या, तसतशी नियोगाची रूढी कमी कमी होऊ लागली. महाभारतकाळी ही रूढी बंद झाली होती. महाभारतात आर्य स्त्रियांच्या पातिव्रत्याची उदात्त वर्णने ठायी ठायी आढळतात. एका सावित्रीचेच आख्यान या बाबतीत फार बोलके आहे. तिच्या रूपाने पातिव्रत्य–धर्मच जणू मूर्तिमंत झाला आहे. त्याचा ठ[illegible] आज हजारो वर्षे हिंदू स्त्रियांच्या अंतःकरणावर कोर[illegible] गेला आहे. श्री. चिंतामणराव वैद्य म्हणतात. 'द्रौपदी, सीता, दमयंती इत्यादी अनेक पतिव्रता स्त्रियांची सुंदर चरित्रे आज हजारो वर्षे आमच्या हिंदू लोकांच्या स्त्रियांच्या दृष्टीसमो[illegible] महाभारताने ठेवलेली असल्यामुळे, पातिव्रत्य हा आमच्या हिं[illegible] स्त्रियांचा अवर्णनीय अलंकार होऊन बसला आहे. महाभारताचे हिंदू समाजावर जे अनेक उपकार आहेत त्यांपैकी, स्त्रियांच्या पातिव्रत्याचे जे अतिशय उदात्त स्वरूप त्यात वर्णन केले आहे हा एक मोठा महत्त्वाचा उपकार आहे अणि तो हिंदू समाज कधीही विसरणार नाही.'

स्त्रीने पतीबरोबर सती जाण्याची चाल भारतीय आर्यां[illegible] रूढ होती. सतीच्या धैर्याला पातिव्रत्याची पवित्र आणि उदा[illegible] कल्पना हाच एकमेव आधार आहे. ही चाल भारतात महा-भारतकालापर्यंत आणि अलिकडच्या काळात इंग्रजांची राज[illegible] येईपर्यंत चालू होती. ग्रीक इतिहासकारांनी या विषयात लिहि[illegible] आहे, की पंजाबातल्या स्त्रिया अत्यंत धैर्याने व स्वखुशी[illegible] आपल्या पतीच्या चितेवर जाळून घेऊन देहत्याग करता[illegible] पांडूबरोबर सती गेलेली माद्री ही पंजाबातलीच होती. श्री-कृष्णाच्या कित्येक स्त्रियांनी श्रीकृष्णाचे निर्याण झाल्यावर इं[illegible] प्रस्थात अनुगमन केले, अशीही कथा महाभारतात आहे.

पडद्याची चाल महाभारतकाली म्हणजे सनपूर्व ३०० [illegible] सुमारास राजे लोकांत रूढ होती. राजस्त्रियांचे नखही दृष्टी[illegible] पडत नाही, अशी वर्णने सौतीने महाभारतात घातली आहे[illegible] मात्र ही चाल प्रारंभापासून आर्य क्षत्रियांत नसावी, असे अनुमा[illegible] आहे. मूळ भारताच्या काळातही तिचा आढळ होत नाही[illegible] सुभद्रा रैवत पर्वताच्या महोत्सवात उघडपणे फिरत होती[illegible] म्हणूनच ती अर्जुनाच्या दृष्टीस पडली. वनवासामध्ये द्रौपदी[illegible] पांडवांबरोबर उघडपणे फिरत होती. ती जयद्रथाच्या नजरे[illegible] आली आणि त्याने तिचा अपहार करण्याचा प्रयत्न केला[illegible] तो त्यामुळेच. अशा अनेक उदाहरणांवरून मूळ भारता[illegible] काळात क्षत्रिय स्त्रियांना पडदा नव्हता, असे दिसते. ही चा[illegible] कधीपासून अंमलात आली, याविषयी श्री. वैद्य लिहितात– 'बहुधा ही पडद्याची रीत पर्शियन लोकांपासून पर्शियन बा[illegible] शाहांच्या अनुकरणाने हिंदुस्थानातील नंदादी सार्वभौ[illegible] राजांनी उचलली असावी; म्हणजे इ. स. पू. ४००–५०० [illegible] सुमारास ती घेतली गेली असून, महाभारतकाली ती अंमला[illegible] असावी.'

धर्म आणि नीती – महाभारतात धर्माधर्मनिर्णयाचे अने[illegible] प्रसंग निर्माण झालेले दिसतात. या प्रसंगी श्रीकृष्ण, भीष्म,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पराशर, व्यास, धर्मराज, इ. विचारवंतांनी जे विचार प्रकट केले आहेत, ते मननीय आहेत. भारतीय तत्त्ववेत्त्यांचा पहिला सिद्धान्त हा, की धर्म हे साध्य नसून साधन आहे आणि समाजाची उन्नती हे त्याचे साध्य आहे. म्हणून त्यांनी धर्माची व्याख्या केली, ती अशी– 'धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मो धारयते प्रजाः' = धर्म शब्दाचा अर्थ धारण करणे असा आहे. सर्व लोकांना धर्माचेच अवलंबन असल्यामुळे धर्मच लोकांना धारण करतो. म्हणून ज्याच्या योगाने लोकांचे धारण होईल, तो धर्म असा सिद्धान्त आहे.

यावरून धर्माचे अंतिम ध्येय समाजाचा उत्कर्ष असे असून, सत्य – असत्य, न्याय – अन्याय त्यावरून ठरविणे आवश्यक आहे, हा दुसरा सिद्धान्त निष्पन्न होते.

' समाजाचा किंवा राष्ट्राचा उत्कर्ष होईल, अशा प्रकारची नियमने म्हणजे धर्म अशी व्याख्या एकदा पत्करली म्हणजे ही नियमने सर्व काळी व सर्व स्थानी एकाच प्रकारची असणे शक्य नाही, हा विचार मान्य करणे प्राप्तच होते. महाभारतातील प्रज्ञावंतांनी हा विचार अनेक ठिकाणी सविस्तर मांडला आहे. प्रत्येक युगातील धर्म वेगळे असतात, असे व्यासांनी स्पष्टच सांगितले आहे. मोक्षधर्माचे सिद्धान्त शाश्वत असले, तरी व्यवहारधर्माचे सिद्धान्त त्रिकालाबाधित असणे शक्य नाही. परिस्थिती नेहमी पालटत असते. तदनुसार समाजावरची बंधनेही बदलणे भाग असते. देशकालाप्रमाणे धर्म पालटतो, असे भीष्मानेही सांगितले आहे. तो श्लोक असा–

स एव धर्मः सोऽधर्मो देशे काले प्रतिष्ठितः ।
अदानमनृतं हिंसा धर्मो ह्यावस्थिकः स्मृतः ।।
(शांति. ३६.११)

अर्थ – योग्य वेळी आणि योग्य स्थळी जो धर्म ठरतो, तोच अयोग्य वेळी आणि अयोग्य स्थळी अधर्म होतो. चौर्यकर्म, असत्यभाषण, हिंसा या सर्वांची गोष्ट अशीच आहे. धर्म हा परिस्थितीप्रमाणे ठरवावा लागतो.

दुसऱ्या एका प्रसंगी भीष्मानेच पुढील विवेचन केले आहे – आपत्ती आली असताना पूर्वीच्या लोकांनी आचरण केलेल्या गौण धर्माचेही आचरण करावे. कारण हे भारता, संपन्नतेच्या कालाचे धर्म निराळे आहेत व आपत्कालाचे धर्म निराळे आहेत. द्रव्यसंग्रह केल्यावाचूनही धर्म संपादन करता येईल; पण चरितार्थाचे महत्त्व धर्माहूनही अधिक आहे. ज्या उपायाने धर्मनिष्ठ राहूनही द्रव्याची प्राप्ती होईल, असा खात्रीचा उपाय नाही. म्हणूनच आपत्काली अधर्मालाही धर्माचे स्वरूप येते व धर्मही अधर्म होतो, असे ज्ञानी लोकांचे मत आहे.

भिन्न प्रसंगी व देश, काल आणि परिस्थिती यांच्याप्रमाणे धर्माचे रूप बदलत असेल तर, विशिष्ट प्रसंगी माणसाने वर्तन कसे ठेवावे आणि ते कशाच्या आधाराने निश्चित करावे असा प्रश्न पुढे उभा राहातो. सत्य, अहिंसा, क्षमा, यांबद्दल काही शाश्वत सिद्धान्त असते, तर काही झाले तरी त्याप्रमाणे वागावे असे धोरण ठेवता आले असते. पण तसे नाही. कधी सत्य हे असत्य ठरते आणि भलत्याच वेळी, समाजाची हानी होत आहे अशा प्रसंगीही, सत्याचरण केले तर त्यामुळे प्राणी नरकास जातो, असे भारतीय तत्त्ववेत्ते निक्षून सांगतात (कर्ण.६९).

अशा स्थितीत धर्माधर्मनिर्णय करताना आपली बुद्धी वापरावी आणि तारतम्य पाहून योग्यायोग्य ठरवावे, असा महाभारतकारांचा अभिप्राय दिसतो. सत्यासत्याचा विचार चालू असता भीष्माने युधिष्ठिराला सांगितले आहे, ते असे – श्रुतीत जे जे सांगितले आहे तो तो धर्म होय, असे कित्येक म्हणतात; व कित्येकांच्या मते तो सर्वच धर्म होय असे नाही. या दुसऱ्या मताचा आम्ही तिरस्कार करीत नाही. कारण श्रुतीत प्रत्येक गोष्ट सांगितलेली असणे शक्य नाही (शांति १०९). यास्तव धर्मनिर्णयाच्या कामी स्वतःची तारतम्य बुद्धी वापरली पाहिजे.

पुढे एका प्रसंगी तर भीष्माने धर्मराजाला स्पष्टच सांगितले आहे –

तस्मात् कौन्तेय विदुषा धर्माधर्मविनिश्चये ।।
बुद्धिमास्थाय लोकेऽस्मिन् वर्तितव्यं कृतात्मना ।।
(शांति.१४१.१०४)

अर्थ– म्हणून हे कुंतीपुत्रा, विद्वान पुरुषाने धर्म आणि अधर्म यांचा निर्णय करण्याच्या कामी बुद्धीचा अवलंब करून या लोकात वागले पाहिजे.

महाभारतातला धर्म हा प्रवृत्तिधर्म आहे. सदर ग्रंथ मुख्यतः ऐहिक उत्कर्षाची प्रेरणा देणारा, त्याचे मार्ग सांगणारा व त्या ऐहिक वैभवावाचून सर्व व्यर्थ होय, असे निक्षून प्रतिपादन करणारा आहे. ऐहिक ऐश्वर्य, दिगंतापर्यंतचे साम्राज्य, त्रिखंडात दुमदुमणारी कीर्ती, इ. आकांक्षा मानवी मनात निर्माण करून त्यासाठी मरण – मारणाचा संग्राम करण्याची प्रेरणा देणारा संदेश या भव्य ग्रंथात आहे. मोक्ष हे मानवाचे अंतिम ध्येय असले पाहिजे, हे महाभारतकारांनाही मान्य आहे; पण मोक्ष ही अत्यंत उन्नत अशी अवस्था असल्यामुळे ती समाजाच्या प्रगत व प्रगल्भ अवस्थेतच शक्य असते. ज्या समाजातील लोकांचे आचार शुचिर्भूत आणि विचार प्रगल्भ व पवित्र आहेत, जिथे राज्यव्यवस्था उत्तम आहे, जिथे लोकव्यवहार सुरळित चालतात, जो समाज विद्यासंपन्न व पराक्रमी असून, परकीय आक्रमणापासून संरक्षण करण्यास समर्थ असतो, अशाच समाजात मोक्षसाधनाचे प्रयत्न व परिणती या गोष्टी शक्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेत, असा भारतीय तत्त्ववेत्त्यांचा सिद्धान्त आहे. यासंबंधी महाभारतात म्हटले आहे, ते असे —

यस्यैव बलमोजश्च स धर्मस्य प्रभुर्नरः

(शांति. १५२.१८)

अर्थ— ज्याच्या जवळ बल आणि ओज आहे असाच मनुष्य धर्माचरण करण्यास समर्थ आहे.

अज्ञानात खितपत पडलेल्या हीनदीन व भुकेकंगाल असलेल्या समाजाचा आणि मोक्षाचा काडीइतकाही संबंध नाही—

क्षुधा निर्णुदति प्रज्ञां धर्मबुद्धिं व्यपोहति ।
क्षुधापरिगतज्ञानो धृतिं त्यजति चैव हि ॥

(आश्वमेधिक. ९०.९१)

अर्थ— भुकेकंगालपणामुळे माणसाचा बुद्धिभ्रंश होतो आणि त्यांच्या धर्मनिष्ठेचाही लोप होतो. क्षुधा माणसाचे ज्ञान नष्ट करून त्याचे धैर्यही हिरावून घेते.

हे कठोर सत्य महाभारतातल्या प्रज्ञावंत पुरुषांना चांगले माहीत होते. आणि म्हणून धर्मव्यवस्थेत भारतीय तत्त्ववेत्त्यांनी राजधर्माला अग्रस्थान दिले आहे. भीष्म म्हणतो —

यथा राजन् हस्तिपदे पदानि संलीयन्ते सर्वसत्त्वोद्भवानि ।
एवं धर्मान् राजधर्मेषु सर्वान् सर्वावस्थान् संप्रलीनान् निबोध ॥

(शांति. ६३.२५)

अर्थ— हे राजा, ज्याप्रमाणे एकटया हत्तीच्या पावलात इतर सर्व प्राण्यांच्या पावलांचा समावेश होतो, त्याप्रमाणे एका राजधर्मात इतर सर्व धर्मांचा सर्व प्रकारे अंतर्भाव होतो, हे तू पक्के समज.

राज्याच्या व समाजाच्या सुव्यवस्थेची जबाबदारी फक्त राजावरच असते असे नाही. प्रजेलाही त्या बाबतीत काही कर्तव्य असते. या विषयीचे दोन श्लोक असे—

अरक्षितारं हर्तारं विलोप्तारमनायकम् ।
तं वै राजकलिं हन्युः प्रजाः संनह्य निर्घृणम् ॥
अहं वो रक्षितेत्युक्त्वा यो न रक्षति भूमिपः ।
स संहत्य निहन्तव्यः श्वेव सोन्माद आतुरः ॥

(अनुशासन ६१.३२–३३)

अर्थ— प्रजेचे रक्षण न करता तिजपासून जो कर घेतो व प्रजेला सन्मार्गाला न लावता जो लुबाडतो, तो राजरूपी कली प्रजेने सज्ज होऊन निष्ठुरपणे ठार मारावा. 'मी तुमचे रक्षण करीन' असे म्हणून जो राजा त्याप्रमाणे प्रजेचे रक्षण करीत नाही, त्याला सर्वांनी एक होऊन पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे ठार करावे.

महाभारतात धर्म, अर्थ व काम यांची महती अनेक ठिकाणी गायिली आहे आणि ती वाचताना एक गोष्ट ध्यानात येते ती ही, की भारतीय तत्त्ववेत्ते त्रिविध पुरुषार्थांचे सारखेच महत्त्व मानतात. धर्माचे महत्त्व फार याबद्दल वादच नाही; पण केवळ त्याकडे जास्त लक्ष देऊन जर कोणी अर्थ व काम यांची हेळसांड करू लागला, तर त्याचा नाश झाल्यावाचून राहणार नाही, असे महाभारतात अनेक वेळा अनेक विचारवंतांनी सांगितले आहे. बलराम एका प्रसंगी म्हणतो —

धर्मार्थौ धर्मकामौ च कामार्थौ चाप्यपीडयन् ।
धर्मार्थकामान् योऽभ्येति सोऽत्यन्तं सुखमश्नुते ॥

(शल्य. ६०.२२)

अर्थ — जो मनुष्य विषयवासनेने धर्मार्थांस धक्का लावू देत नाही, अर्थ साधण्यासाठी धर्मकाम बुडवीत नाही आणि केवळ धर्माच्या पाठीस लागून अर्थकामांवर पाणी सोडीत नाही; तर धर्म, अर्थ व काम (ऐहिक विषयाबद्दलच्या वासना) या तिहींचे एकसमयावच्छेदेकरून समसमान सेवन करतो, तोच आत्यंतिक सुख भोगतो.

धन हे जसे राष्ट्राचे बल आहे, तसेच क्षात्र तेज हे राष्ट्राचे बल आहे. ही दोन्ही परस्परावलंबी आहेत. ऐश्वर्य प्राप्ती झाल्यावर त्याच्या रक्षणासाठी माणूस आपले क्षात्र तेज प्रगट करतो; त्याचप्रमाणे पुष्कळ वेळा क्षात्र तेजाने लक्ष्मीला वश करून घेतो. पण एवढे खरे, की धन असूनही क्षात्र तेज नसेल तर सर्व व्यर्थ होते. म्हणूनच भारतीय तत्त्ववेत्त्यांनी क्षात्र तेजाची महती तर गायिलीच; शिवाय रणात छातीवर वार घेत धारातीर्थी पडणाऱ्या वीराला योगयुक्त संन्याशाची गती अर्थात मुक्ती मिळते असेही सांगितले. द्रौपदी, भीम, कुंती, इ. महाभारतातल्या स्त्रीपुरुषांनी क्षात्र तेजाला खूपच गौरविले आहे. या सर्वांत विदुलेने आपल्या पुत्राला दिलेला क्षात्र धर्माचा तेजस्वी संदेश हा सर्वश्रेष्ठ ठरतो. याविषयी डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे म्हणतात— "विदुलेचा हा क्षात्र धर्माचा संदेश इतका प्रखर, इतका हृदयभेदक आहे; स्वाभिमान, आवेश, चैतन्य यांनी तो इतका रसरसलेल आहे, की तो वाचीत असताना क्षात्र धर्माची अग्निमय मूर्तीच आपल्या पुढे उभी आहे की काय असा भास होतो. असा संदेश ज्या देशातील माता आपल्या पुत्रांना देतात त्या देशातच अजिंक्य, अपराजित व अमोघ पराक्रमी असे पुरुष निर्माण होतात."

धन आणि क्षात्र तेज यांच्याप्रमाणेच उद्योग किंवा प्रयत्न हे प्रवृत्तिधर्माचे तिसरे अंग होय. महाभारतात कृष्ण, भीष्म, भीम, अर्जुन यांच्यासारखे पुरुष सदैव उद्योगाचीच प्रशंसा करताना आढळतात. 'पुरुषाने प्रयत्न करीत असावे, केवळ दैव फिरले असे म्हणून निस्तेज, विषण्ण किंवा म्लान होऊन बसू नये' असे कृष्णाने म्हटले आहे (उद्योग ७७.)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पितामह भीष्म याहून जास्त स्पष्ट शब्दांत प्रयत्नवादाचे महत्त्व सांगत आहे–

> उत्थानेन सदा पुत्र प्रयतेथा युधिष्ठिर ।
> न ह्युत्थानमृते दैवं राज्ञामर्थं प्रसाधयेत् ।।
> साधारणं द्वयं ह्येतद्दैवमुत्थानमेव च ।
> पौरुषं हि परं मन्ये दैवं निश्चित्य मुच्यते ।।
> (शांति. ५६·१४-१५)

अर्थ– हे पुत्रा युधिष्ठिरा, तू उद्योगाच्या दृष्टीने प्रयत्न कर. उभे राहिल्यावाचून अर्थात पुरुषप्रयत्न केल्यावाचून दैव हे राजांचा अर्थ कधीही साध्य करून देणार नाही. दैव आणि पुरुषप्रयत्न ही दोन्ही समानच आहेत. पण त्यांमध्ये मी प्रयत्नाला अधिक महत्त्व देतो. दैव हे फलाच्या द्वारे अनुकूल किंवा प्रतिकूल ठरते, असे समजून त्याच्यावर हवाला ठेवू नये.

सावधानता, दक्षता, साहसी वृत्ती यांचीही महाभारतात अनेक ठिकाणी प्रशंसा केली आहे.

> न हि प्रमादात् परमस्ति किञ्चित् वधो नराणामिह जीवलोके ।
> प्रमत्तमर्था हि नरं समन्तात् त्यजन्त्यनर्थाश्च समाविशन्ति ।।
> (सौप्तिक. १०.१९)

अर्थ– या लोकी मनुष्यांना बेसावधपणापेक्षा अधिक घातक असे काहीच नाही. बेसावध राहणाऱ्या मनुष्याला सर्व प्रकारची संपत्ती सोडून जाते आणि त्याच्यावर संकटे मात्र कोसळतात.

ही व अशांसारखी वचने पाहिल्यावर महाभारतातल्या प्रवृत्तिधर्माची चांगली कल्पना येते. राष्ट्राचा उत्कर्ष, वैभवशाली जीवन, साम्राज्यसत्ता अशा भव्य आकांक्षा त्या पुरुषांच्या चित्तांत होत्या. लोकांनी त्यासाठी अहोरात्र प्रयत्न करावे, अशी त्यांची इच्छा होती. षड्रिपूंची निंदा करणे त्यांना मान्य नव्हते. संताप, क्रोध, ऐश्वर्याचा लोभ, यांवाचून माणसाच्या हातून पराक्रम होणे शक्य नाही, हे ते जाणून होते. साहसी वृत्ती आणि नित्य मरणमारणाची सिद्धता यांवाचून ऐश्वर्य मिळणे शक्य नाही, हेही त्यांना पक्के ठाऊक होते.

राजनीती– महाभारतात राजधर्माचे जागोजाग विवेचन आले आहे. नारद, कणिक, भरद्वाज, भीष्म, कृष्ण, इत्यादींच्या मुखातून त्याचा सविस्तर ऊहापोह झाला आहे. राजनीतीची अनेक अंगे व तिचे विविध पैलू त्या ऊहापोहात चर्चिले गेले आहेत. त्यांनी राजनीतीचे दोन प्रमुख विभाग मानले आहेत. एक गृहनीती व दुसरी परनीती. राजाने आपल्या प्रजेशी कसे वागावे, राज्यात नैतिक गुणांचा उत्कर्ष कसा साधावा, राज्य सुखसंपन्न व ऐश्वर्यवान कसे करावे, राज्यातले स्वास्थ्य कसे रक्षावे, राज्यावर अवर्षण, उत्पात, इ. अनर्थ कोसळले असता राजाने प्रजेची काळजी कोणत्या प्रकारे घ्यावी आणि या सर्वांसाठी स्वतःही चारित्र्यसंपन्न कसे असावे, याविषयीचे जे नियम व उपदेश महाभारतात आहेत ते राजधर्माच्या गृहनीतीत येतात. या गृहनीतीविषयी भीष्माने युद्धिष्ठिराला उपदेश केला आहे, तो असा–

गर्भिणी जसे आपल्या गर्भाचे पालन करते त्याप्रमाणे राजाने सदैव प्रजेचे पालन केले पाहिजे. ज्याप्रमाणे गर्भिणी आपल्याला स्वतःला प्रिय असलेल्या गोष्टींचा त्याग करून आपल्या गर्भाला हितकारक तेच करते, त्याप्रमाणे कुरुश्रेष्ठा, धर्माच्या अनुरोधाने वागणाऱ्या राजानेही निःसंशय तसेच वागले पाहिजे. म्हणजे आपल्याला इष्ट असतील त्या गोष्टींचा त्याग करून जी जी गोष्ट लोकहिताची असेल ती ती त्याने केली पाहिजे. ज्ञानसंपन्न अशा राजाने चारही वर्णांवर सदैव दया केली पाहिजे. राजा धर्मात्मा व सत्यवक्ता असेल तरच प्रजेचे रंजन होते (शांति. ५६). कोप न पावणारा, व्यसनशून्य, सौम्य शिक्षा करणारा आणि जितेंद्रिय असा राजा असला म्हणजे हिमालय पर्वताप्रमाणे तो लोकांच्या विश्वासास पात्र होतो. ज्याच्या राज्यात प्रजा आपल्या पित्याच्या घरात असल्याप्रमाणे निर्भयपणे संचार करीत असते, तोच राजा सर्वांत श्रेष्ठ होय. ज्याच्या राज्यामध्ये वास करणारे लोक आपल्या कर्मामध्ये आसक्त, केवळ आपल्या शरीरावरच प्रेम न करणारे, वश्य, शिक्षा मान्य करणारे, आज्ञेत राहणारे, दुसऱ्याला पीडा देण्याची इच्छा न करणारे आणि सत्पात्री दान करण्याची आवड असलेले असे असतात, तोच खरा पृथ्वीपती होय (शांति. ५७). राजाची उत्पत्ती धर्मासाठी आहे; आपल्या इच्छा तृप्त करण्यासाठी नाही. जो लोकांचे संरक्षण करतो तोच राजा होय, हे तू लक्षात ठेव. धर्म हा सर्व प्राण्यांना आधारभूत असून, राजा हा धर्माला आधार आहे. राजाने लोकांनी प्रार्थना केल्यावाचून त्यांचे प्रिय करावे (शांति. ९३). जो राजा सदाचाराने वागणाऱ्या लोकांशी असत्याचरण करतो, त्याचा आत्मा परशूच्या योगाने छिन्न झालेल्या वनाप्रमाणे त्या कर्माच्या योगाने क्षीण होतो.

ज्यांना आपण परकीय समजून शत्रूसम लेखतो, त्यांच्याशी वागण्याचे जे नियम ती परनीती होय. या परनीतीसंबंधी महाभारतात जे वर्णन केले आहे, ते संक्षेपात असे–

जय धर्मामुळे मिळत नाही, तर बलामुळे मिळतो. या लोकात धर्माचे अथवा अधर्माचे फल कोणी प्रत्यक्ष पाहिलेले नाही. यास्तव धर्माधर्माची निष्फळ चर्चा करीत न बसता राजाने सामर्थ्यप्राप्तीची इच्छा करावी. कारण हे सर्व जग बलाढ्य पुरुषांच्याच आधीन असते. संपत्ती, सैन्य व अमात्य या गोष्टी या लोकात बलवान पुरुषालाच प्राप्त होतात. जो ऐश्वर्यसंपन्न

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नसेल तो पतित होय. द्रव्य अल्प, राज्य अल्प, बल अल्प, इ. सर्व प्रकारचे अल्प म्हणजे ते उच्छिष्टच होय. बल आणि धर्म हे अधिकारी पुरुषामध्ये वास्तव्य करीत असले, तर ते मोठ्या भयापासूनही रक्षण करू शकतात. तथापि धर्माहून बलाचीच योग्यता अधिक आहे, कारण बलाच्या योगाने धर्म प्रवृत्त होतो.

ज्याप्रमाणे जंगम पदार्थ पृथ्वीवरच अवलंबून असतात, त्याप्रमाणे धर्म हा बलावरच अवलंबून असतो. वृक्षाचा आश्रय करून राहणाऱ्या वेलींची जशी वृक्षांवर सत्ता चालत नाही, तशी बळावर धर्माची सत्ता चालत नाही. म्हणून राजाने बलाचे संपादन करावे. आपले व आपल्या शत्रूचे कार्य एकच असले, तरी बलाढ्य शत्रूशी संधी करून सावधपणे व युक्तीने कार्य साधावे; पण कार्य झाल्यावर मात्र त्या शत्रूवर कधीही विश्वास ठेवू नये. आपल्यावर ज्याचा विश्वास नसेल त्याच्यावर विश्वास ठेवूच नये; पण आपल्यावर विश्वास ठेवणाऱ्यावरही तो ठेवू नये. कोणत्याही प्रसंगी आपल्या व प्रजेच्या जीविताचे रक्षण करणे अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे शत्रूकडून फसविले जाऊ नये म्हणून नेहमीच सावध असणे हे आद्य कर्तव्य होय. अविश्वास हे त्याचे मूलसूत्र आहे.

भीष्म म्हणतो –

संक्षेपो नीतिशास्त्राणामविश्वासः परो मतः ।

(शांति. १३८.९६)

अर्थ – अविश्वास हेच राजनीतीचे मुख्य व संक्षिप्त स्वरूप आहे.

भरद्वाज म्हणतो– राजा शत्रुंजया, आपत्तीच्या प्रसंगी योग्य प्रकारची मसलत करावी. योग्य प्रकारे पराक्रम गाजवावा, योग्य प्रकारे युद्ध करावे आणि प्रसंग पडला तर योग्य रीतीने पलायनही करावे. त्याविषयी विचार करू नये. नम्रता केवळ वाणीत असावी; पण अंतःकरण तीक्ष्ण असावे. मित्राप्रमाणेच शत्रूचेही मधुर भाषणाच्या योगाने सांत्वन करीत असावे.

प्रहरिष्यन् प्रियं ब्रूयात् प्रहरन्नपि भारत ।
प्रहृत्य च कृपायीत शोचेत च रुदेत च ।

(आदि. १४०.५६)

अर्थ – शत्रूवर प्रहार करण्याचे मनात असता वरकरणी त्याच्याशी गोड बोलावे, प्रहार करीत असतानाही गोडच बोलावे आणि प्रहार केल्यावर त्याच्याविषयी सहानुभूती दाखवावी, खेद प्रदर्शित करावा व रडावेही.

ऋण, अग्नी आणि शत्रू यांचा अवशेष ठेवला, तर ते पुन: पुन्हा वृद्धिंगत होतात. यास्तव त्यांचा शेष ठेवू नये. शत्रू अवशिष्ट ठेवले तर पूर्वी त्यांचा अपमान झाला असल्यामुळे ते पुढे अत्यंत भीती उत्पन्न करतात. म्हणून शत्रूने हृदयाला पाझर फोडणारे उद्गार काढले, तरी त्याला सोडू नये ... त्याच्याविषयी दु:ख बाळगू नये. निग्रह किंवा अनुग्रह, ... किंवा शिक्षा या गोष्टी राजाने तारतम्य पाहून कराव्या.

शत्रू जर अवेळीच चालून आला, तर त्या वेळी आपले सामर्थ्य दाखविण्याच्या भरीस न पडता सूज्ञ पुरुषांना संमत असलेल्या मार्गाचा अवलंब करून त्याच्याशी स्नेह करावा. क्रोध ... अहंकार यांचा त्याग करून शत्रूच्या छिद्रांचा शोध घेत राहावे.

वहेदमित्रं स्कन्धेन यावत्कालविपर्ययः ।
ततः प्रत्यागते काले भिन्द्याद् घटमिवाश्मनि ॥

(आदि. १४०.२१)

अर्थ – आपला काळ उलट असेल तोवर शत्रूला डोक्यावर घ्यावे; पण योग्य काळ आलेला पाहून दगडावर आपटलेल्या मडक्याप्रमाणे त्याचा चुराडा करावा.

आशां कालवतीं कुर्यात् कालं विघ्नेन योजयेत्।
विघ्नं निमित्ततो ब्रूयान्निमित्तं वापि हेतुतः ॥

(आदि. १४०.८८)

अर्थ – प्रसंगविशेषी शत्रूला आशा दाखवावी; पण ति... कालाची मर्यादा सांगावी आणि ती सफल होण्याला विघ्न आणावी. आलेल्या विघ्नांचेही काहीतरी कारण सांगावे आणि त्या कारणांच्याही मुळाशी कोणता तरी हेतू असल्याचे सांगावे. थोडक्यात सांगायचे तर–

कर्मणा येन केनैव मृदुना दारुणेन च ।
उद्धरेत् दीनमात्मानं समर्थो धर्ममाचरेत् ॥

(आदि. १४७.३...)

अर्थ – सौम्य असो व भयंकर असो; जे आवश्यक ते ... करून दीनदशेतून आपला उद्धार करून घ्यावा. प्रथम सम... व्हावे आणि सामर्थ्य आल्यावर धर्म आचरावा.

महाभारतीय राजनीतीत शत्रूचा संहार करावा, कपटा... कपटाने उत्तर द्यावे, येन केन प्रकारेण शत्रूचे मूळच उखडून काढावे, इ. उपदेश असला, तरी भारतीय पुरुषांना युद्धाची भलतीच हौस होती किंवा ते युद्धपिपासू होते, असे मात्र सम... नये. युद्ध शक्य तो टाळावे आणि अपरिहार्य ठरलेच तर ... करावे, असा त्यांचा उपदेश आहे. युधिष्ठिराला नारद म्हणतो– 'हे शत्रुतापना, युद्ध करून रक्तपात करणे हे होता होईल तो टाळले पाहिजे. यास्तव शत्रूच्या नाशास उद्युक्त झाल्या... प्रथम साम, दान, भेद हे उपाय योजावे. या उपायांची ... प्रकारे योजना केल्याने प्राणहानी न होता आपला उद्देश सिद्ध... जातो. हे प्रजापालका, तू असेच धोरण ठेवतोस ना ?' (सभा. ...)

भीष्मही युधिष्ठिराला अशाच प्रकारे सांगतो– युधिष्ठिरा, तुझे चतुरंग सैन्य प्रबळ आणि पुष्ट असू दे. तसे असूनही ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सामोपचाराचेच वर्तन ठेव आणि त्याचा उपयोग नच झाला तर युद्धाविषयीचा प्रयत्न कर. कारण युद्धातील जय हा निकृष्ट प्रतीचा आहे. तो स्वाभाविक रीत्या किंवा दैवयोगाने मिळतो, असे तज्ञ लोकांचे मत आहे. म्हणून हे राजा, इतर उपायांनी कार्य होणे शक्य नसेल तरच युद्ध करावे. कारण युद्ध हा साम, दान आणि भेद यांच्या नंतरचा उपाय आहे. म्हणून परपक्षाच्या योद्धयांवर क्रौर्यमिश्रित सामोपचाराचा पुनःपुन्हा प्रयोग करावा. अशी चोहों बाजूंनी पीडा उत्पन्न झाली म्हणजे शत्रू तह करायला तयार होतो. शत्रूचे जे अगदी खाजगी लोक असतील त्यांच्यामध्ये फाटाफूट करण्यासाठी गुप्त हेरांचा प्रवेश करवावा. जो दुसरा राजा आपल्या शत्रूहून श्रेष्ठ व बलिष्ठ असेल त्याच्याशी संधी करणे प्रशस्त होय. कारण तसे केल्याने शत्रूचा व त्याच्या इतर पराक्रमी पुरुषांचा प्रतिबंध होईल. अशा रीतीने पीडा देणे त्यांना अशक्य ठरते.

सुभाषितवचने – वरील विवेचनाला अनुकूल अशी सुभाषिते व नीतिवचने महाभारतात सर्वत्र विखुरलेली आहेत. त्यांतली काही पुढे दिली आहेत –

कीर्तिरक्षणमातिष्ठ कीर्तिर्हि परमं बलम् ।
नष्टकीर्तेर्मनुष्यस्य जीवितं ह्यफलं स्मृतम् ।।

अर्थ – कीर्ती सांभाळण्यासाठी प्रयत्न कर. कारण कीर्ती हे माणसाचे श्रेष्ठ बल आहे. ज्या माणसाची अपकीर्ती झाली, त्याचे जगणे निष्फलच होय.

अतो हास्यतरं लोके किञ्चिदन्यन्न विद्यते ।
यत्र दुर्जनमित्याह दुर्जनः सज्जनं स्वयम् ।।

अर्थ – जिथे दुर्जनच स्वतः सज्जनाला 'तू दुर्जन आहेस' असे म्हणू लागतो (तिथे) या जगात त्यापेक्षा अधिक हास्यास्पद गोष्ट कोणतीही नाही.

नाधर्मश्चरितो लोके सद्यः फलति गौरिव ।
शनैरावर्त्यमानस्तु कर्तुर्मूलानि कृन्तति ।।

अर्थ – गाय जशी फळली की लगेच वीत नाही, त्याचप्रमाण माणसाच्या हातून अधर्माचरण घडले की त्या पापाचे फल त्याला लगेच मिळत नाही. पण हळूहळू येता येता ते पाप त्याला गाठते आणि मग त्याची पाळेमुळे कुरतडून टाकते.

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ।।

अर्थ– अग्नीत हविर्द्रव्य घातल्याने तो विझत नाही; तर अधिकच पेटतो. त्याप्रमाणे विषयांचा उपभोग घेतल्याने विषयवासना मंदावण्याऐवजी अधिकच वाढत जाते.

सुप्रणीतो बलौघो हि कुरुते कार्यमुत्तमम् ।
अन्धं बलं जडं प्राहुः प्रणेतव्यं विचक्षणैः ।।

अर्थ – सेनासमूहाला नीट मार्गदर्शन केले असता त्याच्या हातून उत्तम कार्य होते. सैन्य हे आंधळे व अज्ञ असते. यास्तव दूरदर्शी नेत्यांनी सैन्याला योग्य मार्गदर्शन केले पाहिजे.

परनेयोऽग्रणीर्यस्य स मार्गान् प्रतिमुह्यति ।
पन्थानमनुगच्छेयुः कथं तस्य पदानुगाः ।।

अर्थ – एखाद्या समाजाचा पुढारी परप्रत्ययनेयबुद्धी झाला म्हणजे त्यालाच आपल्या मार्गाविषयी मोह पडतो. अशा स्थितीत अनुयायी त्याच्या मार्गाचे अनुसरण कसे करू शकतील ?

प्रच्छन्नो वा प्रकाशो वा योगो योऽरिं प्रबाधते ।
तद्वै शस्त्रं शस्त्रविदां न शस्त्रं छेदनं स्मृतम् ।।

अर्थ – गुप्तपणे असो किंवा उघडपणे असो; जे साधन शत्रूला मारक ठरते, त्यालाच शस्त्रवेत्ते शस्त्र समजतात. केवळ कापणारे तेच शस्त्र नव्हे.

प्राज्ञस्तु जल्पतां पुंसां श्रुत्वा वाचः शुभाशुभाः ।
गुणवद्वाक्यमादत्ते हंसः क्षीरमिवाम्भसः ।।

अर्थ – लोकांची बरी किंवा वाईट बोलणी ऐकून शहाणा मनुष्य हंसक्षीरन्यायाने त्या बोलण्यातून जे वचन गुणकारी असेल, तेवढेच नेमके घेतो.

न धर्मपर एव स्यान्न चार्थपरमो भवेत् ।
न कामपरमो वा स्यात् सर्वान्सेवेत न्यायतः ।।

अर्थ – (धर्म, अर्थ व काम हे तीन इहलोकीचे पुरुषार्थ आहेत. म्हणून) मनुष्याने त्यांतून केवळ धर्माच्या, केवळ अर्थाच्या किंवा केवळ कामाच्या नादी न लागता तीन्ही पुरुषार्थ यथायोग्य प्रमाणात यथाकाल साधावे.

अरण्ये विजने न्यस्तं परस्वं दृश्यते यदा ।
मनसाऽपि न वाञ्छन्ति ते नराः स्वर्गगामिनः ।।

अर्थ – अरण्यात, निर्जनस्थळी पडलेले दुसऱ्याचे द्रव्य पाहून ज्यांना ते घेण्याची मनानेही इच्छा होत नाही, ते पुरुष स्वर्गाला जातात.

धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः ।

अर्थ – आपण जर धर्माचे पालन केले तर धर्म संकटातून आपले रक्षण करतो; पण आपणच जर धर्म धुडकावून लावला तर तो आपले रक्षण करीत नाही.

असंत्यागात्पापकृतामपापान्
तुल्यो दण्डः स्पृशते मिश्रभावात् ।
शुष्केणार्द्रं दह्यते मिश्रभावात् ।
तस्मात्पापैः सह संधिं न कुर्यात् ।।

अर्थ – पापी माणसाची संगत मोडली नाही तर निष्पाप माणसांनाही केवळ पाप्यांचे जोडीदार म्हणून त्यांच्या बरोबरीने शिक्षा मिळते. वाळलेल्या सरपणात ओले सरपण मिसळले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तर वाळल्याबरोबर ओलेही जळते. म्हणून पापी माणसांची संगती धरू नये.

एकं विषरसो हन्ति शस्त्रेणैकश्च वध्यते ।
सराष्ट्रं सप्रजं हन्ति राजानं मन्त्रविप्लवः ।।

अर्थ – विष दिले, तर ते पिणारा एकच मनुष्य मरतो. शस्त्राने वार केला तर एकटाच मरतो. परंतु राजाची गुप्त मसलत फुटली तर राष्ट्र व प्रजा यांच्यासह राजाचा नाश होतो.

अप्राप्तकालं वचनं बृहस्पतिरपि ब्रुवन् ।
लभते बुद्धयवज्ञानमवमानं च भारत ।।

अर्थ – हे राजा, योग्य समय प्राप्त झाला नसता जर एखाद्याला सल्ला दिला, तर बृहस्पतीच्या बुद्धीचीही हेटाळणी होते. त्याचा अपमान केला जातो.

सुलभाः पुरुषा राजन् सततं प्रियवादिनः ।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ।।

अर्थ – हे राजा, ऐकणाऱ्यांना गोड वाटेल, असे तोंडदेखले बोलणारे पुरुष हवे तितके मिळतात; मात्र कडू असले तरी पथ्यकर असेल ते बोलणारा वक्ता दुर्मिळ व ते ऐकून घेणारा श्रोताही दुर्मिळच होय.

न देवा दण्डमादाय रक्षन्ति पशुपालवत् ।
यं तु रक्षितुमिच्छन्ति बुद्ध्या संविभजन्ति तम् ।।

अर्थ – देव काही गुराख्याप्रमाणे हातात काठी घेऊन (आपल्या भक्तांची) राखण करीत नाहीत, तर ज्याचे रक्षण करण्याची त्यांना इच्छा होते, त्याच्या मनात बुद्धीची प्रेरणा देतात.

न कुलं वृत्तहीनस्य प्रमाणमिति मे मतिः ।
अन्त्येष्वपि हि जातानां वृत्तमेव विशिष्यते ।।

अर्थ – दुराचारी माणसाचे कुल–गोत्र हे त्याच्या मान्यतेला आधारभूत होऊ शकत नाही. त्याहून अंत्यजांत जन्मलेल्याचे सदाचरण हे त्याला अधिक सन्मान मिळवून देते.

धर्मे तिष्ठन्ति भूतानि धर्मो राजनि तिष्ठति ।
तं राजा साधु यः शास्ति स राजा पृथिवीपतिः ।।

अर्थ – सर्व प्राणिमात्र धर्माच्या आधारावर जगतात. तो धर्म राजाश्रित असतो. म्हणून जो राजा धर्माचे चांगले रक्षण करतो, तोच पृथिवीपती होण्याला पात्र होतो.

आदावेव हि वर्तव्यं मनुष्येण यथाक्षमम् ।
यथा नातीतमर्थं वै पश्चात्तापेन युज्यते ।।

अर्थ – कार्य बिघडले म्हणजे मग पश्चात्ताप करण्याची स्वतःवर पाळी येऊ नये, याकरिता मनुष्याने कोणत्याही कामाला हात घालण्यापूर्वीच हे कार्य आपल्या शक्तीच्या आटोक्यात आहे किंवा नाही याचा विचार करून वागावे.

सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वाऽप्रियम् ।
प्राप्तं प्राप्तमुपासीत हृदयेनापराजितः ।।

अर्थ – सुख होवो अथवा दुःख होवो; आपल्या मनासारखे काही घडो अथवा न आवडणारे काही घडो; प्रसंगी जे जे कार्य प्राप्त होईल, ते ते मन खचू न देता यथायोग्यपणे करीत राहावे.

प्रभवार्थाय भूतानां धर्मप्रवचनं कृतम् ।
यः स्यात्प्रभवसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ।।

अर्थ – प्राणिमात्राचा अभ्युदय व्हावा म्हणून शास्त्रकारांनी धर्माचा ऊहापोह केला आहे. अर्थात ज्याच्या योगाने प्राणिमात्राचा अभ्युदय साधेल तोच धर्म हे निश्चित आहे.

कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम् ।
इति ते संशयो मा भूत् राजा कालस्य कारणम् ।।

अर्थ – कालाच्या प्रभावाने राजा बरा किंवा वाईट होतो का राजाच्या प्रभावाने काल बरा अथवा वाईट होतो, या विषयी शंका बाळगू नकोस. दिवस बरे येण्याला किंवा वाईट येण्याला राजा हाच कारण आहे.

मृषावादं परिहरेत् कुर्यात् प्रियमयाचतः ।
न कामान्न च संरंभान्न द्वेषाद्धर्ममुत्सृजेत् ।।

अर्थ– राजाने आपल्या संबंधीच्या खोटया आरोपांचा परिहार करावा. प्रजेने मागणी करण्यापूर्वीच तिचे इच्छित पूर्ण करावे आणि सुखोपभोगांच्या नादी लागून किंवा कामाच्या गर्दीमुळे किंवा आपल्याला आवडत नाही म्हणून कोणत्याही सबबीवर धर्माचरणाला फाटा देऊ नये.

अतिक्रान्तं हि यत्कार्यं पश्चाच्चिन्तयते नरः ।
तच्चास्य न भवेत्कार्यं चिन्तया च विनश्यति ।।

अर्थ – कार्य करण्याची वेळ निघून गेल्यानंतर 'अरेरे! असे केले तर बरे झाले असते' असा पश्चात्ताप जो करीत बसतो, त्याचे ते कार्य तर होत नाहीच; पण व्यर्थ चिंतेने मात्र झुरणीला लागतो.

न तत्परस्य सन्दध्यात् प्रतिकूलं यदात्मनः ।
एष संक्षेपतो धर्मः कामादन्यः प्रवर्तते ।।

अर्थ – आपल्या स्वतःला जी गोष्ट प्रतिकूल किंवा दुःखद वाटते, तीच गोष्ट दुसऱ्याच्या नशिबी यावी असा विचार मनात आणू नये. संक्षेपात हे धर्माचे लक्षण होय. याहून धर्माचरण हे फलाच्या इच्छेने केले जाते.

आगमानां हि सर्वेषामाचारः श्रेष्ठ उच्यते ।
आचारप्रभवो धर्मो धर्मादायुर्विवर्धते ।।

अर्थ– सर्व विद्यांपेक्षा प्रत्यक्ष सदाचरण हे श्रेष्ठ म्हटले आहे, कारण धर्म हा आचारमूलक आहे. अशा आचारमूलक ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वागल्यास मनुष्याच्या आयुष्याची वृद्धी होते.

महाभारताचा काल – यासंबंधी चिं. वि. वैद्य यांनी जे विवेचन केले आहे ते असे–सौतीने महाभारतास अनुक्रमणिका जोडून प्रत्येक पर्वाची अध्यायसंख्या व श्लोकसंख्या दिली आहे. त्यावरहुकूम पाहता हल्ली प्रचलित असलेले महाभारत व सौतीचे महाभारत एकच, असे निश्चयाने म्हणता येते. या ग्रंथाचा काल अन्तःस्थ व बाह्य प्रमाणांवरून निश्चयात्मक रीतीने कायम करता येतो.

महाभारतात एक लक्ष श्लोक आहेत. अशा एकलक्षात्मक ग्रंथाचा उल्लेख गुप्त कालातील एका लेखात 'शतसाहस्र्यां संहितायां' असा आलेला आहे. त्या लेखाचा काल इ. स. ४४५ चा आहे. तेव्हा इ. स. ४०० च्या पूर्वी महाभारताला हल्लीचे स्वरूप प्राप्त झाले असले पाहिजे. त्याही पूर्वी या ग्रंथाचा उल्लेख आढळतो, तो ग्रीकांच्या लेखांत. डायॉनक्रायसोस्टोम हा ग्रीक लेखक इ. स. च्या पहिल्या शतकात हिंदुस्थानच्या दक्षिण भागात पांड्य, केरळ इ. प्रदेशांत आला होता. त्याने लिहिले आहे की, हिंदुस्थानात एक लक्ष श्लोकांचे 'इलियड' आहे. त्याचा हा उल्लेख महाभारतालाच उद्देशून आहे, हे उघड आहे. त्या काळी दक्षिणेत महाभारत प्रचलित असले पाहिजे. यावरून सौतीचे महाभारत त्यापूर्वी बरीच वर्षे तयार झालेले असावे यात काही संशय नाही.

यवनांचा उल्लेख महाभारतात वारंवार आलेला आहे. यवनांचा व आपला जवळचा परिचय अलेक्झँडरच्या वेळेला झाला. तेव्हा साधारणपणे महाभारताच्या काळाची पूर्वमर्यादा इ. स. पूर्व ३२० ही धरावयास पाहिजे.

ज्योतिषशास्त्रातील राशी व नक्षत्रे या दोन गोष्टी या कालनिर्णयाच्या कामी उपयोगी पडतात. आर्यज्योतिषाची घटना नक्षत्रांवर आहे आणि ग्रीक ज्योतिषांची घटना राशींवर आहे. महाभारतात जेथे तेथे नक्षत्रांचा उल्लेख आहे, राशींचा नाही. यावरून राशी हिंदुस्थानात महाभारताच्या मागाहून प्रचलित झाल्या हे निर्णयात्मक ठरते. ग्रीकांची शास्त्रे व कला यांना भारतात प्रसार व्हायला दीर्घकाल लागला असला पाहिजे. म्हणजे राशींचा प्रचार इ. स. पू. २०० च्या सुमारास झाला असावा. आणि महाभारत त्यापूर्वीचे असले पाहिजे. या दृष्टीने इ. स. पू. २५० हा महाभारताचा काल निश्चित ठरतो.

भारतसावित्री – महाभारताचा प्रमुख उद्देश धर्म आणि धर्मनिरूपण हा आहे. कोणताही प्रसंग वर्णन करताना धर्म हाच एक व्यापक हेतू व्यासांच्या डोळ्यांपुढे होता. सर्व महाभारतभर धर्माचे नाव दुमदुमून राहिले आहे. 'यतो धर्मस्ततो जयः' हे महाभारताचे घोषवाक्य आहे. ग्रंथाच्या शेवटी भारतसावित्री म्हणून जे चार श्लोक दिले आहेत, त्यांत ग्रंथाचे धर्म हेच हृद्गत व्यक्त होते. त्यांतील एक श्लोक असा –

> न जातु कामान्न भयान्न लोभाद्
> धर्मं त्यजेज्जीवितस्यापि हेतोः।
> नित्यो धर्मः सुखदुःखे त्वनित्ये
> नित्यो जीवो धातुरस्य त्वनित्यः ॥

अर्थ – कामाने, भयाने, लोभाने अथवा जीवाच्याही आशेने धर्म सोडू नये. कारण धर्म नित्य आहे व सुखदुःखे क्षणिक आहेत. जीव नित्य आहे आणि शरीर अनित्य आहे.

व्यासांनी महाभारतकथेचे निमित्त करून तिच्या आधारावर त्या युद्धकथेला धर्मसंहितेच्या रूपात परिवर्तित केले. वेदांचे सार जसे गायत्री मंत्र, तसे महाभारताचे सार धर्म हे आहे.

काव्यदृष्ट्या श्रेष्ठत्व – जगामध्ये जी चार-पाच भव्योदात्त महाकाव्ये आहेत, त्यांत व्यासांचे हे आर्ष महाकाव्य सर्वश्रेष्ठ आहे. ते सुबद्ध आणि भव्योत्तुंग असे काव्यशिल्प आहे. त्याच्या कथानकाचे स्वरूप विस्तृत असले तरी ते एकसंध असून, त्यात विस्कळीतपणा मुळीच नाही. महाभारत रचताना व्यासांनी सदैव आपल्या संविधानकाकडे पूर्ण लक्ष ठेवले आहे. उदाहरणार्थ श्रीकृष्णाचे चरित्र कौरव-पांडवांशी आणि भारतीय युद्धाशी संलग्न आहे, तेवढेच महाभारतात दिले आहे. त्याचे बालचरित्र कुठेच सांगितलेले नाही. कृष्णाने रुक्मिणीचे हरण ज्या चमत्कृतिपूर्ण रीतीने केले, ती कथाही महाभारतात आढळत नाही. ही ग्रंथकाराची उणीव नसून ते त्याचे कौशल्यच म्हटले पाहिजे. बाह्यतः भासणारी ही उणीव पुढे सौतीने हरिवंशपर्व हे खिलपर्व जोडून भरून काढली व अशा रीतीने श्रोत्यांची जिज्ञासा तृप्त केली. भारतीय युद्धात अठरा अक्षौहिणी म्हणजे सुमारे चाळीस ते पंचेचाळीस लक्ष सैन्य गुंतले होते. भारतातील सर्व राजे कौरवांच्या किंवा पांडवांच्या बाजूस मिळून त्या युद्धात सहभागी झाले होते. त्यामुळे या युद्धाला राष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले होते.

महाभारतातील व्यक्ती उदार चारित्र्याच्या आहेत. युधिष्ठिर भीम, अर्जुन, कर्ण, द्रोण, भीष्म ही त्यांतील ठळक उदाहरणे होत. श्रीकृष्णाचे चरित्र तर अद्वितीयच आहे. धर्म, नीती व तत्त्वज्ञान या तीन्ही बाबतीत तो राष्ट्राचा आदर्श पुरुषोत्तम होता. दुर्योधनाची भूमिकासुद्धा त्या दृष्टीने विचार करण्यासारखी आहे. त्याच्या जीवनाचा ओघ पांडवांच्या वैरभावाने कलुषित झालेला असला तरी त्याचा दृढनिश्चय, मानीपणा, त्याचे मित्रप्रेम व त्याची एकंदर राजनीती वाखाणण्याजोगी आहे. सार्वभौमत्व तरी मिळवीन किंवा मरण तरी पत्करीन या दोन गोष्टींच्या मधल्या पायरीला तो कधीही शिवला नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यास जरी पांडवपक्षपाती असले तरी, दुर्योधनाचे यथातथ्य चित्रण करण्याच्या कामी त्यांनी कुठेही कसूर केली नाही. त्यांनी द्रौपदीचे चरित्रचित्रण केले आहे, ते तर अद्वितीयच आहे. पंडिता, पतिव्रता व मानिनी अशा त्रिविध स्वरूपात ती महाभारतामध्ये चमकते. इतके असूनही तिच्यातले मानवी स्वभावविशेषही जागोजाग दृष्टोत्पत्तीस येतात. कधी कधी तिला स्त्रीसुलभ असा पतींविषयी रागही येतो आणि कधी कधी ती त्यांच्याशी विवादही करते. कधी कधी ती त्यांच्याजवळ हट्टही करते. तिचे धैर्य तर असामान्यच होय. द्रौपदी म्हणजे मूर्तिमंत वेदनाच आहे असे वाटते. तिची ही वेदना शब्दांच्या चौकटीत बसवणे कठीण होते. पण व्यासांनी हे महत्कर्म आपल्या दिव्य प्रतिभेच्या बळावर यशस्वीपणे केले आहे. कुंती, गांधारी, सुभद्रा, सावित्री, दमयंती, शकुंतला, इ. स्त्रियाही द्रौपदीइतक्याच उदात्त चरित्राच्या होत्या. व्यासांनी त्यांनाही समर्थपणे चित्रित केले आहे.

श्रीकृष्ण तर हा महाभारताचा प्राणच आहे. त्या पूर्णावतार पुरुषोत्तमाच्या अंगी वसत असलेल्या दैवी सद्‌गुणांचे वर्णन करताना व्यासांच्या प्रतिभेने कमालीचे काव्यकौशल्य प्रकट केले आहे. श्रीकृष्णाविषयी व्यासांची धारणा काय होती, ते पुढील श्लोकावरून कळून येईल –

भगवान्वासुदेवश्च कीर्त्यतेऽत्र सनातनः ।
स हि सत्यमृतं चैव पवित्रं पुण्यमेव च ।।
शाश्वतं ब्रह्म परमं ध्रुवं ज्योतिः सनातनम् ।
यस्य दिव्यानि कर्माणि कथयन्ति मनीषिणः ।।
असच्च सदसच्चैव यस्माद्विश्वं प्रवर्तते ।

(आदि. १.२५६–५८)

अर्थ – या भारत ग्रंथात भगवान श्रीकृष्ण हाच वर्णिला जात आहे. तोच सत्य, ऋत, पवित्र, पुण्यकारक आणि शाश्वत आहे. तोच ब्रह्म आहे. तोच सनातन ज्योती आहे. या अनित्य आणि नश्वर जगात तोच परम ध्रुव आहे. त्याची दिव्य कृत्ये विद्वान कथन करतात. त्याच्यापासूनच सत् आणि असत्, जन्म आणि मृत्यू तसेच हा पंचभूतात्मक पसारा या गोष्टी प्रवृत्त होतात.

महाभारतात इंद्र, सूर्य, यम, कुबेर, इ. अनेक देवता वावरताना आणि मूळ कथेतल्या पात्रांशी संबंध ठेवताना दिसतात. या देवतांचे व्यक्तिदर्शनही उदात्त आहे. याविषयी चिं. वि. वैद्य तुलनेने लिहितात, ते असे –

"या बाबतीत होमरच्या इलियडपेक्षा महाभारताचे कौशल्य अधिक आहे. इलियडमध्ये वर्णन केलेल्या ग्रीक देवता माणसापेक्षाही वाईट रीतीने वागतात. त्या एकमेकांशी भांडतात व एकमेकांस मारतात. त्यांचे देवतास्वरूप बहुतेक नष्टप्राय झालेले आहे. महाभारतात देवांचे जे वर्णन आहे, ते अशा प्रकारचे नाही. मानवी प्राण्यांच्या व्यवहारात ते सहसा प नाहीत, क्वचित पडल्यास ते देवांप्रमाणेच वागतात. उदाहरण आपण येथे घेऊ. कर्णास सहज कवच हो अर्जुनाकरिता काढून घेण्याच्या इराद्याने इंद्राने एक यांजलो. ब्राह्मणाने काही मागितले तरी त्यास नाही म्हण नाही, असा कर्णाचा पण होता. तो जाणून इंद्राने ब्राह्म स्वरूप घेऊन कर्णाजवळ त्याची कवचकुंडले मागितली. शूर कर्णाने ती त्यास दिली. परंतु इंद्र साधारण माणसा कवचकुंडले बगलेस मारून निघून गेला नाही, तर देवस्वभावाप्रमाणे आचरण केले. तो संतुष्ट होऊन, ' वाटेल तो वर माग' असे कर्णास म्हणाला. कर्णाने त्याज अमोघ शक्ती मागितली व कर्ण ती अमोघ शक्ती अर्जुना चालवील हे ठाऊक असूनही इंद्राने ती शक्ती त्यास दि तात्पर्य, महाभारतातील देवचरित्र देवाप्रमाणेच उदात्त हा भारताचा इलियडपेक्षा विशेष गुण आहे."

महाभारताचे रमणीयत्व विशेषेकरून त्यातील संभा आहे. अशी जोरदार संभाषणे अन्यत्र क्वचितच आढ त्या संभाषणांतून त्या त्या व्यक्तींच्या स्वभाववैशिष्ट्यांवर प्रकाश पडतो. आदिपर्वातील कौरव– पांडवांच्या शस्त्र विद्येतील प्राविण्यदर्शनाच्या वेळची दुर्योधन, कर्ण, अर्जुन यांच्यामधील भाषणे; सभापर्वातील भीष्म व शि यांच्यामधील भाषणे; वनपर्वातील धर्म, भीम व द्रौपदी य मधील भाषणे; द्रोणपर्वातील धृष्टद्युम्न, सात्यकी, अ धर्म यांच्यामधील भाषणे व इतरही अनेक भाषणे व्या उत्तम कवित्वाची साक्ष पटवितात. श्रीकृष्णाचे कौरवस भाषण हे तर सर्वांच्या शिरोभागी शोभणारे आहे. संभाषणांचा विशेष हा, की ती निर्भय व सडेतोड आहेत. दुर्योधनाला जो उपदेश करतो, त्यात तो त्याची निर्भत्सना करायलाही कमी करीत नाही. दुसरे शकुंतलेचे. कालिदासाची शकुंतला व व्यासांची शकुंत जमीनअस्मानाचे अंतर आहे. ज्या वेळी भर सभेत दु 'मी तुझ्याशी लग्न केले नाही आणि तुझी-माझी नाही.' असे म्हणून तिचा अपमान केला, तेव्हा ती स्त्री त्याला उत्तर करते, 'हे राजा, तुला सत्याचा नाही. सत्यपराङ्‌मुख अशा तुझ्याशी मला सहवास पती आणि पुत्र यांच्यापेक्षाही सत्य अधिक मूल्यवान व्यासांनी रेखाटलेल्या या सर्व संभाषणांतून प्रत्यक्ष नीतीतत्त्वांचा उपदेश झालेला आहे. व्यासांची यु सरस आहेत. सौतीने त्या वर्णनांचा अतिरेक कर पुष्कळदा नीरसता उत्पन्न केली, असे म्हणावेसे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाभारतातील स्त्री-पुरुष वर्णनेही फार सुंदर व मर्यादायुक्त आहेत. नारीरूपाचे वर्णन करताना त्यात कुठेही ग्राम्यता येत नाही. उदाहरणार्थ धर्मराजाने केलेले द्रौपदीचे वर्णन पाहण्यासारखे आहे.

महाभारत हे नवरसांचा सागर आहे. याविषयीचे विवेचन श्री. बाळशास्त्री हरदास यांनी केले आहे, त्याचा सारांश असा –

नल-दमयंतीच्या आख्यानात रसराज शृंगाराचे जे आविष्करण झाले आहे, त्याने अनेक कवींच्या प्रतिभेला फुलोरा आणला आहे. भीष्माच्या रूपाने व्यासांनी विशुद्ध वीररसाचा आविष्कार केला आहे. संपूर्ण भीष्मपर्व म्हणजे त्या रसाचे संविधानकच होय. वीररसाचा रौद्र व भयानक रसाशी झालेला शबलित आविष्कार तर सर्वत्र आढळेल. महाभारतातला करुण रसाचा आविष्कार देखील अनुपम व अलौकिक आहे. अभिमन्युवधानंतरचा सुभद्रा, कुंती, द्रौपदी व युधिष्ठिर यांचा विलाप वाचताना अंतःकरण द्रवल्यावाचून राहत नाही. कर्णाच्या मृत्यूनंतर, तो आपला बंधू आहे हे समजल्यावर युधिष्ठिराने केलेला विलापही अंतःकरणाला चटका लावतो. द्रौपदीवस्त्रहरणाचे दृश्य तर करुणामयच आहे. दुःशासन भरसभेत तिची अब्रू लुटण्याचा प्रयत्न करीत असताना डोळ्यातून अश्रुधारा वाहवणारी आणि सभेतल्या कुरुवृद्धांना 'मी दासी आहे काय ?' असा प्रश्न विचारणारी द्रौपदी ज्याच्या अंतःकरणाला पाझर फोडणार नाही, त्याची गणना 'स वै मुक्तोऽथवा पशुः' या कोटीतच करावी लागेल. घटोत्कचयुद्ध, श्रीकृष्णाचे विश्वरूपदर्शन आणि वन पर्वातील हनुमंताच्या स्वरूपाचा भव्य आविष्कार ही स्थळे अदभुत रसाची अग्रगण्य उदाहरणे ठरतील. कीचकवधानंतर भीमाने केलेली त्याच्या प्रेताची दुर्दशा व दुःशासनाचा कंठनाल चिरून त्याने केलेले रक्तप्राशन या प्रसंगात भयानक रस उफाळून आला आहे. महायुद्धानंतर रणभूमीवरील प्रेतांच्या भोवती श्वापदे, पक्षी व क्रव्याद यांच्या घिरट्या घालणाऱ्या थव्यांचे जे वर्णन आहे, त्यात बीभत्स रस मूर्तिमंत झाला आहे. द्रोणपर्व हे तर रौद्र रसाचे क्रीडास्थानच होय. हास्य रसाचेही प्रसंग अधूनमधून आहेतच. शांतिपर्व हे तर नावाप्रमाणेच शांत रसाचे आगरच होय.

महाभारतातील वृत्त मुख्यत्वे अनुष्टुभ आहे. त्याच्या खालोखाल उपजाती वृत्त दिसते. आदिपर्वामध्ये पौष्य नावाचे एक उपपर्व आहे. हे पर्व गद्य शैलीत लिहिलेले आहे. मधेमधे काही वैदिक शैलीचेही छंद आहेत, याविषयी डॉ. वासुदेवशरण म्हणतात. – 'सूत्रकालीन चरणसाहित्याचा हा एक तुकडा असून, महाभारताच्या मूळ कथेशी संबंध नसतानासुद्धा ग्रंथारंभी तो जोडला गेला आहे.' अनुष्टुभ वृत्त हे महाकाव्यरचनेला उपयुक्त असे वृत्त आहे. त्या वृत्तात गंभीर व भारदस्त रचना करता येते. महाभारताची रचना तशी आहे. ती जितकी सोपी तितकीच शुद्धही आहे. उत्तरकालीन संस्कृत महाकाव्यांची भाषा भारदस्त खरी; पण ती सोपी व सरळ नसते. त्या रचनेत पदलालित्य असते; पण अर्थग्रहणासाठी थबकून विचार करावा लागतो. याउलट पुराणांची भाषा ती सोपी असते; पण भारदस्त नसते व शुद्धही नसते. महाभारतात हे दोन्ही गुण साधलेले आहेत. यापुढे जाऊन चिं. वि. वैद्य लिहितात –

" महाभारतामध्ये जितका भाग मूळचा व्यासांचा आहे, तितक्याची भाषा इतर भागांच्या भाषेहून विशेष सरस, सरळ व गंभीर अशी आपल्यास दिसून येते, हे सांगण्यास प्रत्यवाय नाही. सौतीही कमी प्रतिभावान कवी नव्हता हे आपण पूर्वी म्हटलेच आहे. परंतु त्याच्या वेळी संस्कृत भाषा जनसमूहाच्या बोलण्याच्या प्रचारातून गेलेली होती. यामुळे त्याच्या भाषेत अर्थातच थोडासा फरक पडणे साहजिक आहे. "

संस्कृत साहित्याच्या ग्रंथांत महाकाव्याचे लक्षण सांगताना त्यात कोणकोणते विषय असावे, त्यांची लांबलचक यादी दिलेली असते. पण महाभारताचा व्याप याहून कितीतरी प्रचंड आहे. त्यात अनाद्यनंत अशा लोकचक्राचे वर्णन, सविस्तर भूतसृष्टी, सविज्ञान श्रुती, ब्रह्मर्षी व राजर्षी यांची चरित्रे, चतुर्विध पुरुषार्थ, विविध शास्त्रे, इतिहास, लोकयात्रा, नीतिशास्त्र, वर्णाश्रमधर्म, राजधर्म, आपद्धर्म, मोक्षधर्म, पुराणकथा, धर्मकथा, नीतिकथा, नाराशंसी गाथा, इ. तत्कालावधी ज्ञात असलेल्या सर्व गोष्टी ग्रथित झाल्या आहेत. या सर्वांच्या सुंदर समन्वयाने कौरव–पांडवांच्या इतिहासाचे हे भरजरी सणंग विणलेले आहे. हे सर्व लक्षात घेऊनच महाभारतगौरवाचा पुढील श्लोक लिहिलेला आहे –

यथा समुद्रो जलवान् यथा च हिमवान् गिरिः ।
ख्यातावुभौ रत्ननिधी तथा भारतमुच्यते ॥

अर्थ – जलाने भरलेला समुद्र आणि बर्फाच्छादित हिमालय हे रत्नांचे निधी म्हणून प्रसिद्ध आहेत. महाभारतही तसेच आहे.

महाभारत ही कवींना विषय पुरविणारी अक्षय्य खाण आहे. कालिदास, भारवी, माघ, इ. संस्कृत भाषेच्या महाकवींनी आपले काव्यविषय मुख्यत्वे महाभारतातूनच निवडले आहेत. महाभारतातून एखादा कथाभाग किंवा प्रसंग निवडून त्याला काव्याचे कोंदण चढवायचे ही परंपरा आजतागायत अविच्छिन्नपणे चालू आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गीता म्हणजे अमृतदोहन – महाभारताच्या भीष्म पर्वातील २५ ते ४२ या अध्यायांत गीता सांगितलेली आहे. महाभारताची १८ पर्वे तसे गीतेचेही १८ अध्याय आहेत. ज्ञानेश्वरांनी महाभारताला अठरा पाकळ्यांचे कमळ म्हटले असून, गीतेला त्यातला पराग मानले आहे (ज्ञाने. १.५०). तिच्या आद्यंती धृतराष्ट्र व संजय यांच्या संवादाचे काही श्लोक आहेत. बाकी सगळा भाग श्रीकृष्णार्जुनांच्या संवादरूपात विस्तारला आहे. त्यांच्या संवादरूपत्वामुळेच तो रोचकही झाला आहे. गीतेच्या शैलीला कुठेही शुष्कपणाचा स्पर्श झालेला नाही. हा मुख्यत्वे अध्यात्मविद्येचा ग्रंथ आहे. बौद्ध धम्मपदाप्रमाणे केवळ नीतिविद्येपुरताच तो मर्यादित नाही. गीतेचे स्वर असे गोड लागतात, की जणू आपला मित्र आपल्यावर अमृतवाणीचा वर्षाव करतो आहे असे वाटावे. कर्मशास्त्र आणि मोक्षशास्त्र यांचा असा रसपूर्ण ग्रंथ दुसरा उपलब्ध नाही. गीता अशा प्रकारचे मार्मिक ज्ञान माणसाला देते, की त्याच्या जीवनातले अनेक संशय निरस्त व्हावे आणि त्याला कर्माकर्माचा निश्चय करता यावा. इथे अर्जुन शिष्य बनला आहे आणि श्रीकृष्ण गुरू होऊन शिष्याच्या कल्याणासाठी प्रवृत्त झाला आहे. भगवान श्रीकृष्णाची ही वाणी वेदव्यासांच्या मनःसमाधीतून निष्पन्न झाली आहे.

प्रज्ञावाद हे त्या काळातले एक व्यापक दर्शन होते. कृष्ण प्रज्ञावादी होता. बुद्धही प्रज्ञावादी होता; पण बुद्ध प्रज्ञावादाचा मार्ग अनुसरताना श्रमणधर्माच्या किंवा निवृत्तीच्या प्रभावात आला आणि त्याने व्यवहारात सांख्यांची त्यागप्रधान परंपरा स्वीकारली. कृष्णाने वैदिक कर्मयोगाचा आश्रय केला. त्याने प्रज्ञावादाबरोबरच एका अंगाने कर्म आणि पुरुषार्थ यांचा अंगीकार केला आणि दुसऱ्या अंगाने वैदिक विचारधारेतून विकसित झालेले तेजस्वी ब्रह्मदर्शनही प्रतिपादिले. याही उपर निवृत्तिमार्गी कपिलादी सांख्यांच्या विचारसरणीचाही त्याने योग्य तो आदर केला. महाभारताच्या कित्येक प्रकरणांत पसरलेले विचारांचे हे भिन्न भिन्न तंतू गीतेमध्ये कलात्मक रीतीने समन्वित केले गेले आहेत. गीताशास्त्राची ही काव्यमय कला पाहून अंतःकरण आनंदपुलकित होते. केवळ प्रज्ञावाद जीवनाचे पूर्ण दर्शन बनू शकत नाही. त्याच्याशी जेव्हा ब्रह्मवादाचा मेळ बसतो, तेव्हाच त्याला जीवनदर्शनाची योग्यता प्राप्त होते. हा ब्रह्मवादही केवळ सांगण्या-ऐकण्याची वस्तू होता कामा नये, तो स्वानुभवातून पल्लवित झाला पाहिजे. त्याचा अखंड प्रवाह हृदयातून बाहेर पडला पाहिजे. गीतेचा ब्रह्मवाद या जातीचा आहे. त्यामुळे तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात गीतेला जे महत्त्व लाभले आहे ते दुसऱ्या कोणत्याही ग्रंथाला लाभलेले नाही. म्हणूनच लो. टिळकांनी ‘आमच्या धर्मग्रंथातील तेजस्वी व निर्मळ हिरा’ या शब्दांत गीतेला गौरवले आहे.

तत्त्वज्ञान – महाभारताच्या कालापर्यंत तत्त्वविद्या व अ[ध्या]त्मविद्या म्हणून जी विचारसरणी प्रतिष्ठित झाली होती, [...] ‘मथियेले नवनीत’ उद्योगपर्वाच्या सनत्सुजातीय प्रक[रणात] दिलेले आहे. त्याचे चार अध्याय आहेत. पहिल्या अध्या[यात] मृत्यूच्या समस्येवर विचार केला आहे. जीवनात प्रमाद [...] स्खलन याचेच नाव मृत्यू, हा सनत्सुजाताचा पहिला सि[द्धांत] आहे. बुद्ध आणि महावीर या दोघांनीही तसेच म्हटले [...] पुढच्या अध्यायात जीवनाच्या कृतार्थतेसाठी वेदांचे [...] शाब्दिक ज्ञान पुरेसे नाही, असे सांगितले आहे. जीवनात [...] आणि सत्याचरण यांनाच महत्त्व आहे. यालाच अक्षरब्र[ह्म] साक्षात्कार असे म्हणतात. हा साक्षात्कार ज्याला घडला [...] त्याचे वेदाध्ययन व्यर्थ होय. त्याच्या पुढच्या अध्यायात [...] सुजाताने अक्षरब्रह्माच्या साक्षात्कारासाठी ब्रह्मचर्याची [...] कालीन साधना आवश्यक म्हणून सांगितली आहे. ब्रह्मतत्त्[वाची] प्राप्ती ही झटपट होणारी गोष्ट नव्हे. त्यासाठी प्रय[त्नांची] फार मोठी गरज असते. भौतिक शरीर माणसाला माता[पितरां]पासून मिळते; पण सत्याच्या क्षेत्रात त्याला आचार्यां[च्या] कृपेने नवा जन्म घ्यावा लागतो. आचार्याच्या ज्ञान[...] प्रविष्ट होऊन जो ब्रह्मचर्यपूर्वक ज्ञानसाधना करतो [...] परमपदाचा अधिकारी होतो; त्यालाच जीवनयोग सिद्ध हो[तो]. तोच आपले अज्ञान नष्ट करून अमृताची प्राप्ती करून [...] व त्यायोगे मृत्यूपासून मुक्त होतो. जीवनात कधी ना [कधी] तरी ब्रह्मज्ञान प्राप्त करून घ्यावेच लागते. मोक्षासाठी [...] व्यतिरिक्त दुसरा मार्ग नाही. ब्रह्म हे सर्वत्र व्याप्त आहे. वि[श्वा]तील सारी रूपे ही ब्रह्माची रूपे आहेत. अणू आणि महत् [...] सर्व रूपांत त्याची सत्ता आहे. ब्रह्म हेच विश्वाची प्र[...] आहे आणि तेच अमृतही आहे. विश्वाचे सुंदर आणि [...] स्वरूप म्हणजेच ब्रह्म होय (उद्योग. ४२-४५).

महाभारताची थोरवी – महाभारताचे महत्त्व भारता[च्या] सांस्कृतिक वाङ्मयात अपरंपार असे आहे. ब्रह्मयज्ञात स्मर[ण] म्हणून त्याचा उल्लेख येतो. भारतीय वाङ्मयात ऋग्वेदा[च्या] खालोखाल महाभारतालाच मान आहे. जगातल्या सर्व [...] काव्यांत महाभारत विस्तारानेही फार मोठे आहे. इलियड [व] ओडिसी ही दोन महाकाव्ये एकत्र केली तर जेवढा ग्रंथ हो[ईल] त्याच्या सात-आठपट महाभारत मोठे आहे. तो एक सांस्[कृतिक] ज्ञानकोशच आहे. भारत राष्ट्राच्या जीवनदृष्टीचे व ध्येयां[चे] यथार्थ व संपूर्ण दिग्दर्शन त्यात झाले आहे. गेली दीड-दोन ह[जार वर्षे] त्याने भारतीय मनावर अलौकिक प्रभुत्व गाजवले आहे. [...] भारतावरून जशी महाकाव्ये निर्माण झाली, तशी [...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारतीय प्रादेशिक भाषांतून रूपांतरेही झाली आहेत. मराठीत ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, मोरोपंत, वामन पंडित व रघुनाथ पंडित, या महाकवींच्या प्रतिभेचे उन्मेष महाभारतानेच घडविले आहेत. भारताचे केवळ वाङ्मयात्मक जीवनच नव्हे; तर व्यावहारिक जीवनही महाभारतावर आधारले गेले आहे. रामायणाने जीवनाचे ध्येयदर्शन घडविले असले, तर महाभारताने मानवी जीवनाची अपरिपूर्णता लक्षात घेऊन विषम परिस्थितीच्या घनांधकारातून ध्येयसिद्धीचा मार्ग दाखविला आहे, असे श्री. बाळशास्त्री हरदास म्हणतात.

महाभारताचे हे महत्त्व केवळ भारतापुरतेच मर्यादित नाही, भारताबाहेरही त्याने आपला प्रभाव दाखवला आहे. इ. स. च्या दुसऱ्या शतकापासून ग्रीक वाङ्मयात त्याचे उल्लेख येतात. सहाव्या शतकात कंबोडियाच्या देवळांतून संपूर्ण भारतसंहितेचे वाचन होत असे. सातव्या शतकात मंगोलियातील तुर्क लोक हिडिंबवधासारखी प्रकरणे काव्यरूपाने गात होते. दहाव्या शतकाच्या पूर्वी जावा बेटातील लोकांनी आपल्या भाषेत महाभारताचे संपूर्ण भाषांतर केले होते. इ. स. १८१९ मध्ये फ्रांझ बॉपने जेव्हा सर्वप्रथम नलोपाख्यानाचे रूपांतर केले, तेव्हा जगाच्या वाङ्मयातील एक देदीप्यमान अलंकार म्हणून पाश्चात्य साहित्यिकांत त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्या आख्यानाची मग अनेक पाश्चात्य भाषांमधून भाषांतरेही झाली. डॉ. विंटरनिट्झ याला विदुलेची वीरगाथा, द्रोणपर्वातील रात्रियुद्धाचे वर्णन व स्त्रीपर्वातील गांधारीच्या तोंडून येणारे रणभूमीचे वर्णन यांची मोहिनी पडली असून, सावित्रीच्या आख्यानाने तर त्याला वेडच लावले आहे. त्याविषयी तो म्हणतो – सावित्री– उपाख्यानाचा कवी ब्राह्मण असो किंवा सूत असो, पण तो निश्चितपणे सर्वकाळी सर्वश्रेष्ठ महाकवी ठरल्यावाचून राहणार नाही. केवळ महाकवीच इतके उदात्त स्त्री-जीवन इतक्या जिवंतपणे चित्रित करू शकेल.

महाभारताची संशोधित आवृत्ती– काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत सर्व देशभर महाभारताच्या वेगवेगळ्या प्रती, काही छापील, तर बऱ्याचशा हस्तलिखित स्वरूपात उपलब्ध आहेत. या प्रत्येक प्रतीत पाठभेद आहेत आणि कमीअधिक प्रमाणात प्रक्षेपही आहेत. त्यामुळे साहजिकच महाभारताच्या संशोधित आवृत्तीची आवश्यकता निर्माण झाली होती. ती पुरी करण्याचे कार्य पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराने स्वीकारले. अत्यंत किचकट असा हा प्रदीर्घ उद्योग त्या संस्थेने केला. डॉ. सुकथनकर, डॉ. बेलवलकर, डॉ. गोडे, डॉ. दांडेकर, डॉ. वैद्य, इ. विद्वान संशोधक त्या कामी आपली जिद्द पणाला लावून झटले. त्यांनी निरनिराळ्या बारा लिप्यांतील महाभारताच्या १२५९ हस्तलिखित पोथ्या तपासल्या आणि त्यांतील निरनिराळ्या पाठांचे संशोधन करून एक मूल पाठ निश्चित केला. मंदिराने महाभारताची ही संशोधित आवृत्ती छापून प्रसिद्धही केली आहे. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिराचे हे भारतावरच नव्हेत; तर जगातल्या सर्व जिज्ञासू व अभ्यासू लोकांवर महदुपकार झाले आहेत. [म. भा. उ.; म. क. शि.; म. भा. व्या.; भा. सा.; म. भा. स.; भा. त. रा.]

महाभाव

रासलीलेच्या दार्शनिक विवेचनातील एक पारिभाषिक संज्ञा. महाभाव ही स्थिती एकमात्र रसिकेश्वरी राधा हिच्या ठिकाणी आढळते. भावसिद्धी झाल्यावर भक्ताची प्रवृत्ती अंतर्मुख होते आणि तो आपल्या अंतःकरणात अष्टदलकमलाचा साक्षात्कार अनुभवतो. कमलाचे एकेक दल हे एकेका भावाचे प्रतीक असते. महाभावाची प्राप्ती हे साधकाचे चरम लक्ष्य असते. आणि त्यासाठी त्याला क्रमाने एकेका भावाला जागवावे लागते. या अष्टभावांचे समष्टिरूप म्हणजेच महाभाव होय. अष्टदलातील कर्णिकेच्या रूपाने जो बिंदू असतो, तोच अष्टदलाचे सार आहे. त्यालाच महाभाव असे दुसरे नाव आहे. वस्तुतः अष्टदल हे महाभावाचे अष्टविध विभक्त स्वरूपच असते, असे गोपीनाथ कविराज म्हणतात. [रा. रा. का.]

महाभाष्य

पाणिनीच्या अष्टाध्यायीवर पतंजलीने लिहिलेले भाष्य. यात पतंजलीने पाणिनीची सूत्रे आणि त्यांवरची कात्यायनप्रभृतींनी लिहिलेली वार्तिके यांवर व्याख्या लिहिली असून, तिच्यात मधूनमधून आपल्या इष्टिवाक्यांचाही समावेश केला आहे. हा ग्रंथ ८५ आह्निकांत विभागलेला आहे. पतंजली आपल्या शिष्यांना अष्टाध्यायी शिकवीत असता त्यातील काही सूत्रांचे सविस्तर समीक्षण करीत असे आणि नंतर ते आह्निकरूपात लिहून ठेवीत असे. याचाच अर्थ असा, की महाभाष्यातील ८५ आह्निके म्हणजे त्याने विद्यार्थ्यांना शिकवलेले ८५ दिवसांचे पाठ होत.

आपल्या आधी होऊन गेलेल्या सर्व वैयाकरणांच्या ग्रंथांचे आणि सर्व वैदिक व लौकिक प्रयोगांचे सूक्ष्म अध्ययन करून पतंजलीने महाभाष्याच्या रचनेला प्रारंभ केला आहे. त्यामुळे व्याकरणविषयक सर्व विषय महाभाष्यात येऊन जातात.

पाणिनीवर पतंजलीची अपार श्रद्धा होती. पाणिनीचा उल्लेख करताना त्याने प्रत्येक वेळी त्याला भगवान, आचार्य, मांगलिक वा सुहृद असे कोणतेतरी विशेषण लावलेले आहे. पाणिनीची सूत्रे त्याने वेदवाक्याप्रमाणे प्रमाण मानली आहेत. अइउण्, ऋलृक्, इ. चौदा प्रत्याहारसूत्रे धरून अष्टाध्यायीच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकूण ३९९५ सूत्रांपैकी १६८९ सूत्रांवर पतंजलीने भाष्य लिहिले असून, उरलेली सूत्रे जशीच्या तशीच महाभाष्यात घेतली आहेत. त्यांपैकी १२२८ सूत्रांवर केवळ कात्यायनाची आणि २६ सूत्रांवर इतरही आचार्यांची वार्तिके होती, त्यांचे त्याने परीक्षण केले आणि वार्तिके उपलब्ध नसलेल्या ४३५ सूत्रांवर भाष्य लिहिले. कात्यायनाने वार्तिकांत पाणिनीवर घेतलेल्या आक्षेपांचे त्याने अनेक ठिकाणी निराकरण केले आणि पाणिनीचा पक्ष उचलून धरला.

महाभाष्याची रचनाशैली न्यायघटित भाषेत असली तरी अत्यंत स्पष्ट, सुबोध आणि प्रसादयुक्त आहे. त्यात पारिभाषिक व शास्त्रीय शब्द येणे अपरिहार्य असले, तरी लोकव्यवहारात येणारे सुंदर व परिचित शब्दही पतंजलीने अनेकदा योजले आहेत. त्यामुळे त्यात भाषेचा कठीणपणा जाणवत नाही. त्याची विषय प्रतिपादन करण्याची शैलीही आकर्षक आहे. प्रतिपाद्य विषय कठीण व गंभीर असेल, त्या ठिकाणी त्याने मधूनमधून विनोदी वाक्ये घालून आणि समयोचित लौकिक दृष्टान्त देऊन विषयाला जिवंतपणा आणला आहे.

पतंजलीची विषय निरूपण करण्याची पद्धतही साधी व संभाषणात्मक आहे. कठीण विषयांचा उपन्यास त्याने 'इदमिह सम्प्रधार्यम्' = या ठिकाणी हे लक्षात घ्यावे, अशांसारखी वाक्ये योजून केला आहे. पूर्वपक्षाची स्थापनाही तो निःपक्ष-पातीपणे करतो आणि मग उत्तरपक्षात त्याचे खंडन करतो. कधीकधी तो पूर्वपक्ष व उत्तरपक्ष दोन्ही मांडतो आणि त्या संबंधीचा निर्णय वाचकावर सोपवतो; तर कधी 'याचा निर्णय देवच जाणे,' असे उत्तर देतो. अशा प्रकारे व्याकरणा-सारखा नीरस आणि शुष्क विषय त्याने सरस बनवला आहे.

अष्टाध्यायीतील सूत्रांचे प्रयोजन सांगणे, त्यांतील पदांचा अर्थ निश्चित करून सूत्रार्थ निश्चित करणे आणि सूत्राची व्याप्ती वाढवून किंवा कमी करून सूत्रार्थाचे नियंत्रण करणे, ही तीन तत्त्वे त्याने भाष्यासाठी आधारभूत मानली आहेत.

विरोधी तर्कांना उत्तर देताना पतंजलीने अनेकदा बोचरी, उपरोधिक, उपहासपूर्ण भाषा योजिली आहे. उदा० 'तत्कारी च भवान् तद्द्वेषी च' = आपणच ते केलेत आणि आपणच त्याचा द्वेष करता. 'अन्यद् भवान् पृष्टोऽन्यद् आचष्टे। आम्रान् पृष्टः कोविदारान् आचष्टे' = एक विचारले, तर आपण दुसरेच सांगता. आम्रवृक्षांबद्दल विचारले तर कोविदारां-(डोंगरी टेंभुर्णी) संबंधी सांगता.

महाभाष्यातील उपमा, न्याय, दृष्टान्त व सुभाषितेही लोकव्यवहारातील व समर्पक आहेत. उदा० 'व्यंजनानि पुनर्नट-भार्यावद् भवन्ति। तद्यथा नटानां स्त्रियो रङ्गगता यो यः पृच्छति कस्य यूयं कस्य यूयं तं तं तव तव इत्याहुः' व्यंजने ही नटांच्या बायकांप्रमाणे असतात. कसे ते? रंगमंचावरील नटांच्या बायकांना जो जो कोण विचारतो की, तुम्ही कुणाच्या, तुम्ही कुणाच्या, तेव्हा तेव्हा त्या त्या आम्ही तुझ्या, आम्ही तुझ्या असे उत्तर देतात.

अनेक ठिकाणी आपल्या म्हणण्याला पुष्टी देण्यासाठी समर्पक वाक्प्रचारांचा उपयोग केला आहे. उदा० 'न हि भिक्षुकाः सन्तीति स्थाल्यो नाधिश्रीयन्ते' = याचक आहेत म्हणून कोणी स्वयंपाक करायचा थांबत नाही. 'पर्याप्तो ह्येकः पुलाकः स्थाल्या निदर्शनाय' = शितावरून भाताची परीक्षा होते.

पतंजलीने आपल्या महाभाष्यात अनेक सारगर्भ शब्द वापरले आहेत. एका वाक्याचा मजकूर त्याने काही ठिकाणी एका शब्दात आणला आहे. उदा० 'उष्ट्रासिकाः' उंटाप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारांनी बसणे; 'वहंलिह' चालता चालता शेत खाणारा पशू, इत्यादी.

व्याकरण हे शब्दांचे शास्त्र आहे. महाभाष्याच्या प्रारंभी शब्दाची परिभाषा देताना त्याने सांगितले आहे, की ज्या ध्वनीमुळे पदार्थाचे ज्ञान होते, त्याला व्यवहारात शब्द हे नाव आहे. ध्वनी म्हणजेच शब्द. शब्द हा नित्य असून त्याचाच अर्थबोध होतो. नित्य शब्दालाच स्फोट अशी संज्ञा आहे. स्फोटाची उत्पत्ती होत नाही व म्हणून नाशही होत नाही. बोलताना ध्वनीच्या द्वारे नित्य स्फोटरूपी शब्दाचा आविष्कार तेवढा होतो आणि तोच श्रोत्याला अर्थबोध करून देतो. या दृष्टीने शब्दाचे नित्य व कार्य असे दोन भेद होतात. स्फोटरूपी शब्द नित्य व ध्वनिरूपी शब्द कार्य किंवा अनित्य असतात. पतंजलीने शब्दाच्या या दोन स्वरूपांचा स्वीकार केला असून, शब्द आणि अर्थ यांचा संबंध नित्य मानला आहे. तसेच त्याने पदाचे गुण, क्रिया, आकृती व द्रव्य असे चार अर्थ मानले आहेत.

आपली अद्वितीय प्रतिभा आणि विद्वत्ता यांमुळे पतंजलीला आचार्य परंपरेत मानाचे स्थान मिळाले. व्याकरण शास्त्रात महाभाष्यातील शब्द प्रमाण मानला जाऊ लागला, एवढेच नव्हे; तर महाभाष्याला विरोधी आणि महाभाष्यात न सांगितलेले वचन अप्रमाण मानले जाऊ लागले. व्याकरण शास्त्राला त्याने दर्शनाच्या पदवीला नेऊन पोचवले, ही त्याची असामान्य कामगिरी होय. [प. का. भा.]

महाभूतघटदान मत्स्य पुराणात (२८८) या दानाचा विधी सांगितला आहे, तो असा – सुवर्णकुंभ करावा. तो दुधातुपाने भरावा. त्यात कल्पवृक्ष

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करावा. देवप्रतिमाही ठेवावी. मग त्याचे दान करावे. या दानाने विष्णुपदाची प्राप्ती होते.

महामखम (१) दर बारा वर्षांनी गुरू सिंह राशीत प्रवेश करतो, त्या वेळी माघी पौर्णिमेला कुंभकोणम येथे तमिळ लोक मोठा उत्सव करतात, त्याला महामखम असे म्हणतात. त्या पर्वात तिथल्या महामखम नामक सरोवरात स्नान करण्यासाठी हजारो यात्रेकरू जातात. त्या सरोवराच्या काठी निरनिराळ्या नावांची अनेक शिवलिंगे आणि एक अश्वत्थ वृक्षही आहे. स्नानानंतर यात्रेकरू त्या वृक्षाला प्रदक्षिणा घालतात. पाहा–कुंभकोणम.

(२) या नावाचा राष्ट्रीय उत्सव केरळ प्रदेशात पूर्वी होत असे. त्या प्रसंगी तिरुवानाय नदीच्या तीरावर केरळसम्राट आपल्या संपूर्ण वैभवानिशी उपस्थित होत आणि त्यांचे सर्व सामंत-सरदार त्यांना अभिवादन करून आपली राजनिष्ठा प्रकट करीत. कालांतराने केरळ प्रदेशात अनेक राज्ये निर्माण झाली. मग सामूतिरी राजे त्या उत्सवात सम्राटाचे स्थान घेऊ लागले. पण त्यांचे वर्चस्व न मानणाऱ्या राजांच्या वतीने निवडक शंभर वीर तिथे जाऊन आपला विरोध प्रकट करू लागले. सामूतिरी राजे त्या वीरांना तिथे ठार मारीत; पण तरीही वर्षानुवर्ष हा विरोध आणि प्राणत्याग सुरू राहिला. अशा प्रकारे त्या उत्सवाला भीषण रूप प्राप्त झाल्यामुळे पुढे तो उत्सव बंद करण्यात आला. [कैं· सा. द.]

महामंत्रानुसारिणी एक बौद्ध देवता. ही अक्षोभ्यापासून उत्पन्न झालेली असून, हिला पंचरक्षा नामक धारिणी देवतांपैकी मानतात. ही नीलवर्ण, एकमुखी व चतुर्भुज आहे. हिच्या तीन हातांत वज्र, परशू व पाश असून, चौथा हात वरद मुद्रेत असतो. ही हूंकारबीजा व अक्षोभ्य-किरीटिनी आहे.

या देवतेच्या उपासनेमुळे राज्याचे, गावाचे व जनतेचे रक्षण होते, त्याचप्रमाणे रोगराई, दुष्काळ आणि इतर संकटांचा नाश होतो, असे म्हटले आहे [इं. बु. इ.;]

महामाई राजस्थानमधील एक देवता. तिथे हिची सप्तमातृकांमध्ये गणना करतात. ही महामाया; मावलिया, वायांसा, इ. अनेक नावांनी ओळखली जाते. विवाहित स्त्रिया पुत्रप्राप्तीसाठी आणि पुत्रवती स्त्रिया बालकांच्या आरोग्यासाठी या देवतेची पूजा करतात. चैत्र व भाद्रपद महिन्यांच्या शुद्ध पक्षात या देवीचा उत्सव होतो. या वेळी तिला बलिदान करतात. व नवस बोलतात. [मरु-भारती, ऑक्टोबर १९५५]

महामाघी एक तिथिव्रत. गुरू व चंद्र हे मघा नक्षत्रात असले म्हणजे त्या पौर्णिमेला महामाघी असे म्हणतात. या पौर्णिमेला तिलपात्रे, आंगरखे, धाबळ्या, इ. गोष्टी दान देतात. पाहा– माघस्नान. [हि· ध·; नि. सिं·; व्र. प.]

महामानसी एक जैन देवता. ही सिंहवाहना व चतुर्भुज आहे. ही हातात तलवार, कमंडलू व भाला धारण करते. हिचा चौथा हात वरद मुद्रेत असतो. दिगंबरमते ही हंसवाहना असून चतुर्भुज आहे. ही आपल्या तीन हातांत अंकुश, पुस्तक व अक्षमाला धारण करते. तिचा चौथा हात वरद मुद्रेत असतो. यावरून ही शारदेप्रमाणे जैनांची विद्यादेवी असावी, असे वाटते. [ज. इ.; देवीकोश ३]

महामाया (१) परमेश्वराची आदिशक्ती. हिच्या प्रभावामुळे सृष्टीचे जीवन चालू राहते. ती विश्वाला मोह निर्माण करते. त्यामुळे मनुष्य मायाममतेच्या भोवऱ्यात गुंततो व संसारात गुरफटून जातो. अज्ञानामुळेच या असार संसाराविषयी मोह निर्माण होतो. त्यातून मुक्त होण्यासाठी अध्यात्मज्ञान प्राप्त व्हावे लागते. त्यासाठी महामायेची उपासना सांगितली आहे. देवी महात्म्यात हिचे वर्णन केले आहे, ते असे–

तन्मात्र विस्मयः कार्यो योगनिद्रा जगत्पतेः ।
महामाया हरेश्चैषा तया संमोहते जगत् ॥
ज्ञानिनामपि चेतांसि देवी भगवती हि सा ।
बलदाकृष्य मोहाय महामाया प्रयच्छति ।।
तया विसृज्यते विश्वं जगदेतच्चराचरम् ।
सैषा प्रसन्ना वरदा नृणां भवति मुक्तये ॥
सा विद्या परमा मुक्तेर्हेतुभूता सनातनी ।
संसारबन्धहेतुश्च सैव सर्वेश्वरेश्वरी ।।

अर्थ– त्यामुळे या बाबतीत आश्चर्य करू नये, कारण ही महामाया जगदीश्वर विष्णूची योगनिद्रा नामक शक्ती आहे. तिने हे विश्व मोहव्याप्त केले आहे. ज्ञानी मानवांची अंतःकरणे बलात्काराने आकृष्ट करून ती भगवती महामाया देवी मोहाधीन करते. हे चराचर जगत त्या महामायेकडून निर्माण केले जाते. ती ही प्रसन्न झाली की मानवांना मुक्तीचा वर देते. ती मोक्षाला कारण असून, नित्य सर्वश्रेष्ठ ब्रह्मविद्या आहे. सर्वेश्वराची ईश्वरी अशी तीच संसारबंधाला कारण आहे.

मार्कंडेय ऋषीने तिच्याविषयी आणखी काही माहिती सांगितली आहे, ती अशी–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ती नित्य (उत्पत्तिविनाशरहित) असून, संपूर्ण चराचर विश्व हेच तिचे स्वरूप आहे. देवांच्या कार्यसिद्धीसाठी म्हणजे दैत्यांचा नाश करण्यासाठी ती अवतार घेते. महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती हे तिचेच अवतार होत. [देवीमाहात्म्य]

(२) शाक्त संप्रदायाची एक देवता. कालिका पुराणात हिच्यासंबंधी एक कथा सांगितली आहे, ती अशी—वेताळ आणि भैरव नावाचे दोन भाऊ होते. महामायेकडून वर मिळवण्यासाठी शिवाच्या सूचनेवरून त्यांनी तप केले. महामाया त्यांच्यावर प्रसन्न झाली आणि एका लिंगातून प्रकट झाली. कालिका पुराणात तिचे वर्णन आले आहे, ते असे—

महामायेची मूर्ती—विक्रमपूर

शोणपद्मप्रतीकाशां मुक्तमूर्धजलम्बिनीम्
चलत्काञ्चनसम्बद्धकुण्डलोज्ज्वलशालिनीम् ॥
सुवर्णरत्नसम्बद्धकिरीटत्रयधारिणीम्
शुक्लकृष्णारुणैर्नेत्रैस्त्रिभिश्चारुविभूषिताम् ॥

अर्थ – तिची काया लाल कमळासारखी असून, तिचा केशसंभार मोकळा सोडलेला आहे. तिच्या कानातील हेलकावणाऱ्या सुवर्णकुंडलांनी ती तेजस्वी दिसते. रत्नखचित असे तीन सुवर्णमुगुट तिने धारण केले आहेत. पांढऱ्या, काळ्या आणि लाल अशा तीन नेत्रांनी ती सुशोभित झाली आहे.

ही देवी चिरयौवना असून, तिचे स्तन पुष्ट व उन्नत आहेत. ती चतुर्भुज असून, तिच्या वरच्या उजव्या हातात तलवा[र] खालच्या हातात सिद्धसूत्र आणि डावा वरचा हात अ[...] आणि खालचा हात वरद मुद्रेत आहे. ती नग्न आहे, पण ति[...] नानाविध अलंकार घातले आहेत.

विक्रमपूर येथील भग्नावशेषांत महामायेची एक मूर्ती सा[प]डली आहे. खाली शिवलिंग आणि वर चतुर्भुज देवी, असे ति[चे] रुप आहे. तिचे दोन हात ध्यानमद्रेत असून, एका हाती जपमा[ळ] व दुसऱ्या हाती पुस्तक आहे. ही अलंकारविभूषित असून ति[चे] मुख सुंदर व यौवनपूर्ण आहे. [डे. हिं. इ.; श्रीविद्यार्णवतंत्र]

(३) बौद्ध दैवतपरिवारातील हेवज्राचे एक नाव. जे[व्हा] त्याची शक्ती बुद्धडाकिनी त्याला आलिंगन देते आणि तिच्या[सह] तो यब्युम अवस्थेत राहतो, तेव्हा त्याला महामाया असे ना[व] मिळते. महामाया हा देव चतुर्मुख व चतुर्भुज असून, त्याच्या मांडीवर एक देवता आहे. तसेच त्याच्या भोवती चार दिशां[ना] चार देवता आहेत. याचा वर्ण निळा आहे. हा देव भयंकर अ[सून] त्याच्या अंगाला भस्म चर्चिलेले असून, त्याच्या चार हात[ांत] कपाल, बाण, खट्वांग व धनुष्य या वस्तू आहेत. त्याने मान[व] चर्म परिधान केलेले असून, तो नृत्याच्या अर्धपर्यंक अवस्[थेत] उभा आहे. पार्वतीला दृढालिंगन देऊन बसलेल्या शिवाशी [या] देवतेचे बरेच साम्य आहे. [इं. बु. इ.]

महामायूरी

एक बौद्ध देवता. हिची पंचरक्षामंडलात ग[णना] होते. ही ध्यानीबुद्ध अमोघसिद्धी याच्यापा[सून] उत्पन्न झाल्याचे मानतात. म्हणूनच हिच्या मुकुटावर अमो[घ]सिद्धीची प्रतिमा कोरलेली असते. ही हरित वर्णाची असून त्रि[मुख] व षड्भुज असते. हिचे उजवीकडील मुख निळे आणि डावीक[डील] मुख गौर असते. ही एका हातात मोरपिसारा धारण क[रते] आणि हिचा एक हात वरद मुद्रेत असतो. अन्य हातांत धनु[ष्य,] बाण, रत्न व कमंडलू, या वस्तू असतात. हिच्या गळ्यात [...] अलंकार असून, ही शृंगारभाव दर्शविते. ही अर्धपर्यं[क] स्थितीत असते.

ही सर्पविष उतरविणारी देवता आहे, असे मानले जाते. हि[ला] विद्यादेवीही मानतात. [इं. बु इ.; ह. च. सां. अ.]

महामारी

एक उग्र देवता. हिच्यामुळे अनेक रोग, विशे[षतः] हगवणीची साथ येते, असा समज आहे. [...] सांथीच्यां वेळी ग्रामीण भागात हिला बलिदान करण्याची [प्रथा] आहे. गुजरातेत या देवीला म्हातारी समजतात. गोंड लो[क] देवीला बली तर देतातच; शिवाय त्या वेळी सर्व गाव स्व[च्छ] करून तो केरकचरा कोणत्यातरी रस्त्यावर आणून टाक[तात]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जाणाऱ्या-येणाऱ्यांनी तो केराचा ढीग ओलांडला, की त्यांच्या बरोबर ही महामारी दुसऱ्या गावी जाते, अशी गोंडांची समजूत आहे. पाहा – मरी आई. [पॉ. रि. फो. नॉ. इं.]

महामारीशमनव्रत राजांनी केलेल्या महापापांचा परिणाम म्हणून महामारीसारखा रोग उत्पन्न होतो, अशी प्राचीन काळी समजूत होती. या रोगाच्या उपशमनार्थ राजा किंवा कोणीही एखादा पुरुष या व्रताचे अनुष्ठान करीत असे. हे अनुष्ठान गावाच्या मध्यभागी किंवा घरात करता येते. या अनुष्ठानासाठी नृसिंह पुराणात नृसिंहमंत्राचा जप आणि अनुष्ठानप्रकाशात महामृत्युंजय जप किंवा दुर्गापाठ, रुद्र, अतिरुद्र, महारुद्र, इत्यादी विधाने व भैरवउपासना करावी; त्याचप्रमाणे तीळ, तूप, साखर आणि गुळवेल यांचे हवन करावे, असे सांगितले आहे. सुश्रुताने मात्र देशत्याग हा यावरील उत्तम उपाय होय, असे सांगितले आहे. [व्र. प.]

महामुद्रा (१) एक योगमुद्रा. हिची प्रक्रिया अशी– गुदाच्या मुळाशी डाव्या पायाचा घोटा लावून, तळवा उजव्या पायाच्या मांडीला लावावा. उजवा पाय लांब पसरून दोन्ही हातांनी त्याचा अंगठा धरून ठेवावा व हनुवटी छातीवर दाबून धरावी. दृष्टी भ्रूमध्यावर स्थिर करावी. नंतर कुंभक करून, हळूहळू रेचक करावा.

या मुद्रेचे चंद्रांग व सूर्यांग असे दोन प्रकार आहेत. गुदमूल डाव्या पायाने दाबून, डाव्या नाकपुडीने पूरक व कुंभक आणि उजव्या नाकपुडीने रेचक केला असता चंद्रांग महामुद्रा होते. याच्या उलट केले असता सूर्यांग महामुद्रा होते.

या मुद्रेमुळे अविद्यादी पाच क्लेश दूर होतात; तसेच क्षय, कास, उदावर्त, प्लीहा, जीर्ण ज्वर, इ. सर्व रोगांचा नाश होतो. [योगविद्या; यो. सो. पू.]

(२) बौद्ध तंत्रांतली एक साधना. ही साधना सर्वांत कठिण मानली जात होती. या साधनेत पारंगत झालेल्या साधकांची गणना सिद्धाचार्यांमध्ये होत असे. बौद्ध तंत्रांत मंडलचक्र व मुद्रा-मैथुन या विधींत स्त्रीचा उपभोग अवश्य मानला जात असे. तो विधी भौतिक स्वरूपात न करता काल्पनिक स्वरूपात करण्याची प्रथा होती. महामुद्रेच्या रूपाने भगवती नैरात्मा हिचे चिंतन केले जात असे. गुह्यसमाज तंत्रानुसार महामुद्रा म्हणून मानलेल्या स्त्रीच्या देहात पाच तथागतांचा निवास असतो. म्हणून ही साधना करणाऱ्या साधकाला तथागतचक्री असेही म्हणतात. असा साधकवर्ग बाह्य अनुष्ठानांतून मुक्त होतो. महामुद्रेची अनेक रूपे आहेत. [हिं. मा. को.]

महामृत्युंजय यंत्र स्वामी आपल्या सेवकावर रागावला आणि त्याचा घात करायला तयार झाला, तर त्याने या विचारापासून परावृत्त व्हावे म्हणून या यंत्राचा प्रयोग करतात. त्यासाठी भूर्जपत्राचे दोन तुकडे घेतात. त्या प्रत्येकावर लोखंडाच्या लेखणीने एकाबाहेर एक असे सात चौकोन काढतात. बाहेरच्या चौकोनाला लागून प्रत्येक बाजूला तीन याप्रमाणे बारा कमलदले काढतात. चारही कोपऱ्यांवर चार त्रिशूल काढतात. यंत्राच्या मध्यभागी साध्य व्यक्तीचे नाव लिहितात. भोवतालच्या पद्मदलांवर आग्नेयीकडून प्रारंभ करून वामावर्ताने ल ची बाराखडी लिहितात. अशा प्रकारे दोन्ही भूर्ज-पत्रे तयार झाल्यावर त्यांचे संपुट करून ती जमिनीत पुरतात. नंतर त्या स्थानी साधक उत्तराभिमुख होऊन एक शिला ठेवतो. त्यामुळे साध्य व्यक्तीचा क्रोध नाहीसा होऊन ती प्रसन्न होते, असे सांगितले आहे. [यं. चिं.]

महामोहन यंत्र राजाला वश करून घेण्यासाठी या यंत्राचा उपयोग करतात. त्यासाठी एक काशाचे भांडे घेऊन ते भस्माने किंवा गोमयाने स्वच्छ करतात. जाईच्या काडीची लेखणी करून गोरोचनाने किंवा चंदनाने भांड्याच्या मध्यभागी, ज्याला वश करायचे, त्याचे नाव लिहितात. त्याच्या बाहेरील पद्माच्या आठ पाकळ्यांवर 'व'कार लिहितात. नंतर वर्तुळ काढून त्याबाहेरील सोळा दलांवर अकारादी सोळा स्वर लिहितात. नंतर त्याच्या बाहेर तीन वर्तुळे काढतात. अशा रीतीने यंत्र काढल्यावर त्याची मालती, चमेली, श्वेतकमल, इ. पांढऱ्या सुगंधित फुलांनी व पांढऱ्या वस्तूंनी सात दिवस पूजा करतात. मग ते यंत्र सोने, चांदी व तांबे या त्रिधातूंच्या डबीत ठेवून ती डबी शरीरावर धारण करतात. त्याने इष्ट व्यक्ती वश होते, असे म्हटले आहे. [यं. चिं.]

महामोक्षपरिषद सम्राट हर्षवर्धन दर पाच वर्षांनी प्रयाग येथे गंगायमुनांच्या संगमावर ही परिषद भरवीत असे. भारताच्या सर्व भागांतून विद्वान ब्राह्मण, श्रमण आणि जैन मुनी या परिषदेला उपस्थित राहून धर्मचर्चा करीत. इतरही लक्षावधी लोक परिषदेसाठी जमत. अनेक सामंत राजे आपापला दळभार घेऊन येत. त्यांची मोठी मिरवणूक निघे. पहिल्या दिवशी बुद्धमूर्तीचे आणि दुसऱ्या दिवशी सूर्य व शिव यांच्या प्रतिमांचे पूजन होत असे. सम्राट हर्षवर्धन या परिषदेच्या निमित्ताने धर्मनिरपेक्षपणे सर्वांची संभावना करी आणि याचकांना दाने देई. त्याचा खजिना या वेळी तो रिकामा करी. मग आपल्या अंगावरचे बहुमोल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वस्त्रालंकारही याचकांना देऊन तो पूर्णपणे निष्कांचन होई. त्यानंतर आपली बहीण राज्यश्री हिच्याकडून एक साधे वस्त्र मागवून ते तो नेसी आणि भगवान बुद्धाच्या पूजेसाठी जाई. या परिषदेचे जुने नाव दानमेळा असे होते. हा मेळा हर्षवर्धनाच्या पूर्वजांपासून चालत आला होता.

महायक्ष जैन दैवतसमूहातला एक यक्ष. अजितनाथ या तीर्थंकाराचा सेवक. हा चतुर्मुख व अष्टभुज असून, याच्या हातांत चक्र, त्रिशूल, कमल, अंकुश, खड्ग, दंड व कुठार, ही आयुधे असतात आणि एक हात वरद मुद्रेत असतो. श्वेतांबरांच्या मते हा श्यामवर्ण आणि हत्तीवर बसणारा आहे. दिगंबरांच्या मते हा सोनेरी वर्णाचा आहे. या यक्षाच्या मूर्ती अजितनाथाच्या अनुषंगाने पाहायला मिळतात. [जै. इ.]

महायान बौद्धांचा एक धार्मिक व तात्त्विक विभाग. महायान हा संप्रदाय नसून ती एक विचारधारा आहे. तिच्या अंतर्गत अनेक संप्रदाय आहेत आणि त्या संप्रदायाच्या दार्शनिक सिद्धान्तांमध्ये अनेक प्रकारचे पार्थक्य आहे.

अशोकाच्या काळी बौद्धांमध्ये मूर्तिपूजा नव्हती. रिक्त आसन, चक्र, कमलपुष्प व पदचिन्हे ही बुद्धाची प्रतीकेच पूजली जात होती. बुद्धाची पूजा केल्याने तो वरदान देईल, असे बौद्ध लोक मानीत नव्हते. त्यांचा भर ध्यानावर होता. बुद्धाचे ध्यान केल्याने चित्त विशुद्ध व समाहित होऊन ध्यानी पुरुषाला निर्वाण प्राप्त होऊ शकते, असे ते मानीत. त्यामुळे त्यांच्या धर्मसाधनेत प्रार्थनेलाही स्थान नव्हते.

पण इ. स. च्या पूर्वी काही काळ बौद्धांमध्ये करुणामय देवांची पूजा सुरू झाली. ते त्या देवांच्या प्रतिमा पुजू लागले आणि सुख व मोक्ष यांच्याशाठी त्यांची प्रार्थनाही करू लागले. त्यांचे हे देव शाक्यमुनी, पूर्वबुद्ध, अनागत बुद्ध, मैत्रेय, बोधिसत्त्व, इ. होते. त्यांची पूजा-प्रार्थना करीत असता या पूजक बौद्धांमध्ये भक्तीचा प्रभावही वाढू लागला व निर्वाणाचे स्वरूपही बदलले. हळूहळू बुद्ध हा लोकोत्तर पुरुष मानला जाऊ लागला. त्यातून महासांघिकांमध्ये लोकोत्तरवाद उत्पन्न झाला. महासांघिक हे प्रथम स्थविरांपासून वेगळे झाले. महासांघिकांचा संप्रदाय विकसित होऊन त्यातूनच महायानाची उत्पत्ती झाली. बौद्धसंघ हा महायान आणि त्याच्या विरुद्ध अर्थाने हीनयान अशा दोन प्रधान यानांमध्ये (मार्ग) विभक्त झाला.

हीनयानाचा अर्थात स्थविरवादाचा आदर्श अर्हत्त्व हा होता आणि त्याचे लक्ष्य निर्वाण हे होते. अर्हत हा रागादी मलांचा उच्छेद करतो व तो क्लेश व बंध यांतून मुक्त असतो. त्याचे चित्त संसारविमुख आणि मन निर्विषयी असते. आपल्या उन्न-तीसाठी तो प्रयत्नशील असतो. अष्टांगिक मार्ग ही त्यांची साधना असते, असे स्थविरवादी मानीत. त्यांच्या मते बुद्ध जरी ज्येष्ठ-श्रेष्ठ असला, तरी बुद्धाची काया जरा, व्याधि, मरण, इ. दुःखांपासून मुक्त नाही. महासांघिकांच्या विचारात इथे फरक पडला. बुद्धाला निद्रेची किंवा विश्रांतीची आवश्यकता नाही; तसेच जोवर तो जीवित राहू इच्छितो, तोवर त्याला मरणही नाही, असे महासांघिक मानू लागले.

चर्यापिटकात बुद्धाच्या पूर्वजन्माची कथा वर्णित आहे. त्या ग्रंथात पारमितेचाही उल्लेख मिळतो. त्यात अर्हत हा आदर्श परमकारुणिक बुद्धाच्या आदर्शाच्या अपेक्षेने तुच्छ ठरवलेला आहे. बुद्धचरिताच्या अनुशीलनाने बुद्धाचे अनुकरण करण्याची इच्छा त्या ग्रंथात प्रकट झाली आहे. भगवान बुद्ध सर्वज्ञ होता. सारे जीव दुःखाने आर्त आहेत, हे त्याने जाणले. त्या जीवांविषयी त्याच्या मनात महाकरुणा उत्पन्न झाली. त्या करुणेने प्रेरित होऊन जीवांना उपदेश करण्याचे काम त्याने स्वीकारले.

बुद्धचरिताच्या या करुणामयत्वाने प्रभावित झाल्यानंतर काही बौद्धांमध्ये एका नवीन विचारपद्धतीचा उदय झाला. त्या पद्धतीत अष्टांगिक मार्गाच्या जागी बोधिसत्त्वचर्येचा विकास झाला. मग अर्हत्त्व हा त्यांचा आदर्श न राहता बोधिसत्त्व हा आदर्श झाला. त्यांच्या मते बुद्ध हा बुद्धत्वाच्या प्राप्तीपर्यंत बोधिसत्त्व होता. ज्याच्या ठिकाणी सम्यक ज्ञानाचा उदय होतो, त्याच्याच चित्तात जीवलोकाविषयी करुणेचा प्रादुर्भाव होऊ शकतो. या विचारसरणीचेच नाव महायान असे पडले. बोधिसत्त्वाला आदर्श ठरविल्यामुळे महायानाला बोधिसत्त्वयान किंवा अग्रयान असेही म्हणू लागले.

महायान पंथाच्या प्रारंभकाली त्याचे स्वतःचे असे लिखित ग्रंथ नव्हते. पाठीमागून ते निर्माण करण्यात आले. इत्सिंगच्या मतानुसार बोधिसत्त्वांची पूजा हीच महायानी बौद्धांची विशेषता होती. त्यांच्यामध्येही अनेक मतवाद होते. त्यांतले काही भक्तिप्रधान होते; तर काही तंत्रप्रधान होते. त्यापैकी बोधिसत्वयान व प्रज्ञायान हे मार्ग भक्तिप्रधान असून, मंत्रयान, वज्रयान, तंत्रयान, इ. मार्ग तंत्रप्रधान आहेत.

प्रायः महायानवादी हे हीनयानी लोकांच्या धर्मसाधनेला तुच्छ समजतात. हीनयानी लोकही महायानांच्या ग्रंथांना प्रामाणिक मानीत नाहीत. महायानी मताचे प्रमुख सिद्धांत असे –

(१) बोधिसत्त्वाची कल्पना – हीनयानमतानुसार अर्हत् पदाची प्राप्ती हे भिक्षूचे परम लक्ष्य आहे. निर्वाणाची प्राप्ती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाल्यानेच भिक्षू हा क्लेशरहित होऊन आत्मप्रतिष्ठित होतो. पण महायानीमतानुसार बोधिसत्त्व हा मानवी जीवनाचा श्रेष्ठ आदर्श आहे. या बोधिसत्त्वाच्या ठिकाणी करुणा व महामैत्री असते. प्रत्येक प्राण्याला क्लेशातून मुक्त करून निर्वाणात प्रतिष्ठित करणे हे त्याच्या जीवनाचे उद्दिष्ट असते.

(२) त्रिकायकल्पना – हीनयानी मतात बुद्धाचा निर्माणकायच मानलेला आहे. महायानी मतात बुद्धाचे धर्मकाय, संभोगकाय व निर्माणकाय असे तीन काय मानले आहेत. (त्रिकाय पाहा.)

(३) दशभूमिकल्पना– हीनयानी मतानुसार अर्हत्पदाच्या प्राप्तीपर्यंत स्रोतापन्न, सकृदागामी, अनागामी व अर्हत अशा चारच भूमी असतात. पण महायानीमताप्रमाणे निर्वाणाच्या प्राप्तीपर्यंत दशभूमी असून, त्या एकामागून एक पार करूनच बोधिसत्त्वाला बुद्धत्व मिळवता येते.

(४) निर्वाणकल्पना– हीनयानी मताप्रमाणे क्लेशावरण दूर होणे म्हणजेच निर्वाण होय. पण महायानी मताप्रमाणे निर्वाणात क्लेशाबरोबरच ज्ञेयावरणही दूर होते. पहिले दुःखाभावरूप आहे, तर दुसरे आनंदरूप आहे.

(५) भक्तिकल्पना– हीनयान हा सर्वस्वी ज्ञानप्रधान मार्ग आहे. बुद्धाच्या अष्टांगिक मार्गाचे आचरण करणे, हेच त्याचे अंतिम उद्दिष्ट आहे. पण महायानी मतात भक्तीला भरपूर स्थान आहे. बुद्ध हा लोकोत्तर पुरुष असल्यामुळे त्याची भक्ती करण्यानेच मानव या दुःखमय संसारातून पार होऊ शकतो, असे महायानी मानतात. भक्तीचा स्वीकार केल्यामुळेच महायान मताच्या उत्कर्षकाळात बुद्धाच्या मूर्ती निर्माण होऊ लागल्या. गुप्त काळात बौद्ध कलांचा जो विकास झाला, त्याचे कारण महायान मताचा प्रभाव हेच होय.

महायान पंथाची साधना आणि तत्त्वज्ञान ज्या ग्रंथांत विशदपणे सांगितले आहे, ते ग्रंथ असे–(१) अष्टसाहस्रिका प्रज्ञापारमिता (२) सद्धर्मपुंडरीक (३) ललितविस्तर, (४) लंकावतारसूत्र, (५) सुवर्णप्रभास (६) गंडव्यूह (७) तथागतगुह्यक (८) समाधिराज व (९) दशभूमिक. या सर्वांना वैपुल्यसूत्रे असे म्हणतात. हे सारे ग्रंथ एकाच संप्रदायाचे नाहीत व एकाच काळी रचलेलेही नाहीत.

महायान दर्शनाचा आद्य आचार्य नागार्जुन हा होय. प्रज्ञापारमितासूत्रशास्त्र हा ग्रंथ त्याने महायान मताच्या प्रतिष्ठेसाठी लिहिला. आर्यदेव हा नागार्जुनाचा शिष्य होता. त्याचा चतुःशतक हा प्रसिद्ध ग्रंथ आहे. त्यात ४०० कारिका आहेत. याने महायानसंपरिगृह, महायानाभिधर्म, संगीतिशास्त्र, इ. ग्रंथ लिहिले. वसुबंधूने अभिधर्मकोश लिहून महायान मताला शास्त्रशुद्ध स्वरूप दिले. बौद्ध जगावर या ग्रंथांचा व्यापक प्रभाव पडला. दिङ्नागाने बौद्ध न्यायाची प्रतिष्ठा केली. धर्मकीर्तीने त्याच विषयावर भर दिला. धर्मपाल हा नालंदाचा एक प्रसिद्ध आचार्य होता. त्याने त्रिंशिका ग्रंथावर टीका लिहिली. त्याचा शिष्य चंद्रकीर्ती याने माध्यमिक दर्शनावर अनेक ग्रंथ निर्माण केले शांतिदेवाने बोधिचर्यावतारसूत्रसमुच्चय व शिक्षासमुच्चय हे ग्रंथ रचले. दीपंकर, आर्यदेव, अश्वघोष व शांतरक्षित हेही महायान मताचे प्रसिद्ध आचार्य मानले जातात.

महायानसूत्रांचे पुराणांशी बरेच सादृश्य आहे. पौराणिक साहित्यात जशी अनेक माहात्म्ये, व स्तोत्रे आढळतात, तशीच ती महायान साहित्यातही आढळतात. त्यांच्या स्वयंभू पुराण या ग्रंथात नेपाळातल्या स्थानांचा महिमा वर्णित आहे. महावस्तू व ललितविस्तर यातही स्तोत्रे आलेली आहेत. नागार्जुनाच्या तिबेटी अनुवादात चतुःस्तव हे स्तोत्र मिळते. तारा या देवीवर तर अनेक स्तोत्रे लिहिली गेली आहेत. महायान साहित्यात धारणींना महत्त्वाचे स्थान आहे. धारणीतले मंत्र वैदिक मंत्रांप्रमाणे रक्षणाचे काम करतात, अशी महायानी बौद्धांची धारणा आहे. धारणीमध्ये प्रायः बुद्ध, बोधिसत्त्व व तारा यांची प्रार्थना असते.

महायान पंथात पारमितांच्या साधनेला अग्रस्थान आहे. पारमिता शब्दाचा अर्थ पूर्णत्व हा आहे. दान, शील, नैष्कर्म्य, प्रज्ञा, वीर्य, क्षांती, सत्य, अधिष्ठान, मैत्री व उपेक्षा अशा दहा पारमिता आहेत. या पारमितांच्या साधनेनेच शाक्यमुनीला ५५० जन्म घेतल्यावर सम्यक्संबोधी प्राप्त झाली. पारमितांच्या अभ्यासावाचून कोणालाही बोधिसत्त्व किंवा बुद्ध ही पदवी प्राप्त होणार नाही, असे महायानी लोकांचे ठाम मत आहे.

पाहा – बोधिसत्त्व. [बौ. ध. द.; बौ. द. मी.]

महायोग शिव व शक्ती यांचे मीलन झाले म्हणजे जे सामरस्य प्राप्त होते, त्याला नाथसंप्रदायात महायोग किंवा कुंडलिनीयोग असे म्हटलेले आहे. ज्ञानदेवांनी यालाच पंथराज असे नाव दिलेले आहे. मंत्र, लय, हठ व राजयोग यांच्या समुच्चयाला योगशिखोपनिषदात महायोग असे म्हटले आहे. हा महायोग शक्तिपात नामक दीक्षेने प्राप्त होतो. बाल, शूद्र व स्त्री यांनाही हा प्राप्त करून घेता येतो. श्वेताश्वतरोपनिषदात याला देवात्मशक्ती असे म्हटले आहे. [भा. द. सं.]

महार महाराष्ट्र व मध्य प्रदेश या राज्यांतील एक जात. या लोकांना अंत्यज, अतिशूद्र, भूमिपुत्र किंवा धरणीचे पूत, भूयाल, चोखामेळा, धेड, डोंब, हुलसाव, काठीवाले, म्हेत्रे,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मिराशी, परवरी, तराळ व वेसकर अशीही नावे आहेत.

महार शब्दाची व्युत्पत्ती कालौघात नष्ट झाली आहे. तरीसुद्धा महाहारी (महा+आहारी) म्हणजे पुष्कळ खाणारे यावरून महार शब्द बनला असावा, असे एक मत आहे. काहींच्या मते, अगदी खालच्या लोकांना संस्कृतमध्ये मृताहारी हे नाव दिलेले आहे, त्याचे महार हे प्राकृत रूप असावे. मार्कंडेय पुराणात त्यांना मृतहारिन् असे म्हटलेले आहे. मेलेली जनावरे उचलून नेण्याच्या त्यांच्या धंद्यावरून त्यांना हे नाव मिळालेले दिसते. अंत्यज व अतिशूद्र ही त्यांची नावे त्यांचा सामाजिक दर्जा दर्शवतात. भूमिपुत्र किंवा धरणीचे पुत्र या नावावरून ते इथले मूळचे रहिवासी होते; हे सूचित होते. धेड व डोंब हे गुजरात व उत्तर भारत या प्रदेशांतील महार होत. काठीवाले हे नाव त्यांच्या पुरातन व्यवसायाचे द्योतक आहे. न्यायालयात किंवा नोंदणी खात्यातही या जातीची ती खूण मानली जाते. मिराशी म्हणजे जमीनदार. परवरी शब्द गायक महारांसाठी योजतात. वेसकर म्हणजे वेशीवरचा पहारेकरी. वारकरी पंथाचे अनुयायी असलेले महार चोखामेळा या संताच्या नावाने ओळखले जातात. कानडा प्रदेशातील महारांना हुलसाव हे नाव आहे.

महारांच्या उत्पत्तीविषयी काही दंतकथा प्रचलित आहेत, त्यांपैकी एक अशी – एकदा पार्वती नदीत स्नान करीत होती. त्या वेळी पाण्यात पडलेल्या एका बेलाच्या पानावरील रक्ताच्या थेंबांना तिचा स्पर्श झाला. त्याबरोबर त्या बिंदूचे एका सुंदर बालकात रूपांतर झाले. तिने त्या बालकाला उचलून घरी आणले आणि महादेवाला दाखवले. महादेवाने त्याचे महामुनी असे नाव ठेवले. एक दिवस ते बालक रांगत घराबाहेर गेले आणि तिथे पडलेल्या एका मृत गाईचे मांस खाऊ लागले. महादेवाने जेव्हा हे पाहिले, तेव्हा त्याला फार राग आला आणि त्याने त्या मुलाला शाप दिला, की 'तू गावाबाहेर राहशील, मृत जनावरांचे मांस खाशील आणि लोक तुझ्या सावलीचाही विटाळ मानतील.'

ही कथा कोणीतरी मागाहून रचली असावी, हे उघड दिसते.

अवने, आँट, वालकांबळे, गोपाळ, हेडशी, जोगती, कडू, कासरे, मुरळी, पुल्लार, सोम किंवा सोमवंशी, इ. महारांच्या अनेक पोटजाती आहेत. सोमवंशी हे आपली उत्पत्ती चंद्रापासून मानतात आणि इतरांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजतात. यांची संख्या बरीच आहे. गोपाळ हे महारांतील साधू होत. खंडोबाला वाहिलेल्या महार मुलींची संतती म्हणजे मुरळी होत. काही पोटजातींत आपसांत विवाह होतो, तर काहींत होत नाही.

अभंग, आढाव, आडसुळे, अहिरे, अवचट, भेडे, भिलंग, भिंगार, भोसले, चितळे, कांबळे, गायकवाड, जोशी, कदम, काळे, पाटेकर, साळवे, शेळके, शिंदे, इ. आडनावे यांच्यात आहेत. एकाच आडनावाच्या कुटुंबांत लग्नसंबंध होत नाहीत.

हे लोक सर्वसाधारणपणे उंच, बळकट, पिळदार शरीराचे व काळे असतात. पुरुषांच्या हातात एक जाड काठी असते, तिच्या एका टोकाला घुंगूर बांधलेले असतात. पूर्वी हे लोक लंगोटी, कुडते, खांद्यावर घोंगडी व डोक्याला पागोटे असा पोषाख करीत असत. कालमानानुसार त्यांच्या पोषाखात आता फरक पडला आहे त्यांच्या स्त्रिया नऊ वारी लुगडे व चोळी असा वेष करतात. ऐपतीप्रमाणे त्या पितळेचे, चांदीचे किंवा सोन्याचे दागिने घालतात.

उद्योगधंदे – महार हे खेड्याचे वंशपरंपरागत चाकर असून, सीमेसंबंधीच्या सर्व बाबतींत अधिकारी मानले जातात. ते सरकारी तिजोरीचे रक्षक असतात. सरकारी अधिकाऱ्यांना मार्ग दाखवण्याचे व त्यांचे निरोप पोचवण्याचे काम ते करतात. शेतकऱ्यांना साऱ्याचा तगादा करण्याचे काम त्यांच्याकडे असते. गावच्या सीमेवर पाहरा करणे, चावडीवर लक्ष ठेवणे, चावडी व गावकुसू दुरुस्त करणे आणि गावातील रस्ते झाडणे, ही कामे त्यांची असतात. याबद्दल त्यांना सरकारकडून थोडा पैसा व थोडी जमीन असा मोबदला मिळतो. पण धान्याच्या रूपाने मिळणारे बलुते हे त्यांचे उत्पन्नाचे प्रमुख साधन होय. पूर्वी त्यांना बावन मार्गांनी बलुत्याचे उत्पन्न मिळत असे. पण आता ते प्रमाण बरेच कमी झाले आहे. मुसलमानी व मराठी राज्यांत त्यांना मिळणाऱ्या बलुत्यांपैकी कांही बलुत्यांची नांवे अशी – सीतादेवी किंवा उभ्या उसाचा भाग. वेशीवरची देणगी. होळीचा नैवेद्य. बेंदराच्या सणाचे धान्य. मृत जनावरांची कातडी. हातशेकणे म्हणजे गुऱ्हाळावरील भट्टी राखण्याबद्दल मिळणारी रक्कम. घरटक्का, मृतांचे खड्डे खणण्याबद्दलचे पैसे, प्रथमच वापरलेल्या खळ्यावरचे उरलेले धान्य. पेवाच्या तळाचे धान्य. वधू-वरांसाठी मांडलेल्या पाटांवरील तांदूळ. गावाच्या रक्षणाबद्दल वर्षाकाठी एक वहाणांचा जोड. रुक्का म्हणजे लग्नप्रसंगी मिळणारी काही नाणी, खोबऱ्याचा तुकडा व मूठभर तांदूळ. प्रथम मळणीच्या वेळी महार स्त्रियांच्या ओटीत टाकलेले काही धान्य. वधूच्या किंवा वराच्या आईला ओवाळल्याबद्दलची ओवाळणी. मडंके म्हणजे मृत जनावरावरील कर. मांगुली म्हणजे आपाढी व कार्तिकी अमावास्येला गावाभोवती दोरा गुंडाळण्याबद्दल मिळणारी देणगी. रानसोडवण म्हणजे धान्य कापून त्यांच्या गंजी रचताना मिळणारी काही कणसे. गवत व लाकडे उभारल्यानंतर मिळणारा लगिनटक्का, इत्यादी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गावकऱ्यांसाठी लाकडे तोडणे, त्यांच्या टपालाची ने-आण करणे, त्यांच्या घरांची अंगणे झाडणे, मृतासाठी स्मशानात गोवऱ्या नेणे किंवा खड्डा खणणे ही कामे महार करतात. गावातल्या मेलेल्या जनावरांवर त्यांचाच हक्क असतो.

काही महार घरगडी, मोतद्दार, मोटरड्रायव्हर, कंत्राटदार, सावकार व शेतकरी आहेत. काही टोपल्या, चटया, सुपे, पंखे वगैरे विणतात; तर काही लग्नकार्यांत ढोलके, सनई, सूर वगैरे वाद्ये वाजवतात.

अन्न – ज्वारी-बाजरीची भाकरी, भाज्या, मासे, डाळ, हे महारांचे मुख्य अन्न होय. कोकणातील महारांचे कोद्र व तांदूळ हे मुख्य अन्न असते. गुरेढोरे, शेळ्या, मेंढ्या व कोंबडी या मेलेल्या जनावरांचे मांस ते खातात. डुकराचे मांस मात्र ते खात नाहीत. ताडी व मद्य यांची त्यांना आवड आहे.

देवके– पुणे व नासिक या जिल्ह्यांतील महार लोक आंबा, पिंपळ, रुई, शमी व उंबर या पंच पालवींची पूजा करतात. खानदेश जिल्ह्यातील महार अरकाठी, बोरकाठी, जांभूळ, आंबा व रुचकिन या पंचपालवींची आणि सातारा जिल्ह्यातील महार बाभूळ, वड, जांभूळ, आंबा व रुई यांची पालवी पुजतात. ती त्यांची देवके होत.

या लोकांत उंबर, नाग, खेकडा, सूर्यफूल, कोहळा, पानकणीस, कदंब, मोर, नागवेल, आंबा, इ. आणखीही काही देवके आहेत. समान देवकांत लग्नसंबंध होत नाहीत.

विवाहप्रथा – वेगवेगळ्या जिल्ह्यांतील महार, लग्नासंबंधी पूर्वीचा काही धागादोरा असल्याशिवाय, एकाच पोटजातीचे असले तरी आपसांत लग्नसंबंध करीत नाहीत. सावंतवाडी भागात एकाच खेड्यात राहणाऱ्या महारांत लग्नसंबंध होत नाही.

मुलीचे लग्न ती पाळण्यात असल्यापासून ती सोळा वर्षांची होईपर्यंत केव्हाही होते. लग्न उशिरा होण्याचे मुख्य कारण गरिबी हे असते.

मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. काही वेळा मुलाचा बाप वधूपित्याला देज देतो. साखरपुड्याच्या वेळी वरपिता वधूला नवी साडीचोळी देतो. नंतर वराचे आईबाप व वधूचे नातेवाईक तिच्यावरून काही नाणी ओवाळून टाकतात.

लग्नाचा मुहूर्त ब्राह्मण ज्योतिषी काढून देतो. त्याच वेळी तो वधू-वरांच्या मस्तकांवर टाकण्यासाठी काही अक्षता देतो. हळद लावण्याचा मुहूर्तही तोच काढून देतो. वराला हळद लावून झाल्यावर उरलेली हळद वधूकडे पाठवतात. हळद लावून झाल्यावर वधू-वरांना आपापल्या घरी स्नान घालतात. त्यासाठी पितळेचे पाच हंडे गरम पाण्याने भरून गोलाकार ठेवतात. त्या हंड्यांभोवती पांढऱ्या सुताचे अनेक वेढे देतात. त्या हंड्यांच्या मध्यभागी वधूला पाटावर बसवतात आणि सुवासिनी एकदम ते हंडे उचलून त्यांतील पाणी वधूच्या अंगावर ओततात.

लग्नासाठी वधूच्या व वराच्या घरी मांडव घालतात. मांडवाची मुहूर्तमेढ बहुधा उंबराची असते. कुळाच्या देवकाची पूजा करतात आणि ते देवक, पोळीचा तुकडा व कुऱ्हाड यांसह मुहूर्तमेढीला बांधतात. काही ठिकाणी वधू-वरांना लग्नाच्या वेळी बांबूच्या पाटीत बसवतात व त्यांच्या मानेभोवती पिवळा दोरा सात वेळा गुंडाळतात. काही ठिकाणी ते बांबूच्या टोपलीत समोरासमोर उभे राहतात. त्यांच्या मध्ये अंतरपाट धरतात. मंगलाष्टके म्हणून झाल्यावर अंतरपाठ दूर करतात. लोक वधूवरांवर अक्षता टाकतात आणि वधू-वर एकमेकांच्या गळ्यात हार घालतात. पुष्कळ ठिकाणी लग्नसमारंभाच्या सुरवातीपासून शेवटपर्यंत वधूला चाकू आणि वराला सुरा आपल्याजवळ बाळगावा लागतो. यांच्या लग्नात काही ठिकाणी ब्राह्मण, काही ठिकाणी महार गोसावी, तर काही ठिकाणी धनगर पौरोहित्य करतो. ठाणे जिल्ह्यात, लग्नाच्या आदल्या दिवशी भगतालाच बोलावून दुसरा दिवस शुभ आहे का, ते विचारतात आणि दिवस शुभ असेल, तर लग्न लावतात. ठाणे जिल्ह्यातील चोखामेळा महार, पुरोहित म्हणून ब्राह्मणांनाच बोलावतात.

सावंतवाडी भागातील महारांत लग्नापूर्वी नवरामुलगा आणि त्याचे आईबाप एका टोपलीत शेर-दोन शेर तांदूळ, नारळ, पाच पैसे, पानसुपारी, केळी व कदंबाची पाने असे देवक ठेवून त्याची पूजा करतात. नंतर घराच्या दारात मांडवाची मुहूर्तमेढ रोवून तिची पूजा करतात. मग शेस भरणे नामक एक विधी होतो. यात पाच दांपत्ये, नवरामुलगा व त्याचे आईबाप यांच्या कपाळांना अक्षता लावतात. मग वराला लग्नमंडपात नेऊन पाच सुवासिनी त्याच्या अंगाला हळद लावतात. मांडवाच्या बाहेर सावरीच्या फांद्यांनी एक त्रिकोण उभारतात. त्याच्या वरच्या टोकाला पाण्याने भरलेली एक कापडी पिशवी बांधतात. त्रिकोणात पिशवीच्या खाली नवऱ्यामुलाला बसवतात. त्याच्या डोक्यावर वरून पाणी ठिबकत राहते. थोड्या वेळाने त्याला तिथून बाहेर काढतात आणि स्नान घालतात.

महारांचा लग्नसमारंभ एकूण पाच दिवस चालतो. पहिल्या दिवशी लग्न होते. पुढे तीन दिवस नवरामुलगा वधूच्या घरी राहतो आणि चौथ्या दिवशी तो वधूसह वाजतगाजत आपल्या गावी जायला निघतो. घरी पोचल्यावर वरमाय त्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दोघांवरून भाकरीचा तुकडा ओवाळून टाकते. घरात पोचल्यावर दोघांची बाशिंगे सोडतात व पुन्हा बांधतात. लोकांना पानसुपारी वाटली, की समारंभ संपतो. हल्ली बौद्ध धर्माची दीक्षा घेतलेले महार बौद्ध पद्धतीने लग्नविधी करतात, त्याला एक दोन-तास लागतात.

पूर्वी महार पुरुषाला एकापेक्षा जास्त बायका करता येत असत. विधवेला आते, मामे किंवा मावस भावाशी, तसेच नवऱ्याच्या कुळातील पुरुषाशी लग्न करता येत नाही. खानदेशात विधवेला धाकट्या दिराशी लग्न करता येते. लग्न रात्रीच्या वेळी होते. त्या वेळी बहुधा पुनर्विवाहित स्त्रिया व गोसावी हजर असतात. महारांचे गुरू किंवा महारवाड्यातील कळता महार लग्नात मंगलाष्टके म्हणून लग्न लावतो. नवरा-नवरीच्या पदराला गाठ मारतात. वधूच्या कपाळी कुंकू लावतात व तिची ओटी भरतात. एवढ्याने विवाहविधी समाप्त होतो. प्रथम वराला विधवा स्त्रीशी लग्न करायचे असल्यास प्रथम त्याचे रुईशी लग्न लावतात.

प्रसूतिप्रथा – मूल जन्मल्यावर त्याच्या अंगावर थोडे पाणी शिंपडतात. सोलापूर आणि सातारा या भागांत मूल जन्मल्यावर तिसऱ्या दिवशी तिरवी किंवा तिकोंदी नामक एक संस्कार करतात. त्या वेळी पाच कुमारिकांना जेवायला घालतात. पाचव्या दिवशी पाच लहान दगड ओळीने मांडून सुईण त्यांची पूजा करते. कोल्हापूरच्या महारांत या दिवशी बाळंतिणीच्या बाजेजवळच्या भिंतीवर चंदनाचे व हळदीचे काही ठिपके काढण्याची पद्धत आहे. बाळंतिणीच्या खोलीत आंघोळीचे पाणी जाण्यासाठी जे भोक पाडलेले असते ते सहाव्या दिवशी बुजवतात. ती जागा शेणाने सारवून त्याची पूजा करतात. याच दिवशी सटवाई देवीची पूजा करतात. कानडा जिल्ह्यात मुलाचे नाव सहाव्या दिवशी, कोल्हापूर भागात नवव्या दिवशी आणि इतर ठिकाणी बाराव्या किंवा तेराव्या दिवशी ठेवतात. जननाशौच सर्वसाधारणपणे बारा दिवस पाळतात. पुणे शहरात ते एकेचाळीस दिवस, अहमदनगरच्या बाजूला अकरा दिवस आणि कोल्हापूर भागात आठ दिवस पाळतात.

देवधर्म – महार हे हिंदू असून, त्यांच्यांत शैव व वैष्णव असे दोन्ही भेद आढळतात. काही महार मातंगपट्टा, कबीर, गिरी आणि नाथ या पंथांचे अनुयायी आहेत. चोखामेळा महार वारकरी असून, ते गळ्यात तुळशीकाष्ठाची माळ घालतात. ते आळंदी-पंढरपूरची वारी करतात आणि त्या वेळी भजन करतात.

भवानी, महादेव, चोखोबा, ज्ञानदेव, तलखोबा, खंडोबा, विठोबा आणि म्हसकोबा या दैवतांना महार लोक भजतात. नागोबा, देवीच्या साथीची देवता सटवाई आणि पटकीची देवता मरीआई यांची देवळे बहुधा त्यांच्या वाड्यांतच असतात आणि ते त्यांची पूजा करतात. शांतारिअम्म, मरीदेवी आणि महादेव ही कानडा जिल्ह्यांतील महारांची कुलदैवते होत. काही गावांत मोठ्या देवळाजवळच महारांच्या तलखोबाचे देऊळ असते. त्यातल्या दगडी मूर्तीची ते पूजा करतात. ठाण्याच्या भागातील महारांची म्हसकोबा, जनाई, गौरी, बहिरोबा, खंडोबा, चोखोबा, भवानी, यल्लम्मा, गिरोबा, इ. कुलदैवते आहेत. याशिवाय, काहींच्या घरांत पूर्वजांचे टाक असतात. सर्व महार प्रमुख हिंदू देवतांनाही भजतात.

महारांचे धर्मगुरू हे त्यांच्या जातीतील असून त्यांना गुरू, साधू, वाचक पंडित, गोसावी किंवा मेंढे जोशी असे म्हणतात. खानदेशातील महार ठाकूर या नावाने ओळखले जाणारे भिक्षेकरीही महारांचे पौरोहित्य करतात. महारांतील साधू भक्तिविजय, दासबोध, ज्ञानेश्वरी, हरिविजय, रामविजय, संतलीलामृत इ. ग्रंथ वाचतात. काहीजण पुराणही सांगतात.

प्रत्येक महार स्त्रीला व पुरुषाला गुरू असतो. प्रत्येक मुलाला व मुलीला पहिल्या वर्षी गुरू दीक्षा देतो. तिला कान फुंकणे असे नाव आहे. एखाद्या शुभ दिवशी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास मुलाचे आईबाप त्याला घेऊन गुरूच्या घरी जातात. गुरूच्या घरातील स्त्रिया एक खोली सारवून जमिनीवर पाट मांडतात, त्याच्या भोवती रांगोळी घालतात आणि चार दिवे लावून ठेवतात. पाटावर एक घट पाण्याने भरून ठेवतात. त्याच्या समोर दुसरा पाट मांडून गुरू बसतो. तो घटाची पूजा करतो. मग तो मुलाला आपल्या मांडीवर घेतो आणि त्याच्या व आपल्या अंगावर एक धोतर पांघरतो आणि त्याच्या उजव्या कानात मंत्र उच्चारतो. याबद्दल गुरूला मुलाचे आईबाप ऐपतीप्रमाणे धोतर, पितळी ताट व तांब्या आणि दक्षिणा देतात. त्यानंतर ते आपल्या आप्तेष्टांना व गुरूला भोजन देतात.

महारांचा मंत्रतंत्र, जादूटोणा व भुतेखेते यांवर विश्वास आहे. आजारपण येते, ते भुताखेतांच्या कोपामुळे अशी त्यांची समजूत आहे. त्यांना शांत करण्यासाठी ते मांत्रिकाला बोलावतात.

महार लोक शूर असून शिवाजीमहाराजांच्या काळापासून त्यांनी लढाईत बहादुरी गाजवली आहे. सांप्रतही भारतीय सैन्यात त्यांची काही पथके आहेत. अनेक महारांच्या नावापुढे नाक असे पद असते. ते सैन्यातील नाईक या शब्दाचे अपभ्रष्ट रूप होय.

मर्तिकप्रथा – हे लोक सर्वसाधारणपणे प्रेते पुरतात. ज्यांची ऐपत असेल, असे लोक मात्र प्रेते जाळतात. प्रेताला घराच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उंबरठ्यावर गरम पाण्याने स्नान घालतात व नव्या पांढऱ्या वस्त्रात गुंडाळतात. वस्त्राच्या एका टोकाला मूठभर तांदूळ बांधतात. प्रेत तिरडीवरून स्मशानात नेताना वाटेत एका ठिकाणी तिरडी खाली ठेवतात आणि प्रेताच्या वस्त्रातील तांदूळ काढून ते जमिनीवर ठेवतात व दगडांनी झाकतात. मृतासाठी सुमारे पाच फूट खोल खड्डा खणतात. मृताचे मस्तक उत्तरेकडे करून त्याला आत ठेवतात. काही ठिकाणी प्रेत बसलेल्या अवस्थेत पुरतात. मृताच्या डोक्यावर बेलाची पाने टाकतात. मृताचा उत्तराधिकारी प्रथम आणि बाकीचे नंतर मृताच्या अंगावर माती टाकतात. खड्डा भरून झाल्यावर मृताचा उत्तराधिकारी एका मडक्यात पाणी भरतो, त्याला छिद्र पाडतो आणि तीन वेळा खड्ड्याभोवती रडत व बोंब मारीत प्रदक्षिणा घालतो. नंतर ते मडके फोडून टाकतो. सर्वजण जवळपासच्या झऱ्यावर स्नान करून मृताच्या घरी जातात, तिथे निंबाच्या फांदीने अंगावर गोमूत्र शिंपडून घेतात आणि आपापल्या घरी जातात. तिसऱ्या दिवशी मृताचे काही नातेवाईक खोबऱ्याच्या दोन वाटयांत गूळ घालून स्मशानात नेतात. एक वाटी तांदूळ ठेवलेल्या जागी व दुसरी थडग्यावर ठेवतात. सातव्या दिवशी शांतिभोजन घालतात. हे लोक श्राद्ध करीत नाहीत, पण पक्षपंधरवड्यात पितरांसाठी महालय करतात.

पूर्वी महार लोकांना अस्पृश्य समजत असत. पण सांप्रत कायद्याने अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. श्री. भीमराव आंबेडकर हे त्यांच्या समाजात मोठे विद्वान व कर्तबगार पुरुष होऊन गेले. महारांच्या आणि पर्यायाने सर्व अस्पृश्य समजल्या गेलेल्या जातींच्या उद्धारासाठी त्यांनी यावज्जीव भगीरथ प्रयत्न केले. त्यांनी जेव्हा हिंदू धर्म सोडून बौद्ध धर्म स्वीकारला, तेव्हा त्यांच्या बरोबर बहुतेक सर्व महार बौद्ध बनले. इ. स. १९६१ च्या शिरगणतीप्रमाणे महाराष्ट्रांत सुमारे सत्तावीस लक्ष महारांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केलेला आहे. आता ते लग्नविधी, जन्मसंस्कार, नामकरण, श्राद्धविधी, अंत्यविधी, इ. संस्कार बौद्ध धर्माप्रमाणे करतात. बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यावर महार म्हणून पूर्वी करीत असलेल्या सर्व गावकामांचा आणि सरकारी कामांचा त्यांनी त्याग केला आहे. ते आता चरितार्थासाठी आपला स्वतंत्र असा व्यवसाय करतात. त्यांच्यांत हल्ली शिक्षणाचे प्रमाणही वाढले आहे. सरकारी व बिनसरकारी नोकरीत आता त्यांची संख्या बरीच आहे. बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यावर ते आता फक्त डॉ. आंबेडकरांची जयंती व बुद्धजयंती हे दोन उत्सव साजरे करतात. ते भगवान बुद्धाची देव म्हणून पूजा-अर्चा करतात. [ट्रा. का. बाँ.; दि महार फोक, रॉबर्टसन, १९३८; अस्पृष्टांचा प्रश्न, श्री. म. माटे, १९३३]

महाराजव्रत एक तिथिव्रत. ज्या शुद्ध किंवा वद्य चतुर्दशीला आर्द्रा नक्षत्र असते, किंवा चतुर्दशी पूर्वाभाद्रपदा आणि उत्तराभाद्रपदा अथवा या दोन्ही नक्षत्रांनी युक्त असते, त्या वेळी हे व्रत करतात. ही तिथी शिवाची आवडती असल्याचे सांगितले आहे. व्रतविधी असा – त्रयोदशीला विधिपूर्वक स्नान. स्नानानंतर 'यज्जाग्रतो दूरम्' या शिवमंत्राचा जप. शिव व उमा यांना पंचगव्य, पंचामृत, उसाचा रस यांनी स्नान घालून सुगंधी द्रव्यांचे अनुलेपन. 'त्र्यंबकं यजामहे', या मंत्राने बिल्वपत्रांचा होम. रात्रभर जागर. उद्यापनाच्या वेळी गोप्रदान करतात. फल – सर्व संकटांचा परिहार व सर्वोच्च स्थानाची प्राप्ती. [हि. ध.]

महाराजासंप्रदाय एक लौकिक संप्रदाय. उत्तर बंगालमधील दिनाजपूर जिल्ह्यातील शेतकरी महाराजा नावाच्या देवाची पूजा करतात. हा देव शेतीचे संगोपन व संरक्षण करतो, अशी त्यांची समजूत आहे. जेव्हा अवर्षण पडते, तेव्हाही या देवाची पूजा व प्रार्थना करतात. त्याचप्रमाणे देवी, पटकी किंवा गुरांचे रोग येतात, तेव्हाही याची पूजा करतात.

हा महाराजा एखाद्या ग्रामदेवाच्या स्वरूपात दिसतो. याची व्यवस्थित मंदिरे बांधलेली नसतात; गावात एखाद्या टेकाडावर मोकळ्या मैदानात याचे स्थान असते. याचा एक पुजारी ब्राह्मणेतर व दुसरा शेतकऱ्यांपैकी असतो. महाराजाला पशुबळी चालत नाही. केळी, तांदूळ, मिठाई हे पदार्थ त्याला आवडतात.

कार्तिक, मार्गशीर्ष अथवा पौष या महिन्यांत म्हणजे भाताच्या कापणीपूर्वी किंवा कापणी पूर्ण झाल्यावर कोणत्याही मंगळवारी अथवा शनिवारी याची पूजा करतात. महाराजाची पूजा दोन प्रकारांनी केली जाते (१) महाराजासमोर बसून सामूहिक रीत्या त्याचा जप करणे. (२) पुजाऱ्याच्या द्वारा त्याची प्रार्थना करणे. दुसऱ्या प्रकारच्या पूजेत प्रथम बसान म्हणजे मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करतात. या वेळी जे मंत्र म्हणतात, त्यांना बसावेर मंत्र असे म्हणतात. त्यांपैकी एक मंत्र असा –

शंक साट शंक पाट शंक सिंहासन ।
शंक पाटे महाराज महाशान्ति जुरिले आसन ।
आइस प्रभु बैस पाटे पूजा पाटी लेह हाते हाते ।
पूजा पाटी लेह हस्त करिये ।

अर्थ – शंखासन तयार आहे. मंदिर व सिंहासन शंखाचेच केलेले आहे. महाराजदेवा आणि महाशांतिदेवी, या आणि शंखाच्या मंदिरात आसनस्थ व्हा. देवतांनो ! या व या मंदिरा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तील आसनांवर बसा. आपल्या हातांनी या पूजासाहित्याचा स्वीकार करा. घ्या, हा उपहार हाती घ्या.

हा मंत्र म्हणून सर्व पदार्थ अर्पण करतात. यानंतर लाभान म्हणजे आवाहनविधी होतो. या विधीच्या वेळी म्हटल्या जाणाऱ्या मंत्रांना लाभानेर मंत्र असे म्हणतात. सर्वांत शेवटी शानेर मंत्र (शांतिमंत्र) म्हणतात.

महाराजा हा ग्रामदेव असला, तरी या संप्रदायाला जादूटोणा मंजूर नाही. प्रार्थना व उपहार यांवरच याचा सारा भर आहे.

पंडितांच्या मते या संप्रदायाचा उगम अनार्य संस्कृतीत आहे. याचे सर्व मंत्र स्थानिक बंगाली बोलीत आहेत. पाऊस पाडणारा महाराजा देव आणि वेदोक्त पर्जन्यदेवता यांमध्ये खूप साम्य आढळते. [ज. अं. सो. बॉं., १९२२ अंक ४ था]

महाराजिक प्राचीन संस्कृत व पाली साहित्यात कुबेराला महाराज असे म्हटले आहे. कुबेर व त्याचे साथीदार धृतराष्ट्र, विरूदक, विरूपाक्ष असे चौघे उत्तर, पूर्व, दक्षिण व पश्चिम दिशांचे लोकपाल मानलेले आहेत. या चौघांना चार महाराज या नावाने ओळखतात. दीघनिकायाच्या आटानाटीय सुत्तात यांची प्रथम गणना केलेली आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायीतही या महाराजांचा उल्लेख आहे (अष्टा. ४.२.३५). या महाराजांची भक्ती करणाऱ्यांना महाराजिक अशी संज्ञा त्या काळी होती. विवाहादी मंगलकार्यांच्या प्रसंगी कुबेराची पूजा केली जात असे. [पृथिवीपुत्र]

महारामायण एक संस्कृत रामायण. वाल्मीकीचे रामायण हे आदिरामायण नव्हे, असे काही संप्रदायांचे मत आहे. त्यांच्या मते शिवाने पार्वतीला जे रामायण सांगितले, ते आदिरामायण होय. त्यालाच महारामायण असे दुसरे नाव आहे. हे रामायण स्वायंभुव मन्वंतराच्या पहिल्या भागात रचले गेले, अशी समजूत आहे. यात तीन लाख पन्नास हजार श्लोक असून, ते सात कांडांमध्ये विभागलेले आहेत.

महारामायणात अयोध्याविस्तार, वेदान्तवर्णन, विविध उत्सव, राज्याभिषेककारण, दंडकारण्याची उत्पत्ती, वानरसेनेची संघटना, रामेश्वरस्थापना, रावणपांडित्य, लंकाविजय, इ. अनेक विषय विस्ताराने वर्णिले आहेत.

हा ग्रंथ रामभक्तिशास्त्राचा एक आधारग्रंथ आहे. श्री. कामिल बुल्के यांच्या मते भुशुंडी रामायण व महारामायण हे दोन्ही ग्रंथ एकच असावे. त्यांत रामाच्या रास-क्रीडेचे वर्णन आहे. [रामकथा; हिंदुत्व; रा. भ. शा.; रा. सा. म. उ.]

महाराष्ट्र भारतीय संघराज्यातले एक मोठे घटकराज्य. दक्षिण द्वीपकल्पाचा हा एक भाग असून, त्याच्या चतुःसीमा अशा – पश्चिमेला सिंधुसागर (अरबी समुद्र), वायव्येला दादरा–नगरहवेली व गुजरात, उत्तरेला मध्यप्रदेश, पूर्वेला मध्यप्रदेश व आंध्र प्रदेश, आग्नेय दिशेला म्हैसूर आणि दक्षिणेला गोवा व आंध्र प्रदेश. या राज्याचे क्षेत्रफळ १,१८, ४५९ चौ. मैल असून, त्याची लोकसंख्या ३ कोटी ९६ लक्ष एवढी आहे. राज्यकारभारासाठी हे राज्य २६ जिल्ह्यांत विभागलेले असून त्यांचे चार विभाग केले आहेत. त्या विभागांची व जिल्ह्यांची नांवे अशी–

(१) मुंबई विभाग – जळगाव, धुळे, नासिक, ठाणे, मुंबई, कुलाबा व रत्नागिरी.

(२) पुणे विभाग – पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर. (वरील दोन्ही विभागांना मिळून पश्चिम महाराष्ट्र म्हणतात.

(३) औरंगाबाद विभाग – (मराठवाडा) – औरंगाबाद, परभणी, बीड, उस्मानाबाद व नांदेड.

(४) नागपूर विभाग – (विदर्भ) – बुलढाणा, अकोला, अमरावती, नागपूर, यवतमाळ, भंडारा, चंद्रपूर व वर्धा.

ब्रिटिश राजवटीत सिंध, गुजरात, पश्चिम महाराष्ट्र आणि बेळगाव, धारवाड, विजापूर व कारवार हे कर्नाटकातील जिल्हे मिळून मुंबई इलाखा बनवलेला होता. विदर्भाचे आठ जिल्हे मध्यप्रांतात समाविष्ट होते आणि मराठवाड्याचे पाच जिल्हे निजामाच्या राज्यात होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५६ साली महाराष्ट्राचे तीन्ही विभाग आणि गुजरात यांचे मिळून विशाल मुंबईराज्य बनविण्यात आले. त्यानंतर १९६० मध्ये गुजरात राज्य वेगळे होऊन संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. मुंबई ही या प्रदेशाची राजधानी आहे.

भूरचना – महाराष्ट्राची भूमी अग्निजन्य खडकांची बनलेली आहे. ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे उफाळून वर आलेला तप्त रस भूपृष्ठावर पसरून थंड झाला की, त्याचा एक घट्ट थर होतो. असे अनेक उद्रेक होऊन लाव्हारसाचे पुष्कळ थर एकांवर एक पसरतात. अशा खडकांना कृष्णप्रस्तर म्हणतात. महाराष्ट्राच्या भूगर्भात असे खडक आहेत. त्यांच्यावर दक्षिणेचे पठार पसरलेले आहे. सह्य पर्वताची निर्मिती ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे झालेली आहे. यालाच पश्चिम घाट असे म्हणतात. हा पर्वत तापीपासून कन्याकुमारीपर्यंत सुमारे ११०० मैल लांब पसरलेला आहे.

सिंधुसागर व सह्याद्री यांच्या मधील अरुंद प्रदेशाला कोकण म्हणतात. त्याची रुंदी २५ ते ६० मैल व लांबी दमणपासून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…ोव्यापर्यंत सुमारे ३५० मैल आहे. त्यात सह्याद्रीच्या अनेक शाखा पसरलेल्या आहेत.

महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवर पसरलेला सातपुडा पर्वत हा सह्याद्रीचाच एक भाग आहे. नर्मदा नदी त्याच्या उत्तरेला आहे. सह्य व सातपुडा या दोन पर्वतांमधील विस्तृत प्रदेशाला दख्खनचे पठार म्हणतात. सातपुडा पर्वत तापीच्या मुखापासून अमरकंटकपर्यंत सुमारे ६०० मैल लांब पसरलेला आहे.

सह्याद्रीची शाखा अकोलनेरजवळ पठारात विलीन होऊन जेऊर-जवळ पुन्हा डोके वर काढते; तिथून एक रांग बीदरपर्यंत व दुसरी गुलबर्ग्यापर्यंत पसरलेली आहे. या डोंगरांना बालाघाट म्हणतात. आंबेजोगाई व तुळजापूर ही स्थाने या डोंगरावर आहेत. रायरेश्वरापासून शिंगणापूरपर्यंत पसरलेल्या रांगेला महादेवाचा डोंगर म्हणतात.

नद्या – कोकण भागात उल्हास, वैतरणा, दमणगंगा, अंबा,



दख्खनच्या पठारालाच देश असेही नाव आहे. या पठारावर सह्याद्रीच्या अनेक रांगा पसरलेल्या आहेत. त्यातला सातमाळा डोंगर नासिक जिल्ह्याच्या वायव्य कोपऱ्यात सुरू होतो. मनमाडपलिकडे अंकाईटंकाईपासून सातमाळाची अजंटा शाखा सुरू होते. या डोंगराची एक रांग बुलढाण्यापर्यंत आणि दुसरी देवगिरीसिंदखेडवरून परभणीपर्यंत गेलेली आहेत. पहिल्या रांगेत अजंटाची लेणी व दुसऱ्या रांगेत वेरूळची लेणी आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील हरिश्चंद्रगडापासून पूर्वेकडे पसरलेली

वासिष्ठी व सावित्री या मुख्य नद्या आहेत. त्या सह्य पर्वतात उगम पाऊन सिंधुसागराला मिळतात. पावसाळ्यात या नद्यांना पूर येतो, पण नंतर त्या लवकरच कोरड्या होतात. तापी, वैनगंगा, वर्धा, गोदावरी, भीमा, कृष्णा या देशावरील मुख्य नद्या होत. तापी नदी सातपुड्यात उगम पावून पश्चिमेकडे वाहत जाते व सिंधुसागराला जाऊन मिळते. तिला पूर्णा, गिरणा, पांझरा, इ. बारा उपनद्या मिळतात. वर्धा व वैनगंगा या नद्या मिळून होणारी प्राणहिता नदी गोदावरीला मिळते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गोदावरीचा उगम सह्य पर्वतावर त्र्यंबकेश्वराजवळ होतो. दारणा, कारवा, प्रवरा, मुळा, पूर्णा, मांजरा, मानेर, या नद्याही तिला मिळतात. सातारा जिल्ह्यात महाबळेश्वर येथे कृष्णा नदी उगम पावते. तिच्या वेण्णा, कोयना, वारणा, इ. सात-आठ उपनद्या आहेत. पुणे जिल्ह्यात भीमाशंकर येथे भीमेचा उगम आहे. तिला मुळा-मुठा, घोडनदी, इंद्रायणी, वेळ, कुकडी, मांडवी, नीरा, पवना, इ. अनेक उपनद्या येऊन मिळतात. पुढे भीमा नदी कृष्णेला मिळते. गोदावरी व कृष्णा बंगालच्या उपसागराला मिळतात.

सातपुडा व सातमाळा–अजंटा यांच्या मध्ये तापीचे खोरे आहे. आणि त्याच्या पूर्वेला वर्धा व वैनगंगा या नद्यांचे खोरे आहे. सातमाळा व बालाघाट यांच्या मध्ये गोदावरीचे खोरे आहे. बालाघाट व महादेव या डोंगरांच्या मध्ये भीमेचे खोरे असून, महादेवाच्या डोंगराच्या दक्षिणेकडे कृष्णेचे खोरे आहे.

हरिश्चंद्रगडापासून फोंडा घाटापर्यंतच्या सह्याद्रीवरील प्रदेशाला घाटमाथा असे म्हणतात. याची लांबी २०० मैल आहे. भीमाशंकर, महाबळेश्वर, विशाळगड, शिवनेरी, सिंहगड, रायगड, प्रतापगड, ही स्थाने या भागात आहेत. कोकण व देश यांना जोडणारे अनेक घाट या प्रदेशात आहेत, म्हणून याला घाटमाथा हे नाव मिळालेले आहे.

सह्याद्री व त्यांच्या निरनिराळ्या रांगा यांच्या माथ्यावर शेंकडो डोंगरी किल्ले बांधलेले आढळतात. ऐतिहासिक काळी सबंध महाराष्ट्रावर ताबा ठेवण्याच्या दृष्टीने या किल्ल्यांना फार महत्त्व होते.

हवामान – महाराष्ट्र प्रदेश उष्ण कटिबंधात येतो. त्याचे तपमान सर्वसाधारणपणे जास्त असले, तरी सिंधुसागर व सह्याद्री वगैरे पर्वत यांमुळे त्यात बराच फरक पडतो. समुद्राच्या सान्निध्यामुळे कोकणपट्टीचे हवामान समशीतोष्ण झाले आहे. पण ते दमट असते. उंच उंच डोंगरमाथ्यावरील भागात हवा थंड असते. पुणे, नासिक यांसारख्या ठिकाणी हिवाळा व उन्हाळा फार कडक नसतो; तर सोलापूर, नागपूर, इ. ठिकाणी हवामान फारच विषम आहे. अशा प्रकारे महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत अत्यंत भिन्न प्रकारचे हवामान आढळते.

महाराष्ट्रातील पाऊस मुख्यतः ज्येष्ठ ते भाद्रपद (जून ते सप्टेंबर) या चार महिन्यांत हिंदी महासागरावरून ईशान्येकडे वाहणाऱ्या मोसमी (मान्सून) वाऱ्यांमुळे पडतो. आश्विनातही काही भागांत थोडा पाऊस पडतो.

राज्याच्या निरनिराळ्या भागांत पावसाचे जे भिन्न प्रमाण आढळते, त्याचे कारण सह्याद्री हे होय. या पर्वतामुळेच महाराष्ट्राला पाऊस मिळतो. समुद्रकिनाऱ्यावर कोकणात १०० ते १५० इंच पाऊस पडतो, तर घाटमाथ्यावर त्याचे प्रमाण २०० ते २५० इंच एवढे वाढते. सह्याद्री ओलांडल्यावर प्रमाण ५०, २५, १५ इंच असे कमी कमी होत जाते. पुणे, नगर, खानदेश, सातारा, सोलापूर या जिल्ह्यांत हे



भारताचे प्रवेशद्वार – मुंबई

आहे. मराठवाड्यात ३० ते ४० इंच पाऊस पडतो. वैनगंगा या नद्यांच्या खोऱ्यांत भंडारा, चांदा व ... जिल्हे समाविष्ट आहेत. बंगालच्या उपसागरावरून ... वाऱ्यांमुळे या भागांत ३० ते ६० इंच पाऊस पडतो.

पिके – शेती हा महाराष्ट्रातील लोकांचा मुख्य ... असून, सुमारे ६४ टक्के लोक या व्यवसायात गुंतलेले ... राज्यातील एकूण जमिनीपैकी सुमारे ६० टक्के ... लागवडीखाली आहे. असे असले, तरी महाराष्ट्र अन्नाच्या दृष्टीने स्वयंपूर्ण नाही. गहू, तांदूळ, बाजरी ही धान्ये ... तून आयात करावी लागतात.

खरीप व रब्बी असे पिकांचे दोन हंगाम असतात. ... तांदूळ, भुईमूग, कापूस ही खरीप पिके पावसाळ्यात ... गहू, हरबरा, इ. रब्बी पिके दिवाळीनंतर होतात. ज्वारी ... मात्र दोन्ही हंगामांत होते.

ज्वारी हे महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकांचे मुख्य अन्न ... हेच धान्य इथे सर्वांत अधिक पिकते. या पिकाला ... काळी कसदार जमीन व मध्यम पाऊस लागतो. तापी, ... गोदावरी, भीमा व कृष्णा या नद्यांच्या काठच्या प्रदेशांत ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुष्कळ पिकते. सोलापूर, उस्मानाबाद व अहमदनगर या जिल्ह्यांत ज्वारीचे पीक जास्त प्रमाणात येते. सोलापूर जिल्हा म्हणजे ज्वारीचे कोठारच आहे.

ज्वारीप्रमाणेच बाजरीलाही उष्ण हवा लागते; पण पाऊस कमी पुरतो व जमीन कमी कसदार असली तरी चालते. नासिक, अहमदनगर, पुणे, सातारा व औरंगाबाद या जिल्ह्यांत बाजरी अधिक पिकते.

गव्हाला जमीन कसदार व हवा थंड लागते. नासिक, नागपूर, धुळे, औरंगाबाद, अहमदनगर, जळगाव, वर्धा, बुलढाणा, अकोला, परभणी, उस्मानाबाद व बीड या जिल्ह्यांत पुष्कळ गहू पिकतो.

तांदुळाला उष्ण व दमट हवा व भरपूर पाऊस यांची आवश्यकता असते. जमीन कमी कसदार असली तरी चालते; पण भुसभुशीत पाहिजे. कोकण, मावळ, वैनगंगेचे खोरे व वर्धा नदीच्या खोऱ्याचा दक्षिण भाग हे या पिकाचे मुख्य क्षेत्र आहे.

वाल, पावटे, कुळीथ ही कडधान्ये कोकणातील सखल प्रदेशात होतात; तर तूर, हरभरा, मूग, मसूर, उडीद, वाटाणे ही कडधान्ये पठारी प्रदेशात होतात.

उसाला काळी कसदार जमीन, उष्ण हवा व भरपूर पाणी लागते. देशावरील पठारी प्रदेशात या पिकाला अनुकूल अशी नैसर्गिक परिस्थिती आहे; अहमदनगर, कोल्हापूर, पुणे, नासिक, सातारा, सांगली, सोलापूर, औरंगाबाद व उस्मानाबाद या जिल्ह्यांत त्यांचे उत्पादन बरेच होते. उत्तर भारतापेक्षा महाराष्ट्रात दर एकरी उसाचे उत्पादन अधिक असून, त्यातील साखरेचा उताराही जास्त आहे.

कापसाला काळी कसदार जमीन, उष्ण व कोरडी हवा आणि मध्यम पाऊस लागतो. तापी-पूर्णा खोऱ्यात आणि अमरावती, यवतमाळ, जळगाव, अकोला, बुलढाणा, वर्धा, नागपूर, औरंगाबाद, परभणी व नांदेड या जिल्ह्यांत कापसाचे पीक पुष्कळ येते. हा कापूस इतर राज्यांना पुरवता येतो.

कापसाप्रमाणेच तंबाखूला काळी जमीन, उष्ण हवा व कमी पाऊस लागतो. कोल्हापूर व सांगली या जिल्ह्यांत तंबाखू बराच पिकतो.

ऊस, कापूस, तंबाखू व गळिताची धान्ये ही महाराष्ट्राची प्रमुख व्यापारी पिके आहेत. भुईमूग, तीळ, जवस, करडई यांचे तेल काढतात, म्हणून त्यांना गळिताची पिके म्हणतात. यांना साधारण प्रतीची जमीन, उष्ण व कोरडी हवा आणि मध्यम पाऊस लागतो. भुईमुगाचे पीक नासिक, सातारा, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, परभणी, औरंगाबाद व बुलढाणा या जिल्ह्यांत खूप येते. जवस वैनगंगेच्या खोऱ्यात चांगला पिकतो. तीळ, करडई, वगैरे पिके बऱ्याच जिल्ह्यांत होतात.

कोकणातली जमीन फारशी सुपीक नसली, तरी फळांच्या बाबतीत हा भाग समृद्ध आहे. रत्नागिरी जिल्ह्यात आंबा व काजू यांचे उत्कृष्ट व भरपूर पीक येते. ठाणे जिल्ह्यात केळी व चिकू विपुल होतात. नारळ, सुपारी, ही फळे कोकणात भरपूर होतात. देशावर अनेक जिल्ह्यांत आंबे, केळी, फणस, पेरू व द्राक्षे पुष्कळ होतात. नागपूर, अमरावती व वर्धा या भागात संत्र्यांचे अमाप पीक येते. भाजीपाल्याचे असंख्य प्रकार महाराष्ट्रात सर्वत्र पिकतात.

पावसाच्या भिन्न प्रमाणानुसार निरनिराळ्या भागांत वेगवेगळ्या प्रकारची जंगले आढळतात. सातपुडा व सह्य पर्वतराजीत दाट जंगले असून, त्यांत हिरडा, मोह, पांगारा, आपटा, पळस, चिंच, सावर, धामण, कवठ, बेल, कडुनिंब, धावडा, अंजन, ऐन, बहावा, बेहेडा, शिसवी, इ. मोठे वृक्ष असतात. कोकणच्या प्रदेशात नारळी, पोफळी व बांबूही विपुल आढळतात. महाराष्ट्राच्या पूर्व भागातील बराच प्रदेश काटेरी झाडांच्या जंगलांनी व्यापला आहे. बाभळीच्या जातीची झाडे त्यांत असतात. चांदा जिल्ह्यात मात्र घनदाट जंगल असून, त्यात सागवान, बांबू, धावडा, अंजन, हिरडा, टेंभुर्णी वगैरे अनेक प्रकारची उपयुक्त झाडे विपुल आहेत.

महाराष्ट्रातली बहुतेक शेती जून ते सप्टेंबर या चार महिन्यांतील अनियमित पडणाऱ्या पावसावर अवलंबून आहे व जमीन विशेष सुपीक नाही. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्याला पोटापुरेसे अन्न त्याच्या शेतातून मिळत नाही. शेतमालाचे उत्पादन वाढविण्यासाठी खते, चांगले बी-बियाणे, पाटबंधारे वगैरे उपाय करूनही ते फारसे यशस्वी होत नाहीत. कारण कधी पाऊस कमी पडतो, तर कधी जास्त पडतो; नवे नवे रोग पिकांचा नाश करतात. बहुतेक शेतकरी अज्ञानी व आळशी असल्यामुळे त्यांना शेतीच्या पद्धतीत सुधारणा करणे जमत नाही. अलिकडे हरितक्रांतीच्या प्रेरणेने व आकाशवाणीवरून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या शेतीविषयक माहितीच्या श्रवणाने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांत शेतीसुधारणेविषयी बरीच आवड निर्माण झाली आहे; पण एकंदरीत या क्षेत्रात महाराष्ट्र संपन्न नाही. काही मळेवाले मात्र ऊस, द्राक्षे, तंबाखू, हळद, इ. पदार्थांची भरघोस पिके काढून श्रीमंत झाले आहेत.

शेतीच्या अनुषंगाने करण्याजोगे काही पूरक उद्योग इथले शेतकरी आता करू लागले आहेत. भाजीपाला, दूध, फळे यांचे उत्पादन करून व तो माल शहरात पाठवून काही शेतकरी आपली आर्थिक स्थिती सुधारू लागले आहेत.

उद्योगधंदे – शेतीव्यतिरिक्त खेडेगावांत अनेक लहान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लहान उद्योग करणारे कारागीर आहेत. सुतार, लोहार, महार, मांग, चांभार, कुंभार, बुरुड, कासार, तांबट हे बलुतेदार शेतीची अवजारे, हत्यारे, दोर, मोटा, गाडगी, मडकी, भांडी वगैरे नित्योपयोगी वस्तू बनवून गावकऱ्यांना पुरवतात. विणकर, सोनार, शिंपी, परीट, न्हावी, इ. कारागीरही समाजाच्या अत्यावश्यक गरजा भागवतात. हे व्यवसाय फार पूर्वीपासून चालत आलेले आहेत. बहुतेक गावांत ते अजूनही थोडेफार चालू आहेत; पण यांत्रिक उत्पादनामुळे आता परिस्थिती पुष्कळ बदलली आहे. खेडी स्वयंपूर्ण राहिलेली नाहीत. कापड, भांडी, हत्यारे आणि अन्नधान्यही बाहेरून आणले जाते.

यांत्रिक युगात सुरू झालेला मोठा उद्योग म्हणजे कापडाच्या गिरण्या. त्या महाराष्ट्रात विशेषतः मुंबईत बऱ्याच आहेत. नागपूर, सोलापूर, पुणे, सांगली, इ. ठिकाणीही आहेत. पण मुंबईची दमट हवा आणि इतर सोयी या उद्योगाला उपकारक असल्यामुळे तिथे ६५ गिरण्या आहेत. भारतातली पहिली कापडगिरणी इ. स. १८५४ साली मुंबईत कावसजी नानाभाई दावर यांनी सुरू केली. गेल्या शंभर वर्षांत कापडधंदा खूपच वाढला असून, साध्या कापडाच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण झाला आहे. इतकेच नव्हे, तर सांप्रत कापडाची परदेशात निर्यातही केली जाते. हातमाग व यंत्रमाग यांवरही विपुल कापड बनवले जाते. हे माग सोलापूर, नासिक, नगर, ठाणे, खानदेश कोल्हापूर, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नांदेड या जिल्ह्यांत बरेच आहेत. पुणे, पैठण, येवले, औरंगाबाद, नांदेड, चांदा या ठिकाणी रेशमी व जरीचे कापड, तसेच कशिद्याचे काम केले जाते.

श्री. किर्लोस्कर यांनी महाराष्ट्रात प्रथम यंत्रोत्पादनाचा उद्योग सुरू केला. प्रथम त्यांनी लोखंडी नांगर, औते, रहाट, मोटा, पंप, इ. वस्तू वनवल्या. नंतर शेंगा फोडण्याचे यंत्र, चरक, खुर्च्या, पलंग, इ. वस्तूंची निर्मिती सुरू केली. त्यानंतर गिरण्यांचे माग आणि आता ऑईल इंजिनेही ते बनवू लागले आहेत. किर्लोस्करांच्या मागोमाग कूपर यांनीही शेतीची यंत्रसामग्री वनवण्याचा कारखाना काढला. सांप्रत महाराष्ट्रात असे अनेक लहान मोठे कारखाने असून, त्यांत विविध प्रकारची यंत्रे व मोठ्या यंत्रांचे सुटे भाग तयार होतात. चाकू, कात्र्या, सुरे, इ. लहान हत्यारे व इतर संसारोपयोगी वस्तू बनवण्याचे काही कारखानेही निघाले आहेत.

पुणे, नासिक व सांगली ही ठिकाणे तांब्यापितळेच्या भांड्यांविषयी प्रसिद्ध आहेत. तांबटांचा हा घरगुती धंदा फार पूर्वीपासून चालू आहे. यांत्रिक पद्धतीने भांडी बनवण्याचे कारखाने सुरू झाल्यामुळे हा घरगुती धंदा आता बसत चालला आहे. मुंबईत असे कारखाने बरेच आहेत.

काचेच्या वस्तू बनवण्याचे कारखाने तळेगाव, ओग[ळेवाडी], नागपूर, कांदिवली व मुंबई येथे आहेत. तळेगावचा कारखाना इ. स. १९०८ मध्ये सुरू झाला. तिथे [...] बांगड्या, बरण्या, चिमण्या, वगैरे विविध वस्तू [...] ओगलेवाडी येथे कपबश्या, बरण्या तयार होतात, तसेच कंदिल व स्टोव्हही होतात. कांदिवलीच्या कारखान्यात [...] तयार होतात. एनॅमलच्या वस्तू बनवण्याचे बरेच [...] आता निघाले आहेत. चिनीमातीच्या भांड्यांचा [...] नागपूरला आहे. विविध प्रकारच्या काचसामानाची [...] करण्याचा व्यवसाय महाराष्ट्रात खूपच विस्तारलेला [...]

आगपेट्या बनवण्याचे कारखाने कुर्ला, बोरिवली, अंधेरी, सांताक्रूझ, अंबरनाथ, औरंगाबाद व नागपूर येथे [...] कागद बनवण्याचे कारखाने मुंबई, पुणे व नागपूर येथे [...] पूर्वी जुन्नर, एरंडोल, औरंगाबाद, दौलताबाद, इ. [...] हातांनी कागद बनवण्याचा उद्योग चालत असे. तो [...] उत्कृष्ट असल्यामुळे व्यापारी व सावकार यांना फार [...] होता. आता पुठ्ठा तयार करण्याचा कारखाना [...] निघाला आहे.

महाराष्ट्रात साखरेचे कारखाने बरेच असून, विपुल[...] वर साखरनिर्मिती होते. साखरेच्या मळीपासून मद्य[...] करण्याचे कारखानेही आता सुरू झाले आहेत. [...] होतो, तिथेच गूळ तयार केला जातो. हा घरगुती [...] पासून असंख्य ठिकाणी चालू आहे. कोल्हापूरचा गूळ [...] प्रसिद्ध आहे. साखर व गूळ हे पदार्थ महाराष्ट्रा[...] प्रांतांत निर्यात केले जातात.

तंबाखूपासून होणारे पदार्थ म्हणजे विडी, [...] तपकीर. त्यांचे कारखाने महाराष्ट्रात सर्वत्र, विशेषतः पुणे, अहमदनगर, नासिक, कोल्हापूर व सोलापूर या [...] आहेत.

शेंगदाणे, करडी, तीळ, इ. पदार्थांचे तेल काढ[...] सर्वत्र आढळतात. पण तेलाच्या गिरण्या मुंबई, वऱ्हाड, [...] नासिक, सोलापूर या भागांत बऱ्याच आहेत.

आयुर्वेदीय औषधांचा पहिला कारखाना पनवेल [...] १८७२ साली श्री. पुराणिक यांनी सुरू केला. त्यानं[तर] [...] कारखाने बरेच निघाले आहेत. इतर औषधांचे कार[खाने] [...] व पुणे येथे पुष्कळ निघाले आहेत.

रासायनिक पदार्थ तयार करण्याचे कारखाने मुख्य[...] आहेत. या क्षेत्रात अलिकडे पुष्कळ प्रगती झालेली [...] औषधी द्रव्ये, रंग व इतर पदार्थांची निर्मिती हो[...] तयार करण्याचे लहानमोठे कारखानेही पुष्कळ आहे[त].

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाराष्ट्रात वीज-उत्पादन खूप मोठ्या प्रमाणावर होते. वीज-निर्मिती मुख्यतः जलशक्तीने केली जाते; कारण ती



राजाभाई टॉवर – मुंबई

स्वस्तात भरपूर मिळते. खोपोली व राधानगरी येथील विद्युत्केंद्रे जुनी व प्रसिद्ध आहेत. कोयना-जलविद्युत्-प्रकल्पामुळे वीजनिर्मिती पुष्कळच मोठ्या प्रमाणावर होऊ लागली आहे. आणखी काही प्रकल्पही उभारण्यात आले आहेत. अलिकडे उष्णतेपासून व अणुशक्तीनेही वीज–निर्मिती सुरू झाली आहे. डिझेल तेल वापरूनही वीज उत्पन्न केली जाते. एकंदरीत हा एक प्रचंड उद्योग असून, त्यावर राज्यातील बहुतेक कारखाने अवलंबून आहेत. खेड्यापाड्यांतूनही सर्वत्र वीजपुरवठा करण्याच्या योजना आता कार्यान्वित झालेल्या आहेत.

याव्यतिरिक्त महाराष्ट्रात रबर व प्लॅस्टिक यांचे कारखाने, विटा तयार करणे, कातडी कमावणे व त्याच्या वस्तू बनवणे, निरनिराळी खते तयार करणे, दारुगोळा बनवणे, मिठागरे, मच्छिमारी, वोलपट, इ. असंख्य व्यवसाय जोमाने चालू आहेत.

खनिज द्रव्यांच्या बाबतीत महाराष्ट्र समृद्ध नसला, तरी काही द्रव्ये इथे विपुल प्रमाणात मिळतात. भंडारा व नागपूर या जिल्ह्यांत मँगेनीझ धातूच्या खाणी आहेत; चांदा, नागपूर, भंडारा, इ. जिल्ह्यांत कोळसा पुष्कळ सापडतो; रत्नागिरी, चांदा, नागपूर व भंडारा या जिल्ह्यांत लोखंड मिळते. कोल्हापूर, कुलाबा, सांगली, रत्नागिरी व ठाणे या भागांत बॉक्साइट आहे; यवतमाळ व चांदा या जिल्ह्यांत चुनखडी; रत्नागिरी व भंडारा जिल्ह्यांत क्रोमाइट; काही जागी इल्मेनाईट व युरेनियमचे साठेही सापडले आहेत.

प्रागैतिहासिक काल—महाराष्ट्रातील गोदावरी, प्रवरा, तापी, भीमा, कृष्णा, मुळा-मुठा, घोडनदी, इ. नद्यांच्या काठांवर जी उत्खनने झाली आहेत, त्यांतून विविध प्रकारची दगडी हत्यारे, रानटी पशूंची हाडे, मातीची भांडी, इ. अतिप्राचीन काळातील वस्तू प्राप्त झाल्या आहेत. त्यांच्या अभ्यासावरून या प्रदेशातील मानवाच्या प्राचीन वास्तव्यावर बराच प्रकाश पडतो. भूरचना, हत्यारांचे प्रकार, जंगली बैल, रानटी हत्ती व पाणघोडे, यांचे अवशेष यांचा अभ्यास करून पुराणवस्तुशास्त्रज्ञांनी असे अनुमान केले आहे, की एक ते दीड लाख वर्षांपूर्वी आदि-अश्मयुगीन मानव महाराष्ट्राच्या भूमीवर वावरत असला पाहिजे. तो कसा होता, ते सांगता येत नाही. कारण आतापर्यंत त्याचा एकही सांगाडा कोठेही मिळालेला नाही. मात्र त्याने हत्यारे बनवण्यास अयोग्य अशा बेसाल्ट दगडाची उत्कृष्ट हत्यारे बनवली होती, यावरून त्याची बुद्धिमत्ता ध्यानात येते. द्वितीय अश्मयुगातील मानवाची हत्यारेही महाराष्ट्रात पुष्कळ सापडली आहेत. ती अगदी वेगळ्या दगडाची व वेगळ्या पद्धतीने बनवलेली दिसतात; त्यावरून त्या काळातील मानवाचा बौद्धिक विकास झालेला समजतो. वीस हजार वर्षांपूर्वीच्या या मानवाने विविध प्रकारची लहान, पातळ, छिलक्यांची, टोकदार व धारदार हत्यारे बनवली. तो भटके, शिकारी जीवन जगत होता.

त्यानंतरच्या ताम्र – पाषाणयुगातला मानव शेती करून व घरे उभारून राहू लागला होता. त्याच्या वसाहती नासिक, जोर्वे, नेवासे, चांडोली, सोनगाव, इनामगाव, दायमाबाद, प्रकाशे, सालवडा, भाडणे, बहुरूपे, वहाळ, इ. ठिकाणी आढळल्या आहेत. त्या वसाहतींचा काळ सन पूर्व. १५०० च्या आसपासचा असावा. नदीच्या काठी लहान झोपड्या बांधून गावे वसवलेली असावी. शेतीबरोबर पशुपालन व संवर्धनही सुरू झाले. धान्य शिजवून खाण्याची कल्पना याच काळातली असून, त्यासाठी मानवाने मातीची भांडी बनवली. रांजण, परात, वाडगा, इ. त्या काळातली भांडी सापडली असून, त्यांवर हरीण, मोर, वाघ यांची चित्रेही काढलेली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेत. त्याच काळातं मानवाला धातूचा शोध लागला आणि तो तांब्याची हत्यारे बनवू लागला. मृतांना राहत्या घरांतच पुरण्याची पद्धती या कालखंडात दिसून येते. प्रेताजवळ भांडी-कुंडी आणि गळ्यात भिन्न भिन्न मण्यांच्या माळा अशा वस्तू ठेवण्याची पद्धत होती.

त्या काळातला मानव गहू, तांदूळ, ज्वारी, डाळ, इ. धान्ये वापरीत असे. त्याचबरोबर मिठात घालून वाळवलेले डुकराचे मांस, गोमांस, नदीतले मासे, कासव आणि काही सरपटणारे प्राणी यांचाही समावेश त्याच्या आहारात होत असावा.

त्या काळातील मृतांचे सांगाडे सापडले आहेत, त्यावरून ते वरवर पाहता आदिवासी लोकांसारखे दिसत असले, तरी त्यांची भौतिक प्रगती पुष्कळ झालेली होती, यात काही शंका नाही. मात्र त्यांच्या आध्यात्मिक किंवा मानसिक अवस्थेविषयी काही कल्पना करता येत नाही. मृतांबरोबर गाडगी, मडकी, खेळणी, दागिने, इ. वस्तू पुरण्याच्या रूढीवरून, मरणोत्तर जीवनावर त्यांची श्रद्धा असावी, एवढेच अनुमान करता येते. त्यांचा धर्म जादूटोण्याच्या पायरीवरचा असावा.

सनपूर्व १००० च्या सुमारास ताम्रपाषाणयुगाचा अंत झाला. त्या युगातील वसाहतींचा नाश कसा झाला, ते सांगता येत नाही. त्यानंतरच्या ४–५ शे वर्षांच्या काळात महाराष्ट्रात वसती झाल्याचा पुरावा मिळत नाही. त्यानंतर लोहयुग सुरू झाले. त्यात प्रथम भाजलेल्या विटांची घरे व तटबंदीची शहरे निर्माण झाली. त्याच वेळी चिन्हाहत (पंचमार्क) नाणी सुरू झाली. मुख्य बदल म्हणजे लोखंडाची हत्यारे वापरात आली. या लोहयुगापूर्वीची महाराष्ट्रातली संस्कृती शेजारच्या प्रांतातील संस्कृतीपेक्षा कोणत्याही प्रकारे निराळी नव्हती, असे डॉ. शां. भा. देव यांनी प्रतिपादले आहे. त्यानंतर महाराष्ट्राची वेगळी संस्कृती विकास पावली असे दिसते.

दंडकारण्य – प्राचीन संस्कृत वाङ्मयात विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील प्रदेशाला दक्षिणापथ असे नाव दिलेले आढळते. त्याच्या सीमा भिन्न भिन्न ग्रंथांत व कालखंडांत निरनिराळ्या असल्याचे दिसून येते याच प्रदेशाला दंडकारण्य असेही म्हणत. कालांतराने केवळ सांप्रतच्या महाराष्ट्र प्रदेशालाच ही नावे प्राप्त झाली, असे काही विद्वानांचे मत आहे. विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील विदर्भ वगैरे देशात आर्यसंस्कृतीचा प्रसार अगस्त्यमुनीने सुरू केला. अत्यंत प्राचीन काळी परशुरामाने सिंधुसागराला मागे हटवून सह्य पर्वताच्या पश्चिमेला नवी भूमी निर्माण केली व तिथे आर्यसंस्कृतीचा प्रसार केला, अशी पौराणिक कथा आहे. रामायणकाली दंडकारण्यात राक्षस, वानर, इ. लोकांची वसती होती. ते मानवच होते; पण त्यांची संस्कृती वेगळी होती. आर्य ऋषी दंडकारण्यात आश्रम बांधून राहू लागले होते आणि राक्षस लोक त्या ऋषींच्या यज्ञकर्मांत विघ्न आणीत होते. पुढे दाशरथी राम चौदा वर्षांच्या वनवासा-साठी दंडकारण्यात गेला असताना त्याचा व राक्षसांचा संघर्ष होऊन अनेक राक्षस मारले गेले. शेवटी रामाने राक्षससम्राट रावणाचा वध केल्यामुळे राक्षसांचे वर्चस्व नष्ट झाले व आर्य-संस्कृतीचा प्रसार निर्विघ्नपणे होऊ लागला.

महाभारतकाली दंडकारण्यात काही वसती झालेली असावी. विदर्भ, अश्मक, मूलक, कुंतल, गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र, इ. प्रदेशांचा उल्लेख महाभारतात आहे. त्या प्रदेशांत आर्य लोकांनी विशेषत: यादव वंशाच्या भिन्न भिन्न शाखांनी राज्ये स्थापिली होती. रामायण, महाभारत व पुराणे यांत मध्य व दक्षिण भारतातील बहुतेक सर्व राजघराण्यांचा उगम यादव वंशातूनच झाल्याचे म्हटले आहे. अनार्य, द्रविड व आदिवासी लोकांना आर्यसंस्कृतीत समाविष्ट करण्याचे श्रेय यादव-वंशातील लोकांनाच आहे. काही संशोधकांच्या मते आर्य व द्रविड या दोन्ही वंशाच्या लोकांची गाठ प्रथम दंडकारण्यातच पडली. तिथे त्यांचा मोठा संघर्ष झाला आणि शेवटी सांस्कृतिक समन्वय होऊन महाराष्ट्रीय समाज निर्माण झाला. पौराणिक कथांचा कालक्रम निश्चित सांगता येत नाही; पण ऐतिहासिक दृष्टीने विचार केल्यानंतर असे दिसते, की महाराष्ट्रात आर्यांची वसाहत पाणिनीच्या नंतरच्या काळात झाली असावी.

नामाभिधान – इतिहासाचार्य चिं. वि. वैद्य यांच्या मते सनपूर्व ६०० च्या सुमारास आर्य लोक दक्षिणेत आले आणि गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र, इ. वसाहती करून स्थायिक झाले. अशोकाच्या शिलालेखात रास्टिक लोकांचा उल्लेख आढळतो, ते हेच लोक होत. आंध्रभृत्य म्हणजेच सातवाहन यांच्या साम्राज्यात ते एका सत्तेखाली आले आणि त्यांचे मोठे राष्ट्र निर्माण झाले. रा. गो. भांडारकर यांच्या मते दक्षिणेतील रठ्ठ लोकांनाच अशोकाच्या शिलालेखांत रास्टिक म्हटलेले असून, त्याचेच संस्कृत रूप राष्ट्रिक असे झाले. भोज हे लोक ज्याप्रमाणे आपणांस महाभोज म्हणवू लागले, तसे रठ्ठाचे महारठ्ठ व राष्ट्रिकचे महाराष्ट्रिक झाले.

सातवाहनांच्या काळातले शिलालेख नाणेघाट, भाजे, कार्ले, बेडसे या ठिकाणी उपलब्ध झाले आहेत. त्यांत 'महारठि' 'महारठिनी' हे शब्द आढळतात. हे शब्द महारठ्ठ देशातील लोकांचे वाचक आहेत. सनपूर्व तिसऱ्या शतकांत बौद्ध भिक्षू मोग्गलीपुत्त तिस्स याने आपले शिष्य महिसमंडल, बनवासी, अपरांत, महारठ्ठ, इ. प्रदेशांत पाठवले होते, असे महावंस या ग्रंथावरून कळते. यावरून त्या काळी या प्रदेशाला महारठ्ठ हे नाव होते, असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सिद्ध होते. महाराष्ट्र हे त्याचेच संस्कृत रूपांतर आहे. वररुची, वात्स्यायन, भरतमुनी यांच्या ग्रंथांत महाराष्ट्र हे नाव आढळते. त्यापूर्वीच्या संस्कृत ग्रंथांत महाराष्ट्राचा उल्लेख आलेला नाही. म्हणजे सुमारे दोन हजार वर्षे या प्रदेशाचे महाराष्ट्र हे नाव प्रचलित आहे, असे दिसते. मार्कंडेय, वायू व ब्रह्म या पुराणांत महाराष्ट्र हे देशनाम सापडते. सागर जिल्ह्यातील एरण या गावी इ. स. ३६५ मध्ये स्तंभावर कोरलेला एक शिलालेख आहे. श्रीधरवर्म्याचा सेनापती सत्यनाग याने तो स्तंभ उभारलेला असून, त्या शिलालेखात त्याने स्वतःला महाराष्ट्रप्रमुख असे म्हटले आहे. महाराष्ट्र देशाचा उल्लेख असलेला हा आद्य कोरीव



वांद्रे कॅसलचे प्रवेशद्वार–१८९१

लेख होय. त्यानंतर वराहमिहिर, दंडी व राजशेखर यांच्या संस्कृत ग्रंथांत महाराष्ट्राचा उल्लेख पुष्कळ वेळा आलेला आहे. आज आपण ज्याला महाराष्ट्र म्हणतो, त्या सर्व भूप्रदेशाला एक अभिधान प्राप्त होण्यापूर्वीपासूनच त्याच्या भिन्न भिन्न घटक विभागांत महाराष्ट्र संस्कृतीची जोपासना होत होती. विदर्भ, अश्मक, कुंतल, अपरान्त, गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र ही त्या विभागांची नावे प्राचीन संस्कृत वाङ्मयात वारंवार आलेली आहेत. विदर्भाचा प्रथम उल्लेख बृहदारण्यकोपनिषदात सापडतो. आर्य लोक दक्षिणेत आले, ते प्रथम विदर्भ व अपरान्त या प्रांतांत आले. विंध्य पर्वताच्या पश्चिमेकडून भृगू ऋषी अपरान्तात व अगस्त्य ऋषी पूर्वेकडून विदर्भात उतरला. रामायण व महाभारत या ग्रंथांत विदर्भाचा उल्लेख अनेक वेळा आलेला आहे. त्यानंतर अश्मक या गोदातीरावरील प्रदेशात वसाहत झाली. प्रतिष्ठान (पैठण) ही त्याची राजधानी होती. म. म. काणे यांच्या मते खानदेश, नासिक व नगर या जिल्ह्यांचा अंतर्भाव अश्मकात होत असे. चिं. वि. वैद्यांच्या मते कुंतल हा कृष्णेच्या उगमाजवळचा देश होय. अपरान्त म्हणजे कोकण हा प्रदेश प्राचीन काळापासून विदर्भाइतकाच प्रसिद्ध आहे. महाभारत, धर्मसूत्रे व अशोकाचे शिलालेख यांत अपरान्ताचे उल्लेख आढळतात. शूर्पारक ही त्याची राजधानी होती. गोपराष्ट्र म्हणजे नासिकच्या भोवतालचा प्रदेश होय. मल्लराष्ट्र हे त्याच्या दक्षिणेला होते. या सर्व प्रदेशांत प्राकृत भाषा प्रचलित झाली आणि त्या सर्वांचा मिळून एक प्रदेश निर्माण झाला. त्यालाच कालांतराने महाराष्ट्र हे नाव प्राप्त झाले.

राजकीय इतिहास – भाषेमुळे पृथगात्म झालेला समाज आपली स्वतंत्र अशी राजसत्ता निर्माण करू शकला नाही, तर त्याच्या अस्मितेला स्थिरता येत नाही व त्याच्या संस्कृतीची जोपासनाही होऊ शकत नाही. सनपूर्व ३०० च्या सुमारास महाराष्ट्री भाषेमुळे महाराष्ट्रसंस्कृती निर्माण झाली आणि सुदैवाने त्याच वेळी या प्रदेशात एक प्रभावी व बलशाली राजसत्ता अवतरली. ती सत्ता सातवाहन राजवंशाची होय.

सातवाहन – सम्राट अशोकाची सत्ता सर्व महाराष्ट्रावर नसावी, असे डॉ. केतकरांचे मत आहे. विदर्भ व शूर्पारक (सोपारा) हे प्रदेश मात्र त्याच्या साम्राज्यात होते. त्याच्या मृत्यूनंतर म्हणजे सनपूर्व २३५च्या सुमारास महाराष्ट्रात प्रतिष्ठान नगरीत सातवाहन वंशाची सत्ता स्थापन झाली. त्या वंशाचा मूळ पुरुष श्रीसातवाहन याचा उल्लेख पुराणांत किंवा शिलालेखांत आढळत नाही. १९४५ साली त्याच्या नावाची नाणी सापडल्यामुळे, त्याचे अस्तित्व सिद्ध झाले व कालही निश्चित करता आला. पुराणांत या वंशाला आंध्रभृत्य म्हटले आहे. पण सातवाहनांचे प्रारंभीचे सर्व शिलालेख व नाणी महाराष्ट्रातच सापडली आहेत. हे सर्व शिलालेख महाराष्ट्री भाषेत आहेत व गाथासप्तशती हा हाल सातवाहनाचा ग्रंथही महाराष्ट्रीमध्येच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. त्यावरून सातवाहन राजवंश महाराष्ट्रीय होता, हे निश्चित होत. तो वर्णाने क्षत्रिय होता, असे काही पंडितांचे मत आहे. या वंशाने सनपूर्व २३५ ते इ. स. २२५ पर्यंत सुमारे साडेचार शतके अखंड राजसत्ता चालविली. त्यातली पहिली २०० वर्षे त्याचे राज्य अत्यंत वैभवशाली होते. त्यानंतर थोडा पडता काळ आला; शकांनी महाराष्ट्राचा काही भाग जिंकून तिथे सुमारे ५० वर्षे राज्य केले. पण गौतमीपुत्र सातकर्णी याने शकांचा निःपात करून आपले साम्राज्य व वैभव वाढवले. यवन, शक व कुशाण यांच्या आक्रमणांना यशस्वी प्रतिकार करून सातवाहन राजांनी भारतीय संस्कृतीचे रक्षण केले. त्या विजयाचे स्मृतिचिन्ह म्हणूनच शक कालगणनेला शालिवाहन हे नाव मिळाले. सातवाहनांचेच शालिवाहन हे दुसरे नामाभिधान होते. या वंशाची साम्राज्यसत्ता आंध्र, कलिंग, माळवा, गुजरात, सौराष्ट्र व राजस्थान या प्रदेशांवर प्रस्थापित झाली होती. काही काळ ती मगधापासून दक्षिणेला कावेरीपर्यंत पसरली होती. सातवाहन राजे वैदिक धर्माचे अभिमानी व यज्ञकर्ते होते. त्यांनी विद्याकलांचे व कृषिव्यापाराचे संवर्धन करून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा पाया घातला.

सातवाहनांच्या नंतर महाराष्ट्रावर नंदिवर्धन व वत्सगुल्म येथील वाकाटक, बादामीचे चालुक्य, मान्यखेटचे राष्ट्रकूट, कल्याणीचे चालुक्य व देवगिरीचे यादव अशा पाच राजघराण्यांनी राज्य केले. इ. स. १३१८ साली यादवांची सत्ता नष्ट झाली. सातवाहनांच्या सत्तेच्या आरंभापासून यादवांच्या अंतापर्यंत सुमारे पंधराशे वर्षांच्या कालखंडात या प्रदेशात स्वराज्य व साम्राज्य नांदत होते.

वाकाटक – या घराण्याचा मूळ पुरुष विंध्यशक्ती हा विष्णुवृद्धगोत्री ब्राह्मण असून, तो बहुधा सातवाहनांचा एक सेनाधिकारी असावा. सातवाहनांचे साम्राज्य विलयाला गेल्यावर त्याने इ. स. २५० च्या सुमारास विदर्भात स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्याच्या घराण्याने इ. स. ५५० पर्यंत म्हणजे सुमारे तीनशे वर्षे राज्य केले. उत्तरेत बुंदेलखंडापासून दक्षिणेस हैदराबादपर्यंत वाकाटक साम्राज्याचा विस्तार झाला होता. कोसल, मेकल, मालव, कुंतल, अश्मक, मूलक हे सर्व प्रदेश त्यात समाविष्ट होते. वाकाटकांचा शेवटचा राजा हरिषेण याचे राज्य उत्तरेस माळव्यापासून दक्षिणेस कुंतलपर्यंत आणि गंगासागरापासून सिंधुसागरापर्यंत पसरले होते.

चालुक्य – त्यानंतर महाराष्ट्रावर बादामीच्या चालुक्यांची सत्ता प्रस्थापित झाली. जयसिंह हा चालुक्यांचा मूळ पुरुष होय. चालुक्य हे मानव्यगोत्री क्षत्रिय घराणे होते. त्याने इ. स. ५५० पासून इ. स. ७५३ पर्यंत राज्य केले. नर्मदेपासून थेट रामेश्वरापर्यंत त्याचे प्रभुत्व प्रस्थापित झाले होते. पांड्य, पल्लव, केरळचे राजे, गंग, कदंब, कोकणातले मौर्य या चालुक्यांनी आपले मांडलिक बनवले होते. चालुक्य राजा पुलकेशी याने कनोजचा सम्राट हर्षवर्धन याचाही पराभव होता.

राष्ट्रकूट – चालुक्यांच्या नंतर राष्ट्रकूटांचा उदय त्या वंशाचा संस्थापक दंतिदुर्ग हा चालुक्यांचा एक होता. इ. स. ७५४ साली त्याने शिरपूर, रायपूर व जवळील रामटेक येथील राजांचा पराभव करून तिथे स्वतंत्र राज्य स्थापले. लवकरच खानदेश, नासिक, पुणे, या भागांत त्याचा विस्तार झाला. या घराण्यात गोविंद (व कृष्ण (३ रा) हे राजे महापराक्रमी निघाले. पांड्य, पल्लव, चेर, गंग, पूर्व चालुक्य (वेंगी) या सर्व राजांना त्यांनी रामेश्वरपर्यंत आपले साम्राज्य विस्तारले आणि गु माळवा, ओडिसा हे प्रदेशही जिंकले. राष्ट्रकूटांनी कनोज आपली सेना हिमालयापर्यंत नेऊन भिडवली. या पराक्र राष्ट्रकूटांना मौर्य व गुप्त या वंशांइतकी थोरवी प्राप्त

चालुक्य – इ. स. ९७३ च्या सुमारास राष्ट्रकूटांचा होऊन चालुक्य घराणे पुन्हा उदयाला आले. कल्याणी त्याची राजधानी होती. हे घराणे बादामीच्या चालुक्यां असावे. या घराण्यातील राजांनी सर्व दक्षिण जिंकली आणि बंगाल, आसाम, मगध, कनोज, नेपाळ या प्रदे स्वाऱ्या करून त्यांच्या राज्यांनाही नमवले होते. ही योक्ती असावी; पण ते राजेही बादामीच्या चालुक्यां पराक्रमी होते, यात शंका नाही. त्यांनी इ. स. ११८ महाराष्ट्रावर राज्य केले.

यादव – त्यानंतर देवगिरीचे यादव सत्तारूढ झाले. हे पराक्रमी होते. दक्षिणेस कावेरीपर्यंत त्यांनी आपले सा विस्तारले होते आणि उत्तरेस लाट (गुजरात), माळ प्रदेशांवरही आपले अधिराज्य स्थापले होते. पण इ. स. १४ व्या शतकाच्या प्रारंभी मुसलमानांनी यादवांची सत्ता केली आणि महाराष्ट्रावर मुस्लिम राज्य सुरू झाले.

सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट हे राजवंश राष्ट्रीय नव्हते, असे इतिहासपंडितांचे मत होते. पण पन्नास वर्षांत नाणी, शिलालेख, ताम्रपट, इ. साधने प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे, इतिहाससंशोधनाला नवी मिळाली असून, पंडितांनी वेगळे निष्कर्ष काढले आहेत. राष्ट्रियत्वाचा निश्चय करताना, हे राजवंश मुळात कोठून याचा विचार न करता, ते कोणत्या भूमीला स्वराज्य त्यांची कर्मभूमी कोणती, ते कोणाला स्वजन मानीत,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रदेशाला साम्राज्य मानीत हा निकष लावला पाहिजे. या दिशेने इतिहासाचा सखोल अभ्यास करून डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी असे प्रतिपादले आहे, की सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट व चालुक्य हे राजवंश महाराष्ट्रीयच होते.

सातवाहन ते यादव या सुमारे १५०० वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्रात राजसत्ताक शासनव्यवस्था प्रचलित होती. लोकमताला त्या क्षेत्रात स्थान नव्हते. मात्र राजसत्ता सर्वस्वी अनियंत्रित होती असे नाही. तिच्यावर धर्मशास्त्राचे नियंत्रण होते आणि ते अत्यंत प्रभावी होते. या कालखंडात ५०–६० राज्यकर्ते होऊन गेले आणि त्यांतील बहुसंख्य राजे सुविद्य, सुसंस्कृत व प्रजाहितदक्ष होते, असे उपलब्ध पुराव्यावरून ध्यानात येते. त्यांनी धर्मशास्त्रात सांगितलेली सर्व कर्तव्ये कसोशीने पाळून प्रजेला सुखी ठेवण्याचा प्रयत्न केला, राज्यात समृद्धी निर्माण केली व महाराष्ट्रसंस्कृतीचा विकास घडवून आणला.

शिलाहार – या घराण्याच्या तीन शाखा होत्या. एक दक्षिण कोकणात, दुसरी उत्तर कोकणात व तिसरी घाटमाथ्यावर कऱ्हाड–कोल्हापूरच्या भागात राज्य करीत होती. ही राज्ये राष्ट्रकूटांच्या साम्राज्यातील मांडलिक राज्ये होती. ती यादवांच्या वेळी नष्ट झाली.

मुसलमानी सत्ता– इ. स. १२९६ साली अलाउद्दीन खिलजीने रामदेवराव यादवाचा पराभव करून त्याला आपला मांडलिक बनवले. त्यानंतर यादवांना आपले स्वातंत्र्य परत मिळवता आले नाही. रामदेवरावाचा पुत्र शंकरदेव याने १–२ वर्षे तसा प्रयत्न केला; पण अलाउद्दिनाचा सेनापती मलिक काफूर याने इ. स. १३१३ साली त्याला ठार मारून देवगिरीचे राज्य खालसा केले.मुसलमानांना असे यश मिळण्याचे कारण हे,की महाराष्ट्रातले राज्यकर्ते दुर्बल व बेसावध होते. राज्य सांभाळण्यासाठी अवश्य ते क्षात्रतेज, राजनीती, सावधपणा, शौर्य, धैर्य, आक्रमणशीलता यांपैकी कोणताही गुण त्यांच्या ठायी उरला नव्हता. दिल्लीची सुलतानी सत्ता त्या काळी फारशी प्रबल नव्हती आणि सुलतानांचे सरदारही विशेष पराक्रमी नव्हते. दिल्लीत व इतरत्रही नित्य बंडाळ्या चालू होत्या. तरी देखील महाराष्ट्रात कोणीही आपले स्वातंत्र्य पुन्हा मिळवू शकले नाही. तुगलक सुलतानांचे साम्राज्य बरेच मोठे होते; पण त्यातील अनेक प्रांतांत बंडे उद्भवली. महाराष्ट्रातही तसेच बंड होऊन बहमनी राज्याची स्थापना झाली.

जाफरखान किंवा हसन गंगू नावाच्या एका सरदाराने हे राज्य इ. स. १३४७ साली स्थापन केले. तो पूर्वी गंगू नामक ब्राह्मणाच्या पदरी गुलाम होता. त्याच सुमारास राजस्थानातील सिसोदिया वंशातील सजर्नसिंह व क्षेत्रसिंह नामक दोन तरुण दक्षिणेत आले होते. त्यांनी राज्यस्थापनेत जाफरखानाला साहाय्य केले आणि त्याबद्दल त्याच्याकडून दौलताबादेजवळ दहा गावांची जहागिरी व सरदारी मिळवली. जाफरखान मात्र दक्षिणेचा सुलतान झाला. त्याची राजधानी गुलबर्गा येथे होती.

बहमनी सुलतानांपैकी पहिले चार-पाच सुलतान पराक्रमी व कर्तबगार होते. बाकीचे बहुतेक नादान, व्यसनी व जुलमी होते. इ. स. १४५८ नंतर महमूद गवान नावाच्या सरदाराने उत्तम कारभार केला. पण इ. स. १४८१ साली त्याचा खून झाला. त्यानंतर लवकरच बहमनी राज्याचे पाच तुकडे झाले. इ. स. १४८४ मध्ये वऱ्हाडात इमादशाही सुरू झाली. इ. स. १४८५ साली अहमदनगरची निजामशाही, इ. स. १४८९ साली विजापूरची आदिलशाही, इ. स. १४९२ साली बीदरची बरीदशाही व १५१२ मध्ये गोवळकोंड्याची कुतुबशाही स्थापन झाली. ही सर्व राज्ये शेवटी मोगल बादशहांनी जिंकून आपल्या साम्राज्याला जोडली.

बहमनी राज्यातील मुसलमानांत दक्षिणी व परदेशी हे वांशिक भेद होते, तसेच शिया व सुन्नी हे धार्मिक भेदही होते. त्यांचे आपसांतील वैर बहमनीसत्तेच्या नाशाला कारणीभूत झाले. त्या



कुलाब्याची दांडी

राज्यात सतत चाललेल्या बंडाळी व कत्तली यांमुळे सर्वच प्रजा हैराण झालेली असे. हिंदू प्रजेची स्थिती तर फारच हलाखीची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होती. पक्षपात, अन्याय, लुटालूट, बलात्कार व कत्तली हेच हिंदूंच्या नशिबी होते, असे मुस्लिम इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे. काफरांचा उच्छेद करणे हाच बहमनी सुलतानांचा उद्देश होता. तो सफल व्हावा यासाठी त्यांनी उदंड सायास केले, जुलुम जबरदस्ती केली, जाळपोळ व लुटालूटही केली; मात्र हिंदूंचा उच्छेद करण्यात ते पूर्ण यशस्वी झाले नाहीत. मुसलमानांची सत्ता हळूहळू कमकुवत होत गेली आणि मराठ्यांची सत्ता महाराष्ट्रावर हळूहळू प्रस्थापित होऊ लागली.

मराठेशाही – बहमनी राज्यात व त्याच्या नंतर झालेल्या पाच शाही राज्यांत कित्येक मराठा सरदार वतनदार होते; पण बहमनी राज्यांचे लचके तोडून आपले स्वतंत्र हिंदू राज्य स्थापावे अशी हिंमत कोणालाही झाली नाही. किंबहुना तशी कल्पनाही कोणाला शिवली नाही. उलट सुलतानाची चाकरी इमानेइतबारे करून आपले वतन संभाळण्यातच सर्वांनी भूषण मानले. इमादशाही व निजामशाही स्थापन करणारे फत्तेउल्ला इमादशहा व अहंमद निजामशहा हे मूळचे ब्राह्मण होते. मुसलमान झाल्यानंतर ते स्वतंत्र राज्य स्थापू शकले. हिंदू समाजाचे कर्तृत्व त्या वेळी इतके लोप पावले होते, की थोर परंपरा सांगणारे सगळे पुरुष मंदिरे, मूर्ती, स्त्रिया, स्वधर्म व स्वसंस्कृती यांची विटंबना पाहत स्वस्थ बसले होते. काही मराठे सरदार निरनिराळ्या सुलतानांच्या हाताखाली खूप पराक्रम गाजवीत होते; ते त्यांचे आधारस्तंभच होते. पण लहरी सुलतान अशा सरदारांचा बिलकुल मुलाहिजा ठेवीत नसत. ते त्यांचा अपमान करीत, त्यांची वतने खालसा करीत किंवा मुसलमान सरदाराकडून त्यांचा नाशही करीत. शहाजीराजे भोसले हे सर्व मराठा सरदारांत पराक्रमी व कर्तबगार होते. त्यांनी आपली सगळी कर्तबगारी निजामशाही राखण्यासाठी खर्च केली. त्यांनी काही दिवस मोगलांची मनसबदारीही पत्करली होती. शेवटी निजामशाही नष्ट झाल्यानंतर ते आदिलशाहीच्या पदरी सरदार म्हणून राहिले. त्यांच्यासारख्या महापराक्रमी पुरुषाला स्वतंत्र राज्य स्थापणे कठीण नव्हते. पण ते आदिलशहासाठी दक्षिणेतली सर्व हिंदू राज्ये बुडवण्यास कारणीभूत ठरले.

स्वराज्य स्थापन करण्याची बुद्धी प्रथम शहाजीराजांचा पुत्र शिवाजी याला झाली. त्याने वयाच्या १६व्या वर्षीच मावळातील मराठा तरुणांची संघटना करून सैन्य उभारले आणि हळूहळू तोरणा, राजगड, पुरंदर, लोहगड, इ. किल्ले हस्तगत केले. नंतर त्याने जावळी, कोल्हापूर, मुधोळ, सावंतवाडी, इ. प्रांत जिंकून घेतले. इकडे आदिलशाही व तिकडे दिल्लीची मोगल बादशाही या बलाढ्य शत्रूंशी अत्यंत हुशारीने सामने करून शिवाजीराजांनी महाराष्ट्रात स्वराज्य स्थापिले. त्या कामात समर्थ रामदासस्वामींचा त्यांना आशीर्वाद लाभला. इ. स. १६७४ साली शिवाजीराजांनी स्वतःला रायगडावर राज्याभिषेक करवून घेतला आणि छत्रपती ही पदवीही धारण केली.

शिवाजीमहाराजांनी नंतरच्या पाच-सहा वर्षांत स्वराज्याचा विस्तार केला. त्यांच्या नंतर संभाजीला ते स्वराज्य राखता आले नाही. औरंगजेब बादशाहा स्वतः प्रचंड फौजेनिशी दक्षिणेत आला व त्याने इ. स. १६८९ साली संभाजीला पकडून ठार मारले. त्यानंतर त्याचा भाऊ राजाराम छत्रपती झाला व सर्व मराठे सरदारांनी गनिमी कावा करून मोगली फौजांना हैराण केले. औरंगजेब मराठ्यांना जिंकू शकला नाही. शेवटी इ. स. १७०७ साली त्याचा अंत झाला. त्यानंतर संभाजीचा मुलगा शाहू मोगलांच्या कैदेतून सुटून आला व छत्रपती झाला. बाळाजी विश्वनाथ भट याला त्याने पेशवेपद दिले. या पेशवे घराण्यात एकामागून अनेक कर्तबगार पुरुष निपजले व त्यांनी पेशवे म्हणून मराठी राज्याचा कारभार केला. इ. स. १७५९ पर्यंत पेशव्यांनी मराठी साम्राज्याचा खूप विस्तार केला होता. पानिपतावरील युद्धात इ. स. १७६१ मध्ये मराठ्यांचा दारुण पराभव झाला. तरीही थोरले माधवराव पेशवे, महादजी शिंदे आणि नाना फडणीस यांनी पुन्हा मराठ्यांची साम्राज्यसत्ता प्रस्थापत केली. इ. स. १७९५ च्या सुमारास मराठी साम्राज्य सत्तेच्या आणि वैभवाच्या शिखरावर होते. पण त्यानंतर गृहकलह, दुही, निष्ठाशून्यत्व, व्यापक दूरदृष्टीचा अभाव आणि इंग्रजांचे आक्रमण यामुळे मराठी सत्ता नष्ट झाली. इ. स. १८१८ पासून भारतावर इंग्रजांची सत्ता सुरू झाली ती इ. स. १९४७ पर्यंत चालू राहिली. इ. स. १९५६ मध्ये संपूर्ण महाराष्ट्र व संपूर्ण गुजरात यांचे मिळून विशाल मुंबईराज्य स्थापण्यात आले होते. परंतु स्वतंत्र संयुक्त महाराष्ट्रासाठी जे तीव्र आंदोलन झाले, त्यामुळे १ मे १९६० पासून सध्याचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले.

धार्मिक इतिहास – आर्य लोकांनी महाराष्ट्रात वसाहती स्थापून यज्ञप्रधान वैदिक धर्माचा प्रसार केला. त्या वेळी इथे वस्ती करून असलेल्या आर्येतर लोकांचा धर्मही त्यांनी काही अंशी स्वीकारला असावा. वैदिक देवतांच्या उपासनेबरोबर समाजात नागपूजा, वृक्षपूजा व भूतप्रेतपूजा यांनाही स्थान मिळाले. मात्र तरीही वैदिक धर्मच प्रभावी राहिला. सातवाहन राजे वैदिक धर्माचे अभिमानी होते. त्यांनी अनेक यज्ञयाग केले. त्यांच्या लेखांत संकर्षण, वासुदेव, चंद्र, सूर्य, इंद्र, यम, वरुण, कार्तिकेय, पशुपती, गौरी, रुद्र, पार्वती, लक्ष्मी-नारायण, सरस्वती, कृष्ण या देवदेवतांना वंदन केलेले आहे. वाकाटकांच्या काळातही वैदिक यज्ञयाग पूर्ववत चालू राहिले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection,,Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रवरसेन याने अनेक यज्ञ केले. तो शिवभक्त होता. द्वितीय रुद्रसेन विष्णूचा भक्त होता. चालुक्य राजांनीही यज्ञ करून ब्राह्मणांना दक्षिणा दिल्याचे उल्लेख त्यांच्या कोरीव लेखांत आढळतात. ते शिव व विष्णू यांची उपासना करीत होते आणि स्मृतिपुराणोक्त व्रते करून दानधर्म आचरीत होते. राष्ट्रकूटांच्या काळी यज्ञसंस्था लुप्तप्राय झाली असावी. त्या वंशातील राजाने यज्ञ केल्याचा उल्लेख सापडत नाही. यादवांपैकी एका राजाने यज्ञ केल्याचा उल्लेख आढळतो. मोठाले यज्ञ होत नसले, तरी ब्राह्मण कुटुंबात पंचमहायज्ञ करण्याची प्रथा चालू होती. अग्निहोत्र करणाऱ्या ब्राह्मणाला पुष्कळ दाने मिळत होती. त्यावरून यज्ञसंस्था पूर्ण नष्ट झाली नव्हती, असे दिसते. तथापि स्मृति-पुराणोक्त धर्मातील कर्मकांडाला विशेष महत्त्व आले होते. पुराणोक्त व्रतवैकल्ये, तीर्थाटने, पूजाअर्चा या धर्मकृत्यांत बहुतेक लोक मग्न असत. निरनिराळ्या देवतांची मंदिरे बांधून त्यांत मूर्तींची प्रतिष्ठा करण्याची प्रथा खूपच वाढली होती. हळूहळू लोक यज्ञसंस्थेकडून भक्तिप्रधान पूजाधर्माकडे वळले आणि वैदिक धर्माचे रूपांतर भागवत धर्मात झाले.

इ. स. च्या प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रात शक वगैरे परकीय लोक आले, ते बहुतेक हिंदू झाले व शिव-विष्णूंची उपासना करू लागले. त्यांच्या शिलालेखावरून कळते, की त्यांनी देव-ब्राह्मणांना गाई, गावे, इ. दाने दिली; विहिरी, तळी, धर्मशाळा बांधल्या आणि तीर्थयात्राही केल्या.

महाराष्ट्रात बौद्ध पंथाचा प्रसार अशोकाच्या काळातच सुरू झाला होता. अनेक धर्मप्रचारक इथे आले होते व त्यांनी हजारो लोकांना दीक्षा दिली होती. बौद्ध भिक्षूंची संख्या वाढल्यानंतर त्यांच्या निवासासाठी सह्याद्रीच्या कुशीत शेकडो विहार निर्माण करण्यात आले. त्या काळातील असंख्य बौद्ध लेणी किंवा चैत्यगृहे महाराष्ट्रात आढळतात. त्यांत सापडलेल्या कोरीव लेखांवरून कळते, की राजे व व्यापारी बौद्ध भिक्षूंच्या निर्वाहासाठी गावे व जमिनी दान देत असत. वैदिकधर्मी राजेही बौद्ध भिक्षूंना पुष्कळ साहाय्य करीत. तथापि इ. स. च्या ४ थ्या शतकापासून महाराष्ट्रात या पंथाला उतरती कळा लागली आणि ७ व्या ८ व्या शतकांत तर तो बहुतेक लुप्त झाला.

वाकाटकांच्या काळापर्यंत महाराष्ट्रात जैन धर्माचे अस्तित्व दाखवणारा एकही आधार सापडत नाही. इ. स. ५ – ६ व्या शतकापासून कर्नाटकात व महाराष्ट्रात जैन धर्माचा प्रसार होऊ लागला. चालुक्य राजे वैदिक धर्माचे अभिमानी असले, तरी त्यांनी जैन लोकांना आश्रय दिला होता. त्यांचे अनेक अधिकारी जैन होते. त्यांनी पुष्कळ जैन मंदिरे बांधली. राष्ट्रकूटांच्या राजवटीत जैनांचा अधिकच उत्कर्ष झाला. वेरूळमधील इंद्रसभा हे जैन लेणे दंतिदुर्गाच्या प्रेरणेनेच निर्माण झाले.

जैन लोकांनी महाराष्ट्रात व्यापाराचे जाळे पसरले होते आणि काही ठिकाणी राज्यकारभारही हाती घेतला होता. त्यामुळे जैन धर्म या भागात चांगला रुजला व वाढला. महाराष्ट्रात सर्वत्र त्यांची क्षेत्रे आहेत. जैन व वैदिक तत्वज्ञानात फरक असला, तरी धार्मिक आचारांत फारसा फरक नाही. त्यांची मंदिरे, पूजा-अर्चा, इ. गोष्टींत बरेच साम्य आहे. जैन मुनी विद्याव्यासंगी होते. त्यांनी संस्कृतात व प्राकृतात पुष्कळ ग्रंथ निर्माण केले. त्यामुळे जैन धर्माला कधीच अवकळा आली नाही. त्यांची लोकसंख्या मोठी नसली, तरी त्यांच्यांत धनिक वर्ग मोठा असल्यामुळे समाजकारण व राजकारण यांवर त्यांचा प्रभाव राहिला.

बौद्ध व जैन धर्मांच्या प्रसाराची प्रतिक्रिया म्हणून पुराणांची निर्मिती झाली, असे म्हणतात. वैदिक धर्माचे व देवतांचे माहात्म्य पुराणांत सांगितलेले आहे. त्यांत अनेक उद्बोधक कथा आहेत. त्यांचे कीर्तन व प्रवचन करून वैदिक धर्माच्या अनुयायांनी आपले श्रेष्ठत्व टिकविले. पुढे आद्य शंकराचार्यांनी आपल्या अद्वैत तत्त्वज्ञानाला वेदांचे अधिष्ठान प्राप्त करून दिले आणि पंचायतनपूजा रूढ केली. त्यांच्या वेदान्त तत्त्वज्ञानाचा प्रभाव सांप्रत महाराष्ट्रावर बराच पडलेला दिसत असला, तरी तसा तो पूर्वी नसावा. धार्मिक क्षेत्रात शंकराचार्यांना सर्वाधिकार केव्हा मिळाला ते समजत नाही; पण तो यादवकाळापर्यंत तरी मिळालेला नव्हता.

यादवांच्या काळी महाराष्ट्रात तांत्रिक संप्रदाय रूढ असल्याचे दिसते. मत्स्येंद्रनाथ हा त्याचा संस्थापक होय. नाथसंप्रदायाचाही बराच प्रसार झाला होता. मत्स्येंद्रनाथ व गोरखनाथ यांच्याच परंपरेत पुढे निवृत्तिनाथ व ज्ञानेश्वर झाले. महाराष्ट्रात या पंथाचा प्रसार विशेष झाला नसला, तरी त्याचा प्रभाव महानुभाव, दत्त व वारकरी संप्रदायांवर पडलेला दिसतो.

महानुभाव पंथाची स्थापना श्रीचक्रधर यांनी इ. स. च्या १२ व्या शतकात केली. त्याचा प्रसार पंजाब, काश्मीर उत्तर प्रदेश, या भागांतही झाला होता.

महाराष्ट्रात दत्तोपासकांची संख्या बरीच आहे. गुरुचरित्र हा दत्तोपासकांचा मान्य ग्रंथ होय. ही दत्तोपासना यादवकाळाच्या पूर्वीपासून असावी. मात्र इ. स. च्या १४ व्या शतकात नृसिंहसरस्वतींच्यामुळे तिचा विशेष प्रचार झाला.

वारकरी पंथ हा महाराष्ट्रातला सर्वांत मोठा संप्रदाय आहे. पांडुरंग हे या पंथाचे आराध्य दैवत होय. यालाच भागवत संप्रदाय म्हणतात. भक्तिमार्ग प्राचीन असला तरी त्याला या पंथाने विशेष महत्त्व दिले. या पंथात हरिहरांचे ऐक्य प्रति-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

पादलेले असून, शैव व वैष्णव यांच्यांत अभेद मानलेला आहे. या पंथाने जातिभेदालाही स्थान दिलेले नाही.

याव्यतिरिक्त महाराष्ट्रात गोसावी, वीरशैव (लिंगायत), रामदासी, इ. आणखी काही पंथ उदय पावले होते, ते अजूनही चालू आहेत.

सातवाहन ते यादव या कालखंडातील मुख्य धर्मशास्त्रीय ग्रंथ म्हणजे महाभारत, स्मृती व पुराणे हे होत. सनपूर्व २५० ते इ. स. ३०० या काळात महाभारत, मनुस्मृती व याज्ञवल्क्यस्मृती यांचे वर्चस्व होते. त्यांतील धर्मशास्त्र समाजाचा ऐहिक उत्कर्ष दृष्टीपुढे ठेवून सांगितलेले आहे. धर्मापासून अर्थ व काम प्राप्त होतात म्हणून धर्माचे आचरण करावे, असे व्यासांनी सांगितले आहे. त्यांचा धर्म प्रवृत्तिपर आहे. स्मृतींतही प्रवृत्तिधर्माचा पुरस्कार केलेला आहे. त्या काळातले धर्मशास्त्र शब्दप्रामाण्यवादी नसून बुद्धिप्रामाण्यवादी होते. धर्म अपरिवर्तनीय मानला जात नव्हता. त्यानंतर पुराणोक्त धर्मशास्त्र प्रचलित झाले. बुद्धिप्रामाण्य व तदनुषंगाने येणारे धर्मपरिवर्तनाचे तत्त्व पुराणांतही प्रतिपादलेले आहे. रामायण, महाभारत यांतील भक्तिमार्ग, समता व नीतितत्त्वे यांचा प्रसार पुराणांनी केला. भूतदया, औदार्य, मनोनिग्रह, अद्रोह हीच सनातन धर्माची खरी लक्षणे होत, असे सर्व पुराणांत म्हटले आहे. वेदाध्ययन, यज्ञ, तप यांमुळे मोक्ष मिळत नाही, तर जो मनुष्य प्राणिमात्राकडे आत्मौपम्य बुद्धीने पाहतो, त्याला मोक्ष मिळतो, असे पुराणांत सांगितले आहे. महाभारत, स्मृती व पुराणे यांतील बुद्धिप्रामाण्यवादी, प्रवृत्तिप्रधान, नीतिनिष्ठ दृष्टफलार्थी व समाजोत्कर्षकारक धर्माची परंपरा साधारणपणे इ. स. च्या १० व्या शतकापर्यंत चालू होती. पुढे त्या धर्मातील महत्तत्त्वांचा लोप झाला, त्याला अत्यंत विकृत रूप प्राप्त झाले आणि हिंदू समाजाचा ऱ्हास झाला.

इ. स. च्या ८ व्या शतकानंतर नव्या स्मृती रचल्या गेल्या नाहीत. पुढे निबंधकारांचे युग सुरू झाले. बुद्धिप्रामाण्य व देशकालपरिस्थितीनुरूप धर्मनियम सांगण्याचे धोरण नष्ट झाले. अदृष्ट फलाचे माहात्म्य वाढले. शंकराचार्यांचा निवृत्तिवाद समाजात प्रसृत झाला. संसार असार असून, त्याचा त्याग केल्यावाचून मोक्ष मिळत नाही, हा सिद्धान्त सर्वमान्य झाला. व्रते, वैकल्ये, उद्यापने, प्रायश्चित्ते, उपासतापास म्हणजे धर्म, अशा कल्पना निबंधकारांनी प्रसृत केल्या.

विज्ञानेश्वर, अपरार्क, हेमाद्री, कमलाकरभट्ट, इ. मध्ययुगीन धर्मशास्त्रज्ञांच्या कार्याचे विवेचन करताना म. म. काणे म्हणतात– त्या काळात मुसलमान लोक सर्वत्र देवळे पाडीत होते, अत्याचार करीत होते. पण त्या वेळचे धर्मशास्त्रकार व्रते, प्रायश्चित्तविधी, श्राद्धविधी, तीर्थयात्रा, आशौच यांवरच सर्व बुद्धिबळ खर्च करीत होते. सर्व धर्माला घेरीत चाललेल्या राजकीय व धार्मिक अशा घोर आपत्तींविषयी ते पूर्ण उदासीन होते.

इ. स. च्या ११ व्या शतकापासून धर्मशास्त्रकारांची दृष्टी मोक्षाकडे लागल्यामुळे, समाजाची धारणा व त्याचा अभ्युदय यांकडे त्यांनी संपूर्ण दुर्लक्ष केले. धर्माचा स्वातंत्र्याशी, प्रजेच्या उत्कर्षापकर्षांशी काही संबंध असतो, हे त्यांना मान्य नसावे. त्यांच्या ग्रंथांत समाजाच्या दैन्यदारिद्र्याचा लवमात्र विचार केलेला नाही; राजधर्म, क्षात्रधर्म, आक्रमणाचा प्रतिकार, धर्मांतरितांची शुद्धी, समाजसंघटना यांचाही विचार त्यांनी केला नाही. व्रत–वैकल्य, श्राद्ध–पक्ष, सोवळे–ओवळे, प्रायश्चित्ते यांतच सर्व धर्म साठविला आहे, असे त्यांनी मानले व प्रतिपादले. संतांनी या कर्मकांडात्मक धर्मावर प्रखर टीका केली असली, तरीही समाजावरचे त्या धर्माचे वर्चस्व मुळीच कमी झाले नाही. त्यामुळेच समाज निष्क्रिय, कर्मवादी, दैवाधीन, प्रज्ञाहत व अंधश्रद्ध बनला. समाज पंथोपपथांत विभागला गेल्यामुळे दुबळा व परकीय आक्रमणाचा प्रतिकार करण्यास असमर्थ झाला. यादवकाळात समाजाचा हा ऱ्हास सुरू झाला व त्याचा परिणाम यादवांच्या राजवटीच्या शेवटी दिसून आला. अलाउद्दीन खिलजी व त्याचा सेनापती मलिक काफूर यांनी १५–२० वर्षांत यादवांचा आणि दक्षिणेतील अनेक हिंदू राजांचा सहज पराभव करून तिथे मुस्लिम सत्ता स्थापन केली आणि त्यानंतरच्या ३०० वर्षांत ती नष्ट करण्याचा प्रयत्न कोणीही केला नाही. स्वधर्माच्या उत्कर्षासाठी स्वराज्य हवे असे कोणालाही वाटले नाही.

महाराष्ट्रात मुसलमानी सत्ता स्थापन होण्यापूर्वीच इ. स. च्या १३ व्या शतकात मुसलमान साधू व धर्मप्रसारक दक्षिणेत येऊन कार्य करू लागले होते. खुल्ताबाद व दौलताबाद येथे अनुक्रमे जलालउद्दीन गंजखां व मोमिन आरिफ यांच्या कबरी आहेत. हे दोघे १३ व्या शतकाच्या पूर्वार्धात इकडे येऊन स्थायिक झाले होते. अलाउद्दिनाच्या स्वारीनंतर शेख निजामोद्दीन याने इ. स. १३०० साली सातशे धर्मप्रसारक दक्षिणेत पाठवले. मुंतजवोद्दीन जर्जरीवक्ष हा त्यांचा प्रमुख होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ बुऱ्हाणोद्दीन गरीबशहा हा सातशे धर्मप्रसारकांसह दक्षिणेत आला. इ. स. च्या १४ व्या शतकाच्या पूर्वार्धात त्या चौदाशे सूफी प्रचारकांनी देवगिरीच्या परिसरात मुख्य केंद्र ठेवून सारा महाराष्ट्र व्यापला आणि इस्लामच्या बलात्कारी विस्ताराची मोहीम उघडली. त्या साधूंनी विलक्षण चमत्कार करून हजारो हिंदूंना आपल्या नादी लावले.

अशा प्रकारे हिंदू समाजावर मुस्लिम धर्मप्रसारकांनी

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रदस्त पगडा बसवून इस्लामचा विस्तार जोराने चालू केल्यामुळे बहमनी राज्य चांगले स्थिरावले. बहमनी सुलतानांनीही धर्मप्रसाराचे काम नेटाने व जबरदस्तीने चालू ठेवले. त्यांच्या दोन अडीचशे वर्षांच्या कारकिर्दीत इस्लामचा प्रसार महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणावर झाला.

ख्रिस्ती धर्माचा प्रसार गोव्यामध्ये प्रथम पोर्तुगीजांनी सुरू केला. इ. स. १५१० साली अल्बुकर्क याने गोवा प्रांत घेतला आणि तिथे पोर्तुगीज सत्ता स्थापली. इ. स. १५३४ मध्ये दीव, चौल, वसई, साष्टी (मुंबई) ही ठिकाणेही पोर्तुगीजांनी घेतली आणि ख्रिस्ती धर्माचा प्रसार सुरू केला. इ. स. च्या १६ व्या शतकात त्यांनी हजारो हिंदूंना जबरदस्तीने बाटवले. आर्थिक लाभामुळेही हजारो लोक आपणहून ख्रिस्ती झाले असावे. पोर्तुगीजांनी केलेला धर्मच्छळ इन्क्विझिशन या नावाने जगप्रसिद्ध आहे. शिवाजीमहाराजांनी त्याला थोडासा आळा घातला होता; पण पेशवाईच्या काळात पोर्तुगीजांनी कोकणात फारच अरेरावी सुरू केल्यामुळे चिमाजीअप्पाने वसईवर स्वारी करून तो भाग जिंकला. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत महाराष्ट्रात इतरत्र ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला नव्हता. इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी उघडपणे धर्मप्रसाराचे काम सुरू केले. ठिकठिकाणी शाळा व इस्पितळे सुरू करून, दुष्काळग्रस्तांना अन्नवस्त्र पुरवून आणि पतित आणि अस्पृश्य यांना जवळ करून त्यांनी हजारो लोकांना आपलेसे केले. हिंदू धर्मातील दुष्ट रुढींची निंदा करूनही त्यांनी अनेकांना आपल्या कळपात ओढले. आदिवासी गिरिजनांतही त्यांनी येशूचा संदेश याच पद्धतीने पोचवला. ख्रिस्ती झाले की नोकरी मिळते, मानमरातब वाढतो या आशेनेही पुष्कळ लोक ख्रिस्ती झाले. काही ठिकाणी जबरदस्तीनेही बाटवण्याचे प्रकार झाले.

ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न काही शास्त्रीपंडितांनी केला. मोरभट दांडेकर, कृष्णशास्त्री साठे, विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी लेख लिहून व प्रवचने करुन मिशनऱ्यांच्या प्रचाराचे खंडन केले. त्यामुळे सुशिक्षित लोकांत धर्मांतराचे प्रमाण कमी झाले. पण अडाणी व गरीब लोकात ख्रिस्ती प्रचारकांचे काम अनिरुद्धपणे चालू राहिले व ख्रिस्ती अनुयायांची संख्या बरीच वाढली.

इंग्रजी शिक्षण, ब्रिटिश राज्यपद्धती आणि मिशनऱ्यांची टीका यामुळे हिंदू विचारवंतांना धर्मसुधारणेची आवश्यकता भासू लागली. बंगालमधील ब्राह्म समाजाचे एक नेते केशवचंद्र सेन यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात प्रार्थनासमाज सुरू झाला. इ. स. १८७९ मध्ये मुंबईत थिऑसॉफिकल सोसायटीची शाखा सुरू झाली. विश्वबंधुत्वाची भावना वाढवणे हा त्या संस्थेचा उद्देश आहे. पण या संस्थांचा समाजावर फारसा प्रभाव पडला नाही.

पारशी लोक भारतात आल्यानंतर प्रथम गुजरातेत स्थायिक झाले. मुंबई बेट पोर्तुगीजांच्या ताब्यात होते, तेव्हा त्या सरकारने मुंबईचा किल्ला बांधण्यासाठी लागणारे सामान व माणसे पुरविण्याचा मक्ता खरदेशजी पोचाजी पांडे नावाच्या पारशी व्यापाऱ्याला दिला होता. त्याचप्रमाणे दोराबजी नानाभाई याच्याकडे दलालीचे काम सोपविले होते. इंग्रजांना मुंबई मिळाल्यावर दोराबजी त्यांच्यासाठी करवसुलीचे काम करू लागला. अशा प्रकारे पारशी लोक मुंबईत आले. इ. स. च्या १७ व्या शतकाच्या अखेरीस रुस्तमजी याने जंजिऱ्याच्या सिद्दीविरुद्ध लढून मुंबईचे रक्षण केले. या कामगिरीबद्दल इंग्रजांनी त्याला मुंबईची पाटिलकी बहाल केली. त्याचा मुलगा कावसजी हा ठाणे येथे मोठा अधिकारी झाला.

तेव्हापासून अनेक पारशी घराणी मुंबईत येऊन उद्योगधंदे करू लागली. त्या निमित्ताने पारशी लोक महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत पसरले. मात्र त्यांची मुख्य वसती मुंबईतच आहे.

पेशवाई बुडाल्यानंतर हिंदु-मुसलमानांचे वैर पुष्कळ कमी झाले. खेडोपाडी स्थायिक झालेली असंख्य मुस्लिम कुटुंबे हिंदू समाजाशी सलोख्याने वागत होती. इंग्रज हे दोघांचे शत्रू ठरल्यामुळे त्यांच्या विरुद्ध दोन्ही समाजांत द्वेष उत्पन्न झाला. इ. स. १८५७ च्या युद्धात हिंदू व मुसलमान एकजुटीने इंग्रजांशी लढले. पण त्यामुळेच इंग्रज सावध झाले आणि त्यांनी हिंदू मुसलमानांना एकमेकांविरुद्ध चिथावून त्यांचे बळ कमी करण्याचा डाव टाकला. तेव्हापासून देशात हिंदू–मुसलमानांचे दंगेधोपे सुरू झाले. राष्ट्रीय सभेने त्यांच्यांत एकोपा उत्पन्न व्हावा म्हणून पुष्कळ प्रयास केले. लो. टिळक, म. गांधी, पं. नेहरू यांना त्या बाबतीत थोडेसे यश आले होते; पण ते अगदी अल्पकाळ टिकले आणि हिंदू–मुसलमानांतील वैरभाव पुन्हा जास्त जोराने उफाळून आला. त्याचे पर्यवसान म्हणजे भयानक कत्तली आणि पाकिस्तानची निर्मिती हे होय. ब्रिटिशांच्या राजवटीत महाराष्ट्रात हिंदू–मुसलमानांचे दंगे बरेच झाले आणि अजूनही ते होत आहेत. त्यांचे रूप सांप्रत जास्त भीषण झाले आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्रातील हिंदू समाजावर अनेक संकटे गुदरली असली, तरी त्या त्या काळात कोणी तरी थोर पुरुष जन्माला येऊन त्याने स्वधर्माचे रक्षण केले, असा इतिहास आहे. ब्रिटिशांच्या राज्यात इंग्रजी शिक्षणामुळे काही सुशिक्षित लोकांना आपल्या सनातन धर्माचा व जुनाट रूढींचा उबग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आला व त्यांनी पाश्चात्य आचार-विचार स्वीकारले. त्यामुळे आता धर्म बुडणार अशी भीती सनातन धर्माच्या मंडळींना वाटू लागली होती. पण तसे काही घडले नाही. त्याचे एक कारण असे, की इंग्रजी शिक्षणाचा प्रसार अगदी थोडया लोकांत झाला होता आणि बहुसंख्य लोक निरक्षर होते. आणि दुसरे असे की सुशिक्षित लोकांतही स्वधर्म सोडणारे थोडेच निघाले. सध्याच्या अत्यंत सुधारलेल्या युगातही सुशिक्षित माणसांनी पाश्चात्य आचार, पेहराव, व जीवनचर्या यांचा अंगिकार केलेला असला, तरी त्यांची धर्मश्रद्धा व भक्तिभावना कमी झालेली नाही. लाखो लोक उपास, नवससायास, तीर्थ-यात्रा करून देवांची व साधुसंतांची कृपा संपादण्याचा प्रयत्न करीत असतात. धर्मनिष्ठा नसलेले लोक फार थोडे आहेत.

सामाजिक विकास – आर्य लोक उ. भारतातून दक्षिणेत आले आणि त्यांनी दंडकारण्यात वसाहती स्थापल्या, त्या वेळी त्यांची चतुर्वर्णांकित समाजरचनाही इथे सुरू झाली. त्यांच्या पूर्वीच इथे वसलेल्या पुलिंद, शबर, भिल्ल, कातकरी, ठाकूर, वारली, इ. अनार्य व आदिवासी लोकांशी त्यांचा प्रथम संघर्ष झाला असला, तरी आर्यांनी बऱ्याच लोकांना आपल्यांत सामावून घेतले. अशा भिन्न संस्कृतीच्या मानवांचे संमिश्रण होऊन महाराष्ट्रीय समाज निर्माण झाला आहे. काही आदिवासी डोंगराळ प्रदेशात घनदाट अरण्यात राहायला गेले, ते आर्यांशी संबंध तुटल्यामुळे आपल्या मूळ अवस्थेत तसेच राहिले. अजूनही तसे काही लोक महाराष्ट्रात आढळतात.

व्यक्ती, कुटुंब, जाती आणि वर्ण हे आपल्या समाजाचे घटक आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासाकडे पाहाता असे दिसते, की प्रारंभीच्या हजारबाराशे वर्षांच्या काळात समाज वर्ण-जाति-निबद्ध असला, तरी त्या वर्ण-जातिव्यवस्थेला कडक रूप प्राप्त झालेले नव्हते. भिन्न भिन्न वर्णांत व जातींत मिश्र विवाह पुष्कळ प्रमाणात होत असत. पुराणकथेप्रमाणे सातवाहन कुलाचा संस्थापक हा ब्राह्मण-कन्या व नाग-पुरुष यांचा पुत्र होता. हा प्रतिलोम विवाह असल्यामुळे तज्जन्य संततीला पुराणांनी शूद्र मानले आहे. पण काही पंडितांच्या मते सातवाहन-कुल क्षत्रिय होते. त्या कुळातील राजांनी नाग, शक, इ. कन्यांशी विवाह केले. वाकाटक राजे ब्राह्मण होते. त्यांच्यापैकी रुद्रसेन याची राणी प्रभावती ही गुप्त राजवंशातील म्हणजे वैश्य वर्णातली होती. कल्याणीच्या चालुक्य विक्रमादित्याची राणी कदंब या कुळातील जयकेशीची कन्या होती. प्रख्यात कवी राजशेखर (ब्राह्मण) याची पत्नी अवन्तीसुंदरी ही चव्हाण कुळातील क्षत्रिय कन्या होती. अशाप्रकारे आंतरवर्णीय विवाह इ. सनाच्या ११ व्या शतकापर्यंत चालू होते. त्या काळात अनुलोम विवाह ही नित्याचीच गोष्ट होती. असे विवा… शास्त्रानेच मान्य केले होते. वर्णसंकराप्रमाणे व्यवसा… प्रचलित व सर्वमान्य होता. शास्त्रकारांनी त्या त्या व… जातींचे व्यवसाय ठरवून दिलेले असले, तरी ते निर्बं… कडक नव्हते. धर्मशास्त्रानुसार यजन, याजन, अध्य… ब्राह्मणांचे व्यवसाय होत. पण त्या काळी ब्राह्मणांनी… केली, शेती केली व व्यापारही केला. क्षत्रिय वर्णाचे लो… व व्यापार करीत होते. वैश्य लोकांनी पराक्रम करून… स्थापल्याची उदाहरणे इतिहासात सापडतात. स्मृति… शूद्राला व्यापार, कारागिरी हे व्यवसाय विहित म्हणू… तले आहेत.

प्राचीन काळी ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे सर्व लोक… विशेषी एकत्र भोजन करीत होते. एवढेच नव्हे, तर शू… भोजन करण्यासही त्यांना प्रत्यवाय वाटत नसे. मध्य… स्मृतिकारांनी ही गोष्ट निषिद्ध मानली असली, तरी मध्य… प्रारंभी तसे एकत्र भोजन होत असे. इ. स. १०… सुमारास मात्र त्रैवर्णिकांचे सहभोजनही निषिद्ध ठरले… मिश्र विवाहसुद्धा बंद झाले. पूर्वी अस्पृश्यता नव्हती, … मध्ययुगात निर्माण झाली, असे म. म. काणे यांनी म्हट…

महाराष्ट्रात पितृप्रधान कुटुंबपद्धती प्रचलित आहे… तीत सर्वांत वडील पुरुषाची अनिर्बंध सत्ता सर्व कुटुंबावर… पूर्वी मोठाली कुटुंबे अशा कुटुंबप्रमुखाच्या वर्चस्वाखाली… नांदत होती. त्यांत तीनचार पिढ्यांची माणसे एक… एकमेकांच्या हितासाठी झटत. प्राचीन काळी अ… स्त्रियांना बराच मान मिळत असे. परंतु मध्ययुगात … बदलली. धर्मशास्त्राने स्त्रियांच्या आचारांवर बं… घातले. त्यामुळे भरपूर काबाडकष्ट करावे, पुरुषां… साधन व्हावे आणि होतील तेवढ्या मुलांचे संगोपन … ढेच त्यांच्या नशिबी आले. शिक्षणाचा अभाव, बाल… व मातृत्व आणि घरकाम यामुळे त्यांना समाजा… स्थान उरले नाही. कामकरी वर्गातल्या स्त्रिया मा… बरोबरीने काम करीत असल्यामुळे त्यांना थोडेसे स्वा… ब्राह्मण व उच्च मराठे यांच्या व्यतिरिक्त इतर जातीं… विवाह व घटस्फोट प्रचलित होते. पूर्वी महाराष्ट्रात … रूढ नव्हती. ती मुसलमानांच्या अनुकरणाने सरंजामी… सुरू झाली.

लोकजीवन – महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भा… हवामान व भौगोलिक परिस्थिती यांमुळे तिथल्या … जीवनात बराच फरक आढळून येतो. कोकणात … पडतो. पावसाचे पाणी छपरावरून लवकर वाहून …

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घरांची व झोपड्यांची छपरे बरीच उतरती असतात. ती गवताची किंवा नारळीच्या झावळ्यांची बनवतात. सलग सपाट जमीन कमी असल्यामुळे इथली खेडी लहान-लहान, ४०-५० घरांची असतात. घरापुढील अंगणात आंबा, फणस, नारळी, पोफळी, केळी यांची झाडे असतात.

हवामान उष्ण व दमट असल्यामुळे कपडे फार लागत नाहीत. शेतकरी आखूड धोतर नेसून, अंगात लहानसे कुडते घालतो व डोक्याला मुंडासे बांधतो. पावसाळ्यात तो अंगावर घोंगडी घेतो. इतर लोकही थोडे कपडे वापरतात. स्त्रिया नऊवारी लुगडी नेसतात व चोळ्या घालतात.

कोकणातील लोकांचे मुख्य अन्न म्हणजे भात. त्यांची भाकरी तांदुळाची किंवा नाचणीची असते. पक्वान्ने बहुतेक तांदुळाचीच असतात. अन्नात खोबऱ्याचा उपयोग भरपूर केला जातो. आमसुलाचे सार, वालांची उसळ, मासे व माशांचे कालवण हे पदार्थ भाताच्या जोडीला असतात.

कोकणातील लोक शेतीबरोबर मासेमारीचा उद्योगही करतात. मासे पकडून ते धुणे, वाळवणे, खारवणे, ही कामे सर्वत्र चालू असतात. त्याचप्रमाणे आंबे, काजू, नारळी, पोफळी, फणस, केळी यांची बागाईत चालते. झावळ्या विणणे, काथ्याच्या दोऱ्या वळणे, पोहे करणे, आमसुले बनवणे, कोंबड्या व बकऱ्या पाळणे, इ. पूरक उद्योगही कोकणातले लोक करतात.

देशावर सपाट प्रदेश बराच असल्यामुळे खेडी मोठी असतात. त्यांत नारळी-पोफळीच्या ऐवजी वड, पिंपळ, चिंच, कडुलिंब, इ. झाडे दिसतात. पठाराच्या ज्या भागात पाऊस अगदी कमी पडतो, तिथे घरे धाब्याची म्हणजे सपाट छपरांची असतात; तर ज्या भागात पुष्कळ पाऊस पडतो, तिथे छपरे उतरतीच असतात. शहरांतील घरांवर कौलारू किंवा पत्र्याची छपरे दिसतात; तर खेड्यातून कंबळीची छपरे असतात. खेड्यातील घरांना कुडाच्या भिंती असतात. दगड-विटांची घरे थोडीच.

देशावरील हवामान विषम असल्यामुळे लोक उन्हाळ्यात थोडे सुती कपडे व हिवाळ्यांत खूप गरम कपडे वापरतात.

पठारावर अगदी पूर्व भागात भात बरेच पिकत असल्यामुळे तिथे तांदूळ हेच मुख्य अन्न असते. पश्चिम भागातले लोक भात खातात, पण पोळी व भाकरी हे त्यांचे मुख्य अन्न होय. मध्यभागात तर पोळी किंवा भाकरी हेच अन्न असते; भाताचा उपयोग कमीच केला जातो. कडधान्ये, भाजीपाला यांचा उपयोग या प्रदेशात बराच केला जातो.

पठारावरील जमीन सुपीक असून ती बागायतीला योग्य आहे. त्यामुळे शेतीला पूरक अशी बागाईत इथे बरीच केली जाते. त्याव्यतिरिक्त हातमाग, गूळ बनवणे, तेलघाणे, कोंबड्या व शेळ्या-मेंढ्या पाळणे, दूध-उत्पादन, इ. पूरक उद्योग चालतात.

घाटमाथ्यावरील जंगलात व इतर डोंगराळ प्रदेशांत बरेच आदिवासी राहतात. त्यांच्या झोपड्या लहान असतात. ते अगदी कमी वस्त्र वापरतात. नाचणी, वरी, कोदो, कुटकी यांच्यासारखी धान्ये; मोहाची फुले, कंदमुळे व फळे हे त्यांचे अन्न होय. जंगलातील लाकडे तोडणे, कोळसा करणे, मध व इतर जंगली पदार्थ जमवणे, शिकार करणे हे उद्योग ते करतात.

धर्मसुधारणा – हिंदू धर्मसुधारणेचे आंदोलन प्रथम बंगालमध्ये राजा राममोहन राय यांनी सुरू केले. महाराष्ट्रात लोकहितवादी व जोतिबा फुले यांनी त्या आंदोलनाचे स्वागत केले. वेदप्रामाण्य व पुराणोक्त परंपरागत धर्म यांवर लोकहितवादींनी प्रखर टीका केली आणि विश्वधर्माच्या अधिष्ठानावर आधारलेल्या व हिंदू समाजाला उपयुक्त अशा धर्मतत्त्वांची चिकित्सापूर्वक मांडणी केली. जोतिबा फुले हे त्याच काळातले दुसरे विश्वधर्मी समाजसुधारक होत. जातिवद्ध व उच्चनीच भावाने भरलेल्या समाजरचनेच्या विरुद्ध प्रत्यक्ष बंडाचा उठाव करण्याकरिता ते सिद्ध झाले होते. त्यांनी ब्राह्मणांच्या धार्मिक सत्तेविरुद्ध युद्ध पुकारले व सत्यशोधक चळवळ सुरू केली.

हिंदू धर्मग्रंथांच्या आधारे समाजसुधारणेचे प्रयत्न राममोहन राय, विद्यासागर, इ. मंडळींनी केले. त्याचे लोण महाराष्ट्रातही पोचले. पण धर्मशास्त्राच्या आधारे समाजसुधारणा करणे कठिण आहे, कारण धर्मशास्त्रात अनेक परस्परविरोधी वचने आढळतात, असे काही पंडितांच्या ध्यानात आले. म्हणून त्यांनी विवेकबुद्धीच्या आधारे सुधारणेचा प्रयत्न करावा, असे ठरवले. त्यासाठी त्यांनी इ. स. १८४० साली परमहंस सभेची स्थापना केली. पण ती सभा लवकरच बंद पडली. पुढे इ. स. १८६७ मध्ये केशवचंद्र सेन यांच्या प्रेरणेने प्रार्थनासमाजाची स्थापना झाली. भांडारकर व रानडे या विद्वान तत्त्ववेत्त्यांचे नेतृत्व लाभल्यामुळे प्रार्थनासमाजाचा महाराष्ट्रात बराच प्रसार झाला. महाराष्ट्रातील धर्मसुधारणेच्या आंदोलनाला प्रार्थनासमाज व सत्यशोधक समाज यांनी तात्त्विक अधिष्ठान दिले. त्याचा अर्थ असा–मनुष्याच्या शुद्ध नैतिक जीवनाला ईश्वराचे अधिष्ठान आवश्यक आहे, कारण ईश्वराच्या भक्तीने मनुष्याच्या हृदयात नैतिक बुद्धी दृढ होते. ईश्वराचे ज्ञान होण्याकरिता धर्मग्रंथ किंवा गुरू यांची आवश्यकता नाही. शुद्ध नैतिक जाणीव व विश्वरचनेच्या चमत्काराची अनुभूती हीच ईश्वराच्या जाणिवेला प्रकट करते. दुष्ट चालीरीती, गुलामगिरी व विषमता नष्ट करण्याचे सामर्थ्य, अशी तात्त्विक भूमिका दृढ झाल्यामुळेच प्राप्त होते. सामाजिक सुधारणा हे त्याचे प्रत्यंतर होय, अशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रार्थनासमाज व सत्यशोधक समाज यांची भूमिका होती.

या भूमिकेच्या विरुद्ध असा निधर्मी दृष्टिकोन आगरकरांनी प्रथम मांडला. त्यांनी बुद्धिवादाचा निकष लावून हिंदू धर्माची समीक्षा केली. मानवी समाजाला धर्मसंस्थेची यापुढे गरज नाही, कारण धर्मसंस्थेचा मूळ आरंभ अज्ञान व भीती यांतून झालेला आहे, असे त्यांचे मत होते. पण हिंदू समाजाचे हजारो वर्षांचे रूढिनिष्ठ अगतिकत्व मोडण्यास ते असमर्थ ठरले. काही सामाजिक सुधारणा पुढे घडून आल्या. पण त्यांचा निधर्मी दृष्टिकोन कोणीही स्वीकारला नाही. सत्यशोधक चळवळीचे रूपांतर ब्राह्मणेतर चळवळीत झाले. सुशिक्षित समाज बदलला नाही आणि बहुजनसमाजाला त्या आंदोलनाची दादही लागली नाही.

कोल्हापूरच्या शाहूमहाराजांना जातिभेद नको होता, पण गुणकर्मावर आधारित अशी चातुर्वर्ण्य व्यवस्था पुनरुज्जीवित करायची होती. म्हणून त्यांनी क्षात्र जगद्गुरूंचे पीठ स्थापन केले. पण वैदिक ब्राह्मणांचा मोठा वर्ग त्यांच्या विरुद्ध होता. त्यामुळे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद उत्पन्न झाला.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत परंपरागत समाजरचनेचे समर्थन व प्राचीन संस्कृतीतील शाश्वत अध्यात्मवादाचा पुनरुद्धार करण्याची प्रवृत्ती बळावली. विवेकानंदांनी भारतीय संस्कृती, वेदान्त व अध्यात्म यांचे उदात्त दर्शन जगाला घडवले. ते समाजसुधारणेच्या विरुद्ध नव्हते. पण त्यांच्या अध्यात्मवादाच्या नव्या मांडणीमुळे हिंदू धर्मावर अधिष्ठित असलेल्या जुन्या रूढी व जातिभेद यांचे समर्थन करणारे निबंध प्रसिद्ध होऊ लागले आणि सुधारकांची अवहेलना सुरू झाली. पण इ. स. १९२० नंतर ही सुधारणाविरोधी प्रतिक्रिया विराम पावली. त्याच वेळी म. गांधींनी शाश्वत नीतिधर्माच्या आधारावर सर्वधर्मसमन्वयाचे व हिंदूंच्या सामाजिक सुधारणेचे आंदोलन सुरू केले. त्याचाच परिणाम म्हणजे महाराष्ट्रातील ब्राह्मण संस्कृत पंडितांमध्ये धर्मसुधारणेचा व समाजसुधारणेचा पुरस्कार करणारे काही पंडित पुढे आले व त्यांनी तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी मंडळ स्थापले. केवलानंदसरस्वती, म. म. पां. वा. काणे व के. ल. दप्तरी हे त्या मंडळाचे अग्रणी होत. हिंदूधर्मग्रंथांचेच अवलोकन करून, धार्मिक व सामाजिक सुधारणा कशा इष्ट आहेत, यांचे समर्थन त्यांनी सुरू केले व सर्व हिंदूंना समान असे वेदोक्त कर्मकांड संक्षेपाने सुरू केले. प्राचीन काळी विद्वान व शीलसंपन्न सत्पुरुष समाजाची धारणा होण्यासाठी व अवनती टाळण्यासाठी वेळोवेळी एकत्र येऊन विचारविनिमय करून नवे धर्मनियम सादर करीत, तसे आता केले पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादले.

गेल्या दीडशे वर्षांतील धार्मिक व सामाजिक सुधारणे[illegible] आंदोलनामुळे समाजाचे रूप बरेच पालटले आहे. कायद्या[illegible] क्षेत्रावर तर त्याचा मोठा प्रभाव पडला आहे. काय[illegible] सतीची व बालविवाहाची चाल बंद पाडली, विधवाविवाह [illegible] केला, घटस्फोटाचा हक्क स्त्री-पुरुषांना प्राप्त करून दि[illegible] तसेच हिंदू, बौद्ध व जैन यांची आंतरजातीय लग्ने कायदे[illegible] ठरवली, स्त्रियांना संपत्तीचा वारसाहक्क पुरुषांच्या बरोब[illegible] ठरवला व अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरवला. दीडशे [illegible] पूर्वीच्या हिंदू समाजाच्या रूढी आता बऱ्याच बदलल्या आहे[illegible] याचे श्रेय धर्मसुधारणेच्या आंदोलनाला आहे.

देवधर्म – महाराष्ट्रात शिव-महादेवाची उपासना कर[illegible] लोक सर्वांत जास्त आहेत. प्रत्येक गावात एक तरी शिवमं[illegible] असतेच. बारा ज्योतिर्लिगांपैकी पाच स्थाने महाराष्ट्रात आहे[illegible] बहुतेक शहरांत शिवाची बरीच मंदिरे आढळतात. शिवा[illegible]णेच गणपतीची उपासना करणारे लोकही पुष्कळ आहेत. म[illegible] राष्ट्रातील अष्ट विनायकांची क्षेत्रे प्रसिद्धच आहेत. सर्व धा[illegible] कृत्यांत प्रथम गणेशपूजन केले जाते. घरोघरी गणपतीची पू[illegible] अर्चा पुष्कळ चालते. चतुर्थीचा उपवासही बरेच लोक कर[illegible]

पूर्वी शैव पंथाचे प्राबल्य होते व वैष्णव पंथाशी त्याचा [illegible] होत असे. पण कालांतराने या पंथांचे ऐक्य होऊन शिव व [illegible] या दोन्ही देवतांना बहुतेक लोक सारखेच पूज्य मानू ला[illegible] महाराष्ट्रात विष्णूची मंदिरे सर्वत्र आहेत. विठ्ठल हा वि[illegible] अवतार मानला जातो. वारकरी पंथाचे ते दैवत आहे. [illegible] विठोबा-रखमाईची देवळे बहुतेक गावांत आढळतात. मुरली[illegible] राधाकृष्ण, गोपाळकृष्ण या नावांनीही विष्णूची उपासना चा[illegible] समर्थ रामदासांनी रामभक्तीचा महिमा गाइल्यामुळे राम[illegible] बहुतेक गावांत आढळतात. दत्तोपासकही बरेच आहेत.

देवीची उपासना करणारा शाक्तपंथ वेगळा असला, तरी [illegible] लोकही निरनिराळ्या रूपांत देवीची उपासना करतात. को[illegible] पूरची अंबाबाई व तुळजापूरची भवानी, त्याचप्रमाणे जोगे[illegible] या कित्येक कुटुंबांच्या कुलदेवता आहेत.

भैरव हा शिवपरिवारातला एक देव असून, तो बहि[illegible] या नावाने एक ग्रामरक्षक ठरला आहे. त्याचे देऊळ गा[illegible] वेशीजवळ असते. प्रत्येक गावात रामसेवक मारुतीचे दे[illegible] असतेच. तो बलोपासकांचा देव आहे. याशिवाय खंडोबा, म्हा[illegible] मरीआई, जोगाई, इ. असंख्य ग्रामदेवतांना भजणारा फार [illegible] समाज महाराष्ट्रात आहे. आर्यांनी आर्येतरांना आपल्यात [illegible] वून घेतले, त्या वेळी त्यांच्या बरोबर ही दैवतेही हिंदू [illegible] समाविष्ट झाली. पांढर, चव्हाटा, डोंगर, झाडे, भुते, इ. [illegible] दैवतांचे कुलाचार ग्रामीण भागात रूढ आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जाती-जमाती – महाराष्ट्रात हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, जैन, पारशी, शीख, लिंगायत, नवबौद्ध, इ. अनेक धर्मांचे व थांचे लोक वसलेले आहेत. त्यांत हिंदू लोकांची संख्या सर्वांत जास्त असून, त्याखालोखाल मुसलमान व ख्रिस्ती यांची वसती आहे. इतर लोक काही विशिष्ट भागात केंद्रित झालेले आहेत. हिंदू समाज असंख्य जाती-पोटजातींत विभागलेला असून, त्यातील ब्राह्मण, मराठे व कायस्थ या प्रमुख पुढारलेल्या जाती आहेत. त्यांच्यांत सुशिक्षित लोक बरेच असून, ते शासन, शिक्षण, न्याय, वैद्यक, स्थापत्य, इ. व्यवसाय करतात. मुसलमान, ख्रिस्ती, व जैन लोकांतही अनेक जाती व पोटजाती आढळतात. मुसलमानांची वसती बहुतेक खेड्यांत आढळते. शहरांमध्ये ते मुख्यतः चाकू, सुऱ्या व इतर लोखंडी सामान यांचा व्यापार करतात. ख्रिस्ती लोकही ग्रामीण व शहरी भागांत सर्वत्र असून, ते तांत्रिक स्वरूपाच्या व्यवसायांत जास्त प्रमाणात आढळतात. जैन लोक विशेषतः व्यापारात गुंतलेले आहेत. शहरांप्रमाणेच लहान लहान खेड्यांतही गुजराती व मारवाडी यांची विविध प्रकारची दुकाने आढळतात. पारशी लोकांची वसती मुख्यतः मुंबई शहरात आहे. हे लोक बहुतेक सुशिक्षित असून डॉक्टर, वकील, इंजिनियर, शासकीय अधिकारी वगैरे वर्गांत त्यांचा बराच भरणा आहे. महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगतीला त्यांनी मोठा हातभार लावला आहे. शीख लोक मुख्यतः वाहतुकीच्या व लाकूड-सामानाच्या व्यवसायात आढळतात.

महाराष्ट्रात सुमारे अडीचशे जाती आहेत. ब्राह्मण, मराठा, कायस्थ या वरिष्ठ जातींव्यतिरिक्त सोनार, सुतार, कुंभार, कुणबी, बुरूड, गवंडी, कोळी, गुरव, घिसाडी, तेली, कासार, न्हावी, तांबोळी, भंडारी, भोई, लोहार, परीट, धनगर, वाणी, शिंपी, इ. व्यावसायिक जाती असंख्य आहेत. महार, मांग, चांभार, इ. पूर्वास्पृष्ट जातीही अनेक आहेत. शहरांतून जातिभेद व अस्पृश्यता यांची विशेष जाणीव होत नसली, तरी खेडेगावांत परिस्थिती अजून मुळीच बदललेली नाही. पूर्वास्पृष्ट जातींप्रमाणेच असंख्य वन्य जमाती अद्यापही समाजापासून दूर राहिल्या आहेत. या वन्य जमातींची वसती दाट जंगलांमध्ये किंवा दऱ्याखोऱ्यांत असते. ठाणे व कुलाबा या जिल्ह्यांतील आगरी, वारली, कातकरी व ठाकूर; धुळे जिल्ह्यातील भिल्ल आणि विदर्भातील कोरकू व गोंड या त्यांतील प्रमुख जमाती होत. नागरी किंवा ग्रामीण जीवनाशी या आदिवासी लोकांचा संपर्क फारसा न आल्यामुळे ते अजूनपर्यंत जंगलीच राहिले आहेत. त्यांच्या देवता, त्यांचे सण, उत्सव निराळे आहेत. अज्ञान व दारिद्र्य यांमुळे त्यांची फार दुर्दशा झालेली आहे. सांप्रत इतर लोकांशी त्यांचा अधिक संपर्क येऊ लागल्यामुळे त्यांच्या जीवनात बदल होत आहे. त्यांच्या सुधारणेसाठी सरकारही प्रयत्नशील आहे.

भारताचे विभाजन होऊन पाकिस्तान निर्माण झाल्यानंतर सिंधमधून सुमारे १२ लक्ष सिंधी हिंदू लोक भारतात आले. त्यांतील सुमारे ३ लक्ष सिंधी महाराष्ट्रात स्थायिक झाले आहेत. ही एक नवीन जातच आहे. हे लोक मुख्यतः व्यापार करून उपजीविका करतात.

सण, उत्सव, जत्रा – हिंदू लोकांच्या बहुतेक सर्व सणांत व उत्सवांत धार्मिक विधी व व्रते यांना महत्त्वाचे स्थान असते. त्याव्यतिरिक्त केवळ व्रते केली जातात, त्यांची संख्याही मोठी आहे. महाराष्ट्रातील हिंदू लोक जे सण व उत्सव वर्षभरात साजरे करतात, त्यांची नावे अशी –

(१) गुढी पाडवा – चैत्र शुद्ध प्रतिपदा.
(२) रामनवमी – चैत्र शुद्ध नवमी.
(३) हनुमानजयंती – चैत्र शुद्ध पौर्णिमा.
(४) परशुरामजयंती – वैशाख शुद्ध द्वितीया.
(५) अक्षय्य तृतीया – वैशाख शुद्ध तृतीया.
(६) आषाढी एकादशी.
(७) नागपंचमी – श्रावण शुद्ध पंचमी.
(८) नारळी पौर्णिमा – श्रावण शुद्ध पौर्णिमा.
(९) कृष्णजन्माष्टमी – श्रावण वद्य अष्टमी.
(१०) पोळा – आषाढ, श्रावण किंवा भाद्रपद अमावास्या.
(११) गणेशचतुर्थी – भाद्रपद शुद्ध चतुर्थी.
(१२) अनंतचतुर्दशी – भाद्रपद शुद्ध चतुर्दशी. (गणेशचतुर्थी ते अनंतचतुर्दशी हे अकरा दिवस गणेशोत्सव.)
(१३) घटस्थापना – आश्विन शुद्ध प्रतिपदा.
देवीचे नवरात्र– आश्विन शु. प्रतिपदा ते नवमी अखेर.
(१४) दसरा – (विजयादशमी) – आश्विन शु. दशमी.
(१५) कोजागिरी – आश्विन शुद्ध पौर्णिमा.
(१६) हदगा – आश्विन मास.
(१७) दीपावली – (नरकचतुर्दशी, लक्ष्मी पूजन व बलिप्रतिपदा) आश्विन वद्य चतुर्दशी, अमावास्या व कार्तिक शुद्ध प्रतिपदा.
(१८) भाऊबीज – कार्तिक शुद्ध द्वितीया.
(१९) कार्तिकी एकादशी.
(२०) त्रिपुरी पौर्णिमा – कार्तिक शुद्ध पौर्णिमा.
(२१) चंपाषष्ठी – मार्गशीर्ष शु. षष्ठी. (खंडोबाचा उत्सव)
(२२) दत्तजयंती – मार्गशीर्ष पौर्णिमा.
(२३) मकरसंक्रांत – पौष महिन्यात.
(२४) दुर्गाष्टमी–(शाकंभरी नवरात्रारंभ) पौष शु. अष्टमी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(२५) रथसप्तमी – माघ शुद्ध सप्तमी. सूर्याची पूजा.
(२६) महाशिवरात्र – माघ वद्य चतुर्दशी.
(२७) होळी – फाल्गुन पौर्णिमा.
(२८) रंगपंचमी – फाल्गुन वद्य पंचमी.

या सर्वांची माहिती त्या त्या नावाखाली दिलेली आहे.

सिंधी लोक वरील सणांप्रमाणेच काही वेगळे सणही साजरे करतात, त्यांची नावे अशी – चेनी चांद, चालिहो, तिजरी, थडरी, महालक्ष्मी, नानकजयंती.

जैनांचे सण – वर्षप्रतिपदा (वीर संवत्), ज्ञानपंचमी (कार्तिक शु. पंचमी), चातुर्मासी चतुर्दशी (कार्तिक शु. १४), कार्तिक पौर्णिमा, मौन एकादशी (मार्गसर शुद्ध ११), पौष दशमी (पार्श्वनाथजयंती), मेरू त्रयोदशी (पौष वद्य १३ ऋषभदेव-जयंती), महावीरजयंती, चैत्रपौर्णिमा, अक्षय्यतृतीया, पर्युषण पर्व, दिवाळी, इत्यादी.

शिखांचे सण – गुरू नानकजयंती, वैशाखी, होला मोहल्ला, गुरू गोविंदजयंती, वसंतपंचमी, प्रकाशदिन.

वन्य जमातींचे लोकही वरील सणांशिवाय वेगळे सण साजरे करतात, त्यांची नावे अशी – सखर चौथ, वाघदेव, दिवसो, भवाईचा सान, मोठा देव, गावबांधणी, नंदुरादेव.

मुस्लिम सण – मोहरम, मिलाद-उन-नबी, शाब-इ-मेराज, शाब-ए-बरात, रमजान, बकरीद.

ख्रिस्ती सण – नाताळ, लेंट, गुड फ्राय डे, ईस्टर, पाम संडे, स्वर्गारोहण, पेंटेकोस्ट; मेरी, जोसेफ, पीटर, झेवियर, इ. संतांचे सण.

पारशी सण – नवरोज, रपिथ विन, खोर्दाद साल (झरथुष्ट्र-जयंती), फरवर्दगन जशन, आर्दिबेहेस्त, मैद्योझरेन गहंबार, खोर्दाद जशन, तिर्यन जशन, मैद्योशेम गहंबार, अमरदाद जशन, शाहरेवार जशन, पैतिशाहेन गहंबार, मेहेर्गन जशन, जमशेदी नवरोज, अयथ्रेन गहंबार, अवन जशन, अदर्गन जशन, फर्वर्दिन जशन, दाए-ददार जशन, जशन-इ-सदेह, दिसा जशन, मैद्योरेम गहंबार, वहमन जशन, अस्पंदर्मद जशन, फर्वर्दगन जशन, हमस्पथमएदेम गहंबार.

जत्रा – महाराष्ट्रात गावोगावी जत्रा भरतात, त्यांतील काहींची माहिती खाली दिली आहे.

कान्हेरी (बोरिवली) – महाशिवरात्रीच्या दिवशी कामाठी जातीचे लोक तिथे जाऊन भीमाची पूजा करतात.

महालक्ष्मी (मुंबई) – आश्विनातील पहिले १० दिवस मोठी जत्रा भरते. देवीचे लाखो भक्त तिथे जमून पूजा करतात. चैत्रा-तही जत्रा असते, पण ही लहान असते.

लक्ष्मीनारायण (गोवलिया टँक) मुंबई – आश्विन शुद्ध द्वादशी ते वद्य षष्ठीपर्यंत मोठी जत्रा भरते. पहिल्या दि... देवाला पंचामृताभिषेक केला जातो. इतर दिवशी भजन, ... प्रवचन असते.

वडाळा (मुंबई) – इथे विठोबाची जत्रा आषाढ शुद्ध ... ते द्वादशी भरते.

माणकेश्वर (मुंबई) – श्रावण वद्य पंचमी ते नवमी. ... तीन लाख शिवभक्त या जत्रेत जमतात. हे शिवलिंग ... असून, मंदिर सुमारे ६०० वर्षांपूर्वीचे आहे, असे म्हणतात.

डोंगरी (मुंबई) – पीर सय्यद अहमद अली शहा ... उरुस, रजब ६-८ तीन दिवस. हा पीर नवसाला ... म्हणून मुसलमानांप्रमाणे हिंदू भाविक लोकही तिथे जातात.

माहिम (मुंबई) – हजरत मखदुम फकी अली साहेबाचा ... डिसेंबर महिन्यात १० दिवस सर्वधर्मीय भक्त तिथे ... हजरत अली साहेबाला भजतात. तो नवसाला पावतो, ... समजूत आहे.

वडाळा (मुंबई) – शेख मिस्त्रीचा उरूस नोव्हेंबरमध्ये ... दिवस असतो.

मौंट मेरी, वांद्रे (मुंबई) – सप्टेंबरमध्ये आठ ... नंतर रविवार ते रविवार आठ दिवस. ख्रिस्ती लोकां... अत्यंत पवित्र क्षेत्र असून, हजारो लोक या जत्रेत भाव...



मौंट मेरीचे चर्च – वांद्रे

मौंट पोइन्सूर, बोरिवली (मुंबई) – डिसेंबरमधील ... रविवारी २५–३० हजार ख्रिस्ती लोक तिथे जमतात.

महालक्ष्मी, विवळवेढे (ता. डहाणू) – चैत्र शुद्ध ... वद्य दशमी या १५ दिवसांत सर्व धर्मांचे सुमारे एक लाख ... देवीच्या दर्शनाला तिथे जातात. पौर्णिमेच्या दिवशी मुख्य...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भरते. त्या दिवशी ४० ते ५० हजार लोक जमतात. त्यांत मुख्यत: वारली, महादेव कोळी वगैरे आदिवासींचा भरणा जास्त असतो.

म्हसे (ता. मुरबाड)—पौष शुद्ध अष्टमी ते अमावास्या या दिवसांत इथे म्हसोबाची जत्रा भरते. इथे महेश्वराचे लिंग आहे. त्यालाच म्हसोबा म्हणतात. तो नवसाला पावतो. पन्नास हजारांवर भक्त त्या दिवसांत दर्शनाला जातात. पौष पौर्णिमा हा मुख्य दिवस. तिथे गुरांचा फार मोठा बाजार भरतो.

हाजी मलंग, वाडी (ता. कल्याण)—माघ महिन्यात मलंग गडावर मोठी यात्रा जमते. माघ पौर्णिमा हा मुख्य दिवस होय. त्या दिवशी सर्व धर्मांचे सुमारे ८० हजार भक्त तिथे जमतात. सात-आठ दिवसांत सुमारे दोन लाख लोक दर्शन घेतात.

भिवंडी – बाबा दिवाणसाहेबाचा उरुस. जिल्काद ९–२० या दिवसांत जत्रा भरते.

अंबरनाथ (ता. कल्याण)– येथे महाशिवरात्रीच्या दिवशी अंबरेश्वराची सुमारे एक लाखाची जत्रा भरते.

तकाई (ता. खालापूर) – खोपोलीपासून तीन मैलांवर एका टेकडीवर बोंगल्या विठोबाचे देऊळ आहे. तिथे कार्तिक शुद्ध एकादशी ते वद्य एकादशी या मुदतीत जत्रा भरते. त्या १५ दिवसांत सर्व जातींचे सुमारे एक लाख लोक दर्शनाला जातात. कार्तिक शुद्ध एकादशी हा मुख्य दिवस असतो.

सप्तशृंगगड (जि. नासिक)– चैत्र शुद्ध प्रतिपदा ते वद्य चतुर्थी आणि आश्विन शुद्ध प्रतिपदा ते पूर्णिमा या दिवसांत इथे सप्तशृंगी देवीची जत्रा भरते. चैत्रातली जत्रा खूप मोठी असून, महाराष्ट्राच्या सर्व भागांतून लोक तिथे जमा होतात. त्या वेळी मोठा बाजार भरतो.

पेंइट (जि. नासिक)– फाल्गुन शुद्ध एकादशी ते पौर्णिमा खंडोबाची जत्रा भरते. खंडोबाचे देऊळ पेइंटपासून तीन मैलांवर तोंडवळ या गावी आहे. जत्रेच्या दिवसांत पेइंटला खूप मोठा बाजार भरतो; तो महत्त्वाचा असतो. सुमारे एक लाख आदिवासी त्यासाठीच जत्रेला जातात.

वणी कसबे (जि. नासिक)– हे गाव सप्तशृंगगडापासून सहा मैलांवर आहे. गडावरील जत्रेनंतर चैत्र वद्य प्रतिपदा ते अमावास्या या गावात सप्तशृंगी देवीची जत्रा असते. तिथेही हजारो यात्रेकरू दर्शनासाठी जातात.

वडनेर – भैरव (ता. चांदोर) – या गावी चैत्र शुद्ध त्रयोदशी व चतुर्दशी या दिवसांत भैरवनाथाचे जोगेश्वरीशी लग्न होते. त्या वेळी मोठी जत्रा भरते.

परधडी (ता. नांदगाव)– नसरतपूर येथे शनीचे देऊळ आहे. ते गाव परधडी गावाला जोडले गेले आहे. जेव्हा शनिवारी अमावास्या असते, तेव्हा तिथे खूप मोठी जत्रा भरते. वर्षभरात सुमारे एक लाख भक्त शनीचे दर्शन घेतात.

त्र्यंबक (ता. नासिक)– हे फार पवित्र क्षेत्र असल्यामुळे तिथे नेहमी यात्रेकरू येतात. पण श्रावण, कार्तिक व माघ या मासांत तिथे विशेष जत्रा भरतात. त्याव्यतिरिक्त पौष वद्य पंचमी ते अमावास्या या काळात निवृत्तिनाथाची जत्रा असते.

नासिक (पंचवटी)– येथील काळाराममंदिरात रामनवमीला रथोत्सव होतो. त्या वेळी महाराष्ट्राच्या सर्व भागांतून हजारो यात्रेकरू तिथे जमतात.

तळोदे (जि. धुळे)– वैशाख शुद्ध तृतीया ते शुद्ध चतुर्दशी. या ठिकाणी कालिकादेवीची जत्रा असते. यात्रेकरू दर्शनाला व नवस फेडायला तिथे जातात. त्या ठिकाणी गुरांचा व शेत मालाचा मोठा बाजार भरतो.

सारंगखेडे (ता. शहादे) – मार्गशीर्ष पौर्णिमेला दत्तजयंती–निमित्त इथे मोठी जत्रा भरते. महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांतून, तसेच मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान या राज्यांतूनही लाखावर यात्रेकरू तिथे जातात. त्या वेळी तिथे मोठा बाजार भरतो. त्यासाठी गुजरातमधील घोडे, राजस्थान व माळवा या भागांतील बैल व गाई, सातपुडा पर्वतराजीतील साग, बांबू व बैलगाड्या आणि इतर अनेक वस्तू घेऊन व्यापारी तिथे जातात.

शिरपूर (जि. धुळे) – खंडोबाची यात्रा. माघ पौर्णिमा.

मुळावद (जि. धुळे) – महाशिवरात्रीला कपिलेश्वराची मोठी यात्रा भरते.

जळगाव – येथे कार्तिक शुद्ध एकादशी – द्वादशीला रामरथोत्सव होतो. तेव्हा सुमारे २५ हजार रामभक्त तिथे जमा होतात. हा उत्सव कार्तिक शुद्ध प्रतिपदा ते पौर्णिमा या दिवसांत फार थाटाने केला जातो. जळगाव येथे महालक्ष्मीच्या देवळात नवरात्राचा उत्सव होतो. त्या वेळी हजारो यात्रेकरू तिथे जमतात.

कोथळी (एदलाबाद महाल, जि. जळगाव) – या गावी मुक्ताबाईची समाधी आहे. त्या ठिकाणी माघ वद्य दशमी ते द्वादशी या तीन दिवसांत विदर्भातील सुमारे ५० हजार लोक जत्रेसाठी जातात.

चांगदेव (जि. जळगाव, तापी–पूर्णा संगम)– माघ वद्य त्रयोदशी ते अमावास्या येथे चांगदेवाची जत्रा असते. त्या वेळी तिथे हजारो लोक जातात.

शिरडी – (जि. नगर) येथे श्रीसाईबाबांची जत्रा चैत्र शुद्ध अष्टमी–नवमीला असते. त्या वेळी ५०–६० हजार साईभक्तांचा मेळावा तिथे भरतो व मोठा उत्सव केला जातो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीरामपूर (जि. नगर) – येथे श्रीरामनवमीचा उत्सव चैत्र शुद्ध नवमी ते एकादशी हे तीन दिवस चालतो. त्या वेळी सुमारे ३० हजार लोक तिथे दर्शनासाठी जमतात. त्या जत्रेत कुस्त्यांचा मोठा फड असतो.

टोके (ता. नेवासे) – येथे सिद्धेश्वराचे स्वयंभू लिंग आहे. माघ वद्य एकादशी ते फाल्गुन शुद्ध द्वितीया या दिवसांत तिथे मोठी जत्रा भरते. त्या वेळी सुमारे ७० हजार शिवभक्त तिथे जमतात. महाशिवरात्री हा जत्रेचा मुख्य दिवस होय.

प्रवरासंगम (ता. नेवासे) – महाशिवरात्रीनिमित्त माघ वद्य एकादशी ते अमावास्या या काळात इथे मोठी जत्रा भरते. त्या वेळी सुमारे ७० हजार यात्रेकरू शिवदर्शनासाठी तिथे जातात.

बोघेगाव (जि. अहमदनगर) – येथे बन्नुम्माचा दर्गा आहे. त्या ठिकाणी आश्विन शुद्ध पौर्णिमेनंतरच्या गुरुवारी जत्रा भरते व तीन दिवस चालते. त्या दिवसांत सुमारे २५ हजार लोक तिथे जमतात. त्यांत सर्व धर्मांचे व जातींचे लोक असून, मराठवाड्यातले लोक जास्त असतात.

शिंगणापूर (जि. अहमदनगर) – शनीची मोठी यात्रा दर अमावास्येला भरते.

मढी (ता. पाथर्डी) – येथे कानिफनाथाची जत्रा फाल्गुन वद्य पंचमी ते चैत्र शुद्ध प्रतिपदा या कालात असते. त्यांतील पहिला व शेवटचा दिवस हे मुख्य आहेत. हिंदू व मुस्लिम दोन्ही धर्मांचे अगणित लोक कानिफनाथाचे भक्त असून, ते मोठ्या संख्येने या जत्रेला जातात. तिथे गुरांचा, विशेषतः गाढवांचा मोठा बाजार भरतो.

आळंदी देवाची – येथे ज्ञानेश्वरांची समाधी असून, तिथे आषाढी व कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने दोनदा मोठी यात्रा असते. एक लाखाहून अधिक लोक समाधीचे दर्शन घेतात.

चतुःशृंगी (जि. पुणे) – येथे नवरात्रात मोठी जत्रा भरते.

देहू (जि. पुणे) – येथे संत तुकारामांची समाधी असून, त्या ठिकाणी दोनदा जत्रा भरते. कार्तिकी एकादशीनिमित्त ४०–५० हजार व फाल्गुनात तुकारामबीजेनिमित्त २०–२५ हजार वारकरी तिथे जातात.

जेजुरी – (जि. पुणे) येथे खंडोबाची जत्रा वर्षातून चारदा असते. (१) मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा ते षष्ठी, (२) पौष पौर्णिमा, (३) माघ शुद्ध पौर्णिमा व (४) चैत्र पौर्णिमा. सोमवती अमावास्येलाही तिथे जत्रा भरते. या जत्रांसाठी सर्व महाराष्ट्रातून सुमारे ७० हजार लोक जमा होतात. पौषी जत्रेच्या वेळी तिथे गाढवांचा मोठा बाजार भरतो.

कारंजे (ता. बारामती) – येथे सोमेश्वराचे देऊळ आहे. तिथे श्रावणातल्या शेवटच्या सोमवारी पंचवीस ते तीस हजारांची जत्रा भरते. याला सोमयाचे कारंजे असेही म्हणतात.

मांढरदेव (ता. वाई) – येथे पौष शुद्ध त्रयोदशी ते अमावास्या या काळात काळुबाईची मोठी जत्रा असते. हिंदू व मुसलमान असे दोन्ही धर्मांचे सुमारे ८० हजार लोक तिथे जातात.



ज्ञानेश्वरांची समाधी– आळंदी

शिंगणापूर (जि. सातारा) – येथे चैत्र शुद्ध पंचमी ते पौर्णिमा शंभू महादेवाची मोठी जत्रा असते. त्या वेळी सुमारे एक लाख लोक तिथे जमतात. महाशिवरात्रीलाही तिथे लाखावर लोकांची जत्रा जमते.

म्हसवड (ता. माण) – येथे कार्तिक महिन्यात सिद्धनाथाची व मार्गशीर्ष महिन्यात नागोबाची अशी दोनदा जत्रा भरते. दोघांची देवळे आहेत व विरोबाचेही देऊळ आहे. दुसऱ्या जत्रेत गुरांचा मोठा बाजार भरतो.

पाल (ता. कराड) – येथे पौष मासात खंडोबाची जत्रा भरते. त्या वेळी सर्व जातींचे सुमारे ७५ हजार हिंदू तिथे जमा होतात. त्या उत्सवात खंडोबा व म्हाळसा यांचा विवाहसोहळा साजरा होतो.

जत (जि. सांगली) – यल्लमा देवीची जत्रा मार्गशीर्ष मासात भरते. महाराष्ट्राच्या सर्व भागांतून व म्हैसूर राज्यातूनही सुमारे एक लाख यात्रेकरू त्या वेळी तिथे जमतात.

बत्तीस शिराळे – येथे नागपंचमीला मोठी यात्रा भरते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खरसुंडी (जि. सांगली) – पौष व चैत्र महिन्यात खरसुंड सिद्धाची यात्रा ५० हजारांच्या वर भरते.

रेवणसिद्ध (जि. सांगली) – विटे गावाजवळ महाशिवरात्रीनिमित्त मोठी जत्रा भरते.

वैराग (ता. वार्शी) – येथे श्रावण शुद्ध एकादशी ते वद्य प्रतिपदा या काळात नाथपंथाची मोठी जत्रा असते. पौर्णिमेला २०–२५ हजार लोक तिथे जमतात.

पंढरपूर – चैत्र, आषाढ, कार्तिक व माघ शुद्ध एकादशीला इथे मोठ्या यात्रा असतात. अधिक मासातील एकादशीलाही यात्रा असते. आषाढी यात्रा सर्वांत महत्त्वाची असून, त्या वेळी तीन लाखांहून अधिक वारकरी विठ्ठलाच्या दर्शनाला जमतात. इतर मासांत १ ते ३ लाखांची यात्रा होते.

मोहोळ (जि. सोलापूर) – येथे नागनाथाचे मंदिर आहे. त्या ठिकाणी चैत्र अमावास्या ते वैशाख शुद्ध दशमीपर्यंत मोठी जत्रा असते. वैशाख शुद्ध ३ व ७ हे मुख्य दिवस असून, त्या दिवशी सुमारे २० हजार लोक महादेवाच्या दर्शनाला जातात.

वडवळ (ता. मोहोळ, जि. सोलापूर) – नागनाथाची जत्रा. चैत्र पौर्णिमा ते वद्य सप्तमी. चतुर्थी व सप्तमी हे दोन दिवस मुख्य असून, त्या दिवशी सुमारे वीस हजार लोक संत नागनाथाच्या दर्शनाला जमतात.

सोलापूर – येथे सिद्धेश्वराची गड्डा जत्रा जानेवारी महिन्यात असते. १४ जानेवारी (मकर संक्रांत) हा मुख्य दिवस असून, त्या दिवशी संत सिद्धेश्वराच्या योगदंडाचे व त्याच्या एका भक्त स्त्रीचे लग्न होते. १२ ते १६ जानेवारी या पाच दिवसांत तिथे लाख-दीड लाखांची यात्रा होते.

वाडी रत्नागिरी (पन्हाळा महाल, जि. कोल्हापूर) – चैत्र शुद्ध अष्टमी ते पौर्णिमा इथे ज्योतिबाची जत्रा भरते. पौर्णिमेचा दिवस मुख्य असतो; त्या आठ दिवसांत सबंध महाराष्ट्रातून सर्व जातींचे दीड ते पावणेदोन लाख लोक ज्योतिबाच्या दर्शनाला जमतात.

कोल्हापूर – येथून जवळच एका टेकडीवर टेंबलाईचे देऊळ आहे. तिथे आश्विन शुद्ध पंचमीला (कोहळे पंचमी) पन्नास ते साठ हजार भक्त देवीच्या दर्शनाला जमतात.

पैठण (जि. औरंगाबाद) – येथे फाल्गुन वद्य द्वितीया ते अष्टमी या सात दिवसांत मोठी जत्रा असते. सुमारे २ लाख लोक सर्व महाराष्ट्रातून जमतात. फाल्गुन वद्य षष्ठी ही संत एकनाथांची पुण्यतिथी होय. त्या निमित्त ही जत्रा भरते.

औंढ्या नागनाथ (जि. परभणी) – येथे माघ वद्य चतुर्दशी ते फाल्गुन शुद्ध द्वितीया या काळात मोठी जत्रा भरते. इथल्या शिवलिंगाला नागेश म्हणतात. हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक स्थान आहे. चार दिवसांत ४०–५० हजार लोक शिवदर्शनासाठी इथे जमतात.



शिवमंदिर – औंढ्या नागनाथ

सेलू (जि. परभणी) – येथे मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी ते वद्य प्रतिपदा या काळात मोठी जत्रा भरते. गोपाळराव सुभेदार नामक एक साधुपुरुष होऊन गेले, त्यांच्या स्मरणार्थ तिथे ३०–४० हजार भक्त जमतात. विष्णु–केशवाच्या रूपात त्यांची पूजा केली जाते.

परभणी – येथे शहा-तुरब-उल्-हक याचा उरुस रमझान महिन्यात ४ दिवस असतो. त्या वेळी ३०–४० हजार भक्त तिथे जमतात.

तळवाडा (जि. बीड) – येथे चैत्र वद्य अष्टमी ते वैशाख शुद्ध तृतीया या दिवसांत त्वरितपुरी देवीची जत्रा भरते. सुमारे ५० हजार भक्त देवीच्या दर्शनार्थ जमतात.

बीड – येथे मकरसंक्रांत व महाशिवरात्र या दोन्ही दिवशी कंकालेश्वराची मोठी जत्रा भरते. सुमारे २५ हजार लोक जमतात. या स्थानाला कनकालय असेही म्हणतात. जत्रेत कुस्त्यांचा मोठा फड होतो.

परळी वैजनाथ (जि. बीड) – येथे माघ वद्य त्रयोदशी ते अमावास्या या काळात महाशिवरात्रीची मोठी जत्रा भरते. इथले शिवलिंग हे एक ज्योतिर्लिंग असल्यामुळे हे स्थान अत्यंत पवित्र मानले जाते आणि सुमारे ५० हजार यात्रेकरू तिथे त्यावेळी जमतात.

माहूर (जि. नांदेड) – येथे मार्गशीर्ष शुद्ध एकादशी ते पौर्णिमा हे पाच दिवस दत्तजयंतीचा मोठा उत्सव होतो. दत्ताचे मंदिर एका टेकडीवर आहे. महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांतून तसेच उ. भारत, आंध्र, म्हैसूर, गुजरात या प्रदेशांतूही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आलेले पन्नास हजारांवर दत्तभक्त या उत्सवात भाग घेतात.

माळेगाव (जि. उस्मानाबाद) – येथे मार्गशीर्ष वद्य द्वादशी ते पौष शु. चतुर्थी या आठ दिवसांत खंडोबाची जत्रा असते. त्यासाठी सुमारे २ लाख यात्रेकरू तिथे जातात. त्या वेळी तिथे गुरांचा मोठा बाजार भरतो. ती घेण्यासाठी गुजरात, राजस्थान, म्हैसूर, आंध्र, इ. प्रदेशांतून व्यापारी येतात. घोडे, उंट, बैल व खेचरे यांची विक्री फार मोठ्या प्रमाणावर होते.

तेर (ता. उस्मानाबाद) –येथे संत गोरोबाची जत्रा चैत्र वद्य एकादशी ते वैशाख शुद्ध तृतीया या काळात असते. त्या आठ दिवसांत तिथे वारकरी पंथाचे सुमारे ५०, हजार लोक जमतात.

लातूर (जि. उस्मानाबाद) – येथे महाशिवरात्रीनिमित्त माघ मासात मोठी जत्रा असते. सिद्धेश्वर हे ग्रामदैवत आहे. त्याच्या दर्शनार्थ ५०–६० हजार लोक तिथे जमतात.

तुळजापूर (जि. उस्मानाबाद) – येथे तुळजाभवानीची जत्रा आश्विन शुद्ध प्रतिपदा ते दशमी असते. त्या प्रसंगी भारताच्या सर्व भागांतून सुमारे ६० हजार यात्रेकरू तिथे जमतात.

येडमाळ (जि. उस्मानाबाद) – येथे चैत्र शुद्ध चतुर्दशी ते वद्य पंचमी या काळात येडेश्वरी देवीची जत्रा भरते. 'वेडेआई'चे रूपांतर येडाई झाले व त्यावरूनच गावालाही येडमाळ हे नाव मिळाले. तिथे सुमारे ८० हजार यात्रेकरू महाराष्ट्राच्या सर्व भागांतून जमा होतात.

धनोरा (जि. बुलढाणा) – येथे महासिद्ध बाबाची जत्रा माघ शुद्ध एकादशी ते पौर्णिमा या दिवसांत असते. त्या प्रसंगी बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ व जळगाव जिल्ह्यांतले कुणबी, मराठा, लेवा, गुजर या जातींचे ३०–४० हजार लोक या संताच्या दर्शनार्थ जमतात. मध्यप्रदेशातले गोंड, कोरकू व वंजारी लोकही येतात.

पिंपळगाव सराई (जि. बुलढाणा) – येथे शरीफ सैलनी शहा मियाचा उरुस फाल्गुन शुद्ध पौर्णिमा ते वद्य नवमी या दिवसांत होतो. पंचमी ते नवमी हे मुख्य दिवस असून, त्या पाच दिवसांत भिन्न धर्मांचे व जातींचे सुमारे ७० हजार लोक उरुस पाहायला तिथे जातात.

देऊळगाव राजा (जि. बुलढाणा) – येथे आश्विन शुद्ध प्रतिपदा ते वद्य चतुर्थी या काळात बालाजीची जत्रा भरते. या १९ दिवसांत तिथे सुमारे एक लाख यात्रेकरू जातात. आंध्र प्रदेशातील तिरुपतीचा बालाजी या दिवसांत देऊळगावला जातो, अशी समजूत आहे. येथे बाजारात धमनी गाड्यांची मोठी विक्री होते. पूर्वी काठेवाडी घोड्यांच्या व्यापाराबद्दल ही जत्रा प्रसिद्ध होती.

लोणी बुद्रुक (जि. अकोला) – येथे कार्तिक वद्य चतुर्दशी ते मार्गशीर्ष शुद्ध द्वितीया या काळात संत सखाराममहाराज यांच्या पुण्यतिथीचा उत्सव होतो. सर्व महाराष्ट्रातून महाराजांचे सुमारे ८० हजार भक्त त्या वेळी तिथे जमतात. कार्तिकी अमावास्येला सुमारे १० हजार लोकांना भोजन घातले जाते.

मंगरूळ (जि. अकोला) – येथे सय्यद मौलाना हजरत हयात कलंदर रहमतुल्ला अलम या पीराचा दर्गा असून, त्याच्या उरुसाच्या वेळी २५ हजारांची जत्रा भरते.

कारंजा – बहिरम (जि. अमरावती) – येथे मार्गशीर्ष शुद्ध पंचमी ते वद्य पंचमी या काळात बहिरमाची किंवा भैरवाची जत्रा भरते. त्या दिवसांत एक ते दीड लाख यात्रेकरू तिथे दर्शनार्थ जातात.

करंजगाव (जि. अमरावती) – येथे भाद्रपद शुद्ध चतुर्थी ते पौर्णिमा या काळांत गणेशोत्सव साजरा केला जातो. त्यावेळी तिथे २५–३० हजारं लोक दर्शनार्थ जातात.

अचलपूर (जि. अमरावती) – येथे रविउल् – अव्वल १०–१५ या दिवसांत शहा दौल रहिमान शहा गाझीचा उरुस होतो. त्या साठी सुमारे ३० हजार लोक तिथे जातात.

ऋणमोचन – अमरावतीपासून १८ मैलांवर हे स्थान आहे. पौष मासात दर रविवारी यात्रा असते, त्यावेळी २५–३० हजार लोक जमतात.

सालबर्डी (जि. अमरावती) – येथे महाशिवरात्रीनिमित्त मोठी जत्रा भरते. त्या वेळी २५–३० हजार शिवभक्त तिथे दर्शनाला जातात.

शेगाव (जि. बुलढाणा) – येथे डिसेंबर १३–२० या दिवसांत गजानन महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त उत्सव होतो. तिथे त्यांची समाधी आहे. २५–३० हजार लोक दर्शनार्थ तिथे जमतात.

अमरावती – येथे आश्विन शुद्ध प्रतिपदा ते दशमी या काळात अंबादेवीची जत्रा असते. त्या दिवसांत सुमारे दोन लाख लोक तिथे जातात.

कौंडिण्यपूर (जि. अमरावती) – येथे कार्तिक शुद्ध एकादशी ते वद्य द्वितीया या काळात विठ्ठल– रखुमाईची जत्रा होते. कार्तिक वद्य प्रतिपदा हा मुख्य दिवस होय. त्या दिवशी सुमारे ३०,००० आणि सात दिवसांत सुमारे ७५,००० लोक जत्रेत भाग घेतात.

सत्रंग विठोबा (जि. अमरावती) – येथे फाल्गुन अमावास्या ते चैत्र शुद्ध दशमी या काळात विठोबाची जत्रा असते. पहिले तीन दिवस मुख्य असतात. २५–३० हजार लोक तिथे संत विठ्ठलबुवा किंवा अवधूतबुवा यांच्या समाधीच्या दर्शनार्थ जमतात. इथे अश्विनातही जत्रा भरते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घुइखेड (जि. अमरावती) – येथे माघ शुद्ध प्रतिपदा ते द्वादशी या काळात वंडोजी बाबाची जत्रा भरते. माघ शुद्ध



अंबादेवीचे मंदिर– अमरावती

सप्तमी ते नवमी हे तीन दिवस मुख्य असतात. २५–३० हजार भक्त दर्शनार्थ जातात.



रामाचे मंदिर– रामटेक

दिग्रस (जि. यवतमाळ) – येथे आश्विन शुद्ध एकादशी ते वद्य पंचमी या काळात घंटीबाबांची जत्रा भरते. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त ५०–६० हजार भक्त समाधीच्या दर्शनासाठी जमतात.

वणी (जि. यवतमाळ) – येथे फाल्गुन वद्य प्रतिपदा ते चैत्र शुद्ध पौर्णिमा यावेळी रंगनाथस्वामीची जत्रा भरते. मंदिरात शेषशायी विष्णूची मूर्ती आहे. विदर्भातील ही एक मोठी जत्रा आहे. ती गुरांच्या बाजारासाठी प्रसिद्ध आहे.

धाग (ता. आर्वी जि. वर्धा) – या गावी महाशिवरात्रीची जत्रा भरते. तिथे एका लहानशा गुहेत शंकराची पाषाणमूर्ती आहे. आसपासच्या गावांतील सुमारे ३० हजार लोक तिथे शिवदर्शनासाठी जमतात.

कापसी (हिंगणघाट, जि. वर्धा) – येथे लक्ष्मीनारायणाचे मोठे मंदिर आहे. ते संत नानजी महाराज यांनी बांधवले. त्यांना लोक देवदूत मानतात व भजतात. त्यांच्या स्मरणार्थ माघ शुद्ध सप्तमी ते पौर्णिमा या दिवसांत तिथे ३०–४० हजार भक्त जमतात.

रामटेक (जि. नागपूर) – येथे रामनवमीचा उत्सव साजरा केला जातो. त्या वेळी तिथे विदर्भ व मध्य प्रदेश या भागांतून ३० हजाराहून अधिक लोक जमा होतात.

अंभोरा (जि. नागपूर) – त्रिवेणीसंगम. येते चैतन्येश्वरमंदिर व हरिहरस्वामीची समाधी आहे. कार्तिक अमावास्येला मोठी यात्रा भरते.

देवता व साधूसंत नवसाला पावतात, इष्ट कामना पूर्ण करतात, म्हणून नवस बोलण्यासाठी व ते फेडण्यासाठी हजारो लोक अशा जत्रांतून भाग घेतात आणि काही वस्तू देवाला वा समाधीला अर्पण करतात. काही लोक करमणुकीसाठीही जत्रेला जातात; तर बरेच लोक बाजारासाठी जातात. अशी आणखी शेकडो ठिकाणे असून, कुठे दोन ते चार हजारांची, कुठे पांच-सहा हजारांची, तर कुठे पंधरा ते वीस हजारांची जत्रा दर वर्षी भरते.

तीर्थक्षेत्रे – महाराष्ट्रात असंख्य तीर्थक्षेत्रे आहेत, त्यांतील प्रमुख क्षेत्रांची नावे अशी–

(१) अक्कलकोट (जि. सोलापूर) – दत्तक्षेत्र.
(२) आंबेजोगाई (जि. बीड) – योगेश्वरीचे मंदिर.
(३) आपेगाव (जि. औरंगाबाद) – हे ज्ञानेश्वरांचे जन्मस्थान आहे.
(४) आळंदी (जि. पुणे) – ज्ञानेश्वरांची समाधी.
(५) ओझर (जि. पुणे) – हे अष्ट विनायकांतील एका गणपतीचे क्षेत्र आहे.
(६) औंढ्या नागनाथ (जि. परभणी) – ज्योतिर्लिंग.
(७) औदुंबर (जि. सांगली) – दत्तक्षेत्र.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(८) कऱ्हाड (जि. सातारा) – देवीचे स्थान व संगम.
(९) कळंब (जि. यवतमाळ) – गणपतीक्षेत्र.
(१०) कळसूबाई (जि. नासिक) – सह्याद्रीचे सर्वोच्च शिखर व देवीचे स्थान.
(११) कुलपाक (जि. परभणी) – जैनांचे तीर्थक्षेत्र.
(१२) कुंथलगिरी (जि. उस्मानाबाद) – जैनक्षेत्र.
(१३) कोल्हापूर (करवीर) – महालक्ष्मीचे मंदिर.
(१४) कौंडिण्यपूर (जि. अमरावती) – विदर्भपंढरी.
(१५) घृष्णेश्वर (जि. औरंगाबाद) – ज्योतिर्लिंग.
(१६) चंद्रपूर (जि. चांदा) – महाकालीचे मंदिर.
(१७) चांदवड (जि. नासिक) – रेणुकादेवी.
(१८) चाफळ (जि. सातारा) – श्रीराममंदिर.
(१९) चिंचवड (जि. पुणे) – मोरया गोसावी यांची समाधी
(२०) जांब (जि. औरंगाबाद) – हे समर्थ रामदासांचे जन्म–स्थान आहे.
(२१) जेजुरी (जि. पुणे) – खंडोबा.
(२२) ज्योतिबा (जि. कोल्हापूर) – शिवस्थान.
(२३) तुळजापूर (जि. उस्मानाबाद) – भवानी.
(२४) तुळापूर (जि. पुणे) – भीमा व इंद्रायणी यांचा संगम. येथून जवळच वढू या गावी संभाजीचे वधस्थान आहे.
(२५) त्र्यंबकेश्वर (जि. नासिक) – ज्योतिर्लिंग.
(२६) थेऊर (जि. पुणे) – अष्ट विनायकांपैकी गणपतीचे स्थान. थोरले माधवराव यांची समाधी.
(२७) देहू (जि. पुणे) – संत तुकारामाचे जन्म स्थान.
(२८) धोम (जि. सातारा) – वाईपासून ५ मैलांवर कृष्णातीरी वसलेले तीर्थक्षेत्र. इथ शिवपंचायतनाची देवळे व नरसिंहाचे मंदिर आहे. या ठिकाणी दर वर्षी महादेवाची व नरसिंहाची यात्रा भरते.
(२९) नरसिंगपूर (जि. पुणे) – भीमा व नीरा यांचा संगम. लक्ष्मीनरसिंहाचे मंदिर. याला नीरानरसिंहपूर असेही म्हणतात.
(३०) नरसोबाची वाडी (जि. कोल्हापूर) – दत्तक्षेत्र.
(३१) नांदेड–शिखांचे तीर्थस्थान. इथे गुरू गोविंदसिंगाची समाधी आहे.
(३२) नासिक – पश्चिमकाशी.
(३३) निंवगाव (जि. पुणे) – दावडी-निंवगाव हे खंडोबाचे क्षेत्र भीमेच्या काठी आहे.
(३४) निर्मळ (जि. ठाणे) – परशुरामभूमी.
(३५) नेवासे (जि. अहमदनगर) – ज्ञानेश्वरीची रचना.
(३६) पंढरपूर (जि. सोलापूर) – विठ्ठलक्षेत्र.
(३७) परशुराम (जि. रत्नागिरी) – परशुरामक्षेत्र.
(३८) परळी – वैजनाथ (जि. बीड) – ज्योतिर्लिंग.
(३९) पाल (जि. सातारा) – तारळी नदीच्या काठी व[...]लेले खंडोबाचे प्रसिद्ध स्थान. मूळ नाव राजापूर. पालई ना[...] गवळणीला इथे खंडोबाचे दर्शन घडले, म्हणून या गावा[...] पाल हे नाव मिळाले, असे म्हणतात. इथले देऊळ इ. स. [...] १५ व्या शतकातले आहे.
(४०) पाली (जि. कुलाबा) – अष्ट विनायकांतील ग[ण]पतीचे एक स्थान.
(४१) पुळे (जि. रत्नागिरी) – गणपतीचे स्थान.
(४२) पैठण (जि. औरंगाबाद) – दक्षिणकाशी.
(४३) प्रकाशे (जि. धुळे) – शिवस्थान.
(४४) प्रवरासंगम (जि. अहमदनगर) – टोके गावी प्र[वरा] व गोदा यांचा संगम होतो. तिथे सिंहस्थयात्रा भरते.
(४५) भद्रावती (जि. चांदा) – जैनांचे तीर्थक्षेत्र. [...] पार्श्वनाथाचे भव्य मंदिर आहे. जवळच विरासन नावा[च्या] टेकडीत बौद्ध लेणी आहेत.
(४६) भीमाशंकर (जि. पुणे) – ज्योतिर्लिंग.
(४७) मलंगगड (जि. ठाणे) – हाजीमलंगाची कबर.
(४८) महड (जि. कुलाबा) – अष्ट विनायकांपैकी ए[क]
(४९) महाबळेश्वर (जि. सातारा) – शिवक्षेत्र.
(५०) माहुली (जि. सातारा) कृष्णा-वेण्णा संगम.
(५१) माहूर (जि. नांदेड) – दत्त व रेणुका यांचे स्था[न]
(५२) मोरगाव (जि. पुणे) – इथे अष्ट विनायकांपैकी [...] गणपतीचे स्थान आहे.
(५३) रांजणगाव (जि. पुणे) – हे अष्ट विनायकां[पैकी] एका गणपतीचे स्थान आहे.
(५४) राजापूर (जि. रत्नागिरी) – गंगा येते.
(५५) रितपुर (ऋद्धिपूर, जि. अमरावती) – महानु[भा]वांचे पुण्यक्षेत्र.
(५६) लेण्याद्री (जि. पुणे) – अष्ट विनायकांपैकी [...] गणपतीचे स्थान.
(५७) लोणार (जि. बुलढाणा) – विरजक्षेत्र. इथे [...] सूदनाचे मंदिर आहे.
(५८) वाई (जि. सातारा) – प्रसिद्ध क्षेत्र.
(५९) शिंगणापूर (जि. सातारा) – शंभुमहादेव.
(६०) शिरडी (जि. अहमदनगर) – साईबाबा.
(६१) संगमेश्वर (जि. रत्नागिरी) – तीन नद्यांचा [...] संगमेश्वर व कर्णेश्वर यांची मंदिरे.
(६२) सज्जनगड (जि. सातारा) – इथे समर्थ रामदा[स]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समाधी व मठ आहे आणि श्रीरामाचे व मारुतीचे मंदिरही आहे.

(६३) सप्तशृंगी (जि. नासिक) – देवीचे स्थान.

(६४) सिद्धटेक (जि. पुणे) – अष्ट विनायकांपैकी एक.

(६५) हरेश्वर (जि. कुलाबा) – हरिहरेश्वर व काळभैरव यांची जागृत स्थाने.

या तीर्थक्षेत्रांची माहिती कोशांत स्वतंत्रपणे त्या त्या नावाने दिलेली आहे.

ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळे–(१) अंकाई–टंकाई (जि. नासिक) – अंकाई हे सह्याद्रीचे एक शिखर असून, त्याची उंची सुमारे ३२०० फूट आहे. जवळच टंकाईचा डोंगर आहे. या दोन डोंगरांवर दोन किल्ले असून, अंकाईच्या उतारावर तीन ब्राह्मणी शिल्पपद्धतीची लेणी व टंकाईच्या उतरणीवर सात जैन पद्धतीची लेणी प्रेक्षणीय आहेत.

(२) अंजनवेल (जि. रत्नागिरी)–वासिष्ठी नदीच्या तीरावर शिवाजीमहाराजांनी बांधलेला किल्ला आहे. हे एक बंदर असून, त्यात दीपगृह आहे. इथले तारकेश्वराचे मंदिर प्राचीन आहे.

(३) अंजनेरी (जि. नासिक) – इथे किल्ला, अंजनीचे देऊळ व जैन लेणी आहेत.

(४) अंबरनाथ (जि. ठाणे)– शिवमंदिर.

(५) अक्कलकोट (जि. सोलापूर)– इथल्या जुन्या राजवाड्यातील देशी, विदेशी, जुन्या-नव्या विविध प्रकारच्या हत्यारांचा मोठा संग्रह प्रेक्षणीय आहे.

(६) अगाशिव (जि. सातारा)– कराडपासून एक मैलावर अगाशिवाचा डोंगर आहे; त्याच्या माथ्यावर शिवमंदिर आहे आणि डोंगरात ५४ बौद्ध लेणी आहेत. ही लेणी सन पू. २५० ते इ. स. २०० या काळातली असावी.

(७) अजंटा (जि. औरंगाबाद) – इथे प्रेक्षणीय लेणी आहेत व त्यांतील चित्रसृष्टी सुंदर आहे.

(८) अंमळनेर (जि. जळगाव)– धुळ्यापासून २१ मैलांवर बोरी नदीच्या काठी हे शहर वसले आहे. हे एक औद्योगिक व व्यापारी केंद्र आहे. इथे एक किल्ला आहे. शहरापासून एक मैलावर खाटेश्वर महादेवाचे मंदिर आहे. जवळच सतीचा खांब आहे. नदीपलिकडे वरुणेश्वराचे मंदिर व एक तलाव आहे. तिथून दीड मैलावर एका टेकडीवर अंब ऋषीचे स्थान दाखवतात. आषाढी एकादशीला तिथे मोठी यात्रा असते. श्रीमान प्रतापशेटजींनी तिथे रामाचे भव्य व सुंदर मंदिर बांधले आहे. तसेच तिथले जैनांचे मंदिरही प्रेक्षणीय आहे. पण सखाराममहाराजांच्या वाडीमुळे या शहराला विशेष महत्त्व आले आहे. सुमारे १७५ वर्षांपूर्वी इथे हे साधू होऊन गेले. नदीच्या पात्रात त्यांची समाधी आहे. तिथे वैशाख शुद्ध एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत मोठी यात्रा भरते. सुमारे ८० हजार लोक तिथे जमतात.

(९) अहमदनगर– जिल्ह्याचे मुख्य ठिकाण. हे शहर अहमद निजामशहाने इ. स. १४९४ साली वसवले. निजामशाहीची राजधानी येथे होती. इथला किल्ला हुसेन निजामशहाने इ. स. १५५९ मध्ये बांधला. चांदबिबीचा महाल पूर्वेस ६ मैलांवर



चांदबिबीचा महाल– अहमदनगर

एका उंच टेकडीवर आहे. वास्तविक ती सरदार सलाबत जंगाची कबर आहे. निजामशहाची कबर, अलमगीराचा दर्गा व फरिबाग ही इतिहासप्रसिद्ध ठिकाणे प्रेक्षणीय आहेत. अहमदनगरच्या किल्ल्याजवळ दमडी व टोली नावांच्या दोन मशिदी आहेत. त्यांची रचना अगदी सारखी असून, त्यांतील कोरीव नक्षीकाम सुंदर आहे.

(१०) इगतपुरी (जि. नासिक)– हे शहर थळ घाटाच्या टोकाशी आहे. येथून तीन मैलांवर त्रिंगलवाडी येथे एक किल्ला व काही लेणी आहेत. इथे ब्रह्मदेवाचे एक मंदिर आहे.

(११) उदगीर (जि. उस्मानाबाद) – मांजरा नदीच्या काठी हे इतिहासप्रसिद्ध गाव आहे. इ. स. १७६० साली सदाशिवराव भाऊ व निजाम यांची मोठी लढाई होऊन निजामाचा पराभव झाला. इथल्या किल्ल्यावर उदागीरबुवांची समाधी आहे.

(१२) उस्मानाबाद (धाराशिव)– सोलापूरच्या उत्तरेला ४३ मैलांवर हे शहर आहे. इथली लेणी प्रसिद्ध आहेत.

(१३) एलिचपूर (जि. अमरावती)— पूर्वी ही वऱ्हाडची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजधानी होती. इथे अनेक मशिदी, कबरी व दर्गे असून, त्यांचे शिल्पकाम प्रेक्षणीय आहे. याला आता अचलपूर म्हणतात.

(१४) औंध– (जि. सातारा)– इथले कलावस्तुसंग्रहालय फार प्रेक्षणीय आहे.

(१५) औरंगाबाद – पूर्वी या गावाचे नाव खडकी होते. येथे खडकेश्वराचे मंदिर आहे. औरंगजेबाने तिथे वस्ती केली व त्याला औरंगाबाद हे नाव मिळाले. हिमरू व किनखाब या इथल्या खास कला होत. औरंगजेबाच्या मुलाने आपली आई रबीया दुराणी हिच्या स्मरणार्थ ताजमहालासारखे शिल्प इथे निर्माण केले, त्याला बिबी का मकबरा म्हणतात. मलिकंबर नावाच्या एका तंत्रज्ञाने इथे एक पाणचक्की उभी केली आहे. वाहत्या पाण्याचा प्रपात निर्माण करून त्याच्या योगाने पिठाची चक्की चालवण्याची सोय इथे केलेली आहे.

जवळच डोंगरात नऊ लेणी खोदलेली आहेत. क्रमांक ३ व ७ ही लेणी विशेष प्रेक्षणीय आहेत. सातव्या लेण्यातील उग्रतारा व भृकुटीतारा या मूर्ती व शिल्पकाम मनोहर आहे. लेण्यांतील बौद्ध विहाराजवळ संत निपट निरंजन याची समाधी आहे.

(१६) कर्नाळा– (जि. कुलाबा)– पनवेलच्या दक्षिणेला ८ मैलांवर हा डोंगरी किल्ला आहे. किल्यावर १२५ फूट उंचीचा एक स्तंभ आहे. यादवांच्या राजवटीत हे उ. कोंकणातील मुख्य ठाणे होते. किल्यात शिलालेख आहेत.

(१७) कल्याण (जि. ठाणे)– इ. स.च्या १८ व्या शतकापासून व्यापाराचे मोठे केंद्र म्हणून याचे उल्लेख सापडतात. कोकण व देश यांना जोडणाऱ्या मार्गावरील एक मोठे नाके इथे होते. इथे दुर्गाडी नावाचा किल्ला व इतिहासप्रसिद्ध अशा दोन मशिदी आहेत.

सेंचुरी रेयानच्या परिसरात एका टेकडीवर एक भव्य व सुंदर विठ्ठलमंदिर बिडला यांच्या कल्याण चॅरिटी ट्रस्टतर्फे बांधण्यात आले आहे. या मंदिरात तीन गर्भगृहे असून, त्यांवर तीन शिखरे आहेत. गर्भगृहासमोर १४०० चौ. फूट क्षेत्रफळ असलेला विशाल सभामंडप आहे. त्यावर मध्यभागी ४० फूट उंचीचा घुमट आहे. त्याच्या दोन्ही बाजूंवर आकाशविहार करणाऱ्या विद्याधरांच्या आकृती कोरलेल्या असून, जवळ नृत्य करणाऱ्या देवांगनांच्या प्रतिमा आहेत.

गूढमंडपाला पाच प्रवेशद्वारे आहेत. ती संगमरवरी असून, त्यांवर सुंदर नक्षी कोरलेली आहे. गर्भगृह व गूढमंडप यांच्या भिंती संपूर्ण शुभ्र संगमरवरी असल्यामुळे अत्यंत आकर्षक वाटतात.

मुख्य गर्भगृहात विठ्ठल-रखुमाईंच्या काळ्या पाषाणाच्या सुरेख मूर्ती असून,. मागील गर्भगृहात लक्ष्मी-नारायण व भुवनेश्वरी यांच्या मूर्ती आहेत. गर्भगृहाची द्वारेही संगमरवरी असून, त्यांवर शेषशायी विष्णू, कमलासना लक्ष्मी व ध्यानस्थ शिव यांच्या पाषाणमूर्ती आहेत. मुख्य द्वाराच्या दोन्ही बाजूंना जय-विजय



विठ्ठलमंदिर – कल्याण

असून, मंडपाच्या मध्यभागी नवगृहांच्या आकृत्या आहेत. मंडपाच्या स्तंभांवर देवता, संत व देशभक्त यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. मंदिराच्या भिंतींवर सुंदर नक्षी व कल्येक देवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

(१८) कळसूबाई (जि. नासिक) – सह्याद्रीचे सर्वोच्च शिखर (५४२८ फूट). कोळी लोकांची कुलदेवता कळसू हिचे देऊळ वर आहे.

(१९) कान्हेरी–बृहन्मुंबईतले एक प्रेक्षणीय स्थान.

(२०) कार्ले (जि. पुणे) – बौद्ध लेणी.

(२१) कुंडल (जि. सातारा) – इथे बरीच लेणी आहेत.

(२२) कुडे (जि. कुलाबा)– बौद्ध लेणी.

(२३) कोंदिवटे – बृहन्मुंबईतले एक प्रेक्षणीय ठिकाण. इथे बरीच जुनी लेणी आहेत.

(२४) कोयनानगर (जि. सातारा)– या ठिकाणी कोयना नदीला मोठे धरण बांधून शिवसागर नामक विशाल जलाशय निर्माण करण्यात आला आहे. इथले विद्युत्‌निर्मितीकेंद्र फार मोठे व प्रेक्षणीय आहे.

कोयना नदी महाबळेश्वराच्या माथ्यावर उगम पावून दक्षिणेकडे वाहत जाते. हेळवाक या गावाजवळ ती पूर्वेकडे वळते व कराडजवळ कृष्णेला मिळते. हेळवाकजवळ कोयनेला धरण बांधून तिचा पाणलोट डोंगर पोखरून पश्चिमेकडे वळवण्यात आला आहे आणि तो १४४० फूट खाली सोडून त्याच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पोफळी येथे वीज निर्माण केली जाते. हे विद्युत्गृह डोंगरातच लेणे खोदून त्यात बांधलेले आहे.

(२५) कोल्हापूर (करवीर) – दक्षिणकाशी.

(२६) खडकवासले – पुण्याच्या नैऋत्येला ११ मैलांवर हे गाव आहे. इथे मुठा नदीला इ. स. १८७९ मध्ये धरण बांधण्यात आले. त्याची लांबी ४८२० फूट व उंची १०७ फूट आहे. त्यामुळे मोठा तलाव तयार होऊन पुणे शहराला पाणी पुरवठा करण्याची उत्तम सोय झाली. त्यातून शेतीलाही पाणी दिले जाते. जवळ लष्करी शिक्षणाचे महाविद्यालय आहे. धरणाखाली जलसंशोधनकेंद्र आहे.

(२७) खर्डे (जि. अहमदनगर)– इ. स. १७९५ साली इथे मराठे व निजाम यांची जंगी लढाई होऊन मराठ्यांचा मोठा जय झाला. इथे एक किल्ला आहे.

(२८) खुलताबाद (जि. औरंगाबाद)– औरंगाबादेपासून १४ मैलांवर हे ठिकाण आहे. औरंगजेब, अझमशहा, असफशहा, नासिरजंग, मलिकंबर, इ. पुरुषांच्या कबरी इथे आहेत. पूर्वी याला रोझा म्हणत. या गावाजवळच भद्रवंती या प्राचीन नगराचे अवशेष सापडले आहेत.

(२९) खेड (जि. पुणे) – पुण्याच्या उत्तरेला २५ मैलांवर हे गाव आहे. इ. स. १७०८ साली शाहू व ताराबाई यांच्या सैन्याची लढाई इथे झाली. इथले सिद्धेश्वराचे देऊळ व दिलावरखानाची कबर प्रेक्षणीय आहे. इथले तुकाईचे देऊळ बरेच जुने आहे. इथे चंडिरामबोवाची समाधी आहे.

(३०) गाविलगड (जि. अमरावती) – सातपुड्याच्या टोकावरील हा किल्ला इ. स. १४२५ साली अहमदशहा बहमनी याने बांधला, असे म्हणतात. किल्ल्यात पठाणी शिल्पपद्धतीची प्रेक्षणीय मशीद आहे. दिल्ली दरवाज्यावर गंडभेरुंडाचे चित्र उठवदार काढलेले आहे.

(३१) घटोत्कच लेणी (जि. जळगाव) – पाचोऱ्यापासून १६ मैलांवर ही लेणी आहेत.

(३२) घारापुरी – मुंबईजवळ हे बेट असून, त्यावर सुंदर लेणी आहेत.

(३३) चांदा – जिल्ह्याचे ठिकाण. गोंड राजवटीत बांधलेल्या किल्ल्यात हे शहर वसलेले आहे. त्याची तटबंदी अजून उभी आहे. शहरात अचलेश्वर, महाकाली व मुरलीधर यांची मंदिरे आहेत. गोंड राजांच्या छत्र्या आणि गावाबाहेर असलेल्या दशावतारांच्या प्रचंड मूर्ती प्रेक्षणीय आहेत.

(३४) चांभारलेणी (जि. नासिक) – जैन लेणी.

(३५) चौल (जि. कुलाबा) – कुंडलीक नदीच्या मुखाशी असलेले प्राचीन बंदर. याचे जुने नाव चंपावती होते. इ. स. च्या १६व्या शतकापर्यंत हे उद्योगधंद्याचे व व्यापाराचे मोठे केंद्र होते. पूर्वी या शहरात सुमारे ३०० मंदिरे होती. तेथील राजकोट किल्ला, बौद्ध लेणी व हिंगलाज देवीचे मंदिर ही प्रेक्षणीय आहेत.

(३६) जंजिरा (जि. कुलाबा) – मुंबईच्या दक्षिणेला ४४ मैलांवर राजपुरी खाडीच्या तोंडाशी असलेल्या बेटावर हा किल्ला आहे. तिथे दर वर्षी मुसलमानांची मोठी जत्रा भरते. जवळच एक दीपगृह आहे.

(३७) जीवधन (जि. पुणे) – हा किल्ला नाणेघाटाच्या तोंडाशी आहे. त्यावर बौद्ध लेणी आहेत.

(३८) जुन्नर (जि. पुणे) – हे प्राचीन व इतिहासप्रसिद्ध गाव कुकडी नदीच्या काठी आहे. पूर्वी हे व्यापाराचे मोठे केंद्र होते. याच्या परिसरात बरीच लेणी आहेत. गावात काही हेमाडपंती देवळे आहेत. इथली जामा मशीद सुमारे ५०० वर्षांपूर्वीची आहे.

(३९) जोगेश्वरी – बृहन्मुंबईमधील प्रसिद्ध लेणे. हे शैव लेणे इ. स. च्या ७ व्या शतकातले असावे. त्यात शिवमूर्ती असून, दर्शनी भागात मोठी कमान आहे.

(४०) तान्सा तलाव (जि. ठाणे) – तान्सा नदीला धरण बांधून हा तलाव केलेला आहे. धरणाची उंची ११८ फूट व लांबी १॥ मैल आहे. याचे पाणी मुंबई शहराला पुरविले जाते.

(४१) तारापूर (जि. ठाणे) – येथे बंदर व किल्ला आहे. सांप्रत येथे अणुशक्तिकेंद्र बांधण्यात आले आहे.

(४२) तासगाव (जि. सांगली) – सांगलीपासून १५ मैलांवर हे गाव आहे. इथले श्री गजाननाचे मंदिर प्राचीन आहे. त्यात उजव्या सोंडेचा गणपती असल्यामुळे हे स्थान प्रसिद्ध आहे. सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांनी तिथे बांधलेले सात मजली गोपूर फार प्रेक्षणीय आहे.

(४३) तोरणा (जि. पुणे) – पुण्यापासून ४० मैलांवर नीरेच्या उगमाजवळ हा किल्ला आहे. हा किल्ला घेऊन शिवाजीमहाराजांनी स्वराज्यस्थापना सुरू केली. याला प्रचंडगड असेही म्हणतात.

(४४) दौलताबाद (जि. औरंगाबाद) – देवगिरी. इतिहासप्रसिद्ध शहर व किल्ला.

(४५) नरनाळा (जि. अकोला) – सातपुड्याच्या डोंगरावर, अकोटपासून १४ मैलांवर हा जुना किल्ला आहे. याचा घेर १४ मैलांचा असून, त्यात ६७ बुरूज व २७ दरवाजे आहेत. तो इ. स. च्या १५ व्या शतकातला आहे. महाकाली दरवाजावरील शिल्पकाम प्रेक्षणीय आहे. येथे एक नवगजी (२७ फूटी) तोफ असून, ती इ.स.१६७०साली बसवल्याचा आलेखतिच्यावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

आहे. तीन किल्ले मिळून हा विस्तीर्ण किल्ला झालेला आहे.

(४६) नळदुर्ग (जि. उस्मानाबाद) — कल्याणीच्या चालुक्य वंशातील राजाने इथला किल्ला बांधला. इ. स. च्या १७ व्या शतकात इब्राहीम अदिलशहा (दुसरा) याने बोरी नदीवर बांध घालून तलावात पाणीमहाल बांधला; त्यामुळे हे ठिकाण प्रसिद्ध आहे.

(४७) नागपूर — इ. स. च्या १६ व्या शतकात या प्रदेशात गोंडांचे राज्य सुरू झाले. त्या घराण्यातील राजा बख्तबुलंद याने इ. स. १७०२ साली नागपूर शहर वसवले. त्याचा मुलगा चांद सुलतान याने इ. स. १७०६ साली तिथे आपली राजधानी स्थापली. इ. स. १७४३ मध्ये रघुजी भोसले याने तिथे मराठ्यांची सत्ता स्थापली. इ. स. १८५४ मध्ये इंग्रजांनी भोसल्यांचे राज्य खालसा केले. त्यानंतर नागपूर ही मध्यप्रांताची राजधानी झाली. तेव्हापासून या शहराचा खूपच विकास झाला. धंतोली, रामदासपेठ, धरमपेठ, रविनगर, शंकरनगर, इ. भाग नवीन वसलेले आहेत. शहराचे क्षेत्रफळ सुमारे ८५ चौरस मैल असून, लोकसंख्या (१९६१ च्या शिरगणतीप्रमाणे) ६.५ लाख आहे. येथील जुम्मा तलाव, बुरान शाह किल्याचा एक बुरूज, भोसल्यांचे वाडे व छत्र्या, काशीबाईचे देऊळ, रुक्मिणीमंदिर व तुळशीबाग ही ठिकाणे प्रेक्षणीय आहेत. आता या शहरात कित्येक तलाव व रमणीय उद्याने निर्माण करण्यात आली आहे.



नागपूरकर भोसले यांची छत्री

(४८) नाणेघाट — जुन्नरजवळचा इतिहासप्रसिद्ध घाट.

(४९) निलंगा (जि. उस्मानाबाद) — इथले नीलकंठेश्वराचे मंदिर हे प्राचीन शिल्पकलेचे सुंदर उदाहरण आहे. इथले शिवलिंग स्वयंभू आहे, असे म्हणतात. इथला पीर कादरी याचा दर्गा प्रसिद्ध आहे.

(५०) परांडा (जि. उस्मानाबाद) — हा ऐतिहासिक म... वूत किल्ला महंमद गवान याने बांधला, असे म्हणतात. या... २६ बुरुज आहेत. काही बुरुजांवर प्रचंड तोफा आहेत. वि... पूरची प्रसिद्ध मुलुख (मलिक) मैदान ही तोफ या किल्ल्या... तयार झाली. ती इ. स. १६३२ साली विजापूरला ने... आली. इथे पूर्वी निजामशाहीची राजधानी होती.

(५१) पांडवगड (जि. सातारा) — हा प्रसिद्ध किल्ला वा... तालुक्यात आहे. शिलाहार राजा दुसरा भोज याने इ. स. ... १२ व्या शतकात हा बांधला. त्याच्या आग्नेय भागात धा... गावाजवळ काही लेणी आहेत.

(५२) पाटण (जि. जळगाव) — एक प्राचीन नगर. इथे अने... देवळांचे अवशेष, शिलालेख व लेणी आहेत. चांगदेवाचा ... इथे होता.

(५३) पातूर (जि. अकोला) — हे गाव निर्गुणा नदीका... आहे जवळच्या डोंगरात बौद्ध लेणी आहेत. इथे काही प्रा... मंदिरांचे अवशेष आढळतात. शेख बाबू नावाच्या साधूची ... थे आहे.

(५४) पिंपळगाव राजा (जि. बुलढाणा) — हा गाव ... वर्षांपूर्वी एका गवळी राजाने वसवला. ज्योतिषी गणेश ... याच गावचे. इथे रेणुकेचे देऊळ खडकात खोदलेले आहे.

(५५) पुणतांबे (जि. अहमदनगर) — गोदावरी नदीच्या ... काठी हा जुना गाव असून, तिथे चांगदेवाची समाधी ... अहल्याबाईने बांधलेला एक घाटही आहे.

(५६) पुणे — मुंबईपासून सुमारे १२० मैल अंतरावर घा... वर मुळा-मुठासंगमाजवळ हे शहर वसलेले आहे. ... पुनत नावाच्या एका स्थानाचे वर्णन, उत्तम दगडासाठी प्र... असे केले आहे. त्याने ज्या मर्यादा व खाणाखुणा दिल्या आहे... यावरून ते स्थान म्हणजे पुणेच असावे. त्यानंतर ... येथे सापडलेल्या इ. स. ७६८ मधील एका ताम्रपटात पु... हे नाव आले आहे. त्या वेळी पुनक प्रांत राष्ट्रकूटां... सत्तेखाली होता. यादवांच्या नंतर या भागावर मुसल... सत्ता सुरू झाली, ती इ. स. १५९५ पर्यंत कायम होती. ... साली अहमदनगरचा निजामशाहा याने पुणे व भोवता... काही मुलूख मालोजी भोसले यांना जहागीर म्हणून दि... त्या जहागिरीचे पुढे शिवाजीमहाराजांनी स्वराज्य केले. ... राव पेशवे यांनी या नगरीत शनिवारवाडा बांधून ... केल्यामुळे त्याचे महत्त्व वाढले. पुढे ती मराठी साम्रा... राजधानीच झाली. पेशवाई बुडाल्यानंतर पुणे हे इंग्रजी ... ज्यातले एक दुय्यम शहर बनले.

यादवांच्या अखेरीपर्यंत पुणे हे एक खेडेगावच होते. ...

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मानी राजवटीत त्याची थोडीशी वाढ झाली असावी. भोसल्यांची जहागीर झाल्यापासून त्या स्थानाचे महत्त्व वाढू लागले.

मुळा-मुठासंगमाजवळ पुण्येश्वराचे देऊळ होते, त्यावरून या स्थानाला पुण्यक हे नाव मिळाले असावे. त्याचा अपभ्रंश होऊन पुणे हे नाव रूढ झाले. या गावाच्या सीमेवर बहिरोबा, मारुती, नारायणेश्वर, पुण्येश्वर व म्हसोबा यांची देवळे होती. पुण्येश्वर व नारायणेश्वर यांचे मुसलमानी अमदानीत दर्गे झाले, त्यांना धाकटा शेखसल्ला व थोरला शेखसल्ला असे



पुणे विद्यापीठ

म्हणतात. इ. स. च्या १६ व्या शतकात या गावाभोवती एक तट बांधण्यात आला होता. पण इ. स. १६३० साली विजापूरकरांचा सरदार मुरार जगदेव शहाजीचा पाठलाग करीत पुण्यावर चालून आला व त्याने तटबंदी पाडून टाकून गावावर गाढवांचा नांगर फिरवला. पुढे शहाजी राजांनी या गावात लालमहाल हा वाडा बांधला व जिजाबाईने कसबा पेठेतील गणपतीचे मंदिर बांधले. पुण्याचा विस्तार वाढून लोकसंख्या वाढली, त्याप्रमाणे त्याचे वैभवही वाढले. इ. स. १७९५ मध्ये त्याच्या वैभवाचा कळस झाला होता.

ब्रिटिश राजवटीत पुण्याचे वैभव कमी झाले, तरी विस्तार वाढत गेला. मुठा नदीच्या पलिकडे जंगल होते, ते कमी होऊन तिथे वसती झाली. सांप्रत औंध, दापोडी, खडकी कँटोनमेंट, धानोरी, लोहगाव, येरवडा ही गावे पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात समाविष्ट केली आहेत. पूर्वेकडे लष्कर भाग असल्यामुळे तिथेही वसती वाढली. त्याच्या पलिकडे पूर्वेला लोहगाव, वडगाव शेरी, मुंढवा, हडपसर, वानवडी ही गावे पुण्याच्या हद्दीत येतात. दक्षिणेला पद्मावतीपर्यंत आता वसती झाली आहे. कोंढवे खुर्द, धनकवडी, बिबवेवाडी, विठ्ठलवाडी, हिंगणे बुद्रुक व खुर्द, कात्रज तलाव हा भाग पुण्याच्या क्षेत्रात येतो. पश्चिमेला कोथरूड व पाषाण येथपर्यंत हे शहर विस्तारले आहे. या शहराची लोकसंख्या आता १० लाखांवर गेली आहे. इ. स. १८५६ साली पुणे नगरपालिकेची स्थापना झाली. आणि इ. स. १९५० मध्ये ती महानगरपालिका झाली.

१९ व्या शतकात या शहराला निराळेच महत्त्व प्राप्त झाले. या शहरात अनेक थोर पुरुष होऊन गेले, तशाच काही राजकीय घटनाही झाल्या. हे शहर विद्येचे मोठे केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. भारत – इतिहाससंशोधक मंडळ, भांडारकर प्राच्यविद्या संशोधनमंदिर, डेक्कन कॉलेज व संशोधनमंदिर, वैदिक संशोधनमंडळ, अशा अखिल भारतीय ख्यातीच्या संस्था या नगरीत आहेत.

या शहरात काही प्रेक्षणीय स्थळे आहेत, ती अशी –

पर्वती – पुण्याच्या दक्षिण भागात २६० फूट उंच टेकडीवर महादेवाचे मंदिर आहे. पूर्वी तिथे पर्वती देवी होती. नानासाहेब पेशव्यांनी तिथे मंदिर बांधून शंकराची चांदीची मूर्ती त्यात स्थापली. शंकराच्या मांडीवर पार्वती व गणपती यांच्या सोन्याच्या मूर्तीही स्थापल्या. या मुख्य मंदिराच्या चार कोपऱ्यात सूर्य, गणेश, पार्वती व विष्णू यांची लहान देवळे आहेत. मंदिराच्या पश्चिमेला कार्तिकस्वामीचे व विष्णूचे अशी दोन स्वतंत्र देवळे आहेत. टेकडी चढून जायला मोठमोठ्या दगडी पायऱ्या बांधून काढलेल्या आहेत. त्या एवढ्या प्रशस्त आहेत, की हत्तीही वर चढून जाऊ शकतो. या टेकडीच्या पायथ्याशी पूर्वी एक तळे होते. ते आता कोरडे झाले आहे. त्यातले गणपतीचे मंदिर अजून चांगले आहे. त्याच्या भोवती नवीन वनवलेली सारसबाग फार प्रेक्षणीय आहे. जवळच पेशवे उद्यान आहे. त्यात पशुपक्षी ठेवलेले आहेत.

शिंद्यांची छत्री – पुण्यापासून तीन मैलांवर आग्नेय दिशेला वानवडी नावाच्या गावात महादजी शिंदे यांची छत्री (समाधी) आहे. तिथे त्यांचा पुतळाही आहे.

विठ्ठलवाडी – पर्वतीपासून २–३ मैलांवर मुठानदीच्या काठी हे ठिकाण असून, तिथे विठ्ठलाचे मंदिर आहे. तिथे आषाढी–कार्तिकी एकादशीला यात्रा भरते.

शनिवारवाडा – पुण्याच्या मध्यभागी, मुठा नदीच्या तीरावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पेशव्यांचा प्रसिद्ध शनिवारवाडा आहे. सांप्रत त्याची बाह्य तटबंदी तेवढी उरली आहे. आतल्या वास्तूंचे अवशेषही दिसत नाहीत.

शनिवारवाड्यासमोर नदी ओलांडून पलिकडे गेल्यानंतर शिवाजीमहाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा पाहायला मिळतो. तियून जवळच पाताळेश्वर लेणे आहे. तिथे भूगर्भातील खडकात पांचालेश्वर शिवमंदिर आहे. हे लेणे इ. स. च्या ७ व्या किंवा ८ व्या शतकातले असावे.

पर्वतीवरील मुख्य मंदिर– पुणे

पुण्याच्या पश्चिम भागातील पुणे विद्यापीठ, राजभवन, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पापाण, इ. ठिकाणे उल्लेखनीय आहेत. येथे एका टेकडीवर चतुःशृंगीचे देऊळ आहे. वर चढायला ८० पायऱ्या आहेत. आश्विन महिन्यात येथे नवरात्राची मोठी यात्रा भरते.

याव्यतिरिक्त पुण्यात बोटॅनिकल गार्डन, कमला नेहरू उद्यान, संभाजी उद्यान, जिजामाता बाग, वंडगार्डन, एम्प्रेस गार्डन, विमानतळ, आगाखान पॅलेस, पर्णकुटी, इ. प्रेक्षणीय स्थळे आहेत.

(५७) पुरंदरगड (जि. पुणे) – सासवडजवळ हा प्रसिद्ध किल्ला आहे.

(५८) प्रतापगड (जि. सातारा) – हा किल्ला इ. स. १६५६ मध्ये शिवाजीने बांधला. त्यानंतर पाच वर्षांनी भवानीचे देऊळ बांधले. शिवाजीच्या जीवनात या देवीला फार मोठे स्थान होते. हा किल्ला महाबळेश्वरापासून जवळ आहे. गडाच्या माचीवर अफझुलखानाची कबर आहे. आता गडावर शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे.

(५९) वाळापूर (जि. अकोला) – माण व म्हैस नद्यांच्या संगमावर हे गाव असून, तिथे बाळा देवीचे देऊळ व एलिचपूरच्या नबाबाने इथे बांधलेल्या किल्ला अत्यंत भक्कम म्हणून प्रसिद्ध आहे. इथे राजा जयसिंगाची सुंदर छत्री आहे.

(६०) बीड – जिल्ह्याचे मुख्य ठिकाण.

(६१) बेडसे – (जि. पुणे) – कामशेतपासून ४-५ मैलांवर हे गाव असून, तिथे डोंगरांत बौद्ध लेणी आहेत.

(६२) बेलापूर (श्रीरामपूर, जि. अहमदनगर) – प्रवरेच्या तीरावर हे प्राचीन गाव आहे. इथे जुना महानुभावी मठ आहे. आता इथे साखरेचे कारखाने झाले आहेत.

(६३) बोरिवली – बृहन्मुंबईतले एक उपनगर. याच्या आसपास बरीच लेणी (कान्हेरी, मंडपेश्वरी, जोगेश्वरी) आहेत. एकसर गावातील आंबराईत सहा मोठे (८×) वीरगळ आहेत. पोहसर व मागाठण या गावांच्या जवळ बौद्ध लेणी व कुंडे आहेत. अकुर्ली गावाजवळ एका टेकडीवर पाली शिलालेख कोरलेले आहेत.

(६४) ब्रह्मपुरी – पंढरपूरपासून १६ मैलांवर भीमेच्या काठी हे गाव आहे. इथे सिद्धेश्वराचे प्राचीन देवस्थान आहे. या ठिकाणी औरंगजेबाचा तळ पाच वर्षे पडला होता. त्याच्या मुलीची कबर नदीपलिकडे घडेश्वर या गावी आहे. गावाला बेगमपूर म्हणतात.

(६५) भंडारदरा (जि. अहमदनगर) – पुण्यापासून मैलांवर प्रवरा नदीला दोन टेकड्यांच्या मध्ये इथे धरण बांधण्यात आले आहे. त्याची लांबी १६६३ फूट व उंची २७० फूट आहे. याचा परिसर डोंगराळ व दाट जंगलाने व्यापलेला असल्यामुळे फार रमणीय आहे. धरणातून नदीच्या पात्रात सोडलेले पाणी पुढे सहा मैलांवर असलेल्या कड्यावरून खाली कोसळते. हा सुंदर धबधबा वर्षभर पाहायला मिळतो.

(६६) भांडक (जि. चांदा) – याचे प्राचीन नाव भद्रावती असून, ती वाकाटकांची राजधानी होती. याच्या परिसरात बरेच प्राचीन भग्नावशेष पाहायला मिळतात.

(६७) भाजे (जि. पुणे) – मळवली स्टेशनपासून दीड मैल अंतरावर हे गाव आहे. तिथल्या डोंगरात बौद्ध लेणी आहेत.

(६८) भाटघर (जि. पुणे) – पुण्यापासून ३३ मैलांवर या ठिकाणी वेळवंडी नदीला मोठे धरण बांधलेले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तयार झालेला मोठा तलाव आणि त्याचा परिसर फार प्रेक्षणीय आहे. तलावाचे पाणी शेतीला पुरवले जाते.

(६९) भोरप सुधागड – (जि. कुलाबा) – पालीपासून ८ मैलांवर हा किल्ला आहे. त्याची उंची सुमारे ५ हजार फूट असून, त्यावर भोरई देवीचे जागृत देवस्थान आहे. किल्ल्याच्या एका बाजूला टकमक नावाची खोल दरी आहे.

(७०) मंगळवेढे (जि. सोलापूर) – एक ऐतिहासिक स्थान. दामाजीपंताचे गाव.

(७१) महाबळेश्वर– जुने महाबळेश्वर हे तीर्थक्षेत्र असून, नवीन शहर थंड हवेसाठी व निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे.

(७२) मांजलगाव (जि. बीड)– गोदावरीच्या काठी वसलेले गाव. इथे सुंदर देवळे व घाट आहेत. त्रिविक्रममंदिराचे शिल्प विशेष प्रेक्षणीय आहे. जवळच गौतम ऋषीचे स्थान दाखवतात.

(७३) माणगाव (जि. कुलाबा)– येथून जवळच असलेला तळघाचा डोंगरी किल्ला व मांदाडजवळची लेणी प्रेक्षणीय आहेत.

(७४) माथेरान (जि. कुलाबा) – थंड हवेचे ठिकाण.

(७५) मालवण (जि. रत्नागिरी)– जुने बंदर. येथील बेटावर शिवाजीने बांधलेला सिंधुदुर्ग आहे. त्यात एक मूर्ती आहे ती शिवाजीची आहे, असे म्हणतात. येथे इंग्रजांची वखार होती. गावात समुद्रकाठी राजकोट किल्ला आहे.

(७६) माहीम (जि. ठाणे)– जुने नाव महिकावती. महिकावतीची बखर या नावाचा जुना ग्रंथ आहे, त्यात याची माहिती आहे. याच्या जवळच केळवे गाव आहे. म्हणून केळवे-माहीम असे जोड नाव रूढ झाले आहे. माहीमला भुईकोट किल्ला आहे. तिथून जवळच, खाडीत पोर्तुगीजांनी बांधलेले दोन लहान किल्ले आहेत.

(७७) मुंबई–महाराष्ट्राची राजधानी. सांप्रत या नगरीचा खूप विस्तार झाला आहे. पण फार पूर्वी मुंबई म्हणजे लहान लहान बेटांचा एक पुंजका होता. कुलाबा, मुंबई, महालक्ष्मी, वरळी, माजगाव, शीव आणि माहीम अशी त्या बेटांची नांवे होती. त्या सर्व भूप्रदेशाची उत्तर-दक्षिण लांबी सुमारे १० मैल व पूर्व-पश्चिम रुंदी १ ते ३ मैल होती. ही सर्व बेटे मिळून प्रथम एकच बेट असावे आणि धरणीकंपामुळे त्याचे असे वेगळे तुकडे झाले असावे, असे भूगर्भशास्त्रज्ञांचे मत आहे.

या बेटांत मूळची वसती कोळ्यांची होती. मुंबादेवी ही त्यांची कुळदेवता. चारपाचशे वर्षांपूर्वी तिची या बेटात स्थापना झाली. कोळी लोक या देवीला मुंबा आई असे म्हणत. त्यावरूनच या बेटाला मुंबई हे नाव मिळाले. कोळ्यांप्रमाणेच भंडारी, पाचकळशे, सुतार, वाडवळ, पळशे जोशी व पाताणे प्रभू लोकही या बेटांत पूर्वीपासून वसलेले आहेत.

इ. स. च्या १५ व्या शतकाच्या अखेरपर्यंत कोकणात मुसलमानांचे राज्य होते. त्यानंतर १६ व्या शतकात पोर्तुगीजांनी



मुंबई इ. स. १८६३

कोकणात प्रवेश केला व इ. स. १५३० च्या सुमारास मुंबई बेट त्यांच्या ताब्यात गेले. त्या वेळी तिथे कोळी, भंडारी व पाचकळशी या जातींच्या पाच दहा हजार लोकांची वसती होती. बेटाचा बराच भाग ओसाड होता, तर काही जंगलमय होता. मात्र तिथे जहाजे नांगरण्यासाठी फार सोयीस्कर अशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खाडी असल्यामुळे पोर्तुगीजांनी त्या ठिकाणी एक उत्तम बंदर बनवले. पोर्तुगीज भाषेतील बों = चांगले व बेहीया = बंदर या शब्दावरून बॉम्बेहीया हे नाव त्या ठिकाणाला मिळाले. त्याचेच बॉंबे हे रूप कालांतराने प्रचलित झाले. पोर्तुगीजांनीच तिथे एक किल्ला बांधला.

इ. स. १६६१ साली पोर्तुगालच्या राजाने आपली कन्या इंग्लंडचा राजा २ रा चार्लस याला दिली, त्या वेळी हे बेट तिला आंदण दिले. इ. स. १६६६ साली इंग्लंडच्या राजाने ते सालिना १०० रुपये भाडयाने ईस्ट–इंडिया कंपनीला दिले. त्या काळी भरतीच्या वेळी सखल भागात पाणी शिरे व ओहटीच्या वेळी ते मागे हटे. त्यामुळे सगळीकडे दलदल माजून रोगराईचा फैलाव होत असे.

इ. स. १६७० मध्ये मुंबईचा मुख्य किल्ला मजबूत करून आणि माजगाव, शिवरी, शीव, माहीम व वरळी येथे लहान लहान किल्ले बांधून शहराचा बंदोबस्त करण्यात आला. त्याच वर्षी तिथे तारवे बांधण्याची गोदी बांधण्यात आली. इ. स. १६८९ साली जंजिऱ्याच्या सिद्दीने मुंबईवर स्वारी करून बराच भाग जिंकून घेतला. किनाऱ्यावरचा छोटा किल्ला सोडला, तर जवळ जवळ सगळी मुंबई सोळा महिने त्याच्या ताब्यात होती. पुढे औरंगजेबाने त्याला शह दिला, तेव्हा तो मुंबई सोडून गेला. मराठे, मोगल, डच, फ्रेंच या सर्वांपासून धोका असल्यामुळे इंग्रजांनी मग सर्व किल्ले अधिक मजबूत केले व काही नवीन बांधले. इ स. १७१६ साली तेव्हाच्या मुंबई शहराभोवती तटबंदी उभारण्यात आली. तो सर्व भाग फोर्ट या नावाने ओळखला जातो; आतला छोटा किल्ला म्हणजे बॉम्बे कॅसल होय. इ. स. १७७६ ते ८० या काळात वरळीचा बांध, गव्हर्नर हॉर्नबी साहेबाच्या कारकिर्दीत बांधण्यात आला. तो दगडी असून अर्धा मैल लांब आहे. त्यामुळे समुद्राचे पाणी सर्वत्र पसरणे बंद झाले. मग सखल भागात भर टाकून दलदल नष्ट करण्यात आली, तेव्हा रोगराईला आळा बसला. त्यानंतर मुंबईची वस्ती वाढू लागली. १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात मुंबई शहराचा विस्तार झाला, तसाच बंदराचाही झाला. तिथे नवीन गोद्या व धक्के बांधण्यात आले. लवजी नसरवानजी नावाचा जहाजे बांधणारा तज्ज्ञ सुरतेत होता, त्याला मुंबईला बोलावण्यात आले. त्याच्या सल्ल्यानुसार मुंबईतली पहिली कोरडी गोदी बांधण्यात आली. तिथे त्याने उत्तम जहाजे बनविण्यास सुरवात केली.

आंग्रे यांचे आरमार प्रबळ होते, तोपर्यंत इंग्रजांना त्याचा मोठा धाक वाटे. तरी देखील त्या काळात मुंबईचा व्यापार खूप वाढला आणि वस्तीही वाढली. इ. स. १७५० साली तिथे सुमारे ७०,००० लोक स्थायिक झाले होते. किल्ल्याच्या पश्चिमेला व उत्तरेला एस्प्लनेड हे विस्तीर्ण मैदान होते. कुलाबा भागात मुळीच वसती नव्हती. एस्प्लनेडपलिकडे जुम्मा मशीद, मांडवी, उमरखाडी, भुलेश्वर वगैरे भागांत बरीच वसती होती. पण धोबी तलाव, गिरगाव, खेतवाडी या भागात नारळीच्या बागा होत्या; तर मलबार हिल, खंबाला हिल, ब्रीच कँडी वगैरे भागांत तेव्हा जंगलच होते.

इ. स. १७५६ मध्ये इंग्रजांनी आंग्र्यांची आरमारी सत्ता नष्ट केली आणि पानिपतच्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाला. नंतर इंग्रजांना पेशव्यांचा धाक राहिला नाही. त्यांची सत्ता सं- हिंदुस्थानात हळूहळू वाढत गेली आणि मुंबईची खूप भरभराट झाली. इ. स. १८०० नंतर मुंबई शहराला फारसा धोका उरला नसल्यामुळे तटबंदीच्या बाहेरही घरे बांधून बरेच लोक राहू लागले. इ. स. १८५० पर्यंत मुंबईची लोकसंख्या ५ लाख झाली असावी.

इ. स. १८४९ साली जी. आय. पी रेल्वे कंपनीची स्थापना झाली आणि १८५३ साली मुंबई ते ठाणे लोहमार्ग सुरू झाला. त्याच वर्षी मुंबई व कलकत्ता तारायंत्राने जोडली गेली. इ. स. १८६२ साली मुंबईचा तट पाडून टाकण्यात आला व त्याच्या भोवतालचा खंदकही बुजवण्यात आला. कुलाब्यापासून ... बंदरापर्यंत बेटाचा पूर्वेकडील समुद्रकिनारा बांधून काढण्यात आला व कुलाबा ते मलबार डोंगर हा पश्चिमेकडील ... मागे हटवून बॅकबेचा धक्का बांधण्यात आला. १८७२ साली मुंबई नगरपालिका अस्तित्वात आली. इ. स. १९०० पर्यंत ... नगरीचे स्वरूप खूपच पालटले. अनेक भव्य इमारती निर्माण झाल्या. विविध प्रकारच्या संस्था सुरू झाल्या आणि लोकांसाठी कित्येक सुखसोयी करण्यात आल्या.

वाळुकेश्वर – मुंबई बेटाच्या नैर्ऋत्य दिशेच्या किनाऱ्याशी



वाळुकेश्वराचे मंदिर – मुंबई

एक डोंगर आहे. या डोंगराच्या आश्रयाने पूर्वी मलबार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोकांनी वसती केली होती, म्हणून त्याला मलबार डोंगर म्हणतात. त्याच्या माथ्यावर वाळुकेश्वराचे मंदिर आहे. रामाने तिथे वाळूचे लिंग बनवून स्थापले, म्हणून त्याला वाळुकेश्वर म्हणतात, अशी आख्यायिका आहे. तिथेच एक तळे आहे. त्याला बाणगंगा म्हणतात. रामाने तिथे बाण मारून भूगर्भातून पाणी वर आणले, अशीही कथा सांगतात. या डोंगराच्या अगदी शेवटच्या भागाला दांडी म्हणतात. तिथे सरकारी बंगला आहे, त्यात पूर्वी गव्हर्नर व आता राज्यपाल राहतात. यांच डोंगरावर एक सुंदर बाग केलेली आहे. तिला हँगिंग गार्डन म्हणतात. कारण बागेखाली पाणी आहे. तिथे आणखीही उद्याने आहेत.

महालक्ष्मी – वाळुकेश्वराच्या उत्तरेला समुद्रकिनाऱ्यावर एका टेकडीवर महालक्ष्मीचे मंदिर आहे. तिथे नवरात्रात मोठी यात्रा असते.

कुलाब्याची दांडी – इ. स. १७६८ साली प्रथम हे दीपगृह सरकारने बांधले. ते १५० फूट उंच होते. त्यानंतर इ. स. १८७४ साली १८ फूट उंच खडकावर नवे दीपगृह बांधण्यात आले. ते १८ मैलांवरून सहज दिसते.

बॉम्बे कॅसल – हा मुंबईचा वालेकिल्ला पोर्तुगीजांनी बांधला होता. इंग्रजांनी तो पक्का केला. त्या बॉंबे कॅसलचे अवशेष टाउन हॉलच्या मागच्या बाजूला नाविकदलाच्या ताब्यात असलेल्या भागात दिसतात. त्याचे भव्य प्रवेशद्वार लाकडी व जड असून, त्याचे शिल्पकाम प्रेक्षणीय आहे. थोडी तटबंदी अजून शिल्लक आहे. तिथे पोर्तुगीजांच्या वेळचे दहा फूट उंच, दगडी कालदर्शक छायायंत्र आहे. ते सुमारे साडेतीनशे वर्षे अचूक वेळ दाखवीत आहे.

व्हिक्टोरिया टर्मिनस – इ. स. १८५३ साली मुंबई–ठाणे लोहमार्ग सुरू झाला. त्याच्या मुंबईतील टोकाला हे नाव देण्यात आले. त्या जागी पूर्वी बोरीबंदर हे जहाजे लागण्याचे ठिकाण होते. तिथेच मुंबा देवीचे देऊळ होते. मूळचे देऊळ मुसलमानांनी पाडले. ते इ. स. १३१७ साली पुन्हा बांधले गेले. पोर्तुगीजांनी इ. स. १७६० साली ते पुन्हा उद्ध्वस्त केले. त्यानंतर इ. स. १७६६ मध्ये ते सध्याच्या जागी बांधण्यात आले.

व्हिक्टोरिया टर्मिनस या स्टेशनची इमारत अत्यंत भव्य व सुंदर आहे. रेखीव समतोल, सुरेख घुमट, चारही कोपऱ्यांवरचे टोकदार मिनार आणि उंच कमानी यामुळे ही इमारत विलक्षण आकर्षक वाटते. तिचे शिल्पकाम इटालियन गॉथिक पद्धतीचे आहे. त्यात जागोजागी सिंहाकृती व नक्षीदार जाळीच्या खिडक्या दिसतात. ही इमारत इ. स. १८८८ मध्ये बांधून पूर्ण झाली.

व्हिक्टोरिया टर्मिनसच्या समोरच मुंबई महानगरपालिकेची भव्य व उंच इमारत उभी आहे. ती इ. स. १८९३ साली पूर्ण झाली. तिचे शिल्पकाम व नक्षीकाम भारतीय पद्धतीचे आहे. तिच्या रचनेत अनेक मिनार व घुमट आहेत. निरनिराळे प्राणी पक्षी व वृक्षवेली यांच्या आकृती अतिशय सुबक व आकर्षक आहेत. या वास्तूतला मध्यवर्ती मनोरा २३५ फूट उंच असून, त्यातील कमानी व घुमट यांमुळे दर्शनी भाग फारच प्रेक्षणीय झाला आहे.



महानगरपालिका– मुंबई

ओल्ड कस्टम हाऊस – टाउन हॉलच्या बाजूला जी अगदी जुनी इमारत दिसते, ती इ. स. १७१४ मध्ये बांधलेली आहे. इ. स. १८९५ साली त्या इमारतीत बरेच बदल करण्यात आले. सांप्रत त्या इमारतीत मुंबईच्या कलेक्टरचे ऑफिस आहे.



नगरभवन (टाउन हॉल)– मुंबई

टाउन हॉल – ही इमारत इ. स. १८३३ साली बांधून पूर्ण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाली. तिची लांबी २६० फूट व रुंदी १०० फूट आहे. या हॉलची रचना ग्रीक पद्धतीची असून, अंतर्बाह्य असलेले भव्य स्तंभ, दर्शनी भागातल्या लांब पायऱ्या, उत्तर व दक्षिण बाजूच्या समतोल पडव्या यांमुळे ती फार प्रेक्षणीय वाटते.

राजाबाई टॉवर – जुने सचिवालय व हायकोर्ट यांच्या मध्ये मुंबई विद्यापीठ आहे. त्यातील सर्वांत जुन्या इमारती म्हणजे कावसजी जहांगीर हॉल व ग्रंथालय. ग्रंथालय व क्लॉक टॉवरची इमारत इ. स. १८७८ मध्ये पूर्ण झाली. या टॉवरची उंची २८० फूट आहे. त्याच्या चारही बाजूंवर १६·५ फूट व्यासाची चार घड्याळे आहेत. श्रीमान प्रेमचंद रायचंद यांनी आपली माता राजाबाई हिच्या स्मरणार्थ ४ लक्ष रुपये सरकारला दिले, त्यातून हा मनोरा बांधण्यात आला आहे.

जुम्मा मशीद – मुंबईत सुमारे नव्वद मशिदी आहेत. त्यांतील डोंगरीवरची मोगल मशीद, मांडवीची जकेरिया मशीद, मशीद-बंदराजवळची सातमाड मशीद, शेख मेमन स्ट्रीटवरची जुम्मा मशीद, माहीमची जुनी मशीद व मेमणवाड्यातली इस्माइल हबीब मशीद या जुन्या व प्रेक्षणीय आहेत. जुम्मा मशीद ही त्यांतली सर्वांत जुनी. ती कोकणी मुसलमानांची आहे. पूर्वी ती डोंगरी किल्ल्याजवळ होती. सध्याची इमारत १८०… पूर्ण झाली. ती एका तलावावर बांधलेली आहे. तलावा… दगडी कमानी बांधून, त्यावर प्रार्थनागृह बांधण्यात… मशिदीची रचना चौकोनी व भव्य आहे. ही इमार… नक्षीकामाने… भित केलेले…



याव्य… मुंबईत सेंट… चर्च, सेंट… कॅथिड्रल, सचिवालय, … कोर्ट, इ. … प्रेक्षणीय … आहेत. त्या… बृहन्मुंबईत … प्रेक्षणीय … आहेत, त्यां… अशी – … कान्हेरी, … घारापुरी, … श्वरी, मंडे… लेणी; … बाग (व्हि… गार्डन्स), … गार्डन, … मेहता … कमला नेहरू … कृष्णगिरी … उद्यान, … पवई व … तलाव; … मरीन … वरळी, … मानोरी, … व सों या … रमणीय समुद्रतट; बाबुलनाथ, भुलेश्वर, माधवबाग, … मांडकेश्वर, काळबादेवी, वडाळा विठ्ठलमंदिर, इ. … चर्चगेट स्टेशनची नवी इमारत, प्रिन्स ऑफ वेल्स … तारापोर मत्स्यालय, अपोलो बंदरचे प्रवेशद्वार, … हुतात्मा स्मारक स्तंभ, सांताक्रुझ व विलेपार्ले येथील …

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कुलाबा व सांताक्रुज येथील वेधशाळा, आरे गवळी वाडा, इत्यादी.

पूर्वी मुंबई शहरात कुलाब्यापासून उत्तरेला माहीम व शीव येथपर्यंतचा भाग समाविष्ट होता. तेव्हा त्याचे क्षेत्रफळ २६ चौ. मैल होते. इ. स. १९५० व १९५७ मध्ये काही उपनगरे व ठाणे जिल्ह्यातील काही खेडी मुंबईत समाविष्ट करण्यात आली व त्याला बृहन्मुंबई हे नाव देण्यात आले. त्याचा विस्तार आता उत्तरेला दहिसर व मुलुंडपर्यंत झालेला असून, त्याचे क्षेत्रफळ सुमारे १७० चौ. मैल आहे. सांप्रत या महानगरीची लोकसंख्या ५० लाखांवर गेली आहे. मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, गुजराती, शीख, तमिळ, कन्नड, कोळी, हिंदुस्थानी, बंगाली इ. नाना प्रकारचे लोक इथे वसलेले असल्यामुळे या नगरीला बहुरंगी स्वरूप प्राप्त आहे. मुंबई महानगरपालिका ही स्वायत्तसंस्था तिचा कारभार पाहते.

मुंबईच्या उत्कृष्ट बंदरामुळे तिला व्यापारी व औद्योगिक दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यांमुळे ही भारताची व्यापारी व औद्योगिक राजधानी ठरली आहे.



(७८) राजगड (जि. पुणे) – पुण्याच्या दक्षिणेस ४० मैलांवर हा किल्ला आहे. हा इ. स. १६४८ साली शिवाजीने बांधला. इथेच प्रथम इ. स. १६७३ पर्यंत त्याची राजधानी होती. वर पद्मावतीचे देऊळ आहे.

(७९) रायगड (जि. कुलाबा) – महाडपासून १६ मैलांवर हा प्रसिद्ध किल्ला आहे. तो अत्यंत बळकट आहे. शिवाजीमहाराजांनी इथे राज्याभिषेक करून घेतला. ते इथेच मरण पावले. तिथे त्यांची समाधी असून, तिच्या समोर जगदीश्वराचे देऊळ आहे.

(८०) लोणार (जि. बुलढाणा) – विदर्भातील हे प्राचीन नगर मेहकरपासून १२ मैलांवर आहे. याला पुराणांत विरजक्षेत्र असे म्हटले आहे. गावाच्या मध्यभागी दैत्यसूदन मंदिर आहे. ते इ. स.च्या १३ व्या शतकात बांधलेले असून, त्याचे शिल्पकाम फार प्रेक्षणीय आहे. गावाच्या पश्चिमेला एक मोठा तलाव आहे. विष्णूने या ठिकाणी लवणासुराचा वध केला, अशी आख्यायिका प्रचलित आहे.

(८१) लोहगाव पुण्याच्या ईशान्येस ९ मैलांवर हा गाव आहे. इथे संत तुकारामाचे आजोळ होते. सांप्रत तिथला विमानतळ प्रसिद्ध आहे.

(८२) वज्रेश्वरी (जि. ठाणे) – वडवली गावात तान्सा नदीच्या काठी हे क्षेत्र आहे. टेकडीवर वज्राबाईचे देऊळ आहे. तिथे चैत्रात मोठी यात्रा भरते. इथून जवळच अकलोली गावात गरम पाण्याची कुंडे आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(८३) वर्धा – जिल्ह्याचे मुख्य ठिकाण. याचे जुने नाव पालकवाडी असे आहे. १९३४ साली म. गांधी इथे वास्तव्य करू लागले. वर्ध्यापासून ४ मैलांवर शेगाव (सेवाग्राम) येथे त्यांचा आश्रम सुरू झाला. त्यामुळे वर्ध्याला फार महत्त्व आले. पुढे आचार्य विनोबा भावे हे वर्ध्यापासून ५ मैलांवर पवनार येथे राहू लागले. शेठ बछराज बजाज यांनी १९०५ साली इथे बांधलेले लक्ष्मीनारायणाचे मंदिर प्रेक्षणीय आहे.

(८४) वसई (जि. ठाणे) – इथला किल्ला प्रसिद्ध आहे.

(८५) वाशिम (जि. अकोला) – प्राचीन वत्सगुल्म नगर इथे होते. इथे वाकाटकांची राजधानी होती.

(८६) विजयदुर्ग (जि. रत्नागिरी) – उत्तम बंदर म्हणून प्रसिद्ध आहे. इथला किल्ला फार मजबूत आहे. कान्होजी आंग्रे यांचे मुख्य ठाणे इथे होते.

(८७) विशाळगड (जि. कोल्हापूर) – पूर्वीचे नाव खेळणा शिवाजीने इ. स. १६५९ साली तो सर करून त्याला विशाळगड हे नाव दिले. त्यावर पीर मलिक रहाणे याचा दर्गा आहे. तिथे दरसाल मोठा उरुस भरतो.

(८८) शिवनेरी (ज़ि. पुणे) – जुन्नरजवळ हा प्रसिद्ध किल्ला आहे. शिवरायांचे जन्मस्थान.

(८९) सज्जनगड (जि. सातारा) – हा किल्ला इ. स. च्या १३ व्या शतकात बांधलेला असावा. समर्थ रामदासांची समाधी इथे आहे.

(९०) सातारा – जिल्ह्याचे मुख्य ठिकाण. शाहू महाराजांची राजधानी इथे होती. जवळ अजिंक्यतारा नावाचा प्रसिद्ध किल्ला आहे.

(९१) सिन्नर (जि. नासिक) – सातशे वर्षांपूर्वी एका गवळी राजाने हे गाव वसवले असे म्हणतात. तिथे गोंदेश्वराचे मोठे देऊळ आहे. त्याचे शिल्पकाम प्रेक्षणीय आहे. इथले ऐश्वर्येश्वराचे चालुक्य शैलीचे मंदिर लहानसेच पण सुंदर आहे.

(९२) सिंहगड – पुण्याच्या नैर्ऋत्येस १५ मैलांवर हा प्रसिद्ध किल्ला आहे. तो अत्यंत मजबूत आहे. प्रथम त्याचे नाव कोंडाणा होते. औरंगजेबाने त्याला बक्षिदाबक्ष हे नाव दिले. पुढे त्याला सिंहगड हे नाव मिळाले. गडावर तानाजी मालुसरे व छ. राजाराम यांच्या समाध्या आहेत.

(९३) सोपारे (जि. ठाणे) – प्राचीन काळी या स्थानाला शूर्पारक हे नाव होते. तिथे एक बौद्ध स्तूप व अशोकाचे शिलालेख आहेत. त्या काळी हे व्यापाराचे मोठे केंद्र होते.

(९४) सोलापूर – जिल्ह्याचे मुख्य ठिकाण. हे शहर बरेच जुने आहे. प्राचीन ताम्रशिलाशासनांत त्याचा निर्देश सोन्नलिगे किंवा सोन्नलगे असा केलेला आहे. त्याचे रूपांतर सोन्नलापूर, सोलापूर असे झाले. शहराभोवती कोट असून आत मोठा कि[illegible] आहे. तो किल्ला हसन गंगू बहमनी याने बांधला. निजा[illegible] आदिलशाही, मोगल, निजाम, यांच्या नंतर इ. स. १७[illegible] हे शहर मराठ्यांच्या ताब्यात आले. येथे अनेक [illegible] देवळे आहेत. इथले सिद्धेश्वराचे देवस्थान मोठे व प्र[illegible] आहे. पूर्वीपासून हे महत्त्वाचे लष्करी ठाणे व व्यापारा[illegible] केंद्र आहे. सांप्रत हे एक मोठे औद्योगिक केंद्र बने[illegible] कापडाच्या गिरण्यांप्रमाणेच इथे हातमागही बरेच आहे[illegible]

(९५) हरिश्चंद्रगड (जि. अहमदनगर) – याची [illegible] ४६१९ फूट असून, वर जुनी मंदिरे आहेत. डोंगरात इ. [illegible] १०–११ व्या शतकांतली पाच लेणी आहेत.

कलाविकास – ज्या कलाप्रकारांतून महाराष्ट्रियांच्या [illegible] स्वभावधर्मांचा व निष्ठांचा प्रत्यय मिळतो त्यांनाच महा[illegible] कलाप्रकार म्हणणे रास्त ठरेल. या दृष्टीने महाराष्ट्री[illegible] क्षेत्राकडे पाहिले, तर असे दिसून येईल की रंग[illegible] चित्रपट यांचा अपवाद वगळता, इतर सर्व कला मह[illegible] संस्कृती आकाराला येण्यापूर्वीच परिणत अवस्थेला पो[illegible] अभिजात स्वरूपाच्या कला आहेत आणि त्यांतील [illegible] प्राचीन भारतीय आर्य संस्कृतीच्या वारशाच्या परंपरे[illegible] राष्ट्राकडे आलेल्या आहेत, असे श्री. के. नाराय[illegible] म्हणतात. आर्य संस्कृतीतील कलांचा वारसा महारा[illegible] संपूर्णपणे जशाचा तसा पत्करावा लागला व त्याच[illegible] स्वरूपाच्या कक्षेत त्यांना आपले व्यक्तित्व समाविष्ट [illegible] लागले. महाराष्ट्रीय संस्कृतीला प्रगतीची नवी दिशा [illegible] दिसली ती राजकीय आक्रमणामुळे. त्या निमित्ताने [illegible] इस्लामी व युरोपीय या अगदी वेगळ्या प्रकारच्या दो[illegible] कीय संस्कृतींशी संबंध आला. महाराष्ट्रीय संगीत, [illegible] चित्रकला यांवर इस्लामी संस्कृतीचा बराच परिणाम [illegible] दिसतो. संगीताच्या क्षेत्रात तर तो विशेष जाणवतो.

संगीत – प्राचीन भारतीय संगीतशास्त्राचा संगीत[illegible] हा ग्रंथ सर्व भारतात प्रमाणभूत मानला जातो. त्याचा [illegible] शार्ङ्गदेव हा देवगिरी येथे इ. स. च्या १३ व्या शतका[illegible] गेला. तो यादव राजा सिंघण (इ. स. १२१०–१२४७) [illegible] दरबारी होता. संगीतरत्नाकरात त्या काळी प्रचलित [illegible] संगीतशास्त्राचे विस्तृत विवेचन केलेले आहे. त्या[illegible] धवळे, इ. मराठी संगीतप्रबंधांचा उल्लेख आढळतो. अ[illegible] खिलजीने रामदेवराव यादवाचा पराभव केल्यानंत[illegible] जाताना यादवांच्या दरबारातला संगीतज्ञ गोपाल नाय[illegible] आपल्याबरोबर दिल्लीला नेले. त्याच्या बरोबर महारा[illegible] संगीतविद्या तिकडे गेली. अमीर खुस्रवाने ही कला [illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नायकाकडून शिकून घेतली आणि त्या गायकीत थोडे फेरफार करून ख्याल गायकी सुरू केली. त्या काळी ती गायकी लोकप्रिय झाली नाही. पण पुढे इ. स. च्या १८ व्या शतकात ती रसिकमान्य झाली. त्या पूर्वीच्या काळात संगीतरत्नाकरातली प्रबंध गायकीच लोकांना अधिक सरस वाटे. धृपद – गायन हा प्रबंध-गायकीचाच पर्याय पुढे प्रचारात आला व लोकप्रिय झाला.

इ. स. च्या १४ व्या शतकात होऊन गेलेला महानुभाव संत दामोदर पंडित याची हिंदी भाषेत व रागतालांत बांधलेली बरीच पदे आता उपलब्ध झाली आहेत. हा दामोदर पंडित अस्सल महाराष्ट्रीय होता. ग्रंथसाहेबात नामदेवांचे काही अभंग किंवा पदे आहेत व त्यांचे रागही दिलेले आहेत.

यादवांच्या नंतर सुमारे अडीचशे वर्षे महाराष्ट्रात कोणी संगीतशास्त्रज्ञ झालेला दिसत नाही. प्रसिद्ध कवी दासोपंत (१६ व्या शतकाचा उत्तरार्ध) यांनी हजारो रागबद्ध पदे रचली असून, त्यांतील राग हिंदुस्थानी व दाक्षिणात्य संगीत पद्धतींत प्रचलित आहेत. त्याच शतकात होऊन गेलेला पुंडरीक विठ्ठल याने षड्रागचंद्रोदय, रागमाला, रागमंजिरी व नर्तननिर्णय हे चार ग्रंथ रचले. त्याने उत्तरेकडील व दक्षिणेकडील दोन्ही पद्धतींचा अभ्यास केला होता. पण आपल्या ग्रंथांत त्याने दाक्षिणात्य शुद्धरागपद्धती स्वीकारली. एकनाथांनी निरनिराळ्या चालींत शेकडो पदे बांधली आहेत. त्यांची गेयता, प्रासादिकता व शुद्ध मराठी भाषा यांमुळे ती शास्त्रीय संगीताइतकीच लोकप्रिय आहेत.

तंजाऊर प्रांतात मराठी राजवट सुरू झाल्यानंतर अनेक मराठी घराणी तिकडे जाऊन स्थायिक झाली. त्यामुळे अस्सल मराठी गायकी तिकडे रूढ झाली. त्याच काळात मराठी हरिदासी कीर्तनपरंपरेचा प्रभाव दाक्षिणात्य संगीतावर पडला. शिवकालापासून पेशवाईच्या अंतापर्यंत राजाश्रयाने हरिदास, धृपदिये, मृदंगवादक, इ. संगीतकारांची अनेक घराणी प्रसिद्धी पावली. पण त्या काळात मुख्यत्वे शाहिरी संगीताचीच वाढ झाली. त्या संगीतातही मूळ रागरागिणीपद्धतीच आधारभूत मानली जाई.

इ. स. च्या १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात संगीताचे शास्त्रीय शिक्षण सर्वांना सुलभ व्हावे, या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. स्वरलिपी (नोटेशन) सारख्या नवीन साधनांची निर्मिती होऊन संगीताची स्वतंत्र पुस्तकेही तयार झाली. इ. स. १८७४ साली श्री. बळवंत त्र्यंबक सहस्रबुद्धे यांनी पुणे गायन समाज या नावाची संस्था सुरू केली. या समाजाने गायनवादनाचे वर्ग सुरू केले. इ. स. १८८० पासून पंचवीस–तीस वर्षांच्या काळात संगीतावरील शास्त्रीय लेखन, संशोधन व प्रकाशन जोमाने होऊ लागले. त्यानंतर अनेक महाराष्ट्रीय तरुण उत्तर हिंदुस्थानात जाऊन तिथल्या गुरूंजवळ गायनविद्या शिकले. काही तिकडेच स्थायिक झाले, तर काही परत आले. अशा कलावंतांत गायनाचार्य बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे नाव प्रथम येते. त्यांचा आवाज निर्दोष व गोड होता. त्यांनी हिंदुस्थानी संगीत महाराष्ट्रात आणून अनेक नामांकित शिष्य तयार केले.

पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली व शास्त्रीय संगीताचा प्रचार करून समाजाच्या सर्व थरांत त्याला मानाचे स्थान प्राप्त करून दिले. त्याच काळात मराठी रंगभूमीवर संगीत नाटके सुरू झाली. त्या नाटकांनी संगीताची अभिरुची वाढविण्यास फार मोठी मदत केली, यात शंका नाही. त्याचे बरेच श्रेय अण्णासाहेब किर्लोस्कर व गोविंदराव देवल यांना दिले पाहिजे. पं. भातखंडे हे एक चिकित्सक संगीतज्ञ होते. त्यांनी संस्कृत व इतर भाषांतील अनेक ग्रंथांचे अध्ययन करून आपली एक संगीतपद्धती तयार केली आणि लक्ष्यसंगीत नामक संस्कृत ग्रंथ रचून त्यात तिचे वर्णन केले. हिंदुस्थानी संगीतपद्धती हा ग्रंथही त्यांनी लिहिला व ही त्यांची कामगिरी अखिल भारतात अलौकिक गणली गेली. संगीताचे शास्त्रीय लेखन त्यांनीच सुरू केले आणि शास्त्रीय संगीताला नवे वळण लावले.

संगीताच्या प्रचाराच्या दृष्टीने भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे, अबदुल करीम खाँ, अल्लादियाँ खाँ, सवाई गंधर्व, इ. नामवंत कलावंतांनीही मोठे कार्य केले आहे. हे स्वतः उच्च श्रेणीचे गायक असून, त्यांची शिष्यपरंपरा मोठी आहे. पं. ओंकारनाथ ठाकूर, विनायकबुवा पटवर्धन, नारायणराव व्यास हे पलुस्करांचे शिष्य असून, त्यांनी संगीतविद्येच्या प्रसाराचे कार्य खूप जोमाने केले.

भारतात ग्वाल्हेर, जयपूर, आग्रा व किराणा या नावाचे शास्त्रीय संगीताचे जे प्रमुख संप्रदाय प्रसिद्ध आहेत, त्यांची वाढ महाराष्ट्रात विशेष झाली आहे. अनंत मनोहर जोशी, मिराशीबुवा, कृष्णराव फुलंब्रीकर, नारायणराव व्यास, वामनराव पाध्ये, विनायकराव पटवर्धन, जगन्नाथबुवा पंढरपूरकर, गजाननराव जोशी, निवृत्तिबुवा सरनाईक, अंजनीबाई मालपेकर, हिराबाई बडोदेकर, केसरबाई केरकर, मोघुबाई कुर्डीकर, लक्ष्मीबाई जाधव, भीमसेन जोशी, कुमार गंधर्व, गंगूबाई हनगल, द. वि. पलुस्कर, किशोरी आमोणकर, माणिक वर्मा, डॉ. वसंतराव देशपांडे, जितेंद्र अभिषेकी, पं. जसराज, इ. गायकगायिकांची नावे त्या दृष्टीने विख्यात आहेत. त्यांची संगीतसेवा अनमोल ठरली आहे. त्याचप्रमाणे भाऊराव कोल्हटकर,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बालगंधर्व, केशवराव भोसले, बापूराव पेंढारकर, मा. दीनानाथ, दत्तोपंत हल्याळकर, गोपीनाथ सावकार, ज्योत्स्ना भोळे, छोटा गंधर्व, प्रसाद सावकार, रामदास कामत, सुहासिनी मुळगांवकर, ज्योत्स्ना मोहिले, जयमाला शिलेदार, मीनाक्षी, विमल कर्नाटकी, निर्मला गोगटे, आशालता वाबगांवकर, इ. कलावंतांनी रंगभूमीवर गाऊन महाराष्ट्रीय रसिकांना वेड लावले आहे.

गेल्या २५–३० वर्षांत बोलपट व आकाशवाणी या माध्यमांमधून संगीताचा अतिशय प्रसार झाला आहे. व त्यातून असंख्य भावगीत–गायक–गायिका उदय पावल्या आहेत.

लोककला – महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात लोककलांचे विविध प्रकार शतकानुशतके प्रचलित आहेत व त्यांचा नित्य विकास होत आहे. मराठी लोकांच्या जीवनात त्यांना महत्त्वाचे स्थानही लाभलेले आहे. त्यांत नृत्यनाट्य, गाणेबजावणे, भजनकीर्तने अशा अनेक कलांचा समावेश होतो. त्यांतील मुख्य प्रकार असे–

रामायण, महाभारत व निरनिराळी पुराणे यांतील आख्यानांवर आधारित नृत्यनाट्य अनेक प्रसंगी करण्याची चाल भारतात सर्वत्र आहे. घाटावर याला ललित म्हणतात, तर कोकणात दशावतार व खेळे म्हणतात. सगळी कथा गीतरूप असते; जोडीला सोंगे, अभिनय, नृत्य व वाद्येही असतात. हे खेळ फारच लोकप्रिय आहेत. सण, उत्सव, लग्नसमारंभ अशा प्रसंगी भवानीची आराधना करणारा गोंधळी गोंधळाच्या कार्यक्रमात गाऊन व नाचून लोकांची खूप करमणूक करतो. हा व्यवसाय वंशपरंपरागत होता. खंडोबाच्या सेवेसाठी जन्मभर वाहिलेल्या स्त्री–पुरुषांना मुरळी व वाघ्या असे म्हणतात. मुरळी नाचते व गाते. वाघ्या तिला साथ करतो. घंटी व घिमडी ही त्यांची वाद्ये होत.

कोकणातले कोळी फार कलाप्रिय आहेत. त्यांच्या नाचगाण्याचे पुष्कळ प्रकार आहेत. त्यांत समिंदर, म्हावर यांना बरेच स्थान असते. स्त्री–पुरुष एकत्र नाचताना अगदी बेहोष होऊन जातात. त्यांची गाणी जशी ऐकायला गोड, तसा नाचही आकर्षक असतो कोकणातले बाळू किंवा रामागडी हे लोकही कोळ्यांसारखाच नाच करतात, त्याला जाखडी म्हणतात.

कोळ्यांप्रमाणे घाटावरचे धनगरही नाचगाण्याचे शोकीन आहेत. त्यांचे गजानृत्य प्रसिद्ध आहे. मोठाले ढोल व झांज ही त्यांची वाद्ये. काही ठिकाणी लग्नाच्या वरातीत त्यांचे गुगुळ नृत्य करवतात.

तमाशा म्हणजे नाचगाण्याची मेजवानीच. त्यामुळे तो अतिशय लोकप्रिय आहे. त्यातील उत्तान नृत्ये व शृंगारिक लावण्या यांमुळे समाजात त्याला प्रतिष्ठा नसली तरी समाजाच्या फार मोठ्या भागाला त्याचे विलक्षण आकर्षण वाटते. नागपूर–विदर्भाकडे त्याला दंढार म्हणतात.

डोंबारी ही एक भटकी जमात आहे. गावोगावी फिरून हे लोक कसरतीची कामे करतात. डोंबारी पुरुष हा खेड्यापाड्यातील सर्कसवालाच होय. हे लोक वर्णाने उजळ व नाकीडोळी चांगले असतात. डोंबारी स्त्रिया नाचगाणेही चांगले करतात. तमाशातील संगीत बारी म्हणजे मूळचा डोंबारणीचा नाच होय.

लेझिम हा महाराष्ट्राचा एक वैशिष्टयपूर्ण कलाप्रकार आहे. त्यात मराठी माणसाचा मर्दानीपणा स्पष्ट दिसतो. लेझिमीच्या तालावर नृत्य करायला बावीस तगडे जवान लागतात. साथीला रणहलगी, खैताळ (मोठी झांज), घुमके, वरंडी, इ. वाद्ये असतात.

पोवाडा हा गीतप्रकार बराच जुना आहे. पूर्वी गोंधळी लोक पोवाडे रचून गात. पेशवाईत तमाशेवाले पोवाडे म्हणू लागले. पुढे स्वतंत्रपणे पोवाडे रचून गाणारे शाहीर उदय पावले. पराक्रमाचे वर्णन हा त्यांचा प्रमुख विषय होय.

डौरी लोक दांगटी पोवाडा गात गावोगांवी फिरतात. घिमडी व तुणतुणे ही वाद्ये ते वाजवतात. समोर दिसेल त्या प्रसंगावर झटपट पोवाडा रचून म्हणण्याइतके कवित्व त्यांच्या अंगी असते. पोवाडा म्हणताना ते बराच अंगविक्षेप करतात व प्रसंगी नाचतातही.

मराठी संतांनी रचलेले अभंग साध्या रसाळ चालीवर गाऊन भजन करण्याची चाल महाराष्ट्रात खेडोपाडी, तशीच शहरांतही आहे. अशी भजने निरनिराळ्या प्रसंगी रात्र रात्र चालतात. आषाढी–कार्तिकी एकादशीला पंढरीच्या विठोबाचे दर्शन घेण्यासाठी वारकरी पंथाचे हजारो भजनी जथे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून तिकडे जातात. टाळ व मृदंग यांच्या साथीवर, लयबद्ध ठेक्यात अभंग गाताना त्या जथ्यांतले लोक साधी नाचाची पावले टाकतात. वारकऱ्यांची ही दिंडी पंढरीची वाटचाल करीत असताना मार्गावरील गावांतले लोक तिचे मोठ्या उत्साहाने व भक्तिभावाने स्वागत करतात.

गेली सुमारे पाचशे वर्षे भारुडाचे नाच गाणे खेड्यापाड्यांतून अव्याहत चालू आहे. एकनाथांच्या भारुडांत नृत्याचा भाग बराच आहे. त्यांचे कडकलक्ष्मीचे भारूड तर सगळे नृत्यानेच भरलेले आहे. ब्राह्मण व महार यांच्या आध्यात्मिक भारुडात संवादही असल्यामुळे ते एक नृत्यनाट्यच ठरते.

कोकेवाला कानफाट्या म्हणजे नाथपंथी गोसावी. त्याचे वाद्य फार मधुर असते, त्याला कोका म्हणतात. त्याच्या स्वरात आपला मुलायम स्वर मिसळून लांब हाळीच्या चालीवर त्याने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गायलेली गोपीचंद, गोरखनाथ व मच्छिंद्रनाथ यांची गाणी खेडुतांना श्रवणीय वाटतात.

वरील विविध कलाप्रकारांत नृत्याचा जो भाग समाविष्ट आहे, त्याला लोकनृत्य म्हणता येईल. सण-समारंभांच्या वेळी अशी लोकनृत्ये होतात. स्त्रियांची नृत्ये सहजसुंदर असतात. पुरुषांची नृत्ये वीर-रसपूर्ण असतात. लेझिम व ढोल यांच्या साथींमुळे ती खूप दमदार होतात. देवदासी व मुरळ्या देवासमोर जे नृत्य करतात, त्याला धार्मिक दृष्टीने विशेष महत्त्व असते.

नृत्याचा दुसरा प्रकार म्हणजे आदिवासींची नृत्ये. भिल्ल, कातकरी, वारली, गोंड, ठाकूर, माडिया, कोरकू, बंजारा, इ. जंगली लोक जन्म, लग्न, सण, उत्सव असा प्रसंगी जी खास नृत्ये करतात, ती नृत्यकलेच्या प्राथमिक अवस्थेतली दिसत असली तरी, ती कलात्मक व मनोरंजक वाटतात. भडक वेशभूषा, कर्कश वाद्ये व जोरदार हालचाली ही त्यांची वैशिष्ट्ये होत. वारल्यांचा तारपेनाच, गौरीनाच, घोरनाच, हे प्रकार उल्लेखनीय आहेत. गोंडांची नृत्ये भारदस्त व जास्त कलात्मक वाटतात. सर्व आदिवासी लोक नाचताना निरनिराळी गाणी म्हणतात.

लोककलेचा आणखी एक प्रकार सर्व खेडेगावांतून आढळतो, तो म्हणजे भित्तिचित्रे. देवाचा कोनाडा किंवा गाभारा, कमानी, भिंती, दरवाजे, इ. सर्व ठिकाणे स्वस्तिक, तुळशीची पाने, पशुपक्ष्यांच्या आकृती, नक्षी काढून सुशोभित केलेली असतात. पोळा, गौरी-गणपती, कानबाई, महालक्ष्मी, इ. उत्सवांच्या वेळी घरांच्या भिंती सारवून त्यांवर चुन्याच्या निवळीने कृषिजीवनातील विविध प्रसंग रेखाटण्याची प्रथा आहे देवदेवतांची व नागाची पूजा करण्यासाठी त्यांची चित्रेही भिंतीवर काढली जातात. ही चित्रे पुष्कळदा जिवंत वाटतात. रांगोळ्या काढण्याची चालही परंपरागत आहे. अंगणात सडासारवण करून त्यावर स्वस्तिक, गोपद्म, कमळ, चंद्र, सूर्य, इ. आकृती काढण्याची हौस बहुतेक स्त्रियांना असते. सण-समारंभांत तर तिचा विशेष आविष्कार झालेला दिसून येतो. या रांगोळ्यांत मराठी जीवनातील आचार-विचारांचे व संस्कारांचे प्रतिबिंब आढळते. कपबश्यांच्या बारीक तुकड्यांनी किंवा रंगीत बांगड्यांच्या काचांनी विविध आकृती व चित्रे रेखण्याची कलाही ग्रामीण भागात दिसून येते. अशा आकृतीमध्ये कलात्मक सौंदर्य निश्चित असते. विविध रंगाचे कांचमणी दोऱ्यात गुंफून बनवलेली चित्रेही फार आकर्षक असतात.

कुंभाराने बनवलेल्या मातीच्या भांड्यांवरही या लोककलेचे दर्शन घडते. विविध आकारांची गाडगी-मडकी तयार करून त्यांवर रंगीबेरंगी चित्रे काढण्याची कला कुंभाराला परंपरेने अवगत असते. फळे, फुले, पाने, वेली, पक्षी यांच्या चित्रांमुळे ती भांडी फार सुंदर दिसतात.

याव्यतिरिक्त सुतार, सोनार, बुरूड, जिनगर, विणकर, यांची कलाकुसर म्हणजे लोककलाच होय. प्राचीन काळापासून अशा लोककला चालत आलेल्या आहेत. सामाजिक जीवनाचा ठसा या कलांवर उमटलेला असतो. सामाजिक जाणिवा कित्येक शतके जिवंत ठेवण्याचे कार्य या लोककला करीत असतात.

नृत्य—महाराष्ट्रीय नृत्यप्रकारांतील लोकनृत्ये व आदिवासींची नृत्ये हे दोन प्रकार लोककलांमध्ये समाविष्ट केलेले आहेत. तिसरा प्रकार शास्त्रीय नृत्यांचा. यात कथक, मणिपुरी, कथकळी व भरतनाटयम या प्रसिद्ध नृत्यप्रकारांचा समावेश होतो. ही नृत्ये इतर प्रदेशांत उदय पावली असली, तरी महाराष्ट्रात त्यांचा विकास पुष्कळ झाला आहे. तथापि त्यांचे यथार्थ ज्ञान मिळवायला बरेच कष्ट, वेळ व द्रव्य यांची आवश्यकता असल्यामुळे महाराष्ट्रात शास्त्रीय नृत्याचे उपासक थोडेच आढळतात.

चित्रकला—महाराष्ट्रीय चित्रकलेचा आविष्कार अजंठ्याच्या लेण्यातील भित्तिचित्रांत पाहायला मिळतो. ती चित्रे पंधराशे वर्षांपूर्वीची असूनही, त्यांतली काही चित्रे अजून उत्तम दिसतात. मुसलमानी अंमलात ही कला मागे पडली असली, तरी ती परंपरा श्रीमंतांच्या महालांत चालू राहिलेली दिसते. त्याचप्रमाणे पोथ्यांवर पौराणिक प्रसंगांची चित्रे काढण्याची चालही महाराष्ट्रात होती. अशा प्रकारची काही चित्रे भारत इतिहास-संशोधक मंडळात पाहायला मिळतात. ब्रिटिश राज्य सुरू झाल्यानंतर देशी चित्रकलेवर पाश्चात्य चित्रकलेचा प्रभाव पडला. आधुनिक चित्रांमध्ये पौर्वात्य व पाश्चात्य चित्रकलांचा सुंदर समन्वय झालेला दिसतो.

शिल्पकला — द. भारतातील भव्य मंदिरे आणि उ. भारतातील प्रचंड मशिदी, दर्गे व महाल यांच्यासारखी शिल्पकामे महाराष्ट्रात क्वचितच पाहायला मिळतात. तथापि शिल्पकलेची उत्कृष्ट उदाहरणे म्हणून प्रेक्षणीय अशी मंदिरे व लेणी महाराष्ट्रात पुष्कळ आहेत. वेरूळ, अजंठा, कार्ले, भाजे, नासिक, कान्हेरी, जोगेश्वरी व घारापुरी येथील डोंगरांत खोदलेली लेणी आणि नासिक, सिन्नर, बलसाने, अंबरनाथ, संगमेश्वर, शिंगणापूरवाडी, रत्नागिरी व कोल्हापूर येथील काही जुनी मंदिरे त्या दृष्टीने फारच सुंदर आहेत. वेरूळ येथील कैलास लेणे म्हणजे शिल्पकलेतील अनर्घ्य रत्नच होय. शुचिता, भव्यता व उदात्तता यांचे मनोहर चित्रण या लेण्यांत झाले आहे. हे शिल्पकाम राष्ट्रकूट राजा कृष्णराज (इ. स. ७६०–७८३)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याने निर्माण करविले. या ठिकाणी ब्राह्मणी, बौद्ध व जैन अशा तीन्ही पंथांची लेणी आहेत.

अजंटा हे बौद्धांचे तीर्थक्षेत्र होते. तिथली लेणी सन पूर्व २ऱ्या शतकापासून इ. स. ८व्या शतकापर्यंतच्या काळात निर्माण झाली. काही लेण्यांत बुद्धमूर्ती असून, बहुतेक सर्व लेण्यांतील खांबांवर सुरेख नक्षीकाम आहे व भिंतींवर सुंदर चित्रे आहेत. कार्ले व भाजे येथील लेणी अत्यंत प्राचीन असून, त्यांत चैत्यगृहे खोदलेली आहेत. तेथील कोरीव शिल्पकाम अलौकिक वाटते.

नासिकजवळची पांडवलेणी ही बौद्ध लेणी आहेत. त्यांतील भिंतींत कोरलेल्या मूर्ती व नक्षी प्रेक्षणीय आहे. तिथल्या



नासिक येथील पांडव लेणी

प्राचीन शिलालेखांमुळे या लेण्यांना विशेष ऐतिहासिक महत्त्व लाभले आहे.

कान्हेरी येथील लेणी इ. स. च्या २ ऱ्या शतकातील असून, त्यांची संख्या १०२ आहे. तिथे बौद्धांची मोठी वसाहत असावी. जोगेश्वरीचे शैव लेणे इ. स. च्या ८ व्या शतका-तील असून, त्यात शिवाच्या दोन मूर्ती आहेत. हे शिवमंदिर खूप भव्य आहे. घारापुरीची लेणी ही त्याच काळातली असून त्यांतील त्रिमूर्ती, शिव, गणेश, द्वारपाल, इ. मूर्ती भव्य व सुबक आहेत.

नासिक येथील नारोशंकराचे देऊळ फार प्रसिद्ध आहे. त्याच्या शिखरावर सुंदर कोरीव काम केलेले आहे. ... लहान लहान सुबक मूर्तीही कोरलेल्या दिसतात. पंचवटीच्या रामाच्या मंदिरातील राम, लक्ष्मण व सीता यांच्या काळ्या पाषाणाच्या मूर्ती फारच सुंदर आहेत. सिन्नर येथील गोंदेश्वराचे देऊळ ८०० वर्षांपूर्वी यादव वंशातील राव गोंद नामक राजाने बांधलेले असून, त्याचे शिल्पकाम उत्कृष्ट आहे. हे देऊळ हेमाडपंती व उंच चौथऱ्यावर बांधलेले आहे. खानदेशातील बलसने येथे हेमाडपंताने बांधलेले एक उत्कृष्ट देवालय आहे. त्यातील खांबांवर व छतावर सुंदर मूर्ती व पौराणिक प्रसंग कोरलेले दिसतात.

अंबरनाथ येथील शिवमंदिर हे तर कलासमृद्धच ... ते इ. स. च्या ११ व्या शतकातले हेमाडपंती बांधणीचे ... त्यात सर्वत्र सुंदर चित्रे व नक्षी कोरलेली आहे.

महाराष्ट्राला अभिमान वाटवा अशा ज्या काही ... आहेत, त्यांत संगीताप्रमाणेच नाटयकलेचाही अंतर्भाव ... (मराठी रंगभूमी व चित्रपट पाहा)

भारताची व महाराष्ट्राची संस्कृती सामान्यतः सारखी असली, तरी महाराष्ट्रीय स्त्री-पुरुषांची वेषभूषा आणि त्यांच्या-तील काही गुणदोष यांमुळे महाराष्ट्राचा वेगळेपणा ... येतो. महाराष्ट्रीय मनुष्य तुटक वागणारा, अल्पसंतुष्ट व ... विन्मुख आहे, अशी समजुत आहे. तो परप्रांतात जायला ... उत्सुक नसतो, त्याच्यात व्यापारी वृत्ती नाही, असे ... आणखी काही दोष सांगितले जातात. महाराष्ट्रियांचा ... पणे नजरेत भरणारा गुण म्हणजे त्यांची समन्वयबुद्धी ... मराठी मनुष्य अतिरेकी नाही. तो विलासी नसून काटक ... कष्टाळू आहे. त्याची वृत्ती संकुचित नसून, त्याच्या ठायी ... राष्ट्रीय दृष्टी आहे. महाराष्ट्राला विद्वत्तेची थोर परंपरा ... लेली आहे. महाराष्ट्रीय संतांची परंपराही मोठी व ... असून, तशी परंपरा इतरत्र आढळत नाही. महाराष्ट्राच्या ... तीत स्वाभिमान, निःस्पृहपणा, शुचिर्भूतपणा, चिकित्सक ... प्रतिसहकारवृत्ती, इ. गुणांचे संगोपन विशेष आस्थेने ... आहे. या गुणांमुळे व तदंगभूत दोषांमुळेही महाराष्ट्रीय ... वेगळा दिसून येतो.

प्रस्थापित सत्ता मदांध झाली की तिला आव्हान ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हा महाराष्ट्राचा बाणा आहे. संस्कृत पंडितांनी गीर्वाण भाषेचे फार स्तोम माजविले होते, तेव्हा ज्ञानेश्वरांनी ब्रह्मविद्या सांगण्यासाठी मराठीत ज्ञानेश्वरी लिहिली. महाराष्ट्राला ज्ञानेश्वरीसारखा अलौकिक ग्रंथ लाभला हे त्याचे मोठे भाग्य होय. स्वतंत्र प्रज्ञेच्या मागे प्रखर असा आत्मविश्वास असावा लागतो, तो ज्ञानेश्वरांच्या ठायी होता. त्यामुळे ते वेदांवरही टीका करण्यास कचरले नाहीत. वेदांतील ज्ञानाची कवाडे स्त्रीशूद्रांना बंद होती ती त्यांनी उघडून दिली.

भागवतधर्ममंदिराचा कळस शोभणारे संत तुकाराम यांच्याही वाणीत तसेच प्रखर तेज आहे. वेदपठण हे काही खरे अध्यात्मज्ञान नव्हे, असे सांगून ते ब्राह्मणांना म्हणतात, की वेदांचा अर्थ आम्हांलाच कळतो; तुम्ही नुसते भारवाहक आहां.

ज्ञानोबा–तुकोबांच्या या भूमीतच, शिवबाचा अवतार झाला. त्याने वयाच्या सोळाव्या वर्षी हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली होती. अखिल भारताच्या स्वातंत्र्याची कल्पना तरुणपणीच शिवरायांच्या विशाल मनात उद्‌भवली. 'मराठा तितुका मेळवावा' या समर्थांच्या मंत्रामुळे त्यांना सामर्थ्य प्राप्त झाले आणि दिल्लीच्या मुसलमानी सत्तेला आव्हान देऊन त्यांनी हिंदवी स्वराज्याचा संकल्प केला. हेच मराठ्यांचे असामान्यत्व होय. थोरले बाजीराव पेशवे यांनी शिवरायांचा संकल्प पुरा करून मराठी साम्राज्याचा पाया घातला आणि बाळाजी बाजीराव पेशवे यांनी मराठी साम्राज्य प्रस्थापित केले.

चातुर्वर्ण्यामुळे समाजात कमालीची विषमता उत्पन्न झाली आहे. मराठी संतांनी चातुर्वर्ण्यावर आघात न करता ही विषमता परमार्थ-क्षेत्रात नष्ट करण्याचे प्रयत्न केले. ज्याच्या ठायी भक्तिभाव आहे, जो सदाचारी आहे, तो अंत्यज असला, तरी ब्राह्मणाच्या बरोबरीचा आणि भक्ती व सदाचार नसलेला ब्राह्मण हा अंत्यजसम होय, असे त्यांनी अनेक ठिकाणी म्हटले आहे. हा क्रांतिकारक विचार परमार्थक्षेत्रापुरता मर्यादित न राहता क्षात्रधर्मातही पसरला. त्यामुळे महाराष्ट्रात सर्व वर्गांतून सेनापती, सरदार व शूर वीर निर्माण झाले.

पेशवाई बुडाल्यानंतर ब्रिटिश सत्तेला आव्हान देणारे क्रांतियुद्ध इ. स. १८५७ साली झाले, त्याचे सूत्रधार नानासाहेब पेशवे, रंगो बापूजी व तात्या टोपे हे होते. झाशीची राणी लक्ष्मीबाई ही अबला स्त्री देखील त्या रणधुमाळीत सामील झाली व धारातीर्थी पतन पावली. या शूर व्यक्तींमुळे महाराष्ट्राचे नाव निश्चितच उज्ज्वल झाले आहे.

पाश्चात्य विद्येच्या प्रसारामुळे महाराष्ट्रात जे सामाजिक व राजकीय प्रबोधन झाले, त्याचे श्रेय लोकहितवादी, म. फुले, डॉ. भांडारकर, न्या. रानडे, आगरकर व विष्णुशास्त्री चिपळूणकर यांना आहे. त्यांनी सनातन धर्मशास्त्राच्या सत्तेला आव्हान देऊन जातीयता, विषमता, स्त्रीचे दास्य, अंधश्रद्धा व दुष्ट रूढी यांवर प्रखर टीका करून समाजाला जागृत केले. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी महाराष्ट्रियांचा आत्मविश्वास चेतवून, इंग्रजी सत्ता अजिंक्य नाही, तिच्यावर मात करता येईल असे गर्जून सांगितले. त्यांनी पेटवलेल्या वन्हीतूनच ब्रिटिश साम्राज्याचे भस्म करणारी महान ज्योती लो. टिळकांच्या रूपाने निर्माण झाली. लो. टिळकांनी जनशक्ती जागृत करून ब्रिटिश सत्तेला आव्हान दिले व लोकसत्तेचा पाया घातला. राष्ट्रकार्यासाठी निर्भयपणे कारावासात जाण्याची दीक्षा भारताला प्रथम टिळकांनी दिली आणि कारावासापेक्षाही अधिक उग्र अशा एका दिव्य व्रताची दीक्षा स्वा. सावरकरांनी दिली. स्वातंत्र्यासाठी वधस्तंभावर चढणे हे ते व्रत होय. नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रमाणेच वासुदेव बळवंत व चाफेकर यांच्यापासून त्यांना स्फूर्ती मिळाली. क्रांतीचे पूर्ण शास्त्र व तत्त्वज्ञान सिद्ध करून त्याचा अखिल भारतात योजनाबद्ध प्रसार सावरकरांनी केला, म्हणून ते भारतीय क्रांतिकारकांचे मुगुटमणी ठरले. अशा प्रकारे धार्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत समाजाला प्रबुद्ध करण्याचे कार्य महाराष्ट्रांतील या थोर व्यक्तींनी केले.

वर्णाश्रमव्यवस्था, जातीय विषमता, अस्पृश्यता या कल्पना कायमच्या नाहीशा करण्यासाठी उदंड प्रयास करणारा श्रेष्ठ पुरुष म्हणजे डॉ. भीमराव आंबेडकर. अस्पृश्य जातीत जन्म झालेला असूनही त्यांनी आपली असामान्य विद्वत्ता व अलौकिक धैर्य यांच्या बळावर मनूला पदच्युत केले. मनुस्मृतीचे दहन करून त्यांनी नवी स्मृती रचण्याचा अधिकारच आपल्या हाती घेतला. सात कोटी अस्पृश्य लोकांच्या मनात त्यांनी मानवत्वाची जाणीव उत्पन्न केली.

ब्रिटिश सत्ता नाहीशी होऊन भारताला स्वातंत्र्य मिळाले, पण सामाजिक, धार्मिक व विशेषत: आर्थिक क्रांती पूर्ण झाल्यावाचून आपले स्वातंत्र्य चिरस्थायी होणार नाही. ती आर्थिक क्रांती घडविण्याचे महान कार्य आचार्य विनोबा भावे यांनी आरंभिले आहे. त्यांनी भूदानयज्ञाची जी दीक्षा भारताला दिली आहे, तिला जगाच्या इतिहासात तोड नाही. या भूदानयज्ञामुळे त्यांनी नव्या श्रद्धा, नवे तत्त्वज्ञान व नवी मूल्ये निर्माण केली आहेत. भूदान ही केवळ आर्थिक क्रांती नसून, ती सामाजिक व धार्मिक क्रांतीसुद्धा आहे. ती यशस्वी झाली, तर सर्व जगाचा इतिहास बदलून जाईल.

महाराष्ट्रीय लोक केवळ महाराष्ट्राचा विचार केव्हाच करीत नाहीत. ज्ञानेश्वर, शिवाजीमहाराज, बाजीराव यांच्या प्रमाणेच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रानडे, विष्णूशास्त्री, टिळक, सावरकर यांचे कार्यक्षेत्र अखिल भरतखंड हेच होते. विनोबा तर ज्ञानेश्वरांप्रमाणे 'विश्वचि माझे घर' या वृत्तीचे आहेत. महाराष्ट्र, मराठी भाषा, मराठ्यांचा इतिहास व परंपरा यांचा त्यांना अभिमान आहे. पण या अभिमानातून, महाराष्ट्रीय अहंकाराच्या जोपासनेतून जे सामर्थ्य निर्माण होते ते अखिल भारताच्या सेवेसाठी खर्च झाले पाहिजे, अशी त्यांची वृत्ती आहे. [महाराष्ट्र १९६९ – प्रसिद्धी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई; महाराष्ट्र–श्री. वि. पां. दांडेकर, १९४७; म. प.; म. जी.; वि. मुं. रा. प.; म. प्रा. इ. सं.; महाराष्ट्र संस्कृती – डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, 'वसंत' जानेवारी ते जुलै १९६८; सू. सं.; महाराष्ट्राचा पुण्यग्राम– वि. वि. करमरकर, १९२५; मुंबईचे वर्णन – गो. ना. माडगांवकर, १९६१; मुंबई आणि मुंबईकर–श्री. गंगाधर गाडगीळ, १९७०; महाराष्ट्रातील लोककला– प्रसिद्धी संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई १९७१; फे. फे. म.; महाराष्ट्राचे जिल्हे– प्रसिद्धी विभाग, मुंबई; श्री. शां. शं. रेगे, महाराष्ट्र टाइम्स]

महाराष्ट्री एक प्राकृत भाषा. सर्व प्राकृत भाषांत महाराष्ट्री प्राकृत ही श्रेष्ठ मानलेली आहे. या महाराष्ट्रीबद्दल दण्डी म्हणतो–

महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः ।
सागरः सूक्तिरत्नानां सेतुबन्धादि यन्मयम् ॥

(काव्यादर्श १.३४)

अर्थ – महाराष्ट्रात बोलल्या जाणाऱ्या भाषेला श्रेष्ठ प्राकृत असे म्हणतात. कारण ही भाषा सूक्तिरूपी रत्नांचा सागर आहे आणि तिच्यात सेतुबंधादी ग्रंथ रचलेले आहेत.

महाराष्ट्री प्राकृताची काही वैशिष्ट्ये अशी –

(१) स्वरमध्यग अल्पप्राण वर्णांचा लोप होतो. स्वरमध्यग क्, त्, प्, ग्, द्, ब् प्रायः लुप्त होतात व संयोगी स्वर तेवढा शिल्लक राहतो. उदा० प्राकृत – पाउअ; नगर – नअर.

(२) महाप्राण स्पर्श ख्, थ्, घ्, भ्, ध् यांच्या जागी केवळ प्राणध्वनी शिल्लक राहतो. उदा० कथयति–कहेइ.

(३) ऊष्म व्यंजनध्वनीच्या स्थानी ह् येतो. उदा० पाषाण–पाहाण.

(४) अपादान (पंचमी विभक्ती) एकवचनाला 'अ हि' प्रत्यय लागतो. उदा० दूरात्–दूराहि.

(५) पूर्वकालिक क्रिया ऊण प्रत्यय लावून दाखवली जाते. उदा० पृष्ट्वा – पुच्छिऊण.

साहित्यिक प्राकृतांत महाराष्ट्री ही सर्वांत अधिक विकसित झालेली होती. इ. स. च्या पहिल्या शतकापासून महाराष्ट्रीत पद्यरचना सुरू झाली होती. संस्कृत नाटकांत जर पद्यभाग प्राकृतात आला असेल, तर तो महाराष्ट्रीतच असतो. हालकृत गाथासप्तशती, प्रवरसेनकृत सेतुबंध (किंवा रावणवहो), जयवल्लभकृत वज्जालग्ग, वाक्पतिराजाचे गउडवहो हे महाराष्ट्रीतील प्रसिद्ध ग्रंथ होत. सेतुबन्ध व गउडवहो ही तर महाकाव्येच आहेत.

जैनांनी धर्मशास्त्राखेरीज इतर साहित्य महाराष्ट्रीतच रचले आहे. परंतु तिची काही भाषात्मक वैशिष्ट्ये असल्यामुळे तिला जैन महाराष्ट्री असे म्हणतात. ऋषभचरित, शांतिनाथचरित, पार्श्वनाथचरित, इ. तीर्थंकरांची चरित्रे, मलयसुंदरीकथा, महावीरस्तव, गाथाकोश, नवपय, जीवविचार, सिद्धहेमचंद्र, प्राकृतशब्दानुशासन, इ. त्यांचे ग्रंथ महाराष्ट्रीतच आहेत. यावरून महाराष्ट्रीत विपुल ग्रंथरचना झाली होती, हे कळून येते.

महाराष्ट्री प्राकृताचा गाहासत्तसईतील एक नमुना असा –

उअ णिच्चलणिप्पन्दा भिसिणीपत्तम्मि रेहइ बलाआ ।
णिम्मलमरगअभाअणपरिट्ठिआ संखसुत्ति व्व ॥

अर्थ – पाहा, कमळाच्या पानांमध्ये बगळी कशी एकाकी आणि निश्चल बसलेली आहे. जणू निर्मळ पाचूच्या पूजापात्रात मोत्यांची शिंपली ठेवावी, तशी ती शोभत आहे.

डॉ. मनमोहन घोष यांनी महाराष्ट्रीला शौरसेनीची उत्तरकालीन शाखा मानली आहे. महाराष्ट्रीपासूनच मराठी भाषा उत्क्रांत झाली आहे. [सा. भा. वि.; नि. उ. सा.; ब्र. ख. तु. अ.; गाथासप्तशती – संपा. स. आ. जोगळेकर]

महारौरव अठ्ठावीस नरकांपैकी रौरव नामक नरकाचे भयानक स्वरूप तप्त तांब्याप्रमाणे असते. या नरकाला अग्नी सतत तापवीत ठेवतो. पृथ्वीच्या पोटात हा नरक आहे, अशी समजूत आहे. या ठिकाणी क्रव्याद नावाचे रूरूंचे संघ असतात. स्वार्थी माणसे या नरकात पिचत राहतात (भाग.पु.५.२६.७–१२). [पु. इं.; मा. पु. सां. अ.]

महार्थमंजरी नाथसंप्रदायाचे तत्त्वज्ञान विवरून सांगणारा एक प्राचीन ग्रंथ. महाप्रकाशशिष्य गोरक्षनाथ याने हा रचला आहे. महेश्वरानंद हे गोरक्षनाथाचे सांप्रदायिक नाव होय. महेश्वरानंदाने हा ग्रंथ महाराष्ट्रीय प्राकृत भाषेत रचला असून, त्यावर परिमल नावाचे एक विस्तृत भाष्य संस्कृत भाषेत लिहिले आहे. मूळ ग्रंथाच्या एकूण सत्तर गाथा आहेत. एकाहत्तरावी समाप्तिगाथा शार्दूलविक्रीडित वृत्तात आहे. अभिनवगुप्ताचार्यांच्या अलौकिक पांडित्याचे अनुकरण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केल्यामुळे, मंजरीकाराचेही विद्याविचक्षणत्व या ग्रंथामध्ये प्रकट झाले आहे, असे पंडितांचे मत आहे.

शिवसूत्रांतील तत्त्वज्ञानांचे निरूपण करणारा हा ग्रंथ असल्याने यात अद्वैत तत्त्वच सिद्ध करून दाखविण्याचा प्रयत्न आहे. परिमलभाष्यात प्रथम मूळ गाथेचे पद-पदार्थ सांगितले आहेत. नंतर अन्य मतांचा पूर्वपक्षरूपाने अनुवाद करून त्याचे खंडन-उदाहरणांसह सप्रमाण केलेले आहे.

जगत, जगदीश्वर, बंध, मोक्ष, मोक्षाधिकारी, प्रमाण, प्रमेय, इ. विषयांसंबंधी शैवाचार्यांनी केलेल्या विचारांचे सामान्य स्वरूप महार्थमंजरीत आहे. याशिवाय इतर अध्यासवादी शांकरमतानुयायांचे खंडनही सविस्तर केलेले आहे.

अध्यासवादी अभ्यासकांनी विश्वाच्या निर्मितीसंबंधी प्रतिबिंबवाद, आभासवाद, अवच्छेदवाद, मायावाद, अजातवाद या सारख्या ज्या कल्पना केल्या आहेत, त्या सर्व कल्पनांचे सोपपत्तिक खंडन परिमलात पाहायला मिळते, तसेच शैव संप्रदायाचा चिद्विलासवादाचा सिद्धान्त वैदिक वचनांच्या आधारे सिद्ध करण्याचाही प्रयत्न दिसतो.

महेश्वरनंदाने इतरही बरेच ग्रंथ लिहिले आहेत. सांप्रत त्यांपैकी महार्थमंजरी व परिमल हे दोनच ग्रंथ उपलब्ध आहेत.
[श्री. बाळाचार्य खुपेरकर – नवभारत, ऑगस्ट १९६०]

महालय पक्ष भाद्रपद महिन्याच्या कृष्ण पक्षाला महालय पक्ष किंवा पितृपक्ष असे म्हणतात. हा पक्ष पितृकार्याला अत्यंत योग्य आहे. कारण या पक्षात पितर यमलोकातून आपल्या कुटुंबीय माणसांच्या घरी वास्तव्य करण्यासाठी येतात, अशी समजूत आहे. भाद्रपद पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंत रोज महालयश्राद्ध करावे, असे शास्त्रवचन आहे. पण ते शक्य नसल्यास ज्या तिथीला आपला पिता मृत झाला असेल, त्या दिवशी या पक्षात सर्व पितरांच्या उद्देशाने महालय श्राद्ध करण्याचा परिपाट आहे. हे श्राद्ध पितृत्रयी– पिता, पितामह, प्रपितामह; मातृत्रयी– माता, पितामही, प्रपितामही; सापत्नमाता, मातामह, मातृपितामह, मातृप्रपितामह, मातामही, मातृपितामही, मातृप्रपितामही, पत्नी, पुत्र, कन्या, पितृव्य, मातुल, बंधू, आत्या, मावशी, बहीण, पितृव्यपुत्र, जावई, बहिणीचा मुलगा, सासरा, सासू, आचार्य, उपाध्याय, गुरू, मित्र, शिष्य या सर्वांच्या उद्देशाने करायचे असते. जे कोणी जिवंत असतील, ते वगळून इतरांच्या नावाचा उद्देश करतात. देवांच्या जागी धूरिलोचन संज्ञक विश्वेदेव घ्यावे. शक्य असल्यास देवांकरता दोन, तीन पार्वणांना प्रत्येकी तीन आणि पत्नी इत्यादी एकोद्दिष्ट गणाला प्रत्येकी एक असे ब्राह्मण बोलवावे. एवढे शक्य नसेल, तर देवांकरता एक, तीन पार्वणांकरता तीन आणि सर्व एकोद्दिष्ट गणाला एक असे पाच ब्राह्मण सांगावे. महालय श्राद्धात क्षणदान, अर्घ्यदान, पूजा, अग्नौकरण, पिंडदान, विकिरदान, स्वधावाचन वगैरे विधी करायचे असतात.

योग्य तिथीवर महालय करणे अशक्य झाल्यास पुढे 'यावद्-वृश्चिकदर्शनम्' म्हणजे सूर्य वृश्चिक राशीला जाईपर्यंत तो कोणत्याही योग्य तिथीला केला तरी चालतो. या पक्षातल्या चतुर्थीला किंवा पंचमीला भरणी नक्षत्र असताना त्या वर्षी मृत झालेल्या व्यक्तीचे श्राद्ध करतात. भाद्रपद वद्य नवमीला अविधवा नवमी म्हणतात. या दिवशी सौभाग्याने मृत झालेल्या स्त्रीबद्दल श्राद्ध करण्याचा किंवा सवाष्णीला भोजन घालण्याचा प्रघात आहे. गुजरातेत या नवमीला डोशी नवम म्हणतात. सौराष्ट्रात वद्य त्रयोदशीला बाळाभोळांनी तेरस असे म्हणतात. या दिवशी कुळात मृत झालेल्या लहान मुलांची आठवण करून त्यांच्या प्रीत्यर्थ काकबळी देतात. अपघातात मृत्यु पावलेल्यांचे महालय श्राद्ध वद्य चतुर्दशीला करण्याचा प्रघात आहे. हिला घातचतुर्दशी असे नाव आहे. सर्वपित्री अमावास्या ही सर्व पितरांना उद्देशून श्राद्ध करण्याची तिथी आहे. या दिवशी बहुतेक घरांतून एक तरी ब्राह्मण जेवायला बोलावण्याची रीत आहे. महालयासाठी भूरिभोजन घालावे आणि आप्तेष्टांनाही भोजनाचे निमंत्रण द्यावे, असे शास्त्रवचन आहे. [नि. सिं.; श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

महालसा एक देवता. हिला म्हाळसा असेही म्हणतात. ही मल्लारीं मार्तंडाची (खंडोबा) पत्नी आहे. लोकसमजुतीप्रमाणे म्हाळसा हा मोहिनीचा अवतार समजला जातो. अमृतमंथन झाल्यावर विष्णूने मोहिनीचे रूप धारण करून दैत्यांना मोहविले. त्या वेळचे मोहिनीचे उन्मत्त लावण्य पाहून शिव तिच्यावर भाळला आणि तिच्या मागे धावू लागला, असे भागवताच्या अष्टम स्कंधात सांगितले आहे. लोकमानसाने याच कथेचा धागा पुढे ओढला आहे, तो असा –

शिवाची ती अतृप्त इच्छा पुरी करण्यासाठी मोहिनीने शिवाला आश्वासन दिले, की ' तू पुढे जेव्हा मार्तंड भैरवरूपाने अवतार घेशील, तेव्हा मी म्हाळसा या नावाने अवतरून तुझी इच्छा पूर्ण करीन. '

या जनश्रुतीचा आणखीही एक पर्याय आहे. त्यानुसार म्हाळसा ही साक्षात मोहिनी नसून, मोहिनीच्या ध्यासामुळे शिवाला पार्वतीच मोहिनीस्वरूप भासू लागली. म्हाळसा हा तिचाच अवतार होय.

शिवाच्या मार्तंड भैरवावतारात म्हाळसा ही नेवासे येथील तिम्माशेट वाण्याच्या घरी एका कन्यकेच्या रूपाने अवतरली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिम्माशेटने त्या कन्येचा संभाळ केला आणि पुढे मार्तंड भैरवाच्या स्वप्नादेशानुसार पाली येथे तिचा मार्तंड भैरवाशी विवाह लावून दिला.

म्हाळसा ही मुळात कन्नड ग्रामदेवी होती. माळव्व हे तिचे लोकप्रिय नाव असून, ती मैलाराची पत्नी होती. मैलाराबरोबरच ती कर्नाटकात प्रतिष्ठा पावू लागली. पुढे तिच्या विकासाचे दोन वेगळे प्रवाह बनले. एकीकडे ती खंडोबाची पत्नी बनली आणि दुसरीकडे आदिशक्तीचे एक स्वरूप म्हणून विकसित झाली. प्रारंभी या दोन्ही प्रवाहांतील उन्नयनाचे साधन मोहिनी हेच होते. मैलार हा शिव आणि माळव्व ही मोहिनी. पण पुढे मैलार हा शिव-मोहिनी-कथेचा संबंध सोडून भैरव बनल्यानंतर मैलारपत्नी माळव्व ही मोहिनीऐवजी योगेश्वरी पार्वतीचेच एक रूप म्हणून ओळखली जाऊ लागली. तिच्या उन्नयनाच्या पहिल्या स्वतंत्र प्रवाहात मात्र तिचे मोहिनीरूपच अबाधित राहिले आणि एक वैष्णवी शक्ती म्हणून तिला इ. स. च्या १३ व्या शतकात अत्युच्च प्रतिष्ठा लाभली. नेवाशाचा मोहिनीराज म्हणजे मोहिनीचे रूप घेतलेली मूळची म्हाळसाच होय. एकाच ग्रामदेवीच्या विकसनाचे हे दोन प्रवाह इतके अलग बनले, की खंडोबापत्नी म्हाळसा आणि नेवाशाची मोहिनी यांचे मूळ एकच आहे, हे सत्य आज विस्मयजनक ठरले आहे.

महाराष्ट्रात म्हाळसा आणि कर्नाटकात माळव्व या नावांनी लोकप्रिय असलेल्या या देवतेला माळजदेवी, म्हालजा, मालचिदेवी, मालची, मालाची, मालती, माळवी, म्हालसिका, महालया, महालाय, इ. दुसरीही अनेक नावे आहेत.

म्हाळसा ही सांप्रत खंडोबाची पत्नी म्हणून प्रसिद्ध असली, तरी मूळची ती स्वतंत्र देवता होती. आजही ती एक स्वतंत्र देवता म्हणूनच गाजत आहे. देवीहोसुर येथील इ. स. च्या ११ व्या शतकात प्रसिद्ध असलेले माळजदेवीचे मंदिर आज वनशंकरीचे म्हणून ओळखले जाते. भोगावती (पैठण), वालसंग (जि. औरंगाबाद), नांदुरा (जि. बीड) आणि नेवासे या चार ठिकाणी म्हाळसेची मंदिरे असल्याचे उल्लेख स्थानपोथीत आहेत.

पण सध्या विशेष प्रसिद्ध असलेली म्हाळसेची स्थाने म्हणजे नेवासे आणि म्हारदोळ ही होत. नेवासे येथील देवतेला मोहिनीराज हे नाव असून, तो विष्णूचा अर्धनारीनटेश्वर अवतार आहे, अशी लोकांची धारणा आहे.

म्हारदोळ हे स्थान गोमंतकात फोंडे-पणजी रस्त्यावर आहे. पूर्वी म्हाळसेचे मंदिर साष्टी महालात वेर्णे येथे होते. पण इ. स. च्या १६ व्या शतकात पोर्तुगीजांनी त्याचा विध्वंस केला. त्यानंतर मराठी सत्तेखाली असलेल्या म्हारदोळ गावी या देवीचे स्थलांतर करण्यात आले. इथल्या देवीला महालसा नारायणी म्हणतात. नारायणी म्हणजे नारायणाचा अवतार असलेली मोहिनी.

म्हाळसेच्या प्राचीन मूर्ती आज अस्तित्वात नाहीत. त्यामुळे तिचे मूळ रूप कसे होते, ते सांगणे शक्य नाही. आज आढळणाऱ्या म्हाळसेच्या मूर्ती संकीर्ण कल्पनांनी युक्त आहेत. मोहिनी-म्हाळसा आणि मैलारपत्नी-म्हाळसा असे त्या मूर्तींचे दोन गट पाडता येतील. परंतु यांपैकी कोणत्याही गटातील मूर्ती निश्चित कल्पनांनी घडवलेल्या नाहीत. वज्रवूर येथील

महालसा – म्हारदोळ (गोवा)

मोहिनीची मूर्ती नग्न आणि द्विभुज आहे; तर नेवासे आणि म्हारदोळ येथील मोहिनी – म्हाळसेच्या मूर्ती मात्र चतुर्भुज आहेत. म्हारदोळच्या म्हाळसेच्या उजव्या दोन हातांत त्रिशूळ व एका दैत्याचे केस धरलेले असून, डाव्या दोन हातात अमृतकलश व रक्त गळत असलेले दैत्यशिर आहे. त्या दैत्यशिरातून सांडत असलेले रक्त एक कुत्रा पीत असून, तिच्या पायाखाली एक दैत्य तुडवला जात आहे, असे दाखविले आहे. नेवाशाच्या म्हाळसा-मोहिनीराजाच्या उजव्या दोन हातांत चक्र व गदा आणि डाव्या दोन हातांत शंख व पानपात्र आहे. ही मूर्ती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्धनारीनटेश्वररूप आहे, असे दाखविण्यासाठी उराचा डावा भाग स्तनयुक्त घडवलेला आहे.

मैलारपत्नीच्या स्वरूपात ती स्वयंभू लिंगाच्या रूपाने आणि खंडोबाच्या पत्नीच्या स्वरूपात अश्वारूढ खंडोबाच्या मागे बसलेली किंवा स्वतंत्र मूर्तिरूपाने आढळते. पाहा – गोमंतक. [खंडोबा – श्री. रा. चिं. ढेरे; देवीकोश २]

महालक्ष्मी जगदंबेचे एक नामरूप. हिला दुर्गा, महिषासुरमर्दिनी, इ. नावेही आहेत. ही देवी म्हणजे विष्णुपत्नी नसून शिवपत्नी दुर्गाच होय. देवीमाहात्म्य या ग्रंथात तिची अवतारकथा दिली आहे, ती अशी –

एकदा देव-दानवांचा घनघोर संग्राम होऊन त्यात दानवांचा जय झाला. त्यांचा मुख्य महिषासुर हा जगाचा स्वामी बनला व त्याला इंद्रपद प्राप्त झाले. तेव्हा पराजित झालेले सर्व देव ब्रह्मदेवाबरोबर भगवान विष्णू व शंकर यांच्याकडे गेले व त्यांनी आपली करुण कहाणी त्यांना सांगितली. ती ऐकून विष्णू व शंकर हे अत्यंत क्रुद्ध झाले आणि त्यांच्या मुखांतून महान तेज बाहेर पडले. ब्रह्मदेव, इंद्र, इ. सर्व देवांच्या शरीरांतूनही मोठे तेज बाहेर पडून ते सर्व तेज एकत्र झाले. मग त्या दिव्य तेजातून एक स्त्रीदेवता प्रकट झाली. तिने दानवांशी युद्ध करून महिषासुराला व त्याच्या सर्व सैन्याला मारून टाकले. या देवीला महिषासुरमर्दिनी किंवा महालक्ष्मी म्हणतात.

महालक्ष्मीचे रूपध्यान दुर्गासप्तशतीत वर्णिले आहे, ते असे–

अक्षस्रक्परशूगदेषुकुलिशं पद्मं धनुः कुण्डिकाम् ।
दण्डं शक्तिमसिं च चर्म जलजं घण्टां सुधाभाजनम् ।
शूलं पाशसुदर्शने च दधतीं हस्तैः प्रसन्नाननाम् ।
सेवे सैरिभमर्दिनीमिह महालक्ष्मीं सरोजस्थिताम् ।।

अर्थ – हातामध्ये अक्षमाला, परशू, गदा, बाण, वज्र, कमल, धनुष्य, कुंडिका, दंड, शक्ती, खड्ग, चर्म, शंख, घंटा, सुधापात्र, शूल, पाश व सुदर्शनचक्र धारण करणारी, प्रसन्नवदना, कमलासना व महिषासुरमर्दिनी अशा महालक्ष्मीचे मी ध्यान करतो.

शाक्त संप्रदायाचे अनुयायी ज्या आदिशक्तीची उपासना करतात ती महालक्ष्मीच होय. ती चतुर्भुज असून, तिच्या हातांत फळ, गदा, ढाल व कपाल या वस्तू असतात. तिच्या मस्तकावर सर्प, लिंग व योनी असते.

चंडिकल्पात शाक्तांच्या उपास्य देवतेचे वर्णन केलेले आहे. त्यात तिला १८ हात असून, त्यांत अक्षमाला, परशू, इ. अठरा वस्तू असतात, असे सांगितले आहे. हे वर्णन दुर्गासप्तशतीमधील वर्णनाशी जुळते आहे.

भाद्रपद महिन्यात गणपतीच्या उत्सवाबरोबर महालक्ष्मीचाही उत्सव साजरा केला जातो. शुक्ल पक्षातील अनुराधा नक्षत्रावर देवीचे आगमन होते, ज्येष्ठा नक्षत्रावर तिची पूजा करतात आणि मूळ नक्षत्रावर तिचे विसर्जन करतात. हा उत्सव स्त्रियांचा आहे. पुराणात त्याविषयी कथा आहे, ती अशी–

प्राचीन काळी कोलासुर नावाचा दैत्य स्त्रियांना फार त्रास देऊ लागला, तेव्हा सर्व स्त्रियांनी ब्रह्मा – विष्णू – महेश यांची प्रार्थना केली. मग त्रिमूर्तींनी कोलासुराचा नाश करण्याचे कार्य महालक्ष्मीवर सोपवले. महालक्ष्मीने कोलासुराला मारून लोकांना संकटमुक्त केले.

महालक्ष्मीने केलेल्या या उपकाराचे स्मरण म्हणून हा उत्सव साजरा केला जातो. गणपतीच्या उत्सवातच गौरीचेही पूजन असते. त्यामुळे महालक्ष्मी व गौरी या दोघींची पूजा एकदम करण्याची प्रथा आहे. महालक्ष्मीचा उत्सव भाद्रपद शुद्ध अष्टमीला सुरू होतो. त्या तिथीला दुर्वाष्टमी म्हणतात. त्या दिवशी दूर्वांची पूजा करण्याची प्रथा आहे. त्यामुळे दूर्वांच्या विस्ताराप्रमाणे वंशविस्तार होतो अशी कल्पना आहे. अखंड सौभाग्य – प्राप्तीसाठी सुवासिनी हा उत्सव करतात.

कोलासुर म्हणजे रानडुक्कर होय. तो शेतीची नासधूस करतो. त्याचा नाश करून देवीने शेतीचे संरक्षण केले. म्हणून महालक्ष्मी ही समृद्धीची देवता मानली जाते.

महाराष्ट्रात कोल्हापूर, मुंबई, डहाणूजवळचे विवळवेढे, केळशी (जि. रत्नागिरी), आडिवरे (जि. रत्नागिरी), कुडाळ व वाई; गोमंतकातील बांदिवडे, मांद्रे; तसेच झाशी, कुंभळगड अणहिलवाड, इ. ठिकाणी महालक्ष्मीची मंदिरे आहेत. पाहा – दुर्गा. [कल्याण – शक्तिअंक; डे. हिं. इ.; संस्कृति – समवाय]

महालक्ष्मीव्रत एक काम्य व्रत. हे आश्विन शु. अष्टमीच्या दिवशी करतात. त्याचा विधी असा – व्रतकर्त्याने चंदनाने लक्ष्मीची प्रतिमा काढावी. तिच्या शेजारी सोळा दोरे एकत्र केलेला आणि सोळा गाठी मारलेला दोरक ठेवावा. मग महालक्ष्मीची षोडशोपचार पूजा करावी. देवीला सोळा परींची पत्री व फुले वाहावी. सोळा घारग्यांचा नैवेद्य दाखवावा पिठाचे सोळा दिवे पेटवून आरती करावी. मग दोरकाची पूजा करून तो पुढील मंत्राने डाव्या मनगटात बांधावा–

धनं धान्यं धरां हर्म्यं कीर्तिमायुर्यशः श्रियम् ।
तुरगान् दन्तिनः पुत्रान् महालक्ष्मि प्रयच्छ मे ।।

मग सोळा दूर्वा आणि सोळा अक्षता हातात घेऊन महालक्ष्मीची पुढील कथा ऐकावी. –

एका नगरात गुणवान नावाचा एक ब्राह्मण होता. त्याला सोमक नावाचा एक मुलगा झाला. सोमकाच्या लहानपणीच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बाप निवर्तला आणि त्याला उत्पन्नाचे साधन काहीच राहिले नाही. त्यामुळे तो दारिद्र्याने गांजून गेला. एके दिवशी तो तिथल्या राजाचा मृगयाविहार पाहण्यासाठी रानात गेला. दुपारच्या वेळी तो एका तळ्यावर गेला. तिथे गंधर्वकन्या महालक्ष्मीची पूजा करीत होत्या. सोमकाने त्यांना विचारले. 'तुम्ही ही कोणाची पूजा करता आणि तिचे फल काय?'

त्यावर गंधर्वकन्या म्हणाल्या. 'आम्ही महालक्ष्मीची पूजा करीत आहो. या पूजेने संपत्ती मिळते आणि सकल मनोरथ पूर्ण होतात.'

मग सोमकाने त्यांच्याकडून पूजेचे विधान समजून घेतले आणि स्वत: तिची पूजा केली. प्रार्थना केल्यावर महालक्ष्मी त्याच्यापुढे उभी राहिली. तिने त्याला 'वर माग' म्हटले; पण सोमक म्हणाला. 'तुझ्या दर्शनाने माझे सर्व मनोरथ पूर्ण झाले.' त्यावर देवी म्हणाली. 'हा माझ्या हातातला दोरक घे आणि आश्विन शुद्ध चतुर्दशी, कृष्ण अष्टमी, कार्तिक शुद्ध चतुर्दशी व कृष्ण अष्टमी या चार दिवशी या दोरकाची पूजा कर म्हणजे मी तुझ्या घरी कायमची राहीन.' सोमकाने तसे केले व अखेरच्या दिवशी तो दोरक नदीत विसर्जित केला. त्या दिवसापासून त्याला अखंड लक्ष्मी आणि कीर्ती यांचा लाभ झाला.

महालक्ष्मीचे हे व्रत ओळीने पाच वर्षे करून मग त्याचे उद्यापन करावे असे सांगितले आहे.

चित्पावन ब्राह्मणांत मुली लग्नानंतर ओळीने पाच वर्षे हे व्रत करतात. तो व्रतविधी थोडा वेगळा आहे, तो असा—

आश्विन शुद्ध अष्टमीच्या दिवशी पूर्वाह्णी महालक्ष्मीच्या धातुमय मूर्तीची पूजा करतात. त्याच्या आधी तुळशीची पूजा करून तुळशीवृंदावनातून, लग्नाला जितकी वर्षे झाली असतील, तितके खडे घेऊन येतात व ते देवीजवळ मांडतात. तसेच सोळा पेरांची दूर्वा किंवा सोळा धाग्यांचा रेशमी दोरा घेऊन त्याला वर्षसंख्येइतक्या गाठी मारतात. तो दोराही देवीपुढे ठेवून त्याची पूजा करतात. मग तो दोरा डाव्या हातात बांधतात. पूजा पूर्ण झाल्यावर ब्राह्मणाला सोळा घारग्यांचे वायन देतात व महालक्ष्मीची पुढील कथा ऐकतात—

आटपाट नगर होते. तिथल्या राजाला पाटमाधवराणी व चिमादेवराणी नावाच्या दोन राण्या होत्या. पहिली आवडती व दुसरी नावडती होती. राजाला नंदबनेश्वर नावाचा एक शत्रू होता. राजाने एके दिवशी नगरातले सर्व लोक बोलावून त्यांना सांगितले, की 'तुम्ही नंदबनेश्वराचा शोध करा आणि त्याला ठार मारा.' पण लोकांना ते काही जमले नाही. त्या गावात एक म्हातारीचा लेक होता. त्याने मात्र नंदबनेश्वराला मारण्याची जिद्द धरली. आणि लगेच तो आईकडून एक भाकरी घेऊन त्या कामगिरीवर निघाला व रात्री एका रानात राहिला.

तिथे त्याने नागकन्या महालक्ष्मीचे व्रत करीत आहेत, के दृश्य पाहिले. लेकाने त्यांना विचारले. 'या व्रताने काय होते?' त्या म्हणाल्या. 'मनी चिंतिले कार्य होते.' लेकाने त्यांच्या बरोबरच महालक्ष्मीची पूजा केली आणि राजाचा शत्रू मरेल असा आशीर्वाद मागितला. तो आशीर्वाद फळाला आला. दुसऱ्या दिवशी पहाटे राजाचा शत्रू मरून पडला. हे काम म्हातारीच्या लेकाचे असले पाहिजे, असे लोकांनी राजाला सांगितले. राजाने त्याला बोलावून आणले व सगळा खुलासा विचारला. राजा त्याच्यावर प्रसन्न झाला. त्याने लेकाला माडीचा वाडा बांधून दिला व नवलवाट असे त्याचे नाव ठेवले. नवलवाट आनंदाने तिथे राहू लागला. ही बातमी पाटमाधवराणीला समजली. तिने ते व्रत नवलवाटाकडून विचारून घेतले, मग महालक्ष्मीची पूजा केली व दोरक हातात बांधला.

एके दिवशी सारीपाट खेळत असता राजाने पाटमाधवराणीच्या हातातला तो दोरक पाहिला. राजाला ते भिकारी चिन्ह वाटले. राजाने तिच्या हातातला तो दोरक तोडून टाकला. सकाळी महाल झाडताना दासींना तो सापडला. त्यांनी तो नवलवाटाला दिला व त्याने तो चिमादेवराणीला म्हणजे नावडत्या राणीला दिला.

पुढे आश्विन मास आला. पहिली अष्टमी आली; पण पाटमाधवराणी व्रतच नव्हे, तर महालक्ष्मीचे नावसुद्धा विसरून गेली होती. चिमादेवराणीच्या घरी मात्र पूजेचा थाट मांडला होता. रात्री घागरी फुंकण्याचा आवाज ऐकून राजा चिमादेवराणीकडे गेला. ती नावडतीची आवडती झाली. सकाळी राजा तिला घेऊन आपल्या राजवाड्यात यायला निघाला. त्याने पाटमाधवराणीला निरोप धाडला, की 'तू आम्हांला सामोरी ये.' तिला ते आवडले नाही. ती फाटके-तुटके नेसून सामोरी आली. राजाला राग आला. त्याने तिला रानात नेऊन ठार मारण्याबद्दल शिपायांना फर्मावले.

शिपाई तिला मारायला धजले नाहीत; पण तिला रानात टाकून ते परत आले. मग त्या पाटमाधवराणीची खूप फरफट झाली. तिला कुठेच आसरा मिळेना. मग ती एका ऋषीकडे गेली व त्याच्या गुंफेत त्याची सेवा करून राहिली. मग ऋषी तिच्यावर प्रसन्न झाला. त्याने अंतर्ज्ञानाने जाणले, की हिच्यावर महालक्ष्मीची अवकृपा आहे. मग त्याने तिच्याकडून महालक्ष्मीची पूजा करवून घेतली.

पुढे एक दिवशी राजा त्या ऋषीच्या आश्रमात आला. राणीने त्याचे उत्तम स्वागत केले. राजा प्रसन्न झाला. तो तिला घेऊन राजधानीला यायला निघाला. नगराबाहेर रथ उभा करून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजाने विमादेवराणीला सामोरी येण्याबद्दल निरोप पाठविला. ती उत्तम वस्त्रालंकार लेवून सामोरी गेली. राजाला बरे वाटले. तो पाटमाधवराणीला म्हणाला. ' मागे तू अशी सामोरी आली असतीस, तर तुला असे हाल भोगावे लागले नसते. ' मग राजा दोन्ही राण्यांसह वाजत गाजत नगरात आला. दोन्ही राण्यांनी त्यापुढे महालक्ष्मीचा वसा कधीच टाकला नाही. त्यामुळे महालक्ष्मी सदैव त्यांच्यावर प्रसन्न राहिली.

दुपारचे हे पूजाविधान झाल्यावर त्याच दिवशी प्रदोषकाळी महालक्ष्मीची दुसरी पूजा करतात. त्यासाठी तांदुळाच्या पिठाची उकड करून तिचा महालक्ष्मीचा मुखवटा बनवतात. तो काजळ-कुंकवाने रेखतात. हे काम कडक सोवळयाने चालते. मग तो मुखवटा सुशोभित मंडपीखाली एका भांडयांच्या उतरंडीवर घट्ट बसवतात. उतरंडीवर भरजरी लुगडे नेसवतात. मग कापडाच्या पिशव्यांचे मुद्दाम तयार केलेले हात देवीला जडवतात. हा मुखवटा तयार होत असताना व्रत करणाऱ्या मुलीने तो बघायचा नसतो. मंगळागौरीप्रमाणेच या पूजेसाठीही अनेक वसोळचा बोलावतात. त्या सर्व मिळून मग देवीची पूजा करतात. आरती झाल्यावर रात्री घागरी फुंकणे हा विशेष कार्यक्रम असतो. तो पहायलाच हवा. वसोळचा मुलींबरोबर इतर सुवासिनी स्त्रियाही त्यात भाग घेतात. प्रथम या घागरी धुपाच्या धुराने घुपवतात. मग एकेकटी स्त्री एकेक घागर उचलते व तिच्यात फुंकर घालीत थोडा वेळ नाचते. या वेळी काही स्त्रियांच्या अंगात देवीचा संचार होतो. एखादी स्त्री घुमू लागली, की तिच्या अंगात संचार झाला, असे समजायचे. मग भाविक जिज्ञासू तिला वेगवेगळे बऱ्यावाईटाचे प्रश्न विचारतात. त्या बाईने घुमत घुमत दिलेली उत्तरे ही देवीने दिलेली उत्तरे असे समजतात. अशा प्रकारे तिथे जमलेल्या बायका देवीला सबंध रात्रभर जागवतात आणि सकाळी तिचे विसर्जन करतात. पुढे वर सांगितलेल्या तिथींना दोरकाची पूजा करून कहाणी ऐकतात. शेवटच्या तिथीला (कार्तिक वद्य अष्टमी) दोरक जळात विसर्जित करतात. पाच वर्षांनंतर व्रताचे उद्यापन करतात. फल – सौभाग्य, संतती आणि संपत्ती यांची प्राप्ती. [व्रतराज; पुरुषार्थ चिंतामणि]

महालिंगदास (इ. स. चे. १६ वे शतक) एक मराठी संतकवी. हा खानदेशातील चाळीसगाव तालुक्यातल्या गिरिजा उर्फ गिरणा नदीकाठच्या वाडे गावी राहत होता. हा सूर्यवंशी विप्र म्हणून ओळखला जात असे. चाणक्यनीतीत याने स्वतःसंबंधी जी माहिती दिली आहे, ती अशी–

रामकृष्ण माझें गुरुदैवत । विक्रमदेव माझा पिता ।
महालिंगदासू करी कविता । सूत बंकदेवाचा ।।
बंधू कश्यपाचा । गोत्र भारद्वाजाचा ।।
कुळ वासुकीचा । उपनाम अहिररावो ।।

याने वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी, पंचोपाख्यान, चाणक्यनीती, इ. ग्रंथांची रचना केली आहेत. याच्या बहुतेक ग्रंथांतून व्यवहारचातुर्य व राजनीती हे विषय आले आहेत. सिंहासनबत्तिशी या ग्रंथाच्या अखेरीला हा म्हणतो–

हा ग्रंथ प्रस्ताविक । राजनीती आत्यंतिक ।।
डोळस होय लोक । आइकिलीया ।।

याच ग्रंथात कवीने छत्तीस कुळींचे व साठ उपकुळींचे मिळून शहाण्णव कुळींचे राजे यांची नामावळ दिली आहे. ऐतिहासिक दृष्टया ही नामावळी महत्त्वाची आहे. याशिवाय आडनावे कशी निर्माण होतात, हे सांगताना हा म्हणतो–

जैसे स्थानीं बैसले । तेचि आडनांव पावले ।।
अथवा करणीस्तव जाले । नाना कुळांचे ।।

याचा अश्वविद्येवर शालिहोत्र नामक ग्रंथ आहे. [म. वा. इ.]

महालिंगदेव (इ. स. चे १५ वे शतक) एक कन्नड वीरशैव भक्तकवी. हा तत्त्वज्ञही होता. याने वीरशैव संप्रदायाच्या प्रसारासाठी प्रभुदेवर षट्स्थलज्ञान चारित्रवचनद टीके व षट्स्थलविवेक अशा दोन टीकाग्रंथाची रचना केली. या ग्रंथांमुळे वीरशैव संप्रदायाचे तात्त्विक अधिष्ठान भक्कम झाले, असे म्हटले जाते. [हिं. क. भ. तु. अ.]

महाली एक जात. या लोकांची वस्ती पश्चिम बंगालमधील जलपैगुडी, मिदनापूर, पश्चिम दिनाजपूर आणि बर्द्वान या जिल्ह्यांत मुख्यत्वे आहे. सांस्कृतिक दृष्टया ते संथाळांशी निगडित आहेत. ते महाली नामक बोली बोलतात. बांबूच्या टोपल्या, चटया, करंडया वगैरे विणणे हा त्यांचा मुख्य उद्योग आहे. याशिवाय, काही लोक शेती करतात व काही शेतमजूर म्हणूनही काम करतात. यांच्यापैकी काही पूर्वी पालख्या वाहण्याचे काम करीत असत.

यांच्या झोपडया चौकोनी असून, त्यांच्या भिंती बांबूच्या कामटयांच्या व छपरे गवताची असतात.

संथाळांप्रमाणेच यांच्यांत बस्के किंवा कांती, बेस्रा, हंसदा, हेमब्रोम, किस्कू, मंडी, इ. दहा पोटभेद आहेत.

विवाहप्रथा – एकाच पोटभेदात व जवळच्या नातेवाइकांत विवाहसंबंध होत नाही. सर्वसाधारणपणे मुलामुलींची लग्ने मोठेपणी होतात. देज देणे व त्याबरोबरच वधू, तिची मोठी बहीण व वधूची आई यांना लुगडी देणे, हा विवाहातील महत्त्वाचा भाग असतो. देजाची रक्कम चोवीस ते चौसष्ट रुपये असते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varaṇasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाली लोकांत वधू मिळवण्याचे सात प्रकार आहेत. त्यांपैकी सर्वांत अधिक प्रचलित प्रकार म्हणजे वडिलधाऱ्या मंडळींनी मुलगी पसंत करून केलेला विवाह होय. दुसऱ्या प्रकाराला इडिगोश किंवा दुआर लेवेट असे नाव आहे. यात मुलाचे आई-बाप मुलीला आपल्या घरी आणून ठेवतात आणि सवडीसवडीने किंवा प्रत्यक्ष विवाहसमारंभाच्या वेळी देजाची रक्कम देतात. तिसऱ्या प्रकारात मुलगी आपण होऊन मुलाच्या घरात घुसते व तिथे राहू लागते. त्या घरातील लोक तिचा छळ करतात. तो तिने शांतपणे सहन केला, तर तिचा वधू म्हणून स्वीकार केला जातो. चौथ्या प्रकारात मुलगा व मुलगी संगनमत करून एखाद्या नातेवाइकाच्या घरी पळून जातात. तिथे मुलगा तिच्या कपाळावर कुंकवाचा टिळा लावतो व तिच्या भांगात शेंदूर भरतो. यानंतर मुलीचे आईबाप ही हकीकत मुलाच्या आई-बापांच्या कानांवर घालतात आणि मग देज देऊन लग्नसंमारंभ करतात. काही वेळा मुलगा जबरदस्तीने मुलीला पळवून नेतो आणि तिच्या कपाळी कुंकुमतिलक लावून भांगात शेंदूर भरतो. त्यानंतर दोन्ही पक्षांत तडजोड होऊन त्यांचे लग्न होते.

विधवेशी किंवा घटस्फोटित स्त्रीशी लग्न करणे, हा पाचवा प्रकार. मुलामुलींनी स्वतःच लग्न ठरवणे, हा सहावा प्रकार आणि मुलाला घरजावई करणे, हा सातवा प्रकार होय.

यांपैकी पहिल्या विवाहप्रकाराचा विधी असा – प्रथम मुलाचे आईबाप मध्यस्थामार्फत मुलीला मागणी घालतात. आणि मग एके दिवशी ग्रामप्रमुखासह मुलाकडील माणसे मुलीच्या घरी जातात. तिथे वधू त्या सर्वांचे पाय धुते. मग देजाची रक्कम ठरवतात. मुलीचे आई-बाप आलेल्या लोकांना बकऱ्याचे किंवा कोंबडीचे मांस आणि तांदुळाची दारू वाटतात. त्यानंतर काही दिवसांनी मुलीकडील मंडळी मुलाच्या घरी जातात. त्या वेळी मुलाचा बाप आपल्या ग्रामप्रमुखाच्या हस्ते देजाची अर्धी रक्कम मुलीच्या गावच्या प्रमुखाकडे देतो. तो ती मुलीच्या बापाकडे देतो. लग्नाचा मुहूर्त याच दिवशी ठरवतात. लग्नाला जितके दिवस असतील, तेवढ्या गाठी गवताच्या दोन दोऱ्यांना बांधतात. एक दोरी वरपिता आपल्याकडे ठेवतो व दुसरी वधूपित्याकडे देतो.

लग्नापूर्वी तीन दिवस वधू-वरांना तेलहळद लावतात. त्या वेळी मुली गीते गातात. या तीन दिवसांत वर आपल्याजवळ अडकित्ता व वधू काजळाची डबी बाळगते. दृष्ट लागू नये, म्हणून ही तरतूद असते.

लग्नाच्या दिवशी सकाळी मांडव घालतात. मांडवाच्या पूर्वेला एक खड्डा खणून त्यात थोडी नाणी टाकतात व त्यात मोहाच्या झाडाची एक फांदी लावतात. त्यानंतर नवरामुलगा गावातील काही लोकांच्या घरी जाऊन थोडा थोडा भात जेवतो.

त्यानंतर वराचे समारंभपूर्वक स्नान होते. मग तो वधूगृही जायला निघतो. या लोकांत खरे लग्न लागण्यापूर्वी वधूचे व वराचे वृक्षाशी लग्न लावतात. ज्याचे खालचे दात आधी आले असतील त्याचे आंब्याशी व ज्याचे वरचे दात आधी आले असतील, त्याचे मोहाच्या वृक्षाशी लग्न लावण्याची पद्धत आहे.

वर लग्नमंडपात जाऊन एका चटईवर वधूच्या उजव्या हाताला बसतो. मग वरपिता उरलेली देजाची अर्धी रक्कम वधूच्या गावच्या प्रमुखामार्फत वधूपित्याला देतो. नंतर वर वधूच्या कपाळी कुंकू लावतो, भांगात शेंदूर भरतो आणि आंब्याच्या डहाळीने घटातले पाणी तिच्या अंगावर शिंपडतो. वधूही तसेच करते. त्या वेळी स्त्रिया शंख वाजवतात. नंतर नवरा मुलगा वधूच्या डाव्या हातात लोखंडी कंकण घालतो. एवढे झाल्यावर विवाहविधी संपतो.

दुसऱ्या दिवशी वरात निघते आणि ती प्रथम वराच्या गावच्या प्रमुखाच्या घरी थांबते. तिथे वरमाय वधूला आपल्या मांडीवर बसवून खीर भरवते. मग सर्वजण वरगृही येतात. तिथून वधू-वर स्नानासाठी गावातील तळ्यावर जातात. त्या वेळी त्यांचे नातेवाईक शंख वाजवीत त्यांच्यांबरोबर जातात. स्नान झाल्यावर घरी परतताना वर एका झाडावर बाण मारतो आणि त्याच्या मुळाशी जाऊन बसतो. मग वधू त्याला थोडा गूळ खायला देते आणि त्याचा हात धरून त्याला उठवते. पुन्हा तो दुसऱ्या एका झाडाला बाण मारून त्याच्या खाली जाऊन बसतो. वधू पुन्हा त्याला गूळ खायला देते आणि हात धरून उठवते. घरी पोचेपर्यंत असाच कार्यक्रम चालतो. त्यानंतर जेवणावळ होते.

दुसऱ्या दिवशी वधू-वर वधूच्या घरी जातात व तिथे दोन दिवस राहून परत येतात.

महाली लोकांत लग्नाच्याच दिवशी पितरांचे श्राद्ध करण्याची पद्धत आहे.

प्रसूतिप्रथा – गरोदर स्त्रीला काही नियम पाळावे लागतात. तिने स्मशानासारख्या ठिकाणी जाऊ नये, गळाने पकडलेले मासे खाऊ नयेत, फाटकी वस्त्रे शिवू नयेत किंवा सुईत दोरा घालू नये, भाकऱ्या भाजू नयेत, इ. काही बंधने तिच्यावर असतात.

प्रसूतीच्या वेळी हाडी जातीच्या स्त्रीला सुईण म्हणून बोलावतात. प्रसूती अवघड वाटली, तर भगतालाही बोलावतात. मूल जन्माला आल्यावर थाळी वाजवून ती बातमी लोकांना कळवतात. पहिले दोन दिवस, मूल रडले, तर त्याला फक्त गरम पाणी पाजतात आणि तिसऱ्या दिवसापासून आईचे दूध देतात. दुसऱ्या दिवशी आईला व मुलाला आंघोळ घालतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दहाव्या दिवशी मुलाचा बाप ग्रामदेवतेला तांदुळाची दारू अर्पण करतो आणि गावच्या पुरोहितालाही थोडी दारू व दहा विड्याची पाने देतो. एवढ्याने जननाशौच फिटते. मुलाचे नाव एकविसाव्या दिवशी ठेवतात. त्या दिवशी आप्तेष्टांना जेवायला बोलावतात. ते येताना आपल्या बरोबर भाजी व तांदूळ घेऊन येतात.

तीन ते सात वर्षांच्या दरम्यान मुलांचे कान टोचतात.

मुले आठव्या-नवव्या वर्षीच विडचा ओढायला लागतात.

शारीरिक दुर्बलतेमुळे, कुणीतरी चेटुक केल्यामुळे किंवा देवतांच्या आणि भुताखेतांच्या प्रकोपामुळे माणसाला आजारपण येते, अशी महाली लोकांची समजूत आहे. त्यामुळे आजारपण नष्ट होण्यासाठी ते झाडपाल्याची औषधे, भगताच्या मार्फत देवतांना प्रसन्न करणे, इ. उपाय करतात. देवी, पटकी व इतर साथीचे रोग शीतळा, चंडी आणि योगिनी किंवा सिमबोंगा यांच्यामुळे होतात, असे ते मानतात. हे लोक बडा पहाड व मनसादेवी यांना भजतात.

या जातीच्या लोकांची एक विचारसभा असते. तिच्यात ते जातीचे तंटेबखेडे सोडवतात.

मर्तिकप्रथा– माणूस आसन्नमरण झाला, की त्याच्या तोंडात तुलसीदले घालून पवित्र केलेले पाणी घालतात. माणूस मेल्यावर घरातील मांजराला त्याच्या अंगावरून जाऊ देत नाहीत. मांजर त्याच्या अंगावरून गेल्यास मृताचे भूत होते आणि तिथे असलेल्या सर्वांना ते ठार मारते, अशी समजूत आहे. तसेच एखाद्याला रात्री मृत्यू आल्यास काही लोक जागे राहून प्रेताचे संरक्षण करतात.

महाली लोक सर्वसाधारणपणे प्रेते जाळतात. हरिबोल असे तीनदा उच्चारून प्रेताची तिरडी उचलतात आणि गावातील रस्त्यावर येऊन तिरडी खाली ठेवतात. मृताच्या नातेवाईक स्त्रिया त्याच्या अंगाला तेलहळद लावतात आणि त्याच्या तोंडात काही नाणी ठेवतात. नंतर गवताचा एक पलिता पेटवून तो स्मशानात नेतात आणि मृताचा उत्तराधिकारी त्याच पलित्याने चिता पेटवतो. मृताची रक्षा झाल्यावर मृतात्म्याच्या कोपाने घरात आणखी मृत्यू ओढवू नये, म्हणून पेटत्या चितेत एक कोंबडे टाकतात. नंतर सर्वजण गावातील नदीवर स्नान करून मृताच्या घरी जातात. दहाव्या दिवशी मृताचे श्राद्ध करतात. देवीसारख्या साथीच्या रोगाने मेलेल्याला पुरतात. [सोशल प्रोफाइल्स ऑफ दि महालीज् – श्यामलकांती सेनगुप्ता]

महाबल बौद्धांचा एक देव. हा ध्यानी बुद्ध अमिताभ याच्यापासून उत्पन्न झालेला आहे. हा प्रत्यालीढ अवस्थेत असून एकमुख, चतुर्भुज व रक्तवर्ण आहे. याच्या अंगावर व्याघ्रचर्म आणि सर्प असतो. उजव्या हातात शुभ्र दंड व चामर असून, डाव्या हाताने हा ,वंदनमुद्रा दर्शवितो. याचे सुळे बाहेर दिसत असल्यामुळे हे ध्यान भयप्रद दिसते. याच्या मस्तकावर अमिताभाची मूर्ती असते. [इं. बु. इ.]

महावस्तू हीनयानी बौद्धांचा एक प्रसिद्ध ग्रंथ. महावस्तु–अवदान असे याला दुसरेही नाव आहे. लोकोत्तरवादी महासांघिकांचा हा विनयग्रंथ आहे. महावस्तू या शब्दाचा अर्थ महान विषय किंवा कथा अर्थात उपसंपदा इत्यादी बौद्ध विनयासंबंधी कथा, असा आहे. महावग्गाप्रमाणेच या ग्रंथात बुद्धाच्या जीवनाचे आणि संघस्थापनेचे वर्णन केले आहे.

ग्रंथाच्या प्रारंभी, बोधिसत्त्वाला बुद्धत्व प्राप्त करून घेण्यासाठी ज्या चार चर्या आवश्यक मानलेल्या आहेत, त्यांचे वर्णन आहे, ते असे –

(१) प्रकृतिचर्या – या चर्येचे साधक मातापिता, श्रमण, ब्राह्मण व वृद्ध यांची सेवा करतात, सत्कर्मे करतात आणि बुद्धाची पूजा करतात.

(२) प्रणिधिचर्या किंवा प्रणिधानचर्या – या अवस्थेत जीव संबोधी प्राप्त करण्याची प्रतिज्ञा करतो.

(३) अनुलोमचर्या – यात बुद्ध बनण्यासाठी आवश्यक ते गुण प्राप्त करून घेतले जातात.

(४) अविवर्तचर्या किंवा अनिवर्तनचर्या – बोधिसत्त्वाच्या आठव्या भूमीवर पोहचल्यावर ही अवस्था सुरू होते.

या चर्यांच्या पूर्तीनंतर बोधिसत्त्वाला बुद्धत्वाची प्राप्ती होते. यानंतर चतुर्विध उपसंपदांचेवर्णन आहे. या ग्रंथात दुरारोहा, बद्धमाना, पुष्पमंडिता, रुचिरा, चित्तविस्तार, रूपवती, दुर्जया, जन्मनिदेश, यौवराज व अभिषेक या बोधिसत्त्वाच्या दशभूमींचे प्रथमच सविस्तर वर्णन केलेले आहे.

हा ग्रंथ फार मोठा आहे. बुद्धाचे जीवनचरित्र सांगणे हा त्याचा मुख्य उद्देश असला तरी, जातके, सूत्रे, कथा व विनय यांनीच याचा मोठा भाग व्यापला आहे. या ग्रंथाच्या मूळ रूपाची रचना सनपूर्व २०० च्या सुमारास झाली असून, नंतर वेळोवेळी त्यात भर पडत गेली आहे. यातला काही भाग तर इ. स. च्या चौथ्या शतकातला आहे. हा ग्रंथ मिश्र संस्कृत भाषेत आहे. [बौ. ध. द; आजकल, वार्षिक अंक, डिसेंबर १९५६]

महावाक्ये आरण्यकांतील व उपनिषदांतील सारगर्भ तत्त्वज्ञान सांगणाऱ्या चार वाक्यांना महावाक्ये अशी संज्ञा आहे. 'प्रज्ञानं ब्रह्म', 'अयमात्मा ब्रह्म', 'तत्त्वमसि',

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि 'अहं ब्रह्मास्मि' ही ती चार महावाक्ये होत. या चारही वाक्यांत आत्मा व ब्रह्म यांचे ऐक्य आहे, असे सांगितलेले आहे.

(१) प्रज्ञानं ब्रह्म – हे वाक्य ऋग्वेदाच्या ऐतरेय आरण्यकात आलेले आहे. चक्षूच्या द्वारे बाहेर पडणाऱ्या व अंतःकरणवृत्तीत प्रतिबिंबित झालेल्या चिदाभासाने पुरुष रूपादिकांना पाहतो, श्रोत्रेंद्रियाच्या द्वारे बाहेर पडलेल्या अंतःकरणवृत्त्युपाधिक चिदाभासाने शब्द ऐकतो, घ्राणेंद्रियाच्या द्वारा गंध जाणतो, वागिंद्रियावच्छिन्न चैतन्याने शब्दोच्चार करतो आणि रसनेंद्रियाने मधुर व अमधुर रस जाणतो. अशा प्रकारे, सर्व इंद्रिये व अंतःकरणाच्या निरनिराळ्या वृत्ती यांच्या योगाने उपलक्षित होणारे जे चैतन्य, तेच प्रज्ञानं ब्रह्म या वाक्यातील प्रज्ञान होय. त्याचप्रमाणे देव, मनुष्य व पशू या उत्तम, मध्यम व अधम देहांना धारण करणाऱ्या जीवांमध्ये व आकाशादी भूतांमधे, जगताच्या जन्मस्थितिलयाचे कारण असे जे एक चैतन्य आहे, तेच ब्रह्म होय. म्हणजे प्रत्येक शरीरात शरीरेंद्रियसमूहापेक्षा विलक्षण असलेले जे साक्षिचैतन्य प्रज्ञान, तेच सर्व भूतभौतिक जगाचे उपादानकारणभूत असलेले चैतन्य ब्रह्म होय. ज्या अर्थी सर्व ठिकाणी स्थित असलेले प्रज्ञान हे ब्रह्म आहे, त्या अर्थी माझ्या ठिकाणचे प्रज्ञानही ब्रह्म आहे, असा त्याचा भावार्थ आहे.

(२) अहं ब्रह्मास्मि – यजुर्वेदाच्या बृहदारण्यकोपनिषदात हे वाक्य आलेले आहे. देशादिपरिच्छेदशून्य असा जो परमात्मा या मायाकल्पित जगातील ज्ञानाचे अधिकारी असलेल्यांच्या सूक्ष्म शरीराचा साक्षी या रूपाने स्थित असा अनुभवाला येतो, तोच या वाक्यातील अहं शब्दाचा लाक्षणिक अर्थ आहे. आणि देशादिपरिच्छेदरहित परमात्मा हा या वाक्यातील ब्रह्म शब्दाचा लक्ष्यार्थ आहे. अस्मि हे पद साक्षी व परमात्मा यांचे ऐक्य दाखवणारे आहे.

(३) तत्त्वमसि – सामवेदाच्या छान्दोग्य उपनिषदात हे वाक्य आलेले आहे. सृष्टीच्या पूर्वी स्वगतादिभेदशून्य नामरूपरहित अशी जी सद्वस्तू सांगितली आहे, ती सृष्टी उत्पन्न झाल्यानंतरही विचारदृष्ट्या तशीच आहे. हा तत् या पदाचा लक्ष्यार्थ होय. श्रवणादिकांचे अनुष्ठान करून महावाक्याच्या अर्थाचा निश्चय करणारा जो अधिकारी जीव, त्याच्या स्थूल, सूक्ष्म व कारण या तीन देहांचा साक्षी व त्यामुळेच त्यांहून अगदी विलक्षण असा जो सद्रूप आत्मा, तो या वाक्यातील त्वं पदाचा लक्ष्यार्थ आहे. याच वाक्यातील असि या पदाने त्या दोन्ही पदार्थांच्या लक्ष्यार्थांचे ऐक्य सांगितले आहे.

(४) अयमात्मा ब्रह्म – अथर्ववेदाच्या माण्डूक्योपनिषदात हे वाक्य आलेले आहे. त्यातील अयम् या पदाने आत्म्याचे स्वप्रकाशकत्व व अपरोक्षत्व व्यक्त केलेले आहे. तो स्वप्रकाश असल्यामुळे अपरोक्ष (प्रत्यक्ष) आहे. अहंकारापासून देहापर्यंत आत्मा या शब्दाला पात्र होणारे जे पदार्थ आहेत, त्या सर्वांचे अधिष्ठान व साक्षी या रूपाने त्यांच्या आत व त्याहून विलक्षण असलेले जे चैतन्य, तोच हा महावाक्यातील आत्मा होय. या सर्व आकाशादी मिथ्याभूत जगाचे जे अधिष्ठान, तेच ब्रह्म आहे. सर्व जगाचा बाध झाल्यावर अवशिष्ट राहणाऱ्या पारमार्थिक सच्चिदानंदलक्षण स्वरूपालाच ब्रह्म असे इथे म्हटले आहे. एवंगुणविशिष्ट जे ब्रह्म तेच स्वप्रकाश आत्मरूप होय.

अशा प्रकारे, या चारही वाक्यांचे तात्पर्य ब्रह्मात्म्यैक्यामध्ये आहे. संन्यासग्रहणाच्या वेळी यांपैकी एका महावाक्याचा उपदेश करतात. [हि. ध.; सार्थ पंचदशी; महावाक्यविवरणम्]

महावाक्योपनिषद

एक नव्य उपनिषद. याच्या शांतिपाठात हे उपनिषद अथर्ववेदाचे आहे, असे सांगितले आहे. ब्रह्मदेवाने यात अपरोक्षानुभव कथन केला असून, परमात्म्याच्या साक्षात्कारासाठी हंसविद्येचा अभ्यास आवश्यक असल्याचे सांगितले आहे. हंसः सोऽहम् या वाक्याचा जप केल्याने हंसविद्या प्राप्त होते. हजारो सूर्यांच्या तेजाहून अधिक तेजाचा पूर यावा, तसा परमात्मा तेजस्वी दिसतो. इथे समाधी नसते, योगसिद्धी नसते किंवा मनोलयही नसतो; तर हे ब्रह्मैक्य असते. अथर्वशिरात असणारा नेहमीचा अथर्वाचा उपनिषदाच्या शेवटी असून, त्या हंसविद्येमुळे श्रीमहाविष्णूचे सायुज्य मिळते, असे तिथे सांगितले आहे. [डॉ. सी. ग. देसाई]

महावारुणी

एक पुण्ययोग. चैत्र वद्य त्रयोदशी शततारका नक्षत्राने युक्त व शनिवारी असेल, तर त्या योगाला महावारुणी योग म्हणतात. या योगावर गंगास्नान केले तर शत सूर्यग्रहणांच्या स्नानाचे पुण्य लाभते, अशी श्रद्धा आहे. शुभयोग, शनिवार व शततारका नक्षत्र यांनी चैत्र वद्य त्रयोदशी युक्त असेल, तर तो महामहावारुणीयोग होतो. या योगावर केलेले गंगास्नान तीन कोटी कुलांचा उद्धार करते, असे म्हटले आहे. या योगाला बंगाल प्रदेशात खूप महत्त्व आहे.

महाविद्या

दश महाविद्यांमधील एक शाक्त देवता. त्या देवतेचे ध्यानश्लोक असे–

चतुर्भुजां महादेवीं नागयज्ञोपवीतिनीम् ।
महाभीमां करालास्यां सिद्धविद्याधरैर्युताम् ।।
मुण्डमालावलीकीर्णां मुक्तकेशीं स्मिताननाम् ।
एवं ध्यायेन्महादेवीं सर्वकामार्थसिद्धये ।।

अर्थ– महाविद्यादेवी चतुर्भुज, सर्पाचे जानवे धारण करणारी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाभयंकर, करालमुख, सिद्ध-विद्याधरसेवित, मुंडमालाधारिणी, मुक्तकेशा व मुहास्यवदना आहे. सर्व कामनांच्या सिद्धीसाठी अशा प्रकारे देवीचे ध्यान करावे.

"हुं श्रीं ह्रीं वज्रवैरोचनीये हुं हुं फट् स्वाहा ऐं" हा हिचा मंत्र आहे. भुवनेश्वरीची पूजा ज्या यंत्रावर करतात, त्याच यंत्रावर महाविद्येची पूजा करतात. हे यंत्र असे–

प्रथम अष्टदल पद्म काढतात. त्या कमळाच्या कर्णिकेत षट्कोन काढतात. पद्मदलांबाहेर वर्तुळ व त्याच्या बाहेर षोडशदलपद्म व बाहेर चौकोनी व चतुर्द्वार असे भूपुर काढतात.

महाविद्यादेवीचे स्तोत्र, कवच, इ. वाङ्मय धन्वंतरीतंत्रशिक्षा या ग्रंथात दिलेले आहे. तीन आठवडे तिच्या स्तोत्राचा पाठ केल्याने मंत्रसिद्धी होते, असे म्हटले आहे. [ध. तं. शि.]

महावीर (१) (सनपूर्व ५९९ – ५२७) जैनांचा २४ वा तीर्थंकर. याचा जन्म कुंडग्रामी झाला. हे ठिकाण वैशाली (वसाढ) च्या जवळ असून, पाटण्यापासून २७ मैल दूर आहे. याच्या पित्याचे नाव सिद्धार्थ असून, मातेचे त्रिशला असे होते. सिद्धार्थ हा राजा होता व त्रिशला ही लिच्छवी राजवंशातल्या चेटक राजाची कन्या होती. त्या काळी वैशालीचे गणराज्य हे मोठे शक्तिशाली होते. मगध, कोसल, वत्स व अवंती या विशाल गणराज्यांच्या बरोबरीने त्याचा उल्लेख होत होता. महावीर अशा एका बलशाली गणराज्यात जन्म पावला होता. म्हणूनच त्याला जैनग्रंथांत वैशालिक म्हटले आहे.

आई-बापांनी त्याचे नाव वर्धमान ठेवले; पण त्याची प्रसिद्धी महावीर या नावानेच झाली. याचे मुख्य कारण त्याच्या ठिकाणी वीरवृत्ती होती, हे होय. इंद्र त्याच्या दर्शनासाठी आला होता व दर्शन होताच त्याने त्याला वीर म्हटले. चारणमुनींनी त्याला सन्मती या नावाने संबोधले. त्याला महावीर असे नाव ठेवले ते संगमदेवाने. हा संगमदेव वर्धमानाच्या पुढे सर्परूपाने प्रकट झाला. वर्धमान ज्या वटवृक्षावर चढून बसला होता, त्या वृक्षाला त्याने वेढले. पण वर्धमानाच्या मनात त्याला मारण्याची लवमात्रही इच्छा झाली नाही. त्याने तत्काळ त्या सर्पामधले हिंसकत्व नष्ट केले. तेव्हापासून वर्धमान हा महावीर म्हणून बोलला जाऊ लागला.

महावीराला ज्ञातृपुत्र असेही एक नाव आहे. या नावाची व्युत्पत्ती आणि त्याचा सांप्रतच्या एका जातीशी कसा संबंध पोचतो, याविषयी श्री. राहुल सांकृत्यायनें यांनी लिहिले आहे, ते असे–

'पालिभाषेत ज्ञातृ शब्दाचे नात असे रूप बनले आहे. ज्ञातृका (नातिका) नावाचे एक महाग्राम वैशाली गणराज्यात होते. या वैशालीत (वसाढ) व त्याच्या आसपास आजही एक प्रभावशाली जात वास्तव्य करते. त्या जातीचे लोक स्वतःला जथरिया, असे म्हणतात. ही भूमिहार ब्राह्मणांची एक शाखा आहे. ज्ञातृ, ज्ञातर, जातर, जतरिया, जथरिया, असा हा शब्द बनला आहे. सांप्रत कित्येक जथरिया तरुण महावीराला आपला पूर्वज मानू लागले आहेत. मात्र काही सनातनी जथरिया हे मानायला तयार नाहीत. कारण जथरिया हे ब्राह्मण आहेत व प्राचीन ज्ञातृ लोक हे क्षत्रिय होते. पण एक गोष्ट त्यांच्या ध्यानात येत नाही, की कोण्या एका प्राचीन काळी ब्राह्मण-क्षत्रिय असा भेद नव्हता. एकाच पित्याच्या दोन पुत्रांपैकी एखादा पुत्र आपल्या इच्छेनुसार राष्ट्ररक्षणासाठी हाती खड्ग घेऊन क्षत्रिय होत असे, तर दुसरा एखादा वेदमंत्रांचे अनुष्ठान करणारा ब्राह्मण होत असे. सनपूर्व १५ व्या शतकात कुरु-पांचालांच्या भूमीत ब्राह्मण, क्षत्रिय अशा जातींचे बीजारोपण झाले. या दोन्ही जनपदांनी पहिल्या प्रथम राजतंत्राचा स्वीकार केला. प्रजातंत्री राज्यातही हा भेद स्वीकारला गेला; पण तो फार उशीरा. ज्ञातृगण हे प्रजातंत्री आर्य होते. आयुधजीवी बनल्यामुळे त्यांना लोक क्षत्रिय म्हणू लागले होते. पण वस्तुतः ज्या आर्यांत ब्रह्म-क्षत्र असा भेद झाला नव्हता, अशा आर्यांचे ते प्रतिनिधी होते.

म्हणून नव्या पिढीतल्या जथरियांना आपण वर्णदृष्ट्या एक पायरी खाली आलो, असे वाटत नाही. त्यांनी महावीराला आपला पूर्वज मानून, गेली कित्येक शतके चैत्र शुद्ध १३ ला वैशाली येथे महावीरजयंतीचा मेळावा भरविणे सुरू केले आहे आणि हजारो स्त्री-पुरुष त्यात भाग घेऊन महावीराला आपली श्रद्धांजली वाहू लागले आहेत.

महावीराच्या जन्माविषयी काही प्राचीन गाथा आढळतात, त्यांचा सारांश असा –

देव ज्याची पूजा करीत होते, ज्याने अच्युतकल्प नामक स्वर्गात दिव्य भोग भोगले, अशा महावीर जिनेंद्राचा जीव बहात्तर वर्षांना काही कमी इतके आयुष्य घालवून पुष्पोत्तर नामक भूमीवर च्युत झाला आणि आषाढ शुक्ल षष्ठीच्या दिवशी कुंडपूर नगराचा स्वामी सिद्धार्थ क्षत्रिय याच्या घरी नात वंशात, शेकडो देवींनी सेवित अशा त्रिशला देवीच्या गर्भात आला. तिथे नऊ महिने आठ दिवस राहून चैत्र शुक्ल त्रयोदशीच्या रात्री, उत्तरा फाल्गुनी नक्षत्रात त्याने जन्म घेतला.

महावीर जन्मापासूनच विशेष ज्ञानी होता. एकदा एक मुनी त्याच्या दर्शनाला आला आणि त्याच्या दर्शनमात्रे त्या मुनीच्या चित्तातल्या शास्त्रविषयक शंका एकाएकी दूर झाल्या. वयाच्या तिसाव्या वर्षी महावीराने तपस्येसाठी गृहत्याग केला. तो निघा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लेला पाहताच त्रिशलेला अपार दुःख झाले. तिने त्याला गृहत्याग न करण्याबद्दल विनविले. पण तो म्हणाला –

आई, मी केवळ तुझ्यापासूनच दूर होतो आहे; जीवनापासून नाही. या जगात आईच्या पदराखालून किती मुलांना जबरदस्तीने यज्ञ किंवा युद्ध यांच्या बलिवेदीवर बलिदान करण्यासाठी नेले जात असेल, हे कोणी सांगावे ? या देशातल्या कितीतरी तरुण-तरुणी वासनांची शिकार बनून आपले जीवन धुळीत मिसळून देत असतात. लोक मांस खाण्यासाठी दुसऱ्यांना ठार करतात; पण मांस खाऊन ते स्वतःच आपली हत्या करतात. मांसातून मद्य, मद्यातून मदिराक्षी आणि तिच्यासह विषयोपभोगासाठी धनसंग्रह, अशा प्रकारे बलवती तृष्णा त्यांना सतावते आणि ते दुसऱ्यांना सतावतात. अशा सर्व लोकांना तृष्णेतून आणि संसारातून मी मुक्त करू इच्छितो. पण माझ्या हातून ही गोष्ट घडायची, तर मला माझ्या अंतरातील शत्रूंना आधी हाकलून लावले पाहिजे. त्यासाठीच मी गृहत्याग करून तपस्येचा मार्ग स्वीकारीत आहे.

लोककल्याणाच्या या भावनेने प्रेरित होऊन महावीराने जगातल्या सर्व सुखांचा परित्याग केला आणि ऋजुकूला नदीच्या तीरी जृंभक ग्रामी बारा वर्षे कठोर तपःसाधना केली. त्या तपसाधनेच्या द्वारे त्याने आपल्या अंतःशत्रूंपासून मुक्ती आणि केवल ज्ञान या दोन्ही गोष्टी प्राप्त करून घेतल्या.

ध्यानस्थ महावीर

त्यानंतर महावीराने सहासष्ट दिवसांपर्यंत मौनपूर्वक विहार केला. या विहारात तो मगध देशातल्या राजगृहाजवळच्या विपुलाचल पर्वतावर राहिला.

तिथेच आषाढ शुक्ल पौर्णिमेच्या दिवशी इंद्रभूती नामक विद्वान ब्राह्मणाच्या अंतःकरणातल्या शंका त्याने दूर केल्या. मग तो इंद्रभूती जिनदीक्षा घेऊन महावीराचा पहिला गणधर बनला. त्यानंतर त्याने भव्य जीवांना उपदेश केला. पुढे काशी, कोसल, पंचाल, कलिंग, कुरुजांगल, कंबोज, बाल्हीक, सिंधू, गांधार, इ. देशांत फिरून त्याने जनांना धर्माचा उपदेश केला.

गृहस्थांना तो आठ मूल गुण पाळण्याचा उपदेश करी. आठ मूल गुण असे –

(१) मांस खाऊ नका. (२) दारू पिऊ नका. (३) म खाऊ नका; कारण मध मिळवतांना असंख्य मधुमक्षिकांची अं नष्ट केली जातात. (४) कोणत्याही प्राण्याला पीडा देऊ नक (५) असत्य बोलू नका. (६) चोरी करू नका. (७) आपल् पत्नीशिवाय जगातल्या सर्व स्त्रियांना आई, बहीण किंवा मुल माना. (८) कुटुंबपोषणासाठी आवश्यक तेवढाच धनधान्य संग्रह करा. याहून अधिकाची इच्छा करू नका.

राजन्य वर्गाला त्याने उपदेश केला, तो असा –

यः शस्त्रवृत्तिः समरे रिपुः स्याद् यः कण्टको वा निजमण्डलस्
अस्त्राणि तत्रैव नृपाः क्षिपन्ति न दीनकानीनशुभाशयेषु॥

अर्थ – जो शस्त्रधारण करून रणांगणात युद्ध करण्यास आला असेल अथवा जो आपल्या देशाला बाधक ठरत अ अशावरच राजांनी शस्त्र उचलावे. दीन, दुःखी व सदाचा पुरुषांवर त्याने शस्त्र चालवू नये.

धनसंग्रहाविषयी तो एक मूलभूत गोष्ट सांगतो, ती अ

शुद्धैर्धनैर्विवर्द्धन्ते सतामपि न सम्पदः।
न हि स्वच्छाम्बुभिः पूर्णाः कदाचिदपि सिन्धवः।

अर्थ – सज्जनांचीही संपत्ती शुद्ध न्यायोपार्जित कधीही वाढत नाही (संपत्तीचा अमाप संचय शुद्ध, न्याय धर्म्य मार्गाने कधीही होऊ शकत नाही.) पावसाळ्यात न जेव्हा दुथडी भरून वाहू लागतात, तेव्हा तो पूर स्वच्छ येत नसून, गढूळ पाण्यानेच येत असतो.

महावीराच्या सर्व उपदेशात अहिंसेला अत्युच्च स्थान काया, वाचा आणि मन या तिहींच्या द्वारे ही अहिंसा केली पाहिजे, अशी महावीराची धारणा होती. अहिं त्याने श्रेष्ठ धर्म मानला आहे. तो म्हणतो –

धम्मो मंगल मुक्किठ्ठं, अहिंसा संजमो तवो।
देवा वि तं नमंसंति, जस्स धम्मे सया मणो॥

अर्थ – धर्म हेच उत्कृष्ट मंगल आहे. अहिंसा, संयम तप हा धर्म आहे. ज्याचे मन अशा धर्मामध्ये नित्य र त्याला देवही नमस्कार करतात.

अहिंसेच्या खालोखाल त्याने आत्मविजयाला प्राधान्य आहे. तो म्हणतो –

जो सहस्सं सहस्साणं संगामे दुज्जए जिणे।
एगं जिणेज्ज अप्पाणं एससे परमो जओ॥

अर्थ – लाखो लोकांशी संग्राम करून त्यांच्यावर मिळविणे, हा खरा विजय नव्हे; तर आत्म्याशी यु

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याच्यावर विजय मिळविणे हाच परम विजय होय.

बाह्य शत्रूंवर विजय मिळविणे हे जितके सोपे आहे, तितका आत्मविजय सोपा नाही. तो अत्यंत कठीण आहे; पण त्याचे फलही तेवढेच मोठे आहे. आत्मविजय झाला, की त्याबरोबर विश्वविजय सहज होऊन जातो. बाह्य शत्रूंवर विजय मिळविल्याने शत्रुत्व उत्तरोत्तर वाढत जाते. वैर आणि प्रतिवैर यांची परंपरा अखंड चालू रहाते. आत्मविजयाने मात्र शत्रूचे मित्र बनतात किंबहुना शत्रुत्वच संपून जाते. म्हणून महावीर म्हणतो—

अप्पाणमेव जुज्झाहि किं ते जुज्झेण बज्झओ ।
अप्पण्णामेवमप्पाणं जइत्ता सुहमेहए ।।

अर्थ – अरे, तू बाह्य शत्रूशी का लढत राहिला आहेस ? लढायचेच असले, तर आपल्या आत्म्याशीच लढ. आत्मविजय केल्यानेच तुला खरे सुख प्राप्त होईल.

महावीराचे चरित्र, चारित्र्य आणि कार्य यांचे श्री. शां. भा. देव यांनी उत्कृष्ट विवेचन केले आहे. त्याचा सारांश असा –

तत्कालीन समाजजीवनातील सर्व दुष्ट गोष्टी आणि दुष्प्रवृत्ती यांच्या विरुद्ध बंड उभारून महावीराने श्रमणसंस्थेची प्रतिष्ठापना केली. संन्यस्त वृत्ती, कुशाग्र बुद्धी, पराकोटीचा त्याग आणि जी तत्त्वे स्वतःला पटली, ती निर्भयपणे लोकांपुढे मांडण्याचे धैर्य, अशा अनेक गुणविशेषांच्या जोरावर महावीराने आपल्या धार्मिक कार्याची बैठक पक्की केली. राजापासून रंकापर्यंत आणि ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत सर्व वर्गांतले आणि थरांतले शिष्य त्याने आपल्या भोवती गोळा केले. प्रचलित जातिव्यवस्थेवर त्याने कडाडून हल्ला केला. कुठल्याही व्यक्तीला जे मोठेपण येते, ते विशिष्ट कुलात जन्म घेतल्याने येत नसून, ते त्याच्या उत्तम चारित्र्यानेच येते, हे महावीराने निर्भयपणे प्रतिपादिले.

महावीर हा ब्राह्मणधर्माच्या अथवा ब्राह्मणधर्मातील सर्व गोष्टींच्या विरुद्ध नव्हता, असेही दिसून येते. आदर्श ब्राह्मणांची निंदा न करता त्याने त्यांना आपल्या धर्मात समाविष्ट करून घेतले. महावीराचे गणधर मुख्यतः ब्राह्मणच होते. महावीर स्वतःला 'एक ब्राह्मण' अशी पदवी लावून घेत असे. महावीराचा हल्ला मुख्यत्वे अधःपतित पुरोहित आणि त्यांचे जटिल क्रियाकांड, यांच्यावर होता. आपली आध्यात्मिक समानता उद्घोषित करताना त्याने तिला वर्ण अथवा वर्ग यांचा अडथळा येऊ दिला नाही. त्याचप्रमाणे स्त्री आणि पुरुष असाही भेद त्याने केला नाही. त्याने स्त्रियांनाही संन्यासग्रहणाचा अधिकार बहाल केला.

या सर्व गोष्टी करीत असताना महावीराने पार्श्वनाथाची परंपरा कुठेही खंडित होऊ दिली नाही. यात त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे औदार्य आणि धर्मसंघटकाचे चातुर्य दिसून येते. पार्श्वनाथाचा चातुर्यामधर्म आणि महावीराने वाढविलेला पंचयामधर्म यांत भिन्नता नव्हती. आपल्या आधीच्या तीर्थंकरांनी उपदेशिलेल्या श्रमणधर्माची नैतिक बैठक पक्की करण्यासाठीच महावीराने चातुर्यामधर्मात ब्रह्मचर्य हा पाचवा याम समाविष्ट केला. यावरून जुन्या-नव्याचा समन्वय करताना, त्यात सुधारणा करताना आणि त्यांची संघटना करताना महावीराची दृष्टी किती प्रगल्भ होती, हे दिसून येते.

महावीराने लोकांना जो उपदेश केला, त्याला स्वानुभवाचे बळ होते. लोकांनी कितीही त्रास दिला तरीही मनःशांती ढळू न देता तपस्येच्या द्वारे इंद्रियनिग्रह कसा करायचा, ते त्याने स्वतःच्या आचरणाने लोकांना शिकवले. आपली तत्त्वे लोकांच्या अंतरात ठसवण्यासाठी लागणारी अभिजात नम्रताही त्याच्या जवळ होती. उत्तम गुरू म्हणूनही त्याने नावलौकिक मिळवला. शिष्यांना शंका विचारण्यास, संवाद करण्यास आणि अभ्यास करण्यास त्याने उत्तेजन दिले. सबंध भगवतीसूत्र हा ग्रंथ गुरु-शिष्यसंवादरूपाने ज्ञान कसे द्यायचे, याचा उत्कृष्ट नमुना आहे. त्याने आपली तत्त्वे लोकांच्या भाषेमध्ये म्हणजेच अर्धमागधीत सुलभ रीतीने विशद करून सांगितली. त्यामुळे त्याचा उपदेश शिष्यांना आणि लोकांना त्यांच्या स्वतःच्या भाषेत सुलभपणे ग्रहण करता आला आणि त्याबरोबरच त्या भाषेच्या विकासालाही प्रोत्साहन मिळाले.

मानवी मन संकुचितपणाच्या भावना सोडून सर्वसंग्राहक पातळीवर कसे येऊन पोचते, याचे प्रत्यंतर महावीराच्या स्याद्वाद किंवा अनेकान्तवाद या सिद्धान्तावरून कळून येते. स्याद्वादाच्या विचारसरणीत कुठल्याही गोष्टींचा सर्व बाजूंनी विचार करण्याचा संकेत अभिप्रेत आहे. तत्त्वांधता आणि संशयात्मता या दोन्हींपासून बचाव करून सर्वांगीण ज्ञान मिळवण्याचा स्याद्वाद हा एक अप्रतिम मार्ग आहे. त्यात प्रतिपक्षाबद्दल समंजसपणा दाखवण्याचे मानसिक धैर्यही अभिप्रेत आहे. स्याद्वादाने येणारे सम्यग्ज्ञान व अहिंसेने येणारे सम्यग्दर्शन या दोघांचा परिपाक सम्यक् चारित्र्यात झाला पाहिजे. म्हणूनच ज्याच्या योगे चारित्र्य निष्कलंक राहण्यास मदत होईल, अशा तऱ्हेचे धर्मनियम त्याने श्रमणांना घालून दिले; त्याचबरोबर क्रियावादाचीही शिकवणूक दिली. बऱ्यावाईट कर्मांच्या फलाची जबाबदारी कोणालाही टाळता येत नाही. म्हणून क्रियाक्षय करून जो निच्या फलाच्या परिणामातून मुक्त झाला, तोच खरा मुक्त होय. अशा प्रकारचा मोक्ष ही एखादी परमेश्वराची देणगी नसते; तर सम्यग्ज्ञान, सम्यग्दर्शन आणि सम्यक् चारित्र्य य त्रयीचा अवलंब करून प्रत्येक जीवाने तो स्वतः साध्य करून घ्यायचा असतो, असे त्याने सांगितले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केवल ज्ञानाच्या प्राप्तीनंतर बेचाळीस वर्षांच्या उर्वरित आयुष्यात महावीराने श्रमणधर्माच्या संघटनेचे आणि प्रसाराचे महान कार्य केले. जैन धर्माच्या आजपर्यंतच्या अस्तित्वाला महावीराचे हे महान कार्यच कारणीभूत ठरले आहे, असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये.

महावीर वयाच्या बहात्तराव्या वर्षी आश्विन अमावास्या या तिथीस मोक्षाला गेला.

अशा या महावीराची कसायपाहुड या ग्रंथात जयगाथा गायिली आहे, ती अशी –

सो जयइ जस्स केवलणाणुज्जलदप्पणम्मि लोयालोयं ।
पुढ पदिबिंबं दीसइ वियसिय सयवत्तगब्भगउरो वीरो ।।

भावार्थ – ज्याच्या केवलज्ञानरूपी उज्ज्वल दर्पणात लोक आणि अलोक प्रतिबिंबासारखे विशद रूपाने दिसतात आणि जो विकसित कमलाच्या परागाप्रमाणे सुवर्णकांतीने झळकतो, अशा भगवान महावीराचा जयजयकार असो !

पाहा – अनेकान्तवाद, चातुर्यामधर्म, जैनधर्म. [म. स्मृ. ग्रं.; जै. ध.; जै. सं. सं.; महावीर अँण्ड हिज फिलॉसफी ऑफ् लाईफ – डॉ. ए. एन्. उपाध्ये, १९५६]

(२) (इ. स. चे ९ वे शतक) एक गणिती. याचा सारसंग्रह नावाचा एक ग्रंथ व्यक्तगणितावर आहे. या ग्रंथात अंकगणित आणि क्षेत्रगणित हे विषय आहेत. हा ग्रंथ भास्कराचार्यांच्या लीलावतीसारखा, पण त्यापेक्षा थोडा विस्तृत आहे. याची श्लोकसंख्या सुमारे दोन हजार असावी. यात श्रीधराचार्य नामक ग्रंथकाराच्या ग्रंथातील मिश्रक व्यवहारातील काही वाक्ये आली आहेत. हा जैन होता आणि राष्ट्रकूट वंशातील राजा अमोघवर्ष याचा त्याला आश्रय होता. [भा. ज्यो. इ.]

महावीरजयंती

जैन धर्माचा प्रणेता महावीर याचा जन्म चैत्र शुद्ध त्रयोदशीला झाला. त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ जैन लोक त्या दिवशी मोठा समारंभ करतात, त्याला महावीरजयंती असे म्हणतात. या दिवशी महावीराची मंदिरे सजवतात, त्याची मोठी मिरवणक काढतात. मिरवणुकीच्या अग्रभागी एक घोडा असतो. घोड्यावर एक मुलगा असतो. या मुलाच्या हाती एक लहानसा लाकडी पाळणा आणि त्यावर जरीचे कापड असते. महावीरजयंतीचा समारंभ भारतात सर्वत्र साजरा केला जातो.

काही जैन लोक पर्युषण उत्सवातच, भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला हा उत्सव करतात. [जै. ध.; एन्सा. रि. ए.; जै. क.]

महावेध

हठयोगातली एक प्रक्रिया. हिचे वर्णन असे –

महाबन्धस्थितो योगी कृत्वा पूरकमेकधी. ।
वायूनां गतिमावृत्य निभृत्वं कण्ठमुद्रया ।।
समहस्तयुगो भूमौ स्फिचौ सन्ताडयेच्छनैः ।
पुरद्वयमतिक्रम्य वायुः स्फुरति मध्यमः ।।
महावेधोऽयमभ्यासान्महासिद्धिप्रदायकः ।
वलीपलितवेपद्म्यः सेव्यते साधकोत्तमैः ।।
एतत्त्रयं महागुह्यं जरामृत्युविनाशनम् ।
वह्निवृद्धिकरं चैव ह्यणिमादिगुणप्रदम् ।।

अर्थ – योग्याने महाबंध योग व पूरक करून जालंधरबं[ध] करावा. नंतर दोन्ही तळहात जमिनीवर टेकून दोन्ही कुल्ले दोन्ही हातांवर भार देऊन वर उचलावे आणि जमिनीवर हळूहळू आपटावे. म्हणजे देहस्थ वायू, इडा व पिंगला यांचा त्याग करून सुषुम्नेमध्ये प्रवेश करतो. या बंधाचा अभ्यास महासिद्धी देणारा आहे. याने अंगावरील वळकटया व केसांचा पांढरेपणा नाहीसा होतो. उत्तम साधकाने महामुद्रा, महाबंध व महावेध हे त्रिक गुप्त ठेवावे. हे त्रिक वार्धक्य व मृत्यू यांना दूर ठेवणारे, जठराग्नीची वृद्धी करणारे आणि अणिमादी अष्टसिद्धी देणारे आहे. [यो. सो. पू.]

महाव्रत

(१) एक ब्रह्मचारिव्रत. हे व्रत महानाम्नी व्रताप्रमाणेच ब्रह्मचाऱ्याने एक वर्षभर आचरायचे असते. [ते] पूर्ण झाल्यावर आचार्याने शिष्याला पूर्वाभिमुख बसवून 'अ[थ] महाव्रतम्' इ. आरण्यक तीन वेळा सांगावे. ब्रह्मचाऱ्याने [ही] तीन वेळा म्हणून सूर्यदर्शन व भूमिस्पर्शन करावे. बाकी [सर्व] कृत्य महानाम्नीव्रताप्रमाणेच करावे. महानाम्नीच्या स्थानी म[हा]व्रत असा उल्लेख करावा. पाहा – महानाम्नी. [ऋ. ब्र. ह.]

(२) सोमयागातील एक विशेष विधी. हा विधी स[र्व] सोमयागात करतात असे नाही. सत्रातून येणाऱ्या अग्निष्टोमा[त] सोमयागाच्या अंगाने प्रायः हा विधी येतो. ऐतरेय आरण्य[कात] एक दिवससाध्य असा महाव्रत क्रतू स्वतंत्र पद्धतीने कर[ण्याचे] विधान आढळते. या व्रतात अनेक मनोरंजक कार्यक्रम असतात. आग्नीध्रीय मंडपासमोर आणि सद व हविर्धान या मंडपां[च्या] मध्ये ब्राह्मण व शूद्र यांच्यांत चढाओढीचा एक प्रसंग अ[सतो]. ही दोन्ही माणसे आपल्या सर्व शक्तीनिशी एक कातडे आपा[पल्या] बाजूला ओढतात. होता आपले मंत्र झोपाळ्यावर बसून म्ह[णतो]. सुवर्णासनावर बसून अध्वर्यू आणि स्वर्णखचित बैठकीवर [बसून] उद्गाता आपापले मंत्र म्हणतात. उद्गाता इ. सामगायक [साम] गातात, त्या वेळी यजमानस्त्रिया शंभर तारा असलेले एक [वीणा] वाद्य, तसेच कर्करी इ. वाद्ये वाजवून सामगांची साथ करतात. कित्येक दासी आपल्या डोक्यावर पाण्याने भरलेले घडे घे[ऊन] ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मार्जालीय मंडपाच्या उत्तर बाजूला विशिष्ट पद्धतीचा नाच करतात. जमिनीत खड्डा करून मढविलेले कातडे बैलाच्या शेपटीने वाजवून सामगायनाचा ताल धरला जातो. या नगाऱ्याला भूमिदुंदुभी असे म्हणतात. एक ब्राह्मण व एक शूद्र यांची वनावट कुस्ती होते. ही कुस्ती ब्राह्मण जिकतो. त्याला बक्षीस म्हणून पांढऱ्या कातडयाचा एक गोल तुकडा मिळतो. त्याचप्रमाणे ब्राह्मण व शूद्र यांच्यामध्ये एक विनोदी संवाद होतो. संवादात सत्रकर्त्याची एकजण स्तुती करतो आणि एकजण निंदा करतो. नंतर एक धनुष्यधारी क्षत्रिय तिथे टांगलेल्या कातडयावर बाण मारतो. पाहा – गवामयन. [प. का. भा.; इं. वे. क. सू.; म. ज्ञा. को. –वेदविद्या]

(३) एक काम्य व्रत. कार्तिक अमावास्येला किंवा पौर्णिमेला या व्रताला प्रारंभ करतात. यात तूप घातलेला पायस नक्तभोजन म्हणून सेवन करतात. प्रतिपदेच्या दिवशी उपवास करून आठ किंवा सोळा ब्राह्मणांना भोजन घालतात.

शिव ही या व्रताची देवता आहे. शिवाला प्रथम पंचगव्याने व नंतर उष्णोदकाने स्नान घालतात. मग पूजा व नैवेद्य करून आचार्याला आणि दंपतींना सोने, वस्त्रे, इ. वस्तू दान देतात.

हे व्रत सोळा वर्षे करायचे असते. प्रत्येक वर्षी तिथी मात्र वेगवेगळ्या असतात. नक्तपद्धती आणि उपवासही भिन्न प्रकारचे असतात. फल – दीर्घायुष्य, सौभाग्य, सौंदर्य व गोलोक यांची प्राप्ती. [हि. ध.; पु. इं.]

महाशांती

राजाच्या कल्याणासाठी त्याच्या विजययात्रेच्या प्रसंगी, तसेच दुःस्वप्न, दुर्निमित्त आणि दिव्यभौम उत्पात घडले असता ही शांती करावी, असे सांगितले आहे. तिच्यासाठी मंडप करावा. त्याच्यामध्ये चौरस वेदिका करावी. वेदिकेवर चार उपदिशांना चार व मध्ये एक असे पाच जलकलश स्थापावे. पंचगव्याने वेदीचे प्रोक्षण करावे. कलशात पंचरत्ने, दूर्वा, शमी, कुश, भात, यव, इ. द्रव्ये घालून वर पल्लव ठेवावे. वेदीच्या आग्नेयीस अग्निकुंड करावे. मधल्या कलशाला अनुलक्षून रुद्राध्याय जपावा. मग कलशाची पूजा करावी.

कुंडात अग्निस्थापना करून आज्यसंस्कारापर्यंत कर्म करावे. पुरुषसूक्ताने पायस शिजवावा. 'जातवेदसे' या मंत्राने त्या पायसाच्या अग्नीला सात आहुती द्याव्या. 'तरत्समन्दी' या सूक्ताने चार, व 'यमाय सोमम्' या मंत्राने सात आहुती द्याव्या. मग २७ नक्षत्रांना आहुती द्याव्या. स्विष्टकृतादी होम करावा. मग तिळ आणि आज्य यांचा घरात होम करावा. यजमानाला कलशातल्या जलाने अभिषेक करावा. वलिदान करावे. यजमानाने स्नान केल्यावर ब्राह्मणांनी शांतिमंत्र म्हणावे. यजमानाने पुण्याहवाचन करावे. नंतर ब्राह्मणांना भोजन घालून दक्षिणा द्यावी. या शांतीमुळे सकल अरिष्टे शमतात, मनोरथ सिद्ध होतात, शत्रूवर विजय मिळतो व दीर्घायुष्य लाभते. [शां. क.]

महाशाल

ब्राह्मणांचा एक वर्ग. प्राचीन काळी काही ब्राह्मण केवळ वेदांचे अध्ययन-अध्यापन करीत. त्यांना पुरोहित अशी संज्ञा होती. पुरोहित आणि अपुरोहित ब्राह्मणांच्यामध्ये जो ब्राह्मणवर्ग होता, त्याला महाशाल असे म्हणत. हा वर्ग अध्ययन आणि त्याचबरोबर अन्यही कामे करीत असे. धर्म, राजनीती अथवा अशा प्रकारची अन्य शास्त्रे यांचे अध्ययन करण्यात हे निमग्न असत. जातककालात पुरोहित, राजनीतिज्ञ आणि मंत्री अशा अधिकारांवर कामे करणारी माणसे या वर्गात होती. काही न्यायाधीश या वर्गातीलच होते. [हिं. रा. तं.]

महाशिवरात्री

माघ वद्य चतुर्दशीला महाशिवरात्री म्हणतात. महाशिवरात्रीचे व्रत हे काम्य व नैमित्तिक असे दोन्ही प्रकारचे आहे. हे सर्व वर्णांतील स्त्री-पुरुषांना विहित आहे. उपवास, पूजा व जागरण ही या व्रताची तीन अंगे असून, ती सारख्याच महत्त्वाची आहेत. शिव ही या व्रताची प्रधान देवता आहे. याचा विधी असा –

माघ कृष्ण त्रयोदशीला एकभुक्त राहावे. चतुर्दशीच्या दिवशी सकाळी व्रताचा संकल्प करावा. सायंकाळी नदीवर किंवा तळ्यावर जाऊन शास्त्रोक्त स्नान करावे. भस्म व रुद्राक्ष धारण करावे. प्रदोषकाळी शिवाच्या देवळात जावे. एकच पूजा करायची असेल तर पूजेचा संकल्प तसा करावा. मग पुढील मंत्राने शिवाचे ध्यान करावे –

ध्यायेन्नित्यं महेशं रजतगिरिनिभं चारुचन्द्रावतंसं
रत्नाकल्पोज्ज्वलाङ्गं परशुमृगवराभीतिहस्तं प्रसन्नम् ।
पद्मासीनं समन्तात्स्तुतममरगणैर्व्याघ्रकृत्तिं वसानं
विश्वाद्यं विश्वबीजं निखिलभयहरं पञ्चवक्त्रं त्रिनेत्रम् ।।

मग षोडशोपचारे पूजा करावी. भवभवानीप्रीत्यर्थ तर्पण करावे. शिवाला एकशे आठ कमळे किंवा बेलाची पाने नाममंत्राने वाहावी. मग पुष्पांजली अर्पण करून अर्घ्य द्यावे. पूजासमर्पण, स्तोत्रपाठ व मूलमंत्राचा जप झाल्यावर शिवाच्या मस्तकावरील एक फूल काढून ते स्वतःच्या मस्तकावर ठेवावे आणि क्षमायाचना करावी.

शिवरात्रीला रात्रीच्या चार प्रहरी चार पूजा कराव्या, असे विधान आहे. त्यांना यामपूजा असे म्हणतात. प्रत्येक यामपूजेत देवाला अभ्यंग स्नान घालावे; अनुलेपन करावे; धोत्रा, आंबा व बेल यांची पत्रे वाहावी. तांदुळाच्या पिठाचे २६ दिवे करून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांनी देवाला ओवाळावे. पूजेच्या शेवटी १०८ दिवे दान द्यावे. प्रत्येक पूजेतले वेगळे मंत्र असतात, त्यांनी अर्घ्य द्यावे. नृत्य, गीत, कथाश्रवण, इ. गोष्टींनी जागरण करावे. पहाटे स्नान करून पुनश्च शिवपूजा करावी. पारण्याला ब्राह्मणभोजन घालावे. आशीर्वाद घेऊन व्रतसमाप्ती करावी.

उद्यापन – बारा, चौदा किंवा चोवीस वर्षे व्रत केल्यावर त्याचे उद्यापन करावे. त्या वेळी मंडपात सर्वतोभद्र मंडलावर कलशस्थापना करून त्यावर नंदी व उमेसहित शिवाची सुवर्ण-प्रतिमा स्थापावी. शिवाला आज्याहुती द्याव्या. चौदा ब्राह्मणांची पूजा करून वस्त्रालंकारांनी त्यांची संभावना करावी. मग आचार्यपूजा, गोप्रदान व प्रतिमादान केल्यावर पुढील मंत्राने ब्राह्मणांची पूजा करावी –

व्रतमेतत्कृतं यन्मे पूर्णं वाऽपूर्णमेव वा ।
सर्वं सम्पूर्णतां यातु प्रसादाद्भवतां द्विजाः ।।

अर्थ – मी केलेले हे व्रत पूर्ण असो किंवा अपूर्ण असो; ते सर्व, हे ब्राह्मणहो ! तुमच्या प्रसादाने पूर्णतेला जावो.

नंतर शंकराच्या चौदा नावांचा उच्चार करून कुंभदान करावे.

तुंब्याची फुले, धोत्र्याची फुले, आम्रमंजिरी व बेल या वस्तू शिवाला प्रिय असतात. या पूजेत त्यांचा उपयोग करतात. केवड्याचे कणीस शिवाला याच दिवशी वाहायचे असते.

दक्षिणेत या व्रताचा विधी थोडा निराळा आहे, तो असा–

तिकडचे लोक आदल्या दिवशी एकभुक्त करतात, रात्री पवित्र जागी झोपतात, सकाळी कावेरी नदीत किंवा अन्य कोणत्याही नदीत किंवा जलाशयात स्नान करतात; मग शिवदर्शन करतात. पहिल्या यामपूजेत शिवाला कमळे वाहून पोंगळाचा (तांदुळाची खीर) नैवेद्य दाखवितात व ऋग्वेदातील सूक्तांचा पाठ करतात. दुसऱ्या यामात तुळसीदले वाहून पायसाचा नैवेद्य दाखवतात आणि यजुर्वेदाचा पाठ करतात. तिसऱ्या यामात बिल्वदले वाहून तीळयुक्त भाताचा नैवेद्य दाखवतात व सामवेदाचा पाठ करतात. चौथ्या यामात नीलकमळे वाहून साध्या अन्नाचा नैवेद्य दाखवतात व अथर्ववेदाचा पाठ करतात.

व्रतराजात दिलेल्या शिवरात्रीच्या दोन कथा अशा–

(१) एक व्याध होता. तो शिकारीवर आपले कुटुंब पोशी. त्याला काही व्यापाऱ्यांचे कर्ज झाले होते. ते फिटेना म्हणून त्यांनी त्याला एका शिवमंदिरात बांधून ठेवले. तो दिवस शिवरात्रीचा होता. व्याध शिव शिव म्हणत तिथे त्या दिवशी उपवाशी राहिला. सायंकाळी त्याची सुटका झाली. लगेच तो धनुष्यबाण घेऊन रानात शिकारीला गेला. रात्री तो एका तळयाजवळ आला व तिथे एका झाडावर टपून बसला. थोडया वेळाने तिथे पाणी पिण्यासाठी हरणांचा एक कळप आला. व्याध ज्या झाडावर बसला होता, ते झाड बेलाचे होते. त्याच्या खाली एक पुरातन शिवलिंग होते. सावजे नीट दिसावी, म्हणून व्याधाने डोळ्यापुढची बिल्वदळे खुडली आणि ती खाली टाकली. ती नेमकी शिवलिंगावर पडली. पण सावजांना शिकाऱ्याचा वास लागला. त्यामुळे ती पळून गेली. रात्रभर तो जागा राहिला. पहाटेच्या प्रहरी एक हरीण व दोन हरिणी तिथे आल्या. व्याध आपणावर बाण सोडीत आहे, असे पाहताच ती हरणे घाबरली. हरिणी व्याधाला मनुष्यवाणीने बोलल्या. 'तू आता आम्हांला मारू नको. आम्ही घरी जातो. पाडसांना एकदा शेवटचे पाजतो व परत येतो.' व्याधाला त्या गोष्टीचे आश्चर्य वाटले. त्याने त्या हरिणांना सोडून दिले. कबूल केल्याप्रमाणे त्या हरिणी व त्यांची पाडसे सकाळी व्याधाकडे येऊन हजर झाली. ती सगळीच 'इतरांना मारू नको मला मार' असे व्याधाला विनवू लागली. तो अद्भुत प्रसंग पाहून व्याधाचे मन द्रवले. तो म्हणाला, 'तुम्ही सगळे सुखाने घरी जा. यापुढे मी मृगहत्या करणार नाही.' व्याधाने आपले धनुष्यबाण मोडून टाकले आणि तो तिथून निघून गेला. अशा प्रकारे त्याला उपवास, जागरण व शिवपूजा घडली आणि त्याचे व्रत पूर्ण झाले. त्यामुळे देवदूतांनी त्याच्यासाठी विमान आणले. व्याधाच्या सर्व कुटुंबाला देवदूत स्वर्गात घेऊन गेले. आजही तो व्याध आणि तो कळपाचा स्वामी मृग आकाशात तळपत असल्याचे लोकांना दिसते.

(२) मिथिला नगरीत सुधन्वा नावाचा एक ब्राह्मण होता. त्याला शिकारीचा छंद होता. एकदा तो शिकारीसाठी रानात गेला असता दिवसभर भटकूनही त्याला शिकार मिळाली नाही. त्याला त्या दिवशी उपास घडला. रात्रीही तो रानातच राहिला. रात्री त्याला एक वाघ दिसला. तो ब्राह्मणावर चालून आला. ब्राह्मण पळत सुटला व वाघ त्याच्या मागे लागला. पुढे त्याला एक आमराई दिसली. तिथल्या एका उंच आम्रवृक्षावर ब्राह्मण चढून बसला. वाघ झाडाच्या बुंध्याशी बसला. वाघाची हालचाल समजावी, म्हणून ब्राह्मण डोळ्यांपुढचा आंब्याचा मोहोर खुडून खाली टाकू लागला. झाडाखाली एक शिवलिंग होते. त्यावर तो मोहोर पडू लागला. अशा स्थितीत रात्र निघून गेली. सकाळ झाली तरी वाघ झाडाखालून हालेना. ब्राह्मणाने विचार केला, की आपण झाडावरच बसून राहिलो, तर सुकून मरून जाऊ. त्यापेक्षा वाघाची एका वेळची भूक शमवली, तर तेवढे पुण्य तरी लागेल. या विचारासरशी ब्राह्मण झाडावरून उतरला व वाघाला म्हणाला. 'मला खाऊन तू उपासाचे पारणे कर.' तो वाघही रात्रभर तिथल्या शिवलिंगाच्या सान्निध्यात राहिला होता. त्यामुळे त्याचीही वृत्ती पालटली. तो म्हणाला. 'तू सुखाने

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घरी जा. मी तुला मारणार नाही.' अशा प्रकारे वाघ व ब्राह्मण या दोघांनाही न कळत शिवरात्रीचे व्रत घडले. त्या पुण्याने त्यांना आकाशातून विमान आले. दोघेही शिवलोकी गेले. शिवाने ब्राह्मणाला चंड या नावाने व वाघाला निकुंभ या नावाने आपल्या गणात सामील करून घेतले. त्या दिवसापासून शिव व्याघ्रचर्म पांघरू लागला.

दक्षिणेत प्रचलित असलेली महाशिवरात्रीची एक कथा अशी– एक तरुण ब्राह्मण होता. तो अनेक दुष्कर्मे करी. एके दिवशी त्याच्या दुष्कर्मांबद्दल त्याला हद्दपार करण्यात आले. उपाशी पोटी वणवण हिंडत तो प्रदोषकाळी एका शिवमंदिरात आला. गाभाऱ्यात कुणी नव्हते व देवापुढे बरेच खाद्य पदार्थ होते. ते नीट दिसावे म्हणून त्या तरुणाने समईतील वात सारून तिथे प्रकाश केला. इतक्यात तिथे पुजारी आला व त्याने चोर चोर अशी हाकाटी केली. लगेच लोक धावून आले आणि त्यांनी त्या तरुणाला बडवून ठार मारले. ती महाशिवरात्र होती. तरुणाला उपास घडला होता आणि दिवा उजळून त्याने शिवाला एक उपचार समर्पिला होता. म्हणून त्याला स्वर्ग मिळाला.

भारतात सर्वत्र असंख्य शिवस्थाने असून, त्या ठिकाणीं महाशिवरात्रीला मोठ्या यात्रा भरतात. [व्रतराज; सा. इं. फे.]

महाश्री तारा एक बौद्ध देवता. हिला धनाची देवता मानतात. ही अमोघसिद्धीपासून उत्पन्न झालेली असून, हरितवर्ण व द्विभुज आहे. हिचा एक हात धर्मचक्र मुद्रेत आहे. हिच्या गळ्यात खूप अलंकार असून ही कमलासनावर ललितासन घालून बसलेली आहे. 'ॐ तारे तुत्तारे तुरे धनं दे दे स्वाहा' हा मंत्र म्हणून हिची पूजा करतात. हिच्या बाजूला एकजटा, अशोककांता, आर्यजांगुली व महामायुरी या देवता असतात. कलकत्त्याच्या इंडियन म्युझियममध्ये हिचे अशा प्रकारचे स्वरूप पाहायला मिळते. [इं. बु. इ.; देवीकोश ३]

महाश्वेता एक देवता. भविष्य पुराणात हिचा मंत्र सांगितला आहे, तो असा–' ह्रां ह्रीं सः ' रविवारी उपवास करून या मंत्राचा जप करायचा असतो. त्यामुळे ईप्सितप्राप्ती होते. [हि. ध.]

महाषष्ठी एक तिथिव्रत. कार्तिक शुद्ध षष्ठीला सूर्य वृश्चिक राशीत आणि मंगळवार असेल, तर त्या दिवसाला 'महाषष्ठी असे म्हणतात. आदल्या दिवशी उपवास करणे, षष्ठीला अग्नीची पूजा करणे आणि ब्राह्मणभोजन घालणे असा याचा विधी आहे. फल– पापनाश. [हि. ध.]

महाष्टमी एक तिथिव्रत. आश्विन शुद्ध अष्टमीला महाष्टमी असे म्हणतात. त्या दिवशी हे व्रत करतात. भद्रकाली ही या व्रताची प्रमुख देवता होय. यात तूप, तीळ व पायस यांचा होम करतात. सकाळी देवीच्या छत्र, चामर, वस्त्र, शस्त्र, इ. वस्तूंची पूजा करतात आणि सायंकाळी बलिदान करतात. या तिथीसंबंधी निर्णय सांगताना सप्तमीयुक्त अष्टमी ही वर्ज्य मानली आहे आणि नवमीयुक्त अष्टमी ग्राह्य धरली आहे. सप्तमीयुक्त अष्टमीला देवीची पूजा केली तर मुले, पत्नी व धन यांची हानी होते, असे म्हटले आहे. [व्र. प.; व्रतराज]

महासनत्कुमारसंहिता ही संहिता चार अध्यायांत विभागली असून, तीत चाळीस परिच्छेद आणि दहा हजार श्लोक आहेत. पूजाविधी हा या संहितेचा विषय आहे. तिच्या चारही अध्यायांची क्रमशः नावे अशी– ब्रह्मरात्र, शिवरात्र, इंद्ररात्र व ऋषिरात्र. [भ. वि.]

महासप्तमी एक तिथिव्रत. माघ शुद्ध सप्तमीला महासप्तमी असे म्हणतात. व्रतावधी एक वर्ष. याचा व्रतविधी असा– माघ शद्ध पंचमीला एकभुक्त राहून षष्ठीला व सप्तमीला सूर्याची पूजा करावी. पूजेसाठी करवीर पुष्पे आणि रक्तचंदनाचे गंध घ्यावे. एका वर्षाचे माघ मासापासून चार-चार महिन्यांचे तीन भाग करावे. या प्रत्येक भागात निरनिराळी फुले, नैवेद्य, धूप, इ. पूजोपचार घ्यावे. उद्यापनाच्या वेळी एक रथ दान द्यावा.

या तिथीला निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळी नावे आहेत. बंगालमध्ये हिला भास्करसप्तमी, उत्तर प्रदेशात अचला व जयंतसप्तमी व महाराष्ट्रांत रथसप्तमी म्हणतात. [हि. ध.]

महासरस्वती (१) शाक्त पंथातली एक देवता. ही महालक्ष्मीपासून उत्पन्न झाली. हिच्यात सत्त्वगुणांचे प्राधान्य असते. ही श्वेत वर्णाची व चतुर्भुज आहे. हिच्या हातांत माला, अंकुश, वीणा व पुस्तक या वस्तू असतात. देवीच्या या स्वरूपाला महाविद्या, महावाणी, भारती, वाक्, आर्या, ब्राह्मी, वेदगर्भा, इ. नावे आहेत.

श्रीविद्यार्णवतंत्रात हिचे वर्णन पुढीलप्रमाणे आढळते – ही गौरीच्या शरीरातून उत्पन्न झाली असून, अष्टभुजा आहे. बाण, मुसळ, चक्र, त्रिशूल, शंख, नांगर, घंटा व धनुष्य ही आयुधे हिच्या हातीं असतात. [डे. हिं. इ.]

(२) एक बौद्ध देवता. ही एकमुखी व द्विभुज असून, तिच्या एका हातात शुभ्र कमळ असते व दुसरा हात वरदमुद्रेत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असतो. ही हसतमुख असून, हिच्या शरीरावरील वस्त्रालंकार चंदनपुष्पांनी युक्त असतात. हिची कांती सुंदर असते आणि ही कमलस्थ चंद्रावर बसलेली असते. या देवतेच्या दोन्ही बाजूंना हिच्यासारख्याच दोन दोन लहान मूर्ती असतात. या चार देवतांची नावे प्रज्ञा, मेघा, स्मृती व मती अशी आहेत. ही देवता विद्या, चातुर्य व स्मरणशक्ती देणारी आहे. [इं. बु. इ.]

महासहस्रप्रमर्दिनी एक बौद्ध देवता. हिची पंचरक्षामंडलात गणना करतात. ही तरुण व सुंदर असून, गौरवर्ण, एकमुख आणि षड्भुज आहे. हिच्या गळ्यात विविध प्रकारचे अलंकार असतात. हिचा एक हात वरद मुद्रेत असतो आणि अन्य हातांमध्ये खड्ग, पाश, इ. आयुधे असतात. ही ध्यानी बुद्ध वैरोचनापासून उत्पन्न झाली आहे. या देवतेच्या पूजनाने भूत-पिशाचांची बाधा दूर होते, अशी समजूत आहे. [इं. बु. इ.; देवीकोश ३]

महासांघिक एक बौद्ध संप्रदाय. मूळ बौद्ध संघापासून वेगळा निघणारा हाच पहिला संप्रदाय होता. वैशाली येथील द्वितीय संगीतीच्या वेळी काही लोक फुटून बाहेर पडले व कौशांबी येथे जाऊन त्यांनी दहा हजार भिक्षूंची एक वेगळी सभा घेतली. त्या वेळी प्रचलित असलेल्या विनयाच्या नियमांचा त्यांनी आपल्या सिद्धान्ताप्रमाणे अर्थ लावला आणि काही नवे नियमही बनवले. त्याचबरोबर त्यांनी सूत्रांचा व विनयपाठाचा अर्थही आपल्या मताला अनुकूल असा लावला. बुद्धाची म्हणून जी वचने मानली जात होती, त्या सूत्रांचा त्यांनी संग्रह केला; त्यांतील अनेक सूत्रांचा त्यागही केला. महासांघिकांच्या या संकलनाला आचारिकवाद असे म्हणतात.

महासांघिकांनी आपला धर्मसूत्रपाठ सूत्र, विनय, अभिधर्म, धारणी व इतर अशा पाच भागांत विभागला होता, असे युआन च्वांगने म्हटले आहे.

महासांघिक हे बौद्ध धर्माचे प्रमुख सिद्धान्त मानीत होते. त्यांचा सर्वसामान्य सिद्धान्त हा की बुद्ध हा मानव नसून अतिमानव होता. त्याचे शरीर अनास्रव धर्मांनी बनलेले होते. त्यामुळे तो निद्रा व स्वप्न यांपासून मुक्त होता. त्याच्या अंगी इतके सामर्थ्य होते, की एकाच वेळी तो अगणित भौतिक शरीरे धारण करू शकत असे. तो आत्मस्थित असून, नेहमी समाधि-अवस्थेत असे. बुद्धाप्रमाणेच बोधिसत्वही अतिमानवी होते. ते पांढऱ्या हत्तीच्या रूपाने आपल्या मातेच्या उदरात प्रवेश करीत आणि तिच्या कुशीतून बाहेर पडत.

अर्हतांच्या स्वरूपाविषयीही त्यांनी विचार केला होता. अर्हत हे पूर्ण नसतात. त्यांना इतर लोकांकडून शिकण्यासारखे असते. अर्हत्पदावर पोचूनही त्यांना संशय व संदेह उत्पन्न होतो. त्यांच्या ठिकाणी अज्ञानही असते. दुसऱ्यांच्या साहाय्याने ते ज्ञान प्राप्त करून घेऊ शकतात.

महासांघिकांची काही अन्य मते पुढीलप्रमाणे – (१) पंच विज्ञानाचे सराग व विराग असे दोन प्रकार असतात. (२) रूपेंद्रिये केवळ मांसल असतात. ती स्वतः इंद्रियांचे विज्ञान जाणत नाहीत. (३) प्रज्ञेच्या द्वारे दुःखाची समाप्ती व निर्वाण प्राप्ती शक्य आहे. (४) काहीही अव्याकृत नाही. (५) मन हे मुळात पवित्र असते. (६) मृत्यूनंतर आणि पुनर्जन्माच्या आधी जीव असतो.

प्रारंभी या महासांघिकांना पुराणपंथी थेरवाद्यांनी पुष्कळ विरोध केला. पण त्यांनी हळूहळू मगधात आपला जम बसवला आणि पाटलीपुत्र व वैशाली या ठिकाणी आपली केंद्रे स्थापन केली. तिथून त्यांनी उत्तर भारतात व दक्षिण भारतातही आपल्या संप्रदायाचा प्रसार केला.

पुढे महासांघिकांच्या एकव्यवहारिक, लोकोत्तरवाद, कुक्कुटिक, बहुश्रुतीय, शैल, चैतियवादिन्, अंधक, इ. उपशाखा निघाल्या. [बौ. द. मी.; आजकल, वार्षिक अंक, डिसेंबर१९५६]

महासांतपन एक प्रायश्चित्त. यामुळे सर्व पापांचा नाश होतो. याचा विधी असा– पहिल्या दिवशी गोमूत्र, दुसऱ्या दिवशी गोमय, तिसऱ्या दिवशी दूध व याच पद्धतीने दही, तूप, दर्भोदक हे क्रमाने पिऊन सातव्या दिवशी उपोषण करायचे. हे प्रायश्चित घेण्याला जो असमर्थ असेल त्याने ब्राह्मणाला दोन सवत्स गायी दान द्याव्या, असे म्हटले आहे. काही शास्त्रकारांनी या प्रायश्चित्ताचा विधी पंधरा दिवसांचा सांगितला आहे. महासांतपनाच्या प्रत्याम्नायाबद्दल सोळा सवत्स गायी दान द्याव्या असेही सांगितले आहे. [श. क.; प्रा. व्य. प्र.]

महासितवती एक बौद्ध देवता. हिची पंचरक्षामंडलात गणना करतात. ही एकमुख, चतुर्भुज व रक्तवर्ण आहे. नाना प्रकारचे अलंकार हिच्या गळ्यात असतात. ध्यानी बुद्ध अमिताभापासून ही उत्पन्न झाली आहे. हिचा एक हात वरद मुद्रेत असून, अन्य हातांमध्ये अंकुश, वज्र आणि पुस्तक या वस्तू असतात. ही देवता दुष्ट ग्रह, हिंस्र पशू, यांपासून उपासकाचे संरक्षण करते, अशी समजूत आहे.

साधनमालेत तिचे षड्भुज व हरितवर्ण ध्यानही वर्णिलेले आहे. निष्पन्नयोगावलीत तिच्या एका त्रिमुख, अष्टभुज व रक्तवर्ण ध्यानाचे वर्णन केलेले आहे. [इं. बु. इ.; देवीकोश २]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

महास्थानगड एक क्षेत्र. हे स्थान पूर्व बंगालमधील बोग्रा जिल्ह्यात बोग्रा शहरापासून सात-आठ मैलांवर आहे. या भागात हे परशुराम-क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. इथे परशुरामाचे एक मंदिरही आहे. परशुरामाच्या वार्षिक उत्सवानिमित्त इथे मोठी यात्रा भरते. याशिवाय इथे सुलतान हजरत अवलियाची कबर आहे. महास्थानगडच्या परिसरात बरेच प्राचीन अवशेष आढळतात.

महासितवती

इथे मातीची देवाची मूर्ती उत्खननात सापडली आहे. हे अत्यंत प्राचीन नगर होते व तिथे सनपूर्व दुसऱ्या शतकापासून इ. स. च्या १२ व्या शतकापर्यंत वस्ती होती. तिथे सनपूर्व तिसऱ्या शतकातली एक लहानशी लेखशिला सापडली असून, ती पुराणवस्तु-संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. बंगालमध्ये सापडलेली ही पहिलीच लेखशिला होय. तिच्यावर प्राचीन ब्राह्मी लिपीत सहा ओळी मजकूर कोरलेला आहे. त्यात पुडनगर असे स्पष्ट नाव आहे. तो पुंड्रनगर शब्दाचा अपभ्रंश आहे. त्यावरून महास्थान व पुंड्रनगर ही एकच होत, असे सिद्ध होते. [हि. जॉ. ए. इं.; स. भा. प्र. व.]

महास्थामप्राप्त

महास्थामप्राप्त एक बोधिसत्त्व. गौतम बुद्धाचा प्रमुख शिष्य मौद्‌गल्यायन हाच पुढे बोधिसत्त्व म्हणून प्रसिद्धीस आला. याच्या वर्णनात मतभिन्नता आहे: महास्थाम प्राप्त पीत वर्णाचा असून, त्याच्या उजव्या हातात खड्ग व डाव्या हातात कमळ असते, असे एकमत आहे.

याच्या डाव्या हातात सहा विकसित कमळे आणि उजवा हात वरद मुद्रेत आहे, असेही वर्णन आहे. याची एक मूर्ती चिनी संग्रहात आहे. [इं. बु. इ.; गॉ. नॉ. बु.; निष्पन्नयोगावली]

महाळुंग एक गाव. हे सोलापूर जिल्ह्यात पंढरपूरपासून सुमारे पस्तीस मैलांवर आहे. या गावी अंबिका देवीचे मोठे मंदिर आहे. तिच्या मंडपासमोर संवडड (शमी) नावाचा एक पुराण वृक्ष आहे. लोक या वृक्षाचीही पूजा करतात. ज्याच्या शरीरात वातप्रकोपामुळे चमका निघत असतील, त्याने या वृक्षाला आलिंगन दिले तर, चमका बंद होतात, असे सांगतात. या वृक्षाशेजारी एक मोठी चौकोनी विहीर आहे. या विहिरीसंबंधी असे सांगतात, की वर्षातून एकदा तिच्यात गंगेचे पाणी येते. तेव्हा विहिरीतील सर्व पाणी पांढरेशुभ्र होते. या पर्वणीच्या वेळी तिथे स्नान करण्यासाठी महाराष्ट्राच्या सर्व भागांतून लोक येतात. या पाण्यात स्नान केल्यावर अनेक रोग नष्ट होतात, अशी समजूत आहे.

महाळुंग गावात खूप माकडे आहेत. या सर्व माकडांना अंबिका देवीची मुले समजतात. त्यांना कोणी धरून नेत नाहीत. तसा कोणी प्रयत्न केला, तर त्याचा निर्वंश होतो, अशी लोकांची समजूत आहे. या माकडांच्या प्रमुखाला पाटील असे म्हणतात. यात्रेच्या वेळी या पाटलाला अहेर करण्याची पद्धत आहे. मंगळवारी व शुक्रवारी देवीच्या दर्शनासाठी येणारे लोक या माकडांना आवर्जून खाद्यपदार्थ आणतात. [म. लो. मा. ३]

महिदास ऐतरेय ऐतरेय ब्राह्मण व आरण्यक यांचा कर्ता. पाहा– ऐतरेय.

महिपतिनाथ (समाधी इ. स. १८२२) नाथसंप्रदायातील एक मराठी संतकवी. शिवदिनकेसरीच्या शिष्यांपैकी नरहरीनाथ हा याचा गुरू होय. महिपतिनाथ हा मूळचा पैठणचा असून, जनार्दनस्वामींच्या वंशातील होता. परंतु याचे सारे आयुष्य ग्वाल्हेर, इंदूर, उज्जयिनी या भागात गेले. त्यामुळे याचा सारा शिष्यपरिवार त्याच भागात आहे. उज्जयिनीला दत्तबुवा नामक एक नाथसंप्रदायी साधू होते. त्यांच्या मठात महिपतीचे काही काळ वास्तव्य होते. याच

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मठात महिपतीची हिंदी, मराठी ग्रंथरचना आहे. हा काही काळ इंदूरला राहत होता. इंदूरच्या यशवंतराव होळकर महाराजांनी याचा अनुग्रह घेतला होता, असे सांगतात. ग्वाल्हेरच्या दौलतराव शिंद्यांच्या आग्रहाखातरच हा उज्जयिनीहून ग्वाल्हेरला गेला आणि तिथेच त्याचा मृत्यू झाला. याचा मठ ग्वाल्हेरला आजही आहे. अप्पानाथ, नारायणमहाराज, निर्मलनाथ, अमरनाथ, दाजीमहाराज, इ. याचे शिष्य होते.

महिपतिनाथाचे बरेच काव्य आहे. त्यात पदे, अभंग, कडका छंदातले कटाव, लावण्या असे विविध प्रकार आहेत. हा आपल्या पदात स्वतःला नरहरी महीपती असे म्हणवितो. कवीने आपल्या काळच्या परिस्थितीचे वर्णन एका पदात केलेले आहे, त्यातला काही भाग असा –

पाहता पाहता धर्म बुडाला अधर्म झाला चहूंकडे ।
जिकडे तिकडे कली मातला, कठीण काळ हा आला पुढे ।। धृ०।।
दात्यांचे घरी दरिद्र आले, कृपण धनाढ्य झाले कीं ।
पापि चिरायू पुण्यशील ते, अल्पायुष्या गेले कीं ।
सत्कर्माचा लोप जाहला, दुष्कर्मी जन भुलले कीं ।
स्वधर्म सांडूनि अधर्म वाढे, कैसे कलियुग आले कीं ।

महिपतीची भाषा सहज-सुंदर आहे. [म. सा.; गो. च. प.]

महिमभट्ट

(इ. स. १००० चा सुमार) एक आलंकारिक. हा काश्मीरचा राहणारा होता. याला राजानक ही पदवी होती. याच्या पित्याचे नाव श्रीधैर्य आणि गुरूचे नाव श्यामल असे होते. हा फार मोठा विद्वान होता. व्याकरण, न्याय, मीमांसा व अलंकार या शास्त्रांवर त्याचे असाधारण प्रभुत्व होते. व्यक्तिविवेक हा याचा ग्रंथ होय. महिमभट्टाने हा ग्रंथ आनंदवर्धनाच्या ध्वनिसिद्धान्ताचे खंडन करण्यासाठी लिहिला. त्यामुळे याला ध्वनिविरोधी आचार्य मानतात.

आपल्या नातवांच्या शिक्षणासाठी महिमभट्टाने हा ग्रंथ लिहिला असून, तो प्रामुख्याने गद्यात्मक आहे. या ग्रंथाची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यात विषयाचे विवेचन प्रथम गद्यात केलेले असून, नंतर त्याचे सार श्लोकरूपाने दिले आहे. या श्लोकांना संग्रहश्लोक असे नाव त्याने दिले आहे. पण दोन–तीन ठिकाणी संग्रहश्लोकांनाच अंतरश्लोक असेही म्हटले आहे. या श्लोकांची संख्या २७० आहे. अशा प्रकारे वृत्ती, उदाहरण आणि शेवटी कारिका असे या ग्रंथाच्या विवेचनाचे स्वरूप आहे.

संपूर्ण ग्रंथाचे तीन भाग असून, त्यांना विमर्श असे नाव आहे. प्रथम विमर्शाचे नाव ध्वनिलक्षणाक्षेप असे असून, त्यात आनंदवर्धनाच्या ध्वनीच्या लक्षणाचे परीक्षण करून त्यातील दोष दाखवले आहेत. त्यानंतर त्याने स्वतः ध्वनीचे शुद्ध लक्षण देऊन त्याचे अनुमानपर विवेचन केले आहे.

द्वितीय विमर्शाचे नाव शब्दानौचित्यविचार असे असून, त्या[त] प्रामुख्याने काव्यदोषांचे विवेचन केलेले आहे.

तृतीय विमर्शाचे नाव ' ध्वनेरनुमाने ऽ न्तर्भावप्रदर्शनः ' अ[से] आहे. यात ध्वनीचा अंतर्भाव अनुमानातच कसा होतो, ते नि[र]निराळी उदाहरणे देऊन सांगितले आहे.

या ग्रंथावर रुय्यकाची व्यक्तिविवेकव्याख्यान व मधुसूदना[ची] विवृती अशा दोन टीका आहेत.

म. म. काणे यांच्या मते व्यक्तिविवेक हा ग्रंथ म्हणजे अलं[कार]कारशास्त्राचे भूषण आहे. त्यात नवीन युक्तिवाद, विस्तृ[त] वाचन, तर्कशुद्ध विचारसरणी, चोख चिकित्सापद्धती व सूक्ष्म निरीक्षणशक्ती दिसून येते.

या ग्रंथाचे वैशिष्टय असे, की यातील सर्व विवेचन मूल[भूत] आहे. आणि ग्रंथकाराला त्याबद्दल अभिमानही आहे. त्याने [जे] युक्तिवाद किंवा तर्क मांडले, ते त्यापूर्वी कोणीही मांडले नव्हते असे त्याचे म्हणणे आहे. ग्रंथातील विवेचन विद्वत्तापूर्ण आहे [हे] खरे; पण त्याची मांडणी तितकीशी पद्धतशीर नाही, हे [या] ग्रंथाचे एक वैगुण्य आहे. पाहा– ध्वनी. [सं. सा. इ.; महि[म]भट्ट– डॉ. व्रजमोहन चतुर्वेदी, १९६८]

महिमाधर्म

महायानी बौद्धांचा ओडिसा राज्यातील ए[क] अर्वाचीन भक्तिसंप्रदाय. यालाच नवीन बौ[द्ध]धर्म असे नाव आहे. या संप्रदायाच्या अनुयायांना महिमा[पंथी] असे म्हणतात. इ. स. १८७५ मध्ये भीमभोई या संताने [हा] संप्रदाय स्थापला. खंडगिरी, मणिनाग व कपिलास ही [संप्र]दायाची पुण्यक्षेत्रे होत. या संप्रदायाचे अनुयायी चैतन्यदास[कृत] विष्णुगर्भपुराण अथवा निर्गुणमाहात्म्य, बलरामदासकृत छ[त्तीसा] किंवा गुप्तगीता, जगन्नाथविरचित तुलाभिना आणि अ[च्यु]नंददासाची शून्यसंहिता अथवा अनादिसंहिता या ग्रंथांना [आपले] धर्मग्रंथ मानतात. [म. बौ. ध.]

महिया

एक जात. या लोकांची वस्ती गुजरातमधील [सौरा]... जुनागड, जेतपूर व बांटवा या भागात आढळ[ते. हे] लोक मूळचे जाधव राजपूत असावे, असे म्हणतात. यांना म[हिया] हे नाव का प्राप्त झाले, त्यासंबंधी मतभिन्नता आहे. काहीं[च्या] मते यांचा मया नावाचा पूर्वज होता, त्याच्या नावाव[रून] नाव आले. तर काहींच्या मते गुजरातमधील मही नदीच्या [का]... हे राहत होते म्हणून यांना महिया असे म्हणू लागले. ... हे लोक या भागात कोळी म्हणून ओळखले जातात. ...

महिया पुरुष उंच, सशक्त व बांधेसूद असतात. ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पोशाख मध्यमवर्गीय राजपूतांप्रमाणे असतो आणि रीतिरिवाजही त्यांच्याप्रमाणेच असतात.

हे लोक कोणाच्याही बंधनात न राहणारे आणि दंगेखोर म्हणून प्रसिद्ध आहेत. इ. स. १८६७ साली यांनी संस्थानिकांविरुद्ध बंड केले होते. त्यानंतर यांना थोडीफार जमीन देऊन त्यांचे बंड शमवण्यात आले. परंतु यांना शेतात काम करण्याचा कंटाळा असतो. मजुरीपेक्षा लढाईच्या कामाला हे लोक अधिक योग्य आहेत, असे म्हटले जाते.

यांच्यांत अनेक पोटभेद आहेत. त्यांची नावे अशी– दत्तियार, मारवा, डांगर, पडेरी, बाकिआ, धाना, चलावडा किंवा वारू गुरमूल, चुडासमा, कात्याल, कोहिल्ला, धांकडा आणि सोळंकी.

विवाहप्रथा –हे लोक चुलतबहिणीशी लग्न करतात, पण आतेबहिण किंवा मामेबहिण यांच्याशी करीत नाहीत. यांच्यांत सख्या बहिणी सख्या जावा होऊ शकतात. माणखेतरी ब्राह्मण यांचे पौरोहित्य करतात. लग्नाच्या आदल्या दिवशी वधुवरांच्या हातात मिंडोल नावाच्या लाकडाचा एक एक तुकडा बांधला जातो. मग नवरा मुलगा वाजत गाजत नवरीच्या घरी येतो. तिथे त्याला नारळ व जमलेल्या मंडळींना खजूर किंवा खडीसाखर देतात. याच वेळी नवऱ्यामुलीला दागिने व अहेर देतात. दुसऱ्या दिवशी लग्नाच्या वेळी गणपतीची व गृहदेवतांची पूजा करतात. मग कन्यादान आणि सप्तपदी होते.

यांच्यांत विधवेला मामेभावाशी लग्न करतात येते. पण त्यासाठी पन्नास रुपयांपासून दोनशे रुपयांपर्यंत दंड द्यावा लागतो. ती अनपत्य असेल तर धाकट्या दिराशीही लग्न करू शकते. आपल्या कुटुंबाबाहेरील पुरुषाशी तिला लग्न करायचे असल्यास कुटुंबप्रमुखाची परवानगी घ्यावी लागते. विधवाविवाहाला मुहूर्त लागत नाही. अविवाहित तरुणालाही विधवेशी लग्न लावता येते. यांच्यांत घटस्फोटाला मान्यता असली, तरी तो फारसा प्रचलित नाही. स्त्रीने व्यभिचार केल्यास तिला ५० रुपयांपासून १२५ रुपयांपर्यंत दंड करतात.

हे लोक महाकाली व रामदेपीर या देवतांना भजतात. या देवतांना अर्पण केलेल्या वस्तू हे आपापसांत वाटून घेतात. यांना मद्यमांस चालते.

मर्तिकप्रथा – हे लोक मृताला जाळतात; साधूंना व लहान मुलांना पुरतात. साधूला बसलेल्या स्थितीत उत्तरेकडे तोंड करून पुरतात. महारोग आणि देवी या रोगांनी मेलेल्यांनाही पुरतात. नदीत किंवा तीर्थात अस्थिविसर्जन करतात. अकराव्या दिवशी मृत व्यक्तीची कणकेची प्रतिमा करून नदीकाठी तिची पूजा करतात. एखादा माणूस अपघाताने मरण पावला, तर त्याची दगडी प्रतिमा करून तिची पूजा करतात. [मुं. इ. जा.; वि. मुं. रा. प.; ट्रा. का. बॉं.]

महिष

एक जनपद. सांप्रतच्या म्हैसूर जिल्ह्यात हे जनपद होते. म्हैसूर हे नावही महिषवरूनच पडले असावे. आंध्र प्रदेशातील कोंडपूर व मस्की येथील उत्खननात मिळालेल्या काही नाण्यांवर महिष हे नाव आढळले आहे. ही नाणी इ. स. च्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या शतकातील असावी. म्हैसूरमध्ये सापडलेल्या शिलालेखांतही हे नाव सापडते. महिष हा एक प्राचीन राजवंश होता. जुन्या म्हैसूर संस्थानाचा उत्तर भाग महिष राजांच्या राज्यात मोडत होता. महिष म्हणजे रेडा हे त्या लोकांचे देवक असावे. त्यावरूनच त्या लोकांना महिष हे नाव मिळाले असावे.

महिष हे असुर म्हणून ओळखले जात होते, असे दिसते. महिषांची जी राजधानी ती महिष्मती किंवा माहिष्मती होय. या नावाची एक नगरी प्राचीन काळी दक्षिणेत तुंगभद्रेच्या खाली होती.

महिष लोक दक्षिणेप्रमाणेच उत्तरेतही पसरले असण्याचा संभव आहे. नर्मदेच्या तीरावरील माहिष्मती नगरीचे नाव तिला याच लोकांवरून मिळाले असेल. महिष ही विंध्य पर्वतातील एक जमात होती व त्यांचे राज्यही होते, असे ब्रह्म पुराण व वायू पुराण यांत म्हटले आहे (ब्रह्म ३. ७४. १८७; वायू ९९. ३८६).

या महिषांचा राजा महिषासुर होय. पौराणिक उल्लेखांत रेडा व असुर या दोन्ही कल्पना एकत्र संवलित झालेल्या दिसतात. महिषासुराचे चित्र किंवा मूर्ती यांत त्याचे अंग रेड्याचे व डोके असुराचे असते. [रा. ले. सं.; जॉ. ए. मे. इं.]

महिषघ्नीपूजा

एक काम्य व्रत. आषाढ शुद्ध अष्टमीला हे व्रत करतात. दुर्गा ही या व्रताची देवता आहे. तिनेच महिषासुराला मारले. या व्रतात तिला हळदमिश्रित पाण्याने स्नान घालून चंदनाचे गंध लावतात. आणि कापुराची आरती करतात. तूप–साखर घालून केलेल्या पदार्थांचा नैवेद्य दाखवतात. नंतर ब्राह्मण व कुमारिका यांना भोजन घालतात. तोपर्यंत व्रत करणाऱ्या व्यक्तीला उपवास असतो, तो त्यानंतर सोडायचा असतो. सायंकाळी दीपाराधना करतात. फल – सर्व इष्ट वस्तूंची प्राप्ती. [हि. ध.; व्र. प.]

महिषासुरमर्दिनी

महामायेचे एक रूप. या रूपात तिने महिषासुराला मारले, म्हणून तिचे नाव महिषासुरमर्दिनी असे पडले. हा महिषासुर रंभासुराचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुत्र होय. रंभासुराने तप करून शंकराला प्रसन्न केले आणि वर मागितला, की 'मी अपुत्र आहे; तेव्हा तू माझा पुत्र हो.' शंकराने 'तथास्तु' म्हटले. पुढे एके दिवशी रंभासुराला रस्त्यातून चाललेली एक सुंदर महिषी दिसली. तेव्हा त्याने तिला जवळ केले आणि तिच्या ठिकाणी आपले वीर्यस्थापन केले. योग्य वेळी तिला शंकराच्या अंशाने जो पुत्र झाला, तोच महिषासुर होय (कालिका पु. ६२).

महिषासुराने तप करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले. त्याने ब्रह्मदेवाजवळ वर मागितला, की 'मला पुरुषाकडून मृत्यू नसावा!' ब्रह्मदेवाने तो वर दिला. त्यायोगे उन्मत्त होऊन महिषासुर त्रैलोक्याला छळू लागला (दे. भा. ५.१६). अरुणाचलावर पार्वती तपश्चर्या करीत असता महिषासुर शिकारीसाठी तिथे पोचला. पार्वतीचे अप्रतिम सौंदर्य पाहून त्याला तिच्याविषयी अभिलाषा उत्पन्न झाली. एका वृद्ध अतिथीचे रूप घेऊन तो तिच्याकडे गेला आणि 'तू कशाकरिता तप करतेस?' असे त्याने तिला विचारले. ती म्हणाली. 'मी बलवान शंकरासाठी तप करीत आहे.' त्यावर महिषासुराने म्हटले. 'मी बलवान आहे. तेव्हा तू मला वर.' पार्वती म्हणाली 'तुझे बल मला दाखव.' महिषासुर त्या कामी प्रवृत्त झाला.

महिषासुरमर्दिनी– वेरूळ गुंफा

पार्वतीने त्याला युद्धाचे आव्हान दिले. मग त्या दोघांचे युद्ध झाले. त्यात पार्वतीने महिषासुराचा वध केला (स्कंद पु. १.३.१०.११). त्या दिवसापासून पार्वती ही महिषासुरमर्दिनी म्हणून प्रसिद्धी पावली.

ही देवी ब्रह्मा– विष्णु– महेशांच्या संघटित शक्तीतून निर्माण झाली, असे मत्स्य पुराणात म्हटले असून, ती सर्व देवांच्या अंशापासून उत्पन्न झाली, असे मार्कंडेय पुराणात सांगितले आहे. कालिका पुराणात हिच्या रूपाचे वर्णन आहे, ते असे –

जटाजूटसमायुक्तामर्धेन्दुकृतशेखराम् ।
लोचनत्रयसंयुक्तां पूर्णेन्दुसदृशाननाम् ॥
तप्तकाञ्चनवर्णाभां सुप्रतिष्ठां सुलोचनाम् ।
नवयौवनसम्पन्नां सर्वाभरणभूषिताम् ॥
सुचारुदशनां तीक्ष्णां पीनोन्नतपयोधराम् ।
त्रिभङ्गस्थानसंस्थानां महिषासुरमर्दिनीम् ॥

अर्थ– महिषासुरमर्दिनी ही मस्तकी जटाजूट बांधलेली, जटाजूटात अर्धचंद्र धारण करणारी, त्रिनेत्र, पूर्णचंद्राप्रमाणे मुख असलेली, तप्त सुवर्णाच्या वर्णाची, शोभन पद्धतीने बसलेली, सुलोचना, नवयौवनसंपन्न, सर्वाभरणभूषित, सुंदर दंतपंक्तींची, पुष्ट व उन्नत स्तन असलेली व त्रिभंग अवस्थेत उभी असलेली अशी आहे.

अभिलषितार्थचिंतामणीत हिची मूर्ती कशी असावी, ते पुढीलप्रमाणे सांगितले आहे– दशभुज. दहाही हातांत त्रिशूल, खड्ग, चक्र, बाण, शक्ती, खेटक, धनुष्य, पाश, अंकुश व परशु ही आयुधे. पायाखाली दडपलेला महिष म्हणजे रेडा, एका हातात त्या महिषाचे तोडलेले मस्तक, त्याच्या मानेत खुपसलेले त्रिशूल आणि उग्र व रौद्र चेहरा.

महिषासुरमर्दिनीची मंदिरे अनेक ठिकाणी आहेत. भुवनेश्वर येथील मंदिरातली मूर्ती उजवा पाय रेड्याच्या मस्तकावर ठेवून प्रत्यालीढ अवस्थेत उभी आहे. बादामी येथील मूर्तीचा तिचा भाला महिषाच्या मानेतून आरपार गेला असून, तिने महिषाचे शेपूट धरून त्याचा मागचा भाग उचलला आहे. हळेबीड येथील होयसळेश्वराच्या मंदिरावर जी महिषासुरमर्दिनीची मूर्ती कोरलेली आहे, ती अत्यंत सुंदर आहे. ती अष्टभुज असून, त्यांतल्या काही भुजा तुटून पडल्या आहेत. तिच्या उजव्या हातात परशू, खड्ग, चक्र व त्रिशूळ ही आयुधे असून डाव्या हातात धनुष्य आहे. डावा पाय महिषाच्या अंगावर ठेवलेला असून उजव्या पायावर भार देऊन तोल सांभाळला आहे. त्रिशूळ महिषाच्या छातीत रोवला आहे. ती नखशिखांत अलंकाराने मढलेली आहे. मस्तकावर नकशीदार मुकुट असून, गळ्यातली एक माळ गळ्याबरोबर असून, दुसरी स्तनांमधून पोटापर्यंत डौलदारपणे रुळत आहे. तिच्या बोटात अंगठ्या कोरून शिल्पकाराने आपल्या कसबाची परिसीमा गाठली आहे. विशिष्ट प्रकारच्या गोंडेदार कंबरपट्ट्याने कंबर व मांड्या यांची शोभा वाढविली आहे. तिला वस्त्र नेसविलेले नाही; तरीही अलंकारांच्या योजनेमुळे ती विवस्त्र वाटत नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मूर्तीचा चेहरा शांत व गंभीर आहे. कंबरेच्या बाकदारपणामुळे तिच्या उभे राहण्यात डौल आला आहे व लयही साधली आहे.

शारदीय नवरात्रात अष्टमीच्या दिवशी ज्या देवीची पूजा करतात व नवमीच्या दिवशी जिच्यासाठी होम व बलिदान करतात, ती देवी म्हणजे महिषासुरमर्दिनीच होय. दक्षिणेत काही ठिकाणी तिच्यासाठी रेडा बळी देण्याची पद्धत एके काळी होती. हा रेडा महिषासुराचा प्रतिनिधी म्हणूनच देवीपुढे मारला जात असे. [देवीकोश १; सह्याद्री जुलै १९६५]

महिषीदान कार्तिकी एकादशी, अयन संक्रांत, चतुर्दशी अथवा संक्रांती किंवा ग्रहण या वेळी महिषीदान करतात. विद्वान ब्राह्मणाला हे दान देतात. जिचे केवळ एकच वेत झालेले आहे, अशी बिनखोडीची म्हैस आणून तिची, 'यमस्वरूपायै महिष्यै नम:' या मंत्राने प्रार्थना करतात. नंतर तिची शिंगे व खूर अनुक्रमे सोन्याने व चांदीने मढवितात आणि तिला तांबड्या फुलांच्या माळा व वस्त्रे घालून, मग तिचे दान करतात. [दा. चं.]

महिसम्मा एक क्षुद्र देवता. महाराष्ट्रातल्या वऱ्हाड भागात हिची स्थाने आहेत. ही संसर्गजन्य रोगाची देवता आहे, असे मानतात. हिचा तांदळा गावाबाहेर असतो व त्याला शेंदूर फासलेला असतो. मराठा वर्गातला माणूस हिचा पुजारी असतो. गावात रोगाची साथ आली, की वर्गणी जमा करून हिची जत्रा भरवितात. या वेळी देवीला शंभर बकऱ्यांचा, दोन रेड्यांचा आणि डुकरांचा बळी देतात. गावाच्या चारही दिशांना चार डुकरे जिवंतपणी पुरतात. डुकरे पुरताना त्यांनी ओरडू नये म्हणून त्यांच्या तोंडात खैराच्या लाकडाच्या पाचरा मारतात. डुकराला पुरताना ते ओरडले, तर ते अशुभ मानतात आणि विधी निष्फळ झाला, असे समजतात. यात्रेच्या वेळी एक ओटा तयार करतात आणि त्यावर रेड्याचा बळी देतात. रेड्याचे मुंडके गावपाटलाच्या घरासमोर पुरतात. रेड्याच्या धडाचे मांस महार लोक वाटून घेतात. दुसरा रेडा बळी दिल्यावर तिथे जमलेले भक्त त्याच्या रक्तात काही दाणे (धान्य) भिजवून घेऊन ते शेतात फेकतात. असे केल्याने पीक चांगले येते, अशी भावना आहे. [देवीकोश ३]

महीचंद्र (इ. स. चे १७ वे शतक) एक जन मराठी कवी. लातूर येथील बलात्कारगण भट्टारक पीठावरील महत्त्वाच्या व्यक्तींत याची गणना करतात. विशालकीर्ती हा याचा गुरू होय. याने बरीच मोठी ग्रंथनिर्मिती केली आहे. त्यांतील काही ग्रंथांची नावे अशी – आदिनाथपुराण, सम्यक्त्व कौमुदी, नंदीश्वरकथा, गरुडपंचमीकथा, नेमिनाथभवांतर, इत्यादी. यांपैकी आदिनाथपुराण हा रसीला ग्रंथ पंधरा अध्यायांत विभागला असून तो कवीने आशापूर येथील शांतिनाथ चैत्यालयात बसून, लिहिला. या ग्रंथासाठी महीचंद्राने ब्रह्मजिनदासाच्या आदिनाथरासाचा आधार घेतला आहे. याची ओवीसंख्या १६८१ आहे. हा ग्रंथ मुळात संस्कृत भाषेत होता. महीचंद्राने त्याचे मराठीत रूपांतर केले आहे. ग्रंथात अनेक संस्कृत सुभाषिते आहेत. मूळचा संस्कृत ग्रंथ कोणाचा हे मात्र कवीने सांगितले नाही. याशिवाय महीचंद्राने काली–गौरीसंवाद या नावाची एक हिंदी रचनाही केली आहे.

महीचंद्राचा शिष्यपरिवार मोठा होता. महाकीर्ती, ब्रह्मचिंतामणी, रामकीर्ती, देवेंद्रकीर्ती, इ. अनेक लोक याचे शिष्य होते. [प्रा. म. जै. सा.]

महीदान एका गोचर्माएवढी किंवा त्याहून अधिक भूमी देणे याला महीदान असे म्हणतात. शंभर गाई व एक बैल यांना मोकळे सोडले असता त्यांना बसायला जेवढी जागा लागते, तेवढी भूमी किंवा दहा हात लांबीची काठी घेऊन तशा साठ काठ्या बसतील एवढ्या लांबी-रुंदीच्या जमिनीला गोचर्मभूमी म्हणतात. एवढ्या भूमीचे दान देणारा व घेणारा दोघेही प्रतिष्ठा पावतात, असे म्हटले आहे. [दा. चं.]

महींद्र व्यास महानुभाव पंथातील एक पंडित. याला महींद्रभट, म्हाइंभट किंवा महीभट्ट अशीही नावे होती. हा नगर जिल्ह्यातील सारोळे येथील एका श्रीमंत व विद्वान ब्राह्मणाचा मुलगा होता. मुंज झाल्यावर आपला मामा पंडित गणपती आपेया यांच्याकडे त्याने विद्याभ्यास केला व तो चांगला पंडित झाला. त्याची तीव्र बुद्धिमता पाहून गणपती आपेयाने आपली मुलगी देमांबा त्याला दिली. विवाहानंतर हा दक्षिण देशात जाऊन राहिला व तिथून अनेक सभा जिंकून व जयपत्रे मिळवून तो स्वदेशी परत आला. आपल्या अजिंक्यपदाचा त्याला एवढा गर्व झाला, की तो दिवसाही दिवटचा लावून रस्त्यातून जात असे. आकाशात प्रभाकर सूर्य व पृथ्वीवर मी विद्यासूर्य अशी प्रौढी तो मिरवू लागला. एकदा हा आपल्या मामाबरोबर देगावी निघाला असता, वाटेत चक्रधराची व याची गाठ पडली. त्या वेळी याने चक्रधराशी वादविवाद केला. पण या वादात महींद्रभटाचा पराजय होऊन तो निरुत्तर झाला. तेव्हा त्याने चक्रधराचे पाय धरले व त्याची उपदेशदीक्षा घेऊन तो त्याच्या जवळ राहू लागला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रा. वसंत जोशी यांनी मात्र महींद्रभटाने चक्रधराचे शिष्यत्व न स्वीकारता गोविंदप्रभूचे शिष्यत्व स्वीकारले होते, असे म्हटले आहे.

गोविंदप्रभूची सेवा महींद्रभटाने मोठ्या भक्तीने आणि एकनिष्ठेने केली. गोविंदप्रभू वेळी अवेळी कोणताही पदार्थ किंवा फळे मागे आणि महींद्रभट कोणत्याही मार्गाचा अवलंब करून त्याची ती इच्छा पुरी करी.

महींद्रभटाला चक्रधर आणि गोविंदप्रभू या दोघांचाही सहवास लाभला होता. त्यांच्या निधनानंतर त्याने त्यांच्या स्मृतींचे संकलन करण्याचे ठरविले. या आठवणी जमा करण्यासाठी तो अनेक व्यक्तींना भेटला. त्यासाठी त्याला खूप हिंडावे लागले. गोळा केलेल्या आठवणींना अधिकृत स्वरूप यावे, यासाठी त्याने नागदेवाचार्यांचे साहाय्य घेतले. चक्रधराच्या मुखीचे निश्चित शब्द कोणते, ते नागदेवाचार्यांनी त्याला सांगितले. अशा प्रकारे काम करून महींद्रभटाने त्या लीळाचरित्राचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन विभाग केले. या दृष्टीने महींद्रभट हा मराठीचा आद्य संशोधक, संपादक आणि चरित्रकार होता, असे म्हणता येईल. याशिवाय, त्याने स्मृतिस्थळ व गोविंदप्रभुचरित्र या नावाचेही दोन ग्रंथ लिहिले आहेत. त्याने रचलेल्या दहा आरत्या जतीचा दशकू या नावाने महानुभाव पंथात प्रसिद्ध आहेत. [म. म. वा.; म. सा.; प्रा. वसंत स. जोशी—नवभारत, डिसें. १९६५]

महीधर

(इ. स. चे १६ वे शतक) एक संस्कृत ग्रंथकार. हा महीदास किंवा भूदास या अन्य नावांनीही प्रसिद्ध आहे. हा काशीनिवासी, वत्सगोत्रीय ब्राह्मण होता. याचा वेदशास्त्राप्रमाणे तंत्रशास्त्रावरही मोठा अधिकार होता. आणि तरीही हा रामभक्त म्हणून प्रसिद्ध होता.

महीधर काशी-निवासी असला, तरी त्याची मूलभूमी अहिच्छत्रा ही होती. उत्तर प्रदेशात मुरादाबाद जिल्ह्यातील रामनगर म्हणजे अहिच्छत्रा असे काहीजण मानतात; परंतु हे रामनगर पंजाब प्रदेशात आहे, असेही काहींचे मत आहे.

वेददीप हा याचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ होय. हा ग्रंथ म्हणजे शुक्ल यजुर्वेदाच्या वाजसनेयी शाखेवरचे विस्तृत भाष्य आहे. यात त्याने यज्ञप्रक्रियेचे सुबोध पद्धतीने विवेचन केले आहे. या ग्रंथाच्या बाबतीत तो उव्वट या भाष्यकाराचे ऋण मान्य करतो. याव्यतिरिक्त याचे चरणव्यूहटीका, कात्यायनशुल्बसूत्रटीका, पुरुषसूक्तटीका, मंत्रनिघंटू, इ. अनेक ग्रंथ आहेत.

बृहज्जातकटिप्पण, लीलावती-टीकाविवरण, वर्षफल—पद्धती, ताजिकमणी व मणित्थ, हे त्याचे ज्योतिषविषयक ग्रंथ होत.

महीधराप्रमाणे त्याचे वंशजही ग्रंथकार झाले. महीधराचे आणि त्याच्या वंशजांचे हस्तलिखित ग्रंथ वाराणसीच्या संस्कृत महाविद्यालयात आहेत. [वै. सा.; का. सा. सा.; म. च. को.; क्रि. स्ट. का. शु. प्रा.; तं. स्ट. रि. लि.]

मही नदी

गुजरात प्रदेशातील एक नदी. विंध्यपर्वताचा ए[क] फाटा ज्या ठिकाणी अरवली पर्वताला मिळ[तो] त्या ठिकाणी ही नदी उगम पावते. हिच्या एका शाखेचा उ[गम] माळव्यातील अमझेरा टेकडीवरील मेहद तलावातून झा[ला] आहे. हिच्या काठावर नवनाथ, चौऱ्यायंशी सिद्ध आणि अ[नेक] देवता यांची स्थाने आहेत. या देवतांमध्ये शत्रुघ्नी मा[तेचे] माहात्म्य मोठे आहे. हिला चारही युगांची देवता मानतात. हिचे मंदिर कराराजवळ आहे. धारनाथपासून या मंदिरापर्यंत[च्या] महीच्या प्रवाहाला गुप्ततीर्थ म्हणतात. रविवारी या नदीत स्नान करणे पुण्यदायक मानतात. श्रावण महिन्यात व[...] शिवरात्रीला इथे मोठ्या स्नानयात्रा भरतात. इथल्या शत्रु[घ्नी] मातेची स्थापना मयूरध्वज राजाने केली असे समजतात. [या] नदीचा उल्लेख महाभारतातही आहे (वन. २२२.३३).

महीच्या तीरावरील मिग्रड, कजिलपूर, अंगद व मलपूर [ही] चार ठिकाणे कोळी लोक फार पवित्र मानतात. चैत्र [...] पौर्णिमेला या सर्व ठिकाणी यात्रा भरते. इथले लोक म[हीला] मातेसमान मानतात व स्वतःचे निर्दोषत्व सिद्ध करण्या[साठी] हिची शपथ घेतात.

ही नदी खंबायतजवळ समुद्राला मिळते. त्या स्थाना[ला] महीसागरसंगम असे नाव आहे. ते एक पवित्र तीर्थक्षेत्र मा[नले] जाते. [हि. ध.; वि. मुं. रा. प.; कल्याण—तीर्थांक]

महीपतिदास

(१६११—१६८१ इ.स.) एक कन्नड सं[त] याचा जन्म विजापूर येथे झाला. कोल्ह[...] प्रल्हाद कृष्णाचार्य हे त्याच्या घराण्याचे कुलगुरू होते. [...] वडिलांचे नाव कोजेरीराव असे होते. उपनयन झाल्यावर [मही]पतिदासाने वेद, उपनिषदे, भारत, भागवत, इ. संस्कृत ग्रं[थांचे] अध्ययन केले. पुढे फिरत फिरत तो ऐगळी गावी गेला. [...] तिथल्या करणिकाने आपली कन्या त्याला दिली. तिच्या[पासून] त्याला एक मुलगा झाला. त्या मायलेकरांना तिथेच ठेवून [मही]पतिदास परत विजापुरास आला.

त्या काळी महमद आदिलशाह हा विजापूरच्या ग[ादीवर] होता. तिथल्या बालेकिल्ल्यात नृसिंहाचे मंदिर होते. त्यामं[दिरात] महीपतिदासाने नित्य प्रवचने सुरू केली. तो बहुभाषी [...] अनेक भाषांतून तो प्रवचने करू शकत असे. आदिल[शाहाचा] खवासखान नावाचा एक सरदार होता. त्याने नृसिंहमंदि[र]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ती गर्दी पाहिली. जिज्ञासा म्हणून तो तिथे गेला व तेथे चाललेले प्रवचन त्याने ऐकले. त्याला ते आवडले. त्याने महीपतिदासाला आपल्या वाड्यात प्रवचनासाठी बोलावले. तो तिथे अस्खलित फारसी भाषेत वेदान्त सांगू लागला. खवासखानाची त्याच्यावर मर्जी बसली. त्याने महीपतिदासाला आपल्या खजिन्यावर खजिनदार नेमले. त्याच सुमारास कलबुर्गीच्या देशमुखाने आपली मुलगी तिम्मव्वा ही त्याला दिली. महीपतिदासाचे हे दुसरे लग्न होते. हळूहळू त्याची कीर्ती वाढत गेली. मग महमद आदिलशहाने त्याला आपला दिवाण म्हणून नेमून घेतले. दिवाणकी करीत असतानाही तो आदिलशहाच्या जनानखान्यात प्रवचने करीत असे.

पुढे योगायोगाने शानुंग नावाच्या एका मुसलमान साधूची आणि त्याची गाठ पडली. शानुंगाला वाक्‌सिद्धी होती, असे म्हणतात. त्याचा महीपतिदासावर खूप प्रभाव पडला; पण शानुंगाने त्याला आपला शिष्य न बनविता भास्करस्वामी नावाच्या एका सिद्ध सत्पुरुषाकडे पाठविले. त्याच्या दर्शनासाठी महीपतिदास सारवाड गावी गेला. भास्करस्वामीने त्याला ज्ञानबोध केला. गुरूच्या सहवासात महीपतिदासाने थोड्याच काळात अनेक योगसिद्धी प्राप्त करून घेतल्या.

महीपतिदासाने तिथून पुढे गुलबर्गा जिल्ह्यातील शहापूरला जाऊन तिथे तीन वर्षे वास्तव्य केले. तिथे त्याने एका मारुतीची स्थापना केली. तिथे ज्या टेकडीवर तो तपाला बसे, त्या टेकडीला महीपतिटेकडी म्हणून लोक ओळखू लागले. पुढे शहापुराहून तो काखंडकी गावी जाऊन राहिला. तिथे अनेक भक्त व शिष्य त्याच्याभोवती गोळा झाले. तुम्ही आपला योगक्षेम कसा चालविता, असे एका शिष्याने विचारताच महीपतिदासाने त्याला ज्या एका पद्यात उत्तर दिले, ते पद्य असे –

संसार चिंतेयु स्वामि श्रीहरि गुंटु ।
कंसारि कृष्ण करुणिसुव इदरिट्टु ।। ध्रु. ।।
बुत्तायतव माडि होत्तु नडेसुव पडेय ।
मत्तु चिंतिसलेके हत्तु कडेय ?
भक्त वत्सल स्वामि चिंतायकेन्नोडुव ।
नित्य नडसुव ग्रास भक्त रोडेय ।। १ ।।
आने मोदलिरिवे कडेता नडसु तिरल्लिक्के ।
जनकोट्टि कैयना दणियलेके ।
अनुदिन हरिवाक्य अनुभविसु तिरल्लिक्के ।
अनुमान विडिदु ना हेणगलेके ? ।। २ ।।
भारवहिसि कोंडिरलु नारपित परिपूर्ण ।
सारांशनित्तु वरकृपेय ज्ञान ।
आर हगवेनगेके । दोरुतिव निधान ।
तरक महीपति पोरेव गुरु करुण ।। ३ ।।

भावार्थ– माझ्या संसाराची चिंता श्रीहरीला आहे. तो मजवर कृपा करतो. आयते घास देऊन तो माझा योगक्षेम चालवतो. त्यामुळे बाहेर दहा घरे हिंडण्यांची चिंता मला नाही. तो भक्तवत्सल माझा रोजचा ग्रास मला देतो. मुंगीपासून हत्तीपर्यंत सर्वांचा योगक्षेम प्रभू चालवीत असता दहा लोकांच्या पुढे हात पसरण्याचे मला मुळी कारणच काय ?

महीपतिदासाला दोन मुलगे होते. त्याने कार्तिक अमावास्येला आपली इहलोकीची यात्रा संपविली. काखंडकीस एका शमीवृक्षाखाली त्याची समाधी बांधलेली आहे. दर वर्षी तेथे उत्सव होतो. महीपतिदास द्वैती असला, तरी त्याने इतर मतांचा अनादर केला नाही. [वि. के. कुलकर्णी–पुरुषार्थ, नोव्हें-डिसें. १९६५]

महीपती (१७१५ ते १७९० इ. स.) एक सत्पुरुष व मराठी संतचरित्रकार. नगर जिल्ह्यात ताहराबाद नावाचे एक गाव आहे, ते महीपतीचे जन्मस्थान होय. हा ऋग्वेदी वासिष्ठगोत्री देशस्थ ब्राह्मण होता. याचे आडनाव कांबळे, वडिलांचे नाव दादोपंत व आईचे गंगाबाई असे होते. या दंपतीने पंढरीची वारी धरली होती. दादोपंताला बराच काल पुत्र-संतान झाले नाही. त्यासाठी तो झुरत असता पांडुरंगाच्या कृपेने त्याला वयाची साठी उलटल्यावर एक पुत्र झाला. त्याचे नाव त्यांनी महीपती ठेवले.

महीपती रूपाने सुरेख व बांध्याने सुदृढ होता. लहानपणी तो बराच खोडकर होता. त्या मुळे आणि ताहराबाद हे गाव अगदीच लहान व एका बाजूस असल्यामुळे त्याला शिक्षणाचा फारसा लाभ झाला नाही. यावद्दल तो स्वतःच म्हणतो-

म्यां नाहीं पाहिला अमरकोश । गीर्वाणभाषा तीहि निःशेष ।
नाना पुराणें विशेष । श्रवण सायासें न केलीं कीं ।।

पण तरीही महीपतीने संस्कृत भाषेचे जुजबी ज्ञान करून घेतले होते. मोरोबा तांभेरकर नावाच्या एका सत्पुरुषाकडे त्याचे हे शिक्षण झाले. त्याला गुजराती, कानडी व हिंदी याही भाषा अवगत होत्या. त्याचे हस्ताक्षरही चांगले होते.

वडिलांबरोबरच तोही पंढरीची वारी करू लागला होता. त्याचे वडील त्याच्या सोळाव्या वर्षीच निवर्तले. त्यामुळे संसाराचा भार त्याच्यावरच येऊन पडला. चरितार्थासाठी त्याने गावातच कुळकर्णपणाची वृत्ती स्वीकारली. ताहराबाद हे गाव एका मुसलमानाला जहागीर म्हणून मिळाले होते. महीपतीला कामासाठी रोज जहागीरदाराच्या कचेरीत जावे लागे. एके दिवशी काम आटोपून परत आल्यावर तो स्नानसंध्येच्या आह्निकात गुंतला असता, त्याला जहागीरदाराचे बोलावणे आले. देव-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूजा आटोपून येतो, असा त्याने निरोप पाठविला. पण 'असाल तसे या' असा पुन्हा त्याला निरोप आला. महीपती कचेरीत गेला. त्याने जहागीरदाराचे करायचे ते काम केले. परत आल्यावर त्याच्या मनाने घेतले, की दोन धन्यांची चाकरी आपल्या हातून होणार नाही; तेव्हा यवनसेवेपेक्षा विठ्ठलाची चाकरी करावी हे बरे. निर्धार पक्का झाला आणि त्याने आपली लेखणी विठ्ठल मूर्तीच्या पायी ठेवली. तो भजन पूजनाच्या मार्गाला लागला 'आपल्या वंशात सात पिढ्या सरकारी नोकरी करू नये; केल्यास तो निपुत्रिक राहील' असेही त्याने निर्धारवचन उच्चारले. तीन-चार पिढ्या त्याच्या वंशजांनी त्याची आज्ञा पाळली.

महीपती

महीपती ईश्वरभजनात निमग्न असता काही ग्रंथरचना करण्याचे त्याच्या मनात आले. त्या विचारात असता 'तू संत-चरित्रे वर्णन कर' असा त्याला तुकोबाचा स्वप्नदृष्टांत झाला. या वेळी महीपती पन्नाशीच्या घरात आला होता. त्याच्या आधी नाभाजी व उद्धव चिद्‌घन यांनी बरीच संतचरित्रे वर्णिली होती. महीपतीने ती वाचली आणि त्यांच्या आधारेच भक्त-विजय लिहायला प्रारंभ केला. पुढे नामदेव, ज्ञानेश्वर, इ. कवींच्या चरित्रांपर्यंत आल्यावर त्याला कळले, की नाभाजीने दिली आहे त्यापेक्षा कितीतरी जास्त व भिन्न माहिती महाराष्ट्रात ज्ञाने-श्वरादी संतांविषयी उपलब्ध आहे. म्हणून त्याने नाभाजीचा मागोवा सोडला आणि इकडील ग्रंथांच्या आधारे ती चरित्रे लिहिली. काही अध्याय त्याने नामदेवाच्या तीर्थावळीवरून रचले. पुढे काही अध्यायांत महाराष्ट्रातील संतांची चरित्रे सांगितली. मग पुनश्च तो नाभाजीकडे बळला. पुनश्च काही चरित्रे त्याने नाभाजीच्या ग्रंथांवरून घेतली. तुकारामाच्या चरित्राची माहिती त्याने कोणत्याही ग्रंथाच्या आधारे न घेता ती प्रत्यक्ष त्याच्या वंशजांकडून मिळविली. भक्तविजयामधले तुकारामचरित्र त्याच्या सर्व चरित्रांत सरस उतरले आहे. तुकारामानंतर बोधलेबुवा, गणेशनाथ, उद्धव चिद्‌घन व शेवटी विसोबा सराफ यांचे चरित्र सांगून महीपतीने आपला भक्तविजय ग्रंथ पुरा केला.

त्यानंतर कथासारामृत नावाचा ग्रंथ रचून त्याने कित्येक व्रते आणि व्रतकथा वर्णिल्या. त्यांसाठी त्याने पद्म पुराण व स्कंद पुराण यांचा आधार घेतला. मात्र भाषेच्या व सौरस्याच्या मानाने हा ग्रंथ अगदी साधारण आहे, असे वि. ल. भावे म्हणतात.

· पांडुरंगमाहात्म्य हा ग्रंथ त्याने शिवपार्वती-संवादरूपाने लिहिला असून, त्यात पंढरपूर, त्याच्या परिसरातली क्षेत्रे व चंद्रभागा यांच्या कथा चित्तवेधकपणे सांगितल्या आहेत. त्यानंतर त्याने भक्तलीलामृत व संतलीलामृत असे आणखी दोन ग्रंथ लिहिले. पैकी दुसरा अपूर्ण राहिला आहे. वयाच्या ७५व्या वर्षापर्यंत त्याने हा प्रदीर्घ लेखनोद्योग केला. त्याच्या ग्रंथांची नावे अशी:

(१)	भक्तविजय	अध्याय	५७	ओव्या	९९१६
(२)	संतलीलामृत	,,	३५	,,	५२५९
(३)	भक्तलीलामृत	,,	५१	,,	१०७९४
(४)	संतविजय	,,	२६	,,	४६२८
(५)	कथासारामृत	,,	३६	,,	७२००
(६)	पांडुरंगमाहात्म्य	,,	१२	,,	

याशिवाय त्याने काही स्फुट प्रकरणे लिहिली आहेत, ती अशी: (१) पंढरीमाहात्म्य (२) अनंतव्रतकथा (३) दत्तात्रेयजन्म (४) तुळशीमाहात्म्य (५) गणेशपुराण (६) पांडुरंगस्तोत्र (७) मुक्ताभरणकथा (८) ऋषिपंचमीमाहात्म्य व (९) अपराधनिवेदनस्तोत्र

याचे अभंग, आरत्या, पदे, सारांश ज्ञानेश्वरी, इ. वाङ्मय अजून अप्रकाशित आहे, असे श्रीबळवंतसुत म्हणतात.

महीपतीचे सर्वच ग्रंथ ऐतिहासिक दृष्ट्या विश्वसनीय नाहीत, असे काही विद्वानांचे मत आहे. श्री. ह. श्री. शेणोलीकर लिहितात – 'व्यक्तिचित्रणातही त्यांचे असे खास वैशिष्ट्य काही दिसत नाही. विभूतिपूजक वृत्तीनेच सर्व संतांचे माहात्म्य सारख्याच भक्तिभावाने ते वर्णितात. चमत्कारांचे भारूड रचून त्या त्या व्यक्तीभोवती दैवी वलय त्यांनी निर्माण केले आहे. स्थलकालपरिस्थिती वगैरेंच्या माहितीबाबतचा बारकावा महीपतींच्या भावांच्या चरित्रग्रंथांप्रमाणे महीपतीच्या ग्रंथांत सापडत नाही.'

वृद्धावस्थेत पंढरीच्या वारीला जात असता त्याच्यावर एक प्रसंग गुदरला, त्याची हकीगत कळविणारे एक पत्र त्याने पांडुरंगाला लिहिले आहे, ते असे–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जयजय क्षीराब्धिवासा अनंता । अनंतशायी मायातीता ।
भक्तवत्सल पंढरीनाथा । रुक्मिणीकांता श्री विठ्ठला ।।१।।
सेवेसी विज्ञापना ऐसी । येत होतो पंढरीशी ।
पांच कोश प्रथम दिवशी । नांदुरग्रामीं पातलो ।।२।।
एक रात्र क्रमोनी तेथ । प्रातःकाळीं उठलों त्वरित ।
तो अश्वावरोनि अकस्मात । ग्रामद्वारांत पडियेलों ।।३।।
तेणें देहदुःखें करून । विकळ मूर्छित पडिलो जाण ।
तों नामधारक यात्रेंतून । आला धांवून सन्निध ।।४।।
त्यांनी संबुखितां मजकारणें । यास्तव देहीं परतले प्राण ।
चित्तास प्रतीती आली गहन । अगाध महिमान संताचे ।।५।।
मग इष्टमित्र आप्तविषयाही । डोली करोनी आणिले गांवी ।
परी चित्तवृत्ती विठाबाई । तुझे पायी लागली ।।६।।
त्रितापाचे विस्तार किती । पत्रीं लिहावें तुजप्रति ।
तरी शरीरी नाही शक्ति । लेखणी हाती धरवेना ।।७।।
अंतरसाक्ष चैतन्यघन । जाणशी जिवाची निज खूण ।
परी मी आर्ष म्हणवोन । तुजकारणे लिहिले ।।८।।
आतां शेवटील हेत आहे साचा । संबंध तोडी या देहाचा ।
ठाव इच्छितसे पायाचा । आणीक वाचा न बोले ।।९।।
मागें भक्तासि पावलासी अंती । तें यथार्थ करी रुक्मिणीपती ।
दासानुदास महिपती । सेवेसी विनंती करीत ।।१० ।।

महीपतीच्या पत्नीचे नाव सरस्वती असे होते. त्याला विठ्ठल व नारायण असे दोन पुत्र होते. महीपती जेवढा विरक्त होता तेवढाच उदारही होता. त्याच्या हयातीत महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. त्या वेळी त्याने आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवून ते गोरगरिबांकडन लुटविले. दर तीन वर्षांनी अशा प्रकारे तो आपला संसार लुटवीत असे, अशीही आख्यायिका आहे. त्याने ताहराबाद येथे अयाचित वृत्तीने एक विठ्ठलमंदिरही बांधले. ताहराबाद येथेच त्याचा मृत्यू झाला. त्याच्या दहनस्थानी आनंदराव सटवाजी सेकदार याने त्याची समाधी बांधली आहे. त्याच्या दोन्ही मुलांच्या समाध्याही त्याच्या दोहो बाजूंस बांधल्या गेल्या आहेत. [म. सा.; पुरुषार्थ, जून-जुलै १९६४]

महीपा (इ. स. चे ९ वे शतक) चौऱ्यायंशी सिद्धांपैकी एक. हा महीधरपा किंवा महिलपा म्हणूनही ओळखला जातो. मगध देशातील एका शूद्र कुळात याचा जन्म झाला. याचा सत्संगाकडे ओढा असल्यामुळे याने कण्हपाचे शिष्यत्व पत्करले. तिबेटातल्या तंजूर ग्रंथालयात याचा वायुतत्त्व दोहागीतिका नामक एक ग्रंथ आहे. या ग्रंथाची भाषा अपभ्रंश किंवा हिंदी आहे. चर्यागीतामध्येही याचे एक गीत आढळते [पु. त. नि.; सि. सा.; हिं. सा. बि.]

महीशासक एक बौद्ध निकाय. इत्सिंगाच्या मते बौद्धांचे अठरा निकाय हे पुढील चार प्रधान निकायांमध्ये समाविष्ट झाले आहेत–(१) आर्य महासांघिक (२) आर्य स्थविर (३) आर्य मूलसर्वास्तिवादी व (४) सम्मितीय. इत्सिंग पुढे म्हणतो, की महासांघिकांचे सात, स्थविरांचे तीन मूलसर्वास्तिवाद्यांचे चार व सम्मितीयांचे चार मिळून बौद्धांचे १८ निकाय बनतात. त्यांपैकी महीशासक हा विभाग मूळसर्वास्तिवाद्यांच्या चार विभागांमध्ये तिसरा येतो.



महीपा

मात्र या निकायासंबंधी मतभेद बरेच आहेत. दीपवंश व महावंश यांच्या मते महीशासकांची उत्पत्ती स्थविरवादातून झालेली आहे. पाली वाङ्मयातून कळते, की वण्णिपुत्तकांच्या बरोबर महीशासक हे स्थविरवाद्यांपासून अलग झाले आणि त्यांच्यांतून पुढे सर्वास्तिवाद निघाला. वसुमित्र याच्या उलट सांगतो, की हा निकाय सर्वास्तिवाद्यांपासून निघाला. स्थविर निकाय दक्षिणेत पसरला व पुढे लंकेतही पोचला. महीशासकांनीही तेवढे क्षेत्र व्यापले होते. पण त्यांचे पूर्वस्थान माहिष्मती हे होते. बौद्धांच्या दुसऱ्या संगीतीच्या वर्णनावरून माहिष्मती येथे एक प्रसिद्ध बौद्ध संघ होता, असे कळते. काही विद्वान म्हणतात, की माहिष्मती वरूनच महीशासक हे नाव पडले.

थेरवाद्यांच्या प्रमाणेच प्रारंभिक महीशासकही चार आर्यसत्यांच्या ज्ञानावर विश्वास ठेवीत होते. गत नाही, अगत नाही, केवळ वर्तमान आहे आणि नऊ असंस्कृत धर्म आहेत, असे ते मानीत. ते पुढे म्हणतात– अर्हत मागे फिरून येत नाही. फक्त स्त्रोतापन्न या पहिल्या भूमिकेवर जे असतात, तेच तेवढे परत येतात. कोणताही देव पवित्र जीवन चालवू शकत नाही. अंतराभव अर्थात चालू जन्म आणि पुढचा जन्म यांच्या मधली कोणतीही स्थिती असत नाही. सम्यक वाचा, सम्यक क्रिया व सम्यक जीवन ही खरे तत्त्वे नाहीत. कारण त्या मानसिक दशा नव्हेत. दिव्यमार्गातून त्यांना काढून टाकले पाहिजे. पण महीशासकांचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे मत पुढच्या महीशासकांनी अमान्य केले. सर्वास्तिवाद्यांप्रमाणे तेही गत, अगत व अंतराभव यांवर विश्वास ठेवू लागले. [बौ. घ. द.; आजकल, वार्षिक अंक, डिसेंबर १९५६]

महेंद्र बौद्ध धर्माचा एक प्रचारक. हा सम्राट अशोकाचा पुत्र होता, असे काही लोक मानतात; तर उत्तरेकडील बौद्ध दंतकथा व काही पाश्चात्य विद्वान त्याला अशोकाचा भाऊ मानतात. सनपूर्व २८५ च्या सुमारास बिंदुसाराने अशोकाला उज्जयिनीचा उपराज नेमले होते. त्या कामगिरीसाठी अशोक पाटलिपुत्राहून उज्जयिनीला जात असता वाटेत विदिशा नगरीतील असंघिमित्रा नामक एका श्रेष्ठिकन्येशी त्याने विवाह केला. तिच्यापासून अशोकाला महेंद्र व संघमित्रा ही दोन अपत्ये झाली.

सनपूर्व २६४ मध्ये पाटलिपुत्र नगरात बौद्ध भिक्षूंची तृतीय संगीती भरली होती. तिच्यात बौद्ध धर्माचा प्रचार करण्यासाठी अबौद्ध देशांत धर्मप्रचारक पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार अशोकाने सिंहल किंवा ताम्रपर्णी देशात जे प्रतिनिधिमंडळ पाठवले, त्याचा महेंद्र हा प्रमुख होता. तिकडे जाण्यापूर्वी महेंद्र आपल्या मातेला भेटण्यासाठी विदिशेला गेला. तिथे तिनेच बांधलेल्या एका भव्य विहारात त्याने मुक्काम केला होता.

महेंद्र तिथून दक्षिण भारतात गेला व कावेरीच्या तीरावर त्याने एक विहार बांधला. नंतर तो चार भिक्षूंसह ताम्रपर्णी देशात गेला. तियला राजा ' देवानां प्रिय ' तिष्य याने त्याचे चांगले स्वागत केले. महेंद्राने राजाला व त्याच्या अनुचरांना बौद्ध धर्माच्या तत्त्वांचा उपदेश केला. त्याच्या उपदेशाने प्रभावित होऊन राजाने आपल्या चार हजार प्रजाजनांसह बौद्ध धर्माचा स्वीकार केला. नंतरच्या काळात ताम्रपर्णी देशात बौद्ध धर्माचा प्रसार झपाट्याने झाला. हजारो लोक भिक्षू बनून संघात दाखल झाले. त्यांच्यासाठी अनेक मठ व विहार बांधण्यात आले. राजाने महेंद्रासाठी एक विहार बांधून दिला, त्याला महाविहार असे नाव होते.

राजकन्या अनुला हिनेही पाचशे स्त्रियांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेण्याची इच्छा प्रकट केली. परंतु स्त्रियाच स्त्रियांना दीक्षा देऊ शकत असल्यामुळे, प्रसिद्ध भिक्षुणींना ताम्रपर्णी देशात पाठविण्याची विनंती अशोकाकडे करण्यात आली. राजाने त्याप्रमाणे आपली कन्या संघमित्रा हिला तिकडे पाठवले. तिच्या बरोबर राजाने बोधिवृक्षाची एक शाखाही पाठवली. अनुराधपूर नगरात ती शाखा जमिनीत पुरण्यात आली. तिच्यापासून झालेला वृक्ष अजूनही तिथे विद्यमान आहे. राजकन्या अनुला हिने आपल्या पाचशे स्त्रियांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. संघमित्रेसाठी राजाने एक स्त्रीविहार बांधून दिला.

महेंद्र व संघमित्रा यांच्या हयातीतच सारा ताम्रपर्णी देश बौद्धधर्मी बनला. महेंद्र नव्वद वर्षांचा होऊन चैत्य पर्वतावर (मिहिंत्तले) निधन पावला आणि संघमित्राही ७९ वर्षांची होऊन ताम्रपर्णी देशातच मरण पावली. [वि. स्मृ. ग्रं.; भा. च. को.; भा. इ. रू.; आजकल, वार्षिक अंक, डिसेंबर १९५६; आजकल, ऑगस्ट १९६१]

महेंद्रगिरी एक पवित्र पर्वत. याची सप्त कुलपर्वतांत गणना होते. परंतु या पर्वताची स्थाननिश्चिती मात्र करता येत नाही. ओडिसामध्ये महानदीकाठी हा पर्वत आहे, असे एक मत आहे; तर दक्षिणेत सह्याद्रीच्या एका टोकाला तिरुवितांकुर (त्रिवांकुर) जिल्ह्यात हा डोंगर आहे, असे दुसरे मत आहे. पार्जिटरच्या मते महेंद्राचल हे नाव महानदी, गोदावरी व वेनगंगा या नद्यांमधील टेकड्यांनाच फक्त लागू आहे. हा पर्वत मलयाचलाला भिडलेला आहे, असे हर्षचरित्रात म्हटले आहे. कालिदासाने कलिंगाच्या राजाला महेंद्राधिपती असे म्हणून या पर्वताचा उल्लेख केला आहे.

रामायणात याची विपुल माहिती मिळते. अगस्त्य मुनींनी समुद्रामध्ये या पर्वताची स्थापना केली. हा सुंदर व भव्य पर्वत सुवर्णमय असून, त्याची एक बाजू समुद्रात गेलेली आहे. या पर्वतावर श्रेष्ठ देव, ऋषी, यक्ष व अप्सरा राहतात. प्रत्येक पर्वदिवशी इंद्र इथे येत असतो (४.४१). परशुरामाने कश्यपाच्या हातावर पृथ्वीचे उदक सोडल्यावर तो इथेच येऊन राहिला होता. रामचंद्राने शिवधनुष्याचा भंग केल्याची वार्ता ऐकल्यावर त्याची परीक्षा घेण्यासाठी परशुराम या पर्वतावरून रामापुढे आला होता (१.७५) व नंतर पराजित होऊन तो इथेच परतला (१.७६). हनुमान या पर्वतावरूनच सीताशोधार्थ लंकेत गेला होता (५.१).

या पर्वतावर कुंती, धर्म व भीम यांची मंदिरे आहेत. कुंतीच्या मंदिरालाच गोकर्णेश्वरमंदिर असे म्हणतात. परशुरामाची निवासभूमी म्हणून हा पर्वत प्रसिद्ध आहे. [कल्याण–तीर्थांक; हि. जॉ. ए. इं.; हि. ध.; वा. रा. को.; प. च.]

महेंद्रसूरी (इ. स. चे १४ वे शतक) एक प्रसिद्ध ज्योतिषी. हा फीरूजशाह बादशहाच्या पदरी मुख्य ज्योतिषी होता. याच्या गुरूचे नाव मदनसूरी असे होते. हा जैन असावा असे वाटते. यंत्रराज नामक एक ग्रंथ याने रचला आहे. हा ग्रंथ गणिताध्याय, यंत्रघटनाध्याय, यंत्ररचनाध्याय, यंत्रशोधनाध्याय व यंत्रविचारणाध्याय या पाच अध्यायांत विभागलेला आहे. या ग्रंथाच्या साह्याने सूर्यग्रहताऱ्यांचे उन्नतांश, भोग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दोन खस्यांमधील अंशात्मक अंतर, स्थळांचे अक्षांश, तसेच काल, दिनमान, इ. गोष्टी वेधाने काढता येतात. महेंद्राने त्रिज्या ३६०० व परमक्रांती २३।३५ मानली आहे; प्रत्यंशाची भुज्या, क्रांती आणि द्युज्या यांच्या सारण्या दिल्या आहेत; सप्तांगुल शंकूची छाया एकपासून नव्वदपर्यंत दिली आहे; त्याचप्रमाणे वेधोपयोगी बत्तीस तारांचे सायन भोगशर दिले असून, अयनवर्षगती चौपन्न विकला सांगितली आहे.

महेंद्राच्या या ग्रंथावर मलयेंदुसूरीची व यज्ञेश्वराची टीका आहे. महेंद्रसूरीने दिलेले नक्षत्रपत्रक हे टॉलेमीचे आहे, असे श्री. शं. बा. दीक्षित यांचे मत आहे. श्री सुधाकर द्विवेदी यांच्या मतानुसार हा ग्रंथ कदाचित कोण्या फारसी ग्रंथाचा अनुवाद असावा. [भा. ज्यो. शा.; भा. ज्यो. इ.]

महेनी देवत्व पावलेली एक ब्राह्मणकन्या. उत्तर प्रदेशातल्या गाझीपूर जिल्ह्यातील ह्योबान गोत्री राजपूत स्त्रिया हिला भजतात. इ. स. १५२८ मध्ये राजा भोपतदेवाने अथवा त्याच्या मुलाने महेनीला भ्रष्ट केले, असे सांगतात. त्यावर तिने स्वतःला जाळून घेतले. त्या वेळी तिने राजाला कुलक्षयाचा शाप दिला. त्यामुळे राजाचे घराणे नष्ट झाले, असे समजतात. बलीया येथे महेनीची समाधी आहे. हिला पुरुष भजत नाहीत किंवा तिच्या समाधीकडे जातही नाहीत. [पॉ. रि. फो. नॉ. इं.]

महेश ठाकूर (इ. स. च्या १६ व्या १७ व्या शतकाचा सुमार) एक पंडित. बिहार प्रदेशाच्या दरभंगा जिल्ह्यातील भौर नामक गावी याचा जन्म झाला. धीरा व चंद्रपती हे याचे माता-पिता व पं. शुचिघर झा हे याचे गुरु होत. त्याव्यतिरिक्त रामेश्वर भट्ट हेही याचे एक गुरू होते, असे म्हणतात. हा व्याकरण व न्यायशास्त्र यांत पारंगत होता. याला महामहोपाध्याय अशी पदवी होती. याच्या पांडित्यावर प्रसन्न होऊन अकबर बादशहाने मिथिलेचे राज्य याला बहाल केले, असे एक मत आहे. दुसऱ्या मते महेशाचा रघुनंदनदास राय नावाचा तर्कशास्त्रात प्रवीण असलेला एक शिष्य होता, त्याला अकबराने ते दिले; परंतु त्याने ते गुरूला दक्षिणा म्हणून देऊन टाकले. त्यामुळे महेश ठाकूर हा खंडवला नावाच्या राजवंशाचा संस्थापक बनला. आजही याचे वंशज तिथे आहेत. आयुष्याच्या अखेरीला सारा राज्यकारभार आपल्या गोपाळ नामक मुलावर सोपवून हा काशीमध्ये राहायला गेला. तिथे त्याने गंगा व तारा यांच्यासंबंधी अनेक स्फुटपदे रचली.

याने बरेच ग्रंथ रचले आहेत. प्रसिद्ध नैयायिक पक्षधर मिश्र याने गंगेशाच्या ग्रंथावर आलोक नावाची टीका लिहिली होती. या आलोकावर याची दर्पण नावाची टीका आहे. अनेक पंडितांनी दर्पणाचा एक आधारभूत ग्रंथ म्हणून निर्देश केला आहे. अकबर बादशाहाचे एक संस्कृत चरित्र याने लिहिले असून, ते इंडिया ऑफिसमध्ये आहे, असे कळते. याची मम्मटाच्या काव्यप्रकाशावरही एक टीका आहे. काव्यप्रकाशातल्या कारिका या भरताच्या असून, वृत्ती तेवढी मम्मटाची आहे, ही समजूत यानेच प्रथम लेखनिविष्ट केली. ही टीका कलकत्ता संस्कृत सीरीजमधून प्रसिद्ध झालेली आहे. तत्त्वचिंतामण्यालोकदर्पण हा संस्कृत ग्रंथ व मलमासनिर्णय हे दोन्ही ग्रंथ याचेच होत. [बि. ज. स्मा. ग्रं.; हिं. सा. वि.; म. च. को.; काव्यप्रकाश]

महेशी एक प्राचीन नगर. हे नगर बिहार प्रदेशातील दरभंगा जिल्ह्याच्या सहर्षी नामक रेल्वे स्टेशनानजिक आहे. आद्य शंकराचार्य आणि मंडनमिश्र यांचा वादविवाद या नगरात झाला, अशी एक समजूत आहे. याव्यतिरिक्त उग्रतारा या बौद्ध देवतेचे एक मंदिर इथे आहे. इथे हिला महाचीनतारा असे म्हणतात. भारतात या देवीची स्थाने फारशी आढळत नाहीत. त्यामुळे या स्थानाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे.

महेश्वर (१) निरुक्ताचा एक टीकाकार. वैदिक ऋचांचा सृष्टिपर अर्थ करण्यात दुर्गाने यास्कावर ताण केली आहे, तर महेश्वराने दुर्गावरही ताण केली आहे. 'आर्ष्टिषेणो होत्र' व 'यद्देवापिः' या दोन ऋचांत विद्युत्पर अर्थ आहे, असे तो म्हणतो; पण या अर्थाचा वासही दुर्गादिकांना आला नव्हता, असे श्री. वैं. का. राजवाडे लिहितात. अत्री, भृगू, अंगिरा, इ. ऋषींच्या नावांच्या व्युत्पत्ती त्याने धातूंवरून दिल्या आहेत. निर्वचन शब्दाचा अर्थ तो पुढीलप्रमाणे सांगतो– 'सर्वशब्दस्य अवयवशः निष्कृष्टस्य वचनम्' = सबंध शब्दाचे तुकडे करून मग काढलेलाल्या शब्दाचा अर्थ म्हणजे निर्वचन होय. [नि. म. भा.]

(२) (इ. स. चे ११ वे शतक) एक व्युत्पन्न ज्योतिषी. प्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्य याचा हा पिता व गुरू होय. हा शांडिल्यगोत्री होता. याने शेखर नावाचा करणग्रंथ, प्रतिष्ठाविधिदीपक हा फलग्रंथ, वृत्तशत नामक मुहूर्तग्रंथ, इ. ग्रंथ लिहिले; त्याचबरोबर लघुजातकावर एक टीकाही रचली. या महेश्वराचा बहाळच्या लेखात उल्लेख आहे. [भा. ज्यो. इ.; या. का. म.]

(३) मध्य प्रदेशातील एक तीर्थक्षेत्र. हे नर्मदेच्या तीरावर, इंदूरपासून ५६ मैलांवर वसलेले आहे, प्राचीन काळातली माहिष्मती नगरी इथेच होती, असे इतिहासज्ञांचे मत आहे. हैहय वंशातील महिष्मान राजाने ही नगरी वसवली व त्याच वंशातील सहस्रार्जुनाची ही राजधानी होती, असे विष्णू पुराणात (४. ११. ९. १९) म्हटले आहे. पूर्वी इथे नागांचे राज्य होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कार्तवीर्य सहस्रार्जुनाने कर्कोटकाच्या पुत्राचा पराभव करून ही नगरी जिंकली, असे मत्स्य पुराणात (४३. २९) म्हटले आहे. याच ठिकाणी कार्तवीर्य व रावण यांचे द्वंद्वयुद्ध होऊन कार्तवीर्याने रावणाचा पराभव केला व त्याला बंदी केले, अशी कथा मत्स्य पुराणात (४३. ३८) आहे. सहस्रार्जुनानेच ही नगरी वसवली, असेही एक मत आहे. हरिवंशावरून कळते, की इक्ष्वाकू वंशातील मांधाता राजाचा पुत्र मुचकुंद याने ही नगरी वसवली.

ही नगरी नर्मदा नदीच्या तीरावर, विंध्य व ऋक्ष या पर्वतांच्या मधे वसलेली आहे, असे महाभारतात म्हटले आहे.

माहिष्मती ही अवंती प्रदेशाच्या दक्षिण भागाची राजधानी होती. मंडनमिश्र व शंकराचार्य यांचा शास्त्रार्थ याच नगरीत झाला, अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे.

ही प्राचीन नगरी धरणीकंपामुळे नष्ट झाली, असे म्हणतात. त्या जागी सध्याचे महेश्वर नगर सुमारे एक हजार वर्षांपूर्वी वसवले गेले. इथून जवळच सहस्रधारा हे स्थान आहे. त्याचा उल्लेख रामायणात आढळतो. एकदा सहस्रार्जुनाने आपल्या सहस्र भुजांनी नर्मदेचा प्रवाह अडवण्याचा प्रयत्न केला, पण ती त्याच्या भुजांमधून पार निघून गेली. म्हणून त्या स्थानाला सहस्रधारा असे नाव मिळाले. तिथे नर्मदेच्या अनेक धारा दिसून येतात.

महेश्वर हे स्थान अहल्याबाईच्या वास्तव्यामुळे पुनीत झाले आहे. तिने इथूनच राज्यकारभार केला. तेव्हा या नगराचे वैभव पुन्हा वाढले. अहल्याबाईने इथे सुंदर घाट व मंदिरे बांधली आणि संस्कृत पाठशाळा स्थापल्या. या नगरात नर्मदेच्या काठी



महेश्वर येथील घाट व मंदिर

एक भव्य व मजबत किल्ला आहे. त्या किल्ल्यात अहल्याबाईचा सुंदर पुतळा आहे. इथली विठोजी होळकराची छत्री व अहल्याबाईची छत्री फार प्रेक्षणीय आहे.

महेश्वरापासून जवळच महेश्वरी नदी नर्मदेला मिळते. त्यांच्या संगमावर महेश्वरीच्या दोन्ही तीरांवर कालेश्वर व जालेश्वर ही मंदिरे आहेत. नगराच्या पश्चिमेला मतंग ऋषीचा आश्रम व मातंगेश्वरमंदिर आहे. नर्मदेच्या पात्रात एका बेटावर बाणेश्वरमंदिर असून, तिथेच सिद्धेश्वर व रावणेश्वर नामक लिंगे आहेत.

महेश्वर नगर उत्कृष्ट लुगड्यांविषयी प्रसिद्ध आहे. ती लुगडी महेश्वरी या नावानेच ओळखली जातात. [मा. प्रा. रा.; हि. जॉ. ए. इं.; कल्याण–तीर्थांक; कादम्बिनी, डिसेंबर १९६३]

महेश्वर कृच्छ्र एक प्रायश्चित्त. महेश्वराने मदनाला जाळून टाकले, तेव्हा महेश्वराला हे प्रायश्चित्त घ्यायला सांगितले, अशी कथा आहे. याचे विधान असे– दुपारी मातीचा फुटका परळ हाती घेऊन तीन विद्वान ब्राह्मणांच्या घरी भिक्षा मागावी; नंतर देवाला नैवेद्य दाखवून ती भिक्षा खावी. सायंकाळी देवासंनिध झोपावे. दुसऱ्या दिवशी उठल्यावर एक गाय दान देऊन पंचगव्य प्राशन करावे. [हि. ध.]

महेश्वरपंडित (इ. स. चे १४ वे शतक) एक महानुभाव कवी. हा नागदेवाचार्यांचा पुत्र होता. गोविंदप्रभूंच्या साक्षीने राजमठाच्या रायांगणात ज्या सात मुंजी एकाच वेळी झाल्या, त्यात महेश्वरपंडित हाही एक बटू होता. याने साती ग्रंथांपैकी ऋद्धिपूरमाहात्म्य हा ग्रंथ लिहिला असून त्याचे नऊ प्रसंग व ८२७ ओव्या आहेत. त्यांतील मंगलाचरणाच्या काही ओव्या अशा –

जो हेमवर्णी सारिखा । नमन करूं इति मुनि वेषा।
जो न वर्णवे सेखादिकां । सहस्रमुखीं ।।
वेद जयाचे नागारी । वर्णितां गुण लावण्याची थोरी।
श्रमले तयाचि परी । नेणती म्हणोनि ।।
श्रुतिवरी रचिलीं पुराणें । तें बोलो नेणती अज्ञानें।
भांबावली षट् दर्शनें । जयासि पाहतां ।।
अज्ञानाचेनि प्रसादें । आगम दुरि राहिलें विसंवादें।
ननु वादितीचि उपनिषदे । भूलिकीं जालीं ।।
ऐसा षट्प्रमाणीं अगोचरु । श्रुति नव्हेचि निर्धारु।
तो नमस्कारिला श्रीचक्रधरु । मुनी महेश्वरीं ।।
प्रभुचेनि नाम प्रसादिकें । देवा आळविती कवतिकें।
तथा नागार्जुनासि सी अमृत सुखें । नमस्कारीन।।

याव्यतिरिक्त याने निर्वेदस्तोत्र, संकटस्तोत्र, इ. काही स्तोत्रें रचली आहेत. [प्रा. म. सं. क. ; म. म. वा.]

महेश्वरमूर्ती शंकराच्या सामान्य मूर्तीला महेश्वरमूर्ती असे म्हणतात. या मूर्तीचे अनेक प्रकार आहेत. गोकाक येथे सापडलेल्या मूर्तीला तीन तोंडे व पाच हात आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंगावर नाग व बैठकीवर नंदी आहे. बीकानेरमधली मूर्ती नंदीवर आसनमांडी घालून बसली असून,ती त्रिमुख आहे; प्रत्येक मुखाला जटामुकुट व त्यावर गंगेचे मस्तक आहे. ही मूर्ती द्विभुज आहे. तिच्या डाव्या अंगाला पार्वती पाय खाली सोडून बसली आहे.

धारापुरी येथील शिवमूर्ती ही महेश्वरमूर्तीच आहे. या प्रतिमेत आर्यावर्त व दक्षिणापथ यांच्या आध्यात्मिक व कलात्मक परंपरांचा समन्वय झालेला दिसतो. तिच्यात दक्षिणेचे विशालत्व आहे, तसेच उत्तरेतील प्रतिमांचे मार्दवही आहे.

मध्य आशिया, जावा, इ. भारताच्या बाहेरील देशांतही महेश्वरमूर्ती आढळतात. [मू. वि.; भा. सं. क.]

महेश्वरव्रत एक काम्य व्रत. फाल्गुन शुद्ध चतुर्दशीला या व्रताचा आरंभ करतात. व्रतविधी असा— व्रताच्या दिवशी उपवास करून शिवाची पूजा करावी. उद्यापनाच्या वेळी एक गाय दान द्यावी. हे व्रत एक वर्षभर केले, तर पौंडरीक यज्ञाचे फल मिळते आणि जर हे व्रत प्रत्येक महिन्याच्या दोन्ही चतुर्दशींना केले, तर सर्व इच्छा पूर्ण होतात, असे सांगितले आहे.

व्रताच्या दिवशी दक्षिणामूर्तीला तूप व पायस यांचा नैवेद्य दाखवावा, असाही एक पर्याय आहे. व्रतावधी एक वर्ष. उद्यापनाच्या वेळी उपवास व जागर करून भूमी, गाय व पलंग दान द्यावा. फल—नंदीची योग्यता प्राप्त होणे. [हि. ध.; व्र. प.]

महेश्वराष्टमी एक काम्य व्रत. मार्गशीर्ष शुद्ध अष्टमीला या व्रताचा प्रारंभ करतात. कमळावर ठेवलेल्या शिवाच्या मूर्तीला किंवा शिवलिंगाला तूप व दूध यांनी स्नान घालून पूजा करणे, हा या व्रताचा प्रमुख विधी आहे. उद्यापनाच्या वेळी गाय दान देतात. वर्षभर हे व्रताचरण केले, तर अश्वमेधाइतके फल मिळते आणि शिवलोक प्राप्त होतो. [हि. ध.]

महेश्वरी (१).एक देवता. उज्जयिनीच्या महाकालमंदिरात ही देवता आहे (मत्स्य १३. ४१). हे ललितेचे दुसरे नाव आहे. 'सर्व विश्व योगसामर्थ्याने आपल्या नियंत्रणाखाली ठेव' असे महेश्वरीला महादेवाने सांगितल्याचे वायू पुराणात म्हटले आहे (२३.५). ही पाठारे प्रभूंची देवता असून, मुंबई येथे नवीवाडी गल्लीत हिचे मंदिर आहे. माघ महिन्यात या देवीची यात्रा भरते. हिच्या पूजेअर्चेची सर्व व्यवस्था पाठारेप्रभू लोकांच्याकडे आहे. [देवीकोश ३]

महोत्सवव्रत एक काम्य व्रत. प्रत्येक चैत्र शुद्ध चतुर्दशीला हे व्रत करतात. व्रतविधी असा — शिवमूर्तीला दुधाने व इतर उपचारांनी स्नान घालून सुगंधी द्रव्ये लावावी. नंतर दवणा व वेलाची पाने वाहून पूजा करावी. तांदुळाच्या पिठाचे दिवे करून शिवाला ओवाळावे. निरनिराळ्या खाद्य पदार्थांचा नैवेद्य दाखवून पडघम वाजवावे. शिवाची रथयात्रा करावी. नक्त भोजन करावे. फल—इच्छापूर्ती. [हि. ध.]

महोदधी अमावास्या एक तिथिव्रत. मार्गशीर्ष मासातील चतुर्दशीने युक्त असलेल्या अमावास्येला हे नाव आहे. या दिवशी व्रतधारी व्यक्तीने समुद्रस्नान करायचे असते. फल—अश्वमेधाचे पुण्य. [हि. ध.]

महोदयपर्व पौष किंवा माघ महिन्याची अमावास्या, सोमवार, श्रवण नक्षत्र व व्यतीपात इतके योग एकत्र आले असता महोदयपर्व होते. काहींच्या मते अर्धोदय पर्वातील योगात किंचित न्यून असेल, तर त्याला महोदयपर्व म्हणावे. या पर्वाचा योग दिवसा असावा लागतो. पाहा — अर्धोदयपर्व.

महोपनिषद या नावाची दोन उपनिषदे आहेत. त्यांपैकी एक लहान व दुसरे मोठे आहे. वस्तुतः हे लहान उपनिषद दुसऱ्या मोठ्या उपनिषदाचा पहिला अध्याय असून, त्यात नारायण हा सर्वश्रेष्ठ व ब्रह्मस्वरूप आहे, असे सांगितले आहे. मोठ्या उपनिषदाचे एकूण सहा अध्याय असून, ते गद्यपद्यात्मक आहे.

दुसऱ्या अध्यायात, शुकमुनीला जन्मतःच आत्मज्ञानाचा लाभ झाल्याचा उल्लेख आहे.तसेच शुकमुनीने आपला पिता व्यास याला जगाच्या उत्पत्तीविषयी विचारलेला प्रश्न आणि त्याने त्याचे दिलेले उत्तर आहे. नंतर त्याच प्रश्नाच्या उत्तराकरता व्यासाने शुकाला जनकाकडे पाठवले. जनकाने शुकाची परीक्षा पाहिली आणि व्यासाने दिले तसेच उत्तर दिले. मनोविकल्पातून जगाची उत्पत्ती होते आणि ते विकल्प नष्ट झाले, की संसाराचा अंत होतो, हे ते उत्तर होय. जीवनात पूर्ण शांती मिळण्यासाठी जीवन्मुक्ती हा मार्ग आहे, असेही जनकाने शुकाला सांगितले.

तिसऱ्या अध्यायात निदाघाची गोष्ट आहे. लहान वयात त्याने सर्व श्रुतींचे ज्ञान मिळवले आणि साडेतीन कोटी तीर्थांत स्नान करून पुण्य प्राप्त केले. जगातील विविध गोष्टी ब्रह्मज्ञानप्राप्तीच्या आड कशा येतात, याचे काव्यमय वर्णन या अध्यायात आहे. विषाने एकाच जन्माचा अंत होतो, तर विषयाने पुढच्या जन्माचाही नाश होतो, असे यात सांगितले आहे.

चौथ्या अध्यायात ऋभूने निदाघाला केलेला उपदेश आहे. दृढ निश्चयाने सत्याचे ज्ञान होते, ब्रह्मदेवाने मनापासून हे जग निर्माण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केले असल्यामुळे, जग हा मनाचा खेळ आहे, असे यात सांगितले असून, पुढे संतुष्ट माणसाचे वर्णन केलेले आहे.

पाचव्या अध्यायात सप्तविध मोहांचे सविस्तर वर्णन आहे. बीजजाग्रत्, जाग्रत्, महाजाग्रत्, जाग्रत्स्वप्न, स्वप्न, स्वप्नजाग्रत् आणि सुषुप्ती हे ते सात मोह होत. ज्ञानभूमी, विचारणा, तनुमानसी, सत्त्वापत्ती, असंसक्ती, पदार्थभावना आणि तुर्यगा अशा सात भूमिका ओलांडल्यावर ज्ञान होते, असे म्हटले आहे.

सहाव्या अध्यायात समता स्थितीचे वर्णन आहे व विचारवंताचा जो चतुर्विध निश्चय होतो, त्याचेही विवरण आहे. शेवटी, 'स्वस्थ' होणे हे ध्येय सांगितले असून, शुकाला उपदेश केला आहे, तो असा –

संशान्तसर्वसङ्कल्पः प्रशान्तसकलेषणः ।
निर्विकल्पपदं गत्वा स्वस्थो भव मुनीश्वर ॥

अर्थ– हे मुनीश्वरा, ज्यांचे सर्व संकल्प निमाले आहेत, ज्याच्या सर्व एषणा नष्ट झाल्या आहेत, असा तू निर्विकल्पपदी जाऊन स्वस्थ हो.

अर्थवादाने उपनिषदाची समाप्ती होते. [डॉ. सी. ग. देसाई]

मळगावकर गोपाळनाथ

(इ. स. च्या १७ व्या शतकाचा सुमार) एक मराठी संत. हा रत्नागिरी जिल्ह्यातील परुळे गावचा रहिवासी व गौड सारस्वत ब्राह्मण होता. त्याचे वडील वारल्यावर आईसह हा सावंतवाडीजवळच्या मळगावी राहायला गेला. नंतर काही कालाने तो पंढरपुरी गेला. तिथे बोधलेबुवांची व याची गाठ पडली. गोपाळनाथाने बोधले बुवाचाच अनुग्रह घेतला. नंतर त्यांच्या आज्ञेने हा पुनश्च मळगावी येऊन राहिला. तिथे आल्यावर त्याने विवाह केला आणि आपले सारे आयुष्य पांडुरंगाच्या भक्तीत व्यतीत केले. सावंतवाडीच्या खेमसावंत राजाची गोपाळनाथावर अपार श्रद्धा होती. त्याने गोपाळनाथाला पांडुरंगाचे मंदिर बांधून दिले आणि दोन तीन सनदाही लिहून दिल्या.

गोपाळनाथ कीर्तनकार होता, तसाच ग्रंथकारही होता. याच्या ग्रंथाची नावे अशी–(१) स्कंदपुराणांतर्गत पांडुरंग–माहात्म्य– हा ओवीबद्ध ग्रंथ असून, त्यात पाच अध्याय व सुमारे सहाशे ओव्या आहेत. (२) प्रकाशबोध हा वेदान्तावरचा ग्रंथ आहे. (३) बालक्रीडा– हा छोटा ग्रंथ आहे. याव्यतिरिक्त पदे, अभंग, भूपाळ्या अशी याची स्फुट रचना बरीच आहे. पांडुरंग-माहात्म्यातील याने गायिलेला भक्तमहिमा वाचनीय आहे. त्यातील काही ओव्या अशा–

एक पुरे पतिव्रता । काय कीजे इतर लक्ष वनिता ॥
एक साधु जगाच्या हिता । इतर वार्ता काय काज ॥
काय कीजे चोराची नगरी । आत्मघातकी दुराचारी ॥
भक्तांविण संसारीं । कीर्ति चराचरी माझी नव्हे ॥
भक्त माझे निधान । भक्त माझे पावन ।
भक्त माझे जीवप्राण । करी निंबलोण मी त्यांसी ॥
भक्त माझ्या जीवाचे जीव । भक्त माझ्या देवाचे देव ।
भक्तांविणें वस्तीसि ठाव । सर्वदा पहाहो मज नाही ॥

गोपाळनाथाने अनेकवार गोपाळबोध किंवा बोध–गोपाळ अशी मुद्रा वापरली आहे. यातील 'बोध' म्हणजे माणकोजी बोधले हे होत. गोपाळनाथ हा अद्वैती होता. त्याची समाधी मळगावी आहे. दरवर्षी इथे उत्सव होतो. [सा. र.; म. च. को.]

मांग

एक जात. यांची वस्ती महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात व म्हैसूर या राज्यांत आहे. संस्कृत वाङ्मयात या लोकांना मातंग असे म्हटले आहे. त्यावरून मराठीत मांग हा शब्द आला आहे. जंब ऋषी हा आपला पूर्वज असल्याचे ते सांगतात. हे पूर्वास्पृष्ट असून, गावाबाहेर त्यांची स्वतंत्र वस्ती असे, तिला मांगवाडा असे म्हणत. महारांशी या लोकांचे पूर्वापार वैर आहे.

मांग हे सर्वसाधारणपणे उंच, बळकट, काळे आणि ओबडधोबड असतात. त्यांच्यापैकी पुष्कळजण डोक्यावर केसांची गाठ मारतात आणि दाढीमिशा ठेवतात. मांग स्त्रिया केसांचा अंबाडा घालतात. त्या हातांवर खूप गोंदून घेतात. त्या लुगड्याचा कासोटा घालीत नाहीत. त्या कथलाचे व पितळेचे दागिने घालतात.

मांगांचे तीन प्रमुख प्रादेशिक भेद आहेत– (१) महाराष्ट्र मांग (२) कानडी मांग. यांना मादिग असे म्हणतात. आणि (३) गुजराती मांग. यांना मांगेला असे नाव आहे.

महाराष्ट्रातील मांग–यांच्यांत अस्सल मांग, बाळे, बुरूड, दबकर, देसूर, डाकेलवर किंवा वाजंत्री मांग, ढोर, घडशी, होलगे, जिनगर, जिराइत, काकर मोची, नाडे, मुसलमान, इ. अनेक पोटभेद आहेत.

उद्योगधंदे–पूर्वी यांच्यांतले काही लोक गावचे पहारेकरी व वाटाड्ये म्हणून काम करीत. त्याबद्दल त्यांना जमीन इनाम मिळालेली असे. सांप्रत यांच्यापैकी बरेच लोक अंबाडीचे व वाखाचे दोर वळून विकतात; काही जण गोफणी, शिंकी, केरसुण्या, टोपल्या, सुपे वगैरे तयार करतात काही; वाजंत्री वाजवतात, बैलांना खच्ची करतात आणि जोडे व कातड्याचे काम करतात. फाशी देण्याचे काम मांगच करतात. डाकेलवार हे मांगांतील भाट असून, ते भीक मागतात. काही मांग शेती करतात व काही मजुरी करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मांग लोक गुन्हेगार म्हणून प्रसिद्ध होते. ते बहुधा गोसाव्याच्या वेषाने चोरीसाठी घरे न्याहाळून ठेवीत. चोरी–घर-

वाजंत्री वाजवणारे मांग

फोडीला जाताना ते अंगाला जोंधळ्याची घाटे बांधीत किंवा कमरेपासून डोक्यापर्यंत कांबळ वेढीत व तोंडाला राख किंवा काजळ फाशीत. हे लोक टोळ्या करून गुन्हे करीत. रात्रीच्या अंधारात चोरी व घरफोडी करण्यात ते पटाईत होते. चोरीचा माल घेणाऱ्याला ते जंगलात नेऊन लुटीत. टोळीच्या प्रमुखाला ते नाईक म्हणत. गुन्ह्यासंबंधात कोणी काय करायचे ते तो ठरवून देई. त्या वेळी सर्वजण खूप दारू पीत. गुन्ह्याच्या वेळी प्रत्येकजण नेमलेले कार्य करतो का नाही, यावर नाइकाची देखरेख असे. लुटीत रोकड मिळाली, तर टोळीतील सर्व इसमांना एक हिस्सा व नाइकाला दोन हिस्से मिळत. चोरीचा माल ते पुरून ठेवीत आणि पोलिसतपास मंदावला म्हणजे तो सोनार, सावकार, कलाल, इ. लोकांना विकीत.

ज्वारीची भाकरी, वरण आणि मिरच्यांची चटणी हे या लोकांचे मुख्य अन्न आहे. याशिवाय ते शेळ्या–मेंढ्यांचे मांस, कोंबडी आणि मेलेल्या गुरांचे मांसही खातात. ते गांजा व तंबाखू ओढतात. दारू त्यांना अत्यंत प्रिय आहे, ज्या ठिकाणी ते राहतात, त्या भागात प्रचलित असलेली भाषा ते बोलतात.

या लोकांत अदमाने, अल्हाट, भिसे, भोंडे, दिवटे, गायकवाड, हुंडे, जाधव, मोरे, पारधी, इ. आडनावे असून, एकाच आडनावात विवाहसंबंध होत नाही.

विवाहप्रथा –समान पोटजातीत लग्ने होत नाहीत. मामेबहिणीशी लग्न होते; पण आते व मावस बहिणीशी होत नाही. लग्न लहानपणी व मोठेपणीही होते. काहीं वेळा पाळण्यातही मुलामुलींचे विवाह होतात. बेळगाव जिल्ह्यात काही ठिकाणी ज्या मुलींची लग्ने रजोदर्शनापूर्वी होत नाहीत, त्यांना नंतर लग्न करायची परवानगी नसते. त्या मग जोगतिणी होतात.

लग्न जुळवताना मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो व देज म्हणून दहा रुपये मुलीच्या बापाला देतो. त्यांच्याच जातीचा साधू लग्नाचा मुहूर्त काढून देतो. लग्नाच्या निमित्ताने बहिरोबा, खंडोबा, काळूबाई, इ. देवतांच्या नव्या मूर्ती बनवतात किंवा घरातील जुन्या मूर्ती उजळतात. लग्नाच्या आधी पाच दिवस रोज वधूला तिच्या घरी हळद लावतात आणि उरलेली हळद वाजतगाजत वराच्या घरी नेतात. लग्नाच्या आधी तिसऱ्या दिवशी दुपारी वराच्या व वधूच्या घरी कुलदेवतेच्या नावाने बकरा बळी देतात. संध्याकाळी नवऱ्या मुलाचा काका आप्तेष्टांसह नैवेद्य घेऊन वाजतगाजत मारुतीच्या देवळात जातो. त्या वेळी काका एका हातात कोयता धरतो आणि चार लोक त्याच्या डोक्यावर कापड ताणून धरतात. देवळातील गुरव आंबा, जांभूळ, रुई, शमी व उंबर यांच्या फांद्या देवके म्हणून आणून ठेवतो. या देवकांना नैवेद्य दाखवतात आणि ती घरी आणून लग्नमंडपाच्या एका खांबाला बांधतात. नंतर त्यांना दोन्ही घरी बकरा अर्पण करतात आणि मेजवानी देतात. लग्नाच्या दिवशी नवरा मुलगा घोड्यावर किंवा बैलावर बसून गावातील मारुतीच्या मंदिरात जातो. तिथे वधूपिता त्याला धोतर व पागोटे देतो. ते नेसून तो वधूगृही जातो. दोन टोपल्यांत चामडे आणि दोर घालून त्यांत वधू-वरांना समोरासमोर बसवतात आणि त्यांच्या मधे अंतरपाट धरतात. लग्नाचे पौरोहित्य साधू किंवा ज्ञातिप्रमुख करतो. त्याने मंगलाष्टके म्हटल्यावर जमलेले लोक वधू-वरांवर अक्षता टाकतात. एवढे झाल्यावर ती पति-पत्नी होतात. काही ठिकाणी वधूच्या टोपलीत जाते व वराच्या टोपलीत दोरा ठेवून त्यांत त्यांना उभे करतात व अक्षतांऐवजी ज्वारीचे दाणे त्यांच्या मस्तकावर टाकतात. नंतर वधू-वरांना जमिनीवर शेजारी शेजारी उभे करतात आणि त्यांच्या अंगावर अंतरपाट टाकतात. मग त्यांच्या भोवती पाच वेळा सूत्रवेष्टण करतात. त्या सूत्राचे दोन तुकडे करून, त्यांत हळकुंडे बांधून त्यांची त्या दोघांच्या हातांत कंकणे बांधतात. नंतर त्यांना बोहल्यावर उभे करून त्यांच्या तोंडाला हळद लावतात. त्या रात्री नवरा मुलगा वधूगृही राहतो. दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी वधूपिता जमलेल्या लोकांना मेजवानी देतो. चौथ्या दिवशी वरपिता वधूला साडी-चोळी देतो. वधू-वरांना बाशिंग बांधून गावातील मारुतीच्या मंदिरात व तिथून वरगृही नेतात. नंतर वधू-वरांना गावातील लोकांच्या घरी नेऊन आणतात आणि एवढे झाल्यावर लग्नसमारंभ संपतो.

विधवाविवाह कृष्ण पक्षातील एखाद्या रात्री होतो. वधू

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिच्या भावी पतीने दिलेले नवे कपडे व अलंकार घालते. नंतर वधू-वरांना शेजारी बसवून वधूला कुंकू लावतात व तिची ओटी भरतात. मग दोघांच्याही वस्त्रांना गाठ मारतात. दुसऱ्या दिवशी ज्ञातिबांधवांना मेजवानी देतात. एवढ्याने हा विधी पुरा होतो. प्रथमवराला विधवेशी लग्न करायचे असल्यास प्रथम त्याला रुईच्या झाडाशी लग्न करावे लागते.

प्रसूतिप्रथा – स्त्रीला जननाशौच पाच आठवडे असते. प्रसूतीनंतर पाचव्या दिवशी सटवाईची पूजा करतात आणि तिला डाळभाताचा नैवेद्य दाखवतात. बाळंतिणीच्या खोलीत कणकेचे दोन दिवे रात्रभर पेटवून ठेवतात. बाराव्या दिवशी बाळ-बाळंतिणींना स्नान घालतात. त्या दिवशी घराच्या बाहेरच्या बाजूला सात खडे मांडतात आणि बाळंतीण स्त्री त्यांची सटवाई म्हणून पूजा करते. बाराव्या दिवशी मुलाचे नाव ठेवतात. ब्राह्मण ज्योतिषी नाव काय ठेवायचे ते सांगतो. बारशाच्या दिवशी जमलेल्या स्त्रियांना घुगऱ्या वाटतात.

मुलाचे जावळ एक ते तीन वर्षांच्या दरम्यान करतात.

देवधर्म – मांग लोकांत बरेचजण शैव असून, ते महादेवाला भजतात. बहिरोबा, खंडोबा, म्हसोबा, अंबाबाई, बहिरी, जनाई, विठोबा, यमाई, इ. त्यांच्या कुलदेवता आहेत. देवीला मंगळवारी व शुक्रवारी आणि देवाला रविवारी ते कोंबडे-बकरे अर्पण करतात. मरीआई ही त्यांची प्रिय देवता असून, गावात पटकी उद्भवल्यास ते तिला बकरा बळी देतात. ते पितरांच्या उठावाच्या प्रतिमा करून त्यांची पूजा करतात. आळंदी, देहू, कोंढणपूर, पंढरपूर, शिंगणापूर, इ. क्षेत्रांच्या ते यात्रा करतात.

मंत्रतंत्र, जादूटोणा, भुताटकी, यांवर या लोकांचा फार विश्वास आहे.

आपल्या ज्ञातिबांधवांना भेटल्यावर ते फर्मान असे म्हणतात आणि इतरांना भेटल्यावर महाराज असे म्हणतात.

मांगांच्या ज्ञातिप्रमुखाला मेहेत्रिया असे म्हणतात. तो इतर ग्रामवृद्धांच्या साहाय्याने जातीचे तंटेबखेडे सोडवतो.

मर्तिककथा – सर्वसाधारणपणे मांग लोक प्रेते पुरतात. मृताला स्नान घालून कपडे घालतात व तिरडीवर ठेवतात. त्याच्या वस्त्राच्या टोकाला तांब्याचे एक नाणे आणि धान्याचे थोडे दाणे बांधतात. मृताचा उत्तराधिकारी विस्तवाचे मडके घेऊन पुढे चालतो. वाजंत्रीमांग वाद्ये वाजवीत पुढे चालतात. वाटेत थांबून मृताच्या वस्त्रातील नाणे सोडवून फेकून देतात. स्मशानात पोचल्यावर खड्डा खणून त्यात प्रेत पालथे ठेवतात. मृताचा उत्तराधिकारी आपल्या पागोट्याचे टोक पाण्यात बुडवून ते मृताच्या तोंडात पिळतो आणि मोठ्याने बोंब मारतो. ते ऐकून देव मृतासाठी स्वर्गाचे दार उघडतील, अशी कल्पना असते. खड्ड्यात माती लोटून लोक जवळपासच्या नदीवर स्नान करतात व घरी जातात. तिसऱ्या दिवशी मृताचा उत्तराधिकारी ज्वारीच्या तीन भाकऱ्या, भात व दही किंवा दूध घेऊन स्मशानात जातो आणि ते मृतात्म्याला अर्पण करतो. तेराव्या दिवशी तो स्मशानात तेरा द्रोण पाण्याने भरून ठेवतो. त्याच दिवशी आप्तेष्टांना जेवण देतात.

मांग–गारुडी नावाची मांगांची एक पोटजात आहे. मांग गारुडी पुरुष मध्यम उंचीचे, सशक्त, चपळ पण आळशी असतात. ते पंचा किंवा लंगोटी नेसतात, अंगात बंडी किंवा अंगरखा घालतात. कमरेला काचा बांधतात व डोक्याला जुने पागोटे गुंडाळतात; खांद्यावर उपरणे घेतात. त्यांच्या स्त्रिया अपुरे लुगडे नेसतात व चोळी घालतात. पुरुष व स्त्रिया केस विंचरीत नाहीत. त्यामुळे ते पिंजारलेले असतात. हे लोक गलिच्छ व भांडखोर असतात. हे लोक फिरस्ते असून, ते आपला संसार भाकड म्हशीवर लादून नेतात. त्यांच्या बरोबर बायकामुले, कुत्री, तट्टे व गुरेढोरे असतात. त्यांच्या तांड्यात कधी कधी शंभर माणसेही असतात. तांड्याचा एकजण म्होरक्या असतो. ते अशुद्ध मराठी भाषा बोलतात.

भीक मागणे, खेड्यापाड्यांत जादूचा तमाशा करणे, भाकड म्हशी, पाड्या व तट्टे विकणे, म्हशी भादरणे, इ. उद्योग ते करतात. गवळ्यांकडून ते भाकड म्हशी घेतात आणि त्या गाभण राहिल्या की जास्त किंमतीला विकतात.

हे लोक अट्टल गुन्हेगार म्हणून एका काळी प्रसिद्ध होते. ते लहाणपणीच बायकामुलांना चोरीचे शिक्षण देत. हंगामाच्या दिवसांत ते धान्य व कापूस चोरीत आणि उभ्या पिकांत आपली जनावरे चारीत. ते कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या, गुरे व विशेषतः म्हशी चोरीत आणि गुरांना विषही घालीत. बाजारात खिसे कापणे, वाळत घातलेले कपडे, जोडे, कोंबड्या, इ. चोरणे या कामी त्यांच्या बायका फार पटाईत असत.

मध्य प्रदेशातील मांग पूर्वी राजाची दवंडी पिटण्याचे काम करीत. तसेच बेवारशी प्रेतांना वाहून नेणे व गुन्हेगारांना फाशी देणे ही कामेही ते करीत. दखने (दक्षिणेतील), खानदेशी, घोडके (घोडे संभाळणारे), डफळे (डफ वाजविणारे), उचले, पिंडारी, ककरकाढे (दगड काढणारे), होलेर (कातडी कमावणारे) इ. पोटभेद त्यांच्यांत आहेत. यांच्यांत सगोत्र कुळांचे गट असून, समान गटात विवाहसंबंध होत नाही.

हे लोक मृतांना पुरतात व तीन दिवस आशौच पाळतात. प्रेत पुरल्यावर खूप दारू पितात; मग मृताच्या घरी जाऊन कडुलिंबाची पाने खातात. पाने चावून चोथा थुंकला, की मृताशी सर्व संबंध संपला, असे हे समजतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ग्रहणाच्या वेळी हे लोक ' मांगाला दे दान सुटे गिराण ' असे ओरडत भीक मागतात. मांजराला हे फार पवित्र मानतात.

कानडी मांग – यांच्यांत असादरू, चन्न होलिय, डकलेरू, ढोर, मोची, पेंड, सनादी किंवा वाजंत्री, इ. पोटभेद आहेत. यांच्यांत आपसांत लग्नसंबंध होत नाहीत. तसेच यांच्यांत आवळे, भंडारयवरू, गनिकेनवरू, हुले, हुत्रे, कंगारपांडुर, इ. बेडगू असून, एकाच बेडगूत विवाहसंबंध होत नाही.

विवाहप्रथा– मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. देज सुमारे तीस रुपये द्यावे लागते. ब्राह्मण ज्योतिषी लग्नाचा मुहूर्त काढून देतो. काही वेळा ब्राह्मण पुरोहित व काही वेळा एखादी वृद्ध स्त्री लग्नात पौरोहित्य करत. वधू तांदुळांनी भरलेल्या टोपलीत व वर पाटावर उभा राहतो. त्या दोघांत अंतरपाट धरून पुरोहित मंगलाष्टके म्हणतो. ती संपल्यावर जमलेले लोक वधूवरांवर अक्षता टाकतात. वराकडील एक सुवासिनी वधूच्या गळ्यात मंगळसूत्र बांधते. आणि एवढ्याने विवाहसमारंभ संपतो.

देवधर्म–हे लोक येल्लम्म, दुर्गव्व, द्यामव्व, मर्गाई, खंडोबा, वेंकटराम, मारुती, इ. देवतांना भजतात. त्यांच्यासाठी ते कोंबडी व बकरे बळी देतात. पितरांच्या पितळी प्रतिमा करून ते त्यांची पूजा करतात. मरिअम्माचेही ते भक्त आहेत. दर दोन किंवा तीन वर्षांनी ते वर्गणी काढून एक लहानसा मांडव घालतात. पितळेचा एक तांब्या विकत घेतात. त्याच्यावर नारळ ठेवतात. त्याला फुले वाहतात आणि तो मरिअम्माचे प्रतीक म्हणून तीन दिवस ठेवतात. त्या तीन दिवसांत ते दारू पितात, गोडधोडाचे जेवतात आणि कोंबडी-बकरी बळी देतात. तिसऱ्या दिवशी ते मरिअम्माचे विसर्जन करतात.

मृतिकप्रथा– सर्वसाधारणपणे हे लोक प्रेते पुरतात. विवाहिताला बसल्या स्थितीत आणि अविवाहिताला झोपलेल्या स्थितीत पुरतात. प्रेत घोंगडीतून स्मशानात नेतात. खड्डयाचे तोंड तीन दगडांनी बंद करतात. दुसऱ्या दिवशी मृतात्म्याला एरंडीच्या पानावर भात, गूळ व तूप अर्पण करतात. कावळ्याने त्या अन्नाला स्पर्श केला, की मृताचा उत्तराधिकारी स्नान करून घरी परततो. चौथ्या दिवशी बकरा कापतात आणि ज्ञातिबांधवांना जेवण देतात. भाद्रपदाच्या वद्य पक्षात महालय करतात.

गुजराती मांग– यांना मांगेला असे म्हणतात. टोपल्या आणि सुपे विणणे हा यांचा व्यवसाय आहे. हे हनुमान आणि मरीआई या देवतांना भजतात. या लोकांत भट नावाची एक पोटजात असून, ते यांचे पौरोहित्य करतात.

विवाहप्रथा–मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. मुलीचा बाप या गोष्टीला तयार झाला, तर मुलाचा बाप गावातील लोकांना मद्य वाटतो. याच दिवशी विवाहाचा मुहूर्त ठरवतात. त्यानंतर काही दिवसांनी मुलगी आपल्या मैत्रिणीसह मुलाच्या घरी जाते. तिथे तिला नवे कपडे व चांदीचा एक दागिना देतात. लग्नाच्या आधी दोन दिवस वधू-वरांना आपापल्या घरी हळद लावतात. लग्नाच्या दिवशी दुपारी वर मिरवणुकीने वाजत गाजत घोड्यावर बसून वधूगृही जातो. लग्नमडपात बोहल्यावर एक दिवा लावून ठेवलेला असतो. त्याला वधू-वर वाकून नमस्कार करतात. या वेळी सुवासिनी गीते गातात. पुरोहित त्यांच्या वस्त्रांना गाठ मारतो आणि त्यांचे हात जुळवतो. मग ती गाठ सोडतात आणि विवाहविधी पुरा होतो. त्यानतर जेवणावळ होते. नवरा मुलगा तीन दिवस वधूगृही राहतो. चौथ्या दिवशी वरात वरगृही जाते. चार दिवसानंतर वधू माहेरी जाते व तिथे चार दिवस राहून पुन्हा सासरी येते. वधूपिता वराला चांदीची किंवा पितळेची अंगठी अथवा गाय वा वासरू देतो.

प्रसूतिप्रथा –गरोदर स्त्रीची पाचव्या महिन्यात पाच सुवासिनी ओटी भरतात आणि स्त्रियांना जेवण देतात. मूल जन्मल्यावर सहाव्या दिवशी सटीची पूजा करतात. याच दिवशी पुरोहित मुलाचे नाव ठवतो.

नाचणीचो भाकरी, आंबील, भात व डाळ हे या लोकांचे मुख्य अन्न होय. कुत्रा, मांजर आणि गाढव सोडून हे सर्व प्राण्यांचे मांस खातात. हे मद्यपान खूप करतात.

मृतिककथा –हे लोक मृत्यूनतर चौथ्या दिवशी प्रेत पुरतात. त्या दिवशी सकाळी लवकर उठून, भाताचे पिंड करून ते कोंबड्याच्या काळजाने झाकतात. आणि मृताच्या घरात काही तास हे पिंड ठेवून मग वाहत्या पाण्यात सोडतात. दुपारी आप्तेष्टांना भोजन देतात. मृताची चांदीची प्रतिमा करून घरात ठेवतात व आठवड्यातून एक दिवस तिच्या पुढे दिवा लावतात. [ट्रा. का. बाँ.; गु. जा.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

मांगलिक

पुण्याहवाचनाच्या वेळी मंगल वाद्यांच्या गजरात सुवासिनी स्त्रिया गणपती व वरुण यांना अक्षता वाहून वधू-वराना किंवा मुंजामुलाला नीरांजने ओवाळतात, त्याला मांगलिक असे म्हणतात. [ल. वि. सो.]

मांगल्यसप्तमी

एक काम्य व्रत. हे मांगल्यव्रत या नावानेही प्रसिद्ध आहे. या व्रतात सप्तमीच्या दिवशी एक मंडल काढून त्यावर विष्णू व लक्ष्मी यांची पूजा करतात. चिकणमाती, तांबे, चांदी व सोने यांची प्रत्येकी चार चार पात्रे करतात. ही भांडी मीठ, तीळ, कुंकू यांनी भरतात. त्यांवर वस्त्राचे आच्छादन घालतात. नंतर आठ तरुण सौभा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यवती स्त्रियांचा सन्मान करून त्यांना दक्षिणा देतात. त्यांच्या समक्ष व्रत करणारा पुरुष किंवा स्त्री 'मांगल्य प्राप्त होवो,' अशी लक्ष्मीनारायणांची प्रार्थना करतात. मग त्या सुवासिनींना निरोप देतात. अष्टमीला पुन्हा विष्णूची पूजा करतात आणि आठ तरुण सुवासिनींचा सत्कार करून ब्राह्मणभोजन घालतात. नंतर उद्यापन करतात. फल– मनोरथसिद्धी. [हि. ध.]

मांगीतुंगी एक जैन क्षेत्र. हे स्थान महाराष्ट्रातल्या नासिक जिल्ह्यात आहे. गजपंथगिरी क्षेत्राजवळ एक पर्वत आहे, त्याच्या दोन शिखरांना मांगी व तुंगी अशी नावे आहेत. मांगी शिखरावरील गुंफेत जैन साधूंच्या सुमारे साडेतीनशे मूर्ती व पदचिन्हे असून, तुंगीवरील गुंफेत तीस मूर्ती आहेत. त्यांतल्या काही मूर्ती जैन साधूंच्या असून, तिथे त्यांची नावेही कोरलेली आढळतात. जैनांच्या मते या दोन पर्वतांच्या मध्ये असलेल्या एका जागी बलरामाने कृष्णाचा अग्निसंस्कार केला. इथूनच श्रीरामचंद्र, हनुमान व सुग्रीव हे निर्वाणपदाला गेले, असे जैन लोक मानतात. [जै. ध.]

मांजर एक पाळीव प्राणी. याच्याविषयी काही संकेत प्रचलित आहेत, त्यांपैकी काही असे– मांजराची पूजा केल्याने प्रतिस्पर्ध्याला जिंकता येते. मांजर हे सटवाई देवीचे वाहन आहे. महाराष्ट्रात काही ठिकाणी प्रसूतीच्या पाचवीच्या दिवशी मांजराला बाळंतिणीजवळ राहू देतात. राजस्थानात मात्र नवजात बालकाला मांजराने पळवून नेऊ नये, म्हणून माता बालकाला नेहमी आपल्या पुढ्यात घेऊन झोपते.



मांजर

ती बालकाकडे कधीही पाठ करून झोपत नाही. दिवाळीच्या दिवशी राजस्थानातील लोक मांजराला लक्ष्मीचे प्रतीक मानतात आणि त्याला घरातून बाहेर हाकलीत नाहीत. मांजराला ठार मारणे हे बहुतेक सर्व लोक महापाप समजतात आणि त्याबद्दल प्रायश्चित म्हणून काशीयात्रा करावी व सोन्या… मांजर दान द्यावे, असे सांगतात. पूर्वकाळी हरिद्वार येथील … (नावाडी), लोकांना ओरडून सांगत, की ज्याने मांजराला … मारले असेल, त्याने नावेत बसू नये. तसा कोणी बसल्यास … पैलतीराला जाणार नाही, अशी त्यांची समजूत असे. कामा… निघाले असताना मांजर आडवे आल्यास काम होणार नाही, अशी महाराष्ट्रातील लोकांची समजूत आहे. राजस्थानात … काही लोक प्रवासाला जाण्यापूर्वी मुद्दाम मांजराचे … घेतात. भांडणारी मांजरे समोर येणे किंवा स्वप्नात मां… दिसणे, हे अशुभ मानतात. मांजराला स्पर्श केला असता स्ना… करावे, असे मार्कंडेय पुराणात सांगितले आहे.

मुसलमान लोक मांजरीला पवित्र मानतात. मांजरी… देवदूताकडून शुभाशीर्वाद मिळालेला आहे, अशी त्यांची समजूत आहे. मांजरी घरात वाळगल्यास बरकत आणते आणि मांजरीने स्पर्श केलेले अन्न स्वच्छ राहते, असेही ते मानतात.

मांजरीचे गर्भवेष्टन हे लाभदायक असून, घराच्या … खाली ते पुरले असता, घराचा उत्कर्ष होतो, अशी समजूत आहे. [लौ. दं.; की. पॉ.; श. क.; मरुभारती–ऑक्टो. १९६…]

मांड विलावल थाटातून उत्पन्न झालेला एक राग. आज… कडे हा एक स्वतंत्र राग समजला गेलेला अ… तरी मुळात मांड हा प्रादेशिक लोकगायनाचा एक प्रकार … कजरी, सावन, टप्पा हे जसे पूरब व पंजाबचे प्रकार आहेत, तसा मांड हा मारवाड देशातील प्रकार आहे. हे … निरनिराळ्या रागांत गायिले जातात.

मांड राग महाजातीतील आहे. याच्या आरोहात … बहुधा वर्ज्य करतात. म हा याचा वादी स्वर म्हणता … सा रे म प धा प म ग रे सा हे मांडाचे गुंजन आहे.

हा क्षुद्र राग आहे; पण त्यातील स्वर किंचित करुण … ते मुख्यत्वे वत्सलतेची भावना निर्माण करतात, म्हणून तो … काल स्मृतीत राहतो. [क. सं.; सु. वि. को.]

मांड (इ. स. च्या १५ व्या शतकाचा उत्तरार्ध) … गुजराती संतकवी. हा सिरोही गावचा रहि… असून, बंधारा जातीचा होता. याच्या आईचे नाव मेघू … वडिलांचे नाव हरी असे होते. मदन जोशी हा त्याचा गुरु …

याचा सर्वप्रसिद्ध ग्रंथ प्रबोधबत्तिसी हा होय. हा … ग्रंथ बत्तीस भागांत विभागलेला असून, कवीने त्या प्र… भागाला बीशी अशी संज्ञा दिली आहे. एका विशीत वीस … असून ती षट्पदी, चौपाई, इ. छंदांत आहेत. कवीने या …

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुमारे पाचशे म्हणींना आणि लोकोक्तींना पद्यरूप दिलेले आहे. गुजराती साहित्यात अशा प्रकारच्या रचनेचा प्रारंभ मांडणानेच प्रथम केला, असे म्हणतात. याशिवाय याच्या अन्य ग्रंथांची नावे अशी–(१) रामायण (हनुमंतोपाख्यान सहित) (२) सतभामानूं रुसणु (३) रुकमांगदकथा व (४) पांडवविष्टी. याची काही स्फुट पदे आणि जकडियाही मिळतात. जकडियांमध्ये नीती व वैराग्य हे विषय आहेत.

मांडणकवीच्या भाषेत मराठीचे अवशेष मिळतात, हे विशेष होय. मराठीतील 'चा' हा षष्ठीचा प्रयोग याने अनेकवार केला आहे. याची रचना अत्यंत व्यवस्थित आहे. अनेक म्हणी एकत्रित करण्यात त्याची कोशकाराची भूमिका स्पष्ट दिसते. याच्या या भूमिकेचा प्रभाव म्हणूनच पुढे तीन शतकानंतर दयारामाने प्रबोधबावनीची रचना केली. [गुज. सा. इ.; गु. सं. हिं. दे.]

मांडणा राजस्थानात व मध्य प्रदेशात दसरा, दिवाळी, राखी पुनव, इ. प्रमुख सणांच्या वेळी घराची भिंत सारवून तिच्यावर जे कणे काढतात, त्यांना मांडणा असे म्हणतात. या मांडण्यांत त्रिकोण, चौकोन, षट्कोन, अष्टकोन, स्वस्तिक, कमळ, वेल, फूल, चौपड, इ. आकृती व चित्रे काढतात. यासाठी तांदुळाच्या पिठात थोडी हळद कालवून त्या रंगाचा किंवा गेरू रंगाचा उपयोग करतात. भिंतीवर लहान-मोठे चौक सारवून त्यांत या आकृती भरतात. घरातील स्त्रिया आणि मुली हे काम करतात. कित्येकदा कणा आखून रंगाचे ठिपके देतात. आणि आडव्या–उभ्या रेषांनी ते ठिपके जोडून विशिष्ट आकृती किंवा त्रिकोणादिक बनवितात. या आकृती किंवा रेखाचित्रे कोणत्या प्रसंगी कोणती काढायची, ते परंपरेने ठरलेले असते. विवाहाच्या प्रसंगी माय माता व भैरू यांच्या रेखाकृती घरात मूल जन्मले म्हणजे पदचिन्ह, इ. त्यांचे प्रकार असतात. पुत्रजन्माच्या प्रसंगी एका कागदावर स्वस्तिक, पाळणा, घुंघरा, इ. आकृती काढून त्यांवर कुंकू शिंपडतात. हा कागद बाळंतिणीच्या सासरी पाठवायचा असतो. काही ठिकाणी हा कागद मुलीच्या माहेरी पाठविण्याचीही चाल आहे. कुठे कुठे लक्ष्मीपूजनाच्या वेळी पगल्या (पदचिन्हे) काढून त्यांचीही पूजा करतात. दिवाळीच्या वेळी शेतकरी आपल्या भिंतीवर नांगर आणि औत हाकणारा यांची चित्रे काढून त्यांची पूजा करतात. आदिवासी लोकांतही विशिष्ट प्रसंगी कालवलेल्या पिठाच्या अथवा चुन्याच्या रेघोट्यांनी भिंतींवर चित्रे आणि आकृत्या काढण्याची चाल आहे. विशिष्ट सणाच्या दिवशी किंवा मंगलकार्याच्या वेळी भिंती सारवून त्यांवर कणे काढावे आणि त्यांत सूर्य, चंद्र, शिव, गौरी, नाग, इ. चित्रे असावी, असे मत्स्य, वामन व भविष्य या पुराणांत सांगितले आहे. [लोक–कला त्रैमासिक, भाग २, अंक २ – श्री. ईशनारायण जोशी, धर्मशास्त्री १९५५; श्री. भगवान सहाय त्रिवेदी– युगप्रभात, १६ सप्टेंबर १९५९]

मांडवगड एक गिरिदुर्ग. हा माळव्यात आहे. माळवा हा आर्यावर्त आणि द. भारत यांना जोडणारा दुवा आहे. त्याने भारताची काही वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक स्थळे आपल्या अंगावर वागवली आहेत. मांडवगड हे त्यांपैकी एक होय. निसर्गसौंदर्य आणि प्राचीन वैभवाची प्रतीके असलेली भव्य भवने या गडावर असल्याकारणाने हजारो प्रवासी दर वर्षी मांडवगड पाहायला जातात. अकबर, जहांगीर व शहाजहाँ या मोगल सम्राटांनी इथ बराच काळ वास्तव्य केले होते. जहांगीरने आपल्या आत्मचरित्रात या गडाविषयी लिहून ठेवले आहे, की 'सुखप्रद हवा-पाणी आणि मनोरम दृश्ये या दृष्टीने मांडवगडासारखे सुंदर स्थान मला दुसरे ठाऊक नाही.'

हा दुर्ग धारपासून २२ मैलांवर, दक्षिण विंध्याचलावर बांधलेला आहे. उत्तर–दक्षिण सुमारे चार मैल आणि पूर्व–पश्चिम सुमारे पाच मैल असलेल्या एका पठारावर त्याची उभारणी झाली आहे. याला तीन बाजूंनी ६०० फूट खोल आणि कुठेकुठे एक फर्लांगापासून तीन फर्लांगांपर्यंत रुंद असा खंदक आहे; त्याला कांकडाखोह असे म्हणतात. हा खंदक दक्षिण अंगाने हळूहळू उतरत निमाड प्रांताला जाऊन मिळतो.

मांडवगड कोणी बांधला आणि कधी बांधला याविषयी काही माहिती मिळत नाही. तिथले प्राचीन भग्नावशेष पाहिल्याअंती तो एक प्राचीन गिरिदुर्ग असावा, एवढेच अनुमान करता येते. मंडपदुर्ग, मंडपाचल, मंडपगिरी, मंडपाद्री, मंडपशैल, इ. नावांनी ऐतिहासिक वाङ्मयात त्याचे उल्लेख आढळतात.

माळव्यावर परमार वंशाचे आधिपत्य सुमारे पाचशे वर्षे राहिले. या काळात मांडवगड हाही परमारांच्या सत्तेखाली राहिला. त्यांच्या कारकीर्दीत मांडवगड कला आणि साहित्य यांचे केंद्र बनला होता. त्या काळात तिथे अनेक देवालये, दीपस्तंभ, इ. वास्तू निर्माण झाल्या. सांप्रत मांडवगडावर अस्तित्वात असलेल्या बहुतेक साऱ्या वास्तू मात्र मुसलमानी राज्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या आहेत.

माळव्यावर पहिले मुसलमानी आक्रमण गुलाम वंशातल्या इल्तिमिश या सुलतानाने केले. दुसऱ्यांदा सुलतान बलबन हा माळव्यावर चालून आला. तिसरे आक्रमण अलाउद्दिन खिलजी याने केले. त्याने आपला सेनापती आईन उल्मुल्क याच्या हस्ते मालवनरेशाचा पराभव केला. तेव्हापासून या प्रांतावर मुसलमानांचा स्थायी स्वरूपात अधिकार स्थापन झाला. माळ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ग्यावर अधिकार गाजवणारे हे सुलतान विद्याप्रेमी व विद्वानांचे आश्रयदाते होते. यामुळे या गडावर साहित्यनिर्मितीही बरीच झाली आहे. तारीख महमदशाही मंडवी, तारीखे नासिरशाही हे इतिहासग्रंथ इथे रचले गेले. महाकवी मंडन यानेही इथे राहून कित्येक सुंदर ग्रंथ निर्माण केले. संग्रामसिंह सोनी याचा बुद्धिसागर नामक ग्रंथ, पुजराज याची सारस्वत व्याकरणावरची व सोमा गणीची महावीरचरित्रावरील टीका यांची टीका रचनाही या गडावर किंवा त्याच्या आसपास झालेली आहे.

गडावर प्रवेश करताना जो एक मोठा दरवाजा लागतो, त्याला दिल्ली दरवाजा असे नाव आहे. हुशंगशहाने हा दरवाजा बांधला. या दरवाजाजवळूनच एक रस्ता सरळ गावात जातो आणि दुसरा दक्षिण अंगाने गडावरील राजप्रसादाकडे जातो. गडावरची दर्शनीय स्थळे पुढीलप्रमाणे–

तबेला महाल–पूर्वीच्या काळात याच्या तळमजल्यावर शाही फौजेचे घोडे बांधले जात आणि वरच्या मजल्यावर त्यांचे



तबेला महाल – मांडवगड

रक्षक राहत. सांप्रत त्याचे रूपांतर डाक बंगल्यात केले आहे.

जहाज महाल – तबेला महालाच्या समोर दोन तलाव आहेत. एक कपूर तलाव व दुसरा मुंज तलाव. या दोन तलावांच्या मधली लांबलचक भव्योत्तुंग वास्तू जहाजासारखी दिसते, म्हणून तिला जहाज महाल असे नाव पडले आहे. याची लांबी ३६१ फूट, रुंदी ४८ फूट व उंची ३२ फूट आहे. हा महाल सुलतान गियासुद्दीन खिलजी याने बांधला, असे म्हणतात. सम्राट जहांगीर याच शाही प्रासादात काही काल राहिला होता. इथली मोठमोठी दालने महिरपींनी युक्त आहेत. इथे सुंदर छते व कलाकुसरीचे झरोके आहेत. महालाच्या खाली एक नाली असून, ती दोन्ही तलावांना मिळते.

हिंडोला महाल – जहाज महालाच्या जवळच झूल्यासारखा दिसणारा जो एक महाल आहे, त्याला हिंडोला महाल असे म्हणतात. सुलतानांच्या काळात ही वास्तू दिवाने–खास म्हणून वापरली जात होती. ही इमारत इ. स. च्या १५ व्या शतकाच्या अखेरची आहे. सर जॉन मार्शल म्हणतो, की दिल्ली किंवा आग्रा या दोन्ही शहरांमध्ये या काळात इतकी सुंदर वास्तू निर्माण झाली नाही. मात्र हिच्या भव्यतेला आणि सुंदरतेला एक गालबोट



हिंडोला महाल – मांडवगड

आहे. इथली अनेक हिंदू मंदिरे पाडून त्या सामग्रीने हिची उभारणी झाली आहे. हिच्या जवळ एक मशीद आहे. तिला दिलावरखांची मशीद असे म्हणतात.

हिंडोला महालाच्या उत्तरेला नाहर झरोका आहे. माळव्याचे सुलतान प्रजेला या झरोक्यातून दर्शन देत असत. जहाज महालाच्या वायव्येला चंपा बावडी आहे. हिच्या जवळच एक प्रशस्त स्नानगृह आहे. मुंज तलावाच्या पश्चिम तीरावर मल्लो महाल आहे. सांप्रत त्याचे भग्नावशेषच दिसतात.

इथून पुढे जाताना मोठमोठ्या वृक्षांची राई लागते. त्यात खुरासानी चिंचेची झाडेच प्रामुख्याने आहेत. इथून थोडे दक्षिणेला गेल्यावर लोहानी गुंफा नावाच्या काही बौद्ध गुहा दिसतात. त्यापुढे लागतो तो हुशंगशहाचा मकबरा. गडावरची ही सर्वांत सुंदर इमारत होय. ही इमारत संगमरवरी आहे.



छप्पन महाल – मांडवगड

हिच्या पूर्वेला जामा मशिद आहे. ही इ. स. १४५४ मध्ये महमद खिलजीने बांधली. हिची लांबी २७४ फूट, ६ इंच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रुंदी २७३ फूट, ९इंच आहे. मशिदीसमोर अशर्फी महाल आहे. त्यापुढे एक विजयस्तंभ लागतो तो सातमजली आणि १६३ फूट उंच आहे. महमूद खिलजीने महाराणा कुंभावर विजय मिळविल्यानंतर त्याचे स्मारक म्हणून हा स्तंभ उभारला. पण दुर्दैव हे, की वीज पडून तो स्तंभ कोसळला. या स्तंभाजवळच एक राममंदिर आहे. इ. स. च्या ९ व्या शतकात बनवलेली रामप्रभूची सुंदर मूर्ती या मंदिरात विराजमान आहे. गावाच्या दक्षिण अंगाला एक प्राचीन जैन मंदिरही आहे. प्राचीन काळापासून जैनांनी मांडवगड हे आपले तीर्थस्थान मानले आहे.

हुशंगशहाच्या कबरीसारख्या आणखी अनेक कबरी मांडवगडावर आहेत; पण त्या लहान आहेत. त्यांचे घुमट बरेच उंच आहेत. दाइका महाल, छप्पन महाल, इ. त्यांची नावे आहेत.

नीलकंठेश्वर– जैन मंदिरापासून थोडे पुढे गेल्यावर उजव्या हाताला जो एक रस्ता जातो, त्यावर नीलकंठेश्वराचे मंदिर आहे. हे मंदिर खोलगट भागात असून, तिथे गार पाण्याचे झरे



नीलकंठेश्वराचे मंदिर – मांडवगड

आहेत आणि सभोवती घनदाट वृक्षराजीही आहे. गडावर बरीचशी पायपीट झाल्यावर थोडा वेळ विश्रांती घ्यायला हे ठिकाण अत्यंत आल्हाददायक आहे.

नीलकंठेश्वराच्या दक्षिण अंगाला गडाचा तारापोर दरवाजा लागतो. तिथून मागे फिरल्यावर सागर तलाव दिसतो. त्याच्या तीरावर एक जागा अशी आहे, की माणूस जो ध्वनी उच्चारील त्याचा प्रतिध्वनी निघतो. तिथूनही अनेक मोठमोठ्या इमारती दिसतात.

इथून रस्ता वळतो आणि तो रेवाकुंडावर येतो. हे कुंड रूपमतीने बांधले आहे. या कुंडातून नर्मदा गुप्त रूपाने वाहते, असे म्हणतात. नर्मदापरिक्रमा करणाऱ्यांची अशी समजूत आहे, की या रेवाकुंडात स्नान केल्यावाचून परिक्रमा सफल होत नाही.

बाजबहादुर व रूपमती यांचे महाल – रेवाकुंडाजवळच बाजबहादुराचा महाल आहे. त्याच्याच थोडे पुढे रूपमतीचा महाल आहे. रूपमती ही गणिकेच्या कुलात जन्मली होती, असे काही लोक मानतात; तर काही लोक तिला गृहस्थ कुलातली समजतात. यांपैकी काहीही असले, तरी ती बाजबहादुराची परम प्रेयसी किंवा काहींच्या मते धर्मपत्नी होती. जगून आणि मरूनही तिने पातिव्रत्य जागवले. बाजबहादुराचे शेवटचे दिवस अत्यंत वाईट गेले. मोगल सेनेच्या आक्रमणात जीव बचावण्यासाठी त्याला खानदेशाकडे पळून जावे लागले. मांडवगड मोगलांच्या हाती गेला. बाजबहादुराचा सारा जनानखाना मोगल सरदार आदमखाँ याच्या हाती लागला; पण परपुरुषाचा स्पर्श होण्याचा आतच रूपमतीने विषप्राशन करून इहलोक सोडला.

रूपमतीचा महाल हे गडावरचे सर्वांत उंच ठिकाण आहे. इ. स. च्या १५ व्या शतकात निमाड प्रांतावर नजर ठेवण्यासाठी हा महाल बनवला गेला होता. इथले बहुतेक भव्य प्रासाद घोरी आणि खिलजी या सुलतानांनी निर्माण केले आहेत. ते मरून गेले; पण शिल्पकलेच्या रूपाने अमर झाले. [मांडू–दि सिटी ऑफ जॉय; वीणा–धार अंक; धार तथा मांडव.]

मांडवपरतणे

विवाहसमारंभातील एक लौकिक विधी. लग्न लागल्यावर दुसऱ्या दिवशी वधूची आई विहिणीला आणि वरपक्षाकडील अन्य मानकरणींना आपल्या घरी न्हायला बोलावते. या वेळी न्हायला जाणाऱ्या सर्व स्त्रिया शुभ्र पातळे नेसून वाजतगाजत वधूगृही जातात. जाताना त्यांना परिटाकडून पायघड्या घालण्यात येतात. वधूगृही आल्यावर सर्वांना प्रथम बांगड्या भरतात आणि मग न्हाऊ घालतात. या स्नानाला रासन्हाणे असे म्हणतात. दुपारी वराकडील मंडळींना मेजवानी होते. या मेजवानीत करंज्या व पाटवड्या यांची आवश्यकता असते. भोजनानंतर व्याही मंडळींना पानसुपारी व अहेर आणि स्त्रियांना खण – लुगडी देतात. मांडवपरतणे झाले की लग्नसमारंभ संपतो. [ल. वि. सो.]

मांडव्य

एक ऋषी. संहितेचा तात्त्विक अर्थ लावणारा आचार्य असा ऐतरेय आरण्यकात याचा उल्लेख आहे (३. १. १.). याने शुक्ल यजुर्वेदाची शिक्षा रचली आहे. पितृतर्पणात याचा समावेश आहे.

मांडव्य नावाचा एक ज्योतिषीही आढळतो. याच्या नावावर मांडव्यसंहिता नामक एक ग्रंथ उपलब्ध आहे. हा भृगुकुलोत्पन्न गोत्रकार आहे. [प्रा. च. को.; म. ज्ञा को.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मांडव्यतीर्थ हे ठिकाण महाराष्ट्रातील पंढरपूरच्या ईशान्येला भटुंबरे गावाजवळ आहे. आज याला मांडव खडकी असे म्हणतात. प्राचीन काळी मांडव्य ऋषीने इथे तपश्चर्या केली, म्हणून या क्षेत्राला हे नाव प्राप्त झाले, असे समजतात. इथे स्नान करून कोणत्याही पुण्यकृत्याचा प्रारंभ केला, की ते सिद्धीला जाते, अशीही लोकांची श्रद्धा आहे. पंढरपुरात गयावर्जन करणारे लोक प्रथम इथे येऊन स्नान करतात आणि मग गयावर्जनाला प्रारंभ करतात. [पं. मा.]

मांडूक्योपनिषद हे उपनिषद अथर्ववेदाचे आहे. याचा कर्ता अज्ञात आहे. काही विद्वान, हे उपनिषद गौडपादाचार्यांनी रचले, असे म्हणतात; पण ते केवळ अनुमान आहे. सनपूर्व ११०० ते १००० या काळात हे निर्माण झाले असावे, असे डॉ. दप्तरींचे मत आहे. प्राचीन उपनिषदांतले हे शेवटचे उपनिषद आहे. याला शेवटचे एवढ्याचसाठी म्हणायचे, की यात उपनिषद्विचारांची वाढ पूर्णावस्थेला गेलेली दिसते. साऱ्या उपनिषद्विचारांचे सार यात स्पष्ट, ठसठशीत व मोजक्या शब्दांनी सांगितले आहे. यात बाराच वाक्ये अशी आहेत, की ज्यांत आत्म्याच्या चार अवस्थांचे वर्णन आहे. प्रश्नोपनिषदात आत्म्याच्या तीन अवस्था स्पष्टपणे वर्णित असून, एक अवस्था गर्भितपणे वर्णिली आहे. या उपनिषदात मात्र ती अवस्था चौथी म्हणून तिचे वर्णन केले आहे. यात जो विषय चर्चिला आहे, तो सारांशरूपाने श्री. पांडुरंगशास्त्री गोस्वामी यांनी पुढीलप्रमाणे सांगितला आहे–

ॐकार हा आत्म्याचा वाचक आहे. त्यात अ, उ, म आणि अर्धमात्रा असे चार अंश आहेत. त्यांतील अ हा अंश म्हणजे जागृत अवस्थेचा अभिमानी होय. तोच स्थूल शरीरसमुदायाचाही अभिमानी असतो. जागृत अवस्थेत तो देहाच्या बाहेर असलेल्या घटपटादी अवस्थांचा दीर्घ अनुभव घेत असतो. यालाच विश्व किंवा वैश्वानर म्हणतात.

उकार हा प्रणवाचा दुसरा अंश होय. तो स्वप्नस्थानाचा अभिमानी म्हणजे वासनामय पदार्थांचा भोक्ता असतो. तो स्वप्नामध्ये देहाच्या आतच वासनामय विश्वप्रपंचाचा अनुभव घेत असतो. हा तैजस आणि सूक्ष्म पदार्थांचा भोक्ता असल्यामुळे याला प्रविभक्तभुक् असे म्हटले आहे.

प्रणवाचा तिसरा अंश मकार हा आहे. तो कारणदेहाचा अथवा सौषुप्त अवस्थेचा सूचक आहे. सुषुप्ती म्हणजे गाढ निद्रा. या अवस्थेत आत्मा प्रविष्ट झाला म्हणजे तो सुप्त-स्वरूपाशी एकरूप होऊन जातो. भिन्न भिन्न विषयांची प्रचीती त्या अवस्थेत त्याला येत नाही; पण आत्म्याचे ज्ञान मात्र अव्याहत असते. म्हणून त्या काळात आत्म्याला प्रज्ञानघन म्हणतात. आत्मा त्या काळात स्वस्वरूपाचा आनंद अनुभवीत असल्याने त्याला आनंदभुक् असे म्हणतात. परम सूक्ष्म चित्प्रतिबिंबित अज्ञानवृत्ती हीच त्याच्या आनंदाच्या अनुभवाचे साधन असल्यामुळे त्याला चेतोमुख असे म्हणतात. या अवस्थेत आत्म्याला प्रकृष्ट रूपाने अंतर्बाह्य विषयाचे ज्ञान असू शकत नाही, म्हणून त्याला प्राज्ञ असेही म्हणतात.

या तीनही अवस्थांच्या पलिकडे असलेले निरुपाधिक चैतन्य हाच अर्धमात्रात्मक असा आत्म्याचा चौथा अंश होय. याला तुरीय असे म्हणतात. हा तुरीय भाग ज्ञानेंद्रियांना दिसू शकत नाही म्हणून त्याला अदृश्य म्हटले आहे. त्याच्या ठिकाणी देणे-घेणे, इ. व्यवहार संभवत नाहीत, म्हणून त्याला अग्राह्य व अव्यवहार्य म्हटले आहे. अनुमानाने त्याचे ज्ञान होत नाही, म्हणून त्याला अलक्षण म्हटले आहे. अंतःकरणाचा विषय होऊ शकत नाही, म्हणून अचिंत्य म्हटले आहे. शब्दांनी बोलून दाखविता येत नाही, म्हणून त्याला अव्यपदेश्य म्हटले आहे. एकमेवाद्वितीय आत्मरूपाने स्वयंप्रकाशित असल्याने त्याला एकात्मप्रत्ययसार म्हटले आहे. त्याच्या ठिकाणी सर्व प्रपंचाचा उपशम होतो, म्हणून त्याला प्रपंचोपशम म्हटले आहे.

त्याला या अवस्थेत शांत, शिव व अद्वैत असेही म्हणतात. शांत म्हणजे निर्विकार, शिव म्हणजे आनंदरूप आणि अद्वैत म्हणजे एकरूप होय. हेंच आत्म्याच्या तुरीय भागाचे स्वरूप आहे. [उ. र.; उपनिषदर्थव्याख्या–डॉ. के. ल. दप्तरी; स्तोत्रसंग्रह – म. म. पांडुरंग गणेश गोस्वामी.]

मांडो गोमंतकातील ख्रिस्ती लोकांच्या लोकगीतांचा व नृत्याचा एक प्रकार. मांडो गीतांची भाषा ही ख्रिस्ती लोकांची पोर्तुगीजमिश्रित कोकणी आहे. गीतांची बांधणी छंदात्मक असली, तरी वाद्यांच्या साथीवर गायला योग्य अशी ती लयदार असते. या गीतांची रचना पिढ्यानपिढ्या चालत आली आहे. काही गीते मात्र परंपरेने चालत आली आहेत. प्रेम आणि शृंगार हा मांडो गीतांचा मुख्य विषय आहे. क्वचित राजकारण व समाजकारण या विषयांवरही उपरोधिक मांडो रचले गेले असून, ते त्या त्या काळात लोकप्रियही आहेत.

मांडो गीतांत बहुधा स्त्री आपल्या कोमल व हळुवार भावनेचा आविष्कार करते. एक प्रेयसी आपल्या प्रियकराला उद्देशून म्हणते–

सोर्गार पेटला नुय रे लांपू ओंत्रोळार सुकणी कोरताय ...
जार्दिनात पोडला फुलांचो पोरमोळ तू मुज्या सासणाचो ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – स्वर्गात दिवा पेटला आहे, नाही का रे ? आकाशात पाखरे गात आहेत. उद्यानात फुलांचा सुगंध पसरला आहे. तू माझा अनंत काळचा सांगाती आहेस.

सोदांच आमगेर तू येतालोय मुजे कुशीक रे बोसतालोय
काळजाच्या उमाळ्यांनी गोपांत घेतालोय
आता तू सासनाक मुजो जालोय

अर्थ – तू आमच्याकडे नेहमीच येत होतास. माझ्या शेजारी बसत होतास. प्रेमभराने मला जवळ घेत होतास. आता तू कायमचा माझा झालास.

मांडो गीत गायले जात असतानाच, मांडो नृत्यही केले जाते. नृत्याला घुमट व व्हायोलिन या वाद्यांची साथ असते. नृत्याच्या वेळी पुरुष व स्त्रिया रांगा करून समोरासमोर उभ्या राहतात. स्त्रियांच्या हातांत चिनी पंखे असतात. त्यांची हालचाल सुरांशी व बोलांशी मिळती-जुळती असते. पण या हालचालीपेक्षाही स्त्रियांच्या नेत्रविभ्रमांना अधिक महत्त्व असते. पुरुष काळा सूट घालतात आणि त्यांच्या हातांत रंगीबेरंगी रुमाल असतात. स्त्रियांच्या हातांतील पंख्यांप्रमाणेच ते रुमालांची हालचाल करतात. या नृत्याची लय संथ असते आणि पदन्यासही हळुवार असतो. मांडो नृत्य झाल्यावर दुपंद किंवा दुल्पद हा गीतप्रकार गातात आणि त्याच्या सुरावटीवर नृत्य करतात. या वेळी गाण्याची, साथीची व पदन्यासाची लय वाढलेली असते.

इ. स. च्या १७ व्या शतकात, पोर्तुगीज पूर्व आफ्रिकेतल्या लोकांनी मांडो हा नृत्य-गीतप्रकार गोमंतकात आणला असावा, असे काही लोकांचे मत आहे. [श्री. बा. द. सातोस्कर]

मांढरदेवी हिला काळूबाई, कालिका अथवा कालेश्वरी अशीही नावे आहेत. हिचे स्थान सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यात मांढरदेव नावाच्या गावाजवळ, महादेवाच्या डोंगरावर आहे. तिथे हिचे हेमाडपंती मंदिर असून, ते इ. स.च्या १२व्या किंवा १३ व्या शतकातील असावे, असे म्हणतात. या मंदिराचे सभागृह इ. स. १९२४मध्ये बांधण्यात आले आणि सभागृहाचा पितळी दरवाजा इ. स. १९३७मध्ये उभारला गेला. ही दोन्ही कामे मुंबईच्या एका देवीभक्ताने केली. देवीच्या समोर सिंहाचा संगमरवरी पुतळा आणि एक दीपमाळ आहे. गुरव या देवीचे पुजारी आहेत. देवीची पूजा त्रिकाळ असते.

पौषी पौर्णिमा हा देवीच्या जत्रेचा प्रमुख दिवस होय. या दिवशी तिच्या दर्शनासाठी कर्नाटक, आंध्र, मध्य प्रदेश, इ. प्रदेशांतून अनेक भक्त येतात. या भक्तांमध्ये हिंदूंप्रमाणे मुसलमानांचाही समावेश असतो. अनेक भक्त देवीला साडी-चोळीचा आहेर करतात. पाहा – काळूबाई. [फे. फे. म.; सातारा गॅझे.]

मांदळ एक आनद्ध वाद्य. याचा आकार पखवाजाप्रमाणे पण मोठा असतो. हे लाकडाचे न बनविता मातीचे बनवितात. याचे एक तोंड लहान व दुसरे मोठे असते. लहान तोंडाला नारी व मोठ्या तोंडाला नर म्हणतात. मांदळाची पुडे सुताच्या दोरीने आवळतात. मात्र लाकडी गठ्ठे वापरीत नाहीत. मांदळाच्या दोन्ही मुखांना पाण्यात भिजविलेली कणिक लावतात. नरमुखाला नारीमुखापेक्षा कणिक अधिक असते. याला शिवगौरीचे वाद्य असे म्हणतात आणि गौरी नृत्यनाट्यात हे वाजवितात. यावर सर्व प्रकारचे बोल काढता येतात. [परंपरा, लोकगीत विशेषांक, एप्रिल १९५६; रा. लो. सं.]

मांदळमामा कुलाबा जिल्ह्यातले दैवज्ञ लोक, मुंज, लग्न, इ. कार्यात हा लौकिक समारंभ करतात. मांदळ म्हणजे ढोल. हा ढोल मामा वाजवितो म्हणून याला मांदळमामा असे नाव मिळाले आहे. मुंज किंवा लग्न लागण्यापूर्वी भाचा किंवा भाची यांना ढोलावर बसवून तो ढोल मामा वाजवितो. या वेळी मामाच्या व भाच्याच्या किंवा भाचीच्या डोक्यावर एक उपरणे घालतात. हे उपरणे मुलाच्या अथवा मुलीच्या पित्याकडील असते. शेवटी मामाला या उपरण्याचाच अहेर करतात. या वेळी चार सुवासिनी हातात गाडगी घेऊन ती वाजवीत मामा-भाच्यांच्या भोवती चार फेऱ्या घालतात. तसे करतांना त्या पुढील गाणे म्हणतात–

नाचे ग नाचणी, पाया लागे मुरमुर माती ।
मामाला गे शेले पयरावती ।।

गाणे म्हणून झाल्यावर मामाला नारळ देतात. मग मामा मुलाला अथवा मुलीला उचलून देवाजवळ नेतो. या सगळ्या विधीला मांदळमामा असे म्हणतात. [बदलापूर]

मांसाहार फार प्राचीन काळापासून भारतात मांसाहार प्रचलित आहे. हडप्पा आणि मोहेंजोदडो येथील लोक पाण्यातील प्राणी व पशुपक्षी यांचे मांस खात असत. वैदिक काळात यज्ञप्रसंगी पशू बळी देऊन त्यांचे मांस खाण्याची प्रथा होती. अतिथींच्या सत्कारासाठी त्या काळी महोक्ष (मोठा बैल) मारीत असत. विद्वान, व्याख्यानकर्ता व वेदज्ञ पुत्र प्राप्त व्हावा अशी इच्छा असणाऱ्याने गाय किंवा बकरा यांचे मांस खावे किंवा तुपाबरोबर मांसौदन खावा, असे एक विधान बृहदारण्यक उपनिषदात उल्लेखिलेले आहे.

रामायणकालातही विविध प्रकारचे मांसपदार्थ लोक खात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असत. भरद्वाजाच्या आश्रमात भरताच्या सैनिकांना विविध मांस-पदार्थ वाढले गेले होते. सीतेने गंगा नदीला मांसभूतौदन अर्पण करण्याचा संकल्प केला होता. तसेच चित्रकूट पर्वतावर असताना रामचंद्राने सीतेला स्वादिष्ट मांस दिले होते. त्या काळात श्राद्धाच्या वेळी ब्राह्मणांना मांसपदार्थ वाढण्याची पद्धत होती.

ज्या पशूंचे मांस लोक खात असत, त्यांचे मेध्य (पवित्र) व अमेध्य (अपवित्र) असे दोन प्रकार होते. बकरा, मृग व वराह हे मेध्य पशू असून, त्यांचेच मांस देवतांना अर्पण करीत. मृगाचे मांस आर्यांना विशेष प्रिय होते. वनवासातील पहिल्याच दिवशी क्षुधापीडित रामलक्ष्मणांनी अनेक प्रकारचे मृग मारले, अशा प्रकारचे उल्लेख रामायणात आहेत.

चरबी असणारे पक्षी आहाराच्या दृष्टीने श्रेयस्कर मानले जात असत. हंस, प्लव, क्रौंच व कुरर हे पक्षी त्यांपैकी प्रमुख होते. मोर, कोंबडा, इ. पक्षी व मासे हेही खाण्याचे प्राणी होते. मांस सुकवून ठेवण्याचीही कला त्या काळच्या लोकांना अवगत होती. रामायणकाळी लोकांत मांसाहार मोठ्या प्रमाणावर चालू होता, तरी त्याला तेवढी प्रतिष्ठा नव्हती. जे ऋषिमुनी कंदमुळे व फळे यांवर निर्वाह करीत, तेच श्रेष्ठ मानले जात.

महाभारतकाळी मांसभोजनाचा प्रचार श्रीमंत लोकांत अधिक होता. याच काळात मांसाहाराचा निषेधही होऊ लागला होता. अनुशासन पर्वात युधिष्ठिराने विचारल्यावरून भीष्माने सांगितले आहे, की ज्याला सौंदर्य, दीर्घायुष्य, अमर्याद शक्ती, तीव्र बुद्धी आणि स्मरणशक्ती हवी असेल, त्याने मांसाहार करू नये. आध्यात्मिक उन्नती साधू इच्छिणाऱ्या व्यक्तीने तर मांसाहार करूच नये, असे महाभारतात स्पष्ट सांगितले आहे. मांस व मदिरा यांचा त्याग केल्याने अश्वमेध केल्याचे पुण्य मिळते; जो दुसऱ्याचे मांस खाऊन पुष्ट होतो, तो शेवटी दुर्गतीला जातो, असे नारदाने म्हटले आहे.

अशा या निषेधांमुळे नित्याचा मांसभोजनाचा प्रघात समाजात कमी होऊ लागला. पण यज्ञप्रसंगी देवता व पितर यांना पशुबळी अर्पण करून त्यांचे मांस प्रसाद म्हणून भक्षण करण्याची प्रथा समाजात चालूच राहिली. निरनिराळ्या मांसांनी श्राद्ध केले असता विभिन्न कालापर्यंत पितर संतुष्ट होतात, असे विष्णूपुराणात सांगितले आहे.

मांसाहार करू नये, अशा प्रकारचा विचारप्रवाह वैदिक कालातही दिसतो. मांसाहाराचा त्याग का करावा, त्याची काही कारणेही सांगितलेली आहेत. या लोकी मनुष्य ज्या प्राण्याला खातो, तोच प्राणी परलोकात त्याला खाईल, असे शतपथ ब्राह्मणात सांगितले आहे. यज्ञासाठी दीक्षा घेतलेला यजमान व तपस्वी यांनी मांसभोजन करू नये. यजायज्ञीय साम गाणाऱ्याने जन्मभर नाही, तर निदान एक वर्ष तरी व आचार्याने उपाकर्मापासून उत्सर्जनापर्यंत तरी मांस खाऊ नये, असेही सांगितलेले आहे यावरून असे दिसते, की वैदिक काळात काही लोक मांसाहार हा आध्यात्मिक उन्नतीला प्रतिबंधक मानीत असत.

उपनिषत्कालापासून यज्ञ-यागांचे महत्त्व कमी होऊ लागले. यज्ञ केल्याने स्वर्ग मिळतो, असे त्याचे फल सांगितले होते. त्याऐवजी तप आणि तत्त्वज्ञान यांच्या योगाने मोक्षप्राप्ती होते, असे या कालात ऋषिमुनी प्रतिपादन करू लागले. वानप्रस्थ व संन्यास आश्रमातील मुनींनी मांसभोजनाचा जवळजवळ त्याग केला. त्याचा प्रभाव साऱ्या समाजावर पडला. तसेच सात्त्विक दृष्टीनेही मांसाहार हीन मानला जाऊ लागला. मांसाहार करणे ही जरी सामान्य माणसाची प्रवृत्ती असली तरी, त्यापासून परावृत्त होणे हेच श्रेयस्कर आहे, असे मनूने म्हटले आहे (५.५६).

बौद्ध व जैन संस्कृतींत अहिंसातत्त्वाला प्राधान्य दिलेले आहे. अहिंसेचे पालन करायचे तर प्राणिवध करता येणार नाही व प्राणिवध केला नाही, तर मांसही मिळणार नाही. अशा या साखळीमुळे बौद्ध व जैन धर्मांच्या अनुयायांना मांसाहार बंद करावा लागला. गौतम बुद्धाच्या काळात काही ठराविक दिवशी मांसासाठी पशुवध करायचा नाही, असा नियम करण्यात आला. सम्राट अशोकानेही मांसाहारावर निर्बंध जारी केले व ते तो स्वतःही पाळू लागला. त्याच्या आहारातील सूपासाठी नेहमी हजारो पशू मारले जात. त्याऐवजी फक्त दोन मोर व एक हरिण एवढ्याच प्राण्यांची हत्या होऊ लागली. पुढे ही हिंसा बंद होईल, असे त्याने प्रजेला आश्वासन दिले. पुढे तर त्याने आपल्या राज्यात पशुपक्षी व मासे यांची हत्या बंद केली.

यज्ञातील हिंसेला स्पष्ट विरोध उपनिषदे, महाभारत, मनुस्मृती, इ. ग्रंथांत केलेला नाही. पौराणिक कालातही यज्ञीय हिंसेचे समर्थक लोक होतेच. काही पुराणांनी मात्र मांसाहाराला तीव्र विरोध केला. भागवत पुराण हे त्यांपैकी एक महत्त्वाचे पुराण होय. त्याने मांसाहाराच्या विरुद्ध जे प्रतिपादन केले, त्याचा परिणाम लोकांवर पुष्कळ झाला. वैष्णव लोकांनी मांसाहाराचा जो त्याग केला, त्याचे सर्व श्रेय भागवत पुराणालाच आ

अशा प्रकारे सात्त्विक वृत्तीच्या अध्यात्मवादी व्यक्ती मांसाहारापासून निवृत्त झाल्या, तरी भोजनात रुचीला प्राधान्य देणाऱ्या लोकांत मांसाहार चालूच राहिला. आणि आजतागायत सर्व समाजांत तो मोठ्या प्रमाणावर चालू आहे. [रा. का. न. ; भा. प्रा. सं. ; म. भा. स. ; प्रा. भा. सं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माउली एक ग्रामदेवता. कोकणात बऱ्याच ठिकाणी हिची मंदिरे आढळतात. हिची मूर्ती चतुर्भुज किंवा अष्टभुज असते. ही एका हाताने महिषासुराची जीभ ओढते आणि दुसऱ्या हातातील त्रिशूळाने त्याला भोसकते. हिच्या डोक्यावर मुकुट आणि गळ्यात माळ असते. कधीकधी ही महिषासुराला पायाखाली तुडवीत आहे, असेही दाखविलेले असते. सर्प, फुरसे वगैरे विषारी प्राण्यांचा दंश झाल्यास विष उतरावे म्हणून हिचे तीर्थ देतात. ते घेतल्याने कुष्ठ रोगही बरा होतो, असे समजतात. कित्येक ठिकाणी हिला सांतेरी असेही म्हणतात. पाहा – सांतेरी. [चित्पावन]

माकड एक चतुष्पाद प्राणी. माकडाला हनुमंताचा वंशज व मानवाचा पूर्वज मानतात. काही वन्य जाती त्याला आपल्या टोळीचा देव समजतात. ओडिसा प्रदेशातल्या भुइयांच्या मते माकड हे सूर्याचे प्रतीक आहे. उत्तर भारतातल्या अनेक वसाहतींनी माकडाला आपल्या वसाहतींचा रक्षणकर्ता मानले आहे व त्यासाठी त्याची मंदिरेही उभारली आहेत. ही मंदिरे सामान्यतः जलस्थानांजवळ असतात. पाण्यात होणाऱ्या अपघातांपासून माकडदेवाने आपले रक्षण करावे, असा त्यामागे हेतू असतो. माकड हा जात्याच विध्वंसक प्रवृत्तीचा पण बुद्धिमान प्राणी आहे. माकड मनुष्यवस्तीत मरण पावले, तर त्याला पूजोपचार समर्पून समारंभपूर्वक दहन करण्याची प्रथा आहे. अनेक जाती-जमातींनी माकडाला देवकत्व दिले असले, तरी छोटा नागपूर प्रदेशातील बेहर, सह्याद्रीतले कातकरी, इ. लोक माकडांना मारून त्यांचे मास खातात. माकड आणि वानर यांच्यांत फरक केला जातो. पाहा – वानर. [सु. वि. को.]

माकडजी (इ. स. चे १३ वे शतक) राजस्थानात देवत्व पावलेला एक पुरुष. हा देवजीचा मित्र आणि गुरुबंधू होता. देवजीप्रमाणेच हा वीरपुरुष होता. याने देवजीला युद्धात खूप मदत केली. याचा उत्सव आषाढ शुद्ध नवमीला रात्री डोंगरावर साजरा केला जातो. पाहा – देवजी. [मरु-भारती, ऑक्टोबर, १९५५]

माकडवाले एक भटका व्यावसायिक वर्ग. हे लोक जातीने कैकाडी आहेत. यांची वस्ती म्हैसूर, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या भागांत आढळते. हे माकडाचे खेळ करून दाखवितात, म्हणून यांना माकडवाले असे म्हणतात. हाच यांचा प्रमुख व्यवसाय आहे. हे माकडांना शिकवून त्यांच्या कडून विविध खेळ करून दाखवतात. मुख्यत्वे नर माकडाकडून हे खेळ करवतात. त्यांत गाडी ओढणे, पलटणीत जाणे, नवरा–बायकोचे रुसणे–फुगणे, बायकोला मारणे, इ. कामे असतात. खेळ करणाऱ्या माकडाच्या अंगात एक रंगीत कुडते, विजार, आणि डोक्याला एक शंक्वाकृती गोल टोपी घालतात. माकडीणीला एक फाटके पातळ नेसवतात.

हे दहा-पंधरा कुटुंबांच्या टोळ्या करून गावोगाव फिरतात. गावाच्या बाहेर माळावर पालात उतरतात. यांच्या बरोबर माकडे, गाढवे, बकरी, कोंबड्या, कुत्री, इ. प्राणी असतात.

यांच्या बायका गोंदण्याचे काम करतात. शिवाय शिंदीचे खुळखुळे करणे, सुपे-टोपल्या दुरुस्त करणे, इ. व्यवसायही त्या करतात. कधीकधी हे लोक भिक्षाही मागतात.

माकडवाल्यांच्या तोंडी बहुधा राम, हनुमान, इ. देवतांची गाणी आढळतात. त्यांतील एका गीताचा काही भाग असा–

पंल्या दिवशी बोलली गंगा । नका बायांनो, करू या दंगा ।
दशरथ राजाला जाऊन सांगा ।
घोडो उभी पाचोया रंगा, जु जु बाळा जु ॥
दुसऱ्या दिवशी बोलली भागा । निराकार होईल जागा ।
बायांनो तुम्ही चरणाशी लागा ।
चुडयाचे दान रामाला मागा, जु जु बाळा जु ॥

यांच्या बहुतेक चालीरीती कैकाड्यांप्रमाणे आहेत. पाहा – कैकाडी. [म. ग्रा. स.; गां. गा.; म. लो. मा. पुष्प ४ थे]

माक्कम केरळ प्रदेशातील एक देवी. हिची कथा पुढीलप्रमाणे आहे– उत्तर मलबारमधील कुंजिमंगलम नावाच्या गावात कंटकोट्टू नावाचे एक नायर कुटुंब राहत होते. त्या कुटुंबात सात भावांच्या पाठीवर एक कन्या जन्मली. तिचे नाव माक्कम असे ठेवले. तिला लग्नानंतर चार मुले झाली आणि मग वैधव्य आले. मग ती माहेरी राहायला आली. सर्व भावांचे माक्कमवर खूप प्रेम होते; पण भावजया मात्र तिचा तिरस्कार करीत. त्यांनी तिला नष्ट करण्याचे खूप प्रयत्न केले. परंतु ते सर्व व्यर्थ ठरले. अखेर एके दिवशी त्यांनी माक्कमवर व्यभिचाराचा आरोप केला. त्यामुळे मात्र भाऊ तिच्यावर चिडले व तिचा छळ करू लागले. त्या छळाला कंटाळून तिने आपल्या चारही मुलांसह विहिरीत जीव दिला. पुढे ती लोकांना साक्षात्कार दाखवू लागली. त्यामुळे लोक तिला देवी समजून भजू लागले.

आजही सत्यनिष्ठा आणि निर्दोषित्व या गुणांसाठी केरळी जनता माक्कमला आदर्शरूप मानते. उत्तर केरळमध्ये कण्णनूरजवळच्या चाला शहरात माक्कमचे मंदिर आहे. प्रतिवर्षी तिचा इथे उत्सव होतो. [कै. सा. द.; युगप्रभात, १ ऑगस्ट १९६३]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माक्स म्यूलर फ्रीडरिश (१८२३–१९०० इ. स.) एक जर्मन प्राच्यविद्यापंडित व भाषाशास्त्रज्ञ. जर्मनीतील डेस्सौ या गावी याचा जन्म झाला. त्याचा पिता विल्हेम हा जर्मन भाषेचा एक प्रसिद्ध कवी होता. त्याच्या आईला इंग्रजी, फ्रेंच व इटालियन या भाषा उत्तम येत होत्या. आईप्रमाणेच हाही बहुभाषी होता. इ. स. १८४१ मधे हा लिपझिग विश्वविद्यालयातून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला. त्यानंतर त्याने बर्लिन विश्वविद्यालयात संस्कृताच्या अध्ययनाला सुरवात केली. याच सुमारास त्याने ऋग्वेदाचा अभ्यासही चालू केला. इ. स. १८४४ मधे त्याने केलेले हितोपदेशाचे जर्मन भाषांतर छापून प्रसिद्ध झाले. त्यामुळे त्याची गणना पंडितांत होऊ लागली. बंगाली भाषाही या सुमारास तो शिकला. इ. स. १८४५ मधे तो पॅरिस विश्वविद्यालयात गेला व तिथे बर्नाफ, बॉप आणि स्कॅलिंग या प्रसिद्ध पंडितांकडे त्याने संस्कृतचा विशेष अभ्यास केला. नंतर तो ऑक्सफर्डच्या कॉलेजात प्राध्यापक म्हणून लागला. प्रथम युरोपियन भाषांचा



माक्स म्यूलर

व नंतर तौलनिक भाषाशास्त्राचा प्राध्यापक म्हणून त्याने तिथे काम केले. त्याच विश्वविद्यालयात संस्कृत भाषेचा प्राध्यापक म्हणून काम करण्याची त्याची इच्छा होती. पण ती मात्र पुरी झाली नाही.

ऑक्सफर्ड येथे असतानाच त्याने तौलनिक भाषाशास्त्र, ऋग्वेदाची सटीक प्रत व भाषांतर, चिप्स फ्रॉम ए जर्मन वर्कशॉप आणि सेक्रेड बुक्स ऑफ दि ईस्ट या ग्रंथमालेतील अनेक पांडित्यपूर्ण ग्रंथ, इ. साहित्य प्रसिद्ध केले. ऋग्वेदाची आवृत्ती काढण्यापूर्वी याने ऋक्प्रातिशाख्याचा सूक्ष्म अभ्यास करून, त्याचे जर्मन भाषेत भाषांतर केले. ऋग्वेदाची ऋग्वेदप्रकाश नामक सायणभाष्यासह सटीक आवृत्ती हे याचे महत्त्वाचे कार्य होय. या ग्रंथाचे मोठमोठे सहा भाग असून, ही आवृत्ती तयार करण्यासाठी त्याने फार मेहनत घेतली. त्या ग्रंथात त्याने 'ऋग्वेदसंहिता शार्मण्यदेशोत्पन्नेनेङ्ग्लण्डदेशनिवासिना मोक्षमूलरभट्टेन संशोधिता गोतीर्थाभिधाने नगरे' असे लिहिलेले आहे. शार्मण्य म्हणजे जर्मन आणि गोतीर्थ म्हणजे ऑक्सफर्ड होय. त्याने स्वतःच्या नावापुढे भट्ट असे पद लावले आहे. इ. स. १८६. मध्ये पुणे शहरात सातशे विद्वानांची एक परिषद भरून तिच्यात या ग्रंथाची परीक्षा करण्यात आली. सर्व पंडितांनी त्याची प्रशंसा केली. आपल्या हस्तलिखित संहितेपेक्षा या पुस्तकाचा मूळ लेख अधिक शुद्ध आहे, असे म्हणून त्यांनी आपापली हस्तलिखिते या नव्या ग्रंथावरून शुद्ध करून घेतली, असे डॉ. मार्टिन हॉग याने लिहून ठेवले आहे.

ऋग्वेदाच्या आवृत्तीसाठी त्याने ईस्ट इंडिया कंपनी व विजयनगरचे महाराज यांच्याकडून आर्थिक साहाय्य मिळाले होते. याची इंग्रजी भाषा सुबोध व काव्यमय असल्यामुळे याच्या ग्रंथांच्या वाचनाने अनेक विद्वानांना वैदिक वाङ्मयाची गोडी लागली. इ. स. १८५६ मध्ये त्याने संस्कृत साहित्याचा प्राचीन इतिहास हा ग्रंथ लिहिला.

सेक्रेड बुक्स ऑफ दि ईस्ट हे त्याचे आणखी एक महत्त्वाचे कार्य होय. या मालेचा तो प्रमुख संपादक होता. या मालेत एकूण एकावन्न ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या द्वारे भारतीयांचे प्राचीन ग्रंथ, त्यांचे धर्मविचार व बुद्धिवैभव यांचा युरोपीय राष्ट्रांना परिचय करून देण्याचे काम याने केले.

'हिंदुस्थान आणि आपण त्यापासून काय शिकावे' या आपल्या ग्रंथात तो म्हणतो –

मनुष्याच्या विचारशक्तीचा इतिहास घ्या किंवा आत्मज्ञान घ्या, हिंदुस्थानला अग्रेसरत्वाचा मान निर्विवाद मिळतो. भाषा, धर्म, पुराणे, धार्मिक दंतकथा, तत्त्वज्ञान, रूढी किंवा कायदे, कला किंवा शास्त्र कोणत्याही संस्कृतीचा विचार करा, तुम्हांला, तुमची इच्छा असो वा नसो, हिंदुस्थानाची कास धरावी लागेल. कारण मानवी ज्ञानाबद्दलची इतकी सांगोपांग, उपयुक्त

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि बोधप्रद माहिती हिंदुस्थानाबाहेर मिळणे शक्य नाही.

तौलनिक भाषाशास्त्राचे अध्ययन करीत असता संस्कृत भाषेचे विशेष महत्त्व याच्या ध्यानी आले आणि संस्कृतच्या ज्ञानाशिवाय भाषाशास्त्राचा अभ्यास अपूर्णच राहील, असे याने प्रतिपादन केले.

तौलनिक धर्मशास्त्राच्या अध्ययनातही वैदिक धर्माचे श्रेष्ठत्व याला प्रतीत झाले होते. राष्ट्राच्या जीवनात वैदिक धर्माइतका दुसरा कोणताही धर्म एकरूप झालेला नाही, असे त्याला आढळून आले. विवाहादी सर्व संस्कार वैदिक वाङ्मयाला अनुसरून करण्याची भारतीय लोकांची पद्धत त्याला वैशिष्ट्यपूर्ण वाटली. सर्व गोष्टींमुळे भारत, भारतीयलोक व संस्कृती यांबद्दल त्याला जिव्हाळा वाटू लागला. लो. टिळकांसारख्या थोर वैदिक पंडिताला राजद्रोहाच्या आरोपावरून शिक्षा झाली, तेव्हा शिक्षेची मुदत भरण्यापूर्वी त्यांना सोडविण्याच्या कामात याने पुढाकार घेतला.

भारतीय पंडितांनी त्याच्या विद्वत्तेचा गौरव केला आहे. लो. टिळकांनी खास लेख लिहून त्याच्या विद्वत्तेविषयी प्रशंसा केली आहे. स्वामी विवेकानंदांनी त्याच्या भारताच्या प्रेमाबद्दलच्या आठवणी लिहिलेल्या असून, त्याचे व्यक्तित्व प्राचीन ऋषिमुनींची आठवण करून देणारे होते, असे म्हटले आहे. [लो. सा. रू.; सं. सं ; मोक्षमूलरकृत धर्मविषयक व्याख्याने; वाचस्पती शास्त्री–आजकल, ऑक्टो. १९५४; अ. च. को.]

मागध (१) एक प्राचीन प्रतिलोम जात. वैश्य पुरुष व क्षत्रिय स्त्री यांची ही संतती आहे, असे कौटिल्य, गौतम, मनू आणि याज्ञवल्क्य यांचे मत आहे. उशनस व वैखानस म्हणतात, की वैश्य पुरुष व ब्राह्मण स्त्री यांची ही संतती होय. बौधायनाच्या मते शूद्र पुरुष व वैश्य स्त्री यांची ही संतती आहे. विष्णुधर्मसूत्रात शूद्र पुरुष व क्षत्रिय स्त्री यांच्या संततीला मागध म्हटले आहे.

खुष्कीच्या मार्गाने मागधांनी व्यापार करावा, असे मनूने म्हटले आहे. महाभारताच्या अनुशासन पर्वात यांचा बंदी (भाट) म्हणून उल्लेख आलेला आहे. स्कंद पुराणाच्या सह्याद्रिखंडातही यांना बंदी म्हटलेले असून, ते आलंकारिक गद्य, सहा भाषा व कला यांत निष्णात असतात, असे म्हटले आहे. हे कालिकेचे भक्त होते. वैखानस म्हणतो, की शूद्रांनीही यांच्या हातचे अन्न खाऊ नये. ते स्तुतिपाठ करून, गाऊन किंवा दौत्य करून आपली उपजीविका करीत. [हि. ध.; भा. सा. इ.]

(२) मत्स्य पुराणात मगध देशातील लोकांना मागध म्हटले. विष्णुपुराणानुसार शकद्वीपात या नावाचे क्षत्रिय लोक होते.

मागधी भाषा एक प्राकृत भाषा. ही भाषा मगध जनपदाची भाषा होती. अर्धमागधी, शौरसेनी, महाराष्ट्री व पैशाची या भाषांप्रमाणे मागधीतही स्वतंत्र साहित्यकृती आढळतात. प्राचीन काळी बरीचशी शतके भारताचा राज्यकारभार मगधातून चालत असे. त्यामुळे मागधी भाषेला राज्यभाषेचे गौरवस्थान प्राप्त झाले होते. राजमहालातही ती बोलली जात असावी. बुद्धाने आपला धर्म जनांना ज्या लोकभाषेत उपदेशिला, ती भाषा मागधीच होती. पहिल्या संगीतीत त्रिपिटकाचे अनुग्रथन झाले, तेही मागधीतच. ते करणारा महाकाश्यप हा बौद्ध आचार्य मगधनिवासीच होता.

मगधाचा दबदबा संपला, तेव्हा हळूहळू मागधीलाही गौणत्व येऊ लागले. तिचे अभिव्यक्तीचे सामर्थ्यही उणे पडू लागले. मग ती राजभाषा किंवा प्रतिष्ठितांची भाषा न राहता केवळ कारूनारूंची भाषा राहिली. म्हणूनच भरताने एक नियम सांगितला की, नाटकात सुरुंग खोदणारे, गवंडीकाम करणारे, अश्वरक्षक, इ. पात्रांनी मागधीत बोलावे.

मागधीची काही वैशिष्ट्ये अशी–

(१) रच्या स्थानी ल. उदा० राजा – लाजा, पुरुष – पुलुशे. (२) स व ष यांच्या स्थानी श. उदा० शुष्क – शुश्क. समर – शमल. (३) क्षच्या जागी ष्क. उदा० पक्ष – पष्क. (४) ज च्या जागी य. उदा०जानाति – याणादी. जनपद–यणवद; जायते – यायदे. (५) पुंलिंगी आणि नपुंसकलिंगी आकारान्त शब्दांच्या कर्त्याचे एकवचनात एकारान्त रूप. उदा० नरः – नले. (६) अहं (मी) च्या स्थानी आणि कधी कधी वयं (आम्ही) च्या स्थानी हगे असे रूप होते.

काही विद्वानांच्या मते मागधी व पाली या दोन भिन्न भाषा आहेत. पण श्री. हवालदार त्रिपाठी यांनी त्या दोन भाषा एकच असल्याचे सप्रमाण दाखवून दिले आहे. ते म्हणतात – बौद्ध परिभाषेत बुद्धवचनाला परियाय असे म्हणतात. त्याचा अपभ्रंश पलियाय असा झाला. प्रथम अक्षर दीर्घ होऊन पारियाय असे झाले आणि त्याचेच संक्षिप्त रूप 'पालि' असे रूढ झाले. बुद्धघोषाच्या ग्रंथातही पाली शब्दाचा प्रयोग भाषा या अर्थाने न करता बुद्धवचन या अर्थानेच केला आहे. उदा० नेयं पालियं न अट्ठकथायं दिस्सती (हे पालीत म्हणजे बुद्धवचनात दिसत नाही तसेच अठ्ठकथेतही दिसत नाही.)

बुद्धघोषाने अट्ठकथा अनुवादिल्या त्या मागधीतच. गुरूची त्याला तशीच आज्ञा होती. समंत पासादिका या ग्रंथात तो म्हणतो – "सम्मा सम्बुद्धेन वुत्तपकारो मागधको वोहारो = या ग्रंथात सम्मक संबुद्धाने प्रयुक्त अशा मागधीचा व्यवहार आहे." चौदाव्या शतकानंतर पाली शब्दाचा बुद्धवचन हा अर्थ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मागे पडला व तो शब्द भाषा या अर्थाने प्रचलित झाला.

शाकारी, चांडाली व शाबरी या मागधीच्या उपभाषा असल्याचे प्राकृतानुशासन या ग्रंथात सांगितले आहे (१३. १५).

मार्कंडेयानेही शाकारीला मागधीचे रूप मानले असून, चांडालीला मागधीची विकृती व शाबरीला मागधी व शौरसेनी यांचे मिश्रण म्हटले आहे. पिशेलही म्हणतो की, मागधीच्या अनेक स्थानिक बोली होत्या.

शूद्रकाच्या मृच्छकटिक नाटकातली संवाहक, स्थावरक, कुंभीलक, वर्धमानक, भिक्षू, रोहसेन व शकार ही पात्रे मागधी भाषेत बोलतात. उदा०—

शकारः— (टाळी वाजवून हसत) **भावे। भावे। पेक्ख दाव ! अन्तलेण शुशिणिद्धा एशा गणिआदालिआ णं। जेण मं भणादि, एहि शन्तेशि किलिन्तेशि त्ति। हगे ण गामन्तलं ण णगलन्तलं वा गड़े। अज्जके ! शवामि भावश्श शीशं अत्तणकेहिं पादेहिं। तव ज्जेव्व पश्चाणुपश्चि आएे आहिण्डन्ते शन्ते किलिन्ते ह्मि संवुत्ते।**

अर्थ — भाव, भाव, पांहा एकदा ! माझ्यावर अंतःकरणापासून प्रेम करणारी ही गणिकेची कन्या. ती मला म्हणते, ' ये, तू दमला आहेस. गळून गेला आहेस.' पण मी कोणत्या दुसऱ्या गावाला गेलो नाही की नगराला गेलो नाही. गणिके, मी विटांच्या मस्तकाला पायांनी स्पर्श करून शपथेवर सांगतो, की मी तुझ्याच मागे मागे हिंडण्याच्या कारणामुळे थकून गेलो आहे.

शाकुंतल नाटकात दोन्ही प्रतीहारी, धीवर आणि शकुंतलेचा छोटा पुत्र सर्वदमन; मुद्राराक्षसात जैन साधू, दूत आणि सिद्धार्थक व समिद्धार्थक आणि वेणीसंहारात राक्षस व त्याची स्त्री ही पात्रे मागधीत बोलतात.

वररुची व हेमचंद्र यांनी आपल्या व्याकरणग्रथांत मागधीचे विशिष्ट नियम सांगून, शेष नियम शौरसेनीप्रमाणे समजावे, असे म्हटले आहे. त्यावरून असे वाटते, की पुढच्या काळात शौरसेनी भाषेचा मागधीवर खूप प्रभाव पडला आणि मागधीचे रूप बऱ्याच अंशी अस्पष्ट झाले. [प्रा. सा. इ.; बौ. ध. वि.]

माघ (१) चैत्रादी गणनेतला अकरावा मास. या महिन्याच्या पौर्णिमेस किंवा तिच्या आगेमागे मघा नक्षत्र येते म्हणून याला माघ अशी संज्ञा मिळाली आहे. तप हे याचे त्यापूर्वीचे नाव होय. हा शिशिर ऋतूचा पहिला मास आहे. या महिन्यातील धार्मिक कृत्ये अशी —

माघ शुद्ध चतुर्थीला तिलचतुर्थी म्हणतात. या दिवशी प्रदोषकाली नक्तव्रत करून धुंडा देवीची पूजा करावी, असे सांगितले आहे. या दिवशी धुंडिराजाची पूजाही विहित आहे. हिलाच उमाचतुर्थी असेही नाव आहे. या दिवशी कुंद पुष्पांनी गौरीची पूजा करावी; तिला गूळ, मीठ व यावक या पदार्थांचा नैवेद्य दाखवावा; तसेच सुवासिनी, ब्राह्मण व गाई यांचीही पूजा करावी असे विधान आहे. हिलाच कुंदचतुर्थी असेही म्हणतात. या दिवशी प्रदोषकाली कुंद पुष्पांनी शिवाची पूजा करायची असते. माघ शुद्ध पंचमीला वसंतपंचमी किंवा श्रीपंचमी म्हणतात. या दिवशी कुंद पुष्पांनी लक्ष्मीची पूजा करावी, असे विधान आहे.

माघ शुद्ध सप्तमीला रथसप्तमी म्हणतात. या दिवशी सूर्य-पूजा करून सूर्याला पायसाचा नैवेद्य दाखवायचा असतो.

माघ शुद्ध अष्टमीला भीष्माष्टमी म्हणतात. त्या दिवशी भीष्माच्या उद्देशाने श्राद्ध करतात. माघ शु. द्वादशीला तिळांची उत्पत्ती झाली, असे सांगितले आहे. या दिवशी उपवास, तिलस्नान, तिळांनी श्रीविष्णूची पूजा, तिळांचा नैवेद्य, तिळांच्या तेलाचा दिवा लावणे, तिलहोम, तिलदान व तिलभक्षण हे विधी करतात.

माघ पौर्णिमेला धान्य, कांबळे, कृष्णाजिन, तांबडी वस्त्रे, अंगरखे, जोडा, पांघरूण, इ. वस्तू दान द्याव्या, असे सांगितले आहे. माघस्नानाची समाप्तीही याच दिवशी करतात. या दिवशी पवित्र तीर्थात केलेले स्नान विशेष फलदायी मानलेले आहे.



माघ मासाचे एक सांकेतिक चित्र

या दिवशी कुंभकोणम्च्या महासरोवरात स्नान करण्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असंख्य भाविक जमतात. या दिवशी गंगायमुनादी नऊ पवित्र नद्यांचे जल या सरोवरात येते, अशी समजूत आहे. या दिवशी काही लोक विष्णूची पूजा करतात व ब्राह्मणभोजनही घालतात. या पौर्णिमेला शनी मेष राशीत, गुरू व चंद्र सिंह राशीत आणि सूर्य श्रवण नक्षत्रात असेल, तर अशा योगाला महामाघी म्हणतात. हा दिवस स्नान-दानादी कृत्यांना विशेषेकरून विहित आहे. काही लोक या दिवशी लक्ष्मीचे प्रतीक म्हणून दिव्याची पूजा करतात व श्रीं या बीजमंत्राचा जप करतात. काही घराण्यांतून या दिवशी कुलधर्मही असतो. त्यात देवीला नवान्नाचा नैवेद्य दाखवून ब्राह्मण–सुवासिनींना भोजन घालतात.

माघ वद्य अष्टमीच्या दिवशी व नवमीच्या दिवशी अष्टकाश्राद्धे करतात.

माघ वद्य चतुर्दशी ही महाशिवरात्री होय. या दिवशी उपवास, पर्वस्नान, शिवपूजा, इ. धार्मिक कृत्ये करतात. या दिवशी सूर्योदयापूर्वी यमतर्पण करावे, असे सांगितले आहे.

माघ अमावास्या ही युगादी तिथी आहे. त्या दिवशी अपिंडक श्राद्ध करतात. त्या दिवशी शततारका नक्षत्राचा योग असल्यास तो मोठा पुण्यकाल ठरतो. या योगावरही श्राद्ध करतात. ही अमावास्या सोमवारी सकाळी असेल, तर त्या दिवशी विशेषेकरून तमिळनाडमधले स्त्री-पुरुष अश्वत्थाची पूजा करून त्याला प्रदक्षिणा घालतात व दाने देतात. [ध. सिं.; नि. सि.; हि. ध.]

(२) (इ. स. च्या ७ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक संस्कृत महाकवी. 'शिशुपालवध' या महाकाव्याचा कर्ता. माघाने आपली अल्पस्वल्प माहिती काव्याच्या शेवटी कविवंशवर्णनात दिली आहे, ती अशी –

श्रीवर्मल नावाच्या राजाचा सुप्रभदेव नावाचा एक प्रधान मंत्री होता. त्याचा पुत्र दत्तक. दोघेही पिता-पुत्र परोपकारी, उदार आणि सत्त्वशील होते. दत्तकाच्या परोपकारी वृत्तीमुळे लोक त्याला सर्वाश्रयदत्त असे म्हणत. माघ हा या दत्तकाचा पुत्र होय. माघ हा श्रीमाळी ब्राह्मणकुलात भिन्नमाळ (गुजरात) येथे जन्मला. त्याचे घराणे गर्भश्रीमंत होते, असे दिसून येते. कारण माघाचे बालपण व तारुण्य वैभव-विलासात व्यतीत झाले असावे, असे त्याच्या काव्यातील विलासवर्णनांवरून अनुमानिता येते. घराण्याची दानशूरता त्याच्या ठिकाणी पराकाष्ठेला गेली होती. त्याने मुक्तहस्ताने संपत्तीचे दान केले आणि अखेरीस तो निष्कांचन झाला, अशी कथा आहे.

व्याकरण, न्याय, वेदान्त, साहित्य, राजनीती, इ. शास्त्रांचा तो प्रगाढ पंडित होता. त्याच्या जवळचा शब्दखजिनाही प्रचंड होता. 'नवसर्गगते माघे नवः शब्दो न विद्यते' = माघाच्या नऊ सर्गांत सर्व शब्दसंपदा येऊन गेल्याने त्यांच्या अभ्यासकाला कोणताच शब्द नवा किंवा अपरिचित उरत नाही, अशी त्याच्याविषयी एक अतिशयोक्ती रूढ आहे.

माघकवीविषयी भोजप्रबंधातली एक आख्यायिका डॉ. के. ना. वाटवे यांनी दिली आहे, ती अशी –

माघाच्या बाळपणी एका ज्योतिषाने त्याच्याबद्दल असे भविष्य वर्तविले होते की, 'हा मुलगा आपल्या आयुष्याचा बराच भाग वैभवात आणि अतिसमृद्धीमध्ये घालवील. पण शेवटी ते वैभव नष्ट होऊन त्याला विपन्नावस्था येईल व पायाला सूज येऊन त्यातच त्याचा अंत होईल.' ग्रहांना संतुष्ट करण्यासाठी माघाच्या बापाने पुष्कळ दाने दिली; जप, शांती इत्यादिकांत अमूप पैका खर्चिला व त्यामुळे आता आपल्या पुत्राची विपत्ती खास टळली, अशा समाधानातच तो निवर्तला. पुढे माघाचे शिक्षण झाले. नंतर त्याने 'शिशुपालवध' नावाचे काव्य लिहून विद्वज्जनांना आश्चर्यचकित करून टाकले. त्याने वैभवाचे दिवस स्वतः उपभोगले व याचकांनाही दानांनी संतोषविले. पण भविष्य हे अटळच होते. अखेर त्याला अठरा विश्वे दारिद्र्याने गाठले. आपल्या माणसांत तोंड दाखविण्याची त्याला लाज वाटू लागली. म्हणून तो पत्नीस घेऊन धारानगरीस गेला. एके दिवशी त्याने आपल्या भार्येजवळ आपल्या 'शिशुपालवध' काव्याची पोथी दिली व तिला म्हणाला, "ही भोजराजास अर्पण कर व तो जे द्रव्य देईल ते घेऊन ये." त्याप्रमाणे ती राजसभेत गेली. राजाने त्या पोथीत कोठेतरी एक शलाका घालून हाती आले ते पान उघडले व पाहातो तो त्यावर एक श्लोक निघाला. ते उषःकालचे वर्णन होते. कवीश्वराने त्यात म्हटले होते, "आता चंद्रविकासी कुमुदे मावळली आणि सूर्यविकासी कमळांना तजेला चढला. उलूक पक्षी हिरमुसला पण तिकडे चक्रवाक आनंदला. चंद्रमा इकडे अस्ताला गेला तर तिकडे सहस्रकराचा उदय झाला. काय पाहा! विधिविलसिताची करणी किती विचित्र असते ती!" (शिशु. ११.६४). हा श्लोक पाहून राजाला पराकाष्ठेचा आल्हाद झाला. (त्या श्लोकात माघाने आपल्या पडत्या काळाचा जो सूक्ष्म ध्वनी गोवून दिला आहे तो राजाला उमगला असावा). तो गहिवरून उद्गारला. "या सबंध काव्यग्रंथाची गोष्ट तर राहोच; पण या एका श्लोकाचे मूल्य ही सर्व वसुंधरा आहे! या ठिकाणी 'ही' हे सखेद आश्चर्य दर्शविणारे अव्यय इतके चपखल बसले आहे, की या एका अव्ययाच्या जडणीसाठी मी पारितोषक म्हणून कवीला एक लक्ष द्रव्य देतो."

माघभार्या ते द्रव्य घेऊन घरी येत असता वाटेत (पूर्वीच्या) याचकांनी तिच्याजवळ माघाच्या दातृत्वाची प्रशंसा करून द्रव्य मागितले. तिच्याने नाही म्हणवेना. तिने ते सर्व द्रव्य त्यांना दिले व आपण गेली तशी परत आली. तिने माघाला घडलेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वृत्तान्त सांगितला. त्यालाही भार्येच्या उदारतेचे कौतुक वाटले. भार्या पहाते तो माघाच्या पायाला सूज आलेली ! इतक्यात दुसरा एक याचक दारी आला. त्याला द्यावयाला काही घरात आहे काय असे माघाने विचारताच डोळ्यांतील अश्रूंनीच तिने 'नाही' असे मूक उत्तर दिले. ते पाहून माघाने धरणीवर देह टाकला व क्षणार्धात त्याचे प्राणोत्क्रमण झाले. सकाळी हा वृत्तान्त भोजाला समजताच तो म्हणाला. "श्रीमाल नगरात राहणारे येवढाले धनिक माघाचे प्रत्यक्ष आप्त असता भुकेने अशा नररत्नाला मरण यावे यापेक्षा शरमेची दुसरी गोष्ट कोणती ? येथे सुसंस्कृत लोक राहत नसून क्रूर भिल्ल राहतात, असे समजून श्रीमालाला मी 'भिल्लमाल' हे नाव आजपासून देतो." पुढे त्याचे भिन्नमाळ असे रूपांतर झाले. हा गाव गुजरात व मारवाड या प्रांतांच्या सरहद्दीजवळ गुजरातमध्ये आजही या करुण कथेची साक्ष देत उभा आहे. पाहा – शिशुपालवध. [सं. सा. इ. ; सं. का. पं.; सं. क. द.]

माघमंडल पूर्व बंगालमधील एक व्रत. हे व्रत सौभाग्यवती स्त्रिया व कुमारिका करतात. या व्रतात सूर्याची उपासना असते. सतत पाच वर्षेपर्यंत माघमासात हे व्रत करतात. वयाच्या तिसऱ्या, चौथ्या वर्षापासूनच मुली या व्रताला प्रारंभ करतात. त्यासाठी त्या सूर्योदयापूर्वी उठतात व नदीवर जातात. तिथे एखादी वडीलधारी स्त्री अथवा मुलगी त्यांना मंत्र सांगते. हातात फुले घेऊन मुली ते मंत्र म्हणतात. या मंत्रांमधून सामान्यपणे सूर्याचे बालपण, तारुण्य, विवाह, पुत्रप्राप्ती, इ. विषय असतात; त्याचप्रमाणे स्त्रीजीवनाच्या सुखदुःखाचे आविष्कारही त्यांत असतात. मुली नदीवरून घरी आल्यावर अंगणात चंद्रसूर्यांची चित्रे काढतात. दरवर्षी एक नवीन चित्र काढले जाते. प्रत्येक चित्राचा रंग निरनिराळा असतो. पाच चित्रे पूर्ण झाली म्हणजे मुली खिरापत वाटतात. वाटून राहिलेली खिरापत झोंबाझोंबी करून आपापसांत वाटून घेतात. [इं. फो. लो.]

माघसप्तमी एक तिथिव्रत. माघ शुद्ध सप्तमीला या व्रताला प्रारंभ करतात. व्रतविधी असा – सूर्योदयापूर्वी डोक्यावर बोरीची सात आणि रुईची सात पाने ठेऊन नदीत किंवा कोणत्याही शुद्ध प्रवाहात स्नान करावे. नंतर सूर्याला सात बोरे, रुईची पाने, भात, तीळ, दूर्वा, अक्षता व चंदन या वस्तूंसह अर्घ्य द्यावे. मग सप्तमीला देवता समजून प्रथम तिला आणि नंतर सूर्याला नमस्कार करावा. काहींच्या मते माघस्नान व हे स्नान भिन्न आहे, तर काही लोक या दोन्ही स्नानांना माघस्नानच मानतात. [हि. ध.]

माघस्नान माघ महिन्यातील पुण्यस्नान. या स्नानाचा प्रारंभ आणि समाप्ती केव्हा करावी, याविषयी बरेच मतभेद आहेत. ब्रह्म पुराण व पद्म पुराण यांच्या मते पौष शुद्ध एकादशीला या स्नानाला प्रारंभ करून, माघ शुद्ध द्वादशीला किंवा पौर्णिमेला त्याची समाप्ती करावी. तथापि पौषी पौर्णिमेला प्रारंभ करून माघी पौर्णिमेला याची समाप्ती करण्याचा प्रघात रूढ आहे.

महिनाभर सतत स्नान करणे अशक्य असेल, तर निदान तीन, दोन किंवा एक दिवस तरी स्नान करावे, असा पर्याय आहे. हे तीन दिवस म्हणजे मकरसंक्रांत, रथसप्तमी व माघी पौर्णिमा हे होत. या तीन दिवसांच्या निवडीतही अनेक मतमतांतरे आहेत.

स्नान शक्यतो शीतोदकाने करावे. पण हे शक्य नसेल तर उष्णोदकाने करायला हरकत नाही. जो माणूस धडधाकट असूनही ऊन पाण्याने स्नान करतो, त्याचे स्नान निष्फळ ठरते. स्नानासाठी विहीर, तलाव, नदी, डोंगरातील जलाशय, संगम. गंगा व प्रयाग ही स्थाने क्रमाने अधिकाधिक प्रशस्त होत. मात्र ज्या जलाशयात स्नानाला प्रारंभ केला असेल, त्याच जलाशयात समाप्तीपर्यंत ते करायला पाहिजे, असा निबंध आहे. सूर्योदयापूर्वी नक्षत्रे दिसत असताना केलेले स्नान उत्तम, नक्षत्रे लोप पावल्यानंतरचे स्नान मध्यम आणि सूर्योदयानंतरचे स्नान कनिष्ठ होय.

स्नानाला प्रारंभ करताना पुढील मंत्र म्हणायचा असतो-

दुःखदारिद्र्यनाशाय श्रीविष्णोस्तोषणाय च ।
प्रातःस्नानं करोम्यद्य माघे पापविनाशनम् ॥

मौन धरून स्नान करावे, नंतर सूर्याला अर्घ्य द्यावे; कोणत्याही जलाशयात स्नान केले तरी प्रयागाचे स्मरण करावे; स्नानाच्या आधी किंवा नंतर शेकायला बसू नये, अभ्यंग करू नये, भूमिशयन करावे, नित्य तिल-दान करावे, ब्रह्मचर्याने रहावे, इ. नेमधर्म या स्नानकालात पाळायचे असतात. समाप्तीच्या वेळी तीळ, चरू व तूप यांचे हवन करतात. नंतर पुढील मंत्राने प्रार्थना करतात–

दिवाकर जगन्नाथ प्रभाकर नमोऽस्तु ते ।
परिपूर्णं कुरुष्वेह माघस्नानमुषःपते ॥

पद्म पुराणात या व्रतासंबंधी कथा आली आहे, ती अशी– दिलीप नावाचा राजा एकदा शिकारीसाठी रानात गेला असता तिथे त्याला एक तळे दिसले. त्या तळ्यात त्याने स्नान केले आणि मारलेल्या पशूचे मांस खाल्ले. त्या रात्री तो तिथेच राहिला. दुसऱ्या दिवशी पहाटे तो शिकारीला निघाला असता त्याला हारीत नावाचा ऋषी भेटला. तो राजाला म्हणाला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'आता माघमास चालू आहे. अशा वेळी स्नान करायचे सोडून तू हे दुसरेच काय करीत आहेस ?' मग राजाने त्याला माघस्नानाचे माहात्म्य विचारले. हारीत म्हणाला. 'मला आता वेळ नाही. या विषयी तू वसिष्ठ ऋषीला विचार.' राजाने वसिष्ठाकडे जाऊन त्याला माहिती विचारली. वसिष्ठ म्हणाला. 'हे राजा, माघस्नान करणाराला स्वर्ग मिळतो, महादानाचे पुण्य लाभते; त्याची सर्व पापे नष्ट होतात. पूर्वी अदितीने बारा वर्षे माघस्नान केले, म्हणून तिला बारा आदित्य हे पुत्र झाले (उ. खं. १२५) [हि. ध.; व्रतराज; नि. सिं.]

माघ्यावर्ष एक विधी. याच्याविषयी दोन मते आहेत. भाद्रपद वद्य सप्तमी, अष्टमी व नवमी या तिथींना हा विधी करावा, असे नारायणाचे मत आहे. दुसरे मत असे, की माघ्यावर्ष हा अष्टकांसारखा एक विधी असून, तो भाद्रपद वद्य त्रयोदशीला करावा. या विधीच्या नावाविषयीही विद्वानांत मतभेद आहेत. म. म. काणे यांच्या मते माघ्यावर्ष किंवा मघावर्ष हे या विधीचे नाव असून, त्याचा अर्थ पावसाळ्यात चंद्र मघा नक्षत्रात असताना केलेले श्राद्ध असा आहे. भाद्रपद वद्य त्रयोदशीला, चंद्र मघा नक्षत्रात असताना केलेले श्राद्ध पितरांना तृप्त करते, असे विष्णू, मनू, इ. धर्मशास्त्रकारांचे सांगणे आहे. (विष्णुधर्मसूत्र ७८.५२-५३; मनु. ३.२७३; याज्ञ. १.२६) यावरूनच पुढे महालयश्राद्धाची कल्पना निघाली असावी. [हि. ध.]

माच माळव्यातील एक नृत्यनाट्य. माच शब्दाचा शब्दशः अर्थ मंच किंवा रंगमंच, नाट्यमंडप असा आहे. पुढे माच या शब्दावरून त्यावर सादर केल्या जाणाऱ्या नृत्यनाट्यालाही माच असेच नाव मिळाले.

माच उभारणे हे या नृत्यनाट्यातले पहिले काम असते. त्यासाठी प्रत्यक्ष नृत्यनाट्याअगोदर काही आठवडे एका शुभ मुहूर्तावर गावातील अथवा गावाबाहेरील एखाद्या मोकळ्या जागी एक स्तंभ उभा करतात. या वेळी माच नाट्यातील अभिनेते व त्याच्याशी संबंधित असणारे अन्य कार्यकर्ते एकत्र होऊन आपल्या गुरूच्या हस्ते या स्तंभाची पूजा करतात. आम्रपल्लव, धने, फूल व रक्तवर्णी वस्त्र या वस्तू पूजेला आवश्यक असतात. ही पूजा चालू असताना सातत्याने ढोलकवादन सुरू असते. माचनाट्य यशस्वी व्हावे म्हणून या पूजाविधीत त्या स्तंभाला प्रार्थना केली जाते.

मग तिथून जवळच दुसऱ्या जागी पाच ते दहा फूट उंचीचा एक भक्कम मंडप उभारतात. त्यावर आधारासाठी फळ्या टाकून, वर एखादी शुभ्र चादर ताणून तिचे आच्छादन देतात. चादरीवर रंगीबेरंगी कागदांची फुले चिकटवतात. मंचाच्या चारही बाजूंना रंगीत पाने, लाल-पिवळ्या वस्त्रांचे तुकडे, आंब्याची पाने आणि त्या त्या ऋतूत फुलणारी फुले यांच्या झालरी लावतात. हा मंच चारही दिशांनी मोकळा असतो.

मंचाच्या व्यवस्थापनासाठी त्याच्या दोन्ही बाजूंना २।२ पाट व समोर वेदीचे चार खांब पुरतात. या चार खांबांजवळ १६ तरुण, १ जमादार, १ ठाणेदार आणि १ बादशहा बसतो. पुढच्या एका विशिष्ट अंतरावरील पाटाला 'बारह घाट के पाट' असे म्हणतात. इथे माचमंडळीचे काही विश्वासू कार्यकर्ते व अभ्यासू अभिनेते उभे राहतात. हा पाट ज्या रेषेत असतो, त्याच रेषेत रंगमंचासंनिध असा दुसरा एक पाट असतो. त्याला 'टेक का पाट' अशी संज्ञा आहे. इथे गायक व नर्तक यांना सूरसाथ करणारे लोक बसतात. मंचाच्या एका बाजूला काही जाणते वृद्ध कलावंत बसतात व नृत्यनाट्याच्या वेळी गायक, वादक आणि नर्तक यांच्या काही चुका झाल्या, तर त्या नेत्रपल्लवी-करपल्लवीच्या साहाय्याने दुरुस्त करतात. माचनाट्याच्या मूलप्रवर्तकाचे आसनही याच मंचावर एका बाजूला असते. त्याला गुरूचे आसन असे म्हणतात. त्यावर कोणी बसत नाही. मंचाच्या तीन कोपऱ्यांत तीन मशाली लावून प्रकाशयोजना साधली जाते. अर्थातच आता ज्या गावात वीज पोचली आहे, तिथे मशालीची आवश्यकता नसते. माच नाट्याच्या या रंगमंचव्यवस्थेत वेशभूषा-रंगभूषागृहाला स्थान नाही. मुख्य रंगमंचाच्या आसपास कुठेही पात्रे आपली वेशभूषा-रंगभूषा करतात. रंगमंचाच्या तीनही बाजूंना प्रेक्षक बसतात. रंगमंच सर्व बाजूंनी मोकळा असल्यामुळे प्रेक्षकांना कुठूनही नृत्य पाहता येते.

माच नाट्याच्या आरंभी त्या नाट्याशी संबंधित असणारे सर्व कार्यकर्ते व कलावंत गणपती, भेरूजी व माचनाट्यलेखक यांना वंदन करतात. त्याचप्रमाणे त्या त्या नगरातील देवतांनाही अभिवादन केले जाते.

यानंतर भिश्ती रंगमंचावर येऊन जलसिंचन केल्याचा अभिनय करतो. त्या वेळी तो पुढील गीतपंक्ती म्हणतो –

आया हूँ भूपाली भिश्ती : भूपाल सेर से चल कर
आयो उज्जैन सेर देखूंगा बस्ती ॥
अरे भरवा लो पानी छानी कर लायो रे समन्दर तीर से
सोना की म्हारी मसक बनी रे कंचन डोल मंढाया ।
म्हारी मसक का पानी जो पीले वा घर कर दूं माया ॥

भिश्ती गेल्यावर एक स्त्री येते व ती माचनाट्यलेखकाच्या गुरूचे स्तवनगीत म्हणत म्हणत रंगमंचावर बिछायत अंथरल्याचा अभिनय करते. या वेळी ती आपल्या घरच्या हला-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खीच्या गोष्टीही श्रोत्यांना ऐकवते व त्यांची सहानुभूती संपादन करते. ती जवळजवळ अर्धा तास रंगमंचावर असते.

त्यानंतर पुन्हा सर्वजण देवी व गणपती यांना वंदन करतात. मग अगोदर देवीचा पुजारी व त्याच्या पाठोपाठ स्वतः देवी रंगमंचावर प्रवेश करते. देवी सर्व कलावंतांना आशीर्वाद देते. एवढे झाल्यावर सर्वजण गुरूचा जयघोष करतात व मग मुख्य नाटचाला आरंभ होतो.

माचनाटचलेखक किंवा ते सादर करणारा दिग्दर्शक सादर केल्या जाणाऱ्या नाटचाच्या संवादवह्या घेऊन अभिनेत्याच्या मागे मागे चालतो व स्वतःच संवाद म्हणतो. अभिनेता फक्त त्यानुसार अभिनय करतो व मधून मधून ध्रुपद धरून सूर ओढतो.

बालमुकुन्द गुरू हा पहिला माचनाटचलेखक होय. त्याच्या व्यतिरिक्त नानूराम शेखावटी, कालूराम उस्ताद, भेरू गुरू, इ. माचकार सुप्रसिद्ध आहेत. अलिकडे सेवाराम परमार, राधाकिशन, नाथूसिंह उस्ताद यांनीही काही माचनाटचे लिहिली आहेत. [लो. ध. ना. प.; मा. उ. सा.]

माचेर्ल आंध्र प्रदेशातील एक प्राचीन नगर. हे नगर इथल्या तीन मंदिरांसाठी प्रसिद्ध आहे. ही मंदिरे तीन वीर पुरुषांची असून, त्यांची नावे मंदिरासमोरच्या एका स्तंभावर कोरलेली आहेत. या देवालयाचे शिल्पकाम कन्नड कारागिरांनी केले आहे. या तीन मंदिरांपैकी एका मंदिराच्या भिंतीवर महाभारतातील आणि भागवतातील देखावे चित्रित केलेले असून, दुसऱ्या मंदिरात रामायणातील प्रसंग दाखविले आहेत. हे सर्व प्रसंग तांबडचा पाषाणावर कोरलेले असून, त्यांपैकी कोणत्याही एका पाषाणाला हस्तस्पर्श केला, तर त्यातून एक विशिष्ट स्वर निघतो. हा स्वर हंपीच्या विठ्ठलमंदिरातील संगीतमंडपाच्या स्तंभाची आठवण करून देणारा आहे. याच मंदिराच्या शिखरावर कामशास्त्रातील चौसष्ट आसनांच्या आकृत्या खोदलेल्या आहेत. हे देवालय आदित्येश्वराचे आहे. [श्री. यशोदादेवी—ज. आं. हि. रि. सो. २६, १९६०-६१.]

माछी एक जात. यांची वस्ती कोकणभागात आणि गुजरातमध्ये समुद्राच्या किनाऱ्यावर आढळते. हे लोक मूळचे कोळी असावे, असे मत आहे. मच्छीमारी हा यांचा धंदा आहे. यांचे दहा पोटभेद आहेत. यांच्यांत विधवा धाकटचा दिराशी लग्न करू शकते. कृष्ण, चैत्य व हिरवा या देवांना हे भजतात. यांचे उपाध्ये ब्राह्मण असतात. हे मृताला जाळतात आणि त्याचे श्राद्धही करतात. [मुं. इ. जा.]

माजिदा नवद्वीपाच्या परिसरातील एक प्रसिद्ध पुण्यस्थ[ळ]. याला सप्तर्षींचे भजनस्थल मानतात. कारण [इथे] सात ऋषींच्या नावाने सात टेकडचा दाखविल्या जातात. [त्या] टेकडचांच्या दक्षिणेला वाहणाऱ्या जलधारेला गोमती म्हणता[त] आणि तिच्या किनाऱ्यावर नैमिषारण्य आहे, असे मानता[त]. तिथल्या लोकांची अशी श्रद्धा आहे, की भविष्यकाळी शौनकादि ऋषी इथे चैतन्यभागवत श्रवण करतील. [नवद्वीप]

माझी पंजाब प्रदेशातील एक बोली. अमृतसर, लाहोर [व] गुरुदासपूर हा भाग माझा या नावाने ओळखला जातो. त्यामुळे या भागातील बोलीला माझी अशी संज्ञा आहे. अमृतसरी, लाहोरी व गुरुदासपुरी असे या बोलीचे तीन पोटभेद आहेत. रावी व चिनाव यांच्या दुआबातील बोली ही अमृतसरी म्हणून प्रसिद्ध आहे. या बोलीत ब चे उच्चारण व असे करतात. उदा० बारी = वारी. बाढ = वाढ. इत्यादी. भाई शब्दाचा उच्चार अमृतसरीमध्ये भाऊ असा होतो.

लाहोरी भाषा शकरगढ आणि सियालकोटचा काही भा[ग] यात प्रचलित आहे.

गुरुदासपुरी ही गुरुदासपूर, जंडियाला आणि लोप्पा [या] भागात बोलली जाते.

माझी भाषेत पुत्र, सूत्र, रात्री, इ. संस्कृत शब्दांचे पुत्तर, सुत्तर, रात्तर असे प्रयोग आढळतात. [मैं ध. पं.]

माझोरा एक प्राचीन स्थान. हे गाव उत्तर प्रदेशात फैजाबाद जिल्ह्यातील अकबरपूर नावाच्या तालुक्यात आहे. सांप्रत हे गाव दोहती क्षेत्र या नावाने प्रसिद्ध आहे. [या] गावाजवळ दोन ओहोळांचा संगम झाला आहे, म्हणून या[ला] दोहती हे नाव मिळाले, असे सांगतात. श्रावण आपल्या मात[ा]पित्यांसाठी पाणी आणायला गेला असता दशरथाच्या बाणा[ने] विद्ध झाला तो या जागी, असे सांगतात. त्यामुळे या स्थाना[ला] क्षेत्राचे पावित्र्य लाभले आहे. त्याचप्रमाणे दशरथाला पु[त्र]प्राप्तीसाठी हेच स्थान कारणीभूत झाले; म्हणूनही या[ला] महत्त्व दिले जाते. [स. भा. प्र. व.]

माटलादेवी काही कोकणस्थ लोकांची ही कुलदेवी [आहे]. माटला कुणबीण आहे, असे समजतात. ति[च्या] कुलाचाराच्या निमित्ताने कुणबीण सवाष्णही जेवायला बो[ला]वतात. त्याचप्रमाणे दिवाळी, लग्नकार्य, गर्भाधान, इ. प्रसंगी माटलादेवीच्या नावाने सवाष्ण सांगण्याची प्रथा आहे. [...] कुणबिणीने निमंत्रणाच्या दिवशी ओशट खाता कामा नये, [...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नियम आहे. पूर्वी ब्राह्मण लोक शूद्र स्त्रिया करीत असत, तेव्हाचा हा अवशेष असावा, असे श्री. ना. गो. चापेकर यांचे या कुलाचाराविषयी मत आहे. [चित्पावन]

माडिया गोंड लोकाची एक शाखा. माडिया लोकांचे पहाडी माडिया आणि बिसनर्शिगी माडिया असे दोन भेद आहेत. या लोकांची वस्ती प्रामुख्याने मध्य प्रदेशातील बस्तर जिल्ह्यात आहे. पहाडी माडिया बस्तरमधील अबुझमाड पर्वतावर आणि शिंगी माडिया इंद्रावती नदीच्या दक्षिणेकडे सखल प्रदेशात राहतात. महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातही यांची थोडी वस्ती आहे.

बिसनर्शिगी माडिया — बिसनर्शिगी माडिया स्त्रीपुरुष शरीराने बळकट व नीटस बांध्याचे असतात. त्यांचे नाक-डोळे चांगले असतात. त्यांच्यापैकी अनेकांचे केस भुरे असतात. पुरुष डोक्यावरील पुढच्या बाजूने दोन इंच केस कापतात व बाकीचे वाढवतात. ते केस चांगले विंचरतात व मागच्या बाजूला त्यांची गाठ मारतात. त्यांच्या स्त्रिया केसांचा अंबाडा घालतात.

पुरुष एक कटिवस्त्र गुंडाळतात. काही पुरुष डोक्याला लहानसे पागोटे बांधतात. त्यांच्या कमरेला लाकडी फणी व तंबाखूची लाकडी डबी असते. कानांत अनेक सुंकली, हातात एकेक कडे व गळ्यात थोड्या मण्यांच्या माळा असतात. स्त्रिया कमरेभोवती पांढरे तोकडे वस्त्र गुंडाळतात. त्यांचा वरचा भाग नेहमी उघडाच असतो. पण बाजाराला किंवा चारचौघांत जाताना आणि परक्यांसमोर त्या छातीचा भाग पदराने झाकून



माडिया स्त्रीच्या केसांतील फण्या

घेतात. डोक्यावर त्या पितळेचा गोलाकार पट्टा घालतात. गळ्यात काचेच्या रंगीत मण्यांच्या अनेक माळा आणि लोखंडी व पितळी सऱ्या घालतात. दंडांत वाकी, हातांत कथलाच्या जाड बांगड्या, कानांत कर्णफुले, नाकांत चमक्या आणि पायांत



बिसनर्शिगी माडिया पुरुष— ताडी जमा करताना

वाळे हे त्यांचे अलंकार होत. शिवाय केसांत त्या पिना व फण्या अडकवतात.

यांच्या गावाभोवती बांबूच्या कामटयांचे गच्च कुंपण असते. हिंस्र प्राण्यांपासून संरक्षण व्हावे, म्हणून ही योजना असते. एका गावात बहुधा सहा ते बारा झोपड्या असतात आणि त्या बहुधा एकाच कुटुंबातील संबंधितांच्या असतात. झोपड्यांचे छप्पर गवताचे आणि भिंती माती व बांबूच्या कामट्यांनी बनवलेल्या असतात. घराभोवती छोटी बाग व काही वेळा मोठे शेतही असते. घरांना बहुधा तीन खोल्या असतात. प्रत्येक खोली म्हणजे स्वतंत्र झोपडीच असते. स्वयंपाकघर शयनघर व कोठी म्हणून त्या खोल्या वापरतात. घरे बहुधा स्वच्छ असतात. घराशेजारी डुकरांसाठी व गुरांसाठी गोठे असतात. सर्वसाधारणपणे प्रत्येक गावात ग्रामप्रमुखाच्या घराशेजारी एक प्रशस्त झोपडी बांधलेली असते. गावात येणाऱ्या पाहुण्यांची व्यवस्था त्या झोपडीत करतात. एरवी तरुण मुले त्याचा सामुदायिक शयनगृह म्हणून उपयोग करतात. मुलींसाठी वेगळे शयनगृह असते.

उद्योगधंदे — शेती हा माडियांचा मुख्य व्यवसाय आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जंगलातील काही झाडे ते तोडतात आणि ती वाळली की जाळतात आणि त्या राखेत बी पेरतात. काही वेळा झाडे तोडलेल्या जागीच हे सर्व करतात; तर काही वेळा नेहमीच्या शेतात लाकडे वाहून नेतात आणि तिथे ती जाळून त्या राखेत बी पेरतात. भात, कुटकी, बाजरी, भोपळे, काकडचा, वाटाणा, इ. पिके ते काढतात.

याशिवाय ते जंगलातील कंदमुळे, फळे वगैरे गोळा करतात आणि कोंबडया, बकरी व डुकरे पाळतात. शिकार करणे व मासे मारणे हे त्यांचे आवडीचे उद्योग आहेत. स्वतःच्या उपयोगाकरता ते पानांच्या किंवा बांबूच्या टोपल्या व चटया विणतात.

भात, कंदमुळे, फळे, मांस व मासे असा यांचा आहार असतो. ताडी, मोहाची दारू व खजुराची दारू ही यांची पेये होत. तांदूळ व ज्वारी यांपासून बनवलेले मद्य यांना फार आवडते. इतर मद्यांच्या जोडीने ते घेतले असता, माणूस एकदम हिंसाचाराला प्रवृत्त होतो. माडिया लोकांत खुनाचे प्रमाण अधिक आढळते, याचे कारण हेच आहे. जन्म, विवाह, मृत्यू, सण, उत्सव, इ. प्रसंगी हे लोक खूप दारू पितात.

हे लोक जी बोली बोलतात, तिला माडिया असेच नाव आहे.

विवाहप्रथा – मुलेमुली वयात आल्यावर लग्ने होतात. आते-मामे भावंडांत लग्न होते. लग्न आईबाप ठरवतात. मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. मुलीच्या घरी जाताना तो तांदुळाच्या दारूचे एक मडके व पायलीभर तांदूळ घेऊन जातो. मुलीला मागणी घालायची भाषा ठरलेली आहे, ती अशी – मुलाचा बाप मुलीच्या बापाला म्हणतो. 'तुमच्या बागेत एक फूल उमलले आहे, असे ऐकतो. ते खुडून आम्ही आमच्या केसांत खोवण्यासाठी इथे आलो आहो.' मुलीच्या बापाला हा संबंध पसंत असेल, तर तो मुलाच्या बापाकडचे मद्याचे मडके घेतो आणि त्यातले थोडे मद्य कोठीच्या खोलीतील पितरांच्या मडक्यापुढे ओततो. उरलेले मद्य जमलेले सर्वजण पितात.

मुलीसाठी देज द्यावे लागते. दहा मोठी मडकी तांदुळाची दारू, तेवढ्याच पायल्या तांदूळ किंवा कुटकी, दोन मोठी व एक लहान मडके मोहाची दारू, एक डुक्कर, एक कोंबडा आणि मुलीच्या आईसाठी चार वार कापड, एवढे देज असते. लग्नाचा मुहूर्त पुरोहित ठरवतो. मुहूर्ताच्या दिवशी वरपक्षाकडील मंडळी वधूच्या गावी जातात. वरपित्याने देज दिले, की लग्नातील काही विधींना सुरवात होते. आप्त सुवासिनींनी वधूला जवळच्या झऱ्यावर स्नान घालणे, हा त्यांतला पहिला विधी होय. दरम्यानच्या काळात गावातील स्त्रिया एक लांबच लांब रांग करून उभ्या राहतात व शेजारणींच्या हातांत हात गुंफून गीते गातात.

सूर्यास्तसमयी मुलीचा बाप मुलीला घराबाहेर आणतो. ... तो वराजवळ जाऊन, मुलीची काळजी घेण्याबद्दल त्याला विनंती करतो आणि वधू-वरांचे हात जुळवतो. वधू-वर एकमेकांना अंगठ्या देतात. एवढ्याने वधूच्या गावातील कार्यक्रम संपतो.

मग सर्वजण वराच्या गावी जाण्याची तयारी करतात. वधूला द्यायच्या भेटवस्तू एकत्र करतात. ही तयारी चालू असता, वर तिथून हळूच निसटतो आणि घरी जाऊन वधूच्या स्वागताची तयारी करतो. वधू मिरवीत वरगृही जाते. ... ती पितरांच्या खोलीत जाऊन त्यांना नमस्कार करते. ... पितरांच्या चुलीवर वधू-वरांसाठी स्वयंपाक चाललेला असतो. वधू-वर त्या चुलीसमोर बसून राहतात आणि तिथेच जेवण करून मग बाहेर येतात.

मध्यंतरीच्या काळात बाहेरच्या बाजूला स्त्री-पुरुष ... ढोलाच्या साथीवर नृत्य करीत असतात. नृत्याच्या वेळी ... मधून त्यांचे मद्यपानही चालू असते. जेवण झाल्यावर वधू-वर त्यांच्या नृत्यात सामील होतात.

बिसनशिंगी माडियांचे विवाहप्रसंगीचे हे नृत्य अत्यंत प्रेक्षणीय असते. पुरुष या वेळी डोक्यावर गव्याची शिंगे असलेले शिरस्त्राण घालतात. बांबूच्या कामट्यांवर हे शिरस्त्राण बनवलेले असते. त्यावर पुढच्या बाजूने गव्याची शिंगे आणि मागच्या बाजूने मोरपिसे व कोंबडयाची पिसे यांचा गुच्छ बांधलेला असतो. नृत्य करताना त्यातले एखादे पीस गळून पडले, तर ते अशुभ समजतात. म्हणून नृत्याला सुरुवात करण्यापूर्वी, ... गळू नये यासाठी धरतीमाता व पितर यांची प्रार्थना करतात. ... शिंगे व गुच्छ भारी किमतीच्या रेशमी कापडाने गुंडाळलेले ... आणि त्याचे एक टोक मागे लोंबत असते. पुढच्या बाजूला ... कवड्यांच्या काही माळा लोंबत असतात आणि त्यांनी नर्तकांचे ... डोळे झाकले जातात. हे शिरस्त्राण माडियांच्या घरात ... परंपरेने चालत असते. नृत्य झाल्यावर त्याचे भाग सुटे ... ते मोठ्या काळजीपूर्वक बांबूच्या पेटीत ठेवून देतात. ... स्त्रिया डोक्यावर पितळेचा चकचकीत मुगुट घालतात ... उजव्या हातांत काठी घेतात. त्या एका रांगेत उभ्या राहून ... आणि नर्तकांच्या बाजूने किंवा त्यांच्या मधून अशा वेगवेगळ्या ... हालचाली करीत व लयबद्ध पावले टाकीत नाचतात. ... गळ्यांत लांब ढोलकी अडकवून मोठा गोल करतात ... तऱ्हेतऱ्हेचे आकृतिबंध निर्माण करतात. ढोलांचा आवाज ... मोठा असतो. रात्रभर असे नृत्य चालते आणि पहाटे ... नंतर वध-वरांना त्यांच्या नव्या घरी नेतात. तिथे ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चुलता घराच्या छपरावर चढून त्यांच्या मस्तकावर पाणी ओततो आणि मग वधू-वरांना एका खोलीत नेऊन खोलीचे दार बाहेरून बंद करतो. एवढे झाल्यावर लग्नविधी पुरा होतो.

पूर्वी माडिया तरुणाने एखाद्या तरुणीला मागणी घातली, की ती त्याच्या शौर्याचा व पराक्रमाचा अंदाज घेण्यासाठी त्याला रानरेडा मारून त्याची शिंगे आणायला सांगत असे. मग



माडिया नर्तकीचा पितळी मुगुट

गावातले लोक त्याला वाजतगाजत जंगलात घेऊन जात आणि रानरेड्यांच्या कळपाजवळ सोडीत. त्या वेळी त्याच्या हातात फक्त एक भाला असे. साधारणपणे कळपातला एखादा रेडा बाजूला फोडून तो त्याच्यावर हल्ला करी व त्याला ठार मारी. एखाद्या वेळी तो तरुण रानरेड्याच्या धडकांनी जखमी होऊन पडला, तरी कोणी त्याला मदत करीत नसत. रेड्याला मारल्यावर तो तरुण त्याच्यावर उभा राहत असे. मग वधूकडचे लोक त्या रेड्याला बांबूंनी बांधून मिरवीत गावात घेऊन येत. मग वधू त्याच्या शिंगावर कोरीव काम करी आणि त्यांचे शिरस्त्राण बनवून लग्नाच्या वेळी ते वराच्या मस्तकावर ठेवी. बायको मिळवायची, तर माडिया तरुणाला हा जिवावरचा खेळ खेळावाच लागे.

प्रसूतिप्रथा – गरोदर स्त्रीवर काही बंधनें नसतात. प्रसूतीनंतर मुलाची वार घरामागे एका खड्ड्यात पुरतात आणि त्यावर लाकडाचे ओंडके ठेवतात. नाळ कापलेला बाणही त्याच्या जवळच जमिनीत खोचून ठेवतात. बाळंतिणीसाठी एक वेगळी झोपडी बांधतात आणि ती काहीं आठवडे त्या झोपडीत राहते. वारेच्या खड्ड्यावर बसून ती रोज स्नान करते. काही आठवड्यांनंतर मुलाचा बाप शेजाऱ्यांना जेवण देतो. त्याच दिवशी मुलाचे नाव ठेवतात आणि माता झोपडीतून आपल्या घरी राहायला येते.

देवधर्म – माडियांचा धर्म धरतीमाता, ते राहतात ती भूमी आणि त्यांची टोळी यांच्या भोंवती गुंफलेला आहे. धरती ही ग्रामदेवतेच्या रूपाने पूजिली जाते. बस्तरच्या राजघराण्याची कुलदेवता असलेली दंतेश्वरी ही त्यांच्या राज्याचे प्रतीक मानलेली आहे. हल्ली काही वेळा ती पृथ्वीमातेचें प्रतीक समजली जाते. त्यांच्या कुलदेवतेला अंगा–पेन असे नाव आहे. प्रत्येक खेड्याच्या सरहद्दीवर तिचे मंदिर असते. तीन लाकडी ओंडके समांतर ठेवून त्यांच्यावर आडव्या काठ्या ठेवतात व ते एकमेकांना बांधतात. त्यांतल्या मधल्या ओंडक्याचे मस्तक एखाद्या पक्ष्यासारखे किंवा सापासारखे असते. पितळेच्या घंटा, चांदीचे पट्टे आणि मोरपिसे यांनी देवता सजवलेल्या असतात. देवतेचा पुजारी तिथे जवळच राहतो आणि तिचे रक्षण करतो.

दंतेवाडा इथे दंतेश्वरीचे मंदिर आहे. तिच्या वार्षिक जत्रेसाठी शेकडो माडिया जमतात. दसऱ्याच्या वेळी जगदलपूर येथे पंधरा दिवस जत्रा भरते. पूर्वी दसऱ्याच्या दिवशी एका उंच व भव्य रथातून बस्तरच्या महाराजांची मिरवणूक काढीत असत. तो रथ ओढायला बिसनशिंगी माडिया मदत करीत असत. प्रत्येक खेड्याच्या सरहद्दीवर ग्रामदेवतेचे मंदिर असते. भीमल ही त्यांची पर्जन्यदेवता असून, एक लाकडी खांब किंवा उभा दगड हे तिचे प्रतीक असते.



अंगा–पेन, माडियांची कुलदेवता

सण व उत्सव – वर्षभर या लोकांचे काही ना काही उत्सव चालूच असतात. ते वर्षारंभी भीमल देवतेचा उत्सव करतात. त्यानंतर मोहवृक्षाचा उत्सव येतो. त्याची पूजाअर्चा केल्याशिवाय त्याची फुले खाता येत नाहीत किंवा फुलांपासून मद्यही काढता येत नाही. फाल्गुन महिन्यात सामूहिक मासेमारीचा व आम्रवृक्षगौरवाचा असे दोन उत्सव येतात. चैत्रात सामूहिक शिकारीचा व पुढे पावसाळ्यात पेरायचे बी पवित्र करायचा, असे दोन समारंभ असतात. पिके तयार झाल्यावर नवे धान्य खाण्याचे अनेक उत्सव असतात. ज्वारीसारखी धान्यें, भोपळे, काकड्या, तांदूळ, घेवडा, डाळी, वगैरे त्यांचा उत्सव झाल्याशिवाय खाता येत नाहीत. वर्षाच्या शेवटी गवत किंवा बांबू कापण्याचा उत्सव होतो आणि मग सर्वजण झाडे तोडून शेतीसाठी जमीन तयार करायच्या कामाला लागतात. गावचा पुरोहित ग्रामप्रमुखाच्या सल्ल्याने या उत्सवांसाठी दिवस ठरवतो. उत्सवाच्या आदल्या रात्री सर्व पुरुष सामुदायिक शयन-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गृहात झोपतात. उत्सवाच्या वेळी देवतेला कोंबडा बळी देतात.

नृत्य हे माडियांचे करमणुकीचे प्रमुख साधन आहे. याशिवाय, त्यांना कोंबडयांच्या झुंजी लावणेही आवडते. मोठमोठे बाजार भरतात, त्या ठिकाणी बाजार संपल्यावर हे लोक कोंबडयांच्या झुंजी लावतात. त्या वेळी कोंबडयांच्या पायांना धारदार पाती बांधलेली असतात आणि त्याचे पर्यवसान एखादा कोंबडा मरण्यात होते. कोणता कोंबडा जिंकील, याबद्दल ते पैजही लावतात.

माडियांच्या प्रत्येक खेडयात काही अधिकारी असतात. गावाचा एक प्रमुख असतो. त्याला पेडा असे म्हणतात. त्याच्या हाताखाली कोटवार नावाचा एक अधिकारी असतो. गावातील जन्ममृत्यूंची माहिती पोलिसांना कळवणे, हे त्याचे काम असते. अनेक खेडयांचा मिळून एक परगणा होतो. त्यावरच्या प्रमुखाला परगणा मंझी असे म्हणतात. प्रत्येक गावात एक पंचायत असते आणि ग्रामप्रमुखच तिचा अध्यक्ष असतो. प्रत्येक परगण्याची एक परगणापंचायत असते. ग्रामपंचायतीच्या निर्णयावर इथे अपील करता येते. लहानसहान गुन्हे, भांडणे, तंटे, यांचे निकाल ग्रामपंचायत देते. याशिवाय, गावात काही धार्मिक अधिकारीही असतात. भूम-गायता किंवा पर्मे त्यांतला मुख्य होय. गावाच्या उत्सवातील सर्व पशुबली व्यवस्थित दिले जातात का नाही, हे तो पाहतो. ग्रामदेवतेची पूजाही तोच करतो. पेनवड्डई किंवा वड्डई हा कुळाचा पुरोहित असतो. पितर आणि मृत यांच्याशी संबंध असल्यामुळे त्याला फार महत्त्व असते. हनगुंडा हा अंत्यक्रियेच्या वेळी पौरोहित्य करतो. तसेच तो भुताखेतांना संतुष्ट करतो. दैवी शक्तीचा अंगात संचार होणाऱ्या पुरुषांना सिरहा किंवा गुणिया असे नाव आहे. आजारी माणसाला बरा करण्यासाठी याला बोलावतात. कारण भुताखेतांच्या कोपामुळे आजार उद्भवतात, अशी यांची समजूत आहे.

मर्तिकप्रथा– हे लोक प्रेते जाळतात. गरोदर व बाळंतीण, तसेच साथीच्या रोगाने मेलेले, यांना मात्र पुरतात. मृताला मस्तक पूर्वेकडे करून मघल्या खोलीत ठेवतात. त्याचा भाचा त्याच्या छातीच्या बरोबर वर एक काठी छपरात घुसवतो. त्या भोकावर भाचा ढोल ठेवतो आणि तो एका विशिष्ट लयीत वाजवतो. तिथे थोडा वेळ वाजवल्यावर तो छपरावरून खाली उतरतो आणि जमिनीवर राहून ढोल वाजवतो. यामुळे व्यक्ती मृत झाल्याची बातमी आसपासच्या लोकांना कळते. हनगुंडा नामक पुरोहित अंत्यक्रिया करतो. त्याची पत्नी मृताला स्नान घालते. नंतर थोडे भात सडून ती तांदूळ करते आणि पानात त्याच्या चार पुरचुंडया बांधते. त्यांपैकी दोन मृताच्या काखेत आणि दोन त्याच्या कमरेला बांधते. नंतर ती त्याच्या छातीला जळक्या भांडयांच्या बुडाचे काळ लावते. मग प्रेत तिरडीवर ठेवून स्मशानात नेतात. मृताचा मेहुणा चितेला अग्नी देतो. दुसऱ्या दिवशी मृताच्या नावाने एक गाय मारतात.

माडिया लोक मृतांच्या स्मरणार्थ गावाच्या आसपास दगड उभारतात. काही वेळा हे दगड फारच मोठे असतात. उभ्या सुळक्यासारखा त्यांचा आकार असतो. त्यांच्या समोर पाटयासारखा एक सपाट दगड ठेवलेला असतो. त्याच्यावर मृताच्या घरातील स्त्रिया तांदूळ, हळद, मृताच्या आवडीचे धान्य फळेमुळे, इ. पदार्थ ओततात.

माडियांचा लाकडी कोरीव
स्मारकस्तंभ

एखादा प्रति किंवा श्रीमंत माणू मेल्यावर त्याच्या नावाने एखा लाकडी, कोरीव क केलेला खां उभारतात.

पहाडी माडिया– बस्तर जिल्ह्याच्या अबुझमाड या पहाडी प्रदेशात यांची वस्ती आहे. अबुझमा पर्वताची काही शिखरे दोन ते तीन हजार फूट उंचीची आहेत. पहाडी माडियांची पुष्कळशी खेडी गढ प्रदेशात आहेत. इंद्रावतीच्या खोऱ्यातील पहाडी, माडियांवर बिसनशिंगी माडि यांचा बराच प्रभाव आहे.

हे लोक वर्णाने काळे, मध्यम उंचीचे व बसक्या नाकाचे असतात. त्यांचे ओठ जाड असतात आणि केस काळे असतात. यांचे शरीर घाटदार असते. त्यांच्या स्त्रियाही सशक्त असतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डोक्यावर मोठमोठी ओझी घेऊन त्या महिन्यातून एकदा तीस-चाळीस मैल दूर असलेल्या बाजाराला अनेक डोंगर पायी चढून व उतरून जातात.

पहाडी माडिया पुरुष फक्त एक कटिवस्त्र नेसतो. थंडीच्या दिवसात उबेसाठी त्यांच्या घरात शेकोटी पेटवलेली असते. स्त्री-पुरुष बहुधा रोज स्नान करतात. पण कपडे मात्र रोज धूत नाहीत. यांच्या झोपड्याही नव्या असताना स्वच्छ असतात तेवढ्याच. नंतर ते उखडलेल्या जमिनी कधी सारवीत नाहीत.

पुरुष डोक्याचा घेरा करतात. स्त्रिया भांग पाडून केसांचा मागे अंबाडा बांधतात. पुरुषांच्या गळ्यांत मण्यांच्या एक-दोन माळा असतात. त्यांच्या कानांत जस्ताची मोठी वलये असतात. काही वेळा पितळेची बारीक वलये असतात. स्त्रियांच्या गळ्यांत रंगीबेरंगी मण्यांच्या माळा व लोखंडी आणि पितळी गोल सऱ्या असतात. इतर दागिने बिसनशिंगी माडिया स्त्रियांसारखेच असतात.

पहाडी माडियांचा नृत्यवेष मात्र बिसनशिंगी माडियांपेक्षा वेगळा असतो. काही डोक्याला पांढरे किंवा लाल पागोटे बांधतात; तर काही पांढरा किंवा लाल कपडा गुंडाळलेली टोपी घालतात. टोपीवर मोराच्या किंवा कोंबड्याच्या पिसांचा तुरा खोचतात. टोपीला गुंडाळलेल्या कपड्याचा शेमला पाठीमागे घोट्यापर्यंत सोडलेला असतो. ते अंगात बिनबाह्यांचे लाल रंगाचे जाकिट घालतात व त्यावरून पांढऱ्या कापडाचे पट्टे आडवे गुंडाळतात. त्यामुळे पंखांचा आकार फासळ्यांसारखा दिसतो. ते पायघोळ लुंगी गुंडाळतात, कमरेभोवती पांढरे फडके गुंडाळतात आणि त्यावर पाठीमागे घंटांचा झुबका अडकवतात. ते मानेच्या मागच्या बाजूला बांबूची एक ढाल बांधतात. त्यांच्या हातात एक काठी असते.

नृत्यवेषात पहाडी माडिया पुरुष

यांच्या स्त्रिया मात्र नृत्याच्या वेळी नेहमीचाच पोषाख करतात.

दाट धुके आणि पाऊस यांपासून संरक्षण व्हावे व अंगात ऊब यावी, या हेतूने एका झाडाच्या सालीचे लांब पट्टे वेणीसारखे एकत्र गुंफून त्यांचा एक पायघोळ परकर ते वापरतात.

त्यांच्या कमरेला कोयतीसारखे एक हत्यार खोचलेले असते. फेकून मारण्यासारखे लहान लहान भाले, खुपसून मारायचे मोठे भाले, कुऱ्हाडी व धनुष्यबाण ही त्यांची प्रमुख आयुधे होत.

हे लोक स्वभावाने आनंदी असतात. तसेच कुठल्याही परिस्थितीत ते विनोद करू शकतात. त्यामुळे या लोकांत फारशी भांडणे होत नाहीत. ते मोकळ्या मनाचे आणि प्रामाणिक व आतिथ्यशील आहेत.

या लोकांची खेडी डोंगरमाथ्यावर वसलेली असतात. यांची घरे मोकळ्या जागेच्या दोन्ही बाजूंना बांधलेली असतात. गावाच्या एका टोकाला सामुहिक शयनगृह असते. क्वचित शयनगृहाच्या आवारातच ग्रामदेवतेचे मंदिर असते. किंवा ते गावाच्या सीमेवर असते. गावातल्या घरांपासून दूर अंतरावर रजस्वला स्त्रियांना एक आठवडाभर राहण्यासाठी एक झोपडी बांधलेली असते. यांच्या झोपड्या लांब आकाराच्या असतात. झोपड्यांच्या मागच्या बाजूला डुकरांसाठी छपरे असतात. तसेच रजस्वला स्त्रीसाठीही एक झोपडी असते.

घरे बांबू व मातीची असून, त्यांवर गवताचे छप्पर असते. घराला बहुधा स्वयंपाकघर, शयनघर व कोठी अशा तीन खोल्या असतात. कोठीतच पितरांसाठी चूल व मडके असते.

शेती हा यांचा मुख्य व्यवसाय आहे. डोंगर-उतारावर झाडे तोडून व ती जाळून त्या राखेत हे बी पेरतात; पण दोन वर्षांनी या जागा पुन्हा शेतीसाठी निरुपयोगी होतात व नवीन जागी यांना बी पेरावे लागते. कोसरा किंवा कुटकी, सावा, कोदो, तांदूळ, बाजरी, डाळी व काकड्या, भोपळे, इ. पिके व भाज्या ते पिकवतात. सर्व नवीन धान्ये खाण्यापूर्वी ते नवान्नभक्षणाचा समारंभ करतात. त्या वेळी देवतेला काळ्या कोंबड्याचा बळी देतात.

काही ठिकाणी पहाडी माडिया कायमची शेती करतात व त्यात भात पिकवतात.

हे लोक रानातील विविध प्रकारची फळे, कंदमुळे, फुले, मध वगैरे गोळा करतात आणि त्यांचा खाण्यासाठी उपयोग करतात. तसेच हे बहुतेक सर्व प्रकारचे प्राणी आणि पक्षी मारून खातात. धनुष्यबाणाने नेमबाजी करून लक्ष्यवेध करण्यात हे फार कुशल आहेत. हे डुकरे, कोंबड्या व क्वचित शेळ्या व गाई-म्हशी पाळतात. या प्राण्यांचे मांसही ते खातात. मासे पकडण्यासाठी ते बांबूचे विविध प्रकारचे सापळे बनवतात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व त्यांत मासे पकडतात. वर्षातून एकदा तरी ते सामुदायिक मासेमारी व शिकार करतात.

हे लोक साबुदाण्याच्या झाडापासून काढलेले मद्य, ताडी, शिंदी, मोहाचे मद्य, इ. मद्ये पितात. सर्वसाधारणपणे जेवण झाल्यावर हे लोक मद्य पितात. सणासुदीला, तसेच विवाह-समारंभ व मृत्यू या प्रसंगी आबालवृद्ध दारू पितात.

वांबूपासून धान्याच्या कणग्या, घरांच्या भिंती, कुंपणे, नृत्याच्या वेळच्या ढाली, धान्य मोजण्याची मापे, तऱ्हेतऱ्हेच्या टोपल्या व चटया हे लोक उत्तम तयार करतात.

पहाडी माडिया स्त्री-पुरुष वर्षभर नृत्य करीत नाहीत; तर पिकांची कापणी होऊन ती घरात नेऊन भरली, की पेरणीची वेळ येईपर्यंतच्या मधल्या काळात ते काही वेळा नृत्य करतात. या काळातील नवान्नभक्षणाचा समारंभ व लग्न या वेळी व सरकारी पाहुण्यांच्या आगमनप्रसंगी फक्त हे लोक नृत्य करतात. गीताच्या ठेक्यावर हे नृत्य चालते. ढोलाच्या साथी-पेक्षाही या नृत्यात गीतालाच अधिक महत्त्व असते. तीन किंवा दोन तरुण व त्यांच्या मधे एक तरुणी असे तिघे गीत गातात व गाताना पुढे मागे पावले टाकतात. त्यांच्या मागे एका रांगेत नर्तक स्त्री-पुरुष उभे राहतात. नर्तक आपल्या उजव्या हाताच्या व्यक्तीच्या खांद्यावर व डाव्या हाताच्या व्यक्तीच्या कमरेभोवती हात ठेवतात. ते टाचा उंच करून उजवा पाय उजवीकडे टाकतात व मग पुन्हा दोनदा टाचा उंच करून तिसऱ्या वेळी डावा पाय उजव्या पायाच्या जागी आणतात. या एकाच प्रकाराच्या पदन्यासामुळे यांचे नृत्य एकसुरी व कंटाळवाणे होते.

हे लोक बिसनशिंगी माडियांप्रमाणेच भूमिदेवता, पेन आणि ग्रामदेवता या देवतांना भजतात. भुताखेतांवर आणि जादू-टोण्यावर त्यांचा विश्वास आहे.

हे लोक पितरांनी आपले काही वाईट करू नये म्हणून, त्यांचीही उपासना करतात. प्रत्येक घरात कोठीच्या खोलीत मृतासाठी मडके व चूल असते. पेरणी आणि कापणी यांवर पितरांची सत्ता चालते, अशी या लोकांची समजूत आहे. यामुळे ते शेतीविषयक सर्व सण-उत्सवांत त्यांना अन्नधान्य व मद्य अर्पण करून संतुष्ट राखतात. कोठीच्या खोलीतील धान्याचे संरक्षण पितरच करतात, अशी त्यांची समजूत आहे. घरात स्त्रीसंग करणे म्हणजे पितरांचा अपमान करण्यासारखे आहे, अशी समजूत असल्यामुळ पूर्वी आणि सांप्रतही काही गावांत स्त्री-पुरुष त्यासाठी घराबाहेर जंगलात जातात.

विवाहप्रथा · यांच्यांत आते-मामे भावंडांत सर्रास लग्ने होतात. अशा लग्नात देज कमी द्यावे लागते, हा त्यातला फायदा असतो. मुलीच्या लग्नापूर्वीच्या वर्तनाचा बाऊ ... नाहीत. आते-मामे भावंडांचे लग्न होत असले, तरी काही ... मुले व मुली आपापले लग्न ठरवतात व तसे आपल्या ... वडिलांना सांगतात. मग मुलाचे आईबाप काही ग्रामवृद्ध ... मोहाच्या दारूच्या पाच बाटल्या घेऊन दुपारच्या वेळी मुली... घरी जातात. तिथे मुलाचा बाप मुलीच्या घराचे दार ... उंबऱ्याच्या आत दारूच्या बाटल्या ठेवतो व दाराबाहेर ... टचाने बसलेल्या आपल्या मंडळींत येऊन बसतो. मुलीचे ... बाप मग आपल्या गावातील वडीलधाऱ्या मंडळींना बोलाव... आणि त्यांच्या समक्ष मुलीला हा संबंध पसंत आहे का ... विचारतात. तिने होकार दिल्यास दोन्ही बाजूंचे लोक तो ... पिऊन टाकतात आणि मुलीकडचे लोक रात्री मुलाकड... लोकांना जेवण देतात. तिने नकार दिल्यास मुलाकडचे ... आपल्या दारूच्या बाटल्या घेऊन परततात. मुलीने होकार दि... वर देज ठरवतात. वधूच्या आईसाठी कापड, एक डुक्कर, ... पायली मीठ, एक पायली दळलेली अंबरी फुले, एक किंवा ... शेर मिरच्या, दोन-तीन हळकुंडे, वराच्या ऐपतीप्रमाणे ...



माडिया तरुणी

चाळीस पायल्या कुटकी धान्य, दोन ते पंधरा बाटल्या ... दारू आणि पाच ते चाळीस रुपये रोख, एवढे देज असते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एका ठरवलेल्या दिवशी मुलाचे आईबाप आप्तेष्टांसह पण वराला न घेता वाजतगाजत मुलीच्या गावी देज घेऊन जातात. मुलीच्या आईबापांकडे देज दिल्यावर मुलाकडील लोक बरोबर आणलेल्या शिध्याचा स्वयंपाक करून जेवतात. नंतर सर्वजण नृत्यवेषात वधूच्या घरासमोर जमतात आणि पहाटेपर्यंत नृत्य करतात. नंतर मुलीचे लोक देजात मिळालेले डुक्कर आणि धान्य घेऊन स्वयंपाक करतात आणि सर्वांना जेवण देतात. मग वधूचे आईबाप तिला वराच्या मातापित्यांच्या स्वाधीन करतात. आईबापांचे घर सोडताना वाईट वाटते, हे दर्शविण्यासाठी तिने खूप रडावे, अशी अपेक्षा असते. मग ती सासूसासऱ्यांबरोबर चालत त्यांच्या गावी जाते. तिथे तिला वराच्या घरात नेऊन सोडतात. एवढ्याने लग्नविधी संपतो.

काही वेळा वराला देज देण्याची ऐपत नसते. अशा वेळी तो भावी सासऱ्याकडे नोकर म्हणून तीन ते सात वर्षे राहतो आणि त्यानंतर त्याच्या मुलीशी लग्न करतो. लग्नाचा सर्व खर्च मुलीचे आईबाप करतात.

काही वेळा मुलगी आपल्याला आवडणाऱ्या विवाहित पुरुषाच्याही घरात घुसते आणि त्याची पत्नी म्हणून राहू लागते. कामाला एक माणूस अधिक मिळाले, म्हणून पुरुषही तिचा स्वीकार करतो.

विधवा बहुधा धाकट्या दिराशी पुनर्विवाह करते.

प्रसूतिप्रथा – गरोदरपणी स्त्रीवर काही निर्बंध नसतात. शेवटच्या दिवसापर्यंत ती आपले नेहमीचे काम करीत असते. स्त्री गर्भवती आहे, हे निश्चित झाल्यावर पती तिच्याशी संग करीत नाही.

दर मासिक पाळीच्या वेळी स्त्रिया गावातील त्यांच्यासाठी मुद्दाम बांधलेल्या झोपडीत राहतात किंवा काही वेळा प्रत्येक घराच्या मागे रजस्वला स्त्रियांना राहण्यासाठी म्हणून एक झोपडी बांधलेली असते, तिच्यात पाच किंवा सहा दिवस राहतात. पुरुषांनी अशा स्थितीतल्या स्त्रियांचे तोंडही पाहायचे नसते. तसेच अशा स्थितीतल्या स्त्रियांवर कोणी जादूटोणा करू नये, म्हणून या दिवसांत त्यांच्या झोपडीच्या छपरावर एरंडाची झुडपे किंवा एरंडाच्या बिया ठेवतात. स्त्री प्रथम ऋतुमती झाली म्हणजे किंवा गरोदरपणी काही समारंभ करीत नाहीत. स्त्रीची प्रसूती याच झोपडीत होते. त्या वेळी तिला धीर देण्यासाठी तिची सासू किंवा एखादी गावातील स्त्री असते. पण ती प्रसूतीच्या वेळी तिला काहीही मदत करीत नाही. ती स्त्रीच आपल्या नवजात बालकाची नाळ कापते आणि त्यानंतर वार घरामागच्या कचऱ्याच्या ढिगाखाली पुरते.

प्रसूतीच्या आठ दिवसांत मुलाच्या बापाने शेतातले किंवा इतर काही काम करता कामा नये, घरात न झोपता सामुदायिक शयनगृहात झोपले पाहिजे, त्याने स्वतःसाठी अन्न शिजवता कामा नये, तर एखादा मित्र त्याला जेवण आणून देईल अशी व्यवस्था त्याने केली पाहिजे, मात्र पत्नीसाठी त्याने स्वयंपाक केला पाहिजे, असे काही निर्बंध त्याच्यावर असतात.

माडियांची तंबाखूची लाकडी डबी

तसेच या दिवसांत त्याला नेहमीच्या घरात प्रवेश करायची बंदी असल्यामुळे तो जवळच एक लहानशी झोपडी बांधून तिथे राहतो.

सुवेर संपल्यावर स्त्री रात्रीच्या वेळी नदीवर जाऊन स्नान करते, कपडे धुते आणि सकाळी मुलाला घेऊन आपल्या घरात जाते. नंतर मुलाच्या अंगावर, एखाद्या पूर्वजांच्या अंगावर होत्या, तशा काही जन्मखुणा आहेत की काय, ते पाहतात आणि त्या पूर्वजाचे नाव त्या मुलाला ठेवतात. तसेच मुलाच्या अंगावर आजीच्या अंगावरच्या जन्मखुणा आढळल्या, तर त्याला आजोबाचे नाव ठेवतात. अशा काही खुणा नसल्यास मुलाचे नाव दोन-तीन वर्षांनी ठेवतात. मुलाचे इतर काही संस्कार करीत नाहीत.

यांच्यात पंचायत असते. तिथे लग्न, घटस्फोट, इ. संबंधीच्या कटकटी, लहानसहान गुन्हे व गावाचा कारभार आणि शेतीसंबंधीची व्यवस्था, इ. गोष्टींवर विचारविनिमय होतो.

नवीन धान्य खाण्याचे यांचे उत्सव बिसनशिंगी माडियांप्रमाणेच असतात.

मर्तिकप्रथा – ग्रामप्रमुख, प्रतिष्ठित पुरुष व त्यांच्या स्त्रिया यांना हे लोक जाळतात व बाकीच्यांना पुरतात. मृत्यूची बातमी मृताच्या सर्व नातेवाइकांना कळवतात. ते सर्व जमल्यावर दोन किंवा तीन दिवसांनी अंत्यक्रिया करतात. आसन्नमरण व्यक्तीला पलंगावरून खाली ठेवतात. मृताचे डोळे बंद करून त्याला तिरडीवर ठेवतात व एका वस्त्राने झाकतात. नंतर ती तिरडी स्मशानात नतात. मृत्यू म्हातारपणी आलेला असेल, तर तो नैसर्गिक समजतात. पण अकाली मृत्यू आला असेल, तर त्यामागे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कुणाचे तरी चेटूक किंवा एखाद्या देवतेचा कोप असेल असे मानतात. त्याचे नक्की कारण शोधण्यासाठी तिरडी धरणारे लोक वाटेत उभे राहतात. मग वड्डई नामक पुजारी एक विधी करतो. सजा वृक्षाची सात पाने घेऊन ती तो एका ओळीत मांडतो. एक पान ग्रामदेवतेचा कोप झाला, असे सांगणारे असते. दुसरे आजारपणामुळे मृत्यू आला, असे दर्शविते. तिसरे कुलदेवता आणि पितर यांच्या क्रोधाचे प्रतीक असते. चौथे गावकऱ्याचा जादूटोणा, पाचवे भांडण झालेल्या एखाद्या व्यक्तीचा जादूटोणा, सहावे वड्डईने केलेले चेटूक व सातवे पान नैसर्गिक मृत्यू दर्शविणारे असते. वड्डई किंवा गायता पुरोहित जमिनीवर कुऱ्हाडीचे तीन घाव घालतो आणि प्रेताला आपल्या मृत्यूचे कारण उघड करण्याविषयी विनंती करतो. मग प्रेत तिरडीधारकांना एका पानाजवळ जायला प्रवृत्त करते, अशी समजूत आहे. तिरडीधारक मग त्या पानावर जाऊन उभे राहतात आणि थोड्या वेळाने तिथून बाजूला होऊन पानांच्या रांगेकडे पाठ करून उभे राहतात. मग वड्डई पानांची अदलाबदल करतो. तीन-चार वेळा जर प्रेताने त्या ठराविक पानाकडेच जायला प्रवृत्त केले, तर ते पान ज्याचे प्रतीक असते ते मृत्यूचे कारण समजतात.

प्रेत पुरायचे असेल, तर त्यासाठी कंबरेइतका खोल खड्डा खणतात आणि प्रेत त्यात ठेवतात. मृताचा वडीलधारा आप्त प्रथम त्याच्यावर थोडी माती लोटतो व मग बाकीचे माती टाकतात. मृताच्या बरोबर त्याचे कपडे, दागिने, कुऱ्हाड वगैरे वस्तू पुरतात किंवा जवळच्या सजा वृक्षावर टांगून ठेवतात. नेहमी दुपारी चारच्या सुमारास प्रेत घराबाहेर काढतात व संध्याकाळी जाळतात किंवा पुरतात.

काही लोक खड्डा खणत असताना दुसरे काही जवळच्या रानातील सजा वृक्षाच्या जाड फांद्या तोडून त्याचे गुळगुळीत खांब बनवतात व त्यावर कुऱ्हाड आणि चाकू यांच्या साहाय्याने मोरांच्या आकृत्या कोरतात. खड्डा बुजवून झाल्यावर त्या थडग्यावर चारही बाजूंना चार खांब उभे करतात, मध्यभागी एक सपाट दगड ठेवतात आणि त्याच्यापुढे थोडे मोहाचे मद्य ओततात. नंतर मृताचे आप्त त्या दगडावर धान्याच्या टोपल्या आणि मोहाच्या मद्याची मडकी ठेवतात. मग थडग्याभोवती बांबूचे कुंपण उभारतात.

प्रेत जाळायचे असेल, तेव्हा मोहाच्या झाडाखाली चिता रचतात. प्रत्येक नातेवाईक मृताच्या मस्तकावर लाकडाची ढलपी ठेवतो. प्रेत जाळलेल्या जागी कुंपण घालतात व खांब उभारतात आणि दगड ठेवतात.

हे लोक मृताशौच चार दिवस पाळतात. त्यानंतर ऐपत असेल तर, मृताचा उत्तराधिकारी त्याच्या थडग्याजवळ मृताचे स्मारक म्हणून मोठा दगड उभारतो. [हा. ट्रा. ई. इं.; मा. गों. व.; साधना, २४ जुलै १९७१; मा. म. सु.]

माणकोजी बोधला (इ. स. चे १७ वे शतक) एक मराठी संतकवी. हा सोलापूर जिल्ह्यातील धामणगावचा पाटील होता. याच्या वडिलांचे नाव भानजी जगताप असे होते. भानजी मूळचा पुण्यानजिकच्या सासवडचा रहिवासी होता, असे म्हणतात. एकदा मोठा दुष्काळ पडला असता तो आपल्या कुटुंबाबरोबर धामणगावाला गेला. माणकोजीचे लग्न बालपणीच झाले, असे सांगतात. त्याच्या बायकोचे नाव ममताई, मुलाचे यमाजी व सुनेचे भागीरथी असे होते.

माणकोजीचे सारे कुटुंबच विठ्ठलभक्त होते. तो स्वतः प्रत्येक एकादशीला पंढरीची वारी करीत असे. द्वादशीला ब्राह्मणभोजन घालून त्रयोदशीला तो परत फिरे. महीपतीने भक्तविजयात याचे चरित्र आणि अनेक चमत्कारकथा सांगितल्या आहेत. मध्वमुनीश्वरानेही याचे एक छोटे पण रसाळ चरित्र लिहिले आहे. नामदेवाच्या गाथ्यातही नामदेवाने लिहिलेले म्हणून याचे एक चरित्र आहे. पण हा नामदेव दुसराच कोणी असावा, कारण त्यात कालविपर्यय आहे.

माणकोजीचे अनेक अभंग उपलब्ध आहेत. त्यांतील नाममाहात्म्य सांगणारा एक अभंग असा —

सकाळी उठोनी हरीचे नाम उच्चारा ।
नाम उच्चारिता तुटे पातक धारा ।। १ ।।
हरीचें जे नाम ज्याच्या येईल वाचे ।
ते नर सदैव भाग्याचे ते एक जीव दैवाचे ।। २ ।।
हरीचे जे नाम जे जे उच्चारीत गेले ।
हरीरूप होऊनी ते नर वैकुंठी गेले ।। ३ ।।
बोधला म्हणे देवा नाम उच्चारीत गेलो ।
नाम उच्चारितां विठ्ठलपायी विनटलो ।। ४ ।।

जोतिराम व गोपाळनाथ असे माणकोजीचे दोन शिष्य होते. जोतिरामाने माणकोजीवर एक कीर्तिकटाव रचला आहे. धामणगावाला माणकोजीची समाधी आहे. [स. सं. गा.]

माणिक एक रत्नविशेष. याचे पद्मराग व नीलगंधी हे मुख्य भेद आहेत. त्यांत पद्मराग श्रेष्ठ असून, त्याची उत्पत्ती लंकेतल्या रावणगंगेत होते. याव्यतिरिक्त कुरुविंद, माणिक्य, सौगंधिक व मांसखंड असेही माणकाचे उपप्रकार आहेत. मानसोल्लास या ग्रंथात माणकाचे गुण पुढीलप्रमाणे सांगितले आहेत —

वर्णादिकं गुरुत्वं च स्निग्धता च तथाच्छता ।।
अर्चिष्मत्ता महत्ता च मणीनां गुणसंग्रहः ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – जडपणा, बुळबुळीतपणा, स्वच्छपणा, अतिशय लाली, तेजस्वीपणा, मोठा आकार, हे माणकाचे गुण होत.

दोन रंग असणे, दोरा असणे, तेज नसणे, पाणी नसणे, धुरकटपणा, इ. माणकाचे दोष समजले जातात.

उत्तमं सिंहलोद्भूतं निकृष्टं तम्बुरोद्भवम् ।
मध्यजं मध्यमं ज्ञेयं माणिक्यं क्षेत्रभेदतः ।।

अर्थ – सिंहलदेशातील माणिक उत्तम व हिमालयातील माणिक हलके होय. मध्यदेशातील माणके मध्यम समजावी.

ब्रह्मदेश, सयाम, लंका, म्हैसूर, मद्रास, पंजाब व उदयपूर (राजस्थान) या भागांत माणके सापडतात. माणकांची सर्वांत जास्त पैदास ब्रह्मदेशात होते. कानांतले दागिने व अंगठ्या यासाठी माणकांचा उपयोग करतात. सूर्यग्रहाच्या अनुकूलतेसाठी माणिक धारण करतात. [हिं. शि. शा.; रत्नदीपिका.; ल. र.प.]

माणिकदास एक रीतिकालीन हिंदी संतकवी. हा अहमदाबादचा रहिवासी असून विद्वान पाटीदार होता. कालांतराने याला उपरती झाली आणि हा साधू बनून उज्जैनीला राहू लागला. याने संतोषसुरतरू, सत्संग-प्रभाव, रामरसायनं, कवित्त प्रबंध, आत्मविचार हे पाच ग्रंथ रचले आहेत. यांतील संतोषसुरतरू हा ग्रंथ नीतिकाव्याचा एक नमुना म्हणून सांगता येईल. कोण्या बालमुकुंदाच्या अध्यापनासाठी रंगीलदास व्यास याने याच काव्याचा उपयोग केला होता. माणिकदासाचे काव्य उच्च कोटीचे नाही. त्यात यतिभंग व मात्रांची न्यूनाधिकताही पाहायला मिळते. [हिं. नी. वि.]

माणिकप्रभू (१८१७ – १८६५ इ. स.) एक दत्तसंप्रदायी सत्पुरुष. दत्तसंप्रदायी लोक यांना दत्तात्रेयाचे चौथे अवतार समजतात. यांचा जन्म सांप्रतच्या म्हैसूर राज्यातील लाडवंती या लहानशा गावी झाला. यांच्या पित्याचे नाव मनोहरनाइक हरकुडे व आईचे बयम्मादेवी असे होते. त्यांच्या कुळात सावकारीबरोबरच रामभक्तीही परंपरेने नांदत होती. मनोहरनाइक हे देशस्थ ऋग्वेदी, आश्वलायन शाखेचे श्रीवत्सगोत्री ब्राह्मण होते. माणिकप्रभू हे त्यांचे द्वितीय चिरंजीव. बालवयापासूनच त्यांनी नाना प्रकारचे ईश्वरी चमत्कार दाखवून आपले अवतारित्व सिद्ध केले. त्यांचे दर्शन, स्पर्शन व भाषण सर्वच अमोघ असल्याचा प्रत्यय अनेकांना येत असे. बालपणीच त्यांनी सहजस्फूर्त व प्रासादिक अशी शेकडो भक्तिगीते रचली. वयाची पहिली जवळजवळ पंचवीस–सव्वीस वर्षे त्यांनी निरनिराळ्या गावी भटकण्यात व लीला–चमत्कार करण्यात घालवल्यानंतर ते इ. स. १८४५ साली हुमणाबादेजवळ एका निर्जन स्थानी स्थायिक झाले. त्यांच्याच वास्तव्यामुळे कालांतराने तिथ आजचे माणिकनगर उभारले गेले.



माणिकप्रभू

माणिकनगर येथे स्थायिक झाल्यावर लौकरच त्यांच्याभोवती भक्तजनांची दाटी झाली. मोठमोठ्या शेठसावकारांनी माणिकप्रभूंना जडजवाहीर अर्पण केले. प्रभूंनी इच्छा प्रकट करायचा अवकाश, हवे तेवढे धनधान्य भक्तमंडळी त्यांच्यापुढे आणून ओतीत. जमलेल्या या सर्व धनधान्याचा विनियोग गोरगरिबांच्या उपयोगासाठीच होत असे.

माणिकप्रभूंनी प्रवर्तित केलेल्या संप्रदायाचे नाव सकलमत संप्रदाय असे आहे. सर्व धर्मांतील व पंथोपपंथांतील उत्तमोत्तम तत्त्वांचा व विचारांचा समन्वय करणारा असा हा संप्रदाय आहे. या संप्रदायाचे उपास्य श्रीचैतन्यदेव म्हणजे मानवाच्या अंतर्यामी वास्तव्य करणारा आत्मा आहे. मधुमती नामक शक्तीसह दत्तात्रेयाचे मूर्तिध्यान या संप्रदायात पूजिले जाते. हा संप्रदाय अद्वैती व सर्वसमावेशक असल्यामुळे कोणत्याही एका विशिष्ट देवतेचा मंत्र घेतला पाहिजे, असा प्रस्तुत पंथाचा आग्रह नाही. अशा उदार व समन्वयशील दृष्टीमुळे हिंदू, मुसलमान, पारशी, जैन, बौद्ध, लिंगायत, इ. धर्मांचे व पंथांचे असंख्य लोक माणिक-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रभूंचे अनुयायी बनले. जंगमांचा संक्रांतिमहोत्सव, मुसलमानांचा मोहरम आणि ब्राह्मणांची दत्तजयंती हे उत्सव माणिकनगरात थाटाने साजरे होत.

मार्गशीर्ष शु. ११ शके १७८७ या दिवशी माणिकप्रभूंनी जीवसमाधी घेतली. त्यांच्या अवतारकार्यामुळे दत्तसंप्रदायाच्या प्रसाराला व प्रगतीला फार मोठा हातभार लागला. समन्वयाच्या वृत्तीतून निर्माण झालेली दत्तदेवता जणू समन्वयाचे प्रात्यक्षिकच बनून भूतलावर माणिकप्रभूंच्या रूपाने अवतरली आणि तिने योग व भोग यांचा मेळ घालून दाखवला.

माणिकप्रभू हे एक प्रासादिक कवी होते. त्यांच्या पदसंभारात कृष्णविषयक पदे जास्त आहेत. मराठी, हिंदी व कानडी अशा तीनही भाषेंत ते लीलेने पद्यरचना करीत. त्यांच्या गीतांना मीरेच्या पदावलीची माधुरी आहे. त्यांचे एक पद असे –

श्रीगुरु माझा दत्त दयाघन रे ।
अंतरचालक त्रिभुवनपालक सकळांसी जीवन रे ।।
अखंड अगोचर व्याप्त चराचर शाश्वत चिद्‌घन रे ।।
माणिकदासासि मिळविले स्वरुपासी देऊनि उन्मन रे ।।

कवित्वाप्रमाणेच माणिकप्रभूंना संगीतकलेचीही देणगी लाभली होती. त्यांच्या दरबारात नेहमी संगीताच्या मैफली रंगत.

माणिकप्रभूंच्या नंतर त्यांच्या गादीवर त्यांचे बंधू आरूढ झाले. या गादीवर येणाऱ्या पुढच्या प्रत्येक सत्पुरुषाला माणिकप्रभू अशीच उपाधी लागते. श्रीमनोहर माणिकप्रभू व श्रीमार्तंड माणिकप्रभू हे दोन सत्पुरुष अलिकडच्या काळात विशेष प्रसिद्धी पावले. हे दोघेही प्रासादिक कवी असून, त्यांची गीतरचना मधुर आहे. [द. सं. इ. ; सु. वि. को. ; अ. च. को.]

माणिक्यवर्तिव्रत

एक काम्य व्रत. विशेषत: हे बायका करतात. यात माणकासारख्या लाख वाती करून त्यांनी देवाला ओवाळायचे असते. बाकीचा सर्व विधी लक्ष्यवर्तिव्रताप्रमाणे असतो. पाहा– लक्षवर्तिव्रत.

माणेकथरी

गुजरात प्रदेशात आश्विन पौर्णिमेला माणेकथरी पुनम असे म्हणतात. इथल्या लोकांची अशी समजूत आहे की, या रात्री जर पावसाचा एक थेंब शिंपल्यामध्ये पडला, तर त्याचे मोती बनते. म्हणूनच या पौर्णिमेला हे नाव मिळाले आहे. या पौर्णिमेला चंद्र अत्यंत शीतल व उत्साहदायक असतो. म्हणून हे लोक त्या रात्री चांदण्यात भोजन करतात. चंद्राला नव्या भाताचा नैवेद्य दाखवून मग तो भक्षण करतात; तसेच खेळ, गरब नृत्य, संगीत, इ. कार्यक्रम करतात. पाहा – कोजागरी पौर्णिमा. [सुरत गॅझे.; भडोच गॅझे]

माणेकस्तंभ

विवाहातील एक लौकिक विधी. हा विधी गुजरातमधील कुणबी, भाटिया, वाघेर, इ. जातींचे लोक करतात. त्यासाठी मुहूर्त पाहून अनुकूल दिशेला अथवा घरातून बाहेर पडल्यावर उजव्या बाजूला एक खड्डा खणून त्यात शमीच्या लाकडाचा एक खांब बांबूसहित उभा करतात. खांबाला आंब्याची किंवा पिंपळाची पाने बांधतात. हा खांब रोवण्यापूर्वी मुलीचा बाप या खड्ड्याची यथाविधि पूजा करतो. मग पाच सगोत्र पुरुष, नवरी मुलगी आणि तिचा पिता हे सर्वजण मिळून हा खांब उभा करतात. माती लोटण्यापूर्वी एका लहानशा सुपात दूध, दही, मध, जल, गंधाक्षता, फुले, इ. द्रव्ये घालून ते खड्ड्यात ठेवतात. मग पुरोहित या स्तंभाची पूजा करतो. सुवासिनी त्याला गंधाक्षता लावतात. स्तंभारोपण चालू असताना मंडपातील स्त्रिया मंगलगीते गातात.

माणेकस्तंभ तयार करण्याचा मान सुताराचा असतो. त्यासाठी सुताराला सव्वाशेर गहू व पावशेर गूळ इतका शिधा आणि काही दक्षिणा देतात. स्तंभारोपणाच्या दिवसापासून लग्नकार्याला प्रारंभ झाला, असे मानतात. [ल. वि. सो.]

मातंग

जैन दैवतसमूहातला एक यक्ष. हा सुपार्श्वनाथाचा सेवक आहे. याचे वर्णन पुढीलप्रमाणे–

हा नीलवर्ण, हत्तीवर आरूढ व चतुर्भुज आहे. त्याच्या उजव्या दोन हातांत बेलफळ आणि पाश असून, डाव्या दोन हातांत नकुल व अंकुश आहे. दिगंबरमते हा सिंहारूढ असून त्याच्या हातांत दंड, शूल, स्वस्तिक व ध्वज आहे. याच्या स्वतंत्र मूर्ती आढळत नाहीत. [जै. इ.]

मातंगपरमेश्वरतंत्र

शैव संप्रदायाचे तत्त्वज्ञान विवरून सांगणारा एक ग्रंथ. सदाशिवाने हे तंत्र एक कोटी श्लोकांत सांगितले होते. नंतर अनंताने त्याची मर्यादा एक लक्ष श्लोकांपर्यंत आणली. पुढे ३५०० श्लोकांपर्यंत याचा संक्षेप झाला. यात सहा पदार्थ आणि सात सहजमल यांचे विवेचन आहे. पदार्थांची नावे अशी –(१) पती, (२) शक्ती, (३) त्रिपर्वा, (४) पशू, (५) बोध व (६) मंत्र. सहजमल पुढीलप्रमाणे आहेत –(१) मोह, (२) मद, (३) राग, (४) विषाद, (५) शोष, (६) वैचित्त व (७) हर्ष.

या तंत्रातील तत्त्वज्ञानाचे स्थूल स्वरूप असे–मायेपासून कला निर्माण झाल्या. कलेमुळे जीव जगातील गोष्टींकडे आकृष्ट होतात. नंतर वासनांनी हे संबंध अधिक दृढ होतात. याला राग असे म्हणतात. रागामुळे दुःख निर्माण होते. म्हणून विषयासक्त न होणे हे सुखाचे साधन होय. [हिं. इं. फि. ५]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मातंगी एक तांत्रिक व क्षुद्र देवता. हिचे रूपध्यान असे – श्याम वर्ण, मस्तकी चंद्र, त्रिनेत्र, रत्नसिंहासनस्थ आणि चतुर्भुजांत दंड, कृपाण पाश व अंकुश धारण करणारी. मंत्रमहार्णवात हिचे एक सौम्य रूपही वर्णिले आहे. तिथे ती महाविद्या या स्वरूपात आढळत असून, तिचे सरस्वतीशी बरेच साम्य आहे. हिची उपासना वाक्‌सिद्धीसाठी केली जाते. हिच्या उत्पत्तीविषयीच्या काही कथा अशा –

(१) जमदग्नीची भार्या रेणुका हिच्या हातून एके दिवशी काही प्रमाद घडला, म्हणून जमदग्नी तिच्यावर रागावला. त्याने आपला मुलगा परशुराम याला तिचे शिर तोडायला सांगितले. त्याच्या एका बाणाने रेणुकेचे शिर तर तुटलेच; शिवाय तिच्या मागे तिची मादिग जातीची दासी होती, तिचेही शिर तुटले.

पुढे जमदग्नीचा क्रोध शमला. त्याने रेणुकेला पुनश्च जीवदान देण्याचे मान्य केले. मग परशुराम त्या उद्योगाला लागला. रात्रीच्या अंधारात तो धडाला शिर चिकटवीत असता त्याच्या हातून एक चूक झाली. त्याने रेणुकेचे मस्तक दासीच्या धडावर आणि दासीचे मस्तक रेणुकेच्या धडावर चिकटविले. त्या दोघीही जिवंत झाल्या. सकाळी ती चूक परशुरामाला व जमदग्नीलाही कळली; पण आज्ञाधारक पुत्राकडे पाहून जमदग्नीने क्रोध न करता रेणुकेचे शिर ज्या धडावर चिकटविले होते, तिला आपली पत्नी म्हणून स्वीकारले. ती मादिग दासी पुढे मातंगी या नावाने प्रसिद्ध झाली. मातंगीच्या आकारात ब्राह्मणी रेणुकेचे धड असल्यामुळे ब्राह्मणही पुढे या मातंगीला भजू लागले. तंत्रविद्येतली तर ती एक देवताच ठरली.

(२) वरील कथेचा दुसरा पर्याय प्रचलित आहे, तो असा– परशुरामाने रेणुकेचे शिर तोडल्यावर ते अंतराळात उडून गेले. परशुराम त्या शिराच्या शोधासाठी निघाला; पण ते त्याला सापडले नाही. शेवटी त्याने एका मांगिणीचे शिर तोडून ते रेणुकेच्या धडाला जोडले व तिला सजीव केले. त्या दिवसापासून रेणुका ही मातंगी बनली. हिचे कान पंख्यासारखे, दात फाळासारखे व तोंड उघडे असते. ती गाढवावर बसते. तिच्या एका हाती केरसुणी व दुसऱ्या हाती पाण्याचा खुजा असतो. शीतलादेवीच्या स्थानाजवळ बहुधा हिचेही स्थान असते.

(३) मातंगी ही दुर्गेचेच एक रूप आहे. प्राचीन काळी मतंग ऋषी सर्व जीवांना वश करण्याची सिद्धी प्राप्त व्हावी, म्हणून तप करीत होता. हजारो वर्षे त्याचे तप चालले होते. एके दिवशी त्रिपुरसुंदरीच्या नेत्रातून एक तेजोगोल बाहेर पडला आणि त्यातून श्यामवर्णाची एक देवी निर्माण झाली. मतंग ऋषीकरता प्रकटली म्हणून ती मातंगी या नावाने प्रसिद्ध झाली.

धन्वंतरीतंत्रशिक्षेत मातंगीचा मंत्र दिला आहे, तो असा– 'ॐ ह्रीं क्लीं हूं मातङ्ग्यै फट् स्वाहा' मातंगीच्या उपासनेसाठी एक यंत्रही सांगितले आहे, ते असे– एक षट्‌कोन काढावा, त्याबाहेर अष्टदल पद्म काढावे आणि षट्‌कोनात वर दिलेला मातंगीचा मंत्र लिहावा.

माहूरगडावर रेणुकेच्या देवस्थानात मातंगीचेही स्थान आहे. गुजरातेत मोढेरा येथेही मातंगी आहे.

मातंगी ही मांग व मादिग जातींची कुलदेवता आहे. मादिग हे स्वतःला 'मातंगी मक्कळू' (मातंगीचे पुत्र) असे म्हणवतात. मादिग स्त्रिया तिला शक्तिदेवी मानून तिची उपासना करतात. यल्लमाच्या जशा जोगतिणी किंवा खंडोबाच्या जशा मुरळ्या तशा मातंगीच्या उपासिका म्हणून काही मुली सोडल्या जातात. त्या जन्मभर कुमारिका राहून मातंगीची सेवा करतात. अशी कुमारिका प्रथम एका वृक्षाशी लग्न लावून मग मातंगीच्या देवळात वास्तव्य करते. तिला वेश्यावृत्तीने जगण्यास परवानगी असते. मातंगी बनविण्यासाठी जेव्हा एखाद्या मुलीची निवड होते, तेव्हा तिला अनेक दिव्ये करावी लागतात. प्रथम एक वारूळ खणून त्यात तिला बसवितात. एक टोपली तिच्या डोक्यावर उलटी ठेवतात. मग त्या जातीतला कथेकरी तिला मातंगीच्या पराक्रमाच्या कथा सांगतो. एवढे झाल्यावर ती स्त्री मातंगीची उपासिका बनते. मग मातंगीचे भक्त तिला मानतात. जत्रेच्या वेळी तिच्या अंगात देवीचा संचार होतो.

मातमंगर लग्नापूर्वीचा एक लोकाचार. उत्तर प्रदेश, बघेलखंड, इ. प्रदेशांतील मागासलेल्या जातींत हा विधी करतात. मातमंगर हा शब्द मृत्तिकामंगल यापासून बनला आहे. उत्तर प्रदेशात हा विधी पुढीलप्रमाणे होतो. काही स्त्रिया मिरवणुकीने गावाबाहेरच्या वारुळाकडे जातात. त्या वेळी चांभार ढोल वाजवतो. बैगा जातीतला एक माणूस वारुळाची माती खणून त्यातील पाच ढेकळे एका कुमारिकेच्या खणात टाकतो. नंतर सर्वजण गाणी म्हणत घरी परततात. वारुळाची माती लग्नघरी आणून ती चुलीच्या मातीत मिसळतात.

बघेलखंडात हाच कार्यक्रम थोड्या निराळ्या प्रकाराने करतात. अनेक स्त्रिया शेजारच्या शेतात जाऊन जमीन खणून माती आणतात. जाताना त्या गाणी म्हणत जातात. नववधूही त्यांच्या बरोबर असते. शेतात पोचल्यावर त्या आळीपाळीने माती खणतात. एक स्त्री खणत असताना इतर स्त्रिया अश्लील गाणी गात उभ्या राहतात. घरी परतल्यावर त्यांना गूळ व तेल देतात. [फो. लो. नॉ. इं.; श्री. राजीवलोचन अग्निहोत्री, विंध्यभूमी, ऑगस्ट १९५५]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मातरिश्वन काण्व एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या आठव्या मंडलातील चौपन्नावे सूक्त याने रचले आहे. हे वालखिल्य सूक्त आहे. पुराणवाङमयात उल्लेखिलेल्या वालखिल्य ऋषिसमुदायाशी याचा संबंध नाही. ऋग्वेदाच्या खिल सूक्तांमध्ये या सूक्ताचा समावेश करतात. यात प्रकण्व, कृश आणि संवर्त या ऋषींचा आणि पौर राजाचा इंद्रकृपापात्र म्हणून उल्लेख आढळतो.

इंद्र व विश्वेदेव यांची स्तुती हा या सूक्ताचा विषय आहे. त्यातील एक ऋचा (ऋ. ८.५४.५) अशी –

यदिन्द्र राधो अस्ति ते माघोनं मघवत्तम ।
तेन नो बोधि सधमाद्यो वृधे भगो दानाय वृत्रहन् ।।

अर्थ – हे धनवान आणि वृत्राचा नाश करणाऱ्या इंद्रा, संपत्तिदानाने आम्हांस आनंदित करून तू आमचा भाग्योदय घडवून आण. [ऋ. म. भा.]

माता जन्म देणारी स्त्री. जी जन्म देत नाही, पण मुलाला आपल्या दुधावर पोसते, तिला उपमाता असे म्हणतात. निर्माणवाचक मा धातूवरून माता शब्द बनला आहे (श. क.). माता अपत्याला नवमास आपल्या पोटात वागवते. जन्म देताना वेदना सोसते. आपल्या शरीरातील दुधावर मुलाला वाढवते. मूल पाच वर्षांचे होईतोपर्यंत मातेचा आणि त्याचा निकटचा संबंध असतो. मुलाच्या शैशवकालात ती मुलाच्या अनेक खस्ता खाते. किंबहुना ती त्याच्याच प्राणांनी जगते. ती आपल्याला देह तर देतेच, शिवाय भावना व संस्कारही देते. आईच्या बऱ्या-वाईट स्वभावाचा परिणाम मुलावरही होतो. ती जसे बनवील तसे मूल बनते. म्हणून मातेला पहिला आणि सर्वश्रेष्ठ गुरू मानले आहे.

ऋग्वेदात अनेक स्थली मातेचे वर्णन आहे. तिला सर्वांहून अधिक घनिष्ठ व प्रिय मानले आहे (ऋ.१.२४. १;७.१०१.३). अथर्ववेदात 'माता भवतु सम्मना:' पुत्राने मातेला अनुकूल असा मनोभाव धारण करून राहावे असे सांगितले आहे (अथर्व. ३०. ३. २). प्राचीन काळी अध्ययन समाप्त झाल्यावर शिष्याला निरोप देताना आचार्य जो उपदेश करीत असे, त्यात 'मातृदेवो भव' मातेची देवाप्रमाणे पूजा कर, असे सांगत असे (तै. उ. शिक्षाध्याय).

धर्मसूत्रांमध्ये पुत्राची मातेविषयीची कर्तव्ये विस्तारपूर्वक वर्णिली आहेत. गुरू म्हणून मातेचे महत्त्व सांगताना वसिष्ठाने पुढील श्लोक (वसिष्ठ ध. सू. १३.४८) लिहिला आहे –

उपाध्यायाद्दशाचार्य: आचार्याणां शतं पिता ।
पितुर्दशशतं माता गौरवेणातिरिच्यते ।।

अर्थ – दहा उपाध्यायांपेक्षा एक आचार्य, शंभर आचार्यां[पेक्षा] एक पिता आणि एक सहस्र पित्यांपेक्षा एक माता ही (गौरवा[मुळे]) म्हणून) अधिक श्रेष्ठ आहे.

मुलाच्या बाबतीत मातेचे एवढे महत्त्व असल्यामुळे ध[र्म]सूत्रांनी मातेची सेवा-शुश्रूषा आणि तिचे भरणपोषण हे पु[त्राचे] आवश्यक कर्तव्य म्हणून सांगितले आहे. माता पतित झा[ली] किंवा व्यभिचारादी दोषांनी कलंकित झाली, तरी मुलाने [हे] कर्तव्य चुकत नाही. आपस्तंब म्हणतो–

माता पुत्रत्वस्य भूयांसि कर्माण्यारभते । तस्यां शुश्रूषा नित्या पतितायामपि ।। (आप. ध. सू. १.१०.२८.९)

अर्थ– माता ही पुत्राविषयीची अधिकांत अधिक कार्ये क[रते] म्हणून तिची सेवा-शुश्रूषा नित्य झाली पाहिजे. ती प[तित] झाली तरी तिच्या सेवा-शुश्रूषेत कसूर होता कामा नये.

वसिष्ठाचे तर असे मत आहे, की 'माता तु पुत्रे न प[तति]' (मुलाच्या बाबतीत आई कधी पतित होऊच शकत नाही.)

गौतम ऋषीचा चिरकारी नावाचा पुत्र होता. एके दि[वशी] गौतमाचा वेष धारण करून आलेल्या इंद्राने चिरकारी[ला] आपल्या मातेचा वध करण्यास सांगितले. त्या वेळी चिरकारी[ने] मातृमाहात्म्याचे सुंदर चित्र इंद्रापुढे उभे केले. तो म्हणतो–

नास्ति मातृसमा छाया नास्ति मातृसमा गति: ।
नास्ति मातृसमं त्राणं नास्ति मातृसमा प्रिया ।।

(म. भा. शांति. २६६.[...])

अर्थ – मातेसारखी छाया नाही, मातेसारखे आश्रय[स्थान] नाही, मातेसारखे रक्षण नाही आणि मातेसारखी [प्रिय] वस्तू नाही.

यापुढे चिरकारी म्हणतो – ती संतानाला जन्म देते म्हणून जननी. त्याच्या अंगप्रत्यंगांना पुष्टी देते म्हणून अंबा [...] वीरसंतती उत्पन्न करते, म्हणून वीरसू म्हटली जाते. माता [...] सर्व पीडितांचे सुख आहे. ती असते म्हणून लोक सनाथ [असतात] आणि ती गेल्याने अनाथ होतात.

माता व पिता यांपैकी कोणाची आज्ञा निर्णायक, या [...] धात परशुरामाने व रामाने पित्राज्ञा श्रेष्ठ मानली; पण [...] लिखित स्मृतीने मातापित्यांत विरोध आला असता, [...] मातृपक्षाचे समर्थन करावे, असे सांगितले आहे.

महाभारतात अनेक पुत्रांनी आपल्या मातेविषयी प्रगाढ [...] दर दाखविल्याच्या आणि त्यांचे दुःख दूर केल्याच्या कथा [...] गरुडाची माता विनता आपल्या सवतीच्या गुलामगिरीत [...] असता, तिला त्या दास्यातून मुक्त करण्यासाठी [...] कष्ट सोसले व स्वर्गातून अमृतही पृथ्वीवर आणले (म. [भा.] आदि. २६.३४). पांडवांनी आपल्या मातेचे सदैव प्रिय [...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीकृष्णाने देवकी आणि यशोदा या दोन्ही मातांवर अपार प्रेम केले. अलिकडच्या इतिहासात शिवाजीमहाराज हे परम मातृभक्त झाले. त्यांची माता जिजाबाई हिने त्यांना शरीरानेच नव्हे; तर बुद्धी, भावना व संस्कार यांनीही घडविले होते. ते थोर उपकार शिवाजीमहाराज यावज्जन्म विसरले नाहीत. हिंदवी स्वराज्याचे छत्रपती होऊनही ते मातृनिधनाने जणू अनाथ झाले.

पुराणे व तंत्रग्रंथ यांत देवीला माता मानून तिची अनेक नावांनी पूजा आणि प्रशंसा केली आहे.

प्राचीन शास्त्रकारांनी स्त्रीची अनेक प्रकारे निंदा केली आहे; पण त्यावरोबरच तिच्या पवित्रतम मातृरूपाची मात्र ऊर भरून प्रशंसा केली आहे. 'द्वारं किमेकं नरकस्य नारी' = स्त्री हे नरकाचे एकमेव द्वार आहे असे लिहिणारे शंकराचार्य आपल्या मातेच्या मृत्युसमयी तिच्या सेवेला उपस्थित झाले आणि तिचा मृत्यू झाल्यावर संन्याशाला निषिद्ध असूनही त्यांनी आपल्या मातेचा अंत्यसंस्कार स्वहस्ते केला.

मातेचा महिमा लक्षात घेऊन कवींनी जन्मभूमीलाही मातृभूमी म्हणून गौरविले आहे. कन्या व पुत्र यांची मातृविषयक जी कर्तव्ये तीच मातृभूमीविषयीही आहेत, अशी कवींची, पुराणकारांची आणि देशभक्तांची धारणा आहे. कवींच्या दृष्टीने आई या शब्दात सर्व विश्व साठले आहे. पाहा – पिता; पुत्र. [हिं. प. मी.; म. भा. ना.; घ. शा. वि.]

मातामहश्राद्ध मातापिता जिवंत असताना, मातेच्या पित्यासाठी म्हणजे मातामहासाठी जे श्राद्ध करतात, त्याला मातामहश्राद्ध असे नाव आहे. याला दौहित्रश्राद्ध असेही म्हणतात. आश्विन शु. प्रतिपदा ही त्या श्राद्धाची तिथी आहे. या श्राद्धात पिंडदान करावे किंवा करू नये, अशी दोन्ही मते आहेत. श्राद्धाचा विधी इतर श्राद्धांप्रमाणेच आहे. मामा हयात असला तरी दौहित्राने (मुलीच्या मुलाने) हे श्राद्ध करायचे असते. अधिक मासात हे श्राद्ध करू नये, असे धर्मशास्त्रकार सांगतात. [ऋ. ब्र. स.; व्रतराज; नि. सि.]

मातामाय विदर्भातील एक लोकदेवता. हिला मरीमाय किंवा माराई असेही म्हणतात. एका लोककाव्यात हिचे चरित्र आढळते, ते असे –

हिचा जन्म पिंपळाच्या फांदीवर झाला. त्यामुळे सर्व देव आनंदित झाले. त्या वृक्षाच्या आश्रयाने राहणारे दैत्य मात्र दुःखी झाले. मातामायेच्या जन्मामुळे लोकांची संपत्ती उभारून आली, रोगराई नष्ट झाली, अशी तिची कीर्ती सर्वत्र पसरली. काही दिवस गेल्यावर बाऱ्या विभूताशी तिचे लग्न ठरले. इंद्र हा मातामायचा मामा. तो गंध-अक्षतांची वाटी घेऊन लग्नप्रसंगी उभा राहिला. पण त्याच्या मनात कपट होते. त्याने रानात जाऊन एक काळाडोम नाग पाठविला. त्या नागाने बाऱ्याला दंश केला. बाऱ्या मरून गेला. मातामायच्या नशीबी बाळपणीच वैधव्य आले. याचा सूड घेण्यासाठी मातामाय इंद्राच्या घरी निघाली. तेव्हा तिची मामी तिला शरण आली आणि तिने पदर पसरून पतीला अभयदान मागितले. 'आम्ही तुझी अखंड पूजा करू' असे तिने तिला वचनही दिले. मातामाय द्रवली. तिने इंद्राला जीवदान दिले. मग इंद्रादी सर्व देव तिची सेवा करू लागले. ती सेवेला पावू लागली. विदर्भातील ग्रामीण जनता तिचे गीत गाताना म्हणते –

माता माही माय, चांदयाचा हाटा गेली कुंकवाचा पट्टा लेली ।।
माता माहे मायेचं, निंबाखाली ठाण गंगेचं पाणी आणं ।।

आजही या मातामायेची सर्वत्र पूजा होताना दिसते. [सर्वोदय, मे १९६१, लोकसाहित्य अंक]

मातीची भांडी प्राचीन संस्कृतीचे संशोधन करण्यासाठी निरनिराळ्या जागी जे उत्खनन करण्यात आले आहे, त्यात भिन्न भिन्न स्थानी विविध प्रकारच्या मातीच्या भांड्यांचे तुकडे सापडले आहेत. जमिनीच्या निरनिराळ्या थरांत वेगवेगळ्या कालखंडांतील संस्कृतीचे जे अवशेष आढळतात, त्यांतल्या मातीच्या भांड्यांवरून त्या त्या जागी गडप झालेल्या मानवी संस्कृतीचे वेगळे स्वरूप कल्पनेने जाणता येते. धातूच्या वस्तू जमिनीत दीर्घ काल राहिल्या, तर त्या गंजतात किंवा रासायनिक प्रक्रियेमुळे नष्ट होतात. लाकडी वस्तूही कुजून जातात. मातीची भांडी मात्र फुटली तरी खराब न होता खापरांच्या रूपात राहू शकतात. त्यांच्या तुकड्यांवर विविध प्रकारची झिलई असते, रंग असतात व चित्रे काढलेली असतात. त्यांवरून माती मळण्याची पद्धत, भांड्यांची घडण, माती भाजण्याची रीत, भांड्यांचे आकार, रंगकाम, चित्रकला यांत उत्तरोत्तर विकास झालेला दिसून येतो. ही भांडी सामान्य लोकांच्या रोजच्या उपयोगातली असल्यामुळे प्राचीन मानवाच्या जीवनाचा इतिहासही त्या भांड्यांत लपलेला आढळतो. म्हणूनच सांप्रत इतिहाससंशोधक या भांड्यांच्या तुकड्यांचे सूक्ष्म अवलोकन व अध्ययन करून प्राचीन संस्कृतीसंबंधी पुष्कळ ज्ञान मिळवू शकतात.

प्रारंभी मनुष्य हातांनी मातीची भांडी घडवीत असे. ती भांडी अगदी साधी, गोल आकाराची व रुंद तोंडाची असत. ती उन्हात सुकवून लगेच वापरायला घेतली जात. अशी भांडी ब्रह्मगिरी, क्वेट्टा, राणा, घुंडई, इ. ठिकाणी मिळाली आहेत. ब्रह्मगिरी-(कोल्हापूर) येथील भांड्यांवर भुरकट वैंगणी रंगाच्या रेघा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काढलेल्या आढळतात. गुजरातमध्ये हरिपूर व लांघणज येथे मिळालेली भांडी भुरकट पिवळ्या रंगाची, हाताने घडवलेली व उन्हात सुकवलेली आहेत.

कालांतराने मातीची भांडी भाजण्याची पद्धत सुरू झाली. त्यामुळे ती पक्की होतात, हे त्या लोकांना कळले. त्यानंतर नवाश्मयुगात चाकावर मातीची भांडी बनवण्याची कला मनुष्याला

सिंधुसंस्कृतीतली भांडी – हडप्पा, मोहेंजोदडो, रंगपूर, लोथल वगैरे ठिकाणी बरीच मातीची भांडी चांगल्या स्थितीत मिळाली आहेत. त्यांतली काही हातांनी बनवलेली असली, तरी बरीच भांडी चाकावर बनवलेली आहेत. काही भांडी राखी रंगाची तर काही गुलाबी रंगाची आहेत. ती गोलाकार व सुंदर असून, त्यांवर सुरेख चित्रेही काढलेली दिसतात. अशा प्रकारची भांडी



(१) प्रेत ठेवण्यासाठी रुंद तोंडाचे मडके–जोरवे, (२) साठवणीचा रांजण– जोरवे, (३) पाणी पिण्याचा पेला – नावडातोडी, (४) राखी रंगाचे, तोटीचे भांडे– जोरवे, (५) अन्न शिजवण्याचे भांडे– नावडातोडी,(६) लाल-काळा, अर्धगोलाकार वाडगा– आहड, (७) रंगीत लोटा–नावडातोडी.

साध्य झाली. तो मोठाली साठवणीची भांडी बनवू लागला. नासिक, जोरवे, भोजपूर, बहाळ, लांघणज, नेवासे, इ. ठिकाणी केलेल्या उत्खननात अश्मयुगातील दगडी आयुधांच्या बरोबरच मातीची बरीच खापरे मिळाली आहेत. त्यांतील काही भुरकट पिवळ्या रंगाची आहेत, तर काहींवर काळ्या रंगाची चित्रे काढलेली आहेत.

क्वेट्टा येथेही मिळाली आहेत. ही भांडी बनवताना मातीत चुना, अभ्रक व बारीक वाळू हे पदार्थ मिसळलेले दिसतात. बहुतेक भांडी गोल आहेत.

वरील ठिकाणी मिळालेली मातीची भांडी भाजताना भट्टीचे तपमान नियंत्रित केलेले असावे; त्यामुळे त्यांचा रंग सर्वत्र एकसारखा झाला आहे. अशा भट्ट्यांचे काही नमुने हडप्पा व मोहें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जोदडो येथे सापडले आहेत. त्या भट्टया गोल असून, त्यांत दोन खण आहेत. खालचा खण विटांचा असून, तो विस्तवासाठी आणि वरचा खण मातीचा असून, तो भांडी ठेवण्यासाठी आहे. त्यांच्या मध्ये भोके ठेवलेली आहेत. वरच्या भागातही छिद्रे आहेत. तपमान व हवा नियंत्रित करण्यासाठी त्यांचा उपयोग होतो.

ही भांडी भाजल्यानंतर त्यांवर भिन्न रंगांचा लेप लावलेला दिसतो. बहुतेक भांड्यांवर गेरूत गोंद मिसळून त्याचा लेप लावलेला आहे. काही थोड्यांवर बैंगणी रंगाचा लेप आहे. बहुतेक भांड्यांवर काळी रेखाचित्रे काढलेली आहेत. त्यांत बैल, मासा, बदक, पिंपळ, केळ, इ. चित्रे दिसतात. काही भांड्यांवर निरनिराळ्या आकृत्या आहेत.

आर्यसंस्कृतीतली भांडी – वरील भांड्यांहून जरा वेगळ्या प्रकारची भांडी रूपड, बागपत, तिलपत, अहिच्छत्रा, उज्जैन, इ. जागी सापडली आहेत. सिंधुसंस्कृतीच्या भांड्यांचा नाजुकपणा या भांड्यांत नाही. मात्र त्यांची माती भरपूर कुटलेली असून, ती भांडी पूर्णपणे भाजलेली वाटतात. ही भांडी राखी रंगाची असून, त्यांवर काळी चित्रे आहेत. अशी भांडी सिंधुसंस्कृतीच्या वरच्या थरांतही सापडली आहेत. ही भांडी आर्य लोकांची असावी, असे अनुमान केले जाते. लोथल, दरौली, महेश्वर,



गोल डेरा–जोरवे

उन्दल, विरोली, आहाड, इ. ठिकाणी बाहेरून लाल व आतून काळी अशी खापरे मिळाली आहेत, ती चित्रित, राखी रंगाच्या खापरांच्याच काळातली असावी. ही खापरे ताम्रयुगीन संस्कृतीतली आहेत.

काळ्या झिलईची खापरे – तक्षशिला, कौशांबी, हस्तिनापूर, राजघाट, इ. जागी अशी काळी चमकदार भांडी उत्खननात सापडली आहेत. ओडिसातील शिशुपालगढ, महाराष्ट्रात पैठण व नासिक या ठिकाणीही अशी खापरे मिळाली आहेत. स. पू. ५०० ते स. पू. २०० या काळात ती भांडी चालू होती. ती भांडी गोलाकार व सुंदर होती. ती तयार करण्यासाठी माती खूप बारीक व मऊ करून घेतली जात असे. वेगाने फिरणाऱ्या चाकावर भांडी घडवली जात. थोडीशी सुकल्यावर त्यांचा पृष्ठभाग हातांनी चोळून गुळगुळीत करीत. भांडी उन्हात पूर्ण सुकल्यावर त्यांना रंगीत लेप लावीत. माती, लोखंडाचा गंज, ॲल्युमिनिया, चुना, मॅग्निशिया ही द्रव्ये त्यात वापरली जात, अशी कल्पना आहे. भट्टीत धूर कोंडून भांड्यांना काळा रंग आणीत. पण त्यांवर विलक्षण चमक कशामुळे आली, ते मात्र समजत नाही. या खापरांत पाणी मुळीच शिरत नाही.

विदेशी घडणीची भांडी – यवन, कुशाण, इ. परकीय लोकांनी भारतात विदेशी भांडी आणली व तशी भांडी इथेही बनवून घेतली. तशा प्रकारची भांडी भारतात कित्येक ठिकाणी उत्खननात मिळाली आहेत. स. पू. १ ले शतक ते इ. स. चे ४ थे शतक हा त्यांचा काल मानला जातो. लाल चमकदार भांडी ग्रीसमधली असावी. त्यांवर निरनिराळ्या रंगांनी चित्रे व नक्षी काढलेली दिसते. कुशाणकालीन भांडी लाल असून, त्यांवर काळ्या रंगाची चित्रे आहेत. त्यांचे आकार सुंदर आहेत. त्यांवर शंख, स्वस्तिक, कमल, हंस, इ. आकृतींचे छाप उठवलेले दिसतात. अशी भांडी अहिच्छत्रा, हस्तिनापूर, मथुरा, दिल्ली, कौशांबी, सिरकप, इ. ठिकाणी सापडली आहेत. पाटलिपुत्र व उज्जैन येथेही अशी भांडी मिळाली आहेत. ही सर्व भांडी विदेशी छापाची आहेत. त्यांत मौर्यकाळातील काळ्या झिलईच्या भांड्यांतली कारागिरी आढळत नाही. त्यांची माती नीट मळलेली नाही व दोष झाकण्यासाठी त्यांवर जाड लेप दिलेला आहे. ही भांडी उघड्या भट्टीत भाजलेली दिसतात.

गुप्तकालीन भांडी – अहिच्छत्रा येथे या कालातली बरीच खापरे मिळाली आहेत. त्यांच्या अभ्यासावरून असे दिसून येते, की गुप्तयुगात प्रारंभी कुशाणकालीन भांड्यांसारखीच भांडी बनवली जात होती. त्यांवर लाल रंगाचा लेप असून, वर तोरण, त्रिरत्न, कमल, शंख, हंस, त्रिशूळ, मासा, चक्र, इ. आकृतींचे छाप उठवलेले आहेत. काही भांड्यांवर लाल रंगावर काळी चित्रे आहेत; तर काहींवर चमकदार लेप आहे. ही भांडी वरच्या थरांत मिळाली असल्यामुळे ती नंतरच्या काळातली,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कुशाणकालीन भांड्यांहून निराळी असावी. कौशांबी, सहेत-महेत, सारनाथ, राजगीर, बानगढ, बीकानेर, इ. ठिकाणी जी गुप्तकालीन खापरे मिळाली आहेत, त्यांवरून असे ध्यानात येते, की भारतीय कारागिरांनी विदेशी छापाच्या भांड्यांना भारतीय रंगरूप देण्याचा प्रयत्न केला आहे.

द. भारतात ब्रह्मगिरी, म्हैसूर, मस्की, इ. ठिकाणी झालेल्या उत्खननात जी मातीची भांडी सापडली आहेत, ती स. पू. १००० च्या सुमाराची असावी, असे अनुमान केले जाते. ती राखी रंगाची आहेत. त्यांची घडण सुबक नाही व पृष्ठभाग खडबडीत आहे. त्यांच्या मातीत लहान लहान दमड व अभ्रकाचे तुकडे आढळतात. बहुतेक भांडी चाकावर बनवलेली आहेत. मस्की येथील काही भांडी राखी रंगाची आहेत, तर काहींवर भुरकट गुलाबी रंगाचा लेप आहे.

त्यानंतरच्या कालखंडातील मातीची भांडी द. भारतात अनेक ठिकाणी मिळाली आहेत. ती बाहेरून लाल व आतून काळ्या रंगाची आहेत. भाजताना ती उपडी घालून ठेवल्या-मुळे असे झाले असावे. त्यांची घडण साधीच आहे. नेवासे येथे अशीच लाल-काळी भांडी मिळाली आहेत. त्यांच्या बरोबर उत्तर भारतीय काळ्या झिलईची खापरे व सातवाहन राजांचे शिक्के सापडल्यामुळे ती भांडी मौर्य-सातवाहन कालातली मानता येतात. त्यांचे आकार भारतीय पद्धतीचे असून, ती उत्तम मातीची व पातळ घडणीची आहेत.

त्या कालखंडातील भांड्यांत काही ठिकाणी हत्तीच्या आकाराच्या शवपेटिका व मोठाले रांजण मिळाले आहेत. अरिकामेडू येथे राखी रंगाची भांडी मिळाली आहेत, तशीच लाल-काळी भांडी देखील आहेत.

द. भारतात रोमन बनावटीची भांडी अनेक ठिकाणी मिळाली आहेत. त्यांचा काळ स. पू. १ ले शतक व इ. स. चे १ ले शतक असा ठरविण्यात आला आहे. ती राखी व लाल रंगाची असून, त्यांवर चमक आहे, खास रोमन भांडी सुबक व उत्तम मातीची आहेत. त्या प्रकारची देशी भांडी मात्र साधी असून, एकावर कमळाची आकृती आढळते. त्यानंतरच्या काळातली इ. स. च्या ५ व्या शतकापर्यंतची भांडी द. भारतात अनेक ठिकाणी सापडतात. ही भांडी उ. भारतातील मातीच्या भांड्यांइतकी सुरेख नाहीत.

याव्यतिरिक्त भारतात कित्येक ठिकाणी उत्खनन करण्यात आले आहे. त्यातून जमिनीच्या निरनिराळ्या चार-पाच थरांत भिन्न भिन्न कालखंडांतील वस्तू सापडल्या आहेत. त्यांतील मातीच्या विविधरंगी खापरांचा अभ्यास करून पुराणवस्तु-शास्त्रज्ञांनी प्राचीन इतिहासाचे धागेदोरे जमविण्याचा प्रयत्न चालू ठेवला आहे; त्यात त्यांना बरेच यशही मिळत आहे.

प्राचीन काळातली जी मातीची भांडी सापडली आहेत, ती विविध आकारांची आहेत. काही भांडी नारळासारखी तर काही फणसासारखी दिसतात. काही भांड्यांच्या तोट्या माश्याच्या किंवा हत्ती, मगर, इ. प्राण्यांच्या मुखासारख्या आहेत. काही भांड्यांना पशूंचा आकार दिलेला असतो. शिशुपालगड येथे कासवासारखा कमंडलू मिळाला आहे. ग्रीक व रोमन पद्धतीची भांडीही पुष्कळ मिळाली आहेत.

भांडी सुंदर दिसावी, म्हणून त्यांना प्रथम रंग देण्याची प्रथा सुरू झाली. मग लेप देऊन चकाकी आणणे, चित्रे काढणे इ. प्रकार सुरू झाले. प्रारंभी नुसत्या रेखाकृती काढलेल्या आढळतात. त्यानंतर कोणी नदीचे चित्र रेखाटले, तर कोणी मासे मारणाऱ्याचे चित्र काढले. पुढे भांड्यांवर चित्र कोरण्याची पद्धत सुरू झाली आणि एकाच प्रकारची नक्षी अनेक भांड्यां-वर काढण्यासाठी त्या नक्षीचे छाप बनवले जाऊ लागले. काही ठिकाणी तर संपूर्ण भांडे बनवण्यासाठी साचे तयार केलेले आढळतात. त्यांत चित्रे, नक्षी, वगैरे सर्व काम एकदम, भांडी बनवतानाच होऊ लागले.

भारतीय कलाकाराला निसर्गप्रमाणे कलाकृती बनवणे आवडते. निसर्गात गोल आकार जास्त प्रमाणात आढळतात. त्यामुळे त्याने बनवलेली भांडी गोलाकार आहेत. उलट परदेशी बनावटीच्या भांड्यांचे आकार कोनयुक्त असतात. भारतीय पद्धतीच्या बहुतेक भांड्यांवर कमल, स्वस्तिक ही शुभसूचक चिन्हे आढळतात. काही भांड्यांवर हंसपंक्ती आहेत, तर काहींवर सूर्यबिंब आहे.

मातीचे घट व कलश यांचा वापर भारतात प्राचीन काळा-पासून अव्याहत चालू असून, त्यांचे वर्णन संस्कृत ग्रंथांत अनेक ठिकाणी आढळते. संक्रांत, अक्षय्यतृतीया, इ. सणांत; लग्न, मुंज इ. धार्मिक विधींत व अंत्यक्रियेसाठी मडकी लागतात. अशा प्रसंगी वापरलेली मडकी लगेच फोडून टाकली जातात. त्यामुळे ती साधी बनवलेली असतात. त्यांवर चुना व गेरू यांच्या साहाय्याने काही मंगल चिन्हे तेवढी काढलेली असतात; बाकी कलाकुसर नसते.

चिकट लेप चढवून, भाजून झिलई दिलेली भांडी प्राचीन काळी आपल्याकडे तयार केली जात होती. पण बरण्या, कप, बश्या वगैरे नव्या पद्धतीची भांडी या देशात अलिकडेच होऊ लागली आहेत. ती विद्या चीन देशातून इराणात व तिथून आपल्याकडे आली असावी, असे अनुमान आहे. म्हणूनच त्या भांड्यांना चिनी मातीची भांडी असे म्हणतात.

दिल्ली, मुलतान, पेशावर, लाहोर, गुजराणवाला व भावलपूर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही शहरे चिनी भांडयांसाठी फार प्रसिद्ध आहेत. सुरया, थाळया लोटे, इ. भांडी दिल्ली येथे विशेष चांगली होतात. लाहोरची मर्तबान या नावाची मिठाई ठेवण्याची भांडी, हुक्के व प्याले प्रसिद्ध आहेत. लखनौ, रामपूर, बुलंदशहर, बारावंकी, अलीगड, अमरोहा, सहारणपूर, सीतापूर या गावीही सुरया, बदया, रंगीत घट, इ. सुंदर भांडी तयार होतात. राजस्थानातील जयपूर, बासी, लालसोर, गुढा, इ. गावी आणि बीकानेर, अलवार या भागांत तयार होणाऱ्या सुरया खूप लोकप्रिय आहेत. मध्य प्रदे-



१. भावलपूरची मुरई, २. मिश्र पद्धतीचा लोटा व ३. कंगोरे असलेले मातीचे भांडे – जोरवे

शातील बऱ्हाणपूर, इंदूर, छत्रपूर या ठिकाणची भांडीही प्रसिद्ध आहेत. बऱ्हाणपूरची भांडी तांबडया रंगाची असून, त्यांवर पिवळी नक्षी असते. द. भारतातही बऱ्याच ठिकाणी मातीची भांडी तयार केली जातात.

मातीच्या बाहुल्या, देवादिकांच्या मूर्ती, बैल, हत्ती, घोडे वगैरेंची चित्रे वनवण्याची कला सर्वत्र आढळते. पाहा – उत्खनितसंस्कृती. [प्राचीन भारतीय मिट्टी के बर्तन–डॉ. राय गोविंदचंद, १९६०; हिं. दे. का. व.]

मातृका लोकमाता या उपाधीच्या क्षुद्र देवता. यांची संख्या सात, आठ, नऊ, चौदा, सोळा, इ. आहे. सात मातृकांची नावे अशी –

ब्राह्मी माहेश्वरी चैव कौमारी वैष्णवी तथा ।
वाराही च तथेन्द्राणी चामुण्डाः सप्त मातरः ॥

या सातजणींत महालक्ष्मीचा अंतर्भाव केला, की त्याच अष्टमातृका होतात. काही लोक त्यांत महालक्ष्मीच्या ऐवजी योगेश्वरी किंवा चर्चिका यांचा अंतर्भाव करतात.

नऊ मातृकांची नावे अशी – (१) ब्रह्माणी (२) वैष्णवी (३) रौद्री (४) वाराही (५) नारसिंही (६) कौमारी (७) माहेंद्री (८) चामुंडा व (९) चंडिका. चौदा व सोळा मातृकांचे पाठभेदही बरेच आहेत.

मातृका या निरनिराळया देवांच्या शक्ती असल्याचे सांगितले आहे. ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, माहेंद्री आणि चामुंडा या अनुक्रमे ब्रह्मा, शिव, स्कंद, विष्णू, यम, इंद्र व रुद्र यांच्या क्रियाशक्ती होत. त्या आपल्या स्वामींची वाहने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि आयुधे स्वीकारतात. त्यांची मुखेही स्वामींप्रमाणे असतात.

मातृकांची उत्पत्ती – अंधकासुर दैत्य तपःसामर्थ्याने प्रबळ झाला. त्याने त्रैलोक्य जिंकून कैलासावर आक्रमण केले. त्याला कैलास जिंकायचा होता आणि त्याचबरोबर पार्वतीचे अपहरण करायचे होते. पार्वतीवर घाला घालताच शंकर तिच्या रक्षणार्थ धावला. दोघांचे घनघोर युद्ध झाले. त्या युद्धात शंकराच्या बाणांनी अंधकासुर सर्वांगी घायाळ झाला आणि त्याच्या शरीरातून रक्त गळू लागले. त्या रक्ताच्या प्रत्येक थेंबागणिक राक्षस निर्माण झाले. शंकराला एकट्याला त्या सर्वांचा संहार करणे कठीण जाऊ लागल्यामुळे, त्याने आत्मतेजातून १९० मातृकांचा गण उत्पन्न केला. या मातृका अंधकासुराचे रक्त प्राशू लागल्या; पण त्यांचा तो प्रयत्न सफल होईना आणि राक्षसांची उत्पत्ती थांबेना. तेव्हा विष्णू शिवाच्या मदतीला धावून आला· त्याने आपल्या देहातून शुष्क रेवती नावाची एक मातृका उत्पन्न केली. तिने अंधकासुराचे रक्त प्राशन केल्यावर अंधकासुराचा नाश झाला.

मातृकांचे नेमलेले काम संपल्यावर त्या भक्ष्य शोधण्यासाठी इतस्ततः भटकू लागल्या. सगळीकडचे भक्ष्य संपले, तेव्हा त्या शिवाकडे गेल्या. शिव तरी त्यांना कुठून अन्न पुरविणार ? तिथे निराश झाल्यावर त्या त्रैलोक्यभर हिंडून जीवसृष्टीचे भक्षण करू लागल्या. त्यामुळे थोड्याच काळात संपूर्ण पृथ्वी निर्जीव होईल, अशी भीती देवांना उत्पन्न झाली. मग शिवाने नृसिंहरूप धारण करून काही अघोर मातृका नव्याने उत्पन्न केल्या. विष्णूनेही काही मातृका निर्मून त्या अघोर मातृकांच्या दिमतीला दिल्या. मग या नव्या शिव-विष्णुनिर्मित मातृकांनी पूर्वीच्या १९० मातृकांचा नाश केला.

काही फेरफार करून अशाच कथा कूर्म पुराण, अद्‌भुत रामायण, इ. ग्रंथांत आहेत.

मातृका या माणसाच्या दुष्ट प्रवृत्तींच्या प्रतिनिधीही मानल्या गेल्या आहेत. योगेश्वरी, माहेश्वरी, वैष्णवी, ब्राह्मी, कौमारी, ऐंद्री, दंडधारिणी व वाराही या अनुक्रमे काम, क्रोध, मद, मोह, मात्सर्य, पैशुन्य व असूया इत्यादींच्या प्रतिनिधी होत.

वर्णमालेतले सर्व वर्ण यांनाही अक्षरमातृका असे म्हटले आहे. कलकत्ता येथील कालीदेवीच्या गळचात राक्षसांच्या मुंडांची माला दाखवली आहे. ही रुंडमाळा ५२ रुंडांची आहे. ही ५२ रुंडे म्हणजे वर्णमालेतील ५२ अक्षरांची प्रतीके आहेत, असे सर जॉन वुड्राफ म्हणतात.

मातृकांची संख्या फार मोठी असली, तरी पुराणकालात पूजेसाठी सात किंवा आठ मातृका निश्चित केल्या गेल्या, असे दिसते. या सात किंवा आठ मातृकांची नावे मात्र निश्चित झालेली आढळत नाहीत; प्रत्येक पुराणाचा आणि तंत्रग्रंथा[चा] नावाच्या बाबतीतला पाठभेद वेगवेगळा आहे.

सुप्रभेदागमतंत्रात या मातृकांच्या मूर्ती कशा कराव्या, पुढीलप्रमाणे सांगितले आहे – अवस्था बसलेली. द्विभुज. ए[क] हात अभय आणि दुसरा वरद या मुद्रा दाखवणारा. अधि[क] हात असल्यास त्यांमध्ये आयुधे.

कुंभकोणम, वेरूळ, बेलूर, अमरकंटक, ऐहोळ, इ. ठिका[णी] मातृकांच्या मूर्ती असून, त्यांच्या रक्षणासाठी एका बाजू[ला] वीरभद्र व दुसऱ्या बाजूला गणपती उभा असतो. नर्मदे[च्या] तीरावर मांधाता पर्वतराजीमध्ये एक मातृकामंदिर आ[हे.] दक्षिणेत तमिळनाडूमध्ये चक्रपल्ली गावी सप्तमातृकांचे मं[दिर] असून, त्याच्या परिसरात सात शिवलिंगे आहेत. बुलढा[णा] जिल्ह्यातल्या तारापूर या गावच्या देवीमंदिरातही सप्तमातृ[]कांच्या मूर्ती आहेत. पुण्याजवळच्या यवत गावी जे [] श्वराचे मंदिर आहे, त्याच्या ओवऱ्यात मातृकांच्या मूर्ती [] विल्या आहेत. गुजरातेतील तिलकवाडा या गावीही एक [] मातृकांचे मंदिर आहे. मध्य प्रदेशातील उदयगिरीच्या [] मध्ये सप्तमातृकांच्या मूर्ती खोदल्या आहेत. कित्येक ठिकाणी सलग मातृकापट्ट आहेत.

सर्वांत सुंदर सप्तमातृकांच्या मूर्ती बेसनगर येथे [] त्यांच्यांवर गुप्तकालीन मूर्तिशैलीचा प्रभाव दिसतो. अंग[] गात सौष्ठव आणि आकर्षक केशरचना यांनी त्या मूर्ती [] नीय वाटतात.

इनामगाव येथील उत्खननात लांब स्तनांच्या, शिर न[] व वृषवाहन (बैलावर बसणाऱ्या) अशा काही स्त्रीमूर्ती [] डल्या आहेत. डॉ. सांकळिया यांच्या मते त्या मातृका[] आहेत. या लंबपयोधर व विशिरा मातृकांचे उल्लेख महा[भार]ताच्या शल्यपर्वात आले आहेत (अ. ४६) लंबस्तनी ही [] पूतना असावी. कारण बालघातिनी मातांच्या यादीत [] नाव असून, तिचे वैशिष्टच लंबस्तन हेच आहे. गोवाहना [] वृषवाहना मूर्तीचे नाव महाभारतात शकुनी असे दिले [] (वन. २३०.३३). या सर्व स्कंदपरिवारातल्या देवता असून, [] बालघातक म्हणून भयप्रद ठरल्या आहेत. श्री. ढेरे म्हणतात [] मातृत्वाचे भक्षक रूप या बालघातिनी मातांच्या [] मानवाचा पूजाविषय झालेले आहे. मुलांच्या अपमृत्यूला [] देवता कारणीभूत होतात, अशी समजूत अत्यंत प्राचीन [] पासून चालत आली आहे. या समजुतीपोटीच या देवतां[च्या] उपासनेचे विधि-विधान विस्तारत गेले. या असंख्य माता[] आणि त्यांच्या पुत्रांच्या उपासनेच्या क्षेत्रातूनच पुढे अनेक [प्रति]ष्ठित देवतांना जन्म मिळाला. या आदिमातांच्या विकास[]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कहाणी भारतीय देवतांचे समृद्ध विश्व उजळून टाकणारी आहे.

इनामगावी उत्खननात उपलब्ध झालेल्या मातृकामूर्तींच्या संबंधात डॉ. सांकळिया यांनी पुरातत्त्वशास्त्राच्या दृष्टीने काही निष्कर्ष सांगितले आहेत, ते असे—

"मानवाने स्त्रीचे स्वरूप व तिचे महत्त्व हे वीस हजार वर्षांपूर्वीच जाणले होते आणि स्त्रियांच्या अशाच स्वरूपाच्या आकृती हस्तिदंत, हाडे, मृदुपाषाण, यांमध्ये कोरलेल्या युरोपमध्ये झालेल्या पुरातत्त्वीय संशोधनात मिळालेल्या आहेत. अशा प्रकारच्या या मूर्तींचा प्रसार युरोपमधून सायप्रस, क्रीट, तुर्कस्तान, इराक, इराण, अफगाणिस्तान आणि नंतर भारत या क्रमाने झालेला दिसून येतो."

मातृकांचा शिवाच्या आराधनेशी संबंध आहे. कमलाधिष्ठित शिवाच्या समोर त्या उभ्या असतात आणि वीरभद्र व विनायक हे त्यांच्या उभय पार्श्वी असतात. मंगल कार्यांच्या वेळी मातृकापूजा करतात. त्या वेळी गणपती, दुर्गा, क्षेत्रपाल व वास्तोष्पती या चार देवता त्यांच्या बरोबर पूजिल्या जातात. प्रत्येक मातृकेचा एखादा प्रिय वृक्ष असतो. बहुधा प्रत्येक खेड्यात पाणवठ्याजवळ किंवा डोंगरकपारीत त्यांची स्थाने असतात. गावोगावी त्यांचा आढळ होतो. सुलभ प्रसूतीसाठीही ही त्यांची पूजा करतात. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल अनेक स्थानिक दंतकथा प्रचलित आहेत. [देवीकोश २; मू. वि.; लो. सं. क्षि.]

मातृकापूजन

विवाहादी मंगल कार्यात पुण्याहवाचनानंतर मातृकापूजन करतात. त्यासाठी एका पाटावर तांदुळाचे पुंजके घालून त्यावर मातृकांचे आवाहन करतात.

गौरी पद्मा शची मेधा सावित्री विजया जया।
देवसेना स्वधा स्वाहा मातरो लोकमातरः।
धृतिः पुष्टिस्तथा तुष्टिरात्मनः कुलदेवता।
ब्राह्मी माहेश्वरी चैव कौमारी वैष्णवी तथा।
वाराही च तथेन्द्राणी चामुण्डाः सप्त मातरः।

या मातृका एकूण तेवीस भरतात. त्यांच्या जोडीला विकल्पाने गणपती, दुर्गा व क्षेत्रपाल यांचेही आवाहन करतात. मग 'मातृकाभ्यो नमः' अशा सामान्य नाममंत्राने त्यांची पूजा करतात व शेवटी 'गौरीमिमाय...' या मंत्राने मंत्रपुष्प वाहून पूजा समाप्त करतात.

उ. भारताच्या डोंगराळ भागात मातृकांची पूजा फार लोकप्रिय आहे. ही पूजा नवसासाठी होत असते. या पूजेसाठी एक लाकडी फळी घेतात व तिच्यावर सोळा मातृकांची चित्रे आणि त्यांच्या उजव्या हाताला गणपती व चंद्रसूर्य काढतात. मग गवताचा एक कुंचा शेणात बुडवून त्याने त्या चित्रांना स्पर्श करतात. काही मंत्र म्हणून लोणी व साखर यांचे तीन किंवा पाच थेंब त्या चित्रांवर शिंपडतात. ज्याच्या बऱ्याभल्यासाठी ही पूजा करायची, त्याच्या कपाळावर व गळ्यावर लोण्यात बुडवलेल्या नाण्याने छाप उठवतात. त्यानिमित्त ब्राह्मणांना दानदक्षिणाही देतात. [पॉ. रि. फो. नॉ. इं.; ऋ. ब्र. स.]

मातृकाव्रत

एक काम्य व्रत. चैत्र शुद्ध नवमीला हे व्रत करतात. यात प्रामुख्याने भैरव आणि चौसष्ट योगिनींची पूजा पांढऱ्या गंधाने व पांढऱ्या फुलांनी करायची असते. फल — संततीचे संरक्षण. [व्र. प.]

मातृगया सिद्धपूर

गुजरातेतील एक तीर्थक्षेत्र. पालनपूर-मेहसाणा मार्गावर सिद्धपूर हे रेल्वे-स्टेशन आहे. तिथून अर्ध्या मैलावर मातृगया हे तीर्थस्थान आहे. इथे भाविक लोक आपल्या आईचे श्राद्ध करतात. इथे एकदा श्राद्ध केल्यावर पुन्हा दरवर्षी आईचे श्राद्ध करावे लागत नाही. इथे हर्षबिंदुसरोवर, अल्पासरोवर आणि ज्ञानवापी अशी तीन कुंडे आहेत. त्यांत ससंकल्प स्नान करून श्राद्ध करायचे असते.

या क्षेत्रासंबंधीची कथा अशी— प्राचीन काळी कर्दम ऋषी आणि त्याची पत्नी देवहूती यांचा आश्रम या भागात होता. कर्दम ऋषीला कन्या होत्या; पण पुत्र नव्हता. म्हणून पुत्रप्राप्तीसाठी त्याने घोर तप केले. तेव्हा भगवान विष्णूने प्रसन्न होऊन त्याला दर्शन दिले आणि वर मागायला सांगितले. तेव्हा कर्दमाने विष्णूसारखा पुत्र मागितला. हे ऐकून विष्णूला फार हर्ष झाला आणि त्याच्या डोळ्यांतून दोन अश्रू ओघळले. ते जिथे पडले, तिथे हर्षबिंदुसरोवर निर्माण झाले. मग भगवान विष्णूने देवहूतीच्या उदरी अवतार घेतला. विष्णूचा हा अवतार म्हणजे कपिल मुनी होय. त्याने ज्ञानवापीजवळ देवहूतीला सांख्यशास्त्र सांगितले आणि तिला मुक्ती दिली. म्हणून हे स्थान मातृगया या नावाने प्रसिद्धीला आले.

मातृहत्येच्या पापातून मुक्त होण्यासाठी परशुरामाने इथल्या दोन्ही कुंडात स्नान केले होते, अशीही कथा आहे.

या क्षेत्रात कपिलमुनी, देवहूती, गयागदाधर भगवान, सोमनाथ महादेव, इ. मंदिरे आहेत. [प. भा. द.; वि. मुं. रा. प.]

मातृचेट

(इ. स. चे १ ले शतक) एक बौद्ध पंडित व कवी. याच्या चरित्राविषयी निश्चित अशी काही माहिती मिळत नाही. तारानाथ या इतिहासकाराने त्याच्या विषयी काही आख्यायिका दिल्या आहेत, त्यांपैकी एक आख्यायिका अशी—

मातृचेट हा संघगुप्त नावाच्या एका श्रीमंत ब्राह्मणाचा मुलग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होता. त्याने एका बौद्ध व्यापाऱ्याच्या मुलीशी लग्न केले होते. त्याचे पाळण्यातील नाव काळ असे होते. पण तो कमालीचा मातृभक्त निघाल्यामुळे त्याला मातृचेट असे नाव पडले.

पण या आख्यायिकेत सत्याचा अंश फार कमी दिसतो. मातृचेट याचा अर्थ मातेचा सेवक असा आहे. ही माता म्हणजे जन्मदात्री नसून दुर्गा असावी. त्यावरून असे वाटते, की मातृचेट हा प्रथम शिवशक्तीचा उपासक असावा. त्याने काही शिवस्तोत्रे रचल्याचे इत्सिंग सांगतो. त्याने तंत्रविद्येतही प्रावीण्य मिळविले होते. ओडिसा, तिरहूत, कामरूप, इ. देशांत संचार करून त्याने अनेक बौद्ध पंडितांशी वादविवाद केले व त्यांत विजय मिळविले. त्यावरून त्याला दुर्धर्षकाल ही उपाधी प्राप्त झाली. पुढे आईच्या सूचनेवरून तो नालंदाच्या विद्यापीठात गेला. तिथेही त्याने बौद्ध पंडितांशी वादविवाद केला; पण त्यात त्याचा पराभव झाला. या वादात त्याला बौद्ध तत्त्वज्ञानाचे महत्त्व पटले आणि त्याने लगेच त्या धर्माची दीक्षा घेतली.

मातृचेटाने अध्यर्धशतक नावाचे एक बुद्धस्तोत्र रचले आहे. हे दीडशे श्लोकांचे आहे. स्तोत्रवाङमयातले हे पहिले स्तोत्र होय, असे मानतात. यावरून मातृचेटाला स्तोत्रवाङमयाचा जनक समजतात. हे स्तोत्र त्या संप्रदायात अत्यंत लोकप्रिय ठरले. त्याचे चिनी, तिबेटी व मध्य आशियातल्या तोखारी या भाषांत अनुवाद झाले आहेत. पुढील अनेक कवींना त्याने स्तोत्ररचनेची प्रेरणा दिली आहे. दिङ्नाग या बौद्ध पंडिताने त्याचे अनुकरण केले आहे. अनेक जैन आचार्यांनीही या काव्याच्या आधारावर स्तोत्रकाव्ये रचली आहेत.

आपल्या एका स्तुतिपद्यात त्याने विरोधाभासाचे एक सुरेख पद्य लिहिले आहे, ते असे –

> परार्थैकान्तकल्याणी कामं स्वाश्रयनिष्ठुरा ।
> त्वय्येव केवलं नाथ ! करुणाऽकरुणाऽभवत् ।।
>
> (अध्यर्ध शतक ६४)

अर्थ – दुसऱ्यावर उपकार करण्यात व दुसऱ्याचे कल्याण करण्यात पराकोटीला गेलेली पण स्वतःचे आश्रयस्थान जे शरीर त्याविषयी कमालीची निष्ठूर बनलेली करुणा, हे नाथ, तुझ्या ठिकाणीच केवळ ' अकरुणा ' झाली आहे.

बौद्ध धर्माचे दिव्य उपदेश मातृचेटाच्या मुखाने श्रवण करावे म्हणून कनिष्क राजाने त्याला आपल्या दरबारात बोलावले; पण वार्धक्यामुळे त्याला ते निमंत्रण स्वीकारणे अशक्य ठरले. म्हणून त्याने बौद्ध धर्माच्या मान्य सिद्धान्तांचे विवरण करणारे ८५ श्लोकांचे एक लघुकाव्य रचून ते कनिष्काकडे पाठवले. त्या काव्याचा अनुवाद ' महाराज कनिष्क लेख ' या नावाने तिबेटी भाषेत सुरक्षित आहे. [सं. सा. इ.; एन्सा. रि. ए.]

मातृ–पितृपूजा एक व्रत. धर्मशास्त्रात माता आणि पिता यांना तीर्थ मानले असून, मातापित्यांची सेवा हे पुत्राचे तप, दान व मोक्ष असेही सांगितले आहे. मातापित्यांविषयीच्या याच पूज्य भावनेतून हे व्रत निर्माण झाले आहे. मुख्यत्वे स्त्रिया हे व्रत करतात. त्यासाठी त्या माहेरी जातात; दिनशुद्धी पाहून मातापित्यांना स्नान घालतात; व्रताचा संकल्प करून गणपतिपूजन व स्वस्तिवाचन करतात; मग मंगल वाद्यांच्या गजरात मातापित्यांचे पादप्रक्षालन करून त्यांची वस्त्रालंकार, पुष्पहार व मिष्टान्न देऊन पूजा करतात.

या व्रतात दीपदान करावे असे सांगितले आहे. त्यासाठी धान्यराशीवर एक दिवा लावून ठेवतात. त्या दिव्याचीही पूजा करतात व पुढील मंत्राने माता-पिता व दीप यांची प्रार्थना करितात–

> यन्मयाद्य यथाशक्ति मातापित्रर्चनं कृतम् ।
> प्रीयेतां तेन मे देवौ नित्यं गौरीमहेश्वरौ ।।
> मातृगेहे मया दत्तो दीपोऽयं मङ्गलाह्वयः ।
> निहत्य दुरितं सर्वं पुनातु च कुलद्वयम् ।।

अर्थ – आज मी जे यथाशक्ति मातापित्यांचे अर्चन केले, त्याने गौरीमहेश्वर हे देव मजवर नित्य प्रसन्न होवोत. मातृगृही जो हा मंगलसंज्ञक दीप मी दान दिला, तो माझे सर्व दुरित नाहीसे करून उभय कुलांना पुनीत करो.

मग सुवासिनींना हळदीकुंकू देऊन व्रताची समाप्ती करतात.

फल–पुण्य व सौभाग्य यांची प्राप्ती. [व्रतराज]

मातृपूजा जगदंबा आदिशक्ती व तिची अन्य रूपे यांची मातृभावनेने पूजा व उपासना करणे, याला मातृपूजा असे नाव आहे. भारतीय तत्त्वज्ञान, धर्मविचार, कला व साहित्य यांत मातृपूजेला महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. या पूजापद्धतीमध्ये विविध विचारधारांचे एकत्रीकरण झालेले आहे. कालांतराने त्यातूनच ज्या लोककथा, परंपरा आणि संप्रदाय यांचा उद्‌भव झाला, त्यांचे परस्परांशी पुष्कळच साम्य आहे.

भारतीय मातृपूजेचा इतिहास बहुरंगी आहे. त्यात विविध प्रकारच्या कल्पना व श्रद्धा एकवटलेल्या आहेत. या मातृकल्पनेभोवती जी धार्मिक भावना उत्तरोत्तर वृद्धिगत झाली, तिचा प्रभाव भारतीय विचारांवर व कल्पनांवर पडलेला आहे. मातृपूजेची प्रथा ही प्राचीन मातृसत्ताक समाजव्यवस्थेतून निर्माण झाली, असे मानववंशशास्त्रज्ञ सांगतात. मातृसत्ताक समाजरचनेत माता ही कुटुंबाच्या केंद्रस्थानी असते. सर्व कुटुंबावर तिची सत्ता चालते. या वस्तुस्थितीमुळे त्या उपासना-पद्धतीत माता ही शक्तीचे प्रतीक बनली आणि त्यामुळे साऱ्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्त्रीदेवतांना महत्त्व प्राप्त झाले. त्या सर्वांना माता समजून पुरुष त्यांची आराधना करू लागले.

भारतात आर्यांच्या आगमनापूर्वी जे आर्येतर लोक वसले होते, त्यांच्यांतही मातृपूजा प्रचलित होती. पुढे आर्य आणि आर्येतर यांच्या संस्कृतिसमन्वयात आर्यांनीही तिचा स्वीकार केला. मोहेंजोदडो व हडप्पा येथे जे सिंधुसंस्कृतीचे अवशेष सापडले आहेत, त्यांत मातृपूजेची काही चिन्हे मिळाली आहेत. तिथे ज्या स्त्रीमूर्ती आढळल्या, तशाच प्रकारच्या मूर्ती मध्य-पूर्वेतील अनेक देशांत आढळल्या आहेत. त्यावरून कोण्या प्राचीन काळी मातृपूजा सर्व जगात रूढ असावी, असे वाटते.

वैदिक वाङ्मयात पुरुषदेवतांना प्राधान्य असले, तरी त्यात काही स्त्रीदेवताही वर्णिल्या आहेत. त्या सर्वांत अदितीला श्रेष्ठत्व आहे.

ऋग्वेदात अदितीचे वर्णन केलेले आहे, ते असे–

अदितिर्द्यौरदितिरन्तरिक्षमदितिर्माता स पिता स पुत्रः ।।

(ऋ. १.८९.१०)

अर्थ – अदिती ही द्युलोक आहे, ती अंतरिक्ष आहे, ती माता आहे, पिता आहे आणि पुत्ररूप सृष्टी आहे.

वाजसनेयी संहितेत अदितीला महामाता, ऋताची अधि-ष्ठात्री, पराक्रमी, रक्षणकर्त्री व मार्गदर्शक म्हणून गौरविले आहे (२१.५). एकंदरीत अदितीचे वैदिक वर्णन पाहता मातृत्व हा तिचा विशेष गुण आहे, असे दिसते. अदिती म्हणजे देवमाता ही कल्पना पुराणांतही आढळते; पण अदितीच्या कल्पनेतून मातृपूजेचा विकास झालेला नाही. मातृपूजनाच्या उगमाच्या दृष्टीने वैदिक वाङ्मयातील भूदेवीचे वर्णन अधिक महत्त्वाचे आहे. ऋग्वेदात तिलाही महामाता म्हटले आहे (१.१६८.३३). अथर्ववेदात तिच्यासंबंधी एक समग्र सूक्त असून, त्यात तिने आपल्या प्रजेला सर्व प्रकारची सुखसमृद्धी द्यावी, अशी प्रार्थना आहे (अथर्व १२.१.१–१८).

ऐतरेय ब्राह्मणात भूमीलाच श्री म्हटले आहे (८.५). उत्तरकालीन उपनिषदांतही भूमी आणि श्री किंवा लक्ष्मी यांना एकरूप मानले आहे. पुराणांतही भूदेवी म्हणजे शक्तीचे किंवा महामातेचे एक रूप होय, असे वर्णन आढळते. विष्णू हा जसा लक्ष्मीचा पती आहे, तसाच तो भूदेवीचाही पती मानला गेला आहे. या कल्पनेमुळेच मूर्तिकलेत विष्णूच्या दोन्ही अंगी लक्ष्मी आणि भूदेवी यांना स्थान मिळाले आहे.

पुराणांतील दुर्गादेवीचा उगम भूमातेच्या कल्पनेतूनच झाला असावा. इतर मातृदेवतांप्रमाणेच दुर्गादेवीचा उत्सव पावसाळ्यानंतर कापणीच्या हंगामात येतो. यालाच आपण आश्विन महिन्यातील देवीचे नवरात्र असे म्हणतो. जगद्धात्री, शाकंभरी व अन्नपूर्णा अशीही देवीची अन्य नावे आहेत. त्यावरून तिचा भूमातेशी संबंध स्पष्ट दिसतो.

लक्ष्मी ही मूळची धान्यदेवता असावी. कारण त्याच स्वरू-पात अद्यापही तिची पूजा अनेक ठिकाणी केली जाते.

नंतरच्या वैदिक साहित्यात अंबिका, उमा व दुर्गा या देवतांचे उल्लेख येतात. मैत्रायणी व काठक या संहितांमध्ये अंबिकेला धान्यदेवता म्हटले आहे. तिलाच पुढे दुर्गा हे नाव प्राप्त झाले आणि शरद्‌ऋतूत तिचा उत्सव प्रचलित झाला.

रामायण, महाभारत व पुराणे यांत या महामातेला उमा, काली, दुर्गा, कात्यायनी, चंडी, इ. अनेक नावे लाभली असून, ती शिवाची पत्नी आहे, असे सांगितले आहे. या एकाच देवीच्या सौम्य व उग्र रूपांची वर्णने आहेत. देवी पुराणात महाकाली (संहारक), महालक्ष्मी (पोषक) आणि महासरस्वती (ज्ञानदात्री) ही तीन्ही रूपे एकाच मूळ आदिमायेने त्या त्या कार्यासाठी घेतली असल्याचे वर्णन आहे.

शाक्त संप्रदायात देवीला सर्व जगाची माता आणि सर्वव्यापक असे मानले आहे. देवीमाहात्म्यात याविषयी पुढील श्लोक आहे–

ब्रह्मविद्या जगद्धात्री सर्वेषां जननी तथा ।
यया सर्वमिदं व्याप्तं त्रैलोक्यं सचराचरम् ।।

अर्थ – जगद्धात्री देवी ही ब्रह्मविद्या व सर्वांची माता आहे, जिने हे सर्व चराचर त्रैलोक्य व्यापून टाकले आहे.

इ. स. च्या ६ व्या शतकानंतर हर्षचरित, कादंबरी, स्वप्न-वासवदत्ता, मालतीमाधव, इ. संस्कृत विदग्ध साहित्य निर्माण झाले. त्यात देवीची उग्र रूपात केली जाणारी पूजा आणि तिला दिले जाणारे पशुबळी यांचे वर्णन आढळते. इ. स. च्या १० व्या शतकापर्यंत अनेक स्थानिक देवताही पुराणे आणि क्षेत्रमाहात्म्ये यांचा पालव धरून हिंदूंच्या दैवतसृष्टीत प्रविष्ट झाल्या.

स्त्री व पुरुष यांच्या समागमामुळे जीव उत्पन्न होतो, हा निसर्गाचा नियम मनुष्याने विश्वाच्या उत्पत्तीलाही लागू केला आहे. त्यासाठी विश्वजनक देव आणि विश्वजननी देवी या युग्माची कल्पना निघाली. सिंधुसंस्कृतीच्या काळापासून लिंग हे विश्वजनकाचे व योनी हे विश्वजननीचे प्रतीक मानले गेले आहे. शिवलिंगात ही दोन्ही प्रतीके एकत्र केली गेली आहेत.

पुराणे व तंत्रे यांत मातृपूजेतील असंख्य विधींचे सविस्तर वर्णन आहे. विविध आसने, मुद्रा, गीते, नृत्य, उत्सव, इ. प्रकारांचाही या पूजेत अंतर्भाव असतो. बंगालमधील दुर्गा-पूजेच्या उत्सवात हे सर्व प्रकार आढळतात.

मनुष्याच्या ठिकाणी आध्यात्मिक आकांक्षा उत्पन्न होते आणि तो दिव्य अनुभवासाठी प्रयत्नशील होतो, याचे कारण ही महामाया म्हणजे ईश्वरी शक्तीच होय. मनुष्याच्या मनात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बुद्धी, भावना, वासना व महत्त्वाकांक्षा उत्पन्न होतात, त्याही या ईश्वरी शक्तीमुळेच. दुर्गासप्तशतीत देवीचा अनेक असुरांशी संग्राम झाल्याची वर्णने आहेत. मनुष्याच्या मनात जे दैवी व दानवी अंश असतात, त्यांमधील संग्रामाचेच ते रूपक चित्र आहे. मनुष्याच्या हालचाली आणि त्याचे शरीरव्यापार जे होतात, त्यांत ईश्वरी शक्तीचाच साक्षात्कार असतो. या सर्वव्यापी व सर्वसमर्थ अशा परमेश्वरी शक्तीच्या साक्षात्कारासाठी एक साधन किंवा माध्यम म्हणून आपला उपयोग होऊ शकतो, ही भावना प्रत्येक साधकाच्या मनात उत्पन्न व्हावी, हाच मातृपूजेचा उद्देश आहे.

या परमेश्वरी शक्तीचा साक्षात्कार घडावा, तिची कृपा लाभावी आणि त्या कृपेने जन्म-मरणातून मुक्ती प्राप्त व्हावी, यासाठी जे प्रयास निग्रहाने व सातत्याने करावे लागतात, त्यांना साधना असे नाव आहे. महामायेच्या उपासनेत या साधनेलाच प्राधान्य आहे. तंत्रशास्त्रात तिच्यावरच सर्व भर दिला आहे. मंत्र व यंत्र ही या साधनेची दोन अंगे होत.

मंत्र म्हणजे मातृदेवीचे नादमय प्रतीक. जीवोत्पत्तीच्या कार्यात पहिली पायरी म्हणजे परमेश्वरी संकल्प होय. या संकल्पातून इच्छा उत्पन्न होते. तिचे रूपांतर ब्रह्माच्या क्रियेत होते. ही क्रिया म्हणजेच परब्रह्माची शक्ती होय. त्यापुढची पायरी म्हणजे नाद किंवा विश्वाचे कंपन. त्यातून दृश्य सृष्टी उत्पन्न होते. या विश्व-कंपनाची दृश्य रूपे म्हणजेच अक्षरे. या अक्षरांना मातृका म्हण-तात. ही अक्षरे शरीराच्या भिन्न भागांवर ठेवून त्यांना मातेच्या सेवेसाठी पवित्र करण्याची एक प्रथा तांत्रिक पूजेत आहे. तिला अंगन्यास म्हणतात. या अक्षरमातृकांतून मातृदेवतेचे अनेक मंत्र निर्माण झालेले आहेत. या मंत्रांचा जप करणे व त्यांचे पुरश्चरण करणे हा मातृपूजेतला एक महत्त्वाचा भाग आहे. मंत्रमहोदधी व मंत्रमहार्णव या ग्रंथांत मातृदेवतेची जितकी नावे, तितके त्यांचे मंत्रही दिले आहेत.

यंत्र म्हणजे शक्तीच्या ज्ञानाचे एक साधन किंवा एक माध्यम होय. तांत्रिकांच्या दृष्टीने मानवी शरीर हे सर्वोत्तम यंत्र किंवा साधन होय. हे शरीर म्हणजे विश्वातील एक वस्तू नाही, तर विश्वाची छोटीशी प्रतिकृतीच आहे. जे अनंत विश्वात आहे, ते सर्व सूक्ष्मरूपाने मानवी शरीरातही आहे. त्यामुळे विश्वातील सत्याचा शोध घेण्यासाठी दूर कुठे भटकायला नको; स्वतःच्या देहावरच सर्व लक्ष केंद्रित केले तरी कार्य साधते, अशी तांत्रि-कांची श्रद्धा आहे. म्हणून त्यांनी देह, हे एक यंत्र मानले आहे. त्याव्यतिरिक्त वर्तुळ, चतुष्कोन, षट्कोन, इ. आकारांची, विशिष्ट कोठे असलेली, तसेच विविध अक्षरमातृकांचा न्यास असलेली अनेक यंत्रे त्यांनी निर्माण केली. यंत्रचिंतामणी या ग्रंथात त्या सर्वांचा समावेश असून, वर्णनही केलेले आहे.

स्वामी रामकृष्ण परमहंस हे अनन्य मातृपूजक होते. मातृ-पूजेमुळे सर्व प्राणिमात्रातील समतेचा प्रत्यय येतो, असे ते म्हणत. मानवतेची सेवा हाच मातृपूजेचा सर्वोत्तम मार्ग होय, असे त्यांनी सांगितले आहे. महायोगी अरविंद यांनीही महामायेला म्हणजे परमेश्वरी शक्तीला अनन्यभावे शरण जाण्यावर भर दिला आहे. या ईश्वरी शक्तीशी एकरूप होणे हेच साधकाचे ध्येय असले पाहिजे, असे ते सांगतात.

सामान्य, सुसंस्कृत भारतीय माणसाची अशी श्रद्धा असते, की जन्मदात्री माता म्हणजे त्या जगज्जननीचे एक प्रतिरूप आहे. त्यामुळे मातेला देवता मानण्याची प्रवृत्ती सर्वत्र आढळते. एकंदरीत स्त्री जातीलाच भारतीय मनाने मातेचे स्थान दिले आहे. मातेप्रमाणेच मातृभूमीलाही जे पूज्यत्व दिले गेले, त्याचे उगम मातृदेवतेच्या उपासनेत आहे. ‘ जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ’ हे प्रभू रामचंद्राचे उद्गार या बाबतीत प्रसिद्धच आहेत. पाहा – शक्तिपूजा. [ग्रे. वी. इं.]

मातृभूतय्य

(इ. स. चे १८ वे शतक) द. भारतातील एक भक्तकवी. हा तेलुगू ब्राह्मण असून, तिरुचिरा-पल्लीत राहत होता. हा संगीताचा जाणकार होता. ... भैरवी रागातील ‘ नि मदी चल्लग ’ ही याची चीज प्रसिद्ध ... असे सांगतात, की तंजाऊरच्या महाराजांनी याला याच्या संगीत-ज्ञानाबद्दल दहा हजार रुपये बक्षीस म्हणून दिले होते.

मातृभूतय्य हा सुगंधिकुंतलांबा या देवीचा उपासक होता. त्रिशिरगिरी या नाममुद्रेने याने आपली पदे व कीर्तनाख्याने ... देवतेच्या स्तुतिपर रचली आहेत. [सं. शा.]

मातृभूतेश्वरम

द. भारतातील एक शिवस्थान. हे ... तमिळनाडू प्रदेशाच्या तिरुचिरापल्ली ... शहरात एका डोंगरावर आहे. हे मंदिर सुमारे तीनशे ... पूर्वी मदुरेच्या नायक वंशातील मंगम्म नामक राणीने बांधले ... मंदिर अत्यंत विशाल आणि मंगम्माच्या अद्भुत साहस ... कल्पना आणून देणारे आहे. मंदिराच्या भिंतींवर शिवजीवनाशी संबंधित असलेल्या अनेक कथा चित्रित केलेल्या आहेत.

या मंदिराला मातृभूतेश्वर हे नाव का प्राप्त झाले, याबद्दल एक दंतकथा सांगतात, ती अशी – एक स्त्री या शिवाची अनन्य भक्त होती. एकदा तिच्या प्रसूतीची वेळ जवळ आली, ... तिने आपल्या आईला बोलावणे धाडले. आई कावेरी नदीच्या पैलतीराला राहत होती आणि कावेरीला पूर आला होता. त्यामुळे ती वेळेवर पोहचू शकली नाही. मुलीची चिंता ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिवच आईच्या रूपाने तिच्या शुश्रूषेला आला. काही दिवसांनी आई तिथे आली आणि शिव अंतर्धान पावला. या घटनेच्या स्मृतीनिमित्त या शिवाला हे नाव प्राप्त झाले. [त. सा. सं.]

मातृभोजन उपनयनांगभूत एक लौकिक सोहळा. उपनयन केल्या जाणाऱ्या बटूने आईच्या ताटात भोजन करणे व आईने मुलाला घास देणे, असे याचे स्वरूप आहे. लहानपणापासून मुलगा आईबरोबर जेवत असतो. आईच्या पानातले उष्टेही तो खात असतो. पण मुंज झाल्यावर त्याला ब्रह्मचाऱ्याचे नियम लागू होतात व कोणाचेही, प्रत्यक्ष आईचे सुद्धा, उच्छिष्ट निषिद्ध ठरते. आपल्या ताटातले अन्न मुलाला भरविणे हा एक वात्सल्याचा भाग असतो. मुलाची मुंज झाल्यावर आई त्या वात्सल्याच्या आनंदाला मुकणार असते. म्हणून आईच्या ताटातले हे शेवटले भोजन सोहळ्याने करतात. त्यासाठी पाट-रांगोळी करून चांदीच्या ताटवाटया ठेवतात. ताटात सर्व प्रकारचे सुग्रास भोजन वाढतात. ताटापुढे समई पेटवून ठेवतात. मुलाच्या पंक्तीला आठ ब्रह्मचारी मुलगे (मुंजे) बसवतात. त्यांना अष्टवर्ग म्हणतात. आईच्या शेजारी मुलगा बसतो. आई त्याला घास देते आणि आपणही जेवते. हे मातृभोजन उरकून मुलगा अष्टवर्ग्या मुलांना दक्षिणा देतो व मग उपनयनासाठी गुरूकडे जातो.

मातृव्रत एक काम्य व्रत. आश्विन महिन्यातल्या नवमीला हे व्रत करतात. त्या दिवशी उपवास व मातृदेवतेची पूजा करायची असते. विजय मिळविण्याच्या आकांक्षेने राजा किंवा प्रजा यांपैकी कोणीही हे व्रत करावे, असे सांगितले आहे. तसेच जिची मुले जगत नाहीत किंवा जिला एकच मूल आहे, अशा स्त्रीनेही हे व्रत करावे, असे म्हटले आहे. [हि. ध.]

मातृसत्ताक कुटुंबपद्धती ज्या कुटुंबात माता ही केंद्रस्थानी असते व कुटुंबाचे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक व्यवहार स्त्रीच्या हाती असतात, अशा कुटुंबपद्धतीला मातृसत्ताक कुटुंबपद्धती असे म्हणतात. हिंदु कुटुंबसंस्था ही प्राधान्याने पितृसत्ताक आहे. तिच्या केंद्रस्थानी पिता असतो. त्याची वंशपरंपरा पुरुषसंततीच्या द्वारे चालते, पुत्र – पौत्र आणि त्याचे वंशज पैतृक संपत्तीचे वारसदार होतात. पण मातृसत्ताक पद्धतीमध्ये या गोष्टी नेमक्या उलट असतात. या पद्धतीची काही वैशिष्ट्ये अशी –

(१) वंशपरंपरेचे निर्धारण मातेच्या द्वारे होते. मुले पित्याच्या नव्हेत, तर मातेच्या कुलगोत्राची समजली जातात.

(२) विवाहानंतर मुलगी सासरी न जाता माहेरीच राहते. आवश्यकता वाटेल तेव्हा तिचा पती तिच्या घरी जाऊन वास्तव्य करतो.

(३) पुत्राला संपत्तीचा अधिकार किंवा वारसा न मिळता तो मुलीला मिळतो. प्रायः अशा कुटुंबात मातेचा भाऊ किंवा त्याच्या अभावी भाचा संपत्तीचा अधिकारी होतो. कारण या पद्धतीत संतती पित्याच्या घरी न राहता ती मातेच्या बरोबर त्यांच्या आजीकडे (मातामही) राहते. मामाची औरस संतती तिच्या मातेसह दुसऱ्या कुटुंबात असते. अशा वेळी मातेच्या संपत्तीचा अधिकारी कन्येचा पुत्र म्हणजेच भाचा होत असतो. पितृप्रधान कुटुंबपद्धतीत जे संबंध पिता–पुत्राचे असतात, तेच मातृसत्ताक पद्धतीत मामा–भाच्यांचे असतात. वारसाहक्काप्रमाणे या पद्धतीत यौवराज्य, पौरोहित्य, इ. पदे व सामाजिक सन्मानाच्या उपाधी पुत्राऐवजी भाऊ अथवा भाचा यांना मिळतात. तिरुवितांकूर–कोच्चिन राज्यांमध्ये राज्याचा उत्तराधिकारी राजपुत्र होत नसून, राजाच्या बहिणीचा मुलगा अर्थात भाचा होत असतो.

(४) आईच्या जातीवरून मुलाची जात निश्चित केली जाते.

प्रायः अशी समजूत आहे, की या पद्धतीत कुटुंबशासनाची सत्ता मातेच्या हाती असते. या समजुतीमुळेच समाजशास्त्रज्ञांनी मातृसत्ताक पद्धती असे नाव दिले आहे. एक गोष्ट खरी, की अशा काही मातृसत्ताक समाजांमध्ये स्त्रियांची दशा बरीच उन्नत असते. पण अधिकांश मातृसत्ताक कुटुंबात ही सत्ता मातेच्या हाती नाममात्र असून, कुटुंबांचे बहुतेक सर्व व्यवहार स्त्रीचा भाऊच पाहत असतो. कारण तो त्याच कुटुंबात राहत असतो.

गेल्या शतकात बऱ्याच पाश्चात्य समाजशास्त्रज्ञांनी मातृसत्ताक कुटुंबाची वर उल्लेखलेली वैशिष्ट्ये किंवा त्यांचे अवशेष पाहून अशी कल्पना की केली, प्रारंभी जगात सर्वत्र मातृसत्ताक कुटुंबपद्धतीच प्रचलित होती. गेल्या शतकातला आणखी एक सर्वमान्य सिद्धान्त असा होता, की मानवसमाजाची प्रारंभिक दशा स्त्री–पुरुषांचा स्वेच्छाचार ही होती. त्यानंतर प्रथम मातृसत्ताक पद्धती उदय पावली आणि मग पितृसत्ताक पद्धती प्रस्थापित झाली.

कामचारानंतर मातृसत्ताक कुटुंबपद्धती उदयाला आली, या कल्पनेला दोन मोठे आधार तसा विचार करणाऱ्यांना मिळाले. पहिला आधार असा– संततीची माता कोण याचा निश्चित निर्णय प्रत्यक्ष प्रमाणाने होऊ शकतो; पण पिता कोण हा केवळ अनुमानाचाच विषय असतो. अतएव स्वेच्छाचारानंतर मातृप्रधान कुटुंबसंस्था संभवनीय आहे. पण उत्क्रांतिवादाचा प्रणेता डार्विन म्हणतो, की मनुष्यजातीच्या सामाजिक इतिहासात स्वेच्छाचार सार्वभौम असा कधीच नव्हता.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तशी कल्पना करणे हे विज्ञानविरोधी होय. दुसरा आधार असा – मातृसत्ताक व्यवस्था सूचित करणारी उदाहरणे प्राचीन व आधुनिक समाजामध्ये बरीच आढळतात.

वरील आधारही फोल असल्याचे डॉ. हार्टलँड या विद्वानाने अनेक उदाहरणे दाखवून सिद्ध केले आहे. तो म्हणतो, की पितृत्व निश्चित असूनही जगातल्या अनेक जातींत मातृसत्ताच प्रचलित आहे. दुसऱ्या आधाराबद्दल वंशशास्त्रज्ञ सांगतात, की जगात सर्वत्र मातृसत्ताक पद्धतीच्या बरोबरीने पितृसत्ताक कुटुंबपद्धतीही दिसून येते.

प्राचीन भारतात प्रथम मातृसत्ताक कुटुंबपद्धतीच होती, अशी कल्पना श्री. सुविमलचंद्र सरकार, इ. विद्वानांनी केली आहे. या कल्पनेला त्यांनी काही प्रमाणे दिली आहेत, ती अशी–

(१) ब्राह्मणे, उपनिषदे व अन्य प्राचीन साहित्य यांत मातेच्या नावावर पुत्राचे नाव ठेवण्याची पद्धती दृष्टिगोचर होते. बृहदारण्यकाच्या शेवटी जी वंशब्राह्मणांची तालिका दिली आहे, तिच्यातली सर्व नामे गौतमीपुत्र, कात्यायनीपुत्र, इ. आहेत. रामायण-महाभारतातही अशी उदाहरणे दिसतात. सौमित्री (सुमित्रेचा पुत्र), कौंतेय (कुंतीचा पुत्र), वैनतेय (विनतेचा पुत्र) ही नावे मातेवरूनच पडलेली आहेत.

(२) अर्जुनाचा चित्रांगदेशी विवाह झाला, त्याला अट अशी होती, की तिला होणारा पुत्र अर्जुनाकडे न जाता तिच्या बापाकडेच राहील.

(३) मनुस्मृती व धर्मसूत्रे यांत मामाला उच्च स्थान दिले आहे. मधुपर्कद्वारा पूजित होणाऱ्या व्यक्तींत मामाची गणना आहे, पण काकाची नाही (मनु. ३·११९). बृहन्नारदीय पुराणातही मामाला पूज्य मानले आहे (९·९२).

पण ही सर्व प्रमाणे भारतात कोण्या एका काळी मातृसत्तेचा सार्वत्रिक प्रसार असल्याचे सिद्ध करू शकत नाहीत. वैदिक कुटुंबपद्धती तर स्पष्टपणे पितृसत्ताक होती. तिच्यात पिता, पुत्र, पौत्र अशाच परंपरेने वंश चालत असे. मातृवंशी कुटुंबात महत्त्व पावलेल्या आज्याचे (मातामह) नाव वैदिक साहित्यात कुठेही आढळत नाही. आईवरून दिल्या जाणाऱ्या नावांचा प्रयोग प्राचीन भारतात होता हे खरे; पण त्याहून अधिक तो पितृनामांचा होता, हे लक्षात ठेवायला हवे. पाणिनीच्या गोत्रापत्य प्रकरणातं बहुतांश नावे पुरुषांचीच आहेत. मातृनामांचा प्रयोग होण्याचे एक महत्त्वाचे कारण असे होते, की पुरुष अनेक बायका करीत आणि त्या बायकांना होणारे पुत्र ही त्या त्या आईची अपत्ये म्हणून मातृनामाने निर्दिष्ट केली जात. कुंतीचे पुत्र ते कौंतेय आणि माद्रीचे पुत्र ते माद्रेय; पण ते सर्व मिळून पांडूचे पुत्र म्हणून पांडवच मानले जात होते.

सांप्रत मातृसत्ताक कुटुंबपद्धतीची भारतात दोन केंद्रे आहे[...] एक आसाम व दुसरे केरळ. आसामातल्या खासी, सिंतेंग, [...] इ. जातींत मातृप्रधान कुटुंबसंस्था आजही पूर्णरूपाने विद्य[...] आहे. केरळात नायर, थिया, इ. जातींत मातृसत्ताक कुटुंबपद्[...] एका काळी प्रचलित होती; पण सांप्रत ती ढासळली [...] तिच्या जागी पितृसत्ताक पद्धती रूढ झाली आहे. (मरुमक्क[...] तायम्; नायर पाहा) नायर जातीत ही पद्धती रूढ होण्या[...] काही कारणे आहेत. नायर ही लढाऊ जात आहे. मध्य यु[...] ते आपल्या नेत्याबरोबर युद्धासाठी मोहिमेवर जात व कि[...] कदा महिनोगणतीच नव्हे; तर वर्षोगणती घराबाहेर रा[...] अशा स्थितीत घरी राहणाऱ्या पुरुषांनी लढाईवर गेलेल्या [...] पाची संपत्ती गिळंकृत करू नये, म्हणून कुटुंबातल्या स्त्री[...] कुटुंबप्रमुख व कुटुंबाच्या संपत्तीची अधिकारी बनवले [...] त्यातून या मातृसत्तेचा उगम झाला. पण या मातृसत्ताक कु[...] पद्धतीचे अनेक दुष्परिणाम केरळातल्या लोकांना भोगावे ला[...] आणि त्यामुळे त्यांनाच तिचा उबग आला. या व्यक्ति[...] व्यक्तिवादी प्रवृत्ती आणि औद्योगिक क्रांती हीही कारणे [...] त्यामुळे केरळीय समाजाने तिच्या विरुद्ध चळवळ सुरू [...] आणि १९३२ साली ती पद्धती बदलून टाकण्यास तत्[...] राजसत्तेला भाग पाडले. आता तर संपूर्ण हिंदू समाजाला [...] होणारा एक सर्वव्यापक हिंदू कायदाच अस्तित्वात आला [...] त्यामुळे यापुढे या देशात मातृसत्ताक कुटुंबपद्धतीला [...] नाही. [हिं. प. मी.; एन्सा. रि. ए.;]

मात्रा (१) एक कालपरिमाण. ' ह्रस्ववर्णोच्चारण[...] (ऱ्हस्व वर्णाचा उच्चार करण्यास जेवढा काल ला[...] तेवढ्या कालाला मात्रा असे म्हणतात),असे त्याचे लक्षण [...] वैदिक स्वरांच्या उच्चारणात मात्रेचा विचार करावा ला[...] ऱ्हस्वासाठी एक मात्रा, दीर्घासाठी दोन मात्रा व प्लुता[...] तीन मात्रा एवढा काल सांगितलेला आहे. पाणिनीय शि[...] काही पशु-पक्ष्यांचे आवाज किती मात्रांचे असतात, ते पु[...] प्रमाणे सांगितले आहे –

> चाषस्तु वदते मात्रां द्विमात्रं चैव वायसः।
> शिखी रौति त्रिमात्रं तु नकुलस्त्वर्धमात्रकम्॥

अर्थ – चाष पक्ष्याचा ध्वनी एक मात्रेचा, कावळ्याचा [...] मात्रांचा, मोराचा तीन मात्रांचा व मुंगसाचा आवाज [...] मात्रेचा असतो.

प्राणायामविधीत पूरक, कुंभक व रेचक हे कोणत्[...] प्रकारात किती प्रमाणात असावे, हे मात्रा शब्दाने नि[...] केलेले असते. संगीतात निमेषमात्र कालाला मात्रा म्हटले[...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(२) इंद्रियवृत्तीलाही मात्रा असे म्हणतात. गीतेच्या टीकेत 'मात्रास्पर्शास्तु' या श्लोकावर टीका करताना मात्रेचे लक्षण सांगितले आहे, ते असे – 'मीयन्ते आभिर्विषया: मात्रा इन्द्रियवृत्तय:' = ज्यांनी विषयांचे मापन केले जाते अशा इंद्रियवृत्ती म्हणजे मात्रा होत. [श. क.]

मात्रांगुल एक प्राचीन परिमाण. पुरोहिताच्या किंवा कारागिराच्या उजव्या हाताच्या मधल्या बोटाएवढया लांबीच्या मापाला मात्रांगुल असे म्हणतात. यज्ञातील दर्भ किंवा दर्भासन या वस्तू मोजण्यासाठी अथवा शिडी किंवा शिडीची पायरी मोजण्यासाठी हे परिमाण पूर्वी उपयोगात आणीत. पाहा – अंगुली. [एन्सा. हिं. आ.]

माथुरी एक लोकनृत्य. हे नृत्य आंध्र प्रदेशातील अदीलाबाद जिल्ह्यात प्रचलित आहे. स्त्रिया आणि पुरुष दोघेही हे नृत्य करतात. मात्र यांचे गट वेगवेगळे असतात. पुरुषांच्या हातांत टिपऱ्या असतात. स्त्रिया टाळ्या वाजवून त्यांना साथ देतात. नृत्याला ढोल व झांज यांचीही साथ असते. विवाहाच्या वेळी व अन्य उत्सवप्रसंगी हे नृत्य केले जाते. [भा. लो. नृ.]

मादय्यगारी मल्लना (इ. स. १४७० – १५३०) एक तेलुगू कवी. याची तेलुगू साहित्यातील अष्ट दिग्गजांमध्ये गणना होते. हा नियोगी ब्राह्मण असून, बंदकीला राहत होता. मादय्य हे याच्या पित्याचे नाव होते. रायल राजाच्या दरबारात याला चांगला मान होता. राजशेखरचरित्र हा याचा प्रमुख काव्यग्रंथ होय. हा ग्रंथ तीन आश्वासांमध्ये विभागला असून, त्यात राजकुमारी कांतिमती आणि राजशेखर यांचा प्रणय वर्णिला आहे. कवीने हा ग्रंथ कृष्णरायाचा मंत्री साल्य तिम्मराजा याचा जावई नंदीयाळ अप्पय्या याला अर्पण केला आहे. याने एकादशीमाहात्म्य या नावाचे दुसरे एक काव्य रचले होते, असे सांगतात.

राजशेखरचरित्र या काव्यप्रबंधाची भाषा प्रौढ आणि सहजसुंदर आहे. [ते. सा. इ.; ते. वा.; ते. उ. सा.]

मादिग म्हैसूर राज्यातील एक जात. या लोकांना जांबव, पद्मजातियवरू, मातंग, चांमार, अशीही अन्य नावे आहेत. मादिग हे नाव मातंग या शब्दाचा अपभ्रंश असावा, असे एक मत आहे. जंबू ऋषी हा आपला मूळ पुरुष असल्याचे ते सांगतात. त्यावरून त्यांना जांबव हे नाव मिळाले आहे. कानडाप्रदेशात पूर्वी मातंग नामक वंश राज्य करीत होता. मादिग लोक त्या वंशातीलच असावे, असेही एक मत आहे.

उद्योगधंदे – हे लोक चामडी कमावून त्याच्या पखाली, वहाणा वगैरे वस्तू तयार करतात. काही ठिकाणी ते पहारेकऱ्याचे काम करतात; तर काही ठिकाणी साफसफाईचे काम करतात. काही मादिग शेतीही करतात.

हे लोक गाय, म्हैस, शेळया, मेंढया, इ. पशूंचे मांस खातात. अतिरिक्त ताडी पिण्याबद्दल हे प्रसिद्ध आहेत.

वेषभूषा – मादिग पुरुष कमरेभोवती एक वस्त्र गुंडाळतात, अंगात सदरा घालतात व डोक्याला पागोटे गुंडाळतात. त्यांच्या स्त्रिया साडी नेसतात, पण चोळी घालीत नाहीत.

मादिग लोक कन्नड किंवा तेलुगू भाषा बोलतात. या भाषांवरूनच त्यांचे कन्नड मादिग व तेलुगू मादिग असे दोन मुख्य भेद पडलेले आहेत. त्यांच्यांत परस्पर लग्नसंबंध होत नाहीत. कन्नड मादिगांचे पुन्हा तनिगे बुव्वडवरू, हेडिगे बुव्वडवरू आणि मोर बव्वडवरू असे तीन पोटभेद आहेत. तेलुगू मादिगांचे तले बुव्वमुवल्लू, गंय बुव्वमुवल्लू व मोर बुव्वमुवल्लू असे तीन पोटभेद आहेत. बधू-वर लग्नप्रसंगी थाळी, टोपली किंवा सूप यांपैकी

मादिग पुरुष

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कशात भोजन करतात, त्यावरून हे भेद पडलेले आहेत. याशिवाय मादिगांचे जांबव आणि डाक्कलोरू असेही भेद आहेत. जांबव शाखेचे लोक मादिगांचे गुरू असून, त्यांचे मठ आहेत. ते लिंग धारण करतात आणि कपाळाला भस्म व चंदन लावतात. हे लोक पांचालांच्या कडे भिक्षा मागतात. डाक्कलोरू हे भटके असून, अस्पृश्य मानले जातात.

मादिग लोकांत अनेक कुळे किंवा बेडगू असून, एकाच कुळात लग्नसंबंध होत नाहीत.

विवाहप्रथा – हे लोक आते–मामे बहिणीशी व मोठ्या बहिणीच्या मुलीशी लग्न करणे श्रेयस्कर मानतात. लग्न आईबाप ठरवतात. साटेलोटे पद्धतीने मुलीचा विवाह करण्याचीही पद्धत आहे. मुलीचे देज घेतात.

मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. मागणी घालायला जाताना तो बरोबर थोडी ताडी घेऊन जातो. मुलीच्या बापाने होकार दिला, की ओप्पू विळच नावाचा एक समारंभ करतात. त्या वेळी मुलाचा बाप सात किलो तांदूळ, दोन-तीन नारळ, थोडे तेल, तूप, गूळ व हळद एवढे सामान घेऊन मुलीच्या घरी जातो. तिथे मुलीची ओटी भरतात. तिच्या समोर पाच कलश मांडून त्यांची पूजा करतात. सिंहासनपूजा हा या समारंभातील मुख्य विधी आहे. यात एका कांबळीवर विडयाची पाने व सुपाऱ्या ठेवून त्यांची पूजा करतात. नंतर सर्वांना ताडी देतात. हा एक प्रकारचा साखरपुडाच असतो.

लग्न मुलाच्या घरी होते. लग्नमंडप बारा खांबांवर उभारतात. लग्नाच्या आदल्या दिवशी संध्याकाळी वधूकडील वऱ्हाड वराच्या गावी येते. नंतर दोन्ही पक्षांतील काही सुवासिनी गावच्या कुंभाराकडे जाऊन काही कोरी मडकी घेऊन येतात; त्यांना कुंकू व तांदुळाचे पीठ यांचे टिळे लावतात, त्यांच्या भोवती हळदीचे सूत्र बांधतात व त्यांची पूजा करतात. काही वेळा पूजेच्या वेळी बकरा बळी देतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी जातीतील एखादा पुरुष वधू-वरांची नखे कापतो. नंतर अंगणातील एका चौकोनाच्या चार कोपऱ्यांवर ठेवलेल्या चार घडयांतील पाण्याने चार सुवासिनी वधू-वरांना स्नान घालतात. नंतर वधू-वरांना घराच्या उंबऱ्यावर बसवतात. तिथे जवळच पाण्याने भरलेले एक मडके ठेवतात. वधू – वरांचे मामा त्यांना उचलून घेतात व स्वतः भोवती तीनदा फिरतात. प्रत्येक फेरीच्या वेळी वधू-वर सूर्याला नमस्कार करतात आणि तिसऱ्या फेरीच्या वेळी मडक्याला लाथ मारतात.

नंतर वधू-वरांना लग्नमंडपात नेऊन बसवतात. मग नवरामुलगा नवे कपडे घालून गावाबाहेर जातो व एका झाडाखाली बसतो. तिथे सुवासिनी त्याच्या अंगाला हळद लावतात. नंतर तो सूर्याला व चारही दिशांना नमस्कार करतो. मग तो लाल [illegible] लात गुंडाळलेला खंजीर हातात घेऊन आपल्या घरी [illegible] तिथे दोन्ही पक्षांत लुटुपुटीची लढाई होते. मग ज्ञाति[illegible] वधूच्या गळयात ताळी बांधतो. वधू-वरांना बाशिंगे व [illegible] बांधतात. दोघांनाही लग्नमंडपात बोहल्यावर समोरासमोर [illegible] करतात. यजमान किंवा एखादा वृद्ध लग्नात पौरोहित्य कर[illegible] वधू-वर एकमेकांच्या मस्तकावर जिरे व तीळ टाकतात. [illegible] वधू-वरांच्या एकाखाली एक धरलेल्या ओंजळीत दूध ओत[illegible] त्यानंतर वधू-वर एकमेकांच्या मस्तकावर अक्षता टाकतात [illegible] गळयात हार घालतात. मग वर आणखी एक ताळी वधू[illegible] गळयात बांधतो. लग्नातील हा आवश्यक विधी असतो. [illegible] वधू-वर घोंगडीवर ठेवलेल्या कलशाची व त्याच्या समोर [illegible] लेल्या पाने व सुपाऱ्या यांची पूजा करतात. नतर सर्वांना [illegible] सुपारी देतात.

यानंतर वधू-वर व तीन सुवासिनी केळीच्या पानावर [illegible] लेल्या थाळीतील टोपलीतील, किंवा सुपातील गूळभाताची [illegible] करतात व तो सर्वजण प्रसाद म्हणून खातात. त्यानंतर [illegible] भोजन होते. त्या वेळी वरपक्षाने सर्वांना ताडी दिली [illegible] असा नियम आहे.

विधवाविवाह सर्रास प्रचलित आहे. विधवेला आपल्या [illegible] ऱ्याच्या नातेवाईक पुरुषाशी लग्न करता येत नाही. या [illegible] तही देज द्यावे लागते.

या लोकांत मुलींना बसवी म्हणून देवीला अर्पण कर[illegible] चाल आहे. काही कुटुंबांत सर्वांत मोठया मुलीला बसवी [illegible] विण्याची पद्धतच असते. काही वेळा आईबाप संकटप्रसंगी [illegible] नवस बोलतात. मुलगी वयात आल्यानंतर बसवी बनवि[illegible] विधी करतात, तो असा –

एका शुभ दिनी मुलीला नवे कपडे घालून देवळात [illegible] तिथे तिला एका घोंगडीवर बसवतात व तिच्या शेजारी [illegible] ठेवतात. इतर बसवी स्त्रिया तिला हळद लावतात व तिची [illegible] भरतात. मग ती उभी राहून खंजिरावर तांदूळ ओतते. [illegible] अर्थ तिचे त्याच्याशी लग्न लागले, असा होतो. मग देव[illegible] पुजारी किंवा एखादी बसवी ताळीने खंजिराला स्पर्श [illegible] आणि ती ताळी मुलीच्या गळयात बांधते. मुलगी खंजीर [illegible] देवळात ठेवते आणि पुजारी तिला वेताची काठी आणि [illegible] देतो. तिच्या खांद्यावर मग शंख व चक्र यांच्या मुद्रा उम[illegible] समारंभ संपल्यावर मुलीचा बाप ज्ञातिभोजन घालतो.

बसवी झालेल्या मुलीला होलेय पुरुषाशिवाय कोणत्याही [illegible] षाशी सहवास करता येतो.

प्रसूतिप्रथा– गरोदर स्त्रीचे डोहाळेजेवणासारखे काही [illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करीत नाहीत. तिच्या नवऱ्याला त्या काळात प्रेत उचलणे, छपरावर चढणे, जनावर मारणे, इ. गोष्टी निषिद्ध म्हणून सांगितलेल्या आहेत.

स्त्रीला प्रसूतिवेदना सुरू झाल्या, की प्रसूती सुखरूप व्हावी, म्हणून देवाला नवस बोलतात. नवजात बालकाला सुईण स्नान घालते. तिसऱ्या दिवशी घरासमोर एक लहानसा खड्डा खणून त्याची पूजा करतात. त्यावर माता मुलाला घेऊन बसते. मग वनस्पती घालून तापवलेल्या पाण्याने त्या दोघांना स्नान घालतात. आसपासच्या स्त्रिया त्यांच्या स्नानासाठी मडकेभर पाणी आणून देतात. एखादी वयस्कर स्त्री घरोघरी जाऊन थोडे अन्न जमवते व ते बाळंतिणीला आणून देते. संध्याकाळी स्नानासाठी खणलेल्या खड्ड्याची सुईण पूजा करते व त्याला मांस आणि भात यांचा नैवेद्य दाखवते. मग तिला सूपभर धान्य आणि थोडे पैसे देतात. सहाव्या दिवशी सटीची पूजा करतात. जननाशौच दहा दिवस पाळतात. एक महिन्याने मुलाचे नाव ठेवतात.

मादिग स्त्री

मुलीला प्रथम रजोदर्शन झाले, की नऊ दिवस तिला बाजूला ठेवतात. त्या दिवसांत तिला राहण्यासाठी तिचा मामा एक झोपडी उभारतो आणि दहाव्या दिवशी तिने स्नान केल्यावर ती मोडून टाकतो. पहिल्या दिवशी मुलीला एका जुन्या जोड्यावर व केरसुणीवर उभे करून स्नान घालतात. मुलीचे लग्न झालेले असेल, तर दुसऱ्या दिवशी तिची सासू तिची ओटी भरते व तिला आंघोळ घालते. त्या दिवशी काही स्त्रियांना जेवण देतात.

या लोकांची पंचायत असून, तिच्यात लोकांचे तंटेबखेडे सोडवले जातात.

मादिग लोकांचे अनेक गट असून, त्यांना कट्टेमणी असे नाव आहे. कट्टेमणीच्या प्रमुखाला दोड्ड यजमान किंवा पेड्ड यजमान असे म्हणतात. त्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्याला चिक्क यजमान असे म्हणतात. तो लग्नात पौरोहित्य करतो.

देवधर्म – मंत्रतंत्र, जादूटोणा, इ. गोष्टींवर यांचा फार विश्वास आहे. ते भुताखेतांना प्रसन्न करतात. मारम्म, मासनम्म, मातंगी किंवा महालक्ष्मी या देवतांना ते भजतात. दिवाळीत ते महालक्ष्मीला अनेक बकरे, कोंबड्या वगैरे बळी देतात. मारम्म देवतेचा ते वार्षिक उत्सव करतात व तिलाही पशुबळी देतात.

यांच्या आणखीही काही ग्रामदेवता असून, त्यांना पशुबळी देण्याच्या काही विलक्षण पद्धती यांच्यांत रूढ आहेत. उदिसलम्म नामक ग्रामदेवतेला रेडा बळी देतात, तेव्हा त्याचे मुंडके कापून तिच्या समोर ठेवतात, त्याचा पुढचा उजवा पाय कापून त्याच्या तोंडात आडवा ठेवतात आणि एक दिवा लावून त्याच्या डोक्यावर ठेवतात. नंतर एक मादिग पुरुष ते मुंडके स्वतःच्या डोक्यावर घेऊन गावाला एक फेरी घालतो. त्या वेळी रेड्याच्या रक्तात भिजवलेले एक वस्त्र त्याच्या मानेभोवती गुंडाळतात, त्या माणसाला पिशाचे पळवून नेतील अशी भीती असते, म्हणून बरोबरचे लोक त्याला दोरीने बांधून धरून ठेवतात आणि लिंबे कापून चारी दिशांना फेकतात. अशा प्रकारे गावाला फेरी घालणे हे कृत्य अत्यंत अमंगल व धोक्याचे समजले जाते. रोगाची साथ असेल तेव्हा अशी मिरवणूक काढतात. त्यामुळे गावातील लोकांचे संरक्षण होते, अशी समजूत आहे. या मिरवणुकीला बळिहरणम असे म्हणतात.

मर्तिकप्रथा – सर्वसाधारणपणे हे लोक प्रेते पुरतात. गर्भिणी

उदिसलम्माला रेड्याचे बलिदान

स्त्री आणि महारोगी यांना मात्र जाळतात. प्रेत स्मशानात नेताना त्याचे मस्तक गावाकडे करतात. तसे केले नाही तर, काहीतरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संकट येते, अशी समजूत आहे. प्रेत पुरल्यानंतर सर्वजण नदीवर किंवा विहिरीवर जाऊन हात पाय धुतात. मृताचा उत्तराधिकारी मात्र स्नान करतो. तिसऱ्या दिवशी स्मशानात जाऊन मृतात्म्याला अन्न व पाणी ठेवतात. तसेच पुरलेल्या जागी मृताची एक प्रतिमा रेखाटून, तिच्या समोर बकरे किंवा कोंबडे बळी देतात. मृताशौच तीन दिवस पाळतात. दहाव्या दिवशी कलश-पूजन करून ज्ञातिभोजन घालतात. हे लोक श्राद्ध करीत नाहीत. पण चैत्रपाडवा, विनायकी चतुर्थी, सर्वपित्री अमावास्या या दिवशी ते सगाचीची पूजा करतात. [मं. ट्रा. का.]

मादेश्वरक्षेत्र म्हैसूर राज्यातील कोळेगाल गावाजवळचे एक वीरशैव क्षेत्र. याला मलयक्षेत्र असेही नाव आहे. वीरशैव संत मलय मादेश्वर या ठिकाणी लिंगरूप झाला, म्हणून या स्थानाला क्षेत्र पदवी प्राप्त झाली. मादेश्वरासंबंधी एक आख्यायिका सांगतात, ती अशी –

सुत्तूर मठात असताना, मठाच्या प्रथेप्रमाणे एकदा मादेश्वरावर दळायची पाळी आली. पण याच्या हाताचा नुसता स्पर्श होताच जाते सुरू झाले आणि ते पाहून लोक आश्चर्यचकित झाले. अद्यापही सुत्तूरमठात ते जाते भाविकांच्या दर्शनासाठी ठेवलेले आहे.

सुत्तूरहून पुढे मादेश्वर कावेरीच्या तीरावरील प्रभुलिंगन पर्वतावर गेला. तिथे शून्यसिंहासनाचा पाचवा गुरू श्री आदिगणेश्वर याने त्याला आपला उत्तराधिकारी नेमले. त्यानंतर त्याला जगद्‌गुरू निर्मार्या गणेश्वर असे नवे नाव मिळाले. पण या पीठाचा त्याला लोभ नव्हता. त्याने निरंजनस्वामीला आपला उत्तराधिकारी नेमले आणि तो तिथून दूर झाला. पुढे तो लिंगरूपात विलीन झाला, असे सांगतात.

मादेश्वरपहाडावर मादेश्वरस्वामीचे मंदिर आहे. मंदिर सुंदर व मंडपांनी युक्त आहे. मादेश्वरक्षेत्रातील अंतरगंगा हे महातीर्थ मानलेले असून, तिच्यात स्नान केल्याने काशीतील गंगेत स्नान केल्याचे पुण्य मिळते, असे सांगितलेले आहे.

शिवरात्र, दिवाळी, इ. प्रसंगी इथे मोठी यात्रा भरते. [व्ही. वेंकटेश "ईश" – अजंता, एप्रिल-मे १९५९]

माधव (१) (इ. स. १६५० चा सुमार) हा सौराष्ट्रातील सारस्वत होता. याने आयुर्वेदप्रकाश नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. [म. च. को.]

(२) (इ. स. १७०३ चा सुमार) रामदासी पंथाचा एक कवी. याचा मठ त्रिवेंद्रम येथे आहे. महाभारत, रामायण, योगवासिष्ठ व गणेशपुराण असे याचे ग्रंथ आहेत. [म. च. को.]

माधव कंदली (इ. स. चे १४ वे किंवा १५ वे शतक) असमिया भाषेतील एक श्रेष्ठ कवी. या कवीचे चरित्र फारसे उपलब्ध नाही. हा सध्याच्या नौगांव जिल्ह्यातील असावा, असे माधवचंद्र वर्डलाय यांचे मत आहे. हा जातीने ब्राह्मण असून, याला कविराज अशी उपाधी होती. कंदली ही देखील एक उपाधीच असून, ती विद्वानांना, विशेषतः तार्किकांना दिली जात असे. यावरून माधव हा नैयायिक असावा असे वाटते. कवी स्वतःबद्दल सांगतो, ते असे –

कविराज कंदली ये आमके से बूलिकरा
माधव कंदली आरो नाम
सपोने सचिते मजि ज्ञान काय वाक्य मने
अहर्निशे चिंतो राम राम ।।

अर्थ – मला कविराज कंदली असे म्हणतात. माधव कंदली हे माझे दुसरे नाव होय. मी स्वप्नात, जागृतावस्थेत सदैव काया, वाचा, मने करून रामाचे चिंतन करीत असतो.

कवीने वराहीराजा महामाणिक्य याच्या आज्ञेवरून रामायणाचे असमिया भाषेत रूपांतर केले. हे करीत असताना त्याने जागोजाग वाल्मीकीविषयी आदर व्यक्त केला आहे. असे असूनही त्याने मूळ रामायणाचा शब्दशः अनुवाद केला नाही. याच्या रामायणातील आदिकांड व उत्तरकांड अनुपलब्ध आहेत. यामुळे काही पंडितांच्या मते याने केवळ पाचच कांडे रचली असावी. पण कवीच्याच काही पंक्तींचा आधार घेऊन काही अभ्यासक असे म्हणतात, की याने सातही कांडे रचली होती. मात्र ती उपलब्ध नाहीत. शंकरदेव याने उत्तरकांड व माधवदेव याने आदिकांड रचून हे रामायण पूर्ण केले आहे.

वाल्मीकीचा राम हा महामानवाच्या स्वरूपात चित्रित केला गेला असला, तरी माधवाने विष्णूचा अवतार म्हणूनच तो रेखाटला आहे. याच्या रामकथेवर अध्यात्म-रामायणाचा प्रभाव आहे, असेही म्हणतात. प्रस्तुत ग्रंथात आढळणारा भक्तियुक्त शृंगार हा महामाणिक्याच्या अनुरोधाचा परिणाम असावा. त्या शृंगाराचा एक नमुना असा –

प्रभू रामचंद्र सीतेला सोडून वनात जायला निघाले, तेव्हा सीता त्यांना विचारते –

कमन अंग मोक हिन देखिला हा ।
सि कारणे प्रभु मोक उपेक्षित या हा ।।
सूर्य अविहने येन नो शोभय दिन ।
रजनी नो शोभे येन शशधर हीन ।।
वसंत नो शोभे बिने कोकिलेर रोले ।
निष्फल जीवन प्रभू तुमि बिने कोले ।।

अर्थ – (हे रामा !) माझे कोणते अंग तुम्हाला हीन दिसले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

की ज्यामुळे तुम्ही मला इथे ठेवून वनात जाऊ इच्छिता ? ज्याप्रमाणे सूर्याशिवाय दिवस, चंद्राविना रात्र आणि कोकिळकूजिताविना वसंत शोभून दिसत नाही, त्याचप्रमाणे तुमच्या सान्निध्याविना माझे जीवन शोभणार नाही, ते व्यर्थ ठरेल.

याची भाषा ओजस्वी आणि शब्दरचना अलंकारिक आहे. युद्धवर्णने, निसर्गदृश्ये, अनेक मनोव्यापार आणि स्वभावचित्रे रेखाटण्यात याचा हातखंडा आहे. सीतेने उर्मिलेचे केलेले वर्णन म्हणजे याच्या भाषेच्या माधुर्याचा एक उत्तम नमुना आहे –

त्रैलोक्यमोहिनी कन्या महारूपवती ।
सुंदर नासिका दंत मुकुतार पांति ॥
मृणाल युगल बाहु कृश मध्यदेश ।
कमलनयनी आकुंचित केश ॥

अर्थ – ही कन्या मोठी सुंदर असून, त्रैलोक्याला मोहिनी घालणारी आहे. हिचे नाक सुंदर आणि दंतपंक्ती मोत्यांच्या सराप्रमाणे आहेत. हिचे दोन्ही हात कमलतंतूप्रमाणे असून, कटी कृश आहे. हिचे डोळे कमलाप्रमाण आणि केस कुरळे आहेत.

संकेतांच्या आणि शब्दांच्या माध्यमातून आपले व्यक्तिचित्र सजीव करण्याची कला याला चांगली अवगत आहे. या त्याच्या शब्दसृष्टीत आसामी जीवनाचे व निसर्गाचे प्रतिबिंबही आढळते.

आसामी लोकमानसात रामकथा रुजविण्याचे काम याच्या संस्कृतनिष्ठ भाषेने केले. माधवाच्या या बहुगुणी व्यक्तिमत्त्वावर प्रसन्न होऊनच शंकरदेवाने याचा पूर्वकवी अप्रमादी म्हणून गौरव केला आहे. माधवकंदलीच्या अनुकरणातून पुढे अनेक कवींच्या रामकथा असमिया भाषेत अवतरल्या. [आ. अ. आ. लि.; मै. गु. अ. ग्रं.; च. भा. नि.; हिं. वि. को.]

माधव घोष (इ. स. च्या १५ व्या १६ व्या शतकाचा सुमार) एक बंगाली भक्तकवी. हा चैतन्यमतानुयायी असून, चैतन्याचा परमभक्त होता. हा चांगला गायकही होता. याने चैतन्याच्या जीवनावर आणि राधाकृष्णांवर अनेक पदे रचली आहेत. चैतन्य-चरितामृत, चैतन्य-भागवत, वैष्णववंदना, इ. ग्रंथांमध्ये याचा सादर उल्लेख आढळतो. 'श्री माधव घोष मुख्य कीर्तनीया गणे' असा चैतन्य-चरितामृतात याचा गौरव केलेला आहे. त्यावरून हा एक नामांकित कीर्तनकार होता, असे दिसते. [चै. म. ब्र. सा.; हिं. बं. वै. क.; ब्र. सा.]

माधवदास (इ. स. १५४५ – १५९६) एक गुजराती संतकवी. याच्या पित्याचे नाव करवर्लसिंह आणि मातेचे नाव हिरलदेवी असे होते. माधवदास हा सिसोदिया राजपूत असून, तो सुरतेला राहत होता. या संतकवीसंबंधी एक दंतकथा सांगतात, ती अशी – याचे सजना नावाच्या एका वैश्यकन्येवर प्रेम होते. परंतु हिरलदेवीच्या उपदेशामुळे याच्या अंगी वैराग्य बाणून याने घर सोडले आणि समर्थदास नामक संताचे शिष्यत्व पत्करले. याची अनेक स्फुट पदे उपलब्ध आहेत. त्यांत कुंडलियाँ, सवैय्या, रेख्ते, इ. प्रकार आहेत. माधवदासाची वाणी ही व्यथित अंत:करणाची भाषा असून, ती हृदयस्पर्शी आहे. याच्या भाषेत अनेक फारसी शब्द आढळतात. [गु. सं. हिं. दे.]

माधवदेव (इ. स. १५१३ – १५९६) आसामातील एक वैष्णव संतकवी आणि शंकरदेवाच्या शरणधर्माचा प्रचारक. याच्या पित्याचे नाव गोविंदगिरी व मातेचे मनोरमा असे होते. त्या काळी कचारी आणि आहोम राजे यांच्यामध्ये सतत संघर्ष चालत असे. त्या अस्थिर परिस्थितीत कुटुंबपोषण करून सुखाने राहणे अशक्य झाल्यामुळे गोविंदगिरीने आपल्या गावाहून स्थलांतर केले. तो सारी संपत्ती घेऊन बायकोसह निघाला. पण दुर्दैवाने त्याची पाठ सोडली नव्हती. वाटेत त्याची सर्व संपत्ती चोरांनी लुटली. गोविंदगिरी पुरता कफल्लक बनला. नावेत बसून पलिकडे जायचे, तरी त्याच्या गाठीला नाणे उरले नाही. हरिसिंग बरा नावाच्या एका सुखवस्तू गृहस्थाने गोविंदगिरीची ही परिस्थिती पाहिली आणि त्याने गोविंदगिरीला केवळ नदीपारच केले नाही, तर त्या जोडप्याला आपल्या घरी आश्रयही दिला.

हरिसिंग बरा हा उत्तर लखीमपूर विभागातील नारायणपूरचा रहिवासी होता. तिथेच मनोरमेच्या पोटी माधवदेवाचा जन्म झाला. हरिसिंग बराच्या घरी बापाला आश्रिताचे जिणे जगावे लागत असल्याने माधवदेवाचे लहानपण कष्टातच गेले. एके दिवशी तर हरिसिंग बराच्या मुलाने गोविंदगिरीचा खूप अपमान केला. त्यामुळे त्या घरी राहणे गोविंदगिरीला असह्य झाले. तो आपला मुलगा, एक मुलगी आणि पत्नी यांच्यासह तिथून बाहेर पडला. अनेक गावे तो हिंडला, पण कुठेही त्याला स्थैर्य मिळाले नाही. अशा स्थितीत एका गावी त्याला घागरी माझी नावाचा त्याचा एक बालमित्र भेटला. त्याने गोविंदगिरीला आपल्या घरी नेले. पुढे किती तरी वर्षे गोविंदगिरी आपल्या कुटुंबासह त्याच्या घरी राहिला. गोविंदगिरीने त्याच ठिकाणी आपल्या मुलीचे लग्न केले. त्याच्या जावयाचे नाव गयापाणी तथा रामदास असे होते. त्याने सासुरवाडीच्या माणसांचा भार आपल्या शिरावर घेतला. गोविंदगिरीला त्यामुळे बरेच स्वास्थ्य लाभले. मग त्याला बांडुका या आपल्या जन्मगावची आठवण झाली. तो माधवदेवाला घेऊन तिकडे गेला. गोविंदगिरीची पत्नी जावयाकडेच राहिली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इतकी वर्षे माधवदेवाला शिक्षणाचा काही संस्कारच झाला नव्हता. बांडुका गावी त्याचे शिक्षण सुरू झाले. तो एका पाठशाळेत जाऊ लागला. तिथे त्याने संस्कृत भाषेचे अध्ययन केले आणि व्याकरण व न्याय ही शास्त्रे अभ्यासिली. पुराणे आणि भारत व भागवत हे ग्रंथही तो पढला. त्याने कायस्थांच्या वाणिज्य व्यवसायाचीही माहिती करून घेतली.

बांडुका येथेच गोविंदगिरीचा अंत झाला. त्याच्या मृत्यूनंतर माधवदेव आपल्या बहिणीच्या गावी धुवाहाट येथे परत आला. थोड्या दिवसांनी त्याची आई आजारी पडली. माधवदेवाचे घराणे मूळचे शाक्त होते. शाक्त संप्रदायाचे संस्कार माधवदेवाच्या मनावर झाले होते. त्यामुळे आई दुखण्यातून बरी व्हावी, म्हणून माधवदेवाने देवीला दोन पांढरे बकरे बळी देण्याचे ठरविले. पण त्याच्या बहिणीचा नवरा रामदास याला ती गोष्ट रुचली नाही.

त्याच सुमारास आसाममधील वैष्णव धर्माचा संस्थापक शंकरदेव हा त्या गावी येऊन राहिला होता. त्याच्या बरोबर त्याचे अनेक शिष्यही होते. रामदासानेही त्याचे शिष्यत्व पत्करले होते. माधवदेवाची ती बकरे बळी देण्याची कल्पना त्याने शंकरदेवाच्या कानी घातली आणि शंकरदेवाच्या सांगण्यावरून माधवदेवाला एके दिवशी शंकरापुढे आणले. त्या भेटीत शक्तिपूजा आणि वैष्णव उपासना या बाबतींत त्या दोघांमध्ये वाद झाला. त्या वादात उभयपक्षी आपापल्या विचारांचे समर्थन झाल्यावर, शंकरदेवाने शेवटी भागवतातला एक श्लोक विष्णूचे महत्त्व पटविण्यासाठी त्याला ऐकविला, तो असा–

यथा तरोर्मूलनिषेचनेन तृप्यन्ति तत्स्कन्धभुजोपशाखाः ।
प्राणोपहाराच्च यथेन्द्रियाणां तथैव सर्वार्हणमच्युतेज्या ॥

(भाग. पु. ४. ३१. १४.)

अर्थ – ज्याप्रमाणे वृक्षाचे मूळ शिंपल्याने त्याच्या सर्व फांद्या, डहाळ्या यांना तृप्ती मिळते, ज्याप्रमाणे प्राणांना उपहार दिल्याने सर्व इंद्रिये परितुष्ट होतात, त्याचप्रमाणे एका श्रीविष्णूची पूजा केल्याने सर्व देवांची पूजा केल्यासारखेच होते. म्हणजेच विष्णुपूजेने सर्व देव संतुष्ट होतात.

त्या श्लोकाने चमत्कार घडवून आणला. माधवदेवाला श्रीविष्णूचे महत्त्व प्रतीत झाले; त्याचबरोबर शंकरदेवाचा भक्तीच्या क्षेत्रातला अधिकारही कळून चुकला. माधवदेव त्याच क्षणी शंकरदेवाला शरण गेला. दुसऱ्याच दिवशी शंकरदेवाने त्याला आपल्या एकशरण नामक धर्माची दीक्षा दिली. माधवदेव शंकरदेवाचा शिष्यच बनला नाही; तर त्याने त्याच्या धर्माचा प्रचार करण्याचे कंकणच हाती बांधले. त्याने केवळ त्रैवर्णिकांतच नव्हे, तर त्या काळी वर्णबाह्य असलेल्या गारो, भोट, इ. आदिवासी जमातींतही वैष्णव धर्माचे बीज रुजवले आणि त्या धर्माच्या अनुषंगाने त्यांना हिंदुधर्माच्या कक्षेत आणले. तो धर्मकार्यासाठी आमरण ब्रह्मचारीच राहिला. गुरूने त्याला गृहस्थाश्रम स्वीकारण्याविषयी अनेकवार गळ घातली; पण गुरूची तेवढी एकच गोष्ट त्याने मानली नाही. त्याने अनेक नैष्ठिक ब्रह्मचारी शिष्यही आपल्या भोवती गोळा केले. त्याने गुरुसेवाही उत्तम प्रकारे केली. शंकरदेवाने दोन तीर्थयात्रा केल्या, त्यांत माधवदेवही गुरूबरोबर राहिला. गुरूच्या सहवासात राहूनही त्याचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कधीच झाकोळले नाही. गुरूने आपल्या अंतकाळी त्यालाच आपल्या संप्रदायाचा उत्तराधिकारी नेमले.

संप्रदाय वाढविण्याच्या कामी माधवदेवाला अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. ज्या कोच राजांच्या राज्यात तो आपल्या धर्माचा प्रचार करीत होता, त्या राज्यातले ब्राह्मण शाक्तपंथी होते. कोच राजेही शाक्तच होते. त्या ब्राह्मणांनी राजाकडे गाऱ्हाणे नेले, की माधवदेव शक्तिपूजेची निंदा-नालस्ती करून राज्यात वैष्णव धर्म वाढवतो आहे. कोच राजा रघुदेव याला ती गोष्ट आवडली नाही. त्याने शिपाई पाठवून माधवदेवाला पकडून आणले. पण का कोण जाणे, माधवदेवाचे दर्शन होताच रघुदेवाचा राग मावळला. त्याने त्याला कैदेत ठेवले पण सन्मानाने वागवले. काही दिवसांनी तो सुटला. पुन्हा काही दिवसांनी राजाचे कान फुंकले गेले. हाजो येथील हयग्रीवाच्या मंदिरात माधवदेवाने आपले प्रचारकेंद्र निर्माण केले होते. रघुदेवाने ते स्थान त्याला सोडायला लावले. या सगळ्या प्रत्यवायांनी माधवदेवाचे मन विषण्ण झाले. त्याने रघुदेवाचे राज्य सोडायचे ठरविले. तो संकोश नदी पार करून कुचबिहारच्या लक्ष्मीनारायण राजाच्या राज्यात आला. त्या राजाने त्याचे अत्यंत प्रेमादराने स्वागत केले. माधवदेवाने आपले उर्वरित आयुष्य कुचबिहारमध्येच घालवले. तो काळ त्याला अत्यंत शांततेचा आणि सुखासमाधानाचा गेला. आपला नामघोषा हा ग्रंथ त्याने त्या काळात आणि त्याच ठिकाणी पुरा केला.

नामघोषा हा ग्रंथ असमिया साहित्यात आणि वैष्णव धर्मात अजरामर ठरला आहे. त्याला गीता आणि उपनिषदे यांच्या तोडीचा दार्शनिक ग्रंथ मानतात. आसाममध्ये वैष्णव धर्माची वाढ होण्यास या ग्रंथाचा फार उपयोग झाला. माधवदेवाने या ग्रंथात संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि आचार यांना निश्चित रूप दिले आहे व नामधर्माचे महत्त्वही वर्णिले आहे. प्रस्तुत ग्रंथ सुमारे १००० पद्यांचा आहे. ही संपूर्ण रचना मौलिक नाही. त्यातील अर्धी पदे संस्कृतातून अनुवादिलेली असून, अर्धी रचना स्वतंत्र आहे. भाव, भाषा आणि शैली या तीन्ही दृष्टींनी प्रस्तुत ग्रंथ मधुर आणि दर्जेदार उतरला आहे. त्यात पदोपदी दास्यभक्ती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आविष्कार दिसतो. त्यातला एक नमुना असा –

मोर सम पापी लोक नहि के इ तिन लोक
तुमि सम नहि पापहारी
हरि ओ हरि करुणासागर, करियो कृपा आमाक
प्रियतम आत्मा सखा इष्ट गुरू मानिया आछो तोमाक
चरणत धरो कातर करो हो इवार नेरिबा मोक

भावार्थ – माझ्यासारखा पापी आणि तुझ्यासारखा पापहारक त्रैलोक्यात दुसरा सापडायचा नाही. हे करुणासागरा, तू माझ्यावर कृपा कर. माझा प्रियतम आत्मा, सखा, मित्र, गुरु, तूच ! मी तुझे चरण धरीत आहे. मला तू मोकलू नकोस.

माधवदेव हा केवळ कवीच नव्हता, तर गायकही होता. छंदःशास्त्रावर त्याचा पूर्ण अधिकार होता. तो आपली गीते मधुर स्वराने गात असे आणि श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत असे. त्याच्या या गीतांना बडगीते म्हणतात. त्यांतला एक नमुना असा –

भयो भाइ सावधान । येवे नहिं छुटे प्राण ।।
गोविन्दर फर मान । निकटे मिलय जान ।।
जीवन यौवन थोड । सब मायामय छोड ।।
दुख सब करू थोड । हरि पदे मन जोड ।
तेजु सब अभिलाष । दूर करू मोहपाश ।।
हरि पदे करू पाश । कहय माधवदास ।।

भावार्थ – भाई सावधान ! प्राण गेला की परत येणार नाही. गोविंदाची भक्ती कर. आयुष्य त्याला जडव. हे जीवन, हे यौवन अल्प आहे. सर्व मायामय आहे. हे सारे सोडून दे. हरिपदी मन जडव, म्हणजे तुझे दुःख हलके होईल. सर्व अभिलाषांचा त्याग कर, मोहपाश दूर कर आणि हरीचे पाय धर, असे तुला माधवदासाचे सांगणे आहे.

आपला भक्तिपंथ आबाल–वृद्धांच्या मनात रुजावा, वाढावा म्हणून त्याने काही एकांकी नाटकेही लिहिली आणि त्यांचे प्रयोगही केले. या नाटिकांमधून त्याने कृष्णाच्या बाललीला चित्रित केल्या. जन्मरहस्यग्रंथात त्याने सृष्टीचे उत्पत्तिस्थितिलय वर्णिले. राजसूययज्ञ या ग्रंथात त्याने भगवान श्रीकृष्ण हा सर्वश्रेष्ठ देव असल्याचे सिद्ध केले. गुरूच्या आज्ञेवरून त्याने कीर्तनघोषा नावाचा ग्रंथ संकलित केला. हा गीतग्रंथ शंकरदेव आणि माधवदेव या दोघांची पद्यरचना एकत्र करून निर्मिलेला आहे. असमिया वैष्णवांचा तो उपासनेचा ग्रंथ आहे. आसामातले अशिक्षित खेडूतही कीर्तनघोषेतली पदे आवडीने गातात. याव्यतिरिक्त इतरही अनेक लहानमोठे ग्रंथ त्याने निर्मिले. सांप्रत आसामी वैष्णव कीर्तनासाठी आणि उपासनेसाठी त्याच्या ग्रंथांचा उपयोग करतात. त्याच्या साहित्याने शरणिया दास्यभक्ती मधुर झाली आहे. माधवदेवाने आत्मसमर्पणाविषयी जे सिद्धान्त मांडले आणि पंथात प्रसृत केले, ते थोडक्यात असे –

कृष्ण हा दयाशील देव आहे. तो भक्तांचा प्राणबांधव आहे. आपल्या भक्तावर तो चरणच्छत्राची छाया धरतो. म्हणून त्याला सर्वभावे शरण जावे.

त्याने आपल्या नामघोषेत स्वतःला अनेक ठिकाणी मुरुख म्हटलेले आहे. मुरुख म्हणजे मूर्ख. त्याचा अर्थ केवळ आत्मनिंदा किंवा आत्मोपहास असा नाही. या शब्दाने त्याने आपल्याला ज्ञानाविषयी कदर नसल्याचे आणि केवळ आत्मोद्धारासाठी भक्तीच पुरेशी असल्याचे सूचित केले आहे.

शंकरदेव आणि माधवदेव या गुरुशिष्यांना कृष्ण आणि उद्धव यांचे अवतार मानतात. शंकरदेवाने माधवदेवाच्या मुखानेच आपला वैष्णव संप्रदाय प्रभावित आणि प्रचारित केला. माधवदेवाने आपल्या अंगीच्या अनेक गुणविशेषांमुळे त्या पंथात आपले नाव सर्वतोमुखी केले. त्या पंथातले त्याचे स्थान आजवरही अढळ राहिलेले आहे. आसामसारख्या भारताच्या सीमावर्ती प्रदेशातील असंख्य जनांना वैष्णव धर्मात समाविष्ट करून त्याने त्यांना भारताच्या संस्कृतीशी एकरूप करून टाकले. [आ. अ. आ. लि.; लो. नी.; हिं. वि. को.; च. भा. नि.]

माधवनाथ महाराज

(१८५७–१९३६ इ. स.) एक नाथसंप्रदायी सिद्ध पुरुष. नासिक जिल्ह्यात सिन्नर तालुक्यात पांगरी वुद्रुक नावाचे एक गाव आहे. इथला ब्रह्मगिरी नामक पुरुष हा याच्या घराण्याचा मूळ पुरुष होय. हे घराणे शुक्ल यजुर्वेदी असून, रत्नपारखी असे याचे आडनाव होते. मल्हारदादा व मथुराबाई या धर्मप्रवण दांपत्याच्या पोटी माधवनाथाचा जन्म झाला. त्याच्या जन्मानंतर लवकरच मल्हारदादा मृत्यू पावले.

माधवाची बुद्धी अत्यंत कुशाग्र होती आणि मन भक्तिप्रवण होते. हे पाहूनच वयाच्या दहाव्या वर्षी त्याला करवीच्या विश्वनाथ महाराजांच्या गादीवर बसवण्यात आले. गुरूच्या अनुग्रहाने त्याला गूढ शक्ती प्राप्त झाली आणि तो विदेहावस्थेत राहू लागला.

तेरा वर्षांच्या माधवाने आसेतुहिमाचल यात्रा केली व सहा वर्षे हिमालयात तपश्चर्या केली. नंतर तो करवीला आला.

माधवाने अनेक चमत्कार करून दाखविले होते. त्यामुळे अनेकांची त्याच्यावर श्रद्धा बसली. आणि माधवाचे माधवनाथ महाराज झाले. याचा शिष्यसंप्रदायही फार मोठा होता. बंकिमचंद्र सेन हे याचेच शिष्य होत. माधवनाथ महाराजांना गायन आणि चित्रकला या गोष्टी चांगल्या अवगत होत्या.

माधवनाथ महाराजांनी अनेक ठिकाणी मंदिरे बांधविली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

औरंगाबाद जिल्ह्यातील देवगावचे लक्ष्मी-व्यंकटेशमंदिर, जळगाव जिल्ह्याच्या थोर गव्हाण गावचे नाथमंदिर, इंदूरचे नाथमंदिर, धारचे सत्यनारायणमंदिर; याशिवाय शिराळे, नांदगाव, काशी, इ. ठिकाणी अनेक लहान-मोठी मंदिरे त्यांनीच उभारली. अखेर हिंगणघाट इथे त्यांनी देहत्याग केला. [माधवनाथ महाराज— पुरुषार्थ, जून-जुलै, १९६४]

माधवभट्ट या नावाचे अनेक भाष्यकार आढळतात. ऋग्वेदावरच्या चार भाष्यकारांची नावे माधवभट्ट अशी होती, असे आतापर्यंत आढळून आले आहे. या चारांतला एक सामसंहितेचाही भाष्यकार आहे. ऋग्वेदभाष्यकारांपैकी एक माधव सायणाचार्यांचा थोरला बंधू होता. दुसरा भाष्यकार वेंकटमाधव होय. त्याचा निर्देश अनेक प्राचीन भाष्यांमध्ये मिळतो. तिसऱ्या माधवाने ऋग्वेदाच्या पहिल्या अष्टकावर टीका लिहिली आहे. [वै. सा. सं.]

माधवसुत (इ. स. चे १८ वे शतक) एक संतकवी. हा तिरुवेळंदूरच्या माधवस्वामीचा मुलगा होय. तिरुवेळंदूर हे गाव तंजाऊरपासून सुमारे पस्तीस मैल दूर आहे. माधवसुताचे मूळ नाव रामपंडित असून, तो माधवनंदन या नावानेही प्रसिद्ध आहे. याची हरिवंशावर विशाल टीका आहे. या ग्रंथाची ओवीसंख्या ३०,८२० इतकी आहे. हा ग्रंथ त्याने तीन वर्षांत पुरा केला. याव्यतिरिक्त याची भागवताच्या दशमस्कंधावरही टीका आहे. तिची ओवीसंख्या १०,८५५ इतकी आहे. याने हरिवंशाच्या प्रारंभीच माधवस्वामीला नमन करताना म्हटले आहे—

त्या ईश्वरानुग्रहे अचार । कवनबोध चालिला सैरार ।
जैसा भागीरथीचा थोर । लोट धांवे अलोट तेणें परी ॥
ज्याच्या कवित्वासि बसे खरडा । नाही बळिहरणाचा पसरडा ।
सर्वांसि कळेसा अर्थ उघडा । चाले धवपडा वाचक जेथें ॥
सुलभ असोनी बहुसाळ । जे अमृताहूनहि रसाळ ।
नित्यनूतन अबाळगोपाळ । थोर थोर भूपाळ ऐकतीजे ॥

यावरून माधवसुताची अनन्य पितृभक्ती कळून येते. माधवसुताची भाषा शब्दापेक्षा अर्थाकडे अधिक लक्ष देणारी आहे. [म. सा.; नवभारत, जानेवारी, सप्टेंबर, डिसेंबर १९६०]

माधवस्वामी (इ. स. च्या १७व्या शतकाचा उत्तरार्ध व १८ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक मराठी संतकवी. याच्या चरित्रासंबंधी अभ्यासकांत भरपूर मतभेद आहेत. याच्या उपलब्ध चरित्राची स्थूल रूपरेषा अशी—

संत एकनाथांची उमा नावाची एक मुलगी तंजाऊर भागातील कोण्या नागनाथाला दिली होती. हेच माधवस्वामीचे माता-पिता होत. तंजाऊरजवळील कोनूर मठाचे अधिपती राघवस्वामी हे याचे गुरू होत.

माधवस्वामी गृहस्थाश्रमी असून, याला रामपंडित व कृष्णपंडित असे दोन मुलगे होते. या दोघांनीही विपुल काव्यरचना केली आहे. माधवास्वमीचा नातू वासुदेव पंडित, नातसून मीनाक्षीअम्मा पणतू अंबाजी यांचीही काव्यरचना चांगली आहे.

वर दिलेल्या नातेसंबंधावरून मुक्तेश्वर हा माधवस्वामीचा मावसभाऊ म्हणायला हवा. सारांश माधवस्वामीचा वंश हा संत एकनाथांचा दौहित्रक वंश ठरतो. माधवस्वामी हा समर्थ रामदासांचा प्रशिष्य होय. मात्र याविषयी अस्तिनास्तिपक्षी मतभेद बरेच आहेत.

व्यंकोजीनंतर तंजाऊरच्या गादीवर आलेला त्याचा मुलगा शहाजी हा माधवस्वामीचा शिष्य होता, असे दिसते. याचे बहुतेक सारे आयुष्य तिरुवेळंदूर या गावी गेले. हा गाव तंजाऊरपासून सुमारे ३५ मैल दूर असून, दक्षिण लोहमार्गाच्या मायावरम नामक स्टेशनपासून दोन मल आहे. माधवस्वामीने त्रिवंदूर म्हणून या गावाचा उल्लेख केला आहे. त्याने इथे एक राममंदिर बांधले होते. या मंदिरातच त्याने आपली सर्व ग्रंथरचना केली असावी.

माधवस्वामीने विपुल ग्रंथरचना केली आहे. याच्या वाङ्मयाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करतात—(१) वेदान्तविषयक (२) पौराणिक (३) महाकाव्य आणि (४) नाटककथा.

वेदान्तविभागात अनुगीता, भगवद्गीता व योगवासिष्ठ हे तीन प्रमुख ग्रंथ येतात. हे सर्व ग्रंथ ओवी छंदात असून, त्यांतील पहिले दोन ग्रंथ अनुवादात्मक आहेत.

पौराणिक विभागात प्रल्हादचरित्र, सीतास्वयंवर, मल्लारिमाहात्म्य, रामहास्यवदन, गणेश पुराण, विष्णू पुराण, इ. रचना येते. यांतील गणेश पुराण उत्तरखंड असून, विष्णू पुराणाची ओवीसंख्या सुमारे साडे आठ हजारांवर आहे.

महाकाव्य या प्रकारात रामायण आणि महाभारत अशी दोन महाकाव्ये मोडतात. पकी रामायणे दोन आहेत. एक लघु आणि श्लोकबद्ध व दुसरे विशाल आणि ओवीबद्ध. संक्षिप्त रामायण अपूर्ण असून, ते युद्धकांडापर्यंतच रचलेले आहे. ओवीबद्ध रामायण हे सप्तकांडात्मक असून, अतिप्रचंड आहे. याची ओवीसंख्या १८,९७५ इतकी आहे. याची सात कांडे २२० प्रसंगांमध्य विभागली आहेत. अयोध्या कांडात प्रजेच्या रामभक्तीच्या अंतरंगाचे वर्णन कवीने केले आहे, ते असे—

राम विश्राम जीवाचा । राम जप हा शिवाचा ।
राम वैरी भवाचा । तारक भक्तांसी ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राम निरंतर पडो दृष्टी । रामासीच सांगो गुह्य गोष्टी ।
राम सुखे सकळ सृष्टी । आनंदमय ।।
जिव्हे करी रामजप । मना स्मर रामरूप ।।
वासने न धरी संकल्प । रामावांचुनी ।
जागृति स्वप्न रात्रि दिवस । सर्वदा लागो रामध्यास ।।
ऐसे सकळ जनाचे मानस । चिंती निरंतर ।।

विस्ताराच्या दृष्टीने याची भारतरचना सर्वांत मोठी आहे. भारताची अध्यायसंख्या ९२४ असून, ओवीसंख्या सुमारे ८८,२७४ इतकी आहे.

प्रबोधचंद्रोदय या संस्कृत नाटकाच्या आधारे एक ओवीबद्ध नाटचकथा याने रचली आहे. या प्रकरणातील भाषाशैली व रूपकपद्धती हृदयंगम आहे.

कवीची भाषा साधी पण सुडौल आहे, वर्णने सूक्ष्म आहेत, आणि स्वभावचित्रे ठसठशीत आहेत. [म. सा.; माधवस्वामीकृत योगवासिष्ठ भाग १, संपा.–शं. गो. तुळपुळे, १९५८; मुक्तेश्वरकृत महाभारत, विराटपर्व, संपा. – द. सी. पंगु, १९६५; नवभारत, जानेवारी, एप्रिल, सप्टेंबर, डिसेंबर, १९६०]

माधवाचार्य

(१) (इ. स. चे १४ वे शतक) एक महापंडित व भाष्यकार. याच्या आईचे नाव श्रीमती व बापाचे मायण होते. सायण व भोगनाथ हे याचे धाकटे बंधू होत. हा यजुर्वेदाच्या बौधायन सूत्राचा व भारद्वाज कुलातला होता. भारतीतीर्थ, विद्यातीर्थ व श्रीकंठ असे याचे तीन गुरू होते. विजयनगरच्या बुक्क राजाचा हा अमात्य होता.

बुक्क राजा हा वैदिकवाङ्मयाचा चाहता होता. त्याला वाटले, की वेद हे अर्थज्ञानास अत्यंत कठीण आहेत; त्यांच्यावर भाष्य झाले तरच ते सुगम होतील. ही कल्पना त्याच्या मनात बळावली आणि त्याने माधवाचार्याला भाष्यरचनेची प्रेरणा दिली. माधवाचार्य त्या कामाला लागला. चारही वेदांत ऋग्वेदाचा क्रमांक पहिला असला तरी, माधवाचार्याने प्रथम यजुर्वेदावरचे भाष्य सुरू केले. ऋग्वेदभाष्याच्या प्रस्तावनेत त्याचे कारण सांगताना तो म्हणतो की, ' यज्ञात अध्वर्यूंच्या कार्याला प्राधान्य असल्यामुळे प्रथम यजुर्वेदाचे व्याख्यान करून, नंतर होत्याच्या कार्यासाठी ऋग्वेदाचे भाष्य आरंभिले आहे. ' त्याने आपल्या या भाष्यांना ' माधवीय वेदार्थप्रकाश ' असे नाव ठेवले.

पण वेदभाष्याचा आरंभच फक्त माधवाचार्याने केलेला आहे. ज्या वेळी माधवाचार्य भाष्यरचनेस प्रवृत्त झाला, तेव्हा त्याचा धाकटा भाऊ सायण हा पुरुषार्थ सुधानिधी नावाचा धर्मशास्त्रविषयक ग्रंथ लिहिण्यात गुंतलेला होता. तो ग्रंथ पुरा झाल्यावर माधवाचार्याने आपण आरंभलेले वेदभाष्याचे काम त्याच्याकडे सोपविले. सायणाने चारही वेदांवरील भाष्ये पुरी केली; मात्र त्या भाष्यांना स्वतःचे नाव न देता, त्याने माधवीय वेदार्थप्रकाश असे वडिलबंधूचेच नाव कायम ठेवले. दुसरे एक मत असे आहे की, भाष्यरचनेला प्रारंभ केल्यावर थोडयाच कालात माधवाचार्य मृत्यू पावला. त्यानंतर त्याचे कार्य पुरे करण्याबद्दल बुक्करायाने सायणाला आज्ञा दिली आणि त्याच्याकडून ते काम पुरे करून घेतले.

माधवचार्याने धर्मशास्त्रविषयक पुढील ग्रंथ लिहिले आहेत– (१) पराशरमाधव (२) कालमाधव (३) दत्तकमीमांसा (४) गोत्रप्रवरनिर्णय (५) मुहूर्तमाधव (६) स्मृतिसंग्रह व (७) व्रात्यस्तोमपद्धती.

पराशरमाधव हा ग्रंथ म्हणजे माधवचार्याच्या अलौकिक विद्वत्तेचे, गंभीर चिंतनाचे आणि अप्रतिम मेधाशक्तीचे जाज्वल्य उदाहरण आहे. धर्मशास्त्रात या एकाच ग्रंथाने त्याचे नाव अमर झाले आहे. वस्तुतः हा स्वतंत्र ग्रंथ नसून पराशरस्मृतीचे ते भाष्य आहे. पण त्यात केलेल्या सांगोपांग विषयविवेचनामुळे त्याला स्वतंत्र ग्रंथाची योग्यता प्राप्त झाली आहे. कालमाधव हा ग्रंथ कालनिर्णयाच्या कामी उपयुक्त ठरला आहे. त्यात वर्षकल्पना, वर्षभेद, तिथी व कालकल्पनेचे तत्त्वज्ञान यांचे विवरण केलेले आहे.

मंडनमिश्रशास्त्री यांनी मीमांसादर्शन नावाचा एक ग्रंथ हिंदी भाषेत लिहिला आहे. त्यात त्यांनी माधवाचार्याच्या न्यायमाला नामक आणखी एका ग्रंथाचे विवरण दिले आहे. माधवाचार्याच्या पूर्वी पार्थसारथीने शास्त्रदीपिका नावाचा मीमांसेवर एक ग्रंथ लिहिला होता; पण तो ग्रंथ क्लिष्ट आहे आणि त्यामुळेच अभ्यासकांना दुर्बोध आहे. हे ध्यानी आणून माधवचार्याने न्यायमालेची रचना केली. त्याचा हा ग्रंथ सरळ, सुगम आणि श्लोकबद्ध आहे. त्याने त्यात एकाच अधिकरणाच्या तीन चार पद्यांत भट्ट व प्रभाकर या मीमांसेतील दोन्ही परंपरांच्या सिद्धान्तांचा सूक्ष्म परिचय करून दिला आहे. हा पद्यमय ग्रंथ पाहून बुक्कराय परमसंतुष्ट झाला आणि त्याने माधवाचार्याला त्याचेच गद्यात विस्तृत व्याख्यान करण्याची आज्ञा दिली. माधवाचार्याने तीही गोष्ट पुरी केली. ' मीमांसारूपी सागराला मी पुष्करिणी बनवीन ' अशी ग्रंथाच्या प्रारंभी त्याने प्रतिज्ञा केली होती. ती प्रतिज्ञा पूर्ण करण्यात तो यशस्वी ठरला.

' सर्वज्ञः स हि माधवः ' अशी माधवाचार्याविषयी विद्वदुक्ती आहे. पण तो केवळ विद्यापारंगत होता असे नव्हे, तर त्याचे आचरणही शुद्ध, निर्मळ आणि श्रुति-स्मृतींना अनुसरून होते.

आयुष्याच्या अखेरीस याने संन्यास ग्रहण करून विद्यारण्य हे नाव धारण केले. [मी. द.; आ. सं. मू.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(२) (इ. स. चे.१४ वे शतके) एक दार्शनिक विद्वान. याने सर्वदर्शनसंग्रह नावाचा एक ग्रंथ लिहिला असून, तो दार्शनिक वाङ्मयाच्या इतिहासात महत्त्वाचा ठरला आहे. याने त्यात क्रमाने चार्वाक, बौद्ध, आर्हत, रामानुज, पूर्णप्रज्ञ, नकुलीश पाशुपत, शैव, प्रत्यभिज्ञा, रसेश्वर, औलुक्य, अक्षपाद, जैमिनीय, पाणिनी, सांख्य व पातंजल अशा आस्तिक व नास्तिक मिळून १५ दर्शनांचे विवेचन केले आहे. हा एकच ग्रंथ पढल्याने वरील १५ दर्शनांच्या अनेक ग्रंथांचे सारसर्वस्व हाती येते.

हा ग्रंथही बुक्करायाचा अमात्य व धर्मशास्त्रकार असलेल्या अर्थात थोरल्या माधवाचार्यांच्या नावावर आजपर्यंत मोडत होता; पण आता ती शंका फिटली आहे. सायणाचार्यांच्या पुत्राचे नावही माधव असेच होते. सदर ग्रंथातील पहिल्या दर्शनाच्या शेवटी 'इति सायणमाधवीये सर्वदर्शनसंग्रहे' अशी पुष्पिका आहे. त्यावरूनही तो सायणपुत्र होता हे सिद्ध होते. याव्यतिरिक्त ग्रंथाच्या मंगलाचरणात तो स्वतःबद्दल 'श्रीमत्सायणदुग्धाब्धिकौस्तुभेन महौजसा'=सायण नावाच्या, क्षीरसमुद्रापासून उत्पन्न झालेला महातेजस्वी, कौस्तुभमणी असा स्वतःबद्दल उल्लेख करतो. [म. च. को.; सर्वदर्शनसंग्रहः]

माधवेंद्रपुरी (इ. स. चे १५ वे शतक) एक माध्वमतानुयायी आचार्य. याच्या चरित्रासंबंधी वरेच मतभेद आहेत. काहींच्या मते याचा जन्म दक्षिणेत झाला, तर काहींच्या मते तो बंगालमधील सिल्हेट जिल्ह्याच्या पूर्णीपत या गावी झाला. कलकत्त्यानजिकच्या विष्णुपूर नामक गावी तो वसती करून राहिला होता एवढे खरे! याने आपल्या मुलाला आपला शिष्य अद्वैताचार्य याच्या स्वाधीन केले आणि तो यात्रेला निघाला. काशीला याचा मुक्काम असता केशवपुरी नामक याच्या ज्येष्ठ बंधूने व वल्लभ नामक व्यक्तीने याचे शिष्यत्व पत्करले.

लक्ष्मीपती हे याचे गुरू होत. त्यांच्याकडून दीक्षा घेतल्यावर हा काही काळ उडुपीला राहिला. नंतर पुनश्च यात्रा करीत वृंदावनाला पोचला. तिथे याला एक स्वप्नदृष्टान्त झाला. त्या दृष्टान्तानुसार याने गोपाळाची मूर्ती शोधून काढून तिची प्रतिष्ठा केली. या मूर्तीसाठी एका धनिकाने चांगले मंदिरही बांधून दिले. पुढे तो रैमुन या गावी कायमच्या वास्तव्याला गेला.

माधवेंद्रपुरी हा सर्व शास्त्रांचा ज्ञाता आणि भक्त असा संन्यासी होता. मुसलमानी वर्चस्वाच्या काळात याने निर्भयपणे कृष्णपूजेचा प्रचार केला, हे याचे मोठे कार्य समजतात. कृष्णभक्तीचा व्यापक प्रचार चैतन्यमहाप्रभूंने केला असला, तरी त्याला अनुकूल असे वातावरण यानेच निर्माण केले होते. चैतन्य संप्रदायात राधा-कृष्णांच्या भक्तीला महत्त्वाचे स्थान आहे. राधा-कृष्णभक्तीचा मूल प्रेरक हाच होय. याचा शिष्यसमुदायही मोठा होता. त्यात नित्यानंद, ईश्वरपुरी, इ. श्रेष्ठ भक्त होते. [चै. म. व्र. सा.; व्र. सां. इ.; हिं. वि. को.; भा. सं.; एच. वेदांतशास्त्री– स. पे., ऑ. इं. ओ. कॉं., १९५१]

माधवेश्वर एक प्राचीन शिवस्थान. हे मंदिर महाराष्ट्रातल्या नगर जिल्ह्यातील गंजिभोर या गावी आहे. हे द्विगर्भ देवालय असून, मंडपाच्या पश्चिमेला व पूर्वेला समोरासमोर तोंड करून दोन गर्भगृहे आहेत. पश्चिमेकडील गाभारा मंडपाच्या पातळीत असून, त्यात एका चवथऱ्यावर लक्ष्मी-माधवाची एक प्राचीन मूर्ती आहे. या मंडपाच्या बाहेरच्या ओसरीवरील दोन टोकांच्या दोन कोनाड्यांत विष्णूच्या मूर्ती आहेत. पूर्वेकडील गाभारा खोल असून, त्यात शिवलिंग आहे. या गाभाऱ्याला पूर्वेच्या बाजूला एक दार असून, त्यावर गणेशमूर्ती आहे. समोर एक नंदीमंडप आहे. मुख्य मंडपाची रचना साधी असून, त्याच्या मध्यभागी चार खांब आहेत. [भां. नाईक– न्यू इं. अॅ., जुलै ते डिसें. १९४७]

माधुकरी एक वृत्ती. दुपारच्या वेळी घरोघरी जाऊन शिजलेल्या अन्नाची भिक्षा मागणे याला माधुकरी असे म्हणतात. ही वृत्ती विद्यार्थ्यांसाठी प्रशस्त मानलेली आहे. विद्यार्थ्याने दारात जाऊन गृहिणीकडे माधुकरी मागायची तर "ॐ भवति भिक्षां देहि" असे म्हणावे व पुरुषाकडे मागायची असल्यास "ॐ भवान् भिक्षां ददातु" असे म्हणावे, असे सांगितले आहे. पूर्वी ज्या ज्या गावी पाठशाळा असत, त्या त्या गावी गरीब विद्यार्थी माधुकरीसाठी गृहस्थांच्या घरी जात. गृहस्थही अशा विद्यार्थ्यांना माधुकरी घालणे हे आपले कर्तव्य समजत. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ व्हायला आणि विद्यापरंपरा जित्या-जागत्या ठेवायला या माधुकरीची मोलाची मदत झालेली आहे. जुन्या काळी 'मी माधुकरी मागून शिकलो' असे कित्येक विद्वान अभिमानाने सांगत. माधुकरी मागून शिकणे ही लज्जेची बाब नसून गौरवाची होती.

माधुरीदास (इ. स. चे १७ वे शतक) एक चैतन्यमतानुयायी भक्तकवी. हा कपूर खत्री असून, वृंदावनात राहत होता. रूपगोस्वामी हा याचा गुरू असल्याचे सांगतात. याची समग्र काव्यरचना श्रीमाधुरीवाणी या नावाने प्रकाशित झालेली आहे. उत्कंठामाधुरी, वंशीधरमाधुरी, केलीमाधुरी, मानमाधुरी व प्रियाजीकी बधाई असे या काव्याचे विषयानुरूप

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्गीकरण केलेले आहे. हे काव्य कवित्त, सव्वैया, चौपाई, छप्पय, दोहा, सोरठ, इ. छंदांत आहे. माधुरीदासाची भाषा सरस व प्रवाही आहे. [ब्र. कृ. मा. भ.; चै. म. ब्र. सा.]

माधौदास (इ. स. चे १७ वे शतक) एक राजस्थानी संत-कवी. हा दधवाडिया गोत्राचा चारण असून, चूंडाचा मुलगा होता. याच्या जन्मस्थानासंबंधी अचूक माहिती मिळत नाही. परंतु लोकसमजूत अशी आहे, की पूर्वीच्या जोधपूर राज्यातील वलूंदा नामक गावी याचा जन्म झाला. माधौदास एक वीरपुरुष म्हणून लोकांना परिचित आहे. एकदा हा घरात नाही, असे पाहून काही मुसलमानांनी याच्या गायी पळविल्या. घरी परतल्यावर त्याला ही घटना समजली, तेव्हा त्याने मुलाला बरोबर घेऊन त्या मुसलमानांचा पाठलाग केला. नंतर त्यांच्यांत मोठी लढाई झाली आणि तिच्यात माधौदास मारला गेला.

हा जोधपूरचे महाराज सूरसिंह यांच्या आश्रयाला होता. याने रामरासौ व भाषादसमस्कंध नामक दोन ग्रंथ रचले आहेत. त्यांपैकी दसमस्कंध हा ग्रंथ उपलब्ध नाही. रामरासौ ग्रंथात रामकथा वर्णिली आहे. त्याचे सोळाशेहून अधिक छंद आहेत. या ग्रंथाची भाषा डिंगल आहे. [रा. भा. सा.]

माध्यंदिन (१) शुक्लयजुर्वेदाची एक शाखा. मध्यंदिन ऋषीने प्रणीत केल्यामुळे हिला हे नाव मिळाले आहे. मध्यंदिन ऋषीचे चरित्र उपलब्ध नाही. कळते ते एवढेच की तो याज्ञवल्क्याचा शिष्य होता. माध्यंदिनांच्या संहितेला वाजसनेयी असे म्हणतात. पंधरा वाजसनेय शाखांमध्ये माध्यंदिन शाखेला मुख्य व सर्वसाधारण असे म्हटले आहे. जाबाल, इ. अन्य शाखा या शाखेच्या आधारावरच बनल्या आहेत.

(२) ब्राह्मणांतली एक पोटजात. या ब्राह्मणांविषयी मो. वि. पटवर्धन यांनी माहिती दिली आहे, ती अशी — हे राजपुरोहित ब्राह्मण राष्ट्रिक, वैराष्ट्रिक व महाराष्ट्रिक क्षत्रियांबरोबर बुद्धकालात दक्षिणेकडे आले. त्यांची पहिली वस्ती मुख्यत्वे गोदावरीच्या काठी झाली होती. पुढे मुसलमानी राजवटीतल्या जुलमामुळे ते तिथून पांगले व देवगिरी, उत्तर कोकण, पैठण, नगर, पुणतांबे, कोल्हापूर इथपासून खाली दक्षिणेस तंजाऊरपर्यंत पसरले. सामान्यतः माध्यंदिनांचे दोनभाग पडलेले दिसतात.

मुख्य भाग नासिक, बागलाण, नगर, खानदेश, विदर्भ व मध्य प्रदेश या भूप्रदेशात आहे. या भागात यांना वाजमाध्यंदिन, किस्ती व रनावट अशी नावे आहेत. यांच्यांत बरीच गोत्रे आहेत. त्यांतली मुख्य गोत्रे अत्री, काश्यप, कुत्स, कौशिक, कौंडिण्य, गार्ग्य, गौतम, भारद्वाज, वसिष्ठ, शांडिल्य, जामदग्न्य, पराशर, इ. आहेत. मातापूरची रेणुका, तुळजापूरची भवानी, सप्तशृंगी व कोल्हापूरची महालक्ष्मी या त्यांच्या कुलदेवता आहेत. खानदेश, वऱ्हाड या भागातल्या काही माध्यंदिनांची तिरुपती बालाजी, जेजुरीचा खंडोबा अशी अन्यही कुलदैवते आहेत. हे शांकरमतानुयायी स्मार्त आहेत. यांच्यांत मातुलकन्यापरिणय नाही. हे सर्व शाकाहारी असून, कात्यायन व पारस्कर यांच्या सूत्रांना अनुसरून आपले सर्व संस्कार करतात. हे पंक्तिपावन आहेत किंवा नाहीत याबद्दल वाद निर्माण झाला होता. पण संकेश्वरपीठाने हे पंक्तिपावन असल्याबद्दल निकाल दिला आणि तो वाद मिटवला. एका काळी शेती, व्यापार व सावकारी हे यांचे मुख्य व्यवसाय होते. यांच्यांत दशग्रंथी, वैदिक व याज्ञिक बरेच होते.

दुसरा भाग उत्तर कोकणात मुंबई, ठाणे, वसई, माहीम, तारापूर, सोपारे, दमण भिवंडी या भूप्रदेशात स्थायिक झाला आहे. यांच्यांतही बरीच गोत्रे आहेत. हेही स्मार्त असून शृंगेरीमठाच्या अनुशासनात आहेत. तेराव्या शतकात उत्तर कोकणावर देवगिरीच्या रामदेवराय यादवाचे राज्य होते. अलाउद्दीन खिलजीने जेव्हा या भागावर स्वारी केली, तेव्हा त्याच्या बंदोबस्तासाठी रामदेवरायाने आपला मुलगा भीमदेव किंवा बिंब याला इकडे पाठवले. त्याच्या बरोबर राजगुरू पुरुषोत्तमपंत कांवळे पैठणकर हाही या भागात आला. उत्तर कोकणातील माध्यंदिन हे वरील पुरुषोत्तमपंताचेच वंशज होत. पुढे त्यांचे व तत्पूर्वी या भागात असलेल्या ब्राह्मणांचे पौरोहित्याच्या बाबतीत भांडण सुरू झाले. त्यात अन्य ब्राह्मणांनी असा प्रचार सुरू केला, की माध्यंदिन हे ब्राह्मणच नाहीत. हे भांडण शृंगेरीच्या मठाकडे गेले. त्या वेळी मठपतींनी निर्णय दिला, की माध्यंदिन हे ब्राह्मण आहेत. हे लोकही कात्यायन व पारस्कर यांच्या सूत्रांना धरून आपले संस्कार करतात. [व. व जा.]

माध्यमिक एक बौद्ध दार्शनिक संप्रदाय. बुद्धदर्शनाचा विकास होताहोता ते माध्यमिकांच्या विचारात कळसाला पोचले, असे म्हणतात. या मताचे मूळ तथागत बुद्धाच्या उपदेशामध्ये साठवलेले आहे. त्यामुळे माध्यमिक सिद्धान्त हा बुद्धाइतका प्राचीन ठरतो.

बुद्धाने नैतिक जीवन कृतार्थ होण्यासाठी दोन्ही अंतांचा म्हणजे टोकांचा निषेध केला आहे. अखंड कायक्लेशात्मक तप आणि अतिरिक्त भोग-विलास ही दोन्ही टोके बुद्धाला मान्य नव्हती. त्या दोहोंच्या मधला अतएव मध्यम मार्ग त्याने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वीकारला. याच मध्यम मार्गाचे अनुसरण हा संप्रदाय करतो, त्यामुळे याला माध्यमिक मार्ग असे नाव पडले आहे. अद्वैतवाद्यांचे जसे ब्रह्म, तसे माध्यमिकांचे शून्य हे परमार्थ सत्य आहे. म्हणून त्याला शून्यवाद असेही म्हणतात. या शून्य तत्त्वाचे लक्षण नागार्जुनाने पुढील श्लोकात सांगितले आहे –

न सन्नासन्न सदसन्न चाप्यनुभयात्मकम् ।
चतुष्कोटिविनिर्मुक्तं तत्त्वं माध्यमिका विदुः ।।
(मा. का. १. ७)

अर्थ – सत नाही, असत नाही, न सत आणि न असत दोन्ही नाही आणि या दोहोंहून भिन्नही नाही या चार संभावित कोटींहून विलक्षण असे जे एक तत्त्व (शून्य) आहे, त्याला माध्यमिकांनी आपले परम तत्त्व म्हटले आहे.

साहित्य – माध्यमिक साहित्याचा विकास हा बौद्ध पंडितांच्या तार्किक बुद्धीचा परम उत्कर्ष आहे. शून्यतेचा सिद्धान्त प्रज्ञापारमिता, रत्नकरंड, इ. प्राचीन सूत्रांमध्ये उपलब्ध होतो; पण तर्क आणि प्रमाणे यांच्या द्वारे शून्यतेचा सिद्धान्त प्रस्थापित करण्याचे सारे श्रेय नागार्जुनालाच दिले पाहिजे. त्याने माध्यमिक कारिका लिहून आपली प्रौढ तार्किक शक्ती, अलौकिक प्रतिभा आणि असामान्य पांडित्य या गुणविशेषांची ग्वाही दिली, असे पं. बलदेव उपाध्याय म्हणतात. आर्यदेव हा त्याचा शिष्य. आपल्या गुरूचे विचार अधिक स्पष्ट करण्यासाठी त्याने अनेक ग्रंथ लिहिले. ही घटना इ. स. च्या २ न्या शतकातली आहे. इ. स. च्या ३ ऱ्या व ४ थ्या शतकांत या मताचा प्रभावी समर्थक असा कोणी पंडित झाला नाही. पाचव्या शतकात माध्यमिक मत मागे पडले आणि विज्ञानवादाचा जोर झाला. मात्र सहाव्या शतकात माध्यमिक मताला पुनश्च ऊर्जित काळ आला. द. भारतात त्याचा विशेष बोलबाला झाला. या काळात भव्य किंवा भावविवेक या आचार्याने ओडिसा प्रांतात आणि आचार्य बुद्धपालित याने गुजरातमध्ये या मताचा जोरदार प्रचार केला. सातव्या शतकात आचार्य चंद्रकीर्ती उदयाला आला. त्याने अनेक ग्रंथ लिहून शून्यवादाचा सिद्धान्त पराकोटीला नेला. त्याच शतकात शांतरक्षित या आचार्याने काही ग्रंथ लिहून शून्यवादाचे प्रभावपूर्ण समर्थन केले.

शून्यवादाची उभारणी – हे जगत मायिक आहे. स्वप्नातल्या पदार्थांची सत्ता जशी काल्पनिक, तशीच जगातल्या समस्त पदार्थांची सत्ता काल्पनिक आहे. जाग्रत आणि स्वप्न यांत काही भेद नाही. जागृतीत आपण जे पाहतो त्यालाच जगत म्हणतात. या जगतातल्या पदार्थांचे विश्लेषण केल्याअंती काही शिल्लकच उरत नाही. केवळ व्यवहारासाठी जगताची सत्ता मानावी लागते. अतएव जगत हे व्यावहारिक रूपाने सत्य आहे; पारमार्थिक रूपाने नाही. हे जगत काय आहे हे पा गेल्यास असे अनुभवाला येते, की हा एक प्रसिद्ध संबंधांचा स च्चयमात्र आहे. कोणत्याही पदार्थाची त्याच्या गुणांना सोडून स्वतंत्र सत्ता असत नाही. त्याचप्रमाणे संबंध वगळून जगताचे स्वतंत्र सत्ता मान्य करता येत नाही. सुख-दुःख, बंध-मोक्ष, उत्पा नाश, गति-विराम, देश-काल, इ. जितक्या म्हणून या जगतातल्या धारणा आहेत, त्या केवळ कल्पनाच आहेत. या निर्मूल आणि निराधार कल्पना माणसांनी आपल्या व्यवहाराच्या सिद्धीसाठी उभ्या केल्या आहेत. तार्किक दृष्टीने विश्लेषण केल्यास त्या केवळ असत ठरतात.

हे जगत कार्य-कारणांच्या नियमावर चालते, असे नैय दार्शनिक मानतात. पण कार्य-कारणाची स्वतंत्र कल्पना करता येतच नाही. कोणताही पदार्थ कारणाला सोडून राहू शकत नाही आणि कोणतेही कारण कार्याहून पृथक दिसत नाही. कार्यावाचून कारणाची सत्ता मानता येत नाही. आणि कारणा वाचून कार्याची सत्ता स्वीकारता येत नाही. कार्यकारणाची कल्पना अशी सापेक्ष असल्यामुळे ती असत्य आहे आणि निराधारही आहे.

कोणताही पदार्थ स्वतः उत्पन्न होत नाही, परतः म्हणजे दुसऱ्याच्या सहाय्याने उत्पन्न होत नाही; या दोहोंनीही उत्पन्न होत नाही आणि अहेतूनेही उत्पन्न होत नाही. हा बाब शांतिदेवाने पुढील श्लोकात सांगितला आहे –

न स्वतो नापि परतो न द्वाभ्यां नाप्यहेतुतः ।
उत्पन्ना जातु विद्यन्ते भावाः क्वचन केचन ॥
(बोधिचर्यावतार)

अशा प्रकारे जगताचा उत्पाद (उत्पत्ती)च नसल्यामुळे त्याचा विनाशही संभवत नाही. जर एखाद्या पदार्थाचा जन्म झाला नसेल, तर त्याच्या विनाशाची चर्चा करणे व्यर्थ आहे. म्हणून हे जग अजात (अनुत्पन्न) आणि अनिरुद्ध (अविनष्ट) आहे.

हे जगत संसर्ग किंवा संबंध यांचा समुदायमात्र आहे असे वर म्हटले; पण परीक्षण केल्याअंती हा संसर्गही असत्य प्रतीत होतो.

गुणसमुच्चयाव्यतिरिक्त आत्म्यालाही स्वतंत्र सत्ता नाही. मानस व्यापारांव्यतिरिक्त आत्मा नावाचा पदार्थच अस्तित्वात नाही. आपल्या दैनंदिन अनुभवात आपण मानस व्यापारांशी परिचित असतो. ज्ञान, इच्छा व यत्न ही मानवी जीवनाची प्रधान साधने होत. आपले मन कधीही या त्रिविध साधनांपासून स्वतःला मुक्त करू शकत नाही. या तिहींच्या समुच्चयाला आत्मा म्हणतात, ते केवळ व्यवहार चालण्यासाठी.

काही लोक आत्म्याला कर्ता मानतात; पण कर्ता आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कर्म या दोन्ही भावना निःसार आहेत. क्रिया करणाऱ्या व्यक्तीला कर्ता म्हणतात. तो जर विद्यमान असेल, तर तो क्रिया करू शकत नाही. कारण क्रियेमुळेच त्याला कर्ता ही संज्ञा प्राप्त झाली आहे. अशा अवस्थेत त्याला दुसरी क्रिया करण्याची आवश्यकताच उरत नाही. त्यामुळे कर्त्याच्या अभावी कर्मच अधांतरी राहते. क्रिया असंभव झाल्यामुळे धर्म आणि अधर्म हेही शिल्लक उरत नाहीत. धर्माधर्मांच्या अभावामुळे सुगती आणि दुर्गती या गोष्टीही मिथ्या ठरतात. जर फलच विद्यमान नसेल, तर स्वर्ग व मोक्ष यांच्यासाठी सांगितलेला मार्गही व्यर्थ आहे. हाच आशय नागार्जुनाने पुढील कारिकेत व्यक्त केला आहे.

धर्माधर्मौ न विद्येते क्रियादीनामसम्भवे ।
धर्मे चासत्यधर्मे च फलं तज्जं न विद्यते ।।

कर्माप्रमाणेच ज्ञानही नाना प्रकारच्या विरोधांनी परिपूर्ण असल्यामुळे सत्ताहीन आहे. माणसाला विषयांचे प्रत्यक्ष ज्ञान इंद्रियांच्या द्वारे होते असे म्हणतात. पण ते ज्ञान नव्हे; तर तो केवळ आभास आहे. आत्म्याची सत्ता नाही, कर्माची सत्ता नाही, कर्मफलाची सत्ता नाही आणि हाताचीही सत्ता नाही. मग सत्ता आहे तरी कशाची ? माध्यमिक म्हणतात, की सत्ता एकमात्र शून्याची आहे.

सत्ता म्हणजे सत्य. ते दोन प्रकारचे आहे. (१) सांवृतिक सत्य आणि (२) पारमार्थिक सत्य. नागार्जुनमते तथागत बुद्धाने या दोन्ही सत्यांना लक्ष्य करून धर्मोपदेश केला आहे. त्याच्या काही उपदेशांत व्यावहारिक सत्य; तर काही उपदेशांत पारमार्थिक सत्यप्रतीत होते. म्हणून या दोन्ही सत्ता मानल्या पाहिजेत. केवळाही अद्वैतवादी पंडित असो, त्याला जर जगात राहायचे असेल व शरीरधारण करायचे असेल, तर सांवृतिक सत्य मानणेच भाग आहे. नागार्जुन म्हणतो—

व्यवहारमनाश्रित्य परमार्थो न देश्यते ।
परमार्थमनागम्य निर्वाणं नाधिगम्यते ।।
(मा. का. २०.१८)

अर्थ— व्यवहाराचे साहाय्य असल्यावाचून परमार्थाचे ज्ञान होऊ शकत नाही आणि परमार्थ जाणल्यावाचून निर्वाण प्राप्त करून घेता येत नाही.

संवृती म्हणजे अविद्या. ती सत्य वस्तूवर आवरण घालते. हिला मोह, विपर्यास, इ. नावांनीही उल्लेखितात. सांवृतिक सत्य याचा अर्थ अविद्या किंवा मोह यांच्या द्वारे उत्पादित असे काल्पनिक सत्य होय. त्याचे लोकसंवृती व अलोकसंवृती असे दोन प्रकार होतात. ज्यांना साधारण जनसमाज सत्य समजतो, असे घटपटादी पदार्थ लोकसंवृतीत येतात. अलोकसंवृती ही

याच्या विरुद्ध आहे. कावीळ झालेल्या माणसाने शंखाचा शुभ्र वर्ण पिवळा आहे, असे समजणे, हे अलोकसंवृतीत येते.

पारमार्थिक सत्य हे निर्वाणतुल्य आहे. ते शून्यरूप आहे. ते सर्व धर्मांनी रहित व निःस्वभाव आहे. ते विषय आणि विषयी या भावांनीही रहित आहे. ते वाणीचा विषय होत नाही, तसेच चित्ताचाही विषय होत नाही. स्वानुभूतीच्या द्वारेच त्याची प्रचीती होत असते.

या शून्यतेच्या अनुभवासाठी शमथ अर्थात चित्ताची एकाग्रतारूप समाधी या गोष्टीची नितांत आवश्यकता आहे. समाधीच्या अभ्यासाने प्रज्ञेचा उदय होतो आणि साधक समाहितचित्त बनतो. याच अवस्थेत त्याला परमतत्त्वाची अर्थात शून्यतेची अनुभूती घडते. समाधीसाठी वैराग्य अपेक्षित असते; त्याचप्रमाणे सहा पारमितांचा अभ्यासही आवश्यक असतो.

शून्यतत्त्वाची समीक्षा केल्याअंती एक गोष्ट स्पष्ट होते, की ज्याला अद्वैत वेदान्त्यांनी ब्रह्म म्हटले, तीच वस्तू माध्यमिकांनी शून्य या नावाने निर्दिष्ट केली आहे. बुद्ध हा अद्वैतवादी होता. त्याच्या अनेक नावांत अद्वयवादी असेही एक नाव आहे. बोधिचित्तविवरणात शून्यतेला अद्वयलक्षण म्हटले आहे. त्यावरून माध्यमिकांचे शून्य हे अद्वैततत्त्व आहे, असे म्हणणे चूक ठरणार नाही. शून्य व ब्रह्म यांचे स्वरूप सांगणारे शब्दही समानार्थक आहेत. फरक असला तर तो इतकाच, की माध्यमिक आचार्य शून्याला निषेधात्मक शब्दांनी अभिव्यक्त करतात आणि अद्वैतवादी ब्रह्माला सत्तात्मक शब्दांनी निर्दिष्ट करतात. तत्त्व एकच; केवळ ते समजावून देण्याची प्रक्रिया तेवढी भिन्न आहे. [बौ. द. मी.; भा. द.; बौ. ध. द.]

माध्व संप्रदाय

मध्वाचार्यांनी स्थापन केलेला एक वैष्णव संप्रदाय. याला ब्रह्मसंप्रदाय किंवा स्वतंत्रास्वतंत्रवाद असेही म्हणतात. ब्रह्मदेव हा या पंथाचा संस्थापक होय, असे पद्मपुराणात म्हटले आहे. पण मध्वाचार्य हेच त्याचे प्रवर्तक मानले जातात. श्रीशंकराचार्यांच्या अद्वैतमताला विरोधी असे द्वैतमत त्यांनी प्रतिपादले. नारायणीय उपनिषद हा या संप्रदायाचा आधारग्रंथ आहे. नारायण किंवा विष्णू ही याची मुख्य उपास्यदेवता होय. हा भक्तिमार्गी पंथ असून, याचे अनुयायी शाळग्रामरूपी विष्णूची विविध उपचारांनी पूजा करतात. त्यांच्या उपासनेत अंकन, नामकरण व भजन यांचा अंतर्भाव होतो. हे लोक गळ्यात तुलसी-माला आणि शरीरावर शंख, चक्र, इ. विष्णूच्या मुद्रा धारण करतात. कपाळावर गोपीचंदनाच्या दोन उभ्या रेषा, त्यांच्या मध्ये भस्माची काळी रेघ व तिच्या शिरोभागी हळदीचा बिंदू ही या संप्रदायाची मुद्रा आहे. याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंकन म्हणतात. मुलांना विष्णूची नावे देणे याला ते नामकरण म्हणतात.

या पंथाचे अनुयायी मुख्यतः कर्नाटकात आढळतात. त्या भागात या पंथाचे आठ प्रसिद्ध मठ आहेत. भारतात या संप्रदायाचे एकूण १८ मठ आहेत. केवळ ब्राह्मण किंवा संन्यासी या पंथाचे दीक्षागुरू होऊ शकतात.

माध्व लोक आध्यात्मिक गुरूला फार मान देतात, त्याची पूजा करतात. त्याचे स्मारक म्हणून वृंदावन बांधलेले असते. देवपूजेनंतर त्या वृंदावनाचीही पूजा केली जाते.

या संप्रदायात मुद्राविधीला अत्यंत महत्त्व असते. शरीरावर तप्त मुद्रा घेणे अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे मोक्ष मिळतो अशी माध्वांची धारणा आहे. माध्व ब्राह्मणांना गुरूला भेटण्यासाठी मठात गेल्यावर प्रत्येक वेळी मुद्रा घ्यावी लागते. उजव्या दंडावर चक्र व डाव्या दंडावर शंख उठवतात. या खुणा जन्मभर राहतात. गुरूकडून मुद्रा घ्यावी लागते व त्यासाठी त्याला दक्षणा म्हणून एक ते तीन महिन्यांची प्राप्ती द्यावी लागते. स्त्रिया लग्नानंतर मुद्रा घेतात. लहान मुलांनाही मुद्रा देतात. मात्र ती केवळ त्वचा पोळण्यापुरती किंचित तप्त केलेली असते.

माध्व लोक इतके शिवद्वेष्टे आहेत की, ते महाशिवरात्रीच्या दिवशी पुरणपोळी करून जेवतात, असा त्यांच्यावर सर्वसामान्यपणे आरोप केला जातो. पण या आरोपात तथ्य नाही. वैष्णवांनी विष्णुव्रताव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्रताचे उपोषण करू नये, असे वैष्णव शास्त्र आहे, त्याला अनुसरून ते वागतात. यात शिवद्वेष मुळीच नाही. माध्व संप्रदायाचे लोक शिव, पार्वती, गणपती, लक्ष्मी, हनुमान, आदिशेष यांनाही भजतात. पण विष्णू हा त्यांचा सर्वश्रेष्ठ उपास्य आहे. पाहा– मध्वाचार्य; द्वैतदर्शन. [मध्वाचार्य व त्यांचे तत्त्वज्ञान–रा. बा. अवधानी, १९४९; वै. शै. म. व.; वैष्णवधर्म]

मान एक आदिवासी जमात. या लोकांची वसती मुख्यतः विदर्भात आणि मध्य प्रदेशात आढळते. आमची उत्पत्ती गोंड लोकांपासून झाली, असे काही मान लोक सांगतात. हे दिसायलाही गोंडांसारखेच आहेत. हे लोक सुदृढ बांध्याचे, कष्टाळू व प्रामाणिक आहेत. यांनी सुमारे दोन शतके चांदा भागात राज्य केले होते. यांचा सैनिकी बाणा आजही दिसून येतो. पण हे लोक आता शेती करू लागले आहेत. हे विशेषतः भातशेती करतात. यांच्या स्त्रिया यांना शेतीच्या कामात खूप मदत करतात. याशिवाय यांच्यापैकी काहीजण नगररक्षणाचे व क्षेत्ररक्षणाचे कामही करतात.

मराठा जातीच्या सहवासाने यांच्या अनेक चालीरीती मराठ्यांप्रमाणेच झाल्या आहेत. यांच्या दोन पोटजाती असून, त्यांना अनुक्रमे बडवाईक मान व खाद मान अशी नावे आहेत. बडवाईक मान हे सैनिक असून, खाद मान हे अनैतिक संबंधातून उत्पन्न झाले आहेत; असे म्हणतात.

यांच्यांत अनेक कुळे असून, ते एकाच कुळात लग्नसंबंध करीत नाहीत.

मानांच्या प्रत्येक कुळाचा एकेक भाट असतो. ज्या कुळाला भाट नसेल त्याला जातिबाह्य ठरवितात.

मर्तिकप्रथा– हे लोक मृतांना पुरतात किंवा जाळतातही. जेव्हा मृताला पुरतात, तेव्हा लगेच जेवणावळीचा कार्यक्रम करतात. यानंतर कोणतेही अन्य क्रियाकर्मांतर नसते. मृताला जाळतात, तेव्हा त्याचे पाय उत्तरेकडे करून ठेवतात. ती… दिवस सुतक पाळतात. [ट्रा. का. सें. प्रॉं. इं.]

मानपुरी (इ. स. चे १८ वे शतक) एक भक्तकवी. ह… कान्यकुब्ज ब्राह्मण असून, उ. भारताचा रहिवासी होता. त्याच्या नावात पुरी हे उत्तरपद आहे. त्यावरून तो दसनामी गोसाव्यांपैकी असावा, असे वाटते.

मानपुरी हा योगी होता. त्याने आपली योगसाधना हिमालयात केली, असे कळते. पुढे तो तीर्थयात्रा करीत दक्षिणेत आला व देवगिरी (दौलताबाद) येथे वास्तव्य करून राहिला. मानपुरी ज्ञानेश्वरांना परमवंदनीय मानतो. त्याने म्हटले आहे–

गुरु ज्ञानदेव मन भायो रे। भूला मन समझायो रे॥
ज्ञान अवतार लियो कलि जुगमों। सोवत जगत जगायो रे॥

मानपुरीने हिंदी भाषेत जशी पद्यरचना केली आहे, तशी… मराठीतही केली आहे. मराठवाड्यात येऊन राहिल्यावर त्याने मराठीचा अभ्यास करून तिच्यात कविता करण्याइतके प्रभुत्व मिळवले. त्याचे एक मराठी पद असे –

श्रीहरि मागे पुढें दाटला। आनंद मनीं बहु वाटला॥ ध्रु.॥
जिकडे तिकडे आपणचि झाला। स्वयें सदोदित थाटला॥१॥
देखुनिया निजरूप गुरूचे। संशय समुळि आटला॥ २॥
मानपुरीला अनुभव जाला। जन्ममरण रोखा फाटला॥ ३॥

मानपुरीच्या एकशे बारा हिंदी पद्यांचे संकलन श्री. ह… कामत यांनी मानपुरी–पदावली या ग्रंथात केले आहे. त्याची… हिंदी रचना सौंदर्यपूर्ण आहे. तीमधून त्याची आध्यात्मिक अनु… भूतीही स्वाभाविकपणे व्यक्त होते. त्याची सर्व पदे वि… रागांत असून, त्यांना गेयताही भरपूर आहे.

देवगिरी येथे मानपुरीची समाधी व एक मठही आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मानमोडीची लेणी जुन्नरपासून दोन मैलांवर, शिवनेरी-जवळ मानमोडा नावाचा डोंगर आहे. त्या डोंगरात अंबा–अंबिका, भीमाशंकर व भूतलिंग हे लेण्यांचे तीन समूह आहेत. या सर्व लेण्यांना मानमोडीची लेणी असे म्हणतात. त्या डोंगराचे मूळ नाव मानमुकुट असे होते.

पहिल्या समूहातील लेणी तीनमजली असून, त्यांतील एका विहाराच्या दुसऱ्या मजल्यावर भिंतीत अंबा, अंबिका व गणपती यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. त्या मूर्तींवरूनच या विभागाला अंबा-अंबिका हे नाव मिळाले आहे. तिथून काही अंतरावर भूत लिंग लेणी आहेत. तीही तीनमजली असून, त्यातील एक स्तूप



मानमोडीचे लेणे–भूतलिंग समूहातले एक

महादेवाच्या पिंडीच्या आकाराचा आहे. आग्नेयीस भीमाशंकर लेणी आहेत. या गटातील क्रमांक ६ च्या लेण्यात महासत्रप नहपान याचा मंत्री अयम वत्सगोत्री याच्यासंबंधी एक कोरीव लेख आहे. क्र.२च्या लेण्यात रंगीत रेखाकृती काढलेल्या आढळ-तात. भूतलिंग गटातील ३८ क्रमांकाच्या लेण्यातला स्तूप हा येथील सर्वांत प्राचीन आहे. त्याचा आकार बुद्ध-वचनानुसार पालथ्या भिक्षापात्रासारखा आहे. [सह्याद्री; मु. पू. म. २]

मानवगृह्यसूत्र या सूत्राला मैत्रायणीय मानवगृह्यसूत्र असेही म्हणतात. हे सामान्यपणे मैत्रायणी संहितेच्या आधाराने रचलेले आहे. मानव हा मैत्रायणी शाखेच्या सहा पोटभेदांपैकी एक पोटभेद आहे. मानवाचार्य या गृहस्थाने हे गृह्यसूत्र रचले, असे अष्टावक्र आपल्या प्रस्तुत गृह्यसूत्राच्या भाष्यात सांगतो. पण हा मानवाचार्य या गृह्यसूत्राचा कर्ता होता का तत्प्रणित शाखेचे हे सूत्र असल्यामुळे प्रस्तुत सूत्राला हे नाव प्राप्त झाले, यावद्दल निश्चित काही सांगता येत नाही.

प्रस्तुत गृह्यसूत्रात पुरुष नावाचे दोन भाग आहेत आणि प्रत्येक पुरुषाचे कित्येक खंड आहेत. चार विनायक आणि षष्ठीकल्प यांची पूजाविधाने हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. या सूत्राचे काठक व वाराह या दोन सूत्रांतल्या आरंभीच्या प्रकर-णाशी जवळजवळ साम्य आहे. यात निरनिराळ्या प्रकारची व्रते व दीक्षा सांगितल्या आहेत. या व्रत-दीक्षा विद्यार्थ्याने आपल्या मैत्रायणी शाखेचे अध्ययन सुरू करण्यापूर्वी करायच्या असतात. [इं. वे. क. सू.]

मानवधर्मसभा आधुनिक महाराष्ट्रातील एक सुधारक संस्था. श्री. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी २२ जून १८४४ रोजी सुरत येथे या संस्थेची स्थापना केली. त्यांना त्या कामी दुर्गाराम मंछाराम या व्यक्तीचे खूप साहाय्य झाले. दादोबा हे या संस्थेचे अध्यक्ष आणि श्री. मंछाराम हे कार्यवाह होते. या संस्थेच्या स्थापनेचा हेतू विशद करताना त्यांनी म्हटले आहे, ते असे –

"प्रत्येक धर्मामध्ये चांगले तसे वाईटही आहे. व हंसक्षीर-न्यायाने सगळ्या धर्मांतील चांगले तेवढे ग्रहण करून जर एक मानवधर्म स्थापन केला तर धर्माच्या नावावर आतापर्यंत जो कलह चालला आहे तो बंद पडेल व मानवजातीचे ऐहिक तसेच पारमार्थिक कल्याण होईल."

दादोबांनी जगद्वासी आर्य या टोपण नावाने धर्मविवेचन या नावाचे एक पुस्तक लिहिले आहे. त्या पुस्तकात या संस्थेची पुढील सात तत्त्वे सांगितली आहेत –

(१) ईश्वर एक व तोच पूज्य.
(२) नीतिपूर्वक सप्रेम ईश्वरभक्ती हाच धर्म.
(३) मनुष्यमात्राचा पारमार्थिक धर्म एकच होय.
(४) प्रत्येक मनुष्यास विचार करण्याचे स्वातंत्र्य आहे.
(५) नित्य नैमित्तिक कर्मे विवेकास अनुसरून असावी.
(६) मनुष्यमात्राची एक ज्ञाती.
(७) सर्वांस ज्ञानशिक्षा असावी.

या सात तत्त्वांचे स्पष्टीकरण धर्मविवेचन या ग्रंथात आहे. भगवान राम-कृष्णांच्या सगुण साकार मूर्तींची पूजा करणे, हे या संस्थेच्या चालकांना व अनुयायांना वेडगळपणाचे वाटत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होते. म्हणून ते रविवारी चर्चमध्ये जमून निराकार प्रभूची प्रार्थना करू लागले. निराकार ईश्वराची प्रार्थना हा त्यांचा प्रमुख आचार बनला. मूर्तिपूजेप्रमाणेच यांना जातिसंस्थेचेही वावडे होते. जादूगार व मांत्रिक यांच्या विरुद्ध या संस्थेने मोहीम उघडली होती, हे तिचे मोठे कार्य होय.

महाराष्ट्राच्या प्रबोधनाचा प्रारंभ म्हणून या संस्थेकड पाहिले जात असतानाही, ही सभा लवकरच अस्तंगत झाली. स्वार्थत्यागपूर्वक व ध्येयपूर्वक काम करणाऱ्या व्यक्ती या संस्थेला लाभल्या नाहीत, हे तिच्या नाशाचे प्रमुख कारण आहे. पुढे या सभेतूनच परमहंससभेची स्थापना झाली. पाहा– परमहंससभा. [म. जी. १; दादोबा पांडुरंग]

मानववंश

पृथ्वीच्या पाठीवर कुठेतरी मुळात एकच मानववंश उत्पन्न झाला आणि त्यातील लोक भिन्न भिन्न प्रदेशांत जाऊन वसल्यानंतर तिथल्या भिन्न हवामानाच्या प्रभावामुळे त्यांचे वेगवेगळे मानववंश बनले, असे बहुतेक पंडितांचे मत आहे. या मानववंशांच्या संख्येविषयी मात्र बरेच मतभेद आहेत. लिने यांनी कॉकेशियन, मोंगोलियन व एथिओपियन असे तीनच वंश मानले; तर ब्लूमेनबाक याने अमेरिकन व मलायन हे आणखी दोन वंश मानले. वर्ण, केस व चेहरा यांतील भिन्नतेवर हे विभाजन आधारलेले आहे. पुढे नाक व मस्तक यांची मोजमापे घेऊन वंशविभाजन करण्याची पद्धती सुरू झाली. त्या पद्धतीनेही अनेक प्रकारे वंशविभाजन करण्यात आले आहे. जी. इलियट स्मिथ याने मानवाचे सहा वर्ग केले आहेत, त्यांची नावे अशी– ऑस्ट्रेलियन, निग्रो, मोंगोल, नॉर्डिक, मल्पाइन व मेडिटरेनियन.

प्राचीन इतिहासाच्या अभ्यासात मानवशास्त्र व व्युत्पत्तिशास्त्र यांचा बराच उपयोग होतो. मानवशास्त्राच्या अध्ययनाने कोणकोणते मानवसमूह पृथ्वीच्या पाठीवर कुठेकुठे पसरलेले आहेत व त्यांचे एकमेकांशी संपर्क कसे व कुठवर आले, याविषयी बरीच माहिती मिळू शकते. व्युत्पत्तिशास्त्राच्या अध्ययनाने निरनिराळ्या सामाजिक, आर्थिक व राजकीय विचारांची देवघेव निरनिराळ्या मानवसमूहांत कशी झाली असेल, याची कल्पना येऊ शकते. एकभाषाभाषी मानवसमूहातही अनेक वंशांचे व जमातींचे लोक असू शकतात. भाषाविषयक संबंधामुळे वांशिक संबंधावर बराच प्रकाश पडतो. या दोन्ही शास्त्रांच्या अध्ययनामुळे मानवांचे निरनिराळे वंश एकमेकांच्या संपर्कात व संघर्षात येण्यापूर्वी त्यांची संस्कृती कशी होती व तदनंतर ती कशी बदलत गेली, हे समजते. यादृष्टीने भारताच्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास करून शास्त्रज्ञांनी भारतीय संस्कृतीवर बराच प्रकाश पाडला आहे. भारतात मानवाचा कोणंताही वंश उत्पन्न झालेला नाही, तर भिन्न भिन्न मानवीसमूह निरनिराळ्या काळी बाहेरून भारतात येऊन वसले, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. सध्या जे लोक या देशात अस्तित्वात आहेत, ते अनेक वंशांच्या मिश्रणाने झालेले आहेत. अतिप्राचीन काळातील मानवाचे सांगाडे वगैरे अवशेष भारतात उपलब्ध नसल्यामुळे त्या काळात इथे येऊन वसलेल्या मानवांची अचूक माहिती मिळत नाही. पण सध्या भारतात असलेल्या मानवांच्या शरीरांची ठेवण आणि साहित्यातील परंपरागत ज्ञान यांवरून शास्त्रज्ञांनी काही निष्कर्ष काढले आहेत. त्यांच्या मते देहयष्टीचा विचार केला असता, पुढील सहा भिन्न वंशांचे लोक भारतात येऊन वसले आहेत–(१) नेग्राईड (२) ऑस्ट्रिक (३) मोंगोलाईड (४) द्रविड (५) अल्पाईन व (६) नॉर्डिक.

(१) नेग्राईड – हे लोक प्रागैतिहासिक काळात आफ्रिकेतून अरबस्तान, इराण, बलुचिस्तान व सिंध या मार्गाने भारतात आले. हे लोक निग्रो वंशाचे पण खुजे असल्यामुळे त्यांना नेग्रिटो असे म्हणतात. त्यांचा रंग काळा, उंची कमी, केस मऊ कुरळे, कपाळ रुंद, नाक रुंद व चपटे आणि ओठ जाड व काळे असतात. हे लोक भारतात सर्वत्र पसरलेले होते व पूर्वेकडे ब्रह्मदेश, मलाया, फिलिपाईन्स, इ. प्रदेशांतही जाऊन वसले होते. इतरत्र ते अजूनही आहेत. पण भारतातून तो वंश आता नष्टप्राय झाला आहे. अंदमान बेटातील जंगली माणसे, केरळमधील कदर, कुरुंब व पुलियन; वायनाडमधील इरूल, बिहारमधील राजमहाल डोंगरावरील काही आदिवासी व आसाममधील अंगामी नाग या जमातींत नेग्रिटो वंशाचा थोडा अंश आढळतो. ते लोक अगदी प्राथमिक अवस्थेत होते, दगडी हत्यारे वापरीत होते आणि कंदमुळे व जंगली पशू यांवर उपजीविका करीत होते. तिरकमठा वापरण्याचे त्यांना माहीत होते. मात्र त्यांची मानसिक व आध्यात्मिक अवस्था कशी होती हे निश्चित सांगता येत नाही. त्यांच्या नंतर भारतात आलेल्या ऑस्ट्रिक लोकांनी त्यांना नष्ट किंवा आत्मसात केले असावे.

(२) ऑस्ट्रिक – नेग्रिटो लोकांनंतर दाक्षिणात्य किंवा प्रोटो–ऑस्ट्रलॉईड म्हणजे मूळ ऑस्ट्रेलियसदृश लोक भारतात आले. पॅलेस्टाईन हे त्यांचे मूलस्थान होते. तिथून ते आशिया मायनर, इराक व इराण या मार्गाने भारतात आले असावे. त्यांच्यापैकी काही ब्रह्मदेश, मलाया व इंडोनेशिया या मार्गाने ऑस्ट्रेलियापर्यंत गेले.

भारतातील खालच्या वर्गातील सर्व लोकांत या ऑस्ट्रिक वंशाचा अंश अधिक प्रमाणात आढळतो. प्राचीन काळी या लोकांना निषाद हे नाव मिळाले होते. पुलिंद, शबर हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोकांपैकीच होते. द्रविड व आर्य या पराक्रमी लोकांनी पराभूत केल्यामुळे जे निषाद गिरिकंदरांत जाऊन लपले व तिथेच शेती व शिकार करीत राहिले, तेच कालांतराने कोल, भिल्ल, इ. नावांनी ओळखले जाऊ लागले. ऑस्ट्रिक व नेग्रिटो लोकांच्या मिश्रणामुळे झालेल्या जमातींना शबर किंवा मुंड म्हणतात. ऑस्ट्रिक लोकांचा वर्ण काळा-तपकिरी, देहयष्टी लहान, केस कुरळे, मस्तक लांब, नाक रुंद व चपटे आणि ओठ जाड होते. त्यांना भात व शाकभाज्या पिकवणे माहीत असावे. उसापासून साखर बनवणे, नागवेलीची पाने खाण्यासाठी व धार्मिक विधीसाठी वापरणे, लग्नासारख्या समारंभात तेल, हळद व शेंदूर यांचा उपयोग करणे, कापसाचे वस्त्र विणणे, हत्तीला आपल्या कह्यात आणून शिकविणे, कुत्री व कोंबडी पाळणे, इ. गोष्टी त्यांच्याकडूनच हिंदू संस्कृतीत आल्या असाव्या. ते झूम पद्धतीने म्हणजे टोकदार लाकडाने जमीन उकरून व बी पेरून शेती करीत. मातीची भांडी, सस्कंध परशूसारखी नवाश्मयुगीन दगडी हत्यारे, शिलामंडले, स्मारकस्तंभ या गोष्टीही त्यांच्याच असाव्या वीस या संख्येवर आधारित गणनापद्धती व चंद्राच्या कलांप्रमाणे तिथिगणना या कल्पना त्यांच्यापासूनच घेतलेल्या आहेत. त्या काळातल्या अनेक दंतकथा व आख्यायिका पुराणांत समाविष्ट झालेल्या दिसतात पुनर्जन्म, अंड्यापासून विश्वाची उत्पत्ती, विष्णूचे कूर्मादी अवतार; नाग, कासव, मकर, वानर, हत्ती यांच्या रूपातील देवतांची पूजा, या कल्पना ऑस्ट्रिक संस्कृतीत उगम पावलेल्याहोत्या. देवकाची कल्पना ऑस्ट्रिक लोकांचीच आहे. ऑस्ट्रेलिया व आसपासच्या बेटांत जाऊन वसलेल्या ऑस्ट्रिक लोकांपैकी काही लोक कालांतराने भारतात परत आले असावे. प्रेते उघड्यावर टाकून देणे, सामुदायिक शयनगृहे, शिरकाण, इ. चाली व नावा, नारळ, इ. वस्तू त्यांनीच इथे आणल्या असाव्या.

गंगा या नावाची व्युत्पत्ती ऑस्ट्रिक भाषेतील नदी किंवा पाणी या अर्थाच्या शब्दाशी संबद्ध आहे. इतकेच नव्हे, तर अंग, वंग, कलिंग, उड्र, पुण्ड्र, पुलिंद, कुणिंद, कोसल, ब्रह्म, इ. देशवाचक नावे ऑस्ट्रिक भाषांतूनच आलेली आहेत, असे भाषाशास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे.

(३) मोंगोलॉइड– यांचे मूलस्थान पश्चिम चीनमध्ये यांगत्सेक्यांग नदीच्या उगमाजवळ होते. तिथून ते लोक उत्तर चीन, सयाम, ब्रह्मदेश, तिबेट वगैरे देशांत पसरले. आर्यांचे भारतात आगमन होण्यापूर्वीच हे मोंगोल वंशाचे लोक ब्रह्मपुत्रा नदीच्या काठाने भारतात आले असावे. वैदिक साहित्यात व रामायण–महाभारतात त्यांचा किरात या नावाने निर्देश केलेला आहे. ते पृथुशीर्ष व उंच असून, त्यांचा वर्ण पिवळट, नाक रुंद व चपटे आणि गालाची हाडे पुढे आलेली असतात. सांप्रत अशा प्रकारचे लोक नेपाळ, सिक्कीम, भूतान व आसाम या भागात आढळतात. पण प्राचीन काळी हे लोक गंगेचे खोरे, मध्य भारत, राजस्थान, सिंध या प्रदेशांत पसरलेले होते. त्यामुळे उत्तर भारतातील संस्कृतीवर त्यांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. द. भारतात मात्र त्यांचा अंश आढळत नाही. आसाममधील आहोम, बंगालमधील कोच, तसेच गुर्जर, हूण, हे लोक या मोंगोल वंशाचे आहेत.

(४) मेडिटरेनियन– हे लोक भूमध्य समुद्राच्या आसपासच्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांशी संबंधित आहेत. यांनाच द्रविड म्हणतात. द. भारतातील तमिळ, तेलुगू, मलयाळम व कन्नड या भाषा बोलणारे लोक या वंशाचे आहेत. मध्य भारतातील गोंड, खोंड, उरांव हे लोकही त्यांच्यांतलेच आहेत. प्राचीन काळी हे लोक इराण, बलुचिस्तान, सिंध, पंजाब, गंगेचे खोरे व द. भारत या सर्व प्रदेशांत वसलेले होते.

या द्रविड वंशाच्या तीन शाखा होत्या. तीन्ही शाखांचे लोक लंबशीर्ष होते. एका शाखेचे मध्यम बांध्याचे, काळे व रुंद नाकाचे लोक कर्नाटक, तमिळनाडू व केरळ या प्रदेशांत आढळतात. दुसऱ्या शाखेचे जरा उंच, उजळ व सरळ नाकाचे लोक पंजाबात व गंगेच्या खोऱ्यात आहेत. हे मूळ मेडिटरेनियन लोकांपैकी असून, त्यांनीच मुख्यतः सिंधुसंस्कृती निर्माण केली, असे मानले जाते. तिसरी शाखा प्राच्य, सेमिटिक किंवा ज्यूइश म्हणून ओळखली जाते. या शाखेच्या लोकांचे नाक विशेष लांब व बाकदार असून, ते पंजाब, सिंध, राजस्थान व उत्तर प्रदेशाचा पश्चिम भाग या प्रदेशांत आढळतात. हे लोक बलुचिस्तानातून उ. भारतात व जलमार्गाने द. भारतात आले असावे.

ऑस्ट्रिक लोकांची संस्कृती कृषिप्रधान व ग्रामीण होती, तर द्रविडांची संस्कृती नागरी व व्यापारप्रधान होती. वैदिक साहित्यात दास किंवा दस्यू म्हणून ज्यांचा उल्लेख केलेला आहे, तेच हे द्रविड लोक होत. हडप्पा व मोहेंजोदडो येथील उत्खननांत सापडलेली सिंधुसंस्कृती भौतिक दृष्टीने आर्यसंस्कृतीहून श्रेष्ठ होती. ती संस्कृती द्रविड लोकांची होती. तिच्या निर्मितीत ऑस्ट्रिक लोकांचाही भाग असला पाहिजे. आर्य संस्कृतीचा द्रविड संस्कृतीशी समन्वय होऊन हिंदू संस्कृती निर्माण झाली. हिंदू संस्कृतीत अधिक भाग आर्यपूर्व संस्कृतीचाच दिसून येतो.

देवाची षोडशोपचारे पूजा करण्याची प्रथा द्रविडांकडून हिंदू संस्कृतीत आली आहे. वैदिक आर्यांना ती ज्ञात नव्हती. त्यांची संस्कृती यज्ञप्रधान होती. आर्यसंस्कृतीत द्यौः पिता व पृथ्वी माता यांना निसर्गदेवता म्हणून स्थान होते. पण द्रविडांनी माता देवी व पिता देव या देवतांना सर्वव्यापी मानले होते. त्या देवता हिंदू संस्कृतीत उमा व शिव या रूपांनी प्रतिष्ठित झालेल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेत. इंद्र, अग्नी, वरुण, सोम, सूर्य, पूषा, इ. वैदिक देवतांचे महत्त्व हळूहळू कमी होऊन शिव, उमा, विष्णू, हनुमान, गणेश, शीतला, इ. द्राविड देवतांची उपासना आर्य लोकांनी सुरू केली. द्रविडांचा शिव व आर्यांचा रुद्र हे एकच होत. द्रविडांचा मुरुगन म्हणजे यौवन व सामर्थ्य यांचा देव. तोच पुराणांतला स्कंद किंवा कार्तिकेय होय.

लिंग हे शिवाचे प्रतीक ऑस्ट्रिक लोकांकडून घेतलेले दिसते. पशुरूपी देवतांची पूजाही त्यांच्याच देवकांवरून प्रचलित झाली असावी. द्रविड लोकांत वानरपूजा रूढ होती. हनुमान हे नाव तमिळ मधील अणमंतीवरून आलेले दिसते. हिंदू धर्मातील हनुमानाची उपासना हा द्रविड संस्कृतीचाच अंश आहे.

आपले विविध प्रकारचे अन्न, सुती वस्त्रे, घरे ही द्रविड संस्कृतीचीच अंगे आहेत. सध्या प्रचलित असलेल्या बऱ्याच रूढी व बंधने आर्यपूर्व काळातली आहेत. त्याचप्रमाणे पुराणांतील कथा व दंतकथा ऑस्ट्रिक व द्रविड लोकांपासून परंपरेने आलेल्या आहेत. हिंदूंचे तत्त्वज्ञानही आर्यपूर्व आणि वैदिक विचारांच्या समन्वयातून विकास पावलेले आहे.

(५) अल्पाईन व (६) नॉर्डिक – उरल पर्वताच्या दक्षिणेला असलेल्या गवताळ प्रदेशातून नॉर्डिक वंशाचे लोक प्रथम इराण व इराक या प्रदेशांत येऊन वसले होते. इराक व आशिया मायनर या भागांत वसलेल्या अन्य जातींच्या मानवांशी त्यांचा मिलाफ सुरू झाला. त्यामुळे तिथून भारतात आलेल्या आर्य लोकांत नॉर्डिक व अल्पाईन अशी दोन प्रकारची माणसे आहेत.

नॉर्डिक हे लंबशीर्ष, उंच, गोरे व सरळ नाकाचे असून, यांनाच आर्य म्हणतात. त्यांचे डोळे निळे व केस पिवळे असावे. प्राचीन साहित्यात आर्यांचे वर्णन असेच आहे. वायव्य सीमाभागात त्यांचे मूळ रूप बऱ्याच प्रमाणात आढळते. पंजाब, राजस्थान व गंगेचे खोरे या प्रदेशांत उच्च वर्गातील माणसांत या वंशाचा अंश पुष्कळ आढळतो. महाराष्ट्रातील चित्पावन ब्राह्मणांतही त्यांचे प्रमाण बरेच आहे. हवामान आणि वंशसंकर यांमुळे आर्यांच्या त्वचेचा, डोळ्यांचा व केसांचा रंग पुष्कळ बदललेला आहे.

अल्पाईन हे लोक भारतात सर्वत्र आढळतात. हे पृथुशीर्ष, ध्यम उंचीचे व काळसर वर्णाचे असून, त्यांचे नाक उंच व सरळ असते.

मूळ आर्य लोक शेती व पशुपालन करून राहणारे होते. त्यांना तांबे व कथिल हे धातू माहीत होते; त्याचप्रमाणे रजत (चांदी) हा धातूही परिचित होता. कुऱ्हाड, धनुष्य-बाण, भाला व गोफण ही त्यांची आयुधे होती. त्यांनी लोहयुगात प्रवेश केला होता. ते लोखंडी शस्त्रास्त्रांप्रमाणे युद्धाला उपयोगी असे रथही वापरीत होते. त्यामुळेच ते भारतातील पुरवासी द्रविड लोकांना जिंकू शकले. त्यांना वस्त्र विणण्याची कलाही माहीत होती.

भोवतालची परिस्थिती आणि मनावर होणारे संस्कार यांमुळे मानवी जीवनाला निराळे वळण लागते व त्याचे दर्शन त्या मानवसमूहाच्या भाषेत घडते. त्यामुळे प्राचीन संस्कृतीचा विचार करताना वांशिक भेदावर भर न देता भाषाभिन्नत्वाचा विचार करणे अधिक युक्त ठरते. भारतीय लोक वरील सहा वंशांच्या मिश्रणाने बनलेले असले, तरी सध्या त्यांच्या चार भाषिक शाखा मानल्या जातात. त्या शाखांची नावे अशी– निषाद (ऑस्ट्रिक), किरात (सिनो–तिबेटियन), द्राविड व आर्य (इंडो-युरोपियन).

भारतात आलेल्या सर्व मानवसमूहांचे जीवन शेतीवर आधारलेले असल्यामुळे व त्या सर्वांचा संयुक्त इतिहास घडत गेल्यामुळे एक नवीनच समाज निर्माण झाला आणि एक नवी संस्कृती भारतात उत्क्रांत झाली. हजारो वर्षांच्या सहवासामुळे वरील भिन्न वंशांच्या स्वभावधर्मांचे संकलन होऊन काही सामान्य गुणधर्म भारतीय जनतेत विकास पावले आहेत. अनेक भिन्न प्रकारच्या संस्कृतींचा समन्वय होऊन भारतीय संस्कृती निर्माण झाली आहे. [हि. क. इं. पी. १; प्रा. भा. सं.; सं. चा. अ.; ट्रा. डे. इं.; स. सं. ; भा. आ. अ.]

मानव शाखा

ही मैत्रायणीय शाखेची पोटशाखा आहे. या शाखेची संहिता उपलब्ध नसून, फक्त गृह्य व श्रौत अशी सूत्रेच उपलब्ध आहेत. मत्स्य पुराणात मानवाला पंचार्षेय म्हटले आहे. या शाखेची गृह्यपरिशिष्ट व शुल्बसूत्रेही आहेत. [पुराणम्, जुलै १९६५]

मानव श्रौतसूत्र

मनूने रचलेले म्हणून याला मानवश्रौतसूत्र असे नाव आहे. याचे दहा अध्याय आहेत. अकरावा अध्याय परिशिष्टाचा आहे. या अध्यायांमध्ये अनुक्रमे प्राक्सोम, अग्निष्टोम, प्रायश्चित्त, प्रवर्ग्य, इष्टी, चयन, वाजपेय, अनुग्रह, राज-सूय व शुल्बसूत्र हे विषय आहेत. [हिंदुत्व]

मानवी

जैनांची एक देवता. श्वेतांबरांनी हिची अनेक स्वरूपे वर्णन केली आहेत. एका रूपात ही नीलवर्ण असून, कमलाच्या पानावर अथवा एखाद्या वृक्षाच्या डहाळीवर बसलेली आढळते. दुसऱ्या स्वरूपात ही कमलासना असून चतुर्भुज आहे. हिचा एक हात वरद मुद्रेत असून, अन्य तीन हातांमध्ये माला, खेटक व वृक्षशाखा या वस्तू आहेत. दिगंबरमते ही नीलवर्ण असून, डुकरावर बसलेली असते. हिच्या हाती त्रिशूल असतो. उभयपंथाचे जैन लोक हिला तीर्थंकरांची शासनदेवता मानतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जैनांची ही विद्यादेवीही आहे. [जै. इ.; देवीकोश खं. ३]

मानसपूजा विविध उपचारांची सामग्री गोळा करून केलेल्या देवपूजेला षोडशोपचारपूजा म्हणतात. हीच पूजा मनाने उपचार समर्पून केली, म्हणजे ती मानसपूजा होते. षोडशोपचार अर्थात बाह्य पूजा ही श्रमसाध्य असते. तिच्यात उपचारांच्या वस्तू मिळवणे कठीण आणि खर्चाचे असते. हे सर्व करण्यासाठी बराचसा वेळही खर्ची पडतो. पण मानसपूजेत दुर्लभ वस्तूही केवळ कल्पनेने मिळवता येतात आणि त्यासाठी कोणताही खर्च करावा लागत नाही. बाह्य पूजेसाठी उपचार गोळा करणे हे पूजकाच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते, पण मानसपूजेत एखाद्या सम्राटालाही मिळवता येणे कठीण असे समृद्ध उपचार केवळ मनाने मिळवून ते देवाला समर्पिता येतात.

ही मानसपूजा सर्व पूजांमध्ये श्रेष्ठ मानलेली आहे. कारण या पूजेत मनाची एकाग्रता लवकर होते व पूजकाला पवित्र वातावरणात सहजपणे प्रवेश करता येतो. या पूजेत पूज्य, पूजक व पूजा या त्रिपुटीची साम्यावस्था होऊन साधकाला अवर्णनीय आनंद प्राप्त होतो. श्रीशंकराचार्यांनी या मानसपूजेला परा-पूजा असे म्हटले असून, तिचे एक स्तोत्र रचले आहे, ते असे–

अखण्डे सच्चिदानन्दे निर्विकल्पैकरूपिणि ।
स्थितेऽद्वितीयभावेऽस्मिन्कथं पूजा विधीयते ।।१।।
पूर्णस्यावाहनं कुत्र सर्वाधारस्य चासनम् ।
स्वच्छस्य पाद्यमर्घ्यं च शुद्धस्याचमनं कुतः ।।२।।
निर्मलस्य कुतः स्नानं वासो विश्वोदरस्य च
अगोत्रस्य त्ववर्णस्य कुतस्तस्योपवीतकम् ।।३।।
निर्लेपस्य कुतो गन्धः पुष्पं निर्वासनस्य च ।
निर्विशेषस्य का भूषा कोऽलङ्कारो निराकृतेः ।।४।।
निरञ्जनस्य किं धूपैर्दीपैर्वा सर्वसाक्षिणः ।
निजानन्दैकतृप्तस्य नैवेद्यं किं भवेदिह ।।५।।
विश्वानन्दयितुस्तस्य किं ताम्बूलं प्रकल्प्यते ।
स्वयंप्रकाशचिद्रूपो योऽसावर्कादिभासकः ।।६।।
गीयते श्रुतिभिस्तस्य नीराजनविधिः कुतः ।
प्रदक्षिणमनन्तस्य प्रणामोऽद्वयवस्तुनः ।।७।।
वेदवाचामवेद्यस्य किंवा स्तोत्रं विधीयते ।
अन्तर्बहिश्च पूर्णस्य कथमुद्वासनं भवेत् ।।८।।
एवमेव परा पूजा सर्वावस्थासु सर्वदा ।
एकबुद्ध्या तु देवेशे विधेया ब्रह्मवित्तमैः ।।९।।

अर्थ – अखंड सच्चिदानंद, निर्विकल्प अशा ब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणी अद्वैतभाव मनात स्थिर झाल्यावर परमेश्वराची पूजा कशी काय करणार !

जो विश्वाला व्यापून उरला आहे, त्याचे आवाहन कुठे करायचे ? जो सर्वांचाच आधार, त्याला आसन कशाचे द्यायचे ? जो स्वभावतःच स्वच्छ आहे, त्याला पाद्य आणि अर्घ्य कसे द्यायचे ? जो शुद्ध आहे, त्याला आचमन कशासाठी ?

निर्मळाला स्नान कशासाठी घालायचे ? ज्याच्या उदरात सर्व विश्व सामावले आहे, त्याला वस्त्र कसे नेसवायचे ? ज्याला गोत्र नाही आणि वर्णही नाही, त्याला यज्ञोपवीत कसे घालायचे ?

जो स्वभावतःच निर्लेप आहे, त्याला गंधाचा काय उपयोग ? जो सर्व वासनांपासून मुक्त आहे, त्याला फुलांचा वास काय कामाचा ? जो सर्वत्र समरूपाने राहून विश्वाला भूषवितो, त्याची आरास ती काय करायची ? ज्याला काही आकारच नाही, त्याला अलंकार कसे घालायचे ?

निरंजनाला धूप आणि सर्वसाक्षीला दीप कसा दाखवायचा ? स्वरूपाच्या आनंदात तृप्त असलेल्याला नैवेद्याचा काय उपयोग?

जो विश्वाला आनंद देतो त्याला तांबूलाचा आनंद आपण कसा काय देणार ? जो स्वयंप्रकाश आहे, जो सूर्य, चंद्र आणि अग्नी, इत्यादींना प्रकाशित करणारा आहे, असे ज्याच्या विषयी वेदांनी म्हटले, त्याची आरती करून आम्ही त्याला काय प्रकाशित करणार !

जो अनंत आहे, त्याला प्रदक्षिणा आणि जो अद्वितीय आहे. त्याला नमस्कार कसा घालायचा ? जो वेदांनाही अगम्य आहे, त्याचे स्तोत्र तरी काय करायचे ?

जो आतबाहेर सर्वत्र परिपूर्ण भरलेला आहे, त्याचे विसर्जन कसे करायचे ?

अशा प्रकारे देवाधिदेव अशा परमात्म्याची ब्रह्मवेत्त्यांमध्ये श्रेष्ठ असलेल्या पुरुषांनी एकात्मबुद्धीने सर्व अवस्थांमध्ये परा पूजा करावी.

मानसपूजा ही ध्यानाच्या अगोदरची पायरी आहे. हिच्यात भक्ताची भगवंताशी एकांतावस्था अल्पायासाने सिद्ध होते. तुकाराममहाराजांनाही मानसपूजा आवडत होती. त्यांनी या पूजेवर काही अभंग रचले आहेत. [सु. स्तो. सं. १]

मानस व्रत मनाने आचरिलेल्या व्रताला हे नाव आहे. या व्रतात कोणत्या गोष्टी येतात, त्याविषयी वराह पुराणात पुढील श्लोक आहे–

अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यमकलङ्कता ।
एतानि मानसान्याहुर्व्रतानि तु धराधरे ।।

अर्थ– अहिंसा, सत्य, चोरी न करणे, ब्रह्मचर्य आणि दोषराहित्य ही मानस व्रते म्हटली आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मानस सरोवर एक तीर्थस्थान. याला मानसरोवर असेही म्हणतात. हे तिबेटच्या हद्दीत आहे. हिमालय चढून गेल्यावर तिबेटचे पठार लागते. तिथून सुमारे तीस मैल गेल्यावर पर्वतश्रेणींनी वेढलेली दोन सरोवरे भेटतात. एकाचे नाव आहे राक्षसताल व दुसऱ्याचे मानस सरोवर. ही दोन सरोवरे मनुष्याच्या दोन डोळ्यांसारखी असून, दोहोंच्या मध्ये नाकासारखा उंच उठलेला एक पर्वत आहे. हा पर्वत या दोन्ही सरोवरांना अलग ठेवतो. त्यांपैकी राक्षसताल विस्ताराने फार मोठे असून, ते गोलही नाही व चौकोनीही नाही. त्याच्या कित्येक भुजा कोसन्‌कोस दूर पसरतात व वेडीवाकडी वळणे घेत पर्वतांच्या पोटात घुसतात. लंकाधिपती रावणाने या सरो-वराच्या काठी शिवाच्या प्रसन्नतेसाठी तप केले, म्हणून त्याला हे नाव मिळाले. मानस सरोवराचा आकार सामान्यपणे अंड्या-सारखा आहे. समुद्रसपाटीपासून मानसाची उंची सुमारे १५ हजार फूट आहे. त्याचा परिघ सुमारे ५४ मैलांचा असून खोली ३५० फूट आहे. त्याचे पाणी निळसर व अत्यंत स्वच्छ असते. त्यात दिवसभर लाटा उसळत असतात. रात्री मात्र ते शांत असते. मानसात मासे आहेत व राजहंसही आहेत. राजहंस व सामान्य हंस अशा दोन हंसजाती तिथे आहेत. राजहंस शुभ्र असतात, तर सामान्य हंस मातट पांढरे किंवा बदामी रंगाचे असतात. या सरोवरात कमळांचा मात्र सर्वस्वी अभाव आहे.

मानस सरोवराचा पृष्ठभाग बर्फाच्छादित असतो. त्याच्या तळाशी उकळत्या पाण्याचे झरे आहेत. त्यांतून निघणाऱ्या वाफेच्या दाबाने मानस पृष्ठावरच्या बर्फाचे मोठमोठे खंड हिवा-ळ्यात त्याच्या तीरावर फेकले जातात. त्यामुळेच मानसाचा बर्फाच्छादित भाग भेगाळल्यागत दिसतो. या पोटातल्या कढत पाण्याच्या झऱ्यांमुळे मानसाचे पाणी सौम्य शीतल असते. त्यामुळे त्यात स्नान करणे त्रासदायक वाटत नाही.

असे सांगतात, की कोण्या एका काळी मानस सरोवराचे पाणी राक्षसतालामध्ये जात असे. पण सांप्रत तसे होत नाही. जल-धारेचे ते स्थान आजही दिसून येते; पण सांप्रत तो भाग उंच झाला आहे. प्रत्यक्षात मानस सरोवरातून कोणत्याही नदीचा उगम दिसत नाही; पण संशोधकांचे मत असेआ हे, की मान-साचे पाणी भूगर्भातून कित्येक कोस दूर जाऊन मग वर येते आणि तेच ठिकाण एखाद्या नदीचे उगमस्थान ठरते. शरयू व ब्रह्मपुत्रा या नद्या अशाच प्रकारे मानसातून उगमपावल्या आहेत.

हे सरोवर विधात्याच्या मनातून निर्माण झाल्याचे वाल्मीकि-रामायणात म्हटले आहे, तो श्लोक (बाल. २४.८) असा–

कैलासपर्वते राम मनसा निर्मितं परम् ।
ब्रह्मणा नरशार्दूल तेनेदं मानसं सरः ॥

अर्थ – (विश्वामित्र म्हणतो) हे नरशार्दूल रामा, कैलास पर्वतावर ब्रह्मदेवाने आपल्या मनापासून निर्माण केलेले एक विशाल सरोवर आहे. मनोनिर्मित असल्यामुळेच त्याला मानस सरोवर असे म्हणतात.

याचा महिमा महाभारतात पुढीलप्रमाणे गाइलेला आहे–

ततो गच्छेत राजेन्द्र मानसं तीर्थमुत्तमम् ।
तत्र स्नात्वा नरो राजन् रुद्रलोके महीयते ॥
(म. भा. वन. ८२)

अर्थ –(पितामह व सावित्री यांच्या तीर्थाचे स्नान केल्यावर) हे नृपश्रेष्ठा, उत्तम अशा मानस तीर्थाला जावे. तिथे स्नान केल्याने हे राजा, मनुष्य रुद्रलोकामध्ये पूजित होतो.

विष्णूने मत्स्यावतार घेतला तो मानस सरोवरात, असे वामन पुराणात म्हटले आहे (७८.३).

मानस सरोवराची यात्रा अत्यंत कष्टप्रद आहे. मानसा-कडे जायला हिमालयातून अनेक पायवाटा आहेत. त्या सर्वांत अलमोड्यावरून जाणारा रस्ता जास्त सोयीचा समजतात. हा मार्ग सुमारे २०९ मैलांचा आहे. अलमोड्यापासून गर्बिआंग, पुढे लिपुखिंड आणि त्यापुढे तकलाकोट लागते. तकलाकोट हे तिबेटातील पहिले गाव होय. तकलाकोटापासून मानस सरो-वराचा दक्षिणकाठ सुमारे ३२ मैल आहे. तकलाकोटपासून पुढचा प्रवास अधिक कष्टप्रद आहे. चालणे शक्य नसल्यास बसण्यासाठी घोडी व सामानासाठी खेचरे भाड्याने घ्यावी लाग-तात. हा भाग अगदी उजाड असून, फूट–सवाफूट वाढणाऱ्या काटेरी झुडुपांव्यतिरिक्त तिथे अन्य काहीही उगवत नाही. हवा विरळ झाल्यामुळे धाप लागते व थकवाही फार येतो. वाटेत कुठेही घर नाही, किंवा कुठलाही आडोसा नाही. त्यामुळे मुक्कामा-साठी राहुट्या बरोबर घ्याव्या लागतात आणि चोर दरवडे-खोरांपासून उपद्रव होऊ नये म्हणून काही शस्त्रधारी रक्षकही सोबत घ्यावे लागतात. या सर्व गोष्टी गर्बिआंग येथे मिळतात.

भाविक यात्रेकरूंच्या दृष्टीने कैलास-मानसाची यात्रा म्हणजे यात्राकृत्याची परिसीमा होय. पण फारच थोडे यात्रेकरू कैलास-मानसाच्या यात्रेला जाण्याचे धैर्य दाखवतात. इंग्रजी राजवटीच्या काळात कैलास-मानसाला जाण्यासाठी पासपोर्ट वगैरे काही लागत नसे. पण तिबेटावर चीनचे आधिपत्य आल्यापासून ही यात्रेची वाटच आता बंद झाली आहे. पाहा–कैलास. [कल्याण तीर्थांक; हि. कै. मा.; प. भा. व.; हिमालय दर्शन]

मानसिंह (१७८२–१८४३ इ. स.) एक राजस्थानी हिंदी कवी. हा राजपुत्र होता. गुमानसिंह हे याच्या पित्याचे नाव होय. वयाच्या एकविसाव्या वर्षी मानसिंह

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुरच्या गादीवर बसला. गादीवर आल्यानंतर याला अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. त्यांत नाथसंप्रदायी लोकांचाही वाटा होता. मानसिंहाने त्या सर्व संकटांवर मात केली, पण त्याला नाथसंप्रदायी साधूंचा परिहार करता आला नाही. अखेर याने संन्यास घेतला आणि भ्रमंतीला प्रारंभ केला.

मानसिंह जसा कविताप्रेमी होता, तसा तो कविप्रेमीही होता. त्याने अनेक कवींना आश्रय दिला होता. बांकीदास हा प्रसिद्ध कवी याच्याच आश्रयाखाली होता. मानसिंहाचा संस्कृत, पिंगल आणि मारवाडी या तीन्ही भाषांवर अधिकार होता. या तीन्ही भाषांमधून तो कविता करीत असे. याने पिंगल भाषेत रचलेले सुमारे बावीस ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यांतील काहींची नावे अशी– कृष्णविलास, नाथचरित्र, जलंधरचरित्र, नाथपुराण, नाथस्तोत्र, सिंधुगंगा, इत्यादी.

राजस्थानामध्ये याची कविता खूप लोकप्रिय आहे. याचे कारण म्हणजे त्याने अनेक गंभीर दार्शनिक विचार आपल्या कवितेत साध्या भाषेतून प्रकट केले आहेत. गेयता, गतिमानता आणि भावुकता हे याच्या काव्याचे विशेष होत. [रा. पिं. सा.]

मानसी जैनांची एक विद्यादेवी. श्वेतांबर जैन हिची दोन स्वरूपे मानतात. एका स्वरूपात ही हंसावर बसलेली असून, हिच्या एका हातात वज्र आणि दुसरा हात वरद मुद्रेत असतो. दुसऱ्या स्वरूपात ही सिंहारूढ व चतुर्भुज आहे. तिचा एक हात वरद मुद्रेत असून अन्य हातांत वज्र, माला, इ. वस्तू असतात. दिगंबरमते हिचे वाहन सर्प आहे. यावरून हिचे मनसा देवीबरोबर साधर्म्य दिसते. [जै. इ.; देवीकोश ३]

मानसी गंगा व्रजमंडलातील एक तीर्थ. हे स्थान मथुरा नगरीपासून तेरा मैल दूर असलेल्या गोवर्धन भागात आहे. एक नदी अडवून तयार केलेला हा तलाव आहे.

या तलावाच्या तीरावर भगवानदासाने बांधलेले हरिदेवाचे मंदिर आहे. मंदिरासमोर एखादा जलाशय हवा म्हणून भगवानदासाने हा तलाव खोदला. नंतर मानसिंह नावाच्या त्याच्या मुलाने त्याची पक्की बांधणी केली. त्यामुळे मानसिंहगंगा असे नाव या तलावाला मिळाले. त्याचेच संस्कृतीकरण मानसी गंगा असे झाले आहे. या तलावाला चारही बाजूंनी विविध राजा-महाराजांनी सुंदर आणि पक्के घाट बांधले आहेत. या तलावात गिरिराज पर्वताचे एक शिखर असून, त्याची गिरिराजमुख म्हणून पूजा केली जाते. या तीर्थस्थानी हरिदेवमंदिराव्यतिरिक्त किशोरीश्याममंदिर आणि त्याच्या नजिक सुरजमल जाटाची पत्नी किशोरी हिचा महाल आहे. दिवाळीच्या सणात इथे हरिदेवाची पूजा, दीपदान, इ. कार्यक्रम होतात. दीपदान उत्सव सुरजमल जाटाने सुरू केला. [व्र. सां. इ.]

मानस्तंभ एक शिल्पप्रकार. दर्शनार्थींचा मद गळून पडावा आणि त्याच्या मनात धर्मभावना जागी व्हावी या हेतूने मानस्तंभांची उभारणी करण्यात येते. विशेषतः जैनांनी हा शिल्पप्रकार रूढ केला असे म्हणतात. जैनांनी त्याच्या उभारणीचे काही नियमही सांगितले आहेत. हा रस्त्याच्या मधोमध किंवा मंदिरात उभारतात. हा उंच सुळक्यासारखा असून, आकाराने गोल किंवा क्वचित चौरस असतो. तो खाली मोठा असून वर लहान होत जातो. त्याच्यावर छतासारखी एक छत्री असते. त्याच्या भोवती प्राकार असून, चारही दिशांना चार गोपुरद्वारे आणि चार वनखंडे असतात. प्रत्येक वनात पूर्वादी क्रमाने सोम, यम, वरुण व कुबेर यांचा निवास असतो, अशी समजूत आहे. या वनांप्रमाणे चारही दिशांना चार विहिरी असून, त्यांनाही नावे असतात. जैन कल्पनेप्रमाणे याची उंची तीर्थंकराच्या बारा पट असावी लागते. सर्वांत वर प्रत्येक दिशेला एकेक याप्रमाणे आठ प्रतिहार्यांसह चार जिनप्रतिमा असाव्या लागतात. चितोड गडावरील कीर्तिस्तंभ हे मानस्तंभाचे उत्तम उदाहरण होय. याची उंची ८० फूट असून तो, सातमजली व चौकोनी आहे. हा इ. स. च्या १५ व्या शतकात बांधला गेला, असे म्हणतात. या स्तंभावर कोरलेल्या मूर्ती सुरेख आहेत. [भा. सं. जै. यो.; जै. सं. सं.]

मानिनी शृंगारनायिकांपैकी एक नायिका. आपला प्रियकर अन्य स्त्रीकडे आकर्षित झाला आहे, हे जाणून ईर्ष्येने प्रियकरावर रुसून बसलेली नायिका म्हणजे मानिनी.

मानिनीला स्वतःच्या रूपगुणांविषयी अभिमान असतो. हा एक शृंगारनायिकेचा अवस्थाभेद आहे. पार्वती ही मानिनी कशी होती, ते मानिनी हा शब्द वापरून कालिदासाने पुढील श्लोकात सांगितले आहे –

इयं महेन्द्रप्रभृतीनधिश्रियश्चतुर्दिगीशानवमत्य मानिनी ।
अरूपहार्यं मदनस्य निग्रहात् पिनाकपाणिं पतिमाप्तुमिच्छति ।।

(कुमार संभव. ५.५३)

अर्थ– ही मानिनी पार्वती धनाढ्य अशा इंद्रप्रभृती चार दिक्पालांना अवमानून, मदनाच्या निग्रहामुळे रूपाला न भुलणारा असा पिनाकपाणी शंकर आपल्याला पती मिळावा म्हणून इच्छा करते.

मानुष लिंग शिवलिंगाचा एक प्रकार. ही लिंगे माणसांनी घडविलेली असतात, म्हणून यांना मानुष लिंगे हे नाव मिळाले असावे. याची स्थिर लिंगांत गणना होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मभाग, विष्णुभाग व रुद्रभाग असे याचे तीन भाग असतात. सर्वांत खालच्या भागाला ब्रह्मभाग असे म्हणतात. हा भाग चौकोनी असतो. मधल्या अष्टकोनी भागाला विष्णुभाग असे नाव आहे. हे दोन्ही भाग जमिनीत पुरलेले असतात. सर्वांत वरच्या गोल उभट भागाला रुद्रभाग हे नाव आहे. याला पूजाभागही म्हणतात, कारण पूजासाहित्य यावरच वाहिले जाते. रुद्रभागावर काही रेषा असाव्या, असे मूर्तिशास्त्रावरील ग्रंथांत म्हटले आहे. या रेषांना ब्रह्मसूत्रे म्हणतात. दैविक व आर्षक लिंगांवर अशा रेषा नसतात.

या लिंगाच्या तीन भागांच्या आकार-प्रकारावरून त्यांचे दहा भाग कल्पिले आहेत, ते असे– (१) सार्वदेशिक (२) सर्वसम (३) वर्धमान (४) शैवाधिक (५) स्वस्तिक (६) त्रैराशिक (७) अघ्य (८) नगर (९) द्रविड व (१०) वेसर. [डे. हिं. इ.; शिवलिंगोपासना]

मानुषी बुद्ध बत्तीस शुभ महालक्षणे आणि ऐंशी लघुलक्षणे जो धारण करतो तो बुद्ध, अशी बौद्धांच्या दोन्ही पंथांची धारणा आहे. ही सर्व बुद्धाची बाह्य लक्षणे होत. याव्यतिरिक्त नागार्जुनाने आपल्या धर्मसंग्रह ग्रंथात तीन प्रकारची मानसिक लक्षणे सांगितली आहेत; ती अशी – दशबले, अठरा आवेनिक धर्म आणि चार वैशारद्ये. हीनयान पंथाचे लोक चोवीस बुद्ध आणि प्रत्येकाचा निरनिराळा बोधिवृक्ष मानतात. महायान लोकांनी ही संख्या बत्तीसपर्यंत वाढविली असून, त्यांतील शेवटच्या सात तथागतांना मानुषी बुद्ध मानले आहे. त्यांची नावे अशी – (१) विपाशी (२) शिखी (३) विश्वभू (४) क्रकुच्छंद (५) कनकमुनी (६) कश्यप आणि (७) शाक्यसिंह. या सातही मानुषी बुद्धांमध्ये पहिले चार बुद्ध अस्तित्वात आले होते की नाही, याबद्दल अजूनही संदेह आहे. मानुषी बुद्धांचा रंग पिवळा असतो. ते सर्व भूमिस्पर्श मुद्रेत खोदलेले असतात.

मानुषी बुद्धांच्या मानुषी बुद्धशक्ती आहेत, त्यांची नावे पुढीलप्रमाणे – (१) विपश्यंती (२) शिखिमालिनी (३) विश्वधरा (४) ककुद्वती (५) कंठमालिनी (६) महीधरा आणि (७) यशोधरा.

मानुषी बुद्ध आणि त्यांच्या शक्ती यांच्यापासून निर्माण झालेले सात मानुषी बोधिसत्त्वही आहेत. त्यांची नावे अशी – (१) महामती (२) रत्नधर (३) आकाशगंज (४) शकमंगल (५) कनकराज (६) धर्मधर (७) आनंद. [इं. बु. इ.]

मान्य मैत्रावरुणी एक सूक्तद्रष्टा. मान्य हे अगस्त्याचे पैतृक नाव आहे, असे सांगतात. ऋग्वेदातील याच्या नावावर असलेल्या एका सूक्तामध्ये मत्स्यांवर कथा आढळते (८.६७). कोळ्याच्या जाळ्यात अडकलेल्या मत्स्यांनी आदित्य व अदितिदेवी यांची प्रार्थना करून स्वतःची सुटका करून घेतली, अशी ती कथा आहे. जाळ्यातून सुटका झालेल्या माशांनी अखेर कोळ्याचेही कुशल चिंतिले आहे. माशांनी केलेल्या प्रार्थनेच्या काही ऋचा अशा –

अस्ति देवा अंहोरुर्वस्ति रत्नमनागसः । आदित्या अद्भुतैनसः ॥
मा नः सेतुः सिषेदयं महे वृणक्तु नस्परि । इन्द्र इद्धि श्रुतो वशी ॥
मा नो मृचा रिपूणां वृजिनानामविष्यवः । देवा अभि प्र मृक्षत ॥
(ऋ. ८. ६७.७-९)

अर्थ– दुष्टांचे पाप, तसेच निष्पापांचे पुण्य जाणणाऱ्या हे आदित्यांनो, आम्ही संपूर्णतः निष्पाप आहोत.

हे आदित्यांनो, जाळ्यात अडकलेल्या आम्हां भक्तांना तुम्ही मुक्त करा. सृष्टिनियंत्रक इंद्र आम्हांस मुक्त करो.

हे रक्षणेच्छू आदित्यदेवांनो, हिंसक शत्रूंच्या जाळ्यापासून तुम्ही आमची मुक्तता करा.

ऋग्वेदातील अनेक कथासूक्तांपैकी हे एक आहे. शिवाय हे एक नीतिसूक्तही आहे. पाहा – अगस्त्य. [ऋ. म. भा.]

मापौडी एक देवता. या देवतेची मंदिरे बिहार प्रदेशाच्या सिंगभूम भागातील पोरहट व सेरैकेला या दोन गावी आहेत. ही दोन्ही गावे संस्थानिकांच्या राजधान्या होत्या. या देवीचे दर्शन केवळ राजघराण्यातील लोकच घेऊ शकत. सामान्य जनांना हिचे दर्शन घेण्यास परवानगी नसे.

मापौडीची मूर्ती अष्टधातूची असून, ती त्रिनेत्र चतुर्भुज आणि सिंहवाहना आहे. हिच्या हातांमध्ये तरवार, गदा, मुंड आणि खापर आहे.

या देवतेचा इतिहास बराच प्राचीन असावा. वंशप्रवलेख नावाचा, भूर्जपत्रांवर लिहिलेला एक ग्रंथ आहे. इ. स. १६४३ साली मगुनी राऊत डोग्रा याने तो नकलून घेतला. ग्रंथ ओडिया भाषेत आहे. या ग्रंथावरून या देवीविषयी कळते, ते असे– प्रभु रामचंद्र रामेश्वराची आराधना करीत असता मापौडी त्यांच्या स्वप्नात जाऊन म्हणाली, की मी इथल्या शिवलिंगाच्या रक्षणासाठी अवतार धारण केला आहे. या ग्रंथाप्रमाणे मंडलेश्वरी व हिंगुलाक्षी ही या देवतेची अन्य नावे असून, पौडी हा पार्वतीचा अपभ्रंश असावा.

या देवीने सिंगभूम या भागात यायचे ठरविले आणि मुलीच्या वेषात ही केओंझर, बोनाय, जमडा, कोंयतला या मार्गाने निघाली. वाटेत खिरा व निरा या बंधुद्वयाच्या स्वप्नात जाऊन देवीने त्यांना आपले स्थान दाखवून, आपली मूर्ती राजाच्या घरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पोचवण्याची आज्ञा केली. तदनुसार त्या बंधूंनी ती मूर्ती एका झाडाखाली टोपलीतून शोधून काढली आणि पोरहटच्या अच्युतसिंग नामक राजाकडे पोचती केली. राजाने ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीला या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. त्यामुळे मापौडी देवी राजघराण्याची कुलदेवता बनली.

भाद्रपद महिन्यात सोळा दिवस या देवीचा वार्षिक उत्सव करतात. देवीला कोंबडे, बकरे यांचा बळी देतात. नव्या भाताचा नवेद्य दाखविल्याशिवाय इथे कोणी ते भात खात नाहीत.

इ. स. १५८१ च्या सुमाराला भूमिया, कोल, इ. वन्य जमातींनी पोरहटच्या राजाविरुद्ध बंड केले. या रणधुमाळीत देवी गहाळ झाली. पुढे काही दिवसांनी ही देवी एका नदीत सापडली. इ. स. च्या अठराव्या शतकाच्या प्रारंभी येथील राजांनी बौद्ध धर्माला आश्रय दिला. त्यामुळे साहजिकच देवी स्थानभ्रष्ट झाली. पुढे हिची मूर्ती योगायोगाने सेरैकेलाच्या प्रधानाच्या हाती लागली. तिथला राजा अभिरामसिंग व प्रधान नरहरी यांनी तिची ज्येष्ठ शुद्ध चतुर्थीला प्राणप्रतिष्ठा केली.

देवीची मूर्ती सेरैकेला इथे आली, त्यामुळे या गावची भरभराट झाली आणि पोरहटची पिछेहाट झाली, अशी समजूत आहे. यातून या दोन राजघराण्यांत वैर उत्पन्न झाले. पोरहटच्या राजाने अभिरामसिंगाचा पुत्र दत्तक घेतला होता. या मुलाकरवी सेरैकेला येथील देवीची मूर्ती पळवून आणण्याचे प्रयत्न झाले. परंतु पोरहटच्या राजाला यात अपयश आले. पुढे असा प्रकार घडू नये म्हणून अभिरामसिंगाने सामान्य जनांना तिच्या दर्शनाला बंदी केली. [देवीकोश ३]

मामकी एक बौद्ध देवता. ही अक्षोभ्य या ध्यानी बुद्धाच्या वज्रकुलातील असून, त्याची आत्मिक शक्ती आहे. ही कृष्णवर्ण असून, कृष्ण वज्र हे तिचे अभिधानचिह्न आहे. तिच्या ठायी जल या द्रव्याचे गुण आहेत.

मामकीच्या प्रतिमा फारशा आढळत नाहीत. पण या देवतेची काही नेपाळी चित्रे उपलब्ध आहेत. [इं. बु. इ.]

मामसावळे कुलाबा जिल्ह्यात प्रचलित असलेला विवाहातील एक लौकिक सोहळा. याला मामेसोहळा असेही म्हणतात. या सोहळ्याचा खर्च मामा करतो म्हणून याला मामसावळे असे नाव मिळाले असावे. यात नवऱ्या मुलाचा मामा लग्न लावण्यापूर्वी नवऱ्याची घोड्यावरून मिरवणूक काढतो; नंतर अनेकांना बोलवून पानसुपारी देतो. मग नवऱ्या मुलीचा मामाही वधूची अशीच मिरवणूक काढतो. त्या वेळी नवऱ्या मुलाने काढून ठेवलेला मिरवणुकीचा पोषाख मुलीला घालतात. मुलगी तो पुरुषी पोषाख करून मिरवीत जाते. [बदलापूर]

मामा आईच्या भावाला मामा म्हणतात. मामा या अर्थी संस्कृतात मातुल शब्द आहे. मामा शब्द त्यावरून निघालेला नाही. काहींच्या मते तो संस्कृत माम किंवा मामक या शब्दापासून बनला असावा. माम हा शब्द याच किंवा यासारख्या अर्थाने पंचतंत्रात वापरलेला दिसतो.

मामकी

वैदिक कुटुंबपद्धती ही पितृप्रधान असल्यामुळे तिच्या मध्ये आईच्या भावाला अर्थात मामाला विशेष महत्त्व नव्हते. त्याचा मैत्रायणी संहितेत केवळ एकदाच उल्लेख आलेला आहे (१·६·१२). पण महाकाव्ये आणि स्मृती यांच्या काळी मामाचे महत्त्व वाढलेले दिसते. रामायणात रावण आपल्या बहिणीच्या अपमानाचा सूड घेण्यासाठी आपला मामा मारीच याच्याशी सल्ला मसलत करताना दिसतो. महाभारतात दुर्योधन आपला मामा शकुनी याच्या सल्ल्याने व कौशल्याने पांडवांना द्यूतात हरवितो. महाभारतात अनेक ठिकाणी मामाची गणना प्रिय नातेवाइकांमध्ये केलेली आहे त्यांतील एक श्लोक (शल्य. ४·९) असा–

पुत्रो भ्राता पिता चैव स्वस्त्रियो मातुलस्तथा ।
सम्बन्धिबान्धवाश्चैव योद्‌ध्या वै क्षत्रजीविना ।।

अर्थ – क्षत्रियधर्माने जीवन व्यतीत करू इच्छिणाऱ्या पुरुषाने पुत्र, भ्राता, पिता, भाचा, मामा, बंधुबांधव आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इतर नातेवाईक या सर्वांशी युद्ध करणे प्राप्त झाल्यास ते कर्तव्य म्हणून करावे.

सूत्रसाहित्यात मधुपर्काच्या द्वारा सन्मानित केल्या जाणाऱ्या व्यक्तींमध्ये मामाचे स्थान सामान्यतः चुलत्यानंतर सांगितलेले आहे. पण मनुस्मृतीमध्ये मामाला अग्रक्रम दिलेला आहे. ज्यांच्या बरोबर कलह करणे योग्य नव्हे, अशा व्यक्तींत काकाच्या अगोदर मामाचा उल्लेख आहे (मनु. ४.१७९-१८०).

बृहन्नारदीय पुराणातही मामाला पूज्य मानले आहे (९.९२). यावरून असे स्पष्ट दिसते, की वैदिक कालात आणि सूत्रकालात मामाला कुटुंबात प्रतिष्ठा मिळालेली नव्हती. मनुस्मृती, महाभारत आणि पुराणे यांच्या काळात त्याला महत्त्व प्राप्त झाले.

आपल्या कित्येक लोकाचारांमध्ये मामा प्रमुखपणे दिसून येतो; आणि तोही बहुधा सर्व जातींमध्ये. कित्येक ब्राह्मण पोटजातींत समावर्तनाच्या प्रसंगी मामाने स्नातकाचा अर्थात भाच्याचा मधुपर्क करण्याची पद्धती आहे. कित्येक ब्राह्मणांमध्ये लग्नाच्या वेळचा नवरदेवाचा मधुपर्कही मामाने करण्याची रूढी आहे. मुंजीत भिक्षावळीचा खर्च मामाने करायचा असतो. कित्येक ब्राह्मणांत मामा-भाचीचा विवाहही निषिद्ध मानला जात नाही. कित्येक देशस्थ ब्राह्मणांमध्ये मामाकडून कन्यादान करवण्याचा प्रघात आहे. समावर्तनानंतर काशीला जाण्यासाठी निघालेल्या स्नातकाला आपली कन्या देण्याचे कबूल करून मामाने परतवून आणायचे अशीही चाल आहे.

काही ब्राह्मणेतर जातींमध्ये मुलीचे आईबाप हयात असताही मामाच वधूचे कन्यादान करतो. लग्नाच्या वेळी मुलीचा मामाच तिला कडेवर घेऊन पाटावर नेऊन उभी करतो. सासरी कसे वागावे, याचा मुलीला उपदेश करण्याचे काम दैवज्ञ समाजात मामाकडेच असते. मुंजीच्या आधी मुलगा मामाच्या मांडीवर बसतो व मुलाचा बाप त्याला अहेर करतो, अशीही प्रथा दैवज्ञांमध्ये आहे. काही जातींत बाशिंग बांधण्याचा अधिकार मामाचा असतो आणि हे बाशिंग मामानेच आपल्या खर्चाने विकत घेतलेले असते. शिंपी आणि अन्य काही जातींतही बाशिंग व काकण मामानेच द्यायचे असते. काही मराठा जातींत नवऱ्या मुलाचा मोह (श्मश्रू) करतात, तेव्हा त्याला मामाच्या मांडीवर बसवितात.

मूल जन्मल्यावर पाळणा मामाकडून येणे अशी चाल काही ठिकाणी दिसते. कित्येक जातींत मामाच्या हातूनच मुलाला पाळण्यात घालतात. ठाकूर आदिवासींत मुलाचे जावळ करायचे असेल, तर मामाकडून त्याच्या केसांच्या दोन बटा तरी प्रथम काढवतात. परदेशी तेली लोकांमध्ये अंतरपाटाचा शेला मामाने द्यायचा असतो. मांदळमामा हा विधीही मामाचे महत्त्व दाखवणाराच आहे. मामाला महत्त्व देणाऱ्या या सर्व चालीरीती मातृसत्ताक कुटुंबपद्धतीतून आल्या असाव्या. कारण मातृ[सत्ताक] कुटुंबपद्धतीत मुलगी लग्न होऊनही सासरी जात नाही. [तिचा] पतीच प्रसंगविशेषी तिच्या माहेरी येतो. त्यामुळे जन्म[लेल्या] मुलांचा प्रतिपाळ मामालाच करावा लागतो. त्याचा बाप, चुल[ता] इ. पितृकुलातली माणसे घरात नसून अन्यत्र असतात. त्यामुळे भाचा किंवा भाची यांच्या संस्कारात मामालाच पुढाकार घ्या[वा] लागतो. पाहा – मांदळमामा. [हिं. प. मी.; बदलापूर]

मामादेवी राजस्थानातील एक देवता. ही सर्व देवांची मा[ता] आहे, अशी इथल्या लोकांची श्रद्धा आहे. मा[ता] जननी म्हणजे जन्मकाळची माता आणि आसपूर्णी म्हणजे इच्छा पूर्ण करणारी, असे हिचे वर्णन करतात. या देवी[च्या] सभोवती इतर देवतांच्या मूर्ती आढळतात. गंगौर (उदयपूर) इथे हिची एक मूर्ती आहे. यात्रेच्या वेळी तिला उदयपूर[च्या] तलावात स्नानासाठी नेतात. यामुळे वर्षभरात तिला [आलेले] मालिन्य नष्ट होते, अशी समजूत आहे. या देवीमुळे गंगौर क्षेत्राचे माहात्म्य प्राप्त झाले आहे. राजपूत स्त्रियांनी या [ठिकाणी] जोहार केला होता. त्यामुळे यात्रेकरू लोक मामादेवी[च्या] दर्शनाप्रमाणेच त्या जोहारस्थानाचेही दर्शन घेतात. मामा[देवी] हे दुर्गेचेच एक रूप आहे, असे मानतात. [देवीकोश ३]

मामुलिया बुंदेलखंडातील मुलींचा एक लौकिक आचार. भाद्रपद अथवा आश्विन मासातील वद्य ... सामान्यपणे सायंकाळी केला जातो. त्यासाठी मुली एका अंगणात जमतात व तिथला थोडासा भाग शेणाने ... त्यावर एखाद्या काटेरी झाडाची फांदी पुरतात. याला म[ामु]लिया असे म्हणतात. प्रथम या फांदीची हळद व तांदूळ ... पूजा करतात. नंतर काट्यांवर विविध रंगांची फुले खोव[तात]. मग चणे, काकडी, इ. पदार्थांचा नैवेद्य दाखवून त्या फांदीला [प्रद]क्षिणा घालतात. या कार्यक्रमानंतर सर्व मुली मिळून गाणी ... नदीवर जातात आणि ती फांदी नदीत टाकतात. [हि. ... इ. १६; श्री. वासुदेव गोस्वामी – विंध्यभूमी, ऑगस्ट १९...

मायराणी एक क्षुद्र देवता. महामायी या वेदपूर्व लोक... तेचे हे एक स्वरूप असावे, असे म्हणतात. ... मंदिरे आढळत नाहीत; पण हिच्या नावाचे टाक अनेक ... देवघरांत पूजले जातात. गुणकीर्ती या जैन कवीने ... धर्मामृत नामक ग्रंथात आणि एकनाथ, तुकाराम, रामदास, महंमद, इ. संतकवींनी हिचा उल्लेख केलेला आहे.

हिचा कुलधर्म अनेक ब्राह्मण घराण्यांतून केला जातो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केलेल्या विधवेची पूजा, असे त्याचे स्वरूप असते. या विधवेला विठ्ठल-सवाष्ण असे म्हणतात. हा कुलधर्म नित्य आणि नैमित्तिक स्वरूपांत आढळतो. काही ठिकाणीं विवाहापूर्वी हा विधी उरकतात. ब्राह्मणांच्या बरोबर, परंतु एकांतात या विधवेला जेवायला वाढतात. ती भोजनाला बसण्यापूर्वी प्रथम तिच्या पात्राखाली आणि नंतर तिच्या पाठीवर हळदकुंकू वाहतात. भोजनोत्तर तिची लुगडे देऊन बोळवण करतात. [कृ. वि. आचार्य-भा. इ. सं. मं., इतिवृत्त, शके १८३८]

माया (१) भारतीय तत्त्वज्ञानातली एक कल्पना. माया शब्दाची व्याख्या विद्यारण्यांनी आपल्या पंचदशीत पुढील दोन श्लोकांत सांगितली आहे —

चिदानन्दमयब्रह्मप्रतिबिम्बसमन्विता ।
तमोरजःसत्त्वगुणा प्रकृतिर्द्विविधा च सा ॥
सत्त्वशुद्धविशुद्धिभ्यां मायाविद्ये च ते मते ।
मायाबिम्बो वशीकृत्य तां स्यात्सर्वज्ञ ईश्वरः ॥

(पंच. १. १५-१६)

अर्थ — जी चिदानंदमय ब्रह्माच्या प्रतिच्छायेने युक्त आणि तम-रज-सत्त्व या गुणांची साम्यावस्था ती प्रकृती होय. ती दोन प्रकारची आहे. सत्त्वगुणाची शुद्धी व अशुद्धी यांच्या योगाने माया व अविद्या असे तिचे (प्रकृतीचे) दोन भेद मानले आहेत. (म्हणजे शुद्ध सत्त्वप्रधान प्रकृतीला माया म्हणतात व मलिनसत्त्वप्रधान प्रकृतीला अविद्या म्हणतात.) मायेत प्रतिबिंबित झालेला आत्मा त्या मायेला स्वाधीन ठेवून सर्वज्ञ असा ईश्वर होतो.

निर्विशेष व निर्लक्षण अशा ब्रह्मापासून सविशेष व सलक्षण अशा जगताची उत्पत्ती कशी झाली, एकमेवाद्वितीय अशा ब्रह्मापासून नानाविध जगताची सृष्टी कशी झाली, या प्रश्नांचे यथार्थ उत्तर मिळण्यासाठी मायेचे स्वरूप जाणणे आवश्यक आहे. शंकराचार्यांनी माया व अविद्या या दोन्ही शब्दांचा प्रयोग समान अर्थाने केला आहे. पुढच्या वेदान्त्यांनी मात्र त्यांत भेद मानला असून, वरील व्याख्येमध्ये तो स्पष्ट झाला आहे. परमेश्वराच्या बीजशक्तीचे नाव माया आहे. या अविद्यात्मक बीजशक्तीला अव्यक्त असे म्हणतात. ही शक्ती परमेश्वराचा आश्रय करून राहणारी महासुप्तिरूपिणी आहे. आत्मस्वरूप न ओळखणारे संसारी जीव या महासुप्तिरूपिणीच्या ठिकाणी शयन करतात (शारीरक भाष्य १.४.३). अग्नीची दाहक शक्ती जशी शारीरक असे हवे नित्य त्याच्या बरोबर असते, तशीच माया ही सदैवी ब्रह्माच्या संगतीत सदैव राहते. ती सत नाही किंवा असत नाही. ती त्यादोहोंहून विलक्षण आहे. म्हणून तिला अनिर्वचनीय म्हणतात. सत व असत अशी जगतातल्या पदार्थांची दोन रूपे आहेत. जे सर्वकाळ एकाच प्रकारचे असते, त्याला सत म्हणतात. कोणत्याही ज्ञानाने ते बाधित होत नाही. अन्य ज्ञानाच्या द्वारे पूर्व वस्तू बाधित झाल्यास त्याला असत म्हणतात. मायेच्या विषयात हे दोन्ही प्रकार असंगत आहेत. 'सत् चेन्न बाध्येत असत् चेन्न प्रतीयेत' = माया सत असती, तर ती ब्रह्मज्ञानाच्या योगाने बाधित झाली नसती आणि ती असत असती तर तिची प्रतीती आली नसती. म्हणून तिला अनिर्वचनीय म्हणावे लागते. या विषयी शंकराचार्यांच्या विवेकचूडामणीतील एक श्लोक असा —

सन्नाप्यसन्नाप्युभयात्मिका नो भिन्नाप्यभिन्नाप्युभयात्मिका नो।
साङ्गाप्यनङ्गाप्युभयात्मिका नो महाद्भुताऽनिर्वचनीयरूपा ॥

अर्थ — माया ही सत नव्हे व असतही नव्हे. ती भिन्न नव्हे आणि अभिन्नही नव्हे. ती उभयात्मकही नव्हे. ती सांग नव्हे, तशीच अनंगही नव्हे; तर ती महान अद्भुत असून, अनिर्वचनीय म्हणजे जिच्या विषयी काहीच बोलता येत नाही, अशी आहे.

माया ही भगवंताची अव्यक्त शक्ती असून, ती अनादी आहे. ती गुणत्रयाने युक्त अशी अविद्यारूपिणी आहे. तिचे अनुमान कार्यावरून होते. तीच या जगताला उत्पन्न करते, असे शंकराचार्यांनी म्हटले आहे.

आवरण आणि विक्षेप अशा मायेच्या दोन शक्ती आहेत. आवरणशक्ती ही ब्रह्माच्या शुद्ध स्वरूपाला झाकून टाकते आणि विक्षेपशक्ती त्या ब्रह्माच्या ठिकाणी पंचमहाभूतात्मक प्रपंच उत्पन्न करते.

योगवासिष्ठातील मत— मायेचे स्वरूप व कार्य याविषयी योगवासिष्ठात पुढील विचार मांडलेले आहेत — आपल्याला जे हे विश्व दिसते, ते माया नामक अविद्येचा विलास आहे. ही माया सत्य आणि असत्य यांचे अघटित मिश्रण करते आणि काहीतरी निराळाच भास उत्पन्न करते. जीव, जगत आणि ईश्वर या वस्तूंचे जे भान होते, ते मायानिर्मित आहे. जे नाही ते आहे, असे समजणे हीच माया होय.

जग हे मायेचे कार्य आहे; पण मायाच मुळी मिथ्या असल्यामुळे तिचे कार्य जो प्रपंच, तोही मिथ्या होय. जग हा ब्रह्माचा स्वभाव आहे, म्हणजे संकल्पामुळे ब्रह्म हेच जग बनले आहे. जग आणि ब्रह्म यांच्यामध्ये वस्तुतः कार्य-कारणाचा अभाव आहे. ब्रह्मापासून जग उत्पन्न व्हायला कोणतीच सहकारी कारणे नसल्यामुळे ब्रह्म हेच मायारूपाने जग बनले आहे, असे म्हणावे लागते.

सिद्धान्तोऽध्यात्मशास्त्राणां सर्वापह्नव एव हि ।
नाविद्यास्तीह नो माया शान्तं ब्रह्मदमक्रमम् ॥

अर्थ — सर्व द्वैतजाताचा निषेध हाच अध्यात्मशास्त्राचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सिद्धान्त आहे. तिथे अविद्या नाही व मायाही नाही. एकच ब्रह्म शांतरूपाने सर्वत्र भरलेले आहे.

वसिष्ठाने अशा प्रकारे मायेचा निरास करून ब्रह्म हेच एकमेवाद्वितीय असे सत्य आहे, असा सिद्धान्त मांडला आहे.

इतिहास – श्री. बहिरट यांनी 'मराठी संतांचा मायावाद' या लेखात माया शब्दाचा इतिहास कथन केला आहे. तो असा –

वैदिक कालापासून या शब्दाचा वापर करण्यात आला आहे. ऋग्वेदात माया शब्द अद्‌भुत, गूढ व अनाकलनीय शक्ती अशा अर्थी वापरला आहे. ती शक्ती निरनिराळ्या वर्गांत असल्याचे वर्णन आहे. त्याचप्रमाणे ती अमूर्त नसून, कोणाच्या तरी ठिकाणी असते. ती त्वष्ट्यासारख्या कारागिरात, दस्यूंमध्ये, असुरांमध्ये व देवांतही असते. ती नेहमी चांगलीच असते असेही नाही. ती ज्याच्याजवळ असेल त्याच्या स्वभावाप्रमाणे तिचे कार्य बरे होईल वा वाईट होईल. इन्द्र आपल्या मायेने अनेक रूपे धारण करतो (ऋ. ६. ४७. १८); मित्र व वरुण मायेने पर्जन्यवृष्टी करतात व आपल्या आधिपत्याचे रक्षण करतात (ऋ. ५. ६३. ३–७). माया ही देवाप्रमाणे असुराजवळही असते व इंद्र आपल्या मायेने असुराची माया जिंकतो, असे वर्णन आहे (ऋ. १.११.७). असुरास मायावी म्हटले आहे. अथर्ववेदात, मायेपासून माया जन्मली (८.९.५), विराटरूपातून तिचे दोहन झाले व तिच्यावर असुर जगतात. (८.१०.२२), असे वर्णन आहे. उपनिषद्‌ग्रंथांत 'माया' हा शब्द प्रथम श्वेताश्वतर-उपनिषदात आढळतो. "मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम्" (४.१०) माया ही महेश्वराची शक्ती मानली आहे. भगवद्‌गीतेत माया शब्द पाच-सहा ठिकाणी आला आहे. त्यामध्ये माया ही परमेश्वराची दैवी शक्ती आहे, असे सांगितले आहे. अज्ञानामुळे लोक या शक्तीकडे व तिच्या कार्याकडेच पाहातात व ज्याची शक्ती त्या देवास ओळखीत नाहीत, असे वर्णन आहे. पुढे शांकर वेदान्तात माया म्हणजे जगत्कारण सदसद्‌विलक्षण अनिर्वचनीय अज्ञान मानली गेली. ते स्वरूप गीतेत आढळत नाही.

ब्रह्मसूत्रांमध्ये 'माया' हा शब्द एका ठिकाणीच आला आहे. (३.२.३).

गौडपादाचार्यांच्या कारिकेमध्ये मात्र मायावाद स्पष्ट स्वरूपात प्रगट झाला आहे. कारिकांमध्ये सोळा ठिकाणी माया शब्द आला आहे; एवढेच नव्हे, तर वैतथ्य नावाचे एक स्वतंत्र प्रकरणच आहे. "मायामात्रमिदं द्वैतमद्वैतं परमार्थतः। (गौ. का. २–१७) ही त्यांची भूमिका आहे. एवढेच नव्हे तर मायावादाच्या पलिकडे जाऊन शेवटी अजातवाद म्हणजे विश्व झालेच नाही या तत्त्वावर गौडपादाचार्य स्थिर झाले आहेत. शंकराचार्यांच्या ग्रंथात मायावादाचे रूप परिणत स्वरूपात व्यक्त झाले आहे. त्यांनी अविद्या, माया, अज्ञान हे समानार्थक मानले असून, विश्व हे अविद्येचे, मायेचे अथवा अज्ञानाचे कार्य व माया ही सदसद्‌विलक्षण, अनादी व अनिर्वचनीय मानली आहे. रामानुज, मध्वादिकांना शंकराचार्यांचा हा मायावाद मान्य नाही. मायेचा अर्थही त्या सर्वांनी शंकराचार्यांनी सांगितलेल्या अर्थाहून भिन्न मानला आहे.

रामानुजाचार्य हे माया म्हणजे भिन्न भिन्न पदार्थ उत्पन्न करणारी त्रिगुणात्मक प्रकृती मानतात; तर मध्वाचार्य [illegible] भगवंताची इच्छा व वल्लभाचार्य भगवंताची विशेष शक्ती मानतात. काश्मीरीय शैवमतातही माया ही ईश्वराची शक्ती मानलेली आहे. या सर्वांच्या मतानुसार माया ही मिथ्या नसून सत्य आहे.

सामान्यपणे संतांची धारणा अशी आहे, की मायेमुळेच हा विश्वप्रपंच उभा झाला आहे. माया ही जगताचे उपादान कारण आहे. संतांनी सत्य माया किंवा विद्या माया असे मायेचे आणखी एक रूप मानले आहे. ही विद्या माया आत्मा व ब्रह्म यांच्या मीलनाच्या कामी साहाय्यक होते. हिच्या उलट अविद्या माया ही अज्ञानाचा प्रसार करणारी असून, ती [illegible] शिवांचे ऐक्य प्रस्थापित होऊ देत नाही. ती त्रिविध प्रलोभने पुढे करून आणि अनेक बाधा उपस्थित करून साधकाला [illegible] भ्रष्ट करते. वल्लभसंप्रदायातही भगवंताच्या शक्तिस्वरूप असलेल्या मायेची हीच दोन रूपे मानलेली आहेत.

संतांनी, विशेषतः निर्गुणी संतांनी या अविद्या मायेची [illegible] निंदा केली आहे. ठगिनी, वेश्या, रूखडी, सर्पिणी, नटिनी, [illegible] निंदाव्यजक विशेषणे योजून ते तिचा तिरस्कार करतात.

(२) एक देवता. गौतम बुद्धाच्या मातेचे नाव माया किंवा मायादेवी असे होते. उ. भारतात ती एक ग्रामदेवता या [illegible] पात पूजिली जाते. हिच्या दगडी मूर्ती काही ठिकाणी आढळतात. याच नावाची एक देवी जिनेश्वराची सेविका आहे.

(३) प्रातःस्मरणातील मोक्षदायक सप्तपुऱ्यांमधली एक पुरी. तिचे स्थान निश्चित नाही. स्कंद पुराणात (४.७.११) हरिद्वार क्षेत्रालाच मायापुरी असे म्हटले आहे. [भा. प्र. [illegible]

मायाजालक्रम बौध्द धर्मातील अवलोकितेश्वराच्या मूर्तीचा एक प्रकार. हे अवलोकितेश्वराचे [illegible] रूप असून, तंत्रविद्येतील एक उपास्य आहे. याचे वर्णन [illegible] पंचमुख, त्रिनेत्र, द्वादशभुज. वर्ण निळा. आसन प्रत्यालीढ. [illegible] डमरू, खट्वांग, पाश, अंकुश, वज्र, धनुष्य, बाण कपाल, [illegible] कमल, रत्न आणि चक्र ही आयुधे धारण करतो. [इं. बु. [illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मायाजालक्रम कुरुकुल्ला बौद्धांची एक देवता. मायाजाल तंत्रात हिचे ध्यान वर्णिले आहे ते असे – रक्तवर्ण. रक्तवस्त्र. षड्‌भुज. दोन हातांनी ही त्रैलोक्य-विजय मुद्रा आणि एका हाताने अभय मुद्रा दर्शविते. हिच्या एका हाती जपमाळ, दुसऱ्या हाती कमंडलू व तिसऱ्या हाती कुंद पुष्पाचा देठ असतो. हिच्या मस्तकावर पाच ध्यानी बुद्ध असून, ही तक्षकावर वज्रपर्यंकासनात बसलेली असते. [इं. बु. इ.]

मायापूर बंगालमधील नवद्वीपाच्या परिसरातले एक पुण्य-स्थळ. हे गंगेच्या पैलतीरावर असून, गौडीय मठाचे मुख्य स्थान आहे. इथले श्रीयोगपीठ हे मुख्य मंदिर असून, ते चैतन्यप्रभूंच्या आविर्भावाचे स्थळ समजले जाते. याव्यतिरिक्त इथे अनेक मठ-मंदिरे आहेत; पृथुकुंड नावाचे एक कुंडही आहे.

मायामोह भागवत संप्रदायाचे अनुयायी बुद्धाला मायामोह या नावाने विष्णूचा अवतार मानतात. दैत्यांना असत्य व वेदविरोधी विचार शिकवून त्यांच्या मनात भ्रम निर्माण करणे व त्या भ्रमात त्यांचा नाश करणे, या उद्देशाने विष्णूने हा अवतार धारण केला, असे समजतात. विष्णू पुराणात या अवताराचे वर्णन दिगंबर, मुंडित व मयूरपिच्छ धारण करणारा, असे केलेले आहे. [डे. हिं. इ.]

मायावरम द. भारतातील एक प्रसिद्ध शिवस्थान. मद्रास–तिरु–चिरापल्ली या लोहमार्गावरील हे स्थान तमिळनाडू राज्यात चिदंबरमपासून तेवीस मैलांवर आहे. मायूरम हे या क्षेत्राचे प्राचीन नाव असून, याला तमिळ भाषेत तिरुमायि-लाडुतुरै असे म्हणतात.

मयूरेश्वरमंदिर हे इथले प्रमुख मंदिर होय. मयूरेश्वर इथे लिंगाच्या स्वरूपात आहे. या मंदिराच्या परिसरात पार्वतीचे मंदिर असून, तिला अभयांबा म्हणून ओळखतात. तमिळ भाषेत हिला अंचला म्हणतात. या परिसरातच एक मोठे तळे आहे.

या मंदिराला मयूरेश्वरमंदिर हे नाव का प्राप्त झाले, या-संबंधी एक कथा सांगतात, ती अशी –रुद्रगणांनी दक्षयज्ञाचा विध्वंस करायला प्रारंभ केला, तव्हा एक (मयूर) मोर तिथे होता. तो सतीच्या आश्रयाला आला म्हणून सतीने त्याला अभय दिले नंतर सतीने योगाग्नीत शरीर जाळून टाकले. त्या वेळी तिच्या स्मरणात मोर होता. म्हणून सती लांडोरीरूपात उत्पन्न झाली आणि तिने त्याच रूपात शिवाराधना सुरू केली. शिवाने मयूरेश्वरलिंगाच्या रूपात तिला दर्शन दिले. नंतर सतीने लांडोरीरूपाचा त्याग करून हिमालयात पार्वतीचे रूप धारण केले. तिने मयूराला अभय दिले, म्हणून तिला अभयांबिका म्हणू लागले.

या मंदिरात निरनिराळ्या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या तीन गणेशमूर्ती आहेत. पहिला पेरिविनायक म्हणजे महागणपती. याला स्थलविनायक असेही म्हणतात. दुसरा अगस्त्य-विनायक. याची स्थापना अगस्तीने केली अशी श्रध्दा आहे. तिसऱ्या गणपतीचे नाव कालंजिया गणेश किंवा कोठीगणेश. धान्यसमृद्धीच्या आकांक्षेने या गणपतीची स्थापना झाली, असे म्हणतात. [कल्याणतीर्थांक; श्रीगणेश कोश]

मायिदेव (इ. स. चे १५ वे शतक) एक कन्नड वीरशैव आचार्य. विजापूर जिल्ह्यातील आयिपुरी म्हणजे सांप्रतचे ऐहोळ, हे त्याचे जन्मस्थान होते. पुढे तो विजयनगर येथे गेला. तिथल्या प्रौढदेवराय राजाने त्याचा सत्कार केला. मायिदेव हा महाविद्वान व वादपटू होता. अनेक पंडितांना वाद-विवादात जिंकून तो अजिंक्य ठरला. त्यामुळे त्या काळात सर्व-श्रेष्ठ पंडित अशी त्याची ख्याती झाली.

वीरशैव तत्त्वज्ञानावर याने अनुभवसूत्र नामक ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ त्या संप्रदायात अधिकृत मानला जातो. या व्यति-रिक्त शतकत्रय नावाचा एक ग्रंथ त्याने कन्नड भाषेत लिहिला आहे. वीरशैव पंथाचे प्रमुख तत्त्व जे षट्स्थल, त्याविषयी त्याने या ग्रंथात मूलग्राही विवेचन केले आहे. त्याच्या नावावर आणखी-ही चार ग्रंथ आहेत. [स. पे.–ऑ. इं. ओ. कॉ. १९५९]

मार एक दुष्ट आणि मानवाला तपःसाधनेपासून भ्रष्ट कर-णारी देवता. संस्कृत वाङ्मयात मदनालाच मार म्हटले आहे. कारण मारगणाचा तो अधिपती आहे. हा गण कसा उत्पन्न झाला, त्या विषयीची कालिका पुराणातली कथा अशी–

सर्व विश्वाला मोह घालणारी एखादी शक्ती असावी, अशी इच्छा ब्रह्मदेवाच्या मनात उत्पन्न झाली. त्या चिंतेत असता त्याच्या नाकातून जे निःश्वास बाहेर पडले, त्यांतून नानारूपी आणि महाबलवान असा एक गण निर्माण झाला. त्या गणातले लोक अश्वमुख, गजमुख, सिंहमुख, श्वानमुख, वराहमुख अशा प्रकारचे होते. त्यांतले काही अतिउंच होते; तर काही अतिठेंगणे होते; काही महास्थूल होते तर काही अतिकृश होते. त्यांच्या हातांत नाना प्रकारची तीक्ष्ण शस्त्रे होती. त्यांची हाणामारीची प्रवृत्ती लक्षात घेऊन ब्रह्मदेवाने त्यांना मार असे नाव दिले. त्यांनी सदैव मदनाच्या मागोमाग राहावे आणि त्याला सर्व प्रकारे साहाय्य करावे अशी त्यांना ब्रह्मदेवाने आज्ञा केली.

बौद्ध साहित्यात मार ही शक्राच्या खालोखालची देवता आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तो कामलोकांवर राज्य करतो आणि साधकांना भुलवून मार्ग-भ्रष्ट करतो. मार हत्तीवर बसून संचार करतो. कामवासना, क्षुधा, तृष्णा, लोभ, आलस्य, भीती, संशय, दंभ, तिरस्कार व आत्मस्तुती ही त्याची सेना आहे. बुद्ध जेव्हा ज्ञानप्राप्तीसाठी समाधी लावून बसला, तेव्हा त्याची ती समाधी भग्न करण्यासाठी माराने अनेक प्रकारची विघ्ने तिथे उपस्थित केली. पण गौतम अविचलित राहिला आणि शेवटी बुद्ध झाला. पाहा – काम.

मारग मळणे एक कुलाचार. हा कुलाचार काही देशस्थ व कोकणस्थ ब्राह्मणांच्या कुटुंबांत रूढ आहे. दर वर्षी किंवा घरी मंगलकार्य झाले असता हा कुळधर्म करतात. हा कार्यक्रम गावाच्या बाहेर अथवा देवीच्या देवळात करायचा असतो. या वेळचा स्वयंपाकही तिथेच करतात. मग ब्राह्मण-सुवासिनी यांना भोजन घालतात.

घरात कार्य झाले म्हणजे सर्वांनी कुलदेवीच्या क्षेत्रात जाऊन तिथे हा कुळधर्म करायचा असतो. परंतु प्रत्यक्षात जाणे शक्य न झाल्यास तिचे क्षेत्र ज्या दिशेला असेल, त्या दिशेला किंवा तिचे प्रतीकस्थान जिथे असेल, त्या ठिकाणी जाऊन हा कुळधर्म पार पाडतात.

श्री. ना. गो. चापेकर यांनी यासंबंधी पुढील माहिती दिली आहे– मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा व फाल्गुन वद्य पंचमी अथवा चैत्र शुद्ध प्रतिपदा आणि वैशाख किंवा ज्येष्ठ असे तीन वेळा गणपती, जुगाई, मनाई, मारुती, महालक्ष्मी, श्रीवर्धन, कुसुमेश्वर, जोगेश्वरी, वाग्जाई, नंदी, घरणंकरी, आदित्य या देवतांना नैवेद्य दाखवतात. पैकी वैशाख अगर ज्येष्ठ महिन्यात घालायचे नैवेद्य घराच्या बाहेर घालण्याची रीत आहे. या वेळी स्वयंपाक घरी करायचा नसतो. यालाच मारग मळणे असे म्हणतात. [चित्पावन; दे. ऋ. ब्रा. प.]

मारन (इ. स. चे १४ वे शतक) एक प्राचीन तेलुगू कवी. हा तिक्कन्नामात्याचा मुलगा असून शिष्यही होता. याने मार्कंडेय पुराणाचा तेलुगूमध्ये स्वतंत्र अनुवाद केला आहे. कवीने हे काव्य प्रतापरुद्र दुसरा, याचा सेनापती नागयगन्न नायक याला अर्पण केले आहे. हा काव्यग्रंथ आठ आश्वासांमध्ये विभागला आहे. यात हरिश्चंद्रोपाख्यान, मनुचरित्र, कुवलयाश्व, इ. अनेक आख्याने आहेत. याव्यतिरिक्त त्यात धर्मशास्त्र-विचार विस्ताराने सांगितला आहे. उत्तरकालीन अनेक तेलुगू कवींनी याच्या कथा व वस्तूंच्या आधारे स्वतंत्र काव्यरचना केलेली आढळते. यावरून मारनाची महत्ता सहज कळून येते. कवीची भाषासरल व प्रवाही आहे. [ते. सा. इ.; ते. उ. सा.]

मारनमाहोन एक लोकनृत्य. मणिपूरमधील तंगखुल नागा लोकांमध्ये हे नृत्य प्रचलित आहे. लढाईत वा शिकारीत यश मिळाल्यानंतर विजयी वीरांच्या सन्मानार्थ जी मेजवानी दिली जाते, त्या प्रसंगी हे नृत्य करतात. द्रुत गती आणि उल्हास ही या नृत्याची वैशिष्टये आहेत. नृत्याच्या वेळी नाचणाऱ्यांच्या हातात लाल व पांढरी फुले असतात. या फुलांना ते शत्रूच्या किंवा शिकार केलेल्या पशूच्या रक्ताचे प्रतीक मानतात. युद्धात शत्रूला ठार कसे केले किंवा शिकार कशी केली, याचा अभिनय या नृत्यात केला जातो. नाचणारे शिकाऱ्याच्या पोषाखात असतात.

याशिवाय विजयाशी संबंधित असलेले कसोमखुलेन नावाचे आणखी एक नृत्य हे करतात. या नृत्यात स्त्री-पुरुष सरमिसळ भाग घेतात. [ए. हो. रा.]

मारबत विदर्भातील एक लोकोत्सव. हा उत्सव विशेषतः नागपुरात भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला साजरा करतात. त्यासाठी बांबूच्या बेळांचा एक सांगाडा बनवून आणि त्यावर कागद चिकटवून, एक उंच आणि भयानक अशी स्त्रीमूर्ती तयार करतात. तिला मारबत म्हणतात. मग या मूर्तीची रस्त्यातून मिरवणूक काढतात. दुसरा एक असाच पुरुषाकार पुतळा बनविलेला असतो. याला बडग्या हे नाव आहे. बडग्याला मारबतचा नवरा समजतात. यांची मिरवणूक चालू असताना ठिकठिकाणी या पतिपत्नींची भेट घडवून आणतात. अर्थात आणखी एक लहान स्त्रीमूर्ती बनवितात. ती मारबतची मुलगी होय. मारबतला स्मशानात अथवा तलावाच्या काठी नेऊन जाळतात. मग मिरवणुकीतील सर्वजण स्नान करून घरी परत येतात. परत येताना ते मैदानातले गवत अथवा सब्जाची फांदी आणून ती घराच्या वळचणीला खोचतात.

मारबतला सार्वजनिक तसेच कौटुंबिकही महत्त्व आहे. श्रावण अमावास्येनंतरच्या पहाटेला घरातला कर्ता पुरुष मातीची मारबतमूर्ती करून तिच्या डोक्यावर खळगा करतो आणि त्यात तेल घालून वात पेटवतो. त्या प्रकाशात घरातले मुलगे पळसाची फांदी घेऊन कानाकोपरा झाडतात आणि 'जारे मारबत' असे म्हणतात. मारबत ही देवता ढेकूण, पिसवा, मच्छर आणि पटकी जंतू नष्ट करते, अशी समजूत आहे.

मारम्म द. भारतातील एक ग्रामदेवता. हिच्या जत्रेच्या वेळी हिचे भक्त जळत्या निखाऱ्यांवरून चालत जाण्याचे दिव्य करतात. यात स्त्रियाही भाग घेतात. हिचा पुजारी धोबी असतो. हिची मूर्ती असत नाही. मात्र जत्रेच्या वेळी हिचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मातीची मूर्ती करून ती बसवितात. जत्रा संपल्यावर शेवटच्या दिवशी तिचे विसर्जन करतात. [व्हि. गॉ. सा. इं.]

मारवा हिंदुस्थानी संगीतातील एक राग. वादी स्वर–कोमल रिषभ. संवादी स्वर – तीव्र धैवत. यात पंचम वर्ज्य असल्यामुळे याची जाती षाडव-षाडव ही आहे. याचे आरोह स्वर नी रि ग म ध म ध म ध नी रि असे असून, अवरोह स्वर रि नी ध म ग रि सा हे आहेत. गानसमय-दिवसाचा शेवटचा प्रहर. [क. सं.; सु. वि. को.]

मारवाडी मारवाडातील लोकांना मारवाडी असे म्हणतात. राजस्थानातील जोधपूर या संस्थानालाच मारवाड हे दुसरे नाव होते. मारवाड हा शब्द मरुवार या मरुस्थल-वाचक शब्दाचा अपभ्रंश आहे.

मारवाडी बनिया स्त्री

मारवाडी लोक सांप्रत भारताच्या सर्व भागांत पसरलेले आहेत. व्यापार हा त्यांचा मुख्य व्यवसाय होय. ते बहुतेक वाणी म्हणून ओळखले जातात. कारण खेडोपाडी त्यांची वाण-सामानाची दुकाने असतात. त्यांच्यांत अग्रवाल, ओसवाल, खंडेलवाल, पोरवाल, मेश्री अशा अनेक जाती आहेत. तसेच ब्राह्मणही आहेत. त्यांच्यांतील ब्राह्मण आपणांस छन्नाती ब्राह्मण म्हणवितात. कारण सहा प्राचीन ऋषींपासून आपली उत्पत्ती झाली, असे ते मानतात. त्या पोटजातींची नावे दध्यवस, गूजरगौड, खंडेवाल, खंडेलवाल पारीख, शिरवळ व सारस्वत अशी आहेत. त्यांच्यांत लग्नसंबंध होत नाही. पण रीतीभाती, भाषा यांवरून ते मुळात एकाच जातीचे असावे, असे वाटते. यांचा वेद यजुर्वेद असून, शाखा माध्यंदिन आहे.

महाराष्ट्रात यांची वसती बरीच आहे. त्यांतील काही जैन आहेत, तर काही वैष्णव आहेत. गिरीचा बालाजी हा वैष्णवांचा देव आहे.

मारवाडी लोक मेहनती, शांत व मितव्ययी आहेत. ते व्यापाराबरोबरच सावकारी व दलाली करून बरेच श्रीमंत झाले आहेत. त्यांची भाषा मारवाडी ही आहे. ते बहुतेक शाकाहारी असून, डाळरोटी व तूप हे त्यांचे मुख्य अन्न असते.

जाट मारवाडी म्हणून एक जात आहे. त्या जातीचे लोक मद्यमांसाहारी आहेत. ते शेती करतात. [म. ज्ञा. को.]

माराङ्‌बुरू संथाळ लोकांचा एक प्रमुख देव. हे एका मोठ्या पर्वताचे नाव आहे. या पर्वताला हे लोक आपल्या जमातीचा आदिपुरुष आणि संरक्षक मानतात. यांच्या मते हा देव स्त्री नाही किंवा पुरुषही नाही. याला दोन भावंडे असून, त्यांतील एक पुरुष व एक स्त्री आहे. पुरुषाचे नाव मनिको आणि स्त्रीचे नाव जहेर इरा होय. या दोघांचे माराङ्‌बुरूने लग्न लावले. त्यांना सात पुत्र झाले. प्रत्येक पुत्राने आपले स्वतंत्र कुळ निर्माण केले. अशा प्रकारे संथाळांचा वंशवेल वाढला. [दि ॲनल्स ऑफ रूरल बेंगॉल, डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर]

मारान मलबारमधील एक जात. हे लोक मारायन म्हणूनही ओळखले जातात. उत्तर मलबारमध्ये यांनाच ओच्चन असे म्हणतात. हे लोक मलबारमध्ये नायर जातीच्या लोकांसाठी न्हाव्याचे काम करतात. त्यांच्या अंत्यसंस्कारप्रसंगी हे पुरोहितां-चेही काम करतात. पुरोहिताचे काम करणाऱ्या लोकांना अट्टिकुरिस्सी मारायन म्हणतात. यांचे विवाह व इतर संस्कार नायरांप्रमाणेच आहेत. मंदिरात सेवक म्हणून काम करणे व ढोल वाजविणे हे यांचे प्रमुख व्यवसाय होत. [का. ट्रा. स. इं.]

मारी एक ग्रामदेवता. हिचे ठाणे म्हैसूर राज्यातील शिरसी गावात आहे. इथे प्रतिवर्षी तिची यात्रा भरते. यात्रेच्या वेळी तिचे लग्न लावण्यात येते. नंतर तिचा संसार, मुले-बाळे, मुलांचा व्यवसाय, त्यांचे अभक्ष्यभक्षण, इ. सर्व प्रसंग एका नाटकाद्वारे दाखवितात. यात्रेच्या वेळी रेडा, कोंबडी व बकरी बळी देतात. मारीची मूर्ती लाकडाची असून, तिला शेंदूर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

फासलेला असतो. हे मरीआईचे एक रूप आहे. [देवीकोश ३]

मारीची एक बौद्ध देवता. वैदिक देवतांमध्ये उषा या देवतेला जे स्थान आहे, तेच बौद्ध संप्रदायात हिला आहे. ही विरोचनाची स्त्री आहे, असे एक मत आहे; तर ही विरोचनाच्या शरीरापासून निर्माण झाली, असे दुसरे मत आहे.

मारीची

तिबेटातील लामा प्रातःकाली हिचे पूजन, स्तवन करतात. ही सात डुकरांच्या रथातून संचार करते. हिचा सारथीही अरुणाप्रमाणेच लंगडा आहे.

साधनमाला या ग्रंथात या देवीच्या स्वरूपाचे सहा प्रकार वर्णिले आहेत. ही एकमुखी, त्रिमुखी, पंचमुखी अथवा सहा मुखांची असून, तिला दोन, आठ, दहा व बारा भुजा असतात. हिच्या हाती सुई-दोरा असतो. या दोन आयुधांनी ही दुष्ट वृत्तीच्या लोकांची मुखे व डोळे शिवून बंद करते, अशी भक्तांची समजूत आहे.

ज्या वेळी या देवतेला एक मुख व दोन हात असून, तिच्या हाती अशोक वृक्षाचे पान असते, तेव्हा तिला अशोककांता असे म्हणतात. पण याच स्वरूपात जेव्हा अशोकपर्णाच्या ऐवजी तिच्या हाती सुई– दोरा असतो, तेव्हा तिला आर्य मारीची म्हणून ओळखतात.

मारीचीच्या चार बाजूंना चार देवता असतात. त्यांची नावे अशी– पूर्वेला वर्त्ताली, दक्षिणेला वडाली, पश्चिमेला वराली आणि उत्तरेला वराहमुखी. या चौघी तिच्या सेविका होत.

मारीची ही चैत्याच्या गर्भात राहते. भारतात अनेक ठिकाणी हिच्या मूर्ती आढळतात. काही मूर्ती डाक्का येथील संग्रहालयात असून, उज्जयिनी, टिपेरा, आटपारा, दुवाली इथे मिळालेल्या मूर्ती राजशाही संग्रहालयात ठेवल्या आहेत.

काही शिल्पांमध्ये ही देवता सप्तपर्यंकांवर बसलेली दाखवितात. ही हृदयाच्या ठिकाणी ॐकार धारण करते आणि भक्तांची संकटे हरण करते, असे साधनमालेत म्हटले आहे.

काही वेळा वज्रवाराही या देवीस्वरूपालाच मारीची मानलेले असते; पण ते बरोबर नाही. [इं. बु. इ.; देवीकोश ३]

मारू बिहाग हिंदुस्थानी संगीतातील एक राग. हा जोड राग आहे. जुन्या काळी प्रचलित असलेल्या मारू व बिहाग अशा दोन रागांच्या संयोगाने त्याची निर्मिती झाली आहे. याचे आरोह स्वर सा ग म ग म प म प ग म प नी सां हे असून, अवरोह स्वर सा नी ध प म ग री सा असे आहेत.

मार्कंडेय एक ऋषी. भृगुवंशातला एक गोत्रकार. हा द्वापर त्रेतायुगात झाला. याला धूमोर्णा नावाची स्त्री होती. हा प्रारंभी अल्पायुषी होता, पण सप्तर्षींच्या आशीर्वादाने दीर्घायुषी झाला. ब्रह्मदेव व शंकर यांनीही त्याला कल्पांतापर्यंत आयुष्य दिले. धर्मराज वनवासात असता याने त्याला अनेक वृत्तान्त कथन केले. याला कल्पांतीच्या वटवृक्षाचे व प्रलयाचे दर्शन झाले होते. याच्या नावावर पुढील ग्रंथ आढळतात– (१) मार्कंडेय पुराण (२) मार्कंडेयस्मृती (३) मार्कंडेयसंहिता (४) वराह पुराण. वयाला साठ वर्षे झाल्यावर दीर्घायुष्य प्राप्तीसाठी जी उग्ररथशांती करतात, तिच्यातली प्रमुख देवता मार्कंडेय हीच असते. [प्रा. च. को.]

मार्कंडेय आश्रम पंजाबमध्ये विलासपुरापासून पुढे ... वर ब्रह्मपूर लागते. तिथून चार मैलांवर हे स्थान आहे. यात्रेकरू इथे, पाच ठिकाणी स्नान करतात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पहिले स्नान इथल्या मार्कंडेय तीर्थात, दुसरे बडिकिशन सरोवरात व उरलेली तीन वेगवेगळ्या विहीरींवर होतात. ही सर्व तीर्थे एका मैलाच्या परिसरात आहेत. तिथल्या डोंगरात एक गुहा आहे. तिथे मार्कंडेयाचा आश्रम होता असे सांगतात.

महाभारतात म्हटले आहे, की मार्कंडेय-आश्रम गोमती व गंगा यांच्या संगमाजवळ आहे. पद्म पुराणात मात्र तो शरयू व गंगा यांच्या संगमाजवळ असल्याचे सांगितले आहे. तिथे मार्कंडेय ऋषीने तपश्चर्या केली. [कल्याण—तीर्थांक; हि. जॉ. ए. इं.]

मार्कंडेय कवींद्र प्राकृत भाषांचा एक व्याकरणकार. हा ओडिसाचा रहिवासी होता. याच्या कालासंबंधी निश्चित माहिती मिळत नाही. काहींच्या मते हा इ. स. च्या १५ व्या शतकाच्या पूर्वार्धात झाला, तर काहींच्या मते १७ व्या शतकात झाला. याने प्राकृतसर्वस्वम् या नावाचा एक ग्रंथ रचला आहे. या ग्रंथाच्या दोन हस्तलिखित प्रती उपलब्ध आहेत. त्यांतील एक प्रत इंडिया ऑफिसमध्ये असून, ती ताडपत्रांवर लिहिलेली आहे. दुसरी प्रत ऑक्सफर्डला आहे. ग्रंथकाराने प्रथम प्राकृत भाषांचे वर्गीकरण करून त्यानुसार त्या त्या भाषेचे साररूप व्याकरण दिले आहे. सर्वप्रथम आठ पादांमध्ये महाराष्ट्री प्राकृत भाषेचे नियम त्याने दिलेले आहेत. या नियमांना प्राधान्याने वररुचीचा आधार आहे. नऊ ते बारापर्यंतच्या पादांना भाषाविवेचनम् असे नाव असून, त्यांत अनुक्रमे शौरसेनी, प्राच्या, अवंतिका, बाल्हिका आणि मागधी या भाषांचे नियम आहेत. सतरा व अठरा या दोन पादांमध्ये अपभ्रंश आणि पुढील दोन पादांत पैशाचीचे नियम आहेत.

प्राकृत भाषांच्या व्याकरणाचे ज्ञान करून घेण्यासाठी हा ग्रंथ फार उपयुक्त आहे, असे सर्व विद्वान सांगतात. [प्रा. भा. व्या.]

मार्कंडेय पुराण अष्टादश महापुराणांपैकी एक. विष्णू पुराणानुसार हे सातवे पुराण आहे. मार्कंडेय ऋषीने प्रोक्त असल्यामुळे याला हे नाव मिळाले आहे. हे वैष्णव पुराण असून, याला राजस पुराण समजतात. हे पुराण इतर पुराणांच्या मानाने छोटे म्हणजे अवघे १३७ अध्यायांचे आहे. नारदसूचीप्रमाणे याचे ९००० श्लोक असायला हवे. पण सांप्रत उपलब्ध असलेल्या प्रतीत केवळ ६९०० श्लोक आढळतात. प्रचलित मार्कंडेय पुराणात नरिष्यंत राजाच्या चरित्राचा काही भाग नाही. मुळात तो होता, असे नारदसूचीवरून कळते. तो लुप्त झालेला कथाभाग बराच मोठा असला पाहिजे. तो जमेस धरल्यास ९००० ही संख्या पुरी होईल.

प्रस्तुत पुराणात ज्या अनेक प्राचीन कथा आलेल्या आहेत, त्या अन्यत्र कुठेही आढळत नाहीत. इतर पुराणांत प्रक्षेप आले आणि त्यांची बरीच वाढही झाली. पण या पुराणाचे तसे झाले नाही. शिवाय या पुराणाचा व्यासांशीही संबंध जोडलेला नाही. डॉ. हाजरा म्हणतात, की या पुराणात सर्वांत कमी फेरफार झाले आहेत आणि हे पुराण सर्वांत जुने आणि महत्त्वाचे आहे.

प्रस्तुत पुराणातील प्रारंभीचा श्लोक असा —

> यद्योगिभिर्भवभयार्तिविनाशयोग्य-
> मासाद्य वन्दितमतीव विविक्तचित्तैः ।
> तद्वः पुनातु हरिपादसरोजयुग्म-
> माविर्भवत्क्रमविलङ्घितभूर्भुवःस्वः ।।

अर्थ — विवेकयुक्त चित्ताच्या योगिजनांनी भवभय आणि पीडा यांच्या विनाशासाठी समर्थ अशा ज्याला जवळ जाऊन वंदन केले आणि (वामनस्वरूपात) जे एकामागून एक असे भूः, भुवः, स्वः या लोकांचे विलंघन करीत प्रकट झाले, ते श्रीहरीचे चरणकमलयुग्म तुम्हांला पवित्र करो.

पुराणाचा उपक्रम — महाभारतातल्या काही शंका विचारण्यासाठी जैमिनी हा मार्कंडेयाकडे गेला. त्याच्या शंका अशा होत्या— (१) सर्व कारणांचे परम कारण आणि अखिल विश्वाला आधारभूत असलेला गुणातीत जनार्दन विष्णू मनुष्यरूपात का अवतरला? (२) एकटी द्रौपदी पाच पांडवांची पत्नी कशी झाली? (३) महाबली बलरामाला तीर्थयात्रा करून कोणत्या पापाचे प्रायश्चित्त घ्यावे लागले? आणि (४) द्रौपदीचे पाच लहान पुत्र कुमार अवस्थेतच का मारले गेले?

या शंका ऐकल्यावर मार्कंडेय ऋषी जैमिनीला म्हणाला. 'माझी आता नित्यकर्माची वेळ झाली आहे. तेव्हा तू विंध्याचलाच्या कडेकपारीत वास्तव्य करणाऱ्या चार पक्ष्यांकडे जा. पिंगाक्ष, विबोध, सुपुत्र व सुमुख अशी त्यांची नावे आहेत. हे पक्षी तत्त्वज्ञ आणि वेद-शास्त्रांत निष्णात आहेत. ते तुझ्या सर्व शंकांचे योग्य समाधान करतील.'

दुर्वासाच्या शापाने पक्षीण झालेल्या वपू नामक अप्सरेच्या पोटी हे चार पक्षी जन्माला आले. शमीक ऋषीने त्यांना आपल्या आश्रयाला नेऊन त्यांच्यावर श्रुत्युक्त संस्कार केले. त्यामुळे त्यांच्या हृदयात ज्ञान प्रकट झाले व त्यांना संस्कारवती अशी सुस्पष्ट मनुष्यवाणीही प्राप्त झाली. जैमिनी त्यांच्याकडे गेल्यावर त्या पक्ष्यांनी त्याचे शंकासमाधान पुढीलप्रमाणे केले —

(१) परमात्मा वासुदेव चार स्वरूपांत राहतो. त्याचे पहिले स्वरूप गुणातीत आहे. दुसरे स्वरूप म्हणजे शेष या नावाने प्रसिद्ध असलेला बलराम हे आहे. तिसरे स्वरूप प्रजापालन व धर्माची व्यवस्था करणारे आहे. या स्वरूपातच परमात्मा देव, तिर्यक् व मनुष्य या तीन रूपांत अवतार घेतो. चौथे स्वरूप

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणजे क्षीरसागरात शेषशायी भगवान विष्णू असे आहे.

(२) इंद्राने त्वष्ट्याचा वध केला म्हणून त्याला ब्रह्महत्या लागली. वृत्राचा वध केल्यामुळे त्याला दुसरी ब्रह्महत्या लागली. त्याने अहल्येशी जारकर्म केल्यामुळे तेही पाप त्याच्या माथी बसले. या सर्व पापांमुळे धर्म, तेज, बल व रूप हे गुण त्याला सोडून गेले. या चारांपासून पुढे पाच पांडव (शेवटच्या रूप या गुणापासून नकुल व सहदेव असे दोन) निर्माण झाले. इंद्राची पत्नी शची कृष्णा या नावाने अग्नीतून उत्पन्न झाली व ती एकटी पांच पांडवांची (म्हणजेच इंद्राची) पत्नी झाली.

(३) बलरामाने पूर्ण विचार करून भारतीय युद्धात भाग घ्यायचा नाही असे ठरवले. मग त्याने तीर्थयात्रेचा बेत केला. निघण्याच्या आदल्या रात्री तो खूप मद्य प्याला आणि पत्नीला घेऊन विहार करण्यासाठी रैवतक पर्वतावर गेला. तिथे पायथ्याशी सूत पुराणकथा सांगत होता व अनेक श्रोते ती ऐकत होते. बलरामाला पाहताच सर्व श्रोत्यांनी त्याला उठून उत्थापन दिले. सूत मात्र आसनावरचा उठला नाही. बलरामाला त्यामुळे आपला अपमान झाला असे वाटले व दारूच्या धुंदीत त्याने त्या सूताला ठार केले. धुंदी उतरल्यावर मग त्याला पश्चात्ताप झाला. या सूतहत्येच्या पातकाची निष्कृती करण्यासाठी तो बारा वर्षे तीर्थयात्रा करीत राहिला.

(४) विश्वामित्र एका स्त्रीला ओढीत नेत असल्याचे हरिश्चंद्राने पाहिले. ती स्त्री विद्यांचे प्रतीक होती आणि त्या विद्यांना विश्वामित्र निंद्य कर्मासाठी सिद्ध करू पाहत होता. हरिश्चंद्र राजाने त्या स्त्रीला अभय दिले. त्या रागाने विश्वामित्राने हरिश्चंद्राला परोपरीने छळले. तो छळवाद पाहून पाच विश्वेदेवांना अत्यंत दुःख झाले. ते म्हणाले. 'या पापी विश्वामित्राला कोणती गती मिळेल?' ते ऐकून विश्वामित्राने त्या पाच देवांना शाप दिला, की 'तुम्ही मनुष्ययोनीत जन्म घ्याल.' तेच पाच देव द्रौपदीचे पाच पुत्र झाले व कुमारावस्थेतच मरून परत देवत्व पावले.

जैमिनीच्या चारही शंकांचे अशा प्रकारे निरसन झाले.

मार्कंडेय पुराणाची रचना गप्त साम्राज्याच्या कालातली आहे. इ. स. ४०० ते ५०० हा त्याचा रचनाकाल असल्याचे श्री. बलदेव उपाध्याय सांगतात. सह्य पर्वताच्या उत्तरभागी गोदावरीच्या उगमासमीप असलेला प्रदेश हा जगतात सर्वाधिक मनोरम आहे, असे प्रस्तुत पुराणाचा लेखक म्हणतो (५४). त्यावरून त्याच प्रदेशात म्हणजेच महाराष्ट्र प्रदेशात या पुराणाची रचना झाली असावी.

विषय आणि शैली या दोन्ही दृष्टींनी मार्कंडेय पुराण अवघ्या पुराणसाहित्यात वैशिष्ट्यपूर्ण आहे. हे पुराण गुप्तकालीन संस्कृतीच्या उदात्त भावनेने भरलेले आहे. त्या सुवर्णयुगात संस्कृतिसंवर्धनाच्या कामी ज्या अनेक धार्मिक व सामाजिक संस्थांनी प्रेरणा दिली आणि जे नवे विचार मांडले, त्यांचे सुस्पष्ट दिग्दर्शन प्रस्तुत पुराणात आढळते. त्या युगात संपूर्ण समाजजीवनाविषयी एक नवा दृष्टिकोन पल्लवित झाला होता. 'जुने तेवढे सगळे सोने नव्हे व नवे तेवढे सर्व निंद्य नव्हे' हा तो दृष्टिकोन होय. प्रस्तुत पुराणात तो दृष्टिकोन उचलून धरलेला आहे.

मानव आणि त्याची कर्मशक्ती यांविषयीही त्या काळात एक नवी आस्था आणि एक नवी श्रद्धा लोकांत उत्पन्न झाली होती. त्यासंबंधी या पुराणात म्हटले आहे, ते असे–

मनुष्यः कुरुते तत्तु यन्न शक्यं सुरासुरैः ।

अर्थ– देव आणि असुर यांना जे करता येणे शक्य नाही, ते मनुष्य करू शकतो.

नाविज्ञातं न चागम्यं नाप्राप्तव्यं दिवि चेह वा ।
उद्यतानां मनुष्याणां यतचित्तेन्द्रियात्मनाम् ॥

अर्थ– ज्या मनुष्यांची चित्त, इंद्रिये आणि आत्मा ही स्वाधीन आहेत आणि जे कर्मात उद्युक्त आहेत, त्यांना इह आणि परलोकी अविज्ञात, अगम्य आणि अप्राप्य असे काही नाही.

कर्मयोगाची ही भावना गुप्तयुगात तत्कालीन विचारवंतांनी उच्च स्तरावर नेऊन ठेवली; त्याचबरोबर हेही सांगितले, की कर्मप्रवणता ही केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी नव्हे; तर प्राणिमात्रांच्या उपकारासाठी झाली पाहिजे. अशा प्रकारच्या उदात्त कर्माला मार्कंडेय पुराणात करुणात्मक कर्म असे म्हटले आहे-

एवं न बन्धो भवति कुर्वतः करुणात्मकम् ।
न च बन्धाय तत्कर्म भवत्यनभिसन्धितम् ॥

अर्थ– मानवाचे जे कर्म करुणेने प्रेरित असते, ज्यात अभिसंधान किंवा कपट नसते, ते कर्म कर्त्याला कधीही बंधनकारक होत नाही.

सर्व भूतांच्या ठिकाणी मैत्रीभाव हे गुप्तकालीन संस्कृतीचे एक सुगंधी पुष्प होते. ही भावना भागवतधर्म आणि बौद्धांचा महायान पंथ यांनी वाढवली होती. पुढील दोन श्लोकांत तिची अभिव्यक्ती झाली आहे (१८.१२ व १९ २०)–

सर्वलोकप्रियो नित्यमुवाचैतदहर्निशम् ।
नन्दन्तु सर्वभूतानि स्निह्यन्तु विजनेष्वपि ॥
यो मेऽद्य स्निह्यते तस्य शिवमस्तु सदा भुवि ।
यश्च मां द्वेष्टि लोकेऽस्मिन् सोऽपि भद्राणि पश्यतु ॥

अर्थ– सर्व लोकांच्या ठिकाणी प्रेम धारण करणारा व सर्व लोकांना प्रिय असा मनुष्य नित्य व अहर्निश असे म्हणतो. 'सर्व भूते सुखाने नांदोत व परकीयांवरही प्रेम करोत. जो आज

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माझ्याशी स्नेह धरतो त्याचे या लोकी सदैव कल्याण होवो. जो या लोकी माझा द्वेष करतो, त्याचेही भले होवो.'

मार्कंडेय पुराण हे भागवतधर्मियांचे पुराण आहे. समाज आणि मनुष्य यांच्या विषयी भागवतांचा एक महत्त्वाचा दृष्टिकोन होता, तो म्हणजे गृहस्थाश्रमाची प्रतिष्ठा हा होय. बौद्ध धर्माने गृहत्याग व निर्वाण यांवर विशेष भर दिला. त्या गोष्टींची जेव्हा अती झाली, तेव्हा समाजाचे विघटन होऊ लागले. हे विघटन थांबावे आणि समाज सुस्थित व समुन्नत व्हावा, म्हणून भागवतांनी गृहस्थधर्माला उचलून धरले व त्याला नवी प्रतिष्ठा मिळवून दिली. मार्कंडेय पुराणातल्या कित्येक अध्यायांत गृहस्थाश्रमाचा महिमा वर्णिलेला आहे. पुढील दोन श्लोक (९५.७-८) या गोष्टीची साक्ष देऊ शकतील –

गृही समस्तदेवानां पितॄणां च तथार्हणम् ।
ऋषीणामतिथीनाञ्च कुर्वन् लोकानुपाश्नुते ॥
अनुत्पाद्य सुतान् देवान् सन्तर्प्य च पितॄंस्तथा ।
अकृत्वा च कथं मौढ्यात् सुगतिं गन्तुमिच्छसि ॥

अर्थ – समस्त देव, पूजनीय पितर, ऋषी आणि अतिथी यांच्या विषयी जो आपल्या कर्तव्याचे पालन करतो, त्याचेच इहलोकीचे जिणे कृतार्थ होते. हे मूढा, पुत्रोत्पत्ती न करता, देवांचे आणि पितरांचे तर्पण न करता तू उत्तम गतीची इच्छा कशी धरतोस! (तुला ती गती प्राप्त होणार नाही.)

प्रस्तुत पुराणाचे वक्ते अनेक असले, तरी हे पुराण मार्कंडेयाच्या नावानेच प्रसिद्ध आहे.

भागवतधर्मी नेत्यांनी व आचार्यांनी जी दोन प्रतीके ज्ञानस्रोत म्हणून स्वीकारली, त्यांपैकी एक नारद व दुसरा मार्कंडेय होय. दोघेही परम भागवत आणि सनातन धर्माचे चिरंजीव प्रतिनिधी होते. दोघेही सांप्रदायिक गुरू म्हणून मानले गेले होते. नारद हा वैदिक विद्यांचा प्राचीन आचार्य होता. मार्कंडेयाचाही अनेक ज्ञानशाखांत अधिकार होता. एक तर तो भार्गववंशी होता. महाभारतात या कुलाला सर्वश्रेष्ठ मानले आहे. महाभारताचे एक संस्करण भार्गवांनी संपन्न केले होते आणि त्यात राजनीती व सामान्य नीती यांची अनेक आख्याने व प्रकरणे समाविष्ट केली होती. मार्कंडेय हा त्याच वंशातला आणि श्रीविष्णूचा परमभक्त होता. मृत्यू त्याच्या स्वाधीन होता. चिरंजीव पुरुषांत त्याची गणना असून, धर्मामुळे तो चिरंजीव झाला, असे म्हटले आहे. भागवतांनी धर्म व नारायण एकरूपच मानले आहेत. ज्या प्रकारे नारायणाचे, त्याच प्रकारे धर्माचेही अस्तित्व सृष्टी आणि प्रलय या दोन्ही कालांत अखंड कायम असते, असे भागवतांनी मानले आहे. मार्कंडेयाचा दुसरा विशेष हा, की तो निवृत्तिलक्षण यतिधर्माचा आणि प्रवृत्तिलक्षण गृहस्थधर्माचाही संपूर्ण ज्ञाता होता. भागवतांनी त्याला आपल्या नव्या लोकसंग्रहात्मक व आचारमूलक धर्माचा प्रतिनिधी कल्पून त्याच्या मुखातून निघालेल्या उपदेशांच्या रूपात या नव्या पुराणाचे संकलन केले.

प्रस्तुत पुराणाचे पाच भाग दिसून येतात, ते असे–

(१) अध्याय १ ते ९ – यांत जैमिनीचे मार्कंडेयाला चार प्रश्न. मार्कंडेय त्याला विंध्याचलातल्या धर्मपक्ष्यांकडे पाठवतो. ते पक्षी जैमिनीच्या प्रश्नांची उत्तरे देतात. या विभागात हरिश्चंद्राचे विस्तृत आख्यान आलेले आहे. हरिश्चंद्राच्या कथेचे दोन भाग आहेत. पहिल्या भागात त्याच्या दानाचा महिमा वर्णिलेला आहे. तो विश्वामित्राला आपले सार्वभौम राज्य देऊन टाकतो व शेवटी आपल्या स्त्री-पुत्रांना व स्वतःलाही विकून दानाची दक्षिणा चुकती करतो. हा त्याग फार मोठा आहे यात शंका नाही; पण तेवढ्याने त्याची परीक्षा पुरी होत नाही. शेवटी तो जेव्हा म्हणतो की, 'माझ्या प्रजेला सोडून मी स्वर्गात येणार नाही' त्या वेळी त्याची खरी परीक्षा होते. हरिश्चंद्राने त्या वेळी म्हटले आहे. 'हे देवेंद्रा, मी केलेली दाने आणि केलेले यज्ञ यांचे जे पुण्य असेल, ते तू सर्वांना समान रूपाने वाटून दे. तसे केल्याने चिरकाल स्वर्गात राहण्यापेक्षा मला एका दिवसाची जरी स्वर्गप्राप्ती झाली, तरी ती माझ्या वाट्याला खूप आहे.'

हरिश्चंद्राच्या या बोलण्याने त्या आख्यानाची उंची पर्वतशिखरासारखी वाढली आहे.

(२) अध्याय १० ते ४४ – या भागात जैमिनी, प्राण्यांची उत्पत्ती, त्यांचा नाश, संसार, जन्म, इ. गोष्टींविषयी प्रश्न करतो आणि धर्मपक्षी त्याला उत्तरे देतात. इथे पक्षी नाममात्र वक्ते आहेत. वास्तविक वक्ता आहे सुमतीचा पिता आणि श्रोता आहे मतिमंद सुमती.

या विभागात दत्तात्रेयाचा अवतार वर्णिला आहे. त्या वर्णनाच्या अनुषंगाने मदालसा, ऋतुध्वज व अलर्क यांचे आख्यान आले आहे. मदालसा ही त्या युगातल्या उदात्त स्त्रीचरित्राची प्रतिमा होती. तशीच ती ज्ञानीही होती. तिने आपला पुत्र अलर्क याला ज्ञानोपदेश केला आहे. या उपदेशात राजधर्म, वर्णाश्रमधर्म, इ. विषय विवेचले आहेत. दत्तात्रेय व अलर्क यांच्या संवादात योगशास्त्राचे विवरण केले आहे.

(३) अध्याय ४५ ते ८० – यांत मार्कंडेयाने आपला शिष्य क्रौष्टुकी याला पुराण कथन केले आहे. यात मनू व मन्वंतरे यांची माहिती आलेली आहे.

(४) अध्याय ८१ ते ९२ – यांत देवीमाहात्म्य आले आहे. हे देवीमाहात्म्य दुर्गासप्तशती या नावाने प्रसिद्ध आहे. यात दुर्गेला अंबिका, कात्यायनी, महिषासुरमर्दिनी, इ. नावे आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डॉ. वासुदेवशरण अग्रवाल म्हणतात– हे देवीमाहात्म्य म्हणजे एका बुद्धिमान पुरुषाची रचना आहे. यात अत्यंत उदात्त शैलीने देवीचा महिमा वर्णिलेला आहे. गुप्तकालात संस्कृत भाषेला जी एक नवी शक्ती प्राप्त झाली होती, तिचे स्वरूप या माहात्म्यावरून कळून येते.

(५) अध्याय ९३ ते १३७ – यांत राज्यवर्धन, नाभाग, करंधम, मरुत्त, नरिष्यंत, इ. श्रेष्ठ पुरुषांची आख्याने आहेत, श्रीकृष्णाचे संपूर्ण चरित्र आहे. आणि मार्कंडेयाचेही चरित्र आहे. शेवटी फलश्रुती आहे. याव्यतिरिक्त सर्व पुराणांत मिळून सृष्टीची उत्पत्ती, भारताचा भूगोल, भारताचे माहात्म्य, मरणोत्तर गती, विविध नरक, अनेक पातके व त्यांची फले, इ. विषयही आले आहेत.

योगनिद्रा, देवी, पार्वती, कात्यायनी, अग्नी व सूर्य यांची स्तोत्रे प्रस्तुत पुराणात आढळतात. या स्तोत्रांची पृष्ठभूमी वैदिक असून दृष्टिकोन समन्वयात्मक आहे. एकाच देवतत्त्वाची अनेक रूपे त्या स्तोत्रांत वर्णिलेली आहेत. त्यामुळे त्यांत अद्वैताचा धागाही दिसून येतो. [मार्कंडेय पुराण–एक सांस्कृतिक अध्ययन, डॉ. वासुदेवशरण अग्रवाल; पु. नि.; पु. वि.]

मार्गपालीबंधन एक धार्मिक विधी. दिवाळीच्या पाडव्याला पूर्वी हा विधी करीत असत. त्याचे विधान असे – सायंकाळी कुश अथवा मोळ यांचा मोठा दोर करून तो पूर्व दिशेकडील एका खांबाला व वृक्षाला बांधावा. नंतर त्याच्या खालून गायी व हत्ती यांसह राजा, ब्राह्मण, इत्यादिकांनी जावे. या वेळी त्या दोराच्या प्रार्थनेचा पुढील मंत्र म्हणावा–

मार्गपालि नमस्तेस्तु सर्वलोकसुखप्रदे ।।
विधेयैः पुत्रदाराद्यैः पुनरेहि व्रतस्य मे ।।

याप्रमाणे आणखी एक दोरी करून ती एका बाजूने राजपुत्रांनी व दुसऱ्या बाजूने इतरांनी ओढावी. इतरांचा जय झाला, तर तो राजाचा असे समजावे. [हि. ध.; नि. सि.]

मार्गशीर्ष चंद्रादी गणनेतला नववा महिना. या महिन्याच्या पौर्णिमेस किंवा आगेमागे मृगशीर्ष नक्षत्र असते, म्हणून याला मार्गशीर्ष असे नाव पडले आहे. " मासानां मार्गशीर्षोऽहम् " = मासांमधला मी मार्गशीर्ष आहे, या वचनाने गीतेत या मासाचा गौरव केलेला आहे (१०.३५). महिन्यांमध्ये मार्गशीर्षाला जे अग्रस्थान दिले आहे, ते तत्काळी बारा महिन्यांच्या गणनेत मार्गशीर्ष महिना पहिला धरून मोजण्याची प्रथा होती म्हणून होय. (म. भा. अनु. १०६ व १०९; वा. रा. ३.१६; भाग. पु. ११.१६.२७). मृगशीर्ष नक्षत्रास अग्रहायणी किंवा वर्षारंभाचे नक्षत्र असे नाव असून, मृगादी नक्षत्रगणना जेव्हा प्रचारात होती, तेव्हा मार्गशीर्ष महिन्यालाही श्रेष्ठत्व आले असावे.

मार्गशीर्ष महिन्यापासून कार्तिक अखेर बारा महिन्यांच्या अधिदेवतांची जी नावे आहेत, ती अनुक्रमे केशव, नारायण,



मार्गशीर्ष मासाचे सांकेतिक चित्र

माधव इत्यादी संख्येतल्या पहिल्या बारा नावांच्या क्रमाने आहेत. त्यावरून केशव ही मार्गशीर्ष मासाची अधिदेवता होय. या महिन्यातील धर्मकृत्ये अशी –

मार्ग. शुद्ध पंचमीला नागपूजा सांगितली आहे. या दिवशी स्नानदानादी पुण्यकृत्ये करून, नागांची कृपा संपादन करावयाची असते. शुद्ध षष्ठीला चंपाषष्ठी म्हणतात. हिलाच स्कंदषष्ठी असेही दुसरे नाव आहे. या षष्ठीला महाराष्ट्रात जेजुरी येथे खंडोबाची जत्रा भरते. ज्या ब्राह्मणांचे खंडोबा हे कुलदैवत असते, त्यांच्या घरी शु. प्रतिपदेपासून खंडोबाचा उत्सव सुरू होतो. याला खंडोबाचे नवरात्र असे म्हणतात. (चंपाषष्ठी पाहा.)

शुद्ध एकादशीला मोक्षदा असे नाव आहे. या दिवशी श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतेचा उपदेश केला, म्हणून त्या दिवशी गीतेची जयंती साजरी करतात. शुद्ध चतुर्दशीला पिशाचमोचनी तीर्थात स्नान करावे व पिशाचयोनीत गेलेल्या आप्तस्वकीयांचे श्राद्ध करावे, असे सांगितले आहे.

पौर्णिमेला दत्तात्रेयाचा अवतार झाला, म्हणून त्या दिवशी दत्तजयंतीचा उत्सव करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कृष्ण अष्टमीच्या दिवशी काळभैरवाची उत्पत्ती झाली, म्हणून त्या दिवशी त्याची पूजा करावी, असे सांगितले आहे. वद्य अष्टमीस अष्टका श्राद्ध करायचे असते.

मार्गशीर्षापासून आरंभ करून प्रत्येक महिन्यात प्रत्येक रविवारी सौरव्रत करावे, असे हेमाद्रीने सांगितले आहे. [ध. सिं.; नि. सिं.; गी. र.; गीतातत्त्वमंजरी]

मार्जन शरीरावर पाणी शिंपडून घेण्याचा विधी. " प्रोक्षणादिना अङ्गनिर्मलीकरणम् " = प्रोक्षणादी गोष्टींनी अंग निर्मळ करणे म्हणजे मार्जन होय (श. क.). मार्जन हा स्नानाचाही एक पर्याय आहे. मार्जनात टीचभर लांबीचे दोन कुश घेऊन त्यांच्या अग्रांनी आपल्या मस्तकावर व अंगावर पाणी शिंपडून घ्यायचे असते. मार्जन करताना नऊ प्रणवांनी युक्त अशा 'आपो हिष्ठा०' इ. तीन ऋचा म्हणायच्या असतात. मार्जनासाठी तांब्याचे, रुप्याचे किंवा सोन्याचे गोकर्णाकृती पात्र घ्यावे व त्यात पाणी भरून त्याच्या योगाने मार्जन करावे, असे आचारेन्दुः या ग्रंथात सांगितले आहे. पात्र न मिळाल्यास डाव्या हातात पाणी घेऊनही मार्जन केले तरी चालते. संध्या करताना संकल्प केल्यावर प्रथम मार्जन सांगितले आहे.

मार्तंड–भैरव सूर्य व शिव यांची संयुक्त प्रतिमा. शारदातिलकतंत्रात सूर्याचे हे रूप म्हणजे शिवाचे अर्धे रूप असल्याचे सांगितले आहे. मंडा (राजशाही) येथे मार्तंडभैरवाची एक मूर्ती सापडली असून, ती बाराव्या शतकातली आहे, असे म्हणतात. ही मूर्ती त्रिमुखी व दशभुज आहे. मधले मुख शांत व सौम्य असून, बाजूची दोन्ही मुखे उग्र-भीषण आहेत. त्याच्या दोन हातांमध्ये पूर्ण विकसित कमळे आहेत. मागील हातांत खट्वांग, त्रिशूल, शक्ती, नीलोत्पल, डमरू व सर्प या वस्तू आहेत. ही शिवाची आयुधे होत. त्याच्या मस्तकातून ज्वाळा वर आलेल्या आहेत. [डे. हिं. इ.]

मार्तंडमंदिर एक पुण्यक्षेत्र. हे क्षेत्र श्रीनगरपासून ४० मैलांवर व अनंतनागापासून ५ मैलांवर आहे. हे सूर्यमंदिर आहे. काश्मीरच्या प्राचीन स्मारकचिन्हांत याला सर्वश्रेष्ठ स्थान आहे. उंच पहाडावर हे निर्माण केलेले आहे. याची लांबी १०४ फूट असून रुंदी २८९ फूट आहे. त्याच्या भोवती विशाल प्रांगण आहे. त्याभोवती एक तटवजा भिंत बांधली होती, ती आता कुठे कुठे ढासळून पडली आहे. या भिंतीला लागून आतल्या बाजूने काही ओवऱ्याही बनवल्या होत्या, याची कुठेकुठे साक्ष दिसते. देवालयाचे अर्धमंडप, अंतराळ व गर्भगृह असे तीन भाग आहेत. अंतराळात गंगेची मूर्ती असून तिच्या एका हाती जलपात्र व दुसऱ्या हाती कमल आहे. दोही अंगी छत्रचामर धरणाऱ्या परिचारिका आहेत. अंतराळाच्या भिंतीवर अनेक सुंदर कोरीव मूर्ती आहेत. तटाच्या पश्चिम अंगाला विष्णूची मूर्ती आहे. हा विष्णू त्रिमुख आहे. हे याचे वैशिष्टय होय. त्याचे एक मुख वराहाचे, दुसरे नृसिंहाचे व तिसरे विष्णूचे आहे. हा विष्णू अष्टभुज आहे. विष्णूची ही विचित्र कल्पना केवळ याच ठिकाणी पाहायला मिळते. इथे जो सूर्यरथ आहे, त्याला सहा घोडे आहेत. सूर्य त्या रथात बसला असून अरुण त्याचे सारथ्य करीत आहे.

या मंदिराच्या बाह्य भागावर ग्रीक शिल्पकलेची छाप स्पष्ट दिसते. राजतरंगिणीकार कल्हण म्हणतो, की हे मंदिर ललितादित्याने बांधले. [म. क.; योजना, फेब्रु. १९६०]

मार्तंड सप्तमी एक काम्य व्रत. पौष शुद्ध सप्तमीच्या दिवशी या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. या दिवशी उपवास करून सूर्याची पूजा आणि मार्तंड या नावाने सूर्याचा जप करायचा असतो. या व्रतात आत्मशुद्धीसाठी गोमूत्र किंवा गोमय अथवा दही किंवा दूध प्राशन करतात. दुसऱ्या दिवशी सूर्याची पूजा रवी या नावाने करतात. याप्रमाणे प्रत्येक महिन्यात दोन दिवस हे व्रत करायचे असते. त्यांतील एक दिवस गाईला चारा घालतात. नंतर ती गाय दान देतात. फल– सूर्यलोकप्राप्ती. [हि. ध.; व्र. प.; कृ. क. त.]

माल एक तेलुगुभाषी जात. यांची वस्ती मुख्यतः मध्य प्रदेशात आणि तेलंगणात आढळते. हे लोक स्वतःला तेलंगी सदरभोई असे म्हणवून घेतात, पण मराठे लोक यांना तेलुगू ढेर असें म्हणतात. काहींच्या मते हे तेलुगू परिया होत. विणकाम व मजुरी हे यांचे विशेष व्यवसाय आहेत. हे लोक एका ठराविक पद्धतीनेच डोक्याला व कमरेला वस्त्र गुंडाळतात. यावरून त्यांना ओळखणे सोपे जाते.

यांच्यांत शैव व वैष्णव हे दोन पंथ आहेत. नरसिंहस्वामीला भजणारे ते मतद्दार आणि महादेवाला भजणारे ते लिंगदार होत. हे सर्व लोक दक्षिणाचारी पंथाचे अनुयायी आहेत. हे लोक इतर जातीच्या लोकांना आपल्या जातीत घेतात, तेव्हा एक विधी करावा लागतो. कडुनिंबाची फांदी किंवा चांदीचा तुकडा घेऊन त्याने नवागताच्या जिभेला डाग दिला जातो. एखादा माल मनुष्याच्या तोंडातले पान त्याला खावे लागते. बकरे कापून ज्ञातिभोजनही करतात.

विवाहप्रथा – यांच्यांत मामेबहिणीशी, आतेबहिणीशी व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मोठ्या बहिणीच्या मुलीशी लग्न करण्याची प्रथा आहे. दोघा भावांना दोघी बहिणींशी लग्न करता येत नाही. मात्र एका पुरुषाला दोघी बहिणींशी लग्न करता येते. पोटजातीतच विवाह जमवतात. यांच्यांत बालविवाह रूढ आहे. पण बहुधा मुले वयात आल्यानंतर लग्न करतात. बहुपत्नीप्रथा यांच्यांत रूढ होती.

लग्न जमवण्यात मुलाचे पालक पुढाकार घेतात. त्यासाठी पत्रिका पाहतात. लग्नापूर्वी हळदीसमारंभ करतात. दोघांच्या डोक्याला बाशिंगे बांधतात. लग्नाच्या वेळी वधूवर शिंदीच्या चटईवर उभे राहतात. त्यांच्यामध्ये अंतरपाट धरतात, ब्राह्मण मंत्र म्हणतात व उपस्थित लोक वधूवरांवर अक्षता टाकतात. वधू व वर एकमेकांच्या मस्तकावर जिरे-गूळ तीनदा टाकतात. त्यानंतर कन्यादानाचा विधी केला जातो. मग वर वधूच्या गळयात मंगळसूत्र बांधतो व पायांत चांदीची जोडवी घालतो. अशा प्रकारे मुख्य विधी संपतो. यांच्यांत मुलगे व मुली देवाला वाहण्याची प्रथा आहे. अशा मुलांना पोतराज व मुलींना बसवी म्हणतात. त्यासाठी त्यांचे देवाशी लग्न लावतात.

यांच्यांत विधवाविवाह रूढ आहे; पण विधवेला दिराशी लग्न करता येत नाही. लग्न साधे असते. तिला साडीचोळी देऊन तिच्या गळयात ताळी बांधणे एवढाच विधी असतो. स्त्रीने व्यभिचार केला तर नवऱ्याला काडीमोड करता येते.

देवधर्म – हे लोक मुख्यतः भूतपूजक आहेत. पोचम्म, एल्लम्म, मरियम्म, महिसम्म व मुथ्यलम्म या दैवतांना हे भजतात. आषाढ महिन्यात त्यांना पशुबळी दिला जातो. काही वीरपुरुषांना देव मानून हे लोक त्यांना भजतात. चिन्न केशव स्वामी याची पूजा वर्षप्रतिपदा, गणेशचतुर्थी या दिवशी व शनिवारी केली जाते.

मर्तिकप्रथा – यांच्यांत मृतांना पुरतात किंवा जाळतात. प्रेत जाळले तर तिसऱ्या दिवशी रक्षा व अस्थी गोळा करून रक्षा नदीत टाकतात व अस्थी पुरून टाकतात. प्रेत पुरताना त्याचे मस्तक दक्षिणेकडे करतात. मृत मनुष्य विवाहित असेल तर दहा दिवस व अविवाहित असेल तर तीन दिवस सुतक पाळतात. जंगम व दासरी हे मर्तिकाचे विधी चालवतात. माल जंगम लोक बसल्या स्थितीत प्रेत पुरतात. ते सुतक पाळीत नाहीत. दहाव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. माल लोक पितर अमावास्येला पितरांच्या नावाने जंगम व दासरी यांना भिक्षा घालतात. [ट्रा. का. सें. प्रॉं. इं.; का. ट्रा. नि. डो.]

मालकंस

हिंदुस्थानी संगीतातील एक राग. हा भैरवी थाटातून उत्पन्न होतो. याच्या आरोहावरोहांत ऋषभ व पंचम हे स्वर वर्ज्य असल्यामुळे याची जाती ओडव-ओडव आहे. याचा वादी स्वर मध्यम व संवादी षड्ज आहे. गानसमय रात्रीचा तिसरा प्रहर. श्री. गोविंदराव टेंबे या रागाविषयी लिहितात – जाणत्या नेणत्या आबालवृद्धांना या रागाविषयी न कळत आदर व आत्मीयता वाटते. उच्च संगीताविषयी जिज्ञासा व गौरवाची भावना निर्माण करणारा हा राग आहे. उदात्त सौंदर्य व गंभीर लालित्य या दोन गुणांचे असामान्य मिश्रण या रागात झालेले आहे. शोक, विषाद, हीन अभिरुची, उत्तान किंवा ग्राम्य शृंगार, इ. अनेक भावनांपासून हा सर्वस्वी अलिप्त असतो. [क. सं.; सु. वि. को.]

मालदेव

(इ. स. चे १६ वे शतक) एक हिंदी जैन कवी. हा भटनेर (हनुमानगढ) येथील वडगच्छीय शाखेच्या आचार्य भावदेवसूरीचा शिष्य होता. श्वेतांबर जैनांच्या हिंदी रचनेचा प्रारंभ कवी मालदेवापासून झाला, असे मानतात. याच्या भाषेवर राजस्थानी भाषेचा खूप प्रभाव आहे. याने प्राकृत, संस्कृत, हिंदी व राजस्थानी या चार भाषांमध्ये विपुल ग्रंथरचना केली आहे. पुरंदर चौपाई, सुरसुंदरी चौपाई, वीरांगद चौपाई, भोजप्रबंध, विक्रमपंच दंड चौपाई, इ. त्या ग्रंथांची नावे आहेत.

या सर्व ग्रंथांमध्ये पुरंदर चौपाई हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. याची रचना प्रेमकाव्यासारखी आहे. यात कवीने प्राधान्याने आदर्श स्त्रीचरित्र व तिचे शील हे विषय चर्चिले आहेत. याची भाषा आणि दृष्टान्त देण्याची पद्धती विषयानुकूल आहे. त्याच्या काव्याचा एक नमुना असा –

ससनेहा तड दुख सहई, माल तजइ परिनार।
तबलगि मथि मथियइ दही, जबलगि घीय मसारी॥
हरिणा पासइ फंदतओ, जड चराए पराया खेत।
माल जान यु परिहरउ, परनारी सू हेत॥

अर्थ – ज्याच्या मनात परस्त्रीसंबंधी प्रेम आहे, त्याला दुःख सहन करावे लागते. जोपर्यंत दह्यात लोणी असते तोपर्यंत ते घुसळले जाते. दुसऱ्याच्या शेतात चरणारे हरिण अखेर फासात जाते. म्हणून मालदेव म्हणतो, की परनारीचा अभिलाष धरणे चांगले नाही.

मालदेवाच्या काव्यात अनेक सुभाषितेही आढळतात. [हिं. सा. खंड २; मरु-भारती, जुलै १९५७]

मालपहाडिया

एक अनुसूचित जमात. या जमातीच्या उत्पत्तिकथेवरून मलपहाडिया हे नाव अधिक योग्य वाटते. पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद, जलपैगुडी, पुरुळिया, मालडा, पश्चिम दिनाजपूर आणि मिदनापूर या जिल्ह्यांत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या लोकांची प्रामुख्याने वस्ती आहे. पूर्वी हे लोक बिहारमध्ये राहत होते आणि तियल्या पहाडी प्रदेशात शेती करून व जंगलातील फळामुळांचा उपयोग करून आपला चरितार्थ चालवीत होते. याबद्दल तियल्या राजाला ते नाममात्र रक्कम स्वामित्व म्हणून देत असत. पण इंग्रजांच्या हाती बिहारची सत्ता गेल्यावर त्यांना जमिनीचा उपभोग घेता येईना. म्हणून ते शेजारच्या बंगालमधे जाऊन चहाच्या मळ्यांत व मैदानी प्रदेशात मजुरी करू लागले व पुढे तिथेच स्थायिक झाले.

आपल्या उत्पत्तीविषयी ते पुढील कथा सांगतात– रावणाने सीतेला पळवून नेल्यावर रामलक्ष्मणांनी तिचा खूप शोध केला आणि दमल्यामुळे विश्रांतीसाठी ते एका ठिकाणी थांबले. विश्रांती घेत असताना रामचंद्राच्या अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. घामाबरोबरच त्याच्या अंगातून मल बाहेर आला. त्या मलापासून रामाच्या सोबतीसाठी एक पुरुष व एक स्त्री असे एक जोडपे निर्माण करण्यात आले. मलापासून उत्पन्न झाल्यामुळे व पहाडी प्रदेशात राहत असल्यामुळे त्यांना मलपहाडी असे नाव मिळाले. त्या जोडप्याचेच आम्ही वंशज आहो.

हे लोक भ्रष्ट स्वरूपात बंगाली भाषा बोलतात किंवा बंगाली भाषेचे मिश्रण असलेली सद्री बोली बोलतात.

या लोकांची घरे जमिनीपासून थोड्या उंचीवर बांधलेली असतात. घरांच्या भिंती तागाच्या काठ्या, बांबूच्या फांद्या किंवा बांबूच्या कामट्या यांच्यावर माती थापून बनवतात. घराचे छप्पर गवताचे असून, ते उतरते असते. घराच्या एका बाजूला पडवी असते. तिच्यात ते पावसाळ्यात स्वयंपाक करतात. एरवी ते अंगणातच उघड्यावर रांधतात. घरांना खिडक्यांच्या ऐवजी भिंतीत दोन तीन लहान भोके असतात. पण त्यांतून फारच थोडी हवा किंवा उजेड घरात येतो. रात्री झोपण्यासाठी मुख्य झोपडीशिवाय एक लहान झोपडी बांधलेली असते. गुरांसाठी बहुधा एक गोठाही अंगणाच्या एका बाजूला बांधलेला असतो.

घर बांधण्यासाठी जागा निवडली, की ती शुभ की अशुभ हे पाहण्यासाठी त्या जागेचे चारही कोपरे सारवून त्या ठिकाणी संध्याकाळच्या वेळी थोडे तांदूळ ठेवतात. दुसऱ्या दिवशी सकाळी ते तांदूळ जसेच्या तसे असले, तर ती जागा भुताखेतांपासून मुक्त आहे, असे समजून तिथे घर बांधतात. अन्यथा ती जागा सोडून देतात.

घराचा पहिला खांब पुरण्यापूर्वी त्या खड्ड्यात प्रमुख देवतेच्या व पितृदेवतेच्या नावे एक पैसा टाकतात. घरातली माणसेच स्वतः कष्ट करून घर बांधतात. घराच्या दर्शनी भागावर व आतल्या भिंतींवर ते पशुपक्ष्यांची चित्रे काढून ती रंगवतात.

जलपैगुडी जिल्ह्यातील मलपहाडी चहाच्या मळ्यांत काम करतात, तेव्हा चहाच्या मळ्यांचे मालक त्यांना राहण्यासाठी घरे बांधून देतात.

उद्योगधंदे – मलपहाडी लोकांपैकी काहीजण शेती करतात, काही मजुरी करतात, काही लाकूडफाटा गोळा करून व कोळसा तयार करून विकतात, तर काही शेळ्या, गुरे व कोंबड्या पाळतात. शेतकरी चांगल्या जमिनीत वर्षाला तीन पिके काढतात. भात, तीळ, ऊस, ताग, कडधान्ये, सण, भाजीपाला, इ. पिके ते काढतात.

वेषभूषा– मलपहाडी पुरुष धोतर नेसतात व सदरा घालतात. त्यांच्या स्त्रिया साडी नेसतात व चोळी घालतात. त्या हातांत चांदीच्या, पितळेच्या किंवा काचेच्या बांगड्या; गळ्यांत हार, कानांत डूल व नाकांत नथ घालतात.

या लोकांना स्वच्छतेची आवड असून, ते आपली घरे झाडून सारवून स्वच्छ ठेवतात. उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात ते रोज स्नान करतात व राखेने कपडे धुतात. हिवाळ्यात मात्र फार थंडीमुळे ते रोज स्नान करीत नाहीत.

या लोकांकडे बासरी, ढोल, करताल, मांदळ, इ. वाद्ये असतात आणि सणासुदीच्या व फुरसतीच्या वेळात ते ही वाद्ये वाजवतात.

भात हे यांचे मुख्य अन्न होय. भातापासून बनवलेली हंडिया नामक दारू हे त्यांचे रोजचे व सणासुदीचे पेय आहे.

मलपहाडी लोकांत देहेरी, पुजारी, लेया, गृही, सिंघ, मंझी, अहिरी किंवा धनुकी, पटोर, इ. खुंट किंवा पोटभेद आहेत. या खुंटांत श्रेष्ठ–कनिष्ठभावही आहे.

विवाहप्रथा – मातेकडून व पित्याकडून तीन पिढ्या वगळून हे लोक लग्नसंबंध जोडतात. मोठ्या भावाच्या विधवेशी आणि मृत पत्नीच्या धाकट्या बहिणीशी लग्न करण्याची पद्धत आहे. सर्वसाधारणपणे एकाच खुंटात विवाहसंबंध करीत नाहीत. मुलांची लग्ने साधारणपणे अठरा ते बावीस व मुलींची बारा ते अठरा या वयात होतात. मध्यस्थामार्फत आईबाप मुलांची लग्ने ठरवतात.

शिवरात्र झाल्यावर यांची लग्नसराई सुरू होते. भाद्रपद, पौष आणि चैत्र या महिन्यांत हे लग्ने करीत नाहीत. मध्यस्थाने मुलीची माहिती मिळवली, की मुलाचे आईबाप, ग्रामप्रमुख व आप्तेष्ट मुलीच्या घरी जाऊन मुलगी पाहतात. ती पसंत पडल्यास तिच्या हातात एक रुपया ठेवतात. नंतर मुलीकडील लोक मुलाच्या घरी जाऊन मुलगा पाहतात. तो पसंत पडल्यावर एक दिवस ठरवून मुलाच्या घरी जाऊन लग्नाची बोलणी करतात. या दिवसाला मालाचंदन असे नाव आहे. याच दिवशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लग्नाचा मुहूर्त ठरवून लग्नदोरे तयार करतात. लग्नाला जितके दिवस असतील, तितक्या गाठी दोरांना मारतात आणि वधूपिता ते मुलाचे वडील व आप्तेष्ट यांच्याकडे निमंत्रणादाखल पाठवतो.

लग्नाच्या आधी दोन दिवस नवऱ्या मुलाकडील लोक एका तळ्यावर जाऊन जलहारी देवतांची पूजा करतात आणि तळ्यात दोन पेटत्या पणत्या सोडतात. त्या पणत्यांनी जर एकमेकांना स्पर्श केला, तर वधू-वरांचे भावी आयुष्य सुखसमृद्धीचे जाईल, असे समजतात. मुलीकडील लोकही जलहारी देवतांची पूजा करतात. त्यानंतर लग्नाचा मांडव उभारतात. मांडवाच्या मध्यभागी एका खांबाला शेंदराचे पाच टिळे लावतात व त्याला आंब्याच्या डहाळ्या बांधतात. हा खांब त्यांच्या ग्रामदेवतेचा प्रतिनिधी असतो.

लग्नाच्या आदल्या दिवशी नवरामुलगा आपला मेहुणा व दोन बहिणी यांच्यासह तळ्यावर जातो. तिथे मेहुणा कोयतीने पाण्यावर सात वेळा वार करतो. प्रत्येक आघाताच्या वेळी थोडे थोडे पाणी भरून सातव्या वारानंतर त्या दोघी बहिणी आपले घडे पाण्याने पूर्ण भरतात. हे घडे मग मांडवात नेऊन ठेवतात. मग वरमाय वराला मांडीवर घेऊन उखळीवर बसते आणि वराच्या बहिणी त्याला त्या पाण्याने स्नान घालतात. नंतर वरपिता मांडवातील ग्रामदेवतेची पूजा करून तिला कोंबडे बळी देतो व मुलाला तिचे आशीर्वाद मागतो. नंतर वराकडील मंडळी वधूगृही जायला निघतात. वधूच्या गावाच्या सरहद्दीवर पोचल्यावर वधूपक्षाकडील मंडळी लुटुपुटीच्या लढाईच्या आवेशाने काठ्या हातांत घेऊन वऱ्हाडी मंडळीच्या जवळ जाऊ लागतात. पण दोन्ही पक्ष जेव्हा एकमेकांच्या जवळ येतात, तेव्हा मारामारी करण्याऐवजी ते एकमेकांना आलिंगन देतात. वरमंडळी जानोशात आल्यावर वधूचा मेहुणा तिला कडेवर घेऊन तिठ्यावर जातो. तिथे ती खाली उतरते आणि मेहुणा गवताच्या तीन पेंढ्यांना आग लावतो आणि त्या स्वतःच्या व वधूच्या पायांमधून नेऊन त्या फेकून देतो. मग वधू दह्या-दुधाची तीन गाडगी डोळे मिटून फोडते आणि पुन्हा मेहुण्याच्या कडेवर बसून घरी येते.

लग्नाचा मुहूर्त बहुधा सकाळी लवकर असतो. मांडवात वधू-वर एकमेकांच्या शेजारी बसतात. मग नवरा मुलगा उजव्या हाताच्या तळव्याने वधूच्या डोक्याला पाच किंवा सात वेळा तेल चोळतो आणि तिच्या कपाळी शेंदूर लावतो. त्यानंतर वधू त्याच्या कपाळी शेंदराचे पाच किंवा सात तिलक लावते. मग तिच्या हातात वर लोखंडांची बांगडी घालतो. नंतर वराला एक भांडेभर ताडी प्यायला देतात. तो त्यातली थोडी ताडी पितो आणि उरलेली वधूला देतो. वधू जर ती ताडी चटकन प्याली, तर तिला हा विवाहसंबंध पसंत पडला, असे मानतात.

नंतर वराचा मेहुणा वराला आणि वधूची मोठी भावजय वधूला आपल्या खांद्यावर घेऊन मांडवात बसतात. त्यांच्या पुढे एका पितळेच्या तबकात साळी व दूर्वा ठेवलेल्या असतात. वधू-वरांकडील मोठी माणसे त्यांच्या मस्तकावर साळी व दूर्वा टाकून त्यांना आशीर्वाद देतात आणि अहेर करतात. हा सर्व अहेर वधूच्या मालकीचा असतो. नंतर वधू-वरांना वरमंडळीच्या जानोशात नेतात. मग वराकडील मंडळी 'आम्हांला भूक लागली, तहान लागली, राजाराणीचे लग्न झाले, आम्हांला आता जाऊ द्या,' अशा अर्थाचे गाणे गायला लागतात. नंतर थोड्याच वेळात वधूपक्षाकडील लोक त्यांना जेवायला वाढतात. वधू-वरही वधूच्या घरात जाऊन उपास सोडतात. नंतर वरात निघून वराच्या गावी येते आणि मांडवात थांबते. तिथे वधू–वर उखळी व जात्याची तळी यांच्यावर बसतात. तिथे वधू–वरांना अहेर होतो. हा अहेर वराच्या मालकीचा असतो. मांडवापासून घराच्या वाटेवर आंब्याच्या पाच किंवा सात पानांवर साळी व दूर्वा ठेवलेल्या असतात. गृहप्रवेश करताना वधूने ही पाने, त्यांवरील साळी व दूर्वा न सांडता गोळा करून सासूला दिली, तर ती वधू भाग्यवान समजतात. यानंतर पाच किंवा सात दिवसांनी गावातल्या लोकांना जेवणावळ घालतात. त्या वेळी वाढण्याचे काम वधू–वर करतात.

मुलीला प्रथम ऋतुप्राप्ती झाली, म्हणजे कोणताही विधी करीत नाहीत. फक्त त्या तीन दिवसांत ती बाजूला बसते आणि घरातले कोणतेही काम करीत नाही.

प्रसूतिप्रथा – गरोदर स्त्रीला काही नियम पाळावे लागतात. तिन्हीसांजा ती नदीवर जात नाही. कारण तिथे भुताखेतांचा वावर असतो, अशी समजूत आहे. भुताखेतांपासून संरक्षण होण्यासाठी मांत्रिक काही मोहरीचे दाणे मंत्रून देतो. ते एका फडक्यात बांधून गरोदर स्त्रीच्या डाव्या हातात बांधतात. प्रसूतीसाठी त्या स्त्रीचा पती अंगणात एक झोपडी उभारतो. पत्नी प्रसूत होऊन तिचे जननाशौच संपेपर्यंत पुरुष त्या झोपडीच्या बाहेरच राहतो व तिथेच आपल्यासाठी आणि पत्नीसाठी स्वयंपाक करतो. पाच दिवसांनी आशौच संपल्यावर तो घरात प्रवेश करतो. मात्र चहाच्या मळ्यांत काम करणारे मलपहाडी पत्नीला बाळंतपणासाठी दवाखान्यात पाठवतात आणि यांपैकी कोणतेच नियम पाळीत नाहीत.

नवव्या दिवशी मुलाचे व सातव्या दिवशी मुलीचे मुंडन करतात आणि मग नाव ठेवतात. तीन ते सहा महिन्यांच्या काळात मुलाला अन्नप्राशन करवतात. त्या वेळी आप्तेष्टांना जेवण देतात. त्या दिवसापासून आई पूर्ण शुद्ध झाली, असे समजतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवधर्म – भगवान हा त्यांचा सर्वश्रेष्ठ देव असून, तो जगाचा उत्पत्तिकर्ता व संहारकर्ता आहे, असे हे लोक मानतात. याव्यतिरिक्त ते काली, सूर्य, मनसा, भगवती, हरिनाथ, महादेव, इ. देवतांना व ग्रामदेवतांना भजतात.

वैशाख महिन्यात हे श्रीरामाची पूजा करतात; तसेच वैशाख, आषाढ, माघ आणि फाल्गुन या महिन्यांत रविवारी हे सूर्याची पूजा करतात आणि त्याला दोन ते दहा पांढरे बकरे बळी देतात. गाय, बैल, शेळ्या यांच्या संरक्षणासाठी ते ज्येष्ठ महिन्यात गोरभू देवाची पूजा करतात. याशिवाय इतर देवतांच्या पूजाही ते करतात आणि भुताखेतांना कोंबडे देऊन संतुष्ट करतात.

मृतकप्रथा – परमेश्वराने जे जीव जगात निर्माण केलेले असतात, ते तो मृत्यूच्या क्रियेने परत नेतो, अशी मलपहाडींची समजूत आहे. पुनर्जन्मावर त्यांचा विश्वास आहे. माणूस आजारी पडला आणि तो आसन्नमरण झाला, की ते मांत्रिकाला बोलावून आजारीपणाचे कारण शोधून काढतात. जर एखाद्या भुताखेताने पछाडल्यामुळे तो आजारी पडला, असे वाटले तर मांत्रिक काहीतरी विधी करतो.

हे लोक प्रेते पुरतात किंवा जाळतात. आर्थिक अडचण, पावसाळा व शेतीच्या कामाचे दिवस असताना ते प्रेते पुरतात. कारण त्यांना ते सोयिस्कर वाटते. साथीचे रोग, सर्पदंश यांमुळे आणि पाण्यात बुडून व वीज पडून मृत्यू आलेल्यांना मात्र गावाबाहेर दूर पुरतात. मृताला तेलहळद लावून स्नान घालतात आणि पांढऱ्या कापडाने झाकतात. काही लोक त्याच्यावर नाणी ठेवतात. प्रेत स्मशानात नेण्यापूर्वी ती नाणी गोळा करून मृताच्या जवळच्या नातलगाला देतात. हरिबोल असे म्हणून प्रेताची तिरडी उचलतात आणि स्मशानाकडे चालू लागतात. त्यांच्या मागून घरातील एक स्त्री शेणपाण्याचे गाडगे घेऊन वाटेत शेणपाणी शिंपडीत जाते, गावाच्या हद्दीवर पोचल्यावर गाडगे फोडून फेकून देते व घरी परतते. तिरडी उचलणारे लोकच मृतासाठी खड्डा खणतात, मृताचे डोके उत्तरेला करून त्याला खड्ड्यात ठेवतात व त्याच्यावर माती लोटतात.

प्रेत जाळताना मृताचा उत्तराधिकारी प्रेताला अग्नी देतो. स्मशानातून घरी जाताना प्रेतवाहक वाटेत नदीवर किंवा तळ्यात स्नान करून मृताच्या घरी जातात. तिथे घरातील एक पुरुष त्यांच्यावर पवित्र जल शिंपडतो आणि त्याने पेटवलेल्या धूपावरून ते हात फिरवतात आणि शुद्ध होतात.

निरनिराळी कुटुंबे पाच, नऊ, अकरा, तेरा, पंधरा किंवा तेवीस दिवस आशौच पाळतात. पण सर्वसाधारणपणे तेरा दिवस आशौच पाळण्याची पद्धत आहे. हे लोक मृताचे श्राद्ध करतात. एका वर्षानंतर ते सर्व गावाला जेवण देतात. [दि मालपहारियाज ऑफ वेस्ट बेंगॉल – ए. के. दास, बी. रायचौधुरी, एम्. के. राहा, १९६६]

मालवगण

मालवगण प्राचीन काळातला एक लोकसंघ. पंजाबात झेलम (वितस्ता) नदीच्या पूर्वेला चिनाब (असिक्नी) व रावी (इरावती) या नद्यांच्या मधल्या प्रदेशात यांचे गणराज्य होते. महाभारतात मालव व क्षुद्रक या आयुधजीवी गणांचा उल्लेख एकत्र आढळतो. हे लोक भारतीय युद्धात कौरवांच्या बाजूने लढले होते. पाणिनीने त्यांचा समावेश प्रजातंत्र गणराज्यांत केला आहे. हे लोक आर्य लोकांपैकी असून, फार प्राचीन काळापासून पंजाबात वसलेले होते. क्षुद्रकांचे गणराज्य चिनाब व झेलम यांच्यामध्ये होते. ही दोन्ही गणराज्ये स्वतंत्र असून, त्यांच्यांत सतत युद्धे चालत होती. पण सनपूर्व ३२६च्या सुमारास शिकंदराने जेव्हा भारतावर आक्रमण केले, तेव्हा ही गणराज्ये आपसांतील वैर विसरून एक झाली व त्यांनी शत्रूचा निकराने प्रतिकार केला.

ग्रीक इतिहासकारांनी मालवांना मल्लोई म्हटले आहे. ते युद्धविद्येत अत्यंत कुशल व स्वाभिमानी होते, असे एरियनने लिहून ठेवले आहे. मालवांच्या शौर्याची एवढी ख्याती होती, की त्यांच्याशी लढावे लागणार हे समजताच शिकंदराचे सैनिक कच खाऊ लागले. शिकंदराने त्यांना मोठ्या प्रयासाने लढण्यास उद्युक्त केले व तो स्वतः पुढे घुसला. त्या रणधुमाळीत मालवांचा बाण लागून शिकंदर घायाळ झाला. शेवटी त्याचा जय झाला हे खरे; पण मालव लोकांचे शौर्य व धैर्य पाहून तो स्तिमित झाला व त्याने त्यांचा मोठा सत्कार केला.

त्यानंतरच्या काळात मालवांनी पंजाबातून स्थलांतर केले. पण त्या २–३ शतकांतला त्यांचा इतिहास अज्ञात आहे. मात्र काही काळ ते सतलज नदीच्या दक्षिणेला फिरोजपूर, लुधियाना, भटिंडा या भागांत राहिले असावे. कारण त्या प्रदेशाला मालवा हे नाव असून, अजूनही ते रूढ आहे. पुढे ते मेवाड प्रदेशात जाऊन स्थायिक झाले. तिथे त्यांनी स्वतंत्र गणराज्य स्थापले. मालवनगर ही त्यांची राजधानी होती. जयपूर राज्यात बुंदीपासून ४५ मैलांवर कोटिनगर आहे. तेच पूर्वीचे मालवनगर होय, असे इतिहासकार सांगतात. त्याच्या परिसरात मालवांची शेकडो नाणी सापडली आहेत. त्यांतली काही नाणी सन पूर्व पहिल्या शतकातली असून, काहींवर "मालवानां जयः" हे शब्द ब्राह्मी लिपीत आढळतात.

सनपूर्व पहिल्या शतकातच जयपूरच्या मालवांपैकी काही लोक मध्य प्रदेशात गेले. तिथे शकांचे राज्य होते. मालव आणि शक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांचे घनघोर युद्ध होऊन, त्यात शकांचा पराजय झाला. मालवांनी अवंती नगरी जिंकली. ही घटना सनपूर्व ५८ च्या सुमारास घडली. त्या विजयाचे स्मारक म्हणून मालवांनी मालव संवत सुरू केला, असे म्हणतात. त्यानंतर इ. स. च्या १ ल्या शतकात शकांनी मालवांचा पराभव करून पुन्हा अवंतीवर सत्ता स्थापली. पण इ. स. च्या ३ ऱ्या शतकाच्या प्रारंभी मालवांनी अवंतीचे राज्य परत मिळवले.

मालवांच्या या अवंतीविजयासंबंधी विद्वानांत मतभेद आहेत. काही इतिहासकारांच्या मते इ. स. च्या २ ऱ्या शतकापर्यंत मालव लोक मेवाडमध्येच राज्य करीत होते. ते राज्य सुसंघटित व प्रबळ होते. त्या काळात त्यांचा प. भारतातील शकक्षत्रपांशी अनेकदा संघर्ष झाला नहपानाचा जावई उषवदात याने त्यांचा एकदा पराभवही केला होता. पण गौतमीपुत्र सातकर्णी याने मालवांच्या मदतीने शकांचा पूर्ण पराभव केला.

त्यानंतर मध्य प्रदेशात शकक्षत्रप कार्दमकांचे राज्य सुरू झाले. त्यांच्याशी मालवांचा संघर्ष सुमारे २०० वर्षे चालू होता. त्या काळात मालवांनी मेवाडच्या दक्षिणेकडील व पूर्वेकडील प्रदेशांत जाऊन नवीन वसाहती केल्या असाव्या. त्यांच्या प्रभावामुळेच त्या सर्व भूभागाला माळवा हे नाव प्राप्त झाले. त्या प्रदेशांत मालवांनी गणराज्येही स्थापन केली असावी.

इ. स. च्या ४थ्या शतकात सम्राट समुद्रगुप्ताने दिग्विजय केला, तेव्हा त्याची सार्वभौम सत्ता मालवांनी मान्य केली. मालव लोक गुप्त साम्राज्यात सामंत म्हणून नांदू लागले. दशपूर (मंदसोर) येथे मालवांचे औलिकर नामक घराणे राज्य करीत होते. त्याच घराण्यातील यशोधर्मा याने इ. स. च्या ६ व्या शतकात हूण सरदार मिहिरकुल याचा पराभव केला आणि गुप्त साम्राज्यातील बराच प्रदेश जिंकून आपले साम्राज्य स्थापले.

मालवांनी सुरू केलेला संवतच पुढे विक्रम संवत या नावाने भारतात सर्वत्र प्रचलित झाला. मालवांनी ही कालगणना मेवाडात असताना सुरू केली, की अवंतीविजयानंतर, यावद्दल पंडितांत एकमत नाही. पाहा– विक्रम संवत. [भा. इ. रू.; वि. स्मृ. ग्रं.; ए. इं. – मजु.; हिं. वि. को.]

मालवी भाषा व साहित्य

मध्य प्रदेशातल्या उज्जैन, इंदोर, देवास, मंदसोर व राजगढ, या प्रदेशांत मालवी भाषा बोलली जाते व तेच तिचे मुख्य क्षेत्र आहे. याव्यतिरिक्त दक्षिणेस नर्मदानदीपर्यंत; तसेच निमाड, भोपाळ, नरसिंहगढ, दक्षिण झालेवाड, नीमच, रतलाम, पूर्व झाबुआ इथपर्यंत तिची व्याप्ती आहे. राजस्थानच्या काही भागांतही हिचा आढळ होतो. चांदा व बैतूल जिल्ह्यांतल्या काही जातीही मालवी भाषा बोलतात. कोटा जिल्ह्याच्या प्रदेशातही मालवी बोलणारे लोक आहेत. मालवी बोलणाऱ्यांची संख्या एकूण सुमारे ४०-५० लाख एवढी आहे. डॉ. सुनीतिकुमार चाटुर्ज्या म्हणतात – मालवी बोलीच्या संबंधात असे दिसते, की वास्तवात ही मध्यदेशाच्या भाषेची एक शाखा आहे. पण मारवाडी व राजस्थानी भाषांचा तिच्यावर प्रभाव आहे. सामान्यतः इ.स.च्या ९ व्या शतकापासून मालवी ही स्वतंत्र भाषा बनल्याची प्रमाणे उपलब्ध होतात. त्या काळात ती लोकव्यवहाराची तर भाषा होतीच; शिवाय शिक्षणक्षेत्रातही तिचा उपयोग होत असे.

मालवी ही कोमल आणि श्रवणसुभग बोली आहे. हिच्यात कित्येक भिन्न भाषांचे शब्द स्वाभाविक रूपाने मिळून मिसळून गेले आहेत. मालव जनपदातल्या लोकांनी जिथे जिथे वसाहती केल्या, तिथे तिथे स्थानिक बोलीवर आपला प्रभाव पाडला. या लोकांनी पहाडी प्रदेशांतही प्रवेश करून वसाहती मांडल्या. त्यावरोबरच त्यांची भाषाही तिथपर्यंत पोचली. पहाडी बोली, मध्य आशियातल्या भटक्या जमातींच्या बोली आणि राजस्थानातील काही बोली यांच्याशी मालवीची जी जवळीक दिसते, त्याचे मुख्य कारण हे आहे.

मालवीची सामान्य लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत–

(१) ऱ्हस्व इ चा उच्चार अ होणे. उदा० दिन-दन; हरिण – हरण; पंडित – पंडत, इत्यादी.

(२) ऐ व औ हे ध्वनी ए व ओ, होतात. उदा० चैन-चेन; और – ओर, इत्यादी.

(३) य आणि व यांचा उच्चार अनुक्रमे ज व ब होतो. उदा० त्रिवेणी – तिबेरणी; विष्णु – बिसनु; यदा–जदा; संध्या-सं...

(४) शब्द विकृत करण्याची प्रवृत्ती आहे. उदा० किसन-किसन्यो; सुमन–सुमन्यो; बालक – बालुडो; रुपया - रु...

मालवी गद्याचा एक नमुना असा–

“मालवी बोली में जो साहित्य है, वो बिखर्यो हुवो है, एक जगे नी है, इसमें अपना साहित्य की विशेषता को ... उतनी भान नही होने पायो है । ‘मालव’ लोग इस देस में भोत पुराना जमाना से है, इनको गणतंत्र इतिहास में ... खास महत्त्व और पुरानीपन रखे है । सिकंदर का दांत ... करनेवाला मालवी लोग था । महाभारत और पुराणों में मालवी लोगों की कथा-गाथा भरी हुयी हैं, तब उनको ... उनको साहित्य कई पिछड्योंज रियो होयेगा, या तो ... सके, पर मालवा ने बडा उलट–पुलट, हवा का फेर-फार ... ऊमे अपनो साहित्य भी वे बचई नी सक्या ।

भावार्थ – मालवी बोलीत जे साहित्य आहे, ते एका ... नसून विखुरलेले आहे. त्यामुळे आपल्या साहित्याचे गुण...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोकांच्या ध्यानी येऊ शकले नाहीत. या देशात मालव लोक फार प्राचीन काळापासून वसलेले आहेत. त्यांची गणराज्ये इतिहासात खास महत्व पावली आहेत. माळव्यातल्या लोकांनी सिकंदरला खडे चारले आहेत. पुराणे आणि महाभारत यांत मालवी लोकांच्या कथा-गाथा विपुल आहेत. त्या काळी मालवी भाषा आणि तिचे साहित्य मागसलेले राहिले असेल हे शक्यच नाही; पण माळव्यामध्ये ऐतिहासिक घडामोडी व उलथापालथी बऱ्याच झाल्या. त्या उत्पातांत मालव लोक आपले साहित्य वाचवू शकले नाहीत.

रतलामी, मंदसौरी आणि आदर्श अशी मालवीची तीन मुख्य रूपे आहेत. उमठवाडी, सोंधवाडी, मेवाती, भोयरी, रागडी, इ. मालवीच्या काही पोटभाषाही आहेत.

भोजराजाच्या कालात (इ. स. चे ११ वे शतक) मालवी साहित्याचा प्रशंसनीय विकास झाला. स्वतः भोजराजाने मालवी साहित्याला प्रोत्साहन दिले होते. त्यानंतर परमारांची शक्ती हळू हळू कमी होऊ लागली व सोळंकी राजांचा प्रभाव वाढू लागला. त्यातच अनेक छोटी मोठी राज्ये माळव्यात निर्माण झाली. त्यामुळे मालवीचे स्वरूप बदलू लागले. तिच्यात पोटभेद निर्माण होऊ लागले ते याच काळात. सतराव्या शतकापर्यन्त ही पोटभेदांची निर्मिती चालू होती.

प्राचीन मालवीचे साहित्य अपभ्रंश भाषेशी संबंधित आहे, तर मध्ययुगीन साहित्य राजेमहाराजे व मांडलिक यांच्या कागदपत्रांत दडून राहिले आहे. उज्जैन येथील प्राच्य ग्रंथसंग्रहालयात मालवीची काही साहित्यिक सामुग्री उपलब्ध आहे.

मालवी लोकगीते – मालवी लोकगीतांची सृष्टी विपुल आहे. ऋतू आणि सण-उत्सव यांची गीते, खेळांची गीते, देवदेवतांची गीते, तीर्थांची गीते, संस्कारांची गीते, प्रेमगीते, पनिहारिणींची गीते, चरखागीते, बालगीते, प्रभातीची गीते असे त्यांचे वर्गीकरण करता येईल.

सणासुदीच्या गीतांपैकी एक कुलवधूचे गीत –

म्हारी देराणी जेठाणीने उरी रे बुलावोजी राज ।
उनकी जोडीले, भोत खुलांगाजी राज ।
सुबकी घडी म्हारे आनंदे वदावोजी राजा ।।
हेडांगा बुगछोनें ओढांगा साळूजी राज ।
कटारे की बिंदलीसे भोत खुलांगाजी राज ।
सुबकी घडी म्हारे आनंदे वधावोजी राज ।।

भावार्थ– हे पतिदेवा, या सणाच्या दिवशी शुभ घडीला माझा आनंद वाढविण्यासाठी तुम्ही माझ्या जावांना बोलवून घ्या. त्यांच्या जोडीने माझे रूप खुलून दिसेल. मी माझी रेशमी साडी नेसीन आणि कटारीची बिंदी कपाळी चिकटवीन. या साजशृंगाराने माझे रूप आकर्षक होईल. या शुभ घडीला हे पतिराजा, तुम्ही माझा आनंद वाढवा.

पुढील गीत मुलांच्या खेळातले आहे –

अटली-मटली चव्वा-चन्नन । आवे नार, जावे नार ।।
अगला झूले बगला झूले । सावन मास करेली फूले ।।
फुल-फुलकी बावडी । राजा गयो दिल्ली ।।
दिल्ली से लायो सात कटोरी । एक कटोरी फूटी ।
राजा की टांग टूटी ।।

भावार्थ– अटली–मटली चव्वा– चन्ना, बाई येते, बाई जाते; अगला झुलतो बगळा झुलतो, श्रावणमासात कारल्याची वेल फुलते. फुला-फुलांची बावडी, राजा गेला दिल्लीला. दिल्लीहून आणल्या सात कटोऱ्या. एक कटोरी फुटली. राजाची टांग तुटली.

माळव्याच्या लोकदेवतांत भेरूजीला (भैरव) फार महत्त्वाचे स्थान आहे. त्याच्या पूजेला विलंब झाल्याबद्दल एक स्त्री क्षमायाचना करते, ते गीत असे –

भेरूजी बालक तमारी बस । ओ लंबा तमारा केस ।
ओ भवरे पटापर मखो मोगरोजी ए ।
भेरूजी कुमाऱ्या के बारेनें । इना कळेश्या के कारनें
बिलामे रयाजी ।।
भेरूजी सुताऱ्या के बारेनें । इना बाजोटया के कारनें
बिलामे रयाजी ।

भावार्थ – हे बालवेषधारी भेरूजी, तुझ्या लांब लांब केसांत माळलेला मोगरा फार सुंदर दिसतो. कलशासाठी कुंभाराच्या घरी आणि तुझ्या बाजेसाठी सुताराच्या घरी थांबावे लागल्यामुळे तुझ्या पुजेला विलंब लागला (त्याबद्दल मला क्षमा कर).

विवाहगीतांपैकी जावयाच्या रूपगुणांची प्रशस्ती पुढील गीतात केलेली आहे –

पागा बांधो जमाई हो । पेचां हो सवा लाखेरी ।।
सासू निरखो जमाई हो । उवा हो केलके आडे के ।।
मैं कंई निरखा सहेल्या हो । हिनवाणी सूरज उगीयो ।

भावार्थ – जावयाने पिळदार पगडी घातली आहे. तिला सव्वा लाखाच्या झिळमिळया आहेत. नवरदेवाच्या सासूबाई, अंगणात लावलेल्या केळींच्या आडोशाला जरा दृष्टी टाक तर खरी. अगे सख्यांनो, मी काय निरखू ! जावई तर उदयाचलावरच्या आरक्त सूर्याप्रमाणे तेजस्वी आहे.

विवाहाच्या शुभ दिवशी सकाळी म्हणायचे प्रभातीगान–

सरज उग्यो हो केवडारी फडस । केवाणोल्या भले उगीयो ।।
तम जागो हो सूरजजी हो देव केवाणोल्या भले उगीयो ।।
तुम लीज्यो हो दातण झारी हाथ केवाणोल्या भले उगीयो ।।
दातण करज्यो हो रूडो तुळसा के क्यारे ।
केवाणोल्या भले उगीयो ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तुम दीज्यो हो सूम्यागो केरा दान केवाणोल्या भले उगीयो ॥
तुम दुवाडो हो तुमारी सून्या गाय केवाणोल्या भले उगीयो ॥

भावार्थ – प्रभाती नेहमी उगवणारी पण आजची प्रभात सामान्य नाही. केवडयाच्या पात्यांच्या आडून उगवणाऱ्या सूर्याचे किरण किती सुंदर दिसतात. तुम्ही उठा, तुळशीवृंदावनाच्या अंगणात दंतधावन करा. गोदान करून पुण्य मिळवा. मग आपल्या गायींची धार काढा. केवढा आजचा शुभ दिवस !

मालवी लोककथांमध्ये प्रबंधरूप दीर्घकथा पुष्कळ आहेत. त्यांत चूडावत, शक्तावत, राणावत, चैलावत, बगडावत, इ. राजपूत वंशांतील वीर पुरुषांच्या कथा आहेत. त्याशिवाय सणावारांच्या कथा – कहाण्याही आहेत.

आधुनिक मालवी गद्यात सर्वश्री श्रीनिवास जोशी, बाबूलाल भाटिया, ओंप्रकाश, 'अनूप,' इ. लेखक प्रसिद्ध आहेत. आनंदराव दुबे, मदनमोहन व्यास, गिरवर सिंह 'भंवर', स्वयंप्रकाश उपाध्याय, प्रकाश उप्पल, इ. कवी मालवीमध्ये काव्यलेखन करीत आहेत. [मा. उ. सा.; मा. लो. वि. अ.; मालवी लोकधुने, संकलक – श्री. कुमार गंधर्व, १९७१]

मालवीय, पं. मदनमोहन (१८६१–१९४६ इ. स.) एक थोर देशभक्त, विद्वान पंडित व बनारस हिंदू विद्यापीठाचे प्रधान संस्थापक. हे भारद्वाजगोत्री, चतुर्वेदी ब्राह्मण होते. यांचे घराणे मूळचे माळव्यातले. मालवीय हे आडनावही त्यावरूनच पडलेले आहे. सुमारे दोन-अडीचशे वर्षांपूर्वी या घराण्यातले काही पुरुष माळवा सोडून बिहारमध्ये पाटणा, मिर्झापूर, इ. ठिकाणी, तर काही पुरुष उत्तर प्रदेशात अलाहाबाद येथे जाऊन स्थायिक झाले.

पं. मदनमोहन मालवीय यांचे आजोबा अलाहाबाद येथे एक विद्वान शास्त्री व श्रीकृष्णभक्त म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचे पुत्र पं. ब्रजनाथजी हेही विद्वान व अनेक भक्तिप्रधान ग्रंथांचे लेखक म्हणून सर्वत्र सुपरिचित होते. त्यांचे रूप देखणे होते व आवाज सुरेल होता. रसाळ वाणीचे पुराणिक म्हणून त्यांचा लौकिक होता. काशी, रेवा, दरभंगा, इ. संस्थानांतून त्यांना वारंवार पुराणासाठी बोलावणी येत. ते सच्चरित, शांत स्वभावाचे व विनम्र वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांच्या पत्नी मूनाबाई या तर त्यांच्या परिसरातल्या सर्व जनांच्या आईच होऊन राहिल्या होत्या. त्याही आपल्या पतीप्रमाणे सुशील, धर्मपरायण व शांत प्रकृतीच्या होत्या. अशा सद्‌गुणसंपन्न मातापित्यांच्या पोटी पं. मालवीय यांचा जन्म झाला. देखणी व निकोप शरीरयष्टी, असीम ज्ञानलालसा, कमालीची सहिष्णू वृत्ती, इ. गुणसंपदा पं. मदनमोहन यांना त्यांच्या मातापित्यांकडूनच लाभली.

मदनमोहन यांचे प्राथमिक शिक्षण पं. हरदेवजी यांच्या … शाळेत झाले. तिथे त्यांना संस्कृत श्लोकांचे पाठांतर, … संगीत, इ. विषयांचे शिक्षणही मिळाले. इ. स. १८६१ … त्यांचे मौंजीबंधन झाले. त्यानंतर आठ वर्षांनी म्हणजे इ. … १८७७ साली वयाच्या सोळाव्या वर्षी ते प्रवेशपरीक्षा … झाले. याच काळात त्यांनी उत्तम वक्ता म्हणून लौकिक … दक केला. मॅट्रिकच्या परिक्षनंतर मदनमोहन म्यूर सेंट्रल कॉलेज मध्ये गेले. सर तेजबहादूर सप्रू, पं. मोतीलाल नेहरू इ. … नावारूपाला आलेले थोर पुरुष हे त्या वेळी मदनमोहन …

पं. मदनमोहन मालवीय

सहाध्यायी होते. कॉलेजात शिक्षण घेत असताना मदन… अन्य अनेक उद्योगांत यशस्वीपणे भाग घेत होते. कॉले… वार्षिक स्नेहसंमेलनात होणाऱ्या संस्कृत व इंग्रजी … त्यांनी उत्तम प्रतीच्या भूमिका केल्या. इ. स. १८८० … आदित्यराम भट्टाचार्य या सहकाऱ्याच्या सहकार्याने … हिंदुसमाज नामक एक संस्था स्थापन केली. प्रयागला … नावर ब्रिटिश सरकारने काही अन्याय्य व जाचक निर्बंध … होते, ते सैल करण्यासाठी मदनमोहन यांनी आपल्या … वतीने आंदोलन उभारले व त्यात यश संपादिले. …

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांनी हिंदू समाजाच्या उद्धाराच्या अनेकविध योजना आखल्या व पुढे त्या प्रसंगाप्रसंगाने कार्यवाहित आणल्या. हिंदूंच्या संघटनेसाठीही त्यांनी या काळापासूनच प्रयत्न आरंभिले. हिंदुस्थानचा मोठेपणा, हिंदुस्थानची संस्कृती आणि साहित्य यांची जपणूक करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. ' असे ते म्हणत.

कॉलेजात असतानाच इ. स. १८७८ साली मिर्झापूरच्या पं. नंदरामजी यांच्या कन्येशी त्यांचा विवाह झाला. इ. स. १८८४ मध्ये ते बी. ए. झाले. त्यानंतर एम. ए. ची पदवी संपादन करावी, अशी त्यांची इच्छा होती. तथापि वाढत्या प्रापंचिक गरजा निवारण्यासाठी नोकरी करण्याचा निर्णय त्यांना घ्यावा लागला. ज्या सरकारी विद्यालयात ते शिकले, तिथेच त्यांनी आता शिकवण्यासाठी पदार्पण केले.

याच वेळी म्हणजे इ. स. १८८५ साली हिंदी राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. राष्ट्रीय सभेच्या दुसऱ्या अधिवेशनाला मदनमोहन उपस्थित राहिले व तिथे भाषण करून त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांचे स्नेहशील व्यक्तिमत्त्व व रसाळ वक्तृत्व यांच्या प्रभावाने दादाभाई नौरोजी, सर ह्यूम, इ. नेते प्रभावित झाले. इ. स. १८८७ साली मद्रास येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात मदनमोहन मालवीय आपल्या समवेत आणखी पन्नास नव्या कार्यकर्त्यांना घेऊन उपस्थित झाले व त्यांनी आपल्या उत्कृष्ट संघटनशक्तीचा प्रत्यय राष्ट्रसभेच्या नेत्यांना आणून दिला.

विद्यालयातले अध्यापकाचे कामकाज अत्यंत आदर्शपणे सांभाळून ते सार्वजनिक कार्यातही कळकळीने भाग घेत होते. त्यामुळे त्यांच्याविषयी सर्वत्र आदराचे वातावरण निर्माण झाले. त्यांचे भाषण मधुर, आर्जवी व मुद्देसूद असे. या त्यांच्या वक्तृत्वाने त्या काळात कालाकंकरच्या राजा रामपालसिंहांना विलक्षण मोहिनी घातली. रामपालसिंह हे एक विलायती आचारविचारांनी अंतर्बाह्य बहकलेले राजे होते. तथापि मदनमोहन मालवीय यांच्या वक्तृत्वाने त्यांना थोडी जाग आली व स्वदेशासाठी काही करावे, असे वाटू लागले. त्यांनी मदनमोहन यांना आपल्या हिंदुस्थान पत्राचे संपादक होण्यासाठी विनविले व त्यासाठी भरपूर पैसाही देऊ केला. मदनमोहन मालवीय यांनी ही विनंती मानली; पण त्यापूर्वी त्यांनी राजेसाहेबांना एक अट घातली. ते म्हणाले. ' मी तुमच्या पत्राचे संपादन करीन; मात्र एक लक्षात ठेवा, तुम्ही राजेमहाराजे लहरी, व्यसनी आणि अहंकारी असता. या तुमच्या दुर्गुणांची झळ मला माझ्या कार्यात कधीही लागता उपयोगी नाही. ज्या क्षणी असे काही घडेल, त्या क्षणी मी संपादकपदाची धुरा सोडून देईन. '

राजेसाहेबांना मदनमोहन यांच्या बाणेदारपणाचे कौतुक वाटले व त्यांनी, त्यांची अट पूर्णपणे मानली जाईल, असे त्यांना अभिवचन दिले.

इ. स. १८८७ साली मालवीयजी 'हिंदुस्थानचे' संपादक झाले. त्या पत्राचा त्यांनी लौकरच आमूलाग्र कायापालट केला व त्याचा खप वाढवला. राजेसाहेबांनी त्यांच्या या कर्तृत्वावर प्रसन्न होऊन त्यांचे वेतनही वाढवले. परंतु एक दिवस त्यांनी आपल्या वचनाचा भंग केला. एकदा त्यांनी मद्याच्या नशेत बेहोष असताना मदनमोहन यांना बोलवणे पाठवले व ते आल्यावर त्यांचा अपमान होईल, असे काही शब्द वापरले. तत्काळ त्या मानी व निःस्पृह पुरुषाने राजेसाहेबांना त्यांच्या वचनाची आठवण करून दिली व आपण वचनभंग केला असल्यामुळे इतःपर मी आपल्या नोकरीत राहणार नाही, असे बजावले. राजेसाहेबांनी आपला अपराध कबूल केला; परंतु मालवीयजींनी आपला निर्णय बदलला नाही. तिथून ते प्रयागला आले.

यानंतर त्यांनी वकील व्हायचे ठरवले व इ. स. १८९१ साली वकिलीची सनद संपादिली. इ. स. १८९३ पासून त्यांनी वकिलीला आरंभही केला. अल्पावधीतच एक श्रेष्ठ वकील म्हणून त्यांचा लौकिक झाला. इ. स. १८९३ ते १९०५ या बारा वर्षांत त्यांनी वकिलीवर अमाप पैसा मिळवला, पूर्वीची कर्जे फेडून टाकली व स्वतःसाठी एक वास्तूही उभारली.

इ. स. १९०५ सालापासून त्यांनी वकिली बंद केली व आपला संपूर्ण वेळ राजकारण व समाजसेवा यांत व्यतीत करायला सुरवात केली. वकिली चालू असल्याच्या काळापासूनच त्यांनी देवनागरी लिपीच्या प्रचाराचे काम स्वीकारले होते. आपल्या बिनतोड युक्तिवादांनी देवनागरीच्या विरोधकांना जिंकून घेऊन त्यांनी तिला सर्वत्र मान्यता मिळवून दिली. लौकरच दिल्ली, आग्रा, लखनौ, कानपूर, इ. ठिकाणचा किरकोळ सरकारी व्यवहारही देवनागरीतून सुरू झाला.

इ. स. १९०३ साली त्यांनी प्रयागला बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हिंदू वसतिगृह उभारले. या वसतिगृहासाठी त्यांनी अविश्रांत मेहनत घेतली, शेकडो व्याख्याने दिली व पन्नास सहस्र रुपयांचा निधी जमवला. त्या वेळच्या संयुक्तप्रांत-सरकारने या वसतिगृहासाठी एक लाख रुपये दिले. अशा प्रकारे लोकांच्या घरीदारी जाऊन व सरकारदरबारी खेटे घालून मदनमोहन मालवीयांनी हे एक महत्कार्य सिद्धीस नेले.

याच काळात ते प्रयाग नगरपालिकेत निवडून गेले व त्यांनी तिथेही लोकसेवेच्या अनेक योजना प्रत्यक्षात उतरविल्या. त्यांपैकी प्रमुख म्हणजे एका नव्या वसाहतीची मांडणी. प्रयागच्या वाढत्या वस्तीवर उपाययोजना म्हणून त्यांनी लूकरगंज मोहल्ला नावाची एक नवी पेठ वसवली. प्रयागला प्लेगची साथ आली, तेव्हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांनी सरकारी अधिकारी व समाजसेवक यांच्या सहकार्याने शहराला त्या साथीची झळ फारशी लागू दिली नाही. स्वतः घरोघरी हिंडून त्यांनी रुग्णांच्या औषधोपचाराची व स्वच्छतेची व्यवस्था केली आणि लोकांना धीर दिला. नगरपालिकेतील त्यांच्या कामगिरीवर खूष होऊन सरकारने त्यांना कायदे-कौन्सिलावरही नेमले.

यानंतर काही काळ त्यांनी लीडर नावाचे एक पत्र इंग्रजीतून चालविले. त्यासाठी लागणारा पैसा त्यांनी आपल्या पत्नीचे अलंकार विकून उभारला.

अशा प्रकारे लोकसेवेच्या अनेक योजना त्यांनी यशस्वीपणे प्रत्यक्षात उतरवल्या असल्या, तरी त्यांची सर्वप्रसिद्ध व सर्वोत्कृष्ट कामगिरी म्हणजे बनारस हिंदू विद्यापीठाची संस्थापना ही होय. हे विद्यापीठ प्रत्यक्ष उभे झाले इ. स. १९१६ साली. तथापि त्यापूर्वी अनेक वर्षे मदनमोहन मालवीय त्याच्या निर्मितीसाठी खपत होते. अहोरात्र त्यांना तो एकच ध्यास लागला होता. त्यासाठी ते समाजातल्या सर्व थरांतल्या लोकांच्या गाठी-भेटी घेत होते, आपल्या मृदुमधुर वाणीने त्यांना या सत्कार्याला साहाय्य करण्यासाठी विनवीत होते आणि कोणी नकार दिला किंवा अपमान केला, तरी त्याविषयी राग न मानता पुढचे घर गाठीत होते. प्रत्यक्ष विद्यापीठ स्थापनेच्या अगोदरचा एक महिना तर त्यांनी यमुनेच्या तीरावर भगवंताच्या उपासनेत व दीड कोटी गायत्रीमंत्राच्या पुरश्चरणात घालविला. विद्यापीठाच्या स्थापनेच्या दिवशी त्यांनी म. गांधींना प्रमुख पाहुणे म्हणून पाचारण केले.

बनारसचे हे हिंदू विद्यापीठ म्हणजे जगातली एक महत्त्वपूर्ण संस्था आहे. काशीपासून चार मैल अंतरावर हे विद्यापीठ वसले आहे. तिथे पंचवीस सहस्र वृक्षांची गर्द राई निर्माण करून तिच्यात विद्यापीठाची मुख्य इमारत उभी केली आहे. धर्मविभाग, प्राच्यविभाग, शास्त्रविभाग, स्थापत्यविभाग, इ. अनेक विभागांनी हे विद्यापीठ समृद्ध केलेले आहे. इथल्या ग्रंथालयात सुमारे एक लक्ष ग्रंथ आहेत. वसतिगृहांतून दोन-सव्वादोन सहस्र विद्यार्थ्यांच्या राहाण्याची सोय करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठी पोहोण्याचे तलाव, क्रीडांगणे, बागा, शेती, इ. अनेकविध सोयी इथे केलेल्या आहेत.

बनारस हिंदू विद्यापीठाची सर्वभावे सेवा करताना व त्याची शान वाढविताना मदनमोहन मालवीय राजकारणातही महत्त्वाचा भाग घेत होते. स्वराज्याच्या चळवळीत ते आपल्या परीने काम करीत होते. राष्ट्रीय सभेच्या लाहोर (१९०९) व दिल्ली (१९१८) येथील अधिवेशनांचे व अखिल भारतीय हिंदू महासभेच्या काशी (१९२३), बेळगाव (१९२४) व पुणे (१९३५) येथील अधिवेशनांचे ते अध्यक्ष होते. हिंदी साहित्य संमेलनाच्या प्रयाग (१९१०) व मुंबई (१९१८) येथील अधिवेशनांचीही अध्यक्षपदे त्यांनी भूषविली होती.

अस्पृश्यतानिवारणासाठी त्यांनी एक अभिनव प्रयोग केला होता. इ. स. १९२७ साली काशी येथे, १९२८ साली कलकत्ता येथे, १९३६ साली नाशिक व काशी या दोन्ही ठिकाणी त्यांनी सहस्रावधी अस्पृश्यांना मंत्रदीक्षा देऊन उच्चवर्णीय हिंदूंच्या पंक्तीला आणून बसविले होते. अग्नी किंवा सूर्य यांच्या साक्षीने दीक्षा घेणाऱ्याने तीर्थस्नान करायचे, पंचगव्य घ्यायचे आणि मुखाने ॐ नमः शिवाय, ॐ नमो नारायणाय व ॐ नमो भगवते वासुदेवाय, या तीनपैकी एक मंत्र म्हणायचा, की तो पावन झाला, असा हा दीक्षाविधी होता. पूर्वास्पृश्यांना ही दीक्षा म्हणजे आपला मोठा बहुमान झाला, असे वाटायचे.

इ.स.१९३८ साली मदनमोहन मालवीय यांनी कायाकल्पाचा प्रयोग केला. त्यामुळे त्यांना पुनश्च उत्साह आला. अनेक नवनवी कामे शिरावर घेऊन त्यांनी ती पार पाडली.

तथापि शेवटी शरीर थकलेच. पंचाऐंशी वर्षांचे वय झालेले पं. मदनमोहन मालवीय एके दिवशी शांतपणे मृत्यूच्या स्वाधीन झाले. [पंडित मालवीय – श्री. शां. कृ. क्षीरसागर, १९६२; भारतभूषण पं. मालवीय – श्री. रा. गो. भिडे, १९४९]

माला

(१) कोणत्याही देवतेच्या उपासकाला ज्या गोष्टी करणे आवश्यक असते, त्यांत जप ही एक गोष्ट आहे. जप करताना जपसंख्या मोजण्यासाठी माला वापरतात. माळेतल्या मण्यांची संख्या विविध संप्रदायांमध्ये व विविध कामनांच्या सिद्धीसाठी वेगवेगळी सांगितलेली आहे. सूत्रात मणी ओवून



मोत्यांची माळ

झाल्यावर त्याची दोन्ही टोके एकत्र करून त्यांमध्ये जो एक मोठा मणी ओवतात, त्याला मेरुमणी म्हणतात. माळेच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मेरुमणी असावाच लागतो, अशी श्रद्धा आहे. (जपमाळ पाहा)

गळयात घालायच्या अलंकारांतही माला हा एक अलंकार असतो. ही माला मुख्यत्वे सुवर्णाच्या मण्यांची, सुवर्ण नाण्यांची, मोत्यांची किंवा रत्नांची असते. विवाहविधीत वधूवर एकमेकांच्या गळयांत पुष्पमाला घालून पतिपत्नी या नात्याने एकमेकांचा स्वीकार केल्याचे सूचित करतात. पूजेमध्ये देवाच्या गळयातही फुलांच्या माळा घालतात. एखाद्या व्यक्तीचा सत्कार करायचा असेल, तर तोही त्याच्या गळयात पुष्पमाला किंवा पुष्पहार घालून करतात. अशा प्रकारे फुलांच्या माळेला अनेक सांस्कृतिक गोष्टींत फार महत्त्व आलेले आहे.

(२) एक वेदविकृती. एका ऋचेचा अर्धा भाग घेऊन तिच्यातली पदे आदीकडून अंताकडे व अंताकडून आदीकडे क्रम व क्रमविपर्यास या पद्धतीने म्हणणे याला क्रममाला असे म्हणतात. उदा० —

ओषधयः संवदन्ते सोमेन सह राज्ञा । या अर्धर्चेचा क्रममालापाठ पुढीलप्रमाणे —

आदीकडून अंताकडे	अंताकडून आदीकडे
ओषधयः सं	राज्ञेति राज्ञा
सं वदन्ते	राज्ञा सह
वदन्ते सोमेन	सह सोमेन
सोमेन सह	सोमेन वदन्ते
सह राज्ञा	वदन्ते सं
राज्ञेति राज्ञा	समोषधयः

ऋचेतील पदे क्रम, व्युत्क्रम व संक्रम या पद्धतीने म्हणणे, याला पुष्पमाला म्हणतात. [ऋ. सं.— पं. सातवळेकर, १९५७]

माला कोंडा स्वामी द. भारतातील एक लोकदेव. आंध्र प्रदेशातल्या नेल्लोर जिल्ह्यातील एका टेकडीवर याचे देऊळ आहे. या स्थानाच्या निर्मितीसंबंधी एक लोककथा प्रचलित आहे, ती अशी—

ब्राह्मणाचा एक मुलगा होता. तो आपली गुरे या डोंगरावर चरायला नेत असे. एक दिवस तो संवगड्यांसमवेत इथे खेळत असता, त्याने एक दगड पायाने दूर केला. घरी परतल्यावर रात्री त्याला खूप ताप भरला. मध्यरात्री एक देव स्वप्नात येऊन त्याला म्हणाला. ‘ माझे नाव माला कोंडा स्वामी. तू मला लाथ मारून माझा अपमान केला आहेस. म्हणून मी तुझ्या घरादारावर आपत्ती आणणार आहे. जर तुला सुरक्षित राहायचे असेल, तर त्या डोंगरावर माझे देऊळ बांध. ’

मुलाने हे स्वप्न सकाळी घरातल्या व गावातल्या लोकांना सांगितले. मग सर्वांनी मिळून त्या देवाचे देऊळ बांधले. मुलाने ज्या दगडाला लाथ मारली होती, त्याच दगडाची मूर्ती करून देवळात स्थापण्यात आली. [द्र. गॉ. मॉ. हिं.]

मालाधर बसू (इ. स. चे १५ वे शतक) बंगालमधील एक भक्तकवी. हा वर्धमान जिल्ह्यातील कुलीन गावचा रहिवासी असून, जातीने कायस्थ होता. याला सुलतान हुसेन शाह याने गुणराज खाँ अशी पदवी दिली होती. मालाधरने भागवताच्या दहाव्या आणि अकराव्या स्कंधांचा अनुवाद केला आहे. हा ग्रंथ कृष्णविजय या नावाने सर्वपरिचित आहे. याला गोविंदविजय असेही म्हणतात.

मूळ भागवतात राधेचा आढळ होत नाही. पण प्रस्तुत कवीने गीतगोविंदाचा आदर्श डोळयापुढे ठेवून आपल्या अनुवादात राधेला स्थान दिले आहे.

कृष्णविजय हे एक सुललित काव्य आहे. त्यात कवीच्या भक्तहृदयाचा साक्षात्कार पदोपदी दिसतो. महाप्रभू चैतन्याने देखील या काव्याची प्रशंसा केली आहे. [बं. सा. सं. इ.; बं. उ. सा.; बं. सा. क.; हि. बें. लँ. लि.]

मालापनिक्कर केरळ प्रदेशातील एक जात. या लोकांची वस्ती कालिकत जिल्ह्यात आणि बडवुरम, मंबड, अमसोम, रामचनपोट्टी, वंबडअमसोय, इं. ठिकाणी आढळते. आम्ही नायरांचे वंशज आहो, असे हे सांगतात.

या जातीतील मुली वयात आल्यावर त्यांची लग्ने करतात. विवाहात ताळी बांधण्याचा मुख्य विधी असतो.

हे लोक वृक्ष व प्राणी यांची पूजा करतात.

यांच्यांत बारा वर्षांवरील मृताचे दहन करतात; परंतु आर्थिक संपन्नता नसेल तर मृताला पुरतात. त्यापूर्वी प्रेताला स्नान घालून नवे वस्त्र गुंडाळतात. हे लोक मृताशौच पंधरा दिवस पाळतात. शेवटच्या दिवशी मेजवानी असते. [ट्रा. के.]

मालिनी शाक्तांची एक प्रमुख देवता. तंत्रसारात हिचे वर्णन पुढीलप्रमाणे आढळते—

मालिनी हि भगवती मुख्यं शाक्तरूपं बीजयोनिसंघट्टेन समस्तकामदुघम् ।

अर्थ — भगवती मालिनी ही शक्तीचे मुख्य रूप होय. बीजयोनीसंघट्टाने (ती) सकल इच्छा पूर्ण करते.

तंत्रसारातील हे वर्णन आणि अभिनवगुप्ताच्या तंत्रालोकातील मालिनीचे वर्णन सारखेच आहे. सर्व सिद्धी देणारे आणि सर्व न्यून पूर्ण करणारे बीजयोनीसंघट्ट हे मालिनीचे स्वरूप आहे. [नवभारत, ऑक्टोबर १९५९, जून, १९६०]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मालेर एक वन्य जमात. यांची वस्ती मुख्यतः बंगालमधील राजमहल टेकड्यांच्या परिसरात आहे. त्या भागाला दमन-इ- कोह असे म्हणतात.

मालेरांमध्ये अनेक कुळे व गोत्रे आहेत. पण त्यांचा आपापसांत रोटीबेटी- व्यवहार होत नाही. मालेर पहाडिया लोक आपल्याला 'असल पहाडिया' म्हणवून घेतात.

हे लोक काळे, खुजे पण सशक्त असतात. यांचा चेहरा उभट गोल असतो. नाकपुड्या वाटोळ्या, ओठ जाड आणि हनुवटी व जिवणी प्रमाणबद्ध असते. डोळे मोठे व लांबट असतात. यांच्या स्त्रिया अंगाबांध्याने सुदृढ असतात. पुरुष चपळ असून, ते ताठपणे चालतात.

यांच्यांतील स्त्री-पुरुषांचा पोषाख स्वच्छ असतो. हे लोक केसांची निगा चांगली राखतात. स्त्रिया केस पाठीमागे बांधतात, पण दोन मोठ्या बटा कानावर सोडतात. त्या घागरा आणि त्यावर साडी नेसतात; गळ्यात पोवळ्यांच्या विपुल माळा घालतात. पुरुषांना लाल रंगाचे पागोटे फार आवडते.

पहाडियांची घरे टेकड्यांवर असून, ती काळजीपूर्वक बांधलेली असतात. झोपडीच्या मागील बाजूला प्रसंगी बाहेर पडण्यासाठी एक चोरदार ठेवलेले असते. त्यांच्या घराचे प्रवेशद्वारही फार लहान असते. खाली बसून घरात प्रवेश करावा लागतो. घराभोवती मोठे अंगण असते. अंगणात भाजीपाला, मोहरी, तंबाखू इ. पिके हे घेतात. जनावरांसाठी निराळ्या झोपड्या बांधतात. भुतांचा उपसर्ग होऊ नये म्हणून घराच्या अंगणात एक मोठा बांबू पुरून ठेवतात.

व्यवसाय– शिकार, दरोडेखोरी, लूटमार हे यांचे पूर्वीचे व्यवसाय होते. पण आता शिकार करणे हाच यांचा प्रमुख व्यवसाय बनला आहे. ओत्ग हा यांचा शिकारीचा देव आहे. शिकारीतला काही भाग ते या देवाला आणि ग्रामपुरोहिताला देतात. शिकार केलेल्या प्राण्याचे काही अवयव स्त्रियांनी खाता कामा नये, असा निर्बंध आहे. हा नियम मोडणाऱ्या स्त्रीला बारा रुपयांपर्यंत दंड करतात. त्याचप्रमाणे शिकारी कुत्र्याला कोणी मारू नये, असाही यांचा एक नियम आहे. मांजराची हत्या केली, तर शिकाऱ्याला गुन्हेगार समजतात. या गुन्हेगाराला त्याचे प्रायश्चित्त म्हणून गावातील लहान मुलांना मीठ वाटावे लागते. याशिवाय शिकारीसंबंधी आणखीही काही नियम यांच्यांत रूढ आहेत.

विवाहप्रथा– मालेरांमध्ये प्रेमविवाह पुष्कळ होतात. या प्रेमिकांनी विवाहापूर्वी नैतिक मर्यादांचे उल्लंघन केल्यास त्यांना पंचायतीकडून दंड होतो किंवा जातिबहिष्कृतही करण्यात येते. बहिष्कृत झालेल्यांना पुन्हा समाजात यायचे असेल तर, त्यांनी काही जनावरांचा बळी द्यावा लागतो. बळी दिलेल्या जनावरां- रक्त त्यांच्यावर शिपडले म्हणजे ते शुद्ध होतात.

प्रत्यक्ष लग्नाचा विधी अत्यंत साधा असतो. मुलीचा मुलीचा हात वराच्या हाती देऊन 'हिचा प्रेमाने सांभाळ कर' अशी वराला विनंती करतो. मग नवरा मुलगा आपल्या उजव्या हाताच्या करांगुलीने वधूला कुंकू लावतो. नंतर तेच बोट नवरी मुलगी वराच्या घरी येते.

मालेरांमध्ये बहुपत्निकत्वाची चाल आहे. एखादा माणूस मरण पावला तर, त्याच्या स्त्रिया त्याच्या सख्ख्या किंवा चुलत बंधूंच्या स्त्रिया होतात. मात्र प्रत्येकाला एकेकच स्त्री मिळते.

मालेरांमध्ये पूर्वी नइया नावाचे पुरोहित होते. हे लोक आपले काम करीत नाहीत. देमानो लोकांना आता पौरोहित्य करावे लागते.

देवधर्म – मालेर पहाडियांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. हे पाप-पुण्य मानतात. यांचे नैतिक आचरण याच श्रद्धेवर अधिष्ठित असते. बेडो हा यांचा हा प्रमुख देव असून, ते याला सूर्यरूप मानतात. राक्षी, पोवगोसाई, द्वारगोसाई, कुलगोसाई त्यांच्या देवतांची नावे आहेत. या प्रत्येक देवाचे सण असतात. देवांच्यामूर्ती लाकडाच्या असतात. दरवर्षी झाला, की जुन्या देवतामूर्ती विसर्जित करून हे नवीन मूर्ती बनवितात. हे लोक देवाला कौल लावतात. त्यांचे व चेरिन असे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारात पानावर रक्त शिपडण्यात येते आणि दुसऱ्या प्रकारात काच्या गतीवरून भाकित करतात.

मालेरांना नृत्याची आवड फार असते. पण हे नृत्य करीत नाहीत. नृत्याच्या वेळी हे लोक धान्यापासून विलेली दारू पितात. यांची नृत्ये मिश्र असतात. प्रत्येक एक नृत्यांगण असते.

यांच्यांतील अविवाहित तरुण-तरुणी सामुदायिक मध्ये झोपतात. मुलांसाठी व मुलींसाठी निरनिराळी असतात.

मृतकप्रथा – यांच्यांत मृतांना पुरतात. पण देमानो हिताचे प्रेत एका खाटेवर ठेवून गावाबाहेरील झाडाखाली तात आणि त्यावर झाडाच्या डहाळ्या टाकतात. या ते असे सांगतात की, देमानोची भुते फार धोकेबाज त्यांना स्मशानात पुरले तर गावातल्या लोकांना ही भुते त्रास देतात. जी माणसे सांसर्गिक रोगाने आणि मेलेली असतात, त्यांचीही प्रेते न पुरता झाडाखाली टाकून देतात.

नैसर्गिक मृत्यूने मेलेल्या माणसाचे प्रेत खाटेवर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्मशानात नेतात आणि खाटेसह पुरतात. नंतर त्या जागेवर एक दगड ठेवतात. मेलेला माणूस टोळीचा नायक असेल तर, त्या जागेवर एक खोपटे बांधतात आणि त्याच्या भोवती एक कुंपण घालतात. अंत्यविधीनंतर सतत पाच दिवस त्याच्या मांडलिकांना आणि नोकरांना जेवणावळी द्याव्या लागतात. एका वर्षाच्या अखेरीस आणखी एक भोजन द्यावे लागते. [ई. टी. डाल्टन–इं. स्ट. पा., प्रे. एप्रिल १९६०]

माल्यवान दक्षिणेतला एक पर्वत. एक सुंदर पर्वत असे याचे वर्णन रामायणात आढळते (५. ३५. ८०) या पर्वतावरूनच हनुमंताचा पिता केसरी हा गोकर्ण पर्वतावर जात असे. रावणाला मारून परत येत असताना रामचंद्राने हा पर्वत सीतेला दाखविला होता, असा याचा उल्लेख रघुवंशात (१३.२६) आहे.

हा पर्वत दक्षिणेत असला तरी, त्याचे नेमके स्थान सांगता येत नाही. पुराणांन्वये या पर्वताची रांग मेरूच्या पूर्वेला, नीलाच्या दक्षिणेला, निषाधाच्या उत्तरेला आणि इलावृतवर्षाच्या पश्चिमेला आहे. ही केतुमालाची सरहद्द असून, ती एक हजार योजने लांब पसरलेली आहे. चाक्षुष हा जलप्रवाह याच्या शिखरांवरून खाली आला आहे. याच्या शिखरावर कलिंगामधील अमरकंटक हे स्थान आहे, असा ब्रह्म पुराणात उल्लेख (२.१९.३८; १७.१८) आहे.

पण श्री नंदलाल दे यांनी माल्यवान पर्वत म्हणजे तुंगभद्रेच्या तटावरील आनेगुंदीचा पर्वत मानला आहे, ते योग्य वाटते. त्यांनी त्याला स्फटिक-शिला हे नाव दिले आहे.

या पर्वतावर रामलक्ष्मण राहिले होते. तिथं श्री रामचंद्राचे मंदिर असून, त्यात पद्मासनस्थ राममूर्ती आहे. त्या मूर्ती जवळच लक्ष्मण व हनुमंत यांच्याही मूर्ती आहेत. [वा. रा. को.; का. मा.; पु. इं.; हि. ध.; स. भा. प्र. व.]

मावची गुजरातमधील एक वन्य जमात. खानदेशातील डांग आणि सोनगड या भागातही या लोकांची वस्ती आढळते. बायको मिळविण्यासाठी यांना भावी सासऱ्याच्या घरी चाकरी करावी लागते. या चाकरीच्या मुदतीत विवाहसंस्कार झाला नसला, तरी विवाहेच्छू वर व ती मुलगी पतिपत्नींच्या नात्याने वागू शकतात. हे लोक मांसभक्षक असून, यांना गोमांसही चालते. यांचा भुताखेतांवर फार विश्वास असतो. अस्तंबा, गौळीमाता, वाघदेव, इ. देवतांना हे भजतात. यांच्यांत मृतांना पुरतात. मृताला पुरताना त्याचे आवडीचे पदार्थही त्याच्याबरोबर पुरतात. [रज:कण]

मावजी राजस्थानमधील देवपदाला पोचलेला एक संत. बागड भागात याचे बरेच अनुयायी असून, ते याला विष्णूचा कलंकी अवतार मानतात. दक्षिण राजस्थानमधील डुंगरपूरजवळ असलेल्या साबळे या गावी मावजीचे मंदिर आहे. त्या मंदिरात याची चतुर्भुज मूर्ती असून, हातांमध्ये शंख, चक्र, गदा व पद्म ही आयुधे आहेत. मूर्ती अश्वारूढ आहे. मावजीची काही पदेही उपलब्ध असून, ती त्याच्या अनुयायांच्या नित्य पाठात असतात. या पदांची भाषा हिंदी व बागडी अशी मिश्र आहे. [मरु-भारती, जानेवारी १९५८]

माविलन द. भारतातील एक जात. या लोकांची वस्ती केरळ प्रदेशातील कन्ननोर जिल्ह्यात आणि वयकर, पडयूर, थाडिकडनू या भागात आढळते. हे शरीराने बळकट व कुरळ्या केसांचे आहेत. हे तुळू व तमिळ अशी मिश्र भाषा बोलतात.

यांच्या पूर्वपरंपरेसंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. तुलुमन व चिंगट्टन असे यांचे दोन पोटभेद आहेत. पूर्वी हे कंदमुळे व फळे शोधीत व शिकार करीत भटकत असत; पण आता एका जागी राहून टोपल्या विणण्याचे व मजुरीचे काम करतात. शिकार आणि मध गोळा करणे हेही यांचे व्यवसाय आहेत. यांच्यापैकी काहीजण माहुताचे काम करतात.

विवाहप्रथा — यांची लग्ने वडीलधारी मंडळी ठरवितात. विवाहसमारंभ वधूगृही होतो. हुंडा आणि देज या दोन्ही पद्धती यांच्यांत रूढ आहेत.

यांच्यांत जातपंचायत आहे. पंचायतीच्या प्रमुखाला चिंगन असे म्हणतात. जातीतील सर्व लोक याच्या आज्ञा पाळतात.

हे निसर्गपूजक आहेत. यांच्यांत पितृसत्ताक कुटुंबपद्धती व वारसापद्धती प्रचलित आहे.

मृतकप्रथा — हे लोक मृताला दक्षिणेकडे डोके करून पुरतात. सुतक किती दिवस पाळावे, यासंबंधी निश्चित नियम नाहीत. पण सुतकाची साधारण मर्यादा सात ते पंधरा दिवसांची असते. [ट्रा. के.; का. ट्रा. स. इं.]

मास वर्षाचा १२ वा भाग. मास हा सामान्यपणे ३० दिवस व ३० रात्री इतका असतो. त्याच्या पूर्वार्धाला शुक्ल किंवा शुद्ध पक्ष आणि उत्तरार्धाला कृष्ण किंवा वद्य पक्ष म्हणतात. शुक्ल पक्षाच्या शेवटी पौर्णिमा व कृष्णपक्षाच्या शेवटी अमावास्या येते. हे दोन दिवस महत्त्वाचे समजले जातात. प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेनंतर ८ वा दिवस एकाष्टका या नावाने महत्त्वाचा मानीत. वैदिककाळी माघपौर्णिमेनंतरचा आठवा दिवस विशेष महत्त्वाचा समजला जाई. त्या दिवशी अष्टका

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नावाचा विधी करीत. या दिवशी जुने वर्ष संपून नवे वर्ष सुरू होत असे.

अमान्त व पूर्णिमान्त अशी दोन प्रकारची मासगणना चालू होती व आजही आहे. दक्षिण भारतात अमान्त मास व उत्तर भारतात पूर्णिमान्त मास रूढ आहे.

चैत्र, वैशाख, इ. नक्षत्रांवरून पडलेली मासनामे सांप्रत रूढ असून, ती ब्राह्मणकाळी सुरू झाली. त्यापूर्वीची मासनावे अशी– (१) मधु, (२) माधव, (३) शुक्र, (४) शुची. (५) नभ, (६) नेभस्य, (७) इष, (८) ऊर्ज, (९) सह, (१०) सहस्य, (११) तप आणि (१२) तपस्य.

वैदिक वाङमयात चांद्र मास व ३६० दिवसांचे वर्ष यांचा वास्तवाशी मेळ घालण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यासाठी वैदिकांनी ३०, ३५, ३६ असे दिवस जास्ती धरून पाहिले होते (ऋ. १.२५.८; ऐ. ब्रा. १.१२; श. ब्रा. ४.३.१.५). सौर व चांद्र या मासांचा मेळ घालण्यासाठी एक महिना अधिक मास म्हणून घेतला पाहिजे, हे वैदिकांना त्या काळी कळून चुकले होते (तै. सं. ५.६.७.१; काठक सं. २१.५). या अधिक मासाला वाजसनेय संहितेत (७.३०) अंहसस्पती, तै. संहितेत (१.४.१४.१) संसर्प व अथर्ववेदात (५.६.४) सनिस्रस अशी नावे दिली आहेत.

वर्षातली पूजा, व्रते, दाने, स्नाने, इ. धर्मकृत्ये आणि सणवार या गोष्टी मासांना धरूनच सांगितलेल्या आहेत.

विविध धर्मपंथातली मासनामे अशी –

जैन मास – (चैत्रादी क्रमाने) वसंत, कुसुमसंभव, निदाघ, दानविरोधी, अभिनंद, सुप्रतिष्ठा, विजया, प्रतिवर्धन, श्रीयान, शिव, शिशिर व हैमवान.

पारशी महिने – फरवर्दी, आर्दिबेहस्त, खुर्दाद, तीर, अमरदाद, शेहरेवार, मेहेर, आबान, आजूर, दय, बहमन, इस्पिंदर.

मुसलमानी महिने – मोहरम, सफ्फर, रबी-उल्-अव्वल, रबी-उल्-आखिर, जुमादी-उल्-अव्वल, जुमादी-उल्-आखर, रजब, शाबान, रमजान, शव्वाल, जीकाद, व जिल्-हिज्ज.

खिस्ती महिने – जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे, जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर.

मासभेद–

सूर्योदयापासून दुसऱ्या दिवशीच्या सूर्योदयापर्यंतचा दिवस तो सावन दिवस होय. अशा तीस दिवसांचा जो महिना त्याला सावन मास म्हणतात. सूर्याने एका राशीत प्रवेश केल्या दिवसापासून पुढील राशीत प्रवेश करीपर्यंतचा जो महिना त्याला सौरमास म्हणतात. शुक्लप्रतिपदेपासून अमावास्येअखेर जो महिना होतो, त्याला चांद्रमास म्हणतात व अश्विनी नक्षत्रात चंद्राने प्रवेश केल्यानंतर सत्तावीस नक्षत्रे भोगून पुन्हा अश्विनीत प्रवेश करीपर्यंतचा जो महिना, त्याला नाक्षत्रमास म्हणतात. [वे. इं.; पुरुषार्थचिन्तामणी; सं. मि.; पं. ज्यो. शा.]

मासनूर

पंढरपूर क्षेत्राचे दक्षिणद्वार म्हणून हे स्थान प्रसिद्ध आहे. भीमा आणि पुष्पावती या नद्यांच्या संगमावर हे आहे. इथे सिद्धेश्वर नावाचे शिवलिंग आहे. यात्रेकरू प्रथम संगमात स्नान करून नंतर सिद्धेश्वराचे दर्शन घेतात. पंढरपूरच्या यात्रेला आलेले यात्रेकरू आवर्जून या क्षेत्राला जातात. [पं. प्र.]

मासर्क्षपौर्णमासी व्रत

एक काम्य व्रत. कार्तिक पौर्णिमेला याचा प्रारंभ करतात. व्रतविधी असा : कार्तिक महिन्यात चंद्र कृत्तिका व रोहिणी नक्षत्रांत असताना मिठाने एक वर्तुळ काढावे. त्याला चंदन लावावे. मग त्याची पूजा करावी. याचप्रमाणे मार्गशीर्षात मृगशीर्ष आणि आर्द्रा नक्षत्रात चंद्र असतानाही त्याची पूजा करावी. अशाप्रकारे आश्विन मासाच्या पौर्णिमेपर्यंत ही पूजा करावी. व्रताच्या दिवशी हविष्यान्नाचे नक्तभोजन करावे, सौभाग्यवती स्त्रियांना मिष्टान्न भोजन, तूप, दूध, इ. पदार्थ देऊन त्यांचा सन्मान करावा. उद्यापनाच्या वेळी एक जरीचे वस्त्र दान द्यावे. [हि. ध.]

मासव्रत

एक काम्य व्रत. मार्गशीर्षापासून या व्रताला प्रारंभ करून कार्तिक मासअखेर बारा महिने हे व्रत करतात. या व्रतात प्रत्येक महिन्यात अनुक्रमे पुढील पदार्थ दान द्यायचे असतात – मीठ, तूप, तीळ, सहा धान्ये, रंगीत किंवा सुंदर वस्त्रे, गहू, जलपूर्ण पात्र, कापूरमिश्रित चंदन, लोणी, छत्र, साखरेचे वा गुळाचे लाडू व दिवे. उद्यापनाच्या वेळी गाय दान द्यावी आणि दुर्गा, ब्रह्मदेव, सूर्य किंवा विष्णू यांची पूजा करावी असे सांगितले आहे. [हि. ध.]

मासशिवरात्रिव्रत

एक तिथिव्रत. प्रत्येक महिन्याच्या वद्य चतुर्दशीला हे व्रत करतात. व्रतावधी बारा वर्षे. व्रतदेवता शिव. या व्रताचा प्रारंभ आश्विन, मार्गशीर्ष किंवा माघ महिन्याच्या वद्य चतुर्दशीला करावा, असे सांगितले आहे. शिवलिंगाची पूजा, उपवास व जागर हे या व्रताचे प्रमुख विधी होत. शिवपूजा करताना शिवाभोवती दिव्यांची रोषणाई करतात.

उद्यापनाच्या वेळी शिवरात्रीच्या आदल्या रात्री आचार्यांच्या घरी जाऊन 'आगच्छ मे गृहं तात कृतकृत्यं गृहं कुरु' या मंत्राने त्यांना निमंत्रण देतात. त्याचप्रमाणे शिवज्ञानी व तपोधन ब्राह्मणांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इतर अकरा ब्राह्मणांनाही बोलावतात. दुसऱ्या दिवशी सकाळी चल व अचल अशा दोन शिवलिंगांना तुपाचे अभ्यंगस्नान, सुगन्धिद्रव्यलेपन, पंचामृतस्नान आणि नंतर एक सहस्र, शंभर, पन्नास, अथवा पंचवीस घागरी शीतोदकाने अभिषेक करतात. मग पूजा करतात. हे शक्य नसेल, तर रुद्रमंत्राने तिलाहुती देऊन हवन करतात व दक्षिणा देतात. इतर ब्राह्मणांना कुंभदान करतात. नंतर क्षमायाचना करून आशीर्वाद घेतल्यावर व्रतसमाप्ती करतात. फल– मोक्षप्राप्ती. [व्रतराज]

मासा (१) एक जलचर प्राणी. मासा हा समृद्धी आणि सुदैव यांचे प्रतीक मानलेला आहे.

मोहेंजोदडो येथील संस्कृतीत मासा हा शिवाचे प्रतीक मानून त्याची पूजा करीत असत. तिथल्या लोकांनी आपल्या राशिचक्रात मीन म्हणजे मत्स्य याचा अंतर्भाव केला होता. मत्स्य हा शिवाचा डोळा आहे, असेही ते लोक समजत. नंतरच्या काळातील स्कंद पुराणात शिवाला मीन किंवा मीनांचा अधिपती असे म्हटले आहे. काम जिवंत झाल्यावर त्याने आसामातील मणिकूट पर्वतावर शिवाची मत्स्यरूपात स्थापना केली, असे कालिका पुराणात सांगितले आहे. प्रभास येथील ऋषितीर्थात तीन नेत्र असलेले मासे आढळत, असा उल्लेख स्कंद पुराणात आहे. प्राचीन काळी भारतातील अनेक राजघराण्यांचे व वंशांचे मत्स्य हे राजचिन्ह होते. नंतरच्या काळातील विलव, एटकली, कावल, किलकिल आणि परव यांनीही त्याचा राजचिन्ह म्हणून स्वीकार केला. मदुरेच्या पांड्य राजांनी मत्स्यद्वय हे आपले राजचिन्ह मानले होते. त्यामुळेच त्यांना मीनवर कोन असे नाव मिळाले होते. त्यांचा राजवाडाही मत्स्याकृती बांधलेला होता. ओढ्रदेशीच्या मत्स्य राजवंशाचेही हेच चिन्ह होते.

मासा हा जननशक्तीचे प्रतीक मानलेला आहे. कामदेवाच्या ध्वजावर मासाच अंकित असतो. द. भारतातील होलेय जातीचे लोक नवदांपत्याला नदीवर घेऊन जातात आणि वधूने विणलेली चटई पाण्यात सोडून काही मासे पकडतात. नवदांपत्य त्या माशांचा मुका घेते व त्यांना सोडून देते. काही वेळा त्यांतील एखादा मासा घरी नेतात आणि त्याच्या खवल्यांनी नवदांपत्याचे कपाळ शृंगारतात.

विष्णूचा अवतार म्हणून माशाची अनेक वेळा पूजा करतात. पद्मा नदीच्या तीरावरील हिंदू स्त्रिया माघ शु. पंचमीला इलिशू माशाची पूजा करतात आणि नंतर तो भक्षण करतात. तसेच धार्मिक प्रवृत्तीचे लोक तीर्थक्षेत्रात गेल्यावर पिठाचे लहान लहान गोळे करून व ते भूर्जपत्रात किंवा कागदात गुंडाळून माशांना खाण्यासाठी नदीत टाकतात. त्या भूर्जपत्रावर किंवा कागदावर रामनाम लिहिलेले असते. ते रामनाम माशांनी गिळले की, यात्रेकरूंना मोक्ष मिळतो, अशी समजूत आहे.

मासा हा भाग्याचे प्रतीक मानलेला आहे. भूतपिशाचांची बाधा होऊ नये, म्हणून घराच्या भिंतींवर माशाचे चित्र रेखाटतात. शृंगेरी येथील माशांना संतुष्ट केले असता, त्वचारोग बरे होतात, अशी तिथल्या लोकांची समजूत आहे.

मृताचा आत्मा माशाच्या शरीरात प्रवेश करतो, अशीही काही लोकांची समजूत आहे. गोंड लोक माणूस मेल्यावर आठव्या दिवशी नदीकिनारी जातात आणि मृताच्या नावाने पुकारा करतात. मग एक मासा पकडतात आणि मृताचा आत्मा सापडला, म्हणून त्याला घरी आणतात. पंच द्राविड ब्राह्मण आणि जैन वगळून बहुतेक सर्व जाती-जमाती मासे खातात. [रि. इं.]

(२) मुलींचा एक खेळ. दोन किंवा अधिक मुली समोरासमोर तोंड करून एकमेकींपासून आठदहा हातांच्या अंतरावर बसतात. उजवे पाऊल डाव्या मांडीवर ठेवून त्या मांडी घालून बसतात. नंतर त्या उजव्या बाजूला पालथ्या निजतात. त्या वेळी त्यांचा आकार माशाप्रमाणे दिसतो. मग त्या तशाच अवस्थेत तोंडाने पकवा घालीत, सरकत सरकत समोरच्या मुलीच्या जागी जातात आणि पुन्हा परत आपल्या जागी येतात. याप्रमाणे हा खेळ चालू राहतो. त्या वेळी पुढील गाणे म्हणतात–

किकीचे पान बाई की की। सागर मासा सूं सूं।। १ ।।
पतंग फुगडी लालुंगा लालुंगा। त्रिंबक थय्या खेळुंगा खेळुंगा ।।
सुसरी मासा सूं सूं सूं सू। सांगड मासा सूं सूं सूं सू ।।
लसणीची कांडी काही सोलेना सोलेना।
सवत माझी बोलेना बोलेना ।।
लसणीची कांडी सोलली सोलली।
सवत माझी बोलली बोलली ।।

हा खेळ महाराष्ट्रात प्रचलित आहे. [व्या. ज्ञा. को.]

मासिक श्राद्ध (१) एक संस्कार. पाकयज्ञसंस्थांमध्ये हा संस्कार अंतर्भूत आहे. हा श्राद्धविधी बराचसा दर्शश्राद्धाप्रमाणे असून तो औपासनाग्नीवर करायचा असतो. अष्टका म्हणून जो संस्कार सांगितला आहे, त्याच्या प्रकृतिभूत हे मासिक श्राद्ध आहे, असे गृह्यसूत्रकारांनी मानलेले दिसते.

मासिश्राद्ध असेही एक श्राद्ध असून, त्याला दर्शश्राद्ध असेही म्हणतात. मासिश्राद्ध हे सांवत्सरिक श्राद्ध, महालय श्राद्ध अथवा नैमित्तिक श्राद्धे यांची प्रकृती आहे.

मासिक श्राद्धात माता, पिता, मातामह व मातामही अशी चारही पार्वणे घ्यायची असतात. पुरूरव आणि आर्द्रव संज्ञक देवांच्यासाठी व पितरांतल्या प्रत्येक व्यक्तीसाठी एकेक अथवा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रत्येक पार्वणासाठी एकेक असे ब्राह्मण बोलावतात. त्यांना क्षण दिल्यानंतर औपासनाग्नीजवळ बसवून अग्निमुख सुरू करतात. अन्वाधानामध्ये पितृमन्तसोम, अंगिरस्वंत यम, इ. सोळा देवतांचा निर्देश करतात. प्रत्येक ब्राह्मणाला एकेक याप्रमाणे अर्घ्यपात्रे मांडून प्रोक्षणीच्या विधीने त्यांमध्ये पाणी भरून ठेवतात. ब्राह्मणांना स्वस्थानी बसवून त्यांची पूजा करतात. पूजेसाठी देवांना यवोदक आणि पितरांना तिलोदक घेतात. मग अग्निमुखातील विधीप्रमाणे प्रधानहोमापर्यंतचे कर्म करतात. सिद्ध चरूने अन्वाधानोक्त देवतांसाठी आहुती देतात. पार्वणातील प्रत्येकासाठी आज्याच्या आहुती देतात. कव्यवाहन अग्नीसाठी स्विष्टकृताची आहुती देऊन प्रणीताविमोकापर्यंतचे कर्म करतात. घरात तयार केलेल्या अन्नाने ब्राह्मणांना भोजन घालतात. ते जेवीत असता अभिश्रवण सूक्त म्हणतात. मग दर्शश्राद्धाप्रमाणे पिंडदान करतात. पिंडांची पूजा करावी, असाही एक पक्ष आहे. शेवटी पितरांचे तर्पण करतात.

दर्शश्राद्धाप्रमाणे मासिक श्राद्ध अमावास्येच्याच दिवशी केले पाहिजे, असे नाही. ते कृष्णपक्षात केव्हाही करता येते. तसेच ते प्रत्येक महिन्यात केलेच पाहिजे, असेही नाही. इतर पाकसंस्थांतील विधीप्रमाणे एकदाच संस्कार म्हणून ते करतात. काहींच्या मते मात्र ते प्रत्येक महिन्यात केले पाहिजे. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

(२) मृताला उद्देशून पहिल्या वर्षात वर्षश्राद्ध (द्वितीयाब्दिक) करण्यापूर्वी प्रत्येक मासाचे एक याप्रमाणे बारा मासांची बारा आणि ऊनमासिक, त्रैपक्षिक, ऊनषाण्मासिक व ऊनाब्दिक अशी चार मिळून सोळा श्राद्धे करायची असतात. यांना मासिक श्राद्धे म्हणतात. आद्य मासिक ११ व्या दिवशी व पुढची मासिके मासाच्या प्रथम दिवशी करतात. ऊनमासिक व ऊनषाण्मासिक ही एक दोन किंवा तीन दिवसांनी कमी किंवा तिसऱ्या भागाने कमी अशा काळी करतात. त्रैपक्षिक ४५ दिवसांनी व ऊनमासिक १२ व्या दिवशी करतात. ऊनषाण्मासिक व ऊनाब्दिक ही मृत्युतिथीच्या पूर्वदिवशी करतात. ही सगळी मासिक श्राद्धे निश्चित काळी करणे शक्य न झाल्यास ती ऊनाब्दिक श्राद्धाबरोबर करतात. जोवर मासिक श्राद्धे पुरी झाली नाहीत, तोवर घरात मंगल कार्य करू नये, असे सांगितले आहे. तसे करणे अपरिहार्य ठरल्यास त्या आधी सगळी मासिक श्राद्धे अपकर्षाने एकाच दिवशी करून तो प्रत्यवाय दूर करतात. याला मासिकनिवृत्ती असे म्हणतात. [घ. सिं.]

मासोपवासव्रत एक काम्य व्रत. हे व्रत यती, वानप्रस्थ किंवा विधवा स्त्री यांनी करायचे असते. गृहस्थाला मात्र त्याचा निषेध सांगितलेला आहे. व्रतविधी असा–

गुरूची आज्ञा घेऊन आश्विन शुद्ध एकादशीला उपवास सुरू करावा. एक महिना उपवास करावा. या कालात प्रत्येक दिवशी विष्णूची पंचोपचारांनी त्रिकाल पूजा करावी. देवालयातच राहावे. विष्णुसंन्निध झोपावे. दिवसभर विष्णुस्तुतिपर मंत्र म्हणावे. त्याचे ध्यान करावे. संयमाने राहावे. द्वादशीपासून पुढे तीस दिवस ब्राह्मणभोजन घालावे. उद्यापनाच्या वेळी विष्णूची पूजा करून तेरा ब्राह्मणांची यथाशक्ति संभावना करावी. नंतर विष्णूची सुवर्णमूर्ती करून ती पलंगावर ठेवावी. तो पलंग त्या मूर्तीसह दान द्यावा.

नारदपुराणान्वये हे व्रत आषाढ, श्रावण किंवा भाद्रपद यांपैकी कोणत्याही एका महिन्यात केले तरी चालते. या पुराणात या व्रताचा कालावधी तेरा वर्षे सांगितला आहे. फल-विष्णुलोकप्राप्ती. [हि. ध.; व्रतराज; नारदपुराण]

माहाराज्य एक वैदिक शासनव्यवस्था. माहाराज्य म्हणजे मोठ्या राजाचे ऐश्वर्य. काही लहान लहान राजे एकत्र होऊन त्यांचे माहाराज्य बनत असे. या शासनव्यवस्थेत सर्व राज्यांना समानाधिकार असे. सर्व राजे एकत्र बसून कायदे करीत. ऐतरेय ब्राह्मणाच्या आठव्या पंचिकेतील दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या अध्यायांत माहाराज्याचा अनेकवार उल्लेख आलेला आहे. राज्यापेक्षा माहाराज्याचे ऐश्वर्य मोठे, असे तिथे म्हटले आहे. [वै. सा.; म. ज्ञा. को.]

माहिमसमुद्र (१६१३–१६८३ इ. स.) एक जैन आचार्य व कवी. याचा जन्म आग्रा शहरात झाला. याने वयाच्या बाविसाव्या वर्षी श्वेतांबर पंथाची दीक्षा घेतली. नंतर त्याला जिनसमुद्रसूरी असे नाव मिळाले. याने हिंदी व राजस्थानी भाषेत विपुल ग्रंथरचना केली आहे. त्या ग्रंथांतले तत्त्वप्रबोध नाटक, वैद्यचिंतामणी चौपाई अथवा समुद्रप्रकाश सिद्धान्त, इ. ग्रंथ प्रसिद्ध आहेत. वैराग्यशतकावर याने सर्वार्थसिद्धी मणिमाला नावाची संस्कृत व हिंदी या दोन्ही भाषांमध्ये टीका रचली आहे. या व्यतिरिक्त याची शेकडो स्फुट पदे राजस्थानी भाषेत आहेत. [हिं. सा. २]

माहिया पंजाब प्रदेशातील लोकगीतांचा एक प्रकार. या लोकगीतांमधून शृंगाररस आणि करुणरस यांचे चित्रण आढळते. शृंगारातही विरह शृंगार अधिक प्रमाणात आढळतो. ही लोकगीते सामान्यपणे तीन ओळींची असतात आणि पहिल्या पंक्तीतच संपूर्ण पदाची पार्श्वभूमी सांगितलेली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असते. कमी शब्दांत अधिक आशय व्यक्त करणे, हा या लोकगीतांचा विशेष आहे.

पंजाबात गायली जाणारी ही गाणी प्रथम हीर आणि रांझा या प्रणयी युगुलाशी संबंधित असावी. माहिया या पदाचा संबंध महिषी या शब्दाशी आहे. माहिया म्हणजे म्हशी चारणारा. लोकगीतांतील रांझा हा नायक प्रथम हीरच्या घरी म्हशी चारण्यासाठीच राहिला होता. त्यावरूनच या गीतप्रकाराला माहिया हे नाव मिळाले असावे.

माहिया पदांची तुलना कुमाँऊ प्रदेशातील भगनौल या गीतप्रकाराशी केली जाते. त्या गीतांना टप्पा असेही म्हणतात. [हिं. सा. को.; कु. लो. सा.]

माहिष्य एक प्राचीन अनुलोभ जात. क्षत्रिय पुरुष आणि वैश्य स्त्री यांची ही संतती होय (गौतम. ४·२०). सह्याद्रिखंडात यांना उपनयनाचा अधिकार असल्याचे सांगितले असून, हे शकुन सांगून व भविष्य वर्तवून आपला उदरनिर्वाह करतात, असे म्हटले आहे. सूतसंहितेत त्यांना अंबष्ठ असे म्हटले आहे. डॉ. दत्त यांच्या मते माहिष्य हे शुद्ध कैवर्त असून, शेती हा त्यांचा व्यवसाय आहे. [हिं. ध.]

माही महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्यामधील चंदगड तालुक्यात भरणाऱ्या लहान मोठ्या यात्रांना माही हे सामूहिक नाव आहे. या यात्रा प्रामुख्याने माघ महिन्यात भरतात. म्हणूनच यांना माही हे नाव मिळाले असावे. काही ठिकाणी या वेळी पशुबली देण्याची प्रथा आहे. ही जत्रा रवळनाथाच्या उद्देशाने माघ पौर्णिमेच्या आसपास चार-पाच दिवस चालते. या यात्रेला एक विशिष्ट परंपरा आहे, ती अशी – उत्सवाच्या दिवशी रवळनाथाचा पुजारी मुंडन करतो. दुपारपर्यंत नाथाची पूजा-अर्चा होते. नंतर प्रदक्षिणा असते. प्रदक्षिणेसाठी देवाची उत्सवमूर्ती पालखीत ठेवून मिरवणूक काढतात; पालखीच्या मागे पुजारी चालत असतो. या वेळी त्याच्या डोक्यावर एक चांदीचे ताट असून, त्यात एक मोठा पेटलेला काकडा असतो. ताटाखाली चुंबळ असत नाही. पुजारी हातातल्या तलवारीने ताटाचा तोल सावरतो. प्रदक्षिणा संपवून मंदिरात जाताना मंदिराच्या पायऱ्यांवर झोपलेल्या भक्तांना ओलांडून जायचे असते. [श्री. पु. वा. जोग – अमृत, जून १९६२]

माहीय एक पूर्वास्पृश्य जात. या लोकांची वस्ती गुजरात प्रदेशात आढळते. 'आम्ही माहीय नावाच्या ऋषीचे वंशज आहो,' असे हे सांगतात. सांप्रत धेड जातीतील काही लोक हे नाव धारण करू लागले आहेत. यांच्यापैकी जे विणकाम करतात, त्यांना वणकर असे म्हणतात. हे लोक कोळी किंवा कुणबी या लोकांप्रमाणे दिसतात; पण वर्णाने जरा अधिक काळे असतात. मृत पशूंची कातडी काढणे व जाडेभरडे कापड विणणे हे यांचे परंपरागत उद्योग होत. काही लोक आता शेतीही करतात.

आचार्य, बावा, चौहान, घोलकिया, गोसाई, महंत, राणा, वघेला, भेरविया या नावांची कुळे या जातीत आहेत. एकाच नावाच्या कुळांतील लोकांमध्ये विवाह होत नाहीत.

विवाहप्रथा – यांचा लग्नसमारंभ इतर जातींच्या सारखाच असतो. लग्नाच्या वेळी वधू-वरांच्या वस्त्रांच्या गाठी मारून त्यांना अग्नीभोवती पाच प्रदक्षिणा घालायला लावतात. व त्यांच्यावर अक्षता टाकतात. ही दोन्ही कामे गरोडा नावाचा पुरोहित करतो. हे हस्तिदंती बांगड्या विवाहचिन्ह म्हणून वधूच्या हातात घालतात.

हे जातप्रमुखाला मेहतर म्हणतात. सांप्रत त्या नावाऐवजी पटेल हे नाव वापरतात.

मर्तिकप्रथा – यांच्यांत मृतांना पुरतात किंवा जाळतात. बाराव्या दिवशी एका खाटेखाली चौदा मडकी ठेवून ती खाट वस्त्राने झाकतात. मग तिची पूजा करतात. नंतर माताचा पिंड करून त्याचीही पूजा करतात. पूजेनंतर पिंडाचे चार भाग करून ते नदीत किंवा तळ्यात टाकतात. पाहा – धेड. [सुरत गॅझे.]

माहुली एक पुण्यक्षेत्र. हे गाव सातारा शहराच्या पूर्वेला तीन-चार मैलांवर आहे. इथे कृष्णा आणि वेण्णा या नद्यांचा संगम झालेला आहे. कन्यागतात इथे मोठी यात्रा भरते. संगमाच्या ऐलतीरावरील वस्तीला संगम माहुली आणि पैलतीरावरील वस्तीला क्षेत्रमाहुली अशी नावे आहेत. पेशवाईतले प्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे हे क्षेत्र माहुली या गावाचेच होत. इथे संगममाहुलीला छत्रपती शाहू यांची समाधी आहे. त्यांच्या समाधीपुढेच त्यांनी पाळलेल्या कुत्र्याचीही समाधी आहे. याव्यतिरिक्त अन्य अनेक समाध्या इथे आहेत. सातारा शहराची ही स्मशानभूमीच आहे.

इथे कदंब देवीचे एक प्रसिद्ध मंदिर आहे. हा गाव पूर्वी दशग्रंथी विद्वान ब्राह्मणांचा गाव म्हणून प्रसिद्ध होता. [सातारा गॅझे.; वि. मुं. रा. प.; स. भा. प्र. व.]

माहूर एक पुण्यक्षेत्र. पूर्वीचे नाव मातापूर. त्याचाच अपभ्रंश माहूर असा झाला आहे. ही माता म्हणजे जमदग्नीची भार्या रेणुका ही होय. हे स्थान महाराष्ट्रात मराठवाडा आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विदर्भ यांच्या सीमेवर आहे. ते नांदेड जिल्ह्यात किनवट तालुक्यात येते. हे गाव डोंगराळ भागात समुद्रसपाटीपासून २५०० फूट उंचीवर आणि अगदी आडवळणी आहे. तिथे जायला अजूनही प्रवासाच्या नीटशा सोयी नाहीत.

सांप्रत माहूर हे लहानसे खेडे असले तरी, पुरातन काळी हे मोठे नगर असावे, असे आजूबाजूस कित्येक मैल विखुरलेल्या नगरवस्तीच्या अवशेषांवरून अनुमानिता येते. देवीच्या साडेतीन पीठांतील मूळपीठ, दत्तात्रेयाचे शयनस्थान आणि ऋषिमुनींचे तपःस्थान असे, याचे अनेकांगी माहात्म्य असल्यामुळे माहूर क्षेत्रात भिन्न पंथाच्या यात्रेकरूंची नेहमीच वर्दळ असते.



रेणुकादेवी – माहूर

इथले महत्त्वाचे स्थान म्हणजे रेणुकेचे मंदिर होय. हे मंदिर डोंगरावर उंच जागी बांधलेले आहे. रेणुका ही इथल्या शक्तिपीठाची अधिष्ठात्री देवता. देवी जगदंबा हिच्या स्वरूपाशी ती एकजीव झालेली आहे. रामानंदाच्या एका स्तोत्रात तिचे माहात्म्य वर्णिले आहे, ते असे—

वंदिली म्या अहो वंदिली निजसत्ता भवानी ।
मातापुरवासिनी भवानी वंदिली ।।
मातापुरी मूळपीठी अंबिका । सगुण रूपे प्रकटली भवानी ।।
पिंजाळे मवाळे चरणतीर्थ हे स्नाने जाती पातके भवानी ।
सिंहाद्री पर्वती राहुनी भक्ता प्रतिपाळिसी भवानी ।
सुरवर मुनिजन स्तविती तुजला महिमा न वर्णवे भवानी ।
रामानंद पूर्ण बोधे चरण तुझे वंदितो भवानी ।

या रेणुकेला एकवीरा असेही म्हणतात. हिचे मंदिर गावालगतच्या गिरिशिखरावर आहे. वर चढण्यासाठी हजार-दीड हजार पायऱ्या बांधलेल्या आहेत. मंदिराचे वास्तुशिल्प प्राचीन पद्धतीचे आहे. गाभाऱ्यात रेणुकेची मूर्ती नसून तिचा तांदळा आहे. त्यालाच शिरोभागाचा आकार दिलेला असून, त्यावर चांदीचा टोप चढविलेला आहे. तिच्या बैठकीवर सिंह कोरलेला आहे. हे देवीचे ध्यान भव्य आणि उग्र दिसते. रेणुकेच्या शेजारीच महालक्ष्मी व तुळजाभवानी यांची दोन लहानशी मंदिरे आहेत. दक्षिणेच्या बाजूस काही पायऱ्या उतरून गेल्यानंतर परशुरामाचे मंदिर लागते. त्यात परशुरामाची ओबड धोबड मूर्ती आहे. रेणुकेच्या पूर्वेस २।। ते ३ मैल अंतरावर दुसऱ्या एका गिरिशिखरावर दत्तात्रेयाचे स्थान आहे. त्याला दत्तशिखर म्हणतात. मूळ मंदिर अगदी लहान असून, ते मुकुंदभारती या महंताने इ. स. १२१९ मध्ये बांधले. त्याचा जीर्णोद्धार आणि विस्तार सखन शालिवाहन याने इ. स. १६२४ मध्ये केला. त्यात दत्ताची एकमुखी मूर्ती आहे. दत्तशिखरावरील हे पठार प्रशस्त असून, त्यावर अनेक मंदिरे, समाधि-स्थाने, ओवऱ्या व मठ आहेत. हे दत्तस्थान शंकराचार्यांच्या परंपरेतील भारती गोसाव्यांच्या ताब्यात आहे. या दत्तस्थानाला औरंगजेबाकडून ४०हजारांची जहागीर मिळाली होती, हे विशेष होय.

दत्तशिखराच्या पश्चिमेस एका मैलावर अनसूयेचे मंदिर व अत्रीऋषीच्या पादुका आहेत. दत्तमंदिरापासून जवळच उतारावर सर्वतीर्थ नावाचे एक कुंड आहे. हे परशुरामाने निर्माण केले आणि याच्या काठी आपली माता रेणुका हिची अंत्यक्रिया केली, अशी कथा आहे.

गावापासून डोंगरपायथ्याकडे जो रस्ता गेला आहे, त्याच्या डाव्या कडेला संत विष्णुदासांचा मठ आहे. हे रेणुकेचे परम भक्त होते. अलिकडच्या काळात विदर्भ व मराठवाडा या भागात रेणुकेची उपासना त्यांनीच पुनरुज्जीवित केली. त्यांचा शिष्यपरिवार त्या भागात सर्वत्र पसरलेला आहे. वरीच वर्षे माहूर येथे राहून त्यांनी परमार्थसाधना केली.

विष्णुदासांच्या मठाजवळच मातृतीर्थ आहे. रेणुकेचे वास्तव्य त्या जागी होते, असे सांगतात. या मातृतीर्थाला दोन मोवाळे किंवा मावळा तलाव असे म्हणतात. हा एक विस्तीर्ण तलाव आहे. ज्यांना गुजरातमधील मातृगयेला जाणे शक्य नसते, ते लोक या मातृतीर्थावर मातृश्राद्ध करतात. मातृतीर्थाच्या परिसरात रेणुकेची दहनभूमी आहे. तिथे मूलझरी, कमलतीर्थ आणि अमृतकुंड ही तीर्थे आहेत.

सुप्रसिद्ध दत्तोपासक दासोपंत यांनी एका तपाहून अधिक काळ या ठिकाणी तपःसाधना केली आणि दत्तात्रेयाने त्यांना इथे साक्षात दर्शन दिले, असे म्हणतात.

माहूर हे महानुभाव संप्रदायाचेही एक प्रमुख क्षेत्र आहे. दत्तात्रेय हे आपल्या संप्रदायाचे मूळ आहे, अशी महानुभावांची श्रद्धा आहे. चक्रधरस्वामींचे परमगुरू चांगदेव राऊळ यांनी माहूर येथे दत्तात्रेयापासून ज्ञानशक्तीचा स्वीकार केला. ह्या-मुळे महानुभावांच्या वाङ्मयात माहूरचा महिमा श्रद्धेने गा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लेला आढळतो. महानुभावांचे इथले दत्तस्थान देवदेवेश्वर या नावाने ओळखले जाते. सुमारे सातशे वर्षांपूर्वी भास्करभट्ट बोरीकर या महानुभाव कवीने हे स्थान आपल्या ताब्यात घेतले. तेव्हापासून आजतागायत त्यांच्याच परंपरेतला माणूस या क्षेत्राच्या गादीवर असतो. प्रतिवर्षी इथे दत्तजयंतीची मोठी यात्रा भरते. ती पाच दिवस चालते. या काळात अनेक यात्रेकरू नवस फेडण्यासाठी इथे येतात.

माहूरच्या पुरातन अवशेषांत माहूरगड हा महत्त्वाचा आहे. हा गड ५०० फूट उंचीच्या पहाडावर आहे. मध्ययुगात हा गड दुर्गम समजला जात असे. त्याच्या तीन बाजू दुर्लंघ्य असून, सोपी असलेली उत्तर बाजू बांधून काढलेली आहे. ती तटबंदी अजून-ही उभी आहे. [आ. दे. आ. दै.; मातापूरची जगन्माता.; क्षेत्र माहूर-श्री. दा. शं. जोशी, पुरुषार्थ, ऑक्टो-नोव्हें. १९६३]

माहेजी एक यात्रास्थान. हे गाव महाराष्ट्र राज्याच्या जळगाव जिल्ह्यातील पाचोरे तालुक्यात आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई–दिल्ली मार्गावर माहेजी नावाचे स्टेशन असून, तिथून तीन मैलांवर चिचखेड येथे ही यात्रा पौष पौर्णिमेला भरते. या जिल्ह्यातील ही एक प्रसिद्ध यात्रा आहे.

ही यात्रा भरण्याचे मूळ कारण सांगतात, ते असे – सुमारे तीन शतकांपूर्वी माहेजी नावाची एक स्त्री होऊन गेली. ती जामनेरजवळ असलेल्या हिरवी नामक गावात एका तिलोली कुणबी कुळात जन्मली. सासू-सासऱ्यांच्या जीवघेण्या जाचाला कंटाळून ती घरातून पळून गेली आणि योगिनी बनली. तोरणमाळच्या एका साधूने तिला दीक्षा दिली. नंतर ती यात्रा करीत देशभर भटकली. त्यामुळे तिचा महिमा इतका वाढला, की तिच्या हयातीतच लोक तिला नवस करू लागले. अखेर ती चिचखेड्याला स्थायिक झाली. तिथे ती बारा वर्षे राहिली आणि नंतर तिने जिवंत समाधी घेतली. पुढे तिथे तिचे एक मंदिरही बांधण्यात आले.

पोवार घराण्यातील एका प्रमुखाच्या नवसाला माहेजी पावली म्हणून त्याने हिची यात्रा सुरू केली, असे सांगतात. ही यात्रा सुमारे एक महिनाभर चालते. [म. जि.–जळगाव]

माहेय एक प्राचीन जनपद. हे जनपद मही व नर्मदा या नद्यांच्या मधील प्रदेशात असावे. इथे राहणारे लोक माहिक म्हणून ओळखले जात. या जनपदाचा निर्देश महाभारताचे भीष्मपर्व (९.४८), वायू पुराण (४५.१३०), इ. ठिकाणी आढळतो. अर्चनाना, श्यावाश्व, तरंत, पुरुमीढ, इ. वैदिक ऋषी या जनपदात वास्तव्याला होते, असे म्हणतात. जमदग्नी हा या माहिकांचा पुरोहित होता. [भा. बृ. इ.; ट्रा. ए. इं.]

माहेश्वर ज्वर प्राचीन काळी युद्धप्रसंगी वापरण्यात येणारी एक शक्ती. या ज्वराचा प्रयोग शिवाने कृष्णावर केला होता, असे भागवतात म्हटले आहे (१०.६३). कृष्णाने या ज्वराच्या प्रतिकारासाठी वैष्णव ज्वराची निर्मिती केली. या वैष्णव ज्वराला तोंड देण्यास माहेश्वर ज्वर असमर्थ ठरला आणि तो आत्मशांतीसाठी तीन्ही लोकांत भटकू लागला. परंतु त्याला कुठेही शांती लाभली नाही. अखेर अवंतीला येऊन क्षिप्रा नदीत स्नान केल्यावर त्याला शांती मिळाली. हे पाहून वैष्णव ज्वरानेही तसेच केले आणि तोही शांत झाला. या दोन्ही ज्वरांना क्षिप्रेने शांत केले म्हणून तिला ज्वरघ्नी असे नाव पडले, अशी माहिती स्कंद पुराणाच्या अवंती खंडात दिलेली आहे. [पु. इं.]

माहेश्वरी ही मारवाडी बनियांची एक पोटजात होती; पण आता ती एक वेगळी जात बनली आहे. हे लोक मूळचे राजस्थानातील असले, तरी सांप्रत भारताच्या सर्व भागांत जाऊन स्थायिक झालेले आहेत. मारवाडी किंवा राजस्थानी ही त्यांची मुख्य भाषा आहे; पण निरनिराळ्या राज्यांत वसलेले माहेश्वरी लोक पंजाबी, गुजराती, मराठी, तेलुगू, बंगाली, इ. प्रादेशिक भाषा उत्तम बोलतात.

महेश या शब्दावरून माहेश्वरी हे नाव आलेले आहे. माहेश्वरी लोक मुख्यतः महादेवाचे उपासक आहेत. याविषयी एक आख्यायिका प्रचलित आहे, ती अशी– जयपूरजवळ खंडेल नामक स्थान आहे. प्राचीन काळी तिथला राजा सुजात सेन याला महादेवाच्या प्रसादामुळे एक पुत्र झाला. तो राजकुमार एकदा मृगयेसाठी अरण्यात गेला. त्याच्या बरोबर त्याचे ७२ मित्र होते. अरण्यात काही ऋषी यज्ञ करीत होते. तो पाहण्यासाठी हा राजकुमार व त्याचे साथीदार तिथे गेले. त्यांच्या गडबडीमुळे यज्ञात व्यत्यय आला व ऋषींना राग येऊन त्यांनी त्या सर्व युवकांना शाप दिला. त्या शापामुळे ते युवक पाषाणरूप होऊन पडले. ती वार्ता समजल्यावर त्या युवकांच्या स्त्रिया तिथे जाऊन विलाप करू लागल्या. त्या वेळी शिवपार्वती तिथून जात होती. त्या स्त्रियांनी पार्वतीची प्रार्थना केली आणि तिच्या सांगण्यावरून शिवाने त्या पाषाणरूप झालेल्या तरुणांना सजीव केले. मात्र त्याने त्यांना क्षत्रियधर्म सोडून वैश्यधर्म अंगिकारण्याचा आदेश दिला. त्या लोकांपासून माहेश्वरी ही जात उत्पन्न झाली.

राजकुमाराबरोबर जे ७२ मित्र होते, ते माहेश्वरी लोकांतील ७२ गोत्रांचे मूळ पुरुष मानले जातात. त्या बहात्तर गोत्रांत सांप्रत सुमारे एक हजार पोटभेद उत्पन्न झाले आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या लोकांचे रीतिरिवाज आणि विविध संस्कार बनियांच्या-सारखेच आहेत. मात्र यांच्या लग्नविधीत दोन वेगळे प्रघात आढळतात. (१) मामाफेरा– लग्नसमारंभात वधूचा मामा तिला घेऊन वराला चार प्रदक्षिणा घालतो. त्या वेळी वरावर वधू फुले व कापूस उधळते. (२) लग्नाच्या वेळी वधूने हस्तिदंताची कंकणे घालणे आवश्यक असते. ती कंकणे निदान चाळीस दिवस हातांत ठेवायची असतात.

माहेश्वरी महाजन

माहेश्वरी लोकांत काही विशेष सण व व्रते असतात, ती अशी–(१) बडी तीज– भाद्रपद वद्य तृतीयेला विवाहित स्त्रिया उपवास करून पतीला दीर्घायुष्य मिळावे, अशी प्रार्थना करतात. अविवाहित स्त्रिया चांगला पती मिळावा म्हणून हे व्रत करतात. सायंकाळी शिवपूजा करून उपवास सोडतात. (२) गोर्जा–चैत्र शुद्ध तृतीयेला शिव-पार्वतींची पूजा करतात. (३) रक्षाबंधन– हा समारंभ माहेश्वरी लोक भाद्रपद वद्य पंचमीला साजरा करतात. त्याला भाईपंचमी किंवा भाईपाचू असे म्हणतात. (४) महेशनवमी – ज्येष्ठ शुद्ध नवमीला महेश्वराची पूजा करतात. माहश्वरी जातीचा उदय त्या दिवशी झाला, असे मानले जाते.

माहेश्वरी लोक मुख्यतः शिवोपासक असले तरी ते विष्णूची उपासनाही करतात.

पूर्वी यांच्यांत बालविवाह, पडदा, इ. चाली रूढ होत्या. पण रायबहादुर श्यामसुंदरलाल लोइवाल यांनी इ. स. १८९२ साली माहेश्वरी महंत सभा स्थापून समाजसुधारणेला प्रेरणा दिल्यानंतर आता त्या समाजाची वरीच सुधारणा झाली आहे.

या लोकांच्या अंत्यसंस्कारात मृताचा मुलगा, नातू, पणतू या सर्वांना क्षौर करावे लागते. इतर मारवाडी जातीच्या लोकांत फक्त मृताच्या मुलाचे क्षौर करण्याची चाल आहे.

गेल्या शतकात माहेश्वरी लोक फक्त व्यापारात पुढे आले होते. पण सांप्रत त्यांच्यांतील बऱ्याच कर्तबगार लोकांनी मोठमोठे उद्योगधंदे व कारखाने चालवले आहेत. बिडला, सोमाणी, लखोटिया, बांगुर, जाजू, तोष्णिवाल, राठी, दामाणी, इ. अनेक कर्तृत्ववान पुरुष या जातीत निपजले आहेत. [रा. जा.; श्री. लखोटिया – इलस. वीकली, २८ मार्च १९७१]

माळजदेवी म्हैसूर प्रदेशातील एक देवता. हिला माळची असेही म्हणतात. हिचे एक प्रख्यात क्षेत्र धारवाड जिल्ह्याच्या हावेरी तालुक्यातील देवीहोसूर या गावी आहे. या गावात सापडलेल्या, इ. स. १०६३ च्या एका शिलालेखात इंदपय्य नावाच्या अधिकाऱ्याने या देवीच्या मंदिराला मकरतोरण बांधून दिल्याचा उल्लेख आहे. त्याच शिलालेखात हिला काळी, काळराक्षसी, रौद्रा, भैरवी, उग्रा, महाकाळी, काळयोगिनी, इ. विशेषणे लावलेली आढळतात. बनवासी प्रांताचा राज्याधिकारी रेचरस हा तिचा परमभक्त होता. त्याने हिच्या नैवेद्यासाठी व नंदादीपासाठी दान दिले होते. इथे सापडलेल्या इ. स. ११४८ च्या शिलालेखात माळजदेवी योगपीठासह उदय पावलेली असून, ती सर्व देवांच्या स्तुतीला पात्र झालेली आहे, अशी तिची प्रशंसा केलेली आहे.

अभिनव मंगराजाच्या मंगराजनिघंटू या कन्नड कोशात माळजदेवीला मैलाराची पत्नी म्हटले आहे. श्री. पांडुरंग देसाई यांच्या मते माळचीचे मालती असे संस्कृतीकरण झाले. माळव किंवा माळची ही मराठीत म्हाळसा झाली आहे. पाहा–महालसा. [श्री. पांडुरंग देसाई– नवभारत, नोव्हेंबर १९५७]

माळवा मध्य भारतातील एक प्राचीन प्रदेश. मध्य प्रदेशातील शिवपुरी, गुणा, विदिशा, राजगढ, शाजापूर, देवास, इंदोर, उज्जैन, मंदसोर, रतलाम, धार व झाबु आहे जिल्हे माळव्याच्या पठारावर आहेत. भोपाळ विभागातील सीहोर, रायसेन व होशंगाबाद हे जिल्हेही माळव्यातच येतात. नर्मदा नदीच्या खोऱ्यातील निमाड प्रदेशाचा अंतर्भाव माळव्यातच होतो. शिवपुरी हे शहर माळव्याच्या उत्तर सीमेवर आहे. राजस्थानातील टोंक संस्थानातला सिरोंज पिडवा व छबडा हा भाग; त्याचप्रमाणे झालावाड व कोटा या प्रदेशांचाही अंतर्भाव माळव्यात होतो. बेतवा नदी ही माळव्याची पूर्व सीमा असून, तिच्या पलिकडे बुंदेलखंड आहे. चंबळ व मही या नद्या माळव्याची वायव्य सीमा दर्शवितात. माळव्याची पश्चिम सीमा गुजरात राज्याला भिडलेली आहे. आणि सातपुडा पर्वतश्रेणी ही या प्रदेशाची दक्षिण सीमा होय.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्राचीन काळी या प्रदेशाला अवंती असे नाव होते. क्वचित पश्चिम भागाला अवंती व पूर्व भागाला दशार्ण असे म्हणत. अवंती देशाच्या उत्तर भागाची राजधानी उज्जैन होती व दक्षिण भागाची माहिष्मती. अवंती व दशार्ण या जनपदांवर यादवांचे राज्य होते. सनपूर्व ६ व्या शतकात भारतात जी १६ महाजनपदे अस्तित्वात होती, त्यांपैकी अवंती हे प्रमुख होते. अवंतीचा राजा चंडप्रद्योत याचे राज्य मथुरेपर्यंत पसरले होते. पुढे हर्यंक वंशातील मगधसम्राट अजातशत्रू याने अवंतीचे राज्य जिंकले. मौर्यसम्राट बिंदुसार याच्या राजवटीत राजपुत्र अशोक उज्जैन येथे राज्यपाल होता. पुष्यमित्र शुंग मगधाचा राजा झाल्यावर विदिशा ही पूर्व भागाची राजधानी झाली. त्यानंतर विदिशा व पद्मावती येथे नागवंशाचे राज्य होते. त्या काळात या प्रदेशाचा सांस्कृतिक विकास खूप झाला.

त्यानंतर या प्रदेशावर शकांनी आपली सत्ता स्थापन केली. त्याच काळात पंजाबातून मालव लोक मेवाडमध्ये टोंक प्रदेशात येऊन वसले. त्यांनी तिथे प्रजातंत्र गणराज्य स्थापले. त्यांचा शकांशी संघर्ष झाला व शेवटी सातवाहनांच्या मदतीने मालवांनी शकक्षत्रपांची सत्ता नष्ट केली. त्यानंतर समुद्रगुप्ताने दिग्विजय केला, तेव्हा मालवगणांनी त्याचे सार्वभौमत्व मान्य केले. तो-पर्यंत मालव लोक या साऱ्या पठारी प्रदेशात पसरले होते. त्यांच्यावरूनच कालांतराने या प्रदेशाला मालवदेश हे नाव प्राप्त झाले. वाकाटक राजा पृथ्वीसेन (द्वितीय — इ. स. ६ व्या शत-काचा उत्तरार्ध) याच्या बालाघाट येथील शिलालेखात प्रथमच अवंती प्रदेशाच्या राजाला मालवाधिपती ही पदवी दिलेली आढळते. बाणभट्टानेही मालवपती हा शब्द वापरलेला आहे.

गुप्तवंशाची सत्ता दुर्बळ झाल्यानंतर हूण सरदार तोरमाण याने माळवा प्रदेशावर सत्ता स्थापली. पण त्याचा पुत्र मिहिर-कुल व दशपूरचा मालवराजा यशोधर्मा यांचे युद्ध होऊन मिहिर-कुलाचा पूर्ण पराभव झाला. यशोधर्म्याने गुप्त साम्राज्यातला बराच प्रदेश जिंकून आपले साम्राज्य स्थापले. मध्यंतरी काही काळ वाकाटक राजा हरिषेण याने अवंतीवर राज्य केले. पुढे प्रभाकरवर्धन याने माळव्यावर सत्ता प्रस्थापित केली. त्यानंतर चालुक्य, राष्ट्रकूट व प्रतीहार या राजवंशांची सत्तास्पर्धा उत्तर भारतात दीर्घ काळ चालू होती. त्यांच्यापैकी कोणी तरी हा प्रदेश जिंकून आपल्या साम्राज्यात समाविष्ट करी. असे सत्तां-तर इ. स. च्या ९ व्या शतकापर्यंत चालू होते. इ. स. च्या ९ व्या शतकात परमार वंशाने माळवा प्रदेशात आपले राज्य स्थापले. त्या वंशाचे राज्य सुमारे ४०० वर्षे चालले. त्या वंशातील मुंज व भोज हे राजे अत्यंत शूर व विद्वान होऊन गेले. त्यांच्या शासनकाळात माळवा हे साहित्य व संस्कृती यांचे प्रमुख केंद्र बनले. धारानगरी ही त्या विशाल राज्याची राजधानी होती.

इ. स. १३०५ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती ऐन — उल - मुल्क याने परमारांचा पूर्ण पराभव करून माळवा जिंकला. तेव्हापासून माळवा हा दिल्लीच्या सुलतानशाहीचा एक सुभा बनला. पण फिरोज तुगलुकाच्या मृत्यूनंतर दिल्लीची सत्ता दुबळी झाली आणि त्या गोष्टीचा फायदा घेऊन इ. स. १४०१ साली दिलावरखां सुभेदाराने स्वातंत्र्य पुकारले. तो मुहंमद घोरीच्या वंशातला होता. त्याने मांडू येथे राजधानी नेली. त्याचा पुत्र अलफखां (होशंगशाह इ. स. १४०५ — १४३४) याने मांडव-गडावर अनेक सुंदर वास्तू निर्माण केल्या. त्याचा पुत्र मुहंमद व्यसनी निघाल्यामुळे त्याचा वजीर महमूदखां खिलजी (इ. स. १४३६ — ६९) याने त्याला मारून राज्य बळकावले. त्याची कारकीर्द भोवतालच्या सत्तांशी लढण्यात गेली. त्याने दिल्लीवर व चितोडवरही स्वारी केली होती. पण त्यांत त्याचा पराभव झाला. फरिश्ताने त्याला सच्चा, उदार व न्यायी म्हटले आहे. त्याने आपल्या राज्याचा बराच विस्तार केला व सामर्थ्य वाढ-वले. त्याच्या नंतरचे दोन सुलतान विलासी होते. त्यांनी इ. स. १५१० पर्यंत राज्य केले. त्या काळात मांडूमध्ये साहित्य, संगीत व स्थापत्य या कलांना विशेष प्रोत्साहन मिळाले. परमारांच्या काळात माळव्यात जैनांचा प्रभाव पुष्कळ वाढला होता. मुसल-मानी राजवटीतही तो चालू राहिला. त्यांना मोठी अधिकारपदे मिळत गेली. त्यामुळे मांडू हे जैनांचे एक प्रमुख तीर्थस्थान व विद्याकेंद्र बनले.

त्यानंतर महमूद खिलजी (दुसरा) गादीवर आला. त्याने इ. स. १५१२ साली मेदिनीराय पूरबिया याला आपला वजीर नेमले. त्यामुळे राज्यकारभारात राजपुतांचा प्रभाव वाढला. महमूद खिलजीला ते सहन झाले नाही. त्याने गुजरातच्या सुल-तानाची मदत घेतली व मेदिनीरायाने मेवाडच्या राणा सांगाची मदत घेतली. राणा सांगा याने चंदेरी, विदिशा व गागरौन ही ठिकाणे जिंकून महमुदाला कैद केले; पण लगेच सोडूनही दिले. इ. स. १५३१ मध्ये गुजरातच्या सुलतानाने माळवा जिंकून आपल्या राज्यात सामील केला व महमुदाला ठार मारले. पुढे इ. स. १५३५ साली हुमायून बादशाहाने माळवा जिंकला. शेर-शाहा दिल्लीच्या तख्तावर बसल्यानंतर त्याने शुजाअतखां याला माळव्याचा सुभेदार नेमले. त्याचा पुत्र बाजबहादुर याने इ. स. १५५५ साली माळव्याचे स्वातंत्र्य पुकारले. तो व त्याची राणी रूपमती ही दोघे संगीतक्षेत्रात नावाजती ठरली आहेत.

इ. स. १५६२ साली अकबराने बाजबहादुरचा पराभव करून माळवा जिंकला. तेव्हापासून तो प्रदेश मोगल साम्राज्याचा एक भाग बनला. उज्जैन ही पुन्हा माळव्याची राजधानी झाली. त्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काळी माळव्यात उज्जैन, रायसेन, चंदेरी, सारंगपूर, मांडू, हंडिया, गागरौन, कोटडी, पिंडवा, बीजागढ, गढा, मंदसौर व नंदुरबार या बारा जिल्ह्यांचा समावेश होता. मोगलांच्या राजवटीत माळव्याची खूप भरभराट झाली.

इ. स. च्या १७ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत माळव्याला बरीच शांतता लाभली. पण त्यानंतर मराठ्यांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या. मोगल, मराठे, निजाम व राजपूत यांच्यांत सतत लढाया चालू होत्या. इ. स. १७४१ साली दिल्लीच्या बादशहाने माळवा प्रांताची सनद पेशव्यांना दिली. त्यापूर्वीच शिंदे, होळकर व पवार हे मराठा सरदार माळव्यात चौथाई वसूल करू लागले होते. त्यांनीच पुढे माळव्यात वेगवेगळ्या भागांत आपली सत्ता स्थापली. त्यापूर्वी दोस्त मुहंमद नामक अफगाण सरदाराने भोपाळ येथे आपले स्वतंत्र राज्य सुरू केले होते.

मराठे सरदारांनी माळव्यात एकमुखी सत्ता प्रस्थापित केली नाही. आपापल्या राज्यांत त्यांनी चांगली राज्यव्यवस्थाही केली नाही. त्यांचे अनेक जहागिरदार व जमीनदार प्रबळ होऊन स्वतंत्र कारभार करीत होते. त्यांच्यांत झगडे चालू होते. त्यामुळे माळव्याची स्थिती पार बिघडून गेली. पुढे महादजी शिंदे याने माळव्यात कारभाराची घडी नीट बसवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा अनेक राजपूत राजे व जमीनदार यांच्याशी त्याला लढावे लागले. पेशवाई बुडाल्यावर तर या प्रदेशात अराजकच माजले. पुढे इंग्रजांनी तिथे शांतता प्रस्थापित केली आणि निरनिराळ्या संस्थानिकांना व जहागिरदारांना ब्रिटिश साम्राज्याचे मांडलिक म्हणून मान्यता देऊन त्यांना स्वस्थ बसवले.

अशा प्रकारे माळव्याचा सारा इतिहास उज्जैन, माहिष्मती, विदिशा, धारा, मांडू, भोपाळ, इंदोर व दशपूर या नगरांशी निगडित आहे. [वि. स्मृ. ग्रं.; हिं. वि. को.; मा. लो. वि. अ.]

माळी बागकाम करणाऱ्या लोकांचा एक वर्ग. माळ या शब्दावरून माळी हे नाव आले आहे. या लोकांची वसती मुख्यत्वे महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, राजस्थान व बंगाल या प्रदेशांत असून, बिहार, ओडिसा, पंजाब व उत्तर प्रदेश या प्रदेशांतही थोडी आहे. मात्र निरनिराळ्या प्रदेशांतील माळी लोकांचा परस्परांशी कसलाही संबंध नाही. माळी हे नाव व्यावसायिक असल्यामुळे, बागकाम करणाऱ्या इतर जातींच्या लोकांनाही ते लावले जाते. मुसलमान माळ्यांना बागवान म्हणतात.

मराठा माळी –– हे मूळचे कुणबी असावे. पुढे धंद्यावरून वेगळी जात बनली. यांचे फूलमाळी, अधप्रभू, अघशेटी, वावने, हळदे (किंवा बनकर), जिरे, काच, कडू, क्षीरसागर, लिंगायत, पदे, रांत व उंडे असे तेरा पोटभेद आहेत. मात्र फूलमाळी, हळदे, जिरे व काच यांची संख्याच जास्त आहे. फूलमाळी हे फुलांचा व्यवसाय करणारे असून, सर्वांत उच्च मानले जातात. यांनाच सावतामाळी असेही म्हणतात. ते आपल्या पागोट्याला फुलांचा गुच्छ लावीत नाहीत किंवा पायतणांवर फुलांची नक्षी काढीत नाहीत. जिरे माळी जिरे पिकवतात, तर हळदे माळी हळद पिकवतात. हळदे माळी हलक्या दर्जाचे मानले जातात. या पोटजातींमध्ये लग्नसंबंध होत नाही. पण अलिकडे हे सर्व पोटभेद हळूहळू नाहीसे होऊन सावतामाळी किंवा नुसतेच माळी असे जातीचे नाव सांगण्यात येते. संत सावतामाळी व म. ज्योतिबा फुले हे मोठे पुरुष या जातीत होऊन गेले.

फुले, फळे, भाज्या, ऊस, हळद, जिरे, इ. बागायती पिके काढणे हा यांचा मुख्य व्यवसाय होय. बागेत निघालेला माल बाजारात नेऊन विकण्याचे काम त्यांच्या स्त्रिया करतात. फुलांचा धंदा सांप्रत खूपच वाढल्यामुळे हे लोक बरेच सधन झाले आहेत.

विवाहप्रथा – यांच्यांत आते व मामे बहिणींशी लग्न करण्याची प्रथा आहे. मावस भावंडांचे लग्न मात्र होत नाही. पूर्वी अनेक बायका करण्याची चाल होती. मुले वयात आल्यावर त्यांचे लग्न करतात. काडीमोड आणि विधवेचा पाट लावण्याची चाल पूर्वीपासून आहे.

देवधर्म – हे लोक अंबा, भवानी, जनाई, तुकाई, खंडोबा, भैरोबा व सप्तशृंगी या देवतांना भजतात. बरेच माळी वारकरी पंथाचे आहेत.

यांच्यांतील निरनिराळ्या कुळांची किंवा कुळांच्या गटांची वेगवेगळी देवके होती. साळुंकीचे पीस, सूर्यकिरण, गवत, पानकणीस, सूर्यफूल, पाच पालवी ही त्यांची देवके आहेत. समान देवकांच्या कुळांत लग्नसंबंध होत नसे. पण आता ते लग्नसंबंधाला बाधक मानले जात नाही.

यांची जातपंचायत असून, तिचा प्रमुख जातीतले तंटे मिटवतो. यांच्या बाकीच्या चालीरीती मराठा कुणबी लोकांप्रमाणे आहेत.

गुजराती माळी – हे मूळचे कणबी असावे. कारण हे बरेचसे त्यांच्यासारखेच दिसतात. यांचे बहुतेक रीतिरिवाज कणब्यांप्रमाणेच आहेत. बागायत व फुले विकणे हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. काही लोक व्यापार करतात, तर काही घरकाम करतात. यांच्यांत कबीर, रामानुज, स्वामीनारायण, वल्लभ, शैव या पंथांचे अनुयायी आहेत; काही जैन आहेत.

विवाहप्रथा – यांच्यांत जवळचे नाते असलेल्या कुळांचा लग्नसंबंध होत नाही; पण काही ठिकाणी बहीण-भावांच्या मुलांचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लग्ने होतात. विधवेचा विवाह पूर्वीपासून रूढ आहे. तिला धाकट्या दिराशी लग्न करता येते. काडीमोडही प्रचलित आहे.

कानडी माळी – यांना कामटी किंवा कुंचगीवक्कल असेही म्हणतात. पावसाळ्यात ते कुंचगी (कुंची) वापरतात, म्हणून त्यांना ;कुंचगीवक्कल हे नाव मिळाले आहे. यांच्यांत भिन्न कुळे नाहीत.

यांच्यांत बालविवाह रूढ आहे. अनेक बायका करण्याचीही चाल होती. विधवाविवाह रूढ होता. हे लोक वेंकटराम, येल्लम, गुट्टिअम्म व हनुमान या देवतांना भजतात. चंद्रगुट्टी ही त्यांची मुख्य देवता असून, तिचे मंदिर म्हैसूरमधील सोराब येथे आहे. ब्राह्मण लोक यांचे पौरोहित्य करतात. यांची जातपंचायत असून, सरपंच जातीने निवडलेला असतो. त्याचा अधिकार तहहयात चालतो. हे मृतांना जाळतात; पण पाच वर्षांखालील मुलांना पुरतात.

राजस्थानी माळी – यांचा मूळ व्यवसाय भाजीपाला पिकवून विकणे हा होता. पण आता ते नोकरी व कारागिरी हे उद्योगही करू लागले आहेत. हे सर्व देवांना भजतात. यांचे पुरोहित ब्राह्मण असतात. अमावास्या, पौर्णिमा, एकादशी व वैकुंठचतुर्दशी या दिवशी हे उपास करतात. हे लोक रविवार हा पवित्र दिवस मानतात.

विवाहप्रथा – यांच्यांत बालविवाह रूढ आहे. हे लोक लग्न



राजस्थानी माळी

लावण्यासाठी ब्राह्मणाला बोलावतात. देजाची चाल आहे. अनेक बायका करता येतात, पण सहसा कोणी करीत नाही. यांच्यांत घटस्फोट रूढ नाही. स्त्रीचे वर्तन अनैतिक असेल तरच पतीला घटस्फोट घेता येतो.

मर्तिकप्रथा – हे लोक मुलांची प्रेते पुरतात व मोठ्या माणसांची प्रेते जाळतात. त्यापूर्वी प्रेताला स्नान घालतात. मग पिंडदान करतात. हे अकराव्या दिवशी क्षौर करतात व ज्ञातिभोजन घालतात. अस्थिविसर्जन व श्राद्ध करण्याची प्रथा आहे.

पंजाबी माळी – यांचे फूल, गोह, सैनी, कच्छी, मच्छी, धनकट, तांबोळी, कंबोह हे पोटभेद आहेत. हे लोक भैरव, हनुमान, श्यामजी, देवी, गूगा, इ. देवतांना भजतात. यांची जातपंचायत असून, तिच्या प्रमुखाला चौधरी म्हणतात.

बंगाली माळी – यांना मालाकार असे म्हणतात. फुलझाडे लावणे, कंच फुलांची आरास करणे व सोलाची चित्रे बनवणे हे त्यांचे व्यवसाय आहेत. सोला नावाचे एक झाड आहे. त्याचे लाकूड हलके असून, गाभा पांढरा असतो. त्याचे पातळ तुकडे कापून त्यावर हे लोक चित्रे काढतात किंवा ते तुकडे जोडून त्यांची खेळणी किंवा बाहुल्या बनवतात.

प्राचीन बंगाली साहित्यात मालाकारांचा उल्लेख ठाक या नांवाने केलेला आहे. या ठाकांचे अनेक पोटभेद आहेत. काही लोक महादेवाची व आपल्या हत्यारांची पूजा करतात, तर काही विश्वकर्म्याची पूजा करतात. [ट्रा. का. बाँ.; म. लो. सं.; लो. सा. रू.; पूना गॅझे.; सो. ला. रा.; सु. वि. को.; ग्लो. ट्रा. पं. नॉ. प्रॉ.; से. इं., १९५१]

मिकिर

एक आदिवासी जमात. आसाममधील शिवसागर, नौगांग, कामरूप, खासी टेकड्या, उत्तर काचार टेकड्या व मिकिर टेकड्या यांत या लोकांची वस्ती आहे. मिकिर हे नाव त्यांना आसामी लोकांनी दिलेले आहे. ते आपल्याला आर्लेंग असे म्हणतात.

या लोकांचा वर्ण पिवळट व गव्हाळ असून, ते मध्यम उंचीचे असतात. त्यांचे नाक रुंद व सपाट असते. ते शरीराने बळकट असून, न थांबता कित्येक मैल ओझी वाहून नेतात.

वेषभूषा – या लोकांचा पोषाख वैशिष्ट्यपूर्ण असतो. लाल पट्टे असलेल्या पांढऱ्या कापडाचा व बिनबाह्यांचा लांब कोट ते घालतात आणि आखूड धोतर नेसतात. डोक्याला ते पगडी घालतात. थंडीच्या दिवसांत ते अंगावर शाल घेतात. स्त्रिया परकर नेसतात व वरचा भाग उत्तरीयाने झाकतात. परकरावर त्या नक्षीदार कंबरपट्टा बांधतात. स्त्रिया व पुरुष केस मागे वळवून मानेवर त्यांचा अंबाडा बांधतात.

स्त्रिया कानात चांदीच्या सळया, सोन्याचांदीची कर्णभूषणे, गळ्यात माळा, हातात बांगड्या, अंगठ्या वगैरे अलंकार घालतात. सणासुदीला स्त्रीपुरुष आपल्या डोक्यात भीमराज नामक पक्ष्याची पिसे खोचतात. डाओ, भाला आणि धनुष्यबाण ही पुरुषांची हत्यारे आहेत.

मिकिर लोक स्वभावाने शांत असून, शेजारपाजारच्या नागा, कुकी, काचारी वगैरे बंडखोर टोळ्यांपासून अलग राहून ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शेती, शिकार, मासेमारी, इ. व्यवसाय करीत आले आहेत. सपाटीवरील प्रदेशात राहणारे मिकिर आसामी लोकांपेक्षा निराळे वाटत नाहीत. बाहेर ते असमिया भाषाच बोलतात आणि घरात मिकिर बोली बोलतात.



मिकिर स्त्री

घरे–यांची घरे मोठी असून, कुटुंबातील सर्व लोक एकत्र राहतात. जमिनीत खांब पुरून, त्यांच्यावर ते घर बांधतात. घरे बांबूच्या कामट्यांची असून छप्पर गवताचे असते. घराला अनेक खोल्या असतात. धान्य घरातच साठवतात. घरात बांबूच्या कामट्यांची एक चौपाई - आणि बांबूच्या निरनिराळ्या आकाराच्या टोपल्या व करंड्या असतात. धान्य, कपडे, अलंकार वगैरे त्यांत ठेवतात. घरात जाण्यासाठी खाचा पाडलेल्या एका फळीचा शिडीसारखा उपयोग करतात.

उद्योगधंदे – शेती हा या लोकांचा मुख्य उद्योग आहे. ते झूम पद्धतीने शेती करतात. भात हे मुख्य पीक असून, याशिवाय मका, कापूस, एरंडी ही पिकेही ते काढतात. एरी नामक रेशमाच्या किड्यांना पोसण्यासाठी ते एरंडीच्या पानांचा उपयोग करतात. मिकिर स्त्रिया घरातल्या मागावर सर्व कुटुंबियांसाठी कापड स्वतः विणतात. सुती किंवा रेशमी धागे त्या परसात उगवणाऱ्या निळीने रंगवतात. प्रत्येक गावात लोहाराचे एक दुकान असते. लोहार गावातल्या लोकांना हत्यारे व मासेमारीचे गळ बनवून देतो. मिकिर लोक स्वतः आपले सोन्याचांदीचे दागिने बनवतात. पण सांप्रत तयार दागिने विकत घेण्याकडे त्यांचा कल वाढू लागला आहे.

भात आणि मासे हे यांचे मुख्य अन्न आहे. कोंबड्या, डुकरे, बकरे, इ. पशूंचे मांसही ते खातात. तांदुळाची दारू हे त्यांचे आवडते पेय असून, दिवसातून केव्हाही ते पितात. पानसुपारी, तंबाखू, विडी, सिगारेट ही व्यसने त्यांना आहेत. काही लोक अफूही खातात.

मिकिर लोकांचे चिंगथांग, रोघंग व अमरी असे तीन पोटभेद आहेत. प्रत्येक पोटभेदात काही कुळे असून, त्यांपैकी इंग्टी, तेरंग, तेरॉन, तिमंग व इंघी ही कुळे प्रमुख आहेत. एकाच कुळात लग्नसंबंध होत नाही.

विवाहप्रथा – मुलींची लग्ने साधारणपणे पंधराव्या वर्षी व मुलांची अठराव्या वर्षी होतात. मुलाला एखादी मुलगी आवडली, की मुलगा आपल्या आईबापांना मुलीला मागणी घालण्यासाठी तिच्या घरी पाठवतो. त्या वेळी मुलीला अंगठी किंवा बांगडी देतात. तिने ती स्वीकारली, तर तिला हा संबंध पसंत आहे, असे समजतात. नंतर लग्नाचा दिवस ठरवतात. मधल्या काळात दोन्ही पक्ष समारंभासाठी मद्य तयार करतात. नवरामुलगा श्रीमंत असेल, तर तो लग्नाच्या वेळी जमलेल्या सर्व लोकांना मद्य देतो. तसेच वधूच्या गावी जाताना वाटेत जी गावे लागतात, त्या प्रत्येक गावात तो दारूचा एकेक भोपळा देतो. वधूच्या घरी पोचल्यावर वरपक्षाकडील मंडळी वधूपित्याला मद्याच्या दोन वाटल्या देतात. वधूपिता त्यांना, ही भेट का दिली? असे विचारतो. त्यावर वरपिता त्याला सांगतो, की माझी पत्नी आता म्हातारी झाली आहे. तिला काम करवत नाही. म्हणून आमच्या मुलाशी तुमच्या मुलीचे लग्न लावण्यासाठी आम्ही आलो आहो. त्यावर वधूपिता उत्तर देतो, की माझ्या मुलीला घरकाम येत नाही, की विणकाम येत नाही. मग कसे होणार? त्यावर वरपिता सांगतो, की काही हरकत नाही. आम्ही तिला हे सगळे शिकवू. एवढा संवाद झाल्यावर वधूची आई लग्नासाठी मुलीची संमती विचारते. काही वेळा मुलगी लगेच संमती देते, तर काही वेळा त्यासाठी खूप वेळ वाट पाहावी लागते. या मधल्या काळात दोन्ही पक्षांतील लोकांचे गीतांत सवालजवाब होतात. मुलीने संमती दिल्यावर वरपिता व वधूपिता दारू पितात. मग वधू आपल्या घरात वरासाठी शय्या तयार करते. मुलाला लाज वाटली, तर तो स्वतः तिथे न निजता त्याऐवजी त्या शय्येवर आपले कपडे ठेवतो. दुसऱ्या दिवशी वधूवर वरगृही जातात. वधूचे आईबापही तिच्या बरोबर असतात. तिथे सर्वांना जेवण देतात. आणि संध्याकाळी वधूचे आईवडील आपल्या घरी परततात. आईबापांना मुलगी जर एकटीच असेल,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तर ती सासरी न जाता नवराच तिच्या घरी राहायला येतो.

सर्वसाधारणपणे मिकिर पुरुष एकच पत्नी करतो. पण श्रीमंत पुरुष मात्र काही वेळा एकापेक्षा अधिक बायका करतात. या लोकांत घटस्फोटाचे प्रमाण अगदी कमी आहे.

मिकिर मुली

बापाची संपत्ती मुलांना मिळते. पण पत्नीला व मुलींना मात्र काहीही मिळत नाही.

देवधर्म – यांचे देव असंख्य असून, ते त्यांची निरनिराळ्या वेळी, निरनिराळ्या स्थानी आणि निरनिराळ्या प्रकारे पूजा करतात. यांच्या देवतांच्या मूर्ती नसतात किंवा मंदिरेही नसतात. अरनम केंथे हा त्यांचा श्रेष्ठ देव होय. तीन वर्षांनी एकदा त्याला डुकराचा बळी अर्पण करतात. पेंग ही त्यांची गृहदेवता असून, तिला दर वर्षी बकरा बळी देतात. गृहदेवता, समृद्धिदेवता व व्याधिदेवता असे देवतांचे तीन प्रकार त्यांनी मानलेले आहेत. या सर्व देवतांना ते कोंबडी किंवा बकरा अर्पण करून संतुष्ट राखतात. ज्या डोंगरावर हे लोक राहतात, तिथल्या देवतेलाही ते दर वर्षी बळी अर्पण करतात. त्या वेळी ते स्वतःच मंत्र म्हणतात. त्यासाठी त्यांना पुरोहिताची आवश्यकता भासत नाही.

भुताखेतांच्या प्रकोपामुळे किंवा माणसाने चेटूक केल्यामुळे आजारपण येते, अशी या लोकांची समजूत आहे. त्यासाठी ते मांत्रिकाला बोलावतात आणि उपाययोजना करतात.

सण-उत्सव – हे लोक अनेक सण व उत्सव साजरे करतात. दर वर्षी पेरणीपूर्वी प्रत्येक गावाचा उत्सव होतो. त्या वेळी कोंबडा किंवा बकरा बळी देतात. या वेळी नृत्य करीत नाहीत किंवा गाणीही गात नाहीत. कापणीच्या वेळी सर्व लोक एकमेकांना मदत करतात आणि धान्य घरी आणून टाकल्यावर सामुदायिक भोजन करतात.

मृतकप्रथा – हे लोक सर्वसाधारणपणे प्रेते जाळतात. मात्र लहान मुले, साथीच्या रोगाने दगावलेले आणि वाघाने मारलेले अशांची प्रेते पुरतात. यांचा अंत्यविधी बराच लांबलचक व खर्चिक असतो. मृत व्यक्ती श्रीमंत असल्यास घरी दारू बनवतात व भात कांडून खूप तांदूळ करून ठेवतात. चार–पाच दिवस चालणाऱ्या अंत्यविधीला पुरेशी दारू व तांदूळ तयार झाले, की रात्री गावातल्या तरुणांना बोलावतात. काहीजण ढोल वाजवतात व काही नृत्य करतात. दुसऱ्या दोन दिवशी सकाळीही तरुण जमतात व नृत्य करतात. पण या वेळी नृत्याला ढोलाची साथ नसते. तिसऱ्या दिवशी प्रेत स्मशानात बांधून नेण्यासाठी ते बांबूच्या काठ्या तयार करतात आणि स्मशानात चिता रचून ठेवतात. या दिवशी मृताच्या नावाने एक बकरा मारतात. मध्यरात्री गावकरी मशाली व ढोल घेऊन मृताच्या घरासमोर जमतात. तरुण–तरुणी चांगला पोषाख करून येतात व नृत्य करतात. रात्रभर नृत्य चालते. मग एक डुक्कर मारून जमलेले लोक ते शिजवून खातात. डुकराचे थोडे मांस मृतासाठी वेगळे शिजवतात व घरात ठेवलेल्या मृताजवळ नेऊन ठेवतात. मग मुलांना व मुलींना शिजवलेले मांस व भात देतात. तसेच मलांना दारू वाटतात. मग एक वृद्ध पुरुष प्रेत त्याच्याच कपड्यांत गुंडाळतो आणि ते बांबूला बांधतो. ढोल वाजवीत प्रेत



मिकिर लोकांचे घर

स्मशानात नेतात आणि जाळतात. प्रेत जळेपर्यंत तरुण मंडळी नृत्य करतात. अस्थी गोळा करून पुरतात. नंतर मृताच्या त्या थडग्यावर ठेवलेल्या शिळेवर मृतासाठी थोडे अन्न ठेवतात. एवढ्याने अंत्यविधी समाप्त होतो. [द्रा. आ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मिजी एक जमात. यांची वस्ती भारताच्या ईशान्य भागात आढळते. हे अका जमातीबरोबर रेशमाचा व्यापार करतात. व्यापारासाठी लागणारा माल हे भूतानमधून आणतात. हे अका जमातीचे मित्र असून, संकटप्रसंगी त्यांना मदत करतात. या दोन्ही जमातींत बेटीव्यवहार होतो. अकामध्ये अंकामिरी नावाची एक टोळी आहे. अंकामिरी व मिजी यांच्यांतही सलोख्याचे नाते आहे. पाहा– अका.

मिझो आसाममधील एक आदिवासी जमात. त्यांची वस्ती प्रामुख्याने मिझो टेकड्या या जिल्ह्यात आहे. या लोकांना अगदी अलिकडच्या काळापर्यंत लुशाई या नावाने ओळखत असत. लुशाई हा शब्द मिझो लोकांचा एक प्रमुख पोटभेद लुशेई या नावावरून आलेला आहे. मिझो शब्दाचा अर्थ पहाडी प्रदेशात राहणारा माणूस असा आहे. हे लोक मंगोलियन वंशाचे असून, ब्रह्मदेशातील चीन डोंगर या प्रदेशातून भारतात आले, असे अनेक विद्वानांचे मत आहे.

मिझो लोकांचे अनेक पोटभेद असून त्यांपैकी लुशेई, राल्टे, ह्मार व पोई हे प्रमुख आहेत. त्यांच्या वेगवेगळ्या बोली असून, त्यांच्यांत फारच थोडा फरक आहे. लुशेई लोक बोलत असलेली मिझो ही भाषा सर्व मिझो लोकांची अधिकृत मातृभाषा मानलेली असून, ती रोमन लिपीत लिहितात.

वेषभूषा – मिझो लोकांचा पोषाख पूर्वी फार साधा असे. सात फूट लांब आणि पाच फूट रुंद असे एक कापड ते खांद्यावरून अंगाभोवती गुंडाळीत. थंडीच्या दिवसांत ते आणखी एक वस्त्र त्यावरून गुंडाळीत. उन्हासाठी ते डोक्याला पागोटे बांधीत. काही वेळा, थंडीसाठी किंवा शेतात काम करताना डासांचा उपद्रव होऊ नये, म्हणून ते पांढऱ्या बाह्यांचा एक कोट घालीत. या बाह्यांवर नक्षी काढलेली असे.

स्त्रियाही पुरुषांसारखेच एक वस्त्र अंगाभोवती गुंडाळीत आणि कमरेपासून गुडघ्यांपर्यंत परकर नेशीत. परकर घट्ट राहावा, म्हणून त्याच्यावर कमरेभोवती दोरा किंवा पितळेचा पट्टा बांधीत. त्या अंगात पोलके घालीत. स्त्रियांच्या कपड्यांवर रंगीबेरंगी धाग्यांनी सुंदर आकृत्या काढलेल्या असत. पुरुषांचे व स्त्रियांचे सर्व सुती कपडे वनवण्यासाठी लागणारे कापड स्त्रिया घरच्या हातमागांवर विणीत आणि अजूनही विणीत असतात. त्यात त्या फार प्रवीण आहेत.

बाहेर जाताना मिझो पुरुष एक नक्षीकाम केलेली पिशवी खांद्याला अडकवतात. तीत तंबाखूची डबी, गारगोटी, धार लावायची पोलादी पट्टी असलेली लाकडी किंवा चामड्याची पेटी व पाईप एवढ्या वस्तू ठेवलेल्या असतात. प्रवासाला किंवा शेतात काम करायला जाताना पुरुष त्या पिशवीत शिदोरी ठेवतो आणि डाओ हे हत्यारही कोंबतो.

मिझो पुरुष

उन्हात व पावसात ते डोक्याला हॅट घालतात. ती बांबूच्या बारीक कामट्यांनी विणतात व आतल्या बाजूने तिला पाने शिवतात. स्त्रिया पावसात डोक्यावर इरले घेतात. कालमानपरत्वे त्यांच्या पोषाखात आता फरक पडला आहे.

मिझो स्त्रिया व पुरुष कर्णफुले वगळल्यास सारखेच दागिने घालतात. पुरुष कानांत लहानसा लाकडी गोल किंवा पिवळा स्फटिकमणी घालतात. स्त्रियाही सुरुवातीला कानात लाकडाचे गोलाकार तुकडे घालतात. मग त्याहून मोठ्या आकाराचे मातीचे गोलाकार तुकडे आणि नंतर हस्तिदंती चकती अडकवलेले वलय घालतात. स्त्रिया बहुधा हातांत बांगड्या घालीत नाहीत. स्त्रिया व पुरुष दोघेही गळ्यांत नकली खड्यांच्या माळा घालतात. स्त्रिया केस लांब वाढवतात.

स्त्रिया, पुरुष व मुलेही तंबाखू ओढतात.

घरे – घरे बांधण्यासाठी ते पाणी जवळ असलेली अशी डोंगरमाथ्यावरची जागा पसंत करतात. गावातील रस्त्याच्या दोन्ही बाजूना, समोरासमोर तोंड करून ते ओळीने घरे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बांधतात. घरे आकाराने चौकोनी असून, जमिनीत खांब पुरून त्यांवर बांधलेली असतात. त्या प्रदेशात वारंवार होणाऱ्या चक्री वादळातही ती टिकून राहतील, अशी भक्कम असतात. घराचा सांगाडा लाकडी खांबांचा असतो. भिंती बांबूच्या व छप्पर गवताचे किंवा पानांचे असते. जमीन घट्ट विणीच्या बांबूच्या चटयांची असते. प्रत्येक घराला गच्ची असते. तिथे कोंबडयांचे बांबूचे खुराडे, सरपण, उखळ व इतर आयुधे असतात. शिकारीत मारलेल्या जनावरांची मुंडकीही तिथेच टांगलेली असतात. घराच्या मध्यभागी चूल असते. तिच्या दोन्ही बाजूंना मुले व आईबाप झोपतात. घरात खोल्या नसतात. पूर्वी एक ठराविक धार्मिक विधी केलेल्या लोकांनाच घराला खिडक्या ठेवायची मुभा होती. पण त्याला फार खर्च येत असल्यामुळे तो सर्वसाधारण लोकांच्या आवाक्याबाहेर होता. तो न करता खिडक्या ठेवल्यास संकटे येतात, अशी समजूत होती. पण ख्रिस्ती धर्माने ही समजूत दूर केल्यामुळे आता बहुतेक सर्व घरांना खिडक्या असतात. घराच्या खालच्या जागेत गुरे व डुकरे असतात. घराशेजारी भाजीपाला पिकवतात.

उद्योगधंदे – शेती हा या लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. ते झूम पद्धतीने शेती करतात. तांदूळ हे इथले मुख्य पीक आहे. शिकार करणे आणि मासे पकडणे हे उद्योगही ते करतात.

मिझो लोक बांबूपासून आपल्याला लागणाऱ्या हरतऱ्हेच्या सुंदर टोपल्या विणतात. ओझी वाहणे, मौल्यवान वस्तू ठेवणे किंवा धान्य साठवणे, यांसाठी निरनिराळ्या आकाराच्या टोपल्या असतात. स्त्रिया घरात लागणारी मातीची भांडी स्वतःच हाताने बनवतात.

भात, भाज्या, मासे व मांस हे यांचे मुख्य अन्न होय. तांदुळापासून बनवलेले मद्य ते आवडीने पितात.

विवाहप्रथा – मुले व मुली स्वतःच आपला जोडीदार पसंत करतात. मुलाने एखादी मुलगी पसंत केली, की तो आपल्या मित्रामार्फत आपली पसंती आईबापांच्या कानावर घालतो. आईबाप मग एखाद्या नातेवाइकाला मध्यस्थ म्हणून मुलीच्या घरी धाडतात. मुलीला व तिच्या आईबापांना मुलगा पसंत असल्यास देजाच्या वाटाघाटी सुरू होतात. या वाटाघाटी जितक्या लांबतील, तितका शुभ शकून मानतात. देज ठरल्यावर मुहूर्त निश्चित करतात.

लग्नाच्या दिवशी जेवणावळ होते. त्या दिवशी लोक गीते गातात व दारू पितात. त्या दिवशी रात्री वधू आपल्या मैत्रिणींसह वरगृही जाते. तिथे तिचे चांगले आगतस्वागत करतात. नंतर ती पुन्हा माहेरी परतते आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा पतिगृही राहायला जाते. हल्ली काही वेळा, वधू दुपारीच एकदा वरगृही जाऊन परत येते व रात्री पुन्हा कायम राहण्यासाठी जाते.

देजाच्या रकमेपैकी काही भाग वधूपिता आपल्या नातेवाइकांना देतो. मुलीवर काही संकट आले, तर त्या वेळी त्यांनी मुलीच्या पाठीशी राहावे, ही त्यातून अपेक्षा असते.

पतीच्या निधनानंतर तीन महिने पत्नीने त्याच्या घरी राहिले पाहिजे, असा नियम आहे. त्यानंतर थ्लाहुअल नामक एक विधी केल्यावर ती दुसरे लग्न करायला मोकळी होते. पण ती जर पतीच्याच घरात राहिली आणि तिने दुसऱ्या पुरुषाशी संबंध ठेवला, तर तिला दंड होतो.

घटस्फोट अगदी सुलभ रीतीने मिळतो. 'मी तुला घटस्फोट देतो' एवढे शब्द पतीने उच्चारले, की त्याला घटस्फोट मिळतो. देजाची रक्कम नवऱ्याला परत केली, की स्त्रीलाही घटस्फोट मिळू शकतो.

संपत्तीचा वारसा सर्वांत धाकट्या मुलाकडे जातो. मोठे मुलगे कर्तेसवरते होऊन आपापल्या संसाराला लागलेले असतात. त्यामुळे धाकटा मुलगा म्हातारपणी आईबापांची काळजी अधिक चांगल्या प्रकारे घेऊ शकतो, अशी याच्यामागची कल्पना आहे. ग्रामप्रमुखाच्या बाबतीत मात्र त्याचा मोठा मुलगा त्याच्या संपत्तीचा वारसदार होतो कारण ग्राम प्रमुखाच्या सामाजिक जबाबदाऱ्या त्याला पार पाडायच्या असतात.

मिझो युवती

पूर्वी प्रत्येक गावावर एक प्रमुख नेमलेला असे व त्याची सत्ता त्या गावावर चाले. आपल्या सल्लामसलतीसाठी त्याने गावातल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जाणत्या वृद्धांची एक समिती नेमलेली असे. प्रमुखाचे हुकूम दवंडी पिटून सांगणारा एक पुरुष, लोहार व एक पुरोहित असे तीन लोक ग्रामप्रमुख नेमीत असे. त्यांच्या कामाबद्दल त्यांना वर्षाकाठी प्रत्येक घरातून थोडे भात मिळत असे.

ग्रामप्रमुखाला वर्षाकाठी घरटी एक मण भात मिळे. तसेच गावकऱ्याने केलेल्या प्रत्येक शिकारीचा थोडा भागही त्याला मिळे. त्याचे बरेच मोठे घर गावकऱ्यांना बांधून द्यावे लागे. त्याला नको असलेला कोणताही इसम गावाबाहेर घालवून देण्याचा त्याला अधिकार होता. गावकऱ्यांनाही दुसऱ्या एखाद्या गावाच्या प्रमुखाच्या संमतीने आपले गाव सोडून त्या गावी राहायला जायचा अधिकार होता. सांप्रत प्रत्येक गावावर ग्रामपंचायतीचा अधिकार चालतो.

देवधर्म – पूर्वी हे लोक भुताखेतांची पूजा करीत असत. भुतांचे चांगले आणि वाईट असे दोन प्रकार ते मानीत. त्यांच्यापैकी सर्वोच्च भुताला ते पथिअन असे म्हणत व ते सृष्टी निर्माण करते, असे मानीत. भुताखेतांच्या प्रकोपामुळे आजारपण येते, अशी या लोकांची समजूत होती. त्यामुळे कोणी आजारी पडले असता, ते भुताखेतांना पुरोहिताकरवी कोंबडे, बकरे किंवा डुक्कर यांचा बळी देऊन संतुष्ट करीत. मृतात्मे दुसऱ्या एका निराळ्या जगात राहतात, अशी यांची समजूत होती. बहुसंख्य मिझो लोकांनी आता ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे आणि त्यामुळे त्यांच्या देवाधर्माविषयींच्या पूर्वीच्या श्रद्धा आता लोप पावल्या आहेत.

मृतकप्रथा – हे लोक बहुधा मृतांना पुरतात. माणूस मरतो, तेव्हा त्याचा आत्मा मस्तकातून रिह नामक तळ्याकडे जायला निघतो, अशी या लोकांची समजूत आहे. ब्रह्मदेशातील चीन डोंगरामध्ये हे तळे आहे. पण मृतात्मा तिथून लगेच परततो आणि आपल्या मूळ गावाच्या किंवा घराच्या आसपास येऊन जवळजवळ तीन महिने राहतो, असे हे लोक मानतात. म्हणून तीन महिनेपर्यंत मृताची कुटुंबीय मंडळी जेवायच्या वेळी मृताच्या नावाने एक पान मोकळे सोडतात किंवा मृतासाठी घराच्या दारात थोडे अन्न वाढून ठेवतात. तीन महिन्यांनंतर मृताचे कुटुंबीय त्याच्यासाठी तिथिन नामक एक विधी करतात आणि त्यामुळे मृतात्मा परलोकी गेला असे समजतात. पण ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्यापासून त्यांच्यांतून आता अशा कल्पना नाहीशा होत चालल्या आहेत. [ट्रा. आ.]

मिताक्षरी

एक सांकेतिक भाषा. प्रियकर व प्रेयसी परस्परांना गुप्त संदेश पाठवण्यासाठी हिचा उपयोग करतात. हिच्या संबंधीचा नियम पुढीलप्रमाणे आहे –

अकौ खगौ घङश्चैव चटौ तपौ परस्परौ ।
यशौ रषौ लसश्चैव हवाळाक्षं मिताक्षरी ॥

अ साठी क, क साठी अ ची बाराखडी; त्याचप्रमाणे ख-ग, घ-ङ., च-ट, त-प, य-श, र-ष, ल-स, ह-व, ळ-क्ष, ... वर्णव्यत्यास केल्याने मिताक्षरी भाषा तयार होते. 'आज संध्या-काळी आपण दोघे बागेत फिरायला जाऊ' यावद्दल मिताक्षरी भाषेत पुढील रचना होते – काड लंस्याआक्षीं कातज बोहे दाहे... थिषाशसा डाकूं.

कथासरित्सागरात अशा तऱ्हेच्या सांकेतिक भाषांचे उल्लेख आढळतात. [ओ. ऑ. स्टो. १]

मित्र

एक वैदिक देवता. मित्र शब्दाची व्याख्या यास्काने दिली आहे, ती अशी – 'प्रमीतेः त्रायते । संमिन्वानः द्रवति इति वा' = मरणापासून तारणारा किंवा पाण्याने भिजवीत अंतरिक्षात धावत जाणारा तो मित्र होय. मित्र हा नेहमी वरुणाशी संबंधित असलेला आढळतो. ऋग्वेदात केवळ एकच सूक्त एकट्या मित्राला उद्देशून आहे (३.५९). या सूक्तात त्याची ... स्तुती आहे, ती त्याच्या गुणांचे स्पष्ट वर्णन करणारी नाही. ... मारून तो लोकांना एकत्र करतो आणि शेत पेरणाऱ्यांकडे अनिमिष नेत्रांनी पाहत असतो. तो पूतदक्ष अर्थात पुण्यकर्मात कुशल आहे. तो माणसांना उद्यमशील बनवतो. तो आकाश व पृथ्वी यांचे पोषण करतो. पंचजन त्याची आज्ञा पाळतात. तो ... देवांचा आश्रयदाता आहे. विष्णू आपली तीन पावले मित्राच्या नियमानुसार ठेवतो. तो सूर्यमार्गाचे नियमन करतो.

सूर्यमार्गाचे नियामकत्व या गुणावरून ब्राह्मणग्रंथात मित्राचा दिवसाशी व वरुणाचा रात्रीशी संबंध कल्पिलेला आहे. ... विधिविषयींच्या वाङ्मयामध्ये मित्राला पांढरा आणि वरुणाला काळा पशू सांगितला आहे, यावरूनही मित्र दिवसाचा व वरुण रात्रीचा देव मानला जात होता, हे स्पष्ट होते.

वैदिक वाङ्मयात मित्र ही सूर्यदेवता आहे, असा जो अन्तर्गत पुरावा मिळतो, त्याला अवेस्त्यामध्ये पुष्टी मिळते. इराण, बाबिलोन, इ. देशांत मिथ्र नावाने सूर्यपूजा चालत होती. वेदात जसे मित्रावरुण तसेच अवेस्त्यात अहुर-मिथ्र नित्य संबद्ध आहेत. अहुर व वरुण यांचे बरेचसे गुण समान आहेत.

डॉ. केतकर लिहितात – मित्र ह्या शब्दाची व्युत्पत्ती संदिग्ध आहे. ऋग्वेदामध्ये मित्र या शब्दाचा अर्थ सुहृद असा कित्येक स्थळी आहे. मित्र देवाचा दयाळूपणा (सौहृद) जागजागी वर्णिलेला आहे. मित्र हा शांततेचा देव आहे असेही विधान ... (तै. सं. २.१.८), यावरून आणि अवेस्त्यामध्ये मित्राची ... बाज वर्णन करताना, तो विश्वासूपणाचा संरक्षक आहे ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्णन आहे, यावरून मित्र या शब्दाचा मूळ अर्थ स्नेही किंवा सुहृद असून, पुढे सूर्यदेवाची निसर्गातील वस्तुजातावर कृपा करणारी सत्ता पाहून त्याला हे नाव दिले असावे, असे मानण्यास जागा आहे.

मग लोकांचा इष्ट देव सूर्य होता. ते लोक मित्र या नावाने सूर्याची उपासना करीत होते. मित्र शब्द प्राचीन पर्शियन भाषेत मिथ्र झाला आहे. मिथ्राचेच परिवर्तित रूप मिहिर होय. मार्कंडेय पुराणातही (१०७.७) मिहिर या नावाने सूर्याची स्तुती केलेली आहे.

असीरिअन मेतृ शब्दही मित्राचाच पर्याय आहे. त्या देशात मेतृ हा जलद गतीने पाऊस आणणारा आणि धान्यसमृद्धी करणारा देव आहे. प्रारंभी दिलेल्या व्याख्येतही या अर्थाचा अंश आहेच. पाहा– मित्रावरुण. [वै. मा.; सिं. भा. सं. प.; इं. मि. ली.; म. ज्ञा. को.; वै. सा. सं.]

मित्रमिश्र (इ. स. चे १६ वे व १७ वे शतक) एक विद्वान निबंधकार. हा ओरछाचा राजा श्रीवीरसिंहदेव याच्या आश्रयाला राहिला होता. मित्रमिश्राचे पूर्वज गोपाचलमंडलाचे (ग्वाल्हेर) निवासी होते. याच्या पित्याचे नाव परशुराम मित्र असे होते. मित्रमिश्राने आपल्या पांडित्याविषयी स्वतःच गौरवपूर्ण आणि काहीसे अतिशयोक्तिपूर्ण लिहून ठेवले आहे.

मित्रमिश्राने वीरसिंहदेवाच्या प्रेरणेने वीरमित्रोदय नावाचा एक विशाल धर्मनिबंध लिहिला. हेमाद्रीच्या चतुर्वर्गचिंतामणी या निबंधापेक्षा हा ग्रंथ लहान आहे; पण लोकप्रियता व व्यावहारिक उपयोग या दोन्ही दृष्टींनी हा निबंध चतुर्वर्गचिंतामणीहून अधिक महत्त्वपूर्ण आहे. आपल्या आश्रयदात्या श्रीवीरसिंहदेव राजाचे नाव त्याने या निबंधाच्या नामकरणात प्रारंभी घातले आहे.

या निबंधाच्या विभागांना प्रकाश असे नाव आहे. त्याचे बावीस प्रकाश उपलब्ध झाले आहेत. परिभाषा, संस्कार, आह्निक, पूजा, प्रतिष्ठा, राजनीती, व्यवहार, शुद्धी, श्राद्ध, तीर्थ, दान, व्रत, समय, ज्योतिष, शांती, कर्मविपाक, चिकित्सा, प्रायश्चित्त, प्रकीर्ण, लक्षण, भक्ती व मोक्ष अशी त्यांची नावे आहेत. या नावांवरूनच त्याच्या निबंधाची व्याप्ती कळून येते. त्याने धर्मशास्त्राच्या सर्व अंगोपांगांचा आवश्यकतेनुसार प्रपंच केला आहे. आपला निबंध सजविण्यासाठी त्याने श्रुती, स्मृती, रामायण, महाभारत, पुराणे, इ. साहित्यातील वचनांचा व विवेचनांचा आश्रय घेतला आहे.

मित्रमिश्र हा अनेक शास्त्रांचा प्रकांड पंडित तर होताच; त्याव्यतिरिक्त वैदिक वाङ्मयावरही त्याचा अधिकार होता. प्रसंगवशात त्याने वेदमंत्राच्या ज्या व्याख्या केल्या आहेत, त्यांवरून त्याचा हा अधिकार कळून येतो. मित्रमिश्राची विवेचनशैली सरळ आणि सुबोध आहे. त्याला पांडित्यप्रदर्शनाची हौस नाही. आपला निबंध वाचकांना सुबोध होऊन उपयुक्त ठरावा, हा उद्देश त्याने कधीही डोळ्यांआड केला नाही. महाभारताएवढ्या विस्ताराचा हा निबंध म्हणजे धर्मशास्त्राचा एक धर्मकोशच आहे. मित्रमिश्राला त्याबद्दल यथार्थ अभिमानही आहे. आह्निकप्रकाशाच्या ३९ व्या श्लोकात तो म्हणतो –

> मा कुर्वन्तु मुधा बुधा परिचयं ग्रन्थेषु नानाविधे–
> ष्वत्यन्तं न हि तेषु सर्वविषयः कश्चित् क्वचिद् वर्तते ।
> पश्यन्तु प्रणयादनन्यमनसो ग्रन्थं मदीयं त्विमम्
> धर्माधर्मसमस्तनिर्णयविधिर्यस्मिन् दरीदृश्यते ।।

अर्थ –विद्वानांनी नानाविध ग्रंथांच्या अभ्यासाचा व्यर्थ प्रयत्न करू नये. कारण अशा कोणत्याही ग्रंथामध्ये धर्माचे सर्व विषय सांगोपांग विवेचलेले आढळणार नाहीत. म्हणून इतर सर्व निबंधकारांकडे दुर्लक्ष करून जिज्ञासूंनी माझा हा ग्रंथ प्रेमाने वाचावा. यात धर्माधर्मविषयक सर्व निर्णय आढळतील.

याच विशाल ग्रंथाचा एक प्रकाश राजनीतीवर आहे. राजनीती किंवा राज्यशास्त्र हे धर्मशास्त्राचेच एक अंग आहे, असे मित्रमिश्र मानतो. त्याने या प्रकाशात राजशब्दार्थविचार, राजप्रशंसा, राज्याभिषेक, राजगुण, राजदोष, राजदंड, कोश, मित्र, उपाय, अभियान, सैन्य, युद्धाची पूर्वकृत्ये, इ. सर्व राजकीय अंगांचा विचार केला आहे. शिवाय प्राचीन भारतीय राज्यशास्त्रासंबंधी सर्व विषयांचे निरूपणही व्यवस्थित केले आहे. लक्ष्मीधर, नीलकंठ, अनंतदेव, चंडेश्वर, इ. अनेक राज्यशास्त्रीय निबंधकार मित्रमिश्राच्या आगेमागे होऊन गेले. पण मित्र मिश्राचे स्थान या सर्वांच्या वरचे आहे. त्याचा हा निबंधही भारतीय राज्यशास्त्राचा ज्ञानकोशच आहे.

मित्रमिश्राने सर्वप्रथम राजा या शब्दाच्या अर्थाचे विशेष विवेचन केले आहे. बहुतेक निबंधकार राजा हा शब्द क्षत्रियवर्णाचा पर्याय शब्द मानतात. पण मित्रमिश्र या मताचा नाही. तो म्हणतो–

> राज्यं तु जनपदपरिपालनम् । राजशब्दो यस्मिन्कस्मिश्चित् प्रजापालके वर्तते । नृप इति न क्षत्रियमात्रस्यायं धर्मः । किन्तु प्रजापालने अधिकृतस्य अन्यस्यापि ।

अर्थ – जनपद म्हणजे देश; त्याचे परिपालन म्हणजे राज्य होय. जो कोणी प्रजापालक असेल त्याला राजा म्हणावे.

राजा याचा अर्थ केवळ क्षत्रियाचाच तो धर्म असा नाही, तर प्रजापालनाच्या ठिकाणी अधिकृत असलेला कोणत्याही वर्णाचा मनुष्य राजा या नावाने ओळखला जातो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मित्रमिश्राच्या मतानुसार प्रजापालनाचे अधिकार मिळविणारे, देशाच्या राज्यघटनेतले मंत्री हेही राजेच ठरतात. राजा हा दीर्घदर्शी, उत्साही, शक्तिमान, त्यागी, दुसऱ्यांच्या गुणांची कदर करणारा, कुशल, दक्ष, इंद्रियविजयी व प्रजाप्रिय असावा, त्याला द्रव्याची व कीर्तीची हाव नसावी, व्यसने नसावी आणि आजचे काम उद्यावर ढकलून कशीबशी वेळ मारून नेण्याची त्याची वृत्ती नसावी. त्याचे धोरण कचखाऊ नसावे.

मित्रमिश्र हा स्वतंत्र व सडेतोड विचारांचा आहे. याज्ञवल्क्याचा टीकाकार विज्ञानेश्वर हा धर्मशास्त्रातला मान्यवर अधिकारी समजला जातो. बरेचसे निबंधकार विज्ञानेश्वराला अनुसरतात; पण मित्रमिश्र मात्र कित्येक प्रसंगी त्याला शाब्दिक टोले हाणायला कमी करीत नाही.

मित्रमिश्राच्या या वीरमित्रोदय ग्रंथाच्या प्रामाण्याविषयी म. म. काणे लिहितात, ते असे – हिंदुकायद्याच्या वाराणसीपंथामध्ये वीरमित्रोदयाला मोठे प्रामाण्य आहे. पूर्वीच्या प्रीव्ही कौन्सिलने असे मत दिले आहे, की विज्ञानेश्वराच्या मिताक्षरा टीकेत जी बाब संशयास्पद असेल, त्या बाबीत वीरमित्रोदयाचे मत प्रमाण मानावे. दायभाग ग्रंथात जिचा उल्लेख नसेल त्या बाबीत वीरमित्रोदयाच्या मताला मान्यता द्यावी असे बंगालच्या न्यायालयाचेही मत आहे.

पश्चिम भारतात वीरमित्रोदयाला व्यवहारमयूखापेक्षा कमी प्रामाण्य आहे. दक्षिण भारतात विज्ञानेश्वराच्या ग्रंथावरील स्मृतिचंद्रिकेला सर्वांहून अधिक प्रामाण्य असले, तरी वीरमित्रोदयाच्या मताला मान आहे. कारण पूर्वीच्या धर्मशास्त्रीय ग्रंथांत पुष्कळ विषय गळलेले आहेत. अनेकांनी जे अनेक विषय गाळले, त्यांची पूर्तता वीरमित्रोदय या ग्रंथात केलेली आहे.

वीरमित्रोदयाव्यतिरिक्त याज्ञवल्क्यस्मृतीवरील टीका, आनंदचंपू, इ. अन्य काही ग्रंथही मित्रमिश्राने लिहिले आहेत. [हि. ध.; आ. सं. मू.; भा. रा. प्र.]

मित्रविंदेष्टी एक इष्टी. मित्र व राष्ट्र हे अनुकूल व्हावे म्हणून ही इष्टी करतात. कात्यायन श्रौतसूत्रांमध्ये ही इष्टी सांगितली आहे (५·१२). आश्वलायन श्रौतसूत्रांत या इष्टीला महावैराजी असे नाव आहे. अग्नी, सोम, वरुण, मित्र, इंद्र, बृहस्पती, सविता, पूषा, सरस्वती व त्वष्टा या दहा देवतांसाठी निरनिराळे हवी तयार करणे व प्रधान यागाच्या वेळी सर्व हवींमधून एकत्र अवदान घेऊन सर्व देवतांसाठी एकदाच याग करणे, असा याचा विधी सांगितलेला आहे. या इष्टीचे सर्व तंत्र दर्शपूर्णमासेष्टीप्रमाणे आहे. पाहा – दर्शपूर्णमास. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

मित्रसप्तमी एक तिथिव्रत. मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीला हे नाव आहे. सूर्य ही या व्रताची देवता होय. षष्ठीच्या दिवशी सूर्याच्या मूर्तीला स्नान घालणे, सप्तमीला केवळ फलाहार करणे, सूर्याची विविध प्रकारच्या फुलांनी पूजा करणे, कणकेच्या पदार्थांचा नैवेद्य दाखविणे, गरीब व निराधार ब्राह्मणांना भोजन घालणे व रात्री जागरण करणे, असा याचा विधी आहे.

ही तिथी हा गंगेचा जन्मदिवसही मानतात. या दिवशी गंगा विष्णूच्या चरणापासून उगम पावली आणि शंकराच्या मस्तकावर पडली. शिवभक्त या दिवशी शक्य तो गंगाजलाने शिवलिंगाला स्नान घालतात. [हि. ध.; श. क.]

मित्रावरुण मित्र आणि वरुण या दोन देवता मिळून बनलेली जोडदेवता. द्यावापृथिवी या देवतायुग्माच्या खालोखाल या देवतायुग्माचा क्रमांक लागतो. मित्र आणि वरुण या दोघांना आवाहन करणारी जेवढी सूक्ते ऋग्वेदात आहेत, त्यापेक्षा या जोडदेवतेची सूक्ते अधिक आहेत. मित्राची वैयक्तिक वैशिष्ट्ये विशेष उल्लेखनीय नाहीत, म्हणून एकट्या वरुणाचे जे गुणविशेष, तेच या युग्मावर आरोपित केले गेले आहेत. यांच्या विषयीची एक ऋचा अशी –

प्र बाहवा सिसृतं जीवसे न आ नो गव्यूतिमुक्षतं घृतेन।
आ नो जने श्रवयतं युवाना श्रुतं मे मित्रावरुणा हवेमा॥
(ऋ. ७·६२·५)

अर्थ – मित्रावरुणांनो, आमचा जीवनक्रम उत्तम चालावा म्हणून तुम्ही आपले बाहू (आमच्या साहाय्यार्थ) पुढे करा; आमच्या धेनूंच्या तृणाच्छादित भूमीवर उदकवर्षाव करा. तारुण्याच्या देवांनो, आमची कीर्ती जगात पसरेल असे करा व आम्ही जो तुमचा धावा करतो, त्याच्याकडे अवश्य लक्ष द्या.

या यौगिक शब्दात मित्र नाम पहिले आहे, त्याचे कारण असे असू शकेल, की मुळात हाच अधिक योग्यतेचा देव असावा. कदाचित यौगिक शब्दात कमी अक्षराचे नाव प्रथम घालण्याची प्रवृत्ती असल्यामुळेही मित्र शब्द प्रथम घातला असेल. मित्रावरुण ही इराणी व भारतीय आर्य एकत्र असलेल्या काळातली देवता असावी. कारण अवेस्त्यातही अहुर (वरुण) व मिथ्र या देवतांचे युग्म कल्पिले गेले आहे.

महाभारतामध्ये मित्रावरुणांना पुरुष-प्रकृती म्हटले आहे. अथर्ववेदात मित्राचा प्रातःकालाशी व वरुणाचा सायंकालाशी संबंध जोडलेला आहे. रात्री ज्या चराचराला वरुण झाकून टाकतो त्याला प्रातःकाली मित्र अनावृत करतो (अथर्व. ९.३.१८). मित्रावरुणांच्या व्रतांना मनुष्य, अग्नी, सूर्य, आदित्य,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नद्या, इ. सगळे मान देतात. परावाणी ही मित्रावरुणांच्या सदनातून उत्पन्न झाली, असे आगम – ग्रंथात म्हटले आहे.

मित्रावरुण हे परमात्म्याचे अंडकोश होत, असे भागवतात सांगितले आहे (२.१.३२). उर्वशी दृष्टीस पडताच मित्रावरुणांचे वीर्य एका घटात पडले व त्यातून मित्राच्या अंशाने वसिष्ठव वरुणाच्या अंशाने अगस्त्य जन्माला आले. उर्वशीमुळे आपले स्खलन झालेले पाहून मित्रावरुणांना विषाद वाटला व त्यांनी 'तुला मनुष्यजन्म घ्यावा लागेल' असा शाप उर्वशीला दिला (भाग. पु. ९.१४.१७).

संतानप्राप्तीच्या इच्छेने प्रजापतीने मित्रावरुणासाठी यज्ञ केला, त्या वेळी यज्ञकुंडातून इला नामक कन्या निर्माण झाली. काशीत मित्रावरुणसंज्ञक दोन शिवलिंगे असून, त्यांची पूजा केल्याने त्या देवतांचे लोक प्राप्त होतात, असे सांगितले आहे. [वें. मा.]

मिथिला भारताच्या पूर्व भागातील एक प्रदेश. मिथिला हे त्या देशाचे आणि त्यातील नगरीचेही नाव होते. सांप्रत ज्याला जनकपूर म्हणतात तीच पूर्वीची मिथिला नगरी होय. हे जनकपूर एक लहानसे शहर असून, ते नेपाळच्या सीमा प्रदेशात येते अंग देशाची राजधानी चंपा हिच्यापासून जनकपूर साठ योजने लांब होते, असे जातकात म्हटले आहे.

मिथिलेच्या चतुःसीमा कोणत्या ते वृहद्–विष्णू पुराणाच्या मिथिलाखंडात सांगितले आहे, ते असे –

कौशिकीं तु समारभ्य गण्डकीमधिगम्य वै ।
योजनानि चतुर्विंश व्यायामः परिकीर्तितः ।।
गङ्गाप्रवाहमारभ्य यावद् हैमवतं वनम् ।
विस्तारः षोडशः प्रोक्तो देशस्य कुलनन्दन ।
मिथिला नाम नगरी तत्रास्ते लोकविश्रुता ।।

अर्थ – एका अंगाने कौशिकी नदी व दुसऱ्या अंगाने गंडकी नदी. या दोन नद्यांमधला २४ योजने म्हणजे ९६ कोसांचा प्रदेश, गंगानदीच्या तीरापासून हिमालयाच्या तराईपर्यंतचा १६ योजनांचा म्हणजे ६४ कोसांचा प्रदेश, एवढा सगळा भूविस्तार म्हणजे मिथिलेचे राज्य असून, त्या राज्याची लोकविश्रुत राजधानी म्हणजे मिथिला नावाची नगरी होय.

काही विद्वानांच्या मते मिथिला हा शब्द मिथ् म्हणजे युग्म यावरून बनला आहे. या उत्पत्तीला इतिहासात प्रमाण सापडते, ते असे–नाभाग वंशाच्या विशाल नामक राजाने आपल्याच नावावरून वैशाली नावाची एक नगरी स्थापली होती. पण कालांतराने त्याची शक्ती घटली व विदेहाच्या राजांनी वैशाली जिंकून ती आपल्या राज्यात समाविष्ट केली. मग त्या दोन्ही देशांची मिळून मिथिला ही राजधानी बनली.

पुढच्या काळात मिथिलेला तीरभुक्ती म्हणू लागले. त्या शब्दाचा अर्थ नदीतीरसंबंधित प्रदेश असा आहे. पश्चिमेला गंडकी व पूर्वेला कौशिकी या दोन नद्यांच्या तीरांनी मर्यादित केलेली भूमी ती तीरभुक्ती होय. त्या शब्दाचा अपभ्रंश म्हणजे तिरहुत. हाच अपभ्रंश सध्या रूढ आहे. सांप्रत बिहारमधल्या दरभंगा, मुजफ्फरपूर, सारन व चंपारण या जिल्ह्यांना तिरहुत म्हणूनच ओळखतात.

मिथिला प्रदेशात आर्य संस्कृतीची मुहूर्तमेढ कशी रोवली गेली, याविषयीची एक कथा शतपथ ब्राह्मणात सांगितली आहे, ती अशी –

कोण्या एका काळी हा सारा प्रदेश म्हणजे नुसती दलदल होती. अग्नीने त्या भूमीला कधी स्पर्शच केला नव्हता. पण एके दिवशी कालचक्राने पलट खाल्ली आणि त्या भूमीचा ललाटलेख उजळला. विदेघ माथव या सरस्वतीच्या तीरावरच्या राजाला यज्ञीय अग्नी लपवून ठेवण्याची इच्छा झाली. त्याने तो अग्नी आपल्या मुखात लपवला. गौतम रहूगण हा त्याचा पुरोहित आहुती देण्यासाठी यज्ञशाळेत येतो, तर अग्निकुंड शांत झालेले. गौतमाने राजाला त्याविषयी विचारले; पण मुखात अग्नी असल्याने तो काही बोलू शकेना. मग गौतमाने वेदांतल्या सूक्तांनी अग्नीचे स्तवन आरंभिले. त्या सूक्तात घृत हा शब्द येताच अग्नी लालचावला व राजाच्या मुखातून बाहेर पडला. पण घृत कुठेच न दिसल्याने यज्ञकुंडात न शिरता त्याने सरळ पूर्व दिशेचा रस्ता धरला. त्याला धरण्यासाठी विदेघ माथव व गौतम रहूगण दोघेही त्याच्या मागून पळू लागले. अग्नी आपल्या मार्गातली भूमी जाळीत, वहाळ-वोहोळ आटवीत आणि नदीनाले सुकवीत चालला. शेवटी त्याला सदानीरा नदी आडवी आली. ती त्याला आटवता आली नाही, त्यामुळे अग्नी तिथेच थांबला. अग्नीच्या स्पर्शामुळे तेवढ्या प्रदेशातली दलदल सुकली. तिथली भूमी उत्पादनक्षम बनली. मग अग्नीने विदेघ माथवाला आज्ञा केली· "तू इथे वस्ती करून तुझे राज्य निर्माण कर. ही भूमी धनधान्यसमृद्ध बनव." विदेघ माथवाने ती आज्ञा मानली. तिथे त्याने एका समृद्ध व उत्कर्षाभिमुख अशा विदेह जनपदाची स्थापना केली (श. ब्रा. १.४.१.१०–१७).

गौतम रहूगण हा त्या नवनिर्मितीच्या कार्यातही त्याचा पुरोहित बनला. त्याच्या मागून अनेक ऋषीमुनीही त्या प्रदेशात आले. तिथले वातावरण वेदमंत्रांनी दुमदुमून गेले. तिथे यज्ञसंस्थाही निर्माण झाली आणि तिच्या अनुषंगाने भारताचा हा पूर्वप्रदेश आर्यसंस्कृतीच्या कक्षेत समाविष्ट झाला.

याच विदेघ माथवाच्या वंशात निमी नावाचा एक राजा झाला. त्याने आपले राज्य बरेच वाढवले; अनेक यज्ञही केले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असाच त्याचा एक यज्ञ चालू असता, तो पुरा होण्याच्या आतच वसिष्ठशापाने त्याचा मृत्यू ओढवला. पण त्याला पुत्र संतान नसल्यामुळे राज्याला कोणी वारस उरला नाही. म्हणून मग ऋषींनी निमीच्या देहाचे मंथन केले. त्यातून एक सुलक्षणी पुत्र निर्माण झाला. मंथनातून जन्मला म्हणून त्यांनी त्याचे नाव मिथी ठेवले. त्याने आपला राज्यविस्तार बराच केला आणि आपल्या त्या विशाल राज्यासाठी मिथिला नावाची एक नवी राजधानीही उभारली. या मिथीलाच एका नव्या नगरीचा जनक म्हणून जनक हे नाव पडले. याच्या पुढचे मिथिलेचे सर्व राजे जनक या नावानेच पुराणांत उल्लेखिलेले आहेत.

मिथिला नगरी सुरेख, सुंदर, सुबद्ध व चार महाद्वारांची होती, असे तिचे वर्णन रामायणात आहे. मिथिलेतील लोक निरोगी व आनंदी वृत्तीचे असून ते अनेक उत्सव-समारंभ साजरे करीत, असे महाभारतात म्हटले आहे (वन. २०६.९) बुद्धाच्या काळी व्यापारी उलाढाली करून या प्रदेशातले लोक श्रीमंत बनले होते. श्रावस्तीहून अनेक व्यापारी आपला माल घेऊन मिथिलेत विक्री करण्यासाठी येत.

मिथिलेच्या राजवंशात जनकाचा मान फार मोठा आहे. तो अध्यात्मदर्शनात पारंगत होता आणि आत्मानुभवीही होता. व्यासपुत्र शुक याला अध्यात्मज्ञान मिळवण्यासाठी मिथिलेत येऊन जनकाचे पाय धरावे लागले, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. त्याने आपली राजधानी म्हणजे जणू एक विद्यानगरीच बनवली. इतिहास, व्याकरण, न्याय इ. अनेक शास्त्रांत पारंगत असलेल्या पंडितांना जनकाने राजाश्रय दिला होता.

बौद्ध व जैन धर्मांच्या इतिहासातही मिथिलेला स्थान आहे. बुद्ध या नगरीत काही वेळा आला होता. इथल्या मरवादेवाच्या आम्रवनात वसती केल्यावेळी त्याने ब्रह्मायू नावाच्या एका आचार्याला धर्माची दीक्षा दिली होती.

वर्धमान महावीरही अनेकदा मिथिलेत येत असे. मिथिला हे महावीराचे आजोळच होते. जैन व बौद्ध यांच्या नंतरच्या काळात तंत्रविद्येने मिथिलेत प्रवेश केला. मैथिली लोक तांत्रिक उपासनेच्या मार्गाला लागले. उग्रतारा ही बौद्ध तंत्रांतली एक महत्त्वाची देवता आहे. भारतानले तिचे एकुलते एक मंदिर मिथिलेतच आहे. ही मूर्ती चीनमधून तिबेटच्या मार्गाने मिथिलेत आणून स्थापन केलेली आहे.

मिथिलेची विद्यापरंपरा गौतम रहूगणापासूनच सुरू होते. तो सूक्तद्रष्टा आणि महाज्ञानी होता. मीमांसा, सांख्य, न्याय, ज्योतिष, आगम, व्याकरण, इ. शास्त्रांतले प्रकांड पंडित मिथिलेत गाजून गेले. भारताच्या पूर्व भागात पंडिती परंपरेसाठी मिथिलेलाच अग्रमान द्यावा लागेल. न्यायशास्त्रात गंगेशोपाध्याय यांनी एक नवा संप्रदाय स्थापन केला, तो मिथिलेतच हाच संप्रदाय इथून पुढे बंगालमधल्या नवद्वीपात गेला आणि ख्याती पावला. डॉ. तेजनारायण लाल यांनी आपल्या 'मैथिली लोकगीतों का अध्ययन' या ग्रंथात मिथिलेच्या विद्यापरंपरेविषयी आणखी काही लिहिले आहे, ते असे –

विश्वामित्र हा गायत्री मंत्राचा द्रष्टा याच भागातला होता. कौशिकी हे तिथल्या नदीचे नाव त्याच्या कुलावरूनच पडले आहे. स्मृतिकार याज्ञवल्क्य इथल्या कुसुमा या गावी राहत असे. सांख्यदर्शनकार कपिलमुनी याचा आश्रम दरभंगा जिल्ह्यातल्या ककरौड या गावी होता. प्रख्यात विद्वान उदयनाचार्य हाही याच जिल्ह्यातल्या करिअन या गावचा रहिवासी होता. वाचस्पती मिश्र हा प्रख्यात वेदान्ती झंझारपुर या गावी राहत असे. पूर्वमीमांसेचा प्रणेता जैमिनी हाही मिथिलावासीच होय. याव्यतिरिक्त शवरस्वामी, कुमारिलभट्ट, पक्षधर मिश्र, मुरारी इ. अनेक प्रकांड पंडित मिथिलेत होऊन गेले. दार्शनिक जगात त्यांनी मिथिलेची कीर्ती अजरामर करून टाकली.

इ. स. ११०० ते १५०० या कालखंडात मिथिलेमध्ये एक विद्यापीठ चालत होते, असे कळते. पण त्यासंबंधी विशेष माहिती मात्र मिळत नाही.

मिथिला हे अनेक कलांचे माहेरघर आहे. इथे कापड रंगवणे, भांडी बनवणे, सुतारकाम, लाखेच्या बांगड्या, बांबूकाम, बाहुल्या बनवणे, रंग तयार करणे, इ. व्यवसाय चालतात. इथल्या स्त्रिया तलम सूत काढून त्याचे कापड विणण्यात जुन्या काळापासून वाकबगार आहेत. त्या भरतकामही सुंदर करतात. इथे अनेक प्रकारच्या पगड्या बनतात. इथे भित्तिचित्रांच्या कलेचीही परंपरा आहे. विवाहादी मंगल प्रसंगी व व्रतोत्सवांच्या प्रसंगी तिथल्या स्त्रिया भिंतीवर अनेक प्रकारची प्रतीकात्मक चित्रे काढतात. इथे श्यामचकेवा नावाच्या पक्ष्यांच्या खेळण्यांचा एक संच मिळतो. हा खेळ कार्तिक मासात खेळला जातो. इथे लग्न-मुंजींच्या प्रसंगी मातीचे मोठमोठे हत्ती करतात. इथे एक विशिष्ट प्रकारचे गवत उगवते. स्त्रिया त्या गवताच्या विविध वस्तू बनवतात. त्यावर छान चित्रेही काढतात. कन्यापुतर नावाची एक खास बाहुली इथे मिळते. ती कापडाला निरनिराळे रंग देऊन त्याची बनवतात. अनेक कलावस्तूंसाठी बांबूचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. [बि. ज. स्मा. ग्रं.; हि जॉ. ए. इं.; पु. इं.; फो. लो., सप्टें.–ऑक्टो. १९६०].

मिथुन मेषादी राशिगणनेतील तिसरी राशी. मृगशीर्ष अर्धे, आर्द्रा संपूर्ण व पुनर्वसूचे तीन चरण मिळून मिथुन राशी बनते. गदाधारी पुरुष व वीणाधारिणी स्त्री या दोन या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राशीच्या अधिष्ठात्री देवता आहेत. बुध हा या राशीचा स्वामी आहे. ही राशी पुरुष, द्विस्वभाव, मनुष्य, वायुतत्त्वाची व अल्पप्रसव आहे. या राशीचा अंमल हात, खांदे, बाहू, फुफ्फुसे व श्वासनलिका यांवर चालतो. या राशीत बुध, रवी, चंद्र, शनी, शुक्र व गुरू हे क्रमाक्रमाने अधिकाधिक बलवान असतात. शास्त्रीय विषयांची जिज्ञासा, वाचनाची आवड व बुद्धिमत्ता हे या राशीचे गुणधर्म आहेत. या राशीचे फल असे—

मिथुनोदयसञ्जातो मानी स्वजनवत्सलः ।
त्यागी भोगी धनी कामी दीर्घसूत्रोऽरिमर्दनः ।।

(कोष्ठीप्रदीप)

अर्थ—मिथुन राशी किंवा लग्न यांवर जन्मणारा पुरुष मानी, स्वजनांवर प्रेम करणारा, त्यागी, भोगी, धनी, कामी, रेंगाळत काम करणारा व शत्रुनाशक होतो.

मिनांडर (सनपूर्व २ रे शतक) भारताच्या वायव्य भागात राज्य करणारा ग्रीक राजा. शाकल म्हणजे पंजाबमधील सियालकोट येथे त्याची राजधानी होती. त्याची विविध प्रकारची नाणी काबूलच्या आसपास व सिंधूच्या खोऱ्यात; त्याचप्रमाणे उत्तर प्रदेशाच्या पश्चिम भागातही सापडली आहेत. काठेवाड व भडोच या भागांत इ. स. च्या १ ल्या शतकापर्यंत ती प्रचलित होती, असे पेरिप्लसवरून कळते. यावरून मिनांडरचे अधिराज्य भारताच्या केवढ्या विस्तृत प्रदेशावर पसरलेले होते, याची कल्पना येते.

पुष्यमित्र शुंग हा मगधाच्या सिंहासनावर बसल्यानंतर मिनांडरने मगधाकडे आपला मोर्चा वळवला होता. पण तो अयोध्येजवळ तळ देऊन थांबला असतानाच पुष्यमित्राने त्याच्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला. त्यानंतर पुष्यमित्राने मिनांडरचा पाठलाग करून त्याला सिंधुपार हुसकावून लावले.

भारतात अनेक यवन (ग्रीक) राजे होऊन गेले, पण त्यांतील मिनांडरलाच बौद्ध परंपरेत मानाचे स्थान मिळाले आहे. त्याने बौद्धधर्म स्वीकारला होता आणि तो महान पंडितही होता. मिलिंदपन्ह नामक पाली ग्रंथातील राजा मिलिंद म्हणजे यवन राजा मिनांडरच होय, असे मानले जाते. त्या ग्रंथात राजाने अनेक कूट प्रश्न विचारलेले असून, बौद्ध भिक्षू नागसेन याने त्या सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे दिलेली आहेत. पाली भाषेतील महान ग्रंथांत याची गणना होते. बुद्धघोषाने याला त्रिपिटकाच्या बरोबरीने आदरणीय मानले आहे. यातील पहिले तीन अध्यायच मिनांडरच्या वेळचे असावे, बाकीचा भाग नंतर केव्हातरी जोडला गेला असावा, असे काही पंडितांचे मत आहे. या ग्रंथात मिलिंद याला यवन राजा म्हटले आहे. त्याचा जन्म काबूलजवळच्या कलसी ग्रामात झाला, असेही त्यात सांगितले आहे. क्षेमेन्द्राच्या अवदानकल्पलता या ग्रंथात या राजाचे भारतीय नाव मिलिंद्र असे दिले आहे. मिलिंदपन्ह या ग्रंथावरूनच कळते, की मिनांडरने आपले राज्य मुलाला देऊन टाकले व तो बौद्ध भिक्षू झाला. नागसेनानेच त्याला दीक्षा दिली. शेवटी मिलिंदाला अर्हंतपद प्राप्त झाले, असे म्हणतात.

प्लुटार्क म्हणतो, की मिनांडर हा अत्यंत न्यायी राजा असून, प्रजेला त्याच्याविषयी फार प्रेम वाटत असे. त्यामुळेच त्याच्या मृत्यूनंतर अनेक नगरांतील लोक त्याच्या रक्षेतील अल्पांश मिळवण्यासाठी मोठ्या उत्सुकतेने तिथे जमा झाले होते. [हि. क. इं. पी. २; भा. इ. रू.; पा. सा. इ.]

मियाँ अहमद उत्तर प्रदेशातील एक मुस्लिम संत. याचे चरित्र उपलब्ध नाही. पण त्याच्या अंगी अद्‌भुत सामर्थ्य असावे. लहान मुले झोपेतून किंचाळत उठू लागली म्हणजे मियाँ अहमदाच्या नावाने त्यांच्या गळ्यात बारीक कड्यांची माळ करून बांधतात. असे केल्याने मुलांचे किंचाळत उठणे कमी होते, अशी श्रद्धा आहे. [फो. लो. नॉ. इं.]

मियाणा गुजरातमधील एक पूर्वीची गुन्हेगार जात. यांचा मिया नामक एक पूर्वज होता, त्याच्या नावावरून यांना हे नाव मिळाले. यांचे मूल वसतिस्थान सिंधमध्ये असून, तिथे राहणारे मियाणा मच्छीमारी करतात.

सुमारे दोनशेचे वर्षांपूर्वी माळिया संस्थानातील पहिल्या ठाकोर कमाजीचा मुलगा मोरजी याने मोरवीच्या ठाकोरांविरुद्ध लढण्यासाठी यांना सिंधमधून गुजरातमध्ये बोलावले. त्यांच्या मदतीने मोरजीने आपले संकट निवारले खरे, पण पुढे हे मियाणा आपल्या गावी परत गेलेच नाहीत. त्यांनी गुजरातमध्येच वास्तव्य केले.

यांच्यांत जामा, संघवानी, मोर, परेडी, मानेक, गंध, लढाणी, सैतानी, बंदानी, कटिया, भढी, सुमेर, वाघेर, काजरदिये, मुल्ला, मांलेक, सम आणि घर या नावाच्या पोटजाती आहेत. या जातीत हिंदू व मुसलमान अशा दोन्ही धर्मांचे लोक आढळतात.

मियाणा पुरुष उंच, सशक्त व चलाख असतात. त्यांचे केस लांब, डोळे पाणीदार व वर्ण सावळा असतो. हे तंग तुमान, अंगरखा आणि पागोटे असा पोशाख करतात. कधी कधी हे पागोट्याच्या आतून तांबडी किंवा खाकी रंगाची टोपी घालतात. यांना घोडेस्वारीचा व शिकारीचा छंद असतो. हे लोक धीट व बुद्धिमान असतात. यांच्या स्त्रिया देखण्या असतात. त्यांचे केस लांबसडक व कुरळे असतात. त्या तंग चोळी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व आखूड अंगरखा घालतात. त्या घागरा मात्र नेशीत नाहीत.

चोरी, दरोडेखोरी, लुटालूट हे यांचे पूर्वीचे धंदे होते. दुसऱ्यांच्या बायका पळविण्यातही हे तरबेज होते. व्यभिचारी स्त्रीला तिचे नाक कापून ते विद्रूप करीत. पोलिसांच्या पहाऱ्यातून पळून जाण्याबद्दल व रातोरात चाळीस ते साठ मैलांपर्यंतची मजल मारण्याबद्दल यांची ख्याती होती. गुन्हे करण्याच्या यांच्या योजना मोठ्या अक्कलहुषारीने आखलेल्या असत. अलिकडे यांच्यांतील काही लोक शेती, मोलमजुरी, गुरे चारणे यासारखे उद्योग करीत असले, तरी त्यांच्यांतील गुन्हेगारी वृत्तीचा लोप मात्र पुरतेपणे झालेला नाही. व्यवसायासाठी बाहेर पडल्यावर हे स्वत:ला सिंधी किंवा जाट म्हणवितात. कधी कधी ते फकीरही बनतात. हे चोरीचा माल शेतात किंवा स्मशानात पुरून ठेवतात.

मियाणा लोक कच्छी आणि सिंधी या दोन भाषांनी बनलेली एक मिश्र भाषा बोलतात. तिला करो काजडी असे नाव आहे. हे हिंदी व गुजराती या भाषाही बोलू शकतात. बोलताना एकसारखे मोचिओ म्हणजे मी म्हणतो असे पालुपद वापरतात.

यांच्या झोपड्या गावाबाहेरील एखाद्या मोकळ्या मैदानात उभारलेल्या असतात. त्यांवर ज्वारीच्या धाटांचे किंवा गवताचे आच्छादन असते. वीसपंचवीस घरांच्या वस्तीला वाढ अशी संज्ञा असते. [वि. मुं. रा. प.; गु. जा.]

मियाँमल्हार हिंदुस्थानी संगीतातील एक राग. हा राग तानसेनाने निर्माण केला, असे सांगतात. याची जाती राधानना ही असून, वर्ग षाडव–षाडव हा आहे. याच्या आरोहात गंधार व अवरोहात धैवत हे स्वर वर्ज्य असतात. मंद्रसप्तकातील मध्यमापासून तार सप्तकातील मध्यमापर्यंत याचा विस्तार होऊ शकतो. आरोहस्वर– प, नि, धा, नी, सा, री, सा, म, री, पम, निधा, नीसा. अवरोहस्वर– रीनी, साधा, निप, –ग, म, री, सा. हा राग वर्षाकाळात केव्हाही गातात. [कृ. सं.]

मिरज महाराष्ट्रातले एक गाव. संगीतकलेसाठी या गावाची फार ख्याती आहे. तंतुवाद्यांसाठी तर हे स्थान साऱ्या भारतात प्रसिद्ध आहे. समर्थांच्या शिष्या वेणाबाई या मिरजेच्या असून, त्यांचा मठ इथे आहे. त्याचप्रमाणे निरंजन रघुनाथाने स्थापन केलेली दत्तमूर्ती, ऐतिहासिक किल्ला, गणेश व अंबाबाई यांची मंदिरे इथे आहेत. हे गाव सांगलीजवळ आहे.

ख्वाजा शमसुद्दीन मिरासाहेब या अवलियाचा दर्गा हे इथले एक प्रमुख इस्लामी स्थान आहे. हा दर्गा इ. स. १६६८ साली बांधण्यात आला. या दर्ग्यातच हजरत ख्वाजा महंमद मिरा याचीही तुरबती आहे. या पितापुत्रांच्या तुरबतीमध्ये एक तलवार आहे. तिथे स्त्रियांना प्रवेश नसतो. ख्वाजा शमसुद्दिन- संबंधी अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. सुप्रसिद्ध गायक अब्दुल करीमखां यांची कबरही याच दर्ग्याच्या आवारात आहे. दर वर्षी इथे त्यांची पुण्यतिथी साजरी केली जाते. त्याचप्रमाणे शमसुद्दिनाचा उरूसही भरतो.

गांधर्व महाविद्यालयाचे संस्थापक कै. पं. विष्णुबुवा पलुस्कर यांचे संगीताचे सर्व शिक्षण आणि प्रारंभीचे वास्तव्य मिरजेत झाले व मृत्यूही तिथेच झाला. [म. जि.– सांगली.]

मिरासी हे लोक मुसलमान असून, यांची वस्ती प्राधान्याने पंजाब व राजस्थान या प्रदेशांत आढळते. मिरास या अरबी शब्दावरून मिरासी हा शब्द बनला असावा. मिरास म्हणजे वारसा. भाट लोक ज्याप्रमाणे वंशपरंपरेने राजस्थानातल्या राजवंशांच्या वंशावळी ठेवीत आले आहेत, त्याप्रमाणे हे लोक वंशपरंपरेने निरनिराळ्या जातींची भाटगिरी करीत आले आहेत. मिरासी लोक मूळचे हिंदू असावे.

या लोकांच्या अनेक पोटजाती आहेत. ज्या लोकांचे ते भाट असतात त्यांच्या दर्जावरून यांचा दर्जा ठरतो. रइ व कुलवंत मिरासी – हे शिकलेले असून जाट, सैयद व हिंदू लोकांचे भाट असतात; म्हणून ते श्रेष्ठ मानले जातात. हे पूर्वी हिंदू ब्राह्मण असून, राजांचे भाट होते. राणा मिरासी – राजपूत व सैयद यांचे भाट. मीर मिरासी – धनिकांचे भाट. कलावंत मिरासी – संगीतकलेचे जाणकार. कव्वाल – कुरैशी जातीचे भाट. खरिआल – कुंभारांचे मिरासी. वाद्य वाजवून [illegible] मागणारे, कनिष्ठ दर्जा. मीरमलंग – मिरासींचे मिरासी. [illegible] रची – नगारा वाजवणारे. रबाबी – रबाब वाजवणारे. हे [illegible] आहेत. कलनोत – हे सर्वांकडे भीक मागतात. तानसेनाचा [illegible] नानक बक्ष हा यांचा पूर्वज होता. सरदोई – पठाणांचे मिरासी, याशिवाय लच्छ, लंगा, लोरी, पोस्ला, चारण, इ. [illegible] काही पोटभेदही आहेत.

या पोटजातींचेही काही पोटभेद आहेत, त्यांना गोत [illegible] तात. या लोकांच्या जातपंचायती असतात. काही [illegible] पंचायतप्रमुखाला राणा म्हणतात. जातीची व्यवस्था पाह[illegible] अधिकार पंचायतीला असतात.

ज्या कुळांचे भाट म्हणून हे लोक काम करतात, त्या कुळांची सर्व माहिती लक्षात ठेवून ती हवी तेव्हा सांगणे, [illegible] संबंधी शंकांचे निरसन करणे, यजमानाकडे आलेल्या [illegible] ण्यांचे आगत-स्वागत व व्यवस्था करणे, शेतकरी कुटुंबात [illegible] काम करणे, लग्नातील मेजवानीची तयारी करणे, [illegible] निमंत्रणे पोचवणे, इ. कामे त्यांना करावी लागतात. [illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांना जन्म, लग्न, मृत्यू अशा प्रसंगी द्रव्य, धान्य, वस्त्र या रूपाने बक्षिसी मिळते. विशेष प्रसंगी त्यांनी गाय किंवा म्हैस मागितली तरी ती दिली जाते. आता ही भाटगिरीची व बक्षिसीची चाल कमी झाली असून, हे लोक शेती किंवा अन्य व्यवसाय करू लागले आहेत. काहीजण शिकून नोकरी करतात.

हे लोक मुसलमान असूनही दुर्गा भवानीला भजतात. गाण्यापूर्वी तिला आवाहन करतात किंवा तिचे स्तोत्र गातात. या व्यतिरिक्त हे सखि सरवर, पीर मुर्तझा, गुग्गा पीर, पीर हिदायत अली शाह, शाह मस्तावली, शाह बहावल हक्क, गौर अझम जिलानी यांनाही भजतात. हे लोक अमीर खुस्रू व हजरत दाऊद यांनाही पीर मानतात. यांच्यातील एक पोटजात नागपूजक आहे.

मिरासी स्त्री व पुरुष

यांच्या स्त्रिया सरदार दरकदारांच्या जनानखान्यांतील स्त्रियांपुढे नाचगाणी करून पोटापुरते मिळवतात.

हे लोक आपल्या गाण्याला साथ म्हणून ढोलक, मंजीरी, किंगरी, इ. वाद्ये वाजवितात. महाराष्ट्रात हे लोक भिक्षा मागताना आढळतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.; पं. का.; वॉं. बे. क्रा.; म. ज्ञा. को.; ग्लो. ट्रा. पं. नॉं. प्रॉ.; रा. जा.]

मिरी आसाममधील एक आदिवासी जमात. आसामच्या सपाट प्रदेशात राहणारे मिरी हा अबोर लोकांचाच एक पोटभेद आहे. मिरी या शब्दाचा अर्थ मध्यस्थ असा आहे. पूर्वी आसामचा अबोर लोकांशी होणारा सर्व व्यापार दीर्घ काळ या लोकांमार्फतच होत असे, म्हणून यांना मिरी हे नाव मिळाले.

मैदानी प्रदेशात राहणाऱ्या मिरी लोकांनी आसाममधील गोसावी नामक ब्राह्मण पुरोहितांना आपला गुरू मानले आहे. पण त्यांच्या शिकवणुकीने त्यांच्या राहणीमानात मात्र सुधारणा झालेली नाही. त्यांची राहणी पूर्वीसारखीच गलिच्छ आहे. ते डुकरे, कोंबड्या व गोमांस खातात आणि दारू पितात. आसाममधील लोकांचे सण व उत्सव ते पाळतात. बिहू उत्सवाच्या वेळी मिरी मुली नृत्यात भाग घेतात. याशिवाय, वर्षातून एकदा त्यांच्या एका खास उत्सवात अविवाहित स्त्रिया व पुरुष एका मोठ्या घरात काही दिवस एकत्र राहतात आणि एकमेकांना अनुरूप ठरणाऱ्या जोड्या मग विवाहबद्ध होतात.

या लोकांची घरे नदीकिनारी, एका ओळीत जमिनीत खांब रोवून त्यावर बांधलेली असतात. घरांच्या खालच्या भागात त्यांची डुकरे, कोंबड्या, गुरे वगैरे पाळीव प्राणी असतात. घराभोवती परसू किंवा कुंपण यांपैकी काहीही नसते.

शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. त्यांची ही शेते गावापासून दूर डोंगरावर असतात. त्यांची धान्याची कोठारेही या शेतांतच असतात.

आसामच्या पहाडी प्रदेशात राहणाऱ्या मिरी लोकांना पर्वतिया मिरी असे नाव आहे. दिरज्मो डोंगराच्या पश्चिमेला घीघासी मिरी व बोर्डोलोनीच्या उत्तरेला सरक मिरी राहतात. याशिवाय, पाणिबोटिया मिरी आणि तारबाटिया मिरी असे त्यांचे आणखी दोन भेद आहेत. पहाडी प्रदेशातून सपाटीवर येताना त्यांपैकी पहिल्या लोकांना नद्यांतून छोट्या बोटीतून यावे लागते, तर दुसऱ्या लोकांना जमिनीवरून यावे लागते, म्हणून त्यांना तशी नावे मिळाली आहेत.

पर्बतिया मिरी स्त्रिया वेताच्या पट्ट्यांपासून बनवलेला एक लहानसा परकर नेसतात. तो कमरेला इतका घट्ट आवळलेला असतो, की त्यामुळे त्यांच्या हालचालींनाही अडथळा होतो. याशिवाय त्यांच्या अंगावर दुसरे कोणतेही वस्त्र नसते.

पाणिबोटिया मिरी – यांची घरे जमिनीपासून उंच अशी, खांबांवर बांधलेली असतात. घराची जमीन बांबूच्या कामटयांची असते आणि छप्पर पानांचे असते. घरांच्या दोन्ही बाजूंच्या पाख्यांखाली दोन गच्च्या असतात. घराच्या अंतर्भागाची लांबी साठ फूट व रुंदी सोळा फूट असते. त्याच्या एका बाजूला लांबच लांब अशी जाण्यासाठी वाट असते. मोठ्या खोलीत मातीच्या चार चुली असतात. खोलीत एका बाजूला शस्त्रे, थैल्या, शिकारीची हत्यारे वगैरे ठेवलेली असतात. चुलींच्या जवळ अनेक शिंकी टांगलेली असतात. मोठ्या खोलीत घरातील सर्व माणसे एकत्र खातात, पितात व झोपतात. काही वेळा तीस तीस जोडपी व त्यांची मुले आणि नोकर अशा एका खोलीत निजतात.

गावापासून दूर ठिकाणी त्यांच्या धान्याच्या कणग्या असतात. चोरांच्या भीतीने आपली ताटे, स्वयंपाकाची धातूची भांडी, तिबेटी देवघंटा, इ. किमती सामान ते पुरून ठेवतात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाणिबोटिया मिरी स्त्रियांचा पोषाख वैशिष्टचपूर्ण असतो. त्या एक तोकडा परकर नेसतात. त्यांच्या कमरेला चामड्याचा



पाणिबोटिया मिरी स्त्री

रुंद पट्टा असतो आणि त्यावर पितळेच्या चकत्या बसवलेल्या असतात. याच्या वर त्या वेताच्या धाग्यांचा परकर घालतात. त्या छातीभोवती बांबूचा विणलेला पट्टा गुंडाळतात आणि त्यात पुढच्या बाजूने वक्षःस्थळ झाकण्यासाठी कापडाचा एक तुकडा खोचतात. हा त्यांचा प्रवासासाठी आणि कामाच्या वेळी घालायचा वेष असतो. एरवी त्या एरी रेशमाचे मोठे कापड शालीसारखे पांघरतात. त्या हातांत चांदीच्या किंवा तांब्याच्या बांगड्या घालतात आणि पायांत वेताच्या किंवा बांबूच्या सुबकपणे विणलेल्या साखळ्या घालतात. त्या कानांत चांदीची कर्णभूषणे आणि गळ्यांत मण्यांच्या असंख्य माळा घालतात. त्या केस नीट विंचरून दोन वेण्या घालतात.

पाणिबोटिया मिरी पुरुषांचे शरीर घाटदार असते. ते उंच असतात. ते कपाळावर मस्तकाच्या पुढच्या बाजूला केसांची गाठ बांधतात. कपाळाभोवती ते पितळेचा किंवा तांब्याचा पट्टा घट्ट बांधतात. त्यांचा प्रमुख कानांत चांदीची कर्णभूषणे घालतो. बांबूची किंवा वेताची एका विशिष्ट आकाराची टोपी तो घालतो. त्या टोपीला मागच्या बाजूला चोचीसारखा आकार असतो. तो लंगोटी नेसतो आणि वर एक उत्तरीय पांघरतो. त्यावर तो ताडाच्या काळ्या केसाळ धाग्यांचा बिनबाह्यांचा कोट घालतो. धनुष्यबाण आणि तलवार ही त्याची आयुधे असतात.

शेती हा या लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. यांचा बराचसा वेळ शेतातील व जंगलातील उत्पन्न मैदानी प्रदेशातील बाजारात नेण्यात किंवा शिकारीत खर्च होतो. निरनिराळ्या प्रकारचे सापळे लावून हे लहानमोठे प्राणी पकडतात. ते मासेही पकडतात. हे लोक मिथुन, डुकरे, कोंबड्या व शेळ्या पाळतात.

यांचा मुखिया अनेक बायका करतो. बायको त्याला विकत घ्यावी लागते. तो मेल्यावर त्याच्या सर्व बायका त्याच्या मुलाच्या बायका होतात. फक्त मुलाची आई मात्र त्यातून वगळली जाते. स्त्रीच्या रूपापेक्षा तिचे कुलशील पाहून तिला पसंत करतात. गरीब पुरुषांना बायको मिळण्यासाठी फारच कष्ट करावे लागतात आणि पैसाही जमा करावा लागतो. त्यामुळे काही वेळा दोन भाऊ मिळून एकच पत्नी करतात. वधूची किंमत मोजली, की तिचे आईबाप नवऱ्या मुलाला व त्याच्या मित्रांना आपल्या घरी जेवायला बोलावतात. त्यानंतर वधूला घेऊन वर आपल्या घरी जातो. तिच्या बरोबर तिचे नातेवाईकही वरगृही जातात. तिथे त्यांना वरपक्षाकडून जेवण मिळते.

मिरी स्त्रिया पतीशी एकनिष्ठ असतात. त्या आज्ञाधारक असून, सहनशील असतात. हसतमुखाने त्या शेतातील कष्टाची कामे करतात आणि मोठी ओझी डोक्यावर घेऊन दूरच्या बाजाराला चालत जातात.

प्रत्येक खेड्याची लागवडीला आणण्यासारखी काही जमीन असते. पण तिच्यातला पाचवा हिस्साच ते दरवर्षी शेतीसाठी वापरतात. एका जमिनीत ओळीने दोन वर्षे ते शेती करतात आणि नंतर चार-पाच वर्षे ती तशीच पडिक ठेवतात. ते तांदूळ, कोदो, ज्वारी, बाजरी, मका, बटाटे, तंबाकू, लाल मिरी इ. पिके काढतात. पण ते जे पिकवतात, त्यावर त्यांची वर्षभर गुजराण होत नाही. धान्याला पूरक म्हणून ते वाळवलेले मांस खातात. यासाठी सर्वसाधारणपणे प्रत्येक कुटुंबातील काही लोक वर्षातून अनेक महिने मैदानी प्रदेशात तळ ठोकून राहतात आणि मांस व मासे मिळवून ते वाळवतात व आपल्या पहाडी प्रदेशात वाहून नेतात.

या लोकांचा भुताखेतांवर फार विश्वास असून, त्यांना संतुष्ट राखण्यासाठी ते पशुबळी देतात. मृत्यूनंतर जीवाला अस्तित्व असते, असे हे मानतात आणि अशा जीवांवर जमराजा (यमराजा) राज्य करतो, अशी त्यांची धारणा आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे लोक मृताला पुरतात. त्याच्या बरोबर त्याचे कपडे, दागिने, स्वयंपाकाची भांडी, शस्त्रे व शिदोरीही पुरतात. असे केल्याने यमराजाला पृथ्वीवरील त्याचे महत्त्वाचे स्थान कळेल, अशी त्यांची अपेक्षा असते. पाहा – पर्वतिया मिरी; अंका मिरी. [इं. स्ट. पा. प्रे. – जानेवारी १९६०]

मिल एक जात. या लोकांची वस्ती प्राधान्याने ओडिसा राज्याच्या गंजाम जिल्ह्यात आणि आंध्र प्रदेशातल्या विशाखापट्टम जिल्ह्यात आढळते. हे कोळी आहेत. यांच्यांत मामेबहिणीबरोबर विवाह करण्याची चाल आहे. तसेच हे भाची-बरोबरही लग्न करू शकतात. यांचे विवाह प्रौढपणी होतात. हे मृतांना जाळतात. सुतक पाळीत नाहीत. [का. ट्रा. स. इं.]

मिश्मी ईशान्य सीमा–प्रांताच्या लोहित विभागातील एक आदिवासी जमात. या भागातील लोहित व दिवंग या नद्यांच्या खोऱ्यात मिश्मी लोकांची वस्ती आहे. हा प्रदेश अत्यंत दुर्गम अशा पहाडांनी व घनदाट जंगलांनी वेढलेला आहे. तरीही गेल्या शतकात काही धाडसी प्रवासी त्या प्रदेशात जाऊन आले. त्या सर्वांनी तिथल्या लोकांचे वर्णन करून ठेवले आहे, ते असे – मिश्मी लोक हे अत्यंत घाणेरडे, रानटी व क्रूर होते. तसेच ते अत्यंत कपटी व भांडखोरही होते. पण आता शंभर वर्षांनंतर त्यांची स्थिती फार बदलली आहे. सर्व बाबतींत आता ते सुधारले आहेत. त्यांचे दात स्वच्छ व शुभ्र दिसतात. त्यांच्या मुलांचे चेहरेही स्वच्छ असतात. ते रंगीबेरंगी व उत्तम विणलेले कपडे वापरतात. तसेच त्यांच्या प्रदेशात गेलेल्या लोकांचे आता ते प्रेमाने स्वागतही करतात.

मिश्मी लोकांचे दिगारू किंवा तराओ, मिजू किंवा कमा व चूलिकाटा किंवा इडू असे तीन भेद आहेत. दिगारू व मिजू लोक लांब केस ठेवतात आणि इडू कपाळावरील थोडे केस कापतात, एवढाच त्यांच्यांतील मुख्य भेद होय. हे सर्व लोक उजळ वर्णाचे व खुजे असून, त्यांचे चेहरे मोंगोलाइड छापाचे, रुंद व बसके असतात. त्यांच्यापैकी अनेक घराणी ब्रह्मदेशातून आली असावी. कारण तिकडच्या काचिन, चिन, लेपचा इ. भाषांशी या लोकांची भाषा थोडीशी मिळतीजुळती आहे.

या लोकांत अनेक गोत्रे असून, ताइन गोत्राचे मिश्मी सपाटी-वरील प्रदेशात जास्त परिचित आहेत.

वेषभूषा – मिश्मी पुरुष कमरेभोवती लंगोटीसारखे एक वस्त्र नेसतात आणि गुडघ्यापर्यंत पोचणारा काळा किंवा पिंगट रंगाचा कोट अंगात घालतात. याशिवाय, ते रंगीबेरंगी व चित्रविचित्र असे भरपूर कपडे वापरतात. लोकर, कापूस व खाजकुयलीच्या जातीच्या झाडापासून काढलेला धागा यांपासून ते स्वतःची वस्त्रे विणतात. तिबेटमधून आणलेले उबदार कोटही ते वापरतात. पुरुषांच्या कोटाला नक्षीदार किनार असते. डोक्यावर ते वेताची सुरेख विणलेली हॅट घालतात. कुयलीचा धागा व माणसाचे केस यांपासून बनवलेले एक कवच ते अंगात घालतात. ते इतके भक्कम असते, की त्यात बाणही शिरू शकत नाही. त्यांच्या खांद्यावर चामड्याचे पट्टे असतात आणि त्यांना लोकरीचे आवरण असलेले पिशव्यासारखे मोठे खिसे जोडलेले असतात. पिशव्यांना मागे-पुढे झांजेएवढ्या पितळेच्या चकत्या लावलेल्या असतात. त्यांच्या पाठीला साबुदाण्याच्या झाडाच्या काळ्या धाग्यांपासून बनवलेली ढाल बांधलेली असते. त्यांच्या जवळ एक लांब तिबेटी तलवार, सुऱ्या, खंजीर आणि एक भाला एवढी हत्यारे असतात.



दिगारू मिश्मी तरुणी

त्यांच्या स्त्रिया सुंदर कपडे विणण्यात प्रवीण आहेत. त्या गुडघ्यापर्यंत पोहचणारे काळे वस्त्र कमरेभोवती गुंडाळतात सुरेख कशिदा काढलेली चोळी अंगात घालतात आणि त्यावर शाल पांघरतात. या शालीही कशिदा काढून फारच छान विण-लेल्या असतात. त्यांच्या कपाळावर एक चांदीची पट्टी बांधलेली असते आणि कानांत नीरांजनासारखी चांदीची मोठी कर्ण-भूषणे व गळ्यांत पुतळ्यांच्या किंवा काचमण्यांच्या पुष्कळ माळा असतात. स्त्रिया व पुरुष केस लांब वाढवतात आणि कपाळाच्या वरच्या बाजूला त्यांची गाठ बांधून, तीत एक आडवी पिन खोचतात. स्त्रिया व पुरुष दोघेही तंबाखू ओढतात. अगदी लहान वयातच हे व्यसन त्यांना लागते. तंबाखू ओढण्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साठी ते बांबूच्या, पितळेच्या किंवा चांदीच्या लांब नळयांचा उपयोग करतात.

यांच्या गावात फार थोडी घरे असतात. क्वचित एकच घर असते. जमिनीत खुंट पुरून त्यांवर ते घर बांधतात. घर लांबच लांब असून, त्यात अनेक खोल्या असतात व पुढे जाण्यायेण्यासाठी वाट ठेवलेली असते. प्रत्येक खोलीत एक चूल असते आणि तिच्यावर मांस वाळवण्यासाठी शिंके टांगलेले असते. घरे बांबूची असतात आणि त्यांत दहापासून साठापर्यंत माणसे राहतात. त्यांची धान्याची कोठारे मात्र घरापासून दूर आणि सहजगत्या दृष्टीस न पडतील अशा जागी असतात.

उद्योगधंदे – हे लोक व्यापार करण्यात तरबेज आहेत. जंगलातील बचनाग, तीता, इ. जडीबुटी गोळा करून आणि सदिया व दिब्रुगड येथील बाजारांत त्या विकून ते आपल्या गरजेच्या वस्तू विकत घेतात. त्याशिवाय कस्तुरी, आले, मेण, गवत, कागद बनवण्यासाठी साल, इ. वस्तूही ते विकतात. काही लोक आसामातील उसाच्या मळयांत ऊस तोडायचे काम करतात. काही लोक शेती करतात. त्यांच्या शेतात तांदूळ, मका, हलक्या दर्जाचा कापूस, रताळी, बटाटे, इ. पिके येतात. याशिवाय ते शेळया व गुरेही पाळतात. मिथुन नामक रेडयासारखे दिसणारे प्राणीही ते बाळगतात. शेतीसाठी वगैरे त्यांचा काही उपयोग होत नाही, पण सणासमारंभाच्या वेळी त्यांना मारून ते त्यांचे मांस खातात. एखाद्या माणसाची श्रीमंती त्याला असलेल्या बायका आणि त्याच्या जवळ असलेले मिथुन पशू यांवरून मोजतात.

व्यापारासाठी औषधी वनस्पती गोळा करताना, कस्तुरीमृगाची शिकार करताना किंवा बाजाराला जाताना मिश्मी लोकांना दुर्गम पहाडी प्रदेशातून खूप चालावे लागते. त्यामुळे त्यांच्या पायाच्या पोटऱ्या घाटदार झालेल्या असतात. त्यांच्या प्रवासात त्यांना अनेकदा नद्या ओलांडाव्या लागतात. त्यासाठी त्यांवर ते वेताचे झुलते पूल बांधतात. नदीचा प्रवाह अरुंद असेल, तिथे दोन काठांवर दोन झाडांना किंवा खडकांना एक मोठा दोर घट्ट बांधतात. त्याच्यावर दोराचेच एक कडे अडकवतात. नदी पार करू इच्छिणारा त्या कडयात बसतो आणि मान वर करून ते कडे पुढे सरकवतो. ते जोराने घसरत मध्यावर येते आणि मग उरलेला पूल त्या दोराला हातांनी व पायांनी घट्ट धरीत धरीत तो पार करतो. हा प्रवास फारच भयंकर असतो. लोहित नदीचा उगम तेझूपासून दहा मैलांवर परशुरामकुंडात होतो. मिश्मी लोक ते तीर्थक्षेत्र मानतात व माघ पौर्णिमेला तिथे स्नानासाठी जातात.

विवाहप्रथा – या लोकांत अनेक बायका करण्याची पद्धत आहे. पुरुषाला पत्नी विकत घ्यावी लागते. त्यासाठी एका ढुकर... पासून वीस मिथुनांपर्यंत किंमत मोजावी लागते. ऐपतीप्रमाणे पुरुष अनेक स्त्रियांशी लग्न करू शकतो. लग्न ठरवताना मुलीची

दिगारू मिश्मी तरुणी

पसंती विचारात घेतात. पुरुषाच्या मृत्यूनंतर त्याच्या सर्व स्त्रि... या त्याच्या वारसाच्या स्त्रिया होतात. त्यांतून फक्त ... आई वगळली जाते.

स्त्रीच्या प्रसूतीसाठी घराजवळ एक वेगळी झोपडी उभार... मुलगा झाल्यास जननाशौच दहा दिवस व मुलगी झाल्यास ... दिवस पाळतात. तोपर्यंत ती त्या झोपडीतच राहते.

देवधर्म – हे लोक अनेक देवतांची व भुताखेतांची पूजा ... तात. आजारपण आले किंवा काही दुर्दैवी घटना घडली, ... सारे भुताखेतांच्या प्रकोपामुळे घडले, असे मानून ते ... कोंबडे, बकरे वगैरे बळी देऊन संतुष्ट करतात. अशा वेळी ... आपल्या घरावर झाडाची एक डहाळी टांगून ठेवतात. ... लोकांना काही वेळ ते घर वर्ज्य आहे, असा त्याचा अर्थ ... विनाश, समृद्धी, रोगराई, ज्ञान, इत्यादींच्या स्वतंत्र दे... त्यांनी मानलेल्या आहेत.

हे लोक भांडणतंटे आपसातच मिटवतात. खून, ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यभिचार, इ. गुन्ह्यांबद्दल दंड म्हणून पशू द्यावे लागतात. खुनाबद्दल ७५ ते ८० पशू दंडादाखल द्यावे लागतात; तर चोरी, व्यभिचार यांसाठी ५ ते ७ पशू इतका दंड असतो.



दिगारू मिश्मी कुटुंब

मृतिकाप्रथा – हे मृतांना पुरतात. घराजवळच मृताचे थडगे उभारतात व त्यावर एक छप्पर घालतात. मृताचे कपडे व कप छपराला टांगून ठेवतात. टोळीप्रमुखाचा किंवा एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीचा मृत्यू झाल्यास अनेक पशू मारतात आणि त्यांच्या कवट्या थडग्याभोवती रचून ठेवतात. तसेच मृतासाठी कच्चे व शिजवलेले मांस आणि मद्य, तो वापरीत असलेली शस्त्रास्त्रे व कपडेही तिथे ठेवतात. काही वेळा, प्रतिष्ठित व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी पुरोहितालाही बोलावतात. गरीब लोक प्रेते जाळतात किंवा नदीत फेकून देतात. हे लोक नृत्य अशुभ मानतात व मृताला पोचवून आल्यावर नृत्य करतात. पाहा – इदु मिश्मी. [इं. स्ट. पा. प्रे.– जानेवारी १९६०; लो. नी.; व्हेरिअर एल्विन – इलस्. वीकली, २१ ऑक्टोबर १९५६]

मिश्र कुलपती (इ. स. चे. १७ वे शतक) एक हिंदी कवी व संस्कृत पंडित. याच्या पित्याचे नाव परशुराम मिश्र होते. तेलंगणातील पंडितराज जगन्नाथ हा याचा गुरु असून, हा जयपूरच्या रामसिंहाचा आश्रित होता. याचे वंशज आजही जयपूरला आहेत.

याने पन्नास ग्रंथ रचले आहेत, असे सांगतात. पण आतापर्यंत दहाच ग्रंथ उपलब्ध झाले आहेत. रसरहस्य हा याचा महत्त्वाचा ग्रंथ आहे. यात याने मम्मटाच्या काव्यप्रकाशाचा अनुवाद केला आहे. संग्रामसार हा याचा दुसरा महत्त्वाचा ग्रंथ होय. हा ग्रंथ म्हणजे महाभारताच्या द्रोणपर्वाचा पद्यानुवाद आहे. [हिं. सा. २; हिं. सा. इ.]

मिश्र बलभद्र (इ. स. चे १६ वे शतक) एक हिंदी पंडितकवी व वैयाकरण. याचा जन्म बुंदेलखंडात वेत्रवती (बेतवा) नदीच्या तीरावर वसलेल्या ओरछा गावी झाला. याच्या पित्याचे नाव काशिनाथ असे होते. प्रसिद्ध कवी केशवदास हा याचा लहान भाऊ होय. बलभद्राने नखशिख नावाचा एक शृंगारग्रंथ रचला असून, त्यात त्याने निरनिराळ्या नायिकांचे वर्णन केले आहे. या ग्रंथात अलंकारांचा विपुल वापर आहे. नखशिख ग्रंथावर गोपाळकवीने एक टीका रचली असून, तीत बलभद्राच्या पुढील अन्य ग्रंथांचा उल्लेख केला आहे– (१) बलभद्री व्याकरण (२) हनुमन्नाटक व (३) गोवर्धन सतसईवरील टीका. याव्यतिरिक्त, याचा दूषण विचार नावाचा काव्यदोषांचे निरूपण करणारा एक ग्रंथही आहे. याची भाषा अत्यंत प्रौढ आहे. [हिं. सा. इ.]

मिश्र सुखदेव (इ. स. चे १७ वे शतक) एक हिंदी कवी व आचार्य. कंपिला गावी याचा जन्म झाला. याचे सारे शिक्षण काशीला झाले. शिक्षण पुरे झाल्यावर हा फत्तेपूर जिल्ह्यातील असोथर गावचा राजा भगवंतराय खीची आणि डौंडिया खेरेचा राव मर्दनसिंह यांच्या आश्रयाला राहिला. काही दिवस हा औरंगजेबाचा सरदार फाजिलअलीशाह याच्याकडेही राहत होता. अखेरच्या काळी हा राजा देवीसिंहाच्या आग्रहावरून रायबरेली जिल्ह्यातील दौलतपूर गावी जाऊन राहिला. याचे वंशज आजही तिथेच आहेत.

राजा राजसिंह गौडाने याला कविराज अशी पदवी दिली होती. याने सात ग्रंथ रचले आहेत. त्यांची नावे अशी – वृत्तविचार, छंदविचार, फाजिलअलीप्रकाश, ससार्णव, शृंगारलता, अध्यात्मप्रकाश व दशरथराय. अध्यात्मप्रकाशात याने ब्रह्मज्ञानविचार मांडला आहे. त्यावरून हा साधुवृत्तीने राहत होता, असे दिसते. छंदःशास्त्रावरही याचे प्रभुत्व होते. [हिं. सा. इ.]

मिसरीख एक तीर्थक्षेत्र. हे स्थान अयोध्येजवळील सीतापूरच्या दक्षिणेला सुमारे १३ मैलांवर आहे. इथे दधीची ऋषीचा आश्रम होता, असे सांगतात. या क्षेत्रात मिश्रतीर्थ अथवा निमसर नावाचा एक मोठा तलाव आहे. यासंबंधी एक कथा सांगतात, ती अशी – दधीची ऋषींसाठी देवांनी भारतातल्या सर्व तीर्थांचे जल इथे आणले. त्यावरून या जलाशयाला मिश्रतीर्थ हे नाव मिळाले आणि त्याचेच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अपभ्रष्ट रूप मिसरीख असे झाले. प्राचीन सरोवराच्या तीरावर अनेक मंदिरे होती. आता तिथे फक्त दधीचीचे मंदिर आहे. या सरोवराला अनेक घाट असून, ते सुमारे दीडशे वर्षांपूर्वी मराठ्यांनी बांधले, असे म्हणतात. या तीर्थात स्नान केल्याने महापुण्य लाभते, अशी समजूत आहे. [स. भा. प्र. व.]

मिसरू मिश्र (इ. स. च्या १५ व्या शतकाचा मध्य) एक धर्मशास्त्रकार. हा मिथिलेचा रहिवासी होता. विवादचंद्र व पदार्थचंद्र हे याचे दोन ग्रंथ होत. तिरहुतच्या राजघराण्यातील चंद्रसिंहाची राणी लछिमादेवी हिच्या सांगण्यावरून याने हे ग्रंथ रचले. विवादचंद्र हा ग्रंथ व्यवहारावर असून, दुसरा वैशेषिक तत्त्वज्ञानावर आहे. पहिल्या ग्रंथात ऋणादान, न्यास, अस्वामीविक्रय, दायविभाग, स्त्रीधन आणि न्यायालयीन कार्यपद्धती, इ. विषय आहेत. हा ग्रंथ हिंदू कायद्यावरील प्रमाणग्रंथांपैकी एक आहे. [हि. ध.; म. च. को.]

मिहिरकुल (इ. स. चे ६ वे शतक) हूण वंशातील एक पराक्रमी राजा. याच्या वडिलांचे नाव तोरमाण असे होते. मिहिरकुलाची माहिती राजतरंगिणी, युआन च्वांगचे प्रवासवर्णन, नाणी, शिलालेख इ. साधनांच्या द्वारे मिळते. याची राजधानी पंजाबातील सियालकोट येथे होती. यालाच शाकलनगर असे प्राचीन नाव आहे.

मिहिरकुल हा परम शिवभक्त होता. मंदसोर येथील यशोधर्म्याच्या शिलालेखात, याने शंकराखेरीज कोणापुढेही मान वाकवली नाही, असे म्हटले आहे. श्रीनगरमध्ये याने आपल्या नावाने मिहिरेश्वर हे शिवमंदिर बांधले होते. याच्या नाण्यांवर एका बाजूला 'जयतु वृषा' आणि दुसऱ्या बाजूला 'जयतु वृषध्वज' असे लिहिलेले आढळते; याव्यतिरिक्त त्रिशूल, नंदी व छत्र ही चिन्हेही आढळतात.

मिहिरकुल प्रथम बौद्ध धर्मावर प्रेम करीत होता; पण तो नंतर बुद्धाचा परम शत्रू झाला. त्याने गांधार देशातील सोळाशे मठ व स्तूप यांचा विध्वंस केला आणि लाखो बौद्ध लोकांना कापून काढले.

माळव्यातील पराक्रमी राजा यशोधर्मा याने मिहिरकुलाचा पराभव केला. त्याचप्रमाणे गुप्तवंशातील नरसिंह गुप्तानेही याला पराजित केले. त्यामुळे राजस्थान, माळवा इ. प्रदेश याच्या राज्यातून कमी झाले. पण काश्मीर, गांधार या प्रदेशांवर मात्र याचा अधिकार कायम राहिला. याचा एक शिलालेख ग्वाल्हेरला (गोपाद्री) मिळाला असून, तो याच्या राज्याच्या पंधराव्या वर्षातला आहे. [म. च. को. ; प्रा. भा. सं. ; हिं. वि. को.]

मीठ एक खारट खाद्य पदार्थ. संस्कृतात याला लवण म्हण- तात. वैदिक आर्यांना मीठ माहीत नसावे. कारण ऋग्वेदात त्याचा उल्लेख आढळत नाही. भटक्या जीवनाचा त्याग करून वैदिक आर्य वसाहती करून राहू लागले, तेव्हा त्यांना मिठाचा उपयोग माहीत झाला. म्हणूनच अथर्ववेदात (७.७६.१) व पुढे ब्राह्मणे आणि उपनिषदे या साहित्यात मिठाचे उल्लेख आढळू लागतात. मिठाला एक बहुमोल पदार्थ मानले आहे. छांदोग्योपनिषदात तर याला सोन्यापेक्षा अधिक मौल्यवान म्हटले आहे.

हा पदार्थ इतका महत्त्वाचा असूनही, प्राचीन वाङ्मयात याचा उल्लेख का नाही याचे सर्वांना आश्चर्य वाटते. पंजाब, सिंध, इ. ठिकाणी प्रथम आर्यांची वस्ती होती आणि तिथे विपुल प्रमाणात मीठ असल्यामुळे त्याचा वाङ्मयात उल्लेख का- नसावा, असे अभ्यासकांचे मत आहे. पुढे कुरुक्षेत्रात मीठ दुर्मिळ म्हणून बहुमोल झाले आणि त्याचा उल्लेख नंतरच्या वाङ्मयात होऊ लागला असावा.

धर्मशास्त्रात मिठाला मानाचे स्थान आहे. मोक्षप्राप्तीसाठी करायच्या दश दानांमध्येही मिठाचा समावेश आहे. त्या- प्रमाणे दश पर्वतदानांमध्येही मिठाचा पर्वत निर्दिष्ट आहे. दानामुळे दाता देवलोकी पूज्य होतो आणि त्याला पुढ- जन्मी चांगले भाग्य लाभते, असे मत्स्य पुराणात म्हटले आहे. स्मृतिग्रंथांनी मीठ तयार करणे हा एक निंद्य व्यवसाय म- त्यासाठी चांद्रायणादी प्रायश्चित्ते सांगितली आहेत (याज्ञ. २३५). त्याचप्रमाणे मीठ चोरणारा टिटवीच्या जन्माला जा- असेही याज्ञवल्क्यस्मृतीत म्हटले आहे (५.२१५).

मिठाच्या उपयोगाने पदार्थ चांगले टिकतात, असे सम- वर मिठाला काही दैवी गुणधर्म चिकटवले गेले. त्यामुळे सं- संस्कृतीत मिठाविषयीचे बरेच संकेत निर्माण झाले. मि- दृष्टबाधा जाते, अशी समजूत असल्यामुळे दृष्ट काढ- साहित्यात मिठाचा आवर्जून उपयोग करतात. मिठात ल- अंश आहे, असे मानतात आणि त्यामुळे सायंकाळी कोणाला- देत नाहीत. साडेसाती टळावी, म्हणून लोहपात्रातून मिठाचे- करण्याची प्रथा आहे. मिठाचे पोते घेऊन बाहेर जाणे- मानतात. मीठ वाहून नेणारा माणूस आडवा आल्यास तो- शकून समजतात. हातातल्या हातात मीठ दिल्यामुळे देणा- घेण्याऱ्या माणसांत कलह निर्माण होतो, अशी कल्पना- शनिवारी व अमावास्या, पौर्णिमा या दिवशीं मिठाची- करू नये, असा संकेत आहे. गुजराती लोक लग्नाच्या सा- खरेदी मिठापासून करतात. म्हैसूर प्रदेशात सर्व शुभ- भोजनारंभी व अशुभ प्रसंगीं भोजनांती मीठ वाढतात. दि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोक मीठ वाढून घेत नाहीत. त्यांच्यांत वधूच्या प्रथम गृह-प्रवेशाच्या प्रसंगी तिच्या उजव्या पावलाखाली मीठ टाकण्याची चाल आहे. काही गुन्हेगार जातींचे लोक एखाद्याच्या घरी मीठ खाल्ले तर तिथे चोरी, दरोडेखोरी करीत नाहीत. त्यावरून 'खाल्ल्या मिठाला जागणे' अशी म्हणच मराठीत रूढ झाली आहे. देवाच्या नैवेद्यातही मीठ न वाढण्याची चाल आहे.

उ. भारतात शपथ घेताना मिठाचा खडा पाण्यात टाकतात व 'मी जर खोटा असेन, तर या पाण्यातल्या मिठाच्या खड्या-सारखा विरघळून जाईन,' असे म्हणतात.

मीठ समुद्राच्या पाण्यापासून किंवा सरोवरातील खाऱ्या पाण्यापासून तयार करतात. मिठाच्या खाणी किंवा डोंगरही असतात. अशा मिठाला खनिज मीठ म्हणतात. राजस्थान व पंजाब या प्रदेशांत मिठाच्या खाणी आहेत. आणि पूर्व व पश्चिम किनाऱ्यावर समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार केले जाते. [वे. इं.; म. ज्ञा. को.; की. पॉ.; प्रा. व्य. प्र.]

मीन मेषादी राशिगणनेतील बारावी राशी. पूर्वा भाद्रपदाचा एक चरण, उत्तरा भाद्रपदा व रेवती मिळून सव्वादोन नक्षत्रे या राशीत येतात. मत्स्ययुग्म ही या राशीची आकृती सांगितली आहे. ही राशी स्त्री, द्विस्वभाव, जलतत्त्वाची, आर्द्र व बहुप्रसव आहे. गुरू हा या राशीचा स्वामी आहे. शुक्र या राशीत उच्च असतो. बुध, मंगळ व शनी हे या राशीत निर्बल असतात. या राशीत जन्मणाऱ्या लोकांत गायन-वादनाची आवड आढळते. मनुष्यशरीरात या राशीचा अंमल पोट व आतडी यांवर चालतो. विसराळूपणा व निष्काळजीपणा हे या राशीचे दोष होत.

आकाशात या राशीमध्ये चार ठळक तारकांचा भला मोठा चौकोन दिसतो. विषुववृत्ताच्या उत्तरेला दहा ते तीस अंशां-मध्ये या चौकोनाची मांडणी आहे. याच्या एवढा भव्य चौकोन आकाशात दुसरा नाही. पाश्चात्य ज्योतिष्यांनी या चौकोनाचे पेगासस असे नाव ठेवले आहे. हे एका घोड्याचे नाव आहे.

माउंट विल्सन येथील वेधशाळेतून पेगाससच्या चौकोनाची प्रकाशचित्रे घेतलेली आहेत. शास्त्रज्ञ सांगतात, की या चौको-नाच्या पोटात, जिथे काहीही नाही असे आपल्याला वाटते, तिथे दहा कोटी प्रकाशवर्षे इतक्या अंतरावरून एकशे बासष्ट तेजो-मेघांचा एक संघ फिरत आहे आणि त्यांतल्या प्रत्येक तेजोमेघा-जवळ एवढी अलोट द्रव्यसंपत्ती आहे, की तो आपल्या आकाश-गंगेसारखे कोट्यवधी तारकांचे एकेक विश्व सहज उभारू शकेल.

मीनपा (इ. स. चे ९ वे शतक) चौऱ्यायंशी सिद्धांपैकी एक. हा आसाम प्रदेशातला रहिवासी असून, एका कोळ्याच्या कुळात जन्मला होता. त्याने ध्यानमार्गाचा अभ्यास केला होता. हा पालवंशी देवपाल राजाच्या कालात होऊन गेला, असे म्हणतात चर्पटीपाद हे याचे गुरू होत. तंजूर-मठातील ग्रंथालयातील बाह्यांतर बोधिचित्त बंधोपदेश नावाचा एक ग्रंथ आहे. या ग्रंथाची भाषा प्राचीन असमिया अथवा मगही असावी. चर्यागीतीमध्ये याचे एक पदही दिलेले आहे. मीनपा संबंधीच्या अनेक शैव दंतकथा श्री. बागची यांनी कौलज्ञाननिर्णय या ग्रंथाच्या प्रस्तावनेत दिल्या आहेत. मत्स्येंद्र-नाथ हा याचा शिष्य होय. [पु. त. नि.; सि. सा.; हिं. सा. बि.]



मीनपा

मीना एक जंगली जात. या लोकांची वस्ती राजस्थान, पंजाब, मध्य प्रदेश, या राज्यांत आढळते. हे मूळचे राजस्थानातील राज्यकर्ते असावे, असे म्हणतात. कारण जय-पूरच्या राजाला राज्याभिषेक करताना यांच्या अंगठ्याच्या रक्ताचा टिळा लावावा लागत होता. हे लोक स्वतःला रावत म्हणवून घेतात आणि हे आजही इथले परंपरागत रक्षक मानले जातात. हे सुदृढ व देखणे असतात.

यांच्या उत्पत्तीसंबंधी बरेच मतभेद आहेत. यमल नावाचा सुप्रसिद्ध मीना हा यांचा मूळ पुरुष असून, त्याच्या वंशजांना हे नाव मिळाले असे म्हणतात. काहींच्या मते काही रजपूत रणां-गणातून पळून गेले आणि स्वतःचे नाव बदलून राहिले, तेच हे मीना होत. मत्स्यावताराशासून यांची निर्मिती झाली, असेही एक प्रमाण दिले जाते. काहींनी ही एक संमिश्र जात मानलेली आहे. यांच्यांत कगोल, सीरा, जरवाल, बाग्री इ. बत्तीस कुळे आहेत.

मारवाडातील या जातीच्या लोकांत त्यांच्या स्थानावरून दोन भेद पडले आहेत. मारोठ, नावा, सांभर इ. ठिकाणी राह-णारे मीना आपल्याला श्रेष्ठ समजतात आणि गोपाड, जालोर इ. ठिकाणच्या लोकांना ते आपल्याहून खालच्या दर्जाचे मान-तात; त्यांना धेडिया मीना अशी संज्ञा आहे. या दोन्ही वर्गांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोकांत सर्वसामान्यपणे रोटी-बेटी-व्यवहार होत नाहीत.

उच्चकुलीन मीनांमध्येही दोन पोटभेद असून, ते जमीन-दार व चौकीदार या नावांनी ओळखले जातात. चौकीदार

मीना पुरुष – राजस्थान

मीना हे स्वतःला योद्धे म्हणवितात आणि जमीनदारांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ मानतात. ते जमीनदारांच्या मुली करतात, पण आपल्या मुली त्यांना देत नाहीत.

चौकीदार मीना हे लुटारू, दरोडेखोर व वाटमारीसाठी एका काळी प्रसिद्ध होते. ते महाराष्ट्र व कर्नाटक इतक्या दूर-पर्यंत जाऊन दरोडे घालीत. त्या कामासाठी दिवाळीनंतर बाहेर पडत. हल्ली बरेचसे मीना शेती, मजुरी, नौकरी, इ. व्यवसाय करू लागले आहेत. जळाऊ लाकूड विकणे हाही एक त्यांचा व्यवसाय आहे. निकृष्ट दर्जाची कामे करायला त्यांना त्यांच्या समाजाकडून बंदी असते.

विवाहप्रथा – मीनांमध्ये अनेक कुळ्या असून, समान कुळीत त्यांचे लग्नसंबंध होत नाहीत. यांच्यांत देजाची व हुंड्याचीही चाल आहे. देजाची रक्कम कमीत कमी सत्तावीस रुपयांपर्यंत असते. विवाहानंतर एक वर्षाने मुलगी सासरी जाते.

विधवा स्त्री आपल्या मृत पतीच्या कुळीतील पुरुषाबरोबर पुनर्विवाह करू शकत नाही. विधवेच्या विवाहात नवा पती पत्नीला एक नवे वस्त्र व लाखेचा पांढरा चुडा देतो आणि शनिवारी रात्री तिला आपल्या घरी घेऊन जातो. या वेळी प्रथम-संबंधातील तिची अपत्येही तिच्याबरोबर जातात. त्यांना कुळी बदलावी लागत नाही. पण त्यांचा आपल्या पहिल्या पित्याच्या मालमत्तेवरील हक्क मात्र नष्ट होतो. दत्तक घेण्याची प्रथा तुरळक प्रमाणात यांच्यांत आढळते. मात्र मुलगा त्याच कुळीतला व त्याच कुटुंबातला असावा लागतो.

सामान्यपणे हे लोक घटस्फोट होऊ देत नाहीत. पण स्त्रीचे चारित्र्य चांगले नसल्याची खात्री झाल्यास हे घटस्फोट देतात. स्त्रीने दुसरा विवाह केला तर तिला पहिल्या पतीला नुकसान-भरपाई म्हणून पंचायत सांगेल ती रक्कम द्यावी लागते. दुसऱ्या नवऱ्याने ही रक्कम दिली नाही, तर तिला पहिल्या नवऱ्या-कडेच राहावे लागते.

मीना स्त्रिया सोन्याचे दागिने व काचेच्या बांगड्या वापरीत नाहीत. त्या चांदीचे व काशाचे दागिने घालतात.

प्रसूतिप्रथा – हे लोक जननाशौच सात दिवसांपासून सत्तावीस

मीना युवती – राजस्थान

दिवसांपर्यंत पाळतात. ते संपल्यावर उत्सव करून गूळ वाटतात. मुलाचे नामकरण व पत्रिका ब्राह्मणाकडून करून घेतात. हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चांभार, भंगी, खाटिक, इ. लोकांच्या हातचे खात नाहीत. हा नियम मोडणाऱ्याला, त्याचप्रमाणे गाय, म्हैस यांची हत्या करणाऱ्याला व अनैतिक वर्तन करणाऱ्याला ते जातिबहिष्कृत करतात.

देवधर्म—बहुतेक सर्व मीना भैरव, हनुमान, महादेव व काली देवी यांचे उपासक आहेत. दर वर्षी फाल्गुन महिन्यात महादेवाची एक यात्राही ते भरवतात. हे लोक शीतळा देवी व पिंपळ यांची पूजा करतात, गंगेला पवित्र मानतात आणि ब्राह्मणांना गुरू करतात. पौर्णिमा, एकादशी व अमावास्या या तिथींना हे उपास करतात. रविवार, बुधवार व गुरुवार हे यांचे शुभ दिवस होत.

मर्तिकप्रथा—यांच्यांत मृताला जाळण्याची किंवा पुरण्याची पद्धत आहे. मुलांना पुरतात. मृताचे दहन करण्यापूर्वी त्याचे मुंडन करून त्याला स्नान घालतात. नवव्या दिवशी नातेवाईक मुंडन करतात. त्याचप्रमाणे नवव्या आणि बाराव्या दिवशी जेवण देतात. पिंडदानही करतात. मृताच्या अस्थी गंगेत विसर्जित करतात. वार्षिक श्राद्धही करतात. काही मीनांमध्ये सहा महिन्यांनी ज्ञातिभोजन घालतात.

या लोकांत मृताची संपत्ती सर्व मुलांना सारखी वाटतात. मुलगा नसल्यास अविवाहित मुलगी संपत्तीची वाटेकरी होते. ती विवाहित असल्यास निकटचे नातेवाईक संपत्तीचे वारसदार होतात. [सो. ला. रा.; रा. जा.; म. ज्ञा. को.; पं. का.; क्लो. ट्रा. पं. नॉ. प्रॉ.; गु. जा.; धर्मयुग, ५ एप्रिल १९६४]

मीनाची अम्मा एक ग्रामदेवता. हिचे ठाणे मदुरेत आहे. अनेक लोक हिला मीनाक्षी मानतात. हिच्या संबंधी एक दंतकथा सांगतात, ती अशी—

पांड्य नावाचा एक राजा होता. तो दुष्ट व पाखंडी होता. त्याने एकदा मीनाक्षीदेवीचे मंदिर बंद केले. त्यामुळे देवी त्याच्यावर कोपली. राजाचा सूड घेण्यासाठी तिने एका मुलीचा जन्म घेतला. राजालाही संतान नव्हते. एके दिवशी त्याला राजवाड्यात एक लहान मुलगी दिसली. तिच्या दंडात एक सोन्याचे कडे होते. राणीच्या दंडातही तसेच एक कडे होते. त्यामुळे राजाला आश्चर्य वाटले आणि त्याने त्या मुलीचा सांभाळ करायचे ठरविले. परंतु राजज्योतिषाने तसे करण्यात धोका आहे, हे सांगितल्यावर राजाने त्या मुलीला एका टोपलीत घालून नदीत सोडून दिले. ही मुलगी एका व्यापाऱ्याला सापडली. त्याने तिला घरी आणून कनदाई असे तिचे नाव ठेवले आणि तिचा प्रतिपाळ केला.

पुढे शिव एका व्यापाऱ्याचा वेष घेऊन कावेरीपट्टन इथे राहू लागला. त्याला कनदाईची जन्मकथा समजली आणि त्याने तिला मागणी घातली. नंतर त्यांचा विवाह झाला. काही कालाने व्यापाऱ्याला वाईट दिवस आले. त्याने कनदाईच्या हातातले कडे मदुरेच्या बाजारात नेऊन विकले. योगायोगाने त्याच वेळी राणीचेही कडे हरवले होते. राजदूतांनी ते कडे एका व्यापाऱ्याकडे पाहिल्यावर त्यांना ते राणीचेच कडे वाटले. त्यांनी त्या व्यापाऱ्याला पकडून राजापुढे उभे केले. राजाने त्याला मृत्युदंड सांगितला. ही वार्ता कनदाईला समजली, तेव्हा तिने दुर्गेचे रूप घेऊन राजाला ठार केले. तेव्हापासून तिथले सर्व लोक तिला भजू लागले. राजाला ठार केल्यामुळे देवीलाही रक्ताची चटक लागली. म्हणून मग लोकही दर वर्षी तिला पशुबळी देऊ लागले. [व्हि. गॉ. सा. इं.]

मीनाक्षी मदुरेतील एक प्रसिद्ध देवता. पाहा — मदुरा.

मीमांसादर्शन षड्दर्शनांपैकी एक दर्शन. मान् = पूजा किंवा विरोध या धातूला सन् प्रत्यय लावल्याने मीमांसा शब्द बनतो. याला पूर्वमीमांसा असेही म्हणतात. यातील मीमांसा हा शब्द श्रुतीइतकाच प्राचीन आहे. तो नाम आणि क्रियापद या दोन्ही रूपांत श्रुतीमध्ये दिसून येतो. ज्यांत मीमांसा हा शब्द आला आहे, अशी श्रुतीतली काही वचने अशी—

उत्सृज्यां नोत्सृज्यां इति मीमांसन्ते
ब्रह्मवादिनस्तदाहुरुत्सृज्यमेवेति ।
(तै. सं. ७.५.७.१)

अर्थ — दिवस सोडावा किंवा न सोडावा अशी ब्रह्मवादी लोक मीमांसा करतात. (शेवटी) सोडावाच असे म्हणाले.

ब्राह्मणं पात्रे न मीमांसेत ।
(तां. म. ब्रा. ६.५.९)

अर्थ — (निमंत्रित) ब्राह्मणाच्या गुणावगुणांची चर्चा करू नये.

उदिते होतव्यमनुदित इति मीमांसन्ते ।
(कौ. ब्रा. २.९)

अर्थ — सूर्योदयापूर्वी अग्नीला होम द्यावा का सूर्योदयानंतर द्यावा अशी वाटाघाट करतात.

महाश्रोत्रियाः समेत्य मीमांसां चक्रुः को नु आत्मा किं ब्रह्मेति ।
(छांदोग्योप. ५.११.१)

अर्थ — महाविद्वान एकत्र येऊन आत्मा म्हणजे काय व ब्रह्म म्हणजे काय यांची मीमांसा करते झाले.

सैषा आनन्दस्य मीमांसा भवति ।
(तै. उ. २.८)

अर्थ — आनंदाविषयी (शेवटी) हा असा निर्णय ठरतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'विचारपूर्वकतत्त्वनिर्णयः' असे मीमांसेचे लक्षण केलेले आहे. परस्परविरोधी वेदमंत्रांतला विरोध दूर करून त्यांच्या अर्थाचा निर्णय ठरवणे याचे नाव मीमांसा होय.

कुमारिलभट्ट म्हणतो–

धर्माख्यं विषयं वक्तुं मीमांसायाः प्रयोजनम् ।

अर्थ – धर्म नावाच्या विषयाचे विवेचन करणे, हे मीमांसेचे प्रयोजन होय.

श्रुतीचे कर्मकांड व ज्ञानकांड असे दोन विभाग आहेत. यज्ञयागांच्या विधीचे व अनुष्ठानाचे वर्णन करणे हा कर्मकांडाचा विषय आहे. जीव, जगत व ईश्वर यांचे रूप व त्यांचा परस्पर संबंध या गोष्टींचे निरूपण करणे, हा ज्ञानकांडाचा विषय आहे. या दोहोंत दिसून येणाऱ्या विरोधांचे निराकरण करण्याच्या प्रधान उद्देशाने या दर्शनाची प्रवृत्ती झाली आहे. कर्मकांड हे वेदाचे पूर्वखंड असून, ज्ञानकांड हे उत्तरखंड आहे. म्हणून या दर्शनाला पूर्वमीमांसा व ज्ञानकांडाला अर्थात वेदान्ताला उत्तरमीमांसा म्हणतात. या शास्त्राला प्राचीन काळी न्यायशास्त्र असेही म्हणत. त्यावरून असे वाटते, की लोक व वेद यांमध्ये प्रचलित असलेल्या न्यायांच्या आधारे या शास्त्राची रचना झाली असावी. कित्येक मीमांसाग्रंथांची नावे न्यायकणिका, न्यायरत्नाकर, न्यायमाला, अशांसारखी न्यायपूर्वपदाची आहेत, ही गोष्टही मीमांसेला न्याय म्हणत, याला प्रमाणभूत ठरते.

पार्थसारथिमिश्राने श्लोकवार्तिकाच्या आपल्या व्याख्यानात मीमांसेची परंपरा सांगितली आहे, ती अशी – ब्रह्मदेवाने प्रजापतीला प्रथम मीमांसेचा उपदेश केला. प्रजापतीपासून इंद्र, आदित्य, वसिष्ठ, पराशर, कृष्णद्वैपायन व जैमिनी अशा परंपरेने मीमांसेचा प्रचार झाला.

मीमांसा या शब्दाचा नेमका अर्थ म्हणजे संबंधनिश्चिती हा होय. एखाद्या शब्दाचा अथवा वाक्याचा अर्थ निश्चित करताना व त्याचा इतर शब्दांशी अथवा वाक्यांशी असणारा संबंध निश्चित करताना जो विचार करावा लागतो व जो तर्कवाद स्वीकारावा लागतो, त्याला मीमांसा म्हणायचे. ज्या परस्परावलंबी शब्दांनी अथवा वाक्यांनी अशी पद्धती शिकवली जाते, त्या शब्दांना अथवा वाक्यसमूहाला मीमांसाशास्त्र हे नाव दिले गेले आहे. प्रा. विनायक विष्णू देशपांडे यांनी आपल्या पूर्वमीमांसा नामक निबंधात या शास्त्राच्या प्रवृत्तीचे व मीमांसान्यायांचे विवेचन केले आहे, ते असे –

मीमांसाशास्त्राची प्रवृत्ती श्रुतींचा सम्यगर्थ समजून घेण्याकरिता झाली आहे. श्रुतींमधील निरनिराळ्या वाक्यखंडांचा व वाक्यांचा परस्परांशी मेळ बसेल व सर्व ग्रंथ सरळपणे विशद करता येईल हा उद्देश घेऊन जैमिनीच्या सूत्रग्रंथात अर्थ लावण्याचे नियम दिलेले आहेत व हे नियम इतके सर्वमान्य होऊन बसले आहेत, की गौतमवसिष्ठापस्तम्बादी धर्मशास्त्रावरील अगदी प्राचीन शास्त्रकारांनीसुद्धा या नियमांना आधारभूत मानलेले आहे. मेघातिथी, विज्ञानेश्वर, माधवाचार्य, जीमूतवाहन यांच्यासारख्या सर्वमान्य झालेल्या शास्त्रकारांनी आपापल्या ग्रंथांतून या नियमांच्या साहाय्यानेच सर्व धर्मशास्त्राचा विस्तार केला आहे व धर्मशास्त्रावरील अगदी अलिकडचे निबंधकारसुद्धा मीमांसाशास्त्राला, त्या शास्त्राने स्वीकृत केलेल्या पद्धतीला आणि त्या शास्त्रातील नियमांना शिरोधार्य मानतात. न्यायालयांतून ज्या वेळी शास्त्रवचनांचा अर्थ लावण्याची पाळी येई, त्या वेळी तो या मीमांसाशास्त्राच्या नियमांनुसारच लावला जात असे. हे इंग्रजी राज्याच्या सुरवातीपर्यंत तरी अखंडितपणे चालू होते. कारण तोपर्यंत (मुसलमानी अंमलातसुद्धा) धर्मशास्त्रामध्ये निर्णय देण्याचा अधिकार विद्वान ब्राह्मणांनाच दिलेला होता. इंग्रजी राज्याच्या सुरुवातीला जुन्या परंपरेला धरून राज्यकर्त्यांनी न्यायाधीशांना मदतनीस म्हणून धर्मशास्त्री पंडित नेमले होते; परंतु या नियमांचे महत्त्व आणि सत्यत्व इंग्रज न्यायधीशांस आणि इतर न्यायधीशांस आणि इतर विद्वानांस इतके पटले आहे, की आता न्यायालयातून पंडितांची व्यवस्था कमी केली असली तरी, शास्त्रवचनांचा अर्थ लावण्याकरता मीमांसानियमच उपयोगात आणण्यात येतात. या नियमांची योग्यता आणि महत्त्व कोलब्रुक, थिबो, माक्समुल्लर वगैरे विद्वानांनी आणि सर जॉन एज, सर टॉमस स्ट्रेंज, मेन वगैरे कायदेपंडितांनी मान्य केले आहे. या शास्त्राचे कित्येक नियम आज पाश्चिमात्य देशांतील सर्वमान्य झालेल्या कायद्याचा अर्थ लावण्याच्या पद्धतीतील नियमांशी तंतोतंत जुळतात. इतकेच नव्हे, तर पाश्चिमात्य पद्धतीतील नियमांपेक्षा मीमांसाशास्त्राच्या नियमांमध्ये पुष्कळ ठिकाणी अधिक सूक्ष्मतेने व काटेकोरपणे विचार झालेला आढळतो, म्हणूनच या नियमांचे महत्त्व आणि योग्यता ही पाश्चिमात्य विद्वानांना मान्य झाली आहे.

कायद्यात उपयोगी पडणारे काही मीमांसान्याय असे-

(१) प्रत्येक शब्दास, वाक्यखंडास आणि वाक्यास काही तरी हेतू आणि अर्थ असलाच पाहिजे. यास सार्थकतान्याय हे नाव आहे.

(२) जेथे एका नियमाने काम भागण्यासारखे आहे, तेथे ठिकाणी एकापेक्षा अधिक नियमांचे अस्तित्व मानणे योग्य नाही. यास लाघवन्याय म्हणतात.

(३) एका ठिकाणी असलेल्या शब्दाचा अगर वाक्याचा अर्थ भिन्न भिन्न प्रकारांनी करू नये. यास अर्थैकत्वन्याय म्हणतात.

(४) जेथे स्पष्ट विरोध असेल, तेथे दोन पक्षांपैकी कोणता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याही एकाचा अवलंब करावा. यास विकल्पन्याय असे नाव आहे.

(५) ज्या ठिकाणी शक्य असेल त्या ठिकाणी (शक्य तितकी खटपट करून सुद्धा) समन्वय केला पाहिजे व होता होईल तो विरोध टाळला पाहिजे. यास सामञ्जस्यन्याय म्हणतात.

(६) मुख्य कल्पनेशी विरोधी अशी गौण कल्पना ज्या ठिकाणी शब्दाने अथवा वाक्याने प्रतीत केली जाते, त्या ठिकाणी गौण कल्पनेचा मुख्य कल्पनेशी समन्वय करून घेतला पाहिजे व तसे शक्य नसेल तर गौण कल्पनेचा त्याग केला पाहिजे. यास गुणप्रधानन्याय म्हणतात.

मीमांसादर्शनाचे दोन प्रमुख विभाग आहेत– (१) कर्मकांडाच्या विधीत जे परस्पर विरोध दिसून येतात त्यांच्या परिहारासाठी व्याख्यापद्धतीचा आविष्कार करणे व (२) कर्मकांडाला आधारभूत असे सिद्धान्त युक्ती व तर्क यांच्या आधारे प्रतिष्ठित करणे. मीमांसेतील कर्मकांडाचे जे सिद्धान्त आहेत त्यांच्याविषयी श्री. बलदेव उपाध्याय लिहितात–

धर्म हा दर्शनाच्या आधारावर उभा असतो. वैदिक कर्मकांडाने आपली सत्ता व स्थितीची पूर्णता यांच्यासाठी कित्येक सिद्धान्त मानलेले आहेत. आत्म्याच्या अमरत्वाविषयी श्रद्धा हा त्यांपैकी एक सिद्धान्त होय. मृत्यूनंतरही आत्मा अस्तित्वात राहतो व स्वकृत शुभ कर्मांचे फल स्वर्गात भोगतो. कर्मफलांना सुरक्षित ठेवणारी शक्ती हा दुसरा सिद्धान्त होय. मीमांसकांची वेदांच्या ठिकाणी दृढ श्रद्धा असते. वेद हे कोण्या व्यक्तीने रचलेले नसून ते अपौरुषेय आहेत, असे मीमांसक मानतात. मीमांसकांच्या मते मानवी जीवन स्वप्नवत किंवा मायिक नसून ते नितांत सत्य व यथार्थ आहे. तसेच हे जगतही मायिक नसून सत्य आहे. या सिद्धान्तांच्या पायावर कर्मकांडाचा प्रासाद त्यांनी उभा केला आहे. चार्वाक, जैन व बौद्ध हे वेदांना प्रमाण मानीत नाहीत. अर्थात वेदविहित कर्मांवरही त्यांची श्रद्धा नाही. काही उपनिषदांतही कर्मकांडाची निंदा केलेली आढळते. वरील वेदप्रामाण्य न मानणाऱ्या धर्मपंथांच्या सिद्धान्तांचे मीमांसादर्शनाने तर्क व प्रमाणे यांच्या आधारे खंडन करून कर्मकांडाचे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. विरोधी मतांच्या प्रबल आघातापासून वेदाला बचावण्यासाठी मीमांसा सदैव बद्धपरिकर राहिली आहे. आपल्या सिद्धान्तांचे रक्षण करणे आणि त्यांची प्रामाणिकता सिद्ध करणे यासाठी त्यांनी प्रमाणशास्त्रही निर्माण केले असून, ते न्यायाच्या प्रमाणशास्त्राहून अनेक गोष्टींत भिन्न व स्वतंत्र आहे.

मीमांसासाहित्य – या शास्त्राचे साहित्य विपुल व विस्तृत आहे. जैमिनीची सूत्रे हा या शास्त्राचा मुख्य व सर्वांगपूर्ण ग्रंथ होय. जैमिनी हा सनपूर्व ३ ऱ्या शतकात होऊन गेला. मात्र या शास्त्राचा हा आदिप्रवर्तक नव्हे. त्याच्या पूर्वी बादरायण, बादरी, ऐतिशायन, कार्ष्णाजिनी, लावुकायन, कामुकायन, आत्रेय व आलेखन असे आठ मीमांसक आचार्य होऊन गेले असून, जैमिनीने आपल्या ग्रंथात त्यांच्या मतांचा उल्लेखही केला आहे. याव्यतिरिक्त आपिशली, उपवर्ष, बोधायन व भवदास हेही मीमांसेचे प्राचीन आचार्य होत. अन्य ग्रंथांत त्यांचा उल्लेख केलेला आहे.

जैमिनीने सोळा अध्यायांमध्ये मीमांसादर्शनाच्या मूलभूत सूत्रांची रचना केली. पहिल्या बारा अध्यायांत त्याने धर्मजिज्ञासा, कर्मभेद, शेषत्व, प्रयोज्य – प्रयोजकभाव, कर्मांमधला क्रम, अधिकार, सामान्य – विशेष, अतिदेश, ऊह, बाध, तंत्र व आवाप या बारा विषयांचे विवेचन केले आहे. त्यावरून प्रस्तुत बारा अध्यायांना द्वादशलक्षणी असे म्हणतात. पुढच्या चार अध्यायांना संकर्षणकांड किंवा देवताकांड असे नाव आहे. कित्येक विद्वान हे चार अध्याय जैमिनिकृत नसल्याचे सांगतात. यांत देवतांच्या अधिकाराचे विवेचन केलेले आहे. असे हे सोळा अध्याय असले, तरी पठन – पाठनपरंपरा मात्र पहिल्या बारा अध्यायांचीच आहे.

जैमिनीच्या मीमांसादर्शन या ग्रंथाची सूत्रसंख्या २६४४ असून, अधिकरणे ९०९ आहेत. काहींच्या मते ही सूत्रसंख्या २६५२ किंवा २७४२ आहे.

अनेक सूत्रे मिळून एक अधिकरण बनते. अधिकरणात एक प्रधान सूत्र असते व बाकीची गुणसूत्रे असतात. प्रधान सूत्र पूर्वपक्ष उपस्थित करते व अन्य सूत्रे त्याचे खंडन करून सिद्धान्त सांगतात. विषय, संशय, पूर्वपक्ष, सिद्धान्त, प्रयोजन व संगती असे अधिकरणात सहा पदार्थ असतात. प्रस्तुत ग्रंथात अशी अधिकरणे काहींच्या मते ९०९ तर काहींच्या मते ९१५ आहेत.

द्वादशलक्षणीच्या बारा अध्यायांत जे विषय आले आहेत, ते संक्षेपाने असे –

अध्याय १– धर्म म्हणजे काय? वेदांतील आज्ञार्थी वचनांनी सांगितलेली कोणतीही इष्ट गोष्ट म्हणजे धर्म होय. शब्द व अर्थ यांचे संबंध नित्य आहेत. विधी व अर्थवाद यांतील भेद आणि परस्परांचा संबंध, श्रुति-स्मृतींचे बलाबल, नामधेय, पूर्वसंदर्भावरून अर्थ लावणे, इत्यादी.

अध्याय २ – वाक्यातील मुख्य शब्द क्रियापद होय. वेदोपदिष्ट कर्मांचे फल अपूर्व, मुख्य कर्मे आणि गौण कर्मे, मंत्र आणि ब्राह्मण यांच्या व्याख्या. ऋक्, यजु: व साम यांच्या व्याख्या. संख्या, देवता, संज्ञा यांच्या भिन्नत्वामुळे कर्मभिन्नत्व प्राप्त होते. शाखाभेदाने विधिभिन्नत्व होत नाही. शब्दांतर, अभ्यास, संख्या, संज्ञा, गुण व प्रकरणांतर ही कर्मभेदाची प्रमाणे.

अध्याय ३ – शेष म्हणजे काय? मंत्र हे पुरुषार्थाचे शेष आहेत. पुरुषार्थ हे कर्त्याचे शेष आहेत व कर्ता काही कर्मांचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शेष आहे. एकवचनात अनेकवचनांचा अंतर्भाव होतो. शब्दाचा मुख्यार्थ तेवढाच ग्राह्य. श्रुती, लिंग, वाक्य, प्रकरण, स्थान, समाख्या या प्रकरणांवरून वेदवचनांचा विनियोग कसा करायचा ते समजते. यांपैकी दोन गोष्टींत विरोध प्राप्त झाला असता पूर्व पूर्व प्रमाणे बलवत्तर होत. वेदाध्ययन केलेला पुरुष हाच यज्ञाचा अधिकारी होतो; इतर कोणी नाही.

अध्याय ४ – यज्ञासाठी जे जे कर्तव्य म्हणून आज्ञापिलेले असेल ते ते क्रत्वर्थ समजावे. ते करणे आवश्यक आहे. क्रत्वर्थावाचून जे जे कर्तव्य ते ते पुरुषार्थ होय. अर्थकर्म व प्रतिप्रत्तिकर्म यांची उदाहरणे. निरनिराळ्या कर्मांबद्दल देश, काल व कर्ता कोण हे सांगणारी श्रुतिवाक्ये अर्थवाद नसून नियम होत. ज्या व्रतांना कोणतेही फल सांगितलेले नसते, त्यांचे स्वर्गप्राप्ती हे फल समजावे.

अध्याय ५ – कोणतेही व्रत आचरताना कृत्यांचा जो क्रम दिलेला असतो, त्या क्रमानेच ती घडली पाहिजेत. श्रुती, अर्थ, पाठ, इ. क्रम ठरविण्याची प्रमाणे. विरोध आला असता परस्परांचे बलाबल पाहून निर्णय ठरवणे. सात प्रकारचे अतिदेश.

अध्याय ६– अधिकाराची व्याख्या. स्वर्ग ही परमानंदाची स्थिती. यज्ञ हा स्वर्गाला पोचवणारा मार्ग. पति–पत्नी दोघांनी मिळून यज्ञ करायचा. उपनयनानंतरचे गुरुवंदनादिक अधिकार. त्रैवर्णिकांवर तीन ऋणांतून मुक्त होण्याची जबाबदारी. नित्यकर्मे अवश्यकरणीय. ब्राह्मण हेच सत्राचे अधिकारी. राजाला भूमिदान करता येत नाही. कारण भूमीवर सर्व प्रजेचा हक्क असतो.

अध्याय ७–८ – दर्शपूर्णमासातले विधी अतिदेशानेही करायचे की काय याविषयी विवरण. प्रकृतियज्ञामध्ये जे जे विधी सांगितलेले असतील, ते ते सादृश्याच्या नियमाप्रमाणे विकृतियज्ञात करायला हरकत नाही.

अध्याय ९ – ऊहाचा विचार. मंत्र व संस्कार यांना अतिदेशाचा नियम लागू करताना त्यात आवश्यक तो बदल करणे. फल ही यज्ञातली मुख्य गोष्ट. यज्ञात करायच्या सर्व विधींचा उद्देश अपूर्व हा असतो.

अध्याय १० – बाध आणि अभ्युच्चय यांसंबंधी विचार. प्रकृतियागातील कृत्यमालिकेचा विकृतियागात उपयोग करण्याविषयी नियम. प्रतिषेध आणि पर्युदास यांचे विवेचन. नञ् शब्दाचा अर्थ.

अध्याय ११ – तंत्र आणि आवाप यांचा विचार. ज्या कृत्यांचा दृश्य परिणाम होतो, ती कर्मे तो परिणाम दिसेपर्यंत केली पाहिजेत. अदृश्य परिणामाची कृत्ये एकदाच करायची.

अध्याय १२ – प्रसंगविचार. जेव्हा अनेक वस्तू सारख्याच रीतीने कर्त्याच्या उपयोगाला येत असतील, तेव्हा त्यांतील कोणतीही वस्तू स्वतःच्या कामासाठी वापरावी. अनध्यायाचे नियम वेदाध्ययनालाच लागू आहेत. यज्ञात प्रथम मंत्र म्हणून नंतर तदनुरूप क्रिया करावी. हौत्र मंत्रामध्ये विकल्प नाही. संस्कार म्हणून जी कर्मे करावी लागतात, ती सर्व यज्ञकर्त्या पुरुषाने करावी.

शबरस्वामीने मीमांसादर्शनाच्या बारा अध्यायांवर विस्तृत व प्रामाणिक भाष्य लिहिले आहे. पातंजलमहाभाष्य व शांकरभाष्य यांच्या तोडीचे हे भाष्य मानतात. हेच भाष्य सांप्रत मीमांसेचा मूलग्रंथ मानले जाते. या भाष्यावर कुमारिल भट्ट, प्रभाकर मिश्र व मुरारी मिश्र असे तीन व्याख्याकार झाले. या तिघांत काही मतभेद असल्यामुळे मीमांसेचे भाट्टमत (कुमारिल भट्टाचे), प्राभाकरमत (अन्य नाव, गुरुमत) व मिश्रमत असे तीन प्रधान विभाग झाले आहेत.

कुमारिल भट्टाने शाबर भाष्यावर श्लोकवार्तिक, तंत्रवार्तिक व टुप्टीका असे तीन ग्रंथ लिहिले. हे तीन्ही ग्रंथ मीमांसेचे आधारस्तंभ समजले जातात.

मंडनमिश्र हा कुमारिल भट्टाचा प्रधान शिष्य होय. त्याने मीमांसेवर भावनाविवेक, विधिविवेक, विभ्रमविवेक, मीमांसासूत्रानुक्रमणी, इ. ग्रंथ लिहिले.

भाट्टमताच्या सिद्धान्तांचा प्रचार करण्यासाठी अनेक मार्गांवर मीमांसकांनी जैमिनीची सूत्रे व कुमारिल भट्टाचे ग्रंथ यांवर सुबोध टीका लिहिल्या. या मीमांसकांत पार्थसारथी मिश्र (११ वे शतक), माधवाचार्य (१४ वे शतक), खंडदेव मिश्र (१७ वे शतक) हे तिघे प्रमुख होत. पार्थसारथी मिश्राने तंत्ररत्न, न्यायरत्नाकर, न्यायरत्नमाला व शास्त्रदीपिका हे ग्रंथ लिहिले. माधवाचार्याने न्यायमालाविस्तार हा ग्रंथ लिहिला. खंडदेव मिश्राने भाट्टकौस्तुभ, भाट्टदीपिका व भाट्टरहस्य असे तीन पांडित्यमंडित ग्रंथ लिहिले.

प्रभाकर मिश्र याने आपले स्वतंत्र मत प्रस्थापित करण्यासाठी शाबर भाष्यावर बृहती व लघ्वी अशा दोन टीका लिहिल्या. प्रभाकराचा शिष्य शालिकनाथ मिश्र याने प्रभाकराच्या बृहतीवर ऋजुविमला व लघ्वीवर दीपशिखा या नावाच्या टीका लिहिल्या आहेत. नंदीश्वराने प्रभाकरविजय लिहून शालिकनाथ व भवनाथ यांच्या मतांचा परिपोष केला. रामानुजाचार्य यांचा तंत्ररहस्य हा ग्रंथ लहान असूनही सुंदर आहे. त्याला प्रभाकरमताची प्रवेशिका असे म्हणतात. मुरारी मिश्राच्या संप्रदायाविषयी फारशी माहिती मिळत नाही. याने मीमांसासूत्रांवर बृहत्टीका लिहिली होती. तिचा काही भाग आपल्याला नेपाळमध्ये मिळाला आहे, असे डॉ. उमेश मिश्र यांनी म्हटले आहे. प्रामाण्यवादावर त्याचे विवेचन महत्त्वपूर्ण आहे. 'मुरारेः तृतीयः पन्थाः' ही लोकोक्ती याच्यावरूनच निर्माण झाली असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मीमांसेत 'तृतीयः पन्थाः' म्हणजे तिसरे मत याने प्रचलित केले. त्रिपादी नीतिनयन व एकादशाध्यायाधिकरण हे याचे ग्रंथ सांप्रत उपलब्ध झाले आहेत.

प्रमाणविचार – यथार्थ अनुभवाला मीमांसक प्रमा म्हणतात. अतएव अज्ञात तत्त्वाचे अर्थज्ञान म्हणजे प्रमा आणि या अज्ञात अर्थाच्या ज्ञानाला उत्पन्न करणारे जे साधन ते प्रमाण होय. भाट्ट मतात अशा प्रकारची सहा प्रमाणे दिली आहेत, ती अशी – (१) प्रत्यक्ष, (२) अनुमान, (३) उपमान, (४) शब्द (५) अर्थापत्ती, (६) अनुपलब्धी. अद्वैत वेदान्तालाही ही प्रमाणे मान्य आहेत.

प्रत्यक्ष – 'साक्षात् प्रतीतिः प्रत्यक्षम्' = साक्षात उत्पन्न ज्ञान हेच प्रत्यक्ष होय. इंद्रिय व अर्थ यांच्या साक्षात संबंधाने प्रत्यक्ष ज्ञान होते.

अनुमान – हे प्रमाण न्यायवैशेषिक यांच्याप्रमाणेच मीमांसकही मानतात.

उपमान – यामध्ये मीमांसकांचा नैयायिकांशी मतभेद आहे. मीमांसक म्हणतात, की जेव्हा एखाद्या प्रथम पाहिलेल्या वस्तूसारखी दुसरी वस्तू पाहिली जाते, तेव्हा स्मृत पदार्थाच्या सादृश्याचे ज्ञान होते. त्यालाच उपमानजन्य ज्ञान म्हणतात.

शब्द – ज्ञात शब्दाने पदार्थाचे स्मरणात्मक ज्ञान झाल्यावर जे वाक्यार्थाचे ज्ञान होते, तेच शब्द प्रमाण होय. पौरुषेय व अपौरुषेय असे त्याचे दोन भेद आहेत. आप्तांचे वाक्य पौरुषेय असून, वेदवाक्य अपौरुषेय आहे. स्वतः शब्द हा अदृष्ट असतो. तो जेव्हा आप्तवाक्य व वेदवाक्य यांच्या रूपात येतो, तेव्हा त्याच्यामध्ये काही दोष राहत नाहीत. अशा प्रकारच्या आप्तवेदवाक्याने उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाला शब्द प्रमाण म्हणतात. वेद अपौरुषेय आहेत हे सिद्ध करण्यासाठी मीमांसकांनी ज्या युक्त्या दिल्या आहेत, त्या अशा –

(१) नैयायिक लोक वेदाला ईश्वरी रचना मानतात आणि म्हणून त्यांच्या दृष्टीने वेद पौरुषेय आहेत. पण मीमांसक ईश्वराची सत्ता मानीत नाहीत. ईश्वरच नसल्यामुळे वेद ही त्याची रचना आहे, असे म्हणणे निरर्थक आहे, असे त्यांचे मत आहे.

(२) वेदांत कोणत्याही कर्त्याचे नाव दिसत नाही. कित्येक मंत्रांच्या ऋषींची नावे आढळतात; पण ते मंत्रकर्ते नव्हेत. त्यांना ते मंत्र दिसले. यावरून ऋषींना द्रष्टे म्हणायचे. यावरून वेद अपौरुषेय मानणे हेच न्यायसंगत ठरेल.

(३) वेद हे नित्य आहेत. वेदांच्या नित्यत्वाचे सर्वश्रेष्ठ प्रमाण म्हणजे शब्दांची नित्यता हे होय. कानाने ऐकू येणारा ध्वनी अनित्य असून, तो केवळ शब्दाच्या स्वरूपाचा सूचक असतो. उच्चारण हे शब्दाला उत्पन्न करीत नाही; तर त्याच्या रूपांचा आविर्भाव करते. उच्चारणावर अवलंबून नसल्यामुळे शब्द नित्य आहेत आणि त्यांचा अर्थाशी संबंधही नित्य व स्वाभाविक आहे. वेद हा नित्य शब्दांचा समूह असल्यामुळे वेदही नित्य आहेत.

वेदांचा विषयविभागही मीमांसकांनी विस्ताराने विवेचिला आहे. त्यांनी वेदांतले विषय पाच प्रकारचे असल्याचे सांगितले आहे. त्यांची नावे अशी –

(१) विधी – स्वर्गाची कामना करणाऱ्या पुरुषाने यज्ञ करावा, अशा प्रकारच्या प्रवर्तक वाक्यांना विधी म्हणतात.

(२) मंत्र – अनुष्ठानाच्या अर्थाचे स्मारक असलेल्या शब्दांना मंत्र म्हणतात.

(३) नामधेय – यज्ञाच्या नावांना नामधेय म्हणतात.

(४) निषेध – अनुचित कार्यापासून परावृत्त होण्याला निषेध म्हणतात.

(५) अर्थवाद – एखाद्या पदार्थाच्या खऱ्या गुणांचे कथन करणे म्हणजे अर्थवाद होय.

वेदांचे हे पाच विषय असले तरी, वेदांचे तात्पर्य विधिवाक्यांतच आहे. अन्य चार विषय त्या विधिवाक्यांचे केवळ अंगभूत आहेत.

अर्थापत्ती – हे पाचवे प्रमाण होय. कोणत्याही अर्थाची अर्थांतरावाचून उपपत्ती होत नाही, असे पाहून त्या उपपत्तीसाठी ज्या अर्थांतराची कल्पना केली जाते, तिला अर्थापत्ती म्हणतात.

अनुपलब्धी – वरील पाच प्रमाणे ही भाव पदार्थांच्या उपलब्धीला साधक असतात. पण अभावाच्या उपलब्धीलाही प्रमाणाची गरज असते. इंद्रिये भावात्मक वस्तूंचे ज्ञान करून देतात; पण अभावाचे नाही. म्हणून अनुपलब्धी या प्रमाणाची स्वतंत्र सत्ता मानली पाहिजे. कोणत्याही पदार्थाच्या उपलब्धिज्ञानाची समग्र साधने उपस्थित आहेत; पण तरीही त्या पदार्थाची उपलब्धी मात्र होत नाही. त्यामुळे त्या पदार्थाचा अभाव सिद्ध होतो.

तत्त्वज्ञान – पदार्थ – तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने मीमांसकांनी काही पदार्थ नित्य मानले आहेत. मात्र पदार्थांच्या कल्पनेत वरील तीन्ही मतांत भेद आहे. द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, परतंत्रता, शक्ती, सादृश्य व संख्या असे आठ पदार्थ गुरुमतात सांगितले आहेत. कुमारिल भट्ट पाच पदार्थ मानतो. एक भाव व चार प्रकारचे अभाव मिळून हे पाच पदार्थ होतात. मुरारी मिश्राची पदार्थांची कल्पना या दोहोंहूनही भिन्न आहे. परमार्थात ब्रह्म हा एकच पदार्थ तो मानतो; पण लौकिक व्यवहारासाठी त्याने (१) धर्मिविशेष, (२) धर्मविशेष, (३) आधारविशेष व (४) प्रदेशविशेष असे चार पदार्थ मानले आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जगत – इंद्रिये ही बाह्य वस्तूंच्या उपलब्धीची साधने आहेत. त्यांच्याद्वारे जगताच्या ज्या रूपाची उपलब्धी होते, त्याच रूपात जगत हे सत्य आहे. जगात तीन प्रकारच्या वस्तूंचे ज्ञान आपणांस होत असते – (१) शरीर – ज्यात राहून आत्मा सुखदुःखांचा अनुभव घेतो, (२) आत्मा – आत्मा इंद्रियांच्या द्वारे सुख-दुःखांचा अनुभव घेतो व (३) पदार्थ – ज्यांना आत्मा भोगीत असतो. या तीन वस्तूंनी युक्त असा हा नानारूप संसार अनादी व अनंत आहे. या जगाची मूलसृष्टी नाही व त्यामुळे त्याचा प्रलयही नाही. केवळ व्यक्ती उत्पन्न होतात व नाश पावतात एवढेच.

शक्ती – कार्यकारणसंबंधाच्या व्याख्येत मीमांसेने एक नवी दृष्टी स्वीकारली आहे. मीमांसक म्हणतात, की कार्याच्या उत्पत्तीसाठी कारणाव्यतिरिक्त शक्ती नावाचा एक विशिष्ट पदार्थही मानला पाहिजे. बीजापासून अंकुर होतो, ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे; पण जर बीज भाजून पेरले, तर कितीही परिश्रम केले तरी त्यातून अंकुर निर्माण होणार नाही. म्हणून कारणाला मदत करण्यासाठी शक्ती हा पदार्थ मानणे भाग आहे.

मीमांसकांनी अपूर्व नावाचा आणखी एक शक्तीसारखा पदार्थ कल्पिला आहे. मीमांसा वैदिक कर्मकांडाच्या अनुष्ठानाला सर्वाधिक महत्त्व देते. पण कर्म आणि कर्मफल यांत फार मोठे व्यवधान असते. यज्ञ आज करायचा; पण त्याचे स्वर्गरूपी फल मृत्यूनंतर मिळायचे. या कालांतराने होणाऱ्या फलोत्पत्तीचे अपूर्व हे साधन बनते. आजचे कर्म आणि कालांतरातले फल या दोहोंमध्ये अपूर्व विद्यमान राहते. ते एका बाजूने कर्मातून उत्पन्न होते तर दुसऱ्या बाजूने कर्मफलाचे निष्पादक बनते.

आत्मा – आत्मा हा कर्ता व भोक्ता दोन्ही आहे. तो व्यापक असून प्रत्येक शरीरात भिन्न आहे. ज्ञान, सुख, दुःख, इच्छा, इ. गुण त्याच्यामध्ये समवाय संबंधाने राहतात. कुमारिलमतात आत्म्याच्या ठिकाणी क्रियेचे अस्तित्व मानले आहे. स्पंद व परिणाम हे क्रियेचे दोन प्रकार होतात. आत्म्याच्या ठिकाणी स्पंद (स्थानपरिवर्तन) असत नाही; पण परिणाम (रूप-परिवर्तन) असतो. परिणामशील असूनही आत्मा नित्य पदार्थ आहे. आत्म्यामध्ये चित् व अचित् असे दोन्ही अंश असतात. चिदंशाने तो प्रत्येक ज्ञानाचा अनुभव घेतो व अचिदंशाने परिणामाला प्राप्त होतो. कुमारिलमतात आत्मा हा वेदान्त्यांच्या मतानुसार चैतन्यस्वरूप नसून चैतन्यविशिष्ट आहे. शरीर व विषय यांचा संयोग होताच आत्म्याच्या ठिकाणी चैतन्याचा उदय होतो. स्वप्नस्थितीत विषयाशी संपर्क तुटल्यामुळे त्याच्या ठिकाणी चैतन्य राहत नाही. आत्मसंवित्तीमध्ये आत्म्याचे ज्ञान होते. आत्मा हा ज्ञानाचा कर्ता त्याचप्रमाणे ज्ञानाचे कर्मही एकाच वेळी असतो. प्राभाकर मत मात्र याहून भिन्न आहे. प्रभाकर-मताचे आचार्य म्हणतात, की आत्मसंवित्ती ही धारणा ठीक नाही. एकच वस्तू एकाच वेळी कर्ता व कर्म होऊ शकत नाही. प्रत्येक वस्तुज्ञानात त्या ज्ञानाच्या द्वारे आत्म्याचे ज्ञान कर्त्याच्या रूपात प्रकाशित होते.

ईश्वर – मीमांसक ईश्वराचे अस्तित्व मानीत नाहीत. बादरायण ईश्वराला कर्मफलाचा दाता मानतो; पण जैमिनीच्या मते यज्ञानेच त्या त्या फलाची प्राप्ती होते. त्यासाठी मध्यस्थ ईश्वराची आवश्यकता नाही. अर्थात हे प्राचीन मीमांसकांचे मत आहे. उत्तरकालीन मीमांसकांना ईश्वराची सत्ता नाकारणे शक्य झाले नाही आणि त्यांनी यज्ञपतीच्या स्वरूपात ईश्वराचा स्वीकार केला. आपदेव आणि लौगाक्षिभास्कर यांनी गीतेतल्या, कर्मफल ईश्वरार्पण करण्याच्या सिद्धान्ताला श्रुतिमूलक मानले आहे व मोक्षासाठी त्या गोष्टीची आवश्यकताही प्रतिपादन केली आहे. वेदांतदेशिकाने हाच उद्देश मनात धरून सेश्वर मीमांसा नामक ग्रंथाची रचना केली आहे. प्रभाकर व त्याचे अनुयायी ईश्वराची सत्ता मानतात.

मोक्ष – 'प्रपञ्चसम्बन्धविलयो मोक्षः' = या जगताशी जड-लेला आत्म्याचा संबंध नष्ट होणे म्हणजे मोक्ष होय, असे मीमांसक मानतात. भोगायतन शरीर, भोगसाधन इंद्रिय व भोग्य विषय पदार्थ या तीन बंधनांनी जीव हा संसाररूपी शृंखलेने जखडून राहतो. या तिहींचा आत्यंतिक नाश झाला, की तो मुक्त होतो. ही झाली भाट्टमताची मोक्षकल्पना. प्राभाकर मत याहून भिन्न आहे. प्रकरणपंचिकेत म्हटले आहे, की 'नियोग-सिद्धिरेव मोक्षः' = कोणत्याही बाह्य फलाची कामना न धरता कर्तव्यबुद्धीने नित्य कर्माचे अनुष्ठान करणे म्हणजे मोक्ष होय. मुक्ती ही अविच्छिन्न कार्याची दशा आहे. निष्काम कर्माला सोडून अन्य फलाची आकांक्षाच राहत नाही.

मीमांसकमते मोक्षदशेत आत्म्याला आनंदाचा अनुभव घडत नाही. त्या दशेत केवळ सर्व दुःखांचा सर्वथा नाश होतो; आत्मा सुखदुःखांच्या पलिकडील आपल्या विशुद्ध रूपात राहतो. या अवस्थेसाठीच मुक्तदशा आनंदमय नसूनही वांछनीय ठरते.

काम्य व निषिद्ध ही कर्मे जीवाला बंधनरूप होतात; परंतु नित्य-नैमित्तिक कर्मे या बंधनरूप दोषापासून रहित असतात. म्हणून काम्य व निषिद्ध या दोन कर्मांपासून निवृत्त होऊन नित्य-नैमित्तिकांचे अनुष्ठान करणे ही गोष्ट मोक्षासाठी नितांत आवश्यक आहे. नित्य-नैमित्तिक कर्मे हीच मोक्षाची साधक आहेत. मात्र कर्माबरोबरच आत्मज्ञानही आवश्यक आहे. मोक्षाला कर्म हे प्रधान कारण असून, आत्मज्ञान सहकारी कारण आहे.

आचारमीमांसा – मीमांसादर्शनाचा मुख्य उद्देश धर्म

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्याख्या करणे व वेदप्रतिपाद्य आचार सांगणे हा आहे. याविषयी श्री. बलदेव उपाध्याय यांनी जे विवेचन केले आहे त्याचा सारांश असा – "चोदनालक्षणोऽर्थो धर्मः"=चोदनेच्या द्वारे लक्षित अर्थ म्हणजे धर्म होय. चोदना म्हणजे क्रियाप्रवर्तक वचन अर्थात वेदाचे विधिवाक्य. मीमांसकांच्या मते विधीचे प्रतिपादन हेच वेदवाक्यांचे मुख्य तात्पर्य आहे. वेदांतली ज्ञानप्रतिपादक वाक्ये क्रियेची स्तुती किंवा निषेध करीत असल्यामुळे परंपरेने क्रियापर आहेत. त्यांना अर्थवाद म्हणतात. म्हणून कोणत्यातरी प्रयोजनाच्या उद्देशाने आचरलेला वेदविहित यागादी अर्थ म्हणजे धर्म होय. या अर्थाचे विधिवत अनुष्ठान केल्याने पुरुषाला निःश्रेयसाची अर्थात स्वर्गाची प्राप्ती होते.

वेदप्रतिपाद्य कर्मे तीन प्रकारची आहेत – (१) काम्य – कोणत्यातरी विशिष्ट कामनेच्या सिद्धीसाठी करायचे कर्म. उदा० 'स्वर्गकामो यजेत'=स्वर्गाची कामना धरणाऱ्याने यज्ञ करावा. (२) प्रतिषिद्ध – अनर्थाला कारण होत असल्यामुळे ज्यांचा निषेध केला आहे, अशी कर्मे. उदा० "न कलञ्जं भक्षयेत्"=विषलिप्त शस्त्राने मारलेल्या पशूचे मांस खाऊ नये. व (३) नित्य-नैमित्तिक – अहेतुक करायची कर्मे. उदा० संध्यावंदन हे नित्य कर्म असून, विशिष्ट काली करायचे श्राद्धादी कर्म हे नैमित्तिक होय.

मनुष्याने वेदप्रतिपादित व इष्टसाधक अशा कार्यामध्ये निरत राहावे व आपले कल्याण साधावे, हे मीमांसेचे उद्दिष्ट आहे. यज्ञयागामध्ये इंद्र, अग्नी, वरुण, इ. देवतांना उद्देशून आहुती दिल्या जातात. वेदांत या देवतांचे स्वरूपवर्णनही आढळते. पण मीमांसेच्या मते देवता या संप्रदान भावाचे कारक सुचवणारी केवळ पदे आहेत. याहून त्यांना अधिक महत्त्व नाही. देवता या मंत्रात्मक असतात आणि ते मंत्र सोडून त्यांना पृथक अस्तित्व नसते.

वरील तत्त्वज्ञानात्मक विचारांवरून मीमांसा हे एक दर्शन असल्याचे सिद्ध होते. यज्ञयागादी वैदिक अनुष्ठानांचे तात्त्विक विवेचन करणे हा मीमांसेचा मुख्य उद्देश असला, तरी त्या विवेचनाच्या उपपत्तीसाठी मीमांसेने जे सिद्धान्त शोधून काढले आहेत, ते अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. मीमांसेचे शब्दविषयक सिद्धान्त भाषाशास्त्राच्या दृष्टीने फार मोलाचे आहेत. कुमारिल भट्टाचा अभिहितान्वयवाद व प्रभाकराचा अन्विताभिधानवाद हे दोन वाद शाब्दबोधाच्या यथार्थ निरूपणासाठी नितांत मननीय आहेत. विरोधी वाक्यांची एकवाक्यता करण्याची प्रक्रिया मीमांसेनच सांगितली गेली आहे. जसे पदाचे ज्ञान व्याकरणाच्या द्वारे आणि प्रमाणाचे ज्ञान न्यायाच्या द्वारे होते, तसेच वाक्याचे ज्ञान मीमांसेच्या द्वारे होते. वाक्यज्ञानाच्या बाबतीत मीमांसेने अनेक मूलभूत सिद्धान्त मांडले असून, त्यांचा उपयोग स्मृतिकारांनी अर्थनिर्णयाच्या बाबतीत करून घेतला आहे. [भा. द.; मी. द.; हिं. इं. फि.; क. हे. इं. ३; लक्षणसंग्रह :]

मीयाँ शौरी (इ. स. च्या १८ व्या शतकाचा उत्तरार्ध व १९ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक संगीतशास्त्रकार आणि टप्पा या गानप्रकाराचा जनक. याचे खरे नाव गुलाम नबी असे होते. हा लखनौला राहत होता. त्याने आपला पिता गुलाम रसूल याच्यापाशीच ख्यालगायकीचे शिक्षण घेतले. याचा आवाज पातळ होता. त्यामुळे ख्यालातील तानपद्धतीवर याचे समाधान होत नव्हते. म्हणून याने आपल्या आवाजाला अनुरूप असा टप्पा हा गानप्रकार शोधून काढला. टप्प्यासाठी पंजाबी भाषा सोयीची आहे, असे दिसल्यावर याने पंजाबात जाऊन त्या भाषेचा अभ्यास केला आणि त्या भाषेत अनेक टप्पेही रचले. हा साधुवृत्तीने राहत होता. गम्मू नावाचा याचा एक पट्टशिष्य होता. त्याने टप्पा हा गानप्रकार फार लोकप्रिय केला. [सं. शा. क. इ.]

मीर (१) (१७२३–१८१० इ. स.) एक उर्दू कवी. याला गजलांचा सम्राट असे म्हणतात. याचे हे सम्राटपण गालिब, जौक, इ. कवींनी मान्य केलेले आहे. याचे वडील मीर महमद अली हे एक साधुपुरुष होते. त्यांच्या शिकवणीचा मीरच्या काव्यावर विलक्षण प्रभाव आहे. मीरच्या एका टीकाकाराने असे म्हटले आहे, की मीरचा प्रत्येक अश्रू म्हणजे एक शेर होय आणि प्रत्येक चरण म्हणजे रक्ताचा एक थेंब होय. पाहा – उर्दू भाषा व साहित्य. [उ. का. प.]

(२) एक मुसलमान जात. या लोकांची वस्ती गुजरात राज्यात आहे. हे लोक मूळचे भाट असावे, असे म्हणतात पावसाळ्यात हे शेती करतात आणि बाकीच्या दिवसांत सारंगीवर गाणी गाऊन भिक्षा मागतात. यांच्या बायका मुसलमानांच्या लग्नात गाणी म्हणण्याचे काम करतात. हे घरात गुजराती भाषा बोलतात. यांचा पोषाख हिंदू पद्धतीचा असतो. यांचे अनेक रीतिरिवाज हिंदूंप्रमाणे आहेत. हे सय्यद दादा मियानचे अनुयायी आहेत. [मुं. इ. जा.; वि. मुं. रा. प.]

मीराबाई (इ. स. चे १६ वे शतक) राजस्थानातील एक थोर संत कवयित्री. हिचे जीवनवृत्त व काल यांविषयी निश्चित माहिती मिळत नाही. समकालीन कवींच्या काव्यकृती व दंतकथा यांवरून मीरेचे चरित्र समजते, ते असे –

मेडत्याच्या राव रत्नसिंहाची ही मुलगी. कुडकी नामक एका

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

छोट्या गावी ती जन्मली. बालपणीच तिचे आई-बाप निवर्तले त्यामुळे तिचा आजा, रत्नसिंहाचा पिता, राव राठोड दूदाजी याने तिचे पालनपोषण केले.

बालपणी एकदा तिच्या घरी एक साधू आला व त्याच्या जवळ असलेली कृष्णमूर्ती पाहून मीरा वेडावली. तिने हट्ट करून ती कृष्णमूर्ती मागून घेतली व दिवस-रात्र त्या कृष्णाची पूजा-अर्चा करण्यात ती दंग होऊन गेली. वयात आल्यावर मेवाडच्या महाराणा सांगाचा ज्येष्ठ पुत्र कुंवर भोजराज याच्याशी मीरेचा विवाह झाला; परंतु थोड्याच दिवसांत मीरेचा नवरा मरण पावला व मीरा विधवा झाली. संसाराच्या उंबरठ्यातच घडलेल्या या दुःखद घटनेमुळे मीरेला कमालीचे वैराग्य आले. या प्रसंगी तिचा दुःखभार हलका करण्यासाठी तिला तिची कृष्णभक्ती उपयोगी पडली. त्यापुढे तिने कृष्णालाच आपला पती मानले व अष्टौप्रहर ती त्याच्या सेवेत रममाण राहू लागली.



गोपालकृष्णाचे मंदिर – चितोड

कृष्णमूर्तीची पूजा-अर्चा आणि साधु-सज्जनांचा सहवास यांत ती आपला सर्व वेळ व्यतीत करू लागली. महाराणा सांगाने चितोड गडावर तिच्यासाठी गोपालकृष्णाचे एक मंदिर बांधले.

सासरच्या माणसांना मीरेचे हे वागणे कुलशीलाला कलंकभूत वाटू लागले. त्यांनी तिला प्रारंभी समजावून पाहिले; पण त्याचा उपयोग होत नाही, असे पाहिल्यावर तिचा नाना प्रकारांनी छळ मांडला. त्यांनी एकदा तिच्या पूजेतल्या फुलांत साप घालून ठेवला व त्यामुळेही तिचा मृत्यू झाला नाही, असे पाहून तिला विषप्राशन करायला लावले. त्यानेही तिला मरण आले नाही. मीरेने हे सारे छळ-भंग आपल्या भक्तिबळावर शांतपणे सहन केले. परंतु अखेरीस तिला या साऱ्या प्रकारांचा उबग आला व तिने सासरच्या घराचा त्याग करायचे ठरविले. मग ती एके दिवशी सरळ आपल्या माहेरी निघून गेली. तिथे तिच्या चुलत्याने तिला मोठ्या सन्मानाने वागविले. मीरेच्या भक्तिसाधनेला तिथे बहर आला. वेदनांनी विव्हल झालेल्या अंतःकरणातून उमटलेल्या तिच्या शब्दांना तिथे काव्याचे कोंदण लाभले. परंतु थोड्याच दिवसांत तिचे हे सुखी जीवन संपुष्टात आले. राजकीय उलाढालीत मेडत्यावर जोधपूरच्या राव मालदेवाची सत्ता सुरू झाली व मीरेच्या चुलत्यालाच वनवास पत्करावा लागला. सहाजिकच मीरेला आता मेडता येथे राहणे अशक्य ठरले. मग तिने तीर्थयात्रेचे प्रस्थान ठेवले.

प्रथम ती वृंदावन येथे गेली. तिथे तिने तिथले प्रसिद्ध भगवद्भक्त जीवगोस्वामी यांच्या भेटीची इच्छा प्रकट केली. परंतु 'मी स्त्रियांना भेटत नाही', असे म्हणून जीवगोस्वामींनी तिला भेटण्याचे नाकारले. त्यावर मीरेने जीवगोस्वामींचा निरोप घेऊन येणाऱ्या शिष्याला म्हटले, "मी तर आजपर्यंत समजत होते, की वृंदावनात एक कृष्ण हाच पुरुष आहे आणि बाकी सगळ्या गोपी आहेत; पण आज मला कळले, भगवान कृष्णाशिवाय आणखीही एक पुरुष इथे वास्तव्य करतो."

शिष्याने मीरेचे हे बोलणे जीवगोस्वामींना सांगितले, तेव्हा ते विलक्षण प्रभावित झाले व मीरेला येऊन भेटले.

थोडे दिवस वृंदावनात काढल्यावर मीरा द्वारकेला गेली व तिथेच अखेर श्रीकृष्णचरणी विलीन झाली.

मीरेच्या जीवनचरित्राचे विश्लेषण करताना आचार्य काका कालेलकर लिहितात–

मीरेचा जन्म एका राजकुलात झालेला आणि तिचे लग्नही राजस्थानातील थोर कुलात झालेले. माहेरी किंवा सासरी वैभवाला तोटा नव्हता. तिने संस्कारसमृद्धी मिळवण्यातही कसला हलगर्जीपणा केला नाही. तिच्या काळचे संतसाहित्य तिला मुखोद्गत होते, हे तिच्या शैलीवरूनच स्पष्ट होते. आध्यात्मिक आणि पौराणिक साहित्याशी तिचा चांगला परिचय होता. निसर्गाने जसे तिला रूपलावण्य दिले होते, तसे कंठमाधुर्यही दिले होते. संगीतकलेतही ती निष्णात होती.

मीरेचा गुरू कोण याची बरीच चर्चा चालते आणि या चर्चेला उपयोगी पडणारी माहिती तिच्या नावावर असणाऱ्या मीरासाहित्यात भरपूर मिळते. कुणी तिला रैदासाची शिष्या म्हटले आहे, तर कुणी तुलसीदासाची. तथापि बारकाईने पाहिले तर तिचे गुरुत्व भगवान गोपालकृष्णाकडेच असल्याचे दिसून येईल. तिच्या जीवनभर तोच तिचा मार्गदर्शक होता. तिच्या जीवनात जे जे साधु–सत्पुरुष तिला भेटले, त्या त्या सर्वांच्या विचारांतील ग्राह्यांश तिने रसज्ञपणे व मर्मज्ञपणे स्वीकारला; परंतु कोणत्याही संप्रदायाचा टिळा तिने आपल्या भाळी धारण केला नाही.

मीरेच्या प्रेमसाधनेविषयी श्री. कालेलकर लिहितात–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मीरेची सगळी साधना तिच्या प्रेमभक्तीतच होती. या साधनेला पूरक म्हणून तिने अन्य अनेक साधना अजमावून पाहिल्या. त्या सर्वांचा प्रतिध्वनी तिच्या काव्यात ऐकायला मिळतो. माहेरी, सासरी किंवा पुन्हा माहेरी परतल्यावर मीरेची सगळी पदे राजस्थानी भाषेतच रचली गेली आहेत. पुढे वृंदावनात पोचल्यावर तिचे दिवस व्रजभाषेच्या वातावरणात मुरले.

मीरेच्या साहित्यात यथेच्छ भेसळ आहे. वाटेल त्याने वाटेल तसे पद रचून शेवटी 'मीराके प्रभु गिरिधर नागर' जोडावे असे खूप ठिकाणी घडलेले आढळते. त्यामुळे मीरेच्या पदाचा शुद्ध मूलपाठ ठरविणे कठिण झाले आहे. अलिकडे श्री. परशुराम चतुर्वेदी यांनी अतिशय परिश्रमपूर्वक मीरेची शुद्ध पदावली सिद्ध केली आहे.

भाषेवरून मीरेच्या पदांचे तीन काल ठरवता येतात. जी पदे केवळ राजस्थानीत आहेत, त्यांचा काळ पहिला. ज्यांत व्रजभाषेतील शब्द, वाक्यरचना किंवा प्रत्यय आले असतील त्यांचा काळ दुसरा व गुजराती भाषेतील पदांचा तिसरा.

मीरेच्या पदांमध्ये भक्तिरस ओथंबलेला आहे. तिच्या काव्यात संस्कारिता आहे; पण नटवेपणा नाही. काव्यरस भरपूर असला, तरी ही कविता प्रयत्नपूर्वक घडवलेली आहे, असे वाटण्याइतकी कृत्रिमता तिच्यात नाही. प्रेमभक्तीचे बारकावे घेण्यात सूरदासाइतकी ती खोलात शिरली नसली, तरी भक्तीचा उन्माद आणि स्त्रीसहज स्वात्मार्पण तिच्या काव्यात जागोजाग व्यक्त होते. मीरेची पुढील दोन पदे याची साक्ष देतील —

मोहि लागी लगन हरिचरनन की।
चरन बिना कछुवै नहिं भावै जग माया सब सपनन की ॥
भवसागर सब सूखि गयो है फिकर नहीं मोहि तरनन की ॥
मीरा के प्रभु गिरिधर नागर आस वही गुरु सरनन की ॥

भावार्थ — एका हरिचरणांचीच मला आस लागली आहे. हरिचरणांशिवाय मला दुसरे काही सुचत नाही. जग हे एक स्वप्नांची माया आहे. भवसागर सगळा सुकून गेला आहे आणि त्यातून तरून जाण्याची मला मुळीच चिंता नाही. मीरेचा आधार केवळ श्रीकृष्णच आहे व त्यालाच शरण जाण्याची तिला ओढ आहे.

हेरी में तो दरद दिवाणी दरद न जाणै मोरा कोई।
घायल की गति घायल जाणै की जिण लाई होइ ॥
जौहरि की गति जौहरि जाणै की जिण जौहर होइ ॥
सूली ऊपरि सेज हमारो सोवण किस विध होइ ॥
गगनमंडल पै सेज पिया की किस विध मीलण होइ ॥
दरद की मारी बन बन डोलूं बैद मिल्या नहिं कोई ॥
मीरा की प्रभु पीर मिटेगी जब बैद सांवलिया होइ ॥

भावार्थ — सखे, मी प्रेमाने वेडी झाले आहे. माझे प्रेम कुणाला कळत नाही. घायाळाची वेदना केवळ घायाळालाच कळते. रत्नाची पारख रत्नपारख्यालाच होते. सुळावर शय्या अंथरून मला झोप कशी येणार आणि माझ्या प्रियकराचे आसन स्वर्गात असल्यामुळे आमचे मीलन तरी कसे होणार ? घायाळ अवस्थेत रानावनात फिरले; पण कोणी वैद्य भेटला नाही. साक्षात श्रीकृष्णच वैद्य म्हणून आला, तरच मीरेची ही व्यथा-वेदना संपेल.

आत्मनिष्ठ अबला किती जबरदस्त तेजस्विनी होऊ शकते आणि एवढे आत्मिक शौर्य दाखवूनदेखील स्त्री ही स्त्रीच कशी राहू शकते, याचे उत्तम उदाहरण मीरेच्या जीवनात आणि कवनांत आपल्याला पाहायला सापडते. मीरेने भारतीय जनमानसाची जी इतकी विलक्षण पकड घेतली आहे, तिचे मर्म तिच्या या प्रामाणिक जीवनानुभूतीत आहे. श्री. काका कालेलकर म्हणतात — केवळ भावनात्मक आंतरिक सोलीव आत्मकथा वाचायची असेल, तर मीरेची कविता वाचावी. [मीराँबाई की पदावली; रा. पिं. सा.; मीरा — श्री. मंगेश पाडगावकर]

मुंगूस

एक चतुष्पाद प्राणी. अनेक हिंदू, बौद्ध व जैन देवता मुंगूस जवळ बाळगतात. बौद्ध देवता जंभल याचे मुंगूस हे बोधचिन्ह आहे. मुंगूस हे रत्ने आणि द्रव्य यांचा साठा समजले जाते. कुबेर जेव्हा त्याचे पोट दाबतो, तेव्हा ते संपत्ती



मुंगूस

ओकते, असा संकेत आहे. सर्प आणि मुंगूस यांच्यांत हाडवैर असून, मुंगुसामुळेच सर्पांची उत्पत्ती कमी झाली, असे म्हणतात. एखादा विषारी सर्प मुंगुसाला डसला, तरी त्याच्या विषापासून आपला बचाव करण्याचे औषध त्याला माहीत असते, असेही सांगतात. पण याचे विवेचन असे केले जाते, की मुंगुसाच्या अंगावर दाट केस असतात आणि त्याची कातडी जाड असते, त्यामुळे सर्प त्याला चावला तरी त्याच्या अंगात विष शिरत नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनेक व्रत-वैकल्यांमध्ये मुंगुसाला मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. कजरी नवमी या व्रताच्या वेळी मुंगुसाचे चित्र काढून त्याची पूजा करतात. महाभारताच्या आश्वमेधिक पर्वात (९०) मुंगुसाची एक कथाही आली आहे. मुंगुसाचे तोंड पाहाणे शुभ मानलेले आहे. पाहा– नकुलनवमी. [इं. बु. इ.]

मुंगेर बिहार प्रदेशातील एक प्राचीन नगर. आज हे स्थान मोंघीर या नावाने ओळखले जाते. मुद्‌गल नावाचा ऋषी या ठिकाणी राहत असल्याने त्याला मुद्‌गलाश्रम अथवा मुद्‌गलगिरी असे नाव प्राप्त झाले असावे. मुनीच्या वास्तव्यामुळे याला मुनिग्रह असे म्हणत. आणि कांही पंडित मुनिगृहापासूनच मुंगेर शब्द तयार झाला असावा, असे म्हणतात.

महाभारतात या स्थानाला मोदगिरी असे म्हटले आहे. धर्मपालाचा पुत्र देवपाल याच्या मोंघीर येथील ताम्रपटात मुद्‌गगिरी हे नाव आहे.

हे स्थान तीन्ही बाजूंनी गंगेने वेढलेले असून, त्याच्या पूर्वेला एक डोंगर आहे. इथे एक भुइकोट किल्ला आहे. त्या व्यतिरिक्त सीताकुंड, रामेश्वरकुंड, ऋषिकुंड, इ. उष्ण पाण्याची कुंडे आणि पंचकुमारी नावाचा धबधबा आहे. किल्ल्याच्या वायव्येला गंगेच्या तीरावर एक प्राचीन घाट आहे. तिथे स्नान केल्यावर सर्व दुःखांचा नाश होतो, अशी समजूत आहे. या घाटावरच रामसीता स्नानासाठी थांबले होते, असे लोक सांगतात. रावणाला मारल्यानंतर त्या ब्रह्महत्येचे पातक घालविण्यासाठी रामाने इथेच प्रायश्चित्त घेतले, अशीही आख्यायिका आहे.

सीताकुंडासंबंधीची दंतकथा पुढीलप्रमाणे सांगतात–

सीता रावणाघरी राहिली म्हणून तिच्या हातचे अन्न खाण्याचे ऋषींनी नाकारले. त्यामुळे सीता संतप्त झाली आणि धरणी दुभंग करून ती आत गडप झाली. हनुमंताने तिची प्रार्थना करून तिला वर आणले; परंतु दुभंगलेली धरणी तशीच राहिली आणि तिथे हे कुंड बनले.

या कुंडातले पाणी सदैव उकळत असते; पण रामनवमीच्या दिवशी ते थंड होते, असे म्हणतात. माघी पौर्णिमेला इथे मोठी यात्रा भरते. [मोंघीर गॅझे.; धर्मयुग, ३ जून १९६३,]

मुंज एक प्रकारचे तृण. याची वाढ झपाट्याने होते व त्याची उंची सरासरी दहा फूट असते. या गवतात विषारी प्राणी लपून बसतात, असे ऋग्वेदात म्हटले आहे (१.१९१.३). वैदिकांच्या काळी सोमरस गाळण्यासाठी या तृणाचा उपयोग करीत. त्यापासून उच्च आसने (आसंदी) बनवीत, असे शतपथ ब्राह्मणात (१२.८.३.६) सांगितले आहे. उपनयनातील बटूची मेखला मुंज तृणाचीच करीत. त्यावरूनच उपनयनाला मौंजीबंधन हे दुसरे नाव मिळाले आहे. [वे. इं.; सु. वि. को.]

मुंजा भूतयोनीतील एक देवता. मुंज होऊन सोडमुंज न झालेल्या अवस्थेत मृत झालेल्या मुलाचे भूत म्हणजे मुंजा होय. अनेक ऋग्वेदी ब्राह्मणांच्या घराण्यांत मुंजोबा हे कुलदैवत असते. याचे प्रतीक म्हणून पाच धागऱ्यांची पूजा करण्याची पद्धत आहे. कित्येकदा या देवतेचा स्वतंत्र टाकही असतो. याचे ठाणे फार करून पिंपळावर असते. श्रावणातल्या कोणत्याही शनिवारी याचा कुळधर्म करतात. या वेळी अकरा मुंजांना जेवायला घालतात. मुलगा व्हावा म्हणून अनेकजण मुंजोबाची स्थापना करतात आणि पिंपळाचे झाड लावून त्याची मुंजही करतात. मुंजाचे स्थान म्हणून काही जण पिंपळाला पार बांधण्याचाही नवस करतात. [दे. ऋ. ब्रा. प.]

मुंजाल (इ. स. चे १०.वे शतक) एक ज्योतिषशास्त्रकार. हा भारद्वाजगोत्री दाक्षिणात्य ब्राह्मण होता. याने बृहत्मानस या ग्रंथाचा संक्षेप करून लघुमानस नावाचा ग्रंथ रचला. त्यात मध्यम, स्पष्ट, तिथी, त्रिप्रश्न, ग्रहयुती, सूर्यग्रहण, चंद्रग्रहण व शृंगोन्नती असे आठ अधिकार आहेत. मुंजालाने आपल्या ग्रंथात अयनगतीचा स्पष्ट उल्लेख केला आहे. याच्या पूर्वी उपलब्ध झालेल्या कोणत्याही ज्योतिषग्रंथात अयनगतीचा निर्देश नाही. याने चंद्राला एक विशेष संस्कार सांगितला आहे. हा संस्कार याच्या अन्य कोणी सांगितलेला नाही. तो ताऱ्यांचे निरीक्षण करून शोध लावीत असे. यावरून मुंजाल हा एक संशोधक असावा, असे श्री. शं. बा. दीक्षित यांचे मत आहे. भास्कराचार्याने याची अनेक वचने उद्‌धृत केली आहेत. [भा. ज्यो. शा.; भा. ज्यो. इ.]

मुंड बिहारमधील एक आदिवासी जमात. छोटा नागपूर आणि रांची या भागांत या लोकांची विशेष वस्ती आहे. मुंड हे नाव त्यांना शेजारच्या हिंदू लोकांनी दिले आहे. ते स्वतःला हरो को (=माणूस) आणि आपल्या वंशाला होरो म्हणजे मानव असे संबोधतात.

हे लोक द्रविड लोकांसारखे दिसतात. यांचा वर्ण काळासावळा, डोके लांबट, नाक रुंद व बसके, ओठ जाड व चेहरा रुंद असतो. यांचे शरीर घाटदार व बळकट असते. साधारणपणे ठेंगू लोकांत यांची गणना होते.

वेषभूषा – मुंड लोकांचा पोषाख अगदी साधा असतो. पुरुष सहा ते नऊ हात लांब व किनार असलेले वस्त्र कमरेभोवती गुंडाळतात. सणासुदीला ते याहून लांब धोतर, मिसलाय व त्याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुढे आणि मागे सोगे सोडतात. वरच्या भागावर ते एक उत्तरीय घेतात. थंडीत ते घोंगडी पांघरतात. ख्रिस्ती व हिंदू झालेले मुंड अंगात कोट घालतात व डोक्याला पगडी घालतात.

मुंड स्त्रिया साडी नेसतात. स्त्री-पुरुषांचे कपडे सुती असतात. स्त्रिया स्वतः घरी कापसाचे सूत काढतात आणि कपडे मात्र विणकराकडून विणून घेतात. या हातांत काचेच्या, पितळेच्या किंवा लाखेच्या बांगडया घालतात. कानांत चांदीची किंवा सोन्याची कर्णफुले, गळयात हासळी आणि पायांत वाळे असे सर्वसाधारण स्त्रियांचे दागिने असतात. क्वचित काही स्त्रिया नाकात नथ आणि कपाळावर सोन्याची बिंदी घालतात. स्त्रिया केस विंचरून त्यांचा मानेवर अंबाडा बांधतात. मुंड मुली कपाळावर, हनुवटीवर व हात, पाय आणि पाठ यांवरही गोंदून घेतात.

धनुष्य-बाण, तलवार व भाला ही त्यांची हत्यारे होत. बाहेर जाताना त्यांच्या हातात एक काठी असते व काटा टोचला, तर तो काढण्यासाठी एक बारीक चिमटा कमरेला खोचलेला असतो.

मुंड लोकांना संगीताची फार आवड आहे. ते ढोलकी, नगारा, दुमांग, तंबोरा, मुरली, इ. वाद्ये वाजवतात.

भात हे या लोकांचे मुख्य अन्न आहे. त्याच्या जोडीला भाज्या, डाळ, कडधान्ये, क्वचित मांस किंवा मासे यांपैकी काहीतरी असते. गरीब लोक मका व काही झाडपाला उकडून खातात. तांदुळाची दारू हे त्यांचे आवडते पेय आहे. प्रत्येक कुटुंब आपल्या घरासाठी दारू तयार करते. पुरुष तंबाखू खातात व काहीजण विडया ओढतात.

घरे– हे लोक डोंगराच्या पठारावर घरे बांधतात. घरांची आखणी योजनापूर्वक नसते. बहुतेकांची घरे मोठी असतात. चांगल्या स्थितीतील मुंड कुटुंबाचे घर म्हणजे एका चौकाभोवती तीन-चार घरे मिळून बनलेले असते. पण सर्वसाधारण मुंडाचे घर म्हणजे निदान दोन तरी झोपडया असतात. त्यांतली एक स्वयंपाकघर म्हणून व दुसरी निजण्यासाठी वापरतात. निजायच्या झोपडीत रात्रीच्या वेळी शेळया व गुरे बांधतात. स्वयंपाकघरात पितरांचे स्थान असते. तिथे त्यांची पूजा करतात. तिथेच धान्यही साठवतात. स्वयंपाकघरातच एका बाजूला कोंबडयांचे खुराडे असते. घराच्या भिंती मातीच्या किंवा बांबूच्या असतात आणि छप्पर कौलांचे किंवा गवताचे असते. घराचे खांब व वासे सागवानी लाकडाचे असतात. घराला लाकडी फळयांची दारे असतात. घराला खिडक्या मात्र नसतात. प्रत्येक घरामागे परसू असून, त्यात ते मका, मिरच्या, वांगी, भोपळा, इ. पिकवतात. प्रत्येक घराजवळ खताचा खड्डा असतो. गावाच्या दुर्गंधीत हा खड्डा भर टाकीत असतो.

यांच्या घरांत स्वयंपाकासाठी गाडगीमडकी, कथलाच्या काही थाळया, लाकडी पळया, पानांचे द्रोण, पाण्यासाठी मोठे घडे, बांबूच्या पेटया, करंडया, टोपल्या, चटया व क्वचित खाट असते. ते गवतात भाताच्या मुडया बांधून ठेवतात.

अविवाहित मुले व मुली यांच्यासाठी सामुदायिक शयनगृहे बहुतेक प्रत्येक गावात असतात.

याव्यतिरिक्त, प्रत्येक गावात जुन्या वृक्षांची एक छोटीशी राई असते. तिच्यात ग्रामदेवतांचा निवास असतो. गावकरी मधून मधून त्या देवतांची पूजा करतात आणि त्यांना पशुबळी देतात. प्रत्येक गावात नृत्यासाठी एक अंगण असते.

उद्योगधंदे– शेती हा मुंड लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. ते मुख्यत्वे भात पिकवतात. भाताच्या अनेक हलक्या जाती ते काढतात. याशिवाय, मका, मोहरी, उडीद, मूग, कुळीथ, इ. कडधान्येही ते पिकवतात.

विवाहप्रथा– या लोकांत अनेक किली किंवा कुळया आहेत. समान कुळीत लग्नसंबंध होत नाही. बहुधा आईवडीलच मुलांची लग्ने ठरवतात. त्यांना एखादी चांगली मुलगी आढळल्यास ते एका दूताला (मध्यस्थाला) तिच्या आईबापांकडे पाठवतात. त्यांना हा संबंध योग्य वाटल्यास ते मुलाच्या आईबापांना आपल्या घरी येण्याचे निमंत्रण देतात. ठरलेल्या दिवशी मुलाचे आईबाप, मध्यस्थ व इतर आप्तेष्ट मुलीच्या गावी जायला निघतात. वाटेत ते शुभाशुभ शकुनांचे निरीक्षण करतात. गायवासरू हंबरणे, भात वाहून नेताना दिसणे, भरलेला घडा दिसणे, इ. काही शुभ शकुन असून, कुऱ्हाड नेणारा माणूस दिसणे, तांदूळ घेऊन जाणारा माणूस दिसणे, केरकचरा बाहेर टाकताना दिसणे, इ. गोष्टी अशुभ शकुन होत. अशुभ काही दिसले तर लोक घरी परततात व शुभ शकुन झाले, तर पुढे चालू लागतात. मुलीच्या घरी पोचल्यावर सर्वजण अंगणात चटयांवर बसतात. मग मुलाकडचा दूत मुलीकडच्या दूताला वाटेतले शकुन सांगतो. त्याने ते शुभ आहेत, असे म्हटले की पुढील बोलणी सुरू होतात. मग घरातल्या स्त्रिया बाहेर येऊन पाहुण्यांचे पाय धुतात व त्यांच्या समोर दारूचे दोन घडे ठेवतात. सर्वजण त्यांतली दारू पिऊन टाकतात. नंतर पाहुण्यांना जेवणही देतात. निघण्यापूर्वी ते मुलीकडच्या लोकांना आपल्या घरी येण्याबद्दल निमंत्रण देतात.

ठरलेल्या दिवशी मुलीकडील मंडळी मुलाच्या गावी जायला निघतात. वाटेत काही अशुभ दिसले, तर सर्व मंडळी परत फिरतात व दूत तेवढा ही वाईट बातमी मुलाच्या घरी जाऊन सांगतो. पण तसे काही न घडल्यास सर्वजण मुलाच्या घरी जातात व तिथे मुलीकडच्या सारखाच सर्व कार्यक्रम होतो.

त्यानंतर मुलाच्या घरी साखरपुडा होतो. तिथे मुलीकडच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोकांना दारू व मांसभोजन देतात. मग देज ठरवतात. त्यासाठी वधूपिता आपल्याला जितके रुपये देज हवे असेल, तितके दगड वरपित्याकडे पाठवतो. तसेच त्याला जितक्या साड्या हव्या असतील, तितक्या साल वृक्षाच्या पानांच्या गुंडाळ्या करून व त्यांना रंगीत दोरा गुंडाळून त्या वरपित्याकडे पाठवतो. वरपिता जेवढे रुपये व साड्या देऊ इच्छीत असेल, तेवढे दगड व गुंडाळ्या ठेवून घेतो आणि बाकीच्या दूतामार्फत परत करतो. आणि वराकडच्या लोकांना तेलहळद लावतात. एवढ्याने हा विधी पुरा होतो.

लग्न त्याच वर्षी करायचे असेल, तर देज देण्याचा व मुहूर्त ठरविण्याचा एक विधी मुलीच्या घरी होतो.

लग्नाच्या आधी काही दिवस वधूवरांच्या अंगणात मातीचे बोहले उभारतात. त्याच्या चारही कोपऱ्यांवर साल वृक्षाच्या चार डहाळ्या आणि मध्यभागी बांबू, साल व सोसो वृक्षांच्या

मुंड पुरुष व स्त्री

वधूपित्याला ते मान्य झाले, तर वरपिता व वधूपिता एकमेकांना आलिंगन देतात. नंतर दोन्ही गावांचे पाहान (ग्रामपुरोहित) एकमेकांचे हात हातांत घेतात. एवढ्याने सोयरीक पक्की झाली, असे समजतात. सोयरीक मोडली, तर ती मोडणाऱ्याला पाच रुपये दंड होतो.

मग मुलगा वधूच्या मामाच्या मांडीवर बसतो व वधूपिता त्याला नवे कापड आणि मण्यांची माळ देतो. नंतर भोजन होते फांद्या एकत्र करून रोवतात आणि त्यांना तांदुळाचे पीठ पाण्यात कालवून त्याने रंग देतात. मग त्यांच्या भोवती दोरा गुंडाळतात. लग्नाच्या आधी तीन दिवस रोज संध्याकाळी वधूवरांना आपल्या घरी बोहल्यावर बसवून तेलहळद लावतात. लग्नाच्या आदल्या दिवशी संध्याकाळी नवरा मुलगा हळदीने रंगवलेले वस्त्र नेसून बोहल्यावर बसतो आणि काही सुवासिनी हातांच्या ओंजळीत अक्षता व दूर्वा घेऊन त्याचे पाय, मांड्या, खांदे व गाल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांना स्पर्श करतात आणि मग आपल्या हाताचा मुका घेतात. वधूच्या घरीही असाच विधी होतो.

लग्नाच्या आदल्या दिवशी वराकडील मंडळी वधूच्या गावी जायला निघाली असता वाटेत एखादे आंब्याचे झाड लागले, की सर्वजण तिथे थांबतात. नवरामुलगा या झाडाला तांदुळाच्या पिठीचा टिळा लावतो आणि त्याच्या खोडाभोवती सूत गुंडाळतो. मग तो झाडाखाली आईच्या मांडीवर बसतो आणि आंब्याच्या पानाचा देठ व गूळ तोंडात घालतो. देठ थोडासा चावून, तो चोथा तो आईला देतो. आई तो गिळून टाकते व मुलाला आशीर्वाद देते.

वऱ्हाडी मंडळी वधूच्या घरी आली, की वधूकडील काही सुवासिनी वराच्या अंगावर आंब्याच्या डहाळीने पाणी शिंपडतात व त्याच्या समोर एक मुसळ फिरवतात. तू जर स्वार्थी निपजलास किंवा चोरी केलीस तर तुला मुसळाने मार मिळेल, असे त्या वेळी त्या म्हणतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी वर आपल्या जानोशातून पालखीत बसून वधूगृही जातो. वधूला एका मोठ्या पाटीत बसवून वराच्या पालखीभोवती तीनदा फिरवतात आणि वध-वर एकमेकांवर तीन मुठी तांदूळ टाकतात. नंतर न्हावी वराची हजामत करतो व त्याच्या हाताच्या करंगळीतून थोडे रक्त काढून त्याने एक चिंधी भिजवतो. तसेच वधूची नखे काढून झाल्यावर तिच्याही करंगळीतून थोडे रक्त काढून त्याने एक चिंधी भिजवतो.

लग्नाच्या वेळी बोहल्यावर दोन पत्रावळी ठेवतात आणि समोरासमोर तोंड करून वधू-वर त्यांच्यावर उभे राहतात. वर आपल्या उजव्या पायांच्या बोटांनी वधूच्या डाव्या पायाची बोटे दाबतो आणि रक्तात भिजवलेल्या चिंधीने आपल्या व वधूच्या मानेला तीनदा स्पर्श करतो. वधूही आपल्या चिंधीने तसेच तीन वेळा करते. त्यानंतर दोघे एकमेकांच्या गळयात हार घालतात व एकमेकांना कुंकुमतिलक लावतात. मग त्यांच्या वस्त्रांना गाठ मारतात आणि त्यांना घरात नेतात. तिथे त्यांना गूळ, पोहे, दूध वगैरे देतात. नंतर वधूवरांना मांडवात एका बाजूला ठेवलेल्या नांगरावर बसवतात. ती दोघे एकमेकांना तेलहळद लावतात आणि चार कुमारिकांनी जवळच्या झऱ्यावरून आणलेल्या चार घागरींतल्या पाण्याने त्यांना स्नान घालतात. नंतर नवरा मुलगा तलवारीने एक बकरा मारतो. वधूकडील मंडळी तांदुळाची दारू वाजतगाजत वराच्या जानोशात नेतात. तिथे वधूपिता व वरपिता आणि वधूमाता व वरमाता एकाच द्रोणातून दारू पितात आणि थोडा वेळ एकमेकांना उचलून घेऊन नृत्य करतात. नंतर वधू-वर वधूच्या आप्तेष्टांचे पाय धुतात व ते नवदांपत्याला रोख पैशांत आहेर करतात. यानंतर जेवणावळ होते.

वरात वरगृही आल्यावर वधूवरांना दोन स्त्रिया उचलून घेतात व बोहल्याभोवती तीन फेऱ्या घालतात. नंतर जेवणावळ होते. त्या वेळी वर सर्वांना मीठ वाढतो. एवढयाने लग्नविधी समाप्त होतो.

लग्नानंतर काही दिवसांनी वधू-वर वधूगृही जातात आणि बोहल्यावर व भोवती लावलेल्या डहाळ्या वर उपटून टाकतो.

घटस्फोट हवा असल्यास पंचायत भरवून तो मिळवता येतो. विधवाविवाह साध्या पद्धतीने होतो.

प्रसूतिप्रथा – गारासी बोंगा ही त्यांची गरोदरपणाची व प्रसूतीची देवता आहे. स्त्री गरोदर आहे हे निश्चित झाले, की या देवतेच्या नावाने एक लाल किंवा करडा कोंबडा व दारूचा एक घडा राखून ठेवतात. मग एका दिवशी स्त्रीचा बाप किंवा भाऊ तिच्या घरी येतो आणि या देवतेची पूजा करतो. स्त्रीचे व तिच्या अपत्याचे संरक्षण करण्याविषयी तो देवतेची प्रार्थना करतो आणि तिच्यासाठी ठेवलेला कोंबडा मारून तिला अर्पण करतो. यानंतर गोडाचे जेवण व मद्यपान होते.

जननाशौच आठ दिवस पाळतात. नवव्या दिवशी मुलाची, मातेची व इतर नातेवाइकांची नखे काढतात. नंतर माता इतर स्त्रियांसह जवळच्या झऱ्यावर स्नानासाठी जाते. इतके दिवस मुलाच्या खाली असलेली चटई त्या वाटेत जाळून टाकतात. परत येताना एका हंडयात पाणी आणतात आणि त्यात तांब्याचे नाणे व तुळसीदले टाकून ते पाणी घरात शिंपडतात. एवढयाने घर शुद्ध होते. कुटुंबप्रमुख मग देवांना आणि पितरांना भात अर्पण करतो. मग मद्यपान करून नातेवाईक आपापल्या घरी जातात.

दुसऱ्या दिवशी मुलाचे नाव ठेवतात. नाव काय ठेवायचे, ते पुढील विधीवरून ठरवतात–एका पितळेच्या थाळीत पाणी भरतात आणि तिच्यात मुलाचे प्रतीक म्हणून एक तांदुळाचा दाणा टाकतात. नंतर माता एखाद्या पूर्वजाचे किंवा नातेवाइकाचे नाव घेऊन दुसरा एक तांदुळाचा दाणा त्या थाळीत टाकते. हा दुसरा दाणा पहिल्या दाण्याला लागला, तर त्या नातेवाइकाचे नाव मुलाला ठेवतात. दुसरा दाणा बाजूला पडला, तर तिसरा टाकतात. दोन्ही दाण्यांचा एकमेकांना स्पर्श होईपर्यंत असे करतात. त्याच दिवशी मुलाच्या कमरेत करदोटा बांधतात. एक ते तीन वर्षांच्या काळात केव्हातरी मुलाचे कान टोचतात.

देवधर्म – सिंग बोंगा हा त्यांचा सर्वश्रेष्ठ देव आहे. प्रत्येक धार्मिक विधीपूर्वी त्याची प्रार्थना करतात. याव्यतिरिक्त ते पितरांची व ग्रामदेवतांची पूजा करतात. ग्रामदेवता त्यांना शेतीच्या कामात व शिकारीच्या वेळी मदत करतात. गावावर काही संकट आले असता, ते सिंग बोंगाला एक पांढरा कोंबडा बळी देतात. मनुष्य जन्मभर कसा वागला असेल, त्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रमाणे सिंग बोंगा त्याला पुन्हा मानव, पशू, पक्षी, कीटक यांपैकी कोणत्या तरी योनीत जन्माला घालतो, अशी त्यांची समजूत आहे. हे लोक भुताखेतांनाही बलिदान देऊन संतुष्ट राखतात.

काही मुंड लोकांनी हिंदू धर्म स्वीकारला आहे. महादेव हा त्यांचा आवडता देव असून, ते त्याला पशुबली अर्पण करतात.

इ. स. च्या १९ व्या शतकाच्या शेवटी बिर्सा भगवान नामक एका मुंड पुरुषाने आपल्या नावाने एक नवा धर्म स्थापन केला. परमेश्वर हा एकच असून, बिर्सा हा त्याचा अवतार आहे आणि मनुष्याने सदाचरणाने वागावे ही या धर्माची प्रमुख तत्त्वे आहेत. मात्र या धर्माचे अनुयायी फारच थोडे आहेत.

सण-उत्सव – मुंड लोक अनेक सण व उत्सव साजरे करतात. पौष पौर्णिमेला ते मागे पोरोब नामक एक सण साजरा करतात. त्या दिवशी ते पितरांची पूजा करतात. फा-गू हा त्यांचा सण फाल्गुन पौर्णिमेला असतो व तो हिंदूंच्या होळीसारखाच असतो. चैत्र वद्य पंचमीला त्यांचा बा-परब किंवा सरहुल हा उत्सव असतो. त्या दिवशी पाहान किंवा ग्रामपुरोहित चंडी बोंगा व इतर ग्रामदेवता यांची पूजा करतो. पूजा संपल्यावर सर्व लोक नाचत, गात, वाद्ये वाजवीत आपल्या घरी परततात. त्या दिवशी सर्व लोक साल वृक्षांची फुले डोक्यांत घालतात, हातांत फुलांच्या डहाळ्या मिरवतात व घरांवर त्या फुलांच्या माळा बांधतात. याशिवाय ते भाताची पेरणी, लावणी व मळणी करण्यापूर्वी उत्सव करतात. बहुतेक सर्व उत्सवांच्या वेळी ते नृत्य करतात. लग्नाच्या प्रसंगी ते विशिष्ट नृत्ये करतात.

नृत्यवेषात मुंड सरदार

रोगराई होते, ती भुतांच्या प्रकोपामुळे होते, असे ते मानतात व त्यांना बळी अर्पण करून संतुष्ट राखतात. माणसांनी जादू-टोणा केल्यामुळेही काही आजार उद्‌भवतात, अशी त्यांची समजूत आहे.

या लोकांत पंचायत असून, तिच्यात जातीतील तंटेबखेडे सोडवले जातात. निरपराधित्व सिद्ध करण्यासाठी शपथा घेण्याची व दिव्ये करण्याची यांच्यांत पद्धत आहे.

मर्तिकप्रथा – काही मुंड प्रेते जाळतात, तर काही ती पुरतात. पूर्वी मात्र सर्व मुंड प्रेते जाळीत असत. एखादा मुंड पुरुष मृत झाला, की त्याला तेलहळद लावून नवे कपडे घालतात. प्रेत चारपाईवरून स्मशानात नेतात. गावाच्या हद्दीजवळ चारपाई थोडा वेळ खाली ठेवतात. प्रेत स्मशानात नेल्यावर मृताचा उत्तराधिकारी त्याच्या तोंडात निखारा ठेवतो. प्रेत जळल्यावर अस्थी गोळा करून एका फडक्यात बांधतात. मग दूर्वांनी मृताची एक प्रतिमा तयार करतात आणि जमिनीवर लाह्यांनी मृताची आकृती रेखाटतात. ती प्रतिमा व लाह्या अस्थीच्या कपड्यात गुंडाळतात. ते गाठोडे मग एका मडक्यात घालून ते मडके घराजवळच्या एका झाडावर टांगतात.

तिसऱ्या किंवा पाचव्या दिवशी मृताचे आप्त क्षौर करतात व नखे कापतात. नंतर एका विशिष्ट झाडाच्या तीन फांद्या घेऊन, प्रेताची चारपाई खाली ठेवलेल्या जागी, त्यांची ताऱ्याची आकृती करून ठेवतात. त्याच्यावर एक मडके पालथे घालतात आणि वर गवत पसरतात. नंतर मृताला भात अर्पण करतात आणि ते सर्व जाळून टाकतात. नंतर सर्वजण मृताच्या घरी जातात आणि बंद दारावर टकटक असा आवाज करतात. आतल्या माणसांनी 'कोण आहे ?' असे विचारल्यावर सर्वजण आम्ही 'दुःख दूर करतो व आनंद देतो' असे सांगतात. दार उघडल्यावर सर्वजण आत जातात. मग एकजण पितरांच्या खोलीत जाऊन त्यांना दारू अर्पण करतो आणि नवीन मृतात्म्याला त्यांच्यामध्ये सामावून घेण्याची विनंती करतो. जमलेल्या सर्व लोकांना मग जेवण मिळते.

पुढे पौष किंवा माघ महिन्यात, स्मशानात पूर्वजांच्या अस्थी ज्या शिळेखाली पुरल्या असतील, तिथेच या नवीन मृताच्या अस्थींचे गाडगे पुरतात. [दि मुंडाज अँण्ड देअर कंट्री – शी. शरच्चंद्र रॉय, १९७०; एन्सा. मुंडा.]

मुंडकोपनिषद

दशोपनिषदांपैकी एक महत्त्वाचे उपनिषद. हे अथर्ववेदाशी संबंधित आहे. याचे तीन अध्याय असून, प्रत्येक अध्यायाचे दोन खंड आहेत. मुंड = मुंडन करणे, यावरून मुंडक शब्द बनला आहे. मनाचे मुंडन करून अविद्येपासून मुक्त करणारे ज्ञान ते मुंडक, असा त्याचा अर्थ सांगतात. प्रस्तुत नावावरून हे उपनिषद मुंडित संन्याशांना उद्देशून सांगितले असावे, असे वाटते. यातील विषयांच्या प्रतिपादनावरून व संन्यासविषयक उक्तींवरून हे संन्यासाला महत्त्व देणाऱ्या उपनिषदांच्या सदरात पडते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यात सृष्टीच्या उत्पत्तीविषयीची दिलेली उपपत्ती सांख्य व वेदान्ती यांनी अनुसरली आहे. मुमुक्षूंच्या मनात आत्मानुभवाविषयी तीव्र जिज्ञासा उत्पन्न करणाऱ्या दृष्टीने याच्या तोडीचे दुसरे उपनिषद आढळणार नाही, असे श्री. रा. द. रानडे म्हणतात.

या उपनिषदात अक्षरविद्या किंवा ब्रह्मविद्या विस्ताराने सांगितली आहे. या विद्येची परंपरा त्यात दिली आहे, ती अशी– ही विद्या ब्रह्मदेवाने आपला ज्येष्ठ पुत्र अथर्वा याला सांगितली. अथर्व्याने अंगीला, त्याने भारद्वाज सत्यवादाला व त्याने अंगिरसाला सांगितली.

शौनकाच्या मनात एक कोडे होते, की अनेक प्रकारच्या भूतांनी भरलेल्या या संसारात त्या सर्वांचा उद्गम असणारे कोणते तरी तत्त्व असायला हवे. अर्थात ते काय बरे असेल ? या कोड्याच्या उलगड्यासाठी त्याने अंगिरसाला शरण जाऊन प्रश्न केला, तो असा –

कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवति इति ।।
(मुंडकोप. १. १. ३).

अर्थ – कोणती एक वस्तू विशेषतः ज्ञात झाली असता हे सर्व विज्ञात होते ?

या प्रश्नाच्या उत्तरासाठी अंगिरसाने पुढील सर्व उपनिषदाचा प्रपंच केला आहे. तो म्हणतो –

परा आणि अपरा अशा दोन विद्या जाणण्यास योग्य आहेत. अपरा विद्या म्हणजे वेद-वेदांगांचे व इतर शास्त्रांचे ज्ञान आणि परा विद्या म्हणजे अविनाशी अशा ब्रह्माची प्राप्ती करून घेण्याचे ज्ञान होय.

याचे स्पष्टीकरण श्री. बेलसरे यांनी पुढीलप्रमाणे दिले आहे – "इंद्रियांच्या माहितीवर आधारलेल्या सर्व विद्या त्या अपरा म्हणजे कनिष्ठ विद्या समजाव्या. याचे कारण असे की, आपले मूळ स्वरूप ज्ञानमय आहे. अर्थात ज्ञानामध्ये पूर्ण समाधान असते यात शंका नाही; पण इंद्रियाचा पाया घेऊन वाढणाऱ्या सर्व ज्ञानामध्ये, म्हणजे या जगातील सर्व विज्ञान, शास्त्र, कला, विद्या यांच्यामध्ये, एक चमत्कारिक पण प्रत्येकाला अनुभवास येणारा अंतर्गत विरोध आहे. तो असा की, या शास्त्रांचे ज्ञान जितके वाढते तितकी आपणांस आपल्या अज्ञानाची जाणीव अधिक होत जाते. ज्ञान जर समाधान देते तर अज्ञान असमाधान निर्माण करते, हे स्वाभाविकच आहे. याचा अर्थ असा, की माणसाची ज्ञानलालसा पूर्णपणे तृप्त करण्यास लौकिक विद्या, अपरा विद्या समर्थ नाहीत. किंबहुना यामुळेच त्या अपरा आहेत. इंद्रियांचे क्षेत्र म्हणजे दृश्यांचे क्षेत्र होय. दृश्यांचे क्षेत्र स्थलकालांनी मर्यादित असते. म्हणून दृश्यांचे ज्ञान पूर्णत्वास जाऊ शकत नाही. त्याच्या उलट जे ज्ञान इंद्रियांच्या पलिकडे आरंभ करते, त्याचे क्षेत्र अमर्याद असल्याने ते प्राप्त झाले असता अज्ञान समूळ नाहीसे होऊन समाधान प्राप्त होते. कोणत्याही खऱ्या सत्पुरुषाकडे हे ज्ञान असते. म्हणून ज्याला आत्मदर्शनाची खरी तळमळ लागली आहे, त्याने संतांपाशी जाऊन ते ज्ञान मागावे. याच हेतूने शौनक अंगिरस ऋषीपाशी गेला आणि त्याची तृप्ती झाली."

हे अक्षर ब्रह्माचे ज्ञान कर्मकांडात्मक यज्ञांनी होणार नाही, असे सांगताना अंगिरस म्हणतो –

प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपा अष्टादशोक्तमवरं येषु कर्म ।
एतत् श्रेयो ये अभिनन्दन्ति मूढा जरामृत्युं ते पुनरेवापि यन्ति ।।
(मुंडकोप. १. २. ७)

अर्थ – सोळा ऋत्विज, यजमान आणि पत्नी असे अठरा जणांचे गौण कर्म ज्यामध्ये सांगितले आहे, अशा या यज्ञरूपी नौका अस्थिर आहेत. यज्ञच श्रेयस्कर असे समजून जे मूढ त्यांच्यांतच आनंद मानतात, ते पुनःपुनः जरा व मृत्यू भोगतात.

कर्मकांडांमध्ये रुतून बसलेल्या रागात्मक पुरुषांच्या बुद्धीला ब्रह्मविद्येचा मार्ग आकलन होऊ शकत नाही. याउलट जे तप आणि श्रद्धा यांचे व्रत घेऊन अरण्यामध्ये जातात व तिथे ब्रह्मविद्येची उपासना करतात, तेच मलरहित होऊन अमृताच्या मार्गामध्ये उंच उठतात.

दुसऱ्या मुंडकाच्या पहिल्या खंडात एका नव्या विषयाची अवतारणा केलेली आहे. तिथे प्रश्न केलेला आहे, की अधिदैवत आणि अध्यात्म यांची जी व्यवस्थात्मक रचना आहे, ती अक्षर ब्रह्मातून कोणत्या प्रकारे उत्पन्न होते? याच्या उत्तरासाठी पुढील विवेचन केलेले आहे –

अग्नीच्या उंच उठणाऱ्या ज्वालांमधून जशा हजारो ठिणग्या बाहेर पडतात, तसेच एका अविनाशी अक्षर पुरुषापासून विश्वरचनेतले अगणित भाव उत्पन्न होतात. संसारातल्या सर्व भावांचे उद्गमस्थान तो एक अक्षर पुरुषच आहे. तो अमूर्त आहे, अजन्मा आहे आणि सर्वांच्या आतबाहेर आहे. तो प्राण व मन या दोहोंहूनही वर आहे. त्याच्या पलिकडे दुसरे काही नाही. प्राण, मन, कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये, तसेच पंचमहाभूते, या सर्वांचा विकास त्याच एका पुरुषापासून म्हणजेच अक्षर ब्रह्मापासून होत असतो. या विराट जगतल्या ज्या दिव्य शक्ती अगर देवता आहेत, त्यांच्याच अंशांतून मानवाचे आध्यात्मिक स्वरूप बनले आहे. असा तो अक्षर पुरुष व्यक्तीच्या हृदयकेंद्रात वास्तव्य करतो.

यः सर्वज्ञः सर्वविद् यस्यैष महिमा भुवि ।
दिव्ये ब्रह्मपुरे ह्येष व्योम्न्यात्मा प्रतिष्ठितः ।।
मनोमयः प्राणशरीरनेता
प्रतिष्ठितोऽन्ने हृदयं सन्निधाय ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तद् विज्ञानेन परिपश्यन्ति धीरा
आनन्दरूपममृतं यद् विभाति ।।

(मुंडकोप. २. २–७)

अर्थ – जो सामान्यतः सर्व जाणतो व विशेषतः सर्व जाणतो, पृथ्वीवर सगळीकडे ज्याचा महिमा (सत्ता) आहे, तो आत्मा दिव्य ब्रह्मपुरीतील म्हणजे प्रकाशमय हृदयातील आकाशात राहतो. तो मनाला चेतना देणारा व प्राण आणि शरीर यांचा नियंता आहे. हृदयाचा आश्रय घेऊन तो शरीरात राहतो. अमृतमय आनंदरूपाने विलसणाऱ्या आत्म्याला शहाणे लोक पूर्णपणे पाहतात.

भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः ।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ।।

(मुंडकोप. २. २. ८)

अर्थ – (प्रकाशमय आत्म्याचे) अर्थात सर्वज्ञ आत्म्याचे दर्शन झाले असता हृदयग्रंथी सुटते, सर्व संशय तुटतात आणि सर्व कर्मे क्षीण होतात.

तिसऱ्या मुंडकाच्या पहिल्या खंडात ऋग्वेदातल्या अस्यवामीय सूक्तात आलेला एक मंत्र उद्धृत केलेला आहे, तो असा –

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति ।।

(मुंडकोप. ३.१.१)

अर्थ – सदा एकत्र असणारे व एकमेकांचे मित्र असणारे दोन पक्षी एकाच वृक्षाच्या आश्रयाने राहतात. त्यांपैकी एक पक्षी झाडाचे मधुर फल खातो आणि दुसरा पक्षी स्वतः फल न खाता नुसताच पाहत राहतो.

हे दोन पक्षी म्हणजे जीवात्मा व परमात्मा होत. विश्वातल्या ज्या दिव्य शक्ती आहेत, त्यांची ही दोन रूपे आहेत. यांनाच देवसत्य म्हटलेले आहे. एक देवसत्य विराट्‌मध्ये आहे व दुसरे अध्यात्मकेंद्रात आहे. जीवाने शिवाशी तद्रूप बनणे हीच जीवाची परमावस्था होय. सामान्यतः जीव हा देहामध्ये आसक्त असतो. आपण देहच आहोत अशा बुद्धीने तो जगतो. या देहबुद्धीमुळे त्याच्या सामर्थ्याला सर्व बाजूंनी मर्यादा पडतात. तो एक प्रकारे दीन बनतो. पण जेव्हा तो दुसऱ्या पक्ष्याला म्हणजे ईश्वराला पाहू लागतो, त्या वेळी त्याचा महिमा कळून तो शोकरहित बनतो. हे ' पाहणे ' यासाठी जीवाला काही अभ्यास करावा लागतो. त्या अभ्यासाचे स्वरूप पुढील मंत्रात सांगितले आहे –

' सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा सम्यग्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम् ।
अन्तःशरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रो यं पश्यन्ति यतयः क्षीणदोषाः ।।

(मुंडकोप. ३.१.५)

अर्थ – हा आत्मा ज्योतिर्मय आणि शुभ्र असून तो शरीराच्या आत हृदयकमलामध्ये राहतो. सत्य, तप, यथार्थ ज्ञान आणि ब्रह्मचर्य यांचा नित्य अभ्यास केल्याने त्या आत्म्याचे दर्शन होते. क्षीणदोष म्हणजे ज्यांचे कामक्रोधादी विकार नाहीसे झाले आहेत, अशा साधकांना आत्मदर्शन घडते.

' सत्यमेव जयते नानृतम् ' हे प्रसिद्ध वाक्य याच उपनिषदात आहे (३.१.४९). सत्याचाच जय होतो; असत्याचा नाही. ईश्वराकडे जाण्याचा मार्ग सत्याने भरलेला आहे. पूर्णकाम ऋषी त्या मार्गाने सत्याचे परम निधान जो परमात्मा त्याच्याप्रत पोचतात. ' नायमात्मा बलहीनेन लभ्यः = बलहीनाला आत्मलाभ होत नाही, हे वाक्य याच उपनिषदात आहे.

बुद्धिमान लोक एकाग्र मनाने त्या परब्रह्माची उपासना करतात. जो जीव अनेक प्रकारच्या कामनांनी आक्रांत असतो, तो तसा जन्म मिळवितो. पण जो कामनांचा निरोध करतो, त्याच्या त्या कामनांचा विलय होतो. जो बलहीन आहे, प्रमादी आहे आणि ज्याचे तप विधिपूर्वक नसते, त्याला आत्मदर्शन कधीही होत नाही; पण जो तप, श्रद्धा, इ. वर सांगितलेल्या साधनांनी या मार्गावर चालत राहतो, तो त्या ब्रह्मधामाचा मुक्काम गाठतो. त्याची स्थिति-गती पुढील मंत्रात सांगितली आहे –

यथा नद्यः स्यन्दमानाः समुद्रे अस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय।
तथा विद्वान् नामरूपाद्विमुक्तः परात्परं पुरुषमुपैति दिव्यम्॥

(मुंडकोप. ३.२.८)

अर्थ – ज्याप्रमाणे सतत वाहणाऱ्या नद्या नाम व रूप यांचा त्याग करून समुद्रात अस्त पावतात, त्याचप्रमाणे नाम व रूप ह्यांपासून मुक्त होणारा विद्वान, सर्वांत श्रेष्ठ असणाऱ्या पुरुषाशी एकरूप होतो.

शेवटी अंगिरसाने सांगितले आहे, की जे शास्त्रविहित कर्मे करणारे, शाश्वत ब्रह्मनिष्ठ, एकर्षिनामक अग्नीचे उपासक, श्रद्धावंत आणि शिरोव्रती (शिरावर अग्नी नेण्याचे व्रत करणारे किंवा मुंडित) असे अधिकारी पुरुष असतील, त्यांनाच ही ब्रह्मविद्या सांगावी. [उ. र.; उपनिषद्‌नवनीत–डॉ. वासुदेवशरण अग्रवाल, सा. हिंदुस्थान, ३१ मे १९६४; उ. अ.]

मुंडपृष्ठ एक पवित्र स्थान. हे ठिकाण गयेजवळ फल्गु नदीच्या तीरावर एका टेकडीवर आहे. इथे महादेवाने उग्र तपश्चर्या केली, असे सांगतात. इथे विष्णुपदही आहे. याच्या थोडे पूर्वेला कनकनंदी हे तीर्थ आहे. तिथे स्नान केल्याने तीन ऋणांतून मुक्तता मिळते, असे सांगितले आहे. या टेकडीवरच गयासुराने आपले डोके टेकले होते, अशी कथा आहे. इथे श्राद्धही करतात. पाहा– गया. [हि. ध.; पु. इं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुंड्ला मुडम्मा द. भारतातील एक ग्रामदेवता. हिचे चरित्र पुढीलप्रमाणे सांगतात– मुंड्ला ही एक शूद्राची मुलगी होती. ती गुरे चारण्याचे काम करीत असे. केवळ आपल्या आवाजाने गुरांना असतील तिथून वळवून आणण्याचे सामर्थ्य तिच्या ठिकाणी होते. मुंड्लाचे सामर्थ्य गावच्या लोकांना भीतिप्रद वाटले. ते मर्यादित करण्यासाठी गावकऱ्यांनी एका मांत्रिकाला बोलावले. एक विशिष्ट जागा सोडून मुंड्लाने बाहेर जाऊ नये म्हणून मांत्रिकाने एक कुवेडे केले. ही गोष्ट मुंड्लाला कळली आणि ती एकाएकी अदृश्य झाली. काही दिवसांनी ती गुरे चारत होती त्या कुरणात एक दगड उत्पन्न झाला. तो दगड म्हणजेच मुंड्ला होय, असे गावकऱ्यांना वाटले. त्यांनी त्या दगडाची एक स्त्रीमूर्ती बनविली आणि तिच्यावर एक मंदिर बांधले. अशा प्रकारे ती देवत्व पावली. पुढे हिच्या देवळाभोवती एक गाव वसले आणि ते तिच्याच नावाने प्रसिद्ध झाले. या देवतेची यात्रा नऊ दिवस चालते. [द्र. गॉ. मॉ. हिं.]

मुंडेश्वरी एक देवी. बिहारमधल्या शहाबाद जिल्ह्यातील रामगढ गावी एका टेकडीवर हिचे मंदिर आहे. हे मंदिर नागर शिल्पशैलीचे एक नमुनेदार उदाहरण असून, यावर गुप्त शैलीची छाप दिसते. बिहार प्रांतातील हे जुन्यांत जुने शिल्प आहे, असे समजतात.

देवालयाचा आकार अष्टकोनी असून, चहूबाजूंनी त्याला दारे व खिडक्या आहेत. ठिकठिकाणी झरोकेही आहेत. मंदिराच्या आधाराचे खांब फार मोठे आहेत. मुख्य द्वार पूर्वेस आहे. गर्भागारात मध्यभागी चतुर्मुखी शिवलिंग व त्याच्या शेजारी मुंडेश्वरीची मूर्ती आहे. त्यावरून असे म्हणतात, की हे मंदिर मुळात शिवाचे असून, पुढे शाक्त पंथाच्या उत्कर्षकालात शिवलिंगांच्या शेजारी मुंडेश्वरीची स्थापना झाली असावी. ही देवी म्हणजे महिषासुरमर्दिनीच होय. ती महिषासुरावर आरूढ झालेली आहे. इतर ठिकाणच्या महिषासुरमर्दिनीपेक्षा हे रूप वेगळे दिसते.

हे मंदिर सांप्रत भग्न अवस्थेत आहे. त्याच्या भोवती आढळणाऱ्या काही शिलालेखांवरून ते इ. स. ६३५ साली उदयसेन राजाच्या कारकिर्दीत बांधले गेले असावे, असे वाटते. या ठिकाणी जे उत्खनन झाले आहे, त्यावरून एका काळी या मुंडेश्वरीच्या परिसरात अनेक मंदिरे असावी, असे दिसते. मुंडेश्वरीचे हजारो भक्त असून, ते नवरात्रात तिच्या दर्शनासाठी तिथे जातात. [टें. ली. वि.]

मुकुट देवदेवतांच्या मस्तकावरील शिरोभूषण. मुकुटाला मौली असेही दुसरे नाव आहे. मानसार या ग्रंथात मुकुटाचे काही प्रकार दिले आहेत, ते असे–

(१) जटामुकुट – यात मस्तकावरील केशसंभार जटामय असून, तो उंच मुकुटाप्रमाणे रचलेला असतो. सर्वसाधारणपणे ब्रह्मा व रुद्र-शिव यांच्या मस्तकावर तो असतो. त्यात कधी रत्ने, चंद्रकोर व क्वचित कपाल असते.

(२) किरीट-मुकुट – नारायण, सूर्य, कुबेर, इ. देवतांच्या मस्तकावर शंकूच्या आकाराचे शिरोभूषण असते, त्याला किरीट-

करंड-मुकुट

किरीट-मुकुट

मुकुट असे म्हणतात. त्याच्यावर कधी लहानसा कळस असतो, किंवा कधी अलंकार असतो.

(३) करंड – मुकुट – हा मुकुट करंडीप्रमाणे अर्धगोलाकार आणि वर चपटा असतो. तो बहुधा गौण देवतांच्या मस्तकावर असतो.

(४) शिरस्त्रक–हा मुकुट पागोट्याप्रमाणे व्यवस्थित बांधलेला असतो. शुंगकालातील यक्ष, नाग, इत्यादी मूर्तींच्या मस्तकावर हा घातलेला दिसतो.

पूर्वी राजे लोक आपल्या मस्तकावर विविध आकारांचे रत्नजडित सुवर्ण-मुकुट धारण करीत. [डे. हिं. इ.]

मुकुटसप्तमी एक जैन व्रत. श्रावण शुद्ध सप्तमीला मुकुटसप्तमी म्हणतात. या दिवशी उपवास, आदिनाथाची पूजा आणि ‘ॐ ह्रीं वृषभादितीर्थंकरेभ्यो नमः ’ या मंत्राचा जप करायचा असतो. व्रतावधी सात वर्षे. उद्यापनाच्या वेळी सात उपकरणे जिनाला अर्पण करतात. फल– मोक्षप्राप्ती. [जै. क.; जै. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुकुंद (इ. स. चे १७ वे शतक) एक गुजराती संतकवी. हा गुगली जातीचा ब्राह्मण असून, द्वारकेत राहत होता. स्वामी केशवानंदांच्या संपर्कात आल्यावर याने भक्तमाल हा ग्रंथ रचला. या ग्रंथात अनेक संतांची त्रोटक चरित्रे त्याने वर्णिली आहेत. याव्यतिरिक्त याने गोरक्षनाथ व कबीर यांचीही स्वतंत्र चरित्रे लिहिली आहेत. या दोन्ही चरित्रग्रंथांमधून प्राधान्याने ज्ञान आणि योग हे विषय आले आहेत. याचा कबीरचरित्र हा ग्रंथ हिंदू आणि मुसलमान या दोन्ही समाजांमध्ये सारखाच प्रिय आहे. [गुज. सा. इ.; मा. गु. लि.]

मुकुंददास (१६४८–१७१८ इ. स.) एक गुजराती संतकवी. हा सुरतेचा रहिवासी होता. काही लोक याला ब्राह्मण समजतात, तर काही भावसार किंवा अग्रवाल मानतात. याने ऐन तारुण्यात स्वामी प्राणनाथांकडून दीक्षा घेतली. प्राणनाथानंतर त्याने स्थापन केलेल्या धामी संप्रदायांचा हा एक प्रमुख प्रचारक बनला. गुजरात, राजस्थान, इ. प्रदेशांत याने त्या पंथाचा खूप प्रचार केला. उदयपूरला प्रणामी मंदिराची उभारणीही यानेच केली.

मुकुंददासाने १६७ ग्रंथ रचले, असे सांगतात. नवरंग-सागर, मिहिराजचरित, सुंदरसागर, षट्-शास्त्र, लीलीप्रकाश, गीतारहस्य व गुरु-शिष्यसंवाद हे त्यांतील उल्लेखनीय ग्रंथ होत. त्या सर्वांत नवरंग-सागर हा ग्रंथ मोठा आहे. यात ३६०० चौपाया आहेत. त्या ग्रंथात तो नवरंग अशी आपली नाममुद्रा देतो. याची भाषा व्रज असली तरी गुजराती, बुंदेलखंडी व खडी बोली या भाषांचे तिच्यात मिश्रण आहे. [गु. सं. हिं. दे.]

मुकुंदराज (इ. स. च्या १२ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक संतकवी. याला मराठीचा आदिकवी मानतात. हा माध्यंदिन शाखेचा देशस्थ ब्राह्मण होता. काही विद्वान मुकुंदराजाला ज्ञानेश्वरांच्या अलिकडचा मानतात, तर काही त्यांच्या पूर्वीचा. मुकुंदराजाच्या स्थलाविषयीही असेच मतभेद आहेत. विवेकसिंधूत मुकुंदराजाने वैनगंगेच्या तीरावरील मनोहर अशा अंबानगरीचा उल्लेख केला असून, तेच त्याचे वास्तव्यस्थान असल्याचे त्यावरून कळते. पण या अंबानगरीबद्दल संशोधक वेगवेगळी मते सांगतात. काही म्हणतात, की ही अंबानगरी म्हणजे आंबेजोगाई होय. काहींच्या मते अंबानगरी म्हणजे भंडाऱ्याजवळील वैनगंगातीरावरचे अंभोर हे गाव होय. दोन्ही मतांच्या सिद्धीसाठी आधार दिले गेले आहेत. महाराष्ट्र सारस्वतकार भावे, पांगारकर, अलिकडील प्रा. सुरेश डोळके हे अंबानगरी म्हणजे अंभोर या मताचे समर्थक आहेत; पण अंबानगरी म्हणजे आंबेजोगाई या मताला पुष्टी देणारे आधारही उपेक्षणी[य] नाहीत. याविषयी डॉ. शं. गो. तुळपुळे लिहितात–

“ आंबेजोगाईजवळील मुकुंदराजांची समाधी सर्वश्रुत [आहे.] हे अत्यंत रमणीय असे स्थान दासोपतांच्या समाधीपासून [एक-दोन] कोसावर, एका दरीतील गुहेत आहे. या दरीतून जयंती नावा[ची] नदी वाहत असून, ती आंबेगावातून येऊन पुढे जवळच वाणनदी[स] मिळाली आहे. विवेकसिंधूत ज्याचा उल्लेख आला आहे



मुकुंदराजाची समाधी– आंबेजोगाई

त्या जैतपाळाच्या किंवा जयंतपाळाच्या नावावरून त्या गावा[च्या] नदीस जयंती हे नाव मिळणे अशक्य नाही, ही गोष्ट जाता जा[ता] नमूद करून ठेवावी असे वाटते. ही समाधीची गुहा म्हणजे मुकुंदराजाचे ध्यानधारणेचे व ग्रंथरचनेचे स्थान होय, या आंबे[-] जोगाईत रूढ असणाऱ्या आख्यायिकेतील सत्यांश ध्यानात घे[ण्या]सारखा आहे. या समाधीच्या किंचित खालच्या अंगास ज्ञाने[-] श्वरांच्या पादुका असून, ज्ञानेश्वर हे मुकुंदराजांच्या समाधीच्या दर्शनास येऊन गेल्याचे हे स्मृतिचिन्ह होय, असे जे सांग[ण्यात] येते तेही असंभवनीय नाही.”

मुकुंदराजाने आपल्या ग्रंथांतून आत्मचरित्रपर असे काही[ही] उल्लेख केलेले नाहीत. काही मठस्थ कागदपत्र, काही [सांप्र]दायिक स्फुट अभंग आणि भक्तिरहस्य हा केशव जयरा[म...] ग्रंथ, यावरून मुकुंदराजाच्या पूर्वजीवनासंबंधी काही हकी[कत] मिळते, ती अशी–

मुकुंदराजाचे पूर्वीचे नाव मुकुंदभट्ट असे होते. तो वि[द्वान] ज्योतिषी होता व काशीत राहत होता. एकदा हरिनाथ [नावाचा] सत्पुरुष आपला शिष्य रघुनाथ याच्यासह काशीला गेला. [...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याने रघुनाथाला माधुकरीसाठी पाठविले. माधुकरी मागत तो मुकुंदभट्टाच्या दारी गेला. त्याला पाहून मुकुंदभट्ट म्हणाला, की तुझे मरण आजच्या आज आहे. रघुनाथाने हे भविष्य हरिनाथाला सांगितले. पण हरिनाथाने आत्मसामर्थ्याने शिष्याचे मरण चुकविले व त्याला पुनश्च मुकुंदभट्टाकडेच माधुकरीसाठी पाठविले. रघुनाथाला जिवंत पाहून मुकुंदभट्ट आश्चर्यचकित झाला. रघुनाथाचे मरण ज्याने चुकविले, त्या महापुरुषाची भेट घेतलीच पाहिजे, असे वाटून त्या भेटीसाठी तो वैनगंगेच्या तीरी अंबानगरी येथे आला. तिथे हरिनाथाने रघुनाथाकरवी त्याला गुरूपदेश देऊन, त्याचे नाव मुकुंदराज असे ठेवले.

मग त्याने विवेकसिंधू हा ग्रंथ शारंगधराच्या राज्यात राहून रचला व जैतपाळाच्या प्रसंगाने त्याचा ' गदारोळ ' केला.

जैतपाळ राजाला एकदा ब्रह्मसाक्षात्काराचा उमाळा आला. मग तो राज्यात येईल त्या साधुसंताला व विद्वान ब्राह्मणाला 'मला ब्रह्मदर्शन घडवा ' असे सांगू लागला. पण कोणीही त्याची ती इच्छा पुरी करू न शकल्यामुळे त्याने त्या सर्वांना पकडून तलाव खोदण्याच्या कामावर वेठीस लावले; काहींना चक्की पिसायला लावले. ही गोष्ट घडत असता, एके दिवशी मुकुंदराज तिथे गेला. ब्राह्मणांची ती दुर्दशा पाहून त्याला दया आली. त्याने जैतपाळाची भेट घेतली व त्याला साधुसंतांच्या व ब्राह्मणांच्या छळाबद्दल विचारले. जैतपाळ म्हणाला, की ' ते लोक मला ब्रह्मसाक्षात्कार घडवू शकले नाहीत, म्हणून मी त्यांना वेठीस धरले आहे. ' त्यावर मुकुंदराज बोलला. ' मी तुला ब्रह्मसाक्षात्कार घडवीन. '

असे म्हणून मुकुंदराज जैतपाळाच्या अश्वशाळेत गेला. तिथून त्याने एक घोडा निवडून बाहेर काढला. हा घोडा म्हणजे पूर्वजन्मीचा मलय नामक एक गंधर्व होता. त्याने एकदा नारदाचा अपमान केल्यावरून नारदाने 'तू अश्वजन्माला प्राप्त होशील' असा त्याला शाप दिला होता. गंधर्वाने त्याला उःशाप मागितल्यावर नारदाने म्हटले होते, की ' एका साधूच्या करस्पर्शाने तुझा उद्धार होईल. '

नेमका तोच घोडा पुढे आणून मुकुंदराज जैतपाळाला म्हणाला, ' तू या घोड्यावर बैस. ' जैतपाळ त्याच्यावर स्वार होण्यासाठी रिकिबीत पाय ठेवतो तोच मुकुंदराजाने जैतपाळाच्या पाठीवर आपल्या वेताच्या छडीने सपासप तीन प्रहार केले. त्यासरशी जैतपाळाची समाधी लागली व त्याला ब्रह्मसाक्षात्कार घडला. त्या स्थितीतून बाहेर आल्यावर मुकुंदराजाने त्याला तत्त्वज्ञानाचा उपदेश केला.

विवेकसिंधूच्या १८ व्या प्रकरणात मुकुंदराजाने आपली गुरुपरंपरा दिली आहे, ती अशी–

आदीगुरू श्रीआदिनाथु । तेयोनि श्रीहरिनाथु ।
तेयाचा शिष्य श्रीरघुनाथु । जो पूर्णसिंधु ।।

यातील आदिनाथ म्हणजे शिव. तो नाथसंप्रदायाचा आदिगुरू. हरिनाथ म्हणजे श्रीचक्रधरस्वामी व रघुनाथ म्हणजे चक्रधरांचा महानुभावपंथप्रवर्तनपूर्वशिष्य रामदेव दादोस होय, असे श्री. ढेरे म्हणतात. मुकुंदराजाने हरिनाथ व आदिनाथ यांच्या भेटीचे अद्भुत चित्र रेखाटले आहे. त्याने आपला संप्रदाय सांगितला नाही. पण आदिनाथ – हरिनाथ – रघुनाथ– मुक्तिनाथ (मुकुंदराज) या नाथपदान्त नावांवरून तो नाथसंप्रदायी होता यात शंका उरत नाही.

मुकुंदराजाने रचलेल्या विवेकसिंधूची १८ प्रकरणे असून, ओवीसंख्या सुमारे १७०० आहे. हा ग्रंथ गुरु-शिष्यसंवादपद्धतीने लिहिलेला आहे.

विवेकसिंधूतले तत्त्वज्ञान हे अद्वैतप्रतिपादक असल्याचे व ते शांकर मताला अनुसरून असल्याचे मुकुंदराजाने स्वतःच सांगून ठेवले आहे. याविषयी तो म्हणतो–

आगा शास्त्रें आनेकें । आसति संदेहदायकें ।
परि आद्वैतप्रतिपादकें । तींचि आइकावि ।।
आद्वैतशास्त्रश्रवणें । इंद्रियें होतीं प्रत्येकप्रवणे ।
आणी ज्ञानाधीकारू पावणें । अनायासें ।।
तत्त्वता आद्वैतचि आसे । द्वैत नाथिलेंचि आभासे ।
तें मूढजनांसि साच यैसें । आवडों लागे ।।

(विवेकसिंधू ७.९२–९४)

शंकरोक्तीवरी । मियां बोलिलो हे वैखरी ।
म्हणौनि धरावी चतुरीं । शास्त्रबुद्धि ।।

(विवेकसिंधू ७.१४७)

शंकराचार्यांचे ब्रह्मसूत्रभाष्य व उपनिषद्भाष्य यांचे मंथन करून मुकुंदराजाने ब्रह्मविचार व साध्य-साधनविचार विवेकसिंधूत मांडले आहेत. शंकराचार्य व मुकुंदराज यांच्या तत्त्वज्ञानाविषयी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी एक तौलनिक लेख लिहिला आहे, त्याचा सारांश असा–

मराठीत मायावादी अद्वैत वेदान्ताची विवेचनात्मक मांडणी करणारा विवेकसिंधू हा पहिला ग्रंथ होय. वेदान्त सिद्धान्ताची समग्र क्रमबद्ध व प्रकरणवारीने मांडणी करणारा याच्या तोडीचा दुसरा ओवीबद्ध ग्रंथ मराठीत नाही. शांकर अद्वैताचा मुख्य सिद्धान्त असा, की ब्रह्मसाक्षात्काराने म्हणजेच तत्त्वज्ञानाने मोक्षप्राप्ती होते. मुकुंदराजाचाही तोच सिद्धान्त आहे–

जीवासि तत्त्वज्ञानेंवीण । नाही बंधविच्छेदन ।
ते करावी नोडवण । ईश्वरेंचि कीं ।।

(विवेकसिंधू ५.३०)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विवेकसिंधूचे सर्व प्रतिपादन 'तत्त्वमसि' या महावाक्यावर केंद्रित झाले आहे. शांकर पद्धतीप्रमाणे तत्पदार्थ म्हणजे परमेश्वर व त्वं पदार्थ म्हणजे जीवात्मा असल्याचे मुकुंदराजानेही प्रतिपादिले असून, जीव-शिवांचे अद्वैत विवरून दाखविले आहे. शांकर मताप्रमाणे स्थूल, सूक्ष्म व कारण असे व्यक्ती व समष्टी यांचे देहत्रयच आहे. पण मुकुंदराजाने महाकारण हा चौथा देह मानला आहे.

सृष्टीच्या उपपत्तीकरिता मुकुंदराजाने सांख्यशास्त्रातले विचार स्वीकारले आहेत. त्यामुळेच त्याला देहचतुष्टयाची कल्पना करावी लागली.

जाग्रत्, स्वप्न, सुषुप्ती व तुर्या अशा जीव-शिवांच्या चार अवस्था मुकुंदराजाने सांगितल्या आहेत शांकरमताप्रमाणे पहिल्या तीन याच अवस्था असून, तुर्या म्हणजे साक्षीभूत शुद्ध आत्मचैतन्य आहे. मुकुंदराजमते तुर्या म्हणजे निर्विकल्पक आत्मसाक्षात्कार असून, ती एक मनोवृत्ती आहे. ती जीवनमुक्त पुरुषाला लाभते. ही अवस्था देहपातानंतर राहत नाही, म्हणून तीसुद्धा विनाशीच आहे.

तत्पदार्थ म्हणजे परमेश्वर असून, सर्व विश्व म्हणजे समष्टी हे त्याचे शरीर होय. मूल प्रकृती महामाया ही त्याची विश्व निर्माण करणारी शक्ती आहे. तिलाच महाकारण ही संज्ञा आहे. ब्रह्माच्या ठिकाणी असलेली ही महामाया ब्रह्माहून भिन्न का अभिन्न, या प्रश्नाचे उत्तर शंकराचार्यांप्रमाणेच मुकुंदराजाने दिले आहे. तो म्हणतो, की भिन्न की अभिन्न याचे निर्वचन तर्काने शक्य होत नाही; म्हणून मायेला अनिर्वचनीय समजावे. ज्या अर्थी ती अनिर्वचनीय आहे, त्या अर्थी ती सत्य नसून मिथ्या आभासरूप आहे. मुकुंदराजाचे मायाविवरण असे–

हे परब्रह्म निर्गुण । सर्वेश्वराचे निजस्वरूप जाण ।
मूळ मायेसी अधिष्ठान । जाण पूर्ण चैतन्य जें ।।
माया ब्रह्मीचा विवर्तु । ऐसें बोले वेदान्त सिद्धान्तु ।
जो उपनिषदाचा मथितार्थु । प्रमाणसिद्ध ।।
ब्रह्म निर्विकार जैसे । तैसे ते असतचि असें ।
तेथें अन्यथा आभास भासे । तो ब्रह्मविवर्तु गा ।।
हे गुणत्रयाची समता । ईश्वराची उन्मनी अवस्था ।
ते चैतन्ये अधिष्ठिता । बोलिजे महामाया ।।
सृष्टयादिक व्यापारु । जो करी जगदीश्वरू ।
तो हि मायेचाचि बडिवारु । ऐसे जाण तूं ।।
हे असंभावनीय । माया निर्वचनीय ।
म्हणौनि मिथ्याचि परि वाया । आभासति असे ।।
(विवेकसिंधू ३.२३–२४, २६, ३१, ३९–४०)

स्वयंप्रकाश, परब्रह्म हे एकच परमार्थ सत्य आहे. जीव, जगत व ईश्वर या तीन्ही कल्पना सापेक्ष असून मिथ्या आहेत. त्याच-बरोबर माया व विद्या या उक्तीही मिथ्या होत. माया किंवा विद्या ही खोटी असल्यामुळे बंध व मोक्ष हे द्वंद्वही खोटे आहे.

विवेकसिंधूतले कवित्व मुख्यत: अलंकारयोजनेच्या रूपाने प्रकट झालेले आहे, असे सांगून डॉ. अ. ना. देशपांडे लिहितात –

ही अलंकारयोजना ही सौंदर्यदृष्टीतून स्फुरलेली नसून, तो केवळ प्रतिपाद्य विषयाचे स्पष्टीकरण करण्यासाठी आहे. उदा.–

नदी उगवी स्थिरावती । तरि तेचि समुद्र होती ।
आहो आघारु का न होती । आणिका नदियांसी ।।
तैसा आपुला उगवु । जरि न सांडिता हा जीवु ।
तरि आंगासि येतां थोरावु । परब्रह्मीचा ।।

या ओव्यांत जो विचार मांडलेला आहे, त्यातील मर्म स्पष्ट होण्यास जीव = नदी आणि परब्रह्म = समुद्र हे साम्यदर्शन निश्चित साहाय्यकारी झालेले आहे.

मुकुंदराजाने महाभाष्य नावाचा एक संस्कृत श्लोकबद्ध ग्रंथ लिहिला आहे. त्यात विवेकसिंधूतला सर्व विचार बीजरूपाने आलेला आहे. याव्यतिरिक्त त्याच्या नावावर परमामृत, मूळ-स्तंभ व पवनविजय हे तीन ओवीबद्ध ग्रंथ नोंदले गेले आहेत. पण ते मुकुंदराजाचे नसावे, असेच बहुतेक विद्वानांचे मत आहे. विवेकसिंधूचा संस्कृत श्लोकबद्ध अनुवाद झालेला असून, मुद्गल-सुत गोपाळ हा त्याचा कर्ता आहे.

[म. सा.; प्रा. म. वा. इ.; मु. अं. को.; विवेकसिंधु; गो. च. प.; श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी – नवभारत, ऑगस्ट १९५९; प्रा. म. सं.; नवभारत, मे १९६०]

मुकुंदराज कारंजेकर (इ. स. च्या १८ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक महानुभाव कवी. हा मूळचा वऱ्हाडातील उमरखेड गावचा रहिवासी असून, याचे उपनाव वांगे असे होते. याने कवीश्वर आम्नायात पंथाची दीक्षा घेतली. याच्या गादीला कारंजेकराची गादी म्हणून ओळखतात. याने वनदेवस्तोत्र, कृष्णावलीस्तोत्र, देवदेवेश्वरस्तोत्र, इ. अनेक मराठी स्तोत्रे रचली आहेत. वनदेवस्तोत्रातील काही भाग असा–

वनांमाजि पक्षी सदा वादताती ।
स्वरें कोकिळा राग मल्हार गाती ।।
सुवे बोलती सर्व शास्त्रां पुराणां ।
स्मरा दत्तमूर्ती धरा नित्य ध्याना ।।
नकळें अही खेळता प्रीतिरंगा ।
नसे वैर तेथें सदा प्रेमयोगा ।।
वनी खेळ क्रीडा श्रीदत्तात्रयाशी ।
म्हणौनी नसे वैरबुद्धी तयांशी ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या काव्याच्या अखेरीला कवीने आपले नाव, स्तोत्र रचल्याचे ठिकाण, इ. माहिती दिली आहे. [म. म. वा.]

मुकुलपर्वत बिहारमध्ये बोधगयेच्या दक्षिणेस सुमारे १६ मैलांवर ही टेकडी आहे. हिला सांप्रत कलुहा टेकडी असे म्हणतात. इथे बौद्ध शिल्पकलेचे पुष्कळ अवशेष व बुद्धाच्या मूर्ती सापडल्या आहेत. बुद्धाने या पर्वतावर सहा वर्षावास केले होते. [हि. जॉ. ए. इं.]

मुकुलभट्ट (इ. स. च्या १० व्या शतकाचा पूर्वार्ध) एक अलंकारशास्त्रज्ञ. याच्या वडिलांचे नाव कल्लट होते. हा श्रीदुराजाचा गुरू होता. याने अभिधावृत्तिमातृका नावाचा ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ फार लहान असला तरी अत्यंत मोलाचा आहे. यात केवळ पंधरा कारिका असून, त्यांवर ग्रंथकाराची गद्यवृत्ती आहे. ग्रंथात अभिधा व लक्षणा या शब्दव्यापाराच्या मुख्य आणि लाक्षणिक अर्थांचे विवरण आहे. लक्षणेचे विवेचन सविस्तर आहे. उपादानलक्षणा, लक्षणलक्षणा, इ. स्वरूपाचे लक्षणाप्रकार मम्मटापूर्वी केवळ याच ग्रंथात मांडलेले आढळतात. त्यामुळे मुकुलभट्टाला लक्षणाविवेचनाचा जनक म्हणावे, असे काहींचे मत आहे. मम्मटाने बव्हंशी मुकुलभट्टाच्या मताचेच अनुसरण केले आहे. प्रसिद्ध अलंकारशास्त्रज्ञ माणिक्यचंद्र याने आपल्या काव्यप्रकाशसंकेत नामक ग्रंथात मुकुलभट्टाच्या ग्रंथातील बरीच अवतरणे दिली आहेत. [सं. सा. शा. इ.; काव्यप्रकाश – संपा. श्री. अर्जुनवाडकर, श्री. मंगरूळकर]

मुकेरी एक जात. या लोकांची वस्ती मध्य प्रदेशात आढळते. यांना कसाई असेही म्हणतात. पूर्वी हे गुरे पाळण्याचा व्यवसाय करीत; पण तो सोडून त्यांनी आता कत्तलखाने उघडले आहेत. हे मूळचे मक्केचे रहिवासी असावेत, असे म्हणतात. मुसलमान आक्रमकांबरोबर ते इकडे आले आणि त्यांनी इथे एक स्वतंत्र जात बनवली. आपल्या जातीतच हे विवाह करतात. विवाहातील बऱ्याचशा चालीरीती यांनी हिंदूंकडून घेतल्या आहेत. हे उच्चवर्णीय हिंदूंकडे जेवतात; परंतु कायस्थांकडे मात्र जेवत नाहीत. पाहा – कसाई, खाटिक. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

मुक्कुवन द. भारतातील एक जात. या लोकांची वस्ती मलबारच्या किनाऱ्यावर आढळते. तिथे हे मासेमारीचा धंदा करतात. खालच्या जातीतील लोकांसाठी हे भोई म्हणूनही काम करतात. काहीजण नारळाच्या बागाही लावतात. काही जण नावाडी आहेत. काही मुक्कुवन मुसलमान झाले आहेत. त्यामुळे इतर मुक्कुवन लोक त्यांच्याशी कोणताही संबंध ठेवीत नाहीत.

विवाहप्रथा – यांच्यांत प्रौढ विवाहाची पद्धत आहे. विवाहविधी अगदी साधा असतो. स्त्री गरोदर असली तर सहाव्या किंवा सातव्या महिन्यात हे ने-कुडी नावाचा एक विधी करतात. पत्नी प्रसूत होईपर्यंत नवऱ्याला केस वाढवावे लागतात. नंतर मूल जन्मल्यावर तिसऱ्या दिवशी तो श्मश्रू करतो.

देवधर्म – हे भद्रकालीचे उपासक आहेत. या देवीचे देऊळ झोपडीवजा असते. देवीची मूर्ती म्हणजे एक लाकडाचा ओंडका असतो. वर्षातून चार वेळा देवीची जत्रा भरते. जत्रेत हिला कोंबडीचा बळी देतात.

या लोकांमध्ये जातपंचायत असते. त्यांच्या मुख्याला अरयन किंवा कर्नवन म्हणतात. तो जातीमधील तंटे-बखेडे मिटवितो.

मर्तिकप्रथा – यांच्यांत सामान्यतः मृतांना पुरतात. मृताशौच सात दिवस पाळतात. आठव्या किंवा चौदाव्या दिवशी अंत्यसंस्कार समाप्त करतात. [का. ट्रा. स. इं.]

मुक्तकेशी एक देवता आणि तीर्थ. हे तीर्थस्थान पंढरपूर क्षेत्रात भीमा नदीत पुंडलिकाच्या मंदिरापासून पुष्पावतीच्या संगमापर्यंत आहे. इथे अस्थी टाकल्या असता काही दिवसांत त्या अस्थींचे पाणी होते, अशी जनांची श्रद्धा आहे.

मुक्तकेशीसंबंधी पद्म पुराणात एक कथा आहे, ती अशी–

प्राचीन काळी विंध्याद्रीच्या उत्तरेला चंद्रसेन नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला पद्मा नावाची एक रूपवती मुलगी होती. पद्मेला आपल्या रूपाचा फार गर्व होता. चंद्रसेनाकडे येणाऱ्या ऋषींना ती विचारीत असे, की ' परमात्मा कशाने प्राप्त होतो आणि त्यासाठी कुठे तपश्चर्या करावी ?' एके दिवशी वैशंपायनाने तिला भीमा–पुष्पावती संगमावर तपश्चर्या करायला सांगितले. बऱ्याच तपानंतर श्रीविष्णू मदनापेक्षा सुंदर स्वरूप धारण करून तिच्यापुढे प्रकट झाला. विष्णूला पाहाताच पद्मा काममोहित झाली. तिच्या अंगावरील वस्त्र गळाले आणि मस्तकावरील केस मोकळे झाले. तिने विष्णूच्या चरणाला घट्ट मिठी मारली. विष्णू तिला म्हणाला. ' पद्मे, मी प्रसन्न झालो आहे, तुला हवा तो वर माग.' त्यावर पद्मा म्हणाली. ' मला इतर वर न देता तुम्हीच माझे वर व्हा.' तिचे हे भाषण ऐकून विष्णू तिला म्हणाला. ' हे स्त्रिये, तू मुक्तकेशी या नावाने इथे प्रसिद्धीला येऊन भक्तांना मोक्ष देणारी होशील. एखाद्या प्रेतावर तुझी दृष्टी पडताच त्याचा उद्धार होईल. ही माझी मूर्ती तुझ्या हृदयी असू दे.'

विठ्ठलाच्या पायाला जे लहान खळगे आहेत, ते मुक्तकेशीच्या भेटीचे साक्षीदार आहेत, असे सांगतात. ज्येष्ठ शुद्ध

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अष्टमीच्या दिवशी मुक्तकेशीचे दर्शन वशेष पुण्यकारक असते, असे सांगितले आहे. [पंढरीमाहात्म्य]

मुक्तागिरी एक जैन क्षेत्र. हे स्थान मध्य प्रदेशातील बैतुल जिल्ह्यात एलिचपूरपासून सात-आठ मैलांवर असून, ते सातपुडा पर्वतश्रेणीत आहे. जैनांनी याला एक निर्वाण-स्थान मानले आहे.

या स्थानाला मेधागिरी असे प्राचीन नाव असावे, असे अभ्यासकांचे मत आहे. या नावासंबंधीचे एक स्पष्टीकरणही दिले जाते, ते असे — मेध म्हणजे हत्या आणि निर्वाण म्हणजे मोक्ष. आत्महत्या करून मोक्ष मिळविण्यासाठी निवडलेला पर्वत म्हणजे मेधागिरी होय. मुक्तागिरी म्हणजे मुक्ती देणारा पर्वत, असे त्याचे स्पष्टीकरण देता येईल.



मुक्तागिरीवरील एक मंदिर

हे स्थान बरेच प्राचीन असावे. या पर्वताच्या पायथ्याजवळ आणि शिखरावर मिळून ४० – ५० मंदिरे आहेत. त्यांतील काही खडकांत खोदलेली आहेत; काहींना मोठमोठी भुयारे आहेत. बहुतेक सर्व मंदिरांतून तीर्थंकरांच्या संगमरवरी मूर्ती आहेत. [जै. ध.; भा. प्रा. जै. ती.; भा. सं. जै. यो.; मंदिर-माला मुक्तागिरी—श्री. भाऊ मांडवकर, १९६०; कल्याण—तीर्थांक]

मुक्तानंद (१७६१ – १८३० इ. स.) एक गुजराती संत-कवी. हा धांगध्रा येथे राहत होता. याचे पूर्वाश्रमीचे नाव मुकुंददास असे होते. संन्यास घ्यायला आई-वडील परवानगी देईनात म्हणून हा वेडयाचे सोंग येऊन मांगरोळला पळून गेला. तिथे त्याने रामानंदांचे शिष्यत्व पत्करले.

मुकुंदबावनी, उद्धवगीता व सतीगीता हे याचे ग्रंथ होत. या-व्यतिरिक्त, त्याने हजारो स्फुट गीते रचली आहेत. पंडितांच्या मते या गीतांची संख्या नऊ हजार इतकी भरेल. भगवान व भक्त यांचे माहात्म्य याने वर्णिले आहे आणि करुण व भक्ती या रसांचे चांगले चित्रण केले आहे. [गुज. सा. इ.; वि. मुं. रा. प.]

मुक्ताबाई (१२७९ – १२९७ इ. स.) ज्ञानदेवांची धाकटी बहीण. एक आत्मज्ञानी व कवयित्री. परब्रह्मी चिःकला, म्हणून संतमंडळी तिचा गौरव करतात. हिचे चरित्र ज्ञानेश्वरमंडळाच्या व्यापक चरित्रातच गुंफलेले आहे. ती निःस्पृह आणि कोणतीही गोष्ट स्पष्ट बोलण्याइतकी धीट होती. तिच्या या धीटपणाचा एक प्रसंग तिच्या चरित्रात आला आहे, तो असा-

नामदेव आळंदीला आला असता निवृत्ती, ज्ञानदेव व सोपान या तिघांनीही त्याला प्रेमाने वंदन केले. पण नामदेवाने मात्र त्यांना प्रतिनमस्कार केला नाही. मुक्ताबाईला ही गोष्ट खटकली. त्यामुळे ती नामदेवाला नमस्कार करायला पुढे झाली नाही. नामदेव हा भक्तश्रेष्ठ आहे आणि त्याचे पाय धरणे उचित आहे, असे निवृत्तिनाथाने समजावूनही ती नमस्कारासाठी उठली नाही. ती नामदेवाला स्पष्टच म्हणाली –

झालासी हरिभक्त तरी आम्हां काय।
आंतली ती सोय न ठाऊकी ।।
घेऊनी टाळ दिंडी हरिकथा करिसी।
हरिदास म्हणविसी श्रेष्ठपणे ।।
गुरुविण तुज नव्हेचि गा मोक्ष।
होशील मुमुक्षु साधक तूं ।।
आत्मतत्त्वीं दृष्टी नाहीच पा केली।
तंववरी ब्रह्मबोली बोलुनी काय ।।
तुझे रूप तूंचा नाही ओळखिले।
अहंतेते धरिले कासयासी ।।

नामदेव परम भक्त होता; पण अद्याप आत्मबोधाला पारखा असल्यामुळे त्याच्या ठिकाणी भक्तपणाचा अहंकार अंशरूपाने वसत होता. परमार्थातले त्याचे हे न्यून मुक्ताबाईने सडेतोड शब्दांत त्याला दाखवून दिले. नामदेवाला ते कटू सत्य मान्य करावेच लागले. त्यानंतर विसोबा खेचराला शरण जाऊन त्याने आत्मबोध प्राप्त करून घेतला आणि तो कृतार्थ झाला.

यादवकालीन सांस्कृतिक इतिहासात मुक्ताबाईचे व्यक्तिमत्त्व विलक्षण तेजस्वी आहे. आपल्या पोरकेपणावर मात करून आलं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्ञानाच्या क्षेत्रात तिने मोठा अधिकार मिळविला. निवृत्तिनाथ हा थोरला भाऊच तिचा गुरू होता. त्याच्याकडून तिने योग-साम्राज्य प्राप्त करून घेतले. एक अलौकिक योगिनी म्हणून तिची तेजोमयी मूर्ती महाराष्ट्राच्या मन:पटावर कायमची विराजमान झालेली आहे. तिच्या उपलब्ध अभंगांची संख्या पन्नासहून कमी आहे. पण तेवढ्या अल्प रचनेतूनही तिच्या दिव्य अनुभवाची झळाळी प्रतीत होते. श्री. सुशीला कुप्पस्वामी यांनी मुक्ताबाई-च्या काव्याचे अंतरंगदर्शन घडवले आहे, त्याचा सारांश असा –

मुक्ताबाईचे अभंग वाचताना सर्वप्रथम नजरेस भरतो, तो तिचा प्रौढपणा. ती आत्मविश्वासाने आणि अधिकारवाणीने बोल-ताना दिसते. तिचा प्रत्येक अभंग एखाद्या दिव्य अनुभवाचा द्योतक असतो. तिच्या कवितेचे स्वरूप आद्यंती एका परमोच्च अशा ज्ञानानुभवाचे स्थिर दर्शन घडवते. सगुण भक्तीपेक्षा निर्गुणाच्या प्रतीतीला तिच्या कवितेत विशेष स्थान आहे. ती म्हणते –

सर्वरूपी निर्गुण संपले पैं सर्वदा । आकार संपदा नाही तया ।।
आकारिती भक्त मायामय काम । सर्वत्र नि:सीम अंतरी आहे ।।

मुक्ताईचे व्यक्तिमत्त्व केवळ कोणाच्या अनुकरणातून साकार झालेले नाही. ते पूर्णपणे स्वतंत्र आहे. मुक्ताबाई जणू स्वयंभू आहे. तिची ज्ञानावस्था इतक्या पराकोटीला गेलेली आहे, की त्या अवस्थेत ती आपले स्त्रीत्वही विसरलेली आहे. तिच्या अभंगांत कुठेही स्त्रीभावाला प्राधान्य नाही. तिच्या अभंगांतून व्यक्त होत राहतो तो केवळ ज्ञानानुभव आणि या तिच्या ज्ञानानुभवाच्या संदर्भात तिची खरी योग्यता कळते, ती चांगदेवाशी झालेल्या संवादातून. सत्याचे निखळ स्वरूपातले ज्ञान त्या संवादातून प्रकट होत जाते. ती म्हणते –

स्वप्नींचा आत्मा केउता आहे । मागुता ये हें नवल काई ।।
चांगा म्हणें बाई सांग मुक्ताबाई । लटिके साच वर्तते देही ।।
मुक्ताई म्हणे चांगया भ्रमिस्त देहीं । निर्धारी राही स्वप्न कैचें ।।
बंधने नाही, बद्ध नाहीं । साच कीं लटिकें वर्तते तेहि नाहीं ।।
भेद नाहीं भेदसी काई । साच की लटिकें वर्तते देहीं ।।
नाहीं सुख दु:ख । पाप पुण्य नाहीं ।
नाही कर्म धर्म । कल्पना नाहीं ।
नाही मोक्ष । ना भावबंधन नाहीं ।
म्हणे वटेश्वरा ब्रह्म नाहीं । सहजसिद्ध बोले मुक्ताई ।।

मुक्ताबाईने चांगावटेश्वराला ज्ञानोपदेश केला, ही तिच्या चरित्रातली महत्त्वाची घटना. मुक्ताबाईची गुरुपरंपरा आदिनाथ-मत्स्येंद्रनाथ–गोरक्षनाथ– गहिनीनाथ – निवृत्तिनाथ – मुक्ताबाई अशी आहे. पण मुक्ताबाईच्या परंपरेत जे अनेक मराठी ग्रंथकार होऊन गेले, त्या सर्वांनी एकमुखाने मुक्ताबाईला गोरक्षनाथाची शिष्या मानले आहे. पण ज्ञानदेवाचाही गुरू झालेला निवृत्ती हा तिचा साक्षात वडील बंधू असता, त्याला डावलून मुक्ताबाईने गोरक्षनाथाचे शिष्यत्व स्वीकारले असेल, हे खरे कसे वाटावे ? शिवाय तिच्या काळी गोरक्षनाथ विद्यमान असणे शक्य नाही. मग प्रत्यक्षातील अधिकारी व्यक्ती टाळून तिने गोरक्षनाथाचा अप्रत्यक्ष उपदेश घेतला, असे तरी कसे म्हणावे? शिवाय मुक्ताबाई नि:संदिग्ध शब्दात सांगते, की आपले गुरू निवृत्तिनाथ आहेत.

इथेच, गोरक्षनाथाची शिष्या असलेली मुक्ताबाई पूर्वी होऊन गेलेली अन्य व्यक्ती तर नसेल ना, अशी शंका निर्माण झाली. श्री. रा. चिं. ढेरे यांनी या शंकांचे उत्तर शोधण्याचा कसून प्रयत्न केला आणि त्यांना महानुभाव वाङ्मय आणि तत्त्वसारासारख्या ग्रंथांच्या परिशीलनातून गोरक्षनाथाची शिष्या असलेल्या पूर्वीच्या मुक्ताबाईचा शोध लागला.

ही मुक्ताबाई विदर्भातील अचलपूरच्या राजाची कन्या व उज्जयिनीच्या विक्रमादित्य राजाची पत्नी होती. तिचे नाव सत्यवंती असे होते. तिने आपला योगी बनलेला दीर भर्तृहरी याच्यापासून परमार्थप्रेरणा मिळवली होती. भर्तृहरीला भोजन दिल्याखेरीज स्वत: अन्नग्रहण करायचे नाही, असा तिचा नेम होता. तो तिने बराच काल चालवला. एके दिवशी तिला अभ्यंगस्नान करायचे होते. त्या दिवशी बराच वेळ वाट पाहूनही भर्तृहरी आला नाही. म्हणून तिने ताट वाढून ठेवले आणि स्नाना-साठी वस्त्रे उतरली. एवढ्यात भर्तृहरी आला. परंतु राणी स्नान करीत आहे, असे समताच तो माघारी वळला. अन्न न घेता त्याने परत जाणे यात तिचा व्रतभंग होता. म्हणून भान न राहून ती तशाच विवस्त्र अवस्थेत बाहेर येऊन ताट हाती घेऊन त्याच्या मागे धावत सुटली आणि त्याच्या मागोमाग नगराच्या सीमेपर्यंत गेली. इतक्यात तिथे गोरक्षनाथ प्रकटला. त्याने भर्तृहरीला छेडले. पण तो म्हणाला. 'माता नग्न असता मी तिच्या हातचे अन्न कसे घ्यावे ?' त्यावर गोरक्षनाथ म्हणाला. 'तू अजून अज्ञान आहेस.' सत्यवंतीची ती उन्मनी अवस्था पाहून गोरक्षनाथ तिच्यावर प्रसन्न झाला आणि त्याने मस्तकी हस्त ठेवून तिला कृतार्थ केले.

थोड्या वेळाने सत्यवंती भानावर आली. मग गोरक्षनाथ तिला म्हणाला. 'तू आता आपल्या घरी जा.' त्यावर ती म्हणाली. 'ते आता शक्य नाही. स्मशानात आणलेले प्रेत परत घरी जात नसते.' हे ऐकून गोरक्षनाथ समजला, की ही स्त्री मुक्त आहे. म्हणून त्याने तिचे नाव मुक्ताई असे ठेवले. गोरक्षनाथा-कडून गुरुबोध मिळाल्यावर ती तप:साधना करण्यासाठी श्रीशैल पर्वतावर गेली आणि तिथे योगिनी म्हणून प्रसिद्धी पावली

तप पुरे झाल्यानंतर ती श्रीशैलाहून महाराष्ट्रात आली. पुढे विदर्भात तिला चांगा वटेश्वर भेटला. त्याला तिने ज्ञानबोध देऊन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कृतार्थ केले. पुढे अल्प काळातच तिने समाधी घेतली असावी.

चांगावटेश्वराला अल्प काळातच गुरुविरह झाला. ज्ञानेश्वरांच्या भेटीला आलेल्या चांगावटेश्वराला ही धाकटी मुक्ताबाई भेटली. परमार्थातला तिचा अधिकारही कळून आला. तशा काही खुणाही तिने त्याला दाखवल्या. चांगावटेश्वराला वाटले, की आपली गुरू मुक्ताई योगिनीच पुनश्च या मुक्ताबाईच्या स्वरूपात जन्माला आली आहे. नावही तेच; योगाधिकारही तोच. म्हणून त्याने कसलाही संकोच न धरता या बालयोगिनीचा गुरू म्हणून स्वीकार केला.

ज्ञानेश्वर-सोपानांच्या निर्याणानंतर मुक्ताबाईला जग उदास झाले. तिला वाटले आता आपणही देह ठेवून परब्रह्मात विलीन व्हावे. मुक्ताबाई आळंदीहून निघून फिरत फिरत तापीतीरावर सोमेश्वरनगरी येथे आली. तो दिवस वैशाख वद्य द्वादशीचा होता. त्या दिवशी मध्यान्ही एकाएकी वीज कडाडली आणि त्या झगमगाटात मुक्ताबाई एकाएकी अदृश्य झाली. चित्कला विश्वचैतन्यात विलीन झाली. जळगाव जिल्ह्यात भुसावळपासून २१ मैलांवर कथोळी या गावी तिची समाधी आहे. तिथे दरवर्षी मोठी यात्रा भरते.

आद्य मुक्ताबाईच्या समाधीविषयी रा. चिं. ढेरे यांनी जी माहिती दिली आहे, ती अशी –

विदर्भात अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यात मोर्शीपासून पाच मैलांवर असलेल्या सालवर्डीच्या डोंगरावर मुक्ताबाईचे समाधिमंदिर आहे. त्या डोंगराला कुंजरगिरी असे नाव आहे. हा डोंगर माडू नदीच्या काठी आहे. या भागात गोंड-कोरकूंची वस्ती आहे. अगस्त्य–वाल्मीकींच्या आणि राम-सीतेच्या पारंपरिक स्मृतिकथा उरी जतन करणाऱ्या नि गेली कित्येक शतके शैव क्षेत्र म्हणून गाजणाऱ्या या कुंजरगिरीवर बौद्ध विहार आहेत आणि यादवकालीन हेमाडपंती वास्तूंचे अवशेष आहेत. या अवशेषांत 'तातोबाची मठी' या नावाने ओळखले जाणारे एक भग्न भव्य हेमाडपंती मंदिर लक्ष वेधून घेते. या मंदिराच्या उंच पायऱ्या चढून आत गेल्यावर शिल्पसुंदर स्तंभांच्या रांगांपलिकडे योगिनी मुक्ताबाईची समाधी आहे. समाधीच्या पलिकडील गर्भगृहात एक शिवलिंग आहे. हे सारे वातावरण त्या शैव योगिनींच्या महासमाधीला पोषक असेच आहे. [म. सा.; प्रा. म वा इ.; म. सं. क.; फ. फे. म.; श्री. रा. चिं. ढेरे – महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै – सप्टेंबर १९७०]

मुक्तांबिका द. भारतातील एक देवता. हिचे स्थान तमिळनाडू प्रदेशातील विलीविक्कम (चिंगलपेट) या गावी आहे. या देवतेचा इतिहास पुढीलप्रमाणे आहे– इ. स. च्या नवव्या शतकात कुमारस्वामी मुदलियार नावाचा या देवीचा ए[क] भक्त होऊन गेला. एकदा तो हिची पूजा करीत असता त्याच्[या] हातून देवीचा एक हात मोडला. भंगलेल्या मूर्तीची पूजा कर[णे] हे अशास्त्रीय आहे, असे जाणून त्याने एक नवी मूर्ती केली आणि तिच्या प्राणप्रतिष्ठेचा दिवस निश्चित केला. त्याच दिवशी शिवाने त्याला स्वप्नात येऊन विचारले, की 'तुझ्या पत्नीचा एक हा[त] मोडला तर तू दुसरी पत्नी करणार काय?' कुमारस्वामी[ला] त्या स्वप्नाचा अर्थ उमगला. मग त्याने नव्या मूर्तीची स्थापना रहित करून पहिल्या मूर्तीचाच हात सोन्याच्या तारेने बांध[ला] व तिची पूजा केली. या गावी एक शिवमंदिर असून, त्याला कीर्तिमाजरिश्वर असे म्हणतात. [देवीकोश ३]

मुक्ताभरणव्रत एक तिथिव्रत. भाद्रपद शुद्ध सप्तमीला [हे] व्रत करतात. शिव व उमा या प्रस्तु[त] व्रताच्या देवता होत. व्रतविधी असा– व्रतसंकल्प करून शिवापु[ढे] सात गाठींचा दोरक ठेवावा. नंतर शिवाची पूजा करावी. देवाचे आसन जरीचे, मोती व रत्ने लावलेले असावे. पूजेनंतर तो सा[त] गाठींचा दोरा आपल्या मनगटात बांधावा. उद्यापनाच्या वेळी ११०० मांडे व जिलब्या यांचे वाण द्यावे. फल– दीर्घायुषी व निरोगी पुत्रांची प्राप्ती. [हि. ध.]

मुक्तावलीव्रत एक जैन व्रत. याचे लघू, मध्यम व बृहत असे तीन प्रकार आहेत. लघुव्रत नऊ वर्षांत पूर्ण होते. यात प्रत्येक वर्षात ९ याप्रमाणे ८१ उपवास करायचे अस[]तात. मध्यमव्रत ६२ दिवसांत पूर्ण करायचे असून, यात ४[९] उपवास आणि १३ पारणा असतात. बृहद्व्रताचा कालावधी ३[४] दिवसांचा असतो. यात २५ उपवास आणि ९ पारणा असतात. फल– मोक्षप्राप्ती. [जै. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.]

मुक्तिद्वारसप्तमी एक काम्य व्रत. ज्या सप्तमीला हस्त कि[ंवा] पुष्य नक्षत्र असेल, त्या दिवशी या व्रता[चा] प्रारंभ करतात. व्रतविधी असा– प्रथम रुईच्या काडीने दा[त] घासून सूर्याला नमस्कार करावा. मग स्नान करून होम करा[वा.] नंतर अंगण झाडून ते गायीच्या शेणाने सारवावे. मग त्या[वर] रक्तचंदनाने सोळा पाकळ्यांचे कमळ काढावे. त्यात पूर्वेक[डून] प्रारंभ करून प्रत्येक पाकळीवर एकेका देवतेचे आवाहन करा[वे.] नंतर त्याची पूजा करावी व उपवास करावा. कडू, गोड, खा[रट,] आंबट इ. सहा रसांपैकी एकेक रस दोन दोन महिने सेवन कर[त] एक वर्षभर राहावे. मग तेराव्या महिन्यात उद्यापन कर[ावे.] कपिला गाय दान द्यावी. फल – मोक्षप्राप्ती. [हि. ध.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुक्तिनाथ एक प्रसिद्ध पुण्यक्षेत्र. हे स्थान नेपाळमध्ये गंडकी नदीच्या उगमाजवळ आहे. याला शालग्रामक्षेत्र असेही म्हणतात. महाभारतात (वन. ८४), तसेच विष्णू (२.१.२४), मत्स्य (१३.१३), वराह (१४४), इ. पुराणांतून या स्थानाचे उल्लेख आढळतात. इथे विष्णू पर्वतरूपात आणि शिव लिंगरूपात आहे,' अशी लोकांची श्रद्धा आहे. इथल्या लहान लहान शिलांनाही विष्णुस्वरूपच मानतात.

पुलह आणि पुलस्त्य ऋषींचे आश्रम इथे होते. रावणद्वारा प्रकट झालेला बाणगंगेचा प्रवाह इथूनच वाहतो. त्याव्यतिरिक्त देविका, गंडकी आणि चक्रा या नद्यांचा त्रिवेणीसंगमही इथेच झालेला आहे. या संगमात जो स्नान करतो आणि देवपितरांचे तर्पण करून शिवपूजा करतो, त्याला पुनर्जन्म घ्यावा लागत नाही, असे वराह पुराणात म्हटले आहे.

राजर्षी भरताची ही तपोभूमी होय. दुसऱ्या जन्मात जेव्हा भरत हरणाच्या रूपात जन्मला, तेव्हाही तो तपस्येसाठी इथेच आला होता. वराह पुराणानुसार गजेंद्रमोक्षाचा प्रसंग इथेच घडला. याव्यातिरिक्त हरिहरप्रभ, हंसतीर्थ, यक्षतीर्थ, इ. अनेक तीर्थे इथे आहेत. [हि. घ.; कल्याण-तीर्थांक; ने. क.]

मुक्ती मोक्षाचा पर्यायशब्द. मुक्तीची व्याख्या अशी – 'निखिलबन्धराहित्येन स्थितिः' = सर्व प्रकारचे बंध गळून गेल्यावर मुमुक्षूला प्राप्त होणारी अवस्था म्हणजे मुक्ती होय. पाहा – मोक्ष. [लक्षणसंग्रहः]

मुक्तेश्वर (१) (इ. स. चे १६ वे व १७ वे शतक) एक महाकवी. हा एकनाथमहाराजांच्या मुलीचा मुलगा होता. याच्या वडिलांचे नाव चिंतामणी व गोत्र अत्री होते. आईचे माहेरचे नाव गोदावरी असून, सासरचे नाव गंगाबाई होते. मुक्तेश्वराचा कुळदेव सोनारीचा भैरव असून, कुलस्वामिनी कोल्हापूरची महालक्ष्मी होती. मुक्तेश्वराच्या चरित्रात लीला-विश्वंभर ही आणखी दोन नावे येतात. कित्येकांच्या मते मुक्तेश्वराच्या आईचे लाडके नाव लीला असून, तिच्या नवऱ्याचे टोपण नाव विश्वंभर होते. मुक्तेश्वराच्या सभापर्वात,

'तो मुद्गल चिंतामणिसुत । लीला-विश्वंभर जगविख्यात'

असा वरील दोन नावांचा निर्देश आहे. यावरून लीला-विश्वंभर हे मुक्तेश्वराचे आईबाप, असा समज निर्माण झाला. पण श्री. अ. का. प्रियोळकर यांना प्रस्तुत ओवीचा लीला-विश्वंभरानुगृहीत असा वेगळा पाठ आढळला आणि त्यावरून त्यांनी असा निष्कर्ष काढला, की लीला-विश्वंभर हे मुक्तेश्वराच्या गुरूचे नाव असून, हा लीला-विश्वंभर म्हणजे साक्षात दत्तात्रेय होय. मुक्तेश्वराच्या कुळात दत्ताची उपासना होती. मुक्तेश्वराचे आजोबा एकनाथमहाराज यांचे गुरू जनार्दन स्वामी दत्तोपासक होते. तिथून ही उपासना मुक्तेश्वरापर्यंत आली होती. म्हणून त्याने आपल्या ग्रंथात अनेक ठिकाणी लीला-विश्वंभर या नावाने त्यांना नमन केले आहे. लीला-विश्वंभर म्हणजे श्री दत्तात्रेय, असे त्याने एका ठिकाणी म्हटले आहे–

ॐ नमोजी विश्वंभरू । तो देव दत्तात्रेय जगद्गुरू ।।

दत्तगुरूला लीला-विश्वंभर हे नाव विख्यात दत्तोपासक दासोपंत यानेही दिले आहे. त्याच्या एका पदाचे ध्रुव पद असे आहे–

पुराण पुरुषेश्वरा गुरुमूर्ती दातारा । लीलाविश्वंभरा दत्तात्रेया ।।

असे अनेक प्रकारचे आधार देऊन लीला-विश्वंभर म्हणजे दत्तात्रेय असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न श्री. प्रियोळकर यांनी केला आहे.

पण संतचरित्रकार श्री. आजगावकर यांना हे मत मान्य नाही. त्यांच्या मते लीला-विश्वंभर नावाचा एक सत्पुरुष मुक्तेश्वरकाली महाराष्ट्रात होऊन गेला. या गोष्टीला त्यांनी दोन पुरावे दिले आहेत, ते असे – (१) बहुतेक जुन्या संतमालिकांत लीला-विश्वंभराचा उल्लेख सापडतो व (२) लीला-विश्वंभराच्या नावावर काही कविताही उपलब्ध आहे.

लीला-विश्वंभर हे तत्कालीन सत्पुरुष मुक्तेश्वराचे गुरू होते, असे श्री. कानोले यांनीही म्हटले आहे.

मुक्तेश्वराचे घराणे मूळचे कर्नाटकातले होते. तिथून ते कुरुंदवाडजवळील तेरवाड या ठिकाणी आले. या घराण्याला मुक्तेश्वरापासून चौथ्या पिढीत तेरवाड हे गाव कोल्हापूरच्या छत्रपतींकडून इनाम मिळाले होते.

मुक्तेश्वर हे त्याचे मूळ नाव नसून ते मुद्गल असे होते, असाही शोध आहे. ' मुद्गल चिंतामणीसुत ' असे मुक्तेश्वरानेही स्वतःबद्दल म्हटले आहे. या मुद्गलाचे आराध्य दैवत मुक्तेश्वर नामक होते. त्याच्याकडूनच त्याला ग्रंथकर्तृत्वाबद्दल प्रेरणा झाली व त्याने मुक्तेश्वर ही नाममुद्रा धारण करून आपली समग्र कविता रचली. तो याविषयी आदिपर्वाच्या आरंभी स्पष्ट लिहितो––

मुक्तेश्वर जो मी अवधूत । माझी मी नामे मुद्रांकित ।
कथा विस्तारी भारत । महाराष्ट्रपदबंधी ।।

हा मुक्तेश्वर कोणत्या ठिकाणचा देव होता, याविषयीही शोध घ्यायचा प्रयत्न झालेला आहे. मुक्तेश्वराची मंदिरे दक्षिणेत, उत्तरेत व पूर्वेलाही आढळतात. शिवकांचीत मुक्तेश्वराचे देवालय असून, तिथे रामदासस्वामींचा मठ होता, असे स. खं. आळतेकर लिहितात. तेव्हा कांचीच्या मुक्तेश्वराच्या आसपास जर या कुटुंबाचे किंवा स्वतः कवीचे वास्तव्य झाले असेल, तर या देवतेची भक्ती जडून त्याचा तो उपासक होणे संभवनीय

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे, असे श्री. प्रियोळकरांनी म्हटले आहे. मूळ महाभारतात नसलेले द्रविड देशासंबंधीचे काही उल्लेख त्याच्या वाङमयात आढळतात. त्यांवरूनही कवीच्या तिकडील वास्तव्याला पुष्टी मिळू शकते. डॉ. पंडित आवळीकर यांनी मुक्तेश्वर देव हा कवीचा आराध्य देव असल्याची प्रियोळकरांची कल्पना मान्य केली आहे; पण हा मुक्तेश्वर धारवाड जिल्हयातील चौडदानपूर या गावचा मुक्तेश्वर असावा, अशी वेगळी पुस्ती जोडली आहे. आवळीकरांच्या मतं कर्नाटकातले डंबळ हे मुक्तेश्वराच्या घराण्याचे वास्तव्यस्थान होते. ते म्हणतात--

'डंबळ येथून मुक्तेश्वर तेरवाडास आला, याचे एक कारण असे की, कर्नाटकावर त्या वेळी विजापूरचा अंमल होता. मराठी राज्याची पहाट दिसू लागल्यावर मराठीचा हा महाकवी स्वातंत्र्य-सूर्याला अर्घ्य द्यावयास तिकडे गेला नसता तरच नवल.'

मुक्तेश्वर अभिजात रसिक होता. त्याला उत्तम शिक्षणाचाही संस्कार झाला होता. त्याने संस्कृत काव्यनाटके अभ्यासली होती व षट्शास्त्रांचेही अध्ययन केले होते. ज्ञानेश्वर, एकनाथ इत्यादी संतांच्या ग्रंथांचा तर त्याने चांगलाच अभ्यास केला होता. शिवाय महाभारताच्या काही प्राकृत टीकाही त्याने पाहिल्या असाव्या, असे वाटते. श्री. वि. का. राजवाडे म्हणतात--

"मुक्तेश्वराने सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला होता, सुप्रसिद्ध पुरुषांच्या भेटी घेतल्या होत्या व निरनिराळ्या प्रकारचे लोक व त्यांच्या चालीरीती यांची माहिती करून घेतली होती. त्याच्या ग्रंथांत इंग्रज, पोर्तुगीज, बर्बर वगैरे परदेशस्थ लोकांचे जे वर्णन आले आहे हे त्याच्या वरील प्रवासाचेच फळ होय."

ग्रंथकर्तृत्व – महाभारताची आदी, सभा, वन, विराट आणि सौप्तिक ही ५ पर्वे; रामायण, गरुडगर्वपरिहार, हरिश्चंद्राख्यान, भगवद्‌गीता, मूर्खलक्षणे, गजेंद्रमोक्ष, शतमुखरावणवधाख्यान, शुक-रंभासंवाद, विश्वामित्रभोजन, दुर्योधनशल्यपरिस्फोट, अर्जुनकामपूर्ती, एकनाथचरित्र; तसेच काही पदे, आरत्या, भूपाळ्या एवढी मुक्तेश्वराची कविता उपलब्ध आहे. त्याची एकूण कविता १७,१५० इतकी भरते. हरिवंशासहित संपूर्ण महाभारत रचण्याचा त्याचा उद्देश होता व हे सर्व कार्य त्याने पार पाडले होते, असे श्री. आजगावकर म्हणतात. पण त्याची फक्त पाचच पर्वे उपलब्ध असल्याने, तेवढीच त्याची महाभारतरचना मानली पाहिजे, असे काहींचे मत आहे.

मुक्तेश्वराचे रामायण हे नाटकरामायण किंवा संक्षेपरामायण किंवा कौतूहलरामायण या नावाने प्रसिद्ध असून, त्याचे ६३१ श्लोक आहेत हे काव्य मालिनी, भुजंगप्रयात व अनुष्टुभ या छंदांत आहे. हरिश्चंद्राख्यान हे जुन्या मराठी काव्यांतले एक उत्कृष्ट काव्य मानावे लागेल. मुक्तेश्वरी शैलीचे सर्व गुणविशेष या काव्यात प्रतीतीला येतात. अलिकडेच त्याच्या एका, आजवर अज्ञात असलेल्या ग्रंथाचा शोध लागला असून, उत्तरकांड रामायण हे त्याचे नाव आहे. मराठवाड्यातील संशोधक श्री. वि. बं. कानोले यांना या ग्रंथाची हस्तलिखित प्रत मिळाली आहे.

महाभारत हा मुक्तेश्वराच्या परिणत प्रज्ञेचा विलास होय. त्याविषयी प्रा. द. सी. पंगू म्हणतात --

"या ग्रंथात मुक्तेश्वराच्या अंगच्या रसिकतेस व स्वतंत्र प्रतिभेस विहार करण्यास पूर्ण मुभा मिळाली असून, त्याची वाणीही प्रसन्न, सहज व ओघवती बनली आहे. मूळ महाभारतातील व्यक्तिवर्णनांना आपल्या कल्पनेचा नवीन उजाळा देऊन व त्यातील निरनिराळे प्रसंग नवरसरंजित करून मुक्तेश्वराने ते आपल्या श्रोत्यांपुढे अशा तऱ्हेने मांडले आहेत, की आज उपलब्ध असलेल्या आदी, सभा वन, विराट व सौप्तिक या त्याच्या महाभारताच्या पर्वांनी महाराष्ट्रकविमालिकेत त्याचे नाव अजरामर होऊन, इतर पर्वांबद्दल रसिकांना चुटपुट लागावी."

सर्वच रस तो सिद्धहस्ताने खेळवतो. पण त्यांतल्या त्यात रसराज शृंगार हा त्याला सर्वांत प्रिय आहे. आदिपर्वातील दुष्यंत-शकुंतला व ययाती या आख्यानांत त्याने शृंगाररसाचे पाट वाहवले आहेत. आपल्या रसिक वृत्तीमुळे आणि विलक्षण कल्पनाशक्तीमुळे महाभारताचा अनुवाद करताना अनेक ठिकाणी त्याने व्यासांची संगती सोडली आहे. क्वचित त्याची शृंगारवृत्ती उच्छृंखल बनून अश्लील अशा पंक्तीही प्रसवली आहे. ययाती शर्मिष्ठेच्या महालात आला असता शर्मिष्ठेने त्याचे जे स्वागत केले त्या प्रसंगाच्या वर्णनात त्याने जो शृंगाररस आळवला आहे, त्यांतल्या काही ओव्या अशा--

वाजी वारण पदाती रथ । ठायी ठायी उतरले वनात ।
ययाति पातला त्वरित । शर्मिष्ठेच्या मंदिरा ॥
तीते जाहला बहु आनंद । नमिले नृपतीचे पादारविंद ।
सहस्र दासींचे वृंद । नमस्कारी नृपातें ॥
उदक ठेविलें दासीजनीं । शर्मिष्ठेने स्वहस्तें करोनि ।
नृपतीस अभ्यंग घालोनी । क्षीरोदक नेसविला ॥
षड्रस अन्ने निपजवून । दिधले रायासी भोजन ।
दिव्य मंचकी आरक्त सुमन । वरी निजवी नरेंद्रा ॥
वेळा कपूर सुगंधयुक्ता । तांबुल अर्पी धरित्रीनाथा ।
मग संतोषोनी अवलोकिता । राजा वदन तियेचे ॥
जैसी सुवर्णचंपककळी । की ओतली मन्मथपुतळी ।
अत्यंत तारुण्यभरे लवली । परी विनत सुकुमार ॥
विराजे राजवदन चंद्रिका । भाळी रेखिला कस्तूरी टिळा ।
आकर्णपर्यंत कज्जलरेखा । नयन तेणे शोभती ॥
दृढ बिल्व पीनस्तन । वरी मुक्तजाळी विराजमान ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हृदयी पदक देदीप्यमान । तेज फांके हृदयाब्जी ।।
करिशावकशुंडादंड । तैसे सरळ भुजदंड ।
कंकणे रुणझुणती प्रचंड । मदनाते चेतवावया ।।
हरिकटीवरी शोभे घटी । उभी राहे सन्मुख गोरटी ।
नृपासी व्यंकट दृष्टी । लक्षीतसे वेल्हाळी ।।

शकुंतला आपला मुलगा भरत याच्यासह हस्तिनापुरात गेली असता, दुष्यंताने तिचा अव्हेर केला. त्या प्रसंगी या मानिनीला जो क्रोध आला, तो त्याने पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे—

ऐसें बोलता मेदिनीपाळा । क्रोधें संतप्त शकुंतला ।
जेवीं प्रळयाग्नीच्या ज्वाळा । स्पर्शो धावती गगनातें ।।
आरक्तता लेवुनि नयनें । अंजन क्षाळिले अश्रुजीवने ।
अधर स्फुरति जेवि पवनें । पद्मपत्रें थरकती ।।
म्हणे धन्य गा पुरुषोत्तमा ! । उत्तम ऐसेंचि रक्षिती नेमा ।
कर्मसाक्षी अंतरात्मा । तृप्त जाला या वचनीं ! ! ।
ईश्वर आणि जोडिले पुण्य । स्मरोनि— बोले यथार्थ वचन ।
माझी साक्षी तुझेंचि मन । तुझे अंतरी वेताहे ! ।
सर्षपप्राय पराचे दोष । पर्वतप्राय करी अधम पुरुष ।
आपुली दुष्कर्मे अशेष । मेरुतुल्य गणीना ।।
नरसिंहा ! सोडोनि कपट । मांडिये बैसवीं कुमारश्रेष्ठ ।
सत्य स्वधर्म करी प्रगट । वडिलवृद्धां देखतां ।।
सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंचि परब्रह्म ।
सत्यापाशी पुरुषोत्तम । सर्व काळ तिष्ठत ।।
असत्य तेंचि पैं पातक । असत्य तोचि महानरक ।
असत्याचेनी संगे दुःख । अनंत जन्मी भोगती ।।

वीर रसाच्या वर्णनातही मुक्तेश्वराची प्रतिभा कमी पडत नाही. भीम आणि जरासंध यांचे जे घनघोर द्वंद्वयुद्ध झाले, त्याचे परिणामकारक वर्णन मुक्तेश्वराने पुढीलप्रमाणे केले आहे—

दोघे पिटिती पाणितळें । जानुमुळें बाहुमुळें ।
मही तारितां पावतळें । शलमौळे थरकती ।।
किरीट काढोनि हस्तकीं । केश आवळिले मस्तकीं ।
चंड गर्जना करिती मुखीं । काळ कापे चळचळां ।।
धांवोनि भीमाची वीरगुंठी । मागधे कवळोनियां मुष्टी ।
दक्षिणहस्त सूदला कंठी । काळपाशासारिखा ।।
भीमें मेखाकार दृष्टी । हृदयीं वोपिली वज्रमुष्टी ।
सोडवूनि मगरमिठी । झिम्झाडोनि लोटिला ।।
तेणें कोपर वोनी मुष्टी । चारी आघात वोपिले पृष्टीं ।
मागध शोभोनि उफराटी । हुमणी (बुकी) हाणी मस्तकीं ।
करप्रहार लत्ताप्रहार । मुष्टिप्रहार मस्तकप्रहार ।
मोजोनि मारिती शतसहस्र । 'उसणें घे घे' म्हणोनी ।।
मस्तकीं वाहती करुनी मोट । भूमी टाकिती जैसा घट ।
तळीं पाषाण होतो पिष्ट । आंगलोटें दोघांच्या ।।
बाहु गदा बाहु मुसळें । बाहु मुद्गल कर त्रिशूळें ।
एकमेकांचो मर्मस्थळें । पाहोनियां मारिती ।।
सर्पाऐसे फुत्कारिती । सिंह ऐसे हुंगारती ।
वृषभाऐसे फुंफाटती । उफाळती इसाळें ।।
मुष्टि घातांचिया ध्वनी । थरथराटे थरके धरणी ।
वोयरोनि पाताळफणी । मार्ग पाहे पळावया ।।

मानवी जीवनात दैवाला प्राधान्य द्यावे, का उद्योगाला म्हणजेच पुरुषप्रयत्नाला द्यावे, या विकल्पात मुक्तेश्वर हा पुरुषप्रयत्नाला श्रेष्ठत्व देतो. याविषयी त्याच्या काही ओव्या अशा—

ईश्वर निष्ठुर कीं कृपाळू । काय करील केव्हां काळू ।
याचा निश्चय विवेककुशळू । करूं नेणे सर्वथा ।।
न कळे विष्णुमायेचा महिमा । जे विचार हिरोनी पाडी भ्रमा ।
म्हणोनि नळा आणि रामा । अपाय घडला जाणतां ।।
पुण्यमार्गी खेळतां निखिल । दुःखें प्राप्त होती प्रबळ ।
पाप करितां क्षेमकुशल । दिसे ये काळी वाटतें ।।
पाप करितां पाविजे दुःख । सुकृते भोगिजे अक्षयी सुख ।
ऐसें बोलती मन्वादिक । वेदवाक्य प्रमाण ।।
न कळें पापपुण्याचें रूप । पापी पुनः पुनः करी पाप ।
पाप करितांहि अमूप । पुण्यफळे भोगितीं ।।
अधर्मेचि धर्म एकातें । विहित ते अविहित सर्वातें ।
दिसे सर्वत्र बहुतांते । समाधान सारिखें ।।
या कामीं कांहीं नेणवें मनें । ईश्वराचे ईश्वर जाणें ।
ऐशा वेदवाक्या प्रमाणें । पुरुष जाणते वर्तती ।।
विचारें पाहतां न मिळे साक्षी । म्हणोनि मिळिजे प्रारब्धपक्षी ।
जैसा समुद्रीं भ्रमोनी पक्षी । नौकास्तंभी आरुढे ।।
विवेकबुद्धीने जितुके टळे । तितुकें टाळिजे विवेककुशलें ।
यालागी माझीं हीं प्रांजळें । वचनें हृदयी धरावीं ।।
पुढे वोढवूनि प्रारब्धा । जो टाकी प्रयत्न धंदा ।
तो पुरुष बुद्धिमंदा— । माजी गणिती जाणते ।।

मुक्तेश्वराचे भाषासौंदर्य व वर्णनशैली इतकी मनोहर आहे, की जगातील महाकवींत त्याची गणना करावी. महाराष्ट्रकविमंडळात मुक्तेश्वर हा प्रतिकालिदास आहे. प्रसाद व प्रतिभा हे दोन्ही श्रेष्ठ गुण त्याच्या ठिकाणी आहेत. त्याच्या कवितेत रूपकांची गर्दी असते व त्याची रूपकेही सर्वांगपरिपूर्ण असतात. त्याची भाषा विलक्षण अर्थवाहक आहे. मराठीचा अस्सलपणा त्याच्या लेखनशैलीत आढळतो. त्याची सृष्टिवर्णनेही बहारदार असतात. श्री. पांगारकर म्हणतात—त्याचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्याची एकराष्ट्रीय भावना. महाराष्ट्र देश, मराठी भाषा व मराठी बाणा याविषयी त्याच्या काव्यात गौरवोद्गार दिसून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

येतात. असा सर्वांगसुंदर कवीश्वर मराठी वाङ्मयात एक मुक्तेश्वरच आहे. [प्रा. म. सं. क. १; म. वा. इ. २; मुक्तेश्वरकृत महाभारत – श्री. अ. का. प्रियोळकर; मु. म. भा. विराटपर्व – द. सि. पंगु; प्रा. म. क. पं.]

(२) एक कवी. हा २०० वर्षांपूर्वी महाराष्ट्रात होऊन गेला. त्याचे समग्र नाव मुक्तेश्वर नागनाथ क्षीरसागर असे होते. याने बहुतेक देवतांच्या व सत्पुरुषांच्या आरत्या रचल्या आहेत.

मुख शरीराचा एक प्रमुख अवयव. धार्मिक दृष्टचाही मुखाला बरेच महत्त्व आहे. माणसे देवाची प्रार्थना किंवा स्तुती मुखानेच करतात. मुख हे कायेच्या नवद्वारांपैकी एक मानलेले आहे. विराट पुरुषाच्या मुखापासून ब्राह्मणाचा जन्म झाला, असे ऋग्वेदात सांगितले आहे.

कामशास्त्रात मुखचुंबनाला फार महत्त्व आहे.

मुखाचा आणि प्राणांचा घनिष्ठ संबंध आहे. मृत्यूच्या वेळी प्राण माणसाच्या मुखातूनच बाहेर पडतो, अशी अनेक लोकांची समजूत आहे. मनुष्य झोपेत असताना प्राण एखाद्या वेळी त्याच्या मुखातून बाहेर पडतो आणि त्याला जर परत यायला काही अडथळा निर्माण झाला, तर माणसाचा मृत्यू ओढवतो, असेही काही लोक मानतात. जांभई देताना काही लोक चुटकी वाजवतात. त्यामुळे तोंडात आलेला प्राण परत आत जातो, अशीही काही लोकांची कल्पना आहे. मनुष्य मरण पावला, की त्याचा आत्मा भूत होऊन मयताच्या शरीरात परत शिरू नये, म्हणून त्याचे तोंड व नाकपुडया बंद करण्याची चाल अनेक लोकांत आहे.

नाक, कान, डोळे भालप्रदेश, तोंड व हनुवटी या सर्वांना मिळून मुखमंडल म्हणतात. [एन्सा. रि. ए.]

मुखवटा मस्तकाच्या पुढील अर्ध्या भागाची म्हणजे कान, नाक, तोंड, डोळे, इ. अवयवांनी युक्त अशा दर्शनी भागाची प्रतिकृती म्हणजे मुखवटा होय. मुखवटा तयार करून तो स्वतःच्या चेहऱ्यावर बसवण्याची प्रथा जगातील सर्व देशांत व मानवी संस्कृतीच्या सर्व अवस्थांत आढळते. मुखवट्याचे अनेक प्रकार व उपयोग होते. केवळ गंमत म्हणून दुसऱ्या एखाद्या व्यक्तीचे रूप घेणे, स्वतःचे रूप लपवण्यासाठी दुसऱ्याचे रूप घेणे, आपत्तीपासून संरक्षण करण्यासाठी दुसऱ्याचे रूप घेणे, इ. अनेक हेतू मुखवटे वापरण्यामागे असतात. दुसऱ्या व्यक्तीचे रूप घेतात, तेव्हा ते खऱ्या, काल्पनिक किंवा दैवी व्यक्तीचे किंवा प्राण्याचे असते. धार्मिक विधीमधे बळी दिलेल्या प्राण्याचे मस्तकासह कातडे पांघरले, तर त्या प्राण्याची शक्ती किंवा त्याचे गुण प्राप्त होतात, अशी समजूत होती. त्यासाठीही मुखवटा धारण केला जाई. पण मुखवटा धारण करण्याचा हेतू



महाराष्ट्रातील व कर्नाटकातील पितळी मुखवटे

कोणताही असला, तरी मुळात त्याचा उगम नक्कल करण्याच्या छंदातून झाला असला पाहिजे, असे विद्वानांचे मत आहे.

देवदेवतांचेही मुखवटे असतात. ते कापडाचे, पितळेचे किंवा काही वेळा तांदुळाच्या पिठाच्या उकडीचेही असतात. खंडोबाचे मुखवटे कापडाचे असतात. भाद्रपदातील गौरीचे मुखवटे कधी पितळेचे असतात. आश्विन शुद्ध अष्टमीला महाराष्ट्रात जी महालक्ष्मी पूजतात, तिचा मुखवटा तांदुळाच्या पिठाची उकड करून बनविण्याची पद्धत आहे. दशावतारी खेळात व भारतातल्या अनेक आदिवासी लोकांत देवादिकांचे मुखवटे वापरण्याची प्राचीन प्रथा आहे. [एन्सा. रि. ए.]

मुखव्रत एक काम्य व्रत. व्रतावधी एक वर्ष. तांबूल भक्षण वर्ज्य करणे हा या व्रताचा प्रमुख विधी होय. वर्षाच्या अखेरीस उद्यापनाच्या वेळी एक गाय दान देतात. फल – यक्षाधिपत्याची प्राप्ती. [हि. ध.]

मुग एक आदिवासी जात. या लोकांची वस्ती आसामजवळील आराकान भागात आहे. मुग आणि कुकी हे एकाच वंशातील लोक असावे, असे वंशशास्त्रज्ञांचे मत आहे. मुग व कुकी यांच्या भाषेतही बरेच साम्य आहे. त्यावरूनही हे मत बरोबर वाटते. मुगांची उत्पत्तिकथा अशी –

एका मूळ कुकी पुरुषाला दोन बायका होत्या. या दोन बायकांपासून त्याला दोन मुले झाली. त्यांतील ज्येष्ठ स्त्रीच्या मुलापासून मुगांचा वंश सुरू झाला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांच्यांत झुमेया आणि झुमेया मुग या नावाच्या दोन प्रमुख टोळ्या आहेत. यांना झुमेया हे नाव मिळण्याचे कारण असे की त्यांच्या भाषेत झुम हा शब्द जाळणे या अर्थी आहे. हे लोक जंगले तोडून ती जाळतात आणि मग त्या जागेवर शेती करतात.

मुग लोक चिनी लोकांसारखे दिसतात. त्यांच्या गालाची हाडे वर आलेली, चेहरा रुंद, नाक बसके आणि डोळे तिरकस

मुग पुरुष

असतात. हे शरीराने बळकट पण बुटके असतात. त्यांचे केस काळे पण नकतकित असतात. स्त्रिया आणि पुरुषही केस राखतात. स्त्रिया केस मागे वळवून त्यांची गाठ मारतात आणि पुरुष त्यांवर मलमलीचा रुमाल बांधतात. मुग पुरुषांचे कान टोचलेले असून, त्यांतील एका छिद्रामध्ये ते ओढलेली विडी ठेवतात. हे कर्णभूषणेही घालतात.

स्त्रिया छातीभोवती एक घट्ट वस्त्र बांधून, ते गुडघ्यापर्यंत सोडतात. अविवाहित मुली जाकीट घालतात. जिच्या अंगात जाकीट आहे, ती स्त्री अविवाहित असे समजायचे. पुरुष कमरे-भोवती लुंगी गुंडाळतात आणि खांद्यावरून एक वस्त्र सोडतात.

मुगांची घरे जमिनीपासून वरीच वर असून ती बांबूची बनवलेली असतात. एखाद्याने घर बांधायला सुरवात केली, तर त्याला इतर लोक मदत करतात. घराच्या खालच्या बाजूला असलेल्या जागेत डुकरे व कोंबडी ठेवण्यात येतात.

भात व मासे हे यांचे प्रमुख अन्न असले, तरी हे बहुतेक सर्व प्राण्यांचे मांस खातात.

मुग पुरुष आणि स्त्री दोघेही धूम्रपान करतात आणि पान खातात. यांच्यांत घोटुलाची (सामायिक शयनगृह) पद्धत आहे. सर्व अविवाहित तरुण घोटुलात झोपतात. यांच्या प्रत्येक खेड्यात पांथस्थांसाठी एक स्वतंत्र निवासस्थान असते. तिथे त्यांची सर्व प्रकारची व्यवस्था केली जाते.

हे लोक स्वभावाने आळशी असले, तरी त्यांना शिकारीचा मोठा नाद आहे. हाच यांचा प्रमुख व्यायाम होय. किलोम हा त्यांचा आवडता खेळ आहे. यांच्यांत सुशिक्षितांचे प्रमाण खूप आहे. हे लोक बौद्धधर्मी आहेत. [इं. स्ट. पा. प्रे., एप्रिल १९६०]

मुग्गू आंध्र प्रदेशात रांगोळीला मुग्गू असे म्हणतात. मुग्गूचे अनेकवचन मुग्गुलू असे होते. त्यामुळे मुग्गुलू हा शब्दही अनेक ठिकाणी प्रचारात आहे. आपल्याकडच्याप्रमाणे रांगोळीच्या भुकटीने मुग्गू काढीत नाहीत, तर तांदुळाच्या पिठाच्या द्रवाने काढतात. त्यासाठी तांदूळ पाच-सहा तास भिजत घालतात. नंतर ते अगदी बारीक वाटून त्यात जरुरीनुसार पाणी घालून त्याचा द्रव तयार करतात. मग त्यात कापडाची एक चिंधी बुडवतात. ती मग पाच बोटांत धरून हलकेच दाबली की, त्यातून द्रवाचे थेंब खाली पडतात. अशा रीतीने प्रथम ठिपके काढून घेतात आणि त्या ठिपक्यांभोवती रेषा काढून मुग्गूच्या आकृत्या तयार करतात. काही वेळा स्त्रिया उजव्या हाताच्या तळव्यावर द्रव घेतात. चार बोटांच्या फटींतून हा द्रव गळू लागतो. त्याच वेळी स्त्रिया कुशलतेने झपाझप हात हालवीत पुढे जातात आणि त्यांतून सुंदर वेलबुट्ट्या तयार होतात.

मुग्गूच्या आकृत्यांत सरळ रेषा व टोके बहुधा नसतात. वक्र रेषा, तिच्या गाठी व रेषेतच केलेली कौशल्यपूर्ण गुंतवणूक, यांमुळे या आकृत्या नयनमनोहर होतात. मुग्गूच्या आकृतीत ठिपके असतात. पण आपल्याप्रमाणे त्या आकृत्या ठिपके जोडून तयार करीत नाहीत, तर ठिपक्यांभोवती रेषा फिरवून तयार करतात. या रेषांत स्थिरता नसून गतिमानता असते. म्हणून पाहाणाऱ्याची नजर त्यांवरून भिरीभिरी फिरत राहते. सफाई-दार आणि एकसारख्या व सुबक रेषा काढण्यासाठी चांगलेच कौशल्य लागते. काही आकृत्यांत एकाच रेषेची अनेक वेटोळी असतात; तर काहींत तीन-चार समांतर रेषांच्या आकर्षक वेल-बुट्टयाही असतात.

देवासमोर, दारात, भिंतीजवळ चारही कडांनी जमिनीवर व भिंतीवरही मुग्गू काढण्याची पद्धत आहे. काही वेळा काड्यांनी या आकृत्या काढतात आणि कधीकधी त्यासाठी चुन्याची व कावेची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूडही वापरतात. आंध्र प्रदेशात देवासमोर रोज शंख, चक्र व श्री हे अक्षर काढण्याची पद्धत आहे. याशिवाय, सात वारांच्या



मुग्गूच्या दोन आकृती

सात विशिष्ट आकृत्या ठरलेल्या आहेत. विशेष प्रसंग, सणवार, उत्सव या वेळी मुग्गू काढतात. पण दिवाळी व संक्रांत या सणांच्या दिवसांत मुग्गूलूची विशेष सजावट करतात. [श्री. अ. दि. कोकड – केसरी, ऑक्टोबर १९६३]

मुग्धा एक नायिकाभेद. 'अङ्कुरितयौवना मुग्धा'=जिच्या अंगी यौवनाचा उदय झाला आहे, अशी युवती म्हणजे मुग्धा होय, अशी भानुदत्ताने रतिमंजिरीत तिची व्याख्या दिली आहे. स्वीया आणि परकीया असे नायिकेचे दोन भेद आहेत. स्वीया नायिकेचेही पुन्हा मुग्धा, मध्या व प्रगल्भा असे तीन भेद होतात. मुग्धा ही ज्ञातयौवना व अज्ञानयौवना अशी द्विविध मानलेली आहे. लज्जाभयपराधीनरती म्हणजे लाज आणि भय यांमुळे रतिक्रीडेची इच्छा न करणारी नवोढा म्हणजे ज्ञातयौवना.

मुग्धा नायिकेचे अमरुशतकातील उदाहरण असे—

अलसवलितैः प्रेमार्द्रार्द्रैर्मुहुर्मुकुलीकृतैः
क्षणमभिमुखैर्लज्जालोलैर्निमेषपराङ्मुखैः ।
हृदयनिहितं भावाकूतं वमद्भिरिवेक्षणैः
कथय सुकृती कोऽयं मुग्धे त्वयाद्य विलोक्यते ।।

अर्थ – आळसाने मंदावलेल्या, प्रेमार्द्र, मुकुलित झालेल्या, क्षणभर समोर असणाऱ्या, लाजेने चंचल बनलेल्या, हृदयातील प्रेमभावनेला व्यक्त करणाऱ्या आणि अनिमेष अशा दृष्टीने, हे मुग्धे, तू आज कोण्या धन्य पुरुषाला पाहत आहेस, ते सांग बरे! [श. क.; हिं. सा. को.]

मुचकुंदतीर्थ उ. भारतातील एक तीर्थस्थान. हे ठिकाण राजस्थानात धौलपूरपासून तीन मैलांवर आहे. इथे एक पर्वत आहे, त्याला गंधमादन असे म्हणतात. या पर्वतामध्ये मुचकुंदगुंफा आहे. मुचकुंदाने देवांच्याकडून वर प्राप्त केल्यावर तो या गुहेमध्ये झोपी गेला होता. दरम्यानच्या काळात कालयवनाने मथुरेवर स्वारी केली असता, श्रीकृष्ण त्याच्यापुढून शस्त्रहीन अवस्थेत पळाला व या गुहेत आला. तिथे त्याने आपल्या अंगावरचा शेला निद्रिस्त मुचकुंदाच्या अंगावर घातला. कालयवनही त्याचा पाठलाग करीत गुहेत पोचला. त्याला वाटले की श्रीकृष्णच शेला पांघरून झोपला आहे. म्हणून त्याने त्याला लाथ मारून जागे केले. मुचकुंदाची दृष्टी कालयवनावर पडताच तो जळून गेला. नंतर श्रीकृष्णाने मुचकुंदाला दर्शन दिले. दर्शनानंतर तो बदरिकाश्रमी तपश्चर्येला निघून गेला. तिथे काही दिवस तप केल्यावर तो विष्णुपदाला गेला.

तपाला जाण्यापूर्वी मुचकुंदाने गुंफेच्या बाहेर यज्ञ केला होता, असे म्हणतात. इथले सरोवर या यज्ञस्थानीच निर्माण झाले आहे, अशी लोकांची श्रद्धा आहे. या सरोवरालाच मुचकुंदतीर्थ असे म्हणतात. याला पक्के घाट बांधलेले असून, त्याच्या तटावर अनेक मंदिरे आहेत. ऋषिपंचमी व देवषष्ठी या तिथींवर इथे मोठी यात्रा भरते. काही लोक इथे येऊन मुलांचे जावळ करतात. [कल्याण–तीर्थांक; प्रा. च. को.]

मुट्टयालम्म द. भारतातील एक ग्रामदेवता. ही सात बहिणींपैकी एक असल्याचे समजतात. या देवतेची ठाणी प्राधान्याने आंध्र प्रदेशात आढळतात. तिथे हिला मोत्यांची देवता असे मानतात. या देवतेची मूर्ती नसते. पण जेव्हा गावात रोगराई उद्भवते, तेव्हा हिची मातीची मूर्ती बनवून तिची पूजा करतात. पाऊस पडावा म्हणूनही हिची पूजा करतात. हिच्या बरोबर आणखी तीन देवता असतात. पण त्यांची नावे, स्वभाव व गुणदोष यांपैकी काहीही सांगता येत नाही. [व्हि. गॉ. सा. इं.]

मुडिया मध्य प्रदेशाच्या बस्तर जिल्ह्यातील एक आदिवासी जमात. मुर = मूळ या शब्दावरून इथल्या मूळच्या लोकांना हे नाव मिळाले असावे. मुडिया लोकांचे जगदलपूर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुडिया किंवा राज मुडिया आणि झोरिया मुडिया असे भेद आहेत. मुडिया लोक गोंडी भाषेची एक बोली बोलतात. बऱ्याच मुडियांना हळबी व मोडकीतोडकी हिंदी भाषा समजते.

वेषभूषा – मुडिया पुरुष कमरेभोवती एक अरुंद वस्त्र गुंडाळतात व डोक्याला पागोटे बांधतात. पागोटयावर ते कवडयांच्या माळा गुंडाळतात. तसेच काही वेळा ते पागोटयात फण्या, पानांच्या पिपाण्या व तंबाखूच्या लाकडी डब्या अडकवतात. विशेष प्रसंगी ते केसांत फुले, पिसे किंवा लाल लोकरीचे गोंडे खोचतात. ते हातांत व दंडांत कडी आणि गळयांत रंगीबेरंगी काचमण्यांच्या

मुडिया तरुण–तरुणी

अनेक माळा घालतात. बाहेर जाताना ते अंगात कुडते घालतात. त्यांच्या स्त्रिया साधारण गुडघ्यापर्यंत पोचणारे एक कटिवस्त्र नेसतात व त्याचा पदर खांद्यावर टाकतात. त्या अंगात चोळी किंवा पोलके घालीत नाहीत. त्यामुळे त्यांचे वक्षःस्थळ बहुधा उघडेच राहते. त्या मस्तकाभोवती ताडाच्या पानांच्या वेण्या किंवा मण्यांच्या माळा गुंडाळतात. केस विंचरून त्या अंबाडा घालतात व केसांत फुले, फण्या आणि नक्षीदार हेअरपिना अडकवतात. त्या कानांत कर्णफुले, गळयांत मण्यांच्या अनेक माळा व धातूच्या सऱ्या आणि हातांत पितळेच्या बांगडया व बोटांत अंगठया, इ. दागिने घालतात.

मुडिया लोकांत नाग, कच्छिम (कासव), बकरा, वाघ व मासा असे मुख्य वंश असून, त्यांत अनेक कुळयांचा समावेश होतो. एकाच वंशातील कुळयांत परस्पर लग्नसंबंध होत नाही. नाग वंशातील लोक नागांना, कच्छिम वंशातील लोक कासवांना, याप्रमाणेच इतर वंशांतील लोक आपल्या वंशाचे नाव असलेल्या प्राण्यांना मारीत नाहीत.

मुडियांचे गाव स्वच्छ असते, त्यांच्या झोपडया विखुरलेल्या असतात. गावाच्या एका बाजूला घोटुल असते. त्यांच्या घराभोवती थोडी बाग असते आणि तिच्या भोवती कुंपण असते. घरे लाकडाची किंवा बांबूची असून, त्यावर माती थापलेली असते. घराचे छप्पर कौलारू असते. घराला पुढे पडवी असते. आतल्या खोलीत पितरांसाठी एक मडके असते. घरात अनेक तऱ्हेच्या बांबूच्या टोपल्या, करंडया पत्रावळींचे गठ्ठे, भांडी, मासे पकडण्यासाठी लागणारे पिंजरे, ढोल, बासऱ्या, धनुष्यबाण, इ. सामान असते. घराजवळच गुरांसाठी गोठा, डुकरांसाठी आडोसा व कोंबडयांसाठी खुराडे असते.

उद्योगधंदे – शेती हा या लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. बाजरी, ज्वारी, तांदूळ, डाळी, इ. पिके ते काढतात. नांगरणी, पेरणी, कापणी, इ. प्रसंगीं ते उत्सव करतात. नवीन धान्ये खाण्याचे सणही ते साजरे करतात. घराभोवतीच्या परसात ते भाजीपाला पिकवतात व फळझाडे लावतात. काही खेडयांत घोटुलाला कसण्यासाठी वेगळी जमीन दिलेली असते. याशिवाय मध गोळा करणे, तेल गाळणे, शिकार करणे, इ. उद्योगही ते करतात. मोहाचे मद्य पिणे हे जितके उल्हासप्रद असते, तितकाच तो कर्तव्याचाही भाग असतो. कारण प्रत्येक सणाच्या, उत्सवाच्या व बारसे, लग्न, मृत्यू, इ. प्रसंगीं देवतांना मोहाची दारू अर्पण करावीच लागते. पण तांदुळाची दारू आणि साबुदाण्याच्या झाडापासून काढलेली दारूही फार मादक असून, ती ते कैफ येण्यासाठी म्हणूनच पितात.

भात, कण्यांची पेज आणि ज्वारीबाजरीची भाकरी हे यांचे प्रमुख अन्न होय. याशिवाय, ते मांस व मासे भाजून भाजून खातात. या लोकांना मासे पकडण्याची फार आवड असून, त्यासाठी ते वेगवेगळे पिंजरे व जाळी वापरतात. यांना बेडूकही फार आवडतात.

विवाहप्रथा – मुडिया लोकांत आते किंवा मामे बहिणीशी लग्न करण्याची पद्धत आहे. सर्वसाधारणपणे आईबाप मुलांची लग्ने ठरवतात. मुलामुलींच्या प्रेमसंबंधापेक्षा ते देजाला अधिक महत्त्व देतात. देजाची रक्कम ठरली, की वधूवरांचे लग्न पक्के झाले, असे समजतात. यानंतर लग्न होईपर्यंत वधू-वरांना एकमेकांशी कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवायला मनाई असते.

मुडिया मुलीचे लग्न ठरले, की ती फार अस्वस्थ होते. तिचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घोटुलातले प्रेमसंबंध, घोटुलातल्या तिच्या मैत्रिणी, खेळ, नाच, गाणी हे सर्व आता संपणार असते. एकदा लग्न झाले, की घोटुलाची दारे तिला बंद होणार असतात. आपले पुढे कसे होणार, या चिंतेने तिला वारंवार रडू येते. पण लग्न झाल्यानंतर कालांतराने या दुःखाची तीव्रता कमी होते आणि एकनिष्ठ पत्नी व कर्तव्यदक्ष माता असा लौकिक ती प्राप्त करून घेते.

लग्नाच्या आदल्या दिवशी वर आप्तेष्टांसह वधूच्या गावी जातो व गावाबाहेर तळ ठोकतो. त्याच्या गावाच्या घोटुलातील मुले व मुली तिथे नृत्य करतात. मोठी माणसे स्वयंपाकपाण्यात दंग असतात. दुसऱ्या दिवशी दुपारी वधूच्या गावातील तरुण ढोल घेऊन त्यांना सामोरे येतात आणि नृत्य करतात.

मध्यंतरीच्या काळात वधूला तिच्या घराच्या अंगणात चटईवर उभी करतात. पेनगॅट्टा देवाचा पुजारी चमच्याने तिच्या डोक्याला व पाठीला तेल लावतो. मग एक मोटियारी तिच्या अंगाला तेल लावते व मोठ्या बायका तिची वेणी घालतात. या सर्व कार्यक्रमाच्या वेळी मुली गीते गात असतात.

सूर्यास्ताच्या वेळी वर वधूच्या घरी येतो आणि वधूशेजारी बसतो. पुरोहित वराच्या हातात एक अंगठी देतो व तो ती वधूच्या बोटात घालतो. मग वधू त्याच्या पाठीत जोराने बुक्का मारते. तोही मग तिला बुक्का मारायचा प्रयत्न करतो; पण ती घरात पळून जाते.

नंतर वराला त्याच्या जानोशात नेतात. तिथे पुरोहित त्याच्या गळ्यात ताडाच्या पानांचा हार घालतो. वराच्या घोटुलातील मुले त्याच्यासाठी उच्चासन तयार करतात व त्याच्यावर त्याला बसवतात. मग रात्रभर नृत्य व गायन चालते. दुसऱ्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी वधूला व वराला आपापल्या जानोशात स्नान घालतात आणि दोघांनाही स्वतंत्रपणे मिरवीत लग्नमंडपात नेतात. तिथे त्यांच्या अंगावर छपराला बांधलेल्या मडक्यातील हळदीचे पाणी ओततात. या विधीमुळे ती दोघे पति-पत्नी होतात. जमलेले लोक वधू-वरांच्या कपाळी अक्षता लावून त्यांना अहेर करतात. पुरोहित त्यांना एकमेकांशी एकनिष्ठ राहण्याबद्दल उपदेश करतो. मग वरात वरगृही जाते.

देवधर्म– भूम किंवा धरनीमाता, कुलदेव आणि पितर यांच्या भोवती मुडियांचा धर्म गुंफलेला आहे. लाकडाचे तीन ओंडके एका बांबूला बांधतात व त्याला भूमदेव असे म्हणतात. भगवान किंवा महापुरुष हा त्यांचा सर्वश्रेष्ठ देव होय. नेहमी नव्याने काही गौण देवतांची भर त्यांच्या धर्मात पडत असते. गावाच्या सीमेवर लहान मंदिरात त्यांच्या देवतांची प्रतीके असतात.

मुडिया लोकांत चार प्रकारचे पुरोहित असतात. त्यांपैकी कैझरगेट्ट हा गावाचा वंशपरंपरा पुरोहित असतो. धरनीमातेला पशुबली देण्याचे काम त्याच्याकडे असते. कोणत्याही समारंभाच्या वेळी तो हातात रक्ताने माखलेला सुरा धरतो. पेरणी, कापणी, इ. प्रसंगीं त्याच्याकडे महत्त्वाची कामगिरी असते. पेनगॅट्ट हा कुलदेवतेचा पुजारी असतो. तिच्या मिरवणुकीच्या वेळी तो बरोबर असतो. लग्न व मृत्यू या प्रसंगीं तो पौरोहित्य करतो. गौण देवतांना संतुष्ट राखण्याचे काम पुजाऱ्याकडे असते. ज्यांच्या अंगात येते, असेही काही लोक यांच्यांत असतात. ते रोगाचे निदानही करतात. गुणिया हा मंत्रतंत्र जाणणारा असतो. तोही रोगनिदान करून मंत्रतंत्रात्मक उपचार करतो.

सण-उत्सव– बस्तर जिल्ह्यात दरवर्षी अनेक ठिकाणी जत्रा भरत असतात. त्यांपैकी नारायणपूर, कोंडागाव, दंतेवाडा व धनरा येथील जत्रांना बस्तरमधील मुडिया व इतर आदिवासीही फार मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

मोहाच्या वृक्षाला यांच्या जीवनात फार मोठे स्थान आहे. फेब्रुवारीच्या मध्याला हा वृक्ष फुलायला लागतो, तो मे महिन्याच्या मध्यापर्यंत फुललेला असतो. मार्च महिन्यात हे लोक मोहाचा एक उत्सव साजरा करतात. त्या वेळी एका गावाच्या घोटुलातील मुले-मुली दुसऱ्या गावाच्या घोटुलातील मुला-मुलींना भेटण्यासाठी जातात व त्यांना मोहाची फुले देतात. मोहाच्या फुलांचा काही भाग कच्चा किंवा भाजून खातात. त्याच्या फळांचा बाहेरचा भाग खातात व आतल्या गराचे पीठ करून भाकऱ्या करतात. बियांचे तेल स्वयंपाकात, दिव्यासाठी, वधूला लावण्यासाठी वगैरे वापरतात. मोहाच्या फांद्यांनी लग्नमंडप व कुलदेवतेचा मंडप उभारतात. या सर्वां

बांबूवर उभे राहून नाचणारा तरुण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मोहाच्या फुलांची दारू ही अत्यंत महत्त्वाची असते. या उत्सवात ग्रामदेवतांना ती अर्पण करतात. मुले-मुली घरोघर जाऊन नृत्य करतात व दारू पितात. पावसाळ्यात तरुण मुलगे बांबूवर उभे राहून नाच करतात. नवीन धान्य खाण्याचे यांचे उत्सव वर्षभर चालू असतात. काही गावांत भाताची कापणी झाली, की घरातील कर्ता पुरुष मूठभर साळी घेऊन घोटुलात जातो, तिथे गॅट्ट साळीच्या गवतात त्यांची पुरचुंडी बांधतो आणि ती छपराला टांगून ठेवतो. नंतर त्यांतल्या थोड्या साळींचे तांदूळ करून ते गावाच्या संरक्षणासाठी ठाकूरदेवाला अर्पण करतात. त्या रात्री घोटुलात सर्व गावाला जेवण देतात. लग्न झालेल्या स्त्रिया मात्र घोटुलाच्या बाहेर थांबतात.

मुडिया तरुण-तरुणींच्या शय्यागृहाला घोटुल असे नाव आहे. तिन्हीसांजा गावातील सर्व अविवाहित मुले व मुली आपले जेवणखाण आटपून घोटुलात येतात आणि रात्र तिथे घालवतात. काही गावांत मुलांसाठी व मुलींसाठी वेगवेगळी घोटुले असतात; तर काही गावांत दोघांसाठी एकच घोटुल असते. घोटुलाभोवती भक्कम कुंपण असते. कुंपणाच्या आवारात एक किंवा अनेक झोपड्या असतात. दिवसा घोटुलात कोणीही राहत नाही. पण खोलीत मध्यभागी शेकोटी पेटलेली असते. घोटुलाच्या भिंतींना ढोल आणि इतर वाद्ये अडकवलेली असतात. भिंतीवर किंवा खांबावर लिंगाची प्रतीके काढलेली असतात.

फार पूर्वी लिंगो पेन या देवता बनलेल्या वीराने मुडियांचे घोटुल स्थापन केले, अशी त्यांची श्रद्धा आहे. त्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ मुडिया हे घोटुल उभारतात. त्याच्या छपराखाली असेपर्यंत भुतेखेते आणि जादूटोणा यांपासून तो घोटुलातल्या मुलामुलींचे रक्षण करतो, अशी समजूत आहे. तसेंच त्याच्या कृपेमुळेच घोटुलातल्या संबंधापासून, मुलींना गर्भधारणा होत नाही, अशीही त्यांची धारणा आहे.

मुले व मुली सहा-सात वर्षांची झाली, की घोटुलात जाऊ लागतात. त्यांना मोठी मुले व मुली शिक्षण देतात. आपल्या टोळीची एकता अभंग राहील, टोळीचे रीतिरिवाज नीट पाळले जातील आणि आर्थिक व सामाजिक जबाबदारीची जाणीव येईल, अशा तऱ्हेचे हे शिक्षण असते. शेतात काम करणे, जंगलात कंदमुळे व फळे शोधणे अशा प्रत्यक्ष कामातूनही त्यांना शिक्षण देतात.

प्रत्येक घोटुलाचा एक प्रमुख असतो. त्याला स्थानपरत्वे सरदार, कोटवार, मलिक, दिवाण, जोरिया, इ. नावे आहेत. मुलींच्या घोटुलातील प्रमुख मुलीला बेलोसा, मल्को मन्जारो, इ. नावे असतात. घोटुलाच्या पुरुष सदस्यांना चेलिक व स्त्री सदस्यांना मोटियारी असे म्हणतात. घोटुलप्रमुख इतर काही अधिकारी नेमतो व त्यांना घोटुलाची स्वच्छता करणे, वाद्यांची निगा राखण, पाहुण्यांची करमणूक करणे, घोटुलात शिस्त राखणे, शिस्त मोडणाऱ्यांना शिक्षा करणे, शेकोटीसाठी लाकडांचा साठा करणे, तंबाखूचा पुरेसा साठा करणे, मुलींच्या घोटुलातील मुलींबरोबर लैंगिक संबंध प्रस्थापित व नियमित करणे, इ. कामे वाटून देतो. मुले सहा वर्षांची झाली, की त्यांना घोटुलात प्रवेश मिळतो व लग्न होईपर्यंत ती घोटुलाची सभासद राहतात. दिवसा मुले घरी आई-बापांना मदत करतात आणि संध्याकाळी जेवणखाण आटपून घोटुलात जातात. आजारी मुले व ऋतुमती मुलींशिवाय सर्वांनी रोज घोटुलात आले पाहिजे, असा नियम आहे. नवीन मुलांना अधिकारी मुलांची सेवा करावी लागते. ती मुले अधिकारी बनली, म्हणजे मगच त्यांना लैंगिक संबंध ठेवण्याची परवानगी मिळते. तिन्हीसांजा लहान मुले घोटुलाच्या अंगणात खेळत असतात. एक अधिकारी मुलगा त्यांच्यावर देखरेख करीत असतो. मोठी मुले घोटुलात प्रवेश करतात, तोवर त्यांची झोपेची

नृत्यवेषात घोटुलप्रमुख

वेळ झालेली असते. अधिकारी मुलांना नमस्कार करून आणि शेकोटीसाठी आणलेली लाकडे संबंधित मुलाकडे देऊन ती झोपी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जातात. मग अधिकारी मुले मुलींच्या घोटुलातील अधिकारी मुलींबरोबर खेळ खेळतात, नृत्य करतात किंवा त्यांच्या नृत्याला साथ करतात. मुली बहुधा रोज रात्री नृत्य करतात. त्यांच्या नृत्यात जोष असतो आणि नाजुकपणा असतो. त्यांच्या नृत्यांतील विविधताही नेत्रदीपक असते.

मध्यरात्री मुले व मुली आपापल्या घोटुलात परततात. काही घोटुलांत आठवडयातून एक किंवा तीन दिवस मुले व मुली जोडया करून एकत्र झोपतात. एकाच कुळीतल्या मुलाशी लैंगिक संबंध ठेवणे निषिद्ध असल्यामुळे या संबंधीचा अधिकारी मुलींच्या घोटुलातल्या या संबंधीच्या अधिकारी मुलीशी विचारविनिमय करून या जोडया ठरवतो. लैंगिक संबंधापूर्वी मुलगा मुलीला फणी देतो व ती त्या फणीने त्याचे केस विंचरते आणि मग त्याचे अंगमर्दन करते.

घोटुलातल्या लैंगिक संबंधाची परिणती गर्भधारणेत होत नाही, असा सर्वसाधारण समज आहे. एखादी मुलगी गरोदर राहिल्यास तो घोटुलाबाहेरच्या चोरटया प्रेमसंबंधाचा परिणाम आहे, असे मानतात. घोटुलातील सदस्यांत उच्च–नीच असा भेदभाव नसतो. श्रीमंत, गरीब, सुंदर, कुरूप या सर्वांना इथे समान वागणूक मिळते.

मुलांसाठी व मुलींसाठी जिथे एकच घोटुल असते, तिथे संध्याकाळी मोटियारी आल्याबरोबर घोटुलप्रमुखाला नमस्कार करतात व प्रत्येक मोटियारी एकेका चेलिकाला आपल्या ताब्यात घेते. ती त्याच्या केसांना तेल लावते, फणीने त्याचे केस विंचरते आणि अंगाला तेल लावून खूप मालिश करते. यामुळे दिवसभर थकलेला चेलिक ताजातवाना होतो आणि मोठया उत्साहाने नृत्यगानात भाग घेतो.

एखाद्या मोटियारीला एखाद्या चेलिकाविषयी जास्त आतमीयता उघडपणे दाखवता येत नाही. काही वेळा चेलिकांची संख्या मोटियारींपेक्षा अधिक असते. अशा वेळी मोटियारी आळीपाळीने त्या सर्वांच्या बरोबर झोपतात. रात्रीच्या वेळी एकाच खोलीत सर्व जोडयांचे संबंध होतात. पण काही वेळा घोटुलाच्या आवारातील इतर झोपडयांचाही काही जोडया उपयोग करतात.

घोटुलातील सदस्य मधून मधून शेजारपाजारच्या घोटुलांना भेट देतात व त्यांतील मुलांमुलींशी मैत्री जोडतात. गावातील प्रत्येक सणासुदीला घोटुलातील मुले व मुली नृत्य करतात. तसेच गावातील भोजनसमारंभ, कापणी, लग्नसमारंभ किंवा अंत्यसंस्कार अशा प्रसंगी ही मुले व मुली गावकऱ्यांना खूप मदत करतात.

घोटुलात शिस्त राहावी यासाठी काही नियम केलेले असतात. अधिकारी व्यक्तीपासून लहान मुलापर्यंत कोणी हे नियम मोडले, तर त्याला शिक्षा होते. घोटुलातील इतर मुलाशी भांडणे, वरिष्ठांची आज्ञा न पाळणे, खोटे बोलणे, दिलेले काम नीट किंवा अजिबात न करणे; घोटुलातील गुप्त गोष्टींची वाच्यता करणे, गुप्त प्रेमप्रकरणे करणे, इ. गोष्टी दंडार्ह मानलेल्या आहेत. दंड करणे, चाबकाचे फटकारे मारणे, राखेचा तोबरा भरणे व घोटुलातून काही काळ बाहेर घालवणे अशा प्रकारच्या या शिक्षा असतात. कालमानपरत्वे घोटुलांची ही प्रथा आता कमी होत चालली आहे

मृतकप्रथा – यांच्यापैकी काही लोक प्रेते जाळतात व काही पुरतात. देवीच्या साथीने, बाळंतपणात किंवा गरोदर अवस्थेत मृत्यू आलेल्या व्यक्तीला मोहाच्या छायेत पुरतात. मग मृताच्या नावे स्मृतिस्तंभ उभारतात. [आ. भा.; दि किंगडम ऑफ दि यंग – व्हेरिअर एल्विन, १९६८; हा. ट्रा. ई. इं.]

मुडुगर एक जात. या लोकांना मुडुवर किंवा मुथुवर असेही म्हणतात. हे लोक केरळातल्या पालघाटात राहतात. हे मूळचे मलबारी आणि द्रविडांपैकी असावे. कारण त्यांची वेषभूषा द्रविडांसारखीच आहे. हे मध्यम उंचीचे, जाड ओठांचे, कुरळया केसांचे व पिंगट वर्णाचे असतात. हे तमिळ व तुळू दोन भाषांचे मिश्रण असलेली भाषा बोलतात. स्त्री व पुरुष दोघेही बांगडया व कर्णभूषणे वापरतात. शेती, मजुरी व शिकार करून हे आपले अन्न मिळवतात.

विवाहप्रथा – विवाह बहुधा मध्यस्थामार्फत ठरवितात. वधूच्या गळयात ताळी बांधणे हा महत्त्वाचा लग्नविधी असतो. यांच्यांत अनेक बायका करण्याची चाल आहे.

देवधर्म – मल्लेश्वर शिव हा त्यांचा प्रमुख देव आहे. अनेक प्रसंगी ते त्याच्या दर्शनाला जातात. त्यांच्यांत प्राणिपूजा व वृक्षपूजाही प्रचलित आहे.

जातीच्या प्रमुखाला ते मुप्पन म्हणतात. ही जागा वंशपरंपरेची असते. मुप्पनच्या हाताखाली दोन मदतनीस असतात.

मृतकप्रथा – हे लोक मृतांना पुरतात व सर्वसाधारणपणे सात दिवस मृताशौच पाळतात. [ट्रा. के.]

मुत्तावली एक जैन व्रत. श्रमणकांना प्रायश्चित म्हणून जे विविध तपश्चर्या आणि उपवास सांगितले आहेत, त्यांपैकी मुत्तावली हा एक उपवास आहे. तीन वर्षे आणि दहा दिवस हा या उपवासाचा कालखंड असून, ओळीने काही दिवस उपवास करायचे व नंतर एक भोजन करायचे, अशी त्याची रीत आहे. सामान्यतः सहा जेवणे वर्ज्य केल्यावर एकदा अन्न घ्यायचे, असा हा क्रम असतो. [हिं. जैं. मो.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुत्राचं द. भारतातील एक जात. या लोकांची वस्ती आंध्र प्रदेशातील कृष्णा, नेल्लोर व कडप्पा या जिल्ह्यांत आणि तमिळनाडूतील उत्तर अर्काट जिल्ह्यात आढळते. इथे हे लोक मुत्तीरियन या नावाने परिचित आहेत. यांच्यांतील काही लोक आपल्याला क्षत्रिय म्हणवितात आणि आपण ययातीचे वंशज असल्याचे सांगतात. यांनी मासेमारीचा व्यवसाय सुरू केल्यापासून यांची गणना हलक्या जातीत होऊ लागली. विजयनगरच्या राजांनी यांना सीमासंरक्षणाचे काम दिले होते. सांप्रत डोरा आणि नायडू या त्यांच्या पदव्या आहेत. हे लोक अत्यंत विश्वासू आणि शूर आहेत. अलिकडे हे शेती व शिल्पकाम करू लागले आहेत.

विवाहप्रथा – यांच्यांत बालविवाहाची पद्धत आहे. परंतु चंद्रगिरीच्या बाजूला यांच्यांत क्वचितच विवाह होतात. आपल्याच जातीमधील स्त्रियांबरोबर हे संबंध ठेवतात. अशा संबंधातून झालेल्या संततीला हे औरस संततीच मानतात.

मादिग लोक आपल्या विवाहसमारंभात यांना आवर्जून पानसुपारी देतात, ही गोष्ट यांच्या दृष्टीने सन्मानाची मानण्यात येते. [का. ट्रा. स. इं.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

मुथुवन द. भारतातील एक संरक्षित जात. या लोकांची वस्ती केरळ प्रदेशातील अर्नाकुलम, त्रिचूर व कोट्टायम या ठिकाणी आढळत असली, तरी हे प्राधान्याने पूपारा, कांजीयर, कालीयरंबू, पूयकुटी, इ. ठिकाणी वसले आहेत. यांचे मूलस्थान तमिळनाडू प्रदेशातील मदुरेचे अरण्य असावे, असे वाटते. कारण पांड्य राजांनी दक्षिणेवर स्वारी केली, तेव्हा हे मदुरा सोडून इकडे आले, असे म्हणतात. आर्य–द्रविड संगमाचे अनेक विशेष या जमातीत पाहायला मिळतात, असे वंशशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. यांचे डोके आखूड परंतु मोठे असते.

मुथुवन पुरुष

हे लोक आता बरेच सुधारले असून, शेती, कुक्कुटपालन व पशुपालन हे व्यवसाय करतात.

विवाहप्रथा – यांच्यांत मुली वयात आल्यावर त्यांची लग्ने करतात. मुलीच्या पसंतीमध्ये मामेबहिणीला अग्रक्रम दिला जातो. ज्यांचे विवाह ठरलेले असतात, त्यांच्यांतील वधू विवाहापूर्वी तीन दिवस अरण्यात पळून जाते आणि वर तिचा पाठलाग करतो. हा राक्षस विवाहाचा अवशेष असावा. पुरुष अनेक बायका करतात. मुलाच्या जन्मानंतर सहा महिन्यांनी त्याचे नाव ठेवतात.

देवधर्म – मुथुवन लोक निसर्गपूजक आहेत. मदुरेची मीनाक्षी ही त्यांची आवडती देवता आहे.

यांच्या जातीप्रमुखाला कानी असे म्हणतात. त्याच्याकडे जातीच्या न्याय–निवाड्याचे काम असते.

मर्तिकप्रथा – हे लोक मृताला घरापासून दूर पुरतात व पंधरा दिवस सुतक पाळतात. [ट्रा. के.]

मुदलियार म्हैसूर प्रदेशातील एक जात. मुळात हे लोक तमिळ प्रदेशातून इकडे आले. मुदलियार ही वेल्लाळ लोकांचीच एक पोटजात आहे. मुदलियार शब्दाची व्युत्पत्ती दोन प्रकारे सांगतात. मुदल म्हणजे पहिला आणि अर म्हणजे नांगर. त्यावरून प्रथम शेती करणारे ते मुदलियार होत. किंवा मुदल म्हणजे संपत्ती. त्यावरून श्रीमंत व्यापारी, वगैरे लोकांना श्रेष्ठीसारखी मुदलियार ही सन्मान निदर्शक पदवी लावतात. मुदलियार हे स्वतःला वैश्य म्हणवून घेतात.

हे लोक आपल्या उत्पत्तीविषयी एक कथा सांगतात, ती अशी – इ. स. च्या ७ व्या शतकात, कावेरी नदीच्या दक्षिण तीरावर एक चोळ राजा राज्य करीत होता. कावेरीच्या उत्तर तीरावर दंडकारण्य असून, त्यात कुरुंब नावाची एक वन्य जमात राहत होती. एकदा राजा शिकारीसाठी जंगलात गेला असता, त्याची व बरोबरच्या लोकांची चुकामूक झाली आणि तो एकटाच जंगलात भटकत राहिला. जंगलात त्याला एक अप्सरा भेटली. राजा तिच्यावर अनुरक्त झाला. आपल्या मुलाला राज्य मिळाले पाहिजे, या अटीवर तिने राजाच्या इच्छेला मान तुकवली आणि आकाश, पृथ्वी व तोंड वृक्ष यांना तिने साक्षीदार नेमले. त्यानंतर काही काळाने राजा आपल्या राजधानीला परत गेला. तिथे पोचल्यावर ही सर्व घटना तो विसरून गेला. इकडे अप्सरेला मुलगा झाला. रानातील ऋषींनी त्याला शास्त्रे व कला शिकवल्या. तो मोठा झाल्यावर आईने त्याला त्याच्या जन्माची सर्व हकीकत सांगितली. तेव्हा तो राजाकडे गेला आणि त्याने राज्याची मागणी केली. प्रथम राजाने त्याला ओळखले नाही; पण साक्षीदारांची नावे सांगताच राजाला ओळख पटली. पण राजाने आधीच आपल्या मुलाला गादीवर बसवले होते. तेव्हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यातून मार्ग काढण्यासाठी राजाने त्याला कुरुंबांचा प्रदेश जिंकून तिथे राज्य स्थापन करायला सांगितले. मुलाने त्याप्रमाणे केले.



मुदलियार कुटुंब

आणि तोंड वृक्षाची स्मृती म्हणून आपल्या राज्याला तोंडलम असे नाव दिले. कानडा प्रदेशातील तुळुव लोकांना त्याने आपल्या राज्यात आणून वसवले. हेच लोक मुदलियारांचे पूर्वज होत.

उद्योगधंदे – यांच्यापैकी काही शेती करतात, तर काही व्यापारी, कंत्राटदार व दलाल आहेत. यांच्यापैकी पुष्कळ लोक सधन आहेत.

या लोकांची वेषभूषा उच्चवर्गीय हिंदूंसारखी असते. स्त्रिया व पुरुष भुतांखेतांपासून रक्षण व्हावे म्हणून ताईत बांधतात. हे लोक तमिळ भाषा बोलतात.

विवाहप्रथा – विवाह बहुधा आईबाप ठरवतात. आते किंवा मामे बहिणीशी लग्न करता येते. लग्नसमारंभ पाच दिवस चालतो. पहिल्या दिवशी पाच सुवासिनी लग्नमंडपाचे खांब पुरतात. दुसऱ्या दिवशी कुलदेवतेची पूजा होते. त्याच दिवशी संध्याकाळी वराला मिरवीत वधूगृही नेतात. तिसरा दिवस हा विवाहाचा दिवस. त्या दिवशी वधू-वरांना तेलहळद लावून स्नान घालतात. कंकण बांधणे, विवाहहोम, सप्तपदी, कन्यादान व ताळी बांधणे हे त्या दिवशीचे मुख्य विधी असतात. चौथ्या दिवशीही होम होतो. पाचव्या दिवशी कंकण सोडतात. गर्भाधानाचा विधी लग्नानंतर तिसऱ्या महिन्यात करतात. तोपर्यंत मुलगी माहेरीच राहते. कारण पहिल्याच वर्षात मूल होणे, हे अशुभ मानतात.

या लोकांची जातपंचायत असून, तिच्याकरवी हे जातीचे तंटेबखेडे सोडवतात.

यांच्यापैकी काही लोक शैव, तर काही वैष्णव आहेत.

मृतकप्रथा – हे लोक सर्वसाधारणपणे प्रेते जाळतात. संन्यासी माणसाला मात्र बसलेल्या अवस्थेत पुरतात. मृताशौच साधारणपणे सोळा दिवस असते. हे लोक श्राद्ध करतात आणि ज्ञातिभोजन घालतात. [मै. द्रा. का.]

मुदुकर्टेल्लू

तमिळनाड प्रदेशातील एक लौकिक व्रत. तिथल्या स्त्रिया धनप्राप्तीसाठी हे व्रत करतात. सातशे वाती तेलात भिजवून त्या तीन पौर्णिमांना, संक्रातीला व शिवरात्रीला देवापुढे लावणे हा या व्रताचा प्रमुख विधी आहे. [का.द्रा.स इं.]

मुद्गर

एक प्राचीन शस्त्र. हे शस्त्र लोखंडाचे व एका माणसाला पेलण्याजोगे असते. याची लांबी सामान्यपणे आठ-नऊ फूट असते. याचे एक टोक गदेसारखे जाड असून, मूठ गोलाकृती असते. वेदकालात या शस्त्राचा उपयोग दूरचा शत्रू मारण्याकडे होत असावा, असे वाटते. हे आयुध अनेक देवतांच्या हातांत दाखवतात. [कल्याण– संस्कृतिअंक; श्रीगणेशकोश]

मुद्गल

एक सूक्तद्रष्टा. भर्म्यश्वाचा पुत्र. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातले १०२ वे सूक्त यांच्या नावावर आहे. कात्यायनाने मुद्गलाची कथा दिली आहे, ती अशी–

एकदा मुद्गलाचे सर्व गोधन चोरांनी पळवून नेले. फक्त एक म्हातारा बैल तेवढा शिल्लक ठेवला. तेव्हा त्यालाच गाडीला जुंपून व दुसऱ्या बैलाच्या जागी द्रुघण (एक लाकडी ठोकळा) जोडून त्याने चोरांचा पाठलाग केला. त्या लाकडी ठोकळ्याने मार्गदर्शनाचे काम केले व मुद्गलाने चोरांपासून आपले गोधन परत मिळवले.

या मोहिमेत मुद्गलाला त्याची पत्नी इंद्रसेना (मुद्गलानी) हिचे खूप साहाय्य झाले. तिच्या अद्भुत पराक्रमाचे वर्णन पुढील ऋचेत (१०.१०२.२) आहे –

उत् स्म वातो वहति वासो अस्या । अधिरथं यदजयत् सहस्रम् ॥
रथीरभून्मुद्गलानी गविष्टौ । भरे कृतं व्यचेदिन्द्रसेना ॥

अर्थ – (फार पूर्वी) जेव्हा मुद्गलाची बायको इंद्रसेना रथात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बसली होती, तेव्हा तिचा पदर वाऱ्याने फडफडत होता. तिने या गायींसाठी चाललेल्या युद्धात हजारो गायी परत जिंकून घेतल्या.

काही पाश्चात्य वैदिक संशोधक या सूक्ताला रथस्पर्धेचे सूक्त समजतात, तर काही संशोधक त्याला संग्रामसूक्त समजतात. डॉ. व. ग. राहूरकर हेसुद्धा त्याला संग्रामसूक्तच समजतात. त्यांनी या विषयाचा समारोप केला आहे, तो असा —

प्रस्तुत सूक्ताचा सुसंगत अर्थ लावता येणे शक्य आहे. हे सर्व सूक्त युद्धविषयक जबाबदारी अंगावर घेतलेल्या एखाद्या राजाच्या पुरोहिताने तयार केले असावे, असे वाटते. हा पुरोहित १, ३, ११ या बृहती वृत्तातील ऋचांनी इंद्रदेवतेला पाचारण करीत आहे व बाकीच्या ऋचांत इंद्राने मुद्‌गलाला कशी मदत केली व मुद्‌गल व मुद्‌गलानी यांनी चोरांपासून गायी कशा परत मिळवल्या, याचे वर्णन करीत आहे.

मुद्‌गल व मुद्‌गलानी हे एक आदर्श दांपत्य म्हणून महाभारतात उल्लेखिलेले आहे (विराट. ६.५१). मुद्‌गल ही ऐतिहासिक व्यक्ती असल्याचे सांगून डॉ. राहूरकर यांनी अजमीढ या मूळ पुरुषापासून एका शाखेने द्रुपद व दुसऱ्या शाखेने कृप इथवर त्याचा वंशवृक्ष दिला आहे. [प्रा. च. को.]

मुद्‌गल कृष्णदास

(इ. स. च्या १६ व्या शतकाची अखेर) एक मराठी कवी. हा पैठणचा रहिवासी असून, एकनाथांचा समकालीन होता. याचे नाव मुद्‌गल व बापाचे नृसिह होते. याचा गुरू कोणी कृष्ण नावाचा होता. त्याच्यावरून याने कृष्णदास हे स्वतःला टोपण नाव घेतले असावे. याने वाल्मीकिरामायणाचे युद्धकांड ओवीबद्ध लिहिले आहे. त्याविषयी कथा सांगतात, ती अशी—

ग्रंथ समाप्त होण्याच्या पूर्वीच आपण मरणार, असे मुद्‌गलाला वाटू लागले. म्हणून तो एकनाथांकडे गेला आणि त्यांना म्हणाला, "माझा मृत्यू झाला तर तुम्ही माझा ग्रंथ पूर्ण करा." त्यावर नाथ त्याला म्हणाले. "तुम्ही मुळीच भिऊ नका. ग्रंथ पुरा होईपर्यंत तुम्हांला मरण नाही." ते ऐकून मुद्‌गलाला धीर आला व त्याने ग्रंथ पुरा केला.

मुद्‌गलाचे हे युद्धकांड ७८ अध्यायांचे असून, त्याची ओवीसंख्या अंदाजे आठ हजार आहे. हा ग्रंथ त्याने वाल्मीकीला अनुसरून व काही ठिकाणी अग्नी पुराणाचा आधार घेऊन रचला आहे. एका ठिकाणी (अ. ६५) त्याने रामकथा व गंगा यांची तुलना केली आहे. ती अशी—

इति श्री कथा रामायणी। गंगाचि केवळ जगतारिणी।
धन्य वाल्मीकिऋषीची वाणी। उगवली तेथोनि ॥
चालिला गंगेचा जळ ओघु। तरी कथेचा चाले विचित्रमार्गु।
शोधितां सुधाकाव्यीचा रंगु। स्वर्ग तृणसमान वाटे ॥
गंगा सर्वकाळ सेवन। करिती धर्मात्मे मुनिजन।
तरी कथाही ते सज्जन। परिसताति प्रीती ॥
गंगा तारक गाति पुराणें। तरि भवबंध तुटे कथा श्रवणें ॥
गंगेहूनि बहु गुणें। हे आगळी विचारितां।
सप्तमुखे गोदावरी। मिळाली सप्तसागरीं।
तरि रामकथा त्रैलोक्या साजरी। सप्तकांडे तियेची ॥

मुद्‌गलाला मराठी भाषेचा विलक्षण अभिमान होता. त्याने तिची प्रौढीही गायिली आहे. त्याची लेखनशैली मनोज्ञ आहे. त्याने उपमा–दृष्टांतादी अलंकारांनी आपला ग्रंथ सुंदर नटवला आहे. मुद्‌गलाचे हे रामायण शिवछत्रपतींच्या स्वराज्यस्थापनेच्या काळात फार लोकप्रिय झाले होते. गडागडांवरून त्याचे वाचन होत असे. [म. वा. इ. खंड २ रा; म. च. को.]

मुद्‌गलतीर्थ

मराठवाड्यातील एक तीर्थस्थान. हे ठिकाण परभणी जिल्ह्यातील मुद्‌गल गावी आहे. या गावाचे माहात्म्य सांगणारा मुद्‌गलमाहात्म्य नावाचा एक संस्कृत ग्रंथ असून, त्याचे सात अध्याय आहेत. अनेक स्थानिक तीर्थांची माहिती त्यात दिलेली आहे. रावणाचा वध केल्यावर रामाने इथे येऊन त्याला तिलांजली दिली, असाही उल्लेख त्यात आहे.

मुद्‌गल नामक ऋषी आणि त्याचे कुटुंब इथे राहत होते, म्हणून या गावाला मुद्‌गल असे नाव मिळाले. या ठिकाणी असलेल्या गोदावरीच्या पात्रात मुद्‌गलेश्वराचे मंदिर आहे. केवळ उन्हाळ्यातच मंदिरात प्रवेश करून दर्शन घेता येते. मंदिरात शिवलिंगाच्या बाजूला त्याचा पुत्र मौद्‌गली, पत्नी भागीरथी आणि सून जाबाला यांच्या मूर्ती आहेत.

मुद्‌गलेश्वराचे दर्शन सर्वकाल सुलभ नसते म्हणून या मंदिराच्या उत्तरेकडे गोदावरीच्या काठावर दुसरे एक देऊळ बांधलेले आहे. [श्री. न. शे. पोहनेरकर – प्रतिष्ठान, ऑक्टोबर १९५९; कल्याण – तीर्थांक]

मुद्‌गल पुराण

हे एक गाणपत्य पुराण असून, त्याला गणेशपुराणाच्या खालोखाल महत्त्व आहे. हे पुराण गणेशपुराणानंतर रचले गेले असून, गणेशपुराणातल्या सर्व कथा त्यात सारांशरूपाने सांगितल्या आहेत. याशिवाय अन्य पुराणांतील गणेशविषयक आख्याने व कथाही या पुराणात संकलित केलेल्या आहेत. प्रस्तुत पुराणाचे नऊ खंड असून, अध्यायसंख्या ४२७ आहे.

मुद्‌गल ऋषी हा या पुराणाचा वक्ता असून, दक्ष हा श्रोता आहे. हा दक्ष म्हणजे दक्षप्रजापती नसून, दक्ष नावाचा एक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजा असावा. गणेश पुराणाच्या उपासना खंडात सोमकांत राजाचा आठवा पूर्वज म्हणून त्याची कथा आलेली आहे. अंध, मूक, बधिर आणि सर्वांगी व्रण झालेले असा हा दक्ष मुद्गल ऋषीच्या अंगावरून आलेल्या वाऱ्याने दिव्यदेही बनला. पुढे त्याने मुद्गल ऋषीचा मंत्रोपदेश घेऊन तपश्चर्या केली व आपले राज्यही मिळवले.

मुद्गल पुराणाचा उद्देश गणेश पुराणाहून भिन्न आहे. गणेश-कथा सांगणे हा गणेश पुराणाचा उद्देश आहे; तर गणेशतत्त्वाचे आध्यात्मिक स्पष्टीकरण हा मुद्गलपुराणाचा उद्देश आहे. यात गणेशतत्त्वाची परब्रह्मस्वरूपात सोपपत्तिक व सविस्तर मांडणी केलेली आहे.

वक्रतुंड, एकदंत, महोदय, गजानन, लंबोदर, विकट, विघ्न-राज, धूम्रवर्ण, इ. गणेशाचे अवतार प्रस्तुत पुराणात वर्णिले आहेत. या अवतारांच्या कथा गणेशपुराणातील कथांहून भिन्न आहेत. त्यांपैकी काही कथा अशा–

इंद्रपदप्राप्तीच्या निमित्ताने चालू झालेल्या महोत्सवात रंभेला पाहून इंद्र कामातुर झाला व त्याचे वीर्य स्खलित झाले. त्या-पासून मत्सर नावाचा एक असुर निर्माण झाला. त्याने शुक्रा-चार्यांकडून पंचाक्षरी विद्या घेतली व तप केले. त्या तपाने संतुष्ट होऊन शंकराने त्याला अभय दिले. दुर्बुद्धीची कन्या मद-करा हिच्याशी त्याने विवाह केला. त्याच्यापासून तिला सुंदरप्रिय आणि विषयप्रिय असे दोन पुत्र झाले. मत्सराने मग आपल्याला राज्याभिषेक करून घेतला, मोठे सैन्य जमा केले व त्या सैन्य-बळावर सारा भूलोक व पाताललोक पादाक्रांत केला. पुढे त्याने कैलासावरही आक्रमण केले. तिथे ठाण मांडून तो त्रैलोक्याचे राज्य करू लागला. या आपत्तीने भग्न आणि त्रस्त झालेल्या देवांनी गणेशाची प्रार्थना केली. ती ऐकून गणेशाने वक्रतुंड नामक अवतार धारण केला. या वक्रतुंडाशी गाठ पडताच मत्सरासुर भयकंपित झाला. वक्रतुंडाशी युद्ध न करता तो त्याला शरण गेला. अशा प्रकारे मत्सरासुर शांत झाला व देवही निर्भय झाले.

अश्विनी कुमारांना कोणत्याही यज्ञात हविर्भाग मिळत नसे. च्यवन ऋषीला त्यांनी नेत्र व तारुण्य दिले; म्हणून च्यवन ऋषीने शर्याती राजाच्या यज्ञात त्यांना हविर्भाग देण्याचे ठर-वले. तो यज्ञ चालू झाला असता इंद्राने त्यात विघ्न आणले. त्याचा पराभव करण्यासाठी च्यवन ऋषीने आपल्या तपोबलाने मदासुर नावाचा महाभयंकर पुरुष उत्पन्न केला. त्याला शक्ति-देवीने वरदान दिले. मग त्याने सर्व देवांचा पराभव केला. आणि गजाननाने एकदंत नामक अवतार घेऊन मदासुराला शरण आणले.

शंकर भिल्लिणीला भुलून तिच्या मागे लागला, तेव्हा मोहा-सुराचा जन्म झाला. त्याने सूर्याकडून वर मिळवले. मग त्याने मदिरा नावाच्या स्त्रीशी लग्न केले. तिच्या पोटी त्याला पाच पराक्रमी पुत्र झाले. पुढे त्याने त्रैलोक्य जिंकून सर्व देवांना संकटात लोटले. मग गणेशाने महोदर नामक अवतार घेऊन त्या महासुराला शांत केले.

शकुनीचा दुर्बुद्धी नावाचा पुत्र होता. त्याला गणेशाने विघ्न-हररूपाने ठार केले. दुर्बुद्धीचा पुत्र ज्ञानारी. तो आपल्या बापाच्या वधाचा सूड घेण्यासाठी प्रवृत्त झाला. त्याने तप करून सामर्थ्य मिळवले व देवांना त्रस्त व भयग्रस्त करून सोडले. त्या वेळी गणेशाने लक्ष्मीच्या उदरी जन्म घेतला. ज्ञानारीला सुबोध नावाचा पुत्र होता. तो मोठा गणेशभक्त होता. ज्ञानारीने त्याचा खूपच छळ केला. शेवटी गणेशाने त्या ज्ञानारीचा वध केला.

विष्णूच्या वीर्यापासून कामासुर नावाचा दैत्य निर्माण झाला. त्याने शंकराला प्रसन्न करून घेऊन त्याच्याकडून वर मिळवले. त्या बळावर त्याने त्रैलोक्य जिंकले व देवांना देशोधडीला लावले. मग सर्व देव मयूर क्षेत्री जाऊन गणेशाची सेवा करू लागले. ही वार्ता कळताच कामासुर आपले सैन्य घेऊन देवांशी युद्ध करा-यला निघाला. त्या वेळी ते संकट दूर करण्यासाठी गणेशाने विकट नावाचा अवतार घेतला आणि कामासुराला शरण आणले.

एकदा कुबेर कैलास पर्वतावर गेला. तिथे त्याला पार्वती दिसली. तिचे असामान्य रूपलावण्य पाहून कुबेर मोहित झाला व तिच्याकडे टक लावून पाहू लागला. त्याच्या या कृत्यातून लोभासुर निर्माण झाला. तो बलदंड होऊन जेव्हा त्रैलोक्याला गांजू लागला, तेव्हा गजाननाने त्याला पाताळात दडपले.

अभिनंदन नावाचा राजा हिमालयावर यज्ञ करीत होता. त्यात इंद्राला हविर्भाग द्यायचा नाही, असे त्याने ठरवले होते. इंद्राला हे समजताच त्याने काल नामक पुरुषाला त्या यज्ञाचा विध्वंस करण्यासाठी पाठवले. कालाने विघ्नासुर या रूपात पृथ्वीवरील सर्वच यज्ञांचा विध्वंस केला. या विघ्नासुराला नष्ट करण्यासाठी गणपतीने विघ्नराज हा अवतार घेतला.

भस्मासुराला मारण्यासाठी विष्णूने मोहिनीरूप घेतले. त्या मोहिनीला पाहून शंकर तिच्या मागे लागला. शेवटी विष्णूने आपले मूळ रूप दाखवताच शंकर खिन्न झाला. त्या प्रसंगी शंक-राचे वीर्य स्खलित झाले. त्यातून श्यामवर्ण आणि रक्तनेत्र असा क्रोधासुर जन्माला आला. तो जेव्हा ब्रह्मांडावर विजय मिळ-विण्यासाठी निघाला, तेव्हा गणपतीने लंबोदर अवतार धारण करून त्याला शांत केले.

शंकर सर्वस्वी आपल्या स्वाधीन आहे आणि आपल्यासारखी धन्य स्त्री त्रिभुवनात कोणीही नाही, अशा विचाराने पार्वती एकदा हसली. तिच्या या हास्यातून मयासुर नावाचा पुरुष

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निर्माण झाला व पुढे तो त्रैलोक्याला उपद्रव देऊ लागला. त्याला मारण्यासाठी गणेशाने विघ्नेश्वर हा अवतार घेतला.

धर्मध्न नावाच्या पुरुषाला यज्ञध्वक नांवाचा पुत्र झाला. तो जगाला भारी होत आहे, असे पाहून त्याचा वध करण्यासाठी गणेशाने शूर्पकर्ण नावाचा अवतार घेतला.

सूर्याला एकदा गर्व झाला. त्याला त्या वेळी जी शिंक आली, तिच्यातून अहं नावाचा असुर निर्माण झाला. गणेशाने धूम्रवर्ण नावाचा अवतार घेऊन त्या अहंला शरण आणले.

वरील कथा म्हणजे कामक्रोधादी षड्रिपूंवरची रूपके आहेत, हे स्पष्टपणे कळून येईल. [मंगलमूर्ती श्री गणेश; श्रीगणेशकोश.]

मुद्दुपळणी (इ. स. चे १८ शतक) एक तेलुगू कवयित्री. ही तंजाऊरच्या प्रतापसिंह राजाच्या दरबारातील एक वेश्या होती. हिच्या आईचे नाव मुत्यालू असे होते. हिचे संस्कृत व तेलुगू या भाषांवर प्रभुत्व होते. नृत्य आणि संगीतकला तिला चांगल्या अवगत होत्या. राधिका स्वांतनमू किंवा इलादेवीय या नावाचे एक काव्य हिने रचले आहे. ते शृंगारप्रधान असून, त्यात राधाकृष्णांच्या लीला वर्णिल्या आहेत. अनेक काव्यगुणांनी युक्त असलेले हे काव्य कुलीन स्त्रियांना वाचण्यास व ऐकण्यास सामाजिक बंदी आहे. हिची शैली साधी पण सुंदर आहे. तिच्या काव्यात म्हणी आणि लोकोक्ती यांचा वापर भरपूर प्रमाणात आढळतो. हिने जयदेवाच्या अष्टपदीचे तेलुगू भाषेत रूपांतर केले आहे. या अष्टपद्या मुळाइतक्याच सुंदर आणि काव्यमय आहेत, असे अनेक संगीततज्ज्ञांचे मत आहे. [ग्रे. बी. इं.; ते. सा. इ.; म. ज्ञा. को.; ते. वा.]

मुद्रणकला मुद्रणकलेचा शोध प्रथम कुणी व केव्हा लावला याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही. मात्र तो कुठे लागला हे सांगता येते. कागदाचा शोध जसा प्रथम चीनमध्ये लागला, तसा मुद्रणकलेचा शोधही चीनमध्येच लागला. सुमारे दीड ते दोन हजार वर्षांपूर्वी लाकडावर बुद्धाची चित्रे कोरून व त्यांना शाई लावून त्यांचे कागदावर ठसे घेण्याची पद्धत चीनमध्ये प्रचलित होती. हळूहळू चित्रांप्रमाणेच अक्षरेही लाकडावर उलटी कोरण्यात येऊ लागली व हे ठसे वापरून कागदाच्या लांब सुरळचांवर पुस्तके छापली जाऊ लागली.

चीनच्या पश्चिमेकडील डोंगरातली सहस्रबुद्धांची गुंफा इ. स. १०३५ साली, तिच्या मुखावर भिंत बांधून बंद करण्यात आली होती. त्यापूर्वी ही गुहा म्हणजे एक बौद्ध विहार होता. तिथे बौद्ध धर्मविषयीचे ग्रंथ असावे, अशा कल्पनेने ९०० वर्षांनंतर म्हणजे इ. स. १९०७ साली ती गुंफा उघडण्यात आली, तेव्हा तिच्यात तीन हजार सुरळचांचे मुद्रित ग्रंथ सापडले. त्यांतील काही ग्रंथांवर मुद्रणकाल छापलेले होते. त्यांपैकी सर्वांत जुना मुद्रणकाल 'हीरकसूत्र' नावाच्या एका ग्रंथावर आढळला. तो ११ मे ८६८ असा होता. "वाँग चियेह नावाच्या एका गृहस्थाने पितरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विनामूल्य वाटण्यासाठी हा ग्रंथ छापला" असा त्यात उल्लेख आहे. हे सर्व ग्रंथ लंडनच्या ब्रिटिश म्युझियममध्ये उपलब्ध आहेत.

हे ग्रंथ ठोकळचांवर अक्षरे कोरून छापल्यावर ठोकळे निकामी होत. एकेक अक्षराचाच एकेक ठोकळा असता तर त्यांची नवी जुळणी करून नवे ग्रंथ छापता आले असते. ही कल्पना सुचल्यावर चिनी कारागीर एकेका अक्षराचा एकेक ठसा बनवू लागले. पी शेंग नावाच्या माणसाने इ. स. च्या अकराव्या शतकाच्या सुमारास ओल्या मातीचे ठसे तयार करून व ते भट्टीत भाजून पक्के करायचा शोध लावला. त्यानंतर ठोकळचांसाठी मातीऐवजी लाकूड व मग धातू यांचा वापर चीनमध्ये होऊ लागला.

चीनमध्ये मुद्रणकलेचा प्रथम शोध लागला असला, तरी आजच्या आधुनिक मुद्रणकलेशी मात्र चीनमधील त्या कलेचा काही संबंध नाही. आधुनिक मुद्रणकलेचा उगम युरोपमध्ये झाला. युरोपमध्ये लाकडी ठोकळे कोरून चित्रे छापायची कला इ. स. च्या १३ व्या व १४ व्या शतकात प्रचलित होती. प्रथम बावन पानी पत्त्यांसाठी व नंतर संतांच्या चित्रांसाठी ठोकळे करण्यात येत. पुढे संतांच्या चित्राखाली, ते चित्र कोणत्या संताचे आहे हे ओळखण्यासाठी, त्या संताचे नाव त्याच ठोकळचावर कोरून ठसे घेण्यात येऊ लागले. अशा ठोकळा-छपाईचे आज सर्वांत जुने चित्र उपलब्ध आहे ते इ. स. १४२३ साली छापलेले संत ख्रिस्तोफरचे. हे चित्रही ब्रिटिश म्युझियमच्या संग्रहात आहे. या ठोकळा-छाप-छपाई-पद्धतीला पुढे शिलोग्राफी असे नाव देण्यात आले. चित्राप्रमाणेच ठोकळचांवर अक्षरे कोरून प्रथम बायबलमधील थोडा मजकूर व नंतर संपूर्ण बायबलच छापण्यात येऊ लागले. या सुटचा छापील पानांची मग पुस्तके बांधण्यात येऊ लागली. या शिलोग्राफिक पद्धतीने मुद्रित झालेले Biblia Pauperum म्हणजे 'गरिबांचे बायबल' हे युरोपात फार लोकप्रिय झाले. जॉन विक्लिफ नावाच्या इंग्रज मुद्रकाने ते छापले होते.

ठोकळा-छाप पद्धतीच्या मुद्रणात जी अडचण चिनी मुद्रकांपुढे होती, तीच आता युरोपियन मुद्रकांपुढेही उभी राहिली. प्रत्येक अक्षराचा सुटा ठोकळा केला तर ? हा प्रश्न चिनी मुद्रकांनी चार शतकांपूर्वी सोडविला होता. परंतु दळणवळणाच्या साधनांच्या अभावी चीनमधला हा शोध युरोपपर्यंत जाऊ शकला नव्हता. शेवटी युरोपातच दोन वेगळचा ठिकाणी दोन माणसांनी साधारण एकाच वेळी आधुनिक खिळाछाप (Typography)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुद्रणकलेचा शोध लावून हा प्रश्न सोडविला. लॉरेन्स कॉस्टर व जोहान गटेनबर्ग ही या दोन संशोधकांची नावे होत.

हॉलंडमधील हार्लेम गावी कॉस्टरची खाणावळ होती. त्याने इ. स. १४४० साली धातूचे टाइप पाडून, १४४१ साली आमच्या मुक्तीचा आदर्श हे जे पुस्तक छापले, ते खिळाछाप पद्धतीने मुद्रित केलेले पहिले पुस्तक होय, असे बऱ्याच तज्ज्ञांचे मत आहे. कॉस्टरने छापलेल्या सर्व पुस्तकांची सुरुवातीची व शेवटची पृष्ठे नष्ट झाल्यामुळे त्यांचा मुद्रणकाल उपलब्ध नाही. तरीसुद्धा अंतर्गत पुराव्यांवरून कॉस्टरलाच अमेरिकन तज्ज्ञांनी पहिल्या मुद्रण-संशोधकाचा मान दिला आहे. गटेनबर्ग हा पहिला संशोधक समजून, जगातील इतर राष्ट्रांनी १९५६ साली मुद्रणकलेची पंचशताब्दी साजरी केली; पण त्यापूर्वी १६ वर्षे म्हणजे १९४० साली अमेरिकेने ती साजरी केली.

युरोपियन तज्ज्ञ कॉस्टरऐवजी गटेनबर्गला मुद्रणकलेचा जनक मानतात. कॉस्टरच्या कारखान्यात काम करणाऱ्या एका कामगाराने त्याची कला चोरली व ती गटेनबर्गला विकली, अशी दंतकथा सांगितली जाते, ती गटेनबर्गच्या चाहत्यांना मान्य नाही. त्यांच्या मते गटेनबर्ग इ. स. १४३४ पासून मुद्रणकलेच्या शोधात होता व १४४४ च्या सुमारास आपल्या शोधात तो यशस्वी झाला. त्याचे अल्पचरित्र उपलब्ध आहे, त्यावरून हे विधान निश्चयाने करता येते.

जर्मनीतील मेंज या गावी इ. स. १४०० या वर्षी गनेटबर्ग जन्माला आला. १४३४ मध्ये तो स्ट्रासबर्गला राहत होता. त्या वेळी काही गुप्त विद्येच्या शोधासाठी गावातल्या काही सावकारांकडून त्याने कर्जाऊ रकमा घेतल्या होत्या व त्यांना ती गुप्त विद्या शिकण्याचा करार केला होता, असा पुरावा उपलब्ध आहे. १४४४ ते १४४७ च्या दरम्यान गटेनबर्गने काही पुस्तके प्रयोग म्हणून छापली. त्यांतल्या 'शेवटचा निकाल' या पुस्तकाची काही पाने मेंज येथील म्युझियममध्ये ठेवलेली आहेत. परंतु १४५६ पर्यंत त्याने छापलेल्या कोणत्याही पुस्तकाचा मुद्रणकाल निश्चितपणे उपलब्ध नाही.

इ. स. १४५० साली गटेनबर्ग पुन्हा मेंज गावी राहायला आला व तिथेच त्याने आपला छापखाना उभारला. १४५६ साली त्याने बायबलची छपाई पूर्ण केली. या ग्रंथावर मुद्रणकाळ छापलेला नाही, परंतु १५ ऑगस्ट १४५६ रोजी बांधणीचे काम पूर्ण झाले असा शेरा असून, मेंज गावचे व्हिकार हेन्रिकुस क्रेमर यांची मान्यतादर्शक सही असलेली प्रत उपलब्ध आहे.

हे बायबल म्हणजे एक प्रचंड ग्रंथ होता. त्याची १३०० पृष्ठे असून, ते दोन भागांत बांधलेले आहे. पॅरिसमधील मॅझारिन नावाच्या एका धर्मोपदेशकाच्या घरी त्याची एकुलती एक प्रत उपलब्ध झाली, म्हणून 'मॅझारिन बायबल,' प्रत्येक पृष्ठावर दोन स्तंभांत प्रत्येकी ४२ ओळी छापल्या म्हणून '४२ ओळींचे बायबल', गटेनबर्गने छापले म्हणून 'गटेनबर्ग बायबल' आणि मेंजच्या म्युझियममध्ये ठेवले म्हणून 'मेंज बायबल' अशा नावांनी हे बायबल ओळखले जाते.

इ. स. १४६८ साली गटेनबर्ग वारला व मेंजच्या दफनभूमीत त्याचे दफन केले तेव्हा, जगातल्या सर्व देशांच्या व भाषांच्या सन्मानास पात्र झालेला, मुद्रणकलेचा संशोधक जोहान गटेनबर्ग, असे वाक्य कोरलेली शिला त्याच्या थडग्यावर ठेवण्यात आली.

कॉस्टर व गटेनबर्ग जेव्हा मुद्रणकलेच्या शोधात होते, तेव्हा ही एक गुप्त विद्या असे समजले जाई. परंतु इ. स. १४५० नंतरच्या २५ वर्षांत साऱ्या युरोपात व नंतर सर्व जगभर तिचा प्रसार झाला. प्रथम बायबले व नंतर इतर पुस्तके छापखान्यांतून बाहेर पडू लागली.

मुद्रणकलेच्या शोधानंतर १०० वर्षांनी तिने भारतात प्रवेश केला. हा प्रवेश म्हणजे एक योगायोगाची गोष्ट होती. मुद्दाम प्रयत्नपूर्वक भारतात मुद्रणकलेचा प्रसार करावा म्हणून मुद्रणालयाची स्थापना झाली नाही.

इ. स. १४९८ साली वास्को द गामाने भारताचा जलमार्ग शोधून काढल्यावर, पोर्तुगीज लोकांनी आशियात व आफ्रिकेत काही मुलुख पैदा केले व त्या ठिकाणी स्थानिक लोकांचे धर्मांतर घडवून आणण्यास प्रारंभ केला. या कामासाठी मिशनऱ्यांना बायबल, प्रार्थना, ख्रिस्ती धर्माची मूलतत्त्वे वगैरे ग्रंथांची गरज भासू लागली. या काळात युरोपमध्ये हे धर्मग्रंथ छापील स्वरूपात उपलब्ध होते. परंतु पोर्तुगीजांनी पादाक्रांत केलेल्या प्रदेशात त्यांचा पुरवठा गरजेइतका होत नव्हता. म्हणून ठिकठिकाणच्या मिशनऱ्यांकडून छापखानेच पाठविण्याबद्दल पोर्तुगालच्या राजाकडे मागणी होऊ लागली.

इथियोपियाच्या आर्चबिशपच्या मागणीनुसार असा एक छापखाना २९ मार्च १५५६ या दिवशी जहाजावर चढविण्यात आला. इथियोपियाचा आर्चबिशप दॉं जुआंव नूनिश बार्रेत स्वत: जातीनिशी हा छापखाना बरोबर घेऊन निघाला होता. त्याने दोन मुद्रक व एक मिस्त्री असे तीन तज्ज्ञ बरोबर घेतले होते. जुआंव गोंसाल्व्हिस हा तरुण छापखाना उभारण्यात व खिळे पाडण्याच्या कलेत निष्णात होता. त्याला घड्याळेही तयार करता येत. गोव्याच्या सेंट-पॉल कॉलेजसाठी त्याने एक मोठे घड्याळ तयार केले होते, असा उल्लेख सापडतो.

जुआंव द बुस्तामांती हाही पोर्तुगीज मुद्रक मिशनरी शिक्षण घेणारा तरुण होता. दुसरा मुद्रक हा गोमंतकीय नवख्रिस्ती होता. त्याचे नाव किंवा इतर ठावठिकाण उपलब्ध नाही. खुद्द पोर्तु-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शालचे बादशहा तिसरे दाँ जुआंव यांनी एक हुशार मुद्रक म्हणून त्याची शिफारस केली होती. म्हणून इथियोपियाच्या आर्च-



इ. स. १६ व्या शतकातील युरोपातला छापखाना

बिशपने त्याला बरोबर घेतले होते. हुशार मदतनीस म्हणून नंतर त्याचा उल्लेख तत्कालीन कागदपत्रांत आढळतो.

पोर्तुगालहून हा छापखाना घेऊन निघालेले जहाज, अरबी समुद्रात वादळ झाल्यामुळे काफिल्यातील इतर जहाजांप्रमाणे गोव्याकडे वळविण्यात आले आणि दि. ६ सप्टेंबर १५५६ रोजी गोवा बंदरात छापखाना उतरविण्यात आला. पुढे इथियोपियाच्या बादशहाने आपल्या राज्यात छापखाना उभारण्यासच बंदी केल्यामुळे तो कायमचा गोव्यात राहिला. सेंट पॉल कॉलेजमध्ये त्याची ताबडतोब जुळवाजुळव करण्यात आली आणि दि. १८ ऑक्टोबर १५५६ या दिवशी त्यातून Conclusoes नावाचे एक पत्रक छापण्यात आले. दिनांक १९ ऑक्टोबर या दिवशी सेंट पॉल कॉलेजातील दोन विद्यार्थी आणि रिबेयरू नावाचा पाद्री यांची एका सेमिनारमध्ये जी भाषणे होणार होती, त्यांतील मुद्दे त्या पत्रकात छापण्यात आले होते. हे पत्रक म्हणजे भारतात छापलेले पहिले मुद्रित होय.

पुढल्याच वर्षी या मुद्रणालयात भारतातले पहिले पुस्तक मुद्रित झाले. आशियात ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठी जे मिशनरी झटले, त्यांतला अग्रगण्य असा सेंट फ्रान्सिस झेवियर याने 'दौत्रिन क्रिस्तां' नावाचे एक पुस्तक मुलांना धार्मिक शिक्षणासाठी उपयोगी पडावे म्हणून लिहिले होते, तेच हे पहिले मुद्रित पुस्तक होय. 'कोंक्लुझांईश' हे पुस्तक काय किंवा 'दौत्रिन क्रिस्तां' हे पुस्तक काय, दोन्ही आज कुठेही उपलब्ध नाहीत. गोव्यातल्या या मुद्रणालयात मुद्रित झालेले जुन्यातले जुने पुस्तक उपलब्ध आहे, ते न्यूयॉर्क पब्लिक लायब्ररीत. Compendio Espiritual de Fe Christaw असे त्या पुस्तकाचे नाव असून, गोव्याचे तत्कालीन आर्चबिशप गास्पर द लियांव यांनी ते लिहिले होते. इ. स. १५६१ मध्ये जुआंव द किर्केसियू या मुद्रकाने ते छापले.

सेंट पॉल कॉलेजमधील हा छापखाना १६ वर्षे चालला व इ. स. १५७३ साली बंद पडला. या काळात फक्त लॅटिन व पोर्तुगीज भाषांतली पुस्तकेच तिथे छापली गेली. मात्र इ. स. १५६१साली स्थानिक भाषेत सेंट झेवियरच्या 'दौत्रिन क्रिस्तां'चे भाषांतर छापण्यात आले होते, असा उल्लेख सापडतो. पण स्थानिक भाषेत म्हणजे कोणत्या भाषेत, मराठीत की कोकणीत ते छापले होते, हे स्पष्ट कळत नाही. मात्र एक गोष्ट निश्चित, की भाषा कोणतीही असली तरी, लिपी मात्र रोमन होती. कारण या वेळी आणि नंतरही देशी भाषेतील अक्षरांचे खिळे गोव्यात तयार झालेच नाहीत.

स्थानिक लोकांना व विशेषतः मुलांना ख्रिस्ती धर्माचे शिक्षण त्यांच्या भाषेतून दिले पाहिजे, हे तत्त्व ख्रिस्ती धर्ममंडळाने स्वीकारले होते. परंतु देशी भाषेतील धर्मपुस्तके कोणत्या लिपीतून छापावी, हा मिशनऱ्यांपुढे मोठाच प्रश्न होता. देशी भाषेतील अक्षरांचे खिळे तयार करण्याचा विचार, त्या लिपीच्या चमत्कारिक वळणामुळे जुआंव गोंसाल्व्हिसने सोडून दिला होता. दरम्यान तमिळ भाषेतील पुस्तके रोमन लिपीत छापण्याचा एक प्रयोग ट्रांकेबारकडे करण्यात आला होता. तो यशस्वी झाल्यामुळे गोव्यातही त्याचे अनुकरण झाले असावे. परंतु हा प्रयत्न त्या वेळी गोव्यात प्रयोगावस्थेत असावा. कारण इ. स. १५५६ ते १५७२ या काळात देशी भाषेत फक्त एकच पुस्तक छापले गेले.

इ. स. १५७३ साली गोवा शहरातील हा छापखाना बंद का पडला याची कारणे कळत नाहीत. बुस्तामांती व गोंसाल्व्हिस हे मुद्रणव्यवसाय सोडून धर्मोपदेशकाच्या व्यवसायात शिरल्यामुळे तो बंद पडला म्हणावे, तर त्यांनी शिक्षण देऊन तयार केलेले त्याचे सहकारी होतेच. कसेही असो १५७३ ते १६१५ पर्यंतच्या काळात गोव्यातील मुद्रणकला लुप्त झाली होती.

इ. स. १६१६ साली राशॉल किंवा रायचूर या गावातल्या सेंट लॉरेन्स कॉलेजमध्ये छापखाना सुरू झाला व त्यात मुद्रणाला पुन्हा प्रारंभ झाला. हा छापखाना मूळचा गोवा शहरातला होता, की तो नव्यानेच आणला होता, हे कळत नाही. या छापखान्यातून पहिलाच ग्रंथ छापला गेला तो फादर स्टीफन्सचा सुप्रसिद्ध ख्रिस्तपुराण हा मराठी ग्रंथ होय. त्याची लिपी मात्र रोमन होती. हा छापखाना पुढे इ. स. १६६० साली बंद पडेपर्यंतच्या ४४ वर्षांत सुमारे ४०–४५ ग्रंथ तिथे छापण्यात आले. त्यांतले १९ ग्रंथ पोर्तुगीजमध्ये व १९ कोकणीत व मराठीत होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोकणी ग्रंथांत 'क्रिस्तांवांच्या दौत्रीनीचो अर्थ' हा पाद्री दियोगु रिबेयरुकृत (१६३२) व मराठी ग्रंथांत एतियँ दला कुवायाचे पीटर पुराण (१६२९) आणि पाद्री आंतोनियु द साल्दांज यांचा सांतु आंतोनीची जीवित्वकथा (१६५९) हे महत्त्वाचे ग्रंथ होत. पाद्री साल्दांज यांचा हा ग्रंथ म्हणजे गोव्यातील छापखान्यात छापला गेलेला शेवटचा मराठी ग्रंथ होय. त्यानंतर इ. स. १६६० साली Soliloquios Divinos (देवाची एकाग्र बोलणी) हा ग्रंथ छापला गेल्यावर सदर छापखाना बंद पडला व अशा प्रकारे मुद्रणकलेच्या भारतप्रवेशाचे पहिले पर्व संपले.

यानंतरचे पर्व म्हणजे भारतीय भाषांतील ग्रंथांच्या मुद्रणाचे. या क्षेत्रात पहिला प्रयत्न पोर्तुगीजांनीच केला. गोव्यातील पहिला छापखाना उभारणारा जुआंव द गोंस्ताल्व्हिस याने देवनागरी लिपीतील अक्षरांचे खिळे तिच्या चमत्कारिक वळणामुळे तयार करण्याचे सोडून दिले, तरी मलयाळम भाषेतील अक्षरांचे खिळे मात्र त्याने तयार केले व सेंट झेवियरच्या दौत्रिन क्रिस्तांचे मलयाळम भाषांतर इ. स. १५७७ साली छापले. देशी लिपीत छापलेले भारतीय भाषांतले हे पहिले पुस्तक होय.

इ. स. १६६० मध्ये गोव्यातील दुसरा छापखाना बंद पडल्यानंतर पोर्तुगीज मिशनऱ्यांनी मुद्रणकलेकडे अजिबात दुर्लक्ष केले. याचे कारण म्हणजे 'इन्क्विझीशन'ची त्याच वर्षी झालेली स्थापना, हे असावे. इन्क्विझीशन या पोर्तुगीज राज्यकर्त्यांनी स्थापन केलेल्या धर्मसमीक्षण सभेचा, हिंदुधर्म, स्थानिक भाषा व चालीरीती वगैरे गोष्टींना कडवा विरोध होता. म्हणून पूर्वीचे स्थानिक भाषांतून धर्मप्रसार करण्याचे धोरण बदलल्यामुळे छापखान्यांतून देशी भाषांतील मुद्रणाची गरज राहिली नाही. म्हणून पोर्तुगीजांनी मुद्रणकलेकडे दुर्लक्ष केले असावे.

पोर्तुगीजांनंतर अवघ्या दहाच वर्षांनी भारतात मुद्रणव्यवसायाकडे लक्ष पुरविले ते मुंबईच्या भीमजी पारेख नावाच्या एका एतद्देशीय गृहस्थाने. या गृहस्थाला देशी भाषांत ग्रंथ मुद्रित करण्याची कल्पना स्फुरली आणि त्याने कंपनी सरकारमार्फत इंग्लंडहून एक छापखाना मागवून इ. स. १६७४ मध्ये तो सुरू केला. वार्षिक ५० पौंड वेतनावर हेन्री हिल्स नावाच्या एका इंग्रज मुद्रकाला विलायतेहून बोलावून त्याने नोकरीवर ठेवले. परंतु या मुद्रकाला 'बनिया' (गुजराती) भाषेचे खिळे पाडता येत नाहीत. किंबहुना त्याला टाईप तयार करण्याची कलाच माहित नाही; तो फक्त टाइपांची जुळणी करून कागद छापू शकतो, हे कळून येताच भीमजीची निराशा झाली.

हा छापखाना भीमजीने विलायतेहून मागविलेला नसून मुद्रणकलेचे महत्त्व ओळखून शिवाजीमहाराजानी मागविला होता; परंतु तो चालवू शकणारा तज्ज्ञ उपलब्ध न झाल्यामुळे महाराजांनी तो भीमजीला विकला, अशी माहिती कन्हैयालाल मुनशी यांनी दिली आहे. परंतु या माहितीला पोषक असा पुरावा तत्कालीन कागदपत्रांत अजून उपलब्ध झाला नाही.

भीमजीचा हा छापखाना किती काळ चालला किंवा त्यात किती व कोणते ग्रंथ मुद्रित झाले याची माहिती उपलब्ध नाही. कंपनी सरकारच्या पत्रव्यवहारात मात्र भीमजीच्या छापखान्यात 'बनिया' लिपीत छापलेल्या काही कागदांचा उल्लेख सापडतो. पण ते टाइप कुणी तयार केले व मुद्रण कुणी केले याचा पत्ता लागत नाही.

पोर्तुगीजांचा गोव्यातला व भीमजीचा मुंबईतला छापखाना बंद पडल्यानंतर भारतातल्या मुद्रणव्यवसायाचे केंद्र पश्चिम किनाऱ्याकडून पूर्व किनाऱ्याकडे झुकले. इ. स. १७०६ साली बार्थोलोम्यू झिगनबाग व हेन्री प्लुटोचा नावाचे दोन डॅनिश मिशनरी भारतात आले व मद्रासमधील ट्रांकेबार शहरी स्थायिक झाले. धर्म प्रसारासाठी धार्मिक पुस्तके हवीत, या नेहमीच्या कारणासाठी त्यांनी आपल्या मायदेशाहून छापखाना मागविला. जॉनास किंचे नावाच्या मुद्रकासह छापखाना जहाजावर चढला. परंतु जहाजे केप ऑफ गुड होपला पोचली, तेव्हा काही आजार होऊन किंचे मरण पावला व मुद्रकाविना पोरका झालेला छापखाना ट्रांकेबारला येऊन पोचला. ईस्ट इंडिया कंपनीतील एका शिपायाला मुद्रणकला थोडीशी अवगत होती. त्याच्या मदतीने तो छापखाना उभारून चालू करण्यात आला. प्रथम रोमन लिपीत काही पुस्तके छापण्यात आली. नंतर तमिळ भाषेच्या लिपीचे खिळे जर्मनीतून तयार करून आणले गेले. त्यांचा उपयोग इ. स. १७१६ मध्ये झिगनबागच्या 'तमिळ भाषेचे व्याकरण' या ग्रंथात प्रथम करण्यात आला. हे व्याकरण लॅटिनमध्ये लिहिलेले होते व तमिळ शब्द तमिळ लिपीत छापलेले होते. श्रीरामपूरच्या कॉलेजमध्ये आजही या ग्रंथाची प्रत उपलब्ध आहे.

त्यानंतर याच छापखान्यात झिगनबागचाच तमिळ बायबल हा ग्रंथ इ. स. १७२३ मध्ये संपूर्ण तमिळ लिपी वापरून छापण्यात आला. पूर्णपणे देशी लिपी वापरून छापलेला भारतीय भाषांतला हा पहिला ग्रंथ होय.

याच डॅनिश मिशनमधील फ्रेडरिक श्वॉर्ट्झ नावाच्या एका मिशनऱ्याशी संबंध आल्यामुळे तंजाऊरचे सर्फोजीराजे भोसले यांना मुद्रणकलेविषयी कुतूहल वाटू लागले. त्यांनी आपल्या राज्यात एक छापखाना काढला व भारतीय लिप्यांचे खिळे वापरून भारतीय भाषांतील पुस्तके छापण्याचा उद्योग आरंभिला. इ. स १८०६ साली या छापखान्यात इसापच्या नीतिकथांचे एक मराठी पुस्तक छापले गेले.

सर्फोजीचा मुख्य प्रधान सरवण्णा पंडित याने मूळ कथा भाषां-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्वरित केल्या होत्या. ब्रिटिश म्युझियममध्ये त्याची एक प्रत उपलब्ध आहे. देवनागरी खिळ्यांचा वापर केलेले मराठीतले हे दुसरे आणि संपूर्ण देवनागरी लिपी वापरून छापलेले हे मराठीतले पहिले पुस्तक होय. त्यापूर्वी फक्त एकच वर्ष बंगालमधील श्रीरामपूर गावी मराठी भाषेचे व्याकरण या ग्रंथात देवनागरी लिपीचा वापर करण्यात आला होता. परंतु त्यात मराठी वाक्यांचे अर्थ इंग्रजीत देताना रोमन लिपी वापरली होती. म्हणून या पुस्तकाला मिश्र पुस्तक म्हणावे लागेल. मात्र मराठीचे खिळे वापरून छापलेले हे पहिले पुस्तक होय.



OF VERBS.

Sing.

Fem.

1. मीं होत होते. *I was existing.*
2. तूं होत होतीस, *thou wast existing.*
3. ती होत होती, *she was existing;*
Neut. ते होत होत, *it was existing.*

Plur.

1. आम्ही होत होतों, *we were existing.*
2. तुम्ही होत होतेत, *ye were existing.*
3. ते होत होतेत, Fem. त्या होत होत्यात.
Neut. ती होत होतीत, *they were existing.*

'मराठी भाषेचे व्याकरण' यातील काही भाग

मद्रासमध्ये मुद्रणकलेची घडी बसल्यानंतर या क्षेत्रात भारतात जे तिसरे केंद्र निर्माण झाले, ते बंगालमध्ये. मराठीतले पहिले पुस्तक महाराष्ट्रात छापले न जाता, ते बंगाल प्रांतात छापले गेले. तसेच हिंदी, पंजाबी, गुजराती, उर्दू वगैरे अनेक भारतीय भाषांतली सुरुवातीची पुस्तके त्या त्या भाषांच्या प्रांतात छापली न जाता बंगालमध्ये छापली गेली.

बंगालमध्येच मुद्रणकलेचे तिसरे केंद्र निर्माण करण्याचे श्रेय सर चार्लस विल्किन्स या इंग्रज गृहस्थाकडे जाते. प्रथम त्याने बंगाली लिपीचे टाईप स्वतः तयार केले व हॉलहेड याचे बंगाली व्याकरण इ. स. १७७८ मध्ये छापले. बंगालीतील हा पहिला मुद्रित ग्रंथ होय.

पुढे स्वतः लिहिलेले संस्कृत व्याकरण छापण्यासाठी विल्किन्स याने देवनागरी खिळे तयार केले. परंतु त्याच्या घराला अकस्मात आग लागून नव्या खिळ्यांसह सारा छापखानाच नष्ट होऊन गेला. काही पंचीस व मेट्रिसा वचावल्या, त्या घेऊन तो विलायतेला गेला व तिथे पुन्हा टाईप पाडून इ. स. १८०८ मध्ये त्याने आपले संस्कृत व्याकरण छापून काढले.

देवनागरी खिळे तयार करताना पंचानन कर्मकार नावाच्या एका भारतीय लोहाराची मदत विल्किन्सने घेतली होती. या पंचाननाने मनोहर नावाच्या आपल्या एका मित्रालाही टाईप पाडण्याच्या तंत्रात तरबेज केले. पण विल्किन्स विलायतेला निघून गेल्यावर पंचानन व मनोहर बेकार झाले. इतक्यात इ. स. १७९३ साली भारतात आलेल्या डॉ. विल्यम कॅरे या मिशनऱ्याशी त्यांची गाठ पडली. कलकत्त्याजवळ मदनवटी येथे १७९८ त कॅरेने एका नव्या छापखान्याची उभारणी केली. नंतर दोन वर्षांनी श्रीरामपूरच्या डच वसाहतीत त्याने हा छापखाना हालविला आणि मनोहर व पंचानन यांच्या साहाय्याने देवनागरी, मोडी, मराठी, गुजराती, बंगाली, कानडी, उर्दू वगैरे लिप्यांचे टाईप पाडून या व इतर अनेक भाषांत बायबलची भाषांतरे छापण्याचा सपाटा चालविला. याशिवाय कोश, व्याकरणे व इतर पुष्कळ ग्रंथ कॅरेने आपल्या ३२ वर्षांच्या कारकिर्दीत छापून काढले. इ. स. १८०२ साली पंचानन मरण पावला. पण त्यानंतर एकट्या मनोहरने निरनिराळ्या भाषांचे वीस हजार खिळे तयार करून कॅरेला मदत केली.

छापखान्याचे तांत्रिक काम करण्यासाठी कॅरेने भारतीय कारागिरांची जशी मदत घेतली, त्याचप्रमाणे निरनिराळ्या भाषांतील पुस्तके तयार करण्याच्या कामी शास्त्रीपंडितांनाही जवळ केले. स्वतः डॉ. कॅरे अनेक भारतीय भाषा शिकला. नागपूरकडल्या वैद्यनाथ शास्त्री तथा वैजनाथ शर्मा नावाच्या एका

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पंडिताचा डॉ. कॅरेला या कामी विशेष उपयोग झाला. त्याच्या मदतीनेच कॅरेने मराठीचे व्याकरण इ. स. १८०५ साली मुद्रित केले. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात हे पुस्तक उपलब्ध आहे. त्यानंतर बायबलचा पहिला भाग (१८०७), मराठी-इंग्रजी कोश (१८१०), मंगल समाचार म्हणजे न्यू टेस्टामेंट (१८११), सिंहासन बत्तिशी (१८१४) वगैरे अनेक मराठी ग्रंथ कॅरेने छापून काढले.

इ. स. च्या १९ व्या शतकाच्या सुरुवातीस अशा प्रकारे डॉ. कॅरेने भारतीय भाषांत ग्रंथछपाई करण्याचा प्रचंड उद्योग केला. त्या त्या भाषेच्या प्रांतांत त्या पुस्तकांचा प्रसार झाला आणि त्यामुळे लवकरच भारतात ठिकठिकाणी छापखान्यांची उभारणी होऊ लागली. म्हणूनच डॉ. कॅरे यालाच भारतातील मुद्रणकलेचा प्रणेता मानले पाहिजे. कॅरेप्रमाणेच त्याचे सहकारी पंचानन, मनोहर व वैद्यनाथ शास्त्री यांनाही मुद्रणकलेचा विकास व विस्तार करण्याचे श्रेय द्यावे लागेल.

बंगालमध्ये सर चार्लस विल्किन्स व डॉ. कॅरे यांचे कार्य चालू असतानाच मुंबईमध्येही या क्षेत्रात प्रयत्न सुरू झाले होते. इ.स.च्या १७ व्या शतकातील भीमजी पारेखचा छापखाना बंद पडल्यावर सुमारे शंभर वर्षांनंतर मुंबई शहरातील रुस्तुम खरसेटजी नावाच्या एका पारशी गृहस्थाने एक छापखाना सुरू केल्याचा उल्लेख सापडतो. इ.स. १७८० सालचे एक पंचांग किंवा कॅलेंडर छापून त्याने ते दोन रुपये दराने विकले होते. परंतु या छापखान्याची अधिक माहिती मिळत नाही.

इ. स. १७९० साली मुंबईत दोन छापखाने निघाले. एक बॉंबे गॅझेटचा व दुसरा कुरियरचा. या छापखान्यांत फक्त रोमन लिपी-चेच खिळे असल्यामुळे प्रथमतः त्यांतून इंग्रजी वृत्तपत्रे व पुस्तके छापली जात. इ. स. १७९३ मध्ये मुंबईत पहिले इंग्रजी पुस्तक छापले गेले. त्याची पृष्ठसंख्या १७१ होती. त्याचे नाव असे होते– Remarks and occurances of Mr. Henry Bechar during his imprisonment of two years & half in the Dominions of Tipoo Sultan from where he made his Escape. हे पुस्तक सेंट झेवियर कॉलेजच्या संग्रहात उपलब्ध आहे.

खुद्द महाराष्ट्रात छापलेले पहिले मराठी पुस्तक म्हणजे 'पंचोपाख्यान' हे होय. इ. स. १८२२ साली कुरियर छापखान्यात ते छापले गेले. विल्किन्सने इंग्लंडमध्ये जे देवनागरी टाईप पाडले होते, ते कुरियर प्रेससाठी मागविण्यात आले आणि विदुरनीती (१८२३), सिंहासनबत्तिशी (१८२४) वगैरे, पुस्तके याच टायपात छापण्यात आली. केनेडीचा कोश (१८२४), महाराष्ट्र भाषेचा कोश (१८२९), मोल्स्वर्थचा कोश (१८३१) हे मुंबईत छापले गेलेले काही मोठे व महत्त्वाचे ग्रंथ होत.

मुंबईत इ. स. १८१२ नंतर भराभर छापखाने निघाले. मुंबई समाचार (१८१२), अमेरिकन मिशन (१८१३), चाबुक (१८२२), जामे जमशेद (१८२८), गणपत कृष्णाजी (१८३१), गव्हर्न्मेंट सेन्ट्रल (१८३१), दर्पण (१८३५), प्रभाकर (१८४०) हे सुरवातीचे काही छापखाने होत. यांपैकी मुंबई समाचार, जामे जमशेद व सरकारी सेन्ट्रल प्रेस अद्‌नही चालू आहेत. अमेरिकन मिशनने ख्रिस्ती धर्मप्रचारा-साठी शेकडो पुस्तके छापून पैसा-दोन पैशांना विकली. दर्पण व प्रभाकर यांनी तर मराठी भाषेचा इतिहास घडविला. पण मराठी मुद्रणाच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्व गणपत कृष्णाजीलाच दिले पाहिजे. अमेरिकन मिशन प्रेसमध्ये प्रथम तो कामाला होता. परंतु तिथे ख्रिस्ती धर्मप्रसारासंबंधीची पुस्तके छापली जातात व ती छापखाण्याच्या कामी आपला हातभार लागतो, हे पाप आहे, असे वाटून त्याने तिथली नोकरी सोडली व स्वतः खिळे तयार करून स्वतःचा छापखाना उघडला. मुद्रणयंत्र व छपाईची शाईही त्याने स्वतःच तयार केली. या छापखान्यात त्याने मग हिंदूधर्मविषयक पुस्तके छापायला प्रारंभ केला. हा छाप-खाना इ.स. १९१४ पर्यंत चालू होता. या मुदतीत अक्षरशः हजारो पुस्तके त्यातून बाहेर पडली. पहिल्या पन्नास वर्षांत गणपत कृष्णाजीचा छापखाना म्हणजे मराठी भाषा व साहित्य यांना फार मोठा आधार होता. त्या काळातली कित्येक नियतकालिके व पुस्तके याच छापखान्यातून छापली गेली.

गणपत कृष्णाजीपूर्वी सुमारे ४० वर्षे हिंदूधर्मविषयक पुस्तके छापण्याची कल्पना नाना फडणिसांना सुचली होती. त्यांनी भगवद्‌गीता छापण्याचे प्रयत्न चालविले होते. त्यासाठी त्यांनी तांब्याचे खिळे तयार केले होते. परंतु त्यांच्या हयातीत ते काम पूर्ण होऊ शकले नाही. ते खिळे आज भारतइतिहास संशोधक मंडळात उपलब्ध आहेत.

नाना फडणिसांची गीतामुद्रणाची कल्पना मिरज संस्थानचे श्रीमंत गंगाधरराव पटवर्धन यांनी इ. स. १८०५ साली पूर्णत्वास नेली; मात्र हे मुद्रण खिळा-छापाने केलेले नसून, ठोकळ्यांच्या पद्धतीने केलेले होते.

हिंदुधर्मग्रंथांचे मुद्रण करण्याचे गणपत कृष्णाजीने सुरू केलेले काम अधिक मोठ्या प्रमाणावर निर्णयसागर छापखान्याने पुढे नेले. निर्णयसागराने मराठी साहित्याच्या दृष्टीने तर हे मोठे कार्य केलेच; पण मराठी, हिंदी, गुजराती वगैरे देशी भाषांना मुद्रणाच्या दृष्टीने एक मोठीच देणगी दिली. ही देणगी म्हणजे अक्षरांच्या सौंदर्याची. त्या पूर्वी देशी भाषांचे खिळे पाडले जात, त्यात सौंदर्यदृष्टी कमी होती. निर्णयसागराने अक्षरांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वळणाकडे फार लक्ष दिले. आजकाल देवनागरी टायपांचे अनेक प्रकार निघाले आहेत. उभट, लांबट, तिरके, गोल असे टाईप मराठी मुद्रणालयांत वापरले जात आहेत. इंग्रजीइतके हे प्रकार विविध नाहीत. पण भारतीय मुद्रणातले सौंदर्य गेल्या काही वर्षांत वाढले आहे, याचे ते द्योतक आहे.

गेल्या शतकात आणि चालू शतकाच्या प्रारंभी छापण्यात आलेली बरीच पोथ्या-पुस्तके शिळाछापाने छापलेली आढळतात. त्यामुळे सर्वसाधारण लोकांचा समज असा होतो, की प्रारंभीची पुस्तके शिळाछापपद्धतीने छापली असून, नंतर खिळाछापाचा शोध लागला. परंतु ही समजूत चुकीची आहे. शिळाछापाचा शोध अगदी अलीकडचा आहे. इ. स. १७९६ साली स्टेनफेल्डर याला फोटोग्राफीचे संशोधन करताना लिथोग्राफीचा शोध लागला. भारतात १८२४ साली ही पद्धत आली. मुंबई सरकारने त्या वर्षी आपला लियो प्रेस सुरू केला: रॉबर्ट डॉबेल हा या छापखान्याचा पहिला युरोपियन मुद्रक होय. त्याच्या हाताखाली माधव बापू, अमिया नाथाजी, राजा राघू वगैरे एतद्देशीय कामगार काम करीत होते, अशी माहिती मिळते.


अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः
३ अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैव
तं अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतांवर
४ अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कले

नाना फडणिस यांनी मुद्रित केलेल्या गीतेचा काही भाग

छापखान्याला 'प्रिंटिंग प्रेस' हे मुद्रणाला महत्त्व देणारे नाव इंग्लंडमध्ये देण्यात आले, तर Typography हे, खिळे पाडणे व जुळणी करणे यांना अनुलक्षून दिलेले नाव युरोपमध्ये रूढ झाले. भारतात इंग्लंडमधल्या नावाचे अनुकरण झाले. 'प्रिंटिंग प्रेस' याची मुद्रणालय, मुद्रणमंदिर, छापघर ही भाषांतरे अगदी अलिकडची होत. यापूर्वी छापखाना हेच नाव प्रचलित होते. त्याहीपूर्वी तंजाऊरच्या सर्फोजीराजाच्या छापखान्यात इ. स. १८०९ साली एकनाथाचे भावार्थ रामायण छापले गेले, त्यात छापखान्याला अर्णयंत्र म्हटले आहे. अर्ण म्हणजे अक्षर व अर्णयंत्र म्हणजे अक्षरे तयार करून मुद्रित करायचे यंत्र किंवा कारखाना होय. सतराव्या शतकात गोव्यात छापलेल्या 'वनवाल्याचो मळो' या कोंकणी ग्रंथांच्या मुखपृष्ठावर "गोंयां सां पावलाच्या कोलेगींत सोळासीं अठ्ठावन्नाव्या वरुसा लिहित मंडपी ठांसिला" असे वाक्य छापले आहे. त्यातील छापखान्याला 'लिहितमंडप' आणि छापला या शब्दाला 'ठांसिला' हे शब्द वापरले आहेत, ते मजेदार वाटतात.

मुद्रणकला प्रथम मिशनऱ्यांनी भारतात आणली व आपल्या धर्मप्रसाराच्या कामी तिचा उपयोग केला. त्यामुळे भारतीय जनतेच्या मनात या कलेविषयी एक प्रकारची अढी निर्माण झाली होती. कारण छपाईच्या शाईत चरबी घालून पुस्तके छापतात आणि लोकांना बाटवतात, असा लोकप्रवाद त्या काळी प्रचलित होता. "नैष्ठिक ब्राह्मण छापलेल्या कागदास शिवत नाहीत" असे १८६३ साली गोविंद नारायण माडगावकरांनी 'मुंबईवर्णनात' लिहिले आहे. एका एतद्देशीय प्रकाशकाने यावर उपाय म्हणून तुपाच्या शाईत गुरुचरित्र छापून विक्रीला काढल्याची जाहिरात दिली होती.

पण पुढे हे गैरसमज दूर होत गेले. मुद्रणाचा व्यवसाय भारतात मोठ्या प्रमाणावर वाढू लागला. पुस्तके, मासिके छापणारे, जॉबकाम करणारे, वर्तमानपत्र छापणारे, आर्ट पेपरवर छापणारे, तसेच शिळाछापाचे, ऑफसेट प्रिंटिंग करणारे, असे छापखान्यांचे त्रिविध प्रकार निर्माण झाले. मोनोटाईप व लिनोटाईप यांची जुळणी, रोटरी, फोटोग्राव्हयूर, रोटोग्राव्हयूर, रेडियो फोटो हे मुद्रणातले शोधही भारतात आता रुळलेले आहेत. ज्या वेळी मुद्रणकलेचा शोध लागला, तेव्हा ती एक गुप्त विद्या समजली गेली. परंतु आजचा या कलेचा विस्तार व विकास पाहिला आणि जीवनाच्या बहुतेक सर्वच क्षेत्रांत तिने केलेला प्रवेश पाहिला, म्हणजे पाचशे वर्षांपूर्वी लागलेला आणि जगाचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चित्र बदलून टाकणारा हा एक क्रांतिकारक शोध होता, असेच म्हटले पाहिजे. पाहा– ग्रंथ. [श्री. बा. द. सतोस्कर]

मुद्रा मोद = आनंद देणारी ती मुद्रा होय. कुलमूलावतार ग्रंथात मुद्रेची व्याख्या सांगितली आहे, ती अशी –

मोचयन्ति ग्रहादिभ्यो पापौघं द्रावयन्ति च ।
मोचनं द्रावणं यस्मात् मुद्रा शास्त्रेषु वर्णिता ।।

अर्थ – ग्रहादिकांच्या बाधेतून मुक्त करणाऱ्या व पापसमुदाय विरघळवून टाकणाऱ्या, अर्थात ज्यांच्यापासून मोचन व द्रावण होते त्या मुद्रा शास्त्रात वर्णित आहेत.

साधना व संप्रदाय यांच्या परत्वे मुद्रांचे विविध अर्थ होतात. (१) हात, पाय, बोटे व शरीराचे इतर अवयव यांच्या विशिष्ट स्थितीला मुद्रा म्हणतात. उदा० – धेनुमुद्रा, घंटामुद्रा, भूस्पर्शमुद्रा, अभयमुद्रा इत्यादी. (२) विष्णूच्या आयुधांची शंख, चक्र इ. चिन्हे वैष्णव लोक आपल्या शरीरावर धारण करतात, त्यांना मुद्रा म्हणतात. (३) गोरखपंथी साधू काच किंवा स्फटिक यांचे जे विशिष्ट कर्णभूषण वापरतात ते. (४) भूचरी, खेचरी, चाचरी, अगोचरी, इ. हठयोगात केल्या जातात त्या. (५) तांत्रिक गुह्य साधनेत जी सहजसाधिका म्हणून साधकाशी अंगसंग करते ती स्त्री. (६) नृत्य, नाट्य, मूर्ती या कलांमध्ये हातांच्या विशिष्ट अवस्थांना लौकिक मुद्रा म्हणतात.

मंत्रशास्त्रात मुद्रांचे महत्त्व फार मानले आहे. त्या त्या देवतेची प्रसन्नता संपादन करण्यासाठी त्या त्या मुद्रा करायच्या असतात आणि त्या गुरुमुखाने समजून घ्याव्या लागतात. गायत्री मंत्राचा जप सुरू करण्यापूर्वी पुढील २४ मुद्रा करतात –

सुमुखं सम्पुटं चैव विततं विस्तृतं तथा ।
द्विमुखं त्रिमुखं चैव चतुः पञ्चमुखं तथा ।
षण्मुखाधोमुखं चैव व्यापकाञ्जलिकं तथा ।
शकटं यमपाशं च ग्रन्थितं चोल्मुकोल्मुकम् ।।
प्रलम्बं मुष्टिकं चैव मत्स्यं कूर्मं वराहकम् ।
सिंहाक्रान्तं महाक्रान्तं मुद्गरं पल्लवं तथा ।।

वर दिलेल्या नामावलीतल्या चोवीस मुद्रा जो जाणत नाही, त्याचा गायत्री जप निष्फल होतो व या मुद्रा केल्याने गायत्री सुप्रतिष्ठित होते, असे म्हटले आहे.

गायत्री जपानंतरच्या आठ मुद्रा अशा –

सुरभिज्ञानशून्यं च योनिकूर्मौ च पङ्कजम् ।
लिङ्गनिर्वाणमुद्रां च जपान्तेऽष्टौ प्रकीर्तिताः ।।

कोणत्याही पूजेच्या आरंभी पुढील पाच मुद्रा करायच्या असतात– अभय, चित्, वरद, साक्षात्कार व विद्राविणी.

दुसरा पर्याय सांगितला आहे, तो असा – आवाहनी, स्थापनी, संनिधापनी, संबोधिनी, सन्मुखीकरणी व अवगुंठन.

देवाला नीराजन केल्यानंतर करायच्या मुद्रांची नावे अशी– काल, योग, सिद्धी, दैहायसी, रस, संक्षोभण, शत्रुक्षयकरी, पाताल, अंजली व परमा.

विष्णुपूजेतील ११ मुद्रांची नावे अशी – शंख, चक्र, गदा, पद्म, वेणू, श्रीवत्स, कौत्सुभ, वनमाला, ज्ञानमुद्रा, विद्याह्वपा, गरुडा...

शिवपूजेतील १० मुद्रांची नावे अशी –

लिङ्गयोनित्रिशूलाक्षमालाऽभीतिमृगासिकाः ।
खट्वाङ्गा च कपालाख्या डमरुः शिवतोषदाः ।।

अर्थ – लिंग, योनी, त्रिशूल, अक्षमाला, अभय, मृग, खड्ग, खट्वांग, कपाल व डमरू या मुद्रा शिवाचा संतोष करणाऱ्या आहेत.

देवीपूजेतील ९ मुद्रांची नावे अशी –

पाशाङ्कुशवराभीतिः खड्गचर्मधनुःशराः ।
मुसली मुद्रिका दौर्गी मुद्राः शक्तेः प्रियङ्कराः ।।

अर्थ – पाश, अंकुश, वर, अभय, खड्ग, चर्म, धनुष्य, शर व मुसल या दुर्गेच्या आवडत्या मुद्रा आहेत.

गणपतीच्या पूजेतल्या ७ मुद्रा अशा–

दन्तपाशाङ्कुशाविघ्नपरशुर्लड्डुकास्तथा ।
बीजपूराह्वया मुद्रा ज्ञेया गणपपूजने ।।

अर्थ – दंत, पाश, अंकुश, अविघ्न, परशू, लड्डुक व बीजपूर (म्हाळुंग) या मुद्रा गणपतीच्या पूजेतल्या होत.

अभिषेकाच्या वेळी कुंभमुद्रा, आसनाकरिता पद्ममुद्रा, ... शोधनाकरिता गालिनीमुद्रा व प्रार्थना करताना प्रार्थना... करायची असते.

या सर्व मुद्रांविषयी मुद्रानिघंटूत सांगितले आहे, ते असे–

अर्चने जपकाले तु ध्याने काम्ये च कर्मणि ।
तत्तन्मुद्रा प्रयोक्तव्या देवतासन्निधापकाः ।।

अर्थ – पूजा, जपकाल, ध्यान आणि काम्य कर्म या प्रसंगी त्या त्या देवतेच्या मुद्रा कराव्या. कारण त्यामुळे देवतेचे सांनिध्य उत्पन्न होते.

मुद्रानिघंटू, स्मृतिचंद्रिका, शारदातिलक व त्या त्या संप्रदायांचे ग्रंथ यांत मुद्रांची नावे व वर्णने आढळतात. हठयोगातल्या मुद्रा हठयोगप्रदीपिका, घेरंडसंहिता व शिव... या ग्रंथांत सविस्तर वर्णिल्या आहेत. पुराणवाङ्मयातही ... माहिती आढळते. बौद्धांच्या १०८ मुद्रा आर्यमंजुश्रीमूलकल्प ग्रंथात दिलेल्या आहेत. जैनांच्या ७३ मुद्रा डॉ. प्रियबाला ... यांनी आपल्या मुद्राविचार या पुस्तकात दिल्या आहेत.

हठयोगात विविध मुद्रांमध्ये आसन, प्राणायाम, ... धारणा करायची असते. मुद्रांच्या साह्याने या गोष्टी ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जीव सर्व शक्तिमान होऊन शिवलोकाला प्राप्त होतो, असे सांगितले आहे.

घेरंडसंहितेमध्ये हठयोगातल्या २५ प्रकारच्या मुद्रा सांगितल्या आहेत, त्या अशा—(१) महामुद्रा, (२) नभोमुद्रा, (३) उड्डियान, (४) जलंधर, (५) मूलबंध, (६) महाबंध, (७) महावेध, (८) खेचरी, (९) विपरीत करणी, (१०) योनी, (११) वज्रोली, (१२) शक्तिचालिनी, (१३) ताडगी, (१४) मांडवी, (१५) शांभवी, (१६) अधोधारणा, (१७) आंभसी धारणा, (१८) वैश्वानरी धारणा, (१९) वायवी धारणा, (२०) नभोधारणा, (२१) अश्विनी, (२२) पाशिनी, (२३) काकी, (२४) मातंगी व (२५) भुजंगिनी.

या सर्व मुद्रा योगाभ्यासकांना सिद्धी मिळवून देतात. मुद्रा ही एक विद्या आहे. या विद्येचे अध्यापन अनुभवी व तंत्रशास्त्रात पारंगत अशा गुरूकडूनच होणे आवश्यक आहे. मुद्रांच्या अभ्यासाने कुंडलिनी शक्ती जागृत होण्यास मदत होते. ती जागृत झाली, की शरीरस्थ षट्चक्रांचा भेद होऊन सुषुम्ना नाडीच्या द्वारे प्राणांचे जाणे-येणे सुरू होते.

तांत्रिक बौद्धांची मुद्रा म्हणजे साधकाने साधनेसाठी स्वीकारलेली स्त्री होय. त्यांच्या मते अशी स्त्री हे शक्तीच्या अभिव्यक्तीचे बाह्य रूप आहे. तिला प्रज्ञा व साधकाला उपाय असे त्यांनी म्हटले आहे. हा एक प्रकारचा तांत्रिक विवाहच आहे. त्यानंतर त्या दोघांवर अभिषेक होतो व मग त्या दोहोंचा मंडलात प्रवेश होतो. तिथे साधकाचे मुद्रेशी योगक्रियारूप अनुष्ठान होते. त्यायोगे साधकाच्या ठिकाणी बोधिचित्ताचा उद्भव होतो. या उत्पन्न बोधिचित्ताला निर्माणचक्रात अर्थात नाभिप्रदेशात धारण करायचे असते. मुद्रेशी साधकाची जी संभोगक्रिया घडते, तिच्यामध्ये साधकाचे स्खलन होता कामा नये. तसे झाल्यास साधक योगभ्रष्ट होऊन नरकगतीला जातो. म्हणून त्याने वीर्यबिंदू नाभिप्रदेशात स्थिर करणे आवश्यक असते. बिंदू स्थिर झाला म्हणजे त्याला ऊर्ध्वगती मिळते. त्या गतीने वर जाता जाता शेवटी तो सहस्रदल कमलात महाबिंदूच्या ठिकाणी प्रविष्ट होतो. तसे झाले की साधकाला मुक्ती मिळते किंवा नित्य आनंद प्राप्त होतो.

बौद्ध तंत्रग्रंथात या मुद्रांचे वय, जाती, रूप, इत्यादींचे विवेचन आढळते. मुद्रा म्हणून स्वीकारलेल्या स्त्रीला जातीचे बंधन नसते. ती डोंबी, चांडाली, इ. हीन जातीचीही चालते. साधकाला उपयुक्त अशी मुद्रा निवडून देणे ही गुरूची जबाबदारी असते. अशा प्रकारची साधना वज्रयानी साधकांमध्ये मध्ययुगात प्रचलित होती. [योगविद्या; मंत्रशास्त्र; शिवसंहिता; कल्याण—साधनांक; श्रीविद्यार्णवतंत्र; हि. ध.; हिं. सा. को.; बौ. ध. द.]

मुद्रितयोषा

बौद्ध साधनेतील एक स्त्री. या स्त्रीच्या सान्निध्यात साधकाने ध्यान-साधना करायची असते. ही स्त्री साधकाला अनुपभोग्य असते. म्हणून तिच्या सान्निध्यात कामविकार जिंकण्याचा अभ्यास केला जाई. या स्त्रीने केलेल्या कामचाळयांचा कोणताही परिणाम साधकावर न होता, तो निर्लेप मनाने विहारात वावरू लागला, म्हणजे तो खरा साधक झाला असे समजत. कालांतराने या स्त्रीला अस्पृश्य म्हणजे सर्वांनाच अनुपभोग्य समजण्यात येऊ लागले. [शृंगारहाट]

मुनई अडुवर

तमिळनाडमधल्या त्रेसष्ट नायन्मार संतांपैकी एक. हा द्वंद्वयुद्धात प्रवीण होता. द्रव्य घेऊन हा एखाद्याला युद्धात मदत करी आणि त्या द्रव्याचा विनियोग साधुसेवेत करी. त्यामुळे त्याला ईश्वरी कृपेचा लाभ झाला, असे म्हणतात. [पे. पु.]

मुनिअप्पा

द. भारतातील एक लोकप्रिय ग्रामदेव. याच्या मूर्ती सहसा आढळत नाहीत. परंतु कोइंबतूर जिल्ह्यात नटरायन या देवाच्या मंदिराजवळ वीरभद्राचे मंदिर आहे; त्या वीरभद्रालाच मुनिअप्पा असे म्हणतात. हे वेताळाच्या जातीचे दैवत असावे.

मुनिअप्पाच्या मंदिराची उत्पत्तिकथा अशी—

एक ब्राह्मण होता. त्याचा एक शूद्र मित्र होता. ब्राह्मणाची बायको स्वैरिणी बनली, म्हणून तो वैतागून एका अरण्यात गेला. त्याच्या मागे त्याचा शूद्र मित्रही गेला. तिथेच ते दोघे एका झोपडीत राहिले आणि तिथेच त्यांनी आपले आयुष्य संपविले. त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्या मृत्युस्थळी मग दोन स्वतंत्र मंदिरे बांधली. त्यात ब्राह्मणाच्या जागी नटरायनची आणि शूद्राच्या जागी मुनिअप्पाची स्थापना केली. [द्र. गॉ. मॉ. हिं.]

मुनिराम सिंह

(इ. स. चे ११ वे शतक) एक जैन साधू. हा राजस्थानातील रहिवासी असावा. याच्या चरित्रासंबंधी फारशी माहिती उपलब्ध नाही. याने पाहुड दोहा नावाचा एक ग्रंथ रचला आहे. या ग्रंथात त्याने इंद्रियदमन, निरंजनसाधना, बाह्यावडंबरनिषेध, गुरु—महिमा आणि विकृत साधनांचे खंडन या बाबतींत गोरक्षनाथासारखे क्रांतिकारक विचार सांगितले आहेत. डोईमुंडन करण्यापेक्षा आत्ममुंडन करणे हे मोक्षमार्गाला अधिक निकटचे आहे, असे याचे मत आहे. पूजा, तीर्थयात्रा हे सर्व त्याला निरर्थक वाटते. याने हिंदू धर्मावर जसे कोरडे ओढले आहेत, तसेच जैन साधूंवरही ओढले आहेत. [उ. भा. सं. प.; गो. च. प.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुनिव्यास (इ. स. चे १४ वे शतक). एक महानुभाव ग्रंथकार. याचे मूळ नाव पंडित कमळाकर असावे. अयाचित कोठी असे असावे; पण त्याचा स्पष्ट निर्देश मिळत नाही. परंपरागत समजुतीप्रमाणे मुनी कमळाकर हाच मुनिव्यास होय. हा कुमारआम्नायात होऊन गेला. महानुभाव वाङ्मयात याला मुनीबास असे म्हटले आहे. याच्या संबंधी काही दंतकथा ऐकायला मिळतात, त्या अशा—

मुनीबास हा लिंगायत होता. त्याने म्हाळाइसापासून संन्यासदीक्षा घेतली. याने बेदरच्या बादशहाला रोगापासून मुक्त केले. त्यामुळे बादशहाची याच्यावर मर्जी बसली.

स्थानपोथी हा ग्रंथ याने रचला. डॉ. कोलते म्हणतात, की प्रथम बाइदेवबासांनी नागदेवाचार्यांच्या आज्ञेवरून याचे टाचण केले. पुढे मुनिव्यास यांनी शके १२७५ मध्ये बाइदेवबासांनी केलेल्या स्थानपोथीच्या टाचणात भर घातली. या पोथीचे तिसरे संस्करण १५ व्या शतकात चिडले महानुभाव याने केलेले आहे.

स्थानपोथीच्या हस्तलिखित पोथ्यांमध्ये श्रीचक्रपाणी, श्रीचक्रधर व गोविंदप्रभू यांच्याशी संबंध आलेल्या स्थानांची एकत्रित नोंद आढळते.

चक्रधरचरित्राचा एक संदर्भग्रंथ म्हणून ही स्थानपोथी महत्त्वाची आहे; तशीच ती तत्कालीन सामाजिक, धार्मिक आणि भौगोलिक माहितीच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे. त्या ग्रंथातले एक स्थानवर्णन असे :

पुनतांबा पाताळगुंफे अवस्थान दीस २० : एकी बासना : दीस १५: उतराभिमुख गुंफा ।। दोनि गंगेचीये थडीए पूर्वपसीम पटिसाळ ।। तीचि घाटू ।। घाटाखालि जळसेनाचें देउळ: पूर्वाभिमूख ।। नंमध्यें लिंगाची देउळी : तेय आसन ।। साळा तोर्थी आसन : विस्वेस्वराचें देउळ पूर्वामूख : जगतीचा दारवठा पूर्वामूख ।। विस्वेस्वरा उतरे कासेस्वराचें देउळ : पूर्वामूख ।। पसीमांमुख खीडकी ।। जगतीचा दारवठा पूर्वामूख ।। कासेस्वरा उतरे : कमळेस्वराचें देउळ : पूर्वामूख ।। तयासि तिन चौक : जगतीचा दारवठा : पूर्वामूख ।। कमळेस्वरा उतरे कारट मठू : उतरामुख ।।

चक्रधराचे एखाद्या गावातील आसन, वस्ती किंवा अवस्थान यांच्या जागा जशा या ग्रंथात निवेदिल्या आहेत, तशाच त्या ठिकाणच्या लीळाही त्यात सांगितल्या आहेत. [स्थानपोथी — संपा. वि. भि. कोलते.; म. म. वा.; प्रा. म. वा. इ. पूर्वार्ध]

मुनिसुव्रत जैनांचा विसावा तीर्थंकर. 'शोभनानि व्रतान्यस्य सुव्रतः' (= ज्याची व्रते शोभन आहेत तो सुव्रत) अशी त्या नावाची व्युत्पत्ती आहे. याच्या पित्याचे नाव सुमित्र आणि मातेचे नाव सोमा किंवा पद्मावती असे होते. त्याचे जन्मनक्षत्र श्रवण, लांछन कासव, चंपक हा ज्ञानवृक्ष, राजगृह हे जन्मस्थान, पारसनाथपर्वत हे मोक्षस्थान; यक्ष वरुण आणि यक्षिणी नरदत्ता. दिगंबरमते बहुरूपिणी ही याची यक्षिणी आहे. त्याचे कासव हे चिन्ह त्याचा संथपणा आणि स्थैर्य दर्शविते, असे म्हणतात. आग्र्याच्या किल्ल्याजवळ एका पाषाणस्तंभावर याची मूर्ती कोरलेली आहे.

याच्याविषयी मुनिसुव्रतपुराण नावाचे एक पुराण आहे. हे पुराण कृष्णदास नामक कवीने इ. स. १६२४ मध्ये लिहिले. याची श्लोकसंख्या ३०२५ व अध्याय २२ आहेत. मुनिसुव्रताच्या कथेशिवाय अनेक उपाख्याने यात असून, रघुवंशाची कथाही सांगितलेली आहे. [जै. इ.; हिंदुत्व]

मुनी वाचंयम अर्थात मौन धारण करणारा व्रती. याचे लक्षण गीतेत (२.५६) दिले आहे, ते असे—

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ।।

अर्थ — दुःखात ज्याच्या मनाला उद्वेग होत नाही, सुखाच्या ठायी ज्याची आसक्ती नसते आणि प्रीती, भय व क्रोध ही ज्याची सुटली आहेत, त्याला स्थितप्रज्ञ मुनी म्हणतात.

मुनी हा शब्द ऋग्वेदात आढळतो. त्याचा उल्लेख असणारी ऋचा ऋग्वेदात आढळते (१०.१३६.२), ती अशी—

मुनयो वातरशनाः पिशङ्गा वसते मला ।

अर्थ — मुनी हे वाऱ्याची मेखला धारण करणारे व मळकट वस्त्रे वापरणारे आहेत.

इंद्र हा मुनींचा मित्र आहे (८.१७.१४) आणि मुनी हे देवांचे मित्र आहेत, असेही ऋग्वेदात म्हटले आहे.

ऋग्वेदातील मुनी शब्दाचा अर्थ यातुविद्या जाणणारा व ईश्वरी प्रेरणा झालेला तपस्वी, असा असावा. अथर्ववेदातही एका देवमुनीचा नामनिर्देश आहे (७.१४.१). ऐतरेय ब्राह्मणात ऐतश नावाचा एक वेडसर मुनी उल्लेखिलेला आहे. ऐतशप्रलाप नावाची त्याची एक अर्थहीन रचना आहे. हे मंत्रकांड पठण करीत असलेल्या ऐतश मुनीला भ्रम झाला आहे, असे समजून त्याच्या मुलाने ते मंत्रकांडपठण बंद केले (ऐ. ब्रा. ६.३३.३).

वैदिक काळातील मुनी म्हणजे साधुपुरुष नसून, तो मांत्रिकाच्या किंवा वैद्याच्या जातीचा होता आणि तो नेहमी कशा तरी तंद्रीत असे, असे डॉ. रा. ना. दांडेकर म्हणतात. ध्यानधारणेत निमग्न असलेले, आत्मक्लेश सहन करणारे व दीर्घ जीवन कंठणारे, असे जे लोक त्या काळी होते, त्यांना मुनी म्हणत व समाजात त्यांना मान होता, असे म. म. काणे म्हणतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उपनिषत्कालातील मुनी वैदिक मुनींपेक्षा वरच्या श्रेणीचे असून, ते यज्ञयाग, तप, उपवास, ज्ञान व श्रद्धा यांच्या साहाय्याने परब्रह्माचा शोध घेऊ लागले होते (बृहदा. ३.४.१; ४.४.२५). मुनींच्या व कर्मठांच्या ध्येयात फरक होता. केवळ संतती अथवा संपत्ती मिळवणे या कर्मठांच्या ध्येयापेक्षा मुनींचे ध्येय श्रेष्ठ प्रकारचे होते, असे ज्ञानकोशात म्हटले आहे.

मुनी हे फळे, कंदमुळे आणि पाणी यांवर आपली वृत्ती चालवीत, असा नैषध चरितात (१.१३३) एक उल्लेख आहे.

ब्रह्मदेवाच्या शरीरापासून पुलस्त्य, पुलह, अत्री, क्रतू, अरणी, अंगिरा, भृगू, कर्दम, नारद, मरीची, आपस्तंब, वसिष्ठ, प्रचेता, इ. मुनी जन्माला आले आणि ब्रह्मदेवाने त्यांना सृष्टी निर्माण करण्याची आज्ञा दिली, असे ब्रह्मवैवर्त पुराणात सांगितले आहे. [वे. इं.; हि. ध.; म. ज्ञा. को. बुद्धपूर्व जग; श. क.]

मुनीश्वर (जन्म १६०३ इ. स.) एक ज्योतिषग्रंथकार. याला विश्वरूप असे दुसरे नाव होते. रंगनाथ दैवज्ञ हे याच्या पित्याचे नाव आहे. मुनीश्वराचे सारे घराणेच ज्योतिषशास्त्रात निष्णात होते. कृष्णाचा शिष्य नारायण हा माझा गुरू, असे हा म्हणतो. कृष्ण आणि नारायण हे याच वंशातील असावे, असे श्री. शं. बा. दीक्षित यांचे मत आहे. कार्तिकस्वामीच्या कृपेने आपल्याला ज्ञानप्राप्ती झाली, असे याने मरीची टीकेत म्हटले आहे. याला शहाजहान बादशहाचा आश्रय असावा. या बादशहाला राज्याभिषेक झाल्याचा काल, वेळ आणि त्या वेळची लग्नकुंडली याने सार्वभौम सिद्धान्त नामक ग्रंथात दिली आहे.

मुनीश्वर भास्कराचार्यांचा मोठा अभिमानी होता. याने बरेच ग्रंथ रचले आहेत. सिद्धान्तसार्वभौम हा त्याचा सर्वप्रसिद्ध ग्रंथ होय. याची रचना इ. स. १६४६ मध्ये झाली असून, त्यावर त्यानेच टीका लिहिली आहे. भास्कराचार्यांच्या लीलावतीवर निःसृष्टार्थदूती नावाची टीका व शिरोमणीच्या गणित व गोल अध्यायांवर मरीची नामक टीका याने केली आहे. याव्यतिरिक्त पाटीसार नावाचा याचा ग्रंथ आहे, असे गणकतरंगिणीवरून समजते. हा पाटीगणितावरील स्वतंत्र ग्रंथ असावा, असे श्री. शं. बा. दीक्षितांचे अनुमान आहे. नृसिंह दैवज्ञाचा मुलगा रंगनाथ याच्या भंगीविभंगीवर याची खंडनात्मक टीका आहे. [भा. ज्यो. शा.; का. सा. सा.]

मुन्नूर हैद्राबाद प्रदेशातील एक जात. या लोकांना मुन्नूर, मुन्नूरवाड, मुन्नुड कापू अशीही नावे आहेत. मुन्नूर शब्दाचा अर्थ तेलुगू भाषेत तीनशे असा आहे. या नावाच्या उत्पत्तीच्या अनेक कथा आहेत – राजा भर्तृहरीला त्याच्या निरनिराळ्या जातीच्या तीनशे बायकांपासून झालेली संतती म्हणजे मुन्नूर लोक होत, अशी एक कथा आहे. तुरुंगात एकत्र असलेले तीनशे पुरुष आणि एक कापू स्त्री यांची ही संतती होय, अशी दुसरी कथा आहे.

उद्योगधंदे – शेती हा या लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. काही लोक मजुरी, व्यापार वगैरे करतात; तर काही सरकारी नोकरीत शिरले आहेत.

हे लोक डुक्कर, बकरे, कोंबड्या, पाली, इ. प्राण्यांचे मांस व मासे खातात. त्यांना दारूही फार आवडते.

विवाहप्रथा – हे लोक मुलींची लग्ने त्या वयात येण्यापूर्वी करतात. नाहीतर आईबापांना त्याबद्दल प्रायश्चित्त घ्यावे लागते. यांचा लग्नविधी कापू लोकांच्या लग्नविधीसारखा असतो. मुलाचा बाप मुलगी पसंत करतो आणि नंतर एक दिवस मुलीच्या घरी जाऊन तिला नवे कपडे व दागिने देतो. त्याच वेळी ब्राह्मण पुरोहित वधू-वरांच्या पत्रिका पाहतो आणि त्या जमत असल्यास लग्नाचा मुहूर्त काढून देतो. वरपिता देज म्हणून सोळा रुपये वधूपित्याला देतो. लग्नापूर्वी पंधरा दिवस वधूच्या व वराच्या घरी पिन्नम्म, व्यंकटेश व भर्तृहरी या देवदेवतांची पूजा करतात. त्यानंतर वराच्या घरासमोर मांडव घालतात. मांडवाचा मधला खांब वराचा मामा किंवा मेहुणा (बहिणीचा नवरा) तोडून आणतो व समारंभपूर्वक रोवतो. त्यावर एक दिवा लग्नसमारंभ संपेपर्यंत तेवत ठेवतात.

या लोकांत वधू-वरांना बांबूच्या टोपलीत समोरासमोर उभे करतात व लग्न लावतात. त्या टोपल्यांत चामड्याचा एकेक तुकडा टाकतात. कन्यादान, वधूच्या गळ्यात वराने ताळी बांधणे आणि वधू-वरांनी एकमेकांच्या पायांवर पाय देणे, हे लग्नातील प्रमुख विधी असतात.

या लोकांत विधवेला पुनर्विवाह करता येतो. जातपंचायतीसमोर स्त्रीने काडी मोडली, की तिला सबळ कारण असल्यास घटस्फोट मिळतो.

प्रसूतिप्रथा – जननाशौच दहा दिवस असते. बाळंतिणीच्या बाजेजवळ एक तलवार ठेवतात. त्यामुळे भुताखेतांची बाधा होत नाही, अशी समजूत आहे. अकराव्या किंवा एकविसाव्या दिवशी बाळंतीण विहिरीला हळदीकुंकू वाहते आणि विहिरीचे पाणी काढते. तेवढ्याने ती शुद्ध होते.

मुलगी प्रथम ऋतुमती झाली, की तिला तीन दिवस एका स्वतंत्र खोलीत ठेवतात. चौथ्या दिवशी स्नान झाल्यावर मुलीला एका भाकऱ्या ठेवलेल्या पत्रावळीवरून व जमिनीवर पसरलेल्या निखाऱ्यांवरून उडी मारायला लावतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवधर्म – यांच्यापैकी काही लोक शैव, तर काही वैष्णव आहेत. स्मार्त ब्राह्मण या लोकांचे पौरोहित्य करतात. हे लोक पोचम्म, इडम्म, महिषम्म, इ. देवतांना भजतात व त्यांना पशुबली देतात.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात. अविवाहित मृतांना मात्र पुरतात. तिसऱ्या दिवशी मृताच्या नावे कोंबडे मारतात आणि त्याचे मांस शिजवून मृताचे आप्त ते खातात व थोडे पक्ष्यांना घालतात. मृताचे श्राद्धही करतात. [का. ट्रा. नि. डो.]

मुन्ययन एक याग. अग्नी आणि अग्नाविष्णू यांच्यासाठी दररोज हा याग करायचा असतो. पूर्णमासेष्टीचा एक काम्यकल्प म्हणून हा याग सांगितला आहे. बोधायनाने याला अहीन याग म्हटले आहे. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे.]

मुप्पाडिमुद्दुपुन्नमुल्लू द. भारतातील एक व्रत. वैधव्य येऊ नये म्हणून स्त्रिया हे व्रत करतात. क्रमाने तेहतीस पौर्णिमांना पानग्यांचे दान व सेवन करणे, असा याचा विधी आहे. पहिल्या पौर्णिमेला एक पानगा, दुसरीला दोन या प्रमाणे पानग्यांची संख्या वाढवतात. [का. ट्रा. स. इं.]

मुमुक्षा जीवनाची एक प्रगत अवस्था. संसारबंधनातून माझी मुक्ती कधी होईल, अशी आकांक्षा किंवा तळमळ माणसाला उत्पन्न होणे म्हणजे मुमुक्षा होय. शंकराचार्यांनी मानवी जीवनात मनुष्यत्व, मुमुक्षुत्व आणि सत्संगती या तीन गोष्टी दुर्लभ आणि केवळ देवाच्या अनुग्रहानेच प्राप्त होणाऱ्या आहेत, असे म्हटले आहे. या तिहींचा परस्पर संबंधही आहे. मनुष्यदेहातच मुमुक्षा होऊ शकते. त्या देहाला आणि तिला योग्य मार्गदर्शन सत्संगतीनेच मिळत असते.

जोपर्यंत जड आणि अशाश्वत वस्तू पूर्णपणे खऱ्या वाटतात, तोपर्यंत मनुष्य बद्धपणात म्हणजे अज्ञानाच्या अवस्थेतच असतो. अशाश्वत वस्तूंच्या ठिकाणी दृढ झालेली बुद्धी तिथून हालल्याशिवाय तिचा शाश्वत आत्म्याकडे जाण्याचा मार्ग मोकळा होत नाही. सामान्य मनुष्य जे जगतो, त्या जीवनाचा अपुरेपणा व अशाश्वतपणा त्याला मनापासून पटणे, ही मुमुक्षेकडे नेणारी पहिली गोष्ट आहे. रोग, अपघात, दैन्य, दारिद्र्य, स्वजनांचा मृत्यू, इ. संकटे माणसाला जीवनाचा अपुरेपणा पटण्यासाठी फार उपयोगी पडतात. आजपर्यंत ज्या ज्या गोष्टींपासून सुखाची अपेक्षा केली, त्यांच्यापासून दुःखच पदरात पडले, ही जाणीव तीव्रतेने उत्पन्न झाली म्हणजे शहाणा मनुष्य शाश्वताकडे नेणाऱ्या नव्या जीवनमार्गाचा साक्षेपाने शोध घेऊ लागतो.

याविषयी समर्थ रामदास म्हणतात –

> जो संसारदुःखे दुखवला । जो त्रिविधतापे पोळला
> तोचि अधिकारी झाला । परमार्थविषयी ॥
>
> (दासबोध ५.३.३४)

मोक्षाची किंवा शाश्वत सुखाकडे जाण्याची ही इच्छा पश्चात्तापाने उगम पावते. आपण आपल्या स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबाच्या देहसुखापलिकडे काही पाहिले नाही आणि देह हा क्षणभंगुर, अशी खरी जाणीव उत्पन्न झाल्यावर मनुष्य बेचैन होतो. इतकेच नव्हे, तर स्वार्थ (अर्थात अशाश्वत देहाचा) साधण्यासाठी आजपर्यंत केलेल्या बऱ्या-वाईट कर्मांची त्याला सारखी टोचणी सुरू होते. आतापर्यंत वाटेल त्या मार्गांनी पैसा मिळविला, खाण्यापिण्याविषयी निर्बंध ठेवला नाही, मर्यादा सोडून कामविषय भोगला, लोकांनी चांगले म्हणावे यासाठी ढोंगाने वागलो, सज्जनांची अवहेलना केली, इतकेच नव्हे तर एक पोट भरण्यासाठी सत्याचा उच्छेद करून असत्याचा बडेजाव माजविला, ही व अशा प्रकारची स्वार्थी कर्मे आठवू लागली, की मनुष्याला त्याबद्दल पश्चात्ताप होऊ लागतो.

अशा प्रकारे आजवर जगलेल्या जीवनाबद्दलचा पश्चात्ताप ही मुमुक्षा उत्पन्न करणारी पहिली गोष्ट असते.

त्यामुळे मुमुक्षा म्हणजे परमार्थदृष्टया व्यक्तीचा दुसरा जन्म असतो. सर्व साधुसंतांनी आणि आत्मज्ञानी पुरुषांनी या दुसऱ्या जन्माचे महत्त्व विशेषत्वाने गायिले आहे. या नव्या जन्मात माणसाला जीवनाचा अर्थ कळून घेण्याची जिज्ञासा उत्पन्न होते. जीवनाचा अर्थ कळून घेण्याच्या प्रयत्नांत त्याच्या केंद्रस्थानी असणारा जो 'मी' तो कोण, असा प्रश्न त्याच्यापुढे उभा राहतो. स्वतःविषयी असलेले अज्ञान त्याला जाचू लागते. या अवस्थेत जीवाचे लक्ष बाह्य पदार्थावरून उडून ते स्वतःच्या अंतरंगाकडे वळते आणि इथूनच आत्मज्ञानाला आरंभ होतो. आत्मज्ञान होणे हेच मुमुक्षेचे अंतिम फलित असते.

देहबुद्धी नष्ट होणे किंवा कमी होणे हे मुमुक्षेतले प्रधान लक्षण होय. मी देह आहे आणि माझे सुख देहाच्या ठिकाणी केंद्रित झाले आहे, असे समजणे याला देहबुद्धी म्हणतात. देहाच्या ठिकाणची वासना नाहीशी होऊन ती आत्म्याच्या ठिकाणी उत्पन्न होणे याला सद्बुद्धी म्हणतात. मुमुक्षेमध्ये असे लक्षात येते, की आपण आत्म्याला विसरलो आणि भलत्याच ठिकाणी आनंदाचा शोध घेत राहिलो.

आपले भवबंध गळून पडावे आणि आपण मुक्त व्हावे, असे मुमुक्षूला सदैव वाटत राहते. त्याची ही आकांक्षा केवळ स्वतःच्या सामर्थ्यावर पुरी होऊ शकत नाही. त्यासाठी योग्य मार्गदर्शन करणारा सत्पुरुष त्याला भेटावा लागतो आणि त्याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ध्यही लाभावे लागते. म्हणून मुमुक्षू पुरुषाने महापुरुषांची म्हणजेच आत्मानुभवी संतांची संगती धरावी, असे सांगितले आहे. या संगतीत कर्तव्यरूप सदाचरण, प्राप्त परिस्थितीमध्ये समाधान आणि आत्म्याचे अखंड अनुसंधान या तीन गोष्टी शिकता येतात. [अध्यात्मदर्शन – प्रा. के. वि. बेलसरे.]

मुरमी एक भटकी जमात. या लोकांची वस्ती नेपाळ, सिक्किम इ. भागांत आढळते. हे लोक दिसायला मंगोलियन लोकांसारखे असून, अंगाने घष्टपुष्ट असतात. ते मोठमोठी ओझी वाहण्याचे काम करतात. काहीजण शेती आणि गोपालन हे व्यवसाय करतात. यांची घरे उंच टेकडयांवर असून, ती दगडी असतात. मुरमी लोक बौद्धधर्मी असून, ते भूतिया भाषेसारखी एक स्वतंत्र भाषा बोलतात.

नेपाळमधील लोक मुरमी लोकांना भूतिया म्हणूनच ओळखतात. भूतिया मुरमी असे त्यांना नाव आहे. यांच्यांत बराथ व अथर अशा दोन प्रमुख टोळया आहेत. या दोन प्रमुख टोळयांमध्ये बेटीव्यवहार होत नाही. बराथ टोळीमध्ये चौपन्न उपटोळया आहेत.

अथरांच्या गोथार, नारवा व मांग्री अशा तीन उपटोळया आहेत. वंशशास्त्रज्ञांच्या मते या तीनही टोळया संकरातून उत्पन्न झालेल्या आहेत.

हे लोक मृतांना जाळतात. [से. इं. १९५१, वे. बें.; इं. स्ट. पा. प्रे., जानेवारी १९६०]

मुरली एक सुषिर वाद्य. संगीतसभेत अथवा वाद्यवृंदात साथीसाठी हे वाद्य वापरतात. मुरलीवादन ही चौसष्ट कलांपैकी एक कला आहे.

हे वाद्य बरेच प्राचीन असावे. ऋग्वेदात (१०.१३५.७) व काठक संहितेत (२३.४.; ३४.५) आलेल्या नाडी या शब्दाचा अर्थ अनेकजण मुरली किंवा वेणू असा करतात.

चंदन, रक्तचंदन, हस्तिदंत, खैर, वेत, बांबू, सोने, चांदी, पितळ, इ. अनेक वस्तूंपासून मुरली बनवतात. या सर्वांत बांबूपासून बनविलेली मुरली सर्वोत्तम असते, असे समजतात. पाहा – वासरी. [वे. इं.; डि. सा. इं. म्यु. म्यु.; हि. ध.]

मुरळी खंडोबाची उपासिका. एखाद्या माणसाला मुले होत नसली किंवा त्याची मुले जगत नसली, म्हणजे तो 'मूल जगल्यास ते तुला अर्पण करीन' असा खंडोबाला नवस करतो. अशा तऱ्हेने खंडोबाला अर्पण केलेल्या मुलींना मुरळया व मुलांना वाघ्ये म्हणतात. कधी कधी विवाहित स्त्रियाही नवसाने किंवा 'आपल्याला खंडोबाची स्त्री होण्याविषयी स्वप्न पडले आहे' असे सांगून, खंडोबाला आत्मसमर्पण करून मुरळया बनतात.

खंडोबाला मुलगे व मुली, वाघ्ये व मुरळया म्हणून वाहण्याची चाल मुख्यत्वे कुणब्यांत व त्यांच्याच दर्जाच्या इतर जातींत आढळते. महारांतही ही चाल प्रचलित आहे. वाघ्ये व मुरळया सर्व दक्षिण महाराष्ट्रभर आढळतात. मुरळयांचे खंडोबाबरोबर लग्न लावले जाते. त्या वेश्यावृत्तीने व भिक्षा मागून उदरनिर्वाह करतात. त्यांचा पोषाख कुणब्यांच्या स्त्रियांप्रमाणेच असतो. पण त्या कपाळाला हळद माखतात व गळयात कवडयांच्या माळा घालतात. काही मुरळया कायमच्या जेजुरीला राहतात; तर काही वाघ्यांबरोबर सर्व दक्षिण महाराष्ट्रात खंडोबाची गाणी गात व भिक्षा मागत गावोगाव भटकत असतात.

खंडोबाच्या यात्रेत जागोजाग वाघ्या आणि मुरळी यांचे कार्यक्रम चाललेले असतात. एका हाताने घोळ (घंटा) वाजवीत मुरळी नृत्य करीत असते.

मुरळी ही देवदासींच्या वर्गातील खंडोबाची उपासिका आहे. देवदासी, भाविणी-जोगतिणी यांच्याप्रमाणेच मुरळयांना देवसेवेत राहून अविवाहित जीवन घालवावे लागते.

महाराष्ट्र शब्दकोशात मुरळी शब्दाची व्युत्पत्ती दोन प्रकारे दिली आहे – (१) मैलाराची पत्नी – मैराली – मुरळी आणि (२) मरळी (कानडी शब्द) – मुरळी. कानडीत मरळी म्हणजे बुद्धिशून्य किंवा बुद्धिशून्याप्रमाणे बतावणी करणारी स्त्री, असे श्री. पांडुरंग देसाई यांनी म्हटले आहे. मरळी शब्दाचा लक्ष्यार्थ असती स्त्री असा आहे. आणि मराठीतही त्याच अर्थाने मुरळी हा शब्द योजतात.

मुरळीचे लग्न खंडोबाबरोबर लावतात, त्याचा विधी असा– हा विवाह चैत्र महिन्यात होतो. प्रथम मुरळीला आणि देवाला हळद लावतात. मग मुरळीचा शृंगार करतात व देवाला पोषाख चढवतात. नंतर उपाध्या नऊ कवडयांची एक माळ मुरळीच्या गळयात घालतो. या विधीला गाठा फोडणे, असे नाव आहे. त्याबद्दल उपाध्यांला सव्वा रुपया मिळतो. मग त्या दोघांवर भंडार उधळतात व 'येळकोट घे' अशी घोषणा करतात. मुरळी वयात आली, की आपल्यासाठी एखादा यजमान मिळवते.

मुरळीचा आत्माविष्कार असलेले एक गीत पुढीलप्रमाणे–

हळदीकुंकानं वटि माझी भरली
खंडेरायाची झालें मी मुरळी – ग बाई मुरळी।।
घेउन भक्तीची भंडारवाटी
मल्लूदेवाच्या लागलें पाठी
'जय मल्हार' दिली आरोळी,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खंडेरायाची झालें मी मुरळी – ग बाई मुरळी ।।
आईबापानं नवस हा केला,
कन्या वाहिली मल्हारीला,
त्याच्या नामाची गोडी आगळी,
खंडेरायाची झालें मी मुरळी – ग बाई मुरळी ।।
एक देवाचे मजला ध्यान,
त्याच्या जवळी माझा पंचप्राण
पिवळ्या झेंड्यावर भंडार उधळी,
खंडेरायाची झालें मी मुरळी – ग बाई मुरळी ।।
सारीं नातीं मी देवाशीं जोडलीं
त्यानं हुकमानं मला इथं धाडली,
सदा मल्हार माझ्या जवळी,
खंडेरायाची झालें मी मुरळी – ग बाई मुरळी ।।

एकनाथांनी मुरळी नामक एक भारूड रचले आहे. त्यात त्यांनी मुरळ्यांच्या निःसंगपणावर पारमार्थिक रूपक रचले आहे. मुरळ्यांनी आपला निःसंगपणा वासनांच्या तुष्टीसाठी न वापरता परमात्म्याच्या भेटीसाठी वापरावा, अशी एकनाथांची भूमिका आहे. पण नाथसमकालीन कवी शेख महंमद श्रीगोंदेकर यांनी मुरळ्यांच्या प्रथेवर प्रखर हल्ला चढविला आहे. त्यासंबंधी ते म्हणतात –

ज्या मुरळ्या करिती अनाचार
चालविती उन्मत्ताचे घरचार ।
त्यांस म्हणती लावी भंडार । आपुलिया हातें ।।
पुण्य आचरण न ये मुरळ्यांच्या चित्ता ।
भलत्याच्या होतील कांता ।।
यांचा हात भाळास लावितां । कोण तरला सांग बा ।।

बंगालचे प्रसिद्ध संत चैतन्य महाप्रभू यांनी आपल्या दक्षिण-यात्रेत जेजुरीला भेट दिली असता, मुरळ्यांना या अनाचारा-पासून निवृत्त करण्याचा प्रयत्न केला होता. पुढे इंग्रजी राज्यात महर्षी शिंद्यांसारख्या सुधारकांनीही या प्रथेविरुद्ध लोकमत तयार करण्याचा प्रयत्न केला. शेवटी कायद्याने मुरळीच्या प्रथेवर बंदी घालण्यात आली. पण अजूनही चोरून मुरळी बनण्याचे प्रकार चालू आहेतच. [म. लो. उ.; ल. वि. सो.; खंडोबा]

मुरारिमल्ल

(इ. स. चे १६ वे शतक) एक महानुभावीय कवी. हा उपाध्ये आम्नायातील बीडकरशाखेपैकी मरकराजा याचा शिष्य होय. याने दर्शनप्रकाश नावाचा एक ग्रंथ रचला आहे. हा ग्रंथ ओवीबद्ध असून, त्यात शहात्तर प्रकरणे आहेत. विविध धर्मग्रंथ व त्यांतील मते सांगण्यासाठी कवीने हा ग्रंथ रचला आहे. प्रस्तुत ग्रंथ रचण्यासाठी कवीने केवढा आटापिटा केला आहे, हे त्यातील पुढील ओव्यांवरून समजते.

इतर ग्रंथ नाना बहुवस । तैसा हा नव्हे दर्शनप्रकाश ।।
जें सकळाहून सार विशेष । तो सांगताये कवी ।।
निगम आगम वेद । पुराण विद्या बहुशास्त्र भेद ।।
याची शोधनी प्रसिद्ध । दर्शनप्रकाश केला ।।
तर मग शोधनी केसी केली । सकळांची मुळें श्रुतिसूत्रें गणिलीं ।।
साध्य साधनें सांगितलीं । उपग्रंथ तेही ।।
काळ पदार्थ अध्याय जाणा । उपनिषदें नावें गणना ।।
घांडोळोनी परमेश्वर विचारणा । केली जाणें ।।

या ग्रंथात निरनिराळ्या संस्कृत ग्रंथांतील उतारे प्रथम दिले असून, त्यापुढे कवीने आपले विवरण केले आहे. विशेष म्हणजे कवीने शंकरपद्धती या ग्रंथाच्या आधारे शंकराचार्यांचा प्रयाण-काळ शके ६७२ असा दिला आहे. [म. म. वा.; म. सा.]

मुरारी गुप्त

(इ. स. चे १६ वे शतक) एक चैतन्यानुयायी संतकवी. याचा जन्म सिल्हेट येथे झाला. परंतु नंतर त्याचे सर्व कुटुंब नवद्वीपात जाऊन राहिले. तिथे याचे घर चैतन्य महाप्रभूच्या शेजारीच होते. त्यामुळे मुरारी गुप्त प्रारंभापासूनच चैतन्याच्या सहवासात आला. हा चैतन्याचा गुरुबंधू असून, त्याच्यापेक्षा वयाने थोडा मोठा होता. याने चतन्यचरितामृत नावाचा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात चैतन्याच्या आदिलीला संस्कृत भाषेत वर्णिल्या आहेत. चैतन्य प्रभूच्या हयातीत झालेले हे सर्वप्रथम चरित्रकाव्य असल्याने त्याला एक ऐतिहासिक महत्त्व आहे. हे काव्य कडचा या नावाने प्रसिद्ध आहे. या ग्रंथाच्या आधारेच लोचनदासाचे चैतन्यमंगल, वृंदावनदासाचे चैतन्यभागवत, इ. ग्रंथ निर्माण झाले. चैतन्यसंप्रदायी लोक मुरारीला हनुमंताचा अवतार मानतात. [चै. म. ब्र. सा.; हिं. बं. वै. क.]

मुरुग

(१) तमिळनाडमधील एक लोकदेवता. प्राचीन कुरिंजी प्रदेशाचा हा प्रमुख देव होता. त्याचे प्राचीन नाव शेयोन व अलिकडचे नाव मुरुग असे आहे. याला कोर्रवै देवीचा पुत्र मानले आहे. सुब्रह्मण्य हे याचे संस्कृत नाव होय. गणपतीप्रमाणेच हासुद्धा सिंदूरवर्णी आहे. मुरुग शब्दाचा अर्थ कुमार असा आहे. कार्तिकेयालाही कुमारच म्हणतात. त्यामुळे मुरुग हे कार्तिकेयाचेच द्राविड रूप मानले गेले आहे.

उ. भारतातील कार्तिकेयाची पौराणिक कथा तमिळ लोकांनी मुरुगाला जशीच्या तशी लावलेली असली, तरी तिच्यात तमिळ संस्कृतीतील अन्य काही लक्षणेही समाविष्ट झाली आहेत. तमिळ लोक त्याला इंद्र व वरुण यांच्या बरोबरीचा मानतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कार्तिकेय आणि हे समस्वभावी आणि समानधर्मे आहेत, असे दिसल्यामुळे आर्य–द्रविड संस्कृतिसंगमाच्या प्रक्रियेत त्या दोहोंचे तादात्म्य घडवून त्याला शिवपरिवारात दाखल केले गेले. अंतर इतकेच, की कार्तिकेय ब्रह्मचारी आहे; तर मुरुग विवाहित आहे. त्याला दोन बायका असून, त्यांची नावे वळ्ळी आणि देवायनी अशी आहेत. वळ्ळी ही किरात-कन्या आहे. मुरुग तिच्यावर मोहित झाला आणि मोठ्या प्रयासाने त्याने तिची प्राप्ती करून घेतली. तमिळनाडमध्ये वळ्ळीच्या प्रेमात सापडलेल्या मुरुगाची ही प्रणय-कथा अत्यंत लोकप्रिय आहे. तत्त्वज्ञांनी तिच्यातून काही आध्यात्मिक अर्थही निष्पन्न केले आहेत. ही कथा ऐकली, की जेजुरीच्या खंडोबाची याच जातीची प्रेमकथा स्मरणात येते. बाणाई नामक एका धनगराच्या मुलीवर खंडोबा असाच अनुरक्त झाला होता आणि त्यापायी त्याने त्या धनगराची मेंढरेही वळली होती.

मुरुग

प्राचीन तमिळ वाङ्मयात मुरुगाचे वर्णन आले आहे, ते असे– मुरुग हा वेंगई वृक्ष असलेल्या उंच पर्वतावर कदंपो वृक्षांमध्ये राहतो. तिथल्या गुहांमध्ये राहणाऱ्या कुरव कुमारिकांबरोबर तो कुरवै नृत्य करतो. तो कधी हत्तीवर, कधी मेंढयावर, तर कधी मोरावर बसतो. कोंबडा हे त्याच्या ध्वजावरचे चिन्ह असून, रणभूमी हे त्याचे मुख्य कार्यक्षेत्र होय. हा देव वृत्तीने शिकारी असल्यामुळे भाताची रास आणि तिच्यावर बकऱ्याचे ताजे रक्त हे त्याचे आवडते भोजन आहे.

मुरुगाची स्थाने बहुधा डोंगरपठारावर असतात. खंडोबाप्रमाणेच याचीही वार्षिक जत्रा स्कंद-षष्ठीच्या दिवशी भरते. याचे हजारो भक्त त्या दिवशी दूधदुभत्याच्या कावडी खांद्यावर घेऊन त्या नाचवीत आणि मुरुगाच्या पराक्रमाचे वर्णन करणारी गीते गात त्याच्या दर्शनाला जातात. अरुणगिरिनाथर या कवीने मुरुगाची अनेक स्तोत्रे रचली असून, ती भावपूर्ण आहेत. मुरुग हा प्रेमाचा देव मानला गेल्यामुळे तमिळ कुमारिका इष्टवर-प्राप्तीसाठी याची पूजा करतात. [रि. इं.; तमिळनाडू][1]

(२) दक्षिण भारतातील त्रेसष्ट नायन्मारांपैकी एक संत. याला देवासाठी नाना परीची फुले जमवण्याचा नाद होता. तो शिवाची शुद्ध भावाने नित्य पूजा करी. याच भक्तीच्या बळावर तो संत बनला. [पे. पु.]

मुरुड एक प्रसिद्ध गणेशक्षेत्र. हे महाराष्ट्रातील कुलाबा जिल्ह्यात आहे. पालीचा बल्लाळेश्वर नामक गणपती प्रथम या ठिकाणी होता; पण मुसलमानांच्या मूर्तिभंजनात तो सापडू नये म्हणून त्याला पाली येथे नेण्यात आले, अशी दंतकथा कोकणात प्रचलित आहे.

मुरुड येथील गणेशमंदिर जरी अष्टविनायकांपैकी एक नसले, तरी त्याचे माहात्म्य खूप आहे. असंख्य गणेशभक्त इथे भक्तिभावाने दर्शनास येतात.

श्रीबल्लाळविनायकाच्या स्मरणार्थ आणि परंपरा अबाधित ठेवण्याकरिता मुरुड येथील, काही गणेशोपासकांनी शके १८२५ (इ. स १९०३) मध्ये, वर्तक यांनी त्यासाठी दिलेल्या जागेत एक जुनी गणेशाची पाषाणमूर्ती स्थापली. मूर्तीच्या कोनाड्यावरच इ. स. १९०९ मध्ये मंदिर बांधले. ही मूर्ती कमळावर बसलेली आहे. तिच्या दोन हातांत पाश व अंकुश असून, तिसऱ्या हाती मोदक व चौथ्या हातात मोत्यांची माळ आहे.

पुष्टिपती म्हणून या गणपतीचा वाढदिवस – उत्सव वैशाखी पौर्णिमेला होतो. हा उत्सव पाच दिवस चालतो. त्यात होमहवनादी कृत्ये होतात. अंगारकी व माघी संकष्टी चतुर्थीच्या वेळी सहस्रावर्तने होतात. [श्रीगणेशकोश]

मुन्हा मध्य प्रदेशातील एक श्रमिक जात. या लोकांची वस्ती प्राधान्याने जबलपूरच्या आसपास आढळते. काही वंशशास्त्रज्ञांच्या मते मुन्हा हा शब्द मुंडा जातीशी संबंधित असावा. अन्य काही संशोधक असे सांगतात, की बिंड जातीची ही एक पोटजात असावी. पण हे लोक मात्र स्वतःला भिल्ल, केवट किंवा लुनिया म्हणवितात.

हे लोक शरीराने धष्टपुष्ट असून, वर्णाने काळे व ठेंगणे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असतात. दगड अथवा माती वाहून नेण्याचे काम हे करतात.

विवाहप्रथा – यांच्यांत देजाची प्रथा आहे. मुलाकडील लोक मुलीच्या लोकांना एक बकरा देतात. तो बकरा कापून त्याचे मुंडके विवाहस्तंभाजवळ टांगतात. मुलाचा मेहुणा ते मुंडके हस्तगत करण्याचा प्रयत्न करतो; परंतु वधूपक्षातील स्त्रिया त्याला मारझोड करून अडथळा आणतात. अखेर तो ते मुंडके मिळवितो. मुलगी सासरी निघाल्यावर कणकेचे सात दिवे करून तिला ओवाळतात. हे दिवे प्रथम सुपात ठेवतात आणि ओवाळून झाल्यावर टाकून देतात. मुलगी नवऱ्याच्या घरी आल्यावर पुन्हा तिला सात दिव्यांची ओवाळणी होते. यांच्या लग्नातले पौरोहित्य ब्राह्मण करतात.

यांचा सामाजिक दर्जा अत्यंत निकृष्ट आहे. तथापि हे लोक ब्राह्मणांच्या हातचे खात नाहीत. यांच्या स्त्रिया लग्नानंतर गोंदून घेतात. पण त्याचा सर्व खर्च मामी किंवा काकी करते. मुलगी नवऱ्याचे अथवा वडीलधाऱ्या माणसाचे नाव घेत नाही. आई-वडील जेष्ठ मुलाला त्याच्या खऱ्या नावाने हाक मारीत नाहीत. त्या मासिक विटाळ पाच दिवस पाळतात.

यांच्यांत जात–पंचायत असते.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात. परंतु गरीब लोक मृतांना पुरतात. हे तिसऱ्या दिवशी मृताच्या अस्थी सावडतात. सुतक तीन किंवा नऊ दिवस पाळतात. माणूस मेल्यापासून सहा महिन्यांच्या आत त्याच्या नावाने ज्ञातिभोजन द्यावे लागते. या वेळी मृताचा उत्तराधिकारी पांढरे कपडे घालतो आणि अळणी जेवण जेवतो. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

मुलतान पश्चिम पंजाबमधील एक प्रसिद्ध शहर. हे लाहोर-पासून २०७ मैलांवर व चिनाब नदीच्या काठा-पासून ४ मैल अंतरावर आहे. पूर्वी या स्थानाचे नाव काश्यप-पूर असे होते. हंसपूर, वेगपूर, सांवपूर व मूलस्थान अशी याची अन्य नावेही होती.

पूर्वी मुलतान येथे एक भव्य सूर्यमंदिर होते. युआन च्वांग याने त्याचा उल्लेख केला आहे. इ. स. च्या ८ व्या शतकाच्या प्रारंभी मुहंमद इब्न कासीम याने मुलतान जिंकले आणि तिथे मुस्लिम राज्य स्थापले. पुढे कनौजच्या प्रतीहारवंशी राजांनी अनेक वेळा त्या प्रदेशावर स्वारी केली. मुलतानचे मुसलमानी राज्य दुबळे असूनही प्रतीहार राजे ते जिंकू शकले नाहीत. कारण प्रतीहारांचे सैन्य जवळ आले की मुसलमान राज्यकर्ते मुलतानचे सूर्यमंदिर व मूर्ती नष्ट करण्याची धमकी देत; त्यामुळे प्रतिहारांचे सैन्य मागे फिरे. हे सूर्यमंदिर सर्व भारतीयांना अत्यंत पूज्य होते. त्यामुळे प्रतिवर्षी लाखो यात्रेकरू मुलतानला जाऊन सूर्याला थोडेतरी द्रव्य अर्पण करीत. अशा प्रकारे तिथे जमा होणारी अलोट संपत्ती मुसलमान राज्यकर्त्यांना मिळत असे.

या शहराभोवती एक उंच तट आहे. इथे एक किल्लाही आहे. तो शहाजहान बादशहाचा मुलगा मुराद याने बांधला असे, म्हणतात. शहरात अनेक पीरांची स्थाने व मुस्लिम साधूंचे दर्गे आहेत. शहराच्या प्रल्हादपुर नामक भागात नरसिंहाचे एक मंदिरही आहे. ते मोडकळीस आलेले असले, तरी उरलेला भाग प्रेक्षणीय वाटतो. व्यापारी दृष्टीने हे शहर महत्त्वाचे असून, येथे तयार होणारे गालिचे व नक्षीदार भांडी प्रसिद्ध आहेत. सांप्रत हे ठिकाण पाकिस्तानात गेले आहे. पाहा – मूलस्थान. [म. ज्ञा. को.; ए. इं.– मजु. ; सा. इं. ए.]

मुलतानी हिंदुस्थानी संगीतातील एक रागिणी. ही मार्गी जातीतील, तोडी थाटाची औडव-संपूर्ण रागिणी आहे. हिच्या आरोहात ऋषभ व धैवत हे स्वर वर्ज्य असून, अवरोहात सातही स्वर लागतात. हिचा वादी स्वर पंचम व संवादी षड्ज आहे. गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर. सकाळच्या रागांत तोडी जशी लोकप्रिय आहे, तशी संध्यापूर्व रागांत मुलतानी रागिणी प्रिय आहे. मा ग मा ही संगती आणि निषादाला महत्त्व ही या रागिणीची वैशिष्टये होत. ध रि सा ही अखेरची अवरोही संगती फार काळजीपूर्वक व रिषभाला प्राधान्य न देता वापरावी लागते. नाहीपेक्षा तोडी रागिणी होण्याचा संभव असतो. [क. सं.; सु. वि. को.]

मुलाणा बारा बलुतेदारांपैकी एक. हा जातीने मुसलमान असतो. काही प्रापंचिक आणि काही धार्मिक कामासाठी याचा गावगाड्यात उपयोग असतो. मराठवाड्यात याला कोरबू असे म्हणतात. जत्रेच्या वेळी, लग्नातील देवकार्यात आणि भुताखेतांना बळी देण्याच्या वेळी बलिपशूंचे हनन करण्याचे काम याच्याकडे असते. या कामासाठी त्याला पैसे व अन्न मिळते. मारलेल्या बकऱ्याचे काळीज याच्या मालकीचे असते. मुलाण्याने प्रार्थना म्हणून बकरे मारल्याशिवाय त्याचे मांस हलाल (भक्षणीय) होत नाही, अशी समजूत आहे.

हा गावातील मशिदी व पीर यांची व्यवस्था ठेवतो. मुसलमान लोकांची लग्नादी कृत्ये याच्या देखरेखीखाली होतात. गावात फकीर नसला, तर गावचा ताबूत हा करतो.

शेतकरी लोक आपल्या इच्छेनुसार याला थोडेफार धान्य देतात. हा मांसविक्रीचा व्यवसायही करतो. [गां. या.; ग्रा. स.; म. ज्ञा. को.; सु. वि. को.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुल्ला हा फारसी शब्द असून, त्याचा अर्थ पंडित, विद्वान मनुष्य असा आहे. इस्लाम धर्माची तत्त्वे शिकवणारा व मशिदीशी संलग्न अशा शाळेत उच्च शिक्षण घेऊन धर्मतत्त्वांचे विवेचन करण्यास योग्य बनलेला मनुष्य, असाही त्याचा अर्थ आहे. अरबी भाषेत याला मौलवी म्हणतात. हा मशिदीजवळ शाळा चालवून तिच्यात मुलांना धार्मिक व व्यावहारिक शिक्षण देतो. मशिदीत बंदगी करण्यासाठी आसपासच्या लोकांना पाच वेळा बोलवणे व स्वतः पुढाकार घेऊन बंदगी करणे ही मुल्लाची मुख्य कर्तव्ये होत. मशिदीतील उंच ठिकाणी उभा राहून बांग देण्याचे कामही तो करतो.

मुल्लांना लग्न करता येत नाही. लोकांना धार्मिक उपदेश करून त्यांची श्रद्धा वाढवणे, हेच काम ते आजन्म करतात. [डि. इ.; वि. मुं. रा. प.; एन्सा. रि. ए.]

मुल्ला कुरुमान द. भारतातील एक जात. या लोकांची वस्ती केरळ प्रदेशातील कालिकत, कन्नूर, किडंगनाद, इ. ठिकाणी आढळते. मुल्ला कुरुमान हे या जातीचे मूळ नाव नसून, नायरांनी त्यांना दिलेले टोपण नाव आहे, असे म्हणतात. मुल्ला हे नाव मूल म्हणजे बांबू यावरून आले असावे. हे लोक पूर्वी बांबू विकण्याचा व्यवसाय करीत होते, असे सांगतात. मूल याचा अर्थ बाण असाही आहे. त्यावरून हे लोक एका काळचे शिकारी असावे, असे समजतात.

हे लोक पिंगट वर्णाचे असून, यांच्यांतील पुरुषही केस वाढवितात. हे जी भाषा बोलतात, तिला कुरुंब असे म्हणतात.

विवाहप्रथा – या लोकांमध्ये लग्ने प्रौढपणी होतात. लग्नासाठी जातिप्रमुखाची परवानगी लागते. हुंड्याचीही पद्धत आहे. लग्नात मुलीचा मामा तिच्या गळ्यात ताळी बांधतो. विवाहापूर्वी ताळिकेट्टुकल्याणम नावाचा विधी करतात. यांच्यांत घटस्फोट रूढ आहे.

मुल्लांमध्ये जातपंचायत असते. पंचायतप्रमुखाला मुडाली असे म्हणतात. तो हातामध्ये रुप्याची कडी घालतो. कोणतीही नवीन गोष्ट करताना याची परवानगी घ्यावी लागते. ही जागा वंशपरंपरागत असते.

मर्तिकप्रथा – यांच्यांत मृतांना पुरतात. गरोदर स्त्री मेली तर तिच्या पोटातील गर्भ बाहेर काढून नंतर तिला पुरतात. हे लोक अकरा दिवस सुतक पाळतात. [ट्रा. के.]

मुशब्बिहा मुसलमान लोकांचा एक पंथ. ईश्वराचे रूप मानवाप्रमाणेच असून, त्याला हात, पाय, डोळे, नाक, कान, इ. अवयव असतात आणि तो मानवाप्रमाणेच हालचाल करू शकतो, असे या पंथाचे मत आहे. [डि. इ.]

मुष्टिक रामायणात उल्लेखिलेली एक प्राचीन जमात. वसिष्ठ ऋषीचा महोदय नावाचा पुत्र विश्वामित्राच्या शापाने निषाद झाला असता त्याला व इतरांना मुष्टिक हे नाव प्राप्त झाले (वा. रा. १.५९.२०-२१, १.६०.१). हे लोक कुत्र्यांचे मांस खात होते. मृतांची रखवाली करणे हा त्यांचा व्यवसाय होता. यावरून हे डोम असावे असे वाटते. [वा. रा. को.; प्रा. च. को.]

मुष्टिका एक प्राचीन अमुक्त शस्त्र. हे शस्त्र म्हणजे तीक्ष्ण धार असलेली एक लहानशी सुरी होय. यावरून जवळच्या शत्रूला मारण्यासाठी हिचा उपयोग होत असावा. त्याचप्रमाणे हातघाईच्या द्वंद्वयुद्धात हिचा फार उपयोग होत असे. निरनिराळ्या कवींनी मुष्टिकेच्या चमकेची चांदण्याशी तुलना केली आहे. गुरखा लोक आपल्याजवळ बाळगत असलेली कुकरी ही मुष्टिकेसारखीच असते. [वे. रा. द. उत्तरार्ध]

मुष्टिविधानव्रत एक जैनव्रत. हे वर्षातून तीन वेळा म्हणजे भाद्रपद, माघ आणि चैत्र या महिन्यांत करतात. व्रतावधी एक वर्ष. व्रतविधी असा – वद्य प्रतिपदेला व्रताला आरंभ करून ते पौर्णिमेला संपवायचे. व्रतकालात रोज एक मूठ शुभ्र द्रव्य जिनेंद्राला अर्पण करून त्याला अभिषेक करायचा आणि 'ॐ ऱ्हीं वृषभादिवीरान्तेभ्यो नमः' या मंत्राचा त्रिकाल जप करायचा. भोजन दिवसातून एकदाच घ्यायचे. वर्षाच्या अखेरीला उद्यापन करायचे. [जै. व्र. वि. सं.]

मुसलमान इस्लामच्या अनुयायांना मुसलमान किंवा मुस्लिम म्हणतात. गेल्या हजार बाराशे वर्षांच्या काळात भारतात या धर्माचा प्रसार चालू असल्यामुळे फाळणीपूर्वीच्या संपूर्ण भारतात मुसलमानांची लोकसंख्या सुमारे दहा कोटी झाली होती. पाकिस्तानच्या स्थापनेनंतर भारतात सुमारे तीन कोटी मुसलमान राहिले होते. त्यांची संख्या आता सुमारे पाच कोटी झाली आहे.

इस्लाम धर्मात तत्त्वतः सर्व माणसे समसमान लेखली जातात आणि त्यांच्यांत धार्मिक उच्चनीचता किंवा जन्मजात श्रेष्ठकनिष्ठपणा मुळीच नाही, असे म्हणतात. मुसलमानी धर्मप्रचारक कुराणाचा व पैगंबराचा आधार घेऊन असे सांगतात, की 'आमच्यांत जातिभेद व पंथभेद नाहीत. आमचा धर्मग्रंथ एक, पैगंबर एक, पंथ एक आणि सारे मुसलमान सारखे.' पण प्रत्यक्ष

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यवहारात ही समानता आढळत नाही. महंमद पैगंबराच्या अनुयायांत विविध कारणांमुळे मतभेद होऊन शिया, सुन्नी, मोटाझली, सेफेशियन, खारेजायी, इ. पंथ उत्पन्न झाले आणि त्यांचे पुन्हा शेकडो उपपंथ झाले आहेत. त्यांच्यांत अत्यंत विषमता असून, ते परस्परांविषयी असहिष्णूही आहेत.

भारतीय मुसलमानांत अशराफ व अजलाव असे दोन वर्ग दिसून येतात. अशराफ म्हणजे अभिजात. परदेशांतून आलेले शुद्ध रक्ताचे, उच्च वंशाचे मुसलमान व उच्च हिंदू जातींतून बाटून झालेले मुसलमान यांचा या वर्गात समावेश होतो. अजलाब म्हणजे हलके लोक होत. या वर्गात हिंदूंच्या हीन जातींतून मुसलमान झालेल्या लोकांचा समावेश होतो. या दुसऱ्या वर्गातील मुसलमानांची संख्या बरीच मोठी आहे.

अरजाल नावाचा तिसरा वर्गही काही ठिकाणी आढळतो. या वर्गातले लोक सर्वांत हीन समजले जातात. हलालखोर, लालबेगी, अब्दाल, बेदीऊ, इ. जाती या वर्गात आहेत. उच्च वर्गातले मुसलमान या हीन जातींशी मुळीच संबंध ठेवीत नाहीत. या हीन जातीच्या मुसलमानांना मशिदीत प्रवेश करायला परवानगी नसते. त्यांचे कबरस्तानही वेगळे असते.

सैयद, शेख, पठाण, मलिक, कुरैशी वगैरे जाती पहिल्या उच्च वर्गात येतात. सर्व मानमरातब व अधिकाराच्या जागा त्यांना मिळतात. हीन जातींच्या मुसलमानांना ते लोक जुलाहा किंवा कुंजडा म्हणतात. मात्र हलक्या जातीचा मुसलमान कर्तबगारीने धनवान झाला, वर आला, तर तो शेख किंवा सैयद होऊ शकतो.

अशराफ वर्गातील जातींतही उच्चनीचता आहेच. महंमद पैगंबराचा जन्म ज्या कुरैशी जातीत झाला, ती जात सर्वश्रेष्ठ मानली जाते. मुसलमानांचा खलिफा त्या जातीतलाच असला पाहिजे, असा नियम आहे. सैयद, शेख, पठाण या उच्च जातींचा परस्पर लग्नसंबंध होत नाही. एवढेंच नव्हे, तर पठाणी मुसलमानांच्या भिन्न जातींतही बेटीव्यवहार रूढ नाही. इतर मुसलमानी जातींतही तसेच आहे. निरनिराळ्या पंथोपपंथांचे अनुयायी मुसलमानही परस्परांशी लग्नसंबंध करीत नाहीत. भिन्न पंथांच्या मशिदीसुद्धा अनेक जागी वेगळ्या असतात. एका पंथाच्या मशिदीत दुसऱ्या पंथाच्या लोकांना मज्जाव असतो. शिया, सुन्नी वगैरे पंथांची कबरस्तानेही वेगळी असतात.

अजलाव व अरजाल या वर्गांतले लोक तर मूळचे हिंदूच होत. ते पूर्वी ज्या जातींचे होते, त्या जातींतले रीतिरिवाज त्यांच्यांत थोड्याफार अंशी चालू राहिले आहेत. धर्म बदलला तरी, त्यांचे मूळचे संस्कार व आचारविचार साकल्याने बदलू शकले नाहीत. त्यामुळे मुसलमानांतही असंख्य जाती उत्पन्न झाल्या आहेत. यांच्यांत परस्पर लग्नसंबंध होत नाहीत.

मुसलमानांत अस्पृश्यतादेखील रूढ आहे. बंगालमध्ये स्पृश्य व अस्पृश्य मुसलमान हा भेद अगदी कट्टरपणे मानला जातो.

मुसलमानांचे सर्वसामान्य रीतिरिवाज, नजर, नमाज, जनाना, मक्केची यात्रा, विवाहविधी, तलाक व अंत्यसंस्कार यासंबंधीची माहिती इस्लाम या लेखात दिलेली आहे. मुसलमानांतील निरनिराळ्या पंथांची व जातींची माहिती कोशात त्या त्या नावांनी दिलेली आहे.

मुसलमान लोक चांद्र वर्ष मानतात. त्यामुळे त्यांचे महिने दर वर्षी वेगवेगळ्या ऋतूंमध्ये येतात. त्यांच्या महिन्यांची नावे मोहरम, सफ्फर, रबी-उल्-अव्वल, रबी-उल्-आखिर, जुमादी-उल्-अव्वल, जुमादी-उल्-आखिर, रजब, शाबान, रमजान, शव्वाल, जीकाद व जिल्-हिज्ज अशी आहेत. त्यांपैकी शाबान, जीकाद व जिल्हज्ज हे महिने विशेष पवित्र मानले जातात.

मुसलमान लोक मोहरम, मौलूद शरीफ (ईद-ए-मीलाद), मेराज, शबरात, शबे कद्र, रमजान ईद, बकरीद, इ. सण साजरे करतात. त्यांची माहिती त्या त्या नावाने कोशात दिलेली आहे.

शिक्षण – पूर्वी मुलगा चार वर्षांचा झाल्यानंतर बिस्मिल्ला नामक संस्कार करून त्याच्या शिक्षणाला प्रारंभ होत असे. प्रत्येक मशिदीला मकतब म्हणजे पाठशाळा जोडलेली असे. तिथे मुलांना प्राथमिक शिक्षण दिले जात असे. त्यांत कुराणातील आयते, प्रार्थना, लेखन-वाचन, गणित, यांचा समावेश असे. मुल्ला किंवा मौलवी हे शिक्षण देण्याचे काम करीत. हदीस, काव्य व नीतिशास्त्र यांचेही शिक्षण ते मुलांना देत. श्रीमंत लोक व शासनाधिकाऱ्यांची मुले यांचे शिक्षण घरोघरीच होत असे. राजपुत्रांसाठी विशेष व्यवस्था केली जात असे. उच्च वर्गातील मुलींनाही प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था घरी केली जात असे. मात्र सर्वसामान्य मुलींना शिक्षण मिळत नसे.

माध्यमिक शिक्षणाच्या शाळांना मदरसा म्हणतात. तिथे धार्मिक व व्यावहारिक शिक्षण मिळत असे. त्यात कुराण, इतिहास, अरबी, फारसी, गणित, व्याकरण, भूगोल, यूनानी चिकित्सा, शेती, कायदा, ज्योतिष, अर्थशास्त्र, इ. विषय शिकविले जात. या शिक्षणाचा काल दहा ते बारा वर्षे असे. काही शाळांतून संगीत, शिल्प, इ. कलांचेही शिक्षण दिले जात होते. या शाळांमध्ये कोणत्याही अपराधाबद्दल मुलांना कडक शिक्षा करण्याची प्रथा होती.

मुसलमानी राज्यांत शिक्षणव्यवस्था पूर्णपणे शासनाधीन होती. त्यामुळे सुलतानाची वृत्ती व मर्जी यांवर ती अवलंबून असे. सुलतानाला शिक्षणाविषयी आस्था असली, तरच राज्यातील शिक्षण व्यवस्थित चाले.

शेकडो वर्षे घनिष्ठ संबंध आल्यामुळे हिंदूंचे अनेक रीतिरिवाज

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुसलमान लोकांनी स्वीकारले आहेत. या बाबतीत मुस्लिम राज्यकर्त्यांनी प्रथम सुरवात केली. राजाच्या मस्तकावरून सुवर्णाची नाणी व माणिक-मोती ओवाळून ती गोरगरिबांना वाटण्याची प्रथा हिंदूंकडून मुसलमान बादशहांनी घेतली. मग सर्वसामान्य मुसलमानांनीही हिंदूंचे अनुकरण सुरू केले. गर्भधारणेपासून मुलाच्या जन्मापर्यंत करण्यात येणारे अनेक विधी; तसेच लग्नातील बहुतेक सर्व विधी मुसलमानांनी हिंदूंकडून घेतले आहेत. मंगनी, बरात या चाली मुसलमानांत नव्हत्या, त्या रूढ झाल्या आहेत. लग्नात सहेरा म्हणजे मुंडवळयाही ते बांधतात. वाद्ये वाजवणे, हळद लावणे हे प्रकारही काही प्रांतांतील मुसलमानांनी घेतले आहेत. लग्नात शहानक नावाचा दहीभात खाण्याचा विधी असतो, तो जोधाबाईने मोगलांच्या जनानखान्यात गेल्यावर सुरू केला. अजूनही तो रूढ आहे.

दिवाळी, दसरा, वसंतपंचमी, इ. सण मुसलमानांनी स्वतःच्या समाजात सुरू केले. हिंदू देवतांना भजणारे मुसलमान बरेच होऊन गेले. हिंदूंच्या पोषाखाचेही अनुकरण मुसलमानांनी केले. निरनिराळ्या प्रदेशांतील मुसलमान त्या त्या भागातील भाषा बोलतात. बिहार, उ. प्रदेश, पंजाब, महाराष्ट्र या भागातील बरेच मुसलमान पूर्वी धोतर वापरीत होते. साडी, चोळी, बांगड्या, कर्णफुले ही वेषभूषाही मुसलमान स्त्रियांनी हिंदूंकडून स्वीकारली.

खेडोपाडी राहणाऱ्या सामान्य हिंदू व मुसलमान लोकांत पूर्वी बराच सलोखा झाला होता. ते परस्परांच्या सणसमारंभांत एकोप्याने भाग घेत होते. हिंदू लोक मुसलमान पीरांना व संतांना भजत, त्याचप्रमाणे काही मुसलमान लोकही हिंदू साधुसंतांना भजत. गेल्या शतकाच्या अखेरपर्यंत हा सलोखा सर्वत्र आढळत होता. पण ब्रिटिश राज्यकर्त्यांनी स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी मुसलमान लोकांत हिंदूंविषयी द्वेषभावना उत्पन्न केली व राजकीय पक्षपाताचे धोरण अवलंबून ती वाढवली. त्यामुळे हिंदू-मुसलमानांचे दंगे सुरू झाले आणि त्यांच्यांतून अधिक शत्रुत्व निर्माण झाले. जे मुल्ला-मौलवी इस्लामचे कट्टर अभिमानी होते, त्यांनी गांवोगावी प्रचार करून अज्ञ मुसलमानांत हिंदुद्वेषाची भावना अधिकच चेतवली. पाकिस्तानची स्थापना हे त्याचेच फळ होय. त्यानंतर तरी दंगे थांबतील व भारतीय मुसलमान इथे भारतीय जीवनाशी भारतीय म्हणून समरस होऊन राहतील अशी अपेक्षा होती. पण आजवर तरी ती फोल ठरली आहे. भविष्यकालाचे कोण सांगणार ! मात्र सरकार आणि भारतातले विचारवंत हा सलोखा निर्माण करण्याच्या कामी प्रयत्नशील आहेत. [आ. सं. उ.; स. सा. वा. ३; जातिव्यवस्था; संस्कृतिसमवाय; भा. शि. सं. इ.; हिं. मु. सां. मि.]

मुसहर

उ. भारतातील एक जंगली जमात. या लोकांची वसती बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, इ. राज्यांत आढळते. हे लोक उंदीर पकडून खातात, म्हणून यांना मुसहर हे नाव मिळाले असावे. रिस्लेच्या मते ही भुई या जातीची एक पोटशाखा आहे. मेणे वहाणे, शेती व शेतमजुरी करणे हे यांचे प्रमुख व्यवसाय आहेत.

विवाहप्रथा – यांच्यांत बाल व प्रौढ या दोन्ही विवाहपद्धती रूढ आहेत. विधवा आणि घटस्फोटित स्त्रिया यांची लग्ने सगाई पद्धतीने होतात. यांना लग्नासाठी ब्राह्मण पुरोहित लागत नाही; मुहूर्तनिश्चयासाठी मात्र ब्राह्मण हवा असतो.

देवधर्म – यांच्यांत भारलेल्या जडवस्तूंची पूजा व भूतपूजा प्रचलित आहे. त्याचप्रमाणे हे काली, दुल्हादेवी, अनसारी, बनराजा, इ. देवतांनाही भजतात. कालीला खच्ची केलेले बोकड बळी देतात. हे मृतवीरांची पूजा करतात. वीरांच्या जत्रेच्या वेळी भगत लोक खुंटाला तलवारी बांधून बेभान स्थितीत कसरती करतात. त्यांना इजा झाली नाही, तर वीर संतुष्ट झाले, असे समजतात. कसरतीनंतर डुकराला भोसकून मारतात आणि त्याचे रक्त व दारू एकत्र करून ते देवांना वाहतात. त्यातील थोडे मिश्रण प्रसाद म्हणून इतरांना वाटतात.

वनदेवता ही त्यांची आणखी एक देवता आहे. तिच्या कृपेमुळेच वृक्षांना फुले-फळे येतात, कंदमुळे पोसतात, वंध्यांना मुले होतात, अशी त्यांची श्रद्धा आहे. पंचाक्षरी तिच्या साहाय्याने भुताखेतांचा बंदोबस्त करतात. प्रत्येक झोपडीत एका ओट्यावर या देवतेची स्थापना केली जाते; पण तिची मूर्ती नसते. [से. इं. १९५१, वे वें.; एन्सा. रि. ए.; देवीकोश ३]

मुसळ

धान्य कांडण्याचे एक साधन. हे बत्त्याच्या जातीचे लांबट आयुध असून, त्याच्या एका अग्राला, क्वचित दोन्ही अग्रांना लोखंडाचे वलय बसवलेले असते. त्याचा दंड खैर वृक्षाचा असतो. यज्ञसंस्थेत धान्य कांडण्यासाठी या आयुधाचा उपयोग सांगितलेला आहे. त्यावरून हे आयुध बरेच प्राचीन असावे असे दिसते. मुसळ हे बलरामाचे एक आयुध आहे. मुसळाची उत्पत्तिकथा विष्णू व भागवत या पुराणांत सांगितली आहे, ती अशी –

एके दिवशी मदोन्मत्त यादवांनी काही ऋषींची चेष्टा करण्याचा एक प्रयोग केला. त्यासाठी सांबाला स्त्री वेष देऊन व ती स्त्री गर्भवती आहे असा भास उत्पन्न करून त्यांनी ऋषींना प्रश्न केला, 'हिला मुलगा होईल की मुलगी होईल ?" ऋषींना ती चेष्टा उमगली व त्यांनी रागाने म्हटले. 'हिला मुसळ होईल व ते सर्व यादवांचा संहार करील.' यादव चरकले. तेव्हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांनी सांबाचे पोट सोडले तर त्यातून खरोखरच मुसळ निघाले. यादवांनी त्याचे बारीक तुकडे करून ते समुद्रात फेकले. त्यांपैकी एक तुकडा एका पारध्याला मिळाला. बाकीच्या तुकड्यांचे कुश झाले आणि त्या कुशांचेच लोखंडी गज बनले. एके दिवशी यादव मद्य पिऊन धुंद झाले असता त्यांच्यामध्ये कलह उद्‌भवला. मग त्यांनी त्या गजांनी एकमेकांवर प्रहार करून यादव कुळाचा सर्वनाश करून घेतला. पारध्याला मिळालेल्या तुकड्याचा त्याने बाण बनवला. तोच त्याच्याकडून चुकून कृष्णाच्या पायाला लागला व त्या घावाने कृष्णाचाही अंत झाला.

मुसळाविषयी काही लोकसंकेत आहेत, ते असे – मुसळाला पाय लावीत नाहीत. अवर्षण पडल्यावेळी किंवा ग्रहण लागले असता परातीत पाणी घालून त्यात मुसळ उभे करतात. ते संकट दूर व्हावे असा त्याचा उद्देश असतो.

मंगल कार्यात घाणा भरण्याचा एक प्रारंभिक सोपस्कार असतो. त्यात दोन रोवळ्यांमध्ये तांदूळ व नारळ घालून पाच सुवासिनी स्त्रिया दोन मुसळांनी ते नारळ-तांदूळ हलक्या हातांनी कांडल्यासारखे करतात. ते कृत्य झाल्यावर ती मुसळे देवकाजवळ ठेवतात. कित्येक जातींत मंगल कार्यामधली नवग्रहांची पूजा झाल्यावर पाच सुवासिनी स्त्रिया मुसळ हातात घेऊन 'यजमानाचे वाईट चिंतणाऱ्याच्या छातीवर' असे म्हणतात व ते मुसळ पाच वेळा जमिनीवर आदळतात. रजस्वलेला चौथ्या दिवशी मंगल कार्यात भाग घेणे असेल, तर तिला प्रथम मुसळाने एक मण तांदूळ कांडायला लावतात.

कोकणात मुसळादेवी या नावाने मुसळ व अन्य काही आयुधे यांची पूजा करण्याची प्रथा आहे. [पु. इं.; चित्पावन]

मुंसा-सुहाग मुसलमानांतील सुन्नीपंथी फकिरांची एक जात. या लोकांची वस्ती गुजरात प्रदेशातील बडोद्याच्या परिसरात आहे. इ. स. च्या १५ व्या शतकाच्या अखेरीला मुसा नावाचा एक फकीर होऊन गेला. त्याच्या अनुयायांना पुढे मुसा-सुहाग हे नाव मिळाले. हे लोक पत्नीभावाने ईश्वराची भक्ती करतात. भिक्षा मागताना हे स्त्रीवेष करतात व बायकांचे दागिने अंगावर घालतात. हे लग्न करीत नाहीत. [मुं. इ. जा.; रजःकण]

मुहर्रम मुसलमानांचा एक प्रसिद्ध सण. पाहा – मोहरम.

मुहूर्त एक लहानसा कालखंड. दिवसाचा ३० वा भाग (४८ मिनिटे). 'नाडिके द्वे मुहूर्तस्तु' = दोन नाडिका = (घटिका) म्हणजे एक मुहूर्त, असे वेदांगज्योतिषात सांगितले आहे. दिवसाचे १५ व रात्रीचे १५ असे एकूण अहोरात्राचे ३० मुहूर्त होतात. (श. ब्रा. १०.४.२.१८; १२.३.२.५). दिवसाच्या १५ मुहूर्तांची नावे सांगितली आहेत, ती अशी –

रौद्रश्चैत्रश्च मैत्रश्च तथा सारभटः स्मृतः ।
सावित्रश्च जयन्तश्च गान्धर्वः कुतुपः स्मृतः ॥
रौहिणश्च विरिञ्चश्च विजयो नैर्ऋतस्तपाः ।
माहेन्द्रो वारुणश्चैव भेदाः पंचदश स्मृताः ॥

रात्रीच्या १५ मुहूर्तांची नावे अशी –

शङ्करश्चाजपादश्च तथाऽहिर्बुध्न्यमैत्रको ।
आश्विनो याम्यवाह्नेयौ वैधात्रश्चन्द्र एव च ॥
आदितेयोऽथ जैवश्च वैष्णवः सौर एव च ।
ब्राह्मो नाभस्वतश्चैव मुहूर्ताः क्रमशो दिशि ॥

तिथी, वार, नक्षत्र, योग व करण ही पाचही अंगे जेव्हा शुभ असतील, अशा काळाला मुहूर्त म्हणावे, असाही एक अर्थ या शब्दाला प्राप्त झाला असून, तोच सांप्रत प्रामुख्याने लक्षात येतो. भारतात फार प्राचीन काळापासून धार्मिक विधी व इतर व्यवसाय यांच्यासाठी शुभ दिवस आणि शुभ वेळ पाहण्याची प्रथा रूढ होती व आहे. त्यावरून शुभ दिवसाला किंवा दिवसाच्या शुभ कालखंडाला मुहूर्त असे नाव मिळाले आहे. त्याला अनुसरून 'कालः शुभक्रियायोग्यो मुहूर्त इति कथ्यते' (= शुभ कर्मांना योग्य असा काल म्हणजे मुहूर्त होय) अशी त्याची व्याख्या विद्यामाधवीय या ग्रंथात दिली आहे. या व्याख्येला अनुकूल अशा अर्थाने ऋग्वेदातही "सुदिनत्वमह्नाम्" (= दिवस सुदिन असताना) असा उल्लेख आढळतो (२.२१.६).

यज्ञसंस्थेत अग्न्याधानासाठी शुभ मुहूर्त पाहत असत, असे काठकसंहिता, शतपथ ब्राह्मण (२.१.२.३) इ. वैदिक ग्रंथांवरून कळते. वरील ग्रंथांत श्रौताग्नीचे आधान कृत्तिका नक्षत्रावर करावे; कारण कृत्तिका हे अग्नीचे नक्षत्र आहे, असे सांगितले आहे. आपली मुलगी तिच्या पतीला प्रिय व्हावी, असे ज्याला वाटत असेल, त्याने तिचा विवाह निष्ट्या (स्वाती) नक्षत्रावर करावा आणि मित्र हा ज्या नक्षत्राची देवता आहे, त्या नक्षत्रावर (अनुराधा) नांगरटीला सुरवात करावी, असे तैत्तिरीय ब्राह्मणात सांगितले आहे. ज्येष्ठा नक्षत्राची देवता इंद्र आहे आणि तो पर्जन्याचा अधिपती आहे. म्हणून त्या नक्षत्रावर शेतात नांगर धरावा, असे पारस्कर गृह्यसूत्रांत म्हटले आहे.

श्रौत, गृह्य व धर्मसूत्रांत अनेक धार्मिक विधींसाठी शुभ काल सांगितले आहेत. मुहूर्तमार्तंड, मुहूर्तचिंतामणी, इ. काही ग्रंथ तर मुहूर्तविषयक माहिती सविस्तर व तपशीलवार देण्यासाठीच निर्माण झाले आहेत. राज्याभिषेकापासून व्यक्तीने नूतन वस्त्र परिधान करणे आणि घर शाकारणे इथपर्यंत या मुहूर्तांचा व्याप मुहूर्तविषयक ग्रंथांनी वाढवला आहे. [हि. ध.; पुरुषार्थ विशे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मणि; श्रीस्वामी केवलानंद अभिनंदन ग्रंथ, १९५२]

मुहूर्तमेढ मंगल कार्याचे देवक बसवताना मुहूर्तमेढ रोवण्याची चाल कित्येक जातींमध्ये आहे. त्यासाठी एका लाकडाच्या मेढीला गवताची पेंढी बांधतात. मग तिच्यावर हळकुंड व सुपारी बांधलेली पिवळी चिंधी बांधतात. मग त्या मेढीची पूजा करून ती एका खळग्यात पुरतात किंवा एखाद्या खांबाला बांधून उभी करतात.

मुळगुंद धारवाड जिल्ह्यातील एक प्राचीन नगर. चालुक्य राजा जयसिंह दुसरा (इ. स. १०२८) याच्या लेखात या क्षेत्राचा पहिला उल्लेख आहे. इतरही १८ लेख इथे सापडले आहेत, त्यांवरून मध्ययुगातील त्या भागातल्या धार्मिक व राजकीय जीवनासंबंधी विपुल माहिती मिळते. मुळगुंद हे पूर्वी शैव आणि जैन या संप्रदायांचे एक बलिष्ठ केंद्र होते. जैन श्रमणांची एक मोठी परंपरा इथे होऊन गेलेली दिसते. धर्मामृत या प्रसिद्ध कन्नड ग्रंथाचा कर्ता नयसेन हा त्यांपैकीच एक श्रमण होय.

इथे कुंभेश्वर, नगरेश, पेटे बसप्प, सिद्धेश्वर, चंद्रनाथ, पार्श्वनाथ, हिरी यांची मंदिरे आहेत. लिंगायत परंपरेतील आनंदस्वामींचा मठही इथेच आहे.

गावाजवळच एक छोटी टेकडी असून, कार्तिक मासात तिथे मोठी यात्रा भरते. यात्रेकरू टेकडीवर जाताना एक दगड बरोबर घेऊन जातात आणि त्यावर पडून राहतात. [धारवाड गॅझे.]

मूकांबिका एक देवता. हिचे स्थान कारवार जिल्ह्यातील कुंदापूरपासून तीस मैलांवर असलेल्या कुट्टूर नावाच्या गावी आहे. इथे हिचे मोठे मंदिर असून, हे स्थान सिद्धपीठ म्हणून गणले गेले आहे. त्याचप्रमाणे परशुरामाने स्थापन केलेल्या सात मुक्तिक्षेत्रांत याची गणना आहे. या देवीची स्थापना आद्य शंकराचार्यांनी केली असा समज आहे. याशिवाय इथे एक शिवमंदिर असून, त्या मंदिरातील शिवलिंग सुवर्णरेखांकित आहे. त्यामुळे भाविक लोक या स्थानाला फार महत्त्व देतात. [देवीकोश १; कल्याण-तीर्थांक]

मूजवत एक पर्वत. ऋग्वेद आणि अथर्ववेद यांमध्ये याचा उल्लेख येतो. या पर्वतावर सोम वनस्पती उगवत होती (ऋ. १०.३४.१). म्हणूनच सोमाला मौजवत असे म्हटले आहे. या पर्वतात राहणाऱ्या लोकांनाही मूजवत किंवा मूजवंत असे म्हणत. महाभारतात मूजवंत नावाच्या एका हिमालयीन पर्वताचा उल्लेख आहे. (सौप्तिक १०.७८५). हा पर्वत आणि वेदांतला मूजवत किंवा मूजवंत हा पर्वत एकच होय, असे यास्क म्हणतो. (नि. ९.८). [वे. इं.; हि. ध.]

मूठ मारणे एक अभिचारात्मक जादूचा प्रकार. एखाद्या नको असलेल्या माणसाचा मृत्यू ओढवावा म्हणून काही लोक एखाद्या त्या कृत्यात तज्ज्ञ अशा देवर्षी किंवा भगत याजकडून ही मूठ मारण्याची क्रिया करून घेतात. त्यासाठी भगत कणकेची शत्रुप्रतिमा करून तिची पूजा करतो. नंतर एका लिंबाला सर्व बाजूंनी सुया टोचून ते देवीपुढे ठेवतो. मग तो विशिष्ट मंत्र म्हणत गुळाचे पाणी त्या मूर्तीवर सोडीत राहतो. यामुळे लिंबू भारले जाते, अशी समजूत आहे. मग हे भारलेले लिंबू ज्याला मूठ मारायची असेल, त्याच्या दिशेने तो फेकतो. हे लिंबू कोणालाही न दिसता इच्छित माणसाच्या छातीवर जाऊन आदळते आणि त्यासरशी त्याला रक्ताच्या उलट्या होऊन माणूस तात्काल मरतो, अशी समजूत आहे. या सर्व प्रकाराला मिळून मूठ मारणे अशी संज्ञा आहे.

या वेळी भगत जे मंत्र म्हणतो, त्यातील एक मंत्र असा –

गणपत बैठे मढे मसान। दुधीयाबीर फेकू।
आबीयवीर फेकू। मल्लकार्जुन फेकू।
राजा मोहू। परजा मोहू।
पलंगा बैठी रानी मोहू। तुरत झ्याड।
तुरत तमाशा। एक घडीमे बाच न माशा।
रक्ताच्या द्याव्या भका। गफलान्या दुशेमनास द्यावा धका।
फुरोमंत्र ईश्वरीबाच्या गुरुका सबदसाच्या ।।

या प्रकारात काही मुठी ठराविक मुदतीच्याही असतात. तेवढ्या मुदतीत तो माणूस मरतो, असे समजतात. शत्रूला मारण्याचे काम झाल्यावर हे लिंबू परत भगताकडे येते. तसे ते न आले तर तो प्रयोग कर्त्यावरच उलटतो, असे म्हणतात. मूठ उलटविण्याचेही अनेक मंत्र असतात. [लो. दं.]

मूडबिद्री द. भारतातील एक जैन क्षेत्र. कर्नाटक प्रदेशातील द. कानडा जिल्ह्यात कारकलपासून दहा मैलांवर हे स्थान आहे. इथे अठरा मंदिरांचा एक समूह आहे. त्यात त्रिभुवनतिलकचूडामणी नावाचे एक विशाल मंदिर आहे. ते तीन मजली असून, भोवती एक तट आहे. याशिवाय सिद्धांतवसती नावाचे आणखी एक मंदिर असून, त्यात सदतीस मूर्ती आहेत. या सर्व मूर्ती विविध रत्नांच्या आहेत. या मंदिरात श्रीधवल, जयधवल आणि महाबंध हे ताडपत्रांवर लिहिलेले प्रख्यात जैनग्रंथ ठेवलेले आहेत. त्यांची लिपी कन्नड आहे. इथेच श्रीभट्टारक चारुकीर्ती पंडिताचार्य यांची गादी आहे. [जै. ध.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मूत्तान एक जात. मलबारमध्ये या लोकांची वस्ती आहे. हे स्वतःला वैश्य मानतात व गुप्त ही उपाधी लावतात. हे जानवे घालीत नाहीत व कोणतेही वैदिक आचार पाळीत नाहीत. पूर्वी हे आपल्याला नायर समजत असले व यांच्या चालीरीती नायर लोकांच्याप्रमाणे असल्या तरी, नायर यांचा विटाळ मानतात. हे लोक अंत्यविधीचे पौरोहित्य करतात. हे कालीचे भक्त आहेत. यांना मद्य-मांस चालते. [का. ट्रा. स. इं.]

मूर्क एक तमिळ शैव संत. याची त्रेसष्ट नायन्मारांमध्ये गणना आहे. याला साधुसेवेची आणि देवभक्तीची आवड होती. त्यासाठी त्याने आपले सर्व धन समर्पित केले. ते संपल्यावर जुगारात पैसा मिळवून त्याने आपली शिवभक्तीची हौस पुरविली, असे म्हणतात. [पे. पु.]

मूर्च्छना क्रमाने सात स्वरांचा आरोह व अवरोह करणे याला संगीतशास्त्रात मूर्च्छना म्हटले आहे. स्वर सात असतात आणि ग्राम तीन असतात. प्रत्येक ग्रामात सात मूर्च्छना होत असल्यामुळे त्यांची संख्या एकवीस आहे. पहिला षड्ज ग्राम. त्यातील सात मूर्च्छनांची नावे अशी–(१)उत्तर मंद्रा (२)रजनी (३)उत्तरायता (४)शुद्धषड्जा (५)मत्सरीकृता (६)अश्वक्रांता आणि (७) अभिरुद्वता. दुसरा मध्यम ग्राम. त्यातील मूर्च्छनांची नावे अशी –(८) सौवीरी (९) हरिणाश्वा (१०)कलोपनता (११) शुद्धमध्या (१२) मार्गी (१३) पौरवी व (१४) हृष्यका. तिसऱ्या गांधार ग्रामातील मूर्च्छनांची नावे अशी – (१५) नंदा (१६)विशाल (१७)सुमुखी (१८) चित्रा (१९) चित्रावती (२०)सुखा व (२१) आलापा. [सं. शा.; सं. र.]

मूर्तिकला एखादी प्रिय व्यक्ती दृष्टीसमोर नसताना तिच्या विषयी प्रेमादर व्यक्त करण्यासाठी किंवा तिचे स्मारक म्हणून तिची प्रतिमा तयार करण्याची प्रथा फार प्राचीन काळापासून चालू आहे. जादूटोणा किंवा मंत्रतंत्र करून दुसऱ्या व्यक्तीला छळण्याच्या हेतूने त्या व्यक्तीची प्रतिकृती किंवा बाहुली बनवून तिला सुया टोचणे, ही प्रथाही सर्व देशांत प्राचीन काळापासून रूढ आहे. मात्र अशा बाहुल्या त्या व्यक्तीसारख्या असतातच असे नाही; त्या केवळ प्रतीकात्मकच असतात. दैवी व दानवी शक्तींना संतुष्ट राखण्यासाठी प्राथमिक अवस्थेतला मानव त्यांची सजीव किंवा निर्जीव प्रतीकांच्या रूपाने पूजा करीत असे. मानवाची बुद्धी विकसित झाल्यानंतर त्याने प्रिय व्यक्तीच्या प्रतिमेप्रमाणेच दैवी शक्तींच्या प्रतिमाही मानवी रूपात बनवण्यास प्रारंभ केला. मूर्ती मानवी असली तरी, ती अद्‌भुत सामर्थ्याने संपन्न अशा देवतेची असल्यामुळे, तिला एकाहून अधिक मुखे व बरेच हात असावे, अशी कल्पना मनुष्याच्या मनात आली. अशा प्रकारे भारतीय मूर्तिकलेचा उगम देवपूजेतून झालेला दिसतो. प्राचीन काळातल्या बहुतेक मूर्ती देवतांच्या असून, त्या पूजेच्या उद्देशानेच बनवलेल्या असाव्या, असे वाटते. यक्ष, किन्नर, गंधर्व, अप्सरा, नर्तिका यांच्या मूर्तीही कालांतराने निर्माण होऊ लागल्या. मात्र मूर्तिकलेचे शास्त्र हे बव्हंशी देवतामूर्तींच्या निर्मितीसाठी तयार झालेले आहे आणि पौराणिक व तांत्रिक मूर्तिकला ही धार्मिक कल्पनां व उपासना यांच्याशी संबद्ध आहे.

मूर्तिकलेचे शास्त्र – मूर्तिकलेच्या अभ्यासासाठी ज्या सामग्रीची आवश्यकता असते, तिच्यात वाङ्मयीन उल्लेखांचाही समावेश केला पाहिजे. मूर्तिकलेशी संबंध असलेल्या अनेक गोष्टींवर प्रकाश पडण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. वैदिक साहित्यात असे अनेक परिच्छेद आढळतात, की ते भारतातील आर्यपूर्व रहिवाशांच्या विशिष्ट धर्मपद्धतीची माहिती देतात. गृह्यसूत्रे, धर्मसूत्रे आणि अर्थशास्त्र हे ग्रंथदेखील प्राचीन आर्येतर जमातींच्या धर्माविषयी निर्देश करतात. मूर्तिकलेच्या अभ्यासासाठी त्यांचा उपयोग होण्यासारखा असतो. बौद्ध व जैन यांच्या साहित्यात हिंदूंच्या धार्मिक चालीरीतींविषयी जे प्रसंगोपात्त निर्देश आढळतात, त्यांचाही उपयोग मूर्तिकलेच्या अभ्यासासाठी होऊ शकतो. रामायण, महाभारत व पुराणे यांत तर मूर्तिकलाविषयक बरीच सामग्री आढळून येते.

संस्कृत वाङ्मयात जे मूर्तिकलेचे शास्त्र निर्माण झालेले आहे, ते प्रचंड आहे. ते परिणत होऊन आजच्या स्थितीला यायला अनेक शतकांचा काळ लागला आहे. हे शास्त्र मूर्तिकारांच्या अनुभवातून बनत गेले आहे. बृहत्संहितेत म्हटलेच आहे, की शिल्पशास्त्राचे ज्ञान कलावंताच्या पिढ्यान्‌–पिढ्यांतून वाढत गेलेले आहे. मानसार नामक ग्रंथात शिल्पशास्त्रज्ञांच्या परंपरेवर विपुल विवेचन आहे. त्यात शिल्पलक्षण नावाचे एक प्रकरण असून, त्यात शिल्पज्ञांचे विविध प्रकार पौराणिक कथांच्या रूपात निवेदिले आहेत. त्यांतली एक कथा अशी –

ब्रह्मदेव हा शिवाच्या वरदानाने महाविश्वकर्मा बनला. याला चार दिशांची सूचक अशी चार मुखे होती. पूर्व दिशेच्या मुखाचे नाव विश्वभू, दक्षिणेच्या मुखाचे विश्वविद, पश्चिमेच्या मुखाचे विश्वस्रष्टा व उत्तरेच्या मुखाचे विश्वस्थ होते. पूर्वमुखातून विश्वकर्मा, दक्षिणमुखातून मय, पश्चिममुखातून मनू आणि उत्तरमुखातून त्वष्टा हे कलाकार जन्मले.

बृहत्संहितेतच स्थपती, सूत्रग्राही, वर्धकी आणि तक्षक असे मूर्तिकारांचे चार प्रकार सांगितले असून, त्या सर्वांत स्थपतीला श्रेष्ठ म्हटले आहे. मूर्तींची वैशिष्ट्ये, त्यांची मोजमापे व काही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्राचीन ग्रंथकार यांचाही उल्लेख बृहत्संहितेत आढळतो.

कश्यप आणि अगस्ती हे महान मूर्तिशास्त्रज्ञ समजले जातात. कश्यपाच्या ग्रंथाचे नाव अंशुमद्भेद असून, अगस्तीच्या ग्रंथाचे आगस्तीय सकलाधिकार असे आहे. द. भारतातल्या मूर्तिकलेला या दोघांनीच वळण लावले. दक्षिणेतल्या मूर्तिशिल्पविषयक नावे खरी किंवा खोटी कशीही असोत; पण त्यांच्या नावावरचे शिल्पशास्त्राचे ग्रंथ प्राचीन काली प्रचारात होते, हे निःसंशय. सांप्रत अपराजितपृच्छा, अपराजितवास्तुशास्त्र, मानसार, मानसोल्लास, समरांगणसूत्रधार, मयमत व शिल्परत्न हे प्रस्तुत शास्त्रावरचे महत्त्वाचे ग्रंथ म्हणून प्रसिद्ध आहेत.



फलक क्र. १ – मूर्तिकलेतील आयुधे

१ चक्र, २ शंख, ३ वज्र, ४ अग्नी, ५ त्रिशूल, ६ परशू, ७ अंकुश, ८ खेटक, ९ धनुष्य, १० बाण, ११ गदा, १२ टंक व १३ खड्ग.

ग्रंथांत विश्वकर्मावतारशास्त्र असाही एक ग्रंथ आहे. त्यात प्रस्तुत विषयाच्या अभ्यासाला लागणारी विपुल सामग्री आहे. सनत्कुमार-वास्तुशास्त्र या ग्रंथात चंद्र, यम, भृगू, अंबरीष, व्यास, मनू, इ. प्राचीन वास्तुशास्त्रज्ञांची नावे आढळतात. ही

वरील बहुतेक ग्रंथांचे उगमस्थान बऱ्याचशा बाबतींत संहिता, आगम आणि तंत्रे यांच्यामध्ये आहे. मूर्तिकलेसंबंधीच्या विविध अंगांची माहिती आणि नियम अनेक पुराणांत व तंत्रग्रंथांत दिलेले आहेत. या दृष्टीने मत्स्य, अग्नी, पद्म आणि विष्णु-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust, Funding by MoE-IKS

धर्मोत्तर ही पुराणे महत्त्वाची आहेत. प्रतिमालक्षण, प्रतिमेची प्रतिष्ठा, देवगृहनिर्माण, इत्यादीं विषयांचे त्यांत विवरण आहे. वैष्णव आगमात वैष्णव देवतांच्या मूर्ती बनवणे, त्यांची प्राणप्रतिष्ठा, इ. चे नियम दिलेले आहेत. गोपालभट्ट या गृहस्थाने हरिविलास नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. तो वैष्णव होता. त्याने शेवटच्या तीन विलासांत वैष्णव मूर्तींची घडण, त्यांची स्थापना, मंदिरांची उभारणी, इ. विषयांचा ऊहापोह केला आहे. कामिकागम हा प्राचीन व मान्य असा आगम ग्रंथ होय. त्याने शैव मूर्तींविषयी विचार केला आहे. हेमाद्रीच्या चतुर्वर्गचिंतामणीमध्ये व्रत नावाचा खंड आहे. त्यात अनेक देवतांच्या मूर्तींची लक्षणे सांगितली आहेत. कृष्णानंदाच्या तंत्रकासार ग्रंथांत तांत्रिक देवतांची ध्याने दिली असून, त्यांची वैशिष्ट्ये कोणती तेही विशदपणे सांगितले आहे. तंत्रशास्त्रात देवतांची जी ध्याने व स्तवने आहेत, ती त्या त्या देवतांच्या निर्मितीला मार्गदर्शक ठरणारी आहेत. जय, विजय आणि पराजय हे तीन मूर्तिशास्त्रज्ञ इ. स. च्या १० व्या शतकाच्या आधी द. भारतात जन्मास आले. त्यांनी शैव मूर्तिकलेचा उत्कर्ष केला. प्रत्येकाने स्वतंत्र संप्रदायही निर्माण केले. राणा कुंभाच्या कारकिर्दीत राजस्थानमध्ये मंडन नावाचा एक पंडित होऊन गेला. त्याने मूर्तिकलेवर आणि तत्संबंधी विषयांवर अनेक ग्रंथ केले असून, ते मूर्तिकलेच्या अभ्यासकाला उपयुक्त ठरणारे आहेत.

आगम व तंत्रे यांच्या पूर्वीच्या मूर्ती सुरेख, बांधेसूद, नैसर्गिक व यथातथ्य असत. मध्ययुगात तंत्रग्रंथांची निर्मिती झाल्यानंतर ही परिस्थिती बदलली. तंत्रांनी मूर्तींचे अवयव अस्वाभाविक दाखवावे, असे नियम केले. प्राचीन मूर्तींचे शरीर पिळदार, पण तरीही ताठर नसे. छाती व पोट एकदम वेगळे न दिसता छाती हळूहळू पोटात विलीन झालेली दिसे. स्त्रियांच्या बाबतींतही स्तनांची पुष्टता व कटीची कृशता स्वाभाविक व हळूहळू विकास पावलेली दिसे. नाक किंचित आखुड, ओठ जरासे जाड, चेहरा गोल, डोळे हरिणाक्ष, वस्त्रे स्वाभाविक, निऱ्या व चुण्या कौशल्यपूर्ण, अलंकार अल्प, मुद्रा व आसने सहज व सौष्ठवपूर्ण, अशी ही प्राचीन मूर्तिकला होती.

मध्ययुगात नेमके याच्या उलट घडले. त्या कालात मूर्ती घडल्या त्या मुख्यत्वे पूजेसाठी. त्यांची जडण-घडण होऊ लागली, ती अशी – मस्तकावर रत्नजडित मुकुट, डोळे बटबटीत, काही मूर्तींत ते अतिदीर्घ, चेहरा लांबट, नाक धारदार, ओठाला मधोमध कोन, हनुवटी लहान व आत वळलेली, हस्तपादादी अवयवांत सौष्ठवाचा अभाव, छाती व पोट एकदम विभक्त, स्तन अतिउठावाचे, सिंहकटी अस्वाभाविक, जघनभाग अतिस्थूल, अलंकार विपुल, उत्तरीयाचा अभाव. अधोवस्त्र मांड्यांपुरते, हात अनेक आणि त्यांत आयुधेही अनेक. तांत्रिक संप्रदायातल्याच नव्हे; तर जैनांच्या मूर्तीही अशाच प्रकारच्या आहेत. त्यांना मूर्ती म्हणण्यापेक्षा दैवी गुणांचे प्रतीक म्हणणेच अधिक योग्य ठरेल.

पार्वती

मूर्तिशास्त्रात मूर्तींचे विविध प्रकार, मूर्तींची परिमाणे, भंग, मुद्रा, आसने, अलंकरणे, उपकरणे, इ. विषय येतात. त्यांचे क्रमाने विवेचन पुढीलप्रमाणे —

मूर्तींचे प्रकार – काष्ठ, माती, धातू, पाषाण, इ. वस्तूंच्या मूर्ती बनवतात.

काष्ठमूर्ती – बृहत्संहितेच्या ५८ व्या अध्यायात देवदार, चंदन, शमी, मधूक, अश्वत्थ, खैर, बेल, जीवक, सिंधुक, तिंदुक, केशर, सर्ज, आम्र, शाल, इ. वृक्षांचे लाकूड मूर्ती बनवण्यास योग्य असते, असे सांगितले आहे. भविष्य, मत्स्य, विष्णुधर्मोत्तर ही पुराणे व मानसारादी ग्रंथ यांतही या विषयावर बरीच माहिती आहे. योग्य वृक्ष निवडणे, तो तोडून घरी आणणे, तत्पूर्वी करायचे विधी, भुताखेतांना शांत करण्याचे उपाय, इ. गोष्टी त्यात सांगितल्या आहेत. प्रारंभीच्या मूर्ती लाकडाच्याच बनवीत असत, असे मूर्तिशास्त्रज्ञांचे मत आहे. जगन्नाथपुरी येथील जगन्नाथ (कृष्ण), बलराम व सुभद्रा या मूर्ती काष्ठमूर्तीच आहेत. आग्नेय आशियात बुद्धाच्याही काही काष्ठमूर्ती आढळतात.

मातीच्या मूर्ती – मोहेंजोदडो व हडप्पा येथील उत्खननांत सनपूर्व २५०० वर्षांपूर्वीपासूनच्या मातीच्या मूर्ती मिळाल्या आहेत. मृण्मय मूर्ती बनवण्यासाठी नदीच्या काठची व शेतातली माती आणावी; तिच्यात समभाग दगडाचे चूर्ण, वाळू व लोहचूर्ण मिसळावे, काही तुरट पदार्थ, काही लाकडांचे अर्क, दही, दूध व तूप हे पदार्थ त्या मातीत एकजीव करावे; तो सर्व लगदा महिनाभर तसाच ठेवावा व नंतर त्याची मूर्ती बनवावी, असे वर्णन हयशीर्षपंचरात्र या ग्रंथात दिले आहे. नैमित्तिक व्रतासाठी बहुधा मातीच्या मूर्ती बनवतात व व्रत संपल्यावर त्यांचे विसर्जन करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धातुमूर्ती – धातूच्या ओतीव मूर्ती बनवण्याची कला भारतीय कलाकारांना प्राचीन कालापासून अवगत होती, असे दिसते. कांसे या धातूच्या अनेक प्राचीन मूर्ती सापडल्या असून, त्या उत्कृष्ट आहेत. धातूच्या लहान मूर्ती ओतण्याचे विधान मधूच्छिष्ट-विधान या नावाने ओळखले जात होते. मधूच्छिष्ट म्हणजे मेण होय. विष्णुसंहिता, मानसार, मानसोल्लास, इ. ग्रंथांत त्याचे वर्णन आढळते. कलाकार प्रथम मेणाची प्रतिमा बनवून तिच्या वर मातीचे तीन थर थापीत. माती नीट सुकली, की मेणाला आच देऊन ते वितळवीत. तसे केल्याने मूर्तीचा साचा तयार होत असे. नंतर त्या साच्यात धातूचा रस ओतीत. रस थंड होऊन मूर्ती बनली, की तो साचा फोडीत. आतली मूर्ती घासून पुसून साफ करीत. धातूच्या मोठ्या मूर्ती घडवणे कठीण व व्यापाचे असे. पण गुप्त कालापर्यंत कलाकार अशाही धातुमूर्ती बनवू लागले होते. गुप्त कालातली बुद्धमूर्ती व नंतरच्या काळातली मंजुश्रीची मूर्ती ही दोन उदाहरणे त्याची साक्ष देतील.

भारतीय मूर्तिसंभारात पंचलोह, तांबे, पितळ, चांदी, सोने, यांच्या मूर्ती विपुल प्रमाणात आढळतात. घरातल्या पूजेच्या मूर्ती तर मुख्यत्वे धातुमूर्तीच असतात.



फलक क्र. २ – मूर्तिकलेतील उपकरणे

१ वीणा, २ डमरू, ३ घंटा, ४ दंत, ५ नरमुंड, ६ सर्प, ७ मृग, ८ पक्षी, ९ – ११ कमल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाषाणमूर्ती – देवस्थानात प्राणप्रतिष्ठा करून कायमच्या बसवलेल्या मूर्ती मुख्यत्वे पाषाणाच्याच असतात. अशा मूर्ती घडविण्याचे तंत्र अनेक ग्रंथांत दिलेले आहे. विष्णुधर्मोत्तर पुराणाचा एक अध्याय त्याच विषयावर आहे. त्यात चांगला पाषाण कसा ओळखावा, त्याची अंतरंगपरीक्षा कशी करावी, तसेच भूस्तरशास्त्रानुसार पाषाणाचे बाल, युवा, मध्य, वृद्ध, इ.



फलक क्र. ३ – मूर्तिकलेतील उपकरणे

१ कमंडलू, २ कपाल, ३ पुस्तक, ४ दर्पण, ५ स्रुचा, ६ स्रुवा, ७ आज्यपात्र, ८ अक्षमाला

प्रकार कसे ओळखावे, ते सांगितले आहे. पाषाणमूर्ती छिन्नी व हातोडी यांच्या साहाय्याने घडवितात.

मूर्तिशास्त्रानुसार मूर्तींचे आणखीही काही प्रकार सांगितले आहेत, ते असे –

चल – चल मूर्ती लहान व हलक्या असतात, म्हणून त्या धातूच्या बनवतात. त्यांना उत्सवमूर्ती म्हणतात. मिरवणूक व धार्मिक कृत्ये यासाठी अशा मूर्ती उपयोगात आणतात.

अचल – अचल मूर्ती मुख्यत्वे पाषाणाच्या असून, त्यांची देवळांत कायमची प्रतिष्ठा करतात.

चलाचल – काही काल अचल व काही काल चल असणाऱ्या पाषाणमूर्तींना चलाचल मूर्ती म्हणतात. तुळजापूर येथील भवानीची मूर्ती अशी आहे. वर्षातून तिचे काही शयनकाल ठरलेले असतात. त्या कालात तीच मूर्ती उचलून शेजघरात पलंगावर झोपवितात.

चित्र– मूर्ती मागून पुढून कोरलेली व सगळे अवयव यथातथ्य दाखविणारी असल्यास तिला चित्र म्हणतात.

चित्रार्ध– भिंतीत, दगडात, छतावर, खांबावर व गोपुरांवर ज्या मूर्तींचा दर्शनी भागच दिसतो, तिला चित्रार्ध म्हणतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चित्राभास– कापडावर रंगविलेली मूर्ती.

सात्त्विक– योगारूढ स्थितीत ध्यानमग्न अशी नारायणाची किंवा शिवाची मूर्ती, तिरुमलैच्या व्यंकटेशाप्रमाणे किंवा पंढरपूरच्या विठ्ठलाप्रमाणे उभी असलेली किंवा श्रीरंगमच्या रंगनाथाप्रमाणे शयान स्थितीत असलेली मूर्ती, यांना सात्त्विक म्हणतात.

राजस– नटराजाप्रमाणे नृत्यमुद्रेत असणाऱ्या व हातांत वेगवेगळी आयुधे धारण करणाऱ्या मूर्तींना राजस म्हणतात.

तामस–उग्र व भयंकर अशा काली, चामुंडा, नरसिंह, इ. मूर्ती व शिवाच्या संहारमूर्ती यांना तामस म्हणतात.

वाकविता ताठ उभे राहणे, याला समभंग म्हणतात. बुद्ध, तीर्थंकर, विष्णू, लक्ष्मी व शिव यांच्या मूर्ती समभंग अवस्थेत आढळतात. कलकत्ता येथील टागोर संग्रहालयातली चंद्रशेखराची मूर्ती समभंगाचे उत्तम उदाहरण आहे.

आभंग– शरीराचा वरचा व खालचा भाग या अवस्थेत किंचित वक्र असतो. टाळूपासून निघालेली लंब रेषा नाभीच्या किंचित उजव्या बाजूने जाते. या अवस्थेतल्या आकृती प्राचीन नाण्यांवर पुष्कळ दिसतात. दक्षिणेतल्या जंबुकेश्वराच्या देवालयातील परमेश्वराची व बृहदीश्वराच्या मंदिरातील पार्वती –



फलक क्र. ४ – मूर्तिकलेतील भंग
आभंग, अतिभंग व त्रिभंग

अभिचारक – शत्रूचा नि:पात करण्यासाठी बनवलेल्या कनिष्ठ देवतांच्या मूर्तींना अभिचारक म्हणतात.

मूर्तींचे भंग –उभ्या मूर्ती ज्या चार भिन्न अवस्थांमध्ये बनविलेल्या असतात, त्या अवस्थांना भंग म्हणतात. मूर्तींचे सौंदर्य तिच्या भंगात असते. शिल्पसंग्रह या ग्रंथात त्यांची नावे व लक्षणे सांगितली आहेत, ती अशी –

समभंग– दोन्ही पायांवर सारखा भार देऊन शरीर कुठेही न

चियरची या मूर्ती आभंग अवस्थेत आहेत.

त्रिभंग– मस्तक डाव्या किंवा उजव्या बाजूस कललेले, धड डाव्या किंवा उजव्या बाजूस झुकलेले आणि पाय डाव्या किंवा उजव्या बाजूस वाकलेले, या अवस्थेला त्रिभंग म्हणतात. सुप्रसिद्ध नटराजमूर्ती या अवस्थेत आहे. त्रिभंगामुळे मूर्तीला डौल येतो; पण अशा मूर्ती तुरळकच असतात.

अतिभंग – यात त्रिभंगापेक्षा अधिक वक्रता असते. वरचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भाग पुढे, मागे किंवा एका बाजूला झुकलेला असतो. उग्र देवता किंवा क्रोधदेवता यांच्या मूर्ती अतिभंग अवस्थेमध्ये घडवतात. मात्र अशा मूर्तींचे प्रमाण अत्यल्प आहे.

नीतीत सांगितले आहे. अष्टतालापेक्षा कमी ती वामन मूर्ती देव, राक्षस, इ. अतिमानुष परिमाणे अष्टतालापेक्षा अधिक घ्यायची असतात. मूर्तींची मापे पुढील प्रकारांनी घेतात –



फलक क्र. ५ – मूर्तिकलेतील आसने
१. पद्मासन, २. समपादस्थानक, ३. योगासन, ४. देहुडाचरण गोपाल, ५. सुखासन व ६ नटराज

मूर्तिपरिमाण – शिल्पग्रंथांत परिमाणाचे ध्यान, लक्षण व शरीर असे तीन वर्ग कल्पिलेले आहेत. मुखमंडल हे शरीर परिमाणाचे मूलमान होय. त्याला ताल म्हणायचे. पुरुष अष्ट-ताल, स्त्री सप्तताल आणि बालक पंचताल असावे, असे शुक्र-

मान–अष्टताल, नवताल, दशताल, इत्यादी.
प्रमाण– रुंदी किंवा आडवा विस्तार.
उन्मान– मूर्तींची उंची.
परिमाण– देवतेच्या निरनिराळ्या अवयवांचा घेर.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उपमान– निरनिराळ्या अंगांचे एकमेकांपासून सापेक्ष मापन.

मूर्तिकलेतली आसने – आसने व मुद्रा या दोन भिन्न बाबी असल्या, तरी त्या दोहोंचाही एकाच विषयाशी संबंध असल्यामुळे मुद्रांबरोबरच आसनांचाही विचार करावा लागतो. मूर्तीच्या सौंदर्याचे व सामर्थ्याचे यथार्थ दर्शन होण्यासाठी विशिष्ट प्रकारे तिची बैठक ठेवणे, हे महत्त्वाचे मानलेले आहे. उपनिषदांत आसनांचा उल्लेख आढळतो, परंतु त्या कालात त्यांचा तपशील वाढलेला नव्हता. पुढे तंत्रमार्गाचा प्रसार झाल्यावर तांत्रिक दर्शनांत आसनांच्या लांबलचक याद्या दिलेल्या आढळतात. मूर्ती घडविताना पायांची विशिष्ट प्रकारची रचना करून ती बसलेली दाखवणे, यात मूर्तिकृत देवतेची अवस्था सामान्य मानवाच्या अवस्थेहून भिन्न असते, हे दाखवण्याचा हेतू असतो. आसने ही मूर्तीचे भाव व दैवी गुण प्रकट करतात. अशी काही आसने व त्यांची लक्षणे पुढीलप्रमाणे –

अर्धपर्यंक – दोन्ही पायांची पद्मासन मांडी घालून, एक मांडी कोणतेतरी उशीसारखे आसन देऊन थोडी वर उचलणे.

आलीढ – डावा पाय गुडघ्यात वाकवून पुढे आणि उजवा पाय ताठ पण तिरका असा मागे.

उत्कुटित –पाय सरळ उभे ठेवून किंवा त्यांना तिढा घालून उकिडवे बसणे.

कूर्म – दोन्ही पायांच्या टाचा ढुंगणास चिकटलेल्या राहतील अशा तऱ्हेने मांडी घालणे.

पद्म – टाचा उलट बाजूच्या जांघांमध्ये बसतील अशा रीतीने मांडी घालणे.

पर्यंक – साधी मांडी घालून बसणे.

प्रत्यालीढ – आलीढाच्या उलट करणे.

भद्र – दोन्ही पाय लोंबते सोडून उंच जागी बसणे.

योग – पद्मासनात ध्यानमुद्रा लावणे.

ललित – उंच जागी बसून एका पायाची मांडी घालणे व दुसरा पाय खाली सोडणे.

वज्र – पायांचे तळवे उलट बाजूच्या मांड्यांवर येतील अशी मांडी घालून तळहात गुडघ्यांवर पालथे ठेवणे.

वीर – एका पायाची खुरमांडी घालून किंवा तो लोंबता ठेवून त्याच्या मांडीवरून दुसरा पाय पलिकडे घेणे.

सिंह – कूर्मासन घालून तळहात बोटे पसरून गुडघ्यावर बहिर्मुख ठेवणे व डोळे मिटून तोंड उघडे ठेवणे.

सुख – शरीराला आराम वाटेल अशा प्रकारे बसणे.

सोपाश्रय – सैलशी मांडी घालून, तळपायांची तिढी पुढे ठेवलेल्या कोणत्यातरी आधारावर बसवणे.

स्वस्तिक – पायाची बोटे उलट बाजूच्या गुडघ्याच्या बेचक्यात बसतील अशी मांडी घालणे.

मूर्तिकलेतील मुद्रा – हाताचा तळवा व बोटे अनेक भिन्न प्रकारच्या अवस्था दर्शवू शकतात. या अवस्थांना मुद्रा असे नाव आहे. ज्या अवस्थेत दंडापासून संपूर्ण हाताचा उपयोग केलेला असतो, तिला हस्त असे म्हणतात. हस्तही मुद्रांच्याच प्रकारांत येतात. मुद्रा किंवा हस्त भिन्न भिन्न प्रकारांत दाखवून त्या त्या देवतेच्या भिन्न भिन्न कृतींचा बोध करून देणे हे भारतीय मूर्तिशिल्पाचे वैशिष्ट्य आहे. यांपैकी काही मुद्रांची नावे व लक्षणे अशी–

अंजली – दोन्ही हातांचे तळवे परस्परांस जोडून डाव्या हाताच्या बोटांवर उजव्या हाताची बोटे व डाव्या हाताच्या अंगठ्यावर उजव्या हाताचा अंगठा टेकवणे. दोन्ही तळव्यांत थोडा फुगवटा ठेवणे व मनगटापासून पुढील भाग जमिनीशी समांतर ठेवणे. हिला नमस्कार मुद्रा असेही म्हणतात. ही उपासकाने करायची मुद्रा आहे. नर्तक किंवा नर्तिका नृत्यारंभी व नृत्याच्या अंती ही मुद्रा करून प्रेक्षकांना प्रणाम करतात. बौद्ध मूर्तिकलेत बुद्ध हा सर्वज्ञ व सर्वश्रेष्ठ असल्यामुळे त्याच्या बाबतीत अंजली मुद्रा दाखवीत नाहीत. त्याच्याहून कनिष्ठ देवता व बोधिसत्त्व यांच्या ठिकाणी ही मुद्रा दाखविण्यात येते.

अभय – हाताचा तळवा समोरच्या व्यक्तीकडे वळवून कोपरापासून पुढचा हात उभा धरणे व बोटे ताठ ठेवणे. प्राचीन काळापासून मूर्ती, नाणी व शिक्के यांत ही मुद्रा आढळते. तसेच ती ब्राह्मणी, बौद्ध, जैन, इ. सर्व संप्रदायांच्या मूर्तिशिल्पांतही आढळते. बुद्धाने आपल्या अंगावर चालून आलेल्या मदोन्मत्त हत्तीला उजवा हात वर करून शांत केले, एवढेच नव्हे तर त्याला पायाशी लोळण घेण्यास लावले, अशी जी आख्यायिका आहे, तिच्यात वरील मुद्रेचे बीज आहे, असे बौद्ध लोक मानतात. या मुद्रेने निर्भयता, सुरक्षितता व मनाची स्वस्थता द्योतित होते.

आश्चर्य – प्रश्न विचारताना आपण ज्या प्रकारे हात करतो त्या प्रकारची ठेवण.

कटकसिंहकर्ण – चारही बोटांची टोके अंगठ्याच्या टोकाला मिळवून कडे तयार करणे.

कट्यवलंबित – हात कमरेवर ठेवणे. जसा पंढरपूरचा विठोबा.

कर्णसिंहमुख – तर्जनी व करंगळी सरळ ठेवून मध्यमा व अनामिका तळहातावर दाबून हात लांब करणे.

कर्तरीहस्त – तळहात जुळवून व विमुख करून खांद्याच्या रेषेत आणणे.

गजहस्त – हात किंचित वर उचलून हत्तीच्या सोंडेसारखा खाली सोडणे. नटराजाच्या मूर्तीत ही मुद्रा दिसते.

सूची– पाचही बोटांची टोके एकमेकांना जुळवून मधे पोकळी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निर्माण करणे किंवा तर्जनीने एखाद्या वस्तूस लक्ष्य बनवणे.

अर्धचंद्रहस्त – अंगठा व तर्जनी दूर पसरून अर्धचंद्राकृती बनवणे. अग्निपात्र धरण्यासाठी उपयुक्त.

तर्जनी – तर्जनी उभी करून बाकीच्या बोटांची मूठ दाबणे.

तर्पण – दोन्ही हातांची ओंजळ खांद्यांच्या पातळीत आणणे.

करून धर्मचक्राला गती दिली. त्या प्रसंगाचे अभिव्यंजन या मुद्रेत होते. अजंटा येथील लेण्यांतील खोदलेल्या मूर्तींत या मुद्रेचे स्वरूप आढळते, ते असे–दोन्ही हात छातीसमोर धरलेले. डाव्या हाताने उत्तरीय वस्त्राचा कोपरा धरलेला. उजव्या हाताची तर्जनी व अंगठा यांची अग्रे जुळवून वर्तुळ बनवलेले आणि दोन्ही



फलक क्र. ६–मूर्तिकलेतील मुद्रा

१. नमस्कार मुद्रा, २. तर्जनी मुद्रा, ३. गजहस्त, ४. कटकहस्त, ५. अंजली मुद्रा, ६. अभय मुद्रा, ७. भूस्पर्श मुद्रा, ८. कटिहस्त, ९. ज्ञान मुद्रा, १० व्याख्यान मुद्रा

धर्मचक्र– उजव्या हाताने ज्ञानमुद्रा व डाव्या हाताने चिन्मुद्रा केली असता ही मुद्रा होते. पुष्कळदा बुद्धाच्या मूर्तीत ही मुद्रा दर्शविली जाते. या मुद्रेचे प्रथम दर्शन सारनाथ येथील बुद्धमूर्तीत झालेले आहे. बुद्धाने सारनाथ येथे पहिला धर्मोपदेश हात अगदी जवळ जवळ धरलेले पण स्पर्शरहित. गांधार, तिबेट व जपान या देशांतील धर्मचक्रमुद्रा याहून जरा भिन्न आहेत.

ध्यान किंवा समाधी – पद्मासनात ताठ बसून दोन्ही तळहात मांडीवर उत्ताणे ठेवून डोळे मिटणे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नमस्कार– दोन्ही हात जोडून ते जमिनीशी लंब रूपात धरणे.

भूस्पर्श– डाव्या हाताचा तळवा वर करून किंवा क्वचित दोन बोटांत उत्तरीय वस्त्राचे टोक पकडन तो मांडीवर ठेवणे व उजवा हात गुडघ्यावरून खाली आणून जमिनीला टेकवणे. हिच्यात बोटे कधी भूमीला शिवलेली तर कधी न शिवलेली व त्याने केलेले माराचे दमन या मुद्रेने ध्वनित केले जाते.

वरद – उजवा हात पालथा करून बोटे परस्परांस जुळवून तो खाली वळवणे. या मुद्रेत प्रेक्षकाला काहीतरी देण्याची क्रिया घडत आहे, असा भास व्हावा लागतो. ही मुद्रा करणारी मूर्ती उभी असेल तर तिचा वर देणारा हात शरीरापासून थोडा



फलक क्र. ७–मूर्तिकलेतील आयुधे

१. गदा, २. चाबुक, ३. पाश, ४. परशू, ५. खट्वांग, ६. खड्ग, ७. खेटक, ८. हल, ९. धनुष्य, १०. अंकुश, ११. बाण, १२. शक्ती.

दाखवतात. ज्ञानप्राप्ती होण्यापूर्वी बोधिवृक्षाखाली वज्रासनावर बसण्याचा स्वतःचा अधिकार सिद्ध करण्यासाठी बोधिसत्त्वाने पृथ्वीला आवाहन केले, या घटनेचे हे प्रतीक आहे. शाक्यमुनी व गूढ संप्रदायातील अक्षोभ्य यांच्या मूर्तींत ही मुद्रा दाखवलेली आढळते. गांधार संप्रदायात बोधिसत्त्वाला झालेली ज्ञानप्राप्ती झुकलेला असतो व मूर्ती बसलेली असेल तर हात कोपरापासून जवळ जवळ छातीइतक्या उंचीवर धरलेला असतो. बोटांना थोडा बाक असतो. ही एक सार्वत्रिक मुद्रा आहे. शिव, विष्णू, तारा, वज्रपाणी, मंजुश्री, मैत्रेयबुद्ध यांच्या मूर्तींत ही मुद्रा आढळते. अवलोकितेश्वराची मूर्ती तर सदैव वरद मुद्रेतच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असते. गुप्त साम्राज्याच्या कालात या मुद्रेची प्रथा सुरू झाली व पुढे तिचा सार्वत्रिक प्रसार झाला. देवता आपल्या भक्ताला वरप्रदान करीत आहे, असा अर्थ तिच्यातून सूचित होतो.

व्याख्यान – उजव्या हाताचा अंगठा व तर्जनी यांचे कडे करून बाकीची बोटे सुटी ठेवणे आणि तळहात पाहणाऱ्याच्या समोर धरणे. हिला वितर्कमुद्रा किंवा चिन्मुद्रा असेही म्हणतात. ही मुद्रा वादविवाद व अध्यापन यांची निदर्शक मानलेली आहे. बुद्धमूर्तीत ती विशेषत्वाने दाखवलेली असते. बौद्धांच्या कित्येक दुय्यम प्रकारच्या देवताही व्याख्यानमुद्रेत असतात.

हरिण – हाताची मध्यमा व अनामिका वाकवून त्यांच्याखाली अंगठा धरणे आणि तर्जनी व कनिष्ठिका ही दोन बोटे उभी ठेवणे.

ज्ञान – अंगठा आणि तर्जनी यांची अग्रे जुळवून बाकीची बोटे मोकळी सोडून तळहात हृदयापाशी आणणे.

याशिवाय बौद्ध मूर्तिकलेत हृदय, संपुट, कमल, उत्तानज, आधार, प्रणाम, विपरीत, विपर्यस्त, वज्रांजली, इ. अनेक मुद्रा आढळतात.

मूर्तिकलेतील आयुधे, अलंकरणे व उपकरणे– कित्येक मूर्ती बहुहस्त असतात. त्या हस्तांत काही आयुधे व काही उपकरणे दिलेली असतात. शिवाय त्यांच्या अंगावर काही अलंकारही दाखवलेले असतात. त्यांपैकी काहींची नावे अशी –

अंकुश, खट्वांग (माणसाचे मुंडके टोकाला असलेली गदा किंवा खाटेचा पाय), पट्टिश, पाश, वज्र (मध्ये मूठ व दोही अंगी त्रिशूल असणारे हत्यार), शक्ती (भाल्याचा एक प्रकार), शूल (लांब निमुळते टोक असलेला भाला), चक्र, खड्ग, धनुष्य, बाण, रज्जू, इ. ही आयुधे होत.

अक्षमाला (रुद्राक्ष, स्फटिक, इ.ची माळ), अंगद (दंडावरील एक दागिना) कमल, मकरकुंडले (कानातला लोंबता दागिना), चन्नवीर (सव्य व अपसव्य असा जोड जानव्यासारखा एक अलंकार), रत्नमुकुट, जटामुकुट, करंडमुकुट, जटाबंध, श्रीवत्स (हृदयावरील एक अलंकार), मौक्तिकमाला, ताटंकचक्रे, मेखला, बाहुभूषणे, पत्ररचना, मांड्यांवर लोंबणारी तोरणे, प्रभामंडळ (शैवमूर्तीत त्याला ज्वाला व वैष्णव मूर्तीत त्यावर नक्षीकाम) इत्यादी ही अलंकरणे होत.

अग्नी (भांड्यात किंवा एखाद्या दांड्याला ज्वालायुक्त अग्नी असतो), कपाल (माणसाच्या डोक्याची कवटी, अर्धे मडके किंवा परळ), कुंडिका (लहान परळ), डमरू, नंद्यावर्त (स्वस्तिकाच्या जातीची एक आकृती), पानपात्र, वीणा, श्रीफल (बेलफळ किंवा नारळ), कमंडलू, पुस्तक, दर्पण, आज्यपात्र, स्रुचा (दांड्याला वाटोळे टवळे असलेली पळी), स्रुवा (चमच्यासारखे लांबट टवळे असलेली पळी), इ. ही उपकरणे होत.

मूर्तिकलेचा इतिहास – भारतात मूर्तिकला अतिप्राचीन काळापासून या ना त्या स्वरूपात विद्यमान आहे. तिचा उगम शोधायचा झाल्यास ऋग्वेदकालाच्याही मागे जावे लागते. वैदिक संस्कृतीच्या पूर्वी भारताच्या पश्चिम व वायव्य भागांत एक संस्कृती नांदत होती. सिंधुसंस्कृती या नावाने ती ओळखली जाते. मोहेंजोदडो आणि हडप्पा ही तिची मुख्य केंद्रे होती. या दोन्ही ठिकाणी जे उत्खनन झाले, त्यात पूर्ण प्रगत अशा नगरांचे अवशेष सापडले, त्याचबरोबर हजारोंच्या संख्येने धातू, अस्थी, हस्तिदंत, रत्न, काच व माती यांच्या मूर्तीही मिळाल्या आहेत. त्या मूर्ती पाहिल्या म्हणजे त्या संस्कृतीतल्या कलाकारांच्या कौशल्याची कल्पना येते.

मृण्मूर्ती – मोहेंजोदडो

त्यांतल्या काही मूर्ती खेळण्यासाठी होत्या, तर काही पूजेसाठी होत्या, हेही कळते. सिंधुसंस्कृतीतले लोक मूर्तिपूजक होते, यात शंका नाही. तिथल्या मूर्तिसंभारात एका ठिकरीवर त्रिशूलसदृश शिंगे असलेली देवतेची एक उभी मूर्ती बनलेली असून, तिच्या चारही अंगी जनावरे खोदलेली आहेत. संशोधकांचे मत आहे, की ती प्राचीन कालची शिवाची मूर्ती असावी. शिव हा पशुपती या नावाने त्या संस्कृतीत पूजिला जात असावा. एक स्त्रीची ताम्रमूर्ती नग्न स्वरूपात मिळाली आहे. एक पाषाणमूर्ती भग्न स्थितीत आढळली आहे. ती नाचणाऱ्या स्त्रीची असावी. कारण तिचा एक पाय उचललेला आहे. माती आणि चुना यांच्या मिश्रणाची एक योगासनातली मूर्तीही सापडली आहे.

सिंधुसंस्कृतीतले हे लोक द्रविड होते. वैदिक आर्यांनी त्यांच्यावर आक्रमण केले आणि त्या आक्रमणात द्रविड लोक पराभूत झाले. पूजा व भक्ती ही द्रविड संस्कृतीची वैशिष्ट्ये होती. चैत्यगृहे, कमानदार छपरे व दगडी फरशीचे बांधकाम हे द्रविड कलेचे नमुने असून, ते इतक्या प्राचीन काळी भारताच्या बाहेर कुठेही सापडत नाहीत. ही सिंधुसंस्कृती वैदिक आर्यांच्या आक्रमणापुढे टिकली नाही. तिथले लोक आर्यांच्या दबावामुळे हळूहळू खाली दक्षिणेकडे हटले. त्यानंतरच्या सुमारे दोन हजार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्षांच्या कालातल्या मूर्ती उपलब्ध होत नाहीत. व त्या काळातला इतिहासही ज्ञात नाही.

सनपूर्व सातव्या-आठव्या शतकापासून मौर्यकालाच्या प्रारंभापर्यंतच्या कालखंडाला महाजनपदयुग असे म्हणतात. बुद्ध आणि महावीर हे याच कालखंडातले धर्मप्रवर्तक होत. देव देवतांची वाढ याच कालात होऊ लागली. या कालातल्या ८ ते १० हात उंचीच्या पाषाणमूर्ती आढळल्या आहेत. या मूर्ती विशेषेकरून यक्षांच्या आहेत. परखम नावाचा एक यक्ष सनपूर्व ७व्या शतकातला असून, त्यावर कुणिक अजातशत्रूचा आलेख आहे. भारतीय मूर्तिशिल्पात हा पुतळा सर्वांत प्राचीन मानला जातो. सांप्रत तो मथुरेच्या वस्तुसंग्रहालयात आहे. आणखीही काही यक्षमूर्तींच्या चबुतऱ्यांवर तद्विषयक माहिती असलेले कोरीव लेख आढळतात. भरहूत येथे ज्या कलाकारांनी यक्षमूर्ती घडवल्या, त्यांची नावे सुपवास, विरूढक, सूचिलोम, अजकालक, सुदर्शन, इ. तिथे कोरलेली आहेत. त्या कालातल्या काही यक्षमूर्ती सांप्रत मथुरेच्या संग्रहालयात आहेत. एका यक्षिणीची विशालकाय मूर्ती बेसनगर येथे सापडली होती, ती सांप्रत कलकत्त्याच्या संग्रहालयात आहे.

सम्राट अशोक याने या देशात ज्या प्रकारच्या शिल्पकलेचा प्रारंभ केला, तशा प्रकारची शिल्पकला मागे नव्हती व पुढेही झाली नाही. त्याच्या काळातले हजारो मण वजनाचे आणि ४० ते ५० फूट उंचीचे पाषाणस्तंभ भारतात अनेक ठिकाणी उभे आहेत. त्या स्तंभांच्या शीर्षांवर सिंह, हत्ती, वृषभ, इ. मूर्ती बसवल्या आहेत. सारनाथ येथील स्तंभशीर्षावर पाठीला पाठ लावून बसलेले चार सिंह आहेत. त्यांच्या चक्राकार बैठकीवर चक्र, हंस, पळणारे घोडे, हत्ती व बैल आहेत. त्याच्यावरचे धर्मचक्र सांप्रत भारताच्या राष्ट्रध्वजावर विराजमान झाले असून, हे स्तंभशीर्ष स्वतंत्र सार्वभौम भारताने आपले अभिज्ञान चिन्ह म्हणून स्वीकारले आहे.

याच काळातली एक विशालकाय चामरधारिणीची मूर्ती पाटण्याच्या वस्तुसंग्रहालयात ठेवलेली आहे. जरा झुकलेली, अंगोपांगांनी परिपुष्ट आणि सुबक घडणीची ही मूर्ती आजही प्रेक्षकांच्या दृष्टीला आनंद देते.

मौर्ययुगापुढचे शुंगयुगही मूर्तिकलेच्या इतिहासात गाजले. त्या कालात माती आणि पाषाण या दोहोंच्याही मूर्ती बनू लागल्या. शुंगकालातल्या मूर्ती त्यांच्या पोषाखावरून वेगळ्या ओळखू येतात. मस्तकावर पुढच्या अंगी दोन गाठी असलेली पगडी आणि दोन पायांमधून धोतराचा जमिनीला स्पर्श करणारा त्रिकोणी पदर असा त्यांचा वेष असतो. या काळातल्या देवता व यक्ष-यक्षिणी यांच्या मूर्ती, जैन-बौद्धांच्या प्रतीकमूर्ती, मंदिरे व स्तूप यांच्यावर अलंकरण म्हणून कोरलेल्या प्रणयनिदर्शक मूर्ती आणि स्तूपांच्या कठड्यावरच्या मूर्ती असा हा मूर्तिसंभार आहे. या कालात विष्णू, शिव, ब्रह्मा, बलराम, इंद्र, कुबेर, लक्ष्मी, इ. पौराणिक मूर्ती; तसेच बुद्धाचे अनुचर व उपासक यांच्या मूर्ती विपुल प्रमाणात बनू लागल्या. अजूनपर्यंत बुद्धाच्या मूर्ती मात्र घडत नव्हत्या. बुद्धाने, आपली मूर्ती बनवू नये, असा आदेश दिला होता. त्यामुळे मूर्तिकलेत बुद्धाची उपस्थिती छत्र, पदचिन्ह, धर्मचक्र, बोधिवृक्ष, पद्म, वज्रासन, इ. प्रतीकांच्या द्वारेच दाखवली जात होती.

मौर्यकालीन मूर्ती (यक्षी) — दीदारगंज

शुंगकाल व त्यापुढचा कुशाणकाल यांमध्ये यक्ष-यक्षिणींच्या मूर्ती नग्न, अर्धनग्न पण भावदर्शक अशा बनू लागल्या. यक्षिणींचा संबंध वृक्षशाखा आणि लतायांच्याशी जोडला गेला. अशा यक्षिणींना मूर्तिशास्त्रज्ञांनी शालभंजिका असे नाव दिले आहे. यांच्या अंगावर अनेक अलंकार असतात. त्यांच्या केशरचनेवर मोत्यांच्या व रत्नांच्या लडी, दंडांत बाजूबंद, हातांत भरपूर कंकणे आणि कमरेला रत्नजडित कटिबंध असतो. अशा प्रकारच्या यक्ष-यक्षिणींच्या मूर्ती भरहूत येथील स्तूपाच्या कठड्यावर शेकडोंनी पाहायला मिळतील. शुंगकालातल्या या कठड्यावर बुद्धचरित्रातल्या अनेक घटना, अशोकादींच्या शोभायात्रा, तळ्यात उमललेली कमळे, इ. दृश्ये कोरलेली आहेत. या कालातल्या स्तूपांच्या तोरणद्वारांवरही मूर्तींची खेचाखेच आहे. शुंगकालात पाटलिपुत्र, सांची, भरहूत, सारनाथ, कौशांबी, बोध-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गया, मथुरा, बेसनगर व दक्षिणेतील जग्गय्यपेट ही मूर्तिकलेची केंद्रे बनलेली होती. मिथुनमूर्ती, नाचरंग करणाऱ्या विलासी

शालभंजिका–मूर्ती

मूर्ती, प्रणयप्रधान कथा आणि गावे व नगरे यांतील समाजदृश्ये अशा प्रकारची मूर्तिसंपदा त्या कालात निर्माण झाली. मातीची खेळणीही अपरंपार बनली.

कनिष्क हा सर्वश्रेष्ठ कुशाण राजा होता. त्याने पटण्यापर्यंत सारा मध्यदेश जिंकून घेतला होता. तो बौद्ध बनला होता. अशोकाप्रमाणे त्यानेही बौद्ध धर्माचा प्रचार केला. त्याच्याच कालात नागार्जुनाने बौद्ध धर्मातला महायान पंथ प्रचलित केला. त्या पंथाने बुद्धाच्या पूर्वजन्मांना महत्त्व दिले. बुद्ध हा पूर्वीच्या अनेक जन्मांत बोधिसत्त्व होता, असे प्रतिपादन सुरू केले. त्यामुळे महायान संप्रदायाच्या वाढीवरोबरच बुद्ध आणि बोधिसत्त्व यांच्या मूर्तींना बहर आला. एकामागून एक अशा त्यांच्या मूर्ती बनत गेल्या. मथुरा, सारनाथ, अमरावती व नागार्जुनकोंडा ही कुशाणकालीन मूर्तिकलेची केंद्रे बनली. कुशाणकाळात प्रारंभी ज्या बुद्धमूर्ती बनल्या, त्यांच्यावर गांधारशैलीचा प्रभाव होता. बुद्धमूर्ती प्रथम बनली, ती गांधारशैलीतच बनली असे म्हणतात. मूर्ती पाहताच कळते, की हिचे ठाणमाण व मुखमंडल भारतीय नसून ग्रीक आहे. कलेचे बाह्यरूप विदेशी, पण तिचा आशय किंवा प्राण भारतीय, असे ते मूर्तिदृश्य दिसते.

कुशाणकाळातली मूर्तिकला देशी–विदेशी अशा मिश्र छापाची होती; पण त्यानंतर अवतरलेली मथुराशैली मात्र शुद्ध भारतीय बनली. मथुरेची मूर्तिकला ही सांची व भरहूत येथील कलांची विस्तारलेली शाखा आहे. मथुराकलेत जैनांचे व बौद्धांचे अनेक स्तूप निर्माण झाले. त्या स्तूपांना चारही दिशांना कठडे बनवले गेले. कलाकारांना आपले कौशल्य दाखवायला ते अत्यंत उपयुक्त ठरले. त्यांनी त्यावर फूलपत्तींच्या आकृती व जनावरे कोरली; तसेच नग्न-अर्धनग्न, फुले तोडणाऱ्या, स्नान करणाऱ्या, चेंडू खेळणाऱ्या, वाद्ये वाजविणाऱ्या, चेंडू उडविणाऱ्या, अशोकवृक्षाला बहर येण्यासाठी त्याला डाव्या पायाची लाथ मारणाऱ्या, अशा अनंत प्रकारच्या स्त्रीमूर्ती निर्माण केल्या.

यक्षराज कुबेर याच्या मूर्तीही त्या काळात पुष्कळ बनल्या. ढेरपोट्या आणि हातात धनाची थैली घेऊन बसलेल्या अशा त्या ठेंगण्या, स्थूल कुबेरमूर्ती आहेत. त्या काली यक्षिणींच्याही अनेक मूर्ती बनल्या. नग्न अवस्थेत एका ठेंगू पुरुषाच्या पाठीवर उभ्या असलेल्या त्या दिसतात.

या कालात तीन वस्त्रे धारण करणाऱ्या, उभ्या आणि बसलेल्या बुद्धमूर्ती निर्माण झाल्या. त्याच्या मागोमाग जातककथांचेही मूर्तिकरण झाले. जैन लोकही या कामी मागे राहिले नाहीत. त्यांनीही तीर्थंकरांच्या मूर्ती, तसेच चतुष्कोणी स्तंभांच्या चारही अंगांना जिनमूर्ती कोरल्या. त्या जशा उभ्या, तशाच बसलेल्या होत्या. बुद्ध व जिन यांच्या बैठ्या मूर्ती सारख्याच दिसतात. बुद्धाच्या अंगावर वस्त्र असते व जैन मूर्ती नग्न असतात, हा त्यांतला फरक. याशिवाय हृदयावरचे श्रीवत्स हेही जिनमूर्ती ओळखण्याचे दुसरे लक्षण आहे.

त्या काळातल्या दोन स्त्रीमूर्ती विशेष उल्लेखनीय आहेत. एक लक्ष्मी व दुसरी प्रसाधिका. लक्ष्मीची मूर्ती लखनौच्या संग्रहालयात असून ती सजीवता व सुंदरता या दोन्ही दृष्टींनी अद्वितीय आहे. प्रसाधिकेची मूर्ती काशीच्या कलाभवनात आहे. तिने ... फुले आणि गजरे यांनी भरलेली प्रसाधनपेटिका आपल्या ... घेतली आहे. मथुरेच्या कलाकेंद्रात नाग-नागिणींच्या मूर्तीही असंख्य बनल्या. मथुरेची एक सूर्यमूर्तीही मोठी विलक्षण आहे. ती पहिली भारतीय सूर्यमूर्ती असल्याचे सांगतात. छोटी ... कुशाण राजासारखा अंगात अचकन आणि गुडघ्यापर्यंत पोहोचणारे बूट असा तिचा वेष आहे. तिच्या कमरेला खंजीर लटकत आहे. याच कालात कृष्णचरितातल्या घटना दगडांवर कोरल्या जाऊ लागल्या. मथुरेतल्या एका पट्टीवर वसुदेव हा कृष्णाला ... टोपलीत ठेवून व ती टोपली डोक्यावर घेऊन यमुना पार करत आहे, असे दृश्य खोदलेले आहे. या कालातल्या कलाकारांनी ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कनिष्क व चष्टन या कुशाण राजांच्या खड्या मूर्ती बनवल्या. हातात राजदंड, अचकन, सलवार व बूट अशा वेषातल्या त्या मूर्ती आहेत. कुशाणकाळातली तोरणे अत्यंत सुंदर आहेत. त्यांचे कित्येक नमुने लखनौच्या संग्रहालयात आहेत.

त्यानंतर गुप्तयुग अवतरले. त्या कालात भारतीय मूर्तिकलेचा परमोत्कर्ष झाला. मूर्तीची जडण-घडण, विविध आशय, अलंकरणे आणि सजीवपणा या सर्व दृष्टींनी गुप्तकालीन मूर्तिकला अद्वितीय ठरली आहे. या कालात बौद्ध व ब्राह्मणी अशा उभयविध मूर्ती

वज्रपाणी — नालंदा

विपुल प्रमाणात घडल्या. अजंटा व वाघ येथील चित्रमय गुहा याच कालातल्या होत. धातुकला, मृण्मयमूर्तींची कला, चित्रकला या सगळ्याच कला त्या काळात उत्कर्षबिंदूवर चढल्या. गुप्तयुगातल्या उभ्या आणि बैठ्या बुद्धमूर्ती जगातल्या कलाविदांना आश्चर्यकारक वाटल्या आहेत. मथुरेच्या संग्रहालयात जी एक मूर्ती आहे, ती शांती आणि गांभीर्य या भावनांचे सुस्पष्ट निदर्शन घडवते. नासाग्रावर दृष्टी लावून परम संतोषात उभी असलेली ती बुद्धमूर्ती जणू विश्वातल्या जीवांना अभय देत राहिली आहे. ही मूर्ती, सारनाथ येथील धर्मचक्रप्रवर्तनातील बैठी मूर्ती आणि सुलतानगंज येथील ७॥ फूट उंचीची ताम्रमूर्ती या तीन बुद्धमूर्ती जगातल्या सर्वश्रेष्ठ व सर्वांगसुंदर बुद्धमूर्ती ठरल्या आहेत.

देवगढ येथे एका गुप्तकालीन मंदिराचे भग्नावशेष आढळतात. त्यांच्या भिंतीवर बाह्य अंगाने देवतांच्या लावण्यसुंदर मूर्ती कोरलेल्या आहेत. त्यांमधले शेषशायी विष्णू, गजेंद्रमोक्ष करणारा विष्णू आणि नरनारायण,ही विष्णुस्वरूपे अत्यंत सजीव आणि सुकुमार आहेत. याच भिंतीवर रामायण-महाभारतांतली दृश्ये आहेत. उदयगिरी येथे वराहअवताराची एक सामर्थ्यवान मूर्ती असून, तिने आपल्या सुळ्यांवर पृथ्वी तोलून धरली आहे. गंगा-यमुनांच्या सुंदर मूर्तीही याच कालात बनल्या. भूमरा, नचना व खोह येथे अनेक शिवमूर्ती साकार झाल्या. शैववैष्णव परिवारातल्या दुर्गा, पार्वती, महिषासुरमर्दिनी, कुबेर, गणेश, कार्तिकेय, मातृका, लक्ष्मी, ब्रह्मा, इ. मूर्तींनी तत्कालीन मूर्तिकला समृद्ध बनली. कमनीय काया, अंडाकृती चेहरा, पातळ ओठ, कुरळे केस, प्रत्येक अवयवाचा भरीवपणा, भावनिदर्शन आणि सजीवता या सर्व दृष्टींनी गुप्तकालातल्या मूर्तींना एक आगळे वैशिष्ट्य आले आहे.

इ. स. चे ६ वे शतक संपण्याच्या सुमारास गुप्तयुगाचा अस्त झाला. तिथून पुढली सहाशे वर्षे मध्ययुग या नावाने ओळखली जातात. या काळात स्वतंत्र मूर्तींची निर्मिती कमी झाली आणि मंदिरांच्या अलंकरण-मूर्तींना बहर आला. देव-देवतांच्या संख्येतही खूप भर पडली. या काळात जैन, बौद्ध आणि पौराणिक या तीन्ही संप्रदायांत बाह्य अवडंबराला खूप महत्त्व प्राप्त झाले; पण त्या कामात कलेचा आत्मा मात्र हरवला. अजंटा, वेरूळ आणि घारापुरी येथील लेणी आणि दक्षिणेतील मामल्लपुरम येथील रथशिल्पे ही याच काळातली होत. वेरूळ येथील गुहामंदिरात कैलासलेणे सर्वश्रेष्ठ आहे. तिथल्या अनेक दृश्यांत रावण कैलास उचलतो ते दृश्य विलक्षण सामर्थ्यसंपन्न आहे. वेरूळ येथील सदाशिवाची त्रिभंग अवस्थेतली मूर्तीही तिच्यावरून दृष्टी हालू नये, इतकी भव्य, सुंदर आहे. घारापुरी येथेही शिव-पार्वतींच्या अनेक सुंदर मूर्ती आहेत. तिथली त्रिमूर्ती तर कलेच्या क्षेत्रात अजरामर ठरली आहे. या सर्व मूर्तींत गती आणि सामर्थ्य यांचा प्रत्यय येतो.

मध्ययुगाच्या उत्तरार्धात या देशामध्ये अनेक सुप्रसिद्ध मंदिरे निर्माण झाली. भुवनेश्वर येथील शिवमंदिर, कोणार्क येथील सूर्यमंदिर, पुरी येथील जगन्नाथमंदिर आणि खजुराहो येथील कंदरिया महादेवाचे मंदिर, ही या कालातली मंदिरे होत. या मंदिरांची प्रसिद्धी प्रणयमूर्ती किंवा शृंगारमूर्ती यांसाठी आहे. कामक्रीडेमधील स्त्री–पुरुषांची विविध संभोगासने तिथे मूर्तिमान झाली आहेत. दिलवाडा येथील जैन मंदिरे सजावटीच्या दृष्टीने पराकोटीला पोचली आहेत. तिथल्या लहान-मोठ्या मूर्तींची गणनाच करता येणे कठीण आहे. जिथे दृष्टी जाईल तिथे मूर्ती, असा तो प्रकार आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या कालातल्या मूर्ती बहुतांशी काळा पाषाण किंवा संगमरवर यांच्या बनलेल्या आहेत. पाल राजांच्या कारकिर्दीत (इ. स. चे ८ वे ते १२ वे शतक) ज्या मूर्ती बनल्या, त्या विशेष प्रसिद्ध आहेत. या काळातल्या महोबा येथे सापडलेल्या बोधिसत्त्वाच्या मूर्ती विलक्षण सुंदर आहेत. त्यांतही सिंहनाद अवलोकितेश्वराची मूर्ती कलादृष्ट्या अप्रतिम आहे. काळ्या पाषाणाची सरस्वतीची त्रिभंग मुद्रेतील मूर्तीही अतीव सुंदर आहे.

चक्रेश्वरी – दिलवाडा

मध्ययुगापूर्वीची दक्षिणेतली मूर्तिकलेची केंद्रे म्हणजे आंध्रातली अमरावती व नागार्जुनकोंडा ही होत. इथल्या मूर्तिशिल्पांचा काळ गांधारशैली व सांची यांच्या मधला आहे. तिथल्या शिल्पांत सांचीप्रमाणे बुद्धाची प्रतीके आहेत आणि गांधारशैलीप्रमाणे बुद्धाच्या मूर्तीही आहेत. तिथे जो एक भव्य स्तूप सापडला आहे, त्याच्या भोवतालच्या कठड्यावर आतल्या व बाहेरच्या अंगांना हजारो मूर्ती कोरून काढलेल्या आहेत. अमरावतीच्या काही सुंदर मूर्ती सांप्रत मद्रासच्या वस्तुसंग्रहालयात आहेत. नागार्जुनकोंडा येथेही कितीतरी प्राचीन बौद्ध स्तूप, विहार व चैत्यगृहे यांचे अवशेष सापडले आहेत. तिथले बुद्धावतरणशिल्प जसे अद्भुत आहे, तशाच तिथल्या शालभंजिका-मूर्तीही कमनीय आहेत. नागार्जुनकोंडा येथील शिल्पकृतींमध्ये आंध्रवासी लोकांच्या धार्मिक व सामाजिक जीवनाचे सुंदर चित्रण झालेले आढळते.

आग्नेय आशियातल्या जावा, सुमात्रा, बाली, इ. द्वीपसमूहात जी मूर्तिकला बहरली, तिचा उगम अमरावती व नागार्जुन या कलाक्षेत्रांतून झाला आहे. तिकडची मूर्तिकला वरील दोन क्षेत्रांतील आशयाने अनुप्राणित आहे.

भारतीय मूर्तींचा विध्वंस दोन परकी जमातींनी केला. प्राचीन मूर्ती हूणांनी विध्वंसल्या आणि त्यानंतरच्या मूर्तिसंभारावर परकी मुसलमानांनी घणाघात केला. आजमितीस उ. भारतातल्या अनेक मोठमोठ्या संग्रहालयांत ज्या उत्तमोत्तम मूर्ती ठेवलेल्या आहेत, त्यांपैकी बहुतेक छिन्नभिन्न आहेत. ही भिन्नता कालकृत नसून, आक्रमक व असहिष्णू अशा मानवाच्या हाताने झालेली आहे. या सार्वत्रिक विध्वंसनामुळे उत्तरेत मूर्तिकलेची हानी तर झालीच, शिवाय मूर्तिकलेची केंद्रेही ओस पडली. पण एवढे होऊनही या देशातली मूर्तिकलेची निर्मिती मात्र थांबली नाही.

उ. भारत प्रतिकूल होताच द. भारतात कलेची केंद्रे उत्पन्न झाली. दक्षिणेतली विशाल मंदिरे आणि गगनचुंबी गोपुरे ही याची साक्ष आहेत. तंजाऊर येथील बृहदीश्वरमंदिर, मदुरेचे मीनाक्षीमंदिर, कर्नाटकातले सोमनाथमंदिर, हळेबीड येथील शिवमंदिर आणि या सर्व मंदिरांचे परिसर मूर्तिकलेने समृद्ध बनले आहेत. दक्षिणेतल्या पुष्कळशा मूर्ती भव्य तर आहेतच; शिवाय त्या शक्ती आणि स्फूर्ती यांनी रसरसलेल्या आहेत. ही स्फूर्ती म्हणजे दक्षिणेतील शैव–वैष्णव संतांच्या जीवनांतून प्रगट झालेली स्फूर्ती आहे. दक्षिणेतल्या मूर्तिसंभारातले द्वारपाल उंच, श्रीमंत आणि सालंकृत आहेत. मदनिकांचे आकृतिसौंदर्य, त्यांच्या निर्मितीतली सफाई आणि कलेचा नाजुकपणा या गोष्टी अद्वितीय आहेत. संतमूर्ती शांत, गंभीर व दर्शनीय आहेत. या रामायण–महाभारतातले मूर्तिबद्ध कथाप्रसंग सुरेख आहेत. या मूर्तिविश्वातले अनर्घ्य रत्न म्हणजे नटराज हे होय. या मूर्तीचा प्रत्येक अंगविक्षेप, प्रत्येक आयुध आणि प्रत्येक अलंकरण हे प्रतीकात्मक आहे. अनेक प्रतीकांच्या समुच्चयातून साकारलेले ते एक विराट प्रतीक आहे. या मूर्तीने नृत्य, नाट्य आणि साहित्य या ललित कलांना प्राणवान बनवले आहे. दक्षिणेतल्या नटराजाच्या अनेक कांस्यमूर्ती जगातील अनेक कलावंतांना मंत्रमुग्ध करतात. तांडवनृत्य करणारा नटराज सर्वांत गतिमान, सर्वांत उत्कृष्ट आणि सर्वांत अद्भुत आहे. त्याची मूर्ती तंजाऊर येथील बृहदीश्वरमंदिरात आहे. हा नटराज केवळ भारतीय कलांचाच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नव्हे; तर विश्वकलेचाही एक अमोल ठेवा आहे. नटराजमूर्ती

नटराज – अमरावती

निर्माण झाली आणि विश्वातल्या मूर्तिकलेने आपल्या मस्तकी शिरपेच चढविला.

दक्षिणेतील मूर्तिकलेत प्रारंभापासून स्त्री ही सौंदर्य आणि मार्दव या दोन्ही गुणांचे प्रतीक ठरली आहे. बौद्ध धर्म त्या भागात पसरण्यापूर्वी दक्षिणेतील कलाकार लाकडी, हस्तिदंती आणि दगडी मूर्ती बनवण्यात तरबेज होते. सनपूर्व तिसऱ्या शतकात बौद्ध धर्म दक्षिणेत पसरला. कोंडाणे, कार्ले, बेडसे ही महाराष्ट्रातली लेणी आणि त्यांतील मूर्ती या सनपूर्व दुसऱ्या शतकातल्या आहेत. या लेण्यांतली मूर्तिकला पूर्णावस्थेला पोचलेली दिसते. यावरून ती त्यापूर्वी अनेक शतके हळूहळू प्रगत होत होती, असे अनुमान करता येते. या लेण्यांतील मूर्तींचे काही नमुने उल्लेखनीय आहेत. कोंडाण्याच्या लेण्यातल्या चैत्याच्या डाव्या भिंतीवर काही चौकटी आहेत. त्यांपैकी एका चौकटीत एक धनुर्धारी आणि अलंकृत पुरुष आहे. त्याचे केस कलापूर्ण रीतीने विचरलेले आहेत. हा पुरुष आपल्या डाव्या बाजूच्या स्त्रीशी प्रणयालाप करीत आहे. त्याच्या डोळ्यांतली चमक त्याचे अंतरीचे प्रेम सुस्पष्ट सूचित करते. त्याची प्रेयसीही प्रेमसागरात डुंबत असल्याचे तिच्या मुद्रेवरून दृष्टोत्पत्तीस येते. आपल्या प्रेमानंदाचा तोल सावरण्यासाठी तिने आपल्या प्रियकराचा शेल एका हातात धरला असून, दुसरा हात ढंगदारपणे कमरेवर ठेवला आहे. त्याच्या उजव्या बाजूकडची स्त्री एका शिळेवर बसली असून, तिला या दोघांच्या प्रेमचेष्टा पसंत नसल्याचे दिसते. ती त्या पुरुषाला चिमटा घेऊन आपली नापसंती सूचित करते. या चित्रसमूहातील लय आणि भाव या दोन गोष्टी चटकन नजरेत भरतात. अजंटा येथील १० व्या लेण्यातली मूर्तिशिल्पे नमुनेदार आहेत. कार्ल्याच्या लेण्यातल्या एका मनोहर मूर्तिशिल्पात एका स्त्रीने आपल्या उजव्या हाताला वाक देऊन मस्तकाला हळुवारपणे स्पर्श केला आहे आणि डावा हात आपल्या प्रियकराच्या कमरेभोवती लपेटला आहे. तिने आपला डावा पाय गुडघ्यात वाकवला असून, बोटेच फक्त जमिनील टेकविली आहेत. बेडशाच्या लेण्यात एका स्तंभावर दुसऱ्या प्रकारचे मूर्तिशिल्प आहे. त्यात एक राजदंपती घोड्यावर स्वार झालेली आहे. हे जोडपे आनंदी आहे. त्याचे अवयव रेखीव आहेत. त्यातला पुरुष प्रेमात आला असून, तो आपल्या अश्वारूढ प्रेयसीला कुरवाळण्यासाठी आपला हात पुढे करीत आहे. दोघांच्याही मुखमुद्रांवर प्रणयभाव प्रतिबिंबित झाला आहे. त्यातला बारकावा असा, की त्यांची घोडीही परस्पर प्रेमात आली आहेत. त्यांची आयाळ आणि कान ताठ झाले आहेत व डोळे विस्फारले आहेत. दक्षिणेतील हीनयानी बौद्धांच्या कलेचे हे सर्व नमुने आहे.



द्वारपालाची मूर्ती – घारापुरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काही लेण्यांत सुंदर स्त्रीबरोबर विदूषकाची मूर्ती कोरलेली दिसते. आपल्या शरीराचा तोल सावरताना ती स्त्री त्या विदूषकाच्या डोक्याचा आधार घेते. विदूषकाचे अवयव ओबडधोबड दिसतात. मुख्य मूर्तीचे सौंदर्य खुलून दिसावे म्हणून हे विदूषक ओबडधोबड बनवले गेले आहेत. वेरूळच्या लेण्यांत असे एक चित्र आहे. भारतीय मूर्तिकलेचे हे एक वैशिष्टय म्हणून सांगता येईल.

दक्षिणेतील मूर्तिकारांनी अनेक प्रकारच्या स्त्री-मूर्ती कोरल्या आहेत. त्यांचे सौंदर्य पवित्र वाटते आणि त्यांच्याविषयी आदर निर्माण करते. वेरूळच्या कैलास लेण्यातली पार्वतीची मूर्ती या दृष्टीने कमालीची सुंदर व प्रशंसनीय आहे.

बौद्ध धर्माचा ऱ्हास झाल्यानंतर पौराण धर्माचे पुनरुज्जीवन झाले. त्या अनुषंगाने दक्षिणेतल्या शिल्पकलेत जोम आणि सामर्थ्य हे गुण आले. भारतीय मूर्तिकलेचे युरोपियन टीकाकार या नव्या प्रवृत्तीला आक्रमक म्हणतात. तांडव नृत्यातला शिव, विविध प्रकारचे भैरव आणि हिरण्यकशिपूचे पोट फाडणारा नृसिंह या मूर्ती त्यांना आक्रमक वाटतात. पण हा आक्रमकपणा थोडाच काल टिकला. पुढील तंत्रसाधनेच्या युगात या आक्रमक वृत्तीची जागा उल्लसित वृत्तीने घेतली. या दृष्टीची काही कोरीव चित्रे वरंगळ जिल्ह्यातील पालमपेट येथील देवळात आढळतात. तिथे ज्या बारा नर्तिकांच्या मूर्ती आहेत, त्यांत जीवनानंद शिगोशिग भरलेला दिसतो.

चोळ वंशाच्या राजवटीत मुख्यत: शैवमूर्ती निर्माण झाल्या. तथापि काही थोड्या वैष्णव मूर्तीही त्या काळात बनवल्या गेल्या. तंजाऊरच्या गोपुरांवर अशा मूर्ती आढळतात. बुद्ध, बोधिसत्त्व, मैत्रेय व अवलोकितेश्वर यांच्या मूर्तीही नागपट्टम येथे सापडल्या आहेत. चोळांच्या प्रमाणेच कर्नाटकातील होय सळांच्या राजवटीतही हळेबीड व बेलूर येथे पुष्कळ मूर्तिशिल्पे निर्माण झाली. त्या मूर्ती लहान पण अधिक अलंकृत आहेत. मदुरेच्या पांड्यांच्या वेळी अनेक भव्य मूर्ती निर्माण झाल्या. इ. स. च्या १५ व्या शतकात विजयनगरची मूर्तिकला उदयाला आली. त्या काळातल्या मूर्ती अतिशय अलंकृत आहेत; पण चोळांच्या काळातील मूर्तींचे सौंदर्य त्यांत दिसत नाही; त्या कृत्रिम वाटतात. इ. स. च्या १७ व्या शतकात मुसलमानांनी दक्षिणेतही मूर्तिभंजन सुरू केल्यामुळे, मूर्तिकलेला अवकळा आली. १८ व्या शतकापासूनच्या काळात ज्या मूर्ती भारतात निर्माण झाल्या आहेत, त्यांत चैतन्य दिसत नाही. परंपरागत मूर्तिशास्त्रान्वये मूर्ती निर्माण करणारे कलाकार क्वचितच आढळतात. जयपूर, ग्वाल्हेर, म्हैसूर, इ. ठिकाणी असे मूर्तिकार आहेत. पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे या कलेलाही वेगळे वळण लागले आहे. पूर्वीचे नियम न पाळता स्वतंत्र वृत्तीने मूर्ती तयार केल्यामुळे त्यांत फारच विविधता आली आहे. तसेच, भारतीय कलेचा आत्माही त्या मूर्तिशिल्पात आढळत नाही.



बुद्धाची कांस्यमूर्ती – नागपट्टम

पूर्वीच्या प्रचंड दगडी मूर्ती किंवा धातूच्या, मातीच्या, लाकडाच्या लहान मूर्ती या केवळ जड वस्तू वाटत नाहीत; त्या सजीव भासतात व कलाकाराची आंतरिक प्रेरणा त्यांत साकार झाल्यासारखी वाटते. पण आधुनिक काळातील मूर्ती म्हणजे त्रिमिती असलेल्या जड आकृती असतात. त्यांच्या बाह्य रंगरूपावरून व माध्यमावरून त्यांचे मूल्यमापन करावे लागते.

पूर्वी मूर्तिकाराला समाजात मानाचे स्थान असे. त्याची कला वंशपरंपरागत असून, कलाकारांच्या श्रेणी असल्यामुळे, त्यांना उपजीविकेची शाश्वती व स्वास्थ्य लाभत असे. तो स्वतःच्या विचार-विकारांना मूर्तस्वरूप देता, समाजाच्या जीवनमूल्यांचे चित्रण कलेच्या द्वारे करीत असे. पण स्वातंत्र्यपूर्व कालातील कलाकार समाजापासून दूर गेलेला दिसतो. कलेला व्यापारी रूप प्राप्त झाल्यामुळे तो श्रीमंत व्यक्तींच्या मर्जीवर अवलंबून होता. मागणीप्रमाणे प्रसिद्ध व्यक्तींचे किंवा राजेमहाराजांचे पुतळे बनवून देण्याव्यतिरिक्त त्याला फारसे काही करता येत नसे. त्याने काही वेगळी शिल्पाकृती निर्माण केली, तर ती खपत नसे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र ही स्थिती बदललेली आहे.

मातीच्या मूर्तींची परंपरा पुष्कळ जुनी आहे. मौर्यकालीन मृण्मूर्ती तक्षशिला, मथुरा, अहिच्छत्रा, कौशांबी, श्रावस्ती, पद्मावती, पाटलिपुत्र, वैशाली, ताम्रलिप्ती, महास्थान, इ. ठिकाणी मिळाल्या आहेत. त्यांतील काही मूर्ती अत्यंत सुंदर आहेत. शुंग व काण्व युगात या कलेचा बराच विकास झाला. आणि गुप्त युगात तर तिचा परमोत्कर्ष झाला. त्या काळातल्या मातीच्या असंख्य सुंदर मूर्ती सापडल्या आहेत. उत्तर भारतात ही परंपरा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चालू राहिली. बंगालमध्ये अनेक मंदिरांवर मातीच्या विविध प्रकारच्या प्रतिमा बसवलेल्या आहेत. त्या अत्यंत प्रेक्षणीय आहेत. पण दक्षिण भारतात मातीच्या मूर्ती क्वचितच आढळतात.

अलिकडे निरनिराळ्या उत्सवांच्या निमित्ताने काही मूर्तिकार गणपती, दुर्गा, इ. देवतांच्या शाडूच्या मूर्ती बनवू लागले आहेत. त्यामुळे या कलेला पुन्हा ऊर्जितावस्था आलेली दिसते. गणपति-उत्सव, दुर्गापूजा-उत्सव यासाठी हजारो मूर्ती निर्माण केल्या जातात, त्यांतील काही फारच सुरेख असतात. मातीच्या मूर्तींना विविध प्रकारचे रंग लावून त्या विलक्षण मनोहर व सहज मिरवण्याजोग्या मूर्ती निर्माण करण्यात आल्या.

सांप्रत देवतांच्या धातुमूर्ती फारशा निर्माण केल्या जात नाहीत. घरच्या देवपूजेसाठी लहान-लहान मूर्ती बनविल्या जातात तेवढ्याच. आता पंचरस धातूचे पुतळे करण्याची पद्धती बरीच रूढ झाली आहे. निरनिराळ्या शहरांतून अर्वाचीन प्रसिद्ध व्यक्तींचे असले पुतळे मोठ्या संख्येने उभारलेले आढळतात. त्या क्षेत्रात या कलेची बरीच प्रगती झाली आहे.

या शतकाच्या आरंभी नवीन पद्धतीने मूर्तिकला शिकलेले अनेक चांगले शिल्पकार उदयाला आले. त्यांतील म्हात्रे, तालीम,

आधुनिक मूर्तिकामाचे दोन नमुने-- (१) पुरुषाची आकृती (ब्रॉंझ) व (२) स्त्रीची आकृती (ब्रॉंझ)

आकर्षक केलेल्या असतात. देवतेच्या मूर्तीसमोर निरनिराळे पौराणिक प्रसंग उभे केलेले असतात, त्यांतील मूर्तीही अतिशय सुंदर वाटतात.

धातूच्या मूर्तींची परंपराही जुनीच आहे. सुलतानगंज येथील बुद्धमूर्ती व मिरपूरखास येथील ब्रह्ममूर्ती ही त्या कलेची उत्कृष्ट उदाहरणे होत. त्यानंतरच्या काळातील पल्लव शैलीच्या बऱ्याच धातुमूर्ती आढळतात. चोळांच्या राजवटीत कांस्यमूर्तिकलेला विशेष बहर आला होता. त्या काळात देवतांची मिरवणूक काढण्यात्री प्रथा सुरू झाली आणि त्यासाठी धातूच्या लहान करमरकर, फडके, पानसरे, नागप्पा, डी. पी. राय चौधरी, बोस, मुल्लिक, वेंकटप्पा यांनी असंख्य लहान मोठे, संगमरवरी किंवा पंचरशी पुतळे बनवले आहेत. त्यांनी बनवलेल्या काही काल्पनिक कलाकृतीही अत्यंत सुंदर आहेत. म्हात्रे यांची मंदिराकडे; तालीम यांची दरिद्रनारायण व एकतानता; करमरकरांची मत्स्यकन्या; डी. पी. राय चौधरी यांची श्रम-विजय, इ. मूर्ती व पानसरे यांची मुंबईतील इमारतीवरची भव्य कोरीव शिल्पे या कलाकृती विशेष उल्लेखनीय आहेत.

त्यानंतर मूर्तिकलेला अगदी नवीन वळण लागलेले दिसते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आधुनिक कलाकार धातू, लाकूड, सिमेंट, प्लॅस्टर, इ. विविध प्रकारच्या माध्यमांतून ज्या आकृती बनवतात, त्या वास्तवा-पासून दूर व सौंदर्यहीन असतात. आजच्या शिल्पकारांचे सौंदर्याचे निकष अगदी वेगळे आहेत आणि त्यांना सौंदर्याचे विशेषसे महत्त्वही वाटत नाही. आपल्या वेड्यावाकड्या मूर्तींतही सौंदर्य असते; पण ते नव्या जाणिवेच्या डोळ्यांनी पाहावे लागते, असा आधुनिक कलाकारांचा दावा आहे. [मू. वि.; सं. मि.; डे. हिं. इ.; इ. ब्रां.; हूं. सा. इं. इ.; प्रा. भा. सा. सां. भू.; भा. मू. क.; भा. क. प.; भा. मू. क. क.; उ. प्र. बौ. वि.]

मूर्तिपूजा

मानवाच्या प्राथमिक अवस्थेत तो निसर्गातील शक्तींना देव मानीत होता. त्या दैवी शक्ती आणि भुते, पिशाचे, इ. दानवी शक्ती या सजीव प्राण्यांत व निर्जीव वस्तूंतही वास करतात, अशी त्याची समजूत होती. त्या शक्तींना प्रसन्न व संतुष्ट करण्यासाठी तो दगड, डोंगर, वृक्ष, नदी, पशू व पक्षी यांची पूजा करीत होता. त्या वस्तू म्हणजे त्या त्या शक्तींची प्रतीके असत. मनुष्याची बुद्धी विकसित झाल्यानंतर त्याच्या मनात दैवी किंवा दानवी शक्ती-संबंधी निश्चित कल्पना साकार होऊ लागल्या आणि त्या कल्पनांना मूर्तरूप देताना त्याने सर्वांत उत्तम आकृतीची म्हणजे मानवी शरीराची योजना केली. चांगल्या देवतांच्या मूर्ती माणसाने सुंदर बनवल्या आणि दानवांच्या मूर्ती भयानक स्वरूपात तयार केल्या. त्या मूर्तींची पूजा फार प्राचीन काळा-पासून भारतात व इतर देशांतही विविध प्रकारे चालू आहे.



गणपती – हळेबिड

सिंध व पंजाब या प्रदेशांतील उत्खननांत सिंधुसंस्कृतीचे जे अवशेष सापडले आहेत, त्यांत विविध प्रकारच्या मूर्ती मिळाल्या आहेत. त्यांतील एक मूर्ती शिवाची असून, काही मूर्ती माता-देवीच्या आहेत. लिंग व योनी यांच्या आकृतीही त्यांत आढळ-तात. सिंधुसंस्कृतीचे लोक त्या मूर्तींची पूजा करीत असावे, असे अनुमान संशोधकांनी केले आहे. सनपूर्व २५०० वर्षे हा त्या संस्कृतीचा काल ठरवण्यात आला आहे. दक्षिण भारतातील द्रविड लोकच त्या संस्कृतीचे निर्माते होते, असे पंडितांचे मत आहे. पूजा व भक्ती ही द्रविडसंस्कृतीची वैशिष्ट्ये होती.

आर्य लोकांचा त्या द्रविड लोकांशी संघर्ष झाला व त्यात द्रविडांचा पराजय झाला. आर्यांनी सर्व उत्तर भारत पादाक्रांत केला, तेव्हा द्रविड लोक दक्षिण भारतात गेले. पण त्या लोकांचे प्राचीन साहित्य उपलब्ध नसल्यामुळे त्यांचा प्राचीन इतिहास अज्ञातच आहे. आर्यसंस्कृती व द्रविडसंस्कृती यांचा समन्वय झाल्यानंतर जी भारतीय संस्कृती उत्क्रांत झाली, तिचे स्वरूप संस्कृत ग्रंथांवरून समजते.

वैदिक आर्यांची संस्कृती यज्ञप्रधान होती. वेदांत सूर्य, इंद्र, वरुण, द्यौ, अग्नी, इ. निसर्गदेवतांची स्तुती व प्रार्थना केलेली आहे. पण आर्य लोक मूर्तिपूजक होते किंवा नाही, याविषयी विद्वानांत तीव्र मतभेद आहेत. माक्स म्यूलर, विल्सन व मॅक्डोनेल यांच्या मते वैदिक काळात मूर्तिपूजा प्रचलित नव्हती. याच्या उलट बोलेनसेन, हॉपकिन्स, वेंकटेश्वर, दास, वृंदावन भट्टाचार्य, इ. पंडितांनी वैदिक आर्यांमध्ये मूर्तिपूजा प्रचलित असावी, असे अनुमान केले आहे. वेदांतील अनेक ऋचांमध्ये देवतांच्या मानवरूपी आकृतींचे वर्णन केलेले आढळते. ऋग्वेद-संहिता प्रायः प्रार्थनामय असल्यामुळे तिच्यात मूर्तींचे वर्णन असण्याच्या संभव नाही. पण पुढील ऋचेत (ऋ. ४.२४.१०) इंद्राच्या प्रतिमेचा निर्देश केलेला आहे, असे श्री. वेंकटेश्वर यांचे मत आहे –

क इमं दशभिर्ममेन्द्रं क्रीणाति धेनुभिः।

अर्थ – दहा धेनू देऊन माझ्या या इंद्राला कोण बरे विकत घेईल ?

देवतांची भौतिक व काल्पनिक अशी दोन रूपे होती, असे यजुर्वेदातील (तै. सं. १.७.१२) व अथर्ववेदातील (७.३१) या उल्लेखांवरून कळते. अग्निचयनात पुरुषाची सुवर्णप्रतिमा करून तिची स्थापना करावी, असे तैत्तिरीय संहितेत सांगितले आहे (५.२.७). वाजसनेयी संहितेत मूर्तिविषयक निश्चित उल्लेख मिळतात. ऐतरेय आरण्यकात 'मी इंद्राचे शरीर तयार केले' असा उल्लेख आहे; तर तैत्तिरीय आरण्यकात सात सूर्यमूर्तींचा उल्लेख आहे. अशा प्रकारे वेदांमध्ये देवतांच्या मानवी रूपांचे वर्णन आढळत असले, तरी वैदिक आर्य त्यांच्या मूर्तींची पूजा करीत होते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असे ध्वनित करणारी वचने मुळीच सापडत नाहीत. याविषयी वि. वि. वैद्यांनी विवेचन केले आहे, ते असे–

'प्राचीन काळी वैदिक धर्मात मूर्तिपूजा नव्हती, असे म्हणायास हरकत नाही. इंद्र, वरुण, सोम, आदित्य, इ. देवता सृष्टीतील प्रत्यक्ष दिसणाऱ्या भौतिक गोष्टींच्या अधिष्ठात्री देवता मानल्या गेल्या होत्या. त्यांची स्तुती ऋषींनी केली आहे. उपनिषत्कालात परब्रह्माची कल्पना दृढ होऊन, परब्रह्माचे निदिध्यासन हेच ईश्वरपूजेचे स्वरूप ठरले. तेव्हा प्राचीन काळी मूर्तिपूजा नसून, सूर्य, अग्नी, सोम, विद्युत, इ. नैसर्गिक वस्तूंचीच पूजा होत असे. देवावर मनुष्यत्वाचा आरोप करणे, हा मनुष्याचा स्वभावधर्म आहे. त्याप्रमाणे देवतांच्या स्तुतींतून मानवी स्वरूपांची वर्णने पुष्कळ ठिकाणी आपल्या सदृष्टीस पडतात. परंतु ही वर्णने रूपकयुक्त आहेत. यास्काने देवतांस मानवी रूपे आहेत, देवतांस कोणतीच रूपे नाहीत व देवता दोन्ही स्वरूपाच्या आहेत, असे तीन मतांचे प्रकार या विषयावर सांगितले आहेत.'



सूर्यमूर्ती – भूमरा

वेदांच्या नंतर ब्राह्मणे व आरण्यके निर्माण झाली. ब्राह्मण ग्रंथांत यज्ञयागांचे विधान विशद केलेले असून, आरण्यकांत यज्ञयागांचा गूढार्थ विशद केलेला आहे. उपनिषदांत आत्मा, ब्रह्म, ब्रह्मांड, यांच्याविषयीचे तात्त्विक विचार आहेत. या ग्रंथांत देवतांच्या भौतिक रूपांचा, त्यांच्या जड मूर्तींचा व त्यांच्या पूजेचा विचार सापडणे असंभवनीय आहे, असे जितेंद्रनाथ बानर्जी म्हणतात.

तथापि या प्राचीन वैदिक ग्रंथांत समाजातील उच्च वर्गाच्या संस्कृतीचे दर्शन तेवढे घडते. ऋग्वेदांत मूरदेव, शिस्नदेव, हे शब्द आढळतात, ते अनार्य आदिवासी लोकांना उद्देशून योजलेले आहेत. त्यांची संस्कृती भिन्न होती. ते लोक त्यांच्या देवतांची प्रतीकरूपाने पूजा करीत असावे; कदाचित ते मूर्तिपूजकही असतील. द्रविड लोक मूर्तिपूजक होतेच. आर्य व द्रविड संस्कृतींच्या समन्वयानंतर उपनिषदांची रचना झालेली असून, काही उपनिषदांत भक्तीचा उगम झालेला आढळतो. भक्तीतूनच देवपूजा व मूर्तिपूजा उद्‌भवली. खिलसूक्ते, षड्विंश ब्राह्मण, गृह्यसूत्रे या उत्तरकालीन वैदिक साहित्यात आणि वेदांगसाहित्यात मूर्तिपूजेचे स्पष्ट उल्लेख सापडतात. मूर्ती दग्ध झाली, भग्न झाली, पडली, तर विशिष्ट हवन करावे, असे मानव गृह्यसूत्रांत सांगितले आहे. आपस्तंब गृह्यसूत्रांत मूर्तिपूजेविषयी पूर्ण विधान आहे. बोधायन, लौगाक्षी, गौतम, इत्यादींच्या सूत्रांत मूर्तिपूजेचा पुष्कळ विचार आलेला आहे. पाणिनीने वासुदेव,



शिव दक्षिणामूर्ती – ललितासन

अर्जुन व महाराज (कुबेर, विरुपाक्ष, इ.) यांच्या मूर्तींच्या पूजकांचा उल्लेख केला आहे. चव्हाठ्यावर स्थापलेल्या मूर्ती, घर-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गुती पूजेच्या मूर्ती व दुकानात विक्रीसाठी ठेवलेल्या मूर्ती अशा तीन प्रकारच्या मूर्ती तेव्हा अस्तित्वात होत्या. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात शिव, जयंत, वैश्रवण यांची मंदिरे बांधण्याविषयी सांगितले आहे. मनुस्मृतीत देवतांच्या मूर्तींना बरेच महत्त्व दिलेले असून, त्यांना प्रदक्षिणा घालावी व त्यांच्या सावलीवर पाय देऊ नये, असेही सांगितले आहे. पोट भरण्यासाठी देवपूजा करणाऱ्या पुजाऱ्यांना मनू व नारद यांनी हीन लेखले आहे (मनु. ३.१५२; नारद पंचरात्र, भारद्वाज संहिता ४.२९). ब्रह्मचाऱ्याचे धर्म सांगताना, त्याने प्रथम देवपूजा व नंतर अग्निकार्य करावे, असेही मनूने सांगितले आहे. पातंजल महाभाष्यात शिव, स्कंद व विशाख यांच्या मूर्तींच्या पूजेचा उल्लेख आढळतो. रामायण व महाभारत या महाकाव्यांतही मूर्तिपूजेचे सुस्पष्ट उल्लेख आहेत. भिन्न भिन्न तीर्थक्षेत्रांत असलेल्या देवतांची पूजा केल्यामुळे अग्निष्टोम, अश्वमेध, इ. यज्ञ केल्याचे फल प्राप्त होते, असे महाभारतात म्हटले आहे.

काही लोकांचा असा समज आहे, की बौद्ध व जैन धर्मांतून मूर्तिपूजा हिंदू धर्मात आली असावी. पण हा समज चुकीचा आहे. कारण त्या दोन्ही धर्मांनी मूर्तिपूजेचा प्रथम निषेधच केलेला होता. पाणिनीच्या अष्टाध्यायीमधील उल्लेखांवरून मूर्तिपूजा बुद्धाहून प्राचीन आहे, हे सिद्ध होते. आर्य व द्रविड या दोन संस्कृतींच्या समन्वयाने बनलेल्या हिंदू समाजात मूर्तिपूजा सुप्रतिष्ठित झाली. बौद्ध धर्माच्या उदयानंतर ती काही काळ मागे पडली असेल; पण सनपूर्व दुसऱ्या शतकात ती पुन्हा प्रस्थापित झालेली दिसते. बौद्ध लोकांतही मूर्तिपूजेचा निषेध फार काळ टिकला नाही. महायान पंथाचा उदय झाल्यानंतर ते लोक गौतम बुद्धाच्या मूर्ती बनवून त्यांची पूजा करू लागले. इ. स. च्या पहिल्या– दुसऱ्या शतकापर्यंत जैन धर्मातही मूर्तिपूजा प्रस्थापित झाली होती. जैनांनी मूर्तिप्रतिष्ठेचे फार मोठे विधिविधान निर्माण केले आहे. जिनमूर्ती कशा असाव्या, याचे शास्त्र वर्धमानसूरीने सांगितले आहे.

मूर्तिपूजा हे हिंदू धर्माचे एक महत्त्वाचे अंग मानले गेले आहे. शंकराचार्यांच्या काळात आणि त्यांच्याच प्रेरणेने पंचायतनपूजा सुरू झाली. या पंचायतनात शिव, विष्णू, सूर्य, देवी आणि गणपती या पाच देवतांचे एकत्रीकरण केलेले आहे. वैदिक मंत्रांनी ही पंचायतनपूजा होत असते. शिव व विष्णू या देवता मोक्ष देणाऱ्या होत, असे उत्तरोपनिषत्कालातही मानले गेले. अनार्य लोक शिवाची पूजा लिंगरूपात करीत होते, तीच पुढे हिंदू धर्मात स्वीकारली गेली. विष्णूची मूर्ती मानवी स्वरूपाची असली तरी, ती चतुर्भुज व शंखचक्रगदाधारी असते. देवीचे रूप स्त्रीसारखेच पण अष्टभुज असे मानले गेले. देवतेच्या ठायी अद्‌भुत सामर्थ्य असल्यामुळे तिची मूर्ती एकाहून अधिक मुखे व चार ते वीस हात असलेली अशी बनवण्याची कल्पना काही मूर्तिकारांना

विष्णू (आदिनारायण)– बादामी

स्फुरली आणि तिच्या हातांत विविध आयुधे व उपकरणे देण्याची प्रथा सुरू झाली. पौराणिक धर्म पूर्णपणे प्रस्थापित झाल्यानंतर मूर्तिपूजेला विलक्षण बहर आला आणि मूर्तींचे असंख्य प्रकार निर्माण झाले. पुराणांत भिन्न भिन्न देवतांच्या विविध प्रकारच्या पूजांचे व पूजोपचारांचे माहात्म्य सांगितलेले आहे. असंख्य व्रतवैकल्ये, सण व उत्सव यांत देवतांच्या पूजेला महत्त्व असल्यामुळे मूर्तिपूजेची विलक्षण वाढ झाली.

भारतात मूर्तिपूजा जशी मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे, तशी ती दुसऱ्या कोणत्याही देशात आढळत नाही. प्रत्येक पवित्र क्षेत्रात असंख्य देवालये आणि अगणित मूर्ती दिसतात. एका काशी क्षेत्रात १५०० पेक्षा अधिक मंदिरे असून, त्यांतील पूजनीय मूर्तींची संख्या अत्यंत मोठी आहे. जगन्नाथपुरी, रामेश्वर, नाशिक, इ. प्रसिद्ध क्षेत्रांतील मूर्ती लक्षांनी मोजाव्या लागतील. याशिवाय प्रत्येक गावात व घरात देवांच्या मूर्ती असतात त्या वेगळ्याच. या देवतांची षोडशोपचारे पूजा करणे, हे आपले परम कर्तव्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे, असे भाविक हिंदू मानतात. देवदर्शनाला गेल्यानंतर देवाला मूठभर तांदूळ किंवा पैसा अर्पण करण्याची चाल आहे. काही देवतांच्या दर्शनासाठी लाखो यात्रेकरू जातात आणि तिथे एखादी वस्तू किंवा द्रव्य देवापुढे ठेवतात. धनिक लोक दर्शन घेताना मौल्यवान अलंकार किंवा विपुल धन देतात. त्यामुळे त्या देवतांच्या मंदिरात अमाप संपत्ती जमा होते. मध्ययुगात मुसलमान आक्रमकांनी अशा मंदिरांतून अगणित संपत्ती लुटून नेली. काही मंदिरांत देवाला मनुष्यासारखेच उपभोग देण्याची प्रथा असते. त्यांत देवदासी व मुरळ्या यांचाही समावेश होतो. आणि हे सगळे उपभोग पुजाऱ्याद्वारे देवाला पोचवले जातात. त्यामुळे तिथले पुजारी अनैतिक उद्योगही करू शकतात. मूर्तिपूजेचे अवडंबर व अतिरेक यांतूनच हे विडंबन सुरू झाले आहे.

काही मूर्ती स्वयंभू असतात, म्हणजे त्या काही चमत्काराने पृथ्वीवर प्रगट होतात. त्यांचे देवत्व स्वतःसिद्ध असते आणि त्यांच्या ठायी विलक्षण, गूढ सामर्थ्य असते असे मानले जाते. लाकूड, दगड, धातू यांपासून बनवलेल्या मूर्तींवर संस्कार करून त्यांच्या ठिकाणी देवत्व आणावे लागते. वार्षिक उत्सवासाठी काही देवतांच्या मूर्ती बनवल्या जातात. उदा० गणपती, दुर्गा, इत्यादी. उत्सव संपल्यानंतर त्यांचे विसर्जन केले जाते.

निर्गुण, निराकार परमात्म्याची उपासना ही सगुण, साकार

शक्तिदेवी – महादुर्गा

देवाच्या उपासनेपेक्षा श्रेष्ठ मानलेली आहे. गीता व भागवत या ग्रंथांत अव्यक्त अशा परमेश्वराला व्यक्त किंवा सगुण समजणे हे अज्ञानाचे लक्षण आहे, असे म्हटले आहे. पण निर्गुणोपासना अत्यंत कठिण व क्लेशकारक असते. सामान्य मनुष्याला ती साधत नाही. परमेश्वराचे सगुण, व्यक्त रूप दिसल्यावाचून त्याला त्याच्या सर्वव्यापी, सर्वशक्तिमान स्वरूपाचे आकलन होत नाही. मूर्ती हे ईश्वराचे प्रतीक असल्यामुळे तिच्या प्रत्यक्ष दर्शनाने चित्त एकाग्र होण्यास मदत होते. योगशास्त्रातही ध्यान व धारणा (चित्त स्थिर करणे) यासाठी मूर्त प्रतीकाची आवश्यकता मानलेली आहे. मूर्तिपूजा हे साध्य नसून, ते उपासनेचे एक साधन आहे. कोणत्याही मूर्तीत स्वतःसिद्ध सामर्थ्य नसते. प्राणप्रतिष्ठेने मूर्तीत जीव येत नाही किंवा सामर्थ्यही उत्पन्न होत नाही, हे मूर्तिभंजकांनी सिद्ध केले आहे. त्यांनी हिंदूंची देवालये पाडली व मूर्ती फोडल्या, तरी देवांनी त्यांचे पारिपत्य केले नाही; कारण त्या मूर्तींची पूजा करणारे स्वतःच दुबळे होते.

कबिराने निराकार ईश्वराची उपासना करण्याचा उपदेश केला होता. त्याच्या नंतर अनेक संतांनी त्या मताचा पुरस्कार केला. आधुनिक काळात आर्यसमाज, ब्राह्मसमाज व प्रार्थनासमाज या संस्थांनीही मूर्तिपूजा त्याज्य ठरवून ती बंद व्हावी, म्हणून पुष्कळ प्रयत्न केले. पण हिंदुसमाजात मूर्तिपूजा इतकी दृढमूल झालेली आहे, की ती कधीही बंद होण्याचा संभव नाही. याविषयी पं. रघुनाथशास्त्री कोकजे आपले विचार मांडतात, ते असे— मूर्तिपूजा अजिबात नष्ट करण्याची खटपट करण्यापेक्षा तिची सुधारणा करणेच इष्ट आहे. चालू मूर्तिपूजेस परंपरेचा आधार नाही, तसाच तात्त्विक आधारही नाही. सामाजिक हिताचा व उत्कर्षाचा या पूजेशी संबंध नाही आणि वैयक्तिक उन्नतीचाही नाही. जन्मभर घरातील देवांची पूजा करणारे अधिक शांत मनाचे किंवा अधिक एकाग्रचित्त बनतात असे दिसत नाही. उलट त्यांचे ठिकाणी कर्मठपणा, क्रोध, दंभ, इतर देवतांचा द्वेष वगैरे दुर्गुण मात्र वाढत जातात.

धारणा किंवा ध्यानरूपी उपासना सुलभ व्हावी म्हणून मूर्तीची आवश्यकता असली, तरी मूर्ती म्हणजे देव नव्हे. मंत्रांनी मूर्तीत जीवचैतन्य उत्पन्न होते, असे मानून मंदिरांत जे कित्येक हास्यास्पद प्रकार चालू असतात, त्यांस आळा घातला पाहिजे. पूजेचा किंवा उपासनेचा विषय परमात्माच असल्यामुळे एका प्रतीकाच्या भक्ताने दुसऱ्या प्रतीकाचा किंवा त्याच्या भक्ताचा द्वेष करणे हे केव्हाही समर्थनीय नाही. मूर्तिपूजा या द्वेषास कारणीभूत होते, असे इतिहासावरून दिसून आलेले आहे.

ध्यानाचे किंवा एकाग्रतेचे साधन म्हणून प्रतीकपूजा करायची असते. म्हणून एकाच वेळी वीसपंचवीस देवांची पूजा करणे युक्त नव्हे. बाह्य प्रतीकाशिवाय ध्यान साधू लागताच प्रतीकपूजेत गुरफटून राहून उन्नती थांबविणे योग्य नाही. जुन्या सर्व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रतीकांपेक्षा सूर्य ही एकच देवता नव्या हिंदूंनी पसंत करून सकाळ-संध्याकाळ तिला अर्घ्य देऊन गायत्री जपाच्या वेळी तिचे ध्यान करावे. हीच वैयक्तिक मूर्तिपूजा आज प्रभावी ठरू शकेल. नित्य आवश्यक धार्मिक कार्यक्रमामध्ये षोडशोपचार मूर्तिपूजेस स्थान देऊ नये. रूढ मूर्तिपूजेची प्रथा मंदिरे, सामुदायिक उत्सव व संस्कार यांसारख्या प्रसंगी चालू ठेवण्यास कोणताच प्रत्यवाय नाही. पाहा – देवपूजा; देवमूर्तिप्रतिष्ठा. [एन्सा. रि. ए.; भा. वा. प्र. वि.; डे. हिं. इ.; हिं. ध. त.; न. भा. ध.]

मूर्धन्वत् आंगिरस

एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील ८८ वे सूक्त याने रचले आहे. याला आंगिरसपुत्र म्हटले आहे. प्रस्तुत सूक्तात अग्नी, सूर्य, उषा आणि अंतरिक्ष यांच्या संख्येसंबंधी एक प्रश्नमालिका विचारली असून, त्या प्रश्नांची उत्तरे आठव्या मंडलातील ५८ व्या सूक्तात दिलेली आहेत, असे अभ्यासकांचे मत आहे. प्रस्तुत सूक्तातील एक ऋचा (ऋ. १०.८८.६) अशी –

मूर्धा भुवो भवति नक्तमग्निस्ततः सूर्यो जायते प्रातरुद्यन् ।
मायाम् तु यज्ञियानामेतामपो यत् तूर्णिश्चरति प्रजानन् ।।

अर्थ – रात्रिसमयी पृथ्वीमस्तकासदृश महनीय बनणारा अग्नी प्रातःकाली अंतरिक्षसंचारी आणि देवज्ञाननिधान सूर्य बनतो.

या सूक्ताच्या पंधराव्या ऋचेत देवयान व पितृयाण या मार्गांचा उल्लेख आहे. यावरून उपनिषत्साहित्यात येणाऱ्या या मार्गांच्या विवेचनाला ऋग्वेदाचा आधार असावा, असे म्हणतात. [ऋ. म. भा.; म. ज्ञा. को.; सी. ऋ.]

मूर्धावसिक्त

एक प्राचीन अनुलोम जमात. काहींच्या मते ब्राह्मण पुरुष व क्षत्रिय स्त्री यांच्या विवाहजन्य संततीला हे नाव आहे. वैखानसाच्या मते हे लोक सवर्ण आहेत.

मूर्धावसिक्त पुरुषाला राज्याभिषेक केला, तर तो राजा होऊ शकतो, असे सांगितले आहे. आयुर्वेद, ज्योतिष, खगोलशास्त्र, गणित यांचे अध्ययन करून त्यावर हे लोक उपजीविका करीत. मूर्धाभिषिक्त या नावाचीही एक प्राचीन जमात असून, ती ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यापासून निर्माण झाली असल्याचे सांगितले आहे. [हि. ध.]

मूलक

एक प्राचीन जमात. यांचा उल्लेख अश्मकांबरोबर होत असतो. अश्मकांचा व त्यांचा संबंध असावा, असे म्हणतात. अर्थशास्त्राचा भाष्यकार भट्टस्वामी याच्या मते हे लोक महाराष्ट्रातले होत. काही अभ्यासकांच्या मते अश्मक व मूलक ही एकाच जमातीची दोन नावे होती. वायुपुराणकारांच्या मते या दोन्ही जमाती इक्ष्वाकुकुलोत्पन्न होत्या. परंतु बौद्ध वाङ्मयातील उल्लेखांवरून या दोन्ही जमाती भिन्न असाव्या, असे दिसते. त्यांची राजधानी प्रतिष्ठान (पैठण) नगरी होती, असा उल्लेख सुत्तनिपातात आढळतो. [ट्रा. ए. इं.; पु. वि. अ.; म. प्रा. इ. सं.]

मूलकंद

हठयोगातील एक संज्ञा. हे स्थान लिंगाच्या वर आणि नाभीच्या खाली असून, त्याचा आकार अंड्यासारखा असतो. इथूनच सर्व नाड्या उत्पन्न होतात. योगशास्त्रमते या मूलकंदातून बहात्तर हजार नाड्यांची निर्मिती झाली आहे. या नाड्यांमध्ये बहात्तर नाड्या प्रमुख असून, ज्यांच्यातून प्राणवायूचा संचार असतो अशा दहा नाड्या अधिक महत्त्वाच्या आहेत, असे नाथसंप्रदायी मानतात. यांतही सुषुम्ना नाडी ही सर्वश्रेष्ठ आहे. [भा. द. सं.]

मूलगौरीव्रत

एक काम्य व्रत. चैत्र शुद्ध तृतीयेला या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. व्रतविधी असा – प्रथम तिलमिश्रित पाण्याने स्नान करावे. नंतर शिव व गौरी यांची पूजा करून सुवर्णफळे अर्पण करावी. ही फळे देवतांच्या पायापासून शिरापर्यंत वाहावी. प्रत्येक महिन्यात निरनिराळ्या प्रकारची फुले पूजेसाठी घ्यावी. बारा महिने निरनिराळे खाद्य किंवा पेय पदार्थ गौरीच्या निरनिराळ्या नावांनी सेवन करावे. उद्यापनाच्या वेळी पलंग, सोन्याचा बैल व गाय ब्राह्मणाला दान द्यावी.

चैत्र शुद्ध तृतीयेला शिवाचा गौरीबरोबर विवाह झाला, म्हणून या दिवशी हे व्रत करीत असावे. [हि. ध.]

मूलजननशांती

एखादे मूल मूळ नक्षत्रावर जन्माला येणे, ही घटना अशुभ समजतात. त्यामुळे त्या अपत्याला किंवा त्याच्या माता–पित्यांना धोका संभवतो किंवा कुटुंबात काही तरी अनिष्ट घडते, असे म्हटले आहे. त्यावरून 'मुळावर येणे' असा वाक्प्रचारही रूढ झाला आहे. हे अशुभ किंवा अनिष्ट त्या नक्षत्राची शांती केल्याने दूर होते, असे धर्मशास्त्रात सांगितले आहे.

ही शांती मूल जन्मल्यानंतर अकराव्या किंवा बाराव्या दिवशी करतात. तत्पूर्वी गोमुखप्रसवशांती करतात. त्यानंतर अग्निस्थापना करून अग्नीच्या पूर्वेस दोन वेदी तयार करतात. त्यांपैकी एकीवर नवग्रहांची व दुसरीवर साळी पसरून त्यांवर कलशाची स्थापना करतात. कलशाला सूत गुंडाळून त्यात पंचपल्लव घालतात. निर्ऋती ही या शांतीची प्रधानदेवता असून, इंद्र व आप या अनुक्रमे तिच्या अधिदेवता व प्रत्यधिदेवता आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कलशावर पूर्णपात्र ठेवून त्यात वरील देवतांच्या सुवर्णप्रतिमांची समंत्रक स्थापना करतात. नंतर भूमीवर काढलेल्या कमळाच्या चौवीस पाकळ्यांवर उत्तराषाढांपासून अनुराधेपर्यंतच्या चौवीस नक्षत्रदेवतांचे आवाहन करतात. या सर्व देवतांचे यथाविधि पूजन झाल्यावर उत्तरेकडे एका शतछिद्र कलशाची स्थापना करून, त्यावर वरुणाचे आवाहन व पूजन करतात. नंतर आचार्य व ऋत्विज या कलशाला स्पर्श करून रुद्राध्याय, अप्रतिरथसूक्त, राक्षोघ्नसूक्त, पवमान, इ. मंत्रांचा पाठ करतात. मग ग्रहयज्ञ करून मुख्य नक्षत्रदेवतांसाठी कृसरान्नाचे (खिचडी) यथाशक्ति हवन करतात. प्रधानहोम झाल्यावर इतर देवतांसाठी तुपाच्या आहुती देतात. स्विष्टकृतादी पुढचे कृत्य झाल्यावर देवतांसाठी बलिदान करतात. मग पूर्णाहुती देतात. नंतर कलशातले पाणी घेऊन त्याने बालक व त्याचे आईबाप यांना अभिषेक करतात. मग यजमान आचार्याला गोप्रदान देऊन शांतीची समाप्ती करतो.

१०८ विहिरींचे पाणी आणून मुळावर जन्मलेल्या मुलाच्या आईबापांनी स्नान करणे, अशाही एक लौकिक शांतिविधी आहे.

मूलबंध हठयोगातील एक बंध. याची प्रक्रिया अशी–

पार्ष्णिभागेन सम्पीड्य योनिमाकुञ्चयेद् गुदम् ।
अपानमूर्ध्वमाकृष्य मूलबन्धोऽभिधीयते ।।

अर्थ– पायाच्या टाचेने गुदस्थान दाबून गुदाचे आकुंचन करावे आणि अपान वायू वर ओढावा. याला मूलबंध म्हणतात.

या बंधाने प्राण व अपान यांचा संयोग होऊन, त्या दोन्ही प्राणांची गती सुषुम्नेत व्हायला मदत होते. सुषुम्ना नाडीत या दोन्ही प्राणांचे ऐक्य झाल्यावर नाभीच्या खालील त्रिकोणाकृती अग्निमंडलात अपान वायू प्रवेश करून तो जठराग्नी प्रदीप्त करतो. या अग्नीचे व अपानाचे ऐक्य झाल्यावर ते प्राणवायूत मिसळून कुंडलिनी जागृत होते.

या बंधाच्या अभ्यासाने प्राणापानांचे ऐक्य होऊन मलमूत्रांचा क्षय होतो आणि वृद्धालाही तारुण्य लाभते, असे म्हटले आहे. [योगविद्या ; यो. सो. पू.; शिवसंहिता]

मूलविद्या एक तांत्रिक देवता. ही वाग्भव, श्वेतवर्ण, श्वेतवस्त्राभरण, त्रिनेत्र, चतुर्भुज व कमलासन आहे. तिच्या हातांत अक्षमाला व अमृतपात्र असते. [श्रीविद्यार्णवतंत्र]

मूलसूत्रे जैनांचे धार्मिक ग्रंथ. या ग्रंथात साधुजीवनाच्या मूलभूत नियमांचा उपदेश असल्यामुळे यांना मूलसूत्रे असे म्हणतात. उत्तराध्ययन, आवश्यक, दशवैकालिक व पिंडनिर्युक्ती किंवा ओघनिर्युक्ती अशी त्यांची नावे आहेत. काही विद्वान पहिल्या तिहींनाच मूलसूत्रे मानतात आणि शेवटचा पिंडनिर्युक्ती हा आवश्यकाचा अंश मानतात.

जैनांच्या आगम ग्रंथांत मूलसूत्रांना अनेक दृष्टींनी महत्त्वाचे स्थान आहे. त्यांतही उत्तराध्यन व दशवैकालिक यांना विशेष महत्त्व असून, त्यांची तुलना सुत्तनिपात, धम्मपद, इ. प्राचीन बौद्ध सूत्रांबरोबर केली जाते. दशवैकालिकाची निर्मिती महावीराच्या निर्याणानंतर ९८ वर्षांनी सेज्जाभव याने केली. उत्तराध्ययन हे सूत्र त्यातील आशयावरून बरेच जुने असावे, असे दिसते. कारण त्यातले विषय बौद्ध वाङ्मयातही आलेले आहेत. या सूत्रात आचार, विचार, श्रद्धा, समजुती व कर्मकांड यांचा संक्षेपाने निर्देश केलेला आहे. आवश्यकसूत्र मूळ स्वरूपामध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे त्याचा काल ठरविणे कठीण आहे. पिंडनिर्युक्तीची स्थितीही तशीच. ही सर्व सूत्रे जैनांच्या अंग ग्रंथांच्या नंतरची आहेत. [हि. जै. मो. ; प्रा. सा. इ.]

मूलस्थान प्राचीन सौवीर देशातील एक स्थान. पंजाबात चंद्रभागेच्या तीरावर हे स्थान होते. वराह पुराणात (१७८.५५–५७) येथील सूर्यमंदिराचा निर्देश आहे. श्रीकृष्णाचा पुत्र सांब याने ते निर्माण केले होते. याविषयी एक आख्यायिका आहे, ती अशी –

सांब अत्यंत देखणा असल्यामुळे श्रीकृष्णाच्या काही स्त्रिया त्याच्या रूपावर भाळल्या. हे श्रीकृष्णाला कळले, तेव्हा त्याने सांबाला ' तुला कुष्ठरोग होईल ' असा शाप दिला. त्याप्रमाणे सांबाला कुष्ठरोग झाल्यानंतर नारदाने त्याला रोगमुक्त होण्यासाठी सूर्याची आराधना करण्यास सांगितले. मग सांबाने चंद्रभागेच्या तीरावर मूलस्थान येथे राहून सूर्याची आराधना केली व तो रोगमुक्त झाला. त्यानंतर त्याने तिथे सूर्यमंदिर निर्माण केले.

पंजाबातील चिनाब (चंद्रभागा) नदीच्या काठी असलेले मुलतान हेच मूलस्थान होय, असे पुरातत्त्वशास्त्रज्ञांचे मत आहे. पाहा – मुलतान. [सं. मु. ५]

मूलाधार चक्र योगशास्त्रातील एक संज्ञा. सहा ज्ञानचक्रांमध्ये हे पहिले आहे. हे षट्चक्रांना आधारभूत असल्यामुळे याला आधारचक्र असेही म्हणतात. सर्व शरीराला व प्राणाला आधारभूत असलेल्या शक्तीचे वास्तव्य या ठिकाणी आहे, म्हणूनही याला मूलाधार हे नाव आहे. वायू प्रथम या चक्रामध्ये शिरतो आणि मग तो चक्रभेदन करीत हृदयाकाशात व नंतर चिद्गगनात संचार करतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

योगशिखोपनिषदात याचे वर्णन केलेले आहे, ते असे –

हे चक्र गुदस्थानापासून दोन अंगुळे वर आणि जननेंद्रियापासून दोन अंगुळे खाली असते. हे चतुर्दल असले तरी, याचा आकार त्रिकोणाकृती आहे. त्याचा अग्रकोन अधोमुख असून, दक्षिणोत्तर बाजूचे दोन कोन किंचित उन्नत आहेत. अधोमुख त्रिकोणाच्या अग्रभागी कुंडलिनी नावाची नाडी असते. मूलाधारचक्राच्या अगदी जवळ पण वरच्या बाजूला स्वाधिष्ठानचक्र असते.

या चतुर्दलांपैकी उजव्या बाजूच्या खालच्या दलावर वं, त्याच्या शेजारच्या खालच्या दलावर शं, शंच्या वरच्या दलावर षं आणि त्याच्या शेजारच्या दलावर सं ही बीजाक्षरे असतात. वं या बीजाने सर्व मंत्र सिद्ध होतात, असे म्हटले आहे. या प्रत्येक दलात गुप्ता, प्रासका, करालां व विकराला अशा अनुक्रमे चार शक्ती वास्तव्य करून असतात. या प्रत्येक शक्तीपासून अनुक्रमे परमानंद, सहजानंद, वीरानंद व योगानंद हे आनंद प्राप्त होतात.

श्रीपूर्णानंदयतीच्या श्रीतत्त्वचिंतामणी या ग्रंथात मूलाधारचक्राचे वर्णन पुढीलप्रमाणे दिले आहे--मूलाधारचक्राला चार



मूलाधार चक्र

पाकळ्या असून, त्यांवर वं, शं, षं आणि सं ही बीजाक्षरे आहेत. त्याच्या आत चौरस धरामंडल असून, त्याच्या भोवती आठ शूल आहेत. धरामंडलात लं हे बीज, ऐरावत, चतुर्मुख ब्रह्मा, शक्ती डाकिनी, त्रिकोण, स्वयंभू लिंग व कुंडलिनी यांची स्थाने आहेत.

डाकिनी ही या चक्राची नियंत्रक शक्ती आहे. सप्त वारांपैकी मंगळवार हा या चक्राचा वार मानलेला आहे. त्याचप्रमाणे सप्तपुऱ्यांमधील माया नामक पुरीचे हे स्थान आहे. [प. द. भे.; हिं. ध.; स. पॉ.; सुबोध स्तोत्रसंग्रह भाग १]

मूषिक एक जनपद. याला मृषिक किंवा मूषक अशीही नावे आहेत. हे जनपद दक्षिण भारतात होते. कृष्णा नदीला मिळणाऱ्या मूसी नदीच्या किनाऱ्यावर हे जनपद असावे. मूसी नदी सांप्रतच्या हैद्राबादजवळून दक्षिणेकडे वाहत जाते. महाभारताच्या भीष्म पर्वात (१०.५७) वनवासीबरोबर या जनपदाचा उल्लेख केलेला आहे. खारवेलाच्या शिलालेखातही या जनपदाचे नाव आहे. [हि. जॉ. ए. इं.; जॉ. पु.; अं. यु. भा.]

मूस्साद केरळमधील एक जात. या लोकांना मूट्टाटू, मूस्साद्, पोट्टुवाल किंवा अकपोट्टुवाल अशी स्थानपरत्वे वेगवेगळी नावे आहेत. मूस्साद लोक अंबलवासी लोकांपैकीच आहेत.

देवळातील उत्सवमूर्ती मूस्साद लोकांच्या ताब्यात असतात. उत्सवप्रसंगी त्यांची मिरवणूक काढणे आणि गर्भगृहाच्या पायऱ्या धुणे, ही यांची कामे असतात. देवाच्या नैवेद्यावर हे आपली उपजीविका करतात. ज्योतिष, वैद्यक आणि जादूटोणा यांचे थोडेबहुत ज्ञान यांना असते.

या लोकांच्या चालीरीती नंपूतिरी लोकांप्रमाणेच आहेत. त्यांचा पोषाखही नंपूतिरी लोकांप्रमाणेच असतो. नंपूतिरी लोकांप्रमाणेच मूस्साद कुटुंबातील फक्त मोठा मुलगा लग्न करतो आणि बाकीचे मुलगे अंबलवासी मुलींशी संबंधम करतात. लग्नात ताळी बांधणे हा महत्त्वाचा विधी असतो.

मुलांचे उपनयन सात ते अकरा या वयात करतात.

हे लोक मृतांना जाळतात. यांच्यांत मृताशौच दहा दिवस पाळण्याची चाल आहे. [का. ट्रा. स. इं.]

मूळ अश्विन्यादी नक्षत्रगणनेतले १९ वे नक्षत्र. हे धनुराशीत येते. पण याचे खगोलातले स्थान मात्र वृश्चिक पुंजाच्या पुच्छात आहे. याची देवता निर्ऋती असून, आकार सिंहपुच्छासारखा आहे. हे तीक्ष्ण, अधोमुख व क्लीब असून, अभिचारादी तामस कृत्यांस प्रशस्त मानलेले आहे. वृश्चिकाच्या पुच्छात तिसऱ्या प्रतीच्या दोन सुंदर तारका पूर्व पश्चिम रेषेत दिसतात. त्या इतक्या जवळ आणि इतक्या सारख्या आहेत, की त्यांना कोणीही ओळखील. मूळ नक्षत्र म्हणतात ते हेच. काही ज्योतिर्विदांनी सगळ्या वृश्चिकपुच्छालाच मूळ म्हटले आहे. त्यांचे मत ग्राह्य धरल्यास मूळ नक्षत्राच्या तारका अकरा मानाव्या लागतील.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वृश्चिकात असल्यामुळेच या नक्षत्राला तीक्ष्ण नक्षत्र म्हटले असावे.

मूळ नक्षत्राने आपला प्रपंच साक्षात आकाशगंगेच्या प्रवाहातच मांडला आहे. याच्या सभोवती आकाशगंगेचा प्रसन्न उल्हास दिसतो. किंबहुना आकाशगंगेचे मूळ ते हेच. इथूनच तिचा ओघ उसळला आणि विश्वाला कव घालून पुनश्च मूळ पदावर आला. हे दृश्य लक्षात घेऊनच वैदिक ऋषींनी याला मूळ असे अन्वर्थक नाव दिले असावे. पण यजुर्वेदातली याची उपपत्ती मात्र अगदीच वेगळी आहे, ती अशी —

आम्ही असुरांचे मूळच उच्छेदून टाकू, असे देवांनी ज्या नक्षत्रावर उद्‌घोषिले, तेच मूळ या नावाने प्रसिद्ध झाले.

मूळ नक्षत्रावर जन्मणारा मनुष्य त्याच्या अशुभ कालावयवात जन्मलेला नसेल, तर तो भाग्यवान, कुलवर्धक आणि दीर्घायू होतो, असे कोष्ठीप्रदीपात म्हटले आहे. [श. क.; नक्षत्रलोक]

मूळ पुरुष ज्याच्यापासून एखादे घराणे सुरू होते, अशा पुरुषाला त्या घराण्याचा मूळ पुरुष म्हणतात. हा मेल्यानंतर पूजाविषय बनून दैवतात समाविष्ट होतो. काही ठिकाणी याचे तांदळे असतात; तर काही ठिकाणी टाक असतात. मूळ पुरुषाच्या नावाने विशिष्ट दिवशी नैवेद्य वाढण्याची प्रथाही पाहायला मिळते. [चित्पावन.]

मृगया शिकार या अर्थी हा संस्कृत शब्द आहे. तो हरिणांची शिकार करणे या अर्थीच प्रारंभी वापरला जात असे. मृगया म्हणजे मृगाची शिकार; पण पुढच्या काळात मृग शब्दाचा अर्थविस्तार झाला आणि सर्वच पशूंना मृग ही संज्ञा लाभली. त्यामुळे कोणत्याही प्राण्याची शिकार म्हणजे मृगया असे ठरले.

मनुष्य हा सदैव हिंसाप्रिय असतो, असे नाही. पण तरीही त्याला अधूनमधून शिकार करणे आवडते. प्राचीन काळी आत्मरक्षण आणि आहार या दोन कारणांसाठी त्याला शिकारी बनणे भाग पडत असे. पुढे माणसाला शेतीचा शोध लागला आणि तो शेती करून आपले अन्न मिळवू लागला. त्यामुळे उदरंभरणासाठी शिकारच मारून आणायला हवी, अशी गरज त्याला उरली नाही. पण तरीही त्याच्या जीवनातली शिकार संपली नाही. शेतीच्या संरक्षणासाठीही वेळप्रसंगी वन्य प्राण्यांची आणि पक्ष्यांची शिकार करणे भाग पडू लागले.

सिंधुसंस्कृतीतले लोक शेतकरी होते. शेतीच्या संरक्षणासाठी आणि पूरक अन्न मिळविण्यासाठी ते शिकार करीत. मोहेंजोदडो येथील उत्खननात मिळालेल्या एका ताइतावर एका हरिणाला व जंगली बकऱ्याला बाण मारणाऱ्या काही शिकाऱ्यांची चित्रे आहेत. हडप्पा येथील एका ताइतावर वाघाच्या शिकारीचे दृश्य आहे. त्यात काही लोक एका वाघापुढे ढोल वाजवताना दिसतात. कदाचित वाघाला घाबरवून आणि त्याच्या मनाचा गोंधळ उडवून मग ते त्याला ठार मारणार असावे.

वेदांत शिकाऱ्याला मृगयू म्हटले आहे. वैदिक लोक प्रारंभी केवळ पशुपालक असले तरी, पुढे ते त्या पशूंच्या मदतीने शेतीही करू लागले. त्यामुळे शिकार हा निर्वाहाचा मार्ग म्हणून त्यांच्या पुढे नसला तरी, मनोविनोद, पूरक अन्न मिळवणे व पशुधनाचे रक्षण या गोष्टींसाठी ते वन्य पशूंची शिकार करीत. वैदिक कालात पाश किंवा जाळे पसरून पक्षी पकडण्याची पद्धत होती. ते लोक खड्डे खोदून त्यांत हरिणांना उडी घ्यायला लावीत व मग त्यांची शिकार करीत (ऋ. ८.८३.४.;) पाळलेल्या हत्तिणीला पुढे करून जंगली हत्ती पकडीत (ऋ. १०.३९८); शिकारी कुत्र्यांना अंगावर घालून रानडुक्कर मारीत (ऋ. ८.२.६; १०.४०.८); विविध युक्त्याप्रयुक्त्यांनी मोठमोठे वाघ-सिंहही पकडीत.

उत्तर वैदिक कालात मृगया हे फार मोठे मनोविनोदाचे लोकप्रिय साधन ठरले होते. भिन्न भिन्न पशूंची शिकार करणाऱ्या लोकांना वेगवेगळी नावे होती — मृगाची शिकार करणारा तो मार्गिक, पक्ष्यांची शिकार करणारा तो पाक्षिक, इत्यादी. ही शिकार बहुधा तिरकमठ्यानेच करीत. जोडीला सुरे आणि भालेही असत. शिकारी लोक कुत्र्यांची झुंड जवळ बाळगीत.

मृगया — कोरीव शिल्पकाम, हंपी

भारतातच नव्हे, तर जगात सगळीकडे शिकारीसाठी कुत्र्यांचा उपयोग केला जात असे आणि आजही केला जातो. ज्यांची उपजीविका केवळ शिकारीवरच असे, ते वन्य लोक समुदायाने शिकारीला निघत. त्यांचा वनप्रवेश होताच जंगलांत खळबळ उडत असे. पशू पळू लागत आणि पक्षी उडू लागत.

पतंजलीच्या काळी काही लोक कुत्रे पाळीत व शिकाऱ्यांना ते भाड्याने देत. अशा लोकांना श्वगणी म्हणत. कुत्रे दिल्यामुळे शिकारीतला अंशभागही त्यांना मिळत असे. काही लोक जाळी बनवून ती भाड्याने देत. अशा लोकांना मृतकवागुरिक म्हणत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सपत्र बाणाने मृगाला घायाळ करणे याला सपत्राकरण असे म्हणत. आरपार बाण घुसविणे याला निष्पत्राकरण म्हणत. पक्ष्यांची शिकार करणारे लोक ससाणे पाळीत. सोडलेला ससाणा लक्ष्य पक्ष्यावर झडप घालून त्याला ठार करी. अनेक शिकारी एकत्र मिळून जंगलात जात व आपापले ससाणे पक्ष्यांवर सोडीत. अशा शिकारीला श्येनंपाता म्हणत.

शिकारीचे काही नियम ठरलेले होते. उघडपणे किंवा मायाजाल रचून शिकार करणे वैध होते. एका शिकाऱ्याच्या सावजावर दुसऱ्याने बाण मारणे अवैध होते. ऋषींच्या आश्रमाजवळच्या हरिणांना मारणे हेही अवैध होते. म्हणूनच मृगाचा पाठलाग करीत कण्वाच्या आश्रमपरिसरात शिरणाऱ्या दुष्यंताला वैखानस हा कण्वशिष्य ओरडून सांगतो– 'आश्रममृगोऽयं न हन्तव्यो न हन्तव्यः।' 'राजर्षीणां हि लोकेऽस्मिन् रत्यर्थं मृगया वने।'= या लोकी वनात केली जाणारी मृगया ही राजर्षींच्या मनोविनोदासाठी आहे, असे रामायणात म्हटले आहे (अयोध्या ४९.१६). रामाला शिकारीची आवड होती, म्हणूनच तो सुवर्णमृगाच्या शिकारीसाठी त्याच्या मागून धावला. दुसऱ्या एका प्रसंगी तो म्हणतो– 'मी वनवासाहून परत येऊन शरयूच्या पुष्पित वनात केव्हा बरे मृगया खेळू शकेन!' मात्र त्याने म्हटले आहे, की हा खेळ थोड्या प्रमाणातच मला आवडतो आणि तेवढ्यालाच राजर्षींनी संमती दिली आहे. रामायणात दशरथ राजाच्याही शिकारीचे वर्णन आले आहे. त्याच्या वेषासंबंधी तिथे म्हटले आहे, ते असे– दशरथाचा शिकारीचा वेष भडक नव्हता. त्याच्या डोक्यावर वनपुष्पांची पगडी होती आणि छातीवर लता–वृक्षांच्या पानांच्या रंगाशी मिळते–जुळते असे कवच होते.

शाकुंतलात कालिदासाने दुष्यंताच्या शिकारीचे वर्णन दिले आहे. दुष्यंताबरोबर शिकारीत धावपळ करावी लागल्यामुळे थकून गळून गेलेला विदूषक जेव्हा शिकारीची निंदा करू लागतो, तेव्हा दुष्यंताचा सेनापती त्याला म्हणतो –

मेदश्छेदकृशोदरं लघु भवत्युत्थानयोग्यं वपुः।
सत्त्वानामपि लक्ष्यते विकृतिमच्चित्तं भयक्रोधयोः॥
उत्कर्षः स च धन्विनां यदिषवः सिध्यन्ति लक्ष्ये चले।
मिथ्यैव व्यसनं वदन्ति मृगयामीदृग् विनोदः कुतः॥

(शाकुंतल २.५)

अर्थ – शिकारीमुळे मेद झडतो, पोट सपाट होते. शरीर हलके व चपळ होते. पशूंच्या शिकारीत पशूंच्या मुखांवरचे भय–क्रोधांचे भाव अभ्यासता येतात. धावत्या पळत्या सावजावर बाण मारून त्याला मारणे, यात धनुर्धारी पुरुषाच्या धनुर्विद्येचा उत्कर्ष दिसून येतो. एवंगुणविशिष्ट मृगयेला व्यसन म्हणणे ही चूक आहे. अशा प्रकारचा मनोविनोद दुसरा कुठला असू शकेल?

मेगॅस्थिनीसने मौर्य सम्राट चंद्रगुप्त याच्या शिकारीचे वर्णन दिले आहे, ते असे – राजा राजभवनातून समारंभाने शिकारीसाठी निघे, त्या वेळी त्याच्या बरोबर राजस्त्रियाही जात. चोपदार भाले घेऊन पुढे चालत. जंगलात गेल्यावर राजा मचाणावर बसत असे. हाके लोक जनावरांना हुसकून त्याच्या मचाणाकडे आणीत. मग राजा त्यांच्यावर शरसंधान करी. अशा वेळी तीन चार स्त्रिया राजाच्या शरीररक्षक म्हणून भोवताली उभ्या राहात. खुल्या मैदानात शिकार करतेवेळी राजा हत्तीवर बसे. त्या वेळी सशस्त्र स्त्रिया रथ, घोडे किंवा हत्ती यांवर बसून राजाला घेरा घालून चालत.

राजे लोक कित्येकदा मृगयेचे व्यसनी बनत. शिकारीत रममाण झाले, की त्यांना राजकाजाची शुद्धच उरत नसे. त्यामुळे राज्यव्यवस्थेत गोंधळ होत असे. हे जाणून स्मृतींनी वायकांचा छंद आणि मद्य यांच्याबरोबर मृगयाही निषिद्ध ठरवली आहे.

कित्येक वन्य जमाती आजही शिकार करून अन्न मिळवताना दिसतात. अशा कित्येक जमातींतले लोक विशिष्ट जनावराचा विशिष्ट अवयव खात नाहीत. जमातीचे देवक असलेला पशू मारीत नाहीत. काही लोक देवकृत्य म्हणूनही शिकार करतात. विशिष्ट दिवशी शुचिर्भूत होऊन शिकारीला निघणे आणि वन्य पशू, विशेषतः रानडुकर मारून आणून त्याचा देवाला नैवेद्य दाखवणे, अशी चाल अनेक गावांतून आढळते.

भारतीय लोकसाहित्यात शिकारीसाठी वनात जाणाऱ्या राजांचे आणि राजपुत्रांचे खूप उल्लेख मिळतात.

मृगशीर्ष अश्विन्यादी गणनेतले पाचवे नक्षत्र. या नक्षत्राची ओळख पटण्यासाठी मृग या संपूर्ण तारकापुंजाची माहिती करून घेतली पाहिजे. मृग हा विषुववृत्तावरचा पुंज आहे. अर्धा दक्षिण गोलार्धात व अर्धा उत्तर गोलार्धात. हा मृग दक्षिणेकडून उत्तरेकडे पळत आहे. त्याची मोहोर थेट ब्रह्महृदय या तारकापुंजाकडे आहे. मुख्य तेरा तारकांनी योग्य जागी बसून ही मृगाची आकृती निर्माण केली आहे. या तारकांना वैदिक ऋषींनी इन्वका असे म्हटले आहे. या मृगाचा पुढचा डावा खूर आणि मागचा उजवा खूर हे ठळक आहेत. या दोन खुरांना अनुक्रमे बेटलग्यूस व रिगेल अशा पाश्चात्य संज्ञा आहेत. या दोन्ही तारकांना ज्योतिर्विदांनी तांबडे व पिवळे राक्षस असे म्हटले आहे. उष्णता व आकारमान यांनी हे राक्षस आपल्या सूर्याला तळहातावर खेळवू शकतील इतके अद्भुत सामर्थ्याचे आहेत. बेटलग्यूस हा आपल्यापासून ३०० व रिगेल हा ५४० प्रकाशवर्षांच्या अंतरावर आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मृगाच्या पुढील दोन पायांच्या मध्ये चिमण्या तारकांचा एक विमणा त्रिकोण आहे. त्यालाच मृगशीर्ष म्हणतात. पण या दिव्य मृगाचे ऐश्वर्य त्याच्या पुच्छातच आहे. त्यातल्या मधल्या तारके-भोवती एक तेजोमेघ आहे. जे काही थोडेच तेजोमेघ अंतराळात भ्रमताना साध्या डोळ्यांना दिसतात, त्यांपैकी हा एक आहे. पृथ्वीपासूनचे याचे अंतर ६०० प्रकाशवर्षे इतके असून, त्याचा विस्तार १० काशवर्षे एवढा आहे. दक्षिणेला व्याध नावाचा जो एक ठळक तारा आहे, त्याने मारलेला त्रिकांड बाण या मृगाच्या पोटात घुसला असून, त्याचा सर्वांत पुढचा तारा थेट पूर्वबिंदूवर उगवतो.

मृगशीर्ष हे नक्षत्र अर्धे वृषभ व अर्धे मिथुन राशीत येते. सोम ही याची देवता आहे. तैत्ति. ब्राह्मणात याविषयी म्हटले आहे, ते असे –

सोमो राजा मृगशीर्षेण आगन् । शिवं नक्षत्रं प्रियमस्य धाम ।

अर्थ – सोमराजा मृगशीर्षासह आला. हे नक्षत्र शिव आहे आणि त्याचे अंतराळातले स्थान प्रिय आहे.

मृग नक्षत्र हे मृदू, तिर्यङ्मुख व क्लीव आहे. हे मैत्री व शुभ कर्मे यांस प्रशस्त मानलेले आहे.

याच्याविषयी ऐत. ब्राह्मणात एक कथा आहे, ती अशी –

प्रजापतीने एक कन्या निर्माण केली आणि दुर्दैवाने तो तिच्यावरच मोहित झाला. मृगाचे रूप धारण करून तो कन्येशी रममाण होत असल्याचे पाहून देवांनी ठरविले, की या निंद्यकर्मी प्रजापतीला ठार मारले पाहिजे. पण ते धाडस करण्यासाठी देवांपैकी कोणीही पुढे येईना. मग देवांनी आपल्यापैकी उंच व धिप्पाड अशा देवांची शरीरे एकत्र केली. त्या शरीरसमवायापासून भेसूर व प्रचंड असा रुद्र उत्पन्न झाला. देवांच्या इच्छेप्रमाणे त्याने मृगरूपी प्रजापतीवर एक बाण सोडला. तो बाण लागून प्रजापतीचे शरीर खाली डोके आणि वर पाय अशा अवस्थेमध्ये खूप उंच उडाले. प्रजापतीच्या या मृगरूपालाच लोक मृगनक्षत्र म्हणतात आणि त्या बाण मारणाऱ्या रुद्राला मृगव्याध म्हणतात. प्रजापतीशी रत होताना त्या कन्येनेही मृगीरूप धारण केले होते. ती तांबड्या रंगाची हरिणी म्हणजेच रोहिणी नक्षत्र होय. प्रजापतीला मारण्याच्या या अद्भुत कृत्याबद्दल रुद्राला देवांनी सर्व पशूंचे आधिपत्य दिले आणि तो पशुपती या नावाने प्रसिद्ध झाला. (ऐत. ब्रा. ३.९).

मृग नक्षत्रावर जन्मलेला मनुष्य विनीत, गुणज्ञ, स्नेहार्द्र व सन्मार्गी असतो, असे कोष्ठीप्रदीपात म्हटले आहे. [नक्षत्रलोक]

मृगशीर्षव्रत एक काम्य व्रत. श्रावण वद्य प्रतिपदेला या व्रताला प्रारंभ करतात. हरिणाचे रूप घेतलेल्या यज्ञाची तीन मुखे शिवाने त्रिशूळाने विद्ध केली, त्याच्या स्मरणार्थ हे व्रत करतात. व्रत करणाऱ्याने चिकणमातीचे एक मृगशीर्ष तयार करून त्याची पूजा करावी आणि नैवेद्यासाठी निरनिराळ्या भाज्या व यवमिश्रित कणकेचे विविध पदार्थ घ्यावे, असे सांगितले आहे. फल – स्वर्गप्राप्ती. [हि. ध.]

मृगारेष्टी एक इष्टी. या इष्टीला महापवित्रेष्टी किंवा रहस्येष्टी असेही म्हणतात (बौधा. श्रौ. सू. २८.१). अश्वमेधाच्या अंगभूत ज्या अनेक इष्टी सांगितल्या आहेत, त्यांतच या इष्टीचे विधान आहे. परंतु सूत्रकारांनी काम्येष्टीत हिचा समावेश केला आहे. क्षयासारखा एखादा रोग झाला असला, चोरीचा आळ आला असला, देव-पितर-ऋषी-ब्राह्मण यांच्यापासून दूर होण्याचा प्रसंग आला असला, आपल्या पत्नीशिवाय दुसऱ्या स्त्रीबरोबर काही गैर व्यवहार घडलेला असला किंवा यासारखे एखादे महापातक हातून घडले असले, तर ही इष्टी करावी, असे बौधायनसूत्रांत म्हटले आहे. या इष्टीत अंहोमुच् अग्नी, इ. दहा देवता सांगितल्या असून, त्यांचे वेगवेगळे हवीही सांगितले आहेत (तैत्ति. सं.७.५.२२). या इष्टीत सुवर्णदक्षिणा द्यायची असते. या इष्टीचे सर्व तंत्र दर्शपूर्णमासाप्रमाणेच असते. इष्टीच्या प्रारंभी आहवनीयावर तीन आहुती द्यायच्या असतात. शिवाय पत्नीसंयाजामध्ये काही उपहोमही करायचे असतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

मृतवत्सादोषशांती गर्भधारणा झाल्यापासून पंधरवड्याने, एका महिन्याच्या आत किंवा वर्षाच्या आत ज्या स्त्रीच्या अपत्याचा मृत्यू होतो, त्या स्त्रीला मृतवत्सा अशी संज्ञा आहे. अशा स्त्रीला शुभ दिनी व शुभ नक्षत्री आघाड्याची मुळी एकच वर्ण असलेल्या गायीच्या दुधात उगाळून प्राशन करण्यास द्यावी; त्यामुळे तिला दीर्घायुषी संतती होते, असे सांगितले आहे. [ध. तं. शि.]

मृतांची स्मारके प्राचीन काळी प्रेत जाळले किंवा पुरले असेल त्या जागी दगड रचून मृताचे स्मारक बनवण्याची प्रथा होती. अशी स्मारके विशेषतः द. भारतात मोठ्या संख्येने सापडली आहेत. उ. भारतातही अनेक प्रदेशांत ही स्मारके आहेत; पण त्यांची संख्या त्या मानाने कमी आहे. काही स्मारके दगडी वर्तुळांच्या रूपात आहेत; तर काही ठिकाणी नुसते दगड रचून ठेवलेले आहेत. काही ठिकाणी मातीच्या ढिगात मडकी असून, त्यांत जळलेली हाडे व कांस्यपात्रे आढळतात. अशा प्रकारची स्मारके तोड लोकांनीही बन-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वलेली आहेत. उ. भारतातील कोल, नाग, खासी, इ. जमातींचे लोकही प्राचीन दगडी स्मारकांसारखी स्मारके उभारतात. तमिळनाडू, ओडिसा, बंगाल, वगैरे प्रदेशांतील काही ठिकाणी गुहेत अस्थी ठेवून दिलेल्या आढळतात. ती एका प्रकारची स्मारकेच होत.

हिंदू लोकांत प्रेत जाळल्या किंवा पुरल्या जागी समाधी बांधण्याची चाल आहे. बौद्ध व जैन लोक प्रसिद्ध व्यक्तीच्या अस्थी एखाद्या पेटीत घालून तिच्यावर स्तूप बांधीत. मुसलमानांत थडगी बांधण्याची चाल आहे, त्यांना कब्र म्हणतात. ही विविध प्रकारची मृतांची स्मारकेच आहेत. [एन्सा. रि. ए.]

मृत्तिका मृत्तिका म्हणजे माती. हिचे सांस्कृतिक उपयोग व संकेत अनेक सांगितलेले आहेत. शुद्ध केलेल्या भूमीवरील मातीला पवित्र मानतात. मृत्तिका ब्रह्मदेवाने निर्माण केली व कश्यपाने तिला अभिमंत्रित केले. हत्ती, घोडे यांच्या पायांखालच्या आणि रस्ता, वारुळ, संगम, डोह आणि गायीचा गोठा या ठिकाणच्या मातीला सप्तमृत्तिका म्हणतात. ही माती धर्मकार्यांत प्रशस्त होय. या सप्तमृत्तिकांत चव्हाट्यावरील माती मिसळली, की तिला अष्टमृद म्हटले जाते. काही जातींत लग्नसमारंभाच्या आधी सुवासिनी स्त्रिया रानात जाऊन वारुळाची किंवा अन्य पवित्र ठिकाणची माती आणून तिची चूल घालतात. या प्रकाराला मृत्तिकामंगल म्हणतात.

पांढरी, तांबडी, पिवळी व काळी अशी चार प्रकारची माती असते. घरे बांधण्यासाठी पांढरी माती उत्तम असते, असे म्हटले आहे. कारण ती फुटत नाही व अग्नीचा तिच्यावर फारसा परिणाम होत नाही. अग्निकर्मालाही पांढरी मातीच योग्य मानलेली आहे. पूर्वी गढ्या व किल्ले यांना हीच माती वापरीत असत. काळी माती शेतीसाठी उपयोगी असते, कारण तिच्यात पाणी धारण करण्याची शक्ती अधिक असते.

भृगूंनी आपल्या संहितेत आणि मय व कश्यप यांनी आपल्या वास्तुग्रंथांत मातीचा अनेक प्रकारांनी विचार केला आहे.

सुवर्णाच्या खालोखाल मातीचे भांडे पवित्र मानलेले आहे. मात्र ते जेवणासाठी वापरल्यानंतर विटाळते. धर्मकृत्यांतले कलश बहुधा मातीचेच करतात. संक्रांतीच्या दिवशी सुवासिनी स्त्रिया मातीचे गाडगे सुगड म्हणून दान देतात. देवकातला अविघ्नसंज्ञक कलश मातीचाच करतात. पाहा– मातीची भांडी.

मृत्युंजय (१) शिवाचे एक नाव व सौम्य रूप. शिव तत्त्वतः निरुपाधिक परब्रह्मस्वरूप असल्यामुळे तो कधी जन्मतही नाही व कधी मरतही नाही. इतकेच काय; पण "मृत्युर्यस्योपसेचनम्" = मृत्यू हे शिवाचे तोंडी लावणे आहे (कठ २.२४). त्या शिवतत्त्वाचे चिंतन करणारा व त्या तत्त्वाला जाणणारा तत्त्ववेत्ताही मृत्यूच्या जबड्यातून सुटतो, म्हणजेच मृत्युंजय बनतो. 'मृत्युं जयतीति मृत्युंजयः,' अशी या

मृत्युंजय शिव – कोरीव मूर्ती, वेरूळ

शब्दाची व्युत्पत्ती आहे. अज्ञानरूपी मृत्यूला जिंकण्याला समर्थ असे ज्ञान देणारा जो गुरू, तोही मृत्युंजयच होय. त्या दृष्टीनेही शिव हा मृत्युंजयच आहे. त्याला आदिगुरू असे म्हटलेले आहे. म्हणून ज्याला मृत्यूवर विजय मिळवायचा असेल, त्याने शिवाची उपासना करावी, असे सांगितले आहे. याविषयी दोन श्लोक मृत्युंजयतंत्रात दिले आहेत, ते असे–

यस्तु सम्पूजयेद् भक्त्या लिङ्गं मृत्युञ्जयाभिधम् ।
यमोऽपि प्रणमेद् भक्त्या किं करिष्यति चामयः ॥
रोगी प्रमुच्यते सद्यो भोगीव कञ्चुकोज्झितः ।
यदि मद्वचने भक्तिस्तदा मुक्तो भवेन्नरः ॥

अर्थ – जो मृत्युंजय नामक शिवलिंगाची भक्तीने पूजा करील, त्याला यमही भक्तीने प्रणाम करील. मग रोगाची कथा काय? जो रोगी असेल तो कात टाकणाऱ्या सर्पाप्रमाणे रोगापासून तावडतोब मुक्त होईल आणि जर माझ्या वचनावर श्रद्धा असेल, तर मनुष्य मुक्तही होऊन जाईल.

या मृत्युंजयाचे ध्यान असे–

हस्ताम्भोजयुगस्थकुम्भयुगलादुद्धृत्य तोयं शिरः ।
सिञ्चन्तं करयोर्युगेन दधतं स्वाङ्के स्वकुम्भौ करौ ।
अक्षस्रङ्मृगहस्तमम्बुजगतं मूर्धस्थचन्द्रस्रवत् ।
पीयूषोक्षतनुं भजे सगिरिजं मृत्युञ्जयं त्र्यम्बकम् ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – दोन करकमलानी उचललेल्या दोन कलशांनी जो आपल्या मस्तकावर जलधारा धरीत आहे, जो दोन कुंभ आपल्या मांडयांवर धारण करीत आहे, ज्याच्या दोन हातांत अक्षमाला व मृग आहे, ज्याच्या मस्तकावर चंद्रमंडळातून स्रवणारे आणि शरीराला भिजवणारे अमृत आहे अशा, गिरिजेसहित, कमलस्थित त्र्यंबक मृत्युंजयाला मी नमस्कार करतो.

रोग आणि अपमृत्यू दूर करणारा मृत्युंजयाचा वैदिक मंत्र (ऋ. ७.५९.१२) असा–

त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम् ।
उर्वारुकमिव बन्धनान्मृत्योर्मुक्षीय मामृतात् ॥

अर्थ – कीर्तिमान आणि महाशक्तिशाली त्र्यंबकाचे (रुद्राचे) आम्ही यजन करतो. (हे रुद्रा) काकडी देठापासून खुडावी, त्याप्रमाणे आम्हांला मृत्यूपासून मुक्त कर, पण अमरत्वापासून दूर ठेवू नको.

तीन दिवस उपवास करून दुधात शिजवलेल्या चरूच्या शंभर आहुती या मंत्राने शिवाला दिल्यास दीर्घायुष्य व शतायुष्य प्राप्त होते, असे ऋग्विधानात सांगितले आहे (२.२७).

प्रस्तुत मंत्राच्या प्रारंभी " ॐ ह्रौं जूं सः भूर्भुवः स्वः " आणि अंती " स्वर्भुवः भूः सः जूं ह्रौं ॐ " ही बीजे लावल्याने हा पन्नास अक्षरी मंत्र बनतो. वामदेव, कहोळ व वसिष्ठ हे त्याचे ऋषी; पंक्ती, गायत्री व अनुष्टुभ् हे छंद; सदाशिव महामृत्युंजय ही देवता; ऱ्हीं ही शक्ती व श्रीं हे बीज आहे.

या मंत्राचा एक लक्ष जप करावा व त्याच्या दशांश संख्येने बेलफळ, तिल, पायस, मोहरी, दुग्ध, दधी, दूर्वा; तसेच वड, पळस आणि खैर या वृक्षांच्या समिधा यांचे हवन करावे. असे केल्याने मंत्र सिद्ध होतो. या मंत्राचे तपशिलवार विधान मंत्रमहोदधीत दिलेले आहे. [भा. प्र. वि.; श. क.]

(२) (इ. स.चे १६ वे व १७ वे शतक) एक मुसलमान मराठी संतकवी. याचे मूळ नाव शहा मुंतोजी ब्रह्मणी असे होते. मृत्युंजयाचे सलग आणि साधार चरित्र उपलब्ध नाही. पारंपरिक चरित्रकथेत त्याला बेदरचा बादशहा मानतात आणि तो स्वत:ला ब्रह्मणी म्हणवून घेतो. यावरून तो बहमनी राजघराण्यातला असावा, असे दिसते. उद्धव चिद्घनाचे ' मृत्युंजयचरित्र, ' महीपतीच्या भक्तविजयातील ४१ वा अध्याय (१०१ ओव्या) व हनुमदात्मजकृत पूर्णानंदचरित्राच्या १६ व्या अध्यायातील २३३–२९५ ओव्या, एवढ्या उपलब्ध सामग्रीवरून मृत्युंजयाचे चरित्र स्थूलपणे उभे राहते, ते असे–

मुंतोजी ब्रह्मणी बेदर येथे राजविलास भोगत असताना त्याच्या जीवनात परिवर्तन घडविणारी एक घटना घडून आली. एकदा मुंतोजी आपल्या माडीवर पत्नीसह केळी खात बसला होता. खाली त्याच्या वाड्यात रक्षण करणारे शिपाई उभे होते. मुंतोजी व त्याची पत्नी दोघेही केळी खाऊन साली खाली टाकीत होते. एवढ्यात एक भिकारी तिथे आला व त्या साली गोळा करून मोठ्या चवीने खाऊ लागला. मुंतोजीला ते पाहून राग आला. त्याने आपल्या शिपायांना आज्ञा केली, की ' त्या भिकाऱ्याला पकडून आणा व शासन करा. ' शिपायांनी भिकाऱ्याला पकडून लाथेखाली तुडवले; परंतु लाथा बसत असताना भिकारी दुःखी होण्याऐवजी संतोषाने हसू लागला. हे त्याचे वर्तन पाहून मुंतोजीने शिपायांना थांबवले व भिकाऱ्याला विचारले. ' माझे शिपाई तुला एवढे मारीत असताना तू हसतोस कसा? ' त्यावर भिकाऱ्याने काही उत्तर देण्याऐवजी रडायला सुरुवात केली. मग मुंतोजी आणखीच संभ्रमात पडला. तो पुन्हा पुन्हा भिकाऱ्याला त्याच्या हसण्या–रडण्याचे कारण विचारू लागला. अखेर भिकारी म्हणाला. ' मी नुसत्या साली खाल्ल्या, तर तू मला एवढे शासन केलेस; तू आतला मगज खातो आहेस, तर तुला पुढे किती शासन होईल, याच्या विचाराने मला हसू आले. पण मग तुझी कीव वाटून रडूही आले.'

भिकाऱ्याचे हे विचारप्रवर्तक उत्तर ऐकून मुंतोजी अंतर्मुख झाला व सर्व वैभवाचा त्याग करून योगी बनला. त्यानंतर भेटेल त्या साधू-संन्याशाला मुंतोजी ईश्वरप्राप्तीचा मार्ग विचारू लागला. मुसलमान महंतांनी त्याला नमाज पढत जा, रोजा करीत जा, असे सांगितले; तर हिंदू साधूंनी त्याला पंढरीची वाट दाखवली. मुंतोजी मग पंढरीला गेला, तिथल्या वैष्णवांच्या मांदियाळीत सामील झाला व तिथेच रंगला.

तिसऱ्या दिवशी रात्री त्याला स्वप्नादेश झाला, ' की तू कल्याणीच्या स्वामी सहजानंदाचा गुरूपदेश घे. ' त्याच वेळी त्याला कोणी तरी विवेकसिंधूची एक प्रत आणून दिली व ती वाचण्यास सांगितले.

पुढे मुंतोजी सहजानंदांना जाऊन भेटला. सहजानंदांनी त्याला गुरूपदेश देऊन त्याचे नाव मृत्युंजय असे ठेवले व त्याला कल्याणीजवळच्या नारायणपूर नामक गावी वास्तव्य करण्यास सांगितले.

त्यानंतर सहजानंदांनी त्याला ब्राह्मणही करवून घेण्याचा प्रयत्न केला; परंतु कल्याणीच्या ब्रह्मवृंदाने तो कौशल्याने उधळून लावला.

नारायणपूर येथे कुटी बांधून राहू लागल्यावर मृत्युंजयाच्या जीवनात अनेक चमत्कार घडले. पुढे त्याने नारायणपूर येथेच आपल्या मठात देह ठेवला. त्याच्या निधनानंतर त्या स्थानाचा मुसलमानांनी कबजा केला. प्रतिवर्षी मुसलमानी कालगणनेनुसार २१ रमझान या दिवशी तिथे त्याच्या नावाने उरुस भरतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मृत्युंजयाने स्वरूपसमाधान व प्रकाशदीप हे दोन लघुग्रंथ लिहिले आहेत. याव्यतिरिक्त सिद्धसंकेत नामक एका बृहद्‌ग्रंथातले विहंगममार्ग नावाचे दुसरे प्रकरण त्याच्या नावावर आहे. त्याच्या प्रकाशदीपातील ईश्वरी सत्तेविषयीच्या काही काव्यपंक्ती अशा —

श्रोत्रें ऐकसी । त्वचेसी सुख भोगसी ।
नेत्रीं रूप देखसी । तूंचि एक ।।
जिव्हेसी रस चाखसी । नासिकीं परिमळा घेसी ।
या इंद्रियांसी जाणतोसी । तूंचि एक ।।
वाचे जें जें बोलणें । हातासी देणें घेणें ।
पायांसी चालणें । तुझेनीचि ।।

वरील ग्रंथांव्यतिरिक्त आणखीही अनेक छोटे-मोठे पद्य-ग्रंथ मृत्युंजयाच्या नावावर हस्तलिखित स्वरूपात आढळतात. मृत्युंजयाची भाषा संस्कृतप्रचुर व सालंकृत आहे. [मु. म. सं.]

मृत्युंजय कोकिळ

(इ. स. चे १८ वे शतक) एक संस्कृत ग्रंथकार. याच्यासंबंधी अनेक जनश्रुती प्रचलित आहेत. त्यांवरून हा संत, तपस्वी व योगी होता असे कळते. याचा जन्म देशस्थ ऋग्वेदी घराण्यात झाला. याच्या पित्याचे नाव वासुदेव. हा नागपुरात राहत होता. वासुदेव हाच मृत्युंजयाचा विद्यागुरूही होता. हा कालीचा उपासक असून, शाक्तपंथी होता. प्रसिद्ध पंडित शिवरामशास्त्री केळवदकर आणि सीतारामशास्त्री वखरे हे दोघे याचे शिष्य होते.

मृत्युंजयाने मुहूर्तार्क व फलाब्धी या नावाचे दोन ग्रंथ रचले आहेत. मुहूर्तार्क ग्रंथ बारा किरणांमध्ये विभागला असून, त्यांत त्याज्य, दोषविवरण, गोचर, संक्रांती, संस्कार, विवाह, यात्रा, इ. विषय विवेचिले आहेत. या ग्रंथावर त्याने स्वतःच प्रभा नामक टीका रचली आहे. फलाब्धी ग्रंथात अकरा तरंग आहेत. त्यांत साठ संवत्सरे, वर्षाधिप, वर्षमंत्री, अग्रिमवान्येश, इ. विषय आहेत. ग्रंथकारांच्या मते मुहूर्तार्क हा ग्रंथ समग्र इहलोकाचे संदेहातीत ज्ञान प्राप्त करून देणारा आहे. [वि. सं. मं., वार्षिक १९६२]

मृत्युयोग

रविवारी नंदातिथी, सोमवारी भद्रातिथी, मंगळवारी नंदातिथी, बुधवारी जयातिथी, गुरुवारी रिक्तातिथी, शुक्रवारी भद्रातिथी व शनिवारी पूर्णातिथी आल्या असता तो मृत्युयोग होतो. हा योग यात्रा आणि सामान्य शुभकृत्ये यांना वर्ज्य आहे. [मुहूर्त चिंतामणि]

मृत्यू

शरीर व प्राण यांच्या वियोगाला मृत्यू म्हणतात. मृत्यू ही देहाची अवश्यंभावी अवस्था आहे. मृत्यूचे दोन प्रकार आहेत—(१) अकालमृत्यू व (२) कालमृत्यू. अकाल मृत्यू हा रोग, अपघात, विष, जारण मारण, युद्ध, इ. कारणांनी होतो. तो मंत्र, तंत्र, औषधे, रसायने, इ. साधनांनी टाळता येतो. मृत्युंजय शिवाची आराधना हे एक अकालमृत्यू टाळण्याचे उत्तम साधन आहे, असे म्हटले आहे. कालमृत्यू हा नैसर्गिक होय. तो वार्धक्यात प्राणांची व शरीरावयवांची शक्ती क्षीण झाल्यानंतर शेवटची अवस्था म्हणून प्राप्त होतो. विवेकपूर्वक त्याचे स्वागतच करावे लागते. याविषयी भागवतात (१०. १) म्हटले आहे, ते असे —

मृत्युर्जन्मवतां वीर देहेन सह जायते ।
अद्य वाऽब्दशतान्ते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः ।।

अर्थ — हे वीरा, ज्यांनी जन्म घेतला, त्यांच्या देहाबरोबरच मृत्यूही उत्पन्न होत असतो. आज असो किंवा शंभर वर्षांनी असो, प्राण्यांना मृत्यू हा निश्चित आहे.

जीवन हे नैसर्गिक व मृत्यू अनैसर्गिक, अद्‌भुत व भयावह आहे, असे प्राचीन मानव मानीत असे. त्याला ती विलक्षण आपत्ती वाटे. आदिमानवाला वर्तमान स्थिती किंवा जिवंतपणा यापलीकडे एखादी अवस्था असू शकेल, याची कल्पना नव्हती. प्राण व आत्मा या दोहोंविषयी त्याला अज्ञान होते. म्हणून तो मृत्यूला घाबरे. प्रेताची व त्यातून बाहेर पडलेल्या प्राणाची त्याला भीती वाटे. हा बाहेर गेलेला प्राण आपल्यावर व आपल्या मुलाबाळांवर संकट आणील, असेही त्याला वाटे.

पुढे तो मृत्यूचे कारण शोधून काढण्याचा प्रयत्न करू लागला. त्याने कल्पना केली, की दानवी शक्तीचा कोप किंवा जादूटोणा यांच्यामुळे मृत्यू येतो. मृत्यू ही भयानक शिक्षा असून, दैवी आदेश न पाळल्यामुळे ती मिळते, अशीही त्याची कल्पना होती. शरीरातून मृत्युसमयी जे निघून जाते, तो काही तरी जड पदार्थ असावा, असेही त्याने अनुमान केले. त्यापुढची कल्पना ही, की शरीरातून निघून जाणारा प्राण ही माणसाचीच लहानशी प्रतिमा असते. प्राणाला माणसाप्रमाणेच अवयवही असतात. या कल्पनेचा विकास होऊन पुढे प्राणतत्त्व हे जड नसून सूक्ष्म आहे, असे ठरले. कारण प्राणतत्त्व शरीराला सोडून गेले, तरी शरीराच्या आकारमानात काही कमतरता येत नाही, असे दिसून आले. काहींच्या मते प्राण हा रक्तात असतो, तर काहींच्या मते तो श्वासात असतो. काहींची कल्पना अशी, की सर्व विश्वाचा मिळून एक महाप्राण असून, मृत्यूनंतर माणसाचा प्राण त्या महाप्राणात विलीन होतो. उपनिषदांतल्या विचारांची जवळीक करणारा असा हा प्राचीन मानवाचा विचार आहे. काही प्राचीन जमातींत पुनर्जन्माची कल्पनाही आढळते. मेलेला जीव नातवंडा-पतवंडांच्या रूपाने पुनः जन्म घेतो, असे ते समजतात. कधी तो पिशाचरूपाने अदृश्यपणे घरात किंवा घराबाहेर वावरतो, असेही अनेक आदिम जातींना वाटत असते. म्हणूनच प्रेत स्मशा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नात नेताना त्या प्रेतात्म्याने परत आपल्या घरी येऊ नये, म्हणून ते लोक अनेक प्रकारच्या युक्त्या योजतात. त्याने घरची वाट विसरावी, म्हणून जादूसारखे काही प्रकारही ते करतात.

मृत्यू जसा अप्रिय तसेच दीर्घायुष्य हे प्रिय, असे आदिमानवापासून मानवजातीला वाटत आले आहे. आयुष्यवृद्धी व प्राणरक्षण यांसाठी त्याने अनेक युक्त्या व साधने निर्माण केली आहेत. विशिष्ट पदार्थ खाणे, विशिष्ट पदार्थ न खाणे, दीर्घायुषी पशुपक्ष्यांचे मांस खाणे व रक्त पिणे, मनुष्य बळी दिला असेल तर त्याचा विशिष्ट अवयव खाणे, काही वनौषधी सेवन करणे, विशिष्ट तेले अंगाला चोळणे, देवाची प्रार्थना करणे, इ. गोष्टी त्याने आयुष्यवर्धक मानल्या आहेत.

वैदिक आर्यांच्या मृत्युविषयक कल्पनाही आदिमानवांच्यापेक्षा फारशा प्रगत नव्हत्या. तेही मृत्यूला भीतिप्रदच मानीत. तशा प्रकारचे अनेक उल्लेख ऋग्वेदात आहेत (ऋ.७.५९. १२; १०.१३.४; १०.४८.५). ऋग्वेदातल्या पुढील काही ऋचाही मृत्यूविषयी भेणेभावच दर्शवतात.

परं मृत्यो अनु परेहि पन्थां यस्ते स्व इतरो देवयानात् ।
चक्षुष्मते शृण्वते ते ब्रवीमि मा नः प्रजां रीरिषो मोत वीरान् ॥
(ऋ. १०. १८. १)

अर्थ – हे मृत्यो, देवयानाहून वेगळा असा जो तुझा मार्ग आहे त्या दुसऱ्या मार्गाकडे तू जा. (स्वर्गाकडे जाणाऱ्या मार्गात आम्ही आहो. तुझा मार्ग पितृलोकाकडे जाणारा. त्याच्याशी आम्हांला काही करायचे नाही). ज्या तुला डोळे आहेत व ऐकण्याला कान आहेत, त्या तुला मी विनवून म्हणतो, की आमच्या मुलाबाळांची व आमचे आश्रित जे इतर लोक (वीरान्) त्यांची हिंसा करू नको.

मो षु णः सोम मृत्यवे परा दाः पश्येम नु सूर्यमुच्चरन्तम् ।
(ऋ.१०. ५९.४)

अर्थ – हे सोमा, तू आम्हांला मृत्यूला देऊन टाकू नकोस. आकाशात संचार करीत असलेला सूर्य आम्हांला दीर्घ काळपर्यंत पाहू दे.

यस्य दूतः प्रहित एष एतत् तस्मै यमाय नमो अस्तु मृत्यवे।
(ऋ. १०.१६५.४)

अर्थ – ज्या यमाचा अर्थात मृत्यूचा दूत म्हणून हे घुबड व हा कपोत आमच्याकडे पाठविला गेला आहे, त्या यमाला, त्या मृत्यूला नमस्कार.

मी मर्त्य आहे आणि मला अमर व्हायचे आहे ही चिंता, हा ध्यास वैदिक ऋषींना लागला होता. एक ऋषी म्हणतो –

यदग्ने मर्त्यस्त्वं स्यामहं मित्रमहो अमर्त्यः ।
(ऋ. ८.१९.२५)

अर्थ – हे अग्ने, मी मर्त्य आहे आणि मैत्रीची दीप्ती असलेला तू अमर्त्य आहेस. मी आणि तू एक व्हावे.

मृत्यू टाळण्यासाठी वैदिक ऋषींना अमृत हवे होते. ते कुठे आहे याची त्यांना जिज्ञासा होती. त्यांनी कल्पना केली, की सूर्य, चंद्र, अग्नी, वायू, उषा, इ. देवता या प्राण्यांसारख्या मरणाधीन नाहीत. अर्थात त्या अमर असल्या पाहिजेत. त्यांचे अमरत्व आपल्याला प्राप्त व्हावे, यासाठी मग वैदिक ऋषी यज्ञ करू लागले व त्या यज्ञात त्या देवतांना आवाहन करू लागले.

मृत्यू आणि परलोक यांच्याविषयी अस्पष्ट कल्पना ऋग्वेदात उमटल्या आहेत. अथर्ववेदात त्या अधिक स्पष्ट झाल्या आहेत. मृत्यूचे १०१ प्रकार आहेत; त्यांपैकी जरेमुळे येणारा मृत्यू तेवढा नैसर्गिक असून, बाकीचे सर्व टाळण्यासारखे आहेत, असे अथर्ववेदात म्हटले आहे (२.१३.२; २.२८.२.; १.३०.३.). अनैसर्गिक मृत्यू टाळण्यासाठी व दीर्घायुष्यासाठी अथर्ववेदात अनेक प्रकारचे मंत्र दिले आहेत. अथर्ववेदात पुनर्जन्माची कल्पना सुस्पष्टपणे दिसून येते, ती अशी– मरणोत्तर जो जन्म मिळतो तो पृथ्वीवरच्या जन्माचीच पुनरावृत्ती असते. मनुष्य दुसऱ्या जगात ' सर्वतनुः साङ्गः ' असा प्रवेश करतो आणि पृथ्वीवरील सर्व सुखोपभोग त्या लोकात अनुभवतो. या जन्मी केलेल्या सत्कर्मांची व दुष्कर्मांची फळे पुढील जन्मी भोगावी लागतात. (अथर्व. ५.६.११.; १८.४.६४.; २.१४.३.; ५.१९.३ इ.)

उपनिषदात मृत्यू आणि तदुत्तर आत्म्याचे अस्तित्व याविषयी अनेक ठिकाणी चर्चा आहे. ऐहिक जीवनाविषयी चर्चा करण्यात स्वारस्य न वाटल्याने आत्म्याच्या परलोकाबद्दलच उपनिषदांनी अधिक आस्था दाखविली आहे. बृहदारण्यकात ही जिज्ञासा पुढीलप्रमाणे व्यक्त झाली आहे (३.९.२८)–

यद् वृक्षो वृक्णो रोहति मूलान्नवतरः पुनः ।
मर्त्यः स्विन्मृत्युना वृक्णः कस्मात् मूलात्प्ररोहति ॥

अर्थ – वृक्ष तोडला तरी त्याची मुळे जिवंत असल्यामुळे तो पुनः वाढतो; पण मृत्युरूपी प्रचंड लाकुडतोड्याने तोडले असताही पुनः जोमाने वाढणाऱ्या या जीवनवृक्षाचे मूळ काय असावे ?

मृत्यूनंतर मनुष्याचे काय होते, हे ज्याला माहीत नाही, त्याने आपण ज्ञानी आहोत अशी प्रौढी मिरवू नये, असे जैवलीने श्वेतकेतूला सांगितले आहे (छांदो. ५.३.१–४).

मृत्युविषयक जिज्ञासा बाळगणाऱ्यांमध्ये नचिकेता हा मोठा धीट व आग्रही वाटतो. यम प्रसन्न होऊन त्याला 'तीन वर माग' असे म्हणाला. नचिकेताने प्रथम दोन मामुली वर मागून तिसरा वर मागितला, तो असा –' मनुष्य मरणाधीन झाल्यावर त्याचा आत्मा जिवंत राहतो किंवा नाही याबद्दल लोकांमध्ये मतभेद आहेत.

CC0: In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काहींच्या मते तो जिवंत राहतो, तर काहींच्या मते राहत नाही. तेव्हा यांतील सत्य कोणते व असत्य कोणते, हे तू मला सांग, असा तिसरा वर मी तुजपाशी मागतो. ' यमाने ' हा वर तू मागू नको ' असे परोपरीने सांगितले असताही नचिकेतान आपला हट्ट सोडला नाही व शेवटी त्याच्याकडून मृत्यूरहस्य म्हणजेच पर्यायाने आत्मविद्या प्राप्त करून घेतली (कठ. १.१.२०–२९).

काही विद्वान लोक, शरीर म्हणजेच सर्व काही मानून शरीरनाशानंतर बाकी काही राहत नाही, असे मानतात. चार्वाक आणि जुने-नवे जडवादी हे यांपैकी होत. काही विद्वान शरीराला आत्म्याचे निवासस्थान मानून, शरीर नष्ट झाले तरी आत्मा शिल्लक राहतो, वासनादेहाने स्वर्ग-नरक भोगतो व शरीर धारण करून दुसरा जन्म घेतो असे मानतात. पाश्चात्य देशांत अधिकांश लोक प्रकृतिवादी किंवा जडवादी आहेत. त्यामुळे ते शरीरनाश म्हणजे जीवननाशच समजतात; पण काही वर्षांपासून पाश्चात्य देशांतही मृत्यूविषयी जिज्ञासा वाढू लागली आहे. मृत्यूचे रहस्य उलगडण्याचे वैज्ञानिक प्रयत्न तिकडील काही संशोधकांनी सुरू केले आहेत. ' साइकिकल रिसर्च ' नावाची एक विज्ञानशाखा तिकडे या बाबतीत संशोधन करीत आहे. या शाखेत काम करणाऱ्या अनेक विद्वानांना असे जाणवू लागले आहे, की मृत्यू म्हणजे जीवनाचा अंत नव्हे. मृत्यूनंतर जीवन राहते व मृतजीवांशी वार्तालापही होऊ शकतो. वर्तमान जन्मात मागील जन्मातील घटनांची स्मृती जागृत होणे व त्या व्यक्तीने आपल्या पूर्वजन्मातील घर-दार, परिवार व नात्याची माणसे दाखवून देणे, अशाही काही अद्भुत घटना क्वचित वाचायला मिळतात. मृत व्यक्ती स्वप्नदृष्टान्त देतात; क्वचित आपला भास निर्माण करतात आणि अनेक प्रकारे आपली सामक्षा दाखवतात, असेही अनुभव आहेत. या व अशाच इतर गोष्टी विचारात घेऊन व त्यांची वैज्ञानिक छाननी करून पाश्चात्य संशोधकांनी या विषयावरचे बरेच ग्रंथ प्रकाशित केले आहेत.

पण मृत्यूनंतर सर्वनाश आणि मरणोत्तर जीवनाचे अस्तित्व हे दोन्ही पक्ष गृहीत धरून कोणताही पक्ष खरा धरला, तरी मृत्यू हा हितकर्ता मित्र आहे, असे योगवासिष्ठात प्रतिपादले आहे (निर्वाण–उत्तरार्ध १०१.२६,२३,२४)–

मृतिरत्यन्तनाशश्चेत्तद्भवामयसंक्षयः ।
मृतश्चेन्न भवेद्भूयः सोऽत्राप्युपचयो महान् ।
भावाभावग्रहोत्सर्गज्वरः प्रशममागतः ।।
मरणं जीवितं तस्मान्न दुःखं न सुखं यतः ।।

अर्थ – मृत्यूने जीवनाचा सर्वथा नाश होत असेल आणि मेल्यावर दुसरे कोणत्याही प्रकारचे जीवन नसेल, तर त्याहून अधिक लाभ तो कोणता ? कारण एकदा मेल्यावर संसारातल्या सर्व दुःखांपासून कायमची सुटका मिळाली. होणे न होणे व देणे घेणे या सर्व ज्वरांची शांती झाली. अशा मृत्यूलाच खरेखुरे जीवन समजावे. कारण त्यानंतर सुखही नाही आणि दुःखही नाही.

मृतस्य देहलाभश्चेन्नव एव तदुत्सवः ।
मृतिर्नाशो हि देहस्य सा मृतिः परमं सुखम् ।।
देहाद्देहान्तरप्राप्तौ नव एव महोत्सवः ।
मरणात्मनि किं मूढा हर्षस्थाने विषीदथ ।।

अर्थ– मृत्यूच्या पश्चात नव्या शरीराची प्राप्ती होत असेल, तर ती फार आनंदाची गोष्ट आहे. कारण त्या वेळी मृत्यूचा अर्थ शरीराचा नाश एवढाच होतो. तसे झाले तर त्याबद्दल हर्ष मानला पाहिजे. कारण त्यात नव्या जीवनाची प्राप्ती आहे. एक शरीर सोडल्यावर जर दुसरे शरीर मिळत असेल, तर तीही आनंदाची गोष्ट आहे. अशा वेळी मृत्यूबद्दल दुःख न वाटता आनंदच वाटला पाहिजे. (निर्वाण उत्त. १०१.२५,२२)

वरील दोन्ही मते मानली तरी त्या दोघांचाही आशय आनंद हाच आहे, असे सांगून वसिष्ठ पुढे आपले मत सांगतो–

मृत्यू हा सर्वनाश करणारा नाही. मेलेला प्राणी नष्ट होतो ही गोष्ट निःसंदिग्ध खोटी आहे. तो मृत्यूनंतर साऱ्या देशकालांत जाऊन दुसऱ्या सृष्टीचा अनुभव घेऊ लागतो. ही त्याची संकल्पजन्य सृष्टी असते. मृत्युसमयी अज्ञानी माणसाला क्लेश होतात; ज्ञानी माणसाला होत नाहीत. मृत्युसमयी प्रत्येक जीवाला मूर्च्छेचा अनुभव येतो. ती मूर्च्छा त्याला महाप्रलयाच्या रात्रीसारखी वाटते. मृत्यूनंतर प्रत्येक जीव आपली स्वप्ने आणि संकल्प यांना अनुसरून आपली नवी सृष्टी उत्पन्न करतो. आपला परलोकही तोच घडवतो आणि जोवर मोक्ष प्राप्त होत नाही, तोवर जन्म-मरणांच्या फेऱ्यात फिरत राहतो. जो जीवन्मुक्त आहे आणि आपल्या सांसारिक जीवनात राहूनही मुक्तावस्थेचाही अनुभव घेत आहे, अशा मनुष्याला पुनर्जन्म नसतो. मृत्यूनंतर तो लगेच देहमुक्त होतो.

मनुष्याचे शरीर हे नवद्वारांनी युक्त आहे. कठोपनिषदात म्हटले आहे की, मानवी शरीर हे अकरा द्वारे असलेले एक नगर आहे (कठ. २.२.१). मृत्युसमयी सामान्यतः या द्वारांपैकी कोणत्याही एका द्वाराने प्राण बाहेर निघून जातो. पुण्यवान पुरुष आपापल्या कर्मानुसार ऊर्ध्वद्वारांनी, पापी पुरुष अधोद्वारांनी आणि मध्यम पुरुष मध्यद्वारांनी प्राण बाहेर टाकतात (म. भा. शांती पर्व २९८).

जीव ज्या प्रकारच्या द्वारमार्गाने बाहेर निघून जातो, तदनुसार त्याला उत्तरकालीन गती मिळते किंवा जीवाला ज्या प्रकारची गती प्राप्त व्हायची असेल तदनुसारच कर्माच्या प्रेरणेने त्याला तशा द्वाराने बाहेर पडावे लागते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नवद्वारांच्या वरचे एक दहावे द्वार आहे. त्याला ब्रह्मरंध्र म्हणतात. ब्रह्मरंध्र हा उत्क्रमणमार्ग आहे. योगारूढ पुरुष या ब्रह्मरंध्राच्या द्वारे आपला प्राण बाहेर सोडतात. या मार्गाने बाहेर पडल्यावर पुनश्च जन्म-मरणाच्या फेऱ्यात सापडावे लागत नाही. असा पुरुष सरळ परम पदाला जातो. या ऊर्ध्व-गतीने जाणाऱ्या योग्याची देह सोडण्याच्या वेळची अवस्था व त्याची परमगती याविषयी गीतेत पुढील दोन श्लोक लिहि-लेले आहेत (गीता ८.१२-१३)–

सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।
मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ।।
ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन् ।।
यः प्रयाति त्यजन् देहं स याति परमां गतिम् ।।

अर्थ – सर्व द्वारांचा संयम करून, मनाचा हृदयात निरोध करून आणि योगधारणेच्या द्वारे प्राणांना मूर्धदेशात स्थापन करून एकाक्षर ब्रह्म अशा ओंकाराचे उच्चारण आणि भग-वंताचे स्मरण करीत करीत जो देहत्याग करतो, तो परम-गतीला प्राप्त होतो.

पुनरावर्तन टळावे म्हणूनच वरील श्लोकांत नवद्वारांचा संयम सांगितला आहे. ही द्वारे बंद केल्याने ब्रह्मपथ सहजपणे खुला होतो व त्या मार्गाने जाणारा पुरुष मुक्त होतो.

मृत्यू कोणत्या अवस्थेत आणि कोणत्या कालात आला असता मनुष्य ब्रह्मलोकी जातो आणि कोणत्या परिस्थितीत व कोणत्या कालात मृत्यू आला असता पुनर्जन्म घेतो, याविषयी गीतेत पुढील दोन श्लोक दिलेले आहेत (गीता ८.२४-२५)

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।
तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ।।
धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ।
तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ।।

अर्थ – अग्नी, ज्योती म्हणजे ज्वाला, दिवस, शुक्ल पक्ष व उत्तरायणाचे सहा महिने यांत मेलेले ब्रह्मवेत्ते लोक मेल्यावर ब्रह्मास पोचतात. (परत येत नाहीत.) धूर, रात्र, कृष्ण पक्ष व दक्षिणायनाचे सहा महिने यांत मेलेला योगी चंद्राच्या तेजाला म्हणजे चंद्रलोकाला जाऊन (पुण्यांश सरल्यावर) परत येतो.

काशी, प्रयाग, इ. महान तीर्थांच्या ठिकाणी मृत्यू येणे, हे स्वर्गप्रद किंवा मोक्षप्रदही मानलेले आहे. तसेच एकादशी व शिवरात्री या दिवशी मृत्यू घडल्यास तो मनुष्य अनुक्रमे विष्णू व शिव यांच्या लोकांना जातो, असेही सांगितले आहे.

मृत्युविषयक इतर धर्मांतल्या कल्पना – जैनांच्या मृत्युविष-यक कल्पना बहुतेक बाबतींत हिंदूंच्या सारख्याच आहेत. मर-णोत्तर जीवनाचा नाश होतो, असे जैन मानीत नाहीत. प्रत्येक प्राण्याचा आत्मा पुनर्जन्म घेतो व तो जन्म पूर्वकर्मानुसार असतो. जेव्हा त्याच्या सर्व कर्मांचा निरास होतो, तेव्हा तो पुनर्जन्माच्या फेऱ्यातून मुक्त होऊन निर्वाणपदाला पोचतो, असे जैन मानतात.

बौद्ध धर्मात मृत्यू अटळ, तसाच दुःखदायक मानलेला आहे. 'सर्वच माणसे मृत्यू पावणार काय ?' या प्रश्नाला उत्तर देताना गौतम बुद्ध म्हणतो. 'होय; जीवन क्षणभंगुर आहे. जीवनाचा शेवट मृत्यूतच व्हायचा. दुःख, शोक, विकलता, यातना, हे मृत्यूचे सहोदर आहेत.'

मृत्यूचे सदैव स्मरण असावे, अशी बौद्ध कल्पना आहे. यास्तव बौद्ध भिक्षू स्मशानात जातात; तिथे मृत शरीराविषयी ध्यान व चिंतन करतात आणि जीवनातील ऐषआराम व विषयोप-भोग यांच्याविषयी आपल्या मनात उद्वेग ठसवतात. जीवनाचे पर्यवसान मृत्यूतच व्हायचे ही जाणीव दृढ असल्यामुळे बौद्ध ग्रंथांत तशा प्रकारच्या अनेक कथा आलेल्या आहेत. मृत्यू हा शरीराचा नाश करतो, म्हणून शरीराबद्दलचा मोह दूर केल्याने दुःखनिवृत्ती होते. मृत्यू म्हणजे जीवनाचा अंत होय. शारीरिक आणि मानसिक अशी जी जीवनतत्त्वे जन्माच्या वेळी एकत्र येतात, ती शरीराचे पतन झाल्यावर विस्कळित होऊन नष्ट होतात. जन्मापासून मृत्यूपर्यंत त्या तत्त्वांत सतत बदल होत असतो आणि मृत्यूमुळे त्यांची अखेर होते.

जीवनाची मर्यादा ठरलेली असते. मृत्यूची वेळही ठरलेली असते. जी महाभूते शरीराच्या अंतर्गत आहेत, त्यांत संघर्ष उत्पन्न झाला म्हणजे मृत्यू होतो. अर्हत पुरुष मृत्यूनंतर निर्वाण-पदाला पोचतात आणि विशिष्ट तपःसामर्थ्याने मृत्यूचा परा-भव करून ते मृत्युंजयही होतात. बुद्धाच्या बाबतीत असे घडले आहे. बुद्धाने आपले अपुरे कार्य पुरे करण्यासाठी आयुष्याचे तीन महिने वाढविले होते, असे सांगतात.

मृत्युसमयी जी वासना शिल्लक राहते, ती सद्वासना असली पाहिजे. अंतकाळी वासना चांगली व्हायची, तर माणसाने जन्म-भर आपले विचार चांगले ठेवले पाहिजेत. मृत्युसमयी मानसिक अवस्था विकल असते. अशा वेळी शरीरात जे मनोविकार अस-तात तेच प्रबल होतात. म्हणून मनोविकारांवर ताबा ठेवण्याचा जन्मभर प्रयत्न केला पाहिजे. सर्व जीवन हे मनोविकार ताब्यात ठेवण्याचे साधनच बनले पाहिजे.

मरणोन्मुख माणसावर कोणते संस्कार करावे, हे बौद्धांच्या विसुद्धिमग्ग या ग्रंथात सांगितले आहे. मनुष्य आसन्नमरण झाला म्हणजे त्याचे मित्र त्याला म्हणतात–

'मित्रा, मन शांत ठेव. तुझ्यासाठी आम्ही बुद्धाची पूजा करतो. तू या पूजासाहित्याला स्पर्श कर, म्हणजे प्राण जाताना तुझ्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वासना चांगल्या राहतील आणि तुला शांतपणे मृत्यू येईल.'

मृत्यूचे साम्राज्य अबाधित चालत असल्यामुळे या लोकाला मृत्युलोक म्हणतात. या लोकात राहणारे सर्व प्राणी मर्त्य आहेत. जगात प्रत्येकाला आपला सर्वांत मोठा शत्रू कोण वाटत असेल तर तो मृत्यू हा होय.

"नास्ति मृत्युसमः शत्रुः" असे रामायणात म्हटले आहे. हा मृत्यू टळावा म्हणून व अमरत्वाची इच्छा धरून हिरण्याक्ष, हिरण्यकशिपू, इ. अनेक दैत्यांनी उग्र तपश्चर्या केली; पण तेही अखेर मृत्यूचे भक्ष्य बनलेच.

मृत्यूच्या राज्यात सान-थोर, मूर्ख-शहाणा, राव-रंक, स्त्री-पुरुष असा कोणताच भेद नाही. मृत्यू समभावाने सर्वांचाच कवलग्रास करतो.

हे सर्व माहीत असूनही जगात प्रत्येक मनुष्य मृत्यू म्हटला की भयग्रस्त होतो हे महदाश्चर्यच होय. मृत्यूला मित्र मानणारा, ते एक अंतिम विसाव्याचे स्थान समजणारा आणि तोवर सतत कर्तव्यकर्मे आचरीत राहणारा, असा मनुष्य लाखात एक तरी मिळेल की नाही याची शंकाच आहे. खरे तर मृत्यूसुद्धा आई-इतकाच कृपाळू आहे. त्याची आराधना किंवा उपासना कोणी करो न करो; त्याचे स्मरण कोणी ठेवो न ठेवो; तो मात्र प्रत्येकाचे स्मरण ठेवून सर्वांना आपल्या पंखाखाली घेतो. या मृत्यूविषयीचा सिद्धान्त व आत्म्याचे अमरत्व अर्जुनाला पटवून देताना भगवंताने गीतेत म्हटले आहे (गीता २.१३,२२)–

देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥
वासांसि जीर्णानि यथा विहाय । नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥

अर्थ – देहधारीला ज्याप्रमाणे या ठिकाणी कौमार, यौवन व जरा यांची प्राप्ती होते, त्याचप्रमाणे दुसऱ्या देहाचीसुद्धा प्राप्ती होत असते. यासंबंधी बुद्धिमान पुरुष मोह पावत नाही. ज्याप्रमाणे मनुष्य जुनी वस्त्रे टाकून देऊन नवी धारण करतो, त्याप्रमाणे देहधारी जीर्ण होऊन गेलेल्या देहाला सोडून दुसऱ्या नव्या देहाला प्राप्त करून घेतो.

एकाच देहाच्या आश्रयाने मनुष्य कौमार, यौवन व जरा यांचा अनुभव घेतो; पण त्याच देहाच्या चौथ्या स्वरूपाच अनुभव त्याला नको असतो. मृत्यू हा कधीकधी अचानक एके दिवशी येतो असे नाही. तो सदैव माणसाबरोबरच असतो. अप-मृत्यूचा अपवाद सांडला, तर मनुष्यशरीराची वाढ पुरी झाली की तिळातिळाने त्याच्या क्षयाची वाटचाल सुरूच होते. शरीर क्षीण होत जाणे म्हणजे तिळातिळाने मरत जाणे, असाच त्याचा अर्थ आहे. असे असता त्याबद्दल जर आपण दुःख मानीत नाही, तर शेवटच्या मरणाबद्दल तरी ते का मानावे ? तसे पाहिले तर मृत्यू हा एका दृष्टीने दैवी अनुग्रहच आहे. प्रत्येक मनुष्याला त्याच्या त्याच्या कल्पनेप्रमाणे या देहाच्या द्वारे अधिकाधिक सुख उपभोगावे असे वाटत असते. पण उपभोगालाही मर्यादा आहे व शरीरशक्तीलाही मर्यादा आहे. ज्या देहाच्या द्वारे मनुष्याला जगाचा उपभोग घेणे अशक्य होते, तो देह नष्ट करून त्याच्या जागी माणसाला नवा देह मिळवून देणारा परमेश्वर हा कृपाळूच म्हटला पाहिजे. मनाला ही गोष्ट एकदा पटवून दिली, की मृत्यूबद्दल दुःख वाटायचे कारणच उरत नाही.

तात्त्विक दृष्टीने पाहिले तर देह हा उपभोगासाठी नसून कर्तव्यासाठी आहे. देह हा नश्वर मानून त्याच्या पतनाची क्षिती न बाळगता कर्तव्य करीत राहण्यातच खरा पुरुषार्थ आहे. मृत्यू मृत्यू म्हणून रडायचे नाही आणि मृत्यू येणारच म्हणून उगाच आगीत उडी घ्यायची नाही किंवा आत्महत्याही करायची नाही. या उलट मृत्यू म्हणजेच अकाल मृत्यू टाळता येण्यासारखा असेल तर तो टाळायचा प्रयत्न करायचा, असेच विचारवंतांचे सांगणे आहे भागवत पुराण (१०.१) म्हणते–

मृत्युर्बुद्धिमता ऽ पोह्यो यावद् बुद्धिबलोदयम्।

अर्थ – शहाण्या माणसाने आपल्या बुद्धिबलाचा जास्तीत जास्त वापर करून मृत्यू टाळावा.

एखादे महान ध्येय, महनीय नैतिक मूल्य किंवा राष्ट्रावरील आपत्ती यांच्यासाठी देहत्याग करणे आणि मृत्यूला सामोरे जाणे, हे धर्मशास्त्राने प्रशंसनीय मानले आहे. भागवतात दोन मृत्यू दुर्लभ अतएव वांच्छनीय मानले आहेत. त्याविषयीचा श्लोक असा (भाग. पु. ६.१०.३३)–

द्वौ सम्मताविह मृत्यू दुरापौ यद् ब्रह्मसन्धारणया जितासुः।
कलेवरं योगरतो विजह्याद् यदग्रणीर्वीरशये ऽ निवृत्तः ॥

अर्थ – या जगात दोन मृत्यू दुर्लभ मानलेले आहेत. एक योगरत होऊन आणि प्राणजय करून ब्रह्मधारणा करीत देहत्याग करणे आणि दुसरा युद्धात अग्रभागी राहून शत्रूचे घाव झेलीत रणभूमीवर देह ठेवणे, हा होय.

जगात जे थोर, कर्ते व निग्रही पुरुष होऊन गेले, त्यांनी आजवर मृत्यूला कःपदार्थ मानले आहे. श्री. महादेवशास्त्री दिवेकर लिहितात –

"तानाजीने आपल्या रायबाचे 'लगीन' न लावता आधी स्वतःचे सिंहगडाशी लग्न लाविले नाही काय ? समरभूमीवर स्वदेह ठेवून मृत्यूला तृप्त केले व विजय मिळविला नाही काय ? शिवाजी अफजुलखानाला भेटावयाला गेले ते मृत्यूच्या गुहेतच गेले नव्हते काय ? जयसिंगाबरोबर महाराज आग्र्यास गेले व औरंगजेबाच्या अटकेत राहिले. ती अटक म्हणजे मृत्यु

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रूपी सिंहाची पकडच नव्हती काय ? पण मृत्यूच्या गुहेत शिरून त्याचे केस उपटून महाराज दक्षिणेत आले व त्यांनी स्वराज्याचा दुंदुभि वाजविला. मृत्यूविषयी बेपर्वा असल्यामुळेच अशी महत्कार्ये घडली. "

अलीकडच्या स्वातंत्र्ययुद्धातही अनेक क्रांतिवीरांनी स्वातंत्र्याच्या वेदीवर हसत हसत प्राणाहुती दिल्या आहेत. देह हा अत्यंत प्रिय खरा; पण त्या देहाच्या अर्पणाने एखादे श्रेष्ठ, अतिश्रेष्ठ, कार्य सिद्ध होणार असेल तर त्या वेळी देहपाताला तयार होणे, हे एक उच्च आध्यात्मिक जीवनमूल्यच मानलेले आहे.

जगाच्या रहाटगाडग्याला उत्पत्तीची व स्थितीची जशी आवश्यकता आहे, तशीच लयाची म्हणजे मृत्यूचीही आवश्यकता आहे. जगाच्या धारणपोषणाला मृत्यूची नितांत गरज आहे. जगात स्थावरजंगम, तसेच सजीव-निर्जीव प्राणी यांची जर सारखी उत्पत्ती व स्थितीच चालू राहिली, तर जगावर महान अनर्थ ओढवेल. मग जग हे जगण्यालायकच उरणार नाही. त्याला नरकाची अवकळा प्राप्त होईल. ती होऊ नये म्हणूनच मृत्यूची नितांत गरज आहे. मृत्यू ही जगाची शोभा आहे. मृत्युभयातूनच जगातले सर्व धर्म उदयाला आले आहेत. मानवी जीवनातले कौटुंबिक आणि सामायिक नातेसंबंधही मृत्यूच्या जाणिवेमुळेच जिव्हाळयाचे बनले आहेत. जे अशाश्वत, अर्थात मरणधर्मी आहे, ते कोणत्या तरी माध्यमाच्या द्वारे अमर करून ठेवावे, यातूनच कलेलाही प्रेरणा मिळाली आहे. मूर्ती, पुतळे, चित्रे, हे सारे शिल्पवैभव मृत्यूवर मात करण्यासाठीच निर्माण झाले आहे.

मृत्यूला महानिद्रा किंवा चिरविश्रांती असेही म्हणतात. माणसाला विश्रांतीची अत्यंत गरज असते. दिवस आणि रात्र ही ईश्वरी योजना त्यासाठीच आहे. दिवसा काम व रात्री झोप असा सामान्य व्यवहार आहे. मनुष्यालाच नव्हे; तर प्रत्येक सजीव प्राण्याला केव्हा तरी दैनंदिन निद्रेपेक्षा महानिद्रा अत्यावश्यक असते. ही दीर्घनिद्रा किंवा चिरविश्रांती मृत्यूमुळेच माणसाला लाभते. या दृष्टीने पाहिल्यास मृत्यूला शत्रू म्हणता येणार नाही. जो विसांवा देतो, आराम देतो, तो शत्रू कसा असेल ?

एका निराळया दृष्टीने विचार केल्यास मृत्यू देहाला का आत्म्याला असा प्रश्न उत्पन्न होतो. आत्मा हा नित्य, सर्वंगत, अचल, सनातन आणि त्रिकालाबाधित आहे, असे गीता सांगते. त्यामुळे त्याचा नाश कधी संभवतच नाही. मृत्यू हा देहाला आहे, हे म्हणणेच रास्त; पण देहाची ती एक अपरिहार्य अवस्था असल्यामुळे तिच्याबद्दल दुःख मानायचे कारण नाही. बरे, देह तरी मृत्यूनंतर नष्ट होतो काय ? मुळीच नाही. त्याचे नुसते रूपांतर होते. देहातील सूक्ष्म तत्त्वांचा अभाव कधीही होत नाही. होते ते एवढेच. की देहातला पृथ्वीचा अंश पृथ्वीत, जलाचा अंश जलात, तेजाचा अंश तेजात, अशा प्रकारे पंचभूतात्मक देह पंचमहाभूतांत विलीन होतो. [गीताप्रदीप; यो. उ. सि.; वे. इं.; उ. र.]

मृदंग एक आहत वाद्य. याच्या निर्मितीसंबंधी ज्या आख्यायिका सांगतात, त्यांतील दोन अशा–

(१) त्रिपुर-विजयानंतर शिवाने जे नृत्य केले, त्यात त्याला साथ करण्यासाठी ब्रह्मदेवाने हे वाद्य निर्माण केले आणि गणपतीने ते वाजविले.

(२) एकदा स्वाती नामक एक पुरुष सरोवरावर पाणी आणण्यासाठी गेला असता जोराचा पाऊस आला. पावसाचे टपोरे थेंब सरोवरात असलेल्या कमळाच्या पानांवर पडले आणि त्यांतून मधुर स्वर उमटले. स्वातीने आश्रमात आल्यावर विश्वकर्म्याकडून तसे ध्वनी काढणारे एक वाद्य बनवून घेतले.

हे वाद्य बरेच प्राचीन असावे असे वाटते. कारण रामायण, महाभारत, हरिवंश, अर्थशास्त्र, विविध पुराणे, उत्तरकालीन उपनिषदे, इ. ग्रंथांमधून याचे उल्लेख आढळतात. जातकांमध्ये मुतिंगा नावाचे जे वाद्य उल्लेखिले आहे, ते मृदंगच असावे, असे वाद्य-विशारदांचे मत आहे. संगीतरत्नाकराचा वाद्याध्याय, संगीतमकरंद, संगीत समयसार आणि मानसोल्लासाचा वाद्यविनोद यांत याची चर्चा आहे.

मृदंग याचा अर्थ मातीपासून बनविलेले वाद्य असा आहे. हे वाद्य मातीपासून बनवीत असत, असे भरतमुनीने म्हटले आहे (ना. शा. ३५.२४०). यावरून याचे मधले खोड मातीचे असावे



मृदंग

असे वाटते. परंतु आता हे खोड रक्तचंदन, खैर, शिसवी, फणस, इ. लाकडांपासून बनवितात. याचा आकार पिपासारखा असून, दोन्ही बाजूंना तो कमी होत गेलेला असतो. हे आतल्या बाजूने कातून आरपार पोखरतात. याची दोन्ही मुखे कातड्याने मढविलेली असतात. उजव्या हाताचे मुख थोडे लहान आणि डाव्या हाताचे मुख थोडे मोठे असते. लहान मुखावर शाई घोटतात व मोठ्या मुखावर कणीक चढवतात. दोन्ही मुखांवरील कातडी आवळण्यासाठी कडेला वेणीसारखा वेठ वळलेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असतो, त्याला गजरा असे म्हणतात. या गजऱ्यातून चर्मवादी किंवा सुताची वादी ओवून घेतात. वाद्यांच्या मध्ये लाकडी गठ्ठे बसविलेले असतात. त्यामुळे आवाज कमी अधिक करता येतो.

अंक्य, आलिंग्य आणि ऊर्ध्वक असे मृदंगाचे तीन प्रकार आहेत. पहिला प्रकार मांडीवर ठेवून वाजवण्याचा, दुसरा जमिनीवर ठेवून पण जवळ घेऊन वाजवण्याचा व तिसरा प्रकार उभा धरून वाजवण्याचा असतो. या तीन्ही प्रकारांचा उल्लेख कालिदासाने कुमारसंभवात केलेला आहे (११.३६).

अलिकडे कीर्तन, भजन, दिंडया, इ. कार्यक्रमांच्या वेळी याचा उपयोग करतात. प्राचीन काळी याचा रणवाद्य म्हणूनही उपयोग होत असावा. दक्षिणेत या वाद्याचा वापर बराच आहे. पाह्य– करदिकई, करदिसमेळ, पखवाज. [म्यु. इं.; सं. शा.; डि. सा. इं. म्यु. म्यु.; क. हि. वा. पु ; ह. च. सां. अ.]

मृदंगमध्यव्रत एक जैन व्रत. हे व्रत बृहत व लघू अशा दोन पद्धतींचे आहे. बृहत व्रत अठ्ठ्याण्णव दिवसांत पुरे करायचे असते. यात एक्याण्णव उपवास आणि सात पारणी होतात. लघुव्रत एक महिन्यात पुरे करायचे असून त्यात तेवीस उपवास आणि सात पारणी होतात. [जै. व्र. वि. सं.]

मृळीक वासिष्ठ एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १५० वे सूक्त आणि नवव्या मंडलाच्या ९७ व्या सूक्तातील २५–२७ या ऋचा याने रचल्या आहेत. दहाव्या मंडलातील सूक्तांत मृळीक शब्द अनेकवार आला आहे. त्याचा एक अर्थ सूक्तकार असा असला तरी, विकल्पाने सुख असाही होतो. सर्वानुक्रमणीमध्ये मृळीकाला वसिष्ठाचा पुत्र असे म्हटले आहे, परंतु याला आधार मिळत नाही.

या सूक्तातील ५ व्या ऋचेमध्ये वसिष्ठाचा उल्लेख आहे. परंतु त्यावरून तो मृळीकाचा पिता ठरणार नाही, असे श्री. केतकरांचे मत आहे.

याने रचलेल्या नवव्या मंडलातील ऋचांमध्ये सोमप्रशस्ती आणि १० व्या मंडलातील सूक्तात अग्निस्तुती आहे. नमुन्याची एक ऋचा (१०.१५०.१) अशी –

समिद्धश्चित् समिध्यसे देवेभ्यो हव्यवाहन ।
आदित्यै रुद्रैर्वसुभिर्न आ गहि मृळीकाय न आ गहि ।।

अर्थ – देवांप्रीत्यर्थ नव्याने प्रदीप्त केलेल्या हे सर्वस्थित हव्यवाहक अग्ने, आदित्य, रुद्र आणि वसू यांच्या समवेत मुळीक ऋषींकडे तू ये.

दहाव्या मंडलातील उपरिनिर्दिष्ट सूक्त हे अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. त्यातील काही मंत्र हे शकुनमंत्र म्हणून प्रसिद्ध आहेत. [सी. ऋ.; म. ज्ञा. को.; प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

मेंढा वैदिक आर्यांच्या पाळीव पशूंत मेष म्हणजे मेंढ्याला महत्त्वाचे स्थान होते. वैदिक वाङ्मयात याचा अनेकदा उल्लेख आलेला आहे (ऋ. १.४३ ६; ८.२.४०; अथर्व. ६.४९.२; वाज. सं. ३.५९; तै. सं. ७.४.१२.१; श. ब्रा. ३.३.४.१८.). यज्ञात सोमरस गाळण्यासाठी याच्या लोकरीचा उपयोग करीत. लोकरीपासून मऊ आसनही तयार करीत (ऋ. १०.१८.१०). मेंढ्यांच्या मांसाचा खाण्यासाठीही उपयोग होत असे. यज्ञात मेषाचीही मेध्य हवी म्हणून हत्या होत असे. मेंढा आपल्या लोकरीने मनुष्याचे शीत निवारण करतो, म्हणून त्याला माणसे व इतर प्राणी यांचे 'संरक्षक प्रावरण' असे वाजसनेयी संहितेत म्हटले आहे (१३.५०). पूषा हा मेंढ्यांच्या लोकरीचे कपडे तयार करतो, असे ऋग्वेदात (१०.२६.६) म्हटले आहे. गांधार देशातील मेंढ्या लोकरीसाठी प्रसिद्ध होत्या. अग्नी हा मेषवाहन आहे. [वे. इं.; सु. वि. को.; रे. हि. इं.]

मेंढा

मेंढ्यांची झुंज मनोविनोदनाचा एक प्राचीन प्रकार. मेंढ्यांचे चोलिक, जटिल आणि शोणवर्ण असे तीन प्रकार मानलेले आहेत. मोठ्या तोंडाचा, गोंडेदार शेपटाचा मेंढा त्या सर्वांत शुभ मानला जातो. काळ्या तोंडाचा मेंढा शूर मानला जातो. असे मेंढे झुंजीसाठी राखून ठेवीत असत.

झुंजीसाठी पाळलेल्या मेंढ्यांना हरभऱ्याची डाळ, तिळमिश्रित भात व हरळीचे गवत चारीत. त्याशिवाय आठवड्यातून एकदा सैंधव आणि तूप एकत्रित करून तेही पाजीत. सकाळ-संध्याकाळ त्यांना हिंडवून आणीत. त्यांच्या शिंगांवर लोखंडाच्या शेंब्या बसवीत. झुंजीच्या आदल्या दिवशी मेंढ्यांना अंधारकोठडीत ठेवीत. प्रत्यक्ष झुंजीच्या दिवशी त्यांना थोडेच खायला देत; पण दारू मात्र पाजीत. त्याचबरोबर सुंठ, मिरी व पिंपळी यांचा भाजन तयार केलेला गोळाही त्यांना चारीत. यामुळे ते जोराने झुंज देत. दोन प्रतिस्पर्धी मेंढ्यांचे पालक पण लावून ही लढत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घडवून आणीत. झुंज सामान्यपणे रविवारी होत असे.

मनोविनोदनाचा हा प्रकार बराच प्राचीन असावा. कारण वात्स्यायनाने आपल्या कामसूत्रांमध्ये याचा उल्लेख केला आहे. [प्रा. भा. म.; मा. – ए. सां. अ.]

मेंदी एक वनस्पती. हिच्या पानांचा उपयोग बोटे, नखे, इ. रंगविण्याकडे करतात. मेंदीच्या फुलांचे अत्तर काढतात. त्याला हीना असे म्हणतात. झाडावरच्या फळांच्या घोसांना इसबंद म्हणतात. मुलांची दृष्ट काढण्यासाठी त्यांचा उपयोग करतात.

मेंदीची झुडपे साधारणपणे उष्ण प्रदेशात व रेताड जमिनीत चांगली वाढतात. ईजिप्त, इराण, अफगाणिस्थान, बलुचिस्थान, इ. देशांत व भारतातील राजस्थान, सौराष्ट्र, माळवा या प्रदेशांत मेंदीची विशेष पैदास होते. तथापि इतर अनेक भागांत कुंपणासाठी मेंदीची झुडपे लावण्याची पद्धत आहे.

मेंदीची पाने बारीक वाटताना त्यात लिंबाचा रस किंवा चिंच घालतात. नंतर ही वाटलेली मेंदी नखांना आणि हातापायांच्या तळव्यांना लावतात. ती वाळल्यावर धुवून टाकतात. मग तळवे व नखे गडद केशरी रंगाने रंगलेली दिसतात. हा रंग तीन–चार आठवडे तरी टिकतो.

मुसलमान पुरुष केस व दाढी यांनाही मेंदी लावतात. मेंदी लावण्याची प्रथा मुसलमानांनी भारतात आणली असा काही लोकांचा समज आहे; परंतु भारतात गुप्त कालापासून मेंदी लावण्याची प्रथा आहे. मदयंतिका या नावाने मेंदीचा उल्लेख संस्कृत भाषेत केलेला आढळतो. मेंदीने रंगलेल्या बोटांचे एका कवीने वर्णन केले आहे, ते असे –

सुदीर्घा रागशालिन्यो बहुपर्वमनोहराः ॥
तस्या विरेजुरङ्गुल्यः कामिनां संकथा इव ॥

अर्थ – लांबसडक, मेंदीने रंगवलेली आणि अनेक पेरांमुळे मनोहर दिसणारी अशी तिची बोटे प्रणयी जनांच्या गप्पागोष्टींप्रमाणे रंगली होती.

रीतिकालीन कवींनीही मेंदीचे वर्णन केले आहे. बिहारी कवी म्हणतो –

गडे बडे छबि छाक छकि, छगुनी छोर छुटैन।
रहे सुरंग रंग रंगि वही नह–दी महंदी नैन ॥

अर्थ – नायिकेच्या बोटांना लावलेल्या मेंदीच्या लाल रंगाने नायकाचे डोळे इतके आकर्षून घेतले, की काही केल्या ते तिथून बाजूला होईनात. मेंदी जणू अशा रीतीने मनाला भुरळ घालते.

पंजाब, राजस्थान व उत्तर प्रदेश या भागांत शृंगाराचे एक साधन म्हणून मेंदीला महत्त्व आहेच; पण शुभ शकुनाचा एक मंगलाचार म्हणूनही मेंदी प्रतिष्ठा पावली आहे. त्या भागांत विवाहाच्या आदल्या रात्री वधू-वरांना मेंदी लावण्याची प्रथा आहे. त्या रात्रीला मेहंदी की रात असेच नाव आहे. ज्या वधूच्या तळहातावरची मेंदी अगदी लालचुटुक रंगते, तिच्यावर तिच्या पतीचे गाढ प्रेम बसते, असे समजतात.

राजस्थानात करवा चौथ, तीज, नागपंचमी, इ. सणांच्या आधी कुमारिका व सौभाग्यवती स्त्रिया हातांच्या तळव्यांवर व पायांवर विविध आकृत्या काढून त्या मेंदीने रंगवतात. मेंदीच्या सुंदर आकृत्या काढणे, ही एक कला आहे. वेल-बुट्टी, पाने, चंद्र-सूर्य, हंस, मोर, स्वस्तिक, लाटा, चक्र, चौपड, इ. मेंदीच्या परंपरागत आकृती आहेत.

मेंदीची नक्षी

गुजरातेत नववधू सासरी जाताना हातापायांना मेंदी लावतात. महाराष्ट्रातही मेंदीचा पुष्कळ प्रचार झाला आहे. नागपंचमीच्या सणाला खेड्यापाड्यांतील व शहरांतील मुली आणि सुवासिनी मेंदीने आपले हातपाय रंगवतात.

मेंदी थंड असल्यामुळे ती लावली असता हातापायांची उष्णता कमी होते. त्यामुळे काही ठिकाणी पुरुषही उन्हाळ्यात हात, पाय व मस्तक यांवर मेंदीचा लेप देतात. त्वचेच्या रोगांवरही मेंदी गुणकारी आहे. [सु. वि. को.; गौरी, एप्रिल १९५८; चिं. ग. कर्वे; प. कृ. गोडे, स्ट. इं. क. हि. १]

मेकनदादा (मृत्यू इ. स. १७२९) एक सुधारक संतकवी. याचा जन्म कच्छमधील नानी खोमडी नामक गावी झाला. पारांबा व भट्ठी हरदोल हे याचे माता-पिता होते. मेकन बालपणापासूनच विरक्त वृत्तीचा होता. त्याने लहानपणीच घर सोडून महंत गांगाराजाचा गुरुमंत्र घेतला आणि तो साधनेसाठी गिरनारच्या गुहेत गेला. तिथे काही काळ तप केल्यावर त्याला दत्तात्रेयाकडून समाजसेवेची दीक्षा मिळाली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नंतर त्याने हरिद्वारची यात्रा केली. या भ्रमतीत त्याला अनेक शिष्य मिळाले. त्याच्या तपाचा प्रभाव पशूंवरही पडू लागला. लालिया नावाच्या गाढवाने आणि मोती नामक श्वानानेही त्याचे शिष्यत्व पत्करले होते, अशी कथा आहे. हे पशुद्वय 'रेगिस्तान के फरिश्ते' या नावांनी प्रसिद्ध आहे. आपल्या पाठी-वरून पखाली वाहून यात्रेकरूंची तहान भागविणे हे काम यांनी केले आणि अखेर आपल्या गुरूसमवेत जीवतसमाधी घेतली, असे म्हणतात.

मेकनदादाला कच्छचा कबीर मानले जाते. हा एक मोठा समाजसुधारक होता. त्याने आयुष्यभर हिंदू व मुसलमान यांच्या ऐक्याचा प्रचार केला. ईश्वराचा निवास सर्वत्र आहे, असा तो लोकांना उपदेश करीत असे. अश्वत्थात असणारा परमेश्वरच बाभळीच्या झाडातही असतो, असे त्याचे म्हणणे होते. एकं-दरीत त्याची वाणी सर्वत्र समभाव सांगणारी होती. त्याने सामाजिक अंध विश्वासांवर अनेकवार कोरडे ओढलेले आहेत. कमी शब्दांत अधिक अर्थ सांगण्याची क्षमता त्याच्या वाणीत होती. त्याच्या भाषेत कच्छी, सिंधी, गुजराती आणि हिंदी यांचे अपूर्व मिश्रण पाहायला मिळते. [गु. सं. हिं. दे.]

मेकल मध्य प्रदेशातला एक पर्वत. या पर्वतातून नर्मदा नदी उगम पावते, म्हणून तिला मेकलकन्यका असे म्हटले आहे (म. भा. भीष्म. ८३.९). या नावाचे एक जनपदही होते. त्या पर्वतप्रदेशात राहणाऱ्या लोकांनाही मेकल असे म्हणत. या प्रदेशावर जयबल, वत्सराज, नागबल, भरतबल, इ. पांडववंशी राजांनी इ. स. च्या प्रारंभीच्या शतकांत राज्य केल्याचे अनेक शिलालेखांवरून कळते. मध्य प्रदेशातील बह्मनी नामक गावी सापडलेल्या एका ताम्रपटातहीं त्यांची माहिती मिळते.

कोसलराजे प्रारंभी मेकलांचे प्रतिस्पर्धी होते; पण नंतरच्या काळात वैवाहिक संबंध जोडून हे दोन्ही राजे परस्पर मित्र बनले. भरतबलाची राणी लोकप्रकाशा ही कोसल–कन्या होती. इ. स. च्या ५ व्या शतकात मेकलांचे राजे वाकाटकांचे मांड-लिक बनले होते. [भा. को.]

मेकोपा (इ. स. चे ९ वे शतक) चौऱ्यांयशी सिद्धांपैकी एक सिद्ध. हा बिहार प्रदेशातील भागलपूरचा रहिवासी असून, जातीने वैश्य होता. याच्या नावावर कोणतीही स्फुट रचना मिळत नाही. परंतु अपभ्रंश अथवा प्राचीन हिंदीमध्ये चित्तचैतन्यशमनोपाय नावाचा एक ग्रंथ याने रचल्याचे कळते. याव्यतिरिक्त याच्या चरित्राची अधिक माहिती उपलब्ध नाही. [हिं. सा. बि.; पु. त. नि.]

मेखला स्त्रियांनी कमरेला बांधायचा एक अलंकार. उपनय-नाच्या वेळी बटूच्या कमरेला मुंजतृणाचे जे कटि-सूत्र बांधतात, त्यालाही मेखला म्हणतात. त्रैवर्णिक बटूंच्या वेगवेगळ्या मेखला कोणत्या तृणांपासून बनवाव्या, त्याचे नियम मनूने सांगितले आहेत (२.४२). दर्शपूर्णमासामध्ये यजमान-पत्नीच्या कमरेला मुंजाची जी दोरी गुंडाळतात तिला आणि सोमयागामध्ये यजमान व त्याची पत्नी या दोघांनाही दर्भांची दोरी कमरेभोवती बांधावी लागते तिला, मेखलाच म्हणतात. योक्त्र असेही तिचे दुसरे नाव आहे.

मेखलाबंधनाची पद्धती बरीच प्राचीन आहे. अथर्ववेदात तिची पुढीलप्रमाणे (६.१३३.२) प्रार्थना केलेली आहे–

आहुतास्यभिहुत ऋषीणामस्यायुधम् ।
पूर्वा व्रतस्य प्राश्नती वीरघ्नी भव मेखले ॥

अर्थ – हे मेखले, तू सर्व प्रकारे प्रशंसित आहेस. तू ऋषींचे आयुध आहेस. तू कोण्या एखाद्या व्रताने पूर्वीच बांधली जातेस. तू शत्रूच्या वीरांना मारणारी हो!

या मेखलाबंधनाचे विवेचन करताना पं. सातवळेकर लिहि-तात– मेखलाबंधन कटिबद्धतेचे सूचक आहे. प्रत्येक कार्यासाठी कंबर कसणे आवश्यक असते. त्यामुळे बुद्धी, धारणाशक्ती, शीतोष्ण सहन करण्याचे सामर्थ्य, सुदृढ इंद्रिये आणि दीर्घायुष्य यांची प्राप्ती होते. [अ. सु. अ. ३.; श्री. विद्याधरशास्त्री पिंडे]

मेखलायक्षिणीमंत्र भूमिगत धन कुठे आहे, हे समजण्याचे सामर्थ्य यावे या उद्देशाने या मंत्राची साधना करायची असते. 'ॐ क्रौं मदनमेखले नमः स्वाहा' असा हा बाराअक्षरी मंत्र आहे. याचा ऋषी विश्रवा, छंद पंक्ती आणि देवता यक्षिणी आहे.

मोहाच्या झाडाखाली बसून चौदा दिवस या सिद्ध मंत्राचा दहा सहस्र जप करावा आणि या झाडाच्या समिधांनीच प्रज्व-लित केलेल्या अग्नीत मधुमिश्रित मधूक पुष्पांचे एक सहस्र हवन करावे, असे सांगितले आहे. तसे केल्याने देवता संतुष्ट होऊन साधकाला अंजन देते आणि ते अंजन डोळ्यांत घातल्या-वर भूमीच्या पोटातले धन त्याला दिसू लागते, अशी त्याची फलश्रुती सांगितलेली आहे. [मं. म.]

मेगॅस्थिनीस शिकंदराच्या मृत्यूनंतर त्याचा एक सेनानी सेल्युकस निकेटर हा सिरियाचा राजा झाला. त्याने सनपूर्व ३०५ च्या सुमारास भारतावर स्वारी करून सिंधू नदी पार केली. पण मगधसम्राट चंद्रगुप्त मौर्य याने त्याचा पराभव केला. तेव्हा सेल्युकसने चंद्रगुप्ताशी तह केला आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मेगॅस्थिनीस नावाचा आपला राजदूत चंद्रगुप्ताच्या दरबारात पाठवला. मेगॅस्थिनीस पाटलिपुत्र येथे अनेक वर्षे राहिला होता. त्या काळात त्याने भारताचे निरीक्षण करून त्याचे सविस्तर वर्णन लिहून ठेवले होते. त्याचा ग्रीक भाषेतला मूळ ग्रंथ 'इंडिका' हा उपलब्ध नाही; पण त्याच्या लेखनातले अनेक उतारे त्याच्या नंतरच्या ग्रीक इतिहासकारांनी उद्धृत केलेले आहेत. काही गोष्टी स्वतः पाहून त्याने जी वर्णने लिहिली आहेत, ती पूर्ण विश्वसनीय आहेत. चंद्रगुप्ताची राज्यव्यवस्था आणि सेनादल यांच्याविषयी जी माहिती त्याने दिली आहे, ती सत्य व बिनचूक मानायला हरकत नाही. सामाजिक व धार्मिक चालीरीतींविषयी त्याने बरेच लिहिलेले आहे. त्यातील काही माहिती ऐकीव असून, पूर्ण विश्वसनीय वाटत नाही. मात्र मौर्ययुगातील भारताचा इतिहास समजण्याच्या दृष्टीने त्याचे लिखाण अत्यंत उपयुक्त ठरले आहे. [भ. च. को.; अ. हि. इं.; बो. का. भा.; प्रा. भा. सं.]

मेघ एक जमात. यांना मिहंग असेही म्हणतात. या लोकांची वसती सियालकोट, अमृतसर, गुरुदासपूर, गुजरात, लाहोर, रावळपिंडी, इ. ठिकाणी आढळते. रावळपिंडीच्या परिसरातील हे लोक मेंग म्हणून ओळखले जातात. हे लोक प्रामुख्याने विणकर आहेत. सियालकोटच्या भागातील मेघ लोक आपली उत्पत्तिकथा सांगतात, ती अशी —

आम्ही ब्राह्मणांचे वंशज असून, प्राचीन काळी काशीला राहत होतो. आमच्या मूळ पुरुषाला दोन मुले होती. त्यांपैकी एक पंडित व दुसरा अक्षरशत्रू होता. पित्याने पंडित मुलाला सांगितले, की तू आपल्या भावाला शिकव. परंतु त्याने ते ऐकले नाही. त्यामुळे वडिलांनी त्याला घराबाहेर हाकलले. तो जम्मू-भागात येऊन राहिला आणि त्याने तिथे ज्ञानदानाला प्रारंभ केला. तिथेच त्याने एक मोठा यज्ञही केला. त्या यज्ञात त्याने गोमांसाच्या आहुती दिल्या आणि मारलेली गाय मंत्रसामर्थ्याने जिवंत केली. पुन्हा एकदा त्याने एक गाय मारली; पण तिला तो जिवंत करू शकला नाही. मग लोकांचा त्याच्यावरचा विश्वास उडाला. गायीला जिवंत करण्याचे सामर्थ्य त्याच्या पित्याच्याही अंगी होते. म्हणून त्याने आपल्या पित्याला बोलावले. परंतु पित्याने त्याला आपल्या पंक्तीला जेवायला बंदी केली. यामुळे तो रागावला आणि त्याने स्वतंत्र पंथ निर्माण केला. त्याचे जे अनुयायी तेच मेघ होत.

मेघ जमातीत बसीथ व घियान अशा दोन टोळ्या आहेत. घियान लोक स्वतःला बसीथ लोकांहून श्रेष्ठ समजतात. हे मांस खात नाहीत. कोणी खाल्ले तर त्याला पंचवीस रुपये दंड करतात. हा दंड सरकारात भरायचा असतो. शिवाय पाच रुपये ग्रामप्रमुखाला आणि काही रक्कम समाजाला द्यावी लागते. दंडाची रक्कम दिली नाही, तर त्याला जातीबाहेर टाकतात.

मेघ लोक गुरूला खूप मान देतात. कोणत्याही प्रश्नासंबंधी निर्णय देण्याचा अधिकार त्यांच्या गुरूला असतो. त्याची गादी केरणमध्ये असून, हा गाव जम्मूपासून तीन मैलांवर आहे. या लोकांना गुरूकडून ठराविक क्षेत्र आखून दिलेले असते. तेवढ्या क्षेत्रातच हे आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रचार करतात.

विवाहप्रथा — मुलाच्या लग्नाचा कोणताही समारंभ हे लोक स्वतःच्या घरी करीत नाहीत. जातीचे काही प्रमुख लोक मुलीच्या घरी जाऊन तिथे संस्कार व समारंभ करून दुसऱ्या दिवशी आपल्या घरी परत येतात. मग वधू-वरांना तुतीच्या झाडाखाली बसवतात. झाडाच्या बुंध्याला एक लांब दोरी गुंडाळतात आणि जमलेले सर्व लोक वधू-वरांसह त्या झाडाला सात प्रदक्षिणा घालतात. मग सर्वांना प्रसाद वाटतात. यानंतर वरपिता थाटाची मेजवानी देतो. यांचे पुरोहित लग्नप्रसंगी उपस्थित नसतात. पण त्यांना त्यांची दक्षिणा पोचवली जाते.

विधवेला मोठ्या अगर धाकट्या दिराबरोबर लग्न करायला परवानगी असते. पण हे दोघेही नसतील, तर जातीमधील कोणत्याही पुरुषाबरोबर ती लग्न लावू शकते. या लग्नाचा खर्च नवऱ्या मुलाला करावा लागतो. त्याची खर्च करण्याची ऐपत नसेल, तर त्याला आपली बहीण किंवा कन्या पत्नीच्या नातेवाइकाला द्यावी लागते. विधवा स्त्री विवाहाला अनुकूल नसेल, तर तिच्या निर्वाहाची व्यवस्था ग्रामप्रमुख करतो.

धार्मिक किंवा इतर उत्सवप्रसंगी यांचे पौरोहित्य ब्राह्मण करतात. ब्राह्मण न मिळाल्यास जातीतले लोकच पौरोहित्य पार पाडतात. [ग्लॉ. ट्रा. पं. नॉ. प्रॉ.]

मेघगर्जना मेघ हे ब्रह्मांडाच्या कवचापासून तयार झाले, असे मत्स्य पुराणात सांगितले आहे (२.३३). मेघांचा गडगडाट होतो आणि कित्येकदा मेघगर्जनेसह पर्जन्यवृष्टीही होते. या घटनेविषयी ज्या लौकिक समजुती आहेत, त्यांपैकी काही अशा —

पुष्कर, आवर्तक, इ. बारा मेघ इंद्राच्या ताब्यात असून, लहर लागेल तेव्हा इंद्र त्यांपैकी एखाद्याला वृष्टी करण्याची आज्ञा देतो. इंद्र खुषीत येऊन मोठ्याने अट्टहास करतो, तीच मेघगर्जना होय. इंद्राच्या धनुष्याचा टणत्कार, म्हातारी हरभरे भरडते, पार्वती धान्य दळते, भगवंताचा रथ तीव्र गतीने धावतो, ऐरावत तुतारी वाजवतो, इंद्र आकाश हालवतो, त्यामुळे झालेला आवाज किंवा देवांनी वाजवलेल्या नगाऱ्यांचा आवाज, इ. अनेक लोकसंकेत मेघगर्जनेविषयी आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मेघांचा गडगडाट ऐकला असता त्याने सूचित होणारे अरिष्ट टळण्यासाठी स्नान करावे. रोहिणी नक्षत्रात मेघगर्जना झाल्यास पुढे ७२ दिवस अवर्षण पडेल व त्यामुळे दुष्काळ उद्‌भवेल. ज्येष्ठ शु. द्वितीयेच्या दिवशी मेघगर्जना होऊ नये. हस्त नक्षत्रातील मेघगर्जनेने सर्प आणि दुष्ट प्राणी यांचे तोंड बांधले जाते. आर्द्रा नक्षत्रात मेघगर्जना झाल्यास महिनाभर पाऊस पडत नाही. पूर्व दिशेस मेघगर्जना झाली, तर पाऊस ताबडतोब पडतो. अकाली मेघगर्जना झाली, तर ती देशावर आपत्ती आणते. याव्यतिरिक्त निरनिराळ्या नक्षत्रांत होणाऱ्या मेघगर्जनांचीही अनेक शुभाशुभ फले सांगितलेली आहेत.

मेघनादारी एक तत्त्वज्ञ आचार्य. हा आत्रेयनाथसूरींचा पुत्र असून, रामानुज पंथाचा अनुयायी होता. न्यायप्रकाश व न्यायद्युमणी या नावांचे दोन ग्रंथ याने रचले आहेत. या ग्रंथांमुळे रामानुजांच्या तत्त्वज्ञानात मोलाची भर पडली, असे मानले जाते.

कर्म व कर्मफल यांच्या संदर्भात मेघनादारीचे विचार पुढीलप्रमाणे आहेत – ईश्वराची कृपा किंवा त्याची अवकृपा यांना अनुसरून कर्मफल मिळत असते. पूर्वजन्मी आपण पुण्यकृत्ये केली असल्यास इहजन्मी सत्कृत्ये करण्याची प्रवृत्ती होते. परंतु पूर्वजन्मी कुकर्मे केली असतील, तर या जन्मी वाईट कर्मे करण्याचीच प्रवृत्ती होते. [हि. इं. फि.]

मेघमल्हार हिंदुस्थानी संगीतातील एक राग. हा महानना जातीतील असून, याची प्रकृती गंभीर आहे. याचा वर्ग औडव–औडव हा आहे. यात गंधार व धैवत हे स्वर वर्ज्य आहेत. याचा वादी स्वर षड्‌ज असून, संवादी पंचम आहे. याचा गानसमय मध्यरात्र; वर्षाकाळात मात्र हा राग केव्हाही गातात. [क. सं.; सु. वि. को.]

मेघमालाव्रत एक जैन व्रत. हे व्रत पाच वर्षांत पुरे होते. व्रताला आरंभ भाद्रपद वद्य प्रतिपदेला करून आश्विन वद्य प्रतिपदेला त्याची समाप्ती करतात. या व्रतात सात उपवास आणि चौवीस एकाशने करायची असतात. त्याचप्रमाणे चौतीस दिवस ब्रह्मचर्य पाळायचे असते. व्रतकालात आकाशात मेघ आले, तर पंचस्तोत्राचा पाठ करतात. फल – मोक्षप्राप्ती. [जै. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.]

मेघराज (इ. स. चे १६ वे शतक) एक जैन कवी. हा मूळचा गुजरातचा रहिवासी असून, नंतर तो महाराष्ट्रात आला. ब्रह्मशांतिदास हा याचा गुरू होय. मेघराजाचे गुजराती व मराठी या दोन्ही भाषांवर सारखेच प्रभुत्व होते. याने जसोधररास, पार्श्वनाथभवांतर, कृष्णगीत, रामायणी कथा, गुजरी मऱ्हाटी गीत व गोमटस्वामीगीत अशा स्फुट रचना केल्या आहेत. गुजरी मऱ्हाटी गीत हे संमिश्रगीत असून, शांतिनाथचरित्र व तीर्थवंदना या रचना केवळ गुजराती भाषेत आहेत.

जसोधररास ही याची सर्वोत्तम रचना होय. हे काव्य मराठी भाषेत रचले असून, त्यात ११६४ ओव्या आहेत. जैन तत्त्वज्ञान व आचारधर्म यांचे विवेचन प्रस्तुत ग्रंथात आहे. अहिंसा आणि ब्रह्मचर्य यांचे महत्त्व सांगण्यासाठी याने यशोधर व चंद्रमती यांचे कथानक सांगितले आहे.

मेघराज जसा कवी होता तसाच तो पंडितही होता. त्याने जैन शास्त्रांचे सखोल अध्ययन केले होते. प्रस्तुत काव्यातून त्याने गृहस्थधर्म, यतिधर्म आणि आत्मा यांचे स्वरूप साध्या भाषेत सांगितले आहे. आत्म्याचा विचार मांडताना तो म्हणतो –

> पाषाणी सोने व्यापिलें । तील व्यापिले तेलें ।
> तैसे देह व्यापिले । आत्मतत्त्वें देखा ॥
> जैसे फूल व्यापिले परिमलें । ते फुलाहोऊनि वेगळे ।
> तैसे जीवतत्त्व निर्मिलें । देहभिन्न ॥

मेघराजाची वर्णनशक्ती प्रभावशाली आहे. [प्रा. म. वां. सा.; नवभारत, जानेवारी १९६६]

मेघरानी नृत्य बंगालमधील एक लोकनृत्य. वैशाख आणि ज्येष्ठ महिन्यांत मेघांना जागविण्यासाठी बंगालमधील स्त्रिया आणि कुमारिका हे नृत्य करतात. त्या वेळी दोन्ही हात आपल्या डोक्यावर किंचित वर नेऊन आणि आपल्या साडीची दोन्ही टोके दोन्ही हातांनी पकडून पावसाचे आवाहन करीत त्या गीते गात गात नृत्य करतात. हे नृत्य आकर्षक व सुंदर असते. [भा. लो. नृ.]

मेघवाळ एक जात. या लोकांची वस्ती गुजरात प्रदेशातील कच्छ भागात आढळते. मेघ ऋषी हा आमचा पूर्वज असे हे सांगतात. मेघवाळांना धेड असेही म्हणतात. यांच्यात चार पोटभेद आणि अनेक कुळ्या आहेत. त्यांतील मातंग कुळी ही श्रेष्ठ मानली जाते.

मेघवाळ नावाचे ब्राह्मणही आहेत. तेच यांच्या मंदिरातील पुजाऱ्याचे काम करतात. गणेश ही यांची कुलदेवता आहे. हे लोक मृतांना पुरतात आणि बारा दिवसांपासून दोन महिन्यांपर्यंत सुतक पाळतात. पितरांसाठी दिवाळीत कावळ्यांना अन्न देतात. पाहा – धेड. [मुं. इ. जा.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मेघालय आसाम प्रदेशातील गारो डोंगर व खासी–जैंतिया डोंगर या दोन जिल्ह्यांचे मिळून वेगळे स्थापण्यात आलेले एक लहानसे राज्य. याचे एकूण क्षेत्रफळ ८,७०० चौ. मैल असून, लोकसंख्या सुमारे १० लक्ष आहे. याच्या पश्चिमेला व दक्षिणेला बांगला देश असून, पूर्वेला उत्तर काचार डोंगर आणि उत्तरेला आसामचा उर्वरित भाग आहे.

या प्रदेशात पूर्वी सुमारे ५० लहान संस्थाने होती. भारत स्वतंत्र होण्यापूर्वी या सर्व संस्थानांची एक संघटना स्थापण्यात आली होती. हे लोक पूर्वीपासून स्वतंत्र बाण्याचे असून, ब्रिटिश राजवटीतही ते ब्रिटिशांपासून अलिप्त राहिले होते. त्याबद्दल पं. जवाहरलाल नेहरूंनी त्यांच्या स्वतंत्र वृत्तीचे पुष्कळ कौतुक केले होते व त्यांच्या आकांक्षेचा विचार करण्याचे आश्वासनही त्यांना दिले होते.

आसाम प्रदेशात गारो व खासी–जैंतिया डोंगरांप्रमाणेच मिझो, नागा, मिकिर व उत्तर काचार डोंगर असून, तिथे वेगवेगळ्या वन्य जमाती वसलेल्या आहेत. या सर्वांचे मिळून एक स्वायत्त पहाडी राज्य स्थापावे, अशी त्या लोकांच्या नेत्यांची मागणी होती. पण राज्य पुनर्रचनामंडळाने तिला मान्यता दिली नाही. असे वेगळे राज्य स्थापणे अव्यवहार्य असून, ते वन्य जमातींच्या हिताचे नाही, असे त्या मंडळाचे मत होते. पण त्यामुळे त्या लोकांत असंतोष उत्पन्न झाला. इ. स. १९६० साली असमिया भाषा ही संपूर्ण राज्याची अधिकृत भाषा ठरवण्यात आल्यामुळे त्या असंतोषात भरच पडली. केंद्र सरकार पहाडी भागातील लोकांना आसाम राज्यांतर्गत स्वायत्तता देण्यास तयार होते; पण ती योजना कोणीही स्वीकारली नाही. शेवटी जानेवारी १९६७ मध्ये आसाम राज्याची पुनर्रचना करण्याचे ठरले. त्या राज्याचे वेगळे विभाग करून त्यांचा कारभार स्वतंत्रपणे चालवावा, पण ते एका मोठ्या राज्याचे घटक म्हणून नांदावे, अशी योजना आखण्यात आली.

पण ती योजनाही पहाडी जमातींना पसंत पडली नाही. त्यांना वेगळे राज्यच हवे होते. शेवटी केंद्र सरकारने ते मान्य केले आणि १९६९ च्या डिसेंबर महिन्यात मेघालय राज्यनिर्मितीचे विधेयक संसदेने मान्य केले. एप्रिल १९७० मध्ये त्या राज्याची प्रत्यक्ष स्थापना झाली. तथापि ते राज्य आसाम राज्याच्या अंतर्गतच होते. आणि त्यात गारो व खासी–जैंतिया या दोनच जिल्ह्यांचा समावेश होता. मिझो, मिकिर व काचार हे डोंगरी भाग त्यात सामील झाले नाहीत. ऑक्टोबर १९७१ मध्ये आसामचे मुख्यमंत्री महेंद्रमोहन चौधरी यांनी ईशान्य भारताच्या पुनर्रचनेसंबंधीचे विधेयक विधानसभेला सादर केले, ते असे– या विधेयकान्वये मेघालय आसामच्या अंतर्गत स्वायत्त राज्य न राहता त्याला पूर्ण राज्याचा दर्जा दिला जाईल. आसाम प्रदेशाचे विभाजन होऊन आसाम, नागा प्रदेश, मेघालय, मणिपूर व त्रिपुरा ही पाच राज्ये आणि अरुणाचल व मिझो राम हे दोन केंद्रशासित प्रदेश स्थापले जातील. ईशान्य भारताची एकात्मता टिकवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

डिसेंबर १९७१ मध्ये या विधेयकाला संसदेनेही मान्यता दिली व मेघालय हे राज्य आसाममधून वेगळे झाले.

मेघालय राज्य ब्रह्मपुत्रेच्या दक्षिणेकडील पठारावर वसलेले आहे. डोंगराळ प्रदेश व दाट झाडी यांमुळे हा प्रदेश दुर्गम आहे. या पठारावर काही उंच शिखरे आहेत, त्यांतील शिलाँग हे सर्वांत उंच आहे. पावसाळ्याच्या आरंभी असंख्य जलमेघ या डोंगरमाथ्यावर जमा होतात आणि मग मुसळधार पाऊस सुरू होतो. म्हणून या प्रदेशाला मेघालय हे नाव देण्यात आले आहे. सुपीक जमीन थोडीच असल्यामुळे या प्रदेशातील लोकांचे जीवन कष्टमय आहे. शेती हाच त्यांचा मुख्य व्यवसाय असला, तरी तेवढ्यावर ते पोट भरू शकत नाहीत. शिकार, जंगलातील विविध पदार्थ गोळा करणे, वगैरे पूरक व्यवसाय त्यांना करावे लागतात. पण या प्रदेशात खनिज संपत्ती विपुल आहे. ती हस्तगत झाली, तर या भागाचा विकास वेगाने होऊ शकेल.

या प्रदेशातील लोक निसर्गपूजक व भूतपूजक आहेत. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी या लोकांना पुष्कळ मदत करून त्यांचा विकास घडवून आणला आहे. तथापि अजूनही त्यांचा भुताखेतांवर गाढ विश्वास आहे. त्यांच्या जीवनावर निरनिराळ्या भूतपिशाचांचा बराच पगडा आहे. डोंगर, नदी, झाडे. इ. ठिकाणी त्यांचा वास असतो, अशी त्यांची श्रद्धा आहे. म्हणून त्यांची पूजा ते करतात. त्याचप्रमाणे ते सूर्य-चंद्रादी ग्रहांचीही पूजा करतात. पितरांची पूजाही या लोकांत रूढ आहे.

या लोकांत मातृसत्ताक कुटुंबपद्धती प्रचलित आहे.

मेघालयातील सर्व जमातींच्या लोकांना नृत्याची फार आवड आहे.

शिलाँग हे या राज्याचे मुख्य ठिकाण आहे. निसर्गसौंदर्य व आधुनिक वास्तुशिल्प या दोन्हींमुळे हे शहर अत्यंत मनोहर बनले आहे.

नोंगक्रेम हे गाव शिलाँगपासून १३ मैलांवर आहे. या ठिकाणी जून महिन्यात खासी लोकांचा नृत्योत्सव असतो. तो पाहायला भोवतालच्या प्रदेशातले बरेच लोक तिथे जमतात. त्या वेळी खासी नर्तक जे नृत्य करतात, ते अत्यंत आकर्षक असते.

सर्व जगात जास्त पाऊस जिथे पडतो, ते चेरापुंजी हे गाव याच प्रदेशात वसलेले आहे. पाहा– आसाम; खासी; गारो; जैंतिया. [मेघालय– श्री. कमलेश्वर सिंह, १९७०; वे. बें. आ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मेच एक जात. या लोकांची वसती आसाम, प. बंगाल, नेपाळ, भूतान व सिक्कीम या भागांत आढळते. बंगालमधील गोवलपाडा जिल्ह्यातील यांच्या वस्तीला मेचपाडा असे म्हणतात. मेच आणि काचारी हे एकाच वंशातील लोक असावे, असे अनेक संशोधक म्हणतात. कामरूप (आसाम) ही यांची मूलभूमी होय. नेपाळात यांच्या उत्पत्तीसंबंधी एक आख्यायिका सांगतात, ती अशी–

नेपाळमधील पारुंगो आणि सिमनिमा या दांपत्याला लापचे, जिमदार व मेचे अशी तीन मुले झाली. आईबापांनी या तिघांना तीन दिशांना पाठविले आणि आपापला प्रदेश शोधायला सांगितले. नंतर या तिघांपासून तीन जाती निर्माण झाल्या.

मेच लोक ही आख्यायिका प्रमाण न मानता स्वतःला राजबंसी म्हणवून घेतात, कारण त्यांना मेच हे नाव आवडत नाही.

मेच लोक वर्णाने कोच लोकांहून अधिक उजळ असून, त्यांची चेहेरेपट्टी मंगोलियन वंशाच्या लोकांसारखी वाटते. काही विद्वानांनी, यांच्या चेहऱ्यांची ठेवण मुग व ब्रह्मी लोकांप्रमाणे आहे, असे म्हटले आहे.

मेच मुली

शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय असला, तरी हे त्याच्या जोडीला पिंजणे, विणकाम, मच्छिमारी, शिकार इ. व्यवसाय करतात. अलिकडे यांच्यांतील बरेच लोक व्यापार, शिक्षण, इ. विविध क्षेत्रांत काम करू लागले आहेत.

हे लोक स्वभावाने भटक्या वृत्तीचे आहेत. त्यामुळ त्यांना जंगले जाळून शेती करावी लागते. त्यांना जंगले फार आवडतात. म्हणूनच ते भूतान व नेपाळ या प्रदेशातील जंगलांत आजवर टिकून राहिले आहेत. तियली मलेरियाची हवा त्यांनी पचविली आहे. त्यामुळे मोकळ्या हवेत आले, की ते वारंवार आजारी पडतात.

यांच्यांत नारजिनारी, छंपरानारी, इश्वरारी अशी अनेक गोत्रे आहेत. मुलगी मिळविण्यासाठी तिच्या पित्याच्या घरी मुलाला नोकरी करावी लागते. यांच्यांत देज घेण्याचीही पद्धत आहे. हारे–खुने नावाचा एक विवाहप्रकार यांच्यांत रूढ आहे. त्यात नवऱ्या मुलाला नवऱ्या मुलीच्या टोळीत दत्तक दिले जाते. या लोकांमध्ये स्त्री-पुरुषांना सारखाच दर्जा असतो. पत्नीच्या सल्ल्यानेच पती अनेक गोष्टी करतो.

पित्याची सर्व संपत्ती सर्व मुलांना सम प्रमाणात वाटली जाते. मुलीला जंगम मालमत्तेमधील काही भाग मिळतो. विधवेच्या संपत्तीवर बहुधा मुलीचा व सुनेचा हक्क असतो.

सीज नावाचे झाड हे यांचे देवक आहे. शिव, मैनाओ, लक्ष्मी, दुर्गा, मनसा, इ. देवतांना हे भजतात. देवशी हा त्यांचा परंपरागत पुरोहित असतो. यांच्या देवोत्सवांतून नृत्य, गायन, इ. कार्यक्रम होतात. [से. इं. १९५१ वे. वें.; को. क. वे. वें.]

मेट लग्नातील एक लौकिक सोपस्कार. वरात घरी येऊन वधू-वर गृहप्रवेश करू लागताच वराची बहीण त्यांना दारात अडवते. मग वर विचारतो, की 'मेट कोणाचे?' त्यावेळ वरभगिनी उखाण्यात आपल्या नवऱ्याचे नाव घेऊन मेट कोणाचे ते सांगते व त्यांना जी मुलगी होईल, ती आपल्या मुलाला देण्याचे वचन मागते. नवरा मुलगा ते कबूल करतो व मग बहीण दार सोडते. [ल. वि. सों.]

मेट्टूपट्टी एक नगर. हे लहानसे गाव मदुराई जिल्ह्यातील नीलकोट्टई गावाच्या दक्षिणेला सुमारे सहा मैलांवर आहे. इथे एक टेकडी असून, तिच्यावर सिद्धांचा निवास होता, असे सांगितले जाते. कदाचित या दंतकथेमुळेच त्या टेकडीला सिद्धमलै हे नाव मिळाले असावे. टेकडीच्या माथ्यावर एक शिवमंदिर आहे. टेकडीच्या बाजूला पंचपांडवपदम व पंचपांडवशय्यासने अशी स्थाने दाखवतात. तिथल्या एका खडकावर करुपन्नस्वामीची शस्त्रधारी मूर्ती खोदलेली आहे. कल्लार जातीचे लोक या देवाला खूप मानतात. [मदुरा गॅझे.]

मेडार म्हैसूर प्रदेशातील एक जात. या लोकांना काही ठिकाणी गौरिग असेही म्हणतात. हे स्वतःला गौरीमक्कळु म्हणजे गौरीपुत्र म्हणवितात. यांच्या उत्पत्तीची कथा अशी–

एकदा पार्वतीला सुपे हवी होती. ती बनविण्यासाठी बसवाच्या (नंदीच्या) मुखातून एका पुरुषाला तिने निर्माण केले. मग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिवाने आपल्या अंगावरील नागाचे बांबूंत रूपांतर केले. त्या बांबूंपासून त्या पुरुषाने पार्वतीला उत्तम सुपे बनवून दिली. त्याबद्दल पार्वतीने त्याला टोपलीभर रत्ने दिली. पण त्याला त्या रत्नांची किंमत न कळल्यामुळे त्याने ती तशीच टाकून दिली व तो तिथून निघून गेला. शिव-पार्वतीला या गोष्टीचा राग आला आणि त्यांनी त्याला शाप दिला, की 'तुला तुझ्या धंद्यातून फक्त पोटापुरते मिळेल; जास्त काही मिळणार नाही.'

उद्योगधंदे – हे बांबू फोडून त्यांपासून टोपल्या, चटया, सुपे, तट्टे, इ. वस्तू विणतात व त्या विकतात. यांच्यापैकी काही लोक शेती व मजुरीही करतात.

हे लोक शेळ्या, मेंढ्या, डुकरे, इ. प्राण्यांचे मांस खातात. यांना दारूही फार आवडते. सणःसुदीला ते खूप दारू पितात.

ते बोलत असलेल्या भाषेवरून यांचे कन्नड मेडार व तेलुगू मेडार असे दोन भेद पडले आहेत. याशिवाय, त्यांचे गौरिग, पल्ली व वंडीकार असेही तीन विभाग आहेत. त्यांच्यांत परस्पर रोटीबेटीव्यवहार होत नाही.

विवाहप्रथा – मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. समान कुळांत लग्ने होत नाहीत. आते किंवा मामे बहिणीशी लग्न करता येते. मुलगी पसंत केल्यावर एका शुभ दिनी मुलाचा बाप काही जातभाईंना बरोबर घेऊन मुलीच्या घरी जातो आणि मुलीला नवी साडीचोळी देतो. त्यानंतर जमलेल्या लोकांना पानसुपारी वाटतात.

लग्नसमारंभ मुलाच्या घरी होतो. लग्नाच्या दोन दिवस आधी संध्याकाळी वधूकडील लोक वरगृही जातात. दुसऱ्या

मेडार दंपती

दिवशी कुलदेवतेची पूजा करून नैवेद्य दाखवतात आणि आप्तेष्टांना जेवण देतात.

लग्न धारे पद्धतीने होते. वराने वधूच्या गळ्यात ताळी बांधणे हा लग्नातील आवश्यक विधी असतो. त्यानंतर वधू-वर एकाच पानात जेवतात. हे सर्व विधी वधूकडच्या जानोशात त्या रात्री पुन्हा एकदा होतात. त्या वेळी मुलीचा मामा कन्यादान करतो.

लग्नाच्या दुसऱ्या दिवशी गिंडी शास्त्र नामक एक विधी होतो. त्यासाठी नवरा मुलगा वधूची एक बांगडी आणि सासऱ्याची पितळेची गिंडी (छोटी घागर) चोरतो आणि आपल्या घरात लपून बसतो. नंतर वधू त्याला शोधायला निघते. प्रथम ती चुकून आपल्या भावालाच नवरा म्हणून पकडते. चूक समजल्यावर सर्वजण त्या भावाची चेष्टा करतात. मग तो रुसतो. तेव्हा काहीतरी बक्षीस देऊन त्याची समजूत काढतात. मग खऱ्या चोराला म्हणजे नवऱ्या मुलाला शोधून वधूच्या घरी नेतात आणि यापुढे नीट वागण्याविषयी त्याची प्रार्थना करतात.

लग्नसमारंभात हे लोक प्राणिहत्या करीत नाहीत. तो संपल्यावर, दुसऱ्या दिवशी ज्ञाति-बांधवांना शेळ्या-मेंढ्यांचे मांस शिजवून वाढतात व खूप दारूही वाटतात.

यांच्यांत घटस्फोट आणि विधवाविवाह रूढ आहे.

मुलीला प्रथम ऋतुप्राप्ती झाली, की मुद्दाम उभारलेल्या खोपटात तिला ठेवतात. सातव्या दिवशी स्नान करून ती घरात येते. पण सोळा दिवसपर्यंत तिला पूर्ण शुद्ध मानीत नाहीत. तिचे लग्न झालेले असल्यास सोळाव्या दिवशी तिचा पतीशी संग होतो.

प्रसूतिप्रथा – स्त्रीची प्रथम प्रसूती माहेरी होते. सातव्या महिन्यात डोहाळेजेवण करून तिला नवी साडीचोळी देतात. जननाशौच नऊ दिवस असते. नवव्या दिवशी शेजारपाजारच्या बायका तिच्या स्नानासाठी घडाभर गरम पाणी घेऊन येतात. त्या सर्वांना त्या दिवशी जेवण देतात. संध्याकाळी जुन्या पाळण्याची पूजा करून त्यात मुलाला ठेवतात व बारसे करतात.

तिसऱ्या वर्षी मुलाचे जावळ काढतात व त्याच दिवशी त्याचे कानही टोचतात. हा विधी कुलदेवतेच्या मंदिरात करतात.

यांच्या जातीच्या प्रमुखाला यजमान किंवा गौड असे नाव आहे. याशिवाय त्यांच्यांतील प्रत्येक कुलावर कट्टेमणी नावाचा एक अधिकारी असतो. यजमान जातीतले तंटेबखेडे सोडवतो.

या लोकांचा शकुनांवर फार विश्वास आहे. रोज कामाला सुरुवात करण्यापूर्वी ते आपल्या हत्यारांची प्रार्थना करतात आणि बांबू आणायला जंगलात जाण्यापूर्वी शुभ शकुन पाहतात.

देवधर्म – यांच्यापैकी काही लोक शैव व काही वैष्णव आहेत. दुर्गम्म ही त्यांच्या जातीची देवता आहे. अनेक ठिकाणी तिची मंदिरे आहेत. हे लोक काही ठराविक दिवशी देवीची पूजा करतात. त्याच वेळी नव्या बांबूंची पूजा करून त्यांचे तुकडे प्रत्येकाला वाटतात. नंतर बांबूची एखादी वस्तू बनवताना त्या तुकड्यांचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उपयोग करायचा असतो. या पूजेच्या दिवशी अनेक पशू मारून त्यांचे मांस शिजवून सर्वजण खातात.

दिवाळीनंतर एक दिवस ते रानात जातात आणि काही बांबू तोडून ते एका सारवलेल्या जागी ठेवतात. तिथेच एक दगडही उभा करतात. मग पुजारी त्या बांबूंची पूजा करतो आणि एक शेळी किंवा मेंढी बळी देतो. नंतर सर्वजण ते मांस शिजवून खातात. काही ठिकाणी त्यानंतर तीन दिवस सर्व लोक आपला व्यवसाय बंद ठेवतात.

मृतकप्रथा – हे लोक सर्वसाधारणपणे प्रेते पुरतात. आकस्मिक किंवा महारोगाने मृत्यू आला असता, प्रेत जाळतात. मस्तक दक्षिणेकडे करून ते प्रेते पुरतात. यांच्यापैकी वैष्णव लोक अंत्यक्रियेसाठी सातानी पुरोहिताला बोलावतात. तिसऱ्या दिवशी ते मृतात्म्याला थडग्यावर पिंड देतात आणि कावळ्याने ते खावे, अशी इच्छा करतात. कावळा जर पिंडाला शिवला नाही, तर मृताची अंतिम इच्छा पुरी करण्याचे आश्वासन देतात. अकराव्या दिवशी ते पुन्हा पिंडदान करतात व ज्ञातिभोजन घालतात. मृताशौच बारा दिवस पाळतात. [मै. ट्रा. का.]

मेढिंगे

महाराष्ट्राच्या ग्रामीण समाजरचनेतील एक घटक. यांना ठोकेजोशी असेही म्हणतात. हे दहापाच कुटुंबांच्या मेळाने गावोगाव फिरत असतात. गावाबाहेर पाले उभारून त्यांत उतरतात. शेतकऱ्यांना भविष्य सांगणे हा यांचा प्रमुख उद्योग असतो. भविष्य सांगण्यासाठी हे सकाळीच बाहेर पडतात. त्या वेळी ते कपाळी गंध व भस्म लावतात, डोक्यावर पागोटे घालतात आणि रेशीमकाठी धोतर नेसतात. यांच्या बायका सुई, पोत वगैरे वस्तू विकतात. [गां. गा.]

मेथे

एक आदिवासी जात. या लोकांची वस्ती मणिपूर प्रदेशात आहे. शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय असला तरी, हे जंगले तोडणे, मासेमारी, विणकाम, सूत कातणे, इ. व्यवसाय करतात. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाही शेतात कामे करतात.

भात आणि मासे हे यांचे सर्वप्रिय व प्रमुख अन्न असते. मेथे लोकांमध्ये सदाचाराला फार महत्त्व आहे. अविवाहित मुली डोक्यावरचे पुढच्या बाजूचे केस कापून टाकतात. पण विवाहित स्त्रिया मात्र केस कापीत नाहीत. त्याचप्रमाणे त्या केसांचा बुचडा न बांधता ते मानेवर मोकळे सोडतात. यांच्यांतील पुरुषही केस राखतात.

स्त्रिया आणि पुरुष दोघेही कानांत चांदीच्या बाळ्या घालतात. स्त्रिया दोन्ही नाकपुड्यांत मुरण्या घालतात. या लोकांमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांनाच अधिक महत्त्व आहे. स्त्रिया पडदा वापरीत नाहीत. त्या उत्तम प्रकारे व्यापार करतात. त्यांच्या गिऱ्हाइकांमध्येही पुरुषांपेक्षा स्त्रियांचीच संख्या अधिक असते.

सामाजिक दृष्टीने श्रीमंत मेथे लाल रंगाचे गरम कपडे, मध्यमवर्गीय हिरव्या रंगाचे लोकरी कपडे व गरीब लोक सुती कपडे वापरतात. त्यांच्या अंगावरच्या कपड्यांवरून त्यांचा सामाजिक दर्जा ओळखता येतो.

लाई हरोबा हा यांचा सर्वांत मोठा धार्मिक उत्सव होय. सर्व स्त्री-पुरुष यात मोठ्या उत्साहाने व श्रद्धेने भाग घेतात. त्या वेळी स्त्रिया आपली नटण्या-मुरडण्याची सर्व हौस भागवून घेतात. यांना नृत्याची फार आवड आहे. [भा. आ.]

मेधाजनन

धारणायुक्त बुद्धीला मेधा असे म्हणतात. मूल जन्माला आल्यानंतर त्याच्या ठिकाणी मेधा उत्पन्न व्हावी म्हणून जो एक संस्कार करतात, त्याचे नाव मेधाजनन असे आहे. या संस्कारात नवजात शिशूच्या उजव्या कानात तीनदा वाक् शब्द उच्चारून त्याला सोन्याच्या चमच्यातून दही, मध व तूप चाटवायचे असते. हा विधी आश्वलायन गृह्यसूत्रांत सांगितला आहे. वैखानसाने मध, तूप, दही आणि सातूचे किंवा तांदुळाचे पीठ एकत्र कालवून मुलाला चाटवावे, असे सांगितले आहे. त्या वेळी 'प्राणो रक्षति विश्वमेजत्' या अनुवाकातील दहा मंत्र म्हणावे, असे बौधायन सांगतो. जातकर्मातील हा प्रमुख विधी होय, असे संस्कारमयूख म्हणतो.

दुसरे मेधाजनन उपनयनानंतर करतात. त्याचा विधी असा– अनुप्रवचनीय होम झाल्यानंतर ब्रह्मचारी बटूने तीन दिवस क्षार पदार्थ न खाणे, भूमिशयन करणे. इ. व्रत करावे. हे व्रत पुरे झाल्यावर चौथ्या दिवशी बटूचे मेधाजनन करावे. त्यासाठी पळसाची एक सपर्ण फांदी आणून ती एका मातीच्या वेदीवर पुरावी. मग आचार्याने पुढील संकल्प करावा –

या उपनयनाच्या व्रताची समाप्ती होऊन वेदग्रहण करण्याचे सामर्थ्य येण्यासाठी मी मेधासावित्रीचे पूजन करतो.

मग 'मेधायै नमः' या मंत्राने त्या फांदीची पूजा करावी. यव, सातू व मोदक यांसह भाताचा नैवेद्य दाखवावा. पुनश्च पंचोपचारपूजा करावी. मग बटूने मेधादेवीला नमस्कार करून पाणी शिंपडीत तीन प्रदक्षिणा कराव्या. त्या वेळी पुढील मंत्र म्हणावा–

सुश्रवः सुश्रवा असि, यथा त्वं सुश्रवः
सुश्रवा अस्येवं मां सुश्रवः सौश्रवसं कुरु
यथा त्वं देवानां यज्ञस्य निधिपोस्येवमहं
मनुष्याणां वेदस्य निधिपो भूयासम् ॥

नंतर दंड, अजिन व कमंडलू या वस्तू वेदीवर ठेवून स्नान किंवा मंत्रस्नान करावे. नंतर नवी वस्त्रे, अजिन, उपवीत, मेखला व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दंड ही समंत्रक धारण करावी. पूर्वीची वस्त्रे गुरूला द्यावी. मग ब्राह्मणांनी पुण्याहवाचन करावे.

अथर्ववेदात (६.१०८.२) मेधेच्या प्रार्थनेचा मंत्र आहे, तो असा –

अहं ब्रह्मण्वतीं ब्रह्मजूतां ऋषिस्तुतां ब्रह्मचारिभिः।
प्रपीतां मेधामवसे हुवे ॥

अर्थ – श्रेष्ठ ज्ञानाने युक्त, ज्ञान्यांकडून सेवित, ऋषींकडून प्रशंसित आणि ब्रह्मचाऱ्यांनी स्वीकृत अशा मेधेला मी माझ्या संरक्षणासाठी आवाहन करतो.

मेधेच्या अशा प्रशस्तीमुळेच संस्कारांत मेधाजननाला महत्त्व दिले गेले. त्यात पळसाची पूजा असल्यामुळे लौकिक भाषेत या संस्काराला पळसुला असे म्हणतात. [हि. ध.; सं. कौ.]

मेधातिथी (१) एक सूक्तद्रष्टा. पहिल्या मंडलातील १२ ते २३ ही सूक्ते व ८ व्या मंडलातील २ व ३ ही सूक्ते याच्या नावावर आहेत. यालाच मेध्यातिथी असेही म्हटले आहे. अतिथीसह होम– हवन करणारा असा त्या शब्दाचा अर्थ आहे. हा कण्व कुलातला असून, अंगिरा–घोर– कण्व–मेधातिथी अशी त्याची वंशवेल आहे. हा एक प्रख्यात वैदिक ऋषी होता. कवी म्हणूनही तो मोठा होता. हा आसंग प्लायोगी राजाचा पुरोहित होता. या राजाने त्याला इतर राजांपेक्षा दहा सहस्र धन अधिक दिले म्हणून याने त्याची स्तुती केली आहे. याने आपली साम गाऊन विभिंदुकीयांच्या यज्ञातून गायी मिळवल्या (पंच. ब्रा.१५.१०.११). इंद्र मेधातिथीकडे मेषरूपाने आला, अशी कथा ऋग्वेदात(८.२.४०) आली असून, षड्विंश ब्राह्मणात त्या कथेला दुजोरा दिलेला आहे. पंचविंश ब्राह्मणात मेधातिथी हा वत्साचा शत्रू असल्याचा उल्लेख आहे(१४.६.६). मेधातिथीने वत्साला, 'तू नीच कुळातील आहेस' असे म्हटले. पण वत्साने अग्निदिव्य करून मेधातिथीचा आरोप चुकीचा असल्याचे सिद्ध केले. मेधातिथी, त्रिशोक, उशनस, गौतम व मुद्गल हे मित्रावरुणांचे आश्रित होते, असे अथर्ववेदात म्हटले आहे (४. २९.६). निर्धन जावई सासऱ्याला छळतो (ऋ. ८.२.२०), अर्बुद व मृगय या दोन राक्षसांचे डोंगरी किल्ले होते (ऋ. ८. ३.१९), जलाच्या अंतरंगात अमृत व औषधी गुण आहेत (ऋ. १.२३.१९), असे काही उल्लेख याच्या सूक्तांतून आढळतात.

याच्या ३२० ऋचांपैकी २२० ऋचांतून सोमाचे उल्लेख व वर्णने आहेत. त्यावरून तो सोमसंप्रदायाचा पुरस्कर्ता असावा, असे डॉ. व. ग. राहूरकर म्हणतात. [सी. ऋ.; प्रा. च. को.]

(२) (इ. स. चे ९ वे शतक) मनुस्मृतीचा भाष्यकार. हा दक्षिणेचा का उत्तरेचा असा विवाद आहे; पण अनेक अंतर्गत उल्लेखांवरून हा काश्मीरचा म्हणजेच उ. भारताचा रहिवासी असला पाहिजे, असे म. म. काणे यांनी म्हटले आहे. याचे भाष्य विस्तृत आणि विद्वत्तापूर्ण आहे. मनुस्मृतीवरील उपलब्ध भाष्यांत हे भाष्य सर्वांत जुने आहे.

गौतम, बोधायन, आपस्तंब, वसिष्ठ, विष्णू, शंख, याज्ञवल्क्य, नारद, पराशर, बृहस्पती, कात्यायन अशा अनेक स्मृतिकारांचे उतारे याने आपल्या ग्रंथात दिले आहेत. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातीलही पुष्कळ उतारे याने घेतले आहेत. याचा पूर्वमीमांसेचा अभ्यास खोल होता, असे दिसते. कारण विधी आणि अर्थवाद हे शब्द त्याच्या ग्रंथात वारंवार येतात. त्याने जशी जैमिनीची सूत्रे उद्‌धृत केली आहेत, तसेच शावर भाष्यातले उतारेही दिले आहेत.

मोक्षाची प्राप्ती केवळ सम्यग्ज्ञानाने होत नाही, तर ज्ञान आणि कर्म यांच्या समुच्चयाने होते, असे तो म्हणतो. संन्यास म्हणजे शास्त्राने सांगितलेल्या सर्व आवश्यक कर्तव्यांचा त्याग करणे नव्हे; तर अहंकार व ममकार यांचा त्याग म्हणजे संन्यास होय, असे याचे मत आहे.

मेधातिथीने या भाष्याव्यतिरिक्त स्मृतिविवेक नावाचा ग्रंथ लिहिला होता, असे कळते; पण सांप्रत तो उपलब्ध नाही. हा गद्य– पद्यात्मक ग्रंथ असावा. त्या ग्रंथात मेधातिथीने मिश्र जातींबद्दल विवेचन केले आहे, असे म्हणतात. पराशरमाधवीयात प्रस्तुत ग्रंथातील यतींच्या कर्तव्याविषयीचा मोठा उतारा दिला आहे. तिथिनिर्णय व सर्वसमुच्चय या ग्रंथांतही स्मृतिविवेकातले श्लोक घेतले आहेत. प्रस्तुत ग्रंथ पुढे कधी काळी उपलब्ध झाला तर धर्मशास्त्राची प्रगती कसकशी होत गेली, त्यावर बराच प्रकाश पडेल, असे म. म. काणे म्हणतात. [हि. ध.]

मेध्य काण्व एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या आठव्या मंडलातील त्रेपन, सत्तावन व अठ्ठावन ही सूक्ते याच्या नावावर असून, ती वालखिल्य सूक्ते म्हणून प्रसिद्ध आहेत. त्रेपन्नाव्या सूक्तात इंद्रस्तुती हा विषय असून, त्यात आयू, कुत्स व अतिथिग्व राजांवर इंद्राने विजय मिळविल्याचा उल्लेख आढळतो. सत्तावनाव्या सूक्तात अश्विनांची स्तुती असून, त्यापुढील सूक्तात ऋत्विज व विश्वेदेव यांची स्तुती आहे.

हा सर्व विश्वपसारा एकाच परमेश्वराने निर्माण केला आहे, असे सांगताना तो म्हणतो(ऋ. ८.५८.२) –

एक एवाग्निर्बहुधा समिद्ध एकः सूर्यो विश्वमनु प्रभूतः।
एकैवोषा सर्वमिदं विभात्येकं वा इदं वि बभूव सर्वम्॥

अर्थ – विभिन्न स्थली विखुरलेला प्रज्वलित अग्नी मूलतः एकच आहे. विश्वप्रकाशक सूर्य, अग्नी आणि सूर्यप्रकाशक उषाही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकच आहे. हा सर्व पसारा एकाच परमेश्वराने मांडला आहे.

या वालखिल्य सूक्तांवर सायणाचार्य किंवा अन्य भाष्य-काराचे भाष्य नाही. [ऋ. म. भा.; प्रा. च. को.]

मेन एक जात. या लोकांची वस्ती पंजाब प्रदेशात आढळते. भाषाशास्त्रज्ञ सांगतात, की मेन हा शब्द मीन (मासा) या संस्कृत शब्दापासून बनला आहे. हे सर्व लोक मुसलमान आहेत आणि मच्छीमारी हा त्यांचा व्यवसाय आहे.

मेन लोकांना मेवून असेही म्हणतात. त्यावरून मेन व मेवो एकच असावे, असे काही विद्वानांनी म्हटले आहे. परंतु या दोन्ही जाती भिन्न आहेत.

मेनांच्या विवाहप्रथेत झुळक्याची चाल आहे. झुळका म्हणजे लग्नाच्या वेळी पेटवायचा अग्नी होय. हा अग्नी जावयाने पेटवायचा असतो.

यांच्यांत दूध, दही यांच्या उपयोगासंबंधाने बरेच निर्बंध आहेत. अलिकडे हे लोक मासेमारीशिवाय अन्यही धंदे करू लागले आहेत. [म. ज्ञा. को.]

मेमण एक मुसलमान जात. या लोकांची वस्ती प्राधान्याने गुजरातमध्ये आढळते. महाराष्ट्र, कर्नाटक, इ. प्रदेशांतही हे तुरळक आढळतात. मेमण लोक व्यापारी असल्याने ते व्यापारासाठी ब्रह्मदेश, सयाम, सिंगापूर, जावा, इ. देशांतही जाऊन स्थायिक झाले आहेत.

यांचा धर्मगुरू कच्छमध्ये मुंद्रा येथे राहतो. मक्का, मदिना, इ. पुण्यक्षेत्रांच्या यात्रा हे लोक करतात. यांच्यांतील काही धनाढ्य लोक मौलाना अब्दुल कादरच्या यात्रेसाठी बगदादलाही जातात. त्यांचा जादूटोण्यावर आणि भविष्यावर बराच विश्वास असतो.

हे लोक गुजराती बोलतात. परंतु कच्छी व हालाई मेमण घरात कच्छी व हालाई भाषा बोलतात. पाहा– कच्छी मेमण. [मुं. इ. जा.; वि. मुं. रा. प.; मै. ट्रा. का.]

मेयकंड (इ. स. च्या १३ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक शैवाचार्य आणि धर्मोपदेशक. हा सदयप्पाच्या मुलीचा मुलगा असून, जातीने वेल्लाळ होता. याने शिवज्ञानबोधम हा शैव सिद्धान्तांचे विवेचन करणारा सुप्रसिद्ध ग्रंथ तमिळ भाषेत रचला आहे. शैव सिद्धान्त बहुजन समाजापर्यंत पोचविण्याचे श्रेय याला आहे. [हि. क. इं. पी. ५]

मेर एक जात. या लोकांची वस्ती गुजरात, राजस्थान व महाराष्ट्र या प्रदेशांमध्ये आहे. राजस्थानातील काही मेर लोक बाटून मुसलमान झाले आहेत. तिथे यांची वस्ती बाढे सोजत व जयतारणा या पहाडी भागात आहे. मेर या शब्दाचा अर्थही पहाडी असाच आहे.

अनेक विद्वानांच्या मते मध्य आशिया ही मेरांची मूळभूमी होय. हूण लोकांच्या स्वाऱ्यांना कंटाळून त्यांनी इ. स. च्या ५ व्या शतकात स्थलांतर केले आणि तिथून हे पंजाब, राजस्थान व गुजरात या भागांत आले. सौराष्ट्रात काही काल यांनी राज्यही केले, असे म्हणतात.

सौराष्ट्रातील मेरांमध्ये त्यांच्या वसतिस्थानांवरून बरडाई मेर, घेडिया मेर असे काही भेद पडले आहेत. त्याशिवाय यांचे केशपाळा, राजसुखा, गोहिल आणि आडिद्रा हे पोटभेद आहेत.

मेर पुरुष

हे लोक उंचेपुरे, गोरे आणि सशक्त असतात. ज्वारी, बाजरी व मका हे त्यांचे प्रमुख अन्न होय. काही मेरांना मांसाहार चालतो आणि काहींना चालत नाही. पाहुण्यांचा आदरसत्कार करण्यात हे लोक आस्थेवाईक असून, स्वभावाने शांत व प्रेमळ आहेत.

शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय होय. घेड प्रदेशातील लोकांना कमी कष्टात अधिक फळ मिळते. परंतु बरडा भागातील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मेरांना मात्र खूप कष्ट करावे लागतात. यांच्यांतील काही लोक सैनिकी पेशा पत्करतात व अनेकजण जेठवा राजपुतांचे आश्रित म्हणूनही राहतात. यांच्या स्त्रिया शेतीच्या कामात मदत करतात आणि घरी असल्या म्हणजे सूत काढतात. त्या स्वत: काढलेल्या सुताचेच कापड विणून घेतात.

मेर पुरुष शर्ट, पायजमा आणि डोक्याला पगडी घालतात. यांचे कपडे स्वच्छ आणि नेटके असतात. स्त्रिया घागरा वापरतात. त्यांना ओढणीसाठी काळी मलमल लागते. त्यांच्या हातांतील बांगडया चांदीच्या असतात. त्यांच्या गळयात सोन्याची साखळी, कानांत फुले आणि पायांत पैंजण असतात.

हे लोक आपल्या पोटजातींमध्ये लग्नसंबंध करतात. यांच्यांत पुनर्विवाहाची चाल आहे. लग्नाच्या पौरोहित्यासाठी हे ब्राह्मणाला बोलावतात.

राम, शिव, कृष्ण व हनुमान ही यांची उपास्यें होत. त्याचप्रमाणे सतीआई, चारणआई व रांदलमाता या देवतांनाही ते भजतात. हे लोक कबीर व रामदेव पीर यांचे अनुयायी आहेत. ते गायीला पूज्य मानतात. मुसलमान मेर अल्लाला भजत असले, तरी दुर्गा ही त्यांची प्रमुख देवता आहे. कोणी आजारी पडल्यास हे वैद्यापेक्षा भगताचा सल्ला अधिक मानतात. [मुं. इ. जा.; वि. मुं. रा. प.; रा. जा.; धर्मयुग, १९ डिसेंबर १९५४]

मेरमे गुजरातमधील एक लोकोत्सव. दिवाळीच्या दिवशी लहान मुले एका फडक्यात मीठ बांधून घेतात व 'सपरे पर दहाडे सवरस' अशा आरोळया ठोकीत गावातून हिंडतात. प्रत्येक घरातील माणसे त्यांच्याकडचे थोडे मीठ विकत घेतात. तसे करणे हा नव्या वर्षाचा शुभ शकुन समजतात. त्याच दिवशी रात्री मुले मशाली घेऊन गावात मिरवणूक काढतात. लोक त्या मुलांना बोलावून मिठाई व दक्षिणा देतात. या प्रकाराला 'मेरमे' म्हणतात. [संजय, नोव्हेंबर १९६०]

मेराज मुसलमानांचा एक सण. हा सण हिजरी सनाच्या सातव्या महिन्यातील सत्ताविसाव्या दिवशी येतो. अरबी भाषेतील उरूज या शब्दापासून मेराज, मिअराज किंवा मेअराज हा शब्द बनला असून, वर चढण्याची शिडी, पायरी, आरोहण किंवा उत्थान असे या शब्दाचे अर्थ आहेत. यालाच इसरा म्हणजे रात्रीचा प्रवास असेही म्हटले जाते. या दिवशी रात्री महंमद पैगंबराने स्वर्गाचा प्रवास केला आणि अल्लाकडून मुसलमानांसाठी दिवसातून पाच वेळा नमाज पढण्याची देणगी घेऊन तो परत आला, अशी कथा आहे. ही घटना रात्री घडली, म्हणून या सणाला शबे मेराज असे नाव मिळाले आहे. त्यालाच मेराज शरीफ असेही म्हणतात. [साधना, १९ एप्रिल १९५२]

मेरुतुंगाचार्य (इ. स. चे १३ वे शतक) एक जैन ग्रंथकार. याने प्रबंधचिंतामणी नावाचा एक ग्रंथ रचला आहे. संस्कृत कथा-साहित्याचा विचार करताना या कवीला वगळता येत नाही. मेरुतुंगाने या ग्रंथात अपभ्रंश भाषेचाही थोडा वापर केला आहे. याची रचना इ. स. १३०५ मध्ये वर्धमानपूर नामक गावी झाली असून, तो पाच प्रकाशांत विभागला आहे. ऐतिहासिक, चरित्रात्मक ग्रंथ असे याचे स्वरूप आहे. यात अनेक अप्रसिद्ध व्यक्तींसंबंधीच्या दंतकथाही आढळतात. तत्कालीन चालीरीती व दरबारी व्यवहार यांची सुस्पष्ट वर्णने यात पाहायला मिळतात. या ग्रंथात अनेक सुंदर सुभाषितेही आहेत. [सं. सा. इ.; अ. सा.; गुज. सा. इ.]

मेरुत्रयोदशी जैनांचा पहिला तीर्थंकर ऋषभदेव याच्या स्मृतिप्रीत्यर्थ पौष वद्य त्रयोदशीस जो उत्सव करतात, त्याला हे नाव आहे. या दिवशी चांदीच्या सात भांडयांची उतरंड रचतात. यालाच मेरू असे म्हणतात. हा मेरू सभोवती ध्वज रोवून सुशोभित करतात. या दिवशी कित्येक जैन उपवासही करतात. [फे. फे. म.]

मेरुनंदन (इ. स. चे १४ वे शतक) एक जैन भक्तकवी. जिनोदयसूरी हा याचा दीक्षागुरू होय. याने जिनोदयसूरीविवाहलउ, अजितशांतिस्तवनम् व सीमंधरजिनस्तवनम् ही तीन काव्ये रचली आहेत. पहिल्या काव्यात गुरुभक्ती आणि अन्य दोन काव्यांत तीर्थंकरांची भक्ती वर्णिलेली आहे. जिनोदयसूरीविवाहलउ हे रूपकप्रधान काव्य असून, त्यात जिनोदयसूरीचा संयमश्रीबरोबर दीक्षाविवाह म्हणजे दीक्षा घेण्याचा प्रसंग वर्णिला आहे. [हिं. जै. भ. क.]

मेरुपंक्तिव्रत एक जैन व्रत. या व्रताला सात महिने दहा दिवस लागतात. यात ८० उपवास, २० बेला आणि १०० पारणा असतात. कोणत्याही मासापासून या व्रताचा प्रारंभ करता येतो. व्रतकाळात 'ओं ह्रीं पञ्चमेरुसम्बधि अस्सीजिनालयेभ्यो नमः' हा मंत्र जपायचा असतो. [जै. व्र. वि. सं.]

मेरुपर्वतदान याचा विधी असा – धान्य, मीठ, गूळ, सुवर्ण, तीळ, कापूस, तूप, रत्ने व साखर यांचा ढीग करावा. त्यावर सोन्याची झाडे मांडावी. त्यांना रुप्याची शिखरे करावी. उसाची अरण्ये व तुपाचे ओढे करावे. ब्रह्मा, विष्णू,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सूर्य यांच्या सुवर्णप्रतिमा स्थापाव्या. शिखरांवर शुभ्र वस्त्र घालावे. अशी सर्व रचना केल्याने तो मेरू पर्वत बनतो. मग त्याच्या चारही बाजूंना सुवर्णाचा मंदर, गव्हांचा गंधमादन, तिळांचा तिलाचल आणि उडदांचा सुपार्श्व असे चार उपपर्वत करावे. मग त्या सर्वांची पूजा व होम करावा. मग तो समग्र पर्वत ब्राह्मणाला दान द्यावा. [प. पु. सृ. खं. अ. २१]

मेरुमंदिर तमिळ भाषेतील एक जैन पुराण. वामनाचार्य नामक कोण्या जैन व्यक्तीने हे पुराण रचले आहे. या ग्रंथात १४०६ पदे असून त्यांत जैन सिद्धान्तांचे विवरण केलेले आहे. वामनाचार्यांच्या कालासंबंधी आणि त्याच्या चरित्रासंबंधी निश्चित माहिती उपलब्ध नाही. [त. सा. सं.]

मेरुलिंग सातारा जिल्ह्यातील सायगावजवळील शिवक्षेत्र. हे स्थान डोंगरावर आहे. हा डोंगर उंच असल्याने त्याला गरिबांचे महाबळेश्वर म्हणतात. वर गुरव आणि महार यांची वस्ती आहे. गुरव हेच तियले पुजारी आहेत. येथील महादेवाला मेरुबा असे म्हणतात. पूर्वी त्याला नरफदेव म्हणत. तो चंद्रराव मोऱ्याचा कुलदेव होता.

देवळाच्या चारही बाजूंस कोट असून, महाद्वार उत्तरेस आहे. देवळाला तीन शिखरे आहेत. गाभाऱ्यात मेरुबाचे लिंग असून, त्याची उंची १।। वीत आहे. त्यातून सात धारांनी सतत पाणी झिरपत असते. त्यामुळे शाळुंका नित्य पाण्याने भरलेली असते. इथे अनेक नंदादीप जळत असतात. चैत्र शुद्ध एकादशीस देवाचा उत्सव होतो. त्या दिवशी शिव-पार्वतींचा विवाहसमारंभ साजरा करतात. देवाला साठ गावांतून उत्पन्न आहे. [भारत इतिहास संशोधक मंडळ, षष्ठ संमेलन वृत्त, शके १८४०]

मेरुव्रत एक जैन व्रत. श्रावण वद्य प्रतिपदेला या व्रताला प्रारंभ करतात. दोनशे वीस दिवसांत हे व्रत पुरे करायचे असते. जैन तत्त्वज्ञानानुसार प्रत्येक युगाच्या प्रथम वर्षाचा प्रारंभ वरील तिथीपासून होतो, म्हणून या व्रताला विशेष महत्त्व दिलेले आहे. [व्र. ति. नि.]

मेरुसावर्णी दक्ष, ब्रह्म, धर्म आणि रुद्र यांना हे सामान्य नाव आहे. मेरुसावर्ण या नावाची दक्षाच्या मुलीची चार मुले होती. त्या सर्वांनी मेरूवर तप केल्याचा उल्लेख ब्रह्मांड पुराणात आहे (१.२४). नऊपासून बारा-पर्यंतच्या मन्वंतरांचे हे अधिपती होते, असे मार्कंडेय पुराणात म्हटले आहे (५०). [हिं. मा. रि.]

मेरुस्वामी (इ. स. चे १८ वे शतक) एक रामदासी कवी. कृष्णातीरी असलेल्या मेरुलिंग नावाच्या गावी याचा जन्म झाला. तिथून हा तीर्थयात्रा करीत अरुणाचलम इथे गेला. त्या गावी त्याची व अनंत मौनी या समर्थशिष्याची गाठ पडली. मेरुस्वामीने त्याचा अनुग्रह घेतला. मग हा दक्षिणयात्रा करून मन्यारगुडी नावाच्या गावी आला व तिथेच यावज्जीव राहिला. याचा मठ व समाधी तिथेच आहे.

मेरुस्वामीने भीमोपदेश, रामसोहळा, अवधूतगीता, स्वानंद-लहरी, आत्मसाक्षात्कार, तत्त्वपट, अनंतवाल्मीकिरामायण, मानसपूजा, मेरुबोध, अनुभवसार, पूर्णामृत, षोडशकळा, समर्थाष्टक, श्रीरामपंचरत्न, संतमाला इ. अनेक ग्रंथ रचले आहेत. याशिवाय त्याची स्फुट रचनाही आहे.

रामसोहळा या ग्रंथाची ओवीसंख्या ९४२७ इतकी आहे. हा ग्रंथ अकरा रुद्र आणि प्रत्येक रुद्रात अकरा उल्लास अशा प्रकारे एकशे एकवीस प्रकरणांत विभागला आहे. त्याचे स्वरूप सर्वसंग्राहक आहे. त्यात वेदान्त, आचार, तीर्थयात्रा, देवतास्तवन, गुरुवर्णन, मायाप्रभाव, इ. अनेक विषय आहेत. परंतु त्यातही अनेक विषयांची सरमिसळ झाली आहे. त्यामुळे ग्रंथ विस्कळित वाटतो. याच्या भीमोपदेश या ग्रंथासंबंधानेही असेच म्हटले गेले आहे. मेरुस्वामीचे हरिहर नाटक या नावाचे एक नाटक आहे. वास्तविक हे नाटक नसून पदे, श्लोक, कटाव, इत्यादींनी युक्त असलेले नाट्यात्मक कथानिरूपण आहे.

कवीची भाषा ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर यांची आठवण करून देणारी आहे. उपमा, दृष्टांत यांचे वैपुल्य तिथे पाहायला मिळते. त्याचा एक नमुना पुढे दिला आहे –

अकाळ ज्ञानवृष्टि संपूर्ण । नेणों टाकील सृष्टि बुडवून ।
अखंड दंडायमान । धारा सोडिल्या ।।
कृपेचा सुशीतळ वारा । त्रिविध ताप उपशम सारा ।
अवचट आनंदाच्या गारा । कोसळती ।।
पर्वतातुल्य नभींहुनी । पडती गारा संख्यात धरणीं ।
अहंतेचे वृक्ष मोडोनी । चूर्ण होती ।।
भवभ्रांति महानगरें । गारावृष्टीनें येकसरें ।
होतीं नव्हतीं विस्तारें । तळासी जाती ।।
अज्ञानवस्तीचीं कुग्रामें । वायुवेगें विक्रमें ।
घरेंची उडोनि जाती संभ्रमें । झंझावात ऐसा ।।
ऐसा कडकडाट बोधाचा । आवर्त ज्ञानप्रळयींचा ।
प्रळयवायु पृथ्वीचा । पदर उडवी ।।

(रामसोहळा रुद्र २, उल्लास ४)

याच्या कवित्वात पुनरुक्ती, विस्कळित रचना, संयमाचा अभाव, इ. दोष जाणवतात. [म. वा. इ. ३; म. सा.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मेरू पर्वत पुराणांत पृथ्वीचे वर्णन करताना जी सात द्वीपे सांगितली आहेत, त्यांतील जंबुद्वीपाच्या केंद्रस्थानी हा पर्वत आहे: मेरु हा सुवर्णपर्वत असून, त्याच्यावर देव निवास करतात, असेही सर्व पुराणांत सांगितले आहे. त्यामुळे तो भूतलावरील स्वर्ग मानला गेला आहे. हा पर्वत हिमालयाच्या उत्तरेला असून, त्या केंद्रापासून अनेक पर्वतराजी निरनिराळ्या दिशांना पसरलेल्या आहेत. निरनिराळ्या पुराणांमध्ये मेरू पर्वताची, त्याच्या भोवतालच्या पर्वतांची व नद्यांची जी वर्णने आहेत, ती बहुतेक सारखीच आहेत. मेरू पर्वताची उंची ८४००० योजने असून, तो भूगर्भात १६००० योजने खोल गेलेला आहे. त्याचा माथ्याजवळचा परीघ ३२००० योजने आणि पायथ्याजवळील परीघ १६००० योजने आहे. यावरून त्याचा आकार वर रुंद होत गेलेल्या घंटाकृती फुलासारखा असावा, असे वाटते. पद्म पुराणात त्याला धत्तुऱ्याच्या फुलाचीच उपमा दिलेली आहे. तो वर्तुळाकार आहे, की कोनयुक्त आहे, याविषयी भिन्न भिन्न पुराणांत निरनिराळी वर्णने आहेत. त्यांवरून या पर्वताचे स्वरूप समजते ते असे–

जंबुद्वीपाच्या मध्यभागी एक अत्यंत उंच व विस्तीर्ण पठार असून, त्याच्या सीमेवर उंच उंच डोंगर आहेत. त्या सर्व भूभागाला मेरू म्हणतात. त्याचा माथा मध्यभागी खोलगट आहे. सीमेवरील डोंगर बाहेरच्या बाजूने उभे पहाड असल्यामुळे अगदी दुर्गम आहेत. हे पठार साधारणपणे गोलाकार आहे; पण त्याच्या काही बाजू सपाट व कोनयुक्त आहेत. मेरू पर्वताची उंची हिमालय पर्वताच्या तुलनेने अनुमानपूर्वक दिलेली आहे; कारण तो पर्वत अती प्रचंड आहे.

पौराणिक माहितीवरून या पर्वताचे स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न अनेक संशोधकांनी केला आहे. काही पंडितांच्या मते पामीरचे पठार म्हणजेच मेरू होय. हेच आर्यांचे मूलस्थान होते, असे पं. राय कृष्णदास यांनी प्रतिपादले आहे. पण दुसरे काही पंडित पश्चिम सैबेरियातील आलताई पर्वताला मेरू पर्वत मानतात. मंगोलियन भाषेत आलताई या शब्दाचा अर्थ सुवर्णाचा पर्वत असाच आहे. हिमालय व मेरू यांच्यामधील हेमकूट व निषध हे पर्वत म्हणजे कुएनलून व थिएनशान पर्वतश्रेणी होत, असे या पंडितांचे मत आहे. डॉ. हर्षे यांनी आलताई म्हणजेच मेरू या मताचे चांगले समर्थन करून, तिथेच आर्यांचे मूल निवासस्थान होते, असे प्रतिपादले आहे. पाहा– जंबुद्वीप; पुराणे.
[पु. वि.; जॉ. पु.; सं. अ. ग्रं.]

मेलक्कारण व्यवसायावरून बनलेली एक जात. मेळक्कारण याचा अर्थ वादनकार असा आहे. यांची वस्ती तमिळनाडमधील तंजाऊर भागात आढळते. यांच्यांत तमिळ व तेलुगू असे दोन भेद आहेत. हे आपापसांत रोटीव्यवहारही करीत नाहीत. तेलुगू वादनकार नृत्य करणाऱ्या मुलींबरोबर संगीताची साथ करीत नाहीत; तमिळ लोक मात्र करतात. [का. ट्रा. स. इं.]

मेलचिदंबरम दक्षिणेतील एक प्रसिद्ध पुण्यक्षेत्र. हे कोइंबतूरपासून चार मैल अंतरावर, पेरूर या गावात आहे. इथे चिदंबराचे विशाल मंदिर आहे. त्याच्या मुख्य पीठावर शिवलिंग आहे. मंदिराच्या घेऱ्यातच पार्वतीचेही मंदिर आहे. तिला मरकतवल्ली किंवा मरकतांबा म्हणतात.

मंदिरद्वाराजवळच ध्वजस्तंभ आहे. स्तंभाजवळ गोस्तन आहे. तिथे दूध सोडले, तर ते स्तनांतून ओघळते आणि मंदिरातील शिवलिंगावर पडते. [कल्याण–तीर्थांक]

मेलूकोटे कर्नाटकातील श्रीरंगपट्टण तालुक्यातले एक पुण्यक्षेत्र. हे स्थान म्हैसूरपासून ३० मैल दूर आहे. हे दक्षिणेतील चार प्रधान वैष्णव क्षेत्रांपैकी एक आहे. हे यदुगिरी डोंगरावर असल्यामुळे त्याचे प्राचीन नाव यादवाद्री किंवा यादवगिरी असे होते. एकशे आठ दिव्य वैष्णव देशांत यादवगिरी हे श्रेष्ठ मानले जाते. श्रीरामानुजाचार्यांनी या क्षेत्राचा पुनरुद्धार केला व स्वत: ते इथे १६ वर्षे राहिले.

इथे संपत्कुमारस्वामीचे विशाल मंदिर आहे. त्यात नारायणाची मूर्ती आहे. हे मंदिर दक्षिणेतील प्रसिद्ध मंदिरांच्या धर्तीचे आहे. मंदिराच्या जवळच पंचतरणीतीर्थ नामक सरोवर आहे. जवळच परिधानशिला आहे. असे म्हणतात, की दत्तात्रेयाने याच शिलेवर संन्यास घेतला. रामानुजाचार्यांनी याच शिलेवर आपली काषाय वस्त्रे आणि दंड ठेवून त्यांचे पुनर्ग्रहण केले होते. अजूनही कित्येक संन्यासी तसे करतात. या क्षेत्रासंबंधी एक कथा आहे, ती अशी –

रामानुजाचार्य या भागात येऊन तोंडनूर. (भक्तिपुरी) येथे राहिले होते. आचार्यांजवळ तिलक लावण्यासाठी श्वेतमृत्तिका (तिरुमण) नव्हती. त्याच विचारात त्यांना झोप लागली असता नारायणाने त्यांना स्वप्नदृष्टांत देऊन सांगितले. ‘ माझ्याजवळ पुष्कळ तिरुमण आहे. मी येथे तुलसीवनामधील वारुळात तुझी प्रतीक्षा करीत आहे.’

प्रात:काळी उठल्याबरोबर त्या दृष्टांताचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी रामानुजाचार्य त्या देशाचा राजा व सेवक यांसह तिथे गेले. सांगितलेल्या ठिकाणी खोदल्यावर त्यांना खरोखरच नारायणाची मूर्ती प्राप्त झाली. मग तिच्यासाठी मंदिर बनवून आचार्यांनी त्या मूर्तीची तिथे स्थापना केली. तेव्हापासून इथली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पांढरी माती वैष्णव लोक नाम लावण्यासाठी वापरतात.

आणखी एक कथा सांगतात, ती अशी—

इथल्या उत्सवमूर्तीचे संपत्कुमार असे नाव होते. ती मूर्ती मंदिरातून एक दिवस अदृश्य झाली. चौकशी केल्यावर समजले, की बादशहाने दक्षिणेतल्या ज्या काही मूर्ती दिल्लीला नेल्या, त्यांत एक नारायणाची उत्सवमूर्तीही होती. मग त्या मूर्तीच्या शोधासाठी रामानुजाचार्य दिल्लीला गेले. बादशहाने त्यांना मूर्ती परत देण्याचे मान्य केले; पण चौकशी करता त्याला कळले, की ती मूर्ती शाहजादीजवळ आहे. तिथून ती मिळवणे दुर्घट होते. म्हणून रामानुजांनी आत्मिक बलाचा वापर करून त्या मूर्तीचे आवाहन केले आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती मूर्ती स्वतःच त्यांच्याजवळ चालत आली. मग ती घेऊन आचार्य यादवगिरी येथे आले. शाहजादीला रामानुजांचे सामर्थ्य प्रतीत झाले व तीही त्यांच्याबरोबर या क्षेत्री येऊन राहिली व इथेच तिने आपला देह ठेवला.

हे मंदिर मोठे प्रेक्षणीय आहे. अनेक राजे व धनिक यांनी त्याला देणग्या दिलेल्या आहेत.

मेलुकोटेच्या जवळच एक पर्वत असून, त्यावर योगनृसिंहाचे मंदिर आहे. [सु. वि. को.; कल्याण–तीर्थांक.]

मेलेनी वंगालमधील एक लोकदेवता. ही कातडीच्या रोगांची देवता मानली जाते. वीस वर्षांच्या आतील ब्राह्मणेतर मुला-मुलींनीच हिची पूजा करायची असते. चैत्र प्रतिपदेला मुले हिची मूर्ती करून एक महिनाभर तिची पूजा करतात. पूजेसाठी सीजा नावाच्या झाडाची एक डहाळी व फुले आवश्यक असतात. महिन्यानंतर हिचे नदीमध्ये विसर्जन करतात. हिच्या संबंधीची अनेक लोकगीते त्या भागात गायिली जातात.

मेलपत्तूर नारायण भट्टतिरी (इ. स. चे १६ वे किंवा १७ वे शतक) केरळातील एक संस्कृत कवी. हा प्रकांड पंडित असून, अहंमन्य होता. सामुतिरीच्या दरबारात याला राजाश्रय होता. पुढे दैववशात याला कुष्ठरोग झाला. त्याच्या निवारणासाठी याने गुरुवायूर क्षेत्रात चक्री भजनाला प्रारंभ केला. असे सांगतात, की एक्केचाळीस दिवसांच्या भजनानंतर याच्या रोगाला उतार पडला आणि अखेर तो एक निस्सीम देवभक्त बनला.

गुरुवायूर क्षेत्रात याने भागवताच्या दशमस्कंधावर काव्यरचना केली. दहा पद्यांचा एक सर्ग असे शंभर सर्ग याने रचले. त्याचे हे काव्य नारायणीयम नावाने प्रसिद्ध आहे. पूंतानमशी याचा घनिष्ठ संबंध होता. पाहा– पूंतानम नंपूतिरी. [कै. सा. द.]

मेव . राजस्थानातील एक जात. या लोकांना मेवाती असेही नाव आहे. मेव लोक हे मीन जमातीचीच एक शाखा आहे. मुळात हे लोक हिंदू असून, यादववंशी राजपूत होते. पण पुढे इ. स. च्या ११ व्या शतकात मुसलमानी आक्रमणानंतर यांना मुसलमान बनावे लागले.

या लोकांत बारा कुळे आहेत. त्यांच्या सहा कुळांची व मीन जातीच्या सहा कुळांची नावे सारखीच आहेत. पूर्वी मीन व मेव या लोकांत लग्नसंबंध होत असे. पण अकबराच्या वेळेपासून तो बंद झाला. हे लोक एकाच कुळात लग्न करीत नाहीत.

हे लोक मुसलमान झाले असले, तरी हिंदूंचे काही रीतिरिवाज व सण पाळतात. सुंता, निकाह व अंत्यसंस्कार हे विधी ते मुसलमानी धर्मांप्रमाणे करतात. मुसलमानांच्या पवित्र ठिकाणांची यात्राही करतात; पण हाजयात्रा करीत नाहीत. हिंदूंचे होळी व दिवाळी हे सण ते पाळतात. त्यांचा वेषही हिंदूंप्रमाणे असतो. मुलांची नावे हिंदू व मुसलमान अशी दोन्ही प्रकारे ठेवतात. ते अंधश्रद्ध असून, शकुनांवर विश्वास ठेवतात. यांच्या स्त्रिया पडदानशीन नाहीत. हिंदू स्त्रियांप्रमाणे त्या गोंदूनही घेतात.

मेव पुरुष

हे लोक उत्तम जासूद असून, अकबराने एक हजार मेव पुरुषांना टपाल नेण्यासाठी नेमले होते, असे अबुल फज़लने लिहून ठेवले आहे.

पूर्वी हे लोक चोऱ्यामाऱ्या करीत असत. सांप्रत शेती हा या लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. [रा. जा.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

मेवाडा ब्राह्मण या लोकांची वसती गुजरात प्रदेशात आहे. हे मेवाडमधून गुजरातमध्ये आले म्हणून यांना मेवाडा ब्राह्मण हे नाव मिळाले असावे. मेवाडमधील एकलिंग महादेव हेच यांचे कुलदैवत आहे. यांच्यांत पाच पोटभेद असून, ते सर्व यजुर्वेदी आहेत. पौरोहित्य व भिक्षा यांवर हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपला निर्वाह करतात. काहीजण शेतीही करतात. यांच्यांतले भट ज्योतिष व पुराण सांगतात. हे पूर्वीचे राजपूत असून, नंतर ब्राह्मण झाले, असे काहींचे मत आहे. गुजरातेत वल्लभ भट मेवाडा या नावाचा एक चांगला कवी होऊन गेला. [वि. मुं. रा. प ; मुं. इ. जा.]

मेवो शेतकऱ्यांचा एक वर्ग. या लोकांची वस्ती प्राधान्याने गुरगाव व भरतपूर या भागांत आढळते. अंबाला भागातही मेवो आढळतात. मेवो धर्माने मुसलमान असले, तरी ते स्वतःला राजपुतांचे वंशज म्हणवितात. हे हिंदू दैवतांना भजतात व हिंदूंचे सणही पाळतात. लग्नतिथी ठरवायला यांना ब्राह्मण पुरोहित लागतो; पण लग्न मात्र काझी लावतो. अमावास्येला अथवा विहीर खणताना हे प्रथम हनुमंताला पार बांधतात.

यांच्या बावन्न कुळचा आहेत. पैकी बारा मोठ्या कुळांना पाल आणि अन्य लहान कुळांना गोट म्हणतात.

मेवो स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक कष्टाळू आहेत. त्या गोंदून घेतात. पुरुष धोतर नेसतात व सोन्याचे दागिने घालतात; परंतु स्त्रिया मात्र दागिने वापरीत नाहीत. सर्वसामान्यपणे यांची आर्थिक स्थिती हलाखीची असते.

मीन आणि मेवो यांचा एकमेकांशी संबंध असून, ते या देशातील द्रविड संस्कृतीचे प्रतिनिधी आहेत, असे म्हटले जाते. मेवोंना अनेकदा मिनामेवो म्हणूनही ओळखतात. हे लोक मुळात अरवलीच्या डोंगरातील आदिवासी असावे, असाही एक तर्क वंशशास्त्रज्ञांनी केला आहे. त्यांच्या मते मेवासती याचे भ्रष्ट रूप म्हणजे मेवो होय. [पं. का.]

मेष राशिगणनेतील पहिली राशी. अश्विनी, भरणी व कृत्तिकांचा एक चरण मिळून मेष राशी बनते. या राशीचा स्वामी मंगळ आहे. ही राशी पृष्ठोदय, आरक्त-पीत, क्रूर, पित्तोष्णस्वभाव, कांतिरहित, समानांग, पर्वतचारी, पूर्व दिशेची अधिपती, वैश्यवर्ण, अल्पसंतान, सुदृढ व चर आहे. या राशीत रवी उच्चीचा व शनि नीचीचा असतो. हिचा अंमल मेंदूवर चालतो. या राशीत जन्मलेला मनुष्य प्रवासी, धीट, साहसी, महत्त्वाकांक्षी, कामप्रेरित, चिडखोर व करारी होतो, असे सांगितले आहे. [सुलभजातक; जातकमार्गोपदेशिका]

मेषदान जो माणूस दक्षिणाग्नी, गार्हपत्य व आहवनीय या तीन अग्नींचा नाश करतो, त्याला अग्निमांद्य हा रोग जडतो. या रोगनाशासाठी मेषदान करावे, असे बौधायनाने सांगितले आहे. हा मेष चांदीचा करून त्याचे खूर सोन्याने मढवावे आणि तो ब्राह्मणाला द्यावा, असे त्याचे विधान आहे.

चांदीच्या मेंढ्याऐवजी प्रत्यक्ष मेंढाही दिला तरी चालतो. या दानामुळे माणसाचा अग्नी प्रखर होतो आणि तो शंभर वर्षे जगतो, असे सांगितले आहे. [दा. चं.; प्रा. व्य. प्र.]

मेषीदान अयन, विषुवसंक्रांती, ग्रहणे, इ. पर्वकाळी किंवा दुःस्वप्न पडले असता अथवा सुवत्ता असेल तर तीर्थाच्या ठिकाणी किंवा राहत्या घरी हे दान द्यायचे असते. दान देण्यापूर्वी मेंढीला वस्त्रालंकारांनी सजवतात, तिला मिठाच्या राशीपुढे उभी करतात व तिचे दान करतात. फल–सर्वपापनाश. हे दान घेणाऱ्या ब्राह्मणाशी संभाषण करू नये व त्याचे मुखावलोकनही करू नये, असे सांगितले आहे. [दा. चं.]

मेहकर एक पुण्यक्षेत्र. संस्कृत नाव मेघंकर. विदर्भातल्या बुलढाणा जिल्ह्यातले तालुक्याचे ठिकाण. हे पैनगंगा नदीच्या तीरावर आहे. सृष्टीच्या प्रारंभी ब्रह्मदेवाने केलेल्या यज्ञातल्या प्रणीतापात्रातून या नदीची उत्पत्ती झाली, अशी कथा आहे. पैनगंगा इथे पश्चिमवाहिनी होते. तिच्या तीरावर उंच जागी शार्ङ्गधर विष्णूचे भव्य आणि प्राचीन मंदिर आहे. आतली विष्णूची मूर्ती ११ फूट उंचीची असून, ती शाळिग्रामशिळेची बनवलेली आहे. ती अतीव सुंदर आहे. इथल्या गढीतल्या एका घराचा पाया खोदीत असता एका लाकडाच्या पेटीत ती सापडली.

शार्ङ्गधर विष्णू – मेहकर

स्थानिक लोक या देवाला बालाजी म्हणतात. मार्गशीर्ष शुद्ध पंचमीपासून पूर्णिमेपर्यंत या देवाचा मोठा उत्सव होतो. इथे स्नान करणे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुण्यप्रद असल्याचे ब्रह्म व मत्स्य या पुराणांत सांगितले आहे. [कल्याण–तीर्थांक; पुरुषार्थ जून-जुलै १९६३]

मेहर एक जात. या लोकांची वस्ती सांप्रत राजस्थानात आढळते. वंशशास्त्रज्ञांच्या मते, यांची उत्पत्ती राजपुतांपासून झाली असावी; कारण राजपुतांची व यांची गोत्रे सारखीच आहेत. नंद मेहरांपासून यांची उत्पत्ती झाली, असेही काही लोक सांगतात. यांना मेहर हे नाव त्यांच्या व्यवसायावरून मिळाले आहे.

विणकाम करणे व ओझी वाहून नेणे हे यांचे प्रमुख व्यवसाय होत. त्याशिवाय शेती, नोकरी, इ. व्यवसायही हे करतात. मात्र हलक्या दर्जाची कामे करायला त्यांना त्यांच्या समाजाची परवानगी नसते.

मेहरांचा स्वतंत्र पंथ नाही किंवा त्यांचा गुरुही कोणी नाही. परंतु काही मेहर कबिराचे अनुयायी आहेत. अमावास्या व पौर्णिमा या तिथींना हे उपवास करतात. बुधवार व शुक्रवार त्यांचे पवित्र दिवस होत. चांभार, मुसलमान, इ. लोकांच्या हातचे अन्न यांना चालत नाही. यांच्यांतील बरेच लोक शाकाहारी आहेत.

विवाहप्रथा – आई-वडिलांच्या तीन पिढ्यांमधील नातेवाइकांत हे विवाहसंबंध करीत नाहीत. वाङ्निश्चयाच्या वेळी मुलाला नारळ व एक रुपया व मुलीला नवे कपडे आणि दागिने देतात. देजाची पद्धत सर्रास आहे, असे नाही. लग्नात होम, सप्तपदी व जातपंचायतीला यथाशक्ति देणगी हे प्रमुख कार्यक्रम असतात. लग्नानंतर एक वर्षाने गौना नावाचा एक समारंभ होतो. गौना म्हणजे वधूचे वरगृही आगमन होय.

प्रसूतिप्रथा – हे लोक प्रथमच गर्भवती असलेल्या स्त्रीचे आठव्या महिन्यात आठांगुळ करतात. तिला बांगड्या भरून नवे कपडे देतात. मुलाचा नामकरणसमारंभ गावचा ब्राह्मण करतो. हे लोक चाळीस दिवस जननाशौच पाळतात. त्यानंतर सूर्यपूजा (निष्क्रमण) आणि नृत्य, गायन, इ. कार्यक्रम होतात.

यांच्यांत दत्तक घेण्याची प्रथा आहे. पण दत्तक मुलगा भिन्न गोत्राचा चालत नाही. दत्तकविधानाच्या वेळी दत्तकाला कुंकू लावतात, पगडी घालतात आणि नारळ देतात.

यांच्यांत जातपंचायत आहे. जातीचे सामाजिक तंटे पंचायतीमार्फत सोडवले जातात.

मृतकप्रथा – हे मुलांना पुरतात व मोठ्यांना जाळतात. जाळण्यापूर्वी मृताची हजामत करून त्याला स्नान घालतात. नवव्या किंवा अकराव्या दिवशी इतर नातेवाईक मुंडन करतात. अकराव्या अथवा बाराव्या दिवशी ज्ञातिभोजन असते. जेवणानंतर मृताच्या वारसाला पगडीचा अहेर करतात. सहा महिन्यांनंतर व वर्ष–श्राद्धालाही ज्ञातिभोजनाचा कार्यक्रम असतो.

मृताच्या मुलांमध्ये संपत्तीची समान वाटणी होते. मुलगा नसेल, तर निकटचे नातेवाईक त्याचे वारस ठरतात आणि तेही नसतील तर सर्व संपत्ती मुलीला मिळते. [सो. ला. रा.]

मेहुलिया एक नृत्य. याला पावसाचा नाच असे म्हणतात. गुजरातमधील आदिवासी लोक पावसाळ्याच्या प्रारंभी हा नाच करतात, म्हणून याला हे नाव मिळाले आहे. यात आदिवासी मुले आपल्या अंगाला निंबाचा पाला बांधतात आणि हातात एक मडके घेऊन घरोघर नाचत हिंडतात. हिंडत असताना ती पर्जन्यदेवतेची प्रार्थनागीते गातात. या वेळी इतर लोक त्यांना थोडे धान्य देतात आणि त्यांच्या अंगावर पाणी ओततात. शेवटी हे नर्तक गावाबाहेर जाऊन तिथे ते मडके फोडतात व परत येतात. [सुरत गॅझे.]

मेक्षण एक यज्ञीय पात्र. हे लाकडाचे असून याचा आकार उलथन्यासारखा असतो. याची एकूण लांबी एक अरत्नी म्हणजे चौवीस बोटे असते. पात्रीमध्ये पीठ घालून त्यावर पाणी ओतले म्हणजे ते मेक्षणाने ढवळतात. [सं. को.]

मैंद रामायण एक संस्कृत रामायण. यात बावन्न हजार श्लोक आहेत. हा मैंद-कौरव-संवादात्मक ग्रंथ असून, याची रचना रैवत मन्वंतरातील एकविसाव्या त्रेतायुगात झाली. जनकपुरातल्या उद्यानातील राम-सीता यांचे लीलाविलास वर्णन करणे हा या ग्रंथाचा प्रमुख विषय आहे. या व्यतिरिक्त यात गुरुसेवा, अहिल्योद्धार, गंगावर्णन, रामेश्वरमाहात्म्य, इ. विषयही आले आहेत. [हिंदुत्व; रा. भ. शा.; रा. सा. म. उ.]

मैत्रक राजवंश सौराष्ट्रात वलभी येथे राज्य करणारा एक प्राचीन वंश. या वंशाचा मूळ पुरुष भटार्क हा इ. स. च्या ५ व्या शतकात गुप्त सम्राटांचा एक सेनापती होता. इ. स. ४७० च्या सुमारास सौराष्ट्राचा सुभेदार म्हणून त्याची नेमणूक झाली. याचे मैत्रक घराणे वर्णाने क्षत्रिय असून यादव वंशातून उगम पावले होते. मथुरेच्या भोवतालच्या प्रदेशावर मित्र नावाचा जो राजवंश राज्य करीत होता, त्याच्याशी संबंधित असे हे घराणे असावे, असे पंडितांचे मत आहे.

भटार्कांच्या पूर्वी पर्णदत्त नामक सुभेदार सौराष्ट्राचा कारभार पाहत होता. गिरिनगर (जुनागड) हे त्याचे मुख्य ठिकाण होते. पण भटार्क याने ते बदलून वलभी येथे मुख्य ठिकाण नेले. गुप्त सम्राट बुधगुप्त याच्या राजवटीत (इ. स. ४७७–५००) गुप्त

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साम्राज्याची शक्ती क्षीण होऊ लागली आणि अनेक मांडलिक व सुभेदार काहीसे स्वतंत्रपणे कारभार करू लागले. मैत्रक भटार्क हादेखील सौराष्ट्रात स्वतंत्रपणे वागू लागला. पण त्याने स्वतःला राजा न मानता, सेनापती ही पदवीच चालू ठेवली. त्याची राजधानी वलभी म्हणजे जुन्या भावनगर संस्थानातील वल नावाचे गाव होय. या भटार्काविषयी अधिक माहिती उपलब्ध नाही. मात्र तो शैव होता असे दिसते. त्याच्या वंशजांनी आपल्या आलेखात त्याचा उल्लेख 'परम माहेश्वर' असा केला आहे.

धरसेन (पहिला) (इ. स. ४९३–४९९) – भटार्काच्या मागून त्याचा ज्येष्ठ पुत्र धरसेन हा गादीवर आला. पण त्यानेही सेनापती हीच पदवी धारण केली. त्या वेळी हूणांचा सरदार तोरमाण याने माळवा पादाक्रांत केला होता. त्याच्या आक्रमणाला प्रतिकार करण्यासाठी धरसेनाने वाकाटक वंशातील हरिशेण राजाशी मैत्रीचा तह केला. त्याने वाकाटक वंशातील चंद्रलेखा नावाच्या राजकन्येशी विवाह केला. वाकाटक राजे फार पराक्रमी असल्यामुळे मैत्रक राजा धरसेन हा त्यांचा सामंतच ठरला. मात्र तो गुप्तसम्राटाची सार्वभौम सत्ता मानीत होता.

द्रोणसिंह (इ. स. ४९९–५१९) – धरसेनाच्या नंतर त्याचा धाकटा भाऊ द्रोणसिंह गादीवर बसला. त्याने राजा ही पदवी धारण केली. एवढेच नव्हे; तर त्या वेळच्या सम्राटाने त्याला महाराज ही पदवी दिली, असे काही आलेखांत म्हटले आहे. त्या सम्राटाचे नाव मात्र त्यांत दिलेले नाही.

द्रोणसिंह हा महत्त्वाकांक्षी व कुशल सेनानायक असल्याचा निर्देश अनेक लेखांत आढळतो. मात्र त्याची राजवट शांततेत गेली आणि त्याने राज्यात सामाजिक व आर्थिक सुव्यवस्था निर्माण केली. त्याची राज्यव्यवस्था उत्तम होती, असे म्हणतात.

ध्रुवसेन (पहिला) (इ. स. ५१९–५४९) – द्रोणसिंहाच्या पश्चात त्याचा धाकटा भाऊ ध्रुवसेन राजा झाला. त्याने महासामंत महाराज ही पदवी धारण केली होती. मध्यंतरी काही वर्षे माळव्यातील राजा यशोधर्मा याने सर्वत्र आपली सत्ता प्रस्थापित केली होती. मैत्रक ध्रुवसेनही त्याचा मांडलिक झाला असावा. पण यशोधर्म्याची सत्ता लवकरच नष्ट झाली आणि वलभीचे राज्य पुन्हा स्वतंत्र झाले. ध्रुवसेन स्वतः विद्वान असून, पंडितांचा आश्रयदाता होता. तो वैष्णव असूनही, त्याने वैदिक ब्राह्मणांप्रमाणेच बौद्ध भिक्षूंनाही पुष्कळ देणग्या दिल्याचे उल्लेख आहेत. इ. स. ५२६ मध्ये वलभी नगरीत जैनांची धर्मपरिषद भरली होती, तिलाही ध्रुवसेनाने पुष्कळ साहाय्य व प्रोत्साहन दिले होते. त्याच्या राज्याचा विस्तार पश्चिमेला द्वारकेपर्यंत व उत्तरेला वडनगरपर्यंत झाला होता.

धरपट्ट – (इ. स. ५४९–५५३) – ध्रुवसेनाच्या मागून त्याचा धाकटा भाऊ धरपट्ट गादीवर आला. भटार्काचा हा चौथा पुत्र होय. गादीवर बसण्याच्या वेळी तो वृद्ध झाला होता. तो सूर्योपासक होता.

गुहसेन (इ. स. ५५३–५६९) – धरपट्टाच्या पश्चात त्याचा पुत्र गुहसेन राजा झाला. लवकरच मगधाच्या पूर्वेकडील प्रदेशावर राज्य करणाऱ्या मौखरी वंशातील राजा ईश्वरवर्मा याने सौराष्ट्रावर स्वारी केली. पण गुहसेनाने त्याचा पराभव केला. गुहसेन हा पराक्रमी व कुशल सेनानी होता, तसाच मोठा मुत्सद्दीही होता. त्याची राज्यव्यवस्थाही उत्तम असून, राज्यात समृद्धी नांदत होती. त्याने स्वतःला महाराज ही पदवी घेतली होती. त्याचा उल्लेख परम माहेश्वर असाही आढळतो. त्यावरून तो शैव होता, असे दिसते. मात्र त्याने बौद्ध विहार व ग्रंथालय यांच्या योगक्षेमासाठी बरीच मदत केली. तो स्वतः कवी असून, संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश या भाषांत काव्यरचना करीत असे.

धरसेन (दुसरा) (इ. स. ५६९–५८९) – गुहसेनाच्या मागून त्याचा पुत्र धरसेन गादीवर बसला. त्याच्या राजवटीत मौखरी राजा ईशानवर्मा याने वलभीवर स्वारी केली. प्रथम धरसेनाने त्याचा यशस्वी प्रतिकार केला असला तरी, शेवटी त्याला मौखरींचे मांडलिकत्व स्वीकारावे लागले, असे दिसते. त्यामुळे त्याचा उल्लेख महासामंत म्हणूनच आढळतो. त्याच्या राज्यात लक्ष्मी व सरस्वती एकत्र नांदत होत्या आणि तो फार उदार व दयाळू होता, असे त्याचे वर्णन केलेले आहे.

शिलादित्य (पहिला) (इ. स. ५९०–६१५) – धरसेनाचा पुत्र शिलादित्य हा नंतर राजा झाला. त्याला धर्मादित्य असेही म्हणत. त्याने माळवा जिंकून तो आपल्या राज्यात समाविष्ट केला होता, असे दिसते. तो अलौकिक बुद्धिवान, मोठा विद्वान व भाषानिपुण असून, धर्मशील व दानशूरही होता. त्याने विविध दर्शनांचा अभ्यास केला होता. तो शिवभक्त असला, तरी बौद्ध, जैन, इ. पंथांनाही पुष्कळ मदत करीत असे. दरवर्षी तो जी सर्वधर्मपरिषद भरवीत असे, तिला मोक्षमहापरिषद असे नाव होते. त्या वेळी दूरदूरच्या प्रदेशांतून आलेल्या अनेक विद्वानांना वस्त्रालंकार देऊन तो त्यांचा परामर्ष करी. त्याच्या राजवाड्याजवळच बौद्ध विहार बांधलेला असून, त्यात बुद्धाच्या सात मूर्ती आणि इतर अनेक शिल्पकलाकृती ठेवलेल्या होत्या.

खरग्रह (इ. स. ६१५–६२१) – शिलादित्याला डेरभट्ट नावाचा पुत्र असून, तो कर्तृत्ववान होता. तथापि शिलादित्याच्या पश्चात त्याचा भाऊ खरग्रह हा राजा झाला. त्याला ईश्वरग्रह असेही नाव होते. तो उज्जयिनी येथे राहून राज्य चालवीत असे. हर्षवर्धनाने त्याच्या राज्यावर सेना पाठवली होती, पण मैत्रक खरग्रह याने तिचा पराजय केला. तो शूर व युद्धकुशल होता;

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तसाच उदार व नीतिमान होता. तो महेश्वराचा भक्त होता.

धरसेन (तिसरा) (इ. स. ६२१–६२७)–खरग्रहाच्या मागून त्याचा पुत्र धरसेन हा गादीवर आला. तो स्वतः विद्वान व सर्व शास्त्रांत पारंगत असून, विद्यावृद्धीला उत्तेजन देत असे. तो महेश्वरभक्त होता. त्याच्या राजवटीच्या अखेरीस हर्षाने सौराष्ट्राकडे मोर्चा वळविला, तेव्हा धरसेन भडोच येथे गुर्जर राजा दुसरा दद्द याच्या आश्रयाला गेला. पण पुढे चालुक्य राजा पुलकेशी याच्या दबावामुळे हर्षाने माघार घेतली आणि धरसेनाने चालुक्यांचे मांडलिकत्व पत्करले. धरसेनाच्या राज्यात प्रजेची सर्वांगीण उन्नती झाली असल्याचे कळते.

ध्रुवसेन (दुसरा) (इ. स. ६२७–६४१)– तिसरा धरसेन याच्या नंतर त्याचा धाकटा भाऊ दुसरा ध्रुवसेन गादीवर बसला. हा बालादित्य या नावाने प्रसिद्ध आहे. त्याने हर्षवर्धनाच्या नातीशी विवाह केला व कनोजचे मांडलिकत्वही पत्करले. ध्रुवसेन सर्व कलांत निपुण आणि विद्वान होता. सर्व धर्मांच्या अनुयायांना तो सारखेच साहाय्य करीत असे. तो परम माहेश्वर असला, तरी बौद्ध पंथाकडे त्याचा अधिक कल असावा, असे वाटते.

धरसेन (चौथा) (इ. स. ६४१–६५०)– ध्रुवसेन (दुसरा) याच्या नंतर त्याचा पुत्र धरसेन वलभीचा राजा झाला. मैत्रक वंशातील हा सर्वांत पराक्रमी राजा असून, त्याचे राज्यही सर्वांत वैभवशाली होते. त्याने परमभट्टार्क महाराजाधिराज परमेश्वर चक्रवर्ति...' अशी पदवी घेतली होती. तो हर्षाचा सामंत असला, तरी स्वतंत्रपणे राज्य चालवीत होता. भडोचवर स्वारी करून त्याने गुर्जरांचा पराभव केला. तो स्वतः विद्वान व विद्वानांचा आश्रयदाता होता. प्रसिद्ध कवी भट्टी त्याच्या आश्रयाला होता. धरसेन दानशूर असून, सर्व धर्मांना सारखेच साहाय्य देत असे.

धरसेनाला पुत्र नसल्यामुळे त्याने पहिल्या शिलादित्याचा नातू व डेरभट्टाचा पुत्र ध्रुवसेन याला राज्याचा वारस नेमले.

ध्रुवसेन (तिसरा) (इ. स. ६५०–६५५)– हा विंध्य पर्वताच्या परिसरातील डेरभट्टाची जहागीर पाहत असे. तो चौथ्या धरसेनानंतर राजा झाला. त्याच्या कारकिर्दीत मैत्रकांना चालुक्य विक्रमादित्याचे मांडलिकत्व पत्करावे लागले, असे दिसते. त्याच्या परम माहेश्वर या पदवीव्यतिरिक्त इतर पदव्या शिलालेखांत आढळत नाहीत.

खरग्रह (दुसरा) (इ. स. ६५५–६५८)– तिसऱ्या ध्रुवसेनानंतर त्याचा थोरला भाऊ खरग्रह वलभीचा राजा झाला. पहिल्या शिलादित्याप्रमाणे यानेही धर्मादित्य ही पदवी धारण केली होती. त्याच्या शासनपत्रात त्याची खूपच स्तुती केलेली आढळते. त्यावरून तो फार चांगला राजा होता, असे दिसते.

शिलादित्य] (दुसरा) (इ. स. ६५८–६८५)– खरग्रहाचा थोरला भाऊ विक्रमादित्य या नावाचा होता. त्याचा पुत्र शिलादित्य (दुसरा) हा वलभीचा राजा झाला. कारण ध्रुवसेन व खरग्रह यांना पुत्र नव्हता. या शिलादित्याने दक्षिण गुजरात हा प्रदेश चालुक्यांकडून जिंकून घेऊन आपल्या राज्यास जोडला. इ. स. ६७७ मध्ये अरबांनी सौराष्ट्राच्या किनाऱ्यावरील गोहा नामक बंदरावर हल्ला केला. पण मैत्रकांच्या सैन्याने त्यांचा पूर्ण पराभव केला.

शिलादित्य (तिसरा) (इ. स. ६८५–७१०)– शिलादित्य (दुसरा) याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र ध्रुवसेन हा वलभीचा राजा झाला. त्याने शिलादित्य (तिसरा) हे नाव घेतले होते. इ. स. ६९१ च्या त्याच्या शिलालेखात त्याचा 'परमभट्टार्क महाराजधिराज परमेश्वर' असा उल्लेख आहे. हादेखील पूर्वीच्या मैत्रक राजांप्रमाणे उदार होता. मात्र त्याच्या कारकीर्दीत मैत्रक पुन्हा चालुक्यांचे मांडलिक झाले.

शिलादित्य (चौथा) (इ. स. ७१०–७४०)– तिसऱ्या शिलादित्याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र धरसेन हा चौथा शिलादित्य म्हणून वलभीच्या गादीवर बसला. त्याच्या शासनपत्रांत त्याचा उल्लेख 'परम माहेश्वर, परमभट्टार्क, महाराजाधिराज, परमेश्वर' असा केलेला आहे. त्यावरून त्याने चालुक्यांचे वर्चस्व नष्ट केले असावे, असे दिसते. पण चालुक्य विक्रमादित्य (दुसरा) याने ते वर्चस्व पुन्हा प्रस्थापित केले. इ. स. ७३५ मध्ये अरबांनी भारतावर मोठे आक्रमण केले. त्यात सिंध, कच्छ, सौराष्ट्र, गुजरात, या प्रदेशांतील हिंदू राजांचा अरब सरदारांनी पराभव केला. नंतर त्यांनी दक्षिणेकडे मोर्चा वळविला. पण चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याने त्यांचा पराभव केला. अरबांच्या स्वारीमुळे वलभीच्या राज्यात जी हानी झाली व अव्यवस्था माजली ती नाहीशी करायला मैत्रकांना दोन तपे लागली.

शिलादित्य (पाचवा) (इ. स. ७४०–७६२)–चौथ्या शिलादित्यानंतर त्याचा पुत्र, पाचवा शिलादित्य म्हणून वलभीच्या गादीवर बसला. त्याने आपल्या कारकिर्दीत राज्यात शांतता व सुव्यवस्था स्थापन करण्याचे काम केले.

शिलादित्य (सहावा) (इ. स. ७६२ ते ७७६)– हा पाचव्या शिलादित्याचा पुत्र होय. त्याने राष्ट्रकूटांचे वर्चस्व दूर केले असावे, असे दिसते. गुर्जर–प्रतीहारांची सत्ताही त्याने नष्ट केली असावी. इ. स. ७७६ मध्ये अरबांनी सौराष्ट्रावर पुन्हा स्वारी केली. पण ती अयशस्वी ठरली. कारण त्यांच्या सैन्यात एका रोगाची साथ पसरून तिला बरेच सैनिक बळी पडले.

सहावा शिलादित्य हाच मैत्रक वंशातील ज्ञात असा शेवटचा राजा होय. त्याच्या नंतर कोण राजा झाला आणि अखेरीस मैत्रकांची सत्ता कशी नष्ट झाली ते समजत नाही. इ. स.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection; Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

७८३ च्या सुमारास हे राज्य लयाला गेले, असे अनुमान करता येते. त्याच वेळी वलभी नगरीही नष्ट झाली. ती कशामुळे नष्ट झाली, हे देखील एक गूढच आहे.

मैत्रक वंशातील राजांनी सुमारे तीनशे वर्षे सौराष्ट्रात राज्य केले. त्या कालखंडात दीर्घ काल त्यांची सार्वभौम सत्ता नांदत होती. ते मांडलिक असतानाही राज्यव्यवस्था उत्तम होती, असे त्यांच्या ताम्रपटांवरून ध्यानात येते. वलभीच्या राज्याचे निरनिराळे भाग पाडलेले असून, त्यांवर भिन्न श्रेणींचे अधिकारी असत. राजाच्या साहाय्याला नेमलेले मंत्रिमंडळ व सचिवालय होते. गुप्तसाम्राज्यातील शासनव्यवस्थेप्रमाणेच ही सर्व व्यवस्था दिसून येते. युआन च्वांग याने या राज्याचे वर्णन "अत्यंत समृद्ध" असे केलेले आहे. [ए. हि. सी.; हि. क. इं. पी.]

मैत्रकृच्छ्र सांतपन प्रायश्चित्ताचा एक प्रकार. सांतपनाच्या तिसऱ्या दिवशी कपिला गायीचे दूध पिऊन राहिले असता हे प्रायश्चित होते, असे प्रायश्चित्तप्रकाशात सांगितले आहे; तर सांतपनाच्या पहिल्या दिवशी पंचगव्य आणि कुशजल प्राशन करून नंतर दोन दिवस उपवास केला असता, हे प्रायश्चित्त होते, असे कल्पतरूत म्हटले आहे. [हि. ध.]

मैत्रायणी ब्राह्मण ब्राह्मणांचा एक वर्ग. महार्णव ग्रंथानुसार साल्हेरमुल्हेरपासून गुजरातपर्यंत यांची वस्ती होती. परंतु सांप्रत हे नासिक ते नागपूर एवढ्या पट्टीत आढळतात. पश्चिम खानदेशातील भडगाव हे यांचे मुख्य केंद्र आहे.

या ब्राह्मणांत मातुलकन्यापरिणयाची चाल नाही. हे स्मार्त व भागवत या दोन्ही पंथांचे अनुयायी आहेत. सप्तशृंगी, जेजुरीचा खंडोबा, लक्ष्मी-व्यंकटेश, कोल्हापूरची अंबाबाई, इ. यांच्या कुलदेवता आहेत. यांची धार्मिक कृत्ये स्वशाखीय पुरोहितांकडून होतात. तो न मिळाला तर ऋग्वेदी किंवा हिरण्यकेशी ब्राह्मण यांना चालतो. यांनाच गुजरातमध्ये मोढ ब्राह्मण म्हणतात. तिकडे गेल्यामुळे त्यांच्या आचार-विचारांत फरक पडला आहे. पाहा-मोढ ब्राह्मण. [मुं. इ. जा.; व. व जा.]

मैत्रायणी शाखा कृष्ण यजुर्वेदाची एक शाखा. कृष्ण यजुर्वेदाच्या चरक शाखेचीच ही उपशाखा मानलेली आहे. मित्रयू ऋषीने ही शाखा प्रवर्तित केली, असे हरिवंशात सांगितले आहे. या शाखेची संहिता आणि उपनिषद उपलब्ध आहे. मानव आणि वाराह ही कल्पसूत्रे मैत्रायणी शाखेशी संबंधित आहेत.

मैत्रायणी संहितेत चार कांडे असून, मंत्र व ब्राह्मण मिळून १८००.० मंत्र आहेत. त्यांत दर्शपूर्णमास, अध्वर, ग्रह, अग्न्युपस्थान, चातुर्मास्य, वाजपेय, काम्येष्टी, राजसूय, इ. यज्ञविषयक सर्व माहिती आलेली आहे. या संहितेत ऋग्वेदातील १००१ मंत्र आले आहेत. संहितेच्या शेवटी मैत्रायणी उपनिषद किंवा आरण्यक दिले आहे. [च. ब्रा. इ.; पुराणम्, जुलै १९६५]

मैत्रावरुण एक यज्ञीय ऋत्विज. हा होत्याच्या गटातला आहे. काही ठिकाणी यालाच होता म्हटले आहे. हा ऋत्विज पशुयाग व सोमयाग यांच्यामध्ये लागतो. अध्वर्यू हा कोणत्याही द्रव्याचा याग करण्यापूर्वी पुष्कळदा मैत्रावरुणाला प्रैष देतो. मग तो होत्याला याज्या मंत्र म्हणण्याची सूचना देतो. सोमयागात मैत्रावरुणाला काही शस्त्रे म्हणावी लागतात. होत्याला सूचना देण्याचा निगदमंत्र म्हणत असता मैत्रावरुण एका दंडाचा आधार घेऊन किंचित वाकून उभा राहतो. होत्याला जेवढी दक्षिणा मिळते, तिच्या निम्मी मैत्रावरुणाला द्यायची असते. म्हणून त्याला अर्धिन् असेही म्हणतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

मैत्रावरुणदंड एक यज्ञीय साधन. हा दंड उंबराचा व यजमानाच्या उंचीचा असतो. परंतु कात्यायन श्रौत सूत्रात (६.४.४) याची उंची यजमानाच्या मुखापर्यंत असावी असे आहे. हा दंड हातात धरून आणि थोडे ओणवे होऊन मैत्रावरुण हा ऋत्विज मंत्र म्हणतो. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

मैत्रावरुणपात्र एक यज्ञीय उपकरण. मित्र व वरुण ही जोडदेवता असल्यामुळे त्यांना समर्पण करायच्या सोमग्रहाला द्विदेवत्यग्रह असे म्हणतात. हा सोमग्रह ज्यात घेतात त्या पात्राला मैत्रावरुणपात्र असे म्हणतात. या पात्राच्या गळ्याजवळ शेळीच्या गळ्याजवळच्या स्तनाप्रमाणे दोन स्तन करतात. या स्तनांना कात्यायन श्रौत सूत्रात अजकाव असे म्हटले आहे. [श्री. विद्याधर शास्त्री भिडे]

मैत्री उपनिषद उपनिषद्-वाङ्मयाच्या इतिहासात याला फार महत्त्व आहे. यात आढळणारा शब्दसंग्रह व इतर अनेक उल्लेख अन्यत्र आढळत नाहीत. पहिल्या चार अध्यायांचा एक व शेवटच्या तीन अध्यायांचा मिळून एक असे याचे दोन विभाग पडतात. पहिल्या विभागातला विषय असा—

बृहद्रथ राजा शाकायन्य ऋषीकडे जाऊन आपल्याला आत्मज्ञान देण्याविषयी त्याची प्रार्थना करतो. शाकायन्य ऋषी त्याचा गुरू मैत्री याच्यापासून त्याला मिळालेले ज्ञान बृहद्रथाला उपदेशितो. यावरून या उपनिषदातले विचार मैत्री ऋषीचे आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असे मानायला हवे. शुद्ध आत्म्याचे वर्णन हा यातला मुख्य विषय होय. शुद्ध अंतरात्मा हा शरीराचा चालक असून, त्याच्या प्रेरणेनेच हा देहरूपी रथ फिरतो. कर्मेंद्रिये हे या रथाचे घोडे, ज्ञानेंद्रिये हे लगाम व मन हे सारथी आहे. शरीरात राहणारा आत्मा हा भूतात्मा आहे. हा भूतात्मा पापपुण्यांच्या शृंखलेने पशूप्रमाणे बद्ध असतो. त्याला पापपुण्यांची फळे भोगावी लागतात व पुनर्जन्महो घ्यावे लागतात.

पुढच्या विभागात सूर्याचे विश्वव्यापक म्हणून वर्णन, षडंगयोग, ज्योतिषशास्त्रातले ग्रह, सुषुम्नानाडी, अनाहत नाद, इ. विषयांचे वर्णन आहे. [उ. र.]

मैत्रेय बुद्ध

मानुषी बुद्धांपैकी आठवा बुद्ध. हा सांप्रत तुषित नावाच्या दिव्य लोकात बोधिसत्त्व या रूपाने वास्तव्य करतो. हा सोळा बोधिसत्त्वांचा नेता आहे. वैरोचन आणि अक्षोभ्य हे दोघेही त्याचे जनक मानले जातात. निष्पन्नयोगावली व साधनमाला या ग्रंथांत त्याचे वर्णन आहे, ते असे— वर्ण पीत. चिन्ह नागकेशर पुष्प. 'मैं' हे बीज. विश्वमकलावर अधिष्ठित. त्रिमुख. चतुर्भुज. एका हाताची वरदमुद्रा व दुसऱ्या हाताची अभयमुद्रा. प्राणिमुद्रेच्या पर्यंकावर बसलेला व अलंकारांनी शोभित.

गौतम बुद्धानंतर चार हजार वर्षांनी मैत्रेय हा बुद्ध म्हणून भूतलावर येणार आहे. भूतलावर येताच तो बोधगयेजवळच्या कुक्कुटपाद पर्वतावर जाईल. लगोलग तियला कश्यप बुद्धाचा स्तूप उघडेल आणि त्यात शयन करणारा कश्यप बुद्ध त्याला बुद्धाची वस्त्रे देईल.

याच्या मूर्ती सर्वत्र आढळतात. त्या उभ्या आणि अलंकृत असतात. त्याच्या मुकुटात एक चैत्य कोरलेला असतो. महायान आणि हीनयान या दोन्ही पंथांचे बौद्ध त्याला भजतात.

आजवर मैत्रेय ही बौद्धांनी मानलेली, तथापि कल्पित अशी एक व्यक्ती होती; पण अलिकडील शोधांती मैत्रेय हा एक ऐतिहासिक पुरुष असल्याचे सिद्ध झाले आहे. आर्य असंग हा योगाचार संप्रदायाचा संस्थापक अशी आजवर समजूत होती; पण आता असे उघड झाले आहे, की त्याचा संस्थापक मैत्रेय होता. आर्य असंगाने तुषित स्वर्गातल्या भविष्यकालीन मैत्रेय बुद्धाकडून अनेक ग्रंथ मिळवले, असे बौद्ध परंपरा सांगते. याचा अर्थ योगाचार संप्रदायाची प्रेरणा आर्य असंगाला मैत्रेयाकडून मिळाली असा होतो. गुप्तकालाच्या प्रारंभी ही गोष्ट घडली, हे आता संशोधनाच्या अंती सिद्ध झाले आहे.

मैत्रेयाने संस्कृत भाषेत अनेक ग्रंथांची रचना केली. त्यांतले बहुतांश ग्रंथ कालौघात लुप्त झाले आहेत. एक-दोन ग्रंथच सांप्रत युरोपीय विद्वानांनी शोधून काढले आहेत. पण तिबेटी भोट भाषेत व चिनी भाषेत त्याच्या ग्रंथांचे जे अनुवाद झाले,

मैत्रेय बुद्ध

ते सांप्रत उपलब्ध आहेत. भोटदेशीय बु स्तो न या ने आ प ल्या ध र्म के इतिहास या ग्रंथात मैत्रेयाच्या नावावर पुढील पाच ग्रंथांचा उल्लेख केला आहे— (१) सूत्रालंकार (२) मध्यान्त विभंग (३) धर्मधर्मता विभंग (४) महायान उत्तरतंत्र व (५) अभिसमयालंकारकारिका.

वरील ग्रंथांत शेवटचा ग्रंथ अत्यंत प्रसिद्ध आहे. मैत्रेय हा संस्कृत भाषेचा प्रकांड पंडित होता व कवीही होता. त्याने श्लोक, आर्या व इतर संस्कृत छंद यांत अत्यंत सुगमतेने आपले धर्मसिद्धान्त सांगितले आहेत. [इं. बु. इ.; गु. सा. इ.]

मैत्रेय रक्षित

(इ. स. १०५० ते ११००) पाणिनीय पद्धतीचा बंगाली व्याकरणकार. याने व्याकरणशास्त्रावर पुढील ग्रंथ लिहिले आहेत—

धातुप्रदीप — पाणिनीच्या धातुपाठातल्या जवळ जवळ सर्व धातूंचे विवेचन या ग्रंथात केलेले आहे. यात त्याने व्याकरणाची पद्धतशीर माहिती दिली असून, उदाहरणेही भरपूर दिली आहेत. सायणाचार्यांनी बहुतेक महत्त्वाच्या धातूंच्या बाबतीत मैत्रेय रक्षिताला प्रमाण मानले आहे. त्यामुळ हा ग्रंथ अखिल भारतीय कीर्तीच्या ठरला आहे.

तंत्रप्रदीप — हा ग्रंथ संपूर्ण उपलब्ध नाही व बंगालखेरीज अन्यत्र त्याची प्रसिद्धीही नाही. मात्र जेवढा उपलब्ध आहे, तेवढ्यावरूनही मैत्रेय रक्षित हा व्याकरणशास्त्रातील सूक्ष्म भेद आणि मर्मस्थाने यांचे विवेचन करणारा बुद्धिमान व्याकरणकार होता, हे कळून येते.

दुर्घट — यात संस्कृत वाङ्मयातील अवघड आणि असमर्थनीय अशा शब्दप्रयोगांचे विवेचन असावे. हा ग्रंथही अनुपलब्ध आहे. मात्र मैत्रेय रक्षितानंतरच्या अनेक बंगाली ग्रंथकारांनी त्याचा उल्लेख केलेला आहे. [भा. कौ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याज्ञवल्क्य ऋषींची पत्नी. ही जनक राजाच्या मित्र
मैत्रेयी नावाच्या प्रधानाची मुलगी होती. सुप्रसिद्ध विदुषी गार्गी वाचक्नवी ही तिची मावशी होती. गार्गीचे मैत्रेयीवर फार प्रेम होते. तिनेच तिला वाढवले आणि विद्याही शिकवली. मैत्रेयी स्वभावतःच वैराग्यशील व अध्यात्मप्रवण होती. ती वयात आल्यावर तिचा बाप तिला अनुरूप असा वर शोधू लागला होता.

जनकाच्या सभेत याज्ञवल्क्य आला असता गार्गी व उद्दालक यांच्याशी त्याचा संवाद झाला. त्या वेळी मैत्रेयी तिथे उपस्थित होती. त्या सभेत याज्ञवल्क्याने अनेक विद्वानांना वादात जिंकले. त्या वेळचे त्याचे तेज, विद्वत्ता, वाक्चातुर्य आणि सुंदर रूप पाहून मैत्रेयी त्याच्यावर अनुरक्त झाली. पुढे मैत्रेयी व याज्ञवल्क्य यांचे लग्न झाले. पण गृहस्थाश्रम स्वीकारूनही ती विरक्तच राहिली. तिची अध्यात्मज्ञानाची आवड दिवसेंदिवस वाढतच गेली. थोड्याच कालात ती ब्रह्मवादिनी म्हणून प्रसिद्ध झाली.

काही कालानंतर याज्ञवल्क्य गृहस्थाश्रम सोडून संन्यास घ्यायला निघाला. त्या वेळी त्याने आपली संपत्ती मैत्रेयी आणि कात्यायनी या दोघी भार्यांना वाटून द्यायचे ठरवले. त्याचा तो प्रस्ताव ऐकताच मैत्रेयी त्याला म्हणाली. 'भगवन, या धनाने जरी सारी पृथ्वी मला मिळाली, तरी मी अमर होईन का?' त्यावर याज्ञवल्क्य म्हणाला. 'नाही. धनाने तुझे जीवन श्रीमंत मनुष्याप्रमाणे भोगमय होईल. संपत्तीने कधी अमृतत्व मिळत नसते.' त्यावर मैत्रेयी बोलली. 'ज्यांनी मी अमर होऊ शकत नाही, ते भोग घेऊन मी काय करू! तुम्ही अमृतत्वाचे जे साधन जाणता, तेच मला सांगा.' (बृहदा. ४.५.३–४)

त्यावर याज्ञवल्क्य अत्यंत प्रसन्न झाला. त्याने तिला जवळ बसवून घेतले आणि तिला अमृतत्व मिळवून देणारे आत्मज्ञान उपदेशिले. त्या आत्मज्ञानाने मैत्रेयी कृतार्थ झाली. [उ. अ.; योगीश्वर याज्ञवल्क्य – रा. गो. कोलंगडे, १९४४]

मैत्रेयी उपनिषद् हे सामवेदाशी संबद्ध आहे. हे तीन अध्यायांचे आहे. बृहद्रथ नावाचा राजा आपल्या ज्येष्ठ पुत्राला राज्यावर बसवून अरण्यात गेला. तिथे त्याने सूर्याकडे दृष्टी लावून उग्र तप केले. त्या तपाचे फल म्हणून आत्मज्ञानी शाकायन्य ऋषी त्याला भेटला. त्याने राजाला आत्मज्ञान उपदेशिले. आत्मज्ञान होण्यासाठी प्रथम चित्तशुद्धी झाली पाहिजे, हे शाकायन्याने त्याला सांगितले. त्या विषयीचे दोन श्लोक (१.५–६) असे–

चित्तमेव हि संसारस्तत्प्रयत्नेन शोधयेत् ।
यच्चित्तस्तन्मयो भवति गुह्यमेतत्सनातनम् ॥
चित्तस्य हि प्रसादेन हन्ति कर्म शुभाशुभम् ।
प्रसन्नात्मात्मनि स्थित्वा सुखमक्षय्यमश्नुते ॥

अर्थ – चित्त हाच सर्व विश्वपसारा होय. म्हणून प्रयत्नाने त्याची शुद्धी करावी. ज्याचे चित्त ज्या ठिकाणी जडते, तो त्या ठिकाणी तन्मय होतो. हे सनातन गुह्य आहे. चित्त प्रसन्न झाल्यानेच माणसाची शुभाशुभ कर्मे नष्ट होतात. प्रसन्नात्मा पुरुष आत्म्याच्या ठिकाणी स्थिर राहून अक्षय सुख उपभोगतो.

दुसऱ्या अध्यायात मैत्रेयाला महादेवाने 'सोऽहं' भावाचा व अभेदाचा उपदेश केला आहे. हे उपनिषद कर्मत्यागात्मक संन्यासाला महत्त्व देणारे आहे. जो अभेददर्शी आत्मज्ञानी व जीवन्मुक्त झाला, त्याला संध्यावंदनादी आवश्यक कर्मे लागू होत नाहीत, हे एका मजेदार कल्पनेने यात (२.१३–१५) सांगितले आहे. महादेव म्हणतो–

मृता मोहमयी माता जातो बोधमयः सुतः ।
सूतकद्वयसम्प्राप्तौ कथं सन्ध्यामुपास्महे ॥
हृदाकाशे चिदादित्यः सदा भासति भासति ।
नास्तमेति न चोदेति कथं सन्ध्यामुपास्महे ॥
एकमेवाद्वितीयं यद्गुरोर्वाक्येन निश्चितम् ।
एतदेकान्तमित्युक्तं न मठं न वनान्तरम् ॥

अर्थ – मोहरूपी माता मेली आहे. बोधरूपी मुलगा झाला आहे. अशी ही दोन सुतके (मरणाशौच व जननाशौच) प्राप्त झाली असता संध्यावंदन कसे करायचे! (आशौचात संध्या धर्मशास्त्राने निषिद्ध मानली आहे.) हृदयाकाशात चिद्रूपी सूर्य सार्वकाल प्रकाशमानच आहे. तो अस्ताला‌ही जात नाही व उदयालाही येत नाही. मग संध्या कशी करायची! (परब्रह्म) एकमेवाद्वितीय असल्याचे गुरुवाक्याने जे निश्चित झाले आहे, त्यालाच एकांत म्हटले आहे. मठ म्हणजे एकांत नव्हे आणि अरण्य म्हणजेही एकांत नव्हे.

तिसऱ्या अध्यायात आत्मज्ञानी पुरुष हा सर्वत्र स्वतःलाच पाहतो आणि सर्वदा समरूप होऊन शांत होतो, असे सांगून हे उपनिषद समाप्त केले आहे.

मैथिली ब्राह्मण ब्राह्मणांचा एक वर्ग. मिथिला भागात राहणाऱ्या ब्राह्मणांना हे नाव आहे. यांच्यांत श्रोतिय, योग्य, पंजीकार, नागर आणि जैवर असे पाच भेद आहेत. श्रोतिय लोक वेदपाठक म्हणून ओळखले जातात. श्रोतियांच्या तुलनेने योग्य ब्राह्मणांचा दर्जा कमी समजला जातो. परंतु या दोन्ही ब्राह्मणांमध्ये बेटीव्यवहार होतात. पंजीकार ब्राह्मण यजमानांच्या वंशावळी सांभाळणे आणि विवाह जमविणे हे व्यवसाय करतात. हे लोक बुद्धिजीवी आहेत.

यांच्यामध्ये मिश्र, ओझा, ठाकुर, पाठक, पूर, पादरी, चौधरी,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राय, सिंह, इ. उपाधी प्रचलित आहेत. [भा. ब्रा. जा. प्र.]

मैथिली भाषा व साहित्य

मैथिली ही बिहारमधील एक भाषा आहे. बिहारच्या दरभंगा, मुजफ्फरपूर, मोंघीर, भागलपूर, सहरसा, शहापूर आणि पूर्णिया या जिल्ह्यांत व नेपाळच्या रौताहत, सप्तरी, सरलाही, मोहतरी आणि मोरंग या जिल्ह्यांत प्राधान्याने ही भाषा बोलली जाते. प्राचीन काळी यातला बहुतांश प्रदेश मिथिला या नावाने ओळखला जात असल्यामुळे, त्या प्रदेशनामावरून तिथे बोलल्या जाणाऱ्या या भाषेला मैथिली हे नाव मिळाले. कोलब्रुकच्या मते ही स्वतंत्र भाषा नसून, बंगालीचीच एक पोटशाखा आहे. ग्रियर्सन मात्र तिला स्वतंत्र भाषा मानतो. आइने अकबरीतही तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा दिला आहे. वर्णरत्नाकरात या भाषेला अवहठ म्हटले आहे, तर विख्यात मैथिली कवी विद्यापती तिला अवहट्ठ किंवा देसिल बअना या नावानें उल्लेखितो.

दरभंगा हे या भाषेचे प्रधान केंद्र आहे. सुमारे दीड कोटी लोक ही भाषा बोलतात. या भाषेची एक स्वतंत्र लिपी असून, तिला तिरहुता किंवा मिथिलाक्षर असे नाव आहे. ही लिपी प्राचीन मागधीतून निर्माण झाली असून, बंगाली, उडिया व असमिया या लिप्यांशी तिचे बरेचसे साम्य आहे. अलिकडे मात्र या लिपीऐवजी देवनागरीचाच वापर होऊ लागला आहे.

प्राचीन मैथिली आणि बंगाली यांच्यांत खूप साम्य आढळते. मध्ययुगात या दोन्ही भाषांत आणखी देवाणघेवाण झाली. पंधराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत बंगाली विद्यार्थ्यांना शिकवायला मैथिली पंडितच असल्यामुळे मैथिलीचा बंगालीवर विशेष प्रभाव पडला. राजकीय दृष्ट्या बंगाली व मैथिली भाषेचे प्रदेश निकट असल्यामुळे त्या दोन्ही भाषांत अधिकाधिक साम्य निर्माण झाले. तथापि एवढे होऊनही बंगालीपेक्षा मैथिलीचे वळण, शब्दांची मोडणी-मांडणी वेगळी राहिली. मैथिलीमधे अ आणि ए या अक्षरांचे उच्चारण संथ गतीने होते. त्याचप्रमाणे क्रियापदरचना, ध्वनी व लिंग याही बाबतीत मैथिलीत बंगालीपेक्षा भिन्नत्व दिसून येते. पुढे दिलेल्या मैथिली आणि बंगाली वाक्यांवरून याची यथायोग्य कल्पना येईल.

मैथिली – यदि भातृ–स्नेहक सम्बन्ध विच्छिन्नभय जाएत नखन शीघ्रे फराक भय गेला पर दुष्ट आक्रमणकारी द्वारा सबहु गोटें अनायासे पराजित भय जएबा योग्य भय जाएब।

बंगाली– यदि भातृ– स्नेहेर बंधन विच्छिन्न हय ताहा हइले शीघ्र खण्ड–विखण्ड हइया दुष्ट आक्रमणकारी द्वारा तोमरा अनायासे पराजित हइते पारिबे।

मैथिली आणि बंगाली यांच्या शब्दांतही फरक आहे. उदा० बंगाली लून (मीठ) मैथिलीत नोन होते. बंगाली अत्ता (आई) मैथिलीत माय होते.

बंगालीप्रमाणेच मैथिलीचे असमिया, उडिया, भोजपुरी, सर्व बोली, इ. बोलीभाषांशी अनेक बाबतींत साम्य आहे आणि तरीही मैथिलीचे वेगळेपण स्पष्टपणे दृष्टोत्पत्तीस येते. भाषादृष्ट्या मैथिली आणि मगही यांच्यांत जवळजवळ मुळीच भेद नाही. आठव्या शतकातील सरहपादाची मगहीतील रचना व तेराव्या शतकातील ज्योतिरीश्वर ठाकूर यांच्या मैथिलीतील वर्णरत्नाकर किंवा त्याच्या पाठोपाठ विद्यापतीने लिहिलेल्या कीर्तिलता यांतील काव्यरचना यांची तुलना केली असता हे लक्षात येते.

मैथिलीच्या एकूण सात बोली असून, त्यांची नावे व त्या ज्या प्रदेशांत बोलल्या जातात, त्या प्रदेशांची नावे अशी–

(१) आदर्श मैथिली– उत्तर दरभंगा.

(२) दक्षिणी मैथिली– दक्षिण दरभंगा, पूर्व मुजफ्फरपूर, उत्तर मोंघीर, उत्तर भागलपूर व पश्चिम पूर्णिया.

(३) पूर्वी मैथिली किंवा खोट्टा बोली– पूर्व पूर्णिया, माल्दा व दिनाजपूर.

(४) छिका– छिकी– दक्षिण भागलपूर, उत्तर संथाळ परगणा व दक्षिण मोंघीर.

(५) पश्चिमी मैथिली–पश्चिम मुजफ्फरपूर व पूर्व चंपारण.

(६) जौलही मैथिली– उत्तर दरभंग्यातील मुसलमान ही बोली बोलतात.

(७) केंद्रीय जनसाधारण मैथिली– पूर्व सोतिपुराची व मधुबन या विभागातील खालच्या स्तरातील लोकांची बोली.

मैथिली साहित्य – मैथिली साहित्येतिहास पुढील तीन कालखंडांत विभागला आहे–(१) आदिकाल (इ. स. १३००–१६००) (२) मध्यकाल (इ. स. १६००–१८६०) व (३) आधुनिक काल (१८६० ते आजतागायत). सामान्यपणे आदिकालात काव्य, मध्यकालात नाटक आणि आधुनिक कालात गद्य साहित्य प्रसिद्धीला आले.

आदिकाल – या कालाच्या पूर्वार्धात समृद्ध साहित्य आढळत नाही. वाचस्पतिमिश्राची भामती व सर्वानंदाची अमरकोशावरील टीका यांत मैथिलीचा वराच आढळ होतो. मैथिली साहित्याला खऱ्या अर्थाने उत्कर्षाचे दिवस आले ओइनवार राजांच्या कारकिर्दीत. या कालखंडात ज्योतिरीश्वर ठाकूर, विद्यापती, गोविंददास, महीनाथ ठाकूर, लोचन झा, रामदास झा, हर्षनाथ झा, इ. नामवंत कवी उदयाला आले व त्यांनी आपल्या काव्यकृतींनी मैथिलीचे नभोमंडल झळाळून टाकले. ओइनवार राजवंशातल्या राजा लक्ष्मीनारायण, राजा शिवसिंह व राणी लखिमा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मादेवी यांनीही काही काव्यकृती निर्माण केल्या. हे शासक रसिक होते आणि कवी व लेखक यांचे चाहते होते.

या सर्व कविमंडळात विद्यापती हा सर्वश्रेष्ठ कवी समजला जातो. मैथिलिकविकोकिल या गौरवपूर्ण उपाधीनेच तो ओळखला जातो. आज उपलब्ध असलेल्या त्याच्या एकूण १४ रचनांपैकी कीर्तिलता, कीर्तिपताका व पदावली या तीनच रचना मैथिली भाषेतल्या आहेत. पहिल्या दोन काव्यांत कीर्तिसिंह व शिवसिंह या राजांच्या पराक्रमांचे वर्णन असून, तिसरीत विद्यापतीच्या राधाकृष्णविषयक शृंगारवर्णनाची छोटी – मोठी पदे संकलित केली आहेत. या पदावलीची भाषा ललितमधुर असून, वर्णने प्रत्ययकारी आहेत. नुकत्याच न्हाऊन आलेल्या राधेचे विद्यापतीने केलेले वर्णन असे –

नहाइ उठल तीर राइ कमलमुखि ।
समुख हेरल वर कान । गुरुजन संग लाज धनि नतमुखि ।
कइसन हेरब बयान । सखि हे अपरुब चातुरि गोरि ।
सब जन तेजि कए अगुसरि संचरि । आड़ बदन तहँ फेरि ।
तँहि पुनि मोति हार तोरि फेंकल । कहइत हार टुटि गेल ।
सब जन एक-एक चुनि संचरु स्याम-दरस धनि लेल ।
नयन चकोर कान्हु-मुख ससि वर । कएल अमिय-रस-पान ।
दुहु दुहु दरसन रसहु पसारब । कबि विद्यापति भान ।।

अर्थ – कमलमुखी राधा स्नान करून नदीतीरावर आली आणि तिने कृष्णाला पाहिले. तिच्याबरोबर तिच्या घरची ज्येष्ठ माणसे होती आणि ती लाजेने चूर होऊन पायाकडे पाहत होती. मग तिला श्रीकृष्णाकडे कसे पाहता येणार ? परंतु हे सखी, ती मोठी चतुर मुलगी होती. ती आपल्या घरच्या माणसांना सोडून एकटीच पुढे आली आणि मग तिने मान मागे वळवली. नंतर तिने मोत्यांचा हार तोडून मागे फेकला व 'हार तुटला' असे म्हणू लागली. सगळे लोक एक एक करून सांडलेले मोती वेचू लागले. तेवढ्यात तिने श्रीकृष्णाकडे पाहिले. कवी विद्यापती म्हणतो, राधेच्या नेत्ररूपी चकोरांनी श्रीकृष्णाच्या मुखरूपी चंद्राचा अमृतरस प्राशन केलाच; पण त्याशिवाय, त्या दोघांनी तो अमृतरस इकडे तिकडे उधळून दिला.

मध्यकाल – या कालातले महत्त्वाचे साहित्य नेपाळात रचले गेले. ओइनवार राजवंशाच्या अस्तानंतर त्यांच्या दरबारातले कवी-लेखक व विद्वान पंडित नेपाळातल्या मल्ल राजांच्या दरबारी गेले. या काळातल्या मैथिली साहित्यात प्राधान्याने संस्कृत नाटकांच्या आधारे नाट्यलेखन झाले. मैथिलीतले स्वतंत्र नाट्यसाहित्य कीर्तनिया या नावाने ओळखले जाते. यात गद्य संवाद कमी व संगीत संवाद अधिक असत. यात नृत्यालाही विशेष प्राधान्य असे. हे नाट्य भक्तिप्रधान असून, त्यात मुख्यत्वे शिव व कृष्ण यांची चरितकथा वर्णिली जाई. गोरक्षचरित, नलविजय, आनंदविजय, पारिजातहरण, इ. कीर्तनिया नाटचे प्रसिद्ध आहेत.

आधुनिककाल – या कालातला श्रेष्ठ कवी चंदा झा हा होय. याचे प्रमुख ग्रंथ असे – मैथिली रामायण, पुरुषपरीक्षाक मैथिली टीका, चंद्रपद्यावली, महेशवाणीसंग्रह, गीतिसुधा आणि छंदोग्रंथ. याच्या साहित्यकृतींत नव्या-जुन्या दोन्ही विचारप्रणालींचा संगम दिसून येतो. त्याने काव्य, नाटक व गद्य या तीनही साहित्यप्रकारांची निर्मिती केली आहे. मैथिली रामायण ही त्याची एक अत्यंत प्रभावी कलाकृती आहे. विद्यापतीच्या पुरुषपरीक्षा या ग्रंथाचा मैथिली अनुवाद करून चंदा झाने मैथिलीच्या विकासाला हातभार लावला आहे. त्याच्या काव्यकृतींचा तर त्याचे समकालीन व नंतरचे कवी यांच्यावर विलक्षण प्रभाव दिसतो. त्याचे अनुकरण करणाऱ्यांत महाकाव्य, खंडकाव्य, गीतिकाव्य या काव्यशाखा पल्लवित करणारे विंध्यनाथ झा, गणनाथ झा, जीवन झा, रघुनंदनदास, लालदास, बदरीनाथ झा, इ. कवी अग्रगण्य समजले जातात. मैथिली साहित्याचे आलोचनकार श्री जयकांत मिश्र हे इ. स. १८८०–१९०७ या कालखंडाला 'चंदा झा युग' अशा शब्दांत गौरवतात. ग्रियर्सन, नगेंद्रनाथ गुप्त, इ. भाषाभ्यासकांना चंदा झाने सर्व प्रकारचे साहाय्य देऊन मैथिलीच्या संशोधनाला हातभार लावला. चंदा झाची भाषा अलंकारप्रचुर व शब्दरचना मोहक आहे. त्याच्या मैथिली रामायणातील एक अवतरण पुढीलप्रमाणे –

भालु ओ प्रचंण्ड कोश–जाय–जाय झट्ट झट्ट ।
राक्षसेन्द्र बीर का पछारि मारि पट्ट पट्ट ।।
शैलखण्ड वृक्ष हाथ सौं उखाड चट्ट चट्ट ।
राक्षसेन्द्र संन्य झुण्ड मुण्ड फोड फट्ट–फट्ट ।।

भावार्थ – प्रचंड शरीराचा तो जांबुवंत लांब लांब ढांगा टाकीत गेला आणि त्याने राक्षसराज रावणाच्या वीरांना पटापट मारले. मोठमोठ्या पहाडांचे दगड व वृक्ष शंभर शंभर हातांनी एका वेळी चटचट उचलले व उखडले जाऊ लागले. राक्षसराज रावणाच्या सैन्याच्या झुंडींवर त्याने ते फेकले व त्यांची मुंडकी फटाफट फोडली.

चंदा झाच्या नंतर हरखनाथ झा, श्रीकृष्ण ठाकूर, फतुर कवी, तुलापती सिंह, इ. कवी उदयाला आले. हरखनाथ झा लक्ष्मीश्वरसिंहाचा दरबारकवी असून, त्याने प्राधान्याने कविता आणि नाटके लिहिली. श्रीकृष्ण ठाकुराने उपदेशपर बोधकथांची निर्मिती केली व काही गीतेही लिहिली. तुलापति सिंहाने गद्य-पद्य अशी उभय प्रकारांची साहित्यरचना केली. मदनराजचरित ही त्याची कादंबरी आणि गीतपंचाशिका हा काव्यग्रंथ विशेष गाजला. फतुर कवीनेही काही श्रेष्ठ काव्यकृती लिहिल्या. विंध्य-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाथ व गणनाथ या दोघा झाबंधूंनी काव्यक्षेत्रात नाव मिळवले. त्या दोघा बंधूंची काव्यकृती विघ्नाथ–गणनाथपदावली या नावाने प्रसिद्ध आहे. या झाबंधूप्रमाणेच आणखी एक झा–बंधूंची जोडी मैथिली साहित्याला ललामभूत ठरली. भानुनाथ आणि बबुजन ही त्यांची नावे होत. या दोघांनी नाटचसृष्टी गाजवली. नटाह्वान काव्य व प्रभावतीहरण या भानुनाथ झाच्या साहित्यकृती विशेष नावाजल्या गेल्या.

विसाव्या शतकात मैथिली गद्याचा विकास होण्यासाठी मैथिलीहितसाधन, मिथिलामोद, मिथिलामिहिर, इ. नियत-कालिकांचा खूप उपयोग झाला.

लोकसाहित्य – मैथिली लोकसाहित्यात कथाकहाण्यांपेक्षा लोकगीतेच अधिक आहेत. श्री. तेजनारायण लाल यांनी या लोकगीतांचे पुढील पाच प्रकारांत वर्गीकरण केले आहे –

(१) धार्मिक आदर्शपर – यात तंत्रमंत्र व जादूटोणा या विषयींची; तसेच शिव, शक्ती, विष्णू, नदी व वृक्ष यांच्या उपासनेविषयींची आणि सण–उत्सव या संबंधींची गीते येतात.

(२) सामाजिक आदर्शपर – लोकांची सेवा व सुधारणा तसेच तप, त्याग, इ. गुणांच्या विषयीची गीते यात येतात.

(३) कुटुंबविषयक – माणसाच्या जीवनातील जन्म, जरा, मृत्यू, आजार इत्यादींविषयीची आणि त्याच्या आप्तस्वजनांविषयीची गीते यात येतात.

(४) राजकीय आदर्शविषयक – राष्ट्रीय चेतना आणि उत्तम प्रशासनव्यवस्था यांच्याविषयीची गीते यात येतात.

(५) आदर्श जीवनविषयक – कर्तव्यपालन, साधे पण उच्च जीवन, नीतिमत्ता, इ. सद्गुणांविषयीची गीते यात येतात.

साप, विंचू, भूत-पिशाच, इ. उतरविण्याचे मंत्र हे मैथिली लोकसाहित्याचे एक वैशिष्टय समजले जाते. त्यांतला भूत उतरविण्याचा एक मंत्र असा –

नमो गणेशाय। सरस रसती जय जयकाली तोरा सोभौ मोतीहार, मोरा देह। विद्या भइरज से मालीन गारवे फूल तैसे विद्या होए, सब गोरीक भूत गनपति हाथ, पोथी चन्दन काठ। जे माता बिसरी दे देंक ठण्डाए, दोहाइ ईश्वर महादेव गौरा पार्वतीक।

मिथिलेतील शुभकार्यप्रसंगी नचारी नामक एक लोकगीत गायिले जाते. या गीताचा तोंडावळा विनोदी असला, तरी प्रकृती गंभीर असते.

मिथिला प्रदेशात प्राचीन काळापासून शिव आणि शक्ती यांचे विशेष माहात्म्य आहे. मैथिली लोकगीतांतून याचा पुरेपूर प्रत्यय येतो. गोसाउनी नामक शक्तिविषयक गीत गायिल्याशिवाय कोणत्याही धार्मिक उत्सवाचा प्रारंभ होत नाही. इतकेच नव्हे; तर सर्वच धार्मिक संस्कारप्रसंगी हे गीत गायिले जाते.

श्रावण शुद्ध तृतीयेच्या दिवशी नवविवाहित स्त्रीला कुंकवाच्या जागी निरांजन, समई किंवा नंदादीप यांच्या ज्योतीने डाग देतात आणि डागलेल्या जागी टरारून फोड आले, की त्या स्त्रीचे सौभाग्य अक्षय टिकेल, असे मानतात. या प्रसंगी जी गीते गातात, त्यांना मधुसावनी असे म्हणतात. या मधुसावनी गीतांप्रमाणेच फाग म्हणजे होळी या सणाविषयीची गीतेही प्रसिद्ध आहेत. मिथिला प्रदेशात मधुसावनी, फाग, छठ(षष्ठीपूजा), इ. उत्सवांना विशेष महत्त्व आहे. त्या प्रसंगी त्या त्या विषयाची संबंधित लोकगीते गाऊन लोक आनंदाचा जल्लोष करतात. छठगीते प्राधान्ये करून सूर्यस्तुतिपर असतात. [हि. वि. को.; परिषदपत्रिका, जाने. १९६८; मै. लो. अ.]

मैनाक एक पर्वत. हा हिमालय व मेना यांचा पुत्र होय. याच्याविषयी कथा आहे, ती अशी– इंद्राने क्रुद्ध होऊन जेव्हा सर्व पर्वतांचे पंख छाटले, त्या वेळी त्या संकटातून वाचण्यासाठी मैनाक पर्वत समुद्रात दडून बसला. त्यामुळे त्याचे पंख शाबूत राहिले.

हा पर्वत नेमका कोणता याविषयी विद्वानांत मतभेद आहेत. श्री. नंदलाल दे यांच्या मते हिमालयाची शिवालिक पर्वतश्रेणी म्हणजे मैनाक होय. पार्जिटरच्या मते अल्मोडा जिल्ह्याच्या उत्तरेस गंगा नदी जियून उगम पावते, त्याच्या जवळची पर्वतश्रेणी म्हणजे मैनाक होय. रामायणात भारत व लंका यांच्या मधल्या समुद्रात असलेला एक काल्पनिक पर्वत, असे त्याचे स्थान सांगितले आहे. हेच मत बऱ्याच विद्वानांनी ग्राह्य धरले आहे. महाभारत, कूर्म पुराण, मार्कंडेय पुराण, इ. ग्रंथांतून मैनाक पर्वताचे उल्लेख आढळतात. [का. भा.]

मैय्पोरुळ तमिळनाडमधील त्रेसष्ट नायन्मारांपैकी एक. हा एक राजा होता. तो शिवभक्तांचा सदैव सन्मान करीत असे. त्याचा फायदा घेऊन त्याच्या शत्रूने साधुवेषात त्याच्या अंतःपुरात प्रवेश मिळविला आणि ‘ मी तुला उपदेश देतो ’ असे म्हटले. त्या मिषाने तो राजाला ठार मारणार होता. पण राजाच्या एका सेवकाला त्याचे हे कपट उमगले आणि त्याने त्या दुष्टाला दूर केले. राजाने त्याला सन्मानपूर्वक गावाबाहेर घालविण्याची आज्ञा दिली. राजाच्या या उदार कृत्यावर शिव प्रसन्न झाला आणि त्याने त्याच्यावर कृपेचा वर्षाव केला. [पे. पु.]

मैलार म्हैसूर राज्यातील खंडोबाचे एक प्रसिद्ध पुण्यक्षेत्र. बेल्लारी जिल्ह्याच्या हडगल्ली तालुक्यात तुंगभद्रा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नदीच्या काठी हे गाव आहे. इथल्या खंडोबालाही मैलार हेच नाव आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात उद्भवलिंग, धातूची भोगमूर्ती आणि मृण्मैलार (म्हणजे मातीची खंडोबामूर्ती) आहे. वैशाख शुद्ध १२ ला मैलार-माळव्व यांच्या विवाहाचा सोहळा, तसेच कार्तिक मासात सबंध महिनाभर दीपोत्सव, मार्गशीर्ष शु. १ ते ६ पर्यंत खंडोबाचे नवरात्र, पौषात धनुर्मास व रथसप्तमीला गावाबाहेरच्या कुरवत्यव्वाच्या भेटीस जाण्याचा कार्यक्रम, हे इथले नैमित्तिक उत्सव होत. याशिवाय, माघ शु. १५ ते कृष्ण ३ पर्यंत इथे मोठी जत्रा भरते. त्याप्रसंगी लाखदीडलाख यात्रेकरू जमतात. मुरळ्यांना इथे कायद्याने बंदी असल्यामुळे देवापुढे केवळ वाघ्येच नाचतात. [खंडोबा]

मैलार-देवरगुड्ड कर्नाटकातील खंडोबाचे एक प्रसिद्ध स्थान. पुणे–बंगळूर लोहमार्गावर, पुण्यापासून ३९५ मैलांवर मैलार-देवरगुड्ड नावाचे एक स्थानक आहे. तिथून पूर्वेला चार मैल दूर एका टेकडीवर खंडोबाचे देऊळ आहे. देवरगुड्ड म्हणजे देवाची टेकडी. इथले देऊळ पूर्वाभिमुख असले, तरी प्राकाराचे महाद्वार उत्तराभिमुख आहे. दरवाजाच्या बाहेर हेगडे-प्रधानाचे स्वतंत्र मंदिर असून, त्यात त्याची विष्णुस्वरूप मूर्ती आहे. प्राकारात घृतमारी (तुप्पद माळव्व)चे छोटे मंदिर आहे; तसेच गंगिमाळव्वचेही मंदिर आहे. मुख्य मंदिराच्या गाभाऱ्यात मैलाराचे स्वयंभू लिंग, मार्तंडभैरवाची चतुर्भुज शिलामूर्ती आणि आणखी दोन धातुमूर्ती आहेत. स्वयंभू लिंगाचे दर्शन स्त्रियांनी घ्यायचे नाही, असा इथला संकेत आहे. इथे ज्येष्ठ शुद्ध १४ ला रंगोत्सव व आश्विनात नवरात्रोत्सव असतो. दसऱ्याच्या दिवशी गोरप्प म्हणजे वाघ्ये देवाच्या धनुष्यावर चढून भविष्य सांगतात आणि कंचवीर पवाड करतात. पवाड करणे म्हणजे छोटी अणकुचिदार पहार पोटरीत आरपार मारून घेणे. आश्विन वद्य ९ या दिवशी देव कुरवत्यव्वाच्या भेटीला जातो. चंपाषष्ठीचे नवरात्र व माघी पौर्णिमेची यात्रा या दोन्ही प्रसंगी शेकडो यात्रेकरू इथे जमतात. इथले वाघ्ये बहुशः धनगर आहेत. मुरळ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. [खंडोबा]

मैलारपूर मराठवाड्यातील एक खंडोबाचे स्थान. हे गाव बीदर-उद्‌गीर मार्गावर बीदरच्या वायव्येस सुमारे दहा मैलांवर आहे. इथल्या खंडेरायाच्या मंदिराच्या परिसरात अनेक पुरातन अवशेष दिसतात. मंदिर बंदिस्त आकारात पूर्वाभिमुख असून, गाभाऱ्यात चतुर्भुज मार्तंड भैरवाच्या अनेक मूर्ती आहेत. सबंध मार्गशीर्ष महिन्यात यात्रेकरू इथे येत असले, तरी चंपाषष्ठीपासून मार्गशीर्ष शु. १० पर्यंत इथला मुख्य वार्षिक उत्सव असतो. मार्गशीर्ष अमावास्येच्या दिवशी हजारो यात्रेकरू इथे जमतात. प्राचीन वाङ्मयात वारंवार उल्लेखिले जाणारे मैलार खंडोबाचे प्रेमपूर किंवा पेंबर ते हेच होय. इथला खंडोबा हा संत दासोपंताचा कुलदेव होता. [खंडोबा]

मैलारलिंग म्हैसूर राज्यातले खंडोबाचे एक प्रसिद्ध स्थान. धारवाडपासून सुमारे दोन मैलांवर एका टेकडीवर पूर्वाभिमुख असे हे खंडोबाचे देऊळ आहे. मंदिरात मैलाराची चतुर्भुज मूर्ती आहे. इथल्या मंदिराच्या खांबांवर काही फारसी लेख दिसतात. त्यावरून असे वाटते की, पूर्वी या मंदिराचे मशिदीत रूपांतर झाले असावे. इ. स. १७५३ साली पेशव्यांनी धारवाडवर स्वामित्व प्रस्थापित केल्यावर या मंदिराचे मशीदस्वरूप घालवून त्यात मैलारलिंगाची पुनः प्रतिष्ठा केली, असे धारवाड गॅझेटियरवरून कळते. [खंडोबा]

मैलारी भिक्षेकऱ्यांची एक जात. यांची वस्ती म्हैसूर प्रदेशातील कोलार, कडूर आणि शिमोगा या भागात आढळते. इतर ठिकाणी असणाऱ्या या लोकांना काच विरलू व वीरभट्टलू अशी नावे आहेत. याशिवाय सर्व मैलारी लोक बल्ला जंगम म्हणूनही ओळखले जातात. ही वलिजांची एक पोटजात असावी, असे म्हणतात. काहींच्या मते ही राजमहेंद्रांचीच एक पोटजात आहे.

कोमटी लोकांचे रक्षण करण्याचे काम यांच्याकडे होते. त्यानंतर प्रत्येक कोमटी कुटुंबाकडून यांना प्रतिवर्षी आणि प्रत्येक विवाहासाठी काही ठराविक रक्कम मिळू लागली. कोमटयांकडे लग्न झाल्यावर तिसऱ्या दिवशी हे त्यांच्या देवतेचे पूजन करतात. त्या वेळी त्यांना भगवी वस्त्रे परिधान करावी लागतात.

मैलारी कितीही श्रीमंत असला, तरी तो कोमटयांकडे जाऊन भिक्षा मागतो. प्रत्येक मैलारी कुटुंबाची ठराविक कोमटी कुटुंबे असतात. त्यांवर दुसरा मैलारी आक्रमण करीत नाही.

मैलारी जातीच्या अग्निपार्टी, एनिकोपल्ली, जुगंतू, किडमंनती, मुद्दारी, नागिदल वादलू व यनिगल वंदलू अशा सात पोट जाती आहेत.

विवाहप्रथा – मैलारांचा विवाहसमारंभ वधूगृही होतो. त्यापूर्वी साखरपुडा होतो. या प्रसंगी वधूला नव्या वस्त्रांचा आहेर करतात. निशलो वृक्षाच्या झाडाला जोडून लग्नमंडप उभारतात. विवाहाच्या दिवशी वधूचे आई–बाप एकभुक्त राहतात. लग्नात एक नवे भांडे तांदुळांनी भरून आणि त्यावर गुळाचा खडा ठेवून ते भांडे दोऱ्याने सुतवितात. मग त्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हळद-कुंकू वाहतात. एका नव्या शेगडीवर दूध तापत ठेवतात. दूध उतू गेले, तर आरंभलेला विवाह सुखकर होईल; असे समजतात. यानंतर जातीमधील वृद्ध स्त्री-पुरुषांना पानसुपारी देतात.

देवधर्म – हे लोक शिवोपासक आहेत. जे शिवलिंगाची पूजा करतात, त्यांना मैलारी शिवलिंगम असे म्हणतात. कार्तिकातल्या सोमवारी हे गंगम्म व मरीअम्म यांची पूजा करतात. जरूर तेव्हा ब्राह्मण पुरोहित बोलावून त्याच्या करवी सर्व धार्मिक कृत्ये करतात.

यांच्यांत जातपंचायत असते. पंचायत प्रमुखाला कुलपेट्टा असे म्हणतात. त्याच्या हाताखाली एक मदतनीस असतो; त्याला कोळकर म्हणतात. विवाहाच्या वेळी पंचायतप्रमुख अध्यक्ष म्हणून काम पाहतो. त्याचप्रमाणे भांडण-तंटे मिटविणे, गुन्हेगारांना शिक्षा करणे, इ. कामेही याला करावी लागतात. मानाचा पहिला विडा याला मिळतो.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना पुरतात. बारा दिवस सुतक पाळतात. हे वार्षिक श्राद्ध करीत नाहीत; परंतु ब्राह्मणांना शिधा व कापड देतात; ज्ञातिभोजनही घालतात. [मै. ट्रा. का.]

मैहर

एक प्राचीन नगर. हे नगर मध्य प्रदेशातील सतना जिल्ह्यात आहे. इथे एक शिवमंदिर व शारदामातेचे मंदिर आहे. हे स्थान प्राचीन काली तांत्रिक साधनेचे प्रधान केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. इथूनच शारदादेवी काश्मीरमध्ये गेली असे सांगतात. वसंतपंचमी, नवरात्र, इ. प्रसंगी इथे मोठ्या यात्रा भरतात. यात्रेच्या वेळी अनेक तांत्रिक साधक आजही अनुष्ठानासाठी इथे येतात.

मैहर गावापासून सुमारे चार मैलांवर एका टेकडीवर शारदेचे मंदिर आहे. त्याविषयी दंतकथा सांगतात, ती अशी –

दसऱ्याच्या दिवशी देवीच्या पूजनासाठी स्वतः आल्हा हा वीरपुरुष येतो. दुसऱ्या दिवशी सकाळी चंदनगंध व त्यावरील अक्षता देवीच्या कपाळी दिसतात.

शारदेच्या मंदिरापासून दोन-तीन फर्लांगावर शिवमंदिर आहे. हे मंदिर म्हणजे शिल्पसौंदर्याचा एक उत्तम नमुना समजला जातो. या मंदिरशिल्पावर गुप्तकालीन शिल्पाचा प्रभाव दिसतो. त्याच्या सभागृहातील स्तंभांवर परिचारिकांच्या उत्तम मूर्ती खोदल्या आहेत. त्यांच्या हातांत चवऱ्या व कमळे आणि शरीरावर अलंकार आहेत. या मंदिराचे तोरणही उल्लेखनीय आहे. ही दोन्ही मंदिरे इ. स. च्या बाराव्या अथवा तेराव्या शतकात बांधली गेली आहेत.

याव्यतिरिक्त या मंदिरांच्या परिसरात अनेक सुंदर मूर्ती आहेत; पण त्या अगदी विच्छिन्न झालेल्या आहेत. [शो. प.]

मोंडारू

भिक्षेकऱ्यांची एक जात. या लोकांची वस्ती म्हैसूर प्रदेशात आढळते. यांच्या उत्पत्तीसंबंधी एक कथा सांगतात, ती अशी –

बेडा नावाच्या जातीच्या एका दांपत्यापासून मोंडारूंची उत्पत्ती झाली. या दांपत्याला आपण सगोत्री आहो, हे माहीत नव्हते. पुढे त्यांना व त्यांच्या संततीला लोकांनी वाळीत टाकले. हेच लोक पुढे मोंडारू म्हणून ओळखले जाऊ लागले. तेलुगु भाषेत यांनाच बंडा असे म्हणतात.

या जातीचे राहणीवरून पाच वर्ग पडले आहेत, त्यांची नावे अशी– (१) उरू मोंडारू (२) बंडा (३) ककालू मोंडारू (४) शिखंडी मोंडारू व (५) कस्तुरी मोंडारू.

उरु मोंडारू लोक स्वतःला इतर मोंडारूंपेक्षा श्रेष्ठ समजतात. बंडा लोक सदैव भटकत असतात. ककालू मोंडारू कावळ्याचे मांस खातात, म्हणून त्यांना हे नाव मिळाले आहे. शिखंडी लोक हिजड्यासारखे हावभाव करून भिक्षा मागतात आणि कस्तुरी मोंडारू अंगाला शेण फासून भिक्षा मागतात. याशिवाय यांच्यांत गावरड्डी, कमाडुला माडीबुटला, मैलुरसांपसाला टेल्ला, मेतला असेही पोटभेद आहेत.

हे लोक प्राधान्याने तेलुगू व डोंबारी जातीची भाषा बोलतात. त्याशिवाय ते जिथे भिक्षेला जातात, तिथली भाषा बोलण्याचाही प्रयत्न करतात. आपल्या जातीच्या माणसाला हे माकरीगाडू असे म्हणतात.

भिक्षा मागणे हा यांचा प्रमुख व्यवसाय असला तरी, यांच्यातील काही लोक अलिकडे शेती करू लागले आहेत. कोणी भिक्षा वाढली नाही तर हे आपल्या शरीराला इजा करून घेण्याचा धाक घालतात, विविध प्रकारचे अंग विक्षेप करतात, ओकारा काढतात आणि तो ओक एका भोपळ्यात भरून घेतात. मादिग बेलदार यांच्याकडेही हे भिक्षा मागतात. स्वजातीच्या माणसाकडे हे भिक्षेला गेले, तर त्यांनी भिक्षा वाढलीच पाहिजे असा दुराग्रह हे धरीत नाहीत. बेड व मंडाला यांच्याकडे मात्र हे भिक्षा मागत नाहीत.

यांचा सामाजिक दर्जा निकृष्ट आहे. हे लोक अस्वच्छ असतात. ते गावाबाहेर तंबूत अथवा पालात राहतात. क्वचित पडक्या देवळांमध्येही वस्ती करतात. न्हावी लोक यांचे केस कापतात; पण नखे मात्र काढीत नाहीत.

विवाहप्रथा– या लोकांमध्ये बाल व प्रौढ या दोनही विवाहपद्धती रूढ आहेत. हे आतेबहीण किंवा मामेबहीण हिच्याशी विवाह करू शकतात. भाचीही वधू म्हणून चालते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सामान्यपणे मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. वधूपक्षाने या मागणीला मंजुरी दिली, तर मुलाकडील लोक वधूगृही जाऊन मुलीच्या बापाला पानसुपारी व चार रुपये देतात. या वेळी कांबळे अंथरणे नावाचा एक समारंभ करतात. हा समारंभ झाला, की लग्न जमल्याचे निश्चित होते.

लग्न समारंभ दोन-तीन दिवस चालतो. लग्नाचे पौरोहित्य जंगम किंवा ब्राह्मण करतो. लग्नाच्या दिवशी वधू-वरांना स्नान घालून नवी वस्त्रे नेसवतात. सायंकाळी मोठे मैदान शेणाने सारवून त्यावर घोंगडे अंथरतात. वधू-वरांना एकमेकांकडे तोंडे करून त्यावर बसवतात. त्यांच्या हातांत कंकण व हळकुंड बांधतात. वराजवळ एक व वधूजवळ एक अशा दोन टोपल्या तांदूळ व डाळ यांनी भरून त्या झाकून ठेवतात. या टोपल्या आणण्याचे काम सुवासिनी स्त्रिया करतात. मग नवरा-नवरीला हळद लावतात, त्यांच्या वस्त्रांना गाठी मारतात आणि दोघांनाही त्या दोन टोपल्यांना तीन प्रदक्षिणा घालायला लावतात. नंतर जेवणावळ होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी वधू शुभ्र वस्त्र नेसते. मग नवरा-नवरी पुनश्च एका घोंगड्यावर बसतात. वर हातात मंगळसूत्र घेऊन आपला डावा पाय नवरीच्या उजव्या पायावर ठेवतो आणि तिच्या गळयात मंगळसूत्र बांधतो. एवढे झाले, की लग्न-समारंभ समाप्त होतो. वधू-वर प्रौढ असतील, तर त्याच दिवशी गर्भाधान संस्कार होतो. लग्नाचा पहिल्या दोन दिवसांचा खर्च वराकडील मंडळी व तिसऱ्या दिवसाचा खर्च वधूकडील लोक करतात.

लग्न झालेल्या मुलीला न्हाण आले म्हणजे नारळ फोडून तिला मखरात बसवतात. नंतर चौथ्या दिवशी मुलीचा चुलता किंवा एखादा अविवाहित तरुण मखर किंवा झोपडी फाडून जाळून टाकतो. मुलगी स्नान करून आली म्हणजे तिचे नातेवाईक तिला नारळ, गूळ भाजलेले धान्य वगैरे वस्तू देतात.

यांच्यांत विधवाविवाहाला मान्यता आहे. परंतु विधवा स्त्री आपल्या दिराबरोबर लग्न करू शकत नाही. तिला लग्न करताना ज्ञातीला सहा रुपये दंड द्यावा लागतो आणि हुंड्याच्या रकमेतील निम्मी रक्कम मृत पतीच्या नातलगांना परत करावी लागते. अविवाहित पुरुष विधवेबरोबर लग्न करू शकतो. हा विवाह कोणत्याही दिवशी सायंकाळीच होतो. त्या वेळी कोणतीही सवाष्ण स्त्री तिथे उपस्थित नसते.

प्रसूतिप्रथा– स्त्री बाळंतीण झाली म्हणजे तिला एका निराळ्या खोलीत ठेवतात. तीन दिवस सुवेर पाळतात. भुता-खेतांची बाधा होऊ नये व दृष्ट लागू नये म्हणून खोलीच्या दरवाज्यावर एक जाळे टांगतात. मूल जन्मल्यावर त्याची नाळ कापून ती एका भांड्यात घालतात व ते भांडे बाळंतिणीजवळच ठेवतात. एक नारळ फोडून तो बाळंतिणीच्या झोपडीसमोर पुरतात व त्यावर मुलाला अंघोळ घालतात. मूल एक महिन्याचे झाले म्हणजे त्याच्या गळयात पांढऱ्या मण्यांची माळ घालतात. सातव्या वर्षी एखाद्या मंदिरात मुलाचे जावळ काढतात.

देवधर्म– हे लोक मरीअम्म व कोल्लपुरम्म यांना भजतात. वर्षातून एकदा एका मंगळवारी किंवा शुक्रवारी देवतेच्या नावाने एक दगड लिंबाच्या झाडाखाली बसवतात. त्याला डुकराचा बळी देऊन ते मांस प्रसाद म्हणून खातात. आषाढ शुद्ध एकादशीला गुरुमूर्तीची पूजा करतात.

मोंडारू जातीत जातपंचायत असते. प्रत्येक वर्गाचा एक प्रमुख असतो. त्यांची कार्यकक्षा ठरलेली असते. एक वर्ग दुसऱ्या वर्गावर आक्रमण करीत नाही. तसे केल्यास त्याला दंड होतो. पंचायतीच्या प्रमुखाला गुडीगडू असे म्हणतात. समाजातील भांडणे मिटविणे, हे याचे प्रमुख काम असते.

मर्तिकप्रथा– हे लोक मृतांना पुरतात. प्रेताला एका शुभ्र फडक्यात गुंडाळून ते स्मशानात नेतात. तिथे ते वस्त्र काढून नग्नावस्थेत त्याला पुरतात. मग तिथे आलेले लोक हात-पाय धुऊन ताडी पितात. ताडीचे काही थेंब अंगावर शिंपडून घेतात व घरी जातात. घरी गेल्यावर दिव्याला नमस्कार करतात.

तिसऱ्या दिवशी मृताच्या आवडत्या गोष्टी केळीच्या पानावर ठेवून मृताला पुरलेल्या जागी ठेवतात. अकराव्या दिवशी जिथे मृत्यू झाला असेल, ती घरातील जागा सारवून तिथे एका नव्या भांड्यात अन्न शिजवितात. तिथल्या अग्नीवर मृताचे नातेवाईक धूप घालून मृताला भुता-खेतांची बाधा होऊ नये म्हणून प्रार्थना करतात. हे लोक श्राद्ध करीत नाहीत, पण महालय मात्र करतात. [मै. ट्रा. का.]

मोंडिवड्डू भटक्या भिक्षेकऱ्यांची एक जात. या लोकांना लंडावाडू असेही नाव आहे. आंध्रमधील नलगुंडा आणि वरंगळ जिल्ह्यांत हे लोक प्रामुख्याने आढळतात. गाढवावर सामान लादून हे गावोगाव फिरत राहतात आणि मुक्कामाच्या जागी शिंदीच्या किंवा ताडाच्या पानांच्या झोपड्या उभारून त्यात राहतात. भिक्षा मागणे हा यांचा मुख्य उद्योग आहे. हे लोक फार आततायी आहेत. भीक मागतेवेळी पुरुषांच्या जवळ लोखंडी वांगड्या व सुऱ्या असतात. कोणी भिक्षा घातली नाही, तर हे छाती पिटून घेतात किंवा हाताला किंवा जिभेला आपल्या जवळच्या शस्त्राने जखम करून घेतात. त्यामुळे लोक भिऊन त्यांना भीक घालतात. त्यांच्या स्त्रिया मेंढ्यांची दोन हाडे एकमेकांवर आपटून भीक मागतात. याशिवाय यांच्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पैकी काहीजण डुकरे व गाढवे पाळून ती बाजारात विकतात; तर काही शेतीही करतात. या लोकांचे तेलुगू, गोंडल व सकंडीवरू किंवा अघोरी असे तीन पोटभेद आहेत. त्यांच्यांत परस्पर रोटीबेटीव्यवहार होत नाही.

हे लोक बहुतेक सर्व प्राण्यांचे मांस खातात. शिंदी पिणे यांना फार आवडते.

विवाहप्रथा – मुलामुलींचे विवाह लहानपणी किंवा मोठेपणी होतात. आते किंवा मामे बहिणीशी लग्न होते. देजाची पद्धत आहे. देजाची सर्व रक्कम दिल्यावर आणि वरपक्षाने चार जेवणे देण्याचे मान्य केल्यावर, मुलीच्या घरी लग्नमंडप उभारतात. लग्न मुलीच्या घरी होते. तांदुळांच्या चौकोनात दोन पाट मांडतात व वधू-वर त्यांवर शेजारी शेजारी बसतात. वधू-वरांचे पाय धुतल्यावर, वर वधूच्या गळयात मंगळसूत्र बांधतो. लग्नातील हाच प्रमुख विधी असतो.

विधवाविवाह अगदी साध्या पद्धतीने होतो. घटस्फोटित स्त्रीचा विवाहही साध्या पद्धतीने होतो.

हे लोक काही वेळा आपल्या मुली देवाला अर्पण करतात.

देवधर्म – हे लोक विभूतिधारी म्हणजे शैव आहेत. याशिवाय, ते येल्लम्म, पोचम्म, मरीअम्म, इ. देवतांनाही भजतात.

मृतकप्रथा – हे लोक मृतांना पालथ्या स्थितीत पुरतात. तिसऱ्या दिवशी पक्ष्यांना अन्नदान करतात व अकराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. हे आशौच पाळीत नाहीत किंवा श्राद्धही करीत नाहीत. मात्र एक वर्षाआड पेटत्या दिव्यांना पितरांचे प्रतिनिधी समजून, त्यांच्या समोर डुक्कर बळी देतात व त्यांचे मांस शिजवून खातात. [का. ट्रा. नि. डो.]

मोईनोद्दीन चिश्ती

(इ. स. ११४२–१२३६) भारतातील चिश्ती संप्रदायाचा आद्य प्रवर्तक. याला भारतातला इस्लामचा पहिला प्रचारक समजतात. याचा जन्म इराणमधल्या सिस्तान प्रांतातील संजर या गावी झाला. वयाच्या बाराव्या वर्षी याचा बाप निवर्तला. वारसाहक्काने त्याच्या वाटधाला एक बाग आली होती. तिची देखभाल करून तो राहत असे. पुढे इब्राहिम कलंदर या साधूच्या कृपेने तो ईश्वरभक्तीकडे वळला व आपले गाव सोडून समरकंद येथे आला. तिथे त्याने कुराण व इस्लामचे इतर धर्मग्रंथ यांचे अध्ययन केले. नंतर त्याने शेख उस्मान हारुनी या सूफी संताचा उपदेश घेतला. नंतर त्याने गुरूची सेवा केली आणि त्याच्या बरोबर मक्का–मदिनेची यात्राही केली. तिथून परत आल्यावर त्याने गुरूचा निरोप घेतला व तो भारताकडे निघाला. या बाबतीत त्याला ईश्वरी आदेश झाला होता, असे म्हणतात. प्रथम तो लाहोर येथे आला. तिथून तो मुलतानला गेला व नंतर अजमेर येथे येऊन स्थायिक झाला. या मार्गक्रमणात त्याने अनेक हिंदूंना मुसलमान बनवले. पृथ्वीराज चौहाणाच्या पराजयानंतर दिल्ली व अजमेर या भागांची राजसत्ता मुसलमानांच्या हातात गेली आणि त्यामुळे मोईनोद्दीनच्या धर्मप्रसाराला भरपूर वाव मिळाला.

भारतात आल्यावर मोईनोद्दीनने दोन लग्ने केली. त्याची एक बायको एका हिंदू सरदाराची कन्या होती. तिला त्याच्यापासून तीन मुलगे आणि एक मुलगी अशी चार अपत्ये झाली. अजमेरच्या वास्तव्यात त्याला हजारो शिष्य मिळाले. त्यांनी भारतात ठिकठिकाणी मठ स्थापले व सूक्तासूक्त मार्गांनी इस्लामचा प्रचार केला.

मोईनोद्दीनची राहणी साधी असे. तो इस्लाम धर्माची कर्तव्ये कसोशीने पाळीत असे व परमेश्वरभजनाच्या बैठकीत आनंदाने भाग घेत असे. म्हणूनच भारतातल्या सूफींना तो अग्रगण्य साधू वाटू लागला. त्याला गरीब नवाज, कुतुबुल मशा ऐरवीन, इ. निरनिराळ्या पदव्यांनी सूफी लोक संबोधितात. अनिसुल अखा वा दलिलुल आरफिन (आत्मसखा व साधकांची रक्षणे) या दोन ग्रंथांत त्याची बोधवचने ग्रथित आहेत. पहिल्या ग्रंथात त्याच गुरू उस्मान हारुनी याचीही बोधवचने आहेत.

साधकांच्या उपासनेत मोईनोद्दीनने पाच उपासनांचा समावेश केला आहे – (१) आईवडिलांची सेवा. (२) कुराणपठण. (३) संतांची सेवा. (४) मक्केची यात्रा व (५) गुरूची सेवा.

साधकांनी पुढील दहा गोष्टी पाळाव्या, असे तो सांगतो – (१) पूर्वज्ञान संपादन करणे (२) कोणाला त्रास न देणे (३) लोकांशी नेहमी सदुपदेशाच्या गोष्टी बोलणे (४) विनम्र भावाने राहणे (५) प्रत्येकाला प्रिय लेखणे (६) लोकांचा आदरसत्कार करणे (७) परमेश्वरी इच्छेत संतुष्ट राहणे (८) कष्ट सहन करणे (९) परमेश्वराची भक्ती करणे आणि (१०) शरणागतीची भावना ठेवणे.

अजमेर येथे मोईनोद्दीनचा दर्गा आहे. या दर्ग्याला अकबर, जहांगीर व शहाजहान या बादशहांनी भेटी देऊन दर्ग्याच्या इमारतीत, मशिदीत व मठात वेळोवेळी वाढ केली आहे. या दर्ग्यामुळेच अजमेरला दुसरी मक्का असे गौरवास्पद नाव मिळाले. दरवर्षी इथे उरूस भरतो व भारताच्या सर्व भागांतून लाखो मुसलमान त्याच्या दर्शनाला येतात. [सू. सं.]

मोगल चित्रशैली

भारतीय चित्रकलेच्या इतिहासात मोगलकालीन चित्रकलेला एक स्वतंत्र स्थान आहे. भारतात ज्या जुन्या चित्रशैली होत्या, त्यांहून भिन्न अशी ही शैली आहे. तिचे अंतरंग भारतीयच असले, तरी तिचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आविष्कार स्वतंत्र आहे. मात्र अजंटा शैलीत दिसून येणारा प्रतिभाविलास, रेषांची तरलता, आकारांचे सजावटी स्वरूप, भावदर्शन, इ. गुणांचा मोगल शैलीत अभाव दिसतो. स्वतंत्र निर्मितीपेक्षा वास्तव दर्शनाकडे तिचा कल अधिक आहे.

मोगल शैलीचा मुख्य प्रेरणास्रोत इराणी आहे. भारताच्या इतिहासात तैमूरलंगाचे नाव विध्वंस, जाळपोळ, लुटालूट या दुर्गुणांशी निगडित आहे. पण बाबर हा त्याच्याच वंशातला पुरुष ललित कलांचा भोक्ता होता. त्याच्या प्रोत्साहनाने जी एक ललितसुंदर चित्रकला जन्माला आली, तिचेच नाव मोगल चित्रशैली असे आहे.

बाबर भारतात येण्यापूर्वी त्या काळी प्रसिद्ध असणाऱ्या बिहजाद नावाच्या पर्शियन चित्रकाराशी त्याचा संबंध आला होता आणि पर्शियन चित्रकलेविषयी त्याला अभिरुची निर्माण झाली होती. त्याच कालात पुस्तके लिहिण्यासाठी कागद उपलब्ध झाला आणि इराणमध्ये पुस्तके लिहिण्याचा धडाका सुरू झाला. मधे मजकूर आणि चौकटीत चित्रे अशा पद्धतीची ती पुस्तके होती. त्यातूनच पुस्तकांची सजावट करणारे चित्रकार निर्माण झाले. चित्रकलेची ही आवड उरात बाळगूनच बाबर भारतात आला. त्याने इकडे येताना काही पर्शियन कलावंतही भारतात आणले. त्यांचा व भारतातल्या चित्रकारांचा संबंध आल्यावर या दोन संस्कृतींच्या संगमातून मोगल शैलीने जन्म घेतला.

शहानामामधील एक चित्र

बाबराच्या पश्चात त्याचा मुलगा हुमायून गादीवर बसला. पण शेरशहा सूरीने त्याची गादी हिरावून घेतल्यामुळे त्याला काही काळ इराणच्या शहाच्या आश्रयाला राहावे लागले. तिथे मीर सय्यद अली व अबदुस् समद नावाच्या दोन प्रसिद्ध चित्रकारांशी त्याचा संबंध आला. त्यांच्या चित्रकलेचा हुमायूनच्या मनावर विलक्षण प्रभाव पडला. पुन्हा तो सिंहासनावर आला, तेव्हा त्याने त्या चित्रकारांना आपल्या दरबारात बोलावून घेतले. त्या दोघांकडून हुमायूनने 'दास्ताने अमीर हमजाद' या पुस्तकाची सचित्र प्रत तयार करून घेतली.

त्या दोघां कलावंतांनी इराणी चित्रशैलीला भारतीय आशय दिला आणि चित्रकलेची एक नवीन धारा प्रवाहित केली.

या काळापर्यंत मोगल चित्रशैलीत इराणी शैलीच्या हीरात व सीराज या कलमांचाच प्रभाव होता. कालांतराने हा प्रभाव इराणी चित्रांच्या सूक्ष्म रेखांमध्ये विलीन झाला. अलंकारिता हे इराणी चित्रांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य होय. इराणी कलाकार नद्या, पर्वत, आकाश, वृक्ष व पशु-पक्षी या सर्वांचे रेखांकन यथातथ्य न करता आलंकारिक पद्धतीने करीत. त्यांच्या रेखा गतिमान असत. रेखा व रंग यांच्या संयोगाने त्या चित्रांना नाजूकपणासह सजीवता प्राप्त होई.

हुमायूनच्या नंतर अकबराची कारकीर्द सुरू झाली. अकबराचा लहानपणापासूनच चित्रकार व चित्रकला यांच्याशी संबंध आला होता. त्यामुळे त्याच्या कारकिर्दीत मोगल शैलीने मूळ धरले आणि काही प्रमाणात तिला प्रगल्भताही आली. अकबर स्वतःही चित्रे काढीत असे. त्याच्या दरबारात दीडशे चित्रकार काम करीत होते. त्यांमध्ये जसे इराणी चित्रकार होते, तसेच भारतीय चित्रकार होते. माधव भीम गुजराती, अनंत बसावन, दसवंत आणि केशवदास हे अकबराच्या दरबारातले प्रसिद्ध हिंदू चित्रकार होत.

अकबर स्वतः चित्रकारांना चित्रकलेचे विषय देई आणि त्याप्रमाणे चित्रकारांनी काढलेली चित्रे आठवड्यातून एकदा तपासूनही पाही. वास्तविक माणसाचे चित्र काढणे हे इस्लामने निषिद्ध ठरवले होते; पण अकबराने या निषेधाला फारसे जुमानले नाही. तो चित्रकारांकडून स्वतःची छबी काढून घेत असे; त्याचप्रमाणे आपल्या अमीर-उमरावांनाही चित्रकारांपुढे बसवून त्यांच्याही छबी उतरून घेत असे.

अकबराच्या कारकिर्दीत हिंदू, जैन, ख्रिस्ती आणि सूफी या सर्व धर्मपंथांच्या प्रचाराला मोकळेपणा मिळाला. अकबरानेही सर्व धर्मपंथांमध्ये सामंजस्य निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. अकबराची ही नीती व अभिरुची लक्षात घेऊन अबदुस् समद व मीर सय्यद या दोघां महान चित्रकारांनी कलेच्या क्षेत्रातही ते सामंजस्य आणले. त्यांनी इराणी कलेचे भारतीयीकरण सुरू केले. भारतीय कलेचे भावात्मक सौंदर्य इराणी रेषांच्या द्वारे ते अभिव्यक्त करू लागले.

अकबराच्या कित्येक राण्या हिंदू होत्या. त्यांच्या सान्निध्यात अकबराच्या कलात्मक अभिरुचीला चांगले वळण मिळाले. फत्तेपूर सिक्रीमध्ये हिंदू राण्यांचे अनेक महाल होते. ते महाल त्याने आपल्या चित्रकारांकडून अंतर्बाह्य सुशोभित करून घेतले. त्या कलाकारांनी तिथे भारतीय भावनाच चित्रांकित केली.

अकबर हस्तलिखित ग्रंथांच्या सचित्र प्रती तयार करून घेत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असे. या कामी त्याने मुसलमान चित्रकारांबरोबरच दसवंत, बसावन, इ. हिंदू चित्रकारांचीही नियुक्ती केली होती. बसावन

रामायणातील एक प्रसंग

हा आकृतिलेखन, रंगसंयोजन आणि प्रतिमा–चित्रण यांत अद्वितीय होता.

अकबराला धार्मिक ग्रंथ आणि कथा-कहाण्या यांची पुस्तके चित्रांनी सजविण्याची विशेष आवड होती. अशा सचित्र पोथ्या अकबराच्या शाही पोथीखान्यात हजारोंच्या संख्येने जमा झाल्या होत्या. अमीर हमजावली नावाची त्याची एक चित्रावली प्रसिद्ध आहे. तिच्यात अकरा चित्रकारांनी चौदाशे किस्से-कहाण्या चित्रित केल्या आहेत. ही सारी चित्रे सुती कपडयांवर चितारलेली आहेत. ही चित्रे आलंकारिक नसून घटनाप्रधान आहेत. त्यांत रेखांची गोलाई आहे. आणि मुखार्ध (प्रोफाईल) चित्रांची



नलदमयंती–कथेतील एक प्रसंग

संख्या अधिक आहे. या चित्रांतून जल, स्थल, पर्वत, मेघ, आकाश; दैत्य, दानव; वड, पिंपळ, इ. वृक्ष; हत्ती, मोर, इ. पशुपक्षी, इत्यादींचे मनोज्ञ दर्शन घडते.

तवारीखे खानदाने तैमूरीया, रज्मनामा (महाभारताचा अनुवाद), अकबरनामा, वाकआत बाबरी, या पोथ्याही अकबराने सचित्र तयार करून घेतल्या. त्याशिवाय पंचतंत्राचा फारसी अनुवादही अयार दानीश या नावाने चित्रांकित केला.

अकबरानंतर जहांगिराची कारकीर्द सुरू झाली. जहांगीरही चित्रकलेचा उपासक, निसर्गप्रेमी आणि रसिक होता. एखादे सुंदर फूल किंवा एखादा वैशिष्टचपूर्ण पशुपक्षी दिसला, की जहांगीर लगेच त्याचे चित्र काढायला लावी. चित्रे तयार करून घेताना तो पैशाकडे मुळीच पाहत नसे. त्याच्या सत्ताकालात मोगल चित्रशैलीने विकासाचा उच्च बिंदू गाठला. त्याने तुजुल-ए-जहांगीरी नावाचे आत्मचरित्र लिहिले आणि त्याच्या कित्येक सचित्र प्रती तयार करून घेतल्या. त्याच्या दरबारात अगारजा नावाचा एक चित्रकार होता. अबुल हसन हा त्याचा पुत्र होय. चित्रकारीत तो बापसे बेटा सवाई होता. त्याने जहांगिराच्या राज्यारोहणाचे एक सुंदर चित्र तयार केले होते. ते पाहून जहांगीर इतका खुष झाला की, त्याने त्याला 'नादीर उज्जमा' हा किताब बहाल करून पुष्कळ धनही दिले. जहांगिराने ज्या एका हिंदू चित्रकाराची तोंड भरून प्रशंसा केली, त्याचे नाव बिशनदास असे आहे. जहांगीर आपल्या आत्मचरित्रात म्हणतो – 'सांप्रतच्या काळात बिशनदासाच्या योग्यतेचा कोणी चित्रकार नाही. छबी बनवण्यात तर तो अद्वितीय आहे.' मनोहर आणि मन्सूर असे त्याच्या दरबारातले आणखी दोन चित्रकार होत. पशुपक्ष्यांची चित्रे बनविण्यात ते अत्यंत निष्णात होते. जहांगिराने अशा अनेक नामांकित चित्रकारांच्या साह्याने काश्मीरमध्ये एक विशाल चित्रशाला निर्माण केली होती.

जहांगिराला युरोपीय चित्रकारांनी काढलेली चित्रेही आवडत. तो आपल्या चित्रकारांकडून त्यांच्या नकला तयार करून घेत असे. चित्रकारही असे वाकबगार, की त्यांनी प्रतिकृती तयार केल्यानंतर मूळ चित्र कोणते आणि नक्कल कोणती, हे समजणेही अवघड व्हावे. छायाप्रकाश आणि परिदृश्य (पर्स्पेक्टिव्ह) या पाश्चात्य चित्रांतल्या दोन गोष्टी जहांगिराला विशेष जाणवल्या. त्याने त्या गोष्टी आपल्या चित्रशैलीत आणण्याबद्दल कलाकारांना सुचवले. मग दरबारी चित्रकार हळूहळू तशा पद्धतीची चित्रे काढू लागले. त्यामुळे प्रथम द्विमिती असलेली मोगल शैली पुढे त्रिमिती झाली.

जहांगीराच्या काळात व्यक्तिचित्रणाला फार महत्त्व आले. त्याच्या पूर्वीही व्यक्तिचित्रण होत असेच; पण त्याची पार्श्वभूमी सपाट असायची. जहांगिराने या पद्धतीत सुधारणा केली. त्याने प्रतिमेच्या पार्श्वभूमीसाठी निसर्गाचा उपयोग करण्यास सांगितले. चेहऱ्यावर छायाप्रकाशांच्या छटा दाखविण्यासही त्याने प्रोत्साहन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिले. चित्रविषयांच्या बाबतीतही त्याच्या काळात खूप वैविध्य आले. पूर्वी केवळ राजेरजवाड्यांची व्यक्तिचित्रे बनवणे हाच

राजपुत्र खुर्रमचे व्यक्तिचित्र

चित्रकारांना उद्योग होता. कलावंतांचा कुंचला केवळ तेवढ्याच एका कामात अडकून पडला होता; पण जहांगिराने त्या चित्रकारांना इतर विषय भरपूर पुरवले. त्याच्या प्रेरणेने प्रधानमंडळ, दरबार, शिकारीचे प्रसंग, नमाझ, राणीवशातल्या बेगमा, राजकन्या असे विविध राजकीय विषय चित्रकार हाताळू लागले. हत्ती, घोडे, वेगवेगळे पशू, पक्षी, शिकारीची सावजे, ही सुद्धा चित्रविषय बनली. विविध वृक्षवल्लीही चित्रकारीत दाखल झाल्या.

मोगल शैलीची चित्रे बहुतांशी दरबारी चित्रे असतात आणि त्यांचे आकारमानही छोटे असते. बौद्ध युगातील भित्तिचित्रे जेवढी विस्तीर्ण तेवढीच ही लहान होत. लघुचित्र हीच संज्ञा त्यांना शोभण्याजोगी आहे. या लघुत्वाचे कारण असे, की मोगल शैलीचे मूळ असलेली इराणी चित्रकला ही पुस्तकावरची चित्रकला आहे. मजकुराच्या भोवती पुस्तकावर चित्रे काढायची असल्यामुळे साहजिकच कमी जागेत त्यांना ती रेखाटावी लागत. इराणी शैलीचे हे लघुत्व मोगल शैलीतही कायम राहिले.

जहांगीरने शहाजाद्यांच्या प्रशिक्षणासाठी अनवरे मुहेली नावाची एक सुबोध कथामाला तयार करवली. त्या कामासाठी त्याने सोळा चित्रकारांची नियुक्ती केली. त्यांतले दहा हिंदू व सहा मुसलमान होते. या पुस्तकात पंचतंत्रातून कित्येक कथा घेतलेल्या आहेत. हे पुस्तक पावणे सात इंच लांब आणि सहा इंच रुंद आहे. यातल्या चित्रकारीत मोगल कलेतल्या रंगरूपांचे पूर्णपणे दर्शन होते. सदर पुस्तक इ. स. १८५१ साली ब्रिटिश म्यूझियमने खरेदी करून सुरक्षित ठेवले आहे.

मोगल शैलीची चित्रे तयार करण्याची पद्धती पुढीलप्रमाणे असे – चित्रासाठी मुख्यतः इराणी किंवा इसफहानी जातीचा सुंदर कागद वापरीत. असे दोन तीन कागद खळीने एकत्र चिकटवीत. मग कागदाची पृष्ठभूमी सुलेमानी दगडाने घाशीत. त्यामुळे त्या कागदाला चमक येई. मग चित्रकार हलक्या चमकदार रंगाने त्यावर चित्रे काढीत. अशा चित्राला टिपाई म्हणत. त्यावर पुन्हा एकदा पातळ पांढऱ्या रंगाचा हात देत. त्यामुळे खालचा चित्राचा आराखडा अधिक स्पष्ट होई. नंतर या आराखड्यात रंग भरीत.

सुती कापडावरही चित्रे काढीत. त्यासाठी रंगात सोने व शाई घोटून ते मिश्रण एकजीव करीत. नंतर चित्र चमकदार होण्यासाठी ते वस्त्र दगडाने घोटीत. असे घोटीव वस्त्र मग चित्रकाराकडे देत. त्याने चित्र काढले, की ते वेलबुट्टी काढणाऱ्या कारागिराकडे देत. तो पाने, फुले अथवा कोनाकृती रेखून चित्राची चौकट शोभिवंत करी. वेलबुट्टी हा मोगल चित्रशैलीचा एक अविभाज्य भाग आहे. कधी कधी मुख्य चित्रापेक्षा वेलबुट्टीच अधिक उठावदार दिसते. मुख्य चित्रातील आशयाशी जुळेल अशीच वेलबुट्टी किंवा निसर्गचित्रे काढली जात. काही वेलबुट्ट्यांवर सोन्याचा किंवा चांदीचा वर्खही बसवीत. अशा कामाला

चित्राच्या भोवती काढलेली वेलबुट्टी

अफशा म्हणत. चित्रकागदाच्या मागच्या अंगाला फारसी लिपीत काही अक्षरे लिहीत व तीही वेलबुट्टीने सजवीत.

जहांगिरानंतर शहाजहानची कारकीर्द सुरू झाली. त्याचा कल चित्रकलेपेक्षा वास्तुशिल्पाकडे अधिक असल्यामुळे त्याने चित्रकलेकडे दुर्लक्षच केले. त्यामुळे त्याच्या पदरी असलेले चित्रकार त्याला सोडून जाऊ लागले; पण त्यामुळे कलेच्या दृष्टीने मात्र एक फायदा झाला. हे सर्व चित्रकार लोकाभिमुख झाले. श्री. पातकर म्हणतात –राजाच्या दुर्लक्षामुळे कलावंताची दृष्टी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इतर रसिक जनांना रंजविण्याकडे वळली. एका अर्थी हा काळ कलाविकासाला पोषक ठरला. सामान्य रसिकापर्यंत कलावंतांची दृष्टी गेल्याने विषयांमध्ये व अभिरुचीमध्ये, नावीन्य व विशालता आली. या कालातील काही चित्रे पूर्वीपेक्षा रेषाप्रभुत्व, रंगसंगती व नाजुकपणा या बाबतींत सरस ठरली आहेत. पण असे असले तरी शहाजहानचा काल हा मोगल शैलीचा ऱ्हासकालच मानतात.

अशा प्रकारे शहाजहानच्या कारकीर्दीत ऱ्हासोन्मुख झालेली मोगल शैली औरंगजेबाचा सत्ताकाल सुरू होताच पूर्णपणे नष्ट झाली. औरंगजेबाला केवळ चित्रकलाच नव्हे; तर साऱ्याच ललित कलांचा तिटकारा होता. त्याने सर्व कलावंतांना आपल्या दरबारातून हाकलूनच दिले. मोगल दरबारातून अशा प्रकारे देशोधडीला लागलेले हे चित्रकार पुढे मेवाड, जयपूर, उदयपूर, बीकानेर, बूंदी, किशनगढ, पंजाबातील बसोली, गुलेर, चंबा, कांगडा, गढवाल, कुलू, इ. ठिकाणी तिथल्या राजांच्या किंवा सरदारांच्या आश्रयाला गेले. ज्या ज्या ठिकाणी ते गेले, तिथे तिथे तिथल्या लोकजीवनाला अनुसरून त्यांनी आपल्या कलेत वेगळेपणा आणला. त्यातूनच पुढे राजस्थानी, कांगडा, बसोली, गढवाली इ. स्थानिक चित्रशैली उदयाला आल्या. [हिं. वि. को.; रूपसौंदर्य; अजंता, सप्टेंबर १९५७]

मोगल राजवंश

दिल्ली येथून भारतावर साम्राज्यसत्ता गाजवणारा वंश. बाबराने इ. स. १५२६ साली दिल्लीवर या वंशाचे राज्य स्थापले. तेव्हापासून इ. स. १८५७ पर्यंत या वंशातील पुरुष दिल्लीचे बादशाह होते. बाबराचा पिता उमरशेख मिर्झा हा तुर्क सुलतान तैमूरलंग याचा वंशज होता व त्याची माता बेगम कुतलुग निगार खानम ही मोगल सरदार चंगेजखान याच्या वंशातली होती. काही इतिहासकारांच्या मते मोगल ही तुर्कांचीच एक शाखा होती. चंगेजखानाच्या वंशजांना चगताई तुर्क म्हणत. मोगलांनी इ. स. च्या १४ व्या शतकात इस्लामचा स्वीकार केला. इ. स. च्या १५ व्या शतकात मध्य आशियातील बहुतेक प्रदेशांवर या वंशाचे राज्य होते. बाबराचा पिता उमरशेख व त्याचे दहा भाऊ यांच्यांत त्या राज्याची विभागणी होऊन उमरशेखला फरगणा प्रांत मिळाला होता. इ. स. १४९४ साली उमरशेख मरण पावला व बाबर फरगण्याचा राजा झाला.

जहीरुद्दीन मुहंमद– (इ. स. १५२६–१५३०) हे बाबराचे जन्मनाम होते. त्याचा जन्म इ. स. १४८३ साली फरगण्याची राजधानी आंदिजान येथे झाला. त्याचा आजा (आईचा बाप) युनसखान याला त्याचे नाव नीट उच्चारता येत नसल्यामुळे तो त्याला बाबर म्हणत असे. त्याच नावाने तो पुढे प्रख्यात झाला.

बाबराने इ. स. १४९४ पासून इ. स. १५०२ पर्यंत फरगण्यावर राज्य केले. त्यानंतर दोन वर्षे त्याला वनवास भोगावा लागला. इ. स. १५०४ मध्ये तो काबूलचा पातशहा झाला. मग त्याने गझनी, कंदाहार, हिरात व बदख्शाँ हे प्रदेशही जिंकले. इ. स. १५१९ ते १५२६ या कालखंडात बाबराने भारतावर पाच स्वाऱ्या केल्या. साम्राज्यविस्तार करणे व अमाप संपत्ती मिळवणे हेच त्याचे उद्देश होते. इ. स. १५२४ मध्ये केलेल्या चौथ्या स्वारीत त्याने बहुतेक पंजाब काबीज केला. मग इ. स. १५२५ साली त्याने भारतावर पाचवी स्वारी केली. त्या वेळी दिल्लीला सुलतान इब्राहीम लोदी राज्य करीत होता. एप्रिल १५२६ मध्ये पानिपत येथे बाबर व इब्राहीम लोदी यांची घनघोर लढाई होऊन इब्राहीम मारला गेला. या लढाईत दोन्ही पक्षांचे मिळून ४० ते ५० हजार सैनिक ठार झाले. शेवटी बाबर विजयी झाला आणि दिल्लीच्या सुलतानशाहीचा शेवट होऊन तिथे मोगल पातशाही सुरू झाली. बाबर हा एक अनुभवी व कसलेला सेनानी होता. त्याचे सैन्य शिस्तबद्ध असून, घोडदळही कार्यक्षम होते. त्याच्याजवळ तोफा व बंदुका होत्या. या सर्व कारणांमुळे त्याला विजय मिळाला. त्यानंतर लगेच बाबराने दिल्ली व आग्रा ही शहरे जिंकून, दिल्ली येथे स्वतःच्या नावाने खुत्बा वाचविला. तिथे मिळालेल्या अफाट संपत्तीचा बराच भाग त्याने आपल्या सैनिकांना वाटून दिला.

दिल्लीच्या तख्तावर आरूढ झाल्यानंतर बाबराने लवकरच मध्य हिंदुस्थानातील रापडी, इटावा, कनोज, जोनपूर, गाझीपूर, ग्वाल्हेर वगैरे प्रदेश काबीज केले. अनेक अफगाण सरदार त्याला शरण गेले. पण चितोडचा राणा सांगा याचे शौर्य व प्रचंड सैन्य यामुळे बाबराला थोडी काळजी वाटत होती. मार्च १५२७ मध्ये आग्र्याच्या पश्चिमेला ३७ मैलांवर खानवा येथे मोगल व राजपूत यांचे युद्ध झाले. बाबराचे सैन्य कमी असूनही त्याने राणा सांगाचा पराभव केला. त्याचा प्रचंड तोफखाना व त्याचे लष्करी डावपेच यांमुळे बाबर विजयी ठरला. दोन्ही बाजूंच्या सैन्याचा भयंकर संहार झाला. बाबराने मुंडक्यांचा मनोरा रचून स्वतःला गाजी हा किताब घेतला.

पुढील वर्षी बाबराने माळव्याच्या सुलतानाचा प्रधान मेदिनीराय याचा पराभव करून चंदेरी किल्ला सर केला. त्यानंतर तो पूर्वेकडे वळला. इब्राहीम लोदीचा भाऊ महमूद लोदी याने बिहारमधे जाऊन मोठे सैन्य उभारले होते. बंगालचा सुलतान शहा हादेखील अफगाण असल्यामुळे त्याने महमूद लोदीला पाठिंबा दिला. बिब्बन नामक सरदाराने अवध व लखनौ काबीज केले होते. पण बाबराने इ. स. १५२९ साली गंगा व घाघरा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या नद्यांच्या संगमाजवळ महमूद लोदीचा व इतर अफगाणांचा पूर्ण पराभव केला. बंगालच्या नसरत शहाने बाबराशी तह करून त्याच बिहारवरील प्रभुत्व मान्य केले. अशा प्रकारे मोगलांची सत्ता पूर्वेकडे बिहारपासून पश्चिमेकडे बदक्शांपर्यंत आणि हिमालयापासून चंदेरीपर्यंत प्रस्थापित झाली. बाबराने मिर्झा बेग, सुल्तान वगैरे पदव्या न वापरता, काबूल येथे पातशाह हा किताब घेतला होता, तोच दिल्ली येथे धारण केला.

बाबर

इ. स. १५३० च्या डिसेंबरमध्ये बाबर मरण पावला. बाबराची शरीरयष्टी दणकट असून, शक्तीही अचाट होती. तो व्यसनाधीन नव्हता. शक्ती व बुद्धी, वीरता व विद्वत्ता हे गुणही त्याच्या अंगी होते. तो कुशल सेनानी होता, तसाच कुशल लेखकही होता. त्याने तुर्कीत व फारसीत निसर्गसौंदर्यावर रचलेल्या कवितांचा संग्रह लोकप्रिय ठरला. त्याचे आत्मचरित्र विविध अनुभवांनी व ऐतिहासिक माहितीने भरलेले असून, त्याची लेखनशैली चांगली आहे.

हुमायून (इ स. १५३०–४० व १५५५–५६)–बाबराची आवडती राणी महामबेगम हिचा हा पुत्र. याचा जन्म काबूल येथे इ. स. १५०८ मध्ये झाला. त्याचे नाव नासिरुद्दीन मुहंमद हुमायून असे होते. हुमायून या शब्दाचा अर्थ भाग्यवान असा असला तरी, तो जीवनात दुर्दैवीच ठरला. लहानपणी त्याला उत्तम शिक्षण मिळाले होते. तुर्की, अरबी, फारसी व हिंदुस्थानी या भाषा त्याला अवगत होत्या. गणित, तत्त्वज्ञान, खगोलशास्त्र, ज्योतिष वगैरे विषयांचीही त्याला आवड होती. लष्करी व प्रशासकीय प्रशिक्षणही त्याला मिळाले होते. बापाबरोबर त्याने अनेक लढायांत भाग घेतला होता व स्वतंत्रपणेही लढाया करून जय मिळविले होते. इ. स. १५२७ साली तो बदख्शांचा सुभेदार म्हणून गेला होता. बाबराच्या मृत्यूनंतर तो दिल्लीच्या तख्तावर बसला. त्यानंतर त्याला अनेक लढाया कराव्या लागल्या. प्रथम त्याने कालिंजर व चुनार या गडांवर स्वारी करून ते जिंकले. नंतर त्याने गुजरातचा सुलतान बहादूरशहा याच्याकडे मोर्चा वळवला. बहादूरशहा फार महत्त्वाकांक्षी व प्रबल होता. त्याने चितोडगड जिंकून घेतला होता. पण हुमायुनाने त्याच्यावर स्वारी केली, तेव्हा तो पळाला व चपानेर किल्ल्यावर जाऊन राहिला. हुमायुनाने तोही किल्ला सर केला, तेव्हा बहादूरशहा खबायतला पळाला. बादशहाने त्याचा नियपर्यंत पाठलाग केल्यामुळे शेवटी तो दीव येथे पोर्तुगीजांच्या आश्रयाला गेला. मग हुमायून आग्र्याला परत गेला. तेव्हा बहादूरशहाने गुजरात प्रदेश परत जिंकून घेतला.

चुनारगडाचा किल्लेदार शेरखान याने हुमायून बादशहाचे प्रभुत्व मानले होते. पण हुमायून गुजरातकडे गेला तेव्हा शेरखानाने बिहार व बंगाल या प्रदेशांत आपले वर्चस्व स्थापले. मग इ. स. १५३७ साली हुमायुनाने चुनारगडाकडे मोर्चा वळवला. त्याने १५३८ मध्ये चुनारगड घेतला. पण शेरखानाने गौड प्रांत जिंकला. मग हुमायुनाने गौडावर स्वारी करून तोही प्रदेश जिंकला. पण तेवढ्यात शेरखानाने कनोज, बनारस वगैरे भागात लुटालूट सुरू केली. इ. स. १५३९ साली चौसा येथे शेरखान व हुमायून यांची लढाई होऊन हुमायुनाचा पराभव झाला व तो कसाबसा जीव वाचवून आग्र्याला पळून गेला. पुढील वर्षी त्याने पुन्हा प्रचंड सैन्य जमवून शेरखानावर स्वारी केली. पण शेरखानाने त्याचा बिलग्राम येथे पुन्हा पराभव केला. हुमायून आग्र्याला पळाला, तेव्हा शेरखानाने त्याचा पाठलाग केला. मग तो लाहोरला पळाला. शेरखानाने दिल्ली व आग्रा काबीज करून तिथे अफगाणांची सत्ता पुन्हा स्थापली.

हुमायून

लाहोर येथे हुमायूनचे भाऊ कामरान, अस्करी व हिंदाल हे त्याला भेटले. पण त्यांनी हुमायूनला मदत न करता, त्याच्याविरुद्ध कारस्थाने केली. तेव्हा हुमायून सिंध, मारवाड, पंजाब व अफगाणिस्थान या प्रदेशांत काही काळ भटकला आणि शेवटी इराणात गेला. इराणचा शहा तहामस्प याने त्याला शिया पंथ स्वीकारण्याच्या अटीवर मदत देण्याचे कबूल केले. ती अट मान्य करून हुमायूनने शहाची मदत घेतली व इ. स. १५४५ त काबूलचे राज्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जिंकले. त्या कामी त्याला बहरामखान याची बरीच मदत झाली. इ. स. १५५५ साली तो मोठे सैन्य घेऊन भारतात आला. पंजाबात सरहिंद येथे त्याने शेरशहाचा चुलत भाऊ शिकंदर सूर याचा पराभव करून आपले राज्य परत मिळवले. पण पुढल्याच वर्षी, इ. स. १५५६ च्या जानेवारी महिन्यात तो पाय घसरून पडला व मरण पावला. हुमायून स्वतः विद्वान असून, तो विद्या व कला यांचा पुरस्कर्ता होता. त्याचा अनेकदा पराभव झाला असला, तरी तो चांगला योद्धा व कुशल सेनापती होता. मात्र तो आळशी, विलासी व बेफिकीर असल्यामुळे त्याला युद्धात अपयश येत असे. तो सात्त्विक व धार्मिक वृत्तीचा आणि फार दयाळू होता. या कारणामुळेही तो राजकारणात अपयशी ठरला. त्याला तारतम्यबुद्धी कमीच होती.

अकबर (इ. स. १५५६–१६०५)– हुमायून सिंधमध्ये भटकत असताना त्याने हमिदा बानू नावाच्या १४ वर्षांच्या मुलीशी लग्न केले. इ. स. १५४२ साली अमरकोट येथे तिला मुलगा झाला, त्याचे नाव जलालुद्दीन महंमद अकबर. हुमायून इराणात गेला असताना त्याचा भाऊ अस्करी अकबराला कंदाहाराला घेऊन गेला. तिथे त्याची बायको सुलतान बेगम हिने अकबराचा चांगला प्रतिपाळ केला. तथापि त्याचे बालपण बहुतेक धामधुमीतच गेले. हुमायूनचा भाऊ हिंदाल हा गजनीचा सुभेदार होता. त्याच्या मृत्यूनंतर अकबर तिथला सुभेदार झाला (इ.स. १५५१–५४). हिंदालची कन्या रझिया सुलताना हिच्याशी त्याने विवाह केला. हुमायून भारतात परत येऊन त्याचा सरहिंद येथे विजय झाल्यानंतर त्याने अकबराला युवराज म्हणून घोषित केले आणि दिल्ली काबीज केल्यानंतर त्याला लाहोरचा सुभेदार नेमले. बहरामखानही अकबराचा पालक म्हणून तिकडे गेला. हुमायूनच्या अपघाती मृत्यूनंतर अकबर बहरामखानाच्या मदतीने कलानोर येथे तख्तावर बसला. त्या वेळी तो फक्त चौदा वर्षांचा होता. बहरामखानाने लवकरच त्याला दिल्लीच्या तख्तावर बसविले व तो स्वतः अकबराचा प्रतिनिधी म्हणून राज्यकारभार करू लागला. दिल्ली येथे राहणे सुरक्षित नव्हते, म्हणून तार्डीबेग या सरदाराला दिल्लीच्या रक्षणासाठी ठेवून बहरामखान अकबरासह लाहोरला गेला. त्या वेळी सूर घराण्यातील आदिलशहा हा बिहारमध्ये चुनार येथे राज्य करीत होता. त्याचा हिंदू प्रधान हेमराज फार पराक्रमी होता. त्याने मोठ्या सैन्यासह दिल्लीवर स्वारी केली. आग्रा व दिल्ली येथील मोगल सरदारांचा पराभव करून त्याने दोन्ही शहरे जिंकली आणि दिल्ली येथे विक्रमाजित या नावाने स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. पण लवकरच बहरामखान व अकबर हे सैन्य घेऊन दिल्लीवर चालून आले. त्यांच्या प्रतिकारासाठी हेमूही प्रचंड सेनेसह पानिपतकडे गेला. पानिपत येथे मोठे युद्ध झाले. प्रारंभी हेमूची सरशी होती; पण अचानक शत्रूचा एक तीर हेमूच्या डोळ्यात घुसून तो घायाळ होऊन पडला. त्याबरोबर त्याच्या सैन्यात गोंधळ माजला व अकबराला जय मिळाला. शेवटी हेमू अकबराच्या हाती सापडला व त्याला ठार मारण्यात आले.

या विजयानंतर अकबर दिल्लीला राहून राज्यकारभार पाहू लागला. मात्र इ. स. १५५६ ते १५६० या चार वर्षांच्या काळात तो नाममात्र बादशाहा असून, बहरामखानच सर्व सूत्रे हालवीत होता. त्या काळात अकबराच्या सैन्याने मेवात, अजमेर, ग्वाल्हेर, जोनपूर, बनारस, इ. ठिकाणे जिंकून घेतली. पुढे अकबराला बहरामखानाचे वर्चस्व नकोसे वाटू लागले. तेव्हा त्याने बहरामखानाला मक्केला जाण्याची परवानगी दिली. तिकडे जाताना वाटेत बहरामखानाने बंड केले. पण त्याचा पराभव झाला. नंतर तो राजस्थान व गुजरात या मार्गाने मक्केला जाण्यास निघाला असता, वाटेत अणहिलवाड येथे मुबारकखान नावाच्या अफगाण सरदाराने त्याला ठार मारले. त्याची विधवा सलिमा बेगम ही अकबराची आतेबहीण होती. तिच्याशी अकबराने विवाह केला.

अकबराच्या कारकिर्दीचा बराच भाग निरनिराळ्या सरदारांची व सुभेदारांची बंडे मोडण्यात गेला. तथापि त्याने हळूहळू आपल्या साम्राज्याचा खूप विस्तार केला. त्याने माळवा, जोनपूर, चुनार, मेरठ, गोंडवन, रणथंभोर, कालिंजर, जोधपूर, इ. ठिकाणे जिंकली. मेवाडचा उदयसिंह सोडून बहुतेक सर्व रजपूत राजांनी अकबराचे प्रभुत्व मान्य केले. जयपूरचा कछवाहा राजा भारमल (बिहारीमल) याने तर आपली कन्या अकबराला दिली. तिच्याशी अकबराने इ. स. १५६२ च्या जानेवारीत विवाह केला. मेवाड जिंकण्यासाठी अकबराने स्वतः चितोडला वेढा दिला. उदयसिंहाने ३–४ महिने गड लढवला. पण शेवटी निरुपाय होऊन तो स्वतः अरवली पर्वताच्या आश्रयाला गेला. तिकडे गडावरील राजपूत स्त्रियांनी जोहार केला व हजारो पुरुषांनी रणांगणावर प्राणार्पण केले. त्यानंतर अकबराने गड जिंकला. तरीही मेवाडचा बराच भाग उदयसिंहाच्या ताब्यात होता. तो उदेपूर येथून राज्य करीत होता. इ. स. १५७२ त उदयसिंह मरण पावल्यावर त्याचा पुत्र राणा प्रताप मेवाडचा राजा झाला. इ. स. १५७६ त अकबराने त्याच्यावर मोठे सैन्य पाठवले. जयपूरचा मानसिंह व आसफखान हे त्याचे सेनापती होते. हळदीघाट येथे घनघोर युद्ध झाले. त्यात राणा प्रतापचा पराभव झाला. तथापि मेवाडचा वायव्य भाग त्याच्याकडे राहिला. तो अकबराला घेता आता नाही. त्या जंगली प्रदेशात राहून राणा प्रतापने मोगलांशी दीर्घ काल लढा दिला व मेवाडचा बराच भाग मुक्त केला.

इ. स. १५७२–७३ साली अकबराने गुजरातवर स्वारी करून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनेक बंडखोर सरदारांचा पराभव केला आणि तो प्रदेश आपल्या साम्राज्यात समाविष्ट केला. त्यानंतर त्याने बिहार व बंगाल या प्रदेशांवर स्वारी केली. तिकडे शेरशहाच्या वंशजांची सत्ता होती. ते दोन्ही प्रदेश अकबराने जिंकून घेतले.

अकबराच्या परधर्मसहिष्णू धोरणामुळे काही कडवे मुसलमान चिडले होते. त्यांनी अकबराला पदच्युत करून त्याचा सावत्र भाऊ काबूलचा मिर्झामुहंमद हकीम याला बादशहा बनवण्याचा कट रचला. पण अकबराने ठिकठिकाणच्या बंडखोरांना पकडून ठार मारले आणि तो स्वतः मानसिंहासह काबूलवर चालून गेला. हकीम पळून गेला व इ. स. १५८५ साली अकबराने काबूल आपल्या साम्राज्यात समाविष्ट केले. इ. स. १५८६ मध्ये राजा भगवानदास व कासीमखान यांनी काश्मीरवर स्वारी करून तेही मोगल साम्राज्याला जोडले. वायव्यसीमा भागात युसूफझाई नामक अफगाण टोळ्या दंगा करू लागल्यामुळे अकबराने राजा बीरबल व कोकलताश यांना तिकडे पाठवले. त्या स्वारीत राजा बीरबल मारला गेला. मग अकबराने तोडरमल व मानसिंह यांना तिकडे धाडले. त्यांनी अफगाण टोळ्यांचा पराभव केला.

इ. स. १५९१ मध्ये अकबराने बहरामखानाचा पुत्र अब्दुर रहीम याला सिंधवर पाठवले. तिथला बलुची शासक जानीबेग याने प्रथम बराच लढा दिला. पण शेवटी तो शरण आला व सिंध मोगल साम्राज्यात समाविष्ट झाला. इ. स. १५९२ साली अकबराने ओडिसाही जिकला. इ. स. १५९५ मध्ये अकबराच्या सेनापतींनी बलुचिस्तान व कंदाहार यांवर मोगलांची सत्ता स्थापली.

अशा प्रकारे मेवाड सोडून बहुतेक सर्व उत्तर भारतावर मोगलांची सत्ता प्रस्थापित झाली. इ. स. १५९१ साली अकबराने अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा व खानदेश या प्रदेशांच्या सुलतानांकडे आपली सत्ता मानण्याचा हुकूम पाठवला. खानदेशाच्या अलीखानाने अकबराचे प्रभुत्व मान्य केले, पण बाकीच्या राज्यांनी तसे केले नाही. म्हणून अकबराने आपले मोठे सैन्य दक्षिणेत पाठवले. त्याचा पुत्र मुराद व सरदार अब्दुर रहीम खानखाना यांनी इ. स. १५९६ साली अहमदनगर जिंकले. पण ते राज्य पूर्णपणे अकबराच्या ताब्यात राहिले नाही. मात्र विदर्भ प्रदेश त्याला मिळाला.

अहमदनगरच्या लढाईत खानदेशचा अलीखान मोगलांच्या बाजूने लढत असता मारला गेला. त्याचा पुत्र बहादुरखान अकबराची सत्ता न मानता स्वतंत्र सुलतान बनला. तेव्हा अकबराने त्याच्यावर स्वारी केली आणि इ. स. १६०१ मध्ये बऱ्हाणपूर व अशीरगड काबीज करून खानदेश आपल्या साम्राज्यात विलीन केला. अहमदनगर, विदर्भ व खानदेश या प्रदेशांवर त्याने दानियलला सुभेदार नेमले. अशा प्रकारे काबूल–कंदाहारपासून बंगालपर्यंत आणि हिमालयापासून दक्षिणेत गोदावरीपर्यंत मोगल साम्राज्याचा विस्तार झाला. म्हणून अकबर हाच मोगल साम्राज्याचा संस्थापक मानला जातो. साम्राज्याचे भिन्न सुभे बनवून त्याने उत्तम शासनव्यवस्था सुरू केली.

अकबर खानदेशात अशीरगड घेण्यात गुंतलेला असताना इ. स. १६०० मध्ये त्याचा मुलगा सलीम याने बंड केले. त्याने अकबराचा जिवलग मित्र व सल्लागार अबुलफजल याचा इ. स. १६०२ साली खून करविला. अकबराचा दुसरा मुलगा दानियल हा इ. स. १६०४ मध्ये मरण पावला. या सर्व घटनांचा परिणाम बादशहाच्या प्रकृतीवर होऊन तो इ. स. १६०५ मध्ये मृत्यू पावला.

पृथ्वीवरील थोर राज्यकर्त्यांत अकबराची गणना केली जाते. त्याचे शिक्षण नीटपणे झाले नव्हते; त्याला लिहिता-वाचताही येत नव्हते. पण त्याची बुद्धी कुशाग्र, चौफेर, शोधक व कल्पक होती. राज्यव्यवस्था, धार्मिक चर्चा, युद्धे, शिल्पकला, इ. अनेक बाबतींत तो स्वतः आपली बुद्धी चालवीत असे. एवढेच नव्हे, तर यांत्रिक कामातही तो लक्ष घालीत असे. बंदुकीतून गोळी सुटताना ती गरगर फिरत जावी यासाठी नळीच्या आतील बाजूला स्क्रूप्रमाणे आटे पाडण्याची कल्पना त्याने सांगितली. एका काडीने सोळा तोफा उडविण्याची सोयही त्यानेच केली.

अकबराने सुरू केलेली राज्यव्यवस्था व महसूलव्यवस्था त्याच्या नंतरही चालू राहिली. त्या व्यवस्थेमुळे त्याचे साम्राज्यही दीर्घ काळ टिकले. ते चिरस्थायी करण्यासाठी त्याने जे उपाय योजले होते, त्यांवरून त्याची मुत्सद्देगिरी व दूरदृष्टी ध्यानात येते. राजपुतांचा विश्वास संपादन केल्यावाचून आपली सत्ता पक्की होणार नाही, हे जाणून त्याने आपले धार्मिक धोरण बदलले. त्याने हिंदूंच्या यात्रेवरील कर व जिझियासारखे जुलमी कर बंद केले आणि लढाईत पकडलेल्या हिंदूंना गुलाम करून ठेवण्याची पद्धत बंद केली. राजपूत राजघराण्यांशी कायमचे सख्य घडवून आणण्याच्या हेतूने त्याने राजपूत राजकन्यांशी स्वतः विवाह केले, तसेच मुलांचेही विवाह केले. जयपूरच्या राजाप्रमाणेच जोधपूरच्या उदयसिंहाने आपली बहीण जोधाबाई अकबराला दिली. भगवानदासाने आपली मुलगी मानबाई सलीमला दिली. हे सर्व पराक्रमी राजपूत सरदार अकबर बादशहाशी एकनिष्ठ राहिले आणि त्यांनी मोगल पादशाही वाढवण्याची व राखण्याची मोठी कामगिरी केली.

अकबराचे उदार धार्मिक धोरण हे त्याच्या थोरवीचे महत्त्वाचे अंग होय. त्याची धर्मनिष्ठा कडवी किंवा आंधळी नव्हती. तो परमतसहिष्णू होता. सर्व धर्मतत्त्वांचा समन्वय साधून त्याने दीने-इलाही नामक नवा धर्म स्थापन केला. अकबराच्या दरबारात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुष्कळ विद्वान पुरुष होते. तो विद्यांचा व कलांचा पुरस्कर्ता होता. त्याने अनेक भव्य इमारती निर्माण केल्या. त्यांच्या शिल्प-कामात त्याचे व्यक्तित्व प्रकट झाले आहे. त्याला चित्रकलेची फार आवड होती. (अकबर पाहा)

जहांगीर (इ. स. १६०५–१६२७) – अकबराच्या मृत्यू-नंतर त्याचा मुलगा सलीम हा दिल्लीचा बादशाहा झाला. अकबराची राजपूत राणी मरियम झमानी म्हणजे जयपूरच्या भारमलची कन्या, हिच्या पोटी त्याचा जन्म झाला. अजमेरच्या शेख सलीम चिस्तीच्या आशीर्वादामुळे तो जन्मला, अशा समजुतीने अकबराने त्याचे नाव मुहंमद सुलतान सलीम असे ठेवले. त्याचे शिक्षण चांगले झाले होते. युद्ध व राज्यकारभार या बाबतीतही त्याला बरेच प्रशिक्षण मिळाले होते. त्याला सुमारे वीस बायका होत्या आणि त्याच्या जनानखान्यात ३०० स्त्रिया होत्या, असे म्हणतात. बादशाहा झाल्यावर त्याने नूरजहानशी विवाह केला.

अकबर हयात असताना सलीमने बंड केले होते, तेव्हा अनेक सरदारांनी त्याच्या विरुद्ध कट केला होता. सलीम तख्तावर बसला, तेव्हा दरबारी मंडळींनी त्याच्याकडून आश्वासन घेतले की, कटात सामील झालेल्या सरदारांना त्याने शिक्षा करू नये

जहांगीर

व इस्लामचे पालन करावे. अकबराचे धार्मिक धोरण बहुतेक मुसलमान सरदारांना नापसंत होते, हे यावरून स्पष्ट दिसून येते. सलीम धार्मिक बाबतीत उदासीन होता. पातशाही मिळताच त्याने नुरुद्दीन मुहंमद जहांगीर पातशहा गाजी म्हणजे धर्मोद्धारक व जगज्जेता हा किताब घेतला. मात्र त्याने धर्मोद्धारासाठी काही केले नाही व साम्राज्याचा विस्तारही केला नाही. मुसलमान सरदारांना दुखवू नये एवढ्यापुरते तो धर्माचरण करीत असे.

जयपूरच्या भगवानदासाची मुलगी मानबाई जहांगीरला दिलेली होती. तिचा मुलगा खुसरू याने इ. स. १६०६ मध्ये बंड केले. तो देखणा, तीक्ष्ण बुद्धीचा, सुशिक्षित व शुद्धाचरणी असल्यामुळे लोकप्रिय होता. त्याला राज्य देण्याचा कट काही सरदारांनी केला होता. म्हणून त्याने पुन्हा तसा प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाही. जहांगीरने त्याचे डोळे शिवून त्याला कैदेत टाकले आणि त्याच्या साथीदारांना क्रूरपणे शिक्षा दिल्या.

इ. स. १६११ साली जहांगीरने नूरजहानशी लग्न केले. तेहरानचा रहिवासी गियासबेग याची ती मुलगी होती. तिचे नाव मेहरुन्निसा. गियासबेग दिल्लीला आल्यावर अकबराने त्याला आपल्या परिवाराचा दिवाण नेमले होते. मेहरुन्निसाचा विवाह पूर्वीच झाला होता. तिचा पती अलीकुलीखान याला जहांगीरने बरद्वानची जहागीर व शेर अफगाण ही पदवी दिली होती. पण तो राजद्रोही हालचाली करू लागल्यामुळे जहांगीरने त्याला ठार मारले व मेहरुन्निसाशी लग्न केले. त्या वेळी त्याने तिला नूरजहान हे नाव दिले. लवकरच जहांगीर सर्वस्वी तिच्या तंत्राने वागू लागला. तिचे सौंदर्य असामान्य होते. ती घोड्यावर बसण्यात व नेमबाजीत पटाईत होती. तिला फारसी भाषेचे चांगले ज्ञान होते व त्या भाषेत ती काव्य करीत असे. ती अत्यंत धार्मिक असली, तरी तितकीच विलासी होती. गुलाबाचे अत्तर तिने इराणातून इकडे आणले असे म्हणतात. ती धूर्त व महत्त्वाकांक्षी असून, राजकारणातले डावपेच करण्यातही कुशल होती. त्यामुळे इ. स. १६११ नंतर मोगल पातशाहीची सूत्रे तिच्याच हाती होती, असे इतिहासकार म्हणतात.

जहांगीरच्या कारकिर्दीतली विशेष महत्त्वाची घटना म्हणजे मेवाडवर मोगलांचे प्रभुत्व स्थापन झाले, ही होय. इ. स. १६१५ साली राजपुत्र खुर्रम याने अमरसिंहाचा पराभव केला. व अमरसिंह मोगलांचा मांडलिक झाला. तटबंदीची डागडुजी न करण्याच्या अटीवर जहांगीरने चितोडगड अमरसिंहाला परत दिला. त्यानंतर खुर्रमने इ. स. १६१७ मध्ये अहमदनगरवर स्वारी केली. मलिकंबरने त्याच्याशी तह केला. या विजयाबद्दल जहांगीरने खुर्रमला शहाजहान ही पदवी दिली. पण मलिकंबरने लवकरच मोगलांचे वर्चस्व झुगारून दिले व निजामशाहीची सत्ता दृढ केली.

इ. स. १६२० मध्ये शहाजहान याने पंजाबातील कांगडा किल्ल्यावर स्वारी करून तो जिंकला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इ. स. १६२२ मध्ये इराणच्या शहाने कंदाहार जिंकून घेतले. त्याच वेळी शहाजहानने दक्षिणेत बंड केले. त्याने जहांगीरचा सर्वांत मोठा मुलगा खुसरू याचा इ. स. १६२१ साली खून केला होता. पण नूरजहान आपला जावई शहारियर याला गादीवर बसवील अशी भीती त्याला वाटत होती. नूरजहानने राजपुत्र पर्विज व सरदार महाबतखान यांना शहाजहानचे बंड मोडण्यास पाठवले. त्यांनी शहाजहानचा पराभव केला, तेव्हा तो दक्षिणेत जाऊन मलिकंबरला मिळाला. पण महाबतखानाने त्याचा पाठलाग करून त्याला नामोहरम केले, तेव्हा त्याने बादशाहाकडे क्षमायाचना केली. जहांगीरने त्याला क्षमा केली व बालाघाटची सुभेदारी दिली.

पुढे नूरजहान व महाबतखान यांचे वैर सुरू झाले. त्यांच्या कारस्थानामुळे जहांगीरची सत्ता दुबळी झाली. जहांगीर इ. स. १६२७ मध्ये लाहोरजवळ मरण पावल्यावर शहाजहानने महाबतखानाच्या मदतीने शहारियरचा पराभव केला व दिल्लीचे तख्त मिळवले. नूरजहानला त्याने लाहोर येथे चांगल्या स्थितीत राहण्याची सोय करून दिली. तिथेच ती इ. स. १६४५ मध्ये मरण पावली.

जहांगीर हा प्रजाहितदक्ष व न्यायी बादशहा होता. त्याचे धार्मिक धोरण उदार व सहिष्णू होते. तुर्की व फारसी भाषांवर त्याचे प्रभुत्व होते. त्याने आत्मचरित्र लिहिले आहे. त्याला अनेक विषयांचे ज्ञान होते. तो रसिक व सौंदर्योपासक होता. त्याच्या पदरी अनेक कलावंत होते. राजकारण व युद्ध या बाबतीत त्याने

नूरजहान

कर्तबगारी दाखवली नाही. तो विलासी व व्यसनी असल्यामुळे नूरजहाननेच कारभार केला. त्याच्या पराक्रमी सरदारांनी व राजपुत्रांनी त्याचे साम्राज्य राखले होते. जहांगीरच्या कारकिर्दीत इंग्रजांनी भारतात प्रवेश केला. जहांगीरने सुरत येथे त्यांना वखार उघडण्यास परवानगी दिली. पोर्तुगीजांनाही त्याने हुगळी येथे वखार काढण्याची परवानगी दिली.

शहाजहान (इ. स. १६७२–१६५८) – जहांगीरची राजपूत राणी जगत गोसाई हिला इ. स. १५९२ साली एक पुत्र झाला. त्याचे नाव होते खुर्रम (= आनंद). हा अकबराचा सर्वांत लाडका नातू होता. अकबराने त्याच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था केली होती. खुर्रमची बुद्धी तीक्ष्ण व स्मरणशक्तीही उत्तम असून, फारसी भाषेवर त्याचे प्रभुत्व होते. इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र वगैरे विषयांचा त्याने अभ्यास केला होता. पण घोड्यावर बसणे, धनुर्विद्या, तलवार चालवणे, इ. युद्धकलांत तो विशेष कुशल होता. नूरजहानचा भाऊ आसफखान याची मुलगी अर्जमंद बानू हिच्याशी खुर्रमचा विवाह इ. स. १६१२ साली झाला. ती त्याची मुख्य बेगम असून, मुमताजमहल या नावाने प्रसिद्ध आहे. तिला चौदा मुले झाली, त्यांतील सात जगली. जहान आरा, दारा शुकोह, शहाशुजा, रोशन आरा, औरंगजेब, मुरादबक्ष व गोहर आरा अशी त्यांची नावे होती. जहांगीरच्या कारकिर्दीत खुर्रमने अनेक युद्धांत विजय मिळवून साम्राज्याचे संरक्षण केले. त्याने दक्षिणेत मुत्सद्देगिरीने मलिकंबरला तह करायला लावले. त्या विजया नंतर जहांगीरने त्याला शहाजहान ही पदवी दिली. सासरा आसफखान याच्या मदतीमुळे शहाजहान शेवटी यशस्वी होऊन बादशाहा बनला.

दौलतखान लोदीचा पुत्र खानजहान लोदी हा अफगाण असला तरी, जहांगीरने त्याला गुजरातची सुभेदारी दिली होती. पुढे नूरजहानने त्याला दख्खनचा सुभेदार केले. त्याने इ. स. १६२९ मध्ये बंड केले. तेव्हा शहाजहान स्वतः मोठे सैन्य घेऊन दक्षिणेत आला. खानजहानला कोणीही मदत न केल्यामुळे त्याचा पराभव होऊन त्याला उत्तरेकडे पळावे लागले.

बुंदेलखंडाचा राजा जुझारसिंह यानेही बादशाहाविरुद्ध उठाव केला (१६३४). शहाजहानने औरंगजेबाला २० हजार सैन्यासह त्याच्यावर पाठवले. औरंजेबाने त्याचा पराभव करून (१६३५) बुंदेलखंडावर वर्चस्व स्थापले. पोर्तुगीजांनी हुगळी येथे वखार उघडून बरीच उलाढाल सुरू केली होती. शहाजहानच्या कारकिर्दीत ते बरीच शिरजोरी करू लागले. म्हणून शहाजहानने कासीम अलीखान याला बंगालचा सुभेदार नेमून पोर्तुगीजांचा बंदोबस्त करायला फर्माविले. त्याने इ. स. १६३२ साली हुगळीवर हल्ला करून पोर्तुगीजांचे बंगालमधून उच्चाटन केले.

इ. स. १६३६ मध्ये शहाजहान स्वतः मोठी फौज घेऊन दक्षिणेत आला आणि त्याने निजामशाही बुडविली. ती वाच-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वण्याचा आटोकाट प्रयत्न शहाजीराजे भोसले यांनी केला. पण मोगलांच्या अफाट फौजेपुढे त्यांचे काही चालेना, म्हणून त्यांनी

मुमताजमहल

शहाजहानशी तह केला. गोवळकोंड्याच्या कुत्बशहाने बादशाहाची सार्वभौम सत्ता मान्य केली. विजापूरच्या आदिलशहाने तसे केले नाही, म्हणून शहाजहानने त्याच्यावर स्वारी केली. मग आदिलशहाने तह करून बादशहाची सत्ता मानली. त्यानंतर औरंगजेबाला दख्खनचा सुभेदार नेमून शहानजहान परत गेला. इ. स. १६५६–५७ मध्ये गोवळकोंडा व विजापूर येथील सुलतानांनी पुन्हा बादशाही सत्ता झुगारण्याचा प्रयत्न केला, तेव्हा औरंगजेबाने त्यांच्यावर स्वारी करून मोगलांचे प्रभुत्व पुन्हा प्रस्थापित केले.

शहाजहानने इ. स. १६४६ साली मध्य आशियातील बदख्शाँ व बल्ख हे प्रदेश काबीज केले होते. पण ते टिकवणे कठीण होते. त्याने कंदाहार घेण्याचे तीनदा प्रयत्न केले, पण तेही सफल झाले नाहीत. या स्वाऱ्यांमुळे मोगल सेनेची फार हानी झाली, असंख्य सैनिक मारले गेले व अफाट द्रव्य खर्च झाले. मोगलांची प्रतिष्ठाही नष्ट झाली.

इ. स. १६५७ मध्ये शहाजहान आजारी पडल्यामुळे त्याच्या चार मुलांमध्ये तख्तासाठी भांडणे सुरू झाली. सर्वांत मोठा दारा शुकोह पंजाब व मुलतान या प्रदेशांचा सुभेदार होता. तो शहाजहानला राज्यकारभारात मदत करीत असे. तो विद्वान, उदार व सहिष्णू होता. त्याला पातशाही मिळावी, अशी शहाजहानची इच्छा होती. शहाशुजा बंगालचा सुभेदार होता. तो शूर असला तरी आळशी व विलासी होता. औरंगजेब दख्खनचा सुभेदार होता. तो उद्योगी, शूर, धाडसी, निर्व्यसनी, मुत्सद्दी व रणकुशल होता; तसाच धूर्त व कपटीही होता. मुराद माळवा व गुजरात या प्रदेशांचा सुभेदार होता. तो शूर व धाडसी असला, तरी दारूपायी त्याची कर्तबगारी कमी झाली होती.

शहाजहानने दाराला आपला वारस नेमताच बाकीचे तिघे भाऊ त्याच्याविरुद्ध एक होऊन उठले. औरंगजेब व मुराद यांनी आपसांत तह करून दिल्लीकडे मोर्चे वळवले. त्यांनी बादशाही सैन्याचा धरमत व सामूगड येथे पराभव केला. लगेच औरंगजेबाने आग्र्यावर स्वारी करून शहाजहानला कैदेत टाकले आणि तो दिल्लीकडे निघाला. वाटेत त्याने मुरादला कैद केले. मग दिल्लीला जाऊन तो तख्तावर बसला. दारा लाहोरला पळाला. पुढे औरंगजेबाने त्याचा पराभव करून त्याला पकडले आणि त्याच्यावर इस्लामद्रोहाचा आरोप ठेवून त्याला फाशी दिले. शहाजहान सात वर्षे आग्र्याला कैदेत होता. औरंगजेबाने त्याचे खूप हाल केले. शेवटी इ. स. १६६६ मध्ये वयाच्या ७४ व्या वर्षी अत्यंत हीनदीन अवस्थेत तो मरण पावला. शहाजहानचे धार्मिक धोरण असहिष्णू होते. त्याने पोर्तुगीजांना निर्दयपणे छळले. काशीमधील असंख्य मंदिरे त्याने नष्ट केली. शिया मुसलमानांवरही त्याने अत्याचार केले. त्याने अकबराची शासनव्यवस्था तशीच चालू ठेवली. त्याचे राज्य अतिशय समृद्ध व वैभवशाली होते. त्याने विद्या व कला यांच्या विकासाला पुष्कळ प्रोत्साहन दिले. त्याच्या काळात बरेच वाङ्मय निर्माण झाले. संगीताला व चित्रकलेला त्याने खूप उत्तेजन दिले. मात्र तो स्थापत्यसम्राट म्हणून प्रसिद्ध आहे. ताजमहाल म्हणजे त्याच्या निर्मितीतले रत्नच होय. त्याची परमप्रिय बेगम मुमताजमहल ही इ. स. १६३१ साली मरण पावली; तिच्या स्मरणार्थ त्याने ही वास्तू उभी केली. त्याव्यतिरिक्त शहाजहानने आग्रा येथे मोती मशीद, जामा मशीद, दिवाण-ए-आम व दिवाण-ए-खास, इ. इमारती बांधल्या. मोती मशीद ताजमहालापेक्षाही सुंदर आहे, असे काही शिल्पशास्त्रज्ञ म्हणतात. दिल्ली येथील दिवाण-ए-खास व दिवाण-ए-आम, जामा मशीद, इ. इमारतीही भव्य–सुंदर आहेत. त्याने बनवलेले मयूरसिंहासनही अप्रतिम होते. ग्वाल्हेर, अजमेर, लाहोर अंबाला, काबूल, इ. शहरांतही शहाजहानने अनेक सुंदर इमारती बांधल्या. त्याच्या शिल्पकामात भारतीय व फारसी या दोन्ही पद्धतींचा सुरेख समन्वय झालेला दिसतो. त्याने निर्माण केलेल्या इमारती केवळ भव्य व दणकटच नाहीत; तर त्यांत नाजूकपणा, अलंकरण व मोहकता आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शहाजहानच्या राज्यात शांतता, सुव्यवस्था व समृद्धी नांदत होती. तो न्यायी व प्रजाहितदक्ष होता. त्यामुळे त्याच्या राजवटीला सुवर्णयुग म्हणतात. पण काही इतिहासकारांना ते मान्य नाही. त्यांच्या मते शहाजहानची शासनव्यवस्था भ्रष्ट होती. त्याने प्रजेवर जुलमी कर लादले, इमारती व दरबारी थाट यांसाठी अफाट द्रव्य उधळले आणि त्यामुळे सामान्य लोक दरिद्री व दुःखीच राहिले.

शहाजहान

शहाजहान देखणा व रसिक होता. तो विद्वानांचा आश्रयदाता होता. तो जसा रणकुशल होता, तसाच उत्तम प्रशासकही होता.

औरंगजेब (इ. स. १६५८ – १७०७) – शहाजहानने जहांगीरविरुद्ध बंड केल्यामुळे लहानपणी औरंगजेबाचे बरेच हाल झाले. पण त्याचे शिक्षण चांगले झाले. अरबी, फारसी, तुर्की व हिंदी या भाषा त्याला चांगल्या अवगत होत्या. धर्मशास्त्राचा त्याने आवडीनें अभ्यास केला होता. युद्धकलेतही तो निपुण होता. शहाजहानच्या कारकिर्दीत त्याला मनसबदारी व सुभेदारी मिळाली होती. तो अनेक युद्धे खळला. शेवटी स्वपराक्रमाने त्याने भावांचा नाश करून राज्य मिळवले. तख्तावर बसताना त्याने अबुल मुजफ्फर मुहीउद्दीन मुहंमद औरंगजेब बहादूर आलमगीर पादशहा गाजी असा किताब घेतला.

इ. स. १६६१ मध्ये औरंगजेबाने मीर जुम्ला याला बंगालचा सुभेदार नेमले आणि कुचबिहार व आसाम घेण्यास सांगितले. कारण कुचबिहारच्या राजाने मोगलांच्या राज्यात शिरून गौहाटी शहर घेतले होते. मीर जुम्ला याने मोठ्या सैन्यानिशी स्वारी करून ते प्रदेश घेतले. मीर जुम्ला इ. स. १६६३ मध्ये मरण पावला, तेव्हा त्याच्या जागी शाइस्तेखानाची नेमणूक झाली त्याने इ. स. १६६६ पर्यंत पोर्तुगीज लुटारूंचा बंदोबस्त करून त्याचे सोनद्वीप घेतले व चितगाववरही प्रभुत्व स्थापले. वायव्य सीमेवरील अफगाण टोळ्या मोगल पातशाहीला नेहमीच सतावीत होत्या. प्रारंभी औरंगजेबाच्या सरदारांनी त्यांचा पराभव केला. पण इ. स. १६७२ मध्ये त्यांनी पुन्हा उठाव केला. मग औरंगजेब त्यांच्या पारिपत्यासाठी स्वतः तिकडे गेला. पेशावरजवळ हसन अब्दल येथे दीड वर्ष राहून व कुटिल राजनीतीचा अवलंब करून त्याने त्या भागातील अफगाण लोकांचा बंदोबस्त केला.

बुंदेलखंडातील चंपतराय बुंदेला याने औरंगजेबाशी शौर्याने लढत दिली. पण शेवटी अपयश आल्यानंतर शरण न जाता त्याने आत्मत्याग केला (इ. स. १६६१). त्याचा पुत्र छत्रसाल याने इ. स. १६७१ मध्ये बुंदेलखंड स्वतंत्र केले.

शिखांचा नववा गुरू तेगबहादूर याने मोगलांविरुद्ध उठाव केला, तेव्हा औरंगजेबाने इ. स. १६७५ साली त्याचा वध केला. तेगबहादुराचा पुत्र गुरू गोविंदसिंह यानेही औरंगजेबाशी शौर्याने लढत दिली. पण त्याचा पराभव झाल्यानंतर तो नांदेडला जाऊन राहिला. जाट व सतनामी यांचे उठावही औरंगजेबाने असेच मोडून काढले.

राजस्थानातील बहुतेक राजपूत घराणी मोगलांची एकनिष्ठ सेवा करीत होती. शहाजहानपर्यंतच्या बादशहांनी त्यांना मानाने वागवले. पण औरंगजेबाने कपटकारस्थाने करून जयपूरचा मिर्झा राजा जयसिंह व जोधपूरचा जसवंतसिंह यांचा काटा काढला. दोघेही महापराक्रमी व कसलेले सेनानी होते. ते राजनिष्ठही होते. पण औरंगजेबाचा त्यांच्यावर विश्वास नव्हता. त्याने जयसिंहाला दक्षिणेत शिवाजीमहाराजांविरुद्ध लढण्यास पाठवले. तो यशस्वी होऊन परत गेल्यावर त्याच्यावर विषप्रयोग होऊन तो मरण पावला, असे म्हणतात. जसवंतसिंहाला औरंगजेबाने वायव्यसीमा प्रांताच्या मोहिमेवर पाठवले. तिकडे असताना त्यालाही विषप्रयोगाने ठार मारण्यात आले. मग औरंगजेबाने मारवाडवर आपली सत्ता प्रस्थापित केली. त्या प्रदेशातली अनेक मंदिरे त्याच्या सरदाराने उद्ध्वस्त केली.

जसवंतसिंहाच्या मृत्यूनंतर त्याची गरोदर राणी प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. त्याचे नाव अजितसिंह. त्या दोघांना औरंगजेबाने आपल्या ताब्यात ठेवले. अजितसिंहाला इस्लामची दीक्षा देण्याचा विचार त्याच्या मनात होता. पण जोधपूरचा स्वामिनिष्ठ सरदार दुर्गादास याने दोघांना सोडवून नेले. त्यानंतर औरंगजेबाने आपला मुलगा अकबर याला प्रचंड सेना देऊन तिकडे पाठवले. त्यामुळे राजपूत पराभूत झाले व जोधपूरचे राज्य औरंगजेबाने घेतले.

त्या वेळी मेवाडवर सिसोदिया वंशातील राजसिंह हा राज्य करीत होता. त्याने औरंगजेबाविरुद्ध हालचाली सुरू केल्या तेव्हा इ. स. १६७९ मध्ये औरंगजेबाने मेवाडवर स्वारी केली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजसिंहाचा पराभव झाला आणि औरंगजेबाने चितोडवर अकबराची नेमणूक केली. राजपुतांनी मग डोंगरी प्रदेशात राहून मोगल सैन्यावर छुपे हल्ले सुरू केले. त्यामुळे ते जेरीस आले. राजसिंहाने एका लढाईत अकबराचा मोठा पराभव केला. तेव्हा अकबर राजपुतांकडे गेला. राजसिंहाने त्याला हाती धरून औरंगजेबाविरुद्ध लढा चालू ठेवला. पण लवकरच (इ. स. १६८० मध्ये) राजसिंह मरण पावला. मग अकबर दुर्गादासाबरोबर दक्षिणेत आला. तिथे त्याने संभाजीकडे मदत मागितली.

त्याच्या मागोमाग औरंगजेबही मराठ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रचंड फौज घेऊन दक्षिणेत आला. पहिली चार वर्षे त्याने अकबराला पकडण्यासाठी व मराठ्यांना नामोहरम करण्यासाठी घालवली. पण त्या दोन्ही कामांत त्याला यश आले नाही. मराठ्यांच्या मदतीची आशा बाळगून अकबर सहा वर्षे महाराष्ट्रात राहिला. पण शेवटी तो निराश होऊन इराणमध्ये गेला. इ. स. १६९४मध्ये त्याने इराणी घोडदलाच्या मदतीने भारतावर स्वारी केली, पण मुअज्जमने त्याचा पराभव केला.

औरंगजेब दक्षिणेत असताना त्याचे सरदार उत्तरेत रजपुतांशी लढत होते. मेवाड व मारवाड या भागात राजपूत लोक गनिमी युद्ध करीत होते. दुर्गादास हा त्यांचा नेता अत्यंत शूर व रणकुशल होता. राजपूत व मोगल यांचा हा लढा दीर्घ काळ चालू होता. त्या कालखंडात राजपुतांनी आपला बराच प्रदेश मोगलांच्या ताब्यातून सोडविला.



इ. स. १६८६ मध्ये औरंगजेबाने विजापूरकरांचा पराभव करून ते राज्य मोगल साम्राज्यात विलीन केले. इ. स. १६८७ मध्ये गोवळकोंड्याचे राज्यही त्याने घेतले. त्यानंतर त्याने मराठ्यांचे राज्य बुडविण्याचे काम पुन्हा हाती घेतले. इ.स. १६८९ साली छ. संभाजी त्याच्या हाती सापडला. औरंगजेबाने त्याला हालहाल करून ठार मारले. पण त्यामुळे सर्व मराठे सरदार चवताळून गेले व त्यांनी मोगल सैन्यावर छुपे हल्ले सुरू केले. औरंगजेबाने संभाजींची राणी येसूबाई व पुत्र शिवाजी यांना पकडून कैदेत ठेवले. मग छ. राजाराम जिंजीला राहून लढा चालवू लागला. औरंगजेबाचा सरदार झुल्फिकारखान याने जिंजीचा किल्ला घेतला, तेव्हा राजाराम महाराष्ट्रात परत आला. त्याच्या मृत्यूनंतर त्याची राणी ताराबाई हिने लढा चालू ठेवला. मराठे सरदारांच्या गनिमी युद्धामुळे औरंगजेब जेरीस

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आला आणि शेवटी इ. स. १७०७ मध्ये तो अहमदनगर येथे मरण पावला.

इ. स. १६९० च्या सुमारास औरंगजेबाने भारताच्या बऱ्याच मोठ्या भागावर आपली सत्ता स्थापली होती. काबूल ते कलकत्ता आणि काश्मीर ते कावेरीपर्यंत त्याचे साम्राज्य होते. पण ते लवकरच भंग पावले. मराठी राज्य तो बुडवू शकला नाही. राजपुतांनीही आपला बराच प्रदेश मुक्त केला. त्यामुळे शेवटी तो अपयशी ठरला.

औरंगजेब अत्यंत कडवा व कर्मठ मुसलमान होता. त्याची राहणी साधी होती. तो निर्व्यसनी होता. (औरंगजेब पाहा)

औरंगजेबाचा कारभार एकतंत्री होता. त्याचा कोणावरही विश्वास नव्हता. त्याने अनेक कर्तबगार पुरुषांना कपटाने ठार मारले. त्याच्या कारभारावर धर्माचे वर्चस्व होते. हिंदू लोकांशी त्याने सलोखा न करता जिहाद पुकारला होता. या सर्व कारणांमुळे औरंगजेबानंतर त्याचे साम्राज्य नष्ट झाले. त्याच्या वंशातील अनेक पुरुष शेवटी नाममात्र बादशहा म्हणून जगले.

नंतरचे बादशहा – औरंगजेब मरण पावताच त्याचा दुसरा मुलगा मुअज्जम (शहा आलम) हा अफगाणिस्थानातून परत आला व आग्र्याचा किल्ला ताब्यात घेऊन तिथेच तो तख्तावर बसला. त्या वेळी त्याने बहादूरशहा हा किताब घेतला. त्याने छ. संभाजीचा पुत्र शिवाजी (शाहू) याला मुक्त केले आणि इ. स. १७१० साली राजपुतान्यातील निरनिराळ्या राजांशी सलोखा केला. त्याच सुमारास शिखांचा गुरू गोविंदसिंग याचा शिष्य बंदा बहादूर यानेही उठाव केला होता. त्याने पंजाबात बराच प्रदेश जिंकून स्वातंत्र्य घोषित केले. बहादूरशहाने काही प्रदेश परत घेतला, तरी तो बंदाचा पूर्ण पराभव करू शकला नाही. इ. स. १७१२ च्या फेब्रुवारीत बहादुरशहा मरण पावला. तो एक दुबळा बादशहा होता. मात्र त्याने पूर्वीच्या सर्व अधिकाऱ्यांना त्यांच्या पदावर कायम ठेवल्यामुळे राज्यकारभार नीट चालू राहिला.

त्यानंतर बहादूरशहाचा मुलगा जहांदरशहा इ. स. १७१२ मध्ये बादशहा झाला. वारसाच्या झगड्यात त्याचे तीन भाऊ मारले गेले. झुल्फिकारखान हा जहांदरशहाचा वजीर होता. जहांदरशहा अत्यंत आळशी व विलासी होता. त्याचा भाऊ अजिमुश्शान याचा मुलगा फर्रुखसियर हा बंगालचा सुभेदार होता. त्याने स्वतःला बादशहा म्हणून घोषित केले. पाटणा व अलाहाबाद येथील दुय्यम सुभेदार सय्यद हुसेन अलीखान व अब्दुल्लाखान हे दोन भाऊ सय्यद बंधू म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी जहांदरशहाला ठार मारून इ. स. १७१३ मध्ये फर्रुखसियरला गादीवर बसविले. तो दुबळा असूनही सय्यद बंधूंविरुद्ध कपटकारस्थाने करू लागला. अब्दुल्लाखान वजीर होता व हुसेन अलीखान मीरबक्ष (सैन्यमंत्री) होता. राजस्थानात अजितसिंह मोगलांच्या प्रदेशावर आक्रमण करू लागला, पण हुसेन अलीने त्याचा पराभव केला. तेव्हा अजितसिंहाने आपली कन्या बादशहाला दिली व पुत्र अभयसिंह याला दरबारात ठेवले. त्यानंतर हुसेन अली दख्खनचा सुभेदार झाला (इ. स. १७१५).

इ. स. १७१६ साली मोगलांचा लाहोर येथील सुभेदार समदखान याने शिखांचा पराभव केला. बंदा बहादूर त्याला शरण गेला. बंदा व त्याचे शेकडो साथीदार मारले गेले.

बादशहा सय्यद बंधूंच्या विरुद्ध कारस्थाने करीत होता म्हणून हुसेन अलीखानाने छ. शाहूशी तह करून मराठ्यांची मदत मिळवली आणि बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्यासह तो दिल्लीला गेला. इ. स. १७१९ साली सय्यद बंधूंनी मराठ्यांच्या मदतीने दिल्लीवर ताबा मिळवला. त्यांनी येसूबाईला मुक्त केले, शाहूला मराठ्यांचा राजा म्हणून मान्यता दिली आणि दक्षिणेतील सहा सुभ्यांत चौथाई-सरदेशमुखीचे हक्क दिले. फर्रुखसियरला काढून सय्यद बंधूंनी त्याच्या जागी जहांदरशहाचा भाऊ रफिउश्शान याचा दुसरा मुलगा रफी उद्दरजात याला बसवले. पण तो रोगग्रस्त झाल्यामुळे लवकरच त्यांनी त्याला पदच्युत केले. अकबराचा मुलगा नेकुसियर याने स्वतःला बादशहा म्हणून घोषित केले होते. पण हुसेन अलीखानाने त्याला कैद केले व रफीउद्दरजाताचा मोठा भाऊ रफीउद्दौला याला शहाजहान (दुसरा) म्हणून गादीवर बसवले. पण तोही रोगी असल्यामुळे लवकरच मरण पावला.

मुहंमदशहा (इ. स. १७१९–१७४८) – मग सय्यद बंधूंनी औरंगजेबाचा १८ वर्षांचा पणतू रोशन अख्तार (जहांदरशहाचा पुतण्या) याला मुहंमदशहा म्हणून तख्तावर बसवले. इ. स. १७२० मध्ये निजाम उल् मुल्क याने सय्यद बंधूंविरुद्ध बंड केले. तेव्हा हुसेन अली बादशहासह दक्षिणेच्या मोहिमेवर निघाला. पण वाटेत हुसेन अलीचा खून झाला. मग त्याचा भाऊ सय्यद अब्दुल्लाखान याने रफी उश्शानचा मुलगा इब्राहीम याला तख्तावर बसवले. पण मुहंमदशहाने दिल्लीला परत जाऊन दोघांनाही कैद केले. मग त्याने मुहंमद अमीनखानाला वजीर नेमले. पण तो लवकरच मरण पावला. तेव्हा त्याने निजाम उलमुल्क याला वजीर नेमले (इ. स. १७२२). पण त्याचे बादशहाशी फारसे पटले नाही, म्हणून तो १७२३ मध्ये वजीरपद सोडून दक्षिणेत गेला. बादशहाने अमीनखानाचा पुत्र कमरुद्दीनखान याला वजीर नेमले. निजामाने हैदराबादचा सुभेदार मुबारीजखान याचा पराभव करून त्याला ठार मारले व तिथे आपली सत्ता स्थापली (१७२४). बादशहाने मग त्याला सुभेदार म्हणून मान्यता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिली व आसफजा ही पदवीही दिली. पण तो दख्खनचा कारभार स्वतंत्रपणे करू लागला.

इ. स. १७३७ साली बाजीराव पेशव्याने दिल्लीवर स्वारी केली, तेव्हा बादशहाने निजामाला मदतीला बोलावले. पण भोपाळ येथे बाजीरावाने निजामाचा पराभव केला. तेव्हा निजामाने तह करून पेशव्यांना बादशहाकडून माळवा दिला व पन्नास लाख रुपये खंडणीही दिली.

मुहंमदशहाच्या कारकिर्दीत बंगाल व अवध हे प्रदेशही स्वतंत्र झाले.

इ. स. १७३८ मध्ये इराणचा बादशहा नादिरशहा याने भारतावर स्वारी केली. प्रथम त्याने लाहोर घेतले. तेव्हा मुहंमदशहा व निजाम मोठी फौज घेऊन त्याच्या प्रतीकारासाठी गेले. पण नादिरशहाने कर्नाळ येथे त्यांचा पराभव केला. मग नादिरशहा दिल्लीला गेला (१७३९). दिल्लीतील लोकांनी त्याच्या विरुद्ध उठाव करून त्याचे काही सैनिक मारल्यामुळे तो चवताळला व त्याने हजारो लोकांची कत्तल केली. मग त्याने दिल्लीतील धनिकांना लुटून अपार संपत्ती गोळा केली. त्या संपत्तीत मयूरसिंहासन, कोहिनूर हिरा, असंख्य रत्ने, विपुल सोने-चांदी आणि हजारो हत्तीघोडे होते. ती सर्व लूट घेऊन नादिरशहा परत गेला. त्याने काबूल प्रांत इराणला जोडून टाकला.

मुहंमदशहाच्या कारकिर्दीच्या शेवटी अफगाणिस्तानचा सुलतान अहंमदशहा अब्दाली याने इ. स. १७४८ साली भारतावर पहिली स्वारी केली. मुहंमदशहाचा पुत्र अहंमदशहा याने सरहिंदजवळ त्याचा पराभव करून त्याला पिटाळून लावले. लवकरच मुहंमदशहा मरण पावला.

अहंमदशहा (इ. स. १७४८–१७५४)–त्यानंतर अहंमदशहा तख्तावर बसला. अयोध्येचा सुभेदार सफदरजंग याला त्याने आपला वजीर नेमले. पण खोजा जावेदखान (नवाबबहादूर) याचे दरबारात बरेच प्रस्थ होते. त्यामुळे अहंमदशहा त्याच्या हातातील बाहुले बनला.

गंगा–यमुनेच्या दुआबात रोहिले व बंगश पठाण यांची राज्ये होती. ते लोक सफदरजंगाच्या अयोध्या प्रांतात व बादशाही प्रदेशात लूटमार करीत, म्हणून सफदरजंगाने त्यांच्यावर स्वारी केली. पण त्याचा पराभव झाला, तेव्हा त्याने शिंदे व होळकर यांची मदत घेतली. तेवढ्यात रोहिल्यांचा सरदार नजीबखान याच्या बोलावण्यावरून अहंमदशहा अब्दालीने पुन्हा भारतावर स्वारी केली (इ. स. १७५२). तेव्हा सफदरजंगाने अहंमदखान बंगश याच्याशी तह केला. त्या तहात सफदरजंगाला जो प्रदेश मिळाला, तो त्याने मराठ्यांना देऊन टाकला. अशा प्रकारे दुआबात शिंद्यांची सत्ता स्थापन झाली.

पंजाबचा सुभेदार मीरमन्नू याने अब्दालीशी तह करून त्याला लाहोर व मुलतान हे सुभे दिले. मग सफदरजंग याने मोगल बादशाहीचे रक्षण करण्यासाठी मराठ्यांना ५० लाख रुपये देण्याचा करार केला; अजमेर व आग्रा या सुभ्यांची सुभेदारीही पेशव्यांना दिली.

पुढे दोनतीन वर्षे दिल्लीत अंदाधुंदी व कारस्थाने माजली व इ. स. १७५४ साली बादशहाने गाजीउद्दीन याला वजीर नेमले. पण त्याने अहंमदशहाला कैद करून जहांदरशहाचा मुलगा अजिजुद्दीन याला आलमगीर (दुसरा) या नावाने गादीवर बसविले. त्याने इ. स. १७५४ ते १७५९ पर्यंत राज्य केले. तो वजीर गाज़ीउद्दीन याच्या हातातले बाहुलेच होता. वजिराने मीरमन्नूच्या मृत्यूनंतर पंजाबवर स्वारी करून तो प्रदेश परत घेतला व आदिनाबेग याला तिथला सुभेदार नेमले.

इ. स. १७५६–५७ मध्ये अब्दालीने भारतावर चौथी स्वारी केली. त्याच्या सेनापतीने आदिनाबेगचा पराभव करून सतलज-पर्यंतचा प्रदेश काबीज केला. तो मग सरहिंदला आला. तेव्हा नजीबखान रोहिला त्याला सामील झाला. मागोमाग अब्दाली आला. त्याने दिल्लीत भयंकर लुटालूट व अत्याचार केले आणि तो मथुरेवर चालून गेला. तिथे सुरजमल जाटाने शौर्याने त्याचा प्रतीकार केला. पण अफगाण सैन्याने मथुरेत शिरून अनन्वित अत्याचार केले. मग अब्दालीने गाजीउद्दिनाचा धाकटा भाऊ इमाद–उल्–मुल्क याला वजीर नेमले, नजीबखानाला मीरबक्षी (सैन्यमंत्री) नेमून नजीबुद्दौला हा किताब दिला, स्वतःचा मुलगा तैमूरशहा व सेनापती जहानशहा यांना लाहोर येथे ठेवले आणि अगणित संपत्ती घेऊन तो परत गेला.

त्यानंतर लवकरच बंगालचा सुभेदार सिराजउद्दौला याचा प्लासी येथे इंग्रजांनी पराभव केला आणि बंगाल प्रांत इंग्रजांच्या ताब्यात गेला.

नजीबुद्दौला याने बादशहा आलमगीर (दुसरा) याला अत्यंत निष्ठुरपणे वागवले आणि त्याचे बरेच धन लुबाडले. तेव्हा गाजीउद्दीन याने मराठ्यांना बोलावले. राघोबादादा मोठे सैन्य घेऊन तिकडे गेला. विठ्ठल शिवदेव याने नजीबला कैद केले, पण मल्हारराव होळकरांच्या सांगण्यावरून त्याला ठार न मारता सोडून दिले. पुढे सरहिंदचा सुभेदार आदिनाबेग याने बोलावल्यावरून राघोबा व होळकर पंजाबात गेले. अफगाण सेनानी पळून गेल्यामुळे लाहोर मराठ्यांच्या ताब्यात आले. मग मराठ्यांनी अटकेवर झेंडा फडकवला.

राघोबा दक्षिणेत परतला आणि दत्ताजी शिंदे दिल्लीला गेला. त्याने वजीर इमाद-उल्-मुल्क याचा पराभव करून दिल्लीवर वर्चस्व स्थापले. त्यानंतर त्याने साबाजी शिंदे याला पंजा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बचा सुभेदार नेमले व दुआबात मिरापूर येथे तळ ठोकला.

इ. स. १७५९ साली अब्दालीने भारतावर स्वारी केली. बादशहा आलमगीर याने नजीब व अब्दाली यांच्याशी पत्रव्यवहार केला होता, म्हणून वजीर इमाद्उल्मुल्क याने त्याला ठार मारले आणि कामबक्षाचा नातू मुही–उल्–मिल्लत याला शहाजहान (तिसरा) म्हणून गादीवर बसवले (नोव्हें. १७५९). अब्दालीने दिल्ली घेऊन बादशहाला पदच्युत केले. पण कोणालाच गादीवर बसविले नाही. वजीर पळून गेला. आलमगीर (दुसरा) याचा मुलगा अलीगौहर याने बिहारमध्ये स्वतःला बादशहा म्हणून घोषित करून शहाआलम (दुसरा) हे नाव घेतले. जानेवारी १७६० मध्ये दत्ताजी शिंदे अब्दालीशी लढताना मारला गेला.

पुढे इ. स. १७६१ मध्ये पानिपत येथे मराठे व अब्दाली यांचे घनघोर युद्ध होऊन मराठ्यांचा दारुण पराभव झाला. मग अब्दालीने शहाआलम याला बादशहा म्हणून मान्यता दिली, इमाद–उल्–मुल्कला वजीर नेमले, नजीबुद्दौला याला दिल्लीचा अधिकारी नेमले आणि तो काबूलकडे परत गेला.

बादशहा शहाआलम १७६० पासून १७७१ पर्यंत दिल्लीला न जाता बिहारमध्येच राहिला. इ. स. १७६५–७१ या काळात इंग्रजांनी त्याचे रक्षण केले. त्या काळात दिल्लीचे तख्त रिकामेच होते. नजीबुद्दौला सर्व कारभार पाहत होता. पुढे १७७२ च्या जानेवारीत महादजी शिंदे याच्या मदतीने शहाआलम दिल्लीला जाऊन तख्तावर बसला. त्याने इ. स. १८०६ पर्यंत राज्य केले. मात्र खरी सत्ता मराठ्यांच्या हाती होती. शहाआलम मरण पावल्यावर त्याचा पुत्र अकबर (दुसरा) गादीवर बसला. त्याने इ. स. १८३७ पर्यंत राज्य केले. पण १८०३ पासून सत्ता इंग्रजांच्या हाती गेली. अकबराचा पुत्र बहादूरशहा याने इ. स. १८३७ पासून १८५७ पर्यंत राज्य केले. हा शेवटचा मोगल बादशहा होय. त्याने १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात बराच पुढाकार घेतला होता. त्याची राणी जिन्नतमहल ही कर्तबगार होती. पण इंग्रजांनी त्यांच्या उठावाचा मोड करून त्या दोघांना रंगून येथे कैदेत ठेवले. तिथे इ. स. १८६२ मध्ये बहादूरशहा मरण पावला. अशा प्रकारे मोगल बादशाही १८५७ मध्ये नष्ट झाली.

मोगल बादशाहीच्या नाशाची कारणे – (१) गादीच्या वारसाबद्दल नियम नसल्यामुळे एक बादशहा मेल्यानंतर त्याच्या मुलांमध्ये झगडा होऊन जो बलवान आणि कारस्थानी असेल तो राज्य बळकावी. त्यामुळे रक्तपात व शक्तिपात फार होत असे. (२) औरंगजेबानेच साम्राज्य खूप वाढवले असले, तरी तोच त्याच्या नाशाला सर्वांत अधिक जबाबदार आहे, असे बहुतेक इतिहासकार म्हणतात. त्याचे धार्मिक धोरण कडवे व असहिष्णू असल्यामुळे हिंदूंशी त्याने कमालीचे शत्रुत्व ठेवले व आत्मघात करून घेतला. (३) औरंगजेबानंतरचे सर्व बादशहा दुबळे व दुराचारी निघाले. ते नामधारीच बादशहा होते. त्यांचे वजीरच खरे सत्ताधीश ठरले. (४) मनसबदारी पद्धतीमुळे लष्कराचे विघटन झाले. त्यात शिस्तही राहिली नाही. दुसरे म्हणजे मोगलांचे आरमारही प्रबळ नव्हते. (५) प्रारंभी मोगल सरदार शूर, कर्तबगार व निष्ठावान होते. पण औरंगजेबाच्या काळापासून सरदारवर्ग विलासी, व्यसनी व स्वार्थी बनला. त्याने साम्राज्याचे रक्षण न करता स्वतःच सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला. सरदारांत अनेक गट तयार झाले आणि त्यांच्यांतही सतत संघर्ष चालू राहिला. अनेक सुभेदार बंडखोर निघाले. त्यांचा बंदोबस्त करणे बादशहाला अवघड पडू लागले. (६) शासनव्यवस्था फारशी मजबूत राहिली नाही. त्यामुळे प्रजेचे हाल होऊ लागले. (७) सतत युद्धे व प्रचंड इमारतींची निर्मिती यांसाठी अलोट द्रव्य खर्च होऊन आर्थिक स्थिती बिघडली. (८) नादिरशहा व अहमदशहा अब्दाली यांच्या स्वाऱ्या, अत्याचार व लुटालूट यांमुळे मोगलांची दुर्दशा झाली. (९) मराठी साम्राज्याची स्थापना झाल्यामुळे मोगल साम्राज्य नाश पावले. [भा. सां. इ.; मु. का. भा.; मो. का. भा. इ.]

मोगिया

एक जात. या लोकांची वस्ती राजस्थानात आढळते. यांच्यांतील काही लोक माळव्यातून इथे आले असावे. एका खुंजी पुरुषाने ब्राह्मण स्त्रीबरोबर विवाह केला आणि त्यांच्या संततीला हे नाव मिळाले, असे सांगतात. कुंचे, झाडू, पंखे व चटया तयार करणे हा यांचा व्यवसाय आहे. यांच्यांतील काही लोक आपल्या धंद्याची प्राचीनता सांगतात ती अशी–राम-रावण युद्धात लक्ष्मणाला रावणाची शक्ती लागून तो मूर्च्छित पडला असता त्याला वारा घालण्यासाठी आम्ही पंखा तयार करून दिला तेव्हापासून आमच्या जातीकडे हे काम आले.

यांना मेवा–मिठाईचा किंवा खानावळीचा व्यवसाय करायला बंदी आहे. भंगी व चांभार यांची कामे करायलाही बंदी आहे.

विवाहप्रथा – हे लोक बालविवाह करतात. वाङ्निश्चयाच्या वेळी वराकडची पाच माणसे वधूगृही येतात. तिथे त्यांना कपडे व दारू मिळते. जातपंचायतीमधील लोकांना गूळ वाटला जातो. लग्नात वरपक्षाकडून देज घेतात. परंतु विवाह झाल्यावर वराला निरोप देताना त्याला हुंडा देतात. विवाहानंतर दोन–तीन वर्षांनी मुलगी सासरी जाते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवधर्म – मातार्जी व भैरव हे यांचे प्रमुख देव होत. हे तीर्थक्षेत्रांच्या यात्रा करतात. पौर्णिमा व शनिवार या दिवशी उपवास करतात. अमावास्या, चतुर्थी व रविवार हे दिवस शुभ मानतात.

प्रसूतिप्रथा – हे लोक जननाशौच एकवीस दिवस पाळतात. त्यानंतर बाळंतिणीला नवीन बांगडया भरतात आणि बत्तासे वाटतात. मुलाचे नामकरण ब्राह्मणाद्वारा करतात. मुलाची पत्रिकाही करून घेतात.

मोगिया लोक भंगी, चांभार, पिंजर, यांच्या हातचे अन्न खात नाहीत. पुरुषांना मांसाहार चालतो, परंतु त्यांच्या बायका मांस खात नाहीत. गाय, म्हैस, माकड व मोर यांचे मांस कोणीच खात नाही. हा नियम मोडणाऱ्याला जातिबहिष्कृत करतात.

यांच्यांत दत्तक घेण्याची चाल आहे. दत्तकासाठी प्रथम जवळचा नातेवाईक पसंत करतात. तसा कोणी नसल्यास गोत्रातील मलगा दत्तक घेतात. जातीचे लोक व पच याच्या साक्षीने दत्तकाला पगडी घालण्याचा समारंभ करतात. त्या वेळी नारळ, बत्तासे व गूळ वाटतात.

यांच्यांत जातपंचायत असते. दत्तक घेणे, पाट लावणे, विवाह, इ. गोष्टी पचायतीपुढे होतात. जातीचे कायदे मोडणाऱ्यांना पंचायत दंड करते. दंडाची रक्कम एकत्र करून त्याची भांडी घेतात व ती लोकांना वापरायला देतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृत मुलांना पुरतात व मोठ्यांना जाळतात. नवव्या किंवा अकराव्या दिवशी क्षौर करतात. तेराव्या दिवशी पगडी घालण्याचा समारंभ करतात. रक्षाविसर्जन सवडीने करतात. हे वार्षिक श्राद्ध आवर्जून करतात. यांच्यांतील नवन लोक दर तीन महिन्यांनी ज्ञातिभोजन घालतात. स्त्री मेली असेल तर कपडे वाटतात.

हे लोक मृताची संपत्ती त्याच्या सर्व पुत्रांमध्ये सारखी वाटतात. मृताचा मुलगा किंवा अन्य नातेवाईक असता मुलीला संपत्तीचा वाटा मिळत नाही. [सो. ला. रा.]

मोगेर

मंगरूळ जिल्ह्यातील एक जात. मासे पकडणे हा या लोकांचा मुख्य उद्योग आहे. याशिवाय ते नावा वल्हवणे, ओझी वाहणे, पालख्या वाहणे, तेल गाळणे, वाद्ये वाजवणे व शेती हे व्यवसाय करतात. मासे पकडणाऱ्या लोकांच्या पाड्यांना पट्टन असे म्हणतात. प्रत्येक पट्टनावर दोन तरी प्रमुख असतात. त्यांना गुरिकार असे नाव आहे. आपल्या अधिकाराची खण म्हणून ते डाव्या हातात सोन्याचे कडे घालतात. गुरिकाराचे पद हे वंशपरंपरा असते. मोगेर लोक तुळुव वंशाचे आहेत.

विवाहप्रथा – या लोकांत अनेक बळी म्हणजे कुळया असून, समान देवक असलेल्या बळींत लग्नसंबंध होत नाही. यांचा लग्नविधी तुळू लोकांच्या लग्नविधीप्रमाणेच असतो. मुलीचे देज देण्याची यांच्यांत पद्धत आहे. साखरपुडयाच्या वेळी देजाची रक्कम देतात. लग्नसमारंभ दोन दिवस चालतो. पहिल्या दिवशी वधूला पाटावर बसवून पाच सुवासिनी तिच्या मस्तकावर अक्षता टाकतात. दुसऱ्या दिवशी वधू-वरांना शेजारी बसवून, वधूपिता किंवा गुरिकार त्यांच्या जुळवलेल्या हातांवर दूधमिश्रित पाणी ओततो. वधूवरांच्या जवळच, एका तांदुळाच्या ढिगावर नारळ व पानसुपाऱ्या ठेवतात. त्या नारळावरही तीनदा दूधमिश्रित पाणी ओततात. मग जमलेले सर्व लोक वधू-वरांवर अक्षता टाकतात व त्यांना आहेर करतात.

गुरिकाराला सांगितल्यावर घटस्फोट सहजपणे मिळतो. उडिपी तालुक्यात घटस्फोट घेऊ इच्छिणारा पुरुष दोनतीन सोबत्यांना बरोबर घेऊन एका विशिष्ट वृक्षाजवळ जातो व हातातल्या कोयत्याने त्याला तीन खाचा पाडतो.

प्रसूतिप्रथा – मुलाच्या जन्मानंतर सातव्या दिवशी, धोबीण मुलाच्या कंबरेत करदोटा बांधते आणि त्याचे नाव ठेवते. कालांतराने मुलाच्या घरचे लोक त्याला दुसरे नाव देतात.

तुळू बोलणाऱ्या काही कुटुंबांत वारसाहक्क स्त्रीकडे जातो. कन्नडभाषी कुटुंबांत मात्र तो पित्याकडून पुत्राकडे जातो.

हे लोक भुताखेतांची पूजा करतात. बोब्बरिय हे त्यांपैकी प्रमुख भूत आहे. बहुतेक प्रत्येक पट्टनात एक भूतस्थान म्हणजे भुताचे मंदिर असते. तिथे मधून मधून उत्सव करून ते त्याला संतुष्ट राखतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात किंवा पुरतात. प्रेत जाळल्यास तिसऱ्या किंवा पाचव्या दिवशी त्याची रक्षा एखाद्या तळ्यात किंवा नदीत टाकतात. सातव्या, नवव्या, अकराव्या किंवा तेराव्या दिवशी अंत्यक्रिया करतात. [का. द्वा. म. ः.]

मोग्गलान

गौतम बुद्धाचा एक पट्टशिष्य. तो ब्राह्मण होता. त्याच्या तारुण्यातील जीवनाविषयी काहीही माहिती उपलब्ध नाही. सारिपुत्ताबरोबर हा गौतम बुद्धाकडे गेला आणि त्या दोघांनी मिळून बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. मोग्गलान हा विद्वान होता. गौतम बुद्ध आपला उपदेश कधी कधी मोग्गलान, सारिपुत्त व आनंद या शिष्यांना पुरा करायला सांगे असे. त्यामुळे सुत्तपिटकाच्या अनेक सूत्रांत मोग्गलानाचीही काही सूत्रे आढळतात. मोग्गलानाने काही गाथाही रचल्या आहेत. हा ऋद्धिमानांत श्रेष्ठ होता. त्याच्या नावापूर्वी महा हे विशेषण लावण्यात येते. याचा मृत्यू बुद्धाच्या हयातीतच झाला. राजगृहाजवळच्या इसिगिली टेकड्यांतील एका गंफेत त्याचा खून झा.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशीही आख्यायिका आहे. काही जैन भिक्षूंनी मत्सरापोटी त्याच्यावर मारेकरी घातला, असे सांगतात.

इ. स. १८५१ मध्ये सांची येथील स्तूप जेव्हा उघडले, तेव्हा एका छोट्या स्तूपात दोन पेट्या सापडल्या; त्यांत मोग्गलान व सारिपुत्त यांच्या अस्थी मिळाल्या. पेटयांवर अशोककालीन पाली अक्षरांत महामोग्गलान व सारिपुत्त ही नावे लिहिलेली आढळली. त्यानंतर या अस्थी लंकेत नेलेल्या होत्या. पण सांप्रत त्या तिथून आणून सांची येथेच ठेवल्या आहेत. [हिं. वि. को.; एन्सा. रि. ए.; भ. बु. द.]

(२) (इ. स. चे १२ वे शतक) एक बौद्ध वैयाकरण. याने पाली भाषेचे व्याकरण लिहिले आहे. मोग्गलान व्याकरण हे कच्चान व्याकरणाच्या नंतर निर्माण झाले. पण कच्चान व्याकरणापेक्षा हे परिपूर्ण असल्यामुळे याचा प्रसार अधिक झाला. या व्याकरणात ८१७ सूत्रे असून, त्यांत सूत्रपाठ, धातुपाठ, गणपाठ, ण्वादिपाठ, इ. व्याकरणविषयक विषयांचे विवेचन केलेले आहे. मोग्गलानाने स्वतःच आपल्या व्याकरणावर वृत्ती लिहिली असून, तिच्यावर पंचिका नामक टीका लिहिली आहे.

वृत्तीच्या शेवटी मोग्गलानाने स्वतःसंबंधी थोडी माहिती दिली आहे. त्यावरून हा लंकेतील अनुराधपूर येथील थूपाराम विहारात राहत होता आणि पराक्रमबाहूच्या कारकिर्दीत (इ. स. ११५३ ते ११८६) याने आपले व्याकरण रचले, हे समजते. [हिं. वि. को.; भ. पा. सा. इ.]

(३) (इ. स. चे १२ वे शतक.) एक बौद्ध कोशकार. हा पुलत्थिपूर येथील जेतवन विहारात राहत होता. त्याने अभिधानप्पदीपिका नामक, अमरकोशाच्या धर्तीवर एक कोश पाली भाषेत रचला आहे. त्यात स्वर्गकांड, भूकांड व श्रामण्यकांड असे तीन विभाग आहेत. [हिं. वि. को.]

मोग्गलिपुत्त तिस्स

(सनपूर्व ३ रे शतक) एक विद्वान बौद्ध भिक्षू. याचा जन्म पाटलिपुत्रातील एका ब्राह्मण घराण्यात झाला. काही विद्वानांच्या मते मोग्गली हे त्याच्या पित्याचे, तर काहींच्या मते ते त्याच्या मातेचे नाव आहे. वयाच्या अठराव्या वर्षीच त्याने तीन वेदांचा अभ्यास पुरा केला आणि इतर शास्त्रांचेही सखोल अध्ययन केले. त्यानंतर त्याचा व सिग्गव या बौद्ध पंडिताचा वादविवाद होऊन तो सिग्गवाचा शिष्य झाला. सिग्गवाव्यतिरिक्त त्याने चंडविज्ज नावाच्या एका बौद्ध पंडिताकडेही बौद्ध धर्माचा अभ्यास केला.

अशोकाने भिक्षूसाठी अनाठायी चालविलेल्या दानधर्माला याने विरोध केला. परंतु राजाने त्याचे म्हणणे ऐकले नाही, म्हणून हा हिमालयात तपाला निघून गेला.

बौद्ध संघातील कलह व इतर दोष दूर करण्यासाठी अशोकाने पाटलिपुत्रात तिसरी संगीती भरविली होती. या संगीतीचा मोग्गली हा अध्यक्ष होता. या संगीतीचे काम नऊ महिने चालले होते. या परिषदेतच त्रिपिटकाच्या संकलनाचे काम पुरे झाले. त्याने रचलेला कथावत्थू हा ग्रंथ प्रामाणिक ग्रंथ म्हणून या सभेने मान्य केला.

बौद्ध धर्माला स्थायी रूप देण्याचे काम जरी महाकाश्यपाने केले असले तरी, या धर्माची ध्वजा त्रिखंडात नेण्याचे श्रेय मोग्गलिपुत्ताला दिले पाहिजे. कारण तिसऱ्या संगीतीच्या वेळी प्रथमच धर्मप्रसाराची योजना आखली गेली आणि त्यासाठी एक सहस्र भिक्षूंना धर्मप्रचारपद्धतीचे शिक्षणही दिले गेले.

याच्या प्रेरणेनेच अशोकाने धर्म-यात्रा केली आणि चौऱ्यायंशी हजार विहार बांधले, असे म्हणतात. [बौ. ध. बि.; म. च. को.]

मोचेटी पञ्चम

एक लौकिक व्रत. हे व्रत प्राधान्याने द. भारतातील स्त्रिया करतात. पहिल्या वर्षी देवीची पूजा करून चार सवाष्णींना हळद–कुंकू देतात. दुसऱ्या वर्षी आठ स्त्रियांना देतात. अशा प्रकारे संख्या वाढवीत सत्तावीस वर्षे हे व्रत करतात. कोणत्याही प्रकारचा बोलबाला न करता हे व्रत आचरायचे असते. फल–धनप्राप्ती. [का. ट्रा. स. इं.]

मोडी लिपी

शीघ्र लेखनासाठी शोधून काढलेली महाराष्ट्रातील एक लिपी. ही प्रथम कोणी शोधून काढली, याविषयी मतभेद आहेत; पण हेमाडपंताने ही तयार केली असे मानण्यात येते. देवगिरीच्या महादेव व रामदेवराव यादव यांच्या कारकिर्दीत इ. स. १२६० पासून हेमाडपंत हा महामंत्री होता. दप्तराचे काम त्याच्याकडे होते. देवनागरी लिपीत प्रत्येक अक्षर सुटे असते व ते लिहिताना प्रत्येक वेळी लेखणी उचलावी लागते. त्यामुळे लेखनाला बराच वेळ लागतो. ही अडचण दूर करण्यासाठी हेमाडपंताने देवनागरी लिपीतील अक्षरे मोडून जलद लिहिता येईल, अशी एक पद्धती शोधून काढली. तिलाच मोडी लिपी असे नाव आहे. या लिपीत लेखणी न उचलता अनेक शब्द लिहिता येतात. फारसी लिपीचीही जलद लिहिण्याची शिकस्ता नामक एक लिपी आहे. त्या धर्तीवरच हेमाडपंताला मोडी लिपी बनवण्याची कल्पना सुचली असावी. हेमाडपंताने लंकेतून ही लिपी आणली असे काही लोक मानतात; पण सिंहली लिपीच्या वळणाचा व मोडीचा अर्थाअर्थी काही संबंध दिसत नाही.

इ. स. च्या १३ व्या शतकापासून २० व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत मोडी लिपी प्रचारात होती. पेशवाईच्या काळात पेशव्यांच्

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सर्व दप्तर मोडी लिपीतच होते. पुढच्या काळात या लिपीला निरनिराळी वळणे लागून तिला सांप्रतचे घोसदार स्वरूप प्राप्त झाले. त्यांपैकी चिटणिशी, महादाजीपंती, बिवलकरी, रानडी, इ. वळणे प्रसिद्ध आहेत. मराठी साम्राज्य वाढत गेले तसतसा



मोडी लिपी—चिमाजी अप्पाचे पत्र, इ. स. १७३९

भारताच्या इतर प्रदेशांतही मोडी लिपीचा प्रसार झाला. सवाई माधवराव पेशव्यांच्या काळी सर्व भारतात मोठमोठ्या शहरी हिचा प्रसार झालेला होता. मद्रास व म्हैसूर येथील सरकारी दप्तरे गेल्या शतकात याच लिपीत लिहिलेली होती. कर्नाटकातही जुन्या सावकार घराण्यांतील हिशेब कानडी भाषेत पण मोडी लिपीत लिहिलेले आढळतात. महाराष्ट्रातही या शतकाच्या सुरुवातीपर्यंत सरकारदरबारी व इतरत्रही मोडी लिपीतच लिहीत असत. इंग्रजी राजवट सुरू झाल्यानंतरही बऱ्याच इंग्रज अधिकाऱ्यांच्या सहीने मोडी अक्षर असलेले कागद ऐतिहासिक दप्तरात सापडतात. ईस्ट इंडिया कंपनीची पहिली सरकारी पत्रके मोडीतच असत. मिशनऱ्यांनीही पहिली मराठी पुस्तके या लिपीत छापली होती. अनिश्चित व दुर्बोध म्हणून सांप्रत मात्र ही लिपी प्रचारातून अजिबात गेली आहे. [म.ज्ञा.को.; म.प.; श्री. म. रा. इनामदार, नवभारत, फेब्रु.१९५४; हेमाद्रिचरित्र]

मोढ ब्राह्मण

गुजरातच्या प्रांतिज तालुक्यात वात्रक नदीच्या तीरावर मोढेरा गावात राहणारे ब्राह्मण ते मोढ ब्राह्मण होत. सांप्रत यांची वस्ती कच्छ–सौराष्ट्रात बरीच आहे. यांच्यांत मुख्यतः चतुर्वेदी, त्रिवेदी, जेठीमल, धणोजा, तांदळजा आणि अगियारसा अशा सहा पोटजाती आहेत. त्यांच्यांत त्रिपाळा, खिजडिया, मजुकोठिया, चुंठा वावडा, संबना, सरखेजी असेही भेद आहेत चतुर्वेदी आणि त्रिवेदी हे श्रेष्ठ मानले जातात. जेठीमल हे हलक्या प्रतीचे समजले जातात. धणोजांबरोबर मोढ किंवा इतर ब्राह्मणही जेवत नाहीत. चतुर्वेदी–त्रिवेदी यांच्यांतही रोटीबेटीव्यवहार होत नाही. हे लोक गोरे, सशक्त व तालमीचे षौकीन असतात.

मोढ ब्राह्मण हे देवीभक्त असून, लिंबोजा ही त्यांची इष्टदेवी आहे. कच्छमधील चतुर्वेदी हे रामानंदी संप्रदायाचे असून, त्रिवेदी हे शैव आहेत. यांच्यांतले जे स्वामीनारायण पंथाचे नाहीत, ते मांस खातात व मद्यपानही करतात. त्यांच्यांत विधवाविवाहाची पद्धत आहे. हे लोक मोढ वाण्यांचे पुरोहित आहेत. वेदविद्या, भिक्षावृत्ती व थोडीशी शेती हे यांचे जीवनव्यवसाय होत. पाहा– मैत्रायणी ब्राह्मण. [वि. मुं. रा. प.]

मोढेरा

एक सूर्यक्षेत्र. हे ठिकाण गुजरातमध्ये वडोद्याजवळ पाटणच्या दक्षिणेस अठरा मैलांवर आहे. याच्या कुशीतून पुष्पवती किंवा रूपेण नदी वाहते. हे गाव सांप्रत खेडेवजा असले आणि त्याच्या सभोवती रण असले, तरी एका काळी तिथे फार मोठी संस्कृती नांदत असावी, असे तिथे सापडलेल्या अनेक अवशेषांवरून वाटते. सांप्रत त्या परिसरात प्राचीन विटा, कोरीव दगड, नाना प्रकारच्या मूर्ती, भग्न स्तंभ अशी शिल्पसंपदा जागोजाग विखरून पडलेली दिसते. मात्र हे गाव म्हणा अथवा नगर म्हणा, वसले केव्हा आणि मोडले केव्हा त्याचा इतिहास अज्ञात आहे. राम–सीतेच्या विवाहप्रसंगी इथल्या मोढ ब्राह्मणांना हे गाव दान म्हणून मिळाले, असे ते ब्राह्मण सांगतात. त्यामुळे ही आख्यायिका थेट प्राचीनकाळाला जाऊन भिडते. कोण्यातरी प्राचीन काळी हे गाव भरभराटीत होते, याच्या दोन खुणा आज तिथे दिसतात. एक तिथले भग्न सूर्यमंदिर आणि दुसरा तिथला तलाव.

पुष्पवती नदीच्या काठी एक टेकडी आहे. गाव वसले आहे ते त्या टेकडीच्या अंगावरच. सूर्यमंदिरही याच टेकडीवर आहे. हे मंदिर इ. स. १०२५ ते १०२७ मध्ये भीमदेव सोळंकी या गुर्जर चौलुक्यवंशीय राजाच्या कारकिर्दीत बांधले गेले असावे, असे संशोधकांचे मत आहे. श्री. याज्ञिक म्हणतात–

अबूच्या पहाडावरील विमलशाहाचे मंदिर, अणहिलवाड पाटण येथील राणीची बाव व मोढेऱ्याचे सूर्यमंदिर ही तीन्ही समकालीन आहेत. विमलशाहाचे मंदिर आजही अस्तित्वात असून, त्याचे सौंदर्य आणि कौशल्य जगाचे डोळे दिपवीत आहे. त्यावरून मोढेऱ्याचे सूर्यमंदिर जेव्हा केव्हा अखंडित असेल, तेव्हा त्याची भव्यता आणि कलासमृद्धी किती वैभवशाली असेल, त्याची कल्पना करता येते.

या संबंध वास्तूची उभारणी एका उंच चौथऱ्यावर झालेली आहे. गर्भगृह, अंतराळ आणि रंगमंडप असे त्याचे तीन विभाग पडतात. गर्भगृह आणि अंतराळ यांमधून प्रदक्षिणामार्ग जातो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रंगमंडप हा या मंदिराचा सर्वांत सुंदर भाग होय. यात अनेक खांब असून, ते खाली अष्टकोनी आणि वर गोल आहेत. त्यांवर नखशिखांत कारागिरी आहे. भिंतीवरही कोरीव काम भरपूर



सूर्यमंदिर–मोढेरा

आहे. त्यात देवदेवता, समरप्रसंग नृत्यप्रसंग आणि कामशास्त्रातील विविध शृंगारिक दृश्ये कोरलेली आहेत. प्रत्येक दोन खांबांच्या मध्ये तोरण आहे. त्यामुळे मंदिराच्या सौंदर्यात भर पडली आहे. रंगमंडपावर पूर्वी घुमट होता, तो आता कोसळला आहे. गाभारा तर सगळाच पडला असून, त्याच्या भिंती तेवढ्या उभ्या आहेत. त्यांची उंची पाहता हा गाभारा दुमजली असावा, अशी जाणीव होते. मुख्य मंदिराच्या सभोवती कितीतरी लहान मोठी मंदिरे त्या काळात असली पाहिजेत. तिथल्या भग्नावशेषांवरून त्यांची कल्पना करता येते.

मंदिरात सूर्यनारायणाची मूर्ती जाग्यावर नाही. ती कोणी नेली आणि काय झाले हे कळायला मार्ग नाही. मूर्तीखालचे शिलासन तेवढे जाग्यावर दिसते. त्या आसनावर दर्शनी भागात सूर्याच्या रथाचे सात घोडे कोरलेले दिसतात. मंदिरात जागोजाग सूर्यमूर्ती कोरलेल्या आहेत. त्या द्विभुज आणि उभ्या आहेत. प्रत्येक मूर्तीच्या शेजारी उषा आणि प्रत्यूषा किंवा संज्ञा आणि वडवा या सूर्यभार्या कोरल्या आहेत. प्रत्येक मूर्तीच्या पायात परदेशी पद्धतीचे बूट आणि त्यांवर पट्टे आहेत.

या मंदिराच्या बांधकामात चुना कुठेही वापरलेला नाही. भिंतीवरील नक्षीकाम आडव्या रेषेत आणि शिखरावरील नक्षीकाम उभ्या रेषेत करून त्यात वैचित्र्य आणले आहे. मंदिरासमोर एक तलाव असून, तो पवित्र मानलेला आहे. त्यात थेट पाण्यापर्यंत पायऱ्या बांधलेल्या आहेत. मार्गात जागोजागी कोनाडे आहेत आणि त्यांतही मूर्ती बसवलेल्या आहेत. या सर्व मूर्ती वैष्णव संप्रदायाच्या आहेत.

या सूर्यमंदिरापासून थोड्या अंतरावर मातंगेश्वराचे मंदिर आहे. हे मंदिर पाचशे वर्षांचे जुने असावे, असे वाटते. [गुजरात]

मोताळा ब्राह्मण

यांची बहुतेक वस्ती गुजरातेतील सुरत जिल्ह्यात आहे. सुरतेजवळ मोता नामक गावी हे राहतात, म्हणून यांना हे नाव मिळाले आहे. हे मूळचे देशस्थ असावे. मोताळा, जांबू (जंबूसरचे) आणि कापिल (कावी येथे राहणारे) हे तीन्ही ब्राह्मणवर्ग मूळचे एकच होते व ते सर्व दक्षिणेतून गुजरातेत गेले, असे म्हणतात. बहुधा दुर्गादेवीच्या दुष्काळात किंवा मलिककाफूरच्या जुलमास कंटाळून त्यांनी हे स्थलांतर केले असावे. काही वर्षांपूर्वी मोताळा आणि जांबू यांच्यांत बेटीव्यवहारही होत असे.

विवाहप्रथा – मोताळा ब्राह्मण दर चार वर्षांनी आपापल्या गावी गोळा होतात आणि एकाच दिवशी सामुदायिक लग्ने लावतात. लग्न लावताना व त्यानंतर चार दिवसपर्यंत वधू डोक्यावरून पदर घेत नाही आणि उजवा हात उघडा राहील अशा रीतीने लुगड्याचा पदर डाव्या बाजूला खोचते. लग्नाचा नाडा लोकरीचा असतो.

कोल्हापूरची अंबाबाई ही मोताळांची कुलदेवी होय. हे ब्राह्मण यजुर्वेदी व काण्व शाखेचे आहेत. ते बुद्धिमान, उद्योगी आणि कष्टाळू आहेत. [वि. मुं. रा. प.; मुं. इ. जा.]

मोती

एक महारत्न. याची उत्पत्ती समुद्रातील किंवा नदीतील कालवांपासून होते. कालवे राहत असलेल्या शिंपांत, त्यांच्या अंगातून निघणाऱ्या चकचकीत रसाची वेष्टणे एखाद्या वाळूच्या कणाभोवती बसून मोती तयार होतो. हा रस शिंपांच्या आतल्या बाजूला लागून त्याही मोत्यासारख्या चमकतात. पांढरा, गुलाबी, काळा, इ. मोत्यांचे निरनिराळे रंग असतात. मोत्यांचा आकार आणि रंग यांवरून त्याची किंमत ठरते. रत्नशास्त्रानुसार गोल, सफेद, निर्मल, स्वच्छ व जड मोती चांगले होत. अर्धवट, त्रिकोणी, कृशपार्श्व, शुक्तिपार्श्व, पिवळे, कांस्यवर्ण, ताम्राभ, इ. मोती निकृष्ट होत.

नैसर्गिक मोत्यांत बसराई किंवा चोखा आणि बदला किंवा ढबदार, अशा दोन जाती आहेत. सुकुमार पोताच्या, तेजस्वी व गोल मोत्याला बसराई असे म्हणतात. हलक्या प्रतीच्या मोत्यांना बदला असे नाव आहे. मजीट, नूर, कागावाशी, गावशाही, शुक्री, हुरमुजी असेही मोत्यांचे प्रकार आहेत.

तांदुळाच्या, मिठाच्या, साखरेच्या किंवा रिठ्याच्या पाण्यात भिजत घालून धुतले असता मळलेले मोती स्वच्छ होतात.

मोत्यांचा उपयोग मुख्यतः दागिने बनविण्यासाठी करतात. मोत्यांचे भस्मही अनेक विकारांवर वापरतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारतीय लोकांना प्राचीन काळापासून मोत्यांची माहिती होती. वैदिक साहित्यात मोत्याला कृशन असे म्हटले आहे. सूर्याच्या रथाला व घोड्याला सुशोभित करण्यासाठी मोती लावल्याचा उल्लेख ऋग्वेदात आहे (१. ३५.४; १०. ६८. १). तसेच समुद्रातून काढलेले मोतीयुक्त शिपले ताईत म्हणून वापरल्याचा उल्लेख अथर्ववेदात आहे (१०. १. ७; ४. १०. १३). शंख व मोती हे राक्षस, राक्षसिणी व आजार यांपासून रक्षण करतात, अशी त्या वेळच्या लोकांची धारणा होती.

शिप, शंख, मेघ, मकर, सर्प, वराह, वेळू व हत्तीचे गंडस्थळ या ठिकाणी मोती तयार होतात, असे रत्नशास्त्रात सांगितले आहे. शिप-शंखातील मोती पांढरे, मेघातून पडणारे ज्योतिर्मय, वासुकीच्या फणेवरील निळे, वेळूतील तांबडे, वराहापासून मिळणारे त्याच्या सुळ्यासारखे पांढरट व हत्तीच्या गंडस्थलातील मोती कर्बुरवर्णाचे असतात. स्वाती नक्षत्रावर पडलेल्या पावसाचे थेंब शिपल्यात शिरले, की त्यांचे मोती बनतात, अशीही समजूत आहे. यांपैकी फक्त शिप-शंखातून मिळणाऱ्या मोत्यांनाच वेज पाडता येते.

सिंहल, पारलोक, सौराष्ट्र, ताम्रपर्ण, पारशव, पांड्य, हाटक व हेमक या देशांना मोत्यांचा आकर असे पुराणांत म्हटले आहे.

सांप्रत कृत्रिम रीतीने मोती तयार करतात. जपानात शिपल्यात वाळूचे कण घालून, ते शिपले समुद्रात सुरक्षित जागी ठेवून, असे मोती तयार करतात.

मोती हे चंद्राचे प्रिय रत्न आहे. अश्विनी, रेवती, धनिष्ठा, हस्त, चित्रा, विशाखा व अनुराधा या नक्षत्रांवर आणि रविवार, मंगळवार, गुरुवार शुक्रवार व सोमवार या दिवशीं मोती धारण करणे शुभ होय, असे सांगितले आहे. मोती चोरले असता बारा दिवसपर्यंत धान्याचे कण खाऊन राहिल्याने शुद्धी होते, असे प्रायश्चित्तव्यवहारप्रकाशात म्हटले आहे. [वे. इ.; सु. वि. को.; मे. गु. अ. ग्रं.; ल.र. प.; प्रा. व्य. प्र.; ज्योतिषसार आणि ज्योतिषरत्न–वे. शा. सं. तुळजाशंकर शास्त्री १९६४]

मोतीसर

राजस्थानातील एक जात. चारण जातीच्या लोकांचे गुणगान करणे हा यांचा प्रमुख व्यवसाय होय. हे लोक चारणांच्या शिवाय अन्य जातीच्या लोकांकडे भिक्षा मागत नाहीत. यांचे सारे रीतिरिवाज चारणांच्या प्रमाणेच असतात.

मोतीसरांच्या उत्पत्तीसंबंधी बरेच मतभेद आहेत. कर्नल वॉल्टरच्या मते ही मारवाडातील आठ राजपुतांच्या वंशापासून बनलेली संमिश्र जात आहे.

यांच्या नावाची व्युत्पत्ती पुढीलप्रमाणे केली जाते–

चारणांची आवड नावाची एक कुलदेवता होती. हे लोक तिचे उपासक होते. त्यामुळे त्यांना देवीच्या गळ्यातील मोत्यांची लडी अर्थात मोतीसर हे नाव मिळाले.

या जातीत बालण, खीला, बिजमाला, रामहिया, पडिहार, मांगलीया, चांदगा व मकवाणा असे आठ पोटभेद आहेत. हे लोक डिंगल भाषेत कविता करण्यात मोठे तरबेज असतात. काही श्रीमंत चारण यांच्या या गुणासाठी यांना आपल्या घरी मुद्दाम ठेवून घेतात. [रा. जा.; रा. भा. सा.]

मोदनव्रत

एक काम्य व्रत. हे चैत्र शु. सप्तमीला करतात. सूर्याची पूजा व ब्राह्मणांना खिरीचे भोजन घालणे हा या व्रताचा विधी आहे. फल–स्वर्गप्राप्ती. [व्र. प.]

मोनपा

ईशान्य सीमा प्रांताच्या कामेंग विभागातील एक आदिवासी जमात. मोनपांची लोकसंख्या सुमारे वीस हजार आहे. हे लोक बौद्धधर्मी असून, तावांग येथील बौद्ध मठाशी यांचा धार्मिक संबंध आहे. याशिवाय, डोरांग-डीजोंग इथेही यांचा एक मठ आहे. एके काळी यांचा तिबेटशी व्यापार व सांस्कृतिक संबंध होता. दुसऱ्या दलाई लामाने आपला शिष्य पाठवून या लोकांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. आजही तावांग येथील मुख्य धर्मगुरू मोनपाच असतो. प्रत्येक कुटुंबाने आपला तिसरा मुलगा वयाच्या सहा ते दहापर्यंतच्या काळात भिक्षू होण्यासाठी मठामध्ये पाठवायचा, अशी त्यांच्यात पद्धत आहे. त्याला परत आणायचा असेल, तर मठपतीकडे दंड भरावा लागतो.

वेषभूषा – मोनपा पुरुष लोकरी कोट, पायजमा, याकच्या केसाची टोपी व चामड्याच्या चपला, असा वेष करतात. श्रीमंत पुरुष सुंदर नक्षी काढलेले जोडे वापरतात. पुरुष कमरेला एक पटका बांधतात आणि त्यात डाओ (खड्ग) असलेले लाकडी म्यान लटकवतात. रानात काम करताना ते कातड्याचा कोट घालतात. त्याने पावसाचेही निवारण होते.

मोनपा स्त्रिया बिनबाह्यांचा एक पायघोळ कुडता घालतात आणि त्यावर गरम कोट घालतात. कशिदा काढलेल्या लहान टोप्या त्या डोक्यावर घालतात. त्या गळ्यात मण्यांच्या माळा, चांदीचे ताईत आणि बोटात अंगठ्या घालतात. त्यांच्या पायात चपलाही असतात.

शेती हा या लोकांचा मुख्य उद्योग आहे. ते झूम पद्धतीने शेती करतात. याशिवाय ते गाय, घोडा, खेचर, शेळ्या–मेंढ्या, याक, डुकरे व कोंबड्या पाळतात. याकच्या दुधापासून ते लोणी व पनीर बनवतात. लोकरीपासून हे लोक गरम कपडे विणतात व वनस्पतींपासून काढलेल्या रंगाने ते रंगवतात. मदर-मदर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आकृत्या व नक्षी काढलेले कापड विणून हे लोक त्यांच्या पिशव्या तयार करतात. वेत व बांबू यांपासून ते कलात्मक टोपल्या, करंड्या, चटया वगैरे दैनंदिन गरजेच्या वस्तू विणतात. काही लोक लोहारकामही करतात. हे लोक कुशल कारागीर असून नृत्यासाठी लागणारे मुखवटे तयार करतात आणि लाकडी पात्रांवर सुंदर रंगीत आकृत्या काढतात.

लाकडी पात्रावरील रंगीत चित्र

हे लोक व्यापारी म्हणूनही प्रसिद्ध आहेत. आसपासच्या लोकांशी हे विनिमय पद्धतीने व्यापार करतात. कस्तूरी, कांबळी, याकच्या शेपटया, अक्रोड, इ. वस्तू ते कलकत्ता व ऊदलगिरी येथे नेऊन विकतात आणि तिथून ॲल्युमिनियमची भांडी, लोकरी व सुती कपडे व छत्र्या खरेदी करून आणतात. पूर्वी तिबेटमधून हे लोक मिरची, गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, फळे व लाकडी सामान यांच्या बदली शेळया–मेंढया, घोडे, याक, लोकर, मीठ, सुकलेले मांस, मासे, चहा, अक्रोड, इ. वस्तू आणीत असत. भूतानमधून हे बांबूच्या चटया देऊन त्याऐवजी तांदूळ, तूप व

नृत्याचा मुखवटा व तो बनवणारा कारागीर

स्त्रियांचे कपडे आणतात. आसामच्या मैदानी प्रदेशातूनही ते धातूची भांडी, सूत वगैरे माल आणतात.

या लोकांत जातिबंधने फार कडक असून, इतर जातींशी ते रोटीबेटीव्यवहार करीत नाहीत. यांच्यांत बहुपतित्वाची व बहुपत्नीत्वाचीही चाल आहे. विधवाविवाह व घटस्फोट रूढ आहे. हे लोक मामाच्या घरी मूल जन्मणे अशुभ मानतात. हे मुलांना भारतीय पद्धतीने शिक्षण देतात. आपल्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे, असा त्यांचा आग्रह असतो.

वर्षाच्या अकराव्या महिन्यात हे ‘तारजाप’ नामक नृत्यप्रधान धार्मिक नाटक करतात. ते हरिणनृत्य करतात व त्या वेळी लाकडी मुखवटे वापरतात. आपली धर्मकृत्ये ते बहुधा पौर्णिमेच्या रात्री करतात.

मर्तिकप्रथा – श्रीमंत लोक प्रेते जाळतात; तर गरीब लोक प्रेताचे एकशे आठ तुकडे करून ते जवळपासच्या नदीत टाकतात. देवी किंवा कोड या रोगाने मृत्यू आलेल्या माणसाला पुरतात.
[श्री. के. सी. चौधरी– वन्यजाति, एप्रिल-जुलै १९७१]

मोपला

मोपला मलबारमधील एक मुसलमान जात. या लोकांना मापिळ्ळा असेही म्हणतात. व्यापारासाठी इथे आलेले अरब पुरुष व स्थानिक स्त्रिया यांची ही संतती होय. हे लोक शिया व सुन्नी अशा दोन्ही पंथांचे आहेत. सुन्नी लोक पोन्नानी तंगल या धर्मगुरूचे अनुयायी असून, शिया हे कोंदोट्टी तंगल याचे अनुयायी आहेत. या दोन्ही पंथांच्या लोकांमध्ये धार्मिक बाबतींत नेहमी झगडे चालू असतात. मोपला लोकांच्या मशिदींना इतर मशिदींप्रमाणे मनोरे नसतात. त्या हिंदूंच्या मंदिरांच्या धर्तीवर असतात.

कालिकतमध्ये मोपलांचे कैकोट्टकर म्हणजे टाळ्या वाजवणारे व कैकोट्टाटकर म्हणजे टाळ्या न वाजवणारे असे दोन भेद आहेत. लग्नकार्यादी मंगल प्रसंगी कैकोट्टकर हे संगीताला टाळ्या वाजवून ताल देतात; तर कैकोट्टाटकर यांना तसे करायला बंदी आहे.

मोपला लोक हे अत्यंत धर्मवेडे होते. इ. स. च्या १७ व्या शतकाच्या अखेरीपासून १९२४ पर्यंत त्यांनी अनेक दंगे केले आणि मलबारमधील शांतता नष्ट केली. पण त्यानंतर इंग्रजांनी कठोरपणे त्यांच्या दंगलींचा बीमोड करून टाकला.

वेषभूषा – मोपला पुरुष किनार असलेले पांढरे वस्त्र कमरेभोवती गुंडाळतात आणि वर उत्तरीय पांघरतात. ते डोक्यावर अगदी लहान टोपी घालतात. ते डोक्याचे मुंडन करतात व दाढी वाढवतात. मोपला स्त्रिया रंगीत कटिवस्त्र गुंडाळतात आणि वर कमीस घालतात. त्या ओढणी घेतात किंवा बुरखा पांघरतात. स्त्रियांना दागिन्यांची फार हौस असते आणि त्यांवर त्या खूप पैसा खर्च करतात. गळ्यांत, कमरेत व हातांत त्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विविध तऱ्हेचे अलंकार घालतात. त्यांच्या कानाच्या पाळीला दहा ते चौदा छिद्रे पाडलेली असतात आणि त्यांत त्या विविध कर्णभूषणे घालतात.

विवाहप्रथा – उत्तर मलबारमध्ये मुलांची लग्ने अठरा ते वीस या वयात व मुलींची चौदा ते पंधरा या वयात करतात. दक्षिण मलबारात मात्र मुलांचे विवाह चौदा ते अठरा या दरम्यान व मुलींचे आठ ते बारा या दरम्यान करतात. लग्नात वधूपित्याला जबर हुंडा द्यावा लागतो. लग्नातील प्रमुख विधी म्हणजे निका होय. काझी व दोन साक्षीदार यांच्या हजेरीत लग्नाचा करार पुरा करणे म्हणजे निका होय. नंतर काझी त्या विवाहाची नोंद करतो. लग्नाच्या दिवशी किंवा त्याच्याही आधी निका समारंभ करता येतो. निका विधीसाठी वधू-वरांचे बाप वधूच्या कुटुंबाच्या मशिदीत जातात आणि तिथे कलिमा वाचतात. विवाहाच्या दिवशी निका असेल, तर मात्र काझी वधूगृही जातो. त्यानंतर वधूच्या घरी मेजवानी होते. मेजवानी झाल्यानंतर एका खोलीत वधू-वरांची थोडा वेळ भेट होते.

मोपला पुरुष अनेक बायका करतात. पुरुषाला पाहिजे तेव्हा घटस्फोट घेता येतो. घटस्फोटाच्या वेळी पुरुषाला स्त्रीचा हुंडा परत करावा लागतो. स्त्रीला पुनर्विवाह करता येतो.

उत्तर मलबारमधील मोपला मरुमक्कतायम ही वारसापद्धती मानतात; तर दक्षिण मलबारमधील मोपलांची वारसापद्धती इतर मुसलमानांप्रमाणे असते.

मर्तिकप्रथा – मोपला लोक प्रेते पुरतात. माणूस मरण पावला, की त्याचे कपडे काढून टाकतात आणि त्याचे पाय मक्केच्या दिशेला करून ठेवतात. दोन्ही पायांचे अंगठे बांधून ठेवतात आणि हातही छातीवर क्रॉसप्रमाणे ठेवतात. दोन्ही बाहूही कपड्याने बांधून ठेवतात. प्रेत स्मशानात नेईपर्यंत मुल्ला प्रेताजवळ कुराण वाचीत बसतात. नातेवाईक जमल्यावर मृताला स्नान घालतात आणि मग प्रेत कपड्याने झाकून ठेवतात. नंतर मशिदीतून तिरडी आणून प्रेत तिच्यावर ठेवतात आणि तिरडी मशिदीत नेतात. तिथे तिरडी पश्चिमेकडच्या भिंतीजवळ ठेवतात आणि सर्वजण रांगेत उभे राहून मृतासाठी प्रार्थना म्हणतात. नंतर तिरडी स्मशानात नेतात व तिथे प्रेत खड्ड्यात ठेवतात. त्याचे तोंड मक्केकडे करतात. नंतर सर्वजण खड्ड्यात मूठ मूठ माती टाकतात. नंतर त्या खड्ड्यात मेंदीचे झुडुप लावतात. मग मुल्ला कुराणाचे पठण करतो. नंतर गोरगरिबांना पैसे व तांदूळ वाटतात. मृताच्या आर्थिक परिस्थितीनुसार मुल्ला तीन, सात किंवा चाळीस दिवस मृताच्या थडग्याजवळ बसून कुराण वाचतो. मृताच्या घरीही मुल्ला कुराण वाचतो. तिसऱ्या व चाळिसाव्या दिवशी मृताच्या आप्तांना जेवण देतात. [का. ट्रा. स. इं.]

मोमारिया संप्रदाय

आसाम प्रदेशातील एक संप्रदाय. उत्तर आसाममध्ये या संप्रदायाचे प्राबल्य विशेष आहे. अनिरुद्ध भुईया नावाच्या माणसाने या संप्रदायाची स्थापना केली. आदी भुईया कुटुंबात याचा जन्म झाला. याच्या पित्याचे नाव पोंडा भुईया असे होते. अनिरुद्धाने ऐन तारुण्यात शंकरदेवाचे शिष्यत्व पत्करले. त्याच्या सान्निध्यात असताना याने अनेक ग्रंथांचे अध्ययन केले. त्यामुळे याची महत्त्वाकांक्षा बळावली. याने कल्पतरू नावाचा, ताम्रपत्रावर लिहिलेला एक अद्भुत ग्रंथ शंकरदेवाला न सांगता पळवला. या ग्रंथात अनेक बीजमंत्र होते. अनिरुद्धाचे अनुयायी मात्र असे मानतात, की त्याला ग्रंथ प्रत्यक्ष सूर्यदेवाकडून मिळाला. या ग्रंथाच्या मालकीवरून पुढे शंकरदेव व अनिरुद्ध यांच्यांत वितुष्ट आले.

अनिरुद्धाने आपल्या संप्रदायाचा प्रचार करून अनेक कैवर्तांना आपल्या संप्रदायात समाविष्ट केले. शंकरदेवाचे विरोधकही त्याला येऊन मिळाले. पुढे याने ब्रह्मपुत्रा व टेंगापाणी या दोन नद्यांच्या दुआबात असलेल्या होलांगपूर नावाच्या गावी एक मोठे सत्र उघडले. तिथे कल्पतरूच्या आधारे याने अनेक चमत्कार केले. त्यामुळे याचा संप्रदाय अधिकच फोफावला.

याच्या अनेक चमत्कारवार्ता आहोम राजाच्या कानावर आल्या. राजाने त्याला बोलावून घेतले. तिथेही त्याने चमत्कार करून दाखविल्याने त्या राजाला अनिरुद्धासंबंधी फार आदर वाटू लागला. त्याचा परिणाम म्हणून डाडी, डोम, इ. खालच्या वर्गाचे लोक याला गुरू मानू लागले. पुढे त्याचे वंशज समाजापासून फटकून वागू लागले.

आहोम राजे शाक्त पंथाचे होते. त्यांच्या राज्यात मोमारिया पंथाची बरीच वाढ झाल्यामुळे काही काळाने आहोम राजघराण्यातील राजांचे व मोमारियांचे वितुष्ट आले. त्यांच्यांत अनेक संघर्ष झाले. इ. स. १७७६ साली यांच्यामध्ये मोठे युद्धही झाले. मग राजघराण्यातील लोकांनी लॉर्ड कॉर्नवॉलिसची मदत घेऊन यांचा पाडाव केला. [सो. हि. का. २]

मोमिन

एक मुसलमान जात. या लोकांची वस्ती प्रामुख्याने गुजरात, महाराष्ट्र, बिहार, इ. प्रदेशांत आहे. तुरळक प्रमाणात सर्व भारतभर हे विखुरलेले आहेत. यांना ममन, मोमना असेही म्हणतात. हे मूळचे हिंदू असून, इमामशहाने यांना बाटविले. त्यानंतर त्यांनी शियापंथ स्वीकारला. काही सुन्नीपंथीही आहेत. शेती व मजुरी हे यांचे व्यवसाय आहेत. बिहारमध्ये ते विणकराचा व्यवसायही करतात. हे कुराण न वाचता इमामशहाचे धर्मपुस्तक वाचतात. यांच्या बहुतेक चालीरीती हिंदूप्रमाणेच आहेत. हे शेंडी ठेवतात आणि सुंताही करतात. गोकुळ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ष्टमी, दिवाळी वगैरे सणही पाळतात. एकमेकांना भेटताना रामराम म्हणतात. मुलांना हिंदूंचीच नावे ठेवतात. हे गुजराती भाषा बोलतात. यांचा पोषाख मात्र मुसलमानी असतो. हे लोक इतर मुसलमानांत मिसळत नाहीत. मांस खात नाहीत. यांना मुसलमान म्हटलेलेही आवडत नाही. हे आपल्याला लेवा कणबी म्हणवून घेतात.

विवाहप्रथा – यांच्यांत गुजराती व दक्षिणी असे दोन पोटभेद आहेत. त्या दोघांत बेटीव्यवहार होत नाही. मुसलमान पद्धतीने प्रथम लग्न लावून कित्येकजण पुन्हा ब्राह्मणाला बोलावून हिंदू पद्धतीने लग्न लावतात. लग्नात बोहले, होम वगैरे काही नसते. वधू-वरांच्या मध्ये एका चौरंगावर तीन दिवे ठेवतात आणि त्यांना ब्रह्मा, विष्णू व महेश समजून त्यांच्या समोर लग्न लावतात. या विधीला दुव असे म्हणतात. यांचे पाटही याच पद्धतीने लागतात. यांना घटस्फोट मंजूर असला, तरी तो केवळ पुरुषांनाच घेता येतो.

मोमिनांच्या मंदिराला खान अशी संज्ञा आहे. परंतु अलिकडे ते त्यांना धर्मशाळा असे म्हणू लागले आहेत. या धर्मशाळेत एका पाटावर एक मातीचा घडा असतो. त्यात पिरान येथील माती व पाणी भरलेले असते. याला ते परमेश्वराचे प्रतीक समजत असावे.

अलिकडे यांच्यांतले काही लोक हिंदू होऊ लागले आहेत. कित्येक लोक स्वामीनारायण संप्रदायाचे अनुयायी बनले आहेत.

यांच्यांत जातपंचायत असते. तिचा प्रमुख भूजनजीकच्या मानकुव गावी राहतो. जातीमधील तंटेबखेडे हाच सोडवतो.

हे लोक मृतांना पुरतात. भाद्रपद महिन्यात पक्षही करतात. [म.ज्ञा. को.; मुं. इ. जा.; रज:कण; वि. मुं. रा. प.; जा. व्य.]

मोयिली द. भारतातील एक जात. या लोकांची वस्ती प्राधान्याने म्हैसूर राज्यातील द. कानडा भागात आढळते. हे लोक म्हणजे देवदासींची संतती होय. यांनाच देवादिग असेही म्हणतात. देवस्थानात देवाची सेवा चाकरी करून राहणे हा यांचा प्रमुख व्यवसाय होय. मालेरू लोकही मंदिरातच राहतात. पण मोयिली लोक त्यांच्याशी संबंध ठेवीत नाहीत. यांच्या स्त्रिया लग्न न करता एखादा यजमान धरून राहतात किंवा वेश्याव्यवसायही करतात. काही स्त्रिया देवस्थानातील नर्तकीही असतात. मोयिली लोक बंट जातीचे आचार-विचार व रीतीरिवाज पाळतात. [का. ट्रा. स. इं.]

मोर (१) एक पक्षी. भारत सरकारने पक्षिशास्त्रज्ञांचा सल्ला घेऊन व खूप विचार करून १९६२ साली मोराला भारताचा राष्ट्रीय पक्षी म्हणून घोषित केले. मोर भारतात सर्वत्र आढळतात. राजस्थान, हरियाणा व व्रजमंडळ यांत त्यांच्या झुंडीच्या झुंडी दिसतात. लंका, ब्रह्मदेश, जपान व जावा बेट यांतही मोर आहेत. लंका व जपान यांमधले मोर पांढरे असतात; तर जावा बेटातील हिरवे असतात.

मोर हा एक सुंदर पक्षी आहे. त्याच्या मस्तकावर तुरा असतो व पृष्ठभागी लांबलचक पिसारा असतो. हा पिसारा म्हणजे



मोर

अनेक पिसांचा गुच्छ असतो. त्यातली पिसे साधारणपणे वीस किंवा त्यापेक्षा अधिक असतात. प्रत्येक पिसावर डोळ्यासारखी वाटोळी आकृती असते. पिसाचा दांडा पांढरा शुभ्र असतो. पिसाच्या कडेला पर असून, त्याच्या डोळ्यावर पिवळी, निळी आणि हिरवट झाक असते. मोराचा पिसारा दरवर्षी गळतो आणि वसंत ऋतूत तो पुन्हा येतो. मात्र पिसारा गळून पडलेल्या अवस्थेत तो कोणालाही आढळत नाही. त्याच्या मस्तकावरचा तुरा चोवीस पिसांचा असून, त्याची पिसे मध्यभागी हिरवीगार व कडेला पिवळी असतात. त्याचा गळा, मान व डोळे निळसर असतात. त्या निळाव्यंतोवर मधेमधे हिरवी–पिवळी छटा दिसते. त्याचे पोट हिरवट, काळसर रंगाचे असते.

मोराच्या मादीला लांडोर म्हणतात. तिला पिसारा नसतो. तिचे पंख उदी–राखी रंगाचे असतात.

मोराचे घरटे जमिनीवर असते. ते गवताचे केलेले असते. ज्येष्ठ ते कार्तिक या महिन्यांत मादी या घरट्यात ६ पासून १५ पर्यंत अंडी घालते. ही अंडी खडबडीत असतात.

मोराचा डामडौल बादशाही असला, तरी तो स्वभावाने लाजाळू व शांत असतो. तो फार वेगाने पळतो. त्यामुळे त्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पकडणे सोपे नसते. डोंगर–उतार, सखल प्रदेश किंवा वनराई अशा ठिकाणी राहणे मोराला आवडते. रात्रीच्या वेळी झाडाच्या उंच फांदीवर, घराच्या छपरावर किंवा झोपडीच्या केंबळावर तो बसून राहतो. त्याचा आवाज मात्र त्याच्या सौंदर्याशी विसंगत आहे. पहाटेच्या वेळी तो 'माऊ ऽऽ माऊ ऽऽ' असा कर्कश ओरडतो. मोर असलेल्या जागी साप, किडे व मुंग्या मुळीच राहत नाहीत. सापाचा तर तो शत्रूच आहे.

मोर हा भूमध्य समुद्राच्या परिसरातून सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी भारतात आला, असे काही विद्वानांचे अनुमान आहे; पण ते खरे वाटत नाही. कारण ऋग्वेदात आणि अथर्ववेदात मोराचा उल्लेख आढळतो. इंद्राचे अश्व हे मोरपिसाऱ्यासारख्या शेपटीचे (मयूरशेप्य) आहेत असे ऋग्वेदात म्हटले आहे (ऋ. ८.१.२५). अश्वमेधातील बलींच्या यादीत मोराचे नाव आहे. मायूरीला (लांडोर) विषबाधा होत नाही, असे अथर्ववेदात म्हटले आहे (अथर्व. ७.५६.७).

मोराचे सौंदर्य लक्षात घेऊन काही लोक त्याला आपल्या घरी पाळतात. पूर्वीच्या राजेरजवाड्यांना मोर पाळण्याची मोठी हौस होती.

शिकंदर भारतात आला, तेव्हा नदीच्या तीरावरून स्वच्छंदपणे विहार करणारे मोर पाहून तो मंत्रमुग्ध झाला. त्याने मोरांची हत्या करण्यास बंदी घातली. त्याच्याही पूर्वी भारतातून पश्चिमेकडच्या देशांत ज्या गोष्टी विक्रीसाठी जात, त्यांत मोरांचाही समावेश होता. अमीर खुस्रव या कवीने आपल्या 'नुरे सिपेहर' या ग्रंथात म्हटले आहे, की भारतातील मोरांची प्रशंसा करायला शब्द अपुरे पडतात. इतरही अनेक जुन्या व नव्या कवींनी मोरांची प्रशंसा केली आहे. गोपालकृष्ण हा मयूरपिच्छधारी होता, असे सारे कृष्णभक्त कवी सांगतात. मोगल बादशहा शहाजहान याने आपल्या सिंहासनावर रत्नजडित मोर बसविले होते. ते सिंहासन तख्तताऊस (मयूरसिंहासन) म्हणून ओळखले जाते.

मोर हा देवसेनापती कार्तिकेय याचे वाहन म्हणून प्रसिद्ध आहे. कार्तिकेयाच्या मूर्ती मोरावर बसलेल्याच करतात. कोल्हापूर येथील वस्तुसंग्रहालयात ११ व्या शतकातील एक कार्तिकेयमूर्ती असून, तिच्यात वाहन म्हणून मोराची सुंदर आकृती कोरलेली आहे. सरस्वतीचे वाहन हंस मानलेले असले, तरी जैन संस्कृतीने आणि लोकमानसाने मोर हेच तिचे वाहन कल्पिले आहे. कुशाण राजांनी आपल्या मुद्रांवर मोराचा छाप उमटविला होता. त्यांच्या ध्वजावरही मोरच काढलेला असे. जुन्या काळी ब्रह्मदेशाच्या ध्वजावरही मोरच अंकित होता.

लोकसमजुती – मोराविषयी काही लोकसमजुती प्रचलित आहेत, त्या पुढीलप्रमाणे–

आकाश मेघाच्छादित झाले म्हणजे मोर उल्हसित होऊन थुई थुई नाचू लागतो. त्या वेळी त्याच्या डोळ्यातून जे आनंदाश्रू गळतात, ते त्याची मादी वरच्यावर गिळते व गर्भवती होते.

जखम झालेल्या जागी मोराचे पीस बांधल्यास ती चिघळत नाही व लवकर बरी होते.

परमेश्वराला सारी सृष्टी निर्माण करायला तीन दिवस पुरले; पण एक मोर निर्माण करायला मात्र तीन दिवस लागले.

कित्येक जैन साधू आपल्या जवळ मोरपिसांचा कुंचा बाळगतात. काही क्षुद्र देवतांच्या मंदिरांतही मोरपिसांचा कुंचा उभा केलेला असतो. त्या देवतांचे पुजारी किंवा पुजारिणी दर्शनासाठी आलेल्या लोकांच्या डोक्यावरून तो कुंचा फिरवतात. मुसलमान फकीरही भिक्षा मागताना असा कुंचा जवळ बाळगतात.

पंजाबात सर्पविष उतरविण्याच्या कामी मोरपीस हे एक औषधिद्रव्य म्हणून वापरतात.

भिल्लांची मयूरी नावाची एक पोट जात आहे. त्या जातीने मोर हे आपले देवक मानले आहे. विवाहादी प्रसंगी ते लोक मयूरमूर्तीची पूजा करतात व मोराचे रक्षण करणे आपले कर्तव्य मानतात. सवर आदिवासींचे गोत्रचिन्हही मोर हेच आहे. मात्र ते त्रैवार्षिक पितरोत्सवातला मुख्य विधी म्हणून मोराची शिकार करतात.

भारतीय लोकभाषांमध्ये मोराविषयीच्या अनेक लोककथा आहेत, त्यांपैकी काही अशा–

सवर जातीचा एक तरुण शेतकरी होता. त्याचे केस खूप लांब होते आणि ते विजसारखे चमकत होते. पण एके दिवशी शेताची नांगरट करताना त्याचे ते केस सारखे डोळ्यांवर येऊ लागले. त्यामुळे तो शेतकरी चिडला आणि त्याने आपले सर्व केस उपटून फेकून दिले. जवळच एक मोर होता. त्याने ते केस उचलले आणि आपल्या पाठीत खोचून दिले. मोराचा पिसारा म्हणजे हे त्या तरुण शेतकऱ्याचे केसच होत.

एक होता मोर. मैना ही त्याची भाची. तिला एकदा एका लग्नाचे बोलावणे आले. तिला वाटले, की आपण अगदी कुरूप; त्यामुळे लग्नात लोक आपल्याला पाहून हसतील. निदान आपला एक अवयव तरी सुंदर असावा म्हणून ती आपल्या मोरमामाकडे गेली आणि म्हणाली. 'मामा, तुझे पाय सुंदर आहेत. ते तू लग्नसमारंभापुरते मला दे आणि माझे हे ओबडधोबड पाय तुला घे. लग्नाहून येताच मी तुझे पाय तुला परत करीन.' मोर बिचारा साधा. त्याने आपले पाय मैनेला दिले आणि मग तो ती कधी येते त्याची वाट पाहत बसला. मैना परत आली; पण तिने पाय परत करावे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मात्र नाकारले. तेव्हापासून मोर नृत्य करताना दुःखाची आसवे गाळू लागला.

माणसाला मोरानेच नाचायला शिकविले, अशी समजूत आहे. ती खरी खोटी कशीही असो; पण भारतीय नृत्यकलेवर मयूरनृत्यकलेचा प्रभाव निश्चित पडलेला आहे. कथक नृत्यात मयूरनृत्य आवर्जून सादर केले जाते. त्या नृत्यात नर्तक किंवा नर्तकी मोराचा पिसारा लावून नाचतात आणि त्यात मोराचे मुग्धले अंगविक्षेप दाखवितात. [बे. फु. आ. रा.; श्री. कृ. रा. देसाई– दीपावली, आक्टोबर १९६२; वे. इं.]

(२) एक नाच. काही मुली एकमेकींच्या हातांत हात गुंफून व फेर धरून नाचतात. फेरात असलेल्या मुली मोरपिसाऱ्याचे हावभाव करतात. नाचाची गाणीही मोरविषयकच असतात.

(३) एक खेळ. एक मोठी मुलगी एका छोटया मुलीला आपल्या समोर पाठमोरी उभी करून आवळून धरते. छोटी मुलगी आपले पाय वर आणि मागे घेऊन मोठया मुलीच्या पायाला विळखा घालते आणि शरीराचा तोल पुढे झोकते. असे केले, की ती मोर झाली. मग मोठी मुलगी तिला विचारते. "मोरा मोरा पाणी किती खोल ?" मोर मुलगी दोन्ही हात पसरून पाणी इतके आहे, असे सांगते. मग मोठी मुलगी तिला तशीच धरून उडया मारीत मागे पुढे जाते. [व्या. ज्ञा. को.]

(४) पंजाबातील एक मुसलमान जात. या लोकांना केहल असेही म्हणतात. यांची वस्ती सतलज, सिंधू व चिनाब या नद्यांच्या काठी आढळते. हे लोक मुख्यत्वे मच्छीमारीचा व्यवसाय करतात. काही जण शेतीही करतात. [पं. का.]

मोरगाव महाराष्ट्रातील एक सुप्रसिद्ध गणेशक्षेत्र. हे गाणपत्य संप्रदायाचे आद्यपीठ मानले जाते. अष्टविनायकांच्या गणनेत याला अग्रस्थान दिले आहे. पुण्यापासून चाळीस मैल दूर, कऱ्हा नदीच्या तीरावर मोरगाव वसले आहे. या क्षेत्राला मोरगाव हे नाव प्राप्त होण्याची जी कारणे सांगितली जातात, ती अशी —या क्षेत्राचा आकार मोरासारखा आहे. इथे मोर विपुल आढळतात आणि इथला गणपती प्रथम अवतीर्ण झाला, तो मोरावर आरूढ होऊन.

या क्षेत्राचे माहात्म्य वर्णन करताना गणेशकोशात पुढील-प्रमाणे माहिती दिली आहे —

ब्रह्मा, विष्णू, शिव, शक्ती व सूर्य या पाच देवतांनी इथे तप केले. त्यांच्या तपसमाप्तीनंतर श्रीगणेशाने त्यांना दर्शन दिले व त्यांनी प्रार्थना केल्यामुळे मोरगाव क्षेत्री कायम वास्तव्य करण्याचे मान्य केले. मग या पाच देवतांनी भाद्रपद शु. चतुर्थीच्या दिवशी इथे गणेशाची विधिपूर्वक प्रतिष्ठापना केली. इथे राहून जे पुरश्चरणादी करतील, त्यांना विघ्नांची भीती वाटणार नाही, असा आशीर्वाद गणेशाने या क्षेत्राला दिला.

या क्षेत्राला स्वानंदपुरी असेही एक नाव आहे व ते इथल्या स्वानंदेश गणेशावरून पडले आहे. पुरातन काळी एकदा मिथिला देशात सिंधू नावाचा दैत्य अत्यंत उन्मत्त झाला व त्याने सर्व देवांना संत्रस्त केले. मग देवांनी गणेशाची प्रार्थना केली व त्याच्या अवतरणासाठी यज्ञ मांडला. यथाकाल गणेश प्रसन्न झाला व त्याने यज्ञातून निघालेल्या सुवर्णमयूरावर बसून सिंधूचा वध केला. तो परत फिरतो, तो वाटेतच सिंधूचा सेनापती कमलासुर याने त्याला गाठले. गणेशाने एका फटक्यातच त्याचा शिरच्छेद केला. कमलासुराचे शिर जे तिथून उडाले ते मोरगावी येऊन पडले. गणेशाने मग त्या शिराचेच आसन करून मोरगावी निवास केला.

मोरगावात शिरल्यावर प्रथम मुसलमानी पद्धतीचा एक दगडी तट दिसतो. त्याच्या चारही कोपऱ्यांवर चार मीनारांसारखे स्तंभ उभारलेले आहेत. हा तट बेदरच्या बादशाहीत जामदारखाना सांभाळणाऱ्या मोरो केशव गोळे या गणेशभक्ताने बांधला. विधर्मी मूर्तिभंजकांपासून आपल्या देवालयाचे संरक्षण व्हावे या हेतूने त्यांने देवळासभोवतीचा तट मुसलमानी धर्तीवर उभारला असल्याचे सांगतात. मंदिराच्या पायऱ्या चढण्यापूर्वी नगारखाना दिसतो. नगारखान्याच्या बरोबर खाली देवाकडे तोंड करून बसवलेला भला मोठा दगडी उंदीर आहे. महाद्वारापुढे दोन व आतील प्रांगणात दोन अशा चार दीपमाळा इथे दिसतात. मध्ये एक जयस्तंभही आहे. त्याच्या पुढे पधरा फूट उंचीवर एक चौथरा व त्या चौथऱ्यावर एक प्रचंड नंदी आढळतो. गणपतीपुढे नंदीचे काय प्रयोजन या शंकेचे निरसन करणारी एक आख्यायिका या भागात प्रसिद्ध आहे, ती अशी—

इथून जवळच भुलेश्वर महादेवाचे देवालय आहे. तिथल्या देवापुढे बसवण्यासाठी म्हणून त्या गावच्या लोकांनी एक पाषाणाचा नंदी दुसऱ्या गावी घडवायला दिला. नंदी तयार झाल्यावर लोक त्याला गाडयावर घालून भुलेश्वराकडे नेऊ लागले. परंतु मोरगावापर्यंत येताच गाडा मोडला. एक गाडा मोडला म्हणून दुसरा केला, तर तोही मोडला. असे पाच-सात वेळा झाले. तेव्हा जास्त वजनामुळे असे घडत असेल, अशा कल्पनेने पाथरवट आणून त्यांच्याकडून नंदी तासून घेण्याचा प्रयत्न झाला. पण त्यामुळे त्या नंदीच्या अंगातून रक्ताच्या चिळकांडया उडू लागल्या. अखेर रात्री त्या नंदीला नेणाऱ्या लोकांच्या स्वप्नात जाऊन नंदीने सांगितले, की 'तुम्ही मला पुढे नेऊ नका. मला इथेच मयूरेश्वराच्या समोर बसू दे.' त्यामुळे लोकांचा निरुपाय होऊन त्यांनी नंदीची तिथे विधिपूर्वक प्रतिष्ठापना केली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नंदीच्या चौथऱ्यापुढे सुमारे २० फुटांवर मुख्य देऊळ व त्याचा प्राकार आहे. मुख्य सभामंडपाच्या पूर्वेला नग्नभैरवाचे देऊळ व पश्चिमेला एक तरटीचे जुने झाड आहे. या वृक्षाखाली बसून मोरया गोसाव्यांनी तपश्चर्या केली व त्यांना सिद्धी प्राप्त झाली. त्यामुळे याला इथे कल्पवृक्ष अशी संज्ञा आहे. आजही या वृक्षाखाली अनेक भाविक अनुष्ठान करतात व आपले इच्छित फल प्राप्त करून घेतात.

तटाच्या आतल्या चौकाच्या आठ कोपऱ्यांत मुद्‌गल पुराणात वर्णिलेल्या गणेशाच्या आठ प्रतिमा बसविल्या आहेत, त्यांची नावे अशी – एकदंत, महोदर, गजानन, लंबोदर, विकट, विघ्नराज, धूम्रवर्ण आणि वक्रतुंड. यांव्यतिरिक्त अलिकडेच तिथे तेवीस परिवारमूर्तीही बसविण्यात आल्या आहेत.

गर्भागारातील मयूरेश्वराची मूर्ती स्थूल स्वरूपाची आहे. तिच्या नेत्रस्थानी, भालप्रदेशी व नाभीमध्ये लखलखित हिरे बसविले आहेत. गणेशाची स्वारी उकिडव्या अवस्थेत बसलेली असून, तिची सोंड डावीकडे वळलेली दिसते. सबंध मूर्ती सिंदूर– र्चित आहे. मुख्य मूर्तीच्या दोही अंगी सिद्धि-बुद्धी यांच्या चल धातुमूर्ती आहेत. मूर्तीच्या पुढयात पाषाणाचे मूषक व मयूर बसविले आहेत.



मयूरेश्वर – मोरगाव

मयूरेश्वराच्या या मूर्तीसंबंधी असे सांगतात, की मूळची मूर्ती ही नव्हे. मूळची मूर्ती मृत्तिका, लोह व रत्ने यांच्या अणूंपासून बनविलेली असून, ती सांप्रतच्या दृश्य मूर्तीमागे अदृश्य आहे. ती मूळ मूर्ती ब्रह्मदेवान स्थापन केली होती; परंतु पुढे असुरांनी वारंवार तिचा विध्वंस केल्यामुळे पांडवानी तिला तांब्याच्या पत्र्याने झाकून टाकले व तिच्यापुढे आज दिसत असलेली मूर्ती बसविली. आजच्या मूर्तीच्या मस्तकावर नागफणा दिसते.

इथे दिवसातून तीन वेळा महापूजा होते. तीन्ही वेळा वेगवेगळे नैवेद्य दाखविले जातात. सकाळी खिचडी व पोळी, दुपारी संपूर्ण भोजन व रात्री दूधभात अशी नैवेद्याची व्यवस्था असते.

गणेश योगीन्द्र आणि मोरया गोसावी यांच्या वास्तव्यामुळे मोरगावला क्षेत्राचे पावित्र्य लाभले, तर कऱ्हा नदीमुळे त्याला तीर्थरूपत्व प्राप्त झाले. विजयादशमी, सोमवती अमावास्या आणि भाद्रपद व माघ महिन्यांतील चतुर्थ्यांना इथे महोत्सव होतात. त्या वेळी मोठी यात्रा लोटते. [श्रीगणेशकोश; मं. मू. मो.; ती. म. १; श्रीभूस्वानन्द– क्षेत्रमहिमा; अष्टविनायक]

मोरया गोसावी (१३७५–१४६१ इ. स.) एक गाणपत्य सत्पुरुष व कवी. यांचे मूळ घराणे कर्नाटकातील शाली या गावचे होते. हे देशस्थ ऋग्वेदी हरितसगोत्री ब्राह्मण होते. यांच्या वडिलांचे नाव वामनभट्ट व आईचे पार्वतीबाई होते. यांचे उपनाव शालिग्राम असले, तरी पुढे या घराण्यात अनेक सिद्ध पुरुष झाल्याने देव या नावाने हे घराणे ओळखले जाऊ लागले.

वामनभट्ट गणेशोपासक होते. वयाची पन्नाशी उलटली, तरी त्यांना संतानप्राप्ती झाली नाही. मग ते मोरगावच्या गणेशासन्निध येऊन राहिले व तिथे त्यांनी गणेशाची अनन्यभावे आराधना करून पुत्रप्राप्तीसाठी त्याला साकडे घातले. वामनभट्टांच्या या उपासनेमुळे मयूरेश्वर प्रसन्न झाला व त्याच्या वरप्रसादाने उतारवयात त्यांना पुत्रप्राप्ती झाली. त्यांनी मुलाचे नाव मोरया ठेवले. शुद्धचरित आणि सत्त्वगुणसंपन्न अशा मातापित्यांच्या सहवासात मोरया वाढला. वयाच्या आठव्या वर्षी त्याचे मौंजीबंधन झाले. बालपणीच त्याने वेदाध्ययन पूर्ण केले. यानंतर सिद्ध योगिराज या सद्‌गुरूच्या उपदेशावरून त्याने थेऊर येथे कडक तपश्चर्या केली. सतत बेचाळीस दिवसांच्या अखंड नामस्मरणानंतर गणपतीने मोरयाला दृष्टान्त दिला. मग तो मोरगावी परतला. यानंतरचे आयुष्य मोरया गोसाव्यांनी लोकसेवेत घालवले. वृद्ध माता-पित्यांच्या देहावसानानंतर त्यांनी मोरगाव सोडले व चिंचवड येथे वास्तव्य केले.

चिंचवडच्या वास्तव्यातच मोरया गोसाव्यांनी गोविंदराव कुलकर्णी यांच्या उमा नामक सुलक्षणी कन्येशी विवाह करून गृहस्थाश्रम थाटला. लौकरच त्यांना पुत्रप्राप्ती झाली. मोरयांनी त्याचे नाव चिंतामणी असे ठेवले.

प्रथम प्रथम मोरया गोसावी प्रत्येक चतुर्थीस मोरगावच्या मंगलमूर्ती गणपतीच्या दर्शनास जात; पण पुढे एके दिवशी मंगलमूर्तीने त्यांच्या स्वप्नात येऊन सांगितले, 'तू एवढ्या दूर येऊ नकोस. कऱ्हा नदीत मी आहे. तिथून मला बाहेर काढ व आपल्या घरी घेऊन जा'. दृष्टान्ताप्रमाणे मोरयांनी केले व कऱ्हा नदीतील गणेशमूर्ती आपल्या चिंचवडच्या घरी नेऊन स्थापन केली.

पुढे मोरया गोसावी यांच्या साधुत्वाची कीर्ती सर्वदूर पसरली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांच्या दर्शनाला येऊ लागल्या. मोरया गोसावी यांनी आपल्या वयाच्या ८६ व्या वर्षी, मार्गशीर्ष वद्य षष्ठी शके १३८३ या दिवशी, चिंचवड येथे जीवत्समाधी घेतली.

मोरया गोसावी

मोरया गोसावी यांनी अनेक प्रासादिक पदे रचली असून, ती विविध गणेशक्षेत्रांतून गायिली जातात. त्यांची सासुर, माहेर, कामधेनू, इ. पदे विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांचे एक पद पुढीलप्रमाणे –

तुजविण कोण आम्हां आहे रे मोरया।
तुझिया भेटीची बहु आस रे मोरया॥
देखितां तुज बहु दिवस झाले रे मोरया।
रात्रंदिवस वाट तुझी पाही रे मोरया॥
जन्मोजन्मींचा तुझा दास रे मोरया।
एक वेळ कृपादृष्टीं पाहे रे मोरया॥
धेनु वत्सालागीं जैसी मोहे रे मोरया।
तैसा वेगीं येई तूं लवलाही रे मोरया॥

प्रतिवर्षी मार्गशीर्ष वद्य षष्ठीला चिंचवड येथे मोरया गोसावी यांचा पुण्यतिथीमहोत्सव साजरा होतो. त्या वेळी तिथे येणाऱ्या सर्व लोकांना प्रसादभोजन देण्याची प्रथा आजतागायत चालू आहे. [विविधा; म. च. को.; सु. वि. को.]

मोरसू ओक्कलू म्हैसूर प्रदेशातील एक जात. या लोकांना होसदेवर ओक्कलू असेही दुसरे नाव आहे. कांचीजवळच्या मोरसूनाड या प्रदेशातून हे लोक म्हैसूर प्रदेशात आले, म्हणून यांना मोरसू ओक्कलू असे नाव मिळाले. त्यांना हे स्थलांतर का करावे लागले, त्याबद्दलची कथा अशी –

मोरसूनाडमधे यकिल जातीचा एक पाळेगार इ. स च्या १५ व्या शतकात राज्य करीत होता. त्याला आपल्यापेक्षा उच्च जातीतील मुलीशी लग्न करायचे होते, म्हणून त्याने मोरसू ओक्कलू जातीतील एक मुलगी शोधण्यासाठी आपल्या दूताला पाठवले. त्याने त्याप्रमाणे एक सुंदर मुलगी राजासाठी पसंत केली. मुलीच्या आईबापांना आणि त्या जातीच्या प्रमुखाला हा लग्नसंबंध पसंत नव्हता. परंतु पाळेगाराला उघडपणे नकार देणे इष्ट नव्हते. म्हणून त्यांनी लग्नाला संमती दिली आणि वरकरणी लग्नाची तयारी चालवली. पण त्यांचा अंतःस्थ हेतू वेगळाच होता. लग्नाच्या आधी काही दिवस एका रात्री आपला भैरव हा कुलदेव बरोबर घेऊन ते सर्व लोक घरदार सोडून निघाले आणि जवळच्या म्हैसूर प्रदेशात येऊन वसले.

उद्योगधंदे – शेती हा या लोकांचा मुख्य उद्योग आहे. भात व नाचणी ही त्यांची मुख्य पिके होत. काही लोक बांधकाम-कंत्राटदार असून, काही सरकारी नोकरीत आहेत. यांची घरे मोठी असून, गुरांना ते घरातच बांधतात. घराला लागूनच धान्य साठविण्याचे कोठार असते.

भात व निरनिराळ्या पशूंचे मांस हे त्यांचे मुख्य अन्न आहे.

यांच्यात मुसाकू, रेड्डी, मोरसू इ. काही पोटभेद आहेत. त्यांच्यांत परस्पर रोटीबेटीव्यवहार होतो. तसेच यांच्यांत अनेक कुळचा किंवा बेडगू असून, एकाच कुळीत लग्नसंबंध होत नाही.

विवाहप्रथा – आते किंवा मामे बहिणीशी लग्न करता येते. प्रथम वधू-वरांचे नक्षत्र जुळवतात. मग मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. मुलीच्या बापाला देज मिळते. दोन्ही बाजूंना संबंध पसंत पडल्यावर, एक दिवस मुलाचे नातेवाईक मुलीच्या घरी जातात आणि तिला नवी साडीचोळी व एखादा दागिना देतात. नंतर ज्ञातिप्रमुख कलशाची पूजा करतो. सर्वांना वधूकडचे लोक जेवण देतात. यानंतर कुठल्याही पक्षाने लग्न मोडले, तर त्याला दुसऱ्या पक्षाला नुकसानभरपाई द्यावी लागते.

लग्न बहुधा नवऱ्या मुलाच्या घरी होते. प्रथम कुलदेवतेची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूजा करतात. दुसऱ्या दिवशी बारा खांबांचा मंडप उभारतात. मामा दुधाचा खांब आणून रोवतो.

लग्नाच्या आदल्या दिवशी संध्याकाळी वधूपक्षाकडील लोक वराच्या गावी येतात. नंतर दोन्ही पक्षांतील काही सुवासिनी, नऊ धान्ये पेरलेल्या मातीच्या वाफ्यावर एक कलश ठेवून त्याची पूजा करतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी नवरा मुलगा हातात खंजिर घेऊन मिरवीत वधूपक्षाच्या जानोशात जातो. बोहल्यावर वधू-वर समोरासमोर तोंड करून उभे राहतात. पुरोहित दोघांच्या मध्ये अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणतो. अंतरपाट बाजूला केल्यावर वधू-वर एकमेकांच्या मस्तकावर मूठ भरून गूळ व जिरे टाकतात. नंतर वराने वधूच्या गळ्यात ताळी बांधल्यावर ती दोघे हात जुळवतात आणि वधूचे आईबाप जुळवलेल्या हातांवर दूध ओततात. ते एका भांड्यात धरून मग एखाद्या वारुळावर टाकतात.

संध्याकाळी वधूला अरुंधतीदर्शन घडवल्यावर वधू-वर मिरवणुकीने जाऊन वारुळाची पूजा करतात आणि त्याची थोडी माती बरोबर आणतात. मग काही सुवासिनी विहिरीवरून किंवा नदीतून तीन घागरी पाणी आणतात. त्या पाण्याने वारुळाची माती कालवून तिचे बारा गोळे करतात. वधू मंडपाच्या बारा खांबांच्या मुळात ते गोळे ठेवते. मग वधू-वर त्या खांबांची आणि कलशाची पूजा करतात.

दुसऱ्या दिवशी दुपारच्या जेवणानंतर सिंहासनपूजा होते. चौपदरी कांबळे जमिनीवर अंथरून त्यावर चार त्रिशूळ व चंद्र-सूर्य काढतात आणि मध्यभागी पाने, सुपाऱ्या आणि कडांना विभूती ठेवतात. याला सिंहासन असे म्हणतात. यजमान त्याची पूजा करतो आणि लग्नविधी समाप्त होतो.

मुलीला प्रथम रजोदर्शन झाले, की तिचा मामा अंगणात तिच्यासाठी हिरव्या फांद्यांचे एक खोपट उभारतो. नऊ दिवस तिने याच खोपटात राहायचे असते. रोज संध्याकाळी धोब्याने धुवून आणलेले कपडे नेसून ती पाटावर बसते. मग सुवासिनी तिची फळांनी ओटी भरतात आणि तिला गोड पदार्थ खायला देतात. दहाव्या दिवशी सकाळी स्नान करण्यापूर्वी ती खोपट मोडून टाकते. मग मामा त्या फांद्या दूर नेऊन जाळून टाकतो.

प्रसूतिप्रथा – जननाशौच सात किंवा नऊ दिवस असते. ते संपवून स्नान करण्याच्या दिवशी स्त्रीच्या नातेवाईक स्त्रिया तिच्या स्नानासाठी घडाभर गरम पाणी घेऊन येतात. मुलाचे नाव २८ व्या किंवा २९ व्या दिवशी ठेवतात.

मूल वर्षाचे होण्याच्या आत मुनीश्वर देवाला, गावाबाहेर एखाद्या सोमवारी बकरा बळी देतात आणि सर्वजण त्याचे मांस शिजवून खातात. पहिल्या किंवा तिसऱ्या वर्षी कुलदेवतेच्या मंदिरासमोर किंवा मुनीश्वराच्या मंदिरासमोर मुलाचे जावळ काढतात. तसेच मुलाचे कान टोचण्यापूर्वी मक्कलदेवरू या मुलांच्या देवतेची पूजा करतात. पूर्वी पहिल्या मुलाचे कान टोचण्यापूर्वी काही माता आपल्या उजव्या हाताच्या दोन बोटांचे शेवटचे सांधे सुताराकडून कापून घेत व बोटांचे रक्त थांबवण्यासाठी ती उकळत्या तेलात बुडवीत. या सर्व प्रकाराचे विधिविधान फार जटिल होते. इ. स. च्या १९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात या प्रथेवर कायद्याने बंदी घालण्यात आली.

या जातीचे अनेक विभाग असून, त्यांना कट्टेमणी असे म्हणतात. प्रत्यक कट्टेमणीवर यजमान किंवा गौड नामक एक मुख्य अधिकारी असतो. अनेक कट्टेमणींचा मिळून एक नाडू बनतो. त्यावर देसाई गौड नावाचा अधिकारी असतो. जातीतले तंटेबखेडे प्रथम यजमान सोडविण्याचा प्रयत्न करतो. आणि ते न जमल्यास देसाईगौडाकडे ते सोपवतो. लग्न, मृत्यू किंवा इतर महत्त्वाच्या प्रसंगी यजमान किंवा त्याचा प्रतिनिधी यांची उपस्थिती आवश्यक असते.

मोरसू ओक्कलू पुरुष

देवधर्म – भैरेदेवरू किंवा बंडीदेवरू या नावाने हे शिवाला भजतात. कोलार तालुक्यात सिटी बेट्ट डोंगरावर याचे प्रमुख स्थान आहे. होसदेवरूला नैवेद्य दाखवल्याशिवाय या जातीच्या स्त्रिया नवान्नभक्षण करीत नाहीत. यांच्यापैकी काही वैष्णव आहेत. भुताखेतांवर यांचा विश्वास असून, ते त्यांना संतुष्ट राखतात.

मृतिकप्रथा – सर्वसाधारणपणे हे प्रेते पुरतात. पण यांच्यापैकी काही आता प्रेते जाळू लागले आहेत. मृताला नवे कपडे घालून व नवे पागोटे बांधून तिरडीवरून वाजतगाजत स्मशा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नात नेतात. प्रेत नेताना वाटेत त्याच्या अंगावर विड्याची पाने आणि लाह्या उधळतात. प्रेत स्मशानात नेल्यावर मृताचे पुत्र व इतर आप्त त्याच्या तोंडात आणि डोळ्यांत थोडा भात घालतात. मस्तक दक्षिणेकडे करून प्रेत खड्ड्यात ठेवतात आणि काटेरी झुडपांच्या फांद्यांनी खड्डा भरतात. थडग्यावर एक लहान छप्पर उभारतात. तिसऱ्या दिवशी मृतात्म्याला पिंडदान करतात आणि ब्राह्मणांना ऐपतीप्रमाणे छत्री, जोडा, गाय व दक्षिणा देतात. त्याच दिवशी संध्याकाळी मृताचे कुटुंबीय देवळात जाऊन देवाची पूजा करवितात. त्यामुळे मृताला स्वर्गाचे दरवाजे खुले होतात, अशी त्यांची समजूत आहे. त्यानंतर रात्री ज्ञातिभोजन घालतात. हे लोक मृताशौच दहा दिवस पाळतात. महालयही करतात. [मै. ट्रा. का.]

मोरोपंत (इ. स. १७२९-१७९४) एक मराठी महाकवी. संपूर्ण नाव मयूरेश्वर रामाजीपंत पराडकर. हे जामदग्न्य गोत्राचे कऱ्हाडे ब्राह्मण होते. सोलापूर जिल्ह्यातील सोनारी गावचा भैरव देव हा या घराण्याचा कुलस्वामी आहे. मोरोपंतांचे वडील हे कोकणातील सौंदळ या गावचे रहिवासी होते. ते इ. स. १७१३ च्या सुमारास केशव पाध्ये व गणेश पाध्ये या बंधुद्वयासह पन्हाळगडावर कायमचे राहायला आले. रामाजीपंतांना तीन मुलगे व एक कन्या अशी चार अपत्ये गडावरच झाली. त्यातले मोरोपंत हे तिसरे होत.

मोरोपंतांचे बाळपण पन्हाळगडावरच गेले. त्यांनी गुरुगृही राहून अध्ययनही तिथेच केले. आयुष्याची पहिली २४ वर्षे त्यांनी पन्हाळगडावर घालवली. पुढे काही कारणामुळे रामाजीपंतांना पन्हाळगड सोडावा लागला व ते तिथून आपल्या सर्व कुटुंबासह बारामतीस कायमच्या वास्तव्यासाठी गेले.

मोरोपंतांनी केशव पाध्ये व गणेश पाध्ये या दोघा प्रगाढ पंडितांकडे संस्कृत भाषेचे अध्ययन केले. संस्कृत महाकाव्ये आणि नाटके अभ्यासून ते उत्तम व्युत्पन्न झाले. रामायण, महाभारत व भागवत हे तीन महान ग्रंथ त्यांनी अनेक वेळा वाचून पूर्ण आत्मसात केले. त्यांनी वैद्यक विषयाचाही चांगला अभ्यास केला होता, असे वाटते. संस्कृत वाङ्मयाबरोबरच त्यांनी प्राकृत काव्यांचा व संत वाङ्मयाचा अभ्यासही काळजीपूर्वक केला होता. पूर्वकालीन मराठी कवींच्या कितीतरी कल्पना व रचनापद्धती पंतांनी उचलल्या आहेत.

मोरोपंत बारामतीस आपले यजमान बाबूजी नाईक यांच्या वाड्यात पुराण सांगत असत. त्याबाबत ते मोरोपंतांना सालिना ५०० रुपये बिदागी देत. या बाबूजी नाईकांच्याबद्दल मोरोपंतांच्या मनात नितांत आदर होता. गयेला विष्णुपदापुढे पिंड देताना पंतांना प्रथम त्यांचे स्मरण झाले. त्या वेळी त्यांच्या मुखातून ज्या आर्या निघाल्या, त्यांतली एक आर्या अशी–

> श्रीबाबूराय प्रभु माझा अत्यंत सदय अन्नद हा ।
> अर्थिजना न म्हणों दे जैसा तप्तास जेंवि सन्नद 'हा' ।।

मोरोपंतांचा विवाह बारामती येथेच झाला. त्यांच्या पत्नीचे नाव रमाबाई असे होते. पंतांना तीन पुत्र व तीन कन्या अशी सहा अपत्ये झाली. पंतांनी विष्णुपदावलीत आपल्या पत्नीविषयी पुढील गौरवोद्गार काढले आहेत–

> मीं जरि अशक्त निर्धन कोपी तरि बहु भली रमा भार्या ।
> ईतें सद्गति दे तूं, हेचि करी प्रथम बोध या कार्या ।।

या धर्मपत्नीच्या सहवासात आणि एकूण कुटुंबपरिवारात मोरोपंतांचा गृहस्थाश्रम सुखाचा झाला. त्यांचे घर गोकुळासारखे गजबजलेले असे. आपले आप्तेष्ट व स्वजन यांना प्रसंगी साह्य करावे, त्यांचे रक्षण करावे आणि त्यांच्या दुःखाने चित्त कळवळावे, असे पंतांचे सांगणे व वागणे असे.

दाशरथी राम हे मोरोपंतांचे उपास्य दैवत होय. ही रामोपासना त्यांना कशी जडली या विषयीची घटना श्री. पांगारकर यांनी सांगितली आहे, ती अशी–

पंत प्रथम घरच्या उपासनेमुळे शालिग्रामाची पूजा करीत; पण त्यांची रामभक्ती दृढ व्हावयास एक कारण झाले. अहमदनगरास एक परम रामभक्त होता. त्याच्या जवळ रामपंचायतनाच्या सुंदर मूर्ती होत्या. त्यांची त्याने उत्कृष्ट भक्ती केली होती. त्याला संतती नव्हती. वय शंभराला टेकले होते. आपल्या रामाची योग्य पुरुषांकडून अखंड पूजा अर्चा कशी चालेल, ही त्यास चिंता पडली. तेव्हा त्याला स्वप्नात रामाने दृष्टान्त दिला की, 'बारामतीस शुभाशय मोरोबा पराडकर आहे; त्याच्या स्वाधीन मला कर.' या दृष्टान्ताप्रमाणे त्या वृद्ध भक्ताने नगराहून सोवळ्याने पायी चालत येऊन त्या मूर्ती मोरोपंतांच्या हवाली केल्या. त्या दिवसापासून पंत रामभक्त झाले.

मोरोपंतांनी देशावरची व कोकणातील अनेक पुण्यक्षेत्रे पाहिली होती. पंढरपुरी तर ते अनेकदा गेले होते व राहिलेही होते. अमरसिंह जाधव या जहागीरदाराच्या समागमे त्यांनी उतार वयात काशी, प्रयाग व गया या त्रिस्थलीची यात्राही केली. एक चातुर्मास्य ते काशीक्षेत्री राहिले. तिथे त्यांनी आपला काव्यसंभार काशीतल्या मोठमोठ्या संस्कृत पंडितांना दाखवला. पंडितांनी त्याची शलाकापरीक्षा केली व ते प्रसन्न झाले. पंत त्यांच्या आदरास पात्र ठरले. आणि मग एके दिवशी काशीतल्या शास्त्रीपंडितांनी पंतांची व्यासपूजा केली.

या यात्रेत त्यांनी तीर्थक्षेत्रांवर आणि देवदेवतांवर हजारो आर्या रचल्या. गया क्षत्री पंतांनी पिंडप्रदान केले. अशा प्रकारे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यात्रा यथासांग करून मोरोपंत बारामतीस सुखरूप परत आले.

मोरोपंतांनी आमरण विद्याव्यासंग, काव्यरचना व रामसेवा केली. आर्थिक दृष्ट्या त्यांचा संसार बेताबाताचाच होता; पण तरीही त्यांनी तो विवेकाने नेटका केला. विनय, सदाचार, प्रेमळपणा, इ. सद्गुणांनी त्यांनी भोवतालच्या माणसांना आदर्श घालून दिला. प्रपंचात राहूनही त्यांनी परमार्थाचा लाभ करून घेतला आणि पाउण लाख मराठी कविता निर्माण करून मराठीचे वैभव वाढविले. ते रामभक्तीत रमले, रंगले. त्यांचे आर्यासप्तक नावाचे एक स्तोत्र प्रसिद्ध आहे. त्यात स्वतःला काय भावावे आणि काय रुचावे याविषयी त्यांनी पुढील श्लोक लिहिले आहेत –

तव पावसरोरुहीं स्वचित्तभ्रमरातें रस चाखवूनि गोवूं ।
तुज भक्त तुझे सदैव गाती मग आम्हीं गुणगीतसक्त होवूं ।।
मज वाटतसे सभाग्य मोठें भगवद्भक्त तयांत म्यां जुडावें, ।
तदधीन तुझ्या यशःसुधेचा ऱ्हद गंभीर, तयामधें बुडावें ।।
तुज वर्णिति संत, संगमुक्त, प्रकृतिप्रेमळ, तद्गणीं शिरावें ।
तुजिया गुणसागरांत माजें मन हें सैंधव माधवा ! विरावें ।।
मन हें विषयीं उडीच घाली विष हे जाणुनि यावरी विटावें ।
तव कीर्ति उदार कामधेनू तिस मी होउनि वासरूं चिटावें ।।

पंतांनी चैत्र शु. पौर्णिमेस हनुमज्जयंतीच्या पर्वणीवर आपला देह ठेवला. श्री. पांगारकर म्हणतात – 'गीर्वाणसागरातून आपल्या अतर्क्य बुद्धिप्रभावाने या मयूरमेघाने काव्यामृत शोषून त्याचा काठिण्यक्षार नाहीसा करून महाराष्ट्र भूमीवर पेयामृताचा वर्षाव सतत चाळीस वर्षे केला व कृतकृत्य झालेला नश्वर देह ठेविला. पंत आपले कार्य करून गेले. पुण्यबलाने त्यांचे सत्संकल्प सिद्धीस गेले.'

मोरोपंतांची कविता सुमारे ७५ हजार आहे. त्यापैकी आर्या ४० हजारांच्या वर असून, बाकीची कविता भिन्न भिन्न वृत्तांत रचलेली आहे. त्यातली जवळ जवळ ६० हजार कविता उपलब्ध असून, सुमारे १५ हजार कविता उपलब्ध नाही. त्यांच्या ग्रंथांची नावे अशी –

(१) महाभारत (२) मंत्ररामायण (३) हरिवंश (४) कृष्णविजय किंवा बृहद्दशम (५) मंत्रभागवत व (६) ब्रह्मोत्तर खंड. याशिवाय ७–८ स्फुट प्रकरणे व अष्टोत्तर शत रामायणे. यांतील काही महत्त्वाच्या व मोठ्या ग्रंथांचा परिचय असा–

मंत्ररामायण – हे रामायण आर्या-गीति-वृत्तात रचले आहे. 'श्रीराम जयराम जय जय राम' या त्रयोदशाक्षरी मंत्रात गुंफलेले असल्यामुळे याला मंत्ररामायण असे नाव दिले आहे. यातली पहिली कांडे संख्येने लहान असून, युद्धकांड सर्वांत मोठे आहे. आपल्या या ग्रंथात १८८० आर्या असून १४६ मंत्र आहेत, असे पंत सांगतात. उत्तरकांडात त्यांनी रामरक्षा गुंफली आहे. रामप्रभू मारीच मृगाला मारून परत आला, तेव्हा जानकी त्याला आश्रमात दिसली नाही. कारण त्या अवधीत रावणाने तिला पळवून नेले होते. सीतावियोगाचे दुःख लक्ष्मणाजवळ व्यक्त करताना पंतांचा राम म्हणतो –

रुचिराक्षा नाहीं कीं वत्सा ! हें अन्यगेह वाटतसे ।।
इतर स्थळासि आलों चुकती अनभिज्ञ लोक वाट तसे ।।
वत्सा ! मज जरि म्हणसी ' सीतेची हेचि होय वलशाला ।
तरि मीच रामनामा नसेन ! साध्वी दिसेल काशाला ? ।।
श्वशुराला परलोकीं गेलिस जरि तू करावया नमना ।।
पुसल्यावांचुनि कैसी सीते झालीस आज यानमना ? ।।
मज राजकन्यके ! तूं वरुनियां पावलीस न सुखातें ।
खातें हें चित्तातें; सांगों कोणास मीं स्वदुःखातें ।।

श्रीकृष्णविजय – याला बृहद्दशम असेही म्हणतात. या ग्रंथाचे अध्याय ९० असून, एकूण पद्यसंख्या साडेतीन हजारांवर आहे. प्रस्तुत ग्रंथाचा उत्तरार्ध अखेरपर्यंत सरस उतरला आहे. बाबा पाध्ये यांच्या सांगण्यावरून पंतांनी हा ग्रंथ रचला. यातील कृष्ण-रुक्मिणी विवाहाचा प्रसंग पंतांनी बहारदार वर्णिला आहे. रुक्मिणी स्वतःच आपल्या विवाहाची कथा यादव-कौरव स्त्रियांना मोकळेपणाने सांगत आहे. त्यातील काही आर्या अशा-

प्रथम म्हणे वैदर्भी–बाई ! होतें लहान मी कन्या ।
धन्या कृष्णकथा मज तेव्हांचि रुचे, न आवडे अन्या ।।
हरिगुणगायक सज्जन ते धनलोभी नव्हेत परि हार ।
मुद्रा कंकण साडे न करिति मातापिताहि परिहार ।।
ज्या दिवशीं हरिचरितश्रवण नसे त्यांत मग वहा दुखणी ।
दुखणी काय नवखणी माडी नलगे, धरा नवेंदु खणी ।।

प्रस्तुत ग्रंथात सुभद्राहरणाचे आख्यानही मनोरम असून, ते मागील पिढीत अनेकांच्या परिचयाचे होते.

महाभारत – हा महान ग्रंथ प्रस्तुत कवीच्या प्रतिभेचे आणि परिश्रमाचे अतिरसाळ फळ होय. याची आर्यासंख्या १७,१७७ एवढी आहे. हा ग्रंथ जसा आकाराने तसाच योग्यतेनेही मोठा आहे. पंतांचा भाषाविलास आणि कल्पनाविलास या ग्रंथात पदोपदी दिसून येतो. पंतांची खरी प्रसिद्धी या ग्रंथामुळेच झाली हे भारत रचनाकालीच लोकप्रिय झाले. रामजोश्यासारख्या हरिदासांनी कीर्तनात मोरोपंती आख्यानांचा उपयोग सुरू केला. त्यातील द्रौपदीवस्त्रहरण, कीचकवध, भीष्मार्जुनयुद्ध, अभिमन्युपराक्रम, कर्ण-शल्यसंवाद, इ. प्रसंगांवरच्या आर्या तत्काळ महाराष्ट्रभर पसरल्या. पंतांचे अर्थांतरन्यास सुभाषिते म्हणून लोकांच्या जिव्हाग्री आरूढ झाले. भीमाने दुःशासनाचा वध केला, त्या रौद्र समरप्रसंगाचे वर्णन करताना पंतांनी सहज-पणे पुढील आर्या लिहिल्या आहेत –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गरुड जसा गगनांतुनि वेगें उतरोनि पन्नगा झडपी ।
तैसा भीम बळानें दुःशासनकंठ अंघ्रिने दडपी ।।
रिपु शूर दूर तेथुनि तें दारुण कर्म पाहतां पळती ।
किति पडती, किति दडती, कितिएकांचीं धृतायुधें गळती ।।

मंत्रभागवत – हे भागवत सुमारे ३६०० आर्यांत पुरे केलेले असून, ते ३३३ नाममंत्रांत गोवलेले आहे. रचनेत सर्वत्र 'नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र साधलेला आहे. या मंत्रमण्यांच्या तीन माळा पंतांनी कल्पिलेल्या आहेत. पहिली माळ पहिल्या नऊ स्कंधांची, दुसरी माळ दशम स्कंधाची व तिसरी माळ शेवटच्या दोन स्कंधांची. पहिल्या माळेत भगवंताच्या अवतारांच्या, भक्तांच्या, देव-दानव युद्धाच्या, सृष्टयुत्पत्तीच्या, इ. नानाविध कथा आहेत. दुसऱ्या माळेत श्रीकृष्णाच्या अवतार-कथा असून, तिसऱ्या माळेत श्रीकृष्णाने उद्धवाला केलेला उपदेश आहे.

श्रीकृष्णाने बाललीला करून यशोदेला कसे भुलविले व सुखविले त्याचे वर्णन पंतांनी वत्सल रसाला अद्भुताचे पुट देऊन फार सुरस केले आहे. श्रीकृष्णाने यमुनातटाकी वृंदावनात गोपींसह रासक्रीडा केली, त्या प्रसंगाचे वर्णनही सुरेख उतरले आहे. त्यातील काही आर्या अशा –

भक्तीनें आळवितां गातां गुण चिंतुनी मनीं मूर्ती ।
प्रकटे गोपींत प्रभु होतां तद्बुद्धि निर्मळा पूर्ती ! ।।
गलदंजनाश्रुमलिनें वदनें त्यांचीं पुशी स्वपाणीनें ।
सांत्वन करी प्रियांचे परमेश्वर अमृतमधुर वाणीनें ! ।।
वनितांसह मग तितुक्या मूर्ती धरुनि स्वयें करी रास ।
गोपी चुंबिति, हुंगिति, आलिंगिति सुंदरा शरीरास ।।
वाद्यें वाजविती सुर गोपींसीं गायजे हरी रासीं ! ।
स्वर शोभला स्वरासीं, जैसेंचि शरीर तच्छरीरासीं ।।
देउनी पद्मादुर्लभ सुखराशी त्यां जळीं स्थळीं रमवी ! ।
अस्खलितवीर्य भगवान् गोपींचा कामताप तो शमवी ! ।।

पंतांच्या स्फुट काव्यात किंवा स्तोत्रकाव्यात केकावलीला फार महत्त्व आहे. ही केकावली पृथ्वी छंदात असून, तिच्यात पंतांनी स्वतःच्या उद्धारासाठी प्रभूला आळवले आहे. केका म्हणजे मयूरवाणी. कवीचे नाव मयूर असल्यामुळे त्याने या आपल्या आर्त वाणीला केकावली असे नाव दिले आहे. श्री. पांगारकर म्हणतात. 'हे काव्य अप्रतिम आहे व अतिप्रेमळ स्तोत्र आहे. यात पंतांच्या बुद्धिशक्तीचा पूर्ण विकास झाला आहे व पंतांच्या अंतःकरणवृत्तींचाही पूर्ण प्रकाश पडला आहे.' प्रस्तुत काव्यात १२१ श्लोक आहेत. त्यांतले काही श्लोक असे–

सदाश्रितपदा सदाशिवमनोविनोदास्पदा ।
स्वदासवशमानसा कलिमलांतका कामदा ।।
वदान्यजनसद्गुरो प्रशमितामितासन्मदा ।
गदारिदरनंदकांबुजधरा नमस्ते सदा ।।
'अतर्क्य महिमा तुझा गुणहि फार वा हे' विधी ।
श्रुतिज्ञहि म्हणे सदा, स्तविल आमुची केंवि धी ? ।
तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ।।
प्रभो ! शरण आलियावरि न व्हां कधीं वांकडे
म्हणोनि इतुकेंचि हें स्वहितकृत्य जीवांकडे ।
प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा ! खरें
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें ।।

पंतांच्या छोटया काव्यात केकावलीच्या बरोबरीने संशयरत्नमालेलाही मानाचे स्थान आहे. हे ४२ आर्यांचे काव्य आहे. हृदयाची आर्तता, मनाची उत्कटता, बौद्धिक चमत्कृती आणि युक्तिवाद हे गुण तिच्यात ठळकपणे आढळतात. देव आपल्याला भेटत नाही, आपल्या उद्धारासाठी धावून येत नाही, याबद्दल नानाविध संशय व्यक्त करून पंत लगेच त्या संशयाचे निराकरणही तिथेच करतात. त्यातील काही आर्या अशा––

उठतां बहु त्वरेनें 'कोठे जाता ?' असे तुम्हा देवी ।
पुसती झाली जाणो ? पुसतां ज्ञाता पुढें न पद ठेवी ।।
किंवा नारद आला आलापीत स्वकीय सच्चरितें ।।
प्रेमळ गीत तुम्हांला हरि हरिणापरिस बहुत वश करितें ।।
किंवा तुज एकाकी पाहुनि खळ दैत्य आडवे आले ।।
फुटतां सागर सिकतासेतूचे काय त्यापुढें चाले ।।

मोरोपंत आणि आर्यावृत्त यांचे समीकरण आहे. खरे तर ती आर्या नसून आर्यागीती आहे. पण प्रचारात तिलाच आर्या म्हणतात. पंतांच्या पूर्वी आर्यावृत्त मराठी वाचकांना फारसे परिचित नव्हते. मोरोपंतांनी आपले बहुतेक काव्य या वृत्तात रचिले आणि आर्येवर स्वतःच्या कर्तृत्वाचा कायमचा ठसा उमटवून ठेवला. तुकोबांचा अभंग तशी पंतांची आर्या. ते आर्येवरच्या आपल्या प्रभुत्वाविषयी आत्मगौरवाने लिहितात ते असे–

प्रकटी प्रथम भगीरथ नृपलोकीं सुरनदीस ती आर्या ।
तसि हे मयूर नाहीं तरि सर्वांना न दीसती आर्या ।।

मोरोपंतांच्या भाषिक व वाङ्मयीन कार्याचे महत्त्व विशद करताना प्रा. ह. श्री. शेणोलीकर लिहितात, ते असे––

आपल्या आर्यारचनेने पंतांनी मराठी भाषेच्या सामर्थ्यात व ऐश्वर्यात बहुमोल भर टाकली. त्यांच्या आर्यांमुळेच अव्वल इंग्रजी अमदानीतही पुराणांतील कथांचा प्रसार लोकांमध्ये होत राहिला. मराठी भाषेचा लवचिकपणा व अलंकारवैभव दाखवून पंतांनी संस्कृत पंडितांचे गर्वहरण केले आणि मराठी भाषिकांतील न्यूनगंड नाहीसा केला. शुद्ध आणि संपन्न अशा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भाषासरणीमुळे मोरोपंतांनीच मराठीला अभियुक्त भाषांच्या पंक्तीत मानाचे स्थान मिळवून दिले, यात शंका नाही. [मोरोपंत चरित्र आणि काव्यविवेचन– ल. रा. पांगारकर, १९४३; प्रा. म. वा. स्व.; म. च. को.]

मोलेसलाम एक जात. या लोकांची वस्ती गुजरात व महाराष्ट्र या दोन प्रदेशांमध्ये आढळते. मौला इस्लाम याचे हे भ्रष्ट रूप आहे. हे लोक पूर्णतः मुसलमान नाहीत. परजातीचा माणूस मुसलमान झाल्यानंतर त्याला मोला म्हणण्याची पद्धत होती. यावरून ही बाटलेल्यांची जात असावी, असे म्हणतात. इ. स. च्या १५ व्या व १६ व्या शतकांच्या दरम्यान महंमद बेगडाच्या कारकीर्दीत हे लोक बाटले, असे सांगतात. मोलेसलाम लोक इतर मुसलमानांच्या पंक्तीला जेवतात, पण घरी ते शाकाहारीच असतात. काजी आणि मौलवी यांच्या बरोबर हे ब्राह्मण पुरोहितालांही आपल्या धर्मकृत्यांसाठी बोलावतात. [रजःकण]

•

मोल्लांबा (इ. स. चे १६ वे शतक) आंध्र प्रदेशातील एक संत कवयित्री. तेलुगू भाषेत हिनेच प्रथम काव्यरचना केली, असे म्हणतात. हिचे सलग, साधार चरित्र उपलब्ध नाही. उपलब्ध आहेत त्या दंतकथा-आख्यायिका. त्यांच्या आधारे तिचे चरित्र मिळते, ते असे –

नेल्लोर जिल्ह्यातील गोपवरम गावच्या केसन्ना नामक एका कुंभाराच्या पोटी ही जन्मली. केसन्ना हाही एक थोर साधू व कवी होता. त्याच्या साधुत्व आणि कवित्व या दोन्ही गुणांचा वारसा मोल्लांबेला मिळाला. बालपणापासूनच मोल्लांबेच्या ठिकाणी दीन-दलितांविषयी कळवळा, सत्याविषयी आग्रह, स्पष्टवक्तेपणा, धैर्य, अन्यायाविरुद्ध झगडण्याची वृत्ती, इ. लोकोत्तर गुणांचा आढळ होऊ लागला. त्यामुळे ती जसजशी मोठी होऊ लागली, तस तसा सर्वांना तिचा दरारा वाटू लागला. तथापि जगातील व समाजातील दुष्प्रवृत्तींचा वाढता प्रभाव पाहून मोल्लांबेला लौकरच वैराग्य आले व ती आपला सर्व वेळ परमेश्वराच्या भजनपूजनात व्यतीत करू लागली. आपल्या एकुलत्या एका मुलीला ऐन तारुण्यात आलेले हे वैराग्य पाहून केसन्नाचे हृदय व्याकुळ झाले. त्याने गावातल्या चार शहाण्या माणसांच्या सल्ल्याने, एका उत्सवप्रसंगी मोल्लांबेचे लग्न लावून टाकण्याचे ठरविले. पित्याचा हा विचार समजल्यावर मोल्लांबा म्हणाली–

'बाबा, मी लग्न करीन; पण माणसाशी नाही, तर परमेश्वराशी !'

मोल्लांबेचा हा निर्णय ऐकून केसन्ना अवाक झाला.

यानंतर मोल्लांबा घर सोडून बाहेर पडली. मार्गात तिला एक साधू भेटला. मोल्लांबेने त्याला विचारले.

'साधुमहाराज, मला परमेश्वराशी लग्न करायचे आहे. तो परमेश्वर मला कुठे भेटेल ?'

साधूने तिला सांगितले. 'तू एखाद्या एकांत स्थळी बसून पतिरूपात परमेश्वराचे चिंतन कर.'

मोल्लांबेने मग तसे केले. तिचा तपोभंग व्हावा, म्हणून परमेश्वराने तिच्यावर नाना प्रकारची संकटे आणली; परंतु मोल्लांबेने त्या सर्व संकटांवर मात केली व आपली तपश्चर्या चालूच ठेवली. मग परमेश्वर तिच्यावर प्रसन्न झाला व त्याने तिला एका भिल्ल-युवकाच्या रूपात दर्शन दिले. मोल्लांबेने आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे त्याच्याशी लग्न केले.

त्याच काळात तिला कवित्वस्फूर्ती झाली. तिने तेलुगू भाषेत रामायण लिहिले. तिचे हे रामायण मोल्लरामायण या नावाने प्रसिद्ध आहे. भाषा, शैली आणि मांडणी या तीन्ही दृष्टींनी पाहता मोल्लरामायणाच्या तोडीचे दुसरे काव्य तेलुगू भाषेत झाले नाही, असे म्हणतात. तिच्या कवित्वाचा एक नमूना असा-

सुडिगोनि रामु पादमुलु सोकिन धूलि वहिंचि राधि येपंट।
नोक्क कांत यय्येनट पन्नग वीतनि पावरेणु।
विय्येड वाडि नोउ सोक निदि ये मगुनो यनि संशयालुडं।
कडिगे गुहुंडु रामपद कंज युगंबु भय्यमु पेंपुनन्।

अर्थ – श्रीरामचंद्राच्या चरणधुळीच्या स्पर्शाने एका दगडातून एक सजीव स्त्री प्रकटली असल्याची कथा गुहाने ऐकली होती. त्यामुळे त्याच्या मनात शंका आली, की अशा रामचंद्राची पाउले माझ्या नौकेला लागल्यावर काय होईल ? म्हणून मग भयविव्हल होऊन त्याने रामाचे चरण घट्ट धरून ठेवले.

तेलुगू साहित्यसमीक्षक मोल्लांबेला मीरेच्या तोडीची कवयित्री मानतात. [आंध्रभारती; ग्रे. वी. इं.; ते. सा. इ.]

मोवार मध्य प्रदेशातील एक शेतकरी जात. छत्तीसगढ, रायपूर, विलासपूर व रायगड या भागात यांची वस्ती आहे. यांची संख्या अत्यल्प आहे. मूळचे झाशी जिल्ह्यातील मोवागडचे निवासी म्हणून त्यांना मोवार किंवा महुवार हे नाव मिळाले, असे म्हणतात. यांच्यांत उपजाती नाहीत, पण देवकुळे आहेत. सूरज, हतैय, नाग, इ. त्यांची नावे आहेत. समान देवकाच्या कुळांत लग्न होत नाही. लग्नसमारंभ कूर्मींच्या समारंभाप्रमाणेच असतात. त्या वेळी हे ब्राह्मणांचा सन्मान करतात. बैरागी व गोसावी हे त्यांचे गुरू असतात. बहुसंख्य मोवार मद्यमांस सेवन करीत नाहीत. यांच्यांतले पुरुष सशक्त, सुदृढ व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काळे असतात. पूर्वी ते सैनिकी पेशात होते. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

मोसाळू सर्व गुजराती लोकांमध्ये प्रचलित असलेला, लग्नविधीतील एक आचार. लग्नाच्या आधी मुलीचा मामा आणि मामी वधूसाठी व तिच्या मातापित्यांसाठी अहेर घेऊन येतात, त्या अहेराला मोसाळू म्हणतात. दोन स्त्रियांच्या डोक्यांवर दोन मोठ्या टोपल्यांमध्ये हे अहेराचे प्रकार ठेवलेले असतात. यांत वधूचा वेष, अलंकार व मुख्यतः चुडा असतो. हा अहेर वाजतगाजत आणतात आणि त्या मिरवणुकीत स्त्रिया गाणी गातात. मामाकडून आलेली ही वेषभूषा वधूने लग्नाच्या वेळी धारण करायची असते. [भडोच गॅझे.]

मोहनोत राजस्थानातील एक जात. राव राजपाल नावाचा एक राजा होता. त्याला मोहनसी नावाचा एक मुलगा होता. त्याच्या संततीला मोहनिया राठोड व त्याच्या प्रधानाच्या मुलीच्या संततीला मोहनोत अशी नावे पडली. मोहनोतांची संख्या वाढल्यावर त्यांच्यांतील अनेक लोक मारवाडमध्ये येऊन स्थायिक झाले. इथेही राजांची सेवा करणे हेच त्यांचे मुख्य काम होते.

मोहनोत पुरुष

मारवाडात मोहनशी वंशाचे काही लोक ठाकूर व काही लोक मोहनोत म्हणून ओळखले जातात. किसनगड, उदेपूर, इ. ठिकाणच्या या लोकांना मेहता म्हणतात. हे लोक प्रथम जैन होते. नंतर ते वैष्णव झाले.

मोहनोत लोक काळ्या रंगाचा जोडा वापरीत नाहीत आणि निंबाची लाकडे जाळीत नाहीत. नागनेची नावाची त्यांची एक कुलदेवता असून, निंब वृक्षाचा तिच्याशी संबंध आहे, असे ते म्हणतात. हे आपल्या मुलांचे जावळ या देवीच्या मंदिरात काढतात.

मोहरम मुसलमानी वर्षाचा पहिला महिना व त्या महिन्यातील मुसलमानी उत्सव. मोहरम या मूळ अरबी शब्दाचा अर्थ, निषिद्ध किंवा धिक्कार करण्यासारखा, असा आहे. इस्लामच्या जन्मापूर्वी अरबस्तानात या महिन्यात युद्ध किंवा रक्तपात करणे, या गोष्टी धार्मिक दृष्ट्या निषिद्ध मानल्या जात. त्यामुळे या महिन्याला मोहरम हे नाव पडले. प्राचीन काळापासून हा महिना अत्यंत पवित्र समजला जाई; परंतु पुढे याच महिन्यात हजरत इमाम हुसेन यांचा वध झाल्यामुळे या महिन्याला अशुभत्व आले व त्यानंतर या महिन्यात विवाहसमारंभ करणे किंवा एखाद्या मनुष्याचा जन्म होणे या गोष्टी अशुभ मानल्या गेल्या आहेत.

मोहरम महिन्याच्या पहिल्या दहा दिवसांत मोहरम नावाचा उत्सव साजरा केला जातो. महंमद पैगंबराच्या मुलीचे मुलगे हसन व हुसेन यांना त्यांच्या शत्रूंनी म्हणजे सुन्नी पंथाच्या खलीफांनी इ. स. च्या ७ व्या शतकात अमानुष प्रकारे मारले. त्या दुःखद प्रसंगाची स्मृती म्हणून हा उत्सव करतात.

या उत्सवात ताझियाला किंवा ताबुताला फार महत्त्व असते. इराकमध्ये करबला येथे ज्या ठिकाणी हुसेन मारला गेला, तिथे त्याची कबर बांधलेली आहे. त्या कबरीची प्रतिकृती तयार करून बसविली जाते, तिला ताझिया असे म्हणतात. इ. स. च्या चौदाव्या शतकात अमीर तैमूर करबलाच्या यात्रेला जाऊन आला व त्यानंतर त्याने ताझिया बनविण्यास आरंभ केला.

प्रत्येक मनुष्य आपल्या ऐपतीप्रमाणे चांदी, हस्तिदंत, शिसवी, चंदन, काच, बांबू, कागद, इ. भिन्न पदार्थ वापरून ताबूत बनवितो. भारी किंमतीच्या प्रतिकृती अनेक वर्षे ठेवतात. अशा वेळी शेवटच्या दिवशी पुरण्यासाठी साधे, बांबू व कागद किंवा अभ्रक यांपासून बनवलेले ताबूत ठेवतात.

या उत्सवासाठी धनिक लोक जी घुमटाकृती इमारत बांधतात, तिला 'इमाम–बारा' म्हणतात. ही जागा पताका, आरसे, हंड्या-झुंबरं, दिवे, उंची कापडाचे भरजरी पडदे, इ. विविध साधनांनी सुशोभित करण्यात येते. एका भिंतीशी, मक्केकडे तोंड करून ताबुताची स्थापना केलेली असते. त्याच्या जवळच हुसेनची आयुधे, कपडे, खाण्याचे पदार्थ वगैरे ठेवलेले असतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मेणबत्त्या व अनेक प्रकारचे रंगीबेरंगी दिवे लावून सगळीकडे लखलखाट केलेला असतो.

ताबुताजवळ एक ओटा बांधलेला असतो. तिथे रोज एक मौलवी ‘ धी मजलीस ’ नामक पोथीतील एक एक भाग जमलेल्या लोकांना वाचून दाखवितो. मजलीसचा अर्थ शोकप्रदर्शक किंवा पवित्र सभा असा आहे. हा गंभीर कार्यक्रम संपल्यावर सकाळ-संध्याकाळ दोन्ही वेळा मरसिया म्हणजे शोकगीत गाण्याचा कार्यक्रम होतो व शेवटी छातीवर हात मारून हसन–हुसेन यांच्या नावांचा आक्रोश केला जातो. मुसलमान स्त्रियादेखील स्वतंत्रपणे वेगळा ताबूत मांडून असाच कार्यक्रम करतात. साधारणपणे प्रत्येक घरी ताबूत बसविण्याची प्रथा असली, तरी थोरामोठ्यांच्या घरी जी मजलीस भरते, तिला उपस्थित राहून शोकप्रदर्शन करण्याकडे बहुसंख्य लोकांची प्रवृत्ती असते. हसन व हुसेन ज्या प्रकारे मारले गेले, तो प्रकार अत्यंत हीन होता. त्यामुळे त्यांचे वंशज त्या प्रसंगाच्या स्मृतीने अत्यंत व्यथित होतात व मोहरमच्या दिवसांत सर्व प्रकारच्या सुखोपभोगांचा त्याग करून व्रतस्थ राहतात. काहीजण तर या दिवसांत पाण्याचा थेंबही पीत नाहीत. कारण हुसेनचा खून झाला, त्या दिवशी शत्रुसैन्याने त्याच्या कुटुंबियांना पाणीसुद्धा पिऊ दिले नव्हते. त्या दुःखद प्रसंगाची स्मृती अशा प्रकारे पाण्याशिवाय राहून ठेवली जाते. हुसेनच्या कुटुंबियांना जसे तेव्हा तहानेने व्याकूळ व्हावे लागले, तसे पुन्हा कोणाला व्हावे लागू नये, म्हणून मोहरमच्या दहा दिवसांत रस्तोरस्ती सुवासिक, थंड सरबत किंवा क्वचित दूधही देण्याची व्यवस्था केली जाते.

उत्सवाच्या शेवटच्या दिवशी सर्व ताबुतांची मिरवणूक काढली जाते. प्रत्येक ताबुताबरोबर मालकाच्या इतमामाप्रमाणे हत्ती, घोडे, पालख्या, वाद्ये वगैरे असतात आणि मिरवणुकीच्या शेवटी गरीब लोकांना हत्तीवरून अन्न व पैसे वाटतात.



पंजासाहेब

ताबुताबरोबर अनवाणी चालणारे जे बरेच लोक असतात, त्यांच्यापैकी एक जण त्या दुःखद प्रसंगाचे वर्णन वाचीत चालतो. पर्शिया, ईजिप्त, हिंदुस्थान, इ. देशांत ताबुतांची मिरवणूक काढली जाते. अरबस्तानात मात्र हा प्रकार अधार्मिक समजतात.

ताबूत हा मूर्तिपूजेचाच एक प्रकार आहे, असे मानून कट्टर मुसलमान या प्रथेला विरोध करतात. पण भारतातील सर्व मुसलमान या उत्सवात भाग घेतात. काही हिंदू लोक तर ताबुताची पूजा करतात, त्याला नवस बोलतात, त्यावर रेवड्या, खारका उधळतात. काही ठिकाणी शेवटच्या दिवशी एखाद्या हिंदू माणसाच्या अंगात पीर संचारतो व तो ताबुतापुढे ‘दूला दूला’ म्हणत नाचतो. एका दांडक्याला चांदीचा नाल किंवा पंजा लावून चांगले वस्त्रही बांधण्यात येते. त्याला नालसाहेब किंवा पंजासाहेब म्हणतात. त्यालाही ताबुतासमोर नाचवितात.

मिरवणूक संपल्यावर सर्व ताबूत गावाबाहेरच्या कबरस्थानातील खड्ड्यात पुरतात. मृत मनुष्याच्या दफनप्रसंगी जो विधी करतात, तो सर्व याही प्रसंगी करतात. ताबुताचे दफन केल्यावर तिथे अन्न, पाणी, फळें, इ. पदार्थ ठेवतात. हा कार्यक्रम संपवून घरी परतल्यावर श्रीमंत लोक गोरगरिबांना अन्न, वस्त्र व द्रव्य यांचे दान करतात. [डि. इ.; मु. स. सं.]

मोहरी एक गळिताचे धान्य. मोहरीचा उपयोग मंत्रतंत्रातही करतात. माणसावर मोहऱ्या टाकून त्याला पशू बनवीत, असे वर्णन कथासरित्सागराच्या शशांकवती लंबकात आलेले आहे. वाईट स्त्रिया मंत्रसाधन करून, मोहऱ्या मंतरून ठेवतात आणि त्या नवऱ्यावर टाकून त्याला कोंबडा बनवतात, अशाही कथा लोकांत प्रचलित आहेत. दृष्ट काढायच्या वेळी मिठाबरोबर मोहऱ्या ओवाळून टाकायची पद्धत आहे.

जेव्हा होमहवनासारखे कृत्य करायचे असेल तेव्हा अग्निमुख करण्याच्या पूर्वी त्या जागेवर चारही दिशांना मोहऱ्या टाकतात. त्याला सर्षपविकिरण असे नाव आहे. त्या जागेवरची भुतें तिथून निघून जावी, असा त्या कृतीचा उद्देश असतो. त्या वेळचा मंत्र असा–

यदत्र संस्थितं भूतं स्थानमाश्रित्य सर्वतः।
स्थानं त्यक्त्वा तु तत्सर्वं यत्रस्थं तत्र गच्छतु॥

अर्थ –सर्व बाजूंनी इथल्या स्थानाचा आश्रय करून जी भुतें-खेते राहिली असतील, त्यांनी या स्थानाचा त्याग करून आपल्या मूळच्या जागी जावे. [प्रा. म.]

मोहिनी विष्णूचा तेरावा अवतार. फक्त भागवत पुराणातच हा अवतार मानलेला आहे. भागवत पुराणाच्या ८ व्या स्कंधात विष्णूच्या या अवताराची कथा दिलेली आहे, ती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

थोडक्यात अशी— देवदैत्यांनी समुद्रमंथन केले, तेव्हा त्यातून अमृत निघाले. दैत्यांनी ते बळाने हरण केले. हे पाहून देव फार दुःखी झाले आणि विष्णूकडे गेले. भगवान विष्णूने त्यांना अमृत मिळवून देण्याचे वचन दिले. अमृतहरण केल्यावर दैत्यांमध्ये ते पिण्याविषयी भांडणे सुरू झाली. त्या वेळी विष्णूने अनुपम लावण्यमयी अशा मोहिनीचे रूप घेतले आणि तो तिथे प्रगट झाला. मोहिनीच्या रूपावर सर्व देव आणि दैत्य भाळले. तेव्हा तिने अमृत वाटण्यासाठी दैत्यांकडून अमृतकुंभ घेतला आणि दैत्यांना फसवून फक्त देवांनाच ते प्यायला दिले. [पु. इं.; पु. वि.; हिं. कृ. पु. प्र.]

मोहिनी—रामस्वामी मंदिर, कुंभकोणम

मोहिनीआट्टम तमिळनाडूमध्ये ज्या प्रकाराला भरतनाट्यम म्हणतात, त्याच प्रकाराला केरळात मोहिनीआट्टम म्हणतात. हे नृत्य स्त्रियाच करतात. पूर्वी पुरुष नर्तकही हे नृत्य करीत; पण पुढे ते स्त्रियांचे, मुख्यत्वे देवदासींचे, नृत्य ठरले. हे नृत्य म्हणजे स्त्रीचे पुरुषाला आव्हानच असते. या नृत्यात नर्तिका प्रेक्षकांना चाळवते आणि आपल्या हावभावांनी प्रेक्षकांच्या ठिकाणी कामभाव जागृत करते. पुराणात भस्मासुर–मोहिनीची कथा आहे. भस्मासुराला मारण्यासाठी विष्णूने मोहिनीरूप घेतले, त्याला आपल्याबरोबर नाचायला लावले आणि त्या नृत्यात त्याचा हात त्याच्याच डोक्यावर ठेवायला लावून त्याचे मरण घडवून आणले.

या मोहिनीरूपाला भस्मासूरच भाळला असे नव्हे; तर वीतराग शिवालाही तिने आपल्या लीलाविभ्रमांनी वेडे केले. त्यावरूनच या नृत्याला मोहिनीआट्टम असे सार्थ नाव पडले आहे.

तंत्रदृष्ट्या मोहिनीआट्टम व भरतनाट्यम यांत थोडाच फरक आहे. कथकळीच्या काही हस्तमुद्रा आणि पदविन्यास स्वीकारून या नृत्याचे वेगळेपण दाखवतात. त्यात नृत्त व नृत्य या दोन्ही प्रकारांचा समावेश असतो. भरतनाट्यममध्ये ज्याला अलारिप्पू म्हणतात, त्यालाच मोहिनीआट्टममध्ये शोलुकाट्ट म्हणतात. बाकीचे वर्णम, थिल्लाना, स्वरम, जाती हे प्रकार भरतनाट्यमसारखेच करतात. मोहिनीआट्टममध्येही भरतनाट्यमप्रमाणेच कर्नाटकसंगीतपद्धतीचा उपयोग करतात; पण पदांची भाषा मात्र मल्याळम असते. पूर्वकाळी या नृत्याचा प्रयोग सणासुदीला घरगुती पद्धतीने होत असे; पण सांप्रत याचा प्रयोग केव्हाही आणि कुठेही केला जातो. त्याला रंगमंचाचीही गरज भासत नाही.

नर्तिकेची वेषभूषा असते ती अशी— ती चुणीदार शुभ्र साडी नेसते व रेशमी शुभ्र रंगाचे तंग पोलके घालते. कमरेत सोन्याचा कमरपट्टा बांधते. केसांचा आंबाडा मागच्या अंगास एका बाजूला कलता बांधून त्यावर फुलांची वेणी माळते. चेहऱ्यावर हलक्या हाताने पावडर फवारते. ओठ अधिक तांबूस करते. डोळ्यांत काजळ घालून भुवया रेखते आणि सर्वांगावर केरळी पद्धतीचे अलंकार धारण करते.

मोहिनीआट्टममध्ये मुख्यत्वेकरून विप्रलंभ शृंगार हा रस असतो. विरहिणी नायिका आपल्या प्रियकराला बोलावून आणण्यासाठी किंवा त्याच्याशी संकेत करण्यासाठी आपल्या

मोहिनीआट्टम— नर्तिका

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सखीला गळ घालते किंवा प्रियकराचा राग दूर करण्यासाठी ती स्वतः प्रयत्न करते, अशा प्रकारची गीते या नृत्यासाठी योजिलेली असतात. गीताला अनुसरून मोहिनी नर्तिका अभिनय करीत असते.

या नृत्याला एक सूत्रधार असतो, त्याला नट्टुवन म्हणतात. तो सुंदर वेष करून व जरीचे पागोटे घालून रंगमंचावर प्रवेश करतो आणि मुखाने गात व हाताने ताल धरीत मोहिनीच्या जोडीने पदन्यास करतो. पूर्वी नृत्याच्या वेळी मांदळ व वीणा ही वाद्ये वाजविली जात असत. पण सांप्रत इतर अनेक वाद्ये वाजविली जातात.

प्रसिद्ध संगीतकार स्वाति तिरुनाळ याने या नृत्याच्या उत्कर्षासाठी मोठे परिश्रम केले. या नृत्यात गायिली जाणारी जी पदे आहेत, ती त्यानेच रचलेली आहेत.

एकाकाळी मोहिनीआट्टम केरळात अत्यंत लोकप्रिय होते. कित्येक श्रीमंत जमीनदारांनी त्याला प्रोत्साहनही दिले होते. पण त्यातूनच त्याच्या अधःपाताला प्रारंभ झाला. ज्यांनी त्या कलेला पोषण दिले, त्यांनीच ती कला आपल्या विलासाचे एक साधन बनवली. मोहिनी नर्तिकांना त्यांनी आपल्या भोगदासी बनवून त्यांचे शील आणि चारित्र्य नष्ट केले. त्यामुळे हे नृत्य शिकण्यासाठी चांगल्या घरातल्या मुली येईनाशा झाल्या. जुन्या नर्तिका कालवश झाल्यानंतर नवी नर्तिकांची पिढी पुढे आलीच नाही. त्यामुळे मोहिनीआट्टम ही नृत्यकला केरळात केवळ नामशेष होऊन राहिली.

पण प्रस्तुत कलेला पुनरुज्जीवित करणारा तिचा एक भाग्यविधाता जन्माला आला, त्याचे नाव महाकवी वळ्ळत्तोळ नारायण मेनन असे आहे. त्यांनी केरळात कलामंडलम नावाची एक संस्था स्थापन करून ज्या लुप्त कलांना पुनश्च प्रकाशात आणले, त्यांपैकी मोहिनीआट्टम ही एक कला होय. त्यांच्या वेळेला ते नृत्य करणाऱ्या स्त्रिया अस्तंगत झाल्या होत्या. मोठ्या कष्टाने त्यांनी तीन नर्तिका शोधून काढल्या आणि त्यांच्याकडून त्या नृत्याची सर्व अंगे समजाऊन घेतली. मग त्यांनी त्या पद्धतीचे शिक्षण देण्यासाठी आपल्या कलामंडलात वर्गही सुरू केले. पण त्यांना कोणी मुलीच मिळेनात. पण ही स्थिती त्यांच्याच प्रयत्नाने पालटली. ज्या कोणी मुली त्यांनी जमवल्या त्यांना त्यांनी उत्तम शिक्षण दिले व त्यांच्याकरवी मोहिनीआट्टमचे जाहीर प्रयोग सुरू केले. पुढे हळूहळू सभ्य लोकांचा त्या कलेविषयीचा तिटकारा कमी होऊ लागला आणि चांगल्या घराण्यातल्या मुली त्या शिक्षणासाठी कलामंडलात दाखल होऊ लागल्या.

श्री. वळ्ळत्तोळ यांनी त्या नृत्यात कालानुरूप पुष्कळ सुधारणा केल्या आणि ते नृत्य अधिक मनोज्ञ व प्रेक्षणीय बनवले. सदभिरुचीला खटकणारे त्यातले दोष त्यांनी काढून टाकले.

मोहिनीआट्टम – नर्तिका

पूर्वी नट्टुवन म्हणजे सूत्रधार रंगमंचावर येऊन मोहिनीच्या संगे गात नाचत असे, तो आता पुढे येत नाही; त्याला त्यांनी जवनिकेच्या मागे ठेवले. मांदळाच्या जागी मृदंग व मुखवीणेच्या जागी व्हायोलीन आणले. त्याचवरोबर ढक्का, बासरी आणि हार्मोनियम असा वाद्यमेळही जमा केला. देशात आणि विदेशांतही त्यांनी मोहिनीआट्टमचे उत्कृष्ट प्रयोग केले व रसिकांच्याकडून प्रशंसा मिळवली. पाहा– भरतनाट्यम. [मार्ग, डिसेंबर १९५७; युगप्रभात– १६ एप्रिल १९६२]

मोहिनी एकादशी

वैशाख शुद्ध एकादशीला हे नाव आहे. या एकादशीची कथा पद्म पुराणाच्या उत्तर खंडात दिली आहे, ती अशी–

भद्रावती नगरीत धनपाल नावाचा एक वैश्य होता. त्याचा मुलगा उवळ्या निघाला व वेश्यासक्तही बनला. त्यामुळे बापाने त्याला घरातून हाकलून दिले. पुढे तो चोऱ्या करू लागला. काही काळाने त्याला आपल्या कृत्यांचा पश्चात्ताप झाला व तो कौंडिण्य ऋषीच्या उपदेशाप्रमाणे मोहिनी एकादशीचे व्रत करू लागला. मरणोत्तर तो विष्णुलोकी गेला.

या दिवशी उपवास, विष्णुपूजा, जागरण, इ. गोष्टी केल्याने विष्णुलोक मिळतो, असे सांगितले आहे.

मोहिनीराजाचे नवरात्र

नगर जिल्ह्यातील नेवासे गाव हे मोहिनीराजाचे मुख्य स्थान आहे. अनेक देशस्थ ऋग्वेदी कुटुंबांत त्याचे नवरात्र करतात. माघ शुद्ध अष्टमीपासून पौर्णिमेपर्यंत हे नवरात्र असते. त्यात पूजा, आरती, नंदादीप, ब्राह्मण–सुवासिनीभोजन, कथाकीर्तन, इ. कार्यक्रम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असतात. या कालात काही लोक एकभुक्त करतात. पौष शुद्ध पौर्णिमेपासून माघ शुद्ध पौर्णिमेपर्यंत घरणे पारणे करण्याचीही पद्धती आहे. रविवार हा या देवतेचा वार मानण्यात येतो. या दिवशीही काही लोक एकभुक्त करतात. [दे. ऋ. शा. प.]

मोहिली नृत्य व्रजमंडलातील एक स्त्रीनृत्य. या नाचात स्त्रिया फेर धरून मंद गतीने नाचतात. हे नृत्य करताना चार पावले उजवीकडे गेल्यावर पाचवे डावे पाऊल मागे टाकतात. नंतर उजवा पाय डाव्या पावलापाशी आणून पुढे जातात. त्याच क्रमाने नृत्य चालू राहते. सर्वांची पावले एकदम पडणे हे या नत्यात महत्त्वाचे असते. [संमेलनपत्रिका]

मोहेंजोदडो एक अत्यंत प्राचीन नगर. हे स्थान सिंधमधील लारकाना तालुक्यात डोक्री नामक स्थानकापासून आठ मैलांवर आहे. सांप्रत त्याला मोहेंजोदडो (=मृतांचे स्थान) असे नाव देण्यात आले आहे. तिथे प्राचीन काळातील विटा व मातीची खापरे शेकडो वर्षे धूळ खात पडलेली होती. प्राचीन वसाहतींच्या भग्न अवशेषांचे अनेक ढीग तिथे होते. इ. स. १९२२ मध्ये श्री. राखालदास बानर्जी हे त्या जागी एका कुशाणकालीन स्तूपाजवळ उत्खनन करीत असताना त्यांना भूगर्भात काही जुन्या वस्तू आढळल्या. म्हणून त्यांनी आणखी काही ढिगारे उकरून बरेच उत्खनन केले. त्यात त्यांना प्राचीन नगराचे अवशेष सापडले. दहा वर्षे तिथे उत्खनन केल्यानंतर ज्या असंख्य वस्तू तिथे मिळाल्या, त्यांचे संशोधन व अध्ययन करून पुरातत्त्वविदांनी असे अनुमान केले, की त्या जागी प्रागैतिहासिक काळी जी एक संस्कृती नांदत होती, तिचे हे अवशेष आहेत. तिथल्या भूगर्भाच्या भिन्न भिन्न थरांत एकावर एक वसलेल्या अनेक नगरांचे अवशेष आढळतात. सुमारे २४० एकरांचे क्षेत्र त्या नगरांनी व्यापले आहे. पूर्वीचे क्षेत्र त्यापेक्षा विस्तृत असावे. तिथे वेदपूर्वकाली जी अत्यंत विकसित संस्कृती होऊन गेली, तिला सिंधुसंस्कृती हे नाव देण्यात आले आहे. हडप्पा, चन्हूदडो, रूपड, इ. ठिकाणी याच संस्कृतीचे अवशेष मिळाले आहेत.

सांप्रत मोहेंजोदडो हे ठिकाण सिंधू नदीच्या तीरापासून सुमारे ३.५ मैल दूर आहे. पण प्राचीन काळी सिंधू नदी या स्थानाजवळून वाहत असावी, असे वाटते. नदीच्या महापुरांमुळे कित्येकदा तिथल्या वसाहतींची हानी झाली असावी आणि शेवटी, वारंवार येणाऱ्या पुरांमुळे त्रासून जाऊन तिथल्या लोकांनी स्थलांतर केले असावे. हजारो वर्षांच्या काळात त्या नगरावर दगडमातीचे थर साचून ते जमिनीत गाडले गेले असावे. त्यातील रुंद रस्ते, चांगली बांधलेली घरे व स्नानगृहे, पाण्याचे नळ, मातीची भांडी व खेळणी, मणी, मूर्ती, इ. विविध वस्तूंवरून त्या प्राचीन संस्कृतीची कल्पना करता येते. पाहा – सिंधुसंस्कृती. [मो. सि. स.; सु. वि. को.]

मोक्ष मुच् = सोडणे, मोकळे होणे किंवा करणे, या संस्कृत धातूपासून मोक्ष शब्द बनला आहे. मोक्षाचा समानार्थक शब्द मुक्ती हा होय. त्याचाही वाच्यार्थ सुटका असाच आहे. पण तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात या शब्दाला विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे. संसारात त्रिविध तापांनी पोळणाऱ्या जीवाची त्यातून सुटका होणे याला मोक्ष म्हणतात. मोक्षाचा विरोधी शब्द बंध हा आहे. अविद्येमुळे जीवाला बंध उत्पन्न होतो. ही अविद्या आत्मज्ञानाने नष्ट झाल्यावर जीवाचे बंध आपोआप गळून पडतात. आणि बंध गळाले म्हणजे आत्मा मुक्त होतो, स्वतंत्र होतो.

मनुष्य या जगात जन्माला आल्यावर अनेक प्रकारची बरीवाईट कर्मे करतो. बऱ्या कर्मामुळे त्याला स्वर्गसुख मिळते आणि निंद्य कर्मामुळे त्याला नरकयातना भोगाव्या लागतात. हे स्वर्गनरक भोगल्यावरही त्याची सुटका होत नाही. त्याला कर्मानुसार पुनर्जन्म घ्यावा लागतो. त्या जन्मात पुनश्च त्याच्या हातून कर्मे घडतात व तदनुसार त्याला जन्म घेणे भाग पडते. जन्माच्या मागून मरण आणि मरणाच्या मागून जन्म, असे हे भवचक्र किंवा रहाटगाडगे सुरूच राहते. या भवचक्राला कंटाळलेला आणि त्यातून कायमची सुटका कशी होईल या विचाराने ग्रस्त झालेला जिज्ञासू जीव मग मोक्षाचा विचार करू लागतो. अशा अनेक बुद्धिमान जिज्ञासूंच्या विचारमंथनातून समग्र जीवनाचे आणि या विश्वपसाऱ्याचे तत्त्वज्ञान निर्माण होते.

भारतातील विविध दर्शने या तत्त्वचिंतनातूनच निर्माण झाली आहेत. पण विविध दर्शनांच्या मोक्षविषयक कल्पना व मोक्ष साधण्याचे मार्ग यांत वैविध्य आढळून येते. मोक्षविषयक कल्पनेचे दोन भाग पाडता येतात—

१. जीवाला जन्म–मरण, सुखदुःख, इ. द्वंद्वांचा अनुभव घ्यायला लावणाऱ्या अविद्येपासून जिवाची सुटका होणे.

२. जीव–शिव किंवा आत्मा–ब्रह्म यांच्या अभेदाची प्रतीती येऊन सुखदुःखाच्या पलिकडचा शाश्वत आनंद उपभोगायला मिळणे.

पहिली कल्पना अभावात्मक असून, दुसरी भावात्मक आहे. मोक्षमार्ग अनेक संप्रदायांनी अनेक सांगितले असले, तरी 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' (ज्ञानानेच मोक्ष मिळतो) हा सिद्धान्तच बहुमताने मान्य झालेला आहे.

मोक्षकल्पनेचा इतिहास पाहू गल्यास वैदिक आर्यांची मोक्षकल्पना फार ढोबळ असल्याचे दिसते. संसारातील यातनांपासून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुटका करून घेणे व ज्या ठिकाणी सर्व सुखे उपलब्ध होतील ते स्थान प्राप्त करून घेणे म्हणजे मोक्ष, असे त्यांना वाटे. हे सुख इंद्रादी देवतांच्या कृपेने मिळते, अशीही त्यांची समजूत होती.

उपनिषत्कालात मोक्षकल्पनेला अधिकाधिक सूक्ष्मता येऊ लागली. सद्योमुक्ती, क्रममुक्ती, सदेहमुक्ती, विदेहमुक्ती, तसेच सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता, या मुक्तीच्या चढत्या श्रेणी, वगैरे भेद त्या कल्पनेत निर्माण झाले. आस्तिक व नास्तिक किंवा वैदिक व अवैदिक या सर्व दर्शनांतून येन केन प्रकारेण मोक्षाची चर्चा केलेली आढळते. विविध संप्रदायांनीही मोक्षाचा ऊहापोह केलेला आढळतो. विविध दर्शनांच्या मोक्षविषयक सिद्धान्तांची आणि मोक्षमार्गांची थोडक्यात माहिती अशी—

चार्वाक दर्शन – 'मरणमेवापवर्गः' = मरण म्हणजेच मोक्ष होय. प्रत्येक क्लेशाचे स्थान हे भोगायतन शरीर आहे. जोवर शरीर आहे, तोवर जीव नाना प्रकारच्या संकटांना तोंड देत जीवन जगण्यामध्ये प्रवृत्त राहत असतो. त्याचा देह एकदा पडला, की त्याच्या अनुषंगाने येणारी सर्व दुःखेही आपोआप थांबतात. अर्थात त्यांची आत्यंतिक निवृत्ती होते. याहून दुसरा मोक्ष नाही.

जैन दर्शन – राग, द्वेष, मोह यांच्यामुळे आस्रव उत्पन्न होतो आणि जीव बंधनात पडतो. तपस्या व नियमांचे पालनहे आस्रव नष्ट करण्याचे साधन आहे. आस्रवनाशाने जीव संवर व निर्जरा या श्रेणीने वर जाताच तो कर्मपुद्गलांतून मुक्त होतो आणि सर्वज्ञ, सर्वस्रष्टा, इ. होऊन मुक्तीचा अनुभव घेऊ लागतो. या अवस्थेला भावमोक्ष अर्थात जीवमुक्ती म्हणतात. वास्तविक ही मोक्षपूर्व अवस्था आहे. या परिस्थितीत चार घाती कर्मांचा नाश होतो. त्यानंतर चार आघाती कर्मे शिल्लक राहतात. त्यांचाही नाश झाल्यावर जी अवस्था प्राप्त होते, तिला द्रव्य-मोक्ष असे म्हणतात. हाच खरा मोक्ष होय. अशा प्रकारे मुक्त झालेला जीव सर्व कर्मे आणि सर्व भाव यांतून मुक्त होतो. तो आपल्या स्वाभाविक गतीला अनुसरून ऊर्ध्व मार्गाने जाऊ लागतो व ऊर्ध्व लोकाच्या धर्मास्तिकाय सीमेपर्यंत पोचतो. अलोकाकाशामध्ये जीव राहत नसल्यामुळे तो ऊर्ध्व लोकाच्या वर जाऊ शकत नाही व तिथून परत फिरून संसारातही येत नाही. तो तिथल्या सिद्धशिलेवर अनंत काल निवास करतो.

बौद्ध दर्शन – बौद्धांनी मोक्ष कल्पना निर्वाण या शब्दाने विवेचिली आहे. (निर्वाण पाहा)

न्याय दर्शन – 'तदत्यन्तवियोगो मोक्षोऽपवर्गः' = तत् म्हणजे दुःख. दुःखाचा अत्यंत वियोग म्हणजे अपवर्ग अर्थात मोक्ष होय. (न्या. सू. ११.२२). ग्रहण केलेल्या जन्माचा नाश होणे आणि पुढचा जन्म न येणे या दोहोंची सिद्धी झाल्यावर आत्म्याच्या दुःखाची आत्यंतिक निवृत्ती सिद्ध होते. या अवस्थेत बुद्धी, सुख, दुःख, इ. आत्म्याच्या नऊ विशेष गुणांचा नाश होतो. मुक्त दशेत आत्म्याचे स्वरूप कसे असते, याचे सुंदर वर्णन न्याय-मंजरीत केले आहे, ते असे—

> स्वरूपैकप्रतिष्ठानः परित्यक्तोऽखिलैर्गुणैः ।
> ऊर्मिषट्कातिगं रूपं तदस्याहुर्मनीषिणः
> संसारबन्धनाधीनदुःखक्लेशाद्यदूषितम् ॥

अर्थ – मुक्त दशेत आत्मा आपल्या विशुद्ध स्वरूपात प्रतिष्ठित व सर्व गुणांनी विरहित असतो. तहान-भूक, लोभ-मोह, शीत-उष्ण या सहा ऊर्मींच्या म्हणजेच क्लेशविशेषांच्या तो पलिकडे जातो व दुःख, क्लेश, इ. संसारबंधनातूनही मुक्त होतो. विद्वान लोकांनी असे सांगितले आहे.

वैशेषिक दर्शन – निष्काम कर्माच्या संपादनाने सत्त्वशुद्धी होते. तिचे फल म्हणून तत्त्वज्ञान उदय पावते. हे तत्त्वज्ञान मिथ्या ज्ञानाच्या निवृत्तीच्या मार्गे मोक्षाचे कारण होते. जोवर कर्माचा काही अंश शिल्लक राहतो, तोवर त्यांचे फल भोगण्याठी जन्म घ्यावाच लागतो. जेव्हा संचित व प्रारब्ध या कर्मांचे फल समाप्त होते आणि नव्या कर्माची उत्पत्ती थांबते, तेव्हा पुनर्जन्म संपतो. मग आत्मा दुःखातून कायमचा सुटतो. याला मोक्ष म्हणतात (वै. सू. ५१२८). मुक्तीच्या अवस्थेत दुःखाचा जसा आत्यंतिक नाश होतो, तसाच आत्मा आपल्या विशेष गुणांनीही विहीन होतो. या मोक्षप्राप्तीसाठी निष्काम कर्म आणि योगसाधन नितांत आवश्यक असते.

सांख्य दर्शन – प्रकृती व पुरुष यांचा परस्पर वियोग होणे किंवा पुरुषाने प्रकृतीपासून अलग होणे म्हणजेच कैवल्य अर्थात मोक्ष होय. बंध व मोक्ष हे वस्तुतः प्रकृतीचेच धर्म आहेत; पुरुषाचे नाहीत. पुरुष बंधाचा अनुभव घेत नाही, मुक्तीचा नाही आणि संसाराचाही नाही. हे सर्व प्रकृतीचेच धर्म आहेत. पुरुषाचा मोक्ष याचा अर्थ प्रतिबिंबरूप मिथ्या दुःखाचा केवळ वियोग एवढाच आहे. पुरुषाने मोक्ष प्राप्त करून घेणे म्हणजे स्वतः आपली स्वतंत्र, असंग व केवल दशा प्राप्त करून घेणे होय. तो प्राकृत पुरुष हा शरीर व मन यांच्या पलिकडचा आहे. तो नित्य बंधनातून मुक्त होणारा, अमरणधर्मा, अपरिवर्तनशील व नित्य सत्य पदार्थ आहे. हे स्वस्वरूप जाणणे हाच पुरुषाचा मोक्ष होय. तत्त्वज्ञानाने ही मोक्षसिद्धी होते आणि विशेष दुःखनिवृत्ती हे तिचे फल असते. या दशेत पुरुषाची कृतकृत्यता होते आणि याच दशेत प्रकृती आपल्या व्यापारातून स्वतः निवृत्त होते.

> प्रतिपुरुषविमोक्षार्थं स्वार्थं इव परार्थ आरम्भः ।
> (सां. का. ५६)

अर्थ – प्रत्येक पुरुषाच्या मोक्षसिद्धीसाठीच प्रकृतीचा समस्त व्यवहार होत असतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तत्त्वाभ्यासामुळे कैवल्य ज्ञानाचा उदय होऊन संशय व विपर्यय हे दोष नष्ट होतात. तो ज्ञानोदय अत्यंत विशुद्ध असतो. या दशेत पुरुषाला आपण निष्क्रिय, अकर्ता व असंग असल्याची प्रतीती येते. विवेकज्ञान झाल्यावर मनुष्य याच जन्मात ज्या मुक्तीचा अनुभव घेतो, तिला जीवन्मुक्ती म्हणतात. शरीरनाशानंतर पुरुषाच्या दुःखत्रयाचा नाश होणे याला विदेहमुक्ती म्हणतात.

योग दर्शन – तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान यांच्या द्वारे पाच प्रकारच्या क्लेशांचा नाश होऊन चित्तवृत्तीच्या निरोधासाठी समाधीची भावना होऊ लागते. ती होण्यासाठी अष्टांग योगाचा अभ्यास करणे आवश्यक असते. या अभ्यासाने चित्त स्थिर झाल्यावर वैराग्याचा उदय होतो आणि त्यानंतर संप्रज्ञात व पुढे असंप्रज्ञात समाधीच्या ठिकाणी चित्त दृढ होते. वैराग्य उत्पन्न झाल्यावर कोणत्याही प्रकारची तृष्णा उरत नाही व विवेकज्ञान उत्पन्न होते. पण ते सत्त्वगुणी असले, तरी जीवाला बंधकच ठरते. म्हणून या विवेकज्ञानाचाही त्याग करायला हवा. यानंतर क्लेशाची कारणे दग्ध बीजाप्रमाणे शक्तिहीन होऊन मनाबरोबरच नष्ट होतात. एवढे सगळे घडून आल्यावर पुरुष त्रिविध दुःखातून मुक्त होतो. त्यानंतर पुरुषाचा गुणांपासून आत्यंतिक वियोग होतो. या अवस्थेत पुरुष आपल्या ज्योतिर्मय स्वरूपात केवली बनून प्रतिष्ठित होतो. यालाच मोक्ष म्हणतात.

मीमांसा दर्शन – 'प्रपञ्चसम्बन्धविलयो मोक्षः' = या जगताशी असलेल्या संबंधाचा विनाश म्हणजे मोक्ष होय. भोगायतन शरीर, भोगसाधन इंद्रिये व भोगविषय पदार्थ या तीन बंधनांनी आत्म्याला जखडून ठेवले आहे. आत्मा शरीरावच्छिन्न होऊन इंद्रियांच्या मदतीने बाह्य विषयांचा अनुभव घेत असतो. या तीन्ही प्रकारच्या बंधांचा आत्यंतिक नाश झाला पाहिजे. अविद्येच्या दशेत जशी संसाराची सत्ता असते, तशीच मुक्तावस्थेही असते. फरक एवढाच, की तिच्यात बंध नसतात. निषिद्ध कर्मांपासून निवृत्त होऊन नित्य कर्मांच्या ठिकाणी प्रवृत्त राहणे, हे मोक्षाचे साधन आहे. अर्थात त्याच्या जोडीला आत्मज्ञानही हवे.

वेदान्त दर्शन – 'आत्मनः स्वरूपेणावस्थितिर्मोक्षः' = आत्म्याचे स्वरूपाने अवस्थान म्हणजे मोक्ष होय. 'अहं ब्रह्मास्मि' (मीच ब्रह्म आहे) अशा ज्ञानाने जीवाला स्वतःच्या ब्रह्मस्वरूपाचा अनुभव झाला म्हणजे त्याचे सर्व भेदभाव मिटतात, भ्रम नष्ट होतात आणि तो सर्व बंधनांतून मुक्त होतो. आत्मज्ञान हेच मोक्षाचे एकमेव साधन आहे.

मुक्त पुरुषाचे शरीर ताबडतोब गळून पडत नाही, कारण ते प्रारब्धाधीन असते. पण एकदा मुक्त झालेला जीव त्यानंतर संसारात पडत नाही, त्याला शोक-मोह बाधत नाहीत. त्याला संसारातली कोणतीही दुःखे स्पर्श करीत नाहीत. अशा पुरुषाला जीवन्मुक्त म्हणतात. तत्त्वज्ञानाच्या द्वारे संचित व क्रियमाण कर्मांचे निवारण होते; पण प्रारब्ध कर्म मात्र शिल्लक उरते. त्याचे फल भोगल्यानेच त्याचा नाश होतो. प्रारब्ध कर्म शांत झाल्यावर जीवाची स्थूल व सूक्ष्म अशी दोन्ही शरीरे नष्ट होतात. त्या वेळी तो जीव विदेहमुक्तीला प्राप्त होतो.

जीव हा स्वभावतःच मुक्त आहे. मोक्षाचे उत्पादनही होत नाही आणि त्याची प्राप्तीही होत नाही. मोक्ष ही स्वाभाविक गोष्ट आहे. पण जीव ही गोष्ट विसरून मोक्षाचा बाहेर शोध घेत फिरतो. पण सद्गुरू जेव्हा त्याचे अज्ञान व भ्रम दूर करतो, तेव्हा मुक्ती ही स्वाभाविक असल्याचा त्याला प्रत्यय येतो. मुक्त पुरुष आपण सच्चिदानंद ब्रह्माशी तद्रूप असल्याचा अनुभव घेतो आणि मुक्तदशेत शाश्वत आनंद उपभोगतो.

योगवासिष्ठमत – योगवासिष्ठातले मतही वेदान्तमताप्रमाणे 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' असेच आहे. 'वासनाप्रक्षयो मोक्षः' = वासनांचा आत्यंतिक विनाश म्हणजेच मोक्ष होय, असे शंकराचार्य म्हणतात. वसिष्ठ म्हणतो – मनाच्या ठिकाणी ज्या स्वरूपाच्या वासना असतात, त्या स्वरूपाचीच कर्मे मनुष्याच्या हातून घडतात. किंबहुना वासनाच कर्मांच्या रूपाने परिणत होतात. वासना या तत्त्वतः मनाहून भिन्न नाहीत. वासना क्षीण झाल्यावर त्याला ब्रह्मस्वरूपाशिवाय दुसरे काहीच प्रतीतीला येत नाही. ब्रह्म हे स्वभावतःच आनंदमय आहे. त्यामुळे या उन्मन अवस्थेलाही आनंदमय अवस्था असे म्हणतात. ही अवस्था प्राप्त होणे हाच मोक्ष होय. मन विषयासक्त झाले म्हणजे वासनांचाही प्रक्षोभ होतो आणि ते निर्विषय झाले म्हणजे वासनांचाही प्रक्षोभ थांबतो.

मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः।
बन्धाय विषयासक्तं मुक्त्यै निर्विषयं स्मृतम्।

अर्थ – मन हेच बंधाला व मोक्षाला कारण आहे. ते विषयासक्त झाले, की बंधाला कारणीभूत होते व निर्विषय झाले, की मोक्षाला कारणीभूत होते.

अशा या मनाला निर्वासन करण्याचा जो अभ्यास करतो त्याला मुमुक्षू म्हणतात. मुमुक्षूला मोक्षलाभासाठी आत्मज्ञानाचाच मार्ग चोखाळावा लागतो.

संसारोत्तरणे जन्तोरुपायो ज्ञानमेव हि।
तपो दानं तथा तीर्थमनुपायाः प्रकीर्तिताः॥

अर्थ – संसारसागरातून तरून जाण्याला अर्थात मुक्त होण्याला आत्मस्वरूपाचे यथार्थ ज्ञान हाच उपाय आहे. त्याव्यतिरिक्त तप, दान, तीर्थाटन, इ. साधने ही अनुपाय आहेत.

निर्वाण या शब्दाने मोक्षाचा उल्लेख करून योगवासिष्ठात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्या शब्दाचा अर्थ नित्य व निरतिशय सुख असा केला आहे —

निर्वाणं नाम परमं सुखं येन पुनर्जनः ।
न जायते न म्रियते तज्ज्ञानादेव लभ्यते ।।

अर्थ — निर्वाण म्हणजे परमसुख होय. ते मिळाल्याने मनुष्य जन्म-मरणांच्या फेऱ्यातून सुटतो आणि ते निर्वाण आत्मज्ञानानेच लाभते.

आत्मस्वरूपाच्या यथार्थ ज्ञानात ज्ञानाची परिपूर्णता असल्यामुळे तिथे शाश्वत व निरतिशय सुखाचीही परिपूर्णता असते. मुक्त मनुष्य दिसायला सामान्य लोकांसारखाच दिसला, तरी तो हृदयाने अपराजित असतो. संसारसागरात राहूनही संसारातल्या दुःख, शोक आणि दैन्य यांचा त्याला कधी स्पर्श होत नाही.

विशिष्टाद्वैत दर्शन — मोक्षाचा उदय होण्यास भक्ती ही प्रधान कारण आहे. भक्ती म्हणजे संपूर्ण शरणागती होय. या भक्तीने भगवान नारायणाचा भक्तावर अनुग्रह होऊन तो त्याला या विषम संसारातून मुक्त करतो. मुक्तीसाठी वर्णाश्रमविहित कर्मे करणे आवश्यक असते. मुक्त दशेत भगवंताच्या संकल्पाने मुक्त पुरुषाचे नवे शरीर निर्माण होते. ते शुद्ध सत्त्वगुणापासून निर्मित असल्यामुळे अप्राकृत असते. मुक्त जीव भगवंताची सेवा करण्यासाठीच ते धारण करतो. भगवंताचे एक सर्वकर्तृत्व तेवढे वगळून बाकीचे त्याचे सर्वज्ञत्वादी कल्याणगुण त्याला प्राप्त होतात. सर्वदर्शनसंग्रहात मुक्त जीव कोणते गुण धारण करतो, त्याविषयी एक श्लोक आहे, तो असा —

एवं गुणाः समानाः स्युर्मुक्तानामीश्वरस्य च ।
सर्वकर्तृत्वमेवैकं तेभ्यो देवे विशिष्यते ।।

अर्थ — अशा प्रकारे सर्वज्ञत्वादी गुण मुक्त व ईश्वर यांचे सारखेच असतात. सर्वकर्तृत्व तेवढे एकच भगवंताच्या ठिकाणी विशिष्ट असते.

पुष्टिमार्ग — आनंदस्वरूप भगवान प्रकट होऊन जीवाला स्वरूप दान करतो. म्हणजेच जीवाचा देह, इंद्रिये व अंतःकरण यांमध्ये आपल्या आनंदाचे स्थापन करून त्याला आपल्या स्वरूपात स्थित करतो. हाच जीवाचा मोक्ष होय. भगवंताचा हा स्वभाव आहे, की तो भक्तजीवाला आपल्याप्रमाणेच आनंदमय बनवून सोडतो.

पांचरात्र दर्शन — या दर्शनात मुक्तीला ब्रह्मभावापत्ती म्हटले आहे. ही मुक्ती साधकाला उपासनेच्या बळावर प्राप्त करता येते. मोक्षदशेत जीव ब्रह्माशी एकाकार होऊन जातो. त्या दशेत तो निरतिशय आनंदाचा उपभोग घेतो. मुक्त दशेत तो त्रसरेणूच्या परिमाणाचा असतो. तो कोटी कोटी किरणांनी विभूषित होऊन परम व्योमाच्या ठिकाणी आपल्या इष्ट देवतेचे दर्शन करतो आणि कालचक्रातून मुक्त होऊन भगवंताच्या निरंतर भजन-पूजनात मग्न राहतो. तो फिरून या संकुल जगात येत नाही.

इस्लाम दर्शन — मनुष्य मेल्यावर त्याच्या बऱ्यावाईट कृत्यांचा निवाडा होऊन तदनुसार त्याला स्वर्ग किंवा नरक मिळतो. नरकाची शिक्षा न मिळणे म्हणजेच मुक्ती मिळणे होय. प्रत्येक मुसलमानाने कुराणपठण, पाच वेळा नमाज, ठराविक उपवास, भिक्षादान व मक्केची यात्रा, ही कृत्ये अवश्य केली पाहिजेत. त्यांच्या योगाने मुसलमान मनुष्य मोक्षाचा अधिकारी होतो.

झरथुष्ट्री दर्शन — अहुरमज्दाने सांगितलेल्या नियमांप्रमाणे वागणारा मनुष्य मेल्यानंतर त्याच्या सत्कृत्यांची संख्या अधिक भरल्यास तो अहुरमज्दस्वरूपी होतो. हाच त्याचा मोक्ष होय.

ख्रिस्ती मत — येशू ख्रिस्तावर श्रद्धा ठेवल्याने मनुष्याच्या पापांचा क्षय होतो व त्याला मोक्ष मिळतो.

मोक्षरहस्य — मोक्ष हे अनुभवाला येणारे एक त्रिकालाबाधित सत्य आहे. त्यासाठी साधनचतुष्ट सांगितले आहे. अध्यात्ममार्गावर पाऊल ठेवण्याचा तो प्रारंभिक मार्ग आहे. साधनचतुष्टयाने व्यक्ती ही आध्यात्मिक मूल्यांना अभिमुख होते. नंतर ब्रह्मनिष्ठ गुरूच्या मुखातून महावाक्यांचा उपदेश झाल्यानंतर मुमुक्षूच्या अंतरात आपल्या सत्तेच्या वास्तविक स्वरूपाची काही प्रारंभिक चेतना जागृत होते. निष्काम कर्म आणि सत्याचे चिंतन-निदिध्यासन यांच्या द्वारे ही प्रारंभिक चेतना पूर्ण चेतनेच्या रूपात परिणत होऊ शकते. नैतिक संस्कारांच्या द्वारे मुमुक्षूचे चित्त शुद्ध झाल्यावर त्या ठिकाणी सत्याचा निर्मल प्रकाश पडतो. त्या प्रकाशात साधकाला निरामय शांती व दिव्य आनंद यांचा अनुभव घडतो.

हा आनंद किंवा ही शांती मृत्यूची शांती नसते. हा आनंद प्रतीतीचा आणि ही शांती उच्चतम जीवनाने अनुप्राणित असते. तिच्यात आध्यात्मिक साधना व नैतिक नियम यांचा संघर्ष न राहता ते दोन्ही शाश्वत आनंदात पर्यवसित होतात.

नैतिक विकास किंवा नैतिक कर्म यांचे मोक्षकल्पनेशी वाकडे नाही आणि आत्मानुभवाशीही शत्रुत्व नाही. श्रेष्ठ नैतिक कर्म म्हणजे सत्य व मोक्ष या भूमिकेवरून खाली येणे नसून, जीवाच्या मोक्षसिद्धीची ती एक स्वाभाविक अवस्था असते.

मोक्ष हे प्रत्येक व्यक्तीचे आध्यात्मिक लक्ष्य असते. मनुष्य हा अनंत उपाधींनी आणि मर्यादांनी परिच्छिन्न असतो. पण त्याच्या अंतरात एक अपरिच्छिन्न आणि अनंत आत्मा विद्यमान असतो. समस्त परिच्छिन्न पदार्थांपासून स्वतःला वेगळे करणाऱ्या आत्मतत्त्वाची प्रत्येक चेतना ही त्याच्या अनंततेचे आणि अपरिच्छिन्नतेचे प्रमाण आहे. व्यक्तीच्या अंतरातली ही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रत्यक् चेतना स्वतःच्या स्वरूपलाभासाठी येन केन प्रकारेण सदैव प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. भौतिक जीवनाच्या कोलाहलातही अंतरात्म्याची अनंत आणि अमर्याद होण्याची ही गूढ हाक एकता येते. जर आत्म्याच्या ठिकाणी स्वतःच्या अनंत स्वरूपाच्या प्राप्तीची अंतःप्रेरणा नसती, तर प्रत्येक जीव 'ठेविले अनंते तैसेची रहावे' या अवस्थेत समाधान मानून राहिला असता आणि त्याने आत्मविकासाची कोणतीही धडपड केली नसती. पण तसे होत नाही. प्रत्येक मनुष्याला आपला विकास व्हावा, आपण मोठे व्हावे, सत्तासंपन्न व्हावे, चिरंतन सुखाचा वाटेकरी व्हावे, असेच वाटत असते. त्याची प्रवृत्ती उत्तरोत्तर विकासोन्मुख असते. 'सर्वो हि उपर्युपरि बुभूषति लोकः' = प्रत्येक व्यक्तीला आपण वर वर जावे असे वाटत असते, असे शंकराचार्य म्हणतात, (कठ. भा. १.१.२८) ते याच अर्थाने.

मनुष्याला स्वतःवर सीमांचे बंधन पडलेले आवडत नाही. बंधहीन मुक्तीसाठी आतुर असतो. प्रत्येक मनुष्याला देहाची बंदो मोडून आपण कुटुंब व्हावे, जात व्हावे, समूह व्हावे आणि शेवटी 'विश्वी विश्वंभर' व्हावे असे वाटत असते. आत्मविकासाच्या या आकांक्षेचे पर्यवसान योग्य साधनेच्या योगाने अनंत सार्वभौम अशा सर्वात्मभावात होत असते. महात्मे आणि महापुरुष यांच्या जीवनात हे पाहाता येते. 'उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्' असे जे म्हटले आहे, ते अशा मुक्त महात्म्यांना उद्देशूनच होय.

मुक्त दशेत व्यक्तीला पूर्ण ब्रह्माचा अनुभव घडल्यानंतर तो ब्रह्मनिष्ठ होतो, असे उपनिषदे सांगतात. याचे तात्पर्य हे, की तो या समस्त विश्वप्रपंचाशी अपृथक भावाचा अनुभव करतो. विरोध आणि परत्व या दोन्ही गोष्टींचा त्याच्या ठिकाणी अंत होतो आणि त्याच्या आत्म्यातून अनंत प्रेम आणि असीम करुणा वाहू लागते. वेदान्तमताप्रमाणे हेच निःश्रेयस होय.

मुक्त पुरुष कर्म करीत नाही किंवा त्याने कर्म करू नये असेही नाही. लोककल्याणासाठी केले जाणारे कर्म आणि मुक्तावस्था यांच्यामध्ये विरोध नाही. मोक्षाचा मनुष्याच्या व्यक्तिगत आणि भौतिक अस्तित्वाशीही विरोध नाही. ब्रह्माशी तादात्म्य झाल्यानंतर स्वतःचे जीवन आत्मतंत्र आहे, तसेच ते परार्थही आहे, असे त्याला वाटू लागते. मुक्त पुरुषाने आपले जीवन परार्थ आहे, असे मानून लोकसंग्रहासाठी कर्म करीत राहणे या गोष्टीला संन्यासवादी शंकराचार्यांचाही विरोध नाही (गी. भा. ३.२६).

मी कर्ता हा अहंकार सर्व कर्मांच्या ठिकाणी सामान्य असतो. कर्तृत्वभावनेच्या रूपाने तो स्वतःला व्यक्त करीत असतो. पण ही कर्तृत्वभावना हेच आपले अज्ञान आहे आणि अज्ञान हे सगळ्या अनर्थांचे मूळ आहे. आत्मा हा अकर्ता आहे, हे ठसवून घेणे आणि कर्तव्यभावनेतून येणाऱ्या अहंकाराचे निवारण करणे, हेच ज्ञान आणि हाच मोक्ष होय. प्रो. हिरियण्णा म्हणतात, की आत्मज्ञान जगताचा नाश करीत नाही आणि कर्माचा अंतही करीत नाही. ते केवळ साधारण कर्माला आधारभूत असलेले अज्ञान व अहंकार यांचा तेवढा नाश करते.

'निस्त्रैगुण्ये पथि विचरतां को विधिः को निषेधः' = त्रिगुणातीत अर्थात मुक्त पुरुषाला विधी तरी कसला आणि निषेध तरी कसला ! असे एक वचन आहे. आत्मज्ञानी पुरुष मुक्त होऊन नैतिक नियमांच्या पलिकडे जातो, असे त्या वचनाचे तात्पर्य आहे. मुक्त पुरुषाला स्वच्छंदता आणि स्वैराचार यांचा अधिकारच मिळाला आहे, असा त्याचा अर्थ नव्हे. डॉ. राधाकृष्णन म्हणतात – मुक्त पुरुष स्वतःसाठी स्वतःच नियम बनतो, तो स्वराट् होतो, तसेच विश्वराट् होतो. जे आत्मप्रेरणेला अनुसरत नाहीत, अशा अज्ञ जीवांसाठीच नियम आणि विधान यांची आवश्यकता असते. पण जे आपल्या अहंकारातून वर उठले आहेत, त्यांच्या ठिकाणी नैतिकता ही त्यांच्या जीवनाचा स्वभावधर्मच बनून जाते. मुक्त पुरुषाच्या ठिकाणी दुश्चरिताची लेशमात्रही संभावना राहत नाही. (इंडि. फि. खं. १. पृ. २२४). ज्ञानेश्वरांनीही 'जयांचिया लीळेमाजी नीती । जियाली दिसे' असेच म्हटले आहे. यावरून मुक्त पुरुषाची स्वतंत्रता ही आध्यात्मिक असते आणि स्वैराचारी नसते हे कळून येईल. ज्यांना नैतिकतेचे यत्किंचितही ज्ञान नसते, अशा मूढांच्या बाबतीतच स्वैराचार संभवतो. तसे नसल्यास मूढ व ज्ञानी यांच्यामध्ये काही भेदच राहणार नाही, असे शंकराचार्यही म्हणतात (ऐत. भा. १.१.१). त्यांनी यापुढेही जाऊन म्हटले आहे, (ब्र. सू. भा. २.३.४८) ते असे–

न च । नियोगाभावे यथेष्टचेष्टाप्रसङ्गः सर्वत्राभिमानस्यैव प्रवर्तकत्वात् अभिमानाभावाच्च सम्यग्दर्शनः ।

भावार्थ – ज्ञानी किंवा मुक्त पुरुष स्वतंत्र आहे. त्याच्या बाबतीत स्वैराचाराचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्याच्या ठिकाणी पापाचा संभवच उरत नाही. कारण पूर्ण आत्मज्ञानात तो स्वैराचार आणि पापाचार यांना पार करून गेलेला असतो. अहंकार हेच समस्त अनर्थांचे मूळ असते आणि ज्ञानी पुरुष अहंकारातून मुक्त झालेला असतो.

गीतेतले स्थितप्रज्ञाचे वर्णनही अशाच प्रकारचे आहे. पाहा– स्थितप्रज्ञ. [शां. आ. द.; यो. हृ.; एन्सा. रि. ए.; हि. इं. फि.; हि. ध.; स. द. सं.; भा. द. रू.]

मोक्षदा एकादशी

मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला हे नाव आहे. या दिवशी भगवंताने कुरुक्षेत्रावर अर्जु-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाला गीता सांगितली. पद्म पुराणात (उ. खं. अ. ४०) हिची कथा दिली आहे ती अशी–

चंपक नगरात वैखानस नावाचा एक राजा होता. एका रात्री त्याचे पितर त्याच्या स्वप्नात आले आणि त्याला म्हणाले, की 'आम्ही नरकयातना भोगीत आहो.' राजाला त्यामुळे दुःख झाले. त्याने पर्वत ऋषीकडे जाऊन त्यांच्या उद्धाराचा मार्ग विचारला. ऋषीने त्याला मोक्षदा एकादशीचे व्रत करायला सांगितले. राजाने ते करताच त्याच्या सर्व पितरांना मोक्ष मिळाला.

हे व्रत पितरांच्या उद्धारासाठी करायचे असते.

मोक्षसप्तमी एक जैन व्रत. प्रतिवर्षी श्रावण शुद्ध सप्तमीला उपवास करून 'ओं ऱ्हीं पार्श्वनाथाय नमः' या मंत्राचा त्रिकाल जप करणे, हा या व्रताचा विधी आहे. व्रतावधी सात वर्षे. नंतर उद्यापन करतात. [जै. व्र. वि. सं.]

मोक्षोत्सव तमिळनाडू प्रदेशातील एक वार्षिक उत्सव. त्या प्रदेशात विविध मंदिरांतून मार्गशीर्ष शुद्ध एकादशीपासून दहा दिवस वेदपठण होते. यालाच मोक्षोत्सव असे म्हणतात. या वेदपठणात दररोज यजुर्वेदाच्या आठ प्रश्नांचा पाठ होतो. श्रीरंगम येथे होणाऱ्या या उत्सवात तिरुमंगै आळवारने प्रथमच वेदमंत्रानंतर तिरुवायमोळीतील काही भागाच्या पाठाला प्रारंभ केला. पुढे त्याचाच प्रभाव वाढून वेदमंत्राऐवजी तिरुवायमोळीचेच पाठ होऊ लागले. त्यामुळे त्या उत्सवाला तिरुवायमोळी उत्सव असेही म्हणतात. [त. प्र. हिं. क्र.]

मौखरी राजवंश एक प्राचीन राजवंश. पाणिनीला या वंशाचे नाव माहीत होते. मौर्यकालीन मौखरी राजांच्या काही मुद्रा गया येथे सापडल्या आहेत. इ. स. च्या तिसऱ्या शतकात राजस्थानात मौखरी वंशाच्या अनेक शाखा नांदत होत्या. इ. स. च्या. ६ व्या शतकाच्या पूर्वार्धात गयेच्या आसमंतात एका मौखरी घराण्याचे राज्य होते. मात्र ते गुप्तांचे सामंत होते. उत्तर प्रदेशातील मौखरी वंश सर्वांत अधिक प्रसिद्ध होता. या वंशातील लोक आपल्याला पंजाबातील केकयराज अश्वपतीचे वंशज मानीत असत. सुरुवातीला हे लोक गुप्त साम्राज्यातील मांडलिक असावे. इ. स. ५५० च्या सुमारास जेव्हा गुप्त साम्राज्याचा अस्त झाला, तेव्हा या वंशातील पुरुषांनी उत्तर भारतावर आपले आधिपत्य स्थापण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गुप्तवंशातील उत्तरकालीन राजांशी यांचा सुमारे पन्नास वर्षेपर्यंत संघर्ष चालू होता.

मौखरीवंशाच्या राज्याच्या चतुःसीमा पूर्वेला मगध, दक्षिणेला मध्य प्रदेश व आंध्र, उत्तरेला नेपाळ आणि पश्चिमेला माळवा अशा होत्या. कनोज ही त्याची राजधानी होती.

हरिवर्मा हा मौखरीवंशातील पहिला राजा होय. त्याला महाराज ही पदवी होती. हरिवर्म्यानंतर त्याचा पुत्र आदित्यवर्मा हा गादीवर आला. यालाही महाराज ही उपाधी होती. त्याचा पुत्र ईश्वरवर्मा हाही तीच उपाधी लावीत होता. हे तिघेही गुप्त सम्राटांचे सामंत होते.

ईश्वरवर्म्यानंतर त्याचा पुत्र ईशानवर्मा (इ. स. ५५०–५७६) हा गादीवर आला. हरहा येथे त्याचा एक शिलालेख मिळाला आहे. त्यावरून त्याने आंध्र, शूलिक व गौड यांचा पराजय केला होता, असे समजते. याला महाराजाधिराज अशी पदवी होती. यावरून त्याने मौखरींचे स्वतंत्र सार्वभौम राज्य स्थापले, असे दिसते. उत्तरकालीन गुप्त राजा कुमारगुप्त याने मात्र त्याचा पराभव केला होता. ईशानवर्म्याने अकरा अश्वमेध व एक हजार अग्निष्टोम केले होते, अशी प्रसिद्धी आहे.

त्याचा पुत्र शर्ववर्मा हा त्याच्या नंतर गादीवर आला. त्याचा एक ताम्रलेख असीरगढ येथे मिळाला आहे. त्याच्यावर परममाहेश्वर महाराजाधिराज अशी त्याची उपाधी लिहिली आहे. त्याने महासेनगुप्ताचा पराजय केला. त्याच्या राज्यात सांप्रतचा सर्व उत्तर प्रदेश, मगधाचा बराचसा भाग, मध्य प्रदेशाचा काही भाग व इतरही काही प्रदेश असावा, असे अनुमान आहे. त्याने आपली नाणी पाडली होती.

शर्ववर्म्याचा पुत्र अवंतिवर्मा होय. त्याच्या चांदीच्या नाण्यांवर 'विजितावनिरवनिपति श्रीअवन्तिवर्मा दिवं जयति' असे लिहिलेले आढळते. हा कनोजवर राज्य करीत होता. सांप्रतचा उत्तर प्रदेश व मगधाचा काही भाग एवढ्या प्रदेशावर त्याचे राज्य होते. शर्ववर्मा व अवंतिवर्मा हे दोघेही बलाढ्य राजे होते, असे बाणाच्या हर्षचरितावरून समजते.

मौखरी वंशाच्या राजवटीतली अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे हूणांची स्वारी होय. त्यांनी पुन्हा उत्तर भारतावर आक्रमण व अत्याचार सुरू केले होते. पण ईशानवर्मा व शर्ववर्मा यांनी त्यांच्याशी दीर्घ काल युद्ध करून शेवटी त्यांचा पराभव केला आणि पूर्व भारताला त्यांच्या आक्रमणापासून वाचवले.

अवंतिवर्म्याचा पुत्र ग्रहवर्मा होय. त्याचा विवाह स्थानेश्वरचा वैसवंशी राजा प्रभाकरवर्धन याची कन्या राज्यश्री हिच्याशी झाला होता. प्रभाकरवर्धनाच्या मृत्यूनंतर माळव्याचा राजा देवगुप्त याने कनोजवर आक्रमण केले व ग्रहवर्म्याला ठार मारले. राज्यश्रीलाही त्याने कैद केले. याचा बदला म्हणून हर्षवर्धनाचा मोठा भाऊ राज्यवर्धन याने माळव्याच्या देवगुप्ता-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर स्वारी केली व त्याचा पराभव केला. परंतु गौड-राज शशांक याने विश्वासघात करून राज्यवर्धनाला ठार मारले.

ग्रहवर्म्याच्या बरोबरच मौखरींच्या राज्याची समाप्ती झाली. त्या राज्याच्या मंत्र्यांनी हर्षाला कनोजचे सिंहासन बहाल केले. त्याने राज्यश्रीच्या सल्लामसलतीने राज्यकारभार केला. त्यानंतरच्या काळात मौखरींच्या वंशातील काही पुरुषांनी कुठे कुठे आपला अधिकार स्थापन केला होता; पण त्यांची स्वतंत्र सत्ता इ. स. ६०६ नंतर राहिली नाही.

हर्षवर्धनाच्या मृत्यूनंतर सुमारे पाऊणशे वर्षांचा कनोजचा इतिहास अज्ञात आहे. इ. स. च्या आठव्या शतकात मात्र कनोज येथे यशोवर्मा नामक एक पराक्रमी राजा होऊन गेला. तो मौखरींच्या वंशातीलच होता, असे काही इतिहासकार म्हणतात. त्याने मगध, वंग, मलय, महाराष्ट्र, सुराष्ट्र, मरू, पंजाब व हिमालयप्रदेश हे भाग जिंकले होते, असे गौडवहो या प्राकृत काव्यावरून समजते. तो साहित्य व कला यांचा प्रेमी व पुरस्कर्ता होता प्रसिद्ध संस्कृत कवी भवभूती व गौडवहोचा कर्ता वाक्पती हे त्याच्या पदरी होते. काश्मीरचा राजा ललितादित्य मुक्तापीड याने त्याचा युद्धात पराभव केला. मौखरींच्या वंशात यानंतर नाव घेण्यासारखे कोणी राजे झाले नाहीत. [प्रा. भा. हिं. का.; ए. इं-मजु.; ब्र. सां. इ.; भा. प्रा. रा.]

मौन वाणीच्या संयमाला मौन म्हणतात. मुनीचे व्रत असाही त्याचा अर्थ आहे. एका काळी या देशात वाणीचा संयम करून राहणारे जे साधक व सिद्ध होते, त्यांना मुनी असे म्हणत. मौन हेच त्यांचे मुख्य तप असे. मौनाने त्यांना वाक्सिद्धी मिळत असे. कुठल्याही गोष्टीच्या संयमाने तिच्यात शक्तिसंचय होत असतो. वाणीच्या संयमानेही तिच्यात शक्तीचा संचय होतो आणि ती वाणी वर किंवा शाप देण्यास समर्थ होते, असे मौनाच्या मागचे तत्त्व आहे.

कित्येक धार्मिक आणि तांत्रिक विधींत मौन पाळण्यास सांगितले आहे. मंत्रविद्या मौन धरून अभ्यासतात. मंत्राचे पुरश्चरण करताना मौन पाळतात. पिशाचविधान मौनानेच करतात. काही लोक चातुर्मासात अथवा जन्मभर जेवताना मौन पाळतात. भाद्रपद शुद्ध प्रतिपदेस पुरुषांनी मौनव्रत करावे, असे सांगितले आहे. त्या दिवशी जेवताना आणि स्वयंपाक करतानाही मौन पाळायचे असते. सूर्यपूजा, देवपूजा गायत्रीजप आणि मंत्रोपदेश हे विधी मौनपूर्वकच करायचे असतात. मंगळागौरीची कहाणी ऐकताना व जेवताना वशेळ्या मुलींनी मौन धरायचे असते. ब्राह्मणांनी मलमूत्रविसर्जन करताना मौन धरावे, असे सांगितले आहे. सीमंतोन्नयन संस्काराच्या दिवशी गर्भवतीच्या पतीने दिवसभर मौन पाळायचे असते. म. गांधी दर सोमवारी मौन पाळीत असत.

मौनाची व्याख्या अशी आहे – 'वाक्संयमहेतुर्मनःसंयमः' = वाणीच्या संयमाला कारणीभूत असणारा मनाचा संयम म्हणजे मौन होय. म्हणजे वाणीच्या संयमात मनाचा संयमही अभिप्रेत आहे. जेव्हा आपल्या मनाकडून एखादे महत्त्वाचे काम करून घ्यायचे असेल, तेव्हा त्याची शक्ती वाढवावी लागते आणि ती वाढ होण्यास वाणीचा संयम उपयोगी पडतो. पंचज्ञानेंद्रियांच्या पंचविध विषयांतच आपले चित्त नेहमी फिरत असते. त्या चित्ताला विषयांच्या समुदायातून बाजूला काढायचे असेल, तर त्यासाठी जाणीवपूर्वक योग्य दिशेने प्रयत्न व्हायला पाहिजेत. त्या प्रयत्नांपैकी मौन हा एक प्रयत्न आहे. या विषयाचे विवेचन श्री. केदारनाथ यांनी केली आहे, ते थोडक्यात असे–

एखाद्या गूढ व पवित्र विषयांत ज्याला खोलपणे विचार करायचा असेल, त्याने आपल्या कर्मेंद्रियांच्या व ज्ञानेंद्रियांच्या व्यापारांना शक्य तितके आवरले पाहिजे, म्हणजे त्यांचा संयम केला पाहिजे. केवळ शब्दोच्चाराचा व्यापार बंद केल्याने ते कार्य पूर्णपणे सिद्ध होत नाही. तरी केवळ वाचेच्या एका कर्मेंद्रियाच्या व्यापाराचा संयम केल्यानेही काही शक्ती वाचते व अशा रीतीने शब्दसंयमाचा परिणाम चित्तात उठणाऱ्या वृत्तींवर होऊन त्यांची काही चंचलता कमी होते. त्यायोगे चित्तशक्तीचा व्यय कमी होऊन तिचा संग्रह होऊ लागतो व त्या शक्तीचा आपल्या इच्छित कार्याकडे आपण उपयोग करू शकतो.

सूक्ष्म विचारांचे चिंतनमनन अंतर्मुखतेशिवाय होऊच शकत नाही. मौनाने या गोष्टी साधू शकतात. पण ते मौन वर लिहिलेल्या उद्देशाने धारण केलेले असले पाहिजे. चित्ताला आध्यात्मिक सूक्ष्म विषयात खोलपणे नेण्यास उपयोगी होऊ शकेल अशी अंतर्मुखता ज्या मौनात साध्य होऊ शकेल, तेच खरे मौन. त्याशिवाय बाकीच्या मौनाला जीवनविकासाच्या दृष्टीने महत्त्व नाही. मौनाचा खरा उपयोग या मार्गात व्हावा, अशी ज्याची इच्छा असेल त्याने आपले साध्य पवित्र ठेवले पाहिजे. मौनाने अंतर्मुखता साधते किंवा नाही याकडे लक्ष ठेवले पाहिजे. आपण आचरीत असलेल्या साधनाने आपण साध्याकडे जात आहो किंवा नाही ते ओळखण्याइतका विवेक, सावधपणा व पारख आदी गुण आपल्यात असले पाहिजेत. [विचारदर्शन २]

मौन एकादशी एक जैन व्रत. मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला हे व्रत करतात. या तिथीला जर हे व्रत करणे शक्य झाले नाही, तर कोणत्याही एकादशीस ते करतात. एकादशीला संपूर्ण दिवस मौन पाळणे व कडक उपवास करणे हा या व्रताचा प्रमुख विधी आहे. द्वादशीला व्रताचे उद्यापन करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्या वेळी पुस्तक, दौत, लेखणी, कागद, इ. ज्ञानप्राप्तीसंबंधीच्या अकरा वस्तू निवडून, त्या प्रत्येकी अकरा या संख्येत समोर ठेवून त्यांची पूजा करतात. [एन्सा. रि. ए.]

मौनव्रत (१) एक काम्य व्रत. हे व्रत विविध प्रकारांनी केले जाते. त्यांतील एक प्रकार असा– आठ, सहा, तीन किंवा एक महिना, किंवा पंधरा, बारा, सहा, तीन किंवा एक दिवस हे व्रत करतात. व्रतकालात विचार, उच्चार व आचार यांच्या योगाने होणाऱ्या सर्व प्रकारच्या हिंसेचा त्याग करायचा असतो. उद्यापनाच्या वेळी चंदनकाष्ठाचे एक शिवलिंग करून त्याची गंधादी उपचारांनी पूजा करतात. नंतर एक सोन्याची घंटा आणि काही पितळेच्या घंटा देवालयात सर्व दिशांना टांगतात. शिवभक्तांना व ब्राह्मणांना भोजन घालतात. मग ते शिवलिंग एका तांब्याच्या संपुटात घालून तो संपुट डोक्यावर ठेवून शिवालयात जातात. तिथे ते लिंग देवालयातील लिंगाच्या उजव्या बाजूला ठेवून त्याची पूजा करतात. फल– शिवलोकप्राप्ती.

कार्तिकस्वामीने नंदिकेश्वराला या व्रताची कथा सांगितली, ती अशी– शाकल्य नगरात सोमशर्मा नावाचा एक गरीब ब्राह्मण राहात होता. त्याला रूपवती व सुपर्णिका नावाच्या दोन मुली होत्या. त्या दररोज गायींना रानात चरायला नेत. एकदा त्या एका तळ्याजवळ आल्या असता तिथे काही देवांगना एकत्र जमून तिथल्या शिवलिंगाची पूजा करीत असलेल्या त्यांनी पाहिल्या. मुलींनी त्यांना विचारले. 'तुम्ही हे काय करीत आहात ?' 'आम्ही मौनव्रत करीत आहो' असे त्यांनी उत्तर दिले. मुलींनीही मग त्या व्रतात भाग घेतला. दहीभात तळ्यात टाकून व फळे, लाडू घेऊन त्या घरी आल्या, जेवल्या आणि झोपी गेल्या. सकाळी सोमशर्म्याला ते लाडू सुवर्णाचे झालेले दिसले. त्याने मुलींना सर्व हकीकत विचारली. मुलींनी पूजेची माहिती सांगून हा शिवकृपेचा प्रभाव आहे, असे सांगितले. दुसऱ्या दिवशी त्या मुली पुन्हा रानात गेल्या असताना त्यांना एक राजा भेटला. राजाला तहान लागली म्हणून त्यांनी त्याला थंड पाणी प्यायला दिले. राजाने त्यांची सर्व विचारपूस केली आणि तो परत फिरला. नगरात आल्यावर राजाने सोमशर्म्याकडे रूपवतीला मागणी घातली. मग राजाचे व तिचे लग्न झाले. नंतर सोमशर्म्याने एका श्रोत्रिय ब्राह्मणाला सुपर्णिकेचे कन्यादान केले.

ऐश्वर्यप्राप्ती झाल्यामुळे रूपवतीला गर्व झाला व तिने हे व्रत करणे पुढे बंद केले. त्यामुळे तिला फार विपन्नावस्था आली. सुपर्णिकेने मात्र व्रत चालू ठेवले होते. पुढे सुपर्णिकेच्या उपदेशामुळे रूपवतीला आपली चूक कळून आल्यावर तिनेही पुन्हा ते व्रत आचरले. तिला शिव प्रसन्न झाला आणि ती पूर्वीप्रमाणे सुखाने राहू लागली. [व्रतराज; हि. ध.; व्र. प.]

(२) एक जैन व्रत. हे व्रत नित्य मौन व नैमित्तिक मौन अशा दोन प्रकारांनी करतात. व्रतावधी एक वर्ष. पौष शुद्ध एकादशीला या व्रताला प्रारंभ करतात. या दिवशी पहिले सोळा प्रहर उपवास करतात. वर्षअखेरीस उद्यापन करतात. [जै. व्र. वि. सं.]

मौनी अमावास्या माघ महिन्याच्या अमावास्येला हे नाव आहे. या दिवशी मौन धरून प्रयागच्या त्रिवेणीसंगमात स्नान करणे हे विशेष पुण्यदायक मानतात. माघस्नानाची ही सर्वांत मोठी पर्वणी होय. त्यातून जर या तिथीला सोमवार आला, तर त्या स्नानाचे पुण्य विशेषच मानतात.

या अमावास्येची बंगालमधील कथा अशी–

एक विधवा ब्राह्मण स्त्री आणि एक गवळण होती. त्या दोघी मैत्रिणी होत्या. ब्राह्मण स्त्रीला एक लहान मुलगी होती. एकदा एक भिकारीण तिच्या दारी भिक्षा मागत असताना त्या लहान मुलीला पाहून म्हणाली. 'या मुलीच्या नशिबी वैधव्य आहे.' मुलीची आई ते ऐकून घाबरली. तिने त्यावर उपाय विचारताच ती म्हणाली, 'सात मौनी अमावास्यांना उपास करून ते पुण्य जर कोणी हिला देईल, तर हिचे वैधव्य टळेल. मात्र पुण्य देणाऱ्या स्त्रीच्या सगळ्या कुटुंबाचा नाश होईल.' गवळणीने हा उपाय केला होता. म्हणून तिने ते पुण्य त्या मुलीला दिले. पुढे त्या मुलीच्या लग्नाच्या दिवशीच मृत झालेला तिचा पती जिवंत झाला. गवळणीच्या घरची सर्व माणसे मात्र मरून पडली. मग गवळणीने एका वाडग्यात दही घेतले आणि रानात जाऊन ते एका महारोगी मुनीच्या अंगावर ओतले. तेव्हा त्यातून नारायण प्रकट झाला आणि त्याने गवळणीची मेलेली माणसे जिवंत केली. [हिं. हॉ. से.; हिं. व्र. प. त्यौ.]

मौनीस्वामी (इ. स. १७८२–१८७४) एक साक्षात्कारी मराठी संतकवी. नारो भिकाजी पारखी हे यांचे पूर्ण नाव होय. नासिक जिल्ह्यातील सिन्नर गावी यांचा जन्म झाला. हे शुक्ल यजुर्वेदी, भारद्वाजगोत्री देशस्थ ब्राह्मण होते. यांनी प्रथम पेशवाईच्या अखेरच्या काळात पेशव्यांकडे व नंतर इंग्रजांकडे नोकरी केली आणि पुढे संन्यास घेतला.

उतार वयात ते मुंबईत राहून भक्तिमार्गाचा प्रसार करू लागले. त्या वेळी डॉ. कुंटे, नाना शंकरशेट, डॉ. भाऊ दाजी, महादेव चिमणाजी आपटे, इ. मोठी मंडळी त्यांच्या शिष्यपरिवारात दाखल झाली.

मौनीस्वामी विद्वान आणि अभ्यासू होते. त्यांच्या नावावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लघुबोध, स्वात्मबोध, पंचीकरण व समाधीकरण असे लहान-मोठे चार ग्रंथ आहेत. या सर्व ग्रंथांत वेदान्ताचे विवेचन आहे. याव्यतिरिक्त त्यांनी अनेक स्फुट पदेही रचली आहेत. त्यांतील एक पद असे—

तो नर सुस्ती । श्रीहरिशी करितो मस्ती ।।
हृदयींस विरुनी आत्माराम । करितो बाह्य प्रपंची काम ।
केवळ विषयसुखी विश्राम । तो मदहस्ती ।।
अंगी तारुण्याचा ताठा । बोलण्याचा ठसका मोठा ।
बहुत सोंगटीचा चडका । सापडे गस्ती ।।
आईबापासी घेतो लबका । साधुनिंदा करितो धडका ।
परद्वारे जो झाला सडका । राहिल्या अस्थी ।।
ख्याल तमाशा जातो थडका । हरिहरभजनाविषयी रडका ।
कामक्रोध आदळती थडका । केवळ हुस्ती ।।

मौनीस्वामींची भाषा कानामनाला गोड लागते आणि अमृतरायाची आठवण करून देते. यांची समाधी मुंबईला ठाकुरद्वारात कोळधाच्या वाडीत आहे. [म. क. च. भाग ५ वा. ; म. सा.]

मौनीमहाराज

(इ. स. चे १७ वे शतक) एक सत्पुरुष. हे अखंड मौन धरून राहत असल्याने त्यांना हे नाव मिळाले. कोणी यांना मौनीबुवा म्हणूनही ओळखतात. त्यांच्या चरित्राची निश्चित माहिती उपलब्ध नाही. यांची समाधी कोल्हापूर जिल्ह्यातील पाटगावी आहे. महाराज पाटगावला कसे आले, यासंबंधी पुढील माहिती सांगतात—

निपाणी–आजरा मार्गावर उत्तूर नावाचे एक व्यापारी केंद्र आहे. तिथून हे बैलाच्या तांड्याबरोबर इथे आले आणि इथल्या रम्य वनश्रीला पाहून इथेच राहिले.

संत रामदास व छत्रपती शिवाजीमहाराज यांच्याबरोबर महाराजांचा प्रत्यक्ष संबंध होता असे म्हणतात. गिरिधराने समर्थप्रतापात तसा उल्लेख केला आहे (७.२३).

शिवरायाने एकदा गडावर संत मंडळी बोलाविली असता मौनीमहाराज तिथे उपस्थित झाले होते, असे सांगतात. कर्नाटकाच्या स्वारीवर जाण्यापूर्वी महाराज पाटगावला मौनीबुवांना भेटायला गेले होते आणि मौनीबुवांनी त्यांना प्रसादही दिला होता.

मामा परमानंदांनी कोल्हापूरदरबारातून बराच पैसा मिळवून महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला आहे. माघ महिन्यात तिथे त्यांच्या पुण्यतिथीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. छत्रपतींनी या मठाच्या व्यवस्थेमाठी वर्षासनही दिले होते. मालवणच्या सिंधुदुर्गातील मंदिरांच्या गाभाऱ्याबाहेर मौनीबुवांची मूर्ती आहे. [मामा परमानंद आणि त्यांचा कालखंड—श्री. प्र. बा. कुळकर्णी; छत्रपती शिवाजी भा. ४; म. च. को.]

मौर्य राजवंश

(सनपूर्व ३२२–१८५) मगध देशावर राज्य करणारा एक महान वंश. चंद्रगुप्त हा या वंशाचा मूळ पुरुष होय. पुराणांत याच्याविषयी फारशी माहिती मिळत नाही. कौटिल्य नामक ब्राह्मणाने नंद राजाचा उच्छेद करून चंद्रगुप्त नामक युवकाला मगधाच्या सिंहासनावर बसवले, एवढेच कळते. नंतरच्या संस्कृत साहित्यात चंद्रगुप्त हा नंद राजाचा दासीपुत्र असल्याचे सांगितले आहे. त्या दासीचे नाव मुरा होते व त्यावरून चंद्रगुप्ताच्या वंशाला मौर्य हे नाव मिळाले, असेही म्हटले आहे. पण बौद्ध साहित्यात चंद्रगुप्ताचा जन्म क्षत्रिय कुळात झाल्याचे सांगितले आहे. महापरिनिब्बान सुत्तात पिप्पलिवनातील मोरिय नामक क्षत्रिय कुळाचा उल्लेख आहे. गौतम बुद्धाच्या वेळी पिप्पलिवन येथे त्या कुळाचे गणराज्य होते. चंद्रगुप्त हा त्या कुळाच्या प्रमुखाचा पुत्र होता, असे महावंसावरून कळते. त्याचा जन्म पाटलिपुत्राजवळच्या गावी झाला.

नंद राजाच्या दरबारात आर्य चाणक्याचा अवमान झाल्यामुळे नंद वंशाचा नाश करण्याची प्रतिज्ञा करून तो बाहेर पडला. पुढे त्याला चंद्रगुप्त हा तेजस्वी मुलगा आढळला. आपल्या प्रतिज्ञेची पूर्ती करण्यासाठी चाणक्याने त्याला उत्तम शिक्षण देऊन तयार केले. मग चंद्रगुप्ताने मोठे सैन्य उभे करून पंजाब व सिंध या प्रदेशांतील यवनांचा पराभव केला आणि तिथे आपले राज्य स्थापले. त्यानंतर त्याने मगधावर स्वारी केली आणि सनपूर्व ३२२ च्या सुमारास नंदराजाचा वध करून तो मगधाच्या सिंहासनावर बसला. पुढे काही वर्षांत त्याने संपूर्ण उ. भारतावर आपली सार्वभौम सत्ता स्थापन केली.

शिकंदराच्या मृत्यूनंतर त्याचा एक बलाढ्य सेनापती सेल्यूकस निकेटर हा सिरियाचा राजा झाला होता. त्याने अफगाणिस्थानपर्यंत आपली सत्ता स्थापली होती. त्याने सनपूर्व ३०५ च्या सुमारास पंजाबवर स्वारी करून सिंधूपर्यंत मजल मारली. पण चंद्रगुप्ताने त्याचा पराभव केल्यामुळे त्याला चंद्रगुप्ताशी तह करावा लागला. त्या तहान्वये हेरातपर्यंतच्या प्रदेशावर चंद्रगुप्ताची सत्ता प्रस्थापित झाली.

त्यानंतर चंद्रगुप्ताने द. भारतातही बरेच प्रदेश पादाक्रांत करून आपले साम्राज्य विस्तृत केले. त्याच्या पराक्रमाचे व साम्राज्यविस्ताराचे वर्णन साहित्यात कुठेही आढळत नाही. पण त्याचे साम्राज्य हेरातपासून मदुरेपर्यंत पसरले होते, याविषयी मात्र संशय नाही. त्या काळातील अत्यंत प्रचंड व समर्थ राष्ट्र म्हणून भारताची गणना होऊ लागली आणि जगातील अनेक देश आपले राजदूत मौर्यांच्या दरबारात पाठवू लागले. सेल्यूकसचा वकील मेगॅस्थिनीस अनेक वर्षे भारतात राहिला. त्याने चंद्रगुप्ताच्या राज्याचे वर्णन लिहून ठेवले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यावरून मौर्यांच्या राज्यव्यवस्थेविषयी व सेनादलाविषयी पुष्कळ माहिती मिळते. चंद्रगुप्ताने आपल्या विशाल साम्राज्याचे अनेक विभाग पाडून त्यावर राज्यपाल नेमले होते. तो स्वतः मगधाचा राज्यकारभार पाहत असे. त्यासाठी त्याने एक सल्लागार मंडळ नेमले होते. साम्राज्यातील व सेनादलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका त्या त्या मंडळाच्या सल्ल्याप्रमाणे केल्या जात.

राजधानी पाटलिपुत्र नगरीची व्यवस्था पाहाण्यासाठी तीस जणांचे एक मंडळ असून, त्याच्याकडे करवसुली, जन्ममृत्यूची नोंद, उद्योगधंद्यांचे नियंत्रण, संरक्षण, इ. कामे दिलेली होती. निरनिराळ्या गावांची व्यवस्था पाहण्यासाठी ग्रामसंस्था होत्या. त्या ग्रामसंस्था म्हणजे लहान लहान राज्येच होती. पाच खेड्यांवरील अधिकाऱ्याला गोप म्हणत. त्याच्यावर स्थानिक, रज्जुक हे अधिकारी असून, सर्वांत वर समाहर्तृ नामक अधिकारी असे. समाहर्त्याकडे गृहमंत्र्याचे व फडणिसाचे काम असे.

चंद्रगुप्ताच्या सैन्यात आठ हजार रथ, नऊ हजार हत्ती, तीस हजार घोडे व सहा लक्ष पदाती सैनिक होते. या अवाढव्य सेनादलाची व्यवस्था अतिशय उत्तम होती. चाणक्य तथा कौटिल्य हा चंद्रगुप्ताचा महामात्य होता. त्याच्या साह्यानेच सम्राट चंद्रगुप्ताने आदर्श अशी राज्यव्यवस्था निर्माण केली. त्याच्या साम्राज्यात शांतता व समृद्धी नांदत होती. (चंद्रगुप्त पाहा.)

बिंदुसार–(सनपूर्व ३००–२७३) आपला पुत्र बिंदुसार याला सिंहासनावर बसवून चंद्रगुप्त भद्रबाहूबरोबर कर्नाटकात गेला. त्याने जैन धर्माची दीक्षा घेतली होती, असे म्हणतात. बारा वर्षे तपश्चर्या करून शेवटी त्याने उपवासपूर्वक देहत्याग केला, असे जैन साहित्यावरून कळते.

जैन साहित्यात चंद्रगुप्ताच्या पुत्राला सिंहसेन म्हटले आहे. पुराणांत त्यालाच बिंदूसार हे नाव दिलेले आहे. त्याने मौर्य साम्राज्य व्यवस्थित संभाळले. आर्य चाणक्य हा काही वर्षे त्याचाही महामात्य होता. आपला पुत्र अशोक याला त्याने अवंतीचा राज्यपाल नेमले होते. त्यानंतर काही वर्षे अशोक तक्षशिला येथेही राज्यपाल म्हणन राहिला होता.

अशोक – (सनपूर्व २७३–२३६) प्राचीन भारतातील सर्वश्रेष्ठ सम्राट. त्याने आपल्या अनेक भावांचा नाश करून सिंहासन बळकावले व तो क्रूर होता, असे काही बौद्ध ग्रंथांत म्हटलेले आहे. त्यामुळे त्याला प्रथम चंडाशोक हे नाव मिळाले होते, असेही म्हणतात. मात्र या दंतकथांना इतर साहित्यात काहीच आधार मिळत नाही. सिंहासनावर बसल्यानंतर चार वर्षांनी अशोकाने राज्याभिषेक करून घेतला.

सनपूर्व २६२ या वर्षी अशोकाने कलिंग देशावर स्वारी केली. त्या देशाचा राजा बलाढ्य असूनही अशोकाला विजय मिळाला. पण त्या युद्धात जो अगणित मनुष्यसंहार झाला, तो पाहून सम्राट अशोकाला अतिशय दुःख झाले आणि त्याने त्यापुढे युद्ध न करण्याची प्रतिज्ञा केली. एवढेच नव्हे तर, त्याने बौद्ध धर्म स्वीकारून अहिंसेचाच पुरस्कार केला. त्याने राज्यातील पशुहत्या बंद केली. उपगुप्त नामक बौद्ध भिक्षूला त्याने आपला गुरू मानले आणि आपले सर्व आयुष्य बौद्ध धर्माचा प्रसार करण्यात व्यतीत केले. त्याने अनेक बौद्ध क्षेत्रांच्या तीर्थयात्राही केल्या. धर्मप्रसारासाठी त्याने असंख्य शिलालेख देशाच्या सर्व भागांत खडकावर किंवा स्तंभावर कोरून ठेवले. त्यांतील सुमारे ३५ शिलालेख उपलब्ध आहेत. त्या शिलालेखांत धर्मतत्त्वे व सम्राटाच्या धर्माज्ञा कोरलेल्या आहेत. त्याच्या जीवनाविषयीची बरीच माहितीही त्यात मिळते. त्याने उभारलेले स्तंभ ही शिल्पकलेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. त्याने हजारो स्तूपही निर्माण केले.

बौद्ध धर्मात उत्पन्न झालेल्या अनेक वादग्रस्त प्रश्नांची चर्चा करण्यासाठी अशोकाने एक धर्मपरिषद बोलावली होती. ती तृतीय संगीती म्हणून ओळखली जाते. त्याचप्रमाणे त्याने देशोदेशी आपले दूत पाठवून बौद्ध धर्माचा प्रसार केला. सिंहलद्वीपात तर त्याने आपला पुत्र महेंद्र व कन्या संघमित्रा यांना पाठवले होते. त्याच्या या कार्यामुळे तो शेवटी धर्माशोक या नावाने ओळखला जाऊ लागला.

अशोकाने आपल्या शिलालेखांत स्वतःला 'देवानां प्रिय प्रियदर्शी' म्हटले आहे. तो अत्यंत लोकप्रिय राजा होता, कारण तो प्रजाहितदक्ष होता. त्याने लोकहिताची अनेक कामे केली होती. त्याच्या राज्यात माणसांसाठी जसे दवाखाने होते, तसेच पशूंसाठीही होते.

अशोकाने आपल्या राज्याचे चार विभाग केले होते. उज्जयिनी (माळवा), तोसली (कलिंग), सुवर्णगिरी (कर्नाटक), व तक्षशिला (पंजाब) ही त्यांची मुख्य ठिकाणे होती. त्या विभागांवर त्याने प्रशासक नेमले होते, ते राजघराण्यातलेच होते. इतर दुय्यम प्रांतांवर दुसरे अधिकारी नेमले जात. द. भारतातील चोळ, पांड्य व चेर ही राज्ये वगळून संपूर्ण भारतावर त्याची सार्वभौम सत्ता होती. चंद्रगुप्ताप्रमाणेच हेरातपर्यंत त्याचे साम्राज्य पसरलेले होते. एवढ्या विशाल साम्राज्यावर त्याची एकसूत्री सत्ता चालू होती. मात्र ती अनियंत्रित एकतंत्री राजसत्ता नव्हती. मंत्रिपरिषदेच्या साहाय्याने तो राज्यकारभार करीत असे. प्रांतिक कारभारासाठी त्याने निरनिराळ्या श्रेणींचे अधिकारी नेमले होते. सारांश, चंद्रगुप्ताच्या वेळची राज्यव्यवस्थाच अशोकाच्या वेळी चालू होती. त्याच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सबंध साम्राज्यात एकच भाषा व एकच लिपी चालू होती. जी राष्ट्रीय व सांस्कृतिक एकात्मता भारतात निर्माण व्हावी म्हणून सांप्रत आपण प्रयत्नशील आहो, ती एकात्मता अशोकाच्या काळी भारतात अवतरली होती, असे श्री. रमेशचंद्र मजुमदार म्हणतात.

सम्राट अशोकाची राजवट अनेक दृष्टींनी संस्मरणीय ठरली आहे. भारतातील सर्वांत प्राचीन कोरीव लेख त्याच्या काळातले आहेत. त्याचप्रमाणे सिंधूच्या खोऱ्यातील प्रागैतिहासिक संस्कृतीचे अवशेष वगळता, भारतीय कलेची उत्कृष्ट उदाहरणे मौर्यकाळातलीच उपलब्ध झाली आहेत. त्यापूर्वीच्या कलाकृती अजून सापडलेल्या नाहीत. सारांश, भारतीय कलेचा इतिहास अशोकाच्या काळापासूनच सुरू होतो. (अशोक पाहा.)

सनपूर्व २३६ च्या सुमारास अशोक मृत्यू पावला. त्यानंतरच्या ५० वर्षांत मौर्य वंशातले सात राजे सिंहासनावर बसले. पण त्यांची माहिती उपलब्ध नाही. निरनिराळ्या पुराणांत त्यांची भिन्न संख्या व भिन्न नावे दिलेली आहेत. वायू पुराणामध्ये अशोकाचा पुत्र कुणाल याने आठ वर्षे राज्य केले आणि त्यानंतर आणखी पाच राजे होऊन गेले. बृहद्रथ हा त्यांतील शेवटचा राजा होता. मात्र मत्स्य पुराणात दशरथ, संप्रती, शतधन्वा व बृहद्रथ या चारच राजांची नावे दिली आहेत. विष्णू पुराणात सात नावे आहेत. त्यांत दशरथ, शालिशूक व शेवटचा बृहद्रथ यांचा समावेश होतो. दिव्यावदान या ग्रंथात वेगळीच नामावली दिलेली असून, तिच्यात संप्रती व पुष्यमित्र यांचाही समावेश आहे. दशरथ हा अशोकाचा नातू होता. नागार्जुनी डोंगरावरील गुंफेतील शिलालेखात त्याचे नाव आहे. त्याने स्वतःला अशोकाप्रमाणेच 'देवानां प्रिय' ही पदवी घेतली होती. जैन साहित्यावरून कळते, की संप्रतीने जैन धर्माला आश्रय दिला होता. त्यात त्याला अर्हन्त म्हटलेले असून, त्याने श्रमणांसाठी विहार स्थापले, असेही सांगितले आहे. अवंती व प. भारतही त्याच्या सत्तेखाली होते, असे दिसते. बृहद्रथ हाच शेवटचा मौर्य सम्राट होता, याविषयी पुराणांचे एकमत आहे. सेनापती पुष्यमित्र याने त्याचा वध केला, असे बाणाच्या हर्षचरितावरून कळते.

अशोकाचा पुत्र जलौक याने काश्मीरामध्ये स्वतंत्र राज्य स्थापून कनोजपर्यंतचा प्रदेश जिंकला होता, असे राजतरंगिणीत म्हटले आहे. त्याने म्लेच्छांचा पराभव करून त्यांचे आक्रमण परतवून लावले, असेही समजते. गांधार, विदर्भ, इ. प्रदेशांतही काही मौर्य राजपुत्रांनी स्वतंत्र राज्ये स्थापन केली असावी. दक्षिणेत आंध्र सातवाहन कुळाने अशोकाच्या मृत्यूनंतर लवकरच स्वतंत्र राज्य स्थापले आणि विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील प्रदेश मौर्य साम्राज्यातून वेगळा केला. कलिंग देशही स्वतंत्र झाला.

अशोकाने बौद्ध धर्माचा पुरस्कार केला, वैदिक ब्राह्मणांचा अवमान केला व अहिंसाव्रताचा स्वीकार केला, त्यामुळे मौर्य साम्राज्याचा नाश झाला, असे काही पंडितांचे मत आहे. पण ही कारणे निर्णायक वाटत नाहीत. त्या काळात एवढे विशाल साम्राज्य दीर्घ काळ अभंग राहणे कठिणच होते. दूरच्या प्रांतांत तिथल्या महत्त्वाकांक्षी पुरुषांनी केलेले उठाव, परकीयांची आक्रमणे, राजवंशातील कपटकारस्थाने यांमुळे केंद्रसत्ता दुर्बल होणे अपरिहार्य होते. सनपूर्व १९० च्या सुमारास यवन राजपुत्र डेमिट्रियस याने भारतावर स्वारी करून वायव्यसीमा प्रांत जिंकून घेतला. त्याने मगधाकडेही आपला मोर्चा वळवला होता आणि अयोध्येपर्यंत मजल मारली होती. पण कलिंगाधिपती खारवेल याने त्याचा पराभव करून त्याला परत पिटाळले. त्याच सुमारास बृहद्रथाचा सेनापती पुष्यमित्र याने राजाचा वध करून मगधाचे राज्य घेतले. अशा प्रकारे मौर्य वंशाचा अंत झाला. [भा. सां. इ.; ए. इं.–मजु.; हि. क. इं. पी. २]

मौलिक द. भारतातील एक प्राचीन जनपद. हे गोदावरीच्या काठावर असून, पैठण ही त्याची राजधानी होती. या जनपदात औरंगाबाद, परभणी, अहमदनगर व बीड या जिल्ह्यांतील काही भाग समाविष्ट होता. [जॉ. पु.]

मौलूद शरीफ मुसलमानांचा एक उत्सव. याला ईद – इ – मीलाद असेही म्हणतात. मौलूद = जन्मदिवस व शरीफ = पवित्र होय. हिजरी सनाच्या रबी उल अव्वल या तिसऱ्या महिन्याच्या बाराव्या दिवशी महंमद पैगंबराचा जन्म झाला, असे समजतात. त्या प्रीत्यर्थ हा दिवस व सबंध महिना पवित्र मानून हा उत्सव करतात. सुन्नी पंथाचे अनुयायी हा दिवस अत्यंत श्रद्धेने व मोठ्या उत्साहाने पाळतात. शीया व वहाबी पंथाचे अनुयायी मात्र हा उत्सव करीत नाहीत. इतकेच नव्हे; तर ते याला विरोधही करतात. त्यामुळे कधी कधी यांच्यांत झगडेही होतात.

महंमदाच्या मृत्यूनंतर सुमारे पाचशे वर्षांनी मेसापोटेमियातील मसूल नावाच्या शहरात त्याच्या एका अनुयायाने हा उत्सव सुरू केला, असे म्हणतात. नंतर अरबलाचा बादशहा अबूस इद मुजफ्फर याने इ. स. १२०७ मध्ये हा उत्सव मोठ्या प्रमाणात करून ही परंपरा सुरू केली.

भारतात हा उत्सव मोठ्या धामधुमीने साजरा केला जातो. या दिवशी रात्री सर्व लोक मशिदीत जमून महंमदाची स्तुतिस्तोत्रे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ऐकतात. मग मेवामिठाई वाटली जाते. अलिकडे हा उत्सव केव्हाही साजरा करतात. [साधना, ८ डिसें. १९५१; डि. इ.]

म्रो एक जमात. या लोकांची वस्ती पूर्व बंगालमधील चितगाव जिल्ह्याच्या बंदरबेन भागात आहे. हे लोक लाजाळू आणि संशयी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यामुळे त्यांचे जातिविशेष टिकून राहिले, असे सांगतात.

शेती व शिकार हे यांचे प्रमुख व्यवसाय आहेत. त्याशिवाय हे पंखे करणे, हातमागावर कापड विणणे, इ. व्यवसायही करतात. कापडासाठी लागणारे सूत ते उजव्या मांडीवर काढतात.

हे लोक मध्यम बांध्याचे आहेत. यांच्यांतील पुरुष लाल रंगाची लंगोटी वापरतात. कधी कधी ते कोट घालतात आणि डोक्यावर केस ठेवून त्याचा अंबाडा डावीकडे बांधतात. त्यावर हाडाचा एक आकडा असतो. अधून मधून ते पगडीही वापरतात त्यांच्या कानांत पांढऱ्या धातूची वलये असतात. ते दातांना काळा रंग देतात. लहान मुलांच्या कमरेला मण्यांची माळ बांधतात.

म्रो स्त्रिया गडद काळ्या रंगाचा अरुंद घागरा घालतात. घागऱ्याच्या किनारीला बारीक पांढरे मणी जडवितात. तो डाव्या बाजूला शिवलेला नसतो. त्याच्यावर चांदीचा कमरपट्टा आणि लाल मण्यांची माळ असते. या स्त्री-पुरुषांचा हा दिवसा वापरायचा पोषाख असतो. रात्री ते जाडे-भरडे सुताचे कपडे वापरतात. यांच्यांतील पतिपत्नी एकत्र नग्न स्नान करतात.

म्रोंच्या एका खेड्यात सुमारे वीस घरे असतात. त्यांची घरे जमिनीपासून उंचीवर असून, ती मजबूत व उतरत्या छपरांची असतात. घरात चढून जाण्यासाठी खाचा पाडलेल्या ओंडक्याचा ते जिन्याप्रमाणे उपयोग करतात. ही घरे अरुंद असून, त्यांत दोनच खोल्या असतात. सामान ठेवण्याच्या खोलीत ते इतरांना प्रवेश देत नाहीत. ज्याने अनेक मेजवान्या दिल्या आहेत, अशा श्रीमंत म्रोचे घर मोठे असते.

म्रो जमातीत सात मोठी कुळे आहेत. त्यांच्यांत सामान्यपणे कुळाबाहेर विवाह करीत नाहीत. पण काही कुळांच्या बाबतीत हा नियम शिथिल आहे. मोठ्या कुळांची उपकुळे पाडण्यात आली असून, त्यांना कुची म्हणतात.

काहीं म्रो बौद्धधर्मी आणि काही निसर्गपूजक आहेत. त्यांचे धार्मिक विधी एक वृद्ध माणूस चालवतो. त्याला सेरा असे म्हणतात. तो कोणत्याही कुळातला असू शकतो. त्याला चेटूक करता येते. गावात रोगराई पसरली, तर म्रो डुकराचा व कुत्र्याचा बळी देतात. त्यानंतर नऊ दिवस सुतक पाळतात. या कालावधीला टो–ऊंग अशी संज्ञा आहे. या नऊ दिवसांत एकही माणूस घराच्या सोप्यातून खाली उतरत नाही.

म्रो लोक संगीतप्रिय आहेत. ते बांबूपासून बासऱ्या व वाद्ये बनवतात. त्यांचे आवडते वाद्य ते भोपळ्यापासून बनवतात. हे वाद्य कुकींच्या वाद्यासारखे असते. त्यांना नाचाचीही आवड असते. त्यांचे नाचासाठी आवश्यक असणारे पार्श्वसंगीत मात्र एकसुरी असते.

अंतिकप्रथा – हे लोक मृताला जाळतात. प्रत्येक खेड्यात स्वतंत्र स्मशान असते. ते नदी-नाल्याच्या काठावर असून, तिथे एक पिंपळाचा वृक्ष असतो. मृताला जाळल्यावर त्याच्या अस्थी नाल्याशेजारच्या खोलीत ठेवतात. त्या खोलीत अन्न, दारू, भांडी व काही चिघ्या ठेवलेल्या असतात. नंतर तिथली सर्व भांडी फोडून टाकतात. चितेतल्या बारीक राखेवर एक वस्त्र आंथरतात. त्याखाली मृताचा आत्मा असतो, अशी त्यांची समजूत असते. तो आत्मा इतरत्र जाऊ नये, म्हणून आंथरलेल्या कापडाच्या चारही टोकांना खिळे मारतात आणि त्यावर कोयता, कुदळ, इ. अवजारे ठेवतात. त्यावर पुन्हा एक वस्त्र टाकतात. त्या वस्त्रावर अन्नाची भांडी व दारू ठेवतात. शेवटी त्या सर्वांवर एक आडोसा पूर्वेकडे तोंड करून उभा करतात.

यांच्यांत वडिलांच्या संपत्तीचा सर्वांत मोठा वाटा धाकट्या मुलाला मिळतो. [से. इं. १९३१]

म्लेच्छ एक जातिवाचक संज्ञा. म्लेच्छ म्हणजे नक्की कोण, हे सांगणे कठीण आहे. म्लेच्छ म्हणजे अपभाषा बोलणारे अर्थात असुर, असा वैदिक अर्थ दिसतो (श. ब्रा. ३. २. १. २४.). याविषयी शतपथ ब्राह्मणावरील सायणभाष्यात पुढील अर्थाचा एक उतारा आहे– संदिग्धार्थं म्हणजेच अपभ्रंशरूप बोलणे म्हणजे म्लेच्छन होय. तशी भाषा बोलणारा म्लेच्छ समजावा. अशी भाषा असुर बोलत.

इथे असुर हा शब्द अनार्य किंवा आर्येतर या अर्थाने घेतलेला दिसतो. म्लेंच्छ लोक कोण व त्यांची उत्पत्ती कशी झाली, याविषयी पुराणांतल्या काही कथा अशा–

(१) ययातीला देवयानीच्या ठिकाणी यदू व तुर्वसू असे दोन पुत्र व शर्मिष्ठेच्या ठिकाणी द्रुह्यू, अनू व पुरू असे तीन पुत्र झाले. शुक्राचार्यांच्या शापाने ययातीला अकाली वार्धक्य आले. 'दुसऱ्या कोणी तुझे वार्धक्य घेऊन तुला आपले तारुण्य दिले, तर तू पुनश्च तरुण होशील ' असा उःशापही त्याला मिळाला होता. तदनुसार त्याने आपल्या पाचही पुत्रांकडे त्यांच्या तारुण्याची मागणी केली. त्या वेळी पुरूने त्याला तारुण्य दिले आणि बाकीच्यांनी ते देण्याचे नाकारले. मग ययातीने त्या चारही मुलांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शाप दिले. त्यांत तुर्वसू, द्रुह्यू व अनू यांना दिलेला शाप असा होता, की 'तुमची संतती म्लेच्छ होईल'. (भागवत पुराण)

(२) वसिष्ठाची कामधेनू विश्वामित्र बलात्काराने ओढून नेत असता तिने आपल्या रक्षणासाठी स्वतःच्या शरीरातून जे शकयवनादी गण निर्माण केले, त्यांत म्लेच्छही उत्पन्न केले. (रामायण व महाभारत).

(३) स्वायंभुव वंशात वेन नावाचा एक राजा झाला. तो कामी, अधर्मी आणि दुराचारी होता. त्याने ब्राह्मणांचा छळ आरंभिला, तेंव्हा त्यांनी मंत्रसामर्थ्याने त्याला ठार मारले. मरतेवेळी वेन निपुत्रिक होता आणि त्यामुळे राज्याला कोणी वारस नव्हता. राजाच्या अभावी देशात अराजक माजेल, या भीतीने त्या ऋषींनी मग वेनाच्या मृतदेहाचे मंथन केले. त्या मंथनातून प्रथम कृष्णवर्ण म्लेच्छ निर्माण झाले आणि नंतर पृथू हा सत्वगुणी व पराक्रमी असा राजा जन्माला आला (भागवत व मत्स्य पुराण).

संस्कृत भाषा नसलेल्या व परकीय लोकांना महाभारतात म्लेच्छ ही पदवी दिलेली आढळते. अशा लोकांत पुंड्र, द्रमिड, सिंहल, बर्बर, शबर, शक, यवन, पल्लव, किरात, दरद यांचा समावेश होतो.

महाभारतकाळी म्लेच्छांची वस्ती कोणत्या प्रदेशात होती, त्याविषयी श्री. अ. ज. करंदीकर यांनी अशोक ते कालिदास या ग्रंथात जे विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा — हिमालयाच्या पायथ्याच्या प्रदेशातला समाज म्लेच्छ असल्याचे उल्लेख महाभारतात अनेकवार आले आहेत. गौतम नावाचा एक ब्राह्मण द्रव्य मिळविण्याच्या इच्छेने उत्तरेला म्लेच्छ देशात गेला, अशी एक कथा शांतिपर्वाच्या १६८ व्या अध्यायात आली आहे. यावरून असे वाटते, की काही पतित ब्राह्मण हिमालयाच्या परिसरातील वंशाने म्लेच्छ आणि व्यवसायाने दस्यू असलेल्या समाजात प्रवेश करून तिथे मानाचे स्थान प्राप्त करून घेत. त्यामुळे गौतम-वसिष्ठासारखी काही गोत्रेही त्या म्लेच्छ-दस्युगणांत रूढ झाली होती. गौतम बुद्ध ज्या शाक्य वंशात जन्माला आला, त्या शाक्यांची गौतम, लिच्छवी, मल्ल, नाग, वती, कोलिय, इ. कुळे होती. कौमुदी महोत्सव नाटकाच्या आर्य लेखिकेने त्यांतील लिच्छवींचा उल्लेख म्लेच्छ असा केला आहे. गौतम बुद्ध ज्या प्रदेशात जन्मला तो प्रदेश म्लेच्छांचा होता. म्लेच्छ समाजात दासप्रथा प्रचलित होती. युआन-च्वांगने लिहून ठेवले आहे, की बौद्ध भिक्षूंच्या साऱ्या विहारांतून त्यांच्या सेवेसाठी क्रीतदास ठेवलेले असत आणि त्यांच्या जिवावर बौद्ध भिक्षू आरामात राहत.

म्लेच्छ लोक भारताच्या उत्तरेस राहत होते व भरताने त्यांचा पराभव केला, असे वर्णन भागवतातही आहे (भाग. पु. ९. १६. ३३; १२. १. ४०–४३). वायू पुराणात ते पितृपूजक असल्याचे लिहिले आहे (९३.४४).

वैदिक धर्माच्या बाहेर असलेले परदेशी, बलदंड व नीतिनियमांची कदर न करणारे, अशांना प्राचीन काळी म्लेच्छ म्हणत असावे, असे स्मृती व पुराणे यांवरून कळते. पुढील कथा वरील विधानाला पोषक ठरेल—

क्षेमक राजाचा प्रद्योत नावाचा एक पुत्र होता. एके दिवशी क्षेमकाला म्लेच्छांनी ठार मारले. प्रद्योताला म्लेच्छांचा क्रोध आला. त्याने नारदाच्या सांगण्यावरून म्लेच्छयज्ञ केला. त्या यज्ञाचे कुंड सोळा कोसांचे होते. त्या यज्ञात प्रद्योताने बर्बर, गुरुंड, शक, खस, यवन, पल्लव, रोमज, कामरू व चीन नावांच्या म्लेच्छांचा संहार केला (भवि. प्रति. १–४).

म्लेच्छ राजवंश— कालिका पुराणात एक कथा आहे, ती अशी— वैदिक आर्यांनी पणी लोकांचा पराभव करून कामरूपामध्ये आपली सत्ता स्थापन केली. पुढे त्यांना भोवतालच्या जंगलातील किरातांचा फार उपद्रव होऊ लागला. त्यासाठी विदेहराजा जनक याने नरक नावाच्या एका तरुणाला हाताशी धरून त्या किरातांचा पराभव केला व नरकाला प्राग्ज्योतिष येथे राज्यावर बसवले. त्याच्या वंशाचे राज्य चालू असता उत्तरेकडून तिबेटमार्गे असीरियातून काही लोक कामरूपात झुंडीने आले. हे लोक म्लेच्छ म्हणून ओळखले जात. या म्लेच्छांच्या नेत्याने नरक वंशाचा पराभव करून त्याचे राज्य जिंकले. तो पुढे नरक ही उपाधी घेऊनच राज्य करू लागला. प्रारंभी त्याचे आर्यांशी चांगले संबंध होते. अनेक विद्वान ब्राह्मण त्याच्या राज्यात जाऊन वसले होते व वैदिक धर्म आचरीत होते. परंतु पुढे बाणासुराच्या चिथावणीमुळे नरक राजा उद्धट झाला व ब्राह्मणांचा पदोपदी अपमान करू लागला. एकदा तर त्याने वसिष्ठ ऋषीला कामाख्या देवीचे दर्शन घेण्यासही बंदी केली. तेंव्हा वसिष्ठ कोपला व त्याने नरक राजाला शाप दिला, की 'श्रीकृष्णाकडून तू लवकरच मारला जाशील.' तो शाप खरा ठरला. श्रीकृष्णाने नरकासुराचा वध करून त्याने अपहरण केलेल्या सोळा हजार मुलींची मुक्तता केली. मात्र त्याने नरकाचे राज्य हिरावून न घेता त्याचा पुत्र भगदत्त यालाच राज्यावर बसवले.

म्लेच्छ लोक स्वच्छता, नीती, भक्ष्याभक्ष्यविवेक या बाबतींत आर्यांपेक्षा हीन दर्जाचे होते. त्यांच्यांतले राजे, धर्मगुरू व अधिकारी अतिरिक्त मद्यपान करीत. त्यामुळे वैदिकांना त्यांच्याविषयी घृणा वाटे. मात्र ते लोक फार पराक्रमी होते. पुराणांत त्यांच्या सामर्थ्याचे वर्णन अनेक जागीं आढळते. वर उल्लेख

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लेला नरकासुराचा पुत्र भगदत्त हाही थोर पराक्रमी होता, असे वर्णन महाभारतात आहे. म्लेच्छ राजांनी एकूण ३०० वर्षे राज्य केले, असे वायू पुराणात म्हटले आहे (९९.३६४). पण भारतीय युद्धानंतर ३००० वर्षे या म्लेच्छ वंशाचा काही ठावठिकाण लागता नाही. इ. स. ३०० च्या सुमारास नरक वंशातील पुष्यवर्मन राजा कामरूपात राज्य करताना आढळतो. सातव्या शतकात कुमार भास्करवर्मा तिथे राज्य करीत होता. त्याचे राज्य धनसंपन्न व विद्येचे माहेरघर होते. हा राजा शिवभक्त असावा. त्याच्या राज्यात कितीतरी शिवमंदिरे होती.

भास्करवर्म्याच्या आधी कामरूपात बारा म्लेच्छ राजे होऊन गेल्याचे कळते. त्याच्या नंतरही चार शतकांहून अधिक काळ म्लेच्छ वंश तिथे राज्य करीत होता. त्या वंशात अनेक पराक्रमी राजे निपजले. पुढे हळूहळू म्लेच्छ लोकांवर वैदिक ब्राह्मणांचा प्रभाव पडत गेला. त्यांचे रीतीरिवाज पुष्कळ अंशी बदलले. त्यांनी हिंदुधर्म स्वीकारला व संस्कृत भाषेलाही आश्रय दिला. [प्रा. भा. सं.; अ. का.; सो. हि. का.]

म्हसोबा एक क्षुद्र देवता. याची गणना कोणी ग्रामदेवतांतही करतात. हा शब्द म्हणजे महिषासुराचा अपभ्रंश असावा, असा पंडितांचा कयास आहे. याची मूर्ती असत नाही. एखादा गोल किंवा उभट दगड घेऊन, त्याला शेंदर फासून तो एखाद्या जागी बसवला, की तो म्हसोबा बनतो. महाराष्ट्रात प्रत्येक गावाच्या शिवेवर आणि शेताच्या बांधावर याचे ठाणे असते. गावात रोगराई उत्पन्न झाली, तर याला कोंबडी, बकरी, नारळ, इ. वस्तू अर्पण करतात.

महाराष्ट्राच्या काही भागांत तेलाचा घाणा सुरू करण्यापूर्वी याची स्थापना करतात. त्यामुळे खूप तेल निघते, अशी समजूत आहे.

म्हसोबाला भुतांचा अधिपती मानतात. त्याचे सामर्थ्य वेताळाइतके असते.

अनेक ठिकाणी म्हसोबाच्या यात्राही भरतात. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात म्हसे नावाच्या गावी पौष पौर्णिमेस याची मोठी यात्रा भरते. म्हसे हे नावही म्हसोबावरूनच पडले असावे. [देवीकोश भाग २. ; लो. दं. ; म. जि.–ठाणे]

म्हाळसा खंडोबाची पत्नी. पाहा– महालसा.

म्हैस एक पशू. भारतात सर्वत्र हिचा आढळ होतो. भाविक लोक हिला अपवित्र मानतात आणि कोणत्याही धार्मिक विधीत हिचे दूध वापरीत नाहीत. जे लोक म्हशीचे दूध पितात किंवा तिच्यावर बसतात, ते मंद बुद्धीचे होतात, असा समज आहे. प्रातःकाली किंवा स्वप्नात म्हशीचे दर्शन अशुभ मानलेले आहे. पश्चिम भारतात म्हशीला सावित्रीचा अवतार मानतात. पाहा – रेडा. [की. पॉं.]

म्हैसूर एक प्राचीन शहर. अशोकाच्या शिलालेखात याचा उल्लेख आढळतो. महाभारतात माहिष्मती नामक एका नगराचा उल्लेख आहे, ते नगर म्हणजे म्हैसूरच होय, असाही काही विद्वानांचा तर्क आहे.

म्हैसूर हा जोडशब्द आहे. म्हैस + ऊर असा त्याचा विग्रह होतो. म्हैस म्हणजे महिष आणि ऊर म्हणजे गाव किंवा पर्यायाने देश. इ. स. च्या ११ व्या व १२ व्या शतकांत याला महिषनाडू म्हणजे महिषदेश असेच म्हणत असत. श्री. शं. बा. जोशी यांनी या महिषदेशाविषयी जी माहिती दिली आहे, तिचा सारांश असा ––

कोण्यातरी प्राचीन काळी इथे महिष नावाचे जन राहत होते. निलगिरीवरचे तोड हे पूर्वीचे महिष लोक होत. या प्रदेशावर त्यांचेच स्वामित्व होते. यादव जसे गोपालक होते, तसे हे लोक महिषपालक होते. या गोपालक यादवांचे आणि महिषजनांचे आपसांत वैर निर्माण झाले. कारण यादवांना त्या प्रदेशात आपली वसाहत स्थापन करायची होती आणि महिषजनांना हे लोक तिथे नको होते. त्यातून या दोन जमातींत युद्ध

प्रचंड नंदी– म्हैसूर

सुरू झाले. या युद्धात जगदंबेच्या कृपेने गोपालक जनांचा विजय झाला आणि महिषजनांचा संहार झाला. त्यामुळेच महिष-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जनांची संहारकर्ती जगदंबा महिषासुरमर्दिनी या नावाने प्रसिद्ध झाली. विजेत्या यादवांची तीच पुढे कुलस्वामिनी झाली. म्हैसूरचा नवरात्रोत्सव म्हणजे या महिषासुरमर्दिनीचाच उत्सव होय. या उत्सवाची परंपरा त्या काळापासून चालत आलेली आहे.

पूर्वी म्हैसूर हे एक संस्थान होतें आणि म्हैसूर शहर ही त्याची राजधानी होती. सांप्रत म्हैसूरचा अंतर्भाव म्हैसूर राज्यात होतो. इतिहासकाळात म्हैसूरवर अनेक राजघराणी सत्ता गाजवून गेली. इ. स. च्या १४ व्या शतकात हा प्रदेश विजयनगरच्या साम्राज्यात अंतर्भूत झाला आणि त्याच शतकाच्या अखेरीस वोडेयर राजघराणे म्हैसूरच्या राजगादीवर बसले.

या वोडेयर घराण्याच्या मूळ पुरुषाची कथा मोठी अद्भुत आहे. द्वारकेचे यदुवंशीय राजकुमार विजय आणि कृष्ण आपले नशीब काढण्यासाठी दक्षिणेत आले आणि म्हैसूरजवळ हाडिनाडू या ठिकाणी राहिले. त्याच सुमारास म्हैसूरच्या महिषपाल अधिपतीला वेड लागले व तो देशोधडीला लागला. त्याला एक सुंदर कन्या होती. तिच्याशी बळजबरीने विवाह करून म्हैसूर आपल्या सत्तेखाली आणायचे, असा बेत करुगहळ्ळीच्या कनिष्ठ जातीच्या अधिपतीने रचला होता. या बेताची माहिती कळताच विजय आणि कृष्ण हे आपल्या अनुयायांसह लग्नाच्या वऱ्हाडात शिरले. ऐन लग्नाच्या वेळी त्यांनी करुगहळ्ळीच्या अधिपतीचा वध केला व राजकन्येची सुटका केली. त्यामुळे विजयाला राजकन्या, म्हैसूरचे राज्य आणि करुगहळ्ळीचा प्रदेश अशा तीन्ही गोष्टी मिळाल्या. आणि तो महिषदेशाचा वोडेयर म्हणजे राजा झाला.

म्हैसूरमधील नवरात्र उत्सव व दसरा फार प्रसिद्ध आहे. दसऱ्याच्या दिवशी हत्तीवर बसून म्हैसूरच्या महाराजांची भव्य मिरवणूक काढतात. ती पाहण्यासाठी अफाट जनसमुदाय लोटतो. या निमित्ताने शहरात सर्वत्र विजेची रोषणाई करतात.

म्हैसूरला लागूनच एक टेकडी आहे. तिचे नाव चामुंडी टेकडी. ही टेकडी समुद्रसपाटीपासून ३४८४ फूट उंच आहे. तिच्या माथ्यावर चामुंडीचे भव्य गोपुरयुक्त मंदिर आहे. चामुंडी हे महिषासुरमर्दिनीचेच दुसरे नाव होय. म्हैसूरच्या राजघराण्याचे हे देवस्थान आहे. स्वतः राजेसाहेब रोज देवीची पूजा करतात आणि सकाळ-संध्याकाळ तिचे दर्शन घेतात. वर जाण्यासाठी मोटारचा रस्ता आहे. पायी वर जायचे असेल, तर एक हजार पायऱ्या चढाव्या लागतात.

देवळाच्या अलिकडे थोड्या अंतरावर महिषासुराचा पुतळा उभा केलेला आहे. हा पुतळा सुमारे दोन पुरुष उंच असून, तो भडक व रंगीबेरंगी आहे. त्याच्या मस्तकावर दोन शिंगे असून, त्याच्या मिशा भरदार आहेत. त्याच्या उजव्या हातात तलवारीसारखे जडजूड शस्त्र आणि डाव्या हातात एक मोठा नाग आहे. त्याच्या कपाळावरील गंध, गळ्यातील जानवे आणि कमरेचा पीतांबर यावरून तो ब्राह्मण आहे, हे समजते.

चामुंडी टेकडीवर चामुंडेश्वरीच्या मंदिराशिवाय महाबळेश्वराचेही मंदिर आहे. याच टेकडीवर सर्वांत उंच जागी राजेंद्रविलास राजवाडा आहे. इथून म्हैसूर शहराचे दृश्य फार मनोहर दिसते.

महिषासुर – म्हैसूर

या टेकडीवर जरा आडवाजूच्या पालथणाला एकाच दगडात कोरलेला एक प्रचंड नंदी आहे. त्याचे दर्शन घ्यायचे तर वाहन सोडून पायउतार व्हावे लागते. या नंदीला मंदिर नाही. एका झाडाखालच्या चौथऱ्यावर तो बसलेला आहे. त्यांची उंची सुमारे दीड पुरुष असून, त्याचे वय तीनशे वर्षांपेक्षा जास्त आहे. त्याचा डौल प्रेक्षणीय आहे.

म्हैसूर शहरात अनेक प्रेक्षणीय वास्तू आहेत. जगमोहन व ललितामहाल हे दोन प्रासाद इथे आहेत. जगमोहन राजवाड्यात पूर्वी म्हैसूरचे राज राहत असत. पण सांप्रत तिथे वस्तुसंग्रहालय आहे. त्यातील चित्रशाळेत राजा रविवर्म्यापासून आधुनिक चित्रकारांपर्यंत अनेक चित्रकारांची विविध चित्रे आहेत. याशिवाय हस्तिदंती, काचेच्या, संगमरवरी, चंदनी लाकडाच्या, पितळी वगैरे नाना प्रकारच्या असंख्य वस्तू व मूर्ती तिथे आहेत. ललितमहल राजवाडा हे राजांचे वासंतिक निवासस्थान आहे.

म्हैसूर हे सुंदर शहर आहे. इथले डांबरी रस्ते रुंद व स्वच्छ आहेत. शहराच्या मोठमोठ्या चौकांत मध्यभागी मेघडंबऱ्या उभारून त्यात म्हैसूरच्या माजी महाराजांचे पुतळे उभारलेले आहेत. तसेच, ठिकठिकाणी लहानमोठी हिरवी उद्याने काळजीपूर्वक जोपासलेली आहेत. शहरातील आणि शहराबाहेर जाणाऱ्या रस्त्यांवर गुलमोहोराची झाडे लावलेली आहेत.

इथले रेल्वेस्टेशन, विद्यापीठ, चंदनाच्या तेलाचा कारखाना,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रेशमाचा कारखाना, प्राणिसंग्रहालय वगैरे अनेक गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. पण या सर्वांपेक्षाही म्हैसूरमध्ये अधिक प्रेक्षणीय काय असेल तर ते वृंदावन उद्यान होय.

म्हैसूरपासून चौदा मैलांवर वृंदावन उद्यान हे स्थान आहे. तिथे कावेरी नदीवर धरण बांधून कित्येक कोसांच्या घेरात



ललितामहाल – म्हैसूर

पाणी साठवले आहे. त्याला कृष्णराजसागर असे म्हणतात. त्या धरणाच्या भिंतीला लागूनच दुसऱ्या अंगाला हे उद्यान निर्माण केलेले आहे. त्याच्या मधोमध एक तलाव आहे. त्याच्या दोन्ही बाजूंनी टप्प्याटप्प्याने उतरून दुतर्फा लहान-मोठी फुलझाडे लावलेली आहेत. या तलावात नावेतून जलविहार करायची सोय आहे. या बागेत अनेक कारंजी आहेत. कुठे एखाद्या पुष्करिणीत कारंजांच्या अनेक जलधारा अंतर्वक्र होऊन एकमेकींवर आपले डोके आपटतात, तर कुठे त्याच रसधारा बहिर्वक्र होऊन एखाद्या उमलत्या भव्य पुष्पाचा आकार दाखवतात. अशा त्या उद्यानात सायंकाळी सात वाजता एकाएकी अद्‌भुतकिमया होते. सगळ्या कारंज्यांतून विविध रंगांच्या जलधारा उडू लागतात. हिरवा, पिवळा, निळा, लाल, गुलाबी, इ. रंग एकमेकांत मिसळून आणि तरीही आपले वेगळे अस्तित्व टिकवून अनुस्यूत नटनाच सुरू करतात. आकाशाच्या काळ्यानिळ्या चांदव्याखाली होणारे हे सप्तरंगी नर्तन प्रेक्षकाला कोणत्यातरी वेगळ्याच दुनियेत घेऊन जाते. त्या उद्यानातील झाडे रंगतात, तशीच माणसेही यक्ष-गंधर्वांच्या प्रदेशातून खाली उतरल्यासारखी वाटतात. तिथले कृत्रिम प्रपात आणि पाणलोट जणू इंद्रधनुष्य विरघळून ते द्रवरूपाने वाहू लागावे, तसे दिसू लागतात. दर बुधवारी आणि रविवारी एक तासभर अशी ही रंगप्रकाशांची उधळण तिथे चालते आणि ती पाहून मन भारावून जाते. पाहा – कर्नाटक.
[कर्नाटक; रमणीय भारत; एन्सा. रि. ए.]

म्हौचंग एक सुषिर वाद्य. हा शब्द मुंहचंगवरून बनला आहे. या वाद्याची रचना बाजासारखी असते. यातून स्वर उत्पन्न होण्यासाठी छिद्रांच्या दोन ओळी केलेल्या असतात. हे वाद्य दोन ओठांच्यामध्ये धरून आणि डावी-उजवीकडे हालवून वाजवितात. व्रजमंडळात होळीच्या नाचाच्या वेळी ढोल, मृदंग, इ. वाद्यांबरोबर याचाही उपयोग करतात. [कृ. जी. व्र. श.]

यंत्रविद्या चाकाला कोणत्या तरी शक्तीने गती देऊन इष्ट कार्य माणसापेक्षा अधिक वेगाने व अधिक सारखेपणाने करणारी विशिष्ट सुसंघटित रचना म्हणजे यंत्र होय. सांप्रत आपण यंत्रयुगात जगत आहोत. मानवी जीवनात दिवसेंदिवस यंत्राला अत्यधिक महत्त्व प्राप्त होत आहे. माणसाच्या गरजेच्या बहुतेक वस्तू हल्ली यंत्राच्या साहाय्याने निर्माण होतात. उष्णता, वीज आणि अणू यांच्या शक्तीने चालणारी उत्तरोत्तर अधिकाधिक समर्थ अशी यंत्रे सांप्रत निर्माण झाली आहेत व होत आहेत.

धर्म, तत्त्वज्ञान, वाङ्मय, मूर्तिकला व चित्रकला या क्षेत्रांत प्राचीन भारतीयांनी बरीच प्रगती केली होती. पण यंत्रकलेविषयी त्यांना फारशी माहिती नव्हती आणि त्या दृष्टीने त्यांनी काही प्रगती केली नाही, अशी बऱ्याच पाश्चात्य व भारतीय विद्वानांची धारणा आहे. पण ही धारणा सत्याला धरून नाही. भारतीय लोक यंत्राविषयी उदासीन होते व त्यांनी यंत्रविषयक कोणतीही कामगिरी केली नाही, हे म्हणणे बरोबर नाही. वेदकाळात व सिंधु-संस्कृतीच्या काळातही काही यंत्रे प्रचलित होती, असे आता सिद्ध झाले आहे.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रात घटीयंत्र, तेलयंत्र, इक्षुयंत्र, इ. अनेक यंत्रांची माहिती आहे. (२१९, २२४). आयुधागार नावाचे एक स्वतंत्र प्रकरण त्या ग्रंथात असून, त्यात युद्धामध्ये वापरण्याच्या यंत्रांची माहिती दिली आहे (११.१८). कौटिल्याने चल व स्थिर असे यंत्राचे दोन प्रकार सांगितले आहेत.

शस्त्रक्रिया करण्यासाठी निरनिराळी यंत्रे व हत्यारे भारतात तयार होत असत, असे वर्णन वैद्यकग्रंथांत केलेले आढळते.

ज्योतिर्विद्येत ज्योतिर्विदांनी कालमापकयंत्र, होरायंत्र, शंकुयंत्र, वेधयंत्र अशी यंत्रे बनविली होती. त्यांच्या साहाय्याने ते अचूक कालमापन करीत व ग्रहांचे आणि ताऱ्यांचे वेध घेत.

भट्टस्वामी नावाचा एक यंत्रज्ञ भारतात होऊन गेला. त्याने यंत्रांच्या प्रकारांसंबधी एक श्लोक लिहिला आहे, तो असा—

व्याधितं भ्रामितं चैव भारयुक्तं च कारयेत् ।
पीडनाद् भ्रमणाद् भारात् त्रिधा यन्त्रं प्रवर्तते ।।

भावार्थ – एका प्रकारची यंत्रे कळ दाबल्याने चालू होतात, दुसऱ्या प्रकारची यंत्रे फिरवल्याने कार्य करू लागतात व तिसऱ्या प्रकारची यंत्रे स्वतःच्याच भाराने चालू होतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जैनांच्या भगवतीसूत्रात महाशिलाकटकसंग्राम व रथमुसलसंग्राम असे दोन शब्द आले असून, ती यंत्रयुद्धे होती, असे सांगितले आहे. पहिल्या यंत्राने मोठमोठे पाषाण त्वरित गतीने फेकले जात. दुसरा यांत्रिक रथ असे. त्याला घोडे नसत व सारथीही नसे. तरी तो मुसळासारखी लाकडे फेकीत शत्रूच्या सैन्यात दाणादाण उडवीत असे. सोमदेवसूरीने यशस्तिलकचंपू नावाचा एक ग्रंथ रचला आहे. त्यात त्या काव्याचा नायक उन्हाळ्यात दुपारच्या वेळी यंत्रधारागृहात जाऊन बसत असे, असे वर्णन आहे. या गृहात यंत्राच्या साहाय्याने जलधारा उडविल्या जात. ज्या उद्यानात तो आराम करी, तिथे एक कृत्रिम मेघमंदिर होते. म्हणजे कोणत्यातरी प्रकारे तिथे ढग तयार केले जात असत, असे दिसते. याच उद्यानात जागोजाग कारंजी उडविणारी यंत्रे बसविलेली होती. त्यात नायकाला वारा घालणाऱ्या आणि चंदनवासित शीतल जल अंगावर शिंपडणाऱ्या यंत्रयुवती होत्या. त्यांच्या हाताला स्पर्श करताच नखांतून पाण्याचे तुषार बाहेर उडू लागत. सोमदेवाचे हे वर्णन थोडेसे अतिरंजित असले, तरी ते केवळ कपोलकल्पित आहे, असे वाटत नाही. तशा प्रकारची काही तरी यंत्ररचना त्याने पाहिलेली असावी.

बुधस्वामीच्या श्लोकसंग्रह नामक ग्रंथात लहान लहान यांत्रिक वस्तू तयार करण्याची माहिती दिली आहे. तिथे एक कथा सांगितली आहे, ती अशी— चंपा नगरीच्या एका वृद्ध राजाच्या राणीला डोहाळे लागले. ती म्हणाली, की 'मला जलचर प्राण्यांनी युक्त असलेल्या जलाशयात विहार करावा, अशी इच्छा झाली आहे.' मग राजाने तिचे डोहाळे पुरवण्यासाठी एक कृत्रिम जलाशय निर्माण केला.

तत्र नक्रादिसंस्थानदारुयंत्रनियंत्रिते ।
विमानाकारपोतस्थौ तौ राजानौ विचेरतुः ।।

भावार्थ–एका जलाशयात राजाने मगर, मासे, इ. यांत्रिक जलचर प्राणी फिरते ठेवले आणि विमानाच्या आकाराच्या होडीत बसून राजाराणींनी तिथे विहार केला.

बृहत्कथेत एक कथा दिली आहे, ती अशी– विश्विल नावाचा एक यंत्रकार होता आणि तो विश्वकर्म्याइतका यंत्रकुशल होता. त्याने एक यांत्रिक कोंबडा बनविला होता. विश्विल दिवसा कुठेही असला, तरी रात्रीच्या वेळी त्या यांत्रिक कोंबड्यावर बसून आपल्या बायकोला भेटायला जाई. हा यंत्रकुक्कुट म्हणजे हेलिकॉप्टरसारखा विमानप्रकार असावा.

कथासरित्सागरातल्या मदनमंचुकेच्या गोष्टीत काही यंत्रांची माहिती मिळते, ती अशी–

मयासुराची कन्या सोमप्रभा व मदनमंचुका या दोघी मैत्रिणी होत्या. सोमप्रभेला अनेक लहानमोठी यंत्रे बनविण्याची कला तिच्या बापाने शिकवली होती. एके दिवशी सोमप्रभा अनेक प्रकारच्या यांत्रिक बाहुल्यांची भरलेली पेटी घेऊन मदनमंचुकेकडे आली. त्या पेटीत पुढील प्रकारच्या बाहुल्या होत्या –

एका टाचणीला धक्का दिल्याबरोबर एक यांत्रिक बाहुली वर उडे आणि वर टांगलेली माळ घेऊन खाली येई. दुसरी यांत्रिक बाहुली पाण्याचे भांडे घेऊन वर हवेत उडे आणि खाली येई. तिसरी बाहुली नृत्य करी व चौथी बाहुली गोष्टी सांगू लागे.

दंडीने आपल्या अवंतिसुंदरी या ग्रंथात ललितालय नावाच्या एका यांत्रिकाची माहिती दिली आहे. त्याने युद्धोपयोगी यंत्र एवढे मोठे तयार केले होते, की त्यातून मुसळाएवढे बाण गजदळातील हत्तींच्या मस्तकावर फेकता येत.

ललितालयाने स्थिर, चर, धारा, द्विप, ज्वर आणि व्यामिश्र असे यंत्रांचे सहा प्रकार सांगितले आहेत. स्थिर यंत्रे एका जागी राहून शत्रुसेनेवर शस्त्रांचा वर्षाव करीत. चर यंत्रे शत्रुसैन्यात घुसून त्याची दाणादाण उडवीत. धारा यंत्रे जलवर्षाव करीत.



भोजराजाचे कालमापक यंत्र

द्विप यंत्रे हत्तींची गंडस्थळे फोडीत. ज्वर यंत्रे शत्रुसैन्यात असह्य उष्णता निर्माण करीत. आणि व्यामिश्र यंत्रे वरील पाच यंत्रांचा आवश्यकतेनुसार एकत्र उपयोग करून बनविलेली असत. ही सर्व युद्धोपयोगी यंत्रे होती.

कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्राच्या आयुधागार प्रकरणात जी युद्धोपयोगी यंत्रे वर्णिली आहेत, त्यांपैकी काही महत्त्वाची यंत्रे अशी–

(१) सर्वतोभद्र – हे तीक्ष्ण अग्रे असलेले चक्र असे. ते नग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राच्या किंवा किल्ल्याच्या तटावर ठेवीत. त्याला गती दिली, की त्यातून मोठमोठे पाषाण शत्रूवर फेकले जात.

(२) **जमदग्नीय** – हे एक शरयंत्र होते. हे तटाच्या आतल्या अंगाला ठेवीत. तटाला असलेल्या छिद्रातून ते यंत्र शत्रूवर शर-वर्षाव करी.

(३) **विश्वासघाटी**–नगराकडे येण्याच्या मार्गात एक लोखंडी तुळई तोरणासारखी बसवलेली असे आणि तिला दुसरीकडे कळ असे. नको असलेला माणूस नगराकडे येताना त्या तोरणाच्या खाली आला, की ती कळ दाबली जाई. त्यासरशी ती तुळई त्याच्या मस्तकावर कोसळून पडे आणि तो तात्काळ मरे.

(४) **बाहुयंत्र**–हातासारख्या दोन खांबांचे हे यंत्र असे. कळ दाबली, की दोन खांब एकत्र येत व मधला माणूस चिरडून मरे.

(५) **पांचालिका** – हे यंत्र तटाच्या बाहेरील खंदकात पाण्यामध्ये ठेवीत. त्याला तीक्ष्ण टोके असत. शत्रू खंदकात घुसला, की ती टोके शत्रूच्या अंगात घुसत.

(६) **देवदंड** – हे तटाच्या भिंतीवर ठेवण्याचे तोफेसारखे यंत्र असे.

(७) **शूकरिका** – हे एक भाल्याच्या आकाराचे यंत्र असे. तटाच्या भिंतीवर अशी यंत्रे लोंबती ठेवीत व त्यामुळे शत्रूला तटाच्या भिंतीवर चढण्यास प्रतिबंध होई.

(८) **तालवृंत** – शत्रुसैन्यात वारा, वादळ निर्माण करून त्याला हैराण करणारे यंत्र.

(९) **आस्फोटिम**–हे चार पायांचे कातडयाने झाकलेले यंत्र असे. त्याच्या साह्याने शत्रूवर दगडांचा वर्षाव करिता येई.

(१०) **उद्घाटिम** –हे लोखंडी दांडे बसविलेले यंत्र असून, ते तटाच्या भिंती फोडण्यासाठी वापरीत.

(११) **शतघ्नी**–याचा अर्थ तोफ असा आहे. हे यंत्र वैदिक काळापासून प्रचलित आहे. शतघ्नीला खाली चाके बसवीत व ती तटावर हवी तिकडे फिरवून तिच्यातून गोळे फेकीत.

समरांगणसूत्रधार नावाचा एक ग्रंथ भोज राजाने लिहिला असून, त्यात यंत्रविधान नावाचे एक स्वतंत्र प्रकरणच आहे त्या प्रकरणात यंत्रविद्येची बरीच चर्चा केली आहे. लोखंड, तांबे, चांदी व जस्त हे धातू; तसेच लाकूड, कातडे, कापड, चक्र, सुऱ्या, दांडे, काठ्या ही पार्थिव यंत्रांची बीजे आहेत.

यंत्राचे गुण – घटकावयांचा योग्य व प्रमाणशीर उपयोग, व्यवस्थित रचना, सौंदर्य, गूढता, कार्यप्रवणता, आवाज न येणे, जरुरीप्रमाणे आवाज उत्पन्न करणे व तो लहान मोठा करणे, शैथिल्य नसणे, गती अप्रतिहत असणे, इच्छित परिणाम निर्माण करणे, गतीमध्ये लयबद्धता असणे, टिकाऊपणा, इ. यंत्राचे गुण होत.

कारागिराचे गुण – परंपरागत प्राप्त झालेले ज्ञान, प्रवीण कलाकाराजवळ कलेचा अभ्यास, प्रत्यक्ष प्रयोग आणि कल्पकता हे गुण कलाकाराच्या अंगी असावे लागतात.

भोजाने आपल्या ग्रंथात दोन कालमापक यंत्रांची माहिती दिली आहे, ती अशी–

एका रुंद वाटोळ्या तबकाच्या परिघाचे तीस समान भाग केलेले असत. प्रत्येक भाग म्हणजे एकेक घटिका होय. त्या प्रत्येक भागावर हस्तिदंताची एक प्रतिमा आडवी ठेवलेली असे. परिघाच्या मध्यबिंदूवर एक स्त्री स्थिर उभी असे. ते तबक एका भागाएवढे फिरले, की ती स्त्री हस्तिदंताची आडवी असलेली प्रतिमा उभी करी. याप्रमाणे दिवसाच्या तीस घटिका या यंत्रावर मोजल्या जात.

दुसऱ्या एका अशाच यंत्रात एक पुरुष हत्तीवर किंवा रथात बसून वाटोळा फिरत राही आणि एक घटिका इतका काळ झाला, की एक ठोका वाजवी.

भोजाने आपल्या ग्रंथात वर्णिलेले एक कौतुकास्पद यंत्र म्हणजे महाविहंग किंवा आकाशयान होय. भोज सांगतो–हे आकाशयान तयार करण्यास हलक्या वजनाचे लाकूड



फलक क्र. १

१. महाविहंग, २. मदनोत्सव, ३. वसंत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लागते. त्याचा आकार मोठ्या पक्ष्याच्या एवढा असतो. त्याला दोन्ही अंगी पंख जोडलेले असतात. यानाच्या खालच्या अंगाला विस्तव पेटवतात. त्यावर पारा असलेले पात्र ठेवतात. अग्नीच्या आचेमुळे पारा तापतो आणि शक्ती निर्माण होते. ती निर्माण झाली, की आतला माणूस त्या शक्तीच्या साहाय्याने दोन्ही पंख चालू करतो. त्यासरशी ते महाविहंगाकार यंत्र जमिनीवरून वर उडते आणि हवेत चालू लागते. पंखांच्या प्रतिक्रिया आणि यंत्राला वर्तुळगती देणारी सामग्री असते. या खोल नावेत बारा खांबांवर एक मजला असतो. त्यावर वाटोळी पाच चक्रे एकावर एक असतात. यंत्राला गती दिली, की मजल्यावर बसलेले लोक वाटोळे फिरू लागतात.

(२) मदनोत्सव – एका मुख्य व पोकळ खांबावर मजला बसविलेला असतो. त्यावर चार माणसे बसतात आणि खांबाच्या मुळाशी उभा असलेला एक इसम ते यंत्र चालवतो. त्यामुळे



फलक क्र. २ – तंत्रविद्येतील यंत्रे

१. निगडमोचन यंत्र, २. यावज्जीववश्यकर गाणपत्य यंत्र, ३. देशांतरस्थ – शत्रुमारण यंत्र, ४. यात्रास्तंभन यंत्र, ५. पिशुनमुखस्तंभन यंत्र, ६. यात्रास्तंभन यंत्र

हवेचा प्रवाह यांच्या संयोगाने आकाशयानाचा हवेत संचार चालू राहतो.

करमणुकीच्या प्रकारात रथदोला या नावाने यंत्राचे पाच प्रकार सांगितले आहेत, ते असे–

(१) वसंत – हे यंत्र खोल नावेसारखे असते. यंत्राचा तळाचा भाग धातू व लाकूड यांचा असतो. तिथेच एका उंच बैठकीवर खांबावरचा मजला वाटोळा गरगर फिरू लागतो.

(३) वसंततिलक – याला दोन मजले असतात. पहिल्या मजल्यावर यंत्रसामुग्री असते. यंत्र चालू केले, की वरचा मजला फिरू लागतो.

(४) विभ्रमक – यात वरच्या यंत्रासारखीच रचना असते; पण त्यात माणसे अधिक बसतात व त्याची गती विविध प्रकारची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असते. त्याच्या प्रत्येक मजल्यावरची गती वेगवेगळी असते.

(५) त्रिपुर – याला तीन मजले असतात. तळमजल्यापेक्षा दुसरा मजला लहान व तिसरा त्याहून लहान असतो. खालून वर जाण्यासाठी शिड्या असतात. हे मजले पुष्कळ दुव्यांनी व लहान लहान चाकांनी जोडलेले असतात. यंत्र सुरू केले, की हे त्रिपुर गरगर फिरू लागते.

भारतात अशा प्रकारे यंत्रविद्येची परंपरा दीर्घ काळ चालू



फलक क्र. ३ – तंत्रविद्येतील यंत्रे

१. देवमातृकयंत्र, २. प्रतिवादी मुखस्तंभन, ३. परमोच्चाटनयंत्र, ४. यावज्जीवजनवश्यकरयंत्र, ५. दुष्टमोहनयंत्र ६. पिशाचीयंत्र

होती व त्या विद्येवरचे अनेक ग्रंथही निर्माण झाले होते. ही विद्या वाढली असती आणि प्रसारही पावली असती; पण गेल्या एक हजार वर्षांच्या काळात भारतीय संस्कृतीचे रूपच बदलून गेले. भारतीय विद्वान व आचार्य यांनी यंत्रविद्येकडे, अर्थात साऱ्याच भौतिक शास्त्रांकडे पाठ केली. ते अध्यात्माच्या मार्गाला लागले. जीवनातल्या भौतिक लाभांची त्यांना कधी कदरच वाटली नाही. मनुष्याने जन्म घेतल्यावर या विश्वप्रपंचाच्या पसाऱ्यात न रमता त्याने वैराग्य घ्यावे, जीवन नश्वर मानावे, उपभोग तुच्छ समजावे आणि आत्मविद्येची साधना करून मोक्ष मिळवावा, ही विचारसरणी समाजातल्या विद्वान मंडळींनी लोकमानसात रुजवली आणि दृढ केली. त्यामुळे भारतीय बुद्धिमंतांच्या हृदयात भौतिक आणि वैज्ञानिक स्फूर्ती निर्माण होणे बंद झाले. विज्ञानाच्या व यंत्रविद्येच्या दृष्टीने भारतातले हे तमोयुग म्हणावे लागेल.

उलट पक्षी इ. स. च्या १६ व्या शतकात पाश्चात्य देशांत एक नवे युग सुरू झाले. त्या लोकांनी भौतिक शास्त्रांतल्या प्रगतीचा मार्ग चोखाळला; यंत्रविद्येतही प्रावीण्य मिळवण्याचा चंग बांधला. या ईर्षेतून ते देश समृद्ध झाले व सत्तासंपन्नही बनले. आपण मात्र भक्ती, ज्ञान, मोक्ष हाच काथ्याकूट करीत, कूपमंडूक होऊन बसलो; आपल्याच हातांनी आपल्या प्रगतीच्या पायांत शृंखला अडकवून घेतल्या आणि परिणामी परतंत्रही बनलो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ही परिस्थिती हळूहळू पालटत आहे व भारतीय लोक यंत्रविद्येत प्रगती करू लागले आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तंत्रविद्येतील यंत्रे – मंत्र, तंत्र आणि यंत्र हे तीन्ही शब्द सहचारी आहेत. त्यांचा परस्पर संबंधही आहे. मंत्राबरोबरच अनेकदा यंत्राचाही प्रयोग होतो. पुष्कळदा यंत्रातच मंत्र लिहिला जातो. बिंदू, त्रिकोण, चतुष्कोण, पंचकोन, वर्तुळ, इ. एका किंवा अनेक आकृतींनी लिहिलेले देवताबोधक चिन्ह म्हणजे यंत्र होय. यंत्र हे बिंदुकोनात्मक चिन्हांनी देवतेच्या स्वरूपाचे नियंत्रण करते; म्हणून त्याला यंत्र म्हणतात. यंत्र हे देवतेचे गृहच असते. प्रत्येक देवतेला मंत्र व यंत्र असतेच आणि त्या देवतेची उपासनापद्धती ज्या ग्रंथात सांगितलेली असते, त्या ग्रंथाला तंत्र म्हणतात. मंत्र व यंत्र यांचा संबंध सांगणारा एक श्लोक असा–

यन्त्रं मन्त्रमयं प्रोक्तं मन्त्रात्मा देवतैव हि ।
देहात्मनोर्यथाऽभेदो यन्त्रदेवतयोस्तथा ॥

अर्थ – यंत्र हे मंत्रमय सांगितले आहे. मंत्राचा आत्मा म्हणजे देवता होय. देह आणि आत्मा यांचा जसा अभेद असतो, तसाच तो यंत्र व देवता यांचा असतो.

साधक व उपासना यांच्या भेदाप्रमाणे यंत्रे विविध असतात. यंत्रचिंतामणीत त्यांची नावे, प्रयोग व उपयोग तपशीलवार सांगितलेले आहेत. कोणते यंत्र कसे व कुठे वापरायचे त्याचेही नियम ठरलेले असतात. यंत्रलेखनासाठी सोने, रुपे, तांबे किंवा कासे यांचा पत्रा घेतात. भूर्जपत्रावरही ते लिहितात. अगंजा, अष्टगंध, गोरोचन, केशर, चंदन, रक्तचंदन किंवा विशिष्ट प्रकारची शाई, यांनी यंत्र लिहितात. त्यासाठी तुळशी, बेल, श्वेतपलाश, सोने, रुपे किंवा तांबे यांची लेखणी घेतात. कित्येकदा ते धातूच्या पत्र्यावर कोरवून घेतात. पाचू, गोमेद, हिरा, पोवळे, शाळिग्राम व स्फटिक यांच्यावरही यंत्रे कोरतात. पंचायतन देवतांच्या मंदिरात त्या त्या देवतांच्या शिलासनाखाली मूळ मंत्र खोदून, त्या त्या यंत्राची स्थापना करतात.

जारण–मारणादी अभिचारकर्मात हत्ती किंवा गाढव यांच्या चामड्यावर, माणसांच्या हाडांची लेखणी करून तिने यंत्र लिहितात. साधनभेदाप्रमाणे यंत्रलेखनाचा पृष्ठभाग, शाई व लेखणी यांच्यांत भेद असतो. सपाट पृष्ठभागावर यंत्र लिहिले, तर ते भूपृष्ठ होते. पत्र्याला वेताचा बाक आणून त्यावर यंत्र खोदले की ते कूर्मपृष्ठ होते. आणि चोहोबाजूंनी बऱ्याच वाकवलेल्या पत्र्यावर यंत्र खोदले, की ते मेरुपृष्ठ होते. यंत्र लिहून झाल्यावर त्यात मंत्रबीजांचा विन्यास करतात. एवढे झाले म्हणजे ते यंत्र पूजेला योग्य होते.

शक्तिसाधनात पशू, वीर आणि दिव्य अशा तीन अधिकारांचे साधक असतात. ते या यंत्रांचा निरनिराळा उपयोग करतात. पशुसाधक बाह्य किंवा जड यंत्रांची पूजा करतात, वीरसाधक स्त्रीच्या शक्तिमय शरीरावर यंत्राची कल्पना करून स्त्रीदेहाची उपासना करतात आणि दिव्यसाधक स्वतःच्याच शक्तिमय देहावर यंत्रकल्पना करून त्याची आध्यात्मिक पूजा करतात. प्रा. श्री. शं. खानवेलकर हे आपल्या श्री. गुरुदत्तयोग या ग्रंथात यंत्राचे रहस्य विशद करतात, ते असे–

देवतेचे शरीर बीजाक्षरातून प्रकट होते. परमशिवाचे, परमदेवतेचे शक्तिमय स्वरूप शब्दब्रह्म अथवा नादब्रह्म यांच्या आश्रयाने साधकाच्या चित्तात प्रकट होते. स्थूल, सूक्ष्म आणि कारण अशा साधकांच्या तीन भूमिकांप्रमाणे ते स्थूल, सूक्ष्म आणि कारण अशा तीन रूपांत प्रकट होऊ शकते. मूळ परमदेवतेचे स्वरूप चिन्मय व आनंदमय असून, त्या आनंदघन चेतनातून तीन रेखा प्रकट होतात. मध्य केंद्राला परबिंदू किंवा प्रधानदेवता म्हणतात. त्या आनंदघन परबिंदूतून प्रकट होणाऱ्या तीन रेखा ज्ञान, क्रिया व इच्छा या तीन अपरबिंदूंना जोडतात. असा हा सबिंदू



परबिंदू – विमर्शशक्तीचे सूचक यंत्र

त्रिकोण मुख्य चिदाकाशात प्रकट होतो. हे आद्य विमर्शशक्तीचे सूचक असे यंत्र आहे व त्याला शाक्त परबिंदू म्हणतात.

या यंत्रात परबिंदूला शून्य अशी संज्ञा देतात. परंतु शून्य याचा अर्थ अभाव असा नाही. सच्चिदानंदाचे मूलतत्त्व स्वतःच्या अंतर्गत सामर्थ्याने प्रकट होण्याइतके उद्योगशील नसते. म्हणून ते शून्य आहे इतकेच. ज्या वेळी या शून्यात महाकालाच्या प्रभावाने अहंभाव उत्पन्न होतो, त्या वेळी त्याला स्वरूपाचे ज्ञान होऊन, त्याचे सबिंदू वर्तुळ निर्माण होते. ज्यावेळी हे सबिंदू वर्तुळ कार्याला सुरुवात करते, त्या वेळी ते कार्यबिंदू वर्तुळ होते व त्याला काली असे नाव प्राप्त होते. त्याचेच दुसरे नाव आद्या अथवा विद्याराज्ञी असे आहे. मंत्रोदयाच्या वेळी ते प्रथम प्रकट होते आणि भविष्यकालात सर्वज्ञता देणाऱ्या विद्येला जन्म देते. ही आद्या किंवा विद्याराज्ञीही चिन्मय व आनंदमय अशा स्वभा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाची असल्यामुळे कार्यबिंदूला स्वस्वरूपाच्या अस्तित्वाचे भान होते व त्याला आपण नित्यतृप्त व आनंदमय आहो अशी जाणीव होते. या कार्यबिंदूपासून अपरबिंदू, नाद आणि बीज अशा तीन गोष्टी निर्माण होतात. त्यांतील अपरबिंदू चेतनमय असतो व बीज जड असते. परंतु हे अजड, जडाजड व जड असे तीन अंश एकमेकांत गुंतलेले असतात. ज्याप्रमाणे पक्ष्याच्या अंड्यातील पिवळा बलक, पाणी आणि कवच हे एकाच शक्तीचे तीन निरनिराळे परिणाम आहेत, त्याचप्रमाणे एकाच कार्यबिंदूतून हे तीन अंश परिणाम होतात. अपरबिंदूचेच दुसरे नाव शब्दब्रह्म असून, ते प्रत्येक सचेतन प्राण्याच्या अर्थव्यक्तीचे साधन आहे. शाक्त परबिंदूच्या आकृतीत अ अपरबिंदू, ब बिंदू आणि क बीज आहेत. परंतु या तिघांचा जो परस्पर संबंध आहे, तो रेखांच्या द्वारा दाखविलेला आहे. अब मधून रौद्री शक्ती व रुद्र पुरुष, बक मधून ज्येष्ठा शक्ती व ब्रह्मा पुरुष आणि कअ मधून वामा शक्ती व विष्णू पुरुष अशा जोड्या प्रगट होतात. या तीन रेखांमुळे जो त्रिकोण उत्पन्न होतो, त्या त्रिकोणाला मांत्रिक त्रिपुरबीज असे म्हणतात. वर दिलेल्या जोड्या रूपकात्मक असून, पहिल्या जोडीत ज्ञानशक्तीचे प्राधान्य, संहारकर्म, अग्निज्योती आणि तमोगुण दिसतो; दुसऱ्या जोडीत इच्छाशक्तीचे प्राधान्य, उत्पत्तिकर्म, सोमज्योती आणि रजोगुण असतो; तर तिसऱ्या जोडीत क्रियाशक्तीचे प्राधान्य, पालनकर्म, सूर्यज्योती आणि सत्त्वगुण असतो. याप्रमाणे कार्यबिंदूपासून तीन निरनिराळ्या शक्ती व पुरुष यांचा आविर्भाव, तीन प्रकाशक ज्योती व तीन गुण व्यक्त होतात व या सर्व वस्तूंवर एकच पराशक्ती (परबिंदू) ताबा ठेवते. त्या परशक्तीला त्रिपुरांबा असे नाव आहे. म्हणून शाक्त सबिंदू त्रिकोण हे परमशक्तीचे रहस्य सुचविणारे यंत्र मानतात.

सर्व तांत्रिक यंत्रांचा राजा म्हणजे श्रीयंत्र किंवा श्रीचक्र होय. कादी विद्या, हादी विद्या आणि कहादी विद्या अशी जी भिन्न मते आहेत, त्यांमध्ये श्रीयंत्रात थोडासा फरक आहे. श्रीयंत्राची पूजा ही अतिश्रेष्ठ विद्या आहे, असे मानतात. (श्रीचक्र पाहा)

यंत्र तयार करून त्याची पूजा झाल्यावर मग ते तांबे, रुपे किंवा पंचरस धातू यांच्या ताइतात घालून दंडावर, गळ्यात किंवा कमरेला बांधतात. यंत्र अंगावर आहे, तोवर धारक व्यक्तीने शुचिर्भूत राहायचे असते. अभिचारकर्मासाठी बनविलेली यंत्रे विशिष्ट विधीने पुरून ठेवतात. भूतप्रेतादी पिशाचयोनींची बाधा दूर व्हावी म्हणून घराच्या भिंतीवर षट्कोनाकृती यंत्र काढतात. कित्येकांच्या देवघरांत नित्य पूजेसाठी पत्र्यावर कोरलेली यंत्रे ठेवलेली असतात. श्री. वासुदेवानंद सरस्वती हे विविध प्रकारची यंत्रे बनवून देऊन भक्तांच्या विविध प्रकारच्या शारीरिक व मानसिक व्यथा दूर करीत, असे सांगतात.

यंत्र हे मंत्राला पूरक आहे. एखादा मंत्र त्रिकोणादी आकृतीत बसवूनच यंत्र बनवले जाते. अशा यंत्रामुळे इष्टसिद्धी प्रभावीपणे होते व यंत्राच्या योगाने देवांची पूजा केली असता ते संतुष्ट होतात, अशी धारणा आहे. यंत्रपूजेमुळे शत्रूचा नाश होतो, रोग बरे होतात, स्त्रिया वश होतात आणि धनधान्य, संपत्ती व लौकिक यांची सहजपणे प्राप्ती होते, अशी असंख्य लोकांची श्रद्धा असते. यंत्रांमध्ये असलेल्या गूढ शक्तीचा उपयोग चांगल्या हेतूने, त्याचप्रमाणे वाईट हेतूनेही करता येतो. [यं. मे. कं. ए. इं.; योगविद्या; श्रीगुरुदत्तयोग; क्रि. स्ट. ले. उ.]

यंत्रेश्वर एक तीर्थ. हे नर्मदेच्या उत्तर तीरावर आहे. त्यात स्नान करणारा मनुष्य पाच हजार वर्षे देवांच्या सान्निध्यात राहतो, असे सांगितले आहे.

य देवनागरी लिपीतील सव्विसावा वर्ण. या वर्णाची पहिली व दुसरी अवस्था अशोकाच्या गिरनार येथील लेखांत आढळते. दुसऱ्या अवस्थेतील य लेखणी न उचलता काढला, तर तिसऱ्या अवस्थेतील य होतो. ही अवस्था कुषाणवंशी राजांच्या (इ. स. चे १ ले व २ रे शतक) वेळच्या मथुरा येथील लेखांत र्य व स्य या जोडाक्षरांत दिसते. शेवटची अवस्था इ. स. ५८८ मधील महानामाच्या बुद्धगया येथील लेखात आढळते.



यच्या रूपाचा विकासक्रम

सांप्रत आपण लिहितो तसा य इ. स. च्या ११ व्या शतकातील उज्जयिनीच्या लेखात लिहिलेला आहे.

य वर्णाचे स्वरूप कामधेनुतंत्रात पुढीलप्रमाणे वर्णिले आहे–

यकारं शृणु चार्व्वङ्गि चतुष्कोणमयं सदा ।
पलालधूमसङ्काशं स्वयं परमकुण्डली ॥
पञ्चप्राणमयं वर्णं पञ्चदेवमयं सदा ।
त्रिशक्तिसहितं वर्णं त्रिबिन्दुसहितं तथा ।
प्रणमामि सदा वर्णं मूर्तिमन्मोक्षमव्ययम् ॥

अर्थ – हे सुंदरी, यकाराचे स्वरूप ऐक. यकार हा सदैव चतुष्कोणमय, तुसाच्या धूमासारखा, स्वतः परमकुंडली, पंचप्राणमय, पंचदेवमय, त्रिशक्तिसहित व त्रिबिंदुयुक्त असा आहे. मूर्तिमंत मोक्ष व अव्यय अशा या वर्णाला मी नेहमी नमस्कार करतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

य ने काव्यारंभ केला असता लक्ष्मीचा लाभ होतो, असे सांगितलेले आहे.

तालू हे याचे उच्चारणस्थान आहे. [म. ज्ञा. को.; श. क.]

यगयी आळवार बारा आळवार संतांपैकी एक. याला विष्णूच्या शंखाचा अवतार मानतात. कांजीवरमजवळच्या एका विहिरीतील कमळात हा प्रथम दिसला असे म्हणतात. विष्णूचा शंख ज्या मानससृष्टीतून उत्पन्न झाला, तीमध्येच दैवी रीतीने याचा जन्म झाला, अशी भाविकांची श्रद्धा आहे. [म. ज्ञा. को.]

यजत एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या पाचव्या मंडलातील ६७-६८ ही दोन सूक्ते याच्या नावावर आहेत. मित्रावरुणांची स्तुती हा या सूक्तांचा विषय आहे. या दोन्ही सूक्तांमध्ये यजताचे नाव आढळत नाही. परंतु याच मंडलातील ४४ व्या सूक्तातील अकराव्या ऋचेत यजताचा उल्लेख आहे, तो याचाच असावा असे वाटते. त्याची एका ऋचा अशी–

ते हि सत्या ऋतस्पृश ऋतावानो जने जने ।
सुनीथासः सुदानवों ऽ होश्चिदुरुचक्रयः ॥ (ऋ. ५.६७.४)

अर्थ – पापी लोकांनाही सन्मार्गदर्शन करणारे, सनातन नियमानुसारी, उदार आणि सत्यस्वरूप मित्रावरुण जगातील एकमेव सद्धर्मनिष्ठ आहेत.

हा अत्रिकुलोत्पन्न ऋषी आहे. [ऋ. म. भा.; प्रा. च. को.]

यजमान (१) यज्ञ करणाऱ्याला यजमान अशी संज्ञा आहे. यज्ञात स्वतः आहुती न देता, जो यज्ञासाठी सामग्री पुरवतो व दक्षिणा देतो त्यालाही यजमान असेच म्हणतात. विशिष्ट यज्ञ केले असता, त्यांच्या नावावरून यजमानाला अग्निष्टोमयाजी, वाजपेययाजी, इ. नावे मिळत असत. जो पुरुष वारंवार यज्ञ करीत असेल आणि यज्ञ करणे हा ज्याचा स्वभाव बनला असेल, त्याला यायजूक अशी संज्ञा होती. यज्ञ करण्यापूर्वी यजमानाला दीक्षा घ्यावी लागे. दीक्षित यजमानाला भूमिशयन, ब्रह्मचर्य, वाक्संयम, नियमित भोजन, इ. व्रतांचे पालन करावे लागे. ब्राह्मण यजमानाला दूध, क्षत्रियाला यवागू (खीर) आणि वैश्याला आमिक्षा एवढेच ग्रहण करता येत असे. यजमानाचा शिष्य किंवा पुत्र मोठा झाल्यावर आपल्या गुरूच्या किंवा पित्याच्या शेजारी बसून आहुती देण्यात त्याला साहाय्य करीत असे. त्याला अलंकर्मीण असे म्हणत.

काही वेळा यजमानाच्या नावाबरोबर त्याने केलेल्या यज्ञाचेही नाव जोडीत असत. गर्ग लोक करीत असलेल्या त्रिरात्राला गर्गत्रिरात्र असे म्हणत. याप्रमाणेच चरकत्रिरात्र, कुसुरविन्दसप्तरात्र अशी नावे प्रचलित होती. शास्त्रानुसार श्रौताग्निप्रतिष्ठा करणाऱ्या यजमानाला आहिताग्नी किंवा अग्न्याहित असे म्हणत. यज्ञ चालू असताना यज्ञमंडपाजवळ असणाऱ्या आवसथ्यात यजमानाला राहावे लागे. म्हणून त्याला आवसथिक म्हणत. अवस्थी हे त्याचेच अपभ्रष्ट रूप आहे. [पा. का. भा.; प. का. भा.]

(२) नवीन मूर्तीची प्रतिष्ठापना करणारा पुरुष. हा देवतेचा भाग बनतो. शंकराच्या आठ मूर्तींमध्ये यजमान ही एक मूर्ती असल्याचे पुराणांत म्हटले आहे. [पु. इं.]

यजुर्वेद चार वेदांपैकी दुसरा वेद. समस्त वैदिक साहित्यात यजुर्वेदाला एक विशिष्ट स्थान आहे. ज्ञान, कर्म, आणि उपासना या जीवनविकासाच्या तीन श्रेणी होत. त्यांमध्ये कर्मश्रेणी किंवा कर्मकांड यांचे प्रतिपादन विशेषतः यजुर्वेदानेच केले आहे. वैदिक कर्मकांडाचा मुख्य आधार तोच असून, यज्ञसंस्थेचा तपशीलवार विचार यजुर्वेदातच झालेला आहे. यजुस् म्हणजे गद्य मंत्र. निरनिराळ्या यज्ञांत असे जे विशिष्ट मंत्र म्हणायचे असतात, किंवा जे विशिष्ट नियम पाळावयाचे असतात, त्या मंत्रांच्या आणि नियमांच्या संग्रहाला यजुर्वेद असे नाव आहे. वेगवेगळ्या यज्ञांचे अनुष्ठान करताना कोणत्या मंत्रासहित कोणत्या क्रमाने क्रिया कराव्या याचे विधान यजुर्वेदात आहे. त्याने विभाग क्रियामूलक आहेत. यज्ञाचा मुख्य ऋत्विज अध्वर्यू हा असतो. त्याच्याच कार्याचा समावेश या वेदात असल्यामुळे त्याला अध्वर्यूवेद असेही म्हणतात.

शुक्ल-कृष्णभेद – यजुर्वेदाचे कृष्ण व शुक्ल असे दोन भेद आहेत. तसेच ब्रह्म व आदित्य असे दोन संप्रदाय आहेत. ब्रह्म संप्रदायाचा प्रतिनिधी कृष्ण यजुर्वेद असून, आदित्य संप्रदायाचा शुक्ल यजुर्वेद आहे. यजुर्वेदाचे शुक्ल व कृष्ण असे दोन भेद कसे व का झाले, याची माहिती अशी–

यजुर्वेदाचा मुख्य आचार्य वैशंपायन ऋषी होय. त्याने याज्ञवल्क्यादी अनेक शिष्य पढवून तयार केले. पुढे वैशंपायन व याज्ञवल्क्य या गुरु-शिष्यांत काही कारणाने वितुष्ट आले. वैशंपायन याज्ञवल्क्याला रागाने म्हणाला. "मी तुला जो वेद शिकवला आहे, तो मला परत देऊन टाक." याज्ञवल्क्याने वेदविद्येला मूर्तिमंत करून तिचे वमन केले आणि त्या स्वरूपात गुरूचा वेद त्याला परत केला. मग सूर्याची उपासना करून त्याच्याकडून स्वतःसाठी याज्ञवल्क्याने वेद मिळविला. त्याने आपल्या वेदाला शुक्ल यजुर्वेद असे गौरवपर नाव दिले. त्याच्या विरोधात वैशंपायनाच्या जुन्या यजुर्वेदाला कृष्ण यजुर्वेद म्हणू लागले.

वैशंपायनाला हा अपमान सहन झाला नाही. त्याने आपल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिष्यांच्या बळावर याज्ञवल्क्याला निकराचा विरोध केला. पण याज्ञवल्क्याने जनमेजय राजा आणि जनक राजा यांच्यावर प्रभाव पाडून त्या राजाश्रयाच्या बळावर आपल्या नव्या वेदाचा अत्यंत धडाडीने प्रचार केला. त्यामुळे उत्तर भारतात जिकडे तिकडे शुक्ल यजुर्वेदाचाच बोलबाला झाला. कृष्ण यजुर्वेदाला त्या भागात स्थानच उरले नाही. त्या वेदाच्या लोकांनी मग दक्षिणापथाचा आश्रय घेतला. दक्षिणेत कृष्ण यजुर्वेदाच्या अनुयायांची बहुसंख्या आणि उत्तरेत त्यांचा अभाव या वस्तुस्थिती वरून या गोष्टीचे प्रत्यंतर येते. उत्तरेत हा शुक्ल यजुर्वेद ब्राह्मणांपुरताच मर्यादित राहिला नाही. क्षत्रिय आणि वैश्य यांचीही सर्व धर्मकृत्ये शुक्ल यजुर्वेदाच्या आधारेच होऊ लागली, याचे कारणही याज्ञवल्क्याचा प्रभाव हेच होय.

दुसरी कथा अशी– याज्ञवल्क्याने जेव्हा वेदाचे वमन केले, तेव्हा वैशंपायनाच्या शिष्यांनी गुरूच्या आज्ञेवरून तित्तिर पक्षी होऊन वमन केलेल्या वेदाचे भक्षण केले. म्हणून कृष्ण यजुर्वेदाच्या संहितेला तैत्तिरीय संहिता असे नाव पडले. पण पाणिनीला हे मत मान्य नाही. त्याने हे नाव तित्तिर ऋषीवरून पडल्याचे सांगितले आहे. आत्रेय शाखेच्या अनुक्रमणिकेतही याच मताचा पुरस्कार केलेला आहे.

कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेचे लोक दक्षिणेत कृष्णेच्या मुखाजवळ मुख्यत्वे वसले आहेत. तुरळक प्रमाणात ते दक्षिणेत सर्वत्र आढळतात. हिरण्यकेशी शाखेचे लोक प्रायः कोकणातील चित्तपावन ब्राह्मणांतच आहेत. मैत्रायणी शाखेचे लोक मुख्यत्वे खानदेशात आढळतात. त्यांची संख्या मात्र अत्यल्प आहे.

शाखाविभाग – सूतसंहिता, ब्रह्मांड पुराण, स्कंद पुराण यांच्या अन्वये यजुर्वेदाच्या १०७ शाखा आहेत. मुक्तिकोपनिषदानुसार त्या १०९, पतंजलीच्या मते १०० आणि शौनकाच्या चरणव्यूहानुसार ८६ आहेत. यावरून असे दिसून येईल, की वरील ग्रंथकारांनी आपल्या वेळी उपलब्ध असलेल्याच शाखांचा निर्देश आपल्या ग्रंथांतून केला. परंतु सांप्रत मात्र यजुर्वेदाच्या केवळ सहा शाखा उपलब्ध आहेत. तैत्तिरीय, मैत्रायणी, कठ, कपिष्ठल, वाजसनेय व काण्व अशी त्यांची नावे आहेत. त्यांपैकी पहिल्या चार कृष्ण यजुर्वेदाच्या व पुढच्या दोन शुक्ल यजुर्वेदाच्या आहेत.

शाखावर्णन – शुक्ल यजुर्वेदाच्या पंधरा शाखा आहेत. या शाखांच्या नावांबाबत मात्र विद्वानांत मतभेद आहेत. पं. भगवद्दत्तांनी सर्वसामान्यपणे मान्य होतील, अशा पंधरा शाखा सांगितल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे–

(१) जाबाल शाखा – या शाखेची संहिता किंवा ब्राह्मण उपलब्ध नाही. जाबालोपनिषद तेवढे उपलब्ध आहे. परंतु तेही मुळात यजुर्वेदाचे का अथर्ववेदाचे, याबद्दल खात्री नाही. सामवेदाचे एक जाबाल दर्शनोपनिषद आहे.

(२) बौधेय शाखा – या शाखेची बौधायन, गौधेय, गोधायन व औधेय अशी अन्य नावे आहेत. या शाखेचा कोणताही ग्रंथ सांप्रत उपलब्ध नाही.

(३) काण्व शाखा – या शाखेची संहिता आणि ब्राह्मण उपलब्ध आहे.

(४) माध्यन्दिन शाखा – या शाखेची संहिता व ब्राह्मण उपलब्ध आहे.

(५) शापेयी शाखा – हिला शापेय, शापीय व साफेय अशीही नावे आहेत. या शाखेची काहीच माहिती मिळत नाही.

(६) तापनीय शाखा – हिचा कोणताही ग्रंथ मिळत नाही.

(७) कपोल शाखा (८) पौंड्रवत्स शाखा (९) आवटी शाखा (१०) परमावटिक शाखा – यांचे ग्रंथ उपलब्ध नाहीत.

(११) पराशर शाखा – या शाखेचे धर्मसूत्र उपलब्ध आहे.

(१२) वैणेय शाखा (१३) वैधेय शाखा – या शाखांची काहीही माहिती मिळत नाही.

(१४) कात्यायन शाखा – या शाखेचे श्रौतसूत्र आणि गृह्यसूत्र उपलब्ध आहे.

(१५) वैजवाप शाखा – या शाखेचे गृह्यसूत्र उपलब्ध आहे. याशिवाय, औधेय किंवा अद्ध, गालव, गोधेय, पुंड्र व शापत्य या शाखांचा उल्लेख पुराणांत आलेला आहे.

कृष्ण यजुर्वेदाच्या काही शाखांची नावे पुढीलप्रमाणे–

(१) चरक शाखा – उव्वटाने आपल्या शुक्ल यजुर्वेदभाष्यात चरकसंहितेतील मंत्र दिले आहेत. सायणाचार्यांनी चरक ब्राह्मणांचा उल्लेख केला आहे.

(२) कठ शाखा – या शाखेचे काठक संहिता, काठक ब्राह्मण, काठक आरण्यक, कठोपनिषद व काठक गृह्यसूत्रे एवढे ग्रंथ उपलब्ध आहेत.

(३) प्राच्य कठ शाखा – हिचे वाङ्मय उपलब्ध नाही.

(४) कपिष्ठल कठ शाखा – या शाखेची संहिता उपलब्ध आहे. पण ती पूर्ण स्वरूपात नाही. वाराणसी येथील सरस्वती-भवन ग्रंथालयात या शाखेच्या गृह्यसूत्राची हस्तलिखित प्रत आहे, असे सांगतात.

(५) चारायणीय शाखा – या शाखेची संहिता व शिक्षा उपलब्ध आहे.

(६) वारायणीय शाखा (७) वातंतवीय शाखा – या शाखांचे ग्रंथ उपलब्ध नाहीत.

(८) श्वेताश्वतर शाखा – हिचे उपनिषद प्रसिद्ध आहे.

(९) औपमन्यव शाखा (१०) पातंडनीय शाखा – या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शाखांचे कोणतेच ग्रंथ सांप्रत उपलब्ध नाहीत.

(११) मैत्रायणीय शाखा – मैत्रायणीय संहिता, मैत्रायणीय ब्राह्मण, मैत्रायणीयोपनिषद व गृह्यसूत्र एवढे या शाखेचे वाङ्मय उपलब्ध आहे.

(१२) मानव शाखा – मैत्रायणीय शाखेची ही उपशाखा आहे. या शाखेचे मानव श्रौतसूत्र व गृह्यसूत्र, गृह्यपरिशिष्ट व शुल्बसूत्र एवढे ग्रंथ उपलब्ध आहेत.

(१३) वराह शाखा – या शाखेचे श्रौतसूत्र, गृह्यसूत्र, परिशिष्ट व गृह्यपद्धती एवढे ग्रंथ मिळतात.

(१४) दुंदुभ शाखा – मैत्रायणीय शाखेची उपशाखा. या शाखेचे कोणतेच वाङ्मय उपलब्ध नाही.

(१५) छागलेय शाखा – कोणताही ग्रंथ मिळत नाही.

(१६) हारिद्रवीय शाखा – या शाखेच्या ब्राह्मण, गृह्यसूत्र, खिल व उपखिल या ग्रंथांचा उल्लेख मिळतो.

(१७) श्यामायन शाखा – या शाखेचे कोणतेही वाङ्मय उपलब्ध नाही.

(१८) श्याम शाखा – वाङ्मय उपलब्ध नाही.

(१९) तैत्तिरीय शाखा – या शाखेचे संहिता, ब्राह्मण, आरण्यक व उपनिषद उपलब्ध आहे.

(२०) औखेय शाखा – ही बहुधा सूत्रशाखा असावी.

(२१) खांडिकेय शाखा – खांडिकेय ब्राह्मणांचा उल्लेख आढळतो.

(२२) आपस्तंब शाखा – या शाखेचे श्रौतसूत्र, गृह्यसूत्र, धर्मसूत्र व शुल्बसूत्र उपलब्ध आहे.

(२३) भरद्वाज शाखा – गृह्यसूत्र व श्रौतसूत्र उपलब्ध आहे.

(२४) हिरण्यकेशी शाखा – श्रौतसूत्र, गृह्यसूत्र धर्मसूत्र व शुल्बसूत्र उपलब्ध आहे.

(२५) बौधायन शाखा – या शाखेचे श्रौतसूत्र, धर्मसूत्र, गृह्यसूत्र व शुल्बसूत्र प्रसिद्ध आहे.

(२६) सत्याषाढ शाखा – हिरण्यकेशी सूत्रांना सत्याषाढ असेही नाव आहे.

(२७) आत्रेय शाखा – या शाखेच्या वाङ्मयाचा उल्लेख मिळत नाही.

(२८) आलंबी शाखा (२९) पलंग शाखा (३०) कमल शाखा (३१) तंडी शाखा – यांचे साहित्य उपलब्ध नाही.

(३२) कलाप किंवा कलापी शाखा – पाणिनीच्या मते कठ शाखा ही कलाप शाखेचा अनुवाद आहे.

(३३) तुंबरू शाखा, (३४) उलप शाखा – या शाखांसंबंधी काहीही माहिती मिळत नाही.

(३५) वैखानस शाखा – या शाखेचे श्रौतसूत्र व स्मार्त सूत्र प्रसिद्ध आहे.

(३६) वाधूल शाखा – या शाखेची सूत्रे मिळतात.

(३७) आग्निवेश्य शाखा – या शाखेचे कल्पसूत्र उपलब्ध आहे.

(३८) कौंडिन्य शाखा – या शाखेचे वाङ्मय उपलब्ध नाही.

(३९) हारीत शाखा – या शाखेचे उल्लेख बौधायन व आपस्तंब धर्मसूत्रांत आहेत.

कृष्ण यजुर्वेद – ऋग्वेदावर ज्याप्रमाणे कात्यायनाची 'सर्वानुक्रमणी' आहे, त्याप्रमाणे कृष्ण यजुर्वेदाचा एखादा विवरणग्रंथ नाही. त्यामुळे त्याच्या ऋषी, छंद, देवता, इत्यादींची स्पष्ट माहिती मिळत नाही. परंतु काही काही कांडर्षींच्या पूजेचा उल्लेख मिळतो. या ऋषींच्या नावांवरूनच कदाचित सहा कांडांना प्राजापत्य, सौम्य, आग्नेय, वैश्वदेव, स्वायंभुव आणि वारुण अशी नावे मिळाली असावी. याशिवाय सांहिती देवता, वारुणी देवता आणि याज्ञिकी देवता अशी तीन नावे मिळतात. प्राजापत्य कांडातच पहिल्या आणि दुसऱ्या कांडांतील मंत्र आहेत. राष्ट्रोन्नतीसाठी देवाची प्रार्थना करणे आवश्यक आहे, असे या मंत्रांत सांगितले आहे. अश्वमेध यज्ञाच्या समाप्तीनंतर म्हणायचे मंत्र राष्ट्रीय भावनांनी ओतप्रोत भरलेले आहेत.

तैत्तिरीय संहितेतील पुष्कळशा देवता ऋग्वेदातीलच आहेत. मात्र तीत रुद्र देवतेला प्राधान्य असून, एक रुद्राध्यायही आहे.

तैत्तिरीय संहितेचा क्रमपाठ शाकल्याने आणि पदपाठ गालवाने केलेला आहे. परंतु हिरण्यकेशी सूत्रानुसार पदपाठाचा रचयिता आत्रेय आहे. त्यांच्या सातव्या कांडात वसिष्ठ आणि सूर्यवंशी राजा सुदास यांची आख्याने आहेत. तैत्तिरीय संहितेच्या काही आवृत्तींत धृतराष्ट्र, पांचाल आणि कौंतेय यांचा उल्लेख सापडतो.

तेलंग आणि द्रविड ब्राह्मण तैत्तिरीय संहितेलाच आपस्तंब शाखा म्हणतात. या ब्राह्मणांतच या संहितेचा सर्वांत जास्त प्रचार आहे. यांच्या आणि माध्यंदिन ब्राह्मणांच्या उच्चारांत काही वेळा फरक आढळतो.

कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय संहितेत दर्शपूर्णमास, सोमयाग, पुनराधान, वाजपेय, राजसूय, पशुयाग, काम्यपशू, काम्येष्टी, अग्निचयने, सत्रे, अहीनयाग, इ. यज्ञांची सविस्तर मांडणी आहे. कृष्ण यजुर्वेदाच्या ज्या भागाला संहिता म्हणतात, त्या भागात ब्राह्मणही पुष्कळ आलेले आहे आणि ज्या भागाला ब्राह्मण म्हणतात, त्यात संहिता म्हणजे मंत्रभागही पुष्कळ आला आहे.

कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय ब्राह्मणात अनेक कथा आल्या असून, यज्ञ हे त्यांचे तात्पर्य आहे. 'देवासुराः संयत्ता आसन्' = देव आणि असुर युद्धासाठी उभे ठाकले, या वाक्याने कथेचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रारंभ होतो. त्या युद्धात प्रथम देवांचा पराभव होतो आणि ते ब्रह्मयाकडे किंवा विष्णूकडे जातात. ते दोघे देवांना एखादा यज्ञ करण्यास सांगतात. देव तो यज्ञ करतात आणि त्यांना विजय व ईप्सित फळ मिळते.

तैत्तिरीय, महानारायण, मैत्री, कठ व श्वेताश्वतर ही कृष्ण यजुर्वेदाची उपनिषदे होत.

कृष्ण यजुर्वेदाच्या वरील सर्व संहितांमध्ये केवळ स्वरूपाचीच एकता नाही, तर त्यात वर्णिलेली अनुष्ठाने व तन्निष्पादक मंत्र यांमध्येही बरेच साम्य आहे. कारण या भिन्न भिन्न शाखांच्या मंत्रसंहिता एकाच मूलभूत वेदाच्या शाखा आहेत.

शुक्ल यजुर्वेद – शुक्ल यजुर्वेदाच्या वाजसनेय संहितेत ४० अध्याय, ३०३ अनुवाक आणि १९७५ कंडिका आहेत. चरणव्यूहानुसार या कंडिकांची संख्या १८८० आहे, तर चिंतामणराव वैद्यांच्या मते ती १९०० आहे. मंत्र गद्यात आणि पद्यात आहेत. पहिल्या अध्यायाचा प्रजापती आणि शेवटच्या अध्यायाचा दध्यङ् आथर्वण, असे ऋषी मानलेले आहेत. सर्वानुक्रमणीत शेवटच्या अध्यायाचा ऋषी ब्राह्मण असे लिहिलेले आहे; तर अजमीर आवृत्तीत ऋषीचे नाव दीर्घतमा असे दिलेले आहे.

वाजसनेय संहितेच्या प्रथमाध्यायात दर्शपूर्णमास, दुसऱ्यात पिंडपितृयज्ञ आणि तिसऱ्यात अग्निहोत्र आणि चातुर्मास्य असे याग दिलेले आहेत.

शुक्ल यजुर्वेदाचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे शतपथ ब्राह्मण होय. या ग्रंथाच्या काण्व व माध्यंदिन अशा दोन प्रती उपलब्ध आहेत. शुक्ल यजुर्वेदाचे श्रौत्रसूत्र कात्यायनाने केलेले असून, गृह्यसूत्र पारस्कराने केलेले आहे. या शाखांचे प्रातिशाख्यही कात्यायनाने केले आहे. त्यात काण्व शाखेचे मतभेद नमूद आहेत. याज्ञवल्क्यशिक्षा हा ग्रंथ या वेदाच्या पठनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. इतर वेदांपेक्षा स्वर व उच्चार या बाबतींत शुक्ल यजुर्वेद फारच वेगळा आहे. माध्यंदिन शाखेचे लोक य च्या जागी ज आणि श च्या जागी ख उच्चारतात; काही वर्णांचा द्वित्व उच्चार करतात; अनुस्वाराचा उच्चार विशेष सानुनासिक करतात आणि स्वर मानेने व्यक्त न करता हाताने करतात.

यजुर्वेदाची रचना ऋग्वेदानंतर झाली, अशी कित्येक पंडितांची धारणा आहे. निरनिराळ्या यज्ञ-यागांसाठी जेव्हा अधिकृत व तपशीलवार माहिती असलेल्या ग्रंथाची आवश्यकता निर्माण झाली, तेव्हा यजुर्वेद निर्माण झाला व त्याची हळूहळू वाढ होत गेली. यासंबंधी श्री. विद्याधरशास्त्री भिडे यांनी आपले मत मांडताना लिहिले आहे, ते असे –

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असे वेदांचे भिन्न भिन्न भाग पाडण्यापूर्वी वेदराशी एकच होती. तिची चार वेदांत विभागणी केव्हा झाली, हे नक्की सांगता येणार नाही. ही भिन्नता उत्पन्न होण्यापूर्वी वेद ब्रह्मस्वरूप म्हणजे प्रणवरूप होते. तैत्तिरीय आरण्यकात (२.११).'ओमिति प्रतिपद्यते एतद्वै यजुः' या वचनाने प्रणवालाच यजुस् म्हटले आहे.

याच अर्थाने भागवत पुराणात ' एक एव पुरा वेदः प्रणवः सर्ववाङ्मयम् ' = पूर्वी वेद एकच एक होता आणि प्रणव हे सर्व वाङ्मय होते, असे म्हटले आहे (९. ४. ४९).

याला एक वेगळी पुष्टी म्हणून की काय विष्णू पुराणामध्ये ' एक एव यजुर्वेदस्तं चतुर्धा व्यकल्पयत् ' = मुळात एक यजुर्वेदच होता; तोच पुढे चार वेदांच्या रूपाने विभाजित केला गेला, असे सांगितले आहे.

श्री. शकुंतला राव शास्त्री यांचे मत मात्र त्याहून भिन्न आहे. त्या म्हणतात –

कालक्रमानुसार पाहता यजुर्वेदाचा काल ऋग्वेदानंतरचा मानला जातो; पण यजुर्वेद अथर्ववेदानंतर तयार झाला असावा, असे दिसते. कारण यजुर्वेदात अथर्ववेदातील मंत्र घेतलेले आहेत. काही मंत्रांत थोडा फेरफारही केलेला आहे. सामाजिक व धार्मिक परिस्थितीबद्दल यजुर्वेदात जे उल्लेख आहेत, त्यांवरूनही यजुर्वेद हा ऋग्वेदानंतरचा असावा, असे म्हणता येते. ऋग्वेदात वर्णविषयक निर्देश अल्प आहेत, तर यजुर्वेदात चारही वर्णांची व्यवस्थित वाढ झालेली दिसते. ब्राह्मण व क्षत्रिय हे दोन वरचे वर्ण यजुर्वेदात पूर्णावस्थेस पोचलेले दिसतात. यजुर्वेदात या दोन वर्णांचे हितसंबंध विशेष प्रकारे सुरक्षित केलेले असून, त्या दोघांच्या कल्याणाकरिताच यजुर्वेदात देवतांची आराधना केलेली आहे.

देवताविषयक कल्पनांमध्ये ऋग्वेदापेक्षा यजुर्वेदात फारशी प्रगती झालेली दिसत नाही. ऋग्वेदातल्या देवतांचीच यजुर्वेदातही आराधना व प्रार्थना असून, यज्ञात त्याच देवतांना हविर्भाग अर्पण करण्यास सांगितले आहे. मात्र या देवतांच्या दर्जामध्ये फेरफार झालेला दिसतो. त्यातला अत्यंत महत्त्वाचा फेरफार प्रजापती, विष्णू व रुद्र या देवतांच्या दर्जामध्ये झाला आहे. ब्रह्मा, विष्णू व शिव या देवतात्रयीचे गुणकर्मानुसार पृथक्त्व पुराण ग्रंथांमध्ये पूर्णावस्थेला गेलेले आहे. या पृथक्त्वाचा मुळारंभ यजुर्वेदातच झाला आहे. ऋग्वेदात विष्णू व रुद्र या देवतांना इंद्र, अग्नी, सूर्य व वरुण या देवतांइतके महत्त्व दिलेले नाही. प्रजापती ही देवता तर केवळ छायारूपच आहे. पण यजुर्वेदात या सर्वांना प्राधान्य आलेले असून, ऋग्वेदातील प्रमुख देवता इंद्र, अग्नी इत्यादिकांचा दर्जा काहीसा कमी झालेला आहे. पुराणांत प्रजापती हा सर्व प्राणिमात्रांचा उत्पत्तिकर्ता मानलेला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रुद्र देवतेचीही यजुर्वेदात बरीच वाढ झाली असून, तिला स्पष्ट व निश्चित रंग-रूप आले आहे. विष्णूलाही ऋग्वेदापेक्षा बरेच वरचे स्थान प्राप्त झाले आहे.

उपनिषदांमध्ये वाढीस लागलेली एका ईश्वराची कल्पना यजुर्वेदामध्येच निश्चित व सप्रमाण मांडली गेली.

यजुर्वेदातल्या नीतिविषयक कल्पना ऋग्वेदातील कल्पनांपेक्षा बऱ्याच प्रगत झालेल्या दिसतात. तिथे उच्चतर नैतिक जीवनाबद्दल खरीखुरी तळमळ दिसून येते. ज्ञान, पापाची क्षमा, अमरत्व, इ. आध्यात्मिक गुणांच्या प्राप्तीबद्दलच्या प्रार्थना यजुर्वेदात विपुल आहेत. उदा०—

वृहस्पते सवितर्बोधयैन ँ॒
स ँ॒ शितं चित्सन्तराँ॒ स ँ॒शिशाधि ।
वर्धयैनं महते सौभगाय विश्व एनमनु मदन्तु देवाः ॥
(तै. सं. ४. १. ७. ३.)

अर्थ – हे बृहस्पते, हे सवित्या, या यजमानाला कर्माविषयी ज्ञान दे. पूर्वी शिकवलेलेही पुनः पुनः शिकव. मोठ्या ऐश्वर्याकरिता यांना वाढव. विश्वेदेव या यजमानाच्या संतोषानंतर संतुष्ट होवोत.

अमुत्र भूयादध यद्यमस्य बृहस्पते अभिशस्तेरमुञ्च ।
प्रत्यौहतामश्विना मृत्युमस्माद्देवानामग्ने भिषजा शचीभिः ॥
(वाज. सं. २७. ९)

अर्थ – हे बृहस्पते, तू मरणापासून व नरकलोकापासून आम्हांला मुक्त कर. तसेच लोकापवादापासून मुक्त कर. देवांचे वैद्य जे अश्विनीकुमार त्यांनी शुद्धकर्म करून या यजमानापासून मृत्युकर्म दूर केले आहे.

यजुर्वेदाच्या मंत्रकर्त्यांना इहलोकींच्याहून उच्चतर असे जीवन अस्तित्वात असल्याची जाणीव झाली होती. भूलोकाच्या वर स्वर्ग नावाचा एक लोक आहे, हा शोध त्यांनी लावला होता. उदा०—

सत्रस्य ऋद्धिरस्य गन्मज्योतिरमृता अभूम ।
दिवं पृथिव्या अध्यारुहमाविदाम देवान्त्स्वर्ज्योतिः ॥
(वाज. सं. ८.५२)

अर्थ–हे सोमा, तू सत्राची समृद्धी आहेस म्हणून आम्ही यजमान आदित्यरूपी तेजाला प्राप्त होऊन अमर झालो. आम्ही पृथ्वीवरून द्युलोकात गेलो व तिथे देवांना पाहाते झालो व ज्योतिर्मय स्वर्गाला प्राप्त झालो.

पापावलद्दची भीती यजुर्वेदात ऋग्वेदापेक्षा अधिक तीव्र दिसून येते. पापक्षालनाविषयीही तिथे अधिक तळमळ आढळते. उदा०—

यद् ग्रामे यदरण्ये सत्सभायां यदिन्द्रिये ।
यदेनश्चकृमा वयमिदं तदवयजामहे स्वाहा ॥
(वाज. सं. ३.४५)

अर्थ – गावात तसेच रानात राहत असता व सभेत बसलो असता आणि इंद्रियांच्या प्रीतीने आम्ही जे पाप केले, त्या सर्व पापांचा या आहुतीने आम्ही नाश करू. हे हविर्द्रव्य आम्ही देवतेला दिलेले असो.

द्रुपदादिव मुमुचानः स्विन्नः स्नातो मलादिव ।
पूतं पवित्रेणेवाज्यमापः शुन्धन्तु मैनसः ॥
(वाज. सं. २०.२०)

अर्थ - पादत्राण काढल्यावर पादत्राणाचे दोष ते घालणाऱ्याला स्पर्श करीत नाहीत, घाम आल्यानंतर स्नान केलेल्या पुरुषाला घामाचे दोष लागत नाहीत. कांवळचातून गाळलेले तूप शुद्ध होते; म्हणजे कीटकादिकांनी रहित होते; त्याप्रमाणे जलांनी मला पातकापासून मुक्त करावे, म्हणजे शुद्ध करावे.

हेमाद्रीने यजुर्वेदाचे ध्यान दिले आहे, ते असे—

अजास्यः पीतवर्णः स्याद्यजुर्वेदोऽक्षसूत्रधृक् ।
वामे कुलिशपाणिस्तु भूतिदो मङ्गलप्रदः ।

अर्थ – यजुर्वेद हा बोकडाच्या तोंडाचा, पीतवर्ण, अक्षमाला धारण करणारा व डाव्या हाती वज्र धारण करणारा, तसेच ऐश्वर्य व मंगल देणारा आहे.

धनुर्वेद हा यजुर्वेदाचा उपवेद आहे. [वै. सा. सं.; वै. सा.; वै. वा. इ.; च. ब्रा. इ.; अॅ. फ्रॉ. फे. व.; पुराणम्, जुलै १९६५; एकता, ज्येष्ठ शके १८७७]

यझत पारशी लोकांची दैवतसृष्टी. यझत हे संस्कृत यजत शब्दाचे अपभ्रष्ट रूप आहे. झरथुष्ट्री धर्मात अहुर मझ्द या सर्वशक्तिमान देवाचे साह्यकारी असे जे वेगवेगळे देवतासंघ आहेत, त्यात अमेश स्पेन्त या देवतासंघाच्या खालोखाल यझतांना मान आहे. यझतांमुळे सर्व प्राणिमात्रांना अहुर मझ्दाचे माहात्म्य परिचित झाले, अशी पारश्यांची धारणा आहे. यझतांची संख्या सहस्रांवर आहे; तथापि त्यांतील मुख्य यझतांची संख्या फक्त चाळीसच आहे.

यझतसृष्टी स्त्री आणि पुरुष यांच्यांत विभागली गेली आहे. त्यांत काही यझत पर्शुभारतीय असून, काही इराणी आहेत. उषह, झम, अर्दवीसूर, दव्हस्प, दयेना, चिस्ती, अशंतात, इरेथे, रसंस्तत, परेंडी, रत, इ. नावे स्त्री यझतांची असून, मिथ्र, अइर्यमन, हओम, वेरेथ्रघ्न, नइर्योसंघ, अपांनपात, माह, इ. नावे पुरुष यझतांची आहेत. स्त्री व पुरुष यझतांची नावे निरनिराळी असली, तरी त्यांच्यांत उच्च-नीच भेदभाव नाही. यझत हे रूपरहित असून, एखाद्या चांगल्या विचाराचे, गुणाचे किंवा निसर्गातील स्थूल वस्तुमात्राचे ते प्रतिनिधित्व करतात.

सर्वसामान्यपणे प्रत्येक यझताच्या नावाने आवाहन करून,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याला स्वतंत्रपणे हविर्भाग अर्पण करण्याची प्रथा आहे. तथापि कधी कधी इंद्राला हवी अर्पण करताना त्याच्यासमवेत त्याला सहकार्य करणाऱ्या इतर एका अगर अनेक यझतांनाही हवी देण्यात येतो. काही यझतांचे युग्म ठरलेले असून, पूजा करतेवेळी अथवा हविर्भाग समर्पण करतेवेळी त्या त्या युग्माला आवाहन केले जाते. अहुर-मिथ्र, मिथ्र-रश्नु, रमन-वायु ही अशा काही यझतयुग्मांची नावे होत.

यझतांमध्ये मइन्यव म्हणजे दिव्य यझत व गएथ्य म्हणजे पार्थिव यझत असे दोन वर्ग असून, त्यांची कार्यक्षेत्रे भिन्न भिन्न आहेत. दिव्य यझतांची नावे व कार्यक्षेत्रे अशी —

नाव	कार्यक्षेत्र
दयेना, चिस्ती, स्रओश	दिव्यज्ञान
मिथ्र, रश्नु, आर्शताद व एरेथ	न्याय
वेरेथ्रघ्न	जय
राम	सुख
रत	दान
अक्षस्ती	शांती
माथ्रास्पेंता, दहम-अफ्रिती व दामि–उपमन	मंत्र
अइर्यमन व हओम	आरोग्य
अशीवंघूही व परेंडी	संपत्ती
द्रवास्प, गेउश व उर्व्हन	पशू

पार्थिव यझतांची नावे व कार्यक्षेत्रे पुढीलप्रमाणे —

नाव	कार्यक्षेत्र
ह्वरेक्षएत, मावोंघह व उषह	प्रकाश
वायू	वायू
आतर व नइर्योसंघ	अग्नी
अर्दवीसूर अनाहित, अहुरनी, अपांनपात	उदक
झम	पृथ्वी

यझत हे परमपवित्र, समर्थ, तेजस्वी व उदार असून, ते स्वर्गात राहतात व पृथ्वीवर देखरेख करतात; माणसांनी त्यांची पूजा-प्रार्थना केली म्हणजे ते त्यांच्या कामना पुऱ्या करतात, अशी पारशी लोकांची श्रद्धा आहे. [म. झो. त्या. शि.]

यतिचांद्रायण एक प्रायश्चित्त. एक महिनाभर रोज दुपारी हविष्य पदार्थांचे केवळ आठ ग्रास भोजन व मनःसंयम हा या प्रायश्चित्ताचा विधी आहे. या प्रायश्चित्ताचा उल्लेख मनुस्मृती (११.२१८), बौधायनसूत्र (४.५.२०), अग्नी पुराण (१७१.४), इ. ठिकाणी आढळतो. [हि. ध.; प्रा. व्य. प्र.].

यतिसांतपन एक प्रायश्चित्त. ओळीने तीन दिवस पंचगव्य आणि कुशोदक पिऊन चवथ्या दिवशी उपवास केल्याने हे प्रायश्चित्त होते. शंखस्मृतीने केवळ पंचगव्याचा उल्लेख केला आहे आणि चवथ्या दिवशी उपवास करून होम करायला सांगितले आहे. शेवटी अलंकृत केलेल्या दोन गायी दान द्याव्या असे म्हटले आहे. ज्याला हे शक्य नसेल त्याने एक सवत्स गाय दिली तरी चालते. [हि. ध. ; प्रा. व्य. प्र.]

यती श्रमणांपैकी एक संप्रदाय. 'यतते चेष्टते मोक्षार्थमिति' = मोक्षासाठी प्रयत्न करणारा तो यती होय, अशी त्याची व्याख्या आहे. जे लोक रक्त वस्त्र वापरणारे, भिक्षेवर उपजीविका करणारे, घरदार न करता सतत भटकत राहणारे, वैराग्यशील असे असत, त्यांना वेदकाळी यती म्हणत. यती हा मुनींच्या जोडीने उच्चारला जाणारा शब्द आहे. हा संप्रदाय ऋग्वेदकाळाच्याही पूर्वी प्रचलित होता. वैदिक आर्यांना यती भेटले होते; पण ते यज्ञ करणारे नसल्यामुळे, क्वचित यज्ञाला विरोध करणारेही असल्यामुळे वैदिकांचे व त्यांचे पटले नाही.

ऋग्वेदात यतींचा उल्लेख अनेक ठिकाणी आला आहे. इंद्र हा यतींचा शत्रू होता, असे अनेक ठिकाणी म्हटले आहे. त्याने यतींना लांडग्यांच्या भक्ष्यस्थानी घातले, असा उल्लेख तैत्तिरीय संहितेत आला आहे (६.२. ७. ५). सगळ्यांचा फडशा पडला; पण त्यांतले पृथुरश्मी, बृहद्गिरी व रायोवाज हे तेवढे जगले (पं. ब्रा. १३. ४. १७–१८). कदाचित आपला पंथ टाकून ते इंद्राला शरण आले असतील. कारण इंद्राने त्या तिघांना अभय आणि क्रमाने क्षत्र, ब्रह्म व वैश्य विद्या दिल्या, असे म्हटले आहे. याचा अर्थ वैदिक आर्यांनी यतींपैकी काहींना त्रैवर्णिकांत दाखल करून गृहस्थाश्रमात आणले, असा दिसतो.

यती हे आर्येतर समाजातले लोक असावे. वैदिक आर्य प्रवृत्तिमार्गी असल्यामुळे त्यांना संन्यासमार्गी यतींबद्दल तिरस्कार वाटत होता. पण यतींची संन्यासमार्गी विचारसरणी वैदिक आर्यांनी विरोध करूनही शमली किंवा दबली नाही. यती-मुनींचा वर्ग समाजात लोकप्रियच राहिला. वैदिक आर्य यतींना मारीत पिटीत होते, तरीही आर्येतर सर्व समाजात त्यांना मान मिळत राहिला. शेवटी आश्रमव्यवस्था निर्माण करताना त्यांना यतींच्या संप्रदायाचा संन्यास हा चौथा आश्रम म्हणून स्वीकारावा लागला. बौद्ध व जैन हे दोन संप्रदाय यति-मुनींची विचारधारा स्वीकारूनच उत्पन्न झालें व वाढले. त्यांनी प्रवृत्ती व गृहस्थाश्रम यांना निवृत्ती व संन्यास यांच्याइतका कधीही मान दिला नाही. जैनांच्या आध्यात्मिक 'गुरूंना यती म्हणतात. ते धर्मप्रसार करतात, तसेच पुरोहिताचे कामही करतात. त्यांचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

८४ गच्छ आहेत. पाहा– मुनी. [हि. ध.; रि. इं.; प्रा. च. को.; भा. सा. इ.]

यथार्थदीपिका वामनपंडिताने भगवद्गीतेवर लिहिलेली टीका. ज्ञानेश्वरीनंतर गीतेवर एवढी प्रौढ अशी टीका वामनाचीच होय. मराठी भाषेतील हा ग्रंथ ओवीबद्ध असून, त्यातील ओव्यांची संख्या २२,२६२ एवढी आहे. हा ग्रंथ लिहिल्याला जवळ जवळ पावणेतीनशे वर्षांचा काळ उलटून गेला आहे. पण सर्वसाधारण लोकांना या ग्रंथाविषयी फारच थोडी माहिती असते. हा महत्त्वाचा ग्रंथ एवढा दुर्लक्षित राहिला, त्याचे एक प्रमुख कारण असे, की वामनपंडिताने स्वतः एखादा स्वतंत्र संप्रदाय स्थापन केला नाही किंवा एखाद्या प्रचलित संप्रदायाचा पाठिंबाही मिळवला नाही. त्याचबरोबर आणखी कारण असे, की प्रस्तुत ग्रंथात वेदान्तातील विविध सिद्धान्तांची सूक्ष्म व शास्त्रीय चिकित्सा असल्यामुळे सर्वसामान्य वाचकाला त्याचे मर्म सुलभपणे आकलन होत नाही.

टीका लिहायला आरंभ करण्यापूर्वी वामनपंडिताने एक विस्तृत प्रास्ताविक लिहिले असून, त्यात आपण ही टीका लिहायला का प्रवृत्त झालो, ते सांगितले आहे. प्रास्ताविकातच भगवान श्रीकृष्ण व आपले गुरू सच्चिदानंदयती यांना त्याने नमन केले आहे. गीतेचे विशेष सिद्धान्त म्हणून जे वामनपंडिताने सांगितले आहेत, त्यांचा पुरस्कार करून कोणीही गीतार्थ सांगितला नाही, असे तो म्हणतो. कोणी शब्दज्ञानी जड निषेधानेच चैतन्य जाणून कृतार्थता मानतात, तर कोणी ज्ञान प्राप्त झाल्यानंतर सगुण भक्तीकडे दुर्लक्ष करतात; कोणी केवळ निर्गुण निराकाराचीच उपासना प्रतिपादतात, तर कोणी केवळ अद्वैतच सांगतात, असे म्हणून गीतार्थ सांगणाऱ्या निरनिराळ्या टीकाकारांबद्दल तो आपले असमाधान व्यक्त करतो. म्हणून इतरांनी न सांगितलेला गीतार्थ प्रगट करावा, अशी आपली भूमिका असल्याचे तो पुढील ओव्यांत सांगतो –

या कारणें जी भगवंता। यथास्थित हे तुझी गीता।
वाखाणावी म्हणोनि होता। बहुतकाळ संकल्प ।।
आणि तुझ्या कृपेचे विभागी। शिष्य संत भक्त योगी।
ते म्हणती कीं जगदुपयोगी। ऐसी टिका करावी ।।
(य. दी. १३१–३२)

गीतेच्या इतर टीकाकारांनी केलेले सिद्धान्त कसे चुकीचे आहेत, ते दाखवावे आणि आपल्या मते गीतेत कोणते सिद्धान्त सांगितले आहेत, ते विशद करावे, अशा दुहेरी हेतूने तो या ग्रंथरचनेला प्रवृत्त झाला आहे.

टीका उदंड झाल्या। परि देवतांस सदुपासकांस म्याल्या।
यथार्थ अर्थ नाही बोलिल्या। तैसी नव्हे ही टीका ।।
म्हणोनी यथार्थदीपिका। नांव पावली हे टीका।
कीं अद्वैत आणि भजावें एका। श्रीवत्सांका जगद्गुरु ते ।।

आपली ही टीका कदाचित लोकांना आवडणार नाही, असेही त्याला वाटत होते. पण ' वाचोत जे वाचिती। न वाचोत जे वाईट मानिती ' अशी त्याने निरपेक्ष भूमिका घेतली आहे.

आपल्या टीकेत श्लोकातील प्रत्येक पदाचा अर्थ आणि श्लोकातील इतर पदांशी असलेला त्यांचा संबंध तो स्पष्ट करतो. गीतेत असे कित्येक शब्द आढळतात, की जे संदिग्ध स्वरूपाचे आहेत. टीकाकाराने अशा शब्दांचे अर्थ स्पष्ट करणे आवश्यक असते. वामनाने हे काम मोठ्या कसोशीने पार पाडले आहे. कर्म, यज्ञ, माया, ब्रह्म, इ. शब्दांचे वामनाने केलेले स्पष्टीकरण या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. या जगात कोणी मनुष्य क्षणभरही कर्म न करता राहू शकत नाही, असे भगवंतांनी म्हटले आहे (गी. ३.५). वामनाने मोठ्या वक्तृत्वपूर्ण भाषेत भगवंताचा हा सिद्धान्त विशद केला आहे. तो म्हणतो –

भूचर टाकूनि भूमि। म्हणे, पळोन जाईन मी।
पळतां पुढें रिकामी। भूमीच दिसे ।।
गगन टाकूनि पक्षी। उडों लागला अंतरिक्षीं।
तों ते सर्वत्र लक्षी। तेंचि गगन ।।
याकारणें कोणी। कांहीं न करूनि कोणे क्षणीं।
असो शकेल, हे वाणी। सर्वथा मिथ्या ।।

गीतेचा यथार्थ अर्थ प्रगट करण्यासाठी आपण ही टीका लिहीत आहो, याचे विस्मरण वामनपंडिताला कधीही झालेले नाही. त्यामुळे आपल्याला अभिप्रेत असलेला अर्थ स्पष्ट केल्यानंतर त्यावर कोणते आक्षेप येण्याची शक्यता आहे, त्याचाही विचार करून, त्या आक्षेपांचे निरसनही तो लगेच करतो. त्याचप्रमाणे आपण लावलेल्या अर्थाहून निराळा अर्थ जर कोणी लावला असेल, तर त्याचाही परामर्श तो आपल्या टीकेत घेतो. सगुणपर अर्थ लावताना निर्गुणपर अर्थाचे खंडन करणे किंवा ज्ञानी भक्ताचे विवेचन चालू असता केवळ ज्ञानपर अशा अर्थाचे खंडन करणे, हा भाग त्याच्या टीकेत सर्वत्र आढळतो. अशा प्रकारे, या ग्रंथाचे स्वरूप खंडनमंडनात्मक झाले आहे.

वामनपंडिताचा तत्त्वज्ञानाचा व्यासंग सखोल होता. यथार्थदीपिकेच्या विवेचनात तो जागोजाग दिसतो. तसेच जे प्रमेय मांडायचे असेल, त्याचे तर्कशुद्ध विवेचन त्याच्या रचनेत आढळते.

बारीकसारीक विचार मांडतानाही तो गीतेच्या श्लोकाच्या आधारेच मांडायचा, हा नियम त्याने आपल्या ग्रंथात सर्वत्र पाळला आहे.

आता हे यथार्थदीपिका। यथार्थ गीतार्थ त्याची दीपिका।
कलियुगतमांत प्रकाशिका। गीतार्थाची प्रगटली।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भीड कोणाची नाही । विरुद्ध अर्थ नावडे कांही ।
संमत वेदां आणि व्यासरविकांही । मूलग्रंथकारातें तें बोलणे ।।

असे उद्गार त्याने अकराव्या अध्यायावरील टीकेच्या अखेरीस काढले आहेत.

ज्या ठिकाणी केवळ वर्णनच करायचे आहे आणि जिथे तत्त्वज्ञानाचा भाग फारसा नाही, तिथे वामनपंडित आपल्या टीकेचा संकोच करतो. पण जिथे तत्त्वज्ञानाचा भाग येतो, तिथे मात्र तो विस्ताराने विवेचन करतो. सगुण ज्ञान, सगुण भक्ती, सगुण ब्रह्म, ऐश्वर योग, चित्तचैतन्य योग, इ. विषयांचे विवेचन त्याने विस्ताराने केले आहे.

गीतेवर टीका लिहिताना वामनपंडिताने पूर्वसूरींचे व पूर्वी होऊन गेलेल्या टीकाकारांचे अनेक विचार घेतले असण्याची शक्यता आहे. पण त्याने काही नवीन सिद्धान्तही मांडले आहेत. सगुण ज्ञान, त्याचे स्वरूप, सगुण ज्ञानाची अद्वैताशी व भक्तीशी घातलेली सांगड आणि हे सगुण ज्ञान गीतेत श्रेष्ठत्वाने वर्णिले आहे, हा त्याचा सिद्धान्त हे सर्व त्याचे स्वतंत्र आहे. गीतेतील ज्ञान स्पष्ट करीत असताना व्यतिरेक व अन्वय यांच्या परिभाषेची योजना वामनाने व्यापक प्रमाणावर केली आहे. अन्वय योग व व्यतिरेक योग हे योगाचे दोन प्रकार त्याने एकटचानेच सांगितले आहेत. ऐश्वर योगाचा त्याने केलेला अर्थ दुसऱ्या कोणीही केलेला नाही. निर्गुण व सगुण यांचे तात्त्विक स्वरूप, साक्षी व अनंत असे निराकार सगुण, अनादी शुद्ध माया व तिचे उदय–लय, अभोक्ता कूटस्थ व भोक्ता चिदंश, इ. आध्यात्मिक विषयांवर वामनाचे विवेचन मूलगामी व स्वतंत्र आहे. त्याच्या ग्रंथात त्याच्या स्वतंत्र बुद्धीचा विलास सर्वत्र पाहायला मिळतो.

अन्वय व व्यतिरेक म्हणजे काय, ते त्याने थोडक्यात स्पष्ट केले आहे, ते असे–

एकावेगळे एक । पाहणे याचे नाव व्यतिरेक ।
जैसे दूध आणि उदक । हंस करिती दो ठायीं ।।
दूध उदक मिळवणें । दोन्हींस एकत्र करणें ।
हे तो अन्वयाची खूण । लोकरीती ।।

ऐश्वर योग म्हणजे काय, ते त्याने स्पष्ट केले आहे, ते असे–

अर्जुना, जो भास दिसतो । माझा योग म्हणोनि पाहे सर्व तो ।
आणि योगहि तो म्हणिजेतो । ऐश्वर म्हणोनी ।।
नसोनि दिसती रूपें नाना । अघटित म्हणावी हे घटना ।
अघटित घटनेस अर्जुना । योग म्हणोनी बोलावे ।।

निर्गुणोपासनेपेक्षा सगुणभजन श्रेष्ठ होय, असा गीतेंचा सिद्धान्त असल्याचे वामनाने म्हटले आहे. जे केवळ निर्गुणवादी आहेत, त्यांना ही गीता कळणार नाही, असे तो मानतो–

अरे, वांझ व्यालीची वेदना । नेणे आणि पुत्राचिया आलिंगना ।
निर्गुणवादियांस कळेना । गीताव्याख्यान आणि प्राप्तिसुख ।।
भक्तीहूनी ज्यांची रचना । अधिक बोले निर्गुणोपासना ।
त्यास हा गीतार्थ अनुभव आकळेना ।
काय जाळावे तयांचे पांडित्य ।।

या सर्व गोष्टी ध्यानात घेता वामनपंडितांची यथार्थदीपिका ही गीतेतील तत्त्वज्ञानाची मांडणी करून दाखवणारी स्वतंत्र रचना आहे, असे निर्विवादपणे म्हणता येते. [वामनपंडितांची यथार्थदीपिका–श्री. वि. रा. करंदीकर, १९६३]

यदुमाणिक (इ. स. चे १८ वे शतक) एक गणेशोपासक. हा मूळचा नेवाशाचा असून, म्हाळसा ही त्याची कुलस्वामिनी होती. अजंटयाजवळच्या रुद्रेश्वर येथे त्याने गणेशाची उपासना केली आणि आपल्या तपोबलाने गणेशाला प्रसन्न करून घेतले. त्याच्या नावातील माणिक हा शब्द म्हणजे वेरूळच्या कैलास लेण्यातील माणिकेश्वर याच्या नावाचे लघुरूप आहे.

रुद्रेश्वर हे स्थान अजंटयाच्या लेण्यापासून आठ मैलांवर पश्चिमेला डोंगराच्या मध्यावर आहे. हे स्थान डोंगरात खोदलेले असून, तिथे चार-पाच फूट रुंद आणि सहा-सात फूट उंच अशी गणेशाची भव्य मूर्ती आहे.

यदुमाणिक हा नाथपरंपरेतील असून, त्याला मध्वमुनीश्वरांची प्रेरणा लाभली होती. यदुमाणिकाने सेंदूरवाडचाचे माहात्म्य वर्णन करणारा एक ग्रंथ रचला आहे. हा ग्रंथ म्हणजे गणेशपुराणाच्या क्रीडाखंडातील सिंदूराख्यान व गणेशगीता या भागांवर लिहिलेली संजीविनी नामक टीका आहे. या टीकेचे एकूण १३ अध्याय असून, त्यांतील ओवीसंख्या १७५१ एवढी आहे. तिच्यातील कथाकथन ठसठशीत आहे. ग्रंथाच्या प्रारंभी गणेशवंदन करताना यदुमाणिकाने गणेशाचा महिमा वेगळ्या रीतीने गायिला आहे. त्यापैकी काही ओव्या अशा –

जेव्हां तमोगुणें शीवशंकरें । त्रिपुरासुर मर्दिला करें ।
तेव्हा तुज नमिलें आदरें । प्रेमभरें गणेश्वरा ।।
जेव्हा सत्त्वगुण वनमाळी । तेणें बळी घातला पाताळीं ।
तुज नमस्कारिले ते काळीं । सुरमंडळी केली स्थिर ।।
जेव्हां रजोगुण चतुरानन । करिता जाला जी सृष्टि निर्माण ।
तेव्हां आधीं केलें तुझें स्मरण । तूं निर्विघ्न विघ्नहर्ता ।।

तेराव्या अध्यायात कलिवर्णन करताना यदुमाणिकाने स्वकालीन दुर्दशेचे आणि समाजजीवनावरील मुसलमानी प्रभावाचे चित्रण केले आहे. ताम्रांचे किंवा म्लेच्छांचे अभ्युत्थान हे त्याच्या मते कलीचे प्रमुख वैशिष्टय असून, गणेश शस्त्रसिद्ध होऊन कलीचे विध्वंसन करील आणि पृथ्वीवर पुनश्च कृतयुग अवतरेल,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशी भविष्यवाणी त्याने ग्रंथाच्या अखेरीस वर्तविली आहे.

ही टीका त्याने खड्गपूर्णेच्या काठी येळूर (वेरूळ) प्रांतात नागापूर येथे इ. स. १७२५ मध्ये पूर्ण केली. [विविधा.]

यदू (१) ऋग्वेदातील प्रसिद्ध पंचजनांपैकी एक जन. या जनाच्या राजाचे नाव यदूच होते. यदू व तुर्वश या दोन जनांचा एकत्र निर्देश ऋग्वेदात वारंवार आला आहे. त्या दोघांचा घनिष्ठ संबंध असावा. भरतांशी त्यांचे शत्रुत्व होते. दाशराज्ञ युद्धात हे भरतांचा राजा सुदास याच्याशी लढले. हे इंद्राचे उपासक होते. इंद्राने यांना संकटातून वाचवले होते. इंद्राने यदु तुर्वशांना सुदासाच्या ताब्यात द्यावे, अशी प्रार्थना वसिष्ठाने केली आहे (ऋ. ७. १९. ८). आणि इंद्राने तसे केले आहे (ऋ. ९. ६१. २). कालांतराने यदुतुर्वश हे सुदासाचे मित्र झाले, असे दिसते (ऋ. ६. २०. १२). यदूंचे वास्तव्य पंजाबच्या दक्षिण भागात होते. पाहा– तुर्वश. [प्रा. च. को.; वे. इं.]

(२) चंद्रवंशातील राजा ययाती व शुक्राचार्यांची कन्या देवयानी यांचा पुत्र. देवयानी ही ययातीची राणी व शर्मिष्ठा ही तिची दासी होती. पुढे ययातीने शर्मिष्ठेशी गांधर्वविवाह केला. देवयानीला ययातीपासून यदू व तुर्वसू हे दोन पुत्र झाले आणि शर्मिष्ठेला द्रुह्यू, अनू व पुरू हे तीन पुत्र झाले.

ययातीने शर्मिष्ठेशी विवाह केल्याचे कळताच देवयानी संतापली आणि पित्याकडे निघून गेली. तिची कथा ऐकून शुक्राचार्यांनाही क्रोध आला व त्याने ययातीला 'तुला अकाली वृद्धत्व प्राप्त होईल' असा शाप दिला. पण जावई वृद्ध होण्यात कन्येचेच अकल्याण आहे, हे ध्यानात घेऊन त्याने राजाला उःशाप दिला, की 'तू आपली जरा दुसऱ्या कोणालाही देऊ शकशील.'

मग ययातीने आपला पुत्र यदू याला आपले वृद्धत्व स्वीकारण्याची विनंती केली. पण यदूने ते स्वीकारण्यास नकार दिला, तेव्हा ययातीने त्याला शाप दिला, की 'तुझी प्रजा (वंशज) राज्यहीन अवस्थेत राहील.'

ययातीचा सर्वांत कनिष्ठ पुत्र पुरू याने पित्याची जरा आनंदाने स्वीकारली. मग ययातीने त्याला 'माझे सर्व राज्य तुलाच मिळेल' असा आशीर्वाद दिला. त्यानंतर ययातीने एक सहस्र वर्षे राज्य केले, विविध सुखे भोगली व अतिशय कामविलासही केला. पण त्याची तृप्ती झाली नाही. शेवटी त्याला विरक्ती आली आणि त्याने पुरूकडून आपली जरा परत घेतली, त्याचे तारुण्य त्याला परत दिले, राज्यही दिले व तो वनवासाला गेला. मात्र त्याने आपल्या सर्व पुत्रांना राज्याचा थोडा थोडा भाग दिला. यदूला नैर्ऋत्येकडील प्रदेश मिळाला. त्यात चर्मण्वती (चंबळ), वेत्रवती (बेतवा) व शुक्तिमती या नद्यांची खोरी समाविष्ट होती.

या यदूच्या वंशजांनाच यादव म्हणतात. पुढे त्यांच्या अनेक शाखा झाल्या. [प्रा. च. को.; भगवान श्रीकृष्ण]

यब्-युम् बौद्ध साहित्यातील एक पारिभाषिक संज्ञा. हा तिबेटी शब्द आहे. यब् म्हणजे पूज्य पिता आणि युम् म्हणजे पूज्य माता होय. यावरून या संयुक्त शब्दाचा अर्थ मातेसह पिता असा होतो. ही युग्ममूर्ती आहे. युम् ही यब्च्या आलिंगनात असते. वज्रसत्त्व व वज्रधर हे बौद्ध देव अनेकदा यब्–युम् अवस्थेत असतात. वज्रधर आसनमांडी घालून बसलेला असतो आणि त्याची शक्ती (स्त्री) त्याच्या मांडीवर बसून त्याच्या कमरेला आपल्या पायाचा आणि गळ्याला हाताचा विळखा घालून असते. वज्रधराने तिला दोन्ही हातांनी कवटाळलेले असते. कधी या दोघांची मुखे विलग असतात, तर कधी चुंबनाच्या अवस्थेत असतात. [इं. बु. इ.; तां. बौ. सा. सा.]

यम (१) एक वैदिक देवता. ऋग्वेदाच्या चार सूक्तांत यमाचे वर्णन असून, ५० वेळा त्याचा उल्लेख आहे. यम ही पर्जन्यसमूहातली देवता मानलेली आहे. हा विवस्वानाचा पुत्र असून, त्वष्टाची मुलगी सरण्यू ही त्याची आई होय (ऋ. १०.१४.५; १०.१७.५). यम हा साक्षात मृत्यू आहे. 'तस्मै यमाय नमो अस्तु मृत्यवे' = मृत्यूरूप अशा त्या यमाला नमस्कार असो, असे ऋग्वेदात म्हटले आहे. (ऋ. १०.१६५.४).

यमाचे सामर्थ्य व कार्य सांगणाऱ्या अनेक ऋचा ऋग्वेदात आहेत, त्यांतील काही अशा–

यमो नो गातुं प्रथमो विवेद नैषा गव्यूतिरपभर्तवा उ ।
यत्रा नः पूर्वे पितरः परेयुरेना जज्ञानाः पथ्या अनु स्वाः ॥
(ऋ. १०. १४. २)

अर्थ – सर्वांत प्रमुख जो यम त्यालाच आमचा गमनमार्ग माहीत आहे. ज्या ठिकाणी आमचे पूर्वज परलोकी गेले, ज्या मार्गानुसार उत्पन्न झाले आणि जो मार्ग अनुसरले, ती आमची जागा कोणी हिरावून घेऊ शकणार नाही.

तिस्रो द्यावः सवितुर्द्वा उपस्थाँ एका यमस्य भुवने विराषाट् ॥
(ऋ. १.३५.६)

अर्थ – द्युलोकाचे एकंदर तीन भाग असून, त्यांपैकी दोन सूर्याकडे व तिसरा यमाकडे आहे.

अथा पितॄन्त्सुविदत्राँ उपेहि यमेन ये सधमादं मदन्ति ।
(ऋ. १०.१४.१०)

अर्थ – तिथे यमाच्या बरोबर पितर आनंदात राहतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अग्नी हा यमाचा प्रिय प्रतिनिधी आहे (ऋ. १०.२१.५). घुबड व कपोत हे त्याचे दूत आहेत (ऋ. १०.१६५.४). चार डोळ्यांचे दोन कुत्रे हे त्याच्या लोकातले रक्षक आहेत (ऋ. १०.१४.११). यम हा अग्नीचा शोधक आहे–

ऐच्छाम त्वा बहुधा जातवेदः प्रविष्टमग्ने अप्स्वोषधीषु ॥
तं त्वा यमो अचिकेच्चित्रभानो दशान्तरुष्यादतिरोचमानम् ॥
(ऋ. १०.५१.३)

अर्थ – हे सकलवस्तुज्ञात्या अग्ने, तू उदकात आणि औषधींत प्रवेश केला आहेस, असे समजल्याने पुष्कळ ठिकाणी आम्ही तुझा शोध केला. परंतु हे अद्भुतदीप्ते देवा, (तू कोणाला सापडला नाहीस; पण) आपल्या अगदी गूढ अशा दहा निवासस्थानां-मध्ये प्रज्वलित होताना तुला यमाने मात्र पाहिले.

यमाला एक जुळी बहीण असून, तिचे नाव यमी आहे. ऋग्वे-दात यम-यमीच्या संवादाचे एक सूक्त आहे (ऋ. १०.१०). त्यात यमी यमाला आपल्याशी संभोग करण्याबद्दल गळ घालते; पण सदर गोष्ट नैतिक दृष्ट्या निंद्य असल्याचे सांगून, यम तिला तिच्या कामनेपासून परावृत्त करतो.

ऋग्वेदात यमाला कुठेही देवता म्हटलेले नाही. पण अग्नी, मातरिश्वा, वरुण आणि बृहस्पती यांच्या बरोबर त्याचा उल्लेख झालेला असल्यामुळे यमही देवता आहे, असे सूचित होते. यम हा पिता, पितरांचा राजा, पहिला मर्त्य, मृतात्म्यांच्या मार्गाने जाणारा, मानवांना एकत्र करणारा, मार्गदर्शक आणि मार्गसंशो-धक आहे. यम आकाशाच्या अगदी दूरच्या भागात राहतो. तो उत्तम पालवीने डवरलेल्या वृक्षाखाली बसून सोमप्राशन करतो (ऋ. १०.१४.१.; १३५.१). ऋग्वेदातील बहुतेक ऋचांत पुण्य-वान लोकांचा राजा म्हणून यमाची आराधना केलेली आहे.

वेदोत्तरकालीन वाङ्मयात यमाचे हे स्वरूप बदलून, मृता-त्म्यांचा कठोर न्यायाधीश असे त्याचे स्वरूप बनले त्याचा व मृत्यूचा निकटचा संबंध आहे. तो मृत्यूचा बंधू आहे. तो पहिला यज्ञकर्ता आणि आपल्या संततीच्या हिताकरिता प्राणार्पण करणारा, स्वार्थत्यागी, आद्य मानव आहे. तो अमर असूनही त्याने यज्ञामध्ये आपल्या देहाची आहुती दिली (ऋ. १०.१३.४). या सर्व कृत्यांमुळे यमाला देवांचा देव असे श्रेष्ठपद प्राप्त झाले.

ऋग्वेदामधील यमासंबंधीच्या सर्व ऋचांचा अभ्यास करून यमाचे स्वरूप निश्चित करणाऱ्या विद्वानांमध्ये महत्त्वाचे मत-भेद निर्माण झाले आहेत. त्यांतले जे निसर्गवादी पंडित आहेत, त्यांनी यम हा मावळत्या सूर्याचे प्रतीक आणि यमाचा पिता विवस्वान हा उगवत्या सूर्याचे प्रतीक आहे, असे म्हटले आहे. यम सूर्यास्ताचा आणि यमी ही त्याची जुळी बहीण रात्रीचा प्रतिनीधी असल्याचेही काहींनी म्हटले आहे. सूर्य हा एक पक्षी आहे आणि पक्षी हेच सूर्याचे दूत आहेत. यमाचे दूतही घुबड व कपोत हे पक्षीच आहेत. देवत्ववादी पंडित यमाला देव समजतात व यम म्हणजे चंद्र असल्याचे सांगतात. अमावास्येला चंद्र नष्ट होतो; त्यावरून विवस्वान म्हणजे सूर्य आणि यम म्हणजे चंद्र असे त्यांचे मत आहे.

काही विद्वान यम हा मर्त्य मनुष्य होता, असे सांगतात. त्यांच्या मते यम व यमी हे मानवजातीचे आद्य जनक होत.

या तीन्हीपैकी पहिल्या दोन मतांचे निर्णायकत्व अमान्य करून, यमाच्या स्वरूपाची कसकशी उत्क्रांती होत गेली, त्याचे विवेचन डॉ. रा. ना. दांडेकर यांनी केले आहे, ते असे –

अगदी प्रारंभी यमाला देव आणि अमर मानीत होते; पण त्याने मानववंशाच्या हिताकरिता अमरत्वाचा त्याग करून यज्ञामध्ये स्वतःची आहुती दिली, म्हणजेच त्याने स्वतःचा बळी देऊन प्रजा निर्माण केली.

सर्व देशांतील प्राचीन पौराणिक कथा अशा आहेत, की जगा-तला आद्य मानव स्त्री-पुरुष असा उभयस्वरूपी होता. पुरुष-सूक्तामध्येही तसेच वर्णन असून, मूळ पुरुषाने आपल्या स्वतः-मधून स्त्रीदेह निर्माण केला, असे सांगितले आहे. यम या शब्दाचा अर्थही जुळे असाच आहे.

आत्मैवेदमग्र आसीत् पुरुषविधः ...... स हैतावानास यथा स्त्रीपुमांसौ सम्परिष्वक्तौ ॥

अर्थ– प्रारंभी आत्मा हा पुरुषस्वरूप होता. तो असा होता, की जसे एकमेकांच्या मिठीत असलेले स्त्री–पुरुष. (बृहदा. १.४)

वरील उताऱ्याप्रमाणेच कठ(१३.७)आणि ऐ. ब्रा.(३.३३) यांतही असेच वर्णन आहे. यमाच्या उत्क्रांतीची ही पहिली अवस्था होय.

ऋग्वेदाच्या दहाव्या सूक्तातील यम-यमी संवादातून यमाच्या उत्क्रांतीतली दुसरी अवस्था सूचित होते. बहीणभावांचा समागम अनैतिक होय, या भावनेमुळे वैदिक ऋषींनी तसा तो झाला नाही, असे सुचवले आहे. तथापि वस्तुतः यम-यमी समा-गम झाला असावा आणि त्या आद्य मानव-युग्मापासूनच मानव-वंश उत्पन्न झाला असावा, असे अनुमान करता येते. त्यावरून यम हा आद्य मानव ठरतो.

वैदिक काळानंतर पौराणिक कथांचे युग सुरू झाले. त्यात मनू हा आद्य मानव आणि मानववंशाचा जनक मानला गेला. तो पहिला यज्ञकर्ता व पृथ्वीवरचा पहिला राजा झाला.

याप्रमाणे यमकथा आणि मनुकथा काही काळ दोन्ही प्रच-लित राहून, पुढे स्मृतिकारांनी व पुराणकारांनी मनूच्या कथेला प्राधान्य दिल्यामुळे यमकथा हळूहळू लोप पावली.

उत्क्रांतीची तिसरी व अखेरची अवस्था म्हणजे यम स्वर्गातला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजा झाला आणि मृतात्म्यांवर राज्य करू लागला. कालांतराने तो मृत्युदेव ठरला व त्याला भयानक स्वरूप प्राप्त झाले. यमाचे हेच स्वरूप उत्तरकालीन पुराणवाङ्मयामध्ये दिसून येते.

पौराणिक यम– पुराणांच्या मते यम हा विवस्वान (सूर्य) व संज्ञा यांचा पुत्र आहे. संज्ञेला विवस्वानाचे तेज सहन होत नसे, म्हणून ती तो समोर येताच डोळे मिटून घेई. त्या गोष्टीचा राग येऊन विवस्वानाने तिला शाप दिला, की 'तुझ्या पोटी प्रजासंहारक पुत्र जन्माला येईल.' तो पुत्र म्हणजेच मानवांच्या प्राणांचे हरण करणारा यम होय (मार्कं. पु. ७४.४). छाया नावाच्या सावत्र आईला त्याने एकदा लाथ मारली. त्याबद्दल तिने त्याला शाप दिला, की 'तुझा पाय लंगडा होईल.' तेव्हापासून यमाचा एक पाय लंगडा झाला. नंतर यमाला वैराग्य उत्पन्न होऊन त्याने तपश्चर्या केली. तेव्हा ब्रह्मदेवाने त्याला वर दिला, की 'तुला पितरांचे स्वामित्व मिळेल.' जगातल्या पाप-पुण्यावर नजर ठेवण्याचेही काम ब्रह्मदेवाने त्याच्याकडे सोपविले. याची नगरी मानसोत्तर पर्वतावर असून, संयमिनी असे तिचे नाव आहे. यमुना ही त्याची जुळी बहीण होय यमाचे नरकलोकावर स्वामित्व असून, तो पापी लोकांना त्यांच्या पापाला अनुसरून कमी-अधिक त्रासदायक अशा नरकात लोटतो. विदुर व युधिष्ठिर हे दोघे यमाचे अंशभूत मानले जातात.

बौद्ध यम – बौद्धमते यम ही मृत्यूची देवता असून, तो धर्मपाल आणि बोधिसत्त्व यांच्या श्रेणीचा आहे. तो षड्भुज असून, पाश, दंड व कुठार धारण करतो. यमी ही त्याची सेविका आहे. बौद्ध मूर्तिकलेत हृदयावर चक्राकृती अलंकार ही यमाला ओळखण्याची खूण होय.

हा पूर्वी वैशालीचा राजा होता. तो सदैव युद्धात गढलेला असे. त्याला वाटले, की आपण नरकाचा अधिपती व्हावे आणि पुढील जन्मी तो यम झाला.

बौद्ध धर्माच्या उत्तरकालात त्रिरत्नांपैकी धर्म या रत्नाशी यम अभिन्न मानला गेला. रामाई पंडिताच्या शून्य पुराणात यम व धर्म अभिन्न मानलेले आहेत. बौद्ध धर्माच्या धर्मसंप्रदाय नावाच्या एका उपसंप्रदायात यमाला खूप वरचे स्थान दिलेले आहे.

यममूर्ती – देवतामूर्तिप्रकरणम् या ग्रंथात यमाच्या मूर्तिध्यानाचा श्लोक दिला आहे, तो असा–

लेखनी पुस्तकं धत्ते कुक्कुटं दण्डमेव च ।
महामहिषमारूढः कृष्णाङ्गश्च यमो भवेत् ।।

अर्थ – हातात लेखणी व पुस्तक, तसेच कोंबडा व दंड धारण करणारा, मोठ्या रेड्यावर बसलेला व काळाकुट्ट असा यम निर्माण करावा.

यमाच्या मूर्तीविषयी विष्णुधर्मोत्तर पुराणात अधिक तपशीलवार वर्णन आहे, ते असे– तो चतुर्भुज व महिषवाहन असतो. धूम्रोर्णा ही त्याची पत्नी त्याच्या डाव्या मांडीवर बसलेली असते.



यममूर्ती–चालुक्य शिल्प

त्याच्या उजव्या दोन हातांत दंड व खड्ग आणि डाव्या दोन हातांत जळता त्रिशूळ व जपमाळ असते. दंडाच्या टोकावर एक ज्वालायुक्त मुख असते. चित्रगुप्त हा लेखणी व भूर्जपत्र घेऊन यमाच्या उजव्या बाजूला व उग्ररूप काल हातात पाश घेऊन डाव्या बाजूला उभा असतो.

पहाडपूर येथील मंदिराच्या चबुतऱ्यावर दक्षिणेकडच्या भिंतीत एक यमाची मूर्ती असून, ती द्विभुज आहे. चिदंबरम येथील यमही द्विभुजच असून, तो आपल्या वाहनासमोर उभा आहे. गुजरातमधील वडनगर गावातल्या हाटकेश्वरमंदिरात यम दिक्पाल म्हणून उभा आहे. हा त्रिभंग अवस्थेत आहे. तो चतुर्भुज असून, त्याच्या वरच्या हातात गदा व खालच्या हातात लेखणी आहे. डाव्या वरच्या हातात काठी असून, तिच्यावर कोंबड्यासारखा पक्षी बसलेला आहे. खालच्या डाव्या हातात पुस्तक आहे. डोक्यावर मुकुट, कानांत वाटोळी कर्णभूषणे,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गळघात हार, पायांत वाळे आणि पादत्राणे आहेत. त्याच्या दोन पायांच्या मध्ये त्याचे वाहन आहे. आणि त्याच्या दोन्ही अंगी दिडक्या पायावर दोन चामरधारिणी उभ्या आहेत. [प्रा. च. को.; व्हॉ. इं. इ. स्ट.; बी. सी. लॉ. को. व्हॉ.१; ऋ. द.; तां. बौ. सा. सा.; गॉ. नॉ. बु.; डे. हिं. इ.]

(२) राजयोगाच्या आठ अंगांपैकी पहिले अंग. ' अहिंसा-सत्यास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहा यमाः ' = अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह हे यम होत, असे पातंजल योगसूत्रात सांगितले आहे. साधकाला या यमांचे पालन करावे लागते. या यमांचे स्वरूप पुढीलप्रमाणे –

अहिंसा – शारीरिक, मानसिक व बौद्धिक अहिंसा पाळणे हा अत्यंत श्रेष्ठ धर्म आहे. मन, वाणी व कर्म या त्रयीने परक्याचे हित चिंतणे, कोणाचाही मत्सर न करणे व दुसऱ्याचे हित करण्यासाठी आपण स्वत: झिजणे, ही अहिंसा होय. आपल्या बसण्या-उठण्याने किंवा बोलण्याने आपण दुसऱ्याला दुखवणार नाही, अशी काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे. मानसिक अहिंसा ही सर्वांत श्रेष्ठ असून, ती पाळणे हे कायिक व वाचिक अहिंसेपेक्षा कठीण आहे. कायिक व वाचिक अहिंसेत मनात हिंसात्मक विचार आले तरी तदनुसार शरीराने आणि वाणीने व्यवहार न करणे, एवढा संयम पाळला म्हणजे पुरे. पण मनात हिंसात्मक विचारच येऊ न देणे, ही गोष्ट फार कठीण आहे. सर्वांचा प्रेरक अंतर्यामी एकच आहे. हे अनुसंधान ठेवून अंतःकरणात कोणाविषयीही द्वेष, मत्सर, क्रोध, इ. भावना उद्‌भवणार नाहीत, अशी मानसिक स्थिती राखणे, ही मानसिक अहिंसा होय.

सत्य – सत्यधर्माच्या पालनाचे महत्त्व सर्व श्रेष्ठ साधुसंतांनी वर्णिले आहे. सत्याचे पालन करणाऱ्या साधकाला इंद्रियातीत अशा आत्म्याचे ज्ञान होते. सत्यव्रताच्या अनुष्ठानाने वाचासिद्धीसारखी महान सिद्धी साधकाला प्राप्त होते, असे सिद्ध सांगतात.

अस्तेय – काया, वाचा आणि मन यांनी परद्रव्याच्या ठिकाणी निःस्पृह बुद्धी ठेवली, की हे व्रत साधते. चोरी न करणे म्हणजे अस्तेय. परक्याची वस्तू आपल्याला मिळावी अशी इच्छा झाली, तरी ती चोरीच होय. देहाचे धारण पोषण व वर्धन ही सृष्टि-नियोजित कार्ये नीट पार पाडावी म्हणून आपल्या जवळ असलेल्या संपत्तीचा न्याय्य उपभोग घेणे, हेही अस्तेयच आहे.

ब्रह्मचर्य – विषयाच्या सेवनात संयम पाळण, या व्रताला ब्रह्मचर्य असे नाव आहे. विषयवासनेतून माणसाचा जन्म होतो, विषयाच्या चिंतनात त्याचा जन्म जातो आणि शेवटी त्यातच त्याचा अंत होतो. विषय किंवा काम ही भावना अत्यंत प्रबळ असून, भल्याभल्यांना या प्रबळ भावनेच्या प्रचंड झंझावातात गिरक्या खाव्या लागतात. या व्रताचे पालन करणे फार कठीण आहे. विषयेच्छा वाढवणाऱ्या वस्तूंचा त्याग करून कायिक, वाचिक व मानसिक शुद्धता मिळवणे, हा या व्रताचा हेतू आहे. न्याय्य मार्गाने मिळणारे वैषयिक सुख संयमाने उपभोगले, की उपभोग घेणाऱ्या व्यक्तीच्या मनाला शांती मिळते. कामोपभोगात नित्य आसक्त राहणाऱ्या मनुष्याला उन्नतीची आशाच करायला नको. स्त्रीचे स्मरण करणे, तिचे वर्णन करणे, तिच्या बरोबर क्रीडा करणे, तिचे सतत अवलोकन करणे, तिच्याशी एकांतात भाषण करणे, तिला भेटण्याचा संकल्प करणे व त्याविषयी फार उत्साह असणे व प्रत्यक्ष भोग घेणे, या सर्व गोष्टी टाळल्या तरच ब्रह्मचर्यव्रताचे आचरण करता येऊ लागले, असे म्हणायला हरकत नाही. स्त्रीविषयक आकर्षणाला वावच मिळू नये, म्हणून काही साधक दूर एकांतात जाऊन योगसाधना करतात. योग्य आहार, मन प्रसन्न करणारा मर्यादित विहार, उच्च ध्येयाचे चिंतन, सत्संगती, भक्ती, विषयवासनेला उत्तेजन देणाऱ्या गोष्टींचा त्याग, इ. गोष्टींनी हे व्रत साध्य होऊ शकेल.

अपरिग्रह – शरीरधारणाला लागणाऱ्या आवश्यक साधनांपेक्षा अधिक साधनांचा संग्रह न करणे म्हणजे अपरिग्रह होय. आपण या ना त्या कारणाने अनेक वस्तूंचा संग्रह करीत असतो. त्यांतल्या बऱ्याचशा वस्तू आवश्यक असतातच असे नाही. पण आसक्तीने, लोभाने, हौसेने आपण त्या जमा करीतच असतो. सर्वसामान्य माणसांचे सोडा, पण कित्येक साधकही देवपूजेची विविध प्रकारची उपकरणी, अभिषेकपात्रे; स्फटिक, रुद्राक्ष, पोवळी, तुळशीकाष्ठ, इत्यादींच्या जपमाळा; हरीण, वाघ, सिंह यांची कातडी; आसने, समया, इ. वस्तू जमवतात. वस्तूंच्या संग्रहाने माणसाच्या मनात त्यांच्याविषयी आसक्ती उत्पन्न होते आणि चित्तात एकदा आसक्तीने ठाणे दिले, की उन्नती होणे कठीण जाते. म्हणून आसक्तीचे मूळ जो वस्तुसंग्रह तोच करण्याची हाव धरू नये. हा संग्रह अशाश्वत आहे, अशी जाणीव साधकाने नित्य ठेवावी. म्हणजे संग्रह करण्याची इच्छाच समूळ नाहीशी होईल. अपरिग्रहाची कास धरली नाही, तर सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, इ. व्रतांची साधना होणार नाही.

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह या यमांच्या मुळाशी संयम ही महत्त्वाची गोष्ट आहे. [भा. मा. शा.; योगविद्या]

यमघंटयोग मुहूर्तज्योतिषातील एक योग. वार आणि नक्षत्र यांच्या संयोगाने हा योग बनतो. याविषयीचा श्लोक असा –

मघार्कवारे शशिने विशाखा आर्द्रा कुजे चेन्दुसुते च मूलम् ।
वह्निर्गुरौ शुक्रदिने विधाता हस्तं.च सौरे यमघण्टयोगः ॥

अर्थ – रविवारी मघा, सोमवारी विशाखा, मंगळवारी आर्द्रा,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बुधवारी मूळ, गुरुवारी कृत्तिका, शुक्रवारी रोहिणी व शनिवारी हस्त नक्षत्र असता, त्याला यमघंटयोग असे म्हणतात.

हा अशुभ योग असून, या योगावर प्रयाण, गृहप्रवेश, देवता-स्थापना, इ. गोष्टी करू नयेत, असे सांगितले आहे. या योगावर जन्मलेल्या मुलाला फार क्लेश होतात, म्हणून त्यासाठी शांती करावी, असे सांगितले आहे. [पू. मा. प्र.; अ. बृ. ज्यो.; मु. चिं.]

यमचतुर्थी एक काम्य व्रत. ज्या चतुर्थीला शनिवार आणि भरणी नक्षत्र असेल, त्या दिवशी यमाची पूजा करावी, असे सांगितले आहे. हाच या व्रताचा प्रमुख विधी होय. फल-दीर्घायुष्यप्राप्ती व पापापासून मुक्ती. [हि. ध.]

यमतर्पण आश्विन कृष्ण चतुर्दशीच्या दिवशी यमाचे तर्पण करावे, असे सांगितले आहे. त्यासाठी प्रथम आघाड्याची पाने मस्तकावरून फिरवून स्नान करावे. नंतर यम, धर्मराज, मृत्यू, अंतक, वैवस्वत, काल, सर्वभूतक्षय, औदुंबर, दध्न, नील, परमेष्ठी, वृकोदर, चित्र व चित्रगुप्त या नावांचा द्वितीयान्त उच्चार करून तिलमिश्रित जलाने तर्पण करावे. ते दक्षिणाभिमुख होऊन देवतीर्थाने करावे. हे तर्पण जीवत्पितृकालाही विहित आहे. फल– पापनाश. [हि. ध.; नि. सिं.]

यमदीपदान एक काम्य व्रत. आश्विन वद्य त्रयोदशीला हे व्रत करतात. या दिवशी सायंकाळी घराबाहेर दीपदानाचा यथाविधि संकल्प करून, दीपाची व यमाची पूजा करतात. नंतर दीपदान करतात. फल– अपमृत्युनिरास. पाहा– दीपावली. [व्रतराज; हि. ध.]

यमदूत यम या मृत्यूदेवतेचे दूत. ते वर्णानें काळे असून, महाभयंकर दिसतात. त्यांचे डोळे लाल असतात. त्यांच्या हातांत एक त्रिशूळ, सोटा व अनेक पाश असतात. पापी माणसांचे आयुष्य संपल्यावर या आयुधांचा उपयोग करून ते त्यांना नरकात घेऊन जातात. आयुष्य संपण्यापूर्वी कोणाही व्यक्तीला स्पर्श करायची त्यांना परवानगी नसते. पुण्यवान लोकांना ते कधीच स्पर्श करू शकत नाहीत. जेव्हा एखादा मनुष्य पुण्यवान आहे का पापी, याबद्दल देवांत एकमत होत नाही, तेव्हा शिवदूत, विष्णुदूत व यमदूत हे आपसांत भांडतात व जे विजयी होतात, ते त्या माणसाचा आत्मा घेऊन जातात. अजामिळ हा परम वैष्णव असल्यामुळे, तो मृत्यू पावल्यावर विष्णुदूत त्याला वैकुंठात नेण्यासाठी आले. त्याच वेळी यमदूतही तिथे आले. अजामिळाने ब्राह्मणधर्माचा त्याग करून एका दासीबरोबर आयुष्य घालविले होते. त्यामुळे तो दुराचारी आहे, असे यमदूतांचे म्हणणे पडले. पण विष्णुदूतांना ते मान्य नव्हते. विष्णुदूतांपुढे यमदूतांचा निभाव लागला नाही आणि त्यांना तसेच परत फिरावे लागले. [सा. इं. गॉ.; पु. इं.; श. क.]

यमद्वितीया कार्तिक शुद्ध द्वितीयेला हे नाव आहे. हा दिवस भाऊबीज या नावानेही प्रसिद्ध आहे. या दिवशी यम आपली बहीण यमुना हिच्या घरी जेवायला गेला, म्हणून या दिवसाला यमद्वितीया असे नाव मिळाले. या दिवशी कोणत्याही पुरुषाने स्वतःच्या घरी पत्नीच्या हातचे अन्न घ्यायचे नसते. त्याने बहिणीच्या घरी जावें आणि तिला वस्त्रालंकार वगैरे देऊन तिच्या घरी भोजन करावे; सख्खी बहीण नसेल, तर कोणत्याही बहिणीकडे किंवा अन्य कोणत्याही स्त्रीला भगिनी मानून तिच्याकडे जेवावे, असे सांगितले आहे.

भाऊबीजेसंबंधी अनेक कथा प्रचलित आहेत, त्यांतील दोन कथा पुढीलप्रमाणे –

(१) एक दिवस यमाने आपल्या दूतांना आज्ञा केली, की ज्याला आजवर कोणीही शिवी दिली नाही, अशा माणसाला घेऊन या. यमदूत अशा व्यक्तीचा शोध घेत पृथ्वीवर फिरू लागले. एका बहिणीला ही बातमी कळली. तिच्या भावाला आजवर कोणीही शिवी दिली नाही, हे तिला माहीत होते. मग ती आपल्या भावाच्या संरक्षणासाठी त्याला शिव्या देत रस्तोरस्ती फिरली व त्याच्या घरी गेली. तिच्या माहेरच्या माणसांना वाटले, की हिला वेड लागले असावे. पण तिने वस्तुस्थिती सांगताच सर्वांनी तिचे कौतुक केले. मग भावाने बहिणीला ओवाळणी घातली. तो दिवस कार्तिक शुद्ध द्वितीयेचा होता. त्या दिवसापासून भाऊबीजेचा सण सुरू झाला.

(२) या दिवशी यमराज आपली बहीण यमुना हिच्या घरी जेवायला जातो व त्या दिवशी नरकात पिचत पडलेल्या जीवांना त्या दिवसापुरते मोकळे करतो.

यमद्वितीया हे एक व्रतही आहे. यात यमधर्म, यमदूत, यमुना, चित्रगुप्त, मार्कंडेय आणि पितर यांचे पूजन करायचे असते. श्रावण, भाद्रपद, आश्विन व कार्तिक महिन्यांतील शुद्ध द्वितीयांना अनुक्रमे चुलतबहीण, मामेबहीण, आते-मावसबहीण आणि सख्खी-बहीण यांच्या हातचे अन्न घ्यायचे असते.

उत्तर प्रदेशातील स्त्रिया त्या दिवशी दारावर कावेने भाऊ-भावजयींच्या प्रतिमा काढून त्यांची पूजा करतात. मग बाहेर अंगणात शेणाने चौकोन सारवून त्याच्या चारही कोनांवर चार व मध्ये एक अशा पाच शेणाच्या बाहुल्या मांडतात. त्यांच्या पुढे जाते, मडके, चुल, इ. वस्तू शेणाच्याच करून ठेवतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मग त्यांची पूजा करतात. त्यानंतर पूजा करणारी स्त्री मुसळ जमिनीवर आपटून म्हणते, की जो कोणी माझ्या भावाचा द्वेष, मत्सर करील, त्याचे तोंड मी मुसळाने फोडीन.

व्रजमंडलात हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. त्या दिवशी यमुनेत स्नान करणे पुण्यकारक मानतात. त्यासाठी इथे लाखांच्या संख्येने यात्रा भरते. इथला हा स्नानोत्सव सर्वांत मोठा उत्सव होय. या दिवशी यमुनेबरोबर यमाचीही पूजा होते. पाहा– भाऊ-बहीण. [नि. सि.; आ. स. प्रा. अ. इ.; हिं. व्र. प. त्यौ.; व्र. सां. इ.; भा. व्र.]

यमद्वीप जम्बुद्वीपाचा एक भाग. येथे द्युतिमत पर्वत असल्याचे वामन पुराणात (४८. १४, १९) म्हटले आहे. या पर्वतातून अनेक नद्या उगम पावतात. या द्वीपात सोन्याच्या खाणीही आहेत.

पौर्वात्य व पाश्चात्य पंडितांच्या मतांचा अभ्यास करून यमद्वीपाच्या स्थानाबद्दल श्री. एस्. मुझफर अली म्हणतात, की यमद्वीप म्हणजे सुमात्रा हे द्वीपच असावे. चिनी कथनानुसार श्रीविजय राजांनी इथे राज्य केले होते. [जॉ. पु.; श्री. ओमप्रकाश-पुराणम्, जुलै १९६५]

यमधर्ममंत्र 'ॐ क्रों ऱ्हीं आं वैं वैवस्वताय धर्मराजाय भक्तानुग्रहकृते नमः' असा चोवीस-अक्षरी मंत्र यमधर्ममंत्र म्हणून सांगितलेला आहे. या मंत्रातील क्रमाने तीन, दोन, पाच, पाच, सात व दोन अक्षरे प्रणवपूर्वक घेऊन होणाऱ्या मंत्राने षडंगन्यास केल्यावर यमधर्माचे समंत्रक ध्यान करतात. हा सिद्धमंत्र आहे. त्याने सर्व आपत्तींचे निवारण होते, नरकप्राप्ती टळते व शत्रूचे भय नष्ट होते, असे म्हटले आहे. [मं. म.]

यमधार दुहेरी धारेची वजनदार तलवार. प्राचीन काळी बंगालमध्ये ही फार लोकप्रिय होती. सैनिक आपल्या कमरपट्ट्याच्या उजव्या बाजूला ती खोचून ठेवीत असत.

यमन हिंदुस्थानी संगीतातील एक राग. याचे आरोह–अवरोह सातही स्वरांनी होतात. याचा वादी स्वर ऋषभ असला, तरी कोणी कोणी तो गंधार किंवा पंचमही मानतात. याचा संवादी स्वर निषाद आहे. याची प्रकृती सौम्य, गंभीर व श्रद्धाशील आहे. तथापि नर्मशृंगारही त्याला मानवतो. गानसमय– रात्रीचा पहिला प्रहर. यात थोड्या प्रमाणात कोमल मध्यमाचा प्रयोग केल्यास, तो यमनकल्याण होतो. स्वरक्रमात वक्रता नसल्यामुळे हा राग रंजक वाटतो. [क. सं.; सु. वि. को.]

यमलजननशांती पत्नी, दासी, गाय किंवा घोडी यांना जुळे झाल्यास, ते अनिष्टकारक मानतात व त्यासाठी शांती करतात. तिला यमलजननशांती असे नाव आहे.

यजमान आहिताग्नी असल्यास त्याने मरुत देवतेसाठी तेरा कपालांवर भाजलेल्या पुरोडाशाचा याग करावा, असे मैत्रायणी संहितेत सांगितले आहे. इष्टीची देवता मरुत्वन्त अग्नी घ्यावी, असे ऐतरेय ब्राह्मणात (७·९) म्हटले आहे. इष्टीचा विधी दर्शपूर्णमासाप्रमाणे करावा. इष्टी करणे शक्य नसल्यास प्रधानदेवतेसाठी पूर्णाहुती द्यावी. गृह्याग्नी असेल तर स्थालीपाक करावा. आणि तो नसेल तर प्रायश्चित्त करावे. या शांतीचा विधी असा–

आठ दिशांना आठ कलश मांडून त्यावर वरुणाची पूजा करावी. नंतर सर्व कलशांतून जल घेऊन यजमान, बालक व पत्नी यांना अभिषेक करावा. मग अग्निस्थापना करून ग्रहांचे स्थापन व पूजन करावे. प्रधानहोम केल्यावर आप, इंद्र, वरुण व अग्नी यांच्यासाठी आज्याच्या आहुती द्याव्या. अग्नी, सोम पवमान, पावक मरुत, यम व मृत्यू या देवतांना चरूच्या आहुती द्याव्या. ग्रहांना समिधा, चरू व तूप यांच्या आहुती द्याव्या आणि बलिदान व पूर्णाहुती करून कृत्य समाप्त करावे.

सत्याषाढ गृह्यशेषसूत्रात (१·१८) या शांतीचा विधी निराळाच सांगितला आहे, तो असा– अश्विनी देवतांच्या दोन सुवर्णप्रतिमा कराव्या. तांबड्या वस्त्रावर तांदळांचे स्वस्तिक तयार करून त्यावर देवतेची स्थापना करावी. मग तिची यथाविधि पूजा करावी. अग्निस्थापना करून प्रधानहोमापर्यंतचे कर्म अग्निमुखाप्रमाणे करावे. अश्विनींच्यासाठी आज्यमिश्रित पायसाच्या एक हजार आठ आहुती द्याव्या. आचार्याला सुवर्णप्रतिमा दान द्याव्या. शेवटी यजमानाला आणि कुटुंबियांना अभिषेक करून विधी समाप्त करावा. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

यमव्रत एक काम्य व्रत. कार्तिक वद्य चतुर्दशीला हे व्रत करतात. त्याचा विधी असा– यम, धर्मराज, चित्रगुप्त, मृत्यू, अंतक, वैवस्वत, काल, सर्वभूतक्षय, इ. यमाच्या नावांनी यमतर्पण करावे आणि तिळांनी भरलेले एक भांडे, त्यात सोने घालून ब्राह्मणाला दान द्यावे. फल–मरणाचे दुःख नष्ट होते. या व्रताचे आणखीही काही पर्याय आहेत. [हिं. ध.]

यमस्मृती एक स्मृतिग्रंथ. याज्ञवल्क्याने दिलेल्या धर्मशास्त्रकारांच्या यादीत यमाचे नाव आहे. या स्मृतीत प्रायश्चित व शुद्धी यांविषयी श्लोक आहेत. दुसरी एक यमस्मृती ९९ श्लोकांची उपलब्ध आहेत. तिच्यामध्ये प्रायश्चित, श्राद्ध व शुद्धी हे विषय आहेत. लग्न झाल्यावर मुलगी आपल्या पतीच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गोत्रात जाते, हे सांगताना यमाने पुढील श्लोक लिहिला आहे –

स्वगोत्राद् भ्रश्यते नारी विवाहात् सप्तमे पदे ।
स्वामिगोत्रेण कर्तव्यास्तस्याः पिण्डोदकक्रियाः ।।

अर्थ – विवाह समारंभात सप्तपदी झाली, की स्त्री स्वगोत्रापासून च्युत होते. नंतर तिच्या पिंडोदकक्रिया पतीच्या गोत्राला अनुसरून कराव्या.

राजाने न्याय कसा द्यावा यासंबंधी यम म्हणतो –

राजा मन्त्रिसहायस्तु द्वयोर्विवदमानयोः ।
सम्यक् कार्याण्यवेक्षेत रागद्वेषविवर्जितः ।।

अर्थ – दोन पक्ष विवाद करीत असता, राजाने रागद्वेषर्वजित होऊन मंत्र्याच्या मदतीने काळजीपूर्वक व निःपक्षपातीपणे निर्णय द्यावा.

बलात्काराने केलेल्या एखाद्या गोष्टीबद्दल मनूचा हवाला देऊन यम म्हणतो –

बलाद्दत्तं बलाद् भुक्तं बलाद्यच्चापि लेखितम् ।
सर्वान् बलकृतानर्थान् निर्वर्त्यानाह वै मनुः ।।

अर्थ – बलात्काराने देवविलेले दान, बलात्काराने भोगलेले द्रव्य, बलात्काराने केलेला लेख, या सर्व गोष्टी ज्याच्या त्याला परत कराव्या, असे मनू सांगतो.

यमाने सांगितलेल्या आणखी काही गोष्टी अशा –

मनुष्याने स्वतःचा प्राण कोणत्याही बऱ्यावाईट उपायाने राखावा. जे इसम विष घालतात, आगी लावतात, चोऱ्या करतात, मनुष्यवध करतात किंवा या अपराधांना साहाय्य करतात, त्यांना सर्वात मोठी म्हणजे वधाची शिक्षा द्यावी. ब्राह्मणाला मात्र वरील गुन्ह्यासाठी वधदंड देऊ नये; तर त्याला सश्रम कारावासाची शिक्षा द्यावी. आसुर पद्धतीने विवाह झालेल्या स्त्रीचे स्त्रीधन, ती स्त्री निपुत्रिक मरण पावल्यास, तिच्या पित्याला हक्काने मिळावे. जो पुरुष आपल्या जातीच्या स्त्रीशी व्यभिचार करील त्याला पाच कृष्णल (एक नाणे) दंड करावा आणि जो खालच्या जातीच्या स्त्रीशी व्यभिचार करील, त्याला बारा पण दंड करावा. जो ऋणको मनुष्य ऐपत असून कर्जाची फेड करीत नसेल, त्याला कर्जाऊ रकमेच्या दुप्पट दंड करावा. जो इसम मनाई केलेल्या तलावाचे पाणी अन्यायाने घेईल किंवा त्या पाण्याच्या प्रवाहामध्ये बिघाड करील किंवा त्या तलावाचा उच्छेद करील, त्याला कडक शासन करावे. स्त्रियांनी संन्यासदीक्षा घेऊ नये. त्यांचा खरा धर्म हा, की त्यांनी सवर्ण वराशी विवाह करून अपत्योत्पादन करावे.

अपरार्काने याज्ञवल्क्य-स्मृतीवरील टीकेत (३.१०९)यमाचे पाच श्लोक दिले आहेत. त्या श्लोकांत सांख्य दर्शनातील २६ तत्त्वे दिली आहेत. यम म्हणतो, की २६ वे तत्त्व पुरुषोत्तम हे असून, ज्याला ही सर्व तत्त्वे चांगल्या प्रकारे कळतील, तो कोणत्याही आश्रमात असला, तरी अंती सर्वश्रेष्ठ अशा विष्णुलोकाला जाईल.

याशिवाय वृहद् यमस्मृती नावाचा एक पाच अध्यायांचा ग्रंथ असून, त्यात १८२ श्लोक आहेत. लघुयम व स्वल्पयम असेही स्मृतिग्रंथ होते. ते सांप्रत उपलब्ध नाहीत; पण धर्मशास्त्रकारांनी त्यांतील उतारे दिलेले आहेत. [हि. व.]

यमाई दुर्गेचे एक रूप. हिच्याविषयी एक दंतकथा सांगतात, ती अशी – राम वनवासात असताना रावणाने सीतेचे हरण केले. त्या वेळी रामाला शोक अनावर होऊन तो 'सीते, सीते' असे आक्रंदन करू लागला. मग आदिमाया पार्वती सीतारूप धारण करून त्याच्या पुढे आली. पण रामाने तशाही स्थितीत पार्वतीला ओळखले व म्हटले. 'ये माई !' त्यावरून पार्वतीला यमाई हे नाव मिळाले.

काही विद्वानांच्या मते रेणुका किंवा यल्लम्मा म्हणजेच यमाई होय. महाराष्ट्रात या देवीची स्थाने सारोळे (जि. नगर), कण्हेसर (जि. पुणे), औंध (जि. सातारा), मार्डी (जि. सोलापूर), इ. गावांत आहेत. त्यांपैकी औंधच्या यमाईची माहिती अशी –

सातारा जिल्ह्यातील औंध गावाजवळ सुमारे ८०० फूट उंच डोंगरावर यमाई देवीचे मंदिर आहे. वर जाण्यासाठी दगडी पायऱ्या आहेत. देवीच्या मंदिराभोवती १५ फूट उंच तट आहे. त्याला ५ बुरूज आहेत. मंदिराचा सभामंडप ३० × २० चौ. फुटांचा असून, त्याला जोडून गाभारा आहे. गाभाऱ्यात एका उंच चबुतऱ्यावर सुमारे ५ फूट उंचीची, काळ्या पाषाणाची, भव्य अशी चतुर्भुजा देवीची मूर्ती उभी आहे. तिच्या हाती त्रिशूळ, गदा, बाण, पानपात्र ही आयुधे आहेत. मूर्तीच्या पायथ्याशी एक तांदळा असून, सर्व पूजोपचार त्यालाच समर्पण केले जातात.

मंदिरासमोर ६० फूट उंच व पायाजवळ १५ फूट व्यास असलेली एक प्रचंड दीपमाळ असून, तिच्यावर १७६ दीप पाजळण्याची सोय आहे.

यमाईचे दुसरे मंदिर औंध गावात असून, तिथे औंधकर पंतप्रतिनिधींचा दरबार भरत असे. हे देऊळ कोणी व केव्हा बांधले याची माहिती देणारा एक शिलालेख तिथे आहे.

यमाई ही औंधकर पंतप्रतिनिधींची कुलदेवी असल्यामुळे त्यांनी तिची व्यवस्था उत्तम ठेवली आहे. [देवीकोश २]

यमांतक एक बौद्ध देवता. मंजुश्रीचे हे दुसरे नाव आहे. याला यमारी असेही म्हणतात. हा नीलवर्ण, त्रिमुख व षड्भुज आहे. याला पूर्व दिशेचा स्वामी मानले आहे. कृष्ण-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यमारी व रक्तयमारी अशी याची दोन रूपे आहेत. प्रज्ञा ही याची शक्ती असून, क्वचित तिच्यासह याची उपासना करतात. यातुविद्या व अभिचारकर्म यांच्या विधिविधानात याची पूजा विहित आहे.

यमांतकाच्या उत्पत्तीविषयी एक कथा सांगितली जाते, ती

यमांतक

अशी– तिबेटातल्या एका गुहेत एक साधू सुमारे पन्नास वर्षे तपश्चर्या करीत होता. पन्नास वर्षांनंतर ज्या दिवशी त्याला निर्वाणपद प्राप्त होणार होते, त्याच्या नेमक्या आधीच्या रात्री दोन चोरांनी याच्या गुहेत येऊन एका रेड्याची हत्या केली. मग त्यांच्या लक्षांत आले, की आपल्या दुष्कृत्याचा साक्षीदार असलेल्या या साधूलाही जिवंत ठेवून चालायचे नाही. म्हणून त्यांनी ध्यानस्थ असलेल्या त्या साधूचाही शिरच्छेद केला. त्याबरोबर त्या शिरविरहित साधूने आपल्या तपोबलाने क्रुद्धरूप धारण केले व समोर पडलेले रेड्याचे शिर स्वतःच्या धडावर ठेवून त्या दोन्ही चोरांना ठार मारले. मग तो त्यांचे उष्ण रक्त घटाघटा प्याला. परंतु तरीही त्याची तहान शमली नाही. म्हणून त्याने आसपासच्या सर्व लोकांना मारून त्यांचे रक्त पिण्याचा सपाटा चालविला. तेव्हा सगळे लोक घाबरले व मंजुश्री बोधिसत्त्वाला शरण गेले. मग मंजुश्रीने त्या यमरूपधारी साधूवर हल्ला करून त्याला ठार मारले. म्हणून त्याला यमांतक हे नाव मिळाले.

निष्पन्नयोगावलीत याचे ध्यान वर्णिले आहे, ते असे– नील, गौर व रक्त वर्णांची तीन मुखे, चार हात आणि त्यांत नीलवज्र, खड्ग, मणी व कमल अशा चार वस्तू. याचे वज्रदंड असेही आणखी एक नाव दिलेले आहे. [इं. बु. इ.]

यमादर्शन एक काम्यव्रत. ज्या मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशीला सोमवार, बुधवार, गुरुवार किंवा शुक्रवार असेल, त्या दिवशी या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. व्रतविधी असा–त्रयोदशीच्या दिवशी काल, दंडधर, अंतक, शीर्णपाद, कंक, हरी, वैवस्वत, इ. यमाच्या नावांनी तेरा ब्राह्मणांना बोलावून त्यांना पूर्वाभिमुख बसवतात. मग त्यांच्या अंगाला तैलमर्दन करून त्यांना गरम पाण्याने स्नान घालतात. नंतर त्यांची गंधादी सुगंधी द्रव्यांनी पूजा करून त्यांना साखरभाताचे भोजन घालतात. तांब्याच्या तेरा पात्रांत प्रत्येकी सोळा शेर तीळ व तांदूळ भरून ती त्यांना दक्षिणेसह दान देतात. फल–या व्रताच्या प्रभावाने यमाचे भयंकर रूप पाहावे लागत नाही. [व्र. प.]

यमादेवी : महाराष्ट्रातील नगर जिल्ह्यातील राशिन या गावी या देवीचे मंदिर आहे. युद्धामध्ये दैत्यांना ठार मारून यमलोकास पाठविणारी देवता ती यमादेवी आणि ज्या गावी दैत्यांच्या प्रेतांच्या राशी पडल्या ते गाव म्हणजे राशिन, अशी या नावांची व्युत्पत्ती सांगतात.

हिच्या मंदिराचे बांधकाम व शिल्पकाम पाषाणाचे असून, त्यात लाकूड अजिबात वापरलेले नाही. देवता स्वयंभू असल्याने तांदळास्वरूपातच आहे. नवरात्रात अष्टमीला इथे मोठी यात्रा भरते. त्या वेळी या देवीचे ‘भंदे’ निघते. एका मातीच्या कलशात देवीच्या ओटीचे सामान म्हणजे खण, नारळ, बांगड्या, हळद, कुंकू, इ. साहित्य घालून, त्यावर सरकी पसरून ते पेटवतात. यालाच भंदे म्हणतात. देवीचा पुजारी तो पेटलेला कलश हाती धरून मंदिरप्रदक्षिणा करतो. या क्षेत्राची ही फार प्राचीन रूढी आहे. या गावी मुसलमानांची बरीच घरे असून, तेही देवीचा घट बसवतात, रेणुकामातेला मानतात आणि यात्रेच्या कार्यक्रमातही भाग घेतात. [देवीकोश ३]

यमुना एक पवित्र नदी. गंगेच्या जोडीने या नदीचा उल्लेख होतो. सूर्य व संज्ञा यांची ही कन्या व यमाची बहीण होय. हिचा उगम हिमालयाच्या बंदरपूंछ नामक हिमाच्छादित शिखराच्या वायव्येस असलेल्या कलिंद पर्वतातून झालेला आहे, म्हणून हिला कालिंदी असेही म्हणतात.

यमुनोत्तरी किंवा जम्नोत्री येथून ती बाहेर पडते व हिमालयाच्या मध्य आणि बाह्य पर्वतश्रेणींतून ८० मैलांचा दीर्घ रस्ता आक्रमीत फैजाबादजवळ मैदानी क्षेत्रात उतरते. हिमालयात तिला टोंस, गिरी व असन या नद्या भेटतात. चंबळ, सेंगर, सिंध, बेतवा आणि केन या नद्या मैदानी प्रदेशात तिला येऊन मिळतात. या सर्व नद्यांचे जलौघ उरात सामावून ती प्रयाग क्षेत्री गंगेला येऊन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मिळते. या दोन नद्यांच्या संगमात स्नान करून पवित्र होण्यासाठी लाखो यात्रेकरू प्रतिवर्षी प्रयागाला जातात.

यमुना प्रथम नैर्ऋत्य, मग दक्षिण व शेवटी आग्नेय या दिशांना प्रवाहित होऊन प्रयाग येथे पोचते. हिमाचल प्रदेश व उत्तर प्रदेश, तसेच पंजाब व उत्तर प्रदेश या राज्यांची ही एक सीमा बनते. हिच्या तीरावर दिल्ली, वृंदावन, मथुरा, आगरा, इटावा, कालपी व हमीरपूर ही शहरे आहेत. हिची लांबी सुमारे ८६० मैल व जलप्रवाहाचे क्षेत्रफळ सुमारे १, १८००० चौरस मैल आहे.

पौराणिक व ऐतिहासिक उल्लेखांवरून कळते, की यमुनेचा प्रवाह निरनिराळ्या वेळी बदलत राहिला आहे. प्रागैतिहासिक कालात यमुना मधुवनाच्या जवळून वाहत होती. तिथेच तिच्या तीरावर शत्रुघ्नाने मथुरा नगरीची स्थापना केली होती (वा. रा. उत्तर. ७०.८)

कृष्णकालात यमुनेचा प्रवाह कटराकेशवदेव या मथुरेतील एका पुण्यस्थलाजवळून वाहत होता. बौद्ध साहित्यावरून कळते की बौद्धांच्या उत्कर्षकाळात यमुनेच्या दोन्ही तीरांवर संघाराम उभारले गेले होते. त्या वेळी यमुनेची मुख्य धारा कटराकेशवदेवापासून दूर जाऊन सांप्रतच्या प्रवाहाने वाहायला लागली होती. वल्लभ संप्रदायाच्या वाङ्मयावरून प्राचीन काळी यमुनेच्या दोन धारा होत्या असे दिसते. एक धारा नंदगाव, बरसाना व संकेत या गावांजवळून वाहत गोवर्धन क्षेत्रातल्या जमुनावतौ या ठिकाणी येत होती आणि दुसरी धारा चीरघाटाजवळून गोकुळात प्रवेशत होती. पुढे या दोन्ही धारा एक होऊन आगऱ्याकडे वाहत गेल्या. पुराणावरून असेही समजते, की प्राचीन वृंदावनात यमुना अनेक धारांनी वाहत होती आणि त्यामुळे वृंदावन जणू द्वीपकल्प बनले होते. तिच्या तीरांवर अनेक सुंदर वने व कुरणे होती आणि श्रीकृष्ण आपल्या गोपसवंगड्यांसह त्या वनांत गायी चारीत होता. सांप्रत वृंदावनात यमुनेच्या दोन्ही तीरांवर प्रशस्त घाट बांधलेले असून, त्यांवर अनेक मंदिरे, छत्र्या व धर्मशाळा आहेत.

यमुनामूर्ती – मंदसोर

यमुनेविषयी पुराणांतरी काही उल्लेख मिळतात, ते असे– भरताने हिच्या तीरावर अश्वमेध यज्ञ केला. वैवस्वत मनूने अपत्यप्राप्तीसाठी यमुनेच्या तीरावर तप केले. नारदाकडून दिव्येची दीक्षा घेण्यापूर्वी चित्रकेतूने हिच्यात स्नान केले. श्रीकृष्णाने यमुनेच्या तीरावरच रासक्रीडा केली. गोपिकांनी कात्यायनी व्रताचे स्नान यमुनेत केले. हिच्या डोहात राहून पाणी विषारी करणाऱ्या कालिय नागाला श्रीकृष्णाने डसून पळवून लावले. सौभरी ऋषीने हिच्या काठी तप केले.

हिचे एक मानवी रूपही कल्पिलेले आहे. बलरामाने तिला एकदा जलक्रीडेसाठी बोलाविले; पण तिने विलंब केल्याने बलराम तिच्यावर फार रागावला. त्याने तिला नांगराच्या फाळाने वृंदावनातून खेचून घेतले. त्यामुळे तिचे पात्र बदलले.

भारतीय शिल्पसंभारात गंगेप्रमाणे यमुनेच्याही मानवी रूपातील अनेक मूर्ती आढळतात. उदयगिरी येथील एका गुंफेच्या दर्शनी भागावर वराह अवताराचे जे गुप्तकालीन शिल्प खोदलेले आहे, त्यात डाव्या बाजूला गंगा व यमुना यांच्या मूर्ती दिसतात. त्यांतील यमुना कूर्मावर आरूढ आहे. विष्णुधर्मोत्तर पुराणात (३. ५२. १–२१) वरुणाचे वर्णन केलेले आहे, त्यात त्याच्या दोन्ही बाजूंना गंगा व यमुना यांच्या मूर्ती असाव्या, असे म्हटले आहे.

मंदसोर येथे यमुनेची एक मूर्ती सापडली आहे. पाटण्याच्या वस्तुसंग्रहालयात ठेवलेली यमुनेची मूर्ती अत्यंत सुंदर आहे.

भारताची राजधानी दिल्ली ही यमुनेच्या काठावर वसलेली आहे. अनेक राजकीय घटना हिच्या तीरावर घडल्या आहेत, अनेक युद्धे, विध्वंस आणि रक्तपात झाले आहेत. पांडवांनी खांडववन जाळून आपली इंद्रप्रस्थ ही नवी राजधानी हिच्याच तीरावर वसवली. पांडवांच्या नंतर पृथ्वीराज चव्हाण याने हिच्या तीरावरच राज्य केले. त्यानंतर इतिहासाच्या प्रवाहात इथे अनेक देशी-विदेशी सत्ता गाजल्या, नांदल्या आणि लयालाही गेल्या. रामचरितमानस या ग्रंथाचा कर्ता गोस्वामी तुलसीदास याचे राजापूर हे गाव यमुनेच्या तीरावरच आहे. म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू आणि श्री. लालबहादूर शास्त्री यांच्या समाध्या यमुनेच्याच तीरावर आहेत.

कृष्णभक्ति– संप्रदायातील अनेक कवींना, संतांना आणि भक्तांना यमुना ही मातेसमान पूज्य वाटते. तिच्याविषयी त्यांनी अनेक पद्यांतून प्रेमादर व्यक्त केला आहे. सुप्रसिद्ध कृष्णभक्त कवी नंददास तिच्याविषयी म्हणतो –

भक्त पर करी कृपा श्री जमुना जू ऐसी ।
छाँडि निज धाम विश्राम भूतल कियो
[illegible] लीला दिखाई ज्यो तैसी ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भावार्थ – यमुना भक्तकृपेसाठी आपले निजधाम सोडून भूतलावर अवतरली आणि तिने इथे प्रकट लीला दाखवल्या.

नंददास दुसऱ्या एका पद्यात म्हणतात –

सब दिन को मनमोहन हरत
सो प्रिय को मन ए जो हरणी ।
इन विना एक क्षण रहे न
जीवन धन्य ब्रजचन्द्र मन आनंदी करणी ।।

भावार्थ – मनमोहन श्रीकृष्ण सर्वांची मने हरण करतो. पण यमुना कृष्णाचे मन हरण करते. कृष्ण एक क्षणही तिचा वियोग सहन करू शकत नाही.

कृष्णभक्तीच्या रसिक व सखी या संप्रदायांत यमुना ही एक गोपी असल्याचे कल्पिले आहे आणि कृष्ण जसा राधेच्या अधीन असतो, तसाच तो यमुनेच्या अधीन राहतो, असे म्हटले आहे.

शंकराचार्यांनी यमुनेवर दोन स्तोत्रे रचलेली असून, ती काव्यमय आणि भावपूर्ण आहेत. त्यांतील एक श्लोक असा –

विहाररासखेदभेदधीरतीरमारुता
गता गिरामगोचरे यदीयनीरचारुता ।
प्रवाहसाहचर्यपूतमेदिनीनदीनदा
धुनोतु मे मनोमलं कलिन्दनन्दिनी सदा ।।

भावार्थ – जिच्या तीरावरील मंद, शीतल आणि सुगंधी वायू वाळवंटामध्ये विहार करीत असताना किंवा रासक्रीडा करीत असताना होणाऱ्या परिश्रमांचा परिहार करण्यात मोठा समर्थ आहे, जिच्या जलाचे सौंदर्य वाणीने वर्णन करण्याच्या पलिकडचे आहे आणि जिच्या प्रवाहाच्या साहचर्याने पृथ्वी व पृथ्वीवरील लहान-मोठ्या नद्या पावन होत आहेत, अशी ही कलिंदकन्या यमुना सर्व काळ माझ्या मनातील कामक्रोधादी विकारांचे परिमार्जन करो.

यमुना नदीचे प्राकृतिक सौंदर्य, राजकीय घडामोडींचे साक्षित्व, इ. गोष्टी विचारात घेऊन श्री. काका कालेलकर यांनी यमुनेचे वर्णन केले आहे, ते असे –

दोघी बहिणींत गंगेपेक्षा यमुना मोठी आहे, गंभीर आहे; कृष्णभगिनी द्रौपदीप्रमाणेच कृष्णवर्ण व मानिनी आहे. गंगा जणू काय गरीब बिचारी मुग्ध शकुंतलाच. पण देवाधिदेव महादेवांनी तिचा स्वीकार केला, म्हणून यमुनेने आपले मोठेपण विसरून जाऊन गंगेलाच वडिलकीचा मान अर्पण केला आहे. यमुना कुरुक्षेत्र आणि पानिपतचा हिंसक भूप्रदेश न्याहाळीत भारताच्या राजधानीपाशी येऊन पोचते. यमुनेच्या पाण्यात साम्राज्याची शक्ती असली पाहिजे. पांडवांपासून थेट मोगल साम्राज्यापर्यंतचा आणि बंडाच्या काळापासून अगदी स्वामी श्रद्धानंदजींच्या खुनापर्यंतचा सारा इतिहास तिच्या स्मरण-संग्रहालयात साठवलेला आहे. दिल्लीपासून आग्र्यापर्यंत बाबरचे वंशज आपल्याशी वार्तालाप करू इच्छीत आहेत, असा भास होतो. दोन्ही नगरांचे किल्ले साम्राज्याच्या रक्षणासाठी नव्हे, तर यमुनेची शोभा पाहण्यासाठीच बांधले असावेत असे वाटते. मोगल साम्राज्याचे नगारे आता शांत झाले. पण मथुरा-वृंदावनातील मुरली मात्र अजून वाजत आहे. एक द्वारकावास सोडला, तर श्रीकृष्णाच्या जीवनाशी जास्तीत जास्त सहकार कालिंदीनेच केला आहे. ज्या यमुनेने कालियामर्दन पाहिले, त्याच यमुनेने कंसाचा शिरच्छेद बघितला. ज्या यमुनेने हस्तिनापुराच्या दरबारात श्रीकृष्णाची शिष्टाई ऐकली, त्याच यमुनेने युद्धकुशल श्रीकृष्णाची योगमूर्ती कुरुक्षेत्रावर संचार करीत असताना डोळे भरून बघितली. ज्या यमुनेने वृंदावनातील प्रणयवासरीत आपला कलरव मिसळला, त्याच यमुनेने कुरुक्षेत्रावर रोमहर्षण गीतावाणीचा पडसाद उमटवला. [मु. स्तो. सं.; ब्र. सा. इ.; भा. न. क.; पु. इ.; जीवनलीला; हि. जॉ. ए. इं.]



यमुनामूर्ती –पाटणा

यरवा एक आदिवासी जमात. या लोकांची वस्ती म्हैसूर राज्यातील कूर्ग भागात आणि केरळ राज्यातील उत्तर मलबारमध्ये आहे. व्यन्नाड हे यांचे मूलस्थान असावे, असे म्हणतात. यांच्यांत पंजिरी, पनिय, बदव आणि काजी यरवा अशी चार कुळे आहेत. बदव व काजी या कुळांतील लोक कावळ्यांचे मांस खातात. त्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जा निकृष्ट मानला जातो. पंजिरी यरवा हे म्हैसूरमधून इथे आले असून, त्यांच्यांत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इप्पुमलै व हरट्टी असे दोन गट आहेत. इप्पुमलै लोक इप्पुमलै भागातून आले म्हणून त्यांना हे नाव मिळाले असावे. त्यांची वस्ती श्रीमंगल व पोन्नमपेट परिसरात आहे. हरट्टी यरवांचा निवास परट्टीमलै इथे आहे. या दोन गटांत रोटी-बेटी व्यवहार होत नाही. शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय असून, ते मुख्यत्वे भात पिकवतात.

विवाहप्रथा – यांच्यांत आते अथवा मामे बहिणीशी विवाह होतो. लग्न वडीलधारी मंडळी ठरवतात. वधूची निवड झाल्यावर वरपिता आणि टोळीप्रमुख वधूच्या घरी साडी व थोडी स्वयंपाकाची भांडी घेऊन जातात. वरपित्याने आपल्या आगमनाचे कारण सांगितल्यावर तिथे वधूला आणतात. मग तिला साडी देऊन ताळी बांधतात. देवपूजाही तिथेच होते. मग दोन्ही पक्षांची मंडळी एकत्र बसून विवाहाचा मुहूर्त ठरवतात.

हे लोक अनेक बायका करू शकतात. यांच्यांत विधवाविवाहाला मान्यता आहे. विधवेबरोबर लग्न करणारा पुरुष आपल्या मित्रांसमवेत तिच्या घरी जातो व तिला चार आणे देऊन तिच्या गळ्यात ताळी बांधतो. पुरुषाने इच्छा व्यक्त करताच त्याला घटस्फोट मिळतो. पुरुषाने एखाद्या स्त्रीशी व्यभिचार केला, तर त्याला त्या स्त्रीशी विवाह करायला भाग पाडतात. व्यभिचाराबद्दल एक ते दहा रुपयांपर्यंत दंडही करतात.

प्रसूतिप्रथा – स्त्री गरोदर असता तिला सातव्या महिन्यात मिष्टान्नाचे भोजन देतात. नंतर तिला तिच्या माहेरी पाठवतात. तिच्या बाळंतपणासाठी स्वतंत्र खोली असते. प्रसूतीनंतर बाळ-बाळंतिणीला स्नान घालतात. जननाशौच बारा दिवस पाळतात. बाराव्या दिवशी बारसे करतात.

देवधर्म – कोरवा, कुट्टथम्म व गुलिकन या देवांना हे भजतात. मलबार जिल्ह्यातील जंगलात यांची मंदिरे आहेत. यांची पूजा करण्यापूर्वी पुजारी सूर्याची प्रार्थना करतो. तांदूळ, नारळ हे यांचे पूजासाहित्य होय. कुट्टथम्माला मद्याचा व कोंबडीचा नैवेद्य लागतो. विवाहाच्या वेळी हे गंगेची पूजा करतात. कुर्ग लोकांचे सर्व सणवार हे साजरे करतात. कावेरी, लक्ष्मणतीर्थ व धरतीमाता (पृथ्वी) यांचीही हे पूजा करतात. यांचा जादूटोणा व मंत्र-तंत्र यांवर खूप विश्वास आहे.

मृतकप्रथा – बहुतेक लोक मृताला पुरतात. तत्पूर्वी प्रेताला स्नान घालून नवे वस्त्र पांघरवतात. खड्डयात थोडा भात व दूध ठेवतात. दूध नसेल तर नारळाचे पाणी चालते. आठव्या किंवा दहाव्या दिवशी काकबली देतात. मृताला स्वर्गात जागा मिळावी म्हणून टोळीप्रमुख देवाची प्रार्थना करतो. मृताची झोपडी शेणाने सारवून तिच्यात पूर्वजांच्या नावाने अन्न, मांस, मद्य, इ. वस्तू ठेवतात. स्त्रियांना बसलेल्या स्थितीत पुरतात.

यर्राप्रगड

(१२८५–१३५५ इ. स.) एक तेलुगू कवी. हा 'आंध्रकवित्रयातील' नन्नय्य व तिक्कन्न यांच्या नंतरचा कवी होय. वेमारेड्डी नामक राजाचा हा आश्रित होता. तिक्कन्न कवीने अर्धवट सोडलेल्या महाभारताच्या तेलुगू अनुवादातील वनपर्वाची रचना याने पुरी केली. पण याने तो अनुवाद श्लोकबद्ध न करता प्रबंधरूपाने केला आहे. त्यामुळे याला प्रबंधपरमेश्वर अशी पदवी मिळाली. वनपर्वाची एकूण श्लोकसंख्या २९०० इतकी आहे. त्यांतील १६०० प्रबंध यर्राप्रगडाचे आहेत. तिक्कन्नाच्या व याच्या भाषाशैलीत कोणताही फरक आढळत नाही. दोघांचीही भाषा निर्मळ व प्रसादपूर्ण आहे.

याव्यतिरिक्त याने रामायण, हरिवंश व नृसिंहपुराण या नावाचे ग्रंथ रचले आहेत. नृसिंहपुराणाची कथावस्तू याने ब्रह्मांड पुराण व विष्णू पुराण यांतून घेतली आहे. हरिवंश काव्यात २६०० पदे असून, ते दहा आश्वासांमध्ये विभागलेले आहे. त्यातील वर्णने सहजसुंदर आहेत. [म. ज्ञा. को.; तें. सा. इ.]

यल्लम्मा

द. भारतातील एक ग्रामदेवता. हिच्या नावाच्या काही व्युत्पत्ती अशा – (१) एकदा रेणुकादेवी कानडी प्रदेशातील सौंदत्ती गावी गेली. तिथे तिच्या भक्तांनी तिला प्रश्न केला, 'यल्ल अम्मा ?' यल्ल म्हणजे कोणीकडे आणि अम्मा म्हणजे आई. त्यावरून तिला यल्लम्मा हे नाव मिळाले. (२) यल्ल म्हणजे सर्व व अम्मा म्हणजे आई. सर्वांची आई किंवा जगदंबा. (३) कर्नाटकात सप्तमातृकांना योळुअम्मा म्हणतात. यल्लम्मा हा त्या योळुअम्माचाच अपभ्रंश असावा.

एक गोष्ट खरी, की यल्लम्मा म्हणजे रेणुकाच होय. हिच्याविषयी अनेक दंतकथा प्रचलित आहेत, त्यांपैकी एक अशी –

रेणुका ही जमदग्नी ऋषींची पत्नी व परशुरामाची माता. पित्याच्या आज्ञेवरून परशुरामाने रेणुकेचा शिरच्छेद केला तेव्हा रेणुकेबरोबर एका मांग स्त्रीचाही शिरच्छेद झाला. परशुरामाने मग त्या दोघांनाही जिवंत केले; परंतु धड व शिर जुळवताना त्याची एक चूक झाली. रेणुकेच्या धडावर त्याने मांगिणीचे शिर चढवले व मांगिणीच्या धडावर रेणुकेचे शिर बसवले. त्यामुळे त्या दोघी सजीव झाल्या व त्यांना अनुक्रमे यल्लम्मा व मरिअम्मा ही नावे मिळाली. (मरीआई पाहा)

रेणुकेचे मुख्य स्थान बेळगावजवळ सौंदत्ती येथे आहे. तिथल्या टेकड्यांना यल्लम्माचे डोंगर म्हणतात. त्यांपैकी एका टेकडीवर सरस्वती नामक नदीच्या काठी देवीचे देऊळ आहे. देवळाच्या बांधकामावरून ते इ. स. च्या तेराव्या शतकातले असावे, असे वाटते. मार्गशीर्ष व चैत्र महिन्यांत पौर्णिमेला इथे मोठ्या जत्रा भरतात. तेव्हा नवस फेडण्यासाठी बरेच भक्त यतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यल्लम्मेच्या उपासकांना जोगती व जोगतीण असे म्हणतात. कर्नाटकात 'यल्लमन कुणी तू' या नावाचे एक लोकनृत्य असून, ते या देवीच्या प्रीत्यर्थ केले जाते. यल्लम्मेची काही गाणीही प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी एक असे–

सौंदत्तीची रेणुकाबाई । उगरगोळाच्या डोंगरी राही ।। ध्रु. ।।
उगरगोळाला गेली कशापाई । तिला जाण्याचे कारण काई ।
लढाई केली घाई घाई । दैत्य वधला त्या हो ठायी ।
सौंदत्तीचा जिंकूनी किल्ला । लावलं निशाण केला हल्ला ।
राखण ठेवीले मारुतीला । कुरगताच्या साक्षी लावूनी ।।

यल्लम्मेची मूर्ती बसलेल्या स्थितीत असते. तिचा चेहरा उग्र असतो. ती चतुर्भुज असून, तिच्या हातीं डमरू, त्रिशूळ, पाश आणि ब्रह्मकपाल ही आयुधे असतात. तिच्या डोक्यावर मुकुट असतो. तिच्या भोवती जमदग्नी, रेणुका, परशुराम, इ. देवतांच्या मूर्ती असतात. संकटाच्या वेळी हिला कोंबडे किंवा बकरे बळी देतात. [देवीकोश २; सा. इं. गॉ.; म. लो. उ.; द्र. गॉ. मॉ. हिं.]

यव आर्यांच्या अन्नधान्यांतील एक प्रमुख धान्य. मराठीत याला जव किंवा सातू असे म्हणतात. ऋग्वेदात याचा अनेकवार उल्लेख आलेला आहे (१·१२३·१५; ११७·२१). त्याचप्रमाणे अथर्ववेद, तैत्तिरीय संहिता, काठक संहिता वाजसनेयी संहिता, इ. ठिकाणीही याचा उल्लेख आहे. मात्र रॉथ व बोर्थलिंग यांच्या मते यव हे विशेष धान्य नसून, हा शब्द सर्व धान्यांसाठी वापरला जात होता. हे नैमिषेयांचे अन्न असून, हविर्द्रव्यही आहे. श्राद्धातही याची आवश्यकता असते.

मद्र व उशीनर या जनपदांमध्ये या धान्याचे पीक खूप येत असे, असा पतंजलीने उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे जिथे यव पिकत नाहीत, ते देश दरिद्री होत, असेही म्हटले आहे. अफगाणिस्तान व काश्मीर या देशांमधील महत्त्वाचे पीक म्हणून ऐने अकबरीत याचा उल्लेख आहे. [पु. इं.; वे. इं.; ऋ. सां. इ.; सु. वि. को.; प. का. भा.]

यवतेश्वर पुण्याच्या पूर्वेला सुमारे २६ मैल अंतरावर, पुणे–सोलापूर मार्गावर यवत नावाचे एक गाव आहे. या गावापासून २–३ मैलांवर भुलेश्वर नावाच्या डोंगरावर एक शिवमंदिर आहे. त्या मंदिरात एक स्वयंभू शिवलिंग असून, त्याला यवतेश्वर किंवा भुलेश्वर म्हणतात. श्रावणात व महाशिवरात्रीला तिथे मोठी यात्रा जमते. हे मंदिर यादवकाळात इ. स. च्या १३ व्या शतकात बांधलेले असावे. डोंगरावर एक दुर्गही बांधलेला होता. मुसलमानी राजवटीत मंदिराची बरीच मोडतोड झाली. पुढे पेशवाईत ब्रह्मेन्द्रस्वामींनी त्याचा जीर्णोद्धार केला, असे म्हणतात. त्या वेळी मंदिराच्या पूर्वेकडील दर्शनी भागावर नगारखाना बांधण्यात आला आणि मंदिराचे शिखरही नव्याने बांधण्यात आले. मूळचे मंदिर पाषाणाचे बांधलेले असून, त्या बांधणीत मोठमोठे शिलाखंड वापरलेले आहेत. जीर्णोद्धाराचे बांधकाम मात्र विटा व चुना वापरून केलेले आहे.

हे देवालय पूर्वाभिमुख असून, गाभारा, सभामंडप, नंदीमंडप व भोवतालची पडवी असे त्याचे भाग आहेत. मंदिराची भव्यता आणि विशिष्ट रचना यांमुळे ते महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरांमध्ये अद्वितीय गणले जाते. देवतांच्या मूर्ती, मानवांच्या मूर्ती, विविध पशूंच्या आकृती व नक्षीकाम यांनी ते सुशोभित केलेले आहे. इतर देवालयांत क्वचितच आढळणारी उंटाची आकृती या ठिकाणी कोरलेली दिसते.

या मंदिराचा गाभारा खोलगट जागेत आहे. त्याचे द्वार अगदी साधे असून, त्याच्या शीर्षकावर लहानशी गणेशमूर्ती कोरलेली आहे. गाभारा व सभामंडप यांना जोडणारा अर्धमंडप आहे; त्याचे द्वार मात्र मोठे व विपुल नक्षीकामाने युक्त असे आहे; त्यात कीर्तिमुख, हंस, इ. आकृती गुंफलेल्या आहेत. त्याच्या दोन्ही बाजूंना दोन स्तंभ असून, त्या स्तंभांवर द्वारपालाच्या सर्वांगसुंदर आकृती आहेत. सभामंडप उंच जागी बांधलेला असून, मध्यभागी असलेल्या चार स्तंभांवर त्याचे छत आधारलेले आहे. त्याच्या बाजूंनाही लहान स्तंभ व अर्धस्तंभ आहेत. या स्तंभांच्या शीर्षकांवर नागशीर्षके व तुंदिलतनू कीचकांच्या प्रतिमा आहेत. सभामंडपाला पूर्व, दक्षिण व उत्तर या तीन्ही बाजूंना प्रवेशद्वारे आहेत. त्या प्रवेशद्वारांच्या दोन्ही बाजूंना उंच दगडी कठडा बांधलेला आहे. प्रवेशद्वारावर गणेशमूर्ती व उंबरठ्यावर कीर्तिमुखे आहेत. त्यांच्या चौकटींवर सिंह, हत्ती, इ. पशूंच्या व मानवांच्या आकृती आहेत. सभामंडपासमोर वेगळा नंदीमंडप आहे.

मंदिराच्या बाह्यांगावरही असंख्य मूर्ती कोरलेल्या आहेत. त्यांत चामुंडा, महिषासुरमर्दिनी, लक्ष्मी, ब्राह्मी, भैरव, इ. देवतांच्या मूर्ती आहेत; पण स्त्रीपुरुष नर्तकवादकांची संख्या अधिक आहे. सभामंडपाच्या कठड्यांच्या भिंतीचे दोन आडवे भाग पाडलेले असून, वरच्या भागात रामायण–महाभारतातील व पुराणांतील प्रसंग कोरलेले आहेत; तर खालच्या भागात सिंह व हत्ती यांच्या उठावदार आकृती आहेत. नैर्ऋत्येकडील शिल्पपट्टांवर रामायणातील एक प्रसंग कोरलेला असून, त्यात दुंदुभिवाहक उंट दिसतात. ईशान्येकडील शिल्पांत भारतीय युद्धातील प्रसंग वास्तवपूर्ण व स्पष्ट दिसतात. उत्तरेकडील शिल्पांत द्रौपदीस्वयंवराची कथा चार भागांत कोरलेली दिसते.

या मंदिराभोवती पंचवीस समांतर स्तंभांवर आधारलेली अशी लंबचौकोनी ओसरी आहे. या ओसरीचे दोन भाग पडतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मागील भागात देवकुलिका (देवळघा) व ओवऱ्या आहेत. त्या ओवऱ्यांना दगडी जाळीची गवाक्षे बसवलेली होती. पण त्यांतील काही गवाक्षे बंद करण्यात आली आहेत. काही देवळघांत अजूनही भग्न मूर्ती आढळतात. त्यांच्या द्वाराग्रपट्टीवर गणेशमूर्ती असून, भैरवाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. ओसरीचा पुढला भाग म्हणजे लांब पडवी असून, तिच्या दर्शनी भागातील कंगोऱ्यावर दोन दोन स्तंभांमध्ये ६–७ फूट लांबीचे शिलापट्ट बसवलेले आहेत. असे एकूण दहा शिलापट्ट असून, त्यांवर मकरतोरणाखाली सप्तमातृकांपैकी तीन तीन मातृकांच्या उठावदार मूर्ती दिसतात. प्रत्येक मूर्तीच्या पीठावर त्या त्या मातृकेचे वाहन कोरलेले आहे. मकरतोरणात कीर्तिमुखांतून बाहेर पडणाऱ्या वेली व त्यांच्या वलयांत योगी, पक्षी, कलिका अशा आकृती कोरलेल्या आहेत, [श्री. अ. वि, नाईक– ज्ञानेश्वर (त्रैमासिक), एप्रिल १९६९]

यवन भारतात आलेल्या ग्रीक लोकांना हे नाव देण्यात आले आहे. प्राचीन ग्रीसच्या एका भागाचे नाव आयोन असे होते. त्या प्रदेशातील लोकांना आयोनियन असे म्हणत. त्या शब्दाचे भारतीय रूपांतर यवन असे झाले असावे, असे पाश्चात्य पंडितांचे मत आहे. कारण त्या दोन शब्दांत वर्णसाम्य आहे. सनपूर्व चौथ्या शतकांत शिकंदराच्या स्वारीमुळे ग्रीक लोकांचा भारताशी संबंध आला. मौर्य वंशाच्या राजवटीत तो संबंध अधिक दृढ झाला. सम्राट अशोकाच्या एका शिलालेखात ॲन्टिअोकुस नामक ग्रीक राजाचा उल्लेख 'अंतिओको नामा योन राजा' असा केलेला आहे. योन हे प्राकृत रूप असून, यवन हे त्याचे संस्कृत रूप आहे.

यवन म्हणजे ग्रीक लोक, हा अर्थ अशोकाच्या शिलालेखांत व इतर काही ठिकाणीही अभिप्रेत आहे, यात शंका नाही. पण पाणिनीची अष्टाध्यायी, मनुस्मृती, रामायण, महाभारत, इ. प्राचीन संस्कृत ग्रंथांत हा यवन शब्द पुष्कळ वेळा आलेला आहे. पाणिनीचा काल सनपूर्व ८ वे शतक हा असावा, असे भांडारकर, वैद्य वगैरे विद्वानांचे मत आहे. पाणिनीच्या सूत्रांत यवन शब्दाचे स्त्रीलिंगी रूप यवनानी होते, असे विधान आहे. वार्तिककार कात्यायनाने यवनी म्हणजे यवन स्त्री व यवनानी म्हणजे यवनांची लिपी, असा भेद दाखविला आहे. ज्यांची भाषा संस्कृत नाही, अशा लोकांना व परकीयांना महाभारतात म्लेच्छ म्हटले आहे. वसिष्ठाची गाय नंदिनी हिचे विश्वामित्राने अपहरण केले, त्या वेळी तिच्या अंगापासून म्लेच्छ लोक उत्पन्न झाले; त्यांत पुण्ड्र, द्राविड, शबर, शक, यवन, पल्हव, किरात, दरद, इ. लोक होते. रामायणातही ती कथा सांगितली असून, कांबोज, बर्बर या भारतीय व शक, यवन या परकीय लोकांना म्लेच्छ म्हटले आहे. जे क्षत्रिय लोक क्रियालोपामुळे व अन्य काही कारणांनी आर्यत्वापासून भ्रष्ट झाले, त्यांचे परिगणन मनुस्मृतीत केलेले असून, त्यात यवनांचा उल्लेख आढळतो. कांही स्मृतिकारांच्या मते यवन लोक संकरज म्हणजे क्षत्रिय पुरुष व शूद्र स्त्री यांच्या संबंधामुळे उत्पन्न झाले.

उत्तर भारतातील लोक असा यवनांचा निर्देश महाभारतात केलेला आढळतो. उत्तरेकडील इतर राजांच्या बरोबर त्यांनी कौरवांच्या बाजूने भारतीय युद्धात भाग घेतल्याचेही सांगितले आहे. मात्र त्यांचे राज्य नेमके कुठे होते, ते निश्चित कळत नाही.

अशा प्रकारे भारतीय लोकांना प्राचीन काळापासून परिचित असलेले यवन लोक व ग्रीक लोक एकच असण्याची शक्यता नाही. यवन देश म्हणजे अरबस्तान आणि यवन लोक म्हणजे त्या देशातील अरब लोक होत, असे श्री. शेंबवणेकर यांनी प्रतिपादले आहे. त्यांनी याविषयी केलेले विवेचन असे – प्राचीन यवन लोक व त्यांचा देश या दोन्ही गोष्टींवर प्रकाश टाकणारा एक पुरावा अमरकोशात आढळतो. निरनिराळ्या गंधवाचक द्रव्यांची नावे देताना अमरसिंहाने तुरुष्क, पिण्डक, सिल्ह व यावन ही चार एकाच सुगंधी द्रव्याची नावे दिली आहेत. तुरुष्क व यावन ही नावे तो पदार्थ तुर्क व यवन देशांत उत्पन्न होतो, असे दर्शवितात. 'यावनः यवनदेशजः।' असे अमरकोशाचे सर्व टीकाकार सांगतात. हा सुगंधी पदार्थ म्हणजे कवडचा ऊद होय. तो अरबस्तानात उत्पन्न होतो, असे हिरॉडोटस म्हणतो. त्यावरून यवन देश म्हणजे अरबस्तान असे सिद्ध होते. सुगंधी द्रव्यांचे उत्पत्तिस्थान म्हणून अरबस्तानची ख्याती अत्यंत प्राचीन काळापासून होती. ज्या देशात जो पदार्थ अनन्यसाधारण उत्पन्न होतो, त्या देशाच्या नावाने तो पदार्थ बहुधा परदेशात प्रसिद्ध होतो. यावन नावाने ओळखला जाणारा पदार्थ ग्रीस देशात किंवा युरोपातील दुसऱ्या कोणत्याही भागात उत्पन्न होत नाही. त्याचे मूलस्थान अरबस्तानच आहे. प्राचीन पर्शियन साम्राज्याच्या अमदानीत तर अरबस्तानकडून घ्यावयाची खंडणी मख्यत: याच पदार्थाच्या रूपाने घेण्यात येत असे.

ग्रीसपेक्षा अरबस्तान भारताला अधिक जवळचे आणि व्यापारामुळे अरबांचा भारताशी अधिक जिव्हाळ्याचा संबंध होता. पारसिक, बाल्हीक, कांबोज, शक, दरद, चीन, हूण वगैरे सर्व लोक अरबांहून भिन्न होते. मग अरबांचा निर्देश संस्कृत भाषेत कोणत्या नावाने झाला आहे, हा प्रश्न येतो. अरब हे नाव जर संस्कृतात आढळत नाही, तर दुसऱ्या कोणत्या तरी नावाने ते लोक प्राचीन भारतीयांना परिचित असले पाहिजेत, हे निश्चित. आणि हे नाव यवन असावे, हे यावन शब्दाच्या वरील चर्चेवरून स्पष्ट होते. ॲन्टिओकुस हा सीरियाचा राजा होता व सीरिया हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अरब किंवा यवन लोकांचाच देश होता. त्यामुळे त्याचा योन-राजा म्हणून उल्लेख केला गेला असावा.

संस्कृत नाटकांत यवनी स्त्री आढळते. शस्त्रागारावर देखरेख करणे, राजाला शस्त्रे देणे अशी मर्दानी कामे ती करते. ही यवनी अरबी किंवा तुर्की किंवा हबशी जातीची स्त्री असावी. त्या जागी ग्रीक स्त्रीची कल्पना करणे केव्हाही योग्य होणार नाही. कारण ग्रीक स्त्रिया आर्यवंशीय होत्या. त्या पुरुषी वळणाच्या होत्या, असे ग्रीक वाङ्मयावरून दिसत नाही.

वराहमिहिराच्या बृहत्संहितेत यवनांचा उल्लेख आला आहे, तो असा–

म्लेच्छा हि यवनास्तेषु सम्यक्शास्त्रमिदं स्थितम् ।

अर्थ – यवन हे म्लेच्छ असताही त्यांच्यामध्ये हे शास्त्र चांगले वसले आहे.

इथे 'इदं शास्त्रम्' म्हणजे बृहत्संहितेत जे ग्रथित केले आहे ते, अर्थात फलज्योतिष व शाकुनादी शास्त्र होय. हे विषय मुख्यतः इजिप्शियन व खाल्डियन लोकांचेच होते. यावरून वराहमिहिराला अभिप्रेत असलेले यवन हे ग्रीक नसून, इजिप्शियन, खाल्डियन वगैरे अरबी वंशाचे लोक असले पाहिजेत. अरबांचे संबंधी, शेजारी व समानशील इजिप्शियन लोकही भारतीयांना यवन या नावानेच परिचित होते, असे या चर्चेवरून निष्पन्न होते. अरबस्तानात इस्लामी धर्माची स्थापना झाल्यानंतर यवन हा शब्द मुसलमानांनाच का लावण्यात आला, तेही ध्यानात येते. इस्लामचे अनुयायी मूळचे अरबच होते. त्यामुळे अरबांना पूर्वापार लावलेले यवन हे नाव मुसलमानांनाही लावले गेले असावे.

शिकंदराने भारतावर आक्रमण केल्यानंतर अनेक ग्रीक राजांनी भारतीय प्रदेशावर आक्रमण केले व वायव्यसीमा प्रदेशाच्या काही भागावर राज्यही केले. हे सर्व लोक यवन या नावाने ओळखले जातात. त्या यवनांचा इतिहास उद्बोधक आहे.

यवन राजवंश – शिकंदर हा भारतावर आक्रमण करणारा पहिला यवन राजा होय. तो परत गेला, तेव्हा पंजाब, सिंध व सिंधू नदीच्या पश्चिमेकडील परोपनिसदे या प्रदेशांवर यवनांची सत्ता होती. पण लवकरच चंद्रगुप्त मौर्य याने ते प्रदेश जिंकून घेतले व तिथे आपले राज्य स्थापले. सनपूर्व ३०५ च्या सुमारास सीरियाचा यवन राजा सेल्युकस याने भारतावर स्वारी केली. पण चंद्रगुप्ताने त्याचा पराभव केला. त्यामुळे सेल्युकसने चंद्रगुप्ताला काबूल, कंदाहार व हेरात हे प्रदेशही देऊन टाकले. अशोकाच्या अंतापर्यंत ते प्रदेश मौर्यांच्या सत्तेखाली होते. सेल्युकसचे राज्य भूमध्यसागरापासून हिंदुकुश पर्वतापर्यंत होते.

त्यानंतर सुमारे शंभर वर्षे यवन राजांनी भारताकडे दृष्टी वळवली नाही. सनपूर्व २०६ मध्ये सेल्युकसचा उत्तराधिकारी ॲन्टिओकुस याने काबूलवर स्वारी केली, पण त्याला तो प्रदेश जिंकता आला नाही. पुढे सनपूर्व १९० च्या सुमारास बॅक्ट्रियाचा यवन राजा डेमिट्रिअस याने काबूल, पंजाब व सिंध हे प्रदेश जिंकून घेतले. तो या प्रदेशांवर राज्य करीत असताना युक्रेटिडीज याने बॅक्ट्रियाचे राज्य घेतले. त्याने डेमिट्रिअसचा पराभव करून काबूल, सिंध व उ. पंजाब हे प्रदेशही घेतले.

यवन राजांच्या अंतर्गत यादवीमुळे पुष्यमित्र शुंग याला सिंधू नदीपर्यंतचा प्रदेश यवनमुक्त करण्यात यश आले. पण सिंध व पंजाब या प्रदेशांवर त्याची सत्ता टिकली नाही. त्यानंतर सिथियन लोकांनी बॅक्ट्रियावर आक्रमण केल्यामुळे तिथले यवन राजे अफगाणिस्थान व पंजाब या प्रदेशांत आले. तिथे त्यांनी सुमारे २०० वर्षे राज्य केले. त्यांची अनेक लहानलहान राज्ये होती. पण त्यांचा इतिहास अज्ञात आहे. तिथे सापडलेल्या नाण्यांवर ३०–४० यवन राजांची नावे आढळली आहेत. त्यांची अधिक माहिती मात्र उपलब्ध नाही. ज्या काही थोड्या राजांची माहिती इतरत्र मिळते, त्यांतील मिनांडर (मिलिंद) हा राजा विशेष प्रसिद्ध आहे.

मिनांडर याने सनपूर्व १६०–१४० पर्यंत काबूल व पंजाब या प्रदेशांवर राज्य केले. त्याने अयोध्या प्रांतावर स्वारी करून साकेत नगर जिंकले होते आणि राजस्थानातील मध्यमिका नगरीही जिंकली होती. पण पुष्यमित्राने त्याचा पराभव करून त्याला सिंधूपार पिटाळून लावले. मिनांडरने भडोचपर्यंत यवनांची सत्ता स्थापली होती. पण ती अल्पकालीन ठरली. मिनांडर याने बौद्ध पंथ स्वीकारला होता. बौद्ध साहित्यात त्याला मिलिंद हे नाव दिलेले आहे. (मिनांडर पाहा)

बेसनगर येथे एक गरुडध्वज आहे. त्यावरील शिलालेखात तो गरुडध्वज हेलिओडोरस नामक यवन पुरुषाने उभारल्याचा उल्लेख आहे. शुंग वंशातील राजा भागभद्र हा विदिशा येथे राज्य करीत असताना, सनपूर्व ११३ च्या सुमारास तक्षशिलेचा यवन राजा ॲन्टिआक्लिदस याने हेलिओडोरस याला आपला राजदूत म्हणून विदिशेला पाठवले होते. तो विष्णुभक्त असून, त्याने भागवत धर्म स्वीकारला होता. वरील शिलालेखात तक्षशिलेच्या राजाचे नाव अंतलिकित असे दिले आहे. हा ॲंटिआक्लिदस युक्रेटिडीजच्या घराण्यातला होता. त्या घराण्यातील भिन्न भिन्न राजे कापिश, पुष्कलावती, तक्षशीला, इ. ठिकाणी राज्य करीत होते.

हर्मेअस हा शेवटचा यवन राजा इ. स. च्या पहिल्या शतकाच्या प्रारंभी काबूलमध्ये राज्य करीत होता. तक्षशीला व पुष्कलावती येथील यवनराज्ये त्यापूर्वीच शकांनी नष्ट केली होती. हर्मेअसचे राज्य लवकरच कुशाण लोकांनी जिंकून घेतले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डेमिट्रिअसपासून हर्मेअसपर्यंत सुमारे २०० वर्षे यवनांचे राज्य वायव्यसीमाप्रांत व पंजाब या भागात होते. शिकंदर व सेल्युकस यांनी भारतावर आक्रमणे केली; पण त्यांचे भारतातील वास्तव्य अल्पकाळच राहिले. भारतीय संस्कृतीवर त्यांचा प्रभाव मुळीच पडला नाही. नंतरच्या दोनशे वर्षांच्या यवनशासन-कालातही ग्रीक संस्कृतीचा प्रभाव भारतावर पडलेला नाही, असे व्हिन्सेंट स्मिथचे मत आहे. मिनांडरने बौद्ध पंथ स्वीकारला व हेलिओडोरसने वैष्णव पंथ स्वीकारला. यावरून भारतीय संस्कृतीचाच यवनांवर अधिक प्रभाव पडला, असे म्हणता येते. ग्रीक लोकांच्या 'प्रभावाने भारताचा विकास झाला, हे पाश्चात्य पंडितांचे मत निराधार आहे. यवनी भाषेतला एकही शिलालेख भारताच्या वायव्य भागात किंवा पंजाबात उपलब्ध झालेला नाही. यवन राजांची नाणी, ग्रीक पद्धतीची शिल्पे व चित्रांकित मातीची पात्रे मात्र पुष्कळ मिळाली आहेत. भारतीय शिल्पकला व चित्रकला यांवर ग्रीक शैलीचा थोडासा प्रभाव पडलेला दिसतो. पण भारतीय कलाकारांनी हळूहळू ती परकीय कलाशैली आत्मसात केली व तिला भारतीय रूप दिले, असे कलाभिदांचे मत आहे. [हि. क. इं. पी. २; भा. सां. इ.; बौ. का. भा.; प्रा. भा. सं.; ट्रा. ए. इं.; हि. जॉ. ए. इं.;श्री. कृ. मो. शेंववणेकर, नवभारत, सप्टेंबर १९६२]

यवमध्य चांद्रायण एक व्रत. यव हा दोन्ही टोकांना लहान असतो व मध्ये मोठा असतो, म्हणून या व्रताला हे नाव मिळाले आहे. याचा विधी असा – अमावास्येला उपवास करून पौर्णिमेपर्यंत प्रत्येक तिथीला भोजनाचा एक एक घास वाढवीत जावा. पुन्हा पौर्णिमेपासून क्रमाने एक एक घास कमी करीत जावा. जे घास खायचे ते चंद्रोदयाच्या वेळी खावे. उद्यापनाच्या वेळी गाय-बैलांचे दान करावे. ज्याला हे शक्य नसेल त्याने तीन प्राजापत्ये करावी. या व्रतामध्ये रोज अन्न भक्षण करावयाचे असल्यामुळे एकादशीव्रताचा लोप झाला, तरी त्याचा दोष लागत नाही. [प्रा. व्य. प्र. ; नि. सिं.]

यवागू यज्ञीय हविर्द्रव्य. सातूच्या पिठाची लापशी किंवा खीर असा याचा अर्थ आहे. पुरोडाश तयार करताना जसे प्रथम पीठ तयार करतात, तसे करून स्थालीमध्ये त्याची लापशी शिजवतात. नित्याच्या अग्निहोत्राला यवागू घ्यावी, असा एक काम्य विकल्प आहे. काही इष्टींमध्ये, काही देवतांना यवागू हा हवी म्हणून घ्यावा, असे तै. ब्रा. मध्ये म्हटले आहे (३.७.१). प्राचीन काळी या लापशीचा अन्नाप्रमाणे उपयोग होत असे. मालव जनपदातील लोकही लापशी खात, असे पाणिनी म्हणतो (अष्टा. ४.२.११६). [श्री. विद्याधरशास्त्री भिडे ; पा. का. भा.]

यशस्विनी एक देवता. हिला दुर्गा व विश्वरूपिणी समजतात. या देवतेला शिवाने शूल, विष्णूने चक्र, वरुणाने शंख, अग्नीने शक्ती, मरुतांनी धनुष्य-बाण, इंद्राने वज्र, कुबेराने चषक, यमाने दंड व पाश, ब्रह्म्याने कुंतक, मृत्यूने खड्ग व खेट आणि विश्वकर्म्याने रत्ने दिली. [ब्रह्मांड पु. ४. २९]

यशोधर्मा माळव्यात राज्य करणाऱ्या औलिकर वंशातील एक महान राजा. मंदसोरच्या परिसरात या वंशातील राजांचे काही शिलालेख सापडले आहेत. त्यावरून हे घराणे मंदसोर (दशपूर) येथे दीर्घ काल राज्य करीत होते, असे दिसते. त्याची ज्ञात झालेली वंशावळ अशी – जयवर्मा – सिंहवर्मा, – नरवर्मा (मालव संवत ४६१ – ४७४) – विश्ववर्मा (मा. सं. ४८०) – बंधुवर्मा (मा. सं. ४९३)– यशोधर्मा (विष्णुवर्धन– मा. सं. ५८९).

बंधुवर्मा हा गुप्त सम्राट कुमारगुप्त (पहिला) (इ. स. ४१३ – ४५५) याचा मांडलिक म्हणून दशपूर येथे राज्य करीत होता. त्याचे पूर्वज नरवर्मा व विश्ववर्मा यांच्या लेखांत गुप्त सम्राटांचा नामनिर्देश नसून, मालव संवताचा उपयोग केलेला आहे. त्यावरून हे घराणे दशपूर येथे स्वतंत्रपणे राज्य करीत असावे, असे अनुमान करता येते.

मालव संवत ५२४ चा एक शिलालेख अलिकडे मंदसोर येथे सापडला आहे. त्यात प्रभाकर नामक नृपतीने गुप्तांच्या शत्रूंचा पराभव केला, असा उल्लेख आहे. हा प्रभाकर औलिकर वंशातला असावा. गुप्तांचे शत्रू म्हणजे हूणच असावे, असे श्री. मिराशी म्हणतात.

मंदसोरजवळ महाराज गौरी याचे दोन शिलालेख सापडले आहेत. त्यांतील एका शिलालेखात आदित्यवर्धन नामक राजाचे वर्णन आहे. प्राचीन काळी मांडलिक राजांच्या लेखाच्या आरंभी तत्कालीन सम्राटाच्या नावाचा उल्लेख करण्याची पद्धत होती. तेव्हा आदित्यवर्धन हा महाराज गौरीचा सम्राट असावा, असे श्री. मिराशींचे मत आहे. वराहमिहिराच्या बृहत्संहितेत अवंतीच्या महाराजाधिराज द्रव्यवर्धनाचा उल्लेख आहे. हा द्रव्यवर्धन इ. स. च्या ५ व्या शतकाच्या उत्तरार्धात उज्जयिनीचा राजा असावा. आदित्यवर्धन व द्रव्यवर्धन हे विष्णुवर्धन (यशोधर्मा) याच्याच औलिकर वंशातले असावे आणि विष्णुवर्धन हा द्रव्यवर्धनाचा पुत्र असावा.

मंदसोरजवळ यशोधर्मा (विष्णुवर्धन) याचे विजयस्तंभ सापडले आहेत. हे दोन्ही स्तंभ मिहिरकुल नामक हूण राजावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मिळविलेल्या विजयाचे द्योतक म्हणून उभारले होते, असे त्यावरील लेखांवरून दिसते. मंदसोरजवळ यशोधर्मा व मिहिरकुल यांचे घनघोर युद्ध होऊन, त्यात यशोधर्मा विजयी झाला म्हणून ते स्तंभ उभारले असावे. त्याची राजधानी उज्जयिनी हीच असावी. प्रारंभी औलिकर वंशाचे राज्य दशपूर येथे होते. उज्जयिनी ही त्या वंशाची राजधानी झाल्यानंतर दशपूर येथे एका वेगळ्या घराण्याचे मांडलिक राज्य स्थापन झाले. यावरून यशोधर्मा (विष्णुवर्धन) याचा जन्म एका बलाढ्य वंशात झाला होता, असे म्हणता येते.

गुप्त सम्राटांची सत्ता दुबळी झाली तेव्हा यशोधर्म्याने आपली स्वतंत्र सत्ता स्थापली आणि मिहिरकुलाचा पराभव करून हूणांच्या मगरमिठीतून उ. भारताला मुक्त केले. याची सत्ता हिमालयापासून महेंद्र पर्वतापर्यंत आणि ब्रह्मपुत्रापासून सिंधुसागरापर्यंत पसरली होती, असे त्याच्या विजयस्तंभावरील लेखात म्हटले आहे.

मंदसोर येथेच यशोधर्म्याच्या काळातला दुसरा शिलालेख आहे, त्यात त्याचे विष्णुवर्धन हे दुसरे नाव आणि राजाधिराज व परमेश्वर या पदव्या यांचा उल्लेख आहे. त्या लेखात मालव संवत ५८९ (इ. स. ५३३–३४) दिलेला आहे. यशोधर्म्याने इ. स. ५३०–५४० या कालखंडात राज्य केले असावे. त्याच्या नंतर त्याचे राज्य लवकरच नष्ट झाले. [हि. क. इं. पी. ३ ; सं. मु. ३]

यशोवंतदास (जन्म इ. स. १४९१) ओडिया भाषेतील एक ज्ञानी कवी. हा पंचसखांमधला चौथा पुरुष असून, पंचाक्षरी मंत्राचा उपासक होता. ओढंग नामक गावी जगू मल्लिक (जगन्नाथ मल्लिक) व रेखादेई यांच्या पोटी त्याचा जन्म झाला. वयाच्या बाराव्या वर्षीच त्याने घर सोडले आणि भारतातील अनेक तीर्थांच्या यात्रा केल्या. नंतर जगन्नाथपुरीत आल्यावर त्याने चैतन्य महाप्रभूंकडून दीक्षा घेतली. पुढे राजा रघुरामाच्या अंजना या मुलीशी लग्न करून हा आपल्या गावी परत गेला.

यशोवंतदास संस्कृत पंडित होता. त्याने संस्कृत स्वरोदयाचा ओडिया भाषेत उत्तम अनुवाद केला आहे. त्याशिवाय प्रेमभक्ती, ब्रह्मगीता, गीतगोविंदचंद्र, गीताराम, इ. ग्रंथ याने रचले आहेत. या सर्व ग्रंथांमध्ये योग, तंत्र, वेदान्त, इ. विषय आले आहेत. गीतगोविंदचंद्र हा त्याचा सर्वजनप्रिय ग्रंथ आहे. नाथयोगी लोक भिक्षाटनाच्या वेळी याचेच गायन करीत असतात.

याने योगभक्तीच्या बळावर जगन्नाथाला वश करून घेतले होते, असे म्हणतात. त्याच्या कृपेमुळेच याच्या योगसाधनेत अनेक अद्‌भुतांचा समावेश झाला, अशी समजूत आहे. योगबलानेच ब्रह्मप्राप्ती व गोपीभावप्राप्ती होते, असे याचे प्रतिपादन आहे. [उ. सा. इ. ; कविश्रीमाला – ओडिया]

यशोवर्मा (इ. स. चे ८ वे शतक) कनौजवर राज्य करणारा एक बलाढ्य राजा. तो कोणत्या वंशातला किंवा कोणाचा पुत्र होता ते ज्ञात नाही. मात्र काही पंडित त्याला मौखरी वंशाचा मानतात. तो केवळ वीर पुरुष नव्हता, तर कवींचा आश्रयदाताही होता. भवभूती व वाक्पती हे थोर कवी त्याच्या दरबारात होते. वाक्पतीच्या गौडवहो या प्राकृत काव्यात यशोवर्म्याच्या गौडविजयाचे वर्णन आहे. गौडनृपतीचे नाव कवीने दिलेले नाही. त्याच्या विशाल साम्राज्यात मगधाचा समावेश झालेला होता. यशोवर्म्याने मगधावर आक्रमण करून तो देश जिंकला, तेव्हा गौडनृपती गौड देशात पळून गेला. पण त्याच्या सरदारांनी त्याला पुन्हा युद्धासाठी प्रवृत्त केले. मग मोठे युद्ध झाले. त्यात गौडसेनेचा पराभव झाला व राजा मारला गेला. यशोवर्म्याने सबंध बंगाल पादाक्रांत केला.

त्यानंतर यशोवर्मा दक्षिणेकडे वळला. नर्मदा नदीच्या काठाने जाऊन तो पश्चिम घाटापर्यंत पोचला व मग उत्तरेकडे वळून त्याने मरुदेश (राजस्थान) व श्रीकंठ (स्थानेश्वर) हे प्रदेश जिंकले. नंतर हिमालयापर्यंत मजल मारून तो कनौजला परतला. गौडवहो काव्यात या दिग्विजयाचे वर्णन केलेले आहे. त्यात ऐतिहासिक सत्य किती आहे, ते सांगता येत नाही. मात्र यशोवर्मा हा त्या काळातला सर्वांत बलाढ्य राजा होता, यात काही शंका नाही. त्याने चीनच्या सम्राटाशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केले होते. इ. स. ७३१ मध्ये त्याने आपला मंत्री चीनच्या दरबारात पाठवला होता. काश्मीरचा राजा ललितादित्य याच्याबरोबर त्याने तिबेटवर स्वारी करून तिबेटी सैन्याचा पराभव केला, असे राजतरंगिणीवरून कळते.

यशोवर्म्याची वैभवशाली राजवट इ. स. ७४० पर्यंत चालू होती. पण त्या सुमारास ललितादित्य व यशोवर्मा यांच्यांत वैर उत्पन्न झाले. मग त्यांचे युद्ध होऊन यशोवर्म्याचा पराजय झाला. राजतरंगिणीत ही हकीकत दिलेली आहे. यशोवर्मा त्या युद्धात मृत्यू पावला किंवा नाही, ते निश्चित कळत नाही. पण त्या नंतरची त्याची माहिती उपलब्ध नाही. इ. स. ७०० ते ७४० ही त्याची कारकीर्द असावी, असे एक अनुमान आहे. चालुक्य राजा विनयादित्य याचे इ. स. ६९५ च्या सुमारास उत्तर भारताच्या सम्राटाशी युद्ध झाल्याचा उल्लेख एका शिलालेखात आहे. तो सम्राट म्हणजे यशोवर्माच असल्यास त्याची राजवट इ. स. ६९० पासून सुरू झाली असण्याचा संभव आहे. [ए. इं. मजु.; भा. प्रा. रा.; हि. क. इं. पी. ३]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यशोविजय (इ. स. चे १७ वे शतक) एक श्वेतांबरपंथी जैन आचार्य व प्रकांड पंडित. याचा जन्म गुजरातमधील कनोडा गावी झाला. बालपणापासूनच याची बुद्धी प्रखर आणि स्मरणशक्ती तीव्र होती. वयाच्या अठराव्या वर्षी काशीला जाऊन व तिथे एक तप ब्राह्मणवेषात राहून याने रघुनाथशिरोमणी नामक आचार्याकडे दर्शनांचा अभ्यास केला. नंतर आगरा येथे त्याने जैन न्यायाचा अभ्यास केला.

यशोविजयाचा संस्कृत, प्राकृत, गुजराती आणि हिंदी या भाषांवर सारखाच अधिकार होता. या चारही भाषांमध्ये त्याने ग्रंथरचना केली आहे. त्याच्या ग्रंथांची संख्या तीनशेहून अधिक आहे. त्यांत न्यायप्रदीप, तर्कभाषा, न्यायरहस्य, न्यायामृततरंगिणी, न्यायखंडनखाद्य, अनेकान्तजैनमतव्यवस्था, इ. ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याशिवाय त्याने दिगंबरपंथी अष्टसाहस्री ग्रंथावर वृत्ती लिहिली आहे. याची अनेक स्फुट पदेही उपलब्ध आहेत. जैन परंपरेनुसार हेमचंद्रानंतर याच्या इतका सर्वशास्त्रपारंगत दुसरा पंडित झाला नाही.

हा डभई येथे मृत्यू पावला. [हिं. जैं. भ. क.; जै. ध.; का. सा. सा.; म. च. को.; हिं. सा. २.]

यष्टिवन बौद्ध लोकांचे एक प्राचीन पवित्र वन. हे राजगृहापासून बारा मैलांवर होते. बिंबिसाराच्या राजशाही बगीचाला हे नाव होते. गौतम बुद्ध गयाशिरापासून राजगृहाकडे जाताना इथे थांबला होता. या वनात सुपतित्थ नावाचा चैत्य असल्यामुळे हे स्थान विशेष प्रसिद्ध होते. याच्या जवळ गरम पाण्याचे दोन झरे आहेत. [हि. जॉ. ए. इं.]

यहुदी भारतातील ज्यू लोकांनाच यहुदी किंवा बेने इस्राएल म्हणतात. हे लोक इ. स. च्या १ ल्या शतकात भारतात आले, असे काही इतिहासकारांचे मत आहे. काहींच्या मते ते इ. स. च्या ६ व्या शतकात इकडे आले. इ. स. च्या ८ व्या शतकात मलबारच्या राज्यकर्त्यांनी या लोकांना सनद दिली होती, ती त्यांनी जपून ठेवलेली आहे. त्यांना धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्य मिळाले होते. इ. स. च्या १६ व्या शतकात मुसलमान व ख्रिस्ती लोकांनी यांच्यावर अत्याचार केल्यामुळे बरेच जण दूरच्या प्रदेशात पळून गेले.

काही यहुदी लोक सधन व्यापारी होते; तर काही कोच्चीनच्या राजाचे सल्लागार होते. पॅलेस्टाइनमधून आलेले यहुदी लोक युरोपियन लोकांप्रमाणे गोरे होते. काळे यहुदी हे एतद्देशीय स्त्रियांच्या पोटी जन्मलेले होत.

या लोकांनी भारतीय लोकांचे बरेच आचार व संस्कार स्वीकारलेले आहेत. लग्नात वधूच्या गळयात ताळी बांधण्याची चाल यांच्यांत आहे. हे लोक मलयाळम भाषा बोलतात. जगातल्या इतर ज्यू लोकांप्रमाणेच हे लोक धार्मिक सण व उपवास पाळतात. जेरुसलेमच्या नाशाच्या दिवशी हे उपास करतात. मुंबई, ठाणे व कुलाबा या जिल्ह्यांत या लोकांची बरीच वस्ती आहे. पाहा — बेने इस्राएल. [का. ट्रा. स. इं.; डे. रि. सा. इं.]

यक्ष एक अतिमानवी योनी. यक्षांचा उल्लेख नेहमी गंधर्व आणि किन्नर यांच्या बरोबर होतो; कित्येकदा 'यक्षरक्षांसि' असा राक्षसांबरोबरही होतो. यक्षांच्या उत्पत्तीबद्दल वेगवेगळया कल्पना प्रचलित आहेत, त्या अशा—

(१) ब्रह्मदेवाच्या शिंकेतून यक्षांची उत्पत्ती झाली.

(२) कश्यप व विश्वा यांच्यापासून यक्ष झाले.

(३) यक्ष हे प्रचेत्याचे पुत्र होत.

(४) प्रजापतीने जल आणि प्राणी निर्माण केले. त्याचबरोबर त्यांच्या संरक्षणासाठी काही मानवसदृश असे जीव उत्पन्न केले. जन्मताच ते तहान–भूक म्हणून ओरडू लागले. ब्रह्मदेवाला वाटले, की हे आता आपण निर्मिलेल्या प्राणिसृष्टीला खातील.

यक्ष–युग्म

म्हणून ब्रह्मदेव त्यांना म्हणाला 'रक्षध्वम्' = रक्षण करा. पण त्यांच्यापैकी काहीजणांनी रक्ष् धातूचा रोखणे, अवरोध करणे,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बलात्काराने बळकावणे असा धात्वर्थ घेऊन, 'ठीक आहे' असे म्हटले. ते झाले राक्षस. काही लोक म्हणाले, 'यक्षामः' = आम्ही खाऊन टाकू. ते झाले यक्ष (वा. रा. उ. ४).

पण अर्वाचीन भाषाशास्त्रज्ञ असे मानू लागले आहेत, की यक्ष शब्द हा मूळ संस्कृत नसून, ते कोणत्या तरी निषाद-भाषेतल्या शब्दाचे संस्कृतीकरण असावे. यक्षांना निरनिराळ्या लोकभाषांत यख्ख, जख्ख, जाख, यक, यस्क असे म्हणतात.

यक्षस्वरूप – महाभारताच्या वनपर्वात यक्षप्रश्नाच्या आख्याना‌च्या संदर्भात यक्षाचे स्वरूपवर्णन दिले आहे, ते असे–

विरूपाक्षं महाकायं यक्षं तालसमुच्छ्रयम् ।
ज्वलनार्कप्रतीकाशमधृष्यं पर्वतोपमम् ॥

अर्थ – (धर्मराजाला भेटलेला तो यक्ष) वटवटीत डोळ्यांचा, आडमाप देहाचा, ताडमाड उंचीचा, अग्नी किंवा सूर्य यांच्यासारखा, अजिंक्य आणि पर्वतासारखा होता.

ब्रह्मवैवर्त पुराणात यक्षांचे वर्णन आले आहे, ते असे–

आजग्मुर्यक्षनिकराः कुबेरवरकिङ्कराः ।
शैलजप्रस्तराकारा अञ्जनाकारमूर्तयः ॥
विवृताकारवदनाः पिङ्गलाक्षा महोदराः ।
स्फटिकारक्तवेषाश्च दीर्घस्कन्धाश्च केचन ॥

अर्थ – कुबेराचे श्रेष्ठ असे सेवक असलेले, पर्वतावरील पाषाणांच्या आकारांचे, काजळासारखे काळेकुट्ट शरीर असलेले, तोंड रुंद उघडलेले, पिंगट डोळ्यांचे, स्थूलोदर, स्फटिकासारखा आरक्तवेष धारण केलेले, दीर्घबाहू, असे यक्षसमुदाय त्या ठिकाणी प्राप्त झाले.

यक्षांची आणखी काही लक्षणे अशी–

यक्ष हे रक्तमांसप्रिय असतात. ते स्मशानात किंवा जलाशयाजवळ राहतात. युधिष्ठिराला भेटलेला यक्ष एका जलाशयाजवळच होता. यक्ष आपल्या निवासस्थानाजवळ येणाऱ्या लोकांना मारतात. ते वाटमारीही करतात. व्यापारी तांडे रानातून जाऊ लागले म्हणजे त्या तांड्यांतल्या माणसांवर हल्ला करून त्यांना व त्यांच्या पशूंना खाऊन टाकतात. यक्ष बंदिस्त घरांतूनही माणसांना उचलून नेऊ शकतात. ते विलासी, कामुक, चंचल व दुष्ट असतात. ते गुप्त संपत्तीचे रक्षण करतात. नेमून दिल्यास नगररक्षणाचेही काम करतात.

यक्ष हे सुंदर असतात, अशीही कल्पना पुराणांतरी आढळते. सुंदर पुरुषाला यक्ष किंवा गंधर्व समजण्याची रूढी लोकांत होती. दमयंतीच्या स्वयंवरात जमलेल्या स्त्रिया नल राजाला पाहून म्हणू लागल्या, की 'हा कोणी देव, गंधर्व किंवा यक्ष असावा' (म. भा. वन. ५२. १६). वृद्ध आणि महावीर यांची सुंदर रूपकांती पाहून तत्कालीन लोक त्या दोघांनाही यक्षच म्हणत.

लोकमानसातल्या यक्षविषयक कल्पना मात्र याहून वेगळ्या होत्या, त्या अशा– यक्ष पाऊस पडतात; अन्न फळे व वनस्पती यांची समृद्धी करतात; गाव आणि गायी यांचे रक्षण करतात आणि रोग, भूतबाधा व वांझपण घालवतात. ते देवस्थानात द्वाररक्षक होतात. ते पाणवठ्याजवळ येणाऱ्या तृषितांना कूटप्रश्न विचारून, त्यांच्याकडून योग्य उत्तर न मिळाल्यास त्यांना मारून टाकतात. ते विघ्नकर्ते असतात तसेच विघ्नहर्तेही असतात. ते उत्तम कलावंत असतात.

यक्षाधिपती कुबेर

त्यांना सुंदर चित्रे काढता येतात, तशीच भव्य मंदिरेही त्यांना उभारता येतात.

कुबेर हा यक्षाधिपती होय. मणिभद्र हा त्याच्या खालोखाल असतो. पुराणांतरी यक्षांची जी नावे आढळतात, ती अशी–

धनद, विशालक, हरिकेश, शेवल, सुपरी, वरुण, अर्यमा, भंडीर, गर्दभ, पूर्णभद्र, समुद्रभद्र, सर्वतोभद्र, सुमन, इत्यादी.

महामायूरी हा बौद्धग्रंथ इ. स. च्या तिसऱ्या शतकाच्या सुमारास निर्माण झाला. त्यात यक्षांच्या नावांची मोठी थोरली यादीच दिलेली आहे. पुढच्या काळात बावन्न ही यक्षसंख्या निश्चित झाली आणि कालांतराने ते बावन्न वीर या नावाने लोकमानसात प्रतिष्ठित झाले.

यक्षांचे लोहेय, भारतेय, कृशांगेय व विशालेय असे चार मुख्य गण सांगितले आहेत.

विद्युन्माला, चंद्रलेखा, सुलोचना, आलीका, वेंदा, मदा, इमिसीका, ही यक्षिणींची काही नावे होत. त्या वेगवेगळ्या ठिकाणी वास्तव्य करतात. यक्षिणींच्या शरीरांतून सुगंध बाहेर पडतो व त्याचा वास घेतल्याने पुरुषांची शुद्ध हरपते. यक्षिणी क्रूरकर्मी असतात. विशेषतः मुलांना पळवून नेऊन मारतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांना आवडता छंद असतो. महाभारतात जरा यक्षिणीची कथा आहे. ती अशीच मुलांना मारणारी आणि खाणारी होती. ही पौराणिक जरा म्हणजे बौद्ध परंपरेतील हारीती यक्षिणी होय. हिला कुबेरपत्नी मानलेले आहे. ही प्रथम लोकांची मुले पळवून मारीत होती. तिचा हा उच्छाद पाहून लोक घाबरले आणि बुद्धाकडे गाऱ्हाणे घेऊन गेले. बुद्धाने तिला वळवण्यासाठी एक युक्ती केली. त्याने हारीतीच्या मुलांपैकी एकाला लपविले. त्यामुळे ती कावरीबावरी झाली. तिच्या हृदयात मातृस्नेह उचंबळला. त्या परिस्थितीत बुद्धाने तिला उपदेश केला. 'तुझे मूल नाहीसे झाल्यानंतर तुझी जी अवस्था झाली, तीच अवस्था अनेक आया-बायांची होत असते, हे लक्षात आण आणि यापुढे बालघाताचे कुकर्म करू नकोस.' तेव्हापासून हारीती बालरक्षक बनली.

यक्षिणी

अद्भुतक्रतू हे वेदांतले यक्षाचे खास विशेषण आहे. यक्ष हा स्वरूपसुंदर, महान व अद्भुत असा मानलेला आहे. एका ऋचेत मित्रावरुणांना अद्भुतक्रतू हे यक्षाचे खास विशेषण लावले आहे (ऋ. ५. ७०. ४.). असे असले तरी वैदिक आर्य हे यक्षभक्त किंवा यक्षपूजक नव्हते. दुसऱ्या एका मंत्रात असा ध्वनी आहे, की जर कोणी मार्ग चुकलेला शेजारी यक्षसदनात जात असेल तर, हे अग्ने, तू लपत छपत त्याच्या घरी जाऊ नकोस (ऋ. ४. ३. १३). इथे शेजारी शब्दाने यक्षपूजक आर्येतर लोक समजायचे. अग्निपूजकांनी त्यांच्याशी संपर्क करू नये, असा याचा भावार्थ आहे. वैदिकांच्या मते यक्षासारख्या अद्भुत देवांवर विश्वास ठेवणारे लोक हे अविकसित बुद्धीचे आहेत (ऋ. ७. ६१. ५).

अथर्ववेदात मात्र यक्षाला भुवनव्यापक म्हटले आहे –

महद् यक्षं भुवनस्य मध्ये । तस्मै बलिं राष्ट्रभृतो भरन्ति ॥
(अथर्व १०. ८. १५)

अर्थ – या भुवनांच्या मध्ये कोणी एक महान यक्ष व्यापून राहिला आहे. सर्व राष्ट्रधर त्याला बळी देतात.

अथर्ववेदात अमृताने घेरलेल्या अपराजित अशा ब्रह्मपुरीचा उल्लेख असून, तिच्यात महाकाय यक्ष राहतो असे म्हटले आहे. ही ब्रह्मपुरी अवध्य म्हणजे अमर आहे, कारण तिच्यातला यक्ष अमर आहे (अथर्व १०. २. १९-३३).

भारतात वैदिक धर्माचा उदय होण्याच्या फार पूर्वीपासून यक्षसंप्रदाय प्रस्थापित होता. यक्ष ही लोकधर्मी देवता आहे. एका काळी यक्षपूजा सर्वांत अधिक प्रचलित होती. वेदोत्तर साहित्य, तसेच बौद्ध-जैन साहित्य व काव्यसाहित्य यांत यक्षांचे उल्लेख विपुल प्रमाणात आहेत. पुराणांत आणि जैन-बौद्ध साहित्यात अनेक यक्षकथा सांगितलेल्या आहेत. आजही सर्व भारतात वीरब्रह्म नावाचा एक देव पूजला जातो. यातले वीर व ब्रह्म हे दोन्ही शब्द यक्षवाचकच आहेत. वीरब्रह्म हे संयुक्त नाव आहे.



यक्षी–भूतेश्वर

ब्रह्म शब्दही यक्षसंप्रदायातूनच आलेला आहे. पण कालांतराने यक्षांचे हे श्रेष्ठत्व ऱ्हास पावू लागले आणि त्यांचा समावेश भूतगणांत आणि क्षुद्र दैवतांत होऊ लागला. सांप्रत रूढ असलेली वीरपूजा हा प्राचीन यक्षपूजेचाच अवशेष होय. भारतीय लोक मारुतीला महावीर समजतात. तो यक्षांचा नियंत्रक असतो. या महावीराची मूर्तीच्या रूपात आणि स्तूपाच्या रूपात पूजा होते. दिवाळीतल्या नरकचतुर्दशीच्या रात्रीला यक्षरात्री असे नाव आहे. महावीराचा जन्मही त्याच दिवशी झाला आहे. या दोन गोष्टी महावीराचे यक्षसंस्कृतीशी नाते दाखवितात. उत्तर प्रदेशात दिवाळीच्या दिवशी महावीराची पूजा करून त्याला चुरम्याचा नैवेद्य दाखवितात. महाराष्ट्रात दासमारुती व वीरमारुती अशी मारुतीची दोन रूपे प्रसिद्ध आहेत. दासमारुती हा रामापुढे हात जोडून आणि मान वाकवून उभा असतो; तर वीरमारुती हा हात उभारून सदैव युद्धोन्मुख असतो. मारुतीचे हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यक्षसमन्वित रूपच गावोगावी पाहायला मिळते.

वेदोत्तरकाली जैन व बौद्ध हे धर्म उदयाला आले. त्यांनीही यक्षांशी आपला संबंध कायम ठेवला. अनेक यक्ष-यक्षिणी बौद्ध प्रवाहात येऊन बौद्ध देवता बनल्या, स्तूपांमध्ये त्यांच्या मूर्ती बनवल्या जाऊ लागल्या. यक्ष हे प्रथम बुद्धाला मानीत नव्हते. ते त्याच्या शिष्यांना व भिक्षूंना त्रास देत असत. पण पुढे बुद्धाच्या उपदेशाने ते त्याला मानू लागले. महायान बौद्धांत पांचिक या नावाने कुबेरयक्ष व त्याची पत्नी हारीती यांची पूजा सुरू झाली. बौद्ध वाङ्मयात यक्ष हे दयाळू, साहाय्यक व मानवाचे मित्र मानलेले आहेत. अपवाद फक्त जातक-कथांचा. त्या कथांमधून यक्षांना महान शक्तीचे, भयंकर आणि मानव-जातीचे शत्रू म्हटले आहे.

जैन धर्मात यक्ष-यक्षिणींना तीर्थंकरांच्या सेवक-सेविकांचे स्थान मिळाले. जैन व्यापारी मणिभद्र-यक्षाला आपला संरक्षण-कर्ता म्हणून पूजतात (मणिभद्र पाहा).

"नांच्या मते यक्ष हे मानवांचे हितकर्ते आहेत. पुत्रप्राप्ती-साठी व रोगनिवारणासाठी यक्षांची उपासना केल्यास इच्छित फल प्राप्त होते, असे विपाकसूत्र व नायाधम्मकहाओ या जैन ग्रंथांवरून कळते. चरकसंहिता व सुश्रुतसंहिता या आयुर्वेदीय ग्रंथांत मात्र यक्षांना उपद्रवकारकच मानले आहे. माणसाला जशी भूतबाधा होते, तशीच यक्षबाधाही होते आणि ती दूर करण्यासाठी औषधांऐवजी मंत्र-तंत्रात्मक उपचारच करावे लागतात, असे वरील ग्रंथांत सांगितले आहे.

यक्षांची एक संज्ञा राजा अशी आहे. कुबेर हा यक्षांचा राजा असल्या-मुळे त्याला राजराज किंवा महाराज अशी पदवी मिळाली. कुबेराला दिल्या जाणाऱ्या बलीला महाराजवली म्हणत. पाली साहित्यात चार दिशांच्या रक्षकांना चारमहाराज म्हटले आहे. हे महाराज म्हणजे यक्षच होत.

सुदर्शन यक्षी–भरहूत

वर सांगितलेली अथर्ववेदातली अमर यक्षाची कल्पना महाभारतातील पुढील श्लोकात आढळते–

पितामहस्तु प्रीतात्मा ददौ वैश्रवणस्य ह ।
अमरत्वं धनेशत्वं लोकपालत्वमेव च ।

(म. भा. वन. २५८.१५)

अर्थ – ब्रह्मदेवाने प्रसन्न होऊन वैश्रवण कुबेराला अर्थात महायक्षाला अमरत्व, धनाधिपत्य व लोकपालत्व या गोष्टी दिल्या.

त्या काळातील लोकमानसातल्या यक्षविषयक कल्पना अशा– यक्षांच्या जवळ अमृत आहे. त्यायोगे ते स्वतः अमर आहेत आणि भक्तांनाही अमृतत्व देत आहेत. यक्षांच्या मूर्तींमध्ये त्यांच्या डाव्या हातात अमृताचा घट दाखविला जातो, त्याचे कारण हे आहे. त्या काळी यक्षपूजा प्रचलित होती. यक्षाच्या कृपेने व्याधी नष्ट होतात व संपत्ती मिळते अशीही श्रद्धा होती.

पूजास्थाने – बौद्ध स्तूपांत यक्षमूर्ती कोरून त्यांची पूजा केली जात असे. यक्षांच्या पूजास्थानांना यक्षचैत्य म्हणत. काही यक्षस्थाने माती, विटा किंवा दगड यांनी बनविलेल्या चौथऱ्या-च्या स्वरूपात असत. त्यावर पूजाशिला, आयागपट्ट किंवा त्रिकोणी पिंडी असे. एखाद्या मोठ्या नगराबाहेर घंटिका यक्षाचे स्थान असे. चोर, लुटारू किंवा परचक्र नगराकडे येत असल्यास तो घंटा वाजवून नागरिकांना त्याची सूचना देत असे. प्राचीन काळी यक्षांची मंदिरेही बांध-लेली होती, असे वाटते.

परखम-यक्ष

यक्षमूर्ती – ऐतिहासिक काळातील भारतीय मूर्तिकलेत यक्षमूर्ती या सर्वांत प्राचीन आहेत. डोक्यावर पगडी, कानांत कुंडले, गळ्यात चपटा कंठा, छातीवर त्रिकोणी हार, बाहूंवर अंगद, हातांत कटक, वर उत्त-रीय, खाली धोतर, उभे अव-स्थान, उजवा हात उभारलेला आणि डावा हात कमरेवर किंवा झुलता, असा यक्षमूर्तींचा वेष-परिवेष असतो. या मूर्तींच्या अनु-करणातूनच पुढे बोधिसत्त्व व विष्णू यांच्या मूर्ती बनल्या. आठ फुटांपासून बारा फुटांपर्यंत उंचीच्या यक्षमूर्ती सापडल्या आहेत. मध्य प्रदेशातल्या परखम या गावी एक मोठा यक्ष मिळाला आहे. गावाच्या नावावरून हा परखम-यक्ष म्हणून ओळखला जातो. उत्तर प्रदेशात मानवी उंचीच्या यक्षिणींच्या मूर्ती सापडल्या आहेत. ओडिसातल्या शिशुपालगडाजवळ किल्ल्यांत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मोठ्या यक्षमूर्ती मिळाल्या आहेत. भरहूत व बोधगया येथील स्तूप व कठडे यांवर यक्षमूर्ती कोरलेल्या आहेत. यक्षांच्या बहुतेक आकृती मदनसुंदर दिसतात. काही यक्ष मात्र ठेंगू आणि कुरूप असे निर्मिले गेले आहेत. त्यांच्या मुखातून कमळे किंवा कमलमाला बाहेर येताना दिसतात. त्यांतले काही स्थूलोदर, द्रव्याची थैली घेतलेले व मद्यपानामुळे उग्र दिसतात.

यक्षी या नेहमी एखाद्या झाडाजवळ दिडक्या पायाने किंवा बुंध्याला पायाचा विळखा घालून किंवा फांदीवर चढून पुढे झुकलेल्या अशा दिसतात. सांची, भरहूत, मथुरा व अमरावती येथील मूर्तिकलेत यक्षींचे कामुक सौंदर्य विशेषत्वाने जाणवते. या यक्षिणींना पुष्पभंजिका असे दुसरे नाव आहे. कारण त्या वृक्षांची फुले तोडून त्यांच्या माळा बनविताना दाखवलेल्या असतात. काही यक्षीमूर्ती देव, दानव आणि नाग यांनी परिवृत असतात. त्यांच्या भोवती भूत–पिशाचही दाखवले जातात.

यक्षांची मूळ वस्ती अलकापुरीत होती, अशी वर्णने सर्वत्र मिळतात. याचा अर्थ यक्षपूजेचा उगम भारताच्या उत्तरेकडील प्रदेशात झाला, असा होतो. पुढे यक्षपूजक लोक अलकापुरी सोडून खाली उतरले, तेव्हा व्रजमंडल हे त्यांचे प्रमुख केंद्र बनले. कालांतराने सिंहल व पूर्व सागरातील द्वीपे इथपर्यंत त्यांचा प्रसार झाला. [पु. इं.; लो. सा. रू.; म. लो. उ.; पा. का. भा.; डे. हिं. इ.; ब्र. सां. इ.; प्रा. भा. लो. ध.; भा. सा. इ.]

यक्षगान द. भारतातील एक नृत्यनाट्य. याचा प्रसार मुख्यत्वे कर्नाटक, आंध्र व तमिळनाडू या प्रदेशांत असून, आंध्रात याला वीथिनाटकम् व तमिळनाडूमध्ये भागवतमेळा असे म्हणतात. भिन्न रूपे व भिन्न वेष धारण करणाऱ्या व्यक्तीला तेलुगूमध्ये जक्कुलू असे म्हणतात. जक्कुलू हा यक्ष शब्दाचा अपभ्रंश आहे. त्यावरून यक्षासारखे नटून सादर केल्या जाणाऱ्या नृत्यनाट्याला यक्षगान असे नाव मिळाले. आंध्रातल्या अनंतपूर जिल्ह्यात ‘ जक्कुलुचेरुवु ’ नावाचे एक गाव असून, तिथले सगळे लोकच पिढीजात यक्षगानकुशल आहेत.

आरंभी यक्षगान हे एक मकनाट्य होते. कालांतराने त्यात रामायण–महाभारतांतले कथाप्रसंग संवादरूपाने सादर केले जाऊ लागले. अहल्योद्धार, सुदामचरित्र, ध्रुवाख्यान, हरिश्चंद्राख्यान, प्रल्हादचरित्र, रुक्मिणीस्वयंवर, इ. विषयांवरही यक्षगानांची रचना झाली.

तंजाऊरचा शहाजीराजा (दुसरा) याने सुमारे वीस यक्षगाननाट्ये रचली. यक्षगानातील सूत्रधार, नटी, विदूषक, इ. पात्रांसाठी त्याने काही नियम केले. त्यामुळे यक्षगानाचे स्वरूप सुसंस्कृत आणि चित्ताकर्षक बनले.

कन्नड यक्षगानाचे बऱ्याच बाबतींत कोकणातल्या दशावतार खेळाशी साम्य असून, आजही कर्नाटकात कुठे कुठे त्याला

यक्षगानातील एक दृश्य

दशावतार यक्षगान असेच म्हणतात. कन्नड यक्षगान हे शक्तीच्या कृपेसाठी सादर केले जाते. ‘ माझी अमुक तमुक मनःकामना पूर्ण झाली, तर तुझ्यासमोर यक्षगान करवीन, ’ अशा प्रकारचे नवस देवीपुढे बोलले जातात व कामनापूर्तीनंतर यक्षगान होते.

यक्षगानातील नाट्यप्रसंग

कार्तिकापासून चैत्रापर्यंतचे चार-पाच महिने कर्नाटकातल्या कुळवाडी-शेतकऱ्यांना मोकळे असतात. हेच लोक यक्षगान सादर करतात. वेगवेगळ्या श्रीमंत देवस्थानांचे व्यवस्थापक या यक्ष-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गान करणाऱ्या नटांना वेषभूषादी आवश्यक ते साहित्य पुरवतात व मग ही मंडळी यक्षगानाचे कार्यक्रम करण्यासाठी दौऱ्यावर निघतात. मंगळूर जिल्ह्यात यक्षगान सादर करणाऱ्या ज्या अनेक नाट्यमंडळ्या आहेत, त्यांत कोल्लूरमेळा, मारणाकट्टी मेळा, मंदाती मेळा, इ. मंडळ्यांची नावे सुप्रसिद्ध आहेत. बहुधा प्रत्येक ग्रामदेवतेपुढे यक्षगान होतेच; याशिवाय काही श्रीमंत लोक आपल्या अंगणातही यक्षगान घडवून आणतात.

यक्षगानातले नाट्य ज्या पौराणिक आख्यानावर उभारले जाते, त्याला प्रसंग म्हणतात. त्यांची भाषा कन्नड असते. मंगळूरकडे ती कोकणी असते. कूट आणि आट अशा दोन पद्धतींनी यक्षगान सादर केले जाते.

कूट पद्धतीला ताळमद्दळे असेही म्हणतात. ताळमद्दळे म्हणजे टाळ-मृदंगाच्या साथीवर केले जाणारे यक्षगान. एखाद्या घरातल्या प्रशस्त सदरेवर हे होते. यात नृत्यनाट्य नसते तर केवळ प्रसंगांचे गायन असते. गायनाची पद्धत अर्थातच कर्नाटक संगीताशी जुळती असते.

आट पद्धतीचे यक्षगान म्हणजे बैलाटम. बैल म्हणजे मैदान किंवा पटांगण आणि आटम म्हणजे नृत्यनाट्य होय. उघड्या मैदानावर किंवा माळरानावर सादर केले जाणारे म्हणून बैलाटम. सहा हात उंचीचे चार बांबू चार दिशांना उभे करून १५ × १२ फुटांची भूमी मर्यादित केली, की बैलाटमचे रंगस्थळ तयार होते. त्याला वर आंब्याचे टाळे बांधतात. त्याच्या जवळच एक लहानशी जागा माडाच्या झापांनी झाकून घेतात, तिला रंगपट म्हणतात. रंगमंचाच्या दोन्ही आणि समोरच्या बाजूला प्रेक्षक बसतात.

रात्र पडली, की एक वादक रंगपटात चेंडे नावाचे एक ढोलासारखे वाद्य वाजवू लागतो. ही यक्षगान सुरू होण्याची पहिली सूचना होय. त्याच्या पाठोपाठ दुसरा एक जण मृदंग वाजवू लागतो. त्याच्या संगे झांजवाला झांज वाजवतो. मग धूप घातला जातो. नंतर सूत्रधार गणेशस्तवन करू लागतो. हे सगळे रंगपटातच घडते.

गणेशस्तवन झाल्यावर सूत्रधाराची म्हणजे भागवताची रंगपटापासून रंगस्थळापर्यंत मिरवणूक निघते. भागवताच्या मागे वादक आपापली वाद्ये वाजवीत चालतात. त्यांच्या आगेमागे दिवटिगे म्हणजे दिवट्या धरणारे असतात. मिरवणूक रंगस्थळी आल्यावर भागवत रंगस्थळाच्या मागे एका बाकावर बसतो.

भागवत ही यक्षगानातली प्रमुख व्यक्ती होय. तो विद्वान असतो, संगीतज्ञ असतो व नाट्य-नृत्यकलाकोविद असतो. एका अर्थी तो यक्षगानाचा दिग्दर्शकच असतो.

यक्षगानातील नटमंडळी वयाने प्रौढ व बहुश्रुत असतात. प्रसंगी ते संवाद-संभाषणे स्वयंस्फूर्तीने करतात. राम, रावण, धर्म, दुर्योधन यांची कामे करणारी माणसे ठरलेली असतात. त्यांच्या शाब्दिक चकमकी प्रेक्षकांना पूर्ण परिचित असल्या, तरी प्रत्येक प्रसंगी त्यांत वेगळा रंग भरला जातो व त्यामुळे त्याला एक प्रकारची रंजकता येते. अर्थातच काहीं पात्रे अधिक रंग भरण्याच्या उद्देशाने जेव्हा मूळ प्रसंगाला सोडून बडबड करू लागतात, तेव्हा भागवत आपली झांज जोरजोराने वाजवून त्यांना वळणावर येण्याची सूचना देतो.

भागवत रंगस्थळामागे येऊन बसला, की मग कोंडगी म्हणजे विदूषक प्रवेश करतात. ते आल्याबरोबर वेड्यावाकड्या उड्या मारून व गंमतीदार बोलून प्रेक्षकांना खदखदा हसवतात. ते गेले, की मग बाळगोपाळ येतात; परंतु ते प्रत्यक्ष रंगमंचावर प्रवेशण्यापूर्वी प्रेक्षकांची उत्सुकता यथेच्छ ताणतात व मगच प्रेक्षकांपुढे येतात. त्यासाठी रंगमंचावर एक आडवी चादर धरतात व त्यामागे बाळगोपाळ आपले नृत्य सुरू करतात. या नृत्याचे नाव तेरे कुणित असे आहे. मग अनपेक्षितपणे चादर बाजूला करतात व प्रेक्षकांना बाळगोपाळांचे नृत्य दिसू लागते.

यक्षगानातील नर्तक

बाळगोपाळ नाचत असताना त्यांच्या मागे बसून भागवत नांदीगीत गात असतो. गणपतीची लाकडी मूर्ती रंगमंचावर आणून उभी करीपर्यंत हे नांदीगीत व नृत्य चालू राहते.

मग गोकुळातल्या गोपींचे प्रतिनिधी म्हणून दोन स्त्रीवेषधारी पुरुष रंगमंचावर येतात. त्या वेळी गायिल्या जाणाऱ्या गीतांत गोपींच्या कृष्णाविषयी लाडिक तक्रारी असतात.

यक्षगानाचा नाट्यविषय कोणताही असला, तरी येथपर्यंत सगळा पूर्वरंग हा असाच असतो. त्यापुढे मुख्य नाटक सुरू होते. प्रथम नाटकातली पात्रे चेंड्याच्या साथीवर नाचत नाचत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रंगभूमीवर येतात. त्यांच्या या नृत्याला बोड्डलग असे नाव आहे.

मग नाटक महाभारतातील विषयाचे असेल, तर युधिष्ठिर त्यावर म्हणजे चार चाके लावलेल्या छोट्याशा टेबलावर आरूढ होतो. हे टेबल प्रसंगी रथ, प्रसंगी शय्या तर प्रसंगी सिंहासनही बनते. मग भागवत आणि युधिष्ठिर यांचे संभाषण सुरू होते व त्यातून प्रेक्षकांना युधिष्ठिराची ओळख करून दिली जाते. हे संभाषण कन्नड किंवा कोकणी भाषेत असले, तरी ते साध्या बोलभाषेत नसते. भागवत संस्कृतप्रचुर भाषेत बोलतो, तर युधिष्ठिर सम्राटाच्या थाटात बोलतो. त्यांच्या संवादाचे स्वरूप साधारणपणे असे असते —

भागवत — राजाधिराज, राजमार्तंड, कोटिप्रकाश —

युधिष्ठिर — शाहवास !

भागवत — अरितिमिर मार्तंड —

युधिष्ठिर — शाहवास !

भागवत — सुस्वागतम्

युधिष्ठिर — वाहवा !

भागवत — नामाभिधानम् ?

युधिष्ठिर — भागवत महाशय ! तुम्ही हस्तिनापूरच्या राजाचे नाव कधी ऐकले आहे ?

भागवत — राजा युधिष्ठिर !

युधिष्ठिर — शाहवास ! शाहवास ! आमीचि, आमीचि !

भागवत — या वेळी सभाप्रवेश करायचं कारण ?

युधिष्ठिर — कारणं अनेक. निवेदन करतो—

मग प्रेक्षकांना कळते, की रंगभूमीवर आलेला हा भरघोस मिशांचा, पायघोळ झगा नेसलेला, चुणीदार अंगरखा घातलेला व रत्नमालांनी नटलेला भारदस्त पुरुष म्हणजे युधिष्ठिर होय.

यानंतर 'प्रसंग' म्हणजे नाटक सुरू होते. स्त्रीपात्रे, विरोधी पात्रे, इ. पात्रे रंगभूमीवर यथाकाल दाखल होतात. कधी शृंगार, कधी करुण, कधी वीर, कधी अद्‌भुत अशा रसांनी युक्त अशी संस्कृतनिष्ठ संभाषणे त्यांच्यांत झडू लागतात. कथानक हळूहळू पुढे सरकते व युद्धप्रसंगाकडे वाटचाल करू लागते. 'प्रसंग' कोणताही असला, तरी यक्षगानाचा उत्कर्षबिंदू म्हणजे युद्ध ! हे युद्ध म्हणजे वाद्यांच्या कडकडाटात दोन योद्धे तांडवपद्धतीने फेर धरून नाचतात व तलवारबाजी करतात. अधूनमधून ते परस्परांच्या अंगावर धावूनही जातात.

हे युद्ध मुके नसते. त्यात शत्रूला 'सावधान' असा इशारा असतो, परस्परांची उणीदुणी काढली जातात, वीरगर्जना होतात व दणकट पदाघाताने धूळ उडवली जाते. वीर आणि रौद्र असे दोन्ही रस एकरस होऊन साक्षात समरप्रसंग उभा करतात. भागवत दमदार चालीचे पद गाऊन युद्धप्रसंग का उभा राहिला, ते सांगतो. अखेर युद्ध थांबते व सत्याचा विजय होतो. असत्याला पराजित व्हावे लागते. युधिष्ठिर, राम, यांसारखे पुण्यश्लोक पुरुष विजयाच्या भेरी वाजवीत आनंदोत्सव साजरा करतात. एवढे होईतो बाहेर दिशाप्रकाश झालेला असतो. स्त्रीपात्रे हातांत पंचारती घेऊन नाचत नाचत रंगमंचावर प्रकटतात. भागवत भरतवाक्य गातो. वाद्यांची लय कमी कमी होत जात पूर्णपणे थांबते आणि यक्षगान संपते. रात्रभर जागलेले प्रेक्षक समाधानाने घरी परतात.

यक्षगानातल्या पात्रांच्या अधिकाराप्रमाणे व जातीपरत्वे त्यांचा पोषाख वेगळा असतो. राजाचा किरीट वेगळा, योद्धा असेल तर त्याचा वेगळा आणि दैत्य–राक्षसांचा आणखी वेगळा असतो. राम, कृष्ण हे दैवी पुरुष निळ्या आणि राजे–महाराजे गुलाबी, हिरव्या किंवा लाल अशा रंगांनी रंगवतात. यम असला तर त्याला कोळशाच्या भुकटीनेच रंगवतात. खलनायक, सेवक आणि द्वारपाल यांचीही अशीच पात्रानुरूप वेषभूषा व रंगभूषा करतात. एकूण वेषभूषा अलंकारखचित, भडक व अवजड असते.

कर्नाटकातली यक्षगानकला ही खऱ्या अर्थाने लोककला आहे. तिला चार-पाचशे वर्षांची जुनी परंपरा आहे. अनेक थोर कवी, भागवत व नट यांनी तिची जोपासना केली आहे. कुञ्जल शेषगिरी भागवतार हे आजमितीचे सर्वश्रेष्ठ भागवत होत. हराडी रामा, मटपाडी वीरभद्र, मारवी रामकृष्णय्या, थक्कटी बाबण्या हे यक्षगानातले श्रेष्ठ नट होत. [कर्नाटक]

यक्षेंद्र जैन दैवतसमूहातला एक यक्ष (दिगंबरमते खेंद्र). हा अमरनाथाचा सेवक आहे. हा श्यामवर्ण असून याला सहा तोंडे, तीन डोळे आणि बारा हात आहेत. हा शंखावर बसलेला असतो. याच्या हातांत मातुलिंग, बाण, खड्ग, मुद्गर, पाश, मुंगूस, धनुष्य, फळ, भाला, अंकुश आणि माला या वस्तू असतात. एका हाताची अभय मुद्रा असते.

याचे पौराणिक षडाननाशी साम्य दिसते. दिगंबरमते तो वज्र धारण करतो. त्यावरून त्याचे इंद्राशी साधर्म्य मानतात. [जै. इ.]

यक्षेश्वर (१) जैन दैवतसमूहातला एक देव. याला ईश्वरयक्ष असेही नाव आहे. हा अभिनंदन तीर्थंकराचा सेवक आहे. हा सावळ्या वर्णाचा व चार हातांचा आहे. याच्या उजव्या दोन हातांत मातुलिंग व माला आणि डाव्या दोन हातांत नकुल व पाश असतात (दिगंबरमते हा धनुष्य, खेटक म्हणजे ढाल आणि खड्ग धारण करतो).

याच्या मूर्ती स्वतंत्रपणे आढळत नाहीत, तर त्या तीर्थ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कराच्या अनुषंगानेच आढळतात. [जै. इ.]

(२) शिवाचा एक अनुचर. सोमाबरोबर वामदेव शिवाने केलेल्या युद्धात याने वामदेव शिवाला मदत केली होती. [पु. इं.].

यज्ञ (१) विष्णूचा एक अवतार. आकूती व रुची यांपासून यज्ञ व दक्षिणा हे जुळे जन्माला आले. या जुळयाचा आजा स्वायंभुव मनू याने यज्ञाला मुलगा म्हणून दत्तक घेतले, असे पुराणांत म्हटले आहे (भाग. पु. १.३.१२). यामदेव हे यज्ञाचे अनुयायी होत. एकदा स्वायंभुव मनू चिंतनात मग्न असता त्याला खाऊन टाकण्याच्या उद्देशाने असुर व यातुधान तिथे आले, तेव्हा यज्ञानें यामदेवांच्या साहाय्याने त्या असुरांचा पराभव करून त्यांना ठार मारले. त्यामुळे यज्ञाला स्वर्गाचे राज्य मिळाले. कीर्ती मिळविण्यासाठी यज्ञाची आराधना करावी, असे भागवत पुराणात म्हटले आहे (भाग. पु. २. ३. ७).

यज्ञपुरुष

दुसऱ्या एका कथेत दक्षिणा ही यज्ञाची पत्नी आहे, असे म्हटले आहे. दक्षिणा व यज्ञ यांना बारा मुलगे झाले व तेच यम या नावाने प्रसिद्धीस आले. स्वायंभुव मन्वंतरात विष्णू आणि आकूती यांच्यापासून यज्ञाचा जन्म झाला. स्वारोचिष मन्वंतरात तुषितापासून, उत्तमामध्ये सत्यापासून, तामसामध्ये हृव्यापासून व रैवतात संभूतीपासून यज्ञाचा जन्म झाला, असे विष्णू पुराणात सांगितले आहे (विष्णू पु. ३. १. ३६–४०). परमेश्वराच्या यज्ञ या अवताराचे वर्णन विष्णू पुराणात (१.४.३२) केले आहे, ते असे–

पादेषु वेदास्तव यूपदंष्ट्र दन्तेषु यज्ञाश्चितयश्च वक्त्रे ।
हुताशजिह्वोऽसि तनूरुहाणि दर्भाः प्रभो यज्ञपुमांस्त्वमेव ॥

अर्थ – यूप या दाढा असलेल्या हे विष्णो, तुझ्या पायांत चारही वेद आहेत, दातांमध्ये यज्ञ आहे, तोंडात चयने आहेत. हुताशन अग्नी ही तुझी जिव्हा आहे. तुझे केस हे दर्भ आहेत. (आणि) असा तू यज्ञपुरुष आहेस.

वरील पौराणिक कथा प्रतीकात्मक असावी आणि यज्ञसंस्थेचे महत्त्व लोकमानसावर बिंबवण्यासाठी तिचा विनियोग असावा, असे वाटते. पाहा – यज्ञसंस्था. [प्रा. च. को.; पु. इं.]

(२) यज्ञ हा एक गंधर्व असून, दक्षिणा या त्याच्या अप्सरा आहेत, असे तैत्तिरीय संहितेत म्हटले आहे (३. ४. ७. १).

यज्ञकृच्छ्र एक प्रायश्चित्त. याचा विधी असा – कर्त्याने सकाळच्या स्नानानंतर ॐ व व्याहृती आणि एक हजार आठ वेळा गायत्री मंत्र जपावा. त्या वेळी वीरासनात बसावे. नंतर तीन वेळा स्नान करावे. संयम व मौन पाळावे. दिवसातून एकदाच दूध किंवा दही किंवा ताक अथवा यवांची कांजी व गोमूत्र घ्यावे. अशा प्रकारे एक दिवस प्रायश्चित्त घेतल्यावर सर्व पापांचे क्षालन होते. [हि. ध.].

यज्ञ प्राजापत्य एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील एकशे तिसावे सूक्त याच्या नावावर आहे. हे सृष्ट्युत्पत्तिसूक्त म्हणून प्रसिद्ध आहे. यज्ञामुळे जगताची निर्मिती झाली आणि त्याला स्थैर्य प्राप्त झाले, हे तत्त्व यात स्पष्ट केले आहे. याव्यतिरिक्त यात यज्ञरूप प्रजानिर्मिती, सृष्टिनिर्मितीची यज्ञसाधने आणि जगताच्या निर्मितीचा क्रम यांचे वर्णन आहे. सृष्टी ही या सूक्ताची देवता आहे. यातील एक ऋचा अशी–

यो यज्ञो विश्वतस्तन्तुभिस्तत एकशतं देवकर्मेभिरायतः।
इमे वयन्ति पितरो य आययुः प्र वयापवयेत्यासते तते ॥
(ऋ. १०.१३०.१)

अर्थ – शंभर उपाध्यायांनी ताणलेले रज्जुवेष्टित यज्ञरूपी वस्त्र पितर विणतात आणि उभ्या सुतानजीक बसून आपले विणकाम चालू ठेवतात.

या सूक्तात यज्ञाची मर्यादा, देवता, घृत, समिधा, छंद, इत्यादींसंबंधी प्रश्न विचारून, त्यांतील काहींची उत्तरे दिलेली आहेत. [ऋ. म. भा. ; प्रा. च. को.]

यज्ञवराह वराहाचे एक रूप. याला गोमती-तीर्थातून प्रकटलेला एक अवतार मानतात. याचे सर्व अवयव ही यज्ञातल्या विविध अंगांची प्रतीके मानलेली आहेत (वायु. ६. ११–२३). पाहा – आदिवराह. [पु. इं.]

यज्ञसप्तमी एक तिथिव्रत. ज्या शुद्ध सप्तमीला संक्रांत असेल त्या दिवशी या व्रताला प्रारंभ करतात. त्या दिवशी व्रतकर्त्याने एकदा हविष्यान्न खावे, वरुणाला नमस्कार करावा, जमिनीवर दर्भशय्या घालून तिच्यावर झोपावे आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दुसऱ्या दिवशी सकाळी आणि सायंकाळी वरुणाला आहुती द्याव्या. पुढे प्रत्येक महिन्यातील सप्तमीला सूर्याच्या निरनिराळ्या नावांनी हवन करावे. व्रतावधी एक वर्ष. उद्यापनाच्या वेळी सोन्याचा रथ करून व त्याला सात घोडे जोडून, तो रथ व एक गाय आचार्याला दान द्यावी. फल – राज्यप्राप्ती. [हि. ध.]

यज्ञसंस्था पुरातन कालापासून भारतात अस्तित्वात असलेली एक धार्मिक व सामाजिक संस्था. प्राचीन वैदिक वाङ्मयापासून अद्यायावत भारतीय वाङ्मयापर्यंत सर्व वाङ्मया-मध्ये यज्ञाचा गौरव केलेला आहे. म्हणून यज्ञाचे महत्त्व, यज्ञाची कल्पना, यज्ञसंस्थेचा इतिहास, यज्ञांचे प्रकार इत्यादींचा विचार करणे आवश्यक आहे.

यज्ञाच्या व्याख्या – यज्ञ हा शब्द यज् या धातूपासून उत्पन्न झाला आहे. यज् धातूचा अर्थ देवपूजा, संगतिकरण व दान असा सांगितला आहे. आपल्यापेक्षा जो श्रेष्ठ आहे, तो देवासारखा आहे असे समजून त्याची पूजा करणे; आपल्या बरोबरीच्या लोकांना प्रेमाने जोडणे, एकत्र करणे; तसेच आपल्यापेक्षा जो लहान आहे त्याला काहीतरी देणे, असा यज्ञ शब्दाचा आशय आहे. म्हणजेच सन्मान, संघटन आणि दान या तीन तत्त्वांनी युक्त असे हे यज्ञकर्म आहे. व्यक्तीच्या स्वतःविषयीच्या कर्तव्या-बरोबर सामाजिक कर्तव्याची जाणीव ठेवणे, ही कल्पना यज्ञ या शब्दातून ध्वनित होते. अशा प्रकारचे हे यज्ञकर्म श्रेष्ठ आहे, असे शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे (१. ७. ४५).

धातूपासून समजणारा यज्ञ शब्दाचा अर्थ मर्यादित असला, तरी त्याच्या अर्थासंबंधी शास्त्रकारांनी अनेक प्रकारे चर्चा केली आहे. निरुक्तामध्ये यज्ञ शब्दाच्या काही व्युत्पत्ती सांगितल्या आहेत (निरुक्त ३. १९), त्या अशा –

> यज्ञः कस्मात् । प्रख्यातं यजतिकर्म इति नैरुक्ताः ।
> याच्ञो भवति इति वा । बहुकृष्णाजिन इति
> औपमन्यवः । यजूंषि एनं नयन्ति इति वा ।

अर्थ – सर्वांना माहीत अशी क्रिया पुरी झाली म्हणजे यज्ञ होतो, असे नैरुक्त म्हणतात. त्यात याचना केली जाते, म्हणून तो यज्ञ. ज्यात अनेक कृष्णाजिने असतात, त्याला यज्ञ म्हणावे असे औपमन्यवांचे मत आहे. यजुर्मन्त्रांनी जे कर्म मुख्यतः केले जाते, तो यज्ञ होय.

पहिल्या व्याख्येत यज्ञ शब्द यज् धातूपासून उत्पन्न होत असल्याचे गृहीत धरले आहे. दुसऱ्या व्याख्येत हा शब्द याच् धातूपासून सिद्ध होतो, असे म्हटले आहे. तिसरी व्याख्या चमत्कारिक आहे. यज् + न अशी रूपसिद्धी करताना त्यातून अजिन या शब्दाची कल्पना करणारा आचार्य लोकविलक्षणच म्हटला पाहिजे. शेवटची व्युत्पत्ती मात्र मार्मिक व समर्पक आहे.

मीमांसाशास्त्रकारांनी यज्ञ शब्दाचा सामान्य अर्थ लक्षात घेऊन 'देवतोद्देशेन द्रव्यत्यागः' = देवतांच्या उद्देशाने द्रव्याचा त्याग करणे, असा यज्ञ शब्दाचा अर्थ केला आहे. त्यावरून यज्ञ हे त्यागप्रधान कर्म असल्याचे समजते. हे कर्म कोणते असा विचार पुढे आला असता, ते वेदप्रतिपादित असे समजणेच प्राप्त आहे. कारण यज्ञधर्म हा वेदात म्हणजे श्रुतीतच सांगितला आहे. वेद-मूलक अशा ज्या मन्वादी स्मृती आहेत, त्यांमध्ये सांगितलेले कर्म ते स्मार्त कर्म होय. याचाही यज्ञ शब्दानेच बोध होतो. म्हणजे यज्ञ या शब्दाने श्रौत आणि स्मार्त कर्म विवक्षित आहे, असे समजते.

यज्ञ शब्द पाणिनीने अनेक वेळा वापरला आहे. परंतु एके ठिकाणी यज्ञ व क्रतु असे दोन्ही शब्द वापरून (अष्टा. ४. ३. ६८) त्यांच्या अर्थांमध्ये त्याने भिन्नता दाखविली आहे. त्याने यज्ञ हा शब्द सामान्य अर्थाने वापरला आहे, तर क्रतु हा शब्द सोमयज्ञ या अर्थी वापरला आहे, असे काशिकावृत्तीत म्हटले आहे.

ज्यामध्ये दुसऱ्याला काहीतरी देणे आहे, असे त्यागप्रधान कर्म म्हणजे यज्ञ होय, हे वरील विवेचनावरून ठरते. यज्ञातील ही त्यागाची कल्पना लक्षात घेऊनच अनेक ग्रंथांत यज्ञ शब्दाच्या अर्थाचा विस्तार केलेला आढळतो.

यज्ञाची उत्पत्ती – यज्ञ निर्माण कसा झाला व त्याचा प्रसार कसा झाला, यासंबंधी अनेक गोष्टी वैदिक वाङ्मयामध्ये सांगि-तल्या आहेत. प्रजापतीने देव आणि असुर यांना उत्पन्न केल्यावर यज्ञ आणि छंद उत्पन्न केले. यज्ञ प्रथम असुरांकडे गेला आणि छंदही त्याच्या पाठोपाठ तिकडे गेले, असे तैत्ति. संहितेत म्हटले आहे (३. ३. ७). त्यावरून यज्ञ हा प्रथम असुरांच्या अधीन होता, असे कळते. देव आणि असुर यांच्यामध्ये अनेकदा युद्धे होत. त्यांमध्ये देवांचा नेहमी जय व्हायचा आणि असुर नेहमी परा-भूत व्हायचे. त्यामुळे यज्ञ असुरांना सोडून देवांकडे गेला. नंतर देवांनी त्या यज्ञाचे विधिविधान खूप वाढविले. पुढे यज्ञाच्या बाबतीत असुर देवांचे अनुकरण करू लागले. देवांच्याजवळ असलेला हा यज्ञ ऋषींनी मिळवला आणि अशा प्रकारे देवां-कडून यज्ञविद्या मनुष्यांपर्यंत येऊन पोचली.

ब्राह्मणग्रंथांत अशा आख्यायिका आढळतात, की वैदिक काळा-तच यज्ञ नष्ट झाला होता. तो देवांनी प्रयत्नपूर्वक परत मिळ-विला. एके ठिकाणी असे म्हटले आहे, की यज्ञ देवांपासून निघून गेला. देव त्याला शोधू शकले नाहीत. त्यांनी हे काम अदितीला सांगितले. तिने देवांपासून वर मिळविला, की 'यज्ञाच्या प्रारंभी व शेवटी मला आहुती मिळाली पाहिजे.' देवांनी तो वर दिला. मग अदितीने यज्ञाला शोधून परत आणले (ऐ. ब्रा. १. २. ७).

यज्ञासंबंधी अशा वैदिक आख्यायिका प्रचलित असल्या,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तरी त्यासंबंधी व्यावहारिक व संभाव्य अशी काही अनुमानें पंडितांनी काढली आहेत. फार प्राचीन काळी मनुष्याला जेव्हा अग्नीचा शोध लागला, तेव्हा त्याच्या जीवनात मोठी क्रांती झाली. अग्नीच्या रूपाने तेजस्वी दैवी शक्ती मानवाच्या हाती आली. पण असा अग्नी घरात सतत जागता ठेवण्याची आवश्यकता शीत प्रदेशातील लोकांनाच अधिक भासत असणार. म्हणून यज्ञ ही संस्था हिमप्रदेशातच उद्भवली असण्याचा संभव आहे, असे अनुमान श्री. वि. दा. सावरकर यांनी केले आहे. तथापि अत्यंत प्राचीन अशा वैदिक वाङ्मयामध्ये सांगितलेल्या वैदिक कल्पनेचा विचार करता वरील अनुमान बरोबर वाटत नाही. यज्ञ हे एक भौतिक व अलौकिक सुखाचे साधन म्हणूनच वेदांत सांगितले आहे. थंडीपासून निवारण करणारा आणि रोजचे अन्न शिजविणारा अग्नी याच्याहून यज्ञातील अग्नीचे पावित्र्य अगदी वेगळे असल्याचे सांगितले आहे.

प्राचीन यज्ञकल्पना – प्राचीन काळी निसर्गाच्या शक्तींवर मानवी जीवन अवलंबून असे आणि मानवाचे भलेबुरे करणारी अशी एक अद्भुत शक्ती निसर्गात आहे, ही समजूत सर्वमान्य होती. त्यामुळे या शक्तीला प्रसन्न करून घेण्याच्या उद्देशाने यज्ञकल्पना प्रथम प्रचारात आली. निसर्गामध्ये असलेल्या शक्तींना देवता मानून, त्या देवतांसाठी आपल्याजवळ असलेले पदार्थ समर्पण करणे, ही यज्ञाची आदिम अवस्था होय. या प्राथमिक स्वरूपाच्या यज्ञासंबंधी काही उपपत्ती लावलेल्या आढळतात, त्या अशा –

देवाने तत्काळ आणि भविष्यकाळी आपणांवर कृपा करावी आणि आपणांस ईप्सित गोष्ट द्यावी, म्हणून देवाला दिलेली देणगी म्हणजे यज्ञ होय. पापी माणसाने पापक्षालनासाठी स्वतःचा बळी देण्याऐवजी स्वतःचे प्रतीक म्हणून एखाद्या प्राण्याचा बळी देणे म्हणजे यज्ञ होय.

यज्ञात दिलेल्या आहुती म्हणजे देवतेला दिलेले भोजनच होय.

वैदिक संस्कृतीच्या विकासातील विचारांच्या अनेक अवस्था आर्यांच्या यज्ञसंस्थेत पाहायला मिळतात. वैदिक वाङ्मय निर्माण होण्यापूर्वी यज्ञाचे स्वरूप अगदी स्थूल होते. यज्ञाचे विधिविधानही फारसे नसे. आणि त्याच्या प्रभावाविषयी स्पष्ट कल्पनाही नव्हत्या. परंतु आर्य लोक सिंधूच्या तीरावर येऊन राहिल्यानंतर त्यांच्यामध्ये सामाजिक स्थिरता आली आणि त्यांच्या धार्मिक कल्पनाही स्थिर झाल्या. याच काळात आर्यांनी वैदिक वाङ्मयाची निर्मिती केली आणि यज्ञकल्पनेचा विस्तार केला. यज्ञाच्या द्वारे परमेश्वर प्रसन्न होतो व तो आपणांस ईप्सित वस्तू देतो, अशी आर्यांची दृढ श्रद्धा होती.

अग्नी हा देवांचे मुख होय. देवतांना अर्पण केलेले पदार्थ अग्नी त्यांना नेऊन देतो, असे म्हटले आहे. म्हणून कोणत्याही देवतेसाठी पदार्थाची आहुती अग्नीत दिली जाते. या दृष्टीने सर्वांचे हविर्द्रव्य त्या त्या देवतेला पोचविणाऱ्या अग्नीला वेदांमध्ये हव्यवाहन असे नाव मिळाले. देवता या अदृश्यस्वरूप असल्याने त्यांना जे पदार्थ समर्पण करायचे, ते अग्नीच्या द्वारे देणे, हे यज्ञाचे स्वरूप वैदिक काळात आढळून येते. यज्ञ करणाऱ्या व्यक्तीला जे पदार्थ अधिक आवडत असतील, अशाच पदार्थांचा त्यात अंतर्भाव होत असे. उदा० – दूध, तूप, तांदूळ, यव, इ. पदार्थ; तसेच गाय, बैल, शेळ्या, मेंढ्या, इ. प्राण्यांचे मांस. यांचा उल्लेख यज्ञाच्या संदर्भात वैदिक वाङ्मयात आढळतो. शत्रूचा नाश व्हावा, योग्य वेळी पाऊस पडावा, राजाची भरभराट व्हावी, पुत्रसंपत्ती व पशुसंपत्ती मिळावी, आरोग्य टिकावे, रोग दूर व्हावे, इ. अनेक विषयांसाठी लहानमोठे यज्ञ यजुर्वेदात व ब्राह्मणग्रंथांत सांगितलेले आहेत. इष्ट कामना पूर्ण करणारे साधन म्हणून यज्ञाचे महत्त्व सांगितले आहे. त्यामुळेच यज्ञ हे समाजजीवनाचे केंद्र समजले गेले. त्या काळी यज्ञसंस्थेला पुष्कळच मांत्रिक स्वरूप प्राप्त झाले. श्रेष्ठ तत्त्वाने केलेल्या यज्ञामुळेच जग निर्माण झाले, असेही त्या काळी मानले जात असे. ब्राह्मणग्रंथांमध्ये यज्ञाचे महत्त्व अनेक प्रकारांनी सांगितलेले आहे. जे लोक यज्ञ व्यवस्थित करीत नाहीत, ते जन्म-मरणाच्या फेऱ्यात सापडतील, असे वर्णन शतपथ ब्राह्मणात आढळते.

मोठमोठ्या यज्ञप्रसंगी जमलेले पंडित यज्ञविषयक अनेक गोष्टींवर चर्चा करीत. यज्ञमंडपात जमलेल्या सामान्य माणसांनाही या चर्चा ऐकायला मिळत. तक्षशिलेत जनमेजयाने सर्पसत्र केले, त्या वेळी यज्ञमंडपातच व्यासांनी महाभारत सांगितले, असे महाभारतातच प्रारंभी म्हटले आहे. अशा प्रकारे प्राचीन काळी अत्यंत साधा आणि सोपा असलेला यज्ञ महाभारतकाळापर्यंत जटिल व समाजव्यापी बनला. यज्ञकल्पनेचा खूपच विस्तार झाला. वैदिक वाङ्मयामध्ये यज्ञाचा विकास कसकसा झाला हे, ऋग्वेद, ब्राह्मणग्रंथ, उपनिषदे, भगवद्गीता, इ. ग्रंथांमधील यज्ञस्वरूपवर्णनावरून कळते.

ऋग्वेदकालीन यज्ञ – वैदिक धर्मात यज्ञाला फार मोठे स्थान आहे. या यज्ञामध्ये असलेल्या देवतांना ऋग्वेदात मानवी रूप प्राप्त झाले आहे. ऋग्वेदकाली लोक देवाला मोठा आधार मानीत. देवाला प्रसन्न करून घेतल्यामुळे प्रतिलाभ होईल, अशी कल्पना त्यांच्यांत दृढमूल झाली होती. निरनिराळ्या देवतांचे माहात्म्य ऋग्वेदात वर्णन केले आहे. या देवतांना हवी पोचविण्याचा उत्तम मार्ग म्हणजे अग्नीत आहुती देणे हा होय. अग्नीत आहुती देऊन म्हणजेच यज्ञ करून जो भरपूर दान व दक्षिणा देतो, तो देवाशी तादात्म्य पावतो, असे एका ऋचेत म्हटले आहे (ऋ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Y73(P15):1k 155M2J.7

१. १२५. ५). देवतांबद्दल कृतज्ञताबुद्धी व्यक्त करण्यासाठी जरी यज्ञ केले जात, तरी सामान्यतः दैवी कृपा संपादन करण्याकरिताच हवी अर्पण करणे, हे यज्ञाचे प्रमुख उद्दिष्ट असे.

ऋग्वेदातील यज्ञकल्पनेचे विवेचन तर्क. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले आहे, ते असे—

"सर्व विश्वाची एकता ज्याच्यात आहे, असा परमेश्वर यज्ञरूप आहे, अशी कल्पना ऋग्वेदात आहे. सर्व उत्पत्तीचे कारण, सर्व विश्वाचा आधार, पापनाश, शत्रुनाश, संकटपरिहार, दीर्घायुष्य, रोगपरिहार, राक्षसनाश, समृद्धी आणि अमरत्व या सर्वांचे साधन यज्ञ मानला आहे. यज्ञाचे तत्त्वज्ञान हे वैदिकांच्यां जीवनाचे तत्त्वज्ञान आहे. त्याचे संक्षिप्त रूप असे — यज्ञ हे भुवनाचे उत्पत्तिस्थान आहे; यज्ञापासून देव आणि ऋषी उत्पन्न झाले; ग्राम्य व अरण्यातील पशू निर्माण झाले. अश्व, गायी, अज, मेंढ्या, वेद हे सर्व त्याच्यातून उत्पन्न झाले, असे ऋग्वेदात (१०.९०) म्हटले आहे. देवांचा प्रथम धर्म यज्ञच होता.

जीवनातील प्रत्येक महत्त्वाची क्रिया यज्ञात गोवलेली आहे. सर्व ऐश्वर्य यज्ञावर आश्रित आहे. वामदेव म्हणतो. ' हे अग्ने, हा यज्ञ केव्हाही मोडता येणार नाही असा आहे; गायी, बैल, मेंढ्या, अश्व, नेते, लोक, मित्र, अन्न, प्रजा, सभा आणि धन यांनी युक्त असा आहे; हे असुरा, ही दीर्घ आणि विस्तृत आधाराची आर्थिक शक्ती आहे.' (ऋ. ४. २. ५)"

ऋग्वेदामधील यज्ञ अत्यंत साधा होता. सोमयागाचा उल्लेख ऋग्वेदात असला, तरी राजे व श्रीमंत लोकच हा यज्ञ करीत. यज्ञाचा हेतू केवळ देवतेला संतुष्ट करणे एवढाच असे. ऋग्वेदकाळी मनुष्ययज्ञ प्रचलित होता की नव्हता, याबद्दल मतभेद आहेत. वैदिक आर्य हिंदुस्थानात येण्यापूर्वी पुरुषमेध प्रचलित असावा आणि त्याचेच रूपक ऋग्वेदातील पुरुषसूक्तात आले असावे. पुरुषमेधाचा स्पष्ट उल्लेख यजुर्वेदात आहे आणि त्यासंबंधात पुरुषसूक्ताचा विनियोग आहे. ऋग्वेदातील पुरुषसूक्त हे पुरुषमेधासाठी नाही. त्यात विराट पुरुषाचे वर्णन केलेले आहे. म्हणून ऋग्वेदकाली वैदिक आर्य पुरुषमेध करीत, हे म्हणणे बरोबर नाही.

यज्ञ हा शब्द ऋग्वेदात अनेक वेळा आला आहे आणि बहुतेक ठिकाणी त्याचा अर्थ श्रेष्ठ कर्म असा आहे. यज्ञोपासना ही प्रापंचिकाला कामधेनूप्रमाणे आहे, अर्थात सर्वाभीष्टवरदा अशी आहे. श्रेष्ठ स्थान मिळवून देण्यासाठी यज्ञ हा एक सोपा मार्ग आहे. यज्ञाच्या योगाने पितर तेजस्वी झाले व स्वर्गलोकाला गेले असे ऋग्वेदात एका ठिकाणी म्हटले आहे (ऋ. ४. २.१६). यज्ञ ही एक नौका असून, ती यजमानास तारून नेते, असेही वर्णन ऋग्वेदात आढळते. या नौकेचे वर्णन पुढील ऋचेत (ऋ. १०. ६३. १०) सुरेखपणे केले आहे—

सुत्रामाणं पृथिवीं द्यामनेहसं सुशर्माणमदितिं सुप्रणीतिम् ।
दैवीं नावं स्वरित्रामनागसमस्रवन्तीमारुहेमा स्वस्तये ॥

अर्थ — उत्तम रक्षण करणारी, अत्यंत विशाल, दोषरहित, सुखकारक, दैन्यरहित, आनंदकारक, व्यंगरहित व छिद्ररहित अशा यज्ञरूपी नावेत आम्ही उत्कर्ष आणि देवत्व प्राप्त करून घेण्यासाठी आरोहण करतो.

पुरुषसूक्तात आलेल्या यज्ञ शब्दाचा एक अर्थ कर्म असा आहे; तर दुसरा अर्थ प्रजापती अथवा विष्णू असा आहे. श्रेष्ठ परमेश्वराप्रीत्यर्थ देवांनी यज्ञकर्म केले. देवांनी अशा प्रकारे जो यज्ञ केला, तोच धर्म होऊन राहिला (तानि धर्माणि प्रथमान्यासन्). म्हणून प्राचीन काळी यज्ञावाचून अन्य कोणतेही कृत्य धर्म म्हणून स्वीकारल्याचे दिसत नाही. पुरुषसूक्तात यज्ञाचे वर्णन करताना म्हटले आहे, की हे विश्व निर्माण करताना परमात्म्याने म्हणजे परम पुरुषाने स्वतःचा यज्ञ केला. जेव्हा जेव्हा सृष्टीच्या उत्पत्तीचा, ऋतूंच्या उगमांचा किंवा निसर्गातील कोणत्याही क्रियेचा उल्लेख येतो, तेव्हा तेव्हा तिथे यज्ञ आणि आहुती यांचा उल्लेख येतो. यावरून प्राचीन वैदिक ऋषी सृष्टीतील सर्वच प्रक्रियेला एक मोठा यज्ञ मानीत, असे दिसते. वैदिक ऋषींच्या आध्यात्मिक जीवनाचेही वर्णन यज्ञाच्या द्वारे केले आहे. मानवाला उपदेश करताना ऋग्वेदात एका ठिकाणी म्हटले आहे, की ' दिव्य ज्ञान देणारा व सर्व आपत्तिविपत्तींतून पार नेण्यास समर्थ असलेला असा हा यज्ञ लोककल्याणासाठी तुम्ही नेहमी आचरा ' (ऋ. ७. ३४. ६).

सोमयाग, दर्शपूर्णमास, इ. यज्ञांचा उल्लेख ऋग्वेदात असला तरी त्यांचे तपशीलवार वर्णन ऋग्वेदात आढळत नाही. यज्ञामध्ये सोम नावाची जी वनस्पती वापरली जाते, तिचे वर्णन करणारे मंत्र मात्र ऋग्वेदात पुष्कळ आढळतात. सोम कुटताना, त्याचे हवन करताना आणि त्याचे प्राशन करताना जे मंत्र म्हटले जातात, ते सर्व ऋग्वेदातील आहेत. ऋग्वेदाचे नववे मंडल सोममंडल म्हणूनच प्रसिद्ध आहे. प्रातःसवन, माध्यंदिनसवन आणि तृतीयसवन यांचा उल्लेखही काही सूक्तांत सापडतो.

यज्ञांचे विधान सांगणे हा ऋग्वेदान्तर्गत सूक्तांचा हेतू नसला, तरी तत्कालीन यज्ञसंस्थेसंबंधी पुष्कळशी माहिती निरनिराळ्या सूक्तांमधून आढळते. यज्ञसंस्थेचा प्रसार करणारे म्हणून ऋग्वेदात आर्यांचा उल्लेख आहे, तर यज्ञास विरोध करणारे म्हणून पणी, दस्यू यांचा उल्लेख आहे.

ब्राह्मणग्रंथांतील यज्ञविस्तार — यजुर्वेदाच्या संहिता आणि ब्राह्मणग्रंथ यांमध्ये यज्ञाचा विस्तार झाला आहे. यज्ञांच्या निरनिराळ्या अंगांचे तपशिलवार वर्णन ब्राह्मणग्रंथांत आढळते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विधी, निषेध आणि अर्थवाद यांच्या द्वारे यज्ञांची माहिती सांगितली आहे. ब्राह्मणकाळात संपूर्ण मानवी जीवनच यज्ञकल्पनेभोवती गुंफण्यात आले. हे यज्ञ कोणत्या उद्देशाने सांगितले आहेत, हे पाहताना आत्मशुद्धी व स्वत:बरोबर अनेकांचा उद्धार हे दोन उद्देश दिसून येतात. वैयक्तिक स्वरूपाचे जे यज्ञ सांगितले आहेत, त्यांमध्ये पहिला उद्देश दिसून येतो. शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे–'अग्नीतून यज्ञ उत्पन्न झाला. तो यजमानाची पापे जाळतो, त्यामुळे यजमानाला ब्रह्मतेज, संपत्ती आणि सुख मिळते, म्हणून यजमानाने नेहमी यज्ञ करावा. (२.२.१.६).' दुसऱ्या उद्देशात सामाजिक दृष्टी दिसते. समाजाच्या सुखासाठीही अनेक यज्ञ सांगितले आहेत.

जीवनातील लहान-मोठ्या घटनांसाठी ब्राह्मणग्रंथांत यज्ञ सांगितले आहेत. या यज्ञांचे अनेक प्रकारे विधान केल्यामुळे त्यांची जटिलता वाढली. यज्ञांत म्हटले जाणारे मंत्र व तंत्र यांचे ज्ञानही खूप विस्तारले. हे ज्ञान एका विशिष्ट वर्गालाच असे. त्यामुळे या वर्गाचे म्हणजे पुरोहितवर्गाचे समाजावर वर्चस्व प्रस्थापित झाले. कोणालाही कोणत्याही देवतेसाठी यज्ञ करायचा झाल्यास तो पुरोहिताच्या साहाय्यावाचून करणे अशक्य झाले. त्यामुळे पुरोहित हा देवता व यजमान यांमधील महत्त्वाचा दुवा ठरला.

यज्ञांचे विधान सांगताना त्या यज्ञांची स्तुती करणाऱ्या अनेक कथा व आख्यायिका ब्राह्मणग्रंथांत आढळतात. एखाद्याने विशिष्ट यज्ञाला प्रवृत्त व्हावे, हाच त्यामागचा हेतु असतो. यज्ञातील विशिष्ट कर्माची स्तुती करतानाही लहान लहान कथा सांगितल्या आहेत. उदाहरणार्थ अग्नीचे मंथन पिंपळाच्या अरणीतून करावे हे सांगताना शतपथ ब्राह्मणात उर्वशी–पुरूरवा यांची कथा सांगितली आहे. इन्द्राची गेलेली शक्ती पशूंनी आपल्या दूध–दह्याच्या द्वारे त्याला परत नेऊन दिली. म्हणून त्याला सांनाय्य नावाचा हवी अर्पण करतात, असे तैत्तिरीय संहितेत म्हटले आहे. प्राचीन काळी केवळ दिवस होता. त्यामुळे यमाच्या मृत्यूचे दु:ख यमी विसरू शकली नाही. म्हणून देवांनी रात्र उत्पन्न केली. तेव्हापासून सकाळ आणि संध्याकाळ निर्माण झाली. म्हणून सकाळी व संध्याकाळी दोन्ही वेळा अग्नीचे उपस्थान करावे, असे मैत्रायणी संहितेत म्हटले आहे. ब्राह्मणग्रंथांत कथा सांगताना, पुष्कळ वेळा देव आणि असुर यांमध्ये युद्ध सुरू झाले, त्यामध्ये देवांचा जय झाला, असुरांचा पराभव झाला, असा त्या कथेचा प्रारंभ केलेला असतो. ब्राह्मणग्रंथांचा समावेश श्रुतींमध्ये होतो. म्हणून ब्राह्मणोक्त यज्ञांना श्रौतयज्ञ म्हणतात. त्यांचे तपशिलवार विधान श्रौतसूत्रांमध्ये केलेले असते.

ब्राह्मणग्रंथांत अशा प्रकारे यज्ञांचे महत्त्व वाढल्यामुळे देवतांना गौणत्व आले. यज्ञामुळे एक अपूर्व शक्ती निर्माण होते आणि त्यामुळे यज्ञकर्त्याला फलप्राप्ती होते. योग्य ते फल मिळविण्यासाठी देवांनीही यज्ञ केले, देवांचे अनुकरण करून असुरांनी यज्ञ केले, मनुष्यांनीही यज्ञ केले, इतकेच काय; तर क्षुद्र योनीतील प्राण्यांनीही यज्ञ केले, असे उल्लेख ब्राह्मणग्रंथांत आढळतात. तात्पर्य, योग्य फल प्राप्त करून घेण्याचा मार्ग म्हणजे यज्ञ होय, असे वैदिकांनी नि:संदिग्ध ठरवले. यज्ञांत काम करणाऱ्या ऋत्विजांचे स्थानही देवतांपेक्षा वरचे आहे, असे काही ठिकाणी सूचित आहे. मंत्रांच्या सामर्थ्यावर ऋत्विज देवतेला हविर्भाग स्वीकारण्यासाठी बोलावतो व ती देवता यज्ञस्थळी उपस्थित होते, असे वर्णन ब्राह्मणग्रंथांत आढळते. उदा० चातुर्मास्य यज्ञातील साकमेध पर्वात हवी ग्रहण करण्यासाठी इंद्राला बोलावले जाते आणि इंद्र ऋषभरूपाने तिथे प्रत्यक्ष उपस्थित होतो, असे शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे (२.५.३.१८). एतावता यज्ञ हा सर्वश्रेष्ठ आहे, हेच मुख्यत: ब्राह्मणग्रंथांत प्रतिपादिले आहे.

यज्ञाच्या द्वारे प्रजापतीने सृष्टी उत्पन्न केली, असे ब्राह्मणग्रंथांत अनेक ठिकाणी म्हटले आहे. परंतु सृष्टी उत्पन्न करणाऱ्या प्रजापतीसाठी असा विशेष कोणताच यज्ञ सांगितलेला नाही. काही यज्ञांत प्रजापती ही प्रधानदेवता आहे. सृष्ट्युत्पत्तीच्या प्रक्रियेचा यज्ञाशी संबंध प्रामुख्याने ब्राह्मणग्रंथांत सांगितला आहे. सृष्टी उत्पन्न करणे हाही प्रजापतीने केलेला एक महान यज्ञच होय, असेही म्हटले आहे.

ब्राह्मणग्रंथांत सांगितलेल्या काम्य यागांचा बारकाईने अभ्यास केला असता, तत्कालीन लोकांच्या ऐहिक सुखोपभोगांसंबंधी कोणत्या आकांक्षा होत्या, ते समजू शकते. कित्येक यज्ञ हे समाजाच्या हितासाठीच सांगितले आहेत, हेही स्पष्टपणे दिसून येते. उत्तम पाऊस पडावा, शत्रूचा नाश व्हावा, अन्नधान्याची समृद्धी व्हावी, परस्परांमधील भांडणे मिटावी, समाजात सांमनस्य वाढावे अशा अनेक कारणांसाठी जे याग सांगितले आहेत, ते समाजजीवनाचा विचार करूनच सांगितले गेले आहेत.

ब्राह्मणकाळांत पुरोहितांचे म्हणजे ब्राह्मणवर्गाचे वर्चस्व प्रस्थापित झालेले असले, तरी क्षत्रिय आणि ब्राह्मण यांमध्ये स्पर्धा नसे. समाजजीवनाचा आणि राष्ट्राचा गाडा ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्या एकोप्यातूनच चाललेला होता. त्यामुळे अनेक प्रकारचे यज्ञ केवळ राजांसाठीच सांगितले गेले आहेत. या यज्ञांत भाग घेऊन पुरोहित राजाचे कल्याण साधीत. युद्धप्रसंगीही राजाला साहाय्य करीत. युद्धाला निघण्यापूर्वी, युद्ध सुरू झाले असता, युद्ध जिंकून परत आल्यावर, अशा अनेक प्रसंगी राजाच्या कल्याणासाठी लहान–मोठे यज्ञ केले जात. राष्ट्राच्या हितासाठी पुरोहित किती जागरूक असत, यासंबंधी तैत्तिरीय संहितेत (१.७.१०) म्हटले आहे, ते असे—

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वयं राष्ट्रे जागृयाम पुरोहिताः।

अर्थ – या राष्ट्रात आपण पुरोहित जागे राहू या.

या यज्ञामधूनच तत्त्वज्ञानाचाही उदय झालेला आहे. ब्राह्मणग्रंथात अनेक वेळा 'य एवं वेद' = जो हे जाणतो, असे वाक्य आढळते. म्हणजे हे सर्व यज्ञकर्म केवळ शुष्क विधान नसून, त्यामध्ये जाणीवपूर्वक कर्म करण्याचा आदेश आहे, असे समजले पाहिजे. यज्ञकल्पनेचा विस्तार ब्राह्मणग्रंथांपेक्षा एका वेगळ्या प्रकारे उपनिषदांत झाला आहे आणि त्याचाही विचार करणे आवश्यक आहे.

यज्ञाचे आध्यात्मिक स्वरूप – आध्यात्मिक तत्त्वज्ञान हा भारतीय संस्कृतीचा अमोल ठेवा असून, त्याच्याच आधारे भारतीय संस्कृतीला जगामध्ये एवढी थोरवी प्राप्त झाली आहे. या आध्यात्मिक तत्त्वज्ञानासंबंधी विचार सांगणारे मूलभूत ग्रंथ म्हणजे उपनिषदे होत. ब्राह्मणग्रंथांत सांगितलेल्या यज्ञकर्मातूनच उपनिषदांतील तत्त्वज्ञान साकार झाले आहे. त्यामुळेच उपनिषदांचा अभ्यास करताना यज्ञासंबंधी विचार ध्यानात घेणे आवश्यक आहे. नुसत्या कर्मापेक्षा ज्ञान हे केव्हाही श्रेष्ठ होय, ही कल्पना उपनिषदांत अनेक ठिकाणी आढळते. तथापि कर्माचा आधार घेतल्याशिवाय नुसते ज्ञान हेही निराधार आहे. म्हणूनच यज्ञाचे सम्यक ज्ञान असले पाहिजे. ज्याला वेदप्रतिपादित यज्ञकर्म प्रत्यक्ष करता येणे शक्य नाही, त्याने त्या वेदभागाचे पठण केल्यास म्हणजे ज्ञान करून घेतल्यास त्या त्या यज्ञाचे फल मिळविता येते. यासंबंधी तैत्तिरीय आरण्यकात (२.१५) म्हटले आहे ते असे–

यं यं क्रतुमधीते तेन तेनास्येष्टं भवति ।

अर्थ – ज्या ज्या यज्ञासंबंधीच्या वेदभागाचे जो जो अध्ययन करतो, त्याला तो तो यज्ञ केल्याचे फल मिळते.

यज्ञाची प्रक्रिया सांगताना ब्राह्मणग्रंथांत एकरूपत्वाची कल्पना मांडली असून, यज्ञीय पदार्थ, ऋत्विज, देवता, इत्यादींचे परस्पर एकत्व प्रतिपादन केलेले आहे. उदा० यज्ञ हा प्रजापती आहे, पाणी हे दर्भ आहे, पृथिवी स्रुवा आहे, प्रजा ही वर्ही आहे, प्राण हे पृषदाज्य आहे, यजमान हा पुरोडाश आहे आणि अग्नी हा पशू आहे. अशा प्रकारची अनेक वाक्ये ब्राह्मणांत आढळतात. या एकत्वाच्या कल्पनेला 'बंधुता' असे म्हटले आहे.

वैदिक वाङ्मयात यज्ञाच्या परिभाषेतून तत्त्वज्ञान कसे मांडले आहे, हे पाहत असताना ऋग्वेदातील पुरुषसूक्ताचा उल्लेख करणे आवश्यक आहे. पुरुषसूक्ताचा ऋषी नारायण असून, त्याने यज्ञाच्या परिभाषेच्या आधारे विराट पुरुषाच्या यज्ञाचे वर्णन केले आहे. पुरुष शब्दाचा काही टीकाकारांनी ब्रह्म किंवा परमात्मा असा अर्थ केला आहे. सूर्यमंडलामध्ये ज्या परम पुरुषाचे वास्तव्य आहे आणि ज्या पुरुषानेच चेतन व अचेतन सृष्टीच्या रूपाने विविधाकार होऊन ती व्यापून टाकली, त्या विराट पुरुषाला हवी बनवून देवांनी यज्ञ केला. या विराट पुरुषाच्या यज्ञाचे वर्णन पुरुषसूक्तात केले आहे, ते असे– हजारो डोक्यांचा, हजारो डोळ्यांचा आणि हजारो पायांचा पुरुष या सृष्टीला व्यापून दहा अंगुळे उरला आहे. भूत, भविष्य आणि वर्तमान सर्व काही तोच आहे. अमृतत्वाचा तो स्वामी आहे. प्रत्यक्ष दिसणाऱ्या जगद्रूपी महिम्यापेक्षाही तो पुरुष मोठा आहे. या विराट पुरुषाचे मुख ब्राह्मण होते; क्षत्रिय हे त्याचे हात होते, वैश्य हे त्याचे ऊरु (मांड्या) होते, तर त्याच्या पायांपासून शूद्र उत्पन्न झाले. याच्या मनापासून चंद्र, डोळ्यांपासून सूर्य, मुखापासून अग्नी व इंद्र, प्राणापासून वायू, नाभीपासून अंतरिक्ष, डोक्यापासून स्वर्ग, पायांपासून भूमी आणि कानांपासून दिशा उत्पन्न झाल्या.

या विराट पुरुषाच्या तात्त्विक यज्ञाचे स्वरूप सांगताना श्री. शं. दा. पेंडसे लिहितात–

प्राचीन काळी होणाऱ्या पुरुषमेधावर विराट पुरुषाच्या हवनाचे हे भव्य रूपक केले आहे. संपूर्ण पृथ्वी आणि नगरे व्यापणारा चातुर्वर्ण्ययुक्त जो मानवी समाज आणि प्राणिमात्र तोच हा विराट पुरुष होय. परमेश्वराची खरी पूजा, चारही वर्णांनी युक्त अशा विराट पुरुषाच्या म्हणजे मानवी समाजाच्या व सृष्टीच्या सर्वस्वाचे म्हणजे चारही वर्णांच्या बुद्धी–शक्ती–संपत्तीचे सामुदायिक कल्याणाकरिता हवन केल्याने होते. समुदायाचे जे अविनाशी स्वरूप तोच परमात्मा आहे व त्याच्याकरिता आपली बुद्धी, शक्ती, सर्व साधनसंपत्ती व सेवा अर्पण करणे, हाच खरा यज्ञ व हाच श्रेष्ठ धर्म होय, असे रूपकात्मक भाषेत सांगितले आहे.

मानवी जीवन हाच एक यज्ञ आहे व तो सतत चालणारा आहे. या जीवनयज्ञाचे वर्णन छांदोग्योपनिषदात यज्ञाच्या परिभाषेतूनच केले आहे. पुरुषाचे जीवन एकशेसोळा वर्षांचे आहे, अशी कल्पना करून या जीवनयज्ञाचे तीन भाग कल्पिले आहेत आणि त्यांना सवन म्हटले आहे. सोमयागात ज्याप्रमाणे तीन सवने असतात, तशी तीन सवन संपूर्ण आयुष्यात असतात. या जीवनयज्ञाचा विचार असा–

पुरुषाच्या पहिल्या चोवीस वर्षांचा भाग म्हणजे प्रातःसवन होय. गायत्री छंदाची चोवीस अक्षरे असतात आणि प्रातःसवनात सर्व ऋचा गायत्री छंदातील म्हटल्या जातात. या प्रातःसवनरूपी जीवनयज्ञात प्राणांची देवता वसू असते. आयुष्याच्या प्रातःसवनात जर रोगाचो किंवा मरणाची शंका आली, तर वसूंना उद्देशून पुढील प्रार्थना (छांदो. ३.१६) करायची असते–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इदं मे प्रातःसवनं माध्यन्दिनसवनमनुसन्तनुतेति ।
माहं प्राणानां वसूनां मध्ये यज्ञो विलोप्सीय ।

अर्थ – हे माझे जीवनरूपी प्रातःसवन माध्यंदिनसवनाशी संबद्ध होऊ दे. प्राणरूपी वसूंमध्ये (पहिल्या चोवीस वर्षांत) माझा हा जीवनयज्ञ लोप न पावता अखंड चालू दे.

चोवीस वर्षांनंतरची चव्वेचाळीस वर्षे हे या पुरुषयज्ञाचे माध्यंदिनसवन आहे. माध्यंदिनसवनात त्रिष्टुभ छंदातील ऋचा म्हटल्या जातात. या त्रिष्टुभ छंदाची चव्वेचाळीस अक्षरे असतात. जीवनयज्ञातील या कालखंडाची देवता रुद्र आहे. जीवनात चोवीसपासून अडुसष्ट वर्षांपर्यंतचा काळ महत्त्वाचा असतो. यज्ञातही दक्षिणा देणे, अभिषेक करणे, रथस्पर्धा, इत्यादी महत्त्वाच्या गोष्टी माध्यंदिनसवनातच होत असतात. त्यात रुद्राला उद्देशून प्रार्थना असते, ती अशी –

यानि चतुश्चत्वारिंशद्वर्षाणि तन् माध्यन्दिनं सवनम् ।
इदं मे माध्यन्दिनं सवनं तृतीयसवनमनुसन्तनुतेति ॥

माझे हे माध्यंदिनसवन तृतीय सवनाशी जोडले जावे, असा या वाक्याचा अर्थ आहे.

यानि अष्टाचत्वारिंशद्वर्षाणि तत् तृतीयसवनम् ।

अडुसष्टानंतरची अठ्ठेचाळीस वर्षे (म्हणजे एकशे सोळाव्या वर्षापर्यंत) हे जीवनयज्ञाचे तृतीयसवन होय.

जगती छंदाची अक्षरे अठ्ठेचाळीस असतात व तृतीय सवनात सर्व मंत्र जगती छंदातील म्हटले जातात. या सवनाची देवता आदित्य आहे. म्हणून त्याची प्रार्थना करतात, ती अशी – माझे हे तृतीय सवन शेवटास जावो. हा माझा यज्ञ मध्येच लुप्त न होवो.

महीदास ऐतरेयाला या जीवनयज्ञाचे सम्यक ज्ञान होते आणि म्हणून तो रोगमुक्त होऊन एकशे सोळा वर्षे जगला असे छांदोग्योपनिषदात म्हटले आहे.

उपनिषदांत वर्णन केलेल्या या जीवनयज्ञाला शंकराचार्यांनी 'यज्ञदर्शन' म्हटले आहे. षड्दर्शनांप्रमाणे मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान या यज्ञदर्शनात सांगितले आहे. हे यज्ञदर्शन आंगिरस गोत्रातील घोर नावाच्या ऋषीने देवकीपुत्र कृष्ण याला सांगितले, असेही शंकराचार्यांनी आपल्या भाष्यात म्हटले आहे.

ज्ञानी पुरुषाचे जीवन हा एक नित्य चालणारा यज्ञच आहे, असे रूपकात्मक वर्णन महानारायणीयोपनिषदात केले आहे. यामध्ये यज्ञकल्पनेचे उदात्तीकरण केले आहे. त्याचप्रमाणे आध्यात्मिक विचार हा यज्ञातून कसा सांगता येतो, हे दाखविले आहे. यज्ञाची परिभाषा नीट ध्यानात घेतल्याशिवाय हे रूपक समजणे अवघड आहे. यात यज्ञप्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर आध्यात्मिक विचार मांडला आहे, तो असा –

तस्यैवं विदुषो यज्ञस्याऽऽत्मा यजमानः श्रद्धा पत्नी
शरीरमिध्ममुरो वेदिर्लोमानि बर्हिर्वेदः शिखा
हृदयं यूपः काम आज्यं मन्युः पशुस्तपोऽग्निर्दमः
शमयिता दक्षिणा वाग् होता प्राण उद्गाता
चक्षुरध्वर्युर्मनो ब्रह्मा श्रोत्रमग्नीद् यावद्ध्रियते
सा दीक्षा यदश्नाति तद्धविर्यत् पिबति तदस्य
सोमपानं यद्रमते तदुपसदो यत् सञ्चरत्युपविशत्युत्तिष्ठते
च स प्रवर्ग्यो यन्मुखं तदाहवनीयो या व्याहृति-
राहुतिर्यदस्य विज्ञानं तज्जुहोति यत् सायं प्रातरत्ति
तत् समिधं यत् प्रातर्माध्यंदिनं सायं च तानि
सवनानि ये अहोरात्रे ते दर्शपूर्णमासौ येऽर्धमासाश्च
मासाश्च ते चातुर्मास्यानि य ऋतवस्ते पशुबन्धा
ये संवत्सराश्च परिवत्सराश्च तेऽहर्गणाः सर्ववेदसं
वा एतत्सत्रं यन्मरणं तदवभृथमेतद्वै जरामर्यमग्निहोत्रम् ।

अर्थ – अशा प्रकारचे ज्ञान ज्याला झाले आहे (म्हणजे जो जीवन्मुक्त आहे), त्याच्या जीवनरूपी यज्ञाचा यजमान आत्मा आहे, श्रद्धा ही पत्नी आहे, शरीर हा इध्मा (यज्ञीय काष्ठे), उर (छाती) ही वेदी, केस हे दर्भ, शेंडी हा वेद, हृदय हा यूप, इच्छा हे तूप, राग हा पशू, तप हा अग्नी, दमरूपी शांतवृत्ती ही दक्षिणा, वाणी हा होता, प्राण हा उद्गाता, चक्षू हा अध्वर्यू, मन हा ब्रह्मा, कान हा आग्नीध्र, यावज्जीवन ही दीक्षा, जे खाणे तोच हवी, जे पिणे तेच या यज्ञातील सोमपान, जे फिरणे ती उपसदिष्टी; चालणे, बसणे, उठणे हेच प्रवर्ग्य, मुख हाच आहवनीय, व्याहृतींचे उच्चारण याच आहुती, त्यांचे ज्ञान हाच होम, सकाळ-संध्याकाळ जे खातो त्याच समिधा, सकाळी, दुपारी व संध्याकाळी खाणे ही तीन सवने, दिवस व रात्र हे दर्शपूर्णमास, पंधरवडे आणि महिने हे चातुर्मास्य, ऋतू हे पशुयाग; संवत्सर, परिवत्सर, इ. वर्षे हे अहर्गण; असे हे सर्ववेदस नावाचे सत्र आहे, मृत्यू हे या यज्ञाचे अवभृथ आहे; असे हे जरामृत्यू येईपर्यंत चालणारे अग्निहोत्रव्रत आहे.

अशा प्रकारे क्लिष्टतम यज्ञाच्या प्रक्रियेतूनच उपनिषदांमध्ये यज्ञाच्या आध्यात्मिक स्वरूपाचा विचार मांडला आहे. यज्ञकर्म हे श्रद्धापूर्वकच केले पाहिजे. श्रद्धेवाचून केलेला यज्ञ फुकट जातो. या संदर्भात कठोपनिषदातील नचिकेताची कथा पाहण्यासारखी आहे. वाजश्रव्याने स्वर्गप्राप्तीसाठी यज्ञ केला, पण त्यात म्हाताऱ्या गायी दक्षिणा म्हणून दिल्या. वाजश्रव्याला संपत्तीची इच्छा होती. त्याला श्रद्धा नव्हती. नचिकेताने अत्यंत श्रद्धेने हे सर्व पाहिले आणि या श्रद्धेच्या बळावरच नचिकेताला यमापासून यज्ञतत्त्व समजून घेता आले. उपनिषदांमध्ये यज्ञाच्या आध्यात्मिक स्वरूपाचे वर्णन केलेले आहे आणि त्याचा आधार घेऊनच भगवद्गीतेत यज्ञकल्पनेचा अधिक विस्तार केलेला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गीतेतील यज्ञकल्पना – गीतेत यज्ञासंबंधी अनेक उल्लेख आढळतात, पण तिथे यज्ञ शब्दाचा अर्थ काय, यासंबंधी विद्वानांत मतभेद आहेत. तिसऱ्या अध्यायात यज्ञाचे सामान्य विधान सांगितले असून, तिथे यज्ञ शब्दाचा अर्थ वेदप्रतिपादित यज्ञ असा घेतला जातो. तथापि भगवद्‌गीतेमध्ये यज्ञ हा शब्द केवळ याच अर्थाने योजला आहे, असे म्हणता येत नाही. गीतेत द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ, ज्ञानयज्ञ, इ. शब्द वापरलेले असल्यामुळे यज्ञ शब्दाचा होमहवन असा अर्थ घेणे योग्य होणार नाही. ब्रह्मदेवाने सृष्टी उत्पन्न केल्यावर या लोकांच्या कल्याणाकरिता यज्ञचक्र उत्पन्न केले. समाजाचे धारण-पोषण होण्यास यज्ञकर्मे किंवा यज्ञचक्र नेहमी सुरळीत चालू राहिले पाहिजे, असे मनुस्मृतीतही म्हटले आहे (१.८७). यज्ञ उत्पन्न केल्यावर प्रजापतीने आपल्या सृष्टीला सांगितले, की यज्ञाच्या साधनेने तुम्ही देवांना संतुष्ट करा व ते देवही तुम्हांला संतुष्ट करतील (गीता. ३.१०-११). यासंबंधी विवेचन करताना श्री. ज. स. करंदीकर लिहितात – "ज्या वेळी या सृष्टीत मानवी प्राण्यांची उत्पत्ती झाली, त्या वेळीच ईश्वराने त्यांच्या बरोबर यज्ञाचीही उत्पत्ती केली. साध्या भाषेत सांगावयाचे तर असे म्हणता येईल, की बुद्धिविशिष्ट असा मनुष्यप्राणी ज्या वेळेपासून या सृष्टीवर संचार करू लागला, त्या वेळेपासून त्याला यज्ञाची जरूरी भासू लागली. सर्व मानवजातीला आवश्यक असा हा यज्ञ कोणता, याचा विचार करणे प्राप्त आहे. श्रौतस्मार्तधर्मप्रोक्त होमहवन असा यज्ञ शब्दाचा संकुचित अर्थ घेता येत नाही. या ठिकाणी यज्ञ म्हणजे पूज्य व्यक्तीकरिता करावा लागणारा त्याग किंवा अशा व्यक्तीची सेवा असा अर्थ होतो."

सृष्टीच्या उत्पत्तीसंबंधी उपनिषदात अनेक ठिकाणी उल्लेख आढळतात (तै. उ. २.१; छांदो. ६.२). या सृष्टीच्या उत्पत्तीचा क्रम सांगताना ज्या गोष्टींचा प्रामुख्याने उल्लेख केला आहे, त्यांमध्ये अग्नीपासून जल उत्पन्न झाले आणि त्यापासून अन्न उत्पन्न झाले, असे म्हटले आहे. यासंबंधीचा मनुस्मृतीतील श्लोक (मनु. ३. ७६) असा –

अग्नौ प्रास्ताहुतिः सम्यगादित्यमुपतिष्ठते ।
आदित्याज्जायते वृष्टिर्वृष्टेरन्नं ततः प्रजाः ॥

अर्थ – अग्नीमध्ये दिलेली आहुती (म्हणजे यज्ञ) चांगल्या प्रकारे सूर्याजवळ जाऊन पोचते. सूर्यापासून पाऊस उत्पन्न होतो. पावसापासून अन्न आणि अन्नापासून प्रजा उत्पन्न होते.

अशा प्रकारच्या सृष्टीच्या उत्पत्तीचा जो क्रम सांगितला आहे, त्यालाच तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत सृष्टिचक्र म्हणतात. असे सृष्टिचक्र भगवद्‌गीतेतही सांगितले असून, त्यामध्ये यज्ञाचे महत्त्व वर्णिले आहे (गीता ३. १४–१५), ते असे –

अन्नाद् भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः ।
यज्ञाद् भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥
कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात् सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥

अर्थ – सर्व प्राण्यांची उत्पत्ती अन्नापासून होते. अन्नाची उत्पत्ती पावसापासून होते. यज्ञ केल्याने पाऊस पडतो. यज्ञ कर्मातून निर्माण होतो. कर्म वेदापासून उत्पन्न होते. वेद हे सगुण ब्रह्मापासून उत्पन्न झाले आहेत. परब्रह्म हे सर्वव्यापी असल्यामुळे जिथे जिथे यज्ञकर्म चालू असेल, तिथे तिथे परब्रह्माचे अधिष्ठान असते, असे समज.

अशाच प्रकारे यज्ञकर्मामध्ये परब्रह्माचे अधिष्ठान असते, असे सांगून भगवंताने यज्ञाचा वेदोक्त कर्माशी एकत्वाने संबंध सांगितला आहे. ईश्वरनिर्मित सृष्टीचे व्यवहार चालण्यासाठी गीतेत सांगितलेले हे यज्ञचक्र सतत चालू राहिले पाहिजे. यज्ञ करावा अशी वेदांचीच आज्ञा असल्यामुळे, ज कर्म यज्ञासाठी करावे लागते, ते ईश्वराला संमतच असते. त्यामुळे ते कर्त्याला बंधनकारक होत नाही, म्हणजे त्याच्या मोक्षाच्या आड येत नाही, असे मीमांसकांनी म्हटले आहे. यज्ञ शब्दाचा अर्थ विष्णू असा घेऊन यज्ञार्थ म्हणजे विष्णुप्रीत्यर्थ असाही अर्थ काही टीकाकारांनी केला आहे. परंतु गीतेत यज्ञ शब्दाचा अर्थ व्यापक, यज्ञ म्हणजे फलाशाविरहित कर्तव्यबुद्धीने प्रेरित होऊन केलेले कर्म, असा समजणे योग्य होईल. म्हणून यज्ञस्वरूप कर्म बंधनकारक न होता ते कर्म केलेच पाहिजे, असे गीतेत सांगितले आहे (गीता ३.९) –

यज्ञार्थात् कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः ।
तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसङ्गः समाचर ॥

अर्थ – यज्ञ म्हणून केलेल्या कर्माखेरीज इतर कर्माने मानव कर्मबद्ध होतो. म्हणून हे अर्जुना, आसक्तिरहित असा होऊन तू यज्ञार्थ कर्म कर.

यज्ञ शब्दाचा फलाशाविरहित कर्तव्यकर्म असा अर्थ घेतल्यामुळे यज्ञ आणि कर्म यांचा समुच्चय गीतेत सांगितला आहे, असे दिसते. यज्ञार्थ कर्मे केली असता ती बंधनकारक होत नाहीत, या मीमांसकांच्या सिद्धान्तातच भर घालून यज्ञार्थ जी कर्मे करायची तीही फलाशा सोडून करावी, असे गीतेत सांगितले आहे, असे लो. टिळकांनी वरील श्लोकावर भाष्य करताना म्हटले आहे.

यज्ञातील कर्मकांडाचा उल्लेख अनेक वेळा आढळत असला, तरी, यज्ञाचे मूलतत्त्व आध्यात्मिक ज्ञान हेच आहे, असे अनेक ग्रंथांत म्हटले आहे. केवळ बाह्य अनुष्ठानास प्राधान्य देणे हे योग्य नव्हे. अनुष्ठानाचे अंतिम साध्य परम पुरुषाचे ज्ञान हेच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. महाभारतातील शांतिपर्व आणि द्रोणपर्व यांमध्येही यज्ञयागांचे वर्णन केले असून, श्रीकृष्णालाच यज्ञाचे तत्त्व जाणणारा असे म्हटले आहे (शांति. ९८. १५). मनुष्याचे संपूर्ण जीवन हा एक महायज्ञ असल्याचेही महाभारतात म्हटले आहे.

भगवद्गीतेतील यज्ञकल्पनेचा विस्तार करताना श्री. सातवळेकर लिहितात – 'मानवी शरीरामध्ये जे व्यापार चालतात हाच एक यज्ञ आहे. आपल्या शक्तीचे समर्पण समष्टीच्या उन्नतीसाठी करणे हे एक यज्ञकार्य आहे. आत्मसमर्पण करून विश्वहित साधण्याचा यज्ञ या विश्वामध्येही अखंड चालला आहे. कनिष्ठाने वरिष्ठाकरिता करायच्या त्यागपूर्वक कर्मालाच यज्ञ म्हणतात. अशा यज्ञात भोगबुद्धीपेक्षा त्यागबुद्धीच अधिक असते. आपली ज्ञानेन्द्रिये व कर्मेन्द्रिये ईश्वरसेवेकडे अथवा परोपकाराकडे लावणे हा एक महत्त्वाचा यज्ञ आहे. सात्त्विक, राजस व तामस असे यज्ञांचे तीन प्रकार सांगून सात्त्विक यज्ञाची श्रेष्ठता विशेष असल्याचे म्हटलें आहे. अशा प्रकारे यज्ञ शब्दाच्या अर्थाचा खूपच विस्तार करून गीतेने भारतीय जनमानसात यज्ञकल्पना अधिकच दृढमूल केली आहे.

यज्ञसंस्थेचा इतिहास– यज्ञ ही एक प्राचीन इंडो–इराणियन संस्था आहे; इंडो-जरमॅनिक नव्हे. इराणी लोकांचा धर्मग्रंथ जो अवेस्ता त्यामध्ये यज्ञसंस्थेसंबंधी काही धागेदोरे सापडतात. ऋग्वेदाच्या काळात आर्य संस्कृतीमध्ये यज्ञसंस्थेला मोठे महत्त्व प्राप्त झाले. यज्ञविषयक ब्राह्मणसाहित्याच्या काळात तर तिने कळस गाठला. यज्ञाचे संपूर्ण ज्ञान नसलेल्याने जर यज्ञ केला, तर त्याला भुते, दुष्ट आत्मे सतावून सोडतात, अशी प्राचीन काळी कल्पना होती. यज्ञ केल्याने माणसाला सामर्थ्य प्राप्त होते, यज्ञाने अन्नसंपत्ती मिळते आणि यज्ञ हेच प्राणिमात्रांचे सत्त्व आहे, असे शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे (१४.३.२.१). यज्ञाचे देवतांशी साम्य दाखवून वैदिक वाङ्मयात यज्ञसंस्थेचा पुष्कळ विस्तार केला गेला.

वेदवाङ्मय हे यासाठीच प्रवृत्त झाले आहे, असे वेदांगज्योतिषात म्हटले आहे. त्यावरून कालगणनेसाठी यज्ञसंस्था निर्माण झाली, असे अनुमान निघते. वेदांमध्ये अनेक प्रकारचे कर्म यज्ञाच्या परिभाषेत सांगितले आहे. कित्येक ग्रंथ तर यज्ञाच्या प्रक्रियेसाठीच तयार झालेले आहेत. म्हणून वेदांतील यज्ञसंस्थेच्या अध्ययनातूनच वेदांच्या मूळ अर्थाकडे जाणे आवश्यक आहे. ही गोष्ट ध्यानात घेऊनच सूत्रकारांपासून सायणाचार्यांपर्यंतचे ग्रंथकार वेदांचा अर्थ लावत होते. तथापि यज्ञाच्या विधिविधानाशी संबंध नसलेले असे अनेक मंत्र वेदांत आढळत असल्यामुळे यज्ञाच्या ज्ञानाशिवाय त्यांचा अर्थ स्वतंत्रपणे लावण्याची आवश्यकता होती. ते काम पाश्चात्य पंडितांनी सुरू केले. पण यज्ञसंस्थेचे त्यांना आकलन न झाल्याने कित्येक मंत्रांचा अर्थ त्यांनाही समजू शकला नाही. यज्ञसंस्थेच्या इतिहासाचे महत्त्व सांगताना डॉ. केतकर लिहितात–

" वेदकालीन स्थिती समजण्यास यज्ञसंस्थेचे ज्ञान आवश्यक आहे. वेदांचा प्रतिपाद्य विषय यज्ञ हा असल्यामुळे वेदांची घटना समजण्यासाठी यज्ञसंस्थेची वृद्धी व तिचा संपूर्ण इतिहास जेव्हा चांगला लक्षात येईल, तेव्हाच वेदांची घडणही समजेल. मनुष्याचे अगर समाजाचे हित साधावयाचे जे जे विधी सर्व जगात उत्पन्न झाले आहेत, त्यांमध्ये विस्ताराच्या अगर वैविध्याच्या दृष्टीने भारतातील यज्ञसंस्थेच्या सदृश दुसरा कोणताच विधी नाही. यज्ञसंस्थेचा परिणाम समाजाच्या विकासाकडे झाला; एवढेच नव्हे, तर त्यापासून अनेक ज्ञानविषयक आणि समाजघटनाविषयक फायदे झाले "

मात्र ऋग्वेदकाळी ही यज्ञसंस्था पूर्णत्वाला पोचलेली दिसत नाही. ऋग्वेदातील अनेक मंत्रांत यज्ञीय पात्रे, यज्ञीय विहार, ऋत्विजांची नावे, यज्ञात म्हणावयाची शस्त्रे, यज्ञीय हवी, इत्यादींचा उल्लेख आढळत असला तरी, एखाद्या संपूर्ण यज्ञाचे विधान ऋग्वेदात आढळत नाही. यज्ञसंस्थेचे विस्तृत स्वरूप यजुर्वेदात दिसते. तिथे अनेक लहान-मोठ्या यज्ञांचे विवेचन आहे. यजुर्वेदसंहितांच्या काळातच ब्राह्मणग्रंथही तयार झाले आहेत. ब्राह्मणांत यज्ञाचे वेगवेगळ्या प्रकारे वर्गीकरण झाले आणि यज्ञकर्म खूपच विस्तारले गेले. निरनिराळ्या प्रकारचे काळ मोजण्यासाठीही भिन्न भिन्न प्रकारचे यज्ञ निर्माण झाले. वर्षाच्या आरंभदिवसाला विषुवदिन म्हटले जाई. वर्षाच्या आरंभदिवशी संवत्सर सत्राला सुरवात करावी, असे ब्राह्मणग्रंथांत सांगितले आहे. या पहिल्या दिवशी होणाऱ्या यज्ञाला विषुवान असे म्हणतात. अतिरात्र, षडह, गवामयन, इ. यज्ञही कालगणना ध्यानात घेऊनच प्रचारात आले असावे. वेगवेगळ्या प्रकारच्या यज्ञांच्या अभ्यासातूनच प्राचीन भारतीय कालगणनेसंबंधी पुष्कळ संशोधन झाले आहे.

यज्ञामध्ये जे जे कर्म करायचे, ते एका विशिष्ट वर्गानेच करायचे, असे सांगितले गेल्यामुळे या काळात पुरोहितवर्गाची म्हणजे ब्राह्मणवर्गाची छाप समाजावर अधिक पडली. यज्ञांच्या विधानांमध्ये जी जटिलता आली, तिचे ज्ञान केवळ ब्राह्मणांनाच असे. त्यामुळे तत्कालीन राजे लोकांनीही ब्राह्मणवर्गाचे हे प्रभुत्व मान्य केले. परंतु पुढे या ब्राह्मणवर्गामध्येही अनेक भेद उत्पन्न झाले, त्यांनी यज्ञाची भिन्न विधाने सुरू केली आणि त्यामुळे यज्ञसंस्था अधिकच गुंतागुंतीची झाली. यासंबंधी डॉ. केतकर म्हणतात की, श्रौत वाङ्मयाचा म्हणजे संहिता, ब्राह्मणे आणि श्रौतसूत्रे यांचा ब्राह्मणजातीच्या स्थित्यन्तराशी निकटचा संबंध आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एका काळी यज्ञसंस्था ही समाजाचे केन्द्र होती. यज्ञाच्या निमित्ताने अनेक लोक एकत्र येत. यज्ञसमारंभाला उपस्थित झालेल्या विद्वानांत शास्त्रचर्चा चालत आणि त्यांतून अनेक गोष्टींचा निर्णय लागे. यज्ञासाठी जमलेल्या लोकांना पुराणे, कथा, इत्यादींच्या द्वारे धर्माचे महत्त्व सांगितले जाई. समाजाच्या सुखासाठी आणि राष्ट्राच्या कल्याणासाठीही वेगवेगळचा प्रकारचे यज्ञ केले जात. अशा प्रकारे यज्ञसंस्था ही सर्वस्पर्शी झाल्यामुळे सामान्य लोकांनाही यज्ञसंस्था ही एक श्रद्धेची गोष्ट झाली.

यज्ञसंस्थेच्या इतिहासाचा विचार करताना तत्कालीन समाजामध्ये भौतिक उन्नतीच्या काय कल्पना होत्या, हे कळून येते. व्यक्तिगत सुखासाठी देवतांजवळ पशू, पुत्र, गृह, धन, अन्न, आरोग्य, इ. अनेक गोष्टींची याचना यज्ञाच्या द्वारे केली आहे. स्वर्ग हा शब्द तर या संबंधात अनेक वेळा उपयोजिला आहे. मात्र स्वर्ग शब्दाचा अर्थ वरचा लोक असा न करता आत्यन्तिक सुख असा केला आहे. यासंबंधीचा श्लोक असा—

यन्न दुःखेन सम्भिन्नं न च ग्रस्तमनन्तरम् ।
अभिलाषोपनीतं यत् तत् सुखं स्वःपदास्पदम् ॥

अर्थ – जे दुःखमिश्रित नाही, जे नंतर नष्ट होणार नाही आणि जे स्वतःच्या इच्छेने मिळविले आहे, ते सुख असा स्वर् पदाचा अर्थ आहे.

व्यक्तिगत सुखाबरोबरच समाजसुख व राष्ट्रकल्याण यांचाही विचार यज्ञसंस्थेच्या द्वारे केला आहे. वैदिक काळी लोक व्यक्तिगत सुखावरोबर समाजाचाही विचार कसा करीत, हे सांगताना संस्कृतिसंगम या पुस्तकात श्री. द. के. केळकर लिहितात. ‘ वेद हे प्रपंच नेटका करण्याविषयी हव्यास वाळगणाऱ्या विजिगीषू, आक्रमणशील, अचाट उत्साही आणि उद्योगी अशा आपल्या पूर्वजांचे वाङ्मय होय. यज्ञांनी देवतांना संतुष्ट करून त्यांच्या करवी ऐहिक जीवन सुखी कसे करता येईल याविषयीच्या उद्योगात ते चूर असत.’

अनेक लोकांचे भिन्न भिन्न आचार व वाङ्मय एकत्र करून यज्ञसंस्था सर्वमान्य करण्याचा प्रयत्न वैदिक काळी झाला. स्थानिक यज्ञसंप्रदाय बंद पडून सर्वसामान्य यज्ञपद्धती तयार झाली. ब्राह्मणकालात विस्तारलेल्या या यज्ञसंस्थेचा उपनिषदांत तात्त्विक विचार झाला. उपनिषदांत अनेक तत्त्वज्ञ व विचारवंत झाले. त्यामुळे नवीन नवीन विचारप्रवाह पुढे आले. बौद्ध धर्म याचमुळे सर्वत्र पसरला. पण बुद्धालाही समाजात दृढमूल झालेल्या यज्ञसंस्थेचा विचार करावाच लागला. यज्ञासंबंधी बुद्धाचे मत काय, याचा विचार करताना श्री. रा. गो. कोलंगडे लिहितात— ‘भगवान बुद्धांची यज्ञविषयक भावना आदरयुक्त आहे. त्यांना यज्ञ मान्य असून, तेथे होणारी हिंसा तेवढी अमान्य आहे. म्हणून त्यांनी वंड उठवले ते यज्ञसंस्थेवर नसून, तेथील हिंसेवर मात्र कठोर प्रहार केला. अहिंसात्मक यज्ञ त्यांना मान्य होता. भिक्षुसंघाला नित्य भोजनादी दान देणे व राहाण्यास विहारादी बांधून देणे यासही बुद्धसाहित्यात यज्ञकर्मच म्हटले आहे.’

यज्ञसंस्थेच्या इतिहासाचा मागोवा घेता असे दिसते, की ह्या संस्थेच्या बाह्य स्वरूपात हजारो वर्षांत अनेक फरक झाले. तथापि तिच्यातील मूलभूत तत्त्वांचा विचार कधीच नष्ट झाला नाही. जेव्हा जेव्हा यज्ञसंस्थेच्या बाह्य स्वरूपालाच लोक जास्त महत्त्व देऊ लागले व तदंतर्गत तत्त्वांकडे त्यांचे दुर्लक्ष होऊ लागले, तेव्हा तेव्हा समाजधुरिणांनी लोकांना जागे करून यज्ञतत्त्वाकडे त्यांचे लक्ष वेधले. यज्ञातील मलतत्त्व ध्यानी घेऊनच ब्राह्मणकालात यज्ञांचा विस्तार झाला. परंतु बाह्य कर्मकांडावरच समाजाचे लक्ष केंद्रित झाल्यामुळे यज्ञाचे स्तोम सर्वत्र माजले. म्हणून या कर्मकांडावर टीका करून मूळ यज्ञतत्त्वाकडे समाजाचे लक्ष वेधण्याचे महान कार्य भगवद्गीतेने केले. जो यज्ञ करणार नाही त्याला संसारयात्रा देखील चांगल्या तऱ्हेने करता येणार नाही, असे सांगून द्रव्ययज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ अधिक श्रेष्ठ होय, असे गीतेत प्रतिपादिले आहे.

त्या त्या देवतेच्या सूक्ताने, मंत्राने किंवा नाममंत्राने अग्नीत आहुती देणे, एवढेच या यागांचे स्वरूप असते. म्हणून त्याला श्रौत किंवा स्मार्त यज्ञ न म्हणता पौष्टिक अनुष्ठाने म्हणणे योग्य होईल.

यज्ञातील ऋत्विज – यज्ञामध्ये काम करणारा तो ऋत्विज होय. प्राचीन काळी यज्ञाचे स्वरूप साधे व सोपे होते. म्हणून यज्ञाला ऋत्विजही कमी लागत. ऋग्वेदामध्ये होता या एकाच ऋत्विजाचा पुष्कळ वेळा उल्लेख आहे. होता हा यज्ञप्रसंगी सूक्ते तयार करी. परंतु यज्ञामध्ये असलेल्या अन्य काही ऋत्विजांचा उल्लेखही ऋग्वेदात आहे. ती ऋचा (ऋ. १०.७१.११) अशी—

ऋचां त्वः पोषमास्ते पुपुष्वान् गायत्रं त्वो गायति शक्वरीषु ।
ब्रह्मा त्वो वदति जातविद्यां यज्ञस्य मात्रां वि मिमीत उ त्वः ॥

अर्थ – ऋचांच्या विनियोगात निष्णात असा एक ऋत्विज (होता) ऋचांचे पठण करीत आहे. दुसरा (उद्गाता) शक्वरी छंदातील ऋचांवर गायत्रसाम गात आहे. ब्रह्मा हा ऋत्विज अथर्ववेदातील मंत्र म्हणत आहे, तर एकजण (अध्वर्यू) यज्ञवेदीचे मापन करीत आहे.

ब्राह्मणग्रंथांत सांगितलेले जे सोमयाग आहेत, त्यांमध्ये सोळा प्रमुख ऋत्विज लागतात. सदस्य हा सतरावा ऋत्विज होय. याव्यतिरिक्त यज्ञामध्ये ऋत्विजांना साहाय्य करण्यासाठी अनेक साहाय्यक असतात, त्यांना परिकर्मी, उपोद्गाते, चमसाध्वर्यू, इ. नावे आहेत. ऋत्विजांची संख्या सोमयागांत निश्चित असते, तरी राजसूय, अश्वमेध, यांसारख्या मोठ्या यज्ञांत ऋत्विजांचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनेक समूह लागतात. स्मार्त यज्ञात मात्र आचार्य हा एकच प्रमुख असतो. त्याव्यतिरिक्त ब्रह्मा, हवनकर्ते, जपकर्ते वगैरे ब्राह्मण लागतात. एकटयाने करायचे जे यज्ञ आहेत, त्यांमध्ये सर्व कामे स्वतः यजमानालाच करावी लागतात. दुसऱ्याकडून यज्ञ करून घेणे हा अधिकार केवळ ब्राह्मणांनाच दिलेला असल्यामुळे, यज्ञातील सर्व ऋत्विज ब्राह्मणच असावे लागतात. यासंबंधी स्मृतीत म्हटले आहे ते असे—

द्विजोत्तमानामार्त्विज्यं न तु क्षत्रियवैश्ययोः ।

अर्थ– ऋत्विज होण्याचा अधिकार केवळ ब्राह्मणांचा आहे. तो क्षत्रिय व वैश्य यांना नाही.

यज्ञामध्ये काम करणारा ऋत्विज वेदज्ञ, चपळ, तरुण आणि स्पष्ट आवाजाचा असावा, असे म्हटले आहे. (ऋत्विज पाहा.)

यज्ञ आणि इतर शास्त्रे– भारतीय संस्कृतीचा विचार यज्ञमूलक असल्यामुळे संस्कृतीच्या आणि संपूर्ण मानवजीवनाच्या अंगोपांगांचा संबंध यज्ञप्रक्रियेशी आहे, असे दिसून येते. आध्यात्मिक शास्त्रांप्रमाणे भौतिक शास्त्रांचेही मूळ यज्ञात सापडते. आजच्या अत्याधुनिक वैज्ञानिक विचारांचे मूलसूत्रही यज्ञातून प्रकट झाले आहे. म्हणून वेगवेगळया शास्त्रांसंबंधी यज्ञविषयात काय सांगितले आहे, हे पाहणे आवश्यक आहे.

यज्ञ व ज्योतिष– खगोलशास्त्र हे वेदांतून प्रगत झाले आहे. वेदांमध्ये असलेल्या अनेक उल्लेखांचा सूक्ष्म अभ्यास करून वेदांच्या कालनिर्णयावर प्रकाश टाकण्यासाठी लो. टिळक प्रभृतींनी पुष्कळ लेखन केले आहे. पण हे सर्व उल्लेख यज्ञांचे विधान सांगताना आलेले असल्यामुळे यज्ञप्रक्रियेच्या ज्ञानाशिवाय खगोलशास्त्राचे ज्ञान नीट होऊ शकत नाही. कोणत्या यज्ञाचा प्रारंभ केव्हा करावा, तो विशिष्ट कालीच का करावा, हे सांगण्यासाठी वेदवाङमयात ज्योतिषविषयक वाक्ये आली आहेत. म्हणून ज्योतिषाला, वेदांगज्योतिष या ग्रंथात, 'कालविधानशास्त्र' असे नाव दिले आहे. पिंडपितृयज्ञ, चातुर्मास्य, सोमयाग, गवामयन, अश्वमेघ, इ. लहान-मोठया यज्ञांचे विधान सांगताना नक्षत्रे, मास, ऋतू, इ. कालदर्शक शब्दांचा उपयोग केला आहे. कालगणनेचा विचार करताना अधिक महिन्याचा विचार ऋग्वेदापासून सर्व ग्रंथांत आढळतो. परंतु चातुर्मास्य यज्ञासंबंधी विचार करताना मैत्रायणी संहितेमध्ये यासंबंधी स्पष्ट उल्लेख आहे. पाच वर्षे ओळीने चातुर्मास्य यज्ञ करावा असे सांगताना, या पाच वर्षांच्या काळात दोन वेळा अधिक महिना येतो, असे म्हटले आहे. म्हणजे पाच वर्षांच्या काळात बासष्ट चांद्र मास होतात. या पाच वर्षांच्या काळाला युग म्हटले आहे. सौर कालगणना आणि चांद्र कालगणना यांचा समन्वय साधण्याचाच प्रयत्न या ठिकाणी केला आहे. आधान, नक्षत्रेष्टी, इ. यज्ञांच्या निमित्ताने फलज्योतिषाचाही उल्लेख वैदिक वाङमयात आढळतो. विशिष्ट कालात, विशिष्ट नक्षत्र असताना एखादे कर्म केल्यास ईप्सित फल मिळविता येते, असे सांगितले आहे. तेव्हा फलज्योतिषाचाही यज्ञकर्माशी निकटचा संबंध आहे.

यज्ञ व आयुर्वेद– वेदांमध्ये सांगितलेल्या अनेक यज्ञांचे फल निरामयत्व म्हणजे निरोगीपणा असे दिले आहे. चातुर्मास्य यज्ञास गोपथ ब्राह्मणात (२.१.१०) भैषज्ययज्ञ असेच म्हटले आहे–

भैषज्ययज्ञा वा एते । ऋतुसन्धिषु व्याधिर्जायते ।
तस्माद् ऋतुसन्धिषु प्रयुज्यन्ते ।

अर्थ– हे चातुर्मास्य यज्ञ भैषज्ययज्ञ आहेत. ऋतू ज्या वेळी बदलतो त्या वेळी रोग उत्पन्न होतो, म्हणून हे यज्ञ ऋतू बदलायच्या वेळी केले जातात.

रोग उत्पन्न झाल्यामुळे मानवीजीवनात जे असमाधान उत्पन्न होते, ते दूर करण्यासाठी अनेक प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत. श्वेतकुष्ट, यक्ष्मा, ज्वर, कास, इ. रोगांची नावे वैदिक वाङ्मयांत आढळतात. हे रोग दूर करण्याचा प्रमुख मार्ग म्हणून यज्ञच सांगितलेला आहे. या विशिष्ट यज्ञांमध्ये वेगवेगळया वनस्पती व ओषधी वापरण्यास सांगितल्या आहेत. यजुर्वेदात अशा औषधींना अम्ब म्हटले आहे. त्यासंबंधीचा मन्त्र असा–

शतं वो अम्ब धामानि सहस्रमुत वो रुहः ।
अधा शतक्रत्वो यूयमिमं मे अगदं कृत ॥

(वाज.सं. १२.७६)

अर्थ – हे ओषधींनो, तुमची स्थाने शेकडो आहेत. हजार ठिकाणी तुम्ही उगवता. तुम्ही माझ्या या यज्ञात या आणि मला निरामय करा.

ओषधी आणि वनस्पती यांची पुष्कळ माहिती अथर्ववेदात मिळते. तसेच अनेक रोगांचा उल्लेख तिथे आहे. क्षुद्र देवतांच्या अवकृपेने रोग होतात. म्हणून त्या देवतांना संतुष्ट करून दूर जाण्यास सांगण्यासाठीही अनेक विधाने सांगितली आहेत. अथर्ववेदाच्या कौशिकसूत्रांत यासंबंधी अनेक लहान लहान यज्ञ सांगितले आहेत. आयुर्वेद हा अथर्ववेदाचा उपवेदच आहे.

वरुण ही जलदेवता आहे. तो क्रुद्ध झाला, तर जलोदर नावाचा रोग उत्पन्न करतो, असे ऋग्वेदात म्हटले आहे. रुद्र ही एक क्रूर देवता समजली गेली आहे. रुद्र पशूंना त्रास देतो म्हणून त्याला संतुष्ट करून घेण्यासाठी यज्ञांचे विधान ब्राह्मणग्रंथांत आढळते.

अश्विनीकुमार हे भिषग्वर्य असल्याचे सांगितले आहे. म्हणून रोगनिवारणासाठी त्यांच्याकरिता यज्ञ सांगितले आहेत. एका ठिकाणी रुद्रालाही देवांचा पहिला वैद्य (प्रथमो दैव्यो भिषक्) असे म्हटले आहे (तै.सं. ४.५.१.२). अशा प्रकारे आयुर्वेदाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अभ्यासाकरिता यज्ञांचे सम्यक ज्ञान असणे आवश्यक आहे.

यज्ञ आणि आधुनिक शास्त्रे– आधुनिक शास्त्रांमध्ये मुख्यतः रसायन; विज्ञान, गणित, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, वैद्यक, शिल्पशास्त्र इत्यादींचा समावेश होतो. ही शास्त्रे आज खूपच प्रगत झाली आहेत. त्यांच्या संबंधी अनेक प्रकारे संशोधन झाले आहे आणि नवनवीन प्रयोग केले जात आहेत. परंतु वैदिक वाङ्मयातील यज्ञसंस्थेचा आणि तद्विषयक वाक्यांचा सूक्ष्म अभ्यास केल्यास आजच्या भौतिक शास्त्रांचाही उगम यज्ञप्रक्रियेतून झाला आहे, हे दाखविता येईल. यज्ञाच्या अनुषंगाने चयन म्हणून एक विधी सांगितला असून, त्याची रचना कशी करावी, याचा विचार शुल्बसूत्रांमध्ये सांगितला आहे. शुल्ब म्हणजे दोरी. हिच्या साहाय्याने अचूक मोजमापे घेऊन यज्ञवेदी तयार केल्या जात. यासाठी वर्तुळात चौकोन कसा काढावा, चौकोनात वर्तुळ कसे काढावे, श्येन, शकट, त्रिकोण, इ. चयनांच्या आकृती कशा काढाव्या, हे भूमितिशास्त्रासंबंधीच्या अनेक सिद्धान्तांनी दाखविले आहे. या चयनासाठी ज्या विटा तयार करायच्या त्या कशा तयार कराव्या, त्यासाठी माती कशी तयार करावी, त्या कशा भाजाव्या, भाजल्यावर त्यांचे आकारमान काय होईल, इ. विषयांचीही चर्चा शुल्बसूत्रांत केली आहे.

यज्ञामध्ये सोम, करीर, शमी, पळस, अश्वत्थ, उंबर, इ. अनेक वृक्षांच्या समिधा व पाने वापरण्यास सांगितली आहेत. या अनुरोधाने त्या वनस्पती कशा उत्पन्न झाल्या, त्यांचे गुणधर्म काय, यांची माहिती यज्ञविषयक वाङ्मयात मिळू शकते.

यज्ञातील पशुहिंसेच्या निमित्ताने शल्यशास्त्राची माहिती उपलब्ध होण्यासारखी आहे. पशूचे विशसन करण्याच्या शास्त्रानुसार, आतील लहानमोठ्या अवयवांचे यथार्थ ज्ञान करून देण्याबाबतचा सर्व तपशील यासंबंधीच्या ग्रंथात आढळतो. पशूंमध्ये बोकड हा सामान्य पशू आहे. मनुष्याच्या शरीराची रचना बोकडाच्या शरीररचनेशी मिळती जुळती असावी आणि म्हणून मानवी शरीराचे अंतरंग समजून घेण्यासाठी पशुयज्ञांचे विधान वैदिक वाङ्मयात केले असावे.

शेती आणि अनेक उद्योगधंद्यांची माहिती यज्ञांच्या निमित्ताने प्राचीन वाङ्मयात आढळते. समाजातील निरनिराळ्या जातीजमातींचाही यज्ञकर्मात कोणत्या ना कोणत्या प्रकारे समावेश होत असे.

यज्ञातील हिंसा-अहिंसा– ब्राह्मणग्रंथांतील यज्ञसंस्थेचा विचार करताना श्रौतयज्ञांमध्ये सांगितलेल्या पशुयागांचा विचारही केला पाहिजे. वेगवेगळ्या देवतांसाठी वेगवेगळे पशू बळी द्यावे, असे अनेक उल्लेख वैदिक वाङ्मयात आढळतात. देवतांसाठी त्या त्या पशूची हिंसा करायची असा विचार केला, की अनेक लोक बिचकतात आणि अर्थाचा अनर्थ करण्याचा प्रयत्न करतात. परंतु प्राचीन काळी जेव्हा सर्वच लोक मांस भक्षण करीत, त्या काळी देवालाही मांस समर्पण करणे ही गोष्ट निषिद्ध नव्हती. आपल्या जवळ जे असेल ते इष्ट देवतेला देणे, समर्पण करणे हीच यज्ञाची मूळ कल्पना आहे. प्राचीन काळी द्रव्य म्हणूनही पशूंचाच वापर होत असे. पशू हेच विनिमयाचे साधन होते. म्हणून यज्ञकर्मातही प्रामुख्याने पशुयागाचा विचार केला गेला.

सृष्टीमध्ये असे दिसते, की एका पदार्थाच्या विनाशातून दुसरा पदार्थ जन्मास येत असतो. एका सूक्ष्म बीच्या विनाशातूनच वृक्ष उत्पन्न होतो. लहान लहान प्राण्यांच्या विनाशावरच अनेक मोठे प्राणी जीवन जगत असतात. 'जीवो जीवस्य जीवनम्' हाच न्याय जगात असतो. म्हणून यज्ञामध्ये देवतेला पशू समर्पण करीत असताना त्या पशूच्या नाशातून फार मोठे फल उत्पन्न होते, असे म्हटले आहे. जिवंत प्राणी हा नाशवंतच आहे. पण एका मोठ्या फलाकरिता होणारा नाश हाही श्रेष्ठ आहे. यज्ञांमध्ये ज्या पशूचे समर्पण होते, बलिदान होते, तो पशू यज्ञकर्त्याच्याही अगोदर श्रेष्ठ अशा स्वर्गलोकाला जातो, असे म्हटले आहे. म्हणून यज्ञांत सांगितलेल्या पशुहिंसेला घाबरण्यासारखे काहीच नाही. आणि आजच्या वेगळ्या विचारांनी वैदिक वाक्यांच्या अर्थाचा अनर्थ करण्याचेही कारण नाही. यज्ञात होणाऱ्या या हिंसेचे वैज्ञानिक आणि तात्त्विक स्वरूपही ब्राह्मणग्रंथांतच पाहायला मिळते.

यज्ञविषयक वाङ्मयाचा अभ्यास करताना पदोपदी अहिंसेची चिन्हे भेटतात. ब्राह्मणग्रंथांनी दिलेल्या पशुयज्ञांतर्गत विधींचे वर्णन पाहत असता असे ध्यानात येते, की पशुयज्ञातील हिंसेचे ब्राह्मणकारांनी उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. ब्राह्मणकाळात मांसभक्षण हे सर्वमान्य असले, तरी यज्ञात पशूला प्रत्यक्ष मारण्याची क्रिया करणाऱ्यांना ती हिंसा बोचक होत असावी. म्हणून यज्ञातील हिंसा ही आवश्यक आहे; पण ती खरी हिंसाच नव्हे, अशा अर्थाची वाक्ये ब्राह्मणग्रंथांत समाविष्ट झाली असावी. पशूला मृत्यूकडे नले जात नसून त्याचा यज्ञ होणार आहे, असे ब्राह्मणात म्हटले आहे. त्या पशूमध्ये असणाऱ्या चैतन्यांचा अंश त्या त्या आधिदैविक स्वरूपांत विलीन होणार आहे, असा विचार मांडला गेला आहे. या पशुयागांमध्ये जे मंत्र म्हटले जातात, त्यांचा विचार केल्यासही असे दिसते, की या सर्व प्रक्रियेत हिंसातत्त्व सौम्य करण्याचा प्रयत्न केला आहे. 'अहिंसतायै' म्हणजे हे कर्म अहिंसेसाठी आहे, असे ब्राह्मणग्रंथांत पुष्कळ वेळा म्हटले आहे.

यज्ञामध्ये होणारी हिंसा ही हिंसा नाहीच, असा सिद्धान्त शास्त्रकारांनीही मांडला आहे. मनुस्मृतीमध्ये या पशुयागांचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विचार करताना म्हटले आहे, की सामान्यपणे मांसभक्षण निषिद्ध असले तरी, यज्ञपूत मांस भक्षण करण्यास हरकत नाही. तसेच यज्ञातील हिंसेसंबंधी मनू म्हणतो–

यज्ञार्थं पशवः सृष्टाः स्वयमेव स्वयम्भुवा।
यज्ञश्च भूत्यै सर्वस्य तस्माद् यज्ञे वधोऽवधः ॥
(मनु. ५. ३९)

अर्थ – स्वतः ब्रह्मदेवानेच यज्ञाकरिता पशूंची उत्पत्ती केली आहे. यज्ञ हा सर्वांच्या कल्याणासाठी आहे. म्हणून यज्ञातील हिंसा ही अहिंसाच आहे.

पशूला मारल्यानंतर त्याला पुन्हा जीवन अर्पण करण्यासाठी प्राण, अपान, इत्यादींना देवता कल्पून, त्यांना आहुती देण्यास सांगितले आहे. यामध्येही गूढार्थाने पशूला अमरत्व दिले गेले आहे. यज्ञातल्या हिंसेचा कठोरपणा कमी करून दाखविताना कालिदासानेही मार्मिकपणे म्हटले आहे, की पशूला मारण्यासाठी कठोर होणारा अग्निहोत्री अंतर्यामी मृदूच असतो.

यज्ञकल्पनेचा तात्त्विक विचार पुढे आल्यावर यज्ञातील पशुहिंसेबद्दलही वेगवेगळी मते मांडली जाऊ लागली. दुसऱ्याच्या सुखासाठी आत्मसमर्पण म्हणजे यज्ञ, असा अर्थ घेतला जाऊ लागला. केवळ मनुष्यांचेच नव्हे, तर सर्व प्राणिमात्राचे सुख ज्यात आहे, असे कर्म श्रेष्ठ होय; म्हणून पशूची हिंसा ही यज्ञकर्मामध्येही करणे इष्ट नव्हे, असाहि विचार मांडला गेला. कदाचित यज्ञातील ही पशुहिंसा फारच मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्यामुळे हिंसेबद्दल अनादर उत्पन्न झाला असावा. हिंसा न करताही परमेश्वराची उपासना करता येते, असेही पुराणकारांनी सांगितले आहे. यज्ञातील पशुहिंसेचा व्यावहारिक, तात्त्विक आणि वैज्ञानिक अर्थ लक्षात न घेता अहिंसेचे तत्त्वज्ञान उदयास आले. अहिंसेचे तत्त्वज्ञान वैदिक ऋषींना माहीत नसावे, असाही आभास निर्माण करून, यज्ञातील पशुहिंसेवर टीका केली गेली. अहिंसा ही केव्हाही श्रेष्ठच; पण तो आध्यात्मिक मार्गातील एक श्रेष्ठ गुण आहे, असे शास्त्रकारांनी सांगितले आहे. अहिंसेची महती सांगताना यज्ञातील हिंसेलाही अनेकांनी विरोध दर्शविला आहे. अहिंसक यज्ञाचे महत्त्व सांगताना महाभारतात म्हटले आहे, ते असे—

सर्वयज्ञेषु वा दानं सर्वतीर्थषु चाप्लुतम्।
सर्वदानफलं चैव नैतत् तुल्यमहिंसया।
अहिंस्रस्य तपोऽक्षय्यमहिंस्रो यजते सदा ॥

अर्थ – सर्व यज्ञांत जे दान केले जाते, सर्व तीर्थांमध्ये जे स्नान केले जाते किंवा सर्व प्रकारच्या दानांचे जे फल मिळते, ते फल अहिंसेच्या तुलनेला येऊ शकत नाही. अहिंसेचे तप चिरंतन आहे. म्हणून हिंसारहित असा यज्ञ नेहमी करणे इष्ट होय.

यज्ञामध्ये पशूंची हिंसा फार मोठ्या प्रमाणात होत असे, तिला विरोध करण्यासाठी जैन आणि बौद्ध पंथांच्या प्रवर्तकांनी प्रथम अहिंसेचे तत्त्वज्ञान लोकांसमोर मांडले. वैष्णव संप्रदायांनीही यज्ञातील हिंसेला विरोध केला; पण यज्ञप्रक्रियेचे मात्र अनुकरण केले. त्यांनी वैदिक वाङ्मयाचे प्रामाण्य स्वीकारले. यामुळेच प्रत्यक्ष पशूची हिंसा न करता पिठाचा पशू करून त्याचे हवन करण्याचे विधान त्यांनी तयार केले. भगवद्गीतेतील तत्त्वज्ञानावर अधिष्ठित असा भागवत संप्रदाय सुरू झाल्यावर तर हिंसासहित यज्ञ मागे पडले. या हिंसा-अहिंसेच्या विचारांमध्ये यज्ञसंस्था समाजाला अप्रिय बनत चालली आणि म्हणून यज्ञसंस्थेतील कर्मकांडाकडे दुर्लक्ष करून त्यांतील मूलतत्त्वांचाच विचार प्राचीन विद्वानांनी समाजासमोर मांडला. कांहींनी तर असेही मांडण्याचा प्रयत्न केला, की वैदिक वाङ्मयात कुठेही पशुहिंसेचा उल्लेख नाही. परंतु वैदिक वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्याला ही गोष्ट केव्हाही मान्य होणार नाही. आजच्या काळात वेदांत सांगितलेला यज्ञ करावा की करू नये, त्यात पशुहिंसा करावी की करू नये, यासंबंधी मतभेद राहतील; पण ज्या प्राचीन काळी वेद रचले गेले, त्या काळी पशुयज्ञ रूढ होते, ही गोष्ट निःसंशय. आज अनेकांना हिंसा मान्य नसल्यामुळे पशुयज्ञात अनेक परिवर्तने सुचविली जातात; परंतु वेदवाक्यांवर हा अन्याय आहे. ज्यांना वेदप्रतिपादित यज्ञ करणे शक्य नसेल, पटत नसेल, त्यांच्याकरिता स्मृती व पुराणे यांमध्ये अनेक प्रकारचे यज्ञयाग व व्रतवैकल्ये सांगितली आहेत.

यज्ञ आणि लौकिक आचार – एक काळ असा होता, की यज्ञ हाच समाजाच्या संस्कृतीच्या केंद्रस्थानी होता. यज्ञांतील अनेकविध प्रक्रियांचा संबंध व्यवहाराशी होता. म्हणून जीवनव्यवहाराच्या सर्व अंगोपांगांचा विचार यज्ञाच्या द्वारे मांडला गेला. पण कालांतराने यज्ञ ही केवळ समाजातील काही लोकांनी करण्याची जटिल गोष्ट झाली. सामान्य माणसाचे व्यवहार बदलले. म्हणून त्यांचा समावेश धार्मिक आचारांमध्ये करणे आवश्यक होते. म्हणून यज्ञाला अविरोधी आणि वेदप्रामाण्याला बाध येणार नाही, असे अनेक नवे आचारधर्म सांगितले गेले. हे काम प्रामुख्याने स्मृती व पुराणे यांनी केले. पुराणांत सांगितलेल्या अनेक व्रतवैकल्यांमध्ये, लहानमोठ्या यज्ञयागांमध्ये आणि शिष्टाचार म्हणून चालत आलेल्या रूढींमध्येही वैदिक यज्ञाचे मूलतत्त्व सुप्त रूपात कसे सांभाळले गेले आहे, हा अभ्यास मोठा मनोरंजक ठरेल.

यज्ञ ही अग्नीवर होणारी क्रिया आहे. अग्नी पिंपळामध्ये आहे, असे वेदांत म्हटले आहे. म्हणूनच अग्नी उत्पन्न करताना पिंपळाच्या लाकडातून घर्षणाने तो निर्माण करतात. पिंपळात अग्नी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असतो. म्हणून त्या अग्नीचीच पर्यायाने उपासना करण्यासाठी अश्वत्थव्रत, अश्वत्थोद्यापन, इ. व्रते सांगितली आहेत.

यज्ञातील अग्नी प्रवासात बरोबर नेताना तो प्रत्यक्ष नेणे शक्य नसते. म्हणून अग्निहोत्री यजमानाने हात अग्नीवर तापवून ते आपल्या तोंडाजवळ धरावे व मंत्र म्हणून श्वास आत घ्यावा असे सांगितले आहे. या कृत्याने अग्नी यजमानाच्या अंतर्यामी प्रविष्ट होतो. या क्रियेला आत्मसमारोपण म्हणतात. कीर्तनाच्या वेळी अथवा पूजेच्या वेळी केल्या जाणाऱ्या आरतीतल्या दीपज्योतीवर हात फिरवून तो आपल्या तोंडाजवळ धरून आत श्वास घेणे अशी जी रूढी आहे, ती या आत्मसमारोपणातूनच आलेली आहे. अश्वमेध यज्ञात कोडी घालण्याचा एक विधी आहे, सत्रात विजयी मिरवणूक आहे, सोमयागात तुपावर हात ठेवून शपथ घेण्याचे विधान आहे, सोमाचे आतिथ्य करण्याचा तपशील आहे, राजसूयात समाजातील वेगवेगळ्या पुढाऱ्यांच्या घरी जाऊन इष्टी करण्यास सांगितल्या आहेत. अशासारख्या शेकडो प्रक्रिया यज्ञांत सांगितल्या आहेत. त्यांचा समाजजीवनाशी, लोकाचारांशी निकटचा संबंध आहे.

स्मृतींत व पुराणांत वेदांच्या आधारे सर्वांना करता येतील असे अनेक यज्ञयाग सांगितले आहेत. विष्णुयाग, ग्रहयज्ञ, गणेशयाग, चंडीयाग, ही त्यांची नावे आहेत. त्यांचा प्रचार सर्व समाजात झाला आणि त्यामुळेच यज्ञाचे मूलतत्त्व विसरले न जाता आचारधर्म पाळला जाऊ लागला. आग्रयणेष्टीऐवजी नवान्नाचा नैवेद्य, प्रत्यक्ष यज्ञकर्म करण्याऐवजी स्तोत्रपाठ, रोज अग्नीला आहुती न देता अग्निस्वरूप अशा अतिथीचा सत्कार, इ. गोष्टींचाही समावेश लौकिक आचारांत झाला. यज्ञाच्या प्रक्रियेतूनच हे सर्व आचार रूढ झाल्यामुळे यज्ञधर्माचा प्रभाव कायम राहिला आणि आपल्या समाजाचे धार्मिक अधिष्ठान टिकून राहिले.

यज्ञ ही कल्पना फार प्राचीन काळापासून आपल्या सांस्कृतिक विचारांवर प्रभाव पाडून आहे. आधुनिक काळात यज्ञ हे जरी सर्व गोष्टींचे केंद्र नसले, तरी प्रत्येक गोष्टीत यज्ञाच्या मूलतत्त्वाचे दर्शन होत असते. प्रत्येक कर्म हे यज्ञच आहे, ही श्रद्धा अद्यापही टिकून आहे. नुसते रोजचे अन्न खायचे तेसुद्धा 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' असे म्हटले आहे. म्हणून भारतीयांच्या भारतीयत्वाला आवाहन करायचे झाल्यास यज्ञ हाच एकमेव शब्द आजही उपयोगी पडतो. पू. विनोबांनीही याचाच आधार घेऊन भूदानयज्ञ, श्रमदानयज्ञ, जीवनयज्ञ, इ. नव्या यज्ञांचे विधान समाजासमोर मांडले आहे. या सर्व यज्ञकल्पनेचा व यज्ञसंस्थेचा इतिहास आणि यज्ञ शब्दाच्या अर्थात होत गेलेला बदल यांचा अभ्यास केल्यास कोणालाही यज्ञाचे महत्त्व पटेल. परंतु यज्ञ हा केवळ विचार नसून ते एक कर्म आहे, तो एक मार्ग आहे, हे ध्यानात ठेवले पाहिजे. म्हणून आपापल्या कुवतीनुसार हा मार्ग आचरायचा आहे. अमुक एक यज्ञ हाच श्रेष्ठ असा आग्रह धरण्याचे काहीच कारण नाही. आपला धर्म वेद, स्मृती, पुराणे या क्रमाने चालत आला आहे. त्या त्या ग्रंथांत सांगितलेले ते ते यज्ञ योग्य प्रकारेच केले पाहिजेत. त्यात सामान्य माणसाला बदल करता येणार नाही. यज्ञकर्म हे श्रद्धेवर आधारलेले आहे. म्हणून श्रद्धापूर्वक यज्ञ आचरला तरच त्यातून फलनिष्पत्ती होते.

यज्ञांचे प्रकार– वेद किंवा श्रुती अशी संज्ञा ज्यांना आहे, अशा वैदिक ग्रंथांत सांगितलेले जे यज्ञ त्यांना श्रौतयज्ञ म्हणतात. या यज्ञांचे तपशीलवार वर्णन श्रौतसूत्रांत केले आहे. श्रुतींत न आढळणाऱ्या पण वेदाला विरोधी नसणाऱ्या अशा ज्या कर्मांचे म्हणजे यज्ञांचे विधान सूत्रकारांनी केले आहे, त्यांना गृह्य कर्म किंवा गृह्य यज्ञ म्हणतात. यांचे विस्ताराने व क्रमशः विधान गृह्यसूत्रांत आढळते. मनू, याज्ञवल्क्य, इ. स्मृतिकारांनीही या कर्मांचे विवेचन केले आहे. त्यामुळे या यज्ञांना स्मार्त यज्ञ असेही म्हणतात. श्रौत यज्ञ आणि स्मार्त यज्ञ मुख्यतः तीन प्रकारचे आहेत, ते असे–

(१) नित्य – जे यज्ञ नित्य केले पाहिजेत आणि जे यज्ञ केले असता कोणतेही फल मिळत नाही, पण केले नसता दोष उत्पन्न होतो, अशा यज्ञांना नित्य यज्ञ म्हणतात. उदा० अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, संध्या, वैश्वदेव, इत्यादी.

(२) नैमित्तिक – एखादे निमित्त म्हणजे कारण घडले असता करायचे यज्ञ या प्रकारात येतात. अशा प्रकारचे यज्ञ करून वेगळे फल मिळत नाही, तर त्या निमित्तामुळे घडणारे दुरित नाहीसे होते किंवा निमित्त चांगले असल्यास त्यापासून अधिक चांगली फलप्राप्ती होते. उदा० नवीन धान्य तयार झाले असता, ते देवतांना समर्पण करून त्याचा उपयोग करावा, असे सांगितले असल्यामुळे, अशा वेळी आग्रयणेष्टी करतात. घर जळले असता किंवा चोरी झाली असता, त्यापासून वाईट फल मिळू नये म्हणूनही काही यज्ञ सांगितले आहेत; ते नैमित्तिक यज्ञ होत.

(३) काम्य – एखादी विशिष्ट इच्छा मनात धरून ती पूर्ण करून घेण्यासाठी जे लहान-मोठे यज्ञ सांगितले आहेत, ते या प्रकारात येतात. पुत्र व्हावा, पाऊस पडावा, शत्रूचा नाश व्हावा, रोग दूर व्हावे, संकट नाहीसे व्हावे, ऐश्वर्य मिळावे, इ. अनेक इच्छांची पूर्ती होण्यासाठी यज्ञ सांगितले आहेत. या प्रकारच्या यज्ञांचा बारकाईने अभ्यास केल्यास प्राचीन काळी वैदिक लोकांच्या भौतिक आकांक्षा कशा होत्या ते समजून येईल.

यज्ञांचे वर्गीकरण आणखी एका प्रकारे करता येते, ते असे–

(१) प्रकृती– काही यज्ञांना प्रकृतियाग म्हटले आहे. म्हणजे इतर यागांतील सर्व मुख्य कर्मांचे विधान त्या यागांच्या अनुषंगाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केलेले असते आणि त्या प्रकृतीप्रमाणे अनेक यज्ञ केले जातात. उदा० दर्शपूर्णमास हा प्रकृतियाग आहे. इष्टी या शब्दाने उल्लेखिलेल्या सर्व यज्ञांची दर्शपूर्णमास ही प्रकृती आहे. म्हणजे ते यज्ञ दर्शपूर्णमासाप्रमाणे केले जातात.

(२) विकृती – मूळ प्रकृतियज्ञाप्रमाणे ज्यांचे बरेचसे विधान असते, पण त्यांत प्रधान देवता, प्रधान हवी आणि एखादे कर्म विशेषत्वाने सांगितलेले असते, त्यांना विकृतियज्ञ म्हणतात. बाकीचे सर्व विधी मूळ प्रकृतीप्रमाणेच असतात. उदा० पुत्रकामेष्टी, कारीरीष्टी, यांसारखे सर्व काम्य याग.

(३) उभयस्वरूप – काही यज्ञ हे प्रकृति-विकृतिस्वरूप असतात. म्हणजे त्यांतील काही अंगे प्रकृतियागाप्रमाणे होत असतात, तर काही नवीन अंगे असून, त्यांचा दुसऱ्या कर्मांत उपयोग सांगितलेला असतो. उदा० अग्नीषोमीयपशुयाग.

(४) अनुभयस्वरूप – काही यज्ञ हे प्रकृतियागही नसतात आणि विकृतियागही नसतात. अशा कर्मांना अपूर्व कर्म असे म्हटले आहे. चातुर्मास्य यज्ञात गृहमेधीय नावाची इष्टी आहे, ती या प्रकारात येते.

यज्ञांच्या अनेकविध प्रकारांचा विचार करताना श्रौत यज्ञांचेच तपशीलवार वर्णन केलेले आढळते. श्रौत यज्ञांपैकी काही यज्ञांचा समावेश संस्कारांत केला आहे. पंधरावा विवाहसंस्कार झाल्यावर अग्निहोत्रव्रत स्वीकारून वेदप्रतिपादित यज्ञ करायचे असतात. म्हणजे श्रौत यज्ञ करण्यासाठी अग्न्याधान करावे लागते. श्रौत यज्ञाचा अधिकारी कोण हे सांगताना मुख्यतः तीन गोष्टींचा उल्लेख केलेला आहे – (१) ज्याने अध्ययनपूर्वक विद्या संपादन केली आहे; (२) ज्याने आधानपूर्वक अग्नींची स्थापना केली आहे; आणि (३) जो आरोग्यसंपन्न आहे आणि ज्याचे ते यज्ञ करण्याचे सामर्थ्य आहे, असाच मनुष्य श्रौत यज्ञाचा अधिकारी होतो.

संस्कार म्हणून केले जाणारे जे यज्ञ आहेत, त्यांचे हविःसंस्था आणि सोमसंस्था असे दोन वर्ग पडतात. आज्य, पुरोडाश, चरू, पशू, यांसारख्या हविर्द्रव्यांच्या साहाय्याने जे यज्ञ करतात, त्यांचा हविःसंस्थेमध्ये समावेश होतो; तर सोम हेच प्रमुख हविर्द्रव्य असलेल्या यज्ञांचा सोमसंस्थेत समावेश होतो. अशा सात हविःसंस्था व सात सोमसंस्था यांची थोडक्यात माहिती अशी–

(१) आधान – गृहस्थाने विधिपूर्वक अग्नीची स्थापना करणे. विवाहानंतर नित्य उपासनेचा जो अग्नी, त्याला औपासनाग्नी म्हणतात. यातूनच गार्हपत्य, दक्षिणाग्नी व आहवनीय या तीन अग्नींची स्थापना करतात. सभ्य आणि आवसथ्य या नावाचे दोन अग्नीही आहवनीयाच्या जवळ स्थापन करतात. काही श्रौतसूत्रांच्या मते आवसथ्य अग्नीचे स्वतंत्र आधान सांगितले आहे. या अग्नींना श्रौताग्नी म्हणतात. श्रौताग्नी धारण करणाऱ्यालाच वेदोक्त यज्ञयाग करता येतात. अशा पुरुषाला आहिताग्नी म्हणतात. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीनही वर्णांना आधान विहित आहे.

(२) अग्निहोत्र – आहिताग्नीने सकाळ–संध्याकाळ करायच्या होमाला अग्निहोत्र म्हणतात. अग्निहोत्र हे एक व्रत असल्याने आहिताग्नीने ते जन्मभर पाळले पाहिजे.

(३) दर्शपूर्णमास – प्रत्येक महिन्याच्या पूर्णिमेस व अमावास्येस प्रारंभ करून दुसऱ्या दिवशी होणाऱ्या यागास दर्शपूर्णमासयाग म्हणतात. पौर्णिमेच्या दिवशीच्या यागास पूर्णमासयाग व अमावास्येच्या दिवशी करायच्या यागास दर्शयाग म्हणतात. (दर्शपूर्णमासयाग पाहा)

(४) आग्रयणेष्टी – नवीन धान्य तयार झाल्यावर त्याचा उपयोग करण्यापूर्वी ही इष्टी करतात.

(५) चातुर्मास्य – फाल्गुन पौर्णिमेस प्रारंभ करून प्रत्येक चार महिन्यांनी करायचा याग. (चातुर्मास्य पाहा)

(६) पशुबंध – सहा सहा महिन्यांनी ज्या वेळी अयन बदलते, त्या वेळी हा याग करतात. यामध्ये मुख्यतः पशुतंत्र असते. पशूचे उपाकरण, यूपाला बांधणे, प्रोक्षण, संज्ञपन (=विगतप्राण करणे), इ. संस्कार यात करायचे असतात. या यागात, वपायाग; पशुपुरोडाशयाग व अंगयाग हे प्रमुख विधी असतात.

(७) सौत्रामणी – या यागात तीन पशूंचा याग सांगितला आहे. विशेष म्हणजे यात सुरा तयार करण्याचे सर्व विधान सांगितले आहे. सुत्रामन इंद्र ही या यज्ञाची प्रधान देवता असल्यामुळे याला सौत्रामणी असे म्हटले आहे.

सात सोमसंस्थांमध्ये मुख्यतः सोमाचे हवन असते, म्हणून या यागांना सोमयाग असे सामान्य नावाने संबोधले जाते. सोमयागात वेगवेगळी सामे गाइली जातात. सामाच्या विशिष्ट प्रकारच्या गायनास स्तोत्र अशी संज्ञा आहे. या स्तोत्रांना विशिष्ट नावे दिलेली आहेत. जे स्तोत्र म्हणून सोमयागाची समाप्ती होते, त्या स्तोत्राच्या नावावरून त्या त्या सोमयागाचा उल्लेख होतो. यज्ञ समाप्त करणे यास संस्था असे म्हणतात. म्हणून सोमयज्ञ समाप्त करणे यास संस्था असे म्हणतात. म्हणून सोमसंस्थांमधील यज्ञांची नावे स्तोत्रावरून दिलेली आहेत. या सोमसंस्थांची थोडक्यात माहिती अशी–

(१) अग्निष्टोम – अग्निष्टोम नावाचे स्तोत्र म्हणून हा याग समाप्त होतो, म्हणून त्याला अग्निष्टोम म्हणतात. या यज्ञात एकूण बारा स्तोत्रे म्हटली जातात. यास ज्योतिष्टोम असेही नाव आहे. हा पहिला सोमयाग असून, सर्व सोमयागांचा हा प्रकृतियाग आहे. या यज्ञात काही इष्टी, काही पशुयाग आणि सोमाचाही याग असतो. (अग्निष्टोम पाहा)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(२) अत्यग्निष्टोम – अग्निष्टोम सोमयागाप्रमाणे बारा स्तोत्रे म्हणून झाल्यावर षोडशी हे स्तोत्र म्हणून या यज्ञाची समाप्ती होते. म्हणजे या यज्ञात तेरा स्तोत्रे म्हटली जातात. क्षत्रियांनी केवळ अग्निष्टोम यज्ञ न करता अत्यग्निष्टोम करावा, असे म्हटले आहे. या सोमयागाचे सर्व विधान अग्निष्टोमाप्रमाणेच असते. (अत्यग्निष्टोम पाहा.)

(३) उक्थ्य – पहिल्या सोमयागाप्रमाणे बारा स्तोत्रे म्हणून झाल्यावर उक्थ्य नावाची तीन स्तोत्रे गाइली जातात आणि मग या यज्ञाची समाप्ती होते. अग्नी आणि इंद्राग्नी या देवतांसाठी या यज्ञात पशुयाग विहित आहे. हा एक प्रकृतियागही असल्याचे कांही सूत्रकारांनी सांगितले आहे. (उक्थ्य पाहा.)

(४) षोडशी – उक्थ्य स्तोत्रे म्हणून झाल्यावर षोडशी स्तोत्र म्हटले जाते व या यज्ञाची समाप्ती होते, म्हणून याला षोडशी असे म्हटले आहे. षोडशी नावाच्या ग्रहपात्रात सोम घेऊन त्याचे हवन यात केले जाते. याचे सर्व विधान उक्थ्य यागाप्रमाणे असते. यात इंद्रदेवतेसाठी आणखी एक पशू सांगितला आहे. हा वाजपेयाचा प्रकृतियाग आहे, असेही म्हटले आहे.

(५) वाजपेय – षोडशीप्रमाणे सर्व स्तोत्रे गाइल्यावर वाजपेय नावाचे सतरावे स्तोत्र म्हणून याची समाप्ती होते, म्हणून याला वाजपेय असे नाव दिले आहे. या यज्ञात सतरा या आकड्यास विशेष महत्त्व आहे. उदा० सतरा अरत्नी लांब यूप, सतरा पशू, सतरा ऋत्विज, सतरा दक्षिणा, इत्यादी. (वाजपेय पाहा)

(६) अतिरात्र – षोडशीप्रमाणे स्तोत्रे म्हणून झाल्यावर चार स्तोत्रांचे तीन पर्याय म्हणजे बारा स्तोत्रे अधिक म्हटली जातात. या पर्यायांना रात्रिपर्याय म्हणतात. यांचे गान मुख्यतः रात्री होते. दुसऱ्या दिवशी उजाडता आश्विन नामक स्तोत्र गाइले जाते आणि या यज्ञाचे अनुष्ठान संपते. सबंध रात्रभर अनुष्ठान चालून ते दुसऱ्या दिवशी संपते म्हणून या सोमयागास अतिरात्र असे म्हटले आहे. (अतिरात्र पाहा.)

(७) आप्तोर्याम – अतिरात्र यागाप्रमाणे सर्व विधी झाल्यानंतर चार स्तोत्रांचा एक पर्याय अधिक म्हणण्यास सांगितले आहे. याला अतिरिक्त पर्याय असे नाव आहे. म्हणजे या यज्ञात एकूण तेहतीस स्तोत्रे म्हटली जातात. यागाचे अनुष्ठान दोन दिवस असले, तरी हा एकाह म्हणजे एका दिवसात संपणारा यज्ञ आहे. हा याग नित्य सोमसंस्थांमध्ये अंतर्भूत आहे की नाही याबद्दल मतभेद आहेत. काहींच्या मते हा काम्य सोमयाग आहे. (आप्तोर्याम पाहा.)

वेगवेगळ्या कामना पूर्ण करून घेण्यासाठी तांड्य महाब्राह्मणामध्ये पुष्कळ सोमयाग सांगितले आहेत. या सोमयागांचे सामान्यतः स्वरूप सारखेच असले, तरी सामगाने आणि ऋग्वेदातील ऋचांचे शंसन (=पठन) यांमध्ये पुष्कळ विशेष सांगितले आहेत. सोमयागांचे वर्गीकरण आणखी एका प्रकारे केले आहे, ते असे–

(१) एकाह – एका दिवसात ज्यांचे अनुष्ठान पूर्ण होते, त्यांना एकाह सोमयाग म्हणतात. यांच्या मुख्य दिवसाला सुत्याह असेही म्हटले आहे. म्हणजे या दिवशी तीन वेळा सोमासंबंधी अनेक विधी सांगितले आहेत. सोम कुटणे, त्याचा रस काढणे, तो गाळणे, त्याचा याग करणे आणि सोमपान करणे हे ते विधी होत. तीन वेळा केल्या जाणाऱ्या या विधींना प्रातःसवन, माध्यंदिन सवन आणि तृतीय सवन किंवा सायंसवन म्हणतात. मुख्य भाग एकच दिवस असला, तरी आगेमागे मिळून पाच सहा दिवस या यज्ञांचे अनुष्ठान होत असते. सप्त सोमसंस्थांमध्ये सांगितलेले सर्व सोमयाग हे एकाहच आहेत. आणखी अनेक एकाह सोमयाग वेगवेगळ्या ब्राह्मणग्रंथांत सांगितले आहेत.

(२) अहीन – एकापेक्षा अधिक दिवस चालणाऱ्या सोमयागांना अहीन म्हणतात. या यज्ञात सुत्याह म्हणजे सवन दिवस दोनांपासून बारापर्यंत असतात. सर्वांत मोठा अहीन याग बारा दिवस चालत असून, त्याला द्वादशाह म्हणतात. (अहीनयाग पहा)

(३) सत्र – बारा दिवसांपेक्षा अधिक काळ चालणाऱ्या यज्ञाला हे नाव आहे. सत्रामध्ये अनेक गोष्टींचा समावेश असतो. कित्येक सत्रे वर्षभर चाललेली असतात. कुंडपायनामयन, गवामयन, इ. सत्रे प्रसिद्ध आहेत. (सत्रे पाहा)

व्यतिरिक्त राजसूय, अश्वमेध यांसारखे मोठे यज्ञही आहेत. त्यांमध्ये कित्येक इष्टी, कित्येक पशुयाग आणि कित्येक सोमयाग होत असतात. हे मोठे यज्ञ राजांनाच विहित आहेत. या यज्ञांमध्ये शर्यती, अभिषेक, गायन, वादन, इ. अनेक गोष्टींचा समावेश असतो. सव नावाचे काही एकाह विहित असून, त्यांमध्ये यजमानास वेगवेगळ्या पदार्थांनी अभिषेक सांगितला आहे. उदा० ओदनसव, मृत्युसव, पृथ्वीसव इत्यादी.

श्रौत यज्ञांप्रमाणेच स्मार्त किंवा गृह्य यज्ञही प्रसिद्ध आहेत. गृहस्थाने करायच्या यज्ञांमध्ये पंचमहायज्ञ महत्त्वाचे आहेत. देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ आणि ब्रह्मयज्ञ हे ते पाच यज्ञ होत. गृहस्थाने गृह्याग्नी किंवा औपासनाग्नी नित्य धारण करावा आणि त्यावर आपले आणि आपल्या मुलांचे संस्कार करावे, असे सांगितले आहे. रोजचा होम, स्थालीपाक, नवान्नहोम, इ. यज्ञ हे नित्य होत. याव्यतिरिक्त सात पाकसंस्थांमध्ये अंतर्भूत होणारे काही विधीही या अग्नीच्या साहाय्याने करायचे असतात. या विविध यज्ञांचे विधान स्मृतींनीही सांगितले असल्यामुळे यांना स्मार्त यज्ञ असेही म्हणतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याव्यतिरिक्त कांही यज्ञ पौष्टिक म्हणून सांगितले आहेत. एखाद्या व्यक्तीच्या अथवा समाजाच्या सुखासाठी विष्णुयाग, गणेशयाग, चंडीयाग, दत्तयाग यांसारखे अनेक यज्ञ रूढ आहेत.

यज्ञीय पात्रे व उपकरणे – यज्ञांचे अनेक प्रकार असल्यामुळे त्यांमध्ये जी उपकरणे वापरली जातात, त्यांचेही वैविध्य आढळते. ब्राह्मणग्रंथांमध्ये जे श्रौत यज्ञ सांगितले आहेत, त्यांच्या अनुषंगाने वैदिक वाङ्मयात या उपकरणांची माहिती येते. कोणते यज्ञपात्र कोणत्या लाकडापासून तयार करावे, त्याचा आकार काय असावा, यासंबंधीही अनेक उल्लेख येतात. श्रौत यज्ञामध्ये मुख्यतः लाकडाचीच पात्रे वापरायची असतात. काही पात्रे मातीची असतात. तैत्ति. संहितेत (१.६.८) यज्ञपात्रांना यज्ञायुध असे म्हटले आहे. या यज्ञपात्रांची यज्ञांच्या क्रमाने थोडक्यात माहिती अशी–

स्रुव – एका अंगठयाएवढे वाटोळे मुख असलेली लांब दांडयाची पळी. स्रुव हा खैराच्या वृक्षाचा करतात. त्याची लांबी एक अरत्नी म्हणजे २४ अंगुले किंवा एक हातभर असते.

अग्निहोत्रहवणी – रोजचा होम करण्यासाठी असलेली एक स्रुची. या स्रुचीचे तोंड पाच बोटे रुंद, वाटोळे असून, हंसाच्या मुखाप्रमाणे तिला चोच असते. दांडा एक अरत्नी लांब असतो. वेकळीच्या झाडापासून ही तयार करतात. प्रोक्षण करण्यासाठी लागणारे पाणी या स्रुचीत सिद्ध करतात. म्हणून हिला प्रोक्षणी असेही नाव आहे.

स्फ्य – तलवारीसारखे लाकडी पात्र. हे खैराचे करतात. यज्ञाच्या वेळी आग्नीध्र हा ऋत्विज स्फ्य हातात धरून यज्ञाचे रक्षण करतो.

कपाल – दोन बोटे लांब, रुंद व उंच असलेला खापराचा तुकडा. असे अनेक तुकडे एकत्र मांडून त्यावर पुरोडाश नावाचा हवी भाजतात. निरनिराळ्या देवतांसाठी कपालांची संख्या वेगवेगळी असते.

शूर्प – तांदूळ पाखडण्यासाठी याचा उपयोग करतात. हे कळकापासून किंवा नळ नावाच्या गवतापासून तयार करतात. चातुर्मास्य यज्ञात इषिका नावाच्या गवतापासून तयार केलेले सूप लागते.

कृष्णाजिन – काळविटाचे कातडे. या कातडयावर उखळ ठेवून हविर्द्रव्य कांडतात.

शम्या – दीड हात लांब असा एक खैराचा दांडा. याचा उपयोग वेदी मोजण्यासाठी करतात.

जुहू – पळसाची एक स्रुची. आहुती देण्यासाठी हिचा उपयोग करतात.

उपभृत् – यज्ञात आहुती देताना ही स्रुची नेहमी जुहूबरोबर घेण्यास सांगितले आहे. ही पिंपळाच्या लाकडापासून करतात.

ध्रुवा – वेकळीच्या लाकडाची एक स्रुची. ही नेहमी तुपाने भरलेली असते.

मेक्षण – उलथन्यासारखे एक लाकडी पात्र.

वेद – दर्भाची केरसुणी. वासरू बसले असता त्याचा गुडघा जसा दुमडलेला असतो, त्या आकाराचा, दर्भांचा वेद तयार करतात. वेदी झाडण्यासाठी याचा उपयोग करतात.

प्रणीता – अभिमंत्रित पाणी ठेवण्यासाठी हे पात्र तयार करतात. याचा आकार चमसासारखा असतो. याची लांबी एक वीतभर व रुंदी चार अंगुळे एवढी असते. विशिष्ट कामना असेल, तर प्रणीतापात्र म्हणून कांश्याचे किंवा मातीचे भांडे घेतात.

इडापात्र – हविःशेष एका पात्रात घेऊन त्यावर इडा नामक देवतेचे आवाहन करतात. नंतर तो इडाभाग सर्व ऋत्विज भक्षण करतात. इडापात्र हे एक अरत्नी लांब, चार बोटे रुंद व खोलगट असे पात्र असते.

स्थाली – यज्ञात वेगवेगळ्या स्थाली सांगितलेल्या असतात. या मातीच्या करतात. यज्ञातील दक्षिणा म्हणून जो चरू ब्राह्मणांना देतात, तो चरू अन्वाहार्यस्थालीत शिजवतात. कढत पाणी करण्यासाठी मदन्ती नावाची स्थाली असते. तूप ठेवण्यासाठी आज्यस्थाली घ्यावी लागते. त्याचप्रमाणे सोम ठेवण्यासाठीही आग्रयणस्थाली, उक्थ्यस्थाली, आदित्यस्थाली, इ. स्थाल्या सांगितल्या आहेत.

यूप – यज्ञीय पशू ज्या खांबाला बांधतात तो स्तंभ. यूपासाठी पळस, खैर, बेल, इ. वृक्ष सांगितले आहेत. यूप खालच्या बाजूला जाड व वरच्या बाजूस निमुळता होत गेलेला असतो. तो चौकोनी किंवा अष्टकोनी असतो. त्याच्या टोकावर एक खिट्टी बसवतात. तिला चषाल म्हणतात.

स्वरू – यूप तोडताना पडलेल्या एका ढलपीपासून सुरीच्या आकाराचा स्वरू करतात. यूप उभा केल्यावर त्याला दोरी गुंडाळतात व त्यात स्वरू खोचून ठेवतात.

स्वधिती – धार असलेली सुरी. पशुयागात पशूची अंगे काढण्यासाठी हिचा उपयोग करतात.

रशना – दर्भाची दोरी. दर्भ दुहेरी किंवा तिहेरी वळून ही तयार केलेली असते. या दोरीने पशूला यूपाजवळ बांधतात.

शुल्व – हीदेखील एक दोरी असून, तिचा उपयोग दर्भसमिधा बांधण्यासाठी करतात.

उपवेष – अग्नी बाहेर काढण्यासाठी याचा उपयोग करतात. उपवेष हाताच्या आकाराचा करावा, असे कात्यायन श्रौतसूत्रात सांगितले आहे.

कारोतर – बाहेरून कातडे लावलेली कळकाची रोवळी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सौत्रामणी यागात सुरा तयार करण्याकरितां हे पात्र सांगितले आहे. या रोवळीत सर्व सामान घालून ती एका खड्डयात पुरून ठेवतात.

कृष्णविषाणा — हरणाचे शिंग. यज्ञाची दीक्षा घेतल्यावर दीक्षिताने आपले अंग नखाने न खाजवता या शिंगानें खाजवावे, असे सांगितले आहे.

उष्णीष — पागोटयासारखे लांब वस्त्र. यजमानाने दीक्षा घेतल्यावर डोक्याला उष्णीष बांधायचे असतें. सोम विकत घेतल्यावर त्यालाही उष्णीष गुंडाळतात.

वालस्राव — गाईच्या अथवा बैलाच्या शेपटीपासून तयार केलेले गाळणे. सुरा गाळण्यासाठी याचा उपयोग करतात.

नेतात. तिला सोमक्रयणी म्हणतात. ती चालत असताना तिच्या सातव्या पावलावर तुपाची आहुती देऊन तेथील माती या स्थालीत भरून घेतात. या मातीचा उपयोग हविर्धानशकटाच्या कण्याला वंगण म्हणून करतात.

ऊर्णास्तुका — ऊर्णा म्हणजे लोकर. एकदा कापून पुन्हा वाढलेल्या लोकरीस ऊर्णास्तुका म्हणतात. पांढरी लोकर शुभ व काळी लोकर अशुभ मानलेली आहे.

आसंदी — आसंदी म्हणजे चौपाई. सोमाचे राजा म्हणून आतिथ्य केल्यावर, त्याला उंच अशा राजासंदीवर ठेवतात. प्रवर्ग्य नामक विधीमध्ये जी उंबराची पात्रे व महावीर इत्यादी मातीची भांडी असतात ती ज्या आसंदीवर ठेवतात, तिला सम्रा-



फलक क्र. १ — यज्ञीय पात्रे व उपकरणे
१. होतृचमस व ब्रह्मचमस, २. द्रोणकलश, ३. इडापात्र, ४. स्फ्य, ५. धृष्टी, ६. स्रुव.

दीक्षितदंड — दीक्षा घेण्याच्या वेळी यजमानाने हा दंड घ्यावयाचा असतो. उंबर अथवा फळे येणाऱ्या कोणत्याही झाडापासून हा तयार करतात. तो यजमानाच्या तोंडापर्यंत येईल इतका उंच असतो.

व्रतस्थाली — दीक्षा घेतल्यानंतर यजमानाने व्रतस्थ राहायचे असते. या काळात त्याने केवळ गाईचे दूध प्राशन करायचे असते. या दुधाला व्रत म्हणतात. हे व्रत ज्यात तापवितात, त्या भांड्याला व्रतस्थाली किंवा व्रतप्रदानस्थाली म्हणतात.

पदरणी — सोम विकत घेण्यास जाताना एक गाय बरोबर

डासंदी म्हणतात. जिच्यावर यजमानाला बसवून अभिषेक करतात, ती अभिषेकासंदी होय.

महावीर — प्रवर्ग्य नामक विधीमध्ये घर्म नावाचा हवी ज्या पात्रात तयार करतात, त्यास महावीर असे म्हणतात. हे पात्र मातीचे असते. एकावर एक तीन बोळकी ठेवली असता त्याचा जसा आकार होईल, तशा आकाराचे दोन फुगवटे असलेले हे पात्र असते. याची उंची टीचभर असून, आतून ते पोकळ असते. या पात्राच्या गळयाभोवती रास्ना म्हणजे मेखला करतात. या महावीरात तूप घालून ते अग्नीवर ठेवतात. तूप उकळू लागले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणजे त्यात गाईचे व शेळीचे दूध ओततात. या तूपमिश्रित दुधालाच घर्म म्हणतात.

दोग्ध्र – धार काढण्यासाठी मातीचे तयार केलेले भांडे. याचा आकार दांडा नसलेल्या स्रुचीसारखा असतो. याला पिन्वन असेही म्हणतात. प्रवर्ग्य विधीमध्ये या पात्राचा उपयोग करतात.

रौहिणहवनी – प्रवर्ग्यामध्ये कच्च्या पिठाचे दोन पुरोडाश करतात. त्याचे हवन करण्यासाठी दोन पात्रे लागतात. यांचा आकार स्रुचीसारखा असतो, पण त्यांना बिल व मुख नसते.

उपयमन – तापलेला महावीर ठेवण्यासाठी मोठ्या आकाराची एक स्रुची.

शफौ – उंबराच्या लाकडाचा चिमटा. याला दोन्ही बाजूंना लांब दांडे असतात. अग्नीवरून उतरवताना महावीर हे पात्र या शफांनीच धरतात. याला परीशास असेही म्हणतात.

धवित्र – अग्नीला वारा घालण्यासाठी तयार केलेले पंखे. कृष्णाजिनाचे तुकडे कामटीला बांधून हे तयार केलेले असतात.

निदान – धार काढताना गाईच्या मागच्या पायांना बांधण्यासाठी असलेली दोरी.

अभ्री – माती उकरण्यासाठी फावड्याच्या आकाराचे एक पात्र. खैर, पळस, उंबर, इ. वृक्षांची अभ्री तयार करतात.

विघन – यज्ञवेदी तयार करताना जी उपकरणे लागतात, त्यांपैकी एक. हातोडा किंवा चोपणे यासारखा यांचा आकार असतो. यज्ञीय वृक्षापासून विघन तयार करतात.

पर्शू – घोड्याच्या किंवा बैलाच्या अस्थीपासून तयार केलेले धारदार शस्त्र. वेदी तयार करताना गवताची मुळे तोडण्याव



फलक क्र. २ – यज्ञीय पात्रे व उपकरणे

१. पूतभृत, २. औदुंबरदंड, ३. आसंदी, ४. दर्वी, ५. वपाश्रपणी ६. आश्विन व शुक्रग्रह, ७. स्वधिती.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याचा उपयोग करतात. याला अश्वपर्शू किंवा अनडुत्पर्शू असेही म्हणतात. प्रत्यक्ष अस्थी मिळाली नाही, तर हे शस्त्र लोखंडाचे बनवतात.

अधिषवणफलक – ज्या दोन फळ्यांवर मोठा पाटा ठेवून त्यावर सोम कुटतात, त्यांना हे नाव आहे. उंबर, पळस किंवा शिवणी यांच्या लाकडापासून हे तयार करतात. उपरव नावाचे चार खड्डे करून त्यावर हे फलक ठेवतात.

वसतीवरी – पाणी साठविण्यासाठी असलेली मोठी घागर. वाहत्या नदीतून पाणी आणून ते मंत्रपूर्वक या घागरीत ओततात. सोमरस तयार करताना यातील पाणी वापरतात.

वायव्यपात्र – सोमरस तयार झाल्यानंतर वेगवेगळ्या देवतांसाठी तो ज्या लाकडी पात्रांत भरून ठेवतात, त्यांना वायव्यपात्रे म्हणतात. ही पात्रे टीचभर उंचीची, उखळीसारखी, मध्ये वाक असलेली अशी असतात. या पात्रांची देवता वायू आहे, पण यांत भरून घेतलेल्या सोमरसाची देवता भिन्न भिन्न असते. या सोमरसालाच ग्रह असे म्हणतात. सोमरस ज्यात घेतात ते पात्र व त्यात घेतलेला सोम यांना मिळून ग्रह म्हणतात. देवतांच्या नावांवरून ग्रहांचा उल्लेख होतो. उदा० मैत्रावरुणग्रह, आश्विन ग्रह, वैश्वदेवग्रह, इत्यादी. काही पात्रांचे आकार वेगवेगळे असतात. आश्विनपात्राचे मुख चौकोनी असून, त्याला ओठासारखी दोन तोंडे करतात. मैत्रावरुणपात्राला गळ्याभोवती दोन स्तन करतात. त्यामुळे त्या पात्राला अजकाव असेही म्हणतात.

ऋतुपात्र– ऋतुनामक ग्रह घेण्यासाठी हे पात्र असते. हे दांडा नसलेल्या स्रुचीच्या आकाराचे करतात. अशी दोन पात्रे लागतात.

सोमस्थाली–काही ग्रह भरून ठेवण्यासाठी मातीच्या स्थाल्या असतात. आग्रयणस्थाली, उक्थ्यस्थाली, आदित्यस्थाली व ध्रुवस्थाली अशा चार स्थाल्या असतात.

परिप्लुपात्र– द्रोणकलशातून सोम घेण्यासाठी याचा उपयोग करतात. याचा आकार नौकेसारखा करतात.

द्रोणकलश– गाळलेला सोम यात पडत असताना ग्रह भरून घेतात. याचा आकार नौकेसारखा, लांबट किंवा चौकोनी असतो. यज्ञीय काष्ठाचेच हे पात्र तयार करतात. द्रोणकलशात असलेल्या सोमाला पवमान म्हणत असल्याने द्रोणकलशातील सोमाला पवमानग्रह असेही नाव आहे.

पूतभृत– गाळलेला सोमरस साठवून ठेवण्यासाठी असलेली मातीची घागर. यातील सोमाला पवमानग्रह म्हणतात.

आधवनीय – सोम भरून ठेवण्यासाठी असलेली घागर.

चमस– मुख्यतः सोमरसाचे प्राशन करण्यासाठी याचा उपयोग करतात. चमस हे वडाच्या, पिंपळाच्या किंवा कोणत्याही यज्ञीय वृक्षाच्या लाकडाचे करतात. चमस चतुरस्र करतात. वेगवेगळ्या ऋत्विजांसाठी वेगवेगळे चमस असतात. त्यांचा उल्लेख ऋत्विजाच्या नावावरूनच करतात. उदा०–होतृचमस, उद्गातृचमस, मैत्रावरुणचमस, अच्छावाकचमस, इत्यादी. सर्व चमस चौकोनी करून त्यांच्या दांड्यांवर वेगवेगळ्या खुणा कराव्या, असेही सांगितले आहे. कोणत्या ऋत्विजाच्या चमसावर कशी खूण करावी हेही सांगितले आहे. सोमयज्ञात अनेक वेळा सोमपान करावे लागते. ते या चमसातूनच करतात.

श्रौत यज्ञांमध्ये अशी अनेक पात्रे लागतात. त्या मानाने स्मार्त यज्ञात फारच थोडी पात्रे लागतात. स्मार्त यज्ञ हे श्रौत यज्ञांचा आदेश घेऊन केले जातात. त्यामुळे त्यांत स्रुव, स्रुक्, स्थाली, इ. पात्रे श्रौताप्रमाणेच असतात. काही विशेष पात्रे किंवा उपकरणे असतात, त्यांचा पुढे निर्देश केला आहे.

कूर्च– दर्भापासून तयार केलेले टीचभर लांब उपकरण. आठ–दहा दर्भांपासून हे तयार करतात. आसन म्हणून कूर्च देतात. पातळ पदार्थ ढवळण्यासही याचा उपयोग करतात. श्राद्धांत तिलोदक देतानाही ते कूर्चानें देतात.

दर्वी– पळी. ही लाकडाची असावी, असे सांगितले आहे. तुपाची किंवा पातळ पदार्थाची आहुती दर्वीने देतात. लाकडाची दर्वी नसेल तर धातूची किंवा पानांनी तयार केलेली दर्वीही वापरतात.

वसोर्धारा– मोठमोठ्या शांतिकर्मांत पूर्णाहुती म्हणून एक विधी असतो. त्या वेळी तुपाची संतत धार धरून अग्नीवर आहुती देतात. त्यासाठी वसोर्धारा नावाची लांब स्रुची तयार करतात. पाठीमागे मोठे बिल तयार करतात. लांब नळीने तूप पुढच्या बिलात जाते व त्यातून अग्नीवर आहुती पडते.

यज्ञसामग्री– यज्ञांत लागणारी लाकडी पात्रे व मातीची पात्रे अगोदर तयार करून घ्यावी लागतात. त्यासाठी अनेकांचे साहाय्य लागते. याव्यतिरिक्त दर्भ, कृष्णाजिने, समिधा अशा वस्तूही लागतात. यज्ञाला प्रारंभ करण्यापूर्वी जी सर्व सामग्री तयार करावी लागते तिला संभार म्हणतात. व्रीही, यव, तिळ, इ. धान्ये; अश्वत्थ, पलाश, उदुंबर, इ. वृक्षांच्या समिधा; वेगवेगळी वस्त्रे, निरनिराळी पात्रे आणि विशिष्ट यज्ञासाठी लागणाऱ्या दक्षिणा या सर्व गोष्टींची सिद्धता असावी लागते. या संभाराला उद्देशून संपत्ती असा शब्दही उपयोजिला आहे. ऋत्विक्संपत्ती, द्रव्यसंपत्ती व देशसमृद्धी या गोष्टी असतील तरच मोठ्या श्रौत यज्ञाला आरंभ करावा, असे म्हटले आहे. श्रौत यज्ञाला जागाही मोठी लागते, तिला देवयजन म्हणतात. श्रौत यज्ञ अनेक दिवस चालणारे असल्यामुळे त्यांत भाग घेणाऱ्या ऋत्विजांना यजमानाने प्रतिदिन भोजन द्यायचे असते. स्मार्त यज्ञ हे त्या मानाने कमी दिवस चालणारे असतात. यज्ञाला साहाय्य करणाऱ्यांनाही यज्ञ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

फल मिळत असते. यज्ञ-सामग्री गोळा करणाऱ्यांना वैदिक वाङ्मयात सनीहार असे नाव दिले आहे. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे; एन्सा. रि. ए.; प्रा. भा. सा. सां. भू; वे. रा. द. उत्तरार्ध; भारतीय संस्कृति; वै. सा. सं.; ऋग्वेदाचा सांस्कृतिक इतिहास; सॅक्रिफाइस इन दि ऋग्वेद; मिस्टिसिझम इन महाराष्ट्र; हिंदुत्ववाद; म. ज्ञा. को.; वे. का. य.; मराठी संत काव्य आणि कर्मयोग– शं. दा. पेंडसे; भा. सं. सा; ब्राह्मण ग्रंथातील पशुयज्ञ व अहिंसा–श्री. ग. उ. थिटे, नवभारत, नोव्हें. १९६९; वै. सं. वि.; संस्कृतिसंगम.]

यज्ञोपवीत

लौकिकात याला जानवे असे म्हणतात. उपनयन झाल्यानंतर बटूला गळचात यज्ञोपवीत धारण करावे लागते. श्रौत–स्मार्त कर्मानुष्ठानाच्या सिद्धीसाठी त्रैवर्णिकांनी यज्ञोपवीत धारण करावे, असा विधी आहे. वेदाध्ययन करतानाही यज्ञोपवीत धारण करावे लागते. यज्ञोपवीत हे कापसाच्या तंतूंनी तयार करतात. हे सूत ब्राह्मणाने किंवा ब्राह्मणकुमारिकेने काढलेले असावे. तीन सूत्रे एकत्र करून त्याचा एक पदर तयार करतात. असे तीन पदर एकत्र करून गाठ बांधली म्हणजे यज्ञोपवीत तयार होते. अशा रीतीने यज्ञोपवीतात एकूण नऊ सूत्रे असतात. त्याची लांबी ९६ अंगुळे असावी, असे सांगितलेले आहे. यज्ञोपवीत तयार करताना विशिष्ट मंत्र म्हणतात. तसेच ते तयार झाल्यावर, त्याच्यावर मंत्रपूर्वक संस्कार करतात. यज्ञोपवीताचे मंत्रपूर्वक अभिमंत्रण केल्यावर ते सूर्याला दाखवतात आणि मग धारण करतात. यज्ञोपवीत धारण करण्याचा मंत्र पुढीलप्रमाणे–

यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत् सहजं पुरस्तात् ।
आयुष्यमग्र्यं प्रतिमुञ्च शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेजः ।।

अर्थ – अत्यंत पवित्र, पूर्वी ब्रह्मदेवासह उत्पन्न झालेले, आयवर्धक, सर्व वस्तूंत श्रेष्ठ व शुभ्र असे यज्ञोपवीत तू धारण कर. तेच तुझे बल व तेज असो.

याज्ञवल्क्याने यज्ञोपवीताला ब्रह्मसूत्र असे म्हटले आहे. ते डाव्या खांद्यावर आणि उजव्या हाताखाली लोंबणारे असे घालतात. ते नेहमी व देवकार्याच्या वेळी डाव्या खांद्यावर म्हणजे सव्य असावे. पितृकार्यात ते उजव्या खांद्यावर म्हणजे अपसव्य असावे आणि अन्य वेळी म्हणजे मानुषकर्माच्या वेळी ते निवीती म्हणजे माळेसारखे ठेवावे. यज्ञोपवीतावाचून भोजन केल्यास प्रायश्चित सांगितलेले आहे. शौच व लघुशंका हे विधी करण्याच्या वेळी ते उजव्या कानावर ठेवावे. एकाने दुसऱ्याचे यज्ञोपवीत घालू नये. यज्ञोपवीत तुटले, तर ते उदकात टाकून देऊन नवे धारण करावे, असे मनू सांगतो.

ब्रह्मचाऱ्याने एक, गृहस्थाश्रमी व वानप्रस्थ यांनी दोन आणि यतीने एक यज्ञोपवीत धारण करावे, असे देवलाने म्हटले आहे.

प्राचीन काळी काळविटाचे चामडे किंवा वस्त्र यज्ञोपवीत म्हणून वापरीत असत. तसेच प्राचीन काळी स्त्रियाही यज्ञोपवीत घालीत असत, असे दिसते. कारण विवाहसमयी वधूने यज्ञोपवीतिनी असावे, असे गोभिलगृह्यसूत्रांत (२.१.१८) म्हटले आहे. ब्राह्मणाने कापसाच्या सुताचे, क्षत्रियाने तागाच्या दोऱ्याचे आणि वैश्याने बकऱ्याच्या लोकरीच्या धाग्याचे यज्ञोपवीत वापरावे, असे मनूने सांगितले आहे (मनु. २.४४). [नि. सिं.; व्रतराज; इं. वे. क. सू.; श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

यज्ञोपवीतोपनिषद

एक अत्यंत लहान असे वैष्णव उपनिषद. यात वैष्णवांनी धारण करण्याच्या ऊर्ध्वपुंड्रालाच वैष्णवांचे यज्ञोपवीत म्हटले आहे. विष्णुभक्ताने आपल्या दोन्ही बाहूंवर सुदर्शन चक्र व शंख यांच्या आकृती गोंदवून घ्याव्या आणि ऊर्ध्वपुंड्र लावावा. असे करणाऱ्याला पुनर्जन्माचे भय राहत नाही व चारही मुक्ती लाभतात, असे या उपनिषदात सांगितले आहे. [श्री. सी. ग. देसाई]

याकिनी

एक तांत्रिक देवता. ही ब्रह्मरंध्रातील सहस्रदल पद्मावर बसलेली असून, सर्व वर्ण, सर्व आयुधे व सर्व धातू यांनी युक्त आहे. शुक्र हा तिचा प्रतिनिधिभूत धातू आहे. ही परशिवाशी रमलेली व सर्व अन्न भक्षण करणारी आहे. [श्रीविद्यार्णवतंत्र]

याज्या

कोणत्याही श्रौत यागात देवतेसाठी हवीचा याग करताना तो मंत्रपूर्वक करायचा असतो. देवतेला हवी देणारा अध्वर्यू होत्याला मंत्र म्हणण्याची आज्ञा करतो. त्यानंतर होता त्या देवतेचे वर्णन असलेली ऋचा म्हणतो. त्या ऋचेला याज्या असे म्हणतात. यागाच्या वेळी म्हणायची ऋचा, म्हणून ती याज्या होय. हे सारे याज्या मंत्र ऋग्वेदातून घेतलेले आहेत. पाणिनीने अष्टाध्यायीत यांचा विचार केला आहे.

ज्या देवतेसाठी याग करायचा त्या देवतेचा निर्देश याज्या मंत्राच्या उत्तरार्धात असतो (आप. श्री. सू. २४.१३८). याज्येच्या शेवटी वषट्कार उच्चारला जातो व अध्वर्यू अग्नीत आहुती देतो. [पा. का. भा.; श्री. विद्याधरशास्त्री भिडे; सं. को.]

यात

एक जात. गंजाम व विशाखापट्टम या जिल्ह्यांत यांची वस्ती आहे. ताडी तयार करणे हा यांचा प्रमुख व्यवसाय होय. त्याच्या जोडीला हे ताडाच्या पानांच्या टोपल्या व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पेट्या तयार करून विकतात. हे लोक तेलुगू भाषा बोलतात. यांच्यांत आतेबहिणीशी लग्न करण्याची चाल आहे. त्यांचे पौरोहित्य ब्राह्मण करतो. यांना घटस्फोट व विधवाविवाह मान्य आहे. हे प्रेतांना जाळतात. [का. ट्रा. स. इं.]

यातुशक्ती सर्व विश्वामध्ये जी एक अद्‌भुत शक्ती वास करते, तिला यातुशक्ती असे म्हणतात. ही शक्ती संवर्धक व संहारक अशी दोन्ही प्रकारची असते. सर्व विश्वाचा व्यापार आणि धारणा या शक्तीच्या योगे होत असतात. ती केवळ कल्पनारूप किंवा अमूर्त नसून, प्रत्यक्ष रसमय आहे, असे डॉ. रा. ना. दांडेकरांनी प्रतिपादले आहे. ते पुढे म्हणतात–"देव, मानव, पशू आणि विश्वातील इतर वस्तू या सर्वांमध्ये हा यात्वात्मक रस असतो. एखाद्या व्यक्तीत किंवा वस्तूत हा रस जितक्या अधिक प्रमाणात असेल, तितके त्या व्यक्तीचे किंवा वस्तूचे वर्चस्व किंवा वल अधिक असते. वैदिक 'असु' ही एक रसात्मक सर्वव्यापी यातुशक्ती होती. ज्याच्या जवळ ही यातुशक्ती अतिशय मोठ्या प्रमाणात व फार उत्कटत्वाने असते तो 'असुर' होय. त्याचा प्रभाव सर्व प्राणिमात्रांवर आणि वस्तुजातावर अप्रतिहतपणे चालतो. वरुणाला 'असुर' समजण्यात येते, ते यामुळेच की तो आपल्या यात्वात्मक 'असु' शक्तीच्या प्रभावाने सर्व विश्वावर आपले अधिराज्य गाजवू शकतो.

असुर वरुणाच्या या अनन्यसाधारण शक्तीला वेदांत 'माया' म्हटले आहे. 'माया' ही शक्तीही यात्वात्मकच आहे. या शक्तीमुळे अद्‌भुत व अलौकिक कार्ये साध्य होतात. उदाहरणार्थ सामान्य मानवाच्या बुद्धीला अगम्य वाटणारे, या प्रचंड निसर्गशक्तींच्या प्रवर्तन-नियमनादीचे काम मायेमुळेच शक्य होते. आणि ते काम वरुणास शक्य झाले आहे म्हणूनच तो खरा मायी. तो जगातील सर्वांत बडा जादुगार आहे. एका वैदिक मंत्रात (७.८८.६) वरुणास साक्षात यक्षिन म्हणजे जादुगार म्हटले आहे आणि दुसऱ्या एका मंत्रसमूहात (५.८५.२–६) असुर वरुणाच्या यातुशक्तीच्या प्रभावाचे मोठे चित्रोपम वर्णन केलेले आहे."

परंतु ऋग्वेदात अनेक ठिकानी यातुशक्तीला संहारक शक्ती मानले आहे. यातुधान म्हणजे यातुशक्ती धारण करणारा. ऋग्वेदात हा शब्द राक्षस या अर्थाने वापरलेला आढळतो. राक्षस यातुशक्तीने निरनिराळ्या पशु-पक्ष्यांची रूपे घेऊन मानवांना त्रास देत. त्यांचा नाश करण्याविषयी ऋग्वेदात इंद्राची प्रार्थना केलेली आहे, ती अशी–

उलूकयातुं शुशुलूकयातुं जहि श्वयातुमुत कोकयातुम् ।
सुपर्णयातुमुत गृध्रयातुं दृषदेव प्र मृण रक्ष इन्द्र ॥
मा नो रक्षो अभि नड्यातुमावता–
मपोच्छतु मिथुना या किमीदिना ॥

(ऋ. ७.१०४.२२–२३)

अर्थ – घुबडाचे किंवा पिंगळ्याचे रूप घेणाऱ्या राक्षसाला दगडाने ठेचल्याप्रमाणे ठेचून मारून टाक. तसेच कुत्र्याचे, खोकडाचे, गरुडाचे किंवा गिधाडाचे रूप घेणाऱ्या राक्षसाला, हे इंद्रा, तू त्याची मान मुरगळून टाक. आमच्या जवळ येण्याची सुद्धा राक्षसाला छाती होऊ नये. त्याचप्रमाणे चेटके व किमीदिन यांची जोडपी तर आम्हांला पाहूनच पळून जावोत.

गूढ, अकल्पनीय अशा दैवी शक्तीवरील विश्वास हा आदिमानवाच्या धार्मिक जीवनाचा पाया आहे. ही दैवी शक्ती सर्व चराचरात वास करते, अशी त्याची समजूत आहे. काही माणसे जन्मतःच अशा शक्तीने युक्त असतात. काही पंडितांच्या मते ही अद्‌भुत शक्ती चराचरात साठवलेली नसून, मंत्र आणि विधी यांच्या साहाय्याने ती निर्माण करता येते. भगत, पंचाक्षरी वगैरे माणसे मंत्रसाधनेने यातुशक्ती प्राप्त करून घेतात.

काही विद्वानांच्या मते यातुशक्तीच्या साहाय्याने सृष्टीचे नियंत्रण करणे शक्य आहे. अशा नियंत्रणासाठी ज्या पद्धतीचा व ज्या तंत्राचा अवलंब केला जातो, त्याला यातुक्रिया म्हणतात व त्या संबंधीची जी विद्या तिला यातुविद्या म्हणतात. यात्वात्मक लोकनृत्ये आणि पाऊस पडावा, जमीन पिकावी, म्हणून करण्यात येणारे विधी यांचे स्वरूप पाहिल्यास त्या क्रियांच्या मागे काही निश्चित तत्त्वे असावी, असे वाटते. मांत्रिक सर्पविष उतरवतो, तेव्हा यातुशक्तीला आवाहन करतो. मीठ, मिरची, हळद, लोखंड, सोने, कवटी, केस, इ. वस्तू दृष्टिबाधा, पायरव, सटी, सोवनी, भूतबाधा यांवर उपाय करताना वापरण्यात येतात. कारण त्या वस्तूंमध्ये शक्ती आहे, अशी समजत सर्वत्र आढळते.

जादू ही धर्माची अगदी प्रथमावस्था होय, असे फ्रेझरने म्हटले आहे. त्याने यातुविद्येला विज्ञानाची पूर्वावस्थाही मानले आहे. सृष्टीतील शक्तींवर कबजा करून, त्यांचा आपल्या इष्टसिद्धीकरता विनियोग करणे हा विज्ञानाचा उपयोग होय. तोच जादूचाही उद्देश असतो. निसर्गाचे नियम योग्य रीतीने वापरले म्हणजे हमखास फलदायी होतात, अशी विज्ञानाची खात्री असते. जादुगाराचीही आपल्या मंत्रतंत्रावर व त्या क्रियेशी संबंध असलेल्या निसर्गातील वस्तूंच्या स्वभावावर अशीच भिस्त असते. जादूचे वैयर्थ्य जाणवू लागले म्हणजे धर्म उत्पन्न होतो.

प्रेइस, मॅरेट, एडमॉँस वगैरे शास्त्रज्ञांच्या मते मात्र यातुविद्या व विज्ञान यांत मौलिक विरोध असून, साम्य असले तरी ते अगदी वरवरचे आहे. विज्ञान हे अनुभव व प्रयोग यांतून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जन्मते आणि त्यांवरच अवलंबून असते. बुद्धिवाद त्याचा निरंतर दिग्दर्शक असतो. निसर्गशक्तींच्या स्पष्ट कल्पनेवर त्याची घडण होत असते व त्याचे अध्ययन सर्वांना करता येते. यातुविद्येचे सगळेच याच्या उलट असते. गूढ भावनेच्या व अंधश्रद्धेच्या वातावरणात ती जगते, गुप्त रीतीने शिकवली जाते आणि अडाणी भोळ्या समजुतीवर तिचे पोषण होते. निसर्गात विलक्षण गूढ, विस्मयजनक व चमत्कारिक शक्ती आहेत, अशा श्रद्धेवाचून तिला अस्तित्वच राहू शकत नाही. तात्पर्य, धर्मसंस्थेचे अगदी प्राथमिक स्वरूप याच दृष्टीने यातुविद्येला समाजशास्त्रात स्थान आहे.

याविषयी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जे विवेचन केले आहे, ते असे– जादू, धर्म व विज्ञान यांचे पौर्वापर्य किंवा साम्यवैषम्य या बाबतींत पंडितांत मतभेद असला, तरी ही गोष्ट निश्चित आहे की, यांची बीजे एकत्र सापडतात. बाबिलोनियात व भारतवर्षात वैद्यक, कायदा, जादू व धर्म हे एकाच धंद्यातून निर्माण झाले. बाबिलोनियात वैद्यक जादूटोण्याच्या स्वरूपात प्रथम होते, असे इतिहास सांगतो. हिंदुस्थानातील अथर्ववेदात सांगितलेले अथर्व वैद्यक, जादू व पौरोहित्य ही तीन्ही कामे करीत. जादू, वैद्यक, धार्मिक संस्कार व यज्ञयाग या क्रिया एकत्रित मिसळलेल्या किंवहुना एकजीव असलेल्या स्थितीत अथर्ववेदात व कौशिकगृह्यसूत्रांत दिसतात. कायदा हासुद्धा हिंदुस्थानात हजारो वर्षे धर्माचाच भाग होता. त्याचा दैवी क्रियेशी व पारलौकिक गतीशी संबंध जोडलेला होता. दिव्य हे न्यायनिर्णयाचे एक प्रमाण होते. न्यायनिर्णयाचा मुख्य अधिकार पुरोहित वर्गाकडे होता. पाहा– जादूविद्या. [वै. दे. अ. द.; हिं. ध. स.; डॉ. प्र. भा. मांडे – नवभारत, जानेवारी १९६९]

यात्रकळी केरळातील एक नृत्यनाट्य. विशेषतः नंपूतिरी ब्राह्मण हे नृत्यनाट्य करतात. हा प्रयोग करणारे ब्राह्मण पढिक व वेदशास्त्रसंपन्न असतात. पेरुमाळांच्या सत्ताकालात इ. स. च्या आठव्या शतकानंतर केरळात या नृत्यनाट्याचा उदय झाला. त्याला कारण घडले, ते असे–

पेरुमाळ राजाच्या दरबारात एक दिवस काही बौद्ध उपस्थित झाले. ते विद्वान आणि वादपटू होते. बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी ते आले होते. त्यासाठी दरबारातील हिंदू पंडितांना त्यांनी वादाचे आव्हान दिले. सर्वांसमक्ष वादाची अट ठरली, की हिंदू हरले तर त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारावा आणि बौद्ध हरले, तर त्यांनी पीत वस्त्रे टाकून पुनश्च हिंदू धर्मात यावे. राजाच्या साक्षीने त्यांच्या वादाला प्रारंभ झाला. त्यात बौद्धांची सरशी होऊ लागली. हिंदू पंडितांची विजयाची आशा मावळू लागली. एकेक करून त्या सर्व पंडितांनी वादाच्या रणक्षेत्रातून काढता पाय घेतला. ते पराभूत पंडित तिथून सरळ तृक्कारियूर या क्षेत्रात गेले आणि त्या महान शिवक्षेत्रात देवाला साकडे घालून बसले. सतत एकेचाळीस दिवस त्यांचे हे देवद्वारी धरणे चालू होते. एके दिवशी एक अत्यंत तेजस्वी ब्राह्मण तिथे आला. त्याने त्या धरणेकरी ब्राह्मणांना एक मंत्र उपदेशिला आणि त्या मंत्राने दिव्याला प्रदक्षिणा घालायला सांगितले. पंडितांनी तो आदेश पाळला. त्याचे फळही लगेच दिसून आले. एकेचाळिसाव्या दिवशी सहा दार्शनिक विद्वान पेरुमाळाच्या दरबारात उपस्थित झाले. त्यांनी त्या बौद्ध आचार्यांना पुन्हा वादाचे आव्हान दिले. पुन्हा वाद सुरू झाला. पण या वेळी बौद्ध सर्वस्वी हरले आणि चंबूगबाळे उचलून पसार झाले. अशा रीतीने केरळी पंडितांची अब्रू बचावली.

त्या दिवसापासून हे नृत्यनाट्य केरळात भगवत्कृपेचे साधन म्हणून प्रचलित झाले.

या घटनेची स्मृती म्हणून आणि एकूणच सर्व सामाजिक आपत्तींचा परिहार व्हावा म्हणून केरळात तृक्कारियुरप्पनची पूजा करतात आणि त्या वेळी जे नृत्यनाट्य करतात, त्याला यात्रकळी असे नाव आहे.

यात्रकळीचे नालपादम, पानम, अभिनयम आणि हास्यम असे चार विभाग आहेत. नालपादमसाठी एक उंच समई पेटवून रंगमंचावर ठेवतात. त्या वेळी नाल म्हणजे चार ब्राह्मण एक प्रार्थनागीत म्हणतात. त्याचा आशय असा–

हे तृक्कायूरवासी शिवशंकरा, तू आमच्या या नाट्यासाठी रंगमंचावर उपस्थित हो आणि इथे वावरणारी भुतेखेते तुझ्या तीव्र कटाक्षाने पिटाळून लाव.

हे गीत गातागाताच ब्राह्मण त्या समईला प्रदक्षिणा घालतात आणि रंगभूमीवर शंकराचे आगमन झाले, असे समजतात.

दुसऱ्या पानम या कार्यक्रमासाठी सर्व ब्राह्मण दिव्याच्या सभोवती बसून एका विशिष्ट गीताने गणपतीचे स्तवन करतात. त्यानंतर अभिनयम सुरू होते. एक भस्मचर्चित ब्राह्मण उपरणे कमरेला गुंडाळतो, एक मडके उलटे करून त्यावर ताल धरतो. मग इतरांपैकी काहीजण त्या तालावर सूर चढवतात. ते ज्या प्रकारचे पद्य गात असतील, त्याला अनुसरून इतर मंडळी मुद्राभिनय करू लागतात. हे अभिनयम थोडा वेळ चालल्यावर मग शेवटचे हास्यम सुरू होते. प्रेक्षकांना हसविण्यासाठी नट खास पोषाख घालून वेडावाकडा अभिनय तरी करतो किंवा एखादे विनोदी गीत तरी गातो. अशी विनोदी गीते मलयाळम साहित्यात विपुल आहेत. ती एखाद्याची टिंगलटवाळी करणारी किंवा असंबद्ध असतात. त्यांपैकी असंबद्ध गीताचे एक उदाहरण खाले–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अडिक्कोल्ला तलिक्कोल्ला अडुपिन् ती एरिक्कोल्ला
उरङ्ङल्ला उरङिङ्ग्याल पिन्नुणरोल्ला
उदिक्कोल्ला अस्तमिकोल्ला भगवान् पोलुम् ।

अर्थ – झाडू मारू नका. पाणी शिंपडू नका. चुलीत आग घालू नका. (मग खा काय ?) झोपू नका. झोपलात तर जागे होऊ नका. (म्हणजे मरा, असेच ना ?) सूर्याने उगवूही नये आणि मावळूही नये. (म्हणजे त्या बिचाऱ्याने करायचे काय ?)

या नृत्यनाट्याच्या भोवती काही धार्मिक विधी गुंफलेले आहेत आणि त्यांचे काही संकेतही आहेत. [केरळ]

यात्रा नाटक बंगाल, ओडिसा व बिहार या प्रदेशांतील एक ग्रामीण नाट्यप्रकार. खेडोपाडी या यात्रा नाटकांचे प्रयोग अजूनही चालू आहेत. यात्रा शब्दाचा अर्थ मिरवणूक किंवा उत्सव असा आहे. पूर्वीच्या काळी एखाद्या देवतेचे भक्त, तिच्या उपासनेचा एक भाग म्हणून तिची मिरवणूक काढीत असत. त्या मिरवणुकीत तिचे काही भक्त तिच्या चरित्रातील एखादा महत्त्वाचा प्रसंग अभिनयाच्या द्वारे लोकांपुढे मांडीत. त्यात नृत्य व संगीत यांनाही स्थान असे. कालांतराने या नाट्य, नृत्य व संगीत असलेल्या नाट्यप्रकाराला यात्रा नाटक असे नाव मिळाले.

यात्रा नाटकाची उत्पत्ती केव्हा झाली, याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. कोणी ती वैदिक काळाच्या पूर्वी, कोणी ती वैदिक काळात, तर कोणी ती वैदिक काळानंतर झाली, असे मानतात. यांपैकी कुठलेही मत ग्राह्य धरले, तरी यात्रा नाटकाची उत्पत्ती फार प्राचीन काळी झाली, एवढे सिद्ध होते.

यात्रा नाटक हे पहिले धार्मिक नाटक होते. देशकालानुसार ज्या ज्या देवतांचे माहात्म्य वाढत होते, त्या त्या देवतांच्या चरित्रातील प्रसंगांवर यात्रा नाटके होऊ लागली. अशा प्रकारे शक्तियात्रा, शिवयात्रा, रामयात्रा, कृष्णयात्रा, इ. अनेक यात्रा प्रसिद्धीला आल्या. या यात्रा नाटकांचा प्रभाव संस्कृत पंडितांवर व इतरही भाषांच्या विद्वानांवर पडला. याच नाटकाच्या धर्तीवर जयदेवाने आपल्या गीतगोविंदाची रचना केली. त्या काव्याच्या अष्टपद्यांवर आज कित्येक शतके अभिनय चालू आहे. मध्ययुग हा यात्रा नाटकाचा उत्कर्षकाल होय. शंकरदेव आणि चैतन्यप्रभू यांनी तो घडवून आणला.

चैतन्यप्रभू यात्रा नाटकात स्वतः भूमिका करीत असत. कृष्णचरित्रातील एखादा प्रसंग निवडून ते आपल्या शिष्यांना त्यातील भूमिका वाटून देत. मग ते शिष्य रंगमंचावर उत्स्फूर्तपणे संवाद बोलत व त्यानुसार अभिनय करीत. चैतन्यप्रभूंच्या काळी यात्रा नाटकात कृष्णलीलेचा प्रभाव इतका वाढला, की यात्रा नाटकाला कालियदमन यात्रा असेच नाव पडले. हे नाव पुढे सुमारे चारशे वर्षे प्रचारात होते. गीतगोविंद, भागवत व चंडीदासादी कवींची पद्ये यांच्या आधारे संवादरचना करून कृष्णयात्रा अभिनीत केल्या जात.

या यात्रांत संगीताला प्राधान्य होते. कृष्णलीलेनंतर विद्यासुंदरयात्रा, शेखरयात्रा, पुराणयात्रा, इ. सामाजिक यात्रांचे प्रयोग होऊ लागले आणि इ. स. च्या अठराव्या शतकाच्या अंतापर्यंत ते चालू राहिले. एकोणिसाव्या शतकात यात्रा नाटकांवर इतर नाटकांचा प्रभाव पडला. या काळात रत्नावली, सावित्री–सत्यवान, पद्मावती, इ. नवीन यात्रा नाटकांचे प्रयोग होऊ लागले.

ही यात्रा नाटके प्रायः खुल्या मैदानात होतात. काही ठिकाणी त्यासाठी मंडप उभारतात आणि प्रेक्षकांना बसण्यासाठी घोंगड्या किंवा चटया अंथरतात. कधी थोड्याशा उंचीवर रंगमंच उभारतात, तर कधी सपाट जमिनीवरच रंगमंचाचे काम भागवतात. लाकडी खुर्च्यांवर रेशमी किंवा सुती कापड टाकून सिंहासन बनवतात. नाटकात फक्त पुरुषच भाग घेतात. स्त्रियांची कामेही पुरुषच करतात. पात्रांचा अभिनय गायकांच्या सामूहिक गायनानुसार चालतो. गाण्याला ढोल, मृदंग व करताल यांची साथ असते. सर्व गायक चोंगा नामक पांढरे वस्त्र नेसून रंगमंचावर येतात. नाटक सुरू होण्यापूर्वी अर्धा तास ढोल वाजवायला सुरुवात होते. नाटकाच्या आरंभी गौर–चंद्रिकेचे गायन होते. त्यात चैतन्यप्रभूला वंदन केलेले असते. नृत्य, गीत आणि वाद्य असे या नाटकाचे स्वरूप असते. एक मुख्य अधिकारी असतो आणि त्याच्या निर्देशनाखाली इतर नट अभिनय करतात. नायकाचे काम मुख्य अधिकारीच करतो.

इ. स. च्या विसाव्या शतकात स्वदेशी यात्रा नावाचा एक नवीन यात्रा नाटकप्रकार बंगालमध्ये फार लोकप्रिय झाला. मुकुंददास नामक एका नाटककाराने समाजात दृढमूल झालेले दोष व परकी शासन यांच्यावर आपल्या नाटकांत प्रखर हल्ला चढवला आणि लोकांचा देशाभिमान जागृत होईल अशा तऱ्हेची नाटके लिहिली. त्या नाटकातील गीते फार प्रभावी असल्यामुळे त्यांचा खेडोपाडी प्रसार झाला आणि त्या नाटकांवरून प्रेरणा घेऊन कित्येक तरुण राष्ट्रकार्याला लागले.

ओडिसामध्ये वैष्णवपाणी याने यात्रा नाटकाला आधुनिक स्वरूप दिले आणि त्याच्या मूळच्या तंत्रात खूप बदल केला. त्याने जवळ जवळ पन्नास यात्रा नाटके लिहिली. त्यांपैकी काहींच्या तीस ते नव्वद आवृत्त्या निघाल्या. यावरून लोकमानसावर त्यांचा केवढा प्रभाव होता, हे ध्यानात येईल. [भा. ना. सा.; हिं. ना. उ. वि.; हि. ओ. लि.; लो ध. ना. प.; एस्. के. बोस– इलस्ट्रेटेड वीकली, २९ जुलै १९६२]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यात्रायोगद्वय मुहूर्तशास्त्रातील एक शुभ योग. मुहूर्तचिंतामणीत याचे निरूपण पुढीलप्रमाणे केले आहे– लग्नी शनी व मंगळ असणे, दशम स्थानी रवी असणे, बुध व शुक्र एकादश स्थानी किंवा दशम स्थानी असणे हा एक शुभ योग होय. तसेच ३, ११ व ६ यांतील कोणत्याही स्थानी मंगळ व शनी असणे आणि गुरु, बुध व शुक्र हे बारा स्थानांपैकी ज्या स्थानी असतील तिथे बलवान असणे, हा एक शुभ योग आहे. या शुभयोगाचे असे दोन पर्याय असल्यामुळे याला योगद्वय म्हटले आहे. या दोन योगांवर राजाने युद्धयात्रा केल्यास त्याला विजय प्राप्त होतो. [मुहूर्तचिंतामणि]

यात्रासिद्धिराय धर्मठाकूर संप्रदायाची एक श्रेष्ठ देवता. प. बंगालमध्ये मैनपूर गावी या देवतेचे स्थान आहे. याच्या वार्षिकोत्सवप्रसंगी स्त्रिया कालीचा वेष करून आणि हातांत माणसाची कवटी घेऊन नृत्य करतात. त्या नृत्यापूर्वी देवदासींचे पात्रनृत्य होते.

यादगिरी आंध्र प्रदेशातील एक पवित्र स्थान. हे ठिकाण नळगोंडा जिल्ह्यातील भोंगरी तालुक्यात आहे. इथे एका टेकडीवर नरसिंहरूपातील विष्णूचे मंदिर असून, ते लक्ष्मीसिंहस्वामीचे मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. भगवान विष्णू इथे का अवतरला, त्यासंबंधीची एक कथा स्कंद पुराणात आहे, ती अशी–

त्रेतायुगात विभांडक नावाचा एक ऋषी होऊन गेला. त्याला ऋष्यशृंग नावाचा मुलगा होता. ऋष्यशृंगाच्या मुलाचे नाव यादव होते. हा यादव बालपणापासूनच विष्णुभक्त होता. नंतर विष्णुदर्शनाची ओढ लागून त्याने या स्थानी तप आरंभले. काही कालाने त्याला इथे विष्णूचे दर्शन झाले. मग त्याने विष्णूला इथेच राहण्याची विनंती केली आणि तिला मान देऊन विष्णू तिथेच राहिला. त्याच्या नावावरूनच या स्थानाला यादगिरी हे नाव मिळाले.

या मंदिराच्या परिसरात आणखी तीन नरसिंहमंदिरे आहेत. कालांतराने त्यांतील नरसिंहमूर्ती मातीच्या ढिगाऱ्यांत गाडल्या गेल्या. एके दिवशी तिथल्या ग्रामप्रमुखाच्या स्वप्नात येऊन नरसिंहाने आपली ही स्थिती सांगितली. ग्रामप्रमुखाने स्वप्नादेशाप्रमाणे त्या टेकडीवर जाऊन त्या मूर्ती उकरून काढल्या आणि त्यांची स्थापना केली.

इथे दर वर्षी फाल्गुन शुद्ध द्वितीयेपासून द्वादशीपर्यंत मोठी यात्रा भरते. मंदिरातील नेहमीचे धार्मिक विधी पांचरात्र पद्धतीनुसार होतात. [टें. ली. आं. प्र.]

यादवप्रकाश एक अद्वैती आचार्य. रामानुजाचार्यांनी कांजीवरम येथे याच्याजवळ अध्ययनाला प्रारंभ केला होता; परंतु पुढे गुरु-शिष्यांत मतभेद निर्माण झाल्यामुळे रामानुजांनी त्याच्याजवळचे अध्ययन बंद केले. यादवाचार्य आणि कांचीनिवासी रामानुजांचे गुरू यादवप्रकाश हे एकच की भिन्न, यासंबंधी टीकाकारांमध्ये मतभेद आहेत.

यादवप्रकाश भेदाभेदवादी होता. ब्रह्मसूत्रांमध्ये (१.४.२०) आश्मरथ्याचे जे मत आहे, त्याच्या आधारावर यादवप्रकाशाचे सिद्धान्त आधारले आहेत, असे श्रुतिप्रकाशिकाकार सुदर्शनाचे मत आहे. वेदान्तदेशिकाचार्यांने आपल्या परमतभंग नामक ग्रंथात याच्या मतांचे समालोचन केले आहे.

यादवप्रकाशाने ब्रह्मसूत्र आणि गीता यांच्यावर भेदाभेद मतानुसार भाष्यरचना केली आहे. हा निर्गुण ब्रह्म व मायावाद मानीत नव्हता. याच्या मते ज्ञानकर्मसमुच्चय हेच मुक्तीचे साधन असून, शुद्ध ज्ञानाने अथवा शुद्ध कर्माने मुक्ती मिळत नाही. [हिंदुत्व; भा. द. सं.; अच्युत १५ वैशाख, वि. सं. १९९३]

यादव राजवंश (१) सोमवंशातील ययाती राजाचा पुत्र यदू याच्या वंशजांना यादव म्हणतात. निरनिराळ्या पुराणांत यदूच्या पुत्रांची निरनिराळी नावे आढळतात. भागवत पुराणात क्रोष्टू, सहस्रजित, नल व रिपू ही चार नावे आहेत; तर मत्स्य पुराणात नील, अंतिक व लघू; वायू पुराणात जित व लघू; हरिवंशात सहस्रद व पयोद; विष्णू पुराणात केवळ क्रोष्टू; पद्म पुराणात भोज, भीम, अंधक, कुंजर, वृष्णी, श्रुतसेन, श्रुताधार, कालदंष्ट्र व कालजित अशी त्यांची नावे दिलेली आहेत. त्यांतील क्रोष्टू व सहस्रजित हे दोनच पुत्र महत्त्वाचे होत; कारण त्यांच्यापासून यादवांच्या दोन शाखा विस्तार पावल्या.

क्रोष्टू शाखा – या शाखेतील भीम सात्वत नामक राजाचे पुत्र अंधक व वृष्णी यांचे वेगळे वंश पुराणप्रसिद्ध आहेत. अंधकाच्या वंशातील आहुकाला उग्रसेन व देवक हे दोन पुत्र होते. उग्रसेन मथुरेचा राजा होता. त्याचा पुत्र कंस हा होय. देवकाची कन्या देवकी हिचा विवाह वृष्णीच्या वंशातील वसुदेवाशी झाला. त्यांचा पुत्र कृष्ण होय.

कंस हा अत्यंत शूर व महत्त्वाकांक्षी होता. मगधसम्राट जरासंघाच्या दोन कन्यांशी त्याचा विवाह झाला होता. जरासंघाच्या साहाय्याने कंसाने आपला पिता उग्रसेन याला पदच्युत करून मथुरेचे राज्य बळकावले. वसुदेव हा उग्रसेनाचा व कंसाचा प्रधान होता. पुढे वसुदेव व देवकी यांना कंसाने बंदिवासात ठेवले. त्याच्या जाचाला कंटाळून अनेक यादव दुसऱ्या प्रदेशात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निघून गेले. पण वसुदेवपुत्र कृष्णाने कंसाला ठार मारले.

वृष्णीच्या वंशातील कृष्ण, बलराम हे वसुदेवाचे पुत्र; स्यमंतक मणी प्राप्त करून घेणारा सत्राजित व त्याचा भाऊ प्रसेन; अक्रूर, सत्यभामा, इ. व्यक्ती पुराणांतरी प्रसिद्ध आहेत. कंसाच्या वधाचा सूड घेण्यासाठी जरासंधाने मथुरेवर सतरा स्वाऱ्या केल्या; पण प्रत्येक वेळी त्याचा पराभवच झाला. तथापि त्या युद्धांमुळे होणारा अनर्थ टाळण्यासाठी कृष्णाने मथुरेहून स्थलांतर केले. सर्व यादवांसह तो सौराष्ट्रात गेला. तिथे त्याने द्वारका नगरी वसवून आपली राजधानी स्थापली.

कृष्णाच्या मृत्यूनंतर त्याच्या राज्यात व वंशात भीषण गृहकलह झाला आणि त्यात असंख्य पुरुष मारले गेले. केवळ वृद्ध पुरुष, स्त्रिया व मुले जिवंत राहिली. ही वार्ता कळल्यानंतर अर्जुन द्वारकेला गेला व त्यांना घेऊन हस्तिनापुरास परत आला. त्या लोकांनी मग पंजाब व मथुरामंडळ या प्रदेशांत वसती केली.

क्रोष्ट शाखेतील यादवांच्या अनेक शाखा होत्या; त्यांतील अंधक, वृष्णी, कुकुर व भोज या शाखा विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांची गणराज्ये होती. त्यांचे आधिपत्य वंशपरंपरेने एकाच कुळाकडे चालत नसे. कारण ययातीच्या शापामुळे यदूच्या वंशजांना सिंहासनावर बसण्याचा अधिकार नव्हता. म्हणून त्या त्या गणराज्यातील लोक आपापल्या अधिपतीची निवड करीत असत.

हैहय शाखा – यदूचा पुत्र सहस्रजित याच्या वंशाला हैहय म्हणतात. या शाखेतील कृतवीर्याचा पुत्र कार्तवीर्य हा सहस्रार्जुन या नावाने प्रसिद्ध आहे. तो अत्यंत पराक्रमी होता. त्याने कर्कोटक नागांकडून माहिष्मती नगरी जिंकून घेतली व तिथे राजधानी स्थापली. हिमालयापासून नर्मदेपर्यंतचा सर्व प्रदेश त्याने पादाक्रांत केला होता. लंकेचा राजा रावण याने आर्यावर्तावर आक्रमण केले असता कार्तवीर्याने त्याला पकडून कित्येक वर्षे बंदिवासात ठेवले होते. पुराणात याच्याविषयी अनेक कथा आहेत. याला परशुरामाने ठार मारले. (कार्तवीर्य पाहा).

सहस्रार्जुनाला शंभर पुत्र होते. त्यांतील एकाचे नाव शूरसेन होते. यमुनेच्या काठावरील व्रजमंडळाला प्राचीन काळी शूरसेन असे म्हणत. ते नाव या शूरसेनावरूनच पडले होते, असे लिंग पुराणात म्हटले आहे. या प्रदेशातच अंधक– वृष्णी या जोड संघाचे गणराज्य होते व उग्रसेन त्याचा अधिपती होता. [प्रा. च. को.; व्र. सां. इ.; पु. वि.; हि. क. इं. पी. १]

(२) देवगिरीचे यादव – महाराष्ट्रावर राज्य करणारा एक वंश. मथुरेहून श्रीकृष्णाबरोबर सौराष्ट्रात जाऊन वसलेल्या यादवांमधील सुबाहू नामक राजाचा पुत्र दृढप्रहार हा या वंशाचा मूळ पुरुष मानला जातो. राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष (पहिला) याच्या राजवटीत जी अस्वस्थता माजली होती, तिचा फायदा घेऊन याने इ. स. ८६० च्या सुमारास नासिकजवळ चंद्रादित्यपूर नगरी वसवून तिथे आपले लहानसे राज्य स्थापले. चंद्रादित्यपूर म्हणजे नासिक जिल्ह्यातील चांदोर होय. याचा उल्लेख एका ताम्रपटात आहे. हेमाद्रीच्या व्रतखंडात या वंशातील राजांची नावे दिली आहेत, ती अशी –

सुबाहू, दृढप्रहार, सेऊणचंद्र, धाडियप्प, भिल्लम, राजगी, वड्डिग, धाडियप्प (दुसरा), भिल्लम (दुसरा) वेसुगी, अर्जुन, भिल्लम (तिसरा), वेदुगी, वेसुगी (दुसरा), भिल्लम (चौथा), सेऊणचंद्र (दुसरा), परम्मदेव, सिंहराज (सिंघण), मल्लुगी, अमरगांगेय, गोविंदराज, अमरमल्लुगी, कालीय बल्लाळ, भिल्लम (पाचवा).

दृढप्रहाराची राजधानी श्रीनगर येथे होती, असे व्रतखंडात म्हटले आहे. हे श्रीनगर म्हणजे सिन्नर असावे, असे श्री. भगवानलाल इंद्रजी यांचे मत आहे. दृढप्रहाराचा पुत्र सेऊणचंद्र याने सेऊणपूर हे नगर वसवले. त्याच्या राज्याला सेऊणदेश असे नाव होते. नासिकपासून देवगिरीपर्यंतचा, गोदावरी नदीच्या काठचा प्रदेश या नावाने ओळखला जातो. तो दंडकारण्याच्या सीमेवर होता. सेऊणपूर ही त्याची राजधानी होती.

सौराष्ट्रातील यादवांची दुसरी एक शाखा कर्नाटकात जाऊन द्वारसमुद्र-हळेबीडच्या परिसरात वसली होती. ते लोकही स्वत:ला यदूचे वंशज व यादवकुलतिलक मानीत. मात्र ते होयसळ-यादव म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहेत.

सेऊणचंद्र व त्याच्या नंतरचे काही राजे राष्ट्रकूटांचे सामंत होते. भिल्लम (दुसरा) हा स्वत:ला महासामंत म्हणवीत असे. तो कल्याणचा चालुक्य राजा तैलप याचा मांडलिक होता. त्याने ठाण्याचा शिलाहार राजा झंझ याची कन्या लछिमव्व हिच्याशी विवाह केला होता. त्याचे राज्य नासिक, खानदेश व औरंगाबाद या प्रदेशावर होते. भिल्लम (तिसरा) हा चालुक्य राजा जयसिंह याचा जावई होता. सेऊणचंद्र हा चालुक्य विक्रमादित्याचा सामंत होता. त्याचा इ. स. १०६९ मधला शिलालेख उपलब्ध आहे. त्याचे राज्य महाराष्ट्र, उत्तर कोकण, कारवार, बेळगाव, विजापूर, धारवाड, बल्लारी येथपर्यंत पसरलेले होते. त्याच्या नंतर परम्मदेव आणि मग सिंहराज (सिंघण पहिला) हा राजा झाला. सिंहराजाने इ. स. ११३७ च्या सुमारास विष्णुवर्धन होयसळ याचा पराभव केल्याचा उल्लेख सापडतो.

सिंघणानंतर मल्लुगी गादीवर आला. हा बिज्जल कलचूरीचा समकालीन होता. त्याने पर्णखेट नामक नगर शत्रूपासून घेतले आणि उत्कलाधिपतीचे गजदल जिंकून घेतले, असा उल्लेख आहे. मल्लुगीनंतर त्याचा पुत्र अमरगांगेय, नंतर त्याचा पुत्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गोविंदराज, नंतर अमरमल्लुगी व कालीय बल्लाळ अशी नुसती वंशावळ मिळते. बल्लाळाच्या पुत्रांना बाजूला सारून त्याचा चुलता कर्णपुत्र भिल्लम (पाचवा) हा राजा झाला, कारण तो जास्त कर्तबगार होता. तो इ. स. ११७८ मध्ये गादीवर बसला. त्याने इ. स. ११८७ मध्ये देवगिरी येथे स्वतंत्र राजा म्हणून राज्याभिषेक करून घेतला.

जैत्रसिंह, साहणी, मायीदेव व लख्खण हे त्याचे सेनापती फार पराक्रमी होते आणि त्याचे सैन्य प्रचंड होते. त्याने चालुक्यांची राजधानी कल्याण नगरी घेतली. त्याचप्रमाणे किसुकाड, तर्डवाडी, बेळवोळ, इ. प्रदेशही जिंकले. त्यानंतर भिल्लमाने होयसळांच्या राज्यावर स्वारी करून बल्लाळ (दुसरा) याचा पराभव केला. चोळ राजा कुल्लोत्तुंग (तिसरा) याचाही त्याने पराभव केला. पण इ. स. ११८९ साली होयसळ बल्लाळ (दुसरा) याने भिल्लमाचा पराभव केल्यामुळे तो परत फिरला. त्यानंतर त्याने विदर्भ, माळवा व गुजरात या प्रदेशांवरही आक्रमण केले व जय मिळवले. पण नाडोलचा चाहमान राजा केल्हण याने जोराचा प्रतिकार केल्यामुळे भिल्लमाला माघार घ्यावी लागली. इ. स. ११९१–९२ या काळात होयसळ बल्लाळ (दुसरा) याने दक्षिणेतील सर्व प्रदेश भिल्लमाच्या सेनापतीकडून परत जिंकून घेतला.

जैतुगी – भिल्लम हा इ. स. ११९३ मध्ये मरण पावला. त्याचा पुत्र जैतुगी किंवा जैत्रपाल हा इ. स. ११९१ पासूनच राज्यकारभार पाहू लागला होता, असे दिसते. होयसळांनी घेतलेला प्रदेश त्याला जिंकता आला नाही. पण काकतीयांच्या राज्यावर त्याने केलेले आक्रमण यशस्वी ठरले. राजा महादेव युद्धात मारला गेला व त्याचा पुत्र गणपती जैतुगीच्या हाती सापडला. पण जैतुगीने त्याला मुक्त करून त्याचे राज्य त्याला परत दिले. त्याच सुमारास जैतुगीने कलिंग देशाचा राजा अनंगभीम (दुसरा) व चोळ राजा कुलोत्तुंग (तिसरा) यांच्याशी युद्धे करून त्यांत जय मिळवले. त्याचप्रमाणे जैतुगीने परमार राजा सुभटवर्मा व चालुक्य राजा भीम (दुसरा) यांचा पराभव करून त्यांच्या राज्यांत खूप लुटालूट केली.

जैत्रपाळाने इ. स. १२०० पर्यंत राज्य केले असावे. तो विद्वानांचा आश्रयदाता होता. त्याने भास्कराचार्यांचा पुत्र लक्ष्मीधर याला राजसभेतील पंडितांमध्ये अग्रस्थान दिले होते. संतकवी मुकुंदराज याने विवेकसिंधू हा ग्रंथ जैत्रपालासाठी लिहिला, असे म्हणतात.

सिंघण – जैत्रपालानंतर त्याचा पुत्र सिंघण हा इ. स. १२०० च्या सुमारास देवगिरीचा राजा झाला. इ. स. १२११ मध्ये त्याने होयसळांच्या राज्यावर स्वारी केली. दोन वर्षांत त्याने तुंगभद्रेपर्यंतचा प्रदेश जिंकला. त्यानंतर त्याने द्वारसमुद्राकडे मोर्चा वळवला. पण कावेरी नदीपर्यंत गेल्यावर त्याला परत फिरावे लागले. तो होयसळांचे राज्य जिंकू शकला नाही. मग त्याने गोव्यातील कदंब, वेणुग्राम (बेळगाव)चे रट्ट, कोल्हापूरचे शिलाहार या राजांचा पराभव केला. पूर्व किनाऱ्यावरील अनंतपूर जिल्हाही त्याने जिंकला. त्याने काकतीयांच्या राज्यावर स्वारी केली, पण ती यशस्वी झाली नाही. त्यानंतर सिंघणाने खानदेश व विदर्भ या प्रदेशांतील राजांनाही जिंकले. मग तो गुजरातकडे वळला. त्याने गजरातवर अनेक स्वाऱ्या केल्या. प्रारंभी त्याला यश मिळाले, पण ते अल्पकालीन ठरले आणि शेवटी त्याला पराभव पत्करावा लागला. खोलेश्वर नावाचा ब्राह्मण सिंघणाचा सेनापती होता. सिंघणाला गुजरातेत प्रारंभी जे यश मिळाले त्यातील मोठा वाटा खोलेश्वराचाच होता. त्याने खंबायत येथे एक विजयस्तंभ उभारला होता. दुसरा सेनापती बीचण याने दक्षिण भारतात पराक्रम करून इ. स. १२३८च्या सुमारास कावेरीच्या काठी एक विजयस्तंभ उभारला.

यादव वंशात सिंघण हा सर्वांत श्रेष्ठ राजा होऊन गेला. त्याने यादवांचे मोठे साम्राज्य स्थापले. तो विद्वानांचा आश्रयदाता होता. संगीतरत्नाकर या ग्रंथाचा कर्ता शार्ङ्गधर याच्या पदरी होता. चांगदेव व अनंतदेव हे प्रसिद्ध ज्योतिषीही याच्या पदरी होते. चांगदेव हा भास्कराचार्यांचा नातू होय. त्याने राजाच्या साहाय्याने सिद्धान्तशिरोमणीच्या अध्ययनासाठी एक मठ स्थापला.

कृष्ण–सिंघणाने इ. स. १२४७ पर्यंत राज्य केले. त्याचा पुत्र जैतुगी आधीच मरण पावला होता. जैतुगीचा पुत्र कृष्ण हा सिंघणानंतर गादीवर आला. तोही पराक्रमी होता. सिंघणाने स्थापलेल्या साम्राज्याचे त्याने चांगले रक्षण केले. त्याचा भाऊ महादेव याने त्याला सिंहासन मिळवायच्या कामी मदत केल्यामुळे त्याने महादेवालाच युवराज नियुक्त केले. इ. स. १२६१ मध्ये सिंघणाच्या मागून महादेवाला राज्य मिळाले.

महादेव – (इ. स. १२६१–१२७०) याने होयसळ, शिलाहार, वाघेला, परमार व काकतीय या राजांशी युद्धे चालू ठेवली. शिलाहार राजा सोमेश्वर याचा त्याने पराभव केला व उत्तर कोकण प्रदेश आपल्या साम्राज्याला जोडला. गुजरात माळव व तेलंगण या प्रदेशांतही त्याला जय मिळाले. प्रसिद्ध पंडित हेमाद्री हा महादेवाचा प्रधान होता.

महादेवाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र आमण व कृष्णराजाचा पुत्र रामचंद्र यांच्यांत यादवी युद्ध झाले. आमण याने प्रथम देवगिरीचे सिंहासन मिळविले होते. पण रामचंद्राने त्याला कपटाने पकडून ठार मारले व तो सिंहासनावर बसला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामचंद्र – (इ. स. १२७१–१३११) हा रामदेवराव या नावाने प्रसिद्ध आहे. तो पराक्रमी होता व त्याचे सेनादल प्रचंड होते. पूर्वीचे साम्राज्य अभंग ठेवण्यात तो काही काळ यशस्वी झाला. मात्र होयसळांच्या राज्यावर केलेल्या आक्रमणात त्याचा दारुण पराभव झाला. गुजरातवरील त्याची स्वारीही अयशस्वी ठरली. मध्य प्रदेशातील थोड्याच राजांचा तो पराभव करू शकला. उत्तर कोकण प्रांत त्याच्या सत्तेखाली राहिला. महादेवाचा प्रधान हेमाद्री हाच रामदेवरावाचाही प्रधान होता. मात्र राघव नामक एक कर्तबगार पुरुष त्याच्या साम्राज्याची शासनव्यवस्था पाहात होता. रामदेवाचा पुत्र भीम याने माहीमच्या राज्यावर स्वारी करून तो प्रदेश जिंकला, असे म्हणतात.

इ. स. १२९४ साली अलाउद्दीन खिलजीने देवगिरीवर अचानक स्वारी केली. त्या वेळी सेवुणांची बरीच मोठी सेना घेऊन युवराज शंकरदेव होयसळांशी लढण्यासाठी गेला होता. त्यामुळे रामदेवराव शत्रूचा पराभव करू शकला नाही. अलाउद्दिनाने राजधानीवर हल्ला करून लूटमार सुरू केली, तेव्हा राजाने त्याच्या बरोबर तह करून त्याला बरीच खंडणी दिली. तिकडे शंकरदेवाला ही वार्ता कळताच तो सैन्य घेऊन परत आला आणि त्याने परत जाणाऱ्या मुसलमानी सैन्यावर हल्ला केला. पण त्यात त्याचाच पराभव झाला. त्यामुळे रामचंद्राला अधिकच कडक अटी पत्करून पुन्हा तह करणे भाग पाडले. त्यात अलाउद्दिनाला अपार संपत्ती मिळाली.

या पराभवामुळे सेवुणांची राजकीय प्रतिष्ठा कमी झाली. आणि लवकरच त्यांचे साम्राज्य विघटित होऊ लागले. काकतीय, होयसळ वगैरे राजांनी आपापले प्रदेश परत जिंकून घेतले.

गुजरातचा वाघेला राजा कर्ण याची कन्या देवलदेवी शंकरदेव यादवाची वाग्दत्त वधू होती. ती देवगिरीकडे येत असता अलाउद्दिनाच्या सरदारांनी तिला वाटेत पकडून दिल्लीला नेले. त्यामुळे रामदेवराव बिथरला व सुलतानाला खंडणी देण्याची टाळाटाळ करू लागला. तेव्हा सुलतानाने मलिक काफूर याला दक्षिणेत पाठवले. त्याने सेवुणांचे राज्य पादाक्रांत केले व रामचंद्रदेवाला पकडून दिल्लीस नेले. अलाउद्दिनाने त्याला सहा महिने आपल्याकडे ठेवून सन्मानाने वागवले आणि रायरायन ही पदवी देऊन सोडून दिले. मग तो दिल्लीचा मांडलिक म्हणून राज्य करू लागला. इ. स. १३०८ साली मलिक काफूरने तेलंगणावर स्वारी केली. तेव्हा रामचंद्रदेवाने त्याला पुष्कळ मदत केली. इ. स. १३११ मध्ये होयसळांच्या विरुद्धही त्याने मलिक काफूरला साहाय्य केले.

त्यानंतर लवकरच शंकरदेव देवगिरीच्या गादीवर बसला. तो स्वाभिमानी असल्यामुळे त्याने दिल्लीला खंडणी पाठवणे बंद केले. तेव्हा अलाउद्दिनाने इ. स. १३१३ मध्ये मलिक काफूरला पुन्हा त्याच्यावर पाठवले. त्याने देवगिरीवर स्वारी करून शंकरदेवाला ठार मारले व यादवांचे राज्य जिंकून घेतले. नंतर तो लवकरच दिल्लीला परत गेला. त्या वेळी दिल्लीची सत्ता जरा डळमळीत झाली होती. म्हणून रामदेवरावाचा जावई हरपाळदेव याने देवगिरीचे राज्य परत घेतले. रामदेवरावाचा मंत्री राघव याने त्याला साहाय्य केले. पण इ.स. १३१७ मध्ये अलाउद्दिनाचा मुलगा मुबारक याने त्याचा पराभव करून त्याला ठार मारले व देवगिरी नगर घेतले. राघवही पराभूत होऊन पळून गेला. अशा प्रकारे देवगिरीच्या सेवुण किंवा यादव वंशाचा अंत झाला.

एवढे वैभवशाली साम्राज्य अल्पावधीत नष्ट कसे झाले, याविषयी श्री. मु. ग. पानसे यांनी विवेचन केले आहे, ते असे—

"यादवांच्या सैन्याचा पसारा अफाट होता. परंतु रामदेवाच्या काळी त्यात शिस्तीचा अभाव आणि बाजारबुणग्यांची संख्या जास्त असावी, असे वाटते. आरामाच्या आहारी गेलेली सेना बेशिस्त बनली, म्हणजे तिची नेमकी ताकद अजमावणे कठीण होते. त्यामुळे रामदेवराव बेसावध राहिला. वैभवाचे शिखर गाठल्यावर स्वत: ऐष-आरामात राहून त्याने राज्यकारभाराची धुरा पूर्णपणे प्रधानांकडे सोपविली. त्याचे प्रधानसुद्धा कमी पराक्रमी नव्हते. परंतु त्यांचे लक्ष पराक्रमापेक्षा पापपुण्याकडे आणि पांडित्याकडे जास्त होते. राजकारणधुरंधर पुरुषात आवश्यक असलेला मुत्सद्दीपणा रामदेवरावापाशी नव्हता; तसा तो त्याच्या प्रधानांच्या व्यवहारातही कोठे दिसत नाही. यादव साम्राज्याच्या मुळावर आलेला रामदेवरावाचा एक स्वभावदोष म्हणजे परधार्जिणेपणा. मलिक काफूरला व त्याच्या सेनापतींना सामोरे जाऊन नजराणे देण्याइतका रामदेवराव आपला स्वाभिमान गमावून बसला होता. त्याचा स्वभाव निष्ठुर होता. त्याचा प्रसाद काही साधुसंतांनाही मिळालेला दिसतो. त्यामुळे, 'या राष्ट्राचा कालांतराने विनाश होईल' अशी कठोर भविष्यवाणी चक्रधराने केली होती; ती लवकरच खरी ठरली."

वास्तविक यादवांच्या कारभारात यंत्रणेच्या दृष्टीने काही उणेपणा दिसत नाही; उलट ती एकसंध झालेली होती. साम्राज्यात विलीन करून घेतलेल्या राज्यांचा कारभार सुरळीत चालू ठेवण्याकरिता यादवांनी तेथे आपले अधिकारी नेमले. हे राजनियुक्त अधिकारी केंद्रसत्तेच्या मंत्र्यांइतकेच साम्राज्याचे आधारस्तंभ होते. यादवांचे प्रधान व सेनापती खूप पराक्रमी होते, तसेच विद्वानही होते. साम्राज्याच्या भरभराटीला मंत्र्यांचे कर्तृत्व कारणीभूत आहे, याची जाणीव सर्व यादवराजांना होती. त्यांचे प्रधान व सेनापती यांच्यापैकी कोणीही केव्हाही राजाज्ञेचे उल्लं-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घन केले नाही. रामदेवाचे तीन्ही मंत्री शूर होते. त्याच्या राज्यात असरूय डोंगरी व भुइकोट किल्ले होते; कोकणातील सर्व बंदरे व तेथील आरमार यावर देखील त्याची पूर्ण सत्ता होती. त्याचे सर्व प्रधान व सेनापती स्वामिभक्त होते. कोणालाही सम्राटाच्या शिथिलतेचा फायदा घेऊन राज्यकारभाराची सूत्रे त्याच्या हातून काढून घ्यावीत, अशी इच्छा झाली नाही.

यादवांच्या काळात महाराष्ट्रीय संस्कृतीचा खूप विकास झाला; संस्कृत व मराठी वाङ्मयाला उदार राजाश्रय मिळाला. तसेच विद्वान व कलावंत यांना मानसन्मान मिळत राहिला. मराठी, कानडी, तेलुगू व गुजराती या चारही भाषांचे प्रदेश या साम्राज्यात होते व त्या भाषांना राजाश्रय मिळत होता. तथापि मराठी भाषा व संस्कृती या काळात विशेष विकसित झाली. मुकुंदराज, चक्रधर व ज्ञानेश्वर हे मराठी साहित्याचे आद्यपुरुष यादवकाळात होऊन गेले. त्यांनी आपल्या वाणीने आणि यादवांनी आपल्या राजसत्तेने महाराष्ट्राच्या सीमा निश्चित केल्या व त्याची अस्मिताही जोपासली. यादवांची राजभाषा मराठी होती व महाराष्ट्र ही त्यांची कर्मभूमी होती. महाराष्ट्रीय समाजाला नीट धार्मिक वळण लावण्यासाठी हेमाद्रीने चतुर्वर्गचिंतामणी हा मोठा ग्रंथ रचला. बोपदेव याने व्याकरण, ज्योतिष, वैद्यक, तत्त्वज्ञान, इ. विषयांवर ग्रंथरचना केली. यादवांच्या राजवटीत महानुभाव पंथाचा उदय झाला. त्या पंथाच्या आचार्यांनीही मराठीत पुष्कळ ग्रंथरचना केली.

ज्ञानेश्वरांनी ओवीला प्रौढत्व आणले, तर इतर संतांनी भक्तिमय अभंग रचले. महदंबेने धवळयांचा गोडवा दाखविला. संतांनी लोकप्रिय केलेल्या या प्रकाराव्यतिरिक्त लोकसंगिताच्या अनेक तऱ्हा महाराष्ट्रात प्रचलित होत्या. शार्ङ्गदेवाने या लोकगीतांना शास्त्रात स्थान दिले. मराठी गायकी व तिचे शास्त्र आत्मसात केल्यामुळे संगीतरत्नाकरामध्ये एक प्रकारचा जिवंतपणा आला.

यादवकालीन वास्तुशिल्प हेमाडपंती या नावाने प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी या शिल्पपद्धतीची मंदिरे आढळतात.

यादव राजे वैदिक धर्माचे अभिमानी, न्यायी व नीतिमान होते. राष्ट्रकूटांच्या काळात जैनांच्या प्रभावामुळे वैदिक परंपरेतील श्रौत यज्ञयागांची जागा स्मार्त महायज्ञांनी घेतली होती. यादवांनीही पंचमहायज्ञांना व वेदाभ्यासाला प्रोत्साहन देण्यासाठी ब्राह्मणांना पुष्कळ दाने दिली. ब्राह्मणांनी आपल्या श्रेष्ठ धर्माप्रमाणे वागावे, यावर त्यांचा कटाक्ष होता. त्या काळात ब्राह्मण वर्गात कर्मकांडाचे आणि व्रतवैकल्यांचे बरेच प्रस्थ माजले होते. हेमाद्रीने व विज्ञानेश्वराने सनातन वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण शास्त्रवचने व रूढीची बंधने यांमुळे त्यांना फारसे यश आले नाही. खालच्या सर्व थरांतील लोकांत भक्तीचा प्रसार होऊन शूद्रांमध्येही संत निर्माण झाल्यामुळे वारकरी पंथाची वाढ याच राजवटीत झाली. पंढरपूरचा विठ्ठल हा त्यांचा मुख्य देव बनला. इ. स. च्या १० व्या शतकात महाराष्ट्रात खंडोबाची उपासना सुरू झाली. ब्राह्मणांपासून शूद्रांपर्यंत सर्व जातींनी खंडोबाला आपला कुलस्वामी मानले. यादवांच्या काळातच शैव आणि वैष्णव या दोन्ही पंथांचे ऐक्य दर्शवणारी तुळजाभवानी ही देवी पूजनीय ठरली.

यादवांच्या रावजटीचे मूल्यमापन करताना डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे म्हणतात– सिंघण हा या वंशातील सर्वात श्रेष्ठ सम्राट होय. त्याच्या कारकिर्दीच्या अखेरीस नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत त्याचे साम्राज्य पसरले. काकतीय, होयसळ, चौलुक्य (सोळंकी) व परमार हे सर्व हतप्रभ झाले व त्याला त्यांनी सम्राट म्हणून मान्यता दिली. पण त्या वेळी दिल्लीला मुस्लीम सत्ता स्थापन झाली होती आणि माळवा व गुजरात या प्रदेशांवर मुसलमानांच्या धाडी सारख्या येत होत्या. त्यांना तोंड देण्याचे सामर्थ्य परमार व चौलुक्य यांच्यात नव्हते. सिंघणाने त्यांच्याशी सख्य करून एक बलिष्ठ संघ सिद्ध केला असता, तर दिल्लीची मुस्लीम सत्ता उखडून टाकणे त्याला अशक्य नव्हते. पण ही दूरदृष्टी त्याला नव्हती. त्यामुळे पुढील पाऊणशे वर्षांतच यादवांचे राज्य नष्ट झाले.

सिंघणानंतर कृष्ण, महादेव, रामचंद्र हे यादव राजे गादीवर आले. त्यांनी गुजरात, माळवा, होयसळ, काकतीय यांच्याविषयीचे पूर्वपार धोरणच चालू ठेवले. त्या सत्तांशी झालेल्या संघर्षात यादव राजे बव्हंशी यशस्वीच ठरले. पण त्यांना मुस्लीम सत्तेशी मुकाबला करावा असे कधीही वाटले नाही. माळव्याचा राजा जगत्तुंग याच्यावर यादव राजा कृष्ण याने प्रचंड विजय मिळवला. त्यामुळे जगत्तुंग कमजोर झाला व दिल्लीचा सेनापती बल्बन याने लगोलग स्वारी करून माळव्याची धूळधाण केली. महादेवाच्या कारकिर्दीत देवगिरीचे वैभव वाढले. 'देवगिरी हे त्रिभुवनसौंदर्याचे सारसर्वस्व आहे,' असे या नगरीचे वर्णन केलेले आढळते. पण त्याच वेळी तिच्यावर दिल्लीच्या परकीय सत्तेची कृष्णच्छाया पडू लागली होती, याची कोणाला कल्पनाही नव्हती. रामचंद्र यादव मोठा कर्ता पुरुष होता. पण वरंगळचे काकतीय व होयसळ यांना पुन्हा पुन्हा नमविण्यातच त्याने आपली सर्व शक्ती खर्च केली. उत्तरेकडे भंडारा, जबलपूर हे प्रदेश जिंकून थेट बनारसवर चालून जाऊन त्याने ती पुण्यनगरी जिंकली. त्या वेळी यादवसत्ता खरोखरच वैभवाच्या शिखरावर होती. पण लवकरच तिला ग्रहण लागले. त्याच्या आधी पन्नास वर्षे सूफी पंथाचे अनेक अवलिये दक्षिणेत इस्लामचा प्रसार करून हिं-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्थान पोखरून टाकण्याचा उद्योग करीत होते. पण त्याची दखल कोणी घेतली नाही. हेमाद्रीसारखे पंडित व मुत्सद्दी हे देवगिरीची इंद्राच्या अमरावतीशी तुलना करण्यात आणि व्रतवैकल्यांच्या याद्या तयार करण्यात गुंतले होते. संतमहंतांना तर केवळ मोक्ष दिसत होता व संसाराची असारता जाणवत होती. सत्तारूढ राजांनाही राजकीय दूरदृष्टी नव्हती. अलाउद्दिनाच्या पहिल्या स्वारीनंतरच्या वीस–बावीस वर्षांत रामदेवराव, शंकरदेव, हरपालदेव यांना घसरलेला डाव सावरण्यासाठी भरपूर अवसर मिळाला होता, पण त्यांच्या ठायी ती कुवत नव्हती आणि दक्षिणेकडील इतर राजेही असेच मूढ व स्वार्थी होते. अलाउद्दिनाच्या देवगिरीवरील विजयामुळे ते सावध तर झाले नाहीतच; उलट यादव कमजोर झाले, असे पाहून त्यांनी यादवांच्या प्रदेशावर हल्ले करून घेता येईल तेवढा मुलुख जिंकून घेतला. हे सर्व राजे आपापसांत झगडत राहिल्यामुळे त्यांचा मुसलमानी आक्रमकांपुढे टिकाव लागला नाही. याचा अर्थ असा, की त्या काळात हिंदू समाजाची जीवनशक्ती क्षीण झाली होती. समाजाचे व धर्माचे रक्षण करावयाचे म्हणजे प्रथम त्याचे स्वातंत्र्य टिकवणे आवश्यक असते. पण त्यासाठी लागणारी संघटनविद्या, विजिगीषा, राजनीतिनिपुणता, भौतिक विद्या, रणविद्या यांचा त्या वेळच्या हिंदू समाजात संपूर्ण अभाव होता. त्यामुळे त्या समाजाच्या राजसत्तांना मुस्लीम आक्रमणाला तोंड देण्याचे सामर्थ्य मुळीच नव्हते. [मु. पू. म.; अ. हि. डे.; म. प.; हि. क. इं. पी. ५; या. का. म.; महाराष्ट्र संस्कृती--वसंत, जून १९६८]

यानाडी आंध्र प्रदेशातील एक वन्य जमात. द. भारतातील आदिवासींमध्ये ही जमात सर्वांत मोठी आहे. या नावाची व्युत्पत्ती यानम = नाव + आदि = उपजीविकेचे साधन, अशी केली जाते. पण हे लोक नावेचा व्यवसाय करताना फारसे आढळत नाहीत. अनादी या संस्कृत शब्दापासून हे नाव आले असावे, अशीही एक कल्पना आहे. ज्यांचे मूळ सापडत नाही, असे हे लोक आहेत. त्यांची परंपरा निश्चित सांगता येत नाही. अनादी शब्दाचा अपभ्रंश होऊन यनादी → यानाडी असे नाव पडले असावे.

हे लोक काळे, बुटके, सडपातळ व सुदृढ बांध्याचे आहेत. त्यांचे कपाळ अरुंद आणि नाक रुंद व चपटे असते. यांचे केस काळेभोर व कुरळे असून, त्यांच्या सर्वांगावर केस असतात. ओठ जाड, पण दात स्वच्छ व सुंदर असतात. यांच्यांतील चल्ला यानाडी हे जरा उंच व दिसायला चांगले आहेत. पण त्यांचे दात फार अस्वच्छ असतात.

या लोकांना भटके जीवन आवडते. हे कधीही घरे बांधून एका जागी कायम वसती करीत नाहीत. एखाद्या माळावर, जवळपास पाणी पाहून, बांबू व ताडपत्रीच्या लहान झोपड्या बांधून त्यांत हे राहतात. त्यांची दारे अगदी ठेंगणी असतात. गाडगीमडकी याखेरीज त्यांच्याजवळ काही नसते. हे अर्धनग्नच असतात. जुनाट पद्धतीने शिकार व मासेमारी करणे, चकमकीने विस्तव पेटवणे, अर्धकच्चे मांस खाणे, अशा अवस्थेत ते अजून आहेत. शेती करणे, अन्न शिजवणे या गोष्टी त्यांना अजूनही माहीत नाहीत. बहुतेक लोक घाणेरडे असून, केस कापत नाहीत व दात घांशीत नाहीत. हे झाडाच्या पानांची टोपी घालतात. प्रत्येकाजवळ धनुष्यबाण असतो.



यानाडी पुरुष

यांचे सुमारे ८९ पोटभेद आहेत. ते बहुतेक खाणेपिणे, व्यवसाय, वसती, इत्यादींवरून झालेले आहेत. चेंचू व मंची हे सर्वांत मोठे वर्ग आहेत. रेड्डी, चल्ला, अडवी, कप्पल, इ. काही पोटभेदांची नावे आहेत. रेड्डी यानाडी हे जरा सुधारलेले व स्थायिक झालेले असून, आचारी किंवा ग्रामरक्षक म्हणून कामे करतात. ते चल्ला व अडवी यानाडींना हलके मानतात. मंची यानाडीही स्वतःला उच्च मानतात. उ. अर्काट जिल्ह्यातील चेंचू यानाडी कप्पल (बेडूकभक्षक) यानाडींना अस्पृश्य मानतात. सोमारी यानाडी हे लोकांचे उष्टे अन्न खातात. या पोटवर्गांत बहुधा रोटीबेटीव्यवहार होत नाहीत.

हरीण, बकरा, ससा, उंदीर, सरडा, मुंगूस, इ. प्राण्यांचे मांस व मासे हे लोक भाजून खातात. मध, कंदमुळे, फुलेफळे यांचाही ते अन्न म्हणून उपयोग करतात. ताडगोळे व शहाळी त्यांना फार आवडतात. हे लोक दुधाचे पदार्थ मात्र कधीही खात नाहीत. डाळही वापरीत नाहीत. तांदुळापासून केलेली दारू यांना फार आवडते.

उद्योगधंदे – शिकार, मासेमारी; जंगलातील मध, सर्पण, तसेच औषधी, वनस्पती, इ. वस्तू गोळा करून विकणे व साप पकडणे हे यांचे मुख्य उद्योग आहेत. आता शहरांशी संबंध आल्यामुळे यांच्यांतील काही जण पहारेकरी, पोलीस, शेतमजूर, पाथरवट,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गवंडी, घरगडी आणि झाडूवाले बनले आहेत. काहीजण डुकरे पाळतात, तर काही वैदूगिरी करतात. चोरी करण्याबद्दलही हे लोक प्रसिद्ध आहेत.

तेलुगू ही या लोकांची भाषा आहे. पण तमिळ भाषेतील बरेच शब्द घेऊन यांनी काही जोडशब्द बनवले आहेत.

यानाडी लोकांना असंख्य वनस्पतींचा औषधी उपयोग माहित असतो. ताप, संधिवात वगैरे रोगांवर हे त्यांचा चांगला उपयोग करतात. साप व विंचू यांच्या विषावर उत्तम औपचोपचार त्यांना माहीत आहेत.

प्रथमरजोदर्शनाच्या वेळी यानाडी मुलीला एका वेगळया झोपडीत राहावे लागते. त्या झोपडीत कुचल्याची एक फांदी ठेवलेली असते. तिच्यामुळे तिला भुताखेतांचा त्रास होत नाही, अशी समजूत आहे. तिथे एका चटईवर मुलगी बसून राहते. चटईच्या चारही कोपऱ्यांवर विड्याची पाने व सुपाऱ्या ठेवतात. तिथे ती नऊ दिवस राहते व रोज अंग धुते. शेवटच्या दिवशी तिला नऊ वेळा आंघोळ घालतात. मग ती झोपडी, चटई व मुलीचे सर्व कपडे जाळून टाकतात व नातेवाइकांना मेजवानी देतात.

विवाहप्रथा – तरुण-तरुणी स्वतःच परस्परांची निवड करतात. मामाचा भाचीवर पहिला हक्क असतो. पण त्याला थोडेसे द्रव्य देऊन भाचीला दुसऱ्या तरुणाशी लग्न करायला मोकळीक मिळवता येते. चुलत किंवा मावस भावंडांचा विवाह होत नाही. सगोत्र विवाहदेखील करीत नाहीत.

विवाहसमारंभ तीन दिवस चालतो. मुख्य विधी म्हणजे वराने वधूच्या गळयात ताळी बांधणे हा होय. त्यानंतर दोघे एकमेकांवर अक्षता टाकतात. समारंभात कुंकवाला फार महत्त्व असते. स्त्रियांप्रमाणे पुरुषही कपाळी कुंकू लावतात. वधू-वरांची वस्त्रे केशरी रंगाने रंगवलेली असतात. ताळी बांधायला केशरी धागा वापरतात. कधी तो हळदीने पिवळा केलेला असतो. आता हिंदू पद्धतीने मुहूर्त पाहून लग्न करण्याची चाल हळूहळू रूढ होत आहे.

यांच्यांत लैंगिक बंधने शिथिल आहेत. लग्नापूर्वी तरुण-तरुणींचे लैंगिक संबंध अनिर्बंध चालतात. मुलीला पळवून नेण्याचीही पद्धत आहे. मात्र मग लग्न साधेपणाने होते.

यांच्यांत विधवाविवाह रूढ आहे. मात्र तो समारंभ साधा असतो. विधवा स्त्रीला लग्न झाल्यावर काही दिवस शेंदूर, बांगडया, चोळी, इ. सौभाग्यचिन्हे वापरता येत नाहीत. विधवेपेक्षा घटस्फोटित स्त्रीला अधिक मान असतो. घटस्फोट सहज मिळतो. स्त्री पाच–सात वेळा घटस्फोट घेऊन पुन्हा लग्न करू शकते.

सर्वच यानाडींना लग्नाचे महत्त्व वाटतेच असे नाही. अडवी यानाडी शक्यतो लग्न करणे टाळतात. एकंदरीत कौटुंबिक बंधने या लोकांना आवडत नाहीत. लग्नाखेरीज झालेल्या मुलांना हीन मानले जात नाही.

नृत्य – या लोकांना नृत्याची फार आवड आहे. सणासमारंभात नृत्य होतेच; त्या शिवाय भिक्षा मागतानाही ते नाच करतात. नृत्यासाठी ते अंगाला राख, कोळशाची भुकटी किंवा हळद लावतात. फुलांच्या माळा व पिसांचा टोप घालतात. पायांत घुंगरेही बांधतात. हातात एक काठी घेतात. नाचताना ते अर्थहीन गाणी म्हणतात व अश्लील हावभाव करतात. अगदी जंगलात राहाणारे यानाडी स्त्री-पुरुष रात्री नाच करतात, तेव्हा बहुतेक नग्नच असतात. त्यांच्या कमरेला परडया बांधलेल्या असून, त्यांत कंदमुळे, मेलेले साप, उंदीर वगैरे खाद्य पदार्थ असतात. नृत्य चालू असताना एकीकडे नारळाच्या झावळ्या जळत ठेवतात. त्या संपेपर्यंत बेहोशपणे नाचगाणे चालू असते.

अलिकडे हे लोक भागवथुलू नावाचे सुधारित नृत्य शिकून, रंगमंचावर त्याचे कार्यक्रम करू लागले आहेत.

देवधर्म – बहुतेक सर्व यानाडी हिंदू आहेत. काही थोडे भूतपूजक आहेत. हिंदू यानाडींच्या देवघरांना देवरइंडलू म्हणतात. प्रत्येक वसतीत एक देवघर असते. त्यात ग्रामदेवतेची स्थापना करतात. पोलेरम्म किंवा अंकम्म ही त्यांची ग्रामदेवता होय. सुब्बरायडू, वेंकटेश्वरलू, पंचळ, नरसिंहुलू हे त्यांचे मोठे देव आहेत. चेंचू देवुडू हा घरातला देव आहे. दगड, विटा, मातीचे गोळे, पाण्याने भरलेले भांडे ही देवतांची प्रतीके मानून त्यांची पूजा केली जाते. कधी कधी लाकडी मूर्ती किंवा भिंतीवर चित्रे काढून त्यांची पूजा करतात. हळद-कुंकू, फुले, कापूर, धूप, इ. उपचारांनी पूजा करून फळे, डाळे, इ. पदार्थांचा प्रसाद वाटतात. पितरपूजाही रूढ आहे.

विशेष धार्मिक वृत्तीचे लोक दर शुक्रवारी देवपूजा करतात. काही लोक दोन किंवा चार आठवडयांत एकदा पूजा करतात. सामान्य लोक मात्र लग्नासारख्या समारंभात किंवा मर्तिकाच्या प्रसंगी देवपूजा करतात.

ग्रामदेवतांना पशुबळी दिला जातो. पण चेंचू देवुडू मात्र साधा देव आहे. त्याची पूजा करताना भक्त एकदाच फलमूलाहार घेतो. काही यानाडी शैव किंवा वैष्णव असून, त्या त्या पंथाच्या मुद्रा धारण करतात.

हे लोक गाय व माकड यांना पवित्र मानतात. स्त्रिया सर्पाची पूजा करून त्याला दूध पाजतात. मुले होण्यासाठी व भूतबाधा नष्ट करण्यासाठी त्या कडुलिंबाच्या व पिंपळाच्या झाडांना प्रदक्षिणा घालतात. रोगाची साथ आली असता कडुलिंबाच्या झाडाला हळदकुंकू वाहून व भक्तिगीते गाऊन रोगराई नष्ट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करण्याविषयी त्याची सामुदायिक प्रार्थना करतात.

यांच्यांत काहीजण भविष्य वर्तवणारे असतात. ते देव आणि मानव यांच्यामध्ये मध्यस्थीही करतात. ही शक्ती अंगी येण्यासाठी त्यांना बरीच साधना करावी लागते. आपल्या सामर्थ्याची लोकांना खात्री वाटावी म्हणून ते जळते निखारे हातात धरण्याचा चमत्कार करून दाखवतात. त्यांच्या अंगात देव येतो व ते देवाला संतुष्ट करण्याचे उपाय गरजूंना सांगतात. त्यासाठी शुक्रवार, शनिवार व रविवार हे दिवस शुभ मानले जातात. त्या दिवशी भगत आंघोळ करून घरासमोर बसतो. त्याची बायको विस्तव पेटवून त्यात धूप टाकते. लोक त्याच्यापुढे सुपारी, फळे, फुले व पैसे ठेवतात. तो ढोलके वाजवून देवाला आळवण्यासाठी जातो. मग त्याच्या अंगात येते.

रोगाची साथ आली, की हे लोक ग्रामदेवतेची पूजा करून तिला कोंबडे, नारळ व मिठाई यांचा नैवेद्य दाखवतात.

मृतकप्रथा – हे लोक प्रेते पुरतात. प्रथम मृताला झोपडीसमोर पानांवर ठेवून स्नान घालतात व मग नवे कपडे घालतात. सर्वजण प्रेतावर तांदूळ टाकतात. मग प्रेत तिरडीवर बांधून नेतात. स्मशानात एका जागी फुली काढून प्रथम त्यावर प्रेत ठेवतात. प्रेताजवळ विडयाची पाने, सुपारी व तांब्याचे नाणे ठेवतात. खड्ड्यात कापड पसरून त्यावर प्रेत पालथे, दक्षिणेकडे डोके करून ठेवतात. प्रथम मोठा मुलगा व नंतर सर्वजण तीन तीन मुठी माती प्रेतावर टाकतात व मग खड्डा बुजवतात. मृताच्या झोपडीसमोर दोन भांडयांत पाणी घालून एकात राख व दुसऱ्यात हळद टाकतात. प्रेताबरोबर गेलेले सर्वजण परत येऊन झाडाच्या डहाळीने प्रथम राखेचे व मग हळदीचे पाणी अंगावर शिंपडून शुद्ध होतात. झोपडीत एक दिवा जळत ठेवतात.

मृत्यूनंतर तिसऱ्या दिवशी चिन्नदिनमू नावाचा विधी असतो. त्यासाठी भात, कढी व गोड पदार्थ करून त्याचे सहा गोळे बनवतात आणि ते नव्या टोपलीत ठेवून स्मशानात नेतात. प्रथम फुलीच्या जागी एक गोळा ठेवतात. मग प्रेत पुरले असले तिथे थोडे पाणी ओततात व प्रेताच्या डोक्याच्या वर एक दगड ठेवतात. प्रथम मृत व्यक्तीची पत्नी किंवा पती व मग इतर लोक त्या दगडावर दूध ओततात. त्यानंतर मृताचा मुलगा खड्ड्याच्या चारही कोपऱ्यांवर एक एक गोळा, विडयाचे पान व पैसा ठेवतो. मग उरलेल्या गोळ्यांवर दूध ओतून तो एका पानात गुंडाळून मृताच्या पोटावर ठेवतात. त्यानंतर मृताच्या डोक्याच्या बाजूला तीन दगडांवर पाण्याचे गळके भांडे भरून ठेवतात; त्यातून पाणी थेंबथेंब प्रेताच्या डोक्यावर पडत राहते. त्यानंतर पुन्हा पूर्वीप्रमाणे सर्वजण शुद्ध होतात.

मृत्यूनंतर सहाव्या दिवशी पेड्डदिनमू नावाचा विधी असतो. त्या दिवशी मृताची एक प्रतिमा करून तिच्या हातापायांजवळ भाताचे चार गोळे ठेवतात. आणि मग तिचे तळयात विसर्जन करतात. नंतर सर्वजण शुद्ध होतात. पेड्डदिनमूच्या प्रसंगी दोन दिवस नाचगाणे चालू असते. सर्व लोकांना मेजवानी दिली जाते. [का. ट्रा. स. इं.; दि यानाडीज – व्ही. राघवैय्या, भारतीय आदिमजाती सेवक संघ, नवी दिल्ली.]

यापनीय पंथ एक प्राचीन जैन पंथ. श्रीकलश नावाच्या श्वेतांबरपंथीय श्रमणाने याची दक्षिणेतील कल्याण येथे इ. स. च्या दुसऱ्या शतकात स्थापना केली, असे देवसूरीने आपल्या दर्शनसार ग्रंथात सांगितले आहे.

या पंथाचा प्रसार कर्नाटकात झाला होता. कदंब, राष्ट्रकूट, इ. वंशातील राजांनी या पंथाला व त्यांच्या आचार्यांना अनेक दाने दिली होती.

यापनीय पंथाचे साधू नग्न राहत, हातात मोरपंखांची पिच्छी धारण करीत आणि शिष्यांना धर्मोपदेश करीत.

यांच्यांत शाकटायन नावाचा एक वैयाकरण होऊन गेला. तो पाल्यकीर्ती या नावानेही प्रसिद्ध होता.

इ. स. च्या १५ व्या शतकापर्यंत या पंथाच्या अस्तित्वाचे पुरावे मिळतात. सांप्रत या पंथाचा कोणी अनुयायी नाही, असे कळते. [जै. ध.; जै. सा. इ.]

याम बारा देवांचा समूह. यज्ञ व दक्षिणा यांच्यापासून हे जन्मले असून, हरियज्ञाच्या वेळी उपस्थित होते. त्यांची नावे अशी – यद्रू, ययाती, विवध, स्रसत, मती, विभास, ऋतू, प्रयाती, विश्रुत, द्युती, वायव्य व संयम. हे देव स्वायंभुव मन्वंतरात होऊन गेले. [पु. इं.]

यामवती एक शाक्त देवता. हिच्या अंगावर काळी वस्त्रे असतात आणि हातांमध्ये कपाल, पाश, अंकुश व शूल ही आयुधे असतात. [श्रीविद्यार्णवतंत्र]

यामुनाचार्य (इ. स. चे १०वे शतक) वैष्णव संप्रदायाचा एक प्रमुख आचार्य. नाथमुनी नावाचे एक आचार्य होते. त्यांना ईश्वरमुनी नावाचा पुत्र होता. तो तारुण्यातच मरण पावला. या ईश्वरमुनीचाच पुत्र यामुनाचार्य होय. पित्याच्या मृत्युसमयी त्याचे वय अंदाजे दहा वर्षांचे होते. पुत्रनिधन झाल्यावर नाथमुनींनी संन्यास घेतला. पुढे त्यांनी योगसाधना केली आणि तिच्या द्वारे अद्‌भुत सिद्धी प्राप्त करून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घेतल्या. म्हणून त्यांना लोक योगींद्र म्हणू लागले.

यामुनाचार्यांचे पालन-पोषण त्यांच्या मातेने व आजीने केले. लहानपणापासूनच यामुनाचार्यांची बुद्धी तीव्र होती. भाष्याचार्य या गुरूकडे त्यांनी सकल शास्त्रांचे अध्ययन केले. थोडयाच कालात ते शास्त्रपारंगत झाले. अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही, की गुरुगृही असतानाच त्यांना मदुरेच्या पांड्य राजाचे अर्धे राज्य मिळाले. घटना घडली, ती अशी––

पांड्य राजाच्या दरबारात विद्वज्जनकोलाहल नावाचा एक दिग्विजयी पंडित होता. राजाला त्याच्याबद्दल नितांत आदर वाटे. हा पंडित विलक्षण गर्विष्ठ होता. तो पंडितांना आपल्याशी शास्त्रार्थ करायला बोलवी आणि ते हरले म्हणजे त्यांच्याकडून दंड म्हणून वार्षिक कर घेई. राजाला ते मान्य होते. यामुनाचार्यांचे गुरू भाष्याचार्यही त्याला कर देणाऱ्यांपैकी एक होते. पण एकदा द्रव्याभावी भाष्याचार्यांना त्याचा वार्षिक कर देता आला नाही. एके दिवशी कोलाहलाचा शिष्य कर मागण्यासाठी भाष्याचार्यांच्या पाठशाळेत गेला. त्या वेळी भाष्याचार्य पाठशाळेत नव्हते. यामुनाचार्य तेवढे पाठशाळेत होते. कोलाहलाच्या शिष्याने भाष्याचार्यांच्या अनुपस्थितीत त्यांना शिवीगाळ केली आणि तावडतोब कर घेऊन कोलाहलाकडे येण्यास बजावले. यामुनाचार्यांना त्या गोष्टीचा संताप आला. ते म्हणाले. ‘ माझे गुरुजी कर भरणार नाहीत. त्याऐवजी तुझ्या गुरूशी मी शास्त्रार्थ करायला तयार आहे. ’ त्याचे हे उत्तर ऐकून शिष्य खवळला आणि त्याने कोलाहलाकडे जाऊन घडला वृत्तांत सांगितला.

बारा–पंधरा वर्षांचा, मिसरूड न फुटलेला मुलगा वादयुद्ध खेळायला तयार झाला, हे ऐकून कोलाहलाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. तो दरबारात जाऊन राजाला म्हणाला. ‘ बोलवा त्या उद्धट पोराला ! ’

यामुनाचार्य खरोखरच वादविवादाला तयार आहेत का, याविषयी चौकशी करण्यासाठी राजाने त्यांच्याकडे दूत पाठविले. यामुनाचार्यांनी ठासून सांगितले, की ‘ मी कोलाहल पंडिताशी वादयुद्ध खेळणार आहे. राजाने मला दरबारात नेण्यासाठी पालखी पाठवावी. ’ राजाने तसे केले.

यामुनाचार्य दरबारात आले. त्या कुमाराला पाहून राजा चकित झाला. कोलाहल पंडिताविषयी राजाला जेवढा आदर होता, तेवढाच त्याच्या गर्विष्ठपणाबद्दल राणीला त्याचा तिटकारा होता. यामुनाचार्यांच्या मुखावरील तेज पाहताच तिची खात्री झाली, की हा बालपंडित कोलाहलाला नक्कीच जिंकणार! तिने राजाला तसे बोलून दाखविले. पण राजा म्हणाला. ‘ माझा पंडित या पोराला काय हरतो ! ’ राणी म्हणाली. ‘ आपण पैज लावू. जर हा बालपंडित हरला, तर मी तुमच्या दासीचीही दासी होईन. माझे पट्टराणीपद सोडून देईन. ’ राजा म्हणाला. ‘ जर तुझ्या या बालपंडिताचा वादात विजय झाला, तर मी त्याला माझे अर्धे राज्य देईन. ’ पैजा ठरल्या आणि दोघे पंडित समोरासमोर आले. बराच वेळ त्यांचा वादविवाद झाला. शेवटी यामुनाचार्यांनी कोलाहल पंडिताला असे काही पिळाचे प्रश्न टाकले, की त्याला त्यांचे उत्तर देता आले नाही. पंचपंडितांनी कोलाहल पंडित हरल्याचा निवाडा दिला. राजाने यामुनाचार्यांना अर्धे राज्य दिले. पाठशाळेतल्या गादीवर गुरुजी म्हणून बसणारे यामुनाचार्य राजा म्हणून सिंहासनावर बसले. ही घटना इ. स. ९७५ च्या सुमारास घडली.

काही वर्षे त्यांनी राज्य केले. त्या वेळी त्यांचे आजोबा नाथमुनी हे खूप वृद्ध झाले होते. समाधी घेण्यापूर्वी त्यांच्या मनात विचार आला, की आपला नातू यामुनाचार्य विद्या आणि भगवद्भक्ती सोडून राजकाजात निमग्न झाला, हे बरे नव्हे. म्हणून त्याला उपदेश करण्यासाठी राममिश्र नावाच्या आपल्या शिष्याला त्यांनी त्यांच्याकडे पाठवले. राममिश्राने त्यांना नाथमुनींचा संदेश सांगितला आणि त्यांना श्रीरंगमच्या मंदिरात नेऊन रंगनाथाची भक्ती हाच जीवनातला खरा आनंद आणि तेच जीवनाचे इतिकर्तव्य असल्याचा उपदेश केला. यामुनाचार्यांना तो उपदेश पटला आणि त्यांनी राज्यत्याग करून रंगनाथाची भक्ती पत्करली. त्यांनी आपले उर्वरित आयुष्य भगवत्सेवा आणि ग्रंथरचना यांत व्यतीत केले.

यामुनाचार्यांनी संस्कृत भाषेत चार ग्रंथांची रचना केली, त्यांची नावे अशी –

(१) सिद्धित्रय – यात आत्मसिद्धी, ईश्वरसिद्धी व संवित्सिद्धी अशा तीन सिद्धींचे विवेचन केले आहे. यामुनाचार्यांच्या सर्व ग्रंथांत हा ग्रंथ श्रेष्ठ आहे.

(२) आगमप्रामाण्य – यात वैष्णवांना आधारभूत अशा पांचरात्र सिद्धान्ताचे पांडित्यपूर्ण विवेचन आहे.

(३) गीतार्थसंग्रह – यात केवळ तीस श्लोक आहेत. यात विशिष्टाद्वैत – सिद्धान्ताला अनुसरून निरूपण केलेले आहे. यामुनाचार्यांच्या मते गीतेचे सार पुढीलप्रमाणे आहे.

स्वधर्मज्ञानवैराग्यसाध्यभक्त्यैकगोचरः ।
नारायणः परब्रह्म गीताशास्त्रे समीरितः ॥

भावार्थ – कर्म, ज्ञान आणि वैराग्य यांनी साध्य असलेल्या केवळ भक्तीच्या द्वारे नारायण परब्रह्म ज्ञात होतो. हेच गीतेचे प्रतिपादन आहे.

(४) स्तोत्ररत्न – याला आळवंदारस्तोत्र असेही म्हणतात. स्तोत्रवाङ्मयातले हे एक अनर्घ्य रत्न असून, ते अत्यंत लोक-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रिय आहे. यात ६५ श्लोक असून, त्यांत प्रपत्ती किंवा आत्मसमर्पणभक्ती हिचे हृदयस्पर्शी वर्णन आहे. त्यांतील एक श्लोक असा-

निमज्जतो ऽनन्तभवार्णवान्तश्चिराय मे कूलमिवासि लब्धः ।
त्वयापि लब्धं भगवन्निदानीमनुत्तमं पात्रमिदं दयायाः ॥

अर्थ – हे भगवंता, अनंत अशा भवसागरात खोलवर बुडणाऱ्या मला तू चिरकालाने तीरासारखा उपलब्ध झालास. तुलाही सांप्रत दयेचे श्रेष्ठ पात्र असा मी उपलब्ध झालो.

आपल्या एकान्त भक्तीने आणि अगाध पांडित्याने यामुनाचार्य दक्षिणेतल्या वैष्णवांचे गुरू बनले. त्यांनी केवळ ग्रंथच रचले नाहीत, तर तमिळनाडमधल्या आळवार संतकवींच्या पद्यांचे अध्ययन व अध्यापनही केले. विशिष्टाद्वैत मताला दर्शनाचे स्वरूप देणाऱ्या रामानुजाचार्यांचे यामुनाचार्य हे आजे गुरू होत. पाहा – विशिष्टाद्वैत दर्शन. [हिंदुत्व; श्रीनिवासाचार्य-अजंता, सप्टेंबर-ऑक्टोबर १९५८]

यारीसाहब (इ. स. चे १७ वे शतक) उ. भारतातील एक संत. हा बावरी पंथाचा अनुयायी आणि बीरूसाहेबाचा शिष्य होता. मुहंमद हे याचे मूळ नाव असावे, असे म्हणतात. खानदानी घराण्यात याचा जन्म झाला, असे अभ्यासकांचे मत आहे. पण संसारातील असारता जाणून याला वैराग्य आले. याची गादी दिल्लीला असून, तिथेच त्याची समाधी आहे. केशवदास, सूफीशाह, शेखनशाह, हसन मुहंमद आणि बुलासाहेब हे याचे पाच प्रमुख शिष्य होत. त्यांपैकी पहिल्या चार शिष्यांचा संबंध दिल्लीच्या गादीशी असून, बुलासाहेबाचा संबंध राजीपूर जिल्ह्याशी आहे.

यारीसाहब

यारीचा रत्नावली नावाचा एक काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. याने योगमार्गालाच विहंगम मत असे म्हटले आहे. याची कविता अनलंकृत असूनही भावस्पर्शी आहे. याच्या भाषेवर फारसी-अरबीचा प्रभाव आहे. याने कवित्त, साखी, सवैया, इ. अनेक छंदांत आपली रचना केली आहे. [उ. भा. सं. प्र.; हिं. सा. को.]

यावक एक काम्य व्रत. याचा विधी असा— गायीला यव चारून तिच्या शेणात पडलेले यव शिजवून खाणे. अशा प्रकारे हे व्रत सात दिवस, पंधरा दिवस किंवा एक महिना करावे. या कालात इतर पदार्थ भक्षण करू नयेत.

त्याचप्रमाणे गोमयातील यव गोमूत्रात शिजवून त्यावर निर्वाह केला, तर त्याला गोमूत्रयावक असे म्हणतात. याचा कालही यावक व्रताप्रमाणेच आहे.

हे एक कृच्छ्रही आहे. याचा विधी असा – पाण्यात सातू शिजवून ते सात दिवस, पंधरा दिवस किंवा महिनाभर खावे. फल – पापनाश. [हि. ध.; नि. सि.; प्रा. व्य. प्र.]

यावज्जीववश्यकरगाणपत्ययंत्र आपल्याला हव्या असणाऱ्या एखाद्या व्यक्तीला यावज्जीव वश करून घ्यायचे असल्यास या यंत्राचा प्रयोग करतात. त्यासाठी एका मोठ्या, छिद्रे न पडलेल्या भूर्जपत्रावर अनामिकेचे रक्त, हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा मद, लाक्षारस व गोरोचन यांचे मिश्रण करून त्याने हे यंत्र काढतात. यंत्रातील चौकोनात पहिल्या ओळीत सात वेळा ऱ्हीं हे बीजाक्षर लिहितात. त्याच्या खालच्या ओळीत पूर्वार्धात क्रों, ऱ्हीं, क्लीं, गं ही चार बीजाक्षरे; उत्तरार्धात साध्यनाम व पुढे गं हे बीजाक्षर लिहितात. त्याखालील तिसऱ्या ओळीत क्लीं, ऱ्हीं, क्रों, ऱ्हीं, क्लीं, क्रों, ऱ्हीं ही सात बीजे आणि चौथ्या ओळीला ऱ्हीं हे बीजाक्षर चार वेळा लिहितात. चौकोनाच्या बाहेर पूर्व व पश्चिम बाजूला तसेच उत्तर बाजूला, प्रत्येकी दहा वेळा गं हे बीज प्राङ्मुख राहील अशा प्रकारे लिहितात. दक्षिण बाजूला काही लिहीत नाहीत. नंतर एका पवित्र ठिकाणची काळी माती आणून तिची गणपतीची मूर्ती तयार करतात. या मूर्तीच्या पोटात हे तयार केलेले यंत्र ठेवतात. मग मूर्तीची यथाविधि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूजा केल्यावर, पुढील मंत्राने प्रार्थना करतात –

देवदेव गणाध्यक्ष सुरासुरनमस्कृत ।
देवदत्तं महावश्यं यावज्जीवं कुरु प्रभो ॥

नंतर जमिनीत हातभर खोलीचा खड्डा खणून, त्यात ती मूर्ती ठेवतात. मग तीवर माती लोटून खड्डा भरून काढतात. मंत्रात 'देवदत्तं' या पदाच्या ठिकाणी साध्य व्यक्तीचे नाव घालायचे असते. यंत्राचा प्रयोग यशस्वी झाल्यास गणेशकृपेने इच्छित व्यक्ती कायमची साधकाला वश होते. [यं. चिं.]

यास्क (स. न. पूर्व ७ वे किंवा ८ वे शतक) एक भाषाशास्त्रज्ञ आचार्य. निरुक्त या ग्रंथाचा कर्ता. याचे चरित्र उपलब्ध नाही. यास्क हा तौलनिक भाषाशास्त्राचा आद्य पंडित मानला जातो. त्याच्या पूर्वी होऊन गेलेले शाकटायन, गर्ग्य व औदुंबरायण हे वैयाकरण व त्याच्या नंतरचा पाणिनी यांच्यामधला यास्क हा दुवा आहे, असे डॉ. केतकर म्हणतात. वेद हे अपौरुषेय आहेत, असा त्याचा दृढ विश्वास होता. वेदांचा अर्थ समजून न घेता केवळ ते पाठ करणे म्हणजे भार वाहणे होय, असे याने म्हटले आहे. कारण अर्थज्ञानरहित शब्द वंध्या धेनूप्रमाणे निष्फल असून तो प्रकाश देऊ शकत नाही आणि ज्याला वेदांचे अर्थज्ञान झाले, त्याचे या लोकी व परलोकीही कल्याण होईल, असे तो म्हणतो. अशा वेदार्थज्ञानाला मार्गदर्शक म्हणून निरुक्त हे निघंटवरचे भाष्य याने लिहिले.

हा भारद्वाज याचा शिष्य होता व जातूकर्ण्य हा याचा शिष्य होता (श. ब्रा. १४. ५. ५. २१; बृहदा. २. ६. ३.; ४. ६.३). महाभारतात याचा उल्लेख असून, नष्ट झालेले निरुक्त विष्णूच्या प्रसादाने याला मिळाले, असे म्हटले आहे. हा पारस्कर देशातील असावा, असे अनुमान श्री. चित्रावशास्त्री यांनी केले आहे. पाहा – निरुक्त. [म. ज्ञा. को.; प्रा. च. को.]

याज्ञवल्क्य एक वेदशाखाप्रवर्तक व तत्त्वज्ञानी आचार्य. हा ब्रह्मराताचा पुत्र होता व महर्षी वैशंपायन याचा भाचा व शिष्य होता. मिथिला नगरी हे त्याचे वास्तव्यस्थान होते. हा उद्दालकाचा शिष्य असून, आसुरी हा याचा शिष्य होता, असेही म्हटले आहे. याला मैत्रेयी व कात्यायनी अशा दोन बायका होत्या. याच्यापासून कात्यायनीला कात्यायन व मैत्रेयीला पिप्पलाद असे दोन पुत्र झाले होते (स्कंद पु. उ. ५.३.४२).

याने वाजसनेयी या वेदशाखेचे प्रवर्तन केले. त्यापूर्वी वैशंपायनाने निर्माण केलेल्या सत्तावीस वेदशाखांचे अध्ययन याने वैशंपायनाजवळच केले. असे असता, याज्ञवल्क्याने नवा वेद प्रवर्तित करण्याचे कारण घडले, ते पुढीलप्रमाणे–

एकदा समस्त ऋषींनी कोणत्यातरी कारणासाठी मेरू पर्वतावर ठराविक वेळी एकत्र होण्याचे ठरविले. जो वेळेवर येणार नाही, त्याला ब्रह्महत्येचे पातक लागेल, असा दंडक घातला. त्याप्रमाणे सर्व ऋषी एकत्र जमले; पण वैशंपायनाला मात्र जाता आले नाही. त्या दिवशी तो पहाटेच स्नानाला निघाला असता, घराच्या कोपऱ्यात निजलेल्या स्वतःच्या वहिणीच्या मुलावर त्याचा पाय पडला आणि तो मुलगा तात्काळ मेला. त्यामुळे वैशंपायनाचे चित्त ठिकाणावर राहिले नाही. म्हणूनच तो त्या दिवशी मेरू पर्वतावर पोचू शकला नाही. मुलाच्या मृत्यूमुळे भ्रूणहत्येचे पातक लागले. त्याच्या क्षालनासाठी त्याने सर्व शिष्यांना बोलावून घेऊन, त्यांना या हत्येचे प्रायश्चित करण्यास सांगितले. त्या वेळी याज्ञवल्क्य आपल्या गुरूला म्हणाला–

'भगवन, हे दुष्कर व्रत मीच एकटा करीन. हे अल्प सामर्थ्याचे शिष्य ते काय करू शकणार !' याज्ञवल्क्याच्या या आत्मप्रौढीचा वैशंपायनाला राग आला. तो त्याला म्हणाला–

'तू अविनीत आहेस. तुला आपल्या ज्ञानाची घमेंड आहे. तू माझा शिष्य होण्याच्या योग्यतेचा नाहीस. तेव्हा तू माझ्याकडून शिकलेले वेद मला परत दे.'

गुरूच्या या उक्तीचा याज्ञवल्क्याला राग आला. तो म्हणाला.

'ठीक आहे. मी तुमचे वेद परत करतो.'

असे म्हणून याज्ञवल्क्याने शिकलेल्या वेदांचे वमन केले आणि अशा प्रकारे ते वेद गुरूला परत दिले.

लगेच तो गुरूच्या आश्रमाचा त्याग करून निघाला. पण आता तो वेदविहीन झाला होता. त्याला वेद हवा होता, म्हणून त्याने सूर्याची आराधना केली. सूर्याने प्रसन्न होऊन, याज्ञवल्क्याला षडंगसहित नवा वेद दिला.

गुरूला वेद परत करून नवा वेद मिळवला या कथेचा दुसरा पर्याय स्कंद व आत्म या पुराणांत सांगितला आहे, तो असा–

भार्गव कुळातला शाकल्य हा याज्ञवल्क्याचा गुरू होता. तो वर्धमान नगरात राहत असून, सूर्यवंशातल्या सुप्रिय नामक राजाचे पौरोहित्य करीत असे. एके दिवशी त्या कामासाठी शाकल्याने याज्ञवल्क्याला पाठवले. तिथले शांतिकर्म उरकल्यावर ओंजळीत शांत्युदक घेऊन त्याने आशीर्वाद देण्यासाठी राजा कुठे आहे, असे विचारले. राजा दारू पिऊन बेहोष झालेला होता. तो त्याच अवस्थेत याज्ञवल्क्यापुढे आला. धुंदीतच तो याज्ञवल्क्याला म्हणाला. 'तुझे आशीर्वादाचे पाणी मला नको आहे. तू ते या समोरच्या खांबावर टाक.' याज्ञवल्क्य संतप्त झाला. त्याने ते उदक खांबावर टाकले. त्यासरशी त्या खांबाला सुंदर पालवी फुटली. तो चमत्कार पाहून राजाची धुंदी उतरली. त्याने पुनश्च

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपल्याला आशीर्वादाचे पाणी देण्याबद्दल याज्ञवल्क्याकडे मागणी केली. 'तू माझ्या हातचे पाणी घ्यायला अत्यंत अयोग्य आहेस' असे म्हणून याज्ञवल्क्य तिथून गुरूकडे आला. राजाच्या सांगण्यावरून शाकल्याने दुसऱ्या दिवशीही याज्ञवल्क्यालाच राजवाड्यात जाण्याची आज्ञा केली. याज्ञवल्क्याने ती मानली नाही. शाकल्य रागावला. त्याने याज्ञवल्क्याला दिलेली विद्या परत मागितली. याज्ञवल्क्याने वमनाच्या रूपाने ती त्याला परत दिली. त्या दिवसापासून शाकल्य आणि याज्ञवल्क्य या गुरु–शिष्यांत कायमचे वैर निर्माण झाले. या वैराचे पर्यवसान शाकल्याच्या आत्महत्येत कसे झाले, तो वृत्तान्त ब्रह्मांड पुराणात सांगितला आहे, तो असा–

एकदा मिथिलेचा राजा जनक याने अश्वमेध यज्ञ आरंभिला. त्या यज्ञात भाग घेण्यासाठी शाकल्य, कहोड, इ. महर्षी जमा झाले होते. याज्ञवल्क्यही आला होता. ही सर्व ऋषिमंडळी एकत्र जमलेली पाहून जनकाच्या मनात विचार आला, की या सर्वांत श्रेष्ठ ऋषी कोण, याची एकदा पारख करावी. त्यासाठी त्याने एक सहस्र गायी, पुष्कळसे सोने, विविध रत्ने, दास–दासी, एवढे सगळे वैभव सभेपुढे आणून ठेवले आणि म्हटले–

"तुम्हां सर्वांमध्ये जो कोणी श्रेष्ठ ज्ञानी असेल, त्याने हे सारे वैभव घेऊन जावे." पण ती संपत्ती घेण्यासाठी कोणीच पुढे आला नाही. त्या वेळी याज्ञवल्क्याने धिटाई केली. तो आपल्या शिष्याला म्हणाला.

'ही सर्व धनसंपदा आणि गायी घेऊन तू माझ्या आश्रमाकडे जा.' शिष्याने त्याप्रमाणे केले. याज्ञवल्क्याचा हा निर्णय इतर ऋषींना अपमानकारक वाटला. ते सर्व आपापसांत चुळबूळ करू लागले. तेव्हा याज्ञवल्क्य त्या सर्वांना म्हणाला. 'ब्राह्मणाचे बल म्हणजे विद्या व तत्त्वज्ञान यांतील प्रावीण्य हे होय. तुम्ही मला प्रश्न करा; मी उत्तरे द्यायला तयार आहे.' याज्ञवल्क्याची ही गर्वोक्ती ऐकून काही विद्वान ऋषी त्याच्याशी शास्त्रार्थ करायला पुढे झाले. अश्वलाने त्याला मुक्तीसंबंधी तात्त्विक प्रश्न विचारले. उषस्त व कहोड यांनी ब्रह्मस्वरूपाविषयी त्याला प्रश्न विचारले. गार्गी नावाची एक पंडिताही पुढे आली. या सर्वांना याज्ञवल्क्याने चपखल उत्तरे देऊन गप्प बसविले. मग तो आपला पूर्वीचा गुरू शाकल्य याला म्हणाला. 'तुम्ही गप्प का? वादाला पुढे या.' ते ऐकून शाकल्य क्रुद्ध झाला व वादाला पुढे सरसावला. त्याने याज्ञवल्क्याला एक सहस्र प्रश्न केले. याज्ञवल्क्याने त्यांची बिनतोड उत्तरे दिली. मग तो शाकल्याला म्हणाला. 'आता माझ्या एकाच प्रश्नाचे तुम्ही उत्तर द्या; अन्यथा प्राणत्याग पत्करा.' याज्ञवल्क्याने प्रश्न विचारला; पण शाकल्याला त्याचे उत्तर देता आले नाही. त्यामुळे त्याला याज्ञवल्क्याच्या सांगण्याप्रमाणे प्राणत्याग करावा लागला.

मग त्याने सूर्याकडे मिळवलेल्या मंत्रांच्या साहाय्याने नव्या यजुर्वेदाच्या पंधरा शाखा निर्माण केल्या. त्या शाखांचा अभ्यास पुढे कण्व, माध्यंदिन इत्यादी शिष्यांनी केला. या पंधरा शाखांची ब्राह्मणेही त्याने निर्माण केली. आपल्या वेदाला त्याने शुक्ल यजुर्वेद असे नाव दिले. मग त्याने त्याच्या प्रसारासाठी कंबर कसली. थोड्याच कालात त्याने संपूर्ण उत्तर भारतात आपल्या वेदाला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यामुळे उत्तर भारतातले ब्राह्मणच नव्हेत; तर क्षत्रिय आणि वैश्यही याज्ञवल्क्याच्या वेदाला अनुसरून आपली धर्मकृत्ये करू लागले. त्यामुळे वैशंपायनाच्या कृष्ण यजुर्वेदाला उत्तरेत स्थानच उरले नाही. कृष्णयजुर्वेदी ब्राह्मण मग आपला वेद घेऊन दक्षिणेत वास्तव्याला आले.

त्यानंतर याज्ञवल्क्याने संन्यास घेण्याचे ठरविले. त्यासाठी त्याने आपल्या दोन्ही बायकांना जवळ बोलावून, आपल्या संपत्तीच्या दोन समान वाटण्या केल्या व दोघींना एकेक घेण्यास सांगितले. कात्यायनीने वाटणी घेतली; पण मैत्रेयीने ती घेतली नाही. ती म्हणाली. 'मला द्रव्य नको; अमृतत्व मिळवून देणारे आत्मज्ञान हवे.' याज्ञवल्क्याने मैत्रेयीचा अधिकार जाणला व सर्व संपत्ती कात्यायनीला देऊन, मैत्रेयीला ज्ञानोपदेश केला. एवढे झाल्यावर तो संन्यस्त झाला.

याज्ञवल्क्य हा केवढा मोठा तत्त्वज्ञानी होता, ते बृहदारण्यक उपनिषदावरून कळून येते. जनकाच्या सभेत त्याने ज्या तत्त्वज्ञानाचा प्रपंच केला, त्यातील मुख्य मुद्दे असे –

(१) ज्याप्रमाणे सर्व विचार मनात सामावतात, त्याप्रमाणे सर्व वस्तू आत्म्यात केंद्रित होतात.

(२) आत्मा सर्वव्यापी आहे.

(३) आत्म्यासाठीच जगातील सर्व वस्तू प्रिय आहेत. आपण जेव्हा एखाद्यावर प्रेम करतो, तेव्हा आत्माच आत्म्यावर प्रेम करीत असतो. आत्मप्राप्ती हेच सर्व प्रयत्नांचे ध्येय आहे.

(४) आत्माच तेवढा सत्य. बाकीचे सर्व 'आर्तम्' म्हणजे दिखाऊ होय.

(५) आत्मा हा मनुष्याची अंतिम ज्योती आहे.

याज्ञवल्क्य हा प्रगाढ पंडित, तत्त्ववेत्ता, निर्भीड, स्वाभिमानी आणि पराकाष्ठेचा प्रयत्नवादी होता. त्याच्या काळातला तो एक असामान्य पुरुष होता. आह्निकसूत्रावलीत त्याला नमन करताना जो श्लोक लिहिला आहे, तो असा –

प्रत्यग्रवेदेन गिरां मलं यो विधूय योगेन च चित्तजातम् ।
ज्ञानेन तत्त्वं पदलक्षमाप तं याज्ञवल्क्यं प्रणतोऽस्मि नित्यम् ॥

अर्थ – नवा वेद मिळवून ज्याने वाणीचा मळ धुवून टाकला, योगसाधनाने ज्याने आपल्या चित्ताचा मल नाहीसा केला आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्याने 'तत्त्वमसि' या सिद्धान्ताचे ज्ञान मिळवले, अशा त्या याज्ञवल्क्याला मी नित्य नमस्कार करीत आहे.

आपल्या उत्तरायुष्यात याज्ञवल्क्याने अनेक ग्रंथ रचले. त्यांतील मुख्य चार ग्रंथ असे –

(१) याज्ञवल्क्यशिक्षा – हिच्यात माध्यंदिन व वाजसनेय यांनी स्वतःच्या वेदाचे अध्ययन व अध्यापन कसे करावे, याचे निरूपण आहे.

(२) प्रतिज्ञासूत्र – यात मंत्रांचे स्वर कसे जाणावे याची माहिती आहे.

(३) याज्ञवल्क्यस्मृती – हिच्यात चातुर्वर्णिकांनी आणि विविध अनुलोम व प्रतिलोम जातींनी कसे वागावे, न्यायदानाची पद्धती कशी असावी व विविध प्रायश्चित्ते कशी करावी, इ. धर्मशास्त्रविषयक बाबींचे विवेचन आहे.

(४) शतपथ ब्राह्मण – यात शुक्ल यजुर्वेदाच्या पंधरा शाखांची विभागचिकित्सा आहे. (शतपथ ब्राह्मण पाहा.)

याव्यतिरिक्त याज्ञवल्क्याने योगशास्त्रही रचले होते, असे याज्ञवल्क्यस्मृतीतल्या एका श्लोकावरून कळते (३.४.११०).

हिरण्यनाम कौशल्याने याला योगशास्त्र शिकवले, असे ब्रह्मांड पुराणात म्हटले आहे (३.६३.२०८). पाहा – यजुर्वेद, बृहदारण्यक उपनिषद. [वेदप्रकाश – म. म. श्रीधरशास्त्री पाठक; प्रा. भा. वि. वि; उ. र.; प्रा. च. को.]

याज्ञवल्क्य उपनिषद

शुक्ल यजुर्वेदाशी संबंधित असणारे एक उपनिषद. हे गद्य-पद्यमिश्रित आहे. यात संन्यास व वैराग्य यांचे महत्त्व प्रतिपादिले आहे. यातील पहिला अर्धा भाग हा जाबालोपनिषद खंड ४ व ५ यांचीच पुनरावृत्ती आहे. यातील विषयप्रतिपादन असे –

वैराग्य निर्माण झाले, की कोणत्याही आश्रमातून सरळ संन्यास घ्यावा. शेंडी व जानवे तोडून 'मी संन्यास घेतला' असे तीनदा म्हणावे. संवर्तकारुणी, श्वेतकेतू, दुर्वास, ऋभू, निदाघ, दत्तात्रेय, शुक, वामदेव व हारीतक हे संन्याशांमधले परमहंस होत. हे त्रिदंड, कमंडलू, शिखा व यज्ञोपवीत या सर्वांचाच त्याग करतात. उजवा हात हेच त्यांचे भिक्षापात्र असते. शेवटी ते कोणत्या तरी एकान्त स्थळीच्या देवालयात, वारुळाजवळ, नदीकाठावर किंवा गुहेत राहून देहत्याग करतात. सर्वसंगपरित्यागी संन्यासी म्हणजे परमेश्वरच होय. संन्याशाने प्रथम संन्यास घेतलेल्या किंवा बरोबरीच्या संन्याशालाच नमस्कार करावा. त्याने स्त्रीविषयक मोह टाळावा. स्त्रीचा त्याग म्हणजे जगाचाच त्याग होय. तो करून नंतर क्रोधही जिंकावा. असा संन्यासी अनासक्त असतो.

यत्र सुप्ता जना नित्यं प्रबुद्धस्तत्र संयमी ।
प्रबुद्धा यत्र ते विद्वान् सुषुप्तिं याति योगिराट् ॥

अर्थ – ज्या ठिकाणी लोक झोपलेले (म्हणजे आत्मविषयात उदासीन) असतात, त्या ठिकाणी संयमी संन्यासी जागृत असतो. ज्या ठिकाणी सामान्य जन जागृत (म्हणजे विषयनिरत) असतात, त्या ठिकाणी आत्मज्ञानी योगिराज झोपलेला असतो.

संन्याशाने हे सर्व जग चिन्मय अर्थात ज्ञानमय आहे, असे जाणावे. [श्री. सी. ग. देसाई]

याज्ञवल्क्यस्मृती

मनुस्मृतीच्या जोडीने उल्लेखिला जाणारा एक स्मृतिग्रंथ. शुक्ल यजुर्वेदाचा कर्ता याज्ञवल्क्य व स्मृतिकार याज्ञवल्क्य हे दोघे भिन्न आहेत, असे विद्वानांचे मत आहे. शुक्लयजुर्वेदकार याज्ञवल्क्याने ही स्मृती रचली नाही, याविषयीचा एक संदर्भ मिताक्षरा या टीकेतच दिलेला आहे तो असा –

याज्ञवल्क्यशिष्यः कश्चित् प्रश्नोत्तररूपं याज्ञवल्क्यप्रणीतं धर्मशास्त्रं संक्षिप्य कथयामास ॥

अर्थ – कोण्या एका याज्ञवल्क्याच्या शिष्याने, याज्ञवल्क्याने (कधीतरी) सांगितलेले धर्मशास्त्र प्रश्नोत्तररूपाने संक्षिप्त करून सांगितले.

मात्र तरीही याज्ञवल्क्यस्मृतीचा संबंध शुक्ल यजुर्वेद आणि त्या वेदाचे अन्य वाङ्मय यांच्याशी इतर वेदांपेक्षा अधिक घनिष्ठ आहे.

प्रस्तुत स्मृतीच्या एका प्रतीत १०१० श्लोक आहेत; तर विश्वरूपाच्या टीकेत १००३ आहेत. अपरार्काने १००६ श्लोक दिले आहेत.

ग्रंथारंभी या स्मृतीच्या उपक्रमाविषयी माहिती दिली आहे, ती अशी – एकदा ऋषिमंडळी मिथिला नगरीत याज्ञवल्क्याकडे गेली आणि त्या ऋषींनी वर्णधर्म, आश्रमधर्म आणि इतर धर्म यांविषयी माहिती सांगण्याबद्दल याज्ञवल्क्याला विनंती केली. ती ऐकून याज्ञवल्क्याने त्यांना सविस्तर धर्मनिरूपण केले.

प्रस्तुत स्मृतीचे आचाराध्याय, व्यवहाराध्याय व प्रायश्चित्ताध्याय असे तीन अध्याय असून, तिच्यात पुढील विषयांचे विवेचन केले आहे –

आचाराध्याय – उपोद्घातात विद्या व धर्म यांची साधने सांगताना पुढील श्लोक लिहिला आहे –

पुराणन्यायमीमांसाधर्मशास्त्राङ्गमिश्रिताः ।
वेदाः स्थानानि विद्यानां धर्मस्य च चतुर्दश ॥
(याज्ञ. १.३)

अर्थ – ब्रह्मादी अठरा पुराणे, तर्कविद्या, मीमांसा (वेदांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayû Trust. Funding by MoE-IKS

वाक्यांचा विचार), मनू इत्यादिकांची धर्मशास्त्रे आणि शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष या सहा अंगांसह चार वेद ही चौदा ज्ञानांची साधने व धर्माचे हेतू होत.

त्यानंतर धर्माची प्रमाणे कोणती व धर्माचे उद्दिष्ट काय, हे सांगण्यासाठी पुढील दोन श्लोक लिहिले आहेत –

श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।
सम्यक् संकल्पजः कामो धर्ममूलमिदं स्मृतम् ॥
इज्याचारदमाहिंसादानस्वाध्यायकर्मणाम् ।
अयं तु परमो धर्मो यद्योगेनात्मदर्शनम् ॥

(याज्ञ. १. ७–८)

अर्थ – वेद, धर्मशास्त्रे, शिष्टांचा आचार, ज्यांच्याविषयी विकल्प असेल अशा धर्मानुष्ठानांत आपणांस जे प्रिय वाटेल ते व उत्तम संकल्पापासून उत्पन्न झालेला व शास्त्राच्या विरुद्ध नसलेला काम (इच्छा), अशी ही पाच धर्माची प्रमाणे आहेत. होमहवन, मनुष्याच्या उत्कर्षार्थ शास्त्राने सांगितलेला आचार, मनाचे किंवा बाह्य इंद्रियांचे दमन, प्राण्यांना पीडा न देणे, आपली वस्तू दुसऱ्यास सर्वथैव अर्पण करणे, वेद व शास्त्रे यांचे अध्ययन आणि काम्य कर्मे वर्ज्य करून इतर सर्व शास्त्रोक्त कर्मांचे अनुष्ठान, या सर्वांत चित्ताचे ऐकाग्र्य करून आत्म्याचे साक्षात दर्शन करणे म्हणजे त्याचा अनुभव घेणे हाच सर्वोत्तम धर्म होय.

त्यानंतर प्रस्तुत अध्यायात पुढील विषयांचे विवेचन केलेले आहे – वर्णनिर्णय, संस्कार, ब्रह्मचर्य, पंचमहायज्ञ, अष्टविध विवाह, स्त्रीधर्म, जातिविवेक, गृहस्थधर्म, त्रैवर्णिकांची कर्मे, भक्ष्याभक्ष्य, द्रव्यशुद्धी, दान, विविध श्राद्धे, ग्रहशांती, राजधर्म, दंडविधान, इत्यादी.

व्यवहाराध्याय– यात पुढील विषय विवेचिलेले आहेत– न्यायसभेतील सभासद, न्यायाधीश, न्यायालयीन कारभारपद्धती, साक्षिदाराची लक्षणे, पुराव्याची साधने, भूमिगत द्रव्य, ऋण, शपथ, दिव्ये, वाटप, वारसाहक्क, विविध प्रकारचे गुन्हे, इत्यादी.

प्रायश्चित्ताध्याय – प्रेतविधी, आशौच, आपद्धर्म, वानप्रस्थधर्म, यतिधर्म, कर्मविपाक, विविध प्रायश्चित्ते, इत्यादी.

कालनिर्णय –विश्वरूप हा प्रस्तुत स्मृतीवरचा पहिला भाष्यकार होय. तो इ. स. ८०० च्या सुमारास होऊन गेला. अर्थात त्यापूर्वी कित्येक शतके स्मृतिकार याज्ञवल्क्य झाला असला पाहिजे. डॉ. जॉली यांच्या मते याज्ञवल्क्य कुमारिलभट्टाच्या आधी (इ. स. चे ७ वे शतक) तीन किंवा चार शतके होऊन गेला. नारद व बृहस्पती यांचे सिद्धान्त व याज्ञवल्क्याचे सिद्धान्त यांची तुलना केली असता, नारद व बृहस्पती यांचे सिद्धान्त फार प्रगत व सुधारलेले दिसतात. यांचा काल इ. स. ५०० च्या आधीचा आहे. त्यावरून याज्ञवल्क्य इ. स. च्या तिसऱ्या शतकानंतरचा असणे शक्य नाही. याज्ञवल्क्य कित्येक बाबतीत मनू व कौटिल्य यांचे अनुकरण करतो. यावरून तो सनपूर्व पहिल्या शतकाच्या आधीचा असणे शक्य नाही. यावरून प्रस्तुत स्मृती सनपूर्व पहिले शतक व इ. स. चे तिसरे शतक एवढ्या कालखंडात केव्हातरी रचली गेली असावी.

मनू व याज्ञवल्क्य– कौटिल्याचे अर्थशास्त्र या ग्रंथातून याज्ञवल्क्याने बरीच माहिती घेतलेली आहे. मनू व याज्ञवल्क्य यांच्या स्मृतींमध्ये समान मजकूर पुष्कळ आहे. पण सर्वसाधारणपणे याज्ञवल्क्य मनूपेक्षा प्रगत विचारांचा आहे. पुढील बाबतींत त्यांच्यामध्ये मतभेद दिसून येतो–

(१) ब्राह्मणाने शूद्र स्त्रीशी विवाह करण्यास मनूने अनुज्ञा दिली आहे, तर असा विवाह याज्ञवल्क्याने निषिद्ध ठरवला आहे.

(२) मनूने नियोगाचा तीव्र निषेध केला आहे, तर याज्ञवल्क्याने तो केला नाही.

(३) मनूने निपुत्रिक व्यक्तीच्या संपत्तीचा वारस म्हणून त्याच्या विधवेचा मुळीच उल्लेख केला नाही. तसेच त्याच्या वारसांचा अनुक्रमही अनिश्चित ठेवला आहे. पण याज्ञवल्याने निपुत्रिक मयताची पहिली वारस त्याची विधवा पत्नी असली पाहिजे, असे स्पष्ट सांगून नंतरचा वारसाक्रमही अनुक्रमाने अगदी स्पष्ट सांगितला आहे.

(४) मनूने द्यूताचा निषेध केला आहे; तर याज्ञवल्क्याने सांगितले आहे, की राजाने आपल्या नियंत्रणाखाली द्यूत चालू ठेवावे आणि त्यावर कर बसवून आपल्या सरकारी उत्पन्नाचे ते एक साधन बनवावे.

(५) इतरही अनेक विषयांचे, विशेषतः, न्यायदानाच्या पद्धतीचे विवेचन याज्ञवल्याने मनूपेक्षा अधिक सविस्तर आणि पद्धतशीर केले आहे.

मनुस्मृतीत नसलेले काही विषय याज्ञवल्क्यस्मृतीत आहेत. याज्ञवल्क्याने शरीरशास्त्रविषयक व औषधीविषयक माहिती दिलेली आहे; पण मनूने या विषयांचा निर्देशसुद्धा केला नाही. उलट पक्षी मनुस्मृतीत सृष्टीच्या उत्पत्तीविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे; पण याज्ञवल्क्याने तो विषय अजिबात गाळला आहे. मनूने अग्नी व जल ही दोनच दिव्ये सांगितली आहेत; तर याज्ञवल्क्याने पाच प्रकारच्या दिव्यांची सविस्तर माहिती दिली आहे.

याज्ञवल्क्याला वेद–वेदांगे, पुराणे, इतिहास, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, मीमांसा, न्याय, विविध सूत्रे, इ. वाङ्मय परिचित होते. वसू, रुद्र, आदित्य इ. वैदिक देवतांबरोबर विनायक, अंबिका

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व नवग्रह यांची पूजा व शांती या स्मृतीत पहिल्या प्रथम आढळते. रुद्राध्यायाची एकादष्णी हा प्रकार या स्मृतीतच प्रथम उल्लेखिलेला आहे. ताम्रपटांचाही पहिला उल्लेख याच स्मृतीत आढळतो.

टीकाग्रंथ– विश्वरूप, विज्ञानेश्वर, अपरार्क आणि शूलपाणी यांच्या प्रस्तुत स्मृतीवरच्या टीका प्रसिद्ध आहेत. या सर्व टीकांमध्ये विज्ञानेश्वराची मिताक्षरा ही टीका सर्वश्रेष्ठ व प्रमाणभूत मानली गेली आहे. स्वातंत्र्यापूर्वी भारताच्या सर्व भागांतील ब्रिटिश न्यायालये मिताक्षरायुक्त याज्ञवल्क्यस्मृतीच्याच आधारे हिंदूंच्या दिवाणी दाव्यात न्यायनिवाडे देत. म. म. काणे म्हणतात – अशा प्रकारचे उच्च स्थान त्या ग्रंथास देणे अगदी योग्य आहे. कारण सदर स्मृतीमध्ये तत्त्वांचे संक्षिप्त पण स्पष्ट विवेचन, व्यापक दृष्टिकोन, स्त्री–पुरुष आणि भिन्न भिन्न वर्णे यांच्या बाबतीत निःपक्षपातीपणा, असे गुण आहेत. संपूर्ण ग्रंथ अनुष्टुप छंदात लिहिलेला असून, त्याची भाषा डौलदार आहे. कुठेही दुर्बोधपणा नाही. विवेचन शक्य तितके थोडक्यात पण सारभूत आहे. सर्व ग्रंथ शक्य तितका संक्षिप्त करण्याचा त्याचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. मनूने दोन हजार सातशे श्लोकांत जे विषय निरूपिले आहेत, ते याज्ञवल्क्याच्या स्मृतीत एक हजार श्लोकांत सामावले आहेत.

प्रस्तुत स्मृतीव्यतिरिक्त वृद्धयाज्ञवल्क्य, योगयाज्ञवल्क्य व बृहद्याज्ञवल्क्य असे तीन ग्रंथ याज्ञवल्क्याच्या नावावर आहेत; पण ते ग्रंथ स्मृतिकार याज्ञवल्क्याचे नसून, ते याज्ञवल्क्य वेगळे असावे, असे विद्वानांचे मत आहे. [हि. ध.; प्रा. भा. सं.]

युआन च्वांग (६०२–६६४ इ. स.) एक चिनी बौद्ध यात्रिक व विद्वान. याचा जन्म चीनमधील लो-यंग या गावी झाला. वयाच्या आठव्या वर्षीच त्याने कन्फ्युशियन धर्माच्या सर्व ज्ञानशाखांमध्ये प्रावीण्य संपादन केले. थोड्याच दिवसांत त्याने आपल्या ज्येष्ठ बंधूप्रमाणे लो-यंगच्या बौद्ध विहारात जाऊन बौद्ध दीक्षा घेतली. मग त्याने बौद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास सुरू केला व तो त्यातही पारंगत झाला.

इ. स. ६१७ साली चीनमध्ये अराजक माजले. त्यामुळे युआन च्वांग आपल्या भावाबरोबर स्पु-चुआन पर्वताच्या आश्रयाला गेला. तिथेच त्याने बौद्ध धर्मावर आपले पहिले प्रवचन दिले व लोकांकडून वाहवा मिळवली.

बौद्ध धर्मात त्या वेळी अनेक पंथोपपंथ निर्माण झाले होते. त्यांतल्या महायान पंथाकडे युआन च्वांग आकर्षित झाला व थोड्याच काळात त्या पंथाचा महापंडित बनला. त्याच काळात त्याने इतरही पंथांचे तत्वज्ञान अभ्यासले. आता तो चतुरस्र विद्वान झाला. वादविवादात तो कोणाला हार जाईना. तो सत्याचा आग्रही होता. बौद्ध आचार्यांची मते, प्रत्यक्ष आचार व बौद्ध धर्मग्रंथांतली वचने यांचा ताळमेळ जमेनासा झाला, की तो अस्वस्थ होई. दिवसेंदिवस त्याची ही अस्वस्थता वाढत चालली. चीनमध्ये उपलब्ध असलेल्या धर्मग्रंथांव्यतिरिक्त भारतात आणखी काही धर्मग्रंथ असले पाहिजेत व ते वाचल्याशिवाय आपल्या ज्ञानाची पूर्तता होणार नाही, असे त्याच्या मनाने घेतले. त्यासाठी त्याने भारतात जाण्याचे ठरविले. परंतु भारतात जायचे तर चिनी सम्राटाची अनुज्ञा घेणे आवश्यक होते आणि प्रवासाच्या अडचणीही खूप होत्या. युआन च्वांगने चिनी सम्राटाकडे भारतात जाण्याची परवानगी मागितली; पण ती त्याने नाकारली. अर्थात युआन च्वांग त्यामुळे निराश झाला नाही. त्याने राजाज्ञा न मानता गुप्तपणे आपली यात्रा सुरू केली. रात्रभर मार्गक्रमण करावे व दिवसभर कुठेतरी आडोशाला लपून बसावे, असा क्रम त्याने सुरू केला. चिनी सीमा ओलांडताना त्याच्यावर सीमारक्षकाने एक बाण सोडला. युआन च्वांग त्यामुळे मरायचाच; परंतु केवळ दैवकृपेने वाचला व सीमापार झाला. पुढे तो तुर्फानच्या बौद्ध राजाकडे गेला. राजाने त्याचे आदरातिथ्य केले व आपल्या दरबारी धर्मपंडित म्हणून राहण्याचा युआन च्वांगला आग्रह केला. तथापि त्याने तो निग्रहपूर्वक नाकारला. तो राजाला म्हणाला. ‘ सद्धर्माच्या शोधासाठी मी भारताकडे जात आहे. माझा मार्ग कोणीही रोखू शकणार नाही. बळजबरी करून तू फक्त माझ्या देहाला इथे बांधून ठेवू शकशील; पण माझी इच्छाशक्ती आणि माझा आत्मा यावर तुला कधीच ताबा मिळवता येणार नाही. ’

मग राजाने अधिक आग्रह धरला नाही. त्याने युआन च्वांगला मोठ्या सन्मानाने निरोप दिला. इतकेच नव्हे; तर मार्गात त्याला उपयोगी पडेल, असे स्वतःचे परिचयपत्रही त्याने दिले.

तुर्फानच्या मुक्कामानंतर युआन च्वांग कडा नामक शहरी पोहचला. हे एक तोखारी भाषा बोलणाऱ्यांचे नगर होते. तिथे दहा संघाराम असून, त्यांत हीनयान बौद्ध पंथाचे दोन हजार बौद्ध भिक्षू राहत होते. एक रात्रभर तिथल्या बौद्ध भिक्षूंशी वार्तालाप केल्यावर तो मध्य आशियातील कूचा नामक शहरी गेला. हे शहर तत्काली समृद्ध व संपन्न समजले जाई. तिथला तोखारी राजा सुवर्णदेव बौद्धधर्मियांना मोठ्या आदराने वागवी. त्याच्या राज्यात ५००० भिक्षू राहत होते. युआन च्वांगचे त्यांनी स्वागत केले. राजानेही त्याचा सन्मान केला. त्याच वेळी हवामान विलक्षण बिघडल्यामुळे युआन च्वांगला तिथे दोन तीन महिने मुक्काम करावा लागला. तिथून निघते वेळी राजाने त्याच्या बरोबर नोकर-चाकर, उंट, घोडे यांचा लवा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जमा दिला. इतकेच नव्हे; तर स्वत: राजा आपल्या नगरजनां-सह त्याला निरोप देण्यासाठी वेशीपर्यंत आला.

कूचा सोडल्यावर युआन च्वांगवर एके ठिकाणी दरवडेखोरांनी हल्ला चढवला; परंतु त्यामुळे किंचितही न घाबरता त्याने आपले मार्गक्रमण चालूच ठेवले. पुढे तो एका उष्ण पाण्याच्या सरोवरांच्या प्रदेशात आला. या प्रदेशात त्या वेळी एका तुर्क सम्राटाचा मुक्काम पडला होता. या सम्राटावर बौद्ध धर्माचा विलक्षण प्रभाव होता. युआन च्वांग हा एक बौद्ध पंडित भारताकडे याच मार्गाने जातो आहे, हे कळल्यावर त्याला विशेष आनंद झाला व त्याने युआन च्वांगचे आदरातिथ्य केले. भोजनोत्तर युआन च्वांगने त्या तुर्क सम्राटाला धर्मो-पदेश केला. त्या वेळी त्याची मधुर वाणी ऐकून व प्रकांड पांडित्य पाहून तुर्क सम्राट भारावून गेला व त्यानेही युआन च्वांगला आपल्या दरबारी राहण्याचा आग्रह चालविला. परंतु ते शक्य होत नाही, असे पाहिल्यावर त्याने दिलदारपणाने युआन च्वांगला निरोप दिला व त्याच्या भारतयात्रेत त्याला सर्व प्रकारचे साहाय्य व संरक्षणही दिले.

युआन च्वांग

पुढे युआन च्वांग समरकंदला गेला. समरकंद हे शहर त्या काळी भारत व चीन यांच्या सीमेवरचे एक प्रमुख व्यापारी केंद्र होते. युआन च्वांगने या शहरी एक प्रवचन दिले व अनेक लोकांना बौद्ध दीक्षा दिली. अनेक प्राचीन बौद्ध विहारांचा जीर्णोद्धारही या निमित्ताने करण्यात आला.

समरकंदनंतर बॅक्ट्रियाच्या बौद्ध प्रदेशातून वाटचाल करीत युआन च्वांग हिंदुकुश पर्वत ओलांडून बामियान प्रदेशात पोचला. बामियान प्रदेशात त्या काळी दहा बौद्ध विहार असून, हजारो भिक्षू राहत होते. इथल्या दोन प्रचंड बुद्धमूर्तींचा उल्लेख युआन च्वांगने केला आहे.

बामियाननंतर ९००० फूट उंच असलेला शिवर नामक पर्वत-मय प्रदेश पार करून तो काबुलजवळच्या कपिश नावाच्या गावी आला. कपिश हे गाव त्या वेळी व्यापारासाठी फार नावाजलेले होते. तियला राजा महायानी बौद्ध होता. त्याने युआन च्वांगचे स्वागत केले. तिथेच युआन च्वांगने विविध बौद्धमतानुयायांची एक परिषद भरवली. सतत पाच दिवस या परिषदेत विद्वानांच्या वादचर्चा रंगल्या होत्या. इथला मुक्काम संपवून युआन च्वांग जलालाबाद गावी आला. भारतीय भूप्रदेशातले हे पहिले ठिकाण. भगवान बुद्धाच्या त्या पवित्र भूमीच्या दर्शनाने त्याचे नेत्र ओला-वले आणि कंठ दाटून आला.

गंधार प्रदेशात गेली सहाशे वर्षे बौद्ध धर्माचा व बौद्ध कलेचा एवढा उत्कर्ष झाला होता, की त्याला बौद्धांच्या पवित्र स्थानाचे माहात्म्य प्राप्त झाले होते. पेशावरचा प्रदेश त्या वेळी हूणांच्या वादळी आक्रमणांनी उद्ध्वस्त आणि उजाड झाला होता. सुमारे दहा लाख बौद्ध विहार तिथे होते, ते सारे विहार हूणांनी छिन्न भिन्न करून टाकले होते व स्तूपांची विल्हेवाट लावली होती. उड्डियान प्रदेशातील १४०० विहारही भग्न केले होते. त्यामुळे तियले १८००० वर बौद्ध भिक्षू देशोधडीला लागले होते. परंतु एवढ्या संहारानंतरही तियले लोक बौद्धधर्मीयच होते. महायान आणि हीनयान असे दोनही पंथ त्यांच्यांत प्रचलित होते. भगवान बुद्धाच्या भूमीतच त्याच्या धर्माला भोगावे लागलेले हे भोगवटे पाहून युआन च्वांग व्यथित झाला.

यानंतर युआन च्वांगने उदकखंडाजवळ सिंधू नदी ओलांडून तक्षशीलेत प्रवेश केला. तिथेही त्याला हूणांच्या विध्वंसक खुणा आढळल्या. तियून तो काश्मीरला गेला. काश्मीरात त्या वेळी बौद्ध धर्माच्या प्रसाराला विशेष गती प्राप्त झाली होती. तियल्या १०० बौद्ध विहारांतून ५००० बौद्ध भिक्षू राहत होते व ते सर्वत्र हिंडून लोकांना बौद्ध धर्माची महती पटवून देत होते. अशोक आणि कनिष्क या श्रेष्ठ बौद्ध सम्राटांविषयी लोकांत विलक्षण आदर व प्रेम नांदत होते.

काश्मीरच्या राजाने युआन च्वांगचे आपल्या राजधानीत मोठे स्वागत केले. युआन च्वांगने इथे चालू असलेल्या बौद्ध धर्मप्रसारा-विषयी समाधान व्यक्त केले. अनेक श्रेष्ठ बौद्ध भिक्षूंच्या व मठ-पतींच्या गाठीभेटी त्याने घेतल्या. सत्तर वर्षे वयाच्या एका महा-यानी भिक्षूने त्याला योगाचार मताविषयी अनेक मौलिक सिद्धान्त सांगितले. ते ऐकत असताना युआन च्वांगला आपल्या खडतर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रवासाचे सार्थक झाल्यासारखे वाटले व त्याची ज्ञानजिज्ञासा बळावली. मग त्याने पुढची दोन वर्षे काश्मीरातच तळ ठोकून बौद्ध तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला व चीनला नेण्यासाठी अनेक महत्त्वाच्या बौद्ध ग्रंथांच्या प्रती तयार करून घेतल्या.

काश्मीराहून त्याने साकल किंवा सियालकोट शहरी प्रयाण केले. तिथे पूर्वी ग्रीक राजा मिनांडर, हूण राजा मिहिरकुल, इ. राजांनी राज्य केले होते. त्यांपैकी मिनांडर हा नंतर बौद्ध बनला होता. दोनशे वर्षांपूर्वी सुप्रसिद्ध बौद्ध आचार्य व दार्शनिक वसुबंधू याचे वास्तव्य तिथेच होते. हे सारे ठाऊक असल्यामुळे युआन-च्वांगला सियालकोटविषयी आदरमिश्रित कुतूहल होते.

सियालकोटहून तो व्यास नदीच्या तीरावरील चीनभुक्ती नामक गावी गेला. तिथे एका माध्यमिक पंथाच्या भिक्षूने युआन च्वांगच्या अनेक शंकाचे निरसन केले व त्याला बौद्ध धर्मातील विविध कोडी उलगडून सांगितली. सुमारे एक वर्षभर युआन च्वांग चीनभुक्तीला राहिला व मग इ. स. ६३४ साली जालंधरला गेला. जालंधरहून तो मथुरेला गेला. मथुरा त्या वेळी बौद्ध मूर्तिकलेविषयी प्रसिद्ध होती. यानंतर त्याने स्थानेश्वर, कपित्थ, कनौज, इ. ठिकाणांना भेटी दिल्या. कनौजच्या राजा हर्ष-वर्धनाची युआन च्वांगशी प्रथम भेटीतच मैत्री जुळली. हर्षाच्या व्यक्तिमत्वाविषयी व शासनव्यवस्थेविषयी युआन च्वांगने विस्तृत व प्रशंसापूर्वक वर्णन लिहून ठेवले आहे.

मग तो अयोध्येला गेला. अयोध्येहून गंगेच्या किनाऱ्याने प्रयागकडे जात असता मार्गात त्याला ठगांनी पकडले व देवीपुढे नरबली देण्याचा घाट घातला; परंतु सुदैवाने त्यातून तो वाचला. प्रयागला पोचल्यावर त्याने पाहिले, की तिथे बौद्ध धर्माचे अस्तित्व अभावानेच आहे. प्रयागहून निघून तो कौशांबीला गेला. कौशांबीला त्याने भगवान बुद्धाच्या स्मृतिचिन्हांना अभिवादन केले.

कौशांबी सोडल्यावर त्याने भगवान बुद्धाच्या जन्मस्थानी जायचा संकल्प केला व त्यासाठी तो श्रावस्ती, कपिलवस्तू अशा स्थानांना भेटी देत देत लुंबिनीवनात पोचला. त्याच वेळी त्याने रामग्राम आणि कुशीनगर या स्थानांचीही यात्रा केली. तिकडून परतल्यावर तो वाराणसीच्या मार्गाने वैशालीला गेला. वैशाली व पाटलीपुत्र ही दोनही स्थाने बुद्धाच्या पदस्पर्शाने अनेक वेळा पावन झालेली होती. युआन च्वांगने त्या त्या स्थानांना भेटी दिल्या, तेव्हा त्याला ते सारे आठवले आणि बुद्धस्मृतीने त्याच्या भावना हेलावल्या. तिथून पुढे तो बुद्धगयेला गेला. बुद्धगया व नालंदा या ठिकाणांना त्याने श्रद्धापूर्वक भेटी दिल्या. नालंदा शहरी या वेळी दहा हजार महायानी भिक्षू राहत होते. त्यांच्या सहवासात युआन च्वांग तिथे १५ महिने राहिला. या काळात त्याने योगाचार संप्रदायाचे व संस्कृत भाषेचे सखोल अध्ययन केले. नालंदानंतर राजगृहाचे दर्शन घेऊन तो इ. स. ६३८ च्या आरंभी बंगालमध्ये गेला. ते सबंध वर्ष त्याने बंगालमध्येच काढले. मग तो ताम्रलिप्तीला गेला. तिथेच त्याने ठरविले, की आता आपण हीनयान बौद्ध मताच्या विशेष अभ्यासासाठी लंकेकडे जावे. परंतु बरोबरच्या बौद्ध भिक्षूंनी त्याला या विचारापासून परावृत्त केले.

यानंतर युआनच्वांग उडीसा, महाकोशल, आंध्र, इ. प्रदेशांची यात्रा करीत कांचीला गेला. तिथे त्याला कळले, की लंकेत राजकीय अशांतता माजली आहे. त्यामुळे मग त्याने तिकडे जाण्याचा विचार पूर्णपणे रहित केला.

युआन च्वांग मग पुन्हा उत्तरेकडे वळला. भरुकच्छ, वलभी, सिंध, मुलतान, इ. नगरांना व प्रदेशांना भेटी देऊन तो पुन्हा नालंदा शहरी मुक्कामासाठी गेला. मध्यंतरी आसामचा राजा भास्करवर्मा याच्या निमंत्रणावरून तो तिकडे जाऊन आला. यानंतर त्याची आणि हर्षाची पुन्हा भेट झाली. हर्षाने आयोजित केलेल्या कनौज व प्रयाग येथील बौद्ध सभांना युआन च्वांग उपस्थित राहिला व त्या सभांत त्याने महत्त्वाचा भागही घेतला. या सभांचे विस्तृत वृत्तांत त्याने लिहून ठेवले आहेत.

यानंतर तो जालंधर, तक्षशिला, जलालाबाद असा प्रवास करीत इ. स. ६४४ साली हिंदुकुश पर्वत पार करून स्वदेशी परतला. स्वदेशी गेल्यावर त्याचे भव्य स्वागत करण्यात आले. आपल्या अनुमतीशिवाय चीनच्या सीमा ओलांडून विदेशी गेलेल्या या पंडितावर तिथल्या राजाचा आरंभी राग झाला होता; परंतु आता त्याचा कुठे मागमसही नव्हता. उलट राजा आणि प्रजा दोघेही त्याच्या स्वागतात सहभागी झाले होते. राजाने त्याला दरबारात मंत्रिपद देऊ केले; परंतु त्याने ते साभार नाकारले.

आपले उर्वरित जीवन त्याने एक सामान्य भिक्षू म्हणूनच घालविले. भारतातून नेलेल्या सुमारे ६०० बौद्ध ग्रंथांचा त्याने आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने चिनी भाषेत अनुवाद केला.

अशा प्रकारे सर्व आयुष्य बौद्ध धर्माच्या सेवेत व अभ्यासात व्यतीत करून युआन च्वांग इ. स. ६६४ साली निर्वाणाला गेला.

[आजकल, वार्षिक अंक, डिसें. १९५६; प्रवासी पंडित – श्री. रा. चिं. ढेरे.; भगवान बुद्धासाठी – श्री. शंकरराव देव]

युइशी एक प्राचीन राजवंश. या राजवंशातील लोकांनी तुखार लोकांवर राज्य केले, म्हणून यांना तुखार-वंशी असेही म्हटले गेले आहे. युइशी लोक आर्य जातीचे होते. ऋषिक हे त्यांचे मूलनाम होय. महाभारताच्या सभापर्वातील अर्जुनाच्या उत्तर-दिग्विजयप्रसंगात यांचा उल्लेख आलेला आहे. ऋषिक अथवा ऋषी याचेच चिनी रूपांतर म्हणजे उषी, युषी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

किंवा युइशी झाले, असे अभ्यासक मानतात. या वंशातील लोकांनी वंक्षूच्या दक्षिणेचा प्रदेश जिंकला होता. [भा. इ. रू.]

युग एक कालपरिमाण. एखाद्या घटनेची पुन्हा पुन्हा आवृत्ती होते, तेव्हा तिच्या एका पर्यायाला जो कालखंड लागतो, त्याला युग असे म्हणतात. युग हा शब्द युज् = जुळणे या धातूपासून बनलेला आहे, म्हणून त्याचा अर्थ 'एक निश्चित कालखंड' असा होतो. या अर्थी युग शब्द वेदांत पुष्कळ जागीं आला आहे. मात्र तिथे युगाचे निश्चित कालमान सांगितलेले नाही.

चतुर्वर्षात्मक युग – वैदिक वाङ्मयात चार वर्षांचे एक युग मानलेले दिसते. तैत्ति. ब्राह्मण (१.४.१०) व तांड्य ब्राह्मण (१७.१३.१७) या ठिकाणी संवत्सर, परिवत्सर, इदावत्सर व अनुवत्सर ही चार वर्षनामे दिलेली आहेत, ती एका युगातील चार वर्षांची नावे असावी. श्री. दप्तरींच्या मते चार वर्षांच्या युगाच्या शेवटी अश्वमेध करीत, त्यात एकवीस यूप असत. एका वर्षातील ऋतुचक्रासाठी ३६५¼ दिवस लागतात, म्हणून एका युगातील पहिली तीन वर्षे प्रत्येकी ३६० दिवसांची व चौथे वर्ष अधिक दीर्घ म्हणजे ३८१ दिवसांचे मानावे लागत होते. अश्वमेधातील २१ यूप हे त्या चौथ्या वर्षातील २१ अधिक दिवसांचे प्रतीक होते, असे दप्तरी म्हणतात. पं. शामशास्त्री यांनी गवामयनम् या पुस्तकात चतुर्वर्षात्मक युगपद्धती स्वीकारून गवामयनाची कल्पना स्पष्ट केली आहे.

पंचवर्षात्मक युग – वेदांगज्योतिषात पंचवर्षात्मक युग मानलेले आहे. त्यातील पाच वर्षांची नावे संवत्सर, परिवत्सर, इदावत्सर, अनुवत्सर व इद्वत्सर अशी होती. वेदांगज्योतिषात ती प्रत्यक्ष आढळत नसली, तरी गर्गादिकांनी हीच नावे दिली आहेत. या युगातील पाच वर्षांत ६२ चांद्रमास व १८३० दिवस येतात. म्हणजे एका युगात दोन अधिकमास होतात. चार वर्षांचे युग मानले, तर सौर व चांद्र वर्षांचा असा मेळ घालता येत नाही. म्हणून वेदांगकाळी पंचवर्षात्मक युगपद्धती सुरू करण्यात आली. महाभारतात या युगपद्धतीचा उल्लेख काही ठिकाणी आला असून, विराट पर्वात (४७.३) भीष्माने दुर्योधनाला पांडवांच्या वनवासाचा किती काल झाला हे सांगताना, पाच वर्षांत दोन अधिकमास धरले आहेत. वायू पुराणातही पंचवर्षात्मक युगाचा उल्लेख आढळतो (३१.२६.२८.; ३१.४९). यासंबंधी श्री. विद्याधरशास्त्री भिडे यांनी पुढील प्रतिपादन केले आहे –

श्रौतसूत्रांत पंचवर्षात्मक चातुर्मास्य यागाचा विधी सांगितला आहे. मैत्रायणी संहिता व काठक संहिता यांतही हा पाच वर्षांचा कालावधी दिलेला आहे. वेदांगज्योतिषातील पंचवर्षात्मक युगपद्धती त्याच पंचवर्षात्मक चातुर्मास्य यागावरून सुचलेली असावी. यावरून असे दिसते, की पंचवर्षात्मक युगाची कल्पना वेदकालातच उगम पावली होती.

महायुग – पुराणांत कृत, त्रेता, द्वापर व कली या चार युगांना मिळून एक महायुग मानलेले आहे. त्याला दिव्य युगही म्हणतात. अशी १००० महायुगे म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. त्याला कल्प म्हणतात. त्यातील वर्षांची गणना पुढील प्रमाणे केली जाते–

कृतयुग – ४८०० दिव्य वर्षे (संध्या व संध्यांश धरून)
त्रेतायुग – ३६०० दिव्य वर्षे (संध्या व संध्यांश धरून)
द्वापरयुग – २४०० दिव्य वर्षे (संध्या व संध्यांश धरून)
कलियुग – १२०० दिव्य वर्षे (संध्या व संध्यांश धरून)
एकूण १२००० दिव्य वर्षे म्हणजे एक महायुग होय.

देवांचे एक वर्ष म्हणजे मनुष्याची ३६० वर्षे. म्हणून महायुगाची १२००० दिव्य वर्षे=१२०००×३६० मानुषी वर्षे = ४३२०,००० मानुषी वर्षे.

देवांचे युग व मानवांचे युग यांचा निर्देश ऋग्वेदात आढळतो. युगमानातील दिव्य वर्षे व मानुषी वर्षे ही कल्पना प्राचीन कालापासूनची आहे, असे काही पंडित मानतात. याविषयी श्री. शं. बा. दीक्षितांनी विवेचन केले आहे, ते असे –

" मनुष्याच्या दिवसापेक्षा देवांचा दिवस मोठा ही कल्पना मनूच्या पूर्वीचीच आहे. तैत्तिरीय संहितेत, मनुष्यांचा संवत्सर म्हणजे ३६० दिवस हा देवांचा दिवस होय, असे म्हटलेले आहे. अर्थात देवांचे वर्ष म्हणजे मनुष्यांची ३६० वर्षे झाली. मनुस्मृतीत देवांचे वर्ष असे स्पष्ट म्हटलेले नसले, तरी युग देवांचे असे स्पष्ट आहे; तेव्हा वर्षेही देवांचीच, असा अर्थ सहाजिक निघतो. म्हणून मनुष्यांची ४३२०,००० वर्षे=देवांचे युग, हे परिमाण मनूच्या वेळचेच, असे निःसंशय दिसते. तशी सहस्र वर्षे हा ब्रह्मदेवाचा दिवस असे मनुवाक्यात आहेच. ज्योतिषग्रंथांत ब्रह्मदेवाचा दिवस तोच कल्प, असे सांगितलेले आहे. एकंदरीत कृतादी युगांचे, महायुगाचे आणि कल्पाचे जे मान ज्योतिषग्रंथांत आहे, ते मनूच्या वेळीच नियमित झाले होते; इतकेच नाही तर निरुक्तकार यास्क याच्या वेळीच नियमित झाले होते. महाभारतात मनुस्मृतीतल्याप्रमाणेच युगपद्धती आहे."

देवांचा एक दिवस (अहोरात्र) म्हणजे मानवाचे एक वर्ष कसे ठरले, याविषयी श्री. र. वि. वैद्य यांनी विवेचन केले आहे, ते असे–

वेदरचनाकाळी आर्य लोकांची वसती उत्तरध्रुवप्रदेशात होती, असे लो. टिळकांनी सिद्ध केले आहे. तिथे सूर्य सहा महिने क्षितिजावर राहून प्रदक्षिणा घालताना दिसतो. त्या कालखंडाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवांचा अह म्हटले आहे. बाकीचे सहा महिने सूर्य क्षितिजाखाली असल्यामुळे तो दिसत नाही. ती देवांची रात्र होय. असे एक वर्ष म्हणजे देवांचे अहोरात्र होय. आर्यलोक उत्तरध्रुवप्रदेश सोडून ६६·५ अक्षांशाच्या दक्षिणेस आल्यानंतर त्यांना रोज सूर्योदय व सूर्यास्त दिसू लागले आणि २४ तासांचा मानुषी अह अनुभवास आला. प्राचीन परंपरा सोडायची नाही म्हणून मग त्यांनी देवांचा दिवस=१ संवत्सर असे ठरवले.

पुराणांत चतुर्युगातील १२००० वर्षे ही दिव्य वर्षे मानलेली आहेत. विष्णू पुराणातील यासंबंधीचे श्लोक असे–

दिव्यैर्वर्षसहस्रैस्तु कृतत्रेतादिसंज्ञितम् ।
चतुर्युगं द्वादशभिस्तद्विभागं निबोध मे ।।
चत्वारि त्रीणि द्वे चैकं कृतादिषु यथाक्रमम् ।
दिव्याब्दानां सहस्राणि युगेष्वाहुः पुराविदः ।।
तत्प्रमाणैः शतैः संध्या पूर्वा तत्राभिधीयते ।
संध्यांशश्चैव तत्तुल्यो युगस्यानन्तरो हि सः ।।
कृतं त्रेता द्वापरश्च कलिश्चैव चतुर्युगम् ।
प्रोच्यते तत्सहस्रं च ब्रह्मणो दिवसं मुने ।।
(विष्णू पु. १.३.१२–१५)

अर्थ – हे मुने, बारा दिव्य वर्षसहस्रांनी कृतत्रेतादी चार युगे होतात. कृतयुगात चार दिव्य वर्षसहस्रे, त्रेता युगात तीन दिव्य वर्षसहस्रे, द्वापर युगात दोन दिव्य वर्षसहस्रे व कलियुगात एक दिव्य वर्षसहस्र एवढी वर्षे असतात, असे पुराविद म्हणतात. युगाच्या आरंभी व शेवटी त्याच प्रमाणात म्हणजे अनुक्रमे चार दिव्य शतके, तीन दिव्य शतके, दोन दिव्य शतके व एक दिव्य शतक एवढा संधिकाल असतो. कृत, त्रेता, द्वापर व कली अशी चार युगांची नावे आहेत. या चार युगांचे सहस्र म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस होय.

युगधर्म – चार युगांचा धर्माशी निकटचा संबंध आहे. प्रत्येक युगात धर्माचा थोडा थोडा ऱ्हास होतो, असे सांगितले आहे. कृतयुगात धर्म संपूर्ण म्हणजे चार पादांचा असतो, त्रेतायुगात त्याचा एक पाद नष्ट होतो, द्वापरयुगात दुसरा पाद नष्ट होतो व कलियुगात तिसरा पाद नष्ट होऊन एकच पाद शिल्लक राहतो. (मनु. १.८१–८२)

मानवाचे आयुर्मानही युगायुगांत कमी होत जाते. कृतयुगात मनुष्य ४०० वर्षे जगतो, त्रेतायुगात ३०० वर्षे जगतो, द्वापरयुगात २०० वर्षे जगतो व कलियुगात १०० वर्षे जगतो. प्रत्येक युगाचा धर्म वेगळा आहे. कृतयुगात तप, त्रेतायुगात आत्मज्ञान, द्वापरयुगात यज्ञ व कलियुगात दान हा मुख्य धर्म होय (मनु. १.८३). मनुष्याच्या कर्माची फलेही भिन्न युगांत भिन्न असतात.

प्रत्येक युगाची पूजनीय देवता वेगळी आहे. वायू पुराणानुसार कृतयुगात ब्रह्मदेव, त्रेतायुगात यज्ञ, द्वापरयुगात विष्णू व कलियुगात महादेव यांची पूजा केली जाते. प्रत्येक युगातील पूजापद्धती भिन्न आहे. कृतयुगात ध्यान, त्रेतायुगात यज्ञ, द्वापरयुगात अर्चा व कलियुगात नामजप केल्याने एकच फल प्राप्त होते, असे विष्णू पुराणात म्हटले आहे (६.२.१९).

युगधर्म नीट पाळला जात नाही, तेव्हा भगवान विष्णू धर्माची व्यवस्था लावण्यासाठी पृथ्वीवर अवतार घेतो, असे वायू पुराणात (९७.६५–६६) सांगितलेले आहे.

पौराणिक युगगणनेविषयी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी विवेचन केले आहे, ते असे –

गेल्या शतकापासून प्राचीन भारतीय साहित्याचा व संस्कृतीचा अभ्यास पाश्चात्य व भारतीय पंडितांनी ऐतिहासिक दृष्टीने सुरू केल्यामुळे पौराणिक युगगणनेचा नवीन अर्थ सापडला आहे. सध्या पुराणांत प्रसिद्ध असलेली युगे, मन्वंतरे व कल्प यांची गणनापद्धती ही दैव युगपद्धती आहे. तिचा व प्राचीन मानुष युगपद्धतीचा एकत्र घोटाळा झाल्यामुळे पौराणिक इतिहासाची कालव्यवस्था नीट समजेनाशी झाली. विष्णुपुराण, भागवत, इ. आधुनिक पुराणांनी मानुष युगगणना टाकून दिली. महाभारत, वायुपुराण, मत्स्यपुराण, इ. प्राचीन ग्रंथांत मानुष युगगणना केलेली सापडते.

श्री. काळे व श्री. दप्तरी यांनी मौर्यपूर्व कालाचा अभ्यास करून पुराणांतील स्वायंभुव मनूपासून मौर्यकालापर्यंतचा इतिहास कालगणनेच्या व इतर घडामोडींच्या दृष्टीने समंजसपणे रचून दाखवला आहे.

युगादितिथी – वैशाख शुद्ध तृतीयेला कृतयुग, कार्तिक शुद्ध नवमीला त्रेतायुग, भाद्रपद वद्य त्रयोदशीला द्वापरयुग व माघ पौर्णिमेला किंवा अमावास्येला कलियुग सुरू झाले, म्हणून त्या तिथींना युगादितिथी असे म्हणतात. त्या दिवशी उपवास, तप, दान, श्राद्ध, होम, जप, इ. अल्प प्रमाणात केले तरी त्याचे कोटिगुणित पुण्य लाभते, असे सांगितले आहे.

कलियुगाच्या व प्रत्येक युगाच्या आरंभी सर्व ग्रह अश्विनीच्या आरंभी एकत्र असतात, हे ज्योतिषग्रंथांतले युगारंभाचे लक्षण मनुस्मृती, महाभारत, इ. ग्रंथांत दिलेले नाही. उलट सूर्य, चंद्र, बृहस्पती व पुष्य एका राशीस येतात, तेव्हा कृतयुग सुरू होते, असे महाभारतात (वन. १९०.९०–९१) सांगितले आहे. कलियुगारंभी सर्व ग्रह एकत्र होते, ही वास्तविक स्थिती नाही, असे श्री. शं. बा. दीक्षित म्हणतात.

भूभौतिक युगे – सुमारे दोन अब्ज वर्षांपूर्वी पृथ्वी उत्पन्न झाली. तिचा पृष्ठभाग थंड व घन होऊन, त्यावर पाणी साचू लागल्यानंतर तिथे जीवसृष्टी उत्पन्न झाली. त्यापूर्वी सुमारे ८

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोटी वर्षांचा काळ संपला असावा, असे अनुमान शास्त्रज्ञांनी केले आहे. प्रथम अस्थिहीन जीवजंतू उत्पन्न झाले. मग मासे उत्पन्न झाले. नंतर मोठे सरपटणारे प्राणी उत्पन्न झाले. सुमारे पाच लक्ष वर्षांपूर्वी मानवाची उत्पत्ती झाली, असे मानले जाते.

सुमारे सहा लक्ष वर्षांपूर्वी पृथ्वीवर पहिला हिमप्रलय झाला. शास्त्रज्ञांच्या मते असे चार प्रलय झाले असावे. त्यांना हिमयुगे म्हणतात. त्या काळात बहुतेक सर्व पृथ्वी हिमाच्छादित असे व जीवसृष्टी जवळजवळ नष्ट झालेली असे. काही भाग उष्ण राहिल्यामुळे तिथली जीवसृष्टी सुरक्षित राहिली असण्याचा संभव आहे. हजारो वर्षांनंतर हवामान पुन्हा उष्ण होऊन जीवसृष्टी पुन्हा उत्पन्न होत असे किंवा राहिलेली वाढत असे. पुन्हा हिमप्रलय होईपर्यंतच्या मधल्या हजारो वर्षांच्या काळात ती सर्व पृथ्वीवर जोमाने नांदत असे. पहिल्या व दुसऱ्या हिमयुगांच्या मधल्या उष्ण कालखंडात मानवाचा जन्म झाला असावा. सुमारे २०,००० वर्षांपूर्वी शेवटले हिमयुग संपले, असे म्हणतात.

प्रारंभी मर्कटसदृश असणाऱ्या आदिमानवाने दगडाची हत्यारे बनवून आपला वेगळेपणा प्रकट केला. ती त्याची हत्यारे गारगोटीपासून बनवलेली व ओबड-धोबड होती. त्या काळाला प्राचीन अश्मयुग म्हणतात. ते अनेक लक्ष वर्षे चालू होते. त्यांतील शेवटच्या काही हजार वर्षांच्या काळात त्या रानटी मनुष्याने वेगळ्या दगडाची लहान उपकरणे बनवली. त्या कालखंडाला मध्य अश्मयुग म्हणतात. कालांतराने मनुष्य सुधारला, धान्ये पिकवू लागला आणि त्याला समृद्धी व स्वस्थता लाभली. त्यामुळे तो अधिक चांगली व घोटीव उपकरणे बनवू लागला. या कालखंडाला नवाश्मयुग म्हणतात. त्या कालखंडाच्या शेवटी मनुष्याला तांबे सापडले व तो त्या धातूची हत्यारे बनवू लागला. तांबे व कथील यांचे मिश्रण केल्यामुळे एक अधिक कठिण व टिकाऊ धातू मिळतो, त्याला कासे म्हणतात. त्याची उपकरणे अधिक उपयुक्त ठरली. नवाश्मयुगानंतरच्या कालखंडात तांबे व कांसे यांचा उपयोग मनुष्याने केल्यामुळे त्याला ताम्र-कांस्य-युग हे नाव मिळाले आहे. त्यानंतर लोह या धातूचा शोध लागला व लोहयुग सुरू झाले.

मानवाने जी उपकरणे बनवली, ती हळूहळू बदलत गेली. त्यांत विकास होत गेला. त्यामुळे त्याच्या राहणीत बदल होत गेला, सुखसोयींत वाढ झाली आणि समाजव्यवस्थेत व परस्पर संबंधांतही फरक पडला. यालाच युगपरिवर्तन म्हणतात. जगाच्या सर्व भागांत असे युगपरिवर्तन एकाच वेळी होते, असे नाही. एखाद्या प्रदेशातील मानवसमूहाने प्रथम प्रगती करून नवीन युगाला प्रारंभ केला, तरी इतर प्रदेशातील मानव मागासलेलाच असू शकतो. तरीही जगात नवे युग सुरू झाले, असे मानण्यास प्रत्यवाय नाही; कारण प्रगत मानव नवीन प्रकारच्या उपकरणांमुळे अधिक बलवान झालेला असतो आणि त्याचा जेव्हा अप्रगत मानवाशी संघर्ष होतो, तेव्हा त्यात प्रगत मानवाचा विजय होतो. त्यामुळे इतर मानवसमूहदेखील आपली प्रगती करून घेतात व नवीन युगात प्रवेश करतात किंवा नष्ट होतात.

नव्या युगाला प्रारंभ झाल्यानंतर त्या युगातील अधिक प्रभावी साधने व उपकरणे मोठ्या प्रमाणावर वापरली जात असली, तरी मागील युगातील साधने एकदम नाहीशी होत नाहीत; तर त्यांचा उपयोग कमी अधिक प्रमाणात चालू राहतो. उत्खननात एकाच जागी निरनिराळ्या युगांतील साधने सापडतात, त्याचे कारण हेच आहे. ज्या देशात नवे युग प्रथम सुरू होते, त्या देशातही मागील युगाचे अवशेष दीर्घ कालपर्यंत टिकून राहतात. [भा. ज्यो. शा.; क. हि. वा. पु.; पुराणम्, जुलै १९६९; वैं. सं. वि.; प्रा. भा. सं.; ज. इ.; ए. इं.– मजु; पु. चिं.]

युगंधर

एक प्राचीन जनपद. शाल्व साम्राज्याच्या सहा भागांपैकी हे एक असावे, असे काशिकावृत्तीवरून दिसते (४. १. १७३). महाभारताच्या वन (१२९.९), विराट (१. १३), इ. पर्वांत याचा उल्लेख आला आहे. वन पर्वात तर याला कुरुक्षेत्राचे प्रवेशद्वार असे म्हटले आहे. श्री. वासुदेवशरण अग्रवालांच्या मते हे स्थान अंबाला जिल्ह्यात असावे. त्याचप्रमाणे हा देश कुरुक्षेत्राच्या दक्षिणेला यमुनेच्या पश्चिम काठावर असावा, असे श्री. बिमलचरण लॉ यांचे मत आहे.

इथे राहणारे लोक यौगंधर अथवा यौगंधरक म्हणून ओळखले जात. तिथल्या राजाला यौगंधरी म्हणत. यौगंधर लोक उंट व गाढव यांचे दूध वापरीत, असे म्हणतात. [प. का. भा.; पा. का. भा. ; हि. जॉ. ए. इं. ; भा. बृ. इ. भाग २]

युगपुराण

गार्गीसंहितेच्या ११३ व्या अध्यायाला युगपुराण असे नाव आहे. एका हस्तलिखितात मात्र या अध्यायाला स्कंदपुराण असे म्हटले आहे. स्कंदाने विचारलेल्या प्रश्नाला शिवाने यात उत्तर दिले आहे, म्हणून कदाचित त्याला स्कंदपुराण असे नाव दिले असावे. पण या अध्यायाला दिलेले युगपुराण हे नाव अधिक योग्य आहे, कारण यात निरनिराळ्या युगांचे वर्णन आलेले आहे.

निरनिराळ्या युगांची वैशिष्ट्ये काय, असा प्रश्न स्कंदाने या पुराणाच्या सुरुवातीला शिवाला विचारला आहे आणि शिवाने त्याला उत्तर दिले आहे. चारही युगांचे शिवाने केलेले वर्णन पुढीलप्रमाणे आहे–

कृतयुगात माणसे सूर्यासारखी तेजस्वी होती. त्यांचे आयुष्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एक लाख वर्षे होते. लोकांना रागलोभ माहीत नव्हते. झाडे फळांनी लगडलेली होती आणि जमिनीत भरपूर धान्य पिकत होते. माणसांप्रमाणेच त्या काळी देव, गंधर्व, किन्नर, दानव, यक्ष, राक्षस व उरगही राहत होते. 'कृतयुगाच्या शेवटी फार मोठे युद्ध होईल व त्यात देव, गंधर्व, ऋषी वगैरेंचा फार मोठ्या प्रमाणात संहार होईल,' अशी भविष्यवाणी यात वर्तविली आहे.

त्रेतायुगात ज्ञान व धार्मिक विधिविधाने यांची वाढ झाली. या युगातील ब्राह्मण वेदपारंगत होते आणि अरण्यात राहत होते. प्रत्येक वर्णाचे लोक आपापली कर्मे आचरीत होते. माणसाचे आयुष्य दहा हजार वर्षे होते. याच युगात नंतरच्या काळात माणसांमध्ये राग व लोभ यांचा प्रादुर्भाव झाला. याच युगाच्या अंती परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली.

द्वापरयुगात माणसाचे आयुष्य एक हजार वर्षे झाले. या युगातील लोक वृत्तीने धार्मिक होते आणि आपापल्या वर्णाश्रम-धर्माला उचित अशी कर्मे करीत होते. या युगाच्या अंती भारतीय युद्ध झाले.

कलियुगाचे वर्णन अनेक राजकीय घटनांनी भरलेले आहे. कलियुगाच्या प्रारंभी राजा जनमेजयाचा ब्राह्मणांशी खटका उडाला, असे सांगितले आहे. पुढे राजा उदायीने पाटलिपुत्र नगराची स्थापना केली, अशी घटना दिली आहे. त्यानंतर शालिशुक नामक एका दुष्ट व युद्धप्रिय राजाचा उल्लेख आहे. त्यानंतर यवन, पांचाल व माथुर यांनी साकेतावर केलेली स्वारी, साकेत जिंकल्यानंतर त्यांनी पाटलिपुत्राचा केलेला पाडाव, मग विजेत्यांमधील अंतर्गत कलह आणि यवनांचे उच्चाटन, इ. काही राजकीय घटना यात वर्णिल्या आहेत. [युगपुराणम्– संपा. डी. आर्. मंकड, चारुतर प्रकाशन, वल्लभविद्यानगर]

युगलअली (इ. स. चे १९ वे शतक) एक रामभक्त कवी. याने रामचंद्रविलास या नावाचा एक ग्रंथ झाशी-मध्ये रचला. या ग्रंथाचे बारा अध्याय आहेत. त्यात रामाच्या विवाहापासून पुन्हा मिथिलागमनापर्यंतचा कथाभाग वर्णिला आहे. यातले विवाहोत्तर देवपूजन, मत्स्यवेध, सीताकृत स्वयंपाक, इ. भाग सरस आहेत. मत्स्यवेधलीला ही यातील एक अभिनव कल्पना आहे. तिचे स्वरूप असे – एका दोरीला मासा बांधलेला असतो आणि ती दोरी सीतेच्या हातात असते. त्या माशाचा वेध रामचंद्र करू पाहतो; पण सीतेच्या कौशल्याने मत्स्यवेध होत नाही.

याव्यतिरिक्त प्रस्तुत कवीचा भावनामृत कादंबिनी नावाचा रसभावावरील एक छोटासा ग्रंथ आहे. साहित्यशास्त्राच्या दृष्टीने हा ग्रंथ मोलाचा मानतात. [रा. भ. ज्ञा.; रा. सा. म. उ.]

युगान्त श्राद्ध एक काम्य व्रत. याची माहिती पुढीलप्रमाणे– सूर्य सिंह राशीत असताना कृतयुग संपले, वृश्चिक राशीत असताना त्रेतायुग संपले, वृषभ राशीत असताना द्वापरयुग संपले. कुंभ संक्रांतीत गेल्यावर कलियुगाचा शेवट होईल. या सर्व संक्रांतीना श्राद्ध करावे. कारण युगाच्या प्रारंभी व युगांती श्राद्ध केले असता, ते अक्षय्य होते.

श्राद्ध करणे हाच या व्रताचा प्रधान विधी होय. फल–दीर्घायुष्य व स्वर्ग यांची प्राप्ती. [हि. ध.; पु. चि.]

युगादिव्रत कृत, त्रेता, द्वापर व कली या युगांचा प्रारंभ अनुक्रमे वैशाख शुद्ध तृतीया, कार्तिक शुद्ध नवमी, भाद्रपद वद्य त्रयोदशी आणि माघ पौर्णिमा किंवा अमावास्या या दिवशी झाला. या तिथींना केलेले उपवास, दान, तप, जप व होम यांचे फल सामान्य फलापेक्षा एक कोटीवर अधिक असते, असे सांगितले आहे. याचा विधी असा– वैशाख शुद्ध तृतीयेला नारायण व लक्ष्मी यांची पूजा करून लवणधेनू दान द्यावी. कार्तिक शुद्ध नवमीला शिव व उमा यांची पूजा करावी आणि तिलधेनू दान द्यावी. भाद्रपद वद्य त्रयोदशीला पितरांचा सन्मान करून माघ अमावास्येला गायत्रीसह ब्रह्मयाची पूजा करावी आणि नवनीतधेनू दान द्यावी. फल–विचार, उच्चार व आचार यांमुळे घडलेल्या पापांचा निरास. [हि. ध.]

युगावतार भगवान विष्णू प्रत्येक युगात अवतार घेतो, असे पुराणांनी मानले आहे. गीतेतील 'सम्भवामि युगे युगे' = मी प्रत्येक युगात जन्म घेतो (भ. गी. ४.८) या वचनाच्या आधारावर पुराणांनी या अवतारांची कल्पना केलेली आहे. विष्णू पुराणात या अवतारांचे विस्तृत वर्णन आलेले आहे, ते असे –

विष्णू प्रत्येक युगात अवतार घेऊन वैदिक धर्माच्या अनुयायांचे रक्षण करतो. प्रत्येक चतुर्युगानंतर वेदांचा लोप होतो, असे सांगितले आहे. त्या वेळी विष्णूप्रमाणेच सप्तर्षी स्वर्गातून पृथ्वीवर अवतरतात आणि वैदिक धर्माचा पुन्हा प्रचार करतात. त्याचप्रमाणे प्रत्येक कृतयुगाच्या आरंभी स्मृतिकार मनू पुनर्जन्म घेतो. कृतयुगात भगवान विष्णू सर्व प्राणिमात्राच्या कल्याणासाठी कपिल मुनीचे रूप धारण करून लोकांना परम ज्ञानाचा उपदेश करतो. त्रेतायुगात तो चक्रवर्ती भूपाल होऊन दुष्टांचे दमन करतो आणि जगाचे रक्षण करतो. द्वापरयुगात तो वेदव्यासांचे रूप धारण करतो आणि वेदांचे चार भाग करून, मग त्यांचा शेकडो शाखांत विस्तार करतो. कलियुगात तो कल्कीचे रूप घेऊन दुराचारी लोकांना सन्मार्गाकडे प्रवृत्त करतो. [म. सा. अ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

युगावतारव्रत भाद्रपद वद्य त्रयोदशीला द्वापर युगाचा प्रारंभ झाला असे म्हणतात. म्हणून त्या तिथीला हे व्रत करतात. याचा विधी असा – अंगाला गोमूत्र, गोमय, दूर्वा व विकणमाती लावावी आणि पाण्याच्या डोहात किंवा तलावात स्नान करावे. या स्नानामुळे गयाश्राद्ध केल्याचे फल मिळते. विष्णुमूर्तीला तूप, दूध आणि शुद्धोदक यांनी स्नान घातल्यास विष्णुलोकाची प्राप्ती होते. [हि. ध.]

युधिष्ठिरशक यालाच कलिकाल, कलियुगसंवत किंवा भारत-युद्धसंवत अशीही नावे आहेत. याचा आरंभ सनपूर्व ३१०२ च्या फेब्रुवारी महिन्याच्या १८ व्या दिनांकास झाला, असे म्हणतात. कालगणनेत या संवताचा उपयोग ज्योतिषग्रंथांत आणि पंचांगात करतात. ताम्रपटादी लेखांत याचा फारसा उपयोग आढळत नाही. शकात ३१७९ व इसवी सनात ३१०२ मिळवून गत कलिवर्ष निघते.

कलीची तीन सहस्र तीनशे दहा वर्षे झाल्यावर नंदराज्य सुरू झाले; शूद्रक राजा कलीची ३२९० वर्षे गेल्यावर राज्य करील; असे या संवताचे उल्लेख स्कंद पुराणात (१.२.४०) आलेले आहेत. पाहा– कलियुग. [सं. मि.; प्रा. च. को.]

युद्धविद्या मानवाच्या प्राथमिक अवस्थेत त्याला स्वसंरक्षणासाठी निसर्गाशी व जंगली पशूंशी झगडावे लागत होते. त्या वेळी तो दगडाची ओबड–धोबड हत्यारे वापरीत होता. कालांतराने तो सुधारला, मानवी संस्कृतीचाही विकास झाला; परी त्याच्या जीवनातला संघर्ष मात्र कमी न होता उलट वाढला. कारण निरनिराळे मानवसमूह आपापसांत झगडू लागले. मानवसमाजात निरनिराळी कुळे उत्पन्न झाल्यानंतर त्यांचे परस्पर संघर्ष सुरू झाले. भिन्न भिन्न भूभागांवर वेग वेगळी राष्ट्रे प्रस्थापित झाल्यावर त्यांचे हितसंबंध वेगळे झाल्यामुळे त्यांच्यांतही परस्पर संघर्ष सुरू झाले. अशा संघर्षांनाच युद्ध म्हणतात.

मानवाचा अहंकार, दुसऱ्यावर वर्चस्व स्थापण्याची ईर्षा, आवश्यकतेपेक्षा अधिक संपत्ती मिळविण्याची हाव, इ. विविध कारणांमुळे युद्धे सुरू होतात. धर्मभिन्नता, वंशभिन्नता, सत्तास्पर्धा, आर्थिक स्पर्धा, भूस्वामित्वाचा वाद, आक्रमक वृत्ती, इ. कारणांमुळेही निरनिराळ्या राष्ट्रांची युद्धे होतात. मानवजातीचा सर्व इतिहास हा अशा युद्धांचाच आहे. पृथ्वीच्या पाठीवर कुठे ना कुठे निरनिराळ्या मानवी समूहांचे युद्ध सतत चालूच असते. त्याचे स्वरूप भिन्न असते एवढेच. युद्धप्रियता ही मनुष्याची उपजत भावना असून, ती कोणाच्याही उपदेशांमुळे कमी झालेली नाही. गौतम बुद्ध, महावीर, येशू ख्रिस्त, म. गांधी, इ. थोर पुरुषांनी अहिंसा व शांती या तत्त्वांचा उद्घोष केला, त्यासाठी सारे जीवन व्यतीत केले; पण त्यांचे सारे प्रयत्न व्यर्थ ठरले. जगातील युद्धे थांबली नाहीत व शांतता प्रस्थापित झाली नाही.

प्रागैतिहासिक काळ – आर्य लोक भारतात आले त्यापूर्वी इथे वसलेले लोक बरेच सुसंस्कृत होते, असे म्हणतात. त्यांनी स्वसंरक्षणासाठी भक्कम दुर्ग, कोट व पुरे बांधली होती. त्यांचे अवशेष आता सापडले आहेत. त्यांत तलवार, भाला, कट्यार, धनुष्यबाण, गदा, गोफण, इ. आयुधे मिळाली आहेत. त्या काळातील आयुधे तांबे व कासे या धातूंची बनवलेली होती. गदेला मात्र दगडी गोळा लावलेला असे. त्या आर्यपूर्व संस्कृतीला सिंधु-संस्कृती हे नाव देण्यात आले आहे. तिची जोपासना करणाऱ्या लोकांचा आर्य लोकांनी पराभव केला. कारण आर्यांच्या जवळ त्यांच्यापेक्षाही प्रभावी अशी लोहाची शस्त्रे होती. ते रथही वापरीत होते. या अनार्य लोकांना ऋग्वेदात दास, दस्यू, अनास ही नावे दिलेली आहेत. आर्यावर्तात आपल्या वसाहती स्थापताना आर्य लोकांना त्या अनार्य लोकांशी बराच काळ सतत युद्ध करावे लागले. आर्य लोकांच्या निरनिराळ्या टोळ्यांमध्येही नेहमी संघर्ष चालत असे. अशा युद्धांचे अनेक उल्लेख वेदांत आढळतात. इंद्र हा वैदिक आर्यांचा लढवय्या व सर्वश्रेष्ठ देव होता. आर्य लोक विजयासाठी त्याची प्रार्थना करीत.

वैदिक युगात आर्यांची कायमची सेना नसे. समाजातील सर्व सुदृढ लोक शस्त्रधारी असून, युद्धाचा प्रसंग येताच ते एकत्र जमत व लढाईत भाग घेऊन नेत्याला साहाय्य करीत. कालांतराने अशा युद्धकुशल लोकांचा एक वर्गच निर्माण झाला व त्याला क्षत्रिय हे नाव मिळाले. समाजाचे संरक्षण करणे हे त्याचे कर्तव्य ठरले.

आर्य लोकांचे कित्येक विभाग होते, त्यांना जन म्हणत. त्यांच्या नेत्याला राजा म्हणत. राजाचा पुरोहित युद्धप्रसंगी प्रार्थना व मंत्र म्हणून राजाला साहाय्य करीत असे.

रथी व पदाती हे सैन्याचे मुख्य भाग होते. घोड्यांचा उपयोग रथाला जोडण्यासाठी केला जात असे; स्वारीसाठी तो होत नसे. हत्तींचा उपयोगही युद्धासाठी केला जात नव्हता. प्रमुख योद्धा रथात बसून धनुष्य व बाण या शस्त्रांनी शत्रु-सेनेवर मारा करीत असे. असा एकेक रथारूढ योद्धा हजारो पदाती सैनिकांना मारू शकत असे. धनुष्य-बाण हे त्या काळातले मुख्य शस्त्र होते. धनुर्विद्येतील प्रावीण्य हेच योद्धयाच्या श्रेष्ठतेचे लक्षण मानले जात होते. संपूर्ण युद्धविद्येलाच धनुर्वेद हे नाव मिळाले होते आणि तो यजुर्वेदाचा उपवेद मानला जात असे. आर्य लोकांचा धनुष्यावर दृढ विश्वास होता. त्याविषयी ऋग्वेदातील एक ऋचा अशी–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धन्वना गा धन्वनाजिं जयेम धन्वना तीव्राः समदो जयेम ।
धनुः शत्रोरपकामं कृणोति धन्वना सर्वाः प्रदिशो जयेम ।।
(ऋ. ६.७५.२)

भावार्थ– धनुष्याच्या साहाय्याने आम्ही शत्रूचे गोधन जिंकू. धनुष्याच्या बळावर आम्ही शत्रूचा पाडाव करू. धनुष्याच्या योगाने शत्रूच्या कडव्या सैन्यावर जय मिळवू. हे आमचे धनुष्य शत्रूचे सर्व मनोरथ हाणून पाडो. धनुष्याच्या साह्याने आम्ही सर्व देशांतील शत्रूंवर विजय निश्चित मिळवू.

वज्र व चक्र ही देवांची आयुधें होती. इंद्राचे वज्र म्हणजे आग्नेय अस्त्र असावे. चक्र हे गरगर फिरवून फेकण्याचे यंत्र होते. शतघ्नी नावाचे मोठें शस्त्र होते. त्याने एका वेळी शंभर माणसे मारता येत. याव्यतिरिक्त खड्ग, भाला, परशू, गोफण-गुंडा, इ. शस्त्रांचे उल्लेख वेदांत आढळतात. अथर्ववेदात (८.८) शस्त्रे व इतर युद्धसामग्रीचाही निर्देश आहे. वैदिक योद्धे ध्वज व दुंदुभी यांचा उपयोग करीत होते. शरीराचे संरक्षण करण्यासाठी योद्धे लोहाचे कवच व शिरस्त्राणही वापरीत होते.

महाकाव्यकाळ – आर्य लोकांनी उ. भारतात सर्वत्र वसाहती स्थापन केल्यानंतर द. भारतातही आपल्या संस्कृतीचा प्रसार सुरू केला. त्या कामी त्यांना राक्षसांचा विरोध होऊ लागला. ऋषि-मुनी निरनिराळ्या प्रदेशांत जाऊन तिथे आश्रम स्थापून यज्ञयाग करीत, तेव्हा राक्षस त्यांच्या आश्रमांचा व यज्ञांचा विध्वंस करीत. राक्षसांना यज्ञसंस्कृती ही परकी होती. व त्यामुळे तिच्याबद्दल त्यांना तीव्र द्वेष होता. म्हणून यज्ञकर्ते ऋषि-मुनी क्षत्रिय राजांची मदत मागत. अशा एका यज्ञाच्या संरक्षणासाठीच विश्वामित्र ऋषीने राम व लक्ष्मण यांना बोलावून नेले होते. आर्य व राक्षस यांच्या या संघर्षाचे पर्यवसान राम-रावणयुद्धात झाले होते. रामायणात अनेक युद्धांचे वर्णन आहे.

त्या काळी राजा हा शासनव्यवस्थेप्रमाणेच सेनेचाही मुख्य असे. मात्र सेनेच्या मुख्य अधिकाऱ्याला सेनापती म्हणत. त्याच्या हाताखाली अनेक अधिकारी असत. सेनेचे पदाती, अश्वारोही, रथी व गजारोही असे चार विभाग असत. म्हणून तिला चतुरंगबल म्हणत. पदातींचेही तलवार व भाले वापरणारे आणि धनुष्य-बाण वापरणारे असे दोन भाग होते. तलवारी तीन प्रकारच्या होत्या. असी म्हणजे लांब तलवार, खड्ग म्हणजे लहान व ऋष्टी म्हणजे दुधारी तलवार होय. धनुष्याला कोदंड हे नाव होते. कूट म्हणजे लपविलेली कट्यार होय. लोहदंडाला वज्र म्हणत. मुद्गर म्हणजे लोखंडी हातोडा. याव्यतिरिक्त शूल, परशू, चक्र, त्रिशूल, शक्ती, अशनी (गदा), शतघ्नी, इ. विविध आयुधे त्या काळी वापरली जात. तथापि बाण हेच प्रमुख शस्त्र मानले जात होते. बाण अमोघ व्हावा म्हणून तो सोडताना मंत्र जपण्याची पद्धत होती. अशा प्रकारे अभिमंत्रित बाणाला अस्त्र म्हणत. बाणांचे अनेक आकार व प्रकार होते. त्यांच्या टोकांना विष लावण्याचीही प्रथा होती. आर्यावर्तात सैनिकांचा एक वेगळा वर्गच होता. त्यांना भट किंवा योध म्हणत. क्षत्रियांपैकी जे केवळ युद्ध हाच व्यवसाय करीत, त्यांचा या वर्गात समावेश होत असे. राक्षसांमध्ये मात्र असा वेगळा वर्ग नसे. त्यांचे सर्व पुरुष लढत असत. रामराज्यातील सैनिकांना शस्त्रविद्येचे उत्तम शिक्षण दिले गेले होते. या सैनिकांना साम, दाम, दंड, भेद, इ. मार्गांचाही अभ्यास करावा लागे. एवढेच नव्हे; तर त्यांच्या बाबतीत वेदांचे ज्ञानही अपेक्षित असे. सैनिकांना चांगले वेतन आणि वेळोवेळी बक्षिसी व सुखोपभोग मिळत. त्या काळातील सैनिकांना सुंदर वस्त्रालंकार वापरण्याची हौस होती. ते सुरापानही करीत. त्यांचे जीवन विलासी होते. तथापि सैन्यात कडक शिस्त ठेवली जात असे. अपराधी व भित्र्या सैनिकांना कडक शिक्षा केली जात असे.

त्या काळात सैन्याची व्यवस्था चांगली ठेवली जात असे. सैन्यातील हत्ती व घोडे यांची निगा राखण्यासाठी सेवक ठेवलेले असत. सैन्यासाठी अन्नपाणी व इतर सामान पोचवणे, रस्ते, आणि पूल, तंबू, इत्यादींची व्यवस्था करणे यासाठी स्वतंत्र पथके असत. शत्रूच्या हालचालींची बातमी काढण्यासाठी गुप्तचरही नेमलेले असत.

रामायणकाली सैनिकांना नीतिधर्म कटाक्षाने पाळावा लागे. युद्धातून माघार घेऊन पळून जाणे हे लांछन व युद्धभूमीवर प्राणत्याग करणे हे भूषण मानले जाई. स्त्रिया, निःशस्त्र पुरुष व शरणागत सैनिक यांना मारणे हे पाप मानलेले होते. झोपलेल्या, दमलेल्या, निःशस्त्र किंवा बेशुद्ध शत्रूवर वार करणेही निंद्य मानलेले होते. शत्रूच्या गुप्तचराला पकडून मारणे योग्य, पण शत्रूच्या दूताला मारणे अनुचित समजले जाई.

महाभारतात युद्धविद्येचे स्वरूप अधिक विकसित झालेले दिसून येते. कौरव–पांडवांच्या काळात भारतात असंख्य राज्ये प्रस्थापित झालेली होती आणि त्यांच्यांत सतत स्पर्धा चालू असे. त्यामुळे त्यांच्यांत वारंवार युद्धे होत. त्या काळी सैन्याची व्यवस्था अगदी उत्कर्षाला पोचली होती, असे चिं. वि. वैद्य म्हणतात. ती युद्धे आर्य लोकांतच आपसांत होत असल्यामुळे धर्मयुद्धाच्या नियमांप्रमाणे चालत. त्या नियमाचा अतिक्रम योद्ध्याकडून बहुधा होत नसे.

प्रत्येक राज्यात कायमची सेना असे. सैनिकांना कित्येक वर्षे चांगले शिक्षण देण्यात येत असे. ही प्रथा रामायणकालापासून प्रचलित होती. प्रशिक्षित सैन्यापुढे अशिक्षित सैनिक निरुपयोगी ठरतात, असे महाभारतात म्हटले आहे (शांति. १०).

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सैनिकांना शस्त्रविद्येप्रमाणेच झाडावर चढणे, घोड्यावर बसणे, हत्तीवरून किंवा रथातून तिरंदाजी करणे, दुर्गात शिरणे व त्यातून बाहेर येणे, असे विविध प्रकारचे शिक्षण दिले जात होते. त्यांना वेळच्या वेळी पुरेसे वेतन व प्रसंगाप्रमाणेच भत्ते देऊन संतुष्ट ठेवावे, असे नारदाने युधिष्ठिराला सांगितले आहे (सभा. ५. ४८, ४९, ५७). तसेच रणात मरण पावलेल्या वीरांच्या कुटुंबांचे पोषण करणे, हेही चांगल्या राजाचे कर्तव्य समजले जात असे. सैन्यात सर्व वर्णांतले तरुण प्रवेश करीत होते.

चतुरंग दल – पायदळ, घोडदळ, गजदळ व रथ ही सेनेची मुख्य अंगे होत. पायदळातील सैनिकांजवळ ढाल व तलवार ही आयुधे असत. भाला, परशू, भिंडीपाल, तोमर, ऋष्टी, शुक्ल, इ. आयुधेही ते कधी कधी वापरीत. गदा हे सामान्य सैनिकाचे अस्त्र नव्हते. बलवान योद्धाच ते वापरू शके. द्वंद्वयुद्धात किंवा हत्तीशी लढताना गदेचा उपयोग करीत. घोडेस्वारांजवळ तलवार व भाला ही शस्त्रे असत. गांधार, सिंधू व सौवीर हे देश अश्वदळाविषयी प्रसिद्ध होते. पदाती व अश्वारोही हे बहुधा कवच किंवा चिलखत वापरीत नसावे, कारण ते जड असते. रथी व गजारोही योद्धे मात्र नेहमी कवच वापरीत. कारण त्यांच्यावर बाणांचा वर्षाव होई. हत्तीच्या सोंडेवर व पायांवरही चिलखत घालण्याची प्रथा होती. हत्ती आपल्या प्रचंड शक्तीने असंख्य सैनिकांना ठार मारू शकत. त्यामुळे प्राचीन काळी गजदळाला फार महत्त्व होते. पण हत्तीच्या पोटाखाली चपळाईने घुसून केवळ मुष्टिप्रहारांनी त्याचा प्राण कासावीस करणारे बलवान मल्लही होते (द्रोण. २६). हत्तीवर बसणारा योद्धा धनुष्य-बाण किंवा शक्ती ही आयुधे वापरीत असे. गजदळ शत्रूला भयप्रद होते; पण पराभूत हत्ती मागे फिरून पळताना स्वपक्षाचीही भयंकर हानी करीत.

रथी हा प्राचीन काळातला सर्वांत श्रेष्ठ योद्धा होय. तो जवळजवळ अजिंक्य असून, शरवर्षावाने शत्रुसेनेची दाणादाण करू शके. भारतीय रथ व धनुष्य-बाण खूप मोठे होते. बाणांची गती व शक्ती एवढी असे की, त्यांच्या आघाताने लोखंडाचे जाड पत्रेही फोडले जात. धनुर्धराच्या अंगी उपजत, ईश्वरदत्त कला असली, तरी सतत अभ्यास केल्यानेच अचूक नेम साधतो व वेगाने शरवर्षाव करता येतो, असे महाभारतात सांगितले आहे (आदि. १३२). रथामुळे धनुर्धराचे सामर्थ्य दसपट वाढते. कारण त्याला बरेच बाण जवळ ठेवता येतात आणि वेगाने रणसंचार करता येतो. महाभारतात रथ्यांच्या द्वंद्वयुद्धांची वर्णने पुष्कळ जागी केलेली आहेत. अस्त्रांचा उपयोग बहुधा रथी करीत. त्यामुळेच असे योद्धे दुर्जय ठरत. अस्त्रविद्या धनुर्विद्येहून अगदी भिन्न होती. धनुर्विद्या ही मानवी विद्या आहे, तर अस्त्रविद्या दैवी आहे. अस्त्रविद्या प्राप्त होण्यासाठी तपश्चर्या करावी लागे; मग ती देवतेच्या किंवा गुरूच्या प्रसादाने एका क्षणात प्राप्त होत असे. अस्त्रांचे वैदिक मंत्र विशेष प्रसंगी योद्धा विसरून जाण्याचाही संभव असे. एकंदरीत अस्त्रांचा उपयोग क्वचित प्रसंगीच केला जात असे.

प्राचीन काळी युद्धामध्ये द्वंद्वयुद्धाला बरेच उच्च स्थान होते. काही प्रसंगीं मोठ्या योद्ध्यांचे द्वंद्वयुद्धच निर्णायक मानले जात असे. दोन्ही पक्षांची चतुरंग दले युद्धासाठी समोरासमोर उभी राहिलेली असतानाही त्यांच्या सेनानींचे धनुर्युद्ध, गदायुद्ध किंवा मुष्टियुद्ध होऊन त्यात जो विजयी होई, त्याच्या पक्षाचा जय झाला असे मानले जाई. भारतीय महायुद्धात अशी कित्येक द्वंद्वयुद्धे झाली. त्याचप्रमाणे मल्लयुद्ध (कुस्ती) व गदायुद्ध करून भीमसेनाने जरासंध व दुर्योधन यांना ठार मारले, अशीही उदाहरणे आहेत.

मुष्टियुद्ध – वेदकालापासून या प्रकारच्या युद्धाचे माहात्म्य होते. केवळ मुष्टीच्या माराने शत्रूला नामोहरम करणारे योद्धे होते. वेदांमध्ये मुष्टियुद्धाचे बरेच उल्लेख आढळतात. सर्व सैन्यामध्ये जे बलिष्ठ योद्धे असतात, त्यांत मुष्टियुद्ध करणारा वीर प्रमुख होय, असे एका जागी म्हटले आहे (ऋ. ८.२०.२०) साधे सैनिकही आपल्या मुठींनी शत्रुसैनिकांना मारीत. महाभारतात व पुराणांत मुष्टियुद्धांची वर्णने जागोजागी केलेली आहेत. राक्षसांशी लढताना बहुतेक वीर मुष्टियुद्धच करीत.

मल्लयुद्ध – प्राचीन काळी हा केवळ खेळ नसून, शत्रूला मारण्यासाठीही त्याचा उपयोग होत असे.

गदायुद्ध – काही योद्धे गदायुद्धात अत्यंत प्रवीण होते. बलराम हा गदायुद्धात सर्वश्रेष्ठ मानला जात होता. हनुमान, भीम, दुर्योधन हे गदायुद्धाबद्दल प्रसिद्ध आहेत. काही प्रसंगी बाहू, मुष्टी, गदा, इ. विविध साधनांचा उपयोग करून प्रतिपक्षाला ठार मारल्याची उदाहरणे आहेत. गदायुद्धात पुष्कळदा गदेवर गदा आपटून त्यांचे तुकडे होत. मग योद्धे मुठींनी प्रहार करू लागत; काहीजण लत्ताप्रहारही करीत.

शिलायुद्ध – लहान मोठ्या दगडांचाही उपयोग युद्धात केला जात असे. रामाची वानरसेना मोठाले पाषाणखंड किंवा वृक्ष राक्षसांवर फेकून त्यांना घायाळ करीत होती. लहान, कोचदार दगड गोफणीने किंवा यंत्राने शत्रूवर मारण्याचीही पद्धत होती.

पाशयुद्ध – पाश हे काही देवतांचे आयुध होते. पाशाचा उपयोग बहुधा देवांनीच केलेला आढळतो. पुराणांत पाशयुद्धाची वर्णने आहेत. कापसाच्या किंवा मुंज गवताच्या दोरीचा पाश बनवीत. तो दहा हात लांब असे. डाव्या हातात पाश धरून, उजव्या हाताने दोरी लांब ओढून, गोल कडे करून व ते गरगर फिरवून शत्रूच्या मस्तकावर फेकले जात असे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चक्रयुद्ध – श्रीकृष्णाचे सुदर्शन चक्र प्रसिद्ध आहे. ते विलक्षण सामर्थ्यवान होते. साधी चक्रेही वापरली जात. शक्ती, तोमर, इ. शस्त्रे चक्राच्या आघाताने तोडता येत असत. मुंड दैत्याने देवीवर अनेक चक्रे फेकली, असे वर्णन मार्कंडेय पुराणात आहे. देवीनेही आपल्या चक्राने त्याची शस्त्रे तोडून टाकली.

पशुयुद्ध – निरनिराळ्या पुराणांत बैल, हत्ती, वराह, इ. पशूंशी वीरांनी केलेल्या युद्धांची वर्णने आहेत. त्यांत शक्तीबरोबरच डावपेच व चपळता यांची विशेष आवश्यकता असे.

धर्मयुद्धाचे नियम – भारतीय महायुद्धाच्या काळी धर्मयुद्धाचे बरेच नियम रूढ होते. धर्म म्हणजे दया याच तत्त्वाचा अवलंब त्यात केलेला दिसतो. धर्मयुद्धात विषदिग्ध बाण व कर्णी म्हणजे अंकुशयुक्त बाण वापरू नयेत, असा नियम होता. रथीने रथीवर, हत्तीने हत्तीवर व घोडेस्वाराने घोडेस्वरावर हल्ला करावा, असाही नियम होता. पण या नियमामुळे संकुलयुद्ध होणे शक्य नाही. द्वंद्वयुद्धाचा हा नियम असावा, असे दिसते. भग्नशस्त्र झालेला, प्रत्यंचा तुटलेला, कवच निघालेला किंवा वाहनाचा नाश झालेला असा प्रतिपक्षी असेल, तर त्याच्यावर प्रहार करू नये, असाही नियम होता (शांति. ९५). युद्धात जखमी झालेल्या शत्रूला औषधोपचार करून त्याच्या देशात परत पाठवावे, असेही सांगितले आहे.

धर्मयुद्धाचे नियम राजाने कधीही मोडू नयेत; मग त्यामुळे मरण आले तरी ते उत्तम, असे शांतिपर्वात सांगितले आहे. परंतु कालांतराने हा नियम बदललेला दिसतो. धर्मयुद्धात कपट, प्रजेला त्रास, शेतांचा नाश. इ. गोष्टी निषिद्ध होत्या. पण कूटयुद्धात तो निषेध राहिला नाही. शत्रूचे राज्य उद्ध्वस्त करण्यासाठी आग लावणारे, विष कालवणारे, दरवडेखोर व जंगली लोक यांना पाठवून त्या प्रदेशात जाळपोळ व लुटालूट करावी; पिण्याचे पाणी विषाने दूषित करावे, शेतातले धान्य कापून टाकावे, झाडे तोडावी, फितुरी करावी, हे धोरण धर्मयुद्धातील नियमांच्या अगदी विरुद्ध आहे. हा बदल बहुधा ग्रीक लोकांच्या स्वारीनंतर झाला असावा, असे चिं. वि. वैद्यांचे मत आहे. वाटेल ते करून शत्रूचा पाडाव करावा; युद्धात सर्व गोष्टी योग्य असतात, हे तत्त्व हिंदू लोकांनी ग्रीकांपासून उचलले, असे ते म्हणतात.

राज्याचे संरक्षण कसे करावे, याविषयी महाभारतात विस्तृत विवेचन केलेले आढळते (शांति. ६९). शाल्व राजाने द्वारकेला वेढा घातला, तेव्हा द्वारकेच्या संरक्षणाची कशी सिद्धता होती, त्याचे वर्णन वनपर्वात केले आहे. तिथे जागोजागी तोफा व यंत्रे लावली होती. तटाच्या बुरुजांवर मोर्चे बांधलेले होते. शत्रूने सोडलेल्या गोळ्यांना प्रतिरोध करण्यासाठी आयुधे होती. अग्नी उत्पन्न करणारी द्रव्ये भरलेले गोळे उडविणारी यंत्रे होती. नगरीत निरनिराळ्या जागी गुल्मसंज्ञक भागावर आरूढ झालेले सैनिक शत्रूवर प्रहार करण्यासाठी टपून बसलेले होते. कोणीही गैरसावध असू नये व मद्यपान करू नये, अशी दवंडी पिटविली गेली होती. नगरीत असलेले आनर्तदेशवासी नट, नर्तक, गवई यांना बाहेर घालवून दिले होते. जलमार्गाने नौकांचे जाणेयेणे बंद होते. सभोवार एक कोसापर्यंत सुरुंग लावून ठेवलेले होते. राजाचे अनुमतिपत्र दाखवल्यावाचून कोणालाही नगरीच्या आत–बाहेर जाता येत नसे.

शाल्वाने विमानात बसून नगरीच्या वर जाऊन, तिथून दगड व बाण यांचा वर्षाव केला, असेही वर्णन महाभारतात आहे.

महाभारतात सैन्याचे जे रूपवर्णन केले आहे, ते असे – एक गज, एक रथ, तीन अश्व व पाच पदाती यांना मिळून एक पत्ती अशी संज्ञा होती. ३ पत्तींचे एक सेनामुख; ३ मुखांचे १ गुल्म; ३ गुल्मांचा १ गण; ३ गणांची १ वाहिनी; ३ वाहिनींची १ पृतना; ३ पृतनांची १ चमू; ३ चमू म्हणजे १ अनीकिनी; व १० अनीकिनी म्हणजे १ अक्षौहिणी अशी व्यवस्था होती. यावरून एका अक्षौहिणीत २१,८७० रथ, तितकेच हत्ती, ६५,६१० अश्व व १,०९,३५० पदाती असत, असे कळते. पण हे वर्णन तितकेसे बरोबर वाटत नाही. कारण गजदळ, रथदळ, अश्वदळ व पायदळ निरनिराळे असे. अक्षौहिणीत निरनिराळ्या दळांचे एकमेकांशी प्रमाण कसे असावे, एवढेच वरील वर्णनावरून ध्यानात येते. युद्धभूमीवर सैन्य कसे उभे करावे, हे शांतिपर्वात (९९) सांगितले आहे. अगदी पुढे गजदळ, त्याच्या मध्यभागी रथ, रथांच्या मागे घोडेस्वार व त्यांच्या मध्यभागी कवच धारण केलेले पायदळ ठेवावे, म्हणजे राजाचा जय होतो, असे म्हटले आहे. एका रथावर चार योद्धे बसू शकत. हत्तीवर आठ योद्धे असत; त्यांत २ अंकुशधारी, ३ धनुर्धर, २ खड्गधर व १ शक्तिधारी असे.

भारतीय युद्धात सैन्याचे जे व्यूह रचण्यात आले होते, त्यांचे वर्णन महाभारतात केले आहे. क्रौंच, गरुड, श्येन, मकर, वज्र, शकट, चंद्र, पद्म, सूचीमुख, चक्र, इ. त्यांची नावे होती. चक्रव्यूहाची कल्पना करणे कठीण आहे. घोटाळ्यात पाडणारी वर्तुळाकार रचना, असा त्याचा अर्थ आहे. एकदा आत शिरले की त्यातून बाहेर पडणे कठीण जाते असे म्हणतात; पण त्याच्या वर्णनावरून तसा बोध होत नाही.

महाभारतातील संकुलयुद्धवर्णने ही बहुतांशी सांप्रतच्या युद्धवर्णनांशी जुळतात. रथदळावर रथदळ, गजावर गज, अश्वांवर अश्व, पदातींवर पदाती आदळले असे वर्णन आढळते. तथापि रथी गजांवर हल्ला करीत, गज रथांचा चुराडा करीत; रथी पदातींवर बाणांचा वर्षाव करीत, पदाती रथावर व गजांवरही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गोफणीने दगड मारीत व परशूनेही मारा करीत (भीष्म.५७). त्या काळीदेखील सैन्याबरोबर बाजारबुणगे असायचे. त्यात सुतारे, हत्ती, घोडे; व्यापारी, वेश्या; द्रव्यकोश, धान्य, इ. सामान यांचा समावेश होत असे.

सेनेच्या प्रचलनाचे वर्णन महाभारतात केलेले आढळते, (उद्योग १५१) ते असे – ती चतुरंग सेना शंख व दुंदुभी या रणवाद्यांच्या गजरात व युद्धघोषणांच्या निनादात पुढे निघाली. अग्रदी पुढे भीमसेन व इतर काही योद्धे असून, ते सर्वजण कवचधारी आहेत. त्यांच्या मागे प्रबंधक व पांचाल आहेत. राजा मध्यभागी असून, त्याच्या भोवती अन्नसामग्री, शस्त्रे, तंबू, कोश, इत्यादींचे गाडे आहेत. राजाच्या मागून मुख्य सेना चालली आहे.

महाभारतात सेनाशिबिरे, शस्त्रागारे, दुर्ग, नगर–कोट यांची चांगली वर्णने केलेली आहेत. त्याचप्रमाणे हेरगिरी कशी करीत, त्याचीही माहिती आहे. युद्ध चालू असताना शत्रूकडील वार्ता मिळविण्यासाठी अनेक हेर पाठविले जात. युद्धाच्या प्रसंगी ईश्वराची कृपा व्हावी म्हणून प्रार्थना करण्याची, तसेच सैनिकांना उत्साह यावा म्हणून विजयगीते व रणगीते गाण्याची प्रथा होती. शंख, मृदंग, भेरी, पणव, आनक, इ. रणवाद्यांचा उल्लेख महाभारतात अनेक जागी आढळतो. त्याचप्रमाणे द्रोणपर्वातील एका अध्यायात महायुद्धातील विविध ध्वजांचेही वर्णन आहे. प्रत्येक प्रमुख योद्धयाच्या रथावर त्याचा वेगळा ध्वज लावलेला असे. ध्वज सोन्याचे बनवलेले असून, त्यांवर वानर, सिंह, बैल, वराह, हत्ती, मयूर, इ. पशुपक्ष्यांच्या आकृती काढलेल्या असत.

ऐतिहासिक काळ – मौर्यकालीन सैन्यव्यवस्थेची माहिती कौटिलीय अर्थशास्त्र व यवन राजदूत मेगॅस्थिनिसचे लेख यांतून उपलब्ध झाली आहे. महाभारतकालीन चतुरंगदळाची परंपरा त्या काळीही चालू होती. मौर्य सम्राटांच्या प्रचंड सेनेची व्यवस्था ठेवण्यासाठी तीस जणांचे एक मंडळ होते. त्या मंडळाचे सहा विभाग असून, प्रत्येकात पाच सदस्य असत. पायदळ, घोडदळ, रथ व गजदळ याव्यतिरिक्त नौदल व वाहतूक पथक असे आणखी दोन विभाग अर्थशात्रात सांगितलेले आहेत. चंद्रगुप्ताची सैन्यसंघटना इतकी कार्यक्षम होती, की त्याने लवकरच जवळजवळ सर्व भारतावर साम्राज्य स्थापले व यवन सैन्याचाही पराभव केला. मौर्यांचे नौदलही चांगले होते, असे अर्थशास्त्रावरून कळते. मौर्यसम्राटांनी सबंध देशात सैन्याच्या प्रवासासाठी अनेक मोठाले व लांब रस्ते बांधले होते.

मौर्यकाळी व त्यापूर्वीदेखील भारतात सर्व प्रमुख नगरे सुरक्षित केलेली होती. काही नगरांना नद्या, डोंगर, जंगले यांमुळे नैसर्गिक संरक्षण लाभले होते; तर काहींच्या भोवती खंदक, पक्के तट व बुरूज बांधलेले होते. आणि त्या तटबंदीच्या आत एक अत्यंत दुर्गम असा बालेकिल्लाही बांधलेला असे.

कौटिल्याने उत्तम सैनिक म्हणून केवळ क्षत्रियांचा निर्देश केला असला, तरी त्या काळी सर्वच वर्णांचे पुरुष सैनिक होत असावे. कारण इतर वाङ्मयात ब्राह्मण सेनापतींची उदाहरणे अनेक आढळतात. अर्थशास्त्रात सैनिकांचे निरनिराळे प्रकार सांगितलेले आहेत, ते असे–(१) मौल– वंशपरंपरागत सैनिकी पेशा करणारे, (२) भृत– पैशासाठी तात्पुरते बनलेले, (३) श्रेणीबल– व्यापारी किंवा औद्योगिक श्रेणींची सेनापथके, (४) आटविक– जंगली जमातींची पथके व (५) मित्रबल– सामंतांनी किंवा मित्र राष्ट्रांनी पाठविलेले सैन्य.

राजाच्या सैन्यात १० सैनिकांवर १ पदिक, १० पदिकांवर १ सेनापती व १० सेनापतींवर १ नायक असावा, असे कौटिल्याने म्हटले आहे.

कौटिलीय अर्थशास्त्रात परराष्ट्रातील कारस्थाने, हेरगिरी, कूटयुद्धे, सैन्याचे आक्रमण, दुर्गाला वेढा देणे, दुर्ग बांधणे व त्यांचे संरक्षण करणे यासंबंधी अत्यंत विस्तृत व शास्त्रीय माहिती आढळते. याव्यतिरिक्त युद्धांचे विविध प्रकार, व्यूहरचना, सैनिकांचे शिक्षण, सैन्यातील शिस्त यांचे महत्त्वही कौटिल्याने वर्णिले आहे.

मौर्यकाळात अश्वदळ व गजदळ यांचा युद्धात अतिशय मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जात होता. पायदळ मोठे असले, तरी घोडे व हत्ती यांच्यामुळे सैन्याचे सामर्थ्य अनेक पटींनी वाढत असे. राजे व सेनापती यांच्या वैयक्तिक पराक्रमालाही विलक्षण महत्त्व होते.

मौर्यसाम्राज्य दुबळे झाल्यानंतर भारतात निरनिराळी राज्ये स्थापन झाली. शुंग, कण्व व सातवाहन यांच्या काळात अनेक परकीय आक्रमणे भारतावर झाली. दक्षिणेत सातवाहनांची सार्वभौम सत्ता काही शतके होती, पण एकंदरीत हा काळ हिंदू राजांच्या आपसांतील युद्धांचा आणि परकीयांच्या स्वाऱ्यांचा होता. त्यात हिंदू राजांनी अनेक वेळा परकीयांचा पराभव केला. सातवाहन राजांनी शकांपासून दक्षिणापथाचे संरक्षण केले. त्यावरून असे दिसते, की भारतीय युद्धविद्या त्या काळी फारशी ऱ्हास पावली नव्हती. त्या काळातील सैन्यव्यवस्थेची माहिती प्राचीन वाङ्मयात मिळत नाही. पण निरनिराळ्या राजांची नाणी आणि ठिकठिकाणी आढळणारी मूर्तिशिल्पे यांवरून तत्कालीन आयुधांची व सैनिकांची कल्पना करता येते. पूर्वीची चतुरंगबलाची परंपरा त्या काळातही चालू होती. सातवाहनांचे नौदलही होते, अशी कल्पना आहे.

गुप्त वंशाने पुन्हा मगधसाम्राज्य स्थापित केले. मात्र मौर्य वंशाप्रमाणे गुप्त राजांनी एकछत्री सत्ता स्थापली नव्हती.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साम्राज्यातील अनेक सामंत राजे गुप्त वंशाची सार्वभौम सत्ता मानून त्यांना खंडणी देत होते व सेनापथके मदतीला पाठवीत होते. गुप्तकालीन सैन्यव्यवस्था मौर्यकालीन व्यवस्थेप्रमाणेच होती. मात्र ती पूर्णपणे सुसंघटित नसावी. चंद्रगुप्त (दुसरा) याने शकांचा उच्छेद करून पश्चिम समुद्रापर्यंत आपली सत्ता प्रस्थापित केली. पण वायव्य सीमा पूर्ण सुरक्षित न केल्यामुळे तिकडून हूणांचे भयानक आक्रमण येऊ शकले. स्कंदगुप्ताने त्यांचा पराभव करून आपल्या साम्राज्याचे रक्षण केले. यावरून त्याच्या सेनासामर्थ्याची कल्पना करता येते.

गुप्तांच्या सेनेचे पायदळ, घोडदळ व गजदळ असे तीनच विभाग होते. रथांचा वापर त्या वेळी कमी झाला होता. गुप्तांचे नौदल असले पाहिजे. मात्र त्याविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. त्या काळी अश्वारूढ योद्धे धनुष्य-बाणांचा उपयोग करू लागले होते. पार्थियन लोकांकडून हे तंत्र भारतीय योद्धयांनी घेतले असावे. धनुष्यबाण, तलवारी, परशू, भाले, बरची, काटेरी बाण ही त्या काळातली आयुधे होत. चिलखते व शिरस्त्राणेही अनेक सैनिकांजवळ असत.

मौर्यकाळी गजदळाला युद्धक्षेत्रात महत्त्वाचे स्थान होते. पण नंतरच्या काळात घोडेस्वार धनुष्य-बाण वापरू लागल्यामुळे अश्वदळ प्रभावी ठरले. गुप्त राजांच्या सैन्यात असे मोठे अश्वदळ होते. अश्वारोही योद्धे कवच वापरीत. त्या काळी स्थिर सेनादलाच्या जागी गतिमान सेनादलाचा उपयोग अधिक प्रमाणात होत असे. हूणांचा पराभव करण्यासाठी गुप्त राजांना तेच तंत्र उपयोगी पडले.

गुप्त साम्राज्य नष्ट झाल्यानंतर इ. स. च्या ७ व्या शतकात हर्षवर्धन हा एक मोठा सम्राट होऊन गेला. त्याचे सैन्य प्रचंड असून, त्यात प्रारंभी ५००० हत्ती, २०,००० घोडेस्वार व ५०,००० पदाती होते. रथांचा उपयोग क्वचितच केला जात असे. चालुक्य राजा पुलकेशी (दुसरा) याने हर्षाचा पराभव केला. यावरून त्याची सेनाही अतिशय प्रबळ असली पाहिजे व त्याचे युद्धकौशल्य अधिक असले पाहिजे, हे उघड होते.

युआन च्वांग या प्रवाशाने भारतीय सैनिकांचा त्यांचे शौर्य, धैर्य व शस्त्रकौशल्य याबद्दल फार गौरव केला आहे. बाणभट्टाने भारतीय सेना–शिबिरे व सेनासंचलन यांचे सुरेख वर्णन केले आहे. एकंदरीत असे दिसते, की भारतीय सैन्यव्यवस्थेची परंपरा फार प्राचीन काळापासून हर्षाच्या काळापर्यंत अव्याहतपणे तशीच चालू होती. युद्धतंत्रात कालमानाप्रमाणे व आवश्यकतेनुसार थोडासा बदल झाला होता इतकेच. रथांप्रमाणे हत्तींचा उपयोगही कमी व्हायला पाहिजे होता; पण तसा तो झाल्याचे दिसत नाही. गजदळ शत्रूच्या सेनेची दाणादाण करण्यासाठी फार उपयोगी पडत होते, हे खरे. पण ते कधीकधी स्वपक्षालाही घातक ठरे. मात्र त्याच्या ऐवजी दुसरे कसलेही दळ त्या काळी निर्माण झाले नव्हते. घोडदळाच्या वेगवान माऱ्यापुढे गजदळाचा टिकाव लागत नसे. म्हणूनच शुक्रनीतिसारात मोठे गजदळ नसावे, असे सांगितले आहे.

गुप्तकाळापासून प्रचलित असलेली सैन्यव्यवस्था गुर्जर-प्रतीहारांच्या काळातही बहुतांशी तशीच चालू होती. युद्धात रथांचा उपयोग अगदी बंद झाला, पण सेना–शिबिरे, संचलन, दुर्गरक्षण, व्यूहरचना, वेढा घालणे या बाबतींत काहीही बदल झाला नाही. घोड्यावर बसून वेगाने धावताना शरसंधान करण्याची कला मात्र मागे पडू लागली. गतिमान युद्धापेक्षा स्थिर सेनांचे युद्ध पुन्हा अधिक प्रमाणात सुरू झालें. मात्र प्रतीहारांच्या सैन्यात प्रचंड व चपळ अश्वदळ होते. तो त्यांचा एक आधारस्तंभच होता.

गुर्जर–प्रतीहार, बंगालचे पाल व द. भारतातले राष्ट्रकूट यांचा सत्तासंघर्ष २–३ शतके चालू होता. प्रत्येकाचे सामर्थ्य प्रचंड होते. पाल राजांनी प्रबळ नौदल संभाळले होते. सर्वांच्या सैनिकी परंपरा प्राचीन काळापासून चालत आलेल्याच होत्या. पण आपसांत लढून या राजांनी आपले सामर्थ्य क्षीण करून घेतले आणि त्यामुळे मुसलमानांच्या आक्रमणाला ते बळी पडले. आपल्या युद्धतंत्रात योग्य तो बदल न केल्यामुळे त्यांचा पराभव झाला, असे म्हणतात. इ. स. ११९९ च्या सुमारास बंगालवर मुसलमानांनी विजय मिळविला, त्याचे कारण सेन राजांचे जुने युद्धतंत्र हेच होय, असे श्री. विमलकांती मजुमदार म्हणतात.

मुसलमानी आक्रमणांपुढे भारतीय राजांचे सेनासामर्थ्य दुबळे ठरण्याची तीन कारणे मजुमदारांनी सांगितली आहेत, ती अशी–(१) घोडदळ – भारतात चांगले घोडे निपजत नव्हते; ते परदेशातून आणावे लागत. आणि भारतीय घोडेस्वार विशेष तरबेज नव्हते. मुसलमान घोडेस्वार अधिक कुशल योद्धे असल्यामुळे त्यांचा जय होत गेला. (२) दुही – भारतात अनेक लहान राज्ये असून, ती आपसांत लढत होती. मोठे साम्राज्यदेखील सामंतांच्या सैन्यावर अवलंबून असे आणि अशा सैन्याचा भरवसा कधीच धरता येत नसे. संपूर्ण देशाच्या संरक्षणाचा विचार कोणी करीत नव्हते. प्रत्येक राजा स्वतःचे हितच पाही. (३) दैववाद – मध्य युगात हिंदू समाज दैववादी, अंधश्रद्ध व निवृत्तिपर झालेला असल्यामुळे, त्याने युद्धविद्येकडे द्यायला हवे तेवढे लक्ष दिले नाही.

भारतीय राज्यकर्त्यांनी युद्धतंत्रात सुधारणा न केल्यामुळे त्यांना मुसलमानांपुढे हार खावी लागली, असे श्री. के. एम्. पणिक्कर यांनीही प्रतिपादले आहे. ते म्हणतात– जोपर्यंत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सैन्यात हत्तीला प्राधान्य होते आणि लढाईत घोड्यांचा उपयोग रथ ओढण्यासाठीच केला जात होता, तोपर्यंत भारतीयांची युद्धपद्धती देशाचे संरक्षण करण्यास समर्थ ठरली. लढाऊ हत्तींचे प्राबल्य अबाधित असेपर्यंत एकाही आक्रमकाला आपले पाय गंगेच्या खोऱ्यात रोवणे शक्य झाले नाही. शक, हूण, इ. लुटारू टोळ्यांनी गंगेच्या खोऱ्यात घुसण्याचा प्रयत्न केला, तेव्हा भारतीय राजांच्या सैन्याने त्यांचा जोराने प्रतिकार केला. पण पुढे परिस्थितीत मोठा घातुक बदल झाला. मध्य आशियातील भटक्या लोकांनी घोड्यांवरील खोगिरांना रिकिबी जोडण्याची युक्ती शोधून काढली. त्यामुळे घोड्यावरील मांड पक्की झाली व आपला तोल संभाळून बाण सोडणे घोडेस्वाराला शक्य झाले. तेव्हापासून घोडदळ हे चढाईचे मुख्य साधन ठरले. मुसलमानांनी मध्य आशियातून ही कल्पना बरोबर आणली व तिच्या जोरावर भारतात सत्ता स्थापली. हिंदू राजांची सर्व भिस्त प्रचंड गजदळ व बेशिस्त पायदळ यांवरच असे. तुर्कांचे घोडेस्वार वेगाने चालून आले, की हिंदू सैन्याची पांगापांग होत असे. हिंदु योद्धयांच्या अंगी शौर्य होते, हत्तींनाही तरबेज केलेले असे, पण घोडदळापुढे त्यांचा निभाव लागत नसे. अलाउद्दिनाने दक्षिणेत स्वाऱ्या केल्या, त्या मुख्यतः घोडदळाच्या जोरावरच. विद्युद्वेगाने दूर अंतरावर जाऊन छापे घालण्यासाठी घोडदळ हे प्रभावी साधन ठरले. पुढे मराठ्यांनी घोडदळ उभे केले.

दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात कायमचे व तात्पुरते जमवलेले असे सैन्याचे दोन भाग असत. सैन्यात तुर्क, अफगाण, इराणी, मोगल व हिंदू असे सर्व प्रकारचे सैनिक असत. हिंदू सैनिकांची संख्या मोठी होती व त्यांना दुय्यम अधिकारांची पदे मिळत होती. सैन्याला धान्य, हत्यारे, घोडे वगैरे पुरवण्यासाठी व सैनिकांची मोजदाद ठेवण्यासाठी अधिकारी नेमलेले होते. गजदळ, घोडदळ व पायदळ हे सैन्याचे विभाग होते. पायदळाला फारसे महत्त्व नसे. गजदळाचा बराच उपयोग केला जाई. मात्र घोडदळाला सर्वांत जास्त महत्त्व होते. अलाउद्दीन खिलजीने घोड्यांवर क्रमांक छापण्याची पद्धत सुरू केली. बंदुकींचा उपयोग केला जात होता. स्वारीपूर्वी सैन्यासाठी रस्ते वगैरे व्यवस्था करणारी पथके होती; त्याचप्रमाणे सैनिकांच्या शुश्रूषेसाठी वैद्यकीय पथकेही होती. उत्तम शिक्षण दिलेले गुप्तहेरही शत्रूच्या बातम्या काढण्यासाठी पाठवले जात. लढाईत लोहकवच घातलेले हत्ती पुढे असून, त्यांच्या पाठीवर अनेक शस्त्रधारी सैनिक असत. हत्तींच्या मागे पायदळाच्या रांगा व त्यांच्यामध्ये घोडेस्वार, अशी सैन्यरचना केली जात असे.

राजपुतांची युद्धविद्या – परकी आक्रमकांच्यापेक्षा भारतीय राजांची युद्धसामग्री व युद्धकला निकृष्ट होती, त्यामुळे त्यांचे सर्वत्र पराजय झाले; विशेषतः मुसलमानांच्या युद्धपद्धतीपुढे त्यांची जुनीपुराणी युद्धपद्धती निकामी ठरली; मुसलमानांच्या घोडेस्वारांची फौज आमच्या हत्तींपेक्षा अधिक चपळ असल्यामुळे मुसलमान अधिक प्रभावी ठरले. काही इतिहासकारांनी केलेली ही कारणमीमांसा श्री. ह. वा. देशपांडे यांना मान्य नाही. राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास या पुस्तकात त्यांनी राजपुतांच्या ऱ्हासाची वेगळी मीमांसा केली आहे, ती अशी –

"सुसज्जित शस्त्रसामग्री व अभ्यस्त युद्धकला हे युद्धातील जयापजयाचे एकमेव निर्णायक कारण ठरू शकत नाही. आणि मुसलमानी आक्रमकांपेक्षा भारतीय लोक शस्त्रांत व युद्धकलेत मुळीच मागासलेले नव्हते, असे कर्नल टॉडने स्पष्ट म्हटले आहे. भारतीय राजांचे सर्व बळ हत्तींचे होते व घोडेस्वारांची प्रबळ सेना त्यांच्याजवळ नव्हती, असे मानणे चुकीचे आहे. चव्हाण, परमार, राठोड, गुहिलोत, इ. राजपूत राजांच्या जवळ उत्कृष्ट घोडदळे होती. किंबहुना राजपुतांची खरी मदार त्यांच्या घोडदळावरच होती. हत्तींचाही ते उपयोग करीत. मुसलमान आक्रमकांनीही हत्तींचा उपयोग युद्धात केलेला आहे.

राजपूत लोक रणरंगणात उतरले, की अगदी मरेपर्यंत लढत, ते शूर असले तरी उतावळे व आततायी होते, अशी काही लोकांची कल्पना आहे. पण प्रत्येक युद्धाच्या प्रसंगी राजपूत वीर केशरिया बाणा धारण करून प्राणार्पण करीत व त्यांच्या स्त्रिया जोहार करीत, हे खरे नाही. पराक्रमाची शर्थ करूनही पराभवाचा संभव स्पष्ट दिसू लागल्यानंतरच ते केशरिया करीत. आणि सबंध इतिहासात राजपूत स्त्रियांनी पाच-सात वेळाच जोहार केलेले आढळतात.

छुप्या हल्ल्याची युद्धपद्धती राजपुतांना माहीत नव्हती, हे मतही बरोबर नाही. अनेक राजपूत वीरांनी अरवलीच्या पहाडात लपून राहून वर्षानुवर्षे अत्यंत बलाढ्य अशा मोगल साम्राज्याविरुद्ध लढा चालविला व कित्येक वेळा जयश्री मिळवले. शिवाजीमहाराजांनी राजपुतांच्या त्याच पद्धतीने युद्ध केले; कारण ते राजपूत वंशातलेच होते.

राजपुतांनी धनुर्विद्येचा चांगलाच अभ्यास केला होता, यात शंका नाही. अनेक राजपूत वीरांनी धनुर्बाणांचा उपयोग करून शत्रूंचा नाश केल्याची वर्णने आढळतात. याव्यतिरिक्त तलवार, भाला, गदा, जंबिया, इ. शस्त्रे वापरण्यातही राजपूत वीर कुशल होते.

इस्लामच्या अनुयायांच्या धडका भारतावर येऊ लागल्या तेव्हा सुमारे सहा हजार वर्षांच्या उत्कर्षोपभोगाने भारतीय आर्यांचा जोम व कस क्षीण होऊ लागला होता. त्यामुळे जोमदार मुसलमानांच्या आक्रमणापुढे आर्य जातीचा टिकाव लागू शकला नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजपुतांच्या पराभवाचे प्रमुख कारण हे आहे."

विजयनगर – विजयनगरच्या सम्राटांना बहमनी सुलतानांशी सतत लढावे लागत होते. त्यामुळे त्यांनी साम्राज्याच्या रक्षणासाठी प्रचंड सेना पदरी बाळगली होती. तिचे पाच विभाग होते – (१) पायदळ (२) अश्वदळ (३) गजदळ (४) धनुर्धारी दळ (५) तोफखाना. विजयनगरच्या सेनादलात ११ लाख पदाती, ५ लाख घोडेस्वार व १ हजार हत्ती होते, असे अब्दुल रज्ज़ाक यानें लिहून ठेवले आहे. त्या सैन्यात रथही होते. एवढ्या मोठ्या सैन्याची सर्व व्यवस्था पाहण्यासाठी इतर अनेक पथकेही होती. मुसलमानांच्या पूर्वीच विजयनगरच्या राजांनी तोफा वापरल्या होत्या, असे म्हणतात. तालिकोटच्या युद्धात तीन हजार तोफा वापरल्या गेल्या. विजयनगरच्या सैन्यासाठी अरबस्तानातून घोडे मागवले जात. विजयनगरचे नौदलही होते. त्याच्या साहाय्याने पोर्तुगीजांच्या जहाजांवर विजयनगरच्या सम्राटांना वचक ठेवता येत असे. साम्राज्यातील निरनिराळ्या मांडलिक राज्यांतही अशीच सुसज्ज सेना ठेवलेली असे. ती युद्धप्रसंगी सम्राटाच्या साहाय्यार्थ पाठवली जाई. विजयनगरच्या सैन्यात हजारो मुसलमान पदाती व घोडेस्वार होते, हे विशेष लक्षणीय होय.

मोगल सेना– मोगल साम्राज्यात सैन्याचे पाच विभाग होते ते असे– (१) पायदळ – यातील सैनिकाजवळ तलवार व लहान भाला असे. कायमचे पायदळ लढाईसाठी उपयोगी पडे. तात्पुरते सैनिक बहुधा मालगुजारीच्या वसुलीचे व आरक्षकांचे काम करीत. (२) घोडदळ – यात बारगीर व शिलेदार असे दोन प्रकारचे घोडेस्वार असत. बारगिरांना सरकारी सामान मिळत असे; शिलेदार स्वतःचे घोडे व शस्त्रे वापरीत. युद्धातील विजयासाठी मोगल बादशाहदेखील मुख्यतः घोडदळावरच अवलंबून असत. (३) गजदळ – सेनापती हत्तीवर बसे. शत्रूंवर जोरदार हल्ला करून आघाडीची फळी फोडण्यासाठी व किल्ल्यांचे भक्कम दरवाजे मोडण्यासाठीही हत्तींचा उपयोग होत असे; पण तोफांचा मारा सुरू होताच हत्तींची दाणादाण उडून ते स्वपक्षाच्या सैनिकांनाच तुडवीत पळू लागत. (४) तोफखाना–बाबराने आपल्या बरोबर काही तोफाही आणल्या होत्या. त्यापूर्वी वास्को-द-गामाने जहाजातून कालिकत बंदरावर तोफांचे गोळे टाकले होते. पण भारतात जमिनीवरील युद्धात तोफांचा उपयोग प्रथम बाबराने केला व राजपुतांवर जय मिळविला. युद्धतंत्रात त्यामुळे नवे युग सुरू झाले. (५) मोगल सेनादलात नौदलाचाही अंतर्भाव होता. मात्र ते फारसे प्रबळ नव्हते.

मोगलकालातील सैन्यव्यवस्थेचे वर्णन श्री. पणिक्करांनी केले आहे, ते असे– पायदळाला कधी शिस्तीचे शिक्षण मिळत नसे; त्यात सुसंघटितपणा नसे किंवा सैनिकांजवळ चांगली हत्यारे नसत. मोगल सैन्य म्हणजे ढालतलवार घेतलेल्या सैनिकांचा जमाव होता. लहानशा घोडदळाचा हल्ला थोपवून धरण्याचीही कुवत त्यांच्यापाशी नसे. त्यांच्या जवळ तोड्याच्या बंदुका असत, पण त्यांतील उत्तम बंदुकीतूनही गोळी सुटेल अशी खात्री नसे. सैन्यभरती, सैनिकांचे शिक्षण, त्यांना नियमित पगार देणे ही कामे व्यवस्थित होत नसत. चार शिपाई जमवले, की सरंजामदार बनता येई. ते शिपाई किंवा घोडेस्वार सामान्य जमीनदारांचे आश्रित असत. त्यांना कसलेच शिक्षण मिळत नसे. त्यांच्यात शिस्त नसे. त्यामुळे प्रत्यक्ष युद्धात त्यांची अडचणच होत असे. मोगलांचा तोफखानाही निकृष्ट होता. कारण तो अवजड होता व भोंगळपणाने कसा तरी वापरला जात असे.

मोगल सैन्यात थोडीफार युद्ध–रचना असे, ती अशी – पुढे पायदळ व मागे तोफखाना. त्याच्या दोन्ही बाजूंना सैन्याचा जमाव. मध्यभागी सेनापती व त्याच्या दोन्ही बाजूंना राखीव सैन्य. त्या मागे संरक्षक सैन्य. पण एकदा युद्ध सुरू झाले, की ही रचना विस्कळीत होऊन वेगवेगळ्या लहान लहान चकमकींत तिचे रूपांतर होई. अखेरचा विजय रणचातुर्य किंवा डावपेच यांपेक्षा संख्याबळावरच अवलंबून असे.

अकबराची लष्करी व्यवस्था पुष्कळ प्रमाणात सुधारलेली होती. पाच हजारांवर फौज बाळगणाऱ्या सरदाराला अमीर व त्यापेक्षा कमी फौज बाळगणाऱ्या सरदाराला मनसबदार म्हणत. अमीराची जागा बहुधा शहाजाद्याला देण्यात येई. याशिवाय खालच्या दर्जाचे बरेच अधिकारी असत. सर्व अधिकाऱ्यांना ठराविक पगार दिला जात असे. सैनिकांची हजेरी-पत्रके ठेवली जात. राजपूत सरदारांना मोठ्या जागा देण्याची पद्धत अकबराने सुरू केली. सैन्याला साधनसामुग्री, अन्न वगैरे पुरवण्याची व्यवस्था चांगली होती. सैन्यासाठी देशभर चांगले रस्ते बांधलेले होते. मोठमोठ्या शहरांना भक्कम तटबंदी केलेली होती. ही सैन्यव्यवस्था औरंगजेबाच्या काळातही बहुतेक तशीच चालू होती.

मराठी सेना– शिवाजीमहाराजांच्या वेळी पायदळ व घोडदळ हे सैन्याचे दोनच भाग होते. पायदळातील प्रत्येक सैनिकाजवळ ढालतलवार किंवा बंदूक असे. हत्यारे शिपायांची स्वतःची असत व दारूगोळा सरकारकडून मिळे. दहा माणसांचा एक गट असे. अशा पाच गटांवर एक हवालदार, दोन हवालदारांवर एक जुमलेदार व दहा जुमलेदारांवर एक हजारी असे. हजारी व पंचहजारी सरदारांवर एक सरनोबत नेमलेला असे. घोडदळात बारगीर व शिलेदार दोन प्रकारचे घोडेस्वार असत. बारगिरांची घोडी व हत्यारे सरकारी असत. शिलेदार स्वतःची घोडी व हत्यारे वापरीत. घोडेस्वाराजवळ भाला व बंदूक असे. सरकारी घोड्यांवर शिक्के मारीत. घोडदळातही हवालदार व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बरोबरत अशी अधिकारपदे होती. स्वराज्याच्या रक्षणासाठी शिवाजीमहाराजांनी शेकडो किल्ल्यांची डागडुजी करून उत्तम व्यवस्था ठेवली होती. गनिमी काव्याचे युद्धतंत्र मराठ्यांनी बरेच वापरले. आदिलशाहाच्या व मोगलांच्या प्रचंड सैन्याला बेजार करण्यासाठी त्याचा फार उपयोग झाला. त्या कामी घोडदळाचा जास्त उपयोग होत असे. महाराष्ट्रातील डोंगरी भागात भीमथडी तट्टे अत्यंत उपयुक्त ठरत.

महाराष्ट्रातील वतनदारी बंद करून शिवाजीमहाराजांनी कायमची सेना बनवली. पण त्यांच्या नंतरच्या काळात पुन्हा वतनदारी सुरू झाली. पेशवाईत सरंजामी सरदार खूपच प्रबळ झाले होते. त्यांच्याजवळ २०–२५ हजारांचे सैन्य असे. त्याच्या खर्चासाठी सरदारांना जहागिरी दिलेल्या होत्या. युद्धाच्या प्रसंगी निरनिराळे सरदार आपापली सेना घेऊन पेशव्यांच्या मदतीला येत. पेंढारी लोकही लढाईत मदत करीत. पण ते भाडोत्री सैनिक असल्यामुळे त्यांच्या निष्ठेविषयी खात्री वाटत नसे. पायदळात मराठ्यांखेरीज इतर लोकांचा भरणा अधिक असे. मुसलमान सैनिकही बरेच होते. मुसलमानांना मोठ्या हुद्याच्या जागाही मिळत. त्यांत अरबांचे प्रमाण मोठे असे. कारण ते फार विश्वासू असत व संकटकाळी उपयोगी पडत. पेशव्यांच्या सैन्यात तोफखान्याला मोठे स्थान मिळाले होते. तो चालविण्याचे काम मुख्यतः गारदी लोकांकडे होते. कवायत शिकलेले पायदळ व तोफा यांचा उपयोग पेशवाईच्या उत्तरार्धात मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. मैदानी युद्धात त्यांच्यावरच जास्त भर असे. त्या काळी गनिमी युद्ध मागे पडले.

महादजी शिंदे याने आपल्या सैन्यात डिबॉईन या फ्रेंच अधिकाऱ्याची नेमणूक करून शिस्तबद्ध सेनापथके तयार केली होती. मराठ्यांनी दारूगोळा, बंदुका, तोफा वगैरे बनवण्याचे कारखाने काढले होते. पण ते अगदी लहान प्रमाणांवरच होते आणि त्यांत जुनीच शस्त्रे बनवीत.

युरोपातील जे लोक भारतात व्यापारासाठी आले, त्यांनी आपल्या वखारींच्या रक्षणासाठी भुईकोट बांधले व सेनापथकेही आणली. ती पथके कवायतीचे शिक्षण घेतलेली, हत्यारांचा वापर करण्यात तरबेज व शिस्तबद्ध होती. छोट्याशा कवायती व शिस्तबद्ध सैन्याला अव्यवस्थित जमावबजा सैन्याचा सहज पराभव करता येतो, हे जाणून डुप्लेने देशी शिपायांची सेनापथके उभारण्यास सुरुवात केली. भारतीय शिपाई परकीय शिपायांहून कोणत्याही बाबतीत कमी नव्हता. एवढेच नव्हे, तर देशी शिपायांचे सुसंघटित सैन्य बनवून त्यांचा इथल्याच बेशिस्त सैन्याविरुद्ध उपयोग करणे इंग्रजांना फायदेशीरच ठरले.

ब्रिटिश सैन्य – इ. स. च्या १८ व्या शतकात ब्रिटिशांनी तयार केलेली देशी सेना इतर राजांच्या सेनांपेक्षा अधिक कार्यक्षम होती. मात्र ब्रिटिशांच्या देशी सैन्यात हिंदी लोकांना वरची अधिकारपदे मिळत नसत. लष्करी डावपेच व सैन्याच्या हालचाली यांचे ज्ञान त्यांना नसे. युरोपियन अंमलदार व हिंदी सेनापथके यांच्यामधील दुवा एवढेच त्यांचे स्थान होते.

अनेक हिंदी राजांनी आपल्या सैन्यातील पलटणींना कवायती शिक्षण देण्यासाठी युरोपियन अधिकारी नेमले. निजाम, हैदर, शिंदे यांनी अशी सेनापथके तयार केली होती. पुढे रणजीतसिंगानेही तसेच केले. तथापि अशा सैन्याचे प्रमाण अल्प होते. शिस्तबद्ध फ्रेंच व इंग्रज सैन्यांपुढे देशी सेनांचा निभाव लागला नाही आणि शेवटी इंग्रजांनी सर्व भारतावर सत्ता स्थापली. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय सैन्यात सुसंघटितपणा, शिक्षण व सुसज्जता हे गुण आले; पण पहिल्या महायुद्धापर्यंत इंग्रजांच्या सैन्यात हिंदी तरुणांना मोठ्या अधिकाराच्या जागा मात्र मिळाल्या नव्हत्या. ब्रिटिश अधिकारीच फक्त सेनानायक होऊ शकत. हिंदी सैन्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील धर्मजातिनिष्ठ वर्गवारी. पठाण, बलुची, पंजाबी, मुसलमान, जाट, शीख, गढवाली, मराठा, महार, इ. जाती लढाऊ ठरवून, त्यांतूनच सैन्यभरती केली जात असे. त्या प्रत्येक जातीजमातीची वेगळी पलटण उभारण्यात येई. त्यामुळे त्या सर्व सैन्यात एकजुटीची भावना किंवा राष्ट्रीय वृत्ती उत्पन्न होणे शक्य नव्हते. किंबहुना तशी ती होऊ नये अशीच दक्षता इंग्रजांनी घेतली. त्यामुळे जनता आणि सेना यांच्यांतही दुरावा निर्माण झाला. ब्रिटिशांनी मुद्दामच तशी व्यवस्था केली होती.

ब्रिटिशांच्या संरक्षणव्यवस्थेचे श्री. पणिक्करांनी वर्णन केले आहे, ते असे – अखिल भारतीय संरक्षणयोजना व तिला धरून परराष्ट्रसंबंधविषयक धोरणाची आखणी या ब्रिटनने भारताला दलेल्या मोठ्या देणग्या होत. दिल्लीच्या जुन्या हिंदी राजांनी शत्रू पानिपतावर पोचेपर्यंत कोणताही प्रतिकार केला नाही. नंतर मात्र त्यांनी मोठ्या लढाया केल्या. पण त्यात त्यांना हार खावी लागली. तसे ब्रिटिशांनी होऊ दिले नाही. भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने इराणचे आखात हे मर्मस्थान आहे, हे लक्षात घेऊन त्यांनी त्या भागावर सतत दृष्टी ठेवली होती. भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रशिया व भारत यांच्यामधील मित्रराष्ट्र म्हणून त्यांनी अफगाणिस्तान कायम ठेवले. सिकियांग व तिबेट या प्रदेशांतही ब्रिटिशांनी हेच धोरण ठेवले. कारण तिकडूनही रशियाचा धोका संभवत होता. फ्रेंचांनी इंडोचायनात प्रवेश केला, तेव्हा ब्रिटिशांनी पूर्वेकडेही आपला बंदोबस्त वाढवला.

पहिल्या महायुद्धाच्या अखेरपर्यंत सागरावर ब्रिटनचे प्रभुत्व होते. पण त्यानंतर इतर राष्ट्रांचे आरमारी सामर्थ्य वाढू लागले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि ब्रिटिशांच्या अनिरुद्ध सागरी सत्तेचे दिवस संपले. म्हणून त्यांनी भारतीय आरमाराची उभारणी सुरू केली. दुसऱ्या महायुद्धापर्यंत ते एक लहानसे पण परिणामकारक संरक्षणदल ठरले. भारताची सांप्रतची सैन्यव्यवस्था ही इंग्रजांनी घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणेच आहे.

युद्धशास्त्राची उपेक्षा – परकीय आक्रमकांनी भारतीय भूमीवर निरनिराळ्या राजांचा पराभव करून भारतावर आपली सत्ता स्थापली, याचे फितुरी हे कारण सांगतात. पण तेच एकमेव कारण नाही. भारताच्या युद्धतंत्रात जी सतत प्रगती व्हायला हवी होती ती थांबली, हे त्याचे महत्त्वाचे कारण होय, असे श्री. ज. द. जोगळेकर यांनी प्रतिपादले आहे. अनेक भारतीय युद्धांचा अभ्यास करून आणि अनेक इतिहासकारांचा आधार घेऊन त्यांनी यासंबंधी भारतीय युद्धशास्त्राची उपेक्षा या आपल्या ग्रंथात जे विवेचन केले आहे, ते असे– बाबराने भारतावर स्वारी केली, तेव्हा आपल्या सैन्याबरोबर तोफा आणल्या. त्या नवीन शस्त्रामुळे युद्धतंत्रात पुन्हा एकदा क्रांती झाली. सतत विजयाची घोडदौड करणाऱ्या राणा सांगाच्या प्रचंड सैन्याचा निःपात बाबराच्या तोफखान्याने केला. पुढील राज्यकर्ते जागरूक व दूरदर्शी असते तर, त्यांनी वेळीच या नवीन शस्त्राचे महत्त्व ओळखून त्याचे तंत्र आत्मसात केले असते. परंतु युद्ध जिंकण्यात अश्वदळ कसा महत्त्वाचा भाग बजावते हे जसे पूर्वीच्या राज्यकर्त्यांना हेरता आले नाही, तसेच युद्ध जिंकण्यात तोफखाना किती निर्णायक ठरणार आहे, ते नंतरच्या राज्यकर्त्यांना ओळखता आले नाही. इतकेच नाही तर, या नवीन संहारक शस्त्राकडे त्यांनी आपल्या श्रेष्ठतेच्या घमेंडीत तुच्छतेनेच पाहिले. श्री. सरकार म्हणतात. "दारूगोळ्यांच्या शस्त्राकडे जसवंतसिंग तुच्छतेने पाही. राजपुतांच्या शूर जमातीने अशा शस्त्राचा वापर करणे अनुचित आहे, असे त्याला वाटे." म्हणून राजपुतांकडे तोफखाना नव्हता. दक्षिण भारतातील योद्धेही अग्निवर्षाव करणारी आयुधे वापरून शत्रूचा नाश करणे हे शौर्याचे काम नव्हे, असे समजत. मराठी राज्यकर्त्यांनीही तोफा व बंदुका या नवीन शस्त्रांचे शास्त्रीय तंत्र आत्मसात केले नाही. श्री. सेन म्हणतात– 'दारूगोळ्याचे शस्त्र युरोपात प्रचलित झाल्यापासून त्याच्या निर्मितीच्या तंत्रात कमालीची सुधारणा झाली होती; परंतु तशी सुधारणा मराठ्यांनी केली नाही. जुन्या घर्तीच्या, टाकाऊ तोफांची निर्मिती ते करीत राहिले. तसेच तोफखाना व पायदळ यांवरील विश्वासामुळे मराठी नेत्यांचे अश्वदळाकडे दुर्लक्ष झाले. याचा परिणाम घातक ठरला.' मराठे व इंग्रज या ग्रंथाच्या प्रस्तावनेत श्री. खरे म्हणतात – 'आमच्या लोकांना ज्ञानार्जनाची हौस नाही. नवीन कल्पना बसवावी, नवीन शोध लावावे, हा हव्यास नाही. दुसऱ्याचे नुसते अनुकरण करण्याची बुद्धी मात्र आम्हांत आहे.'

नद्यांवर पूल बांधण्याच्या शास्त्राकडेही मराठ्यांनी कधी लक्ष दिले नाही. त्यामुळे त्या कामी त्यांना त्या त्या प्रदेशांतील लोकांवर अवलंबून राहावे लागे. ही गोष्ट ऑर्थर वेलेस्ली याने हेरली होती आणि मराठ्यांशी लढताना कोणती साधने वापरावी यासंबंधीचे विचारही त्याने लिहून ठेवले होते. मराठ्यांचे छुपे युद्धतंत्र पूर्वी का यशस्वी ठरले, त्याचे विश्लेषण करून ते तंत्र इंग्रजांविरुद्ध का यशस्वी होणार नाही, याविषयीही त्याने आपला अभिप्राय दिला आहे.

पेशव्यांच्या दरबारात असलेला इंग्लिश राजदूत चार्लस मॅलेट व त्याचे मित्र सवाई माधवरावाला दुर्बिण, पृथ्वीचे गोल वगैरे वस्तू भेट म्हणून देत असत. पण अशा वस्तूंच्या निर्मितीचे ज्ञान किंवा पूल बांधण्याचे तंत्र किंवा तोफा व बंदुका तयार करण्याची कला शिकून त्यात पारंगत होण्याऐवजी आम्ही उसनवारी व भाडोत्री बुद्धी यांवर अवलंबून राहिलो. जी माणसे घड्याळासारखी नाजूक यंत्रे बनवितात, वैद्यकशास्त्रात प्रगती करतात, भूगोल व खगोल शास्त्रांत आघाडी मारतात, तीच माणसे नवीन शस्त्रसंभार निर्माण करतात; इतकेच नाही, तर अद्ययावत व कार्यक्षम शासनयंत्रणा उभी करू शकतात. परंतु नाना फडणिसांनासुद्धा ही गोष्ट उमगली नाही.

इंग्रजांचे राज्य या देशात स्थिर झाल्यानंतरही युद्धशास्त्राविषयी किंवा सैनिकीकरणाविषयी स्वा. सावरकरांवाचून कोणत्याही भारतीय नेत्याने फारशी उत्सुकता दाखविली नाही. गांधीयुगात तर अहिंसक चळवळीवरच भर देण्यात आला. त्यामुळे या विषयाची अधिक उपेक्षा झाली. शस्त्र व सैन्य यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला. पुढे स्वराज्य येताच गांधीवादाच्या संस्कारात वाढलेले नेते शासनारूढ झाले. त्यामुळे शासनाची शस्त्र व सैन्य यांच्याकडे पाहण्याची दृष्टी जगाच्या व्यवहाराविरुद्ध झाली. सैन्यबळाचे महत्त्व कमी आहे, हा पक्ष एकदा स्वीकारल्यावर सैन्याकडे व शस्त्राकडे दुर्लक्ष व्हावे, हे क्रमप्राप्तच आहे. राज्यकर्त्यांच्या आंधळ्या व विकृत दृष्टिकोनामुळेच पर भवांच्या आपत्ती या देशावर कोसळल्या आहेत.

चालू शतकात सुधारलेली व स्वयंचलित शस्त्रे, चिलखती मोटारी, रणगाडे, विमाने, बॉम्ब, रडार, इ. अत्याधुनिक सामग्रीमुळे युद्धाचे स्वरूप पार बदलले आहे. अण्वस्त्रांच्या शोधामुळे तर युद्धातील संहाराला सीमाच उरली नाही. विमानदळ व बाँब यामुळे युद्धे सर्वंकष झाली आहेत. सांप्रत केवळ शस्त्रसज्ज सैन्यालाच शत्रूचा मारा सहन करावा लागतो असे नाही; तर देशातील कोणत्याही नगरावर बाँबवर्षाव होऊ शकतो. त्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुळे घरे-दारेच उद्ध्वस्त होतात असे नव्हे, तर असंख्य नागरिकही प्राणास मुकतात. घरणे, विमानतळ, लोहमार्ग यांचाही नाश होतो. त्यामुळे युद्धासाठी सीमेवर व रणक्षेत्रावर उत्कृष्ट सैन्य पाठवूनच भागत नाही, तर देशातील विविध प्रकारच्या केंद्रांचे संरक्षण करणे, युद्धसामग्रीची वाहतूक चालू ठेवणे व नागरिकांचे रक्षण करून त्यांच्या सहकार्याने शत्रूच्या गुप्त हेरांचा बंदोबस्त करणे, यांचाही युद्धतंत्रात समावेश करावा लागतो.

इ. स. १९६२ मध्ये चीनने हिमालय पार करून प्रचंड सेना भारताच्या उत्तर सीमेवर आणली व भारताचा बराच प्रदेश जिंकला, तेव्हा कुठे आपल्या संरक्षणखात्याला जाग आली. त्यानंतर भारत सरकारने आपल्या युद्धतंत्रात सुधारणा करून सेनासामर्थ्य वाढवले. म्हणूनच त्याला पाकिस्तानचा दोनदा पराभव करता आला. त्या दोन्ही युद्धात भारताच्या सेनादलांनी जो विलक्षण पराक्रम गाजविला. त्यावरून आता यापुढे भारतात युद्धशास्त्राची उपेक्षा होणार नाही, असे म्हणायला हरकत नाही. आपली सेनादले आता अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज असून, त्यांचे अधिकारीही युद्धविद्येत आणि व्यूहरचनेत कुशल बनले आहेत, यात शंका नाही. [मि. सि. ए. इं.; रा. का. स.; म. भा. उ.; भा. सं. प.; प्रा. भा. सां. सां. भू.; वि. सा. इ.; रा. रा. उ. व्हा.; भा. सं. स.; यु. यं. तं.; भा. यु. उ.; मु. का. भा.]

युवकरण एक प्राचीन विद्या. केवळ स्पर्शाने वृद्धांना तारुण्य देण्याची ही विद्या आहे. शंतनू राजाला ही विद्या अवगत होती, असे भागवतात म्हटले आहे. तो श्लोक असा—

अभवच्छन्तनू राजा प्राङ्महाभिषसंज्ञितः ।
यं यं कराभ्यां स्पृशति जीर्णं यौवनमेति सः ॥

(भाग. पु. ९.२२.१३)

अर्थ – (देवापी राज्य सोडून वनात गेला) तेव्हा शंतनू हा राजा झाला. त्याला पूर्वजन्मी महाभिष अशी संज्ञा होती. तो आपल्या हातांनी ज्या वृद्धाला स्पर्श करीत असे, तो तरुण होत असे.

शंतनू ज्याला तरुण करीत असे त्याला उत्तम प्रकारची शांती लाभत असे, असेही भागवतात म्हटले आहे. [पु. वि.]

युवराज सर्व राजपुत्रांत पट्टराणीच्या ज्येष्ठ पुत्राला युवराज अशी संज्ञा आहे. त्याला आर्यकुमार असेही म्हणत (अष्टा. ६.२.५८). जातकांत त्यालाच उपराज म्हटले आहे. कामंदकीय नीतिसारात याविषयी म्हटले आहे, ते असे—

विनयोपग्रहान् भूत्यै कुर्वीत नृपतिः सुतान् ।
अविनीतकुमारं हि कुलमाशु विशीर्यते ॥
विनीतमौरसं पुत्रं यौवराज्येऽभिषेचयेत् ।

अर्थ – राजाने आपल्या पुत्रांना ऐश्वर्यवृद्धीसाठी शिक्षित व विनयादिगुणसंपन्न करावे. राजपुत्र जर अविनीत झाले, तर ते राजकुल तावडतोब भ्रंश पावते. राजाने विनीत अशा औरस पुत्राला यौवराज्याचा अभिषेक करावा.

ज्येष्ठ पुत्राला यौवराज्यावर अभिषिक्त करण्यामध्ये अनेक उद्देश असत. वार्धक्यात राजाची कार्यशक्ती कमी झाली असता युवराजाने त्याला सहकार्य द्यावे, प्रजापालनाची कामे जबाबदारीने अंगावर घ्यावी, लढाईचा प्रसंग ओढवला, तर त्या कामी स्वतः पुढाकार घ्यावा आणि राजाच्या दुर्बलतेमुळे राज्य दुर्बल होण्याची जी शक्यता असते, ती टाळावी, ही युवराजपदाच्या मागची राजकीय भूमिका असे. याच बहुविध उद्देशाने दशरथाने रामाला यौवराज्याचा अभिषेक करण्याचे ठरवले होते.

यौवराज्याचा अभिषेक सामान्यतः राज्याभिषेकासारखाच असे. राजकुमाराला एका मंगलासनावर बसवून पवित्र अभिमंत्रित जलाने त्याला अभिषेक करीत. मग इतर काही अंगोपांगे पुरी झाल्यावर युवराज आपल्या माता–पित्यांना अभिवादन करी. नंतर भाट–चारण 'विजयतां युवराजः' म्हणून त्याला पुढीलप्रमाणे आशीर्वाद देत–

'ज्या प्रकारे अत्री ऋषी ब्रह्म्याला, चंद्रमा अत्रीला व बुध चंद्रम्याला शोभला त्याप्रमाणे तू आपल्या प्रजाप्रेमादी अनेक गुणांनी आपल्या पित्याला शोभावेस. तुझ्या प्रतापी वंशात आजवर सर्व आशीर्वाद यथार्थत्वाने पुरे झाले आहेत.'

श्रेष्ठ राजपुत्राला यौवराज्य देण्याची जशी प्रथा होती, त्याचप्रमाणे युवराज निवडण्याची प्रथाही काही ठिकाणी आढळत होती. अलाहाबाद येथील एका स्तंभालेखावरून कळते, की पहिल्या चंद्रगुप्ताने समुद्रगुप्ताला आपला युवराज निवडले होते. अर्थशास्त्र व शुक्रनीती या दोन्ही ग्रंथांत युवराजाला राज्यकारभाराचे एक अंग मानलेले आहे. युवराजाला स्वतःची मोहर वापरून स्वाक्षरी करण्याचा अधिकार असे. त्याला मंत्रिमंडळात स्थान नसले, तरी मंत्र्याइतके अधिकार असत. राजाप्रमाणेच युवराजालाही शरीररक्षक व स्तुतिपाठक असत. त्याच्या शरीररक्षणाची जबाबदारी मुख्यत्वे मंत्रिपुत्र व अधीन राजांचे राजकुमार स्वीकारीत असत. [हिं. रा. तं.; का. भा.]

यूप पशुयागामध्ये पशू ज्या खांबाला बांधतात, त्याला यूप असे म्हणतात. पळस, खैर, बेल किंवा रोहितक या झाडांचा यूप करतात. विशिष्ट कामनेनुसार यूपासाठी निरनिराळे वृक्ष घेतात. यूपाची लांबी तीन अरत्नीपासून पुढे कितीही चालते. एका अरत्नीचाही यूप करावा, असे कात्यायन श्रौतसूत्रांत म्हटले आहे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(६.१.२५). यूप खालच्या अंगाला जाड आणि वर निमुळता होत गेलेला असतो. त्याचप्रमाणे तो अष्टकोनी किंवा चौकोनी असतो. यूपाच्या वर चषाल बसवितात. ज्या वृक्षाचा यूप केला असेल, त्याच वृक्षाचा चषाल करतात.

वाजपेय यज्ञात यूप सतरा हात लांब आणि चौकोनी असतो. त्यावर बसवायचा चषाल गव्हाच्या पिठाचा करतात. या यागातील यूपाला सतरा वस्त्रे गुंडाळतात. खड्ड्यात पुरलेल्या यूपाचा जेवढा भाग जमिनीत असतो त्याला उपर म्हणतात. उपर तासायचा नसतो.

यूप तयार करायचा विधी पुढीलप्रमाणे आहे – अध्वर्यू प्रथम आहवनीयाग्नीत यूपाहुती देतो. नंतर उरलेले आज्य घेऊन तो तक्ष्यासह रानात जातो. वृक्षाची निवड झाल्यावर अध्वर्यू, ब्रह्मा, यजमान व तक्षा (सुतार) त्याला स्पर्श करतात. 'विष्णवे त्वा' या मंत्राने अध्वर्यू आज्ययुक्त स्रुव्याने वृक्षाच्या खोडाला स्पर्श करतो. खोडावर तिरपा दर्भ ठेवून 'ओषधे त्रायस्वैनम्' असे म्हणतो. आणि 'स्वधिते मैनं हिंसीः' असे म्हणून त्यावर कुऱ्हाडीने घाव घालतो. मग त्या खोडाचा यूप बनवला जातो.



यूप

आहवनीयाच्या पूर्वेला सीमारेषेवर यूप पुरतात. यूप पाण्याने धुतल्यानंतर त्यावर यवमिश्रित जल शिंपडतात. यूप तोडण्यापूर्वी निघालेला पहिला ढलपा व मूठभर दर्भ यूपावर ठेवतात. मग तो ढलपा यूप पुरण्यासाठी केलेल्या खळग्यात ठेवतात. उर्वरित यवमिश्रित जलही त्यात टाकतात. आज्याहुती दिल्यावर अध्वर्यू किंवा यजमान यूपाच्या दक्षिणेला बसून त्याला तूप चोळतात. यूप खड्ड्यात ठेवताना 'या ते धामानि' हा मंत्र म्हणतात. त्याचे टोक आहवनीयाकडे कलते होईल अशा बेताने तो पुरतात. नंतर यजमान यूपाभोवती मेखला गुंडाळतो. तिला यूपद्वीप किंवा यूपहंस्ती असे म्हणतात. प्रोक्षण, अंजन, उच्छ्रयण, परिव्ययण हे सर्व संस्कार यूपावर एकामागून एक असे एकदाच करतात.

अश्वमेध यज्ञात एकवीस यूप असतात. यूपाला प्रदक्षिणा घातल्याने वाजपेय यागाचे पुण्य मिळते, असे सांगितले आहे. [हि. घ.; म. ज्ञा. को.; पु. इं.; श्रीविद्याधरशास्त्री भिडे]

येरुकल

येरुकल एक भटकी जमात. या लोकांना एरुकल असेही म्हणतात. यांची वस्ती मुख्यत्वे आंध्र व तमिळनाडु या राज्यांत आहे. एरुक या तेलुगू शब्दाचा अर्थ मंत्र घालणे किंवा भविष्य सांगणे असा आहे. या जमातीच्या स्त्रिया हा व्यवसाय करतात, म्हणून या जमातीला येरुकल हे नाव मिळाले असावे.

या जमातीत उरू, उप्पू व डब्ब असे मुख्य तीन भेद आहेत. उरू येरुकल हे खेड्यात स्थायिक होऊन शेती करतात. उप्पू येरुकल हे गावोगाव फिरून मीठ आणि इतर वस्तू विकतात. डब्ब येरुकल डोंगराच्या पायथ्याशी राहतात व बांबूच्या चटया, टोपल्या वगैरे विणून विकतात.

उद्योगधंदे– गुन्हेगार जमात म्हणून या लोकांची नोंद झालेली आहे. पूर्वी यांच्यापैकी बहुतेक सर्व लोक भटके होते व चोऱ्या, घरफोडी वगैरे करीत होते. परंतु त्यांच्यापैकी काहीजण आता एका जागी स्थायिक होऊन शेती करू लागले आहेत. काहीजण टोपल्या, चटया, दोऱ्या वगैरे विणतात आणि विकतात. काही कढीनिंबाची पाने गोळा करून वाळवतात व विकतात. काही भीक मागतात व काही भविष्य सांगतात. हे काही वेळा भीक मागणे व भविष्य सांगणे यांचा उपयोग चोरी करण्यासाठी घरे हेरण्याकरताही करतात.



येरुकल पुरुष

वेषभूषा – येरुकल पुरुष गुडघ्यापर्यंत येईल, असे आखूड धोतर नेसतात. त्यांच्या स्त्रिया साडी नेसतात व अंगात चोळी घालतात. त्या गळ्यात रंगीबेरंगी मण्यांच्या पुष्कळ माळा, हातांत काचेच्या किंवा पितळेच्या बांगड्या आणि बोटांत चांदीच्या अंगठ्या घालतात.

येरुकलांच्या झोपड्या कोंबळी असतात. ते मांजर, कोंबडी, डुक्कर, शेळी, मेंढी, इ. प्राण्यांचे मांस व मासे खातात.

विवाहप्रथा – यांची विवाहपद्धती सर्वसाधारण हिंदू लोकांसारखीच आहे. यांच्यांत वधूशुल्क देण्याची पद्धत आहे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लग्नाच्या वेळी नवरा मुलगा वधूच्या गळयात काळी पोत बांधतो आणि वधू-वर एकमेकांच्या मस्तकांवर अक्षता टाकतात. लग्नसमारंभात हे लोक खूप दारू पितात.

हे लोक येरकली नामक तेलुगू, तमिळ व कन्नड या भाषांचे मिश्रण असलेली एक बोली बोलतात. याशिवाय, त्यांची स्वतःची अशी सांकेतिक भाषा असते. चोरीच्या संदर्भात ते तिचा उपयोग करतात.

या लोकांचा शकुनावर फार विश्वास असतो. चोरी करायला निघण्यापूर्वी ते शुभ शकुन पाहतात व आपल्या कामात यश मिळावे, म्हणून देवाची पूजा करतात. तिरुपतीचा व्यंकटेश व लक्ष्मी यांना ते भजतात.

या लोकांत हल्ली शिक्षणाचा प्रसार वाढत आहे. त्यामुळे त्यांची गुन्हेगारीची प्रवृत्ती कमी झाली आहे.

परदेशी मिशनऱ्यांच्या संपर्कात आल्यामुळे काही येरुकल लोकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे. [ट्रा. इं.]

येशू ख्रिस्त (सनपूर्व ६ – इ. स. ४३) ख्रिस्ती धर्माचा संस्थापक. यहुदी धर्मग्रंथात मशी अह ही एक पदवी आहे. तिचा अर्थ अभिषिक्त असा होतो. ग्रीक भाषेत त्या पदवीला ख्रिस्तोस असा पर्याय शब्द आहे. त्यावरूनच युरोपात येशूला येशू ख्रिस्त किंवा जीजस ख्राइस्ट असे म्हणतात.

येशूचे जीवन आणि कार्य यांविषयी ऐतिहासिक आधारांनी प्रमाणित ठरेल अशी सामग्री फार कमी मिळते. म्हणून बायबल आणि विशेषतः चार शुभ वर्तमाने (गॉस्पेल्स) यांच्या आधारे येशूचे चरित्र जाणून घ्यावे लागते.

येशूची माता मेरी ही पॅलेस्टाइनमधील गॅलिलिया प्रांतातल्या नाझरेथ गावची रहिवासी होती. दाऊदाचा वंशज असलेल्या जोसेफ नावाच्या एका सुताराशी तिचे लग्न झाले. विवाहाच्या पूर्वी कुमारी अवस्थेतच तिला पवित्र आत्म्याच्या द्वारे गर्भ राहिला होता. तरीही ईश्वराचा संदेश मिळाल्यामुळे जोसेफने मेरीचे पत्नी म्हणून पाणिग्रहण केले. विवाहानंतर जोसेफने गॅलिलिया सोडले आणि तो आपल्या पत्नीला घेऊन यहुदिया प्रांतातील बेथलेहेम नामक शहरात राहायला गेला. तिथेच येशूचा जन्म झाला. जोसेफला तिथेही फार काळ राहाता आले नाही. तिथला राजा हेरोद हा अत्याचारी होता. त्याच्याकडून आपल्या मुलाला उपद्रव होऊ नये म्हणून जोसेफ येशूसह बेथले-हेम सोडून ग्रीस देशात पळून गेला. हेरोद हा सन पूर्व ४ या वर्षी मरण पावला. जोसेफ त्यानंतर ग्रीसमधून परत आला आणि नाझरेथ या गावी राहू लागला. येशू तेथे लहानाचा मोठा झाला. तो बापाजवळ सुतारकाम शिकला आणि त्याने वयाच्या ३० व्या वर्षापर्यंत नाझरेथ गावी सुतारकी केली.

त्या काळात समस्त यहुदी जात रोमन सम्राट तिबेरियस याच्या आधीन होती. ही राजकीय परतंत्रता यहुदी लोकांना असह्य झाली होती. कोणीतरी ईश्वराचा प्रेषित असा पुरुष येईल आणि तो यहुदी जातीला मुक्त करील, असे त्यांच्या धर्म-शास्त्रात सांगितलेले होते. त्या दिवसाची आणि त्या प्रेषिताची ते उत्कंठेने प्रतीक्षा करीत राहिले होते.

याच कालात योहान दी बॅप्टिस्ट नावाचा एक धर्मनिष्ठ पुरुष जॉर्डन नदीच्या तीरावर राहत असे. तो उंटाच्या केसांचे वस्त्र परिधान करी आणि कमरेला कातडयाचा पट्टा घाली. 'पापाचा पश्चात्ताप करा; स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे', असा उपदेश करीत तो जॉर्डनच्या खोऱ्याखोऱ्यातून हिंडे. त्याने अनेक लोकांना जार्डन नदीत बाप्तिस्मा देऊन शुद्ध केले होते. त्यामुळे आसपासच्या सर्व लोकांना योहान म्हणजे देवाचा पुत्र वाटे. पण तो लोकांना म्हणे, 'देवाचा पुत्र मी नव्हे; तो अजून अवतरायचा आहे.'

योहानची ही कीर्ती येशूच्याही कानी गेली. त्याने लगेच आपली सुतारकीची हत्यारे टाकून दिली आणि योहानकडे धाव घेतली. येशूला पाहताच योहान अंतःस्फूर्तीने उमगला, की देवाचा पुत्र तो हाच होय. तो लगेच येशूच्या पुढे नम्र झाला. येशूने त्याला म्हटले. 'अहो ! असे काय करता ? मी तुमच्या-कडून बाप्तिस्मा घ्यायला आलो आहे.' योहान त्यावर बोलला, 'श्रेष्ठ पुरुषा ! सर्व जगाचे तारण करणारा तू प्रभूचा लडका पुत्र आहेस. मी तुला बाप्तिस्मा कसा देऊ ? तूच मला पावन करून घे.' ते बोलणे अमान्य करून येशू म्हणाला. 'सगळ्या गोष्टी धर्माला अनुसरून झाल्या पाहिजेत. तेव्हा तू मला बाप्तिस्मा दे.' येशूचे म्हणणे योहानला मोडवेना. त्याने मग येशूला विधिपूर्वक बाप्तिस्मा दिला. त्या दिवसापासून येशू ईश्वरी संदेशाचा प्रचार करीत सर्वत्र हिंडू लागला.

थोडयाच कालात त्याला काही शिष्यही मिळाले. त्यांच्या समवेत तो देशपर्यटनाला निघाला. जिथे जाई तिथे तो निर्भयपणे ईश्वरी संदेशाचा उपदेश देई. लोकांना आश्चर्य वाटे, की काल-पर्यंत सुतारकाम करणारा हा माणूस अचानक धर्मोपदेशक कसा काय बनला ? पण कोणी काही म्हटले तरी सामान्य लोक येशूकडे आकर्षित होऊ लागले. येशू साध्या बोलभाषेत आणि व्यावहारिक जीवनातील दृष्टान्त देऊन धर्मप्रवचन करी. त्यामुळे सामान्य लोकांवर त्याचा प्रभाव पडे. हळूहळू त्याची धर्मप्रवचने अधिकाधिक व्यापक, मावगर्भ आणि नीतिप्रधान होऊ लागली.

यहुद्यांच्या धर्मग्रंथाचे नाव तौरैत असे होते. यालाच अलि-कडे जुना करार किंवा बायबलाची जुनी पोथी असे म्हणतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

येशू हा जुना करार मानीत असे; पण त्याचे म्हणणे असे होते, की त्या पोथीतल्या नियमांचा परिष्कार करायला हवा. जुन्या वचनांचा परिस्थितिप्राप्त नवा अर्थ लावायला हवा. येशू ते साहस करीत होता. एके दिवशी पर्वतावरील प्रवचनात त्याने सांगितले – "मी मूसाचे नियम धाब्यावर बसविण्यासाठी आणि नबींचे उपदेश रद्द करण्यासाठी आलो नाही; तर त्यांचे ते काम पूर्ण करण्यासाठी आलो आहे."

याचा अर्थ हा, की येशू हा यहुदी धर्म अपूर्ण समजत होता आणि त्याला तो परिपूर्ण करायचा होता. यहुद्यांच्या धर्मशास्त्र्यांनी माजवलेले कर्मकांडाचे अवडंबर त्याला मान्य नव्हते. कर्मकांडापेक्षा नीती हाच खरा धर्माचा आधार आहे, असे तो समजे. त्याचा लोकांना उपदेश असे, तो असा –

(१) तुम्ही परमात्म्याला आपला दयाळू पिता माना, श्रद्धेने आणि भक्तीने त्याच्यावर प्रेम करा आणि त्याच्यावरच संपूर्ण विश्वास ठेवा.

(२) तुम्ही सर्व माणसांना बहीण-भाऊ समजा आणि त्यांचे कल्याण व्हावे असे सदैव चिंता. कोणाशी वैर करू नका. तुमच्यावर कोणी आक्षेप घेतल्यास आणि तुमचा कोणी अपराध केल्यास त्याला क्षमा करा. अहंकार व ढोंग या दोन्ही अधार्मिक गोष्टी आहेत, तेव्हा त्यांचा विषवत त्याग करा.

देवाची प्रार्थना कशी करावी, हे येशूने आपल्या अनुयायांना पुढीलप्रमाणे सांगितले –

"हे आमच्या स्वर्गस्थ परमपित्या, तुझे नाव गाजो. तुझे राज्य येवो. स्वर्गात व पृथ्वीवर तुझ्या इच्छेचे पालन होवो. आजची भाकरी आज आम्हांला दे. आमच्या अपराध्यांना आम्ही जशी क्षमा करतो, तशी तू आमच्या अपराधांबद्दल आम्हांला क्षमा कर. आणि मोहांपासून व पापांपासून आम्हांला वाचव."

येशू ख्रिस्ताच्या जीवनातील काही उद्बोधक प्रसंग असे–

एके दिवशी स्वतःला अत्यंत धर्मनिष्ठ समजणाऱ्या एका फॅरिसीकडे येशू जेवायला गेला. तो तिथे असताना एक हीन दर्जाची बाई तिथे आली आणि येशूच्या पायाशी गुडघे टेकून बसली. येशूच्या पायावर डोके टेकताच तिचे अश्रू त्याच्या पायावर पडले. तिने ते आपल्या केसांनी पुसले आणि जवळच्या कुपीतील अत्तर त्या पायांवर शिंपडले. एका हीन बाईला येशूने इतके जवळ करावे, हे त्या सनातनी फॅरिसीला आवडले नाही. त्यावर येशूने त्याला एक गोष्ट सांगितली–

दोघा जणांनी एका सावकाराचे कर्ज काढले होते. एकाने ५० मोहरांचे आणि दुसऱ्याने ५ मोहरांचे. दोघेही त्याची परतफेड करायला असमर्थ ठरल्याने सावकराने त्या दोघांनाही कर्ज माफ केले. आता तुम्हीच सांगा बरे, दोहोंपैकी कोणता ऋणको सावकारावर अधिक प्रेम करील आणि त्याची अधिक सेवा करील ?

यावर तो सनातनी फॅरिसी म्हणाला. "अर्थात ज्याच्यावर जास्त कर्ज होते, तो."

तेव्हा येशू त्या बाईकडे बोट करून म्हणाला –

"तुझे आणि त्या बाईचे तसेच आहे. तू स्वतःला पुण्यशील समजतोस आणि म्हणून देवाचे फारसे ऋण मानीत नाहीस. ही बाई आपल्याला हीन समजते आणि म्हणून देवाचे स्वतःवर फार मोठे ऋण मानते. ती आपल्याला महापापी समजते आणि म्हणून लोकांवर प्रेम करणे तिला सोपे आहे. पण तू आपल्याला पुण्यशील समजतोस आणि म्हणून तुला प्रेम करणे कठीण जाते. जो निस्सीम प्रेम करतो त्याला सर्व पापांची क्षमा मिळते."

एके दिवशी सनातनी फॅरिसी आणि काही यहुदी धर्मशास्त्री व्यभिचाराचा गुन्हा केलेल्या एका स्त्रीला घेऊन येशूजवळ आले आणि त्याला म्हणाले –

"गुरुमहाराज, या स्त्रीच्या हातून व्यभिचाराचा गुन्हा घडला आहे. मोझेसच्या कायद्याप्रमाणे अशा स्त्रियांना दगड मारून ठार करण्याची शिक्षा आहे. यावर तुमचे काय म्हणणे ?"

शास्त्रीमंडळी त्याला कोंडीत पकडण्यासाठी असे बोलली होती. 'तिला दगडांनी ठार करा,' असे जर येशूने म्हटले असते, तर 'पापाची घृणा करा; पाप्याची करू नका आणि पाप्यावरही प्रेमच करा' या त्याच्या उपदेशाविरुद्ध ते बोलणे ठरले असते. जर तो 'त्या स्त्रीला मारू नका,' असे म्हणाला असता, तर ते मोझेसच्या कायद्याविरुद्ध बोलणे झाले असते. म्हणून तो काहीही न बोलता खाली मान घालून धुळीत रेघोट्या ओढीत राहिला. यहुदी धर्मशास्त्र्यांनी निर्णय देण्याविषयी येशूला आग्रह केला, तेव्हा तो वर मान करून एवढेच म्हणाला–

"तुम्ही म्हणता, की कायद्याप्रमाणे या स्त्रीला दगडाने ठार केले पाहिजे. करा तर मग. पण माझे एवढेच सांगणे आहे, की ज्याच्या हातून कोणतेही पाप घडले नसेल, त्याने तिला पहिला दगड मारावा."

हे ऐकताच कोणीही तिला दगड मारायला पुढे झाला नाही आणि ते सगळे लोक तिथून निघून गेले. उरली ती एकटी स्त्री. येशू तिला म्हणाला –

"कोणीच तुला अपराधी ठरविले नाही. असे दिसते."

ती म्हणाली, "कोणीच नाही."

"तर मग मीही तुला अपराधी ठरवीत नाही. जा. पुन्हा असले पाप करू नको."

येशू ख्रिस्ताने अनेक चमत्कार केले. त्याने कित्येक रोग्यांना आरोग्य दिले आणि कित्येक मृतांना जिवंतही केले असे सांग-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सात. त्याचे हे चमत्कार पाहून लोक त्याला प्रेषित किंवा पैगंबर समजू लागले. हळूहळू येशूही लोकांना सांगू लागला, की ईश्वराचा प्रेषित पुत्र तो मीच आहे आणि स्वर्गाचे राज्य पृथ्वीवर प्रतिष्ठित करण्यासाठी स्वर्गातून खाली उतरलो आहे.

आणि इथेच संघर्षाचे बीज पडले. यहुदी लोक स्वतःला ईश्वराची आवडती प्रजा समजत होते आणि रोमनांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी एखाद्या प्रेषिताची प्रतीक्षा करीत होते. पण येशूने जेव्हा 'मी केवळ यहुदी लोकांच्याच मुक्तीसाठी नव्हे; तर समस्त मानवजातीला पापातून मुक्त करण्यासाठी आलो आहे,' असे सांगायला सुरुवात केली, तेव्हा यहुदी लोक

येशू ख्रिस्त

त्याच्यावर विथरले. तो आणखीही काही सांगे. 'स्वर्गाच्या राज्यावर केवळ यहुदी लोकांचाच एकाधिकार नाही. जगातल्या मानवमात्राला त्या स्वर्गात स्थान आहे.' ही त्याची भाषणे ऐकून यहुदी लोक म्हणू लागले, की येशू जे स्वर्गीय राज्य आणू इच्छितो, ते काहीतरी वेगळेच आहे. येशूचा धर्म हा नवा धर्म असून, त्याचा जेरुसलेमच्या चर्चशी काहीही संबंध नाही. यहुद्यांमधील धर्मशास्त्र्यांना अशी भीती उत्पन्न झाली, की जर जनता येशूपदिष्ट मार्गाने जाऊ लागली, तर आपल्याला कोणी विचारणार नाही. म्हणून त्यांनी येशूला पाखंडी ठरवले. एवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर त्यांनी त्याला पकडून आपल्या धर्ममहासभेपुढे आणले आणि त्याच्यावर धर्मद्रोहाचा खटला चालवून त्याला प्राणदंडाची शिक्षा दिली. रोमन राज्यपालाने या शिक्षेचे समर्थन केले आणि येशूला क्रूसावर चढवून मारण्याचा आदेश दिला. त्याच्या डोक्यावर काटयांचा मुकुट घालून राजसेवकांनी त्याला सुळी दिले. सुळावर चढविलेल्या अवस्थेतही त्याने कोणावर क्रोध केला नाही. त्याच्या हातापायांत खिळे ठोकणाऱ्या राजसेवकांसाठीही त्याने प्रार्थना केली. तो देवाला म्हणाला–" हे बापा, तू यांना क्षमा कर. कारण हे काय करतात ते त्यांना समजत नाही."

मरणापूर्वी येशू ख्रिस्ताला तहान लागली. तो तिथल्या प्रेक्षक लोकांना म्हणाला. 'मला काहीतरी प्यायला द्या.' त्यावर एका माणसाने एक स्पंज द्राक्षासवात बुडवून वेळूच्या टोकाने येशूपर्यंत पोचविला. येशूने तो स्पंज चोखला आणि जीवनातले शेवटचे वाक्य उच्चारले. 'संपले. हे पित्या, माझा जीव मी तुझ्या हवाली केला आहे!' एवढे बोलून त्याने मान टाकली.

ही शिक्षा इ. स. ३० साली एका शुक्रवारी अंमलात आणली गेली असावी. अशा प्रकारे येशूचा निर्घृण अंत झाला.

येशूला कदाचित या घटनेची पूर्वसूचना मिळालेली असावी. म्हणून त्याने आपल्या शिष्यांना एकत्र जमवून तळमळीचा उपदेश केला, तो असा–

" माझा कायदा प्रेमाचा आहे. तुम्ही त्याची कास धराल, तर तुमच्या सर्व कामना पूर्ण होतील. कारण परमेश्वराची अशी इच्छा आहे, की जे तुम्हांला हवे असेल, ते तुम्हांला मिळावे. माझ्या श्रेष्ठ पित्याने जे चांगले ते मला दिले आणि तेच मी आता तुम्हांला देत आहे. मी ज्याप्रमाणे आपल्या पित्याचा आदेश पाळतो, त्याप्रमाणे तुम्ही जर माझा आदेश पाळाल, तर तुमचे कल्याण होईल. जसा मी तुमच्यावर प्रेम करतो, तसे तुम्ही एकमेकांवर प्रेम करा. हाच माझा तुम्हांला आदेश आहे. तसे तुम्ही केलेत, तर प्रेमासाठी जीवनाचे बलिदान करायलाही तुम्ही तयार व्हाल. तुम्ही माझ्या उपदेशाप्रमाणे वागाल, तर माझ्या बरोबरीचे व्हाल. मी जे केले ते तुम्हीही करू शकाल."

नंतर त्याने चांगले गुणी व निष्ठावंत असे बारा शिष्य निवडून काढले आणि त्यांना आज्ञा दिली, की 'तुम्ही माझा धर्मसंदेश जनतेपर्यंत नेऊन पोचवा.' या बारा शिष्यांना त्याने विशेष प्रका-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रचे शिक्षण आणि काही विशेष अधिकारही देऊन ठेवले होते.

येशू ख्रिस्ताला सुळावर चढवल्यानंतर या बारा शिष्यांनी रोमन राज्यपालाच्या आज्ञेने येशूचे प्रेत सुळावरून खाली उतरवले आणि त्याचे व्यवस्थित दफन केले. पण दफनाच्या तिसऱ्या दिवशी त्या शिष्यांना दिसले, की येशूची कबर रिकामी आहे, म्हणजे तिच्यात येशूचे प्रेत नाही. त्या चमत्कारावर लोकांचा विश्वास बसला. लोक म्हणू लागले, की 'येशू पुन्हा जिवंत झाला आहे.' पुढे काही शिष्यांना त्याने दर्शनही दिले आणि काहींच्या बरोबर संभाषणही केले. येशूचे कबरीतून उठणे या घटनेला ख्रिस्ती धर्मात पुनरुत्थान असे नाव आहे. पुनरुत्थानापासून ४० व्या दिवशी त्याचे स्वर्गारोहण झाले, असे समजतात.

येशूच्या पुनरुत्थानाच्या संबंधात काही नवीन माहिती आता उपलब्ध झाली आहे. येशूला क्रूसावर चढवताना आणि नंतर त्याचे कबरीत दफन करताना एका माणसाने पाहिले होते आणि ती घटना त्याने इस्कंदरिया येथील आपल्या एका मित्राला पत्रद्वारे सविस्तर लिहून कळवली होती. सांप्रत ते पत्र एका उत्खननात उपलब्ध झाले असून, त्यातील मजकूर पुढील प्रमाणे आहे—

"येशूला क्रूसावर चढवल्यानंतर जेव्हा तो मृतवत झाला, तेव्हा त्याचा प्राण गेला, असे समजून त्याचा देह त्याच्या अनुयायांना दिला गेला. त्या वेळी तिकोदेमस नावाच्या वैद्याने ताबडतोब येशूच्या शरीरावर औषधाचा लेप लावला आणि ज्या कबरीत त्याचे शरीर पुरले गेले होते, त्या कबरीत पुरेशी मोकळी जागा ठेवून त्याला हवा मिळेल अशी व्यवस्था केली. खड्डा भरून टाकल्यावर येशूच्या शरीरावर काही योगक्रिया करून ते शरीर सचेतन केले गेले. नंतर त्याला खड्ड्यातून काढून सुरक्षित स्थळी नेण्यात आले. काही दिवसांनी येशूने आपल्या काही शिष्यांना दर्शन दिले. पण त्याचे प्रकट होणे अजूनही धोक्याचे होते. म्हणून त्याच्या शिष्यांनी त्याला एका अज्ञात स्थळी नेऊन ठेवले आणि नंतर सहा महिने उलटल्यावर त्याच्या मृत्यूची गोष्ट लोकांमध्ये प्रकट केली."

प्रस्तुत घटनेच्या संबंधात श्री. ग. दा. सावरकर यांनी आपल्या ख्रिस्तपरिचय या पुस्तकात पुढील माहिती दिली आहे—

येशू ख्रिस्त तरुणपणी भारतात आला होता आणि त्याने नाथ संप्रदायाशी संपर्क साधला होता. त्या संप्रदायाच्या एका भजनात ईशनाथाचा उल्लेख आहे. तो ईशनाथ म्हणजे येशू ख्रिस्तच होय. त्याला क्रूसावर चढवल्याची वातमी जेव्हा भारतात आली, तेव्हा ती ध्यानमग्न चेतननाथ या महापुरुषाच्या कानी गेली. ती ऐकून तो योगबळाने ज्यूंच्या देशात प्रकट झाला आणि येशू ख्रिस्ताला भारतात घेऊन आला. भारतात आल्यावर काश्मीरात राहून येशूने आरोग्य मिळवले, एक मठ स्थापला आणि तो शिवाची आराधना करीत राहिला. वयाच्या ४९ व्या वर्षी काश्मीरातच त्याने योगसमाधी घेतली.

पवित्र कुराणातही येशू ख्रिस्ताचा उल्लेख आला आहे. त्या संदर्भात मौ. महंमद अली यांनी लिहिले आहे, ते असे—

"येशू ख्रिस्त आयुष्याच्या अखेरीस काश्मीरमध्ये आला होता आणि तिथेच त्याचा देहांत झाला. श्रीनगरच्या खातयार नामक मार्गावर त्याची कबर आहे आणि ती 'ईसासाहबकी कब्र' या नावानंच प्रसिद्ध आहे." स्वामी रामतीर्थ यांनीही या कथनाला पुष्टी दिली आहे.

येशू ख्रिस्ताच्या १३ ते ३० या वर्षांच्या कालखंडातील माहिती पूर्वी उपलब्ध नव्हती. पण सांप्रत रशियातला एक संशोधक डॉ. नोतोविच याला तिबेटमध्ये पाली भाषेतला एक ग्रंथ उपलब्ध झाला आहे. त्यात वरील कालखंडातल्या येशू ख्रिस्ताच्या जीवनाविषयी माहिती मिळते, ती अशी—

जेव्हा येशू १३ वर्षांचा झाला, तेव्हा त्याच्या आप्तेष्टांनी त्याच्या लग्नाचा घाट घातला. पण येशूला ते पसंत पडले नाही. त्याला नैष्ठिक ब्रह्मचारी राहायचे होते. म्हणून तो घरातून पळून गेला आणि एका काफिल्याबरोबर भारतात आला. इथे जगन्नाथपुरी, राजगृह, वाराणसी, इ. क्षेत्रांत राहून त्याने वेदाध्ययन व संस्कृत भाषेचे अध्ययन केले. पुढे जेव्हा तो वेद हे ईश्वरप्रणीत नाहीत असे सांगू लागला, तेव्हा येथील ब्राह्मणांशी त्याचे बिनसले. त्यानंतर तो ब्राह्मणी संपर्क सोडून बौद्ध मठांच्या आश्रयाने राहू लागला. तिथे त्याने पाली भाषेचे ज्ञान मिळवले आणि बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. वयाच्या २९ व्या वर्षी तो स्वदेशी म्हणजे पॅलेस्टाईनमध्ये परत गेला.

या घटनेचा एक वेगळा अर्थ पंडितांनी लावला आहे, तो असा – वरील घटना खरी असो वा नसो; पण एक गोष्ट सत्य आहे ती ही, की वैदिक हिंदूंनी ज्या प्रकारे बौद्ध धर्माच्या उत्तर काळी बुद्धाला आपला नववा अवतार मानून बौद्ध दर्शनाचाही वैदिक संस्कृतीत समावेश करून घेतला, त्याचप्रमाणे येशू ख्रिस्तालाही आपला म्हणून आणि भारतीय परंपरेशी त्याचा संबंध जोडून त्यालाही भारतीय संप्रदायपरंपरेशी आणण्याचा प्रयत्न प्राचीन काळीच केला गेला.

येशू ख्रिस्ताचे स्वभाववैशिष्ट्य हे, की तो अत्यंत नम्र, मनमिळाऊ आणि प्रेमळ होता. त्यामुळे सामान्य जनता त्याच्या अवतीभोवती सदैव गोळा होई. कित्येकदा लोकांनी घेरून ठेवल्यामुळे त्याला जेवायलाही फुरसद मिळत नसे. येशूला मुलांची फार आवड होती. तो त्यांच्यावर मेघवृष्टीसारखं प्रेम करी आणि त्यांना जवळ बोलावून आशीर्वाद देई. मुलांप्रमाणेच त्याला निसर्गाचेही अतीव आकर्षण होते. त्याच्या उपदेशात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS -

...पक्षी, इ. निसर्गातली उपमाने नेहमी येतात. धन-दौलत ही ...त्मिक साधनेत विघ्न उत्पन्न करणारी आहे, म्हणून द्रव्या-...ची हावभरी होऊ नका, असे तो धनिकांना सांगे. त्याची एक ...प्रसिद्ध आहे – 'सुईच्या नेढ्यातून उंटही जाऊ शकेल, ...श्रीमंत मनुष्य जाऊ शकणार नाही.'

...येशू ख्रिस्त पतितांना पावन करून जवळ करणारा होता. ...र्मिक अवडंबराची तो सदैव निंदा करी. तो स्वतः अत्यंत ...स्पृह आणि निर्लेप होता. त्याने देहदंडना करणारे तप कधीही ...वरले नाही. मात्र तो सदैव आत्मसंयमी राहिला. तो पापाची ...करीत असे; पाप्याची नाही. पापीजनांविषयी तो सदैव ...दयामय असे. पश्चातापाने कसलाही पापी मनुष्य शुद्ध होतो ...णि ईश्वरी कृपेला पात्र ठरतो असे, तो लोकांना सांगे. ...च्या धर्माचा जगभर प्रसार झाला, त्याच्या अनेक कारणां-...ही हे एक महत्त्वाचे कारण आहे.

येशू ख्रिस्ताने स्वतः कोणताही धर्मग्रंथ लिहिला नाही. त्याचे ...ज्यांनी जवळून पाहिले आणि त्याचा उपदेश श्रवण केला, ...त्याच्या अनुयायांनी त्याच्या जीवनातील प्रसंगांचे वर्णन ...त्याचे उपदेश चार शुभ वर्तमानांत (गॉस्पेल्स) लिहून ...आहेत. येशूच्या धर्मोपदेशाचा प्रसार व्हावा आणि त्याने ...च्या चमत्कारांची वर्णने ऐकून त्याच्या ईश्वरत्वावर लोकांचा ...स जडावा, हा त्या शुभ वर्तमानांचा प्रधान उद्देश आहे. ...शुभ वर्तमानांमुळे, येशूचे मृत्यूनंतर पुनरुत्थान झाले, या ...वरही लोकांत विश्वास उत्पन्न झाला.

येशू ख्रिस्ताच्या जीवनातून संदेश व प्रेरणा घेऊन हजारो नव्हे, ...लाखो ख्रिस्ती मिशनऱ्यांनी जगाच्या कोनाकोपऱ्यांत जाऊन ...दोन हजार वर्षांत आपले आयुष्य लोकसेवेत वेचले आहे. ...अज्ञ, दीन, दलित व पीडित अशा जनतेला चांगले जीवन ...ची संधी मिळवून देणे, यातच प्रभू येशूची खरी सेवा ...भक्ती आहे, असे या मिशनऱ्यांनी मानले. सांप्रत जगाच्या ...भागांत शाळा, महाविद्यालये, इस्पितळे, मंदिरे, इ. अनेक ...प्रभू येशूच्या नावाने चालतात. लक्षावधी लोकांना त्यांचा ...मिळतो. पाहा – ख्रिस्ती धर्म. [म. ज्ञा. को.; हिं. वि. ...वि. ध.; ख्रिस्तपरिचय; भा. सा. पु. ७]

...ळकोट खंडोबाच्या उपासनेत प्रचलित असलेली गर्जना किंवा घोष. खंडोबाची तळीआरती करताना किंवा ...त्यावर भंडारा उधळताना 'खंडेरायाचा येळकोट', 'सदा-...चा येळकोट', 'शिवामल्हारीचा येळकोट' असा उद्घोष ...तात. येळकोट हा शब्द येळू (सात) आणि कोटी (प्रकार ...कोटी ही संख्या) या दोन शब्दांतून बनला आहे. येळू-कोटी महादेव, येळूकोटी तपोधन असे प्राचीन लेखिक उल्लेख मिळतात. मार्तंड भैरवाचे सैन्य सप्तकोटी गणांचे होते, त्यावरून ही घोषणा आली असावी, अशी विद्वानांची कल्पना आहे. खंडोबाच्या संदर्भात सप्तकोटीश्वर, सप्तर्षी, सप्तमलय, सप्तकोटीगण, सातशे मेंढ्या, सात कुत्रे, इ. सात संख्येने युक्त असे शब्द अनेक वेळा येतात. त्यावरून सात ही संख्या सांकेतिक अर्थाने पवित्र बनलेली दिसते. पाहा–खंडोबा. [खंडोबा]

योगकुंडली-उपनिषद एक नव्य उपनिषद. हे कृष्ण यजुर्वेदाशी संबंधित आहे. याचे तीन अध्याय असून, यात योगप्रक्रियेची माहिती दिलेली आहे. यात कुंडलिनीजागृतीविषयी पुष्कळच महत्त्वाची माहिती आढळते. हे उपनिषद कोणी उपदेशिले त्याचा उल्लेख नसून, ते गौतमाला उपदेशिले आहे, एवढे कळते.

याच्या पहिल्या अध्यायात ८६ मंत्र आहेत. यात प्रारंभी प्राणायाम करणाऱ्याने कोणती पथ्ये पाळली पाहिजेत, त्याचे विवेचन असून, पुढच्या मंत्रांत कुंभकाचे प्रकार व त्यांपासून मिळणारी फळे यांचे विस्तृत वर्णन आहे.

दुसऱ्या अध्यायात ४९ मंत्र असून, त्यात प्रारंभी खेचरीविद्येचे वर्णन आहे. 'ह्रीं' हे तिचे बीजाक्षर असून, ती विद्या गुरुमुखाने ग्रहण केली तरच सिद्धी मिळते, असे सांगितले आहे.

तिसऱ्या अध्यायात ३५ मंत्र आहेत. त्यात सांगितले आहे, ते असे – मन म्हणजेच बिंदू होय. मन बंधात अडकले, तरी बिंदूला मात्र कोणतेही बंधन नाही. मनोलय होतो, तेव्हा बिंदू अद्वैत ब्रह्मात किंवा ईश्वरतत्त्वात प्रवेश करतो.

मायेने मोहित झालेला जीवात्मा अनेक तापांनी तप्त होत असतो मात्र ब्रह्मज्ञान होताच हे सर्व ताप दूर होऊन आणि सारे मोहही नष्ट होऊन तो जीवन्मुक्त होतो.

अशा प्रकारे जीवन्मुक्ती व विदेह मुक्ती यांचे वर्णन करून हे उपनिषद संपते. [श्री. सी. ग. देसाई]

योगचूडामणी-उपनिषद एक नव्य उपनिषद. हे सामवेदाशी संबंधित असून, यात १२१ मंत्र आहेत. प्रारंभी सहा योगांगांचा निर्देश आहे. सिद्धासन व कमलासन यांना महत्त्व दिलेले आहे. नंतर मूलाधारादी चक्रे, नाड्या व विविध बंध यांचे वर्णन आहे. योनिमुद्रेचा विशेष उहापोह केलेला आहे. त्यापुढे सांगितले आहे, ते असे –

योग्याला जागृतावस्थेत भ्रूमध्याच्या ठिकाणी हंसाचे दर्शन होते. जीव इंद्रियबद्ध आहे; तर आत्मा तसा नाही. योग्याला केवळ कुंभकाच्या साहाय्याने प्राणसंयम करता येतो. योगासनांनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विविध रोग बरे होतात. प्राणायामाने पापांचा नाश होतो. प्रत्याहाराने मनःशुद्धी होते. धारणेने मनोधैर्य लाभते. आणि समाधीने आत्मानुभूती घडते. [श्री. सी. ग. देसाई]

योगतत्त्व उपनिषद

एक नव्य उपनिषद. हे यजुर्वेदाशी संबद्ध असून, यात १४२ मंत्र आहेत. हे विष्णूने ब्रह्मदेवाला सांगितले. विष्णू हा महायोगी असून, तो सत्यमार्गात दीपस्तंभासारखा उभा आहे, असे यात म्हटले आहे.

या उपनिषदात अष्टांग योगाचे वर्णन आहे. त्याचबरोबर हठयोगाचेही विवेचन आहे. हठयोगाची १२ उपांगे सांगितली असून, महामुद्रा, महाबंध, महावेध, खेचरी, जालंधरबंध, उड्डियानबंध, मूलबंध, दीर्घप्रणवसंधान, सिद्धान्तश्रवण, वज्रोली, अमरोली व सहजोली अशी त्यांची नावे आहेत. या उपनिषदात पुढे अनेक सिद्धींचे वर्णन असून, योगसाधकाने या सिद्धींचा मोह टाळावा, असे म्हटले आहे. [श्री. सी. ग. देसाई]

योगतारा

प्रत्येक नक्षत्रपुंजातील एकेक ठळक तारा निवडून तिला योगतारा असे म्हणण्याचा प्रघात आहे. या योगतारेच्या जवळ चंद्र आला म्हणजे त्या दोहोंचा योग झाला असे म्हणतात. या योगांची काही शुभाशुभ फळेही सांगितलेली आहेत. [पं. ज्यो. शा.]

योगदर्शन

षड्दर्शनांपैकी एक दर्शन. योगाचा उल्लेख नेहमी सांख्यदर्शनाच्या जोडीने येतो. कारण त्या दोहोंच्या सिद्धान्तांत पुष्कळच साम्य आहे. सांख्यदर्शन पंचवीस तत्त्वे मानते. योगालाही ती तत्त्वे मान्य आहेत. फक्त सांख्यदर्शनाला मान्य नसलेले ईश्वर नावाचे सव्विसावे तत्त्व योगदर्शनाने अधिक स्वीकारले आहे.

योगविद्या ही एक अनुभवसिद्ध अशी विद्या आहे. ती भारतीयांची सर्वांत प्राचीन अशी आध्यात्मिक संपत्ती आहे. प्राचीन ऋषि-मुनींना जे प्रातिभ ज्ञान प्राप्त झाले व त्यांची अंतर्दृष्टी विकसित झाली, त्याला योगविद्या हे एक प्रमुख कारण आहे.

योगविद्येचा प्राणविद्येशी घनिष्ठ संबंध आहे. प्राणांचा प्रत्यक्ष संबंध प्राणायामाच्या द्वारे योगशास्त्राशी पोचतो. सर्व उपनिषदांनी मनोजय व प्राणजय हे दोन मोक्षाचे उपाय सांगितले आहेत. या प्राणजयाचे अर्थात तत्स्वरूप योगविद्येचे प्रशंसात्मक प्रतिपादन संहिता, ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे यांत अनेक ठिकाणी केलेले आहे. श्रौत वाङ्मयात काही ठिकाणी योगाचे केवळ संकेत आढळतात, तर काही ठिकाणी योगाचे सुंदर विवेचन पहायला मिळते. ऋग्वेदात दीर्घतमा ऋषी म्हणतो –

अपश्यं गोपामनिपद्यमानमा च परा च पथिभिश्चरन्तम्।
स सध्रीचीः स विषूचीर्वसान आ वरीवर्ति भुवनेष्वन्तः॥
(ऋ. १.१६४.३१)

अर्थ – मी सर्व इंद्रियांचा रक्षक आणि अविनाशी अशा प्राणाचा साक्षात्कार केला आहे. तो प्राण भिन्न भिन्न मार्गांच्या (नाड्या) द्वारे आत-बाहेर येत-जात असतो.

ऐतरेय आरण्यकात म्हटले आहे, ते असे –

प्राण हाच अंतरिक्ष व वायू यांचा स्रष्टा व पिता आहे. तो देवतात्मक आहे व ऋषिरूपही आहे. म्हणून देवता आणि ऋषी यांची भावना प्राणामध्ये करावी. हा प्राणच झोपेच्या वेळी वागादी इंद्रियांचे निगरण करतो (त्यांना गिळून टाकतो). म्हणून त्याला गृत्स असे म्हणतात. रात्रीच्या वेळी तो वीर्याच्या विसर्ग-रूपाने मद उत्पन्न करीत असल्यामुळे त्याला मद म्हटले आहे. हा अपान होय. प्राण व अपान यांच्या संयोगाला गृत्समद म्हणतात. विश्वाला पापापासून वाचवीत असल्यामुळे प्राणाला अत्रि म्हणतात. या शरीरात इंद्रियांचा निवास सर्वांत जास्त होत असल्यामुळे प्राणाला वसिष्ठ असेही म्हणतात. तात्पर्य, समस्त वेद हे प्राणरूप आहेत. म्हणून प्राणाच्या या विविध रूपांची उपासना करावी. (ऐत. आ. २.२.१०)

कठोपनिषदात (२.६ ११) योगाची व्याख्याच सांगितली आहे, ती अशी–

तां योगमिति मन्यन्ते स्थिरामिन्द्रियधारणाम्।

अर्थ – (आत्म्याच्या ठिकाणी) इंद्रियांची स्थिर धारणा करणे, म्हणजे योग होय.

योगाचे महत्त्व विशद करताना कठोपनिषदकार म्हणतो –

तं दुर्दर्शं गूढमनुप्रविष्टं गुहाहितं गह्वरेष्ठं पुराणम्।
अध्यात्मयोगाधिगमेन देवं मत्वा धीरो हर्षशोकौ जहाति॥
(कठोप. १.२.१२)

अर्थ – तो देव, अर्थात आत्मा इतका स्थिर व तेजस्वी आहे, की त्याला पाहणे कठीण आहे. तो गढ स्थानात प्रवेश करून राहिलेला, गुहेत वसलेला, गह्वरात राहणारा आणि पुरातन आहे. धीर पुरुष अध्यात्मयोगाच्या प्राप्तीने त्याला जाणून हर्ष व शोक यांचा त्याग करतो.

उपनिषदांत एक दर्शन म्हणून आणि क्रियात्मक साधन म्हणून दोन्ही अर्थांनी योग शब्द प्रयुक्त आहे. वरील मंत्र योगाचा दर्शनात्मक अर्थ व्यक्त करीत असून, श्वेताश्वतरोपनिषदात क्रियात्मक योगाचे वर्णन (२.८-९) पुढीलप्रमाणे केलेले आहे–

त्रिरुन्नतं स्थाप्य समं शरीरं हृदीन्द्रियाणि मनसा संनिवेश्य।
ब्रह्मोडुपेन प्रतरेत विद्वान् स्रोतांसि सर्वाणि भयावहानि॥
प्राणान् प्रपीड्येह स युक्तचेष्टः क्षीणे प्राणे नासिकयोच्छ्वसीत।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दुष्टाश्वयुक्तमिव वाहमेनं विद्वान् मनो धारयेताप्रमत्तः ॥

अर्थ - शरीराला त्रिरुन्नत करून (छाती, मन व मस्तक एका रेषेत ताठ ठेवून) मनासह इंद्रियांचे हृदयाच्या ठिकाणी निरोधन करून व ब्रह्मरूप नौकेत बसून ज्ञानी पुरुषाने सर्व भयानक प्रवाह तरून जावे. या शरीरात प्राणांचा चांगल्या प्रकारे निरोध करून युक्ताहारविहार व्हावे. प्राणाचे पीडन करून (कुंभक करून) नाकपुड्यांच्या द्वारे श्वास सोडावा आणि इंद्रियरूपी दुष्ट घोड्यांचा लगाम खेचून मनाला अप्रमत्तपणे धारण करावे. योगसाधकाला कोणते फल मिळते, ते श्वेताश्वतरोपनिषदात (२.१२) पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

न तस्य रोगो न जरा न मृत्युः ।
प्राप्तस्य योगाग्निमयं शरीरम् ॥

अर्थ – ज्याला योगाग्निमय शरीर प्राप्त होते, त्याला कोणताही रोग होत नाही, वार्धक्य येत नाही आणि मृत्यूही येत नाही. छान्दोग्य (८.६), बृहदारण्यक (४.३.२०) व कौषीतकी या उपनिषदांत हृदयापासून पुरीततापर्यंत जाणाऱ्या हिता नामक नाड्यांचा निर्देश केला आहे.

अमृतनादोपनिषदात योगाची सहा अंगे व तेजोबिंदूपनिषदात योगाची पंधरा अंगे सांगितली आहेत, ती अनुक्रमे अशी–

प्रत्याहारस्तथा ध्यानं प्राणायामोऽथ धारणा ।
तर्कश्चैव समाधिश्च षडङ्गो योग उच्यते ॥

अर्थ – प्रत्याहार, ध्यान, प्राणायाम, धारणा, तर्क व समाधी असा योग षडङ्ग सांगितलेला आहे.

यमो हि नियमस्त्यागो मौनं देशश्च कालतः ।
आसनं मूलबन्धश्च देहसाम्यं च दृक्स्थितिः ॥
प्राणसंयमनं चैव प्रत्याहारश्च धारणा ।
आत्मध्यानं समाधिश्च प्रोक्तान्यङ्गानि वै क्रमात् ॥

अर्थ – यम, नियम, त्याग, मौन, देश, काल, आसन, मूलबंध, देहसाम्य, दृष्टीची स्थिती, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, आत्मध्यान व समाधी अशी योगाची पंधरा अंगे क्रमाने सांगितली आहेत.

भगवद्गीता हे परम आणि परिपूर्ण असे योगशास्त्रच आहे. योगाने परमात्म्याची प्राप्ती करवणे हे गीतेचे अंतिम लक्ष्य आहे. गीतेच्या प्रत्येक अध्यायाच्या पुष्पिकेत 'योगशास्त्रे' असा उल्लेख येतो. श्रीकृष्णालाही योगेश्वर असेच म्हटले आहे. गीतेत योगाची प्रारंभिक साधना दुसऱ्या अध्यायापासून सुरू होते आणि पुढच्या अध्यायांतून उत्तरोत्तर त्या साधनेचा विकास होत जातो. सहाव्या अध्यायात योगाच्या क्रियात्मक अंगाचा निर्देश, 'शुचौ देशे प्रतिष्ठाप्य' इ. श्लोकांनी भगवंताने केला आहे. पतंजलीने मनोनिरोधाचे जे दोन उपाय सांगितले आहेत, तेच त्या आधी भगवंताने पुढील श्लोकात (गीता ६.३५) सांगितले आहेत –

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥

अर्थ – हे महाबाहो अर्जुना, मन हे निःसंशय चंचल व निग्रह करण्यास अत्यंत कठीण आहे. पण हे कौंतेया, अभ्यास व वैराग्य या दोन उपायांनी त्याचा निग्रह करता येतो.

योगसिद्ध किंवा योगारूढ पुरुष कसा होतो, हे गीतेत (६.२९) सांगितले आहे, ते असे–

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥

अर्थ – ज्याचा आत्मा योगयुक्त झाला आहे, असा पुरुष सर्वभूतांच्या ठिकाणी आत्म्याला व आत्म्याच्या ठिकाणी सर्व भूतांना पाहतो. त्याची दृष्टी सर्वत्र सम होते.

मात्र गीतेतील योग शब्दाचा अर्थ कर्मयोग असाच अनेक वेळा घ्यावा लागतो.

बौद्ध धर्मातही योगाचे महत्त्व मान्य केलेले आहे. बुद्धाच्या जन्मकाळी भारतात योगविद्या प्रतिष्ठित झाली होती. बुद्धाच्या मनावरही तिचा प्रभाव होता. बोधिप्राप्तीसाठी घरदार सोडून तो बाहेर पडला आणि गयेच्या निर्जन वनात गेला. तिथे त्याने आस्फानक नावाची समाधी लावून खूप देहदंडना केली. त्या समाधीतूनच बोधी प्राप्त होऊन तो बुद्ध बनला.

बुद्धाच्या अनेक शिष्यांनीही योगसाधना करून अनेक सिद्धी मिळविल्या व स्वतःचे महत्त्व वाढविले. बौद्धांचे एक स्वतंत्र योगशास्त्र आहे. त्यांनी राजयोग व हठयोग या उभयविध योगाची साधना केली, अनुभव घेतले, त्या अनुभवांची परस्पर देवाण-घेवाण केली आणि योगसाधनेला शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून दिले. बौद्ध योग हा बऱ्याच अंशी पातंजल योगाशी मिळता जुळता आहे. गुह्यसमाज नावाच्या एका बौद्ध ग्रंथात त्या योगाचे विवरण आहे. बौद्ध आचार्य अष्टांग योग न मानता षडंग योग मानतात. प्रत्याहार, ध्यान, प्राणायाम, धारणा, अनुस्मृती व समाधी ही बौद्ध योगाची सहा अंगे होत. यात अनुस्मृती हे नवे अंग प्रविष्ट असून यम, नियम व आसन ही तीन अंगे गाळलेली आहेत. अनुस्मृतीला बौद्ध प्राधान्य देतात. कोणत्याही पदार्थाचे अविच्छिन्न ध्यान म्हणजे अनुस्मृती होय. या अनुस्मृतीसाठीच योगसाधनेचा उपक्रम झाला आहे. अनुस्मृतीचा चिरकाल अभ्यास केल्याने प्रतिभासाची उत्पत्ती होते. त्यातूनच प्रज्ञा व उपाय या दोन तत्त्वांचा संयोग होऊन सृष्टीतल्या समस्त पदार्थांची एकपिंडाच्या रूपात अभिव्यक्ती होते. त्या एक पिंडाचे ध्यान केल्यामुळे समाधिरूप अलौकिक ज्ञान प्राप्त होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

योगाचे चार प्रकार आहेत. मंत्रयोग, हठयोग, लययोग व राजयोग अशी त्यांची नावे आहेत. त्यांचे स्वरूप थोडक्यात असे–

मंत्रयोग – मंत्रातल्या अनेकविध वर्णयोजना अनेक प्रकारची इष्ट फळे देतात. मंत्रातील मूळ शक्ती प्रकाशात आणणे, हा मंत्रसाधनेचा उद्देश असतो. कोणत्या मंत्राने कोणते फल प्राप्त होते, ते ऋषिमुनींनी व सिद्ध पुरुषांनी सांगितलेले असते. मंत्र म्हणजे नुसतेच एकत्र केलेले वर्ण किंवा वर्णसमूह नव्हेत. ते वर्णसमूह अंतर्गत शक्तीचे प्रतीकरूप असतात. मंत्रांमुळे साधकाच्या अंतरातली शक्ती जागृत होऊन त्याला मोठे सामर्थ्य येते.

मंत्रयोगाच्या ध्यानाला स्थूल ध्यान म्हणतात. हे ध्यान पंचसगुणोपासना व अवतारोपासना यांच्या अनुसारे अनेक प्रकारचे होते. मंत्रयोगाच्या समाधीला महाभाव समाधी म्हणतात.

हठयोग – देहशुद्धी हे हठयोगाचे उद्दिष्ट आहे. योग्यांच्या परिभाषेत हिला घटशुद्धी म्हणतात. ही शुद्धी षट्कर्मांच्या द्वारे केली जाते. आसने आणि मुद्रा यांच्या द्वारे हठयोगी देहाची स्थिरता प्राप्त करून घेतो. प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान व समाधी यांच्या द्वारे त्याला लघुता, दृढता, आत्मप्रत्यय व निर्लेपता या गोष्टी मिळतात. आसन, प्राणायाम, मुद्रा व नादानुसंधान हे हठयोगाचे मुख्य प्रतिपाद्य विषय आहेत. कुंडलिनी जागृत करून अष्टैश्वर्याची प्राप्ती करून घेणे, चक्र व ग्रंथी यांचा भेद करणे, प्राणाचा सुषुम्नेत प्रवेश करवणे, चित्त निरालंब करणे व मृत्युभाव दूर करणे, हे हठयोगाचे साध्य आहे. हठयोगातल्या ध्यानाला ज्योतिर्ध्यान म्हणतात आणि प्राणनिरोधाने होणाऱ्या समाधीला महाबोध समाधी म्हणतात.

लययोग – मानवपिंड ही ब्रह्मांडाची प्रतिकृती आहे. ब्रह्म व ब्रह्मशक्ती यांचा विलास जसा ब्रह्मांडात होतो, तसाच तो मानवपिंडातही होतो. ब्रह्मांडातल्याप्रमाणे ग्रह, नक्षत्र, चतुर्दश भुवने, इत्यादींची पीठे मानवपिंडातही आहेत. पंचकोशांचे आवरण शिथिल होताच पिंड स्वेच्छेप्रमाणे कोणत्याही लोकात आपला संबंध स्थापन करू शकतो. पिंड–ब्रह्मांडांच्या या विज्ञानानुसार मनुष्यपिंडाच्या आधारपद्मात कुलकुंडलिनी नावाची ब्रह्मशक्ती प्रसुप्त राहून अविद्येच्या प्रवाहाने सृष्टिक्रिया करीत राहते. महस्रार नावाचे एक चक्र मनुष्याच्या मस्तकात असते. लययोगाच्या द्वारे कुलकुंडलिनीशक्तीला तिथे नेऊन शिवरूपाशी संलग्न केले जाते. अशा प्रकारे शिवाच्या ठिकाणी शक्तीचा लय करून मुक्ती मिळविणे, याला लययोग म्हणतात. लययोगाच्या ध्यानाला बिंदुध्यान व समाधीला महालय समाधी म्हणतात.

राजयोग – मन, बुद्धी, चित्त व अहंकार यांनी संवलित अंतःकरणच जीवाच्या बंधाला कारण होते. मुक्तीला कारणही तेच आहे. अशुद्ध मन जीवाला अधःपतित करते; तर शुद्ध मन त्याला उन्नत करते. इंद्रियपरायण बुद्धी जीवाला बंधनात अडकवते व ब्रह्मपरायण बुद्धी जीवाला मुक्तिभूमीवर आरूढ करते. म्हणून चित्ताला शुद्ध करणे आणि त्या द्वारे जिवा-शिवाच्या अद्वैताचे ज्ञान मिळवून मुक्त होणे म्हणजे राजयोग होय. याच्या ध्यानाला ब्रह्मध्यान म्हणतात व समाधीला निर्विकल्प समाधी म्हणतात. जीवन्मुक्ती हे या समाधीचे फल असते.

पातंजलयोगसूत्रे – वरील चारही योगांत राजयोग हा सर्वश्रेष्ठ मानलेला आहे. राजयोगावर पतंजलीची सूत्रे प्रसिद्ध असून, ती प्रमाणभूत मानलेली आहेत. त्यांना पातंजलयोगसूत्रे असे म्हणतात. मात्र पतंजली हा योगाचा प्रणेता नव्हे. तो त्याला व्यवस्थित आकार देणारा सूत्रकार आहे. 'अथ योगानुशासनम्' या पहिल्याच सूत्रात जो 'अनु' शब्द आहे, त्याचा अर्थ, 'आज-वर निर्माण झालेले जे योगशास्त्र, त्याचा मी व्यवस्थित व पद्धतशीर उपदेश करीत आहे' असा होतो. यावरून पतंजली हा योगशास्त्राचा प्रवर्तक नसून उपदेशक आहे, असे कळते.

सनपूर्व दुसरे शतक हा पतंजलीचा काल मानतात. त्याच्या योगसूत्रांची संख्या १९४ आहे. काही प्रतींत ती १९५ आहे. या सूत्रांचे समाधी, साधन, विभूती व कैवल्य, असे चार पाद आहेत.

पहिल्या समाधिपादात समाधीचे रूप व भेद, तसेच चित्त आणि त्याच्या वृत्ती यांचे विवरण आहे. दुसऱ्या साधनपादात क्रियायोग, क्लेश व त्याचे भेद, क्लेश दूर करण्याचे साधन, हेय, हेतू, हान व हानोपाय आणि योगाची अष्टांगे, इ. विषयांचे विवरण आहे. तिसऱ्या विभूतिपादात धारणा, ध्यान व समाधी यांचे स्वरूप सांगून, योगाच्या अनुष्ठानाने उत्पन्न होणाऱ्या सिद्धींचे विवरण केले आहे. चौथ्या कैवल्यपादात समाधिसिद्धी, निर्माणचित्त, विज्ञानवादाचे निराकरण आणि कैवल्य यांचे विवरण आहे.

पातंजल योगसूत्रांवर व्यासांनी भाष्य लिहिले असून, तो ग्रंथ अत्यंत प्रमाणभूत समजला जातो. योगसूत्रांतील निगूढ रहस्यांचे उद्घाटन करण्यासाठी व्यासभाष्य अत्यंत उपयुक्त ठरले आहे. मात्र हे व्यास पुराणकर्ते व्यास नसून, ते इ. स. च्या तिसऱ्या-चौथ्या शतकाहून प्राचीन नाहीत.

या व्यासभाष्यातला गूढार्थ समजावून देण्यासाठी वाचस्पति मिश्राने तत्त्ववैशारदी व विज्ञानभिक्षूने योगवार्तिक या ग्रंथांची रचना केली आहे. तत्त्ववैशारदीवर राघवानंदसरस्वतीने पातंजलरहस्य या नावाची टीका लिहिली आहे. श्री. बलदेव उपाध्याय म्हणतात– 'विज्ञानभिक्षू योगवार्तिकामधील व्यासभाष्याच्या विवेचनाने तर कृतकृत्य झाला आहेच; शिवाय त्याने तत्त्ववैशारदीच्या व्याख्यानावरही विपुल टीका केली आहे. विज्ञानभिक्षूची दृष्टी मौलिक असून, त्याची मते वाचस्पति मिश्राच्या बऱ्याचशा मतांहून भिन्न आहेत.'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भोजकृत राजमार्तंड, भावा गणेशाची वृत्ती, रामानंदयतीची मणिप्रभा, अनंत पंडिताची योगचंद्रिका, सदाशिवेंद्र सरस्वती यांचा योगसुधाकर व नागोजी भट्टाची लघ्वी व बृहती वृत्ती या योगसूत्रांवरच्या आणखी टीका होत. या सर्व टीकाग्रंथांत राजमार्तंड किंवा भोजवृत्ती ही विद्वज्जनप्रिय आहे. मणिप्रभा व योगसुधाकर या टीका योगसिद्ध पुरुषांनी लिहिलेल्या असल्यामुळे योगसूत्रांचा अर्थ समजण्याच्या कामी अत्यंत उपयुक्त आहेत.

योगव्याख्या – योग शब्द युज् = समाधी या धातूपासून निष्पन्न होतो. त्याचा व्युत्पत्तिलभ्य अर्थ समाधी असा आहे. या समाधिरूप योगाची व्याख्या करण्यासाठी पतंजलीने पुढील सूत्र (१.२) लिहिले आहे.

योगश्चित्तवृत्तिनिरोधः ।

अर्थ – चित्तवृत्तीचा उपशम करणे याला योग म्हणतात.

इथे चित्त म्हणजे मन, बुद्धी व अहंकार एतद्रूप असलेले अंतःकरण होय.

त्याच्या पुढील पाच भूमी किंवा अवस्था असतात — (१) क्षिप्त, (२) मूढ, (३) विक्षिप्त, (४) एकाग्र व (५) निरुद्ध.

(१) क्षिप्त – क्षिप्त म्हणजे चंचल. या दशेत रजोगुणाच्या आधिक्यामुळे चित्त अस्थिर व चंचल राहते आणि बहिर्मुख असल्यामुळे संसारातील सुखदुःखादी विषयांकडे प्रवृत्त होते.

(२) मूढ – तमोगुणाच्या आधिक्यामुळे मूढ चित्त विवेकशून्य असते. त्याला कृत्याकृत्याचा विवेक करता येत नाही. क्रोधादिकांच्या द्वारे त्याची विरुद्ध कार्यामध्ये प्रवृत्ती राहते. कर्तव्य काय आणि अकर्तव्य काय या गोष्टींचा निर्णय त्याला करताच येत नाही.

(३) विक्षिप्त – सत्त्वगुणाचे आधिक्य असल्यामुळे विक्षिप्त चित्त दुःखसाधने टाकून देऊन सुखसाधक अशा शब्दादी विषयांमध्ये प्रवृत्त राहते. क्षिप्त चित्ताच्या अपेक्षेने हे विक्षिप्त चित्त कधी कधी स्थिरता धारण करते. हे त्याचे वैशिष्ट्य सूचित करण्यासाठीच त्याच्या आधी 'वि' उपसर्ग जोडला गेला आहे.

(४) एकाग्र – एकाच विषयाचे चिंतन करणाऱ्या चित्ताला एकाग्र म्हणतात.

(५) निरुद्ध – याचा अर्थ रोधलेले चित्त असा होतो. ज्याने आपल्या साऱ्या वृत्ती रोधून ठेवल्या किंवा हटवल्या, त्याला निरुद्ध म्हणतात. सर्व वृत्ती आणि संस्कार यांचा लय झाल्यानंतर त्या चित्ताला निरुद्ध ही संज्ञा मिळते.

या पाच अवस्थांमधील पहिल्या तीन अवस्था समाधीसाठी अत्यावश्यक नाहीत. शेवटच्या दोन अवस्था मात्र समाधीला उपयुक्त आहेत. त्या अवस्थांमध्ये योगाचा उदय होतो. या पाच अवस्थांचे मिळून चार परिणाम पुढीलप्रमाणे होतात – क्षिप्त व मूढ अवस्थेत व्युत्थान, विक्षिप्त अवस्थेत समाधिप्रारंभ, एकाग्र अवस्थेत एकाग्रता व निरुद्ध अवस्थेत निरोधलक्षणात्मक परिणाम.

पुरुष हा निसर्गतः शुद्ध चैतन्यरूप असून तो स्वतंत्र आहे. शरीर आणि मन यांची बंधने त्याला लागू नाहीत. परंतु तो अज्ञानदशेत चित्ताशी संबद्ध राहतो. चित्त हे प्रकृतीतून उत्पन्न होत असल्यामुळे वस्तुतः ते अचेतन आहे; पण त्यात पुरुषाचे प्रतिबिंब पडले, की ते चेतनसदृश भासू लागते. दुसरी गोष्ट अशी, की चित्त हे वस्तूशी संबंध आल्यावर त्या वस्तूचे रूप ग्रहण करते. पुरुषाला पदार्थाच्या स्वरूपाचे ज्ञान होते, ते चित्ताच्या निरनिराळ्या परिवर्तनांमुळे होते. या परिवर्तनांना वृत्ती म्हणतात. ज्याप्रमाणे पाण्याच्या पृष्ठभागावर उठणाऱ्या लहरींमुळे त्यात प्रतिबिंबित होणारा चंद्र स्थिर असूनही चंचल भासतो, त्याचप्रमाणे परिणामशील नसणारा पुरुषही परिवर्तनशील भासू लागतो. चित्ताच्या या वृत्ती मुख्यत्वे पाच आहेत. त्यांची नावे अशी – (१) प्रमाण (२) विपर्यय, (३) विकल्प, (४) निद्रा व (५) स्मृती. या वृत्तींचे दिग्दर्शन पुढीलप्रमाणे –

(१) प्रमाण – या विषयीचे पतंजलीचे सूत्र (१.७) असे–

प्रत्यक्षानुमानागमाः प्रमाणानि ।

अर्थ – प्रत्यक्ष, अनुमान व शब्द ही तीन प्रमाणे होत (या तिहींच्या द्वारे जे ज्ञान होते, ती एक वृत्ती होय.)

(२) विपर्यय – याविषयीचे सूत्र (१.८) असे –

विपर्ययो मिथ्याज्ञानमतद्रूपप्रतिष्ठम् ।

भावार्थ – वस्तूचे स्वाभाविक स्वरूप जाणिवेत न येता त्या वस्तूचे नित्य नसलेले रूप त्या वस्तूवर आरोपिले जाणे, ही जी वस्तूची अन्यथा जाणीव, तिला विपर्यय म्हणतात.

विपर्ययात संशयही गृहीत आहे.

(३) विकल्प – याविषयीचे सूत्र (१.९) असे –

शब्दज्ञानानुपाती वस्तुशून्यो विकल्पः ।

भावार्थ–एखाद्या वस्तूची जाणीव वर्णसमुच्चयाच्या आधारावर होत असली, तरी ती वस्तू अस्तित्वातच नसते. पण तरीही चित्त त्या जाणिवेलाच धरून बसते. अशा प्रकारची ही जाणीव म्हणजे विकल्प होय.

उदा० घोड्याची शिंगे, हा शब्दसमुच्चय ऐकल्यावर त्या शब्दांचा अर्थ समजतो. पण त्याचा वास्तवाशी मात्र संबंध नसतो. कारण घोड्याला शिंगेच नसतात. ते केवळ शाब्दिक ज्ञान असते. अर्थहीन असल्यामुळे ते निरुपयोगी ठरते.

(४) निद्रा – याविषयीचे सूत्र (१.१०) असे –

अभावप्रत्ययालम्बना वृत्तिर्निद्रा ।

अर्थ – चित्ताच्या ज्या अवस्थेत आधार राहत नाही, ती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अवस्था म्हणजे निद्रा किंवा गाढ झोप होय.

निद्रा ही तमाच्या आधिक्यावर अवलंबित असते. तिच्यात जाग्रत व स्वप्न या वृत्तींचा अभाव असतो.

(५) स्मृती – या विषयीचे सूत्र (१.११) असे –

अनुभूतविषयासम्प्रमोषः स्मृतिः ।

अर्थ – पूर्वी अनुभविलेल्या विषयांचे परिवर्तन न होता यथावत आठवण होणे, अर्थात तो विषय चित्तात पुनश्च उद्‌भवणे म्हणजे स्मृती होय.

चित्ताचे समस्त व्यापार किंवा अवस्था यांचा वरील पाच वृत्तींमध्ये अंतर्भाव होऊ शकतो.

उत्पन्न झालेल्या वृत्ती जेव्हा चित्तात क्षय पावतात, तेव्हा त्या निःशेष क्षीण होत नाहीत. त्यांचे स्थूल रूप तेवढे नष्ट होते. संस्कार या स्वरूपात त्यांचे सूक्ष्म रूप चित्तामध्ये कायम राहते. हे संस्कारच योग्य संधी मिळाल्यावर म्हणजेच उद्‌बोधक कारण उपस्थित झाल्यावर स्थूल होतात आणि वृत्तींचे रूप धारण करतात. त्यामुळे वृत्तीतून संस्कारांची उत्पत्ती व संस्कारातून वृत्तींचा उदय असे हे चक्र सतत क्रियाशील राहते.

या चित्तवृत्तींचा निरोध करणे म्हणजेच योग होय. पण तेवढयाने योगाची पूर्तता होत नाही. जेव्हा वृत्तींच्या बरोबर त्यांच्या संस्कारांचाही निरोध होतो, तेव्हाच पूर्ण योग सिद्ध होतो. वृक्ष केवळ तोडूनच भागत नाही; तर पुनश्च त्याला धुमारे फुटू नयेत म्हणून त्याची मुळेही खणून काढावी लागतात. हाच दृष्टान्त इथे लागू आहे. वृत्तिनिरोधाने प्रज्ञेचा उदय झाल्यावर तिच्या प्रकाशाने वृत्तींबरोबर त्यांच्या संस्कारांचाही निरोध होणे, ही गोष्ट योगाच्या पूर्णतेसाठी नितांत आवश्यक असते.

चित्तवृत्तींचा निरोध करणे म्हणजेच समाधी होय. या समाधीतून प्रज्ञा उत्पन्न होते. एकाग्र चित्तात वास्तव सत्याला प्रकाशित करणारी, क्लेशांचा क्षय करणारी, कर्मबंधने शिथिल करणारी आणि चित्तवृत्तिनिरोधाला जवळ आणणारी ती प्रज्ञा होय. पण पूर्ण योगात या प्रज्ञेचाही निरोध आवश्यक असतो. कारण प्रज्ञा कितीही सात्त्विक असली, तरी शेवटी तीही एक वृत्तीच आहे.

चित्तवृत्तिनिरोधरूप समाधीचे दोन भेद मानलेले आहेत, ते असे –

(१) चित्त जेव्हा अविचल आणि अक्षुब्ध अवस्थेत एकाग्र होऊन ध्येय वस्तूवर चिरकाल स्थिर राहते, तेव्हा त्या समाधीला संप्रज्ञात किंवा सबीज समाधी म्हणतात. कारण या अवस्थेत चित्त समाहित होण्यासाठी कोणते तरी बीज किंवा आलंबन लागते.

(२) पण जेव्हा चित्ताच्या समस्त वृत्ती निरुद्ध किंवा बंद होतात आणि कोणत्याही वस्तूचे बीज किंवा आलंबन राहत नाही, तेव्हा त्या अवस्थेला निर्बीज किंवा असंप्रज्ञात समाधी म्हणतात.

ध्येय वस्तूचे ज्ञान कायम राहत असल्यामुळे पहिल्या समाधीला संप्रज्ञात आणि ध्याता, ध्येय व ध्यान एकाकार झाल्यामुळे आणि ध्येय वस्तूचे पृथक् ज्ञान होत नसल्यामुळे, दुसऱ्या समाधीला असंप्रज्ञात समाधी म्हटले आहे.

चित्त हे अनेक क्लेशांचे भाजन आहे. अविद्या, अस्मिता, राग, द्वेष आणि अभिनिवेश असे हे पाच प्रकारचे क्लेश आहेत. हे सर्व क्लेश अविद्यामूलक असल्यामुळे ते विपर्ययरूप अर्थात मिथ्याज्ञानरूप आहेत. हे क्लेश महत्तत्त्व, अहंकार, इ. परंपरेने परिणाम उत्पन्न करतात आणि आपसांत एकमेकांवर अनुग्रह करून कर्मफले निर्माण करतात. कर्मातून क्लेश उत्पन्न होतात आणि क्लेशातून कर्मांचा उदय होतो. अशा प्रकारे ते एकमेकांना साहाय्यक होतात. वरील क्लेशांचे दिग्दर्शन असे –

(१) अविद्या – अनित्य, अपवित्र, दुःखदायक व अनात्म वस्तूच्या ठिकाणी क्रमशः नित्य, पवित्र, सुखदायक व आत्मबुद्धी ठेवणे या प्रकाराला अविद्या म्हणतात. त्रैलोक्याला नित्य मानणे, अपवित्र शरीराला पवित्र मानणे, दुःखदायक अशा जगातील पदार्थांच्या ठिकाणी सुखबुद्धी धारण करणे आणि शरीर, इंद्रिये व मन यांना आत्मा समजणे, अशा रूपाने ही अविद्या प्रत्यक्ष होते. हिला चतुष्पदा अविद्या म्हणतात. समस्त क्लेशसंततीची ती बीजभूत आहे; तसेच विपाकाच्या बरोबरीने कर्माशय उत्पन्न करणारीही आहे.

(२) अस्मिता – दृक्शक्ती (पुरुष) ही दर्शनशक्ती (बुद्धी) हिच्यापासून नितांत भिन्न आहे. पुरुष हा चेतन असल्यामुळे तोच द्रष्टा असतो. म्हणून त्याला दृक्शक्ती म्हणतात. बुद्धीच्या द्वारे प्रपंचाचे भान होते म्हणून तिला दर्शनशक्ती म्हणतात. या दोन्ही गोष्टी भिन्न असताना त्या एक मानणे हा अस्मितारूप क्लेश होय. याला क्लेश मानण्याचे कारण असे, की सुखदुःखांचा अनुभव प्रत्यक्ष रूपाने बुद्धीच करते; पण पुरुष स्वतःला बुद्धीशी एकाकार करून घेतो आणि भोक्ता बनतो. भोग ही गोष्ट वस्तुतः बुद्धीची आहे. पण अस्मिता क्लेशामुळे पुरुषालाही भोगाची उपलब्धी होते.

(३) राग – सुखोत्पादक वस्तूंच्या ठिकाणी माणसाला जी आसक्ती किंवा तृष्णा उत्पन्न होते, तिला राग म्हणतात.

(४) द्वेष – याउलट दुःख जाणणाऱ्या पुरुषाला दुःखाच्या स्मृतीबरोबरच दुःखसाधनांच्या ठिकाणी जो क्रोध उत्पन्न होतो, त्याला द्वेष म्हणतात.

(५) अभिनिवेश – पामर अर्थात क्षुद्र जीवापासून विद्वानां-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पर्यंत सर्वांना मृत्यूचे जे भय वाटत असते, त्याला अभिनिवेश म्हणतात. निराळ्या शब्दांत सांगायचे झाले, तर जीवनाविषयी जी आसक्ती सर्व प्राण्यांमध्ये स्वभावसिद्ध असते, तिला अभिनिवेश म्हणावे.

योगसाधक पुरुष जेव्हा या सर्व क्लेशांना दूर सारतो, तेव्हाच त्याची योगमार्गात प्रगती होते. हे सर्व क्लेश दूर होऊन चित्त-निरोधरूप समाधी साध्य व्हावी यासाठी पतंजलीने अभ्यास व वैराग्य असे दोन उपाय सांगितले आहेत –

अभ्यास – चित्त सामान्यत: एकाच वेळी दोन वृत्तींत परिणत होऊ शकत नाही. एका वृत्तीचा उपशम झाल्यावाचून दुसऱ्या वृत्तीचा उदय होत नाही. वृत्तीचा उपशम म्हणजे त्या वृत्तीचा अभाव होय. दुसरी वृत्ती उत्पन्न होण्याच्या आधी पूर्ववृत्तीचा अभाव व्हावा लागतो. पुढील वृत्तीचा उदय न होणे म्हणजेही त्या वृत्तीचा अभावच होय. पूर्ववृत्तीचा उपशम व पुढील वृत्तीचा उदय यांत जर क्षणमात्र अंतर राहील, तर त्या क्षणात पुढील वृत्तीचा अनुदय असल्यामुळे त्या क्षणापुरता वृत्तिनिरोध सिद्ध झाला, असे समजावे. या दोहोंत म्हणजे पूर्ववृत्तीचा उपशम व दुसऱ्या वृत्तीचा अनुदय या अवस्थेतले अंतर क्षणाक्षणाने वाढविण्याची सवय करणे, याला अभ्यास म्हणतात.

वैराग्य – ज्यांचा प्रत्यक्ष अनुभव घडला, ते दृष्ट विषय आणि शास्त्रादिकांवरून ज्यांचे ज्ञान झाले, ते आनुश्रविक विषय होत. या दोन्ही प्रकारच्या विषयांची आसक्ती किंवा तृष्णा नष्ट होणे, याला वैराग्य म्हणतात. इंद्रियसुखांविषयी आणि भोगांविषयी ज्या प्रमाणात वैराग्य वाढत जाते, त्या प्रमाणात अंतःकरणातील रजोगुण कमी कमी होत जाऊन सत्त्वगुण वाढीस लागतो. सत्त्वगुणामुळे विवेक उत्पन्न होतो. या विवेकाने सृष्टीतले समस्त भोगविषय परिणामी दुःखप्रद आहेत, हे मनाला पटते आणि मग असा पुरुष शाश्वत सुखासाठी योगमार्गाचा अवलंब करून दिवसेंदिवस त्यात प्रगती करीत जातो.

याहून तिसरा उपाय म्हणजे ईश्वरप्रणिधान हा होय. चित्त कधीकधी व्युत्थित अवस्थेत असते. यामुळे ईश्वरप्रणिधानातही दोन प्रकार होतात. चित्त जेव्हा समाहित अवस्थेत असते, तेव्हा पश्यंती, मध्यमा व वैखरी यांपैकी कोणत्याही वाणीने ईश्वराच्या प्रणवादी नाममंत्रांचा जप करणे आणि आपल्या निरुपाधिक स्वरूपात ईश्वर व आपण एकच आहों, अशी भावना करणे हे एक प्रकारचे ईश्वरप्रणिधान होय आणि चित्त जेव्हा व्युत्थित अवस्थेत असेल, तेव्हा आपल्या हातून घडणारी सर्व प्राप्त कर्मे ईश्वरार्पणबुद्धीने करणे, हे दुसऱ्या प्रकारचे ईश्वरप्रणिधान होय. अशा उभयविध ईश्वरप्रणिधानाने चित्त सर्वदा ईश्वराकडे लावले म्हणजे ईश्वरच त्या साधकाला असंप्रज्ञात समाधीच्या द्वारे आत्मसाक्षात्कारापर्यंत नेऊन पोचवितो.

योगाची आठ अंगे – वर जो अभ्यास म्हणून सांगितला तो साध्य होण्यासाठी व वृत्तिनिरोधरूपी समाधी सिद्ध होण्यासाठी पतंजलीने योगाची एकाहून एक वरचढ अशी आठ अंगे आचरायला सांगितली आहेत. त्याविषयीचे सूत्र (२.२९) असे –

यमनियमासनप्राणायामप्रत्याहारधारणा –
ध्यानसमाधयोऽष्टावङ्गानि ।

अर्थ – यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी ही योगाची आठ अंगे होत.

शरीरातील प्रत्येक अंगाची जशी उपयुक्तता असते, तशीच या अंगांची योगाला आवश्यकता असते. यांतील कोणतेही अंग कमी पडेल, तर तेवढ्याने योगानुष्ठान विकलांग होईल. मात्र सगळी अंगे सारख्याच योग्यतेची नाहीत. यांतले यमांचे अनुष्ठान सर्व काळ अत्यावश्यक आहे. ते न केले तर साधक योगभ्रष्टच होईल. नियम, आसन व प्राणायाम यांचे अनुष्ठान प्रत्येकाने स्वतःच्या प्रकृतिमानानुसार यथाशक्ति करावे. मात्र यम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी ही अंगे अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे त्यांचे अनुष्ठान यथायोग्य व पूर्णत्वाने झाले पाहिजे.

(१) यम – हे पुढीलप्रमाणे आहेत –

अहिंसासत्यास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहा यमाः ।।
(यो. सू. २.३०)

अर्थ – अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह हे पाच यम होत.

अहिंसा – अहिंसा ही शारीरिक, मानसिक, वाचिक अशी त्रिविध आहे. हिची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे –

कर्मणा मनसा वाचा सर्वभूतेषु सर्वदा ।
अक्लेशजननं प्रोक्तमहिंसात्वेन योगिभिः ।।

अर्थ – मन, वाणी व कर्म या त्रयींने सर्व भूतांच्या ठिकाणी सर्व काळ कोणाला क्लेश होणार नाहीत अशा रीतीने वागणे, याला अहिंसा म्हटले आहे.

आपल्या शारीरिक व्यापारांमुळे इतरांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पीडा होणार नाही अशा प्रकारे वागणे, ही कायिक अहिंसा होय. आपल्या बोलण्याने इतरांच्या अंतःकरणाला दुःख होईल, असे कडक, कठोर, निंदास्पद व मर्मभेदी न बोलणे ही वाचिक अहिंसा होय. सर्वांतर्यामी एकच परमात्मतत्त्व भरून राहिले आहे, हे अनुसंधान ठेवून कोणाविषयीही क्रोध, द्वेष, इ. अनिष्ट विकार मनात उद्भवणार नाहीत, अशी मनःस्थिती राखणे ही मानसिक अहिंसा होय.

सत्य – आपल्या अंतरात असलेले ज्ञान दुसऱ्याच्या अंतःकरणात उमटावे म्हणून आपण बोलत असतो. तेव्हा आपल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बोलण्याचा यथावत बोध न होईल अथवा भलताच बोध होईल अथवा मुळीच बोध होणार नाही, अशा संदिग्धपणाने न बोलणे म्हणजे सत्य होय. सत्याचा महिमा उपनिषदांत खूप गायिलेला आहे आणि 'सत्यमेव जयते' असे सांगितले आहे.

अस्तेय – याचे लक्षण पुढीलप्रमाणे –

कर्मणा मनसा वाचा परद्रव्येषु नि:स्पृहः।
अस्तेयमिति तत् प्रोक्तमृषिभिस्तत्त्वदर्शिभिः ।।

अर्थ – काया, वाचा आणि मन यांनी परद्रव्याच्या ठिकाणी नि:स्पृह बुद्धी ठेवणे, या गोष्टीला तत्त्वदर्शी लोकांनी अस्तेय असे म्हटले आहे.

ब्रह्मचर्य–विषयवासनेचा निग्रह करणे आणि वैषयिक सुखांच्या मागे लागून चित्त अशुद्ध, मलिन व क्षुब्ध न होऊ देणे, याला सामान्यपणे ब्रह्मचर्य म्हणतात. मनाला चांगल्या सवयी लावून घेणे आणि संयमाच्या अभ्यासाने चित्त शुद्ध करणे हे ब्रह्मचर्याचे विधायक अंग होय. हे ब्रह्मचर्यही काया, वाचा आणि मन या तीन्ही ठिकाणी वापरले पाहिजे.

अपरिग्रह – शरीररक्षणासाठी लागणाऱ्या आवश्यक साधनां-पेक्षा अधिक साधनांचा संग्रह न करणे म्हणजे अपरिग्रह होय. अशा अतिरिक्त वस्तूंच्या संग्रहाने चित्तात आसक्ती उत्पन्न होते. साधकाचे चित्त भोग आणि भोगसाधने यांत गुरफटून जाऊ नये, म्हणून अपरिग्रहाचा स्वीकार करायचा असतो.

(२) नियम – याची पतंजलिकृत व्याख्या अशी –

शौचसन्तोषतपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमाः।
(यो. सू. २.३२)

अर्थ – शरीर स्वच्छ ठेवणे आणि मन पवित्र राखणे हे शौच; प्राप्त परिस्थितीत मनाचे समाधान राखणे हा संतोष; रसनें-द्रियांवर नियमन ठेवणे, शीतोष्णादी द्वंद्वे सहन करणे आणि इंद्रिये स्वाधीन ठेवणे हे तप; उपास्यदेवतेच्या मंत्रांचा जप करणे, वेदाध्ययन करणे, बुद्धीला सूक्ष्मता प्राप्त करून देणाऱ्या न्याय, योग, वेदान्त इत्यादी शास्त्रांचे अध्ययन करणे, हा स्वाध्याय आणि सर्व कर्मे ईश्वरार्पणबुद्धीने करणे हे ईश्वरप्रणिधान; असे हे पाच नियम होत.

शौच – याचा अर्थ शुद्धी असा आहे. शौचाचे बाह्य व आभ्यं-तर असे दोन भेद आहेत. स्नानादिकांनी शरीराची बाह्य शुद्धी होते. मनाच्या शुद्धतेसाठी आसन, प्राणायाम, ध्यान, इ. गोष्टी कराव्या लागतात. शरीर व मन ही दोन्ही शुद्ध झाली, की साधकाचा ईश्वरी तत्त्वाशी संयोग होणे सुलभ होते.

संतोष – यदृच्छेने आपल्याला जी भोगादिकांची साधने मिळाली असतील, त्यांतच समाधान मानून अधिकाची इच्छा न धरणे आणि प्राप्त साधनांचा अधिकाधिक उपयोग करून घेणे म्हणजे संतोष होय. तुकोबांच्या भाषेत सांगायचे तर 'ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असू द्यावे समाधान' म्हणजे संतोष होय. संतोषात ईश्वरावर भरवसा असतो आणि म्हणूनच न मिळालेल्या गोष्टींबद्दल चित्ताची तडफड नसते.

तप – तप म्हणजे नियम, अर्थात नियमाने चालणे होय (आप. ध. सू. १.५.१). शरीर, मन व बुद्धी यांचा विकास साधायचा असेल, तर तप करायलाच पाहिजे. काया, वाचा आणि मन यांनी शीतोष्णादी द्वंद्वे सहन करणे, नित्यनैमित्तिक कर्मे, व्रते, अनुष्ठाने, उपवास, पवित्र ग्रंथांचे नियमित वाचन, इ. गोष्टी तपात येतात. तपामुळे शरीर व मन यांची जडता नाहीशी होते.

स्वाध्याय – उपास्य देवतेच्या मंत्रांचा जप, वेदाचा स्वाध्याय आणि शास्त्राभ्यास या गोष्टी स्वाध्यायात येतात. 'स्वाध्याया-न्मा प्रमदः' अशी तैत्ति. उपनिषदाची आज्ञा आहे. स्वाध्यायामुळे सत्त्व गुणाची वृद्धी होते व मनावर चांगले संस्कार घडतात.

ईश्वरप्रणिधान – शरीर, इंद्रिये, मन आणि बुद्धी यांच्या द्वारा घडणारे सर्व व्यापार ईश्वरार्पणबुद्धीने करून फलाविषयी निर-पेक्ष राहणे म्हणजे ईश्वरप्रणिधान होय. ईश्वरप्रणिधानाचा नियम केल्याने कर्माची शुद्धी होते.

(३) आसन – आसनाविषयी पतंजलीने पुढील तीन सूत्रे (यो. सू. २.४६–४८) लिहिली आहेत.

स्थिरसुखमासनम् । प्रयत्नशैथिल्यानन्तसमापत्तिभ्याम् ।
ततो द्वन्द्वानभिघातः ।

अर्थ – शरीर ज्या स्थितीत राहिले असता मन व शरीर या दोघांनाही सुख वाटेल आणि स्थिरता प्राप्त होईल, ते आसन होय. शारीरिक हालचाली करण्याविषयी जी सहज प्रवृत्ती असते, तिला प्रयत्न म्हणतात. या प्रयत्नाची शिथिलता संपादन करणे आणि अनंताच्या ठिकाणी तन्मयता संपादन करणे, या दोन उपायांनी आसन स्थिर व सुखावह होते. आसन स्थिर झाले असता रागद्वेषादी द्वंद्वांची पीडा न होणे, ही सिद्धी प्राप्त होते.

शरीर चपळ व निरोगी करण्यासाठी हठयोगात अनेक आसने सांगितली असली, तरी राजयोगात ध्यानधारणेसाठी सिद्धासन, पद्मासन, सिंहासन, भद्रासन, वीरासन, स्वस्तिकासन, इ. आसनां-पैकी एखादे आसन साध्य करावे, असा संकेत आहे. हठयोगा-तली फारच थोडी आसने अष्टांग योगाच्या अभ्यासात उपयोगी पडणारी आहेत. अष्टांग योगाचा मुख्य भर चित्ताची एकाग्रता संपादन करून त्यापुढे वृत्तिनिरोध करणे, यावर आहे. हे सगळे साध्य होण्यासाठी आसन सुखकर असणे व स्थिर असणे, आव-श्यक असते. सिद्ध केलेल्या आसनात छाती, मान व डोके सरळ रेषेत ठेवून बसावे; दृष्टी हृदयाच्या मध्यभागी, नासाग्री किंवा भ्रूमध्यात स्थिर करून व मन एकाग्र करून पुढील अभ्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ष्याला सुरुवात करावी, असे अष्टांग योगात सांगितले आहे.

(४) प्राणायाम – याविषयी पतंजलीचे सूत्र असे–

तस्मिन्सति श्वासप्रश्वासयोर्गतिविच्छेदः प्राणायामः।

(यो. सू. २.४९)

अर्थ – (आसनजय झाल्यावर) श्वास आणि प्रश्वास यांच्या स्वाभाविक गतीचे नियंत्रण करणे, हा प्राणायाम होय.

रेचक, पूरक आणि कुंभक अशा तीन प्रकारांनी प्राणायाम होतो. याविषयी श्री. कृ. के. कोल्हटकर लिहितात –

"निरोगी स्थितीत असलेला प्रौढ मनुष्य एका दिवस-रात्रीत मिळून सामान्यतः एकवीस सहस्र सहाशे वेळा श्वासोच्छ्वास करीत असतो. ह्या हिशेबाने एका मिनिटात पंधरा श्वासोच्छ्वास पडतात. प्राणापानांची ही सामान्य गती होय. पूरक, रेचक आणि कुंभक ह्यांच्या योगाने ह्या गतीत विच्छेद होतो म्हणजे मिनिटास पंधराऐवजी चौदा, तेरा, बारा अशा प्रकारे कमी कमी श्वास-प्रश्वास होऊ लागतात. अशा रीतीने श्वासःप्रश्वासांच्या नैसर्गिक गतीचा प्रयत्नाने विच्छेद करणे हा प्राणायाम होय. ह्या तिहींपैकी कुंभकात श्वास-प्रश्वासांच्या गतीचा पूर्णतया विच्छेद असतो. पूरक आणि रेचक ह्यांत पूर्ण विच्छेद नसला, तरी मिनिटास पंधराऐवजी चौदा, तेरा, बारा असे कमी कमी श्वासोच्छ्वास होतात. म्हणजे प्राणापानांच्या स्वाभाविक गतीत थोडातरी विच्छेद हा आलाच. प्राणापानांच्या स्वाभाविक गतीत प्रयत्नपूर्वक प्रमाणबद्ध विच्छेद करणे हे प्राणायामाचे सामान्य लक्षण असल्यामुळे, श्वासोच्छ्वासासंबंधी दीर्घश्वसनादी जे प्रकार ते सर्व प्राणायामच होत.

अशा प्रकारे दीर्घ प्राणायामाचा अभ्यास यथाशक्ति झाला म्हणजे प्राणवृत्तीला स्थिरपणा येऊ लागतो. ती जसजशी स्थिर होत जाईल, तसतशी ती सूक्ष्म होत जाते. प्राणवृत्ती सूक्ष्म होणे हे प्राणायामाचे उद्दिष्ट असते. मनाची वृत्ती सूक्ष्म आणि एकाग्र होणे हे प्राणवृत्ती सूक्ष्म होण्यावर अवलंबून असते. योगवासिष्ठात "यः प्राणपवनस्पन्दः चित्तस्पन्दः स एव हि" असे म्हटले आहे, ते ह्याच अभिप्रायाने होय. मन सूक्ष्म वस्तूवर एकाग्रतेने विचार करू लागले, तर त्या वेळी प्राणवृत्तीही सूक्ष्म होते, हे सर्वांच्या परिचयाचे आहे. योगशास्त्राने असेही सिद्ध केले आहे, की प्राणवृत्ती सूक्ष्म होईल, तर मनाचे चांचल्य मोडून तेही स्थिर आणि सूक्ष्म होते."

(५) प्रत्याहार – याविषयीचे पतंजलीचे सूत्र असे –

स्वविषयाऽसम्प्रयोगे चित्तस्वरूपानुकार इवेन्द्रियाणां प्रत्याहारः।

(यो. सू. २.५४)

भावार्थ – पाच इंद्रियांचे जे पाच विषय त्यांचा त्या इंद्रियांशी संबंध किंवा संप्रयोग होऊ दिला नाही म्हणजे ती इंद्रिये चित्ताच्या स्वरूपाचे जणू अनुकरण करणारी होतात. या त्यांच्या स्थितीला प्रत्याहार म्हणतात.

या पाच अंगांचे विवरण केल्यानंतर श्री. कृ. के. कोल्हटकर यांनी त्याचा समारोप केला आहे, तो असा.–

"चित्ताचा आणि इंद्रियांचा परस्परांशी मधाच्या पोळ्यातील राणीमाशी आणि इतर माश्या ह्यांच्या संबंधासारखा संबंध असतो. मधमाश्यांचा स्वभाव असा असतो, की त्या सदा राणीमाशीजवळच असावयाच्या. राणीमाशी एखाद्या ठिकाणी असली, की मधमाश्या तेथे बसून पोळे घालतात. ती उठून गेली की त्याही तिच्यासमवेत निघून जातात. इंद्रियांचे असेच आहे. चित्त जिकडे जाईल तिकडे ती जायची. चित्त बहिर्मुख झाले, की इंद्रिये चित्तस्वरूपानुसार होतात. ह्यासाठी कोणतेही बाह्य निमित्त उत्पन्न झाले, तरी चित्ताला तिकडे जाऊ न देण्याचा स्वतंत्र अभ्यास करून इंद्रिये स्वाधीन राखणे हा प्रत्याहार होय."

वर जी योगाची पाच अंगे सांगितली, त्यांना बहिरंग साधने म्हणतात. चित्त स्थिर करण्याच्या कामी त्यांचा साक्षात उपयोग होत नाही, तर परंपरेने तो होतो. या पुढची धारणा, ध्यान व समाधी ही तीन अंतरंग साधने होत. कारण या तीन अंगांनी चित्ताची एकाग्रता साक्षात साधायची असते.

(६) धारणा – या विषयीचे पतंजलीचे सूत्र (३.१) असे –

देशबन्धश्चित्तस्य धारणा।

अर्थ – चित्ताच्या कोणत्या तरी देशावर म्हणजे स्थानावर जणू बांधून ठेवल्यासारखे चित्त स्थिर करणे, ही धारणा होय.

याविषयी स्वामी विवेकानंद म्हणतात –

अंतःसृष्टीतील म्हणजे आपल्या देहातील एखाद्या विशिष्ट भागावर अथवा बाह्य सृष्टीतील एखाद्या विशिष्ट विषयावर मन जेव्हा एकसारखे चिकटून राहते, तेव्हा मनाच्या त्या अवस्थेला धारणा असे नाव आहे.

धारणेचा एक सोपा प्रकार प्रा. श्री. शं. खानवेलकर यांनी सांगितला आहे, तो असा –

"आसनावर बसून नासाग्री दृष्टी लावावी व ती तेथे स्थिर करून डोळे मिटून घ्यावेत. आपली दृष्टी जेथे आहे तेथेच चित्त व प्राण एकत्रित झाले आहेत, अशी कल्पना करून नजर त्या जागेवरून चळू देऊ नये. ह्या वेळी प्रत्याहार करावा लागेलच. आलेली प्रत्येक कल्पना मोडून काढून चित्त पुन्हा पुन्हा नासाग्री आणावे. असे करता करता काही क्षण ते नासाग्राच्या ठिकाणी एकाग्र होईल. हा अभ्यास जरा साधू लागला, की दृष्टी आणखी खाली नेऊन हृदयमध्यावर लावावी; डोळे मात्र उघडू नयेत. आतूनच हृदयाच्या मध्यभागी दृष्टी नेऊन तेथे मन व प्राण एकत्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झालेले आहेत व आपणांस तसे भान होत आहे असे मानावे. रोज तास दीड तास असा अभ्यास केला तर तीन महिन्यांत काही वेळ तरी दृष्टी, मन व प्राण हृदयमध्याच्या केंद्रावर स्थिर झाले आहेत, असा अनुभव येईल. तासभरपर्यंत अखंड अशी चित्तवृत्ती स्थिर झाली, की धारणा (व त्याबरोबर) ध्यानही पक्के होईल. याशिवाय गुरूपदिष्ट मार्गाने साधकाने इतरही कोणती तरी धारणा साध्य केली तरी हरकत नाही. धारणा उत्तम साधली की ध्यान सिद्ध झालेच, असे समजावयास हरकत नाही."

(७) ध्यान – ही धारणेच्या पुढची पायरी आहे. ध्यानाविषयी पतंजलीचे सूत्र (यो. सू. ३.२) असे–

तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम् ।

अर्थ – तत्र म्हणजे ज्या वस्तूवर चित्ताची धारणा केली असेल, तिथेच त्याची एकतानता करणे म्हणजे ध्यान होय.

श्री. कोल्हटकर या ध्यानाचा अर्थ वेगळा सांगतात, तो असा– "एका क्षणाला जी भावना चित्तात असेल, तीच पुढील अनेक क्षणांना टिकणे, ही त्या भावनेची म्हणजे प्रत्ययाची एकतानता होय. धारणा ज्या देशावर केली असेल त्या देशावर ही प्रत्ययैकतानता करणे म्हणजे ध्यान होय.

हनुमंताच्या मूर्तीवर चित्त स्थिर करणे ही धारणा आणि त्याच्या ठिकाणी असलेल्या सामर्थ्याचा आविर्भाव आपल्या ठिकाणी व्हावा म्हणून त्याच्या सामर्थ्यावर चित्ताची एकतानता करणे हे ध्यान होय. एवंच चित्त कोठेतरी स्थिर करणे ही धारणा, तर स्थिर झालेल्या चित्ताचा विशिष्ट वृत्तिरूप परिणाम सारखा टिकविणे हे ध्यान होय."

ध्यानाचे शेकडो मार्ग व पद्धती आहेत. सगुणध्यान, शरीरांतर्गत चक्रावर केलेले ध्यान, निर्गुणध्यान; एखादे तत्त्व, श्लोक, उत्तम विचार यांवर केलेले ध्यान; स्थूलध्यान, सूक्ष्मध्यान, ज्योतिर्ध्यान असे अनेक प्रकार यात असून, साधकाची जी गुरुपरंपरा असेल, जो संप्रदाय असेल, त्याप्रमाणेच त्याने यांपैकी एखाद्या प्रकाराचा अभ्यास सुरू केला पाहिजे.

(८) समाधी – 'सम्यक् आधीयते यस्मिन्' = ज्या ठिकाणी मन नीट ठेवता येते ती समाधी होय. समाधीचे स्वरूप पतंजलीने पुढील सूत्रात (यो. सू. ३.३) सांगितले आहे–

तदेवार्थमात्रनिर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः ।

अर्थ – ध्यानाच्या अवस्थेत ज्या क्षणी ध्यात्याला स्वतःची विस्मृती होऊन फक्त ध्यानविषयावर प्रतीती येत राहते, त्या वेळी त्या अवस्थेला समाधी म्हणतात.

समाधीच्या स्वरूपाविषयी भिन्न भिन्न विद्वानांनी वेगवेगळ्या प्रकारचे विचार सांगितले आहेत. जेव्हा ध्येयाचे बाह्य स्वरूप सोडन अंतःस्वरूपात मात्र मन तदाकार होऊन राहते, तेव्हा त्या स्थितीस समाधी असे म्हणतात, असे विवेकानंदांनी म्हटले आहे. श्री. कृ. के. कोल्हटकर यासंबंधी लिहितात ते असे– "भाव्य वस्तूव्यतिरिक्त दुसरा कोणताही अर्थ भासमान न होता केवळ ती भाव्य वस्तूच भासमान होणे, ही त्या भाव्य वस्तूची अर्थमात्र निर्भासता होय. चित्ताची भाव्य वस्तूशी इतकी तन्मयता होणे, की अमुक भाव्य वस्तूचे ध्यान मी करीत आहे, असे स्फुरण न होणे, ही त्याची स्वरूपशून्यता होय. ध्येय अशा रीतीने केवळ अर्थरूपानेच तेवढे भासमान होणे आणि त्याच्या स्वरूपाचेही अनुसंधान न होणे, हीच समाधी होय.

ध्यान जेव्हा केवळ ध्येयस्वरूपाकार म्हणजे ज्याचे ध्यान करीत असेल, तद्रूपच होऊन, अन्य पदार्थांचे ज्ञान निराळे म्हणून काहीच राहात नाही, म्हणजे ध्यान व पदार्थ ह्या दोहोंचा एक आकार होतो, तेव्हा त्यास समाधी असे म्हणतात, असे श्री. रेळे यांनी प्रतिपादन केले आहे.

विद्यारण्यस्वामींनी समाधीची अवस्था सांगितली आहे, (पञ्चदशी १.५५) ती अशी –

ध्यातृध्याने परित्यज्य क्रमाद्ध्येयैकगोचरम् ।
निवातदीपवच्चित्तं समाधिरभिधीयते ।।

अर्थ – ज्या वेळी ध्याता, ध्यान व ध्येय या त्रिपुटीपैकी क्रमाने ध्याता व ध्यान या जोडीचा लोप होऊन, केवळ ध्येयावरच चित्त एकाग्र होऊन निर्वात स्थानी असलेल्या दीपाप्रमाणे निश्चल होते, तेव्हा त्या अवस्थेला समाधी म्हणतात.

समाधीचे संप्रज्ञात व असंप्रज्ञात असे दोन भेद आहेत.

धारणा, ध्यान, समाधी या तिघांना मिळून संयम असा शब्द पतंजलीने योजला आहे. डॉ. वि. म. भट लिहितात –

या संयमाने ध्येयभूत संकल्पशक्तीला पराकाष्ठेची तीक्ष्ण धार चढते. जागृती, स्वप्न व सुषुप्तीतसुद्धा, त्या संकल्पित ध्येयाची पूर्तता होईपर्यंत, त्याचा ध्यास सुटत नाही. सर्व ज्ञान, भावना व क्रिया (म्हणजेच ज्ञान – भक्ती – कर्म – योग) त्या संकल्पाची पूर्ती करण्यात दासीप्रमाणे राबवल्या जातात. जीवात्म्याच्या सर्व शक्ती एकवटून त्या ध्येयाप्रीत्यर्थच खर्ची पडत असतात आणि केंद्रीभूत झालेल्या सर्व शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक शक्तींचा प्रवाह उन्मार्गी होऊन, तो जेव्हा स्थूल-सूक्ष्म देहांतल्या सहस्रदल कमलाच्या सर्व शक्ती जागृत व प्रफुल्लित करतो तेव्हाच, पतंजली म्हणतात त्याप्रमाणे प्रज्ञेचा उद्भव होतो (तज्जयात् प्रज्ञालोकः), सर्व ज्ञान शक्ती उमलतात, बहरतात आणि ध्येयपूर्तीसाठी अवश्य असलेल्या सर्व कल्पना एकदम सुचून तदनुरूप घटना सहज घडून येतात.

योगसिद्धी – समाधी, विशेषतः संप्रज्ञात समाधी, साध्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाल्याने योग्याला अनेक प्रकारच्या सिद्धी आपोआप प्राप्त होतात. सिद्धी या अद्‌भुत आणि लोकांच्या मनात योग्याविषयी आदरभाव उत्पन्न करणाऱ्या असतात. त्यामुळे एखादा साधक जर या सिद्धींच्या मागे लागला आणि सिद्धी हेच प्राप्तव्य किंवा इतिकर्तव्य मानू लागला, तर त्याची योगमार्गातली प्रगती खुंटते. सिद्धींचा उपयोग करता करता साधनेने मिळवलेले श्रेय क्षीण होते आणि क्वचित प्रसंगी तो सामान्य माणसाहूनही खालच्या पायरीवर जातो. सिद्धींचा उपयोग आत्मोन्नतीसाठी करणारा योगी मात्र कैवल्य मिळवतो.

सिद्धी मिळणे हीसुद्धा योगमार्गातली सामान्य प्रगती नव्हे. अगदी क्षुद्र समजल्या जाणाऱ्या सिद्धी मिळवतानाही साधकाला फार कष्ट करावे लागतात. या सिद्धी कशा प्राप्त होतात, या विषयी प्रा. खानवेलकर यांनी विवेचन केले आहे, ते असे –

" ध्यान– धारणा साधू लागली की शब्द, स्पर्श, रस, रूप, गंधादींचे अनुभव साधकाला येऊ लागतात. नाडीस्फुरण होणे, पाठीच्या कण्यातून सुखद वेग येणे, शरीर शीत कालात उष्ण व उष्ण कालात शीत भासणे, उष्ण कालात वाऱ्याची मंद झुळूक शरीरावर आल्यासारखी वाटणे, नाना प्रकारच्या सुगंधांचा अनुभव येणे, अनाहत नाद ऐकू येणे, दिव्य रसांचा आस्वाद घेता येणे व तेजाचे दर्शन होणे, परमात्म्याची अनंत रूपे दिसणे, अष्टसात्विकभाव जागृत होणे, अशा प्रकारचे हे अनुभव असतात. योगाभ्यासकालात येणाऱ्या या अनुभवांचा आणि सिद्धींचा मात्र काही संबंध नाही.

साधक उच्च भूमीवर जाऊ लागला, की कित्येक वेळा त्याला न समजताच काही गोष्टी त्याच्या हातून घडतात. केव्हा त्याने सांगितलेले भविष्य खरे ठरते, तर त्याने क्वचितच उच्चारलेल्या शापवाणीचा परिणाम घडतो. एखाद्याला काही उपाय सांगितला तर, ज्यासाठी तो उपाय सांगितला असेल ती गोष्ट घडते. कित्येकदा ध्यानीमनी नसताना त्याला अनुकूल असणाऱ्या अशा गोष्टी अभावितपणे घडून येतात. ह्या गोष्टींच्या मागील कार्य-कारणभाव जोपर्यंत समजून येत नाही, तोपर्यंत अशा गोष्टी चमत्कार मानल्या जातात.

साधन करीत असताना शरीर, मन व बुद्धी यांच्या शक्ती विकसित झाल्यामुळे, त्या सामर्थ्याच्या जोरावर योगी काही अलौकिक भासण्यासारख्या गोष्टी सहज करू शकेल, तेव्हा त्यांना सिद्धी म्हणतात. असा अनुभव, चमत्कार व सिद्धी यांत फरक असून, सिद्धी मिळण्याचे मार्ग, योग्याला त्या प्राप्त होण्याचा काल, योग्याजवळ त्या राहण्याचा काल, त्यांचा परिणाम, इत्यादी गोष्टी ठरलेल्या असून, साधनभेदाप्रमाणे त्यांचे वर्गही पडलेले आहेत. "

सिद्धींच्या लहानमोठेपणाच्या मानाने त्यांचे अनुक्रमे सिद्धी, अभिज्ञा, विभूती आणि ऐश्वर्य असे चार प्रकार सांगितलेले आहेत. भागवताच्या अकराव्या स्कंधातल्या पंधराव्या अध्यायात भगवंताने योगी व भक्त यांना प्राप्त होणाऱ्या अठरा महा-सिद्धींचे वर्णन केले आहे. त्यांपैकी आठ सिद्धी स्वतःच्या ठिकाणीच असून, बाकीच्या दहा सिद्धी योगी विश्वातून मिळवू शकतो, असे म्हटले आहे. याशिवाय पाच क्षुद्र सिद्धींचे वर्णन एकनाथी भागवतात पुढीलप्रमाणे केले आहे –

क्षुद्र सिद्धि पंचलक्षण । भूत भविष्य वर्तमान ।
या त्रिकाळांचे जे ज्ञान । ते पहिले जाण ये ठायीं ।।
सुख दुःख शीत उष्ण । मृदु आणि अति कठिण ।।
या द्वंद्वासि वश नव्हे जाण । हे दुसरे लक्षण सिद्धींचे ।।
पराचे स्वप्न स्वयें सांगणे । पुढिलांचे चित्तीचे जाणणे ।
हे तिसरी सिद्धी म्हणणे । ऐक लक्षणे चौथीचीं ।
अग्नि, वायु आणि उदक । शस्त्र, विष आणि अर्क ।
यांचे प्रतिस्तंभन देख । ते सिद्धी निष्टंक हे चौथी ।
कोणासि जिंकिला नवचे पाहे । जेथिचा तेथ विजयी होये ।
एकला सर्वत्र विजयो लाहे । हे पांचवी आहे विजयसिद्धि ।।

पतंजलीने सर्व सिद्धींत अष्टमहासिद्धी या महत्त्वाच्या मानल्या असून, योगसूत्रांत (३.४४) त्यांची नावे दिली आहेत. त्या नावांविषयी एक श्लोक असा –

अणिमा महिमा चैव लघिमा गरिमा तथा ।
प्राप्तिः प्राकाम्यमीशित्वं वशित्वं चाष्टसिद्धयः ।।

(१) अणिमा – शरीर परमाणूप्रमाणे सूक्ष्म करता येणे,
(२) महिमा – शरीर वाटेल तेवढे मोठे करता येणे,
(३) लघिमा – शरीर कापसापेक्षाही हलके करता येणे,
(४) गरिमा– शरीर अत्यंत वजनदार करता येणे,
(५) प्राप्ती – चंद्रबिंबासारख्या अत्यंत दूरच्या वस्तूला बसल्या ठिकाणाहून बोटांनी स्पर्श करता येणे,
(६) प्राकाम्य – मनातली इच्छा पूर्ण करून घेता येणे,
(७) ईशित्व – सर्व सृष्ट पदार्थांवर सत्ता चालविता येणे, आणि
(८) वशित्व – सर्व भूतमात्राला वश करून घेता येणे.

याशिवाय क्षुद्र सिद्धी शेकडो आहेत. दुसऱ्याचे मनोगत जाणणे, स्वप्न सांगणे, भूतकालातील घटना सांगणे, हातातून मूर्ती, कुंकू, अंगारा, बुक्का, इ. वस्तू काढणे, शरीरातील विकृती सांगणे, आपल्याकडे येणारा माणूस कोणत्या कामासाठी येत आहे हे जाणणे, क्षुद्र रोग बरे करणे, दंशादिकांच्या वेदना दूर करणे, अशासारख्या सिद्धींना क्षुद्र सिद्धी म्हणतात. त्या योगसाधनेनेच प्राप्त होतात असे नसून शवसाधन, प्रेतविद्या, मंत्रविद्या, अघोरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साधने, इ. उपायांनीही साध्य होतात.

योगसिद्धीच्या विषयात पं. गोपीनाथ कविराज लिहितात–

योगविद्येचा दीर्घकाल आविच्छिन्न अभ्यास केल्यावर चित्त शुद्ध होते व क्रमशः संसाराला कारणीभूत असणाऱ्या समस्त क्लेशांचे शमन होते. चित्ताच्या आत्यंतिक शुद्धीचे फळ म्हणजे विवेक ख्याती आणि कैवल्यसिद्धी हे होय. सत्त्वगुणाची उच्च अवस्था प्राप्त झाल्यावर योग्याला नाना प्रकारच्या विभूती म्हणजेच सिद्धी प्राप्त होतात. या सिद्धी म्हणजे ईश्वरत्वाची अभिव्यक्तीच होय. ईश्वराचा स्वभाव म्हणजेच ऐश्वर्य. हा आत्म्याचा आगंतुक धर्म नाही. ज्याप्रमाणे मनुष्य धावू लागला, की त्याच्या मागे त्याची छाया आपली इच्छा नसताही धावू लागते, त्याचप्रमाणे एकदा अविद्येचे आवरण दूर झाले, की इच्छा नसताही आपोआप ऐश्वर्याचे स्फुरण होऊ लागते. या ऐश्वर्यातूनच पुढे आत्म्याला कैवल्य प्राप्त होते. योग्याला आपोआप मिळणाऱ्या या सिद्धी त्याच्या मोक्षमार्गात विघ्न आणणाऱ्या असतात, अशी समजूत आहे. पण सर्वांशांनी ती खरी नाही. भगवंताच्या कृपेने जीवाच्या आत विशुद्ध सत्त्वाचा संचार झाल्यावर विभूतींचे जे स्फुरण होते ते मुक्तीला प्रतिबंधक नाही. फक्त त्या विभूतींचा उपयोग जर स्वतःचे लौकिक महत्त्व वाढविण्यासाठी केला जाऊ लागला, तर मात्र त्यांच्यापासून विघ्न संभवते. पातंजल दर्शनात व इतरही ग्रंथांत सिद्धींना विघ्न म्हटले आहे. त्या सिद्धी म्हणजे आत्म्याच्या स्वरूपावस्थेच्या प्राप्तीला प्रतिबंध करणाऱ्या क्षुद्र विभूती समजल्या पाहिजेत. भगवंताची दिव्य विभूती हे शुद्ध सत्त्वाचे कार्य असल्यामुळे ती कधीही तिरस्करणीय समजता कामा नये. या दिव्य विभूतीला महाविभूती म्हटले आहे. ही महाविभूती म्हणजे योग्याची सर्वात्मता होय. अणिमादी सिद्धींना अष्टमहासिद्धी म्हटले असले, तरी त्या महाविभूतीच्या अतिक्षुद्र अंशरूप आहेत. अग्नीच्या संबंधाने जशी लोहादिकांच्या ठिकाणी दाहक शक्ती निर्माण होते, त्याचप्रमाणे सर्वेश्वर परमात्म्याशी योग झाल्यावर जीवही आपल्या धारणाशक्तीनुसार स्वतःचा लाभ करून घेतो, असे म्हटले तर त्यात आश्चर्य मानण्याचे कारण नाही. वस्तुतः जीवाची साधना ऐश्वर्याच्या अर्थात सिद्धींच्या प्राप्तीसाठी नसते किंवा त्याच्या त्यागासाठीही नसते. आत्मस्वरूपाची उपलब्धी हे त्या साधनेचे लक्ष्य असते. या मार्गात प्रथम विभूतींचा उदय होतो आणि पुढे त्यांचा उपसंहारही होतो. शेवटी भोग आणि त्याग यांतही अद्वैतच अनुस्यूत राहते. त्या स्थितीत भोगही राहत नाही व त्यागही राहात नाही. जे राहते ते केवळ अनिर्वचनीय आत्मस्वरूप असते.

राजयोग नामक व्याख्यानसंग्रहात योगाचे तात्त्विक विवेचन झाल्यावर त्या विवेचनाचा समारोप करताना स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे, ते असे –

ह्या राजयोगाची साधना सुरू करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या श्रद्धेची वा विश्वासाची मुळीच अट नाही. स्वतःला प्रत्यक्ष अनुभव येत नाही तोवर कशावरही विश्वास ठेवू नका, अशीच राजयोगाची आपल्याला शिकवण आहे. सत्य स्वतःच्याच पायावर उभे राहू शकते, त्याला कुणी धरून उभे करण्याची आवश्यकता नाही. उभे राहण्यासाठी त्याला कसल्याच टेकूची गरज नाही. आपल्या जागृत अवस्थेतील घटना खऱ्या आहेत, हे सिद्ध करण्यासाठी स्वप्नाची किंवा कल्पनेची मदत घ्यावी लागेल, असे का तुम्हांला म्हणावयाचे आहे ? नाही, असे कुणीही कधी म्हणणार नाही. आता एवढे मात्र खरे की, या राजयोगाच्या साधनेला दीर्घ अवधी आणि निरंतर प्रयत्न यांची आवश्यकता आहे. राजयोगाची साधना काही अंशी शारीरिक स्वरूपाची म्हणजे शरीरसंयमात्मक आहे. परंतु ती अधिकांशी मानसिक स्वरूपाचीच आहे. मुख्यतः ती मनःसंयमात्मकच आहे. मन हा शरीराचाच केवळ सूक्ष्म भाग असून, ते शरीरावर कार्य करीत असते, हे जर आपल्याला मान्य असेल, तर शरीरही उलट मनावर कार्य करीत असलेच पाहिजे, हेही तर्कसंगत म्हणावे लागेल. शरीर आजारी पडल्यास मनही आजारी होते. शरीर निकोप असल्यास मनही निकोप आणि सुदृढ राहते. स्वतःच्या मनावर आपला फारच थोडा तावा असतो. तसा तावा लाभावा, शरीरावर आणि मनावर आपला तावा चालावा म्हणून आपल्याला सुरुवातीस कित्येक बाह्य अथवा शारीरिक बाबींची मदत घ्यावी लागेल. शरीर बरेचसे काबूत आल्यावर मग मनाला हाताळण्याचा आपण प्रयत्न करू शकू. याप्रमाणे मनाला हाताळून त्याला बरेचसे ताब्यात आणल्यावर आपण त्याला आपल्या इच्छेनुसार कार्य करायला लावू शकू आणि आपल्या इच्छेनुसार त्याला त्याच्या सर्व शक्ती एकत्र केंद्रित करावयास भाग पाडू शकू.

राजयोगाच्या मते हे बाह्य विश्व म्हणजे आंतर व सूक्ष्म जगताचे केवळ स्थूल स्वरूप होय. सूक्ष्म हे नेहमीच कारण असते, स्थूल हे कार्य असते. म्हणून बाह्य जगत हे कार्य असून अंतर्जगत हे कारण होय. त्याचप्रमाणे, बाहेरील शक्ती ह्या आंतील सूक्ष्म शक्तींचा केवळ स्थूल आविष्कार होत. ज्याने ह्या आंतील शक्ती समजून घेऊन त्यांना कसे हाताळावे हे जाणले आहे तो समस्त प्रकृतीवर तावा चालवू शकेल. समस्त विश्वावर प्रभुत्व मिळविणे, समस्त प्रकृतीला वशीभूत करणे याखेरीज कशानेही योग्याचे समाधान होण्यासारखे नसते. आपण ज्याला 'प्रकृतीचे वा निसर्गाचे' नियम म्हणतो त्यांचा त्याच्यावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काहीच परिणाम होऊ शकणार नाही. त्या साऱ्यांच्या पलिकडे जाऊ शकेल अशी अवस्था प्राप्त करून घ्यावयाची त्याची इच्छा असते. त्या अवस्थेस पोहोचल्यावर योग्याला आंतर आणि बाह्य समस्त प्रकृतीवर प्रभुत्व लाभंत असते. ह्या प्रकृतीवर सव मिळविण्यावरच मानवजातीची प्रगती आणि सभ्यता अवलंबून असते. ह्या प्रकृतीला मानव जितकी वशीभूत करू शकेल तितका तो प्रगत आणि सुसभ्य म्हणता येईल.

ज्या एकापासून हे वहु निर्माण झाले आहेत, जो एक ह्या अनेकांच्या रूपांनी विराजत आहे, त्या एकाचा शोध लावणे हेच समस्त विज्ञानांचे उद्दिष्ट आणि लक्ष्य होय. राजयोग आंतरजगतापासून सुरुवात करतो, अंतःप्रकृतीचे अनुशीलन करतो, आणि तद्द्वारा आंतर आणि बाह्य, दोहोंनाही वशीभूत करून घेतो. फार प्राचीन काळापासून हा प्रयत्न होत आला आहे. भारतवर्षात हे प्रयत्न विशेषेकरून झाले आहेत; थोडबहुत इतर देशांतही झाले आहेत, नाहीत असे नाही. पाश्चात्य देशांत हिला गुप्तविद्या मानण्यात येत असे आणि जे लोक ती आत्म सात करू जात, त्यांना चेटुक करणारे किंवा जादूटोणा करणारे ठरवून मारून टाकले जाई किंवा जिवंत जाळण्यात येई. भारतात नाना कारणांनी ही विद्या अशा लोकांच्या हाती पडली की त्यांनी तिचा नव्वद टक्के भाग नष्ट केला आणि उरलेला भाग पड्याआड, अत्यंत गुप्त ठेवण्याचा प्रयत्न केला. आजकाल पाश्चात्य देशांत ह्या विद्येचे कित्येक नामधारी गुरू उदयास आलेले दिसतात. या विद्येचा खेळखंडोबा करणाऱ्या भारतातील त्या गुरूंपेक्षांही हे आधुनिक पाश्चात्य गुरू जास्त निपटारे आहेत. कारण, भारतातील ते गुरुब्रुव निदान काहीतरी जाणत असत. ह्या आजकालच्या पश्चिमी प्रणेत्यांना तेवढेही ठाऊक नसते. भारतवर्षात ही विद्या पूर्णत्वास पोहोचावयास आज चार हजारांहूनही अधिक वर्षे होऊन गेलीत. तेव्हांपासून एका उत्कृष्ट, सुसंबद्ध शास्त्राच्या स्वरूपांत तिचा प्रसार भारतात होत आला आहे. ह्या बाबतीत एक मोठी डोळ्यात भरण्याजोगी गोष्ट आढळते ती ही, की ह्या शास्त्राचा टीकाकार जितका अर्वाचीन तितका तो अधिक चुका करतांना आढळतो आणि लेखक जितका प्राचीन, तितका तो अधिक तर्कशुद्ध आढळून येतो. अर्वाचीन लेखकांपैकी बहुतेकजण तऱ्हेतऱ्हेच्या चमत्कारांच्याच वर्णनांत रंगताना आढळतात. याप्रमाणे, ज्यांच्या हाती ही योगविद्या पडली, त्यांनी ती केवळ आपल्याच हाती राहावी या उद्देशाने तिला एखाद्या गुप्तविद्येचे स्वरूप दिले. बुद्धीचा प्रकाश तिच्यावर कधीच पडू दिला नाही, ती अंधारात दडवून ठेवली. पाहा – हठयोग. [पा. यो. द; भा. द; योगविद्या; कल्याण – योगांक; भा. सं. सा.; नवभारत, जानेवारी १९५१; राजयोग.]

योगनाद योगी यौगिक साधना करू लागल्यावर आणि तिच्यात बरीचशी प्रगती झाल्यावर त्याला अनेक प्रकारचे नाद ऐकू येतात. हे गूढ नाद पाठीच्या कण्यातून निघत असून, ते अविरत असतात. त्यांचा आवाजही घंटेच्या आवाजाइतका मोठा असतो.

हंसोपनिषदानुसार योग्याला दहा प्रकारचे नाद ऐकू येतात, त्यांतला पहिला नाद 'चीनी' असून, दुसरा 'चिन – चीनी' असतो. तिसरा घंटेच्या आवाजासारखा असतो. चौथा शंखध्वनीप्रमाणे असतो. पाचवा तंतुवाद्यासारखा आणि सहावा ढोलक्याच्या आवाजासारखा असतो, सातव्याचे अलगुजाशी साम्य असते. आठव्याचे मोठ्या ढोलाच्या आवाजाशी सादृश्य असते. नवव्याचा आवाज मृदंगासारखा असतो; तर दहावा आवाज मेघांच्या गडगडाटाप्रमाणे असतो. हे विविध नाद ऐकत असताना योग्याला शरीराच्या विशिष्ट अवस्था प्रत्ययाला येतात. कधी त्यांचे अंग शहारते, तर कधी त्याला खूप घाम येतो, तर कधी, डोके गरगरते व टाळू गळून पडेल असा भास होतो. दहावा नाद ऐकल्यावर तो ब्रह्मपदाला पोचतो. [क्रि. स्ट. ले. उ.]

योगनिद्रा कल्पांतकाळी भगवान विष्णू क्षीरसागरात शयन करतो; त्याच्या त्या निद्रेला योगनिद्रा म्हणतात. पुनश्च कल्पारंभ होईतो ही निद्रा कायम राहते. कल्पारंभी सृष्टीचे विघटन करणाऱ्या आसुरी शक्तींना परास्त करून जगाची नीट घडी बसवण्यासाठी विष्णू या निद्रेचा त्याग करतो.

देवीमाहात्म्यात या योगनिद्रेला देवता मानून ब्रह्मदेवाने तिची स्तुती केली आहे. तिच्यात योगनिद्रेला प्रार्थिले आहे, की मधु–कैटभ दैत्यांचा संहार करण्यासाठी तू श्रीहरीला जागृती आण. [कल्याण-साधनांक; वासुदेवशरण अग्रवाल – पुराणम्, फेब्रुवारी, १९६७; देवीमाहात्म्य; श. क.]

योगपट्ट नवीन संन्याशाने करावयाचा एक विधी. त्याचे विधान असे – प्रथम कंबर धुवावी. लंगोटी घालून भोवती वस्त्र गुंडाळावे. मग गुर्वाज्ञेने उच्चासनावर बसून जमलेल्या लोकांपुढे वेदान्तावर प्रवचन करावे. त्यानंतर गुरूने त्याच्या मस्तकावर पुरुषसूक्ताने अभिषेक करून त्याचा गंध, पुष्प, वस्त्र, इ. उपचारांनी सन्मान करावा. नंतर डोक्यावर वस्त्राचा एक तुकडा धरून इतर संन्याशांसह गीतेतील अकराव्या विश्वरूप दर्शनाच्या अध्यायातील पंधरा ते तेहतीसपर्यंतचे श्लोक म्हणावे. मग गुरूने त्याचे नवे नामकरण करून 'तू आजपासून दुसऱ्या पुरुषाला संन्यास देण्याला अधिकारी झालास' असे त्याला सांगावे. मग कटिदोरा व पंचमुद्रांकित दंड देऊन इतरांसह नम-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्कार करावा. नव्या यतीने उच्चासनावरून उतरून त्यावर गुरूला बसवावे आणि नमस्कार करावा. [ब. सि.]

योगप्रकाश योगी ध्यानमग्न असताना त्याला जे निरनिराळे प्रकाश दिसतात, त्यांना योगप्रकाश अशी संज्ञा आहे. तो जेव्हा मन एकाग्र करतो, तेव्हा त्याला आपल्या भुवयांच्या मध्ये प्रकाशाचा पर्वत दिसतो. या प्रकाशपर्वताला तारकब्रह्म असे नाव आहे. याव्यतिरिक्त त्याला अनेक प्रकाशकण, तारे, काजवे, रत्नांचे प्रकाश, इ. तेजोमय वस्तू दिसतात. याला आध्यात्मिक अनुभवाचा पहिला टप्पा असे म्हटले आहे. योगी जेव्हा नासाग्रावर दृष्टी स्थिर करून ध्यान करतो, तेव्हा त्याला विविध रंगांनी भरलेले आकाश अगदी जवळ दिसते. त्याच्या वरच्या अवस्थेत साधकाला हजारो सूर्यांचा प्रकाश एकत्र करावा एवढी तेजोमय दृश्ये दिसतात. आध्यात्मिक साधनेच्या वेळी योग्याचे चित्त या प्रकाशात मग्न होते. [क्रि. स्ट. ले. उ.]

योगमाया एक देवता. देवकीच्या गर्भातले आपले तेज काढून ते रोहिणीच्या गर्भात नेऊन ठेवायला श्रीविष्णूने जिला सांगितले ती ही देवता होय. ज्या वेळी विष्णूने कृष्णावतार घेतला त्याच वेळी नंदाच्या घरी यशोदेच्या पोटी हिने कन्या म्हणून अवतार घेतला. तिलाच दुर्गा, भद्रकाली, अंबिका, एकानंशा म्हणून सर्व लोक पूजा करतात. पाहा – एकानंशा.

योगमुद्रा बद्धपद्मासनाचा एक प्रकार. योगाचे प्रतीक म्हणून या मुद्रेला योगमुद्रा हे नाव मिळाले आहे. हिची कृती पुढीलप्रमाणे आहे – प्रथम पद्मासनात बसावे. नंतर हळूहळू कपाळ जमिनीवर टेकण्याचा प्रयत्न करावा. या वेळी दोन्ही हात कमरेच्या मागे नेऊन उजव्या हाताच्या बोटांनी डाव्या हाताचे मनगट पकडावे. श्वासोच्छ्वास नेहमीप्रमाणे चालू ठेवावा. ही स्थिती केवळ पाच ते दहा सेकंद ठेवावी. या स्थितीत पोटावर पायाचा दाब पडत असल्यामुळे मलावरोध नाहीसा होतो आणि वीर्य – दुर्बलता नष्ट होते. या मुद्रेमुळे कुंडलिनी जागृत होते, असेही म्हणतात. [योगविद्या; आसनाज; उ. यो. द.]

(२) एक जैन मुद्रा. हिच्यात दोन्ही हात पोटाजवळ घेऊन बोटे कमळाच्या कळीप्रमाणे मिटून घ्यायची असतात. [जै. इ.]

योगराज-उपनिषद एक नव्य उपनिषद. या एकवीस मंत्रांच्या उपनिषदात मंत्र, लय, राज आणि हठ या चार योगांचा निर्देश असून, मंत्रयोगाला महत्त्व दिले आहे. पुढे शरीरातील नवचक्रांचे वर्णन असून, त्या एकेका चक्रावर योग्याने ध्यान केले असता, त्याला सिद्धी व मुक्ती या दोन्ही गोष्टी मिळतात, असे सांगितले आहे. [श्री. सी. ग. देसाई]

योगवासिष्ठ संस्कृत भाषेतील एक तत्त्वज्ञानपर ग्रंथ. तीर्थयात्रा करून परत आल्यावर श्रीरामचंद्राला परम वैराग्य प्राप्त झाले व संसाराविषयी तो अगदी उदासीन बनला. त्या वेळी रघुकुलाचा पुरोहित वसिष्ठमुनी याने त्याला जो योगपर उपदेश केला, तो योगवासिष्ठ या नावाने प्रसिद्ध आहे. रामचंद्राला असे वैराग्य प्राप्त झाल्याचे वाल्मीकिरामायणात कुठेही सांगितलेले नाही. म्हणूनच योगवासिष्ठाला उत्तररामायण असेही म्हणतात. या ग्रंथाला आर्ष रामायण, वासिष्ठ महारामायण व मोक्षोपायसंहिता अशीही अन्य नावे आहेत.

योगवासिष्ठ हा ग्रंथ फार मोठा असून, त्याची एकूण श्लोकसंख्या बत्तीस हजार आहे. ग्रंथाचा विस्तार व त्यातील पुनरुक्ती यांमुळे ग्रंथ वाचणे सोपे काम नाही. त्यामुळे पुढे या ग्रंथाच्या दोन संक्षिप्त आवृत्त्या निघाल्या. त्यांपैकी एका ग्रंथाचे नाव लघुयोगवासिष्ठ असे असून, त्यात सहा हजार श्लोक आहेत. हा ग्रंथ काश्मीरमधील गौड अभिनंद नावाच्या पंडिताने इ. स. च्या नवव्या शतकात तयार केला. या ग्रंथात मूळच्या योगवासिष्ठातील निर्वाण प्रकरणाचा पूर्वार्धच तेवढा आला असून, उत्तरार्ध आलेला नाही. त्यामुळे हा ग्रंथ अपूर्ण वाटतो. या ग्रंथाचाच अनुवाद बहुतेक सर्व मराठी कवींनी केला आहे. योगवासिष्ठाचा दुसरा संक्षेप योगवासिष्ठसार या नावाने प्रसिद्ध असून, त्यात २२५ श्लोक आहेत. हा संक्षेप कोणी व केव्हा केला, ते मात्र समजत नाही.

योगवासिष्ठ या ग्रंथाचे स्वरूप सर्वसंग्राहक असून, त्यात नाना प्रकारची दर्शने, तत्त्वज्ञाने, मते व विचारसरण्या समाविष्ट झालेल्या आहेत. परंतु हे व्यापक व विस्तृत स्वरूप योगवासिष्ठाला एकदम प्राप्त झालेले नाही; तर त्याची जडणघडण पायरीपायरीने होत गेली. सांप्रतचे योगवासिष्ठ हे त्याचे परिणत व उत्क्रांत रूप होय, असा निष्कर्ष डॉ. माईणकर यांनी काढला आहे. त्यांच्या मते या ग्रंथाचे तीन टप्पे असून, ते पुढीलप्रमाणे आहेत –

(१) वसिष्ठकल्प – वसिष्ठमुनीच्या नावावर परंपरागत समजुतीप्रमाणे जे अनेक ग्रंथ आहेत, त्यांत वसिष्ठकल्प हा एक आहे. हा ग्रंथ सांप्रत उपलब्ध नाही. वसिष्ठ आणि ब्रह्मा यांच्यामध्ये झालेला संवाद म्हणजेच हा वसिष्ठकल्प असावा, असे वाटते. औपनिषदिक तत्त्वज्ञानाच्या आधारे व विवर्तवादाच्या भूमिकेवरून अद्वैताचे प्रतिपादन करणारा हा ग्रंथ म्हणजे योगवासिष्ठाची प्रथमावस्था होय.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(२) मोक्षोपाय किंवा वसिष्ठ-रामसंवाद – योगवासिष्ठाच्या निर्मितीतील हा दुसरा टप्पा होय. वसिष्ठाच्या मूळ ग्रंथाची ही पुनर्रचना बौद्ध धर्माच्या छायेखाली असणाऱ्या काश्मीर प्रांतात झाल्यामुळे बौद्ध मताचा समावेश मूळ ग्रंथात केला गेला व त्याचे स्वरूप थोडे व्यापक झाले.

(३) वासिष्ठरामायण किंवा बृहद्योगवासिष्ठ – ही या ग्रंथाची तिसरी आणि परिणत अवस्था होय. हे स्वरूप या ग्रंथाला काश्मीरमध्ये इ. स. च्या ११ व्या शतकाच्या शेवटी प्राप्त झाले असावे. या अवस्थेत या ग्रंथ केवळ वासिष्ठमत किंवा वसिष्ठरामसंवाद म्हणून राहिला नाही, तर त्याला सर्वसंग्राहक स्वरूप प्राप्त झाले. स्वतः ग्रंथकार त्याला 'शास्त्राणां परमं शास्त्रम्, सर्वेषामितिहासानां सारः, समस्तविज्ञानशास्त्रकोशः' असे म्हणून गौरवू लागला. योगवासिष्ठाला अध्यात्मविद्येच्या ज्ञानकोशाचे हे रूप यायला काश्मीरची भूमी व नाना मतांचा समन्वय साधणारे तिथले वातावरण अत्यंत पोषक ठरले. बौद्ध, शैव, त्रिक, प्रत्यभिज्ञा, वेदान्त, स्पंद, इ. विविध तत्वज्ञाने त्या वेळी काश्मीरात प्रचलित होती.

योगवासिष्ठाचा रचनाकाल – योगवासिष्ठाच्या कालासंबंधी विद्वानांत मतभेद आहेत. डॉ. दासगुप्त यांच्या मते हा ग्रंथ इ. स. च्या ७ व्या किंवा ८ व्या शतकात रचला गेला असावा. डॉ. फर्कुहर त्याचा काळ इ. स. चे १३ वे किंवा १४ वे शतक असा मानतात. श्री. दिवाणजी हा काळ इ. स. चे १० वे शतक, श्री. भट्टाचार्य तो इ. स. चे १० वे आणि १२ वे शतक यांच्या दरम्यान केव्हातरी, डॉ. भीखनलाल आत्रेय तो इ. स. चे ५ वे शतक व डॉ. राघवन तो इ. स. च्या ११ व्या शतकानंतर आणि १३ व्या शतकाच्या मध्यापूर्वी मानतात. डॉ. माईणकर यांनी तीन टप्प्यांचा निरनिराळा काळ मानला आहे. वसिष्ठकल्पाची रचना गुप्तकालात, मोक्षोपायाची रचना इ. स. च्या ३ ऱ्या किंवा ४ थ्या शतकात आणि योगवासिष्ठाची रचना इ. स. च्या १२ व्या शतकाच्या आरंभी झाली असावी, असे ते मानतात.

योगवासिष्ठाची रचना कुठे झाली, हाही एक वादग्रस्त प्रश्न आहे. त्याची रचना पूर्व भारतात, कदाचित बंगालमध्ये झाली असावी, असे श्री. भट्टाचार्य मानतात. श्री. दिवाणजी यांनी त्यांच्या मताचे खंडण करून काश्मीर हे त्याचे जन्मस्थान मानले आहे. डॉ. राघवन हेही काश्मीरपक्षाचेच आहेत.

योगवासिष्ठाचा कर्ता – योगवासिष्ठाचा कर्ता कोण, हा प्रश्नही विवाद्यच आहे. ग्रंथातील प्रकरणाच्या शेवटी 'इत्यार्षे श्रीमद्वासिष्ठरामायणे वाल्मीकीये' असा मजकूर असल्यामुळे हा ग्रंथ वाल्मीकीने रचला, अशी भावना होते. परंपरागत समजूतही अशीच आहे. या समजुतीला मूळ रामायण व योगवासिष्ठ या दोन्ही ग्रंथांतून काही आधार मिळतो, तो असा –

रामायणाच्या बालकांडातील तृतीय सर्ग आणि योगवासिष्ठाच्या वैराग्य प्रकरणातील द्वितीय सर्ग यांत या ग्रंथांच्या रचनेचे जे इतिहास आले आहेत, ते स्थूलमानाने सारखेच आहेत. वाल्मीकीने पूर्वरामायण रचल्यानंतर, ब्रह्मदेवाने त्याच्याच करवी हे उत्तररामायण म्हणजे योगवासिष्ठ लिहविले, असा वृत्तांत दोन्ही ठिकाणी आढळतो. त्यावरून वाल्मीकी हाच रामायणाप्रमाणे योगवासिष्ठाचाही कर्ता आहे, अशी समजूत होते. परंतु लो. टिळकांनी या कल्पनेला विरोध केला आहे. योगवासिष्ठाचे कर्तृत्व त्या आद्य कवीकडे देता येईल, इतका हा ग्रंथ प्राचीन नाही; किंबहुना तो गीतोत्तर काळातील आहे, असे त्यांनी म्हटले आहे. हा ग्रंथ उत्तरकालीन असावा, असे सांगणारा एक आधार प्रत्यक्ष ग्रंथातच मिळतो. निर्वाणप्रकरणातील पूर्वार्धात २२ व्या सर्गात, २२ ते २५ या श्लोकांत रामायण हे वाल्मीकीने, पण योगवासिष्ठ मात्र त्याच नावाच्या दुसऱ्या कोण्या कवीने रचले, असे म्हटले आहे. त्यावरून या ग्रंथाचे कर्तृत्व आदिकवी वाल्मीकीकडे देता येत नाही. तसेच, योगवासिष्ठाचा कर्ता आदिकवी वाल्मीकी नसावा, असे म्हणायला आणखीही एक कारण आहे. या ग्रंथातील विज्ञानवादी बौद्ध, शून्यवादी बौद्ध, शशिकलांक, कालैकवादी, माध्यमिक, हे उल्लेख असलेली ही सर्व मते वाल्मीकीच्या काळी अस्तित्वात नसल्याने, त्यांचे उल्लेख असणारा ग्रंथ वाल्मीकिकृत नाही, हे उघड आहे. भाषेच्या दृष्टीनेही वाल्मीकिरामायण व योगवासिष्ठ या ग्रंथांत बराच फ़रक आहे. तात्पर्य, योगवासिष्ठाचे कर्तृत्व हा विषय आज तरी विवाद्यच आहे.

योगवासिष्ठ या ग्रंथात सहा प्रकरणे आहेत. पहिल्या प्रकरणाला वैराग्यप्रकरण असे नाव आहे. त्यात प्रभू रामचंद्र याने दशरथाच्या सभेत आपल्या मनातील वैराग्याचे विचार सर्वांपुढे स्पष्टपणे मांडले आहेत. दुसऱ्या प्रकरणाला मुमुक्षुव्यवहार असे म्हटले आहे. यात विश्वामित्राच्या सांगण्यावरून वसिष्ठाने रामचंद्राला मुमुक्षूंनी कसे वागावे, यासंबंधी उपदेश केला आहे. तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या प्रकरणाला अनुक्रमे उत्पत्ती, स्थिती व उपशम अशी नावे असून, त्यांत विश्वाच्या उत्पत्तीची, स्थितीची व प्रलयाची उत्तम उपपत्ती लावली आहे. संसारचक्र केव्हा व कसे थांबते, या गोष्टींचे उपशमप्रकरणात सोपपत्तिक विवेचन केले आहे. दृष्टान्तासाठी या प्रकरणात अनेक आख्याने व उपाख्याने सांगितली आहेत. सहाव्या प्रकरणाला निर्वाण असे नाव आहे. हे प्रकरण फार मोठे असून, त्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. निर्वाण शब्दाचा अर्थ आनंद असा आहे. जीव हा मूल अविद्येने स्वस्वरूपापासून च्युत होऊन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घोर अशा संसारचक्रात सापडला आहे व अज्ञानाने सतत दुःख भोगीत राहिला आहे. ही सारी दुःखे नष्ट होऊन जीवाला नित्य व निरतिशय आनंद कसा प्राप्त करून घेता येईल, याचे विवेचन विस्ताराने या प्रकरणात आले आहे.

योगवासिष्ठ हा रामचरित्रातलाच एक भाग आहे. उपनयन संस्कार झाल्यावर राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न या चारही भावांचे गुरुगृही वेदाध्ययन झाल्यावर त्या सर्वांचा स्नातक-संस्कार झाला. त्यानंतर प्रभू रामचंद्र देशपर्यटन व तीर्थयात्रा करून आला आणि काही दिवसांनी त्याला वैराग्य प्राप्त झाले. एकदा दशरथ राजाचा दरबार भरला असता आणि कुलगुरू वसिष्ठ व विश्वामित्र मुनी तिथे उपस्थित असता, रामचंद्र त्या सर्वांना उद्देशून म्हणाला–

किं श्रिया किं च राज्येन किं कायेन किमीहया ।
दिनैः कतिपयैरेव कालः सर्वं निकृन्तति ॥

अर्थ – वैभव, राज्य, देह, आकांक्षा या कशातच माझे मन रमत नाही. काही दिवसांनी काळ हे सगळेच नष्ट करणार आहे.

'मला हा संसार रोगासारखा तापदायक वाटत आहे. माझ्या मनाला लागलेल्या या चितारूपी रोगाची आपण योग्य ती चिकित्सा लवकर करावी,' अशी विनंती त्याने वसिष्ठ व विश्वामित्र मुनींना केली. त्याप्रमाणे त्या दोघांनी त्याला अध्यात्मतत्त्वाचे यथार्थ स्वरूप समजावून दिले, ते असे–

दुःखकारण – मनुष्याच्या सर्व दुःखांचे कारण अज्ञान आहे. माणसाला आपल्या जीवाच्या आणि जगताच्या वास्तविक स्वरूपाचे ज्ञान जसजसे होत जाते, तसतसे त्याचे दुःख कमी होत जाते. पूर्ण आत्मज्ञान किंवा ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्यावर मनुष्याची सर्व दुःखे क्षीण होतात आणि त्याला परम शांती व परम आनंद यांची प्राप्ती होते. पण ही शांती व आनंद प्राप्त करून घेण्यासाठी माणसाने स्वतः प्रयत्न केला पाहिजे आणि आत्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी अधिकारी बनले पाहिजे. हा अधिकार मिळवायचा, तर विचार, साधुसंग, समता व संतोष यांची कास धरली पाहिजे. यांच्या योगाने मन शुद्ध व शांत होते. तसेच नित्य आध्यात्मिक साधना केल्याने आत्मसाक्षात्कारही होतो.

प्रयत्नवाद – या जगात उद्योगानेच सर्व इष्ट गोष्टी साध्य करून घ्यायच्या असतात. मात्र तो प्रयत्न अचूक असायला पाहिजे. पण काही वेळा, दोघांचा प्रयत्न समान असूनही एक उत्तम फल भोगतो व दुसऱ्याला काही मिळत नाही. एखाद्याला काही प्रयत्न न करताही राज्यवैभवाचा लाभ होतो, तर एखाद्याला प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही असलेल्या राज्यवैभवाला मुकावे लागते. हीच गोष्ट विद्या, आरोग्य, आयुष्य, संतती, इ. सर्व गोष्टींत दिसून येते. याला कारण दैवच आहे. सर्व इष्टानिष्ट गोष्टी दैवामुळेच घडून येतात का, असा रामचंद्राने यावर आक्षेप घेतला असता, दैववाद हा निरर्थक आहे, असे वसिष्ठाने सांगितले आहे. पुढे तो म्हणतो 'पूर्वजन्मकृतं कर्म तद्दैवमिति कथ्यते' = पूर्वजन्मी आपण जे कर्म केलेले असते, तेच पुढच्या जन्मी आपल्याला दैव म्हणून भोगावे लागते.

आपल्याला प्राप्त होणाऱ्या सुखदुःखाचा संबंध आपल्या कर्माशीच आहे. ज्या कर्मांचा सुखदुःखाशी असलेला संबंध प्रत्यक्ष कळत नाही, त्या कर्मांना अदृष्ट, प्राक्तन व दैव ही नावे दिली जातात. व ज्या कर्मांचा सुखदुःखाशी असलेला संबंध प्रत्यक्ष कळतो, त्या कर्मांना आपण पौरुष, प्रयत्न अथवा उद्योग असे म्हणतो. यावरून, दैववादी लोक ज्याला दैव असे म्हणतात, ते दैवही तत्त्वतः कर्म म्हणजे प्रयत्नरूपच आहे, हे सिद्ध होते.

शूर, पराक्रमी व शहाणे लोक दैव सर्व काही देईल, अशी वाट बघत नाहीत. ते योग्य प्रयत्न करून उच्च पदाला पोचतात. जे दैवावर हवाला ठेवून स्वस्थ बसतात, ते आपला नाश करून घेतात. लौकिक कर्मे स्वतःच्याच योग्यायोग्य विचाराने करावी. यज्ञयागादी कर्मे स्वतःच्या बुद्धीने व शास्त्राच्या साहाय्याने करावी. अध्यात्मज्ञान, योग व भक्ती यांच्या बाबतीत स्वतःच्या बुद्धीबरोबर शास्त्राचे व गुरूचेही मार्गदर्शन घ्यावे.

अशुभ कर्म करण्याकडे आसक्त झालेल्या चित्ताला योग्य प्रयत्न करून शुभ कर्मांकडे वळवावे. कारण शुभ प्रयत्नाने शुभ फळे मिळतात व अशुभ प्रयत्नाने अशुभ फळे मिळतात.

मनाच्या ठिकाणी ज्या स्वरूपाच्या वासना असतात, त्या स्वरूपाचीच कर्मे मनुष्याच्या हातून घडत असतात. वासना ही तत्त्वतः मनापासून वेगळी नसते. जसजश्या वासना क्षीण होत जातात, तसतसे मनही शांत होत जाते. संपूर्ण वासना क्षीण झाल्या म्हणजे मनाचा मनोभाव मावळतो. मन ब्रह्मस्वरूपी रमले, म्हणजे ब्रह्मस्वरूपाशिवाय दुसरे काहीच प्रतीतीला येत नाही. ब्रह्म हे आनंदमय असल्यामुळे या अवस्थेला आनंदमय अवस्था म्हणतात. ही आनंदमय अवस्था प्राप्त होणे यालाच मोक्ष असे नाव आहे.

मन हेच बंधाला व मोक्षाला कारण आहे. ते विषयासक्त झाले, की बंधाला कारणीभूत होते व निर्विषय झाले, की मोक्षाला कारण होते. पण मनाला निर्विषय करणे हीच गोष्ट अत्यंत कठीण आहे. त्यासाठी अनेक जन्म प्रयत्न करावा लागतो. मनाला निर्वासन करण्याचा जे अभ्यास करतात, त्यांना मुमुक्षु असे म्हणतात.

संसारसागर – संसारतापातून मुक्त होण्यासाठी आत्मस्वरूपाचे यथार्थ ज्ञान होणे आवश्यक आहे. संसारसागर कितीही दुस्तर असला, तरी शहाणे लोक ज्ञानरूपी नौकेच्या आश्रयाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तो एका क्षणात तरून जातात. शास्त्राभ्यास आणि गुरूपदेश ही ज्ञानाची दोन साधने आहेत. दिव्याच्या प्रकाशात अंधारातील पदार्थ ज्याप्रमाणे स्पष्ट दिसतात, त्याचप्रमाणे या शास्त्रांच्या अभ्यासाने आत्मस्वरूपाचा बोध स्पष्ट होतो. श्रवण, मनन व निदिध्यासन या क्रमाने बुद्धी ब्रह्मपदाशी, म्हणजे परमात्मपदाशी समरस झाली, की माणसाला निरतिशय सुखाचा अनुभव येतो. विश्व, ब्रह्म आणि आत्मा हे तीन्ही आनंदमय आहेत, असे सम्यक ज्ञान त्याला होते. सर्व दुःखे अज्ञानमूलक आहेत. ज्ञानी माणसाच्या अज्ञानाचा समूळ नाश झाल्याकारणाने त्याला दुःख होण्याचे काही कारण उरत नाही. म्हणून तो संसारात असूनही सदैव आनंदी असतो.

माणसाला या जगात जे दुःख सहन करावे लागते, त्याचे कारण म्हणजे त्याची संसाराबद्दलची आसक्ती होय. या आसक्तीमुळे त्याला नाना प्रकारची दुःखे सहन करावी लागतात. परंतु सर्व माणसांना अशी दुःखे सहन करावी लागत नाहीत. फक्त अज्ञानी माणसांनाच ती सोसावी लागतात.

संसारविषवृक्षोऽयमेकमास्पदमापदाम् ।
अज्ञं संमोहयेन्नित्यं मौर्ख्यं यत्नेन नाशयेत् ।।
प्राज्ञं विज्ञातविज्ञेयं सम्यग्दर्शनमाधयः ।
न दहन्ति वनं वर्षासिक्तमग्निशिखा इव ।।

अर्थ – अनेक आपत्ती आणणारा हा संसाररूपी विषवृक्ष अज्ञानी माणसालाच दुःख देतो. म्हणून अज्ञानाचा प्रयत्नपूर्वक नाश केला पाहिजे. ज्याप्रमाणे पावसाने भिजलेल्या वनाला अग्निज्वाला दग्ध करू शकत नाहीत, त्याप्रमाणे ज्याने जाणण्याजोगे सर्व जाणून घेतले आहे आणि योग्य दृष्टी प्राप्त करून घेतली आहे, अशा प्राज्ञ पुरुषाला मानसिक दुःखे पीडा देऊ शकत नाहीत.

जीव, जगत, परब्रह्म व मोक्ष यांविषयी योगवासिष्ठात पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे.

जीव – परब्रह्माच्या ठिकाणी जेव्हा, 'मी एक प्रकाशकेंद्र आहे,' अशी भावना निर्माण होते, तेव्हा त्या केंद्राला जीव असे म्हणतात. आपल्या भावनेच्या द्वारा ते केंद्र दीर्घ आकार धारण करते. त्याचप्रमाणे, भावनेच्याच द्वारा ते केंद्र द्रष्टा व दृश्य असे द्विविध रूप धारण करते. 'मी कोणीतरी आहे' अशी दीर्घ काळ कल्पना केल्याने जीवाच्या ठिकाणी अहंकार उत्पन्न होतो. आपल्याच संकल्पाने निर्माण केलेल्या निरनिराळ्या वासनांमध्ये जीव बद्ध होतो. असे हे जीव अनंत आहेत.

अनारतं प्रतिदिशं देशे काले जले स्थले ।
जायन्ते वा म्रियन्ते वा बुद्बुदा इव वारिणि ।।
(यो. वा. ४.४३.४)

अर्थ – पाण्यांवर ज्याप्रमाणे सतत बुडबुडे उठतात व नष्ट होतात, त्याप्रमाणे सर्व देशांत, सर्व काली, जळी, स्थळी जीव जन्म घेतात आणि नष्ट होतात.

जीवाच्या बीजजाग्रत्, जाग्रत्, महाजाग्रत्, जाग्रत्स्वप्न, स्वप्न, स्वप्नजाग्रत् व सुषुप्ती अशा सात अवस्था आहेत. त्याचप्रमाणे सत्त्व, रज व तम या त्रिगुणांच्या व शुभाशुभ कर्मांच्या आधारे जीवाचे पंधरा भेद आहेत. सर्व जीवांचा उदय ब्रह्मापासून होतो. त्याची प्रक्रिया अशी–

सर्वा एताः समायान्ति ब्रह्मणो भूतजातयः ।
किञ्चित् प्रचलिता भोगात् पयोराशेरिवोर्मयः ।।
स्वतेजःस्पन्दिता भोगाद्दीपादिव मरीचयः ।
स्वमरीचिबलोद्भूता ज्वलितागनेः कणा इव ।।
(यो. वा. ३.९४.१९–२०)

अर्थ – हालणाऱ्या पाण्यापासून जशी लाटांची, दिव्याच्या प्रकाशाच्या वलयातून जशी किरणांची, पेटणाऱ्या अग्नीच्या ज्वालांतून जशी ठिणग्यांची, त्याप्रमाणे ब्रह्मापासून सर्व जीवांची उत्पत्ती होते.

ब्रह्मदेवापासून कीटकांपर्यंत सर्वांची उत्पत्ती व लय एकाच नियमाने होतात.

जगत – हे जग उत्पन्न कसे झाले, हे एक कोडेच आहे. प्रत्येक दर्शनात हे कोडे उलगडण्याचा प्रयत्न केलेला आहे. सर्व दर्शनांमध्ये अद्वैत वेदान्ताची जगदुत्पत्तीची प्रक्रिया अधिक सूक्ष्म व सयुक्तिक आहे. योगवासिष्ठकारांनीही त्याच प्रक्रियेचा अंगीकार केलेला आहे. वसिष्ठ म्हणतो –

या जगाच्या मुळाशी एक तत्त्व आहे. त्या तत्त्वाला सत्तत्त्व असे म्हणतात. त्या सत्तत्त्वातूनच हे दृश्य जगत अभिव्यक्त झाले आहे. अभिव्यक्त होण्यापूर्वी ते सत्तत्त्वातच विलीन होऊन राहिलेले असते. अशा वेळी विभिन्न नामरूपाने त्याची प्रतीती येत नाही. या अवस्थेलाच अव्यक्त किंवा अव्याकृत असे नाव आहे. या अव्यक्त अवस्थेचा जो काल, त्यालाच व्यवहारात प्रलयकाळ असे म्हणतात. प्रलयकाळात सर्व स्थिरचर प्राणिसृष्टी आपापली सूक्ष्मतम वासनाबीजे कायम ठेवूनच अव्यक्तामध्ये विलीन होत असते. अव्यक्त अवस्थेमध्ये बीजभूत वासनांचे अस्तित्व जर मानले नाही, तर सृष्टीत वैचित्र्यच उत्पन्न होणार नाही. ज्या अर्थी सृष्टी विविध वैचित्र्याने नंटतच उत्पन्न होते, त्या अर्थी विविध वैचित्र्याला कारणीभूत वासनाबीजांचे वैचित्र्य व अस्तित्व प्रलयकाळी अवश्य मानणे भाग आहे. अव्यक्तामध्ये लीन झालेली सृष्टी पुढील क्रमाने अभिव्यक्त होते – आकाशातून वायू प्रगट होतो. वायूतून तेज, तेजातून जल व जलातून पृथ्वी उत्पन्न होते. आणि पृथ्वीतून तृण, गुल्म, लता, वेली,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

औषधी, वृक्ष, वनस्पती उत्पन्न होतात. त्यांतूनच प्राणिमात्राची पार्थिव शरीरे निर्माण होतात. अशा रीतीने वासनाबीजांचा भूतरूपाने परिणाम घडत असताना, त्या सर्वांच्या मुळाशी असलेले सत्तत्त्व हे सर्वांमध्ये व्यापून राहातच असते. कारण सत्तत्त्व हे स्वभावतःच सर्वव्यापी आहे. तेच सर्व सृष्टीचे अधिष्ठान आहे.

प्रलयकाळी सर्व सृष्टी उत्पत्तिक्रमाच्या विपरीत क्रमाने लय पावत असते. सर्व पार्थिव शरीरांचा पृथ्वीत लय होतो. तृण, गुल्म व लतावृक्षादिकांचाही पृथ्वीतच लय होतो. घटपटादी पार्थिव जड पदार्थही नष्ट झाले असता पृथ्वीतच लीन होतात. पृथ्वी जलात, जल तेजात, तेज वायूत, वायू आकाशात व आकाश सत्तत्त्वात विलीन होते. सत्तत्त्व मात्र कशातच विलीन होत नाही. म्हणूनच त्याला सत् असे म्हणतात. हे सत्तत्त्व सर्वव्यापी असल्यामुळे त्याला विभू, ज्ञानस्वरूप असल्यामुळे ज्ञान, तसेच त्याला अंत नसल्यामुळे त्याला अनंत असे म्हणतात.

परब्रह्म – योगवासिष्ठात परम तत्त्वाला परब्रह्म म्हटले आहे. परब्रह्म हे सर्व प्रकारच्या शक्तींनी युक्त असून, त्यात सर्व वस्तू सामावलेल्या आहेत. ते नेहमी सर्व प्रकारे सर्व काही असून, ते सर्वांबरोबर, सर्वांत आणि सर्व ठिकाणी आहे. ब्रह्म हे अनिर्वचनीय आहे. ते जडही नाही व चेतनही नाही. ते विद्या व अविद्या आणि तम व प्रकाश या दोहोंच्या पलिकडे आहे.

स्फुरन्ति सीकरा यस्मादानन्दस्याम्बरेऽवनौ ।
सर्वेषां जीवनं तस्मै ब्रह्मानन्दात्मने नमः ॥
(यो. वा. १. १. ३)

अर्थ – ज्यापासून पृथ्वीवर व स्वर्गात आनंदाचा वर्षाव होतो आणि जे सर्वांचे जीवन आहे, अशा आनंदस्वरूप ब्रह्माला नमस्कार असो.

मोक्ष – योगवासिष्ठात मोक्षाचे स्वरूप सांगितले आहे, ते असे –

सकलाशास्वसंसक्त्या यत् स्वयं चेतसः क्षयः ।
स मोक्षनाम्ना कथितस्तत्त्वज्ञैरात्मदर्शिभिः ॥
(यो. वा. ५. ७३. ३६)

जगद् भ्रमं परिज्ञाय यदवासनमासितम् ।
विरसाशेषविषयं तद्धि निर्वाणमुच्यते ॥
(यो. वा. ६. ४२. ५१)

अर्थ – सर्व इच्छांपासून अलग होऊन चित्ताचा जो क्षय होतो त्याला आत्मदर्शी तत्त्वज्ञान्यांनी मोक्ष असे म्हटले आहे. सर्व जग हे भ्रम आहे, असे जाणून सर्व विषय हे नीरस आहेत, असे समजून वासनारहित होऊन राहणे याला निर्वाण असे नाव आहे.

मोक्षदशेत मन चंचलतेपासून मुक्त होते. कोणत्याही वस्तूबद्दल अभिलाषा उत्पन्न होत नाही व ती आपल्याला मिळावी, असे वाटत नाही, सर्व जगाचेच विस्मरण होते आणि कोणाबद्दलही इच्छा किंवा द्वेष उत्पन्न होत नाही. त्या दशेत सर्व इन्द्रिये शान्त होतात आणि जीव मनाच्या गुणांचा त्याग करून ब्रह्माच्या गुणांना ग्रहण करतो आणि विभुत्वाचा अनुभव घेते. कर्तृत्व, भोक्तृत्व आणि इतरही उपाधी यांपासून तो मुक्त होतो.

मोक्षाचे सदेह आणि विदेह असे दोन भेद आहेत–

असंसक्तमतेर्यस्य त्यागादानेषु कर्मणाम् ।
नैषणा तत्स्थितिं विद्धि त्वं जीवन्मुक्ततामिह ॥
(यो. वा. ५.४२.१२)

अर्थ – ज्या वीतराग जिवंत पुरुषाच्या कर्मांच्या त्यागात आणि त्यांच्या करण्यात कोणतीही वासना नसते, त्याच्या त्या स्थितीला जीवन्मुक्तता असे नाव आहे.

शरीर नष्ट झाल्यानंतर जेव्हा जीवाला पुनर्जन्म घ्यावा लागत नाही, तेव्हा त्या स्थितीला विदेह मुक्ती असे म्हणतात.

मोक्षप्राप्ती करून घ्यायची असेल, तर आत्मज्ञान करून घेतले पाहिजे. आत्मज्ञान हेच मोक्षप्राप्तीचे एकमेव साधन आहे.

ज्ञानयुक्तिप्लवेनैव संसाराब्धि सुदुस्तरम् ।
महाधियः समुत्तीर्णा निमेषेण रघूद्वह ॥
(यो. वा. २.११.३६)

अर्थ – हे रघूत्तमा, बुद्धिमान लोक दुस्तर अशा संसारसमुद्राला ज्ञानरूपी नौकेच्या साहाय्याने एका क्षणात तरून गेले आहेत.

या मोक्षदायक ज्ञानाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे –

अनाद्यन्तावभासात्मा परमात्मेह विद्यते ।
इत्येको निश्चयः स्फारः सम्यग् ज्ञानं विदुर्बुधाः ॥
(यो. वा. ५.७९.२)

अर्थ – या जगात अनादी, अनंत व प्रकाशवान परमात्मा आहे, अशा प्रकारचा निश्चय होणे, यालाच विद्वानांनी सम्यग् ज्ञान असे म्हटले आहे.

घट, पट, इ. आकार धारण करणारे जगातील जेवढे म्हणून पदार्थ आहेत ते सर्व आत्माच आहेत, आत्म्याशिवाय इथे दुसरे कोणतेही तत्त्व नाही, अशा प्रकारचा निश्चय होणे, म्हणजेच सम्यग् ज्ञान होणे होय. परंतु हे ज्ञान सहजासहजी प्राप्त होत नाही. शेकडो जन्मांत अनुभवलेली संसारभावना ही दृढ झालेली असते आणि तिचा क्षय होण्यासाठी दीर्घ काळ ज्ञानाभ्यास करावा लागतो. अधिकारी व्यक्ती, शास्त्राभ्यास आणि गुरु या तीन गोष्टींचा मेळ जमला असता आत्मानुभव येतो.

योगवासिष्ठातील उपाख्याने – योगवासिष्ठकारांनी आपल्या दार्शनिक सिद्धान्तांचे प्रतिपादन स्वानुभव, दृष्टान्त व उपाख्याने यांच्या द्वारे केले आहे. या ग्रंथात एकूण पंचावन्न उपा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ख्याने आहेत. त्यांपैकी लीला, इंद्रजाल, प्रल्हाद, गाधी, शतरुद्र, राणी चुडाला, इ. काही उपाख्याने फार सरस व श्रेष्ठ आहेत.

योगवासिष्ठाची शैली – योगवासिष्ठ हा तत्त्वज्ञानपर ग्रंथ असला, तरी त्याची लेखनशैली साधी व सोपी आहे. लेखकाला जे काही सांगायचे आहे, ते त्याने अशा पद्धतीने सांगितले आहे, की ते एकदम हृदयालाच जाऊन भिडते. योगवासिष्ठकार स्वतःच आपल्या ग्रंथाविषयी म्हणतो–

शास्त्रं सुबोधमेवेदं सालंङ्कारविभूषितम् ।
काव्यं रसमयं चारु दृष्टान्तैः प्रतिपादितम् ।।
(यो. वा. २.१८.३३)

अर्थ – हे शास्त्र सुबोध आहे, अलंकारांनी नटलेले आहे, रसमय सुंदर काव्य आहे आणि यातील सिद्धान्त दृष्टान्तांनी प्रतिपादन केलेले आहेत.

योगवासिष्ठकारांनी यात अनुभवाचे बोल सांगितले आहेत–

यत् कथ्यते हि हृदयंगमयोपमान –
युक्त्या गिरा मधुरयुक्तपदार्थया च ।
श्रोतुस्तदङ्गहृदयं परितो विसारि
व्याप्नोति तैलमिव वारिणि वार्य शङ्काम् ।।
(यो. वा. ३.८४.४५)

अर्थ – जे मधुर शब्दांनी आणि समजणाऱ्या दृष्टान्तांनी आणि युक्तीने सांगितले जाते, ते ऐकणाऱ्याच्या हृदयात, पाण्यावर तेल पसरावे, तसे पसरते आणि त्याच्या सर्व शंका दूर करते.

अशा प्रकारची धारणा मनात धरून योगवासिष्ठकारांनी ब्रह्मविद्या ही काव्याच्या स्वरूपात लोकांपुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. हा ग्रंथ वाचत असताना वाचकाला आपण आत्मानुभव घेतलेल्या महान व्यक्तीच्या सहवासात आहो, असे वाटत राहाते. त्याच्या मनात येणाऱ्या शंकांचे सरळ व सुबोध भाषेत निरसन केले जाते. दृष्टान्ताच्या द्वारे कठीण सिद्धान्तांचे विवेचन केले जाते आणि हे सिद्धान्त म्हणजे केवळ कल्पना नसून, प्रत्यक्ष जीवनातील या खऱ्या घटना आहेत, हे उपाख्यानांमुळे मनावर ठसवले जाते.

या ग्रंथात दुसऱ्या संप्रदायांच्या सिद्धान्तांवर आक्षेप घेतलेले नाहीत किंवा त्यांचे खंडनही केलेले नाही. योगवासिष्ठकाराची दृष्टी उदार व विशाल आहे आणि सर्व संप्रदाय व मते सत्य आहेत, अशी त्याची धारणा आहे. एकाच परम तत्त्वाला शून्यवादी शून्य, ब्रह्मवादी ब्रह्म, विज्ञानवादी विज्ञान, सांख्य पुरुष, योगी ईश्वर आणि शैव शिव म्हणतात, असे तो सांगतो –

स्वमार्गमभिशंसन्ति वादिनश्चित्रया दृशा ।
विचित्रदेशकालोत्थं मार्गं स्वं पथिका इव ।।
(यो. वा. ३.९६.५३)

अर्थ – निरनिराळ्या देशांतून येणारे वाटसरू ज्याप्रमाणे आपलाच मार्ग उत्तम समजतात, त्याप्रमाणे वेगवेगळ्या मतांचे समर्थक आपल्याच मार्गाची प्रशंसा करतात.

इतके गुण असूनही या ग्रंथात काही दोष आहेत. या ग्रंथात पुनरुक्ती फार आहे. तसेच यात वेगवेगळी प्रकरणे असली, तरी ती नाममात्रच आहेत. प्रत्येक प्रकरणात प्रायः सर्व प्रकरणांतील सिद्धान्त आलेले आहेत. विषयांच्या विवेचनातही एखादा क्रम अनुसरलेला नाही. हा ग्रंथ फार मोठा आहे, हाही त्याचा दोषच आहे. [यो. हृ.; यो. उ. सि.; माधवस्वामीकृत योगवासिष्ठ, संपा- शं. गो. तुळपुळे, १९५८]

योगशिखोपनिषद (१) एक नव्य उपनिषद. हे सहा अध्यायांचे प्रदीर्घ उपनिषद आहे. शंकराने हिरण्यगर्भाला याचा उपदेश केला आहे.

याच्या पहिल्या अध्यायात सांगितले आहे, ते असे – केवळ शास्त्राभ्यासाने ब्रह्मप्राप्ती होत नाही; तर ती सिद्धिमार्गाने होते. ज्ञान व योग या साधनांनी जीव दोषरहित झाला म्हणजे तोच शिव होतो. ज्ञान व योग हे परस्परावलंबी आहेत. चार योगांबरोबरच भावनायोग व सहजयोग असे आणखीही दोन योग आहेत.

दुसऱ्या अध्यायात सांगितले आहे, ते असे – ओंकार हा मूलमंत्र आहे. ते सर्व मंत्रांचे बीज आहे, ब्रह्माचे मूलस्वरूप आहे व नादलिंगही आहे. नाद हा सर्वश्रेष्ठ मंत्र, आत्मा हा सर्वोच्च देव, नादानुसंधान ही सर्वश्रेष्ठ पूजा व संतोष हे परमसुख होय.

तिसऱ्या अध्यायात सांगितले आहे, ते असे– जीव हा मिथ्या असून, ब्रह्म हे एकच सत्य आहे. हे ब्रह्म विश्वात सत्यार्थाने वास्तव्य करून आहे. ज्ञानोदयानंतर सच्चिदानंदाची अनुभूती येते.

चौथ्या अध्यायात, हे जग केवळ भासमात्र कसे आहे ते अनेक दृष्टान्तांनी सांगितले असून, जगद्रूपाने सर्वत्र ब्रह्माचाच प्रकाश असल्याचे सांगितले आहे.

पाचव्या अध्यायात देह हे विष्णूचे देवालय असल्याचे सांगून, मूलाधारादी चक्रे व कामरूपादी पीठे यांचे वर्णन आहे.

सहाव्या अध्यायात परानाडीचे वर्णन आहे. तिच्या ठिकाणी ध्यान केल्याने योग्याला ब्रह्मरंध्रात प्रवेश मिळविता येतो. कुंडलिनी जागृत होऊन नाभिकंदापासून वर चढू लागली, की योग्याचा मुक्तिमार्ग सुरू होतो. हा कुंडलिनीयोग गुरूला शरण जाऊन त्याच्यापासूनच शिकावा. [श्री. सी. ग. देसाई]

(२) एक नव्य उपनिषद. हे यजुर्वेदाशी संबद्ध आहे व अथर्ववेदाशी संबद्ध आहे असे दोन्ही प्रकारचे उल्लेख मिळतात. यात सांगितले आहे, ते असे – आसनावर बसून व नासाग्री दृष्टी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ठेवून मनाचा संयम करावा व प्रणवाचे ध्यान करावे. योगाभ्यासाने सूर्यलोकाचाही भेद करता येतो. योगी सुषुम्नाद्वार शुद्ध करून कपालसंपुटाचा भेद करतो व परमतत्त्वाचा साक्षात्कार करून घेतो. [श्री. सी. ग. देसाई]

योगाचार बौद्धांच्या महायान संप्रदाचा एक पंथ. याला विज्ञानवाद असेही म्हणतात. मैत्रेय किंवा मैत्रेयनाथ याने या पंथाची स्थापना केली. मैत्रेय इ. स. च्या ३ ऱ्या शतकात होऊन गेला. त्याने महायान सूत्रालंकार, धर्मधर्मताविभंग, मध्यांतविभंग, महायान उत्तरतंत्र, अभिसमयालंकारकारिका, योगाचारभूमिशास्त्र, इ. काही ग्रंथ लिहिले. पण त्यांपैकी काहीच सांप्रत उपलब्ध आहेत.

या मताचे आणखी काही आचार्य पुढीलप्रमाणे –

असंग–(इ. स. चे ४ थे शतक) पुरुषपूर (पेशावर) येथे एका कौशिकगोत्री ब्राह्मण कुळात याचा जन्म झाला. समुद्रगुप्ताच्या काळात तो अयोध्या येथे जाऊन राहिला. मैत्रेयनाथानेच त्याला या पंथाची दीक्षा दिली. हा फार विद्वान होता. याने महायानसंपरिग्रह, अभिधर्मसमुच्चय, पंचभूमी, संगीतिशास्त्र, वज्रच्छेदिका, इ. ग्रंथ लिहिले आहेत.

वसुबंधू –(इ. स. चे ४ थे शतक) हा असंगाचा धाकटा भाऊ होता. असंगानेच याला योगाचार पंथाची दीक्षा दिली. याचे लंकावतारसूत्र व विज्ञप्तिमात्रतासिद्धी हे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

स्थिरमती – (इ. स. चे ५ वे शतक) हा वसुबंधूचा शिष्य होता. वसुबंधूच्या ग्रंथावर याने वृत्ती लिहिली आहे. त्रिंशिकाभाष्य, मध्यांतविभंगसूत्रभाषाटीका, अभिधर्मकोशभाष्यवृत्ती, सूत्रालंकारवृत्तिभाष्य व मूलमाध्यमिककारिकावृत्ती हे याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

दिङ्नाग – (इ. स. चे ५ वे शतक) हा ब्राह्मणकुलोत्पन्न असून, वसुबंधूचा शिष्य होता. हा फार विद्वान असून, शास्त्रार्थ करण्यात फार पटाईत होत. म्हणून याला वादिवृषभ अशी उपाधी मिळाली होती. याचे प्रमाणसमुच्चय, प्रमाणसमुच्चयवृत्ती, न्यायप्रवेश, हेतुचक्रनिर्णय, इ. ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

धर्मकीर्ती – (इ. स. चे ६ वे शतक) याने प्रमाणवार्त्तिक, न्यायबिंदू, हेतुबिंदू, प्रमाणविनिश्चय, वादन्याय, इ. ग्रंथ लिहिले आहेत.

धर्मपाल – (इ. स. चे ६ वे शतक) हा नालंदा बौद्ध विहाराचा अध्यक्ष होता. त्याने योगाचार व शून्यवाद या दोन्ही मतांच्या ग्रंथांवर टीका लिहिली.

या सर्व आचार्यांनी ग्रंथ लिहून योगाचार मताला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. असंगाने या पंथाला योगाचार असे नाव दिले; तर वसुबंधूने त्याला विज्ञानवाद अशी संज्ञा दिली. तिबेट व चीन या देशांत या वादाच्या अनेक शाखा निर्माण झाल्या आहेत.

या मताला योगाचार हे नाव पडण्याचे कारण असे की, यात बोधिप्राप्तीसाठी यौगिक आचार हे सर्वांत प्रभावी साधन मानलेले आहे. मैत्रेयनाथ हा स्वतः मोठा योगी होता. त्याने विज्ञानाच्या साक्षात्कारासाठी यौगिक प्रक्रियेचे अनुसरण केले होते. बोधिसत्त्वदशेतील दश भूमी पार केल्यानंतरच बोधी प्राप्त होऊ शकते. यालाच विज्ञानवाद असेही म्हणतात. कारण, यात विज्ञप्तिमात्र हेच अंतिम सत्य मानलेले आहे. थोडक्यात सांगायचे, तर केवळ विचार हाच सत्य आहे, असे यात मानलेले आहे. अशा रीतीने योगाचार ही या दर्शनाची व्यावहारिक बाजू असून, विज्ञानवाद ही त्याची वैचारिक बाजू आहे.

लंकावतारसूत्र हा या मताचा प्रमुख ग्रंथ आहे. या ग्रंथानुसार विज्ञान किंवा चित्त यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणतीही बाह्य वस्तू विद्यमान नाही. या बाह्य वस्तू स्वप्न, मृगजळ किंवा आकाशपुष्प याप्रमाणे असत् आहेत आणि चित्त किंवा विज्ञान तेवढे सत् आहे. या चित्तापासून सर्व जगताचे प्रवर्तन होते आणि चित्ताच्या निरोधामुळे जगताचाही निरोध होतो. समजा, एखाद्या भिक्षूला आपल्या गुहेत एक हत्ती शिरल्याचे स्वप्न पडले; तर तो हत्ती सत्य नव्हे. तो केवळ मनातून उत्पन्न झाला आहे आणि त्याची आकृती वासनेच्या प्रभावामुळे बनली आहे. संसार हा अशा स्वप्नासारखाच आहे. संसारात कोणते रूप नाही आणि कोणी रूपवान पदार्थही नाही. आहे ते केवळ चित्त. त्याच्या बाहेर कोण्या पदार्थाचे अस्तित्व नाहीच. सुख आणि दुःख ही सुद्धा चित्ताचीच संतती आहे.

बुद्धाच्या विचारांना सोडून अन्य पुरुषांच्या विचारांची परिकल्पित, परतंत्र आणि परिनिष्पन्न अशी तीन लक्षणे आहेत. स्वप्नातील हत्ती हे परिकल्पिताचे उदाहरण होय. हत्ती हा ज्ञेयाच्या रूपाने तिथे उपस्थित झाला. विचारच द्रष्टा आणि दृश्य अशी दोन्ही रूपे घेतो. विचारात ग्राह्य आणि ग्राहक अशी दुहेरी भावना प्रस्थापित झाली, की तिला परिकल्पित ही संज्ञा प्राप्त होते. विचार म्हणजेच चित्त. त्याची उत्पत्ती कोण्या बाह्य पदार्थापासून होत नाही. जर निळा रंग आणि तो पाहणारे डोळे असतील, तर निळ्या रंगाची आकृती आपोआप बनेल. चित्त परतंत्र आहे. एका अर्थात विचार स्वतंत्र असत नाही. चित्त परतंत्र आहे. एका चित्ताची उत्पत्ती दुसऱ्या चित्तातून होत असते. बौद्ध दार्शनिक अशा चित्ताला क्षणिक मानतात; पण सर्वथा विनाशशील मानत नाहीत. ते एका चित्तातून दुसऱ्या चित्ताची उत्पत्ती मानतात आणि त्या दोन चित्तांतला अवधीही पुष्कळच दीर्घ मानतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याला त्यांनी निष्यंदकाल असे नाव दिले आहे. परिनिष्पन्न या लक्षणात ज्ञेय हे ज्ञेयाच्या रूपात विद्यमान असत नाही. चित्त जाणते, याचा अर्थ हा, की ते स्वयं ज्ञेय बनतें. ज्ञेयाच्या होण्याने ज्ञान होते आणि आकृतींच्या होण्यामुळे नाम ठेवले जाते. शब्दांच्या दोन माला असतात. एक माला ज्ञेय, ग्राह्य, अभिधेय अशी तर दुसरी माला ज्ञान, ग्राहक, अभिधान अशी. या दोन्ही एकत्र चालतात. दोन्ही माला भ्रमपूर्वक आहेत. दोन्ही विकल्पातून निर्माण झाल्या आहेत. चित्त जाणायचे असेल, तर या दोन्ही मालांना विलग करायला हवे. दोहोंतून मुक्त झालेले चित्त मग शब्दांच्या सीमा ओलांडून जाते. त्या अवस्थेचे वर्णन अशक्य आहे. म्हणूनच बौद्ध परिभाषेत तिला अनभिलाप्य असे म्हटले आहे. 'भवत्येव' एवढेच तिच्याबद्दल म्हणता येईल. मनुष्याची क्लेश आणि ज्ञेय ही दोन आवरणे दूर झाली, की तो चित्तमात्रात निर्वाणपद मिळवतो.

विज्ञानाचे अनेक भेद आहेत. त्यांपैकी आलयविज्ञान व प्रवृत्तिविज्ञान हे दोन प्रमुख आहेत. आलयविज्ञानाला चित्त असेही म्हणतात. या चित्तात जीवाच्या कायिक, वाचिक व मानसिक अशा विज्ञानांची वासनारूप बीजे एकत्र राहतात आणि योग्य वेळी जगात प्रगट होतात. कालांतराने चित्तातच पुन्हा त्यांचा लय होतो.

या मतात सर्व वस्तू क्षणिक मानलेल्या आहेत. त्यामुळे आलयविज्ञानही क्षणिकच आहे. प्रतिक्षण त्यात परिवर्तन होत असते. आलयविज्ञानात शुभाशुभ वासनांबरोबरच चक्षुर्विज्ञान, श्रोत्रविज्ञान, घ्राणविज्ञान, रसनाविज्ञान, कायविज्ञान, मनोविज्ञान व क्लिष्टमनोविज्ञान ही सात विज्ञाने असतात. त्यांना प्रवृत्तिविज्ञान अशी संज्ञा आहे. आलयविज्ञानापासून त्यांची उत्पत्ती होते व आलयविज्ञानातच ते लीन होतात.

आलयविज्ञानाचे स्वरूप समुद्रासारखे आहे. वाऱ्याच्या झुळकींने समुद्राच्या पृष्ठभागावर तरंग उठतात व ते सदैव क्रीडा करीत राहतात. त्यात कधी खंड पडत नाही. त्याचप्रमाणे आलयविज्ञानात विषयरूपी वायूच्या झुळकींनी चित्रविचित्र विज्ञानरूपी तरंग उठतात व आपला खेळ करीत राहतात. त्यांचा कधीच नाश होत नाही. ज्याप्रमाणे समुद्र आणि तरंग यांच्यात भेद नाही, त्याप्रमाणे आलयविज्ञान आणि अन्य सप्तविध विज्ञाने यांच्यांतही फरक नाही. आचार्य वसुबंधूनेही आलयविज्ञानाची जलौघाशी तुलना केली आहे. ज्याप्रमाणे जलाचा प्रवाह तृण, काष्ठे, पालापाचोळा, इ. नानाविध वस्तूंना आपल्यात समाविष्ट करून सतत पुढे चाललेला असतो, त्याप्रमाणे विज्ञानही पुण्य, पाप, संज्ञा, वेदना, आदी चैत्त धर्मांना आपल्याबरोबर घेऊन पुढे चाललेले असते. जोपर्यंत हे जग आहे, तोपर्यंत आलयविज्ञानाला अंत नाही. बुद्धत्वाची प्राप्ती झाली म्हणजे मात्र हा प्रवाह एकदम थांबतो.

क्लेशावरण आणि ज्ञेयावरण ही दोन आवरणे दूर झाली, की मोक्षप्राप्ती होते, असे विज्ञानवादी योगी मानतात. क्लेश हा मुक्तीला बाधक आहे. म्हणून क्लेशावरणाची निवृत्ती झाली, की मोक्षलाभ होतो. मात्र तेवढ्याने सर्वज्ञता प्राप्त होत नाही. ज्ञेयावरणाची निवृत्ती झाल्यावर सर्वज्ञता प्राप्त होते. जेव्हा साधक पुद्‌गलनैरात्म्यात प्रतिष्ठित होतो, तेव्हा क्लेशांचा नाश होऊन मुक्तावस्था प्राप्त होते. पण साधक जेव्हा धर्मनैरात्म्यज्ञानात प्रतिष्ठित होतो, तेव्हा ज्ञेयाच्या अभावामुळे चित्ताला सर्वज्ञतावस्था प्राप्त होते. विज्ञानवादी दार्शनिक यालाच परम पदाची प्राप्ती असे म्हणतात. [भा. द. – बलदेव उपाध्याय; भा. द. – उमेश मिश्र; प्रसारिका, जुलै डिसेंबर १९५५; आजकल वार्षिक अंक, डिसें. १९५६; तां. बौ. सा. सा.]

योगांबर बौद्धांचा एक देव. अक्षोभ्याच्या वंशात याचा जन्म झाला. हा नीलवर्ण, त्रिमुख व षड्‌भुज आहे. याच्या हातात वज्रघंटा असते. ज्ञानडाकिनीला हा आलिंगन देत आहे, अशा याच्या मूर्ती आढळतात. [इं. बु. इ.]

योगारूढ एक पारिभाषिक संज्ञा. योगारूढाचे लक्षण सांगणारा गीतेतला एक श्लोक (६.४) असा–

यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्यते ।
सर्वसङ्कल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते

अर्थ–इंद्रियभोग्य अशा शब्दादी विषयांच्या ठिकाणी व तद्‌साधक कर्मांच्या ठिकाणी जेव्हा मनुष्य आसक्ती धरीत नाही आणि सर्व भोगविषयक व कर्मविषयक संकल्पांचा त्याग करतो, त्या वेळी त्याला योगारूढ म्हणतात.

याविषयी श्री. केंघे यांनी जे विवेचन केले आहे, ते असे–

"(गीतेच्या) ६ व्या अध्यायात ध्यानयोगाच्या संदर्भात योगारूढाचे वर्णन आले आहे. श्लोक ४ ते ९ आणि २७ ते ३२ यांमध्ये प्राप्तयोगारूढाची लक्षणे सांगितली आहेत. विषयांसंबंधी आणि कर्माविषयी आसक्ती न ठेवता, सर्व संकल्पांचा संन्यास करणाऱ्याला योगारूढ म्हणतात. आपणच आपला उद्धार करून घेण्यासाठी आपणावर विजय मिळवायला हवा. अशा तऱ्हेने अत्यंत शांत होऊन आपणावरच ज्याने विजय मिळवला, तो शीत, उष्ण, सुख, दुःख, मान, अपमान इत्यादी द्वंद्वांमध्येही परमात्म्यावर बुद्धी स्थिर ठेवतो. ज्ञानविज्ञानामुळे सतत संतुष्ट राहणारा, कूटस्थ, नित्य, इंद्रियांवर जय मिळवणारा आणि ढेकूळ, दगड, सोने सर्व समान मानणारा योगी मुक्त म्हटला जातो. मित्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शत्रू, उदासीन, मध्यस्थ, द्वेष्य, बंधू किंबहुना साधू आणि पापी यांच्याविषयीही समबुद्धी बाळगणाराच विशिष्ट ठरतो.

ज्याचे मन अगदी शांत झाले आहे, अशा या निष्पाप, निर्मल, ब्रह्मभूत योग्याला उत्तम सुख प्राप्त होते. अशा रीतीने निष्पाप झालेला योगी नेहमी योगाचे आचरण करीत असता सहजपणेच ब्रह्मस्पर्शी अत्यंत सुख मिळवतो. सर्वत्र साम्य पाहणारा योगी प्राणिमात्रात आपणास आणि आपल्यात प्राणिमात्रास पाहतो. जो सर्वत्र ईश्वर पाहतो आणि ईश्वरातच सर्व काही पाहतो, तो ईश्वरापासून आणि ईश्वर त्याच्यापासून कधीही दूर असत नाही. प्राणिमात्रात राहणाऱ्या ईश्वराला एकत्वभावाने जो भजतो, तो सर्व प्रकारे (देहात) असतानाही ईश्वरातच असतो. आपल्याप्रमाणेच जो सर्वत्र सुख वा दु:ख समान पाहतो, तो योगी श्रेष्ठ होय." [गीता : एक अध्ययन – श्री. केंघे, १९६०]

योगिनी शाक्त संप्रदायातल्या गौण देवता. त्यांना आवरण देवता असेही म्हटले आहे. त्या पार्वतीच्या सख्या मानल्या गेल्या आहेत. योगिनींची कोटयवधी संख्या सांगितलेली असली, तरी त्यांतल्या चौसष्ट योगिनी प्रसिद्ध आहेत. (चौसष्ट योगिनी पाहा.) त्यांतही अष्टयोगिनी विशेष प्रसिद्ध असून, त्यांची नावे अशी – मंगला, पिंगला, धन्या, भ्रामरी, भद्रिका, उल्का, सिद्धा आणि संकटा. पाठभेदाने काही वेगळी नावेही आढळतात. या दुर्गादेवीच्या परिचारिका होत.

योगिनींचा वेदांत उल्लेख नाही. पौराणिक वाङ्मयातही त्यांचा फारसा आढळ होत नाही. शाक्त मार्गात मात्र एका काळी त्यांचे बरेच प्रस्थ होते व अजूनही ते अंशमात्रे आहेच. बृहत्कथेत योगिनींचा उल्लेख असला तरी, त्यांचा दुर्गेशी संबंध जोडलेला नाही.

जबलपूरजवळच्या भेडाघाट या ठिकाणी नर्मदेच्या तीरावर एक योगिनीचे मंदिर आहे. तिथल्या प्रत्येक मूर्तीच्या खाली त्या त्या योगिनीचे नाव कोरलेले आहे. तंत्रशास्त्रानुसार त्यांची घडण केलेली असून, शिल्प सुंदर आहे. इ.स. १५६४ साली मोगल सरदार असफखान याने इथल्या काही मूर्तींची मोडतोड केली.

खजुराहो येथेही ६४ योगिनींचे एक मंदिर शिवसागर तलावाच्या तीरावर बांधलेले आहे. इथल्या ६४ योगिनींच्या मूर्तींपैकी आता फक्त तीनच शिल्लक राहिल्या आहेत.

योगिनीतंत्रात या योगिनींची उत्पत्ती, त्यांचे पूजाविधान, त्यांचे सामर्थ्य व त्यांच्या कथा दिलेल्या आहेत. सिद्ध साहित्यातही योगिनींचा उल्लेख आढळतो. सिद्ध योगी या योगिनींच्या गाढालिंगनात राहून सहज साधना करीत असत, असे उल्लेख सिद्ध साहित्यात मिळतात. अर्थात अशा योगिनी म्हणजे तन्त्रमधारी मानुषी स्त्रियाच होत, हे सहज कळून येते.

बौद्धांनीही योगिनी मानलेल्या असून, त्यांची महापीठे निर्माण केली होती. बौद्ध तंत्रांप्रमाणे कामरूप, पूर्णगिरी, उड्डियान आणि जालंधर ही त्यांच्या योगिनींची चार महापीठे होती. भारतीय इतिहासाच्या दृष्टीने पाहिल्यास शक-कुशाणादी आक्रमकांची परदेशांशी दळणवळण ठेवण्याची ही प्रमुख केंद्रे होती. उड्डियान हे एका बाजूने बल्ख व समरकंद या प्रांतांशी आणि दुसऱ्या बाजूने पामीर, खोतान व काश्गर या प्रांतांशी संबंध ठेवण्याचे प्रमुख केंद्र असून, भारताच्या सीमाप्रदेशातील स्वात नदीच्या खोऱ्यात होते. जालंधर नगराकडून शिपकीच्या घाटातून तिबेटकडे जाणारा राजमार्ग होता. कामरूप अथवा आसाम हे पूर्व भारतातील मंगोलियनांचे भारताबाहेरील मंगोलियनांशी संबंध ठेवण्याचे केंद्र होते. पूर्णगिरी कुठे होते, ते मात्र आज सांगता येत नाही. असल्या महत्त्वाच्या केंद्रांतून बौद्ध योगिनींची महापीठे स्थापून मंगोलियन वंशाचे कुशाण नेते भारतावर आपले सांस्कृतिक आणि राजकीय अधिराज्य प्रस्थापित करू पाहत होते. अशा मंगोलियनांचे दास बनलेल्या भारतीय बौद्धांनीच गुह्यसमाजासारखी ओंगळ तंत्रे निर्माण केली.

योगिनीमूर्ती – भेडाघाट

या योगिनी म्हणजे स्वत:ला देवतास्वरूप मानणाऱ्या स्त्रियाच होत्या. त्यांना लामा असे म्हणत. त्यांचे काम म्हणजे विरोधी पंथातील तरुणांना आपल्या जाळ्यात पकडून दास बनवणे, हे होते. त्यांतल्या काही उद्दाम योगिनींना चुंबिका म्हणत. त्या प्रथमालापाच्या क्षणीच तरुण पुरुषाचे चुंबन घेऊन त्याला आपल्या नादी लावीत. काहीतर रस्त्यावर उभ्या राहून विविध कामचेष्टा करीत. असल्या योगिनींचा पुरेसा अनुभव असल्यामुळे अनिरुद्धहरणानंतर हरिवंशकाराने कृष्णाच्या तोंडी पुढील उद्गार घातले आहेत – 'दैत्य-दानवांच्या स्त्रिया पुंश्चली आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मायासंपन्न असल्यामुळे अनिरुद्धाला त्यांनीच पळवून नेले असावे, याविषयी संशय नाही.' रात्रीच्या वेळी अनिरुद्धाला पळवून बाणासुरकन्या उषा हिच्या महालात आणणारी चित्ररेखा ही जशी अप्सरा होती, तशीच योगिनीही होती, असे हरिवंशात स्पष्ट सांगितले आहे. हरिवंशात लंबादेवी असा उल्लेख येतो. ते लामा या शब्दाचेच संस्कृतीकरण असले पाहिजे. यावरूनच 'चौसष्ट योगिनींचे मूळ जादूगारीत तर नाही ना?' असा संशय डॉ. केतकर यांनी व्यक्त केला आहे.

भूतडामर तंत्रात योगिनीसाधन नावाचा जो विधी दिला आहे, त्यातही कामुक व स्वैरविलासी अंश स्पष्टपणे प्रतिबिंबित झाला आहे.

योगिनींचा उल्लेख मातृकांबरोबर केला जातो. पण या दोन्ही देवता एक नाहीत. [श. क; प्रा. म; योगिनी तंत्र; देवीकोश]

योगीगुरुक्कल द. भारतातील एक जात. या लोकांची वसती उत्तर मलबारमध्ये आहे. कालीमंदिरातील पुजारीपण हा यांचा प्रमुख व्यवसाय असून, त्याशिवाय ते भिक्षाही मागतात. यांच्यांतील काहीजण शिक्षकही आहेत. यांच्या शाळा घराच्या अंगणात किंवा घराला लागून असलेल्या ओट्यावर भरतात. यांच्या प्रत्येक कुटुंबात शक्तीची पूजा असते. हे मंत्रतंत्र व जादूटोणा करणारे म्हणूनही प्रसिद्ध आहेत. यांच्यांत मृतांना बसलेल्या स्थितीत पुरतात. [का. ट्रा. स. इं.]

योगीश्वरमूर्ती एक विष्णुमूर्ती. अशा मूर्ती कोणार्क व मथुरा या ठिकाणी आहेत. कोणार्क येथील मूर्ती विश्वपद्मावर बसलेली असून, द्विभुज आहे. तिच्या डोक्यावर अलंकृत केलेला मुकुट आहे आणि गळ्यात तीनपदरी कंठा व जानवे आहे. दंडांत अनेक बाहुभूषणे असून, कमरेला वस्त्र आणि त्यावर मेखला आहे. पायांत साखळ्या आहेत. ही मूर्ती तेराव्या शतकातील असावी, असे अभ्यासकांचे मत आहे. मथुरेत असलेली योगीश्वरमूर्तीही अशीच सुंदर आहे. [मू. वि.]

योगेश्वर शिवाचा पहिला अवतार. हा वैवस्वत मनूचा पुत्र होता. हा वाराहकल्पातील वैवस्वत मन्वंतराच्या पहिल्या युगचौकडीत द्वापरयुग सुरू होण्याच्या पूर्वी झाला, असे शिवशतरुद्रसंहितेत सांगितले आहे. [प्रा. च. को]

योगेश्वरद्वादशी व्रत एक तिथिव्रत. कार्तिक शुद्ध एकादशीला या व्रताला प्रारंभ करून द्वादशीला संकल्पपूर्वक स्नान व विष्णुपूजा करतात. उद्यापनाच्या वेळी वैदिक ब्राह्मणाला सम संख्येने द्रव्यदान करावे आणि वेदवेत्त्याला दुप्पट आणि पंचरात्र यज्ञ करणाऱ्या आचार्याला सहस्रपट धान्य द्यावे, असे सांगितले आहे. याला धरणीव्रत असेही म्हणतात. पाहा – धरणीव्रत. [कृ. क. त.]

योगेश्वराचार्य (इ. स. १८८४ – १९४२) सरभंग संप्रदायाचा एक अनुयायी व संत. बिहार राज्यातील चंपारण्य जिल्ह्यातील रुपौलिया गावी याचा जन्म झाला. हा पराशरगोत्री ब्राह्मण होता. भिनकराम परमहंसाच्या कृपेने योगेश्वराचा जन्म झाला, असे सांगतात. योगेश्वराचा बालपणीच विवाह झाला; पण अवघ्या सहा वर्षांनी त्याची पत्नी निवर्तली. त्यानंतर त्याचे दुसरे लग्न झाले. परंतु त्याच्या मनातील वैराग्याने उचल केली आणि त्याने घर सोडले. नंतर त्याने अलखानंदस्वामीचे शिष्यत्व पत्करले.

योगेश्वराचे स्वरूपप्रकाश आणि स्वरूपगीता या नावाचे दोन पदसंग्रह आहेत. यांमध्ये त्याने गोरखनाथ, कबीर, रोहिदास इ. अनेक संतांची चरित्रे वर्णिली आहेत. त्याशिवाय त्याच्या काव्यात अद्वैत, निर्गुणब्रह्म, जीवात्मा, योग, माया, लोक, पुनर्जन्म, ज्ञानानुभूती, सत्संग इ. अनेक विषय आहेत. योगेश्वराचा योगावरही चांगला अधिकार होता, असें म्हणतात. [सं. स. सं.]

योगेश्वरी एक देवता. हिचे स्थान आंबेजोगाई येथे आहे. हा गाव मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात असून, परळी



योगेश्वरीमंदिराचे महाद्वार – आंबेजोगाई

वैजनाथपासून सोळा मैलांवर आहे. या गावाला जोगाईचे आंबे असेही म्हणतात. देवीचे मंदिर गावाच्या मध्यभागी असून, ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हेमाडपंती बांधणीचे आहे. मंदिराचा प्रमुख दरवाजा उत्तराभिमुख असून, पूर्व आणि उत्तर दारांसमोर दीपमाळा आहेत. महाद्वारासमोर सर्वतीर्थ नावाचे कुंड आहे. या मंदिराच्या आसपास अनेक लहान लहान मंदिरे आहेत. योगेश्वरीची मूर्ती नसून तांदळा आहे. तिची त्रिकाळ पूजा असते. पहिली पूजा गुरवाकडून होते. दुपारच्या पूजेनंतर महानैवद्य होतो. सायंकाळी प्रदोषपूजा आणि नंतर शेजारती होऊन नित्यक्रम संपतो. नैमित्तिक कार्यक्रमात हिचे नवरात्र असते. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत हा उत्सव चालतो. अखेरच्या दिवशी होमहवन होते. दसऱ्याला देवी सीमोल्लंघन करते. मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीपासून पौर्णिमेपर्यंत हिचा दुसरा उत्सव असतो. पौर्णिमेला होम असतो आणि रात्री देवीची पालखी गावातून फिरते.

या देवीची उपासना कुमारीच्या स्वरूपात करतात. ही देवी कुमारी का राहिली, यासंबंधी एक कथा आहे, ती अशी —

परळी वैजनाथाने योगेश्वरीबरोबर विवाह करण्याचे ठरविले. देवीचे माहेर कोकणात होते. तिथून सर्व वऱ्हाड लग्नासाठी परळीला निघाले. त्यांचा मुक्काम आंबेजोगाईच्या जयंती नदीच्या तीरावर पडला. पण देवीच्या मनात वैजनाथाबरोबर विवाह करायचा नव्हता. त्यामुळे या मुक्कामावरून ती पुढे जायला तयार होईना. अखेर लग्नाचा मुहूर्त टळून गेला. देवीला आनंद झाला. आनंदाच्या भरात तिने जयंतीच्या काठीच वास्तव्य करायचे ठरले.

योगेश्वरी हे अनेक देशस्थ व कोकणस्थ घराण्यांचे कुळदैवत आहे. हिचे मंदिर यादवांचा सेनापती खोलेश्वर याने बांधले, असे म्हणतात. या मंदिरात मोराची ओसरी नावाची एक ओसरी आहे. त्या ओसरीवर संतश्रेष्ठ कृष्णदयार्णवाचा निवास होता.

योगेश्वरीमाहात्म्य नावाचा एक ग्रंथ आहे. या ग्रंथाच्या पहिल्या अध्यायात योगेश्वरीच्या अवताराची कथा आहे. या समग्र ग्रंथात आंबेजोगाई या गावाचे माहात्म्य वर्णिले आहे. हा तीस अध्यायांचा ग्रंथ संस्कृतात असून अप्रकाशित आहे. कृष्णदयार्णवाने या देवीचे एक अष्टकही रचले आहे. हिच्या संबंधी लोकसाहित्यही विपुल आहे.

आंबेजोगाई हा गाव मराठी सारस्वताच्या दृष्टीने श्रीमंत आहे. मुकुंदराज, दासोपंत, जयरामस्वामी, वडगावकर, शिवरामस्वामी, कल्याणीकर यांचा या गावाशी संबंध होता. समर्थ रामदासांना इथेच दत्तदर्शन घडल्याची माहिती दासविश्रामधामात दिलेली आहे. महानुभाव पंथाचा संस्थापक श्री. चक्रधर हाही इथे येत असे. यादवांचा सेनापती खोलेश्वर याने आंबेजोगाईचा महिमा वाढविला. त्याने इथे एक भव्य शिवमंदिर बांधले. ते मंदिर खोलेश्वरमंदिर म्हणूनच प्रसिद्ध आहे.

आंबेजोगाईप्रमाणेच योगेश्वरीचे एक ठाणे पैठणपासून तीन मैलांवर आहे. गोदावरी, वेलगंगा व वर्षा या नद्यांच्या त्रिवेणी



योगेश्वरी – आंबेजोगाई

संगमावर हिचे मंदिर असून, पैठणची पंचक्रोशी परिक्रमा इथूनच सुरू होते. या मंदिरानजीक वृद्धेश्वर शिवाचे मंदिर आणि राम व हनुमान यांची मंदिरे आहेत. [यो. मा.; कल्याण–तीर्थांक]

(२) योगेश्वरी ही एक मातृकाही आहे. ती चतुर्भुज व त्रिनेत्र आहे. तिचा एक हात अभय मुद्रेत आणि दुसरा वरद मुद्रेत असतो. वृषभ हे तिचे वाहन असून, बेलाच्या झाडाखाली तिचा निवास असतो. ही गौरवर्ण असून, हिच्या मुकुटावर चंद्रकोर असते.

मत्स्य पुराणात योगेश्वरीचे वर्णन पुढीलप्रमाणे दिले आहे- हिची जीभ खाली लोंबत असते. डोक्यावर जटाजूट असतो. गळयात कवटयांची माळ असते. [पु. इं.; देवी कोश २]

योग्लोक (इ. स. चे १० वे किंवा ११ वे शतक) एक धर्मशास्त्रकार. याने काल या विषयावर बृहद्योग्लोक व लघुयोग्लोक असे दोन ग्रंथ रचले. याव्यतिरिक्त त्याने व्यवहारावरही काही लिखाण केले आहे. जीमूतवाहन व रघुनंदन यांच्या ग्रंथावरूनच योग्लोकाची माहिती मिळते. जीमूतवाहनाने आपल्या व्यवहारमातृका या ग्रंथामध्ये योग्लोकाचे उतारे घेतलेले असून, त्याला तर्कशास्त्रज्ञ किंवा नवमतवादी तर्कशास्त्रज्ञ असे म्हटले आहे. रघुनंदनाच्या कालविवेक ग्रंथातही त्याची मते आहेत. या दोन्ही ग्रंथकारांनी आपल्या ग्रंथांमध्ये योग्लोकाच्या मतांचे खंडन केले आहे. [हि. ध.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

योजन स्थलमापनातील एक सर्वांत मोठे प्राचीन प्रमाण. ऋग्वेदात (१. १२३. ८; २. १६. ३) व नंतरच्या वैदिक वाङ्मयात (तैत्ति. ब्रा. २. ४. २. ७) याचा उल्लेख आलेला आहे. परंतु हे अंतर किती ते मात्र तिथे स्पष्ट केलेले नाही.

पाणिनीने एक योजन म्हणजे चार गोरुते असे मानले आहे. कौटिलीय अर्थशास्त्रातही हेच प्रमाण दिले आहे. एक गोरुत =२ कोस असे संस्कृत शब्दकोशात दिले आहे. यावरून योजन म्हणजे चार गोरुते म्हणजे ८ कोस किंवा १६ मैल होतात. काही संस्कृत ग्रंथावरून १ योजन म्हणजे सुमारे ५ मैल असल्याचे कळते. अन्य काही ग्रंथांवरून तेच अंतर ९ ते १० मैल असावे, असे दिसते. याव्यतिरिक्त अन्यही मते आहेत. [भा. ज्यो. इ.; पा. का. भा. ; कौटिलीय अर्थशास्त्र– संपा. ज. स. करंदीकर व ब. रा. हिवरगावकर, इ. स. १९२७.]

योनिमुद्रा हठयोगातील एक मुद्रा. गुदद्वारापासून दोन अंगुळे वर आणि उपस्थापासून एक अंगुळ खाली, चार अंगुळे लांबी-रुंदीचा जो भाग असतो त्याला योनी म्हणतात. हिला ब्रह्मयोनी असे दुसरे नाव आहे. या ठिकाणी पक्ष्याच्या अंड्यासारखा एक कंद असतो. त्यात इडा, पिंगला, सुषुम्ना, इ. सर्व नाड्या एकवटलेल्या असतात. या ठिकाणीच मूलाधार चक्र असून, त्याच्या मध्यभागी सूर्यापेक्षा तेजस्वी आणि चंद्रापेक्षा शीतल असे स्वयंभू लिंग आहे. त्याला कामेश्वर असे नाव आहे. त्याच्या वर कुंडलिनी शक्ती असते. तिला जागृत करून तिच्या बरोबर प्राणशक्तीला ब्रह्मरंध्राकडे सुषुम्ना नाडीत जाण्याचा मार्ग मोकळा करून देणे, या क्रियेला योनिमुद्रा म्हणतात.

ही मुद्रा करताना प्रथम प्राणायाम करून योगी आपल्या मनाला प्राणवायूसह मूलाधार चक्रात नेऊन ठेवतो आणि योनीचा संकोच करतो. मग कामेश्वर व कुंडलिनी यांच्या बरोबर जीवात्म्याचे तादात्म्य करतो. हे तादात्म्य साधल्यावर जीवात्मा स्थूल, सूक्ष्म व कारण शरीर सोडून सुषुम्नामार्गाने ब्रह्मरंध्रापर्यंत जातो व मग प्राणायामाच्या द्वारे मूलाधार चक्रात परत येतो. या समग्र क्रियेला योनिमुद्रा अशी संज्ञा आहे. या मुद्रेच्या अभ्यासासाठी मार्गदर्शनाची आवश्यकता असते. या मुद्रेवर अधिकार प्राप्त झाल्याने ज्ञानलाभ, वायुसाधन, वाक्सिद्धी, इ. शक्ती प्राप्त होतात. आणि मृत्यूवरही जय मिळवता येतो. [शिवसंहिता]

योनी • स्त्रीचे जननेंद्रिय. ते सृष्टिप्रक्रियेत जननशक्तीचे प्रतीक मानलेले आहे. प्राचीन काळी लिंगाप्रमाणेच योनीचीही पूजा केली जात असे. सिंधुसंस्कृतीच्या उत्खननात लिंगाबरोबरच योनीच्या आकाराचेही दगड सापडले आहेत. त्यावरून सिंधुसंस्कृतीतले लोक लिंगाबरोबरच योनीचीही पूजा करीत असावे, असा तर्क आहे.

तंत्रमार्गात साक्षात स्त्रीच्या योनीची पूजा सांगितली आहे. अशा स्त्रीला मुद्रा म्हणत. मुद्रेच्या योनीची प्रथम पूजा करून मग तिच्याशी सहजसाधना करावी, असे वाममार्गी तंत्रग्रंथात सांगितले आहे. शाक्तांची प्रमुख देवता कामाख्या किंवा कामाक्षी हिचे प्रमुख मंदिर आसाममध्ये गौहाटी येथे असून, मंदिरात तिची मूर्ती नाही; तर योनिप्रतिकच आहे. पृथ्वी व तिची फलधारणाशक्ती यांचे प्रतीक म्हणूनही योनिप्रतीकाची पूजा प्राचीन काळी होत असावी. योनि-लिंगपूजा हा प्रकार भारतातच नव्हे; तर सर्व जगभर मानवाच्या आदिम अवस्थेत प्रचलित होता, असे संशोधकांचे मत आहे.

भारतात शंकराची पूजा लिंगस्वरूपात आजही चालते. शाळुंका आणि लिंग मिळून शंकराची पिंडी होते. ते योनि-लिंगाचेच एकीकरण आहे. पाहा – लिंग.

यौधेय गण एक प्राचीन जमात. पाणिनीने आपल्या अष्टाध्यायीत (५.३.११७) हिचा उल्लेख आयुधजीवी संघ असा केला आहे. शस्त्र हेच ज्यांच्या उपजीविकेचे साधन, अशा लोकांना आयुधजीवी म्हणतात. हे यौधेय लोक उशीनराचे वंशज होत, असे हरिवंशात म्हटले आहे. अर्जुनाने मालव, त्रिगर्त व यौधेय यांचा पराभव केल्याचा उल्लेख महाभारताच्या द्रोणपर्वात व कर्णपर्वात आहे. यौधेय, शिबी, त्रिगर्त व अभीष्ट हे लोक युधिष्ठिराचा सत्कार करायला आले होते, असे सभापर्वात म्हटले आहे. रोहितक ही यौधेयांची राजधानी होती. सुनेत्र हे त्यांचे दुसरे केंद्र असावे. वासुदेवशरण अग्रवाल यांच्या मते सुनेत्र ही त्यांची पूर्वीची राजधानी असावी. हे स्थान सतलजच्या काठी असून, सांप्रत ते सुनेत या नावाने ओळखले जाते.

यौधेयांची काही तांब्याची नाणी सापडली आहेत, त्यांवर 'यौधेयगणस्य जयः' व 'भगवतो स्वामिन् ब्राह्मण यौधेयदेवस्य' अशी अक्षरे आहेत. काही नाण्यांवर त्यांचा युद्धदेव कार्तिकेय याचे चित्र आढळते. स. पू. १ ल्या शतकातील नाण्यांवर 'बहुधान्यके योधेयानाम्' अशी अक्षरे आढळतात. बहुधान्यक हे नगर रोहटकच्या जवळ असावे. कार्तिकेय हा या लोकांचा कुलदेव होता. त्यांची तांब्याची व चांदीची काही नाणी ब्रह्मण्यदेव–कुमार या नावाने बनवलेली असून, त्यांवर 'भगवतः स्वामिनो ब्रह्मण्यदेवस्य कुमारस्य यौध्रेयानाम्' असे शब्द आहेत. ही नाणी इ. स. च्या दुसऱ्या शतकातली असावी.

यौधेयांच्या मातीच्या मुद्रा लुधियाना जिल्ह्यात सापडल्या आहेत आणि त्यांची नाणी सहारणपूरपासून मुलतानपर्यंतच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रदेशात सापडली आहेत. अलिकडे काही नाणी डेहराडून जिल्ह्यात मिळाली आहेत. नाण्यांचे काही साचे रोहटकमध्ये सापडले आहेत. यावरून यौधेयांची मुख्य वसती पूर्व पंजाबात असावी आणि त्यांची सत्ता उ. प्रदेश व राजस्थान या प्रदेशांतील काही भागात असावी, असे दिसते.

पंजाबातील गणराज्ये जिंकीत शिकंदर ब्यास नदीपर्यंत पोचला, तेव्हा यौधेयांनी त्याला प्रतिकार करण्यासाठी सिद्धता केली. प्रजासत्ताक यौधेय गणराज्याच्या पराक्रमी सैन्याची ख्याती यवनांच्या कानी गेली होती. लढून लढून थकलेल्या यवन सैन्याने यौधेयांच्या सैन्याची धास्ती घेतली होती. त्यामुळे ते ब्यास नदी ओलांडून पुढे येण्यास तयार झाले नाहीत व शिकंदर मागे फिरला. यावरून यौधेयांच्या पराक्रमाची व शौर्याची कल्पना करता येते.

भारतात यवनांची सत्ता स्थापन झाली, तेव्हा पंजाबातील गणराज्ये काही काळ त्यांच्या अंकित राहिली असावी. पण यवन सत्तेचा ऱ्हास होताच त्यांनी पुन्हा डोके वर काढले. पुढे शक व कुशाण यांच्या पुढेही त्यांना नमावे लागले. इ. स. च्या दुसऱ्या शतकात यौधेयांनी पुन्हा बळ बांधले आणि शकक्षत्रप रुद्रदामन याच्या सत्तेला आव्हान दिले. गिरनार येथील शिलालेखात रुद्रदामन याने स्वतः यौधेयांच्या शौर्याची व स्वाभिमानी वृत्तीची प्रशंसा केली आहे. त्याच शिलालेखात म्हटले आहे, की रुद्रदामनने त्यांचा पूर्ण नाश केला. पण ते सत्य नाही. कारण इ. स. च्या ३ ऱ्या शतकात यौधेयांचे गणराज्य बरेच प्रबळ झाले होते. गुप्त सम्राटांच्या शक्तीपुढे मात्र त्यांना नमावे लागले. पंजाबातली कुशाणांची सत्ता नष्ट करण्याचे बरेच श्रेय यौधेयांना आहे, असे म्हणतात.

यौधेय लोक आपल्या प्रमुखाला महाराज व महासेनापती म्हणत. ते लोकांनी निवडून दिलेले नेते असत. समुद्रगुप्ताच्या अलाहाबाद येथील स्तंभलेखात मालव, आर्जुनायन, मद्रक, यौधेय, इ. गणराज्यांची नावे आहेत.

यौधेय आणि जोहिय राजपूत हे एकच असावे, असे बिमलचरण लॉ यांचे मत आहे. सतलज नदीच्या काठी, बहावलपूरच्या सीमेवर जोहियवर या प्रदेशात हे जोहिय राजपूत वसलेले आहेत. [पा. का. भा.; ट्रा. ए. इं ; हि. जॉ. ए. इ.; अ. हि. नॉ. इं.; बौ. का. भा.; भा. इ. रू.; स. सो. पा.; हि. क इं. पी. २]

रंग पांढरा, तांबडा, हिरवा, पिवळा आणि काळा हे प्रमुख रंग मानले जातात. रंग ही डोळ्यांना आकर्षित करणारी वस्तू आहे. काही रंग डोळ्यांना आल्हाद आणि मनाला उत्तेजन देतात, तर काही रंग मनावर कसलेतरी अनामिक दडपण आणतात. मानवाला त्याच्या आदिम अवस्थेपासूनच रंगाबद्दल प्रेम आणि आकर्षण वाटत आले आहे. वेगवेगळ्या रंगांनी शरीर रंगविणे, शरीरावर रंगांचे पट्टे ओढणे, रंगामुळे स्वतःला अधिक सुंदर किंवा भीतीप्रद बनविणे, स्वतःचे कपडे व वस्तू रंगविणे इ. प्रकारांनी मनुष्य प्रारंभापासूनच रंगांचा उपयोग करीत आला आहे.

तसे पाहिले तर मनुष्य रंगांच्या दुनियेतच वावरतो. वर निळे आकाश, त्यात काळे मेघ, खाली तांबडी-काळी धरती, निळा निळा सागर, हिरव्या वृक्षवेली, भुरके डोंगर, तांबडी-निळी-जांभळी फळे-फुले, तांबडे-काळे-पांढरे आणि विविध रंगच्छटांचे पशुपक्षी, असा हा सारा रंगांचाच खेळ आहे. सभोवतीची सारी सृष्टी म्हणजे कोणता ना कोणता तरी रंग. निसर्गाची ही रंगाची किमया मनाला थक्क करणारी आहे.

माणूस अनेक रंग युगानुयुगे पाहत आला आहे. त्या पाहण्यातून रंगाबद्दल निरनिराळ्या प्रतिक्रिया त्याच्या मनात निर्माण झाल्या आहेत. रंगविषयक त्याने काही संकेतही निर्माण केले आहेत. काही रंग काही प्रसंगीं विहित आणि काही रंग काही प्रसंगी निषिद्ध असेही त्याने ठरविले आहे. असे काही संकेत पुढीलप्रमाणे–

पांढरा रंग – हा शुभशकुनी समजला जातो. एखादे जनावर विकत घेतले म्हणजे त्याच्या खुरांवर दूध ओततात; त्याचा उद्देश ते जनावर शकुनाचे ठरावे हा असतो. पांढरा चीक व पांढरे तुरे असलेली झाडे चांगली समजतात. शिवाचे हास्य शुभ्र आहे. त्याचप्रमाणे त्याला शुभ्र वस्त्रेच प्रिय आहेत. भारतीयांची विद्यादेवी सरस्वती ही शुभ्रवसना आहे. ‘ या कुन्देन्दुतुषारहारधवला ’. असे तिचे वर्णन आहे. पांढरा दोरा, कापूर, कापूस, पांढरी फुले, दूध, चांदी ही सर्व भाग्यदायक आहेत. काही मराठे लोकांमध्ये साखरपुडा झाला म्हणजे नवरदेवाला एक चांदीचे नाणे व पांढरी कोंबडी देतात. सर्व मंगल कार्यांत पांढरा दोराच वापरतात. शुभ्र वस्त्रे पवित्र समजतात. मात्र पूर्ण शुभ्रवस्त्र दुःखसूचक मानलेले आहे. ते तसे होऊ नये म्हणून त्याला वेगळ्या रंगाची किनार किंवा पदर असणे पसंत करतात. प्रेत झाकायला आणि अत्यंत अशुभ प्रसंगी मात्र बिनकिनारीचे पांढरे वस्त्र वापरतात. श्राद्धदिनी पांढरे गंध लावतात. वधूवरांनी मात्र पांढरे कपडे वापरायचे नसतात.

विशिष्ट ठिकाणी पांढरा रंग असलेली शेळी मुसलमान लोक लाभदायक समजतात. पांढरा रंग त्यांच्या अल्लाचा प्रिय रंग आहे. म्हणून ते आपली घरेही पांढऱ्या रंगाने रंगवतात. प्राचीन काळी एखादे गाव वसवताना त्या जागी पांढरे बैल नांगराला जुंपून ती भूमी नांगरीत. पूर्ण शुभ्र रंगाचे जनावर बळी देण्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बळी देत नाहीत. पांढरे कपाळ व गुडघ्याखाली पाय पांढरा असलेला घोडा सुलक्षणी समजतात.

हिरवा रंग — हा सर्वत्र मंगलदायक समजला जातो. स्त्री प्रथम गर्भवती झाली म्हणजे तिला हिरव्या बांगड्या व हिरवी साडी-चोळी देतात. केळीच्या हिरव्या पानावर तिला जेवण वाढतात. लग्न ठरले म्हणजे उपवर मुलीला हिरवा चुडा भरतात. मुलाचे जावळ करताना त्याच्या आईला हिरवी साडी—चोळी देतात. देवक ठेवताना सुपात हिरवा खण ठेवतात. शुभ कार्याच्या मांडवाला हिरव्या पानांचे तोरण बांधतात. हिरवे कपडे हे स्वर्गात वापरायचे, अशी मुसलमानांची समजूत आहे. ते लोक मोहरमनंतर तीन दिवसपर्यंत त्यांचा काळा झगा काढून ठेवतात व हिरवे गवत हातात घरून 'आमच्यामध्ये हिरवळ येवो' असे म्हणतात. मुसलमानांचा अर्धचंद्रांकित ध्वजही हिरवाच असतो. ते मृतांच्या कबरीवर हिरवेच कापड आंथरतात.

लाल रंग — हा सर्व रंगांत शक्तिशाली मानलेला आहे. शक्तिदेवतेचा लाल रंगाशी घनिष्ठ संबंध आहे. रक्ताचा रंग लाल असतो; म्हणूनच देवीला बलिदान प्रिय आहे. पशुबळी दिल्यावर देवतेच्या कपाळी त्या पशूच्या रक्ताचा टिळा लावतात. शक्तिपूजकाने लाल वस्त्रेच परिधान करायची असतात. गणपतीचा, हनुमंताचा व काही क्षुद्र देवतांचा रंग लालच असतो. त्यांना लाल रंगाचीच फुले आवडतात. जादूटोणा करताना तो करणाऱ्याने लाल वस्त्रे वापरली पाहिजेत किंवा निदान एखादे लाल फडके तरी जवळ ठेवले पाहिजे. यंत्रे तयार करणाऱ्या मांत्रिकानेही लाल वस्त्रेच वापरली पाहिजेत. मंगल कार्याच्या अक्षता नेहमी लाल रंगाने रंगवतात. शुभकार्याच्या निमंत्रण—पत्रिकांना लाल कुंकू लावतात. अंतरपाटावर तांबडे स्वास्तिक काढतात. बहेराच्या वस्तूंना कुंकू लावतात. वधूवरांवरून लाल पाणी ओवाळून टाकतात. लग्नाच्या दिवशी वधूवर कुंकुममिश्रित पाण्याने स्नान करतात. मराठा किंवा इतर तत्सम जाती यांच्यामध्ये विधवेशी लग्न करताना तांबड्या आलवाणात गुंडाळलेली सुरी जवळ ठेवतात. रथयात्रेत रथावर व माणसावर कुंकवाचे पाणी शिंपडतात. सौभाग्यवती स्त्रिया लालच कुंकू लावतात. कुमारी आणि सौभाग्यवती श्रावण महिन्यात मेंदी लावून आपले हात पाय लाल करतात. मात्र जुन्या काळी सौभाग्यवती स्त्रिया तांबड्या रंगाचे लुगडे किंवा तांबड्या बांगड्या वापरीत नसत. कारण तांबडे वस्त्र केशवपन केलेल्या विधवांचे समजले जाई. फक्त रेशमी वस्त्रांना हा नियम लागू नव्हता. प्राचीन भारतात सुळावर दिल्या जाणाऱ्या माणसाला तांबडी वस्त्रे लेववीत व तांबड्या पुष्पमाळा त्याच्या गळ्यात घालीत. संन्यासी, साधू, गोसावी यांची वस्त्रे तांबड्या कावेच्या रंगाने रंगवलेली असतात. सणाच्या दिवशी तांबडे गंध लावतात. शिमगा व रंगपंचमी या सणांत गुलाल व तांबडा रंगच एकमेकांवर टाकतात. मुलीला प्रथमरजोदर्शन झाले, की तिच्या नवऱ्याला तांबड्या रंगाच्या पाण्याने भिजवतात. मुसलमानांत सुंता करायच्या वेळी मुलाला तांबडी लंगोटी नेसवतात. सर्व शुभ कार्यात तांबडा रंग शुभ समजतात. राजपूत लोक लढाईवर जाताना व राजपूत स्त्रिया जोहार करताना केशरिया रंगाची वस्त्रे वापरीत. छत्रपती शिवाजी महाराजांचा ध्वजभगवा म्हणजे लालसर वर्णाचाच होता.

पिवळा रंग — हा श्रीकृष्णाचा प्रिय रंग आहे. तो पीतांबर म्हणजे पिवळे रेशमी वस्त्रच नेसतो. वैष्णव मंदिरातून वसंतपंचमीनंतर देवांना उन्हाळा संपेपर्यंत पिवळी वस्त्रे लेववितात, पिवळे गंध लावतात आणि पिवळी फुले वाहतात. पिवळा रंगही मंगल कार्यात शुभ मानलेला आहे. शुभ कार्यात कुंकवाबरोबरच पिवळी हळदही वापरतात. पिवळा रंग हा सौभाग्याचा, संपत्तीचा आणि वैभवाचा निदर्शक मानला जातो. महाराष्ट्रात पिवळी हळद हीच खंडोबाची प्रिय वस्तू आहे. भंडार म्हणून तीच देवभक्तांवर उधळतात. वधूची अष्टपुत्री नावाची साडी पिवळ्या रंगाची असते. वधूवरांच्या विवाहकंकणात हळकुंड बांधतात. लग्नाअगोदर वधूवरांना हळद लावणे हा सोपस्कार करतात. मुसलमानांतही हा सोपस्कार आहे. एखाद्याला दृष्ट लागू नये म्हणून सिंघमध्ये पिवळ्या चपला वापरतात. प्रवासाला जाताना व नव्याने गृहप्रवेश करताना एक हळदीचा तुकडा व सोन्याचा तुकडा काठीला बांधतात. मंत्रपूर्वक यंत्रे लिहिताना गोरोचन किंवा हळद यांचा पिवळा रंगच घेतात. बौद्ध भिक्षू पिवळीच वस्त्रे वापरतात.

काळा रंग — हा सामान्यपणे अशुभ समजला गेला आहे. अभिचारकर्मात किंवा गंडा — दोरा तयार करताना काळे सूत वापरतात. मंगल कार्यात काळे वस्त्र वापरीत नाहीत. पण सौभाग्यवतीचे मंगळसूत्र मात्र काळ्या पोतीचेच असते. नववधूला पहिल्या मकरसंक्रांतीच्या सणाला काळी चंद्रकळा आणि काळ्या बांगड्या लेववितात. पूर्ण काळ्या रंगाची गाय कपिला म्हणून पवित्र व भाग्यवान समजतात. श्यामकर्ण अर्थात काळे कान असलेला घोडा अश्वमेघात बळी देत असत. महानुभाव संत काळी वस्त्रे वापरतात. ख्रिस्ती लोकांत वराचा पोषाख काळा असतो. मुसलमान स्त्रियांचे बुरखे बहुधा काळ्या रंगाचेच असतात. ख्रिस्ती लोक एखादा जवळचा नातेवाईक मेल्यास वर्षभर आपल्या कोटाच्या बाहीला काळी फीत लावतात. मृतांबद्दल सांत्वनपर पत्रे येतात, त्यांना उत्तर पाठविताना मजकुराभोवती काळी चौकट काढतात. घराला दृष्ट लागू नये म्हणून त्याच्या दर्शनी भागावर काळी बाहुली लोंबवितात किंवा काळ्या रंगात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चित्र काढतात. बालकांना, बटूंना व वधूवरांना भुताखेतांची दृष्ट लागू नये म्हणून त्यांच्या गालावर काळी तीट लावतात.

संस्कृत काव्यातले रंगविषयक संकेत – संस्कृत काव्यात रंगविषयक उल्लेख आलेले आहेत, ते बहुधा प्रसाधनाच्या संदर्भात आहेत. त्यांतले काही उल्लेख असे – महाकाव्यकालीन स्त्रिया आपले स्तन व कपोल यांच्यावर विभिन्न रंगात वेलपत्ती चितारीत. त्याला पत्रभंग म्हणत. स्त्रिया पायांना तांबडा अळिता लावून पाय अधिक आरक्त करीत. काळ्या केसांत आरक्त मधूक पुष्पांची माला हिरव्या दूर्वेच्या सूत्रात गुंफून बांधीत (कुमार. ७.१४). डोळ्यांत काळ्या रंगाचे काजळ घालीत. कानात यवांचे पिवळे अंकुर लोंबवीत (कुमार. ७.१७). ओठ, हातापायांचे तळवे लाल रंगाने रंगवीत. मुखावर कांती यावी म्हणून पिवळ्या मनशिळेचा व शरीर सुगंधित होण्यासाठी कस्तुरीचा वापर करीत (ऋतु. २.२२). काळ्या केसांत पांढरे कुंदपुष्प माळीत (उ. मेघ २). सौभाग्यवती स्त्रिया लाल सिंदुराने आपला भांग भरीत (नैषध १९.५५). गोरोचन, हरताळ व मनशीळ या पीतवर्णी रंगाने स्त्रिया कपाळी तिलक करीत (कुमार ७.२३–२४). तिलकासाठी पांढऱ्या अभ्रकाचा चुराही वापरीत.

भारतीय लोकसाहित्यात काही रंगांनी महत्त्वाचे स्थान मिळविले आहे. लाल रंग हा त्यांमध्ये सर्वांत महत्त्वाचा आहे. तो सुसंकृत, असंस्कृत सर्व लोकांना प्रिय आहे. तो प्रेरणादायी तसाच शृंगाराला उत्तेजक आहे. भोजपुरी नायिकेची चुनडी नेहमी लाल रंगाची असते. मात्र 'पिया परदेशी' गेल्यावर ती आपल्या चुनडीला लाल रंग देऊ नका, असे सांगते. प्रसन्नतेच्या अवस्थेत प्रियतमा आपल्या प्रियकरासाठी लाल पगडी पाठविते आणि नित्य आरक्त सूर्य उगवताना त्याचें दर्शन घेते. कृष्णाचे परिधानवस्त्र म्हणून पीतांबर हे भारतीय लोकसाहित्यातले प्रिय वस्त्र आहे. लाल रंगाच्या नंतर सावळा रंग येतो. मैथिली व मराठी लोकसाहित्यात नायिका नेहमी सावळा प्रियकर अधिक पसंत करते. कृष्णाचा आणि विठ्ठलाचा रंग सावळा अतएव अधिक मनोरम ठरला आहे. 'सावळचाने वेड लाविले' 'सावळीये बुंथी सांवळीये रूप' अशी संतवचने आहेत. कृष्णाला प्रिय असलेली तुलसीही सावळीच आहे. लोकगीतांतला रामही कृष्णाप्रमाणेच सावळा आहे. भोजपुरी जनांना कुसुंबी रंगाविषयी अधिक प्रेम आहे. त्या रंगाची साडी नेसून प्रियतमा आपल्या प्रियकराच्या भेटीसाठी आतुर होऊन बसते. पंजाबी लोककवींना अस्मानी रंगाचे विशेष आकर्षण आहे. त्यांच्या लोकगीतांतील नायिकेचा घागरा अस्मानी असतो. निळा रंग राजस्थानाला प्यार आहे. 'नीला घोडा रो असवार' (राणा प्रताप) हा राजस्थानचा प्रिय नायक आहे. उत्सव, सण व विवाहादी शुभ कार्ये यांच्या गीतांतले रंग चमकदार असतात. धार्मिक पूजाविधींतले रंग सात्त्विक असतात. ऋतुगीतांत सावनभादोंच्या गीतांमध्ये श्यामल वर्णाचा आणि कजलीगीतांत काजळासारख्या काळ्याकुट्ट मेघांचा उल्लेख येतो. होळीच्या गीतांत केसरिया रंगाला प्राधान्य असते. लोकसाहित्यात हे मोजकेच रंग भिन्न भिन्न प्रसंगीं आपली झलक दाखवून जातात. [की. पॉ.; प्रा. भा. प्र.; भा. लो. सा.]

रंगनाथ

(१) (इ. स. च्या १७ व्या शतकाचा पूर्वार्ध) ज्योतिषशास्त्राचा एक अभ्यासक. हा यजुर्वेदी देवरातगोत्री ब्राह्मण होता. विदर्भातील पयोष्णी नदीच्या तीरावरील दधिग्राम हे याचे मूळ गाव होय. हा गाव म्हणजे एलिचपूरजवळचे दहिगाव असावे, असे मत आहे. श्री. गोपीनाथ कविराज यांच्या मते याचा जन्म काशीमध्ये झाला. याची सूर्यसिद्धान्तावर गूढार्थप्रकाशिका नावाची टीका आहे. त्याने ही टीका काशीमध्ये रचली. या टीकेवरून रंगनाथाला ज्योतिःसिद्धान्तांचे, त्यांतही भास्करसिद्धान्ताचे ज्ञान चांगले होते, असे दिसते. रंगनाथाने या टीकेत सर्वत्र उपपत्ती दिली आहे, हे या टीकेचे वैशिष्ट्य होय. तसेच त्याने गोलादी यंत्रे तयार करून अध्यापन केले होते, असे दिसते. रंगनाथाच्या टीकेसह असलेला सूर्यसिद्धान्त हा ग्रंथ काशी व कलकत्ता येथें छापलेला आहे. त्याने त्याच्या पूर्वी होऊन गेलेल्या टीकाकारांचे साहाय्य घेतले असावे, असे वाटते. [भा. ज्यो. इ.; का. सा. सा.]

(२) (इ. स. चे १७ वे शतक) गोलग्रामच्या प्रसिद्ध विद्वत्कुलात याचा जन्म झाला. हे घराणे भारद्वाजगोत्री तैत्तिरीय शाखेचे होते. मल्लारी हे याचे कुलदैवत होते. प्रसिद्ध मीमांसक व ज्योतिषशास्त्रज्ञ नृसिंह हे याचे वडील होत. रंगनाथाची सिद्धान्तशिरोमणीवर मितभाषिणी नावाची टीका आहे, असे सुधाकराने म्हटले आहे. या ग्रंथाचे बारा अधिकार असून, त्यांत चारशे श्लोक आहेत. हा सूर्यसिद्धान्तानुसारी ग्रंथ आहे. [भा. ज्यो. इ.]

रंगनाथ मोगरेकर

(इ. स. चे १६ वे शतक) एक मराठी संत. याच्या वडिलांचे नाव आपेराव ऊर्फ अप्पाराव असे होते. रंगनाथ कपिगोत्री असून, याच्या घराण्यात कृष्णाची उपासना होती. हा गोदाकाठच्या मोगरे गावचा रहिवासी असून, त्याने याच नदीच्या तीरावरील धार गावी कृष्णानंदाचा अनुग्रह घेतला. आपली गुरुपरंपरा हा पुढीलप्रमाणे देतो – सिद्धानंद (ऊर्फ वासुदेवानंद) → परमानंद → वैकुंठानंद → कृष्णानंद.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रंगनाथाचे चित्सदानंदलहरी, पंचरत्न व योगवासिष्ठसार असे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. चित्सदानंदलहरी ही गीताटीका असून, तीत अकरा हजारांहून अधिक ओव्या आहेत. त्याने ही टीका नासिक येथे लिहिली. या टीकेच्या प्रत्येक अध्यायाच्या अखेरीला कवीने त्या अध्यायाचे महत्त्व सांगणारी एकेक कथा दिली आहे. या संदर्भात श्री. वि. ल. भावे म्हणतात " ही कवीची कृती म्हणण्यापेक्षा मागाहूनची कोणा कलमबहाद्दराची मखलाशी असावी, असे वाटते."

रंगनाथाच्या या टीकेवर ज्ञानेश्वरीची अमिट छाप आहे. तिच्यातल्या अनेक सुंदर कल्पना, शब्द व ओव्या या टीकेत पाहायला मिळतात. महाभारताची थोरवी वर्णन करताना हा लिहितो–

तेवि परियसा कथा गहन । जे की ब्रह्मविद्येचे स्थान ।
की भक्तीविरक्तिचे उद्यानवन । जेथ वृक्ष संपूर्ण विवेकाचे ।।
जे ज्ञानपुष्पी मघमघीत । विज्ञानफळे करूनिया लवत ।
विश्रांतिछाया सुशीतळ जेथ । सुख अद्‌भुत ब्रह्मानंदे ।।
नातरी सर्व सुखाचें हे बीजभूत । नवरसें कडसूनि ब्रह्मसुखमथित ।
की अध्यात्मविद्यांचे मूळ अभिव्यक्त । जेथ विरक्त लोधावले ।।

रंगनाथाचा पंचरत्न हा ग्रंथ आद्य श्रीमत् शंकराचार्यांच्या सोपानपंचकावरील टीका आहे. या टीकेवरही अनेकांची छाप आहे. परंतु हा ग्रंथ अत्यंत बांधीव आहे. याची ओवीसंख्या दोन हजार पासष्ट आहे.

योगवासिष्ठसार हा ग्रंथ दहा प्रकरणांत विभागलेला असून, त्याची ओवीसंख्या सुमारे सात हजार आहे. मूळ योगवासिष्ठ रामायणातील सुमारे सव्वादोनशे श्लोक वेगळे काढून त्यावर ही टीका रचलेली आहे. [म. सा.; म. वा. इ. खंड २ रा]

रंगनाथ रामायण एक दीर्घकाव्य. हे तेलुगू भाषेतील पहिले रामायण होय. गोन बुद्ध रेड्डी हा राजा याचा कर्ता होय. याचा काल इ. स. च्या तेराव्या शतकाच्या मध्यात येतो. हा ग्रंथ द्विपद छंदामध्ये लिहिलेला आहे. ११ व्या-१२व्या शतकात आंध्रामध्ये वैदिक धर्माची पुनःप्रतिष्ठा झाली. त्याचे पडसाद या ग्रंथातही उमटलेले आहेत. खुद्द राजाही वैदिक धर्माचा अभिमानी होता. कवीने राम हा ईश्वरी अवतार किंवा परमेश्वर मानला नाही; तर एक अलौकिक शक्तिसंपन्न असा मनुष्यच मानला आहे. यातला रावणही वीर, धीर, योद्धा आणि उदार आहे. श्रेष्ठ राजाच्या ठिकाणी ज्या गुणांची आवश्यकता असते, ते सर्व गुण रावणाच्या अंगी वसत आहेत. त्याच बरोबर तो कामुक, दुराग्रही आणि उद्धटही आहे. कवीने त्याच्या दुर्गुणांची निंदा केली आहे, तशीच त्याच्या सद्‌गुणांची प्रशंसाही केली आहे. रावणाला आपल्या बल-पौरुषाचा गर्व आहे; त्याच बरोबर रामाच्या धनुर्विद्येतील नैपुण्याबद्दल आदरही आहे. तो त्याबद्दल रामाची प्रशंसा करताना म्हणतो–

" नल्ल ओ रघुराम ! नयनाभिराम ।
निल्लुविद्या गुरुव ! वीरावतार !
कर शर लाघव क्रम कला निपुण !
" वीराग्रगण्य यो विश्वशरण्य,
वपुरे ! रामभूपाल ! लोकमुल
नी पाटि निलुकाडु नेर्चुने कलुग ! "

अर्थ – हे श्यामल राम, नयनाभिराम, धनुर्विद्येच्या गुरू, हे वीरावतार, हे निपुण शरचालक, वीरश्रेष्ठ, विश्वशरण्य, या जगात तुझ्यासारखा दुसरा कुणी धनुर्धर असू शकेल का ?

वाल्मीकिरामायणात नसलेल्या अनेक कथा प्रस्तुत रामायणात दिलेल्या आहेत. त्याने त्या इतर पुराणांतून, जैनांच्या रामविषयक साहित्यातून आणि आंध्रातल्या लोकसाहित्यातूनही घेतलेल्या आहेत. लोकसाहित्यातून घेतलेल्या एका कथेचा अंश असा–

रामलक्ष्मण वनवासाला गेल्यावर प्रथम कांही दिवस शृंगवेरपुरात राहिले होते. रात्री राम व सीता झोपी गेल्यावर लक्ष्मण धनुष्यबाण घेऊन पर्णकुटीच्या बाहेर जागता पहारा देत असे. त्याने प्रतिज्ञा केली होती, की १४ वर्षेपर्यंत आपण झोप घ्यायची नाही. या प्रतिज्ञेपासून लक्ष्मणाला च्युत करण्यासाठी निद्रादेवी स्त्रीरूप धारण करून त्याच्यापुढे आली. तिचा प्रश्न आणि लक्ष्मणाने तिला दिलेले उत्तर कवीने पुढील पद्यपंक्तींमध्ये लिहिले आहे–

येनु निद्रादेवि; येपंड देल्पु –
गा नाकु निकेटलु मानाढच ! तंत
विधि विधिचेनु वेंट वेंट वतिप
विधिमेदि निन्नु ने विडुचु किक ?
ननिन, ' नूर्मिलथंदु नहरहंबुलुनु –
जनियुंडुमंत नी समयंबु दीचि
वञ्चिन गंक्रोंदु वरुस निन्ननिन
निच्च, ' नौ गाकंचु ' नेगे निद्रयुनु
नलरुचु ' नी देवतानुग्रहंबु
गलिगे नाकनुचु लक्ष्मण देवुडुंडि'

भावार्थ – मी निद्रादेवी आहे. हे मान्यवरा, विधात्याने तुझ्या बरोबर मी वास करावा अशी योजना केली आहे. मी तुला कसे सोडू ? तूच काहीतरी मार्ग सांग. तेव्हा लक्ष्मण तिला म्हणतो, 'तू उर्मिलेच्या ठिकाणी प्रवेश कर. आणि रात्रंदिवस तिच्यातच सामावून राहा. वनवासकाल संपला की, मी तिथे येऊन तुझे पाणिग्रहण करीन ' निद्रादेवीने लक्ष्मणाचे वचन मान्य केले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि ती तिथून निघून गेली. यामुळे लक्ष्मणही प्रसन्न झाला.

राम जेव्हा शिवधनुर्भंग करायला निघाला, तेव्हा विश्वामित्र सर्वांना सावध करीत आहे. त्या पंक्ती अशा –

हरुनि चापमु रामु डतिसत्त्वयुक्ति
बेरिगि नेडिदे एक्कु वेट्टुचुन्नाडु
अदरकु भूदेवि यात्मलो नीवु
चेदरि चलिपक शेषाहि नीवु
कडक धरिपुमु कमठेंद्र नीवु
कडु नेमरुकुडु दिक्करुलार मीरु ॥

भावार्थ – आज राम शिवाचे धनुष्य चालवणार आहे. हे पृथ्वी, तू आश्चर्यचकित होऊ नकोस. शेषनागा, तू विचलित होऊ नकोस. हे कूर्मा, तू पृथ्वीला घट्ट सावरून ठेव. हे दिग्गजांनो, तुम्ही सावधान असा.

हे रामायण देशी भाषेत असल्यामुळे पश्चिम आंध्राच्या डोंगराळ प्रदेशात फार लोकप्रिय झाले. तिथले लोक त्याची पारायणे करीत आणि स्त्रिया त्यातील प्रसंगांचे गायन करीत.

प्रस्तुत रामायणाची कविता सोपी, सुंदर आणि निर्दोष असल्यामुळे तेलुगू भाषेतले हे सर्वोत्तम रामायण समजले जाते. [आंध्र हिस्टॉरिकल रीसर्च सोसायटीचे जर्नल जुलै १९६० ते एप्रिल १९६१; हिं. ते. म. रा. तु. अ; रंगनाथ रामायण – ए. सी. कामाक्षीराव; दक्षिण भारत]

रंगनाथस्वामी निगडीकर

(१६१२–१६८४ इ. स.) एक मराठी संतकवी. हा आनंद-संप्रदायी असून रामदास पंचायतनातील दुसरा संत होय. त्याच्या पित्याचे नाव बोपजी आणि आईचे नाव बयाबाई होते. या दांपत्याला तीन मुलगे झाले. रंगनाथ हा त्यांतला मधला मुलगा. हा यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचा असून वसिष्ठगोत्री होता. हा स्वरूपाने सुंदर होता. बालपणापासून त्याला शिपाईगिरीची आवड होती. त्यामुळे त्याने लग्नही केले नाही. पण पुढे तो शिपाई झाला नाही. वयाच्या चौदाव्या वर्षीच तो घर सोडून बद्रिकाश्रमी गेला. तिथे त्याने बऱ्याच विद्या संपादन केल्या. नंतर तो घरी परत आला. बोपजीने पूर्णानंदस्वामीकडून अनुग्रह घेतला होता. गुरूने त्याचे नाव निजानंद असे ठेवले होते. मग रंगनाथाने वडिलांकडून अनुग्रह घेतला.

निजानंदाने जीवत्–समाधी घेतली. त्यानंतर रंगनाथ फार करून निगडीलाच राहू लागला. तिथे तो राजयोगी म्हणून राहात असे. लंगोटवंद शिष्यसमुदाय त्याच्या बरोबर असे. त्याशवाय थागम्मा व चंद्रम्मा या दोन शिष्यिणीही होत्या. त्याचा मनोहर नावाचा एक आवडता घोडा होता. इतके राजैश्वर्य असले तरी रंगनाथ त्या भवपाशात कधीच गुंतला नाही, असे म्हणतात.

एकदा एक स्त्री त्याची एकांतात भेट घ्यावी म्हणून आली. रंगनाथाने तिची समजूत काढण्याचा खूप प्रयत्न केला. पण काही केल्या तिची समजूत पटेना. अखेर स्वामीने तिची एकांतात भेट घेण्याचे ठरविले. महाराजांची वाट पहात ती मंचकावर बसून होती. तिचे मन रंगनाथमय झाले होते. महाराज तिच्या जवळ येऊन केव्हा बसले, हेही तिच्या ध्यानात आले नाही. नंतर भानावर आल्यावर तिची दृष्टी रंगनाथाकडे गेली. आणि त्यासरशी तिच्या सर्व देहवासना निमाल्या. नंतर ती बाई त्याच्या बरोबर शिष्यवृत्तीने राहू लागली.

रंगनाथाने गजेंद्रमोक्ष, रामजन्म, गुरुगीता, सुदामचरित्र, शुकरंभासंवाद, पंचीकरण, भानुदासचरित्र, गरुडसत्यभामागर्वहरण, बद्धमोक्षविवरण, इ. लहानमोठी स्फुट प्रकरणे लिहिली आहेत.

रंगनाथाची रचना प्रासादिक आहे. आपल्या काव्यातून तो कधी साधनालाच साध्य मानून आत्मकला विसरणाऱ्या साधकाला उपदेश करतो, तर कधी खरे ज्ञान, धन व सौख्य यांचे स्वरूप सांगतो. हे स्वरूप स्पष्ट करणारे त्याचे काही श्लोक असे–

सकलहि वश झाल्या या कला आणि विद्या
परमचतुर झाला शीकला गद्यपद्या।
सदयहृदय नाही, कोण मी हे कळेना,
तरि मग तितुकेंही ज्ञान तें कां जळेना ॥ १ ॥
अपर धनद झाला पाहता या भुलोकीं
धनकनकललामें तें न भोगीहि शोकीं।
द्विज विबुध न मित्रां दानयज्ञीं मिळेना
तरि मग तितुकेंहि द्रव्य तें कां जळेना ॥ २ ॥
गृह धन सुत दारा देहद्वारां अमूपें
विषयपर सुखें जीं नश्वरें दुःखरूपें।
निजसुख निजरंगें जोंवरी आकळेना
तरि मग तितुकेंही सौख्य तें कां जळेना ॥ ३ ॥

रंगनाथाच्या नावावर असलेला योगवासिष्ठसारटीका हा ग्रंथ एक वादविषय झाला आहे. या ग्रंथाच्या मानकरी व जगदीश्वरी पोथ्या ताडून पाहिल्यावर श्रीधरचरित्र आणि काव्यविवेचन या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म. म. द. वा. पोतदार लिहितात. "रंगनाथाच्या नावावर म्हणून जे योगवासिष्ठ मराठीत प्रसिद्ध झाले आहे, ते निगडीकर रंगनाथाचे की मोगरेकर रंगनाथाचे हे संशयास्पद आहे. निगडीकरापेक्षा मोगरेकराकडेच योगवासिष्ठाचे कर्तृत्व द्यावे, हे अधिक बरे वाटते. कारण चिदानंदलहरी व योगवासिष्ठ यांत अधिक भाषासाम्य दिसून येते." पोतदारांना रंगनाथस्वामी निगडीकराची बद्रिकाश्रमयात्राही अशीच संशयास्पद वाटते. [म. सा.; म. वा. इ. खंड ३ रा]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रंगपंचमी एक लौकिक सण. फाल्गुन वद्य पंचमीला हा सण साजरा करतात. या दिवशी लहान मुले व मोठी माणसे समवयस्कांच्या अंगावर पिचकारीतून रंग उडवतात.

मराठ्यांच्या सत्ताकाळात या दिवशी मोठे दरबार भरविण्याची प्रथा होती. या दरबारांत सरदार, जहागिरदार, इ. मंडळी एकमेकांच्या अंगावर गुलाल उडवीत असत.

महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश, गुजरात, इ. ठिकाणीं हा सण विशेष उत्साहाने साजरा केला जातो.

नव्या जावयाचे पहिल्या वर्षाचे सासुरवाडीकडून जे बारा सण होतात, त्यांत रंगपंचमीचा समावेश असतो. नववधूला त्या दिवशी सासरकडून पांढरी साडी मिळते आणि त्यावर केशरी रंग उडवलेला असतो. शाहिरांनी रंगपंचमीवर पोवाडे रचले आहेत. हिंदी कवींचीही रंगपंचमीवर काव्ये आहेत.

रंगराजम्मा (इ. स. चे १७ वे शतक) एक तेलुगू कवयित्री. ही तंजाऊरच्या विजयराघव नायक राजाच्या दरबारी होती. काहींच्या मते ही त्याची पत्नी असावी. शृंगार काव्यासाठी तिची प्रसिद्धी असून, ती शतलेखिनी म्हणजे एका घटिकेत आठ भाषांमध्ये शंभर श्लोक रचणारी होती. तिच्या प्रतिभेवर मुग्ध होऊन राजाने तिला सुवर्णाचा अभिषेक केला होता. रंगराजम्माला राजनीतीचेही उत्तम ज्ञान होते.

तिने मन्नारुदासविलास व उषापरिणय ही दोन प्रबंधकाव्ये रचली आहेत. त्याशिवाय रामायणसंग्रह, महाभारतसंग्रह, भागवतसंग्रह अशी तिची आणखी तीन काव्ये आहेत. मन्नारुदासविलास या नावाचे नाटकही तिने रचले आहे. या नाटकात तिने अनुक्रमे संस्कृत, प्राकृत, शौरसेनी, मागधी, पैशाची, चूलिका, अपभ्रंश व तेलुगू या भाषांमध्ये काव्यरचना केली आहे. नाटकातील पात्रानुरूप भाषेवरून तिची लोकज्ञता, सरसता आणि विनोदी प्रकृती यांचा परिचय होतो. तिचा व्याकरणावर चांगला अधिकार होता. ज्योतिषशास्त्रही तिला अवगत होते. तिची भाषाशैली बोलचालीची असून, साधी व प्रवाही आहे. [ते.सा.इ.; ग्रे.वी.इं.]

रंगशायी अह्लंराजू (इ. स. १८६०–१९३६) तेलुगू साहित्यातील असाधारण प्रतिभेचा कवी. श्रीमदांध्रचंपूभारत ही याची अमर कृती आहे. हे काव्य गद्यपद्य मिश्रित आहे. श्री. अनंत भट्टाच्या भारतचंपूचा हा तेलुगू अनुवाद आहे. याने रामायणचंपूचीही रचना केली; परंतु तो अजून संपूर्ण स्वरूपात प्रकाशित झालेला नाही. त्याशिवाय याला अकरा शतक-काव्यांचा प्रणेता मानले जाते. या शतक काव्यांत रघुरामशतक, गोविंदशतक, मल्लिकार्जुनशतक ही विशेष प्रसिद्ध आहेत; याची नारायणानंदलहरी व कविमानसरंजनी ही संस्कृत काव्ये फार लोकप्रिय आहेत. हा चित्रकाव्यासाठीही प्रसिद्ध आहे. एकाक्षरी छंदातही याची कविता आढळते. [ते. सा. इ.]

रंगारी एक जात. यांना छीप, भावसार, निराली व नीलगर अशी ही अन्य नावे आहेत. हे लोक सुती कापड रंगवितात व त्यावर छपाई करतात. यांच्यांत हिंदू व मुसलमान दोन्हीही धर्माचे लोक आहेत. उ. भारतात त्यांना छीप व द. भारतात रंगारी ही नावे प्रचलित आहेत. छीप व रंगारी यांच्यांत रोटी-बेटीव्यवहार होत नाही. कापड रंगविण्यासाठी जे नीळ वापरतात, ते नीलगर किंवा निराली होत. उ. भारतात रंगाऱ्यांना भावसार असेही म्हणतात. रंगारी लोक आपल्याला विणकरापेक्षा वरच्या दर्जाचे मानतात. विवाहासाठी उभारलेल्या स्तंभाला सात प्रदक्षिणा घालणे, हा त्यांच्या लग्नातला मुख्य विधी असतो. यांना घटस्फोट व पुनर्विवाह मान्य आहेत.

हे लोक मृताला दक्षिणेकडे पाय करून चितेवर ठेवतात आणि जाळतात.

रंगाऱ्यांतले निराली हे लोक महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात आहेत. अहमदनगर जिल्ह्यातही ते आढळतात. यांचा पोटभेद असलेले चिलिवंत हे लिंगायत आहेत व इतर मराठा आहेत. यांच्यांतही रोटीबेटीव्यवहार होत नाही.

खंडोबा व भवानी ही निराल्यांची कुलदैवते आहेत. यांचे पौरोहित्य देशस्थ ब्राह्मण करतात. हे जननाशौच दहा दिवस पाळतात. ११ व्या दिवशी मुलांचे नाव ठेवतात. मृत पुरुषावर पांढरा कपडा घालतात. मृत सुवासिनीला पिवळे कपडे नेसवितात. तिच्यावर हळद शिंपडून फुले घालतात. मृताला जाळणे व पुरणे अशा दोन्ही प्रथा आहेत.

दक्षिणेत तेलुगू जिल्ह्यात राहाणारे रंगारी मराठी भाषा बोलतात, त्यावरून ते मूळ मराठा जातीचे आहेत असे कळते. त्यांना राव अशी पदवी आहे. ते अंबाभवानीला भजतात. उ. अर्काटमधील रंगारी स्वतःला क्षत्रिय म्हणवितात. आपल्या क्षत्रियत्वासंबंधी ते परंपरेने आलेली कथा सांगतात, ती अशी—

राम लंकेवर स्वारी करण्यासाठी निघाला, तेव्हा त्याच्या बरोबर रंगारी लोक दक्षिणेत आले. काही कारणास्तव राम या लोकांवर कोपला आणि त्याने बहुतेकांचा नाश केला. त्या वेळी एका क्षत्रिय स्त्रीने केवळ आपली दोन मुले वाचवली. तिने त्या मुलांचे जानवे काढून टाकले आणि त्यांतला एक शिंपी व दुसरा रंगारी आहे, असे भासवले. जो रंगारी म्हणून भासवला गेला, त्याचाच वाढलेला वंश म्हणजे रंगारी जात होय.

दुसरी कथा अशी — परशुराम क्षत्रियांचा संहार करीत सुटला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असता दोन पुरुष अंबाबाईच्या देवळात लपले व त्यांनी रक्षणासाठी देवीची प्रार्थना केली. त्या वेळी देवीने एकाच्या हाती सुई-दोरा दिला व दुसऱ्यापुढे रंग ठेवला. परशुरामाने त्यांना पाहिले; पण शिंपी व रंगारी म्हणून सोडून दिले. तेव्हापासून रंगाऱ्यांची जात अस्तित्वात आली.

हे लोक दसरा आणि मदनदहन हे दोन सण मुख्यत्वे पाळतात. दसऱ्याच्या दिवशी तुळजाभवानीची पूजा करतात आणि शिमग्यामध्ये लाकडाची होळी पेटवून तिच्या भोवती उभे राहातात, 'लब लब' असे म्हणून बोंब मारतात व मदनाचे दहन झाल्याबद्दल शोक करतात.

यांच्यांत निरपत्य विधवांना पुनर्विवाह करण्याची मोकळीक असते. मात्र अशा स्त्रियांना धार्मिक मिरवणुकीत भाग घेण्यास प्रतिबंध असतो. या लोकांना मद्य-मांस चालते.

हे लोक प्रेते जाळतात किंवा पुरतात. पाहा–भावसार. [का. ट्रा. स. इं.; पूना गॅझे.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.; देवीकोश ३]

रंगावतारी एक प्राचीन जात. हिलाच रंगावतारक असे दुसरे नाव होते. ब्रह्मपुराणानुसार हे लोक धंदेवाईक नट असून, रंगमंचावर निरनिराळी सोंगे घेत. हे पतित असल्यामुळे यांचा संपर्क करू नये, असे सांगितले आहे. [हि. ध.]

रंगीलदास (इ. स. चे १९ वे शतक) एक गुजराती संतकवी. हा सुरतेचा रहिवासी असून, त्याचा जन्म राणा जातीत झाला होता. बालपणापासूनच हा विरक्त, शांत आणि विवेकी होता. तापी नदीच्या तीरावर अश्विनीकुमार घाटावर सत्संगात काळ कंठणे हा त्याचा कार्यक्रम होता. नीलकंठ घाटावरील कोणा विष्णुदास नामक महात्म्याकडून याने दीक्षा घेतली. रंगील सतसई ही याची कुंडलिया छंदातील एक चांगली रचना आहे. याशिवाय त्याने दोहा, झूलणा, इ. छंदांमध्येही काव्यरचना केली असून, तीत भक्ती, ज्ञान, वैराग्य, इ. अनेक विषय आहेत. रंगीलदासाची भाषा प्रासादिक असून, तीमध्ये भावमाधुरी आढळते. [गु. सं. हिं. दे.]

रंधावा जाटांची एक जमात. यांची वसती मुख्यत्वे पंजाबमध्ये आहे. त्यांच्या मूळ पुरुषाचे नाव रंधावा असे असून, तो जादू किंवा भट्टी राजपूत होता. इ. स.च्या १३ व्या शतकात तो बीकानेर येथे राहत होता. त्याच्या पाचव्या पिढीतील कज्जल नामक एक पुरुष बटाला येथे जाऊन राहिला. तिथे त्यांचा वंशविस्तार बराच झाला आणि पुढे या लोकांनी तिथल्या बऱ्याच भूमीवर स्वामित्व मिळवले.

गुरुदासपूरमधील रंधावा आपल्या मूळ पुरुषाविषयी निराळीच माहिती सांगतात, ती अशी –

रंधावा हा आमचा मूळ पुरुष राजपूत होता. पण त्याने मान जाटाच्या मुलीशी विवाह केल्यामुळे त्याचा दर्जा घसरला व तो जाट बनला.

सर्व रंधावा लोक सखरिया पंथाचे अनुयायी होते. पण हळूहळू त्या सर्वांना शीख पंथाची दीक्षा देण्यात आली आणि रणजीतसिंगाच्या काळापर्यंत सर्व रंधावा लोक शीख बनले.

रंधावा गुरू नानक, सिद्ध साहू, साहिब बुध, साहिब मिहमान, साहिब रामकौर, साहिब अनूपसिंघ, इ. साधुसंतांना भजतात. त्यांच्याशी संबंधित असलेल्या पवित्र स्थानांची ते यात्रा करतात आणि त्यांची पूजा-अर्चा करतात.

बटाला तहसिलातील कासटीवाल गावी जुमा शाह नामक एक राक्षस कैद केलेला आहे, अशी या लोकांची समजूत आहे. दर वर्षी या गावी एक जत्रा भरते. या दिवशी जुमा शाह आपल्याला वर्षभर पुरेल इतके धान्य गोळा करतो असे म्हणतात. त्यामुळे या जत्रेच्या आगे-मागे कोणीही धान्य खरेदी करून घरात ठेवीत नाहीत. असे केल्यास राक्षस रागावेल आणि आपल्या घरातले धान्य घेऊन जाईल, अशी त्यांना भीती वाटते. [ग्लो. ट्रा. पं. नॉ. प्रॉ.]

रंभा एक अप्सरा. ही समुद्रमंथनातून वर आली. हिला कश्यप व प्राधा यांची कन्या म्हटले आहे. इंद्राने तिला स्वर्गात नेले. ही अप्रतिम लावण्यवती होती. म्हणून विश्वामित्राचा तपोभंग करण्यासाठी इंद्राने तिला त्याच्याकडे पाठविले. तिच्यामुळे विश्वामित्र तपोभ्रष्ट तर झाला नाहीच; पण त्याने तिला, 'तू शिळा होऊन पडशील' असा शाप दिला (म. भा. अनु. ६.११). एक ब्राह्मण तुझा उद्धार करील, असा तिला उःशाप मिळाल्याची कथा वाल्मीकिरामायणात दिली आहे. (बाल. ६४)

रावण कैलासाला जात असता रंभा त्याच्या दृष्टीस पडली. त्याने तिला पळवून नेले. त्या वेळी ती म्हणाली, की तुमचा भाऊ कुबेर याची मी सून व नलकूबराची पत्नी आहे.

रंभेचा उल्लेख उर्वशीच्या बरोबरीने केला जातो. ती नृत्यप्रवीण होती. ही कार्तिक महिन्यात वरुण नामक सूर्याबरोबर भ्रमण करते (भाग. पु. १२. ११).

स्कंद पुराणात रंभेविषयी एक कथा दिली आहे ती अशी– श्वेत नामक मुनीचे व एका राक्षसीचे युद्ध झाले, त्यात श्वेत मुनीने वायव्यस्त्राचा प्रयोग केला. त्यामुळे राक्षसी व शिळारूप रंभा दोघी उडाल्या व कपितीर्थात पडल्या. त्यायोगे दोघींचाही उद्धार झाला (स्कंद पु. ३. १. ३९).

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शुकदेवाशी रंभेचा संवाद झाला तो ‘शुक-रंभासंवाद’ या नावाने प्रसिद्ध आहे. [प्रा. च. को.]

रंभाजयंती राजस्थानात राजपूत स्त्रिया ज्येष्ठ शु. द्वितीयेला रंभेची जयंती साजरी करतात व त्या वेळी काही लौकिक आचार पाळतात. केळीच्या एका जातीलाही रंभा म्हणतात. तिचे फळ गणपतीला अर्पण केल्याने मनकामना पूर्ण होतात असे सांगितले आहे.

रंभातृतीया (१) एक काम्य व्रत. ज्येष्ठ शुद्ध तृतीयेला या व्रताला प्रारंभ करतात. मुख्यत्वे हे स्त्रीव्रत आहे. प्रातःकाली स्नानादी नित्यकर्मे आटोपल्यावर व्रतधारी व्यक्तीने गार्हपत्य, दक्षिणाग्नी, सभ्य, आहवनीय व भास्कर या पाच अग्नींच्या मध्ये पूर्वेकडे तोंड करून बसावे. त्याचप्रमाणे ब्रह्मा व महाकाली, महालक्ष्मी, महामाया, महासरस्वती यांची स्थापना करून ब्राह्मणाकरवी सर्व दिशांना होम करावा. सौभाग्याष्टक नावाची आठ द्रव्ये देवीपुढे ठेवून त्यांची पूजा करावी. सायंकाळी होमासाठी रुद्राणीला प्रार्थनापूर्वक आवाहन करावे. मग एका दांपत्याची पूजा व सन्मान करावा. सुपामध्ये नैवेद्य ठेवून तो नैवेद्य सौभाग्यवती स्त्रियांना द्यावा. फल—धन-धान्य व पुत्र यांची प्राप्ती. [हि. ध.; व्र. प.]

(२) प्राचीन काली रंभेने सौभाग्याच्या प्राप्तीसाठी हे व्रत केले म्हणून याला हे नाव मिळाले आहे. मार्गशीर्ष शुद्ध तृतीयेला या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. पार्वती ही या व्रताची देवता आहे. प्रत्येक महिन्याला देवीची पूजा तिच्या निरनिराळ्या नावांनी करावी. उदा० मार्गशीर्षात भवानी, पौषात गिरिजा इत्यादी. निरनिराळी दाने द्यावी आणि विविध खाद्य पदार्थांचे सेवन करावे. [हि. ध.; व्र. प.; व्रतराज]

रंभात्रिरात्र व्रत रंभा म्हणजे केळीचे झाड होय. म्हणून या व्रताला हे नाव मिळाले आहे. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी तीन दिवस. व्रतधारी स्त्रीने स्नान करून केळीच्या झाडाला पाणी घालून तिला दोरे गुंडाळावे. केळीच्या झाडाची चांदीची प्रतिमा करून तिला सोन्याची केळी जडवावी. नंतर तिची पूजा करावी. त्रयोदशीला नक्त, चतुर्दशीला अयाचित भोजन आणि पौर्णिमेला उपवास करावा. त्या केळीच्या झाडाला वर्षभर पाणी घालावे. उमा व शिव आणि कृष्ण व रुक्मिणी यांचीही पूजा करावी. त्याचप्रमाणे त्रयोदशीपासून तीन दिवस होम करावा. फल—पुत्र व सौंदर्य यांची प्राप्ती आणि अवैधव्य. [हि. ध.]

र देवनागरी वर्णमालेतील सत्ताविसावे व्यंजन. या वर्णाला सांप्रतचे स्वरूप प्राप्त होण्यापूर्वी त्याला चार अवस्थांतून जावे लागले आहे. त्याची पहिली अवस्था अशोकाच्या

रच्या रूपाचा विकासक्रम

गिरनार येथील शिलालेखात, दुसरी अवस्था राजा यशोधर्म्याच्या काळातील (इ. स. ५३२) मंदसोर येथील लेखात, तिसरी अवस्था मेवाडचा गुहिलवंशी राजा अपराजित याच्या वेळच्या (इ. स. ६६१) कुंडेश्वर येथील लेखात व चौथी प्रतीहार बाडकच्या जोधपूर येथील लेखात (इ. स. ८३७) आढळते. तिसऱ्या व चौथ्या अवस्थांतील र आणि आजचा र यांत फारसा फरक नाही.

वर्णोद्धारतंत्रात या वर्णाचे ध्यान सांगितले आहे, ते असे—

ललज्जिह्वां महारौद्रीं रक्तास्यां रक्तलोचनाम् ।
रक्तवर्णामष्टभुजां रक्तपुष्पोपशोभिताम् ॥
रक्तमाल्याम्बरधरां रक्तालङ्कारभूषिताम्
महामोक्षप्रदां नित्यामष्टसिद्धिप्रदायिकाम् ॥
एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मन्त्रं दशधा जपेत् ॥

अर्थ—जीभ बाहेर काढलेल्या, महाघोर, रक्तमुख, रक्तलोचन, रक्तवर्ण, अष्टभुज, रक्त पुष्पांनी विभूषित, रक्त पुष्पांची माला व रक्त वस्त्र धारण करणाऱ्या, लाल अलंकारांनी सुशोभित, महामोक्षदायी, नित्य, अष्ट सिद्धी देणाऱ्या व ब्रह्मरूप अशा रकाराचे ध्यान करून त्याच्या मंत्राचा दहा वेळा जप करावा.

मूर्धा हे याचे उच्चारणस्थान आहे. [श. क.; म. ज्ञा. को.]

रईन मुसलमान शेतकऱ्यांची एक जात. हे लोक प्रथम महंमद बिन कासीमबरोबर भारतात आले आणि सिंध भागात वसती करून राहिले. नंतर ते हळू हळू पंजाब, मध्यप्रदेश इ. ठिकाणी पसरले. रईन शेतकरी केवळ फळझाडे व भाज्या यांचीच लागवड करतात. उच्चवर्णीय मुसलमान यांना कुंजडा, कवाडी, सब्जीफरोश, इ. हीनतासूचक शब्दांनी निर्देशितात व यांचा सामाजिक दर्जा निकृष्ट मानतात. हे लोक धर्मभोळे व भित्रे असून, अशिक्षित असले तरी बुद्धिवान असतात. [जा. व्य.]

रकई मुसलमानांची एक जात. या लोकांची वसती गुजरातमध्ये आढळते. हे लोक भिक्षा मागून उदरनिर्वाह करतात. भिक्षा मागताना गुर्ज नावाचा शूल वाजवितात. या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गुर्जाला वरच्या अंगाने खिळे आणि खालच्या टोकाला लहान साखळ्या असतात. भिक्षा दिली नाही तर हे शूलाने गालावर अथवा डोळ्यावर जखम करून घेतात. रकई लोक सुन्नी पंथाचे आहेत. [मुं. इ. जा.]

रक्त शरीरातील सप्तधातूंमधला एक धातू. रक्त हे तांबडे परमाणू, पांढरे परमाणू व जीवनरस यांच्या संयोगाने तयार होते. शरीराच्या एकंदर वजनापैकी रक्ताचे वजन ८ टक्के असते. ते रक्तवाहिन्या व शिरा यांच्यामधून सर्व शरीरभर पसरते व फिरत राहते. रक्त हे शरीरावयवांना प्राणवायू व पोषकद्रव्ये यांचा पुरवठा करते आणि शरीरातला निरुपयोगी भाग मलमूत्ररूपाने बाहेर टाकायला मदत करते. रक्तविषयक काही लोकसंकेत असे —

नात्यामधला रक्तसंबंध (उदा० पितापुत्र, बंधुभगिनी, मायलेकी) हा अधिक घनिष्ठ समजला जातो. अशिक्षित समाजात, रक्त हाच शरीरातला जीवप्राण अशी समजूत आहे. काही जमातींत रक्त पिण्याला मनाई असते, तर काही जमातींत माणसाचे किंवा विशिष्ट जनावरांचे रक्त प्याल्याने त्या माणसाचे किंवा त्या प्राण्याचे गुणधर्म पिणाऱ्याच्या अंगी येतात, असे मानले जाते. प्रतिज्ञा पाळणे यासाठी 'रक्ताशपथ' असे म्हणण्याची चाल आहे. सूड घेण्याच्या बाबतीतही रक्ताचा संबंध येतो. पांडवांतला भीम हा कुरुक्षेत्रावरच्या युद्धात दुःशासनाला मारून त्याचे रक्त घटघटा प्याला, अशी कथा आहे. रक्त प्याल्याने मृत शत्रूच्या अंगीचे शौर्य, धैर्य व साहस त्याला मारणाऱ्याच्या अंगात येते, असे मानतात. रक्त हे भूमीवर सांडले जाऊ नये, असा संकेत आहे. म्हणून बलिदानाच्या जागी बळीचे रक्त एखाद्या खाचेत गळेल अशी योजना करतात किंवा बळीचा गळा दाबून त्याला ठार करतात. एका जमातीतला माणूस दुसऱ्या जमातीत सामील करून घेताना त्याचे रक्त जमातीतल्या माणसाच्या रक्ताशी मिसळतात. रक्त हे पवित्र आहे, अशी ख्रिस्ती लोकांची समजूत आहे. म्हणून ते बाप्तिस्मा देताना रक्ताचा उपयोग करतात.

रक्त हे दुष्ट शक्तींपासून माणसाचे रक्षण करते. रोगपरिहारासाठी काही लोक रक्त पितात आणि अंगालाही चोपडतात. सर्पदंश झाला तर काही लोक दंशाच्या जागी पाल किंवा सरडा यांचे रक्त वापरतात. काही जातींत मूळव्याध जाण्यासाठी शेळीचे रक्त प्यायला देतात. दम्याच्या रोगावर उपचार म्हणून सशाचे रक्त देण्याचीही पद्धत आहे. काही द्रविड जमातींत बळी दिलेल्या बैलाचे रक्त पितात. परिया लोक साथीचा रोग जाण्यासाठी एका बांबूला रक्ताचे भांडे टांगतात. दक्षिणेतल्या काही जातींत वधूच्या कपाळाला रक्ताचा टिळा लावतात. मात्र स्त्रियांचे रजोदर्शनातले व प्रसूतीच्या वेळचे रक्त घातक व अपवित्र मानतात. अभिचारकर्मात पूर्वी काही लोक रक्ताच्या आहुती देत, असा उल्लेख बाणाने हर्षचरितात केला आहे.

रक्तलोकेश्वर बौद्धांचा एक देव. त्याचा रंग लाल असल्यामुळे त्याला रक्तलोकेश्वर असे म्हणतात. याची वस्त्रेही लाल असतात. हा चतुर्भुज असून, त्याच्या हातांत

रक्तलोकेश्वर

धनुष्य, बाण, पाश व अंकुश ही आयुधे असतात. याचा निवास अशोक वृक्षाच्या खाली असतो. याच्या उजव्या बाजूला तारा आणि डाव्या बाजूला भृकुटी या देवता असतात. रक्तलोकेश्वराच्या मूर्ती अत्यंत तुरळक आहेत. त्यांपैकी काही नेपाळात पाहायला मिळतात.

साधनमाला ग्रंथात याचे ध्यान वर्णिले आहे, ते असे– रक्तवर्ण, द्विभुज, मस्तकावर जटामुकुट व त्यांत अमिताभाची प्रतिमा. हा विविध वस्त्रांनी व अलंकारांनी भूषित असून, याच्या डाव्या हातात रक्तकमल असते. [इं. बु. इ.]

रक्तसप्तमी एक तिथिव्रत. मार्गशीर्ष वद्य सप्तमीला या व्रताचा प्रारंभ करतात. रक्त कमळांनी सूर्याची पूजा करणे, हा या व्रताचा प्रमुख विधी आहे. किंवा पांढरी फुले व रक्तचंदन यांनी सूर्यमूर्तीची पूजा करतात. पूजेत वडे आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कुसर (खिचडी) यांचा नैवेद्य दाखवतात. ..द्यापनाच्या वेळी तांबड्या वस्त्रांची जोडी दान देतात. [हि. घ.]

रखुमाई एक देवता. विठ्ठलाची पत्नी. लोकमानसातील विठ्ठल हा कृष्णच आहे. त्यामुळे रखुमाई म्हणजे रुक्मिणी हे ओघानेच आले. त्याची कथा पद्म पुराणाच्या आणि स्कंद पुराणाच्या उत्तर खंडात दिली आहे, ती अशी–

गोकुळात असताना कृष्ण आणि राधा यांचे सख्य होते. कृष्ण गोकुळ सोडून गेल्यावर त्याने द्वारका नगरी वसवली व तो द्वारकेचा राजा झाला. त्या वेळी राधा एकदा द्वारकेला गेली आणि श्रीकृष्णाच्या मंदिरात जाऊन त्याच्या मांडीवर बसली. तेवढ्यात तिथे श्रीकृष्णाची पत्नी रुक्मिणी आली. पण तिला पाहून राधा मांडीवरून उठली नाही किंवा कृष्णानेही राधेला दूर केले नाही. रुक्मिणीला त्यामुळे फार अपमान वाटला आणि तिच्या जिवाचा संताप झाला. पुन्हा कृष्णाचे तोंड पाहायचे नाही, असे ठरवून ती द्वारकेतून बाहेर पडली. अनेक तीर्थे हिंडून ती दिंडीरवनात आली. हे स्थळ तपश्चर्येला योग्य आहे, असे तिला वाटले आणि ती तिथेच तपश्चर्या करू लागली.

रुक्मिणी आपल्याला सोडून गेली, हे पाहून कृष्ण फार दुःखी झाला आणि गोकुळातील गोपाळांना घेऊन तिच्या शोधार्थ निघाला. तिचा शोध करीत करीत तो दिंडीरवनात पोहचला. बरोबरच्या गोपाळांना त्याने सांप्रतच्या गोपाळपुरात ठेवले आणि तो स्वतः रुक्मिणी तप करीत होती तिथे गेला. कृष्णाने तिची खूप मनधरणी केली आणि तिला आपल्याबरोबर घरी चलण्याचा आग्रह केला. परंतु रुक्मिणीचा राग काही कमी झाला नाही. तिने त्याला न ओळखल्याचा बहाणा केला आणि त्याला खूप दूषणे दिली. तिचे बोलणे ऐकून कृष्ण हतबुद्ध झाला आणि तिच्याकडे पाहतच तिथे उभा राहिला.

आजही पंढरपूरच्या देवळात रखुमाई विठ्ठलाच्या शेजारी नाही. तिचे मंदिर विठोबाच्या मंदिराच्या मागच्या बाजूला पूर्वाभिमुख आहे. [विठोबाचे राज्य – पु. रा. बेहरे, १९६४]

रघुदेव न्यायालंकार (इ. स.. चे १७ वे शतक) एक वंगदेशीय नैयायिक. हा गदाधर भट्टाचार्याचा सतीर्थ असून, हरिराम तर्कवागीशाचा शिष्य होता. याने न्याय-वैशेषिक या विषयांवर पुढील ग्रंथरचना केली आहे– तत्त्वचिंतामणीवर तत्त्वदीपिका नावाची टीका, निरुक्तिप्रकाश, न्यायकुसुमांजली कारिकांवरील व्याख्या, द्रव्यसारसंग्रह हा वैशेषिक दर्शनावरील स्वतंत्र ग्रंथ, सिद्धांततत्त्व, शिरोमणिकृत पदार्थखंडनावरील व्याख्या आणि आख्यातवादाची टीका. याशिवाय याने अनेक वादग्रंथही रचले आहेत. त्यांची नावे अशी– मुक्तिवाद, सामग्रीवाद, अनुमितिपरामर्शवाद व निश्चयत्व निरुक्ति. रघुनाथ शिरोमणीच्या दीधिति नामक पाच टीकांवर यानेही टीका रचल्या आहेत, असे सांगतात. [का. सा. सा.]

रघुनंदन (इ. स. चे १६ वे शतक) बंगालमधील धर्मशास्त्रकारांच्या परंपरेतील अखेरचा धर्मशास्त्रकार. हा हरिहर भट्टाचार्याचा मुलगा असून, वंद्यघाटीय ब्राह्मण होता. श्रीनाथाचार्य चूडामणी हा त्याचा गुरू होता. रघुनंदन व महाप्रभू चैतन्य हे वासुदेव सार्वभौमाचे शिष्य होते, असेही एक मत आहे.

रघुनंदनाने धर्मशास्त्राच्या विविध शाखांवर स्मृतितत्त्व नावाचा एक बृहद् ग्रंथ रचला आहे. हा ग्रंथ अठ्ठावीस खंडांमध्ये विभागलेला असून, प्रत्येक खंडाला तत्त्व असे नाव आहे. ग्रंथकाराने आपल्या ग्रंथात तीनशेहून अधिक इतर ग्रंथ व ग्रंथकार यांची नावे दिली आहेत. या ग्रंथात आलेल्या विषयांवर त्याचा एवढा अधिकार आहे, की त्यामुळे त्याला स्मार्तभट्टाचार्य ही उपाधी मिळाली. स्मृतितत्त्वात मलिम्लुच, दाय, शुद्धी, तिथी, संस्कार, प्रायश्चित्त, विवाह, व्यवहार, दुर्गोत्सव, व्रत, देवप्रतिष्ठा, मठप्रतिष्ठा, दिव्य, ज्योतिष, वास्तुयज्ञ, दीक्षा, सामश्राद्ध, यजुःश्राद्ध, शूद्रकृत्य, इ. अनेक विषय आहेत. यातील व्यवहारतत्त्व व दायतत्त्व हे खंड स्वतंत्र छापले आहेत.

दायतत्त्वामध्ये पित्याने केलेले वाटप, पित्याच्या मरणानंतर भावांनी केलेले वाटप, मिळकतीचा वाटा मिळण्यास अपात्र असलेली माणसे, अविभाज्य मिळकत, वाटपाचा पुरावा, स्त्रीधन व त्याचा वारसाक्रम, निपुत्रिकाचा वारसाक्रम, इ. विषय आहेत.

स्मृतितत्त्व या ग्रंथाखेरीज रघुनंदनाने अन्यही ग्रंथ रचले आहेत. त्यात दायभागावरील त्याचे भाष्य प्रसिद्ध आहे. हा भाष्यग्रंथ कलकत्ता हायकोर्टात आणि सर्व बंगालभर प्रमाणभूत मानला जातो. याशिवाय तीर्थयात्राविधी, द्वादशयात्रा, त्रिपुष्करशांती, गयाश्राद्धपद्धती आणि रासयात्रापद्धती हे त्याचे ग्रंथ आहेत. द्वादशयात्राग्रंथात पुरीमध्ये प्रत्येक महिन्यात केल्या जाणाऱ्या उत्सवांची माहिती दिली आहे. [हि. घ.; भा. सं. मू.]

रघुनाथ (समाधी इ. स. ११८६) हरिनाथाचा शिष्य व मुकुंदराजाचा गुरू. हा विदर्भातल्या चंद्रपूरचा रहिवासी असून, त्याचे आडनाव बोबडे असे होते. चंद्रपूर येथे आजही बोबडे घराणे नांदत आहे. रघुनाथाचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता. त्याने अनेक शिष्यांना उपदेश केला. पुढे आपला गुरू हरिनाथ याच्या बरोबर याने अंभोरे येथे श्रीचैतन्येश्वराच्या चरणाजवळ समाधी घेतली. पाहा–मुकुंदराज.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रघुनाथजी कुलू खोऱ्यातील एक प्रमुख देव. याचे तिथे वर्षातून दोन उत्सव होतात. पहिला दसऱ्याला आणि दुसरा वसंतपंचमीला. दोन्हीही उत्सवांत रथयात्रा असते. दसऱ्याचा उत्सव हा सर्वांत मोठा असून, तो सात दिवस चालतो. याचा प्रारंभ विजयादशमीपासून होतो. या कार्यक्रमाला आजूबाजूच्या अनेक देवमूर्ती समारंभाने तिथे आणतात.

दसऱ्याची जत्रा घालपूरच्या मैदानावर भरते. पहिल्या दिवशी रंगीबेरंगी पोषाख करून लोक तिथे जमतात. देवाचे पुजारी, वाजंत्रीवाले, पालखीवाले, इ. लोक वाजतगाजत यात्रेत सामील होतात. सुरुवातीच्या दिवशी रघुनाथजी रथातून निघालेला असतो. नंतर रथाचे ठिकठिकाणी मुक्काम होतात. भाविक लोक रथ ओढतात. सातव्या दिवशी रघुनाथजीचा रथ माघारा फिरतो. ही मिरवणूक मोठी प्रेक्षणीय असते. यात्रेचा हाच एक प्रमुख विशेष आहे.

रघुनाथ हे कुलू खोऱ्यातील स्थानिक दैवत नव्हे सुमारे तीन-चार शतकांपूर्वी तिथे जगत्सिंग नावाचा राजा राज्य करीत होता. त्याने अयोध्येहून हे दैवत इकडे आणले, असे म्हणतात. या राजाने रघुनाथाच्या मूर्तीला आपल्या गादीवर बसवून राज्यात अशी द्वाही फिरविली की, कुलू खोऱ्यातील राजे रघुनाथाच्या वतीने राज्यकारभार चालवतील. जगत्सिंगाच्या या विचारावर भरताचा प्रभाव आहे, असे दिसते.

रघुनाथदास गोस्वामी (इ. स. चे १६ वे शतक) एक चैतन्यमतानुयायी भक्तकवी. वृंदावनातील सहा गोस्वामींमध्ये याची गणना होते. बंगालमधील सप्तग्राम या प्रसिद्ध नगरात, एका कायस्थ जातीच्या गर्भश्रीमंत घराण्यात याचा जन्म झाला. गोवर्धनदास हे याच्या पित्याचे नाव होते. यदुनंदनाचार्य हा रघुनाथदासाचा कुलपुरोहित असून, त्याच्याकडूनच याने दीक्षा घेतली होती. बालपणीच हा पुरीला महाप्रभू चैतन्यांच्या दर्शनाला गेला आणि तिथेच त्याचा अनुयायी बनला. त्यानंतर रघुनाथदासाने घरच्या सर्व संपत्तीवर तुळशीपत्र ठेवून नीलाचलावर प्रयाण केले. जेव्हा चैतन्य समाधिस्थ झाला, तेव्हा हा नीलाचल सोडून वृंदावनात जाऊन राहिला. तिथे राधाकुंडानजिक असलेल्या मानसपावन घाटावर याची लहानशी झोपडी होती. ब्रजवासी वैष्णव भक्तांना चैतन्याच्या लीला सांगणे, हा त्याचा कार्यक्रम होता. असे सांगतात की, दिवसातून एकदा हा थोडेसे ताक पिऊन त्यावरच राही. मानसपावन घाटावरच याची समाधी आहे.

रघुनाथदास संस्कृत भाषेचा चांगला पंडित होता. त्याने विलापकुसुमांजली, राधाष्टक, नामाष्टक, उत्कंठदशक, अभीष्ट प्रार्थनाष्टक, अभीष्ट सूचना, शचीनंदनशतक, इ. स्तोत्रे रचली आहेत. याशिवाय मुक्ताचरित, दानकेलिचिंतामणी हेही याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

रघुनाथदासाच्या प्रोत्साहनाने आणि सहकार्याने कृष्णदास कविराजाने चैतन्यचरितामृतासारख्या महत्त्वपूर्ण ग्रंथाची रचना केली. [भा. सं.; चै. म. ब्र. सा.; हि. बं. वै. क.]

रघुनाथपंडित एक मराठी पंतकवी. याच्या स्थलकालाविषयी विद्वानांत खूपच मतभेद आहेत. तथापि सर्व विद्वानांच्या मतमतांतराचे सार काढल्यावर याच्याविषयी पुढील माहिती मिळते –

रघुनाथपंडित हा शिवकालीन कवी असून, तंजाऊर किंवा चंदीचंदावर या दक्षिणेकडील गावाचा रहिवासी होता. तो विद्वान, संस्कृत भाषेचा पंडित व फारसी-अरबी या भाषांचाही उत्तम जाणकार होता. त्याने नलदमयंतीस्वयंवराख्यान, रामदासवर्णन, गजेंद्रमोक्ष, इ. लहानमोठी काव्ये लिहिली असून, या सर्वांत नलदमयंतीस्वयंवराख्यान अत्युत्तम काव्य समजले जाते. याची भाषा अलंकारसंपन्न व वर्णने प्रत्ययकारी आहेत. सरोवराच्या तीरावर झोपी गेलेल्या श्रांत हंसाचे आणि त्याला पकडण्यासाठी निघालेल्या नळराजाचे वर्णन रघुनाथपंडित पुढील नेमक्या शब्दांत करतो–

त्यांतील एक कलहंस तटीं निजेला ।
जो भागला जलविहार विशेष केला ॥
पोटीच एक पद, लांबविला बुजा तो ।
पक्षी तनू लपवि भूप तया पहातो ॥
टाकी उपानह पदें अतिमंद ठेवी ।
केली विजार वरि डौरहि मौन सेवी ॥
हस्तीं करी वलय उंच अशा उपायीं ।
भूपें हळूच धरिला कलहंस पायीं ॥

नलदमयंतीस्वयंवराख्यानातील अनेक काव्यपंक्ती मराठी भाषेत सुभाषिताच्या मोलाच्या ठरल्या आहेत. [प्रा. म. क. पं.]

रघुनाथ भटजी (समाधी इ. स. १८१७) एक बालयोगी संत व दत्तात्रेयाचा उपासक. याला भृगु ऋषीचा अवतार मानतात. याचे आईवडील नर्मदातीरी राहत असत. बाळपणीच याला योगसिद्धी प्राप्त झाली होती. तो दिवसानुदिवस समाधी लावून बसत असे. आईवडिलांनी रघुनाथ भटजीचे लग्न करायचे ठरवताच तो गृहत्याग करून पळून गेला. प्रवास करीत करीत गोदातीरी नासिक येथे आला. तिथे बाजी-राव बळवंत फडके नावाच्या गृहस्थांनी रघुनाथ भटजीचे अनेक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कित्व जाणले व त्याला आपल्या घरी आणून ठेवले. याने नासिक येथे अनेक चमत्कार केल्याचे सांगतात. दत्तात्रेय व रघुनाथ भटजी यांची रात्री भेट होई व ते दोघे अध्यात्मावर संवाद करीत, अशीही आख्यायिका आहे. याला कोणी अद्वैतेश्वर असेही म्हणत. निरंजन महाराज या कवीने, तसेच इतर अनेकांनीही त्याचे शिष्यत्व पत्करले होते.

माघ वद्य चतुर्दशी शके १७३९ (इ. स. १८१७) या दिवशी याने जीवतसमाधी घेतली. त्याच्या समाधिस्थळी भक्तांनी एक मंदिर बांधून, त्यात शिवलिंगाची स्थापना केली आहे. दर शिवरात्रीला तिथे उत्सव होतो. [पुरुषार्थ, जून-जुलै १९६४]

रघुनाथभट्ट गोस्वामी (इ. स. चे १६ वे शतक) चैतन्य संप्रदायाचा एक अनुयायी. याची वृंदावनातील सहा गोस्वामींमध्ये गणना होते. काशीनिवासी तपन मिश्र याचा हा पुत्र होय. बंगालमधील पद्मावतीच्या तीरावरील रामपूर हे तपन मिश्राचे मूळ गाव होते. एकदा महाप्रभू चैतन्य नीलाचलाहून वृंदावनाच्या यात्रेला निघाले असता वाटेत त्यांचा मुक्काम काशीमध्ये तपन मिश्राच्या घरी पडला. तिथेच बाल रघुनाथाला त्यांचे दर्शन घडले आणि तेव्हापासून तो महाप्रभूंचा भक्त बनला. काही काळाने हा पुरीमध्ये चैतन्यांच्या दर्शनाला गेला आणि त्याने तिथेच राहण्याचे ठरविले. परंतु वृद्ध माता-पित्यांच्या सेवेसाठी महाप्रभूंनी त्याला काशीला परत पाठविले. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर रघुनाथ नीलाचलात येऊन चैतन्यांना भेटला. या वेळी तिथे गदाधर पंडितांची भागवतावरील रसाळ प्रवचने चालू होती. त्यांतून रघुनाथाला वैष्णव भक्तीचे शास्त्र गवसले. नंतर चैतन्यांच्या आदेशानुसार रघुनाथ वृंदावनात जाऊन राहिला. तिथे भागवतातील कृष्णकथा सांगणे आणि त्यातून कृष्णभक्तीचा प्रचार करणे, हे काम त्याने केले. रघुनाथाचा आवाज कोकिळेसारखा मधुर होता. त्याला संगीताचे चांगले ज्ञान होते. भागवतांचा एकेक श्लोक तो तीन चार रागांतून गात असे. त्यामुळे कृष्णकथेतील रोचकता अधिकच वाढत असे.

हा नैष्ठिक ब्रह्मचारी होता. वृंदावनातील श्रीरंगमंदिराजवळ असलेल्या चौसष्ट महंतांच्या समाधींत याचीही समाधी आहे. [चै. म. ब्र. सा.; भा. सं.]

रघुनाथशिरोमणी (इ. स. १४७७ – १५४७) एक प्रसिद्ध नैयायिक. बंगालमधील नडिया किंवा नवद्वीप येथे याचा जन्म झाला. लहानपणीच याचा पिता मरण पावल्यामुळे आणि घरची गरिबी असल्यामुळे याच्या आईने याचे मोठ्या प्रयासाने पालनपोषण केले. वासुदेव सार्वभौम हा याचा गुरू होता. रघुनाथाची हुषारी पाहून याने त्याला आपल्याजवळ ठेवून घेतले व त्याला व्याकरण, तर्कशास्त्र, इ. शास्त्रे शिकविली. त्यात प्रावीण्य मिळाल्यावर गुरूच्या आदेशावरून हा मिथिला नगरीला गेला. मिथिला हे त्या काळी न्यायदर्शनाच्या अध्ययन-अध्यापनाचे मोठे केंद्र होते. तिथे त्याने पक्षधर मिश्र या विद्वान नैयायिकाचा वादविवादात पराभव केला. त्यामुळे चिडून जाऊन पक्षधर मिश्राने त्याच्या तोंडात मारली. या अपमानाचा सूड घेण्यासाठी रघुनाथ रात्रीच्या वेळी तलवार घेऊन त्याला मारण्यासाठी त्याच्या घरी गेला. पण योगायोग असा की, त्याच वेळी पक्षधर मिश्र आपल्या पत्नीजवळ रघुनाथाची स्तुती करीत होता. ती ऐकून रघुनाथाचा राग मावळला आणि त्याने पक्षधर मिश्राची क्षमा मागितली.

रघुनाथाच्या अद्वितीय तार्किक बुद्धीमुळे व प्रगाढ विद्वत्तेमुळे त्याला शिरोमणी ही पदवी मिळाली. याने तत्त्वचिंतामणिदीधिती, बुद्धधिक्कारशिरोमणी, पदार्थतत्त्वनिरूपण, अवच्छेदकत्वनिरुक्ती, नयवाद, आख्यातवाद, इ. ग्रंथ लिहिले आहेत. पाहा – न्यायदर्शन. [म. च. को.; हि. ध.]

रघुनाथ शेष (इ. स. चे १७ वे शतक) एक मराठी पंडित कवी. वामनपंडिताचा मुलगा. याने भागवताच्या दशमस्कंधाच्या आधारे कृष्णकौतुक नावाचे काव्य लिहिले आहे. मराठवाड्यातील सुप्रसिद्ध संशोधक श्री. वि. अं. कानोले यांनी यत्रतत्र विखुरलेल्या माहितीचे कण एकत्र करून कृष्णकौतुक काव्याच्या आरंभी याचे चरित्र मांडले आहे, ते असे–

रघुनाथ शेष याला रघुपती शेष असेही म्हणत. महिपतीच्या संतलीलामृत व भक्तिविजय या काव्यांतून रघुनाथाचे उल्लेख आले आहेत. महिपतीच्या मते रघुनाथ शेष हा विद्वान पंडित असून, पेशाने कीर्तनकार होता. भागवताच्या दशमस्कंधाच्या एकूण ९० अध्यायांत मांडलेला कृष्णचरित्रविषयक कथाभाग त्याने कृष्णकौतुकात काही ठिकाणी सविस्तर, तर काही ठिकाणी संक्षेपाने वर्णिला आहे. कुठे कुठे त्याने नवीन प्रसंगही रचून घातले आहेत व मूळ कथाभागात ते नेमक्या जागी बसवले आहेत.

कृष्णकौतुक काव्याचे एकंदर १० सर्ग असून, आज उपलब्ध असलेल्या या काव्याच्या छापील प्रतीत पहिले ५१ श्लोक नाहीत व १० व्या सर्गातील ९१ व्या श्लोकानंतरचे श्लोकही मिळालेले नाहीत. त्यामुळे सदर काव्य अपूर्ण असावे, असे वाटते.

वामनपंडिताप्रमाणे रघुनाथालाही यमकाचा व प्रासांचा हव्यास दिसतो. त्याने या काव्यात वृत्तवैचित्र्यही पुष्कळ आणले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. बालक्रीडा व रासक्रीडा वर्णन करीत असताना त्याच्या प्रतिभेला बहर येतो. पित्याप्रमाणेच तो कट्टर कृष्णभक्त असावा. त्याच्या काव्यावर सर्वत्र वामनी काव्याची दाट छाया दिसते. रघुनाथाची भाषा सरसरमणीय असून, वर्णने प्रत्ययकारी आहेत. कालियदमनाच्या प्रसंगाचे मूर्तिमंत चित्र वर्णन करणाऱ्या त्याच्या काव्यपंक्ती अशा–

विष कालिय नाग जवे उमळी । येमुनाजळ देत असे उकळी ।
धरणी तरुहीन बरी न दिसे । इतुक्या करिता जन जात नसे ।।
लपटीत पटी वरि पीत पटी । अति घीट नटे निजबाहु पिटि ।
घननीळ कदंब तरूवरते । हरिरूप न जाव मना परते ।।
लक्ष येक असोनि उडी त्यजिता । तरु कांपतसे थिर हांकरिता ।
हरि हा बहुता दिवसा गवसे । यमुना इतुक्यास्तव गर्जतसे ।।
सहसा यमुना जळ आदळता । मग काळय येत असे वरता ।
विषजाळ मुखातुनि टाकितसे । अति कोप धरूनि हरीस डसे ।।

कृष्णकौतुक या एकाच काव्यामुळे पंडितकवींच्या मेळाव्यात रघुनाथ शेष मानाच्या स्थानी विराजमान झाला आहे. [रघुनाथ शेषकृत कृष्णकौतुक – संपा. वि. अं. कानोले, १९६५]

रघुराजसिंह (इ. स. १८२३–१८७९) रीवाँ संस्थानचा राजा. याला प्रतिभेचे देणे पितृपरंपरेने मिळाले होते. तो १८५४ साली गादीवर बसला. त्याने बारा लग्ने केली. त्याला शिकारीचे जबरदस्त व्यसन होते. हा स्वभावाने मोठा उदार आणि रामभक्त होता. तो रोज वीस हजार नामजप करीत असे. त्याचे राज्यकारभाराकडे फारसे लक्ष नसे. काव्य आणि परमार्थ यांत तो दिवस-रात्र रंगून राही. अनेक कवी व विद्वान यांना त्याने आश्रय दिला होता. याने सुंदरशतक, पत्रिका, रुक्मिणीपरिणय, भक्तिविलास, रहस्यपंचाध्यायी, इ. सुमारे २८ ग्रंथ लिहिले आहेत. त्याच्या कवितेत शृंगार व भक्ती हे रस प्रामुख्याने आढळतात. त्याचे वर्णनकौशल्य अपूर्व होते. प्रबंध व मुक्तक अशी उभयविध रचना तो लीलेने करी. त्याच्या भक्तिपर काव्यावर सूर आणि तुलसी यांचा प्रभाव स्पष्ट दिसतो. [हिं. सा. को.]

रघुवंश एक महाकाव्य. कर्ता महाकवी कालिदास. याच्या उपलब्ध प्रतीत १९ सर्ग असून, श्लोकसंख्या १५६९ एवढी आहे. यात दिलीपापासून अग्निवर्णापर्यंत अठ्ठावीस राजांची कथा सांगितलेली आहे. या सर्व राजांमध्ये रघू हा अत्यंत दानशूर व प्रजाहितदक्ष असा राजा होऊन गेला. म्हणून या महाकाव्याला कालिदासाने रघुवंश असे नाव दिले. या महाकाव्याची संक्षिप्त कथा अशी–

इक्ष्वाकुवंशात उत्पन्न झालेला राजा दिलीप आपली राणी सुदक्षिणा हिच्यासह रथात बसून वसिष्ठमुनींच्या आश्रमाकडे जायला निघाला होता. हा आश्रम हिमालयाच्या पायथ्याशी होता. तिन्हीसांजेच्या वेळी तो आश्रमात पोचला. वसिष्ठमुनींनी दिलीपाचे स्वागत करून त्याला क्षेमकुशल विचारले. दिलीप म्हणाला, 'महाराज, तुमच्यासारखा कुलगुरू मला भाग्याने लाभल्यामुळे माझे राज्य सुस्थित आहे. एकच शल्य मनात खुपते ते हे, की मला अद्यापि पुत्ररत्नाचा लाभ झालेला नाही. हा निपुत्रिकपणाचा दोष कसा दूर होईल, ते तुम्ही मला सांगा.'

त्यावर वसिष्ठाने समाधी लावून अंतर्ज्ञानाने राजाच्या अनपत्यतेचे कारण शोधून काढले. तो म्हणाला. 'स्वर्गातली कामधेनू सुरभी हिचा तू एकदा अपमान केलास. त्यामुळे तिने आपल्या संततीची सेवा केल्यावाचून तुला संतती होणार नाही, असा तुला शाप दिला आहे. तेव्हा तू आता असे कर. तिची मुलगी नंदिनी माझ्या आश्रमात आहे. तिची तुम्ही दोघे सेवा करा. ती प्रसन्न झाल्यावर तुम्हांला पुत्रप्राप्ती होईल.'

मग राजा-राणी दोघेही नंदिनीच्या सेवेला लागली. २१व्या दिवशी नंदिनी निबिड अरण्यातल्या एका गुहेत शिरली. एवढ्यात एका सिंहाने तिच्यावर झडप घातली. दिलीपाने सिंहाला मारण्यासाठी तात्काळ धनुष्याला बाण जोडला. पण एकाएकी त्याचा हात स्तंभित झाला. लगेच तो सिंह मनुष्यवाणीने बोलला. 'मी शिवाचा सेवक आहे. आता मी या गाईला खाणार.' त्यावर दिलीप म्हणाला. 'ही माझ्या गुरूची यज्ञधेनू आहे. तेव्हा तू हिला सोड आणि मला खा.' सिंह हसून म्हणाला. 'राजा तू वेडाच आहेस. अरे एवढे तुझे राज्य! असे तुझे तारुण्य! ते तू या सामान्य गायीसाठी वाया घालवणार?' त्यावर दिलीप म्हणाला, 'रक्षणीयांचे रक्षण करणे क्षत्रियाचे कर्तव्य. त्याचे जर पालन होत नसेल, तर मला राज्य किंवा प्राण ठेवून काय करायचे आहे? माझ्या जड शरीरापेक्षा माझे कीर्तिरूप शरीर मला अधिक प्रिय आहे. म्हणून तू मला खा आणि गायीला सोड.'

असे म्हणून दिलीप सिंहापुढे आडवा पडला. तेव्हा नंदिनी त्याला म्हणाली, 'हे राजर्षे! ऊठ. मी माया रचून तुझी परीक्षा पाहिली. आता मी तुजवर प्रसन्न आहे. माझ्या वराने तुला पुत्र होईल.' दिलीपाचे कार्य झाले. तो वसिष्ठमुनींचा निरोप घेऊन राज्यात परत आला.

योग्य वेळी त्याला पुत्र झाला. त्याने त्याचे नाव रघू ठेवले. तो मोठा झाला व शस्त्रविद्येतही प्रवीण झाला. पुढे दिलीपाने नव्याण्णव अश्वमेध केले. शंभराव्या यज्ञाच्या वेळी इंद्राने यज्ञाचा घोडा पळविला. त्या संदर्भात इंद्र व रघू यांचे युद्ध झाले. रघूचे धैर्य पाहून इंद्र त्याच्यावर प्रसन्न झाला. तो म्हणाला. 'शंभर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यज्ञ केल्याने मनुष्य शतक्रतू होतो व त्याला इंद्रपद मिळते. मी ही गोष्ट घडू देणार नाही. तुझ्या पित्याचा हा यज्ञ पुरा होणार नाही. फक्त त्या यज्ञाचे फल तेवढे त्याला मिळेल.'

योग्य वेळी दिलीपाने रघूला राज्याभिषेक केला व वानप्रस्थ स्वीकारला. रघूने राज्य उत्तम चालवले. नंतर दिग्विजयही केला. पुढे विश्वजित नावाचा यज्ञ करून दिग्विजयात मिळालेली सर्व संपत्ती त्याने ब्राह्मणांना दक्षिणा म्हणून देऊन टाकली.

थोडयाच कालाने कौत्स नावाचा एक स्नातक रघूकडे आला. गुरुदक्षिणा देण्यासाठी त्याला चौदा कोटी सुवर्णमुद्रा रघूकडून हव्या होत्या. पण रघू तर पूर्ण निष्कांचन झाला होता. तेव्हा त्याने कुबेरावर स्वारी करण्याचे ठरविले. कुबेर रघूला भ्याला. त्याने रघूच्या राज्यात सुवर्णमुद्रांचा पाऊस पाडला. रघूने ते सारे द्रव्य कौत्साला देऊन टाकले.

कौत्साच्या आशीर्वादाने रघूला अज नावाचा पुत्र झाला. ज्योतीवर ज्योत लागावी, त्याप्रमाणे अजाने रघूचे सर्व गुण उचलले. तो तारुण्यात आल्यावर त्याला भोजाने मांडलेल्या इंदुमतीच्या स्वयंवराचे निमंत्रण मिळाले. अज विदर्भाकडे ससैन्य जायला निघाला. नर्मदेच्या तीरावर त्याचा मुक्काम पडला असता प्रवाहातून पोहत एक हत्ती आपल्याकडे येत आहे, असे अजाला दिसले. अजाने एक बाण त्याच्या मस्तकावर मारला. त्यासरशी त्याचे गजरूप जाऊन त्यातून एक गंधर्व प्रकट झाला. मतंगऋषीच्या शापामुळे त्याला गजयोनी प्राप्त झाली होती. तिच्यातून मुक्त केल्याबद्दल गंधर्वाने अजाला संमोहन नावाचे अस्त्र दिले.

तिथून अज विदर्भात गेला. स्वयंवरात अनेक राजपुत्रांना डावलून इंदुमतीने अजाच्या गळयात माळ घातली. अज इंदुमतीला घेऊन अयोध्येकडे निघाला असता, इंदुमतीने ज्या राजपुत्रांना नाकारले होते, ते सर्व राजपुत्र एकवटून अजावर तुटून पडले. घनघोर युद्ध झाले. या युद्धात अजाने गंधर्वाकडून मिळालेल्या संमोहन अस्त्राचा प्रयोग करून सर्वांना निश्चेष्ट पाडले. मग तो इंदुमतीला घेऊन अयोध्येत पोचला.

नंतर रघूने राज्याची सर्व सूत्रे अजाच्या हवाली केली. अजाला इंदुमतीच्या पोटी दशरथ नावाचा पुत्र झाला. पुढे एके दिवशी अज इंदुमतीसह क्रीडा करण्यासाठी एका उद्यानात गेला. त्याच वेळी नारदमुनी आकाशमार्गाने गोकर्णक्षेत्राकडे निघाला होता. त्या आकाशयात्रेत नारदाच्या वीणेवरची पुष्पमाला खाली गळून इंदुमतीच्या हृदयावर पडली. तेवढे निमित्त झाले आणि इंदुमतीचा प्राण निघून गेला. लाडक्या राणीचा असा अकस्मात अंत झालेला पाहून अज विलाप करू लागला. तिची अंत्यक्रिया करून तो नगरात आला; पण त्याचे चित्त कशातच रमेना. अजेरीस वामदेव त्याच्या सांत्वनासाठी तिथे आला. इंदुमती ही तृणबिंदूने शापलेली देवांगना होती व ती नारदाच्या माळेतील स्वर्गीय पुष्पांच्या स्पर्शाने शापमुक्त होऊन परत देवलोकी गेली, असे वामदेवाने अजाला सांगितले. पण अजावर त्या सांत्वनाचा परिणाम झाला नाही. त्याने दशरथाला राज्यावर बसविले आणि प्रायोपवेशन करून इहलोक सोडला.

दशरथाने राज्य चांगल्याप्रकारे चालवले. पण त्यालाही बराच काल पुत्रसंतान नसल्यामुळे तो दुःखीकष्टी होता. एके दिवशी तो रानात शिकारीला गेला असता त्याने तमसा नदीवर पाणी भरायला आलेल्या श्रावण नावाच्या ऋषिकुमाराला नजर चुकीने मारले. श्रावणाच्या वृद्ध बापाने दशरथाला शाप दिला, की 'आमच्याप्रमाणेच तूही पुत्रशोकाने मरशील.' हा शाप दशरथाला सदैव जाळीत राहिला.

याच वेळी रावण नावाच्या दैत्याने देवांना भयभीत करून सोडले. ते विष्णूला शरण गेले. विष्णू त्यांना म्हणाला, 'रावणाला देवांपासून मृत्यू नाही. म्हणून मी दशरथाच्या पोटी जन्म घेऊन त्याचा वध करीन.'

याच सुमारास दशरथाने मुलगा व्हावा म्हणून पुत्रकामेष्टी यज्ञ केला. यज्ञाच्या शेवटी एक दिव्य पुरुष अग्नीतून प्रकट झाला आणि त्याने दशरथाला पायसाने भरलेले पात्र दिले. त्या पायसाच्या सेवनाने कौसल्येला राम, कैकयीला भरत व सुमित्रेला लक्ष्मण व शत्रुघ्न असे दोन, मिळून चार पुत्र झाले. त्यांनी दशरथाला परम संतोष दिला. या चौघांत राम हा विशेष पराक्रमी व तेजस्वी होता.

एके दिवशी विश्वामित्राने दशरथाकडे येऊन राम–लक्ष्मणांची मागणी केली. तो म्हणाला, 'माझ्या यज्ञात राक्षस विघ्ने आणीत आहेत. तेव्हा यज्ञरक्षणासाठी तू राम–लक्ष्मणांना माझ्या बरोबर पाठव.' दशरथाने त्या दोघांना विश्वामित्राबरोबर पाठवले. त्या प्रवासात ताडका नावाची राक्षसी वावटळीसारखी रामावर धावून आली. रामाने एकाच बाणात तिला ठार केले. ती जमिनीवर कोसळत असताना ते सबंध अरण्य हादरले; त्याच बरोबर रावणाचे सिंहासनही हादरले.

नंतर राम-लक्ष्मणांनी मारीच, सुबाहू, इ. राक्षसप्रमुखांना ठार केले, उरलेले राक्षससैन्य पळवून लावले व अशा प्रकारे विश्वामित्राच्या यज्ञाची विघ्ने दूर केली. नंतर विश्वामित्र राम-लक्ष्मणांना घेऊन मिथिला नगरीकडे निघाला. तिथे जनकाने यज्ञ आरंभिला होता. वाटेत शिळा होऊन पडलेल्या अहिल्येचा रामाने आपल्या पदरजाने उद्धार केला. मिथिलेत गेल्यावर विश्वामित्राने जनकाकडे असलेले परशुरामाचे अवजड धनुष्य रामाला दाखवण्यास सांगितले. ते धनुष्य जो कोणी उचलील,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याला आपली कन्या सीता देण्याचा पण जनकाने केला होता. सीतेच्या प्राप्तीसाठी अनेक राजपुत्र ते धनुष्य उचलायला आले होते व फजीत होऊन परत गेले होते. जनकाने ते धनुष्य रामाला दाखवीत असताना मनात म्हटले, की हा कोवळा कुमार हे धनुष्य काय उचलणार ! पण रामाने ते धनुष्य उचलले; एवढेच नव्हे, तर त्याच्यावर दोरी चढविताना ते मोडूनही टाकले. जनकाला आनंद झाला. त्याने सीता रामाला अर्पण केली.

लग्नसोहळा पार पडल्यावर राम-सीतेची वरात अयोध्येला निघाली. वाटेत अचानक परशुराम रामापुढे येऊन उभा ठाकला. शिवाने आपल्याला दिलेले आणि आपण जनकाकडे ठेवलेले धनुष्य रामाने मोडले याचा त्याला राग आला होता. तो रामाला रागावून म्हणाला, 'तू शिवधनुष्य मोडलेस, यात मोठासा पराक्रम नाही. हे माझ्याकडचे धनुष्य घे आणि याला बाण लाव. एवढे केलेस तरी तू मला जिंकलेस असे मी समजेन.' रामाने ती गोष्ट त्याच क्षणी केली. मग तो म्हणाला, 'मी धनुष्याला जोडलेला बाण कधीच परत घेत नसतो. तेव्हा आता मला सांग, की या बाणाने तुझी गती म्हणजेच गमनशक्ती नष्ट करू, का तुझा स्वर्गमार्ग बंद करू? त्यावर परशुराम म्हणाला 'हे रामा, तू साक्षात आदिपुरुषच अवतार घेऊन पृथ्वीवर आला आहेस, हे मी जाणतो. मला स्वर्ग नको आहे. तेव्हा तो मार्ग बंद केला तरी चालेल. तीर्थयात्रेसाठी माझी गती मात्र कायम ठेव.' रामाने तसे केले. मग परशुरामाचे पाय धरून त्याच्याकडे घडलेल्या उपमर्दाबद्दल क्षमा मागितली. परशुराम निघून गेल्यावर वरात सुखरूप अयोध्येला पोचली.

काही कालाने आपण वृद्ध झाल्याचे जाणून दशरथाने रामाला राज्याभिषेक करायचे ठरविले. पण त्या कामी कैकयी कृष्णसर्पिणीप्रमाणे आडवी आली. दशरथाकडे पूर्वी ठेव म्हणून ठेवलेले दोन वर तिने या वेळी मागून घेतले. एका वराने रामाला चौदा वर्षे वनवास व दुसऱ्या वराने भरताला राज्याभिषेक, अशा दोन गोष्टी तिने मागितल्या. दशरथाचा निरुपाय झाला. रामाने पित्याचे वचन खरे करण्यासाठी वल्कले परिधान करून सीता व लक्ष्मण यांच्यासह वनवास पत्करला. या आघाताने दशरथाला लौकरच मृत्यू आला. भरत त्या वेळी मातुलगृही होता. त्याला अयोध्येत आणून राज्यावर बसविण्याचे कैकयीने ठरविले; पण भरताला ते आवडले नाही. रामाच्या मागे धावत जाऊन चित्रकूट पर्वतावर त्याने रामाची भेट घेतली आणि रामाला तो राज्य करण्यासाठी परत बोलावू लागला. पण ती गोष्ट नाकारून त्याने भरतालाच राज्य चालवायला सांगितले. भरताने अयोध्येच्या सिंहासनावर रामाच्या पादुका स्थापल्या आणि तो जवळच्या नंदिग्रामात राहून विरक्तपणे राज्य चालवू लागला. नंतर राम अनेक मुनींचे पुण्यपावन आश्रम पाहत दक्षिणेकडे निघाला.

एका आश्रमात असता रावणाने सीतेचे अपहरण केले. त्यामुळे रामाला फार दुःख झाले. नंतर त्याने सुग्रीवाशी सख्य करून हनुमंताला सीतेच्या शोधार्थ पाठविले. लंकेत त्याला सीता दिसली. तिला आश्वासन देऊन आणि लंका दग्ध करून मारुती परत रामाकडे आला. नंतर रामाने सुग्रीवाच्या आधिपत्याखाली वानरसैन्य जमा केले. समुद्रावर सेतू बांधला. लंकेत प्रवेश केला. घनघोर युद्ध करून रावणाचा वध केला. सीतेने अग्निदिव्य केल्यावर रामाने सीतेचा स्वीकार केला. लंकेचे राज्य रामाने बिभीषणाला दिले. मग रावणाकडच्या पुष्पक विमानात बसून राम सीतेसह अयोध्येच्या उपवनात उतरला. तिथे भरताची व त्याची भेट झाली. त्याने कौसल्या व सुमित्रा या मातांचे दर्शन घेतले. नंतर तो अयोध्येत प्रवेशला. तिथे कैकयीच्या मनाचा संकोच दूर करून त्याने तिला सुख दिले. तो प्रजेचे पुत्रवत पालन करू लागला.

थोडचा कालाने सीतेला डोहाळे लागले. रामाने तिची इच्छा विचारताच ती म्हणाली, 'पुन्हा एकदा भागीरथीच्या तपोवनात राहावे असे मला वाटते.' रामाने तिची इच्छा पूर्ण करण्याचे वचन दिले.

एवढचात रामाचे गुप्त हेर रामाकडे येऊन म्हणाले, 'प्रभो, राक्षसांच्या घरी राहिलेल्या सीतेच्या चारित्र्याबद्दल पौरजनांना शंका आहे.' ते ऐकून रामाला मोठा धक्का बसला. सीतेने अग्निदिव्य करून आपली शुद्धता सिद्ध केली होती. तथापि प्रजेच्या मनात शंका असल्यास राजा या नात्याने सीतेला जवळ ठेवणे योग्य नव्हे, असा विचार करून त्याने तिचा त्याग करण्याचे ठरविले आणि लक्ष्मणाच्या हाती तिची वनात पाठवणी केली. गंगेच्या पलिकडच्या वनात गेल्यावर लक्ष्मणाने रामाचा हेतू तिला सांगितला. सीतेला परम दुःख झाले. पण तिने रामाला फारसा दोष न देता स्वतःच्या दैवालाच दोष दिला. ती शेवटी एवढेच म्हणाली, 'पत्नी म्हणून नसले तरी एक प्रजाजन म्हणून रामाने माझ्याकडे लक्ष ठेवावे.'

लक्ष्मण निघून गेल्यावर सीतेला रडू कोसळले. एवढचात त्याच वनात राहणारा वाल्मीकिमुनी तिथे आला. त्याने सीतेचे सांत्वन करून तिला आपल्या आश्रमात आणले. तिथे ती तपस्विनीप्रमाणे वल्कले परिधान करून व्रताचरणात दिवस घालवू लागली. तिथे तिला वार्ता समजली, की राम यज्ञ करीत आहे पण त्यासाठी दुसरे लग्न न करता आपलीच प्रतिमा पत्नी म्हणून त्याने जवळ ठेवली आहे, हेही तिला समजले. तेवढचाने तिला दुःखात सुख वाटले.

पुढे लवण नावाच्या राक्षसाचे पारिपत्य करण्यासाठी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामाच्या आज्ञेने शत्रुघ्न यमुनातीराकडे निघाला. वाटेत त्याला वाल्मीकींचा आश्रम लागला. तिथे तो वसतीस राहिला. त्याच रात्री सीता प्रसूत होऊन तिला जुळे मुलगे झाले. ते वृत्त ऐकून शत्रुघ्नाला आनंद झाला. पुढे त्याने लवणासुराला मारून यमुनेच्या तीरावर मथुरा नावाची नगरी वसविली.

वाल्मीकीने सीतेच्या मुलांची कुश आणि लव अशी नावे ठेवली. त्याने त्यांच्यावर यथोचित सर्व संस्कारही केले. त्यांना वेद तर शिकविलेच; शिवाय स्वरचित रामायणही त्यांच्याकडून पाठ करून घेतले.

शत्रुघ्नाला शत्रुघाती व सुबाहू असे दोन मुलगे होते. त्यांना त्याने मथुरा व विदिशा या दोन नगरींच्या राज्यावर बसविले आणि तो अयोध्येस परत आला. रामाला त्याने आपल्या मोहिमेचा सारा वृत्तांत सांगितला; पण सीता प्रसूत होऊन तिला दोन मुलगे झाल्याचे मात्र सांगितले नाही.

पुढे रामाने शंबूक नावाच्या शूद्र तपस्व्याचा वध केला. कारण शूद्राला तप करण्याचा अधिकार नव्हता. मग रामाने अश्वमेघ यज्ञाची दीक्षा घेतली. त्या यज्ञासाठी राजे, राक्षस, वानर व व महर्षी एकत्र जमले. त्या यज्ञात काव्यगायन करण्यासाठी विश्वामित्राने कुश आणि लव या दोन रामपुत्रांना तिथे पाठविले. त्यांचे रामायणगायन लोकांना आणि रामालाही फार आवडले. विशेष म्हणजे रामाच्या आणि कुश-लवांच्या मुख मुद्रेतले साम्य लोकांना आश्चर्यजनक वाटले.

'तुम्ही गाइलेले काव्य कोणाचे,' असे रामाने विचारताच मुलांनी वाल्मीकीचे नाव सांगितले. लगेच राम वाल्मीकीकडे गेला आणि त्याच्या काव्यकर्तृत्वाने प्रभावित होऊन त्याने आपले राज्य वाल्मीकीस अर्पण केले. त्या प्रसंगी वाल्मीकीने कुश-लवांचा वृत्तांत त्याला सांगितला व 'पतिव्रता जानकीचा तू स्वीकार कर' असेही म्हटले. त्यावर राम म्हणाला, 'सीता शुद्ध आहे हे मला पूर्ण ठाऊक आहे. तिने अग्निदिव्य करून ती गोष्ट सिद्ध केली आहे. पण प्रजेचा त्या गोष्टीवर विश्वास बसत नाही. तेव्हा तिने पुन्हा एकदा प्रजाजनांसमक्ष आपल्या शुध्दतेची खात्री पटवावी, म्हणजे मी तिचा पुत्रांसह स्वीकार करीन.'

वाल्मीकीने ते मान्य केले. मग सीतेला सभेपुढे आणले. ती आपल्या शुध्द चारित्र्याची खात्री पटविण्यास सिद्ध झाली. तिने पृथ्वीला उद्देशून म्हटले, "हे धरित्रीमाते! वाणी, मन व कर्म या तीन्ही गोष्टींनी मी माझ्या पतीची लवमात्रसुद्धा प्रतारणा केली नसेल, तर तू मला आपल्या पोटात घे." त्यासरशी जमीन दुभंग होऊन त्यातून पृथ्वीची स्त्रीमूर्ती प्रकट झाली. तिने सीतेला आपल्या मांडीवर बसविले आणि राम नको नको म्हणत असता ती सीतेसह पाताळात गुप्त झाली. त्यानंतर राम सीता-वियोगाच्या दुःखामुळे विरक्तपणे कालक्रमणा करू लागला.

सिंधुदेशात गंधर्वांनी बंडाळी माजवली असता भरताने त्यांचा पराभव केला व तिथल्या तक्षशिला व पुष्कलावती या दोन राजधान्यांमध्ये आपल्या तक्ष व पुष्कल या मुलांना सुस्थिर केले. लक्ष्मणाने अंगद व चित्रकेतू या आपल्या दोन पुत्रांना कारापथ देशाचे राज्य दिले. रामाने आपले पुत्र कुश व लव यांना अनुक्रमे कुशावती व शरावती या दोन राजधान्यांमध्ये प्रतिष्ठित केले. एवढे करून राम आपल्या निर्वाणाची वाट पाहत राहिला.

पुढे रामाच्या कुटुंबातील माणसे हळूहळू महाप्रस्थानाला जाऊ लागली. लक्ष्मणाने शरयूच्या तीरी योगमार्गाने देहत्याग केला. त्यानंतर राम आपल्या भरत व शत्रुघ्न या दोन भावांसह अग्नी हातात घेऊन उत्तरेकडे जाऊ लागला. राम महाप्रस्थानाला निघाला आहे हे जाणून अयोध्येतले लोकही त्याच्या मागून जाऊ लागले. त्याने प्रथम अयोध्येतल्या लोकांना, वानरांना आणि राक्षसांना शरयूच्या तीरी शिडी उभी करून स्वर्गाला पाठविले. नंतर आपले अवतारकार्य पुरे झाले, असे समजून राम आत्मस्वरूपात विलीन झाला. राम निर्वाणाला गेल्यावर अयोध्या भकास झाली.

राजपुत्र कुश कुशावतीमध्ये राज्य करीत असता मध्यरात्री एक स्त्री त्याच्या शयनमंदिरात आली. दारे बंद असूनही ही बाई आत कशी आली, याचा कुशाला अचंबा वाटला. त्याने तिला आत येण्याचे कारण विचारले आणि पुढे असेही म्हटले, की 'रघुवंशातील राजांचे मन परस्त्रीस्पर्शाला विमुख असते हे तुला माहीत आहे ना?' त्यावर ती स्त्री म्हणाली —

'मला सर्व माहीत आहे. राजा, मी अयोध्येची अधिदेवता आहे. तुझ्या पित्याने निजधामाला जाताना आपल्याबरोबर अयोध्यावासी जनांनाही नेले. त्यामुळे ती एके काळची सुंदर आणि वैभवसंपन्न नगरी आज ओसाड पडली आहे. तेव्हा तू कुशावती सोड आणि अयोध्येला परत ये.' कुशाने तिचे म्हणणे मान्य करताच ती अंतर्धान पावली.

पुढे कुश लवकरच अयोध्येला आला. त्यामुळे अयोध्येचे वैभव पुन्हा वाढीस लागले. एके दिवशी तो आपल्या स्त्रियांसह शरयूत जलक्रीडा करीत असताना त्याच्या दंडातला रत्नजडित अलंकार पाण्यात पडला. थोड्या वेळाने ते त्याच्या लक्षात आले. तो अलंकार अगस्त्याने रामाला दिला होता व रामाकडून कुशाकडे आला होता. त्यामुळे कुश त्या अलंकाराला पूज्य समजत असे. त्याने पाणबुड्या बोलावून त्या अलंकाराचा शोध सुरू केला. एवढ्यात एका पाणबुड्याने वर येऊन कुशाला सांगितले, की शरयूच्या डोहात राहणाऱ्या कुमुद नावाच्या नागाने तुमचा दागिना चोरला आहे.' ते ऐकून कुश खवळला. त्याने त्या नागा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर फेकण्यासाठी गरुडास्त्र योजले. ते समजताच नाग भयभीत झाला आणि तो एका तरुण मुलीला संगे घेऊन वर आला. तो हात जोडून कुशाला म्हणाला. 'अस्त्र सोडू नको. ही माझी वहीण कुमुद्वती चेंडू खेळत असता हा दागिना तिच्या हाती लागला. तो तू परत घे. आणि त्याचबरोबर हिचाही स्वीकार कर.' मग कुशाचे कुमद्वतीशी लग्न झाले.

त्या दंपतीला अतिथी नावाचा पुत्र झाला. कुशाने त्याला विद्या-कला शिकवल्या व अनेक राजकन्यांशी त्याचे विवाह घडवून आणले. काही कालाने दुर्जय नावाच्या दैत्याला मारण्यासाठी कुश इंद्राच्या मदतीला गेला. त्या युद्धात त्याने दुजयाला मारले; पण तो स्वतःही प्राणास मुकला. पाठोपाठ कुमुद्वती सती गेली.

त्यानंतर कुशपुत्र अतिथीला राज्याभिषेक झाला. त्याने बाह्य शत्रूंबरोबरच अंतःशत्रूही जिंकले. त्याच्या राज्यात राज्यलक्ष्मी चिरकाल राहिली. त्याचे राज्य सकलैश्वर्यसंपन्न झाले. निषधाच्या अर्थपती राजाची कन्या ही अतिथीची राणी होती. तिच्या पोटी त्याला निषध नावाचा पुत्र झाला. तिथून पुढे नल, नभस, पुंडरीक, क्षेमधन्वा, देवानीक, अहीनगू, पारियात्र, शिल, उन्नाभ वज्रनाभ, शंखण, व्युषिताश्व, विश्वसह, हिरण्यनाभ, कौशल्य, ब्रह्मिष्ठ, पुत्र, पुष्य, व ध्रुवसंधी अशी ही वंशावळ चालत आली. ध्रुवसंधी सिंहाची शिकार करताना मेला. मग मंत्रिमंडळाने त्याचा पुत्र सुदर्शन याला राज्यभिषेक केला.

हा सुदर्शन पुढे शस्त्र व शास्त्र यांत प्रवीण झाला. अनेक राजकन्यांशी त्याने लग्ने केली. आपल्या अनेक पुत्रांपैकी अग्निवर्ण नावाच्या पुत्राला गादीवर बसवून सुदशन वार्धक्यात वानप्रस्थाला गेला.

हा अग्निवर्ण अतिदिलासी होता. त्याने सर्व राज्यकारभार मंत्रिजनांवर सोपवला. तो सदैव तरुणींच्या घोळक्यात रमलेला असे, नाचरंगात दंग असे. प्रजेने दर्शन मागितले तर मोठ्या प्रयासाने तो आपल्या विलासमंदिराच्या खिडकीतून आपला पाय बाहेर काढून 'याचे दर्शन घ्या' म्हणे. अग्निवर्ण वादनविद्येत प्रवीण होता. नर्तकींचे नृत्य सुरू झाले की, तो स्वतः त्याला मृदंगाची साथ करी. इतर वादकांच्या चुकाही दाखवी. पुढे अतिरिक्त विषयसेवनाने त्याला क्षय लागला. त्यातच त्याचा अंत झाला. त्याच्या मंत्र्यांनी त्याचा गुप्तपणे वाड्याजवळच्या उद्यानातच अग्निसंस्कार केला.

अग्निवर्णाच्या मरणसमयी त्याची एक राणी गर्भवती होती. तेव्हा मंत्र्यांनी तिलाच गादीवर बसवले आणि सर्वजण आपला नवा राजा केव्हा जन्माला येतो याची वाट पाहत राहिले.

काव्यपरामर्श – हे महाकाव्य सर्व महाकाव्यवाङ्मयात पहिल्या दर्जाचे आहे. ते साध्या, सरळ व प्रासादिक भाषेत लिहिले गेल्यामुळे आबालवृद्ध संस्कृतरसिकांना अत्यंत प्रिय झाले आहे. त्याची भव्योदात्तता हेही त्याच्या रसिकप्रियतेचे मोठे कारण आहे. रघुवंश आणि कुमारसंभव ही दोन्ही कालिदासाचीच महाकाव्ये. पण कुमारसंभवापेक्षा रघुवंशामध्ये कवीची परिणतप्रज्ञता आणि वैदर्भी लेखनशैली सर्वांगीं आणि सर्वार्थी बहरून आली आहे. कालिदास रससिद्ध झालेला दिसतो, तो मुख्यत्वे शाकुंतल आणि रघुवंश यांतच.

कुमारसंभव आणि मेघदूत ही काव्ये कवीने रघुवंशरचनेपूर्वी लिहिली, हे आता बहुतेक विद्वान मान्य करतात. ही दोन्ही काव्ये प्रमाणबद्ध व आटोपशीर आहेत. कुमारसंभवाचा एकच नायक आहे आणि तो म्हणजे कैलासनाथ शंकर. कवीला त्याच्या चरित्रातील विशिष्ट प्रसंगांचेच वर्णन करायचे होते. मेघदूतातही एकाच विरही नायकाची मनोवस्था त्याला विशद करायची होती. पण रघुवंशाचे तसे नाही. त्यात बरेच नायक असून, ते कमीअधिक योग्यतेचे आहेत. त्यामुळे यात प्रमाणबद्धतेला आणि एकसूत्रीपणाला अवसरच नव्हता. तथापि कवीने या सर्व राजांचे मणी एका सूत्रात गुंफून, त्यांत एकसंघपणा आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

कुमारसंभवाच्या तुलनेने रघुवंशाचे आगळेपण दाखवायचे झाल्यास कुमारसंभवात अद्‌भुताचा अंश अधिक आहे. त्यातली सर्व पात्रे दैवी असून, कवीने त्यांच्यावर मानुषधर्माचा आरोप करून त्यांना भूतलावर आणले आहे. याउलट रघुवंशातील सर्व पात्रे ही माणसे आहेत. मात्र त्यांच्यांत दैवी अंश प्रभावी असल्यामुळे ती जणू दिव्य अशा वरच्या लोकात वावरत आहेत, असा भास होता. निराळ्या शब्दांत सांगायचे झाल्यास कुमारसंभवात स्वर्ग पृथ्वीकडे कललेला दिसतो, तर रघुवंशात पृथ्वीच स्वर्गाच्या रोखाने उंचावत चाललेली आढळते. कुमारसंभवातील देवदेवता मानवी विचार – विकार प्रकट करतात; तर रघुवंशातील वर्ण्य व्यक्तींची मने स्वर्गीय उदात्ततेने विनटली आहेत. यांतील दिलीप हा भक्तिमान, रघू दानशूर, अज प्रेमळ व दशरथ राजगुणसंपन्न आहे. रामाच्या स्वभावात तर या सर्वच दैवी गुणांचा समुच्चय आहे. पण रामानंतर एक दोन पिढ्या वगळल्यास त्या वंशामधल्या राजांमध्ये दैवी गुणांचा ऱ्हास झालेला दिसतो. शेवटचा अग्निवर्ण राजा तर कमालीचा विषयासक्त निघाला. त्याने आपल्या पूर्वजांचे धवल यश कलंकित केले. प्रजेकडे तर त्याने पूर्ण दुर्लक्ष केले. रघू आणि अग्निवर्ण ही दोन टोके आहेत. कवीने त्या दोघांचे चरित्र व दुश्चरित्र सारख्याच समरसतेने वर्णिले असले, तरी त्याचा आदर्श कोणता होता, हे कळायला अडचण पडत नाही. डॉ. के. ना. वाटवे लिहितात–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

" त्याग हा राजधर्माचा प्राण होय, या प्रमुख कल्पनेप्रमाणे त्याने आपले बरेचसे राजे त्यागी दाखविले आहेत. दिलीपाने क्षात्रधर्माच्या इभ्रतीसाठी स्वदेहाचा, रघूने यज्ञासाठी सर्वस्वाचा, अजाने प्रिय पत्नीसाठी स्वपुत्राचा, रामचंद्राने प्रजानुरंजनासाठी सीतेसारख्या साध्वीचा व कुशाने इंद्रसाहाय्यार्थ स्वप्राणांचा त्याग केला. हे सर्वच त्यागप्रसंग उदात्त असून, आर्यांच्या त्यागप्रधान संस्कृतीचे पुरे निदर्शक आहेत. "

कालिदास ज्या गुप्तसाम्राज्याच्या कालात जन्मला आणि वाढला, त्या कालाला भारतीय इतिहासातले सुवर्णयुग म्हणतात. गुप्तराजे दिग्विजय करीत होते. श्रेष्ठी परदेशात व्यापार करून अमाप संपत्ती भारतात आणीत होते. सर्व प्रजा सुराज्याची फळे चाखीत होती. सर्वत्र शांतता होती. विद्या, कला, वाङ्मय यांचा उत्कर्ष होत होता. वैभवाधिष्ठित विलास सर्वत्र दिसून येत होता. सगळीकडे सुख-स्वास्थ्य नांदत होते. या सर्व परिस्थितीचे प्रतिबिंब रघुवंशात स्पष्टपणे उमटले आहे. दिलीप, रघू, राम यांच्या वर्णनाच्या द्वारे कवीने जणू तत्कालीन राजांना कांतासंमित उपदेश करून त्यांच्या पुढे भव्योत्तुंग आदर्शच निर्माण करून ठेवला आहे.

याच्याही पुढे जाऊन सांगायचे तर रघुवंश म्हणजे श्रुतिस्मृतिपुराणोक्त आर्यधर्माचा काव्यमय आविष्कार आहे. माणसाला असलेली तीन ऋणे, त्याचे सोळा संस्कार, चार पुरुषार्थ, वर्णाश्रमव्यवस्था, श्रौत याग, तप, व्रत, त्याग व भोग या सर्व गोष्टी कवीने काव्यातल्या अनेक राजर्षींच्या आचरणातून अभिव्यक्त केल्या आहेत. आर्यसंस्कृतीचे प्रभावशाली निदर्शन करण्याच्या कामी कालिदासाची बरोबरी करू शकेल असा दुसरा महाकवी सापडणे कठीण आहे. म्हणजे या बाबतीतही ' अनामिका सार्थवती ' ठरली आहे.

रघुवंश हे अनेक रसांचे मनोहारी संम्मेलन आहे. सुदक्षिणेचे गर्भारपण (सर्ग ३), इंदुमतीचे स्वयंवर (सर्ग ६), वसंतवर्णन (सर्ग ९), इ. ठिकाणीं शृंगार रस संयतपणे प्रकट झाला आहे. रघू व इंद्र यांचे द्वंद्वयुद्ध (सर्ग ३), रघूचा दिग्विजय (सर्ग ४), राम-परशुरामप्रसंग (सर्ग ११), राम-रावणयुद्ध (सर्ग १२), इ. ठिकाणीं वीर रसाचा प्रकर्ष आहे. अजविलाप (सर्ग ८), सीतात्याग (सर्ग १४), सीतेचे भूगर्भात जाणे (सर्ग १५), रामनिर्याण (सर्ग १५), इ. ठिकाणीं करुण रसाचा प्रवाह खळाळला आहे. दिलीपाची सत्त्वपरीक्षा (सर्ग ५), ताडकेचे स्वरूपवर्णन (सर्ग ११), इ. ठिकाणीं अद्भुताचा आविष्कार झाला आहे. वसिष्ठाश्रमवर्णनात (सर्ग २) व रघूच्या वानप्रस्थात (सर्ग ८) शांत रसाला उठाव मिळाला आहे. कवीची वृत्ती मुख्यत्वे शृंगाराकडे झुकणारी असल्यामुळे अनेक प्रसंगांतून आणि उपमा – दृष्टांतांतून शृंगार रसाचे तुषार त्याने सर्वत्र शिंपडून ठेवले आहेत.

खरे म्हणजे काव्यात संवादचातुर्य दाखवायला विशेषसा अवसर नसतो. त्यासाठीं गद्यरचनाच उपयुक्त ठरते. पण कालिदासाने काव्यातही काही बहारदार संवाद घातले आहेत. वसिष्ठ-दिलीप, दिलीप-सिंह, रघु–कौत्स, राम-परशुराम, हे कवीचे संवाद विशेष उल्लेखनीय असून, त्या त्या संवादांत त्या त्या व्यक्तींच्या स्वभावछटा मनोहरपणे व्यक्त झाल्या आहेत.

रघुवंशाच्या १९ व्या सर्गाचा शेवट आकस्मिकपणे व शोकान्त झाला आहे. कालिदासाची प्रकृती शोकान्त समाप्तीला अनुकूल नाही. त्याला आपली कृती सुखान्त व्हावी असेच वाटते. त्यावरून रघुवंश हे अपुरे काव्य आहे, असे काहींचे म्हणणे आहे. प्रस्तुत काव्याची २५ सर्ग असलेली एक प्रत उपलब्ध झाल्याचेही सांगण्यात येते. पण म. म. मिराशी कवीच्या हातून प्रस्तुत महाकाव्य अपुरे राहिल्याचे सांगतात.

रघुवंशातील ९ ते १५ या सर्गांना वाल्मीकिरामायणाचा आधार आहे, हे स्पष्ट कळते. पण इतर राजांची माहिती त्याने कुठून घेतली, याचा खात्रीलायक पुरावा सापडत नाही. डॉ. के. ना. वाटवे या संबंधात पद्म व शिव या पुराणांचा आधार सूचित करतात. पण म. म. मिराशी यांच्या मते पद्म पुराणकारानेच रघुवंशाचा आधार घेतला आहे. काही पंडितांना वायू व विष्णू या पुराणांचा आधार कवीने घेतला असावा असे वाटते. एकूण या समस्येला निश्चित उत्तर अजून मिळालेले नाही.

रघुवंशावर एकूण ३३ टीका झालेल्या आहेत. यावरून प्रस्तुत काव्याची विद्वन्मान्यता कळून येते. म. म. मिराशी यांनी आपल्या कालिदास या ग्रंथाच्या रघुवंश या प्रकरणाचा समारोप केला आहे, तो असा–

" कवीची भाषा सर्वत्र मधुर व प्रसादयुक्त आहे. ठिकठिकाणी उपमा, उत्प्रेक्षा, अर्थान्तरन्यास, इत्यादी अर्थालंकारांनी तिला नटविले आहे. कालिदासाचा शब्दालंकारांवर कोठेही फारसा भर दिसत नाही....एकंदरीत कवीने अलंकारांचा अगर वर्णनाचा अतिरेक न होऊ देण्याविषयी अत्यंत काळजी घेतली आहे. सर्वत्र वाच्यार्थापेक्षा व्यंग्यार्थावरच भर दिला आहे व वृत्तांचा यथोचित उपयोग केला आहे. "

रघुवंशातील सुभाषिते – कालिदासाने रघुवंशात अर्थान्तरन्यासांच्या रूपाने अनेक सुभाषिते यत्र तत्र पेरून ठेवली आहेत. त्यांतील काही अशी –

हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकाऽपि वा ।

अर्थ – सोने खरे आहे का हिणकस, ते त्याला अग्नीत टाकल्यावरच कळून येते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रतिबध्नाति हि श्रेयः पूज्यपूजाव्यतिक्रमः ।

अर्थ – जे पूजनीय असतील, त्यांचा आदर न केल्याने कल्याणाच्या मार्गात अडथळे येतात.

आदानं हि विसर्गाय सतां वारिमुचामिव ।

अर्थ– (सज्जनांची रीत मेघांप्रमाणे असते.) ते दुसऱ्याकडून (समुद्राकडून) जे घेतात ते फिरून (लोकांना पर्जन्यरूपाने) देण्यासाठीच असते.

पर्यायपीतस्य सुरैर्हिमांशोः कलाक्षयः श्लाघ्यतरो हि वृद्धेः ।

अर्थ– चंद्राच्या कलांमध्ये असलेले अमृत देव आळीपाळीने प्राशन करतात. पण हा आपल्या सर्वस्वाचा व्यय चंद्र परहितार्थ करीत असल्यामुळे त्याची कृष्णपक्षात दिवसेंदिवस होणारी कृशता शुक्ल पक्षात होणाऱ्या त्याच्या वृद्धीपेक्षाही अधिक प्रशंसनीय आहे.

उष्णत्वमग्न्यातपसम्प्रयोगात् शैत्यं हि यत्सा प्रकृतिर्जलस्य ।

अर्थ– शीतलता हा पाण्याचा धर्म आहे. त्याला जी (तात्पुरती) उष्णता येते, ती अग्नी आणि सूर्यताप यांच्यामुळेच होय.

विषमप्यमृतं क्वचिद् भवेदमृतं वा विषमीश्वरेच्छया ।

अर्थ– परमेश्वराच्या इच्छेने विषाचे अमृत व अमृताचे विष एखाद्या वेळी होऊ शकते.

अपथे पदमर्पयन्ति हि श्रुतवन्तोऽपि रजोनिमीलिताः ।

अर्थ – चांगले चांगले विद्वानसुद्धा अविवेकाने अंध झाले म्हणजे वाकड्या मार्गावर पाऊल टाकतात.

तेजसां हि न वयः समीक्ष्यते ।

अर्थ– तेजस्वी व्यक्तींचे वय विचारात घ्यायचे नसते.

पावकस्य महिमा स गण्यते कक्षवज्ज्वलति सागरेऽपि यः ।

अर्थ– अग्नीचा महिमा तो, की जो वाळलेल्या गवतात जळतो तसाच समुद्राच्या पाण्यातही (वडवानळाच्या रूपाने) जळतो.

निर्जितेषु तरसा तरस्विनां शत्रुषु प्रणतिरेव कीर्तये ।

अर्थ– स्वपराक्रमाने जिंकलेल्या शत्रूपुढेही विनय न सोडता वागणे हेच शूर-वीरांच्या कीर्तीला कारणीभूत होते.

अपि स्वदेहात्किमुतेन्द्रियार्थात् यशोधनानां हि यशो गरीयः ।

अर्थ– कीर्ती हेच ज्यांचे सर्वस्व अशा महाभागांना आपल्या देहापेक्षा आणि विषयोपभोगांपेक्षाही कीर्तीच अधिक मोलाची अर्थात श्रेष्ठ वाटते.

पाहा – कालिदास. [सं. का. पं.; कालिदास–म. म. मिराशी; कालिदासाची सृष्टी – प्रा. मा. दा. आळतेकर; सं. सा. इ.]

रघुवंशी राजपुतांचा एक वर्ग. या लोकांची वस्ती मध्य प्रदेश, महाराष्ट्र, इ. राज्यांत आढळते. नागपूर जिल्ह्यात यांना राघवी असे म्हणतात. आम्ही रघुराजाचे वंशज म्हणून आम्हांला रघुवंशी हे नाव मिळाले, असे यांच्यातील काहीजण सांगतात. हे मिश्र जमातीचे लोक आहेत. असे वंशशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. हे लोक व्यवसायाने शेतकरी आहेत. बोकडाला ते आपला संरक्षक देव मानतात. त्यांच्यांत स्वतःचे गुरू असतात व त्यांना धार्मिक समारंभाच्या वेळी बोलावण्यात येते.

रघुवंशी लोकांनी असगोत्री लोकांचा एक समाज बनविला असून ते आपसांत विवाहसंबंधही करतात. यांच्या विवाहविधीत हिंदुस्थानी व मराठी अशा दोन्ही पद्धतींचा समावेश झालेला आहे. यांच्यांत विधवाविवाह प्रचलित आहे. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

रजतदान तीन पल परिमाणे रुपे ब्राह्मणाला पुढील मंत्राने दान देणे, असा याचा विधी आहे–

प्रीतियंतः पितृणां च विष्णुशङ्करयोः सदा ।
शिवनेत्रोद्भवं रूप्यमतः शान्तिं प्रयच्छ मे ।।

अर्थ – पितरांची तसेच विष्णू आणि शंकर यांची प्रीती करणारे व शिवाच्या नेत्रांतून उत्पन्न झालेले असे हे रुपे आहे. म्हणून (हे रूप्यका) तू मला शांती दे. [दा. चं.]

रजवार एक जात. या लोकांची वसती बिहारमध्ये आहे. मुईया जातीपासून यांची निर्मिती झाली, असे म्हटले जाते. परंतु हे लोक आपल्याला क्षत्रिय म्हणवितात. शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. रजवार लोक छलियो नावाचे नृत्य करण्यात पटाईत आहेत. यांना मद्य चालत नाही. ते ब्राह्मणांची सेवा करतात. हे लोक पाण्यात स्वतःचे प्रतिबिंब पाहत नाहीत. हे बारा दिवस मृताशौच पाळतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

रजस्वला रजोदर्शनाच्या अवस्थेत असलेली स्त्री. कोणतीही वस्तू अशुची व अमंगळ असेल, तर तिला स्पर्श न करणे व तिच्यापासून दूर राहणे हे ओघानेच येते. यदाकदाचित संपर्क झाला, तर त्याचे परिमार्जन करणेही आवश्यक ठरते. धर्मशास्त्राने रजस्वला स्त्रीला अशुची मानले असून, तिचा संपर्क घडल्यास सचैल स्नान सांगितले आहे. रजस्वलेचा विटाळ मानण्याची चाल सर्व समाजांत दिसून येते. सुसंस्कृत शहरी समाजात मात्र ती हळूहळू नष्ट होत चालली आहे. रजोदर्शन ही पिशाचबाधा आहे, अशी असंस्कृत लोकांची समजूत असते आणि ते पिशाच आपणांस बाधा करील, या समजुतीने ते रजस्वला स्त्रीचा संपर्क कटाक्षाने टाळतात. वरिष्ठ समाजात रजस्वलेचे अशुचित्व चार दिवस मानतात, तर अनेक आदिवासींमध्ये हा अशुचित्वाचा काळ अधिकही असतो.

मात्र रजस्वला स्त्रीचे अस्पृश्यत्व फार प्राचीन नसावे, असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाटते. वस्त्रहरणाच्या प्रसंगी द्रौपदी रजस्वला असूनही तिला सभेत आणली होती. सभेत आणण्यापूर्वी वाड्यात ती सर्वत्र हिंडत होती. यावरून महाभारतकाळी रजस्वला स्त्रीला अस्पृश्य मानीत नसावे. नंतरच्या काळात रजस्वला स्त्रीला अस्पृश्य मानण्यात येऊ लागले. स्मृतिकारांनी रजस्वलेचे काही नियम सांगितले आहेत, ते असे– रजोनिवृत्तीनंतर चौथ्या दिवशी स्नान केल्यावर स्त्री भर्तृकर्माला व पाचव्या दिवशी देवपितृकर्माला शुद्ध होते, असे शंखाने सांगितले आहे. रजोदर्शन होताच कोणी पाहणार नाही, अशा ठिकाणी स्त्रीने जाऊन बसावें; स्नान व अलंकार वर्ज करावे, मौन धारण करावे, रात्री फक्त एकदा मातीच्या भांड्यात भात खावा, जमिनीवर निजावे आणि चौथ्या दिवशी सूर्योदयानंतर स्नान करून पतिमुख पाहावे, असे व्यासस्मृतीत सांगितले आहे (२.३७–४०).

सर्व सूत्रकार रजस्वलेचा दोष मानतातच असे नाही. रजस्वलेच्या हातचे अन्न ते निषिद्ध मानतात. यावरून ते रजस्वलेला अस्पृश्य मानीत नसावे. कारण तिला एकदा अस्पृश्य ठरवल्यावर अन्नग्रहणाचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

रजस्वला स्त्रीविषयी अनेक कल्पना आणि विधिनिषेध आहेत. त्यांपैकी काही असे– रजस्वला स्त्रीने घरात एका बाजूला बसावे, कशाला स्पर्श करू नये, घरात देवपूजा आणि भोजन चालले असता बोलू नये, वेदमंत्र ऐकू नये, सूर्याकडे पाहू नये, खाली मान घालून बसावे, एका रजस्वलेने दुसऱ्या रजस्वलेला स्पर्श करू नये, वृक्षवेलींना स्पर्श करू नये, लहान मुलावर, गर्भवतीवर व आजारी माणसावर आपली सावली पाडू नये, इत्यादी.

मूल होत नसलेल्या स्त्रीने रजोदर्शनानंतर चौथ्या दिवशी स्नान करून आपल्या ओल्या केसांचे पाणी एखाद्या मुलाच्या तोंडात घातल्यास ते मूल अशक्त होते व त्याची शक्ती त्या स्त्रीला मिळून तिला अपत्यलाभ होतो. अशी समजूत आहे.
[रज:कण; बदलापूर; की. पॉ.]

रजो ओडिसा प्रदेशातील एक उत्सव. ज्येष्ठात मिथुन संक्रांतीच्या आदल्या दिवशी या उत्सवाला सुरुवात होते. तिथून पुढे तीन दिवस तो चालतो. मुख्यत्वे बायकाच हा उत्सव करतात. पुढच्या वर्षीचे पीक देण्यापूर्वी पृथ्वी एकदा रजस्वला होते, अशी त्या स्त्रियांची समजूत आहे. हे तीन दिवस त्या रज:कालाचे समजतात. या तीन दिवसांत नांगरणे, खणणे, इ. कामे बंद ठेवतात. त्याचप्रमाणे हे तीन्ही दिवस स्त्रिया नक्त भोजन करतात. अखेरच्या दिवशी त्या महालक्ष्मीची मूर्ती करून व तिला धरित्री मानून स्नान घालतात. नंतर ती शुद्ध झाली असे समजतात. [इट. ओ. फो.]

रज्जब (इ. स. १५६७–१६८९ अंदाजे) एक संत कवी. हा जातीचा पठाण होता. रज्जबचे पूर्ण नाव रज्जब अली खाँ असे होते. याचा बाप जयपूर राज्यात नायक पदावर नियुक्त होता. साँगानेर येथे याचा जन्म झाला. लहानपणी याने व्यायाम करून कुस्तीत प्रावीण्य मिळविले होते. शस्त्रास्त्रविद्याही तो शिकला होता. पण या गोष्टीपेक्षा त्याला साधू व फकीर यांच्या संगतीची विशेष आवड होती. साधूंच्या मुखांतून अध्यात्म ऐकण्यात त्याला आनंद वाटे.

रज्जब तारुण्यात आल्यावर वडिलांनी आंबेर येथील एका पठाण घराण्यातल्या मुलीशी त्याची सोयरीक ठरविली. वरयात्रा आंबेरकडे निघाली. वाटेत एका डोंगराच्या पायथ्याशी दादू दयाळ हा संत आपल्या शिष्यांसह ध्यानस्थ बसला होता. रज्जबला वाटले, की त्याचे दर्शन घेऊन पुढे जावे. रज्जब त्याच्याकडे गेला आणि दादूचे ध्यान उतरेपर्यंत समोर उभा राहिला. थोड्या वेळाने दादूने डोळे उघडून रज्जबकडे पाहिले. ती दृष्टी विलक्षण होती. ती एखाद्या बाणाप्रमाणे रज्जबच्या हृदयात घुसली. पाठोपाठ एक दोहाही कानी आला –

> रज्जब तैं गज्जब किया सिरपर बाँधा मौर ।
> आया था हरिभजनकूं करं नरककी ठौर ।।

भावार्थ – हे रज्जबा, तू भलतेच केलेस. डोक्यावर वरमुकुट चढवलास. जन्माला आला होतास हरिभजनासाठी; पण जातो आहेस मात्र नरकाकडे.

हा दोहा ऐकताच रज्जबचे डोळे उघडले. त्याला एकाएकी वैराग्य आले. त्याने आपला वरवेष उतरून धाकट्या भावाच्या स्वाधीन केला आणि तो दादूचे शिष्यत्व स्वीकारून तियेच राहिला. पांच-सहा वर्षे दादूच्या संगतीत अध्यात्मसाधना केल्यावर तो अनुभवी पुरुष बनला. दादूच्या शिष्यमंडळीत त्याची प्रतिष्ठा वाढली. तिथून तो पुन्हा साँगानेरला गेला. पुढे त्यालाही कवित्वस्फूर्ती झाली. तो साख्या व पदे रचून त्यांच्या द्वारे अध्यात्म सांगू लागला. साधू म्हणून त्याची कीर्ती दूरवर पसरली. असे सांगतात, की दादू दयाळच्या मृत्यूनंतर त्याने आपल्या डोळ्यांवर कायमची पट्टी बांधली होती. पुढे त्याचाही शिष्यवर्ग निर्माण झाला. रज्जब आयुष्यभर साँगानेर येथेच राहिला. अंतकाळ जवळ आला असे कळल्यावर मात्र तो गाव सोडून जंगलात गेला व तिथे त्याने देहत्याग केला.

रज्जबच्या दहा शिष्यांची नावे भक्तमाल या ग्रंथात मिळतात. त्यांच्याशिवाय आणखीही चार शिष्यांची नावे उपलब्ध आहेत. रज्जबपंथी लोकांना रजवावत असे म्हणतात. या पंथाची मुख्य गादी साँगानेर येथे आहे. तिथे रज्जब वापरीत असलेल्या काही वस्तू स्मारक म्हणून ठेवलेल्या आहेत. याव्यतिरिक्त, त्याच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिष्यांनी स्थापलेले काही मठ छोटचा छोटचा गावांतून दिसतात.

रज्जब हा गोष्टी सांगण्यात मोठा पटाईत होता. समर्पक दृष्टांत योजणे हा त्याचा हातखंडा होता. त्याच्या या गुणाचे उदाहरण म्हणून पुढील दोहा सांगता येईल –

रज्जब पारस परसते मिटिगो लोहविकार ।
तीन बात तो रह गई बाँक धार अरु मार ॥

भावार्थ– रज्जब सांगतो, की परिसाच्या स्पर्शाने लोहाच्या तलवारीचे लोहत्व गेले खरे; पण तरीही तिची वक्रता, धार आणि प्रहार करण्याची शक्ती हे दोष राहून गेले.

वाणी व सर्वांगी हे त्याच्या कवितांच्या संकलनाचे ग्रंथ होत. पहिला ग्रंथ छापून प्रसिद्ध झालेला आहे. त्याच्या साखीच्या अंतर्गत १९३ अंगांमध्ये ५३५२ छंद आहेत. रागरागिण्यांमध्ये त्याची २०५ पदे आहेत. या शिवाय, त्याची इतरही बरीच फुटकळ कविता उपलब्ध आहे. [उ. भा. सं. प.; भा. सं. म.; श्री. मदन मोहन शर्मा – अजंता, मे १९५७]

रटंती चतुर्दशी

एक तिथिव्रत. माघ वद्य चतुर्दशीला हे व्रत करतात. त्या दिवशी अरुणोदयाला स्नान करावे आणि यमाचे त्याच्या चौदा नावांनी तर्पण करावे, असे सांगितले आहे.

रटंती नावाची एक देवी असून, तिला कालीचे एक रूप मानतात. बंगालमध्ये माघ वद्य चतुर्दशीला कालीची जी पूजा करतात, तिला रटंतीपूजा असेच म्हणतात. [हि. ध.]

रणघंटी

ओडिसा प्रदेशातील एक लोकदेवता. मोठचा खडकाला शेंदूर फासून ही देवता तयार करतात. हिला युद्धाची देवता मानतात. युद्धात जय मिळावा आणि स्वतःचे रक्षण व्हावे या दोन हेतूंनी हिची पूजा पूर्वी करीत असत. पराजय झाला किंवा युद्धात मरण आले तर ती रणघंटीची अवकृपा असे मानीत. [स्ट. ओ. फो.]

रणछोडजी

(१७८५–१८४१ इ. स.) एक कवी, इतिहासकार आणि योद्धा. हा जुनागड संस्थानाचा दिवाण असून, जातीने नागर ब्राह्मण होता. दिवाण असल्यामुळे याची वागणूक क्षत्रियाला साजेशी होती. इंग्रजांनीदेखील या वीर राजकारणी पुरुषाची प्रशंसा केलेली आढळते.

गुजराती, संस्कृत, हिंदी व फारसी भाषांवर याचा चांगला अधिकार होता. त्याने फारसी भाषेत तारीख-ई-सोरठ म्हणजे सौराष्ट्राचा इतिहास आणि रुकार-ई-गुनागुन म्हणजे विविध पत्रांचा संग्रह हे दोन ग्रंथ रचले आहेत. तारीख-ई-सोरठ या ग्रंथाचा इंग्रजी अनुवादही झाला आहे. याशिवाय त्याने शिवमाहात्म्य व शिवगीता ही काव्ये रचली असून, काही गरबेही रचले आहेत. [वि. मुं. रा. प.]

रणजीतसिंग

(१७८० – १८३९ इ. स.) पंजाबात खालसा संघाचे राज्य स्थापन करणारा शीख वीर पुरुष. याचा जन्म गुजराणवाला येथे झाला. खालसा संघाचे बारा विभाग मिसल या नावाने ओळखले जात. त्यांतील सुकरचकिया नामक मिसलचा सरदार महासिंग याचा हा पुत्र होता. बंदासिंगाचा एक साथीदार बुधसिंग याने बंदासिंगाच्या मृत्यूनंतर आपले स्वतंत्र दल बनवले. त्यालाच पुढे सुकरचकिया हे नाव मिळाले. कारण सुकरचक गावी बुधसिंगाचे घराणे वसलेले होते. बुधसिंगाचा नातू चडतसिंग याने अहमदशाह अब्दालीच्या आक्रमणाच्या वेळी या मिसलची स्थापना केली. चडतसिंगाचा पुत्र महासिंग हा अत्यंत बुद्धिवान व पराक्रमी होता. त्याने अल्पावधीत आपल्या मिसलची प्रतिष्ठा व शक्ती बरीच वाढवली. तो मरण पावला तेव्हा त्याचा पुत्र रणजीतसिंग केवळ दहा वर्षांचा होता.

महासिंगाचा वजीर लखपतराय, आपली माता राजकौर व भावी सासू (कन्हैया मिसलची राणी) सदाकौर यांच्या साहाय्याने रणजीतसिंग सुकरचकियाचा कारभार पाहू लागला. त्याचे पुस्तकी शिक्षण विशेष झालेले नव्हते. युद्धविद्येचे शिक्षण त्याला लहानपणीच चांगले मिळाले होते. वयाच्या १० व्या वर्षापासून तो लढाईवर जाऊ लागला. त्याला शिकारीचाही नाद होता. लहानपणी देवी आल्यामुळे त्याचा एक डोळा गेला होता. इ. स. १७९९ मध्ये लखपतराय मरण पावला व रणजीतसिंग स्वतः कारभार करू लागला. त्याची आई व दिवाण लखपतराय यांचा अनैतिक संबंध होता आणि त्या दोघांनाही रणजीतसिंगाने ठार मारले, असे म्हणतात.

इ. स. १७९९ साली रणजीतसिंगाने लाहोरवर स्वारी करून ते शहर जिंकले. त्याच्या पराक्रमामुळे इतर सरदार आधीच त्याचा द्वेष करू लागले होते. लाहोरवर त्याची सत्ता स्थापन झाल्यामुळे ते अधिकच चिडले व काही सरदारांनी मिळून इ. स. १८०० साली लाहोरवर आक्रमण केले. भसीन नामक गावी दोन्ही सेनांचे तळ दोन महिने पडले होते. पण शेवटी लढाई न करताच शत्रुसेना निघून गल्यामुळे रणजीतसिंगाचा जय झाला. लवकरच त्याने जम्मू, सियालकोट व दिलावरगढ येथील राजांवर स्वारी त्यांच्याकडून खंडणी वसूल केली.

त्यानंतर इ. स. १८०१ मध्ये रणजीतसिंगाने लाहोर येथे मोठा दरबार भरवून महाराज ही पदवी धारण केली. त्या वेळी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पंजाबातील बहुतेक सर्व शीख सरदार उपस्थित होते. अशा प्रकारे पंजाबात खालसा राज्याची स्थापना झाली. इ. स. १८०८ पर्यंत रणजीतसिगाने पंजाबातील अनेक लहानमोठी राज्ये जिंकून आपल्या सत्तेखाली आणली. इ. स. १८०७ मध्ये त्याने अमृतसर जिंकून घेतले. सतलज नदीच्या दक्षिणेकडील शीख राज्येही आपल्या खालसा राज्यात समाविष्ट करावी असा त्याचा हेतू होता. पण त्या वेळी ब्रिटिशांची सत्ता यमुनेपर्यंत प्रस्थापित झाली होती आणि त्यांना रणजीतसिंगाची सत्ता सतलजच्या दक्षिणला पसरणे इष्ट वाटत नव्हते. त्यांना रशिया व अफगाणिस्तान यांचे भय वाटत होते. नेपोलियन स्वारी करील अशीही भीती होती. म्हणून रणजीतसिंगाशी सलोखा करण्याकडे त्यांचा कल होता. इ. स. १८०६ साली त्यांनी रणजीतसिंगाशी मित्रत्वाचा तह केला. सतलजच्या दक्षिणेकडील पंजाबातील शीख राज्यांवर मराठ्यांचे प्रभुत्व होते, ते इ. स. १८०६ मध्ये इंग्रजांकडे गेले. त्यावेळी काही मिसलप्रमुखांनी रणजीतसिंगाकडे मदतीची याचना केल्यामुळे रणजीतसिंगाने इ. स. १८०६ व १८०७ साली सतलजच्या दक्षिणेकडे मोर्चे वळवले आणि लुधियाना जिंकले. पण तेवढ्यात पतियाळा, नाभा, कैथल वगैरे मिसलांच्या सरदारांनी ब्रिटिशांकडे मदत मागितली. तेव्हा ब्रिटिश सरकारने चार्लस मेटकाफ याला रणजीतसिंगाकडे वाटाघाटी करण्यासाठी पाठवले. ब्रिटिश सरकारची अडचण ओळखून रणजीतसिंगाने सतलजच्या दक्षिणेकडील अधिक प्रदेश ताब्यात घेण्याचा डाव रचला होता. त्याप्रमाणे त्याने फरीदकोट व अंबाला काबीज केले. मालेरकोटला व थानेसर या संस्थानांत खंडणी वसूल केली आणि पतियाळाच्या राजाशी मैत्रीचा तह केला.

त्यानंतर रणजीतसिंगाने, सतलजच्या दक्षिणेकडील पंजाबावर आपला अधिकार ब्रिटिश सरकारने मान्य करावा, अशी मागणी केली; पण ती मान्य झाली नाही. उलट नेपोलियनच्या स्वारीची भीती नष्ट झाल्यामुळे ब्रिटिशांनी रणजीतसिंगाला शस्त्रबळाने विरोध करण्याचाच निश्चय केला आणि लुधियानाकडे आपले सैन्य पाठवले. ब्रिटिशांचे सैन्यबळ वरचढ आहे, हे जाणून रणजीतसिंगाने इ. स. १८०९ मध्ये त्यांच्याशी तह केला. त्या तहान्वये सतलजच्या दक्षिणेकडील ४५ परगण्यांवर रणजीतची सत्ता होती, ती ब्रिटिशांनी मान्य केली. मात्र त्याने अधिक प्रदेशावर अतिक्रमण करू नये व ब्रिटिशांनी सतलजच्या उत्तरेकडील प्रदेशात पाऊल टाकू नये, असे ठरले. या तहामुळे सिंधू व यमुना या नद्यांच्या मधील सर्व शीख लोकांचे संघटन करण्याची रणजीतची महत्त्वाकांक्षा निष्फळ झाली. मात्र त्याला इतर दिशांना आक्रमण करण्याची मोकळीक मिळाली.

त्यानंतर रणजीतसिंगाने कांगडावर स्वारी करून तो प्रदेश जिंकला. त्यापूर्वी तीन वर्षे गुरखा सैन्याने त्या भागात लूटमार चालवली होती. कांगडा घेतल्यावर रणजीतसिंगाने डोंगराळ भागातील सरदारांशी मैत्री संपादली व गुरखाप्रमुख अमरसिंह थापा याला पेचात आणले. तेव्हा त्याने रणजीतला एक लाख रुपये खंडणी देऊन माघार घेतली.

त्यानंतर रणजीतसिंगाने आपले लक्ष अफगाणिस्तानकडे वळवले. प्रथम त्याने सिंधूच्या पूर्वेकडील मुस्लिम राज्ये जिंकली. अफगाणिस्तानचा सुलतान शहा सूजा आपले राज्य गमावून हिंदुस्थानात आला होता. तो अटकेच्या सुभेदाराच्या हाती सापडला. त्याने त्याला काश्मीरच्या सुभेदाराकडे पाठवले. त्याची बेगम लाहोरला रणजीतसिंगाच्या आश्रयाला आली. त्यानंतर काबूलच्या दुराणी राज्याचा वजीर फत्तेखान इ.स. १८१२ साली अटक व काश्मीर येथील सुभेदारांचे पारिपत्य करण्यासाठी भारतावर चालून आला. त्याने रणजीतची मदत घेऊन काश्मीरवर स्वारी केली. त्यांच्या संयुक्त सैन्याने काश्मीर जिंकले. पण फत्तेखानाने रणजीतसिंगाला काश्मीरचा कोणताही भाग दिला नाही. फक्त शहा सूजाला त्याच्या ताब्यात दिले. ते पाहून अटकेचा सुभेदार जहंदादखान याने एक लाख रुपये घेऊन अटकेचा सुभा रणजीतसिंगाच्या स्वाधीन केला. ते कळताच फत्तेखान व त्याचा भाऊ दोस्त मुहंमद यांनी इ. स. १८१३ मध्ये अटकेवर स्वारी केली. पण रणजीतने त्यांचा पराभव केला.

रणजीतसिंगाने मुलतानवरही अनेक स्वाऱ्या केल्या. शेवटी इ. स. १८१८ मध्ये मुलतान त्याच्या ताब्यात आले. त्याच सुमारास फत्तेखानाचा खून झाल्यामुळे अफगाणिस्तानात गोंधळ माजला होता. त्याचा फायदा घेण्यासाठी रणजीतसिंगाने सिंधू नदी ओलांडून खैराबाद व पेशावर जिंकले. नंतर त्याने काश्मीरवर पुन्हा स्वारी करून इ. स. १८१९ मध्ये तो संपूर्ण प्रदेश जिंकला. पुढील दोन वर्षांच्या अवधीत त्याने डेरा गाजीखान, डेरा इस्माइलखान, भक्कर, लेह मंकेरा ही ठिकाणे काबीज केली.

रणजीतसिंगाने पेशावर जिंकले होते, ते अफगाण सैन्याने लगेच परत घेतले. फत्तेखानाच्या खुनानंतर त्याचा भाऊ मुहंमद अझीमखान काबूलला गेला. दुसरा भाऊ यार मुहंमद पेशावर येथे होता. रणजीतसिंगाने पेशावरवर पुन्हा स्वारी केली, तेव्हा यार मुहंमद शरण आला. पण अझीमखान सैन्य घेऊन रणजीतवर चालून आला. रणजीतसिंगाने नौशेरा येथे त्याचा पुरा पराभव केला. मात्र त्याने यार मुहंमदलाच पेशावर येथे आपला मांडलिक म्हणून ठेवले.

रणजीतसिंगाला सर्वत्र असे विजय मिळाले; तरीदेखील ब्रिटिश सरकारशी केलेला सलोखा त्याने कायम ठेवला. इ. स. १८१६ मध्ये नेपाळशी झालेल्या युद्धात व इ. स. १८२४ साली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मदेशाशी झालेल्या युद्धात ब्रिटिशांची प्रारंभी पीछेहाट झाली होती. पण रणजीतसिंगाने त्या संधीचा फायदा घेतला नाही किंवा नेपाळला मदत केली नाही. १८२० मध्ये नागपूरचे भोसले त्याच्याकडे जाऊन ब्रिटिशांविरुद्ध मदत मागू लागले; पण त्याने ती दिली नाही. तसेच इ. स. १८२४ साली नेपाळ सरकारने रणजीतसिंगाशी संरक्षणकरार करण्याची इच्छा दर्शवली होती; पण तिलाही त्याने नकार दिला. इ. स. १८२५ साली भरतपूरच्या राजाने ब्रिटिशांविरुद्ध मदत मागितली, पण त्याने ती दिली नाही.

रणजीतसिंगाने अशा प्रकारे ब्रिटिशांशी इमानदारी ठेवली; पण ब्रिटिशांनी मात्र तशी ठेवली नाही. इ. स. १८२६ मध्ये वहाबी पंथाने शिखांच्या विरुद्ध जिहाद पुकारले आणि ब्रिटिश मुलखातून स्वारीची तयारी केली, तेव्हा ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्याला मुळीच अडवले नाही; उलट प्रोत्साहनच दिले. तो संघर्ष सुमारे चार वर्षे चालू होता. वहाबींच्या सैन्याने एकदा पेशावर घेतले. पण इ. स. १८३१ त वहाबी नेता सय्यद अहंमद मरण पावल्यामुळे ते युद्ध बंद पडले.

इ. स. १८२३ पर्यंत रणजीतसिंगाने पंजाबमधील बहुतेक सर्व मिसलांचे एक राज्य बनवले. त्यानंतर त्याने सिंधकडे दृष्टी वळवली. पण तिथे ब्रिटिशांचा त्याला विरोध झाला. ब्रिटिश सरकारने रणजीतसिंगाशी मैत्रीचा बाह्य देखावा मात्र खूप केला. १८३१ मध्ये इंग्लंडच्या राजाने पाच घोडे व एक इंग्लिश गाडी त्याला भेट म्हणून पाठवली. त्याच वर्षी ग. ज. विल्यम बेंटिंक याने १८०९ मधील मैत्रीचा तह पुन्हा केला खरा; पण सिंधमध्ये रणजीतसिंगाला मुळीच शिरू द्यायचे नाही, असा निर्धार त्याने केला होता. सिंधूच्या पश्चिमेकडील शिकारपूर घेण्याचा त्याचा विचार होता. पण ब्रिटिशांनी त्याला विरोध दर्शवला. रणजीतसिंग दूरदर्शी मुत्सद्दी असल्यामुळे त्यावेळी गप्प बसला. इ. स. १८३५ साली फिरोजपूरचा राजा निपुत्रिक मरण पावला, तेव्हा ब्रिटिशांनी ते शहर ताब्यात घेतले व १८३८ मध्ये तिथे लष्करी केंद्र स्थापले. वास्तविक फिरोजपूरवर रणजीतची सत्ता त्यांनी मानलेली होती. पण फिरोजपूरचा किल्ला लाहोरपासून केवळ ४० मैलांवर असल्यामुळे ब्रिटिशांना तो लष्करी दृष्टीने फार महत्वाचा वाटत होता. म्हणून तो त्यांनी बळकावला. तथापि रणजीतसिंग तेव्हासुद्धा शांत राहिला.

काबूलचा शहा सूजा लाहोर येथे रणजीतसिंगाच्या आश्रयाला होता. त्याच्या बेगमेने कोहिनूर हिरा देण्याचे आश्वासन रणजीतला दिले होते. रणजीतसिंगाने शहा सूजाला मैत्रीचे आणि काही मुलुख, लष्करी मदत व धन देण्याचे वचन दिल्यानंतर शहाने कोहिनूर हिरा त्याला दिला. पण रणजीतसिंगाने मात्र आपले वचन पाळले नाही व शहाचा छळ सुरू केला, असे म्हणतात. इ. स. १८१६ साली शहाने आपली सुटका करून घेतली व आपल्या बेगमेसह तो लुधियानाला पळून गेला. तिथे मग तो ब्रिटिशांच्या संरक्षणाखाली राहू लागला.

पुढे इ. स. १८३१ मध्ये शहा सूजाने काबूलवर स्वारी करण्यासाठी रणजीतसिंगाची मदत मागितली. पण रणजीतसिंगाने त्याला काही अटी घातल्या. त्यांत अफगाणिस्तानात संपूर्ण गोवधबंदी करावी, सोमनाथाचे दरवाजे परत द्यावे व अफगाणिस्तानाच्या युवराजाने लाहोरच्या दरबारात हजर व्हावे या अटी मुख्य होत्या. त्या शहाने मान्य केल्या नाहीत. पण इ. स. १८३३ मध्ये रणजीतसिंगाने वरील अटी न घालता शहाशी तह केला. त्यात शहाने रणजीतसिंगाची सिंधूच्या पश्चिमेकडील प्रदेशावर सत्ता मान्य केली. त्यावेळी रणजीतसिंगाने त्याला बरेच द्रव्य दिले. शहा सूजाने मोठे सैन्य उभे करून सिंधमार्गे कंदाहारवर स्वारी केली; पण दोस्त मुहंमदाने त्याचा पराभव केला. पुढे रणजीतसिंगाने पेशावरवर स्वारी करून ते जिंकले. तिथला सुलतान मुहंमद काबूलला पळून गेला. मग दोस्त मुहंमद याने शिखांच्या विरुद्ध जिहाद पुकारले. भोवतालच्या प्रदेशातील कित्येक मुस्लिम जमातींचे लोक त्याच्या मदतीला आले. तेव्हा रणजीतसिंगाने दोस्त मुहंमदाचा भाऊ सुलतान मुहंमद याला वश करून घेतले. तो आपले सैन्य घेऊन शिखांना मिळाल्यामुळे अफगाणी सैन्याचे धैर्य गळाले. त्यामुळे दोस्त मुहंमदाने माघार घेतली व रणजीतसिंगाचा विजय झाला. या विजयामुळे त्याची प्रतिष्ठा खूप वाढली व सिंधूच्या पश्चिमेकडे त्याची सत्ता पक्की झाली. मग त्याने खैबर खिंडीच्या तोंडाशीच जमरूड येथे एक कोट बांधला. त्यानंतर रणजीतसिंगाने शहा सूजाला काबूल व कंदाहार जिंकण्यासाठी मदत करण्याचे कबूल केले. ही वार्ता कळताच दोस्त मुहंमदाने जमरूडवर मोठे सैन्य पाठवले. पण शिखांनी त्याचा पराभव केला. त्यामुळे शिखांना नमवण्याची दोस्त मुहंमदाची आकांक्षा पूर्ण लयाला गेली.

त्यानंतर लवकरच ब्रिटिश सरकारने रणजीतसिंगाच्या साहाय्याने शहा सूजाला काबूलचे राज्य मिळवून देण्याचे कारस्थान रचले. अफगाणिस्तानवर ब्रिटिश सत्ता प्रस्थापित होणे पंजाबला धोक्याचे होते. म्हणून रणजीतसिंग प्रथम त्या कारस्थानात भाग घेण्यास तयार नव्हता. पण ब्रिटिशांनी त्याच्या मदतीवाचूनही ते कारस्थान पार पाडण्याचे ठरवले होते. म्हणून त्याने तहावर सही केली. मात्र त्या तहामुळे पंजाबचा जो फायदा झाला असता, तो पाहण्याचे भाग्य रणजीतसिंगाला लाभले नाही. ब्रिटिश सेना काबूलकडे दौडत असतानाच जून १८३९ मध्ये तो मरण पावला. त्यानंतर लवकरच अंतर्गत यादवीमुळे पंजाबात अराजक माजले व तो प्रदेश जिंकून घेणे ब्रिटिशांना सोपे झाले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काही इतिहासकारांच्या मते रणजीतसिंगाचे ब्रिटिशांशी सलोखा ठेवण्याचे धोरण चुकीचे होते. त्यापेक्षा त्याने नेपाळचा राजा व मराठे सरदार यांच्याशी संगनमत करून ब्रिटिशांच्या वाढत्या सत्तेला विरोध करणे अधिक योग्य ठरले असते. त्याने पंजाबात शिखांचे राज्य स्थापण्यात अपूर्व यश मिळवले खरे; पण शिवाजीमहाराजांची हिंदवी साम्राज्याची कल्पना त्याला समजली नाही. ज्यांनी मराठ्यांची सत्ता नाहीशी केली, त्यांच्यापुढे आपला टिकाव लागणार नाही याची त्याला जाणीव होती. ह्यातीपर्यंत त्याने खूप शर्थीने शिखांची सत्ता राखली. खरे म्हणजे ब्रिटिश सरकार अधिक प्रबळ होण्यापूर्वी त्यांच्याशी निकराचा लढा देऊन त्यांचा पराभव करणे रणजीतसिंगाला अंती श्रेयस्कर ठरले असते. पण कुठल्याही प्रकारचा धोका पत्करण्याची त्याची तयारी नसल्यामुळे त्याने ब्रिटिशांविरुद्ध सामना देण्याचे टाळले.

रणजीतसिंग

तत्कालीन राजांच्या दरबाराप्रमाणे रणजीतसिंगाचा दरबारही वैभवपूर्ण असे. तो स्वतः मात्र साध्या पोषाखात राही. कधीकधी तो कोहिनूर हिरा आपल्या दंडावर बांधी. दरबारातील व्यवस्था पद्धतशीर व कलापूर्ण असे. तो पाहून अनेकांनी त्याच्या दरबाराची तुलना जहांगीरच्या दरबाराशी केली आहे. दरबाराचा कारभार सामान्यपणे पंजाबीत चाले. पण टिपणे व हुकूम फारसीत लिहिले जात.

डोगरा राजे धियानसिंग, गुलाबसिंग व सुचेतसिंग यांना दरबारात मोठा मान होता. ते दिसायला उमदे व शूर होते. त्यांना रणजीतसिंगाने राजा ही पदवी दिली होती. राजा धियानसिंग त्याचा मुख्य प्रधान होता. राजा गुलाबसिंग मुख्यतः जम्मू प्रदेशाची व्यवस्था पाहत असे. तो फार धूर्त, कारस्थानी व महत्त्वाकांक्षी होता. शीख-ब्रिटिश युद्धानंतर त्याने शीख राज्य सोडले व ब्रिटिश राजवटीत तो काश्मीरचा पहिला राजा झाला.

शीख मंडळीत हरिसिंग नलवा हा प्रमुख होता. तो श्रेष्ठ सेनापती मानला जात असे. अफगाण सरहद्दीवरील लढायांत त्याने मोठा पराक्रम केला व तिथे शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली. मुसलमान, शीख, डोगरा, जाट, इ. सर्व जातींचे लोक दरबारात होते, पण त्यांचे आपसांत हेवेदावे चालू असत.

रणजीतसिंगाचा कारभार एकतंत्री होता. सर्व अधिकाऱ्यांच्या नेमणुका तो आपल्या मनाप्रमाणे करी. त्याची सत्ता अनियंत्रित होती; पण तो स्वतःला खालसाचा सेवक समजे. त्याच्या शिक्क्यावर 'अकाल साह्य' म्हणजे परमेश्वर आम्हांस मदत करो, अशी अक्षरे होती. जेव्हा जय मिळे तेव्हा रणजीतसिंग तो गुरू नानक व गुरू गोविंद यांचा आशीर्वाद मानी.

रणजीतसिंगाने राज्यकारभाराची व्यवस्था चांगली केली होती. त्याच्या पदरी अनेक चांगली लायक, कर्तव्यदक्ष व पराक्रमी माणसे होती. कायदे व न्यायदान पूर्वापार पद्धतीने चाले. त्याने मुलकी राज्यकारभारात मोगल शासनपद्धतीपेक्षा काही निराळे केले होते, असे दिसत नाही. सैन्याच्या व्यवस्थेत मात्र त्याने पुष्कळ सुधारणा केली. शिक्षण व शिस्त यांचे महत्त्व ओळखून त्याने आपल्या सैन्याला पाश्चात्य धर्तीवर शिक्षण देण्याची व्यवस्था केली. व्हेन्टुरा, अलार्द व कोर्ट हे नेपोलियनच्या सैन्यातले अधिकारी रणजीतसिंगाने नोकरीस ठेवले होते. ते कवायती शिक्षणाबरोबर सैनिकांना शस्त्रांचा उपयोग व सैनिकी डावपेच यांचेही शिक्षण देत. सैनिकांना नियमित वेतन दिले जाई. त्याचे घोडदळ फार रुबाबदार असे. रणजीतसिंगाने तोफखानाही तयार केला होता. तोफा चालविण्याचे शिक्षण देण्याची व तोफा बनवण्याची व्यवस्थाही त्याने केली होती.

पंजाबच्या लोकांनी रणजीतसिंगाला बहाल केलेली 'शेर – ए – पंजाब' ही पदवी त्याचे व्यक्तिमत्त्व व कर्तृत्व यांमुळे सार्थ ठरली आहे. आजही लोक त्याच्याविषयी आदर दाखवतात. तो दिसायला अगदी सामान्य किंबहुना कुरूप असून, एका डोळयाने अंध होता. त्याच्या तोंडावर देवीचे वण होते. त्याचे बाहू व पाय कमकुवत दिसत. तथापि तो तेजस्वी होता. घोडयावर बसून तलवार व भाला चालविण्यात तो अत्यंत कुशल होता. तो उद्योगी असून, दिवसभर सतत काम करीत असे. त्याची स्मरणशक्ती अचाट होती. तो स्वभावाने अत्यंत चौकस असून, राजकीय दृष्टीने मोठा चाणाक्ष मुत्सद्दी होता. माणसाची पारख त्याला चांगली होती. तो पराक्रमी व कुशल सेनानी होता. युद्धातील डावपेचांप्रमाणेच राजकारणातले डावपेचही त्याला चांगले समजत.

रणजीतसिंगाला शिक्षण मुळीच मिळाले नव्हते, पण त्याच्या अंगी चातुर्य होते व विवेकही होता. त्याच्या दरबारात विद्वानांना मान मिळत असे. त्याच्या दरबारातील मुन्शी सोहनलाल, मिया शहा महंमद, दिवाण अमरनाथ, गणेशदास ही नावे विद्वत्तेच्या क्षेत्रात प्रसिद्ध आहेत. सोहनलाल याने उमदाद उद तवारीखमध्ये रणजीतसिंगाचे चरित्र व जीवनकार्य यांचे वर्णन केले आहे. अमरनाथ याचा जफरनामा प्रसिद्ध आहे. गणेशदास याचा 'पजेनामा गुरू खालजीका' प्रसिद्ध आहे. यावरून रणजीतसिंगाची इतिहासलेखनाविषयी आस्था दिसून येते. पाठ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शाळा व मदरसा यांसाठी त्याने जमिनी नेमून दिल्या होत्या.

शीख पंथावर रणजीतसिंगाची अपार श्रद्धा होती. तो ग्रंथसाहेबाचे नित्य पठण करी व संतमहंतांना नित्य भेटून त्यांचे आशीर्वाद घेई. युद्धात जय झाला, की तो खूप दानधर्म करी. अमृतसरच्या सुवर्णमंदिरातील सोनेरी छत, कळस, भिंतीवरील पत्रे हे सर्व त्याने दान केलेल्या द्रव्यातून झालेले आहे. ज्वालामुखी देवीच्या मंदिरावरही त्याने सोन्याचे छत व कळस चढवला. एकदा धार्मिक कृत्यात त्याच्या हातून काही चूक घडल्यामुळे अकालतख्ताने दिलेली शिक्षा त्याने निमूटपणे भोगली. त्याची धर्मनिष्ठा जाज्वल्य असली तरी आग्रही किंवा असहिष्णू नव्हती.

मात्र रणजीतसिंग अगदी निर्दोष होता असे नाही. अफू व मद्य या दोन्हींचे त्याला अनावर व्यसन होते. त्याच्या पदरी अनेक स्त्रिया व नर्तकी होत्या. तो लोभी होता. स्वार्थासाठी त्याने अनेक प्रसंगी न्याय व सत्य यांना डावलले. अनेक प्रसंगी त्यान वचनभंगही केला. त्याने स्वतःच्या नात्यातल्या व मर्जीतल्या पुरुषांना मोठी अधिकारपदे दिली होती. सेनादलातही अनेक नालायक अधिकारी त्याने केवळ वशिल्यामुळे उच्च पदी नेमले होते. [हि. क. इं. पी. ९.; सि. इ.; महाराजा रणजीतसिंग – सीताराम कोहली, १९५२; शि. इ.].

रणथंभोर एक गणेशस्थान. हे ठिकाण राजस्थानातील सवाई माधोपूरपासून सहा मैलांवर आहे. रणथंभोर हा एक ऐतिहासिक डोंगरी किल्ला असून, त्याला प्रचंड कोट व बुरुजही आहेत. या किल्ल्यातच हे गणेशमंदिर आहे. इथली गणेशमूर्ती सत्ययुगात पहाडातून प्रकटली, असे सांगतात. केवळ मस्तक व सोंड एवढीच ही मूर्ती आहे. रणथंभोरचा किल्ला ऋद्धि–सिद्धींच्या लग्नात त्यांच्या वडिलांनी गणेशाला अहेर म्हणून दिला अशी दंतकथा आहे. किल्ल्यात मदमीला तलाव, कमलसागर, गुप्तगंगा, पद्मिनीभवन, राजप्रासाद, जौहरे भौहरे, इ. प्रेक्षणीय स्थाने आहेत.

मध्ययुगीन ऐतिहासिक गडांमध्ये या गडाची गणना होते. हे चौहान राजपुतांचे एक वसतिस्थान होते. इ. स. १३०० मध्ये अलाउद्दिनाने यावर स्वारी केली. पण एक वर्ष लढाई केल्यावर त्याला हा किल्ला मिळाला. नंतर तो माळव्याच्या व मेवाडच्या सत्तेखाली होता. इ. स. १५६९ मध्ये अकबराने हा किल्ला जिंकला. [गणेशकोश; ज. द.; राजस्थान]

रणधीरसिंह (१८२२ – १८९६ इ. स.) राजस्थानातील सिंगरामऊ या गावचा एक कवी व जहागिरदार. याने नामार्णव, काव्यरत्नाकर, सालिहोत्र, भूषणकौमुदी, व रागमाला असे पाच काव्यग्रंथ लिहिले. त्याने नामार्णवात एका वस्तूची अनेक नावे विविध छंदांत दिली आहेत. त्या त्या छंदाचे लक्षण व उदाहरणही दिले आहे. काव्यरत्नाकरात नायिकाभेद व अलंकार वर्णिले आहेत. रागमालेत भजने व गीते आहेत. त्याच्या भजनाचा एक नमुना असा–

आली री अनंग अंग जनु घीरे वनमाली
ठाढो हैं निकुंज मध्य प्यारी री।
गल सौं हे मोती माल, केसर को तिलक भाल
मोर पंख सीस मानो चंद्रकी पत्यारी री
पीत बसन लसित अंग सरसित
सुखमा सुढंग जलधर–
ज्यों ली न्यों विद्युत अलोल संग।
बंसी रवित मंजु अधर सुरस।
धारि रनधीर लेतो हैं। अनन्त तान न्यारी री॥

भावार्थ – हे सखी, जणू मदनच असा श्रीकृष्ण कुंजवनात उभा आहे. त्याच्या गळ्यात मोत्यांची माळ, भाळी केशराचा तिलक व मस्तकी मयूरपिच्छ आहे. पीतवसन, कांतिमान व मेघवर्ण असा तो आहे. त्याच्या अधरावर मुरली आहे आणि तिच्यातून तो ताना काढीत आहे.

भूषणकौमुदी ही भाषाभूषण नामक ग्रंथावरची टीका आहे. सालिहोत्रात अश्वपरीक्षा, घोड्यांचे रोग व त्यांवरची औषधे सांगितली आहेत. [क. कौं. १]

रणवाद्ये प्राचीन काळी युद्ध करतेवेळी दोन्ही पक्ष मोठा नाद करणारी काही वाद्ये वाजवीत; त्यांना रणवाद्ये म्हणत. रणवाद्यांचा गजर करण्यात स्वपक्षाला उत्तेजन देण आणि शत्रुपक्षाला धडकी भरवणे असा दुहेरी उद्देश असे. ऋग्वेदकाळी वाजवल्या जाणाऱ्या काही रणवाद्यांचा उल्लेख पुढील ऋचेत आला आहे–

अव स्वराति गर्गरो गोधा परि सनिष्वणत्।
पिङ्गा परि चनिष्कददिन्द्राय ब्रह्मोद्यतम्॥
(ऋ. ८. ६९. ९)

अर्थ – पाहा कर्ण्याचा आवाज होऊ लागला. तुतारीने पुनः पुन्हा कर्कश शब्द केला. प्रत्यंचेचा टणत्कार सुरू झाला. आता वेळ न घालवता इंद्राप्रीत्यर्थ मोठ्याने प्रार्थनासूक्त म्हणा.

राम-रावणयुद्धात भेरी व शंख ही रणवाद्ये होती. कोणाघात नावाचा एक वाद्यप्रकार होता. हजारो ढक्के व शेकडो भेरी एका वेळी वाजू लागल्या, म्हणजे त्या ध्वनीला कोणाघात म्हणत. महाभारतात झर्झर, पणवानक, गोमुख, भेरी, मृदंग, आडंबर, क्षुद्र, पटह, दुंदुभी, पेशय, क्ष्वेड, ककच, मुरज, इ. प्रमुख रण-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाद्यांचा उल्लेख केलेला आहे. युद्धापूर्वी शंखध्वनी करीत. ही रणवाद्ये प्रशिक्षित अधिकाऱ्यांच्या ताब्यात असत. ही सर्व रणवाद्ये सैनिकच वाजवीत. युद्ध सुरू झाल्याची सूचना भेरी वाजवून दिली जात असे. [प्रा. भा. सां.]

रतननाथ (इ. स. चे ११ वे शतक) एक नाथसंप्रदायी योगी. हा क्षत्रिय राजकुमार होता असे म्हणतात. तो पंजाबातील भटिंडा गावचा रहिवासी का नेपाळचा रहिवासी, याविषयी मतभेद आहे. याच्या शिष्यपरंपरेत हिंदूंप्रमाणे मुसलमानही होते. मुसलमान याला हाजीरतन, बाबारतन किंवा पीर रतन या नावाने ओळखीत. याने भारताबाहेर खुरासान, काबूल, गजनी, येथपर्यंत नाथसंप्रदायाचा प्रसार केला. काबूलचा बादशहा याचा शिष्य बनला होता. काबूल व जलालाबाद येथे याने दोन शिवमंदिरे बांधली होती व त्यांच्यासाठी जहागीरही मिळवली होती. पेशावरपासून सुमारे दोन मैलांवर याने एक स्थान वसवले होते; ते सांप्रत धरमशाला या नावाने प्रसिद्ध आहे.

याने रतनज्ञान नावाचे एक पुस्तक लिहून त्यात मच्छिंद्र व गोरक्ष यांच्यामधला संवाद पद्यबद्ध केला आहे. त्या पुस्तकावरूनच कळते, की हा मच्छिंद्रनाथांचा शिष्य असून, गोरक्षनाथाचा समकालीन होता. त्याची व गोरक्षाची प्रथम भेट गोदावरीच्या तीरावर झाली होती. याने गजनीमध्ये देह ठेवला, अशी आख्यायिका आहे. [मैं ध. पं.]

रतन पाँरे राजस्थानातील एक लोकदेव. त्याला देवपद कसे मिळाले याची आख्यायिका अशी — अचलनारायणसिंह नावाचा एक राजा होता. त्याने रतन पाँरेच्या मुलीवर बलात्कार केला. त्यामुळे रतनने चिडून राजाकडे नुकसानभरपाई मागितली. परंतु राजाने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. मग रतनने आपल्या पत्नीसह राजाच्या गडाच्या दारात प्रायोपवेशन करून प्राण दिला. पुढे तो पिशाच बनला. राजाचा सूड घेण्यासाठी त्याने शरयू नदीकडे मदत मागितली. नदीने मदत देण्याचे कबूल केले आणि तिला एकाएकी पूर आला. पुरात राजा, त्याचे कुटुंब, त्याचा गड, सर्व काही वाहून गेले. तेव्हापासून रतन लोकांचा देव बनला. [फो. लो. नॉ. इं.]

रती (१) कामदेवाची पत्नी. स्त्रीसौंदर्याची देवता. हिची उत्पत्ती दक्षप्रजापतीच्या घामापासून झाली, असे कालिका पुराणात सांगितले आहे. ब्रह्मवैवर्त पुराणात हिची उत्पत्ती मदनाच्या डाव्या कुशीतून झाल्याचे सांगितले आहे. पण इतर पुराणांत ती दक्षकन्या असल्याचेच म्हटले आहे. आपली कन्या मदनाला द्यावी अशा विचाराने दक्ष म्हणाला "हे मदना, ही माझी कन्या तुला सर्वथा अनुरूप आहे. तू हिचा स्वीकार कर. ही तुझ्या आज्ञेत आणि तुझ्या बरोबर राहील." मदनाने मग तिचा पत्नी म्हणून स्वीकार केला (कालिका पु. ३.).

(२) एक भावना. माधुर्य उपासनेचा रती हा प्राण आहे. रतीतूनच ही उपासना पुष्पित व फलित होते; म्हणून ती त्या उपासनेचे बीजही आहे. तिला माधुर्यरसाचा स्थायीभाव समजतात. जेव्हा ती रती भक्ताच्या हृदयात स्थायी रूपाने निवास करू लागते, तेव्हा भक्ताला अंशरूपाने रसास्वाद होऊ लागतो. त्याचे चित्त आर्द्र होते. अखिल रसांची मूर्ती असलेल्या श्रीकृष्णाजवळ या रतीचे रहस्य अत्यंत गुप्त आहे. मुक्तीची कामना करणाऱ्या साधकांना ही रती लाभत नाही; तर ती भक्तीची कामना करणाऱ्या भागवतांनाच लाभते. अमृतमधुर आणि कोमल असे ज्यांचे चित्त आहे, त्या भक्तांच्या हृदयात जेव्हा या रतीचा पूर्ण विकास होतो, तेव्हा विश्वातले व अंतरातले समस्त अनुकूल व प्रतिकूल भाव त्याच्या स्वाधीन होतात.

भक्तिशास्त्रानुसार या रतीचे मुख्य व गौण असे दोन प्रकार आहेत. रती व काम यांचा जो स्वाद असतो, तसाच काही अंशी मधुर भक्तीच्या रसाचाही असतो. मात्र हा स्वाद भौतिक स्वादाहून सर्वथा भिन्न असतो. त्याचे शब्दांनी वर्णन करता येत नाही. [श. क.; हिं. कृ. मा.; म. र. स्व. वि.]

रत्नकरंडशास्त्र जैनांचा एक धार्मिक ग्रंथ. त्याच्या दोन हस्तलिखित प्रती आमेर येथील ग्रंथालयात आहेत. श्रीचंद्रकवी हा याचा कर्ता होय. स्वामी समंतभद्र याच्या रत्नकरंड या ग्रंथाचे हे विस्तृत व्याख्यान आहे. याचे २१ संधी असून, त्यांत धार्मिक व नैतिक कथा पुष्कळ आहेत. हा एक आचारग्रंथ आहे. यात उदाहरणे म्हणून प्रसंगोपात्त अनेक व्रतकर्त्या व्यक्तींची कथानके दिलेली आहेत. [अ. सा.]

रत्नकीर्ती (१) (इ. स. चे १० वे शतक) एक प्रसिद्ध नैयायिक. हा विक्रमशीला विद्यापीठात आचार्य होता. रत्नाकरशांतीचा गुरू हाच होय. याने न्यायशास्त्रावर जे नऊ लघुग्रंथ रचले, त्यांची नावे अशी — सर्वज्ञसिद्धी, अपोहसिद्धी, क्षणभंगसिद्धी, प्रमाणांतर्भावप्रकरण, व्याप्तिनिर्णय, स्थिरसिद्धिदूषण, चित्ताद्वैतप्रकरण, अवयविनिराकरण व सामान्यनिराकरण. यांपैकी तीन ग्रंथ अनुपलब्ध आहेत. विमलचंद्र राजाचा आश्रित असलेला रत्नकीर्ती हा या रत्नकीर्तीहून भिन्न आहे, असे संशोधकांचे मत आहे. [पु. त. नि.; म. च. को.]

(२) (इ. स. चे १९ वे शतक) एक जैन मराठी कवी. हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विदर्भात राहणारा होता. भट्टारक सिद्धसेन हा याचा गुरू होय. उपदेशरत्नमाला हा याचा ग्रंथ म्हणजे षट्कर्मोपदेशरत्नमाला नावाच्या संस्कृत ग्रंथावरची टीका होय. या ग्रंथात देवपूजा, गुरूपास्ती, स्वाध्याय, संयम, तप, दान, या श्रावकांच्या षट्कर्मांचे उत्तम विवेचन आहे. मूळ संस्कृत ग्रंथ अठरा अध्यायांचा असून, त्यावरील ही टीका तीस अध्यायांची आहे. संस्कृत भाषेचे ज्ञान उत्तरोत्तर कमी होत आहे, म्हणून मी मराठीत रचना केली, असे कवीने म्हटले आहे. [प्रा. म. जै. सा.]

रत्नत्रयव्रत एक जैन व्रत. हे व्रत वर्षातून तीन वेळा अनुक्रमे भाद्रपद, माघ आणि चैत्र महिन्यांत करतात. यात शुद्ध पक्षातील द्वादशीला एकाशन करायचे व त्रयोदशी, चतुर्दशी आणि पौर्णिमा या तिथींना उपवास करायचा असतो.

रत्नपाणी बोधिसत्त्व

वद्य पक्षातील प्रतिपदेला एकभुक्त राहून पारणे करतात. व्रतकालात 'ओं ऱ्हीं सम्यग्दर्शनज्ञानचरित्रेभ्यो नमः' या मंत्राचा त्रिकाल जप करतात. तीन वर्षे व्रत केल्यावर उद्यापन करतात. फल–निर्वाणपदप्राप्ती.

जंबुद्वीपातील विश्रवण नावाच्या राजाने हे व्रत केल्याची कथा प्रसिद्ध आहे. [जै. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.; जै. क.]

रत्नधेनु रत्नाची धेनू बनवून ती शुभ दिवशी कृष्णाजिनावर ठेवून ब्राह्मणाला दान द्यावी, असे सांगितले आहे (मत्स्य पु. २९२). हे एक महादान आहे. मिठाच्या खड्यांची धेनू करून व तिच्या प्रत्येक अवयवावर एक रत्न ठेवून तिचे दान करावे, असेही सांगितले आहे. फल–विष्णुपदप्राप्ती. [पु. इं.].

रत्नपाणी एक बोधिसत्त्व. याला तिसरा किंवा सहावा बोधिसत्त्व मानले आहे. याचा वर्ण पीत किंवा श्याम आहे. रत्नसंभवापासून याची उत्पत्ती झाली असून, रत्न हे याचे अभिज्ञानचिन्ह आहे. याने कमलस्थित चंद्रमंडल धारण केलेले असते. [इं. बु. इ.; गॉ. नॉ. बु.; निष्पन्नयोगावली.]

रत्नपुरी उ. भारतातील एक जैनतीर्थ. हे स्थान फैजाबाद जिल्ह्यात असून, सोहावल नावाच्या स्टेशनपासून सुमारे दीड मैलावर आहे. याला धर्मनाथ तीर्थंकराची जन्मभूमी मानतात. जिनप्रभसूरीच्या काळात हे स्थान रत्नवाह म्हणून प्रसिद्ध होते. जैन यात्रिक याचा रोइनाई नावाने उल्लेख करतात. इथे श्वेतांबरांचे एक आणि दिगंबरांची दोन मंदिरे आहेत. [कल्याण – तीर्थांक; जै. ध.; भा. प्रा. जै. ती.]

रत्नप्रभसूरी (११८१ इ.स.) श्वेतांबर जैनांपैकी एक तत्त्वज्ञ. याने 'प्रमाणनयतत्त्वालोकालंकार' या ग्रंथावर 'स्याद्वादरत्नावतारिका' नावाची टीका लिहिली आहे. उपदेशमालावृत्ती नावाचाही याचा एक ग्रंथ आहे. [म. च. को.]

रत्नसंभव ध्यानीबुद्धांतला पाचवा बुद्ध. नेपाळी परंपरेत याला तिसरा ध्यानीबुद्ध मानतात. याचे वर्णन असे– हा दक्षिणाभिमुख असून, याचा रंग पिवळा आहे. दोन हातांपैकी डावा हात मांडीवर असून, उजवा हात वरद मुद्रेत आहे. रत्न हे याचे शिरोलांच्छन असून सिंहयुग्म हे वाहन आहे. 'ॐ आः रत्नध्रुक् हुम्' हा याचा मंत्र आहे.

याला दोन हातांपेक्षा अधिक हात असल्याची वर्णनेही आढळतात. तिबेट व चीनमध्ये याची प्रसिद्धी खूप आहे. हा बऱ्याच उशिरा बौद्ध संप्रदायात प्रविष्ट झाला असावा, असे म्हणतात. [इं. बु. इ.]

रत्नहरी (जन्म इ. स. १७९१) एक हिंदी संतकवी. याचा जन्म पंजाबमधील सियालकोटमध्ये गुलाबसिंह व रामकुमारी यांच्या पोटी झाला. याला विरक्तीचे जणू बाळकडूच मिळाले होते. थोडे समजू लागताच हा घर सोडून अमृत-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सरला गेला. त्याने तिथे रामानुज या संताकडून दीक्षा घेतली. हा उदासी संप्रदायाचा अनुयायी होता. काही कालाने रत्नहरीने वैष्णव धर्माची दीक्षा घेतली. रत्नहरीसंबंधी अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. त्याचे स्मारकमंदिर अमृतसरमध्ये आहे. रत्नहरीला उत्तम प्रतिभा लाभलेली होती. त्याने सुमारे बत्तीस ग्रंथ

रत्नसंभव ध्यानीबुद्ध

रचले आहेत. त्यांतील काही ग्रंथ असे— रामरहस्य, रामललामगीत, सारसंगीत, दाशरथिदोहावली, रासपंचाध्यायी, रघूत्तमनामसहस्र, इत्यादी. रत्नहरीची भाषा व्रज असून, ती अलंकारप्रचुर आहे. तिच्यावर पंजाबीचीही छाप आहे. [पं. हिं. सा. इ.]

रत्नाकर (१) (इ. स. चे ९ वे शतक) काश्मीरमधला एक कवी. हा अवंतिवर्म्याच्या दरबारात होता, असे कळते. ध्वनिगायपंजिका, वक्रोक्तिपंचाशिका व हरविजय नामक ५० सर्गांचे महाकाव्य एवढी काव्यसंपदा याच्या नावावर आहे.

हरविजय या संस्कृत महाकाव्यात शिवकृत अंधकासुरवध हा विषय वर्णित आहे. सहाव्या सर्गात त्याने २०० श्लोकांची शिवस्तुती लिहिली असून, ४७ व्या सर्गात चंडिकास्तुती केली आहे. या दोन्ही स्तुतींवरून त्याचा अध्यात्म व शाक्त आगम यांवरचा अधिकार कळून येतो. त्याच्या काळात महाकवी माघ याचा विशेष बोलबाला होता. तो कमी करण्यासाठी त्याने वरील महाकाव्याचे प्रणयन केले. चमत्कृती व पांडित्यप्रदर्शन यांच्या खाली त्याची प्रतिभा आणि रसवत्ता दबून गेली आहे, असा या महाकाव्यावर विद्वानांचा अभिप्राय आहे. [सं. सा. इ.; हिं. वि. को.]

(२) (समाधी इ. स. १७१९) एक संतकवी. हा भार्गवगोत्री यजुर्वेदी ब्राह्मण असून, रामानंदाचा शिष्य होता. याला ज्ञानेश्वरांचा साक्षात्कार झाला होता, असे सांगतात. सांप्रत बऱ्हाणपूर येथे याचे वंशज आहेत. हा मुक्ताबाईच्या परंपरेतला होता. दीपरत्नाकर, उपदेशरत्नाकर, इ. बरेच ग्रंथ याने लिहिले. काही स्फुट पद्यरचनाही केली. त्याच्या सर्व ग्रंथांची मिळून सुमारे ४०,००० इतकी ओवीसंख्या भरते. याने गीताही समश्लोकी रचली आहे. याची भाषा प्रासादिक असून, दृष्टान्त देण्याची हातोटीही चांगली आहे. [गो. च. प.]

(३) एक कन्नड जैन कवी. हा इ. स. च्या १६ व्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला. भरतेशवैभव नावाचे एक गेय काव्य याने लिहिले आहे.

(४) एक महानुभाव ग्रंथकार. याने बत्तीसलक्षणटीका हा ग्रंथ रचला आहे. त्यात मूळ चक्रधराचे सूत्र, त्यावर भीष्माचार्यांचे भाष्य आणि त्यावर स्वतःची टीका, अशी त्याने आपल्या ग्रंथाची रचना केली आहे. [म. च. को.]

रत्नाकरशांती (इ. स. चे ११ वे शतक) एक बौद्ध नैयायिक. याला कलिकालसर्वज्ञ असेही म्हणत. हा ओदंतपुरी व विक्रमशिला या विद्यालयांत आचार्य व व्यवस्थापक होता. याने जेतारी व रत्नकीर्ती यांच्याजवळ तंत्रशास्त्राचे अध्ययन केले. धर्मप्रसारासाठी हा लंकेमध्येही गेला होता. याने छंदोरत्नाकर, विज्ञप्तिभागसिद्धि व अंतर्व्याप्ती असे तीन ग्रंथ लिहिले आहेत. [म. च. को.]

रत्नाचलदान दश पर्वतदानांतील एक दान. यासाठी हिरेमाणकांचा पर्वत करायचा असतो. फल— ब्रह्महत्यादी पापांपासून मुक्तता. याचे सर्व विधिविधान धान्यशैलदानाप्रमाणे असते. पाहा – धान्यशैल. [दा. चं.; पु. इं.]

रत्नावली गोस्वामी तुलसीदासांची पत्नी. हिच्या पित्याचे नाव दीनबंधू पाठक व मातेचे नाव दयावती होते. दीनबंधू बदरिया नावाच्या गावी राहत होता. रत्नावली अप्रतिम लावण्यवती, गृहकार्यनिपुण व कवयित्री होती. तिला सरस्वती असेही म्हणत. वयाच्या १२ व्या वर्षी तिचे तुलसीदासाशी लग्न झाले. ती लहानपणापासूनच शिवभक्त होती.

रत्नावलीचे एकूण २०१ दोहे व ४ पदे आजवर उपलब्ध

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाली आहेत. त्यांतल्या काही दोह्यांत तिच्या गृहस्थजीवनाची छटा आहे; काही दोहे तिने पतीने त्याग केल्यानंतरच्या वियोगावस्थेत लिहिले आहेत; काही सामान्य नीतीवर लिहिले आहेत आणि काही स्फुट आहेत. [अजन्ता, जून १९५३]

रत्नावलीव्रत एक जैनव्रत. या व्रताचे बृहत्, मध्यम व लघू असे तीन प्रकार आहेत. बृहत् व्रत ३६६ दिवसांत पूर्ण होते. यात ३०० उपवास आणि ६६ पारणी असतात. कोणत्याही महिन्यात या व्रताचा प्रारंभ करता येतो.

मध्यमव्रतात ७२ उपवास असतात. प्रत्येक महिन्यात ६ याप्रमाणे हे उपवास एका वर्षात पूर्ण करायचे असतात.

लघुव्रत ४८ दिवसांचे असते. त्यात ३० उपवास व १८ पारणी असतात. [जै. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.]

रत्ने प्रकाशमान कठीण वस्तू म्हणजे रत्न होय. संस्कृतात रत्नाला मणी असेही नाव आहे. मणिरत्न असा जोडशब्दही वापरतात. रत्ने खाणीतून अर्थात भूगर्भातून निघतात. म्हणूनच पृथ्वीला रत्नगर्भा असेही एक नाव आहे.

रत्नांचे महारत्ने व उपरत्ने असे दोन वर्ग आहेत. हिरा, माणिक, मोती, पाचू, पुष्कराज, नील, गोमेद, लसणिया, वैडूर्य व पोवळे ही महारत्ने होत. कूर्म, महाकूर्म, अहिच्छत्र, श्यावगंध, व्योमराग, कीटपक्ष, कुरुविंद, सूर्यनाल, हरितसार, जीवित, यवजाती, शिखिनील, वंशपत्र, धूलिमरकत, भस्मांग, जंबुकांत, स्फटिक, कर्केतन, पारिपात्र, नंदक, अंजनक, लौहितक, शैलेयक, शुक्तिचूर्ण, पुलक, तुत्थक, शुकग्रीव, गुरुत्पक्ष, पीतराग, वर्णरस, कर्पूरक व काच ही वर्गरत्नाकरानुसार उपरत्ने होत. दुसऱ्या काही ग्रंथांत वज्र, मुक्ता, माणिक्य, नील व मरकत ही पाच महारत्ने म्हटली असून, गोमेद, पुष्पराग, वैडूर्य व प्रवाळ ही उपरत्ने म्हटली आहेत.

रत्नाची तेजस्विता लक्षात घेऊन श्रेष्ठ व्यक्तीला रत्नाची उपमा देण्याचीही प्रथा आहे. उदा० नारीरत्न, शिशुरत्न, विद्वद्रत्न इत्यादी. बौद्ध परंपरेत बुद्ध, धर्म व संघ यांना त्रिरत्न म्हणतात. याच परंपरेत पुढील सात वस्तूंना रत्ने म्हटले आहे – (१) सुवर्णचक्र – एखाद्याला चक्रवर्तिपदाचा अभिषेक होतो, तेव्हा हे आकाशातून खाली येते व चक्रवर्तीच्या जवळ राहते. (२) चिंतामणी, (३) सम्राज्ञी, (४) शुभ्र घोडा, (५) पांढरा हत्ती, (६) कुशल मंत्री व (७) कुशल सेनापती.

पुराणांत व लोकसाहित्यात रत्नांच्या उत्पत्तिकथा दिल्या आहेत, त्या अशा –

(१) बली नावाचा एक त्रैलोक्यविजयी दानव होता. त्याने देवलोकावर आक्रमण करून इंद्राला जिंकले. मग देवांनी कपट करून बलीला श्रेष्ठ मानले व 'तू आमच्या यज्ञात बलियोग्य पशू हो,' अशी त्याला विनंती केली. बलीने 'तथास्तु' म्हटले. मग देवांनी सौत्रामणी यज्ञ केला. बलीला पशू म्हणून यूपस्तंभाला बांधले. पण बलीचे जन्म-कर्म विशुद्ध असल्यामुळे त्याच्या शरीराचे सर्व अवयव रत्नमय बनले. ती रत्ने घळघळा भूमीवर गळाली. ती पाहून देव, यक्ष, सिद्ध व नाग त्या रत्नराशीवर तुटून पडले. त्या झटापटीत ती रत्ने समुद्र, नद्या, पर्वत, अरण्य, इ. ठिकाणी विखरून पडली आणि तिथे तिथे त्यांच्या खाणी निर्माण झाल्या.

(२) इंद्राने वज्रासुर नामक एका असुराच्या मस्तकावर प्रहार केला. त्यासरशी त्याच्या शरीरातून नाना प्रकारची रत्ने खाली पडून पृथ्वीवर पसरली.

(३) समुद्रमंथनातून कौस्तुभादी चौदा रत्ने निर्माण झाली.

(४) रत्ने नागाच्या फणेमधून गळून पडली.

रत्नांचे गुणदोष पुढीलप्रमाणे सांगितले आहेत – गुरुत्व, घनत्व, काठिण्य, स्निग्धता, रंग, कांतिमत्ता व स्वच्छता हे रत्नांचे गुण होत. याच्या विरुद्ध ते सगळे दोष समजावे.

रत्ने शरीरावर धारण केल्याने भाग्योदय होतो व दैन्य-दारिद्र्य नष्ट होते, असे सांगितले आहे. चिंतामणी हे रत्न तर इच्छिलेली वस्तू मिळवून देते, असे म्हणतात. ज्याच्या जवळ चिंतामणी असतो, त्याला परचित्तज्ञान होते व त्याचे शत्रू नष्ट होतात, असेही म्हटले आहे. निर्दोष रत्न ऐश्वर्यदायक व सदोष रत्न दारिद्र्य देणारे असते.

रत्नांचा उपयोग ऋग्वेदकालापासून केलेला आढळून येतो. ऋग्वेदात तीन ठिकाणी सप्तरत्नांचा उल्लेख आला आहे. एका ठिकाणी तर एकवीस रत्नांचा उल्लेख आढळतो. त्या ऋचेत म्हटले आहे ते असे – हे ऋभूंनो, तुम्ही असे पराक्रमशाली आहां, म्हणून २१ प्रकारची जी दिव्यरत्ने, जी सोमार्पण करणाऱ्या प्रत्येक भक्ताला एकेक याप्रमाणे तुम्ही देता, ती सर्व रत्ने तुमच्या आशीर्वादासह आम्हांला देण्याची कृपा करा (ऋ. १.२०.७).

ऋग्वेदाच्या श्रीसूक्तात रत्नाबद्दल मणी असा शब्द आला आहे. पुराणांमध्ये रत्ने आणि रत्नखचित ग्रैवेय, किरीट, कुंडल, इ. अलंकार यांचे भरपूर उल्लेख सापडतात. महाकाव्यातही राजवैभवाच्या वर्णनात रत्नखचित अलंकारांचे व गृह, वापी, पुष्करिणी, इ. वस्तूंचे निर्देश येतात. वैदिक कालापासून आजतागायत रत्न ही एक वैभवनिदर्शक वस्तू असल्याचे मान्य झालेले आहे. ज्याच्या खजिन्यात विविध रत्ने आणि रत्नालंकार असतील, तो श्रीमान व भाग्यवान समजला जातो. रत्न ही अशी किमती वस्तू ठरल्यामुळे तिच्या देवघेवीच्या व्यवहारात फसगत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होऊ नये, रत्न म्हणून खडा किंवा नकली वस्तू पदरात बांधली जाऊ नये, म्हणून भारतात रत्नपारखी हा एक वर्गच निर्माण झाला आणि राजेरजवाडे, श्रीमंत, इ. वरिष्ठ लोकांच्या आदराला पात्र ठरला. रत्नाच्या खरेखोटेपणाची शहानिशा करता करता, अनुभव घेता घेता रत्नपरीक्षेचे एक स्वतंत्र शास्त्रच बनले. एतद्विषयक ग्रंथ पुढीलप्रमाणे –

अर्थशास्त्र – कौटिल्याने यात रत्नपरीक्षेविषयी काही महत्त्वाचे अनुभव सांगितले आहेत. त्याचप्रमाणे रत्नांची नावे, उत्पत्तिस्थाने, गुणदोष, इत्यादींचे वर्णन केले आहे. त्याचबरोबर राजाने जाणकार व्यक्तीच्या सल्ल्याने रत्नांची खरेदी करावी, असेही सांगितले आहे.

रत्नपरीक्षा – हा ग्रंथ सातव्या किंवा आठव्या शतकात बुद्धभट्टाने रचला आहे, असे मानतात. त्याने रत्नपरीक्षेविषयी पुष्कळ लिहिले आहे.

अगस्तिमत – बुद्धभट्टाच्या ग्रंथानंतर या ग्रंथाचा काल येतो. अगस्तीने रत्नशास्त्राच्या प्राचीन सिद्धातांचे विवेचन करीत असताना स्वतःचे अनुभवही ग्रथित केले आहेत.

नवरत्नपरीक्षा – कल्याणीचा राजा सोमेश्वर याने हा ग्रंथ लिहिला आहे. यात रत्नांच्या वर्णनाबरोबरच कृत्रिम रत्ने कशी ओळखावी ते विशेष रूपाने सांगितले आहे.

अगस्तीय रत्नपरीक्षा – हा ग्रंथ अगस्तिमताचे सार असला तरी त्यातील विवेचनात काही नव्या गोष्टीही आढळतात.

मानसोल्लास – या ग्रंथात रत्ने तोलावी कशी आणि ती तोलण्याचा तराजू कसा असावा, याचे वर्णन आहे.

याशिवाय रत्नसंग्रह, रत्नसमुच्चय, लघुरत्नपरीक्षा, मणिमाहात्म्य असे आणखी काही ग्रंथ संस्कृत भाषेत आहेत.

रत्नपरीक्षा – हा ठक्कर फेरू याने प्राकृत भाषेत रचलेला ग्रंथ असून, अनेक कारणांनी त्याला महत्त्व आहे. ठक्कर फेरू हा श्रीमाळ जातीचा असून, अलाउद्दीन खिलजीच्या खजिन्यावर आणि टांकसाळीवर होता. याने रत्नपरीक्षेची प्राचीन परंपरा सांगून त्यापुढे रत्नाचे मूल्य, वजन व उगमस्थाने यांची विशेष माहिती दिली आहे. याच्या मते रत्नांची संख्या सोळा असून, लाल, अटकी व फिरोज ही रत्ने पारस देशातील आहेत. याने नवरत्नांची यादी पद्मराग, मुक्ता, विद्रुम, मरकत, पुखराज, हिरा, इंद्रनील, गोमेद व वैडूर्य अशी दिली आहे.

भारतात व सिलोनमध्ये नकली रत्नेही बनवीत असत. नवरत्नपरीक्षा या ग्रंथात ती बनवण्याची प्रक्रिया दिली आहे.

इ. स. च्या अठराव्या शतकापर्यंत भारत ही रत्नांची एक प्रमुख बाजारपेठ होती. रत्नपरीक्षेच्या शास्त्रात भारतीय जवाहिरे मोठे निष्णात होते. इ. स. च्या प्रारंभिक शतकांत रोम आणि भारत यांच्यामध्ये जो विविध वस्तूंचा व्यापार चाले, त्यात रत्नांना विशेष स्थान होते. प्राचीन भारतात राजे आणि श्रीमंत लोक रत्नपारखी होते. रत्नांच्या खरेदीच्या व्यवहारात आपण फसले जाऊ नये म्हणून त्यांना पारखी बनणे अपरिहार्य होते. प्राचीन पौराणिक व बौद्ध साहित्यात जवाहिरे अर्थात रत्नांचे व्यापारी यांच्या विषयी पुष्कळ उल्लेख मिळतात.

बृहत्कथेच्या श्लोकसंग्रहात रत्नव्यवहाराविषयी एक कथा आली आहे, ती अशी– सानुदास नावाचा एक रत्नपारखी होता. तो एकदा पांड्य देशातल्या मदुरेच्या जव्हेरी बाजारात गेला. तिथे एक गिऱ्हाईक आणि एक व्यापारी यांचा एका रत्नाविषयी सौदा चालला होता. सानुदास त्या रत्नाकडे बारीक नजरेने बघत राहिला. ग्राहकाला वाटले, की हा यातला जाणकार असावा. त्याने सानुदासाला त्या रत्नाची किंमत विचारली. सानुदासाने एक कोटी ही किंमत सांगितली. सौदा करणाऱ्या दोघांनाही त्या किंमतीविषयी संशय उत्पन्न झाला; म्हणून ते दोघे दुसऱ्या एका पारख्याकडे गेले. तो पारखी म्हणाला, की 'जाणकाराला हे रत्न पृथ्वीमोलाचे आहे; पण अजाण माणूस त्याचे मोल एक छदामही करील.' यावरून सानुदासाचे रत्नपारखीपण त्या बाजारात प्रतिष्ठित झाले. ती गोष्ट पांड्य राजाच्या कानावर गेली. मग राजाने सानुदासाची रत्नपरीक्षक म्हणून आपल्या कोशागारावर नियुक्ती केली.

दिव्यावदान या बौद्ध ग्रंथात रत्नांचे व्यापारी समुद्रपर्यटन करीत असल्याचा उल्लेख मिळतो. ज्ञातृधर्मकथा व उत्तराध्ययनसूत्रे या जैन ग्रंथांतही रत्नांच्या व्यापाराचे अनेक संकेत मिळतात. [मै. गु. अ. ग्रं.; भारतीय रत्नों का विवेचन– श्री. उत्तमराम शुक्ल शास्त्री – त्रिपथगा, फेब्रुवारी १९५६]

रथ एक प्राचीन वाहन. मध्ययुगापर्यंत याचा उपयोग होत होता. वैदिक आर्य युद्धात रथाचा वापर करीत असत. ते त्यांचे एक महत्त्वाचे युद्धांग होते. प्राचीन काळी इजिप्त, असीरिया, बाबिलोनिया, इ. बहुतेक देशांत युद्धासाठी रथाचा उपयोग होत असे. हडप्पा येथे रथाचे दोन सांगाडे सापडले आहेत; त्यावरून सिंधुसंस्कृतीचे लोकही रथाचा उपयोग करीत, असे दिसते.

वैदिक आर्यांना रथाविषयी विलक्षण प्रेम होते. ऋग्वेदाच्या ६ व्या मंडलातले ४७ वे संपूर्ण सूक्त रथप्रशस्तीचे आहे. त्यातली एक ऋचा (ऋ. ६.४७.२८) अशी –

इन्द्रस्य वज्रो मरुतामनीकं मित्रस्य गर्भो वरुणस्य नाभिः।
सेमां नो हव्यदातिं जुषाणो देव रथ प्रति हव्या गृभाय॥

अर्थ – हे दिव्य रथा ! तू इंद्राचे वज्र, मरुतांचे सैन्य, सूर्य-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विवाचा गाभा आणि वरुणाचे अंतरंग आहेस. तर हा आमचा हविर्भाग गोड करून घेऊन आमच्या पाचारणाचा स्वीकार कर.

ही रथकल्पना प्रतीक म्हणून उपनिषदांतही आलेली आढळते. कठोपनिषदातला या विषयीचा श्लोक असा —

आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु।
बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च।

अर्थ — हे नचिकेत्या, आत्मा हा रथी, शरीर हे रथ, बुद्धी हा सारथी व मन हे लगाम आहे, असे तू समज.



रथ — भीम व कर्ण यांचे युद्ध

वैदिक आर्य रथ चालवण्यात आणि रथ बनवण्यातही कुशल होते. ऋभूंचा वर्ग हा रथकार होता, असे दिसते. कारण ऋभूंनी एक सुंदर रथ बनवून तो अश्विनींना दिला असे वर्णन ऋग्वेदात आहे (१.२०.३.).

रथाची रचना — रथाला दोन चाके असत. अश्विनौचा रथ मात्र तीन चाकांचा होता, असा उल्लेख आहे (ऋ. १.११८.२). पवी (धातूची धाव), प्रधी (घेर), वर्तुळ (मुख्य चाक), अर (आरे), नभ्य (तुंबा) व अक्ष (आंस) हे चाकाचे अवयव असत. आसाचे टोक छिद्रातून निघू नये म्हणून जी खुंटी ठोकीत, तिला आणी असे नाव होते. अक्षावर रथाचा कोश म्हणजे मुख्य भाग असे. त्याला ईषा नावाचा जोखडाला जोडणारा एक उभा दांडा असे. जोखड घोड्यांच्या मानेवर ठेवीत. घोडे वेडेवाकडे चालू नयेत म्हणून, जोखडाच्या दोन्ही टोकांना छोटे छोटे दांडे बसवीत. त्यांना शम्या म्हणत. रथाचा वेग कमी करण्यासाठी किंवा त्याला आधार देण्यासाठी एक भारी लाकूड खालच्या अंगाला लटकावीत. त्याला कस्तंभी म्हणत. मोठ्या रथाला चार चाकेही लावीत. रथाला बहुधा दोन घोडे जोडीत. गाढवे व खेचरे जोडल्याचेही उल्लेख आहेत (ऐ. ब्रा. ४.९.४). रथाला हत्ती व बैल जोडीत असेही वर्णन पुराणांत आहे. घोड्यांच्या पाठीवरून कक्षा (पट्टा) बांधीत. तोंडात लगाम देत. रथाचा उभा दांडा १८८ अंगुली, जोखड ८६ अंगुली व आस १०४ अंगुली असावा, अशी मोजमापे शुल्बसूत्रांत दिली आहेत.

रथाच्या पुढच्या बाजूस दोन लाकडी वाटोळी आसने शेजारी शेजारी असत. त्यांवर डावीकडे योद्धा व उजवीकडे सारथी बसे. रथाला वाघ, गेंडा व हत्ती यांच्या चामड्यांनी चहूअंगी मढवीत. कधी कधी कांवळ्यानेही मढवीत. बैठकीवरही कांवळे किंवा चामडे मढवीत. अशा रथांना अनुक्रमे कांबल व चार्मण म्हणत. श्रीमंत लोक आपल्या रथाला पांढरे कांबळे वेढीत. अशा रथाला पांडुकंबली म्हणत.

रथविद्या — रथी योद्ध्याचे सैन्यात प्रमुख स्थान असे. रथसंचालनकला वैदिक युगापासून महाभारतकालापर्यंत महत्त्वाची मानलेली होती. सारथ्य कर्म करणाऱ्यांना सूत म्हणत. राजे, मंत्री व युवराज यांनाही रथविद्या शिकावी लागे. शत्रूने सारथ्यावर शरसंधान केल्यास त्याचे रक्षण करणे हे योद्धयाचे काम असे. तरीही एखादे वेळी सारथी बाण लागून पडल्यास योद्धयालाच रथ स्वतः हाकावा लागे.

श्रीकृष्ण रथविद्येत पारंगत होता. त्याने शिष्टाईच्या प्रसंगी दुर्योधनाला म्हटले — 'मी अर्जुनाचा सारथी आहे. लक्षात ठेव, की तुझ्या सैन्यातले योद्धे जिकडे जिकडे वळतील, तिकडे तिकडे त्यांना समोर अर्जुनाचाच रथ दिसेल.' अर्जुनही रथविद्येत प्रवीण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होता. त्याचे हे प्रावीण्य उत्तरगोग्रहणप्रसंगी विराटपुत्र उत्तराचे सारथ्य करताना व सुभद्राहरणप्रसंगी दिसून आले. काही राजकन्याही रथविद्येत प्रावीण्य मिळवीत, असे दिसते. सुभद्राहरणप्रसंगी जेव्हा यादवसैन्य अर्जुनावर चालून आले, तेव्हा सुभद्रा त्याला म्हणाली. 'तुम्ही युद्ध करा, रथ मी चालविते. मला त्याचे शिक्षण आहे.' मातली ब्रह्मदेव व शल्य हे महाभारतात उल्लेखिलेले आणखी काही कुशल सारथी होत.

रथाचे प्रकार – निरनिराळ्या उपयोगासाठी रथ निरनिराळे असत व त्यांची नावेही भिन्न असत.

(१) देवरथ – जगन्नाथ, शिव, विष्णू, बुद्ध, राम, कृष्ण, इ. देवतांच्या शोभायात्रेसाठी बनवलेले रथ. त्यांची चाके मोठी व आकार देवमंदिरासारखा असे. ते ध्वजपताकांनी सुशोभित करीत. देवाचे जे ऐश्वर्य, तेच त्या रथांचेही असे.

(२) पुष्यरथ – विशेषप्रसंगी नगरातून राजाची मिरवणूक काढीत त्यासाठी तयार केलेला रथ.

(३) क्रीडारथ – हे रथ स्पर्धेसाठी बनविले जात.

(४) कर्णीरथ – हे आकाराने लहान, वस्त्राने झाकलेले आणि विशेषत: स्त्रियांसाठी बनवीत.

(५) वैनयिक – यांचा उपयोग बहुधा रथविद्येचे शिक्षण देण्यासाठी होत असावा.

(६) सांग्रामिक – हे युद्धासाठी बनविलेले आणि म्हणूनच उंच व मोठे असत. त्यांत शस्त्रांचा बराच मोठा साठाही करता येत असे. एकाऐवजी दोन योद्ध्यांना बसण्यासाठी त्यांत जागा ठेवलेली असे.

शिकंदराविरुद्धच्या लढाईत पोरस राजाने रथांचा उपयोग केला होता; पण तो अयशस्वी ठरला. मौर्य राजांनी युद्धांत रथांचा वापर केला होता, हे अर्थशास्त्रावरून कळते. पण पुढच्या काळात रथाचे महत्त्व हळूहळू कमी होत गेले. इ. स. च्या आठव्या शतकाच्या अखेरीस भारतातल्या युद्धांत रथांचा उपयोग करणे कायमचे बंद झाले.

बुद्धगया, भरहूत, सांची व अमरावती येथील स्तूपांवर रथांची बरीच सुंदर चित्रे कोरलेली आढळतात. कौशांबी, भीटा, इ. ठिकाणी मातीचे लहान लहान रथ सापडले आहेत. गुप्तकालीन कलाकृतींमध्येही रथांच्या आकृती दिसतात. त्यांवरून तत्कालीन रथांची कल्पना करता येते. पाहा – रथयात्रा.
[वे. इं.; क. हि. वा. पु.; त्रिपथगा, जुलै १९६२; ना. प्र. प.– केशव-स्मृति-अंक, १९५१.]

रथकार

रथ बनवणारी एक प्राचीन जात. आरंभी हा एक व्यवसायात्मक वर्ग होता. ऋग्वेदात ऋभूंना रथकार म्हटले आहे. अथर्ववेदात रथकारांना कारूनारूंपैकी एक मानले आहे (३.५.६). यजुर्वेदातही यांचा उल्लेख येतो. तै. संहितेत कारागिरी करणारा एक वर्ग म्हणून यांना उल्लेखिले आहे (४.५.४.२). बौधायनाच्या मते रथकार ही वैश्य पुरुष व शूद्र स्त्री यांची विवाहजन्य संतती होय. याज्ञवल्क्याच्या मते ही माहिष्य पुरुष व करण स्त्री यांची संतती असून, ती अनुलोम जात आहे (१.९५). वैखानस व उशनस यांचे मत असे, की रथकार म्हणजे क्षत्रिय पुरुष व ब्राह्मण स्त्री यांची विवाहबाह्य संतती होय. हे लोक शूद्रसदृश असून, वेदाध्ययनास अपात्र ठरविले गेले आहेत. बौद्धांच्या अस्सलायनसुत्तात व सुत्तविभंगात हीन जाती म्हणून यांचा उल्लेख येतो.

पूर्वमीमांसासूत्रात (६.१.४४.५०) जैमिनी सांगतो, की त्रैवर्णिकांपेक्षा रथकार ही निराळी जात असून, तिला सौधन्वन असे नाव आहे. त्यांना अग्निहोत्र घेण्याचा अधिकार आहे.

रथकारांचे उपनयन पावसाळ्यात करावे, असे सांगितलेले आहे. त्यावरून त्यांचा सामाजिक दर्जा हळूहळू खालावला असावा, असे वाटते. [हि. ध.; म. ज्ञा. को.; बु. भा. स.]

रथंतर साम

एक गायनप्रकार. याचा उल्लेख प्रामुख्याने पुराणांत येतो. या सामगायनाचे वर्णन देवीभागवतात आले आहे, ते असे–राम-लक्ष्मण स्वस्थ बसले असता एकाएकी आकाशातून नारदमुनी तिथे अवतीर्ण झाला आणि स्वरसमुदायाने भूषित असलेली वीणा वाजवीत बृहद्रथंतर संज्ञक साम गात गात रामाजवळ आला (३.३०.२). शिवपूजेमध्ये रथंतर सामाचे गायन विहित असून, देवप्रतिष्ठेचे अधिवासन, तडागादी विधी, इ. प्रसंगीं सामग पुरुषाच्या द्वारे या सामाचे गायन करावे असे सांगितले आहे (स्कंद पु. रेवाखंड ५१.४७; गरुड पु. १.४८.५३; मत्स्य पु. ५८.३६). देवाच्या स्नानांतर्गत भूषणसमर्पणाच्या प्रसंगी हे साम गायचे असते. देवाच्या अवयवांत रथंतर सामाचा आरोप त्याच्या मांडीवर केलेला आहे. (गरुड पु. १.४८.७८) 'अभि त्वा शूर ...' या सामवेदातल्या २३३ व्या मंत्राचे रथंतर सामाने गायन सांगितले आहे. सायणाने आपल्या सामवेदभाष्यभूमिकेत अनेक ठिकाणी या सामावर विचार केला आहे. [पु. वे. सा. स. अ.]

रथदान

एक दान. याचा विधी असा– चार बैल जोडलेल्या व कासरा, पराणी, चाबूक, इ. आयुधांनी युक्त अशा रथात दात्याने आपल्या शक्तीप्रमाणे अठरा धान्ये ठेवावी. मग सुवर्णदक्षिणेसह यथाविधि संकल्प करून हा रथ दान द्यावा. फल–शिवलोकप्राप्ती. [दा. चं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रथनवमी एक तिथिव्रत. आश्विन शुद्ध नवमीला हे व्रत करतात. दुर्गा ही या व्रताची देवता आहे. या दिवशी उपवास करून दुर्गेची पूजा करतात आणि आरसे, चवऱ्या, वस्त्रे, छत्र व माला यांनी सुशोभित केलेल्या रथात, रेड्यावर बसलेली दुर्गेची सुवर्णमूर्ती ठेवून रथाची मिरवणूक काढतात. मिरवणूक दुर्गेच्या देवालयात नेतात. तिथे दीपोत्सव करतात. नृत्य, नाट्य, इ. प्रयोगांनी जागर करतात. दुसऱ्या दिवशी रथातील मूर्तीला स्नान घालून तो रथ देवीला अर्पण करतात. मग एक पलंग, बैल व व्यायला झालेली गाय दान देतात. [हि.ध.; व्र.प.]

रथयात्रा एखाद्या उत्सवाच्या निमित्ताने विशिष्ट दिवशी देवाच्या उत्सवमूर्तीला रथात बसवून तिची मिरवणूक काढणे या सोहळयाला रथयात्रा किंवा रथोत्सव म्हणतात. ही चाल अनेक देवस्थानांतून चालू आहे. या उत्सवासाठी देवस्थानामध्ये लहानमोठे रथ तयार करून ठेवलेले असतात. ते बहुधा चार मोठ्या चाकांचे असतात. त्यांना क्वचित आठ, बारा, सोळा अशीही चाके असतात. मंदिराचे गर्भगृह आणि शिखर यांच्यासारखा या रथांचा आकार असतो. त्यांवर देवदेवतांची चित्रे कोरलेली असतात. यात्रेच्या वेळी ते ध्वजपताका आणि पुष्पमाला यांनी शृंगारतात. रथाच्या पुढच्या अंगाला मोठी व लांब दोरखंडे बांधतात व उत्सवमूर्ती रथात बसल्यावर यात्रेसाठी जमलेली भक्तमंडळी त्या दोरखंडांना धरून तो रथ ओढतात. रथापुढे वाजंत्री लावतात. दक्षिणेत अशा रथयात्रेत रथापुढे देवदासी नृत्य करतात. रथाच्या मागून वैदिक



म्हैसूर येथील उत्सवातील मिरवणुकीचा रथ

लोक मंत्रघोष करीत चालतात. शिवाची रथयात्रा असताना वैदिक मंत्रांबरोबरच काही लोक तेवारम गात चालतात. रथ ज्या मार्गाने जायचा असतो तो मार्ग सुशोभित करतात. घराघरापुढे सडासंमार्जन करून रांगोळ्या घालतात. घराघरांतून रथाला आरती होते. रथापुढे नारळही फोडले जातात. हा रथ निश्चित ठिकाणापर्यंत नेतात आणि शेवटच्या मुक्कामी त्याची विशेष पूजा केल्यावर तो परत देवस्थानाकडे आणला जातो.

या रथयात्रेची चाल पहिल्या प्रथम बौद्धांच्या महायान पंथात सुरू झाली, असे म्हणतात. हीनयानी बौद्ध बुद्धाच्या प्रतीकांची किंवा पदचिन्हांची पूजा करीत. महायानपंथी लोकांनी मात्र बुद्धाच्या मूर्ती बनवून त्यांची पूजाअर्चा सुरू केली. महायानी लोक बुद्धाला परमेश्वर मानून त्याला विविध राजोपचार समर्पू लागले. त्यापूर्वी रणांगणात विजयी झालेले राजे रथात बसून आपली विजययात्रा काढीत. ती राजयात्रा राजाच्या वैभवाला साजेशी असे. तिच्यापुढे भालदार-चोपदार असत. मागेपुढे अनेक लोक मिरवणुकीने चालत. राजमार्गावर घरोघरी त्या राजाला उपायने समर्पिली जात. तीच पद्धत महायानी लोकांनी उचलली. ते बुद्धाची सुवर्णमूर्ती रथात बसवून तिची मिरवणूक काढू लागले. महायान पंथ जिथवर पसरला तिथवर सर्वत्र बुद्धाची रथयात्रा सुरू झाली.

पाचव्या शतकात फाहियान नावाचा एक चिनी प्रवासी भारतात आला होता. त्याने पाटलिपुत्रातल्या रथयात्रेचे वर्णन लिहून ठेवले आहे, ते असे--

वैशाखातल्या अष्टमीला पाटलिपुत्रात बुद्धाची रथयात्रा निघाली. चारचाकी, वीस हात उंच आणि स्तूपाकार असा तो रथ होता. पुढच्या अंगाला हंस जोडलेले होते. रथ रंगवलेला होता. त्यावर लोकरी कापडाचे आच्छादन होते. रथावर रेशमी ध्वज फडफडत होता. मधोमध बुद्धाची बैठी सुवर्णमूर्ती होती. दोन्ही अंगी बोधिसत्त्व उभे होते. असे निरनिराळ्या देवतांचे वीस रथ सजवलेले होते. या यात्रेसाठी भिक्षू व गृहस्थ एकत्र जमले होते. प्रथम ब्राह्मणांनी येऊन बुद्धदेवाला नगरात येण्याचे निमंत्रण दिले. मग बुद्धाची पूजा झाल्यावर रथयात्रा निघाली. नगरप्रवेशाच्या या कार्यक्रमात दोन रात्री खर्ची पडल्या.

देवीपुराणामध्ये दुर्गेच्या रथयात्रेचे वर्णन आहे. भविष्य पुराणात ब्रह्मदेवाच्या रथयात्रेची माहिती दिलेली आहे (१.१८.३-१७). हेमाद्रीच्या व्रतखंडात सूर्याच्या रथयात्रेचे लांबलचक वर्णन असून, ही यात्रा इंद्रध्वजोत्सवाच्या बरोबरीची आहे, असे सांगितले आहे. हे दोन्ही उत्सव प्रत्येक वर्षी मार्गशीर्ष शुक्ल पक्षात लोकांच्या सुखासाठी व आरोग्यासाठी करावे, असे सांगितले आहे. रथ कसा तयार करावा, त्यात मूर्ती कशा बसवाव्या आणि त्यांची मिरवणूक कशी काढावी, याचे वर्णन भविष्योत्तर पुराणात आलेले आहे (१३४.४४-७१).

वैष्णव संप्रदायात पुरी येथील जगन्नाथाची रथयात्रा सर्वांत मोठी असते. प्रतिवर्षी आषाढ शुद्ध द्वितीयेला जगन्नाथाचा रथ निघतो आणि तो पुरीपासून एक मैल दूर असलेल्या जनकपुरापर्यंत जातो. या उत्सवासाठी भारतातून लक्षावधी यात्रा जमते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रथावर विराजमान झालेल्या जगन्नाथाचे दर्शन झाले, की आपल्याला स्वर्गाची कवाडे उघडली, अशी भाविकांची श्रद्धा असते. जगन्नाथाचा रथ साक्षात विश्वकर्म्याने तयार केला आणि ही रथयात्रेची प्रथा इंद्रद्युम्न राजाने सुरू केली, असे स्कंद पुराणात वर्णिले आहे. हे पुराण सातव्या शतकात निर्माण झाले असे मानतात. म्हणजे जगन्नाथाच्या रथयात्रेची परंपरा त्याच्या मागे जाते.

अक्रूराने कृष्ण आणि बलराम यांना गोकुळातून रथात बसवून मिरवीत मथुरेत आणले आणि त्या दिवसापासून भारतवर्षात हा नवा लोकोत्सव सुरू झाला, अशी वैष्णव भक्तांची भावना आहे.

पुरीतून ही रथयात्रा वल्लभ संप्रदायाने व्रजमंडळात आणली. गोस्वामी विठ्ठलनाथ यांनी वृंदावनात आषाढ शुद्ध द्वितीयेच्या दिवशी रथयात्रा सुरू केली, ती आजतागायत चालू आहे. या दिवशी कृष्णमूर्ती रथात बसवून तिची मिरवणूक काढतात. वल्लभसंप्रदायी कवींनी रथयात्रेवर पुष्कळ पद्यरचना केली आहे. गोविंदस्वामींच्या एका पद्यात कृष्ण यशोदेला म्हणतो –

तू मोहि रथ ले बैठि री मैया ।
इतकी ओर बैठि है राधे उतकी ओर बल भैया ।
गोपसखा सब संग चलेंगे अरु गावेंगे गीत ।

अर्थ – आई, तू मला मांडीवर घेऊन रथात बैस. एका बाजूला राधा बसेल. दुसऱ्या बाजूला बलराम. गोपालाचे सवंगडी गीत गात गात रथाबरोबर चालतील.

वैदिक काळी रथ हा देवांचे वाहन होता. इंद्र अनेक घोड्यांच्या रथात बसून सोमपानासाठी भक्तांकडे येत असे. वैदिक आर्यांनी रथ हे सैन्याचे एक अंग ठरवले व मौर्य काळापर्यंत ते चतुरंग दलातले एक अंग राहिले. पुढे युद्धपद्धती बदलली आणि रथ हे युद्धासाठी निरुपयोगी ठरले. पण पुढे महोत्सवाचे एक साधन म्हणून मोठमोठ्या देवस्थानांत रथ निर्माण केले गेले. भारतीय शिल्पकारांनीही रथ बनवलेले दिसतात. कोणार्क येथील सूर्यरथ, हंपी येथील विजयरथ आणि महाबलिपुरम येथील पांडवरथ हे रथ प्रसिद्ध व दर्शनीय आहेत.

भारतात निरनिराळ्या देवांचे रथ निघू लागले. त्याचबरोबर त्यांचे शिबिकोत्सवही सुरू झाले. निरनिराळ्या वारीं निरनिराळ्या देवतांच्या पालख्या निघू लागल्या. पालखीच्या जोडीला काही ठिकाणी लालकी, सुखासन, सरोवरात देवाला फिरविण्यासाठी जोडनौका ही वाहने आली. हे सगळे वाहनोत्सव रथयात्रेतून उगम पावले आहेत. [हि. ध.; म. भा. इ.; च. व. चि.; व्र. चं.]

रथसप्तमी माघ शुद्ध सप्तमीला हे नाव आहे. याव्यतिरिक्त अचलासप्तमी, जयंतीसप्तमी, भास्करसप्तमी, महासप्तमी, माकरीसप्तमी या अन्य नावांनीही ही सप्तमी ओळखली जाते. सप्तमीच्या व्रताचे विधान पुढीलप्रमाणे –

षष्ठीच्या दिवशी एकभुक्त राहून सप्तमीला पहाटे स्नान करावे. सोन्यारुप्याची पणती पेटवून ती डोक्यावर ठेवून सूर्याचे ध्यान करावे. मग तो दिवा उदकात सोडावा. घरच्या अंगणात रक्तचंदनाने सात घोड्यांचा सूर्याचा रथ व त्यावर अरुणासह सूर्यप्रतिमा काढावी. नंतर ‘ ध्येयः सदा सवितृमण्डलमध्यवर्ती ’ या मंत्राने ध्यान करून पूजा करावी. गोवऱ्यांच्या विस्तवावर मातीच्या भांड्यात खीर शिजवून तिचा नैवेद्य दाखवावा. सप्त धान्ये, सात रुईची पाने व सात बोरे सूर्याला वहावी. अष्टांग अर्घ्य द्यावे. ब्राह्मणाला भोजन घालावे.

हे व्रत महाराष्ट्रात मुख्यत्वे स्त्रियाच करतात. या दिवशी हळदीकुंकूही करतात. रथसप्तमीची कथा अशी–

कांबोज देशात यशोवर्मा नावाचा एक राजा होता. त्याला म्हातारपणी एक मुलगा झाला. तो जन्मतःच रोगी होता. त्याला आरोग्य कसे प्राप्त होईल, म्हणून यशोवर्म्याने एका ज्योतिष्याला विचारले. त्याने सांगितले. ‘ पूर्वजन्मी याने गरिबांचा छळ केला आणि सूर्याची पूजा केली नाही, म्हणून याची अशी अवस्था झाली आहे. याच्या आरोग्यासाठी तुम्ही रथसप्तमीला सूर्याची पूजा कराल तर हा निरोगी होईल. ’ राजाने तसे केले. त्यामुळे मुलगा रोगमुक्त व सुखी झाला.

दक्षिणेत या तिथीला रात्री गायन, वादन, दीपोत्सव व रथोत्सव करण्याची प्रथा आहे. ही तिथी अनध्यायाची मानल्यामुळे तिकडचे विद्यार्थी या दिवशी वेदाध्ययन करीत नाहीत. त्याचप्रमाणे या दिवशी एरुकूची पाने डोक्यावर ठेवून नदीत स्नान करण्याचीही चाल आहे. ही पाने या तिथीला मस्तकावर ठेवली तर मनातील अमंगल वासनांचा नाश होतो, अशी लोकांची श्रद्धा आहे. [व्रतराज; हि. ध.; सा. इं. फे.; आ. स. प्रा. अ. इ.]

रथाचा नाच महाराष्ट्रातील भिल्लांचे एक नृत्य. हे लोक एकाच्या खांद्यावर दुसऱ्याला उभे करून त्याचा रथ बनवतात आणि वर्तुळाकार नाचतात. गोमंतकात हा नाच थोडा निराळ्या प्रकाराने होतो. तिथले लोक देवाच्या जत्रेत किंवा रथसप्तमीच्या दिवशी बिनचाकाचा रथ तयार करतात. मग त्याच्या खाली दोन दोन दांडे घालून ते दांडे खांद्यावर घेतात आणि नाचतात. या नाचाला चौघड्याची साथ असते. [फो. डा. म.; भा. लो. नृ.; ए. हो. रा.]

रथोत्सव एक तिथिव्रत. आश्विन शुद्ध द्वितीयेला हे व्रत करतात. त्या दिवशी कृष्ण, बलराम व सुभद्रा यांच्या मूर्ती रथात बसवून त्यांची मिरवणूक काढतात. या दिवशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुष्य नक्षत्र असल्यास ते विशेष पुण्यप्रद मानतात. [हि. ध.]

रथोत्सव चतुर्थी एक व्रत. आश्विन शुद्ध चतुर्थीला हे व्रत करतात. या व्रतात भगवतीचे पूजन, जागर आणि एका सजविलेल्या रथात देवीला बसवून नगर-प्रदक्षिणा या गोष्टी करतात. [व्र. प.]

रनावट ब्राह्मण ब्राह्मणांची एक पोटजात. हे आद्य शंकराचार्यांचे अनुयायी असून, स्मार्त व भागवत या दोन्ही संप्रदायांचे आहेत. व्यंकटेश, कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरची देवी, जेजुरीचा खंडोबा, ही यांची कुलदैवते आहेत. यांना किस्ती असेही म्हणतात. पाहा – किस्ती ब्राह्मण. [व. व जा.]

रन्न (९४९ इ. स.) एक कन्नड महाकवी. कन्नड रत्नत्रयापैकी एक. याचा जन्म मुधोळ येथे एका वैश्य कुटुंबात झाला. या कुटुंबाचा बांगड्या विकण्याचा धंदा होता. हे कुटुंब धर्माने जैन होते. रन्नाचे मोठे तीन भाऊ आपला पिढीजात धंदा करीत; पण रन्नाने मात्र त्या व्यवसायाकडे पाठ फिरवली. तो अध्ययनाच्या मार्गाला लागला. थोड्याच काळात त्याने संस्कृत, प्राकृत आणि कन्नड या भाषांवर प्रभुत्व मिळवून त्यांतील वाङ्मयही आत्मसात केले. अजित सेनाचार्य हा याचा गुरू होता. रन्न हा चावुंडरायाचा सहाध्यायी होता आणि काही काल त्याच्या आश्रयालाही होता, असे सांगतात. तिथून पुढे तो सत्याश्रय चालुक्याच्या दरबारात गेला आणि तिथे राजाश्रयाला राहिला.

रन्नाने परशुरामचरित, चक्रेश्वरचरित, अजितपुराण आणि साहसभीमविजय किंवा गदायुद्ध हे चार काव्यग्रंथ लिहिले. पहिले दोन अद्यापि प्रकाशात आलेले नाहीत. पुढचे दोन मात्र प्रकाशित झालेले आहेत.

अजितपुराण या ग्रंथात त्याने जैनांचा दुसरा तीर्थंकर अजितनाथ याचे चरित्र वर्णिले आहे. हे पुराण छोटेसे असले, तरीही मनोरम आहे. साहसभीमविजय हे त्याचे अलौकिक आणि सर्वजनप्रिय असे काव्य होय. ते वीररसाने रसरसलेले आहे. भारतीय युद्धाच्या अखेरीचा भीम आणि दुर्योधन यांच्यांतील गदायुद्धाचा प्रसंग यात वर्णिलेला आहे. भीम हा अर्थातच या काव्याचा नायक आहे. आपला हा नायक त्याने सत्याश्रय चालुक्याला पुढे ठेवून उभा केला आहे. आपल्या काव्यातली भीमाची वीर मूर्ती वाचकांच्या डोळ्यांपुढे उभी करण्यासाठी त्याने ज्या पंक्ती लिहिल्या आहेत, त्या अप्रतिम आहेत.

दुर्योधन वैशंपायनसरोवरात लपून बसला असता भीमाने त्याला बाहेर येऊन आपल्याशी युद्ध करण्याचे आव्हान दिले. त्या आव्हानाने त्या सरोवरावर व दुर्योधनावर जे परिणाम घडले, त्यांचे रन्नकृत वर्णन (७.३४–३७) असे–

ओडेयलाजांडं कुलगिरिकेडेयल्
पिळियलके धात्री दिविजर्नडुग लकोडारिसुविनं
जटासुर– हिडिंब बक वैरि सिंहनादं गेदम्

अर्थ – जटासुर, हिडिंब, बक यांचा निःपात करणाऱ्या भीमसेनाचा सिंहनाद ब्रह्मांडाचा उच्छेद करणारा, मेरुमंदारासारख्या पर्वतांनाही उद्ध्वस्त करणारा, पृथ्वीला पिळून काढणारा व देवतांनाही धडकी भरविणारा होता.

अनिलतनुजर्नसिह ध्वनियं
केळदळ्कि तत्सरोवरदेहृदेय–
वने पाववंते पारिदुवनाकुलं
कोळदोळिर्द तद्विहगकुलम् ।।

अर्थ – भीमाचा सिंहनाद ऐकल्याबरोबर सरोवराच्या आश्रयाने राहणारे विहगगण आकाशात उडाले. त्या सरोवराचे हृदयच जणू उड्डाण करीत होते.

अळ्र्दु कोळे भीमकोपानळने
सर्वेइविट्ट जलदवल् मरुगिदुदा
कोळद जल मे एदे कासेद स रोळे कूळ् कुदिवंते
कुदिदुव निमिषतितगळ् ।।

अर्थ – भीमाचा कोपानल प्रकट झाल्यानंतर वैशंपायनसरोवराच्या पाण्याला उधाण आले व ते सारखे उसळू लागले. त्यामुळे सरोवराच्या आश्रयाने राहणारे जलचरदेखील भात शिजावा त्याप्रमाणे खदखदू लागले.

आ रवमं निर्जितकंठीरवमं निरस्तघनरवमं
कोपारुणनेत्रं केळदा–
नीरोलगिर्दु बेमर्तनुरगपताकम् ।।

अर्थ – सिंहाच्या नादावर विजय मिळविणारा, मेघमंडळाच्या सतत गडगडाटासारखा असणारा, हा ध्वनी ऐकून दुर्योधनाचे नेत्र क्रोधाने लाल झाले. भीमाच्या आव्हानाने निर्माण झालेला क्रोध एवढा भयंकर होता, की थंड पाण्यात असूनदेखील दुर्योधनाच्या सर्वांगावर घर्मबिंदू उभे राहिले.

गदायुद्धात रन्नाने भीमापेक्षाही दुर्योधनाचे चारित्र्य उदात्त रूपात रंगविलेले आहे. इतर कोणत्याही काव्यापेक्षा रन्नाच्या काव्यात नाट्यगुण मोठ्या प्रमाणात आढळतात. नाट्यात्मक अभिव्यक्तीच्या बाबतीत रन्न हा पंपापेक्षाही श्रेष्ठ ठरतो. पण पंप हा इतर अनेक बाबतींत रन्नाहून सरस आहे. म्हणून रन्नाला पंपाच्या खालोखाल स्थान मिळाले आहे.

रन्नाने आपल्या काव्यात आत्मप्रशंसा पुष्कळ केली आहे. तो स्वतःला बाणभट्टाच्या तोडीचा समजत असे. त्यामुळे तो गर्विष्ठ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि टीकाकारांची पर्वा न करणारा होता, असे दिसून येते.

पंपाची काव्यकृती संस्कृतप्रचुर असल्यामुळे तिला कित्येक ठिकाणी क्लिष्टता आली आहे. हा दोष रन्नाच्या काव्यात आढळत नाही. त्याने कन्नड भाषेतलेच शब्द गोळा करून ते आपल्या काव्यात वापरले आहेत. अशा अनेक गुणांनी रन्नाचे गदायुद्ध हे महाकाव्य कन्नड साहित्यात अजरामर ठरले आहे. [नरसिंगराव मानवी–पंचधारा, शके १८८० (इ. स. १९५८); क. द.; किव्वाळले गणपती शर्मा– भारतवाणी, सप्टेंबर १९५९]

रपारपी मुलांचा एक खेळ. याला महाराष्ट्रात वदावदी, आबादाबी, धप्पाधप्पी अशी अन्यही नावे आहेत. गुजरातमध्ये हाच खेळ छुटीदाडी या नावाने खेळला जातो. एका मोठ्या मैदानात वाटेल तितकी मुले हा खेळ खेळू शकतात. रबरी चेंडू किंवा चिंध्यांचा चेंडू हे एकमेव साहित्य या खेळाला लागते.

प्रथम एक गडी चेंडू घेतो आणि तो खेळात भाग घेणाऱ्या कोणत्याही गड्याच्या अंगावर फेकतो. चेंडू आपणांस लागू नये म्हणून बाकीचे गडी इतरत्र पळतात. फेकलेला चेंडू ज्याच्या हाती लागतो, तो पुन्हा दुसऱ्याच्या अंगावर मारतो. अशा रीतीने हा खेळ चालू राहतो. चेंडू चुकविण्याची धडपड करीत असतानाच तो झेलून आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न केला, तर खेळात विशेष गंमत येते. [स. म. खे. पु.]

रवाडी एक गुराखी जात. या लोकांची वस्ती कच्छ, काठेवाड व गुजरात या प्रदेशात आढळते. हे लोक आपण मारवाडातून व सिंधमधून आलो, असे सांगतात

रवाडी लोक आपणाला राजपूत समजतात. आम्ही राजपूत स्त्रिया न करता अप्सरांशी लग्ने लावली म्हणून आम्हांला ' रहा बहारी ' म्हणजे रीत सोडणारे असे म्हणू लागले, असा हे आपल्या नावाच्या उत्पत्तीचा इतिहास सांगतात. यांच्यांतील काही आडनावे राजपुतांप्रमाणेच आहेत.

गुजरातमधल्या रवाडी लोकांत पोटजाती नाहीत. परंतु काठेवाडमधील लोकांत सहा पोटजाती आहेत. या सर्व जातींमध्ये रोटीव्यवहार होतो; पण बेटीव्यवहार होत नाही. काठेवाडमधील रवडींना मुसलमानांच्या हातचे अन्न चालते.

विवाहप्रथा – यांच्यांत मामेबहिणीशी लग्न होते. जातीतील वरीच लग्ने एका वेळी सामुदायिक पद्धतीने होतात. त्यासाठी आसपासच्या खेड्यांतील लोक एका देवळात जमतात आणि ब्राह्मणाच्या सांगण्याप्रमाणे लग्नाचा दिवस नक्की करतात. वधूवरांनी एकमेकांचे हात हातांत घेणे आणि सप्तपदी हे लग्नातील आवश्यक विधी होत. वरपिता वधूपित्याला देज देतो. ही रक्कम पंचवीस रुपयांपासून दीडशे रुपयेपर्यंत असते विधवेला लग्न करायचे असल्यास तिला आपल्या धाकट्या दिराबरोबरच करावे लागते. घटस्फोटाची यांच्यांत प्रथा रूढ आहे. औदीच्य आणि सोमपुरी ब्राह्मण हे यांचे उपाध्येपण करतात.

हे गुरे पाळण्याचा धंदा करतात. कच्छ–काठेवाडमध्ये हे उंट पाळतात. हे लोक गाई–म्हशींचे दूध, तूप व लोकर विकतात.

देवदेवता– हे लोक यक्ष, क्षेत्रपाळ, पावू, हिंगलाज, इ. देवतांना भजतात. जोधपूर येथे यांची सिकोत्रा ही कुलदेवी आहे.

हे लोक जातपंचायतीमार्फत आपले जातीय तंटे सोडवतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात; अकराव्या दिवशी श्राद्ध करतात. त्या दिवशी व बाराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. [रज:कण; म. ज्ञा. को.; मुं. इ. जा.; बि. मुं. रा. प.]

रबाब एक वाद्य. याची बनावट लाकडाची असते. त्याच्या खालच्या बाजूला एक रुंद पण उथळ असा भोपळा असून, त्यावर कातडे मढविलेले असते. त्यावर घोडी असते. घोडीवर चार तारा बसवून त्या खुंट्यांनी पिळलेल्या असतात. काही वाद्यांवर सहा तारा पाहायला मिळतात. हे वाद्य वाजविताना गजाचा उपयोग करीत नाहीत; तर जव्याने उलट सुलट प्रहार करून ते वाजवितात. परंतु काही लोक घोड्यांच्या केसांच्या गजानेही हे वाद्य वाजवितात. वाद्यवादन करताना तांतीच्या तारांचा उपयोग करतात. या वाद्याचा आवाज मधुर व भरदार असतो. सतारीपेक्षा हे वाद्य आलापीसाठी अधिक उपयुक्त असते.

रबाब वाद्य वाजविणाऱ्यांना रबाबिये असे म्हणतात. प्यारखाँ, लखनौचे सादिकअल्लीखाँ, वायाझिदखाँ व त्यांचे शिष्य शिखरसेन, हे उत्तम रबाबिये होऊन गेले. काश्मीरचे सालेरबावी यांचे नावही या क्षेत्रात प्रसिद्ध आहे.

तानसेनाने या वाद्याची निर्मिती केली, असे म्हणतात. पण पद्मावत काव्यात रबाबाचा उल्लेख आढळत असल्यामुळे, ते तानसेनापूर्वीच निर्माण झाले होते, असे दिसते. तानसेनाने त्यात सुधारणा केली असल्याची शक्यता आहे. तानसेन स्वत: हे वाद्य उत्तम वाजवीत असे. त्याचे वंशजही रबाबिये म्हणून प्रसिद्ध आहेत. ऐने अकबरीत व राधा–गोविंदसंगीत–सार या ग्रंथांमध्ये याचे वर्णन आहे. संगीतसारात याला सात तारा असतात, असे म्हटले आहे.

रबाबाचा प्रसार पंजाबात विशेष आढळतो. अफगाणिस्थानातही हे वाद्य प्रचलित आहे. [सू. सा. श.; म्यु. ई.; सु. वि. को.; श्री. आबासाहेब मुजुमदार, पुणे]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रमजान मुस्लिम वर्षाचा नववा महिना. हा मुसलमानांचा रोजे (उपवास) करण्याचा महिना होय. रम्ज म्हणजे भाजणे, पोळणे. उपवासाने सर्व पापे जळून जातात, म्हणून या व्रताला हे नाव मिळाले असावे. या व्रताचे पालन करणे हा त्यांच्या धर्माचरणाच्या पाच नियमांपैकी एक आहे. या व्रताने स्वर्ग मिळतो आणि पापक्षालन होते, असे महंमदाचे वचन आहे (मिश्कत पु. ७ प्र. १). म्हणून मुस्लिम लोक याचे पालन करतात.

हे व्रत एक महिनाभर आचरायचे असते. व्रतकालात सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत काहीही खायचे-प्यायचे नसते. काही लोक थुंकीही गिळत नाहीत. कष्ट करणाऱ्यांना दिवस उजाडण्यापूर्वी जेवायची मोकळीक असते. प्रवासी, आजारी, वृद्ध, अपंग, गर्भिणी व लेकुरवाळ्या यांनी हा उपवास न केला तरी चालतो. मात्र प्रवासी व आजारी लोकांनी सवड होईल तेव्हा रोजे केले पाहिजेत. याला कझा म्हणजे भरपाई असे नाव आहे. लहान मुले हे व्रत करण्याचा प्रयत्न करतात; परंतु त्यांना झेपले नाही, तर ते लगेच उपवास सोडून नेहमीचे अन्न घेऊ शकतात. अन्नसेवनापूर्वी थंड सरबत घेण्याची चाल आहे.

धार्मिक वृत्तीचे मुसलमान या महिन्यातील काही दिवस मशिदीत घालवितात. तिथे पुनःपुन्हा प्रार्थना करणे, कुराण वाचणे, इ. कार्यक्रमही करतात. रमजानच्या सत्ताविसाव्या रात्री स्वर्गात संपूर्ण कुराण ग्रंथ तयार झाला, असे महंमदाने म्हटले आहे. केवळ उपवास व प्रार्थना करून पुण्य लागत नाही; तर त्या वेळी सत्यभाषण, सद्विचार व सदाचार यांना महत्त्व असते, असेही महंमदाचे वचन आहे. [डि. इ.; ऑ. मु. इं.]

रमजान ईद मुसलमानांचा एक मोठा सण. हा सण म्हणजे रमजान व्रताचे पारणे असते. शव्वाल हा त्यांचा दहावा महिना असून, त्याच्या पहिल्या दिवशी हे पारणे करायचे असते; म्हणून त्याला इदुल फित्र असे म्हणतात. या ईदपेक्षा बकरीदचे महत्त्व अधिक असल्यामुळे तिला मोठी ईद व हिला लहान ईद असे म्हणतात. या दिवशी खूप दानधर्म केला जातो म्हणून त्याला ईदुस्सदका असेही नाव आहे.

सकाळी प्रार्थना झाल्यावर प्रथम दहीभात व साखर यांचे जेवण होते. त्याच वेळी खारका खाण्याचीही चाल आहे. कारण महंमद व त्याच्या कुटुंबातील लोक यांना हाच पदार्थ मुख्यत्वे उपलब्ध होता, अशी समजूत आहे. शेवयाची खीर खाण्याचीही प्रथा आहे.

या दिवशी सर्व स्त्री-पुरुष उत्तम पोषाख करून व अलंकार घालून एकमेकांना भेटायला जातात. त्याचप्रमाणे गावाबाहेरील ईदगाह (प्रार्थनेची जागा) नावाच्या पटांगणात जमून सामुदायिक प्रार्थनाही करतात. तिथे पेश इमाम (मुख्य आचार्य) खुत्बा म्हणजे कौटुंबिक, सामाजिक व आध्यात्मिक कर्तव्यांचा उपदेश करतो. नंतर सर्वजण प्रार्थना करतात. मग आमीन म्हणजे शांती असा घोष केल्यावर हा कार्यक्रम संपतो.

रमण महर्षी (१८७९-१९५० इ. स.) एक आधुनिक संत. तमिळनाडमधील रामनाड जिल्ह्यात मदुरेपासून तीन मैल अंतरावर असलेल्या तिरुच्चुळी गावी यांचा जन्म झाला. यांच्या पित्याचे नाव सुंदर अय्यर व मातेचे नाव अळगम्माळ असे होते. यांचे पाळण्यातले नाव वेंकटरामन असे होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण तिरुच्चुळी येथेच झाले. वेंकटरामन बारा वर्षांचे असतानाच त्यांचे वडील वारले. त्यामुळे त्यांचे सर्व कुटुंब मदुरा येथे त्यांच्या चुलत्याकडे जाऊन राहिले. तिथे वेंकटरामन इंग्रजी शाळेत जाऊ लागले. पण शाळेत त्यांचे अभ्यासाकडे विशेष लक्ष नसे.

वेंकटरामन हायस्कूलमध्ये शिकत असताना त्यांच्या भावी जीवनाचा सूचक असा एक प्रसंग घडून आला. एकदा ते एकटेच बसले असताना एकाएकी त्यांना आपण आता मरणार असे वाटू लागले. पण धीर न सोडता ते शांतपणे मृत्यूचे कोडे सोडवायचा प्रयत्न करू लागले. मरणाचा बाह्य देखावा हुबेहूब साधण्यासाठी त्यांनी तोंड बंद केले, डोळे मिटले आणि श्वासोच्छ्वास बंद केला. आता हे शरीर मृत झाले आणि आता याला स्मशानात नेऊन जाळतील, असा विचार त्यांच्या मनात आला. पण दुसऱ्या क्षणी दुसराच विचार त्यांच्या मनात उद्भवला. हे शरीर मृत झाले हे खरे; पण मी काही मेलो नाही. शरीर जड व अचेतन झाले खरे; पण शरीराच्या आत मी म्हणून कोणीतरी हे मरण पाहणारा आहेच. शरीराहून भिन्न असणाऱ्या त्याचा मला भास होत आहे. शरीराहून निराळी अशी कोणती तरी चिद्वस्तू म्हणजेच मी.

हा साक्षात्कार इतका जबरदस्त होता, की त्यांचा पूर्वीचा स्वभाव अगदी पालटला. त्यांना एकांतवास आवडू लागला. वेळ मिळेल तेव्हा ते मीनाक्षीच्या मंदिरात जाऊन भक्तिभावाने तिची प्रार्थना करू लागले.

त्यानंतर पुढील साधनेसाठी आपण अरुणाचलावर जावे, असे त्यांनी ठरवले. वाटेत अनेक हालअपेष्टा सोसून ते १ सप्टेंबर. १८९६ रोजी सकाळी अरुणाचलावर पोचले. नेहमी आठ वाजेपर्यंत न उघडणारे अरुणाचलेश्वराच्या मंदिराचे दरवाजे त्या दिवशी आधीच उघडलेले होते. वेंकटरामन सरळ गाभाऱ्यात गेले आणि त्यांनी देवाच्या चरणी मस्तक नम्र केले. त्या वेळी त्यांना एका अपूर्व शांतीचा लाभ झाला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यानंतर वेंकटरामनांनी अंगातील कपडे काढून टाकले व फक्त एक लंगोटी परिधान केली. गळ्यातील जानवेही त्यांनी काढून टाकले. मग डोक्याचे मुंडन करून ते संन्यासी बनले.

अरुणाचलेश्वराचे मंदिर अत्यंत भव्य असून, त्याच्या भोवती विशाल प्राकार आहेत. त्यांपैकी पहिल्या प्राकारात एक सहस्र-स्तंभी मंडप आहे. मंडपात एक चवुतरा असून, त्याच्या दक्षिण बाजूला पातालर्लिंग नावाची एक गुहा आहे. वेंकटरामन त्या चवुतऱ्यावर बसून ध्यान करू लागले. परंतु कांही खोडकर मुलांनी त्यांना त्रास द्यायला सुरुवात केली. म्हणून तिथून उठून ते पाताल-लिंग गुंफेत जाऊन बसले. तिथे ध्यानमग्न स्थितीत असता मुंग्या, चिलटे, इ. किडयांनी चावून त्यांचे अंग रक्तबंबाळ केले. वेंकट-रामनांना मात्र त्याची वार्ताही नव्हती. वेंकटाचल मोदली नावाच्या गृहस्थांनी एक दिवस हा प्रकार पाहिला आणि त्यांनी रामनांना तिथून उचलून गोपुर सुब्रह्मण्यस्वामी यांच्या मंदिरात नेऊन ठेवले. तरीही त्यांची ध्यानावस्था भंगली नाही.

अरुणाचलावर त्यांनी ध्यानासाठी अनेक ठिकाणे निवडली. ते बहुधा सदैव ध्यानमग्न असत. शरीराची त्यांना पर्वा नव्हती. त्यामुळे त्यांच्या केसांच्या जटा झाल्या, हातापायांची नखे वाढली आणि शरीरही अत्यंत दुर्बल झाले. पण त्या काळात कोणी ना कोणीतरी दयार्द्र बुद्धीने त्यांची सेवा करीत असे आणि त्यांना खायला-प्यायला देत असे. एक सत्पुरुष म्हणून रमणांची कीर्ती त्या काळात हळूहळू पसरू लागली व अनेक लोक त्यांच्या दर्शना-साठी जाऊ लागले. अरुणाचलावर पोचल्यापासून त्यांनी जे मौन धारण केले होते, ते पुढे सतत अकरा वर्षे त्यांनी पाळले. त्याच काळात लोक त्यांना रमणमहर्षी म्हणू लागले.

मध्यंतरीच्या काळात त्यांची आई त्यांना घरी परत नेण्या-साठी आली होती. परंतु ते तिच्या बरोबर गेले नाहीत. पुढे इ. स. १९१६ मध्ये तीच त्यांच्या आश्रमात येऊन राहिली. पुढे त्यांचा धाकटा भाऊही संन्यास घेऊन निरंजनानंद हे नाव धारण करून त्यांच्याजवळ राहायला आला. महर्षींच्या उपदेशाने त्यांच्या मातुःश्रीही हळूहळू विरक्त बनल्या. इ. स. १९२२ च्या मे महिन्यात त्या कालवश झाल्या. अरुणाचलाच्या पायथ्याशी दक्षिण टोकाला पाली तीर्थाजवळ त्यांची समाधी बांधण्यात आली. समाधीच्या जागेवर शिवलिंगाची स्थापना करून त्याला मातृभूतेश्वर असे नाव देण्यात आले.

महर्षी त्या वेळी स्कंदाश्रमात राहात असत. हा आश्रम अरुणा-चलेश्वरमंदिराजवळ एका गुहेत होता. तिथून रोज पायथ्याला मातृभूतेश्वराच्या पूजेसाठी कोणाला तरी यावे लागत असे. म्हणून भक्तमंडळींनी रमणमहर्षींना पायथ्याशी आश्रम बांध-ण्याची विनंती केली. महर्षींनी ती मान्य केली. मग भक्त-मंडळींनी महर्षींसाठी एक मठ, अतिथिशाळा, भोजनशाळा, स्वयंपाकगृह, गोशाळा, पुष्पवाटिका, इ. इमारती तिथे बांधल्या. त्यांच्या भोवती आंबराई व नारळी-केळीच्या बागा लावून तो सर्व आश्रमपरिसर सुशोभित व सुफलित केला.

आश्रमात कितीही अतिथी आले, तरी त्या सर्वांना इथे सार व भात मिळतो. प्रातःकाळी इडली, अकरा वाजता भोजन, तीन वाजता चहा-कॉफी व रात्री भोजन, अशी इथली व्यवस्था आहे. दर्शनार्थी लोक जी फळे व मेवामिठाई आणतात, ती जम-लेल्या सर्वांना प्रसाद म्हणून वाटली जातात.

रमणजयंती, अळगम्माळचा वर्षदिन व कृत्तिकामहोत्सव हे तीन उत्सव आश्रमात मोठ्या थाटाने साजरे होतात.

महर्षींची मौनावस्था सुटल्यावर त्यांचे नित्यकर्म सामान्यतः पुढीलप्रमाणे असे— पहाटे उठून आश्रमाला लागणाऱ्या भाज्या निवडणे व चिरणे ही कामे ते शिष्यांसमवेत करीत. त्या वेळी शिष्यमंडळी महर्षींनी रचलेल्या अक्षरमणमालेतील गीते व इतर स्तोत्रे गात. नंतर शिष्यमंडळी स्नानादी कृत्ये आटपून स्वयंपाकाकडे वळत.

प्रातःकाळी सहा वाजता महर्षी स्नान करीत व नंतर शिष्य आणि अतिथी यांसह कॉफी, इडली किंवा उपमा असा फराळ

रमण महर्षी

करीत. मग ते मुख्य दालनात येऊन बसत. तिथे अनेक लोक त्यांच्या दर्शनासाठी येत. अकरा वाजेपर्यंत दर्शनाचा कार्यक्रम चाले. मग भोजन करून ते विश्रांती घेत. तीन वाजता पुन्हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चहा वगैरे घेऊन झाल्यावर दर्शनार्थी येऊ लागत, ते रात्र पडेपर्यंत. रात्री भोजनोत्तर कधी कधी ते ऋभुगीतादी ग्रंथांचे पाठ देत. अशा रीतीने तिथे जिज्ञासूंना ज्ञानदान करण्याचे काम सतत चालत असे.

रमण महर्षी एकदा अरुणाचलावर गेले, ते आयुष्याच्या अखेरीपर्यंत तिथेच राहिले. लोकच त्यांच्या दर्शनासाठी तिथे जाऊ लागले. आधिव्याधींनी पिडलेल्या भक्तांना त्यांच्या दर्शनाने शांती मिळू लागली. काव्यकंठ गणपतीशास्त्री नामक एक विद्वान ग्रंथकार त्यांना शरण आले आणि महर्षींच्या उपदेशाने त्यांना शांती व समाधान यांचा लाभ झाला. अनेक पाश्चात्य लोकही आध्यात्मिक साधनेच्या उद्देशाने त्यांच्याकडे येऊ लागले. त्यांपैकी पॉल ब्रंटन हा इंग्रज गृहस्थ प्रमुख होता. त्याने एक पुस्तक लिहून महर्षींचा संदेश पाश्चात्य देशांत पोचविला. त्यामुळे जगाच्या अनेक भागांतून पुष्कळ लोक त्यांच्या दर्शनासाठी येऊ लागले. खरी तळमळ असणाऱ्यांनाच ते उपदेश करीत व अध्यात्मसाधना करू इच्छिणाऱ्यांना मार्गदर्शन करीत. रामनाथ अय्यर, सुंदरम्मल, रामयोगी, नरसिंह अय्यर, शुद्धानंद भारती, हॅरी डिकमन, फ्रेडरिक फ्लेचर, राफेल हर्स्ट, इ. मंडळी त्यांच्या प्रमुख शिष्यांपैकी आहेत. दिनांक १४ एप्रिल १९५० रोजी कर्क रोगाचे निमित्त होऊन त्यांनी हा देह सोडला.

तत्त्वज्ञान – रमणमहर्षींनी स्वतः व्याख्याने देऊन किंवा पुस्तके लिहून आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रचार केला नाही. भक्त त्यांच्याकडे जाऊन त्यांना प्रश्न विचारीत व त्या प्रश्नांना ते स्वानुभवाची उत्तरे देत. या प्रश्नोत्तरांनीच श्रीरमणवाङ्मय बनलेले आहे. हे वाङ्मय पुढीलप्रमाणे –

श्रीसद्दर्शन – यात मुख्य चाळीस श्लोक आणि नंतर रचलेले काही श्लोक आहेत. रमणमहर्षींचे तत्त्वज्ञान सांगणारा आणि अद्वैतानुभव प्रतिपादन करणारा असा हा अलौकिक ग्रंथ आहे.

उपदेशसार आणि रमणोपनिषद – यात कर्म, भक्ती, योग आणि ज्ञान यांचा सुंदर समन्वय असून, वेदान्ताची तत्त्वे थोडक्यात पण सुस्पष्टपणे अवघ्या तीस श्लोकांत सांगितली आहेत.

रमणगीता – भक्तांनी विचारलेले प्रश्न आणि रमणमहर्षींनी त्यांना दिलेली उत्तरे ही सर्व श्लोकरूपाने ग्रथित करून, गणपतीशास्त्री यांनी अठरा अध्यायांची रमणगीता तयार केली आहे.

याव्यतिरिक्त त्यांची इतरही काही स्तोत्रे व प्रबंध प्रसिद्ध आहेत. रमणमहर्षींनी लोकांना वेळोवेळी जो उपदेश केला, त्याचे थोडक्यात सार असे–

गुरू आणि गुरुकृपा – महर्षींनी मानवी गुरू केला नाही. ते सांगत की आत्मा हाच खरा गुरू आहे. मनुष्य संसारातील दु:खाने गांजून गेला म्हणजे मग तो तिकडून निवृत्त होऊन परमात्म्याचे स्मरण आणि प्रार्थना करू लागतो. तेव्हा त्याची चित्तशुद्धी होते आणि आपल्या वासना तृप्त करून घेण्याऐवजी तो ईशदर्शनासाठी उत्सुक होतो. मग परमेश्वर गुरूच्या रूपाने त्याला भेटतो आणि सदुपदेश करतो. त्यामुळे त्याचे चित्त संसारापासून परावृत्त होऊन अंतर्मुख बनते. गुरूंचे दोन प्रकार आहेत–एक बाह्य गुरू आणि दुसरा अंतर्गुरू. बाह्य गुरू त्यांच्या चित्ताला आत लोटतो आणि अंतर्गुरू त्याचे चित्त जोराने आत ओढतो. जोपर्यंत आपली देहात्मबुद्धी थोड्या-बहुत प्रमाणात का होईना कायम असते, तोपर्यंत बाह्य गुरूची आवश्यकता असते. पण ती जेव्हा पार नाहीशी होते, तेव्हा अंतर्गुरू म्हणजे आत्मा किंवा परमात्मा हाच खरा गुरू असल्याचा अनुभव येतो.

कर्म, भक्ती आणि ज्ञान – खरी भक्ती आणि यथार्थ ज्ञान यांमध्ये महर्षी अविरोध मानतात. ब्रह्मात्मैक्य साक्षात्काररूप निष्ठा व प्रपत्ती (शरणागती) यांचे फल समान आहे, अशी त्यांची धारणा आहे. कर्तव्य कर्म करावे; पण कर्तृत्व आणि कर्मफल ईश्वराला समर्पण करून मोकळे व्हावे. म्हणजे आपले कर्म चित्तशोधक व मुक्तिसाधक होते. मी कर्म करतो, असे मानणाऱ्या पुरुषालाच कर्मांचे फल भोगणे भाग पडते. विचाराच्या योगाने हृदयातून कर्तृता धुवून काढली असता संचित, प्रारब्ध व क्रियमाण या तीन्ही कर्मांचा नाश होतो. याचेच नाव मुक्ती होय.

कर्म, भक्ती, योग आणि ज्ञान यांचा समन्वय त्यांनी पुढील पंक्तीत केला आहे–

> हृत्स्थले मनःस्वस्थता क्रिया
> भक्तियोगबोधाश्च निश्चितम् ॥

अर्थ – हृदयाच्या ठिकाणी मन स्वस्थ करणे, हाच कर्ममार्ग भक्तिमार्ग, योगमार्ग आणि ज्ञानमार्ग होय, असे निश्चितपणे समजावे.

आत्मविचार – याचे सार रमणमहर्षींनी पुढील श्लोकात सांगितले आहे–

> हृदयकुहरमध्ये केवलं ब्रह्ममात्र–
> महमहमिति साक्षादात्मरूपेण भान्ति: ।
> हृदि विश मनसा स्वं चिन्वता मज्जता वा
> पवनचलनरोधादात्मनिष्ठो भव त्वम् ॥

अर्थ – हृदयगुहेमध्ये प्रत्यक्ष ब्रह्म हेच मी मी म्हणून आत्मरूपाने स्फुरत असते. एकाग्र मनाने त्या आपल्या आत्म्याचा शोध करीत किंवा बुडी मारीत तू हृदयात प्रवेश कर किंवा प्राणगतिनिरोधाने तू आत्मनिष्ठ हो.

मन – मनाचे रूप संकल्प हे होय. यापासूनच मी, माझे या जड वृत्ती उत्पन्न होतात. जड वृत्ती समाधिद्वारे लीन करता

CC0. In Public Domain. Jangamwadj Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

येतात. याचे मूळ हृदय होय. हे मूळ सापडले, की सद्वस्तू प्राप्त होते. सद्वस्तू अखंड, नित्य, एकाकार व इंद्रियजन्य ज्ञानापासून अबाधित आहे. आत्मा व ब्रह्म म्हणजेच सद्वस्तू होय.

मी कोण आहे, हा विचार सातत्याने सुरू झाला, की मनाचा लय होईल. पण हा विचारसुद्धा एक -मनोविकार आहे. या विचाराने इतर भावना नष्ट होतील व शेवटी मनाचाही लोप होईल. ज्याप्रमाणे अग्नी चितेला जाळतो व शेवटी त्याचीही राख होते, त्याप्रमाणे आत्म्याला अनुभूती प्राप्त होईल व मीपणाचा भाव नष्ट होईल. पण प्राण व मीपणाचा विचार या दोहोंचे मूळ एकच आहे. जे कर्म करायचे, ते अहंभावविरहित असले पाहिजे.

थोडक्यात सांगायचे तर, रमणमहर्षींचे तत्त्वज्ञान हे अद्वैत वेदान्ताला अनुसरणारे असून, आत्मसाक्षात्कार हे त्याचे ध्येय आहे. [भगवान रमणमहर्षी – श्री. रा. गो. भिडे, १९५३; टे. सं. इं.; श्रीरमण, पुरुषार्थ, जाने. १९५९]

रमल फासे टाकून भविष्यविषयक प्रश्नांची उत्तरे सांगण्याची एक पद्धती. पाहा – ज्योतिषशास्त्र.

रमा एकादशी आश्विन वद्य एकादशीला हे नाव आहे. या दिवशी पूजा, उपवास, जागरण, इ. गोष्टी विहित आहेत. फल– इहपरलोकी चिरसुखप्राप्ती.

रमाबाई, पंडिता (इ. स. १८५८–१९२२) महाराष्ट्रातील एक सुधारक विदुषी. २३ एप्रिल १८५८ रोजी मंगळूरजवळच्या गंगामूळ या डोंगरावर डोंगरे नावाच्या चित्पावन ब्राह्मणकुलात रमाबाईंचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अनंतशास्त्री व आईचे नाव लक्ष्मीबाई असे होते. ती दोघेही संस्कृत पंडित होती. गंगामूळ येथे अनंतशास्त्रींनी आश्रम बांधला होता व टुमदार वसाहत उठवली होती. तिथे विद्यार्थी येऊन राहत व संस्कृत भाषा आणि न्याय व व्याकरण ही शास्त्रे शिकून परत जात.

साधारण दहा वर्षे गंगामूळ येथे राहिल्यावर घरच्या कटकटीमुळे अनंतशास्त्रींनी गंगामूळ सोडले. आपली पत्नी, मुलगा व दोन मुली यांना घेऊन ते माळ किंवा माळहेरंजी या आपल्या गावी काही दिवस राहिले आणि मग भारतभर तीर्थयात्रेला निघाले. अनंतशास्त्र्यांनी आपल्या पत्नीला संस्कृत भाषा व व्याकरण, न्याय ही शास्त्रे शिकवली होती. शेजाऱ्यापाजाऱ्यांना व घरच्या इतर माणसांनाही ही गोष्ट आवडली नाही. त्यामुळे रमाबाईंच्या वडिलांना फार त्रास सोसावा लागला. त्यांनी तीर्थयात्रेसाठी गंगामूळ सोडले, तेव्हा रमाबाई फक्त सहा महिन्याच्या होत्या. पायी तीर्थयात्रा करीत हिंडत असता रमाबाई पंधरा सोळा वर्षांची होईतो तिच्या वडिलांनी प्रवासातच तिला संस्कृत काव्ये व शास्त्रे शिकवली. रमाबाई तेवढ्या त्या वयातच पंडिता झाली.

पुढे हे कुटुंब पंधरा-सोळा वर्षांनी त्या काळच्या मद्रास इलाख्यात गेले. त्या वेळी तिथे फार मोठा दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळात रमाबाईंचे आईवडील व मोठी बहीण यांना मृत्यू आला. तरी रमाबाई व त्यांचा मोठा भाऊ श्रीनिवास यांनी तीर्थयात्रेचे व्रत पुढे चालूच ठेवले. तीन-चार वर्षांत चार-पाच हजार मैलांचा प्रवास त्यांनी पायी केला. प्रवासात ती दोघे पुराण सांगत व संस्कृतमध्ये व्याख्याने देत. पण त्यांच्या या उपक्रमाचे कोणीच कौतुक केले नाही. हिंडत हिंडत ती दोघे कलकत्ता शहरी गेली. तिथे मात्र ब्राह्मो समाजाच्या पुढाऱ्यांनी व कलकत्ता विश्वविद्यालयातील पंडितांनी त्यांच्या विद्येचा आदर केला, त्या दोघांना कलकत्ता विश्वविद्यालयात बोलावून त्यांचा सन्मान केला व रमाबाईंना पंडिता सरस्वती अशी उपाधी दिली.

पण कलकत्त्याच्या वास्तव्यातच त्यांचा भाऊ श्रीनिवास हा मृत्युमुखी पडला व रमाबाईंचा एकुलता एक आधारही तुटला. त्यानंतर थोड्या दिवसांनी त्यांनी बिपिन- विहारीदास मेधावी या सुशिक्षित, सुसंस्कृत पण शूद्र बंगाली पुरुषाशी इ. स. १८८० मध्ये विवाह केला. या आंतरजातीय व आंतरप्रांतीय विवाहाने त्या काळात लोकमत फारच क्षुब्ध झाले. रमाबाईंना विवाहसौख्य फार काळ लाभले नाही. विवाहानंतर अवघ्या एकोणीस महिन्यांत विपिनबाबू पटकीने कालवश झाले आणि रमाबाईंवर आभाळच कोसळले. तेवढ्या अवधीत त्यांना एक मुलगी झाली होती. बाईंनी तिचे नाव मनोरमा ठेवले होते. पतिनिधनानंतर कलकत्त्यात राहणे बाईंना अशक्य होते. म्हणून मुलीला घेऊन त्या महाराष्ट्रात आल्या.

महाराष्ट्रात आल्यावर इंग्रजीचा अभ्यास करायचा असे रमाबाईंनी ठरवले होते. त्या वेळी पुण्यात बायकांची एक सभा भरत असे. केरूनाना छत्रे या सभेतील बायकांना काही तरी शिकवीत असत. मुंबईतही प्रार्थना समाजाच्या वतीने अशी सभा भरत असे. पुण्यातील या भगिनीमंडळातील प्रत्येकीच्या घरी दर आठवड्याला रमाबाईंचे पुराण व्हावे, असे ठरले. त्याप्रमाणे पहिले पुराण रमाबाई रानड्यांच्या घरी झाले. त्या पुराणात रमाबाईंनी आपल्या बुद्धिमत्तेने, विद्वत्तेने व वक्तृत्वाने साऱ्यांना चकित करून सोडले. पुण्यातील विद्वानही त्यांचे कौतुक करू लागले.

पुण्या-मुंबईत असलेल्या या सभांना रमाबाईंनी आर्य महिलासमाज असे नाव दिले. अहमदनगर, सोलापूर, पंढरपूर, बार्शी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ठाणे, इ. ठिकाणीही त्यांनी आर्य महिला समाजाची स्थापना केली. याच सुमारास हंटर यांच्या अध्यक्षतेखाली सरकारी विद्या-विषयक चौकशी-समिती नेमण्यात आली होती. त्या समितीपुढे

पंडिता रमाबाई

रमाबाईंनी साक्ष दिली. ही साक्ष इतकी परिणामकारक झाली की, हंटरसाहेबाने तिचे इंग्रजी भाषांतर करवून घेतले आणि इंग्लंडमध्ये गेल्यावर रमाबाईंसंबंधी एक व्याख्यान दिले. त्यामुळे परदेशातही रमाबाईंची कीर्ती पोचली. या घटनेने इंग्रजी शिक्षणाविषयी रमाबाईंना अधिकच निकड वाटू लागली. भारतात राहून हे शिक्षण होणार नाही, असे त्यांना वाटले व त्यासाठी त्यांनी इंग्लंडला जाण्याचे ठरविले. स्त्रीधर्मनीती नामक एक पुस्तक लिहून त्याच्या विक्रीतून त्यांनी आपल्या व कन्येच्या प्रवासखर्चाची तरतूद केली. इंग्लंडला गेल्यावर तिथे परित्यक्त स्त्रियांसाठी होत असलेले काम पाहून त्यांना फार आश्चर्य वाटले. या सेवेचे मूळ त्यांना ख्रिस्ताच्या व्यक्तिमत्वात सापडले आणि ख्रिस्ती धर्माकडे त्यांचे मन आकृष्ट झाले. पुढे लवकरच सप्टेंबर १८८३ मध्ये त्यांनी व छोट्या मनोरमेने बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ती धर्म स्वीकारला. इंग्लंडमध्ये असताना त्या भारतात येऊ इच्छिणाऱ्या मिशनरी स्त्रियांना मराठी शिकवीत. त्याबदली त्यांची इंग्रजी शिक्षणाची व राहण्याजेवण्याची सोय करण्यात आली होती. एका वर्षानंतर चेल्टनहॅम येथील स्त्रियांच्या कॉलेजात त्यांना संस्कृत अध्यापनाचे काम मिळाले.

पुढे जानेवारी १८८५ मध्ये अमेरिकेतील फिलाडेल्फिया येथील स्त्रियांच्या वैद्यकीय कॉलेजच्या मुख्याध्यापिका डॉ. बॉडले यांनी रमाबाईंना अमेरिकेत येण्याचे निमंत्रण दिले. त्याच कॉलेजात आनंदीबाई जोशी वैद्यकीय शिक्षण घेत होत्या. आनंदीबाईंनीही त्यांना अमेरिकेत येण्याचा आग्रह केला. त्या निमंत्रणाचा स्वीकार करून आनंदीबाईंच्या पदवीदानसमारंभाला उपस्थित राहण्यासाठी रमाबाई अमेरिकेला गेल्या.

अमेरिकेतील स्त्रियांची प्रगती व तिथली शिक्षणपद्धती पाहून रमाबाई फार खूष झाल्या. भारतात परत गेल्यावर तिथल्या गरीब व अज्ञ बालविधवांसाठी आपण एक संस्था काढायची, असा त्यांनी त्या वेळी मनाशी निश्चय केला. भारतातील बालविधवांच्या प्रश्नाबाबत अमेरिकेतील लोकमत जागृत करण्यासाठी त्यांनी हाय कास्ट हिंदू वुमन नावाचे एक पुस्तक लिहिले. ते पुस्तक वाचून अनेक अमेरिकन लोकांनी त्यांना त्यांच्या कार्यात मदत करण्याचे ठरविले व त्यासाठी रमाबाई असोसिएशन नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेच्या द्वारे रमाबाईंना दहा वर्षे साहाय्य करण्याचे लोकांनी मान्य केले.

अमेरिकेतून भारतात परतल्यावर रमाबाईंनी मुंबईत शारदासदन नामक संस्था १८८९ साली स्थापन केली. पुढील वर्षी ही संस्था पुण्यात आणण्यात आली. या संस्थेत ख्रिस्ती धर्माचा प्रत्यक्ष उपदेश करायचा नाही किंवा त्या धर्माचे क्रियाशील प्रदर्शन करायचे नाही, असे त्यांनी ठरवले होते. परंतु रमाबाईंच्या प्रार्थनेची व इतर ख्रिस्ती विचारसरणीची छाप सदनातील इतर काही मुलींवर पडली व आपल्याला ख्रिस्ती धर्म स्वीकारायचा आहे, असे त्यांनी रमाबाईंना सांगितले. या विषयावरून वादळ होऊन काही पालकांनी आपल्या मुली सदनातून काढून घेतल्या. सुधारक वर्गानेही संस्थेचा पाठिंबा काढून घेतला. त्यानंतर रमाबाईंनी पुण्याजवळ केडगाव येथे बरीचशी जमीन खरेदी केली व शारदासदन ही संस्था तिथे हालवली.

त्याच सुमारास मध्य प्रदेशात आणि पुढे दोन वर्षांनी गुजरातेत भयंकर दुष्काळ पडला. लोक अन्नान्न करून तडफडू लागले. रमाबाई अशा दुष्काळपीडितांच्या साहाय्यासाठी धावल्या. सुमारे तीन हजार अनाथ व अपंग मुले, मुली व स्त्रिया त्यांच्या भोवती गोळा झाल्या. एवढ्या लोकांच्या पोटापाण्याचाच नव्हे तर पालनपोषणाचा व शिक्षणाचाही प्रश्न होता. रमाबाईंनी परमेश्वरावर दृढ विश्वास ठेवून हे काम अंगावर घेतले आणि यशस्वीपणे पार पाडले.

पूर्वी केडगाव म्हणजे वैराण माळरान होते. तिथे आता एक शहरच उभे राहिले. शेतीपासून छापखान्याच्या कामापर्यंत सर्व कामे सदनातील स्त्रियाच करीत. 'माझ्या दाराशी येईल, ती माझी मुलगी. मग ती उच्चवर्णीय असो, अस्पृश्य असो किंवा गुन्हेगार जमातीतील असो; तिच्या पालनपोषणाची, शिक्षणाची व काहीतरी विद्या, उद्योग शिकवून तिला स्वावलंबी बनविण्याची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जबाबदारी मी घेईन. ' असे व्यापक धोरण रमाबाईंनी जाहीर केले. केडगावच्या आश्रमाला त्यांनी मुक्तिसदन असे नाव दिले. त्यात शारदासदन व कृपासदन या दोन संस्था अंतर्भूत होत्या. कृपासदन परित्यक्ता स्त्रियांसाठी होते. मुक्तिसदनातील धार्मिक व नैतिक शिक्षण ख्रिस्ती धर्मानुसार दिले जाई. मात्र ख्रिस्ती धर्माचे माहात्म्य पटून कोणी ख्रिस्ती होण्याची मागणी केल्या-शिवाय आश्रमातील कोणत्याही स्त्रीला किंवा मुलीला बाप्तिस्मा देण्यात आला नाही.

याशिवाय, रमाबाईंनी इतरही सामाजिक कार्यांत भाग घेतला. हिंदी नॅशनल काँग्रेसला इ. स. १८८९ मध्ये प्रथमच स्त्री प्रति-निधी पाठवण्याच्या कामी त्यांनी पुढाकार घेतला. संमतिवयाच्या बिलाला स्त्रियांचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांनी मुंबईला व पुण्याला स्त्रियांच्या अनेक सभा भरविल्या व त्या बाबतीत एक अर्ज व्हाइसरॉयकडे पाठवला.

पण यापेक्षा त्यांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी केलेले बाय-बलाचे मराठी भाषांतर हे होय. आपला रोजच्या कामाचा व्याप संभाळून त्यांनी मूळ हिब्रू व ग्रीक बायबलावरून हे मराठी भाषां-तर केले. हे काम त्यांना अखेरपर्यंत पुरले. हे काम चालू अस-तानाच त्यांच्या कन्येचा मृत्यू ओढवला व त्यांच्यावर फार मोठा आघात झाला. त्या आघाताने खचून जाऊन ५ एप्रिल १९२२ रोजी त्यांचा मृत्यू ओढवला.

महाराष्ट्रात विधवाशिक्षणाच्या इमारतीचा पाया घालण्याचे अत्यंत उपयुक्त कार्य पंडिता रमाबाई यांनी केले. त्यांनी विधवा-शिक्षणाचे कार्य स्वतःच्या बळावर केवढ्या तरी स्वरूपाला आणले, असे अण्णासाहेब कर्वे यांनी रमाबाईंच्याबद्दल आपल्या आत्मवृत्तात म्हटले आहे.

रमाबाई अत्यंत बुद्धिमान होत्या. मराठी, कन्नड, गुजराती, बंगाली, हिंदी, तुळू व संस्कृत या भाषा त्यांना चांगल्या अवगत होत्या. इंग्रजी भाषेत तर त्यांनी पुस्तकेच लिहिली आहेत. बुद्धि-मत्तेबरोबरच त्यांच्या अंगी जबर इच्छाशक्ती, अलोट धैर्य, अम-र्याद औदार्य व दीनदुबळ्यांविषयी असीम करुणा हे गुणही वसत होते. [पंडिता रमाबाई– श्री. दे. ना. टिळक, १९६०]

रमावल्लभदास (इ. स. १६०९–१६६८) एक महाराष्ट्रीय सत्पुरुष आणि कृष्णभक्तीचा प्रचारक. याचे वडील अबाजीपंत उर्फ यमाजीपंत हे देवगिरीच्या अंबरखानाचे कारभारी होते. राळेरासकर हे त्यांचे उपनाम होते. अबाजी-पंतांना बऱ्याच कालाने, अंबेच्या कृपाप्रसादाने एक मुलगा झाला, तोच हा रमावल्लभदास होय. याचे पाळण्यातले नाव तुकोपंत असे होते. तुकोपंताची सातव्या वर्षी मुंज झाली व बाराव्या वर्षी लग्न झाले. अठराव्या वर्षी तो वडिलांचे काम पाहू लागला. पुढे काही दिवसांनी देवगिरीवर परचक्र आले असता तुको-पंताने ते परतवून लावले. त्या वेळी त्याने केलेल्या शत्रुसैनिकांच्या लुटीत त्याला एकनाथी भागवताची पोथी मिळाली. हा देवाचा प्रसाद समजून तो ते भागवत नित्य वाचू लागला. त्यामुळे हळू-हळू तो विरक्त बनला. पुढे चाकरी सोडून तो गुरूच्या शोधा-साठी हिंडत असता गोदा–प्रवरा संगमाच्या ठिकाणी सिद्धेश्वरा-जवळ लक्ष्मीधर नावाच्या एका साधुपुरुषाची आणि त्याची गाठ पडली. लक्ष्मीधराने त्याला अनुग्रह देऊन गोपाळविद्येचा उपदेश केला व रमावल्लभदास असे त्याचे नाव ठेवले. नंतर तो पंचवटीला गेला असता, त्याला गोपाळ गोसावी नावाचा एक अधिकारी पुरुष भेटला. त्याने रमावल्लभदासाला कृष्णजन्मकथा रचण्याची आज्ञा केली. याच मुक्कामात रमावल्लभदासाला कृष्णाजी नावाचा एक बालमित्र येऊन भेटला. त्या दोघांनी तिथे भागवताच्या दशमस्कंधावरील बहिरंभटी टीका आणि एकनाथी भागवत वाचले.

रमावल्लभदासाने दशमस्कंधाच्या आधारेच कृष्णकथा लिहिली. पण त्याचा प्रमुख ग्रंथ म्हणजे श्रीशंकराचार्यांच्या बृहद्वाक्यवृत्तीवरील वाक्यवृत्ती नावाची टीका हा होय. या विस्तृत टीकेचा प्रारंभ त्याने वाई येथे केला आणि दाभोळ गावी ती पुरी केली. याशिवाय चमत्कारी नावाची गीतेवरही एक टीका याने लिहिली आहे. गुरुवळी, गुरुमहिमा, प्रबोधचंद्रिका, संतनामावळी, वैष्णवगती असे त्याचे आणखीही लहान-मोठे ग्रंथ आहेत. त्याने पदेही बरीच रचली आहेत. त्यांतील कृष्णभक्ति-पर पदाचा एक नमुना असा –

कृष्णा रामा रे सखया कृष्णा रामा रे
आनंदधामा रे माझ्या पूर्णकामा रे ॥ ध्रु ॥
कृष्णा पूतनाशोषण। रामा ताटिकाखोंचण
शोषण खोंचण माझ्या कृष्णा रामा रे ॥ १ ॥
कृष्णा शकटदंडण । रामा धनुषखंडण ।
दंडण खंडण माझ्या कृष्णा रामा रे ॥ २ ॥
कृष्णा गुह्यकउद्धरण । रामा अहल्यातारण ।
उद्धरण तारण माझ्या कृष्णा रामा रे ॥ ३ ॥
कृष्णा व्रजनारीखेळण। रामा वानरमेळण ।
खेळण मेळण माझ्या कृष्णा रामा रे ॥ ४ ॥
काळयवनदलन । विकट तालच्छेदन ।
दलन छेदन माझ्या कृष्णा रामा रे ॥ ५ ॥
कृष्णा भीमकीहरण। रामा जानकीवरण ।
हरण वरण माझ्या कृष्णा रामा रे ॥ ६ ॥
रमावल्लभदास्यपण । कृष्ण देतो आपण ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तुझे चरणस्मरण माझ्या कृष्णा रामा रे ॥ ७ ॥

पुढे रमावल्लभदास रत्नागिरी, सावंतवाडी, गोवा या मार्गाने कारवारला गेला. तिथे त्याला आवडाबाई नावाची शिष्या भेटली. मल्लापूर येथे तिचा मठ आहे. तिथे कृष्णजयंतीचा सोहळा प्रतिवर्षी होत असतो. या सोहळ्याचा कार्यक्रम रमावल्लभाने आखून दिलेला आहे.

रमावल्लभदासाच्या शिष्यांपैकी राघवदासाने बिरुदावळी ग्रंथात आपल्या गुरूचे चरित्र सविस्तर लिहिले आहे. परंतु त्याचा एकच अध्याय सध्या उपलब्ध असून तो रमावल्लभदासांची गाथा या ग्रंथात छापला आहे. रमावल्लभदासाचे वंशज सांप्रत सोलापूर येथे असतात. [म. सा. ; म. वा. इ. २. ; प्रा. म. सं. क.; प्रा. म. वा. स्व.; श्रीरमावल्लभदासांची गाथा.]

रमासपीर एक लोकदेव. राजस्थानातील पुष्कर तीर्थाजवळ झालेल्या लढाईत हा वीर मारला गेला आणि तेव्हापासून याला देवत्व लाभले. पूर्वी पेंढारी लोक लूटमार करायला बाहेर पडले, की त्यांच्या स्त्रिया याची मनोभावे पूजा करीत. शनिवार हा त्याच्या पूजेचा दिवस आहे. या दिवशी याला मातीचे घोडे करून वाहण्याची पद्धत आहे. अनेक पेंढाऱ्यांच्या गळयात घोडयावर बसलेल्या माणसाच्या प्रतिमा असतात, त्या रमासपीराच्याच होत.

याला धर्मराज असेही नाव आहे. त्यावरून याचा बंगालमधील धर्मठाकूराशी संबंध असावा असे वाटते. यमधर्म या नावावरूनही हे नाव पडले असावे. [पॉ. रि. फो. नॉ. इं.]

रम्मत राजस्थानातील लोकनाटयाचा एक प्रकार. रम्मतचे खेळ होळीच्या पूर्वी पंधरा दिवस सुरू होतात. यात प्रथम देवीची स्तुती, नंतर कलगी–तुर्यासारखे काव्यमय झगडे व शेवटी ढोलामारू, हिडाऊमेरी, इ. प्रेमाख्यानांवर सोंगे काढून नृत्य व नाटय होते. हिडाऊमेरी ही एक प्राचीन प्रेमकथात्मक रम्मत आहे. रम्मतमध्ये गीतांना प्राधान्य असते. त्याच्यावर फारसी व उर्दू शायरीचा स्पष्ट प्रभाव आहे. यातले संवाद शेर, गझल, इ. रूपांत गायिले जातात. गायनाला नगारा, बाजाची पेटी, सारंगी, मंजीर व ढोलक या वाद्यांची साथ असते.

रम्मतचा राजस्थानी जनतेच्या जीवनाशी संबंध आहे. सामान्यपणे रम्मतचे विषय सामाजिकच असतात. त्यात समाजातल्या दुष्ट रूढींवर टीका असते. हा खेळ रात्रभर चालतो.

रम्मतच्या आधुनिक कलाकारांत हणूमान, सराजुद्दीन, मूलचंदसुथार, इ. कलाकार प्रसिद्ध आहेत. [रा. लो. ना.; श्रीरामनाथ व्यास – संयुक्त राजस्थान, मे १९५७].

रयनी बांगला देशातील बाकेरगंज जिल्ह्यात साजरा होणारा एक लोकोत्सव. धंदेवाईक संगीतज्ञ स्त्री–पुरुष यात भाग घेतात. कार्यक्रमाच्या वेळी नागगीते गायिली जातात. अंगणात दुपारच्या वेळी या कार्यक्रमाला प्रारंभ होतो आणि प्रहररात्रीपर्यंत तो चालतो. प्रमुख गायकाच्या हातात चवरी आणि पायात घुंगरू असतात. तो कधी वाद्य वाजवितो तर कधी नाचतो. स्त्रियाही त्याच्याबरोबर गातात-नाचतात. हा कार्यक्रम पार पाडण्याची जबाबदारी प्रमुख गायकावर असते. कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत तिथे जमलेल्या लोकांना त्यातून उठता येत नाही. मग प्रमुख गायकाला घरधनी कपडे व धान्य अशी बिदागी देतो. या उत्सवाला बांगला देशात धार्मिक व सामाजिक महत्त्व आहे.

रवळनाथ

रवळनाथ कोकणातल्या ग्रामदेवतांपैकी एक. रवळनाथाविषयी संशोधकांच्या भिन्न भिन्न कल्पना आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काहींच्या मते हे नाव रेवणनाथाचे अपभ्रष्ट रूप असावे व हा देव नाथपंथातला असावा. काही संशोधक हा शब्द राहुल या नावावरून व्युत्पादितात. राहुल हा बुद्धाचा पुत्र होय. प्राचीनकाळी काही लोक राहुलनाथ आणि त्याची उपासना घेऊन कोकणात आले असावे. काहींच्या मते रवळनाथ हे रुरूचे अपभ्रष्ट रूप असावे. अष्ट भैरवांत रुरू आहे. रुरूचे रवळू आणि त्यापुढे नाथशब्द जोडून रवळनाथ असे ते नाव बनले असावे. सर्पविष उतरवणे हे रवळनाथाचे वैशिष्टच असून, देशावरच्या बहिरोबाचेही तेच वशिष्टच आहे. त्यावरून हे दोन्ही देव भैरवसंघातले असावे.

रवळनाथाची मूर्ती उभी व चतुर्भुज असते. डावा पाय किंचित पुढे वाकलेला. हातांत त्रिशूळ, डमरू, खड्ग आणि अमृतपात्र. मस्तकावर मुकुट. दृष्टी सरळ. गळयात नररुंडमाळा. ओठावर गलमिशा. तो ब्रह्मचारी आहे. आयुधांवरून तो शैव परिवारातला असावा असे दिसते. त्याचा पुजारी गुरव किंवा राउळ असतो.

रवळनाथाला काही ठिकाणी क्षेत्रपाळ असेही म्हणतात. क्षेत्रपाळाचे काही अंश रवळनाथात दिसतात. काही ठिकाणी त्याची वार्षिक समाराधनाही करतात. [चित्तपावन; गा. दे.]

रवळोव्यास (इ. स. चे १४ वे शतक) एक महानुभाव मराठी कवी. याला राघवोपाध्ये असेही म्हणत. याच्या चरित्राची फारशी माहिती उपलब्ध नाही. याचे घराणे पाथरीचे असून, ही पाथरी परभणी जिल्हयात आहे. हा उपाध्ये आम्नायातील असून, याची गुरुपरंपरा पुढीलप्रमाणे आहे– जनार्दन→कमळांबा→हिरांबिका→रवळोव्यास.

याने साती ग्रंथांपैकी सहयाद्रिवर्णन नावाचा एक ग्रंथ रचला आहे. गुरूच्या प्रेमामुळे त्याने आपल्या ग्रंथांत हिराइसाचे नाव कवी म्हणून गुंफले असले, तरी या ग्रंथाचा कर्ता तोच आहे. ग्रंथाची ओवीसंख्या ७२६ इतकी आहे.

महानुभावांचा द्वितीय कृष्ण श्रीदत्तात्रेयप्रभू याच्या सहयाद्रीवरील लीळांचे वर्णन हा या ग्रंथाचा प्रमुख विषय आहे. याव्यतिरिक्त त्यात याने अलर्कराजा व कार्तवीर्य यांच्या कथा, परशुरामाचे माहुरला आगमन व तपश्चर्या, सहयाद्रिवर्णन, गुंडम राउळाला शक्तिदान, चक्रधरवर्णन, इ. अवांतर विषयही प्रसंगोपात्त वर्णिले आहेत. याने वर्णन केलेला दत्त एकमुखी व द्विभुज आहे. त्याने केलेले दत्तमूर्तीचे वर्णन असे–

ते श्रीमुर्ति चांपेगीर : कवणा वर्णवे सुंदर
जियेचे नावंचि उदार : ते सगुण बोलो कैसी
जेथ पुराण विवादु : षड्दर्शना उरोधु
आगमा नव्हेचि अनुवादु : निगमे नेति म्हणीतलें
जेथ सोहाळी भली : भारती चकीत जाली
तें रूप प्राकृता बोली : वर्णुं कैसें
जन्ही संध्यारागाचे सदा : काले दिजेति आंबुनदा
तन्ही ते आंगकांतिली कवा : उपमूं न ए
कनकगीरीचा गाभा सोलुनि : परि सूर्यप्रभा, संचरौनि
योप सारिजैल घोटाळुनि : तन्ही उपमा नव्हे
घेऊनि पद्मरागाचे तत्त्व : काढुनि सोनेचांपेयाचे सत्त्व
कनककेतकीचीया वृती एकत्व : किजैल तन्ही
परि हे उपमा पावळी : करणीएची नुतरे पाखाळी
श्री दत्ताची आंगकांती आगळी : सहज म्हणोनि
(सह्याद्रिवर्णन २८–३४)

याव्यतिरिक्त नामाचे दहा ठाय हे एक लघुप्रकरण याने रचले आहे. महानुभावांच्या नित्य पूजेत त्याचा अंतर्भाव असतो. हे प्रकरण गद्यात आहे.

सुंदरी व सकळ या महानुभावांच्या सांकेतिक लिप्याही यानेच शोधून काढल्या. [म. सा.; म. म. वा.; प्रा. म. वा. इ. १]

रवाई हिमालयातील एक भूप्रदेश. हा उत्तर काशीच्या सीमेवर आहे. रवाईचा सर्वांत उंच भूभाग जम्नोत्रीच्या ईशान्येला येतो. या भागात जौनपूर, रवाई, इ. प्रदेश मोडतात. ही सर्व भूमी निसर्गसौंदर्याने नटलेली आहे. इथल्या लोकांनाही रवाईच म्हणतात.

रवाई हे स्वच्छंदी, विलासी व सौंदर्यप्रेमी आहेत. त्यांच्या स्त्रियाही फार सुंदर असतात. त्यांना सौंदर्यामुळेच बांद (बंद) अथवा बंडिया असे म्हटले जाते. त्यांना अंगावर दागिने घालण्याची फार हौस असते. रवाईच्या कुटुंबात स्त्रीचीच सत्ता चालते. तिने आपल्याला सोडून जाऊ नये, म्हणून पुरुष तिला वचकून असतो. कारण इथे विवाहविच्छेद ही सोपी गोष्ट आहे. बहुधा स्त्रियाच पुरुषांना सोडून देतात. अशा घटस्फोट घेतलेल्या स्त्रीबरोबर लग्न करणाऱ्या पुरुषाला बराच खर्च येतो. जी स्त्री अधिक नवरे करील तिला भाग्यवान समजले जाते आणि उत्तरोत्तर तिचे मूल्यही वाढत जाते.

रवाई स्त्रियांमध्ये बहुपतित्वाची चालही आहे. गरिबी हे त्याचे प्रमुख कारण आहे. कुटुंबातल्या संपत्तीवर स्त्रीची सत्ता नसते.

गहू, मका व मोहरी ही इथली मुख्य पिके आहेत. इथे दळणवळणाची साधने फार कमी आहेत. शेती हा इथल्या लोकांचा प्रमुख व्यवसाय असला, तरी ते सतरंज्या व टोपल्या विणण्याचे काम करतात. स्वतःला लागणारे लोकरीचे कपडे बहुधा ते स्वतःच विणतात.

हे लोक पाहुणा घरी येणे हे भाग्याचे समजतात. त्यावेळी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घरातील स्त्रिया व मुली पाहुण्याचे हातपाय धुतात आणि त्याला जेवायला वाढतात.

प्राचीन काळी रवाई गढवाल या प्रदेशाचा किरात, नाग, यक्ष, इ. लोकांशी संबंध होता. नागसंघर्षाची अनेक आख्याने त्यांच्या लोकगीतांत आढळतात-हे लोक कृष्णाची नागराजाच्या रूपात पूजा करतात. याशिवाय नगेलो, नाग, कलिंगनाथ, जाख, महासू, पांडव, सिद्धनाथ, इ. देवतांनाही ते मानतात. गिरिशिखरांनाही ते पूज्य मानतात. फतेह पर्वतातील लोक नागदेवतेच्या भीतीने दूध पीत नाहीत आणि पाण्याला विष्णूचा अवतार मानून ते स्वच्छतेसाठी वापरीत नाहीत.

दिवाळी, बिसू, हरयाली, माघ, इ. उत्सव हे लोक उत्साहाने साजरे करतात. माघ महिन्यात तर ते महिनाभर नाचगाणे, खाणेपिणे, इ. कार्यक्रम करतात.

हे लोक मृताला पुरतात. त्याला पुरण्यापूर्वी त्याचे खाटले सजवितात आणि त्यावर मृताला घालून वाजत गाजत-शेताच्या सीमेवर नेऊन पुरतात. पुरलेल्या जागेवर सातूचे पिंड ठेवतात आणि त्याला सीमेवर लक्ष ठेवण्याची व पिंड खाण्याची प्रार्थना करतात. [गोविंद चातक– आजकल, डिसेंबर १९५८]

रवाज

सारंगीसारखे एक वाद्य. हे गजाने न वाजविता नखीने वाजवतात. याला बारा तारा असतात. त्यांतल्या चार तारा मुख्य असून, त्या तांतीच्या असतात. बाकीच्या आठ तारा तरफांच्या जागी बसवतात. राजस्थानातील राव व भाट हे वाद्य वाजविण्यात प्रवीण असतात. [परंपरा–लोकगीत.]

रविगुप्त

(इ. स. चे ८ वे शतक) एक बौद्ध नैयायिक. याचा जन्म काश्मीरात झाला. याने प्रमाणवार्तिकवृत्ती या नावाचा न्यायशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला आहे. याने काश्मीरात व मगधात मिळून एकंदर १२ पाठशाळा स्थापन केल्या. याला तंत्रशास्त्रही उत्तम अवगत होते. [म. च. को.]

रविनारायण व्रत

ओडिसा प्रदेशातील एक लौकिक स्त्री-व्रत. ज्या रविवारी एकादशी येईल त्या दिवशी हे व्रत करतात. यामुळे पुत्र, धन व चांगला वर यांची प्राप्ती होते, असे समजतात. या व्रताची कथा अशी–

सौराष्ट्रातील एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या मुलीने व सुनेने एका ब्राह्मणाला पुष्कळ धन दिले. ब्राह्मणाने सुनेला आशीर्वाद दिला, की 'परमेश्वर तुझे कल्याण करील.' त्याचप्रमाणे तो मुलीला म्हणाला, की 'तुझ्या नशिबी सौख्य नाही.' ब्राह्मणाचे ते शब्द ऐकून मुलीची आई दुःखीकष्टी झाली. तिने या दोन विरोधी आशीर्वादांतील मर्म विचारल्यावर ब्राह्मण म्हणाला. 'ही मुलगी जिथे झोपते तिथे खणा म्हणजे तुम्हांला कारण समजेल.' त्याप्रमाणे जमीन खणताच तिथे एक फुटके मडके व केरसुणी सापडली. ती घेऊन मुलीची आई कुंभारणीकडे गेली. परंतु तिलाही त्या वस्तूंचा अर्थ सांगता आला नाही. पुढे ज्या दिवशी मुलीचे लग्न झाले, त्या रात्री कुंभारणीने वधूवरांवर चांगला पहारा ठेवला. रात्री यम वराचा प्राण न्यायला आला असता तिने त्याला आत जाऊ दिले नाही. त्यामुळे मरणवेळ टळली. या गोष्टीचा यमाला राग आला आणि त्याने कुंभारणीची सात मुले व पती यांना ठार मारले. कुंभारणीने सकाळी घरी गेल्यावर सूर्याचा धावा करताच ती सर्वजण जिवंत झाली.

कुंभारीण रविनारायणाचे व्रत करीत होती, त्याचे हे फल होय, अशी तिथल्या लोकांची समजूत आहे. [स्ट. ओ. फो.]

रविवर्मा, राजा

(इ. स. १८४८ – १९०६) एक जगप्रसिद्ध चित्रकार. याला ब्रिटिश सरकारकडून राजा हा किताब मिळाला होता. याचा जन्म पूर्वीच्या त्रावणकोर संस्थानातील किलिमनूर गावी झाला. याच्या पूर्वजांनी एका काळी त्रावणकोरच्या राजाला लष्करी मदत केल्यामुळे किलिमनूर हे गाव त्यांना इनाम मिळाले होते. रविवर्म्याच्या घरात संस्कृत विद्येला फार मान होता. त्या कुटुंबातल्या स्त्रियाही विद्यासंपन्न होत्या. घरच्या शिकवणीमुळे रविवर्म्यानेही लहानपणीच संस्कृत विद्येत प्रावीण्य मिळवले. रामायण व महाभारत या ग्रंथांचाही त्याने अभ्यास केला.

त्या कुटुंबातल्या मुला-मुलींमध्ये चित्रे काढण्याची नैसर्गिक प्रवृत्ती होती. रविवर्म्याला राजवर्मा नावाचा एक धाकटा भाऊ होता. रविवर्म्याच्या चित्रांतली पार्श्वभूमी तो सजवीत असे.

या मुलांनी आपला सगळा वाडा रामायण–महाभारतातील प्रसंगांनी चितारला होता. रविवर्म्याच्या मामाचे नावही राजवर्माच होते. त्याला चित्रकलेत चांगली गती होती. रविवर्म्याला त्यांचे पुष्कळ साह्य झाले.

रविवर्मा चौदा वर्षांचा असताना त्याची व त्रावणकोरच्या महाराजांची भेट झाली. त्यांनी या मुलाचे चित्रकलेतले कौशल्य पाहिले आणि त्याला आश्रय दिला. पुढे इ. स. १८६६ साली त्रावणकोरच्या महाराजांच्या थोरल्या बहिणीशी रविवर्म्याचे लग्न झाले. अशा प्रकारे त्या राजघराण्याशी त्याचा नातेसंबंधही जुळला.. रविवर्मा प्रथम खडू आणि कोळसा यांनी चित्र काढी. नंतर त्याने जलरंगांनी चित्र काढण्याचा अभ्यास केला.

इ. स. १८६८ साली थियोडोर जॉन्सन नावाचा पाश्चात्य चित्रकार त्रावणकोरला महाराजांकडे आला. त्याने राजघरा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यातल्या कित्येक व्यक्तींची तैलरंगात सुंदर चित्रे काढली. तोवर रविवर्म्याला तैलरंगाची कल्पनाच नव्हती. त्या चित्रांचा उठाव

राजा रविवर्मा

पाहून रविवर्म्याला एक नवाच साक्षात्कार झाला. जॉन्सनने त्याला या बाबतीत मुळीच मार्गदर्शन केले नाही. जॉन्सनने रंगवलेल्या तसबिरी पुढे ठेवून, त्यांच्या नकला करण्याचा प्रयत्न करीत असता हळूहळू तैलरंगचित्रणातही त्याने प्रावीण्य मिळविले.

तैलरंग आत्मसात केल्यावर रविवर्म्याने त्रावणकोरचे महाराज व महाराणी यांच्या व इतरांच्याही तसबिरी रंगवल्या. आपली ती चित्रे त्याने देशातल्या अनेक ठिकाणच्या प्रदर्शनांत पाठवली. इ. स. १८७३ साली मद्रास येथे भरलेल्या चित्रकलेच्या मोठ्या प्रदर्शनात रविवर्म्याने एका नायर जातीच्या सुंदर स्त्रीचे चित्र मांडले आणि त्याबद्दल त्याची सर्वत्र प्रशंसा झाली. त्या चित्राला त्या प्रदर्शनात तर सुवर्णपदक मिळालेच; शिवाय व्हिएन्ना येथील प्रदर्शनातही सुवर्णपदक मिळाले. हे चित्र व दुसरे एक तमिळ स्त्रीचे चित्र अशी दोन चित्रे, इंग्लंडचे प्रिन्स ऑफ वेल्स भारतात आले असता त्रावणकोरच्या महाराजांनी त्यांना भेट म्हणून दिली. ती चित्रे पाहिल्यावर प्रिन्स ऑफ वेल्सनी त्यांची खूप प्रशंसा केली.

शकुंतलापत्रलेखन नावाचे रविवर्म्याने काढलेले चित्र ड्यूक ऑफ बकिंगहॅम यांनी विकत घेतले. या चित्राचा असा गौरव झाल्यावर संस्कृत महाकाव्यातल्या निरनिराळ्या प्रसंगांची चित्रे काढण्याकडे रविवर्म्याची प्रवृत्ती झाली.

त्रावणकोरच्या महाराजांच्या बंधूंच्या विनंतीवरून रविवर्म्याने सीतेचे दिव्य हे चित्र काढले. ते राजा सर टी. माधवराव यांनी बडोद्याच्या महाराजांसाठी विकत घेतले.

इ. स. १८८१ साली बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी रविवर्म्याला बडोद्यास बोलावून घेतले आणि त्याच्याकडून राजघराण्यातल्या मंडळींची चित्रे काढून घेतली. याशिवाय नल-दमयंती, राधा-माधव, विश्वामित्रमेनका, सीतास्वयंवर, कीचक-सैरंध्री, शंतनु-मत्स्यगंधा, कृष्णजन्म, कृष्णाची दृष्ट, द्रौपदीवस्त्रहरण, इ. बरीच चित्रे सयाजीरावांच्या सांगण्यावरून त्याने काढली. महाराजांनी आपला लक्ष्मीविलास राजवाडा त्या चित्रांनी सुशोभित केला. भावनगरच्या महाराजांनीही रविवर्म्याला त्याच कामासाठी बोलावून घेतले.

आपली रंगीत चित्रे तशाच रंगांत छापता आली, तर सर्वसामान्य लोकांनाही ती उपलब्ध होतील, असा विचार करून रविवर्म्याने १८९४ साली रंगीत चित्रे छापण्याचा एक छापखाना मुंबईत उभा केला. आजही त्याच्या नावाने निघालेला तो छापखाना पुणे जिल्ह्यात मळवली येथे आहे. रविवर्म्याच्या या उपक्रमाला कमालीचे यश लाभले. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत त्याची लाखो पौराणिक चित्रे खपली. घराघरांतून ती लावली गेली.

शिकागो व लंडन येथील प्रदर्शनांत त्याने आपली चित्रे पाठवली. त्यांना तिथे बक्षिसेही मिळाली. लॉर्ड कर्झन यानेही

उषास्वप्न

रविवर्म्याची भेट घेऊन त्याचे कौतुक केले. चारशे ते पाचशे चित्रे रविवर्म्याच्या हातून निर्माण झाली, असे म्हणतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रविवर्म्याच्या चित्रांतल्या स्त्री-पुरुषांची वेषभूषा महाराष्ट्रीय आहे. त्याबद्दल त्याला विचारले असता तो म्हणाला. 'सर्व भारतभर मी हिंडलो. सर्व प्रांतांतील पेहराव पाहिले. पण महाराष्ट्रीय पोषाखासारखा चित्रणयोग्य असा पेहराव मला अन्यत्र आढळला नाही. नऊवारी लुगड्यामुळे स्त्रीचे सौंदर्य उठून दिसते आणि शिवाय ते सुटसुटित असल्याने काम करताना अडथळा येत नाही. लुगडे नेसण्याची अशी तऱ्हा इतरत्र नाही.'

रविवर्म्याने चितारलेल्या शकुंतला, मेनका, दमयंती, इ.स्त्रिया बऱ्याच उंच आहेत. भारतीय स्त्री इतकी उंच नसते. त्यावरून श्रीमंत पंतप्रतिनिधींनी म्हटले आहे, की रविवर्म्याने विलायती स्त्रीला लुगडे नेसवले आहे, असे वाटते.

राजा रविवर्म्याविषयी श्री. ज. गो. घाणेकर पुढील विचार व्यक्त करतात –

कलेच्या विविध अंगांचे एकीकरण आपल्या चित्रात व्यवस्थित करणारा हिंदी चित्रकार म्हणजे राजा रविवर्मा हाच पहिला असे म्हणण्यास हरकत नाही. सर्व बाजूंनी विचार करता भरतखंडातील कलासृष्टीत अभूतपूर्व अशी जागृती उत्पन्न करणारे राजा रविवर्मा हे हिंदी कलायुगाचे शकपुरुषच होत यात शंका नाही. [राजा रविवर्मा चरित्र – शं. द. देवधर]

रविवार

सात वारांपैकी पहिला वार. हा सूर्यपूजेला योग्य मानला जातो. संपत्ती, संतती व आरोग्य इच्छिणारे, नेत्रविकार असलेले व युद्धात जय मिळवू इच्छिणारे लोक, कोणत्या तरी प्रकारे या दिवशी सूर्याची उपासना करतात. वंध्या स्त्रिया या दिवशी सूर्यव्रत करतात. सूर्यपूजा करताना अष्टदल किंवा षट्कोन या आकृती काढतात. हा वार विशेषसा शुभ मानीत नाहीत. या दिवशी कोणताही नवा उपक्रम करीत नाहीत. ताक करीत नाहीत. दृष्टिदोष दूर करणारी यंत्रे या दिवशी करतात. नवे वस्त्र परिधान करीत नाहीत. रविवारी कोणती कृत्ये केली असता ती लाभकारक होतात, याविषयीचा बृहज्ज्योतिषसारातला एक श्लोक असा –

राज्याभिषेकोत्सवयानसेवा गोवह्निमन्त्रौषधशस्त्रकर्म ।
सुवर्णताम्रौर्णिकचर्मकाष्ठसङ्ग्रामपण्यादि रवौ विदध्यात् ।।

अर्थ – राज्याभिषेक, उत्सव, यात्रा, राजसेवा, गोधनाचा क्रयविक्रय, होम, मंत्रोपदेश, औषधयोजना व शस्त्रक्रिया, सोने, तांबे, लोकर, चर्म व काष्ठ यांची खरेदीविक्री, युद्ध, इ. कर्मे रविवारी करावी.

मुसलमानांना प्रत्येक रविवाराचे महत्त्व नसते; पण प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी ते मंत्रतंत्र करतात. मशिदीची झाडलोट आणि पाण्याची भांडी धुवून ठेवणे, ही कामेही त्या दिवशी करतात. ख्रिस्ती लोकांत रविवार हा प्रार्थनेचा वार मानलेला आहे. सात दिवसांचा कालविभाग म्हणजे सप्ताह मोजण्याची प्रथा बाबिलोनियामध्ये प्रथम सुरू झाली असे म्हणतात. तिथून ती कल्पना पश्चिम आशिया, इजिप्त, पूर्व युरोप या प्रदेशांत क्रमाने प्रसृत झाली. इस्राएल लोकांनी जेव्हा कनानवर स्वारी केली, तेव्हा त्यांना तिथे सप्ताह कालगणना प्रस्थापित झालेली आढळली व त्यांनीही ती स्वीकारली. पण सब्बाथ (विश्रांतीचा दिवस) पाळण्याची प्रथा मात्र मूळ इस्राएल अर्थात यहुदी लोकांची होती. हे लोक सप्ताहाचा शेवटचा दिवस म्हणजे शनिवार हा विश्रांतीचा मानीत. सेंट पॉलचा सब्बाथाला तीव्र विरोध होता. पण त्याच्या शिष्यांपैकी जे मूळचे ज्यू होते त्यांना, तसेच ग्रीक व रोमन लोकांनाही सप्ताहात एक दिवस उपासनेसाठी राखून ठेवणे आवश्यक वाटत होते. म्हणून त्यांनी सप्ताहाचा पहिला दिवस म्हणजे रविवार उपासनेसाठी निश्चित केला. कारण त्या दिवशी येशूचे पुनरुत्थान झाले होते.

रोमन साम्राज्यात या पहिल्या दिवसाचे नाव रविवार असे प्रचलित होते; पण ख्रिस्ती लोकांनी त्याला 'प्रभूचा दिवस' हे नाव दिले. रोमन साम्राज्यात जेव्हा ख्रिस्ती धर्म प्रस्थापित झाला, तेव्हा ग्रीक व लॅटिन बोलणाऱ्या लोकांनी हेच नाव (प्रभूचा दिवस) स्वीकारले; पण उत्तरेकडील इंग्लंड, स्वीडन, जर्मनी, इ. देश सनातन पंथाचे असल्यामुळे त्यांनी सन–डे (रविवार) हे जुने नावच चालू ठेवले. ख्रिस्ती शकाच्या पहिल्या २–३ शतकांत रविवारी प्रार्थनेसाठी चर्चमध्ये जमणे एवढाच विशेष कार्यक्रम असे. काही काळाने त्या दिवसाच्या कामाला प्रारंभ करण्यापूर्वी थोडा वेळ परमेश्वराचे चिंतन व प्रार्थना करावी आणि संध्याकाळी काम संपल्यानंतर सर्वांनी एकत्र भोजन करावे, अशी प्रथा पडली. पुढे समाजाला अधिक स्वास्थ्य लाभल्यानंतर उपासनेचा कार्यक्रम अधिक दीर्घ झाला. बायबलचे वाचन, प्रवचन, प्रार्थना, इ. गोष्टींचा त्यात समावेश होऊ लागला. रविवार म्हणजे पवित्र दिवस हे पक्के झाले. त्याच सुमारास रविवारी आनंदोत्सव करावा, प्रार्थनेसाठी नेहमीचे काम बाजूला ठेवले तरी चालेल, अशी कल्पना उदय पावली. मात्र ज्यूंच्या सब्बाथपेक्षा रोमन लोकांच्या उत्सवाप्रमाणे तो दिवस पाळण्याची वृत्ती ख्रिश्चन लोकांची होती. त्या दिवशी नेहमीचे काम चालू ठेवावे आणि परमेश्वराची प्रार्थना, उच्च विचार, ज्ञानप्राप्ती यांत इतर वेळ व्यतीत करावा अशी त्यांची पद्धत होती. रविवार पवित्र दिवस असल्यामुळे त्या दिवशी सर्व व्यावसायिक कामे बंद ठेवावी, प्रार्थनेसाठी चर्चमध्ये जावे, उत्सवसमारंभ करावा, अशी सामान्य जनांची इच्छा असल्यामुळे हळूहळू रविवार म्हणजे विश्रांतीचा दिवस (सब्बाथ) ही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कल्पना प्रस्थापित होऊ लागली. रविवारी सुटी असावी असेही ते म्हणू लागले. म्हणून इ. स. ३२१ मध्ये कॉन्स्टंटाइन बादशहाने आज्ञापत्र काढून रविवार हा सार्वजनिक सुटीचा दिवस ठरविला. ती गोष्ट सर्वांनाच मान्य झाली व अजूनही मान्य आहे. [अ. बृ. ज्यो.; की. पॉ.; एन्सा. रि. ए.]

रविवार व्रत एक जैन व्रत. आषाढ महिन्याच्या अखेरच्या रविवारपासून या व्रताला प्रारंभ करतात. आषाढातला एक, श्रावणातले चार आणि भाद्रपद महिन्यातले चार मिळून वर्षातल्या नऊ रविवारी हे व्रत करतात. याचा व्रतावधी नऊ वर्षे आहे.

प्रत्येक रविवारी उपवास अथवा अलवण पदार्थांनी एकभुक्त करणे आणि पार्श्वनाथाची पूजा करणे हा या व्रताचा प्रमुख विधी होय. या वेळी ' ॐ ऱ्हीं श्रीं अर्हं श्रीपार्श्वनाथाय नमः ' या मंत्राचा त्रिकाल जप करतात.

हे व्रत काशीमधल्या मतिसागर नावाच्या एका व्यापाऱ्याच्या गुणमाला नामक पत्नीने केले होते व त्यामुळे तिचे सर्व दुःख नष्ट झाले, अशी कथा आहे. फल–पुत्र, धन, ज्ञान व आरोग्य यांची प्राप्ती. [जै. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.]

रविषष्ठी एक काम्य व्रत. षष्ठीला उपवास आणि सप्तमीला रवीची पूजा करणे हा या व्रताचा प्रमुख विधी आहे. फल– रोगनिवारण व धनप्राप्ती. [हिं. ध.]

रविसाहेब (१७२६–१८०३ इ. स.) एक गुजराती संतकवी. याचा जन्म आमोद मंडळाच्या तणछा गावी एका वैश्य कुळात झाला. याचे वडील मनछाराम एक सात्त्विक गृहस्थ असून, त्याची आई इच्छाबाई ही देखील एक साध्वी स्त्री होती. रवीने भाणसाहेबाकडून दीक्षा घेतली होती. शेरखी नावाच्या गावी त्याने आपली गादी स्थापून आयुष्यभर ज्ञानप्रसार केला. त्याच्या शिष्यसमुदायात मोरार हा प्रमुख होता. त्याच्यासाठी शेरखी गाव सोडून रविसाहेब जामखंभालिया नावाच्या गावी समाधी घेण्यासाठी निघाला. पण वाटेतच आजारी पडून वांकानेर गावी त्याचा मृत्यू ओढवला. मग मोरारने त्याचा मृत देह जामखंभालियाला आणला आणि तिथे त्याची समाधी बांधली. या समाधीवर रामाचे मंदिर आहे.

रविसाहेबाने हिंदी व गुजराती भाषेत बरीच काव्यरचना केली आहे. तो रवी, रवजी, रविराम, रविदास, इ. नाममुद्रा काव्यात वापरतो. चिंतामणी, भाणगीता, मनःसंयम, पंचकोशप्रबंध, रविभाण, प्रश्नोत्तरी, गुरुमाहात्म्य, इ. त्याचे लहान मोठे ग्रंथ उपलब्ध आहेत. याशिवाय त्याने स्फुट पदेही रचली आहेत. त्याच्या वाणीत रामाच्या सगुण-निर्गुण रूपांचा समन्वय पाहायला मिळतो—

रग रग राम रमि रहयो, निरगुन–सगुनके रूप ।
राम श्याम रवि एक ही, सुंदर सगुन सरूप ।।

अर्थ – नसानसातून राम रमायला हवा. तो सगुण-निर्गुणांचे रूप आहे. राम व श्याम हे दोघेही सुंदर सगुण स्वरूप आहेत.

याने सत्य, प्रेम व शांती यांचा आयुष्यभर प्रचार केला. [गु. सं. हिं. दे.; भा. सं. म.]

रवी एक महत्त्वाचा ग्रह. हा ग्रहमालेचा चालक असून, जगातील सर्व प्राणिमात्रावर आणि निसर्गावरही सत्ता चालवतो. तो विद्युत्धर्मीय, निर्भय, बळकट, उग्र, जीवनशक्तिदायक, दाहक, उष्ण, रुक्ष व जाज्वल्य असा आहे. एखाद्याच्या जन्मकाली रवी प्रबल असल्यास तो वरील गुणधर्मांचा होतो. पिवळा, गडद, तांबूस, बदामी, तपकिरी, नारिंगी व सोनेरी रंगाचा तो द्योतक आहे. मधुर व तिखट हे स्वाद रवीचे प्राबल्य असलेल्या मनुष्याला प्रिय असतात. शरीरातील हृदय, पाठ, जीवनशक्ती, पुरुषाच्या कुंडलीत डावा डोळा, स्त्रीच्या कुंडलीत उजवा डोळा व शरीरातील नाडीचक्र यांवर रवीचा अंमल चालतो. त्यामुळे रवी चांगला नसेल तर वरील अवयवांचे विकार संभवतात. मानसन्मान, कीर्ती, धंदारोजगार, शील, सत्त्व, इ. गोष्टी रवीकडून प्राप्त होतात. कुंडलीत रवी बलवान असता ऐश्वर्य, शौर्य, पितृसुख, आरोग्य, अधिकार व भाग्य या गोष्टी लाभतात. रविप्रकृतीची माणसे सत्यप्रिय, प्रामाणिक, विश्वासू, न्यायी, नियमाने वागणारी, अधिकारप्रिय, गंभीर, निरोगी व किंचित काळसर आढळतात. कुंडलीत रवी निर्बल असलेली माणसे गर्विष्ठ, भपकेबाज, डामडौली, दुराग्रही, वाडवडिलांची पोकळ बढाई सांगणारी व उथळी दिसतात.

मेष, सिंह, धनू व कर्क या राशींमध्ये रवी बलवान असतो. तो सिंह राशीचा अधिपती आहे. मेष ही याची उच्च राशी व तूळ ही नीच राशी मानतात. कुंडलीमध्ये दशमात व लग्नात या ग्रहाचे विशेष महत्त्व असून, नवमात व पंचमात त्या खालोखाल आहे. २, ४, ६, ८ व १२ या स्थानात तो राशिबली नसून पीडित असेल, तर अनिष्ट फले देतो. रवीच्या चतुर्थात शनी असता अनेक आपदा भोगाव्या लागतात. रवीच्या दशमातही शनी चांगला नव्हे. कारण त्या योगे धंद्यांत अडचणी व राजभय संभवते. रवि-चंद्रांमध्ये षडष्टक किंवा द्विद्वादशक योग नसावा. त्या दोघांतली त्रिकोणयोग महत्पद व सांपत्तिक लाभ दर्शवितो. रवि-बुधांचा योग बद्धी व विद्या देणारा, रवि-गुरूंचा योग श्रेष्ठत्व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व ऐश्वर्य देणारा व रवि-मंगळांचा योग जीवनशक्ती व हिंमत देणारा होतो. रवीच्या एकादश स्थानात सर्व ग्रह उत्तम फले देतात.

रवी हा पापग्रह मानलेला आहे; पण काही लोक त्याला शुभग्रह मानतात. हा एक तारा असून, त्याला सूर्य, सविता, इ. अन्य नावेही आहेत. पाहा– सूर्य. [जातक मार्गोपदेशिका]

रशना दर्भाची दोरी. यज्ञीय पशूला बांधण्यासाठी ही दोरी असते. हिची लांबी दोन वावे असते. यूपाला यज्ञपशू बांधण्यासाठी केलेली रशना तिहेरी व तीन वावे लांब असते. एक शिंग आणि पुढचा उजवा पाय यांमध्ये रशना अडकवून पशूला यूपाजवळ बांधतात. पशू यूपाला बांधणे यावरून पशुयागाला पशुबंध असेही नाव पडले आहे. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

रशनू झरथुष्ट्री धर्मातील सत्य या गुणाची देवता. हिला चरम सत्य असे म्हणतात. ही देवता मिथ्र व स्त्राओश या देवतांच्या सहकार्याने मृतात्म्याच्या पाप-पुण्यांचा निवाडा करते. पाप-पुण्यांचे मोजमाप एका तराजूमध्ये ती कृत्ये टाकून केले जाते. नंतर जो निवाडा होईल, त्याप्रमाणे दिव्य करण्यासाठी मृतात्म्याला तिथे आणले जाते. कोणताही मनुष्य या न्यायदानातून व दिव्यातून सुटत नाही.

रस नाट्य–काव्यातील एक प्राणभूत तत्त्व. ‘ रस्यत इति रसः ’ = ज्याचा आस्वाद घेतला जातो तो रस, अशी त्याची व्याख्या आहे. रसनेंद्रियाच्या द्वारे आस्वादिले जाणारे रस कटू, तिक्त, कषाय, मधुर, लवण व आम्ल असे सहा आहेत. त्या रसांनी युक्त अशा भोजनाला षड्रसभोजन असे म्हणतात. नाट्य, काव्य, इ. वाङ्मयातही आस्वादनीयता याच लक्षणाला अनुसरून काही रस मानलेले आहेत. शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स व अद्भुत हे आठ प्रमुख रस आहेत. काही काव्यशास्त्रज्ञांनी यांची संख्या कमी-अधिक मानलेली आहे.

भरताचे नाट्यशास्त्र हा रसप्रक्रियेचे स्वरूप सांगणारा पहिला ग्रंथ मानतात. पण भरताच्याही आधी द्रुहिण व वासुकी या दोन आचार्यांच्या दोन भिन्न रसपरंपरा होत्या, असे डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांनी म्हटले आहे. भरताचे विवेचन नाट्यगत रसांपुरतेच मर्यादित आहे. भरताचे रससूत्र असे –

विभावानुभावसञ्चारिसंयोगाद्रसनिष्पत्तिः ।

(ना. शा. ६.३२)

अर्थ – विभाव, अनुभाव व संचारी भाव यांच्या संयोगातून रसनिष्पत्ती होते.

वरील सूत्रातल्या निष्पत्ती शब्दाचा अर्थ अभिव्यक्ती, उत्पत्ती, पूर्णता अथवा परिपक्वता असा आहे. संयोगाबद्दल त्याने दृष्टांत दिला आहे, तो असा– ज्याप्रमाणे तेल, तिखट, मीठ, मसाला, इ. पदार्थ घालून तयार केलेल्या भाजी-आमटीने जेवणाला एक प्रकारची रुची येते, त्याप्रमाणे एखाद्या नाटकात विभाव, अनुभाव, इ. सामग्री एकत्र आल्याने रसनिष्पत्ती होते.

रसचर्चा – काव्यातले मुख्य तत्त्व व काव्याचा प्राण रस हाच होय. शब्दांना जे काव्यत्व येते, ते या रसामुळेच येते. ज्यात रस असेल तेच काव्य. त्यावाचून असलेले ते काव्य नसून, काव्याची नक्कल होय. काव्यात जी गोडी उत्पन्न होते, ती या रसांमुळेच.

ज्याचा आपण आस्वाद घेतो, जो आपण आवडीने चाखतो, तो रस होय. अर्थात जो रस चाखायचा त्याला कोणत्या ना कोणत्या प्रकारची आस्वादयोग्यता असावी लागते. चाखण्यासारखे त्यात काहीतरी असल्यावाचून कोणीही त्याचा आस्वाद घ्यायला जाणार नाही, ही गोष्ट निश्चित.

मात्र तो रस जिभेने चाखायचा नसून, नेत्र किंवा कान या इंद्रियांच्या द्वारे चाखायचा असतो. इंद्रियांनी रसाचे ग्रहण केल्यानंतर त्यामुळे उत्पन्न होणाऱ्या सुखदुःखादी संवेदना मनाकडे जाऊन पोचतात आणि त्या तिथे पोचल्यावर मनाचे सर्व व्यापार जर सुरळीत चालू असले, तर मनाच्या ठिकाणी निसर्गतः असलेल्या हर्ष, शोक, विषाद, इ. भावना त्या त्या संवेदनांना अनुसरून जागृत होतात. संवेदना ज्या मानाने कमी-अधिक तीव्र असतील त्या मानाने भावना कमी-अधिक उत्कट होऊन त्यांचे प्रतिबिंब मनुष्याच्या चर्येवर व इतर अवयवांवर उमटते. एखाद्या भावनेने चेहरा खुलून दिसू लागतो किंवा कपाळाला आठ्या पडतात. अंगावर रोमांच उभे राहतात किंवा सर्व शरीर भीतीने थरारून एकदम झटका बसल्यासारखे होते. भावनेची परिणती झाली, की हर्ष, शोक, विषाद, तिरस्कार यांचे निदर्शक असे ‘ वाहवा ’, ‘ छीः ’, ‘ शीः ’, ‘ अरेरे ’ इ. उद्गार नकळत तोंडातून बाहेर पडून, ज्या प्रसंगांमुळे भावनांची खळबळ उडाली, त्या प्रसंगांना जणू काय प्रतिक्रिया म्हणून इतर इंद्रियांचीही तदनुरूप हालचाल सुरू होते. कवीने वर्णिलेली परिस्थिती किंवा प्रसंग जणू काय आपल्या समोर प्रत्यक्ष घडत आहे, आपणच त्याचा अनुभव घेत आहो, असा त्याला आभास होतो. तो त्यात समरस होतो. असे झाले म्हणजे त्याला त्या विषयाची गोडी लागली असे आपण म्हणतो.

अशा प्रकारची गोडी काव्यात किंवा नाटकात उत्पन्न होते, ती मनुष्याच्या अंतरंगात ज्या काही विशिष्ट अशा मनोभावना असतात, त्यांचा सर्व बाजूंनी परिपोष केल्यामुळे होत असते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्या मनोभावनांचे उठावदार चित्र ज्या काव्यात दिसून येईल, त्या काव्याला किंवा नाटकाला रसयुक्त म्हटले जाते. या ज्या विशिष्ट मनोभावना आहेत, त्यांचा उत्तम परिपाक ज्या काव्यात झालेला असेल ते काव्य गोड वाटते. पुन:पुन्हा त्याचा आस्वाद घ्यावासा वाटतो. म्हणून त्या विशिष्ट मनोभावनांनाही रस हेच नाव साहित्यशास्त्रज्ञांनी दिले आहे. राग येणे, आनंद होणे, किळस वाटणे वगैरे मनाचे जे धर्म सर्वांनाच अनुभवाला येणारे आहेत, त्यांनाच काव्यशास्त्रवेत्त्यांनी भाव किंवा भावना अशा संज्ञा दिलेल्या आहेत. या भावनांचा आयुष्यात ज्याला अनुभव आला नाही, असा मनुष्य मिळणे अशक्य आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्या मनात या भावना वास्तव्य करून असतात आणि चेतना मिळताच पाण्यात टाकलेल्या तेलाच्या थेंबाप्रमाणे विस्तार पावून मनावर ताबा मिळवतात. हास्य, क्रोध, उत्साह, शोक, भीती, किळस, आश्चर्य या भावना लहान मुलांतसुद्धा दिसून येतात. मोठेपणीसुद्धा पदोपदी याच भावनांचा निरनिराळ्या प्रकारे प्रत्येक मनुष्य अनुभव घेत असतो.

या ज्या मूलभूत आणि स्वयंभू अशा मनुष्याच्या अंतरंगातल्या भावना आहेत, त्यांनाच अनुलक्षून काव्यशास्त्रवेत्त्यांनी रस ठरविले आहेत.

या रसांची प्रक्रिया सांगताना काही पारिभाषिक संज्ञा दिलेल्या आहेत, त्या अशा –

(१) स्थायी भाव – स्थायी भाव म्हणजे कायम टिकणारे भाव किंवा धर्म होत. मनुष्याच्या अंतरातले हर्ष, शोक, विषाद, इ. जे मलभूत आणि स्वयंभू असे भाव आहेत, त्यांना स्थायी भाव अशी संज्ञा आहे. स्थायी भावांचे लक्षण पुढीलप्रमाणे –

ज्या भावना मूलत:च अंतरंगात असतात व रसाच्या प्रभावाने ज्या वृद्धिंगत होऊन मनाला व्यापून टाकतात आणि नंतरही ज्यांचा ठसा अंत:करणावर बराच काल उमटून राहतो, त्या भावनांना स्थायी भाव असे म्हणतात. हे स्थायी भाव रती, हास्य, शोक, क्रोध, उत्साह, भीती, जुगुप्सा किंवा किळस व विस्मय असे आठ असून त्यांवर अनुक्रमे शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स व अद्‌भुत हे आठ रस आधारलेले आहेत. शांतरसाचा स्थायी भाव हा अभावात्मक आहे. निर्विकार होणे, म्हणजे कोणत्याही प्रकारची संवेदना उत्पन्न न होता देवघरातील नंदादीपाच्या ज्योतीप्रमाणे अविचल स्थिती येणे, भावनारहित होणे, हा शांतरसाचा स्थायी भाव आहे. स्नेह हा प्रेयान रसाचा स्थायी भाव आहे आणि ईश्वरविषयक प्रेम हा भक्तिरसाचा स्थायी भाव आहे.

(२) विभाव– 'वासनारूपतया स्थितान् रत्यादीन् स्थायिनो विभावयन्ति रसस्वादाङ्कुरयोग्यतां नयन्तीति विभावाः' वासनारूपाने अंतरात असलेल्या रत्यादी स्थायी भावांना आस्वादयोग्य करून रसपदवीला नेणारे ते विभाव होत. स्थायी भावांना चेतना देऊन त्यांचा उत्कर्ष करण्यास ते कारणीभूत होतात. विभावाचे आलंबन विभाव आणि उद्दीपन विभाव असे दोन प्रकार आहेत. भावनांचा परिपोष करण्यास कारणीभूत होणारी व्यक्ती म्हणजे काव्यातले नायक अथवा नायिका यांना आलंबन विभाव म्हणतात आणि नायकनायिकांच्या निरनिराळ्या कृती त्याचप्रमाणे देश, काल, परिस्थिती यांना उद्दीपन विभाव म्हणतात. रसाचे उद्दीपन यांच्यामुळेच होत असते.

(३) अनुभाव – 'अनुभावयन्ति च तान् (रत्यादीन्) इति अनुभावाः' = स्थायी भावांचा अनुभव घडविणारे म्हणजेच त्यांचा शरीरावर परिणाम दाखविणारे ते अनुभाव होत. एकदम स्तंभित होणे, अंग घामाने डवडवणे, रोमांच उभे राहणे, गळा भरून येणे, कंप उत्पन्न होणे, चेहरा पांढरा फटफटीत पडणे, डोळ्यांतून अश्रू येणे, चेतना नष्ट होणे, इ. प्रकार अनुभाव या सदरात येतात.

(४) व्यभिचारी भाव– 'विशेषेण अभितः काव्ये स्थायिनं चारयन्ति इति व्यभिचारिणः' = स्थायी भावाचा परिपोष करून त्याला सर्वत्र (काव्यात) संचारयोग्य करणारे ते व्यभिचारी भाव होत. अमुक रसाचे अमुकच व्यभिचारी भाव असे निश्चित नसते. सामान्यपणे कोणत्याही रसात हे येऊ शकतात. म्हणूनच त्यांना व्यभिचारी अथवा संचारी असे म्हटले आहे. कोणत्याही रसाचा उत्कर्ष करण्यासाठी हे येतात आणि आपली थोडीशी छटा दाखवून निघून जातात. अळवावरच्या थेंबासारखी यांची स्थिती असते. पाठीमागून यांचा ठसा काहीच राहात नाही. हे व्यभिचारी भाव एकूण तेहतीस आहेत– वैराग्य, ग्लानी, शंका, मत्सर, मद, श्रम, आळस, दैन्य, चिंता, मूर्च्छा, स्मृती, धैर्य, लज्जा, चपलता, हर्ष, आवेग, जडता, गर्व, खेद, उत्सुकता, झोप, अपस्मार, स्वप्न, जागृती, क्रोध, मनोविकार लपविणे, उग्रपणा, मती, व्याधी, उन्माद, मरण, त्रास आणि वितर्क.

रसांचे सोदाहरण स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे–

(१) शृंगाररस हा सर्व रसांचा राजा आहे. रती म्हणजे पुरुषाला स्त्रीविषयी आणि स्त्रीला पुरुषाविषयी वाटणारे कामुक प्रेम. ही भावना या रसात आरंभापासून शेवटपर्यंत प्रामुख्याने असते. परस्परांवर अनुरक्त झालेल्या दोन व्यक्तींवर हा रस आधारून राहातो. म्हणून त्या व्यक्ती या रसाचे आलंबन विभाव होत. पिठोरी चांदणे, वसंत ऋतूचे आगमन, अनुरागयुक्त संभाषण, कामक्रीडेची चित्रे, आकर्षक वेषभूषा, प्रेमगीतांचे श्रवण, एकांत, इ. गोष्टींनी रती या भावनेचे उद्दीपन होते, म्हणून या प्रकारांना शृंगाररसाचे उद्दीपन विभाव असे म्हणतात. कामा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सक्तीचे उद्दीपन झाले, की मग भुवया आकुंचित करणे, कटाक्ष फेकणे, स्पर्श करणे, आलिंगन देणे, इ. ज्या गोष्टी घडतात, ते या रसाचे अनुभाव होत. हास्य उत्पन्न होणे, लाज वाटणे, शरीर गळल्यासारखे होणे, कंटाळा वाटणे, आळस येणे, हे या रसातले व्यभिचारी भाव होत.

शृंगाररसाचे दोन प्रकार आहेत. एक संभोगशृंगार आणि दुसरा विप्रलंभशृंगार. प्रेमी जोडप्याचे मीलन ज्या ठिकाणी झालेले असते, त्याला संभोगशृंगार असे म्हणतात. अभिज्ञान शाकुंतलातले दुष्यंत–शकुंतलेचे मीलन हे संभोगशृंगाराचे उदाहरण आहे. जयदेवाच्या गीतगोविंदातले राधा–कृष्णांच्या शृंगाराचे वर्णन हे विप्रलंभाचे उदाहरण आहे. दोघांचे एकमेकांवर अत्यंत प्रेम आहे; पण त्यांची भेट मात्र होत नाही, काहीतरी विघ्ने येतात. दोघांनाही परस्परांच्या सहवासाची अगदी ओढ लागून राहिलेली असते, पण देशांतरी असल्यामुळे ती गोष्ट घडून येत नाही. अशा स्थितीत झुरणीला लागणे, झोप न येणे, सहवासाची स्वप्ने पडणे, इतर आवडत्या वस्तूंचाही तिटकारा येणे, अश्रू येणे, निदिध्यास लागून राहाणे, इ. सर्व प्रकार विप्रलंभशृंगारात येतात.

(२) हास्यरस – हसू येणे ही यातली प्रमुख भावना आहे. तीच या रसाचा स्थायीभाव होय. एखाद्याच्या शरीराचा बेडौल आकार, बोलताना विलक्षण हातवारे करण्याची विचित्र तऱ्हा, पूर्वापर संबंध सोडून बोलणे, भलत्याच वेळी भलतेच काहीतरी बरळणे, विचित्र पोषाख करणे, एखाद्या क्षुल्लक प्रसंगीसुद्धा भलताच आवेश दाखविणे, बोलण्यात आणि वागण्यात विसंगती म्हणजे बोलणे वीरत्वाचे तर कृती भित्रेपणाची, असली एखादी व्यक्ती पाहिली, की माणसाला हसू येते. ज्या व्यक्तीला पाहून हसू येईल, ती व्यक्ती या रसाचा आलंबन विभाव होय. त्या व्यक्तीच्या ज्या बोलण्याचालण्यामुळे हसू येते, त्या तिच्या कृती या रसाचे उद्दीपन विभाव होत. हसताना डोळे आकुंचित होणे, तोंड उघडणे, गाल फुगणे, इ. जे प्रकार होतात, ते या रसाचे अनुभाव होत. झोप येणे, आळस वाटणे, श्रम होणे, हे यातले व्यभिचारी भाव होत.

(३) करुणरस– अत्यंत आवडत्या आणि जिव्हाळ्याच्या माणसाचा मृत्यू किंवा बहुत काल वियोग, द्रव्याचा नाश, दुर्धर रोगामुळे शरीराला त्रास, इ. कारणांनी हा रस निर्माण होतो. शोक हा या रसाचा स्थायी भाव आहे. शोक म्हणजे मेल्या-गेल्याचे दुःख. करुणरसाच्या आदिअंती हीच भावना प्रमुख असते. नष्ट झालेली व्यक्ती किंवा वस्तू, हिच्यावर हा रस आधारलेला असतो, म्हणून तिला आलंबन विभाव समजावे. व्यक्ती नष्ट झाली असली तर तिच्या गुणवर्णनाने आणि रोगपीडित असल्यास तिला होणाऱ्या असह्य वेदनांनी ही शोकाची भावना प्रदीप्त होते, म्हणून त्यांना उद्दीपन विभाव समजावे. रडणे, दैवाला दोष देणे, भूमीवर अंग टाकणे, ऊर पिटणे, आक्रोश करणे, हे प्रकार या रसाचे अनुभाव होत. शरीर फिकट आणि कृश होणे, वैराग्य येणे, मूर्च्छित होणे, ग्लानी येणे, व्याधी उत्पन्न होणे, चिंताग्रस्त होणे, वेड लागणे, इ. या रसाचे व्यभिचारी भाव होत.

(४) रौद्ररस – क्रोध हा या रसाचा स्थायी भाव आहे. शत्रू हा या रसाचा आलंबन विभाव होय. शत्रूने केलेल्या अपकारांच्या कृत्यांनी क्रोध ही भावना प्रदीप्त होते, म्हणून त्या कृत्यांना उद्दीपन विभाव समजावे. मुष्टिप्रहार करणे, शत्रूला भूमीवर आपटणे, त्याला ठेचणे, जाळणे, चिरणे, विद्रूप करणे हे प्रकारही या रसाचे उद्दीपन करणारेच आहेत. केस ताठ होणे, भुवया वक्र होणे, ओठ चावणे, आयुधे फेकणे, शब्दांनी निर्भर्त्सना करणे, चर्या लालबुंद होणे, इ. या रसाचे अनुभाव म्हणजे शरीरावर दिसणारे दृश्य परिणाम होत. उग्रता, असूया, मोह. इ. या रसातले व्यभिचारी भाव आहेत. थोडक्यात सांगायचे तर सूडाच्या भावनेने भरलेली आणि राक्षसी वृत्तीची कृत्ये ही रौद्ररसाला विषय होत असतात.

(५) वीररस – उत्साह हा या रसाचा स्थायी भाव होय. शत्रू हा याचा आलंबन विभाव आहे. शत्रूचे आक्रमण, त्याने आपल्या राज्यात चालवलेली फंदफितुरी, त्याने चालवलेली शस्त्रास्त्रांची वाढ, सैन्याची जमवाजमव, इ. प्रकारांनी वीरांच्या अंगातला उत्साह वृद्धिगत होतो. म्हणून या प्रकारांना या रसाचे उद्दीपन विभाव म्हणतात. चातुर्य, स्थिरता, आपले साह्यकर्ते कोण आहेत ते पाहून त्यांना एकत्र करणे, इ. या रसाचे अनुभाव आहेत. गर्व, हर्ष, तर्क, धैर्य हे याचे व्यभिचारी भाव होत.

(६) भयानकरस – भीती हा या रसाचा स्थायी भाव आहे. ज्याच्यापासून भीती वाटते, तो आलंबन विभाव व त्याच्या विकट कृती हा उद्दीपन विभाव होय. बोबडी वळणे, कंप उत्पन्न होणे, संरक्षणासाठी आजूबाजूला पाहणे, पळून जाणे, इ. अनुभाव आणि जडता, त्रास, ग्लानी, दैन्य इ. व्यभिचारी भाव होत.

(७) बीभत्सरस – जुगुप्सा म्हणजे किळस येणे, वीट येणे हा या रसाचा स्थायी भाव आहे. रक्त, मांस, दुर्गंधयुक्त पदार्थ हे या रसाचे आलंबन विभाव होत व दुर्गंधी येणे, किडे पडणे, कुजणे, सडणे हे या रसाचे उद्दीपन विभाव होत. थुंकणे, तोंड बाजूला वळवणे, डोळे मिटून घेणे, हे त्याचे अनुभाव आणि मूर्च्छा येणे, व्याधी उत्पन्न होणे, डोके फिरणे, हे यातले व्यभिचारी भाव होत.

(८) अद्भुतरस – विस्मय म्हणजे आश्चर्य हा या रसाचा स्थायी भाव आहे. जी वस्तू पाहून आश्चर्य वाटते ती वस्तू हा आलंबन विभाव व त्या अलौकिक वस्तूच्या गुणधर्मांचे वर्णन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हा उद्दीपन विभाव होय. थबकणे, मनाचा गोंधळ उडणे, डोळे मोठे होणे, हे याचे अनुभाव आणि स्वर गद्गद होणे, रोमांचित होणे हे याचे व्यभिचारी भाव समजावे.

विभाव, अनुभाव व संचारी भाव यांच्या संयोगापासून रस-निष्पत्ती होते म्हणजे काय होते हा रसचर्चेचा मुख्य विषय आहे. नाट्याप्रमाणेच काव्यापासूनही रसास्वाद कसा मिळतो यासंबंधी-चाही विचार भरतानंतर रसचर्चेत उत्पन्न झाला. त्यात अनेक मतमतांतरे पुढे आली. या मतमतांतरांचा अभिनवगुप्ताने ध्वन्यालोकलोचनात निर्देश केला असून, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांनी त्याचा सारांश सांगितलेला आहे, तो असा –

(१) विभावादिकांचा पात्रगत स्थायीशी संयोग होऊन पात्रगतस्थायी परिपुष्ट होतो. हा परिपुष्ट स्थायी म्हणजे रस होय. रस वस्तुतः रामादिक अनुकार्य पात्रांच्या ठिकाणी असतो, पण अनुसंधानबलाने तो नटाच्या ठिकाणी दिसतो. हे लोल्लटाचे मत होय.

(२) विभावानुभावादिक लिंगांवरून नटगत स्थायी अनमित होतो व नट अनुकार्य रामाहून भिन्न नाही, या जाणिवेने त्या स्थायीचा आस्वाद घेतला जातो. या मताप्रमाणे रस नटाश्रित आहे; रामादिकाश्रित नाही.

(३) भिंतीवरील रंगांच्या उचित मिश्रणामुळे तुरगाचा भास व्हावा, त्याप्रमाणे अभिनयसामग्रीमुळे नटाच्या ठिकाणी रामगत स्थायीचा आभास निर्माण होतो. हा मिथ्याज्ञानरूप आभास म्हणजेच रस होय. हे मत व वरील मत या दोहोंवर शंकुकाने आपली उपपत्ती बसविली आहे.

(४) विभावानुभाव उचित प्रकारे दाखविले असता, त्यांनी विभावनीय व अनुभावनीय अशी जी स्थायी चित्तवृत्ती, त्या चित्तवृत्तीला उचित अशी जी रसिकांची वासना, त्या वासनेची चर्वणा म्हणजे रस.

(५) कित्येकांच्या मते शुद्ध विभाव, कित्येकांच्या मते केवळ अनुभाव, कित्येकांच्या मते केवळ स्थायी, कित्येकांच्या मते केवळ व्यभिचारी, कित्येकांच्या मते त्यांचा संयोग, तर कित्येकांच्या मते त्यांचा समुदाय म्हणजे रस होय.

(६) रस हा स्वशब्दवाच्यही असू शकतो, असेही एक मत होते. पण त्यावर आनंदवर्धनाने टीका केली आहे.

(७) भट्टनायकाच्या मते रस प्रतीत होत नाही, उत्पन्न होत नाही किंवा अनुमितही होत नाही. भोज्य-भोजकभावाने रसिक त्याचा आस्वाद घेतो.

(८) विभाव ही बाह्य सामग्री असून, अनुभाव व व्यभिचारी भाव यांचा त्या विभावांवर संस्कार झाला म्हणजे त्या सामग्रीतून सुखदुःखरूप स्थायी उत्पन्न होतो, असे सांख्याभिमान्यांचे मत म्हणून अभिनवगुप्ताने अभिनव भारतीत नमूद केले आहे.

रसविघ्ने – रसास्वाद हा एक अनुभव किंवा भावप्रतीती आहे. ही प्रतीती लौकिक अशा प्रत्यक्ष, अनुमान, इ. प्रतीतींहून भिन्न आहे. रसानुभवाकरिता रसिकाला विशिष्ट पातळीवरून काव्याची गोडी चाखावी लागते. कोणत्याही कारणाने ती पातळी सुटली, की रस निघून जातो. ही पातळी सुटायला कारणीभूत होणाऱ्या गोष्टींना अभिनवगुप्ताने रसविघ्ने म्हटले आहे. रसामध्ये निर्विघ्न अशा रसनात्मक प्रतीतीला बाधक अशी कविगत, काव्यगत, नटगत किंवा रसिकगत कोणतीही गोष्ट म्हणजे रसविघ्न होय. रसविघ्ने सात आहेत, ती अशी –

(१) संभावनाविरह – कल्पनेचा अभाव म्हणजे संभावनाविरह. ज्याला काव्यवस्तू किंवा नाट्यवस्तू यांची कल्पनाच करता येत नाही, त्याला रसास्वाद कुठून मिळणार ! कवी आपल्या कृतीच्या द्वारे जी वस्तू निर्माण करतो, ती एक संवेद्य वस्तू असते. वाचकाला किंवा प्रेक्षकाला तिची जर नीट कल्पनाच करता आली नाही, तर त्याला प्रतीतीच येणार नाही. हा दोष कविगत किंवा रसिकगत असा उभयविध असू शकतो. उचित काय आणि अनुचित काय, याचा विवेक कवीला राहिला नाही तरी हा दोष घडतो. पण कित्येकदा कविकृती चांगली असूनही रसिकालाच कल्पनादारिद्र्यामुळे तिचे आकलन होत नाही. असे हे विघ्न आहे. ते दूर व्हावे म्हणून कवी लोकसामान्य अशी कथावस्तू निवडीत असतो.

(२) स्वपरगत देशकाल विशेषावेश – हे रसिकगत विघ्न होय. कित्येक वाचक किंवा प्रेक्षक काव्य–नाट्यांतून स्वतःच्या वैयक्तिक सुखदुःखांचा आस्वाद घेतात. त्यांना जोवर सुखकारक चालना मिळते, तोवर ते कविकृतीत गढून जातात. पण वैयक्तिक दृष्ट्या अप्रिय किंवा दुःखद प्रसंग त्यांना सोसत नाहीत. कित्येकांना कविकृतीतील प्रसंग आपल्यालाच उद्देशून आहेत असे वाटत असते. अशांना रसास्वाद घेणे शक्य नसते. कारण रसास्वादासाठी आवश्यक असणारी साधारणीभवनाची पातळी त्यांना प्राप्त होतच नाही. नाट्यप्रसंगी हे विघ्न येऊ नये म्हणून भरताने पूर्वरंगविधी करायला सांगितला आहे. या विधीने अशा प्रेक्षकांनाही रसास्वादाला योग्य अशी साधारणीभावाची प्राप्ती होते, असे तो म्हणतो.

(३) निजसुखादिविवशीभाव – कित्येकदा वाचक किंवा प्रेक्षक आपल्याच वैयक्तिक सुखदुःखात व्यग्र असतो. अशा अवस्थेत तो नाट्य-काव्याकडे वळल्यास त्याच्या व्यग्रतेमुळे त्याला रसास्वादाचा लाभ घडू शकत नाही. पाहताना, ऐकताना किंवा वाचताना त्याच्या मनात मधून मधून पूर्वीच्या सुखदुःखादी वृत्ती जागृत होत असतात. नाट्याच्या बाबतीत हे विघ्न दूर करण्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साठी नृत्य-गायनादी प्रकारांची योजना करावी, असे भरताने सांगितले आहे.

(४) प्रतीत्युपायवैकल्य – विभावानुभाव हेच रसप्रतीतीचे उपाय होत. त्यांची नीट संगती नसली, ते विकल असले किंवा त्यांचा अभावच असला, तर ते रसास्वादाला विघ्न ठरते.

(५) स्फुटत्वाभाव – विभावानुभावांची प्रतीती स्पष्टपणे झाली पाहिजे. ती न झाल्यास रसिकाच्या रसास्वादाला विघ्न येते. ही विघ्ने कविगत किंवा नटगतही असू शकतात. वरील दोन विघ्नांचा निरास होण्यासाठी अभिनयाला लोकधर्मी वृत्तींचा आधार घ्यावा, असे सांगितले आहे.

(६) अप्रधानता–काव्यातील प्रधान वस्तू सोडून गौण वस्तूवरच भर दिला गेला, तर रसप्रतीतीत विघ्न येते. हा दोष कथावस्तूच्या दृष्टीने कविगत, तर अभिनयदृष्टीने नटगत असू शकतो. हे विघ्न टाळण्यासाठी कवीने स्थायी भावावर अवधान व औचित्य यांचा विवेक ठेवला पाहिजे.

(७) संशययोग – विभावादिकांतून स्थायी भाव अभिव्यक्त होतो. पण अमुक एका स्थायीचे अमुकच विभाव, अमुकच अनुभाव किंवा अमुकच संचारी भाव असे ठरलेले नसते. वाघ हा जसा भयाचा विभाव होईल, तसा तो क्रोधाचाही विभाव होऊ शकेल. अश्रू हे जसे शोकाचे अनुभाव होतील, तसे ते हर्षाचेही अनुभाव होतील. हे विभावादिक केवळ एकेकटे घेऊन पाहिले, तर ते कोणत्या स्थायीचे द्योतक आहेत, याबद्दल संदेह उत्पन्न होईल व तसे होणे हे रसास्वादाला विघ्न ठरेल. पण विभाव, अनुभाव व संचारी भाव यांची जर औचित्ययुक्त जुळणी झाली, तर स्थायीचा निश्चित प्रत्यय येऊन तो आस्वादाचा विषय होऊ शकेल. उदा० बंधुनाश हा विभाव, अश्रुपात हा अनुभाव व चिंता आणि दैन्य हे व्यभिचारी भाव एकत्र आलेले दिसले, तर त्या सामग्रीतून निश्चितपणे शोकरसच प्रतीत होईल.

रससंख्या – शृंगारादी आठ रस हे प्रामुख्याने सांगितलेले असले, तरी रससंख्या तेवढीच नाही. काहींनी रस हा एकच आहे असे सांगितले आहे; तर काहींनी जितके भाव तितके रस, इथवर मजल मारली आहे. रस एकच आहे असे सांगणारा साहित्यशास्त्री म्हणजे भोज होय. त्याने अहंकार हा एकच रस मानला असून, बाकीचे सर्व त्यापासून उत्पन्न होणारे भाव मानलेले आहेत. भवभूती करुण हा एकच रस मानतो, तर मधुसूदन भक्ती व अग्निपुराणकर्ता शृंगार हा एकच रस असल्याचे प्रतिपादितो. जितके भाव तितके रस असे म्हणणारा साहित्यशास्त्रज्ञ रुद्रट हा आहे. भरताने शृंगारादी आठ रस सांगितले आहेत. शांत या नवव्या रसाचा निर्देश उद्भटाने केला आहे. भक्ती हा दहावा रस मधुसूदनसरस्वतीने युक्तिवादपूर्वक सिद्ध केला आहे. वत्सल रसाचा निर्देश भोजाने केला आहे व विश्वनाथाने साहित्यदर्पणात त्याचे सांगोपांग विवेचन केले आहे. सांप्रत रसचर्चेत क्रांती, प्रक्षोभ व देशभक्ती हे नवे रस काही साहित्य-शास्त्रकार मानू लागले आहेत.

रसपरामर्श – रसविषयक प्रश्नांचा संकलित परामर्श घेताना प्रा. अर्जुनवाडकर व प्रा. मंगरूळकर लिहितात–

संस्कृत काव्यशास्त्रग्रंथांतील रसमीमांसेचा मूलस्रोत भरताच्या नाट्यशास्त्रामध्ये आढळतो. उत्तरकालीन काव्यमीमांसकांनी रसचर्चा ही प्रायः भरताच्या रसनिरूपणाच्या संदर्भात केलेली असून, रसाचे स्वरूप, त्याच्या निष्पत्तीची प्रक्रिया, रसाचे भेद, इ. मुद्द्यांच्या बाबतीत शक्यतोवर भरताच्याच सामान्य स्वरूपाच्या वचनांची वेगवेगळी विशेष स्वरूपाची व्याख्याने केली आहेत. त्यांत काही ठिकाणी भरताशी साक्षात मतभेदही प्रकट केले आहेत. या रसचर्चेचे केंद्र प्रायः 'विभावानुभावव्यभिचारिसंयोगाद् रसनिष्पत्तिः।' हे भरताचे रससूत्र असते. या सूत्राच्या विविध व्याख्यानांचे सविस्तर दर्शन अभिनवगुप्तकृत 'अभिनव भारती' (नाट्यशास्त्रव्याख्यान) आणि लोचन (ध्वन्यालोकव्याख्या) यांत होते. भरताशी काव्यमीमांसकांचा मतभेद सुरू झाल्याची पहिली निशाणी ध्वन्यालोकांतील शांतरसाच्या समर्थनात, तर या बाबतीतल्या मतभेदाची कमाल मर्यादा भोजाच्या 'अहंकार – अभिमान – शृंगार' या सूत्रानुसार झालेल्या रसविवेचनात दिसून येते.

(१) रसाचे स्वरूप – रसाचे आस्वादात्मक स्वरूप बहुतेक सर्वांना मान्य आहे. रसना किंवा चर्वणा म्हणजे आस्वादच होय. भट्टनायकाच्या मते आस्वाद हा भोग आहे; प्रतीती नव्हे. याचे उत्तर अभिनवगुप्ताच्या मते असे आहे, की भोग म्हणजे एक प्रकारची निर्विघ्न प्रतीतीच होय. मात्र ती प्रतीती लौकिक नसून अलौकिक आहे. याच अभिप्रायाने काहींनी रसास्वादाची ब्रह्मास्वादाशी तुलना केली आहे.

(२) रसाची सामग्री – बीज व सहकारी सामग्री अशी ही उभयविध आहे. पारंपरिक रसमीमांसेत प्रायः सर्वत्र स्थायी भाव हे रसाचे बीज मानले जाते व विभाव, अनुभाव आणि व्यभिचारी भाव या गोष्टी सहकारी सामग्री समजल्या जातात. भोजाच्या मते अहंकार हे एकमेव आस्वादबीज होय. अर्थात त्याच्या दृष्टीने तथाकथित स्थायी भाव सहकारी सामग्रीतच मोडतो. किंबहुना तो भावामध्ये स्थायी आणि व्यभिचारी असा मूलभूत भेदच मानीत नाही. अभिनवगुप्ताने मात्र स्थायी आणि व्यभिचारी भावांमधला भेद स्पष्ट केला आहे. त्याच्या मते स्थायी भाव हे सर्व प्राण्यांच्या ठिकाणी निरपवादपणे जन्मतःच असतात आणि व्यभिचारी भाव हे तसे नसतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(३) रसाचा आश्रय – लोल्लट हा नाट्यगत रामादी व्यक्ती आणि गौणत्वाने त्यांचे सोंग वठविणारा नट हे रसाचे आश्रय मानतो. शंकुकाने नटाला; तर भट्टनायक व अभिनवगुप्त यांनी साधारणीकरणाच्या तरतुदीने रसिकाला रसाचा आश्रय मानले आहे. रसबीजभूत स्थायी भाव हे रसिकाच्या मनात वासनारूपाने सुप्त अवस्थेत असतात. ते नाट्य–काव्याने जागृत झाले म्हणजे रसानुभव येतो. अभिनवगुप्ताने रसिकाप्रमाणेच कवीलाही रसाचा आश्रय मानले आहे. आस्वादकाली कवी आणि रसिक या दोहोंमध्ये काही भेद नाही असा याचा अर्थ आहे.

(४) रसाचा निष्पत्तिप्रकार – रस आणि त्याची सामग्री यांमधला संबंध कसा असतो, याविषयी चार प्रकारची मते आहेत. रस हा मुख्यतः रामादिगत आणि अनुकरणाने नटगत असतो व त्यांच्या मधला संबंध जन्यजनक भावाचा असतो, असे लोल्लटादी काही विद्वान मानतात. म्हणजेच विभावादी सामग्री ही नटानुरोधाने रसाची जनक आणि रसिकानुरोधाने रसाची ज्ञापक, असे या लोल्लटाच्या पक्षी ठरते. शंकुकाच्या पक्षी रस नटगत पण अनुकरणात्मक अर्थात अयथार्थ असतो. त्याचे अनुमान रसिकाला विभावादी सामग्रीने होते. अर्थात या पक्षी रस आणि सामग्री यांतला संबंध केवळ ज्ञाप्यज्ञापकभाव हा ठरतो. भट्टनायकाच्या मते यांमधला संबंध भोज्यभोजकभाव हा आहे. आनंदवर्धन, अभिनवगुप्त, इ. विद्वानांच्या मते यांमधला संबंध व्यंग्यव्यंजकभाव हा आहे. शेवटच्या दोन मतांत विभावादी सामग्रीचे साधारणीकरण ही रसास्वादापूर्वीची अवस्था गृहीत धरलेली आहे. साधारणीकरण म्हणजे विभावादिकांची विशिष्ट देशकालाशी संबंध असलेली रूपे गळून जाऊन त्यांना सार्वदेशिक व सार्वकालिक अशी सामान्य रूपे प्राप्त होणे हे होय. भट्टनायकाने रसमीमांसेत घातलेली ही महत्त्वाची भर असून, ती अभिनवगुप्तालाही स्वीकारावी लागली आहे.

(५) रसाचा परिणाम – अभिनवगुप्ताच्या मते रस हा केवळ सुखपर्यवसायी आहे. धनिक, धनंजय, मम्मट, विश्वनाथ, इ. ग्रंथकारांचे हेच मत आहे. या मताच्या मंडनात पुष्कळ ठिकाणी करुणरसाचा निर्देश प्रमाण म्हणून केला जातो. कोणी समजतात त्याप्रमाणे करुणरस दुःखपर्यवसायी असता तर, करुणरसात्मक काव्य–नाट्य पुन्हा ऐकण्यापाहण्याकडे कोणाची प्रवृत्ती झाली नसती, असा त्याविषयी युक्तिवाद आहे. व्यवहारात भावना सुख-दुःखपर्यवसायी होत असतात; पण काव्य-नाट्यातले रस हे त्या भावांहून विलक्षण किंवा अलौकिक असल्यामुळे ते केवळ सुखपर्यवसायी होतात.

संस्कृत काव्यशास्त्रपरंपरेत या विरुद्ध मत सविस्तरपणे देणारा पंडित म्हणजे नाट्यदर्पणकार रामचंद्र गुणचंद्र हा होय. त्याच्या मते शृंगार, हास्य, वीर, अद्‌भुत आणि शांत हे रस तेवढे सुखात्मक असून, करुण, भयानक, बीभत्स व रौद्र हे चार रस दुःखात्मक आहेत. काव्यात अथवा नाट्यात दुःखात्मक रस असूनही लोक त्याकडे प्रवृत्त होताना दिसतात. याचे कारण हे, की त्यात कवी केवळ दुःखात्मक रस ग्रथित करीत नाही तर सुखात्मक आणि दुःखात्मक अशा दोन्ही प्रकारच्या रसांच्या मिश्रणाने तो सुखात्मक रसांची गोडी विशेषच वाढवितो.

दार्शनिक दृष्टी – दार्शनिक दृष्ट्या रसाचे विवेचन करता येते, ते असे – रसाचा अनुभव येण्यास मनुष्याने द्रष्टा झाले पाहिजे. द्रष्टा म्हणजे तटस्थ रूपाने दर्शन करणारा पुरुष. तो प्रकृतीच्या पदार्थांत लीन होत नसल्यामुळे रसाची अनुभूती करू शकतो. जो पुरुष प्रकृतीच्या पदार्थांत आसक्त भावाने लीन होतो, त्याला केवळ राग-द्वेषांचाच अनुभव घडतो; रसाचा नाही. रसानुभूतीसाठी ताटस्थ्याची, अनासक्तिभावाची नितांत आवश्यकता असते. हा केवळ काव्य-नाट्यापुरताच सिद्धान्त नाही; तर तो प्रत्येक कलेच्या बाबतीतही आहे. सौंदर्याच्या अनुभूतीच्या प्रसंगी द्रष्ट्याला अधिकारभावना किंवा 'मी आणि माझे' ही भावना असता कामा नये. रसानुभव घेण्यासाठी एकांतिक भेदवाद किंवा एकांतिक अभेदवाद या दोन्ही दृष्टी उपयुक्त नाहीत. अभेदात भेद व भेदात अभेद हीच रसानुभवांची दार्शनिक दृष्टी आहे. रसावस्थेत जर नितांत अभेद मानला, तर अशा ऐक्यभावात रसानंदाचा उदय होणार नाही. जर एकांतिक भेद स्वीकारला तर त्या भिन्नतेतही रसानंद संभवनीय ठरत नाही. सहृदय रसिकाच्या हृदयात सहानुभूती उत्पन्न झाल्यावरच तो रसिक रसानुभव घेऊ शकतो. जेव्हा व्यक्ती वस्तूपासून स्वतःला वेगळे ठेवूनही वस्तूशी तादात्म्याचा अनुभव करते, त्या वेळीच तिच्या ठिकाणी सहानुभूती उत्पन्न होते. ही अवस्था पूर्ण भेदाची नाही आणि पूर्ण अभेदाचीही नाही.

विषयानंद, ब्रह्मानंद व रसानंद असे आनंदाचे तीन प्रकार आहेत. विषयानंद लौकिक असून, रसानंद उदात्त व अलौकिक आहे. ब्रह्मानंद आणि रसानंद यांचे वेगळेपण सांगण्यासाठी भट्टनायकाने रसाला ब्रह्मानंदसचिव (ब्रह्मानंदाचा मंत्री) असे म्हटले आहे; तर विश्वनाथाने त्याला ब्रह्मानंदसहोदर (ब्रह्मानंदाचा सख्खा भाऊ) म्हटले आहे. पण कोणीही त्याला ब्रह्मानंदरूप म्हटले नाही. कारण ब्रह्मानंद आणि रसानंद यांच्यांत बरेच वेगळेपण आहे. ब्रह्मानंद हा वासनेचा उच्छेद झाल्याने उत्पन्न होतो, तर रसानंद वासनेचे शुद्धीकरण झाल्याने साध्य होतो. साहित्यशास्त्रानुसार स्थायी भावच इतर सामग्रीच्या संयोगाने रसरूपात परिणत होतो, पण वेदान्त-मतात वासनारूपी स्थायी भावच शिल्लक उरत नसल्याने रसाची निष्पत्तीच होऊ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शकत नाही. बीजच नाही तर त्याचा वृक्ष कसा होणार आणि तो छाया कशी देणार ! कामाचे सर्वथा उन्मूलन हे वेदान्त-मतात ब्रह्मानंदाचे सर्वश्रेष्ठ साधन आहे आणि ते रसोन्मेषाला नितांत विरोधी आहे. रसनिष्पत्तीसाठी कामाचे उन्मूलन अभीष्ट नाही तर संशोधन अभीष्ट आहे. याचा आशय हा, की ब्रह्मानंद हा वासनाक्षयावर आधारित आहे; तर रसानंद हा वासनाशुद्धीवर आधारित आहे.

असा हा वासनाशुद्धीवर आधारलेला रसानंद जगातल्या कमनीय पदार्थांच्या ठिकाणी अनुरक्त पण अनासक्त अशा चित्ताला आकृष्ट करणारा अलौकिक पदार्थ आहे. रागात्मक अनुभूतीचे स्थान शुष्कज्ञानात्मक अनुभूतीपेक्षा वरच्या दर्जाचे आहे. म्हणूनच रसाला ब्रह्मानंदरूप न मानता ब्रह्मानंदसहोदर म्हटले आहे.

'रसो वै सः' इ. ब्रह्माचे रसरूप सांगणाऱ्या श्रुतींचा आशयही हाच आहे. वस्तुतः आनंद हाच रस आहे. तो एक आहे आणि अनेक नाही. त्याला पर्यायशब्द नाही. रस ब्रह्मासारखा आहे. ब्रह्म हे जसे एकमात्र सत्य आणि नाना नामरूपात्मक विकृती जशा असत्य, त्याचप्रमाणे शृंगार, हास्य, इ. रसांची अनेकता आणि त्यांचे पार्थक्य वस्तुतः असत्य आहे. रसच एकमात्र सत्य आहे. तो अंशी आहे. शृंगारादी रस त्याचे केवळ अंशरूप आहेत. अभिनवगुप्ताच्या मते भरतमुनीलाही एकमेव रसच अभिमत आहे. भरताने त्या मूलभूत रसाला महारस असे नाव दिले असून, अंशभूत रसांना केवळ रस म्हटले आहे. भरत रस हा शब्द एकवचनी वापरतो, हे लक्षात ठेवले पाहिजे.

कवी कर्णपूर याने आपल्या अलंकारकौस्तुभ या ग्रंथात हे मत विशद रूपाने मांडले आहे. भरतोक्त महारसासाठी त्याने एका विलक्षण स्थायीभावाची कल्पना केली आहे. तो स्थायीभाव म्हणजे आस्वादांकुरकंद हा होय. रसावस्थेत जो आस्वादाचा अंकुर उगवतो, त्याचा हा भाव कंदरूप किंवा बीजरूप आहे. याचे अधिक स्पष्टीकरण कर्णपुराने केले आहे, ते असे –

आस्वादाङ्कुरकन्दोऽस्ति धर्मः कश्चन चेतसः ।
रजस्तमोभ्यां हीनस्य शुद्धसत्त्वतया सतः ।।

(अलं. कौ. ६३)

अर्थ – आस्वादांकुरकंद हा चित्ताचा गुणधर्म आहे. जेव्हा चित्त रजतमांनी रहित होते आणि शुद्ध सत्त्वगुणाच्या प्रकाशाने शांत राहून विश्रांतीचा अनुभव करते, तेव्हा अशा शांत व आनंदमय अवस्थेला आस्वादांकुरकंद म्हणावे.

रसानंदाचा उदय होण्याच्या पूर्वीची ही अवस्था आहे. सर्व रसांची ही साम्यावस्था आहे. हा आस्वादांकुरकंदरूप भावच पुढे विभावादिकांच्या साहाय्याने रसरूपात परिणत होतो. आनंदधर्मी असल्याने रस हा एकच आहे. भाव हे रत्यादी उपाधिस्थानी आहेत. ज्याप्रमाणे सूर्याचे प्रतिबिंब एक असूनही जलगत उपाधिभेदामुळे नानात्वाने प्रतीत होते, त्याचप्रमाणे वरील स्थायीभाव रती, उत्साह, भय, इ. भावांच्यामुळे शृंगार, वीर, भयानक, इ. रसांच्या रूपाने भासित होतो. रसगत समस्त भेद हे उपाधिजन्य आहेत. रसाच्या ठिकाणी कोणताही स्वगत भेद नाही. [भ. ना. शा.; काव्यप्रकाश– संपा. प्रा. अर्जुनवाडकर, प्रा. मंगरूळकर, १९६२; हिं. सा. को.; श्री. बलदेव उपाध्याय, सं. अ. ग्रं. ब्र. कृ. मा. भ.; हिं. वै. सा. र.]

रसकल्याणिनी

एक तिथिव्रत. माघ शुद्ध तृतीयेला या व्रताचा प्रारंभ करतात. दुर्गा (ललिता) ही या व्रताची देवता होय. याचा विधी असा– प्रथम दुर्गेला मधाने व चंदनाने स्नान घालावे. नंतर त्या मूर्तीच्या उजव्या अंगाची पूजा प्रथम आणि डाव्या अंगाची पूजा नंतर करावी. देवीच्या निरनिराळ्या नावांनी उजव्या पायापासून मस्तकापर्यंतच्या प्रत्येक अवयवाला नमस्कार करावा. माघापासून पुढे वर्षभर प्रत्येक महिन्याला तिच्या एकेका नावाने (कुमुदा, माधवी, गौरी, इ.) तिची पूजा करावी. त्याचप्रमाणे प्रत्येक महिन्याला मीठ, गूळ, साखर, मध, पाणक, जीरक (जिरेसाळीचा भात), दूध, दही, तूप, मर्जिका, धने व साखर यांपैकी एकेक जिन्नस वर्ज करावा. महिन्याच्या शेवटी वर्ज केलेला पदार्थ एक पात्र भरून दान द्यावा. उद्यापनाच्या वेळी गौरीची आंगठ्याएवढी सोन्याची मूर्ती अलंकृत करून दान द्यावी. फल– पापमुक्तता, दुःख व रोग यांचे निवारण. [हिं. ध.; पु. चिं.]

रसखान

(इ. स. चे १६ वे शतक). एक कृष्णभक्त मुसलमान कवी. हा दिल्ली येथील एक खानदानी पठाण होता. त्याने इस्लामचा त्याग करून वैष्णव धर्म स्वीकारला होता. याचे मूळ नाव सय्यद इब्राहिम असे होते, असे काही लोक मानतात.

रसखानाचे अधिकृत चरित्र उपलब्ध नाही. 'दो सौ बावन वैष्णव की वार्ता' या ग्रंथात याच्या काही आख्यायिका दिलेल्या आहेत, त्यांपैकी एक आख्यायिका अशी–

रसखान प्रारंभी एका वाण्याच्या पुत्रावर अत्यंत आसक्त होता. त्याचे उष्टेही तो खात असे. एके दिवशी चार वैष्णव गोष्टी बोलत बसले असता म्हणाले, की 'रसखानाचे त्या वैश्यपुत्रावर जसे उत्कट प्रेम जडले आहे, तशी प्रीती जर श्रीनाथावर जडेल, तर माणसाचा उद्धार व्हायला वेळ लागणार नाही.' रसखानाने हे उद्गार ऐकले आणि तो त्या वैष्णवांच्या जवळ गेला. त्याने त्यांना विचारले. 'श्रीनाथाचे स्वरूप कसे आहे ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सांगाल काय ?' त्या प्रश्नाचे उत्तर म्हणून त्या वैष्णवांनी श्रीनाथाचे एक सुंदर चित्र त्याला दाखवले. ते अनुपमेय रूप-लावण्य पाहून रसखानाचे मन त्याच्यावर जडले. त्याची भावना झाली, की आपल्या प्रेमाला योग्य आधार मिळाला. मग चित्रातल्या श्रीनाथाच्या साक्षात दर्शनासाठी तो गोकुळात गेला. तिथे त्याला वल्लभ संप्रदायाचे विठ्ठलनाथ गोस्वामी भेटले. रसखानाचे एकांतिक कृष्णप्रेम पाहून विठ्ठलनाथांनी त्याला पुष्टिमार्गाची दीक्षा दिली. मग तो तिथे स्थायिक झाला. तिथेच त्याला कवित्वस्फूर्ती झाली व तो कृष्णप्रेमाची काव्ये लिहू लागला.

रसखान

सुजान रसखान व प्रेमवाटिका असे रसखानाचे दोन कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. पहिल्या ग्रंथात १३९ पद्ये आहेत; तर दुसऱ्या ग्रंथात ५२ दोहे आहेत.

रसखान हा प्रेमविव्हल कवी आहे. कृष्णाचे सगुण सुंदर रूप त्याने प्रेमासाठी पुढे ठेवले आहे. त्याची प्रेमाच्या बाबतीतली विचारधारा अशी—

श्रीकृष्ण प्रेममय आहे आणि त्याचे रूपलावण्य अवर्णनीय आहे. तो केवळ प्रेमाच्या द्वारेच प्राप्य आहे. तोच एक भगवत्प्राप्तीचा मार्ग आहे. प्रेम जसे अमर तसेच ते प्राप्त करणारा प्रेमीही अमर होतो. प्रेम हे ब्रह्मरूप असल्याकारणाने अगम्य, अनुपम आणि अमित आहे. ते अथांग सागरासारखे आहे. या प्रेमाच्या जवळ जो गेला, तो परत येत नाही. प्रेमानेच त्याला मुक्ती मिळते. प्रेमाचे माहात्म्य विशद करताना तो म्हणतो —

दो मन इक होते, सुन्यों, पै वह प्रेम नआहि।
होई जबै द्वै तनहुं इक, सोई प्रेम कहाहि ॥
अकथ कहानी प्रेम की, जानन लैली खूब।
दो तनहूं जहँ एक में, मन मिलई महबूब ॥
ज्ञान, ध्यान, विद्या, मती, मत, विश्वास, विवेक।
बिना प्रेम सब धूर हैं, अग जग एक अनेक ॥
श्रुति, पुरान, आगम, स्मृती हैं प्रेम सबहि को सार।
प्रेम बिना नहिं उपज दिय, प्रेम बीज अँकुवार ॥
कमल–तंतु सो छीन अरु कठिन खड्ग की धार।
अति सूधो, टढो बहुरी प्रेम पंथ अनिवार ॥

भावार्थ – दोन मने एकत्र आली, तर त्याला प्रेम म्हणता येत नाही. जेव्हा दोन शरीरे एक होतात, तेव्हाच त्याला प्रेम म्हणतात. प्रेममय जीवन जगायचे तर लैला–मजनू हा आदर्श पुढे ठेवावा. ज्ञान, ध्यान, विद्या, बुद्धी आणि विश्वास ही सर्व प्रेमावाचून व्यर्थ आहेत. जगातल्या प्रत्येक पदार्थाच्या ठिकाणी प्रेमाचा अंश विद्यमान आहे. प्रेम हे वेदपुराण संमत आहे. पण या प्रेममार्गावर सगळेच चालू शकत नाहीत. कारण हा मार्ग अत्यंत दुर्गम, काटेरी आणि वेडावाकडा आहे. मात्र खऱ्या प्रेमी भक्ताला तो सरळ आणि सुगम होतो. प्रेम हे कमलतंतूसारखे सूक्ष्म आणि तलवारीच्या धारेसारखे तीक्ष्ण आहे. अशा या प्रेमाला ज्याने ओळखले त्या साधकाला प्रेममार्ग हा अत्यंत सुखकर होतो.

तुकारामाचे जसे अभंग तसे रसखानाचे सवैये प्रसिद्ध आहेत. त्यांची सरलता आणि कोमलता विलक्षण आहे. [हिंदी के प्राचीन कवी– श्री. रामप्यारे तिवारी; हिं. वि. को.]

रसधेनुदान रसाने भरलेल्या एका मोठ्या घड्याला धेनू आणि त्याच्या एक चतुर्थांश इतक्या रसाने भरलेल्या दुसऱ्या घड्याला वत्स समजतात व त्यांचे दान देतात. फल– एकवीस पूर्वजांचा उद्धार. [दा. चं.]

रसरंगदान संक्रांतीच्या दिवशी एक भांडे गुळाने व एक भांडे कुंकवाने भरून, त्या दोन्ही भांड्यांचे ब्राह्मणाला दान देतात. नवऱ्याचा व पुत्रांचा वियोग होऊ नये, यासाठी हे दान द्यायचे असते. [व्रतराज]

रसलीन (१६९९ – १७५० इ. स.) एक रीतिकालीन हिंदी कवी. हा अरबी, फारसी व हिंदी भाषांचा पंडित असून संगीतज्ञही होता. तो जातीने मुसलमान होता. सैयद गुलाम नबी असे त्याचे नाव होते. हरदोई जिल्ह्याच्या बिलग्राम भागात तो राहत होता. मीर तुफैल मोहंमद हा त्याचा विद्यागुरू होय. रसलीन हा साहसी, शूर आणि रणकुशल होता. रामचनौतीच्या मैदानावर लढताना हा धारातीर्थी पडला.

याने अंगदर्पण व रसप्रबोध या दोन ग्रंथांची रचना केली आहे. याशिवाय त्याची काही स्फुट पदेही आहेत. अंगदर्पणात नखशिखवर्णन असून, रसप्रबोधात रसभावांचे विस्ताराने वर्णन केलेले आहे. त्याच्या काव्यावर त्याचा चुलत मामा मीर अब्दुल जलील याचा खूप प्रभाव आहे, असे म्हटले जाते. [हिं. सा. २; क. कौ.; श्री. गोपालचंद्र सिन्हा–सं. अ. ग्रं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रसा एक नदी. हिचा ऋग्वेदात उल्लेख आहे. पणी लोक या नदीच्या पैलतीरावर राहत असे दिसते. कारण ऋग्वेदाच्या एका सूक्तात (१०·१०८·१) पणींनी सरमेला प्रश्न केला आहे, की 'तू पाण्याने भरून वाहणाऱ्या रसा नदीला तरून कशी आलीस'? त्यावरून ही नदी मोठी असावी, असे वाटते. त्याचप्रमाणे ऋग्वेदाच्या नदीसूक्तात ही सिंधूला मिळाली असल्याचे म्हटले आहे (ऋ. १०·७५·६). एकंदरीत ही भारताच्या वायव्य भागातील नदी असावी असे वाटते.

पारशी लोक या नदीलाच रहा असे म्हणतात. ज्ञानकोशकारांच्या मते ही मूळची अरॅक्सीझ असावी. कारण रसाचे अवेस्ती रूप रङ्हा असे असून, ते वेंदिदादमध्ये आढळते. काहींच्या मते ही अफगाणिस्तानच्या उत्तरेला वाहणारी नदी असावी. [ऋ. द.; वै. सा.; म. ज्ञा. को.]

रसायनशास्त्र निरनिराळ्या पदार्थांतील घटक द्रव्ये, त्यांचे गुणधर्म, त्यांच्या परस्परांशी होणाऱ्या प्रक्रिया व त्यांतून होणारी भिन्न पदार्थांची निर्मिती यासंबंधीचे नियम सांगणारे शास्त्र. पाश्चात्य देशांत विकास पावलेले आधुनिक रसायनशास्त्र आणि प्राचीन काळी भारतात विकास पावलेले रसायनशास्त्र यांचे स्वरूप अगदी भिन्न आहे. वैदिक काळी भारतीय लोकांना सुवर्ण, रजत, अयस, श्याम, वंग, इ. अनेक धातू वितळवून त्यांपासून भिन्न वस्तू बनवण्याची कला माहीत होती. खनिज लोह कोळशासह भाजून त्यापासून शुद्ध लोह बनवणे व त्या लोहाची शस्त्रे, साखळदंड, इ. बनवणे; सोने व चांदी या धातूंचे अलंकार आणि इतर धातूंची भांडी बनवणे, त्या काळी ज्ञात होते. त्याचप्रमाणे आयुर्वेदात सांगितलेली विविध औषधे तयार करण्यासाठी निरनिराळ्या द्रव्यांच्या प्रक्रिया करणे हेही त्या लोकांना माहीत होते. वैद्यकाची एक शाखा म्हणून या शास्त्राची बरीच वाढ झालेली होती. भिन्न धातूंची भस्मे आणि असंख्य वनस्पतींचे रस यांचा रोगनिवारणासाठी किंवा शरीरपोषणासाठी उपयोग करण्याची परंपरा वेदकालापासून आलेली असल्याचे प्रफुल्लचंद्र राय यांनी प्रतिपादले आहे.

बुद्धाच्या काळापासून नागार्जुनाच्या काळापर्यंत या शास्त्राची बरीच वाढ झाली आणि या विषयावर अनेक ग्रंथ रचले गेले. सुश्रुत, चरक, पतंजली व वराहमिहिर यांच्या ग्रंथांवरून या शास्त्राचा विकास किती झाला होता, ते कळते. चरकसंहितेतील शरीरस्थान या प्रकरणात (१·२७·३१) जड द्रव्यांच्या गुणांचे वर्णन केले आहे. सुश्रुताने पंचमहाभूतांच्या परस्पर संमिश्रणाचा उल्लेख केला आहे (सूत्रस्थान १४·७–९). पतंजलीचा लोहशास्त्र हा ग्रंथ उपलब्ध नसला, तरी त्यातील असंख्य अवतरणे नंतरच्या ग्रंथांत आढळतात. लोहशास्त्रात अनेक रासायनिक प्रक्रियांचे वर्णन आहे. धातूंपासून क्षार बनवणे, संमिश्र धातू तयार करणे, शुद्ध धातू मिळवणे, इ. क्रियांचे ज्ञान त्या ग्रंथावरून मिळते.

वराहमिहिराने बृहत्संहितेत विविध लेप व चूर्ण बनवण्याच्या रीती सांगितल्या आहेत. तसल्या वज्रलेपाचा उपयोग अशोकस्तंभांवर केलेला असावा. ते स्तंभ वालुकामय पाषाणाचे असूनही त्यांवरील लेपामुळे ते लोहस्तंभ वाटतात. बिहारमधील मौर्यकालीन गुंफांमध्येही भिंतींना असला लेप लावल्यामुळे त्या काचेप्रमाणे दिसतात. याव्यतिरिक्त बृहत्संहितेत शिलादारण, शस्त्रपान, वृक्षायुर्वेद, सुगंधी द्रव्ये, यांचीही माहिती आहे. त्यानंतरच्या संस्कृत साहित्यातून रसायनशास्त्रासंबंधी पुष्कळ माहिती मिळते. गुणाढ्यकृत वासवदत्ता या ग्रंथात शरीरक्रियांचे स्तंभन करणाऱ्या चूर्णाचा उल्लेख आहे. दंडीच्या दशकुमारचरितात योगचूर्ण घेतल्याने गाढ झोप लागते, असे सांगितले आहे.

नागार्जुन हा फार मोठा रसायनशास्त्रज्ञ इ. स. च्या ७ व्या किंवा ८ व्या शतकात होऊन गेला. त्याला एका तपस्व्यापासून रसायनविद्या आणि सामान्य धातूपासून सोने बनविण्याची किमया प्राप्त झाली होती, असे म्हणतात. त्याच्या रसरत्नाकर नामक ग्रंथात प्रथम तांबे व चांदी या धातूंपासून सोने बनविण्याचे प्रयोग दिले आहेत. त्यानंतर सोने व चांदी हे धातू शुद्ध करणे, माक्षिकापासून शुद्ध तांबे मिळवणे, रसकापुरापासून शुद्ध जस्त मिळवणे, इ. प्रक्रिया सांगितल्या आहेत. रक्तपारदापासून शुद्ध पारा प्राप्त करण्याच्या दोन पद्धती नागार्जुनाने दिल्या आहेत. त्यांतील एक पातनविधी आहे. अभ्रक व गंधक यांच्या मिश्रणाला उष्णता देऊन अभ्रकातील धातू शुद्ध करणे त्याला ज्ञात होते. तसेच आम्ल व उष्णता यांच्या साह्याने मोती व रत्ने यांचे बिलयन करणेही त्याला माहीत होते.

कथिल, लोह, सोने, तांबे, इ. धातूंचे हनन करून त्यांपासून क्षार बनविण्याच्या प्रक्रिया नागार्जुनाने दिल्या आहेत. त्यांचा उपयोग रोगपरिहारासाठी होत असे.

रस म्हणजे पारा होय. त्याला रसराज, असेही म्हणतात. त्याच्यापासून अनेक प्रकारचे संरस (मिश्र धातू) बनवण्याच्या रीती नागार्जुनाने दिल्या आहेत. समभाग पारा व सोने मिसळून घोटावे; त्यात गंधक, टंकण, इ. पदार्थ मिसळून पुन्हा घोटावे आणि बंद मुशीत ते मिश्रण ठेवून त्याला मंद आच द्यावी. असे केल्याने जो सरस तयार होतो, त्याच्या सेवनाने दिव्य देह प्राप्त होतो, असे सांगितले आहे.

नागार्जुनाने असे एक सिद्धरसायन तयार केले होते, की त्याच्या सेवनाने अवघी मानवजात अमर व्हावी. पण इंद्राला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ती गोष्ट भयावह वाटली. इंद्राने ते रसायन नष्ट करण्याचा आदेश नागार्जुनाला दिला व नागार्जुनाने ते नष्ट केले, अशी आख्यायिका आहे.

नागार्जुनाने आपल्या ग्रंथात गर्भयंत्र, शिलायंत्र, वंशयंत्र, अधःपातनयंत्र, तुलायंत्र, कच्छपयंत्र, गुडाभ्रकयंत्र, इ. अनेक उपकरणांची माहिती दिली आहे.

नागार्जुनाच्या पश्चात तंत्रशास्त्रावरील अनेक ग्रंथांत रसायनशास्त्राचा उल्लेख सापडतो. नालंदा, उदंतपूर व विक्रमशीला या विद्यापीठांमध्ये तांत्रिक रसायनाचा विशेष विकास झाला आणि तिथूनच या विद्येचा प्रसार द. भारतात आणि तिबेट व भूतान या प्रदेशांतही झाला.

रसरत्नाकरानंतर या शास्त्राचे अनेक ग्रंथ रचले गेले. रसार्णव या ग्रंथात पितळ बनवण्याची क्रिया दिलेली आहे. रसक व तांबे यांचे मिश्रण काही कार्बनिक पदार्थांसह तापविले असता, सोन्यासारखा पिवळा धातू म्हणजेच पितळ तयार होते, असे सांगितले आहे. त्याच ग्रंथात भिन्न धातूंमुळे ज्योतीला कोणते भिन्न रंग प्राप्त होतात, तेही सांगितले आहे. उदा० – सोन्यामुळे ज्योतीला पिवळा, चांदीमुळे पांढरा, तांब्यामुळे निळा, लोखंडामुळे काळा व कथिलामुळे कपोत रंग येतो.

विड म्हणजे आम्लराज बनवण्याची रीत होय. कसीस, सैंधव माक्षिक, सौवीर, गंधक व सोरा या पदार्थांचे मिश्रण शिग्रुमूळरसात घातले असता जे तीव्र द्रावण तयार होते, त्याला विड म्हणतात. ते धातुजारणासाठी किंवा मारणासाठी उपयोगी पडते.

इ. स. च्या ११ व्या शतकापासून १४ व्या शतकापर्यंत रसहृदय, रसेंद्रचूडामणी, रसप्रकाशसुधाकर, रसरत्नसमुच्चय, रसकल्प, रसराजलक्ष्मी, इ. रसायनशास्त्रावरचे ग्रंथ निर्माण झाले. त्या सर्वांत रसरत्नसमुच्चय हा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्या ग्रंथात सुमारे ४० रससिद्धिविशेषज्ञांची नामावली दिलेली आहे आणि तोपर्यंत प्राप्त झालेले सर्व ज्ञान संकलित केलेले आहे. त्यात अनेक पदार्थांचे भिन्न प्रकार व गुणधर्म सांगितलेले असून, असंख्य रासायनिक प्रक्रियांचे व त्यासाठी आवश्यक अशा उपकरणांचे सविस्तर वर्णन आहे. प्रयोगशाळा कशी स्थापन करावी, तेही त्यात सांगितले आहे आणि वजने व मापे यांची सूची दिली आहे.

याव्यतिरिक्त इ. स. च्या १४ व्या शतकात रसनक्षत्रमालिका, रसरत्नाकर, रसेंद्रचिंतामणी, रससार, रसेंद्रसारसंग्रह, रसेंद्रकल्पद्रुम, धातुरत्नमाला, इ. अनेक ग्रंथ तयार झाले. त्या ग्रंथांत पाऱ्याच्या उपयोगासंबंधी आणि विषासंबंधी बरीच माहिती आहे. धातुरत्नमाला या ग्रंथात पारा व इतर धातू कसे मारावे, ते सांगितले आहे.

इ. स. च्या १६ व्या शतकातील रसप्रदीप नामक ग्रंथात शंखद्रावक रसायन बनवण्याची रीत विस्तारपूर्वक दिलेली आहे. या रसायनात खनिजाम्ले असतात. यावरून ही खनिजाम्ले बनवण्याचे ज्ञान भारतीय रसायनशास्त्रज्ञांना अनेक शतकांपूर्वीच प्राप्त झाले होते, असे दिसते.

इ. स. ८०० नंतर वैद्यक व रसायन यांचा संबंध कमी होऊन रसायनशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ निर्माण झाले. धातूंची भस्मे करण्यासाठी व हीन धातूंपासून सोने तयार करण्यासाठी अनेक लोक रासायनिक प्रयोग करू लागले. प्राचीन काळी हिंदू लोक किमयेच्या नादी फारसे लागत नव्हते. अरब लोकांशी संबंध आल्यापासून इथे किमयेचा नाद वाढला. त्यामुळे मूळ हेतू साधला नसला, तरी रासायनिक क्रियांचे ज्ञान बरेच वाढले. मध्ययुगात शक्तीची उपासना व तांत्रिक साधना यांची बरीच वाढ झाली. त्या काळी पारा या धातूला विलक्षण महत्त्व प्राप्त झाले. पारा व गंधक यांपासून उत्पन्न झालेले रसायन घेतल्यामुळे दीर्घायुष्य लाभते, अशी श्रद्धा बळावली.

प्राचीन काळी भारतीय लोकांना जंबीराम्ल (सायट्रिक ॲसिड) द्राक्षाम्ल (टार्टरिक ॲसिड), काष्टाम्ल (ऑक्झॅलिक ॲसिड), इ. सेंद्रिय आम्ले आणि गंधकाम्ल, नत्राम्ल, इ. निरिंद्रिय आम्लेही तयार करता येत होती. त्याचप्रमाणे लोह, जस्त, ताम्र, वगैरे पृथ्वीच्या पोटात सापडणाऱ्या अशुद्ध धातूंचे शोधन करण्याच्या क्रियाही त्यांना अवगत होत्या. ताम्र गंधकित (मोरचूद), स्फटपालाश गंधकित (तुरटी), लोहस गंधकित (हिराकस) व पारदसहरिद (रसकर्पूर) हे पदार्थ तयार करण्याचे तर भारतात कारखानेच होते. हे पदार्थ पुष्कळ शुद्ध बनवले जात होते. भारतात पूर्वी उत्तम पोलाद तयार केले जात होते. भिन्न धातूंची मिश्रणे करण्याची विद्याही भारतीयांना अवगत होती. वाराणसी येथे प्राचीन काळापासून जी भांडी बनवली जातात, ती आठ धातू मिसळून त्या मिश्र धातूची केलेली असतात. दिल्लीतील कुतुबमिनाराजवळ जो लोहस्तंभ उभा आहे, तो सुमारे १५०० वर्षांपूर्वी मिश्रधातूंचा बनवलेला असून, अजूनपर्यंत त्याला किंचितही गंज चढलेला नाही.

रंग तयार करण्यासाठीही भारताची जगभर प्रसिद्धी होती. अजंटा येथील लेण्यांतील छतांवर जी चित्रे काढलेली आहेत, त्यांचे रंग अजूनही तकतकीत दिसतात. ते कसे तयार केले असतील याची कल्पना शास्त्रज्ञांना अजून येत नाही. नानाप्रकारच्या रसप्रक्रियांचे संपूर्ण ज्ञान असल्यावाचून असे रंग बनवणे कधीही शक्य नाही.

त्या काळी विद्यापीठांना जोडून किंवा स्वतंत्रपणे रसशाळा किंवा प्रयोगशाळा बांधलेल्या असत. रसरत्नाकर या ग्रंथात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांचे वर्णन आहे. जिथे वनस्पतींची समृद्धी असेल व विपुल पाणी असेल अशा ठिकाणी रसशाळा बांधीत. पूर्वेला रसभैरवाची स्थापना करीत. आग्नेय दिशेला निरनिराळ्या प्रकारच्या भट्ट्या असत. पश्चिमेला क्षालनादी कर्मांचे साहित्य, वायव्येस शोषणादी कर्मांचे साहित्य व उत्तरेस वेधकर्मांची उपकरणे असत. निरनिराळ्या द्रव्यांचे अर्क काढण्याकरता निरनिराळी पात्रे, द्रोणी, भाते, शंखशिंपले, चाळण्या, इ. वस्तू असत.

अल्बिरूनी याने लिहून ठेवले आहे, की 'हिंदू लोकांत किमयेसमान एक शास्त्र आहे; त्याला ते रसायनशास्त्र म्हणतात. वनस्पती, ओषधी व इतर द्रव्ये यांची विशेष रीतीने एक क्रिया करण्याचे हे शास्त्र आहे. त्यापासून असाध्य रोगीही रोगमुक्त होऊन चांगले सशक्त होतात. त्यांच्या स्नायूंना चैतन्य प्राप्त होते व त्यांना दीर्घायुष्य लाभते.'

प्राचीन काळी दर्शनशास्त्रांच्या अनुषंगाने रसायनशास्त्राचाही अभ्यास केला जात असे. वैशेषिक दर्शनाचे आचार्य कणाद यांनी द्रव्यांच्या गुणधर्मांची मीमांसा केली आहे. आचार्य कणाद परमाणुवादाचे जनक मानले जातात. परमाणूंच्या संयोगाने द्रव्य बनते; प्रत्येक द्रव्याचे परमाणू भिन्न भिन्न असून, ते अविभाज्य आहेत, असे त्यांनी प्रतिपादले आहे.

चरक व सुश्रुत यांच्या ग्रंथांत रसायनशास्त्राची तत्त्वे दिलेली आहेत. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही पंचमहाभूते सूक्ष्म भूतांपासून उत्पन्न झालेली असून, या पंचमहाभूतांचे विशिष्ट गुणधर्म सांगितले आहेत, ते असे –

पृथ्वी– जड, कठिण, अचल, घन, अपारदर्शक व गंधयुक्त.

आप– द्रव, चिकट, मृदू, शीत, बुळबुळित व रुचियुक्त.

तेज– उष्ण, तीक्ष्ण, सूक्ष्म, स्वच्छ व तेजस्वी.

वायू– हलका, शीत, पारदर्शक, विरळ व आघात करणारा.

आकाश– विरळ, लवचिक व कंप पावणारे.

ही पंचमहाभूते बहुधा एकमेकांत मिसळलेली आढळतात. शुद्ध पाण्याला चव नसते. पण त्यात इतर पदार्थ मिसळल्याने त्याला भिन्न भिन्न चवी प्राप्त होतात.

परमाणूंमध्ये ज्या सुप्त शक्ती असतात, त्यांच्यांतील अस्थिर तोल आणि विषम विभागणी यांमुळे पदार्थांच्या अणूंना भिन्न भिन्न रंग, रस, गंध प्राप्त होतात, असे चरकसंहिता या ग्रंथात म्हटले आहे. अणूतील परमाणूंच्या विभिन्न रचनेमुळे नवीन शक्ती निर्माण होतात व त्यांचाही अणूंच्या गुणधर्मांवर परिणाम होतो. अणूंच्या रचनेत सत्त्व, रज व तम यांपैकी ज्याचे प्राधान्य असेल, त्याच्या प्रभावाने पदार्थाचा रंग ठरतो. उदा० पारद व गंधक यांपासून भिन्न परिस्थितीत भिन्न रंगाचे पदार्थ उत्पन्न करता येतात. [म. ज्ञा. को.; वि. स्मृ. ग्रं.; वै. वि. भा. प.; हिं. वि. को.]

रसिक गोविंद

(इ.स. १८००चा सुमार) एक हिंदी संतकवी. हा निंबार्क संप्रदायाचा अनुयायी असून, सर्वेश्वरशरण देवजीचा शिष्य होता. हा जयपूरला राहत होता.

याने रामायणसूचनिका, रसिकगोविंदानंदघन, लछिमनचंद्रिका, अष्टदेशभाषा, पिंगल, समयप्रबंध, कलियुग रासो, रसिकगोविंद व युगलरसमाधुरी या नऊ ग्रंथांची रचना केली आहे. त्यांतील बहुतेक ग्रंथ कृष्णभक्तिविषयक आहेत. रसिकगोविंदानंदघन हा काव्यशास्त्रविषयक बृहद् ग्रंथ चार प्रबंधांत विभागलेला असून, त्यात रस, नायकनायिकाभेद, अलंकार, गुण, दोष यांचे विस्तृत वर्णन आहे. [हिं. सा. इ.; हिं. सा. २]

रसिकमोहन राय

(इ. स. च्या १७ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक चैतन्यमतानुयायी संत आणि कवी. गयेतील एका कायस्थ कुलात याचा जन्म झाला. अंगी विरक्ती बाणल्यावर हा वृंदावनात जाऊन राहिला आणि चंद्रगोपालाचा शिष्य झाला. यापेक्षा त्याच्या चरित्राची अधिक माहिती उपलब्ध नाही.

रसिकसेवकवाणी ही त्याची प्रमुख रचना होय. त्यात विविध आचार्य आणि भक्त यांना श्रद्धांजली अर्पण केल्या आहेत. हा ग्रंथ कुंडलिया छंदात आहे. रसिकमोहनची चंद्रगोपालासंबंधीची अपार श्रद्धा यातून व्यक्त झाली आहे. त्याचा एक दोहा असा–

मेरे देवी–देवता, माता–पिता नृपाल।
जो कछु है सर्वस्व जिहि, श्री प्रभू चंद्रगोपाल ॥

अर्थ – प्रभू चंद्रगोपाल हेच माझे देवी–देवता, माता–पिता, राजा होत. माझे सर्वस्व तेच आहेत.

त्याने काही स्फुट पदेही रचली आहेत. [चै. म. ब्र. सा.]

रसिकसंप्रदाय

राम-सीतेच्या मधुर लीलांचे ध्यान व गायन करणारे संत रसिक अथवा भाविक या नावाने ओळखले जातात. माधुर्यभक्तीच्या तत्त्वावरच इ. स. च्या सोळाव्या शतकात या संप्रदायाचे शास्त्रपूत प्रवर्तन झाले. या संप्रदायाची एक स्वतंत्र साधनापद्धती आहे आणि रामभक्तिसाहित्यातील निम्म्याहून अधिक साहित्य रसिक भक्तांनी निर्माण केले आहे.

सोळाव्या शतकाच्या सुमारास राधा-कृष्ण युगलाची उपासना विविध अंगांनी बहरली होती. जनमानसावर तिचा खूप प्रभाव पडला होता. या प्रभावाचा परिणाम रामभक्तांवरही झाला आणि त्यातून रसिक संप्रदायाची निर्मिती झाली, असे सर्व अभ्यासक म्हणतात. राधा-कृष्णांच्या युगलउपासनेसाठी कृष्णभक्तांनी जे जे केले आणि कल्पिले, ते ते सर्व रामभक्तांनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राम-सीता या युगलाला आणून जोडले. त्यामुळे मूळचा एकपत्नी आणि भोगविलासांना पराङमुख असलेला राम या संप्रदायात विलासी, भोगप्रिय आणि अनेक रमणींचा वल्लभ बनला.

हा संप्रदाय जानकीसंप्रदाय, रहस्यसंप्रदाय, जानकीवल्लभसंप्रदाय, सियासंप्रदाय, इ. नावांनी परिचित आहे. या सर्व नावांमध्ये रसिकसंप्रदाय हे नाव विशेष प्रसिद्ध आहे. त्याचे एक कारण म्हणजे या संप्रदायाचे प्रवर्तक संत अग्रदास हे आपल्या अनुयायांना रसिक या नावाने संबोधीत असत. त्यांनी आपल्या ध्यानमंजरी व अष्टयाम या दोन्ही ग्रंथांमध्ये रामाच्या रसमयी लीलांचे ध्यान करणारे व त्याची अंतरंगसेवा करणारे या अर्थानेच हा शब्दप्रयोग केला आहे.

रामभक्तीतील रसिकभावाचा प्रारंभ इ. स. च्या १६ व्या शतकात झाला असला, तरी त्याचे मूळ इ. स. च्या ९ व्या शतकातील शठकोप आळवार या तमिळ संताच्या वाङमयात पाहायला मिळते. रसिकप्रकाश भक्तमाल नावाच्या ग्रंथात त्याला रामाचा आदिपार्षद असे म्हटले आहे. रसिक पीठांच्या ऐतिहासिक आचार्यपरंपरेतील हा पहिला आचार्य म्हणून गौरविला जातो. पेरुमाळ तिरुमोडी हा रामाची कांताभावाने उपासना करीत होता; त्याचप्रमाणे वैष्णवाचार्य नाथमुनी दास्यभावाने आणि रामानुज दास्य व वात्सल्य या उभय भावांनी रामाची उपासना करीत होते.

उपासना, साधना व साहित्य या सर्व दृष्टींनी इ. स. च्या ९ व्या शतकापासून या संप्रदायाचा विकास सुरू झाला असला, तरी त्यातील सर्व सूत्रांचे एकत्रीकरण झाले नव्हते. त्यामुळे हा संप्रदाय व्यक्तिप्रधानच राहिला होता. त्यातील साधना त्या त्या व्यक्तीपुरतीच मर्यादित होती. ही साधना गुप्त ठेवून मर्यादारक्षण करणे या गोष्टीसाठी हे आचार्य जागरूक होते. परंतु पुढे अनुयायांची संख्या एकसारखी वाढू लागल्यामुळे या उपासनेच्या एकसूत्रीकरणाची गरज निर्माण झाली. ही गरज भागविणारा पहिला पुरुष म्हणजे संत अग्रदास हा होय. त्याने ध्यानमंजरी ग्रंथात या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचे एकत्रीकरण केले. त्यामुळे या ग्रंथाला रसिक संप्रदायात गीतेची प्रतिष्ठा लाभली आहे.

रसिक साधना पुष्ट करण्यासाठी आगम साहित्याचा उपयोग केला गेला आहे. वैष्णवागमाशिवाय शैव, शाक्त, इ. आगमसाहित्यही उपयोगात आणले गेले आहे. त्यात अगस्त्यसंहिता, सदाशिवसंहिता व हनूमत्संहिता यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो.

रसिक संतांचे रसिक आणि रुक्ष रसिक असे दोन वर्ग आहेत. वात्सल्य, दास्य, सख्य व शृंगार या भावांनी राम-सीतेची उपासना करणारे ते रसिक आणि केवळ शांत रसाच्या माध्यमातून या युगलाची उपासना करणारे ते रुक्ष रसिक होत. या दोन्ही वर्गांमध्ये सखीभावोपासकांना अधिक महत्त्व दिले जाते.



संत अग्रदास

कोणताही विधिनिषेध न मानता जगातील प्रत्येक सुंदर वस्तूत रामाचे प्रतिबिंब पाहणे व अहर्निश त्याच्या मूर्तिमाधुर्याचे रसपान करणे, हेच रसिकांचे प्रधान आंतरिक लक्षण आहे. आदर्श रसिक स्वतःजवळ एका गोधडीविना कोणताही संग्रह करीत नाही. गळयात तुळशीची माळा, भाळावर तिलक, दोन्ही दंडांवर रामाच्या आयुधांची मुद्रा, लंगोटी, हातात कमंडलू व पिवळे वस्त्र हा रसिकांचा बाह्य वेष असतो. षडक्षरी राममंत्राचा जप व रासग्रंथाचे अध्ययन करीत हे आपला कालक्षेप करतात.

रसिक भक्तीतील वैशिष्ट्ये – अतिरिक्त ऐश्वर्य आणि शृंगार यांचा त्याग करून मध्यम मार्गाचा स्वीकार करणे हे यांचे पहिले वैशिष्ट्य आहे. रसिक अलीने याच उपासनेला आदर्श उपासना म्हटले आहे. यांपैकी कोणत्याही एकाच मार्गाचा स्वीकार करणारा तो रसिक भक्त होऊ शकत नाही, असे त्याचे म्हणणे आहे.

राम-सीता या उपास्याबरोबर कौटुंबिक संबंध निर्माण करून तदनुकूल आचरण करणे हे यांचे दुसरे वैशिष्ट्य आहे. नर्मसखा सीताप्रसाद, मधुरसखा रसरंगमणी हे आपल्याला रामाचे कनिष्ठ बंधू समजून त्याची उपासना करीत होते. मिथिलानिवासी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जगन्नाथदास त्याला जामात समजून उपासना करीत होता. त्यांची ही उपासनापद्धती माधुर्यातील अतिशयोक्ती टाळून आत्मसंयमाला कारण बनली आहे.

ही उपासना करीत असताना कोणत्याही मर्यादांचे उल्लंघन करायचे नाही हा त्यांचा दंडक आहे. सखीभावाच्या उपासनेतही त्यांनी रामाच्या एकपत्नीव्रताला ढळ पोचू दिली नाही. रामाच्या सर्व प्रिया या आल्हादिनीशक्ती असून, त्या सीतेच्या अंशरूप आहेत व राम या शक्तीच्या द्वारेच त्यांचा भोग घेतो, असे मानले जाते. राम-सीता या युगलाला झोपेतून जागे करण्यासाठी मधुर गायन करणे, ते जागे झाल्यावर एका सखीने तिथे प्रवेश करणे, यासारख्या अनेक मर्यादा इथे दिसून येतात.

हनुमंताला आचार्य मानणे ही यांची चौथी विशेषता आहे. शृंगारी रसिक हे हनुमंताला राम-सीतेच्या सर्व सख्यांमधील सर्वेश्वरी आणि रामाची प्रधान सखी या दोन रूपांत भजतात. कृपानिवासाने त्याच्या पहिल्या रूपाला श्रीप्रसादसखी व दुसऱ्याला चारुशीला म्हटले आहे.

संत तुलसीदासांवर आत्यंतिक श्रद्धा आणि चित्रकूट, मिथिला, अयोध्या, इ. रसिक क्षेत्रांविषयी पूर्ण आस्था ही यांची अन्य वैशिष्ट्ये होत. सर्व रसिकांनी एकमेकांसंबंधी प्रेम व सद्‌भावना बाळगली पाहिजे, हे त्यांचे तत्त्व संप्रदायाच्या प्रसाराचे एक प्रमुख कारण ठरले आहे आणि त्यामुळेच रसिक भक्तांत संघर्ष उत्पन्न झाले नाहीत.

रसिकसाधना – पंचरसात्मक उपासना ही यांची साधना आहे. शृंगार, सख्य, दास्य, वात्सल्य व शांत हे ते पाच रस होत. या साधनेचे सुसंघटित स्वरूप शृंगार आणि सख्यःशाखांत पाहायला मिळते. यांनी वात्सल्य व दास्य हे शुद्ध भाव मानले आहेत. परंतु या भावांचे उपासक कमी आहेत. भक्तिरसात शृंगार व सख्य यांचेच महत्त्व आहे. कारण अंगीस्वरूपात हेच दोन भाव असतात. अन्य भाव अंगभावात जमा होतात. रसिक उपासक केवळ एकाच रसाची उपासना करतात असे नाही, तर ते अनेक भावांची उपासना करतात.

रसिक साधनेचे अधिकारी – हा संप्रदाय माधुर्योपासक आहे. त्यामुळे पूर्णावस्थेला न पोचलेल्या रसिकांचे पतन होण्याची शक्यता असते. म्हणून कामसंकल्पवर्जित व वीतरागी साधक हेच या साधनेचे अधिकारी मानले आहेत.

दिव्य दंपतीची सेवा आणि लोकोत्तर रसास्वाद ही यांची साध्य तत्त्वे आहेत. या उभय तत्त्वांची प्राप्ती उपास्याच्या सान्निध्याने प्राप्त होऊ शकते, म्हणून त्याच्या सेवेत स्वतःला विसरणे हे साधन मानले आहे. सांप्रदायिक लोक याला निकुंजसेवारस, किंवा महल–माधुर्य असे म्हणतात. भगवत्कृपेने साधक जीवाला या साधनेची प्रवृत्ती होते, अशी समजूत आहे.

उत्तरोत्तर विकसित झालेली साधना चार टप्प्यांनी दर्शविली जाते. आचार्यप्रपत्ती, संबंधदीक्षा, साकेतलीलाप्रवेश व लीलासुखभोग हे ते टप्पे होत. पहिल्या अवस्थेत गुरूला शरण जाऊन सांप्रदायिक सिद्धान्त; तसेच ईश्वर व जीव-जगतसंबंध यांचे ज्ञान प्राप्त करायचे असते. या वेळी गुरू पंचसंस्कारदीक्षा देतात. यात मुद्रा, तिलक, नामकरण, मंत्र व माला यांचा समावेश असतो. दुसऱ्या अवस्थेत प्राकृत देहाचा मोह सुटून भावदेहाने आराध्य देवतेच्या विविध अंगांचा परिचय होतो. भावानुकूल सेवेची प्राप्ती हा त्यापुढील टप्पा आहे. साकेत ही सीता-रामांची लीलाभूमी आहे. सेवासुखाचा आनंद ही त्याची चरम सीमा आहे. हा आनंद मनःसंभोग, दृष्टिसंभोग व साक्षात अथवा स्पर्शसंभोग या तीन प्रकारांचा मानतात. मनःसंभोगाला तत्सुखभावना आणि दृष्टिसंभोगाला स्वसुखभावना म्हटले आहे. तत्सुखात साक्षीभाव, तर स्वसुखात भोक्ताभाव असतो. लीलासुखभोगाचा नायक राम आहे. रसिक मतानुसार रामाचे एकपत्नीव्रत विवादास्पद आहे. बालअली, मधुराचार्य, इ. रसिकोपासकांनी रामाच्या अनेक स्त्रियांचा निर्देश केला आहे. रामरसाच्या मते श्रीरामाला आठ पट्टराण्या असून, त्यांत सीता ही सर्वश्रेष्ठ होती.

सीता ही नायिका असून, ती रामाची परा आल्हादिनी शक्ती आहे. श्री, भू व लीला यांची ती अधिष्ठात्री देवी आहे. इच्छा, ज्ञान, क्रिया, इ. शक्ती तिच्या ठायी असून, ती रामाची नित्यभोग्या आहे. ब्रह्माच्या रमणेच्छेसाठीच तिची निर्मिती झाली. सीतेच्या तेहतीस सख्या असून, त्या तिच्या लीलेत मदत करतात. तिचे अलौकिक सौंदर्य, सदाचरण आणि सुशीलता यांमुळे राम सदैव तिच्या अंकित असतो.

पुरुष आणि प्रकृती यांचा जो संबंध असतो, तोच राम व सीता यांचा आहे. सीता ही मूळ प्रकृती असून, राम हा आदिपुरुष आहे. त्यांचा संबंध नित्य आहे. सीतेविना राम व रामाविना सीता ही कल्पनाच रसिकोपासकांना मानवत नाही.

तत्त्वज्ञान – संसारी जीवाला आपल्या शुद्ध स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी रसिक आचार्य हे जिज्ञासूला जीव, ईश्वर, त्याच्या प्राप्तीचे उपाय, फल आणि फलप्राप्तीच्या मार्गातील विघ्ने, यांचा उपदेश करीत असतात. या सर्वांना मिळून पंचार्थज्ञान अथवा अर्थपंचक अशी सांप्रदायिक संज्ञा आहे.

जीवस्वरूप – जीव हा स्वभावतः ज्ञानानंद, अविनाशी व चिन्मय आहे. तो सच्चिदानंदाप्रमाणे सावयव आणि द्विभुज आहे. परमेश्वराशी त्याचा संबंध भोक्ता व भोग्य या स्वरूपाचा आहे. ज्याप्रमाणे पत्नी पतीच्या अधीन असते, त्याप्रमाणे जीव स्रष्ट्याच्या अधीन असतो. कर्मांच्या बंधनामुळेच त्याला स्थूल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देह आणि मायेमुळे सूक्ष्म व कारण हे देह प्राप्त होतात. विषयाच्या प्राप्तीसाठी त्याला या तीन देहांचा स्वीकार करावा लागतो आणि अनेक जन्म घ्यावे लागतात. बद्ध, मुमुक्षू, कैवल्य, मुक्त व नित्यमुक्त या अवस्थांमधून तो क्रमशः पार पडल्यावर त्याला शुद्ध स्वरूपाचे ज्ञान होते.

ब्रह्मस्वरूप – ईश्वराची पर, व्यूह, विभव, अंतर्यामी व अर्चावतार अशी पाच रूपे आहेत. स्वतःच्या आवडीप्रमाणे साधक त्यांची आराधना करतो. रसिकांचे उपास्य बव्हंशी परस्वरूप असते.

साकेतविहारी श्रीरामचंद्र हेच त्यांचे परात्पर ब्रह्म आहे. राम हा निर्गुण व सगुण या दोहोंचे कारण आहे. सर्व अवतार त्याचे अंशावतार आहेत. संसारचक्र चालविण्यासाठी आणि जीवोद्धारणासाठी तो व्यूह, विभव, अंतर्यामी व अर्चावतारी या प्रकारांची सृष्टी निर्माण करतो. ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे कारण तोच आहे. तो नित्यतरुण, सौंदर्यसिंधू व गुणातीत असून, सीता व नित्यमुक्त पार्षद यांच्यासह साकेतलोकात विहार करतो. सीता ही त्याची पराशक्ती आहे. सर्व अवतारांच्या शक्ती या तिच्या अंश आहेत. ती शृंगाराची स्वामिनी असून, नित्य व ब्रह्मविग्रहस्वरूप आहे.

व्यूह – वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध हे चार व्यूह आहेत. जगताची उत्पत्ती, स्थिती व लय यांसाठीच सृष्टीच्या आदिकाली यांची रचना झाली.

विभव – ब्रह्माचा सजातीय रूपातील आविर्भाव म्हणजे विभव. दशावतारांची गणना यातच होते. विभवाचे मुख्य व गौण असे दोन प्रकार आहेत. साक्षात अवतार हे मुख्य विभव आणि आवेशावतार हे गौण विभव होत. अधर्मामुळे पीडलेल्या लोकांच्या रक्षणासाठी जे अवतार घडतात, ते साक्षात अवतार होत. हे काही काल पृथ्वीवर राहतात आणि नंतर नित्यलोकात जातात. गौणावताराची स्वरूपावेश व शक्त्यावेश अशी दोन रूपे आहेत. स्वरूपावेशात परशुराम, दत्तात्रेय, कपिल इत्यादी आणि शक्त्यावेशात ब्रह्मा, शिव इत्यादी अवतार येतात. यांची उपासना मुक्तीसाठी करतात; तर श्रीरामाची उपासना नित्यमुक्तीसाठी केली जाते.

अंतर्यामी – प्राणिमात्राच्या हृदयात परमेश्वराचे जे रूप असते, तेच अंतर्यामी रूप होय. ते जीवांना कार्यरत करते; परंतु स्वतः अकर्ता असते. हे रूप निराकार असते. तथापि रसिक भक्त आपल्या तपोबलाने त्याच्या साक्षात दर्शनाचा लाभ घेऊ शकतात. हे अंतर्यामी रूप नरकादी दशांचे योगमार्गाच्या द्वारे ज्ञान प्राप्त करून देते.

अर्चावतार – हा मूर्तिविशेषात असतो. पांचरात्रविधीने मूर्ती पवित्र करतात. परमेश्वराचे हेच सर्वाधिक सुलभ रूप होय.

कर्म, ज्ञान, भक्ती, प्रपत्ती व आचार्याभिमान हे परमेश्वरप्राप्तीचे पाच प्रमुख मार्ग आहेत. या मार्गांच्या आचरणाने लोकोपचाराचा भाव निर्माण होतो आणि पंचपुरुषार्थांची प्राप्ती होते. परंतु हा साधनापथ कंटकाकीर्ण आहे.

या संप्रदायात गोलोकासंबंधी एक विशेष कल्पना आहे. गोलोक हा ज्योतिःस्वरूप असून, त्यात साकेतधाम आहे. त्याला गोलोकातील अंतःपुर समजण्यात येते. साकेताच्या मध्यभागी कनकभवन नावाचा सुवर्णप्रासाद आहे. त्याला विहारस्थान समजतात. कनकभवनाच्या मध्यभागी कल्पवृक्ष, त्याच्या खाली दिव्य मंडप, मंडपाच्या नाभिस्थानी छत्र-चामरांनी सुशोभित असे रत्नजडित सिंहासन आहे. सिंहासनाच्या मध्यभागी सहस्रदल कमल असून, त्यात एक बिंदू आहे. या बिंदूत आल्हादिनी शक्तीसहित परात्परब्रह्म राम निवास करतो. त्याच्या अंगप्रभेनेच सारा गोलोक प्रकाशित होतो.

व्रतोत्सव – या संप्रदायाचे लोक रामजन्म, रामविवाह, रामषष्ठी, जानकीनवमी, शरयूजन्म, शरयूनौकाविहार, हनुमज्जयंती, दीपावली, अयोध्यापरिक्रमा, इ. अनेक व्रतोत्सव करतात.

बरेच रसिक आचार्य आपणाला द्वैती मानतात. रामप्रसाद, रामसखा, रामचरणदास, इ. संत या मताचे समर्थक आहेत. परंतु काही अर्वाचीन संत आपल्याला विशिष्टाद्वैती मानतात. त्यांत प्रेमलता, बनादास, इ. प्रमुख आहेत. [रा. र. सं.; रामकथा; रा. सा. म. उ.; रा. भ. शा.]

रसिकानंदसंप्रदाय

हा संप्रदाय रसमार्गाचा पुरस्कर्ता आहे. रसिकानंद म्हणजे गोकुळातला श्रीकृष्ण होय. सामरहस्य उपनिषदात या संप्रदायाची माहिती दिली आहे. हे उपनिषद ब्रह्याने सनकादी मुनींना उपदेशिले. त्यानुसार पुरुषोत्तम हा सर्व चराचराच्या अतीत असला, तरी भक्तीच्या योगाने त्याच्या समीप जाता येते. त्याच्या ऊर्ध्व दृष्टिपाताने मानवप्राण्यांचा जन्म झाला आणि त्यांच्यासाठीच हा संप्रदाय सांगितला गेला.

सामरहस्य उपनिषदानुसार या पुरुषोत्तमापासून दोन रूपे निर्माण झाली. पहिले रूप भक्तिसुंदरी आणि दुसरे रूप मायासुंदरी हे होय. भक्तिसुंदरी पुरुषोत्तमाला प्रिय झाली. तिच्यापासून उत्पन्न झालेले लोक भक्तिमार्गाचे पुरस्कर्ते बनले. मायासुंदरीपासून जन्मले ते असुर झाले. पुरुषोत्तम केवळ लीलेसाठी आपले रूप प्रकट करतो. हे रूप सुखमय व आनंदमय असते. त्याच्या शरीरापासून आनंदमय भावना निर्माण होतात.

पुरुषोत्तमाने आपले शरीर द्विधा केले आणि त्यातून राधा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निर्माण झाली. त्यामुळे राधा वेदांनाही पूज्य बनली. म्हणून वेद व्रजलोकातील राधा-कृष्णांच्या क्रीडेचा बहुमान करतात. ही क्रीडा पाहाण्यासाठीच अनेक दिव्य विभूतीही वृंदावनात वृक्ष होऊन राहतात. गोवर्धन पर्वत हा राधा आणि रसिकानंद यांचे क्रीडास्थान आहे. इथे शेकडो प्रासाद असून, त्यांच्यामध्ये रासमंडळ आहे. अणिमादी सिद्धी राधेच्या सख्या बनून रास-क्रीडेत तिला मदत करतात. वृंदावनात राधा व रसिकानंद यांच्यासाठी शृंगारस्थान व मानस्थान अशी आणखी दोन स्थाने आहेत. याशिवाय भोगस्थान नावाचे आणखी एक ठिकाण असून, तिथे रसिकानंद राधेसह भोज्य पदार्थांचा आस्वाद घेतो.

या संप्रदायाचा 'ॐ नमः श्री राधारसिकोभयम्' असा द्वादशाक्षरी मंत्र आहे. तो मूलमंत्र होय. वैवस्वत मनूच्या मुलांना नारदाने ही विद्या शिकविली.

या संप्रदायाचे अनुयायी फक्त रसिकानंदाचीच पूजा करतात. ते जातपात, कुलधर्म, इ. मानीत नाहीत. हे लोक या रसिकानंद संप्रदायाच्या अनुयायांनाच नातेवाईक मानतात. अन्य धर्म आचरणारा कोणीही रसिकानंदाचा भक्त होऊ शकत नाही, असे ते समजतात. अन्य सांप्रदायिकांशी ते कसलाही संबंध ठेवीत नाहीत. [क्रि. स्ट. ले. उ.]

रसिया

लोकगीतांचा एक प्रकार. व्रजमंडळात हा प्रकार फार लोकप्रिय आहे. होळीच्या सणात ही गीते गायली जातात. त्यांना ढोलाची साथ असते. राधाकृष्णांच्या लीलांचे वर्णन करणे, हा या गीतांचा प्रमुख विषय असतो. याशिवाय शृंगारप्रधान विषयही यांत आढळतात. या गीतप्रकाराची अभिव्यक्ती व्यक्तीनुसार भिन्न भिन्न आढळते. घासरीय, सनेहीराय, छीतरमक, इ. कवींची रसिया गीते व्रजभाषेत प्रसिद्ध आहेत.

संगीतज्ञांच्या मते हा गीतप्रकार ध्रुपद घराण्यातला असावा. रसियाचा शास्त्रीय अवतार म्हणजे ध्रुपद असेही म्हटले जाते. हिंदुस्थानी संगीताच्या वाढीला या गानप्रकाराने मोठी मदत केली आहे. [हिं. सा. को.]

रसेश्वरसंप्रदाय

हा शैव मताचा एक संप्रदाय आहे. या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानावर अनेक ग्रंथ निर्माण झालेले असल्यामुळे त्याला दर्शनपदवी प्राप्त झाली आहे. आदिनाथ शंकर याच्यापासून हा संप्रदाय निर्माण झाला व त्यानंतर शुक्र, सोमेश्वर, गोविंद भगवत्पादाचार्य, गोविंदनायक, चर्वटी, कपिल, व्याली, कापाली कंदलायन, इ. या संप्रदायाचे अनेक आचार्य होऊन गेले, असे सांगितले आहे.

भारतवर्षात प्रस्तुत संप्रदायाचे अनेक ग्रंथ विद्यमान आहेत. नागार्जुनाने रसरत्नाकर हा ग्रंथ लिहून या क्षेत्रातले आपले आचार्यत्व सिद्ध केले आहे. त्याला रस सिद्ध होता असे सांगतात. त्यावरूनच त्याला सिद्धनागार्जुन म्हणत. गोविंद भगवत्पादाने रसहृदय हा ग्रंथ लिहून या शास्त्रातले रहस्य समजावून सांगितले आहे. विष्णुस्वामीचा साकारसिद्धी हा ग्रंथही रससिद्धांतावरच होता. पण सांप्रत तो उपलब्ध नाही. प्रस्तुत संप्रदायाचे साहित्य विशाल असून, ते हळूहळू आता प्रकाशात येऊ लागले आहे.

रस म्हणजे पारा होय. या संप्रदायात त्यालाच ईश्वर म्हटले आहे. पाऱ्याच्या जोडीने या संप्रदायात अभ्रकाचाही विनियोग सांगितला आहे. शिवाने पारा आणि अभ्रक यांच्याविषयी सांगितले आहे (स. द. सं. ९.४)

अभ्रकस्तव बीजं तु मम बीजं तु पारदः ।
अनयोर्मीलनं देवि मृत्युदारिद्र्यनाशनम् ।।

अर्थ – हे देवी, अभ्रक हे तुझे बीज (रज) आहे. पारा हे माझे बीज (वीर्य) आहे. आणि या दोहोंचे मीलन हे मृत्यू आणि दारिद्र्य यांचा नाश करणारे आहे.

पाऱ्याचे संस्कृत नाव पारद असे आहे. या नावाची व्युत्पत्ती सांगताना असे म्हटले आहे, की संसारसागरातून पार करणारा म्हणून तो पारद होय. पारा हा 'याचि देही' मोक्ष देणारा आहे, असेही सांगितले आहे. वस्तुतः मोक्ष ही देहत्यागानंतरची प्राप्ती आहे. पण पाऱ्याचे रसायन सेवन केल्याने याच जन्मी माणसाचे शरीर दिव्य होते आणि मुक्तही होते.

या संप्रदायाचे तत्त्वज्ञान असे – 'याचि देही याचि डोळा' मुक्ती मिळवायची तर शरीर चिरकाल टिकले पाहिजे. या शरीरात नाना व्याधी उत्पन्न होऊन त्या शरीराला जर्जर करतात. ज्वर, श्वास, काम. इ. विकारांनी शरीर थकते आणि कधीतरी मग गळूनही पडते. म्हणून मोक्षप्राप्तीसाठी शरीर हे दृढ, काटक, समर्थ आणि व्याधिरहित बनविले पाहिजे. शरीराची ही दृढता, कार्यक्षमता व अभंगता पारदभस्माने प्राप्त होते. पारदाची शक्ती अलौकिक आहे. पारदरसायनाचे सेवन केल्याने सर्व व्याधी आणि उपाधी नष्ट होतात, आत्मज्ञान होते, सर्व सृष्टिबंध नष्ट होतात, जरा आणि मृत्यूही नष्ट होतात आणि याच शरीराच्या द्वारा मुक्तावस्था प्राप्त होते.

अभ्रक व पारद यांचे मिश्रण विशिष्ट यंत्राच्या द्वारे उर्ध्वपतित केल्याने शरीर अजरामर बनविणारा रस सिद्ध होतो. मूर्च्छित, मृत आणि बद्ध या पाऱ्याच्या तीन दशा आहेत. प्राण्याच्याही याच दशा होत. रसाचार्य सांगतात –

मूर्च्छितो हरति व्याधीन् मृतो जीवयति स्वयम् ।।
बद्धः खेचरतां कुर्यात् रसो वायुश्च भैरवि ।।

अर्थ – हे भैरवी, पारा मूर्च्छित केला असता तो व्याधींचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हरण करतो. तो मृत केला असता आयुष्य देतो आणि बद्ध केला असता आकाशात उडण्याचे सामर्थ्य मिळवून देतो. जी प्रक्रिया पाऱ्याची तीच प्राणवायूचीही होय.

ज्या पाऱ्यामध्ये घनता व चंचलता राहत नाही त्याला मूर्च्छित म्हणतात. ज्यामध्ये आर्द्रता (चमक), गौरव (वजनदारपणा) आणि चपलता राहत नाही, अशा पाऱ्याला मृत म्हणतात. पारा एका ठिकाणी स्थिर राहाणे किंवा त्याला घट्ट बसवणे याला बद्ध म्हणतात. या तीनही दशांमध्ये पारा मानवाच्या परम कल्याणाचे साधन बनले आहे. रसग्रंथाने पाऱ्याचे स्वेदन, मूर्च्छन, पावन, निरोधन, मारण, इ. अठरा प्रकारचे विधी विस्तारपूर्वक सांगितले आहेत.

माणसाला अमर बनवणारे रसायन आजवर कोणाला सापडले नाही हे खरे; पण पाऱ्याच्या अमोघ शक्तीचा आविष्कार करणाऱ्या रसाचार्यांनी भारतीय चिकित्साशास्त्राला एका वेगळ्याच रूपात समृद्ध केले आहे. रसायनचिकित्सा हे भारतीय आयुर्वेदाचे खास वैशिष्टय आहे. म. म. गणनाथ सेन म्हणतात, की आयुर्वेदाच्या रसायनतंत्राचा आविष्कार रसेश्वरसंप्रदायाच्या आचार्यांनी केला. हे आचार्य कित्येक शतकांच्या पूर्वी रोग्याची पारदचिकित्सा करीत होते. वेदोत्तर कालात लोह, शिलाजित, इ. काही पदार्थांचा चिकित्सेत थोडाबहुत व्यवहार होत असे. पण पारद व अभ्रक या पदार्थांचा आभ्यंतर प्रयोग प्रायः कोणाला ठाऊक नव्हता. रसेश्वर संप्रदायाने पहिल्या प्रथम पाऱ्याच्या सर्वरोगनिवारक गुणाचा आविष्कार केला. या संप्रदायाचा नाथपंथी हठयोगी यांच्याशी संबंध होता, असे कळते.
[रि. इं.; ना. सं.; भा. द. – श्री. बलदेव उपाध्याय]

रस्सीखेच

एक खेळ. यात खेळणारी मुले आपले दोन संघ बनवून समोरासमोर उभी राहतात व एकच चांगली बळकट दोरी धरून दुसऱ्या संघाला आपल्या बाजूला ओढण्याचा प्रयत्न करतात. यात खेळणाऱ्यांच्या शक्तीची परीक्षा होत असल्याने चांगलीच चुरस उत्पन्न होते व खेळाडूंच्या हातापायांना उत्तम व्यायाम होतो. क्रीडासंमेलनात मोठ्या मंडळींसाठीसुद्धा या स्पर्धेचा समावेश केलेला आहे. [व्या. ज्ञा. को.]

रहीम

(इ. स. १५५६–१६२६) एक भक्तकवी. याचे संपूर्ण नाव अब्दुर्रहीम खानखाना. अकबराच्या दरबारातल्या हिंदी कवींत रहीमचे स्थान महत्त्वपूर्ण होते. केशव, आसकरन, मंडन, नरहरी आणि गंग यानी या कवीची प्रशंसा केलेली आहे.

रहीम हा बहरमखानाचा पुत्र होय. तो पाच वर्षांचा असतानाच पाटन शहरी बहरमखानाचा खून झाला. त्यामुळे रहीमचे पालनपोषण अकबराच्या देखरेखीखाली झाले. त्याच्या अंगी राजकारणाला लागणारे अनेक गुण होते. त्या गुणांनी प्रभावित होऊन अकबराने त्याला पाटनची जहागिरी दिली. अकबराच्या दरबारात तो हळूहळू चढत गेला. गुजरातच्या विजयानंतर अकबराने रहीमला गुजरातची सुभेदारी दिली. रहीमने गुजरातमध्ये उद्‌भवलेली बंडाळी स्वपराक्रमाने शांत केली. त्यामुळे प्रसन्न होऊन अकबराने त्याला खानखाना ही पदवी आणि पंचहजारी मनसब दिली. इ. स. १६०४ मध्ये शहाजादा दानियालचा मृत्यू आणि अबुल फजलचा खून झाल्यानंतर अकबराने रहीमला दक्षिणेचा पूर्ण अधिकार दिला. जहांगिराच्या काळातही काही वर्षे त्याला सन्मान मिळत राहिले. पण पुढे शहाजहानाचा पक्ष घेतल्यामुळे त्याला जहांगिराने काही काळ कैदेत टाकले. त्या कैदेतून सुटल्यावर त्याला पूर्वीचे कोणतेही अधिकार परत मिळाले नाहीत.

रहीमचे कौटुंबिक जीवन कधीही सुखमय नव्हते. लहानपणी पित्याचा मृत्यू झाला. बेचाळीसाव्या वर्षी पत्नी मृत्यू पावली. जावई आणि तीन पुत्रही कालवश झाले. त्याचा आश्रयदाता आणि गुणग्राहक अकबरही त्याच्या हयातीत मरण पावला. पण हे सारे आघात रहीमने अत्यंत धैर्याने सोसले. त्याच्या काव्यात, त्याच्या या सांसारिक व्यथांचे पडसाद उमटलेले दिसतात.

रहीम अजरामर झाला आहे, तो एक कवी म्हणून. तो अकबरकालीन सामाजिक व साहित्यिक प्रवृत्तींचा प्रतिनिधी होता. त्याला अरबी, फारसी, तुर्की व संस्कृत या भाषा उत्तम येत होत्या. अवधी आणि ब्रज या भाषांवर तर त्याचे उत्तम प्रभुत्व होते. भारतीय संस्कृतीशी चांगला परिचय घडावा म्हणून त्याने संस्कृत भाषेचे अध्ययन केले होते. त्याच्या कित्येक नीतिविषयक दोह्यांवर संस्कृत कवींची छाप दिसून येते.

रहीम हा उच्च कोटीचा कवी होता, त्याबरोबरच कवींचा आणि विद्वानांचा आश्रयदाताही होता. विद्वान आणि कवी यांच्या बाबतीत रहीमचे औदार्य हे इतिहास आणि आख्यायिका यांचा विषय बनले आहे. कधीही आणि कुठेही एखाद्या कवीच्या तोंडून एखादा अर्थपूर्ण छंद किंवा दोहा ऐकला, की तो मंत्रमुग्ध होत असे आणि लगेच त्या कवीची संभावनाही करीत असे. असे सांगतात, की गंग कवीचा एक छंद ऐकून त्याला रहीमने छत्तीस लाख रुपयांचा पुरस्कार दिला होता. त्याचे हे स्वाभाविक औदार्य पाहून गंग कवीने एका दोह्यात त्याला प्रश्न केला, तो असा –

सीखे कहां नवाज जू, ऐसी देनी दैन ।
ज्यों-ज्यों कर ऊँचे करो, त्यों-त्यों नीचे नैन ।।

भावार्थ – हे कविश्रेष्ठा, अशी उदार देणगी द्यायला तू कुठे शिकलास ? तुझी नम्रता तरी किती वर्णावी ! जो जो तुझा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हात वर जातो, तो तो तुझे डोळे मात्र खाली भूमीकडे लागतात.

या प्रश्नाला उत्तर म्हणून रहीमने लिहिलेला दोहा असा –

देनदार कोउ और हैं, भेजत सो दिन-रैन ।
लोग भरम हमपर धरे, याते नीचे नैन ।।

भावार्थ – माझे कसले औदार्य ! देणारा कोणी निराळाच आहे. तो रात्रंदिवस माझ्याकडे पाठवीत राहतो. लोक भ्रमाने मला दाता म्हणतात, म्हणून माझी दृष्टी अवनत होते.

औदार्य आणि सम्राटाची अवकृपा या दोन्ही गोष्टींमुळे जीवनाच्या अखेरीस रहीम निर्धन आणि निराश्रित बनला होता. तो त्या अवस्थेत चित्रकूटावर राहत होता. पण तशाही अवस्थेत कवी त्याच्याकडे याचना करण्यासाठी जातच असत. असाच एक याचक दारी आला असता त्याचे काम व्हावे म्हणून रहीमने एक दोहा लिहून त्याला रीवांच्या राजाकडे पाठविले.

सामान्य नीती व सद्गुण यांच्याविषयी रहीमने कित्येक दोहे लिहिले आहेत. त्यांपैकी काही असे –

दीन सबनको लखत है, दोनही लखे न कोय ।
जो रहीम दीनही लखे, दीनबंधु सम होय ।।

भावार्थ – दीन मनुष्य सर्वांच्या तोंडाकडे आशेने पाहात असतो; पण त्याच्याकडे मात्र कुणीच पाहत नाही. रहीम म्हणतो, जो माणूस गरिबांचा विचार करतो तो दीनबंधू परमेश्वरासमान होय.

धनि रहिम जल पंक को, लघु जिय पियत अघाय ।
उदधि बडाई कौन हैं, जगत पिआसो जाय ।

भावार्थ – चिखल आणि पाणी यांच्यांत राहणाऱ्या जीव-जंतूंना जलदान करून डबकेही संतोप देते. समुद्राची कसली आली आहे बढाई ! त्याच्या काठी बसूनही जगातले प्राणी तहानलेलेच राहतात.

ये रहीम दर-दर फिरहि माँगी मधुकरी लाहि ।
यारो यारी छोडिअ वे रहीम अब नाहि ।।

भावार्थ – हे रहीम, तू दारोदार फिरून माधुकरी मागून आणतो आहेस. एका काळी तुझ्या मैत्रीचा फायदा घेणारे आता तुला सोडून गेले आहेत. ते आता तुझे राहिले नाहीत.

तरुवर फल नहिं खात है, सरवर पियहि न पान ।
कहि रहीम परकाज हित, संपति संचहि सुजान ।।

भावार्थ – वृक्ष स्वतःची फळे स्वतः खात नाही. सरोवर स्वतःचे पाणी स्वतः पीत नाही. रहीम म्हणतो, सज्जन लोक परहितासाठीच संपत्तीचा संचय करीत असतात.

रहिमन चूप ह्वं बैठिए देखि दिनन को फेर ।
जब नीके दिन आइहैं, बनत न लगहि देर ।।

भावार्थ – रहीम म्हणतो, गप्प बसून पाहणे हेच ठीक. दिवसांचे फेरे असेच येत असतात. आता वाईट दिवस आले आहेत. उद्या चांगलेही येतील.

रहीमच्या हिंदी काव्यात बरवै नायिकाभेद, रहीम दोहावली आणि मदनाष्टक हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्याच्या काव्याचे मुख्य विषय शृंगार, नीती आणि भक्ती हे आहेत. विष्णू व गंगा यांच्याविषयीची त्याची कविता विशेष उल्लेखनीय आहे. तत्कालीन वैष्णव भक्तिआंदोलनाने प्रभावित होऊन त्याने ती लिहिली आहे. नीती व शृंगारविषयक रचना दरबारी वातावरणाला अनुकूल आहे. बरवै छंद हा त्याचा आवडता आणि हातखंडा छंद आहे. नायिकाभेद हा ग्रंथ त्याने बरवै छंदातच लिहिला आहे. तुलसीदासाला बरवै रामायण लिहिण्याची प्रेरणा रहीमकडूनच मिळाली, असे म्हणतात. बरवैव्यतिरिक्त रहीमने दोहा, सोरठा, कवित्त, सवैया, मालिनी, इ. अनेक छंदांचा उपयोग केला आहे.

याशिवाय रहीमरत्नावली, रहीमविलास, रहिमनविनोद, रहीमकवितावली, रहिमनचंद्रिका, रहिमनशतक हे त्याचे काव्य-संग्रह प्रसिद्ध आहेत.

रहीमची कविता म्हणजे त्याचे सहजोद्गार आहेत आणि त्या उद्गारात दीर्घकालीन जीवनानुभव साठवलेले आहेत. रहीमच्या काव्याने हिंदी भाषेला श्रीमंती लाभली आहे. [राष्ट्र-भारती, अगस्त १९५५; अ. द. हिं. क.; हिं. सा. को.]

रहूगण आंगिरस एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या नवव्या मंडलातील ३७ व ३८ ही दोन सूक्ते याच्या नावावर आहेत. पवमान सोम हा या सूक्तांचा विषय आहे. सोम तयार करण्यासंबंधीची वरीच माहिती यात आलेली आहे. त्यातली एक ऋचा (ऋ. ९.३७.२) अशी –

स पवित्रे विचक्षणो हरिरर्षति धर्णसिः ।
अभि योनिं कनिक्रदत् ।।

अर्थ – दशापवित्रामधील सर्वद्रष्टा, हरितवर्णीय आणि सर्वाधार सोम खळखळ आवाज करीत सोमपात्रात पडतो.

रक्षाबंधन श्रावणी पौर्णिमेच्या दिवशी रक्षाबंधन नावाचा विधी करतात. त्याचा प्रयोग असा– सूर्योदयी स्नान करावे. उपाकर्म व ऋषींचे तर्पण करावे. अपराह्णकाली रक्षा तयार करावी. तांदूळ, सोने व पांढऱ्या मोहऱ्या या एकत्र करून त्यांची पुरचुंडी बांधल्याने रक्षा अर्थात राखी तयार होते. मग तिची पूजा करावी. नंतर पुढील मंत्राने ती राखी मंत्र्याने राजाला बांधावी–

येन बद्धो बली राजा दानवेन्द्रो महाबलः ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तेन त्वामपि बध्नामि रक्षे मा चल मा चल ॥

अर्थ – महाबली दानवेन्द्र बली राजा जिने बद्ध झाला, त्या रक्षेने मी तुलाही बांधतो. हे रक्षे तू चलित होऊ नकोस.

यावरून मूळचे हे रक्षाबंधन राजासाठी होते, असे कळते. भविष्यपुराणातही असेच सांगितले आहे.

इतिहासकालापासून राखीची एक नवी पद्धत सुरू झालेली आहे. ही राखी बहिणीने भावाच्या हातात बांधायची असते. भावाचा उत्कर्ष व्हावा आणि भावाने आपल्याला म्हणजे बहिणीला संरक्षण द्यावे, ही त्यामागची भूमिका असते. मोगल कालात कित्येक राजपूत स्त्रिया राखीबंधू बनवीत आणि हे राखीबंधू संकटकाळ आल्यास आपल्या राखीभगिनीच्या रक्षणार्थ धावून जात. इतिहासातले एक उदाहरण या बाबतीत प्रसिद्ध आहे. उदेपूरची राणी कर्मवती हिने गुजरातच्या बहादुरशहापासून रक्षण व्हावे म्हणून हुमायूनाला भाऊ मानून राखी पाठवली होती. उ. भारतात नोकर मालकाच्या हाताला राखी बांधतात. गरीब लोक श्रीमंतांच्या हाताला राखी बांधून त्यांच्याकडून द्रव्यसंभावना मिळवतात.

एका काळी रक्षाबंधनाचा हा प्रघात उत्तर भारतापुरताच मर्यादित होता. पण अलिकडे भारतभर रक्षाबंधनाची म्हणजेच बहिणीने भावाला राखी बांधण्याची अथवा पाठवण्याची प्रथा सुरू झाली आहे. भावाबहिणीमधले प्रेम घनिष्ठ होण्यासाठी आणि समाजात भ्रातृभाव निर्माण होण्यासाठी या रक्षाबंधनाचा उपयोग होऊ शकतो. अलिकडच्या राख्यांमध्ये वर सांगितल्याप्रमाणे पुरचुंडी नसते, तर दोरा आणि कलाबतू यांचे फूल करून त्याला रेशमी रंगीत दोरा बांधलेला असतो.

जैन लोक हा दिवस रक्षापर्व म्हणून पाळतात. त्या दिवशी जैनमंदिरांतून राख्या ठेवलेल्या असतात. जैन मुनी त्यांचे आदराने ग्रहण करतात. [हिं. रि. इ.; हिं. स. व्र.]

रक्षोहा ब्राह्म एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १६२ वे सूक्त याच्या नावावर आहे. हे गर्भरक्षकसूक्त म्हणून प्रसिद्ध असल्याने गर्भरक्षणासाठी याचे पठण करतात. यातील एक ऋचा (ऋ. १०.१६२.५) अशी –

यस्त्वा भ्राता पतिर्भूत्वा जारो भूत्वा निपद्यते ।
प्रजां यस्ते जिघांसति तमितो नाशयामसि ॥

अर्थ – हे स्त्रिये, तुझ्या बंधूचे, पतीचे अथवा प्रियकराचे रूप घेणाऱ्या गर्भनाशक राक्षसास आम्ही नष्ट करतो

रांगोळी संस्कृत रंगवल्ली. विशिष्ट शुभ्र चूर्ण चिमटीतून जमिनीवर सोडून रेखाटलेल्या आकृतीला रांगोळी असे म्हणतात. रांगोळी काढणे ही एक कला आहे आणि तिचा उगम धर्माच्या अनुबंधानेच झाला आहे. माणसे रांगोळी केव्हापासून काढू लागली व रांगोळीची पहिली रेघ कोणी ओढली हे निश्चित सांगणे कठीण आहे. या बाबतीत एवढेच म्हणता येईल, की रांगोळी ही मूर्तिकला आणि चित्रकला यांच्याही आधीची आहे.

कुठल्याही धार्मिक किंवा मांगलिक कृत्यात रांगोळी आवश्यक आणि प्राथमिक गोष्ट आहे. कोणत्याही सण, उत्सव, मंगल समारंभ, पूजा, व्रत, इ. शुभ प्रसंगी प्रथम धर्मकृत्याच्या जागी रांगोळी काढण्याची प्रथा आहे. एखाद्याला किंवा एखादीला ओवाळताना ती व्यक्ती बसलेल्या पाटाभोवती आणि पुढेही रांगोळी काढतात.



दिवाळीची रांगोळी

समारंभाच्या भोजनप्रसंगीही पाटाभोवती व पानाभोवती रांगोळी काढतात. दिवाळीच्या सणात दारापुढे किंवा अंगणात विविध प्रकारच्या रांगोळ्या काढून त्या विविध रंगांनी भरतात. जुन्या काळी प्रत्येक घरी रोज दारापुढे सडासंमार्जन करून रांगोळी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काढण्याची प्रथा होती. रांगोळी शिरगोळयाच्या चूर्णाने काढतात. कोकणात भाताची फोलपटे जाळून त्यांची पांढरी राखही रांगोळी म्हणून वापरतात. रांगोळीचे पीठ सामान्यपणे भरभरीत असते. त्यामुळे चिमटीतून ते सहजपणे सुटते. जमीन सारवल्यावर तिच्यावर रांगोळीच्या चार रेघा न विसरता ओढल्या जातात. रांगोळी न घातलेली सारवलेली जमीन अशुभ समजतात.

सौंदर्याचा साक्षात्कार व मंगलाची सिद्धी हे रांगोळीचे दोन उद्देश होत. रांगोळीत ज्या आकृती काढतात, त्या प्रतीकात्मक असतात. सरळ रेषेपेक्षा वक्र रेषा ही सौंदर्याची विशेष अनुभूती घडविते. अशा वक्ररेषा आणि बिंदू, त्रिकोण, चौकोन व वर्तुळ यांतून विविध प्रतीकात्मक आकृत्या निर्माण करता येतात. पाटाभोवती रांगोळीचा चौकोन काढला, तर त्याला समोरच्या रेषेवर एक त्रिकोण काढतात. चौकोनाची आडवी रेघ हा त्या त्रिकोणाचा पाया असतो. त्रिकोणाच्या शिरोभागी एक वर्तुळ काढतात. असे केल्याने त्या रेषेला मखराचे स्वरूप येते. चौकोनाचे कोपरे ओके ठेवण्याची चाल नाही. त्या कोपऱ्यांवर रांगोळीची एक चिमूट ओढून तिथे त्रिदळाची आकृती काढतात. हे त्रिदळ त्रिभुवन, तीन देव, तीन अवस्था आणि त्रिकाल यांचे म्हणजेच पर्यायाने त्रिधा विभक्त अशा विश्वतत्त्वाचे प्रतीक असते. शंख, स्वस्तिक, चंद्र, सूर्य, ही आणखी प्रतीके होत. रांगोळीच्या दोन समांतर रेषांच्या मध्यभागी दोन वक्ररेषा एकमेकींवर चढवून एक साखळी आकाराला आणतात. ही साखळी म्हणजे नागयुग्माचे प्रतीक असते. अष्टदल हे अष्टदिशात्मक विश्वाचे, तसेच सूर्य व विष्णू यांचे प्रतीक असते. कमळ हे लक्ष्मीचे व प्रजननशक्तीचे प्रतीक असून, वैष्णव उपासनेत त्याला विशेष महत्त्व आहे. याशिवाय एकलिंगतोभद्र, अष्टलिंगतोभद्र, सर्वतोभद्र अशाही रांगोळ्या धर्मकृत्यात काढल्या जातात. यात मोठ्या



(१) पूजेसाठी रांगोळी (२) ज्ञानकमळ

चौकोनातले बारीक चौकोन विशिष्ट पद्धतीने, कुंकवाने भरून त्यातून शिवलिंगाची आकृती निर्माण करायची असते. या रांगोळ्या शैव धर्माशी संबंधित आहेत. श्री. म. दि. कोकड लिहितात – रांगोळ्यांत प्रतीकांचा प्रपंच फार मोठा आहे. सुरवातीच्या रंगावलीरचना केवळ प्रतीकांच्या भोवतीच रेंगाळत राहिल्याचे दिसते. एके काळी प्रतीके हाच रांगोळ्यांचा मोठा आधार होता. प्रतीकांच्या रचना म्हणजे एक प्रकारची सांकेतिक भाषाच आहे. प्रत्येक प्रतीकात फार मोठा अर्थ भरलेला असतो. शिवाय प्रतीकांच्या या आकृत्या भावनेला आवाहन करणाऱ्या, तशाच कलात्मक व आकर्षक असतात.

याशिवाय ठिपक्यांवरची रांगोळी या नावाचा आणखी एक रांगोळीप्रकार रूढ आहे. प्रथम भूमीवर मोजून काही ठिपके देतात व ते उभ्या आडव्या रेषांनी जोडून त्यातून मोर, कासव, कमळ, वेल, इ. आकृती निर्माण करतात. ठिपक्यांची रांगोळी जटिल पण आकर्षक असते.

रांगोळी मुख्यत्वे स्त्रियाच काढतात. ती काढण्यासाठी त्यांना फूटपट्टी, दोरा, कुंचला, इ. कोणत्याही उपकरणाची आवश्यकता नसते. त्यांची बोटे मुक्तपणे फिरून विविध आकृत्या सहजपणे निर्माण करतात. रांगोळीतल्या प्रत्येक आकृतीचा प्रारंभ तिच्या केंद्रातून होत असतो.

रांगोळीचे आकृतिप्रधान व वल्लरीप्रधान असे मुख्य दोन भेद आहेत. आकृतिप्रधान रांगोळी राजस्थान, महाराष्ट्र, द. भारत, उ. प्रदेश या प्रदेशांत आढळते. तिच्यात रेखा, कोण आणि वर्तुळे ही प्रमाणबद्ध दिसतात. वल्लरीप्रधान रांगोळी भारताच्या पूर्व भागात आढळते. तिच्यात फूलपत्री, वृक्षवल्ली व पशुपक्षी यांना प्राधान्य असते. अशी रांगोळी काढण्यात बंगाली स्त्रिया सिद्धहस्त आहेत. ही रांगोळी आकृतिप्रधान रांगोळीपेक्षा अधिक मोहक वाटते. बंगालमधील अलिपना, राजस्थानातील मांडना, मध्य प्रदेशातील चौकपूरना, गुजरातमधील साथिया, आंध्रातील मुग्गू, तमिळनाडमधील कोलम, कर्नाटकातील रंगोली व केरळातील पूविडल हे सगळे रांगोळीचेच प्रकार होत.

रांगोळीचा इतिहास – चौसष्ट कलांमध्ये रांगोळी या कलेचा उल्लेख वात्स्यायनाच्या कामसूत्रात आढळतो. त्या काळी (इ. स. चे ३ रे शतक) धान्याचा उपयोग करून रांगोळी काढीत. सरस्वतीच्या मंदिरात, तसेच कामदेव व शिवलिंग यांच्या पूजेसाठी विविधरंगी फुलांनीही आकृतिबंधात्मक रांगोळी काढीत. वरांगचरित (७ वे शतक) यात पंचरंगी चूर्णे, धान्ये व फुले यांनी रांगोळीचे चित्रविचित्र आकृतिबंध तयार करीत असल्याचे सांगितले आहे. नलचंपूमध्ये (१० वे शतक) उत्सवप्रसंगी घरापुढे रांगोळी काढीत असल्याचा उल्लेख आहे. वादीभसिंहाच्या (११ वे शतक) गद्यचिंतामणी या ग्रंथात भांजनसमारंभात मंगलचूर्णरेखा काढीत, असा रांगोळीचा उल्लेख आहे. हेमचंद्राने (११–१२ वे शतक) देशीनाममाला या ग्रंथात तांदुळाच्या पिठाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रांगोळी काढीत, असल्याचे सांगितले आहे. मानसोल्लासात (१२ वे शतक) सोमेश्वराने धूलिचित्र या नावाने व श्रीकुमार याने शिल्परत्नात धूलिचित्र किंवा क्षणिकचित्र या नावाने रांगोळीचा निर्देश केला आहे. भास्करभट्ट बोरीकराच्या शिशुपालवध या काव्यात रांगोळीचा उल्लेख रांगवळी असा आहे. त्यापुढील मराठी वाङ्‌मयात रांगोळीचे अनेक ठिकाणी निर्देश झालेले आहेत. या सर्व संदर्भांवरून रांगोळी ही कला सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीपासून प्रचलित असल्याचे कळते.



तुळशीवृंदावन

हिंदू, जैन व पारशी या धर्मांत रांगोळी ही अशुभनिवारक व शुभप्रद मानलेली आहे. श्री. आनंदघनराम रांगोळीचे तात्त्विक रहस्य विशद करताना लिहितात – ' जमिनीवर केरसुणी फिरवतांना किंवा सारवताना जमिनीवर सूक्ष्म रेषा निर्माण होतात, त्यात एक प्रकारचे कंपन असते. या रेखा अनियमित असल्याकारणाने त्यांचे कंपनही अनियमित असते, म्हणून ते शरीराला, नेत्रांना व मनाला हानिकारक असते. हे अनिष्ट कंपन टाळण्यासाठी सारवलेल्या जमिनीवर कोन आणि शुभ चिन्हे व्यवस्थित रूपाने रांगोळीच्या माध्यमाने काढली, की झाडल्याचे व सारवल्याचे अशुभ परिणाम दूर होऊन शुभ परिणामांची प्राप्ती होते. ' [हिस्टरी ऑफ रंगावली आर्ट – स्ट. इं. क. हि.; ३; रंगावलीची विविध रूपे – अ. दि. कोकड]

रांजणगाव महाराष्ट्रातील अष्टविनायकांच्या क्षेत्रांतील एक प्रसिद्ध गणेशक्षेत्र. हे स्थान पुणे-नगर मार्गावर पुण्यापासून ३१ मैलांवर आहे. या क्षेत्रासंबंधी एक कथा आहे, ती अशी –

प्राचीन काळी त्रिपुरासुर नावाचा एक असुर खूप मत्त झाला. त्याने स्वर्ग, मृत्यू व पाताळ हे तिन्ही लोक त्रस्त करून सोडले. इंद्रासह सर्व देव-देवतांची त्याने दाणादाण केली. यावर उपाय म्हणून नारदांनी सर्व देवांना गजाननाची उपासना करायला सांगितले. त्याप्रमाणे सर्व देव गजाननाला शरण गेले; परंतु भगवान शंकरांनी तसे करण्याचे नाकारले. आपल्याच मुलाची आपण काय म्हणून पूजा करायची, असा त्यांनी विचार केला.

पुढे शंकरांच्या नेतृत्वाखाली सर्व देव त्रिपुरासुराशी लढू लागले. पण शंकरांना गजाननाच्या वरप्रसादाशिवाय विजयप्राप्ती होईना. शेवटी नारदांच्या सांगण्यावरून त्यांनी युद्ध थांबवून गजाननाला प्रसन्न करून घेतले. नंतर गजाननाने दिलेल्या बीजमंत्राने मंत्रून सोडलेल्या बाणामुळे शंकरांना त्रिपुरासुराचा नाश करता आला. त्रिपुरासुरवधानंतर त्या जागी शंकरांनी मणिपूर नावाचे नगर वसविले, तेच हे रांजणगाव होय.

इथले गणपतीचे देवालय पूर्वाभिमुख असून, उत्तरायण किंवा दक्षिणायण यांच्या मध्यकाली सूर्यकिरण नेमके मूर्तीवर पडावे, अशी त्याची रचना आहे. देवळाचा गाभारा श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांनी व मुख्य सभामंडप इंदूरचे सरदार किबे यांनी बांधला.



महागणपती–रांजणगाव

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवळात आज असलेल्या पूजामूर्तीच्या खाली तळघरात दुसरी एक लहान मूर्ती असून, तीच खरी मूळची गणेशमूर्ती होय. इस्लामी आक्रमणाच्या काळात केव्हातरी ती तळघरात दडवून ठेवली, ती आजही तिथेच आहे. या मूळच्या श्रीमूर्तीला १० सोंडा व २० हात असल्याचे सांगतात.

देवालयातील आजच्या पूजामूर्तीचे ध्यान मनोहर व प्रसन्न आहे. रुंद कपाळ, आसन मांडी, सोंड डावीकडे वळलेली व दोन्ही बाजूस ऋद्धी-सिद्धी, अशी ही मूर्ती आहे.

भाद्रपदातील गणेशोत्सव हा इथला प्रसिद्ध उत्सव होय. इथल्या गणपतीला महागणपती असे म्हणतात. [श्रीगणेशकोश]

रांधनछट

श्रावणातील शुद्ध षष्ठीला हे नाव आहे. या दिवशी गुजरातमधील स्त्रिया शीतलामातेची पूजा करतात. या दिवशी घरात शक्यतो विस्तव पेटवीत नाहीत. कारण त्या दिवशी शीतला माता घरात चुलीजवळ वावरत असते, अशी समजूत आहे. पाहा – शीतलासप्तमी.

राई

एक जमात. नेपाळमध्ये व पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यात या लोकांची वस्ती आहे. नेपाळ हे त्यांचे मूलस्थान आहे. राई हे या लोकांचे आधुनिक नाव होय. पूर्वी त्यांना किरंती किंवा कीचक म्हणत. त्यावरून हे किरात वंशाचे असावे, असे वाटते. गुरखा लोकांनी नेपाळ जिंकल्यावर तिथल्या किरंतींना त्यांनी राई ही बहुमानदर्शक उपाधी दिली. या लोकांत दुंगमाली, थुलुंग, खंबू, अंबोले, कोवे, इ. अनेक पोटभेद आहेत.

उद्योगधंदे – शेती करणे व लष्करात भरती होणे, हे यांचे प्रमुख व्यवसाय आहेत. यांच्यापैकी काही लोक स्वेटर वगैरे लोकरीची वस्त्रे विणतात.

विवाहप्रथा – मुलाकडील लोक मुलीला मागणी घालतात. मागणी घालण्यासाठी एखाद्या मध्यस्थाची योजना करतात आणि त्याच्याबरोबर बांबूच्या करंड्या, मद्य व मांस हे जिन्नस मुलीच्या घरी पाठवतात. मुलीच्या आईबापांनी होकार दिल्यास एका शुभ दिवशी नवरा मुलगा व त्याचे आईबाप मुलीच्या घरी जातात आणि मुलीचे देज देतात. लग्नाचा मुहूर्त नेहमी रात्रीचा असतो. विधवेला पुनर्विवाह करता येतो. यांच्यांत घटस्फोटाचीही चाल आहे. पत्नीच्या अपराधामुळे पतीने घटस्फोट घेतला, तर लग्नाचा सर्व खर्च दंड म्हणून पत्नीने पतीला द्यायचा असतो.

देवधर्म – हे लोक विष्णू, महादेव व देवी यांना भजतात. परुभांग हा यांचा सर्वश्रेष्ठ देव असून, कार्तिक व फाल्गुन या महिन्यांत ते त्याची पूजा करतात व त्याला डुकराचे मांस आणि मद्य अर्पण करतात. बुमे ही त्यांची कृषिदेवता असून, पेरणी झाल्यावर स्त्रिया घरोघरी तिला कोंबडी अर्पण करतात. पुरुष तिच्या प्रीत्यर्थ पौर्णिमेच्या रात्री नृत्य करतात. सिद्ध नामक देवाला ते दूध व गवत यांचा नैवेद्य दाखवतात. पूर्वी हे लोक गोमांसही खात असत; पण पुढे लढाईच्या निमित्ताने त्यांचा गुरखा जातीशी संबंध वाढल्यामुळे यांनी गोमांस वर्ज्य केले.

मृतकप्रथा – स्थानपरत्वे हे मृताचा संस्कार वेगवेगळ्या पद्धतींनी करतात. काही वेळा, काही संस्कार न करताच प्रेत नदीत फेकून देतात. मृताशौच तीन दिवस पाळतात. मृतात्म्याला सद्गती लाभावी व त्याने भूतयोनीत जाऊन घरातल्या लोकांना त्रास देऊ नये म्हणून त्याचे श्राद्ध करतात. [को. क. वे. वें.]

राई-दामोदर व्रत

ओडिसामधले एक स्त्रीव्रत. मुख्यत्वे विधवा स्त्रिया हे व्रत करतात. ते संपूर्ण कार्तिक मासभर चालते. विधवा या महिन्यात एकभुक्त राहून राई–दामोदराची नित्य पूजा करतात. शेवटचे पाच दिवस त्यांच्याबरोबर लक्ष्मीचीही पूजा करतात.

पुरी येथील जगन्नाथाच्या मुख्य पुजाऱ्याने आपली राई नावाची कन्या जगन्नाथाला अर्पण केली होती. तिने महालक्ष्मीची प्रार्थना केली, की वर्षातून निदान एक महिना तरी माझी जगन्नाथाबरोबर पूजा व्हावी. लक्ष्मीने ती विनंती मान्य केली. तेव्हापासून विधवा स्त्रिया पुढील जन्मी सौभाग्य मिळावे, म्हणून राई-दामोदराची पूजा करू लागल्या. [स्ट. ओ. फो.]

राउत

एक जात. हे लोक मुख्यत्वे मध्य प्रदेशात व अन्यत्रही काही ठिकाणी आढळतात. ही जात कोणत्या मानववंशाची ते निश्चित सांगणे कठीण आहे. रिस्लेच्या मते यांच्यांत बरेच आर्य रक्त मिसळलेले आहे. या लोकांचे अहीर, कवार व कोल या जातींशी मिश्रण झाले असावे. पूर्वी हे लोक भाडोत्री शिपाईगिरी करीत असावे.

यांच्यांत देवके आहेत. लग्नप्रसंगी हे लोक वधू-वरांच्या लाकडी मूर्ती करून मंडपात ठेवतात व त्यांना बोकड बळी देतात. यांच्यांत वारसाचे नियम हिंदूंच्या नियमांहून वेगळे आहेत. बंगालमधल्या राउतांत वडील मुलाला बापाची सर्व संपत्ती मिळते. त्याने आपल्या धाकट्या भावांना निर्वाहासाठी काहीतरी नेमणूक करून द्यायची असते. विधवेशी लग्न केलेले असल्यास तिला झालेल्या पुत्राला संपत्तीचा फार कमी वाटा मिळतो. वडील भाऊ निवर्तल्यास त्याची बायको ही त्याच्या धाकट्या भावाची बायको होते. तिच्या मुलांना वडिलार्जित संपत्तीवर पूर्ण हक्क मिळतो. मध्य प्रदेशातील राउतांमध्ये वडील मुलाला बापाची सर्व संपत्ती मिळत नसून, धाकट्या भावापेक्षा दोडपट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मोठा वाटा मिळतो. बापाने जिवंतपणीच वाटण्या केल्या, तर बापाला धाकट्या मुलाच्या एवढा वाटा मिळतो.

छत्तीसगड प्रदेशातले राउत स्वतःला कृष्णाच्या वंशातले अहिर अहिरा किंवा गहिरा असे म्हणतात. छत्तीसगडामधले सोवळ्या-ओवळ्याचे विधिनिषेध कडकपणे पाळणारे लोकही राउतांच्या हातचे अन्नोदक घेतात. कदाचित याचे कारण हे असेल, की कोण्यातरी काळी छत्तीसगडातल्या लोकांचे यांनी चक्रापासून संरक्षण केले असावे.

गोपालन हा इथल्या राउतांचा जीवनव्यवसाय आहे. गोपाळकृष्ण हा यांचा कुलदेव आहे. हे लोक दूल्हादेव व गोसाईदेव यांना भजतात; परंतु त्यांचा मुख्य उपास्य देव सॅहडा हा आहे. सॅहडा म्हणजे सांड किंवा पुष्ट बैल होय.

गोवरधनखुंदाना नावाचा एक उत्सव हे लोक करतात. त्यात शेणाचा मोठा ढीग करून तो गायीच्या पायाखाली तुडवतात. हा उत्सव दिवाळीमध्ये होतो. गोकुळातल्या गायी हिरव्या चाऱ्यासाठी गोवर्धन पर्वतावर चढल्या आणि तिथे श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वताचा उत्सव केला, त्याची ही स्मृती असावी. याप्रसंगी राउत लोक प्रत्येक गायीच्या गळ्यात सुहाई म्हणजे रक्षाकवच बांधतात. उत्सवात भडक वेषभूषा करतात. छातीवर कवड्या व पाठीवर मोरपंख हे त्या वेषभूषेतले एक महत्त्वाचे अंग असते. अशी वेषभूषा करून हे लोक दिवाळीच्या उत्सवात गल्लीगल्लीतून नाचत हिंडतात. त्या वेळी लाठीकाठी, फरीगदगा, इ. खेळही करतात. या उत्सवात त्यांचा आणखी एक विधी असतो, तो म्हणजे नवाखाई हा होय. त्याचा अर्थ नवान्नप्राशन असा आहे. मातरपूजा ही राउतांची विशेष पूजा आहे. मातर देवतेला ते कोंबडे व रानडुक्कर यांचा बळी देतात व बलिपशूला गायींच्या पायाखाली तुडवतात. आपल्या गोधनाला रोगराई होऊ नये, म्हणून हे पूजापर्व असते.

झासपूर येथील राउतांमध्ये वडाईक, नाईक आणि परप अशा तीन पोटजाती आहेत. हे लोक जानवे घालतात. दूल्हादेव व पितर यांना भजतात. यांच्या घरात किंवा गावात देवप्रतिमा असत नाहीत. गावातला बेंगा हा त्यांचा पुरोहित असतो. तो ग्रामदेवता आणि डोंगरातील भुतखेते यांची पूजा करतो.

विवाहप्रथा – हे लोक विवाहप्रसंगी दूल्हादेवाची पूजा करतात, तिचा विधी असा–मुलीला विवाहस्थळी पालखीतून नेतात. ओरॉंव लोक त्या पालखीचे भोई असतात. लग्न लागल्यावर तांदुळांची एक पुंजी घालतात. ते तांदूळ काळे ठिपके असलेल्या लालसर बोकडाला खायला लावतात. मग त्या बोकडाला कुऱ्हाडीने मारतात. त्याचे रक्त घरातल्या तांदुळावर शिंपडतात. वधू-वरांचे कल्याण व्हावे, म्हणून तीनदा प्रार्थना करतात. मग बोकडाचे मांस शिजवून त्याची मेजवानी देतात.

लग्नाच्या दुसऱ्या दिवशी न्हावी किंवा न्हावीण ह्यांच्याकडून आम्रवृक्षाची पूजा करतात. त्या वेळी झाडाभोवती सूत गुंडाळतात. तिथेच वराकडून तूप, धूप, गूळ आणि पीठ यांचा होम करतात. झाडाची एक फांदी कापून ती वधूच्या मांडवात रोवतात. हाच प्रकार वधूकडेही तिच्या हातून करतात. मग वधूवरांच्या कपाळी गुलाल लावतात. न्हावी आंब्याच्या पानाने वधूवरांना अभिषेक करून त्यांच्या वस्त्रांची गाठ बांधतो.

मृतकप्रथा – राउतांमधले जे सधन असतात, ते प्रेते जाळतात. गरीब माणसे, लहान मुले आणि अपघाताने मेलेली माणसे यांना पुरतात. झासपूरचे राउत प्रेते पुरतात. पुरताना मृताचे डोके उत्तरेकडे व तोंड आभाळाकडे करतात. प्रेतयात्रेत वाटभर साळी पेरीत जातात. मृताच्या डोक्याशेजारीही थोड्या साळी ठेवतात. प्रेत पुरल्या जागी कसलेही स्मारक उभारीत नाहीत. म. ज्ञा. को.; से. इं. १९३१; हिं. अ.]

राका

ऋग्वेदातील एक गौण देवता. पौर्णिमेला राका असे म्हटलेले आहे. ऋग्वेदात तिची पुढील मंत्राने प्रार्थना केलेली आहे (ऋ. २·३२·४) –

राकामहं सुहवां सुष्टुती हुवे शृणोतु नः सुभगा बोधतु त्मना ।
सीव्यत्वपः सूच्याच्छिद्यमानया ददातु वीरं शतदायमुक्थ्यम् ।।

अर्थ – जिला बोलवायला कष्ट पडत नाहीत, अशा राकादेवीला यथायोग्य स्तवन करून आम्ही पाचारण करतो. ती सौभाग्यशालिनी देवी आमची स्तुती ऐकून घेऊन ती मनास आणो. न मोडणाऱ्या सुईने ती आमचे (यज्ञ) कर्म पक्के शिवून टाकून एकत्र करो आणि शेकडो प्रकारे दानधर्म करणारा आणि सर्वांनी वाहवा करावी, असा वीरपुत्र आम्हांला देवो.

राकिणी

एक तांत्रिक देवता. श्रीविद्यार्णवतंत्रात हिचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे–द्वादशदल कमळातील कर्णिकेवर बसलेली, द्विमुख, कृष्णवर्ण, कुरकुरी व चतुर्भुज. चार हातांत कमळ, शूळ, कपाल व डमरू घेतलेली. गुडान्न भक्षण करणारी आणि रक्तात वस्ती करणारी. कालरात्री इत्यादी देवता तिच्या भोवती असतात.

राख

एखादी वस्तू किंवा पदार्थ जळल्यानंतर जी भुकटी उरते, तिला राख असे म्हणतात. फार प्राचीन काळापासून राखेचा धार्मिक कारणासाठी उपयोग केला जात आहे. कोणत्याही धार्मिक विधीला सुरवात करताना ब्राह्मण प्रथम अंगाला भस्म लावतात. त्यामुळे मनुष्य पवित्र होतो, अशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समजूत आहे. अंगाला भस्म लावताना जे घर्षण होते, ते आरोग्यदायकही असते. कारण त्यामुळे रुधिराभिसरण चांगले होते.

विशिष्ट राखेत साध्या राखेपेक्षा जास्त शक्ती असते, असे मानलेले आहे. होळीतील राख शारीरिक पीडा दूर करते किंवा ग्रहांची अशुभ दृष्टी टाळते; तसेच ती पिकांवरची किंवा खळ्यावरची वाईट नजर दूर करते. उपद्रवी प्राण्यांपासून संरक्षण व्हावे, म्हणून वांग्याच्या व मिरचीच्या झाडांवर रविवारी राख शिंपडावी, असेही सांगितलले आहे.

काही राख वैद्यकीय कारणासाठी वापरतात. कुंभाराच्या किंवा सोनाराच्या भट्टीतील थोडी राख आजारी माणसाच्या अंगाला लावतात आणि थोडी राख फडक्यात बांधून त्या माणसाच्या झोपण्याच्या जागेच्या वरच्या तुळईला बांधतात. नंतर येणाऱ्या रविवारपर्यंत रोज त्यातली थोडी राख घेऊन आजाऱ्याच्या अंगाला चोळतात. कुंभाराच्या भट्टीतील राखेने वाईट नजरेची दृष्टबाधाही नष्ट होते. मात्र कुंभार लोक आपल्या भट्टीतील राख द्यायला नाखूष असतात. कारण तसे केल्यास आपल्याला दारिद्र्य येईल, अशी त्यांना भीती वाटते. सोनार लोक कामाला सुरुवात करण्यापूर्वी आपल्या भट्टीतील राख घेऊन ती आपल्या कपाळाला व हत्यारांना लावतात.

चितेतील राखेचेही काही उपयोग सांगितलेले आहेत. भुताने पछाडलेल्या माणसाला चितेतील राख लावतात. पेरण्यापूर्वी सरकीला चितेतील रक्षा चोपडतात. नारळाच्या करवंटीत चितेतील राख घालून ती गोठ्यात पुरतात; त्यामुळे गुरांना आजार होत नाही, अशी समजूत आहे.

मंदिरात देवदर्शनासाठी गेल्यावर भाविक लोक तिथे भांड्यात ठेवलेली राख अंगारा म्हणून कपाळाला लावतात. त्यामुळे भुतांखेतांपासून संरक्षण होते, अशी त्यांची श्रद्धा असते. प्रवासाला निघण्यापूर्वी असा अंगारा घेऊन तो वस्त्राच्या एका टोकाला बांधून ठेवतात. त्यामुळे प्रवास निर्विघ्न होतो, अशी समजूत आहे. बैरागी लोक तर सर्वांगालाच राख फासतात.

उपद्रवी प्राण्यांना दूर ठेवण्यासाठी घराभोवती व गोठ्याभोवती राख पसरतात. आसन्नमरण माणसाच्या अंगात उष्णता उत्पन्न व्हावी, म्हणून त्याच्या हातापायांना राख चोळतात.

लिंगायत लोकांची अशी श्रद्धा आहे, की कपाळाला भस्म लावले असता, जर ब्रह्मदेवाने कपाळी काही वाईट लिहून ठेवले असेल, तर ते पुसून जाते. जानवे बदलण्याच्या वेळी हे लोक भस्मस्नान करतात.

गौतम बुद्धाच्या राखेवर अनेक ठिकाणी स्तूप किंवा दागोबा बांधलेले आहेत. सर्वसामान्य माणसाची रक्षा नदीत किंवा तीर्थक्षेत्रात विसर्जन करतात. [एन्सा. रि. ए.; की. पॉ.]

राखण

ब्राह्मण स्त्री प्रसूत झाल्यावर तिसऱ्या दिवशी ती ज्या खोलीत असेल, तिथला एक कोनाडा सुईण सारवते व त्यावर रांगोळी काढून, तिच्यावर कुंकवाचे पट्टे ओढलेले एक मडके ठेवते. त्या मडक्यात एक पैसा व सुपारी असते. हे मडके म्हणजेच राखण होय. त्याच्यामुळे नवजात बालकाचे संरक्षण होते, असे समजतात. [बदलापूर]

राग

हिंदुस्थानी संगीतातील एक संज्ञाविशेष. भारतीय संगीताचे परकीयांनी गौरविलेले आणि स्वकीयांनी वाखाणलेले अमोल लेणे म्हणजे रागव्यवस्था होय. इतर देशांच्या संगीतभांडारात रंजक स्वरसमूह आहेत, स्वरसंवाद करणारे स्वरमेल आहेत, लोकप्रिय चाली आहेत, गीतपद्धती आहेत; पण रागव्यवस्थेच्या आसपास येऊ शकेल असे काही नाही. कोणकोणते स्वरगुच्छ निश्चितपणे रंजक आणि रसपरिपोषक होतील, यांचा विचार करून भारतीयांनी जो रागरूपाचा विस्तार केला आहे, तो पाहिला म्हणजे आश्चर्य वाटते. गेल्या हजार वर्षांत स्वरस्थाने बदलली असतील, रागनामे बदलली असतील, रागांतले स्वर बदलले असतील, रागांची रूपे आणि त्यांच्याविषयीच्या समजुती बदलल्या असतील; पण स्वयमेव रंजकतेची जी रागान्तर्गत किमया आहे, ती तशीच अबाधित आहे. भैरव, मालकंस, हिंडोल असे प्राचीन राग वर्षानुवर्षे प्रचारात आहेत. त्यांच्या अवीट गोडीबद्दल रसिकांचे प्रशस्तिपत्र आहे आणि रागाचा साचा संभाळून त्यात हवी तेवढी भर घालायला वाव आहे.

रागांची उत्पत्ती – रागांची उत्पत्ती कशी झाली याविषयी काही आख्यायिकात्मक व शास्त्रीय उपपत्ती आहेत, त्या अशा –

> शिवशक्त्योः समायोगाद्रागाणां सम्भवोऽभवत् ।
> पञ्चास्यात् पञ्चरागाः स्युः षष्ठश्च गिरिजामुखात् ।।
> (संगीतदर्पण)

भावार्थ – शिव-शक्तींच्या संयोगातून रागांची उत्पत्ती झाली. शिवाच्या पूर्वमुखातून भैरव, पश्चिममुखातून हिंडोल, उत्तरमुखातून मेघ, दक्षिणमुखातून दीपक आणि आकाशोन्मुखातून श्री या रागांची उत्पत्ती झाली आणि सहावा कौशिक राग पार्वतीच्या मुखातून प्रगट झाला.

या सहा रागांच्या निर्मितीतच त्यांच्यांतून निघणाऱ्या रागिण्या आणि उपराग यांची बीजे आहेत.

रागाची शास्त्रोक्त उपपत्ती सांगितली आहे, ती अशी –

> सामवेदात् स्वरा जाताः स्वरेभ्यो ग्रामसम्भवः ।
> ग्रामेभ्यो जातयो जाता जातिभ्यो रागसम्भवः ।।
> सप्त स्वरास्त्रयो ग्रामा मूर्च्छनाश्चैकविंशतिः ।
> द्वाविंशतिश्च श्रुतयः एतेभ्यो रागसम्भवः ।। (बृहद्देशी)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – सामवेदातून स्वर, स्वरांतून ग्राम, ग्रामांतून जाती आणि जातींतून रागाचा जन्म झाला. सप्त स्वर, तीन ग्राम, एकवीस मूर्च्छना आणि बावीस श्रुती यांतूनच राग संभवतात.

निरनिराळ्या रागांची आणखी एक मानसशास्त्रीय उपपत्ती सांगता येईल, ती अशी –

मानव आपली सुखदुःखे, भावना, कल्पना, विचार वगैरे जेव्हा स्वरांकित गीतातून व्यक्त करू लागला, तेव्हा काही विशिष्ट स्वरांचे समूह अतिशय रंजक आणि विशिष्ट भावना प्रकट करणारे वाटतात, हे रहस्य त्याला कळले. मग प्रत्यक्ष प्रयोग, अनुभव आणि क्रिया यांतून त्याने रंजक व भावदर्शक असे चित्रविचित्र स्वरगुच्छ शोधले. हे स्वरगुच्छ म्हणजेच राग होत.

रागाची व्याख्या – राग कशाला म्हणावे, याविषयी संगीतशास्त्रात काही व्याख्या दिलेल्या आहेत, त्या अशा –

योऽसौ ध्वनिविशेषस्तु स्वरवर्णविभूषितः ।
रञ्जको जनचित्तानां स रागः कथितो बुधैः ॥

(बृहद्देशी)

अर्थ – स्वर आणि वर्ण यांनी भूषविलेला जो ध्वनिविशेष जनांच्या चित्ताचे रंजन करतो, त्याला विद्वानांनी राग म्हटले आहे.

रञ्जयति इति रागः । (संगीत समयसार)

भावार्थ – रञ्ज् या धातूपासून राग शब्द आलेला आहे. त्याचा अर्थ रंजन करणारा, आनंद देणारा असा होतो. जो ऐकताच मनाचे रंजन होऊन आनंद वाटेल, असा स्वरांचा सुसंघटित समूह म्हणजे राग होय.

प्राचीन रागव्यवस्था – मार्ग संगीत आणि देशी संगीत अशी संगीताची विभागणी आहे. त्या विभागणीप्रमाणे मार्ग राग व देशी राग अशी रागांचीही विभागणी केलेली आहे.

मार्ग राग – हे राग काटेकोर नियमांनी बद्ध आहेत. स्वर, स्वरस्थाने, ग्राम, मूर्च्छना, वर्ण आणि अलंकार या बाबतींत जे नियम ग्रंथांत सांगितले आहेत, ते मार्ग–राग गात असता कोणत्याही परिस्थितीत बदलता येत नाहीत. मार्ग संगीताप्रमाणेच मार्ग रागही सांप्रत भारतात अगर अन्यत्र गायिले जात नाहीत. या पद्धतीचे गायन गेली कित्येक शतके अस्तित्वातच नाही. देशी संगीताकडे झुकणारे जे राग आहेत, त्यांची उत्पत्ती मार्ग रागांतून असल्यामुळे ग्राम राग, शुद्ध राग आणि उपराग हे त्यांतून आले, अशी समजूत आहे.

देशी राग – श्रुती, स्वर, ग्राम, मूर्च्छना वगैरे गोष्टींच्या बाबतींत ज्यांत निर्बंध नाहीत, देशकालपरिस्थित्यनुसार रंजकता ही प्रतिज्ञा ठेवून ज्यांची रचना व क्रिया ठेविली जाते, ते देशी राग होत. रागांग, भाषांग, क्रियांग व उपांग या चार वर्गांत देशी रागांचा समावेश केलेला आहे.

भारतीय संगीतात उत्तरपद्धती आणि दक्षिणपद्धती असे दोन भेद प्रत्येक बाबतीत स्पष्ट जाणवतात. दोन्ही पद्धतींत सांप्रत ज्या पद्धतीने रागगायन केले जाते, त्याच पद्धतीने त्यांचा इथे विचार कर्तव्य आहे.

मेल किंवा थाट – पूर्वीच्या काळी मनोरंजक स्वरसमूहांची परिभाषा मूर्च्छनेची होती. अमुक ग्रामात अमुक स्वराची मूर्च्छना एवढे सांगितले, की स्वर, स्वरस्थाने, स्वरस्वरूप या सर्वांचा पूर्ण बोध होई आणि त्या विशिष्ट मूर्च्छनेच्या अनुषंगाने विविध स्वरगुच्छ, मोहक जाती आणि रंजक राग यांची सिद्धी होई. रागगायनक्रिया लोकप्रिय होऊन जसजशी व्यापक आणि विस्तृत होऊ लागली तसतशी परिभाषा जास्त स्पष्ट करणे, प्रत्येक विभागाची चौकट आणि मर्यादा ठरविणे व समजावून देणे क्रमप्राप्त झाले. मूर्च्छना पद्धतीने नवा अवतार घेतला. स्वराची मूर्च्छना म्हणण्याऐवजी कोमल, तीव्र या स्वरूपांत स्वरांची रूपे सांगण्यात येऊ लागली. श्रुतींच्या संख्यांत त्यांची नामे प्रचारात येऊ लागली. या आधुनिक पद्धतीचे नाव आहे मेल किंवा थाट. रागांची निर्मिती कशी होते, त्यांत विविधता कशी येते, हे मेलकल्पनेवरून सहजसुलभ रीतीने समजाविता येऊ लागले. गणिताच्या नियमांनी तिचे स्पष्टीकरणही करता येऊ लागले. आजच्या उत्तर आणि दक्षिण पद्धतींत थाट आणि मेल या कल्पनांवरूनच राग समजाविले जातात.

मेल या शब्दाची व्याख्या अभिनवरागमंजरीत दिलेली आहे, ती अशी –

मेलः स्वरसमूहः स्याद्रागव्यञ्जनशक्तिमान् ।

अर्थ – मेल म्हणजे स्वरसमूह. या स्वरसमूहात रागाचे व्यंजन करण्याची शक्ती असते.

मेलाची उत्पत्ती – अखिल भारतात गेली कित्येक वर्षे सर्वसाधारण व्यवहारासाठी स्थूल मानाने सात शुद्ध आणि पाच विकृत स्वर मानण्यात येतात. या बारा स्वरांपैकी निरनिराळ्या स्वरांचे संयोजन व संमीलन करून जे निरनिराळे स्वरसमूह किंवा स्वरगुच्छ होतील आणि ज्यांतून राग निघू शकतील, त्यांनाच मेल किंवा थाट म्हणतात. सा आणि प हे अचल स्वर; रे, ग, ध, नी यांची कोमल आणि तीव्र अशी प्रत्येकी २.२ रूपे; तसेच शुद्ध आणि तीव्र अशी मध्यमाची दोन रूपे मिळून बारा स्वरांचे सप्तक होते. शुद्ध मध्यमाचा विचार करून स्वरसप्तक मांडता येईल ते असे –

सा रे॒ रे ग॒ ग म प ध॒ ध नी॒ नी सां

या सप्तकाचे मध्यभागी दोन भाग असे करायचे – (१) सा रे॒ रे ग॒ ग म आणि (२) प ध॒ ध नी॒ नी सां. पहिल्याला पूर्वार्ध आणि दुसऱ्याला उत्तरार्ध म्हणतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पूर्वार्धातून जर दर वेळेस फक्त चारच स्वर घ्यायचे आणि उत्तरार्धातूनही दर वेळेस फक्त चारच स्वर क्रमाक्रमानेच घ्यायचे असे ठरविले, तर पूर्वार्धातून सहा व उत्तरार्धातून सहा असे समुदाय निघतात.

पूर्वार्ध–१ सा रे रे म २ सा रे ग् म ३ सा रे ग म ४ सा रे ग म ५ सा रे ग् म ६ सा ग् ग म्

उत्तरार्ध–१ प ध् ध सां २ प ध् नी सां ३ प ध् नी सां ४ प ध नी सां ५ प ध नी सां ६ प नी नी सां

मेल पूर्ण करण्यासाठी जर पूर्वार्धातील सहा प्रकारांचे उत्तरार्धातील सहा प्रकारांशी संयोग करायचे ठरवले, तर प्रत्येक पूर्वार्ध–मेलाशी उत्तरार्धातील सहा प्रकार हे सहा वेळा जोडले जातील आणि अशा रीतीने पूर्वार्धातील ६ तुकडे × उत्तरार्धातील ६ तुकडे = ३६ मेल निघू शकतील.

या ३६ प्रकारांत शुद्ध मध्यम आहे, तिथे तीव्र मध्यमाचा समावेश केला, तर आणखी ३६ प्रकार होतील. तेव्हा १२ स्वरांतून गणितसिद्ध असे फक्त ७२ मेल निघणे शक्य आहे. या ७२ मेलांतूनच सारे राग निघणार. म्हणून या ७२ मेलांना जनक मेल म्हणतात आणि त्यांतून उत्पन्न होणाऱ्या रागांना जन्य राग म्हणतात. जोपर्यंत १२ स्वरांचे संगीत आहे, तोपर्यंत असे ७२ मेलच निघणे शक्य आहे (चतुर्दण्डिप्रकाशिका).

रागांच्या जाती अशा–(१) संपूर्ण –आरोह आणि अवरोह या दोन्हींत प्रत्येकी सात स्वर असलेला. उदा० भैरव, कल्याण.

(२) षाडव – आरोह आणि अवरोह या दोन्हींत प्रत्येकी सहा सहा स्वर असलेला राग. उदा० मारवा.

(३) ओडव – आरोह आणि अवरोह या दोन्हींत प्रत्येकी पाच पाच स्वर असलेला राग. उदा० सारंग.

(४) संपूर्ण षाडव – आरोहात सात आणि अवरोहात सहा स्वर असलेला राग. उदा० मांड.

(५) संपूर्ण औडुव – आरोहात सात आणि अवरोहात पाच स्वर असलेला राग. उदा० दरबारी कानडा.

(६) षाडव-संपूर्ण – आरोहात सहा आणि अवरोहात सात स्वर असलेला राग. उदा० खमाज.

(७) षाडव-औडुव – आरोहात सहा आणि अवरोहात पाच स्वर असलेला राग. या जातीचे राग फारसे प्रचलित नाहीत.

(८) औडुव-संपूर्ण – आरोहात पाच आणि अवरोहात सात स्वर असलेला राग. उदा० शुद्ध-कल्याण.

(९) औडुव-षाडव – आरोहात पाच आणि अवरोहात सहा स्वर असलेला राग. उदा० सूरमल्हार.

रागांच्या स्वरूपावरून त्यांच्या शुद्ध, छायालग व संकीर्ण अशा मुख्य तीन जाती होतात.

रागवर्गीकरण– रागव्यवस्था ही अतिविस्तृत आणि व्यापक आहे. प्रत्येक कालखंडात तिच्यात भर पडत गेलेली आहे आणि तिचे स्वरूप आणि परिभाषाही बदलत गेलेली आहे. प्रत्येक कालखंडातील ग्रंथकारांनी आपल्या निवेदनपद्धतीला अनुसरून रागांचे वर्गीकरण केलेले आहे; तसेच सोपेपणा यावा, स्पष्टीकरण व्हावे या हेतूने परिभाषा वापरली आहे. गणिताच्या पद्धती वापरण्यापेक्षा इतर आलंकारिक पद्धतींवर प्रारंभीच्या काळात भर दिलेला दिसतो. गणिताच्या पद्धती हळूहळू आलेल्या आहेत.

संगीतरत्नाकरात रागांची दहा वर्गांत विभागणी केलेली आहे, ती अशी– ग्रामराग, उपराग, राग, भाषा, विभाषा, अंतर्भाषा, रागांग, भाषांग, क्रियांग, उपांग.

आधुनिक रागव्यवस्थेमध्ये उत्तर किंवा हिंदुस्थानी पद्धतीनुसार सर्व रागांचे वर्गीकरण दहा थाटांतून केले जाते. प्रत्येक

हिंडोल राग – कांगडा शैलीचे चित्र

थाट (किंवा मेल), त्याची स्वरादी वैशिष्ट्य आणि त्यात येणारे राग यांचे वर्णन अभिनवरागमंजिरी या ग्रंथात केले आहे, ते पुढीलप्रमाणे –

(१) कल्याण थाट – सर्व स्वर शुद्ध. मध्यम तीव्र (सा रे ग म प ध नी सां) या थाटातील एकूण राग तेरा आहेत –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यमन, भूपाली, शुद्ध, चंद्रकांत, जयत, मालश्री, हिंडोल, हमीर, केदार, कामोद, श्यामकल्याण, छायानट, गौडसारंग.

(२) बिलावल थाट – सर्व स्वर शुद्ध. (सा रे ग म प ध नी सां) या थाटात एकूण अठरा राग आहेत – शुद्ध बिलावल, अलय्या, शुक्ल, देवगिरी, यमनी, ककुभ, नट, लच्छासाग, सर्पदा, बिहाग, देसकार, हेमकल्याण, नटराग, पहाडी, मांड, दुर्गा, मलुहा, शंकरा.

(३) खमाज थाट – सर्व स्वर शुद्ध. फक्त निषाद कोमल. (सा रे ग म प ध नी सां) या थाटातून एकूण अकरा राग निघतात– झिंजोटी, खमाज, द्वितीय दुर्गा, तैलंगी, रागेश्वरी, खंबावती, गारा, सोरठी, देसराग, जयजयवंती, तिलककामोद.

(४) भैरव थाट – ऋषभ व धैवत हे दोन स्वर कोमल. बाकी सगळे स्वर शुद्ध. (सा रे ग म प ध नी सां) या थाटात एकूण चौदा राग आहेत – भैरव, रामक्री किंवा रामकली, बंगालभैरव, सौराष्ट्र टंक, प्रभातभैरव, शिवभैरव, आनंदभैरव, अहीरभैरव, गुणक्री किंवा गुणकली, कलिंग, जोगिया, बिभास, किंवा विभास, मेघरंजनी.

(५) पूर्वी थाट – ऋषभ व धैवत कोमल, मध्यम तीव्र आणि बाकी सर्व स्वर शुद्ध. (सा रे ग म प ध नी सां) या थाटात एकूण दहा राग आहेत– पूर्वी, पूर्याधनाश्री, जेताश्री, परज, श्रीराग, गौरी, मालवी, त्रिवेणी, टंकी, वसंत.

(६) मारवा थाट – ऋषभ कोमल, मध्यम तीव्र व बाकी सर्व स्वर शुद्ध. (सा रे ग म प ध नी सां) या थाटात एकूण बारा राग आहेत– मारवा, पूरिया, जैत, मालीगौरा, साजगिरी, वराही, ललित, सोहनी, पंचम, भटियार, विभास, भंखार.

(७) काफी थाट – गंधार व निषाद कोमल आणि अन्य सर्व स्वर शुद्ध. (सा रे ग म प ध नी सां) या थाटात एकूण अठ्ठावीस राग आहेत. काफी, सैंदवी, सिंधुरा, धनाश्री, भीमपलास, धानी, पटमंजरी, पटदीपकी, हंसकंकणी, पीलू, बागीश्वरी, सहाना, सूहा, सुघराई, नायकी कानडा, देवसाग, बहार, वृंदावनी सारंग, मध्यमादी सारंग, सामंत सारंग, शुद्ध सारंग, मियाकी सारंग, बडहंस सारंग, शुद्ध मल्हार, मेघ, मियां मल्हार, सूरमल्हार, गौडमल्हार.

(८) आसावरी थाट – गंधार, धैवत व निषाद हे स्वर कोमल आणि बाकी सर्व स्वर शुद्ध. (सा रे ग म प ध नी सां) या थाटात एकूण दहा राग आहेत –आसावरी, जौनपुरी, देवधार, सिंधुभैरवी देसी, षट् (खट्), कौशी कानडा, दरबारी अडाणा, अडाणा, दुसरी नायकी.

(९) भैरवी थाट – ऋषभ, गंधार, धैवत आणि निषाद हे चार स्वर कोमल व बाकी सर्व स्वर शुद्ध. (सा रे ग म प ध नी सां) या थाटात पाच राग आहेत– भैरवी, मालकंस, आसावरी, धनाश्री, बिलासखानी.

गुणकली रागिणी – कांगडा शैलीचे चित्र

(१०) तोडी थाट – ऋषभ, गंधार व धैवत कोमल आणि मध्यम तीव्र. (सा रे ग म प ध नी सां) या थाटात तीन राग आहेत– तोडी, गुर्जरी किंवा गुजरी तोडी आणि मुलतानी तोडी.

कर्नाटक संगीतातील ७२ मेल पुढीलप्रमाणे आहेत– कनकांगी, रत्नांगी, गानमूर्ती, वनस्पती, मानवती, तानरूपी, सेनापती, हनुमत्तोडी, धेनुका, नाटकप्रिया, कोकिलप्रिया, रूपवती, गायकप्रिया, घटभूषणी, मायामालव गौड, चक्रवाक, सुयुक्ता, हाटकांबरी, झंकारध्वनी, नरभैरवी, किरवाणी, खरहरप्रिया, गौरीमनोहरी, वरुणप्रिया, माररंजनी, चारुकेशी, सरसांगी, हरिकामोदी धीरशंकराभरण, नागानंदिनी, योगप्रिया, रागवर्धनी, गांगेयभूषणी, वागीश्वरी, शूलिनी, चलनाट, सालग, जलार्णव, झल्लवराळी, नवनीत, पावनी, रघुप्रिया, गवांबोधिनी, भवप्रिया, शुभपंतुवराळी, षड्विधमार्गिणी, सुवर्णांगी, दिव्यमणी, धवलांबरी, नामनारायणी, कामवर्धनी, रामप्रिया, गोमुखी, विश्वंभरी,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शामलांगी, षण्मुखी, सिंहेंद्र मध्यम, हेमवती, धीमोहिनी, नीतिमती, कौतुकामरण, खेचरांगी, लतांगी, वाचस्पती, मेचकल्याणी, चित्रांगी, सुचरित्रा, ज्योतिस्वरूपिणी, धातुवर्धनी, नासिकभूषण, कोसलांगी, रसिकप्रिया.

कर्नाटक संगीतातील या ७२ मेलांपैकी पहिले ३६ मेल शुद्धमध्यमप्रधानक असून, नंतरचे ३६ मेल प्रतिमध्यमप्रधानक आहेत.

या ७२ मेलकर्ता रागांतून षाडव, ओडव, वर्ज्य आदी स्वरभेदांनी अनेक राग संभवतात. दाक्षिणात्य पद्धतीचे हे वर्गीकरण आधुनिक रागांनाच नव्हे, तर यापुढे जे नवीन मिश्र राग तयार होतील, त्यांनाही उपयोगी पडेल, असे वेंकटमखीने म्हटले आहे (चतुर्दंडिप्रकाशिका ४·८० – ९२). उत्तर पद्धतीच्या दहा थाटांची व्यवस्था अपुरी असून, तिच्यात बदल झाला पाहिजे व थाटसंख्या वाढली पाहिजे, असे कित्येक पंडितांचे म्हणणे आहे.

पूर्वांग आणि उत्तरांग — ‘सा रे ग म प ध नी सां’ या सप्तकातील स्वरांचे मध्यम (म) या स्वराशी दोन भाग पाडले तर चार चार स्वरांचे असे दोन विभाग किंवा समूह होतात. यांपैकी सा रे ग म या भागाला पूर्वांग आणि प ध नी सां या भागाला उत्तरांग असे म्हणतात; परंतु प्रचारात मात्र सा रे ग म प हे पूर्वांग व म प ध नी सां हे उत्तरांग मानले जाते.

रागांची निर्मिती ही षड्ज, मध्यम आणि गंधार या तीन ग्रामांतून होते. त्यामुळे या तीनही ग्रामांत स्वरांचे परस्पर संवाद कसे होतात, ते एकमेकाला बिंब-प्रतिबिंब, ध्वनि-प्रतिध्वनीप्रमाणे पूरक आणि साहाय्यक कसे ठरतात हे प्रश्न उपस्थित होतात. संगीतातील श्रुतिस्वरसंवाद हा सर्वांत मोठा वादग्रस्त विषय आहे.

कोणत्याही रागाचे सौंदर्य, त्यांतल्या स्वरांना कसे, किती, कुठे आणि केव्हा महत्त्व द्यायचे यावर अवलंबून असते. रागांच्या स्वरांना महत्त्व देण्याचे सारे नियम या श्रुतिसंवाद आणि स्वरसंवाद निर्णयातूनच स्पष्ट होतात. यावरून या विभागाची महती कळून येते. रागाला आवश्यक असणाऱ्या वादी, संवादी, अनुवादी, इ. स्वरांची मांडणी कसकशी आहे, त्यांचे कार्य काय आणि त्यांची निश्चिती कशी हे सारे रागरंजनाचे रहस्य आहे.

वादी स्वर – कोणत्याही रागाचा जीवस्वर, प्राणस्वर, महत्त्वाचा स्वर किंवा आत्मा म्हणजे वादी स्वर होय. वादी स्वराशिवाय रागच संभवत नाही. रागाला लागणाऱ्या स्वरांमध्ये या स्वराचे उच्चारण बाकीच्या सर्व स्वरांपेक्षा कितीतरी पटीने जास्त असते आणि या स्वरावर वारंवार थांबून त्याला जाहीर केले जाते. वादी शब्दाची व्याख्या संगीतरत्नाकरात केली आहे, ती अशी – ‘प्रयोगो बहुधा यस्य वादिनं तं स्वरं जगु:’=ज्या स्वराचा प्रयोग वारंवार केला जातो, त्याला वादी म्हणतात. वादी स्वराचा परिणाम रागाची प्रकृती, समय, अंग आणि धर्म ठरवितो. उदा० राग भूप – वादी गंधार, राग बागेश्री – वादी मध्यम, राग सारंग – वादी ऋषभ, राग भैरवी – वादी धैवत.

संवादी स्वर – वादी स्वराशी संवाद करणारा, वादी स्वराच्या खालोखाल ज्याचे महत्त्व आहे असा, वादी स्वराला पूरक व साहाय्यक जो स्वर असतो, त्याला संवादी स्वर म्हणतात. रागात याचे उच्चारण वादी स्वरापेक्षा केव्हाही कमी, पण अन्य स्वरांपेक्षा कितीतरी जास्त असते. याही स्वरावर



बिभास राग – राजपूत शैलीचे चित्र

थांबून तो दर्शविला जातो. रागाची छाया दाखविणाऱ्या इतर स्वरांमध्ये हा फार महत्त्वाचा असतो. वादी-संवादी स्वरांच्या जोडीनेच रागमूर्ती आकार घेते. उदा० राग भूप – संवादी धैवत, राग बागेश्री – संवादी तार षड्ज, राग सारंग – संवादी पंचम, राग भैरवी – संवादी गंधार.

वादी-संवादी स्वरांच्या जोडीने कोणत्याही रागाचे वैशिष्ट्य आणि स्वरूप ठरते. दोन रागांचे स्वर सारखेच असू शकतात; पण जर वादी-संवादी स्वर भिन्न असतील, तर त्यांच्यांत फार फरक पडतो आणि त्यांच्यांतील वेगळेपणा जाणवतो. उदा० भूप व देशकार यांचे स्वर तेच आहेत; पण भूप रागात वादी-संवादी स्वर ग–ध आहेत; तर देशकारात ध–ग हे स्वर आहेत. वादी-संवादी जोडचा षड्ज-पंचम भावाने (सा–प, रे–ध, ग–नी, म–सां) आणि षड्ज–मध्यम भावाने (सा–म, रे–प, ग–ध, म–नी, प–सां) अशा तऱ्हेने येतात.

वादी स्वराचे उच्चारण रागात सर्वांत जास्त असल्यामुळे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यावरून रागाचे अंगही समजते. वादी स्वर जर पूर्वांगात (सा, रे, ग, म) असेल, तर त्याला पूर्वांग राग म्हणतात आणि जर उत्तरांगात असेल, तर उत्तरांग राग म्हणतात. भूप रागाचा वादी स्वर गंधार पूर्वांगात म्हणून तो पूर्वांग राग आणि देशकाराचा वादी स्वर धैवत उत्तरांगात म्हणून तो उत्तरांग राग होय.

वादी–संवादी स्वरांच्या जोड्या एक पूर्वांगात तर दुसरी उत्तरांगात अशा क्रमाने असतात आणि वादीच्या खालोखाल संवादीचे उच्चारण असल्यामुळे वादी स्वरामुळे एक अंग (पूर्वांग किंवा उत्तरांग) आणि संवादी स्वरामुळे दुसरे अंग या दोन्हीचे यथायोग्य उच्चारण होऊन सप्तकाचा समन्वय सुंदर रीतीने साधला जातो.

अनुवादी स्वर– वादी आणि संवादी या स्वरांनंतर रागामध्ये जे इतर स्वर घेतले जातात, त्यांना अनुवादी स्वर अशी संज्ञा आहे. या स्वरांमध्ये एका श्रुतीचे अंतर असू नये असा नियम आहे. रागाच्या वादी–संवादी स्वरांना अनुवादी स्वर

वून घेतले, त्यांचा दर्जा जाणून घेतला आणि स्वतःच्या प्रतिभेने स्वरपुंज रचून राग गायिला, तर त्याच्या रंजकतेचा प्रत्यय येतो. या दृष्टीने या सर्व विभागांचा किती खोलवर विचार भारतीय संगीतात केला आहे, हे स्पष्ट होईल.

समयानुसार रागगायन – भारतीय संगीतात रागांची योजना ऋतूंना अनुसरून आहे, अशीही एक समजूत आहे. सर्व रागव्यवस्थेचे मूलाधार जे सहा राग आहेत, ते समयानुकूल रीतीने सहा विशिष्ट ऋतूंमध्ये गायिल्यास निसर्गतः सुशोभित होतात. हाच नियम त्यांच्या रागिण्या, उपराग व उपरागिण्या यांनाही स्थूल मानाने लाविला जातो. सहा रागांचे सहा ऋतू कोणते याबद्दल मात्र मतभेद आहेत. संगीतातील शिवमत (रागविबोधकार पं. सोमनाथ याचे मत) आणि कृष्णमत (संगीतरत्नाकराचा टीकाकार पं. कल्लीनाथ याचे मत) यांच्यानुसार आणि हनूमन्मत आणि भरतमत मानणाऱ्या ग्रंथांनुसार मूळ सहा राग (ज्यात मतभेद आहे) आणि ते गाण्याचे ऋतू असे–

मत	वसंत	ग्रीष्म	वर्षा	शरद्	हेमंत	शिशिर
शिव	२ वसंत	४ भैरव	५ मेघ	३ पंचम	६ नटनारायण	१ श्री
कृष्ण	२ वसंत	४ भैरव	५ मेघ	३ पंचम	६ नटनारायण	१ श्री
भरत	३ हिंडोल	४ दीपक	६ मेघ	१ भैरव	५ श्री	२ कौशिक
हनूमत्	३ हिंडोल	४ दीपक	६ मेघ	१ भैरव	५ श्री	२ कौशिक

साधारण साहाय्य करतात. या स्वरांच्या उच्चारणांनीच राग परिपूर्ण होऊ शकतो. या स्वरांचे उच्चारण कमी होते, म्हणूनच वादी–संवादी स्वरांचे जास्त उच्चारण शक्य होते, शोभून दिसते आणि उठाव आणते. उदा० राग भूप–सा, रे, प; राग बागेश्री– ध, नी, ग.; राग सारंग–नी, सा, म्

विवादी स्वर– रागाला रंजकता आणणारे वादी, संवादी आणि अनुवादी हे जसे स्वर आहेत, तसा रागाचा रसभंग करणारा जो स्वर असेल, त्याला विवादी स्वर म्हणतात. रागातून हा वर्ज्य करावा लागतो. म्हणून त्याला वर्ज्य स्वर असेही नाव आहे. हा स्वर जर रागगायनात चुकून उच्चारला गेला, तर तो रागाचे मूळचे स्वरूप आणि माधुर्य नष्ट करून टाकतो. म्हणून तो सर्वस्वी टाळायचा असतो.

वादी-संवादी-अनुवादी-विवादी या स्वरांचे महत्त्व नीट समजा-

ऋतूला अनुकूल असेल, तोच राग गायिला तर वातावरणनिर्मिती होते आणि रागही खुलतो. सृष्टीमध्ये जसे चक्रनेमिक्रमाने हे सहा ऋतू येतात, तसेच ते दिवसाच्या चोवीस प्रहरांमध्येही असतात; म्हणून जो राग ज्या ऋतूचा असेल तोच राग दिवसाच्या प्रहरात तो ऋतू आला म्हणजे गायचा, अशा तऱ्हेने या सहा रागांची एका दिवसातही स्थूल मानाने वाटणी केलेली आहे.

रागांची ही समयानुसार वाटणी आणि तिचे काटेकोर पालन करावे किंवा कसे हा संगीतक्षेत्रात मोठा वादविषय झालेला आहे. समयानुसार राग गायिल्यास ते रंजकता वाढवितात, असा आपला अनुभव सांगणारे अनेक गायक, वादक आहेत. योग्य रीतीने, तयार गायकाने कोणताही राग केव्हाही गायिला, तरी तो रंजकच ठरेल, असे दुसरा पंथ प्रतिपादन करतो. प्रत्यक्ष

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परिस्थिती पाहिल्यास गायक-गायिका राग-रागिण्यांच्या नियत नियमांपासून व समयापासून फारसे दूर जात नाहीत, असे अनुभवास येते. हा कदाचित वर्षानुवर्षांच्या संस्कारांचाही परिणाम असू शकेल.

राग शब्दाचा उल्लेख इ. स.च्या पाचव्या शतकातील मतंगकृत बृहद्देशी ग्रंथापासून आढळतो; पण समयाचा विचार मात्र आठव्या शतकातील ग्रंथांत आढळतो. पुष्कळशा ग्रंथांत याचे स्पष्ट व सुसूत्र विवेचन आढळत नाही. राग आणि त्यांचे समयानुसार गायन ही गोष्ट उत्तर पद्धतीतच जास्त प्रकर्षाने आढळते. दाक्षिणात्य पद्धतीत असे नियम नाहीत. या सर्व गोष्टींमुळे हा विषय जास्त वादग्रस्त झाला आहे.

भारतीय संगीताच्या उत्तर पद्धतीत समयानुसार रागगायन निश्चित करण्याची आणखी एक पद्धती आहे आणि ती जवळजवळ सर्वमान्य आहे. सप्तकाचे सा रे ग म आणि प ध नी सां हे दोन पूर्वांग आणि उत्तरांग असे जे भाग पडतात, त्यांवर ही पद्धती अवलंबून आहे. ज्या रागांचे वादी स्वर पूर्वांगात असतील, त्यांना पूर्वांगवादी राग किंवा पूर्वराग म्हणतात आणि ज्यांचे वादी स्वर उत्तरांगात असतील त्यांना उत्तरांगवादी किंवा उत्तरराग म्हणतात. स्थूल मानाने पूर्वांगातील रागांच्या वादी स्वराचे क्षेत्र षड्जापासून पंचमापर्यंत असते (सा रे ग म प) आणि उत्तरांगातील रागांच्या वादी स्वराचे क्षेत्र मध्यमापासून तार षड्जापर्यंत असते. मध्यम आणि पंचम हे स्वर पूर्व राग आणि उत्तर राग या दोन्हींचे वादी होऊ शकतात. दुपारी बारा वाजल्यापासून मध्यरात्री बारा वाजेपर्यंत पूर्वांगवादी किंवा पूर्वराग गायिले जातात आणि रात्री बारा वाजल्यापासून दुपारी बारा वाजेपर्यंत उत्तरांगवादी राग गायिले जातात.

रागनामांची कुळकथा–भारतीय संगीतात जी रागनामे आहेत, ती समाजजीवनातील प्रचलित कल्पनांवरूनच आलेली आहेत.

(१) ऋतुनामांवरून आलेले राग–वसंत.

(२) देवतांच्या नावांवरून आलेले राग–भैरव, गौरी, भैरवी, नारायणी.

(३) स्वरकल्पना देणारे राग–पंचम, द्विगंधार (देवगंधार), खट (षट–सहा रागांच्या स्वरांनी मिळून बनणारा.)

(४) प्रदेशांवरून आलेली रागनामे–सिंधवी–सिंध प्रांतावरून. बंगाल–बंगाल प्रांताच्या नावावरून. मारू–मारवाड देश, तिलंग–तेलंगण, सोरठ–सौराष्ट्र, कानडा–कर्नाटक, वृंदावनी–वृंदावन, मालव–माळवा, गंधार–कंदाहार, पूर्वी–पूर्वेकडील प्रांत, अशी निरनिराळ्या प्रदेशांच्या नावांवरून मिळालेली.

(५) विविध लोकांवरून आलेली रागनामे–गौड–गौड देशांतल्या लोकांवरून मिळालेले नाव. अहीर–अहीर. श्याम–सयामी लोक. गुर्जरी–गुर्जर लोक. नट–सोंगे घेणारे नट लोक.

त्या त्या देशांत व त्या त्या लोकसमुदायांत जे जे स्वरपुंज लोकप्रिय व रंजक ठरले, त्यांतून रागनिर्मिती झाली आणि त्या स्वरपुंजांच्यामुळे त्यांना ते ते नाव मिळाले. तिलंग राग हा तेलंगणातील लोकगीतांत जी धुन (वारंवार येणारा रंजक स्वरपुंज) येई, तीवरून निर्मिला गेला. श्याम देशात (सयाममध्ये) गायिला जाणारा कल्याण तो श्याम कल्याण व गुर्जर लोकांमधल्या लोकप्रिय गीतांतून निघालेली तोडी ती गुर्जरी तोडी.

(६) संयुक्त रागनामे–दोन रागांच्या मिश्रणामुळे बनलेली–वसंतबहार, नटभैरव, पूर्वीकल्याण, छायानट, केदारगौड.

(७) रागनिर्मात्यांच्या नावांवरून आलेली रागनामे–रामदासी मल्हार; राजनारायण; मिराबाई की मल्हार; मियां की मल्हार, मियाँ की सारंग, मियाँ की तोडी. (हे सर्व राग मियाँ तानसेन याने निर्मिले असे सांगतात.)

रागांची शृंगारस्वरूपे किंवा रागध्याने–संगीत ही एक स्वरांची भाषा आहे. प्रत्येक स्वर अंतःकरणात भावतरंग निर्माण करतो. अशा स्वरांचा मनोरंजक स्वरपुंज म्हणजे राग होय. या स्वरपुंजांच्या श्रवणाने निरनिराळे भावतरंग निर्माण होऊन मनात त्या तरंगाच्या विचाराकृती, चित्राकृती किंवा भावाकृती निर्माण होतात. एक राग एक संस्कार करतो, म्हणून एका रागाच्या आकृतीत काही सुसूत्रता, सुसंगती असते आणि मनात निर्माण झालेले विचार एक आकृती घेतात. ही विचारांची आकृती जे संपूर्ण स्वरूप घेते, त्याला रागाचे शृंगारस्वरूप किंवा रागाचे ध्यान असे नाव संगीताचार्यांनी दिलेले आहे. संगीताच्या विविध ग्रंथांतून रागांची शृंगारस्वरूपे किंवा ध्याने आढळतात.

रागाचे माहात्म्य व संकेत–रागांचे माहात्म्य आणि त्यांच्याविषयींचे संकेत हा संगीतातला एक प्राचीन आणि मनोरंजक भाग आहे. या समजुती अनेक आहेत आणि कित्येकदा त्यांत सुसूत्रता आढळत नाही. कल्याण, शंकरा, भैरव आणि केदार हे शंकराचे प्रिय आणि शिवस्वरूप असे राग आहेत. त्यांच्या आळवणीने नटेश्वर शिव प्रसन्न होतो. गौरी रागाने पार्वतीमाता प्रसन्न होते. नारायणी व धनाश्री या रागांच्या गायनाने महालक्ष्मी प्रसन्न होते. बहार रागामुळे फुले उमलतात. रागिणी अहीरी ही एका दिवसाचा उपास, पूजा किंवा अन्य काही शरीरकष्ट घेतल्याशिवाय गायिल्यास गवयाला विवश करते. भावनायुक्त प्रातर्गेय रागगायनाने संगमरवरी दगडही पाझरतो. बिलासखानी तोडी हा राग गाऊन तानसेनाच्या प्रेताला त्याच्या बिलासखान नामक पुत्राने स्मित करायला लावले. मुथ्थुस्वामी दीक्षितार यांनी अमृतवर्षिणी राग गाऊन पाऊस पाडला. तानसेनाने दीपक राग गाऊन दिवे प्रज्वलित केले. त्यानेच शंकरा राग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गाऊन मस्त हत्तीला वठणीवर आणले. [श्री. श्री. गो. सोहनी]

रागेश्वरी हिंदुस्थानी संगीतातील एक रागिणी. ही महानना जातीतील आहे. बागेसरीतील कोमल गंधाराऐवजी हिच्यात तीव्र गंधार लागतो. हिच्या आरोहावरोहांत पंचम आणि आरोहात ऋषभ वर्ज्य असतो. ही औडव-षाडव वर्गातील असून, गंधार हा तिचा वादी स्वर आहे. आरोह – सा ग म ध नी सां आणि अवरोह – सां नी ध म ग म रे सा असा आहे. गानसमय – रात्रीचा दुसरा प्रहर. सा नी ध सा ग हे रागेश्वरीचे गुंजनस्थान आहे. [क. सं.]

राघवचैतन्य (इ. स. चे १५ वे शतक) संतश्रेष्ठ तुकारामांच्या गुरुपरंपरेतील आदिपुरुष. रघुनाथ हे याचे मूळ नाव. गिरनार पर्वताच्या परिसरात वसलेल्या एका शौर्यकुळात याचा जन्म झाला. याचे वडील यवनांच्या नोकरीत होते. रघुनाथाने पित्याच्या आज्ञेवरून गिरनार पर्वतावर बराच काल दत्ताची उपासना केली; परंतु दत्तदर्शन होत नाही, असे पाहिल्यावर त्याने पर्वतावरून उडी घ्यायचे ठरविले. तो खाली उडी टाकणार तोच त्याला दत्तात्रेयाने दर्शन दिले आणि जुन्नरजवळच्या ओतुर गावी जाऊन योगानुष्ठान करण्याचा आदेश दिला. ' तिथे तुला व्यासांचा उपदेश होईल ' असेही दत्तात्रेयाने त्याला सांगितले.

तदनुसार रघुनाथाने ओतुरला जाऊन मांडवीच्या तीरावर पार्थिव लिंगाची उपासना सुरू केली. पुढे अन्नवस्त्राचा त्याग करून त्याने बरीच वर्षे घोर तप केले. तरीही व्यासांचा उपदेश होईना; म्हणून तो आत्मक्लेशाला प्रवृत्त झाला. पार्थिव लिंगासमोर एका दगडावर डोके आपटून घ्यायला त्याने सुरुवात केली. त्यामुळे डोके फुटून त्याची शुद्ध हरपली. थोडया वेळाने शुद्धीवर आल्यावर तो पुन्हा डोके आपटू लागला. त्याची अशी ही तीव्र जिज्ञासा पाहून अखेर व्यासांनी त्याला दर्शन दिले आणि 'ॐ नमो भगवते वासुदेवाय ' हा गुरुमंत्र दिला. राघवचैतन्य असे त्याचे नवे नामकरण करण्यात आले. मग दत्तात्रेयानेही त्याला पुनर्दर्शन देऊन चतुःश्लोकी भागवताची शिकवण दिली व संप्रदायप्रसाराची आज्ञा केली.

व्यासदर्शनानंतर राघवचैतन्य लेण्याद्रीला गला. तिथे त्याने गणेशाची आराधना केली. तिथेच त्याची व केशवभट राजर्षी याची भेट झाली व केशवभटाने त्याचे शिष्यत्व पत्करले. नंतर वाई मुक्कामी राघवाची आणि महमुदशहा बहामनीची भेट झाली. महमुदशहाचा आजार त्याने बरा केला. त्यामुळे त्याची राघवचैतन्यावर श्रद्धा बसली. परिणामी गुलबर्ग्याकडील हिंदु-मुसलमानांत त्याच्यासंबंधी आदर वाढला. आळंदचे पंडित व जोशी हे त्याचे अनुयायी बनले. लेण्याद्रीहून पुन्हा तो ओतुरला आला. तिथे त्याने विश्वनाथ नरसो राजर्षी याला उपदेश देऊन त्याचे केशवचैतन्य असे नाव ठेवले. मग केशवाला बरोबर घेऊन राघवाने तीर्थयात्रा केल्या. या यात्रेंत तो कल्याणीजवळच्या आळंदला आला आणि तिथेच त्याने जीवत्समाधी घेतली. या समाधिस्थानाला सांप्रत दर्ग्याचे रूप प्राप्त झाले आहे.

राघवचैतन्याने संस्कृत व मराठी भाषेत बरेच ग्रंथ लिहिले आहेत, त्यांची नावे अशी – ब्रह्मस्वरूप, मायाविचार, ईशस्तवन, योगनिद्रा, सनातनधर्मविचार, बुद्धिविकास, इंद्रियदमन, त्रिगुणलीला, निराकारमन व जितेपणी मरण. त्याचे महागणपतिस्तोत्रम् हे काव्यमालेत आले आहे व दोन संस्कृत श्लोक हरिकवीच्या सुभाषितहारावलीत प्रसिद्ध झालेले आहेत.

राघवचैतन्याचे शिष्य विविध जातींत विखुरलेले आहेत. [संत तुकाराम–श्री. वा. सी. बेंद्रे, १९६३; तु. म. गु. प.]

राघवदास (इ. स. चे १८ वे शतक) एक राजस्थानी संतकवी. हा दादू दयाळाच्या शिष्यपरंपरेत होऊन गेला. हा क्षत्रिय जातीचा असून, प्रल्हाददास असे त्याच्या गुरूचे नाव आहे. याने भक्तमाल नावाच्या ग्रंथाची रचना केली आहे. या ग्रंथात दादूपंथी प्रधान महंतांची चरित्रे आहेत. त्यामुळे दादूपंथाचा इतिहास लिहिताना या ग्रंथाचा आधार घ्यावा लागतो. ग्रंथाची भाषा राजस्थानी असली, तरी तिच्यावर व्रजभाषेची छाप आहे. याची कविता साधी, सरळ आणि कमी शब्दांत अधिक भाव व्यक्त करणारी आहे. [रा. भा. सा.]

राघवद्वादशी ज्येष्ठ शुद्ध द्वादशीला हे नाव आहे. त्या दिवशी एक काम्यव्रत करतात, त्याचा विधी असा – रामलक्ष्मणांच्या सुवर्णमूर्तींची पूजा करावी. त्या वेळी प्रत्येक अवयवांची निरनिराळ्या नावांनी पूजा करावी. नंतर एक घृतपात्र दान द्यावे. फल–पापनाश व स्वर्गवास. [हि. ध.]

राघवेंद्रतीर्थ (इ. स. चे १७ वे शतक) माध्व संप्रदायाचा एक प्रचारक व संत. याचा पुतण्या नारायण याने राघवेंद्रविजय नावाचे एक सुंदर काव्य रचले असून, त्यात राघवेंद्राचे विश्वसनीय चरित्र ग्रथित केले आहे, ते असे—

राघवेंद्राचे मातुल घराणे गौतमगोत्री होते. त्याचा प्रपितामह कृष्णभट्ट हा सम्राट कृष्णदेवराय याला वीणावादन शिकवीत असे. त्याचा पिता तिम्मण्णाचार्य हा एक पंडित व संगीतज्ज्ञ होता. विजयनगराचा ऱ्हास झाल्यानंतर तो तुंडीरमंडल (कांची) या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भागात गेला व पट्टण नामक नगरात स्थायिक झाला. त्याच्या पत्नीचे नाव गोपिकांबा असे होते. त्याला गुरुराज, वेंकटांबा व वेंकटनाथ अशी तीन अपत्ये होती. त्यांपैकी वेंकटनाथाने चांगल्या प्रकारे विद्याभ्यास करून पंडित म्हणून लौकिक मिळवला. कुंभकोणम येथील माध्व मठाधिपती सुधींद्रतीर्थ यांच्या कानी त्याची कीर्ती गेली. असा विद्वान आपल्या मागून मठाधिपती व्हावा, असे त्यांना वाटले. म्हणून त्यांनी वेंकटनाथाला बोलावून आपली इच्छा त्याच्या कानावर घातली. पण पत्नी व मुले यांना सोडून संन्यास घेण्याची त्याची तयारी नव्हती. सुधींद्रतीर्थांनी वारंवार आग्रह करून त्याचे मन वळवले आणि शेवटी इ. स. १६२१ मध्ये वेंकटनाथाने त्या संप्रदायाची दीक्षा घेतली. तो संन्यासी झाला. गुरूने त्याला राघवेंद्र हे नाव दिले. दोन वर्षांनी सुधींद्रतीर्थ मृत्यू पावले, तेव्हा राघवेंद्रतीर्थ हे मठाधिपती झाले. आपल्या पंथाच्या प्रचारासाठी त्यांनी मदुरा, श्रीरंगपट्टण, उडुपी, पंढरपूर, कोल्हापूर, विजापूर, इ. ठिकाणी दौरा केला. या प्रवासात त्यांनी विपुल ग्रंथलेखन केले.

इ. स. १६६३ मध्ये ते म्हैसूरला गेले. तिथे दोड्ड देवराज वोडेयर या राजाने त्यांना मोठी देणगी दिली. नंतर ते बेल्लारी जिल्ह्यातील मंत्रालय या गावी स्थायिक झाले. आडोनीचा सुभेदार सिद्दी मसूदखान याचा दिवाण वेंकण्णा पंत याने हे गाव त्यांना दान दिले होते. तिथेच इ. स. १६७१ मध्ये त्यांनी देह ठेवला. तिथे त्यांची समाधी असून, हजारो भविक यात्रेकरू दरवर्षी तिथे दर्शनासाठी जातात.

माध्व संप्रदायात दीक्षित झाल्यामुळे ते द्वैतमताचे प्रचारक बनले. त्यांनी सुमारे चाळीस ग्रंथ रचले आहेत. त्यांपैकी बरेचसे ग्रंथ माधव, जयतीर्थ व व्यासराय यांच्या ग्रंथांवरील टीकेच्या स्वरूपात आहेत. त्यांच्या बहुतेक ग्रंथांना भावदीप हे नाव आहे. त्यांच्या स्वतंत्र ग्रंथांपैकी परिमल हा ग्रंथ अत्यंत प्रसिद्ध असून, त्याच्या नावावरून त्यांना परिमलाचार्य असे नाव मिळाले. त्यांची भाषा साधी व सुबोध असल्यामुळे त्यांनी वेदान्तासारखा अवघड विषय सर्वसामान्यांना आकलन होईल अशा रीतीने मांडला.

राघवेंद्रतीर्थ हे प्रगाढ विद्वान होते; तसेच महान भक्तही होते. त्यांच्या प्रशंसेचा पुढील श्लोक प्रसिद्ध आहे–

पूज्याय राघवेन्द्राय सत्यधर्मरताय च ।
भजतां कल्पवृक्षाय नमतां कामधेनवे ॥

अर्थ – पूज्य, सत्य धर्माचे आचरण करणाऱ्या, भक्तांना कल्पवृक्षाप्रमाणे असणाऱ्या आणि नमन करणाऱ्यांना कामधेनूप्रमाणे वाटणाऱ्या राघवेंद्राला नमन असो.

मंत्रालय येथे त्यांनी माध्व संप्रदायाच्या लोकांसाठी एक मठही स्थापन केला आहे. [हिं. क. भ. तु. अ.; श्रीराघवेंद्रस्वामी–बी. एन्. के. शर्मा– न्यू इं. अँ. खंड २ रा, मार्च १९४०]

राचेवर म्हैसूर प्रदेशातील एक जात. या जातीतील लोक आपल्याला क्षत्रिय म्हणवून घेतात. तेलुगू प्रदेशातून आपले पूर्वज सात-आठ पिढ्यांपूर्वी या प्रदेशात आले, असे हे सांगतात. यांचे तेलुगू व कन्नड असे मुख्य दोन भेद आहेत. कन्नड राचेवर किंवा चित्रगार हे रंगाऱ्याचे काम करतात; तर तेलुगू राचेवर किंवा रंगारी हे लष्करी पेशाचे आहेत. याशिवाय यांच्यांत मुरिकिनाडू (सूर्यवंशी), वेलिनाडू (चंद्रवंशी), तंजोर भागातील, अनंतगिरी भागातील, असे आणखीही भेद आहेत.

व्यवसाय – रंगकाम करणे, लाखेची खेळणी बनवणे व जरतारी काम करणे आणि लष्करात नोकरी करणे, हे यांचे परंपरागत व्यवसाय आहेत. याशिवाय काही लोक शेती व इतरही काही उद्योग करतात. शिकार करणे, हा यांचा छंद आहे. पण हरीण व पोपट यांना मात्र ते मारीत नाहीत.

हे लोक काळ्या वर्णाचे असून, त्यांचे मस्तक अरुंद व चेहरा साधारणपणे लंबवर्तुळाकार असतो.

यांच्यापैकी काही लोक शैव तर काही वैष्णव असून, ते चामुंडेश्वरी व श्रीनिवास या देवतांना भजतात. याव्यतिरिक्त स्थानिक देवदेवतांचीही ते पूजा करतात. पुरुष गळ्यात जानवे घालतात व दरवर्षी ते बदलतात.

विवाहप्रथा – या लोकांत गोत्रे असून, समान गोत्रात विवाहसंबंध होत नाही. आते व मामे बहिणीशी लग्न करता येते. लग्नविधी यांच्या तोडीच्या इतर जातींतील लग्नविधीप्रमाणेच असतो. लग्नाच्या तिसऱ्या दिवशी, तेहतीस कोटी देवांचा प्रतिनिधी म्हणून एक कलश स्थापतात व ब्राह्मण पुरोहिताकरवी त्याची पूजा करतात. पाचव्या दिवशी नागबली व गृहप्रवेश हे विधी होतात. लग्नसमारंभ सात दिवस चालतो.

मुलीला प्रथम रजोदर्शन झाले, की ती चार दिवस बाजूला बसते. पाचव्या दिवशी ती स्नान करते, पण पूर्ण शुद्ध होत नाही. अकराव्या दिवशी स्नान करून पंचगव्य घेतल्यावरच ती पूर्ण शुद्ध होते. त्या दिवशी ब्राह्मणांना फळे दान देतात व ज्ञातिभोजन घालतात.

यांची जातपंचायत असून, ती जातीतील तंटेबखेडे सोडवते.

मृतिकप्रथा – म्हैसूरच्या आसपास राहणारे राचेवर प्रेते जाळतात. मृताची रक्षा नदीत विसर्जन करतात. तेराव्या दिवशी ब्राह्मणांना शिधा व इतर दहा प्रकारची दाने देतात. चौदाव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात.

कानकानहळ्ळी (कनकपूर) व इतर ठिकाणी हे लोक प्रेते पुरतात. सातव्या दिवशी प्रेत पुरलेल्या जागी एक खोपट उभारतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्या रात्री सातानी नामक त्यांचा पुरोहित चक्राची पूजा करतो.

काही ठिकाणी केवळ स्नान केल्याने मृताशौच संपते, तर काही ठिकाणी ते दोन दिवस असते. काही लोक पितृपक्षात महालय करतात. [मै. ट्रा. का.]

राजगोंड गोंड लोकांची एक शाखा. गोंड व राजपूत यांच्या संबंधातून उत्पन्न झालेल्या माणसांना राजगोंड हे नाव मिळाले आहे. ते स्वतःला इतर गोंडांपेक्षा उच्च मानतात. इतिहासकाळात त्यांनी मध्य प्रदेशात अनेक राज्ये स्थापली होती. ती राजघराणी स्वतःला राजपूत (क्षत्रिय) मानीत. त्यांतील अनेक घराण्यांनी मुसलमानांपुढे हार खाऊन इस्लाम धर्म स्वीकारला. मात्र बाकीचे बहुतेक राजगोंड हिंदू झाले आहेत. सांप्रत ते जमीनदार असून, शेती हाच त्यांचा मुख्य व्यवसाय आहे.

हे लोक जानवे घालतात. मद्यपान, घटस्फोट व विधवा-विवाह या गोष्टी ते निषिद्ध मानतात. पुरुष अनेक बायका करू शकतात. पण सहसा कोणी तसे करीत नाही. जातीचे नियम जो कोणी मोडतो, त्याला जातीतून बाहेर पडावे लागते. ते हीन जातीच्या माणसाबरोबर पाणी किंवा हुक्का पिणेदेखील निंद्य मानतात व तसे करणाऱ्याला दंड करतात. व्यभिचार केल्यास स्त्रीला जातिबाह्य ठरवतात.

पूर्वी हे लोक वृक्ष व पशुपक्षी यांची नावे गोत्रांसाठी वापरीत. पण नंतर ते ब्राह्मणांप्रमाणे काश्यप, भारद्वाज, इ. गोत्रनामे वापरू लागले.

विवाहप्रथा – त्यांच्यांत सगोत्र विवाह करीत नाहीत. मातुल-कन्येशी विवाह करण्याची प्रथा आहे. या जातीत बालविवाह रूढ नाही. वयाच्या १५ व्या वर्षानंतर तरुणतरुणींचे विवाह होतात. मुलाचा पिता मुलीला मागणी घालतो. मुलीसाठी देज द्यावे लागत नाही.

विवाहसमारंभ वधूच्या घरी होतो. तो करण्यासाठी ब्राह्मण पुरोहित लागतो. सर्व समारंभ व धार्मिक विधी झाल्यानंतर वधू वराबरोबर त्याच्या घरी जाते. तिथे अग्नीला सात प्रदक्षिणा घालण्याचा विधी पुन्हा करतात.

प्रसूतिप्रथा – प्रसूतीनंतर पाच दिवस स्त्रीला अन्न देत नाहीत. सहाव्या दिवशी अन्न देतात. दहा दिवस सुवेर पाळतात. पाच महिन्यांनंतर मुलाचे नाव ठेवतात.

हे लोक दसरा, दिवाळी, नागपंचमी, रामनवमी वगैरे सण-उत्सव साजरे करतात. त्यांना नृत्याची फारशी आवड दिसत नाही. गोंदून घेण्याची आवड आहे, पण ते फक्त हातावर घेतात; पायावर घेत नाहीत.

हे लोक बकरी, हरिण, चितळ, इ. पशूंचे मांस खातात. मात्र कोंबडे, बदक वगैरे पक्ष्यांचे मांस त्यांना मुळीच चालत नाही.

मर्तिकप्रथा – यांच्यांत विवाहित मनुष्य मेला, की त्याचे प्रेत जाळतात; पण अविवाहित माणसाचे प्रेत पुरतात. दहा दिवस सुतक पाळतात. पिंडदान ब्राह्मणाकरवी करतात. [ट्रा. इं.]

राजगोर ब्राह्मण औदीच्य ब्राह्मणांची एक शाखा. या लोकांची वस्ती प्राधान्याने सौराष्ट्रात आढळते. परंतु यांना औदीच्य लोकांपेक्षा कमी लेखण्यात येते. याचे एक प्रमुख करण असे, की यांना वाणी लोकांच्या हातचे अन्न चालते. राजपूत व काठी लोकांचे हे पौरोहित्य करतात आणि इतर शुभाशुभ क्रियाही संपादितात. [वि. मुं. रा. प.]

राजगृह बिहार राज्यातील एक प्राचीन नगर. पाटण्यापासून सुमारे साठ मैल अंतरावर पूर्वेला हे गाव वसलेले आहे. या गावाचे सांप्रतचे नाव राजगिर असे असून, तिथे प्राचीन मगधाची राजधानी होती. जैन ग्रंथांत या स्थानाला क्षिति-प्रतिष्ठित, चणकपूर, ऋषभपूर व कुशाग्रपूर अशी नावे दिलेली आढळतात. पर्वतांनी वेढलेले असल्यामुळे राजगृहाला गिरिव्रज असेही म्हणत असत. वसुमती हे राजगृहाचे सर्वांत प्राचीन नाव होते असे दिसते. राजा कृष्ण आणि वैदर्भी यांचा सर्वांत धाकटा पुत्र वसू याने गिरिव्रज हे नगर वसवले, असे वाल्मीकि-रामायणात सांगितले आहे. त्याच्या नावावरून या नगराला वसुमती असे नाव मिळाले. महाभारत, वायुपुराण व भागवत पुराण या ग्रंथांत त्याला बृहद्रथपूर असे म्हटलेले आहे. राजा बृहद्रथ हा जरासंधाचा पिता होता. त्याच्यावरून हे नाव पडलेले आहे. जरासंधाची राजधानी इथेच होती. त्याचे महाल व आखाडे यांचे अवशेष आजही तिथे दाखवतात. जरासंध आणि भीम यांचे द्वंद्वयुद्ध ज्या ठिकाणी झाले, ती जागा सांप्रत रणभूमी या नावाने प्रसिद्ध आहे.

सनपूर्व सहाव्या शतकात मगधाचा राजा बिंबिसार याने राजगृह ही आपली राजधानी बनवली होती. ती नगरी पाच पर्वतांनी वेढलेली असून, तिच्या भोवती २५–३० मैल लांबीची एक प्रचंड दगडी भिंत बांधलेली होती. त्या भिंतीचे काही अवशेष पर्वतांवरही आढळतात. त्या नगरीला बत्तीस मोठे आणि चौसष्ट लहान दरवाजे होते, असे बुद्धघोषाने लिहून ठेवले आहे. गौतम बुद्ध आपला वर्षावास या ठिकाणीच करीत होता. त्याने इथे अनेक धर्मप्रवचने केली होती. इथले गृध्रकूट हे त्याचे आवडते निवासस्थान होते. त्याच्या निर्वाणानंतर बौद्धांची प्रथम संगीती इथे सप्तपर्णी गुहेत झाली. या सभेसाठीच मुद्दाम ही गुंफा खोदली होती, असे सांगतात. गौतम बुद्धाच्या अवशेषां-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर अजातशत्रूने इथे एक स्तूपही बांधला होता.

महावीरानेही काही वर्षे राजगृह येथे घालवली होती. त्याने आपला पहिला धर्मोपदेश इथल्या विपुल पर्वतावर केला होता.



राजगृहाभोवतालच्या भिंतीचा काही भाग

विसावा तीर्थंकर मुनी सुव्रतनाथ याचा जन्म इथेच झाला. नगरीच्या मध्यभागी मनियार मठ नावाची वास्तू आहे. ती विटांची बांधलेली व गोल आहे. पूर्वी तिथे मणिनागाचे मंदिर असावे. प्राचीन काळी तिथे नागपूजा प्रचलित होती. मठाच्या बाहेरील कोनाडयांत अनेक देवतांच्या मूर्ती आहेत. मनियार मठाजवळच सोनभंडार नामक एक जैन गुंफा आहे.



मनियार मठ–राजगृह

मगधाची राजधानी राजगृहाहून पाटलिपुत्र येथे गेल्यापासून राजगृहाचे राजकीय महत्त्व हळूहळू कमी होत गेले. इ. स. च्या ५ व्या शतकात फाहियान याने या नगराला भेट दिली, तेव्हा ते उजाड दिसले, असे त्याने लिहून ठेवले आहे. त्याला वैभार व विपुल पर्वतांच्या उत्तरेला एका नगराचे अवशेष, आढळले. ते अजातशत्रूने वसवले असावे. त्याचे दोन भाग असून, एका भागाभोवती दगडी कोट आहे, तर उरलेल्या भागाभोवती मातीचा तट आहे.

बौद्ध व जैन लोकांप्रमाणे हिंदू लोकांचेही हे तीर्थस्थान आहे. अधिक मासात इथे महिनाभर मोठी यात्रा भरते आणि यात्रेकरू इथल्या कुंडांत स्नान करतात. पूर्वी इथे राहण्याची वगैरे काहीच व्यवस्था नव्हती. पण सांप्रत इथे अनेक धर्मशाळा, विश्रांतिगृहे व अतिथिगृहे बांधलेली असून, भोजनालयेही आहेत.

राजगृह नगर हे वैभार, विपुल, रत्न, छट, शल्ल, उदय व सुवर्ण या सात पर्वतांनी वेढलेले आहे. त्यांपैकी वैभार पर्वतावर पाच जैन मंदिरे व सोमनाथ-सिद्धनाथ हे शिवमंदिर आहे. विपुल पर्वतावर चार जैन मंदिरे व एक गणेशमंदिर आहे. रत्नगिरी-वरच्या जैन मंदिरात सुव्रतनाथादींची चरणचिन्हे आहेत. उदय-गिरीवर दोन जैन मंदिरे व एक नाटकेश्वर महादेवाचे मंदिर आहे. याव्यतिरिक्त इथली तपोवन, गिरिव्रज व गृध्रकूट ही स्थानेही प्रसिद्ध आहेत.

इथे गार व गरम पाण्याची अनेक कुंडे आहेत. गौतम बुद्ध या कुंडांत स्नान करीत असे, असे सांगतात. त्यांपैकी ब्रह्मकुंड, व्यासकुंड, गंगायमुनाकुंड, अनंतकुंड,[1] सप्तधारा व काशीधारा ही कुंडे अधिक प्रसिद्ध आहेत. इथल्या गरम कुंडात स्नान केल्याने वातरोग व चर्मरोग दूर होतात, अशी लोकांची श्रद्धा आहे. सरस्वती नावाची एक लहानशी नदी इथून वाहते. तिच्या जवळच वैतरणी नदी आहे. तिच्या काठावर पितरांना पिंडदान करतात. वैतरणीच्या काठी अशोकाने बुद्धाच्या स्मृतिचिन्हा-वर बांधलेल्या स्तूपाचे अवशेष सापडले आहेत.

ब्रह्मकुंडाजवळ हंसतीर्थावर काही देवतांच्या मूर्ती आहेत. ब्रह्मकुंडाच्या दक्षिणेला एक शिवमंदिर असून, त्याच्या पश्चिमे-कडील दत्तात्रेयमंडपात काही मूर्ती आहेत. मार्कंडेय कुंडाच्या दक्षिणेला कामाक्षीमंदिर आहे. इथे एक जरादेवीचे मंदिर असून, जरासंध या देवीची पूजा करीत असे, असे सांगतात. एका काळी इथे अठरा बौद्ध विहार होते. पण आज त्यांपैकी काहीच शिल्लक नाही. इथे बौद्धांची अनेक मंदिरे असून, त्यांत ब्रह्मदेश, जपान व थायलंड या देशांतील लोकांनी बांधलेली मंदिरे प्रमुख आहेत.

इथल्या पिप्पल गुंफा, सप्तपर्णी गुंफा, देवदत्त गुंफा, सोन-भांडार गुंफा इ. गुंफा, प्रसिद्ध आहेत. वैभार पर्वताच्या पूर्वेकडील उतारावर अनेक दगडांचा मिळून एक चौथरा बनलेला आहे. त्याला मचाण किंवा जरासंधाची बैठक असे नाव आहे.

प्राचीन अवशेष असलेले हे नगर पाहण्यासाठी देशाच्या सर्व भागांतून हजारो प्रवासी इथे येत असतात. [हिं. वि. को.;

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हि. जॉ. ए. इं.; भा. प्रा. जै. ती.; बौ. का. भा.; जै. ध.; जै. बि.; राजगिर– विहार सरकारचे प्रकाशन, १९५६; राजगृह अँण्ड नालंदा– श्री. अमूल्यचंद्र सेन, १९५४]

राजत एक दान. दहा सहस्र पल (८ गुंजा = १ माष, १६ माष = १ कर्ष व ४ कर्ष = १ पल) रुपे दान देणे, हे उत्कृष्ट दान समजले जाते. पण एवढी ऐपत नसल्यास वीस पलांपेक्षा कितीही अधिक रुपे दान दिले तरी चालते. पाच सहस्र पलांचे दान हे मध्यम व पंचवीसशे पलांचे दान हे कनिष्ठ मानलेले आहे. फल – चंद्रलोकप्राप्ती. [पु. इं.]

राजधानी नगराचा एक प्रकार. ज्या नगरात राजा राहतो ती राजधानी होय, असे समरांगणसूत्रधार या ग्रंथात सांगितले आहे; तर ज्या नगरात राजवाडा असतो, त्याला राजधानी म्हणतात, असे मयमत या ग्रंथात म्हटले आहे. राजाची नगरी (= धानी) ती राजधानी होय, असे शब्दकल्पद्रुमात निर्देशिले आहे.

राजधानी कशी असावी, त्याचे वर्णन कौटिल्याने पुढीलप्रमाणे केले आहे – देशाच्या रक्षणाच्या हेतूने राजधानीची रचना एखाद्या किल्ल्यासारखी असावी. त्यानुसार राजधानी एखाद्या पहाडावर किंवा एखाद्या नदीच्या किनारी वसवावी. वास्तुकलाविशेषज्ञांच्या सल्ल्यानुसार एखाद्या सरोवराच्या किंवा तलावाच्या काठीही ती वसवायला हरकत नाही. राजधानीला सतत पाणीपुरवठा होईल अशी व्यवस्था जवळ असली पाहिजे, हा हेतू याच्या मुळाशी आहे. राजधानीभोवती एखादा कालवा असावा. तसेच तिच्या संरक्षणासाठी तिच्या सभोवती एकएक दंड (= सहा फूट) अंतरावर तीन खंदक असावे. या खंदकांची रुंदी अनुक्रमे चौदा, बारा व दहा दंड असावी. खंदकांमधील भिंती दगडांच्या किंवा विटांच्या असाव्या. खंदकांची खोली त्यांच्या रुंदीच्या एक चतुर्थांश किंवा एक द्वितीयांश असावी. खंदक नेहमी पाण्याने भरलेले असावे व ते नैसर्गिक जलप्रवाहांशी जोडलेले असावे. खंदकांत कमळे व सुसरी असाव्या.

सर्वांत आतल्या खंदकापासून चार दंड अंतरावर एक तट बांधावा. तटाची उंची सहा दंड व रुंदी बारा दंड असावी. तटावर काटेरी झुडपे व विषारी वेली लावाव्या. तटाच्या चारही बाजूंना पक्क्या विटांचे प्राकार बांधावे.

राजधानीला बारा दारे असावी. याशिवाय पाण्यातून आणि जमिनीवरून काही गुप्त वाटाही असाव्या. रथपथ, राजपथ हे रस्ते व द्रोणमुख, स्थानीय, राष्ट्र व कुरणे यांच्याकडे जाणारे रस्ते चार दंड रुंद असावे.

राजवाडा सर्वांत सुरक्षित जागी बांधावा. राजधानीच्या क्षेत्रफळाचा नववा भाग राजवाड्याने व्यापलेला असावा. राजवाड्याच्या ईशान्येला राजाचे आचार्य, पुरोहित मंत्री यांची निवासस्थाने, यज्ञभवन व जलस्थान असावे. त्याच्या जवळच पाकशाला व सभाभवन असावे.

राजधानीच्या मध्यभागी अपराजिता (दुर्गा), अप्रतिहत (विष्णू), जयंत (सुब्रह्मण्य), वैजयंत (इंद्र), शिव, कुबेर, अश्विनीकुमार व लक्ष्मी यांची मंदिरे असावी.

राजधानीत कोशगृह, कोष्ठागार (राजाचे धान्यभांडार), भांडागार, आयुधागार, पण्यगृह (व्यापाऱ्यांच्या मालाचे गुदाम), न्यायालय, परिषद्‌भवन, प्रशासनकार्यालय, औद्योगिक कारखाने, इ. इमारती असाव्या. भांडारात जीवनोपयोगी वस्तू, आवश्यक खाद्यपदार्थ, औषधे व संरक्षणाची साधने यांचा भरपूर साठा असावा. त्यामुळे शत्रूने नगराला वेढा दिला, तरी दीर्घ कालपर्यंत शत्रूशी टक्कर देता येते. दर दहा कुटुंबांसाठी एक, याप्रमाणे नगरात विहिरी असाव्या.

कौटिलीय अर्थशास्त्राप्रमाणेच शुक्रनीती व मानसार या ग्रंथांतही राजधानीची लक्षणे सांगितली आहेत. राजधानीच्या सभोवार खंदक, प्राकार व दरवाजे असावे आणि तिच्या अंतर्भागात रुंद रस्ते, सुंदर उपवने, तलाव व भवने असावी, असे शुक्रनीतीत सांगितले आहे.

मानसार या ग्रंथानुसार राजधानीच्या चार दिशांना चार नगरद्वारे आणि अंतर्भागात नाना देवालये असणे आवश्यक आहे.

मयमत या ग्रंथातली लक्षणेही वरील ग्रंथातील लक्षणांशी मिळतीजुळती आहेत. राजधानीच्या रक्षणासाठी नगरद्वारांच्या समोर सैनिक असावे, तसेच नगराच्या आत व बाहेर शत्रूचे, आक्रमण रोखण्यासाठी सैन्य असावे, एवढे त्यात जास्त सांगितलेले आहे.

राजधानीची ही जी लक्षणे सांगितली आहेत, त्यांपैकी बहुतेक लक्षणे प्राचीन भारतातील अयोध्या, पाटलिपुत्र, कान्यकुब्ज, हस्तिनापूर, द्वारका, मदुरा, इ. नगरांत आढळून येतात. ही सर्व नगरे प्राकार, खंदक, गोपुरे व विशाल महाल यांनी युक्त होती. [प्रा. भा. न. न. जी.; चं. मौ. उ. का.]

राजनीष्टी डोळ्याचे विकार दूर होऊन दृष्टी चांगली व्हावी यासाठी ही इष्टी करायला सांगितली आहे. या इष्टीत भ्राजस्वान् अग्नी आणि सूर्य या प्रमुख देवता होत. यात एकूण तीन हवी करायचे असतात. भ्राजस्वान् अग्नीसाठी पुरोडाश, सूर्यासाठी चरू व पुन्हा भ्राजस्वान् अग्नीसाठी पुरोडाश तयार करतात. सूर्य देवता मध्ये घ्यावी असे सांगितले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. भ्राजस्वान् अग्नीऐवजी ज्योतिष्मान् अग्नी ही देवता काठक संहितेत सांगितली आहे (११.१). इष्टी झाल्यावर सूर्यासाठी चरूचे तीन पिंड द्यायचे असतात. या इष्टीचे तंत्र दर्शपूर्णमासाप्रमाणेच असते. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

राजन्य (१) एक प्राचीन जनपद. हे पंजाबमध्ये होते. सनपूर्व पहिल्या व दुसऱ्या शतकांतले या जनपदाचे शिक्के होशियारपूरपासून मथुरेपर्यंत आढळले आहेत. या शिक्क्यांवर कोण्या राजाचे नाव नसून 'राजन्यजनपदस्य' हे शब्द कोरलेले आहेत. त्यावरून हा संघ प्रजातंत्र होता असे कळते. हे राजन्य लोक कांगड्याच्या पहाडी भागात वसलेले राणा लोक होते, असे डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांनी म्हटले आहे. सांप्रतही त्यांना राणा असेच म्हणतात. शालंकायन नामक एका राजन्याचा उल्लेख पतंजलीच्या महाभाष्यात व काशिकेमध्ये आढळतो. तो त्याच भागातला राजन्यांचा शेजारी संघ असावा. राजन्यक, दैवयातवक, वैल्ववनक, आंबरीपुत्रक व आत्मकामेयक या नावांचे छोटे छोटे जहागिरीसारखे प्रदेश गांधार, कांगडा व पंजाब या भागात होते. राजन्य व इतर प्रजातंत्री संघ हे आयुधजीवी पहाडी क्षत्रिय होते, असे महाभाष्यावरून कळते. [पा. का. भा.; प. का. भा.]

(२) राजघराण्यात जन्माला आलेल्या पुरुष व्यक्तीला अथर्ववेदात राजन्य ही संज्ञा दिलेली आढळते (५.१७.९; १०.४.३२.) पुढे ती सरदार घराण्यातल्या पुरुषांनाही लावू लागले. तैत्तिरीय संहितेत राजन्याला विद्वान ब्राह्मणांच्या बरोबरीचा मान दिलेला आहे (२.५.४.४). क्षत्रिय शब्द रूढ होण्यापूर्वी युद्धकुशल वीरपुरुषाला राजन्य म्हणत असत. पुरुषसूक्तात राजन्य हा शब्द क्षत्रिय या अर्थीच वापरलेला आहे.

राजन्या एक देवता. आंध्र व ओडिसा या प्रदेशांतील जालरिया कोळी जातीचे लोक हिला भजतात. हत्ती हे तिचे वाहन असून, तिच्या उजव्या हातात तलवार असते. या देवीच्या कृपाप्रसादाने वांझ स्त्रियांनाही अपत्यप्राप्ती होते, अशी हिच्या भक्तांची श्रद्धा आहे. [देवीकोश ३]

राजपुरी कर्नाटकातील मंगळूर जिल्ह्यात वसलेली एक जात. हे कोकणी भाषा बोलतात. व्यापार व शेती हे यांचे मुख्य व्यवसाय आहेत. हे स्वतःला वैश्य मानतात; मात्र आपला दर्जा ब्राह्मणांच्या खालोखाल आहे, असे म्हणतात. हे लोक जानवे घालतात. सर्व धार्मिक कृत्यांसाठी हे कऱ्हाडे ब्राह्मणांना बोलावतात. हे शैव पंथाचे आहेत.

कुडाळदेशकर व कुडुलकार या राजपुरी जातीच्या पोटजाती आहेत, असे १८९१ मधील जनगणनेच्या वृतान्तावरून कळते. कुडुलकार हे मिठाई बनवणारे आहेत.

विवाहप्रथा – यांच्यांत मुलगी वयात येण्यापूर्वीच तिचे लग्न करतात. वधू-वरांचे हात मिळवून ते वधूपित्याने धरायचे आणि वधूच्या मातेने त्यांवर पाणी ओतायचे, हा लग्नातला प्रमुख विधी होय. पाणी प्रथम वधूच्या हातावर आणि मग वराच्या हातावर पडेल अशा रीतीने हात धरतात. हा विधी वधूच्या घरी होतो. चार दिवस वर किंवा वधू कोणीतरी विवाह-शय्येवर बसून राहतात. कारण ती शय्या केव्हाही रिकामी ठेवून चालत नाही. चौथ्या दिवशी वधू-वर वराच्या घरी जातात आणि तिथेही तोच प्रकार करतात. यांच्यांत विधवाविवाह रूढ नाही.

हे लोक मुख्यतः शाकाहारी आहेत. भात हे त्यांचे मुख्य अन्न होय. मात्र काहीजण मासे खातात. [का. ट्रा. स. इं.]

राजपूत उत्तर भारतातील एक मोठी जात. सांप्रत या लोकांची वस्ती मुख्यतः पंजाब, उत्तर प्रदेश, बंगाल, राजस्थान, मध्य प्रदेश व गुजरात या राज्यांत आहे. राजपुत्र या शब्दापासून राजपूत हा शब्द बनलेला असून, हे लोक आर्यवंशी क्षत्रिय आहेत, असे सामान्यपणे मानले जाते. पण कर्नल टॉड याने असे प्रतिपादिले आहे, की हे लोक आर्य नसून, सिथियन वंशाचे आहेत. भांडारकर, स्मिथ, क्रुक, इ. शास्त्रज्ञांनी हे मत मान्य केले आहे. स्मिथ म्हणतो – 'हे बाहेरून आलेले लोक हिंदू धर्माच्या सर्वग्राही शक्तीला बळी पडून फारच लवकर पूर्णपणे हिंदू बनले. ज्यांना सरदारकीचा मान मिळाला त्यांचा त्या वेळच्या हिंदू वर्णव्यवस्थेत क्षत्रिय म्हणून समावेश केला गेला. इतर सामान्य लोकांना गुजर हे नाव मिळाले.'

विल्यम क्रुक याने याविषयी केलेले प्रतिपादन असे –

'वैदिक काळातले क्षत्रिय व मध्य युगातील राजपूत यांच्यामध्ये इतकी भिन्नता दिसून येते, की त्यांचा कोणताही संबंध जोडणे शक्य नाही. हे आता पुराव्याने सिद्ध झाले आहे, की बऱ्याच राजपूत घराण्यांची उत्पत्ती शक किंवा कुशाण लोकांपासून किंवा श्वेतहूणांपासून झाली आहे. हूणांशी संबंध असलेल्या गुर्जरांनी हिंदू धर्म स्वीकारला आणि त्यांच्यांतील प्रमुखांपासून उच्च राजपूत घराणी उदय पावली. त्या लोकांना जेव्हा राजवैभव प्राप्त झाले आणि त्यांनी जेव्हा हिंदूंचा धर्म व त्यांची समाजव्यवस्था यांचा स्वीकार केला, तेव्हा त्यांचा संबंध महाभारत व रामायण यांतील प्रमुख वीरांशी जुळवण्याचा प्रयत्न ओघानेच करण्यात आला. त्यामुळेच सूर्य व सोम यांच्यापासून राजपूत घराण्यांची उत्पत्ती झाली, या अद्भुत कल्पनेविषयीच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आख्यायिकांचा समावेश त्यांच्या वृत्तान्तात झाला. परकीयांचा स्वधर्मात करून घेतलेला हा समावेश सोयिस्कर अशा दंतकथांनी छपविणे आवश्यक होते. म्हणूनच आर्य ऋषींच्या नेतृत्वाखाली शुद्धिसमारंभपूर्वक अग्निकुले उत्पन्न करण्यात आली, या कथेचा उद्भव झाला. परमार, परिहार, चालुक्य व चौहान या चारच घराण्यांची उत्पत्ती यज्ञकुंडातून झाली असल्याचे सांगण्यात येते.'

रिस्ले या मानववंशशास्त्रज्ञाने मात्र वरील मताचे खंडन केले आहे, ते असे –

'सिथियन लोकांचे सर्व अवशेष नष्ट झाले आहेत. हिरोडोटसने वर्णन केलेल्या गेट लोकांचेच राजपूत व जाट हे वंशज आहेत, याचे निर्विवाद प्रमाण देता येत नाही. नामसादृश्याचे प्रमाण तर फारच भ्रामक आहे. असे ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत, की हिंदुस्थानावर आक्रमण करणारे सर्व सिथियन लोक रुंद डोक्याचे होते. त्यामुळे त्यांचे वंशज प्रामुख्याने लांब डोक्याचे असण्याचा संभव नाही. वांशिक भिन्नता ओळखण्याचे प्रधान साधन डोके हे होय. राजपूत व जाट हे तर लांब डोक्याचे आहेत. त्यामुळे राजपुतांचे सिथियन लोकांशी साधर्म्य दाखवणे अवघड आहे.'

राजपूत लोकांच्या डोक्यांची व चेहऱ्यांची मापे, त्यांची तरतरीत व सरळ नाके, त्यांची लांबट डोकी व त्यांचा उंच बांधा ही लक्षणे ते आर्य असल्याचे स्पष्ट दाखवतात. आर्य वंशाच्या याच विशिष्ट खुणा आहेत. लेसफील्ड, इवेटसन, इ. युरोपीय संशोधकांना राजपूत हे आर्यवंशी क्षत्रिय आहेत, याबद्दल मुळीच संदेह नाही.

अग्निकुलांची आख्यायिका कवीच्या कल्पनेची सृष्टी आहे; इतकेच नव्हे, तर ती कवीच्या उक्तीचा भ्रांत अर्थ समजून त्यावर उभारलेली आहे, असे चि. वि. वैद्यांचे मत आहे. याविषयी त्यांनी मध्ययुगीन भारत या ग्रंथात केलेले विवेचन असे—

'वसिष्ठाने अग्नीतून क्षत्रियांची चार कुले निर्माण केली, ही कथा पृथ्वीराजाचा भाट कवी चंद याने पृथ्वीराजरासो या महाकाव्यात प्रथम प्रसृत केली. राक्षसांनी किंवा म्लेच्छांनी पृथ्वीला जेव्हा त्रस्त केले, तेव्हा वसिष्ठाने आपल्या अग्निकुंडातून एकामागून एक असे चार वीर पुरुष निर्माण केले. त्यांना परमार, चालुक्य, प्रतीहार व चाहमान ही नावे मिळाली. काव्याचा नायक पृथ्वीराज हा चाहमानाचा वंशज होय. रासोबरोबर ही कथा लोकप्रिय झाली आणि कालांतराने सर्व राजपुतांनी ती सत्य म्हणून मान्यही केली. या चारही कुलांतील वंशजांनीही तिला मान्यता दिली. या चार घराण्यांना आपली वंशपरंपरा सूर्यसोमांशी नेऊन भिडवता येत नाही. ती कुळे केवळ अग्न्युत्पन्नच आहेत, अशी लोकांची समजूत आहे. आणि तीमुळे ही चार कुळे बाहेर देशांतून आली असून, ब्राह्मणांनी अग्निशुद्धि-संस्काराच्या अवगुंठनाखाली त्यांचा क्षत्रियांत समावेश केला, या कल्पनेला निमित्त मिळाले आहे.

जुन्या शिलालेखांच्या पुराव्यावरून असे निःसंदेह सिद्ध होते, की नवव्या शतकात चारपैकी निदान तीन घराणी तरी सूर्य-सोमवंशोत्पन्न होती, असा लोकांचा व त्यांचा स्वतःचा विश्वास होता. इतिहाससंशोधकांनी आता हे मान्य केले आहे, की ही घराणी अग्निकुलोत्पन्न नाहीत. चंदाने ज्या प्रसिद्ध ३६ राजघराण्यांची नावे दिली आहेत, त्यांचा त्याने सूर्य, सोम व यादव वंशीय म्हणूनच उल्लेख केला आहे. त्याने अग्निकुलांचा उल्लेखही केलेला नाही. अग्निकुले म्हणून मानलेल्या चारही घराण्यांचा त्याने सूर्य, सोम किंवा यादव वंशातच समावेश केला आहे.'

पं. गौरीशंकर ओझा यांनी 'राजपुताने का इतिहास' या ग्रंथात, राजपूत हे परकीय सिथियन वंशाचे आहेत, या मताचे सविस्तर खंडन केलेले असून, ते आर्य क्षत्रिय आहेत, असेच प्रतिपादले आहे. त्यांनी पुढे असेही दाखविले आहे, की राजपूत हा शब्द एक जात या अर्थाने इ. स. च्या १६ व्या शतकापूर्वीच्या साहित्यात किंवा अभिलेखांत आढळत नाही. अरबी व फारसी भाषांतील लेखांतही राजपूत या शब्दाचा प्रयोग त्यापूर्वी केलेला नाही. मूळ राजतरंगिणीत त्याचा उल्लेख नाही; मात्र राजतरंगिणीच्या शेवटच्या परिशिष्टात राजपूत जातीचे नाव प्रथमच आले आहे. हे परिशिष्ट अकबराच्या काळात लिहिले गेले. पण सर्व राजपूत लोक आर्यवंशीय क्षत्रिय आहेत व सर्व राजपूत लोक सिथियन वंशाचे आहेत, ही दोन्ही मते एकांतिक वाटतात. कारण वर्णसंकरामुळे कोणताही वंश शुद्ध राहिलेला नाही. शक, कुशाण, यवन, हूण हे सर्व परकीय लोक भारतीय समाजात पूर्णपणे मिसळून गेले आहेत. त्यांच्यातील शूर लोक हिंदूंच्या क्षत्रिय वर्णात सामील झाले असतील. त्यांच्यावर शुद्धिसंस्कार करण्यात आला आणि अबू पर्वतावरील यज्ञातून चार पुरुष निर्माण झाले, ही कथा रचली गेली, ही कल्पना संभवनीय वाटते. कारण प्राचीन काळी अशा प्रकारे परकीय लोकांना आपल्या समाजात सामावून घेण्याची प्रवृत्ती होती. याव्यतिरिक्त काही आदिवासी लोकांच्या नेत्यांनीही स्वपराक्रमाने राज्ये स्थापन केली आणि ते स्वतःला क्षत्रिय म्हणवून घेऊ लागले. राजस्थानातील चारण व भाट आपल्या स्वामींची स्तवने गाऊन त्यांना उच्चकुलोत्पन्न ठरविण्यात कुशल होते. त्यांनी भिन्न भिन्न राजांचा प्राचीन राजवंशांशी संबंध जुळवून दिला. अशा रीतीने प्राचीन क्षत्रियांचे वंशज, परकीय आक्रमक आणि आदिवासी राजे यांचे संमिश्रण होऊन राजपूत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जात निर्माण झाली आहे, असे विल्यम क्रुकने प्रतिपादले आहे.

छत्तीस कुळे – पूर्वी राजपुतांची ३६ कुळे होती. त्यांची नावे चंदवरदायीने पृथ्वीराजरासो या ग्रंथात दिलेली आहेत. ती

राजपूत पुरुष

कुळे पृथ्वीराजाच्या काळातील असावी. रासोमध्ये दिलेली नावे अशी–ककुत्स्थ, परमार, सदावर, चाहुवान, चालुक्क, छंद, सिलार, अभीयर, दोयमत, मकवान, गरूअ, गोहिल, गुहिलोत, चापोत्कट, परिहार, राठोड, रोसजुत, देवरा, टांक, सैंधव, अनिग, यौतिक, प्रतिहार, दधिष्टट्, कारट्टपाल, कोटपाल, हुल, हरितट, गौर, कमाप (कलाप), मट, धान्य-पालक, निकुंभवर, राजपाल, कविनीस व कालच्छुरक (कलचुरी हैहय).

पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान व गुजरात या प्रदेशांत ज्या अनेक राजपूत कुळांनी राज्ये स्थापन केली, त्यांची नावे– गुहिलोत, राठोड, कच्छवाह, चौहान, परमार, चौलुक्य (सोळंकी), जाडेजा, चूडासम, झाला, चावडा, जम्मुवाल, चंदेल, गढवाल, तोमर, प्रतिहार, बुंदेले.

थोर परंपरा – इ. स. च्या ८ व्या शतकात अरबांनी सिंधवर आक्रमण करून तो प्रांत सहजपणे जिंकला आणि तिथून राजस्थानावर स्वाऱ्या सुरू केल्या. पण त्याच वेळी मेवाडमध्ये गुहिलोत घराण्यात बाप्पा रावळ नामक एक पराक्रमी पुरुष उदयाला आला व त्याने अरबांच्या आक्रमणाचा प्रतिकार करून, त्यांचा पराभव केला. इ. स. च्या ९ व्या शतकात बगदादचा खलीफा अलमानून याने स्वतः मोठ्या सैन्यासह भारतावर स्वारी केली. पण मेवाडचा राजा दुसरा खुम्माण याने त्याचा दारुण पराभव केला. त्यामुळे त्यानंतर अरबांनी राजस्थानावर पुन्हा स्वारी केली नाही. इ. स. च्या ११ व्या शतकात गजनीच्या महंमुदाने भारतावर अनेक स्वाऱ्या केल्या; पण तो राजस्थानात शिरला नाही. इ. स. च्या १३ व्या शतकात दिल्लीवर सुलतानशाही प्रस्थापित झाली आणि उत्तर भारतातील बहुतेक राज्ये दिल्लीच्या सुलतानांनी जिंकली. त्यांनी राजस्थानावरही अनेक स्वाऱ्या केल्या, पण त्यात त्यांना यश मिळाले नाही. त्या शतकातला मेवाडचा राजा जैत्रसिंह हा फार पराक्रमी होता. त्याने मुसलमानी सैन्याचा अनेक वेळा पराभव करून मेवाडचे रक्षण केले. हीच परंपरा १३ व्या शतकाच्या अखेरपर्यंत टिकवून मेवाडच्या शूर राजपूत राजांनी आपले स्वातंत्र्य अबाधित राखले. इ. स. १३०३ मध्ये अलाउद्दीन खिलजीने चितोडवर स्वारी केली. त्या वेळी रत्नसिंह व लक्ष्मणसिंह यांनी प्रतिकाराची पराकाष्ठा केली. पण ते रणांगणावर मारले गेले आणि राणी पद्मिनीने हजारो राजपूत स्त्रियांसह जोहार केला. त्या प्रसंगी चितोडचे राज्य नष्ट झाले; पण लवकरच लक्ष्मणसिंहाचा नातू हम्मीर याने ते पुन्हा स्वतंत्र केले. त्यानंतर क्षेत्रसिंह, मोकल, महाराणा कुंभा व संग्रामसिंह हे भीमपराक्रमी पुरुष चितोडच्या गादीवर आले आणि त्यांनी स्वधर्माचे व स्वातंत्र्याचे रक्षण केले. गुजरात व माळवा येथील सुलतानांशीही त्यांना लढावे लागले. पण या सर्व घालमेलीत चितोड अजिंक्य राहिले. पुढे बाबराच्या संघटित सेनासामर्थ्यापुढे राणा सांगाचा टिकाव लागला नाही आणि मेवाडचे स्वातंत्र्य नष्ट झाले. बाप्पा रावळापासून राणा सांगापर्यंत ७-८ शे वर्षे राजपुतांनी मुस्लिम आक्रमणाचा यशस्वी प्रतिकार केला. राजपुतांचे हे कार्य असामान्य आहे.

मात्र राजपुतांना अखिल राजस्थानावर एकच्छत्री राज्य स्थापणे कधीही शक्य झाले नाही. जयपूर, जोधपूर, उदयपूर, अजमीर, बीकानेर, इ. राजस्थानातील राज्ये स्वतंत्र होती. प्रसंगी ती मेवाडच्या नेतृत्वाखाली एक होत असली, तरी त्यांच्या आपसांत नित्य लढाया चालत. राजपुतांत भिन्न भिन्न जमाती व कुळे असून, प्रत्येक जमातीला व कुळाला आपापल्या थोरवीचा अतिरिक्त अभिमान असे. त्या निरनिराळ्या जमातींत सतत यादवी चालू असल्यामुळे राजपुतांचे ऐक्य दुःसाध्य झाले होते. त्यांच्यांतली जातिभेदाची भावना फार तीव्र होती. मानापमानाच्या विपरीत कल्पना त्यांनी आग्रहपूर्वक जोपासल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होत्या. त्यांना धर्माभिमान होता; पण आपला कुलाभिमान धर्मसंघटनेत विलीन करण्यास मात्र ते कधीही तयार झाले नाहीत.

भगवानदास, मानसिंह, जयसिंह, जसवंतसिंह, रायसिंह हे सर्व राजपूत राजे स्वधर्माभिमानी होते; हिंदू धर्मावर त्यांची अपार निष्ठा होती. पण त्यांच्यापैकी बहुतेकांनी आपल्या कन्या मोगल बादशहांना दिल्या आणि मोगल साम्राज्याचा विस्तार करण्यात आपले शक्तिसर्वस्व वेचले. अंगी शौर्यधैर्यादी गुण होते, सेनानायकाची कर्तबगारी होती, हाताशी प्रचंड सेना होती, स्वधर्माचा अभिमानही होता; तरी हे सर्व राजपूत वीर मोगल बादशहांच्या सेवेत राहून हिंदू राज्य बुडविण्याच्या उद्योगात गुंतले होते. याचा अर्थ असा, की स्वराज्य व स्वधर्म यांचा काही संबंध असतो, हे त्यांच्या स्वप्नातही आले नाही. अत्यंत विपरीत गोष्ट ही, की चितोडच्या महाराण्यापुढे नमण्यात त्यांना अपमान वाटे; पण मोगलांची गुलामी पत्करून त्यांना मुली अर्पण करताना त्यांना किंचितही लाज वाटली नाही.

जाती-उपजाती – राजपूत हा शब्द काही वेळा राजांच्या किंवा सरदारांच्या अनौरस मुलांचा निर्देश करण्यासाठी वापरला जातो हे खरे, पण हा त्याचा सामान्य अर्थ नव्हे. महाभारतात राजपुत्र हा शब्द साधारणपणे क्षत्रिय या अर्थाने असंख्य वेळा वापरलेला आहे. कित्येकदा तो प्रत्यक्ष राजकुलातील क्षत्रियांसाठी वापरलेला आढळतो. बाणाच्या हर्षचरितात–ही तो क्षत्रिय (कुलीन) याच अर्थी वापरलेला आहे. बौद्ध धर्माचा ऱ्हास झाल्यानंतर जातिबंधने दृढ होऊ लागली. इ. स. च्या ७ व्या शतकापर्यंत शेकडो क्षत्रिय घराणी बौद्ध झाली होती. त्यामुळे इतर घराण्यांनी त्यांच्यावर कडक बहिष्कार घातला. दूरदूरच्या प्रांतांत निरनिराळी राजपूत घराणी वास्तव्याला गेली होती. ती कितपत शुद्ध राहिली आहेत, हे ठरवणे कठीण होऊ लागल्यामुळे प्रांतभेदाने पोटजाती निर्माण झाल्या. त्यामुळे राजपूत हा शब्द जेवढ्या प्रदेशात क्षत्रिय राजघराणी एकवटली होती, तेवढ्याच प्रदेशापुरता वापरण्यात येऊ लागला. अशा छत्तीस क्षत्रिय घराण्यांची नामावली करण्यात आली आणि तेवढ्याच घराण्यांमध्ये होणारे विवाहसंबंध योग्य असे ठरवले गेले.

कालांतराने त्या सर्व राजघराण्यांचा शाखाविस्तार होऊन राजपुतांच्या पोटजाती व त्यांच्याही उपजाती निर्माण झाल्या. राजपुतांच्या प्रमुख जातींची नावे अशी – राठोड, भाटी, चौहान, कछवाहा, सीसोदिया, पंवार, सोळंकी, पडिहार, तंवर, झाला, चावडा, चुडासमा, जेठवा, जाडेजा, गोहिल, नातरायत, बुंदेल, परमार व वाघेला. या जाती पंजाब, उ. प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, इ. राज्यांत आढळतात. सर्व जातींचे पोटभेदही बरेच आहेत. राजस्थान हे सर्व राजपुतांचे केंद्रस्थान मानले जाते. राजस्थानात राजपुतांची लोकसंख्या त्या मानाने कमीच आहे. इतर राज्यात हे लोक अधिक प्रमाणात वसलेले आहेत. तथापि राजपूत–संस्कृतीची जडण-घडण राजस्थानात झालेली असल्यामुळे, त्या भागातील राजपूत हेच मूळचे राजपूत समजले जातात. राजपुतांमुळेच त्या प्रदेशाला राजपुताना हे नाव मिळाले होते.

पूर्वी सर्व राजपूत लोक क्षात्रवृत्तीचे होते. राजे, सेनापती, सरदार, सैन्यातले निरनिराळे अधिकारी व सामान्य सैनिक असे त्यांचे भिन्न वर्ग असून, त्याव्यतिरिक्त अन्य व्यवसाय ते करीत नव्हते. त्यामुळे ही जात शूर, लढाऊ मानली जाते. त्यांची सैनिकी परंपरा तेजस्वी आहे. त्याचप्रमाणे सरदारांना जहागिरी मिळाल्यामुळे भूस्वामित्वाची परंपराही त्यांच्यांत निर्माण झाली. सरदारी व जमीनदारी यांमुळे राजपुतांच्या निरनिराळ्या घराण्यांना जी प्रतिष्ठा लाभली, ती त्यांच्या वंशजांतही उतरली. सांप्रत क्षात्रवृत्तीचा लोप झाल्यामुळे जमीनदारी व शेती यांवर त्यांची प्रतिष्ठा अवलंबून आहे. ज्यांची जमिनीवर मालकी नाही व जे नोकरी करून गुजारा करतात, त्यांना समाजात फारसा मान नसतो. त्यांचे जमीनदार बांधव त्यांच्या बरोबर भोजन करायलाही तयार नसतात. राजपुतांत कुलाभिमान फार तीव्र स्वरूपाचा असतो. जातिभेदालाही असेच विषम रूप प्राप्त झाले आहे. पूर्वजांच्या मोठेपणाचा अभिमान व सरदारी वृत्ती त्यांच्या अंगी विलक्षण भिनलेली आहे. त्यामुळे ते शेतात किंवा इतरत्र कष्ट करण्यास तयार नाहीत. गरीब राजपूतदेखील सैनिकी पेशाहून वेगळा उद्योग करणे कमीपणाचे मानतात. पण सांप्रत सैनिकी पेशा सर्वांना करता येत नसल्यामुळे त्यांना शेतात किंवा अन्यत्र मजुरी करणे भाग पडते. सांप्रत शेती हाच त्यांचा मुख्य व्यवसाय झाला आहे.

राजपूत लोक उंच, सुदृढ व देखणे असतात. त्यांच्या स्त्रिया सौंदर्य, नाजुकपणा, गौर वर्ण व सुबक बांधा यांविषयी प्रसिद्ध आहेत. राजपुतांचा सरदारी थाटाचा पोषाख म्हणजे अंगरखा, अचकन, चोळणा, डोक्याला साफा व गळ्याभोवती रुमाल असा असतो. सर्वसाधारण लोक धोतर किंवा लुंगी, सदरा, जाकीट, खांद्यावर रुमाल किंवा उपरणे व डोक्याला फेटा असा पोषाख करतात. स्त्रिया घोळदार लेहेंगा, पोलक्यासारखी कोपरापर्यंतची चोळी आणि डोक्यावर ओढणी असा वेष करतात. त्यांच्या अंगावर खूप दागिने असतात.

सरदार व श्रीमंत राजपुतांत पडद्याची चाल आहे. पूर्वी ही चाल नव्हती. पण मुसलमानांच्या संपर्कामुळे व प्रभावामुळे ती प्रचलित झाली. गरीब व कष्टकरी स्त्रियांना मात्र पडदा वापरणे शक्य नसते; त्यामुळे त्यांच्यांत ही चाल नाही. पूर्वी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजपूत समाजात स्त्रियांना बराच मान होता. त्यांना स्वयंवर करता येत असे घरातल्या घरात त्या शिक्षण घेऊ शकत.

राजपूत स्त्री

अनेक राजपूत घराण्यांत विदुषी व कवयित्री स्त्रिया होऊन गेल्याची उदाहरणे इतिहासात आढळतात. स्वतःच्या शीलाचे रक्षण व्हावे म्हणून हजारो राजपूत स्त्रियांनी जोहार केल्याच्याही कथा आहेत. त्यांवरून त्यांच्या स्वाभिमानी वृत्तीची कल्पना करता येते.

खेळ, सण; उत्सव – या मर्दानी जातीच्या लोकांना पोहणे, घोड्यावर बसणे, कुस्ती, शिकार; तसेच तलवार, भाला, इ. शस्त्रे चालविणे व धनुर्विद्या या गोष्टी प्रिय होत्या. आजही त्यांना या खेळांची फार आवड असल्याचे दिसून येते. अचुक नेम मारण्यात हे लोक फार तरबेज असतात. कुस्तीचा छंद बहुसंख्य लोकांना आहे. शिकारीचा तर त्यांना इतका नाद आहे, की वसंतागमानंतर ते आहेरिया नामक उत्सव करून शिकारीला आरंभ करतात.

मर्दानी खेळांप्रमाणेच राजपुतांना फासे व बुद्धिबळे यांचीही खूप आवड आहे. फासे टाकून जुगार खेळणे रावापासून रंकापर्यंत सर्वांनाच प्रिय असते. मद्यपानाचा प्रसार या लोकांत अनिशय आहे आणि ते प्रतिष्ठित मानले जाते. यांच्यांत मद्याप्रमाणे अफूचे व्यसनही अमर्याद आहे.

दसरा, दिवाळी, होळी-रंगपंचमी हे सर्व सण राजपूत लोक साजरे करतातच. त्याव्यतिरिक्त त्यांचे काही विशेष सण व उत्सव असतात आणि हे लोक ते फार थाटाने साजरे करतात. आहेरिया हा उत्सव अशा प्रकारचा आहे. राजे, सरदार, सैनिक व इतर तरुण या उत्सवातील मृगयेत मोठ्या ईर्षेने भाग घेतात. रानडुकराची शिकार फार अवघड व धोक्याची असते आणि तीच या प्रसंगी मुख्यतः केली जाते. राजपुतांचे त्या शिकारीतले साहस, शौर्य व कौशल्य अवर्णनीय असते. त्या शिकारीत साहसी तरुणीही भाग घेतात व आपले तेज तरुणांना दाखवतात. त्यामुळे तरुणतरुणींना आपल्या जन्माचा जोडीदार निवडण्याची संधी या उत्सवात मिळते. राजस्थानात वसंतोत्सवही अतिशय जोमाने साजरा केला जातो. तो वसंतपंचमीपासून चाळीस दिवस चालतो. रंगीबेरंगी वस्त्रे परिधान करून गाणे-नाचणे-खेळणे व मौज करणे हाच लोकांचा मुख्य कार्यक्रम असतो. सर्व थरांतले व जाती-जमातींचे लोक त्यात मुक्तपणे भाग घेतात. हा कामदेवाचा उत्सव असतो. त्याच्याविषयीची ग्राम्यगाणी गात सर्व लोक भेदाभेद विसरून स्वच्छंदपणे हिंडतात.

रथसप्तमीला राजपूत लोक भानुसप्तमी म्हणतात. त्या दिवशी राजे, सरदार व सर्व लोक सूर्यमंदिरापर्यंत मिरवीत जाऊन सूर्याची पूजा करतात. सूर्य ही सूर्यवंशी राजघराण्यांची कुलदेवता होय.

फाग म्हणजे फाल्गुनातील होळी हा वसंतोत्सवाचाच एक भाग होय. त्यात महिनाभर रंग-गुलाल उधळला जातो. पण अष्टमी व पौर्णिमा या दिवशी त्याला विशेष बहर येतो.

त्यानंतर चैत्र महिन्यात स्त्रिया गौरीचा उत्सव करतात. त्यासाठी उपवनात जाऊन त्या फुलांच्या माळा व गजरे घालतात आणि झाडांना बांधलेल्या झोपाळ्यांवर बसून, झोके घेत गाणी म्हणतात. नंतर शेतातल्या मातीची गौरीची प्रतिमा करून तिची स्थापना करतात. जवळच काळ्या मातीत धान्य पेरतात. त्याला अंकुर फुटून ते मोठे झाले, की त्यांच्या भोवती फेर घरून नाचतात. अखेरच्या दिवशी गौरीची मिरवणूक काढून ती तलावापर्यंत नेतात. तिथे तिचे पूजन झाल्यावर फेर धरून नाचगाणे करतात. पुरुष प्रेक्षक बनून ते दृश्य पाहतात. सायंकाळी दारूकाम करतात.

त्यानंतर कामदेवाचा उत्सव होतो. चैत्र शुद्ध १३ व १४ या तिथींना मदनत्रयोदशी व मदनचतुर्दशी असे म्हणतात. त्या दोन दिवसांत सर्व स्त्रिया सर्वांगी पुष्पशृंगार करून मदनाची कामोद्दीपक गाणी म्हणतात व बेहोशपणे नृत्य करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वैशाख महिन्यात घाकटी गोर म्हणून मागच्याच उत्सवाची आवृत्ती करण्यात येते. राजपूत स्त्रिया वटसावित्रीचे व्रतही वैशाख शुद्ध चतुर्दशीस करतात. वैधव्यनिवारण हाच त्याचा हेतू असतो. ज्येष्ठ महिन्यात रंभापूजन केले जाते. रणांगणावर मृत्यू पावलेल्या वीरांचे स्वागत करण्यासाठी ज्या अप्सरा येतात त्यांची नायिका रंभा असते, म्हणून राजपूत स्त्रिया तिला पुजतात. ज्येष्ठातील दुसरा सण म्हणजे अरण्यषष्ठीचा होय. संततीची कामना करणाऱ्या स्त्रिया त्या दिवशी अरण्यात जाऊन काही विशिष्ट वनस्पतींचे भक्षण करतात. श्रावणातील नागपंचमी, रक्षाबंधन व कृष्णजन्म हे सणही राजपूत लोक महाराष्ट्रीयांप्रमाणेच साजरे करतात.

आश्विनातले नवरात्र व दसरा हे सण राजपूत लोक उत्साहाने करतात. त्यात शस्त्रपूजन व अश्वपूजन यांना फार महत्त्व असते. कारण शस्त्र हे वीरतेचे व अश्व हे प्रगतीचे प्रतीक आहे.

दीपावलीचा उत्सव राजस्थानातही अत्यंत महत्त्वाचा गणला जातो. त्यानंतर कार्तिक शुद्ध चतुर्दशीस जलयात्रेचा विशेष उत्सव मेवाडात साजरा करण्यात येतो. तलावाच्या काठी जाऊन वरुणाची पूजा करणे व पाण्यात दिवे सोडणे असा त्याचा कार्यक्रम असतो.

एकंदरीत राजपूत लोक फार उत्सवप्रिय असल्याचे दिसून येते. सतत ७–८ शे वर्षे परकीय आक्रमणांचे आघात होत असताना व त्यांच्या प्रतिकारासाठी नेहमी लढावे लागत असतानाही अनेक सणसमारंभ साजरे करण्याची वृत्ती त्यांच्या ठिकाणी कायम राहिली, ती त्यांच्या वीरतेला साजेशीच आहे.

देव-धर्म – राजपूत लोक मुख्यत: शिव आणि शक्ती यांचे उपासक आहेत. एकलिंगजी हे मेवाडच्या राजवंशाचे आराध्य दैवत होते. त्याचे सेवक म्हणून मेवाडचे राजे राज्यकारभार चालवीत. उदेपूरपासून १२ मैलांवर एकलिंगजीचे मंदिर आहे. ते राजस्थानातील प्रमुख शिवस्थान होय. त्याव्यतिरिक्त हजारो शिवमंदिरे जागोजागी बांधलेली आहेत.

हे लोक शक्तीची उपासना दुर्गा, गौरी, अन्नपूर्णा, शाकंभरी, आशापुरी, इ. अनेक नावांनी करतात. निरनिराळ्या घराण्यांच्या त्या कुलदेवता असून, लग्न झाल्यावर लगेच वधू-वर आपल्या कुलदेवींच्या दर्शनाला जातात.

राजपुतांत वैष्णव धर्माच्या भिन्नभिन्न उपपंथांचे अनुयायीदेखील बरेच आहेत. वल्लभ संप्रदायाचे अनुयायी कृष्णभक्त असून, नाथद्वारा हे त्यांचे फार मोठे पुण्यक्षेत्र आहे. काही राजपूत सूर्योपासक आहेत. हे लोक गणपती, हनुमान, इ. अन्य देवांनाही भजतात. काही लोक जलदेवतांचे पूजक, तर काही नागपूजक आहेत. तेजाजी, गूगा व पीपा या वीर पुरुषांची पूजा करणारेही बरेच आहेत. पितरांची पूजा व त्यांचे श्राद्ध या लोकांत प्रचलित आहे. हे लोक पिंपळाच्या वृक्षाला पवित्र मानतात.

विवाहप्रथा – राजपूत लोकांत पूर्वी बालविवाह फार प्रचलित होता. पण आता ती प्रथा बहुतेक बंद झाली आहे. एकाच घराण्याच्या अनेक शाखा होऊन त्यांच्या पोटजाती बनल्यामुळे अशा जाती लग्नसंबंधाला वर्ज्य मानतात. मुलीचा बाप नेहमी आपल्याहून उच्च कुळातील वर शोधतो. विवाहसंबंध ठरविण्याचे काम भाट किंवा चारण करतात, कारण त्यांना सर्व कुळांची चांगली माहिती असते. मग वधूचा पिता आपल्या ऐपतीप्रमाणे वराकडे अहेर पाठवतो. त्याला टीका म्हणतात. त्यात वस्त्रालंकार, नारळ, घोडा व इतर वस्तू असतात. वराचे लोकही वधूकडे वस्त्रालंकार पाठवतात. मग लग्नाची तिथी निश्चित केली जाते.

काही ठिकाणी मुलीचे लग्न प्रथम वराकडून आलेल्या कट्यारीशी लावतात. मग वधूकडील मंडळी वराच्या घरी जातात आणि तिथे मुख्य लग्नविधी होतो. सामान्यपणे विवाहविधी मुलीच्या घरी होतो. त्यासाठी वरपक्षाचे लोक वाजतगाजत तिथे जातात. वधूपक्षाचे लोक त्यांचे सीमांतपूजन करतात. आणि त्यानंतर मद्यपान होते.

राजपूत सरदार–राजपूत शैलीचे चित्र

विवाहविधी चालविण्यासाठी ब्राह्मण पुरोहित बोलावतात. तो देवतांना आवाहन करून होमहवन करतो. मग वधू-वर अग्नीला चार प्रदक्षिणा घालतात. पुरोहित मंत्र म्हणतात. स्त्रिया गाणी गातात. एवढे झाल्यावर लग्नविधी पुरा होतो.

यांच्यांत अनेक बायका करण्याची पद्धत आहे. पण श्रीमंत लोकांव्यतिरिक्त इतर लोक अधिक बायका सहसा करीत नाहीत. यांच्यांत घटस्फोटाची चाल नाही. विधवाविवाहही या लोकांना मान्य नाही. ती मर्यादा मोडून ज्यांनी विधवाविवाह केला, त्यांना नातरायत हे नाव मिळाले व त्यांना जातिबहिष्कृत करण्यात आले. पण आता त्यांची संख्या इतकी वाढली आहे, की ती एक वेगळी जातच बनली आहे. मात्र इतर जातीतले लोक त्यांच्याशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विवाहसंबंध करीत नाहीत. उच्च कुळातले राजपूत तर यांच्या-बरोबर भोजन करायला किंवा हुक्का प्यायलाही तयार नसतात.

मर्तिकप्रथा – राजपूत लोक प्रेते जाळतात. अगदी लहान मुलांची प्रेते मात्र पुरतात. तिरडीवर प्रेत बांधण्यापूर्वी त्याला स्नान घालून नवी वस्त्रे लेववतात. तिरडी वाहून नेणारे लोकही प्रथम स्नान करतात. स्मशानात गेल्यावर प्रेत चितेवर ठेवण्या-पूर्वी त्याला पुन्हा स्नान घालतात. ते चितेवर ठेवल्यानंतर त्यावर बेलाची पाने, चंदन, धूप व नारळ ठेवतात. त्याच्या हातापायांना तूप लावतात. ब्राह्मण मंत्र म्हणत असताना मृताचा वारस हातात पेटलेली ढलपी घेऊन चितेला पाच फेऱ्या घालतो व ती ढलपी प्रेताच्या मुखाला लावतो. मग चितेला अग्नी देतात.

मृताशौच दहा दिवस पाळतात. त्या दहा दिवसांत द्रोणात साखर, दूध व अफूचे पाणी घालून तो घराच्या छपरावर ठेवतात. तिसऱ्या दिवशी निवलेल्या चितेच्या राखेवर थोडे दूध ओतून मग राख व अस्थी गोळा करतात आणि त्यांचे नदीत किंवा तळ्यात विसर्जन करतात. नऊ दिवस रोज पिंडदान केले जाते. अकराव्या दिवशी सर्वजण स्नान करतात. मृताचे श्राद्ध करतात. मग नात्यातील मंडळींना मेजवानी देतात. तेराव्या दिवशी ज्ञातिभोजन असते. त्या वेळी साधू, भिकारी व नोकरचाकर यांनाही गोडाचे जेवण मिळते. मृतासाठी दानधर्म व श्राद्धे कर-ण्याची प्रथा या लोकांत बरीच आहे.

राजपूत संस्कृती – इ. स. चे ८ वे ते १८ वे शतक या सुमारे एक हजार वर्षांतील राजपुतांचा इतिहास युद्धे आणि विनाश यांनी भरलेला आहे. त्या काळात राजस्थानात कधीही शांतता नव्हती. तथापि तशा परिस्थितीतदेखील राजपुतांनी साहित्य व कला या क्षेत्रांत विलक्षण प्रगती केली होती. राज-समुद्र व जयसमुद्र यांसारखी संगमरवरी पाषाणाने बांधून काढ-लेली विशाल सरोवरे, पिछोला तलावाच्या आत व काठावर बांधण्यात आलेली अप्रतिम राजमंदिरे; जयपूर व जोधपूर येथील भव्य राजमहाल; जागोजागी बांधलेली देवालये; विजयाची स्मारके म्हणून बांधलेले उंच कीर्तिस्तंभ; जैन यतींसाठी बांध-लेले मठ व विहार, इ. असंख्य वास्तू आजही राजपुतांच्या कला-प्रियतेची साक्ष देत उभ्या आहेत.

सामान्यतः राजपूत राजे सुविद्य होते. त्यांच्यापैकी बहुते-कांना विद्वान, कवी, विद्वानांचा परामर्श घेणारा अशी विशेषणे लावलेली आढळतात. अनेक राजांनी स्वतः ग्रंथरचना केलेली असून, काहींनी निरनिराळ्या विद्वानांकडून ग्रंथ रचून घेतले होते. राजस्थानात काव्य, नाटक, संगीत, शिल्प, आयुर्वेद, ज्योतिष, इ. विविध विषयांवर लिहिलेले ग्रंथ उपलब्ध झाले आहेत. त्यांतील काही शिलाखंडांवर कोरलेले आहेत. राजपूत राजांपैकी राणा कुंभा याची साहित्यसेवा विशेष उल्लेखनीय आहे. तो षड्दर्श-नांचा पंडित असून, संगीतशास्त्रातही पारंगत होता. त्याने स्वतः संगीतावर ग्रंथ रचले आहेत आणि शिल्पशास्त्रावर ग्रंथ रचून घेतले आहेत. त्याने निर्माण केलेला कीर्तिस्तंभ; कुंभस्वामी, आदिवराह इत्यादींची मंदिरे; कुंडे, तलाव, कुंभलगडचा किल्ला ही त्याच्या कलाभिरुचीची साक्ष देतात. बाप्पा रावळ, रायमल, प्रताप, अमरसिंह, राजसिंह, जयसिंह, इ. अनेक राजपूत राजांनी साहित्याची व कलेची सेवा केली आहे. मीराबाईची भक्तिरसाने ओथंबलेली पदे तर सर्वतोमुखी झाली आहेत. सारांश उच्च संस्कृतीची जी लक्षणे आहेत, त्यांत कला व साहित्य ही प्रधान लक्षणे असून, त्यांचा राजपुतांनी उत्कट विकास करून दाखविला आहे. [म. यु. भा.; रा. रा. उ. ऱ्हा.; रा. जा.; राजपूत-संस्कृति– ह. वा. देशपांडे, १९३६; ट्रा. का. वॉ.; एन्सा. रि. ए.; वि. मुं. रा. प.; हिं. स. सं. वि.]

राजपूत चित्रशैली

शहाजहान बादशहाच्या कारकीर्दीत मोगल चित्रशैलीची उपेक्षा सुरू झाल्या-नंतर मोगल दरबारातून परागंदा झालेले काही चित्रकार राज-स्थानातील राजपूत राजांच्या आश्रयाला गेले. तिथे त्यांनी ज्या नवीन पद्धतीची चित्रे काढली, तिला राजस्थानी किंवा राजपूत चित्रशैली हे नाव मिळाले. रामायण, महाभारत, गीतगोविंद, इ. ग्रंथ व संतसाहित्य यांतील लोकप्रिय प्रसंगांवरील चित्रे त्यांनी काढली, त्याचप्रमाणे लोक-जीवनातील प्रसंगही चित्रांकित केले. त्यामुळे त्यांची कला लोकाभिमुख झाली. दरबारी बंधने नाहीशी झाल्यामुळे कला-कारांच्या स्वतंत्र प्रतिभेला व तरल कल्पनेला वाव मिळू लागला.

अभिसारिका राधा—राजपूत शैलीचे चित्र

त्यांनी राधाकृष्णांच्या लीलांचे चित्रण अधिक प्रमाणात केलेले आढळते. मात्र राधाकृष्णांच्या प्रणयाचा प्रतीकात्मक उपयोग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करून आत्मा व परमात्मा यांचे मीलन त्यांनी आपल्या चित्रांत दाखविले आहे, असे कलामर्मज्ञ म्हणतात. गीतगोविंदावरील

रागमाला – राजपूत शैलीचे चित्र

चित्रे रचनेच्या दृष्टीने साधी असून, त्यांत गडद रंगाच्या पार्श्वभूमीवर छायेसारखी मनुष्याकृती, रेषेची सुबकता व तालबद्ध हालचाल या गोष्टी दिसून येतात. त्यांच्या रंगसंगतीत योजनाबद्धता आढळते. रसिकप्रिया काव्यावरील चित्रांतील मनुष्याकृतींवर मोगल शैलीची छाप पडली आहे. चेहऱ्याची एक बाजू चितारणे हे मोगल शैलीचे वैशिष्ट्य त्या चित्रांत आढळते. रागमाला, बारहमास व सहा ऋतू यांवरील चित्रांत तर राजपूत कलावंतांची प्रतिभा पराकोटीला गेलेली दिसते.

राजपूत कलावंत निसर्गपूजक असून, निसर्गातील चेतना व प्रफुल्लता रेखांकित करण्यातले त्यांचे कौशल्य अपूर्व आहे. त्यासाठी त्यांनी प्रतीकांचे माध्यम वापरले आहे, तेही मनोरम वाटते. अशा आलंकारिक पद्धतीने चित्रे काढताना कलाकाराला स्वच्छंद कल्पनाविलास करता येतो आणि आत्माभिव्यक्तीही सहज करता येते. प्रतीकांच्या उपयोगामुळे राजपूत चित्रकला सजीव वाटते. मानवी आकृतीच्या चित्रणात डोळ्यांचा आकार माशासारखा काढून चित्रित व्यक्तींचे मनोभाव कलाकारांनी सहजपणे व्यक्त केले आहेत. ही चित्रे प्रतीकात्मक व आलंकारिक असूनही व्यक्तीच्या भावनांची निदर्शक ठरली आहेत. मोगल चित्रशैली व राजपूत चित्रशैली यांतले मुख्य अंतर हे, की पहिली दरबारी आहे, तर दुसरी लोकाभिमुख आहे. मोगल बादशाहांच्या आश्रयाला असलेल्या कलाकारांनी राजे, बादशाहा, सरदार, संत यांची चित्रे काढली आणि दरबारातील प्रसंग चित्रित केले. राजपूत व पहाडी कलासंप्रदायात राधा-कृष्ण हे स्त्री-पुरुषांच्या शाश्वत मीलनाचे प्रतीक होत. याव्यतिरिक्त हरिण, मोर, मेघ, वर्षा, वीज, सर्प, कदंब, लता, यमुनेचा प्रवाह, इ. सुबोध प्रतीकेही या संप्रदायात वापरलेली आहेत. राजपूत चित्रकलेत काल्पनिक सृष्टीचे चित्रण केलेले नसून, वास्तव सृष्टीलाच लाक्षणिक रूप दिलेले आहे आणि प्रणयाला प्राधान्य दिलेले आहे. गीतगोविंद आणि तशा प्रकारची हिंदी गीते यात जी मानवी प्रीती व निसर्गाची प्रफुल्लता आढळते, तीच राधा-कृष्णांच्या चित्रांत दिसून येते. शिव-पार्वतींच्या चित्रात मात्र उंच उजाड पर्वतशिखरे, शिलाखंड व भले मोठे देवदार वृक्ष दिसतात. त्यांतील उदासीनता शिव-पार्वतीच्या एकाग्र तपस्येला अनुकूल वाटते.

राजस्थानातील जोधपूर, जयपूर, उदयपूर, कोटा, बूंदी, किशनगढ, नाथद्वारा, अलवार, बीकानेर, इ. निरनिराळ्या संस्थानांत निरनिराळ्या चित्रकारांनी या चित्रशैलीची जोपासना केली. वेगवेगळ्या ठिकाणच्या कलाकारांच्या चित्रपद्धतीत थोडासा फरकही दिसून येतो. त्यामुळे त्या त्या पद्धतीला त्या त्या स्थानाचे नाव प्राप्त झाले आहे. जयपूर, जोधपूर, कोटा, बीकानेर व नागोर येथील राजप्रासादांत व मंदिरांत राजपूत शैलीची भित्तिचित्रे आढळतात.

राजस्थानी गवळण – राजपूत शैलीचे चित्र

पाहा – चित्रकला.

[रूपसौंदर्य; श्री. महेंद्रसिंह – अजन्ता, ऑगस्ट १९५८; राजस्थान; भा. सं. क.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजप्रासाद राजाचे निवासस्थान. राजवाडा. प्राचीन ग्रंथांत याला प्रासाद, राजगृह, राजभवन, राजगेह, राजनिवेशन, इ. प्रतिशब्द दिलेले आढळतात. प्राचीन काळी राजवाडा हा नगराचा केंद्रबिंदू समजला जाई. राजवाडा बांधण्यासाठी प्रथम भूमीची निवड करीत. ती बहुधा नगराच्या मध्यभागी असे. ही भूमी बरीच मोठी असे. नगराच्या एक-नवमांश भागावर राजप्रासाद बांधावा, असे कौटिल्याने सांगितले आहे. मयमतात हे प्रमाण एक-सप्तमांश एवढे दिले आहे. राजप्रासाद बांधण्याच्या पूर्वी विटा भाजून तयार करीत आणि जंगलातून लाकूड आणून ठेवीत. वास्तुविद्येत प्रवीण असलेले लोक राजवाडा सुंदर व कलापूर्ण बनविण्याच्या कामी साहाय्य करीत. राजवाडा बांधण्यासाठी खूप खर्च येत असे. खारवेल राजाच्या महाविजयप्रासाद नामक राजवाड्याला कित्येक लाख मुद्रा खर्च आला होता, असे हाथीगुंफेतील एका लेखात लिहिलेले आहे.

रामायणात राजप्रासादाचे सप्तभौम, अष्टभौम, अनेकभौम असे प्रकार सांगितले आहेत. भौम म्हणजे मजला होय. यावरून त्या काळी राजवाडा अनेकमजली असे, असे कळते. तसेच राजवाड्याला अनेक चौकही असत. प्रत्येक चौकाला मोठे द्वार असे. दशरथाच्या राजभवनाला पाच चौक होते. प्रासादाच्या वरच्या मजल्यावर दशरथ राहत असे. युवराज रामचंद्राचे भवन दशरथाच्या भवनापासून थोडे अलग होते. त्यात तीन चौक होते. वसिष्ठाचा रथ रामचंद्राच्या भवनात तिसऱ्या चौकापर्यंत गेला होता, असे रामायणात सांगितले आहे. पहिल्या चौकात मुख्य द्वार होते. मधल्या चौकात राजाचे हत्ती-घोडे बांधलेले असत. तिसऱ्या चौकात राम आणि सीता यांचे निवासस्थान होते. या चौकाला प्रविविक्त कक्षा असे म्हटले आहे. इथे स्त्र्यध्यक्ष नामक वृद्ध प्रतीहार हातात वेत्रदंड घेऊन उभे राहत आणि काही युवक शस्त्रसज्ज होऊन रक्षणार्थ खडे असत. कौसल्येच्या महालाला सात चौक होते. त्यांपैकी पाच चौकांनंतर अंतःपुर होते. त्यालाही दोन चौक होते.

वाल्मीकिरामायणाच्या सुंदर कांडात (सर्ग ६-७) रावणाच्या राजभवनाचे विस्तृत वर्णन केले आहे. त्या समस्त राजभवनाला आलय असे म्हटले आहे. आलयाच्या मध्यभागी रावणाचे भवन होते. त्याच्या भवनात शृंगाराची सर्व साधने उपलब्ध होती. अशोकवाटिकेतील त्याचा चैत्यप्रासाद गोलाकार व खूप उंच होता. तो शुभ्र वर्णाचा होता. त्याला हजार सुवर्णखचित स्तंभ होते आणि पोवळ्याचे जिने होते.

हर्षचरितात स्कंधावाराचे म्हणजे राजाच्या शिबिराचे वर्णन केलेले आहे. त्या शिबिरातही राजासाठी वेगळा महाल बांधलेला असे. हर्षाच्या स्कंधावाराच्या बाहेरच्या भागात प्रवेश केल्याबरोबर एका बाजूला गजशाला व दुसऱ्या बाजूला अश्वशाळा होती, असे हर्षचरितात सांगितले आहे. त्यानंतर राजाला भेटायला आलेले राजे, सन्मान्य व्यक्ती व परदेशातून आलेले दूत यांची निरनिराळी शिबिरे होती. स्कंधावाराच्या बाहेरच्या भागात बाजारही होता, असे हर्षचरितावरून समजते.

राजकुल — स्कंधावाराच्या अंतर्भागात राजकुल असे. राजकुल म्हणजे सम्राटाचे राजभवन होय. त्याच्या द्वारावर पहारेकरी असून, सर्वांना आत प्रवेश मिळत नसे. राजकुलात अनेक चौक असत. हर्षाच्या राजकुलाला चार चौक होते. ते अत्यंत विस्तृत होते. हर्षाच्या राजकुलाच्या पहिल्या चौकात राजाचे हत्ती व घोडे याच्या शाला होत्या. राजाचे वाहन पहिल्या चौकात येऊ शकत असे.

राजकुलाच्या दुसऱ्या चौकात हर्ष राजाचा आस्थानमंडप होता. त्याला आस्थान, राजसभा व सभा अशीही नावे दिलेली

राजकुल



आहेत. कादंबरीत याला सभामंडप असे म्हटले आहे. या सभेत राजाच्या दरबारातील लोक एकत्र जमून महत्त्वाच्या विषयावर खलबते करीत. राज्यवर्धनाच्या मृत्यूनंतर हर्षाने याच आस्थानमंडपात प्रमुख दरबारी मंडळीशी सल्लामसलत केली.

राजकुलाच्या चौथ्या चौकात भुक्तास्थानमंडप असे. भोजनोत्तर राजा या मंडपात आपल्या इष्टमित्रांबरोबर वार्तालाप करीत असे. बाण कवी हर्षाला भेटण्यासाठी याच मंडपात गेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होता. आस्थानमंडप किंवा बाह्यास्थानमंडप आणि भुक्तास्थानमंडप यांत आणखी एका दृष्टीने फरक होता. आस्थानमंडपात दरबारातील सर्व लोक एकत्र येत असत; पण भुक्तास्थानमंडपात राजाचे मंत्री, इष्टमित्र, सामंत, इ. निवडक लोकांनाच प्रवेश असे. त्यावरून डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांनी त्यांची तुलना अनुक्रमे मोगलांच्या दरबार–आम व दरबार–खास यांच्याशी केली आहे.

धवलगृह – राजसभेच्या आतल्या भागात धवलगृह असे. हर्षाचे धवलगृह राजभवनाच्या तिसऱ्या चौकात होते, असे बाण सांगतो. धवलगृहाच्या द्वारपालांना अभ्यन्तर-प्रतीहार असे नाव होते. धवलगृहाला काही मजले असत. मजल्यांवर जाण्यासाठी जिने असत. राजेलोक वरच्या मजल्यांवर राहत असत. धवलगृहात अंगण असे व त्याच्या चारही बाजूंना दालने असत.

धवलगृहाच्या वरच्या मजल्यावर राजा आणि त्याच्या राण्या यांच्या राहण्याच्या खोल्या असत. याच मजल्यावर एका बाजूला वासगृह, प्रग्रीव व सौध अशा आणखी तीन खोल्या असत. वासगृहाच्या भिंतींवर चित्रे काढलेली असत. म्हणून तिला चित्रशालिका असेही म्हणत. सौध हा राण्यांच्या मनोविनोदनासाठी बांधीत. प्रग्रीवकात राजाच्या भावांच्या स्त्रिया बसलेल्या होत्या, असे हर्षचरितात सांगितले आहे.

याच मजल्यावर दुसऱ्या बाजूला प्रग्रीवकाच्या समोर चंद्रशालिका नावाचे एक दालन असे. ते बरेचसे उघडे असून, हवा खाण्यासाठी राण्या त्याचा उपयोग करीत. त्याच्या दोन बाजूंना आणखी दोन दालने असत. त्यांत बसून संगीत, नृत्य, इ. कलांनी राजा आपले मनोरंजन करीत असे.

गुप्त सम्राटांचा पाटलिपुत्र नगरातील राजप्रासाद अत्यंत भव्य, कलापूर्ण व वैभवशाली होता. राजप्रासादाच्या प्रत्येक बाजूला सुंदर स्तंभ उभारलेले होते. आणि त्यांच्यावर चारही बाजूंनी सुवर्णाच्या द्राक्षवेली करून चढवलेल्या होत्या. त्यांच्यावर ठिकठिकाणी चांदीचे मनोहारी पक्षी जडवले होते. राजप्रासादाच्या भोवती विस्तीर्ण उद्यान होते. त्यात असंख्य पाळीव मोर व जीवक पक्षी होते. उद्यानात अनेक छायाकुंज होते. तसेच देशी विदेशी अनेक वृक्षही होते. हे वृक्ष सदैव हिरवेगार असत आणि त्यांची पाने कधी गळून पडत नसत. उद्यानात असंख्य पक्षी स्वैर विहार करीत असत. तसेच, तिथे अनेक विशाल जलाशय निर्माण करून, त्यांत मासे सोडलेले असत.

राजप्रासादाच्या बाह्य भागाचे हे वर्णन ग्रीक लेखकांनी केले आहे. राजप्रासादाच्या अंतर्भागाची माहिती कौटिल्याच्या अर्थशास्त्रावरून कळते, ती अशी–

राजप्रासाद सुरक्षित राहावा म्हणून त्याच्या भोवती तट व खंदक असत. प्रासादाच्या मागच्या भागात स्त्रियांची राहण्याची व्यवस्था असे. प्रसूतिकालात उपयोगी पडणाऱ्या अनेक औषधींचा साठा त्यांच्याकडे असे. त्यांच्या निवासस्थानाच्या बाहेरच्या बाजूला राजकुमार व राजकुमारी यांचे निवासकक्ष असत. त्यांच्या समोरच्या बाजूला अलंकारभूमी, मंत्रभूमी, उपस्थान; तसेच युवराज व विविध विभागांचे अध्यक्ष यांची कार्यालये असत. या दालनांच्या मधल्या रिकाम्या जागेत राणीवशाचे रक्षण करणारे सैनिक असत.

राजाचे राहण्याचे महाल थोडे अलग असत. राजाच्या संरक्षणासाठी धनुर्धारी स्त्रिया नेमलेल्या असत. तसेच त्याच्या नोकर-चाकरांचे गण शेजारच्या दालनांत खडे असत.

राजप्रासादाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यात अनेक चक्रव्यूह, गुप्त वाटा, भुयारे, चोरजिने, कळ दाबताच सरकणाऱ्या फरश्या, पोकळ स्तंभ, इ. केलेले असत. आग आणि विषारी जीवजंतू यांपासून राजाचे संरक्षण करण्यासाठी अनेक उपाय योजलेले असत. साप दिसताक्षणीच चीत्कार करून सूचना देण्यासाठी अनेक पोपट तिथे पाळलेले असत. तसेच विष पाहिल्यावरोबरच



बीरबलाचा राजवाडा – फत्तेपूर सिक्री

ज्यांच्यावर विविध प्रतिक्रिया होतात, असे अन्य काही प्रकारचे पक्षीही राजवाड्यात ठेवलेले असत.

नंतरच्या कालातही भारतातील राजेरजवाड्यांनी भव्य, सुंदर व कलापूर्ण राजवाडे बांधले. त्यांसाठी त्यांनी अमाप पैसा खर्च केला. दिल्ली, आग्रा व फत्तेपूर सिक्री येथे मोगल राजांनी बांधलेले राजवाडे प्रसिद्ध आहेत. मध्य भारतात आणि राजस्थानात तर अनेक भव्य राजप्रासाद आहेत. त्यांपैकी चार राजवाडे स्थापत्यकलेच्या दृष्टीने प्रशंसनीय आहेत.

त्यांपैकी पहिला राजवाडा ग्वाल्हेर येथील आहे. त्याचे नाव मानमंदिर असे असून, तो राजा मानसिंगाने बांधला आहे. हा प्रासाद चारशे फूट उंचीच्या टेकडीवर बांधलेला असून, त्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनेक तटबंद्या आहेत. टेकडीच्या सर्व बाजू कापून काढण्यात आल्या असल्यामुळे मुद्दाम ठेवलेल्या दोन वाटांशिवाय तो गड चढून जाणे कठीण आहे. दोन्ही वाटांवर प्रवेशद्वारे आहेत. याच विशिष्ट टेकडीवर हा राजवाडा बांधण्याचे मुख्य कारण म्हणजे तिथे तीन प्राचीन देवालये आहेत. टेकडीच्या माथ्यावर हे मान-मंदिर बांधलेले असून, राजवाडा आणि किल्ला या दोहोंचेही ते मिश्रण आहे. फिकट गुलाबी रंगाच्या दगडांनी हा वाडा बांधलेला आहे. त्याच्या भिंतींना आतल्या बाजूने झिलईदार अशा हिरव्या व पिवळ्या कौलांचा थर बसवलेला आहे. त्यामुळे हा वाडा बहुरंगी वाटतो. वाड्याच्या भिंती सरळसोट नाहीत. त्यांना मध्येमध्ये घुमटांचे बुरुज आहेत. हे घुमट पूर्वी तांब्याने मढवलेले होते व त्यांवर सोन्याचे कळस बसवलेले होते. प्रासादाची लांबी तीनशे फूट व रुंदी एकशे साठ फूट आहे. त्यातील खोल्या व दिवाणखाने यांची संख्या चाळीस आहे. राजवाड्यातील कमानी आणि स्तंभ यांवरील नक्षीकाम अप्रतिम आहे. थोडक्यात सांगायचे तर हा सबंध राजवाडा म्हणजे हिंदू स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे.

ओर्च्छा आणि दतिया येथे दोन भव्य राजवाडे आहेत. ते बांधल्याला तीनशे वर्षे होऊन गेली; पण त्यांच्यावर हवामानाचा कोणताच परिणाम झालेला नाही. हे दोन्ही राजवाडे बुंदेला राजपूत राजांनी बांधले. त्यांपैकी ओर्च्छाचा राजवाडा



दतिया येथील राजवाडा

जुना आहे. हा वाडा बांधण्याकरिता अनेक दशके लागली. राजा वीर सिंगदेव (इ. स. १६०५–२६) याने त्याचा बराचसा भाग बांधला. वीर सिंगावर मोगल सम्राट जहांगीर याची विशेष मर्जी होती. म्हणून वीर सिंगाने ओर्च्छाच्या राजवाड्याला जहांगीर-महाल असे नाव दिले. या राजवाड्याची जागा उंचावर असून, बेतवा नदी राजवाड्याच्या भिंतींना स्पर्शून जाते. सौंदर्य आणि संरक्षण अशा दोन्ही दृष्टींनी या नदीचा उपयोग होतो. दतियाचा राजवाडा इ. स. १६२० मध्ये बांधला गेला. तीही जागा उंचावर असून, त्याच्या एका बाजूला सरोवर आहे. या दोन राजवाड्यांत बरेच साम्य आहे. त्यांना अनेक मजले असून, त्यांत ऐसपैस असे अनेक दिवाणखानेव खोल्या आहेत. जहांगीर-महालात ऐशी खोल्या असून, त्या बाहेरच्या सज्ज्यांनी एकमेकींना जोडलेल्या आहेत. हे राजवाडे इतके विशाल आहेत



जहांगीरमहाल – ओर्च्छा

आणि त्यांची रचना इतकी गुंतागुंतीची आहे, की त्यांची तुलना चक्रव्यूहाशीच करता येईल. त्यांना अनेक शिखरे असून, त्यांत विविधता आहे. त्यांचे घुमट आणि सज्जे फ्रेंच राजवाड्यातील घुमट आणि सज्जे यांप्रमाणे आहेत. बाहेरच्या भिंतींना झुलते सज्जे आहेत. खिडक्या दगडांच्या असून, त्यांवर कोरीव काम केलेले आहे. ओर्च्छा ही बुंदेला राजपूत राजांची राजधानी होती. मराठ्यांनी जेव्हा हा प्रदेश पादाक्रांत केला, तेव्हा त्यांनी बुंदेलखंडाची राजधानी झाशी येथे नेली. त्यामुळे साहजिकच ओर्च्छाचे व तिथल्या राजवाड्याचेही महत्त्व पुढच्या काळात कमी झाले.

दतियाच्या राजवाड्याचा इतिहास थोडा वेगळा आहे. हा राजवाडा बांधून झाल्यावर राजा वीर सिंगदेव याने शहाजहान बादशाहाविरुद्ध बंड केले. ते बंड शहाजहानाने मोडून काढले. त्याचा परिणाम असा झाला, की वीर सिंगाला वनवासात जावे लागले. या राजवाड्यात त्यानंतर तो कधीच राहायला गेला नाही. अनेक शतके हा वाडा तसाच ओस पडून राहिला होता. इ. स. १९४७ साली फाळणीच्या वेळी अनेक सिंधी निर्वासित त्यात राहून गेले. त्यानंतर पुन्हाही तो ओसच आहे.

भरतपूरपासून २२ मैलांवर डीग येथे चौथा राजवाडा आहे. राजा सुरजमल याने तो बांधला. इ. स. १७५६ मध्ये त्याच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बांधकामाला सुरवात झाली. हा राजवाडा सपाटीवर बांधलेला असून, त्याचीबांधणी मोगल पद्धतीची आहे. त्याच्या दोन बाजूंना दोन मोठे कृत्रिम तलाव असून, पश्चिमेकडील तलावाचे पाणी मुख्य राजवाडयाच्या भिंतींना स्पर्श करते. दोन तलावांच्या मध्ये एक ऐसपैस गच्ची आहे. तिच्यावर पाटाने पाणी खेळविलेले



सूरजमलाचा राजवाडा–डीग

असून, मोगल पद्धतीचा बगीचा तयार केलेला आहे. त्यात कारंजीही आहेत. बगीच्याच्या चारही बाजूंना राहण्याच्या खोल्या आहेत. उत्तर भारतातील बहुतेक सर्व राजवाडे किल्ल्यात बांधलेले आहेत. पण हा राजवाडा किल्ल्यात बांधलेला नाही. अर्थात यालाही किल्ल्याचे साहचर्य आहेच. पूर्वेकडील तलावाच्या पलिकडे एक किल्ला बांधलेला आहे. एके काळी हा किल्ला अजिंक्य मानला जात होता. हा राजवाडा मोगल स्थापत्यशैलीचा चांगला नमुना असला, तरी तो मुसलमानांच्या राजवाडयांपेक्षा अनेक बाबतींत भिन्न आहे. त्याचप्रमाणे मुसलमानी राजवाडयांपेक्षा तो भव्य आणि विशाल आहे.

मोगल पद्धतीच्या राजवाडयांना अनेक कमानी आणि जोड-इमारती असतात. त्यामुळे त्यांना राजवाडे म्हणण्यापेक्षा छोटी शहरे म्हणणेच अधिक समर्पक ठरेल. भारतातील मोगलकालीन प्रेक्षणीय राजवाडे लहान लहान हिंदू राजांनीच बांधलेले होते. स्थापत्यकलेच्या दृष्टीने ते अत्यंत सुंदर असून, मोठमोठ्या शाही राजवाडयांनाही त्यांची बरोबरी करता येत नाही. [रा. का. सं.; चं. मो. उ. का.; प्रा. भा. न. न. जी.; श्री. चौधरी–मार्च ऑफ इंडिया, जुलै १९५६]

राजराजेश्वर व्रत

एक काम्य व्रत. राजराजेश्वर म्हणजे कुबेर होय. ज्या अष्टमीला स्वाती नक्षत्र आणि बुधवार असेल, त्या दिवशी हे व्रत करतात. गोड पदार्थांचा नैवेद्य दाखवून शिवाची पूजा करणे हा या व्रताचा प्रधान विधी आहे. शिवमूर्तीच्या समोर आचार्याला गळ्यातील एक हार, करगोटा, कर्णवलय, दोन आंगठ्या, एक हत्ती किंवा घोडा यांचे दान द्यावे, असे सांगितले आहे. हे व्रत यक्षपूजेशी संबंधित असावे, असे वाटते. फल– कुबेराच्या ऐश्वर्याची प्राप्ती. [हि. ध.]

राजराजेश्वरी

एक देवता. दशमहाविद्यांमधील जी चौथी शक्ती भुवनेश्वरी, तिलाच भैरव तंत्रात राजराजेश्वरी असे म्हटले आहे. राजांहून अधिक सरस वैभव भोगणारी आणि ब्रह्मा, विष्णू, महेश, इ. देवतांची आसने करून त्यांवर बसणारी म्हणून हिला राजराजेश्वरी म्हटले आहे. ब्रह्मा विष्णू, रुद्र, इ. देवतांनी आपापली नेमलेली कामे सोडून दिली आणि त्यामुळे ते प्रेतरूप झाले, अशी शाक्त तंत्रांतली कल्पना आहे. अशा वेळी ही त्यांच्या प्रेतांवर उभी राहून विश्वव्यवस्था चालवते, असे म्हटले आहे.

उत्तर प्रदेशातील उनाव जिल्ह्यात बांगरमऊ नावाच्या गावी हिचे प्रसिद्ध मंदिर आहे. इथली मूर्ती तंत्रशास्त्र व योगशास्त्र यांच्या आधारे बनविली आहे, असे सांगतात. याव्यतिरिक्त नेपाळमध्ये आणि रामेश्वर व विदर्भातील मंडला किल्ला या ठिकाणी हिची मंदिरे आहेत.

राजराजेश्वरीला राजरा असेही म्हणतात. महाराष्ट्रातील काही ब्राह्मणांच्या घरी हिचे टाक असतात. या टाकांत तिच्या सात प्रतिमा असतात. या देवीच्या नावाने एक कुलधर्म असतो. घरात लग्नकार्य झाले म्हणजे हा कुलधर्म करतात. काही ठिकाणी चैत्री पौर्णिमेलाही हा कुलधर्म करतात. याला साडेतीन माणसांचा अथवा साडेसात माणसांचा कुलधर्म म्हणतात. साडेसात माणसांत एक घरचे मेहूण, एक बाहेरचे मेहूण, एक ब्राह्मण, एक सुवासिनी, एक ब्रह्मचारी (अर्धा माणूस) आणि एक विधवा, अशी माणसे जेवायला बोलावतात. यांतील विधवेला मायगोसावीण किंवा विठ्ठलसवाष्ण असे नाव आहे.

या वेळी केलेला स्वयंपाक साडेतीन किंवा साडेसात माणसांपुरताच करतात. जेवण करून उरलेले अन्न जमिनीत पुरतात किंवा गावाबाहेर नेऊन टाकतात. हा स्वयंपाक घरातल्या कुमारिकांच्या दृष्टीला पडू द्यायचा नसतो, अशी समजूत आहे. पाहा -मायराणी [श्री. ना. गो. चापेकर – म. सा. प., वर्ष १ ले, अंक २ रा; देवीकोश २ व ३; दे. ऋ. ब्रा. प]

राजवंशी

आसाममधील एक जात. यांची काही वसती बंगालच्या उत्तर भागातही आहे. यांचे मूळचे नाव कोच असे आहे. आसामच्या उत्तरभागात हे कोच याच नावाने ओळखले जातात. गोलपारा व कुचबिहार या भागात त्यांना राजवंशी म्हणतात. बंगालच्या उत्तरभागात वसलेले कोच स्वतःला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजवंशी न म्हणता क्षत्रिय म्हणतात. मात्र हे सर्वच लोक जानवे घालतात.

आसाममधील कचारी आदिवासी लोक आणि मध्यभारतातील क्षत्रिय लोक यांच्या संबंधातून कोच उत्पन्न झाले, अशी समजूत आहे.

कोच जातीतील एक पुरुष विश्वसिंह याने उ. बंगालमध्ये राज्य स्थापले होते. कुचबिहार ही त्याची राजधानी होती. हा कोच राजवंश पुढे फार प्रख्यात झाला. त्या वंशाच्या थोरवीमुळे कोच जातीचे लोक स्वतःला राजवंशी म्हणू लागले. मात्र इतर जातींचे लोक त्यांना कोच याच नावाने ओळखत होते.

या लोकांनी राजवंशी हे नाव घेतले असले, तरी ते मूळचे फार घाणेरडे व मागासलेले लोक होते. इ. स. च्या २० व्या शतकात त्यांच्यांत सुधारणेची चळवळ होऊन ते स्वतःला क्षत्रिय म्हणू लागले. यांच्यांतले जे लोक डुकराचे मांस किंवा कोंबडी खाणे व मद्य पिणे बंद करून वैष्णव दीक्षा घेतात, त्यांना शरणिया म्हणतात. काही वर्षांनंतर हे शरणिया राजवंशी जातीत सामील होतात. अशा प्रकारे बरेच आदिवासी ख्रिस्ती धर्मात न जाता राजवंशी म्हणजे हिंदू बनले आहेत. या लोकांत शिक्षणाचा प्रसार फारसा झालेला नाही. तथापि हे लोक शिष्टाचार पाळण्यात फार दक्ष असतात.

विवाहप्रथा – या लोकांत गांधर्व व ब्राह्म या दोन्ही विवाहपद्धती रूढ आहेत. दुसऱ्या पद्धतीच्या विवाहात वधूला एका पाटावर बसवून वराभोवती सात वेळा फिरवितात. त्या वेळी न्हावी तिच्या डोक्यावर छत्री धरतो. या लोकांत बालविवाहदेखील रूढ आहे. पाहा– कोच. [म. ज्ञा. को.; ट्रा. इं.]

राजवा

एक ग्रामदेव. याचे ठाणे मध्य प्रदेशातील होशंगाबाद जिल्ह्यात आहे. याच्या नावाचा पुकारा केला, तर सर्प-विष उतरते, अशी समजूत आहे. ज्याला सर्पदंश झाला असेल त्याने एखादे वस्त्र अगर दोरी घेऊन, त्याला पाच गाठी मारून, ते गळ्यात घालायचे असते. नंतर 'दोहाई राजवादेव' म्हणजे 'राजवा देवा, कृपा कर' असे म्हणत ओरडायचे असते. मग 'विष उतरलें की, तुझ्या दर्शनाला येईन' असा नवस करायचा असतो. विषमुक्त झाल्यावर देवाची पूजा करून गळ्यातील दोरी अथवा वस्त्र काढून टाकतात. [देवीकोश ३]

राजवाड

एक जमात. या लोकांची वस्ती बिहार व पश्चिम बंगाल, या प्रदेशात आढळते. डॉ. बुचननच्या मते हे आदिवासी असावे. बिहारच्या काही भागांतील हे लोक आपला संबंध भुइयांशी लावतात. सिरगुजामधील व भोवतालच्या भागातील लोक आपल्याला अधःपतित क्षत्रिय म्हणतात. परंतु बंगालमधील राजवाड लोक आपला जन्म कुर्मी व कोल यांच्या संकरातून झाला, असे सांगतात.

यांचा सामाजिक दर्जा निकृष्ट असून, ते स्वतःला वैष्णवपंथी म्हणवून घेतात. यांची धार्मिक कृत्ये पतित ब्राह्मण करतात.

शेती हा यांचा व्यवसाय आहे. पूर्वी हे लोक दरोडेही घालीत असत. हे अभक्ष्य भक्षण करीत नाहीत.

विवाहप्रथा – यांच्यांत बाल व प्रौढ अशा दोन्ही विवाहपद्धती रूढ आहेत. विधवाविवाह सगाई पद्धतीने होतो. घटस्फोटालाही परवानगी असते.

मर्तिकप्रथा – हे मृतांना जाळतात आणि त्यांच्या अस्थी जलात विसर्जित करतात. [से. इं. १९५१ वे. बं.; डाल्टन – इं. स्ट. पा. प्रे., एप्रिल १९६०]

राजवाडे, वि. का.

(१८६४–१९२६ इ. स.) महाराष्ट्रातील अग्रगण्य इतिहाससंशोधक. यांचे संपूर्ण नाव विश्वनाथ काशीनाथ राजवाडे. हे मूळचे कोकणातील वरसई गावचे. यांचे आजोबा मळवलीजवळच्या लोहगडचे किल्लेदार होते. ते वडगावाला राहत असल्यामुळे यांचे बालपण व प्राथमिक शिक्षण वडगाव येथेच झाले. यांचे वडील लहानपणीच निवर्तल्यामुळे यांचे पालनपोषण त्यांच्या चुलत्याने केले.

राजवाडे बालपणापासूनच कुशाग्र बुद्धीचे व अभ्यासू विद्यार्थी म्हणून नावाजले गेले होते. भाषा व गणित या दोन विषयांवर त्यांचे विशेष प्रभुत्व होते. व्यायाम करण्यात व खोखो-आटयापाटया यांसारख्या बलसंवर्धक खेळांतही ते पटाईत होते. त्यामुळे त्यांचे शरीर चांगलेच बळकट व काटक बनले.

राजवाडे यांचे माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथे झाले. तथापि शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या मर्यादितपणामुळे व केवळ परीक्षा पास होण्यासाठीच कराव्या लागणाऱ्या लेखनवाचनामुळे त्यांचे मन तिथे रमले नाही. दिवसचे दिवस ते शाळा अथवा महाविद्यालय चुकवून स्वतःला खोलीत कोंडून घेत व इंग्रजी, मराठी, संस्कृत, इ. भाषांतील मोठमोठे ग्रंथ वाचून स्वतंत्र ज्ञानसाधना करीत. राजवाडे यांच्या या घोर तपामुळे अगदी तरुण वयातच ते प्रकांड पंडित झाले.

इ. स. १८९० साली राजवाडे बी. ए. झाले व लगेच त्यांचा विवाह झाला. परंतु त्यांच्या पत्नी लवकरच निवर्तल्या व राजवाडे पूर्ण वेळ ज्ञानार्जनासाठी मुक्त झाले. मग त्यांनी आपले सर्व जीवन इतिहाससंशोधन आणि ज्ञानसाधना यांना वाहून टाकले. मात्र त्यांच्या बौद्धिक कार्यामागील प्रेरणा केवळ ज्ञानार्जनाची नसून, राष्ट्रीय होती, स्वदेशभक्तीची होती.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही प्रेरणा आपल्याला कशी प्राप्त झाली, हे सांगताना राजवाडे लिहितात – विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या टीकात्मक निबंधांनी इंग्रजीच्या खग्रासापासून माझा बचाव केला. काव्येतिहाससंग्रहकारांच्या ऐतिहासिक पत्रांनी स्वदेश म्हणून काही आहे हे मला कळले व परशुरामपंत तात्या गोडबोले यांनी छापलेल्या काव्यांनी महाराष्ट्रसारस्वताचा मला अभिमान वाटू लागला.

त्यांनी १८९५ साली भाषांतर मासिक सुरू करून त्यात प्लेटो, अॅरिस्टॉटल, गिबन, शंकराचार्य, इ. महान तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांची भाषांतरे छापून मराठी भाषा समृद्ध व संपन्न करण्याच्या प्रयत्नाला ते लागले; परंतु हे भाषांतर मासिक सरासरी दोन वर्षे चालून बंद पडले. यानंतर त्यांनी मराठ्यांचा इतिहास, मराठी व संस्कृत भाषेचे ऐतिहासिक व्याकरण, जुन्या मराठी वाङ्मयाचा इतिहास व भारतीय समाजाच्या इतिहासाची समाजशास्त्रीय मीमांसा या विषयांना अनुसरून विपुल लेखन केले. आपल्या एकूण ३६ वर्षांच्या कर्तव्यरत आयुष्यात त्यांनी पुढील ग्रंथांचे लेखन केले–प्लेटोच्या रिपब्लिक या ग्रंथाचे भाषांतर, 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या ग्रंथावलीचे २२ खंड; विशेषतः यांतील काही खंडांना त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना या त्यांच्या विवेचक बुद्धीचा व सखोल व्यासंगाचा प्रत्यय आणून देणाऱ्या आहेत. त्यांचे संशोधनमय लेखन व त्यांनी संपादित केलेले ग्रंथ यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. राधामाधवविलास चंपू व महिकावतीची बखर यांच्या प्रस्तावना म्हणजे भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहासाचे राजवाडेकृत गंभीर तत्त्वचिंतनच होय. त्यांचे वैचारिक मूल्य मोठे आहे. याशिवाय, विश्ववृत्त, ग्रंथमाला, सरस्वतीमंदिर, प्राचीप्रभा, इ. नियतकालिकांतून त्यांनी केलेले स्फुट लेखन हेही अत्यंत मौलिक स्वरूपाचे व पुढीलांना प्रेरक ठरणारे असे आहे. मराठी भाषेचा धातुकोश हेही राजवाडे यांचे चिरस्मरणीय कार्य समजले जाते.

मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांची जुळवाजुळव करण्याकरिता राजवाडे यांनी सर्व आयुष्य वाहिले; त्यांचा शोध करण्यासाठी ते निरंतर यात्रा करीत राहिले. त्यांचे संशोधन जितके विपुल, तितकेच विविध, सर्वगामी व मूलगामीही आहे. राजवाडे यांना हे आपले संशोधन करीत असताना असंख्य अडीअडचणींना व हालअपेष्टांना तोंड द्यावे लागले; तथापि त्यांनी आपल्या अदम्य उत्साहाच्या बळावर त्या संकटांवर मात केली.

राजवाडे यांच्या महनीय कार्यकर्तृत्वाचे महत्त्व विशद करताना श्री. रा. चिं. ढेरे लिहितात – राजवाड्यांनी इ. स. १८९८ मध्ये 'मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनां'चा पहिला खंड प्रसिद्ध केला. या खंडाला लिहिलेल्या प्रदीर्घ प्रस्तावनेत त्यांनी पूर्वसूरींच्या संशोधनाचा परामर्श घेऊन, इतिहासाच्या साधनांचे महत्त्व विशद केले आहे; अशा साधनांच्या शास्त्रीय संपादनाची दिशा दाखवली आहे; एवढेच नव्हे, तर इतिहासशास्त्र आणि इतिहासाचे तत्त्वज्ञान यांचे व्यापक आणि उत्तुंग विवेचन करून त्या बैठकीवर मराठ्यांच्या इतिहासातील प्रेरणांचा आलेख रेखाटला आहे. राजवाड्यांच्या या प्रस्तावनेने प्रस्तुत क्षेत्रात नव्या युगाचे प्रवर्तन घडविले. या क्षेत्रात स्वतंत्रपणे कार्य करू लागलेल्या त्यांच्या समकालीनांवर त्यांचा प्रभाव पडल्याशिवाय राहिला नाही. तसेच, त्यांच्या तेजोमय प्रज्ञेने भारावलेले अनेक अनुयायी त्यांना मिळाले आणि इतिहाससंशोधनाचे एक व्यापक आंदोलन सुरू झाले. इ. स. १९२६ च्या अखेरीस राजवाडे गेले आणि त्यांच्या मागे-मागे खरे, पारसनीस, भावे, साने इत्यादी अनेक ज्येष्ठ संशोधकांचा अंत झाला. म्हणूनच इ. स. १८९८ पासून १९२६ पर्यंतच्या कालखंडाला इतिहाससंशोधनाच्या संदर्भात 'राजवाडे युग' असे म्हणतात. [रा. ले. सं. प्रस्तावना– श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी; गंगाजळी]

राजविद्या

व्यक्त विश्व हे अव्यक्ताचाच आविष्कार आहे, असे ओळखून सर्व सेवाकार्य, साधना आणि तदनुषंगाने जीवनातील यच्चयावत क्रिया परमेश्वराला अर्पण करण्यास शिकविणारी विद्या म्हणजे राजविद्या होय. हिच्यात संन्यास आणि योग (गीता ९·२८) तसेच ज्ञान, भक्ती, दैवी संपत्ती आदि सर्व साधने (गीता ९·१३–१५) एकवटतात. ही जीवनात प्रत्यक्ष अनुभवास येणारी आणि तशीच आचरण्यास सुलभ असली, तरी तिच्यासाठी व्यक्तातील अव्यक्त ओळखण्याची आवश्यकता असल्यामुळे तिला महा-गुह्य म्हटले आहे. देहावरण भेदल्याशिवाय तिचे ग्रहण होऊ शकत नाही (गीता ९·११).

योगवासिष्ठात ब्रह्मविद्येलाच राजविद्या म्हटले आहे–

तेषां दैन्यापनोदार्थं सम्यग्दृष्टिक्रमाय च ।
ततोऽस्मदादिभिः प्रोक्ता महत्यो ज्ञानदृष्टयः ।।
अध्यात्मविद्या तेनेयं पूर्वं राजसु वर्णिता ।
तदनु प्रसृता लोके राजविद्येत्युदाहृता ।।
राजविद्याराजगुह्यमध्यात्मज्ञानमुत्तमम् ।
ज्ञात्वा राघव राजानः परां निर्दुःखतां गताः ।।
(यो. वा. २.११.१६–१८)

अर्थ–दैन्य नाहीसे व्हावे व लोकात आत्मज्ञानाचा प्रसार व्हावा यासाठी आमच्यासारख्यांनी या ज्ञानाचा उपदेश केला. लुप्तप्राय झालेली ब्रह्मविद्या ऋषींनी क्षत्रिय राजांना शिकविली व त्यानंतर तिचा लोकांत प्रसार झाला म्हणून तिला राजविद्या असे म्हणतात. ही राजविद्या अर्थात अत्यंत गुह्य अध्यात्म राजांच्या हस्तगत झाल्यामुळे त्यांचे दुःख नाहीसे झाले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गीतेतलेच राजविद्या व राजगुह्य हे शब्द वसिष्ठानेही वापरले आहेत. गीतेत सांगितलेली राजविद्या इक्ष्वाकू वगैरे सूर्यवंशी राजांच्या परंपरेनेच प्रचारात आली आणि तीच वसिष्ठाने रामाला आत्मज्ञान होण्यासाठी सांगितली. [यो. सं. वा.]

राजशेखर (इ. स. च्या ९ व्या शतकाची अखेर). एक कवी, नाटककार व साहित्यशास्त्रज्ञ. हा यायावर नामक ब्राह्मण कुळात जन्मला होता. तो आपल्या ग्रंथात ' महाराष्ट्र-कुलचूडामणी ' असे स्वतःचे वर्णन करतो. त्यावरून तो मूळचा महाराष्ट्रीय होता, असे कळते. तो व त्याचे पूर्वज मूळचे विदर्भातले असले, तरी त्या काळात विदर्भामध्ये कोण्याही राजाची समृद्ध अशी राजधानी नव्हती. त्यामुळे राजशेखराच्या पूर्वजांना विदर्भात कोणाचा आश्रय मिळाला नाही. म्हणून ते कुटुंब त्रिपुरीच्या कलचुरी राजांच्या आश्रयाला गेले.

राजशेखराच्या पित्याचे नाव दुर्दक (किंवा दुहिक) आणि मातेचे नाव शीलवती असे होते. राजशेखर ब्राह्मण होता, तरी त्याने चाहुआन नामक क्षत्रिय कुलातील अवंतिसुंदरी या स्त्रीशी विवाह केला होता. त्यावरून त्याच्या काळी असे अनुलोम विवाह होत असत, असे दिसते. अवंतिसुंदरी ही विदुषी व काव्यशास्त्र जाणणारी होती. तिची काही अलंकारविषयक मते राजशेखराने आपल्या काव्यमीमांसेत उल्लेखिली आहेत.

राजशेखराला लहानपणापासूनच काव्यकला मिळाली होती. त्यामुळे त्याला बालकवी अशी पदवीही मिळाली होती. त्या काळात कनौजच्या प्रतीहारांचे साम्राज्य भरभराटीत होते. महेंद्रपाल हा त्याच्या काळचा प्रतीहार सम्राट होता. राजशेखर आपले नशीब काढण्यासाठी त्याच्या आश्रयाला गेला. राजशेखराची विद्वत्ता समजून आल्यावर महेंद्रपालाने त्याला आपला गुरू केले. तियेच त्याला कविराज ही पदवी मिळाली. महेंद्रपाल व मागाहून त्याचा मुलगा महीपाल यांच्या दरबारी राहूनच राजशेखराने आपली बरीच ग्रंथरचना केली.

इ. स. ९१८ च्या सुमारास राष्ट्रकूट राजा इंद्र (तिसरा) याने कनौजवर स्वारी केली व ते नगर उद्ध्वस्त केले. या पराजयानंतर प्रतीहारांच्या साम्राज्याला उतरती कळा लागली. म्हणून राजशेखर पुनश्च त्रिपुरी येथे युवराजदेव (पहिला) या कलचुरी राजाच्या आश्रयाला आला. आपल्या काव्यमीमांसा या बृहद्ग्रंथाच्या रचनेस त्याने त्रिपुरी येथेच प्रारंभ केला.

राजशेखराचे पांडित्य काव्यक्षेत्रात उठून दिसणारे होते. त्याला स्वतःलाही त्या गोष्टीची जाणीव होती. बालरामायणात तो स्वतःबद्दल गौरवाने लिहितो, ते असे –

बभूव वल्मीकभवः कविः पुरा ततः प्रपेदे भुवि भर्तृमेण्ठताम् ।
स्थितः पुनर्यो भवभूतिरेखया स वर्तते सम्प्रति राजशेखरः ।।

अर्थ – मी पुरातन काली वाल्मीकी होतो. नंतर भर्तृमेण्ठ या नावाने पृथ्वीवर आलो. त्यानंतर पुनश्च भवभूतीच्या आकाराने राहिलो आणि तो मी सांप्रतकाली राजशेखर या नावाने जन्माला आलो आहे.

यावरून राजशेखराने वाल्मीकिरामायणाचे, भर्तृमेण्ठाच्या हयग्रीववधाचे व भवभूतीच्या नाटकांचे सखोल अध्ययन केले होते, असे कळते. तो स्वतःला महाकवी न म्हणता कविराज म्हणे. त्याने त्या दोहोंची लक्षणे काव्यमीमांसेत सांगितली आहेत, ती अशी–

जो केवळ एकाच प्रकारच्या प्रबंधात प्रवीण होतो, त्याला महाकवी म्हणतात. आणि जो सर्व भाषा, सर्व प्रबंध आणि भिन्न भिन्न रस यांमध्ये आत्मतंत्र असतो, त्याला कविराज म्हणतात. महाकवीपेक्षा कविराज श्रेष्ठ असतो आणि जगात कविराज विरळाच होतात.

राजशेखर खरोखरच कविराज होता. संस्कृत, प्राकृत, पैशाची व अनेक अपभ्रंश भाषा यांमध्ये त्याची निराबाध गती होती. या सर्व भाषांत तो लीलेने काव्यसृष्टी करीत असे. राजशेखराने बालरामायणात स्वतः रचलेल्या षट्प्रबंधांचा निर्देश केला आहे. ते सहा प्रबंध असे–

(१) बालरामायण–हे दहा अंकांचे महानाटक असून, सीतास्वयंवरापासून रावणवधापर्यंतची रामकथा यात येते. या नाट्यरचनेत कवीने आपली समस्त काव्यचातुरी व पदविन्यासकौशल्य या गोष्टी प्रकट केल्या आहेत.

(२) बालभारत –हेही एक नाटक असून, याचे फक्त दोनच अंक उपलब्ध आहेत. याचे दुसरे नाव प्रचंडपांडव असे आहे. त्यात द्रौपदीस्वयंवर, द्यूत व वस्त्रहरण या तीन घटनांचे वर्णन आहे.

वरील दोन्ही नाटके महेंद्रपालाच्या पुत्र महीपाल याच्या प्रेरणेने रंगभूमीवर आली होती.

(३) विद्धशालभंजिका– ही चार अंकांची नाटिका आहे. यात राजा विद्याधरमल्ल व राजकन्या मृगांकावली यांची प्रणयकथा वर्णिलेली आहे.

(४) कर्पूरमंजरी– हे चार अंकांचे नाटक असून, ते प्राकृत भाषेत लिहिल्यामुळे त्याला सट्टक असे म्हणतात. यात राजा चंडपाल व कुंतल राजकन्या कर्पूरमंजरी यांची प्रणयकथा वर्णिलेली आहे. या सट्टकात कवीने प्राकृत भाषेचे संपूर्ण माधुर्य ओतले आहे. पद्यासाठी महाराष्ट्री व गद्यासाठी शौरसेनी प्राकृत उपयोजिली आहे. यात कर्पूरमंजरीच्या विरहप्रसंगवर्णनात त्याने एक श्लोक लिहिला आहे, तो असा–

परं जोण्हा उण्हा गरलसरिसो चन्दणरसो
खतक्खारो हारो रअणिपवणा देहतवणा ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुणाली बाणाली जलइ च जलद्दा तणुलदा
वरिट्ठा जं दिठ्ठा कमलवअणा सा सुणअणा ।।

अर्थ– जेव्हा ती कमल वदना व सुनयना कर्पूरमंजरी दृष्टिपथात आली, तेव्हापासून चांदणे ताप देऊ लागले, चंदनरस विषवत प्रतीत होऊ लागला, काटचांच्या टोकावर मीठ लावावे तसा हार दुःख देऊ लागला, रात्रीचा गार वारा देह जाळू लागला, कमलतंतू बाणावलीसारखे तीक्ष्ण लागू लागले आणि जलाने भिजलेली तनुलताही जळू लागली.

(५) काव्यमीमांसा– एक साहित्यशास्त्रीय ग्रंथ. हा अठरा विभागांत पुरा करण्याचा राजशेखराचा मानस होता. पण त्याचा पहिला भागच तेवढा उपलब्ध असून, तो अठरा अध्यायांचा आहे. कविरहस्य असे त्याने या पहिल्या भागाचे नाव ठेवले आहे. हा ग्रंथ अपूर्व आहे, असे म. म. काणे म्हणतात. मात्र त्यात काव्यातील रस, गुण किंवा अलंकार यांचे विवेचन न करता, कवींना मार्गदर्शक होतील, अशा व्यावहारिक सूचनाच केलेल्या आहेत.

पहिल्या अध्यायात काव्यमीमांसेच्या दृष्टीने शास्त्रसंग्रह केलेला आहे. दुसऱ्यात वाङमयाचे वर्गीकरण केले असून, त्याचे शास्त्र आणि काव्य असे दोन भेद सांगितले आहेत. तिसरा अध्याय काव्यपुरुषोत्पत्तीचा आहे. सरस्वतीपासून काव्यपुरुषाचा जन्म कसा झाला व तो पुरुष कोणत्या तत्त्वांचा बनला, हे सांगताना कवी म्हणतो–

शब्दार्थौ ते शरीरम्, संस्कृतं मुखम्, प्राकृतं बाहुः, जघनमपभ्रंशः, पैशाचं पादौ, उरो मिश्रम्, समः प्रसन्नो मधुर उदार ओजस्वी चासि । उक्तिचणं च ते वचः, रस आत्मा, रोमाणि च्छन्दांसि, प्रश्नोत्तरप्रवल्हिकादिकं च वाक्केलिः, अनुप्रासोपमादयश्च त्वामलंकुर्वन्ति ।

अर्थ– हे काव्यपुरुषा, शब्दार्थ हे तुझे शरीर. संस्कृत मुख, प्राकृत बाहू, अपभ्रंश जघनभाग, पैशाची भाषा हे पाय, मिश्र भाषा हे हृदय, तू सम, प्रसन्न, मधुर, उदार आणि ओजस्वी आहेस. सुभाषित हे तुझे वचन, रस हा आत्मा, छंद हे रोम, समस्या, कोडी, उखाणे ही तुझी वाक्क्रीडा. अनुप्रास, उपमा, इत्यादिक हे तुला भूषित करतात.

अशा या काव्यपुरुषाचा साहित्यविद्यावधूशी वत्सगुल्म नगरात (हे गाव विदर्भातले वाशिम असावे) विवाह झाला, असे कवीने सांगितले आहे.

कवीला काव्यरचनेच्या कामी उपयुक्त ठरणारे असे अनेक विषय काव्यमीमांसेत विवेचिले आहेत. काव्यातील संकेतांबद्दल कविसमय हा शब्द राजशेखरानेच प्रथम वापरला आहे. त्याने आपल्या या ग्रंथात काही महत्त्वाची ऐतिहासिक व ग्रंथविषयक माहितीही दिली आहे. ' राजशेखराचा हा ग्रंथ कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या धर्तीवर लिहिलेला असून, त्याची भाषासरणी जरा बोजड वाटली, तरी एकंदरीत जोरदार आहे, असे म. म. काणे लिहितात.

(६) भुवनकोश– या नावाचा भूगोलवर्णनात्मक एक ग्रंथ आपण रचला असल्याचे कवीने काव्यमीमांसेतच सांगितले आहे. कवीला भूगोलाची आवड आणि भूगोलाचे ज्ञान बरेच होते, असे दिसते. बालरामायणाच्या दहाव्या अंकात भूगोलाची बरीच माहिती त्याने दिली आहे.

याव्यतिरिक्त हरविलास नावाच्या त्याच्या एका महाकाव्याचा उल्लेख त्याने बालरामायणात केला आहे. हेमचंद्र व उज्ज्वलदत्त यांनी त्या काव्यातले एक-दोन श्लोक उद्धृतही केले आहेत. पण हे महाकाव्य अद्यापि उपलब्ध झालेले नाही.

शार्दूलविक्रीडित हे राजशेखराचे हातखंडा वृत्त होते. याविषयी सुवृत्ततिलक या ग्रंथात असे म्हटले आहे– ' शार्दूलक्रीडितैरेव प्रख्यातो राजशेखरः ।'

राजशेखर हा शब्दकवी आहे, असे श्री. बलदेव उपाध्याय म्हणतात. त्याच्या नाटकांत शब्दांचे अद्भुत चमत्कार अनेक ठिकाणी दिसतात. तो गौडी शैलीचा लेखक आहे. तो कुठे उणा पडत असेल, तर रसवत्तेत. त्याच्या वाङमयात रसपरिपाक कुठेच आढळत नाही. [म. च. को.; सं. सा. इ.; सं. सा. सो. इ.; म. ज्ञा. को.; हि. वि. को.; क. नृ. का.]

राजशेखरसूरी

(इ. स. चे १४ वे शतक) एक जैन कवी. हा मलधारी अभयदेवसूरीच्या शिष्यपरंपरेतील तिलकसूरीचा शिष्य होता. याने दिल्लीत राहून शाह महणसिंहाच्या प्रेरणेने चतुर्विंशतिप्रबंध नावाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ मुक्तक छंदात आहे. याव्यतिरिक्त, प्रमाणन्यायतत्त्वालोकावर रत्नावतारिकापंजिका नावाची उपटीका, स्याद्वादकलिका व श्रीधराच्या न्यायकंदलीवर पंजिका, हे न्यायशास्त्रावरचे ग्रंथ याने लिहिले आहेत. [म. च. को.]

राजश्यामला

देवीचे एक रूप. वामाचारी शाक्त हे तांत्रिक पद्धतीने हिची पूजा करतात. शुक्रवार हा हिच्या पूजेचा दिवस आहे. हिच्या पूजेसाठी विविध प्रकारची फुले लागतात. राजश्यामलारहस्य या उपनिषदात, या देवीच्या मंत्र, न्यास, स्तवन, पूजा व मैथुन या पाच गोष्टी केल्याने भोग व मोक्ष मिळतो, असे म्हटले आहे. शांभव आणि शाक्त हे तिच्या उपासनेचे दोन भेद आहेत. प्रत्यक्ष योनी किंवा योनिचित्र हेच या देवीचे यंत्र होय. या यंत्राची पूजा शाक्तपंथातील खालच्या श्रेणीचे उपासक करतात. [क्रि. स्ट. ले. उ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजसूय एक श्रौत याग. याचे लक्षण असे-' राजा सोतव्यः राजा वा इह सूयते राजसूयः क्रतुः ' = राजा उत्पन्न करावा किंवा राजा ज्यात उत्पन्न केला जातो, तो राजसूय होय (काशिका ३.१.११४). हा यज्ञ बराच जटिल असून, तो अनेक इष्टी, सोमयाग व पशुमेघ यांचा समन्वय आहे. याचे अनुष्ठान २१ महिने किंवा क्वचित तेहतीस महिने चालते.

ज्याला राज्याभिषेक झाला आहे, अशा क्षत्रियालाच राजसूय करण्याचा अधिकार असतो; इतरांना नाही. काहींच्या मते ज्याने वाजपेय केला नाही त्यालाच हा अधिकार असतो; तर काहींच्या मते वाजपेय केल्यानंतरच राजसूयाचा अधिकार मिळतो. (कात्या. श्रौ. सू. २५.१.२; आश्व. श्रौ. सू. ९.९.१९). राजसूय यज्ञ करणारा सम्राट होतो, असे शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे (९.३.४.८).

राजसूयात अनुमत्यादी इष्टी, मल्हादी पशुयाग व पवित्रादी सोमयाग असतात. त्यांच्यामध्ये गौणमुख्य असा भाव नसतो.

फाल्गुन शुद्ध प्रतिपदेला राजसूयाचा आरंभ करतात. प्रथमदिनी पवित्र नामक सोमयाग सुरू होतो. त्यात चार दीक्षा, तीन उपसद व एक सुत्या असते. शुद्ध अष्टमीला हा याग समाप्त होतो. राजा हा यागाचा कर्ता असतो. राजाला सोमभक्षण निषिद्ध आहे. त्यासाठी वडाचे फलासह अंकुर सोमासह विकत घेतात. त्याच्यावर संस्कार करून राजाने दह्यासह त्या अंकुरांचे भक्षण करायचे असते. नंतर अवभृथ स्नान होते. त्यानंतर तीन अनूबंध्या असतात. उदवसानीय इष्टीच्या जागी त्रैधानवीया इष्टी होते.

दशमीच्या दिवशी अनुमतीष्टी होते. तिच्यात अष्टाकपाल पुरोडाश, एकादशीच्या दिवशी आग्नावैष्णव द्वादशकपाल पुरोडाश, द्वादशीच्या दिवशी अग्नीषोमीय एकादशकपाल पुरोडाश, त्रयोदशीच्या दिवशी ऐंद्राग्न द्वादशकपाल पुरोडाश, चतुर्दशीच्या दिवशी यवाग्रयण व व्रीह्याग्रयण अशा इष्टी होतात. पौर्णिमेच्या दिवशी राजसूयांतर्गत चातुर्मास्य याग सुरू होऊन, वैश्वदेवपर्वाचे अनुष्ठान त्या दिवशी होते. कृष्ण प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत रोज पौर्णमासेष्टी होते. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत रोज पिंडपितृयज्ञ वगळून दर्शेष्टी होते. कृष्ण प्रतिपदेला राजसूय इष्टी व त्यानंतर दर्शपूर्णमासेष्टी व नित्य पिंडपितृयज्ञ होतो. त्यानंतर वैशाख, ज्येष्ठ व आषाढ या महिन्यांत दर्शपूर्णमासेष्टी होतात.

आषाढ पूर्णिमेला चातुर्मास्यान्तर्गत वरुणप्रघास व तेव्हापासून कार्तिक पूर्णिमेपर्यंत प्रतिदिन पूर्ववत दर्शपूर्णमासेष्टी होतात. कार्तिक पूर्णिमेला चातुर्मास्यान्तर्गत साकमेधाचे अनुष्ठान दोन दिवस होते. कार्तिक कृष्ण प्रतिपदेपासून फाल्गुन अमावास्येपर्यंत पूर्ववत दर्शपूर्णमासेष्टींचे अनुष्ठान करतात.

फाल्गुन अमावास्येला राजसूयांतर्गत शुनासीरीय याग होतो. त्याच दिवशी पंचवातीय नामक होम करतात. चार दिशांना चार व मध्ये एक अग्नी प्रज्वलित करून त्यात होम करणे, असे याचे स्वरूप आहे. त्यानंतर इंद्रतुरीय नावाची इष्टी होते. त्यानंतर त्याच दिवशी अपामार्गहोम होतो.

पुढे फाल्गुन शुद्ध प्रतिपदेला त्रिषंयुक्तेष्टी व चतुर्थीला द्विहविष्केष्टी होते. त्याच दिवशी रत्नहवी नामक बारा इष्टींना प्रारंभ होतो. हे रत्नी बारा असून त्यांची नावे अशी – यजमान, सेनापती, पुरोहित, पट्टराणी, सूत, ग्रामणी, क्षत्ता, संग्रहीता, अक्षावाप, गोविकर्त, पालगल (दूत) व परिवृक्ती (पतिपुत्ररहित स्त्री). या प्रत्येक रत्नीच्या घरी क्रमाने एकेक इष्टी करतात. फाल्गुन कृष्ण पक्षात कोणतेही कृत्य करीत नाहीत.

चैत्र शुद्ध प्रतिपदेस अभिषेचनीय या राजसूयातील प्रमुख सोमयागाचा विधी सुरू होतो. पहिल्या दिवशी दीक्षा, पुढे तीन दिवस उपसद आणि त्यापुढच्या दिवशी सुत्या, असा तो पाच दिवस चालतो. याचा विधी उक्थ्याप्रमाणे असतो. या यागातील होता भृगु गोत्राचाच असावा लागतो. यात आठ देवतांना ' देवसु हवींषि ' नावाच्या आहुती द्यायच्या असतात. मग सतरा प्रकारची जले आणून त्यांनी राजाला अभिषेक करतात. नंतर होम करून अध्वर्यू सम्राटाच्या हाती तीन बाण व एक धनुष्य देऊन पुढील घोषणा करतो –

आविर्मर्या आवित्तो अग्निर्गृहपतिरावित्त इन्द्रो वृद्धश्रवा आवित्तो मित्रावरुणौ धृतव्रतावावित्तः पूषा विश्ववेदा आवित्ते द्यावापृथिवी विश्वशम्भुवावावित्तादितिरुरुशर्मा । सोमस्य त्वा द्युम्नेनाभिषिञ्चाम्यग्नेर्भ्राजसा सूर्यस्य वर्चसेन्द्रस्येन्द्रियेण । क्षत्राणां क्षत्रपतिरेध्यति दिद्यून् पाहि ॥

(वाज. सं. १०. ९, १७.)

अर्थ – हा यजमान अखिल राष्ट्राचा अधिपती झाला आहे, हे तुम्ही जाणलेच आहे. गृहपती अग्नीने हे जाणलेच आहे. ज्यांची कीर्ती एकसारखी वृद्धिंगत होत आहे, अशा इंद्राने हे जाणले आहे. कर्तव्यपालनाचे व्रत ज्यांनी चालविले आहे, अशा मित्रावरुणांनी हे जाणले आहे. सर्वज्ञ अशा पूषाने हे जाणले आहे. ज्यांच्यामुळे सर्व जगाला सुख होते, त्या द्यावापृथिवींनी हे जाणले आहे. इतकेच नव्हे; तर सर्वांना अत्यंत सुखप्रद अशा देवमाता अदितीनेही, ' हा यजमान अखिल राष्ट्राचा एकमेव अधिपति झाला ' हे जाणले आहे. हे यजमाना, चंद्राच्या यशाने मी तुला अभिषेक करतो. चंद्राच्या यशाने अभिषिक्त झालेला तू सर्व क्षत्रियांचा क्षत्रियेश्वर हो आणि शत्रूंनी तुझ्यावर टाकलेल्या बाणांचे अतिक्रमण करून तू स्वतःच्या शरीराचे रक्षण कर. हे यजमाना, अग्नीच्या तेजाने मी तुला अभिषेक करतो, सूर्याच्या कांतीने मी तुला अभिषेक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करतो आणि इंद्राच्या सामर्थ्याने मी तुला अभिषेक करतो.

मग राजा शुनःशेपाचे आख्यान श्रवण करतो. आणि त्यानंतर होता व अध्वर्यू यांना शंभर किंवा हजार गायी दक्षिणा म्हणून देतो. मग व्याघ्राजिनावर विष्णुक्रम नामक तीन पावले टाकतो. उरलेले सर्व अभिषेकजल पलाशपात्रात ओतून ते आपल्या पुत्राच्या हातात देतो. नंतर नामव्यतिषंजनीय नामक दोन होम होतात.

नंतर गायी पळवून आणण्याचा एक प्रतीकात्मक विधी होतो. राजा एका रथात बसून तो रथ एका गायींच्या कळपात नेऊन उभा करतो. नंतर धनुष्याच्या दोरीने काही गायींना स्पर्श करून ‘ यांना मी पकडले ’ असे म्हणतो. या गायी ज्यांच्या असतात, त्यांना त्याहून जास्त गायी देतो. नंतर यज्ञमंडपात येऊन रथविमोचनीय नावाच्या चार आहुती देतो.

नंतर राजा खैराच्या आसंदीवर बसतो. पुरोहित आणि रत्नी त्याच्या भोवती बसतात. मग राजा आपला भाऊ, सारथी, ग्रामप्रमुख व त्याचा भाऊ यांच्याशी द्यूत खेळतो. मग अवभृथस्नान होते. अनूबंध्या गाय अर्पण केल्यावर उदवसानीया इष्टी होते. अभिषेचनीयानंतर राजा दहा दिवस रोज अनुक्रमे त्वष्टादी देवांना ‘ संसृपां हवींषि ’ अर्पण करतो. हा विधी दशपेयासाठी उभारलेल्या मंडपात होतो. दशपेय हा सोमयागासारखाच असतो. याला दशपेय म्हणण्याचे कारण हे, की दहा सोमचमसांपैकी प्रत्येक चमस दहा ब्राह्मण प्राशन करतात. दशपेयात एक हजार गायी दक्षिणा म्हणून द्यायच्या असतात. शिवाय सोळा ऋत्विजांना विशेष दक्षिणा द्यायची असते.

त्यानंतर वैशाखात कोणतेही कृत्य होत नाही. वैशाख पौर्णिमेला पंचबिल नामक चरूचा याग होतो. त्यानंतर प्रयुग्हवी नामक बारा इष्टी होतात. वैशाख अमावास्येला दोन पशुबंध होतात. ज्येष्ठ शुक्ल एकादशीपासून पाच दिवस केशवपनीय नामक सोमाचे अनुष्ठान केले जाते. ज्येष्ठ कृष्णप्रतिपदेला व्युष्टिद्विरात्र विधीचा संकल्प होतो. हा अहीनयाग आहे. यात सोळा दीक्षा, बारा उपसद व दोन सुत्या होतात. हा ऋतू एका महिन्यात समाप्त होतो. त्यानंतर आषाढ कृष्ण प्रतिपदेला ‘क्षत्रस्य धृती’ या विधीचा आरंभ होतो. तोही एक महिन्यात समाप्त होणारा सोमयाग आहे. भाद्रपदात त्रिष्टोम होतो, तोही एक महिन्याचा असतो. श्रावण कृष्ण प्रतिपदेला अग्निष्टोमाचा आरंभ होतो. कार्तिक पौर्णिमेला राजसूयाच्या अंगभूत असा तीन पशूंचा सौत्रामणी याग होतो. एवढे सगळे झाल्यावर राजसूयाची समाप्ती होते. या यज्ञात सर्व मिळून ४४९ इष्टी, २ पशुयाग, ८ सोमयाग व ७ दर्वीहोम होतात. हे सर्व प्रधान यागच असतात. या व्यतिरिक्त त्या त्या सोमयागाच्या अंगभूत इष्टी, पशू व सौत्रामणी यांचेही अनुष्ठान होते.

राजसूय हा राजाच्या चक्रवर्तीपदाच्या किंवा साम्राज्याच्या प्रतिष्ठापनेसाठी केला जाई. स्वतःच्या सामर्थ्यावर सर्व राजांना जिंकून राजांचाही राजा म्हणून स्वतः अभिषेक करवून घेणे ही राजसूयातली मुख्य गोष्ट असते. धर्मराजाचा राजसूय प्रसिद्ध आहे. त्या यज्ञात अनेक राजांनी त्यांना नेमून दिलेली कामे केली होती. सर्व राजांना जिंकून व अंकित करूनच राजसूय केला जात असल्यामुळे, त्यात अनेक स्वाभिमानी राजसत्ता अपमानित होत व ज्याच्या सामर्थ्यापुढे त्यांना वाकावे लागले, त्या सम्राटाच्या विनाशासाठी टपून बसत. अपमानित होणाऱ्या राजसत्तांचा असंतोष हेच पुढच्या युद्धाचे कारण ठरत असे.

राजसूय करण्यापूर्वी दिग्विजय करावा लागे. तो केल्यानंतर सर्व जित राजांना यज्ञाला उपस्थित राहण्याविषयी निमंत्रण दिले जाई. त्यात सम्राटाला नजराणे व भेटी समर्पण करण्याचा एक मोठा समारंभ होत असे. अभिषेचनीयाच्या दिवशी सर्वश्रेष्ठ पुरुषाचा सत्कार केला जात असे. त्यालाच अग्रपूजा म्हणत. धर्मराजाच्या राजसूय यज्ञात श्रीकृष्णाला अग्रपूजेचा मान मिळाला होता. ती गोष्ट सहन न होऊन शिशुपाल श्रीकृष्णाला अपशब्द बोलला आणि त्याचे प्रायश्चित्त म्हणून श्रीकृष्णाने सुदर्शनचक्र फेकून शिशुपालाचे मस्तक उडवले. धर्मराजाच्या राजसूयात दुर्योधनादी कौरवांनाही नेमून दिलेली कामे करावी लागली होती. त्यातूनच दुर्योधनाचा मत्सर पेटला व तीच पुढील महायुद्धाची नांदी ठरली.

धर्मराजाच्या आधी हरिश्चंद्राने राजसूय यज्ञ केला होता, असे महाभारतात सांगितले आहे. इतिहासकाळात कनोजचा राजा जयचंद्र याने राजसूय यज्ञ केला होता. [हि. ध.; श्रौतयज्ञ परिचय–म. म. विद्याधर गौड.; प. का. भा.; वे. रा. द. उत्तरार्ध]

राजस्थान

भारतीय संघराज्यातील एक मोठे राज्य. याची पश्चिम व वायव्य सीमा पाकिस्तानाला भिडलेली असून, याच्या उत्तरेला पंजाब, ईशान्येला हरियाना व उ. प्रदेश, आग्नेय दिशेला मध्य प्रदेश व नैर्ऋत्येला गुजरात ही राज्ये आहेत. याचे क्षेत्रफळ १, ३२, १५२ चौ. मैल असून, १९७१ मधील शिरगणतीप्रमाणे याची लोकसंख्या २, ५७, २४, १४२ आहे.

भारत स्वतंत्र होण्यापूर्वी हा प्रदेश अनेक देशी संस्थानांत विभागलेला असून, त्याला राजपुताना हे नाव होते. त्यात उदयपूर, डुंगरपूर, बांसवाडा, प्रतापगड, शहापुरा, बूंदी, कोटा, सिरोही, करौली, जैसलमीर, जयपूर, अलवार, जोधपूर, बीकानेर, धोलपूर, टोंक व पालनपूर ही संस्थाने आणि काही जहागिरी यांव्यतिरिक्त अजमेर–मेरवाडा या ब्रिटिशशासित प्रदेशाचा समावेश होत असे. राजपूत लोकांचा व राजांचा प्रदेश म्हणून इंग्र-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जांनी त्याला राजपुताना हे नाव दिले. त्यापूर्वी या प्रदेशाला रायस्थान हे नाव होते. कर्नल टॉड या इतिहासलेखकाने त्याचे रूपांतर राजस्थान असे केले. या प्रदेशातल्या बहुतेक साऱ्या जातीजमाती राजपूत लोकांशी आपला संबंध जोडतात. त्यामुळे हा राजपुतांचा प्रदेश ठरला व त्याला राजपुताना हे नाव मिळाले. या प्रदेशात राजपुतांची राज्ये होती, म्हणून त्याला राजस्थान हेही नाव पडले. पौराणिक काळात यालाच पारियात्रमंडल असे म्हणत. नर्मदेच्या उत्तरेला असलेल्या पहाडी प्रदेशाचे प्राचीन नाव पारियात्र होते. पारियात्र पर्वत म्हणजेच अरवली पर्वतराजी होय, असे काही पंडितांचे मत आहे. त्याच्या दोन्ही अंगी पसरलेल्या प्रदेशाला पारियात्रमंडल हे नाव होते.



अत्यंत प्राचीन काळी, हिमालय पर्वतराजीच्या दक्षिणेला एक समुद्र होता. द्वापर युगात भूकंपासारख्या प्रचंड उत्पातामुळे हिमालय व विंध्य यांच्या मधली भूमी वर आली आणि अरवली पर्वतराजी निर्माण झाली. तिथल्या समुद्राचे पाणी पश्चिम सागरात वाहून गेले. अरवलीच्या पश्चिमेला सपाट व सखल भूमीवर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साचून राहिलेले समुद्राचे पाणी कालांतराने आटले आणि तिथे समुद्राच्या तळाची वाळू तेवढी उरली. अजूनही त्या रेताड भूमीत शंख, शिंपले व भिन्न भिन्न प्राण्यांचे सांगाडे सापडतात. सांभर, डीडवाणा, इ. खाऱ्या पाण्याचे तलावही त्या सागराचेच उरलेले भाग असावे. पूर्वेकडील डोंगराळ प्रदेशातली रेती मात्र पाण्याबरोबर वाहून गेली आणि तिथे नवी काळी माती निर्माण झाली. ती अग्निजन्य खडकांचा चुरा होऊन बनलेली आहे.

नैसर्गिक विभाग – अरवली पर्वतश्रेणी राजस्थानाच्या मध्य भागी दिल्लीपासून सिरोहीपर्यंत पसरलेली असून, तिच्यामुळे या प्रदेशाचे दोन विभाग झाले आहेत. अबू पर्वत हे त्या पर्वतराजीचे दक्षिण टोक होय. तिथपासून अजमेरपर्यंत ही पर्वतराजी अखंड व अत्यंत उंच अशी आहे. अबू हा त्या रांगेतील सर्वांत उंच पर्वत असून, गुरुशिखर हे त्याचे सर्वोच्च शिखर ५६५० फूट उंच आहे. अजमेरपासून रींगसपर्यंत या पर्वतमालेत बरीच खिंडारे आहेत. रींगस ते खेतडी या भागात पुन्हा उंच डोंगर उभे असून, त्यामुळे मेवात हा प्रदेश अत्यंत दुर्गम बनला आहे. त्यानंतर खेतडी ते दिल्ली या भागात अगदी लहान डोंगर व तुटक तुटक टेकाडे आढळतात.

अरवली पर्वताची पश्चिम बाजू उंच व उभ्या पहाडांची बनलेली आहे. आणि पलिकडे विस्तीर्ण वाळवंट पसरलेले आहे. त्यात सगळीकडे वाळूची टेकाडे दिसतात. वाऱ्याबरोबर आलेली वाळू जमून ती तयार झालेली आहेत. त्या प्रदेशात पाण्याचे दुर्भिक्ष असल्यामुळे बरीच जमीन ओसाड आहे आणि लोकवस्तीही कमी आहे.

अरवलीची पूर्व बाजू मात्र उतरती होत गेली आहे. तो प्रदेश म्हणजे एक विस्तीर्ण पठार असून, त्यात डोंगरांच्या अनेक रांगा पूर्वेला पसरलेल्या आहेत. त्यात अनेक नद्या आणि घनदाट अरण्येही आहेत. तो प्रदेश फार सुपीक आहे.

नद्या – पश्चिम राजस्थानात लुणी ही एकच मोठी नदी आहे. तिचे पाणी खारे असते. ती अजमेरजवळ उगम पावते आणि कच्छच्या रणात जाऊन गडप होते. जावी, लगी, खारी, बांदी, सूकडी वगैरे लहान नद्या लुणीला मिळतात. पूर्व राजस्थानात मात्र जलसंपत्ती विपुल आहे. चंबळ, बनास, बाणगंगा, मही, खारी, इ. अनेक लहान-मोठ्या नद्यांमुळे हा प्रदेश भिजला जातो. चंबळ ही सर्वांत मोठी नदी विंध्य पर्वतात उगम पावते आणि राजस्थानातून वाहत जाऊन शेवटी यमुनेला मिळते. बनास नदी अरवलीवरील कुंभलगडाजवळ उगम पावते आणि सुमारे ३०० मैल वाहत जाऊन चंबळेला मिळते. काली सिंध व पार्वती या नद्याही चंबळेला मिळतात. बाणगंगेचा उगम जयपूरजवळ आहे. ती भरतपूर व धोलपूर या भागातून पूर्वेला वाहत जाऊन यमुनेला मिळते. मही नदी ही मुख्यतः गुजरातमध्ये आहे. पण तिचा काही मार्ग राजस्थानाच्या अगदी दक्षिण भागातील बांसवाडा व डुंगरपूर या प्रदेशांतून गेलेला आहे.

तलाव -- या प्रदेशात गोडचा पाण्याचे नैसर्गिक तलाव नाहीत. सांभर, डीडवाणा, पंचपद्रा, छापर, इ. अनेक तलाव खाऱ्या पाण्याचे आहेत. पावसाळ्यात सांभर तलावाचे पाणी २० मैल पसरते. त्याची रुंदी २ ते १० मैल असते. उन्हाळ्यात मात्र हा फुगवटा ओसरतो. या प्रदेशात बांधलेले तलावही बरेच आहेत; ते चांगल्या पाण्याचे आहेत. उदेपूरपासून ३४ मैलांवर जयसमंद नावाचा विस्तीर्ण तलाव आहे. तो इ. स. च्या १७ व्या शतकात राणा जयसिंह याने गोमती नदीला धरण बांधून निर्माण केला. त्याच शतकात राणा राजसिंह याने कांकरोलीजवळ राजसमंद हा तलाव बांधला. उदयपूरपासून ६ मैलांवर उदयसागर आहे, तो राणा उदयसिंह याने इ. स. १५५९–१५६५ या कालखंडात निर्माण केला. उदयपूर येथील पिछोला तलाव सर्व भारतात अप्रतिम आहे. हा तलाव १५ व्या शतकात एका वंजारी शिल्पकाराने बांधला, असे म्हणतात. मात्र इ. स. १५६० साली उदयसिंहाने त्याचा बांध उंच केला. त्याच्या काठावर राजवाडे बांधलेले असून, सभोवार उदयपूर नगर वसलेले आहे. जवळच फत्तेसागर आहे, तो १९ व्या शतकात बांधलेला आहे.

अजमेरजवळ आनासागर नावाचा एक अत्यंत सुंदर तलाव आहे. दोन टेकड्यांच्या मध्ये बांध घालून तो बनवलेला आहे. तो अर्णोराजाने इ. स. च्या १२ व्या शतकात निर्माण केला. संपूर्ण भरला असता त्याचा घेरा ७–८ मैल होतो.

अजमेरपासून ७ मैलांवर पुष्कर सरोवर आहे. ते भारतातले श्रेष्ठ तीर्थस्थान मानले जाते. अजमेरजवळ वीसलसागर व फैसागर या नावांचे आणखी दोन तलाव आहेत. जोधपूरमधील बालसमंद व सरदारसमंद हे तलावही उल्लेखनीय आहेत. अबू पर्वतावरील नक्की तलाव अत्यंत प्रेक्षणीय आहे.

पश्चिम राजस्थानातील जोधपूर भागाला मारवाड म्हणतात. पूर्वी यालाच मरुभूमी किंवा मरुकांतार हे नाव होते. उत्तरेकडील बीकानेर भागाला पूर्वी जांगल म्हणत. पूर्वेकडील अलवार भागाला मेवात म्हणतात. जयपूरजवळ आंबेरच्या डोंगरावर धुंधु नदी उगम पावते, ती बनास नदीला मिळते. तिच्या तीरावरील सर्व प्रदेशाला ढूंढाड म्हणतात. बाणगंगा नदी मेवात व ढूंढाड यांची सीमारेषा आहे. पूर्व राजस्थानातील बनास नदीच्या दक्षिणेकडचा, अरवली व चंबळ यांच्या मधला प्रदेश मेवाड या नावाने प्रसिद्ध आहे. त्याच्या दक्षिणेकडील डुंगरपूर, प्रतापगड, बांसवाडा या महीकाठच्या प्रदेशाला वागड म्हणतात.

हवामान – राजस्थानाचे हवामान अत्यंत विषम आहे. तिथे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हिवाळ्यात विलक्षण थंडी व उन्हाळ्यात तीव्र उष्णता असते. मारवाडमधील उष्णतामान तर सर्व भारतात जास्त आहे. त्या भागात वाळूची वादळे नेहमी होतात. दिवस व रात्र यांतील तपमानातही बरेच अंतर असते. पश्चिम राजस्थानात पाऊस अगदी थोडा पडतो. नैर्ऋत्य भागात जरा अधिक पडतो. पूर्व राजस्थानाच्या दक्षिण भागात भरपूर पाऊस पडतो. अजमेर व जयपूर या भागात मात्र त्या मानाने पाऊस कमी व अनियमित आहे. हा पाऊस उन्हाळ्यात पश्चिम सागराकडून येतो. बांसवाडा ते झालवाड, कोटा या प्रदेशात बंगालच्या उपसागराकडूनही थोडा पाऊस हिवाळ्यात मिळतो.

सिंचन करण्याच्या योजना सुरू झाल्यामुळे शेतीचे उत्पादन वाढले आहे. बाजरी, ज्वारी, गहू, मका, जव, कडधान्ये, डाळी, तांदूळ ही इथली मुख्य धान्ये आहेत. तीळ, मोहरी, जवस, दाणे, कापूस, ऊस, तंबाखू ही प्रमुख व्यापारी पिके होत. जिरे, कांदा, लसूण, अफू हे पदार्थही पुष्कळ पिकतात. प. राजस्थानातही सांप्रत जलसिंचनामुळे शेतीचे क्षेत्र व उत्पादन वाढले आहे. भाकडानांगल धरणाच्या पाण्याचा उपयोग राजस्थानला बराच होतो. चंबळेवर बांधलेल्या धरणांमुळेही राजस्थानची भूमी सुफला झाली आहे.

खनिज संपत्ती – राजस्थानात चांदी, तांबे, शिसे, जस्त, लोखंड, अभ्रक, कोळसा व अॅस्बेस्टॉस या पदार्थांच्या खाणी



आंबेरचा राजवाडा

आहेत. अभ्रक, कोळसा व तांबे हे पदार्थ विपुल प्रमाणात मिळतात. अॅस्बेस्टॉसही पुष्कळ मिळतो. शिसे, जस्त, चांदी व लोखंड या धातूंच्या खाणींतूनही बरेच उत्पादन होते. याव्यतिरिक्त बेरिल, जिप्सम, कॅल्साइट, सोपस्टोन, मॅंगॅनिज, फेल्स्पार, कियनाइट, बेरीट, गार, मुलतानी माती व उत्तम वाळू हे पदार्थ राजस्थानात पुष्कळ मिळतात.

जोधपूरमधील मकराना हे स्थान उत्तम संगमरवरी पाषाणासाठी प्रसिद्ध आहे. किसनगड, जैसलमीर, अजमेर, जयपूर, इ. ठिकाणीही निरनिराळ्या रंगांचा संगमरवर मिळतो. भव्य

वनस्पती – प. राजस्थानात पाऊस कमी असला तरी, पिंपळ, वड, निंब, आंबा, डाळिंब, रोहिडा, इ. वनस्पती काही ठिकाणी आढळतात. पूर्व राजस्थानात पाऊस जास्त असल्यामुळे सर्वत्र भरपूर झाडे, झुडपे असतात. दक्षिण भागातील डोंगराळ प्रदेशात तर घनदाट जंगले असून, त्यांत सर्व प्रकारच्या असंख्य वनस्पती सापडतात.

शेती – राजस्थानातील शेती मोसमी पावसावर सर्वस्वी अवलंबून होती, तोपर्यंत अन्नधान्यांचे उत्पादन नियमित व पुरेसे होत नव्हते. पण आता विहिरी, तलाव, कालवे यांतून जल-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रासाद वांधण्यासाठी लागणारे लाल किंवा इतर रंगांचे मोठाले पाषाणही भरपूर सापडतात.

उद्योगधंदे – राजस्थानात कोळसा व तेल यांची कमतरता असल्यामुळे कारखान्यांसाठी लागणारी शक्ती म्हणून वीज उत्पन्न करण्याचे अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. त्यांतून मोठ्या प्रमाणावर वीजनिर्मिती होऊ लागली आहे. त्यामुळे विपुल प्रमाणात मिळणाऱ्या खनिजांचा उपयोग करता येईल, असे अनेक कारखाने निघाले आहेत व निघत आहेत.

सांभर, डीडवाणा व पंचपद्रा येथील मोठाले तलाव अगदी खाऱ्या पाण्याचे असून, त्यांतून मोठ्या प्रमाणावर मीठ तयार केले जाते.

राजस्थानात पशुपालनाचा उद्योग फार मोठ्या प्रमाणावर चालतो. भारतात पशूंच्या संख्येमध्ये याचा तिसरा क्रमांक आहे. मेंढ्या व बकऱ्या यांची संख्या तर सर्वांत जास्त आहे. या प्रदेशातील निरनिराळ्या जातींचे बैल भारतात विशेष प्रसिद्ध आहेत. नागौरी, सांचोरे, थरपारकर, राठ, हरियाणा व मालवी अशी त्यांची नावे आहेत. नागौरी जातीचे बैल खूप मोठे असतात. या जातीच्या गायी फारसे दूध देत नाहीत. पण इतर जातीच्या गायी भरपूर दूध देतात. मुरा जातीच्या म्हशी उत्तम प्रतीचे भरपूर दूध देण्याविषयी सर्व भारतात प्रसिद्ध आहेत.

मेंढ्यांमध्ये बीकानेरच्या नाली, चोक्ला व मग्रा या जाती, जैसलमीरची जैसलमेरी व जोधपूरची मारवाडी या जाती विशेष चांगल्या आहेत. त्यांची लोकर उत्तम असते. बकऱ्यांच्या जमना, पारी, बरबेरी, सिरोही व अलवारी या जाती दूध व मांस यासाठी उपयुक्त आहेत.



हवामहाल – जयपूर

राजस्थानात उंटाचा उपयोग वाहन म्हणून बराच केला जातो. बीकानेरी, जैसलमेरी, मेवाडी, मेवाती, इ. जाती त्या दृष्टीने फार चांगल्या आहेत. बारमेर व जालोर जिल्ह्यांत आढळणारे मुल्लानी जातीचे घोडेही फार प्रसिद्ध आहेत.

प. राजस्थानात पाण्याचे दुर्भिक्ष असल्यामुळे वारंवार दुष्काळ पडतो आणि लाखो जनावरे चाराषाण्यासाठी पूर्व राजस्थानात व मध्य प्रदेशात वसतीला जातात.

राजस्थानातील मेंढ्यांपासून मिळणारी लोकर चांगली असून, ती मोठ्या प्रमाणावर इतर राज्यांत व परदेशांतही पाठवली जाते. काही लोकर राजस्थानातच रग, गालिचे वगैरे विणण्यासाठी खपते. तो एक तिथला महत्त्वाचा कुटीरोद्योग आहे. उत्तम जातीची लोकर जमवून बाहेर पाठवण्याचा उद्योग फार मोठा आहे व तो वाढवण्याला बराच वाव आहे.

पशूंची संख्या अतिशय मोठी असल्यामुळे या प्रदेशात हाडे व चामडी मुबलक मिळतात. हाडांची भुकटी करून खतासाठी वापरता येते. पण राजस्थानात तसे कारखाने फारसे नाहीत. चामडी कमावण्याचा उद्योगही फारसा केला जात नाही. बहुतेक चामडी अन्य प्रांतांत पाठवली जातात. हे दोन्ही उद्योग खूप मोठ्या प्रमाणावर करणे शक्य आहे.

या प्रदेशात शेतीच्या अनुषंगाने चालणारे उद्योग फारसे नाहीत. कापडाच्या गिरण्या कमी आहेत व साखरकारखाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अगदी थोडे आहेत. तेलाच्या गिरण्या मात्र बऱ्याच आहेत.

जंगलात सापडणाऱ्या वस्तू म्हणजे लाख, डिंक, आपटयाची पाने, कात, वाळा या होत. लाख उत्पन्न करून तिच्यापासून बांगडया करण्याचा कुटीरोद्योग राजस्थानात सर्वत्र चालतो. विडया वळणे, कात बनवणे व खस अत्तर तयार करणे हे कुटीरोद्योगही पुष्कळ ठिकाणी आहेत. कागद बनवणे, लाकडाची खेळणी तयार करणे, कापडावर नक्षी छापणे, कपडे रंगविणे, रत्नांना पैलू पाडणे, चामडयाच्या वस्तूंवर जर भरणे, हातमागावर कापड विणणे, शेतीची उपकरणे बनवणे हे लघु-उद्योग राजस्थानात सर्वत्र आढळतात. कापडाला गाठी मारून ते रंगविण्याचे काम या प्रदेशात अत्यंत कलात्मक पद्धतीने केले जाते. आणि असे कापड भारतात सर्वत्र फार लोकप्रिय झाले आहे.

मोगल काळात उत्तर भारत व पश्चिम किनारा यांमधील व्यापारी वाहतूक राजस्थानमार्गे होत असे. भिलवाडा, चुरू, राजगड, मालपुरा व पाली ही फार मोठी व्यापारी केंद्रे होती. पालीच्या बाजारात चीन, काश्मीर, इराण, अरबस्तान, यूरोप व आफ्रिका येथील मालांची मोठी उलाढाल होत असे. तसाच व्यापार राजस्थानातील निरनिराळ्या शहरांतून ब्रिटिश राजवटीत आणि आजही चालू आहे. कलाकुसरीच्या कामासाठी राजस्थान प्रसिद्ध आहे. जयपूरची पितळी भांडी, सांगानेरचे छापील कापड, मकराना येथील संगमरवरी मूर्ती व चित्रे; उदयपूर, जोधपूर व जयपूर येथील कातडी वस्तू, मेवा व जयपूर येथील हस्तिदंती वस्तू, नाथद्वारा येथील चांदीने मढवलेल्या वस्तू, जयपूरची रत्ने, इ. असंख्य वस्तू भारतातच नव्हे, तर परदेशांतही लोकप्रिय ठरल्या आहेत.

प्रागैतिहासिक काल– राजस्थानात अनेक ठिकाणी उत्खनन करण्यात आले आहे व तिथे पाषाणयुगातील मानवाची चिन्हे सापडली आहेत. चंबळच्या खोऱ्यात आणि चितोडजवळ मध्याश्मयुगीन मानवाची हत्यारे मिळाली आहेत. आहाडजवळही अतिप्राचीन संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. त्यांत नाना प्रकारची मातीची सुबक भांडी, चित्रे व मणी आहेत. दगडी पायावर बांधलेल्या विटांच्या घरांच्या खुणाही तिथे आढळतात. त्या संस्कृतीचा काळ ४ हजार वर्षांपूर्वीचा असावा आणि सांप्रत विंध्यसातपुडयांत राहणारे भिल्ल ती संस्कृती निर्माण करणाऱ्या मानवांचे वंशज असावे, असे म्हणतात.

पश्चिम राजस्थानातील मरुभूमीतही दहा हजार वर्षांपूर्वी मानवाची वसती होती, असे दिसते. मारवाडात केलेल्या उत्खननामुळे त्या मानवाची उपकरणे उजेडात आली आहेत. ती दोन प्रकारची आहेत. त्यावरून त्या प्रदेशात मानवाची वसती ५०००० वर्षांपूर्वीपासून असावी, असे अनुमान करता येते. त्या काळी तिथे भरपूर पाऊस पडत असला पाहिजे. प्रारंभी ते लोक शिकार करून पोट भरत होते व कंदमुळेही खात होते. पाषाणयुगाच्या उत्तरार्धात ते शेती व पशुपालन करू लागले. चाकावर मातीची भांडी बनवणे त्यांना माहीत होते. अशी लाल व राखी रंगाची विविध प्रकारची भांडी मिळाली आहेत.

राजस्थानातल्या निरनिराळ्या मानवसमूहांची माहिती पुराणांत मिळते. आर्य लोक पंजाबातून बाहेर पडून पूर्वेला व दक्षिणला नवीन वसाहती करू लागले, तेव्हा राजस्थानात त्यांची दोन जमातींशी गाठ पडली. त्यांतली एक जमात अगदी रानटी व नरभक्षक होती. पुराणांत त्यांनाच राक्षस म्हटले आहे. दुसरी जमात दैत्य किंवा दानव लोकांची होय. ते असुर वर्गातले होते. ते अनार्य असले, तरी असभ्य नव्हते. शारीरिक सामर्थ्यात तर ते आर्यांपेक्षाही बलदंड होते. त्यामुळे आर्य त्यांना सहज जिंकू शकले नाहीत.

पुष्करारण्य म्हणजे आजचा अजमेरभोवतालचा प्रदेश होय. त्यात दानवांची मुख्य वसती होती. मधू व कैटभ हे त्या दानवांचे सरदार होते. विष्णूने सुदर्शनचक्र सोडून त्यांचा नाश केला. त्यामुळेच त्याला मधुसूदन व कैटभारी ही नावे प्राप्त झाली. धुंधू हा मधू दैत्याचा मुलगा होय. त्या धुंधूला अयोध्येच्या कुवलयाश्व राजाने ठार मारले आणि मग त्या क्षेत्रात कुवलयाश्वाचा एक वंशज निकुंभ याने राज्य स्थापले. त्यामुळे त्या क्षेत्राला धुंधुमार हे नाव मिळाले व त्याचेच रूपांतर ढूंढाड असे झाले आहे. निकुंभाच्या क्षत्रिय वंशाचे राज्य त्या प्रदेशावर इ. स. च्या १३ व्या शतकापर्यंत होते. राजस्थानातील कित्येक गडकोट त्याच राजांनी बांधलेले आहेत, असे कनिंगहॅमचे मत आहे.

जयपूरच्या उत्तरेला मेवात या प्रदेशात मत्स्यांचे राज्य होते. महाभारतकाळातली मत्स्य देशाची राजधानी विराटनगरी आज बैराट या नावाने जयपूर-दिल्ली मार्गावर वसलेली दिसते. मेवातच्या पश्चिमेला बीकानेरपर्यंतच्या प्रदेशाला पूर्वी जांगल हे नाव होते. त्या प्रदेशात शाल्वांचे जनपद होते. त्यांची राजधानी अहिच्छत्रा (नागौर) येथे होती. शाल्व लोक आर्यजनांपैकी नसून, काही ठिकाणी त्यांना दानवच म्हटलेले आहे. त्यांचे पायदळ नामांकित होते. त्यांच्या राज्यात बैल चांगले निपजत. सावित्रीचा पती सत्यवान हा शाल्व होता. या शाल्वांची सत्ता मारवाड व मेवाड या प्रदेशांवरही असावी.

इतिहास– भारतीय महायुद्धापूर्वी यादवांची अनेक गणराज्ये राजस्थान, गुजरात व सौराष्ट्र या प्रदेशांत विस्तारली होती. पण भारतीय युद्धानंतर यादवांचा नाश झाला आणि समग्र भारताची सामाजिक व राजकीय घडी विस्कटून गेली. त्यामुळे त्या काळातील परिस्थितीची माहिती फारशी उपलब्ध नाही. त्यानंतर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बुद्धाच्या काळापासून इतिहासावर थोडासा प्रकाश पडलेला दिसतो. त्या काळी भारतात सोळा महाजनपदे निर्माण झालेली होती आणि मत्स्य हे त्यांपैकीच एक महाजनपद होते. पण कालांतराने तो प्रदेश मगध साम्राज्याचा एक भाग बनला. त्याच्या राजधानीत (वैराट येथे) सापडलेल्या भग्नावशेषांत मौर्य सम्राट अशोकाचा एक स्तंभ सापडला आहे. त्यावरील लेख आणि जवळच भीमजीकी डुंगरी येथे पहाडात कोरलेले शिलालेख यांवरून राजस्थानचा बराच भाग मौर्य साम्राज्यात विलीन झाल्याचे कळते. कौटिलीय अर्थशास्त्रानुसार पूर्व राजस्थानातली अर्जुनायन, कुकुर, इ. संघराज्येही नंदांच्या वेळेपासूनच मगध साम्राज्यात समाविष्ट झालेली होती.

मौर्य वंशाची सत्ता दुबळी झाल्यानंतर भारतावर यवनांची आक्रमणे सुरू झाली. यवन राजा मिनांडर याची काही नाणी राजस्थानातील मध्यमिका नगरीत सापडली आहेत. या नगरीचे अवशेष चितोडपासून ८ मैलांवर आढळतात. पुष्यमित्र शुंग याने यवनांचा पराभव करून त्यांना मगध साम्राज्याबाहेर हाकलून दिले. मात्र यवनांची सत्ता पंजाबात प्रस्थापित झाल्यामुळे त्या प्रदेशातील मालव, शिबी, यौधेय, इ. लोक राजस्थानात येऊन वसले. त्यांची बरीच नाणी जयपूर, मेवाड, इ. भागांत केलेल्या उत्खननात सापडली आहेत.

यवनांच्या नंतर शकांनी भारतावर आक्रमण करून बराच प्रदेश जिंकला. नहपान हा त्यांचा नेता होता. त्याने पंजाबपासून नर्मदेपर्यंतच्या प्रदेशावर सत्ता स्थापली होती. पण सातवाहन वंशातील गौतमीपुत्र सातकर्णी याने त्याचा नाश करून शकांची सत्ता उखडून टाकली. त्यानंतर पंजाब व राजस्थान या प्रदेशांतील गणराज्ये सातवाहनांची मांडलिक राज्ये बनली.

त्यानंतर कुशाणांचे आक्रमण आले. सातवाहनांनी सतत ५० वर्षे त्यांच्याशी संग्राम केला. पण कनिष्क या कुशाण योद्धयापुढे सातवाहनांचा टिकाव लागला नाही. त्यांना नर्मदेपर्यंत मागे हटावे लागले आणि सारा उत्तर भारत कुशाणांच्या सत्तेखाली गेला. तथापि राजस्थानात यौधेय, मालव, इ. गणराज्ये कुशाणांच्या विरुद्ध झगडत राहिली होती. त्या वेळी गुजरातमध्ये शकक्षत्रपांचे प्रबळ राज्य प्रस्थापित झालेले होते. महाक्षत्रप रुद्रदामा याने राजस्थानातील बराच प्रदेश जिंकून घेतला होता. पण तो यौधेयांना जिंकू शकला नव्हता आणि त्याच यौधेयांनी पुढे कुशाणांची सत्ता नष्ट केली.

पुढे लवकरच मगधावर गुप्त वंशाचे राज्य सुरू झाले. त्या वंशातील समुद्रगुप्ताने मोठा दिग्विजय केला. त्याच्यापुढे यौधेयांचे काही. चालले नाही इ. स. च्या ४ थ्या शतकात राजस्थान हा गुप्त साम्राज्याचा एक भाग बनला.

त्यानंतर हूणांची भयानक आक्रमणे सुरू झाली. गुप्त राजे प्रबळ होते तोपर्यंत त्यांनी हूणांचा पराजय केला. पण गुप्त सत्ता दुबळी झाल्यानंतर हूणांनी राजस्थानात धुमाकूळ घातला. राजस्थानातली जनता त्यामुळे उद्विग्न झाली. पण लवकरच यशोधर्मा नावाचा शूर पुरुष उदयाला आला व त्याने हूणांना नामोहरम करून मध्य भारतात आपले राज्य स्थापले. इ. स. च्या ७ व्या शतकात पश्चिम राजस्थान गुर्जरत्रा या नावाने ओळखले जात होते. कारण त्या प्रदेशात गुर्जर लोकांनी राज्य स्थापले होते. तोच राजवंश पुढे गुर्जर-प्रतीहार या नावाने प्रख्यात झाला. मात्र त्यांचे राज्य माळव्यात होते. गुर्जरत्रावर गुर्जरांचे राज्य सुमारे ३५ वर्षे चालू होते. त्याच काळात मेवाडवर गुहिलोत वंशाचे राज्य होते. हर्षवर्धन याने कनोजचे साम्राज्य स्थापले, तेव्हाही राजस्थानातली ही राज्ये स्वतंत्र होती. हर्षाच्या नंतर उ. भारतात एकछत्री सत्ता उरली नाही. पण इ. स. च्या ८ व्या शतकाच्या आरंभी यशोवर्मा नामक महापराक्रमी पुरुष कनोजच्या सिंहासनावर बसला. त्याने मोठा दिग्विजय केला, त्यात राजस्थानही जिंकले. पण त्याची सत्ता अल्पकाळच टिकली. त्याच सुमारास अरबांनी भारतावर पुन्हा आक्रमण केले आणि कच्छ, काठियावाड, गुजरात व द. राजपुताना हे प्रदेश पादाक्रांत करून माळव्यापर्यंत मजल मारली. पण अवंतीच्या गुर्जर–प्रतीहार वंशातील नागभट राजाने त्या आक्रमणाला यशस्वी प्रतिकार केला. त्याने मारवाडातील गुर्जर राज्यावरही प्रभुत्व मिळवले होते.

मेवाड – मेवाडमध्ये त्या वेळी गुहिलोत वंशातील बाप्पा रावळ राज्य करीत होता. पण चितोडवर मौर्य घराण्याचे राज्य



चितोडगडाचे विहंगम दृश्य

होते. अरबांनी त्यांचा पराभव करून चितोडगड घेतला असावा. बाप्पाने अरबांचा पराभव करून तो गड सर केला. जयपूर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

येथेही गुहिलोत वंशाच्या एका शाखेचे राज्य होते. ही दोन्ही राज्ये अवंतीच्या प्रतीहारांची अधिसत्ता मानीत होती.

गुहिलोत घराण्यात इ. स.च्या ९ व्या शतकात खुम्मान नामक थोर पुरुष होऊन गेला. त्यानेही बाप्पाप्रमाणेच अरबांचे आक्रमण मोडून काढले. इ. स. च्या १० व्या शतकाच्या पूर्वार्धात गुहिलोत राजा भर्तृपट्ट याने प्रतीहारांची सत्ता झुगारून दिली व राज्य स्वतंत्र केले. त्यानंतर सुमारे ३५० वर्षे मेवाडचे राज्य स्वतंत्र राहिले. इ. स. १३०० पर्यंत मेवाडच्या राजांनी मुसलमानी आक्रमणांना जोराचा प्रतिकार करून आपले स्वातंत्र्य अबाधित राखले. इ. स. १३०३ मध्ये मात्र अलाउद्दीन खिलजीने चितोडगड सर करून मेवाडचे राज्य घेतले. पण लवकरच राणा हम्मीर याने ते परत जिंकून घेतले. त्यानंतर बाबराच्या आक्रमणापर्यंत सुमारे पावणेदोनशे वर्षे मेवाडचे राज्य वैभवाने नांदले. राणा सांगा हा सभोवतीच्या सर्व सुलतानांना हतबल करून मेवाडचा मुकुटमणी बनला. पण पुढे बाबराने त्याचा पराभव केला. त्यामुळे मेवाडच्या प्रतिष्ठेला मोठा धक्का बसला. त्यानंतर मेवाड स्वतंत्र राहिला, तरी चितोडगड मात्र अकबराने जिंकून घेतला. राणा प्रतापने मेवाडचे स्वातंत्र्य राखले व प्रतिष्ठाही उंचावत ठेवली. पण त्याला चितोडगड मात्र घेता आला नाही. त्याच्या मागून तर मोगल बादशाहाने मेवाड राज्यच जिंकून घेतले. ते इ. स. १६८१ मध्ये पुन्हा स्वतंत्र झाले. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल बादशाही दुबळी झाल्यामुळे मेवाडचे स्वातंत्र्य अबाधित राहिले. पण कालांतराने उत्तर भारतात मराठी साम्राज्य प्रस्थापित होऊन मेवाडचे राजे शिंद्यांचे अंकित झाले. पुढे मराठ्यांच्या ऐवजी इंग्रजी सत्ता आली आणि उदयपूर हे मांडलिक संस्थान बनले.

मारवाड – इ. स. ११९४ मध्ये कनोजचे राज्य नष्ट झाल्यानंतर जयचंद्राचा एक वंशज सियाजी आपले काही लोक बरोबर घेऊन राजस्थानमधील मरुभूमीत जाऊन स्थायिक झाला. त्याने इ. स. १२१२ मध्ये पाली येथे राठोड वंशाचे राज्य सुरू केले. त्या वंशातील राव चुंडा याने इ. स. १३९५ मध्ये पडिहारांकडून मंडोर नगर घेतले. इ. स. च्या १५ व्या शतकात त्याच्या राज्याचा विस्तार झाला. इ. स. १४५९ मध्ये जोधा नामक राजाने जोधपूर वसवले. त्यानंतर मालदेव (इ. स. १५३२–६२) याने आपल्या राज्याचे सामर्थ्य खूप वाढवले. त्याने बीकानेर घेतले. त्यामुळे जोधपूरचे राज्य राजस्थानात प्रबळ ठरले. पण मालदेवाच्या मृत्यूनंतर लवकरच ते राज्य मोगलांचे मांडलिक बनले. राठोड राजे मोगलांचे सेनापती झाले. जोधपूरची राजकन्या जोधाबाई हिचे सलीमशी लग्न झाले. या घराण्यातील जसवंतसिंग अत्यंत पराक्रमी होता. त्याने शहाजहान व औरंगजेब यांची सेवा केली. त्याच्या नंतर त्याचा सेनापती दुर्गादास याने राठोडांचे राज्य राखण्याची पराकाष्ठा केली.



जसवंतसिंगाचे स्मारक – जोधपूर

सतत ३० वर्षे लढा देऊन त्याने अजितसिंगाला जोधपूरचे राज्य परत मिळवून दिले. पण त्याचे स्वातंत्र्य अल्प काळ टिकले. अजितसिंगानेच मोगलांची ताबेदारी पत्करली.

अजमेर -- शाकंभरीचा चौहान वंश फार प्रसिद्ध आहे. इ. स. च्या १० व्या शतकाच्या उत्तरार्धात त्याचे राज्य स्वतंत्र झाले. इ. स. च्या १२ व्या शतकात अजयराज याने अजमेर शहर वसवले. त्याच वंशात प्रसिद्ध राजा पृथ्वीराज चौहान होऊन गेला. कुतुबुद्दीन ऐबक याने अजमेर जिंकले तेव्हा अनेक पुरुषांनी जोहार केला व चौहान वंशाचा अंत झाला. त्या घराण्यातील हम्मीर याने रणथंभोर येथे काही काळ राज्य केले. पण तेही इ. स. १३०१ मध्ये अलाउद्दीन खिलजीने जिंकले.

इ. स. च्या १५ व्या शतकात अजमेर मेवाडच्या अंकित होते. पण लवकरच माळव्याच्या सुलतानाने ते घेतले. त्यानंतर इ. स. १५३१ पासून तिथे मोगलांची सत्ता प्रस्थापित झाली. बादशाही दुबळी झाल्यानंतर तिथे मारवाडची सत्ता आली आणि शेवटी मराठ्यांनी तिथे आपले वर्चस्व स्थापले.

राजस्थानातील प्रमुख राज्यांचा इतिहास हा असा आहे. त्याव्यतिरिक्त अनेक लहानमोठी राज्ये या प्रदेशात नांदत होती. प्रतीहारांचे साम्राज्य होते, तेव्हा माळवा व अबू येथील परमार, मेवाडमधील गुहिलोत, शाकंभरीचे चौहान व अलवारमधील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गुर्जर हे त्यांचे सामंत म्हणून राज्य करीत होते. पश्चिम मारवाड म्हणजे जैसलमीर या भागात भाटी राजपुतांचे राज्य होते. तेही प्रतीहारांचे सामंत होते. पण इ. स. च्या १० व्या शतकात प्रतीहारांची सत्ता दुबळी झाल्यानंतर ती राज्ये स्वतंत्र झाली. अरबांच्या भयाने राजस्थानमधील काठी, जाडेजा, चूडासमा, इ. जातींचे लोक तिथून कच्छ-सौराष्ट्रात वास्तव्याला गेले.

इ. स. च्या ११ व्या शतकात माळव्यातील परमारांची सत्ता मेवाडच्या बऱ्याच भागावर होती आणि वागड (वांसवाडा–डुंगरपूर) या प्रदेशावर त्यांचीच एक शाखा सामंत म्हणून राज्य करीत होती. प. राजस्थानात परमारांची अनेक मांडलिक राज्ये होती. शाकंभरीचे चौहान त्या काळी प्रबळ झाले होते. इ. स. च्या १२ व्या शतकात चौलुक्य राजा जयसिंह याने परमारांचा पराभव करून माळवा जिंकला. त्यामुळे राजस्थानचा बराच भाग त्याच्या सत्तेखाली आला. कुमारपालाच्या वेळीही राजस्थानवर चौलुक्यांचेच वर्चस्व होते. शहाबुद्दीन घोरीने पृथ्वीराजाचा पराभव करून त्याला ठार मारल्यानंतर चौहानांचे राज्य नष्ट झाले. कुतुबुद्दीन ऐबकाने अजमेर, नागौर घेतल्यानंतर राजस्थानात अधिक आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. पण रणथंभोर व नाडौल-जालोरचे चौहान व मेवाडचे गुहिलोत त्या वेळी स्वतंत्र झाले होते. त्यांनी मुसलमानांना पुढे सरकू दिले नाही. जैसलमीरच्या भाटी राजांनीही सिंधमधून येणाऱ्या आक्रमणाला विरोध केला. इ. स. १२३४ मध्ये सुलतान इल्तुमिश हा रणथंभोर व उज्जैन लुटून मेवाडमार्गे गुजरातवर स्वारी करण्यास जात होता; पण मेवाडचा राजा जैत्रसिंह याने त्याचा मोठा पराभव केला. दोन वर्षांनंतर चौहान राजा वाग्भट याने रणथंभोरचा गड तुर्कांकडून परत जिंकून घेतला. इ. स. १२३७ मध्ये मेवाडचा राणा समरसिंह याने वल्वनचा पराभव केला.

त्या काळात प्राचीन मत्स्यदेशाला, तिथे वसलेल्या मेव लोकांवरून मेवात हे नाव मिळाले. ते लोक लढाऊ व जिद्दीचे असल्यामुळे दिल्लीच्या सुलतानशाहीला त्यांचा सतत उपद्रव होत असे.

अलाउद्दीने खिलजीने इ. स. १३०३ साली चितोडगड सर केल्यानंतर मारवाडातील जालोर, नाडौल, सिवाना, भिनमाल, सांचोर, इ. राज्येही जिंकून घेतली आणि जैसलमीरवर स्वारी करून ते नगर उद्ध्वस्त केले. अशा प्रकारे बहुतेक सारा राजस्थान मुसलमानांच्या ताब्यात गेला.

तुगलुक सुलतानांच्या वेळी दिल्लीची सत्ता दुबळी झाल्यामुळे आणि मेवाडचे राज्य प्रबळ झाल्यामुळे प. राजस्थानात जैसलमीरचे भाटी, मंडोरचे प्रतीहार, द. मारवाडातील परमार, चौहान, राठोड वगैरे लहानमोठी राज्ये डोके वर काढू लागली व हळूहळू स्वतंत्र झाली. मेवाडचे राजे मुस्लिम सत्तेशी झुंजत असताना राजस्थानातील बरेच महत्त्वाकांक्षी राजपुरुष त्यांच्या झेंड्याखाली जमा झाले. हळूहळू मेवाडच्या राज्याचा विस्तार होऊन राणा सांगाच्या वेळी सारा राजस्थान मेवाडच्या सत्तेखाली आला होता.

इ. स. च्या १७ व्या शतकात राजस्थानावर मोगलांची सत्ता होती, तेव्हा राजस्थानातील असंख्य राजपुरुष, सरदार व सैनिक मोगलांच्या सैन्यात सामील होऊन मोगल साम्राज्याची वृद्धी करीत होते. त्यांच्यांतील अनेक वीर पुरुषांनी मोठे पराक्रम करून बादशहांना खूष केल्यामुळे त्यांना निरनिराळ्या प्रदेशांत जहागिरी मिळाल्या. त्याचीच पुढे लहानमोठी संस्थाने झाली. आंबेर (जयपूर), कृष्णगड, शाहपुरा, बूंदी, कोटा, सिरोही, डुंगरपूर, बांसवाडा, प्रतापगड, इ. संस्थाने अशा प्रकारे अस्तित्वात आली. मराठ्यांची सत्ता क्षीण होताच त्या निरनिराळ्या प्रदेशांतील राजांनी आपापल्या भोवतालची लहान गावे आपल्या राज्यात सामील करून घेतली. इंग्रजांची सत्ता भारतात प्रस्थापित झाल्यानंतर त्यांनी अशा राज्यांना मान्यता देऊन स्वतंत्रपणे कारभार करण्याची परवानगी दिली.

राजस्थानातील निरनिराळ्या पहाडी प्रदेशांत भिल्ल, मीन, मेर, वगैरे जमाती राजपुतांच्या राजवटीत स्वतंत्रपणे नांदत होत्या. इंग्रजांच्या राजवटीत त्यांनी काही ठिकाणी उठाव केला, पण इंग्रजांनी निरनिराळ्या राजांच्या मदतीने तो मोडून काढला. इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामातही राजस्थानातील काही ठिकाणी उठावणी झाली होती, पण तिथल्या राजांनीच तिचा बंदोबस्त केला. त्यामुळे तिथे फार दिवस युद्ध झाले नाही.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर संपूर्ण राजस्थानाचे एक राज्य बनविण्याचे प्रयत्न सुरू झाले. प्रथम डुंगरपूर, बांसवाडा, प्रतापगड, कुशलगड, झालावाड, कोटा, बुंदी, टोंक, किशनगड व शाहपुरा या दहा संस्थानांचा एक संघ मार्च १९४८ मध्ये स्थापण्यात आला. उदयपूर, जोधपूर, बीकानेर, जयपूर व जैसलमीर या संस्थानांच्या अधिपतींनी त्यात सामील होण्यास नकार दिला. पण जनमताच्या दबावामुळे जयपूरच्या महाराण्याला त्यात सामील व्हावे लागले. एप्रिल १९४८ मध्ये अशा संयुक्त राजस्थान संघाची स्थापना झाली. त्यानंतर भारत सरकारने हैद्राबादवर स्वारी करून ते संस्थान ताब्यात घेतलेले पाहून राजस्थानातील इतर संस्थानेही भारतीय संघराज्यात विलीन व्हायला सिद्ध झाली. इ. स. १९४९ मध्ये जयपूर, जोधपूर, बीकानेर, जैसलमीर ही संस्थाने धरून नवा राजस्थान संघ स्थापन झाला. जयपूर ही त्याची राजधानी ठरविण्यात आली.

सांप्रत राजस्थान राज्यात २६ जिल्हे आहेत, त्यांची नावे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशी – जयपूर, अलवार, भरतपूर, सिकर, झुनझुनू, चुरू, गंगानगर, बीकानेर, जैलसमीर, बारमेर, जालोर, सिरोही, पाली, जोधपूर, नागौर, अजमीर, टोंक, सवाई माधवपूर, बुंदी, कोटा, भिलवाडा, चितोडगड, उदयपूर, डूंगरपूर, बांसवाडा व झालावाड.

ऐतिहासिक स्थाने – राजस्थानात ऐतिहासिक महत्त्वाची व प्रेक्षणिय स्थाने असंख्य आहेत. त्यांतील काही प्रमुख स्थळांची माहिती पुढीलप्रमाणे –

जयपूर – हे शहर कछवा हा वंशातील सवाई जयसिहाने इ. स. च्या १८ व्या शतकात वसवले. त्याची रचना अगदी योजनाबद्ध व रेखीव आहे. विद्याधर पंडित नावाचा एक बंगाली स्थापत्यविशारद जयसिहाच्या पदरी होता. त्याने नगराची आखणी केली. ती करताना जयसिहाने अनेक ज्योतिर्विद, गणितज्ञ व शिल्पशास्त्रज्ञ यांचा सल्ला घेतला होता. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राला अनुसरून हे नगर बांधलेले आहे. नगराच्या पूर्व, उत्तर व पश्चिम या तीन्ही बाजूंना डोंगर असून, त्यांवर काही ठिकाणी गड व मनोरे बांधलेले आहेत. त्यांतील नहरगड हा एका उभ्या पहाडावर बांधलेला असून, त्याला सुदर्शनगडही म्हणतात. तो गड सवाई जयसिहाने मराठ्यांच्या सैन्यापासून जयपूरचे संरक्षण करण्यासाठी इ. स. १७३४ मध्ये बांधला.

जयपूर नगराचा आकार लंबचौकोनी असून, त्यातील पूर्वपश्चिम व दक्षिणोत्तर अशा अनेक रस्त्यांमुळे त्याचे विभाग झाले आहेत. सांडपाण्यासाठी निकास ठेवलेले आहेत. नगराभोवती २० फूट उंच व ९ फूट जाड असा तट बांधलेला असून, त्यात ८ दरवाजे आहेत. नगरातील घरे गुलाबी दगडाची बांधलेली आहेत. म्हणून जयपूरला गुलाबी नगर असे म्हणतात.

जयपूरमधील राजप्रासादाच्या प्राङ्गणात अनेक सुंदर इमारती बांधलेल्या आहेत. त्यांतील मुबारकमहाल, दिवाण–इ–खास व दिवाण–इ–आम या अत्यंत प्रेक्षणीय आहेत. त्यातील संगमरवरी कोरीव काम अप्रतीम आहे. सांप्रत दिवाण–इ–आममध्ये महाराजांचा पोथीसंग्रह व चित्रसंग्रह ठेवलेला आहे. त्यात राजस्थानी शैलीची उत्तमोत्तम चित्रे पाहायला मिळतात. जुन्या संस्कृत पोथ्यांचा संग्रह म्हणजे एक बहुमोल भांडार आहे. दिवाण–इ–खासजवळचा चंद्रमहालही अतिशय भव्य व सुंदर असून, त्याच्या भिंती व छते आरशांनी मढवलेली आहेत. काही दालने चित्रांनी व नक्षीकामाने सुशोभित आहेत. राजवाड्याच्या एका भागात शस्त्रागार असून, त्यात जुन्या उत्तमोत्तम आयुधांचा संग्रह आहे. त्यातच मानसिंहाची तलवार पहायला मिळते. जयपूरचा राजप्रासाद मोगल व राजपूत शिल्पशैलीचा उत्तम नमुना आहे.

चंद्रमहालाच्या उत्तरेला गोविंदजीचे मंदिर आहे. गोविंदजी हा जयपूरच्या राजांचा कुलदेव होय. सवाई जयसिंहाने मथुरेहून त्याची मूर्ती आणून इ. स. १७३४ मध्ये या मंदिरात तिची स्थापना केली.

मुबारक महालाजवळच सवाई जयसिहाने बांधलेली वेधशाळा आहे. सवाई जयसिह विज्ञानाचा भोक्ता व ग्रहगणिताचा ज्ञाता होता. त्याने भारतात एकूण पाच वेधशाळा बांधल्या. जयपूरची वेधशाळा ही त्या सर्वांतली प्रमुख होय. ती अजून चांगल्या स्थितीत आहे. कारण तिथली उपकरणे दगड व चुना यांचा उपयोग करून बांधलेली आहेत. स्थानिक वेळ मोजणे, तारे व ग्रह यांची परिभ्रमणे मोजणे, ग्रहणांची गणिते करणे यासाठी त्यांचा उपयोग केला जात होता. तिथे एक छायाशंकूही आहे.



जंतरमंतर–जयपूर

या वेधशाळेला जंतरमंतर म्हणतात. शहराच्या मध्यभागी असलेला हवामहाल त्याच्या अभिनव रचनेमुळे विलक्षण आकर्षक वाटतो. तो सवाई प्रतापसिंग याने इ. स. १७९९ मध्ये बांधला. त्यात असंख्य गवाक्षे, कमानी व लहान मंडपी आहेत.

शहराच्या दक्षिणेला रामनिवास बगीच्यात एक भव्य इमारत आहे. तिथे वस्तुसंग्रहालय आहे. वालुकापाषाण व संगमरवर यांनी बांधलेली ही इमारत व आतील वस्तुसंग्रह फारच प्रेक्षणीय आहे. नहरगडाच्या पायथ्याजवळ जयपूरच्या राजांच्या छत्र्या आहेत. त्या शुभ्र संगमरवरी असून, त्यांवर सुंदर नक्षीकाम व देवतांच्या मूर्ती कोरलेल्या दिसतात.

शहराच्या पूर्वेला डोंगरमाथ्यावर गलता हे रमणीय स्थान आहे. तिथे एक सूर्यमंदिर असून, आसमंतात अनेक तलाव आणि मंडप बांधलेले आहेत. जवळच एक धबधबा आहे. त्या ठिकाणी गालव ऋषीने तप केले, अशी आख्यायिका आहे. जयपूरजवळच डूंगरी नावाची टेकडी आहे. तिच्या माथ्यावर सवाई जयसिंहाने केलेल्या यज्ञाचा यूपस्तंभ अजून उभा आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आंबेर – कछवाहा राजांची ही जुनी राजधानी जयपूर-पासून ७ मैलांवर डोंगरात वसलेली आहे. अयोध्येचा राजा अंब-

जगत्शिरोमणि–मंदिर

रीष याने तिथे अंबिकेश्वराचे मंदिर बांधले, म्हणून त्या स्थानाला आंबेर हे नाव मिळाले. इथला राजवाडा एका टेकडीच्या माथ्यावर आहे. खालच्या माओता तलावात पडणारे त्याचे प्रतिबिंब फार भव्य व सुंदर दिसते. राजपूत स्थापत्याचा तो एक मनोहर नमुना आहे. त्यात अनेक महाल आहेत. त्यांचे दरवाजे, स्तंभ व भिंती यांवर विलक्षण कोरीव काम व सुंदर भित्तिचित्रे आढळतात.

टेकडीच्या पायथ्याजवळ प्राचीन नगराचे अवशेष आहेत व अनेक मंदिरे उभी आहेत. त्यांतील जगत्शिरोमणीचे वैष्णव मंदिर, गरुडाचे देऊळ व संगमरवरी तोरणद्वार यांसाठी उल्लेखनीय आहे. गरुडाच्या देवळावर अनेक प्रतिमा आहेत. तोरणाच्या दोन्ही बाजूंना हत्ती आहेत. माओताच्या काठी दिलाराम उद्यानात लहानसे वस्तुसंग्रहालय आहे. त्यात अनेक चांगल्या पुराणवस्तू पाहायला मिळतात.

सांगानेर – जयपूरपासून ७ मैलांवर आमन–इ–शाहा नामक नदीच्या काठी हे शहर असून, तिथे जैनांचे एक प्रेक्षणीय मंदिर व प्रासाद आहे. तिथे हाताने कागद बनविला जातो, तो फार चांगला असतो.

बैराट – जयपूरपासून ५३ मैलांवर जयपूर–दिल्ली मार्गावर हे स्थान आहे. प्राचीन काळचे विराटनगर इथेच होते, असे म्हणतात. पांडवांनी तिथे अज्ञातवासाचे एक वर्ष घालवले. पुढे हे बौद्ध धर्माचे एक केंद्र बनले. युआन च्वांग याला तिथे अनेक बौद्ध मठ आढळले. तिथे केलेल्या उत्खननात अशोकाचा एक शिलालेख, एका मोठ्या मठाचे व एका गोल मंदिराचे अवशेष, चांदीची नाणी, मातीच्या यक्षीमूर्ती, मातीची भांडी, यवन राजांची नाणी, इ. वस्तू सापडल्या आहेत. पार्श्वनाथाचे मंदिर, भीमजीकी डुंगरी व भिजककी पहाडी या गोष्टी पुराणवस्तु–संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

अजमेर – चौहान राजवंशामुळे हे नगर प्रख्यात झाले आहे. जयपूरपासून ते ८२ मैलांवर असून, त्याचा परिसर अत्यंत रम्य आहे. ऐतिहासिक, धार्मिक व स्थापत्यकलेच्या दृष्टीने हे स्थान फार महत्त्वाचे आहे. तिथे अनेक भव्य प्रासाद व मंदिरे आहेत. मात्र ख्वाजा मोइनुद्दीन चिस्तीची कबर व दर्गा यांमुळे हे स्थान विशेष प्रसिद्ध आहे. तारागड, अढाई दिनका झोपडा, लाल पाषाणांची मशीद, अकबराने बांधलेला कोटकिल्ला, आनासागर तलाव आणि त्याच्या काठी शहाजहानाने बांधलेली क्रीडागृहे ही इथली आकर्षणकेंद्रे होत.



ख्वाजा मोइनुद्दीन चिस्तीची कबर – अजमेर

चितोडगड – हे इतिहासप्रसिद्ध स्थान अजमेरपासून ११७ मैलांवर आहे. मेवाडच्या सिसोदिया राजवंशाच्या अद्भुत इतिहासामुळे राजस्थानाच्या इतिहासात या गडाला असाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. राणी पद्मिनीच्या जोहारामुळे त्याचे नाव अजरामर झाले आहे. गडावर चढून जाताना सात भक्कम दरवाजे पार करावे लागतात. पाडलपोळ, भैरवपोळ, हनुमानपोळ, रामपोळ इ. त्यांची नावे आहेत. राणा कुंभाने निर्माण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केलेला विजयस्तंभ, जैनांचा कीर्तिस्तंभ, समिद्धेश्वर शिवमंदिर, कुंभश्यामाचे मंदिर, कालिकामंदिर, पद्मिनीचा महाल, भीम-



हनुमानपोळ–चितोडगड

लत्ताकुंड, मीराबाईचे मंदिर, शांतिनाथाचे मंदिर ही इथली दर्शनीय स्थळे आहेत.

उदयपूर – अरवली पर्वतावर वसलेले हे नगर अजमेरपासून १८५ मैलांवर आहे. हे स्थान अत्यंत रमणीय आहे. तिथले भव्य प्रासाद, प्रशस्त उद्याने, स्वच्छ जलाचे तलाव आणि सुंदर कमानी यांमुळे ते प्रेक्षणीय झाले आहे. पिछोला तलाव आणि त्याच्या काठावर बांधलेले राजप्रासाद हे इथले सर्वांत मोठे आकर्षण होय. तिथले जगदीशमंदिरही फार सुंदर आहे.

उदयपूरपासून २ मैलांवर आहाड हे स्थान आहे. प्राचीन शिलालेखांत व जैन साहित्यात याचा उल्लेख आघातपूर या नावाने केलेला आहे. त्या नगराचे भग्नावशेष या जागी आढळतात. विक्रमादित्याच्या पूर्वजांचे वसतिस्थान इथेच होते व त्याला तांबवतीनगरी हे नाव होते, असे म्हणतात. मेवाडच्या गुहिलोत वंशाची राजधानी तिथे असावी. राजा भर्तृपट्ट याचा एक शिलालेख तिथे सापडला आहे. अनेक राजांच्या छत्र्याही तिथे आहेत.

उदयपूरच्या आसमंतात कित्येक प्रेक्षणीय व ऐतिहासिक स्थाने आहेत. राजसमंद, जयसमंद व उदयसागर हे तलाव; एकलिंगजीचे मंदिर व तिथलेच मीराबाईचे विष्णुमंदिर; नागदा हे प्राचीन स्थान व तिथली मंदिरे, ही विशेष उल्लेखनीय आहेत.

कुंभलगड – उदयपूरच्या उत्तरेला ४० मैलांवर हा किल्ला आहे. तो महाराणा कुंभाने इ. स. १४५८ मध्ये बांधला. त्याची उंची समुद्रसपाटीपासून ३५६८ फूट आहे. तिथून अरवली पर्वतराजीप्रमाणेच मारवाडच्या मरुभूमीवरही लक्ष ठेवता येते. वर चढण्याचा मार्ग अगदी अरुंद असून, त्यात अनेक भक्कम दरवाजे बांधलेले आहेत. किल्ल्याच्या आत एका टेकाडावर कतारगड असून, त्यात एक राजवाडाही आहे. किल्ल्यात नीलकंठ महादेवाचे व कुंभस्वामीचे मंदिर आहे. किल्ल्यापासून जवळच एक जैन मंदिर आहे.

मांडलगड – हा किल्ला उदयपुरापासून १०० मैलांवर एका डोंगरावर आहे. त्याला भक्कम तटबंदी असून, अनेक बुरूज आहेत. हा किल्ला चौहान वंशातील राजांनी इ. स. च्या १२ व्या शतकात बांधला, असे म्हणतात.

हळदीघाट – हे प्रसिद्ध स्थान उदयपुरापासून ४१ मैलांवर आहे. राणा प्रतापचा मोगलांशी इथे झालेला घनघोर संग्राम इतिहासात अत्यंत प्रसिद्ध आहे.

जोधपूर – हे प्रसिद्ध नगर जयपूरच्या पश्चिमेला १९२ मैल अंतरावर आहे. हे एका लहानशा डोंगरावर वसलेले आहे. मारवाडच्या राठोड राजवंशातील राव जोधा याने हे इ. स. १४५८ साली वसवले. याच्या भोवती ९ फूट जाडीचा व १५ ते ३० फूट उंच असा दगडी कोट असून, त्यात सात दरवाजे आहेत. दरवाज्यांच्या दोन्ही अंगी बुरूज बांधलेले आहेत. त्या कोटाच्या आत अनेक प्रासाद व मंदिरे आहेत. गुलाबसागर तलावाच्या काठी असलेला तलहातीका महाल व राजमहाल, तसेच गंगाशाममंदिर ही उल्लेखनीय आहेत.



राजसमंद तलावाच्या काठावरील तोरणद्वारे – उदयपूर

शहराजवळ एका पहाडावर गडकोट बांधलेला आहे. राजस्थानातील सर्व किल्ल्यांत हाच उत्कृष्ट व प्रेक्षणीय मानला जातो. त्याची लांबी १५०० फूट व रुंदी ७५० फूट असून, तटाची उंची २० ते १२० फूट आणि जाडी १२ ते ७० फूट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. त्यातून अनेक उंच मनोरेही वर आलेले दिसतात. या तटाच्या आत अनेक राजवाडे, मंदिरे व घरे आहेत. राजवाड्यात सर्वत्र विपुल नक्षी, गवाक्षे व जाळीदार पडदे कोरलेले आहेत. मोतीमहाल व फूलमहाल यांत भिंती, स्तंभ व छते यांवर सुंदर चित्रे व आकृती रंगवलेल्या आहेत. एका दालनात जुन्या शस्त्रांचा संग्रह ठेवलेला आहे.

गडावर जाताना चार–पाच प्रचंड दरवाजे लागतात. ते निरनिराळ्या राजांनी बांधलेले आहेत. जोधपूरपासून ३ मैलांवर उत्तरेला बालसमंद तलाव बांधलेला आहे. त्याच्या काठी एक राजवाडाही आहे. जोधपूरमध्ये असे अनेक सुंदर तलाव असून, त्यांतील कैलन तलाव हा सर्वांत मोठा आहे.

जोधपूरपासून ५ मैलांवर मंडोर हे गाव आहे. तिथे पूर्वी मारवाडची राजधानी होती. प्रथम तिथे पडिहार राजपुतांचे राज्य होते. इ. स. १३८१ मध्ये ते ठिकाण राठोडांनी घेतले. इ. स. १४५८ मध्ये राजधानी जोधपूरला जाईपर्यंत ती इथेच होती. सांप्रत तिथे एका विस्तीर्ण उद्यानात जोधपूरच्या राजांच्या छत्र्या आहेत. त्यांचे शिल्पकाम शैव व बौद्ध या दोन्ही पद्धतींचे असले, तरी कोरीव काम व स्तंभ जैन पद्धतीचे आहेत. महाराजा अजितसिंगाची छत्री सर्वांत भव्य आहे; तर महाराजा जसवंतसिंगाची सर्वांत सुंदर आहे. ही सर्व स्मारके उंच चौथऱ्यांवर बांधलेली असून त्यांची शिखरे खूप उंच आहेत. जवळच ३३ कोटी देवतांचे मंदिर आहे. त्यात देवतांची चित्रे रंगवलेली दिसतात. वीरमहालात एका अखंड खडकात सोळा वीरांच्या प्रचंड प्रतिमा कोरलेल्या आहेत.

ओसियन – जोधपूरपासून ३६ मैलांवर हे गाव आहे. तिथे १६ प्राचीन मंदिरे आहेत. त्यांची बरीच पडझड झालेली असली, तरी त्यांतील शिल्पकाम अप्रतिम व उच्च प्रतीचे वाटते. काही मंदिरे इ. स. च्या ८ व्या शतकातली आहेत. त्यांतील हरिहराची मंदिरे विपुल नक्षीकामाने अलंकृत दिसतात. मात्र सूर्यमंदिर सर्वात सुबक आहे. त्याचे स्तंभ सुंदर कोरीव कामाने नटलेले असून, त्यांतील कलशपुष्पाची आकृती फारच मनोहर आहे. महावीराच्या मंदिराचे तोरणद्वार अतिशय सुशोभित वाटते. ही सर्व मंदिरे सुमारे तीन शतकांच्या कालावधीत भिन्न भिन्न वेळी निर्माण झालेली असल्यामुळे त्यांत भिन्न भिन्न शिल्पपद्धती दिसून येतात.

राणकपूर – जोधपूरपासून सुमारे १०० मैल व उदयपूरपासून ६० मैल अंतरावर अरवलीच्या पायथ्याशी एका घळीत हे स्थान आहे. तिथे जे प्रसिद्ध जैनमंदिर आहे, त्याचा विस्तार ४०,००० चौ. फूट असून, त्यात २९ सभामंडप आहेत. त्या सभामंडपांना एकूण ४२० स्तंभ आहेत. त्यांतील कोणतेही दोन स्तंभ अगदी एकसारखे आढळत नाहीत. त्या स्तंभांची सुबद्ध रचना, शिल्पकामातील विविधता, विपुल नक्षीकाम आणि विलक्षण प्रकाशयोजना यामुळे हे मंदिर पाहताना भान हरपून जाते. हे आदिनाथाचे मंदिर इ. स. १४३९ मध्ये धरणक नावाच्या एका जैन गृहस्थाने बांधले. त्यातील मुख्य गाभाऱ्यात आदिनाथाची चौमुखी मूर्ती आहे आणि सभोवती अनेक गाभारे आहेत.



चौमुखी आदिनाथाचे मंदिर–राणकपूर

हे मंदिर एका उंच चौथऱ्यावर बांधलेले असून, त्याच्या भोवती उंच तट आहे. तटाच्या आतील अंगाला ६६ ओवऱ्या असून, त्यांत सुंदर मूर्ती दिसतात. प्रत्येक ओवरीवर लहानसे सुबक शिखर असून, मुख्य मंदिरावर पाच शिखरे आहेत. सभामंडपाच्या छताला भिन्न आकारांचे २० घुमट आहेत. ते सर्व छत विपुल नक्षी व कोरीव मूर्ती यांनी भरलेले आहे. वरील चौमुखी–मंदिरासमोर आणखी दोन जैन मंदिरे आहेत. त्यांतील पारसनाथाचे मंदिर इ. स. च्या १४ व्या शतकातले असून, त्याच्या बाह्यांगावर काही कामुक चित्रे कोरलेली दिसतात. जवळच एक सूर्यमंदिर आहे, त्याची रचना तारकाकृती दिसते.

जैसलमीर – राजस्थानच्या पश्चिम भागात थर वाळवंटात जोधपूरच्या वायव्येला २२५ मैलांवर हे नगर वसलेले आहे. इथे इ. स. च्या ८ व्या शतकापासून भाटी राजपूत लोकांचे राज्य होते. त्यांनी पंजाबमधून राजस्थानात आल्यानंतर निरनिराळी ठिकाणे जिंकून तिथे राज्य स्थापले. जैसलमीर ही त्यांची शेवटची राजधानी होय. तिची स्थापना रावळ जैसल याने इ. स. ११५५ मध्ये केली, असे म्हणतात. त्याच्या नावावरून या नगराला जैसलमीर हे नाव मिळाले.

संपूर्ण नगराभोवती असलेला उंच तट, त्याच्या आत दक्षिण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भागात एका टेकडीवर बांधलेला गडकोट, त्यातील राजप्रासाद, जैन व वैष्णव मंदिरे, जैन मंदिरातील ग्रंथसंग्रह यांमुळे हे नगर बरेच प्रसिद्ध आहे.

लोद्रवा – जैसलमीरपासून १० मैलांवर हे स्थान आहे. इथे पूर्वी भाटी वंशाची राजधानी होती. त्या वेळी तिथे मोठे नगर होते. आता त्याचे भग्नावशेष तिथे पडलेले आहेत. नगराचा बराच भाग वाळूखाली गेलेला असावा. भग्नावशेषांत दोन जैन मंदिरे आहेत. ती ७००–८०० वर्षांपूर्वीची असावी.

किराडू – बारमेरपासून १६ मैलांवर हे गाव आहे. तिथे इ. स.च्या ११ व्या शतकातली ५ मंदिरे आहेत. ती मंदिरे अगदी मोडकळीस आलेली असली तरी, त्यांचे शिल्पकाम चांगले दिसते. त्यात विपुल नक्षीकाम आहे. शिखरांच्या रचनेत गुप्त शैलीचा प्रभाव दिसून येतो. स्तंभावरील कोरीव कामही त्याच पद्धतीचे आहे. विष्णूचे मंदिर सर्वांत प्राचीन असावे. कारण ते सर्वांत भग्न आहे. शिवमंदिर सर्वांत चांगले आहे. मंदिरांच्या निर्मितीत उच्च प्रकारची कला व उत्कट भक्ती यांचा संगम आढळतो.

बीकानेर – हे नगर जोधपूरच्या उत्तरेला १७१ मैलांवर आहे. याच्या भोवती जो कोट बांधलेला आहे, त्याची लांबी ४.५ मैल असून, त्यात ५ दरवाजे आहेत. त्या नगरात राजा रायसिंहाने इ. स. १५९० च्या सुमारास एक किल्ला बांधला. तो चौकोनी असून, त्याची लांबी १०७८ यार्ड आहे. त्यात ३७ बुरूज व ५ दरवाजे आहेत. त्याच्या आत अनेक राजवाडे व मंदिरे आहेत. त्या बहुतेक इमारती पिवळ्या पाषाणांच्या आहेत. अनुपसिंगाने इ. स. १६०९ मध्ये बांधलेला करणमहाल हा प्रासाद अत्यंत प्रेक्षणीय आहे. अनुपमहाल, रंगमहाल व आनंदविजयमहाल हे बारीक स्तंभ, सुंदर कमानी व नाजुक जाळी यांमुळे अत्यंत मनोहर वाटतात. रायनिवास हा पूर्वी दिवाण–इ–खास म्हणून वापरला जात होता. त्यातील संगमरवरी पाषाणावर लाल व सोनेरी नक्षी काढलेली आहे, ती फार सुंदर दिसते. याशिवाय चंद्रमहाल, फूलमहाल, शीशमहाल, छतरमहाल, गंगानिवास, इ. इमारती विविध प्रकारांनी सुशोभित केलेल्या आहेत.

बीकानेरमध्ये अनेक जैनमंदिरे व मठ आहेत. पारसनाथाचे मंदिर इ. स.च्या १६ व्या शतकातले आहे. चिंतामणिमंदिर त्याच वेळचे असून, त्यात विपुल कोरीव काम आढळते. आदिनाथाचे मंदिरही तसेच आहे. मात्र नेमिनाथाचे मंदिर सर्वांत सुंदर वाटते.

बीकानेर येथील वस्तुसंग्रहालयात काही दुर्मिळ व आकर्षक वस्तू पाहायला मिळतात. गुप्तकालातील उत्कृष्ट मृत्पात्रे तिथे आहेत. सरस्वतीची संगमरवरी शुभ्र प्रतिमा मूर्तिकलेचा उत्तम नमुना आहे. जहांगीर बादशाहाने राजा रायसिंहाला दिलेला रेशमी पोषाखही तिथे ठेवलेला आहे. राजपूत शैलीची चित्रे व कलाकुसरीच्या असंख्य सुंदर वस्तूही तिथे पाहायला मिळतात.

शहराच्या बाहेर, जवळच लालगड नावाचा भव्य राजवाडा आहे. तो लाल वालुका-पाषाणांचा बांधलेला आहे. त्यात दुर्मिळ चित्रांचा संग्रह केलेला आहे.

बीकानेरपासून ५ मैलांवर देवीकुंड येथे बीकानेरनरेशांच्या छत्र्या आहेत. त्यांचे शिल्पकामही प्रेक्षणीय आहे. तिथेही सुंदर चित्रे काढलेली आढळतात.

बीकानेरपासून १६ मैलांवर देशनोके येथे करनीचे प्रसिद्ध मंदिर आहे. करनी ही एक भविष्य सांगणारी स्त्री होती. तीच पुढे देवी मानली गेली. महाराजा सूरसिंगाच्या वेळी तिचे देऊळ बांधण्यात आले. ते दोनमजली असून, त्याच्यावर आठ घुमट आहेत. त्याच्या बाजूला लहान घुमट आहेत. आत एक सोन्याची छत्री आहे. ती जोरावरसिंगाने दिली आहे. महाराजा गंगासिंगाने त्याचा संगमरवरी नक्षीदार दरवाजा बसविला.

कोटा – ही कोटा संस्थानाची राजधानी होती. हे शहर जयपूरच्या दक्षिणेला १४९ मैलांवर चंबळ नदीच्या काठी वसलेले आहे. या स्थानाला कोटा हे नाव भिल्लांचा नेता कोटिया याच्यावरून पडले. बूंदी, कोटा व झालावाड या प्रदेशांना मिळून सांप्रत कोटामंडळ म्हणतात. त्यालाच पूर्वी हाडौती हे नाव होते. पूर्वी येथे भिल्ल व मीन यांचे राज्य होते. सांभरच्या चौहानांची एक शाखा या प्रदेशात जाऊन वसली व इ. स. च्या १४ व्या शतकात रावदेव याने बूंदीचे राज्य स्थापले. त्या घराण्यातील समरसीने लवकरच भिल्लांचा पराभव करून कोटाही जिंकले. पुढे त्याचा वंशज माधोसिंह याने इ. स. १६३१ मध्ये कोटाचे स्वतंत्र राज्य स्थापले. मात्र ते मोगलांचे मांडलीक होते. पुढे तिथे मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले.

कोटा शहरात दोन मंदिरे दर्शनीय आहेत. एक मथुराधीशाचे व दुसरे नीलकंठ महादेवाचे. जुना राजवाडा व वस्तुसंग्रहालय या वास्तूही प्रेक्षणीय आहेत. सरस्वतीभांडार या महालात हे वस्तुसंग्रहालय आहे. त्यात हजारो हस्तलिखित पोथ्या आहेत. त्यांतील काही पोथ्या सुंदर हस्ताक्षरात लिहिलेल्या व चित्रांकित आहेत. सुंदर उद्याने, मनोहर तलाव आणि चंबळेवर बांधलेले जलकेंद्र ही या शहराची नवी आकर्षणे होत. इथे चंबळ नदीला धरण बांधलेले आहे. त्यामुळे या शहराचे महत्त्व खूपच वाढले आहे.

या शहराजवळच रामगड गावी भंड–देवरा नामक शिवमंदिर डोंगरांनी वेढलेल्या जंगलात आहे. ते इ. स. च्या ११ व्या शतकातले आहे. पहाडावर जुना पुराणा दुर्गही आहे. कोटापासून ४८ मैलांवर पार्वती नदीच्या तीरावर अटरू नामक गाव आहे. ते मध्ययुगात फार महत्त्वाचे स्थान असावे. तिथे अनेक प्राचीन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंदिरांचे भग्नावशेष आढळतात. शेरगड हे कोटाच्या दक्षिणेला ५० मैलांवर पार्वती नदीच्या काठी आहे. तिथे मिळालेल्या एका शिलालेखावरून समजते, की नागवंशी राजा देवदत्त याने तिथे एक बौद्धविहार बांधला होता. तिथे एक लक्ष्मीनारायणाचे मंदिरही आहे. ते पूर्वी सोमनाथाचे होते, असे म्हणतात. इथे एक किल्ला आहे, तो परमारांच्या काळातला, अगदी ढासळलेला असा आहे. तो शेरशहाने जिंकला, तेव्हा त्याला शेरगड हे नाव मिळाले. पूर्वी या स्थानाचे नाव कोषवर्धन असे होते.

मुकुंदरा – कोटापासून ३२ मैलांवर डोंगरात हे गाव आहे. महाराव मुकुंदसिंह हाडा (इ. स. चे १७ वे शतक) याच्या नावावरून हे नाव पडले आहे. तिथे भीम की चौरी नामक मंदिर आहे, ते गुप्तकालीन असावे. त्यातील कोरीव नक्षीकाम अत्यंत कलापूर्ण आहे.

गागरोन – कोटा शहरापासून ४५ मैलांवर कालीसिंध व आहू नद्यांच्या संगमावर एका डोंगरावर हे स्थान आहे. इथला किल्ला संरक्षणाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा होता. या किल्ल्यावर अनेक शिलालेख आहेत आणि दुर्गा, गणेश, शिव, इ. देवतांच्या सुंदर मूर्ती आहेत.

झालारपाटण – कोटापासून ५० मैलांवर हे स्थान चंद्रभागा नामक नदीच्या काठी आहे. प्राचीन चंद्रावती नगरीचे अवशेष नदीच्या पैलतीरावर आढळतात. त्यांत काही सुंदर मंदिरेही आहेत. शीतलेश्वर महादेवाचे मंदिर सर्वांत जुने व मोठे असून, त्यातील स्तंभांचे शिल्पकाम अप्रतिम वाटते. सात सहेलीचे मंदिरही सुंदर आहे.

बाडोली – कोटापासून ३० मैलांवर हे स्थान आहे. इथे जंगलात इ. स. च्या ८ व्या शतकातली ७ जुनी मंदिरे आहेत. ती सर्व पडलेली असली तरी, त्यांतील शिवमंदिर फार प्रेक्षणीय आहे. ते ओडिशातील मंदिरांसारखे दिसते. मात्र त्याच्या दर्शनी भागात असलेला मंडप खूप उंच व सुबक आहे. मंदिराचे शिखर ६० फूट उंच असून, ते अत्यंत डौलदार व अलंकृत आहे. इतर मंदिरांतील भिन्न देवतांच्या मूर्ती सुरेख आहेत.

बूंदी – कोटाच्या पश्चिमेला २४ मैलांवर हे शहर आहे. ते पहाडी प्रदेशातील एका घळीत वसलेले आहे. इथे पूर्वी मीनांचे राज्य होते. त्यांचा प्रमुख बूंदा नावाचा पुरुष होता. त्यावरून या शहराला बूंदी हे नाव मिळाले. इ. स. च्या १४ व्या शतकात हे राज्य चौहान वंशातील हाडा शाखेने जिंकले. शहराच्या उत्तरेला १४२६ फूट उंच पहाडावर तारागड नामक मजबूत किल्ला आहे. तो राव नरसिंह याने इ. स. १३५४ मध्ये बांधला.

सर्व शहराभोवती कोट बांधलेला आहे. त्याच्या आत एका टेकडीच्या उतारावर, एकापेक्षा एक उंच अशा भूमितलावर भव्य राजप्रासाद बांधलेला दिसतो. टेकडीच्या पायथ्याशी नवलसागर तलाव आहे. या राजप्रासादाचे निरनिराळे भाग निरनिराळ्या राजांनी भिन्न वेळी बांधलेले असले तरी, त्याचे



शिवमंदिर–बाडोली

संपूर्ण शिल्पकाम अतिशय सुबद्ध व सुंदर वाटते. राजस्थानातील अत्यंत आकर्षक प्रासादांत याची गणना होते. रंगविलास बागेत चित्रशाळा असून, तिथे राजपूत शैलीची सुंदर चित्रे बरीच आहेत.

बूंदी शहराजवळच जैतसागर नावाचा तलाव आहे. मीन सरदार जेताने तो बांधला. त्याच्या काठी एक सुखमहाल आहे. बूंदीपासून उत्तरेला दीड मैलांवर छार बाग आहे. तिथे बूंदीच्या राजांच्या ६६ छत्र्या आहेत. तिथून जवळच बाणगंगेच्या काठी महादेवाचे मंदिर आहे. त्याला लागूनच शिकार बुरुज आहे. महाराव उम्मेदसिंह याने इ. स. १७१३ मध्ये राज्यत्याग करून इथे वास्तव्य केले. पुढे ते शिकारगृह झाले. बूंदीपासून ५ मैलांवर फूलसागर नामक तलाव आहे. तिथला महाल व बगीचाही दर्शनीय आहे.

पाटण – बूंदीपासून २२ मैलांवर व कोटापासून ९ मैलांवर चंबळेच्या काठी हे स्थान आहे. येथे केशोराय विष्णूचे प्रसिद्ध मंदिर आहे. इथे चंबळ नदी पूर्ववाहिनी झाल्यामुळे हे स्थान तीर्थक्षेत्र मानले जाते. विष्णुमंदिराजवळच जंबूद्वीप महादेवाचे मंदिर आहे. इथे एक जैन मंदिर आहे, ते भूगर्भात बांधलेले आहे. त्याचे तीन मजले आहेत. सर्वांत खाली १४ स्तंभी मंडप असून, त्यात काळ्या पाषाणाच्या पूर्णाकृती सुंदर जिनमूर्ती आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे एक प्राचीन स्थान असून, असंख्य पुराणवस्तू जागोजागी आढळतात व खोदकामात सापडतात. तिथे एक प्राचीन शिव-मंदिर आहे. एक प्राचीन जैन मंदिर खूप मोठे असावे. त्याचा एक दरवाजा फक्त उभा आहे. तिथे जैन मूर्ती बऱ्याच आहेत.

अलवार – दिल्लीपासून १०० मैलांवर हे शहर आहे. कछवाहा राजपूत वंशातील प्रतापसिंग याने इ. स. १७७१ मध्ये जे राज्य स्थापले, त्याची ही राजधानी होती. शहरातच एका टेकाडावर गडकोट बांधलेला आहे व त्याच्यामागे डोंगर आहेत. टेकडीच्या पायथ्याशी एक सुंदर तलाव असून, त्याच्या दुसऱ्या बाजूला राजप्रासाद आहे. त्यात बरेच महाल निरनिराळ्या पद्धतीने बांधलेले आहेत. एका भागात वस्तुसंग्रहालय आहे. त्यात मुख्यतः हस्तलिखित पोथ्या आणि चित्रे आहेत. हस्तलिखितांत भागवत व कुराण यांच्या प्रती विशेष उल्लेखनीय आहेत. गुलिस्तानची प्रत आहे, ती लहान लहान चित्रांनी सुशोभित केलेली आहे. चित्रशाळेत मोगल व राजपूत शैलीची चित्रे आहेत. इथल्या शस्त्रागारात अकबर, जहांगीर, शहाजहान, दारा शिकोह, औरंगजेब व नादिरशहा यांच्या तलवारी पाहायला मिळतात. काही तलवारींना रत्नजडित सोन्याच्या मुठी आहेत.

भरतपूर – भरतपूर संस्थानाची ही राजधानी जयपूरच्या पूर्वेला ११५ मैलांवर व मथुरेपासून २२ मैलांवर आहे. हे शहर महाराजा सूरजमल याने इ. स.च्या १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात वसवले. तिथला किल्ला फार मजबूत आहे. त्याच्या दगडी तटाभोवती एक खंदक आहे आणि त्याच्याभोवती मातीच्या दोन प्रचंड भिंती बांधलेल्या असून, त्यांच्यामध्ये एक खोल खंदक आहे. बाहेरच्या भिंतीचा घेर ७ मैलांचा होता. आता ती भिंत पूर्ण पाडण्यात आली आहे. आतली भिंत बहुतेक ढासळलेली आहे. तटाला ८ बुरूज व २ दरवाजे आहेत. उत्तरेच्या दरवाजाला अष्टधाती म्हणतात व दक्षिणेकडील दरवाजाला लोहिया म्हणतात. हे दोन्ही दरवाजे जवाहरसिंगाने दिल्लीहून आणले. अष्टधाती हा दरवाजा अलाउद्दीन खिलजीने चितोडहून नेलेला होता.

जवाहर बुर्ज हा किल्ल्यातील मनोरा, जवाहरसिंगाने इ. स. १७६५ मध्ये दिल्लीवर यशस्वी हल्ला केला, त्याचे स्मारक म्हणून बांधलेला आहे. भरतपूरच्या राजांचा अभिषेक या वास्तूत होत असे. त्याच्या जवळच एका लोहस्तंभावर तिथल्या जाट राजांची वंशावळ कोरलेली आहे. इ. स. १८०५ साली इंग्रजांनी भरतपूरवर हल्ला केला, तो जाटांनी परतवला. त्याचे स्मारक म्हणून किल्ल्याच्या तटावर फत्ते बुर्ज हा मनोरा बांधलेला आहे. किल्ल्यातील महाल खास, कोटी खास व किशोरीमहाल हे राजवाडे दर्शनीय आहेत.

भरतपूरपासून ३ मैलांवर पक्षीनिवास आहे. त्याचे क्षेत्रफळ १२ चौ. मैल असून, त्यात पक्ष्यांसाठी असंख्य झाडेझुडपे राखलेली आहेत.

भरतपूरपासून २२ मैल उत्तरेला वसलेले डीग हे स्थान, तिथला किल्ला, प्रेक्षणीय राजवाडे, बगीचे, तलाव व कारंजी यांसाठी प्रसिद्ध आहे. संगमरवरी पाषाणाचे राजवाडे हे त्यांतील स्तंभ व सुरेख नक्षीकाम यांमुळे विलक्षण आकर्षक वाटतात. राजस्थानात याहून भव्य-सुंदर प्रासाद इतरत्र आढळत नाहीत त्यांतील गोपालभवन हा सर्वांत भव्य प्रासाद इ. स. १७५० मध्ये सूरजमल जाटाने बांधला.

राजवाड्याजवळ मोठा तलाव असून, त्याच्या पलिकडे किल्ला आहे. त्याच्या भक्कम तटाला ७२ बुरुज आहेत. त्याच्या आतील इमारती बहुतेक पडलेल्या आहेत.

गोवर्धन हे प्रसिद्ध पुण्यक्षेत्र भरतपूरपासून जवळच डोंगराळ भागात वसलेले आहे.

धोलपूर – हे शहर भरतपूरपासून ७० मैलांवर आहे. तिथल्या रामसागर तलावाभोवती वनविहार नामक अरण्यात जंगली पशू विहार करीत असलेले सहज पाहायला मिळतात. इथे शेरशहाने बांधलेला किल्ला प्रसिद्ध आहे. शहाजहान बादशहाने तिथे विलासासाठी बांधलेला खानपूर महाल फार प्रेक्षणीय आहे.

राजस्थानात ऐतिहासिक स्थाने असंख्य आहेत. त्यांतील विशेष महत्त्वाच्या स्थानांची माहिती वर दिली आहे. त्याव्यतिरिक्त चितोडजवळ नगरी नामक गावात इ. स. च्या तिसऱ्या शतकातील शिलालेख व दोन स्तूप सापडले आहेत. झालावाड राज्यात खोलवी नामक गावी पहाडात खोदलेले एक मंदिर आहे. ते इ. स. चे ७ वे–९ वे शतक या कालखंडातले असावे. सर्वांत प्राचीन जैन मंदिरे प्रतापगड राज्यात सोहागपूरजवळ, बांसवाडा राज्यात कालिंजरजवळ आणि जैसलमीर व सिरोही येथेही सापडली आहेत. उदयपुराजवळ आहाड या गावी आणि अलवार संस्थानातील राजगड व पारनगर येथे जैन मंदिरांचे अवशेष सापडले आहेत. हिंदू शिल्पकलेचा बराच प्राचीन नमुना भरतपूर राज्यातील बयाना येथे सापडला आहे. तिथल्या पाषाणस्तंभांवर इ. स. ३७२ मधला कोरीव लेख आढळतो.

चितोडगड, कुंभलगड, जोधपूर, तारागड, मांडलगड व भरतपूर येथील किल्ल्यांव्यतिरिक्त रणथंभोर, मंडोर, जालोर, नागोर, सिवाणा, भटनेर (हनुमानगड), बीरसलपूर, वसंतगड, बयाना, विजयगड, तहानगड व गागरोन हे किल्लेही इतिहासप्रसिद्ध आहेत.

पुण्यक्षेत्रे – राजस्थानातील पुण्यक्षेत्रांत दिलवाडा (अबू), कांकरोळी, कैलाशपुरी (एकलिंगजी), नाथद्वारा, अजमेर, पुष्कर व सिकर ही प्रमुख होत. त्यांव्यतिरिक्त बीकानेरजवळ कोल-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यटजी व गोगामेडी, सवाई माधोपूरजवळ महावीरजी, अबू पर्वताजवळ अंबादेवी, भरतपूरजवळ कामा आणि जयपूरजवळ नारायण ही स्थळे धार्मिक दृष्टीने महत्त्वाची आहेत.

बहुतेक तीर्थक्षेत्रांत दर वर्षी जत्रा भरतात. त्या वेळी तिथे घोडे, बैल, गायी, उंट, म्हशी, इ. जनावरांचे मोठे बाजार भरतात. पुष्करची जत्रा कार्तिक मासात, तिलवाडाची चैत्रात आणि गोगामेडीची व परबतसरची भाद्रपदात भरते. अलवार, भरतपूर, धोलपूर, करौली, जयपूर, गलता, सांगानेर, जालोर, लुद्रवा, सांचोर, मेडता, सालासर, रामदेवरा, कोलूगड, पंचतीर्थी, संकराय, चांदालिया, ऊनवा, देशनोक, कुंभलगड, उदयपूर, कोलायत, वेणेश्वर, राणकपूर, दद्रेवा, रणथंभोर, लोहर्गल, राजगड, बूंदी, कोटा, पाटण, गीर मगलोद, जसलमीर, हिंडोन, कलवाडा, नवलगड, डीग, या ठिकाणीही जत्रा भरतात. अजमेर येथे मोइनुद्दीन चिश्तीच्या उरसासाठी हजारो भक्त दर वर्षी जमा होतात.

बहुतेक सर्व महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थानांची व पुण्यक्षेत्रांची माहिती कोशात त्या त्या नावांखाली दिलेली आहे.



जोधपूरचा किल्ला

देवधर्म – राजस्थानातील शेकडा ९० लोक हिंदू आहेत. त्यांत ब्रह्मा, शिव, शक्ती, विष्णू, गणेश, सूर्य, इ. देवतांचे उपासक आहेत, तसेच निरनिराळ्या पंथोपपंथांचे अनुयायीही आहेत. ब्रह्मदेवाची पूजा सांप्रत प्रचलित नाही. पण मध्ययुगात ती होती आणि त्याची मंदिरेही होती. पुष्कर येथील ब्रह्मदेवाचे मंदिर सर्व भारतात प्रसिद्ध आहे. ब्रह्मदेवाची आणखीही काही मंदिरे राजस्थानात आहेत. मात्र शिवाची उपासना करणारे लोक जास्त आहेत. प्रतीहार, चौहान, गुहिलोत, इ. बहुतेक राजवंश शिवपूजक होते. त्यामुळे शैव पंथ हाच इतिहासकाळात राज्याचा धर्म ठरला आणि असंख्य शिवमंदिरे राज्यात निर्माण झाली. कैलासपुरीचा एकलिंगजी हे गुहिलोतांचे कुलदैवत होते. तियले शिवमंदिर आणि सिकर येथील हर्षनाथाचे मंदिर फार प्रसिद्ध आहे. किराडू, चंद्रावती, वाडोली, इ. अनेक ठिकाणी शिवमंदिरे आहेत. यावरून शिवोपासकांचे प्रमाण किती मोठे आहे, ते कळते.

शक्तीची उपासनाही या प्रदेशात तितकीच सार्वत्रिक आहे. बहुतेक राजपूत लोक शक्तिपूजक आहेत. अंबादेवी ही शाक्त पंथाची प्रमुख देवता होय. तिची पार्वती, दुर्गा, काली, भवानी, इ. विविध नावांनी पूजा केली जाते. प्रतीहार व चौहान यांच्या राज्यात शक्तिपूजेचा विशेष प्रसार झाला. ती युद्धदेवता म्हणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

क्षत्रियांना अत्यंत प्रिय होती. सकराई किंवा संकरमाता हिच्या दर्शनासाठी हजारो भक्त जातात. मेवाडात एकलिंगजीच्या मंदिरापासून सुमारे दोन कोसांवर राष्ट्रश्येना नामक देवीचे मंदिर आहे. एकलिंगमाहात्म्य नामक ग्रंथात, ती देवी मेदपाट देशाची रक्षकदेवता असल्याचे सांगितले आहे. राठासेणा हे तिच्या नावाचे अपभ्रष्ट रूप होय. ही राठोडांची कुलदेवीही आहे. शिव आणि शक्ती यांच्याप्रमाणे गणेश, भैरव, कार्तिकेय, कुबेर यांचीही मंदिरे काही ठिकाणी आढळतात.

शिवाच्या खालोखाल विष्णूची उपासना प्रचलित आहे. राम व कृष्ण हे विष्णूचे दोन्ही अवतार राजस्थानात पूजले जातात; मात्र कृष्णाच्या भक्तांची संख्या अतिशय मोठी आहे. नाथद्वारा व कांकरोळी ही दोन वैष्णव केंद्रे त्या दृष्टीने फार प्रसिद्ध आहेत. राजस्थानातील लोकजीवनात कृष्णभक्तीला विशेष स्थान आहे. राजस्थानी चित्रकलेतही राधाकृष्णांची चित्रे अधिक आहेत. कृष्णाच्या मूर्तीही सर्वत्र आढळतात. काही चित्रांत रामायणातील प्रसंग चितारलेले आहेत.

राजस्थानात पूर्वी सूर्यपूजा बरीच प्रचलित होती. भिन्नमाळ हे सूर्योपासनेचे महत्त्वाचे केंद्र होते. ओसियन, मंडोर, पोकरण, किराडू, बिठू व पाली येथे सूर्याच्या मूर्ती सापडल्या आहेत. राजस्थानात सर्वत्र सूर्यमंदिरे होती. त्यांचे भग्नावशेष सापडतात. त्यांवरून त्याभागात सूर्योपासना किती लोकप्रिय होती ते समजते. काही राजपूत राजवंश सूर्यवंशी असल्यामुळे त्यांनी बरीच सूर्यमंदिरे बांधली. इ. स. च्या ८–१० व्या शतकांत राजस्थानात सूर्योपासना इतकी बहरली होती, की जैन पंथासारखे पौराणिकेतर पंथही सूर्यपूजा करू लागले होते. कालांतराने सूर्यपूजकांचा पंथ सूर्यनारायण पंथात विलीन झाला आणि तोही पुढे लक्ष्मीनारायण पंथात समाविष्ट झाला. हा लक्ष्मीनारायण बहुतेक सर्व राजपूत राजांचा देव होता.

राजस्थानात जैन धर्माची प्रतिष्ठा मौर्य काळापासून आहे. सम्राट अशोकाचा नातू संप्रती याने त्या प्रदेशात जैन धर्माचा प्रसार केला. मेवाडमध्ये चितोडपासून आठ मैलांवर मध्यमिका नामक नगरी होती, तिथे जैनांचे एक केंद्र होते, असे बडली नामक गावी मिळालेल्या शिलालेखावरून कळते. पुढे इ. स. च्या ८–१० व्या शतकांत प्रतीहारांच्या राजवटीत श्रीमाळ, जालोर, ओसिया, चितोड, अबू पर्वत, इ. अनेक ठिकाणी जैनांच्या वसाहती स्थापन झाल्या. जैन पंथात सुधारणा करणारा हरिभद्रसूरी ८ व्या शतकांत होऊन गेला. त्याचा शिष्य उद्योतनसूरी व सिद्धर्षीसूरी यांनी त्याचे कार्य पुढे चालवले. खरतर गच्छानेही पंथाची सुधारणा नेटाने केली. त्या गच्छाच्या आचार्यांपैकी जिनवल्लभ, जिनदत्तसूरी व जिनपतिसूरी यांनी जैन पंथाचा प्रसार अत्यंत जोमाने केला. गुजरातचा चौलुक्य राजा कुमारपाल याने जैन पंथाचा पुरस्कार केला. त्याचे वर्चस्व मारवाड, मेवाड व माळवा या प्रदेशांवरही असल्यामुळे राजस्थानात जैन पंथ इतका दृढमूल झाला, की मुस्लिम आक्रमणांमुळेही त्याची हानी झाली नाही. इतकेच नव्हे, तर नागौरच्या जैन पंडितांचा बाबर, हुमायून व अकबर यांच्या दरबारात सन्मानही करण्यात आला. एकंदरीत राजस्थानात जैन पंथाचे वर्चस्व विलक्षण आहे. या प्रदेशात अनेक उत्कृष्ट जैन मंदिरे आहेत. त्यांतील दिलवाड्याची मंदिरे सर्व भारतात अप्रतिम मानली जातात. राणकपूरचे चौमुखी आदिनाथाचे मंदिरही अतिशय प्रसिद्ध आहे. दर वर्षी तिथे हजारो जैन लोक दर्शनाला जातात. जैसलमीरच्या किल्ल्यातील जैन मंदिरे शिल्पकलेच्या दृष्टीने उत्कृष्ट आहेत.

राजस्थानातील जैन लोक अत्यंत उद्योगी असून, त्यांनी साहित्य व कला या क्षेत्रांप्रमाणेच व्यापार व उद्योग या क्षेत्रांतही भरीव कामगिरी केली आहे.

राजस्थानात दादू पंथाचा बराच प्रसार झालेला आहे.

या प्रदेशात मुसलमानांची संख्या लाखाच्या वर असून, अजमेर हे त्यांचे प्रमुख केंद्र आहे. तिथल्या ख्वाजा साहेबाच्या दर्ग्यातील उरसाच्या वेळी सर्व भारतातील व पाकिस्तानातील हजारो मुसलमान भक्त तिथे जमा होतात.

आर्य समाज व रामकृष्ण मिशन या संस्थांचे बरेच अनुयायी राजस्थानात आढळतात. (अपूर्ण)

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. 8418

S.J.V.J. PRATISHTHAN
LIBRARY
Jangamawadimath, Varanasi
Acc. No 7

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जगात ज्या मोठमोठ्या शक्ती काम करीत आहेत, त्यांचे यथातथ्य आकलन आपणांस न होणे ही गोष्ट शक्य आहे. पण एवढे तरी आपण समजून घेणे अगत्याचे आहे, की भारत म्हणजे काय आहे व त्याने आपल्या सामाजिक व्यक्तित्वाचा विकास कशा प्रकारे करून घेतला आहे, भारताच्या विभिन्नत्वाचे पैलू कोणते आणि त्याची सुदृढता कुठे अनुस्यूत आहे, या मुलभूत गोष्टी आहेत. त्यांचे ज्ञान जर आपण मिळवले नाही, तर आपण भारत काय आहे ते जाणण्यास असमर्थ ठरू आणि जर आपण भारताला जाणू शकलो नाही, तर आमचे भाव, आमचे विचार, आमची कार्ये या सर्व गोष्टी अपूर्ण राहतील व आपण भारताची सर्वांगीण आणि प्रभावपूर्ण अशी सेवा करू शकणार नाही.

– पं. जवाहरलाल नेहरू
('संस्कृति के चार अध्याय' प्रस्तावना)

भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे

CC-0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi